प्रशस्त रीतीनें देवकार्यें उरकण्याविषयीं कोणतीहि हरकत नाहींशी झाली कीं, देवळांतील उत्सव पार पाडण्यास उद्युक्त झालेले हिंदु, समता, बंधुत्व व स्वातंत्र्य या तीन पायांच्या तिवईवर अधिष्ठित झालेल्या रेपुब्लिकास सुद्धां देवासारखे भजले. पण, रेपुब्लिकदेवीकडून कोणताच प्रसाद न मिळतां 'लायकी पाहून पायकी' किंवा 'कर्तबगार पाहून रोजगार' असा मंत्र तिजकडून उच्चारला गेला. ह्या मंत्रांतील प्रत्येक शब्दाचा अर्थ पाहिजे तसा फिरवितां येऊनहि समतेचें उच्च तत्त्व त्यांत कायम आहे असें दाखविण्यासाठीं, कितीहि ओढाताण केली तरी जशाची तशी आकृति धारण करणाऱ्या रबराची स्थितिस्थापकता त्यांत भरपूर आहे असें प्रत्यहीं अनुभवास येतें. आधीं लायकी ह्मणजे पात्रता ठरविण्यांत किती भानगडी येतात हें पाहण्यासाठीं पुढील गोष्टीकडे लक्ष दिल्यास 'स्थालीपुलाक न्यायानें' इतर प्रकाराविषयीं थोडक्यांत फार कळून येईल. कोणत्याहि सरकारी कामावर लायक मनुष्याची नेमणूक करण्याची गरज पडल्यावेळीं ज्यास्त शिकून तें कार्य करण्यास पात्र अशाच माणसाची निवड व्हावयास पाहिजे. इस्कोल मेदिक व इस्कोल नोर्माल यांसारख्या विशिष्ट धंद्यासाठीं शिक्षण देणाऱ्या शाळांच्या मागोमाग, शास्त्रें व भाषा मिळून १०।२० विषय शिकविणाऱ्या लिसेवांत संपूर्ण शिक्षण घेऊन दिप्लोम मिळविलेले विद्यार्थी थोड्या प्राक्टिसीनें कोणत्याहि खात्यांतील काम चालविण्यास लायक असतां, कोंकुर्साची अडचण भासवी हें जरा चमत्कारिक वाटतें. पाहिजे असेल तर, ह्मणजे फाजेंदासारख्या आंकडेमोडीच्या खात्यांत नेमणूक व्हावयाची असेल तर गणितविषयांत व अर्थशास्त्रांत चांगले मार्क असलेल्या विद्यार्थ्यांची त्या जागीं निवडणूक व्हावी, असें केल्यापासून लायकीसाठीं परीक्षा (Concurso) घ्यावयाचा खर्च व भानगड चुकून काळाचा अपव्यय होणार नाहीं. व लिसेवांतील विद्यार्थ्यांस पुढील आशेनें ज्यास्त शिकण्यास हुरूप येईल. यावर कदाचित् असा आक्षेप येण्याचा संभव आहे कीं लिसेवांतील विद्यार्थी चांगले हुशार निघत नसल्यामुळेंच कोंकुर्साची यातायात करणें भाग पडतें. पण असें पहा, ६।७ वर्षांच्या अवधींत शिक्षणापासून कांहींच ग्यारंटी नसल्यामुळें कसावसा अभ्यास करून दिप्लोम मिळविलेले विद्यार्थी, कोंकुर्साची जाहिरात बोलेतीवर प्रसिद्ध झाल्यानंतर मिळालेल्या ५।७ महिन्याच्या अवधींत हुशार व लायक होण्याचें बाजूस राहतें, व भीड खर्चाच्या त्यांस लायकी आणण्यासाठीं मात्र कोंकुर्स उपयोगी पडतो. इतकेंहि करून त्यांस पायकी ह्मणजे पगार काय ह्मणाल तर थोडा! हेंच उलट पहा! समतेवर फाजील स्वातंत्र्याचा दाब पडला कीं, तिचें एक टोक खालीं व दुसरें वर जाऊन, बड्या हुद्द्यावर एकाद्याची नेमणूक होण्याची वेळ आली, तर त्या कामांत तो निष्णात आहे कीं काय, हें पाहण्याची गरज न पडतां कोणालाहि एका गुणाचें किंवा कधीं गुण नसतांहि; अर्थात् निर्गुणाचें चीज होऊन जागा मिळतेच व खिशे भरून बाहेर पडण्या इतका भरपूर पगारहि मिळतो असें तूर्त नेमण्यांत आलेल्या मामलेदारांच्या निवडणुकांवरून ह्मणावें लागतें. व एकदां नेमला गेलेला इसम नालायक असें कधींच ठरत नाहीं—कां कीं, नालायक असता तर त्याजागीं नेमणूक झालीच नसती! ही सबब पुढें येते. अशा ह्या लायकीपायकीच्या संबंधाचा अनुभव हिंदूंस कमी ज्यास्त मानानें आल्याशिवाय राहत नाहीं. देशावर आलेलें संकट एकट्याला कसें टाळतां येईल? पण, प्रत्येक गोष्टीस इलाज असतोच ह्मणून आपल्यांत पात्रता आणण्याचा क्रम हिंदूनीं सोडूं नये स्वराज्यकाळांत तिचा योग्य उपयोग झाल्यावांचून राहणार नाहीं.

स्फुट विचार.

नवे मामलेदार:— पणजी व सांखळी येथील मामलेदारांच्या जागा रिकाम्या झाल्यास आज २-३ महिने होत आले. सरकारी ग्याझेटवरून दमण येथील मामलेदारांसहि कामावरून काढल्याचें समजतें; परंतु अजूनपर्यंत त्या जागीं नवे कामदार नेमले गेले नसून त्यांचे अधिकारीच काम चालवीत आहेत. गोव्यांस आर्थिक स्वातंत्र्याचा नवा कायदा लागू केल्यापासून ठिकठिकाणी मामलेदारांच्या हुद्द्यांवर मिलिटरी आफिसरांऐवजीं सिव्हील लोकांच्याच नेमणुका करण्यांत आल्या आहेत. आतांपर्यंत त्या रिकाम्या असलेल्या जागांवर नवे कामदार नेमण्यांत न आल्यामुळें, यापुढें सरकारचें यद्विषयींचें धोरण कसें असावें हे अजमावण्याकडे लोकांचें मन वेधलें होतें; ह्मणजे शासनपत्रा (carta organica) विरुद्ध पुनः सैन्यातील सरदारांस नेमून, या गुरांस त्या कुरणांत स्वैर चारण्याचा हक्क अबाधित राहतो कीं काय, याकडे त्यांचे डोळे लागले होते; पण सरकारनें या जागीं सिव्हील लोकांसच नेमण्याचें योजिलें आहे असें परस्पर समजूं आल्यामुळें हा भ्रम दूर झाला. नेमण्यांत येणाऱ्या कामदारांत किंवा नेमल्या गेलेल्यांत एकादि हिंदु सद्गृहस्थाचा समावेश न होतां, सरकारनें केलेला हा पंक्तिभेद हिंदुसमाजदृष्ट्या फार असमाधानकारक होय, हें खोटें नाहीं. त्याचप्रमाणें हेंहि खरें कीं, हिंदुलोकांनीं समाजहिताचीं किंवा लोकसेवेसारखीं उपयुक्त कामें अंगावर घेऊन व तीं योग्य रीतीनें पार पाडून आपण त्या मोठ्या हुद्द्याच्या कामास पात्र आहों, असें सरकारच्या निदर्शनास आणिले पाहिजे. व इतरेजनांस हें सिद्ध करून दाखविलें ह्मणजे, आपोआपच सरकारचे डोळे उघडून, त्यास खरी वस्तुस्थिति कळूं लागेल, कारण जोंपर्यंत क्रिश्चन पांढरेपेशा मंडळीचा घोळका सरकारी वाड्यांत धिंगाणा घालीत राहील तोंपर्यंत, वरील उपायांचें अवलंबन केल्याशिवाय हिंदुलोकांस आपलें डोकें वर काढतां येणें शक्य नाहीं.

फीचे दर:— इकडील माजी गव्हरनर साहेब सि. फैतस रिबेर यानीं ह्मटल्याप्रमाणें दुय्यम प्रतीचें शिक्षण इकडील लोकांस दुर्घट होऊन उद्योग धंद्याकडे त्याचें मन वळावें ह्मणून किंवा, अन्य कोणत्याही कारणानें न कळे, लिसेव सेंत्राल पाठशाळेचे फीचे दर येत्या जूनपासून वाढविण्यांत आले आहेत. आधींच सध्याच्या महागाईमुळें प्रापंचिक बाबतींत बेजारून गेलेल्या हिंदुसमाजापुढें तर, हें एक नवें संकट दत्त ह्मणून उभें राहिलें आहे, असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. आमच्यामतें सरकारचें हें धोरण निवळ चुकीचें होय. कारण या वाढत्या फीचे दर चुकते करण्याचें अंगीं सामर्थ्य नसल्यावरून जर पोर्तुगिज शिक्षण संपादणें कठीण झालें तर इकडील लोक याहून सुकर अशा इंग्रजी शिक्षणाकडे वळून गोव्यांकडे त्यांचा प्रेमा न राहतां, मनाचा ओढा इंग्रजी हिंदुस्थानाकडे ज्यास्त होईल व तिकडे कामधंदे किंवा सरकारी नोकऱ्या पत्करल्यामुळें त्यांस पोर्तुगिज नागरिक ह्मणवून घेण्यापेक्षां ब्रिटिश नागरिक ह्मणवून घेणें फार श्रेयस्कर वाटेल. बटलर, कुकर या सारख्या हरएक कामांमुळें आधींच मुंबई पुण्याकडे जाणाऱ्या गोंयकरांच्या ओघांत यामुळें तर नवी भर पडेल. सरकारनें प्रजेवर आणखीं कसलेहि नवे कर अप्रत्यक्ष रीतीनें लादले असते तर क्षणभर पुरवले असते, पण उघडउघड शिक्षणाचा मज्जाव करणारे हे फीचे दर साफ अयोग्य होत. व यावरून हें धोरण मुत्सद्देगिरीचें नसून, अगदींच राष्ट्रहितविरोधी व प्रोफेसरांस भरपूर कामाशिवाय भरभक्कम पगार खावविण्याचें आहे, असें ह्मणावें लागतें.

शहरसुधारणा:— मुरगांव हें भावी शहर बनविण्यासाठीं आज कैक वर्षांपासून सरकारनें चालविलेल्या खटपटीस आतां मूर्त स्वरूप येऊन शहरसुधराईसाठीं एक मंडळ नेमण्यांत आलें आहे. सरकारी पद्धतीस अनुसरून गेल्या २९ मार्च रोजीं सदरहू मंडळाची मुरगांवांत स्थापना झाली. या थाटाच्या स्थापना समारंभास गव्हरनरसाहेब व इतर वडे वडे कामदार, कौंसिलर, व्यापारी लोक वगैरे हजर होते. समयास अनुसरून मंडळाचे अध्यक्ष, कांहीं सभासद व खुद्द गव्हरनरसाहेब यांची भाषणें झालीं. इकडील एका हिंदुगृहस्थाकडून पूर्वापार प्राच्य संप्रदायाप्रमाणें, या समारंभास एकादी उणीव न भासावी ह्मणून, कीं, दुसऱ्या कोणत्या हेतूनें नकळे, कळावंतीणीचा एक मेळा तिकडे पाठविण्यांत आला. समारंभाप्रीत्यर्थ बऱ्याच मोठ्या रकमेचा फन्ना उडविण्यांत आला, असें ह्मणतात. हें जर खरें असेल तर पुढें हरएक कारखाने, गिरण्या, वखारी इ० स्थापन होऊन देशाची सांपत्तिक स्थिति सुधारणार या तत्वावरच आज सरकारी तिजोरींतून पैशांचा असा अपव्यय करणें हें फक्त अदूरदर्शित्वाचें लक्षण असून दारिद्र्यांत छानछुकीचे रंगढंग करण्यासारखें आहे. परंपरेनें हें ख्यालीखुशालींत निष्कारण खर्चण्यांत आलेले पैसे, करांच्या चरकांतून सदोदित सारख्या पिळल्या जाणाऱ्या प्रजेकडून कसल्याहि रूपानें वसूल करण्यांत येतील, व कसेंबसें जाडेंभरडें अन्न खाऊन अंगीं त्राण राहण्याकरितां प्राणरक्षणाच्या या बिकट प्रसंगीं तीस विचारसागरांत, थोडावेळ तरी निमग्न होणें भाग पडेल. एरवीं पाहूं गेलें असतां मायबाप सरकारच्या व प्रजारूप लेंकराच्या सुखदुःखांत एकतानता असणें बरोबर आहे, पण तें एकीकडेच राहून सरकारास हे उधळपट्टीचे चाळे सुचत आहेत! हें नेमण्यांत आलेलें मंडळ पुढें कसकशा सुधारणा घडवून आणतें हें पाहणें आहे, परंतु आज हा चाललेला प्रकार तिरस्करणीय होय हें कोणाहि निःपक्षपाती मनुष्यास वाटल्यावांचून खास राहणार नाहीं.

वर्तमानसार

—पणजीचे जज्ज दो० सेयाब्र यांची बदली केलिमान (आफ्रिका) येथें झाली असून त्यांचे जागीं डिचोलीचे जज्ज दो० कुन्हेय मेंदिस यांची नेमणूक झाली आहे. तसेंच दमणचे जज्ज दो० ब्रागांस पेरैर यांची बदली डिचोली येथें झाली असून त्यांचे जागीं केलिमानचे जज्ज दो० आगुस्तीन कुलास यांस नेमिलें आहे.

—वासीन (गोस्तन लस) टोंचण्याप्रीत्यर्थ ग्रामस्त मंडळ्या, देवळें व मुनिसिपालट्या या संस्थांवर सरकारनें ८३३४ रुपयांचा जादा खर्च लादला असून रक्कम सरकारी तिजोरींत जमा केली जाईल!

ANO V.—NUMERO 4 —1920 QUEPEM, QUINTA—FEIRA 15 DE ABRIL

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA.............. 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—**Bharat**

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia **Pundolica**—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस एक आणा. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें-गुरुवार, तारीख १५ माहे एप्रिल सन १९२० अंक ४ था.

PELAS NOVAS CONQUISTAS

JUNTAS LOCAIS

Tem-se dito, amiudadas vêzes, que, na metropole, a India se vê de longe e se ouve muito tarde.

E' uma verdade incontestavel que tambem pode ser aplicada, paralelamente e sem receio de errar, ás Novas Conquistas, pelo modo como são vistos e ouvidos os seus negocios nas regiões oficiais.

Desde há muito, tem havido um clamor geral e unanime, manifestado em comicios contra as peias que se opõi ao desenvolvimento economico das Novas Conquistas, derivadas de mil e um entraves que lhes são criados pelas disposições do regulamento das matas nacionais e da severidade que se nota na sua execução.

¿ Mas, que se logrou com tudo isso? ¿ Que medidas foram tomadas pelo Governo para se pôr termo a este estado de cousas ? Sabem-no todos.

Consistiram, apenas, como de costume, em nomear comissões de estudos !

E' a norma *arcaica* de se pôr termo a quaesquer assuntos: vota-los para sempre ao ostracismo..

Não constitue, porêm, isto o tema do presente artigo; e se o que fica dito acode ao bico da pena è, unicamente, por desabafo, para se demonstrar a maneira discuidadosa como são tratados os assuntos, tocantes ás Novas Conquistas, ainda, quando sejam do interesse mais vital.

Pode-se admitir, por momentos, demora nos assuntos a resolver, quando estes envolvam interesses do Estado ou de quaesquer outras entidades, por demandarem estudos aturados e cumplicados; mas não sabemos a que atribuir o votar ao ostracismo, por parte do elemento oficial, assuntos que sejam simplicissimos, não requerendo *estudo* de especie alguma.

Para exemplo temos as nossas juntas locais, organismos primarios da administração local, muito mal formados e o silencio da parte do Governo em normalisa-los, apesar de instantes reclamações dos interessados.

Tratou-se do assunto no conselho do Governo sob a proposta do ilustre vogal sr. Minezes Bragança.

Mas até aqui nada se resolve. Tudo se mantem *no statu quo ante*.

Quanto ás Juntas locais das Velhas Conquistas, estas exercem, livremente, nos limites legais, as suas atribuições; as das Novas Conquistas estão curtindo paciencia, esperando do Governo remedio para seus males.

As atribuições das juntas locais são modestas, como tambem modestas a esfera da sua acção e a sua base territorial, perfeitamente delimitada nas V. C, o que não sucedendo ás Juntas locais das Novas Conquistas, tem sido dificil o seu funccionamento; e por isso algumas delas cessaram a té o seu exercicio.

Nos termos das disposições expressas da Carta Organica, as eleições desses corpos deviam ser por freguezias civis, que, se não constavam ao tempo em que élas se fizeram, era licito fazel-as pelas sêdes de regedorias, que eram constituidas por freguezias, como s e depreende, tanto da legislação anterior como da vigente; todavia, devido ao criterio errado que, então, se adoptou para as mesmas eleições tomando-se por base as freguezias eclesiasticas resultou dali a anomalia de se constituirem as juntas em alguмas partes, por grande numero de freguezias, e em outras por concelhos inteiros em flagrante autinomia com a letra expressa da Carta Organica e sobre tudo absurdo por envolver na pratica actos de flagrante iligitimidade, conforme expressões autorisadas do mencionado ilustre vogal sr. Bragança.

Se não por legalidade ao menos para decoro das instituições nacionais, não convem manter-se êste estado de cousas.

Objectar-se-há, talvez, com o argumento de que o Governo ao tempo em que se procedera ás eleições das juntas locais, como não conhecesse outra divisão territorial a não ser a das freguezias eclesiasticas, optou por estas; mas isto não colhe de forma alguma, pelo que deixamos exposto.

A criação das juntas locais não è invenção da Carta Organica, foi do Derecto de 24 de Outubro de 1913, em substituição das juntas da paroquia, como medida urgente e indispensavel, afim de expurgar, *desde já o elemento eclesiastico daqueles corpos por ser imcompativel com principios fundamentaes do regime republicano nacional*, autorisando ao mesmo tempo aos governadores da provincia fixar os limites de cada junta local num raio maximo de 10 quilometros

Ora, se o Governo, apesar de uma medida urgente, durante um periodo de quatro anos e pico não se importou de fixar os limites dessas circunscrições, não é o publico quem deve expiar as culpas

Agora, porêm, que o território se acha dividido pela Port. Prov. n.º 851 de 24 de Setembro de 1919 esperamos do Governo medidas urgentes que normalisem a situação das juntas das N. Conquistas.

Gurudas

ECOS & CRITICA

Selos postais

Tivemos uma *batalha* para remeter os nùmeros da edição passada para a India inglesa, por falta de sêlos, no dia 8 do corrente

Não só não havia sêlos de um real e meio mas tambêm os de um real em quantidade suficiente, o que nos derivou graves prejuisos.

¿ Quem responde por isto ?

¡ O sr. Antão, chefe da estação telegrafo-postal de Quepêm ou o seu superior sr. Pereira Batalha?

Ninguem, naturalmente !

E viva a *decisão* da *confusão* da *fusão!*

Tecnico agricola

...Deve ser escolhido pelo mênos um da classe hindú para ser subsidiado no Colegio de Agricultura, de Poona.

As razões que militam a favor da mesma escolha, expo-las hemos no numero imediato que hoje não temos espaço suficiente.

Extraordinario!

Foi nomeado um juri extraordinario para examinar os alunos da Escola Normal, com a exclusão dos professores do mesmo estabelecimento.

¿ Porque ésta extraordinaria ... *extraordinariedade* ?

¿ Será por causa da sindicancia, que fôra decretada na governação passada contra o professorado da referida Escola ?

Mas ninguem sabe, até hoje o que deu em resultado a tal espalhafatosa sindicancia ... nem nunca o saberá, talvez !

O que, porêm, não faz senti-

भारत

गुरुवार चैत्र कृ० ११ शी. १८४२.

सद्यस्थिति व परदेशगमन

परदेशगमन ह्मणजे काय? व त्यापासून होणारें हित कोणतें? ह्या प्रश्नाचें उत्तरें देण्यापेक्षां तें प्रत्यक्ष कृतींत आणून आपली प्रगति करून घेतलेल्या जपानाकडे बोट दाखविल्यास त्यांतील रहस्य ज्यास्त सुलभ प्रकारें कळं येईल. व इतकें दूरच उदाहरण सोडून दिलें तरी, ब्रिटिश भारतांतील आपल्याच हिंदु बांधवानीं त्यापासून किती फायदे घेतले हे आम्ही ऐकून जाणतो आणि आमचच शेजारी ख्रिस्ती, परदेशगमनाचा, आपल्या हाताकडे किती उपयोग करितात हें आह्मास पाहून माहित आहे. मात्र, त्यांतील महत्व समजूनदेखील न उमजल्यासारखें आचरण, एक दोन अपवाद सोडून दिल्यास, एकंदर हिंदुसमाजाकडून होत आहे, असें ह्मणण्यापासून त्यास वाईट न वाटता खऱ्या स्थितीबद्दल खेद वाटल्याशिवाय राहणार नाहीं, अशी आशा करितों. कित्येक गोष्टी अशा आहेत कीं त्या कितीहि नको असल्या तरी ओघानें प्राप्त झाल्याशिवाय राहत नाहींत.

तूर्त प्राप्त झालेल्या आर्थिक स्वराज्याचें दृश्य चिन्ह जें कोंसेल्य दु गोव्हेर्नु, त्यांतील आजपर्यंतच्या कारकिर्दीवरून असें दिसून येतें कीं, त्यापासून हिंदूंचा कोणताच फायदा झाला नाहीं. व आहे तशी स्थिति कायम टिकल्यास पुढें देखील फायद्याची आशा करणें व्यर्थ आहे. दुसऱ्या बाजूनें, कोंसेल्य दु गोव्हेर्नु ह्मणजे, राजरोस, पोर्तुगीज सत्ताधाऱ्यांची मनें आपणास पाहिजे त्या बाजूनें वळविण्यासाठीं, नेटीव ख्रिस्ती लोकांच्या हातांत दिलेलें एक साधन होय असें वाटतें. न पेक्षां, गोवें हें मुख्यतः ख्रिस्तीधर्मी आहे असें ह्मणण्याचें धाष्टर्य एका ख्रिस्ती प्रांतबंधूस होतेंना! त्यांच्या ह्मणण्यावर वस्तुस्थित अवलंबून नसली तरी, पुढें, त्याकडून हिंदुसमाजाची कशी काय वोळवण होणार हें सहज अनुमान करितां येण्यासारखें आहे. तात्पर्य सांगावयाचें काय तर आधींच आपल्या बाजूचा स्वार्थ साधण्यास टपलेले ख्रिस्ती लोक, पोर्तुगालांत उच्च प्रतीचें शिक्षण मिळवून आलेल्या ख्रिस्ती कामदारांची नेमणूक सर्रास करून जगाच्या दृष्टीनें न्यायच करितील पण, हाडीमासीं खिळलेल्या हिंदुधर्मद्वेषपणामुळें हिंदूंच्या हक्काची पायमल्ली करण्यात कितीहि अन्याय करावा लागला तरी त्यावर न्यायाचा रंग चढवून शक्य त्या बाबतींत हिंदूंस कायमचें दास्य करण्यास लावण्यासाठीं पराकाष्टा केल्याशिवाय राहणार नाहींत. ह्मणूनच, त्यांच्या बरोबरीनें काम करण्यासाठीं, त्यांच्या इतकेंच ज्ञान मिळविण्यासाठीं, आज परदेशगमनाशिवाय राजकीयदृष्ट्या अन्य तरणोपाय नाहीं. आजपर्यंत गोव्यांतील हिंदूंनीं शिक्षणाच्या कांहीं बाबतींत अघाडी मारिली आहे. पण तो अपुरा विजय होय. अपुरा विजय ह्मणजे बहुतेक अपजय आहे!

आतां, आर्थिकदृष्ट्यासुधां परदेशगमन आज गोव्यांतील हिंदूंस अपरिहार्य झालें आहे.

भीड खर्चून पात्रता आणिली ह्मणजे, कर्तबगार माणसें मागें राहिलेलीं पाहून, सगळ्या प्रजाजनांच्या मनांत सरकारविषयीं अपूज्य बुद्धी उद्भवणें साहाजिक असतें. व दुसऱ्या बाजूनें, ना लायक माणसें कामावर रुजू झालीं ह्मणजे, त्याकडून न झेंपणारें ह्मणून अपुरें राहिलेलें काम करण्यासाठीं दुसऱ्या माणसांची आवश्यकता भासूं लागते व अशा तऱ्हेची ही परंपरा येथेंच न थांबतां, कधीं न संपणारी कोंकुणांची शृंखला वृद्धिंगत होते अर्थात कामगार लोकांचा पगारहि वाढत जाऊन, भीड खर्चून नेमण्यात आलेले कामदार, राष्ट्राची भीक वाढविण्यास कारणीभूत होतात. ह्या गोष्टी आर्थिकस्वातंत्र्यप्रधान स्वराज्यात सुधारतील अशी आशा वाटूं लागली आहे. पण ती पुरती होण्याचीं चिन्हें बाजूस राहून निराशेचा झुळक जाणवत आहे असें मोठ्या दिलगिरीनें ह्मणावें लागतें. कर्तबगार माणसें हुद्द्यावर चढतच नाहींत, असें या ह्मणण्याचा अर्थ नसून, केवळ जे एखादि क्षुल्लक पण विशेष सवलत असल्यामुळें, हुषार माणसांपेक्षां वाकबगार समजले जातात अशाच नालायक माणसांच्या नेमणुकी संबंधानें, जातां जातां, खेद प्रदर्शित करण्याचा मुख्य उद्देश आहे असें सहृदयांनी कोणासहि वाटेलच. पण हेंच पाहणें आहे कीं, भीडेमुळें सुखी झाले तरी तिची सख्खी बहीण जी भीक ती परंपरेनें राष्ट्राच्या पदरांत पडल्याशिवाय राहत नाहीं. ह्याचें प्रत्यंतर आज आपल्या राष्ट्रांत भरपूर सांपडतें.

ख्रिस्ती लोकांची मिजास स्वतःच्या घरापेक्षां परकी घरांत चांगली चालत असल्याचें उदाहरण ह्मटलें ह्मणजे त्यांच्या वसाहती होत व त्या लोकांच्या देखरेखालीं तयार झालेले आमचे ख्रिस्ती प्रांतबंधु तर कर्तबगारीस योग्य दिशा लावण्यासाठीं परदेशगमन करितात. पण हिंदूंची स्थिति तशी नाहीं. युरोपीयन संस्कृतीचा बराच परिणाम झालेला दिसून येत असला तरी परदेशगमनासाठीं पाऊल बाहेर टाकण्याचा विचार न करितां, येथेंच राहून परदेशगमनाचें पुण्य मिळवूं पाहतात!

लढाईच्या वेळीं आपल्या मातृभूमीच्या रक्षणासाठींसुधां, आईच्या एकुलत्या एका मुलास सरहद्द ओलांडतां येत नाहीं. तर, एकुलतेपणामुळें ह्मणा किंवा इतर कोणत्याहि अपरिहार्य कारणामुळें ह्मणा, ज्यास परदेशगमन करणें शक्य नाहीं त्या विषयीं आमचें कांहींच ह्मणणें नसून, ज्या कोणास वरील प्रकारची आडकाठी नाहीं अशा तरुणांसच परदेशगमन करण्याविषयीं आमचें कळकळीचें सांगणें आहे.

धार्मिक अडचणींची सबब आज तरी सांगतां येत नाहीं. परदेशगमन केलेल्यास समाजाकडून उपसर्ग होण्याची भीत सुदैवानें कमी होत चालली आहे. त्याच प्रमाणें धर्माध्यक्षांकडून ह्या बाबतींत स्वीकारण्यांत येत असलेलें मौन संमतिदर्शक आहे असें त्यांच्याच कृतीवरून सिद्ध होतें. इतकेंच नसून, एका धर्माध्यक्षाकडून अमेरिका, इंग्लंड या ठिकाणी फिरत आलेल्या चक्रवर्ति शिष्योंच्या नुकत्याच झालेल्या स्थापनेवरून असेंच वाटूं लागतें कीं, परदेशगमनानें देखील गोष्टीसुधां महत्व येतें, मग मानवी कृतींस आल्याशिवाय कसें राहील? ह्मणून, राजकीय, धार्मिक, आर्थिकदृष्ट्या आवश्यक असलेल्या परदेशगमनापासून आपलें पाऊल मागें घेऊं नये असें हिंदूंस अगत्याचें सांगणें आहे.

स्फुट विचार.

तांदूळ! तांदूळ!!:—कंट्रोल सुटून तांदळांच्या अपुऱ्या पुरवाठ्यमुळें उत्पन्न झालेला लोकक्षोभाचा वणवा विझेल व जिकडे तिकडे 'क्षुधाशांती'चें साम्राज्य पुन्हं स्थापित होऊन गरीब जनतेचें मन पोटांपेक्षां मोठ्या अशा हरएक राजकीय बाबतींत गुंतेल अशी आमची, कंट्रोल सुटल्याची 'आनंददायक' बातमी ऐकून, समजूत झाली होती. परंतु दुःखाची गोष्ट कीं, कंट्रोलचे अरेरावी अतएव असह्य निर्बंध दूर होताच ज्या ज्या व्यापाऱ्यानीं मोठ्याप्रमाणावर तांदळाची खरेदी केली होती त्या त्या व्यापाऱ्याचा तो माल सरकारच्या अनुदार धोरणामुळें कस्टम केल्याशिवाय कुजत पडलेला आहे! आमच्या नोकरशाहीचा कल असा दिसतो कीं, कंट्रोल निजधामास जाण्यापूर्वी जो कुसक्या नासक्या तांदळाचा भक्कम पुरवठा यालेस्वाव कंपनीनें करून ठेवला होता तो संपून सदरहू कंपनीरूपी सरकारच्या या 'वरदपुत्रा'ची नफ्यासकट रक्कम उभी झाल्याखेरीज इतर व्यापाऱ्याच्या तांदळास बंधमुक्त करावयाचें नाहीं! उक्त कंपनीचा पुरवठा केव्हां संपेल तो संपो; पण त्या पूर्वी प्रखर महागाईच्या जड दडपणाखालीं चेंगरून गरीब जनता आपले प्राण न संपवो ह्मणजे झालें! गरीब जनतेच्या प्राणापेक्षां सरकारास वरील कंपनीचा हितसंबंध ज्यास्त महत्वाचा वाटावा या सारखें देशाचें दुसरें दुर्दैव नाहीं. दशरथानें ज्याप्रमाणें 'राम! राम!' ह्मणून आपला देह ठेविला त्याप्रमाणें आमची गरीब जनता 'तांदूळ! तांदूळ!' बडबडून देहत्याग न करो इतकेंच पुन्हा एकदा इच्छून सध्या या निर्जीव विषयाची रजा घेतों.

मिलटरी खातें:— येत्या जुलई महिन्याच्या पहिल्या तारखेपासून पोर्तुगीज इंडियाच्या मिलटरी खात्यांत महत्वाच्या सुधारणा अमलांत येणार असून त्यामुळें सरकारी तिजोरीस ४० कोंतांचा ह्मणजे एक लाख रुपयांपेक्षां ज्यास्ती फायदा होईल, हें सध्याच्या उधळपट्टीच्या काळांत 'दगडापेक्षां वीट मऊ' या न्यायानें आमच्या वाचकांस कळविण्यास आनंद वाटतो. वरील सुधारण्याच्या ठरावाचें सर्व श्रेय सांप्रतच्या गव्हर्नर साहेबांस असून, त्यांच्याच खटपटीनें मागें निर्दिष्ट केलेला फायदा घडून येणार आहे. अशाच प्रकारच्या धोरणाचा एकंदर खात्यात अवलंब करून तिजोरीच्या तूटरूपी समंधास गाडण्याचा देशोद्धारक प्रयत्न आचरल्यास, साहेबमजकुरांस येथील जनतेकडून सर्व बाजूनीं धन्यवाद मिळाल्याशिवाय खास रहाणार नाहींत. परमेश्वर करो आणि सि. मोराईस यांस हें इष्ट कर्तव्य बजावण्याचें सामर्थ्य प्राप्त होवो, असें अंतःकरणपूर्वक इच्छितों.

अयोग्य विधानः— आमच्या स्थानिक पार्लमेंटच्या एका बैठकींत एका वयोवृद्ध नामदारानें 'गोमांतक हें क्रिस्ती धर्माचें माहेरघर आहे' अशा अर्थाचें एक विधान ठोकून दिलें. वरील नामदारांची 'री' ओढणारे गोमांतकांत थोडथोडके क्रिस्तानुयायी आहेत असें नाहीं. त्या सर्वांचें ह्मणणें किती अयोग्य व बेजबाबदार आहे, हें आमच्या गेल्या अंकांतील पोर्तुगीज अग्रलेखांत आम्ही सप्रमाण सिद्ध केलेंच आहे. त्याचा सारांश असाः गोमांतकांतील पोर्तुगीज रहिवाशांत हिंदु, क्रिस्ती, मुसलमान व नास्तिक अशा चार धर्मांच्या लोकांचा समावेश होतो. पैकीं निम्यापेक्षां ज्यास्त लोक हिंदुधर्माचे असून यांत मुसलमान व नास्तिक लोक मिळविले असतां 'पवित्र, शास्त्राभिमान्याची संख्या एकंदर लोकसंख्येच्या निम्यापेक्षां कितीतरी कमी ठरेल. इतकेंहि असून ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, नवीन काबिजादींतील बहुतेक लोक केवळ वरपांगी क्रिस्ती असून, आचरणानें ते निवळ हिंदु आहेत. या पोर्तुगीज लेखाच्या अनुवादावरून क्रिस्ताच धर्माभिमान्याच्या उपारनिर्दिष्ट विधानाचा फोलपणा वाचकांच्या मनात बिंबण्यास सदरहू विषयाचा ज्यास्त ऊहापोह करण्याचें आह्मास प्रयोजन दिसून येत नाहीं. मात्र नास्तिकांस देव जरी नसला तरी 'धर्म' असतो या गोष्टीकडे वाचक दुर्लक्ष करणार नाहींत अशी आमची अटकळ आहे.

शेतकी शिक्षणः— ओसाड जमिनी लागवडीस आणून व नवीन शास्त्रिय प्रयोगानुरूप थोड्या श्रमात व थोड्या पैशांत ज्यास्त उत्पन्न पैदा करून गोव्यात धान्य समृद्धि व्हावी एतदर्थ इकडे शेतकी शास्त्रज्ञ आणण्याचें सरकारनें योजिलें आहे. त्यांकरवीं इकडील मागसलेल्या शेतकरी वर्गास तिचें सशास्त्र ज्ञान करून देऊन शेतीभातीची चांगली वाढ व्हावी आणि इकडील तरुणांनीं तें शिक्षण संपादन करावें ह्मणून ही योजना सरकारानें अमलात आणण्याचें ठरविलें आहे. शेतकी शिक्षणाच्या प्रयोगासाठीं पाहिजे असलेली आउतें व इतर सामान्य विकत घेण्याकरितां दहा हजार रुपयांची भरपाई गोव्यांतील सगळ्या ग्रामस्थ मंडळ्यानीं आपआपल्या उत्पन्नाच्या मानानें करावी असें फर्मावून ४–५ हुशार तरुणांस हें शिक्षण मिळविण्यासाठीं एखाद्या उच्च प्रतीच्या शेतकीच्या कालेज्यांत पाठवून त्यांस शिष्यवृत्या देण्याचें सरकारनें आंगावर घेतलें आहे; व मिळविलेल्या ज्ञानाचा फायदा आपल्या देशबांधवांस करून देण्याचें अभिवचन त्या विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणार आहे. आह्मांस हा प्रयत्न फार स्तुत्य वाटतो. फार काळापासून, कसलीच सुधारणा न होतां, रेंगाळत असलेली आमची शेती कसें व किती प्रमाणानें उत्पन्न देत आहे, हें आम्ही सांगितलें पाहिजे असें नाहीं. शास्त्रीय प्रयोगांतीं आमच्या शेतींत अमुक फेरफार झाले पाहिजेत व इकडील जमिनींस अमुक प्रकारचें खत पाहिजे हें ठरून व त्यामुळें वाढलेलें उत्पन्न शेतकरी वर्गाच्या नजरेस येऊन शेतकीविषयींची जिज्ञासा जर आमच्यांत उत्पन्न झाली तर खरोखरच सरकारानें इकडील रोगग्रस्त शेतीस रामबाण औषध दिल्यासारखें होईल. शिक्षकवर्गांत एखादा तरी हिंदु इसम असावा अशी आमची विनंति आहे. आमच्या सांपत्तिक स्थितीचा प्रश्न सोडविणें झाल्यास एकंदर ओसाड जमिनी लागवडीस आणणें, शेतींत सुधारणा करणें इ. प्रयत्नास लागलें पाहिजे.

मडगांवचें 'मालावृत्त' येत्या अंकांत प्रसिद्ध केलें जाईल.

ANO V.—NUMERO 5 —1920 QUEPEM, QUINTA—FEIRA 22 DE ABRIL

Govinda P. Hegde Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर
गोव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस एक आणा. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें—गुरुवार, तारीख २२ माहे एप्रिल सन १९२० अंक ५ वा.

UM INQUERITO

E' doutrina assente que para se aprender *comme il faut* uma lingua extranha é mister conhecer bem a lingua materna.

Quem não tiver noção exata da lingua que lhe é familiar, não poderá, portanto, aprofundar-se na beleza e segredos literarias da lingua extranha em que pretender instruir-se.

Eis a razão porque o governo británico tem, invariávelmente, aplicado a diferentes provincias em que se divide o vasto império industanico, a norma da obrigatoriedade do ensino de cada uma das linguas maternas daquelas provincias, não sendo admitido em nenhuma escola inglesa quem não provar ter, por documentos autenticos, conhecimento da sua lingua materna.

Infelizmente, porêm, entre nós, tal principio salutar não se respeita, resultando disto haver muito *diplomado* nativo sem conhecer ... o português.

E' claro que o referido estado de cousas não honra a ninguem, nem aos governantes nem aos governados, urgindo porisso, que uns e outros procurem, a breve trecho, desfaze-lo, para o brilho d'acção colonizadôra do grandioso e magnánimo Portugal.

Comprovada, pois, a necessidade da obrigatoriedade do ensino das linguas maternas, torna-se, naturalmente, necessario difinir as bases sôbre que se deve assentar a resolução do problema da mesma obrigatoriedade.

Antes de registar, porem, a sua despretenciosa opinião sobre o assunto, o *Bharat*, abre nêste lugar, um inquèrito com o seguinte questionario:

¿ Quantas e quais são as linguas maternas dos nativos da India Portuguesa?

¿ Qual é a maneira mais economica e rapida de se conseguir a obrigatoriedade do ensino das mesmas linguas?

E, finalmente, ¿qual deve ser a forma de angariar o professorado para o ensino de cada uma das referidas linguas ?

Tem palavra sôbre o assunto todo aquele que se empenhe em ver traduzida em facto a obrigatoriedade de que se trata.

Colhidas as respostas que nos parecerem suficientes para apreciarmos a opinião pública, faremos, ultimamente, pùblico o nosso modesto modo de vêr sobre o questionario. Até lá, esperamos que os dirigentes da opinião pública não perderão o ensejo por nós proporcionado de remeter-nos, resumidamente, o producto das suas lucubrações sobre o assunto.

DARDOS & CARDOS

Moralisando..

O nosso *patrão* sr. dr. Jaime de Morais, lá em Mormugão botou, ex-catedra, uma fluente fala, ferrando um puxão de orelhas nos que tem a inveterada mania de *zaragetear* contra o patriòtico aumento de impostos para milhoramentos.

Bem merecida lição aos impertinentes *zaragateiros*, pois todos sabem que o nosso *rico* paiz está a nadar numa maré cheia de moedas ... de papel e do arroz pôdre dos srs. Elisbão e Cia, estando, portanto, nas condições de *matar-se* pelo Estado e *son père* ésta brilhante pèrola da ex-coroa portuguesa.

Nossos calorosos *bravos* ao bravo passo de sua exa. o sr. dr. Morais, no sentido directo de *moralisar* tais fanfarrões ...tortos.

Aumentos...

Decididamente, estamos numa epoca em que tudo tende a aumentos. E' a *gripe* de aumentos que está invadindo o Paiz.

Aumentam as exigencias da D. Barriga, aumenta o arroz podre, aumentam os vencimentos, aumenta a carestia, aumenta a tolice, aumenta ... Atè a propina liceal aumentou, como a sêde do Agasti, personagem do *Bharat* (poema èpico) que, numa assentada, sorveu o Mar todo deitando depois toda a agua pelo orgão competente, que porisso è salgada.

Com tal febre de aumentos que aumentam aumentativamente, parece que tambem aumentará a nossa aumentativa ...bancarrota.

Viva, pois, a *gripe* de aumentos!

ECOS & CRITICA

Selos postais

Ainda, da vèz passada, sofremos prejuisos por falta dè selos dum real e meio.

¿ Que havemos de dizer mais ?

Parece que o serviço telegrafo-postal proclamou o *bolchevismo* russo, graças à pericia organisadora do sr. Batalha.

¿ *Antão*, nunca acabará essa *confusão* ?

Ora bolas !

Agradecimento

Sumamente, penhorados agradecemos as felicitações e palavras de incentivo que nos dirigiram, de diversos pontos do Paiz, os amigos sinceros do *Bharat*, pelo reaparecimento dêste.

São tão numerosas as cartas de felicitações, que só nos é possivel agradece-las por este meio, pelo que pedimos mil desculpas aos nossos amaveis amigos.

Digno de louvor

E'-o o sr. prof. Ramacrisna Pamlà Naique que, durante algum tempo, regeu a escola primaria de Loliem.

O prof. Naique tantos esforços envidou em prol da instrução que a referida escola que, antes de sua vinda, era ,apenas frequentada por quatro ou cinco estudantes, chegou a ter mais de 50 alunos, graças à intensa propaganda que o mesmo inteligente professor promoveu nos pais de creanças, logo que tomou conta do honrado lugar de professor da mesma escola.

Ao deixar a mencionada escola, o sr. Ramacrisna foi alvo duma pomposa manifestação em que tomaram parte cavalheiros de todas as raças e castas, tendo-lhe sido oferecida uma medalha de oiro por intermèdio do reverendo pe sr. Caeiro, digno capelão.

Nossas felicitações ao sr. Nai. que pelos loiros que acaba de colher, mercê do seu patriotismo.

Pelos correios

Com êsta epigrafe recebemos uma carta que bem traduz a indignação do seu autor pela *confusão* que o sr. Pereira Batalha criou em volta do serviço postal e tèlegrafico.

O importante bissemanário de Margão, *A Terra* esmiuçou, com provas irrefragaveis, a acção desorganisadôra do sr. Batalha. E, todavia, sua exa. està, impunemente, obrando suas proesas de se lhes tirar chapeu.

¡ A que degradação não tem chegado tudo isso !

Terá isso fim?

Mas leiamos a mencionada carta de quem se oculta sob o seu donimo de *Simplicio*

...Sr. *Redactor*

Pelos modos parece que não hà quem veja, quem se interresso. pelo importante ramo de serviço de correios e telegrafos que com a entrada do novo

व्याख्यानानंतर झालेल्या उपवक्त्यांच्या भाषणांमुळें व विशेषतः अध्यक्ष ना. बाबासाहेब कामत (दोन्ही दिवस यानांच अध्यक्ष नेमण्यांत आलें होतें) यानीं त्यावेळीं बजावलेल्या अविकृत कामगिरीमुळें सर्वांच्या कायमच्या आठवणींत रहातील यांत शंका नाहीं. ह्याच दिवशीं दुपारीं संस्थेच्या सभासदानीं अध्यक्ष व इतर पाहुणेमंडळी यांना थाटाची ॲटहोम पार्टी दिली. या दिवशीं संस्थेचा दिवाणखाना उत्तम रीतीनें शृंगारला होता. मध्यें एक टेबल आडवें मांडून दोन बाजूंला टेबलाच्या दोन रांगा ठेविल्या होत्या. टेबलावर फ्लावर पॉटस ठेऊन ठिकठिकाणीं सुवासिक पुष्पांच्या माळा लटकावल्या होत्या. वरती नित्याप्रमाणें पंखे फिरत असल्यामुळें बाहेरचा ताप नाहींसा झाला होता. प्रत्येक खुर्चीवर नंबर टाकून त्या नंबरची टिकिट निमंत्रित गृहस्थास दिली होती. ती टिकीट दाखवून पाहुण्यानें आंत यावें व नेमलेल्या खुर्चीवर बसावें, असें ठरलें होतें. ठरल्याप्रमाणें ४॥ वाजण्याच्या आधींच सर्व मंडळी हजर झाली व अगदीं शांतपणें आपापल्या जागीं जाऊन बसली. चहापानास आरंभ करतांना मडगांवचे नागरिक व येथील सुप्रसिद्ध व्यापारी रा. यशवंत विष्णु नाईक यांनीं अभिष्ट चिंतनपर थोडक्यांत भाषण केलें व असा सुप्रसंग आणून दिल्याबद्दल नामदार कामत, इतर पाहुणे मंडळी व संस्थेचे सभासद यांना दीर्घायुष्य चिंतिलें. उत्तरादाखल भाषण करतांना नामदार कामत ह्मणाले कीं, आज दोन तीन दिवसांच्या अवधींत उत्सवाचा कार्यक्रम, तो व्यवस्थितपणें घडवून आणतांना चालकांकडून वडून येणारी शिस्त, कोणतेंही काम स्वयंसेवकभावानें करण्याची मंडळीची तयारी, परस्पर प्रेम, पुढाऱ्यांविषयीं आदर आणि नीतिमान, स्वालंबी व तळमळीची अशी तरुण पिढी करीत असलेले श्रम पाहून माझ्या मनावर फारच अनुकूल परिणाम झाला. असल्या प्रसंगीं तर आपण दारूशिवाय नुसत्या चहानें अभिष्टचिंतन (beber saude) करतां येतें हें दाखविल्याबद्दल मी आपलें कौतुक व अभिनंदन करतों. नंतर इतर कांहीं वक्त्यांचीं समयोचित भाषणें होऊन नामदार कामत, हिंदुस्थान व रिपब्लिक यांच्या नावें त्रिवार viva घालून अत्यंत उत्साहापूर्वक समारंभ आटोपला.

चहापार्टीचा समारंभ इतका शिस्तवार शांत, उत्साहवर्धक व यंत्राप्रमाणें व्यवस्थित झाला कीं, जमलेल्या सगळया परकी मंडळीनें, ' गोमांतकांत तरी हा समारंभ अपूर्व व अनुकरणीय आहे' असे उद्गार काढिले, त्या बद्दल मत्सर वाटूनच कीं काय या प्रसंगीं झालेल्या भाषणांत नामदार कामत यानीं परका मंडळीसह सर्व ज्ञाती यांचें सहभोजन व्हावें असा उपदेश केल्याची एक पोलकल्पित बातमी एका मडगांवकरानें मुमुक्षू'च्या धार्मिक बाजारांत पिकविली आहे.

नसतींच विधानें लोकांच्या गळीं बांधून पर न उच्चारलेले शब्द उपदेशिले आहेत असें रचून सांगण्यांत या माणसाला काय कमाई मिळाली अगर कोणत्या दिवसाचा खपा भरून येण्यांकरितां त्यानें हें शतकृत्य केलें समजत नाहीं ! सहभोजन करणें पाप आहे, नामदार साहेबांचें मत या गोष्टींस अनुकूलहि असेल; पण मुद्दा हा कीं गोमांतकच्या त्यांच्या कोणत्याहि भाषणांत हा प्रश्न आला नव्हता. नामदारांच्या भाषणांत कोणकोणते मुद्दे आले होते तें चिवडा कडबोळीं फस्त करण्यांत चूर झालेल्या मडगांवकरास नीटसें कळलें नाहीं, असें वाटतें. नामदारसाहेबांनीं ' दारूशिवाय अभिष्ट चिंतन करतां येतें हें या समारंभापासून शिकण्यासारखें आहे ! असे काढलेले उद्गार या ; मडगांवकरानीं ऐकले नाहींत काय ? बाकी आपलें नाक कापून दुसऱ्यास अपशकून करण्याचें तत्व किती अनिष्ट व परिणामीं घातक आहे हें दासबोधांतून उत्तम दाखविलें असल्यानें तो निर्विकार चित्तानें वाचण्याची आम्हीं त्यांना शिफारस करतों. असो, अशा रीतीनें आज निरुपायास्तव पुनः कडक चहा त्यांना अर्पण करावा लागला, याचें वाईट वाटतें.

चवथ्या दिवशीं, पणजी येथील प्रसिद्ध वकील व दैनिक ' उ हेराल्द 'चे संपादक दोतोर सालिस द आंद्राद यांच्या हस्तें, खिस्तलोकव सी दोतोर पावलीन दीयस यांच्या तसबिरीचा अनावरण विधि झाला. त्या प्रसंगीं प्रो. बाबुसो शंकर कामत यांचें पोर्तुगीजींत व रा. दत्तात्रय व्यंकटेश पै यांचें कोकणींत अशीं दीयस यांच्या गुण वर्णनपर सुश्राव्य भाषणें झालीं. त्यांत त्यांनीं दोतोर पावलीन यांची कवि, विद्वान, शिक्षक व सद्गृहस्थ या नात्यानें केवढी श्रेष्ठ योग्यता होती याचें उत्तम दिग्दर्शन केलें.

पांचव्या दिवशीं प्रो- गोविंद चिमणाजी भाटे, यांचें ' विवाह–मीमांसा ' या विषयावर व्याख्यान झालें. विवाहाची संस्था केव्हांपासून, अस्तित्वांत आली, विवाह किती प्रकारचे आहेत वगैरे मुद्यांचें तात्विक विवेचन केलें.

सहाव्या दिवशीं रा. विठ्ठल सदाशिव सुखठणकर यांचें 'पाश्चात्य प्रगति व पौर्वात्य सुधारणा' या विषयावर पोर्तुगीजमध्यें झालें. इतक्या तरुण वयांत आणि त्यांतहि परकी भाषेंत सरस वक्तत्व, सुंदर विषय मांडणी, मार्मिक विवेचन, भरपूर माहिती व अभ्यासी वृत्तीनें सांठविलेलें ज्ञान या गुणामुळें सदर व्याख्यानहि इतरांप्रमाणेंच लोकप्रिय झाले. यांच दिवशी प्रो. वसंतराव नाईक, एम. ए. यांनीं एकंदर मालेचा समारोप केला. नंतर आभारप्रदर्शन वगैरे होऊन मालेचा कार्यक्रम आटोपला. यंदा व्याख्यान मालेसंबंधानें सर्व गोमंतकांत उत्साह वाढला असून जिकडे तिकडे लोकांच्या तोंडीं हाच विषय होऊन राहिला आहे याचें सर्व श्रेय यंदाचे अध्यक्ष नामदार बाबासाहेब कामत व इतर मुंबईकर मित्रमंडळी यांना आहे.

के. अ. नाईक
(से. सा. ब्रा. स.)

योग्य पारितोषिक

लोलयें–काणकोण येथील प्राथमिक शिक्षणाचे माजी प्रोफेसर श्री. रामकृष्ण पा. नाईक यांस तेथील सर्व जातींच्या व पंथांच्या लोकांकडून सुवर्णपदक अर्पण करण्यांत येऊन, प्रोफेसर मजकुरानीं तेथील मुलांच्याशिक्षणाप्रीत्यर्थ बजावलेल्या लोकहितवर्धक कामगिरीबद्दल आदर व्यक्त करण्यांत आला, हें कळविण्यास आह्मांस आनंद वाटतो. प्रोफेसर नाईक यांचें धोरण इतर शिक्षकानींहि अवलंबिल्यास शिक्षण प्रसाराचा प्रश्न सुटण्यास ज्यास्ती कालावधि लागणार नाहीं, अशी आमची खात्री आहे.

भारत

गुरुवार वैशाख शु० ४ थी. १८४२.

कर आणि गव्हर्नर

कोणत्याहि विषयाचें पूर्ण ज्ञान संपादन न करतां त्यावर मत देण्यास धजणें ह्मणजे शुद्ध आततायीपणा करणें होय. त्यांतहि मत देणाऱ्याचा दर्जा जबाबदारीच्या उच्च पेहरावांत झळकत असला ह्मणजे तर त्या आततायीपणाला नांवच नाहीं ह्मटलें तरी चालेल. कसल्याहि गोष्टीसंबंधानें आपले विचार सार्वजनिक रीतीनें प्रगट करताना जबाबदार माणसानीं अर्थांत त्या गोष्टीचें सर्वांग दृष्टीनें मनन केलेलें असलें पाहिजे. असें नसेल तर दर्जाची जबाबदारी लोकमत क्षोभाच्या समुद्रांत सैंधवाप्रमाणें विरून जबाबदारीचा दर्जा लोकादराच्या उष्णतामापक यंत्रांत पूज्याखालीं उतरल्याखेरीज खास रहाणार नाहीं, हें उघड आहे.

वरील विचार सुचण्याचें कारण, आमच्या उच्च दर्जा व ऊच्च जबाबदारी एवंगुण विशिष्ट मानलेल्या प्रांताधिपतीनीं मुरगांव येथें शहरसुधराई कमेटीच्या संस्थापनेच्या मंगल प्रसंगीं केलेल्या भाषणांतील एक अमंगल विधान, हें होय. सदरहू प्रसंगीं सिं. म.राइस यानीं असें जाहीर केलें कीं, गोमांतकांतील करदेणाऱ्यांची स्थिति दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रांतील लोकांपेक्षां ज्यास्त सुकर असून करांच्या वाढीविरुद्ध ऐकण्यांत येत असलेला आक्रोश निराधार आहे. इतकेंच नव्हे, तर तें नुसतें ढोंग असून त्यांत कांहींच सत्यांश नाहीं.

आमची अशी प्रामाणिक समजूत आहे कीं, गोमांतकांतील मध्यम 'कर'वाल्यांची —व यांचीच संख्या कोठेंहि विशेष असते —खरी 'घर' स्थिति ज्ञात असती तर साहेबबहाद्दरांच्या अधिकारी तोंडांतून उपरिनिर्दिष्ट अर्थाचें बेजबाबदार विचार कदापिहि निघते ना !

ज्यांच्या घराचे वांसे कर चुकते करणें अशक्य होऊन सरकारी जप्तींत फस्त होण्याच्या पंथास लागले आहेत, ज्यांच्या चेहऱ्यावरील तेज, मुख्य उत्पन्नाचा भाग कररूपानें राष्ट्राच्या सर्वग्रासी तिजोरींत गडप होत असल्यामुळें जीवितक्रम अत्यंत कष्टप्रद बनून, लोपत चाललें आहे, ज्यांचीं मुलेंबाळें करांच्या जड दडपणाखालीं चेंगरून पोटासाठीं कंठशोष करीत आहेत, अशांची स्थिति सुकर ह्मणणे ह्मणजे कोळशाचा रंग काळा नसून पांढरा आहे असेंच ध्वनित करण्यांसारखें नाहीं काय ?

घटकाभर अशी कल्पना करूं कीं, गोमांतकांतील लोकांची सांपत्तिक स्थिति समाधानकारक असून ज्यास्ती कर देण्याची त्यांस ताकद आहे. असें जरी मानलें तरी दिलेल्या करांचा उघड उघड दुरुपयोग होत असलेला नित्यशः कळून येत असतां त्यांनीं ज्यास्ती कर कां ह्मणून द्यावा ?

शेफर्ड कंपनीस दिलेला बोटीचा मक्ता स्वताच्या अंगावर घेऊन लोकांच्या सोयी वाढविण्यांचें सरकारनें अभिवचन दिलें. पण त्या अभिवचनाचें पर्यवसान गैरसोयींच्या रूपानें सध्या लोकांस जाचत आहे.

टपाल खात्यांत चालत असलेली 'अंदरकी बात' अवलोकनांत आली ह्मणजे कपाळ उठून जाऊन, अशीच अंधाधुंदी टिकली तर आमच्या देशाचें पुढें काय होईल ? असा प्रश्न मनांत येऊन, निरुत्साहानें अंगांतील रक्त थिजावयास लागते ! आणखीं किती तरी वरील विधानास पुष्टि आणणारीं उदाहरणें देतां येतील !

तात्पर्य, गोमांतकांतील 'कर'वाल्यांची सांपत्तिक स्थिति जरी समाधानकारक असती तरीसुद्धां वर नमूद केलेला दुरुपयोग प्रत्यहीं दिसत असल्यावरून कराच्या वाढीस त्यानीं भयंकर विरोध केला असता. सध्या तर लोक महागाईच्या भयंकर वणव्यांत होरपळत असून, ' उद्यांच्या दिवसा 'च्या घोर चिंतनेनें अगदीं त्रस्त झाले आहेत.

अशा विपत्तींत गोमांतकांतील करदेणाऱ्यांची स्थिति सुकर आहे, असें जाहीर रीतीनें प्रसिद्ध ठिकाणीं विधान ठोकणाऱ्या गव्हर्नरसाहेबांस गोमांतकाच्या अंतःस्थितीचें काडीइतकेंसुद्धां ज्ञान झालें नाहीं, असेंच मोठ्या खेदानें ह्मणावें लागतें-

स्फुट विचार.

सरकारी कर्ज:— गोवा सरकाराकडून गेल्या १० वर्षांपासून तों आजपर्यंत सरासरी ४–५ दां कोणत्या ना कोणत्या सार्वजनिक हिताच्या कामासाठीं ह्मणून, कर्जाची उभारणी करण्यांत आली आहे. त्या पैकीं अगदीं शेवटचें कर्ज, व्यापाराच्या सोईस दळणवळणाची साधनें असे जे प्रसिद्ध रस्ते ते दुरुस्त करण्याकरितां आणि ठिकठीकाणीं नवीन रस्ते बांधण्यासाठीं, उभारलें होतें. पण त्या कर्जाचा उपयोग भलत्याच ठिकाणीं करण्यांत आला,ह्मणजे फक्त सरकारी कामदारांच्या पगारांतच त्याची विल्हेवाट लागली, हें ऐकून कोणासहि सखेदाश्चर्य वाटल्यावांचून रहाणार नाहीं. सरकारी कामदारांचे पगार हे कांहीं अवांतर नसून ते योग्य अंदाज पत्रकांत खर्चीं कलमांत धरले जातात. असें असतां त्यांच्या पायीं सार्वजनिक हिताच्या कामीं काढलेल्या कर्जांची राखरांगोळी कां व्हावी व सरकारी तिजोरीस अशी ओहोटी कां लागावी याचा उलगडा होत नाहीं. फक्त इतकें मात्र अजमावतां येण्यासारखें आहे कीं, सरकारी पैशाचा योग्य उपयोग न होतां बेजबाबदार रीतीनें त्याचा विनियोग होत असतो या वरून हीं चिन्हें बऱ्याचीं नव्हत असें मोठ्या खेदानें ह्मणावें लागतें.

माला–वृत्त

मडगांवहून उपयुक्त ग्रंथमालेचे व्यवस्थापक कळवितातः "गोमांतक व इंग्रजी हिंदुस्थानांतील भागांतील सद्गृहस्थानीं मालेचे फार्म भरून पाठविण्यास सुरुवात केली असून दुसऱ्या आठवड्यापासून वर्तमानपत्रांत फार्म भरून पाठविणाऱ्यांचीं नावें प्रसिद्ध केलीं जातील.ज्या गृहस्थांकडून फार्म भरून रवाना झाले नाहींत त्यांनीं ते सत्वर पाठविण्यांची कृपा करावी. ज्या कोणा प्रांतबंधूंना मालेची उद्देश–पत्रिका, फार्म वगैरे पोंचले नसतील अशांनीं मेहरबानी करून तसें कळविण्याची तसदी घ्यावी. "मालावृत्तांत" जरूर तो खुलासा प्रसिद्ध होईल.

ANO V.—NUMERO 6 —1920

QUEPEM, QUINTA—FEIRA 29 DE ABRIL

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया........... ३-०८-००
किरकोळ अंकास.......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस एक आणा. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें–गुरुवार, तारीख २९ माहे एप्रिल सन १९२० अंक ६ वा.

CONSUMATUM EST !

O *Bharat* não recebeu, com aplauso, como os leitores devem ter concluido da sua atitude, a maravilhosa idêa de introduzir milhoramentos em Mormugão.

¿ Será porque êle não conheça as mil e uma vantagens que dimanarão ao Paiz, da grandiosa idêa do sr. Maravilhas, quando convertida em facto ?

Não. Somos, pelo contrario, daqueles que ardem em desejos de vêr milhorada a antiga cidade de Vasco da Gama.

Entendiamos, apenas, que a critica epoca que estamos a atravessar, não era propria para semilhante empreendimento que necessita, para ter bom exito de muito dinheiro, que, precisamente, nos falta mais, lacuna esta que se pretende preencher, onerando o contribuinte, cuja força contribuitiva, aliás, está já esgotada.

E, porque a situação do Zépagante não è de se agravar com incidência de novos impostos, quer directos, quer indirectos, è que fizemos vêr a extemporaneidade da idea de milhoramentos cuja utilidade, de resto, somos primeiros a reconhece-la.

O problema do *pão* è essencial, levando primasia ás demais questoìs dos interesses do Paiz.

Mas, justamente, tem-se discurado, a olhos vistos, a solução deste problema do *pão*, pondo-se todo o cuidado noutros assuntos que pela delonga nada tinham a perder !

Eis a razão, porque insurgiramo-nos contra a idêa do sr. Maravilhas, ou antes contra o aumento de impostos.

¿ Quem morre de fome, quem se debate, convulsivamente, nas exigencias da barriga, quem tem espirito absorvido, por completo, pelo cruel pensamento de, dia e noite, grangear os meios de subsistencia e existencia de sua familia, estarà lá nas condições de pagar mais impostos e antegosar a beleza da futura cidade ?

Se não, ¿ como è que poderá haver entusiasmo espontaneo pelos milhoramentos projetados ?

O sr. Governador Geral, porêm, entende que o contribuinte goëz é, *no justo apuramento de contas, um dos benificiados*! E' uma afirmação que não podemos deixar passa-la sem o nosso veemento protesto, ainda que modesto.

¿ E' *benificiado* o contribuinte cujos teres e haveres são tragados pelos impostos ja existentes ?

¿ E' *benificiado* o contribuinte que, no intervalo de 24 horas, toma não raro uma sò refeição para não incorrer no desagrado do fisco e de seus *cruèis* agentes ?

¿ E' *benificiado* o contribuinte que para pagar os impostos *queima* os pés para vender o que tem e...há de ter ?

¿ Não labora, nêstas condições, no mais crasso erro quem afirma ser *benificiado* o contribuinte goêz ?

Quem quizer conhecer de perto o contribuinte da India, que percorra, sem aparatos nem espalhafatos as Novas Conquistas e algumas aldêas das Velhas, comunicando-se com os sens habitantes-*proprietarios* e venha, depois, manifestar a sua sincera opinião sobre a *capacidade contribuitiva do povo indiano.*

Estamos certos que a opinião do mesmo observador atento não poderá estar, de forma alguma, de acôrdo com a do sr. Dr. Jaime de Morais.

DARDOS & CARDOS

Metal vil ?

Os chamados filòsofos são uns tolos rematados, sobretudo, quando falam no dinheiro que o batisam com o cognome de *metal vil.*

Pode lá isto ser ?

O dinheiro è *metal vil*?

Isto que não lembraria ao diabo, lembra aos filósofos !

Ora, se o dinheiro fôsse *metal vil*, ninguem teria a *vilesa* de *envilecer-se* pelo dinheiro para, depois, uma vez nas graças dêste *rei do mundo*, enobrecer a sua escura origem e adquirir ares da fidalguia ...*vil.*

¿ *Metal vil*, o dinheiro, êsse *padrão* que por sua *brilhante* influencia suplanta o fascinante poder do *hipnotismo*, *mesmerismo* e todos os *ismos* dêste mundo sublunar ?

E' com a agua do dinheiro que se rega a ùtil planta da burocracia; è com a pedra do dinheiro que se construi o edificio de *melhoramentos* de Mormugão; è com o elexir do dinheiro que o arroz podre se transforma em uma *belesá* de ...*hortaliSa.*

Numa palavra, o dinheiro eis *tudo* !

¿ Em que agua de bacalhau fica, portanto, o cognome de *metal vil*, dado ao dinheiro-sempre *vilmente* e num accesso da *vilesa* pelos que não sabem aprecia-lo *de perto* ?

Pois, o dinheiro eis *tudo* !

O resto é ...filosofia *rota.*

Outro oficio

O *Vidia-prassar* tem levantado uma formidavel campanha contra o *bazar* do jogo de azar e *banditismo* do alcolismo, propagado pelas tavernas que aumentam, embebedando todos e tudo.

Francamente, não podemos secundar a energica *zaragata* do orgão da liga da propaganea de instrução, pois sabemos de *visu* que dos jogadores e bebados é o reino dos ceus.

¿ Pois não vê o mesmo jornal que são santos os que jogam e os que bebem, sacrificando em prôl do seu *cúbico* e *cilindrico* ideal tudo, até a sua propria existencia cuja duração encurtam, com uma prodigalidade que faria meter dedo na bôca espantada ao conhecido filho prodigo da conhecida historia ... primaria ?

O jogo e o alcool são duas rodas da *borracha* da bicicleta que leva o jogador e bêbado para o inferno da degeneração, perdão, para o reino dos cèus do Omnipotente Baco, que hoje nos manda, depois dos *senhores abastados* do arroz pôdre que -diga-se de passagem-vai-nos, tambem, facilitando a conquista do *Nada.*

O *Vidia-prassar* que faça colheres de pàu, em vez de meter-se em tais *santos* assuntos.

E' um prato que lhe oferecemos, á mingua de *dados* e *espiritos* que os *Zotras* e tavernas nos bifaram, há já seculos.

Ta' bem !

Segredam-nos que o emprestimo contraido para a viagão

¡ Já vem agora o motivo, suficiente e chamente, ilucidado, porque achamos extemporánea a idea de milhoramentos de Mormugão ?

Mas *consumatum est*; e o que cá fica dito não demoverá ninguem de seus planos.

Embora !

Fique, ao menos, registada nas colunas do *Bharat* a justificação da nossa atitude em volta de milhoramentos e aumênto de impostos de que falamos.

....

Em todo o caso, fazemos votas para que se concretise, a breve trecho, a idea do sr. Maravilhas, já que, agora, não há quem a faça suspender.

भारत

गुरुवार वैशाख शु० १२ शी. १८४२.

संन्याशी पाहिजेत !

जगांतील कोणत्याहि राष्ट्रांत शिक्षणाचें महत्व फार मानलें जातें. शिक्षणाचा प्रसार होऊन जनता साक्षर झाली, ह्मणजे तें राष्ट्र खरें उन्नत झालें असें ह्मणतां येईल. परंतु ज्या राष्ट्रांतील जनता ह्या शिक्षणाला पारखी झाली, ज्या लोकांना शिक्षणाचें महत्व कळून आलें नाहीं, तें राष्ट्र आपल्या स्वतःचा दुर्धर सत्यनाश करून घेत आहे, असेंच ह्मटलें पाहिजे.

गेल्या आठ दहा वर्षांच्या इतिहासाचें जर आपण चिकित्सक बुद्धीनें निरीक्षण केलें तर सारें जग शिक्षणाच्या बाबतींत पुढें गेलेलें आहे असें दिसून येतें. सर्व राष्ट्रांची सर्व लोकांची, कांहींनाकांहीं प्रगति या दहा वर्षांत घडून आलेली आहे हें आपण पहातों. संबंध जगाच्या पुनर्घटनेसारखें जगड्व्याळ काम या दहा वर्षांत झालेलें आहे हेंही खोटें नाहीं. परंतु गोमांतकीय हिंदुसमाजानें या सर्व राष्ट्रीय प्रगतींत कोणता भाग घेतला ? या दहा वर्षांत जग जितकें पुढें गेलें, त्याच्या कितव्या हिश्शानें आपण त्याला अनुसरलों ? खरें बोलायाचें व सत्य सांगावयाचें तर हिंदुसमाजानें या राष्ट्रीय प्रगतींत काडीचाहि भाग घेतलेला नाहीं. जर नाहीं, तर या दहा वर्षांत हिंदुसमाज काय करीत होता ? या दहा वर्षांत या समाजानें असें कोणतें शतकृत्य केलें कीं, प्राथमिक शिक्षणासारख्या क्षुल्लक बाबतींतहि त्यांचें पाऊल किंचिंन्मात्र पुढें पडूं नये ? अशा कोणत्या बौद्धिक शास्त्रांत तो निमग्न होता कीं, दुय्यम शिक्षणांतहि त्याला रेंगाळतच रहावें लागत आहे ? अशा कोणत्या शास्त्रीय चमत्काराचा त्यानें शोध लावला आहे कीं स्त्रीशिक्षणांतसुद्धां तो साख्या गचांड्या खातो ? परंतु या दहा वर्षांत गोमांतकीय हिंदुसमाजानें कांहींच कामगिरी केली नाहीं असें ह्मणणें ह्मणजे खऱ्या वस्तुस्थितीबद्दल आपलें अज्ञान प्रगट करण्यासारखें आहे. या दहा वर्षांत आपण, नाहीं ह्मटल्यास, बरीच आघाडी मारली आहे, हें प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रें घेऊन दोस्तांचा जय होईल कीं जर्मनीचा पाडाव होईल, गोमांतक इंग्लिशांना पडेल कीं जर्मनी घेणार वगैरे महत्वांच्या प्रश्नांची आपण गंभीरपणें चर्चा केली आहे; महागाईच्या तीव्र अग्नीज्वालानीं भाजून निघालेल्या आमच्या देवांचे उत्सव योग्य रीतीनें कसे पार पडतील ? दारुकाम, नाटकें तमाशे, कलावंतीचे नाच आमच्या पिढीजाद लौकिकाला अनुसरून कसे चालतील ? याचा विचार करण्यांत आपण आपला मेंदू सडवून घेतला आहे; मग हिंदुसमाजानें कांहींच केलें नाहीं असें कसें ह्मणतां येईल ?

ही व्याजोक्ति झाली. परंतु हिंदुसमाजाच्या खऱ्या दुर्दशेचे वाफाडे पुढेंच निघावयाचे आहेत. हिंदुसमाज अधोगतीला जातो आहे, अवनत होतो आहे, हें, एकच कारण आधाराला घेऊन आह्मांला पाहिजे तेव्हां सिद्ध करून दाखवितां येईल. हा सिद्धांत लौकिकदृष्ट्या कानाला कडू व जिव्हेला आंबट लागणें शक्य आहे पण तें सत्यहि आहे व ह्मणून त्याचा कडवटपणा व आंबटपणा आमच्या भावी वर्तन शोधनाच्या कामी हेमगर्भ मात्रेप्रमाणें उपयोगी पडणारा असल्यामुळें त्याची उघडपणें चर्चा करण्यांस आह्मांस हरकत दिसत नाहीं.

राष्ट्राची अधोगति होते कीं प्रगति होते याचा कस लावण्यास शिक्षणासारखा उत्तम फत्तर नाहीं. गोमांतकांतील हिंदुसमाजाला जर या फत्तरावर घांसून पाहिलें तर काय कस लागेल ? दुय्यम शिक्षण, ह्मणजे लिसेवांतील गोष्ट आपण सोडून देऊं. कारण प्राथमिक शिक्षणांत विशेषतः सेगुंदग्रावचे परीक्षेस जितके विद्यार्थी पास होतील त्या मानानें ठोकळ रीतीनें आपणाला हा कयास बांधतां येईल. प्रिमेरग्राव संबंधींहि विचार तूर्त आपणांला बाजूस ठेवला पाहिजे. कारण या परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांची संख्या थोड्या श्रमानें मिळणें शक्य नाहीं. आतां सेगुंदग्रावाच्या परीक्षेला बसलेल्या उमेदवारांची जीं नांवें सरकारी पुरवणी ग्याझेट मध्यें प्रसिद्ध होतात, त्यांच्या आधारानें हिंदुसमाजाची प्राथमिक शिक्षणामध्यें काय प्रगति आहे तें आपणाला पाहवयाचें आहे.

यंदा ह्मणजे १९२० सालीं एकंदर ८९८ मुलें परीक्षेला बसलेलीं आहेत. ह्यांत अवघी १७५ मुलें हिंदूची आहेत. ह्मणजे शेंकडा २० हि हिंदूंची मुलें परीक्षेला बसलेली नाहींत. ख्रिस्ती मुलें जेथें पांच शिकतात तेथें हिंदु एक शिकतो असें साधारण यंदाचें प्रमाण निघेल. आतां गेल्या सालापेक्षां यंदा आह्मीं काय प्रगति केली, हें पहाण्यासाठीं एक पाऊल मागें टाकलें पाहिजे. गेल्या सालीं परीक्षेला बसलेल्या एकंदर सुमारें ७५० मुलांपेक्षां १७१ मुलें हिंदूंची होतीं. ह्मणजे यंदा ४ मुलांनीं आमची प्रगति झाली आहे असें ह्मणतां येईल. या चार मुलांच्या प्रगतीनें समाधान मानून जर आणखीं एक पाऊल मागें टाकलें व १९१८ सालापर्यंत गेलों तर एकंदर ८२५ मुलांपैकीं १०४ मुलें हिंदूचीं होतीं. ह्मणजे १९१८ सालापेक्षां २९ मुलांनीं आमची यंदा अधोगति झाली आहे !

गेल्या सालापेक्षां यंदा जी आपली ४ नी प्रगति झाली आहे ती सुद्धां समाधानकारक नाहीं. कारण १९१९ साल हें ग्रीपीनें पछाडलेलें साल होतें व या सांथीनें जितके बळी या वर्षांत घेतले त्यांत ह्या विद्यार्थ्यांची संख्या बरीच असली पाहिजे व त्या मानानें यंदाहि आपली गेल्या सालापेक्षां पुच्छप्रगतिच झाली आहे असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं !

या परीक्षेला बसलेल्या ख्रिस्ती मुलींची जर संख्या पाहिली तर ती यंदा १६६ आहे ह्मणजे साधारणपणे हिंदुमुलांची व ख्रिस्तीमुलींची प्रगति प्राथमिक शिक्षणामध्यें सारखीच आहे असें ह्मणतां येईल. ख्रिस्ती स्त्रीसमाजाचा व हिंदुलोकांचा चालू राजकीय परिस्थितिंतील दर्जा सारखा आहे ! १९१८ सालीं या परीक्षेला बसलेल्या तीन हिंदु मुली होत्या. त्या मानानें यंदां एकहि हिंदुमुलगी परीक्षेला बसली नाहीं व स्त्री शिक्षणाच्या दृष्टीनेंहि हें साल आपल्याला अधोगतीचें गेलें !

गोमांतकांतील एकंदर पांच लाख लोकवस्तींत अवघे ९०० विद्यार्थी सेगुंदग्रावचे परीक्षेस बसणें ही स्थिति समाधानकारक नाहीं. पण तशांतहि हिंदुसमाजाला ती खास नाहींच नाहीं. कारण इकडे जरी सात आठशींच ख्रिस्ती विद्यार्थी पोर्तुगीझ शिकत असले तरी तिकडून इंग्रजीचें शिक्षण संपादन करणारे हजारों ख्रिस्ती विद्यार्थी आहेत पोर्तुगीज शिक्षण संपादन करून थुंकीझेलेपणा किंवा जोडे उचलण्याचा धंदा करण्यापेक्षां बटलरकी किंवा समुद्रपर्यटन त्यांना ज्यास्त फायदेशीर असतें व त्याला इंग्रजीची तटपुंजी सामुग्री आवश्यक असल्यामुळें तिकडें त्यांचा कल सहज ज्यास्त झुकतो. पण ही स्थिति हिंदुलोकांची नाहीं. आपल्या घरांतील चुलीच्या ऐसपैस भागांत द्रव्याजनार्थ हातपाय बडविण्याशिवाय त्यांना दुसरा उपाय नसतो व ह्मणून इंग्रजींतहि प्रगति करून घेतलेलीं मुलें एखादा अर्धापाव शेंकडा मिळतील कीं काय याची वानवाच आहे.

पोर्तुगीज नाहीं, इंग्रजी नाहीं; मग मराठी तरी समाधानकारक आहे ह्मणावें तर तिकडेहि बेमरे पावणें पांच ! एकादी नमुनेदार मराठी शाळा, जेथें हिंदूंचीच लोकवस्ती ज्यास्त आहे, अशा नवीन काबिजादींत असलेली दिसून येत नाहीं. पुष्कळ संस्था आहेत, पण मराठी, आपली मायभाषा, हेळसांडली जाते, तिरस्कारली जाते, ही खेदाची गोष्ट होय !

वरील अल्प विवेचनावरून हिंदुसमाज शिक्षणाच्या बाबतींत कसे गोते खात आहे व कशी खेदजनक पिच्छेहाट करीत आहे हें आमच्या सुज्ञ वाचकांच्या लक्षांत येण्यास विलंब लागणार नाहीं. गोष्ठ महत्वाची आहे, अगत्याची आहे; हंसण्यावारी न्यावयाची नाहीं व उपेक्षा करण्यासारखी नाहीं. इकडे विचारी लोकांचें लक्ष्य तावडतोब वेधलें पाहिजे व ह्या लेखाचा मुख्य उद्देश हाच आहे.

हिंदुसमाजाची होत असलेली ही पिच्छेहाट, ही पुच्छप्रगति थांबविण्याचें उपाय अविलंबितपणे योजले पाहिजेत हें वर सांगितलेंच आहे. रोग जून झाला आहे, बळावला आहे, त्याला साधे सक्षकी काढे उपयोगी नाहींत. कोणातरी तज्ञ शस्त्रवैद्यांकडून ही क्रिया झाली पाहिजे. किंवा वर्तमान पत्रांतून सभांतून निरक्षरतेच्या नायनाटाबद्दल कितीहि जोरदार व मुद्देसूद तरफदारी केली तरी साक्षरता वाढेल असा संभव नाहीं. शिक्षण प्रसारासाठीं, आपल्या घरदारावर तीलांजली दिलेले स्वार्थत्यागी शिक्षक पाहिजेत. प्रत्येक गावांत प्रत्येक खेड्यांत, प्रत्येक घरांत शिरून 'येथें शिक्षण घेण्याचा एखादा मुलगा आहे काय ?' अशी कळकळीनें पृच्छा करून, असल्यास त्याच्या मार्गांत काय अडचणी आहेत त्याची नोंद करून त्या दूर करण्याचा प्रयत्न करणारे संन्याशी पाहिजेत. तरच शिक्षण प्रसार होईल.

आश्रयदात्यांस विनंति

ज्या उदारांतःकरणाच्या आश्रयदात्यांनीं 'भारता'चा प्रेमपूर्वक स्वीकार करून आह्मांस आभारांत ठेविलें त्यांनीं कृपा करून चालू सालची अगाऊ वर्गणी टपालानें पाठविल्यास आह्मावर फार फार उपकार होणार आहेत. एकंदर आश्रयदात्यांची वर्गणी येत्या महिन्याच्या अखेरपर्यंत हातीं आल्यास दर आठवड्यास 'भारत' दोनदां आपल्या वाचकांस भेट देईल.

स्फुट विचार.

" व्यर्थ आहे ":— शिक्षणप्रसारार्थ कोणकोणत्या उपायांचा अवलंब केला पाहिजे याचें दिग्दर्शन आम्ही आजच्या अग्रलेखांत केलेंच आहे. सांप्रतच्या मनु शाब्दिक चळवळीचा नसून कृतीचा आहे. सध्याच्या काळांत 'क्रियेवीण वाचालता व्यर्थ आहे' निवळ सर्वसंग परित्यागी संन्याशी प्रोफेसरांशिवाय विद्याप्रसाराचा प्रश्न सहज रीतीनें कदापिहि सुटणें शक्य नाहीं. ह्मणून ज्या ज्या तरुणाना सदरहू कार्य बजावण्यांचें सामर्थ्य असेल, त्या त्या देशभक्तानीं शिक्षण प्रसारार्थ आत्मयज्ञ केले पाहिजेत. धनसंचयानें फार तर ऐहिक सुखें वाढून 'भाकरी' खाणाऱ्या 'चाकर' लोकांकडून दिखाऊ ह्मणूनच अल्प टिकाऊ मानमान्यता मिळेल. उलटपक्षीं त्याच तरुणानीं सदरहू क्षणिक सुखांच्या लोभास बळी न पडतां, केवळ स्वराष्ट्रोन्नतिसाठीं आपल्या अस्तित्वाचा उपयोग केल्यास, देशापरी देश सुधरून, त्यांसहि मुक्तिलाभ होणार आहे. हा लाभ नाशवंत नसून चिरकाल टिकणारा असल्यावरून, आमचे तरुण देशभक्त शिक्षणप्रसाराचा प्रश्न सोडविण्यासाठीं आपल्या कंबरा बांधतील अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे.

भपका नको, कार्य हवें:— अगडबंब व भपकेबाज नावांखालीं आमच्या शेतकी खात्याची संस्थापना होऊन आज बराच काळ लोटला. पण सदरहू खात्याकडून आपल्या कामगारांचा पगार अगदीं नियमितपणें वसूल करून घेण्यापरतें अद्यून पर्यंत दुसरें कोणतेंहि महत्वाचें काम झालेलें दिसून येत नाहीं ! या वरून वरील खात्याविरुद्ध, त्याच्या उघड उघड निरुपयोगामुळें, लोकमत किती क्षोभलें असेल याची कल्पनाच केली पाहिजे. आमच्या आंधळ्या सरकारच्या डोळ्यांत हा अनिष्ट प्रकार केव्हां खुपसेल तो खुपसो; परंतु डोळस लोकमताचे डोळे मात्र उपरोक्त गोष्टीनें अंध होण्याच्या बेतांत आले आहेत. अगडबंब व भपकेबाज नांवाच्या खात्याचा उपयोग कदाचित चैनीच्या काळांत होत असेल. सध्याच्या 'भिकार' स्थितींत त्यांचा बडेजाव राखणें राष्ट्रहितविघातक असून, दुष्काळांतील हे 'तेरावे महिने' फार जाचक असतात. ह्मणून आम्ही सरकारास विनंति करतों कीं, एव्हांपासूनच सरकारनें वरील खात्यांत कांहीं तरी उपयुक्तता उत्पन्न करण्यांच्या मार्गास लागावें. भपका नको, कार्य हवें आहे.

आवदितोरीय खातें:— गोव्यांस आर्थिक स्वातंत्र्य दिल्यामुळें त्याच्या तिजोरींतील पैशांचा खर्चवेंच योग्य रीतीनें होऊन बेकायदेशीर खर्चास मंजुरी न मिळतां जमाखर्चाची योग्य तपासणी व्हावी एतदर्थ हें वरील नावांचे खातें पोर्तुगाल सरकाराकडून गोव्यांच्या गळ्यांत अडकविण्यांत आलें आहे. या खात्यासंबंधानें कामदारांचा पगार वगैरे वार्षिक खर्च ५० हजार रुपयांचा आहे. इकडे सरकारी फडणीशी खातें असल्यानें या वड्या व जड अशा अहेराची आह्मांस गरज नव्हती; परंतु सरकारकडून होणाऱ्या कामदारांच्या बेकायदेशीर नेमणुका तरी सरकारच्या नजरेस आणण्यास 'हें खातें उपयोगी पडतें असें कळल्यानें त्यांतल्या त्यांत समाधान मानून घेण्यास जागा आहे.

ANNO V.—NUMERO 7 —1920 QUEPEM, QUINTA—FEIRA 6 DE MAIO

Govinda P. Hegde Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत

BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस एक आणा. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें—गुरुवार, तारीख ६ माहे मे सन १९२० अंक ७ वा.

TAXA DA GUERRA

Todos sabem que o Estado nos prometera cessar o incòmodo imposto da taxa de guerra, depois de êle vigorar por tempo de seis mezes, apenas.

Decorreu já êste periodo, há já seis mezes e, todavia, a despotica taxa continua a oprimir o contribuinte, com o *vigor* do seu sinistro começo.

O Estado faltou, pois, como vêem, à sua palavra, igualando-se nêste ponto, a qualquer criatura vulgar para quem o cumprimento da palavra é coisa que não existe !

¿ Essa falta para não dizer crime grave não está em franca contradição com o principio de *Não faças a outrem o que não queres que outros te façam*, que o Estado, por seus agentes, manda ensinar a seus *filhos*?

Se está, ¿ qual è a força maior que constrangeu o poderoso Estado a descer á despresivel condição daquele a quem o cumprimento da palavra *é letra morta* ?

Que se explique, para que o seu scilencio sobre a contradição enigmatica não estimule a perigosa fauna de ... maus pagadores e outros tiporios sem palavra, para proesas da desorganisação social.

E, depois, quem promete na divida se mete. O Estado prometeu vigorar por tempo de seis mezes a taxa de guerra. Espaçou êste periodo e, portanto, tem o dever de pagar a dito, suspendendo-a, imediatamente sob pena de ser considerado *mau pagador*, além de máu cumpridor da sua palavra.

Não há meio termo.

Ou tem de abolir, desde ja a taxa de guerra, ou tem de declarar-se máu cumpridor da sua palavra-*falido*-e mau pagador.

Aguardamos os acontecimentos para formular, definitivamente, o nosso juizo sobre a preferencia qualitativa que o Estado vai adopta-la para si.

Aguardamo-los, sim.

OS HINDUS E O PROGRESSO DE GOA

Todas as vezes que se tente o progresso duma terra, è mister que todas as sociedades que nela vivem, todas as instituições sociais, politicas e literárias e, em geral, todos os que relacionam com ela, quer directa, quer indirectamente, se esforcem, afincadamente, pelo seu progresso individual, que em resultado dará o progresso da terra que è a sua mãe-pàtria.

Dentre as nações vivas ou mortas è raro encontrar-se uma que se tenha constituida duma só sociedade: todas êlas, civilisadas ou não, encerram em si sociedades que se diferem uma da outra, sob o ponto de vista ètnico, religioso ou do estado de adiantamento no ramo educativo, sendo, porem, e para o regular e progressivo andamento, uma condição essencial que uma respeite a outra no caminho da regeneração, podendo todavia, não apoiar a sua acção ou por lhe parecer improficua ou pelo òdio de raça, crença e da relativa superioriedade, dando assim largas ao seu espirito egoista, quando o bom senso reclama o auxilio mutuo que é a base de todo o progresso e a essencia de todas as religiões.

O tema do presente artigo convida-me para a análise sucinta e dum modo geral do movimento do território de Gôa. Sob o ponto de vista politico, o seu ideal é um e ùnico, havendo, porèm, diferença sob o ponto de vista social.

Há em Gôa sociedades hindù, cristã e maometana que é de pequena extensão, sendo as primeiras duas quási iguais em população. A primeira não perdeu atè hoje o amor pelas suas instituições antigas, pelos seus usos e costumes e a segunda está inteiramente desligada delas, parecendo-lhe atè odiento o lembrar-se daquelas e o viver nestes, abraçando, pelo contrario, tudo o que a civilisação ocidental preconisa fazendo uma imitação cega dos usos e costumes europeus em que, em parte, alguns hiudus ainda mais cegamente andam de mãos dadas com os cristãos e o que é deveras lamentável, por ser de nenhuma importancia para o progresso do paiz. E' um assunto para uma larga discussão que não pode caber nestas linhas que para outro fim são destinadas.

A sociedade hiudu, ainda que não haja no seu seio elemento analfabeto, não em grande escala pode acompanhar, todavia, a sociedade cristã na instrução e para o que tambem se ofereciam inconvenientes, quer por parte das regiões oficiais, quer pela dos interressados, incovenientes que a gloriosa implantação da Republica e o decorrer do tempo arredaram duma vez para sempre. Ela que nos principios pouco se dispunha para a instrução vasada nos moldes ocidentais não pela impossibilidade intelectual ou material, mas porque as condições extranhas, provenientes de diferentes centros a impediam, hoje está no caminho que lhe cabe trilhar.

Educa-se em todos os ramos da actividade humana, aperfeiçoa-se em varios centros educativos fazendo um movimento social e literário a fim de vencer a distância que a separa da outra, ilustrada, há muito. ¿ Qual é o fim ? não é certamente o fazer desaparecer essa distancia e igualar se outra sociedade. O fim é, de mãos dadas a ela, trabalhar pela regeneração do nosso paiz que è a India e que rompera no horizonte, quando tudo, estava a mandriar, e que dum modo directo ou indirecto, desgrudou as pestanas dos que hoje dominam o mundo.

Mas há uma coisa a notar. E' que o progresso duma classe sempre não é apoiado por todos da outra, não porque as vistas da apreciação sejam diferentes, mas porque os odios (raciais ? não, porque pertencem á mesma raça) que as entranhas tufadas encerram não podendo conte-los para mais tempo, visto ser-lhe impossível, procuram desabafar-se deles. E o nosso paiz não podia abrir uma excepção a essa regra. Mas cumpre-me orgulhosamente dizer que o nosso paiz, o paiz ilustrado, o paiz histórico, felizmente, não desempenha esta missão por si. Desde há muito, tem encarregado do, perdão, tem-se encarregado dela algumas pessoas que se podem contar nos dedos da mão, pessoas, aliás ilustradas e como tais merecem-nos alto respeito e consideração.

Que fazem, pois, esses encarregados ? Exercem uma acção activa ? Aparecem no campo de batalha com a espada na mão ? Fazem uma propaganda daquilo de que se encarregaram ? certamente que não. Mas que não deixam passar em vão uma pequena oportunidade, dando azo ás suas vis (honradas para êles) criticas. Formulam teorias ao ar, aproveitando para isso uma minima circunstancia. Estabelecem principios que não tem base nem fim e afinal sustentam doutrinas sem nenhum ideal. Assim vagueiam pelo oceano do ar. Pena è que as tais criticas partem das cabeças que como disse, impõem-se á consideração pelo seu saber que assim, se transforma em ignorancia. Alem disto, consideramo-los pelo numero de primaveras que viram, apesar de nós não as ter-

भारत

गुरुवार वैशाख कृ० ३ या. १८४२.

मराठी व कोंकणी

महाराष्ट्राशीं तीनहि बाजूंनीं संलग्न झाल्यामुळें गोव्यांतील लोकांचा, मराठी भाषेशीं पूर्वापार चालत आलेला परिचय—त्या निकटवर्ति प्रांतांतील प्रबळ वाङ्मयाच्या वर्चस्वाचा संबंध टाळणें अपरिहार्य होतें म्हणून असो, किंवा त्यांशीं दळणवळण चालणें भागच होतें म्हणून असो—दिवसें दिवस अधिकाधिक दृढ होण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. व हा परिचय दृढतर होण्याचें दुसरें कारण कोणतें? ह्याविषयीं विचारपूर्वक चौकशी केल्यास तें पुढील आहे असें कोणासहि कबूल केल्याशिवाय राहणार नाहीं. एकतर, फक्त कोंकणी भाषेंत सगळे विचार प्रगट करितां येण्याइतकी प्रगल्भता नाहीं, व गोव्यांत चालणारी दुसरी भाषा जी पोर्तुगीज ती परकी असल्यामुळें सगळ्यांस तिचें आकलन करितां येणें अशक्य असल्यावरून गोव्यांतील विशेषतः हिंदुलोकांची भिस्त विचारविनिमयाच्या बाबतींत मराठी भाषेवर सर्वथा अवलंबून असणें अगत्याचें आहे व गोमांतकवासीयांस अशा रीतीनें आवश्यक होऊन राहिलेल्या भाषेचा पद्धतशीर प्रसार होण्यासाठीं शाळांचा फैलाव करणें अत्यंत जरूर आहे. ह्या विषयांचा विचार करावा हाच प्रस्तुत लेखाचा उद्देश होय. कोणत्याहि भाषेस चिरस्थायीपणा येण्यास दोन गोष्टी पाहिजेत. एक, तिचें वाङ्मय व दुसरी, तें वाङ्मय ग्रथित करून सांठविणारी त्या भाषेची विशिष्ट लिपि. या दोनहि बाजूनीं पं, हतां, मराठी भाषेंत, वाङ्मय व लिपि यंचा विशिष्टत्व पूर्णपणें दिसून येत आहे, आन ती भाषा लिहितां वाचतां येणारा किंच नुसता 'श्री गणेशा' गिरविणारा लहान मुलगा देखील सांगू शकेल. पण, अगोदर गणेश म्हणजे वांकड्या सोंडेचा देव! अशा वांकड्या दृष्टीनें पाहण्याची सवय आमच्या खिस्ति बांधवांस झाल्याकारणानें, मराठीच्या श्रीगणेशा गिरविण्याविषयींचा आपला सरळपणा सोडून त्यांतील वाङ्मयासंबंधानें उदासीनता दाखवीत आले आहेत व हा वजपा भरून काढण्यासाठीं पोर्तुगीज लिपीनें लिहिलेल्या कोंकणी भाषेचा प्रसार करण्याकडे प्रयत्नाचा जोर वळवीत आहेत. म्हणून तूर्त कोंकणी भाषेचाहि वाङ्मयदृष्ट्या विचार करणें अप्रासंगिक होणार नाहीं.

खरी मातृभाषा जी मराठी तिजकडे दुर्लक्ष होत गेल्यामुळें, पहिल्या प्रथम लहानपणीं कानांत पडलेल्या कोंकणी भाषेकडे त्यांचा ओढा होणें स्वाभाविक आहे. हा ओढा ज्यास्त होण्याचें कारण म्हटलें म्हणजे अर्धकची व पोर्तुगीजशब्दमिश्रित कोंकणी भाषा बोलण्याचा सराव झाल्यानंतर पोर्तुगीज भाषेंत सुलभ प्रकारें प्रवेश होईल असा समज होय. पण हा समज चुकीचा आहे. कांकीं, कोंकणी भाषा ही अगोदरच कमी संस्कृत किंबहुना प्राकृत या सदराखालीं देखील न येण्याइतकी अपुरी व खिस्तिलोकांकडून बोलली जाणारी कोंकणी तर मृत भाषेसारखी म्हणजे जिच्यावर तिचें जीवन अवलंबून आहे अशा मराठीपासून अलिप्त म्हणून कोणताच नूतन संस्कार न स्वीकारणारी अशी होऊन राहिली आहे. वरील नियमास अपवाद म्हणून जर तिजवर कोणताहि संस्कार होत असेल तर पोर्तुगीज भाषेंतील जशास तसें पण कोंकणी भाषेंतील स्वरांवर उच्चारण्यांत येणाऱ्या शब्दांचा भरणा होय! असल्या अपुऱ्या कोंकणीवरून पोर्तुगीज शिकतानां, ह्या शब्दांचा अर्थ किंवा सामान्य कल्पना दाखविणारे प्रतिशब्द कोंकणींत नसल्यामुळें, नवशिक्यापुढें एक घोटाळा उपस्थित होतो. त्यावेळीं, संस्कारहीन कोंकणी व सुसंस्कृत पोर्तुगीज या दोहोंतील तफावत दिसून आली म्हणजे पहिलींतून दुसरींत संक्रमण करितानां, अर्थे उत्पन्न होणारा घोटाळा काढून टाकण्यासाठीं कोंकणी भाषा सुधारली पाहिजे असें त्यांस वाटूं लागतें. ह्यावरून घेतां येण्यासारखा बोध तो हाच कीं, नेहमीं पोर्तुगीज भाषेवर निर्वाह करण्याची प्रौढी मारणाऱ्या लोकांस सुद्धां मातृभाषेची गरज भासूं लागते. आणि ते अपुऱ्या कोंकणीवर नवा पेहराव चढवून, तिजवरून पोर्तुगीज शिकण्याची अपेक्षा करितात यावरून असें निघतें कीं, प्रौढ अशा मराठी भाषेच्याद्वारें पोर्तुगीज भाषामंदिरांत शिरकाव होण्यास मुळींच कठीण जाणार नाहीं. हें केवळ काल्पनिक असल्यावरून संशयात्मक आहे असें कोणासहि वाटत असेल तर मराठीवरून उत्तम इंग्रजी शिकतां येतें, हें व्यवहारिक उदाहरणच तो संशय घालविण्यास पुरेसें आहे.

वाङ्मयदृष्टीनें पाहूं जातां, गोव्यांतील कोंकणी भाषेंतून, मराठी, कानडी, पोर्तुगीज, वगैरे शब्द निराळे काढले तर कोंकणी भाषेंतील म्हणतां येण्याजोगे जे कांहीं थोडे बहुत शब्द राहतील, त्यांवरून असें दिसेल कीं, ती भाषा म्हणजे मराठीच्या बळावर सुरालत असलेली एक पोटभाषा आहे. म्हणून मराठीच्या साह्यावांचून तिच्यांत धारणा करण्याचे प्रयत्न यशस्वी होण्याची दीक्षा व्यर्थ आहे, असें सिद्ध होतें.

जे खिस्तिलोकांच्या कोंकणी भाषेंत करितां येण्यासारखी एकच सुधारणा म्हटली म्हणजे, पोर्तुगीज भाषेंतील शब्दशः भाषांतर केलेलीं वाक्यें तींत घुसडून 'न हिंदु र्न यवनः' अशी तिची स्थिति करणें हीच होय. अशामुळें गोव्यांत चालणाऱ्या कोंकणीहून ती निराळी होऊन पोर्तुगीज जाणणाऱ्यांसच ती उपयोगीं पडण्याचा संभव आहे.

आतां लिपीच्या दृष्टीनें विचार करूं लागलों तर कोंकणी भाषेस मराठी लिपीवर अवलंबून असणें योग्य आहे. कोंकणींतील सगळे स्वर व उच्चार मराठींत लिहितां येत नाहींत अशी हरकत कोणीहि घेईल तर त्यानें असें पाहिलें पाहिजे कीं, पोर्तुगीज लिपींत ही अडचण ज्यास्त तीव्र होईल. स्वताची म्हणून कोणतीच लिपि नसलेल्या कोंकणी भाषेची लिपिसंबंधानें जर अशी दुहेरी खेंचाखेंच होतानां तिचा कल कोणीकडे झुकावा असा प्रश्न निघेल तर तो मराठी वरच असें त्या प्रश्नाचें एकच पण सरळ उत्तर देतां येण्यासारखें आहे.

कोंकणी भाषेचीं पोर्तुगीज लिपींत चालणारीं वर्तमानपत्रें वगैरे नाहींत असें नाहीं पण तींत धड उच्चार नसल्यावरून शुद्धलेखनाविषयीं पंचाईत उद्भवते. आफ्रिकेंतील कांहीं जाती अवघ्या दोनशें चारशें शब्दांच्या भाषेवर निर्वाह करितात. त्या मानानें, दुधाची तहान ताकानें भागविण्याचें तें एक साधन आहे असें म्हणतां येईल. व ती भाषा म्हणजे गोव्यांतील आदि व अंत नसलेल्या खिस्तिलोकांच्या समाजाच्या अंतरंग दाखविणारा एक नमुना आहे ह्या दृष्टीनेंहि तीस पाहतां येईल, असो. इतक्या विवेचनावरून कोणासहि असें वाटावयास नको कीं, आमचा कोंकणी भाषेवर कटाक्ष असल्यामुळें आम्हांस तींतील उपयुक्तता दृष्टीस पडत नाहीं. पण वास्तविक प्रकार तसा नसून मराठी भाषेच्या ऐवजीं कोंकणी भाषेचा उपयोग केल्यानें तिचा उत्कर्ष होऊन वाङ्मय वाढेल असें आम्हांस बिलकूल वाटत नसून मराठीच्या सहचर्यामुळेंच कोंकणी भाषेचा उत्कर्ष होईल, हें कोंकणी भाषेच्या पुरस्कर्त्यांनीं लक्ष्यांत ठेवावें असें आम्हीं म्हणतों.

गोव्यांत कोंकणी भाषा बोलतात म्हणून लिहिण्यावाचण्याकडे कोंकणीचाच उपयोग करावा ह्या युक्तिवादाचें निराकरण होण्यास इतकेंच पाहिलें पाहिजे कीं, एकंदर गोव्यांतील कोंकणी भाषा एक प्रकारची नसून मालवण सांवतवाडी पासून बोलल्या जाणाऱ्या मराठीचेंच तें एक रूप आहे. म्हणून स्थानभेदाप्रमाणें निरनिराळी कोंकणी बोलणाऱ्या लोकांत एकात्मता येण्यासुद्धां मराठी भाषेचीच आवश्यकता आहे असें सिद्ध होतें. व ती पद्धतशीर शिकविण्यासाठीं मराठी शाळांचा प्रसार जिकडे तिकडे झाला पाहिजे हें क्रमप्राप्त होतें.

स्फुट विचार.

संप कीं बंड? :—कामकरी वर्गास आपल्या पगारवाढीसाठीं संप करण्याचा हक्क असून या हक्काविरुद्ध कोणाची तक्रार नाहीं. पैसेवाल्या लोकांकडून कामकरी वर्ग सपशेल लुबाडला न जावा म्हणून सरकारानें उपरोक्त हक्कास पूर्ण पाठबळ दिलें असून संपवाल्यांस सरकारापासून कसलाहि उपसर्ग पोंहचत नाहीं. अशाप्रकारची वस्तुस्थिति पोर्तुगालांतच असते असें नाहीं; युरोपांत व जगांतील इतर सुधारलेल्या भागांतहि संपाचा हक्क कायदेशीर ठरला गेला आहे. पण भूतलावरील कोणत्याहि राष्ट्रांत वरील हक्काची व्यापकता नोकरशाहीपर्यंत विस्तृत झालेली नसून नोकरशाहीचे संप म्हणजे बंडेंच मानलीं पाहिजेत. या तऱ्हेचें लांछनास्पद बंड गेल्या दिवसांत पोर्तुगालच्या नोकरशाहीनें पुकारून आपल्या राष्ट्राच्या तोंडास काळें फासलें! राष्ट्रभक्तांचीं मनें चिंतेनें व्यग्र करून सर्व ठिकाणीं अस्वस्थता माजवून सोडणाऱ्या या नोकरशाहीस कोणती उपमा द्यावी हेंच मुळीं आम्हांस कळत नाहीं. पोर्तुगालच्या नोकरशाहीच्या बेबंदशाहीवर कडक उपायांची योजना झाल्याखेरीज तीचें बंड थंड होणें आम्हाला निदान शक्य वाटत नाहीं.

राष्ट्रहितविघातक:—वरील बंडामुळें विचारी लोकांचीं मनें व्यग्र होण्याचीं कारणें अनेक आहेत. त्यांपैकीं मुख्य कारण हें आहे कीं, बंड पुकारलेल्या नोकरशाहींत बरेच विद्वान लोक असून आपल्या राष्ट्राच्या आर्थिक स्थितीचें परिपूर्ण ज्ञान असलेले—जवळ जवळ अर्थशास्त्रज्ञच म्हटलें तरी चालेल—अशाहि लोकांचा नोकरशाहीच्या सदरहू असाध्य आचरणास पाठबळ होतें! ज्या पोर्तुगीज लोकांनीं आपल्या पराक्रमाचा झेंडा एकेकाळीं सर्व जगभर फडकाविला होता, ज्यांनीं आपल्या राष्ट्राचें वैभव वृद्धिंगत करण्यासाठीं नाना तऱ्हेच्या हाल अपेष्टा भोगल्या व ज्यांनीं आपल्या तेजस्वी स्वार्थत्यागाच्या उदाहरणांनीं जगाचे डोळे दिपविले होते, त्यांच्याच वंशजांनीं केवळ पोटाची खळगी भरून काढण्यासाठीं, भ्याडपणानें बंड पुकारून आधींच निकृष्टावस्थेस पोंचलेली आर्थिक स्थिति ज्यास्त करुणाजनक करावी, यासारखें राष्ट्रहितविघातक आचरण दुसऱ्या कोणत्याहि सुधारलेल्या राष्ट्रांत दृष्टोत्पत्तीस आलें नव्हतें!

मालावृत्त

'उपयुक्त ग्रंथप्रसारक मंडळी'चे विनंतीचा आदर करून गोवाप्रांताचे शिक्षणविषयक प्रगतीची कळकळ असणाऱ्या ज्या ज्या सद्गृहस्थांनीं मालेचे फार्म भरून पाठविले त्यांची आंकड्यांसह नावें आजपासून क्रमशः प्रसिद्ध करण्यास सुरवात करितों. ज्या देशबंधूंनी मालेच्या कार्याबद्दल खासगी पत्रांतून, स्वतः व वृत्तपत्रांमधून प्रेमाच्या सुचना केल्या त्या सर्वांची, संस्था फार आभारी आहे. ज्या गृहस्थांना कोणत्याही कारणामुळें फार्म भरून पाठविण्यास सवड झाली नाहीं त्यांनीं ते लौकर पाठविण्याची मेहरबानी करावी अशी पुन्हां विनंति करितों.

भागिदारांचीं नावें.	भागांचीं रकम
श्री. रामचंद्र सु. हळदीपुरकर; कारवार	२५ रु.
,, प्रो. शिवराम म. परांजपे एम. ए; पुणें	२० ,,
,, अनंत वा. नाईक सराफ; शहापूर	२० ,,
,, विष्णु शे गायतोंडे; म्हापशें	२० ,,
,, रामदास सा. केणी रेमोल; कुंकळ्ळी	१५ ,,
,, लक्ष्मण रा. पांगारकर बी. ए.; पुणें	१० ,,
,, कृष्णराय स. मडुरेकर; पुणें	१० ,,
,, पांडुरंग स. शिरवैकर; केपें	१० ,,
,, एस व्ही. देसाई; हास्पाल	१० ,,
,, विठ्ठल पु. नाईक पानवेलकर; पणजी	१० ,,
,, श्रीपाद हरि केंकरे; मुंबई	१० ,,
,, पंढरीनाथ व्यं. कामत तिसले; सांशेल	१० ,,
,, कृष्णराव गो. वाळे; सादोळशें	१० ,,
" विष्णु रंगाजी शेलडेकर; असोलडें	१० ,,
,, रामचंद्र कृ. कामत; कुळें	१० ,,
	२०० रु.

आ.

व्य. उ. ग्रं. प्र. मं.

आश्रयदात्यांस विनंति

ज्या उदारांतःकरणाच्या आश्रयदात्यांनीं 'भारता'चा प्रेमपूर्वक स्वीकार करून आम्हांस आभारांत ठेविलें त्यांनीं कृपा करून चालू सालची अगाऊ वर्गणी टपालानें पाठविल्यास आम्हांवर फार फार उपकार होणार आहेत. एकंदर आश्रयदात्यांची वर्गणी चालू महिन्याच्या अखेरपर्यंत हातीं आल्यास दर आठवड्यास 'भारत' दोनदां आपल्या वाचकांस भेट देईल.

ANO V.—NUMERO 8 —1920

QUEPEM, QUINTA-FEIRA 13 DE MAIO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA.............. 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत

BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)........ ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत।

वर्ष ५ वें. केपें-गुरुवार, तारीख १३ माहे मे सन १९२० अंक ८ वा.

NOVAS CONQUISTAS

A afirmação, constantemente repetida, de que o nosso Paiz é essencialmente agricola, se estriba na existencia de muitos terrenos ferteis nas Novas Conquistas.

¿ Que tem feito, porêm, o governo, atè hoje, para, tirando o partido da fertilidade dos mesmos terrenos, valorisar a sua riqueza natural ?

Verdade é que para tal fim legislaram-se, em diferentes ocasiões, varios alvitres que, todavia, por terem, apenas, ficado no papel, a resolução do problema do fomento das N. Conquistas, continua a permanecer, tambem, no *statu quo ante*.

E, assim, se, dum lado, se mantem ai *virgens* estensos campos cultivaveis, doutro, os poucos que são cultivados, seguem, inda hoje, na sua cultura, processos rotineiros do tempo dos nossos avoengos !

E' condenavel êsse despreso a que são votadas as N. Conquistas em que reside, aliás, quando, devidamente aproveita das, a táboa de salvação do nosso combalido estado financeiro.

Mas o seu fomento demanda muito denheiro e na crise que estamos a atravessar, sente-se imenso a f a l t a dele. ¿ Nestas c o n d i ç õ e s é lá possivel promover o mesmo tão almejado fomento ? -Objectar-nos-hão.

Esta objecção, porem, não resiste ao mais ligeiro raciocinio, quando se lance uma vista pela maravilhosa empresa de milhoramentos de Mormugão e pelos decretos que criaram a aristocratica Auditoria e aumentaram vencimentos de funcionarios, a começar dos do Governador Geral !

¿ Só para essas coisas é que não mingúa dinheiro e para o fomento solicitado è que ele falta ?

¿ Isto não indica que o desejo do progresso das N. Conquistas, manifestado no papel... oficial pelos dirigentes foi, simplismente, *para inglez vêr* ?

Como quere que seja, já que não têm tempo nem dinheiro para as levantar do marasmo em que vegetam, dignem-se, por Deus, pelo menos, de consolidar ali a segurança de propriedade que não existe e desfazer o paludismo que por ai abunda, para que os raros proprietarios que naquelas paragens possuem predios, possam, libertos de vez, das garras aduncas do vandalismo e chicana e da perniciosa influencia de febres palustres, assenhoriar-se de suas rendas.

Urge, porisso, que os nossos dirigentes, enquanto não providenciem, duma forma positiva e concreta sobre o fomento das N. Conquistas, tratem, quanto antes, de atender-nos, em relação ao que acabamos de expor sobre a segurança de propriedade e paludismo, dois inimigos terriveis que, aproveitando da *vista grossa* do governo, estão, com uma fôrça assustadora, assolando os habitantes das terras em objecto.

Praxes contra lei expressa

A milhor fôrma de executar-se uma lei depende da sua aplicação nitida, concludente, decisiva, sem tibiezas que não admite o fiel da balança da justiça.

Há disposições vigentes cuja hermeneutica obedece a uma corrente de opiniões dos tribunais, da imprensa juridica e, alfim, dos jurisconsultos consagrados, ou dos profissionais experimentados. Há outras cujo preceito é de uma clareza indiscutivel e, portanto, a sua aplicação se impõe sem ambages sem duvidas, sem restrições. Hà tambem algumas cuja eficacia caducou, ou por estarem modificadas por leis ou regulamentos posteriores, ou abrogadas tácita ou expressamente; porque as leis têm que acompanhar a evolução social que firma o progredimento das nações.

Ora agora entremos no assunto que, á-pezar-de estar bastante debatido no fòro, ainda continua a ser decidido pelos tribunais destè distrito.

Aludimos á multa que se impõe ao vogal de conselho de familia, que, intimado devidamente, houver deixado de comparecer á reunião no dia e hora designados, por fôrça do disposto no art. 214. do Co. Civil, imposição que ainda mais se agrava, quando se mande reverter o produto dela a favor dalgum Albergue.

Faz longo tempo que na imprensa juridica desenvolvidamente tratamos do mesmo assunto, concluindo tanto pela ineficacia de tal multa, como pela sua improcedência, aduzindo o texto legal e os arestos e jurisconsultos que entendiam em ultima analise, estar revogado aquele preceito do Cod. Civil, depois da promulgação do Cod. Penal de 1886; que nos seus arts. 188. e 189. aborda o caso da *falta de comparência*, considerando--a crime de desobediência (Vide "Fòro Indiano", 1.° an., e o nosso folheto " A Evolução na Jurispr. Portug ", 1910)

Este nosso humilde artigo mereceu ser transcrito pela "Gazeta da Relação de Lisboa" na sua secção doutrinal, emitindo a este respeito a sua seguinte douta opinião:

"O nosso ilustre colaborador, snr. Dr. Soares Rebêlo........ discutiu com muita proficiência se o art. 214. do Cod. Civil foi revogado pelo art. 189. do Cod. Penal e conclue por afirmar que efetivamente aquele artigo da lei civil não tem hoje aplicação. Tambem assim o entendemos e na prática geral dos nossos tribunais é a doutrina corrente......" (24 ° an., pg. 598.)

O distinto publicista Dr. Luiz Ozorio, na sua valiosa obra intitulada "Notas ao Cod. Pen. Português" cita á pagina 379 a nossa modesta opinião adoptada pela referida "Gaz. da Relação".

Porêm estamos vendo que entre nós, ainda subsiste a praxe de se multar o vogal que não justificou a sua omissão ou o seu impedimento.

Pois valeria bem a pena que se uniformisasse este ponto de jurisprudencia, cortando cerce, de vêz, esses rebentos.. ... de dúvidas !

Soares Rebêlo

ECOS & CRITICA

Vandalismo

O sr. administrador do concelho, dr. Antão adoptou sobre o assunto que, ao de leve, ventilamos na edição passada do nosso jornal com a mesma epigrafe desta local, medidas energicas, proibindo, expressamente, aos botiqueiros e taverneiros, transacções de objectos furtados.

O sr. dr. Antão torna-se merecedor de maiores encomios, não só pela sua energica atitude, revelada na coibição do detestavel vandalismo, mas tambem pelo seu sincero empenho que está desenvolvendo na solução imediata de varios problemas de palpitante interesse do concelho que administra.

Muito bem !

Um grave mal

E' o que está enfermando a segurança de propriedade na aldeia Quepêm, não muito distante da sède do concelho.

भारत

गुरुवार वैशाख कृ० १० मी. १८४२.

राष्ट्रीय मोक्षप्राप्तीचा सोपानमार्ग

कोणत्याहि राष्ट्रास सुधारणेचा वैभव शिखर गांठावयाचा असेल तर त्यानें स्वदेशभिमानाचा सोपानमार्ग मोठ्या धिमेपणानें व उत्कट निःस्वार्थ बुद्धीनें आक्रमिण्यास पुढें सरसावलें पाहिजे. सुधारणेच्या मोक्षाप्रत पोंचविणारी ही शिडी जितकी मजबूत असेल तितक्या लवकर अर्थात आपलें इष्ट ध्येय जें—सुधारणेचा वैभव शिखर—तें साध्य करून घेण्यास कोणत्याहि देशास फार सुलभ होतें, हें निर्विवाद होय. स्वदेशाभिमानाचा मजबूतपणा व सुधारणेचा मोक्ष प्राप्त होण्यास लागणारा कालावधि या दोन्हीं गोष्टींत, गणीतशास्त्राच्या भाषेंत बोलावयाचें झाल्यास, परस्परांत व्यस्तप्रमाणाचें नातें आहे, असें ह्मटलें पाहिजे. ह्मणजे जितकी स्वदेशाभिमानाची शिडी मजबूत असेल तितक्या थोड्या काळांत सुधारणेचा मोक्ष गांठतां येतो. मात्र ही मोक्षदायक शिडी चढूं इच्छिणाऱ्या राष्ट्र मुमुक्षूंत धैर्य व निःस्वार्थीपणा हे दोन आवश्यक गुण प्रामुख्यानें परिपूर्णतेला पोंचलेले असले पाहिजेत.

आमच्या उपरिनिर्दिष्ट सिद्धांताचें त्रिकालाबाधित्व पटविण्यास विशेष चर्चेची आवश्यकता नाहीं. प्राचीन किंवा अर्वाचीन कालांतील सुधारणेचा मोक्ष गांठलेल्या कोणत्याहि देशाच्या इतिहासाचीं थोडींशीं पत्रें चाळिलीं कीं, राष्ट्रीय मोक्षाच्या प्राप्तीची गुरुकिल्ली वर नमूद केलेल्या साधनसमुच्चयांतच आहे, याची प्रचीति पूर्ण रीतीनें मनांत बिंबते.

हे सांगण्यास अगदीं सोपे पण आचरण्यास फार कठिण असे विचार लेखणींतून उतरण्याचें कारण ह्मटलें ह्मणजे सुधारणेचा मोक्ष साधण्याप्रीत्यर्थ ह्मणून आमच्या दांभिक राष्ट्र चालकांकडून करण्यांत येत असलेला 'सव गोलंकार' हें होय. या अधोगतीस ओढणाऱ्या 'सवगोलंकारा'च्या विषारी कीटकांची वर्धनशक्ति इतक्या थराला पोंचली आहे कीं, तिनें आमच्या नोकरशाहीला तिचा देशाभिमान शोषून, धैर्य गिळंकृत करून व निःस्वार्थ बुद्धि अपहारून, अगदीं निकामी, कर्तव्यशून्य, भ्याड व पोटभरू बनविली आहे !

अशी स्थिति नसती तर राष्ट्राच्या तिजोरीची घालमेलीची अवस्था अवलोकूनहि आपल्या वेतनाची वाढ होण्यासाठीं आमची अविचारी नोकरशाही 'सत्याग्रहा'चा दुराग्रह घेऊन खास बसली नसती ! उज्ज्वल देशाभिमानाभावामुळेंच आम्ही राष्ट्रीय अवनतीच्या घाणेरड्या डबक्यांत कुचंबत असून आत्मघाताचा पंथ आक्रमित आहोंत ! धैर्याभावामुळेंच आमचा प्रिय देश सुधारणेचा किल्ला अतुल पराक्रमानें सर करण्यास निधड्या छातीनें उभा ठाकण्याचें सोडून देऊन भ्याड शिपायाप्रमाणें मागें मागें रेंगाळतच आहे ! निःस्वार्थीपणा ही चीज कशाशीं खातात याची सपशेल विस्मृति झाल्यामुळेंच आमच्या राष्ट्रचालकांची स्वताच्या अगडबंब पोटापलीकडच्या आपल्या देशाच्या निकृष्टावस्थेकडे रुपेरी दृष्टीशिवाय दुसरी नजर जात नाहीं !

या राष्ट्रीय 'सवगोलंकारा'च्या महारोगावर वेळींच योग्य उपचारांची योजना न झाल्यास राष्ट्राची अधोगति ठरलेलीच असून अवनतीच्या दुर्धर नरकांत आमचा प्रिय देश समूळ गाडला गेला जाईल, हें निःसंशय आहे. आमचें राष्ट्र अवनतीला पोंचूं नये, त्याला सुधारणेचा मोक्ष प्राप्त व्हावा असें ज्यांस खरोखरच वाटत आहे त्या सर्वांनीं अर्थात आमच्या राष्ट्रपुरुषांत स्वदेशाभिमानाची शिडी मजबूत होण्याप्रीत्यर्थ आटोकाट प्रयत्न करण्याचें सामर्थ्य निर्मून, धैर्य व निःस्वार्थीपणा हे प्रमुख गुण त्यांत पूर्णांशानें जागृत होतील, एतदर्थ अविश्रांत झटलें पाहिजे. ही नवीन व तेजस्वी परिस्थिति तयार होतांच, तिजोरीस तूट पाडणारी स्वार्थी लूट, पगार वाढविण्यासाठीं प्रत्यहीं भरत असलेला नोकरशाहीचा कोलाहलयुक्त बाजार व भ्याडपणामुळें सर्वत्र दृष्टोत्पत्तीस येत असलेली निंद्य व देशहितविघातक दुर्गुणांची वाढ, इत्याद्यनेक गोष्टींचा निर्वंश होऊन, आमचा प्रियतम देश थोड्या काळांत सुधारणेच्या वैभव शिखरावर विराजमान होऊन आपल्या कीर्ति सूर्यानें सर्व जग प्रकाशमान करणार आहे, असें आनंददायक भविष्य वर्तविल्यास आह्मांस कोणी 'वेडेपिरांच्या' मालिकेंत खेंचील असें वाटत नाहीं.

वाय तें संपादनही सुलभ, सुबोध व सुसाध्य होऊन लवकर होतें; तें संपादण्यास फार प्रयास पडत नाहीं. स्वभाषेंतील ज्ञान ग्रहण करून झाल्यावर मग जें स्वभाषेंत नाहीं व जें परभाषेंत विशेष आहे, तें मिळविण्यास प्रवेश करण्यांत आला पाहिजे. व तोही स्वभाषेच्या द्वारें. ह्मणजे परभाषेंतील ज्ञानग्रहण करण्यास सोंपें पडतें. नपेक्षां फार कठिण जातें. शिवाय कठिण होऊनही ज्ञानलाभ पुरा व चांगला होत नाहीं. याचा अनुभव स्वभाषेविना परभाषा (पोर्तुगीज) शिकणाऱ्यांस येइलच.

आमचें पोर्तुगीज सरकार आह्मास जें शिक्षण देतें, तें आपल्या भाषेंतून देतें. आमच्या खुद्द मूळ [जन्म] भाषेंतून (मराठींतून) देत नाहीं. पोर्तुगीज भाषा ही कांहीं आमची जन्म भाषा नव्हे; ती पोर्तुगीज लोकांची जन्म भाषा अर्थात ती आमची माय भाषा नसल्यानें त्या भाषेचें आह्मांस जन्मतः ज्ञान नसतें. तेव्हां ज्या भाषेचें जन्मतः ज्ञान नाहीं, त्या भाषेंतून शिक्षण दिलेलें कितपत सुलभ व सुसाध्य होईल ?

एस्. एच्.

विनंति

मे महिना सुरू होऊन १३ दिवस झाले. तरी आश्रय दात्यांनीं कृपा करून भारताची चालू वर्षाची वर्गणी आगाऊ पाठवून तो द्वी-साप्ताहिक करून घेण्याचें श्रेय संपादावें.

संपादक

स्फुट विचार.

कोणी सांगावें ? :— केरी, पेडणें येथील 'एक अनुभविक' भारताभिमान्याचें आह्मांस एक पत्र आलें आहे. त्यांत ते ह्मणतातः— "आज कित्येक वर्षेंपर्यंत पेडणें महालांतील केरी, पालयें वगैरे सरहद्दीवरील गावांतील लोक अन्नसामुग्री वगैरे सर्व माल ब्रिटिश अमलांतून आणीत आले आहेत; परंतु ह्या दोन वर्षांत आरांवद्याहून तांदूळ वगैरे जिन्नस सोडण्याची वाडी सरकारनें मनाई केल्यामुळें व कांहीं दिवस पोर्तुगीज सरकारनेंहि तांदूळ सरकारी अंमलदारांच्या मार्फत विकल्यानें इकडील गोरगरिबांची फारच दैना झाली. आज नाहीं उद्यां ही वाडीसरकारची बंदी उठेल ह्या आशेनें हीं दोन वर्षें कशीं बशीं कंठिलीं, व दोन महिन्यामागें ही बंदीहि एकदांची उठली. त्या बरोबर गोरगरिबांस फारच आनंद झाल्यास त्यांत नवल तें काय ? या आनंदाच्या भरांत व आतां तरी आपले हाल कांहीं अंशीं कमी होतील ह्या आशेनें बरेच लोक आरांवद्यास तांदूळ आणण्यास गेले. पण पोर्तुगीज सरकारनें ह्या सरहद्दीवरून आपल्या असलांत तांदूळ आणण्याची बंदी करून या दुधांत मीठ कालवण्याचें श्रेय घेतलें आहे, हें ह्या बिचाऱ्यांस काय ठाऊक ! ह्या बंदीमुळें त्या सर्वांना खीन्न चित्तानें परत घरीं यावें लागलें. अशा रीतीनें 'देव देतो व देवचार नाडतो' यांतलाच हा प्रकार झाला ! चौकशी अंतीं असें समजतें कीं, आमच्या सरकाराजवळ कांहीं तांदुळांचे गोण शिल्लक असून ते खपण्याकरितां ही युक्ति योजिली आहे. सरकारी तांदुळांचा दर गोणास १६। रुपये आहे व तो गोण पणजीहून इकडे आणल्यास जवळ जवळ १९ रुपयांस पडेल, व आरांवद्याहून तोच गोण इकडे आणल्यास जकात मजूरी वगैरे सह १७ रुपयांस पडेल. अर्थात १७ रुपयां ऐवजीं १९ रुपये खर्च करण्याचें शहाणपण कोण करील ? आमच्या सरकाराजवळ निदान चार महिन्याला पुरेल इतका तांदूळ आहे कीं काय याचीहि शंकाच आहे. आज सुदैवानें वाडीसरकारनें बंदी उठविली आहे ती जर पुन्हा सुरू होईल तर मग गोरगरिबांच्या हालांस पारावार रहाणार नाहीं ! आज वाडीसरकारनें बंदी उठविली तर आमच्या सरकारनें ती सुरू केली व आमच्या सरकारनें उठविल्यावर वाडीसरकार ती सुरू करील अशा या मांजराच्या खेळांत बिच्याऱ्या उंदराचा—प्रजेचा जीव जातो व जाईल याची वाट काय ? तरी ही बंदी लवकर उठवून सरकार सदरहू त्रासांतून प्रजेची सुटका करील काय ?" —या शेंवटच्या प्रश्नास कोणी सांगावें ? या उलट प्रश्नाशिवाय आमचें दुसरें उत्तर नाहीं. तांदुळांच्या बाबतींत स्वीकारलेल्या अनुदार धोरणाबद्दल आम्ही पुन्हां पुन्हां सरकारची कानउघाडणी केली असतांहि, आमचें बहिरें सरकार आपल्या वरदपुत्राच्या प्रेमवात्सल्यानें अगदीं अंध बनलें असल्यावरून, त्याला प्रजेची दीन स्थिति दिसत नाहीं व तिचे आर्तस्वर त्याला ऐकूं येत नाहींत ! अशा स्थितींत उपरोक्त उत्तरा शिवाय 'अनुभविकां'च्या प्रश्नास आह्मांस दुसरें उत्तर सुचूं नये, यांत आश्चर्य नाहीं.

—येथील न्यायखात्याच्या अमलबजावणीसंबंधानें महत्वाच्या सुधारणा होणार आहेत.

वर्तमानसार

—सांप्रतच्या उत्पन्नानुरूप जमिनीचा सारा वाढविण्याबद्दल येथील गव्हर्नरसाहेबांस वरिष्ट सरकारचा हुकूम यावयाचा आहे, असें पोर्तुगालच्या एका वृतपत्रावरून समजतें.

—चालू माहेच्या ५ तारखेच्या सरकारी ग्याझेटच्या जादा अंकावर बांदिवडें-गोवा येथील श्रीमहालक्ष्मी देवालयाची नियमबंदी प्रसिद्ध झाली असून सदरहू देवालयाच्या महाजनांची नांवनिशीहि त्यांत प्रकाशीत झाली आहे.

—आह्मांस प्रतिभेट देऊं लागलेलीं मासिकें व वर्तमानपत्रें तसेंच अभिप्रायार्थ आलेलीं पुस्तकें यांची पोंच व अभिप्राय पुढील अंकापासून देण्यास प्रारंभ होईल.

—गव्हर्नरसाहेबांचीस्वारी ह्या पशीं पेडणें वगैरे ठिकाणीं दौरा करून आल्याचें समजतें.

—प्राथमिक व दुय्यम प्रतीच्या पोर्तुगीज शिक्षणांत योग्य फेरफार करण्याच्या हेतूनें सरकारकडून एक प्रश्नमालिका ठिकठिकाणचे मामलेदार व मुनिसिपालटीचे अध्यक्ष यांस पाठविण्यांत आली आहे.

—पुणें येथील आग्रिकल्चर कालेजांत शेतकीचें शिक्षण घेण्यासाठीं सरकारकडून पाठविण्यांत येणाऱ्या तिघां विद्यार्थ्यांच्या निवडीकरितां परीक्षा घेण्यांत येणार असून खर्चाप्रीत्यर्थ दरमहिन्याला प्रत्येक विद्यार्थ्यास प्रवास व रहाणीच्या खर्चाखेरीज ५० रुपये देण्यांत येणार आहेत.

—गेल्या अंकांतील अनावरणविधीच्या बातमींत खि. डॉ. जुझे इग्नास दे लोयोल यांच्या नावांच्याऐवजीं डॉ. मिंगेल दे लोयोल फुर्तांद यांचें नांव चुकीनें लिहिलें गेलें.

—माकाव येथील पोलीस खात्यांत काम करण्यांत "मराठा" जातींतील तरुणांची गरज असून, त्यांस दर महिन्यास ४०–४७ पताक ह्मणजे सरासरी ८०–८४ रुपये पगार देण्यांत येईल असें सरकारी रीतीनें जाहीर करण्यांत आलें आहे. उमेदवार तरुणांचें वय १८ वर्षांवर व ३५ च्या आंत असून, त्यांनी सशक्तता, सद्वर्तन, वगैरेचे दाखले दाखविले पाहिजेत. गरजूंनीं फायदा घ्यावा.

—डॉ. शिवराम बळवंत राव यांची नेमणूक येथील देलेगादाच्या जागेवर झाल्याचें एका खासगी पत्रावरून समजतें. ठीक झालें.

—रा. शिवराम गो. साळगांवकर हे 'लेख-संग्रह-माला' प्रसिद्ध करणार असून ती रायबंदर येथील श्रीशारदा वाचन मंदिरांतील वाचकांस नजर करणार आहेत, असें मालेच्या उद्देशपत्रिकेवरून समजतें.

—चिखली-वार्देस येथील कांहीं हिंदूनीं ह्मापशें येथें एक नाटक प्रयोग करून त्याचें उत्पन्न सर भांडारकर विद्यालय या संस्थेस दिलें. अभिनंदनीय.

मालावृत्त

(मागील अंकावरून पुढें चालू)

भागिदारांचीं नांवें		भागांची रक्कम
	मागील पोंच	२०० रु.
श्री. विष्णु श्री. रायतुरकर;	मडगांव	२५ रु.
,, शंभु आ. पै पाणदीकर	,,	२५ ,,
,, रामचंद्र विष्णु केणी;	,,	२५ ,,
,, गुरुदास पुंडलीक कारे;	,,	२५ ,,
,, शंभु कृ. शेट ह्मापशेंकर	,,	१५ ,,

ANO V.—NUMERO 9 — 1920 QUEPEM, QUINTA-FEIRA 20 DE MAIO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA.............. 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास.......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणें. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें-गुरुवार, तारीख २० माहे मे सन १९२०. अंक ९ वा.

PEDIDO URGENTE

Uma das causas que desvalorisam a propriedade nas Novas Conquistas é a carencia de sua segurança.

E' a falta da segurança de propriedade que aí se lamenta, que ninguem se atreve a aceita-la para garantia hipotecaria ou que esta se decuplica, quando, depois de mil hesitações e outras tantas tergiversações, a aceite, por favor.

A Santa Casa de Misericordia, o Sagrado Hospicio de Margão, o Nacional Banco Ultramarino de Nova-Gôa com suas agencias de Mormugão e Mapuçá e outras instituições analogas não emprestam dinheiro nem abrem creditos sobre predios situados nas Novas Conquistas, só porque lhes falece a segurança.

¿ Porque é que o Estado não há de esforçar-se por cortar cêrce êsse mal que enferma a propriedade naquelas terras ?

¿ Por ventura, a propriedade por estar situada nas Novas Conquistas está sujeita a pagar ao Estado menos impostos do que a das Velhas Conquistas ?

Se não ¿ não impende ao Governo o indeclinavel dever de coloca-la á altura da destas ultimas, no que toca á sua segurança ?

No regime de Igualdade em que felizmente estamos, a desigualdade com que se tratam os predios das Novas Conquistas, tende a empanar o brilho da Republica.

Os dirigentes que pensem nisto a serio e levantem-nos, sem mais perda de tempo, do lodaçal da falta de segurança em que jazem sem dó nem piedade.

E', de resto, escusado repetir que as Novas Conquistas saberão condignamente agradecer os *favores*(?) que lhes forem feitos.

O estabelecimento do dominio da segurança de propriedade, eis o que nós pedimos, ao Governo, ainda uma vez, ao terminar este breve artigo.

ECOS & CRITICA

A ULTIMA HORA

Esta processado o *BHARAT* por causa do seu artigo *TAXA DE GUERRA*, publicado no no. 7 da corrente serie !

Sir Chandavarker

Este eminente homem, uma das estrelas da primeira grandesa a fulgurar, com seu resplandecente brilho, no céu scientifico, social e politico da India Britanica esteve, semana passada, em Margão, de caminho para Karvar a cuja conferencia politica fora assistir como presidente, no dia 15 do corrente.

O *Sarasvat-Braman-Samaj* de Margão, aproveitando da momentánea estada de sua exa. ali, promoveu no vasto salão da instituição uma conferencia do ex-presidente do Congresso Nacional Indiano, Juiz aposentado da Relação de Bombaim e *ex-premier* do Estado Nativo de Indore, conferencia que, segundo nos informam, versou sobre diferentes assuntos politicos, sociais, morais e religiosos, confirmando em tudo e por tudo a gloriosa fama que o sr. Sir Naraen Chandavarker disfruta aqui e sobretudo nos hindus *sarasvatas* de cuja classe è oriundo.

Não podemos terminar esta local, sem consignar um elogio ao *Sarasvata Samaj* que com o seu acrisolado patriotismo e verdadeiros sacrificios que o dignificam, proporcionou ao publico a dita de ouvir o eloquente discurso do general vulto que è o sr. Sir Chandavarker.

Taxa de guerra

Era êste o titulo do nosso artigo de fundo da edição de 6 do corrente; mas os srs. tipografos, na pressa com que quizeram dar por terminado o seu trabalho fizeram de *de da*.

E assim, em vez de *Taxa de guerra*, saiu *Taxa da guerra*

Mas como são bons amigos da empresa do *Bharat* e sobretudo da sua pontualidade, esperamos, que o publico disculpar-lhes-há tal falta, bem como outras, presentes e futuras, de igual jaez—E...tambem a nós.

Alerta !

Na festa de Parodá aparecе ram uns *patanas*, semelhantes àqueles que em tempo se celebrisaram nos roubos, perpetrados nos templos hindús de Queula e Manguexa, com uns jogos de intrujar a humanidade jogadora.

São de precedentes funestos os mesmos *patanas* sobre os quais é preciso que as autoridades administrativas tenham vista fina, para que os mariolas não vão explorar a incauta gente, quere nas festas quere nos *Zatrás* com o seu atrativo jogo.. de azar.

Alerta, pois.

Em Canacona

'De caminho para Karwar, o sr. Chandavarker esteve tambem uns momentos em Canacona, cujos ilustres habitantes lhe dedicaram um esplendido *Tea party*, em que tomaram parte, além do sr. Auditor Fiscal que aí se encontrava e funcionalismo em peso, numeroso povo.

Alem dos srs. Chandavarker e Auditor que proferiram discursos eloquentissimos e cheios do saber, falaram, tambem, os srs. Datatria Sinai Gaitondó, vice-presidente em exercicio da Camara Municipal de Canacona, prof. Visvonata Siurama Sirvoicar, regente da escola primaria de Cundaim e pregador religioso Esvonta Bendo

Concluida a cerimonia que se revestiu do desusado brilho, o sr. Naraenraó, acompanhado do seu sequito, seguiu par Karvar pelo seu automovel.

Honra seja aos dignos promotores do *Tea party*.

Processo crime

E' com grande jùbilo que noticiamos aos leitores do *Bharat* que nos proporcionou um processo crime ás costas o nosso *perigoso* (!) artigo *Taxa de guerra*, publicado na edição de 6 de maio da corrente serie.

Não tendo tempo para mais comentario limitamo-nos por oje a registar essa noticia, afirmando, contudo, duma vez para sempre, que continuaremos a trabalhar pelo Paiz com o mesmo desassombro revelado atè aqui, que nunca nos intimidaram processos crimes na sacrossanta defesa dos interesses pùblicos.

E, depois, para nós, o processo crime è um valioso estimulo para o desempenho da missão que nos adoptamos.

Não pode ser

De há muito para cá, o *Vidia prassar* de Pondá vem fulminando, com dados concretos e provas irrefutáveis, o analfabetismo, o alcoolismo e o jogo de azar. O mesmo jornal denunciou ao publico a percentagem de nossos analfabetos, numerou-lhe as tavernas que se encontram disseminadas em algumas das aldeias do seu concelho e desenrolou-lhe diante dos olhos a tètrica fita da devassidão que o jogo de azar continua semeando em diversas camadas sociais da India Portuguesa.

¿ Que è que se conseguiu com toda essa ininterrupta campanha em que o mesmo jornal despende a sua milhor seiva ?

Nada, pela palavra, nada.

Não pode ser

Todo o patriota que almeje do fundo da alma o ressurgimento desta nossa desgraçada

नाहीं. ते अजूनपावेतों हिंदूच आहेत. त्यांची भाषा व धर्म हिंदूच आहे. त्यांनीं त्या लोकांप्रमाणें जन्मापासून पोर्तुगीज भाषेचा आश्रय धरलेला नाहीं. ह्मणून अजून पर्यंत त्यांना मराठीचीच अत्यावश्यकता आहे. येथील ख्रिस्ती लोकांची पोर्तुगीज भाषा ही जन्म भाषा झाल्यानें व त्यांना मराठी किंवा मराठींतून शिक्षणाची आवश्यकता नसल्यानें, पोर्तुगीज शिक्षणाचीच त्यांना—मराठी—पेक्षां अधिक आवश्यकता वाटत आहे व हीच त्यांना अधिक सुलभ व सुसाध्य होते. आणि ह्मणूनच त्यांनीं मराठी भाषेची कांस सोडून तिचा अभिमान सोडून, तिजविषयीं काळजी घेत नाहींत पण हिंदुलोकांची गोष्ट तशी नाहीं. त्यांची पोर्तुगीज ही जन्मभाषा झालेली नाहीं. त्यांची मराठीच [किंवा मराठीशीं जवळ जवळ साद्दश्य असलेली कोंकणीं ह्मणा] ही अजून पर्यंत जन्मभाषा असल्यानें, पोर्तुगीज भाषेंतून शिक्षणाची त्यांना विशेष आवश्यकता नसून मराठी शिक्षणाचीच त्यांना अधिक जरूरी आहे. व मराठींतूनच त्यांचें शिक्षण अधिक सुलभ व सुसाध्य होणारें आहे. ह्मणूनच मराठीविषयीं त्यांची एवढी ह्याकाटी आहे.

या वरून पोर्तुगीज भाषाशिक्षण नको, असें आम्ही ह्मणतों, असें कोणी समजूं नये. आह्मांस पोर्तुगीज भाषाशिक्षणाची तर आवश्यकता आहेच. जोंपर्यंत आमच्यावर पोर्तुगीज सरकारचा अंमल आहे, व राज्यकार्यें पोर्तुगीज भाषेंत चालतात, तों पर्यंत तिचें आह्मांस पूर्ण ज्ञान होणें अगत्याचें आहे. हें कोणाच्यानेंही कबूल केल्याविना रहावणार नाहीं. पण आंह्मांस जें पोर्तुगीज भाषाशिक्षण पाहिजे आहे, तें केवळ राजकीय व्यवहाराची माहिती होण्याइतक्या भाषाज्ञानापूर्ते पाहिजे आहे; व तें ही मिळतांना मराठीच्या द्वारें मिळालें पाहिजे. ह्मणजे तिचा चांगला समज पडेल. आह्मांस जें विद्या येण्याकरितां मुख्य शिक्षण पाहिजे, तें आह्मांस मराठींतच मिळालें पाहिजे, ह्मणजे राजकीय कामांच्या ज्ञानाकरितां जसें आह्मांस पोर्तुगीज भाषाशिक्षण पाहिजे, त्याप्रमाणेंच विद्या पारंगत होण्यास व खासगी व्यवहारासाठीं आह्मांस मराठी भाषेंतून शिक्षणाची आवश्यकता आहे. एस्. एच्.

मालावृत्त

(मागील अंकावरून पुढें चालू)

भागिदारांचीं नांवें — भागांची रक्कम

मागिल पोंच ३१५ रु.

सिं. सिपीयांव वा. फेर्नांदीस; चांदर. १० रु.

श्री. त्रिविक्रम वि. पैं वैद्य; कुंकळ्ळी. १० रु.

कु. मुक्तावाई कृष्ण ज. थळी; मुंबई. ५ रु.

श्री. रामचंद्र वि. कुलकर्णी; तासगांव. ५ रु.

,, दत्तात्रय गो. सडेकर; खानापूर. ५ रु.

,, गणेश स. शिरोडकर; पणजी. ५ रु.

" पुरुषोत्तम अनंत सालकर; ,, ५ रु.

,, अनंत वा. प्रभू मोये; ,, ५ रु.

वर्तमानसार

मुर्गांव, हार्बर येथें इंग्रजी हिंदुस्थानांतील प्रवासी लोकांच्या सोईसाठीं एक ब्रिटिश कस्टम ऑफिस स्थापण्यांत आलें आहे.

भारतावर खटला !

सातव्या अंकांतील पोर्तुगीज अग्रलेख राजद्रोही वाटल्यावरून आह्मावर खटला करण्यांत आला आहे! विशेष माहिती येत्या अंकीं.

भारत

गुरुवार जेष्ठ शु० २ या. १८४२.

एक इषारा

" हिंदुस्थाना सारख्या प्रचंड राष्ट्रास इंग्रजांनीं पारतंत्र्यांत जखडून टाकण्याचें मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे, प्रमुख राज्यकर्त्यांमध्यें वसत असलेले जातिभेद व मतविरोध, हें होय. एरवीं एकदम सगळें युरोप जरी हिंदुस्थानावर तुटून पडतें, तरी सुद्धां हें त्यास, वरील कारणाशिवाय, शक्य होतें ना. ज्या वेळीं, पाश्चात्य सुसंस्कृतीपुढें हिंदुस्थानाचा टिकाव न लागतां, तें हतबल होऊन इंग्रजांच्या हातीं पडलें, त्या वेळची जपानची स्थिति पाहूं गेल्यास, ती बव्हांशीं तशाच प्रकारची होती असें दृष्टोत्पत्तीस येईल; परंतु जेव्हां जातिभेदासारख्या क्षुद्र विचारांस थारा न मिळतां, दिव्यदृष्टीनें बडेलोक व इतर प्रजाजन हे आपापसांतील उच्च नीच भाव विसरून जाऊन एकमेकांत मिळून मिसळून वागावयास लागले, आणि थोराचीं व गरिबांचीं मुलें एकाच शाळेंत जाऊन एकच विद्यासंपादन करूं लागलीं, तेव्हांच जपानची प्रगति होऊन तें कसल्याहि पाश्चिमात्य सुसंस्काराचा स्वीकार करण्यास लायक व कोणत्याहि विकट परिस्थितीशीं तोंड देण्यास सामर्थ्यवान झालें. "

मार्कीस ओकुमा

शुद्ध वातावरणांतील हे प्रगल्भ विचार आमच्या हिंदुस्थानांतील सगळ्या राजेरजवाड्यांनीं, विद्वान राष्ट्रधुरीणांनीं, लोकमान्य देशभक्तांनीं, अतएव एकंदर सुसंस्कृत व्यक्तींनीं मनन करण्यासारखे आहेत. लोकांच्या पुढाऱ्यांचें कर्तव्य एकमेकांतील उखाळ्या पाखाळ्या काढून समाजांत बजबजपुरी माजविण्याचें नसून, आमची उन्नति कशी होईल, आमच्यांत स्वावलंबन कसें येईल व देशाभिमानाची प्रज्वलीत जोत कशी पेट घेईल याचीच लोकांत जागृति करणें हें होय. खुशाल चैन भोगून मनसोक्त आचरण करणें हें राजेरजवाड्यांस इष्ट नसून प्रजा सुशिक्षित कशी होईल, तीस आपल्या स्वदेशाकडे असलेल्या कर्तव्यकर्माची ओळख कशी पटेल व तें बजावण्याचें सामर्थ्य तींत कसें निपजेल, याच गोष्टीचा त्यांस निदिध्यास लागला पाहिजे. देशभक्तांनीं आपल्याच स्वदेशप्रेमाचा तोरा न मिरवितां इतरांतहि हा प्रेमा कसा उत्पन्न होईल व या कामीं कसल्या उपायांची योजना करणें प्रशस्त आहे, यद्विषयीं त्याचें लक्ष वेधलें पाहिजे. व अशा रीतीनें विचाराप्रमाणेंच आचारानेंहि या तत्वाची जाणीव लोकांस करून दिली ह्मणजे, ते लोकांकडून धन्यवाद मिळविण्यास पात्र होतात. चार बगलबच्चा भाटांकडून 'शाबास' ह्मणवून घेणें सोपें, परंतु अखिल समाजाकडून वाहवा होणें कठीण असतें. 'मी मोठा विद्वान, मी मोठा श्रीमंत, मला सर्वांनीं मान द्यावा, माझें ऐकावें, मला लोकांत मिसळून वागण्याचें काम नाहीं, दुसऱ्याची दयाई स्थिति पाहण्याची जरूरी नाहीं; किंबहुना देशसेवा मला माझ्या पोटापाण्यापेक्षां किंवा ऐषारामापेक्षां श्रेष्ठ नाहीं' अशी विचारसरणी असलेले सुशिक्षित, वरील मार्कीस ओकुमांच्या ह्मणण्याकडे लक्ष देऊन त्याप्रमाणें वागण्यास तयार होणार नाहींत, तोंपर्यंत आमची उन्नति, आमची सुसंस्कृति किंवा आमच्यांत स्वावलंबनाची आशा करणें व्यर्थ होय. व ती विचार सरणी नसलेले सुशिक्षित लोक देशांत हजारों जरी निपजले तरी ते "खायाकाळ व भुईला भार" याच विशेषणास खचीत पात्र होतील, असें मोठ्या खेदानें ह्मणावें लागतें. प्रत्येकानें शक्त्यनुसार स्वोन्नतीसाठीं त्याचप्रमाणें लोकसेवेसाठीं थोडा बहूत तरी प्रयत्न केला पाहिजे. जे लोक जाणून बुजून असल्या आपल्या पवित्र कर्तव्याकडे कानाडोळा करितात त्यांस स्वदेशद्रोहाचें महापातक निःसंशय भोंवून कधीं ना कधीं जगाच्या न्यायासनासमोर त्यांस आपल्या कर्तव्यपराङ्मुखतेबद्दलचा जाब द्यावा लागेल. क्षुद्रस्वार्थास बळी पडून जेथें लोकहिताच्या कामास अधिकारी माणसें कसूर करितात तेथें खऱ्या ज्ञानसूर्याच्या उगवण्यास बराच कालावधि आहे, असें भाकीत करण्यास जड जात नाहीं. निसर्गाच्या रहाटांत जो पुढें जाईल तोच मागच्यास जिंकून आपल्या पाठीमागें गरगर फिरण्यास खास लावील; या साठीं, उशिरां कां होईना, हा इषारा, आमच्या गोमांतकस्थ हिंदु सुशिक्षितांस करणें योग्य वाटल्यावरून देण्यांत येत आहे. त्याचा योग्य विचार होईल अशी आह्मांस सबळ आशा आहे.

स्फुट विचार

सर चंदावरकरांची स्वारी:—हिंदुस्थानांतील प्रसिद्ध पुरुष, राष्ट्रीय सभेचे माजी अध्यक्ष, मुंबई हायकोर्टाचे नामांकित रिटायर जज व इंदूर संस्थानचे माजी दिवाण सर नारयणराव चंदावरकर यांच्या भेटीचा अपूर्व लाभ गेल्या आठवड्यांत गोमांतकास झाला, हें आम्ही आमचें सुदैव मानितों. सर साहेबांस कारवार परिषदेस अध्यक्ष या नात्यानें हजर रहाण्यास जाण्याची घाई असल्यावरून गोव्यांत कांही दिवस त्यांचा मुक्काम होणें अर्थात अशक्य होतें. तरीपण मडगांवच्या उत्साही सारस्वतब्राह्मणसमाजाच्या देशभक्त चालकांनीं सरसाहेबांचा तेथील अवघ्या एक दिवसाच्या मुक्कामाचा फायदा घेऊन, त्यांच्या एका प्रवचनाचा दुर्मिळ योग मडगांवच्या जनतेस करून देण्याचें पुण्य संपादन केलें, हें अभिमानास्पद होय. आपल्या विचारपरिप्लुत भाषणांत साहेबमजकुरानीं धार्मिक, सामाजिक, राजकीय इत्याद्यनेक बहुविध विषयांचा मोठ्या गंभीर व मार्मिक रीतीनें खल केला. सर नारायणरावांचें गोमांतकांत ठिकठिकाणीं मोठ्या प्रेमानें स्वागत करण्यांत आलें.

काणकोणच्या सरस्वतीमंदिरांत:—मडगांवहून कारवारास जाण्यास निघाल्यानंतर सर नारायणरावांचा कांहीं तास काणकोणास मुक्काम झाला. या सुसंधीचा लाभ घेऊन तेथील समाजहितदक्ष मंडळीनें त्यांस तेथें नव्याच बांधलेल्या सरस्वतीमंदिरांत मोठ्या थाटानें टीपार्टी दिली. या सुमंगल प्रसंगीं हजर राहण्यास काणकोण महालांतील बराच मोठा जनसमूह जमला होता. त्यांत एकंदर सरकारी कामदारांचाहि समावेश होऊन खुद्द आवदितोरसाहेब—जे तेथील सरकारी तिजोरीची तपासणी करण्यास आले होते—त्यानींहि या टीपार्टी कार्यांत प्रामुख्यानें भाग घेतला होता. इतकेंच नव्हे, तर त्यानीं सदरहू प्रसंगीं आपल्या वक्तृत्व तेजानें पोर्तुगीज जाणणाऱ्या सर्व श्रोत्यांस अगदीं दिपवून टांकलें. सर व आवदीतोर या साहेबद्वयांशिवाय, श्रीयुत दत्तात्रयराव गायतोंडे, विश्वनाथराव शिरवैकर व ह. भ. प. यशवंतराव भेंडे यांचींहि सरस भाषणें झालीं. एकंदरींत टीपार्टीचा हा थाट फारच अपूर्व रीतीनें पार पडला. तेथील शिक्षणफंडास मदत ह्मणून सर साहेबानीं ५० रु. रक्कम अर्पण करून, ते आपल्या परिवारासह स्पेशल मोटारीनें कारवारास रवाना झाले.

आधीं हें वाचा !

'भारत' द्वी—साप्ताहिक करण्याच्या उद्देशानें 'मिनेर्व्ह' आणण्याची व्यवस्था केली असून या नवीन योजनेस लागणारें नवीन व भरपूर सामानहि मागविण्याचें आम्ही धाडस केलें आहे. हेतु हा कीं, 'भारत' द्वाराच लोकहित साधण्याच्या पुण्यकर्मांत आमच्या शेष राहिलेल्या आयुष्याचा विनियोग व्हावा. परंतु या हेतूस मूर्त स्वरूप येणें हें केवळ लोकाश्रयावर अवलंबून आहे. लोकदेवता प्रसन्न होऊन तीनें उदारांतःकरणानें आम्हीं अगदीं निःस्वार्थ व निरपेक्ष बुद्धीनें आरंभिलेल्या लोककार्यास प्रेमपूर्वक हातभार लाविल्यास मात्र, 'भारता'स द्वी —साप्ताहिक बनून आपलें पवित्रतम काम नेटानें चालविण्यास शक्य होणार आहे. ह्मणून आमच्या प्रिय आश्रयदात्यांस नम्रतापूर्वक विनंति करण्यांत येते कीं, त्यांनीं आम्ही मागें विनविल्याप्रमाणें आपापलीच वर्गणी आगाऊ पाठवून नव्हे तर नवीन वर्गणीदार मिळवून त्यांचीहि वर्गणी चालू मेअखेरपर्यंत आह्मांस पोंचती करण्याचें पुण्य पदरास बांधावें. केवळ आमच्या लोकसेवेच्या व्रतास द्रव्याभावामुळें खंड पडूं नये, या परोपकारी व देशहित विधायक दैवी प्रेरणेनें कोणीहि आह्मांस पैशाची मदत पुरविल्यास, तिचाहि साभारपूर्वक स्वीकार होऊन 'भारतफंडा'च्या रिपोर्टांत रकमेसह त्यांच्या नावांचा उल्लेख येईल. आतांपर्यंत आह्मांस 'भारता'च्या पुनरुज्जीवनाप्रीत्यर्थ सुमारें दीड पावणे दोन हजार रुपये खर्च आला असून अजमासें तितकाच खर्च नवीन योजना अमलांत येई तों लागणार आहे. परमेश्वरावर व भावी लोकाश्रयावर पूर्ण विश्वास ठेऊन 'ऋण' काढून हा लोकसेवेचा 'सण' साजरा करण्यांत येत आहे. या एकंदर स्थितीकडे उदार दृष्टीनें नजर पुरवून, आमचे स्वदेशहितचिंतक आश्रयदाते आमच्या उपरिनिर्दिष्ट विनंतीस मान देऊन आपली व आपण मिळवितील त्या नवीन वर्गणीदारांची आगाऊ वर्गणी चालू मेअखेरपर्यंत पोंचती करतील अशी सबळ आशा आहे.

ANNO V.—NUMERO 10 —1920 QUEPEM, QUINTA - FEIRA 27 DE MAIO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-02-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial

Endereço telegrafico—Bharat

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर
गोव्यांत (वार्षिक)........ ३-००-००
ब्रिटिश इंडिया........... ३-०८-००
किरकोळ अंकास.......... ०-०२-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें-गुरुवार, तारीख २७ माहे मे सन १९२० अंक १० वा.

TAXA DE GUERRA

Sem preocuparmo-nos com o processo crime que o digno, douto e zeleso agente do M.P. nesta comarca mandou instaurar contra nós por achar ofensivo da dignidade do Estado o nosso anterior artigo da epigrafe acima, continuaremos a insistir, ainda, em que cumpre ao Estado abolir a breve trecho a mesma incómoda taxa, sob pena de ser considerado *mau pagador e mau cumpridor da sua palavra*.

Ela é incomoda, ela é despotica. E' incomoda, porque está agravando a já bancarrotada situação económica do contribuinte, bancarrota determinada pela cada vez mais crescente carestia que, actualmente, domina o paiz inteiro. E' despotica, porque está vigorando, contra a expectativa geral, ainda depois de terminado o periodo de seis mezes para alem do qual não devia ir o seu *vigor* que porisso mesmo é sinitro.

Mas parece que o Estado, fascinado como está pelo resplandecente brilho argenteo da fabulosa receita da taxa de guerra está impossibilitado de ver a misera condição do esfarrapado zé-pagante bem como está inibido de ouvir os gritos lacinantes dêle, por ter, naturalmente, carregados da mùsica deliciosa e encantadora da sonancia ...da mesma receita os seus ouvidos...oficiais!

Doutra maneira não se explica o scilencio sepulcral do Estado sobre um assunto que está martirisando, cruelmente, o misero contribuinte!

A dispeito da atitude impassivel do governo, deante da taxa de guerra, nós, porem, não conservar-nos- hemos de braços crusados; pelo contrario, como acima fica dito, continuaremos a importunar o Estado com nossos constantes pedidos, paraque ao menos aborrecido, finalmente, extinga a mesma *incomoda e despotica taxa, de sinistro vigor*.

E deste nosso proposito firme e inabalavel nos demoverá coisa alguma, incluindo o processo crime que o digno, douto e zeloso agente do M. P. houve por bem requerer contra nós.

Sim; fique isto bem assente.

Um imquerito

Sr. Redactor

Como resposta ao inquerito aberto por V, no seu mui lido jornal sobre: 1.° Quais e quantas as linguas maternas dos nativos da India Portuguesa, 2.° Qual a maneira de conseguir a obrigatoriedade do ensino d'aquelas linguas; e 3.° Qual a forma de angariar o professorado para o referido ensino, tomo a liberdade de expender o meu disvalioso modo de pensar nas despretenciosas linhas que seguem.

Ao 1.° São duas as linguas maternas dos nativos da India Portuguesa:- 1.° Maratha em Gôa, e o Guzeratha em Damão e Diu.

Ao 2.° A maneira de conseguir económica e rapidamente a desejada obrigatoriedade è exigir a aprovação do ensino elementar destas linguas, aos estudantes que queiram matricular-se nas escolas primarias portuguezas, creando-se, para tanto, as escolas do puro maratha ou guzeratha em toda a India Portugueza.

Ao 3.° O professorado deve ser angariado da India Ingleza e que seja diplomado com o curso de „Training College" de Poona devendo os professores ser escolhidos dentre os que tenham especial vocação de fazer compenetrar os estudantes de variados assuntos nas linguas maratha e guzeratha, respectivamente, podendo também ser entregue o mesmo ensino só aos hindùs que tenham aprovação da cadeira do maratha do Liceu, porque os outros (cristãos ou moiros), unicamente com aquela aprovação, vêem-se mal preparados em ler e escrever correctamente e muito menos em compreender o maratha devidamente.

A proposito, Sr. Redactor, não posso deixar de referir-me ao facto de ter a classe hindù deste concelho entregue uma representação ao Sr. Dr. Couceiro da Costa, então governando este Estado, e, quando foi de visita a este concelho, em 1911, representação em que se pedia que, sendo o maratha a lingua materna dos hindús, fossem criadas em Gôa escolas do puro maratha, para eles poderem ter nitida compreensão do que, ao depois, lhes fosse ensinado nas escolas portuguezas. A este pedido respondeu S. Exa, que os hindus deviam sempre persuadir-se de que a sua lingua materna era o portuguez, e que o maratha só lhes serviria no comercio (!) despachando-a da seguinte maneira: "Oportunamente será atendido o pedido"

Mas chegou, agora, a hora de se pensar a serio, nas regiões oficiais e nos congressos provinciais, sobre qual deve ser a lingua materna dos nativos de Gôa— Concanim ou Maratha— para, assim, auxiliados, terem conhecimento perfeito da lingua nacional— o portuguez!!

Quepèm 2-5-920 De V. etc.
A. R. Sirvoicar

A proposito d'*Um inquerito*, artigo de honra do n.° 5.° do seu mui popular jornal *Bharat* ocorrem-me algumas considerações que vou expô-las, quere como respostas ao seu questionario, quere como meu fraco modo de pensar sobre o mesmo assunto que, sendo de alta importancia para o ramo instrutivo do Pais, não podia deixar de prender atenção de V., que desde há muito tem tomado a peito a empresa de pugnar por tudo o que diz respeito ao progresso de Goa, em geral, e ao das Novas-Conquistas, em especial.

Quanto a 1.ª pergunta: na India Portugueza ou Goa, propriamente dita, existe unica lingua materna, o marata, apresentando, segundo diferenças territoriais, varias formas dialeticas do chamado Concanim que por sua vez vem a ser o Marata falado em Concão.

Qanto á segunda pergunta se me oferece dizer que não se deve admitir nas escolas da instrução primaria portugueza, alunos, sem submete-los, ao exame preliminar em que se deve exigir conhecimento do marata, para o que se torna indispensavel adoptar livros maratas em que o estudante, d'antemão se familiarise, com o que depois há-de estudar nas escolas portuguezas, e em que haja noções da Historia antiga e moderna da India Portugueza, hoje votada ao despreso, tanto na instrução primaria como na secundaria que é absolutamente indispensavel, pois, na opinião do eminente estadista e historiador Lord Macaulay impende a todo o cidadão o dever de conhecer o seu passado para saber o seu futuro.

A resposta da terceira e ultima pergunta do seu inquetito se resume no seguinte:-Deve angariar-se professores habilitados com aprovação da cadeira do marata, anexa ao liceu, ou aqueles que mediante concurso ou diplomas obtidos na India Britanica se mostrem conhecedores habeis da referida lingua.

5-5-920 De V. etc
Z. Molcórnencar

भारत

गुरुवार जेष्ठ शु० १० मी. १८४२

भारतावर खटला !

जो आमचा लेख राजद्रोही मानून येथील कोर्टाच्या सरकारी वकिलानें (delegado) आह्मांवर खटला केला आहे त्या लेखाचें शब्दशः भाषांतर निवळ मराठीवाचकांकरितां खालीं देत आहों:—

*युद्धाचा स्टांप

केवळ सहा महिने अमलांत आणल्यानंतर हा युद्धाचा स्टांप बंद करण्यांत येईल, असें सरकारकडून अभिवचन देण्यांत आलें होतें, हें मशहूर आहेच. हा अवधि संपून सहा महिने झाले; तरी पण उपरिनिर्दिष्ट अरेरावी स्टांप भयंकर प्रारंभाच्या तीव्रतेनें लोकांस जाचीतच आहे. यावरून उघड होतें कीं, सरकारनें आपला शब्द न पाळून या बाबतींत ज्यांना शब्दफेडीची बिलकूल चाड नाहीं, अशांच्या मालिकेंत स्वतास ओढून घेतलें !

ही सरकारची चूक—नव्हे भयंकर गुन्हा-आपल्या पुत्रांस आपल्या प्रतिनिधींमार्फत शिकवूं लावणाऱ्या जें तुला दुसऱ्यानीं करूं नये असें वाटतें तें तूं दुसऱ्याला करूं नकोस या तत्वाशीं उघड उघड विरोध करणारें नाहीं काय ? जर आहे, तर अशा कोणत्या प्रबल शक्तीनें, बलाढ्य सरकारला, ज्याला शब्दफेड ह्मणजे मृत अक्षर आहे, अशांच्या त्याज्य कोटींत उतरविण्यांस भाग पाडलें ?

याचें साष्टीकरण केलेलें बरें; कां कीं, या गूढार्थी विरोधावर सरकारनें मुग्धता स्वीकारल्यास दिवाळखोर व आपला शब्द न पाळणारे अशा भयंकर तऱ्हेच्या लोकांत समाजस्वास्थ्यविध्वंसक कृत्यें करण्याचा ज्यास्तच चेव येईल. दुसरें असें आहे कीं, ज्यानें शब्द दिला त्याच्या शिरावर तो फेडण्याच्या ऋणाची जबाबदारी पडते. सरकारनें अमलांत आणल्यानंतर सहा महिन्यानीं युद्धाचा स्टांप बंद करण्याचें वचन दिलें होतें. तो अवधि संपला. अर्थात वरील ऋण फेडून आपल्या शब्दांतून मुक्त होणें, हें साहजिक सरकारचें कर्तव्य ठरतें. स्टांप बंद करून हें कर्तव्य न बजाविल्यास सरकारास लोक दिवाळखोर व वचनभंग करणारें असेंच ह्मणतील. असें होऊं नये या साठीं एकतर सरकारनें युद्धाचा स्टांप ताबडतोब बंद केला पाहिजे नाहीं तर आपण दिवाळ-खोर व वचनभंग करणारें आहें असें जगजाहीर करण्यास सिद्ध झालें पाहिजे. या व्यतिरिक्त दुसरा तरणोपाय नाहीं.

सरकार वरील दोन मार्गांपैकीं कोणत्या मार्गाचा अवलंब करतें, याची कांहीं काळ वाट पाहून, नंतर प्रस्तुत विषयावर आह्मी आमचें ठाम मत बनविणार आहों.

होय, आह्मी वाट पहात आहों.

---

*युरोपांतील महायुद्धांत पोर्तुगीज राष्ट्रहि सामील झालें होतें, हें सगळ्यांस माहित असेलच. त्या खर्चास मदत ह्मणून हा कर —केवळ सहा महिन्यापुर्ता—लादण्यांत आला. सरकारांत जेव्हां दिवाणीदावे द्यावे लागतात, तेव्हां वादी प्रतिवादींना १०० रैसाच्या ह्मणजे ४ आणे ७ पैच्या स्टांपाचा कागद वापरावा लागतो; व सरकारी कामदारांची कामें ८० रैस ह्मणजे ३ आणे ८ पैचा स्टांपाच्या कागदावर चालतात. या कागदांस अनुक्रमें ५० व ४० रैसांचे युद्धांचे स्टांप सहा महिनेपर्यंत लावण्यांत यावे, असें सरकारनें ठरविलें होतें.

स्फुट विचार

हें नवल नव्हे काय ?:— जर कोणी निःपक्षपातानें आमच्या राजद्रोही मानला गेलेल्या लेखाचें मनन करील, तर त्यास त्यांत असेंच आढळून येईल कीं, युद्धस्टांपाच्या बाबतींत लोकांचें ह्मणणें निर्भिड व स्पष्ट शब्दानीं सरकारासमोर मांडण्याशिवाय दुसरा कोणताच गुन्हा आह्मांकडून घडलेला नाहीं. आमच्या आक्षेपार्ह लेखांत कदाचित् कडकपणा असेल; ज्या कृति भ्याड लोक सरकारी गैरमर्जीच्या स्वार्थघातक भीतीनें स्पष्ट शब्दानीं न संबोधितां 'दरबारी' भार्षेत संबोधितात त्या कृतींस आम्ही कोणाचीहि भीडभाड अगर पर्वा न धरतां साध्या व बालबोध भाषेंतील योग्य नावें दिलीं असतील. परंतु त्या लेखांत आम्ही सवंग लोकप्रियतेच्या स्वार्थी लालसेनें अगर दुसऱ्या कोणत्याहि क्षुद्र इच्छेनें सरकारावर खोटे दोषारोप केलेले नसून, त्याला लोकाना दिलेल्या युद्धस्टांपबंदीच्या वचनाच्या आठवणीखेरीज दुसरा कसलाहि अन्याय निःसंशय केलेला नाहीं. अशी आमची मनोदेवता आह्मांस साक्ष देत आहे. असें असतां आमच्या उक्त लेखांत विचारी सरकारास राजद्रोह दिसावा, हें नवल नव्हे काय ?

राजद्रोह कीं लोकद्रोह ? :— सरकारनें सहामहिन्याच्या अंमलबजावणीनंतर युद्धस्टांप बंद्र करण्याचें वचन दिलें होतें. हें वेदवाक्यप्रमाण वचन सरकारकडून पाळलें न गेल्यामुळें अर्थात आम्ही लोकहितदृष्टीनें सरकारविरुद्ध कडक टीका केली. कां कीं, आधींच न भूतो न भविष्यति अशा भयंकर महर्गतेनें हवालदील बनलेल्या जनतेचें रक्त उपरोक्त कररूपी जळूच्या शक्तिहारक पिल्लूनें शोषण्याचा धूम सपाटा चालविलाच होता ! त्या निरुपद्रवी टीकेंत सरकारास राजद्रोह आढळावा व दिलेलें वचन आपणाकडून फेडलें न गेल्यावरून आपण मूर्तिमंत लोकद्रोही ठरतें याची त्याला बिलकून चाड नसावी, हें खरोखर देशाचें दुर्दैव होय, असें ह्मटल्याशिवाय गत्यंतर नाहीं !

चूक आहे:— आह्मांवर उभारलेल्या खटल्यानें आम्हीं गांगरून जाऊन बेकायदेशीर व अन्यायी कृत्यांचा खरपूस समाचार घेण्याचें आमचें सर्वविश्रुत धोरण सोडून देऊं, असें जर वरील शौर्य आचरण्यांत सरकारास वाटत असेल तर तो त्याचा समज अगदीं वस्तुस्थितीस धरून नाहीं, असें आम्हीं सरकारला सुचवितों. एकच नव्हे, अशाच तऱ्हेचे आणखी कितीहि खटले आह्मांवर उभारण्याचा पराक्रम सरकारनें गाजविला तरी देखील आम्ही आमच्या पवित्र देशसेवेच्या व्रतापासून काडीमात्रसुद्धां ढळणार नाहीं, हें सरकारनें खूप समजावें. लोकसेवेच्या पुण्यकर्मांत आम्ही मागें एकदोनदां सरकारच्या इतराजीचे तडाखे सहन केलेले असल्यावरून या नवीन संकटाचा आह्मांस कांहींच बाऊ वाटत नसून, उलट त्यामुळें पूर्वीपेक्षां ज्यास्तच उत्साहानें आमचें अस्तित्व देशहितार्थ खर्च करण्याची आह्मांला हुरूप येणार आहे, हें सरकारनें पूर्ण ध्यानांत ठेवावें. संकटें शत जरी प्राप्त झालीं तरी आह्मी अंगीकृत-कार्यापासून कदापिहि ढळणार नाहीं. याच्या उलट सरकारचा समज झाला असेल तर ती त्याची चूक आहे, असें त्यास बजावण्याची आह्मी नम्रतापूर्वक परवानगी घेतों.

आश्रय दात्यांस विनंति:—सरकारनें आह्मांविरुद्ध उगारलेल्या तीक्ष्ण शस्त्रापासून बचाव होऊन खटल्याचा अखेर निकाल लागेतों आह्मांस बराच खर्च येणार आहे. एका बाजूनें हा खर्च व दुसऱ्या बाजूनें पत्र द्वि–साप्ताहिक स्वरूपानें नियमितपणानें प्रसिद्ध करण्यास लागणारा पैसा, अशा दुहेरी आर्थिक जबाबदारीच्या कचाट्यांत सांपडून आह्मीं आरंभिलेल्या कार्यास कोणत्याहि सांपत्तिक अडचणीनें 'खो' बसूं नये, एतदर्थ भारताच्या देशहितचिंतक आश्रयदात्यांस फिरून एकदां अत्याग्रहपूर्वक विनंति करण्यांत येते कीं, त्यानीं आपली व नवीन वर्गणीदार मिळवितील त्यांची वार्षिक वर्गणी आगाऊ पाठवून आपल्या देशाविषयींचें निरपेक्ष प्रेम व्यक्त करण्यांची संधि दवडूं नये. आमच्या या विनंतीस आश्रयदाते कुरवाळून धरतील, अशी आह्मांस सध्याच्या प्रसंगी पूर्ण आशा आहे. ही आमची सदिच्छा परमेश्वर सफळ करो.!

मुर्गांव येथील इंग्लिश कष्टम ऑफीस:— भटजीस विश्रांतीसाठीं ओसरीवर थोडीसी जागा दिली ह्मणजे भटजी, घरधन्यापेक्षां शक्तिवान किंवा युक्तिवान असल्यास सबंध घरांत आपला पाय पसरण्यास मागें पुढें पाहत नाहीं अशा अर्थाची प्रचारांत असलेली ह्मण सर्वविश्रुत आहेच. ह्मणजे गोव्यांत आगगाडी सुरू झाल्यापासून रेल्वेचें हेड ऑफिस, थोडीशी इंग्लिश व्यापारी कंपनीचीं आफिसें वगैरे मुर्गांवांत चालू आहेत. आज तिकडे इंग्रजी हिंदुस्थानांतील प्रवाशांच्या सोईसाठीं ब्रिटिश कष्टम ऑफिस उघडण्यास पोर्तुगीज सरकारनें परवानगी दिली आहे. उद्यां त्या आफिसावर देखरेखी खातर गरज असलेल्या एखाद्या पोलिस तुकडीचीही तिकडे स्थापना होईल. परवां एकाद्या इंग्रजी कामदारानें सदरहू कष्टम आफिसांत गुन्हा केल्यास तो इंग्रजी नागकरिक असल्यानें इंग्रजी अधिकाऱ्यांनींच त्याची चौकशी करण्यासाठीं एकादें न्यायकोर्ट स्थापन करण्यांत येईल. अशाप्रकारें ओसरीवर पाय पसरण्यास पोर्तुगीज सरकार थोडीथोडी निवाऱ्याची जागा देत राहिलें ह्मणजे मग सर्व घरांत इंग्रज लोक घुसून घरधन्यास गचांडी मारून बाहेर घालून आपली सत्ता प्रस्थापित करण्यास कमी करतील काय ? एरवीं पोर्तुगीज व इंग्रज सरकार हे एकमेकांचे दोस्त आहेत. एकाचें बरेंभलें झाल्यास दुसऱ्यास त्यांत आनंद वाटणें सहाजिक आहे. परंतु जेव्हां स्वार्थपर दृष्टि होऊन व दुसऱ्याच्या हकाची पायमल्ली करून आपला तळीराम गार करण्यांत एकादा चूर होऊन जातो, तेव्हां त्यास सदाचरणाच्या तत्वाची आठवण रहात नसते. व याचा प्रत्यय सर्वांस दररोज थोडा बहुत तरी येत आहेच. तर मग हा न्याय राष्ट्राराष्ट्रांसच अपवादात्मक कसा असूं शकेल ?

मालावृत्त

(मागील अंकावरून पुढें चालू)

भागिदारांचीं नावें	भागांची रक्कम
मागील पोंच	३६५ रु.
श्री. विठ्ठल ल. प्रभू मोये; शिवोली	५ रु.
,, जिवाजी शा. फळ देसाई; केपें.	५ ,,
,, दत्ताराम शे. दळवी; वेरें–फोंडा.	५ ,,
,' व्यंकटेश फों. कुडचडकर; सांवर्डें.	५ ,,
,, गंगाधर गों. कोरगांवकर; रिवण.	५ ,,
,, दत्ता अ. कामत माड; सांवर्डें.	५ ,,
,, उण्णो दा. कामत गावंकर; पंचवाडी	५ ,,
	४०० रु.

आतां पर्यंत भरून आलेले फार्म आणि आमची मुद्दाम गांठ घेऊन व पत्रांतूनहि कित्येकांकडून जी मालेच्या कार्याविषयीं सहानुभूति दर्शविली जात आहे, ज्यांकडून योग्य सूचना केल्या जातात, व लेखक वर्गाकडूनहि जें अभिवचन मिळालें आहे, त्यावरून गोमांतकांतील जनतेंत चैतन्य उत्पन्न होऊन सार्वजनिक कार्याची विचारी जनांना माहिती कळूं लागली आहे हें सिद्ध होतें. आपल्या गोमांतकाची प्रगति व्हावी, तो कर्तृत्ववान व्हावा, तो सामर्थ्यवान व्हावा असें इच्छिणाऱ्या देशभक्तांनो, तुह्मीं मालेचे अमुकच शेअर्स घ्या, अशी आमची मागणी अगर आग्रह नाहीं. आपापल्या शक्तीप्रमाणें एकेकच भाग घेतला तरी चालेल. पण ही माला सर्वांची व्हावी हा जो आमचा दृढतर हेतु, सहकारितेनें कार्य करण्याचा जो आमचा संकल्प तो सिद्धीस जाण्यासाठीं सर्वांनीं मिळून —कोणत्याच प्रकारच्या भेदाकडे लक्ष्य न देतां तनमनधनानें आह्मांस साह्य करावें एवढीच आमची प्रेमाची मागणी आहे. व्य. उ. ग्रं. प्र. म.

वर्तमानसार

—फोंडें येथील मामलेदाराच्यां जागीं पूर्वीं बडतर्फ केलेल्याच इसमाची पुन्हां नेमणूक करण्यांत आली आहे.

—राजद्रोहीं कटांत सामील असल्यामुळें पोर्तुगालच्या माजी प्रधान मंडळांतल्या कांहीं प्रधानाच्या खटल्याची सुनावणी होऊन त्यांस ८–१० वर्षांची कैदीची शिक्षा सांगण्यांत आली.

----पोर्तुगालांत बांबगोळे वगैरेनीं अत्याचार करणाऱ्यांसाठीं एका वेगळ्याच कायद्याचा मसुदा तयार करण्यांत आला असून त्यांत त्यांस हद्दपारीची शिक्षा नेमण्यांत आली आहे.

—असोळणें येथील श्री वेताळ प्रासादिक ज्ञानमंदिर या संस्थेचा ३ रा वाढदिवस चालू माहेन्याचे २१ तारखेस साजरा करण्यांत आला.

---ता० १६ मे रोजीं मडगांव येथें क्रिश्चन लोकांच्या क्लबांत प्रसिद्ध वक्ते व लेखक सिं॰ कोंस्तांस रोक द कोस्त यांचें "स्त्रियांची संस्कृति व तिंचें सामाजिक कर्तव्य" या विषयावर सुश्राव्य व्याखान झालें.

—दाबोली येथील स्टेशनमास्तरास व त्याच्या भायकामुलांस; गेल्या दिवसांत कांहीं दरोडेखोरांनीं रात्रीचे घरांत शिरून बराच मार दिला. आंतील कपडालत्त्याची जाळपोळ करून व एकंदर दागदागिने व रोकड पैसा घेऊन ते फरारी झाले. या कृत्याच्या संशयावरून कांहीं इसमांस पकडून कैद करण्यांत आले आहे.

ANNO V.—NUMERO 11 —1920 QUEPEM, QUINTA---FEIRA 3 DE JUNHO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA.............. 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोंव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया........... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहीरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें-गुरुवार, तारीख 3 माहे जून सन १९२०. अंक ११ वा.

Milhoramentos em Vasco da Gama

O Dr. Manuel Pedro de Souza e Franklin, redactor que foi do *Correio da India* que se publicava em Nova Goa, escreveu nos seus dois nos., provavelmente, em 1883 e 1887, que Mormugão nunca havia de ser *cidade* nem havia de passar mais que um *armazem* de mercadorias de Anthuerpia; e, certamente, a experiência de mais de 30 anos confirma isto. Tambem eu sustento o mesmo, afirmando que, ainda que o Governo despenda em Vasco da Gama crôres de libras, ele nunca pode ser cidade.

Para uma localidade ser cidade é necessário que haja comercio e industria que não pode haver em Mormugão.

Se um vapor traz 500 sacas de assúcar, não há comerciante algum que as compre, porque nêste paiz microscópico não há consumo em grande escala.

Não pode haver estabelecimentos fabris de ferro nem de tecidos, pois, se os houver não há de ser possivel vender neste paiz todo o seu producto, muito menos exporta-lo para a India inglesa, onde há muitos estabelecimentos dessa natureza e os seus objectos são baratos, sendo que a mercadoria exportada è sujeita aos direitos aduaneiros no territorio ingles.

Suposto o caso de que alguma companhia estabeleça uma fabrica de cordoaria, esta não pode imprimir movimento a Vasco da Gama, assim como uma andorinha não faz verão.

Esta fábrica encontra, alem disso, milhor lugar com todas as condições favoraveis em Dabolim ou na ilha de S. Jacinto; porém a companhia que queira estabelecer essa fábrica e outras como as de extrair oleo e descascar arroz em algum desses lugares onde há fontes de abundante água que servirão para alimentar as máquinas, naturalmente há de pedir ao governo construcção das estradas de Dabolim a essa ilha e de Nazareth a S. Cruz para haver comunicação de curta distância do concelho das Ilhas com o de Bardez que é indispensavel, inadiavel e sem essa construção as fábricas de que se trata, serão inuteis.

O Governo há de construir casas e estradas em Vasco da Gama e ninguem sabe dizer quem há de ocupar essas casas e transitar por essas estradas. E' necessario, primeiro, calcular o número dos inquilinos e o movimento de transeuntes, automoveis, carros e carroças, o que ninguem sabe se foi feito.

Nas estradas há de nascer herva e arbusto, para cuja limpeza háde faltar o dinheiro...

O dinheiro que o governo ha-de despender em Mormugão ha-de ter o mesmo fim que teve o dinheiro que Bessone, director sido das obras públicas inútilmente gastou, sem responsabilidade alguma, em Borim e Banastarim!

Será muito útil e vantajoso ao público tratar o governo em primeiro lugar do canal de Tivim a Colvale e construir estradas de Dabolim a ilha de S. Jacinto e de Nazareth a S. Cruz, cais de Borim, Cumbarjua, Cundaim e ponte de Marcela etc etc.

As aparências são muitas vezes enganadoras e tudo o que brilha não é ouro...

A' vista disto é licito dizer com clareza e evidencia que pretender fundar cidade em Vasco da Gama è pretender fabricar castelo no ar.

E' necesario fazer quaisquer obras em Vasco da Gama, segundo as suas circunstancias porque devagar se vai ao longe. Mas vamos adiante:—

Preciso é notar, que os vapores trazem mercadoria da Europa e outras partes que é descarregada e acondicionada no armazem da Companhia em Mormugão e depois carregada nos vagons e levada para a India Inglesa. Assim tambem a mercadoria da India Inglesa é trazida pelos comboios, descarregada e acondicionada no armazem em Mormugão e carregada nos vapores, è levada para Europa e outras partes.

A mrecadoria desse transito directo nada influi para Vasco da Gama.

Tudo isto è incontestavel.

Se ha alguem que sustente o contrario, devê este assumir a responsabilidade de pagar ao governo toda a quantia que fôr despendida, quando passados cinco anos se conhecer que não se encontra o resultado desejado e prova concreta de promessas...

Varii vària dicunt.!

A prudencia recomenda que antes de lançar-se mão de obra deve estudar-se profundamente o projecto para não errar no que se executa.

Resta-me dizer mais que Mormugão poderia ser cidade se toda a India pertencesse ao nosso governo portugues, ou se houvesse um tratado entre os dois governos portugues e ingles em virtude do qual as mercadorias portuguesas não estivessem sujeitas aos direitos aduaneiros britanicos, o que certamente o Ingles não há de fazer em seu prejuizo sem pedir ao governo portugues indenisação anua que há-de ser uma questão de cifras aureas...

José Sant' Anna Fernandes.

N. da R. São da lavra dum *maduro* as linhas supra, quiça toscas e mal ordenadas mas encerrando, sempre, verdades como punhos.

¿ Quem não dirá que o sr. *Santana Fiscal* seja um dos milhores amigos do Povo, desse bom e pacato Povo em pról do qual o homem não poupa nenhuma ocasião de sacrificar-se!

Na verdade, a abnegação do sr. *Santana Fiscal*, de que temos provas frisantes, abnegação que faria baixar cabeça a muito *patriota* que por ai enxamea, comove--nos até á medula de ossos.

Ao estampar o artigo do sr. Fernandes nas colunas do *Bharat*, este não pode resistir á tentação de registar tambem o que ele sente pela simpatica ainda que modesta pessôa popular do sr. *Santana Fiscal.*

TAXA DE GUERRA

A taxa de guerra foi estabelecida para estar em vigor até seis meses dspois da cessação da guerra.

Como é sabido, foi assinado o tratado da paz nos fins de Junho do ano findo, meses depois de ter sido assinado o armisticio que foi em Dezembro anterior tendo havido festejos oficiais por ambos esses eventos.

Sendo assim, tendo já passado sobre o último destes acontecimentos mais de 6 meses, o respectivo imposto da taxa de guerra devia cessar há muito. Não obstante a sua cobrança continua a fazer-se, com gravame do contribuinte, e o que è pior sujeitando-o a outras graves incomodidades, pois não faltam dias em que os selos de tal taxa se não encontram á venda, nem mesmo nas recebedorias da fazenda ficando assim paralisadas as diligencias para as quais aqueles selos são exigidos.

Urge que o Governador Geral baixe uma portaria mandando cessar a arrecedação do mesmo imposto que sobretudo na epoca que atravessamos muito custa a pagar.

Terá Sua Exa desta maneira cumprido uma expressa e clara determinação da lei, livrando ao mesmo tempo o publico dum bem injusto onus.

(D'O Ultramar)

भारत

गुरुवार जेष्ठ व० २ या. १८४२

भारत व सरकार

'राजद्रोहा'चा शिक्का मारला गेलेला आमचा भयंकर लेख वाचकांच्या अवलोकनांत आलाच आहे. अशीं कोणतीं विधानें त्यांत राजद्रोहात्मक असून तीं मायबाप सरकारचें अढळ पद हादरून टांकणारीं आहेत ? ! असा कोणता भयंकरपणा त्यांत निर्भिय सरकारला आढळून आला कीं, त्यामुळें त्याची हवेलंडी उडण्यासारखी शोचनीय स्थिति व्हावी ? ! असें कोणतें जहर वीष त्यांत भरलेलें अमर सरकारच्या सूक्ष्म दृष्टोत्पत्तीस आलें कीं, त्याच्या अनिष्ट परिणामाकडे तीक्ष्ण नजर पुरवून आपल्या संरक्षणाप्रीत्यर्थ खटल्यासारखा कडेकोट बंदोबस्त त्याला करावा लागला ? ! शेंवटीं अशी क… अचाट शक्ति बलाढ्य सरकारास त्यांत दिसून आली कीं, त्यामुळें त्यानें अगदीं भांबावून जाऊन क्रिमिनल कोडाच्या अभेद्य व अपारदर्शक पडद्याचा आश्रय धरण्यास धूम ठोकावी ? !

आह्मास वाटतें कीं आमच्या विचारी सरकारचें विशाळ डोकें वरील कोणत्याहि एका प्रश्नास समर्पक उत्तर प्रसवण्यास अगदीं असमर्थ आहे—निरुपयोगी आहे. अशी जरी वस्तुस्थिति असली तरी उपरोक्त प्रश्नास सरकारकडून जबाब येणार नाहीं, असें मात्र भविष्य वर्तविण्याची अक्षम्य घाई कोणींहि करूं नये. इसापनीतींतील शूर लांडग्यानें ज्या क्रिमिनल कोडाच्या भरभक्कम आधारान्वयें निरपराधी व कोंवळया करडास आपल्या रुधिरप्रिय घशाखालीं उतरविलें त्याच वळी कायद्याच्या जोरावर आमच्या प्रश्नाची योग्य वासलात लाऊन सरकार आपल्या शूरत्वाची यथार्थता पटविण्यास सज्ज होईल, अशी अटकळ केल्यास मोठीशी चूक होईल, असें वाटत नाहीं.

ही लांडगी न्यायपद्धति आह्मांविरुद्ध उभारलेल्या खटल्यांत सरकारास अमलांत आणावयाची नसती तर त्यानें आपल्या कोर्टांच्या पायऱ्या चढविण्यास आह्मांस खचित भाग पाडलें नसतें, असें कोणालाहि वाटणें साहजिक नव्हे काय ?

आमच्या राजद्रोही मानलेल्या लेखांत आम्हीं सरकारची नालस्ती केलेली नाहीं; सरकारचें राजवैभव जमीनदोस्त होईल, अशा सारखे विचारबांब आह्मीं त्या विरुद्ध फेंकण्याचें अराजक कृत्य केलेलें नाहीं; सरकारच्या थोर नांवलौकिकास बट्टा लागेल अशा तऱ्हेचीं खोडसाळ विधानें आमच्या आक्षेपार्ह लेखांत कितीहि डोकें खाजविलें अगर डोळेफोड केली तरी कोणाहि निःपक्षपाती व सरळ माणसास आढळणार नाहींत; सामर्थ्यवान सरकारच्या त्याहूनहि समर्थ अशा सिंहासनाची वळकटी ढुली पडेल, अशी खुदिरामी वृत्तीची झांक—पुसट पुसटच कां होइनां ?—आमच्या युद्ध–स्टांपाच्या साध्या व निरुपद्रवी लेखांत खास कोणालाहि आढळणार नाहीं ! उलट पक्षीं आमच्या त्या लेखांत कोणालाहि सत्याचा अनुवाद, केवळ सत्याचाच अनुवाद केलेला दिसून येईल. युद्ध–स्टांपाच्या प्रखर वणव्यानें होरपळत असलेल्या त्रस्त जनतेचे दुःखोद्गार सरकारच्या नाजूक कानांवर पोंचविण्यापलीकडे त्या लेखांत आमचा दुसरा कोणताहि वाईट हेतु दृगोचर होणें शक्यच नाहीं.

अशी एकंदरींत आपली बाजू सर्व दृष्टीनीं लंगडी असतां, खटल्याचें दु–धारी शस्त्र सरकारनें आह्मांवर उगारून आपल्या लांडग्या प्रतापाचा सूत्र उवाच करणें, हें सरकारचें कृत्य शुद्ध अन्यायाचेंच आहे, असें लोक ह्मणणार नाहींत काय ?

कदाचित् आमची मुस्कटदाबी करून दुःखितांचें अंतःकरण खऱ्याखुऱ्या, निर्भिड व स्पष्ट शब्दांनीं व्यक्त करण्याच्या देशहितसाधक निःस्वार्थी ध्येयापासून आह्मांस परावृत्त करण्याचें जर सरकारच्या मनांत असेल, तर तो त्याचा हेतु सफळ होणें कदापिहि शक्य नाहीं, हें फिरून एकदां सरकारला सुचविण्याची आह्मीं नम्रतापूर्वक परवानगी घेतों.

लोकसेवेचें व्रत किती कष्टतर आहे, याची आह्मांला मागील अनुभवावरून पूर्ण जाणीव आहे. आमच्या सर्व सुखसोयींवर तिलांजळी सोडून स्वीकारलेलें देशसेवेचें व्रत सरकारच्या रोषास भिऊन आह्मीं कदापिहि सोडण्यास तयार नाहीं. ज्या दिवशीं आह्मांस तें योग्य रीतीनें पाळणें अशक्य होईल, ज्या दिवशीं सरकार आह्मांस सत्य दिसेल तें स्पष्ट बोलण्याची मनाई करील त्याच दिवशीं आह्मी आमच्या भारत कचेरीस कुलूप लाऊन, हरिहरि ह्मणत, शेंवटच्या घटकेची वाट पहात, शेष आयुष्य परमेश्वर चिंतनांत घालण्याचा मार्ग आक्रमूं, इतकेंच सांगून हा लेख येथें संपवितों.

मेव जयते नानृतम्" ह्या वाक्याची महति जाणणें ह्या सर्व गोष्टींत धर्मांचा अंतर्भाव होतो, मग "त्याच्या गळां माळ असो नसो."

धर्मजागृति करणें असेल तेव्हां पहिल्या-प्रथम नीतिशास्त्राचा प्रसार होणें अवश्य आहे, त्या योगें उत्पादकांचे हिंदुसमाजावर व विशेषेंकरून ब्रह्मवृंदावर आभारभार होतील. जगाच्या डोळ्यांत धूळ फेंकण्याच्या इराद्यानें "गळां माळा टिळा टोपी" घालण्यास कठीण नाहीं, परंतु हें बकध्यान ओळखणारे मात्र अशा कृतीला काडीचेंहि महत्व देणार नाहींत. "ब्राह्मण अनाचारी झाले शूद्र आचार करिती कीं" असें जर कोठें आढळून येत असेल तर त्याचे विचार पाहि-त्याखेरीज मनाचा वाईट ग्रह होऊं देणें इष्ट नाहीं.

सारस्वत

मालावृत्त

(मागील अंकावरून पुढें चालू)

भागिदारांचीं नांवें	भागांची रक्कम
मागील पोंच	४०० रु.
श्री. वासुदेव वि. केरकिर; मडगांव	२५ रु.
,, टाकुरसी करसनदास; ठाणें	१५ रु.
,, कृष्ण राम हेगडे, मडगांव	१० ,,
,, वे. नारायण रा. वाळे ,,	१० ,,
,, रामचंद्र गो. पै रायतुरकर ,,	१० ,,
,, पुरुषोत्तम ·गेश वागळे ,,	१० ,,
,, दामू श्रीनिवास नाईक दलाल ,,	१० ,,
,, वैकुंठ विष्णु शे. कारे ,,	१० ,,

पत्रव्यवहार

श्रीयुत संपादक भारत केपें, यांस

वि. वि. आपल्या ता. २०।५।२० च्या अंकांत श्रीयुत एस्. एच्. यांच्या 'देशी भाषेंतून शिक्षणाची आवश्यकता' या मथाळ्याच्या लेखांकांत एक दोन चुकीचीं विधानें आहेत, तीं दुरुस्त करण्याची कृपा करावी. तीं विधानें:—

१ श्रीयुत एस्. एच्. यांचें 'ह्मणणें असें आहे कीं, इंग्रज सरकारनें महाराष्ट्रांतील लोकांस "मराठी" भाषेच्या द्वारें शिक्षण देऊन ज्ञानभांडार या भाषेच्या द्वारें खुलें करून दिलें आहे. परंतु ही त्यांची चूक आहे. महाराष्ट्रांत केवळ प्राथमिक शिक्षण, ह्मणजे थोडेंसें लिहिणें वाचणें, गणीत भूगोल, इतिहास, भूमिती, व्याकरण व इतर थोडेसे विषय, 'मराठी' भाषेच्या द्वारें देण्यांत येतें, आणि खरें ज्ञान ह्मणजे रसायन शास्त्र, भूगर्भशास्त्र, वनस्पतीशास्त्र, ज्योतिषशास्त्र, यंत्रविद्या, विद्युत्, भूमितीची पूर्ण माहिती ,गणिताची पूर्ण माहिती व इतर गहन विषय सद्य स्थितींत संपादण्यांस महाराष्ट्रांतील लोकांस परकी इंग्रजी भाषेचा आश्रय करावा लागतो; कारण अद्यापि मराठीभाषेमध्यें या गहन विषयांचीं पुस्तकें उपलब्ध नाहींत; व महाराष्ट्रांतील विद्वानांनीं तशीं पुस्तकें तयार करण्याचा प्रयत्नहि केलेला दिसून येत नाहीं. आणि इंग्रज सरकारचें Public Instruction,ह्मणजे 'सार्वजनिक शाळा खातें' या बाबतींत अगदीं सुस्त आहे. फक्त या पांचसातवर्षांपासून देशी भाषेंतून या गहन विषयांचें शिक्षण सरकारी शाळांतून व कॉलेजांतून देण्यांत यावें याबद्दल थोडीशी चळवळ वर्तमानपत्रांतून झालेली आढळून येते. यावरून पोर्तुगीज भाषेंतून या सर्व गहन विषयांच शिक्षण देणें योग्य आहे असें माझें ह्मणणें आहे असा आपला ग्रह करून घेऊं नका–सर्व ज्ञान देशीच भाषेंतून संपादन केलें पाहिजे असें मी केव्हांहि ह्मणेन; कारण विध्यार्थ्यांचें बुद्धिबळ ज्ञान संपादनाच्या कामीं खर्च होण्याच्या ऐवजीं निरर्थक परकी भाषेंतील शब्दांचा अर्थ समजून घेण्यांतच पुष्कळ वर्षें पर्यंत खर्च होतें व फार थोडेच विद्यार्थी इतकीं वर्षें खर्च केल्यावर क्वचित् या विषयांचें ज्ञान या परकी भाषेंतून संपादूं शकतात. सर्वच विद्यार्थ्यांना परकी भाषेंतील सर्व शब्दांच्या अर्थाची गरज आहे असें नाहीं. पुष्कळांचें परकी भाषेच्या थोड्याशा ज्ञानानें चाललें असतें व बहुतेक गरजेप्रमाणें परकी भाषा पाहिजे तेव्हां शिकले असते.

परंतु हिंदुस्थान आज सरासरी एक हजार वर्षांपासून पराधीनता गर्तेत लोळत लोळत त्यांतच सुख मानून अज्ञानांधःकाराच्या रात्रींत घोरत पडला आहे तो केव्हां जागा होऊन आपली उन्नति करून घेईल तें हिंदुस्थानास पारतंत्र्यांत लोळविणारा परमेश्वरच जाणे. लोकांनीं जागे होऊन देशी भाषेंतून सर्व शिक्षण देण्यांचें व सरकाराकडून देवविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. सरकार शिक्षणाकरितां जें कांहीं खर्च करितें तें लोकांकडून आलेल्या कराच्या पैशांतून; ह्मणून हा खर्च लोकांचें जेणेंकरून ज्यास्ती हित होईल अशाच रीतीनें झाला पाहिजे. सरकारच्या अंमलदारांच्या इच्छेप्रमाणें खर्च होतां उपयोगी नाहीं. सुदैवानें आह्मां गोमांतकवासियांनां प्रजासत्ताक राज्याच्या नागरिकत्वाचे हक्क मिळाले आहेत. त्या हक्कांची योग्य बजावणी आपण केली पाहिजे.

२. श्रीयुत एस्. एच्. ह्मणतात कीं गोव्यांतील अर्धी प्रजा खिस्ती आहे व त्यांची पोर्तुगीज ही मायभाषा होऊन बसली आहे, हें विधान अगदीं खोटें आहे. जरी अर्धी प्रजा खिस्ती असली तरी मायभाषा पोर्तुगीज असलेले खिश्चन या खिस्ती प्रजेचा एक दशांशहि होणार नाहींत, असें मला वाटतें. व आमच्या गोव्यांतील सर्व भागांतील खिश्चन लोकांची साधारण माहिती असलेला कोणीहि इसम तें कबूल करील. त्यांची भाषा कोंकणी आहे व कोंकणीचें मराठीशीं पुष्कळ साम्य व सादृश्य आहे हें गोव्यांतील दरेक मनुष्य समजून व उमजून आहे. मुठभर पोर्तुगीज मायभाषा असलेल्या लोकांकरितां सर्व लोकांवर पोर्तुगीज भाषा लादणें व सर्व प्रजेचा घामाचा पैसा 'कर' मुठभर लोकांकरिता खर्च करणें केव्हांहि अन्यायच ठरणार. प्रजेच्या भावी आशांचें अंकूर अशा विद्यार्थ्यांच्या कोमल व तरतरीत बुद्धीचा विनियोग फक्त पोर्तुगीजभाषेंतील शब्दांचा अर्थ समजावण्यांत पांच दहा वर्षें पर्यंत खर्च करविणें कधींहि प्रजेच्या हितार्थ होणार नाहीं,हें राज्यकर्त्यांच्या लक्षांत येईल काय ?

कळावें ही विनंति.

सांवडें, ता. २१।५।१९२० आ.

वैकुंठ कृष्ण कामत

आमचे एजंट

श्री. वासुदेव लक्ष्मण राजाध्यक्ष–काणकोण
,, दत्तात्रय रामकृष्ण दलाल –पैंगीण
,, शेषगिरी पद्मनाभ देसाई–लोलयें
,, अनंतराव शेणवी देसाई–पेडणें
,, वैद्य दत्ताराम पां. चिमुलकर– सांखळी
,, शांताराम सूर्यराव सरदेसाई– डिचोली
,, श्रीपाद अच्युत कळंगुटकर–ह्मापसें
,,रघुनाथ अनंत भांडारी –फोंडें
,, गोपाळ कृष्ण गुडे—शिरोडें
,, काशीनाथ अनंत केंकरे,—बार्देस

ह्या आमच्या मित्रांपाशीं त्या त्या गांवच्या व तालुक्यांच्या आश्रयदात्यानीं आगाऊ वर्गणी रु. ३ पोंचती केल्यास, आह्मांवर फार फार उपकार होणार आहेत. इतर ठिकाणीं आमचा वसूलदार फिरतीवर गेला आहे. त्यापाशींहि तेथील वर्गणीदार पैसे भरून, भारतास हातभार लावण्याचें पुण्य संपादन करतील, अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे.

वर्तमानसार

—पणजीचें दैनिक पत्र दियारियु दे नोईत्त यांवर गोव्यांचे पहिले हिंदु ब्यारिस्टर डॉ. शिवराम बळवंतराव यांचा फोटो आला असून त्यांच्या व हिंदुसमाजासंबंधानें सदरील पत्रानें प्रोत्साहनपर उद्गार काढले आहेत.

—ओरिएन्टल गव्हर्मंट सिक्युरिटी कंपनीनें पणजीयेथील आदवोगाद मयत डॉ. मानुयेल सेबस्तीयांव वास यांच्या मृत्यूबद्दलचे पुरावे देतांच एक महिन्यांच्या आंत डॉ. वास यानीं कंपनींत उतरलेला १०,००० रुपयांचा विमा व त्याशिवाय नफ्याची रक्कम ३७२५ रुपये मिळून १३,७२५ रुपये योग्य हिस्सेराशीनें तेथील एजंट श्रीयुत रा. रा. दत्तात्रय आपा सरमळकर यांच्या मार्फत त्यांच्या मुलांमुलींस वांटून दिले.

ANO V.—NUMERO 12 —1920 QUEPEM, QUINTA-FEIRA 10 DE JUNHO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas

India Portuguesa...... 3-00-00
India Inglesa.............. 3-08-00
Numero Avulso.......... 0-01-00

Anuncios

Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत

BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर

गोव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००

जाहीरातींचे दर

मराठी दर ओळीस दोन आणें. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें—गुरुवार, तारीख १० माहे जून सन १९२० अंक १२ वा.

CONGRESSO HINDU

A' iniciativa do conhecido escritor e ilustre patriota Sr. Bascora Prataprao Sardessai e de varios jovens hindús de Gôa projecta-se reunir, breve, um Congresso Provincial Hindu, cujas sessões se realisarão todos os anos e em localidades diversas, à maneira do que se observa com o Congresso Nacional Indiano.

O objectivo a que visa o arquitectado Congresso é, em tudo, identico áo do *Centro Ariano* que, já lá vão dois anos, os hindùs de todas as seitas haviam fundado em Pangim com o ùnico desiderato politico de, unindo-se todos sob a mesma bandeira, promover o seu bem estar social, moral e economico, centro, cuja acção ficara paralisada por diferentes motivos que é desnecessário expôr neste lugar.

O *Congresso Provincial Hindú* não representa, portanto, outra coisa senão uma edição refundida e milhorada do referido Centro.

O *Congresso* de que sê trata terá a sua hegemonia propria, esforçando-se por todos os meios a seu alcance formar um todo de diferentes fracções dos hindùs, dispersas, cá e lá, sem orientação difinida.

Sob êste ponto de vista, calcula-se, desde já, a importancia do Congresso que, frise-se bem, sem mover hostilidades a quem quere, procurará colocar o hindù ao lado do seu irmão cristão em diferentes ramos em que êste lhe leva a primasia.

A' vista do exposto, esperamos que todo o hindú pensante, cioso do seu levantamento politico tomará parte activa na pronta concretisação da grandiosa idêa do sr. Sardessai e de numerosos jovens hindùs que anceam ver realisado, a breve trecho, o *Congresso Provincial Hindú*, para o que a nosso turno empregaremos os nossos milhores esforços—é, de resto, escusado dizer.

A PROPOSITO...

CEGUEIRA

E' natural a um homem acusar outro que em sua legitima defesa rebate uma calúnia, desfazendo o falso conceito que uma sumidade intelectual procure formar ácerca duma classe, baseando-se num ponto mesquinho que me custa repetir nesse lugar e julgar boas todas as suas acções, mesmo que o homem as ache contrarias á natureza das coisas, tendo por ùnico fim ofensas para a classe, piores do que a ofensa pessoal, as quais depois trazem uma capa dourada para ocultar o estado primitivo, quando *algures surje uma criatura insinuar com insistência* etc. etc.

Como se vê, é um jogo de palavras que conquanto encerrem laivos - não me atrevo a dizer de que-não são superfluas, mesmo que tenham o fim de atribuir á outros, insinuações que são de si proprio.

Ora essa sumidade intelectual sem se referir ás respectivas afirmações, que eu citei como não tendo pés nem cabeça, diz que o meu protesto parecia ter laivos desta e daquela especie e que o mesmo podia tambem significar *curteza intelectual*, o que de forma alguma me pode incomodar, porquanto outra coisa não fiz senão trazer aos olhos do público que os que dizem ter *mais* aspirado a emancipação da *importante* e *prestante* classe hindu, não poupam pequena oportunidade para manifestar as suas aspirações duma forma contraria ao que elas rialmente são.

Não me refiro mais neste lugar ao mesmo assunto nem è meu intuito insistir em que os que mais aspiram á emancipação social (?) da classe hindú são aqueles que se opõem justamente ao seu progresso.

Longe de mim esta idea.

Ninguem pode deixar de concordar em que a civilisação ocidental trouxe-nos vàrios beneficios; e o indo-portugues, certo de que ela o caminharia para o seu progresso e da sua terra, não hesitou em adopta-la. Assim nos seus usos e costumes, no seu falar e em uma palavra, no seu modo da vida, nem sequer conservou coisa alguma pela qual se conhecesse o seu estado anterior.

Todavia na sua imitação se nota um erro, a maneira como um romancista o achava na obra de Natureza, que é de ela ter criado no Sol demasiado calor e na Lua excessivo frio.

A imitação foi em demasia no que era dispensavel e foi em menor grau ou antes, nem mesmo houve naquilo em que a sua necessidade era imprescendivel.

E' na sinceridade e franqueza, duas qualidades que são virtudes e que caracterisam um europeu que não houve absoluta imitação. Pelo contrario, a hipocresia é a nossa virtude, ainda que se diga o contrario.

Estas reflexões vem a talho de fóice a proposito do *Concanim* e das expressões Concania, Concanesia, Canarèsia e Marataria, expressões que se formam á força dos sufixos que a gramática generosamente nos põe á disposição a fim de nos livremente usá-los, agora que estamos no pleno periodo de Liberdade!

Alguns dos nossos concidadãos não hindús, pois que dizendo *Concanès*, não se pode distinguir o hindu do cristão, por todos serem da Concãnia, são da opinião de que a nossa lingua materna é o concanim, quando êles proprio tem um des prezo por êle: não o falam atè com criados e pescadores que nem uma patavina do portugues entendem!

Não sei se lhes causa atè o nojo de proferir a palavra *caril*.

Não é a questão em se tratando do ensino das primeiras letras, porque este ensino há de se fazer sempre na lingua conhecida do aluno, qualquer que ela seja.

Ora o *Concanim* não é uma lingua e diste não haja dùvida.

Deixando a divergencia de opiniões á parte, é justo e racional que em vez de si empenhar na formação duma lingua nova, melhor é adoptar uma lingua que é evolutiva, tem a sua literatura e é falada por quási metade da população.

Não quero dizer, porèm, que este ultimo meio é isento de dificuldades que não podem faltar, mas que se podem sanar com o intervalo de anos. Nós que aprendemos linguas extrangeiras não devemos abandonar a que temos, dedicando-nos para forar uma outra.

Se pelo facto de sermos do Concão, Concania e não de Marataria, devemos cultivar o *concanim*, não deve haver nenhuma duvida em voltarmos aos nossos usos e costumes antigos, deixando de comer carne de vaca e de porco e afastando-nos de tudo o que adoptamos da civilisação ocidental, porque ninguem ignora que somos da India, Industana ou Baratcanda.

B. C.

Taxa de guerra

Continua, ainda, a agravar a situação do contribuinte, reduzido á miseria pela cada vez mais crescente carestia.

E não há quem se apiede da sua sorte!

कांहीं अगदीं हताश व बेहोष होऊन खालीं पडले. सिलगुरी स्टेशनावर याचा रिपोर्ट होत असतां ह्यावेळीं दैववशांत तेथें सबडिविजनल मॅजिस्ट्रेटने गुरख्या शिपायांस गिरफदार करण्याची आज्ञा दिली. पोलिसानीहि त्यांस अटक करण्याचा प्रयत्न केला; परंतु ॐ फस्. गुरख्यानीं आपली कुकरी [एक प्रकारचें हातभर लांबीचें शस्त्र] उपसून उलट पोलिसांवर निकराची चाल केली. त्या बरोबर पोलीस वर्गाची पांचावर धारण बसून कोणीहि गुरख्यापैकीं गिरफदार न होतां, गाडीबाई आपला घडघड शब्द करीत चालती झाली. भारतकार ! हें वाचलें ह्मणजे अंगावर रोमांच उभे रहातात. कसकसे अन्याय निर्बलतेचा फायदा घेऊन बलवान लोक करीत असतात, याचीं उदाहरणे पूर्वींहि पुष्कळ झाली आहेत व तूर्तहि होत आहेत ! हा रेल्वेचा अनुभव सर्वत्र सर्वांस थोड्या बहूत अंशीं आहेच असें ह्मणणें गैरशिस्त होणार नाहीं. तरी याचा प्रत्येक भगिनिबंधूनें विचार करून शारीरिक व मानसिक बल वाढविण्याकडेच शक्तीचा उपयोग करावा असें मला वाटतें. फार काय, हा प्रश्न प्रस्तुत तरुण समाजानें हातीं धरून शारीरिक व्यायामपद्धति अमलांत आणण्याकरितां एकादी संस्था स्थापन करून सोडविला पाहिजे. अस्तु ॥ नायमात्मा बल हीने नलभ्य ॥ हें श्रुतिवाक्य सादर करून हा लेख सद्गुरुचरणीं अर्पण करितों.

ॐ तत्सत् ॐ

पूर्णाश्रम

* * * * *

देशी भाषेंत सुइणी शिक्षण

श्रीयुत रा.रा. भारतकर्ते यांसः----

चालू माहेच्या २१ तारखेस प्रसिद्ध झालेल्या ४१ नंबरच्या बोलेतीं ओफिसियालमध्यें ता.१२ एप्रीलची ४१२ नंबराची प्रोविसियाल पोर्तारी प्रसिद्ध झाली आहे. तींत आपल्या गोवेंसरकारानें, फोंडें, केपें, व सांगें एथील मुनिसिपाटीची मागणी लक्षांत घेऊन नवीन गोवें एथील मेडिकल कोलेजच्या सुइणी शिक्षणाच्या क्लासांत हिंदु स्त्रियांना देशी भाषेंतून शिक्षण देण्यांची मुदत आणखी तीन वर्षें वाढविली आहे. या संबंधाची सदर कालेजची जाहिरातहि नंबर ४० व ४१ ह्या बोलेतींवर प्रसिद्ध झाली आहे. तिजवरून विद्यार्थिणीनीं नांवें नोंदण्याची (मात्रीकुल करण्यांची) मुदत जून माहेच्या ५ पासून १४ तारीख पर्यंत बाराच दिवसांची आहे. दिरेक्तोर दे इस्कोल मेदिक सिरूर्जिक " यांच्या नांवावर अर्ज करून, आपलें नांव, वय जन्मठिकाण व तूर्त राहण्याचें ठिकाण यांचा उल्लेख व हिंदुबायकानीं वयाचा दाखला वासीन केल्याचा दाखला व दुसरे सांसर्गिक रोग अंगीं नसल्याचा डाक्टराचा दाखला असे तीन आतेस्ताद जोडून तो अर्ज पाठविला पाहिजे.

आजवरच्या अनुभवानें ह्या शिक्षणाचा परिणाम उत्तम होतो हें सर्वांस ठाऊक आहेच. तेव्हां प्रत्येक वाचकानें आपापल्या गावांतील ह्या शिक्षणाला योग्य दिसतील त्या त्या स्त्रियांस त्याबद्दलची माहिती व सहाय देऊन एकपरी देशहिताचे व दुसरेपरी त्या स्त्रियांच्या जीवनोपयोगाचे कार्यास हात भार लावणें योग्य आहे. हें त्यांचें कर्तव्य आहे. ते ही संधि वायां जाऊं देणार नाहींत अशी आशा आहे. कळावें.

आ.
ना.

भारत

गुरुवार जेष्ठ व० ९ सी. १८४२

दोन नवीन शहरें

मुर्गांव व सांवडें या ठिकाणीं दोन शहरें उभ्वून देण्याची उठलेली हूल सर्वांच्या माहितीची झाली असून, तो एक सार्वत्रिक चर्चेचा विषय होऊन राहिला आहे. या दोन शहरांची स्थापना झाल्यास जुन्या व नव्या काबिजादींत एकेका शहराची भर पडून त्यांस अगोदरच्याहून ज्यास्त महत्व येईल व गोव्यांच्या आर्थिक सामर्थ्याची वाढ होईल. प्रमुख बंदर आणि रेलवे स्टेशन या नात्यानें, जगाच्या प्रवासी व व्यापारी दळणवळणाशीं त्याचा चालू असलेला संबंध विशेष भरभराटीचा होऊन मुर्गांवच्या व्यापारी ऊर्जितावस्थेंवरच सरकारी हातभार लागला असतां त्याची किंमत जगांतील मुख्य बंदरांशीं चढाओढ करण्यापर्यंत वाढेल आणि तसेंच सावडें येथेंहि खाडीचें बंदर व रेल्वे स्टेशन अशा दोन टोकांचा संयोग झाला असल्यामुळें गोव्यांतील अंतर्गत मालाचा खप व वाहतुक होण्याजोगें योग्य केंद्रस्थान अस्तित्वांत येईल, अशी आशा करण्यास जागा आहे. रेल्वे रस्त्यानें गोव्यांतील प्रदेश ओलांडल्यापासून जलस्थल प्रवासास अनुकूल अशा सोईचें, वरील दोनहि ठिकाणीं एकीकरण होऊन गेलें असल्यानें दिवसें दिवस त्याची स्थिति, सुधरत कालावधीनें शहर स्थापनेंपर्यंत त्यांचें पर्यवसान झालें असतें, असें, ह्या दोनहि गावांत थोड्याच कालांत घडून आलेल्या कार्यावरून भासत होतें. इतकेंच, कालावधीवर अवलंबून असलेली गोष्ट, 'राजा कालस्य कारणम्' या ह्मणींतील यथार्थता दाखविण्यासाठीं आजच करून दाखवावी असें आमच्या सरकारास वाटून शहर वसणुकेच्या कल्पनेस मूर्त स्वरूप देण्यासाठीं मुहुर्तमेढ सुद्धां रोवण्यांत आली. आतां, यापुढें, मुर्गांव येथें साजरा करण्यांत आलेल्या उत्सवाच्या सुरवाती नंतर काय काय प्रकार होतील ते दिसणार आहेतच. पण, अगोदर कांहीं सूचना देणें हें आमचें कर्तव्य असल्यावरून त्यांत करतां येण्यासारखे फेरफार जे आह्मांस इष्ट वाटलें ते येथें नमूद करितों.

सांवडें या साधारण प्रतीच्या गावांस रेल्वे स्टेशननें प्राप्त करून दिलेल्या महत्वांत विशेष भर घालण्यास कारणीभूत होणारी जी नदी ती अनेक जागीं, आगबोटी व मोठ्या आकाराच्या होड्या मावविण्याइतकी खोल नसल्यावरून फारच गैरसोय सोसावी लागते. व जिकडे तिकडे प्रवासाची शीघ्रगामी वाहनें प्रचारांत येत चाललीं असतां, रेंगाळत चालणारीं प्रवास-साधनें अद्याप उपलब्ध असल्याबद्दल आश्चर्य वाटतें. ही गैरसोय दूर केल्याशिवाय सांवडें बंदरांस यावी तितकी उपयुक्तता तर येणार नाहींच. मात्र दर साल नवा चिखल सांचत असल्याकारणानें नदीचें पात्र आंखुड होऊन ती गैरसोय भानगडीची होईल यास्तव, जनतेस फारच उपयुक्त ह्मणून आवश्यक, गोवा-सरकारच्या तिजोरींत आगबोटींच्या उत्पन्नानें भर घालणारी ह्मणून फायदेशीर व सांवडें या गांवांचें शहर बनविण्यास बहुशः कारणीभूत झालेली ह्मणून ह्याहि बाजूनें हितकर अशी नदीची दुरुस्ती अगोदर न केल्यास शहरवसणुकेपेक्षां अधिक अगत्याचें काम मागें टेविल्याचें अपयश सरकारच्या माथीं आल्या शिवाय राहणार नाहीं.

मुर्गांव व सांवडें एका रेल्वे-रस्त्यावरचीं स्टेशनें असून, शहरें झाल्यानंतर त्या दोनही ठिकाणांतील व्यापारांची ने---आण सध्या पेक्षां किती तरी वाढेल. तथापि तींत रेल्वे कंपनीचा फायदा होऊन, इकडील गाड्या, होड्या वगैरे साधनाच्या मालकांस भाड्या संबंधानें फायदा घेतां येणार नाहीं. हा फायदा तूर्त पणजी शहराच्या व्यापारी स्थानानें होत आहे. तोहि, मुर्गांव शहराच्या स्थापनें नंतर पणजीचे वर्चस्व अंशतः कमी झाल्यानें होण्याची आशा व्यर्थ आहे, हें लक्ष्यांत घेतलें पाहिजे; ह्मणून ह्या नव्या शहरांच्या स्थापनेपासून नव्या जुन्या काबिजादींतील दळणवळण वाढून गोव्याचा जितका फायदा व्हावयास पाहिजे होता तितका तो खास होणार नाहीं. तो फायदा योग्य प्रमाणांत घडून यावा, असें सरकारास वाटून त्यानें अन्य मार्गाचा अवलंब करण्याकरितां बाणस्तारी व वोरी येथील अपुरे राहिलेले मार्ग पुरे करण्याकडे लक्ष्य पुरविलें असतें, तर नव्या जुन्या काबीजादींचा संयोग होऊनहि बाणस्तारी व वोरी येथील पुलांप्रमाणेंच मुर्गांव-सांवडें-शहरवसणुकीचें काम अपुरें राहील की काय अशा प्रकारचा संशय लोकांच्या मनातून जाऊन सरकारविषयींची अपूज्य बुद्धि कमी होण्यास जागा राहिली असती. आगबोटीनें पणजीपासून सांवडेंपर्यंत किंवा उलट प्रवास केलेल्या इसमास बाणस्तारी व वोरी येथील पूल आज हयात नसल्यावरून दृष्टीस न पडले तरी नदीच्या काठीं दोनहि बाजूस त्यांचीं उभारलेलीं थडगीं पाहून त्यांच्या साठीं पाण्यासारखा खर्चिलेला पैसा पुलाबरोबर पाण्यांत गेल्याची याद देण्याकरितांच कीं काय दगडी स्मारक उभारण्यांत आलें आहे असें वाटूं लागतें. ह्यामुळें गव्हरनरासारख्या बड्या हुद्याच्या माणसास असें वाटलें असावें कीं, पैसा पाण्यांत गेला तरी गुपचूप राहणारी प्रजा कर देण्यास कमकुवत नाहीं. दुसरें, प्रजेसहि असें वाटणें योग्य आहे कीं बाणस्तारीं व वोरी येथील पुलांचीं ओढून उपरीनिर्दिष्ट भावी शहरें अस्तित्वांत येण्यापूर्वींच, कराच्या रूपानें कहर उठवून खर्चाच्या भारानें आकंठ बुडालेल्या प्रजेचा पाय कर्जाच्या 'खोलांत' लोटितात कीं काय ?

भपका बाजूस ठेवून गोव्यांची खरी सुधारणा व्हावी असें मनःपूर्वक ज्यांस वाटतें त्यांनीं, आपोआप शहरें होण्याच्या मार्गावर असलेल्या बंदरीं स्टेशनावर अहंपणाचा शिक्का मारण्याचा हेका सोडून, आयत्या पिठावर रांगोळ्या घालण्याचा हट्ट न धरितां दोन काबीजादींचा संयोग करण्यासाठीं वरील दोन पुलांची उभारणी करून सरकार व जनता या दोघांत परस्परांविषयीं असलेला गैरसमज दूर केल्यानंतर वर उच्चारित दोन शहरांच्या वसणुकेस आरंभ करावा.

---डेराडुम येथील कॉलेजमध्यें वनविद्येचें शिक्षण संपादन करण्यासाठीं गोवासरकारनें एका विद्यार्थ्यास १०० रु.दरमहा देऊन तेथें पाठविण्याचें ठरविलेआहे

स्फुट विचार

वे. प्रा. ज्ञानमंदीरः--- या संस्थेचा तिसरा वार्षिक समारंभ थोड्या दिवसांमागें साजरा करण्यांत आला. ह्या संस्थेचा जन्म अत्यंत आणिबाणीच्या वेळीं ह्मणजे युरोपीयन युद्ध अत्यंत रंगांत असतांना झाला. या वेळीं अनेक सार्वजनिक संस्था द्रव्याभावामुळें काळाच्या अफाट उदरांत गडप्प होत होत्या. वर्तमानपत्रांनींआपले हातपाय आंखडले होते. जगापुढें जीवनार्थकलहाचा प्रश्न त्या वेळीं जितका नेटानें उभा राहिला तेवढा पूर्वी केव्हांहि राहिला नव्हता. अशा वेळीं सदर ज्ञानमंदिरास जन्म देऊन त्याची उत्तरोत्तर भरभराटच होत आहे, हें आपल्या कार्यानें सिद्ध करून दाखविणाऱ्या चालकांचें कौतुक केले पाहिजे. असोळणें येथें हिंदूंचीं केवळ विसपंचविस घरें आहेत. तेथील वस्ती चारसेंवर नसावी असें वाटतें. ह्या गोष्टी लक्षांत घेतां त्या गांवांस भूषणभूत होऊन राहिलेल्या ह्या संस्थेची प्रगति प्रशंसनीय आहे, हें कोणीहि कबूल करील. गोमांतकांतील संस्थांचा आजपर्यंतचा इतिहास जर अवलोकन केला तर गांवांतील क्षुद्र "पोलीतिकें", खासगी द्वेष, परोत्कर्षसहिष्णुता इत्यादि मनुष्यप्राण्यांच्या नीचमनोवृत्ति त्या संस्थावर जोराचा हल्ला करून त्यांच्या ठिगऱ्या ठिगऱ्या उडवून टाकतात असें दिसून येतें. परंतु हा जबरदस्त संमंध ह्या संस्थेस धोका पोंचविण्यास शकला नाहीं, ही सुदैवाची गोष्ट आहे. कदाचित् असेंहि असूं शकेल कीं, श्री वेताळाच्या नावाचा ताईत या संस्थेच्या गळ्यामध्यें असल्यामुळें तिला मत्सररूप पिशाच्यांची बाधा होत नसावी! ह्या बद्दल श्री वेताळास आह्मीं शतशः प्रणाम करितों. असोळणेकरांचा वेताळ प्रागतिक आहे, आपल्या भक्तांना ज्ञानमंदिरासारख्या संस्थांची किती आवश्यकता आहे, ह्याची त्याला पूर्ण जाणीव आहे व या संस्थेस पांच रुपयांची वार्षिक देणगी देवून ज्ञानमंदिराविषयींचा आपला प्रेमभाव त्यानें व्यक्त केला आहे. श्री वेताळाचे एकंदर निस्सिम भक्त आपल्या देवतेस अनुसरून ज्ञानमंदिराकडे प्रेमदृष्टीनें पाहण्यांचा समंजसपणा दाखवितील अशी आह्मीं आशा करीतों. व चालकांनीं मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचें अभिनंदन करून संस्था दीर्घायु होवो असें इच्छितों.

हें कसलें औदार्य ?--- इकडील कष्टमखात्याचे माजी डायरेक्टर सि. गोंसाल्व्हीस कारदोझ यांस, इकडे अटक केलेल्या काहीं जर्मन आगबोटींवरील माल मुंबईस नेऊन उतरविण्यास केलेल्या अविश्रांत श्रमाबद्दलच्या बक्षीसादाखल, १७००० रुपये गोव्यांतील सरकारी तिजोरींतून देण्यांत यावे, असें पोर्तुगाल सरकारनें फर्माविलें आहे. सि. कार्दोझ यांची कीर्ती माहीत नसलेला एखादा मनुष्य गोव्यांत कदाचित् असेल नसेल ! गतसाली गोवासरकारनें मुंबईसरकारच्या कंट्रोलराकडून तांदूळ इकडे आणण्याच्या कामावर नेमल्यावेळीं, डायरेक्टरसाहेबानीं कसकसे लंपडाव लढवून, सरकारी पैशानीं आपले खिसे गरम करून घेतले, याची वर्तमानपत्रांतून झालेली चर्चा साहेबांस फार लांछनीय असून या कृष्ण कारस्थानाबद्दल त्यांस किंवा उगीच नालस्ती केल्याबद्दल वर्तमानपत्रांस, योग्य शिक्षा झाली पाहिजे होती; परंतु तें सगळें एकीकडेच राहून, डायरेक्टरांस असलीं कामें पुढेंहि

ANO V.—NUMERO 13 —1920 QUEPEM, QUINTA-FEIRA 17 DE JUNHO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas

INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............. 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios

Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—**Bharat**

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia **Pundolica**—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर

गोव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहीरातींचे दर

मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें—गुरुवार, तारीख १७ माहे जून सन १९२० अंक 13 वा.

PELOS HINDUS

Agora que a classe hindú da India, compenetrada de seus sagrados deveres para com a Patria, esforça-se por levantar da decadencia politica a que os seus maus fados a tinham arrastado, desnecessario é encarecer a vantagem duma agremeação politica que unindo todos os hindús em massa compacta, num corpo sólido e indivisivel, em ultima analise, numa fôrça concentrada, lhes difina a orientação que politicamente devem seguir.

Precisamente é isto que se propôi realisar o projectado *Congresso Provincial Hindú* cujo directorio organisará naturalmente um corpo de voluntarios, tendo por ùnica missão a ininterrupta e insistente propaganda de principios da instrucção e educação politicas, preconisadas, sobretudo, pelo grande patriota e eminente politico que se chamou Numa Droz.

Como veem, o *Congresso Hindú* nao há de ser uma *fábrica de eleiçõis*, circunscrevendo a sua acção á politica eleiçoeira.

Não; o seu principal fim convergirá em, mediante esforços tenazes e persistentes, formar verdadeiros cidadãos e caracteres na classe hindù pelo metodico emprego de meios permitidos e garantidos pela Constituição do democratico e liberal regime que felizmente nos governa.

E' a especialidade que caracterisa o *Congresso Hindù*, distinctivo que, certamente, o fará simpatico e respeitado, ainda ,na opinião dos mais irredutiveis inimigos da classe hindù.

Anima-nos, porisso, a esperança de que os nossos *leaders* envidarão os seus esforços em concretisar, sem máis perda de tempo, a patriotica idéa do *Congresso Provincial Hindù*

Jurisprudencia Administrativa

Nenhum Estado pode prosperar sem a observancia da Lei e da Justiça, que devem ser amanhadas para o cumprimento exacto do dever. São elas as prerogativas que devem andar aligadas num amplexo perene para a solução dos problemas mais intrincados da administração publica. São elas as duas fôrças poderosas que devem insuflar os actos de um governo que timbra por ser proficuo e moldado nos ditames da ordem, da consciencia e da moralidade. São elas, alfim, as pilastras em que assenta a majestosa cúpula da engrenagem politico-social de um povo que almeja pela alvorada do Progresso.

O afastamento delas produz frutos agros. A decepção é a sua consequência. No seio das populações lavra a descrença e o desprazer. Exhaure a milhor seiva da esperança que é a aspiração dos disconsolados.

Leis boas há que farte, mas deficiente é a sua execução, e nesta, ás vezes, se dá cinca. Temos pomposos programas, proclamações finamente buriladas, discursos veementes de tropos e recamados de promessas espantosas, mirabolantes; mas tudo isso falha na pratica.

São como as palavras que flutuam ao sabor das brizas matinais, e volitam como mariposas errantes nos páramos do infinito ... esquecimento!

Isso, certamente que não prima em qualquer novidade.

Já na antiguidade, um eminente tribuno romano (Cicero, *De off*.,liv. II, cap. 6º) doutrinava que para lograr a confiança dos povos, a *justiça* tem mais poder do que alguma outra vertude."

...E o maduro Epiteeto, no seu famoso *Manual*, consignára essas verdades como punhos:

"Nòs temos muito bons preceitos e belas máximas, mas è para discorrer sôbre elas, *e não para as praticar*. Nossas acções *desmentem* as nossas palavras."

Modernamente, o insigne Jules Simon, na sua valiosa obra *Le Devoir*, lamentava de veras:

"...que o mundo oferecesse um largo estendal de *vitimas humanas* a apelarem para esse deus que se chama o Direito e a Justiça!"

* * *

Ocorreram-nos estas corredias e fugazes considerações, quando chegamos a vêr, com mágua, a celebre *Carta Organica* esfrangalhada e sovada aos pês pelos que deviam cuidar dela com esmêro, recolhendo carinhosamente os seus vagidos ... infantis!

Mas... que brusca desilusão nos veiu oprimir ante-razão? Que amargo desengano se desfolhou aos nossos oês!

Se Ela, logo no seu berço, ao desabrochar da Vida, sofreu tratos de...polè!

De feito acontece que estamos assistindo ao paulatino ruir da derrocada das nossas tão fagueiras instituições administrativas, mercê da impericia umas vezes, e, outras vezes, da irreflexão, ou inconsciência com que elas são tratadas!

O mal vai alastrando, mas pode remediar-se. Convem por isso, que se ponha a nù o lado vulnerevel, para ao menos, evitar-se o dano, de futuro...

Se o jornalista profliga com venábulo da censura os desacertos funcionais de uma autoridade para a sua reparação; ao mesmo passo o juri sconsulto analisa-os no singelo intuito de orientar os poderes publicos no cumprimento exato das desposições legais.

Pois è certo e axiomàtico:

Que o golpe imprevisto da *logica* è o soberano segrêdo dos publicistas superiores (Vitor Hugo, " Mes Fils ", cap. 111)

Que a *razãohumana* é um poder destinto e independente, que só a si mesmo se subordina constituindo esta independência um dever [Emile Saisset, "La Philosophie , pg.57)

Nesta ordem de ideias, já dantes temos esvurmado com o acúlio da nossa critica, na imprensa periódica, e, ultimamente, nos jornais "A India Portuguèsa (1911) e nO Ariano (1914-1915), varios *atos* que iam de encontro ás leis administrativas.

Ora agora o faremos também sem antingir personalidades, mas só *doutrina* que pareça pouco consentanea á razão e aos ditames da justiça e da legalidade, avultando a sua erronea aplicação.

Nada mais.

Irêmos, portanto, analisando mais de espaço, todos os *casos* que involvam preterição de direitos que ás autoridades constituidas incumbe respeitar como um cacifo precioso e sagrado, para o decoro da moralidade publica que, em regra, deixa muito a desejar!

E não nos quedaremos em parlandas de largo folgo. Seremos possivelmente breve porque, consoante aconselha o melifluo La Fontaine:

Les longs ouvrages me font peur
Loin d'èpuiser une matière
On n'en doitprendre que lafleur

Soares Rebêlo

Expediente

Roga-se aos srs. assinantes a fineza de saldarem o preço de suas assinaturas, pelo correio que a Empresa do Bharat lhes ficará muito grata.

माझें ह्मणणें असें होतें कीं, "सर्व लोकांपैकीं निम्मे ख्रिस्ती झाल्यानें व त्यानीं जन्मापासून पोर्तुगीज भाषेचा आश्रय धरिल्यानें, त्यांनां [ख्रिस्तिजनानां] मराठीची विशेषशी—नव्हे निखालस गरज नाहीं. त्यांची पोर्तुगीज लोकांप्रमाणें—ह्या लोकांच्या धर्माबरोबरच पोर्तुगीज ही जन्म भाषा होऊन बसली आहे.

रा. सीताराम केरकर यांनींहि मजप्रमाणेंच आपल्या १६ मेच्या विद्याप्रसारांत पोर्तुगीज व मराठी भागांत ख्रिस्तीयनांविषयीं विधान केलें आहे; व त्यावर 'देबात'चे सन्मान्य व विद्वान संपादक सि. मिनेज ब्रागांस यांनीं आपल्या पत्रांत आपल्या मतपंथानुसार टीका केली आहे; पण ती बरोबर नाहीं. ती अशीः---रा. केरकर ह्मणतातः— "आपल्या गोव्याची या [स्वभाषेच्या] बाबतींत काय स्थिति आहे पहा अर्धी जनता जी हिंदु ती स्वभाषेला अजून चिकटून आहे, तर दुसरी अर्ध संख्यांक प्रजा जी ख्रिस्ती, ती स्वभाषेचा त्याग करून केव्हांच मोकळी झाली आहे. गोमांतकीय ख्रिस्ती जनतेला स्वभाषा नाहीं . . , ... आणि यावर रा. कामत यांच्या प्रमाणेंच —पण अगदीं मात्र ह्मटलेलं नाहीं—'देबाता'चे संपादक ह्मणतात "गोव्यांतील ख्रिस्तीयनास त्यांची स्वतःची भाषा नाहीं, हें कसें तें समजत नाहीं. बहुतकरून [a maioria] ख्रिस्तीयन कोंकणी बोलतात व पोर्तुगीज बोलणाऱ्यांची संख्या अत्यल्प आहे. . . . .

माझें यावर---रा. कामत व ब्रागांस यांच्या कोटीक्रमावर—उत्तर असें कीं: रा. कामत व ब्रागांस यांच्या मताप्रमाणें—कोंकणी भाषा जरी बहुतेक ख्रिस्तीयन बोलतात तरी ती भाषा आहे असें ह्मणतां येत नाहीं; कारण बोलण्याप्रमाणें लिहिण्यास त्यांस लिपी नाहीं, हें एक, आणि २ रें सगळा लेखनाचा [शिक्षणाचाहि] व्यवहार पोर्तुगीज भाषेंत व लिपींत होतो. अर्थात त्यांची कोंकणी भाषा असून नसल्यासारखीच आहे. आणि ह्मणून मी त्यांच्या बोलण्याच्या भाषेस महत्व दिलें नाहीं व धर्माबरोबर पोर्तुगीज ही जन्मभाषा होऊन बसली आहे, जन्मापासून त्यांनीं पोर्तुगीज भाषेचा आश्रय धरिला असल्यानें त्यांना मराठीची विशेषशी—नव्हे. निखालस—गरज नाहीं. =आणि ह्मणून ते मराठी विषयीं [तिचें कोंकणींशी जवळ जवळ सादृश्य आहे असें मी ह्मटलें आहे, व तसेंच श्री. कामत (कोंकणीचें मराठीशीं पुष्कळ [!] साम्य व सादृश्य आहे) ह्मणतात] काळजी घेत नाहींत असें ह्मटलें आहे. श्री. कामत यांच्या ह्मणण्याप्रमाणें जरी त्यांची भाषा कोंकणी आहे व कोंकणीचें मराठीशीं पुष्कळ साम्य व सादृश्य [!] आहे, व हें गोव्यांतील दरेक मनुष्य समजून उमजून आहे, तर मुठभर पोर्तुगीज मायभाषा असलेले लोक सोडून बाकीच्या कोंकणी बोलणाऱ्या ख्रिस्तीयनांस हिंदूंप्रमाणें कोंकणीचा किंवा तिच्याशीं साम्य व सादृश्य असलेल्या मराठीचा अभिमान कां नसावा व त्यांनीं बोलण्याप्रमाणें मराठींतून किंवा कोंकणीतून [इची लिपि तयार करून किंवा मराठी—संस्कृतची लिपि घेऊन, तींतून] शिक्षण व लेखन कां करूं नये ? त्यांची काळजी कां घेऊं नये ? पोर्तुगेजींतूनच सगळा वाचन लेखनाचा व्यवहार कां करावा ?

फार दिवसांनीं दिसूं लागलेला व आंग्लांस (हिंदूस) कोंकणे ह्मणून संबोधिणारा एक ख्रिस्तीयन "येराल्दांत" ह्मणतो कीं, मराठी ही गोमांतकांतील लोकांची भाषा नव्हे ती महाराष्ट्रांतील लोकांची भाषा; गोमांतकांतील हिंदु लोकांची भाषा कोंकणीं. कारण गोमांतक हें महाराष्ट्र देशांतलें नसून कोंकणपट्टींतलें आहे. अर्थात कोंकणांत रहाणाऱ्या लोकांची भाषा कोंकणी असायाची व त्याप्रमाणें ती आहेहि. [पण तीस शरीर (तिची स्वतःची लिपि) मात्र नाहीं.] मराठी ही परकी भाषा—पोर्तुगेज भाषेप्रमाणेंच त्यांनीं आपलीशी मानून जवळ केली आहे. व हा अन्याय होय ! खरें कीं काय ? श्री. कामत काय उत्तर करितात तें पाहूं.

कळावें ही विनंति.

एस्. एच्.

भारत

गुरुवार अषाढ शु० १ दा. १८४२

हिंदु व ख्रिस्ती

अगदीं नसण्यापेक्षां कांहीं तरी असणें चांगलें अशा अर्थाच्या पोर्तुगीज ह्मणीतील भावार्था प्रमाणें, आमची हिंदुसमाजाची तूर्तची स्थिति होऊन, अगोदरच्याहून थोड थोडी चळवळ सुरू असल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें ह्मणजे हिंदूंची आर्जितावस्था अगदीं नजिक येत चालल्याचें पाहून खऱ्या हिंदु-अंतःकरणास आनंदाचें भरतें आल्याशिवाय राहणार नाहीं; पण ही क्षुल्लक गोष्ट ह्मणजे हिंदूंची उदयोन्मुख प्रगति पाहून आजपर्यंत गोव्यांत प्रत्येक बाबतींत मी मी ह्मणणाऱ्या कांहीं ख्रिस्ती लोकांस आमच्या विषयीं चुरस वाटूं लागली आहे. ती त्यांची मनांतच न राहतां बागेंत किंवा लेखनांत आल्याशिवाय राहत नाहीं. त्यांस असें वाटत असावें कीं राजकीय पटांगणांत ख्रिस्ती लोकांबरोबर कुस्ती देण्यास सरसावलेला हिंदुसमाज कधीं काळीं त्यांस चित केल्या शिवाय राहणार नाहीं. ही नाण्याची एक बाजू असली तरी दुसरी बाजू कांहींशीं समाधानकारक आहे ह्मणजे इतर कांहीं उदारमतवादी ख्रिस्ती बंधूंस हिंदूंची राजकारणात सहकारिता आवश्यक वाटून त्यांच्या उत्कर्षाबद्दल कौतुक करण्याचा प्रसंग ते दवडीत नाहींत, परंतु अशा वेळीं आह्मी असें विसरतां कामा नये कीं, ख्रिस्ती बांधवाशीं खऱ्या सहकारितेनें वागण्यासाठीं त्यांजवळ आमचें समानशीलतेचें नातें असून तें दृढ झालें पाहिजे. सुभाषितांत 'समान शीले व्यसनेषु सख्यम्' असें ह्मटल्याप्रमाणें जर आह्मांस ख्रिस्ती समाजाशीं सख्य ठेविलें पाहिजे—व तें ठेवणेंहि आवश्यक आहे तर समान शीलतेवरूनच होय; व ही समान शीलता ह्मटली ह्मणजे शिक्षणांतील बरोबरी होय, असें कोणासहि वाटेलच. असल्या समानशीलतेपासून निष्पन्न होणारें सख्य प्रयत्नसाध्य असून परिणामी हितकरहि होय. न पेक्षां, ख्रिस्ती लोकांस असलेल्या व्यसनाचें किंवा दुर्व्यसनाचें ह्मणा पाहिजे तर--अवलंबन करून सख्य जोडण्याचें कोणी मनांत व कृतींत आणील तर तें कृत्य निंद्य ठरून परिणामहि अहितकारकच होईल. तांबडें पाणी पिऊन रागानें लाल झालेल्या माणसांत भांडण जुंपलेलें प्रत्येक गुत्त्यांत सहज दृष्टीस पडतें ! मग असल्या घातुक व्यसनापासून सख्य तें कसें निपजेल ? आतां व्यसनातहि सख्य उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे असें कोणीहि ह्मणेल व आह्मांस कोणत्याहि व्यसनाची आवश्यकता असेल, तर तें भर्तृहरीनें वाखाणलेलें विद्याव्यसनच होय; ह्या विद्याव्यसनांत आह्मीं मागसलेलों आहोंत. अशा स्थितींत ज्ञानप्रसारार्थ चहूंकडून प्रयत्न सुरू झाले पाहिजेत. तरच हळुहळू चालू असलेली हिंदूंची प्रगति न थंडावतां योग्य प्रमाणांत चालत राहील.

स्फुट विचार

आभार प्रदर्शनः— 'भारता'वर झालेल्या खटल्यासंबंधानें उल्लेख करितांना, प्रेमळ अंतःकरणानें व सहानभूतिपूर्ण शब्दानीं, त्या पत्राचें आर्थिक जीवन व संपादकांची कामगिरी यांचे दिग्दर्शन केल्याबद्दल आह्मी 'नवजीवना'चे मनःपूर्वक आभार मानितों. आजच्या स्थितींत गोव्यांत असलेल्या थोड्याशा हिंदु वर्तमानपत्रांनीं एकमेकांकडे सहकारितेचें धोरण ठेवून एकाच ध्येयाकडे दृष्टि रोंखिली पाहिजे. ह्याची जाणीव 'नवजीवना'स असल्यावरून त्याच्या प्रगमनशील विचारांचें कौतुक करावेंसें वाटतें. खटल्यासारख्या आणीबाणीच्या प्रसंगीं सहाय करण्यासाठीं डिफेन्सफंड उघडून 'विद्याप्रसार' व 'नवजीवन' या उभयतानीं बंधुप्रेम दाखविल्याबद्दल त्यांचे कितीहि आभार मानले तरी थोडेच आहेत असें मोठ्या आनंदानें कबूल करितों.

कोण हा अतिप्रसंग ?:—तांदुळाचा मक्ता अरेरावी पद्धतीनें हातांत आल्यापासून गोव्यांतील लोकांच्या उदरपोषणाची सत्ता एलिस्बांव आणि कंपनीच्या ताब्यांत गेल्यासारखी होऊन 'हमकरेसो'कायद्याचें दृश्य चित्र पाहण्यास मिळालें. असा मक्ता हातांत आल्यानंतर त्या कंपनीनें कुजका नासका तांदूळ गोव्यास पुरवावा हें इकडील अंदाधुंदीस शोभण्यासारखेंच होत ! याचा आह्मीं अगोदर निषेधहि केला आहे. पण या अंदाधुंदीचें पर्यवसान त्या कंपनीकडून पोर्तुगीज नोटीवर शेंकडा बारा आणे वटाव घेण्यापर्यंत होईल हें मात्र कोणासहि शक्य वाटलें नसेल; परंतु अशक्य ती गोष्ट शक्य करून दाखविण्याचा विडा वरील कंपनीनें उचलला असल्यामुळें असले अतिप्रसंग ती बिनदिक्कत अमलांत आणिते. सरकारशीं निष्ठा ठेविली ह्मणजे पुरे ! प्रजेस नासके तांदूळ चारले तरी हरकत नाहीं अशा बाण्यानें वागणारी एलिस्बांवची कंपनी गोवें सरकारची प्रजा असून इंग्लिश नोटा नसल्यास पोर्तुगीज नोटांतून शेंकडा बारा आणे कापून घेऊन पोर्तुगीज सरकारशीं राष्ट्रहित विघातक दृष्टीनें वागते असें ह्मटल्यास हें पाहण्याइतके सरकारचे डोळे उघडलेले नाहींत. असें मोठ्या दिलगिरीनें प्रसिद्ध केल्यापासून आह्मीं अराजनिष्ठ तर होणार नाहीं ना ?

मालवृत्त

(मागील अंकावरून पुढें चालू)

भागिदारांचीं नांवें	भागांची रक्कम
मागील पोंच	५०० रु.
श्री. यशवंत सू. सरदेसाई; मडगांव	५ रु.
,, दत्तात्रय व्यंकटेश पै; कुंपे	५ ,,
,, बाळकृष्ण मंगेश वागळे; सांवर्डे	५ ,,

वर्तमानसार

—आमच्या मेडिकल स्कूलांतील विद्यार्थ्यांची प्रवेश फी ५५००० रैस (६१ रु. २ आणे ४ पै) या प्रमाणें ठरविली असून शेवटच्या डिप्लोमाची रक्कम यापुढें ३५०-०० रैस (८७ रु. ९ आ. २ पै) भरावी लागेल !

---मिलिटरी अफिसरांची मुलकी खात्यांतील जागांवर नेमणूक होऊं नये, अशी कार्त ओंगानिकांत असलेली आडकाठी काढून टाकण्याचें घाटत आहे असें समजतें !

---१०००० रुपयांच्या भांडवलावर कौलें व विटा करण्याचा कारखाना पणजी शहरांत उघडला असून, तें भांडवल एक लाखापर्यंत वाढण्याचा संभव आहे. ईश्वर करो आणि हा कारखाना ऊर्जितावस्थेस येऊन इकडील मजुरांस काम मिळो.

---लिसेव सत्रालच्या जादा प्रोफेसरांच्या जागीं, उच्च शिक्षण असलेल्या उमेदवारांचीं विशेषेंकरून नेमणूक होईल. उच्च शिक्षणांत इस्कोल मेदिकाचाहि अंतर्भाव होतो.

---आंगोल येथें उडाणटप्पू लोकांस, ओब्रस पूब्लीकस ह्या खात्यांत जबरदस्तीनें नोकऱ्या स्वीकारण्यास भाग पाडीत आहेत. इकडेहि हा प्रकार चालू केला असतां बऱ्याच अनिष्ट गोष्टी टळतील.

----पोर्तुगीज प्रधानमंडळाचे अध्यक्ष सिं० आंतोन मारीय बातीस्त हे मरण पावल्याचें दुखःकारक वर्तमान आल्यामुळें गोव्यांतील सरकारी आफिसें दोन दिवस बंद ठेवण्यांत आलीं होतीं.

---रिवण येथील श्री विमलेश्वर आलयाच्या जीर्णोद्धाराचें काम बरेंच उरकलें असून, थोड्या अवधींत तें संपूर्ण होणार आहे. सदरील पुण्य कार्यास ज्या लोकानीं आंकडे घातले असतील त्यानीं त्यांची फेड करावी, अशी जीर्णोद्धार कमेटीच्या चिटणिसांची विनंति आहे.

-- पणजी येथें 'आ प्रोव्हींस' नावाचें एक पोर्तुगीज साप्ताहिक पत्र निघावयास लागलें आहे.

साभार स्वीकार

लोकसंग्रह [दैनिक]:---- संपादक रा. आर. डी. पराडकर, पुणें. वा. व. ट. हां. १३ रु. धोरण जहाल. विषय मांडणी जोरदार. ताज्या तारांचें योग्य प्रमाण.

प्रजापक्ष [साप्ताहिक]:--- हें वृत्तपत्र आकोला येथें रा. परशराम चिंतामण जोगळेकर यांच्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध होत असून, त्यांतील बहुतेक विषय समतोल वृत्तीनें लिहिलेले असतात. धोरण राष्ट्रीय. वा. व. ट. हां. २ रु. १४ आ.

जागृति [साप्ताहिक]:--- सं. रा. भ. ब. पाळेकर, बडोदें. वा. व. ट. हां. २ रु. १४ आ. या पत्राचे विचार मराठे लोकांस फार हितावह होण्यासारखे असतात.

उद्योगीभारतमाला [माला]:--- सं. रा. जनार्दन नरसिंह थत्ते. वा. व. ट. ख. सह २ रु. १३ आणे. या मालेच्या पुस्तकांतील विषय व चित्रें उत्तम असतात. एकंदर लेखांचें धोरण औद्योगिक उन्नतीस हातभार लावणारें आहे.

कीर्तन (मासिक):--- हें उत्कृष्ट मासिक गिरगांव मुंबई येथें केरळकोकिळाचे महाराष्ट्रांत अत्यंत नावाजलेले माजी संपादक महाराष्ट्रभाषाचित्रमयूर रा. कृष्णाजी नारायण आठल्ये या विद्वान व मार्मिक लेखकाच्या चालकत्वाखालीं प्रसिद्ध होत असतें. वा. व. ट. हां. ४ रु.

ANO V.—NUMERO 14 —1920 | QUEPEM, QUINTA-FEIRA 24 DE JUNHO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas

India Portuguesa...... 3-00-00
India Inglesa........ 3-08-00
Numero Avulso......... 0-01-00

Anuncios

Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत

BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर

गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहीरातींचें दर

मराठी दर ओळीस दोन आणें. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें-गुरुवार, तारीख २४ माहे जून सन १९२० अंक १४ वा.

Sustos descabidos

O jornal *A Provincia* que se edita em Pangim sob a direcção do sr. Pereira Batalha inseriu nas suas colunas da edição de 7 do corrente um *sensacional* artigo sob a epigrafe de *Contra a Republica ? ou Contra o Pais?*. Neste artigo,o ex-africano periódico frisa a necessidade *duma intervenção enèrgica das autoridades* contra *a propaganda anti-republicana* que *está sendo feita*, denunciando a seu modo, no decurso do mesmo seu artigo, factos corroborativos e justificativos do referido alvitre.

Entre outras coisas o semanario *A Provincia* narra, ali, o seguinte:

"Há dias, um jornal de uma aldêa das Novas Conquistas permitiu-se cuspir infamias sobre as instituições.

Foi querelado. Mas nestes casos, a querela não é remedio como se verá quando se tratar da decisão final."

Parece que a folha do sr. Batalha pretendeu, na sua aludida prosa, referir-se ao *Bharat*, único jornal que *foi querelado* nas Novas Conquistas; mas se dissemos *Parece*, è porque o nosso semanário não è *de uma das aldeias das Novas Conquistas* nem *permitiu-se cuspir infamias sobre as instituições*; pois *publica-se êle na capital dum dos concelhos das N. C. e permitiu-se apenas exteriorisar sincera-e francamente o sentir geral com respeito á taxa de guerra.*

Como os leitores veem, a *tri lateral* novidade que o sr. inspector dos correios e telegrafos transmitiu ao publico, tem um sò lado *verdadeiro*, o da querela, pertencendo ao dominio da imaginação, perturbada talvez, por quaisquer preconceitos ou propositos, os restantes dois lados; a não ser que o ilustre autor do artigo em questão tenha descoberto algum jornal *de uma aldêa das N.C.* que por *ter-se permitido cuspir infamias sobre as instituições tivesse sido querelado...!*

Se, porem, apesar de dois lados falsos, quiz a *Provincia* no calor de exibir o seu patriotismo, envolver no seu aludido *sensacional* artigo o nosso modesto mas *republicano* jornal, sentimos dizer-lhe que errou no alvo, defeito que, de resto, igualmente caracterisa *sui generis* toda a prosa, subordinada ás duas interrogações *Contra a Republica? ou Contra o País?*, porquanto a imprensa de Gôa ainda que esteja habituada a exercer livremente o direito da critica e exprimir com desassombro o que sente, não è, todavia,êla capaz de promover propagandas antinacionais ou contra as instituições que felizmente nos regem, desde a implantação do regime do glorioso 5 de Outubro de 1910.

Não se assuste, portanto, a *Provincia* com a maneira de ser da imprensa da *terra* que ninguem cá pensa em tocar no prestigio da Republica que lhe è sagrado,como o è a ela; nem se incomode em solicitar do governo energia *especial* para coibir abusos que por ventura os jornais do País cometam, pois *nêstes casos o único remèdio aconselhado pelos sãos principios da Democracia è a querela* porque só o poder judicial *na sua decisão final* è que poderá julgar se o acusado è criminoso ou não, ao contrario do que erradamente supõe o republicano e liberal jornal do sr. Batalha.

Recebemos

E agradecemos as visitas d'*A provincia* e *The Goa Mail* aos quais desejamos longa vida e muitas prosperidades.

Transportes fluviais

Qualquer que seja a forma de governo dum Estado e os principios em que ele se estabeleça, a sua administração publica deve ter por norma basilar e imutável: *servir bem o publico.* E' desta simples expressão que originou toda a sua engrenagem. E esta está de tal maneira disposta que um dente estragado faz que todo o seu movimento se desorganise e a sua acção se torne nula; e o veiculo que se forma pela justaposição de todos os elementos que correspondem a diferentes ramos em que se divide o serviço público, dificilmente preste ao fim que se tem em vista.

Estamos numa estação que nos aperta de todos os lados. As vias de transporte que nos eram mais acessiveis tem agora sido intransitàveis.

O correio anda a passos de caranguejo de modo que as noticias oficiais transmitem-se para umas localidades no quarto dia e para outras no quinto da sua publicação na cidade.

Os transportes que nos conduzem pelo Zuari e Mandovi tem-se tornado tão inexoraveis que nos consideram da qualidade inferior a nossas bagagens que sem receberem empurrões e sem se roçarem umas sobre outras nem se exporem à chuva, viajam, *contentes*, nos seus *camarotes*....interiores !

Dificuldades sem conta porem põem em perigo a nossa vida; e se a gente se despõe a ir a pê para evita-las nem isto pode fazer porque um guardachuva nos leva um dinheirão...!

E pena é que, apesar de se poder obviar a essas dificuldades duma forma que sem nenhum encargo oneroso ao Estado favoreça o público, guiando-se as nossas lanchas tão bem como nas estações anteriores, ninguem pensa nisso !

Quanto a mim deixarei aqui formulada uma idèa que, a se adoptar, será um beneficio ao público que tem o direito de exigir dos competentes acomodações precisas.

O serviço de transporte dos passageiros pelo Zuari e Mandovi faz-se ao presente com tres lanchas, duas da carreira ordinária e uma a que a fazia de Pangim a Mormugão. Esta ultima,porem, só efectua a carreira, quando o avultado numero dos passageiros da estação de Pangim o exigir.

Sucede que as lanchas da carreira ordinaria não aceitam em todos os portos passageiros, ou por sua afluência na lancha, ou porque se espera outra lancha de Pangim, o que o publico por não poder sonhar, aglomera-se, como é natural, nos embarcadouros, só ficando sabendo então que lhe è distinada outra, quando a carreira ordinária os deixa de receber. De modo que o pùblico está sujeito a muitos transtornos e maçadas que só êle experimenta.

O plano que se me sugere é o seguinte:

1.° Estabelecer duas carreiras de Pangim a Sanvordem e duas, vice-versa, e só com duas lanchas:

2.° A primeira deve sair de Pangim ás 6 horas, chegando a Sanvordem às 11, saindo desta estação ás 12 e chegando a Pangim ás 17 horas.

3.° A segunda lancha deve sair de Sanvordem ás 6, chegando a Pangim ás 11, saindo desta estação ás 12 e chegando a Sanvordem ás 17 horas

A lancha da carreira de Pangim a Mormugão ou aquela que faz uma carreira extraordinaria deve substituir as duas primeiras na carreira de Aldonã.

Ora este plano aumenta ao pessoal de duas lanchas, duas horas de serviço, pois que ao presente, o mesmo pessoal trabalha 9 horas, sendo 6 na carre-

भारत

गुरुवार अषाढ शु० ९ मी. १८४२

एकीची आवश्यकता

राहिला जरी एकजुटी
मग काय विचारतां वळकटी

एकाद्या समाजांत राजकीय, धार्मिक, किंवा इतर कोणत्याहि कारणामुळें कां असेना, एकदां फूट शिरली ह्मणजे उत्पन्न होणाऱ्या समाज-विभागांचीं ध्येयें निराळीं ठरून एक प्रकारची भाऊबंदकी उद्भवते—असल्या भाववंदकीचे दुष्परिणाम, मुसलमानांचा प्रवेश भारतांत झाल्यापासून व ख्रिस्ती लोकांचा पांढरा पाय आमच्या मायभूस लागल्यानंतरहि पिढ्यान पिढ्या हिंदूंच्या आंगवळणी पडले असल्यामुळें आज त्यांचें वर्णन करण्याची गरज नसली तरी ते कुपरिणाम शक्य त्या मानानें चुकविण्यासाठीं तन्निवारणार्थ कांहीं उपाय योजणे अत्यंत आवश्यक झालें आहे.

आजवर मिळालेला अनुभव असा आहे कीं, हिंदु समाजाचा एक भाग धार्मिक प्रकरणांत अलग झाला ह्मणजे, त्यानें, अगोदरच दुबळा झालेल्या हिंदुसमाजाचें अहित करून आपल्या पोळीवर तूप ओढण्याचे नित्य प्रयत्न करावे. व नंतर, वरील दोन अडचणींच्या कात्रींत सांपडून खचलेल्या हिंदुसमाजांत ज्या वेळीं मत वैचित्र्य शिरूं लागतें तेव्हां त्याच्या आपत्तींस खरी सुरवात होऊं लागते. ह्या विपर्यांचा ऐतिहासिक पुरावा तर मुबलक सांपडतो. त्याकडे लक्ष्य पुरविल्यास असें वाटूं लागतें कीं, समाजांत एकात्मता येण्यास मुख्य व आवश्यक असलेली गोष्ट ह्मणजे संकटकाल होय. व हा संकटकाल निरनिराळ्या बाजूनीं बाधण्यासारखा असल्यामुळें त्या त्या मानानें एकीसहि निरनिराळें स्वरूप येत असतें. याचें प्रत्यंतर पाहणें असेल तर ख्रिस्ती लोकांसहि तो संकटकाल बाधल्यावांचून राहिला नाहीं असें ऐतिहासिक दृष्ट्या सिंहावलोकन करावें. एकंदर विस्तृत हिंदुसमाजापासून जेव्हां बाटलेले थोडेंसे ख्रिस्ती निराळे झाले तेव्हां त्यांस संकटावस्था प्राप्त होऊन एकीचा अवलंब करावा लागला. पारशी लोकांपासून तर हें एकीचें तत्व जास्त प्रमाणावर आह्मां हिंदूंस शिकतां येण्यासारखें आहे. हिंदुस्थानासारख्या परकी देशांत एकदम आल्याबरोबर त्यांस एकोप्याचें अवलंबन केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें व आह्मीं हिंदु तर स्वदेशांतच परकी झालों असल्यामुळें आमच्या सगळ्या रोगांवर एकी हें एकच औषध कोणताहि राजकारणपटु भिषग्वर सुचविल्याशिवाय राहणार नाहीं.

आज आमचा समाज एकीविना कोणत्या अडचणींत सांपडला आहे त्याचे दिग्दर्शन सभोंवारच्या परिस्थितीकडे नजर फेंकल्यानें उत्तम प्रकारें समजून घेण्यासारखें आहे.

तूर्त एकी व संघटना ह्या विषयीं आह्मांत इतकी तीव्र भावना जागृत झाली पाहिजे कीं, एकामेकांचें बरें भलें झाल्यास त्याकडे मत्सरग्रस्त दृष्टीनें पाहून जीव कष्टी करण्यापेक्षां एकमेकांच्या हितासाठींच देह कष्टविण्याकडे मनाची आतुरता दिसून आली पाहिजे.

स्फुट विचार

फिरतें वाचनमंदीरः— मडगांवच्या मुनिसिपालटीनें स्थापन केलेल्या फिरत्या वाचन मंदिराची हकीकत सर्वांस माहीत असेलच. सदरहु मुनिसिपालटीचा हा प्रयत्न फार स्तुत्य होय. लोकांत ज्ञानाभिरुची वाढावी व त्यांनीं मिळालेल्या ज्ञानाचा फायदा करून घ्यावा ह्या हेतूनें स्थापन करण्यांत आलेल्या या वाचनमंदिराच्या योगें सासष्टी महालांतील प्रत्येक गांवच्या लोकांस या 'मुक्या शिक्षकां'च्या ज्ञानाचा अवर्णनीय लाभ होईल; परंतु त्यांतील सार संपादन करून त्याचा उपयोग आपल्या आयुष्यांतील हरएक प्रसंगीं करून घेणें, हें तेथल्या नागरिकांच्या कर्तबगारीवर किंवा हुशारीवर अवलंबून आहे. गोव्यांतील इतर मुनिसिपालट्यानांहि हा कित्ता गिरविण्यास योग्य असून, फिरतें शक्य नसल्यास, प्रत्येक महालच्या राजधानीच्या गावींतरी एकादें वाचनालय स्थापन करणें त्यांस भूषणावह आहे. मुनिसिपाल खात्यांतील क्षुल्लक व निरर्थक बाबतींतील खर्च कमी करून, त्याचा ओघ उपरोक्त वाचन मंदिराकडे वळविणें, त्यांच्याच हातीं आहे. यामुळें देशाच्या ज्ञानसंपन्नतेच्या कामास या सार्वजनिक संस्थानीं थोडाबहुत हातभार लावल्यासारखें होऊन देशसेवेचाहि प्रश्न त्यांकडून सुटल्यासारखा होईल यांत संशय नाहीं.

दुःखावर डागण्या ?:— पोर्तुगालच्या वृत्तपत्रांवरून कळतें कीं, येथील सरकारी तिजोरीस पडलेली तूट भरून काढण्यासाठीं आमच्या गव्हर्नर जनरल साहेबांच्या सूचनेवरून नवीन कर बसविण्यांत येणार आहेत. हें अशुभ वर्तमान खरें ठरल्यास गोमांतकस्थ करवाल्यांची स्थिति सांप्रतच्या प्रखर महागाईच्या काळांत किती शोकजनक होईल, याचें दिग्दर्शन आह्मी मागें आमच्या 'कर आणि गव्हर्नर' या लेखांत केलेंच आहे. आतां इतकेंच सांगितलें ह्मणजे बस आहे कीं, खरोखरच सरकारकडून नवीन करांचे ओझें येथील असहाय्य व निर्धन जनतेच्या सध्याच करभारानें वांकलेल्या डोक्यावर लादण्याचा अरेरावी प्रयत्न झाल्यास, या कृत्यास पंजाब प्रकरणांतील 'डायरची 'घोड चूक' असेंच ह्मणण्याची लोकांवर पाळी येईल. ही 'घोडचूक' होऊन जनतेंत अस्वस्थता माजूं नये अशी जर राज्यकर्त्यांची सदिच्छा असेल तर त्यांनीं नवीन करांचा जुना विचार आपल्या वैभवशाली मनांतून पार झुगारून दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं, हें उघड आहे. आमचे गव्हर्नरसाहेब शहाणे असल्यावरून या भावी करांच्या संकटांतून गरीब लोकानां मुक्त करतील, अशी आह्मांस आशा आहे.

'भारता'वर खटलाः— गेल्या शुक्रवारीं भारताच्या खटल्यासंबंधानें आह्मांस येथील कोर्टांत 'देक्लारासांवें' देण्याचें कर्तव्य बजवावें लागलें. 'राजद्रोही' मानण्यांत आलेल्या लेखाची जबाबदारी आमची असून त्यांत नमूद केलेल्या प्रत्येक विधानाची सत्यता साक्षीदार व दाखले या दोन्हीं राजमार्गान्वयें योग्य वेळीं कोर्टास पटवून दिली जाईल असें आह्मीं आमच्या जबानीवजा 'देक्लारासावांत' सांगितलें. नंतर जज्जसाहेबांकडून सरकारी वकिलाच्या अर्जाप्रमाणें आक्षेपार्ह लेखाची तपासणी करण्यासाठीं दोन परीक्षक नेमण्यांत आले. त्यांच्या अभिप्रायाचें कार्य पार पडल्यानंतर खटल्यास विशेष रुपरंग येणार आहे. खटल्यासंबंधानें कळविण्यासारखी विशेष महत्वाची बातमी असल्यास ती आह्मीं आमच्या आश्रयदात्यांस वेळोवेळीं कळविणार असल्यामुळें या विषयीं कोणीहि निराळा पत्रव्यवहार करायाची तसदी घेऊं नये.

आमचें धोरणः— सरकारी तारखात्याच्या कित्येक बोकोबांस 'भारता'चें धोरण राजद्रोहात्मक भासत असून आह्मांविरुद्ध त्यानीं एक सारखी 'कोल्हेकुई' सुरू ठेविली आहे. आह्मीं स्वीकारलेल्या देशहिततत्पर धोरणांत बदल व्हावा या अनुदार हेतूनें आह्मांस धमक्यासुद्धां देण्यांत येऊन 'भारत' बंद पाडण्याचा धाकदपटशाहि दाखविण्यांत आला. परंतु ह्या हितशत्रूंच्या अरेरावी डुरकावणीस भीक न घालतां आह्मीं आमच्या धोरणांत बिलकूल बदल करणार नसून 'सत्य दिसेल तें बोलण्याच्या' नियमास कधींहि बाध आणणार नाहीं, असें आह्मीं स्पष्ट बजाविलें आहे. 'भारत' बंद पाडण्याचा अश्लाघ्य व नीच प्रयत्न झाल्यास आह्मी दुसरा महाभारत प्रसिद्ध करूं; पण सरकारच्या बेकायदेशीर कृत्यांवर योग्य टीका करण्याच्या पंथापासून आह्मी कधींहि ढळणार नाहीं. असेंहि जाहीर करण्याचें कर्तव्य आह्मीं आमच्या मतें सरळ रीतीनें बजाविलें आहे.

आमचे हितशत्रुः— सरकारच्या बेकायदेशीर कृत्यांवर टीका करणें ह्मणजे रिपब्लिकविरुद्ध लोकांत गैरसमज पसरवून सार्वजनिक शांततेचा भंग करणें होय अशी कोटी आमच्या हितशत्रूंकडून करण्यांत येत आहे; परंतु ही त्यांची बेअकली कोटी किती अर्थशून्य आहे, हें ज्यानीं हिंदूंना पूर्ण ओळखिलें आहे, ज्यानां हिंदूंचा प्रजासत्ताक राज्यपद्धतीविषयींचा पूर्णाभिमान अवगत आहे व ज्यानां हिंदु लोकांनी रिपब्लिक राज्यपद्धति थोड्या कालावधींत येथें पूर्ण यशस्वी होण्याप्रीत्यर्थ केलेल्या प्रयत्नाची जाणीव आहे, त्यानां पूर्ण कळलेलें आहे. अशा स्थितींत आमच्या शत्रूंनीं आह्मांविरुद्ध कितीहि भयंकर काहूर उठविण्याचा नित्य व हलका अव्यापारेषु 'व्यापार' केल्यास त्यापासून आह्मांस कसलीहि भीति बाळगण्याचें कारण नाहीं, हें येथेंहि व्यक्त केल्याशिवाय आमच्यानें रहावत नाही.

वर्गणीची पोंच

श्री. आत्माराम शं सांवर्डेकर, सांवर्डें	३ रु.	
,, सुकेरकर आणि कंपनी,	,,	३ रु.
,, विठ्ठल सीताराम महांबरे, मुंबई	३॥ रु.	
,, नारायण व्यंकटेश धोंड,	,,	१ रु.
,, बाळकृष्ण रा. प्र. चोडणेकर जां०	३ रु.	
,, दत्तात्रय रामकृष्ण वेरेंकर, कळंगूट	३ रु.	

भारत डिफेन्सफंड

श्री. श्रीपाद गो. हेदे. शिरवडे	१ रु.
,, विठ्ठल सीताराम महांबरे, मुंबई	१ रु.
,, बाळकृष्णानुज धोंड, मुंबई	१ रु.

मालावृत्त

(मागील अंकावरून पुढें चालू)

भागिदारांचीं नावें	भागांची रक्कम
	मागील पोंच ५१५ रु.
श्री. रामा रंगाजी शे. कापडी; कांसावली	५ रु.
,, महादेव बाळप्पा गाईचारी; लोंढा	५ ,,
,, घनःश्याम पां. शे. कवडे; शहापूर	५ ,,
,, अनंत गोविंद हेगडे; कुंकळ्ळी	५ ,,

वर्तमानसार

—मडगांव येथील 'ओस्पीस' या संस्थेमार्फत उघडलेल्या सुईण शिक्षणाच्या वर्गांत राधाबाई झापशेंकर, चंद्रभागाबाई देसाई, भिमाबाई नाईक व अनुसुया बाई खोलकर या हिंदुस्त्रियानीं आपलीं नावें नोंदलीं आहेत.

—इकडील व इतर पोर्तुगीझ कालनींतील टपाल खात्यांतील तिकिटांचे दर वाढविण्यांत येणार आहेत असें समजतें.

—कलकत्ता शहरांत गोड्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठीं २ कोटी ९ लक्ष्य रुपये खर्च येईल असा एका इंजिनियरनें अजमास केला आहे.

—एथील न्यायकोर्टाची पूर्वीची इमारत मोडकळीस आल्यावरून त्याची बदली 'देयांव'च्या वाड्यांत करण्यांत आली आहे.

—इकडील लिसेवकरितां शिक्षणोपयोगी उपकरणें विकत घेण्यासाठीं ५१ हजार रुपये देण्याचें गोवासरकारनें ठरविलें आहे.

—रायबंदर येथील सांतकाजाच्या हास्पिटलांत "क्ष" किरणाच्या कामाची सोय करण्यांत येत आहे असें कळतें.

—पणजीच्या मेडिकल स्कुलांत २५ विद्यार्थींनानीं प्रवेश केला आहे; पैकीं ५ मेडिकल कोर्सांत; १ फार्मसी कोर्सांत १५ सुईण कोर्सांत व ४ परिचारिका कोर्सांत होय.

—मार्गिनेयर कंपनीचा एजंट ३०० रुपये किंमतीस देण्यास तयार असलेला एक पाण्याचा पंप सरकारानें २०७० रुपयांस विकत घेतला!

—पोर्तुगालाहून थेट मोसांबीक, आंगोला व पोर्तुगीज इंडिया येथ प्रवास करणाऱ्यांकरितां आगबोटींची तजवीज करण्याचें सरकारानें योजिलें आहे.

—मोसांबीक येथील गव्हरनरानें इकडील मिशनरी पाद्र्यांस तिकडे पाठविण्यांत यावें अशी मागणी केली आहे—कारण काय असावें?

साभार स्वीकार

दुनिया [साप्ताहिक]:— 'केसरी'च्या सांच्याचें व राष्ट्रीय धोरणाचें हें पत्र रा. दत्तात्रय हरी गोखले यांच्या चालकत्वाखालीं पुणें येथें प्रसिद्ध व्हावयास लागलें आहे. इतर उपयुक्त माहितीबरोबर सदरील पत्रांत सुरस गोष्टीहि वाचावयास मिळतात. वा. व. ट. ३ रु. १४ आणे.

उदय [साप्ताहिक]:— हें अमरावतीचें राष्ट्रीय पत्र श्री. बाळकृष्ण गणेश खापर्डे यांच्या संपादकत्वाखालीं निघत असतें. भाषा जोरदार असून विषय मांडणी चित्ताकर्षक असते. वा. व. ट. २ रु. १४ आणे.

ANO V—NUMERO 15—1920 QUEPEM, QUINTA-FEIRA 1 DE JULHO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............. 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—**Bharat**

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहीरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहीरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें-गुरुवार, तारीख १ माहे जुलै सन १९२० अंक १५ वा.

EM POUCO....

Segundo todas as probabilidades vamos ter no corrente mez de julho varias modificações nos serviços pùblicos com encargos inevitaveis ao tesouro publico, como nos dizem.

¿ Donde se pretende trazer dinheiro para fazer face aos mesmos encargos?

Se é do aumento de impostos, como por aí se segreda, *de mansinho*, podemos afiançar, duma vez para sempre, que tais modificações, embora representem um passo para a frente na civilisação, não hão de ser bem aceitas.

E' que *está exausta*—temo-lo dito, vezes sem conta—*a capacidade contribuitiva* do povo de Gôa.

Esperamos que os competentes terão em vista essa importante circunstancia na efectivação das pretendidas modificações.

A bon entendeur...

Jurisprudencia Administrativa

II

Haverá por aí alguem que possa contestar o papel sublime que a Imprensa desempenha nos destinos dum pôvo que se julgue alumiado pelas almenáras da Civilisação?

Cremos que não.

Já escoaram alguns pares de anos que na imprensa politica, abordando o tema da missão jornalistica, escreviamos, entre outros, os seguintes conceitos que logram inteira atualidade:

"Não há catecismo imposto para um jornalista que estremece a pátria, e põe o seu talento e virtudes ao serviço dela, honrada e desinteressadamente.

"E' um digno sacerdócio uma missão santa, quando se exerce com o necessàrio tino e consciência; áliás, a pena, que maneja, se converte em um verdadeiro punhal ervado". (Vide "Noticias" nº 756, 1909)

Benjamim Constant, Hume Benthan, J. J. Rousseau, Mably Becaria e Filangieri e outros publicistas de polpa apoteusaram a sua acção, e fizeram da sua tribuna um sacerdócio.

Vitor Hugo, o sociólogo dos "Homens do Mar e dos Miseráveis" e o vate das "Odes e Baladas", exclamava naqueles seus estos de inflamado patriotismo:

"A Imprensa é a *fôrça*, a *inteligência*, *o clarim* que toca a alvorada dos pôvos, o dêdo indicador, o auxiliar do patriota, a santa e imensa *locomotiva do progresso*, que leva a humanidade á terra prometida, onde, em torno de nòs, só teremos irmãos e, por cima, o céu glorioso"

Indubitavelmente assim é.

Ramon Salàs, decano da Universidade de Salamanca, concretisou as vantagens da imprensa, os beneficios que ela esparze em pròl da Sociedade, nas belas linhas que vão lêr-se:

"Se se quere governar os povos *pela razão e segundo a justiça*, a imprensa serà util aos que governam, como aos governados. Se os que governam querem governar bem é nescessàrio que se conformem com a *vontade geral e com a opinião pùblica*...

"Quando a autoridade comete *alguns erros*, a Imprensa serve para a advertir, e lhe facilita os meios de *remediá-los* ou, pelo menos, de os não cometer de novo..."["Liç. de Dir Pùblico" pgs. 55 e 56]

Efetivamente, os dirigentes de uma nação ou de um Estado teem que mensurar os seus atos com notável discernimento para que não incidam no desagrado do pôvo, ou, milhor, da Opinião Pública cuja critica é discaroavel, cujo Tribunal é incorrutivel! Os seus atos devem acomodar-se aos tempos e ás circunstancias locais, porque o interesse publico é a suprema lei.

O sábio Vivien, membro do *Instituto*, de Paris, na sua valiosa obra intitulada "E'tudes Administratives", 3 a. ed., tom. 1, cap. III, ensina no seu laconismo didascálico textualmente o seguinte:

"...l' administration se subordonne aux temps *et aux lieux* L' interêt public est sa loi supreme. Aussi, doit-elle compte sans cesse de ses actes..."

E' de apreciar sempre uma critica fundida a rigor no cadinho de principios sadios, na severidade da dialética, na aguçada perspicacia, no aprumo duma esmerada correção e, ademais na irrepreensivel imparcialidade; porque ela, só ela, é que contribui poderosamente para a exegese, expansão e desenvolvimento da vida scientifica, sendo os seus autores tidos por verdadeiros apòstolos do progresso social (Jean Cruet, "La Vie du Droit" "Pauchan" "Esprits Logiques et Espr. Faux")

Por isso dizia o eminente escritor Oliveira Martins, *Hist. de Portugal*:— A critica é a milhor bùssola das inteligências..

Efetivamente quando orientada convenientemente e estribada na sciencia é como uma lima que acepilha as excrescencias. Leva em mira a emenda, e dispõe á cosequente perfeição.

Porem detestamos essa critica bafienta e nevrotica, refrataria á mais eficaz terapéutica, e que prima na filaucia, no remoque, na pedantaria, no ilogismo, emfim.

Criticas desse estopo são de má medra, barateam o chauvinismo rèles, polvilham o acinte por falência inteletual, despontam como tortulhos ao sôpro das primeiras lufadas do sudoeste que distilam cordas de chuva. Os seus autores trabuqueam em franco disperdicio de tempo, sem utilidade teórica nem pratica para a vida da Sciencia ou das Letras, em que discreteam com àrrotos de indigesta sapiencia. Desnudados da competencia tecnica e anemiados do mais arguto critério disparam como aquela personagem de Cervantes murros no ar, combatendo com... abantesmas!

A taes belhotres o sardonico Correia Garção trovejava com o seguinte epigrama:

"............ . Vejo pedantes
trepados em cadeiras, desc mpondo
Os mais honr dos...............".

Soares Rebêlo

MARATA

E' natural a ancia em que deve estar quem escreve estas linhas por saber o que a *Tribuna* prometeu dizer a respeito da vernaculidade do concanim. Antes disso, porêm se torna indispensável fazer-lhe ver como ela se desnorteou ao afirmar que a lingua vernacula de Gôa era o concanim, revelando, ao mesmo tempo, a sua ignorancia sobre *se ela é uma lingua primitiva* ou *dialeto derivado*, ignorancia que é fácil de se disfazer, visto que o concanim é *um dialeto dirivado* não do *telgu*, tamil etc. mas sim do marata e dividido em tantos subdialectos, que um sujeito de Pernem não poderá perceber sem dificuldades o concanim que se fala em Salsete, ao passo que o marata sendo uma lingua gramatical, metodica e viva é entendido por todos hindus e alguns não hindus de Gôa quando se lhes fale ou lêa

भारत

गुरुवार अषाढ शु० १५ मा. १८४२

भारतीय चळवळ

आजकाल ब्रिटिश हिंदुस्थानांतील राजकीय चळवळ इतकी जोरांत आहे कीं, ती जरा मंद व्हावी ह्या हेतूनें कसलेंहि दडपशाहीचें तीक्ष्ण शस्त्र योजिलें तरी तें आपल्या चळवळींत खंड पाडण्याच्या बाबतींत थोंथट आहे असें तेथील लोकांनीं दाखविण्याचा निश्चयच केला आहे. पंजाबच्या प्रकरणांत तर अरेरावी नोकरशाहीच्या शस्त्रांस प्रत्येक बळी पडलेल्या कर्मवीरांकडून सिद्ध झालें कीं, देह गेला तरी बेहतर पण ध्येय सोडावयाचें नाहीं. एक पक्ष सबळ व दुसरा दुर्बळ असल्यामुळें त्यांत ज्याची सरशी व्हावयाची त्याचीच झाली पण त्यांत बायका मुलांच्या नैसर्गिक दुर्बलावस्थेकडे लक्ष्य सुद्धां देण्यांत आलें नाहीं ! ह्या वरून प्राचीन रोमन इतिहासांत घडलेल्या गोष्टीचें स्मरण झाल्याशिवाय रहात नाहीं. राजाकडून झालेल्या एका अबलेच्या छळामुळें एकदम सगळी प्रजा विथरून थोड्याच अवकाशांत राजसत्ताक राज्याचें प्रजासत्ताक राज्यांत रूपांतर झालें. इकडे इतके जाज्वल्य उपाय अमलांत आतांच आले नसले तरी मोठ्या वृक्षास फळें येण्यास इतर वनस्पतींच्या मानानें अधिक काळ लागतो व तीं फळें नंतर पुष्कळ वर्षे पर्यंत मिळतात. म्हणून आजच न झाल्याबद्दल एखाद्या गोष्टीचे परिणाम कधींहि होणार नाहींत अशी कल्पना करितां येत नाहीं.

बुडत्या बरोबर ओळें सुद्धां जळतें ही गोष्ट विशेष सत्यत्वानें पटण्यासाठीं पुढील प्रकार पहा. आधींच वरील सारख्या अत्याचारानीं प्रज्वलित झालेल्या प्रजेच्या असंतोषांत खिलापत प्रकरणानें भर पडली. वास्तविक पाहतां कोठें तुर्की राष्ट्र व कोठें हिंदुस्थान, ह्या दोहोंत कसलाहि संबंध असेल तर तो धर्म विरुद्धतेचा ! ज्यानीं हिंदु धर्माच्या रक्षणार्थ झटणाऱ्या शिवाजी महाराजांच्या कार्यांत अडथळा करून हिंदूंस सळो कीं पळो करून सोडिलें त्या मुसलमानांचा तो देश ! त्यांवरील संकटानें आज हिंदूंस आनंद वाटावयास पाहिजे होता. पण वस्तुस्थिति विपरित असून " मराठा तितुका मेळवावा " ह्या तत्वाप्रमाणेंच " हिंदी तितुका मेळवावा " ह्या नव्या व्यापक तत्वास बाध न येण्याकरितां आमचे हिंदु बांधव जातभाईच्या दुःखांत समदुःखी झालेल्या हिंदी मुसलमानाच्या हातांत, आनंदानें सलोख्याचा हात घालण्यास तयार झाले. तात्पर्य हेंच कीं, उत्साहानें चळवळ करण्यास खरे कर्तबगार तयार झाले कीं ती चळवळ कोणत्या ना कोणत्या कारणानें जास्त नेटानें चालू ठेवण्यास त्यांस कसलेंहि क्षुल्लक कारण पुरेसें होतें, कारण, एकादि बाब क्षुल्लल असली तरी महत्वाच्या माणसांनीं तिला हातभार लाविला असतां तिच्यांतील क्षुल्लकपणा नाहींसा होतो. असो. सरते शेवटीं इतकीच अपेक्षा आहे कीं, [illegible] रीतीनें पद-

स्फुट विचार

कारभार आणि करभार:—चालू महिन्यापासून गोवासरकारच्या कारभारांत बऱ्याच सुधारणा होणार असून त्यां प्रीत्यर्थ करांचें प्रमाण वाढविण्यांत येईल, अशी दाट वदंता आहे. शेंकडा बारा टक्के प्रमाणें असलेला जमीनसारा यापुढें दुपटीपेक्षां जास्त म्हणजे २५ टक्के पर्यंत वाढणार असून, या नवीन साऱ्याच्या नवीन उत्पन्नावर सदरील नवीन सुधारणांची इमारत उभारली जाणार आहे, असेंहि कित्येक लोक म्हणतात. घोडा मैदान जवळ असल्यामुळें करवाढीसंबंधानें पसरत असलेल्या या भयजनक बातम्यांत कितपत तथ्यांश आहे, हें कळून येणारच. बाकी नवीन करांचा बोजा आमच्या नामधारी जमीनदारांस किती असह्य होणार आहे याचें वर्णन आम्हीं अनेकदां केलें असल्यामुळें, सध्या प्रस्तुत विषयावर जास्ती कांहीं लिहिण्याचें कारण वाटत नाहीं.

डॉ. मोराइस:—आमच्या गोव्हेर्नादोर साहेबानीं गोवा कारभाराची 'दोरी' आपल्या हातांत घेतल्यास आज कित्येक महिने लोटले; परंतु लोकांच्या अटकळीप्रमाणें आतांपर्यंत तींत विशेष महत्वाची हालचाल दिसून आली नाहीं. याचें कारण असें सांगण्यांत येतें कीं, डॉ. मोराइस यानीं आपली 'गव्हर्नरी' सूत्रें जोरानें चालविण्याचें काम गोव्याचें पूर्ण ज्ञान प्राप्त करून घेतल्यावर ठरविलें आहे. ठराव उत्तम मुत्सद्दीगिरीचा निदर्शक असून 'वाईट करण्यापेक्षां कांहीं न केलेलें बरें' या दृष्टीनें तर अभिनंदनीय आहे, शंका संशय नाहीं. परमेश्वरापाशीं आमचें इतकेंच मागणें आहे कीं, साहेबमजकुरांचें 'अभ्यासाचें, कार्य संपून त्याचा अपूर्व फायदा जनतेच्या पदरांत पडण्याचे वेळीं, त्यांस वरिष्ट सरकाराकडून येथून—कोणत्याहि निमित्तानें कां होइना—हलविलें जाऊं नये.

सार्वजनिक फंड:— सार्वजनिक कामासाठीं लोकानीं आपापल्या ऐपतीप्रमाणें पैसे भरावे व कांहीं आपमतलबी गडबडगुंडांनीं त्या पैशांची अफरातफर करून आपला तळीराम गार करून घ्यावा, या सारखें देशद्रोहाचें दुसरें पातक नाहीं. सार्वजनिक पैशांचा व्यय योग्य कामीं झाल्यास लोकांत एकप्रकारचा आनंद उत्पन्न होतो व पुढें मागें अशा कामीं हातभार लावण्यास त्यांस हुरूपहि येतो. पण तेंच अशा पैशावर भलत्यानींच ताव मारून त्यासंबंधी अकांड तांडव व्हावें ही दुर्दैवाची गोष्ट होय. व अशा प्रकारानें दुसरा केव्हांहि सार्वजनिक फंड उभारण्यांत आल्यास या कामी मदत देण्यास लोकाचीं मनें शंकित झाल्याशिवाय रहाणार नाहींत. वरील विचार सुचण्याचें कारण म्हटलें म्हणजे 'टिळक पर्स फंड' संबंधानें चाललेली गडबड होय. हा 'सांवळा गोंधळ' कोणत्याहि दृष्टीनें समर्थनीय नसून त्याचे अनिष्ट परिणाम पुढें मागें राष्ट्रीयपक्षास खास भोवल्या शिवाय रहाणार नाहींत, अशी आमची समजूत आहे.

पडून ज्या स्वराज्यासाठीं त्यांतील रहिवाशी तळमळ करीत आहेत तें त्यांस लवकर प्राप्त होवो. व त्यांचा सार्वजनिक कृत्यांतील उत्साह पाहून आम्हांस प्राप्त झालेल्या स्वराज्याचा पूर्ण उपभोग घेण्यासाठीं तसली स्फूर्ति उत्पन्न होवो. कां कीं, तशी स्फूर्ति व उत्साह आम्हांत नसेल तर स्वराज्यापेक्षांहि विशेष सुखकर राज्यपद्धति प्राप्त झाली तरी विजपासून देखील आमची ऊर्जितावस्था होण्याची आशाच नको.

'कार्त ओर्गानिक':— गोमांतक स्वराज्य घटनेच्या या पुस्तकाचें मराठी भाषांतर क्रमशः प्रसिद्ध करण्याचा आमचा बेत असून हा प्रयत्न लोकांस आवडल्यास कायद्याचीं इतर पुस्तकेंहि स्वतंत्र रीतीनें अगर 'भारतां'त मराठी पेहरावांत प्रकाशित करण्याचा आमचा मनोदय आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांत त्याला लागू केलेल्या 'अक्टांच्या' मराठी भाषांतरापासून तेथील 'मराठी' जनतेस अतोनात फायदे झाल्याचें प्रत्यक्ष व परोक्ष रीतीनें दिसून आल्यावरून आम्हीं सदरहु नवीन कार्याची जड पण आवश्यक जबाबदारी शिरावर घेतली आहे. परमेश्वर दयेनें या कामीं आम्हांस कित्येक सन्मानीय व निःस्वार्थी मित्रांचें निरपेक्ष सहाय्यहि असल्यावरून हातांत घेतलेलें कार्य सुरळीतपणें पार पडेल अशी आशा आहे.

योग्य उपाय:—यंदां ह्या व नवीन काविजार्दींतल्या इतर महालांतील एकंदर लोकांस सक्तीनें देवी प्रतिबंधक लस (वासीन) टोंचण्यांत यावी असा सरकारकडून हुकूम सोडण्यांत आला आहे. दरवर्षी या देवीच्या आजारामुळें प्रत्येक महालांत निदान शंभरावर तरी येऊन ठेपणारी मृत्युसंख्या या उपायानें टळणार यांत संशय नाहीं. गांवोगांवचे अज्ञ लोक आपल्या गैरसमजुतीप्रमाणें ही लस टोंचून घेण्यांस कांकूं करितात; परंतु त्यांस वरील प्राणहानि समजावून सांगून त्यांच्या मनावर योग्य परिणाम सरकारी अधिकाऱ्यानीं केल्यास सक्तीच्या उपायांचा अवलंब करण्याचें प्रयोजन नाहीं. देवीसंबंधीं घेतलेल्या खबरदारी प्रमाणेंच सरकारकडून खेडेगांवांत उत्पन्न होणाऱ्या कॉलरा सांथीचे ज्वर यांविषयींहि जर योग्य बंदोबस्त केला जाईल तर फार सुकर होऊन असें करण्यापासून गरीब जनतेस मोठी मदत मिळणार आहे. देवीप्रतिबंधक लस टोंचून घेण्यांत कसलाच अपाय नसल्यामुळें ती टोंचून घेण्यांत अंतर करूं नये, अशी आम्हींहि सर्व लोकांस शिफारस करितों.

वर्तमानसार

—चालू महिन्यापासून न्यायखात्यांतील खालच्या दर्जाच्या एकंदर अमलदारांचे पगार वाढविण्यांत आले आहेत.

—श्री. सौ. लक्ष्मीबाई तळावलीकर यांची नेमणूक सांगें महालांतील मुनिसिपाल सुइणीच्या जाग्यावर झाली आहे, हें कळविण्यास आनंद वाटतो.

—दिव येथें नुकत्याच उडालेल्या वावटळीनें कोणतीहि प्राणहानि झाली नाहीं असें प्रसिद्ध झालें आहे. आनंदाची गोष्ट.

—म्हापसें गोवा येथें प्लेगची सांथ उपस्थित झाली असून तिचा प्रसार न होण्यासाठीं सरकारनें योग्य तो बंदोबस्त केला आहे. प्लेगच्या जाचणींतून गोमांतक केव्हां मुक्त होणार !

—मुरगांव व सत्तरी येथें नेमण्यांत येणाऱ्या सरकारी फार्मासेवतिकांस [कंपौंडरांस] दरमहा २०० रु. पगार देण्याचें घाटत आहे असें म्हणतात.

—गोव्यांच्या खलाशी लोकानीं मुंबई येथें संप केल्याचें समजतें.

—माकाव येथील अफूच्या मक्त्याचें सरकारी उत्पन्न यंदां ९ लक्ष ५० हजार पताकाचें आहे.

—ग्रामस्थ मंडळ्यांच्या [कोमुनिदादीस] कायदेकानूंत नवीन फेरफार करण्यांत येणार आहेत असें कळतें.

—पोर्तुगालांतील राजकीय कैद्यांस माफी देण्यांत येणार आहे असी तिकडील वर्तमानपत्रांची बोलवा आहे.

—अडफडें येथील 'इंग्लिश शाळेस' सि. ब्रीत नावांच्या एका गृहस्थानें, विद्यार्थ्यांस बक्षीसादाखल १२० रुपये दिले.

—मुंबईचे मासिक मनोरंजनाचे उत्साही व उद्यमप्रिय संपादक रा. का. र. मित्र यांचें निधनवृत्त कळविण्यास आम्हांस फार वाईट वाटतें !

—आर्नोल्ड मलबार नांवाच्या एका इंग्लिश मनुष्यानें बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन भिक्षूची वृत्ति धरली. हे पाली भाषेचें ज्ञान संपादन करून बौद्धधर्माच्या तत्वांचा प्रसार इंग्लंडांत करणार आहेत.

साभार स्वीकार

ऊंस, गूळ आणि साखर [मासिक]:—प्रस्तुत पुस्तकाच्या नावांवरून त्यांत कोणत्या विषयांच्या ऊहापोह होत असेल याची कल्पना सहज करतां येते. ऊंस, गूळ आणि साखर या अत्यंत महत्वाच्या विषयाची परिपूर्ण माहिती प्रसृत करून देशोन्नतीस हातभार लावणारें हें मासिक प्रागमहाल, मुंबई नं. २ येथें रा. रा. गं. ना. सहस्त्रबुद्धे यांच्या संपादकत्वाखाल प्रसिद्ध होत असतें. वा. व. ट. हं ३ रु. ४ आणे

माळी पुढारी [मासिक]:—संपादक, मुद्रक आणि प्रकाशक रा. मोतीराव तुकारामजी वानखडे, करजगांव, वऱ्हाड वा. व. ट. हां. २ रु. माळी लोकांच्या आश्रयास पात्र.

इतर जिन्नस

मेसर्स कारापुरकर आणि कं. यांकडून काळी निळी व काळी अशा दोन शाईच्या बाटल्या आमच्या अभिप्रायार्थ आल्यास बरेच दिवस झाले, अनुभवाशिवाय मत देण्याची घाई करूं नये या हेतूनें आम्हीं वरील जिन्नसांसंबंधीं आजपर्यंतां मुग्धता स्वीकारली होती. पण लिहिण्यास आनंद वाटतो कीं, सदरील डिचोली येथील कंपनीची दोन्ही तऱ्हेची शाई उत्तम प्रकारची असून तिची योग्यता खास युरोपियन शाई बरोबर आहे. लेबलांत सुधारणा झाल्यास दुधांत साखर पडल्यासारखें होईल.

भारत डिफेन्सफंड

श्रीयुत मंगेश कृ० सू० सरदेसाई,	वेरें	१ रु.
,, जानकीनंदन,	सांखळी	१ रु.
,, वामन केशव नायक	,,	१ रु.
,, कृष्ण रघुनाथ शिरसाट,	,,	१ रु.
,, रामजी वि० प्र० गांवकर,	शिरोडें	२ रु.
,, गणेश सदाशिव गुडे,	,,	१ रु.
,, गोपाळ कृष्ण गुडे,	,,	२ रु.
,, काशीनाथ उपेंद्र हेदे,	,,	१ रु.
एस्, मुर्गाव, (हसा १ ला)		१ रु. २ आ. ४ पै
श्री दामोदर वाचन मंदीर,	मडगांव	१ रु.
मोतिराम बा. जांबावलीकर	जांबावली	१ रु.
रंजाराम कांत जांबावलीकर	,'	१ रु.

ANO V.—NUMERO 16—1920 QUEPEM, QUINTA-FEIRA 8 DE JULHO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत

BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर
गोव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००

जाहीरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणें. कायमच्या जाहीरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें—गुरुवार, तारीख ८ माहे जुलै सन १९२० अंक १६ वा.

NOVAS CONQUISTAS

Existem nas N. C., ainda por cultivar, muitas regiões ferteis, como tambem há aí muita propriedade...mas sem segurança, o que lhes diminue grandemente a importancia.

Consta-nos porêm que o governo vai milhorar a tristissima condição em que estão vegetando as Novas Conquistas cujo fomento está preocupando, segundo nos informam, a atenção do sr. Governador Geral.

Se isto fôr verdade, podemos garantir a Sua exa. que criará jùs a gratidão de inùmeros habitantes das Novas Conquistas, se, de qualquer forma, conseguir beneficia--las, libertando--as das garras do paludismo e vandalismo, dois males poderosos que atrofiam o seu desenvolvimento—males para debelar os quais forçôso è exercer uma acção energica, ininterrupta e inteligente.

Sem isto, nada feito.

Jurisprudencia Administrativa

III

Prosseguindo:

Se espraiarmos a vista pelo que sôbre o assunto se acha escrito no estrangeiro, desta carecermos as opiniões de estadistas e publicistas de alto coturno, desses a quem os povos cultos endereçam o incenso da sua admiração e respeito.

Mr. Jeferson, quando Fresidente dos Estados-Unidos da Amèrica, exclamava, ateado nas labaredas de patriotismo. —"Nós queremos a liberdade da Imprensa, *sem retrições* porque não queremos privarnos de nenhuma das vantagens que ela procura".

Montesquieu, na sua monumental obra, intitulada "L'Esprit de Lois," doutrinara magistralmente:

"A imprensa è a *salva-guarda* das outras liberdades, descobre aos olhos dos agentes principais de Poder os abusos dos seus subalternos, e tem na discussão o ùnico remèdio ligitimo e eficaz contra os seus excessos..."

· Laboulaye, "Le Parti Liberal," a pg. 269, expõe.

"De todas as garantias politicas da liberdade *a mais energica e a mais segura* é a liberdade de imprensa e de jornais. A imprensa *é o forum* dos povos modernos. E' o jornal que reune cada manhã milhões de homens pelas mesmas ideias e pelos mesmos sentimentos.."

Fecha à chave de oiro essa corrente de opiniões o seguinte trecho de publicista hespanhol:

"A opinião pública, como a experiencia demonstra, não pode formar-se, nem conhecer-se *sem liberdade da Imprensa*, e como em qualquer bom governo *deve seguir-se a opinião pública*, concluiu-se deste principio que a liberdade da imprensa era *essencial para uma boa organisação social* e que sem ela todas as restantes garantias que uma Constituição pode outorgar aos cidadãos, são *nulas e inùteis*." (Vide "El Catecismo Politico, cd. de 1819, París)

* * *

Ora agora esguelhemos uma restea de olhos para o que escreveram publicistas nacionais de certo cunho.

Dias Ferreira entende que a Imprensa "è indispensavel no estado presente da nossa civil isação *social e politica*; companheira inseparavel da liberdade da tribuna, e completamente necessária e indispensavel da existencia dos *governos livres*." ("Cod. Civ. Anota.", 1a. ed., vol. I, pg. 362)

Lopes Praça, nos seus "Estudos sôbre a Carta Constitucional", discretêa largamente, afirmando que "a liberdade na manifestação do pensamento parece dever-se considerar hoje superior á discussão *em todos os povos cultos*. A negação da liberdade de imprensa devia, a ser lògica, trazer consigo a negação de exercer exteriormente *por qualquer forma a nossa atitude*, sem um exame, sem uma censura, sem uma autorisação precedente. *O absurdo é sempre inconseqüênte*..."

E Cândido de Figueiredo descorre no seu livro epigrafado "Rudim de Dir. Publico", cap IV, §.8º, deste modo:

"Um dos mais incontestaveis deveres do homem *é ser verdadeiro*, isto è, dizer que sente e pensa, evitando a mentira e a hipocrisia.

"Se a natureza nos deu o direito de pensar e sentir livremente, *è de justiça e razão* que a lei nos garanta a livre manifestação do que sentimos e pensamos."

O jornalista, portanto, quando agir dentro da esfera do devêr, é um benemerito da Patria, um paladino intemerato, um heroi despretencioso. E' um homem livre, porque está disposto *a sacrificar tudo á Verdade*,-como se exprimiu M Victor Cousin, na "Revue des Deux Mondes", de 1 de fev. de 1867.

Mas não confundamos esse estrênuo defensor da causa popular com qualquer gazetilheiro que haja vendido por um *prato de lentilhas* a sua opinião em assuntos do interesse palpitante do País. ! Esse cidadão ignobil, esse patriota de ribalta, sò merece ser relegado ao ostracismo do oprobrio e do menosprezo. O seu procceder corre parelhas com o daquele marmanjola que, açaçapado no rotundo bojo do célebre cavalo de madeira, concorreu para que a Troia fôsse lambida pelo terrivel incendio !

Pois coloque-se o jornalista que profligou a impiedade e a corrupção; que não agitou o incensório ante a deslumbrante árado Podêr; que o guiou para a vereda de uma administração sensata e proficua e que, por derradeiro, lutou por Verdade e pela Justiça, no escrineo da gloria a que tem incontestável jus pelo bem que semeou! ...

Objetar-se-á que os competentes se têm amostrado de orelhas moucas aos alaridos da Imprensa, que se perdem nas regiões olimpicas como vozes de beduinas, montados em dromedarios, a perpassarem pelos ... áridos desertos da Libia!

Não è de crêr ...

Pelo contrario; não há que desesperar. Da discussão sempre luz o raio da verdade. A emenda è o reconhecimento dos que laboram em erro. Só quem neste persistir è que será um homem...perdido!

Nem é caso para à gente se espantar. "Tristezas não pagam dividas" -lá reza o adàgio.

Tudo terá o seu remedio, com tanto que alimentemos confiança... A fé nos induz á tarefa !...

Bem refletia o satirico poeta quando escreveu:

"Nihil admirari properes est una...
Solaque que possit facere et servare beatum"
(Horacio, liv. I, epist. VI, v. 1)

Soares Rebêlo

Correio e Telegrafo

Está em circulação *A Provincia*, semanário que se publicava em Angola e que se começou a editar na India, porque o seu director achou que a sua acção que se não tornou sem efeito nas terras africanas, não seria tambem nula nesta pèrola do Oriente. E vem com *a vassoura* para limpar esta colónia, modificando a *vidinha da preguiçosos* e outros, acusando de

लहान तोंडीं मोठा घांस घेण्यासारखें होय असें माझ्या अल्प बुद्धीस वाटतें.

यापेक्षां, प्रत्येकानें स्थानिक प्रयत्नाच्या जोरावर आपापल्या ठिकाणीं पुष्कळ कामें करतां येण्यासारखीं आहेत. हिंदु समाजाच्या गरजा पुष्कळ आहेत, आणि पुष्कळ असतीलहि, पण त्या सगळ्या गरजांत विद्यावंत होणें ही फार मोठी गरज आहे; आणि ही गरज भागविण्यासाठीं ठिकठिकाणीं मराठी व पोर्तुगीज शिक्षण सुलभतेनें घेण्याची सोय आधीं झाली पाहिजे. अशा प्रयत्नानीं समाज शिक्षणसंपन्न झाला ह्मणजेच त्याच्या अंगांत प्रांतिक कार्यें करण्याची योग्यता, धमक व कार्यक्षमता उत्पन्न होईल. खरें व स्पष्ट सांगावयाचें ह्मणजे प्रांतिकपरिषदेचें चालकत्व स्वीकारून कर्तबगारीनें तिचें गाडें सुरळीत चालविण्यासारखा व जनतेच्या विश्वासास पात्र झालेला पुढारी आपणांत अजून दिसूं लागलेला नाहीं. अशी स्थिति असतां परिषदेचें ओझें घेऊन हंसें करून घेण्यांत अर्थ नाहीं.

दोन दिवस परिषदेचे कागदी घोडे नाचवून फारतर एकाला कोन्सिलांतील खूर्चीं उठवितां येईल, अगर दुसऱ्याला कुठलाहि भाकरीचा तुकडा मिळण्यास मिळेल, पण समाज-कार्य करण्यासाठीं लागणाऱ्या गुणाची पैदास देशांत अगोदर झाल्याशिवाय व ती होण्यास वीर्यवती विद्या संपादन केल्याशिवाय बाकीच्या धडपडी व्यर्थ होत; तेव्हां तूर्त आपल्या बालपणास पचेल असेच स्थानिक प्रयत्न अगोदर जिकडे तिकडे व जारीनें सुरू होणें जरूर आहे. ते प्रयत्न ह्मणजे ठिकठिकाणीं शाळा घालणें, वाचनालयें स्थापन करणें, पोर्तुगीज भाषेंत प्राविण्य मिळविणें, गरीब विद्यार्थ्यांची सोय करणें, व्याख्यानें करवून लोकमत जागृत ठेवणें, फंड उभारून पोर्तुगालास विद्यार्थी रवाना करणें, जत्रांतून, उत्सवांतून, शिमग्यांतून नीतिपर उपदेशाचीं पत्रकें वाटणें, अशीं कितीतरी कामें आहेत. सदहू कामें यथाशक्य सगळीकडे सुरू झाल्यावर जनतेला जी तेजस्विता येईल, त्या तेजाच्या भरभक्कम चौथऱ्यावर उभारलेली प्रांतिक परिषदेची इमारत मात्र टिकून राहील, नपेक्षां वाळूंतील किल्ल्यांप्रमाणें तिची दुर्दशा झाल्याशिवाय रहाणार नाहीं! कळावें हे विनंति.

एक स्पष्टवक्ता

* * * हिंदु परिषदेसंबंधानें आह्मीं पोर्तुगीज भागांत दोन लेख लिहिले होते. मराठी भागांतहि तिच्या आवश्यकतेबद्दल आमचे विचार मांडण्याची तयारी होती. इतक्यांत सदरहू पत्रव्यवहार आमच्याकडे आल्यामुळें 'परिषदे' विषयीं जास्त चर्चा व वादविवाद झाल्यावर, या अत्यंत महत्वाच्या विषयाकडे वळण्याचें आह्मीं ठरविलें आहे. अर्थात 'स्पष्टवक्त्यां'च्या पत्रावर निर्भिड व स्पष्ट मत भारतांत नमूद करूं इच्छिणारांस तसें करण्याची पूर्ण मुभा आहे.

सं. भारत

—मिलिटरी आफिसरांस पणजी येथील लिसेवाचे [पाठशाळेचे] प्रोफेसरचीं कामें करण्याची मनाई करण्यांत आली.आहे

—शेतकी खात्यांतील कामांत नवीन फेरफार करण्यासंबंधींचा मसुदा पोर्तुगालसरकारकडे पाठविण्यांत आला आहे.

भारत

गुरुवार अषाढ व० ७ मी. १८४२

वसाहतींची अधोगति !

पोर्तुगालचें सुप्रसिद्ध व वजनदार दैनिक 'दियार्यु दे नोतिसियस्' ज्याला इंग्लंडच्या 'टाइम्स 'ची साथ उपमा शोभेल अशा नामांकित पत्रानें पोर्तुगीज वसाहतींसंबंधानें एक लेखमाला सुरू केली आहे. या मालेंत वसाहतींत चालत असलेल्या 'निर्भेळ' बेबंदशाहीचें यथार्थ वर्णन केलें जात असून त्याची पुसट पुसट कल्पना तरी आमच्या निवळ मराठी वाचकांस करतां यावी या हेतूनें सदरहू मालेंतील कांहीं विचार खालीं देत आहों.

सिं. फ्रांसिस्कु ग्रांकोशु, उपरिनिर्दिष्ट वाचनीय लेखमालेचे निस्पृह व निर्भिड लेखक ह्मणतातः— "ज्याला वसाहतींत घडत असलेल्या मजेदार गोष्टींचें प्रत्यक्ष ज्ञान आहे त्याला माहीत होऊन चुकलेलेंच आहे कीं, तेथील बहुतेक मोठ्या हुद्यांच्या जागा बेजबाबदार लोकांनीं व्यापल्या जात असतात. ज्या विषयांचें पूर्ण ज्ञान सदरील पदांचा भार योग्य रीतीनें वाहण्यास अत्यावश्यक असतें त्याचा बव्हंशीं अभाव असल्यावरून, त्यांकडून सर्वत्र गोंधळ माजविला जात असतो. व अशा प्रकारें खुद्द पोर्तुगालांत ज्यानां पोटापाण्यासारखा अगदीं साधा प्रश्नसुद्धां सुरळीत सोडण्याची अक्कल व हिंमत नसते, असे नरपुंगव वसाहतींत आल्यावर येथील मोठमोठ्या हुद्यांवर चमकत असलेले दृष्टोत्पत्तीस येतात! अशामुळें जबाबदारीच्या जागा मूर्ख व लब्धप्रतिष्ठित लोकांच्या हातीं जाऊन वसाहतींतील राज्यकारभाराची नुसती माती माती होऊन जाते. जेथें तेथें 'तीन तेरा व नऊ बारा' या प्रकारची चंगळ उडून जाते!

मिलटरी अमलदारांच्या धागडधिंग्याचें चित्र मनांत येतांच तर भीतीनें अंगावर शहारे उठावयास लागतात. त्यांच्यासाठीं अनावश्यक हुद्दे तयार करण्यांत—रचण्यांत—येऊन त्यांपायीं भक्कम रकमांचा निरर्थक चुराडा करण्यांत येत असतो.........
एवंच वसाहतींचें उत्पन्न सिव्हिल व मिलिटरी नोकरशाहीचें अखंड दंगच चालविण्याचे कामीं अपुरें होत असल्यावरून त्यांची सुधारणा होण्याऐवजीं उलट शुक्लेंदुवत् अधोगतीच होत असलेली नजरेस आल्यास त्यांत आश्चर्य तें कोणतें ?"

वरील विचार "राजद्रोही" भारतकाराचे नाहींत. ते एका अत्यंत शुद्ध पोर्तुगीज रिपब्लिकन गृहस्थांच्या लेखणींतून निघालेले आहेत. त्यामुळें त्यावर अगर ज्या दैनिकानें ते प्रसिद्ध करण्याचें पुण्य संपादन केलें त्यावर सरकारनें खटला केल्याचें ऐकिवांत नाहीं, हें चित्र पहा आणि युद्धटांपासंबंधीं आह्मांवर उभारण्यांत आलेल्या राजद्रोही खटल्याचें भेसूर चित्र पहा! असो.

सि. ग्रांकोशु यांच्या लेखावरून चारशें वर्षांपेक्षाहि जास्त काल पोर्तुगीज अमलाखालीं खिचपत पडलेल्या गोमांतकाची सुधारणा कां होत नाहीं याचा उलगडा होऊन मन दुःखानें व्यग्र होतें. अशीच स्थिति आणखीं कांहीं वर्षें अप्रतिबंध चालल्यास गोमांतकाला कोणते दिवस येणार आहेत, हें भविष्य वर्तविण्यास ग्रहांची गति सुधां अज्ञात असलेल्यांस जड जाणार नाहीं.

ग्रांकोजच्या झणझणीत अंजनानें सरकारचे डोळे उघडल्यास ठीकच. न पेक्षां केवळ राष्ट्रसंरक्षणाकडे नजर पुरवून सरकारास जागें करून राज्यकारभाराचा गाडा सरळ मार्गानें चालविला जावा एतदर्थ गोमांतकीय नागरिकानीं आपली सर्व शक्ति एकवटली पाहिजे. निःस्वार्थ व निरपेक्ष बुद्धीनें देशासाठीं सक्रिय प्रयत्नाच्या या आणीबाणीच्या प्रसंगीं सरकारचें अनुकरण करून झोंपा ताणूं लागल्यास गोमांतकाचा सत्यानाश झाल्याखेरीज खास रहाणार नाहीं, हें प्रत्येकानें पूर्ण लक्षांत ठेवावें. जर आह्मांस जीवंत राहिलें पाहिजे, गोमंतकावर येऊं पाहणारी भयंकर आपत्ति टाळावयास हवी आहे व गोमांतकाला सुधारणेच्या अत्युच्च शिखरावर आनंदानें विहरत असलेल्या इतर राष्ट्राच्या तोडीला पोंचविण्याची गरज आहे तर स्वार्थप्रेरित व्यक्तिविषयक सुखें दूर लाथाडून केवळ गोमांतकासाठी आत्मयज्ञ करण्यास पुढें सरसावलें पाहिजे, दुसतें एकीचें पुराणकीर्तन श्रवण करविण्यास दुसऱ्यास भाग न पाडतां प्रत्यक्ष एकींतच त्यांस लीन करणें अत्यंत जरूरीचें आहे. 'फुकाचे' बोल बडबडण्याचा काळ आटोपला असून 'मोलाची' कृति दाखविण्याचा समय येऊन ठेपला आहे. ही संधि दवडण्याचा मूर्खपणा झाल्यास गोमांतकाला सुखाचे दिवस केव्हांच उगवणार नाहींत, हें प्रत्येकानें खूप लक्ष्यांत ठेवावें.

स्फुट विचार

आल्मेद कॉलेजः—'विद्याप्रसारा'च्या ५ व्या वर्षाच्या दुसऱ्या अंकांत ह्या संस्थेच्या नवीन सालापासून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाविषयीं बरीच माहिती प्रसिद्ध झाली आहे. 'द्वीपा'च्या लिहिण्याप्रमाणें कॉलेजच्या शिक्षणक्रमांत फारच उपयुक्त व महत्वाचे फेरफार झाल्याचें आढळून येऊन मन आनंदीत होतें. 'आल्मेद कॉलेज'नें आपल्या ८ वर्षांच्या अमदानींत शिक्षण प्रसारानें देशावर थोडेफार उपकार केले आहेतच. आतांचें नवीन धोरण अक्षरशः अमलांत येऊन तें अप्रतिहत चालल्यास त्याचा दर्जा अर्थात् वाढणार असून पूर्वीपेक्षांहि 'कॉलेज' जास्त लोकप्रिय होणार आहे, यांत संशय नाहीं. इतकेंच नव्हे तर 'आल्मेद कॉलेज' ही एक नमुनेदार संस्था बनून सबंध गोव्यास ती ललामभूत व कीर्तिदायक होऊन बसणार आहे, अशी आमची मनोदेवता आह्मांस खात्री पटवीत आहे. सवडी प्रमाणें कॉलेजचा शिक्षणक्रम व इतर व्यवस्था प्रत्यक्ष अवलोकन करण्याचा मनोदय आहे. तो पार पडतांच कॉलेजविषयीं जास्त विचार प्रदर्शित करूं. सध्या संस्थेची भरभराटी इच्छून व संस्थापकांचें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करून इतक्यांतच आटोपतें घेतों.

जेथें तेथें तोच प्रकारः— आणखी थोड्या दिवसानीं ब्रिटिश हिंदुस्थानांत मांटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणा अमलांत येणार असल्यावरून त्यांनिमित्त निवडणुकींचा –येलैसांवांचा-संभारंभ पार पडणार आहे. निवडणुकींसंबंधीं 'राजकारण' व इतर

वर्तमानसार

—युरोपांतील महायुद्धांत पोर्तुगालतर्फे रणांगणांत गेलेल्या सैन्यांतील २ लक्ष ७३ हजार ५३७ सैनिक ठार झाले!

—१९२० ते १९२१ सालच्या इकडील [गोवें, दमण व दीव] जमाखर्चाची सरकारी अंदाज पत्रकांतील आंकडे खालील प्रमाणें आहेतः—

उत्पन्न ४६१२००० रुपये.
खर्च ५८१०००० रुपये.

तुटवडा ११९८००० रुपये. हा कसा भरावा!

—पोर्तुगीज व जर्मन नागरिकांमध्यें विवाहासंबंधीं असलेली आडकाठी दूर करण्यांत आली असें कळतें.

—पोर्तुगालचें प्रधानमंडळ बदलण्यांत आलें आहे:

—जनरल गोमिस कोस्त या मिलिटरी आफिसरास त्याच्या बेशिस्त वर्तनामुळें पोर्तुगालमध्यें २० दिवसपर्यंत कैद ठेवण्यांत आलें असें कळतें–१८९७ सालीं राण्याच्या बंडाच्या वेळीं त्यानीं इकडे बरेच अत्याचार केले होते!

—साळगांव, बारदेस येथील 'इस्कोलांस' नावांच्या एका तरुण ख्रिस्ती बाईचा डोंगरावरून जाणाऱ्या एका राज रस्त्यावर ता. १९ जून रोजीं, हाल हाल करून खून करण्यांत आला. बाईच्या मुड्याच्या पंचनाम्यांवरून, फडक्यानें गळा दाबून तिचा प्राण घेण्यांत येऊन चेहरा ओळखतां येऊं नये ह्मणून दगडांनीं तो छिन्नविछिन्न केला होता असें सिद्ध झालें. नावडती ह्मणून खुद्द नवऱ्यानेंच कांहीं साथिदारांमार्फत तिचा खून केल्याच्या वहिमावरून नवऱ्यास व कांहीं इसमांस कैद केलें आहे. खटल्याचें काम जारीनें चालू असून खरा खुनी लवकरच सांपडण्याचा रंग दिसत आहे, असें एक बातमीदार कळवितात.

—कळंगूटचे जुने व प्रसिद्ध व्यापारी रा. गोविंद भिकाजी परींकर हे कांदोळी येथें लवकरच एक गिरण आणणार असून तींत लांकूड चिरणें, तांदूळ तयार करणें, तेल काढण, पिठ दळणें, सोडावॉटर-मशिन चालवणें, फर्निचर कामाचा कारखाना चालवणें वगैरे कामें होणार आहेत, असेंहि वरील बातमीदार कळवितात. श्रीयुत परींकर यांचे प्रयत्न फार अभिनंदनीय असून ते पूर्ण यशस्वी होवोत, असें इच्छितों.

—मुख्य प्रधान सि. बापतिस्त यांच्या अंतविधीचा सगळा खर्च सरकारनें केला!

—इकडील करांच्या वाढीविषयीं प्रसिद्ध झालेली बातमी खरी नसल्याचें गव्हरनरसाहेबानीं पणजीच्या कौंसिलच्या बैठकींत प्रसिद्धपणें सांगितलें.

—या आठवड्यांत पाऊस चांगला पडत असून शेतीची एकंदर स्थिति बरी आहे.

पत्रांत प्रसिद्ध होत असलेले लेख वाचले ह्मणजे येलैसावां संबंधीं 'जेथें तेथें एकच प्रकार' दिसून येतो. मतदार गोळा करण्याच्या क्लृप्त्या, क्यांडिडेटनें आपली स्वतःची योग्यता मतदारसंघाला पटवून देण्यांची मासलेवाईक टूम, इत्यादि इत्यादि गोष्टी इंग्रजी हिंदुस्थानांत काय किंवा पोर्तुगीज हिंदुस्थानांत काय अगदीं एकच. ही स्थिति पाहून मन अगदीं थक होऊन जातें!

ANO V.—NUMERO 17—1920 QUEPEM, QUINTA-FEIRA 15 DE JULHO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)........ ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहीरातीचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहीरातीचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें–गुरुवार, तारीख १५ माहे जुलै सन १९२० अंक १७ वा.

REVOLTANTE !

Não merece outro qualificativo a situação vergonhosa, criada pela exclusão da *W. I. P. Ry School*, de Mormugão, dos alunos que não sejam *descendentes e cristãos*.

Tal exclusão não data da fundação do referido estabelecimento de ensino inglez, pois atè 1915 admitia a *school* no seu corpo discente estudantes sem distincção de castas nem de crenças, prestando por esta forma democratica e liberal valioso apoio não só a quem tivesse em mira empregar-se na Companhia de Caminhos de Ferro, fundadora da mesma escola, mas tambem a quem pretendesse seguir cursos superiores noutros estabelecimentos adequados da India Britanica.

Em 1915, porém, os dirigentes daquela escola fizeram publico o seu proposito da restrição do previligio de admissão *dos descendentes e cristãos*, tão sómente, concitando, desta maneira, contra si, indignação dos excluidos que são, em regra, *hindus*.

Estes não se conservaram de braços crusados ante a feróz perseguição de que eram vitimas, sò porque tinham nascido hindùs, tendo dirigido em tempo aos competentes uma representação por intermédio dum dos membros da direcção, sr. Sawyer, quando esteve, em objecto de serviço em Vasco da Gama, protestando nêla contra a violencia e implorando, ao mesmo tempo, a reparação do mal.

O gentil homem inglez Mr. Sawyer prometeu trabalhar pelo diferimento do pedido dos hindus.

Mais tarde em 1919, um hindú, naturalmente desconhecedor da *despotica* exclusão, requereu admissão dum seu filho na W. I. P. *Ry School*; e, vendo que era disatendida a justa pretenção, procurou alcançar justiça pela intervenção da Direcção da Fiscalisação de Camiuhos de Ferro, á qual se queixou de antirepublicana restrição dos *senhores* da mesma escola.

A nossa Direcção da Fiscalisação tentou qualquer coisa no sentido de banir a pouca vergonha da exclusão, que empana o brilho do regime republicano; mas apesar disso, êla continua ...tendo, igualmente, resultado inutil a promessa do Mr. Sawyer.

E' grave este estado de cousas, porque importa o *imperium in imperio* da Companhia.

E, porque o desafôro dos srs. da escola subiu ao supremo ponto de, sem fazer caso da nossa Fiscalisação, deixar continuar, ainda, a odienta restrição, contraria ao mais comesinho bom senso e diametralmente oposta aos principios basilares da Republica que felizmente nos rege e ao prestigio da qual é grandemente ofensiva a mesma exclusão, tratamos do assunto em artigo de fundo, na certesa de que o nosso governo para sua honra e a do glorioso regime que representa, fará prevalecer *a razão da Igualdade*, desfeita radicalmente a supremacia *castista*.

Crêmos, mesmo, que o *presente* assunto ventilado deve preocupar mais a atenção dos competentes do que os *futuros* melhoramentos de Mormugão.

Aguardamos a solução condigna do *incidente*.

A vila de Sanvordem
OU
Curchorem ? !

Não resta menor sombra de duvida para se afirmar categóricamente e proclamar, alto e bom som, que o local onde se acha instalada a estação do caminho de ferro de Sanvordem pertence exclusivamente á esplendida e pitoresca aldeia de Curchorem a qual è indubitavelmente digna, ainda de melhor sorte, graças á sua posição geografica.

Curchorem, linda e viçosa povoação da provincia de Chondrovadi ostenta-se formosa nas margens do Zuari, assistindo, altiva, a todo o seu progresso e renascimento que o distino lhe impoz miraculosamente.

As fábricas de extração do òlio de coco, de descasque de arroz, as tecelanias, o comercio de importação e exportação de mercadorias, a grande afluencia dos passageiros de todos os pontos tem, presentemente, imprimido a esta interessante povoação um verdadeiro cunho de uma cidade moderna.

A companhia ingleza do caminho de ferro por engano ou por discuido ou porque não tivesse a exacta noção do nome da localidade onde ia instalar a estação, denominou impropriamente, a estação instalada em Curchorem com o nome de estação de Sanvordem; mas è claro, è certissimo que a companhia laborou no erro ao dar nome á esta sua estação que fatalmente tem de ser chamada pelo nome da aldeia da instalação —erro cuja emenda se impõe já.

E' evidente que a aldeia de Sanvordem está, como é do dominio publico, noutra margem do rio Zuari que a separa totalmnete de Curchorem pelo seu curso de Sanguem, tendo, ainda, os seus habitantes de atravessar a passagem para alcançar a estação do caminho de ferro.

Ainda mais; encarando a questão sob o ponto de vista da divisão administrativa, a razão tende ao lado da povoação cuja causa advogo, pois Sanvordém pertence exclusivamente ao concelho de Sanguem e a povoação de Curchorem onde ao prèsente se vê a dita estação faz parte do concelho de Quepem.

Creio que os ultimos dois factos demostram suficientemente e com maior clareza quão improprio e ridiculo è o nome Sanvordem dado a estação do caminho de ferro de Curchorem.

Posto isto, cumpre-me nesta altura frisar em abono da verdade, que a ideia que se pretende elevar á vila, não pode ter, de forma alguma, a denominação de Sanvordem mas sim de Curchorem que è, actualmente centro da vida comercial e industrial.

Voltarei oportunamente ao ponto, quando haja necessidade de abordar a esse respeito mais considerações.

Entretanto chamo ao assunto a atenção dos ilustres membros da Comissão dos milhoramentos da cidade de Mormugão.

X. Curchorencar

DARDOS E CARDOS

O Anuncio

Cá no nosso Paiz desconhece-se, quase por completo, o papel de *impressão* do Anuncio que em toda a parte civilisada è tido como *sciencia* do sèculo X X. Cá dentro ignora-se o maravilhoso poder do Anuncio sobre a economia politica e domestica. Aqui

चालू असला तरी तसल्या संस्थांत परस्परांविषयीं तीव्र चुरस दृष्टोत्पत्तीस येत असतानां समाजैक्याचें कार्य त्यांकडून पार कसें पडेल ? अशी शंका येतेच. शाळांत सध्या देण्यांत येत असलेलें विशेषतः ब्रिटिश हिंदुस्थानांत लागू पडणारें शिक्षण गोव्यांतील स्थलकालास उपयुक्त व्हावें अशा प्रकारचें त्यांत फेरफार केले पाहिजेत. ह्या व इतर गोष्टींचा विचार, गोव्यांतील विचारी लोकानीं सार्वजनिक रीत्या करून इष्ट ठरेल तें अमलांत आणल्याशिवाय त्या त्या संस्थांस यावी तितकी उपयुक्तता येणार नाहीं. असें गोव्यांतील सुज्ञ हिंदूंस वाटत असतां स्पष्टवक्त्यानेंच असा कोणता चष्मा लाविल आहे कीं त्यास विपरित दिसावें ? !

"जनाव, देहली तो वहोत दूर है" ह्या जुन्या कालच्या शब्दांचा चष्मा डोळ्यांस लाविल्यामुळेंच त्यास 'देहली' दूर वाटली ! एरवीं आज शीघ्रप्रवासी साधनाच्या काळांत दूर असें काहींच नाहीं !

कळावें ही विनंति.

आ. शुभाकांक्षी
लक्ष्मीतनय

काळोखांत दडूं नका !

सा. न. वि. वि. कोणतीहि संस्था गर्भावस्थेंत असतांना तिच्याविषयीं बरीवाईट टीका करणें, हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे. त्यामुळें त्या चळवळीच्या मातृस्थानीं असलेल्या लोकानां तिचें योग्य संगोपन करण्यांत मदत होते. परंतु ही टीका करतानां अंधारांत राहून धोंडे फेंकण्याचा भ्याडपणा मात्र स्वीकारतां कामा नये. अनुकूल टीका करतानां टोपण नांव चालेल, परंतु विरुद्ध टीका करतानां आपलें नांव प्रसिद्ध करण्याचा धीर प्रत्येकामध्यें अवश्य असावा. त्यामुळें मूर्खपणाचीं विधानें ठोकण्याचा मोह कमी होतो. 'अखिल गोमांतकीय हिंदुपरिषदेसंबंधीं जो एका निराशावादी अवगुंठित व्यक्तीचा भारतामध्यें पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला आहे. तो लेखकाची "अल्पबुद्धीची" स्पष्टोक्ती खरी असल्याबद्दल खात्री देतोच. शिवाय लेखकाच्या भ्याडपणावर प्रकाश पाडल्याशिवाय रहात नाहीं. स्वयंसेवकाच्या येत्या अंकांत ह्या विषयीं माहिती प्रसिद्ध होणार असल्यावरून तोंपर्यंत आम्हीं मौन्य स्वीकारतों. आज एवढीच सूचना आहे कीं परिषदेविषयीं किंवा अन्य कोणत्याहि विषयावर टीकात्मक लिहितानां 'स्पष्टोक्ती' बरोबर स्पष्ट नांव प्रसिद्ध करण्याचें लेखकांत धैर्य असावें. स्पष्टवक्त्यानें आपल्या खऱ्या नांवानें पुढें यावें. काळोख्या रात्रीं वृक्षांच्या ढोलींत बसून धुत्कार करणें हा व्यवसाय दिवाभीतांचा आहे. मनुष्य प्राण्यांस तो शोभत नाहीं. भारतकर्त्यांनीं नांव प्रसिद्ध करण्यांस भिणाऱ्या पळपुट्यांचे लेख भारतांत यापुढें प्रसिद्ध करूं नये, अशी नम्र विनंति आहे. क. लो. हे विनंति

कर्नाटक कॉलेज ९-७-२० — आपला अ. का. प्रियोळकर

*** प्रस्तुत विषयावर रा. कोदंडधारी व प्रो. द. व्यं. पै यांचीं पत्रें स्थलाभावामुळें येत्या अंकीं प्रसिद्ध होतील.

सं भारत

भारत

गुरुवार अषाढ कृ० ३० शा. १८४२

" पुढें गती कैसी ? "

'पोर्तुगीज इंडियेंतील गव्हर्नरसाहेबांच्या प्रेरणेवरून गोमांतकांत करांची वाढ करण्यांत येणार आहे' अशी बातमी कांहीं दिवसांमागें 'दियारु दे नोतिसियस, पत्रानें प्रसिद्ध केली होती. ती बातमी विश्वसनीय मानून आम्हीं व आमचे इतर कांहीं खिस्ती व्यवसाय बंधूंनी करवाढीविरुद्ध खरमरीत टीका केली होती, हें वाचकांस आठवत असेलच. परंतु वरील अफवा निराधार असून, ती केवळ लोणकढी थाप आहे, असें आमच्या प्रांताधिपतींनीं स्थानिक पार्लमेंटच्या गेल्या दिवसांतील एका बैठकींत अध्यक्ष या नात्यानें निक्षून सांगितलें, हें आतां महशूर आहे.

करवाढीची गोष्ट कल्पित असल्याचें कळून आम्हांप्रमाणेंच आमच्या वाचकांसहि आनंद वाटल्याशिवाय राहणार नाहीं, हें अर्थात् उघड आहे. परंतु या आनंदाच्या टिकाऊपणापेक्षां त्याच्या क्षणभंगुरत्वावरच विश्वास ठेवण्याविषयीं लोकांच्या संशयी मनाचा जास्त कल झुकेल. कां कीं, जरी आमचें सरकार कर वाढविण्याचें अमंगल, आततायी व अमानुष कृत्य होणार नाहीं, असें गव्हर्नरसाहेबांच्या मुखांतून वदवीत आहे तरी जोंपर्यंत नोकरशाहीचे पगार वाढविण्यांच्या अप्रतिहत चालू असलेल्या पातकी कृत्यांस व इतर अनावश्यक ' छंद-ढंगांस ' आळा पडलेला दिसून येणार नाहीं तोंपर्यंत डॉ. मोराईसचे बोल फोल नाहींत असें खात्रीपूर्वक मानण्याला गोमांतकीय जनता सहसा तयार होणार नाहीं.

कर वाढविण्यांत येणार नाहींत आणि नोकरशाहीच्या 'सुंदर उपवनांत' तर महाग खत भक्षक रोप पेरण्याच्या अखंड ढंगांचा रंग पालटणार नसून इतर छंदांचा 'सोनें तोळा रुपये सोळा' अशा प्रकारचा धंदाहि बंद पडणार नाहीं, हा चमत्कार नव्हे काय ? परंतु जोंपर्यंत सेंट झेवियर सारख्या धार्मिक संतानीं राजकीय चमत्कार घडवून आणण्याची आपली पात्रता सिद्ध केलेली नाहीं तोंपर्यंत वरील गोष्टीचें 'चमत्कारिकत्व, जनतेच्या मनांत ठसविण्याचें काम प्रत्यक्ष चार तोंडांच्या ब्रह्मदेवाससुद्धां अशक्य आहे. आमचे गव्हर्नर साहेब तर पडले एक तोंडी. त्यांच्याकडून काय होणार ? असो.

तात्पर्य काय कीं, करवाढीची मीति समूळ नष्ट होण्यास गव्हर्नरसाहेबांचें स्थानिक पार्लमेंटांतील अभिवचन पुरें होत नाही. नुसत्या अभिवचनांनीं ओलावा येण्यासारखी लोकांची मनोभूमिका इतकी कमी तप्त खास नाहीं. जोंवर बुरोक्रासीच्या भक्कम पगारांवर छाटाछाटीच्या गदेचा आघात करण्याचा धाडसी पराक्रम गाजविला जाणार नाहीं, जोंवर नोकरशाहीच्या वाढत्या वृक्षाच्या डहाळ्या छेदण्याचें बिकट पण अत्यावश्यक काम करण्याचें सक्रिय धैर्य द्रगो-

त्वर होणार नाहीं, व, शेवटीं, जोंवर भरपूर द्रव्योत्पादनाचे आधुनिक उपाय अमलांत आणण्याचा यशस्वी उपक्रम होणार नाहीं, तोंवर कसल्याहि राजकीय चमत्कारांवर विश्वास ठेवण्याला मनाची तयारी दाखविणें ह्मणजे निवळ गारुड्यांच्या नकली रुपयांनीं श्रीमंत बनण्याची शेखमहंमदी इच्छा प्रगट करणें होय. ह्मणून राज्यकर्त्यांस आमची इतकीच प्रेमाची विनवणी आहे कीं, 'महाराज, गोमांतकाचें खरेंखुरें हित साधण्याचा तुमचा निर्धार आहे तर आधीं तुमच्या नोकरांचा पगार कमी करा; नोकरांची संख्या बेसुमार वाढलेली आहे त्यांत छाटाछाट करा; व इतकेंहि करून करांचें उत्पन्न अपुरें ठरल्यास, योग्य व प्रामाणिक माणसांच्या जबाबदारीखाल द्रव्योत्पादनाचे सरकारी धंदे थाटून तिजोरीस पडणारी तूट भरून काढा. या शिवाय दुसरा तरणोपाय नाहीं.' असें न झाल्यास 'शिरोभागीं केलेल्या प्रश्नाचें उत्साहजनक उत्तर मिळणें असंभवनीय आहे, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

स्फुट विचार

राष्ट्रीय कर्जः— पोर्तुगीज राष्ट्रीय कर्ज वाढत्या प्रमाणावर असून, १९१४ सालापासून तों १९२० पावेतों तर त्याची गति मोठार वेगानें चालू आहे. ही अनिष्ट व अत्यंत धैर्यवान माणसाचेंहि मन पोळविणारी वाढ राष्ट्रीय बजेटावर अशीच थैमान घालूं लागल्यास, अवघ्या थोड्या अवधींत पोर्तुगीज राष्ट्र सांपत्तिक अवनतीच्या घोर नरकांत पार बुडून जाणार आहे, ह्यांत काडीचाहि संशय नाहीं. आज तारखेला एकंदर कर्जाची विभागणी केल्यास, प्रत्येक नागरिकाच्या शिरावर १०५७ रुपयांपेक्षांहि जास्त रकमेचा बोजा बसतो ! या अवाढव्य कर्जाची जबाबदारी सैल करण्याचे कामीं नोकरशाहीनें स्वार्थत्यागयुक्त प्रयत्न वेंचणें अत्यावश्यक होतें. परंतु पोर्तुगीज बुरोक्रसी आपल्या ख्यालीखुषालीपेक्षां राष्ट्राच्या भावी संकटास जास्त महत्व देण्यास आतांच तयार नसल्यावरून, तिच्या पायीं खर्च होत असलेल्या रकमाची छाटाकाट करण्यास धजणें ह्मणजे सर्पाला दुखवून जींवंत सोडण्यासारखें भयंकर कृत्य होय, अशी राज्यकर्त्यांची ठाम समजूत बनून राहिल्यामुळें, कर्जवाढीच्या भयंकर समंधास गाडणें जवळ जवळ अशक्य होऊन बसलें आहे.

दुसरी बाजुः— एकीकडे राष्ट्रीय कर्ज भयंकर प्रमाणानें वाढलेलें नजरेस येतें तर दुसरीकडे पोर्तुगालांतील नवे शेट सावकार आपली संपत्ति परराष्ट्रीय बँकांत सुरक्षित रीतीनें संभाळण्याचा धांदलींत दंग झाले आहेत, असें दृष्टोत्पत्तीस पडतें. एतावता पोर्तुगीज राष्ट्राची एकंदर स्थिति निराशाजनक असून कोणत्या वेळेला कसा प्रसंग ओढवेल हें सांगतां येत नाहीं. ज्याच्या त्याच्या अंतःकरणांत निराशेनें ठाणें दिलें असून जिकडे तिकडे हृदय विदारक दुःखोद्गार ऐकूं येतात. परमेश्वर करो आणि ग्रहदशेच्या या भयंकर फेऱ्यांतून पोर्तुगीज राष्ट्र कायमचें मुक्त होऊन त्याला लवकरच सुबत्तेचे दिवस उगवोत असें अंतःकरणपूर्वक इच्छितों.

वर्तमानसार

—छापशांच्या लिसेवाचे प्रोफेसर डॉ. सिनारी यांची नेमणूक पणजीच्या लिसेवाच्या एका प्रोफेसराच्या जागीं झाल्याचें कळविण्यास अत्यानंद वाटतो.

—येत्या नवंबरांत पणजी येथें इकडील प्रांतिक कांग्रेसचें ४ थें अधिवेशन भरणार असून त्यांत पिकाचा तुटवडा, तो सुधारण्याचे उपाय व मजुरांच्या अभावामुळें पेरणीकडे यंत्राच्या उपयोगकरणें इ. विषयांचा ऊहापोह होणार आहे.

—यंदां रायतूर येथील सेमिनारीत (खिस्ती धर्माच्या शिक्षणाचें कॉलेज) ४०० खिस्ती मुलानीं प्रवेश केला आहे.

—इकडील गव्हरनरसाहेबांस प्रांतिक कौंसिलनें केलेल्या कामदारांच्या पगारांच्या वाढी तहकूब ठेवण्याविषयीं पोर्तुगाल सरकारकडून कळविण्यांत आलें आहे !

—गेल्या १० तारखेपासून पणजीहून मडगांवपर्यंत व येथून तेथपर्यंत प्रवासाच्या सोयी साठीं मोटार गाड्या सुरू करण्यांत आल्या आहेत.

— सि. आफोंस कोस्त, यानीं पोर्तुगालचे प्रतिनिधि या नात्यानें शांतता परिषदेंत एक लेख दाखविला असून त्यांत जर्मनीकडून पोर्तुगालास नुकसान भरपाई खातर ४३२०५८७५२ पौंड मिळाले पाहिजेत असें ह्मटलें आहे.

—पेडणें येथें प्लेगाचा प्रादुर्भाव झाल्याचें समजतें.

—पणजी शहरांत मुनिसिपालटीकडून विजेच्या दिव्यांची सोय करण्यांत येत आहे.

—मालावृत, वर्गणीची पोंच व डिफेन्स फंड स्थलसंकोच्यामुळें या अंकांत प्रसिद्ध करणें अशक्य झालें.

परदेशगमनः— स्वावलंबनाच्या जोरावर ब्यारिस्टरची पदवी मिळवून व हिंदूंना कधींच न मिळालेली सरकारी वकिलांची जागा पटकावून ज्या प्रमाणें ब्यारिस्टर रावानीं आपली उन्नति परी उन्नति करून पर्यायानें समाजसुधारणेसहि हातभार लावला त्याच प्रमाणें आणखीं कांहीं तरुणांनींहि आपल्या सक्रिय प्रयत्नानीं परदेशगमनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर सोडण्याच्या विचारास लागून हिंदुसमाजाचा दर्जा वाढविण्याप्रीत्यर्थ अविश्रांत झटलें पाहिजे. उच्च शिक्षणप्राप्तीशिवाय इतर मोठमोठाल्या ख्रिस्तीबंधूंप्रमाणें द्रव्यसंपादनार्थहि परदेशगमनाची कास धरणें सध्याचे हलाख स्थितींत अत्यावश्यक झालें असून, उच्चशिक्षण व भरपूर संपत्ति अशा दुहेरी साध्यांच्या भक्कम पायावर परदेशगमनाची इमारत उभारली गेल्यास देशाची सांपत्तिक स्थितिहि झपाट्यानें सुधरल्याखेरीज खास राहणार नाहीं, हें उघड आहे. डॉ. सखारामपंत लाड, ब्या. राव, प्रो. धर्मानंद कोसंबी व इतर पुष्कळ सन्माननीय सारस्वतानीं परदेशगमनाचा मार्ग खुला करून ठेविला आहे. आधुनिक तरुण त्याचा फायदा घेऊन आपली योग्यता व स्वदेशाची संपत्ति वरील मार्गदर्शकांची चिकाटी आपणांत आणवून वाढवितील अशी आशा आहे. ब्यारिस्टर रावानी संपादन केलेल्या पदवीबद्दल त्यांचें आम्हीं, अंतकरणपूर्वक अभिनंदन करून, आपल्या एकंदर आचरणानें ते सर्वांस प्रिय होवोत, अस परमेश्वरापाशीं प्रार्थून, हा स्फुट येथेंच संपवितों.

ANO V.—NUMERO 18—1920 QUEPEM, QUINTA-FEIRA 22 DE JULHO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—**Bharat**

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर
गोंव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडियां........... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहीरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणें. कायमच्या जाहीरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें-गुरुवार, तारीख २२ माहे जुलै सन १९२० अंक १८ वा.

PATRIOTISMO

¿ Porque è que na India Portuguesa se não nota o entusiasmo patriotico que se observa na India Inglesa ?

Quem, como nòs, estudou, mais de perto, a modalidade de ser do nosso patriotismo e o cotejou em todas as suas particularidades com o dos nossos irmãos d'alem--fronteira, responderá, sem mais rebuços, á referida pergunta com o seguinte:

E' que, ao passo que os patriotas e seus *leaders* da India Britanica fazem do patriotismo a sua *única e principal* profissão, relegando ao infimo plano o interesse e comodismo pessoais, entre nós sucede presisamente o contrario.

Aquì, o patriotismo è, em regra, tido como assunto de secundaria importancia; no patriota da Ind a Portuguesa só nasce, ordinariamente, o patriotismo, quando se lhe preencha o egoismo; a idea de sacrificios em pról do Paiz só brota da inteligente cabeça do nosso patriota, quando o seu estomago denuncie a completa fartura; e, finalmente, o patriotismo que cá se exibe, é, em geral, mais *aparente* do que *intimo*.

Daì sentir-se cá dentro a completa ausencia do entusiasmo patriotico que admiramos nos nossos visinhos.

Pelo mesmo motivo, não temos a dita de vêr no nosso seio os Gokhales, Dada-bhais, Lalalajapatarais, Gandhis e toda uma numerosa plêade de grandes paladinos britanicos que durante toda a sua vida conhleceram só a unica cousa, a unica profissão: sacrificios em prol do seu Paiz.

Façam pois do patriotismo o *único e principal meio di vida* e vejám como surgirão do ventre da nossa Mãe-Patria individualidades daquela envergadura e daquele patriotismo verdadeiro.

Equilibrio orçamental

Foi recebida com geral agrado a declaração de Sua Exa o Sr. Governador Geral, feita no Conselho do Governo dismentindo o boato de aumento de impostos para equilibrio orçamental.

Não podia ser outra cousa num paiz distituido de meios e pobre de recursos, como o nosso, que vergado sob o peso de mil encargos se debate nas vascas de derradeira agonia.

[illegible] de esperar isto, de resto, d'um governador como o Sr. Dr. Jaime de Morais, que, estamos certos, não fará agravar a situação sobremodo critica do misero contribuinte da India Portugueza.

E' verdade que o desequilibrio do nosso orçamento provincial è demasiadamente compremetedor e se se não lhe acudir a tempo, a falencia economica è fatal.

¿ Mas como acudir á crise que se depara diante de nós ? como arredar o espectro medonho que se nos apresenta ?

Lançando novas contribuições ou criando novas fontes de receita ?

E' o problema que exige pronta solução.

Se è verdade que a todo o cidadão cabe, a estricta obrigação de concorrer com o seu contingente, em devidas proporções, para despezas publicas, tambem não padece duvida alguma que as faculdades contribuitivas do cidadão indo-português estão esgotadas devido a mil e um contratempos determinados pelas constantes estiagens, e pelo sucessivo encarecimento de artigos da primeira necessidade, crise que assola todo o mundo e que nos suga milhares de rupias.

E' o facto; e contra factos não há argumentos.

O proprietário, que antes da presente crise economica chegava a equilibrar o seu orçamento domestico ás mil maravilhas, está agora condenado a passar por privações por não poder reunir nem tres partes das rendas anteriores, apesar da alta do preço de coco, artigo principal da nossa exportação.

Não é por retraimento ou com o fim de eximir-se aos encargos, como por ai interpretam, que o contribuinte sente horror pelo aumento de impostos; mas unicamente, pelas circunstancias precarias que o oprimem.

Do contrario, não teria explicação o caso da arramatação de tantos predios per falta do pagamento de dividas á Fazenda e do sem numero das execuções fiscais, que representam um termómetro infalivel da miseria e riqueza publica como raciocina Victor Hugo.

Não será, portanto, nestas condiçõis, de boa norma proceder-se ao equilibrio do orçamento do Estado, lançando mão de novos encargos; mas sim criando novas fontes da receita publica.

Lançar impostos novos ou aumentar os existentes para o equilibrio orçamental agravando assim a situação do contribuinte, è uma cousa de facil alcance, mas não è por este trilho escabroso que poderemos conseguir o nosso *desideratum* do desenvolvimento e progresso economico do paiz e que teve em mira a Metropole, quando outorgou autonomia a esta colonia.

Para alcançar este fim principal, quere incitando grandes obras de fomento, quere criando o fundo da reserva distinado para ocorrer ás despezas no caso de crises economicas ou grandes calamidades, como preceitua a Carta Organica, temos de vencer grandes dificuldades e, por isso, se formos mimoseados no entanto com novos encargos *só para manter a maquina burocratica*, a nossa disgraça será certa.

Ora è trabalhando com paciencia e severidade que venceremos todas as dificuldades.

Nestas circunstancias, a primeira tentativa a empreender, seria, portanto, a revisão rigorosa e reducção cuidadosa das despezas publicas, despensando serviços que a experiencia tenha demonstrado disnecessarios e disvantajosos, de sorte que a nova organisação desses serviços corresponda às necessidades riaes e indispensáveis do paiz.

A exploração racional das nossas matas nacionais não seria uma fonte, de somenos importancia das receitas publicas, por quanto essa nossa riqueza valiosa se acha votada ao completo ostracismo e discuido dos seus dirigentes. Nesta parte temos de estudar muito aos nossos visinhos inglezes, convindo ainda, contratar um tecnico dêles com salário modico para milhorar e impulsionar esta nossa industria.

O papel atè aqui desempenhado pelos empregados deste ramo de serviços consistiu unicamente em ampliar os limites das matas nacionaes arrancando aos particulares e ás associações terras do seu dominio e posse, violando assim o sagrado direito de propriedade, com manifesto prejuizo á agricultura e economia social, do que tendo subido reclamações ao Governo se acha nomêada atè uma comissão para a revisão das demarcações.

Não convem manter-se este estado de cousas de forma alguma.

O' arroteamento dos terrenos incultos e desaproveitados è o problema que mais déve atrair todas as atenções como

सोडाच पण स्वतःच्या मनाचीहि लाज धरलेली नाहीं ! (क. का पद्य.) स्पष्टवक्त्यांना माझा स्पष्ट असा सवाल आहे कीं, हीं पत्रें लोकांच्या उपयुक्ततेसाठीं चालवण्यांत येतात कीं चालकांच्या उदरभरणार्थ चालवण्यांत येतात ? आणि तीं व्हावीं तशीं उपयुक्त अजून झालीं नाहींत तर खुद्द स्पष्टवक्ते एखादें पत्र कां चालवून दाखवित नाहींत किंवा असलेल्या पत्रांनीं उपयुक्त कसें बनावें तें कां सुचवित नाहींत ? तर जनाब देहली तो दूर है. संपादक महाराज, आपल्याच पत्राच्या ५ व्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या सारस्वत ब्रा. समाजाच्या ८ व्या वार्षिक संभारंभाच्या हकीगतीकडे आपल्या वाचकांनीं लक्ष द्यावें अशी मी सूचना करतों. अध्यक्षस्थान अत्युत्तम रीतीनें पार पाडणारे, वक्त्यांच्या पंक्तींत बराच वर जागा मिळवणारे, आपल्या जबाबदारीची भरपूर जाणीव असलेले प्रागतिक पक्षाचे सुप्रसिद्ध पुढारी ना. कामत यांनीं अॅटहोम पार्टीचे वेळीं खालील उद्गार काढले होते:– "आज दोन तीन दिवसांच्या अवधींत उत्सावाचा कार्यक्रम, तो व्यवस्थितपणें घडवून आणतांना चालकांकडून घडून येणारी शिस्त, कोणतेंहि काम स्वयंसेवक भावानें करण्याची मंडळीची तयारी, परस्पर प्रेम, पुढाऱ्यांविषयीं आदर आणि नीतिमान स्वावलंबी व तळमळीची अशी तरुण पिढी करीत असलेले श्रम पाहून माझ्या मनावर फारच अनुकूल परिणाम झाला." त्याच हकीगतींत पुढें ह्मटलें आहे कीं, चहापार्टीचा समारंभ इतका शिस्तवार, शांत व उत्साहवर्धक व यंत्राप्रमाणें व्यवस्थित झाला कीं जमलेल्या सगळ्या परकी मंडळीनें, गोमांतकांत तरी हा संमारंभ अपूर्व व अनुकरणीय आहे असे उद्गार काढिले.... चीं सुश्राव्य, परकी भाषेंत सरस वक्तृत्व, सुंदर विषयमांडणी, मार्मिक, विवेचन भरपूर माहिती, अभ्यासी वृत्तीनें सांठवलेलें ज्ञान यांमुळें उत्तम वठलेलीं व्याख्यानें...... देणारे वक्ते आमच्यांत असल्याचें त्याच हकीगतींत सांगितलें आहे.

तेव्हां, संपादक महाराज, आमच्यांत इतके गुण असल्याचें जें नामदार कामतीसारखे व एक संस्था उत्तम रीतीनें चालवलेले रा. केशव अनंत नाईक सांगतात तें आह्मीं खरें मानावें कीं स्पष्टवक्त्यांच्या सगळ्या गुणांच्या अभावांकडेंच सगळें सत्य धांवत असल्याचा समज करून घ्यावा ?

संपादक साहेब, देहली तो दूर है असें ह्मणण्याचा स्पष्टवक्त्यांचा मुख्य मुद्दा तो हा कीं, 'आमच्यांत कर्तबगार माणसांची संख्या हातांच्या बोटांबाहेर अजून गेली नाहीं ह्मणून आह्मांला प्रांतिक परिषद नको." यावर स्पष्टवक्त्यांनां मीं असें विचारण्याची परवानगी घेतों कीं, हिं. प्रां. परिषदेची कल्पना जर ठीक आहे, तिची गरजहि असल्याचें आपणास घटकामर कबूल आहे, परिषदेची कल्पना जर पुष्कळ काळापूर्वीं सांठून राहलेली, [अर्थात कालांतरानें परिपक्व झालेली] आहे, सुशिक्षित हिंदुसमाजाकडून जर. तिचा सर्वत्र, अगत्यानें, उत्साहानें व आदरपूर्वक विचार होतो आहे, ना. कामतींसारखे जबाबदार पुढारी जर आमची तरुण पिढी स्वावलंबी, शिस्तयुक्त, नीतिमान, पुढाऱ्यांविषयीं आदर बाळगणारी, तळमळींची असल्याचें सांगत आहेत. सा. ब्रा. समाजाच्या उत्सवसंभारंभांत सुश्राव्य, मार्मिक........ इत्यादि व्याख्यानें देणारे वक्ते आहेत, खुद्द स्पष्टवक्त्यांनींच ह्मटल्याप्रमाणें एक दोन तरी लेखक आहेत, आणि हें सगळें स्पष्टवक्त्यांना नाकबूल करणें शक्य नाहीं, तर या गुणांच्या व व्यक्तींच्या समुच्चयानें प्रांतिक परिषद तेवढीच भरवून चिरंजिवी कां करितां येऊं नये ? मडगांव हे गोव्यांत नाहीं का मडगांवांत उत्तम काम करणाऱ्या मंडळीला प्रांतिक परिषदेंतून कोणी वगळलें आहे ? का सुशिक्षित, अगत्यानें, आदरपूर्वक, तळमळींची, स्वावलंबी, इत्यादि शद्बांनां स्पष्टवक्ते निराळा अर्थ देतात ? प्रांतिक परिषदेचें पहिलें अधिवेषन भरण्याचें ठरलें तें शिस्तीनें पार पाडणारी मंडळी जेथें आहे तेथें भरवावें व तळमळीच्या व सुशिक्षित पिढीनें तिचें कार्य पुढें चालवावें ह्मणजे स्पष्टवक्त्यांनां कुत्सित विधानें करण्यांस जागाच रहाणार नाहीं. दुसरें असें कीं, एकीकडे आमच्यांत अध्यक्ष, वक्ते नसल्याचें रडगाणें गावें व दुसरीकडे प्रां. परिषद नको ह्मणून टाहो फोडावा तर लोकानीं ते बनण्याचें शिक्षण घ्यावें तरी कोठें ? बरें, त्यांनीं जे स्थानिक प्रयत्न ह्मणून सूचवलेले आहेत ते तरी [उदाहरणार्थ पोर्तुगालास विद्यार्थी पाठवणें] सगळेच, एकंदर प्रांतांतील लोक एकत्र झाल्याशिवाय अमलांत आणणें शक्य आहे काय ? स्पष्टवक्ते ह्मणतात त्या प्रमाणें नीतिप्रसारार्थ, शीलावरील व्याख्यानांचे तुतारीचे फुंकारे एकट्यानेंच कितीहि जोरानें फुंकले तरी कांहींच उपयोग झाल्याचें आजपर्यंत दिसून आलें नसतां हेच प्रयत्न करण्यास स्पष्टवक्त्यानें सांगावें हें चमत्कारिक नव्हे काय ? असो. संपादक महाराज, पत्र लांबलें तरीहि पुष्कळ लिहावयाचें राहिलेंच आहे. पण तें सगळें बाजूस ठेवून मीं स्पष्टवक्त्यांस आणखी एकच प्रश्न विचारतों तो हा कीं, स्वतःचें नांव लपवणाऱ्यास स्पष्टवक्ता हें टोपण नाव शोभतें नां ? तें कसेंहि असो. आपल्या नावांची सार्थकता करण्यास त्यानीं निदान इतकें तरी केलें पाहिजे कीं "तुह्मीं मला कांहीं महत्व दिलें नाहीं ह्मणून मला तुमची प्रांतिक परिषद नको" असें स्पष्ट सांगावें. आणि हें त्यानीं सांगितलें नाहीं ह्मणून मीं या पत्राला स्पष्टवक्त्यांचा अस्पष्टपणा असा मांथाळा दिलेला आहे. आतां स्पष्टवक्त्यांनीं आपलें खरें नांव प्रगट केलें तर ते आमच्या आरोपास पात्र आहेत कीं नाहींत, हें ज्यांना ते मूषक ज्ञातीच्या पंक्तीस बसवतात त्यांना उघड समजून येईल. क. कृ. म. अ. हे विनंति.

फोंडा, ता. १० जुलै सन १९२० — आपला दत्तात्रय व्यंकटेश पै

हिंदु प्रांतिक परिषद

महाशय भारतकर्ते यांस वि. वि:—

गोमांतकांतील हिंदुसमाज सुशिक्षित, सुविचारी व सदाचारी बनावा, राज्यकारभारांत त्यानें आपलें योग्य स्थान मिळवावें, त्याच्यांत प्रचलित असलेल्या कित्येक अनिष्ट चालीरीतींचें निर्मूलन व्हावें, दुर्व्यसनास आळा पडावा, त्यांचें आर्थिक सामर्थ्य वाढावें, सारांश, त्याची सर्वांग सुंदर अशी उन्नति व्हावी हें उच्चतम ध्येय आपल्या दृष्टीपुढें ठेऊन तें गांठण्याच्या पवित्र उद्देशानें फोंडें येथील कांहीं तरुण देशभक्तांनीं गोवा हिंदुपरिषदेच्या स्थापनेचा स्तुत्य व अभिनंदनीय उपक्रम केला असून या कल्पनेंचें ठिकठिकाणीं अत्यंत ऊत्साहानें स्वागत करण्यांत येत आहे.

आपणासारख्या अधिकारी देशभक्त पुढाऱ्यांस या परिषदेची उपयुक्तता व आवश्यकता पूर्णपणें पटून ती यशस्वी करण्याच्या कामीं शक्य ती मदत पुरविण्याची स्फूर्ति व्हावी हे साहजिक आहे.

अशा वेळीं या परिषदेसंबंधानें स्पष्टवक्ता ह्या सहीनें आपल्या 'भारता'च्या १६ व्या अंकांत प्रसिद्ध झालेला मजकूर वाचून सखेदाश्चर्य वाटलें. या लेखकानें पोक्तपणाचा बराच आव आणून आपल्या पोकळ पांडित्याचें प्रदर्शन केलें आहे.

परिषदेची कल्पना ठीक आहे, तिची गरज आहे, तिचे उद्देश फार चांगले आहेत, तिजपासून फार फायदा होणार आहे, आणि आज तिजविषयीं सर्वत्र, अगत्यानें, उत्साहानें आणि आदरपूर्वक विचार होत आहे इ. गोष्टी हा लेखक स्वतः प्रांजलपणें कबूल करितो. मग या परिषदेविरुद्ध लिहिण्याचा आणि लोकांना नाउमेद करण्याचा मोह या लेखकाला अनावर कां व्हावा ? हें आश्चर्य नव्हे काय ? अशा या चळवळीस आपली सक्रिय सहानुभूति देण्याचें आपलें कर्तव्य बजावण्या ऐवजीं तिला 'खो' घालण्याच्या हेतूनें आपली लेखणी सरसावण्याची या लेखकाला दुर्बुद्धि कां सुचली ?

परिस्थिति अनुकूल नाहीं, हिंदु लोकांत पात्रता नाहीं, चिकाटीनें, व्यवस्थितपणानें, शहाणपणानें काम करण्याची त्यानां सवय नाहीं असें रडगाणें गाण्यांत व स्वतः कांहीहि न करितां दुसऱ्याच्या कामांत व्यत्यय आणण्यांत पुरुषार्थ तो कोणता? अशानें आमची उन्नति होणें शक्य आहे काय ?

परिस्थिति अनुकूल करून घेण्यासाठींच, हिंदु लोकांत पात्रता आंणण्यासाठींच आणि त्यानां चिकाटीनें, व्यवस्थितपणानें सार्वजनिक कार्यें करण्याची संवय लागण्यासाठींच या परिषदेची अत्यावश्यकता आहे.

आज काल ब्रिटिश हिंदुस्थानांत, माळी, कोळी, साळी, क्षत्रिय, जैन, लिंगायत, महार मांग इ. ज्ञाति आपापल्या परिषदा, भरवितात व त्या यशस्वीहि करून दाखवितात. मग या ज्ञातींपेक्षांहि आमचा गोमांतकवासी हिंदुसमाज जास्त मागसलेला किंवा जास्त नालायक आहे असें या लेखकाचें ह्मणणें आहे काय ? ब्रिटिश हिंदुस्थानांतील परिस्थिति गोव्यांतील परिस्थितिपेक्षां चांगली आहे असें या लेखकाचें ह्मणणें आहे काय ? ब्रिटिश हिंदुस्थानांतील परिस्थिति गोव्यांतील परिस्थितिपेक्षां चांगली आहे अशी या लेखकाची समजूत आहे काय ? तशी असल्यास ती अगदीं चुकीची आहे असें ह्मणणें भाग आहे.

प्रांतिक परिषद ह्मणजे ग्रामसंस्थांची कचेरी नव्हे, प्रांतिक परिषद ह्मणजे देवळांची 'येलेंसावां' नव्हेत, प्रांतिक परिषद ह्मणजे दसऱ्या दिवाळीचें उत्सव नव्हत हा धडा शिकविण्यास स्पष्टवक्त्या पंतोजींची मुळींच गरज नाहीं. हें न सांगतां समजण्याइतकी अक्कल परिषदेच्या संस्थापकानां व त्यानां पाठिंबा देणाऱ्या देशभक्तानां खचीत आहे. तेव्हां या बाबतींत या लेखकानें आंपल्या मेंदूस निष्कारण शीण देऊन आपलें हंसें मात्र करून घेतलें असें ह्मटल्याशिवाय आमच्यानें राहवत नाही.

शेवटीं परिषदेच्या संस्थापकानां आमची

भारत

गुरुवार अ० अषाढ शु० ७ मी. १८४२

डॉ. शिरगांवकरांचें स्मरण

ह्या पुरुषाचें नांव आजपर्यंत गोव्यांत झालेल्या सार्वजनिक हिंदुचळवळीच्या मुळाशीं निगडित झालें असल्यानें हिंदुगोमांतकस्थांच्या अंतःकरणांत संस्मरणीय होऊन त्यांजविषयीं आदर वाढवित आहे. त्या आदरास व्यक्त स्वरूप देऊन त्यांचें दृश्य-स्मारक उभारण्याकडे हिंदूंचीं प्रवृति वृद्धिंगत होत आहे हें पाहून कृतज्ञतेचें वारें आमच्या समाजांत खेळत असल्यामुळें संतोष व समाधान वाटतें. सद्गुणी माणसाच्या सत्कृतीचा, त्याच्या पश्चात् गौरव करण्यानें अशी महत्वाची एक गोष्ट घडून येते कीं, तसली सत्कृति करण्यास इतरांस हुरूप येतो व तो न खोळंबतां एक सारखा चालू राहतो.

गोव्यांत कोठें कोठें एकाद दुसऱ्याच्या मनांत असलेली सार्वजनिक कार्याविषयीं आस्था वाढवून संघटित करण्यास वै० शिरगांवकरांची उत्साही चळवळ किती उपयोगी पडली, हें सर्वत्र महशूरच आहे.

गेल्या १६ तारखेस डॉक्टर साहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त पणजीच्या उत्साही नवजीवनानें एक खास अंक प्रसिद्ध करून महात्मा शिरगांवकराच्या अप्रतिम व उत्कट देशसेवेबद्दल आपला प्रेमादर व्यक्त केला, हें त्यास फार भूषणावह होय. योग्य संधि प्राप्त होतांच पुरुषोत्तमरावांच्या कोणाच्याहि आठवणींतून कधींच न बुजून जाणाऱ्या निरपेक्ष व निःस्वार्थी देशहितसंवर्धक अलौकिक कामगिरीसंबंधानें कृतज्ञता प्रगट करण्याचें कर्तव्य भारतहि बजावणार आहे. सध्या म० शिरगांवकरांचें मंगल नाम स्मरणानेंच त्यांची मंगल पुण्यतिथी साजरी करून घेण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं.

Temos que fazer, pois, mais alguma coisa do que chorar a formidavel perda de quem nos indicou e impeliu a seguir o verdadeiro caminho do patriotismo, ensinando-nos o holocausto em prol da Patria e criando em nós *espirito novo*-consciencia civica-maravilha que a imprensa luso-indiana não foi capaz de operar -repetimos.

Pois é verdade. A nossa gratidão por Tilak não pode estar a boiar no mar de lagrimas; é forçoso que se traduza em actos positivos e insofismaveis que revelem a compreensão pratica e nitida do *tilakismo*.

Só então é que haverá cumprimento verdadeiro do dever de gratidão para com Bal Gangadhar Tilak, da parte de todos nós que nos mostramos, numa sinceridade rude e nua, engolfados em uma crise de dôr que se não descreve.

Desenvolver e fortalecer em nós o espirito que engrandeceu Tilak, fazendo-o resplandecer na galeria de patriotas deificados, eis em que consiste, em poucas palavras, a maneira mais propria, rial e concreta de cumprir integralmente o nosso dever para com o *Criador da India Nova e Vencedor da oligarquia burocratica* que, nos tempos que lá foram, foi o flagelo para os nossos irmãos do territorio visinho.

Desenvolva e fortaleça, portanto, cada um no seu sêr o *tilakismo*, se pretende honrar a memoria de Tilak, cumprindo para com este o dever de gratidão pelos incontestaveis beneficios que da sua nobre ac ção patriotica auferiu.

De contrario, as lágrimas de quem agora lamenta o desaparecimento desta para melhor, de Tilak não terão outro valor senão...de lagrimas de crocodilo, não passando de mera *formalidade* a demonstração da dor que se exibiu....

O MARATA

Dissera a *Tribuna* na sua edição de 4 de junho que " o concani é a lingua elegante e por ventura mais rica". Recomendei-lhe, porisso, a tradução em concani das obras de Almeida Garrett.

Mas o meu contendor, na sua febre de pro-concanismo responde-me com o seguinte:-"o concani é lingua inculta, porisso não admira que não possa traduzir todas as peças literarias das linguas cultas...o concani não pode traduzir as peças de Almeida Garrett? E' ele uma lingua por constituir".

Só da *Tribuna* podiam dimanar essas afirmações, flagrantemente, contraditorias: uma lingua *inculta* e *elegante* ao mesmo tempo, uma lingua *rica* e *por constituir*, simultaneamente!

Será isto devido a cambalhotas de que parece ser amiga a folha de Calangute? Ela muito bem podia aproveitar da minha recomendação para formação do concani, uma lingua *por constituir*, a qual não tendo literatura propria forçosamente tem de lançar mão de traduzir obras do Portuguez cujos caractores a *Tribuna* julga aceitaveis. O concani sempre ficará sendo uma lingua *por constituir* se nem querendo admitir carateres devanagaricos se alhear do contacto do marata, que tendo uma literatura culta não precisa de auxilio doutra lingua, sendo, porisso, infundado o argumento da *Tribuna* de que "o pior está em que o marata tambem não pode traduzir todas as peças do Inglez". As obras de Shakspeare, Bacon, Dryden, Milton etc. traduzidas em marata indicam ser pouca exacta essa afirmação como tantas outras que faz o aludido jornal.

E se lhe recomendei a tradução de obras de Almeida Garrett foi por que mostrou conhecer as duas linguas *elegantes*: o portuguez e o concani.

Pois, torno, agora, a renovar a minha recomendação. Enquanto se não formem em concani Camões e Garrett a *Tribuna* deve tomar sobre si o encargo de traduzir peças de literatura portugueza na mesma lingua ...*por constituir*.....

O concani por ser *inculto* não pode traduzir as obras das linguas cultas, e não pode ser culto sem as traduzir !!

Como diabo a *Tribuna* há de sair deste bêco sem saida? Com cambalhotas?

O Maharastra tendo por limites pelo lado do ocidente o Mar Arabico abrange Goa, cuja lingua vernacula *ipso facto*, tem de ser o marata o que ainda se confirma praticamente, pois, aqui, desde antiguidade, todos os que se dedicam ao estudo da referida lingua, com pouco esforço se familiarisam com a sua literatura, o que não seria possivel suceder se o marata lhes fosse uma lingua extranha.

Os dominadores implantam na região dominada a sua lingua? Este facto só se dá nos paizes onde, como Brasil, Estados Unidos etc, as linguas vernaculas sejam pobres em recursos literarios. Ora quem supõe que o marata *foi* introduzido em Goa, tem que admitir por força que o concani por ser pobre em literatu-

कीचा फायदा नाहीं, 'सन्मार्गे सोडूनि भले न जातीं' असें एक वाक्य आहे, त्याच प्रमाणें प्रसिद्ध लोकहितवादी ह्यांनीं एके ठिकाणीं असा अभिप्राय दिला आहे कीं, "वेगळीं वेगळीं मतें हीं जसे वेगळे वेगळे चेहरे असतात तशीं आहेत आणि संभाषणांत तें मीठ आहे. यास्तव दुसऱ्याचा अभिप्राय वेगळा असला तर राग कशास पाहिजे ?"

प्रकृत परिषदेविरुद्ध जे कोणी असतील त्यांनां एवढीच विनंति आहे कीं, तुमच्या मतांबद्दल कोणीहि शिव्यांची लाखोली वाहिली तथापि मतस्वातंत्र्य हिरावून घेणें आजच्या काळांत कोणाच्याच नशीबीं नाहीं ही खातरी बाळगा. दुसऱ्यानें थयथयाट केला ह्मणून तुह्मी कौरवी पांडवी माजविण्यास सज्ज होऊं नका, अशांना खुशाल 'अहोरूप महोध्वनि'चा मार्ग सुधरूं द्या. हार मानली कीं, झगडा तुटला.

सारस्वत

शब्द नकोत, कृति पाहिजे !

गोमांतकीय हिंदु समाजाचें 'आत्यंतिक हित साधण्याकरितां' हिंदु परिषद भरविणें जरूर आहे असें ह्मणणारा एक पक्ष, व सदर्हू परिषद यशस्वी व कर्तबगार करण्याचें सामर्थ्य आमच्यांत अजून आलेलें नाहीं असें समजणारा दुसरा पक्ष, या दोहोंमध्यें सांप्रत वाद चाललेला आहे; तेव्हां या वाद गंगेंत मीही एक अर्घ्य द्यावें या हेतूनें आपणास तसदी देत आहें. हा वाद उपस्थित करून "स्पष्टवक्त्यानें" एक बाजू जोरदार शब्दांत पुढें मांडल्यामुळें कित्येकांच्या नाकास मिरच्या झोंबल्या असल्या तथापि हिंदुपरिषदेचा विषय तिच्या जन्मदात्यापेक्षां उठावपणें लोकांसमोर आणून त्याकडे वाचकांचीं मनें जास्त वेधण्याचें काम स्पष्टवक्त्याकडूनच झालें आहे, हें नाकबूल करतां येणार नाहीं.

सदर्हू विषयाची एक बाजु झोंबणाऱ्या शब्दांनीं स्पष्टवक्त्यानीं नावांप्रमाणें पुढें मांडली, तथापि त्यांच्या शब्दांत सार्वजनिक ध्वनि उमटला होता; पण त्यांना उत्तर देणाऱ्या गृहस्थांनीं व्यक्तिविषयक हल्ल्यावरच आपली मदार ठेवली आहे, हें पाहून वाईट वाटतें. अमक्या अमक्या गोष्टींत आह्मीं अपात्र आहोंत, अमुक अमुक गोष्टी आह्मीं पूर्वी केल्या पाहिजेत अमुक अमुक गुणांचा आमच्यांत अभाव आहे, वगैरे गोष्टी सत्य व निर्विवाद अशा सरळ भावानें स्पष्टवक्त्यानीं सांगितल्या, तर त्यांबद्दल मौन स्वीकारून अगर त्यांतील एक दोनच वाक्यें घेऊन नसत्याच कल्पना लढवून झुंजत बसणें यांत शहाणपणा तो कोणता ? मागील इतिहासावरून आमच्यांतील कांहीं पुढारी "ह्मणविणाऱ्या" व्यक्तींबद्दल जर जनतेंत अविश्वास वाटूं लागला तर तो दोष त्या व्यक्तींचा आहे. चार पांचदां दिवाळें काढलेल्या व्यापाऱ्याची "भलामणी" कोण देईल ? सदर्हू व्यक्तींनीं प्रतिकूल टीका ऐकून घ्यावी, तिचा मार्गदर्शकतेसाठीं उपयोग करावा व कृतीनें स्पष्टवक्त्याला उत्तर द्यावें हें योग्य नव्हे काय ?

उत्तरें देणाऱ्यांपैकीं एक दोन समंजस दिसले; पण रा. दत्तात्रय पै व प्रियोळकर यांनीं आपल्या उत्तरांत नसतींच विधानें घुसडून देऊन मुख्य विषयास भलतेंच स्वरूप मात्र दिलें आहे, यांत शंका नाहीं. रा. पैची तर मौज ही कीं, मडगांवच्या सारस्वत ब्रा. समाजासहि त्यांनीं आपल्या आधारास बुडतां बुडतां घेतलें आहे ! सदर्हू समाजाचे व्याख्यानमालेंत यंदा गोमांतकीय वक्त्यानीं कसा मुखरस पाघळला होता, हें ते विसरले काय ? वक्तृत्व एक असो, पण अशी कोणती एक संस्था या मंडळीनें चालवून दाखवून लोकांचा विश्वास संपादन केला आहे ! उलट "लेखणीचे फवारे" व "तोंडाची पाटीलकी" हेच स्पष्टवक्त्याचे शब्द त्यांना लागू केले तर शोभतील, यांत मुळींच असत्य नाहीं ! विरुद्ध मताचे चार शब्द ऐकून त्याला संयुक्तिक उत्तरें न देतां केवळ वर्मे कर्में व अप्रासंगिक मुद्दे उकरून काढण्यांत ज्यांची शक्ति खर्च होते, ती मंडळी परिषदेच्या मंटपांत मागें सिं. कायतान फिगरेद यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या जमीनदारांच्या सभेंत जशी कावकाव करण्यांत आली होती, तिचीच पुनरावृत्ति करणार, असें वाटल्याशिवाय राहत नाहीं ! मडगांवचा सारस्वत ब्रा. समाज नांव घेण्यासारखी संस्था झाली आहे, पण तिला ही स्थिति प्राप्त होण्यास चालकांना काय परिश्रम करावे लागले व लागतात यांचा अनुभव आह्मां शेजाऱ्यांना आहे. संस्थेची चालक मंडळी, वर्षांतून किंतीदा वर्गण्या काढतात, प्रतिपक्षीयांकडून होणारे कसकसे—खासगी रीतीचे-देखील—नुकसान सोसतात, इतर ठिकाणच्या सुशिक्षित मंडळीचें सहकार्य मिळविण्यासंबंधानें कसकसा उद्योग करतात, हें कदाचित् रा. दत्तात्रय पै यांनीं दुरून पाहिलेंच असेल आणि त्या कामीं कोणकोणाचे प्रयत्न विशेष कारणीभूत आहेत, हेंहीं त्यांना (ते संदर संस्थेचे सभासद असल्यावरून) माहीतच असेल ! मग त्यांनीं जोंपर्यंत आपल्या अंगांत अशी धमक आणलेली नाहीं, तोंपर्यंत दुसऱ्यांवर तोंड सोडण्याचा त्यांना काय अधिकार पोंचतो ?

हिंदु परिषदेच्या प्रवर्तकांविरुद्ध घेण्यांत येत असलेले आरोप धुऊन काढण्यासाठीं त्यांनीं आतां कंबरा बांधाव्या. तोंडाचे कुबेर व कृतीचे भिकारी झाले तर फायदा काय ? शब्द नकोत, कृति पाहिजे इतकेंच मी सुचवितों.

निरीक्षक

वर्तमानसार

----गोव्यांतील सर्व ठिकाणीं मोठमोठ्या सभा भरून मराठी शिक्षणाच्या शाळा स्थापण्याविषयीं सरकारास सुचविण्यांत आलें.

—मोईरा-बारदेस येथें गेल्या रविवारीं 'आसोसियासांव आकादेमिक' या संस्थेच्या इमारतीचा दगड बसविण्याचा समारंभ झाला.

---दीवयेथील वादळामुळें अनाथ व गरीब बनलेल्या लोकांस मदत करण्यासाठीं ठिकठिकाणीं वर्गणी गोळा करण्यांत येत आहे.

--दारेसालम-आफ्रिका येथें एका गोवानीज बाईस एकदम ७ जुळीं मुलें झालीं !

--इकडील तांदुळाच्या पिकाच्या वाढींत सुधारणा करण्यासाठीं इंग्रजी हिंदुस्थानांतील एक तज्ज्ञ इंजिनियर आणण्याचें सरकारनें योजिलें आहे. त्याचप्रमाणें जंगलखात्यांतहि सुधारणा करण्यासाठीं पोर्तुगालांतून एक वनशास्त्रज्ञ येणार आहे.

—मुगांव येथें चाललेल्या जुगारास आळा घालण्यासाठीं तिकडील मामलेदारांनीं योग्य बंदोबस्त केला आहे, असें कळतें. फार उत्तम !

भारत

गुरुवार श्रावण शु. ६ छी. १८४२

हात आटोपा !

गोमांतकाची सांपत्तिक स्थिति सांप्रत अवनतीच्या इतक्या भयंकर थरावर पोंचली आहे कीं, कितीहि निधड्या छातीचा आशावादी माणूस असला तरी ती अवलोकून त्याच्या अंतःकरणांत निरुत्साहाची कालवाकालव झाल्याखेरीज खास रहाणार नाहीं, असें आह्मांस वाटतें. व ही आमची समजूत कशी चुकीची नाहीं हें खालील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत येण्यास जास्त सायास लागणार नाहींत.

गेल्या दहा वर्षांमागें आमच्या अंदाजपत्रकांत एकंदर खर्च वजा जाऊन १९११-४२ रुपयांची शिल्लक राहिलेली दिसून येत होती. ही स्थिति पुढें बदलत बदलत गेली व १९१७--१९१८ सालीं संबंध शिल्लक 'गडप, होऊन, त्या ऐवजीं उलट ६२७२६२ रुपयांची तूट दृष्टोत्पत्तीस यावयास लागली ! ही तूट दोन वर्षानंतर १३३२२७२ रुपयांपर्यंत वाढलेली असून भविष्यकाळीं तिच्या वाढीचें क्षेत्र किती आंकडे व्यापील हें ठरविणें अत्यंत कठीण आहे !

शेंवटच्या दोन वर्षांच्या तुटींत भयंकर वाढ होण्याचें मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे पोर्तुगालांत इकडील स्थितिविषयीं पसरलेलें गाढ अज्ञान होय. या अज्ञानाचा मुबलक फायदा घेऊन स्वार्थलोलुप नोकरशाहीनें राष्ट्रोन्नतीचें ध्येय पोटाखालीं दडपून आपला तळीराम गार करण्याचा एकदम सपाटा लावला. सरकारी ग्यांझेटवर पगार वाढीचें कायद्यांवर कायदे फडकावयास लागले. आज एकांचा पगार वाढव तर उद्यां दुसऱ्याच्या पगारांत भर घाल, अशा रीतीनें ज्यांची ज्यांची ह्मणून पोर्तुगालास तोंडओळख अगर पत्रओळख होती त्यानीं त्यांनीं आपला स्वार्थ साधण्याची संधि या दोन वर्षांत दवडली नाहीं. रिटायर नोकरांचे पगार कोठेंहि झाले तरी कामकरी हुद्देदारांपेक्षां कमी असतात, परंतु त्यांनीं सुद्धां हालचालीच्या अमदानींत असलेल्या वेतनापेक्षां निश्चल अशा वानप्रस्थ काळांत सव्वापटीनें आपल्या वसून खातें असलेल्या पगारांत वाढ करून घेतली !

पगार वाढीचें हें खमंग तूप सर्वच नोकरशाहीला आपल्या पोळीवर ओढतां आलें असें नाहीं. ज्यांची पोर्तुगालांत कसलीहि ओळख नव्हती त्यांनां आपल्या कष्टतर आयुष्यांत कोणताहि फेरबदल करतां आला नसून ते पूर्वस्थितींतच धडपडत आहेत. एवंच नोकरशाहीच्या पगाराची वाढ झाली खरी; परंतु त्यामुळें खुद्द तिचेच बहुतेक 'मेंबर, उपरिनिर्दिष्ट कारणामुळें असंतुष्ट आहेत !

एकीकडे नोकरशाही असंतुष्टतेच्या विषारी फुत्कारानें राजकीय वातावरण कलुषीत करून सोडीत आहे तर दुसरीकडे गरीब जनता अंदाजपत्रकांतील वाढत्या तूटवाढीमुळें दचकून जाऊन राजकीय भूमि अश्रूनें भिजवीत आहे. तरीहि पण आमचें सरकार या अनिष्ट प्रकाराकडे आपली सक्रिय नजर फिरवीत नाहीं हें पाहून आमचें काळीज निराशेनें चरें व्हावें यांत आश्चर्य तें कसचें ? ह्मणून राजकर्त्यांसमोर आह्मीं असें ओरडतों कीं तूट वाढीच्या या चालू असलेल्या चाबुकाच्या मारांत आपला हात आटोपा, हात आटोपा !

स्फुट विचार

सत्यानास होईल:—लोलयें-काणकोण येथून आलेल्या कित्येक पत्रांवरून कळतें कीं, तेथें जुगारास ऊत आला असून कित्येक इसमांनीं तर घरदार बायका पोरें इत्यादिकांवर पाणी सोडून 'जुगार सन्यास' स्वीकारलेला आहे ! जुगाराचे अनिष्ट परिणाम प्रत्यहीं नजरेस येत असतां लोलयेंकर जुगार मंडळानें आपला सत्यानास आपल्याच हातानें करून घेण्याचा भस्मासुरी उपक्रम आरंभिलेला पाहून मन दुःखानें व्यग्र होतें ! मित्रांनो, जुगार सोडा व आपापलीं कर्तव्यें योग्य रीतीनें बजवा. नाहीं तर तुमचा खास सत्यानास होईल.

मराठी भाषा:— आमचे प्रेमळ व्यवसायबंधु नवजीवन व विद्याप्रसार यानीं पुरवण्या प्रसिद्ध करून सरकारी शाळांतून मराठीस उत्तेजन मिळवें एतदर्थ जनतेंत जागृति चेतवून प्रस्तुत विषयासंबंधानें सरकारकडे दाद लाऊन घेण्यास तिला प्रवृत्त केल्याबद्दल संदरहू बंधूचें आह्मीं सकौतुक अभिनंदन करितों. आह्मींहि मराठीच्या बाबतींत आमचे प्रयत्न चालू ठेविले असून वेळाप्रमाणें खेळ खेळण्याचें ठरविलें आहे.

साभार स्वीकार

आचार्य [पाक्षिक]:—हें धार्मिक मनोवृत्ति संगोपन करणारें वजनदार पत्र महाशय विष्णु वामन बापट शास्त्री यांच्या चालकत्वाखालीं पुणें येथें प्रसिद्ध होत असतें. धर्माभिमानी लोकांच्या आश्रयास पात्र. वा' व. ट. हां. २ रु. ९ आणे.

बारामती समाचार (साप्ताहिक):—या पत्रांत स्थानिक विषयांची जोरदार चर्चा होत असते. संपादक रा. रा. हरी अनंत जोशी, बारामती.

विश्वबंधु [साप्ताहिक]:—या पत्रांत ब्राह्मणेतरांचे हितसंबंध जोरदार रीतीनें प्रतिपादले जातात. संपादक रा. रा. बळवंत कृष्ण पिसाळ, कोल्हापूर. वा. व. ट. हां. २ रुपये.

गोमांस [साप्ताहिक]:—गोमांतेच्या निःस्वार्थ व पवित्र सेवेस वाहून घेतलेलें हें साप्ताहिक गिरगांव, मुम्बई येथें रा. ग. बापु खंडेराव जोशी [दास माधव] यांच्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध होत असतें.

स्वराज्य (साप्ताहिक):—माजी 'काळ' पत्राच्या संपादकत्वाखाल पुणें येथें प्रकाशीत होणारें हें पत्र किती उपयुक्त व जोरदार असेल हें जास्त विशद करून सांगण्याची आवश्यकता नाहीं. प्रो. शिवराम महादेव परांजपे यांची परांचे हितसंबंध जपण्याची लेखनशैली नेहमीं वाखाणण्यासारखीं असते.

लोकशाही (साप्ताहिक]: --संपादक रा. रा. अनंत बाळकृष्ण घगवे, मुम्बई. सचित्र व जहाल. ध्येय-हितं मनोहारि च दुर्लभं वचः असें आहे. वा. व. ट. हां. ३॥ रु.

वैदिक धर्म (मासिक): ---या राष्ट्रीय भाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या मासिकाचे संपादक रा. रा. श्रीपाद दामोदर सातवळेकर हे बहुश्रुत व कसलेले विद्वान लेखक असून सदरील मासिकाचें ध्येय उच्च कोटींतलें आहे.

ANO V.—NUMERO 23—1920 QUEPEM, QUINTA-FEIRA 26 DE AGOSTO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
India Portuguesa...... 3-00-00
India Inglesa............ 3-08-00
Numero Avulso......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत
BHARAT

SEMANARIO
Tipografia Pundolica—Quepem

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००

जाहीरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणें. कायमच्या जाहीरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें-गुरुवार, तारीख २६ माहे आगष्ट सन १९२० अंक २३ वा.

Escolas Maratas

Seja ou não o marata *lingua mãe* dos habitantes hindús de Goa, é, porem, facto indiscutivel que da mesma lingua êles não podem prescindir em nenhuma das manifestações de sua actividade, pública e particular.

Quere na correspondencia domestica e comercial, quere em qualquer outro assunto que demande a intervenção duma lingua materna, o hindu goez è do marata que usa e isto desde tempos imemoriais. Não admira, portanto, que ele o tenha na conta de *pão do espirito*, cuja privação receia, certamente, determinar-lhe, como consequencia natural, uma lamentavel confusão na sua vida.

E' nesse receio que se estriba o pedido da protecção ao marata por meio da criação de suas escolas, formulado em dezenas de telegramas e requerimentos, que a classe hindú constituindo metade da população da India Portuguesa, dirigiu ao Governo deste Estado, na esperança de que será alterado o projecto do ensino de forma a haver, cá e lá, escolas de puro marata em numero suficiente.

Os factos encarregar-se hão de demonstrar atè que ponto se conseguirá o desiderato da classe hindu.

Entretanto felicitamo-nos e a classe hindu pela expontaneidade do movimento que promoveu, na semana passada, em pról do marata, dando uma irrefragavel prova do seu despertar civico, feliz prenuncio de que não está muito longe o dia da sua completa felicidade e verdadeira rendenção politica.

Sim, ninguem tenha duvidas sobre isso.

COMUNIDADES

Um dos defeitos de que enferma a sociedade indo portugueza é de sujeitar-se com a indole passiva e indiferença diogenica a tudo quanto dimane *de cima* sem o mais leve protesto, por mais repressivo que aquilo seja, dos seus mais vitais interesses

E'um facto e contra factos não há argumentos.

Para se demonstrar esta asserção basta lançar um ligeiro golpe de vista pelas fazes regressivas por que tem passado o sistema comunal e o constante silencio morbido dos seus interessados perante este jogo de *cartas*.

A modificação de qualquer diploma, tem de obedecer ao unico fim de adopta-lo ao meio a que se destina, ora mantendo tudo o que nela se achar de mais salutar, ora introduzindo preceitos que a expriencia ateste serem vantajosos, e ora finalmente expurgado-o de toda a especie de vicios que sejam nocivos ao progresso social.

¿Qual d'estes principios foi observado com respeito aos diplomas promulgados para as associações comunais? Quase nenhum.

E' que o mal provinha do regime defunto dos tempos ominosos. Todo o empenho desse velho regime era pela centralisação de serviços a todo o custo e ainda com o sacrificio de interesses publicos

Alias vejam:

Desde tempos remotos, quando as comunidades exerciam com liberdade a gerencia dos seus negocios, tinham élas os seus corpos consultivos e representativos junto do governo e que eram conhecidos pelos nomes de Camaras Gerais, com latas atribuições para poderem defender os seus interesses legitimos.

A necessidade e utilidade destes corpos foram de tamanho alcance e estas instituições estavam em tal conta que nenhuma medida referente ás comunidades dimanava do Governo sem consulta dos ditos corpos.

Pelo decorrer do tempo porêm, foram convertidas as antigas camaras gerais, com limitadas e restrictas atribuições em camáras agricolas, que, quais reliquias dos tempos passados ainda assim funccionaram até a promulgação do Codigo vigente passando-as desde então, á exepção das consultivas, ás administrações das comunidades.

E' de ver quão fraca e irrisoria è a justificação da portaria que precede á aprovação do dito codigo que fundamenta a extinção das camaras agrarias, pois diz:

"Considerando que na actualidade, as camaras agrarias sucessoras das antigas camaras gerais representam pelas limitadas atribuições que desempenham apenas uma entidade inutil na economia e administração comunal, hoje desenvolvida e bem regulamentada por isso,,

"Considerando que são absolutamente dispensaveis,, ...

Argumentos desta ordem são de tal sorte elasticos e perigosos que podem ser aproveitados para vibrar golpes certeiros em qualquer instituição por mais util que éla seja!

Se as camaras agrarias pelas *limitadas atribuições que desempenhavam se tornaram inuteis* e *dispensaveis* em vez de extingui-las não seria de boa norma conceder-lhas mais desafogadas, restituindo-as ás condições de antigas camaras gerais para que a sua utilidade fosse *positiva* e benefica para gerencia economica das comunidades?

Alem disso se em outros ramos de serviços continuam, os seus corpos consultivos e representativos e a sua acção tem-se visto benefica e vantajosa como se explica só a sua extinção quanto ás comunidades?

Hoje porem, que estamos atravessando o regime discentralisador, impõe-se a necessidade de ressurgimento das camaras agrarias, para, funcionando junto do Governo como corpos consultivos e representativos serem um esteio no desenvolvimento das associações comunais.

Gurudas

No nosso anterior artigo lêu-se gestão em vez de gestação.
Gurudas

Praxes contra lei espressa

Denota-se pouca valia mental nos que estam atreitos ás costumeiras da simples pratica, sem o mais leve criterio juridico. Importa isso andar ás...cegas.

Contra essas praxes descabidas, contra essas velharias cartoriaes cumpre reagir para o bem da Sciencia que não admite dogmatismos, nem preceitos magistrais, rotineiros...

Não.

A logica e o bom senso devem sempre irmanar-se quando se trâte da solução dum problema juridico do menos intrincado que se afigure.

De outro modo quedaremos numa mesquinha banalidade, baixando ao zéro o termometro da hermeneutica que deve orientar a aplicação das leis e pautar a execução delas.

E não poucas de vezes, o absurdo virá rematar as suas tristes consequencias.

Ocorreram-nos estas fugitivas considerações a proposito dum caso que presenciamos e que se debateu, ainda há pouco num dos nossos mais considerados tribunais.

Tratava-se de um conselho de familia, em inventario orfanologico, reunido para deliberar sobre a conveniencia de licitação por parte dos interessados menores. Mas antes

मंडित मंडळी आणखीं कोठें दिसत असल्यास तिचा 'अनावरण विधि' प्रो. पै महाशयांनीं करावा.

आतां मला परिषदेच्या उत्पादकांस एवढेंच सांगावयाचें आहे कीं, स्पष्टवक्तेप्रभृति मंडळीस "प्रांतिक परिषदेस योग्य परिस्थिति नाहीं" इतकेंच म्हणून थांबतां येतें; परंतु तिच्या प्रवर्तकांवर-योग्य परिस्थिति आहे, ती कोठें व कसकशी आहे हें दृश्य प्रमाणानीं सिद्ध करून दाखविण्याची जबाबदारी येते. वाघोबा नाहीं म्हणून घर बसल्या मंडळीस ग्रहित धरूत चालतां येतें; परंतु रानांत फिरणाऱ्या पारध्यानें वाघोबाच्या अस्तित्वा-नास्तित्वाविषयीं अधिक बारकाईनें चौकशी केली पाहिजे. तेव्हां यापुढें प्रांतिक परिषदकारांनी स्पष्टवक्त्यांच्या पत्राच्या टीके पलीकडे जाऊन योग्य परिस्थिति निर्माण करण्याचा व ती जेंथें जेथें आहे तिचाहि पण 'अनावरण विधि' करण्याचा—शिरोभागी दिलेले इंग्रजी उतारे लक्षांत घेऊन– धिमेधिमे प्रयत्न करावा. नंतर ही नूतन प्राप्त परिस्थिति सुविचारी मंडळींकडून तावून–सुलाखून निघाली म्हणजे, प्रांतिक परिषदचशी काय पण कोणतेंहि सार्वजनिक कार्य यशस्वी व चिरायु होईल असें कोणीहि म्हणेल.

देशभक्त हो, प्रांतिक परिषद "मुक्तिदाइनि भव" नाहीं असें कोणी म्हटलेलें नाहीं. वादग्रस्त मुद्दा तो एवढाच कीं, तीस यशस्विनी व चिरंजीवी करण्यास योग्य परिस्थितीची साधनसामुग्री सद्या निर्माण झालेली नाहीं एवढेंच काय तें. "देहली तो बहोत दूर" असूंदे किंवा "एकलहाजा की अंदर" असूंदे, कांहीं तरी पुढ गेलें पाहिजे खास. तेव्हां "देहली यही है" असें म्हणण्या इतकी परिस्थिति येई तोंपर्यंत दम खाणें वाजवी आहे.

इस्लामियांस जसें सर्व कांहीं कुराणांत सांपडतें, तसें काय पाहिजे त्या सुधारणाकरितां प्रांतिकपरिषदेकडे बोट दाखविण्याचा लपंडाव आजकाल चालणें शक्य नाहीं व श्रेयस्करहि पण नाहीं; कारण आरंभशूरत्वा मुळें पुष्कळशा पुढाऱ्यांस ठेंचा लागलेल्या आहेत.

तुम्हीं काय म्हणतां ? परिस्थितीचें आनुकुल्य पाहिजेना ? तरी तें सुध्दां खुद्द परिषदच प्रसवेल ? मित्रहो, असें जर आहे तर मग मी असें म्हणतों कीं, ज्ञातीचा सर्वांगसुंदर उत्कर्ष करावयाचा असल्यास परिषदहि खालची पायरी कां ? "निर्भेड स्वराज्य संघ" स्थापन केल्यास सर्व कांहीं त्यांत आलें !

बहुतेक मंडळी जी चकली जाते ती स्थानिक प्रयत्नाचें व सार्वत्रिक प्रयत्नाचें कार्यक्षेत्र निवडण्यांत होय. जे प्रयत्न स्थानिक मंडळीकडून केले जातात, तेच प्रयत्न सार्वत्रिक मंडळीकडून केले जातात; मात्र सार्वत्रिक मंडळीकडून केले जाणारे प्रयत्न मोठ्या प्रमाणात, एवढेंच काय तें. स्थानिक प्रयत्नाचें कार्यक्षेत्र जसजसें वाढत जाईल तसतशी सार्वत्रिक प्रयत्नाची आवश्यकता आँपोआप भासूं लागते. व हींच स्थानिक कार्यक्षम माणसें सार्वत्रिक कार्यें चिरायु व यशस्वी करण्यास योग्य होत. अशीं स्थानिक कार्यक्षम माणसें आज गोव्यांत आहेत, परंतु तीं प्रांतिक परिषदेसारख्या जबाबदारीच्या सार्वत्रिक कार्यास पुरेशीं नाहींत एवढेंच काय तें. तेव्हां स्थानिक कार्यक्षमतेच्या आखाड्यांत दिवसेंदिवस अधिकाधिक मंडळी उतरली जाईल, एतदर्थ प्रयत्न कराचें परिषदेच्या प्रवर्तकांचें आद्य कर्तव्य होय व हें कर्तव्य योग्य रीतीनें बजावणें म्हणजेच परिषदेचें खरेंखुरें कार्य करणें होय.

आज काल गोव्याचा इतिहास लक्षांत घेऊन सार्वत्रिक कार्यें कशीं यशस्वी व चिरायु होतील हें प्रत्येक पुढाऱ्यानें आधीं पाहिलें पाहिजे. आढूनकुढून एकदांची प्रांतिक परिषद भरविली कीं, कृतकृत्यता मानण्यांत अर्थ नाहीं व आरंभशूरत्वाच्या कितावाशिवाय दुसरें कांहीहि साधणें दुरापास्त व मुष्किलीचें होईल कारण "Cat in gloves catches no mice"

रामचंद्र व्यंकटेश नाईक

* चालू वादास अनुलक्षून आणखींहि बरींच पत्रें आम्हाला आलीं आहेत. त्यांतच स्पष्टवक्त्याच्या उत्तराचाहि समावेश होतो. जुन्या मुद्यांचें नवीन शब्दरचनेंत चर्वितचर्वण करणारे व व्यक्तिद्वेषास थारा देणारे पत्रव्यवहार प्रसिद्ध केले जाणार नाहींत.

सं. भारत

भारत

गुरुवार श्रावण शु. १२ शी. १८४२

नव्या सुधारणा यशस्वी कशा होतील ?

पोर्तुगालच्या कृपाप्रसादानें आम्हांस लाभलेल्या स्थानिक स्वराज्याच्या हक्कांत तत्वशः नवीन सुधारणा करण्यांत आल्या असून, ब्रिटिश इंडियेंतील हरेक कौंन्सिलांप्रमाणें येथेंहि नव्या राजकीय संस्थाचें 'नवें राज्य' जुन्या स्वराज्याच्याच पायावर उभारण्याविषयीं आमच्या गव्हर्नरसाहेबांनां पोर्तुगालहून तारेचा संदेश आला आहे. व या संदेशानुरूप नव्या संस्थाची घटना मुक्रर करण्यात जुना स्थानिक पार्लमेंट गुंतून गेला आहे.

उपरिनिर्दिष्ट नवीन सुधारणाच्या औषधानें गोमांतकास जडलेला सांपत्तिक अवनतीचा महारोग कितपत हटेल यद्विषयीं कोणतेंहि भविष्य वर्तविणें सध्या तरी शक्य नाहीं. मात्र खरें कीं वरील औषधाबरोबर नोकरशाहीच्या संख्येंत छाटाछाट करण्या चें जें एक पथ्य सुचविलें आहे त्या पथ्याची लक्ष्यपूर्वक अमलबजावणी झाल्यास रोग्याला बराच आराम वाटेल, असें छातीठोक विधान करण्यास कसलाच प्रत्यवाय नाहीं.

नुसत्या पथ्यानें कितीतरी रोग्यांची प्रकृति ताळ्यावर आलेली पहाण्यांत येते. कित्येकदां तर वैद्य लोक पथ्यावरच विशेष जोर देतात व रोग्याच्या अंगांतून रोगाची हकालपट्टी करण्यांत आपली कुशलता दाखवून पथ्याचें श्रेष्ठत्व सिद्ध करतात.

नोकरशाहीची छाटाछाट करण्याचें हें अत्यंत जोखमीचं व म्हणूनच गुणावह पथ्य स्थानिक सरकारकडून निरपेक्ष व निर्भयपणें आचरलें गेल्यास आजारी गोमांतकास आराम पडून, सरकारी तिजोरीस निःसत्व बनविणारी तुटीची कीड मृत्युपंथास लागेल. व या दुष्ट कीडीचें मरण म्हणजेच गोमांतकाचें रक्षण होय.

नोकरशाहीच्या 'गगनचुंबित' वृक्षाच्या डहाळ्या छाटून त्याच्या 'सावटानें' रोडावलेलें राष्ट्रोन्नतीचें झाड फोफावण्यास जागा करून दिल्यानें 'नवें राज्य' सुखदायक होणार आहे. हें सिद्ध आहेच. परंतु त्या सुंदर झाडास वेढून राहिलेली पगार वाढीची विषारी वेल छेदून, त्यास अंदाज पत्रकांतील अनावश्यक व फाजील खर्चा कलमांचें खत लावल्यास, स्वराज्याचीं गोड व मधुर फळें चाखण्याचें भाग्य लवकरच प्राप्त होईल, हें तर अगदीं उघड आहे.

एतावता, नवीन सुधारणाच्या भव्य इमारतीस बळकटपणा येणें सर्वथैव वर निर्दिष्ट केलेल्या उपायांच्या पायावर तिची उभारणी झाली पाहिजे. असें जोंपर्यंत होणार नाहीं तोंपर्यंत 'नव्या स्वराज्या' पासून 'नव्या गोमांतकाची' अपेक्षा करणें म्हणजे आफ्रिकेंतील साहारा वाळवंटांत नारळीच्या झाडांची लागवड करून त्यांच्या गोड फळाचें माधुर्य अनुभवण्यास हपापण्यासारखें हास्यास्पद आहे.

सवडीनुसार नव्या जुन्या स्वराज्याची सोपपत्तिक माहिती मराठी वाचक वर्गास करून देण्याचें अभिवचन देऊन या लांबू पहात असलेल्या चिमकुल्या लेखाची येथेंच परिसमाप्ति करितों.

स्फुट विचार

मराठी भाषाः— मराठी भाषेस सरकारी आश्रय मिळून ठिकठिकाणीं मराठी शाळांची स्थापना व्हावी या राष्ट्रीय हेतूनें पणजी, म्हापशें, मुगांव, मडगांव, फोंडें, असोळणें, कुंकळ्ळी, मडकई, सांवर्डें, सांगें, काणकोण, पेडणें व इतर बहुतेक ठिकाणीं हिंदूंच्या जाहीर सभा भरून वरील अर्थाची सरकारकडे मागणी करण्यांत आली. वरील सभांशिवाय कित्येक मुनसिपालट्यांकडूनहि मराठी भाषेस सरकारचें पाठबल असणें किती अगत्याचें आहे हें सनदशीर रीतीनें सुचविण्यांत आलें. एकंदरींत हिंदूंनीं आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावलें आहे. आतां सरकारच्या 'मराठी, धोरणाकडे सर्वांचें लक्ष्य वेधून राहिलें असून उक्त चळवळीच्या रोपाला कोणत्या रुचीचीं फळें येतात, हें पहाण्यासाठीं हिंदुजनतेचे डोळे आतुर झाले आहेत. पहावें काय होतें तें !

एक उपायः—सांप्रत जगाला सतावून सोडणाऱ्या महर्गतेच्या प्रखरतेंत सौम्यता आणण्याचा सांप्रत अधिकारारूढ असलेल्या फ्रेंच प्रधानमंडळाच्या अर्थशास्त्रज्ञ अध्यक्षानीं एक उपाय सुचविला आहे. त्यांचें म्हणणें कीं, उत्पन्नांत शिकस्तीची वाढ व खर्चांत शिकस्तीची काटकसर या दुधारी व तीक्ष्ण शस्त्राचा महर्गतेविरुद्ध प्रत्येकाकडून निर्भिडपणें उपयोग केला गेल्यास जीवनार्थकलहांचा प्रश्न सोप्या रीतीनें सुटण्यास उशीर नको. फ्रेंच फडवणिसांचें हें उपयुक्त मत आमचे अधिकारी व जनता या उभयतानींहि कृतींत उतरविण्याचा जोरानें प्रयत्न करावा, अशी आमची त्यांस आग्रहाची विनंति आहे; कां कीं तसें झाल्यास गोव्यांची राजकीय, सामाजिक व औद्योगिक उन्नति झपाट्यानें होऊं लागेल, यांत बिलकूल संशय नाहीं.

भारत डिफेन्सफंड

श्री. भिकाजी ऊसो नारवेंकर, मडगांव २ रु.
,, केशव अनंत नायक ,, १ रु.
,, काशीनाथ दामू नायक ,, १ रु.
,, सुब्राय वि. शे. कुंकळ्ळींयंकर, केपें २ रु.

साभार स्वीकार

लंघन चिकित्साः—या उपयुक्त पुस्तकाचे कर्ते रा. रा. कृ. गो. किनरे, पुणें हे महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध लेखक असून सदर पुस्तकाच्या प्रकाशनानें त्यानीं रोगी लोकांना आपल्या असंख्य उपकारांत ठेविलें आहे, यांत संशय नाहीं. प्रस्तुत पुस्तकांतील अगदीं साध्या व तर्कशक्तीस सहज पटणाऱ्या आरोग्यतत्वांचा आम्हीं स्वतः अनुभव घेतला असून आमच्या कित्येक मित्रांकडूनहि घेवविला आहे. त्यावरून येथें नमूद करण्यास आनंद वाटतो कीं, 'लंघन चिकित्सा' हा रा. किनऱ्यांचा ग्रंथ अत्यंतोपयोगी असून अपचनापासून उद्भवणाऱ्या कितीहि जुन्यां रोगांवर त्यांत मोठ्या कुशलतेनें सुचविलेले उपचार रामबाण आहेत. आम्हीं तर सवडींत सवड साधून 'चिकित्से' चीं पारायणावर पारायणें करतोंच. त्याचप्रमाणें गोमांतकीय गरजू लोकांशिवाय इतर ग्रहस्थानींहि रा. किनऱ्यांच्या 'लंघनाचें, परिशीलन केल्यास त्यांस आरोग्यविषयक अतोनात फायदे होणार आहेत, हें येथें लिहिणें आमचें कर्तव्य आहे असें आम्हीं समजतों. पुस्तकाची किंमत ३ रु. असून त्याच्या उपयुक्ततेच्या मानानें ती जास्त नाहीं.

हुन्नर रत्नावलिः—रा. सूर्यात्मज कृत या पुस्तकाचा हा पहिला भाग हुन्नरोत्तेजक आहे. औद्योगिक सामर्थ्य वाढवूं इच्छिणाऱ्या लोकानीं सदरहू पुस्तकाचा उपयोग केल्यास त्यांचा हेतु तडीस जाण्यास बरीच मदत होणार आहे. किंमत अवघी १० आणे असून छपाईहि केवळ वाईट नाहीं.

वर्तमानसार

—सप्टेंबर महिन्याच्या २० ते २४ तारीखपर्यंत न्यायखात्यांतील, खालच्या प्रतीच्या कामदारांच्या उमेदवारांच्या परीक्षा घेण्यांत येणार आहेत.

—दियारीयु दे नोइत नांवाच्या दैनिक पत्रकावर एक मराठी शिक्षणाविषयीं लेख प्रसिद्ध झाला असून, त्यांत गेल्या आठवड्यांतील तद्विषयक हिंदूंनीं केलेल्या चळवळीस अयोग्यतेचा शेरा मारला गेला आहे.

—पणजी शहरांत एक मराठी पोर्तुगीज दैनिक निघणार असल्याची आनंददायक बातमी पसरली आहे.

—जुन्या स्थनिक पार्लमेंटच्या बैठकी चालू असून त्यांत 'नव्या स्वराज्या'च्या सुधारणांचा ऊहापोह गेल्या आठवड्यांत चालू होता.

—शिक्षणपुनर्रचनेच्या बिलांत मराठीचा अंतर्भाव करण्याबद्दल ज्या ठिकठिकाणाहून मागण्या करण्यांत आल्या त्यांवरून मराठीचा प्रश्न येथील हिंदूंच्या किती जिव्हाळ्याचा आहे तें तर कळून आलेंच. पण नुसता जिव्हाळा असून किंवा सरकारपाशीं मराठीचा शिक्षणक्रमांत समावेश करण्याबद्दल विनंति करून भागायाचें नाहीं. तर तो समावेश कसा करावा व मराठीच्या शिक्षणास सरकारनें कशी मदत करावी हें असंदिग्धपणें आपण दाखवलें पाहिजे. अर्ध्यापेक्षांहि ज्यास्त प्रजेच्या मागणीस सरकार मान देवो अगर न देवो आपण आपलें कर्तव्य करणे इष्ट आहे. हा प्रश्न एकट्यादुकट्यानें सोडवायाचा नसल्यानें सगळ्या गोव्यांतील विचारी मराठीच्या अभिमान्यांनीं शक्य तितक्या लवकर एकत्र होऊन सरकारला दिशा दाखवून द्यावी अशी सगळ्या प्रांतबंधूस रा. प्रो. दत्तात्रय पै यांची विनंति आहे.

ANO V.—NUMERO 24—1920

QUEPEM, QUINTA-FEIRA 2 DE SETEMBRO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहीरातींचे दर.
मराठी दर ओळीस दोन आणें. कायमच्या जाहीरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें-गुरुवार, तारीख २ माहे सप्टेंबर सन १९२० अंक २४ वा.

Nos quoque gens sumus

Uma das alterações que ultimamente foram introduzidas na nossa Carta Organica restringe o direito de *voto* áqueles que saibam ler e escrever portuguęs, sòmente.

¿ A que *razão do Estado* obedeceu essa *inovação* que, a entrar em vigor com todo o seu rigor, há de necessariamente, reduzir a *cadaveres politicos* os que, ou por culpa do Estado ou propria, não puderam instruir-se na lingua de Camões ?

¿ Terão por ventura, dado os não conhecedores da mesma lingna motivos que justifiquem á antidemocratica supressão do voto, que por eles era tão civicamente exercido ?

Francamente, não acabamos de compreender o *alcance constitucional* da alteração em questão, alteração que é de alterar os mais perfeitos optimismos e enfraquecer a mais ardente fè na Republica !

E' que a eliminação do voto da quase metade da população do Estado da India representa, sem mais nem menos, um cruel e barbaro golpe de espada contra a *Igualdade politica*, tão apregoada pelo glorioso regime que nos governa.

¿ Quererá a Republica Portuguesa proclamar a quarto ventos que não reconhece a qualidade de *cidadão* àqueles que não saibam portugues, ainda que sejam *mestres* noutras linguas ?

Mas que coisa ë o *voto*?

O *voto* ë o meio que, dirivado do principio da *Igualdade politica*, garante ao cidadão o direito de aspirar ás funções publicas (elegibilidade) e manifestar-se sobre a maneira porque os negocios do paiz devem ser governados.

¿ Quem se instruiu em marata, guzarate ou industani não poderá, ao menos, desempenhar, á risca, este ultimo papel ?

A experiencia prova que sim, que os hindus de Goa e Damão, conhecendo, apenas, as suas linguas maternas sabem, condignamente, manifestar-se *sobre a maneira porque os negocios do paiz devem ser governados*

Nestas condições ¿ tem explicação justificavel a alteração referida que tënde a *monarquisar* a Constituição *republicana* ?

¿ Não representa isto uma ofensa á Civilisação que marcha para a conquista do sufragio universal, esterilisando a influencia do criterio de funil de *pesar os votos e não conta-los* ?

Mas para que prosseguir mais se o hindu conhece bem o valor do *civis romanus sum* para demonstrar que pode aquilatar a doutrina que encerra a epigrafe do presente artigo.

Impende-nos, apenas, o dever de solicitar de quem está á testa deste Estado medidas urgentes que façam sem efeito a supressão do *voto* aos cidadãos *portugueses, conhecendo marata, guzarate ou industani.*

E' o que cumprimos ao concluir estas desataviadas mas sinceras linhas, na plena esperança de que não será vibrado contra os que não saibam portuguez, o golpe da espada constitucional que os ameaça com a morte politica.

TILAKISMO

Com a epigrafe de *Em bõa paz* escreveu o sr. Menezes Bragança no *Debate* que-diga-se sem lisonja-é um ornamento do jornalismo portuguez, um belo artigo no qual o talentoso e estudioso escritor, analisando o movimento da classe hindú exteriorisa, sempre sinceramente, o seu receio duma disassociação iminente pela feição separatista que, no seu entender, vai assumindo, cada vês mais acentuadamente, a *agitação* dos hindùs.

E no decurso do seu brilhante artigo como o são todos os que saem da sua scintilante pena dirige uma pergunta sobre o significado ou traducção do *tilakismo*, palavra que cunhamos para o vocabulario politico, formulando as duas seguintes hipoteses interrogativas; culminação do amor patriotico? ou è um metodo de realisações politicas?

Permita-nos o digno director do *Debate* que o esclareçamos em poucas palavras sobre os dois pontos principaisdo seu referido artigo.

Quanto ao movimento da classe hindú é bom declarar, alto e bom som, que êle tem em mira, *única e exclusivamente*, levantar os hindus ao nivel dos seus irmãos cristãos que lhes são superiores no campo de instrução e educação politicas.

Conseguido êste duplo ideal e disfeito assim o atrazo em que por longos anos viveu, a classe hindú identificar-se-há politicamente, com a classe cristã que nunca hostilisámos nem hostilisaremos senão por outros motivos, pelo menos porque depende do apoio animador dos irmãos cristãos o côrôar-se de bom exito o nosso movimento, inspirado no mais puro dos intuitos.

E' pois infundado o receio do ilustre director do *Debate* de que os hindús pelo seu movimento procurem desunir-se dos seus *irmãos* cristãos politicamente, imprimindo-lhe uma feição separatista ou desassociativa.

Agora quanto ao *tilakismo*.

Houve muitos patriotas na India Inglesa; mas ninguem atingiu a culminancia a que Tilak chegou pelos seus quatro predicados principais, inteligencia previlegiada abnegação santa, coragem incomparavel e patriotismo verdadeiro

Todas estas qualidades num sò homem que foi agitação personificada, *acção vitalisada*.

Ora, nòs cunhamos o *tilakismo* para os hindùs e *tambem* os cristãos imitarem o *Rei sem corôa* na sua acção, abnegação santa coragem incomparavel e patriotismo verdadeiro para a honra da Republica Portuguesa e brilho da Politica a cujo gradual afrouxamento estamos assistindo, doença cuja cura rapida e infalivel depende da aplicação do segredo que encerra o poderoso *tilakismo* segundo o nosso diagnotico...pratico

Como o digno articulista do *Em bõa paz* vë, empregamos a palavra *tilakismo* não com o fim de sugerir a formação dum grupo ou seita com este nome, mas sim com a intenção pura e simples de frisarmos a imprescindivel necessidade de cada um desenvolver e fortalecer no seu ser as referidas nobres qualidades como um maravilhoso elixir contra a tuberculose do tal afrouxamento.

Sem mais nem menos.

Culminação do patriotismo?

Metodo de realisações politicas?

Não. Elixir maravilhoso contra o afrouxamento politico.

Balcao Provinciano

E' tão antiga a origem dësta instituição provinciana que há quem a atribua á volumosa e macissa cachola do pre-istorico ente humano. E' corroborada esta arquiologica opinião por um nosso visinho em quem a estreitesa cerebral è substituida pela grandeza estomacal que lhe tem criado *autoridade* para nele crèrmos...como em diluvios biblicos e contos puranicos.

Que o *Balcão* è um legado de nossos avoengos pre-istoricos è um facto incontroverso, pois nem a historia sagrada dos *vedas* nem a historia profana das *Ordenações* falam dêla, o que implicitamente e negativamente comprova a *original* asserção do nosso referido visinho da miniscula cabeça e Mausculo Estomago.

Ainda que escura a sua ori-

येत्या अंकांत

आर्यांश्रु (कै. लो. टिळकांविषयीं)

कवि— श्री. विष्णु रं. शेळडेकर

(१) सार्वजनिक हिताच्या गोष्टींसंबंधानें हिंदु लोकांच्या अंगीं जें एक प्रकारचें शैथिल्य जडलेलें आहे; सार्वजनिक कामांबद्दल जें एक प्रकारचें औदासिन्य त्यांच्यांत पसरलेलें आहे तें हळुहळु नष्ट होण्याच्या कामीं व सर्वत्र जागृति होण्याच्या कामीं हिंदुपरिषदेचा फार मोठा उपयोग होईल (२) सार्वजनिक कामें करण्याची चटक तरुण मंडळीस लागेल (३) ठिकठिकाणची मंडळी एकत्र जमण्याचे प्रसंग परिषदेमुळें वारंवार येणार असल्यामुळें परस्परांबद्दल बंधुभाव व प्रेम हीं वाढतील व एकीच्या भावनेचा प्रादुर्भाव होईल. (४) विचार विनिमय होईल व वेगवेगळ्या पुढाऱ्यांच्या अनुभवाचा फायदा सर्वांस मिळेल. (५) तरूण मंडळीच्या अंगांत सभाधीटपणा येऊंन वक्तृत्वकलेस उत्तेजन मिळेल व शिस्त, नियमितपणा इत्यादि गुणांच्या शिक्षणाचा लाभ होईल. हे व याच सारखे इतर तत्कालिक फायदे पुष्कळ होतील. आणि परिषदेचीं कामें कळकळीनें, उत्साहानें, नेटानें, चिकाटीनें व अंतःकरणाच्या खऱ्या तळमळीनें पार पाडण्यांत आल्यास राजकीय, सामाजिक, धार्मिक वगैरे बाबतींत हिंदुसमाजाची हळुहळु प्रगति झाल्याशिवाय राहणार नाहीं अशी आमची प्रामाणिक समजूत आहे.

हिंदु—परिषदेसंबंधानें भारतांत चालत असलेल्या वादविवादाचें परीक्षण केल्यास खालील निष्कर्ष निघतोः—

[१] परिषदेच्या स्थापनेची कल्पना ठीक आहे.

[२] परिषदेची हिंदुसमाजास अत्यंत आवश्यकता आहे.

[३] परिषदेचे उद्देश फार चांगले आहेत.

[४] परिषदेच्याद्वारें हिंदुसमाजाचें पुष्कळ हित साधतां येईल.

[५] परिषदेसंबंधानें आज सर्वत्र उत्साहानें, अगत्यानें व आदरपूर्वक विचार होत आहे.

इतक्या मुद्यांसंबंधानें सर्वांची पूर्ण एकवाक्यता आहे. येऊन जाऊन वाद काय तो "परिषदेला मूर्त स्वरूप येऊन ती टिकण्यासारखी परिस्थिति आहे कीं नाहीं" या मुद्यासंबंधानें आहे. आणि वरील मुद्यांच्या खालोखाल या मुद्यानें महत्व असल्याकारणानें त्याचाहि विचार होणें अगत्याचें आहे.

वरील प्रश्नाचें उत्तर होकारार्थी देणारे पुष्कळ आहेत तर नकारार्थी देणारेहि कांहीं निघतील आणि वादच चालवावयाचा झाला तर वर्तमानपत्राचे एक दोन कॉलम तर सोडाच पण आपापलीं परस्परविरुद्ध मतें प्रस्थापित करण्यासाठीं स्वतंत्र पुस्तकें सुद्धां त्यांना लिहितां येतील यांत संशय नाहीं; परंतु आमच्या मतें हा वाद अशा रीतीनें तुटणें शक्य नाहीं. परिषदेचें काम हें फार मोठ्या जबाबदारीचें, खर्चाचें, श्रमाचें व दगदगीचें आहे हें खरें आहे व सर्वांच्या विचारानें, सर्वांच्या सहाय्यानें, सर्वांच्या सहकार्यानेंच तें यशस्वी रीतीनें पार पडणारें आहे हें त्याहून ज्यास्त खरें आहे. यंदांच्याच वर्षी तिची प्राणप्रतिष्ठा झाली पाहिजे अशी आग्रहावर कोणी मा क्त केलेली नाहीं व आमचा तसा आग्रहहि नाहीं. पण गोव्यांतील हिंदुलोकांची एक स्वतंत्र परिषद असली पाहिजे, तिच्या स्थापनेपासून हिंदुसमाजाचे पुष्कळ फायदे होणार आहेत आणि आज नाहीं तर उद्यां तिची प्राणप्रतिष्ठा झालीच पाहिजे असें खोल विचारांतीं आमचें व आमच्या स्नेही-सोबती—सहाध्यायी मंडळीचें ठाम मत झालेलें असून त्या कामीं शक्य ते प्रयत्न वेंचण्याचा आमचा निश्चय ठरला आहे.

हिंदुपरिषदेची कल्पना मूर्त स्वरूपांत येऊन ती टिकण्यासारखी परिस्थिति सध्या आहे कीं नाहीं ? या प्रश्नाचा निकाल वर्तमान पत्रांतील वादविवादानें लागणें शक्य नाहीं असें आम्हीं वर सांगितलेंच आहे. या वादविवादानें परिषद एका बाजूस राहून आवेशाच्या भरांत वापरलेल्या शब्दानीं एकमेकांचीं मनें दुखवण्याचा व परस्परांत तेढ उत्पन्न होण्याचा मात्र बराच संभव आहे. परिस्थिति आहे किंवा नाहीं हें प्रत्यक्ष अनुभवाशिवाय समजणें कठीण आहे. आणि ह्मणूनच केवळ अनुभवाखातर परिषदेचें पहिलें अधिवेशन यंदांच्या वर्षी भरविण्याचा प्रयत्न करून पाहण्यांत यावा असें आह्मांस वाटतें. या कामीं आह्मांस जो अनुभव मिळेल तोच आह्मांस मार्गदर्शक होईल हें निराळें सांगावयास नकोच.

तेव्हां ज्या स्वदेशाभिमानी हिंदुगृहस्थांना व तरुणांना परिषदेची कल्पना मान्य असून तींत भाग घेऊन ती यशस्वी करण्यानें आपल्या समाजाच्या प्रगतीच्या कार्यास हातभार लावण्याची सदिच्छा असेल त्यानीं आपापलीं नांवें पूर्ण पत्त्यासह श्रीयुत रा. रा. हेगडे देसाई यांकडे 'भारतां'त प्रसिद्ध करण्यासाठीं पाठवावीं अशी सर्वांस आमची नम्र पण आग्रहाची विनंति आहे. त्याच प्रमाणें त्यानीं आपापल्या राहत्या गावीं सभा भरवून परिषदेसंबंधानें लोकमत तयार करण्याची खटपट करावी अशी प्रार्थना आहे. तसेंच परिषदेसंबंधानें कोणास कांहीं सूचना करावयाच्या असल्यास त्या पत्रद्वारें खालील पत्त्यावर आह्मांस करण्यांत याव्या.

वाडी } भास्कर प्रतापराव सरदेसाई
फोंडा }

* श्रीयुत सरदेसाई व इतर अनेक गृहस्थांकडून आलेल्या सूचनांस मान देऊन प्रस्तुत विषयावर आह्मी आमचें मत येत्या अंकीं नमूद करणार आहों. सं. भारत

साभार स्वीकार

प्रगति (साप्ताहिक):— हें मराठी पत्र पणजी गोवा येथें मराठा नायक समाजांतील एक उत्साही व निःस्वार्थी पुढारी रा. सखाराम रामनाथकर यांच्या चालकत्वाखालीं प्रसिद्ध होत असतें. धोरण प्रागतिक. वा. व. ट. हा. १॥ रु.

गरिबांचा कैवारी [साप्ताहिक]:— संपादक—रा. बाबुराव हैबतराव यादव. धोरण विश्वबंधुत्वाचें. भाषा—साधी पण जोरदार. वा. व. ट. हा. २॥।=. प्रकाशन—कोल्हापूर.

कामगार मित्र [साप्ताहिक]:— या मुंबई येथें कामगार संघातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या पत्राचे संपादक रा. दत्तात्रय गोविंद पंडित हे असून त्यांतील लेख गंभीर व चित्तवेधक असेच असतात. वा. व. ट. हा. ३ रु.

निरीक्षक [साप्ताहिक]:— धोरण प्रागतिक. छपाई—मोहक. भाषा—नेमस्त. संपादक रा. दामोदर बाबुराव गुप्ते. प्रकाशन—गिरगांव रोड, मुंबई. वा. व. ट. हा.— ३ रु. १२ आणे.

भारत

गुरुवार श्रावण कृ. ४ थी. १८४२

हा कलंक धुवून टाका !

राजकीय, कलाकौशल्याच्या किंवा विशिष्ट शास्त्रीय ज्ञानाची गरज असलेल्या अशा सरकारी जागांसाठीं उमेदवारांच्या गैरपद्धतीनें घेण्यांत येणाऱ्या परीक्षांमुळें पोर्तुगीज राष्ट्राची बेअब्रु, पोर्तुगालांत व येथें सारखीच होत आहे. व त्याचे अनिष्ट परिणाम त्रिकालबाधित अशा स्वरूपांत पदोपदीं राष्ट्रास जाचक झाल्यानें परीक्षकांची योग्य निवड झाली पाहिजे असें सगळ्या समंजस व दूरदर्शी माणसांस वाटूं लागलें असून त्याचें ठाम मत असें बनलें आहे कीं, परीक्षांच्या स्वार्थी सोंगानें प्रत्यहीं घडणाऱ्या अन्यायाचें खापर फक्त सरकारच्याच माथ्यावर न फोडतां, इतर नागरीकहि, थेट परीक्षेच्या उमेदवारांपासून तों त्यांस हुद्यांच्या जागांवर नेमणाऱ्या अधिकाऱ्यांपर्यंत, त्याचे वांटेकरी आहेत. ह्मणून एकंदर लोक, प्रजा व सरकार, हीं अनीतिमूलक परीक्षांच्या बाबतींत सारखींच अन्यायी होत.

ज्या राष्ट्रांत योग्यायोग्यतेचा, पात्रापात्रतेचा प्रश्न बाजूस राहून 'वशिल्या' सारख्या जालीम विषाचे वारें परीक्षक मंडळांच्या अंगांत खेळूं लागतें तेथें या मंडळानें पास केलेल्या इसमाच्या हातून होणाऱ्या कृत्यांचा परिणाम भयंकर झाल्यास फारसें नवल नाहीं. तसें न झाल्यास मात्र आश्चर्य होतें !

एकाद्या अयोग्य व्यक्तीची नेमणूक, केवळ परीक्षेंत उत्तीर्ण झाल्याच्या सबबीनें, कलाकौशल्याच्या किंवा विशिष्ट शास्त्रीय ज्ञानाची गरज असलेल्या अशा एका हुद्याच्या कामांवर झाली ह्मणजे, त्या अपात्र कामदारांच्या हातून होणारीं बेकायदेशीर कृत्यें, राष्ट्राच्या इभ्रतीस कलंक लावणारीं आणि सांपत्तिक स्थितीसहि धोका आणणारीं असतात. एकादे वेळीं या बेजबाबदार कृत्यांची लपवाछपव करतां करतां सरकारी अमलदारांच्या नाकीं नव येतात व या अधिकारमदाच्या धुंदींत माजविलेल्या अपूर्व व अवर्णनीय अशा पराक्रमानें त्यांच्या कवडीमोल राजकारण कुशलतेची साक्ष सगळ्यांत पटते.

सध्याच्या काळांत परीक्षा हें एक सोंग आहे ही समजूत नष्ट होऊन ती एक तावून सुलाखून काढण्याची भट्टी किंवा हरेक प्रकारचे घणाचे घाव सोसणारी पण न डगमगणारी ऐरण अशी उमेदवारांची व परीक्षकांची दृढ भावना झाली पाहिजे. राजकीय पक्षभेदामुळें किंवा सामाजिक पंक्तिप्रपंचामुळें या उच्च ध्येयास मुकणें ह्मणजे राष्ट्रहितविघातक कृत्य करणें होय. या साठीं जनतेकडून त्याचा योग्य रीतीनें जरूर प्रतिकार झाला पाहिजे.

परीक्षक हे पात्र व योग्य असे सम असून त्या त्या विषयांत नैपुण्य संपादिलेले असले पाहिजेत. त्यांची नीतिमत्ता व स्वभावसरलत्व हीं इतकीं कांहीं तीव्र असलीं पाहिजेत कीं, 'वशिल्या'सारख्या मोहिनी मंत्राचा प्रयोग करण्याचें धार्ष्ट्य कोणाहि उमेदवारास न व्हावें ! व त्यांचीं अशी खात्री होऊन चुकली पाहिजे कीं अशा हलक्या व दुषणार्ह कृत्यास योग्य प्रायश्चित देण्यास पिनल कोड सदाच जागृत आहे.

"पात्रिय" या लिस्बन येथील दैनिक पत्रानें या विषयींची वर्णिलेली पोर्तुगालची स्थिति फार मननीय आहे. त्यांत पोर्तुगालांत घेण्यांत येणाऱ्या परीक्षांवर व पोर्तुगीज सरकारशीं केलेल्या करारांवर कोणाचाच विश्वास बसत नाहीं, असें स्पष्ट ह्मटलें आहे. फार तर काय—एकादा कामदार हयात आहे किंवा नाहीं, त्यास बडतर्फ करण्यांत आलें आहे किंवा नाहीं याची विचारपूस न करितां अमक्या जागीं तमक्याची नेमणूक करण्यांत येण्याविषयीं शिफारसपत्रांचा व वशिल्याचा वर्षाव चालू असतो !

अशा या मनोभेदक प्रकारानीं एकाद्या राष्ट्राची उन्नति कशी होईल ? बुडत्याचा पाय खोलांत न पडण्यास, पिछेहाटीचें धोरण सुटण्यास व तें सुधरून प्रगतीचा राजपथ आक्रमिण्यास 'परीक्षांच्या सोंगास' आळा घालण्याशिवाय दुसरा तरणोपाय नाहीं.

स्फुट विचार

हक्कावर गदाः— 'स्वराज्या'च्या संघटनेंत घुसडून दिलेल्या नवीन फेरबदलांनुरूप या पुढें राजकीय निवडणुकींत मताधिकाराचें क्षेत्र केवळ पोर्तुगीज लिहूं वाचूं येणाऱ्यां पूर्तेंच आंखडण्यांत येणार आहे ! मराठी, गुजराथी अगर हिंदुस्थानी लिहूं वाचूं येणाऱ्या पोर्तुगीज नागरीकानीं वरील उच्च व राजकीय अस्तित्व निदर्शक हक्काची बजावणी करण्यांत आजपर्यंत आपली पूर्ण पात्रता सिद्ध केली असतां आतांच आमच्या राजकीय समतेचा गर्व वाहणाऱ्या रिपब्लिकन सरकारास तो काढून घेण्याची दुर्बुद्धि कां सुचली हें समजत नाहीं ! निरक्षर लोकांस सुद्धां कित्येक सुधारणेच्या शिखरावर विलसत असलेल्या राष्ट्रांनीं मताधिकाराचा नैसर्गिक हक्क कबूल केला असून, त्यामुळें कांहींच राजकीय नुकसानी झाल्याची साक्ष तेथील निवडणुकींचा इतिहास देत नाहीं. उलट ज्या राष्ट्रांत लिहूंवाचूं येणाऱ्यांपूर्तीच मताधिकाराची व्याप्ति आहे तेथें मात्र अहंकारी व स्वार्थी लोकांचा विजय झाल्यांचीं पुष्कळ उदाहरणें सांपडतात. अशी वस्तुस्थिति असतां पोर्तुगालांत चालू असलेल्या सांवळ्या गोंधळाचा आंधळेपणा केवळ मराठी,हिंदुस्थानी अगर गुजराथी जाणणाऱ्या पोर्तुगीज नागरिकांच्या-नागरिक कसचे?-एका उच्च हक्कावर हडेलहप्पी गदा आणण्यास कारणीभूत व्हावा, हें खास बऱ्याचें लक्षण नव्हे.

चळवळ केली पाहिजेः-वरील हक्काची होऊं पहाणारी पायमल्ली वेळींच ह्मणून पाडणें आमचें महत्वाचें कर्तव्य आहे. मराठीच्या बाबतींत व्यक्त केलेल्या जोरदार व तेजस्वी उत्साहापेक्षांहि मताधिकाराविषयी अवश्य बनलेल्या आमच्या चळवळींत ज्यास्त जोम केला पाहिजे. तरच आमचा वरील हक्क हिरावूं पहाणारें पोर्तुगीज सरकार जागें होण्याचा संभव आहे. 'करील त्याचा कारभार व मारील त्याची तरवार" हा प्रकार कायमचा नष्ट होण्यास टिळकिझम सारखा अन्योपाय नाहीं, हें प्रत्येक हिंदूनें ध्यानांत धरून तदनुसार आपलें चिरोदात्त धोरण निश्चित करणें अत्यंत जरूर आहे. नेभळटपणाचे दिवस मागें पाडले पाहिजेत व निःस्वार्थ व निरपेक्ष स्वाभिमानाची ज्योत अखंड पेटती ठेऊन आपल्या प्रिय देशाची व त्याहूनहि प्रिय राजकीय हक्कांची पायमल्ली न होण्यासाठीं कळकळीनें झटलें पाहिजे. तरच आह्मी सर्व कामीं व ठिकाणीं यशस्वी होऊं.

Anno V.—Numero 25—1920 — Quepem, Quinta-feira 9 de Setembro

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
India Portuguesa...... 3-00-00
India Inglesa.............: 3-08-00
Numero Avulso.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-०
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००

जाहीरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणें. कायमच्या जाहीरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें—गुरुवार, तारीख ९ माहे सप्टेंबर सन १९२० अंक २५ वा.

MAIS UMA VEZ

Tornamos a repetir, mais uma vez, neste lugar, que o movimento da classe hindu, manifestado sob diferentes formas, obedece ao unico e esclusivo fim de promover o seu disenvolvimento social, moral e politico, para que, igualando-se na instrução aos seus irmãos cristãos, possam os hindus servir politicamente á Republica *comme il faut*.

Cremos que è licito a cada um movimentar-se como quizer e á vontade, uma vez que na sua movimentação se renda, com uma rigorosa religiosidade, o devido culto ao principio do *não faças a outrem o que não queres que outros te façam a ti*

E coisa diversa se não observa no movimento da classe hindu.

Não tem porisso absolutamente a razão de ser o receio que se exteriorisa, da separação da classe hindu da classe cristã. Simplismente o que aquela almeja è—repita-se—sem mais nem menos, nivelar-se com esta, á força de seus proprios esforços, para que se apague do quadro politico—e duma vez para sempre—a diferença palpavel que se nota entre hindus e cristãos.

Fique isto bem assente e, para o diante, ninguem atribua ao movimento hindu propositos diversos do que já acabamos de expender com uma repetição fastidiosa, talvez, mas necessaria, sempre.

Sim, senhores. O movimento hindu è inocente, circunscrevendo-se a esfera da sua acção ao seu levantamento sem causar prejuizos a ninguem.

Para o frutificar, sómente, a classe hindu imita na sua acção os seus irmãos do visinho territorio e isto sò por falta de quem cá em casa, a oriente com abnegação e patriotis-

Ensino marata

A' proposito de um artigo de fundo que publicou o *Diario da Noite* de 21 do mez passado sob a epigráfe acima, ocorre-me o seguinte:-

O referido artigo do *Diario*, entre outras coisas diz isto:

"Entremos pois no assunto. Em primeiro lugar a lingua do Estado é a lingua portuguêsa; e è só o disenvolvimento desta que ele deve e hade procurar, não o sacrificando em prol da outra lingua que seja privativa de qualquer grupo ou camada social. Há ainda mais. Temos de reconhecer os intuitos da nação dominante, que são dos mais generosos e liberais, outra coisa não ansiando senão a completa identificação, note-se, dos povos conquistados que, porisso, em reconhecimento, a primeira cousa que devem desejar é conhecer a lingua dessa nação, pela qual essa identificação será mais facil e ao mesmo tempo mais profunda.

Neste sentido mal iremos, portanto, que o Estado auxilie proteja ou fomente outra lingua, emquanto a lingua portuguesa ainda muito carece desse auxilio para ser largamente espalhada".

Antes de entrar no fundo da questão, ponho ao lado da supracitada transcrição este trecho:

"Haja vista a vizinha Inglaterra que longe de perseguir e votar ao ostracismo as linguas indigenas, de qualquer especie que sejam, tem por um dos seus principais deveres abrir por toda a parte escolas e subsidiar. generosamente as da iniciativa particular para o seu ensino, estimular por varios modos a sua frequencia, servindo-se delas como pedestal para estudos superiores, fomentar com toda diligencia a producção de livros didaticos e assim reduzir a escrita, sistematisar e cultivar atè os idiomas rudes e caóticos, numa palavra, avocar suave e rápidamente ao convivio da civilisação europea, por meio da lingua vernacula, povos, que doutro modo andariam alheados por longo tempo da sua benefica influencia:-

E com isto não prejudica a difunsão da lingua propria antes pelo contrario.."

O leitor ponha nos pratos da balança, os 2 trechos citados e veja qual deles pesa mais.

O trecho citado não è do livro escrito por algum indu; mas sim é da pena do insuspeito filologo Monsenhor Sebastião Rodolfo Dalgado.

Diga lá o *Diario* o que lhe aprouver, mas è incontestavel que o Governo tem por um dos seus principais deveres abrir por toda a parte escolas das linguas vernaculas e atè subsidiar as da iniciativa particular.

Dirá, talvez, o leitor que o vernaculo de Goa não è o *marata* mas sim o *concani*, como a *Tribuna*.

Eu não quero entrar mais na discussão sobre se a lingua vernacula de Goa é *marata* ou *concani*, limitando-me apenas a indicar os nomes dos glotologos, Cust, Beames, Hoernle e Grierson, que consideram o *concani* como dialecto do *marata*.

Mas tenha o leitor paciencia atè o numero seguinte que este vai já longo.

L. P.

---

mo, coisas que na India Portuguesa são, *geralmente*, consideradas, como artigos de... luxo na miseria de interesses estomacais.

Separação do meio dos cristãos?

Nunca! Nunca!! Nunca!!!

Mais uma vez: nunca!

Balcao Provinciano

Em um destes dias chuvosos, estando devidamente reunido o nosso *Conselho* de ...*provincia* com a maioria de seus membros *natos* e *eleitos*, apareceu lá, da volta de Margão, um membro noveleiro que lá fora para o colhimento da novidade...da condenação da *Terra* e sobre a qual trocaram-se as seguintes impressões:

—Como sabem, mordido pela tarantula de curiosidade fôra a Margão a fim de saber do julgamento da *Terra* ou antes da sentença da sua condenação. Chegado ao Mercado Novo, perguntei sobre o assunto a muita gente, visinha do Tribunal que julgou a *cambada* da *Terra*. Ninguem, porêm, foi capaz de dizer-me *nem patavina* da.. *poda*!

—*U* que ?! Nós que procuramos conhecer tudo o que ocorre no céu e na terra, nas casas e nas ruas, em fim, em toda a parte visivel e invisivel lamentamos sinceramente a atitude *nirvanica* dessa gente que não soube nada informar-lhe sobre a sua *curiosidade*! *Arê*, eu lhe digo, a nossa instituição *balcanica* sofre do *bolshevismo*.

Todos querem meter focinho no que se dà na Russia, Polonia e America e nos seus *souviets* e trapalhada, ignorando coisas cá da *Terra*.

Isto não pode ser. Proponho, porisso, ao *Conselho* medidas que tonifiquem o Balcão, já em via do enfraquecimento...!

—Mas ouçam-me. Depois de dois dias de demora ali sem nada *pescar*, volto hoje tão *virgem* como o era ao ir em relação ao julgamento da *Terra* E'...já tarde agora.

Oportunamente contarei mais novidades de *Atenas*...da India

भारत

गुरुवार श्रावण कृ. १२ शी. १८४२

गोमांतकीय हिंदु परिषद

प्रस्तुत विषय 'भारता'च्या वाचकांस बऱ्याच दिवसांपासून परिचित झाला आहे व अतिपरिचयामुळें एक प्रकारचा कंटाळा येणें अस्वाभाविक नसलें तरी, हिंदुपरिषदेसारखा सार्वजनिक हिताचा मजकूर अनेक लेखकांकडून बहुविध बाजूंनीं मांडला गेला असल्यानें, त्यावर जवळ जवळ महिना दोन महिन्याच्या अवधींत विचार करण्याची संधि वाचकांस मिळाली व आह्मांस लोकमत थोडेंसें अजमावतां आलें. ह्या गोष्टी कमी महत्वाच्या नव्हत.

आजपर्यंत झालेल्या वादविवादांचा हंसक्षीरन्यायानें विचार करावयाचा झाल्यास व्यक्तिविषयक कुरापती बाजूस ठेवून ऐन मुद्द्यांसंबंधानें विवेचन केले असतां

वादांतून तत्वबोध

तरी निघाल्याचें श्रेय मिळेल. वाद, त्याचा आरंभ व पर्यवसान या त्रयीकडे लक्ष्य देतां निःपक्षपाती मनुष्यास असें वाटेल कीं, 'स्पष्टवक्ता' यानीं परिषदेविषयीं समतोल मनानें ऊहापोह केला असता तर इतरांसहि अतिशय शांत चित्तानें तो विचारांत घेण्यास फुरसत मिळाली असती व आघाताच्या मानानें प्रत्याघातहि अल्प प्रमाणांत राहून एकाची चूक दुसऱ्याकडून सुधारण्यासाठीं हातांत लेखणी घेऊन मर्मभेद करण्याऐवजीं हातांत हात घालून पुढील कार्याकरितां तरी तडजोड झालेली दिसली असती. ही एक बाजू असून, दृष्टिकेंद्र जरा सूक्ष्म केला असतां असें दिसेल कीं, परिषद नको असें कोणाचेंच मत नाहीं व दिसणारा मतभेद इतका सौम्य स्वरूपाचा आहे कीं तो कांहीं अवकाशानें नाहींसा होईल. हा प्रकार आशाजनक होय. तूर्तची वेळ अशी आहे कीं, आज एकमेकांचे उणें पाहत टाळया मारून स्वस्थ न बसतां

जें उणें असेल तें पुरें

करण्याकरितां हातभार लावण्यास झटलें पाहिजे. ह्मणजे सामाजिक कर्तबगारी परस्पर विरोधांत झिजून लय न पावतां सगळयांसच सुफलदायिनी होईल.

'भारता'वर परिषदेचें नांव पुकारण्यांत आल्यापासून तिच्या उपयुक्ततेविषयीं आस्थापूर्वक चर्चा करून, या गोवा–हित–संवर्धक संस्थेसंबंधानें आपआपले विचार प्रदर्शित करण्याचा सुप्रसंग बहुतेकानीं दवडला नाहीं, हें भावी उत्कर्षाचें सुचिन्ह होय. परिषद भरविण्यांत यावी, ती आवश्यक आहे असें प्रत्येक पत्रव्यवहार–लेखकाचें ठाम मत आहे. भानगड काय ती 'आतांच परिषदेच्या कामास सुरवात करावी' कीं 'योग्य परिस्थिति येईपर्यंत ती भरवूं नये' या मतांतच संकलित रूपानें दिसून येते. ह्मणून प्रकृत दोन मतवैचित्र्यांचें विवेचन करून जो निकाल लागेल त्या वरूनच परिषदेविषयींच्या एकंदर वादांतून थोडासा तत्वबोध निघेल असें आमच्या प्रांजल बुद्धीस वाटतें.

कोणत्याहि कामाविषयीं योग्यायोग्य परिस्थितीची मीमांसा करून अमुकच निश्चित करणें हें प्रत्येकाच्या बुद्धिविशेषावर व प्रकृतिभिन्नत्वावर अवलंबून आहे. लो. टिळक शंभर वर्षांपूर्वी जन्मते तर त्यानीं पेशवाई बुडूं दिली नसती, किंवा यापुढें शंभर वर्षांनीं निपजते तर 'अनभिषिक्त राजा' ऐवजीं ' अभिषिक्त राजा ' हें सार्थ नाव मिळविण्यास समर्थ झाले असते, सबब ते अयोग्य परिस्थितींत जन्म पावले, असें एकाद्यास ह्मणतां येईल तर दुसरा असें ह्मणेल कीं, पेशवाईतून इंग्रजशाहींत संक्रमण करणाऱ्या कालावधींत त्यांचा जन्म झाल्यामुळें मावळलेल्या स्वराज्याच्या अंधुक प्रकाशांत व इंग्रजशाहीच्या तीव्र किरणांत, एकाची उणीव तर दुसऱ्याची प्रखरता भासत असल्यावेळीं, ते हयात असल्या कारणानें त्याच्या स्वदेशप्रेमास ऊत येऊन मार्गदर्शकांचा मान त्यांस मिळाला ह्मणून लो० टिळक योग्य त्याच वेळीं जन्मास आले. ह्यांत खरेपणा कोणत्या बाजूस आहे ? हें ठरविणें अनिर्णयात्मक आहे. मात्र, प्रत्येक गोष्ट योग्य त्याच काळीं होते ह्मणून

योग्य परिस्थिति

निर्माण झाल्याशिवाय तीं तीं कार्यें घडत नसतात. असें मानल्या खेरीज त्या मुद्द्यांचा समाधानकारक रीतीनें शेवट होणार नाहीं. तसेंच हेंहि विसरून चालणार नाहीं कीं उत्तम पुरुष व शुभ कार्यें कालाच्या कोणत्याहि भागांत अस्तित्वांत आलीं तरी तीं सुपरिणामकारक झाल्याशिवाय राहत नाहींत.

परिषदेविषयीं आज परिस्थिति हितकर नाहीं असें ह्मणणें ह्मणजे ती उद्यांवर ढकलणें होय व प्रत्येक दिवसास 'उद्यां' असतोच, तर परिषद भरविणें कोणत्या 'उद्यां' वर पडेल, हें परिषद आज नको ह्मणणारे सांगूं शकतील असें वाटत नाहीं ! तत्वतः परिषद पाहिजे ह्मणून सांगण्याचा त्यानीं प्रयत्न केला असला तरी 'उद्यां'च्या सबबीवर ती अस्तित्वांत येऊं नये असेंच अथवा

न करत्याचा वार शनिवार

अशा सारखेंच कांहीं तरी त्यांस वाटत असावें असें कोणाच्याहि स्पष्ट व प्रामाणिक बुद्धीस वाटेलच. आतां, परिस्थितीविषयीं ह्मणाल तर, एकादे वेळीं कितीहि चांगली परिस्थिति अनुकूल असली तथापि, तिजहून फार चांगली परिस्थिति यावयाची आहे अशा बाह्यत: व तत्वतः न्याय्य वाटणाऱ्या तार्किकपणानें हातचें सोडून पळत्याच्या मागें लागण्याचा उपद्व्याप करण्या सारखें हें कृत्य आहे कीं नाहीं हें ठरविणें वाचकांच्या समंजसतेवरच संपविलेलें बरें. कदाचित् कपिलाषष्ठी सारखी सुमुहुर्ताची परिस्थिति आली असली तरी ती साधून घेण्याच्या गडबडींत उडालेल्या धांदलीमुळेंच तिचा फायदा न मिळतां ती गुजरण्याचाहि संभव आहे ! ह्मणून परिषदेचें काम उद्यांवर न ढकलितां आजच सुरवात केल्यास योग्य ती परिस्थिति प्राप्त झाल्या वेळीं तरी निदान परिषद फलद्रूप होईल असें तिच्या प्रवर्तकांस व हितचिंतकांस वाटल्यास

अशक्य आशावादांत

शिरल्याचा टपका त्यांवर लागू होईल असें वाटत नाहीं. अशा प्रकारें परिषदेविषयीं भवति न भवति करणाऱ्या उभय पक्षांचा मतभेद नाहींसा होऊन, एका पक्षास आजच परिषदेचें काम सुरू झालेलें दिसेल व दुसऱ्या पक्षास योग्य परिस्थितींत परिषद यशस्वी झालेली पाहण्यास मिळेल. आणि एकाच बारांत दोन पक्षी मरतील.

आतांच परिषद भरवा, पुढारी दाखवा, पुढारी नाहीं तर परिषद नाहीं असें ह्मणणें ह्मणजे 'बाप दाखवा न पेक्षां श्राद्ध वाढा' असें ह्मणण्या प्रमाणेंच आहे. परिषद यशस्वी होण्यासाठीं खटपट करील तोच तिचा पुढारी होईल. सुदैवानें आमच्यांतील तरुण पिढी सुशिक्षित असून बुद्धिमानहि आहे. त्यांची दृष्टि परिषदेसारख्या सार्वजनिक हिताच्या बाबीकडे वळल्यास किती तरी

चतुर आणि कार्यक्षम

माणसांच्या कामगिरीचा फायदा परिषदेस मिळून अत्यंत स्पृहणीय राष्ट्र–हित–बुद्धि सर्वत्र दिसून येईल. ह्या तरुण पिढींतील काहीं व्यापारांत शिरलेले असोत, काहीं नोकरशाहींतील लहान मोठ्या हुद्द्यांवर विराजित झालेले असोत अथवा इतर कोणत्याहि पेशाचे असोत त्यांतील प्रत्येकास कोणत्या ना कोणत्या रीतीनें हिंदुपरिषदेस हातभार लावतां येण्यासारखा आहे. व असें झालें तरच ती सगळ्या हिंदूंची परिषद असें होऊन तिचा फायद्राहि सगळ्या हिंदूंस मिळेल. असल्या सार्वजनिक कार्यांत पडल्यापासून मनाचा एकलकोंडेपणा जाऊन अंगांत संचरणारा राष्ट्रीय उत्साह खासगी व सार्वजनिक कामांत कार्यक्षमता उत्पन्न करितो.

उदयोन्मुख परिषदेपासून एकदम मोठमोठ्या कार्यांची अपेक्षा करणें ठीक नसून, तीं पाहिल्याप्रथम पार्लमेंटास शक्य झालीं नाहींत कीं, राष्ट्रीय सभेस पार पाडतां आलीं नाहींत, सबब

सार्वजनिक कार्यांची आस्था

उत्पन्न करून ती वाढीस लावणारी संस्था अशा दृष्टीनेंच परिषद तूर्त पाहण्यास हरकत नाहीं व पुढें तिची योग्य जोपासना होऊन अपेक्षित कार्यें घडवून आणल्याशिवाय राहणार नाहीं. परिषदेच्या कामास सुरवात झाल्यावांचून उद्भवणाऱ्या भानगडी व त्या निवारण्याचे उपायहि सुचणार नाहींत. गोव्यांत मोठ्या प्रमाणावर आरंभिलेलीं सार्वजनिक कार्यें यशस्वी होत नसतात हा डाग पुसून टाकून, हिंदु तरुणाच्या राष्ट्रीय कर्तव्याची पारख पाहण्यासाठीं आतुर झालेली परिषद एकटीच काय ती त्यांच्यांत स्वाभिमान जागृत करणारी आहे.

प्रांतिक परिषद भरविण्यापूर्वी स्थानिक प्रयत्न करा ह्मणणाऱ्यांनीं असें पाहिलें पाहिजे कीं, भिन्न ठिकाणीं केलेल्या स्थानिक प्रयत्नाचें ध्येय निरनिराळें असून ऐक्यवर्धक होईलच असें ह्मणणें संभवनीय वाटत नाहीं. व एकाच गावांत स्थापन झालेल्या दोन समान संस्थापैकीं, एकाद्या संस्थेच्या मुळाशीं आवश्यक तितका उदात्त हेतु नसेल तर त्या संस्थांचें कार्य परस्परविरोधक होणें शक्यते बाहेरचें नाहीं. याकरितां स्थानिक प्रयत्नांस उत्तेजन देऊन त्यांत एकात्मता आणूं शकणारी संस्था ह्मटली ह्मणजे प्रांतिक परिषद होय. हेंच दुसऱ्या शब्दानीं सांगावयाचें झाल्यास, प्रांतिक परिषद ह्मणजे उदात्त हेतुमूलक व ऐक्यवर्धक स्थानिक प्रयत्न अस्तित्वांत आणण्यासाठीं झटणारी नमुनेदार संस्था होण्यासारखी आहे, असें ह्मणतां येईल. ह्मणून तिचा उपयोग एकाच गांवांत एका दर्जाच्या दोन संस्था उभारून पक्षभेद वाढविण्याकडे न होतां, गोव्यांतील सगळ्या गांवांस, हिंदुत्वाच्या उच्च भावनेखालीं एकत्र करण्याच्या कामीं तिचा फायदा मिळेल असें एकदां ध्वनित झाल्याबरोबर तिच्या विषयींच्या मत–वैचित्र्यास जागा राहणार नाहीं.

शेवटीं, वरील साधकबाधक प्रमाणाचा विचार करून, परिषद पाहिजे असें सगळ्या पत्रव्यवहार–लेखकांचे मतैक्य असल्यावरून व ती खरोखरच उपयुक्त आहे असें वाटत असल्यावरून तिच्या कामास लवकर सुरवात होणें इष्ट आहे. ह्याकरितां क्षुद्र मतभेद बाजूस ठेऊन 'अखिल हिंदु परिषद' हें नाव यथार्थ असल्याची खात्री सर्वांस पटण्याजोगे प्रयत्न गोमांतकीय हिंदूंकडून होतील अशी आशा प्रदर्शित करून वाचकांची रजा घेतों.

स्फुट विचार

शेतकी पतपेढ्याः— गेल्या दिवसांत कोंसेल्य दु गोव्हेर्नमध्यें चर्चा करण्यांत आलेल्या विषयांत 'शेतकीपतपेढ्या' स्थापन करणें हा एक होय. अज्ञान व गरीब शेतकऱ्यांस शेतीसाठीं सावकारांचें कर्ज घ्यावें लागतें व तें अप्रमाण व्याजामुळें दिवसें दिवस फुगत गेलें ह्मणजे त्या पायीं शेतकऱ्यांच्या साऱ्या उत्पन्नाचा चक्काचूर होऊन त्यांची दैन्यावस्था फार हृदयद्रावक होते, यासाठीं त्यांस सरकारकडून माफक व्याजानें पैसे देण्यांत येऊन त्यांस सावकार कर्जाच्या त्रासापासून मुक्त करावें असा या पतपेढ्या स्थापन करण्याचा स्तुत्य उद्देश आहे. सावकारी अवाढव्य कर्जास गरीब शेतकरी आपल्या अज्ञानामुळें बळी पडत असल्यामुळें ह्या पेढ्यांच्या स्थापनेनें अंशतः तरी त्यांची स्थिति सुधरेल यांत संशय नाहीं. ही योजना लवकर अंमलांत आल्यास खरोखर गरीब शेतकरी सरकारास दुवा देतील व रयत लोकांच्या सांपत्तिक स्थितीस बरीच मदत होईल असें आह्मांस वाटतें.

'शेतकी वसाहती':—नवीन काबिजादींतील बहुतेक भागांतील ओसाड जमिनी लागवडीस आणण्यासाठीं शेतकऱ्यांस तिकडे वसाहती करण्यांस लावण्याविषयींचा दुसराहि विषय सदरहु कोंसेल्यमध्यें निघाला. या वसाहतीसाठीं पूर्वी सरकारनें तीन मुख्य गोष्टींकडे लक्ष्य दिलें पाहिजे. शेतकऱ्यांच्या आरोग्यरक्षणासाठीं मलेरिया सारख्या रोगाचा प्रसार न होण्याकरितां उपाय योजणें शेतीस सहाय होण्यासाठीं ठिकठिकाणी रस्ते बांधणें व त्यांच्या पिकांची नाशाडी न होण्यासाठीं हिंस्र पशूंपासून व चोरधाडी पासून त्यांचा बचाव करणें. ह्या तीन मुख्य गोष्टी साध्य झाल्यास वसाहतवाल्या शेतकऱ्यांस दिलेल्या सवलतींचा उपयोग योग्य प्रकारें होईल हें उघड आहे.

वर्गणीची पोंच

श्री. कृष्ण लक्ष्मण नगर्सेकर,	काणकोण	३ रु.
,, पांडुरंग कृष्ण गायतोंडे,	,,	१ रु.८ आ.
,, शांबा सूर्याजी नगर्सेकर	,,	३ रु.
,, मांगाजी मर्तू नगर्सेकर	,,	३ रु.
,, विश्वनाथ प्र. चोडणेंकर	,,	३ रु.
,, पंढरीनाथ शे. कुडचडकर	,,	३ रु.
,, रघुनाथ गोविंद प्रभू	,,	३ रु.
,, पुंडलीक घ. राजाध्यक्ष,	तळपण	३ रु.
,, वामन हरि पै,	पाटणें	३ रु.
,, कृष्ण गोविंद बाळे,	साडोळशें	३ रु.
,, वासुदेव लक्ष्मण राजाध्यक्ष,	काणकोण	३ रु.
Sr. Francisco A. Rodrigues	Canacona	2 rp. 4 tgs.
Dr. Lourenço Gomes	Canacona	12 tgs.

ANNO V.—NUMERO 27—1920 QUEPEM, QUINTA-FEIRA 30 DE SETEMBRO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas

INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA.............. 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios

Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—**Bharat**

भारत

BHARAT

SEMANARIO

Tipografia **Pundolica**—Quepem

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर

गोव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००

जाहिरातींचे दर

मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें—गुरुवार, तारीख ३० माहे सप्टेंबर सन १९२० अंक २७ वा

Ainda o tilakismo

Comentarios de acepções variadas originou-os o emprego, de resto, bem intecionado do neologismo do nosso *made-tilakismo*.

Se uns o reputam absolutamente dispensavel para o meio politico em que vivemos, meio diverso daquele em que pelas suas excepcionais qualidades se distinguiu o ora endeusado patriota, do ilustre nome do qual proveiu o sensacional vocabulo, outros acham-no ... *infeliz*.

Como quere que seja, a verdade, porem, è que lançamos a mesma palavra no tablado politico para despertar no pacato povo, essa *eterna criança* que no nosso paiz apodrece numa paz *nirvanica*, refractario ao movimento civico e moralisador que tem deixado em continua e crescente vibração a *alma patriotica* do visinho territorio britanico, como iamos dizendo, para dispertar no nosso povo o sentimento da ... *revolta*.

Sim, senhores. A franquesa e lealdade impelem-nos ao terreno da confissão da verdade e esta consiste, pura e simplismente no que acabamos de dizer: empregamos a palavra *tilakismo* na acepção da *revolta*.

Mas estamos vendo que os leitores republicanos e fieis ao glorioso Portugal estão já prestes a alcunhar-nos de *revolucionarios* e *inimigos abominaveis* da *ditosa Patria tão amada* e solicitar dos poderes competentes o nosso *engalfinhamento*, como bandidos da pior fauna politica pelo atrevimento do *abuso* da liberdade de expressão.

Não se inquietem que a acepção do sentimento da *revolta* que quizemos acordar com o *imprestavel* e *infeliz tilakismo* circunscreve-se *apenas* ao significado de *maravilhoso elixir* contra o afrouxamento, descrito no nosso artigo explicativo sobre o *tilakismo* do antepenultimo numero.

¿Revolta contra a Republica ou contra Portugal a que estamos indissoluvelmente ligados pelas gloriosas tradições?-

Nunca! Fique isto bem assente para que ninguem pense, nem mesmo no sonho, em deturpar a pureza dos nossos intuitos que nunca são capazes de ultrapassar a *orbita* do sistema politico que felizmente nos governa e ao qual temos mostrado, por *actos* e *factos* -e sempre-fieis e dedicados *ab imo pectore*.

JURISPRUDENCIA ADMINISTRATIVA

Ainda mais.

Modernamente a Inglaterra e a França tem adoptado a orientação da vetusta Roma, convidando ás mais elevadas dignidades e aos mais importantes cargos os *homens de leis*, cônscios da influencia proveitosa das luzes scientificas dessas entidades nos aposentos burocraticos.

Alphonse Esquire, Bellot, Duvergier, Fournel, Dupin e outros abalisados scientistas espolinam os milhores encómios aos que se consagram a estudos da jurisprudencia, e a exercitam com a consiencia e correção de uns verdadeiros apostolos, de incondicionais obreiros do Bem!

O passado, o presente e o futuro representam a panoplia daqueles estudos. Pois o jurista estuda o *direito constituido* e procura aplica-lo consoante os ditames da mais genuina hermeneutica; aconselha os poderes públicos para fazerem a sua aplicação exata e perfeita; orienta-os, sobretudo, para a sua emenda, para a sua modificação, para a sua reforma radical, ou para a sua abolição, segundo as circunstancias locais, ou de harmonia com as necessidades dos povos: no que resume o *direito constituendo*,-não arremedando esses queixotescos filosofos que eructam azias hegelinas, nem quejandos rábulas que polvilham a ambula dos perfumes com o vinagrinho que lhe espirita o cérebro.!

Daqui se vê quão vantajosa é a acção do jurisperito na marcha do progresso social e politico da nação. Mereciam, porisso, as atenções dos governantes.

Já hoje ninguem pensa, como D. Pedro I, de Portugal, devaneava, -" em *proscrever os advogados* da sua corte por causarem contendas e demandas " (Vide Mariz, " Dialogos" III, cap. 5°, e Fernão Lopes, " Cronica de D. Pedro I"). Antes, pelo contrario, o sabio José Silvestre Ribeiro, no seu bem elaborado relatorio que precede ao Decr. de 17 de fev. de 1858 (publ. na"Rev. de Dir. Adm." por Preto Pacheco, an. VII, n.° 122, pg. 14), atesta que, em todas as epocas, a classe dos advogados" *foi honrada* com o respeito e consideração dos povos. "

Nós que em tudo imitamos França, cujo codigo civil, de bitola napoleonica, serviu de manancial para a confecção do nosso, e aonde foram beber os milhores elementos evolutivos da sciencia juridica quase todas as nações da Europa e America (Cfr. Bigot -Préamenen, "Expos. de Motifs" tom. IV, pg. 45 e Hauteville, " La Defin. du Droit," cap. IV, pg. 225),-bem podiamos, se não deviamos, seguir os exemplos daquela nação lampejada pelas tochas da mais esmerilhada civilisação no treino da nossa administração pública.

A este proposito, no logar oportuno, havemos de comprovar que se malograram vários preceitos sensatos, consignados na *Carta Organica*, ou antes se adulterou a sua aplicação, mercê duma errónea orientação, ou errada interpretação oficialmente adoptada!

+ × +

A missão do jurista não è menos sublime do que a do jornalista. A sua tarefa laboriosa e disinteressada, é coroada de um exito alourado, que é o apanagio das boas acções. E' sempre doce, è agradavel o cumprimento do dever. E' uma virtude que não ficará dispremiada no dizer de um sabio (Baccio, "Da Consol. da Filosofia ", liv. IV).

O jurisconsulto acompanha a evolução social, esteiando -se na historia que, como entende Cesar Cantu, é a mestra da vida. A sua critica é de maximo proveito em quanto esclarece a certeza *com as luzes da sciencia* (Alves de Souza, " Filosof. Elem. "§38). E o insigne jurisconsulto Silva Ferrão, na sua introducção ao *Dic. Elem. Remis. ao C. C.*, pg. 33, já observava:-" E' preciso detestar o erro" ..."

Há bastos exemplos de obtervações e até de criticas energicas cascadas por parte de jurisperitos sobre os negocios publicos, no intuito de se modificar a orientação pouca acertada, relativamente á aplicação errada das leis que regem um Estado, sem que esse gesto de censura scientifica vá beliscar as suscetibilidades, ou abespinhar os melindres, das entidades empavezadas no cocuruto do Poder.

Não.

Porque, acima de tudo, está o dever, a paz publica, os interesses do Estado, a felicidade geral!

Citaremos, para mera amostra, sómente estes massiços conceitos com os quais o aludido catedratico de Salamanca abre, com seguridade e intrepidez, a ulcera que afistulava o governo do seu paiz, deixando escorrer o putrido esqualor que lhe fermentava adentro...

Pois, logo ao iniciar do prologo das suas *Lic. de Dir. Publico*, lê-se:

" O ultimo governo da Hespanha estava *em contradição* não somente com a opinião geral do mundo civilisado, com a conduta politica de todos os outros governos da Europa, e com o bem da nação hespanhola, digna de milhor sorte, mas com os principios mais palpaveis do *senso comum*......

Assim, ambos -o jornalista e o jurista - palmilham pela mesma senda abrolhosa e aspera, para atingirem o mesmo fim:-a prosperidade social e politica, servindo-se do mesmo porta-voz:-a Imprensa!

Mas, isto demanda *estudo* aturado.

ज्यांस पगार भरपूर सोडाच, पण भूक निवारणापुर्ते सुद्धां खाण्यांस वेळेवर मिळत नाहीं अशा सरकारी खात्यांतील–विशेषेंकरून टेलिग्राफ–पोस्ताल व आदमिनिस्त्रासांव दे मात यांतील प्रातिकांत व ग्वार्द फ्लोरेस्ताल प्रभृतीनीं मात्र फ्रान्सच्या मिलेरंड प्रधानानें फ्रान्सच्या पार्लमेन्टांत ह्मटलेल्याचा अनुवाद करून आमच्या येथील दियारियु दे नोइत पत्रानें सुचविल्या प्रमाणें,–थोडें खावें व थोडा खर्च करावा; पण पगाराच्या वाढीच्या मागणीची गोष्ट काढूं नये! सदर मिलेरंडचा उपदेश या बापड्या गरीब नोकरांस केला तर कदाचित् चालेल व शोभेल; कारण ते पूर्वीपासून थोडें खाऊन व खर्चून आलेले; त्यांस वरिष्टां प्रमाणें मोठें पोट व मोठें कुटुंब नाहीं. बाकी ज्यांस भरपूर पगार असून, जे चैनींत दिवस घालवितात, त्यांस तो पगार थोडा होऊन, आणखी आपल्या पगारांत वाढ (aumento) मागतात व देतात. अशांस मिलेरंडचा उपदेश व दियारिय दे नोइतची सूचना लागू नाहीं; व त्यांच्याकडे कोणी ढुंकूनसुद्धा पहात नाहीं?

सि. मिनेज ब्रागांस ह्मणतात, त्याप्रमाणें गरजे प्रमाणं कोन्सिलनें निर्माण केलेल्या दरमहा १५ रु- प्रमाणें वर्षाचे १५० रुपये पगार ठरविलेल्या नोकरांच्या जागा प्रधान पास करित नाहींत, तर महिन्याच्याकाठीं १५० रुपये असलेल्या आवदीतोरींतील नोकरांच्या जागा, कोन्सिलची संमती नसतां निर्माण व पास [aprovado] करण्यांत येतात! ह्मणजे रबराच्या लवचिकपणा प्रमाणें [Elasticidade] आमची सनद असल्यानें ती पाहिजे तेव्हां रबराप्रमाणें थोर होते व नको तेव्हां लहान होते. खरें आहे.

वेळेवर पगार नसलेल्यांनीं न खातां पितां मा-बाप सरकारची सिर्व्हीस [कामें] करावी व वेळवार तो मिळणाऱ्यांनीं खाऊन पिऊन हुरश करून, त्यांच्या कडून पाहिजे तशी-सरकारी [किंवा खासगी सुद्धा] सिर्व्हीस करून घ्यावी!

भरपूर पगार नसणें व तोहि वेळेवर न मिळणें, पण दिवसभर कामकाज करणें, अशा नोकरांनीं चोरून मारून खाऊं नये – उपाशीं रहावें किंवा झाडपाला खावा. व कदाचित् चोरून खाल्यास दंडास पात्र व्हावें आणि तेंच चोरकृत्य पोळीवर खमंग तूप ओढणाऱ्यांनीं केल्यास, ती चोरी नसून, गुन्हा माफ!

पण आमच्यांत तरी जिवनकलहामुळें, महात्मागांधीच्या असहकारिता तत्वाचा परिणाम होतो आहे कोठें?

तितकी आमच्यांत प्रतिकार शक्ति (for ça de resistencia] अजून उत्पन्न झाली नाहीं! आणि ह्मणूनच वरील स्थिति भोगणें प्राप्त!

जागेवरून काढिलेला [exonerado] गोरा वरिष्ट अंमलदार, जागेवरून उठतच नाहीं; पण जागेवर असलेला नेटीव [काळा] अंमलदार कदाचित् न काढितां, जागेवरून बळेंच उठविण्यांत[suspenso]येतो.

या वरून आमची स्थिती बरी नाहीं आह्मी दिवसें दिवस अधोगतीप्रत चाललों आहों. "बुडत्याचा पाय खोलांत" ह्मणतात, त्याप्रमाणें आमची शोचनीय अवस्था आहे. त्यांतून आह्मी केव्हां वर येऊं तें एक ईश्वरच जाणे.

यस. एच्.

भारत

गुरुवार भाद्रपद व. ३ या. १८४२

असहकारिता !

पारतंत्र्यांत रुतलेल्या हिंदुस्थानास आपली स्थिति सुधारून स्वतंत्रतेच्या उच्च व शुद्ध वातावरणांत अप्रतिहत विहरण्यास महात्मा गांधी सारख्या मांत्रिकांनी 'असहकारिते'चा तेजस्वी मंत्र सतत जपण्याविषयीं उपदेशिलें आहें. या मंत्रसामर्थ्यानें मृत्युपंथास लागलेल्या पुष्कळ राष्ट्रांस आराम पडून तीं आज सौख्यामृताचे घुटके घेत आनंदानें दिवस घालवीत आहेत हें त्यानीं सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे. ह्या मंत्राची उपयुक्तता सर्वस्थळीं व सर्वकाळीं खास्खीच असून ज्या ज्या दुसाध्य रोगांवर त्याचा उपयोग करण्यांत येईल ते ते रोग हटकून हटतील हें त्रिकालाबाधित सत्य आतां तर सर्व विश्रुत झालेंच आहे.

इंग्रजी हिंदुस्थानांतील आमच्या देशबंधूंनी वरील मंत्राचा अवलंब आपली राजकीय स्थिति सुधारण्याकडे केला आहे. सुदैवानें आमच्या या गोमांतकांतील पोर्तुगीज नागरिकांची राजकीय परिस्थिति फार चांगली आहे असा बहुतेकांचा ग्रह झाला असल्यानें आमच्या सामाजिक व्यथांवर या रामबाण औषधाची योजना केल्यास त्या पीडांचा समूळ नायनाट होऊन व अशानें आमच्या समाजास जोम व प्रफुल्लता येऊन तो ताजातवाना व कर्तव्यदक्ष होईल आणि आपलें योग्य स्थान पटकावण्यास सहज शक्य होईल.

आमच्या समाजास रुग्णावस्थेंत लोळवणारे हे कोणते रोग आहेत असें पाहूं गेल्यास आळस, सुरापान व जुगार इ० दुर्व्यसनें होत हें कोणासहि कळून चुकलेंच असेल. या अपमानकारक व सांपत्तिक व शारीरिक ऱ्हासांस कारणीभूत दुर्गुणांवर जर 'असहकारीतेच्या' तत्वाचा अवलंब करूं तर उद्योग तत्परता व इतर सद्गुण यांचा विजय होऊन आमचा समाज सौख्य सागरांत या बाबतींत तरी चिरकाल निमग्न राहील ह्यांत संशय नाहीं. हा असहकारितेचा मंत्र, सर्वांस सुसाध्य आहे. त्यासाठीं पैशाअडक्याची बिलकूल गरज नाहीं. मात्र दृढनिश्चय ह्या एकाच 'पंचाक्षरी' शब्दाचा आश्रय धरिला पाहिजे. या शब्दाचा महिमा तुकोबारायासारख्या साधुपुरुषानीं आपल्या प्रेमपूर्ण व रसाळ वाणीनें 'निश्चयाचें बळ! तुकां ह्मणे तेंचि फळ' असा वर्णिला आहे या साठीं, आमच्या गोमांतकस्थ बंधूंनीं उपरोक्त बाबतींत 'असहकारितेचा' स्वीकार करून आपणास धन्य ह्मणवून घेण्याचें पुण्य संपादावें कशी त्यांस आमची प्रेमाची विनंति आहे.

--आमचे प्रांतबंधु श्री. भालचंद्र का० शिरवैकर व शंकर रा. नाडकर्णी हे उच्च प्रतीचें शिक्षण संपादण्यासाठीं पोर्तुगालास रवाना झाल्याचें वर्तमान कळविण्यास आनंद वाटतो. उभयतांचा प्रवास सुखकर होऊन त्यांस शिक्षणात यश प्राप्ति होवो असें इच्छितों.

स्फुट विचार

मराठी भाषाः— मराठीसंबंधीं लोकमत आह्मीं आजपर्यंत अनेकदां आमच्या वाचकांस व सरकारास सादर करण्याची संधि दवडलेली नाहीं. त्यावरून त्याचा कल कोणत्या दिशेकडे वाहत आहे, हें जास्त विशद करून सांगण्याची आवश्यकता नाहीं-तरीहि पण निर्भेळ मराठी शाळांच्या जरूरी विषयीं अजून कोणाचें मन साशंक असल्यास त्यानें ह्यापर्शेच्या हिंदूंकडून गव्हर्नरसाहेबांस पाठवण्यांत गेलेल्या 'मराठी' ठरावाचें मनन करावें अशी आमची आग्रहाची सूचना आहे.

तो ठराव हाः-- "ही बारदेश प्रांतीय हिंदुसभा असा ठराव पुढें आणते कीं, गोव्यांत पोर्तुगेज सत्ता स्थापित होऊन आज चारशेंवर वर्षें झालीं. आणि गोव्यांच्या प्रजेंत हिंदूंची संख्या अर्ध्याहून अधिक असून त्यांची मातृभाषा मराठी आहे. पण सरकारानें या चार शतकांच्या दीर्घ अवधींत देखील त्यांच्या मातृभाषा शिक्षणाची सोय मुळींच केली नाहीं, हें प्रजावत्सल सरकाराला योग्य नव्हे. आमची जन्मभाषा जरी कोंकणी ह्मणण्यांत येते तरी लेखनवाचनाची व आमच्या पूर्वजांच्या संस्कृतीची भाषा मराठी आहे. एवढ्या महाराष्ट्राचीं भाषा ह्मणजे सामान्य नाहीं; आज हिंदुस्थानच्या देशीभाषांत बंगाली वगळली तर मराठीची बरोबरी करणारी दुसरी भाषा नाहीं. मराठीच वाङ्मय भांडार प्रचंड असून त्यांतील आर्यसंस्कृतीस सोडून जोंपर्यंत आह्मीं अलग राहिलों नाहीं व राहण्याची आमची इच्छाहि नाहीं तोंपर्यंत मराठी भाषेच्याचद्वारें आह्मीं इतर भाषांचें शिक्षण संपादणें हितकर आहे.आमच्या राजभाषेंत आह्मांला प्राविण्य मिळविलें पाहिजे तर ज्यावेळीं मराठी भाषेच्या द्वारें आह्मांला पोर्तुगेज शिक्षण उपलब्ध होईल त्याचवेळीं आमची पोर्तुगेज भाषेंत प्रगति होऊन आह्मीं गोव्यांतील हिंदुजनता पुढें पाऊल टांकूं. कोंकणी भाषा ही मुळीं भाषाच नव्हे. इला लिपी व व्याकरण नहीं. साऱ्या कोंकणपट्टींत हिच्या निरनिराळ्या तऱ्हा व वेगवेगळे प्रकार दृष्टोत्पत्तीस येतात. खुद्द गोव्यांतच हिचे प्रकार व शब्द वेगवेगळे आहेत. बारदेश आणि सासष्टी प्रांत ह्यांत कितीं तरी फरक, इतकेंच नव्हे तर आह्मीं हिंदूलोक कोंकणींत बोलूं लागलों तर आमच्या ख्रिश्चन बंधूंस समजत नाहीं.व ख्रिश्चन प्रोफेसर कोकणींतून पोर्तुगेज भाषेचा अर्थ आमच्या मुलांस समजावूं लागले तर त्यांस तो समजतसुद्धां नाहीं, असा प्रकार नेहमी दृष्टोत्पत्तीस येतो. मातृभाषेंतून इतर भाषांचें शिक्षण जसें दोषक होतें तसें तें अन्य भाषेंतून कितीहीं चांगल्यां तऱ्हेनें दिलें तरी फायदेशीर होत नाहीं, याचें प्रत्यंतर इकडून इंग्रजीहिंदुस्थानांत गेलेल्या आमच्या हिंदुबांधवांचेंच होय. सुप्रसिद्ध डॉ. भाऊदाजी डॉ. अनंत चंद्रोबा न्यायमूर्ती तेलंग हे गोमंतकस्थच नव्हें काय ? हा अनुभव इंग्रजी हिंदुस्थानांत प्रजा व सरकार या उभयतांसही पूर्णपणें पटलेला आहे. तेथील उनिवेर्सिदादींत देखील उच्च शिक्षण देशीभाषांतून दिलें जातें. तसेंच आतां सुधारलेल्या काउन्सिलांत सुद्धां देशी भाषांचा प्रवेश होणार. तेव्हां आमच्या परम न्यायी व दयाळू सरकारापाशीं या सभेच्या द्वारें आह्मां हिंदुप्रजाजनाची नम्रतापूर्वक अशी विनंति आहे कीं, ह्या आपल्या अर्ध्या अधिक हिंदुप्रजेच्या अत्यंत आवश्यक उन्नतीच्या मार्गास प्रोत्साहन देऊन मराठी प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराचें सरकारानें श्रेय घ्यावें.'

घि गोवा हिंदु आसोसिएशनः— मुंबईंत स्थापन झालेल्या या वजनदार व नामांकित संस्थेनेंहि जवळ जवळ वरील प्रकारचाच ठराव पास करून, मराठीविषयींचें आपलें अनुकूल मत आमच्या सरकारासमोर मांडण्याचें स्वदेशहितवर्धक कर्तव्य योग्य रीतीनें पार पाडल्याचें कळविण्यास आह्मांस फार आनंद व अभिमान वाटतो. मराठी, व मराठी न येणाऱ्या लोकांच्या मताधिकाराची गळचेपी या दोन्हीं महत्वाच्या विषयांसंबंधानें घि गोवा हिंदु असोसिएशननेंगोवा सरकारला पाठविलेल्या इंग्रजी ठरावांचें मराठी भाषांतर येत्या अंकांत देणार आहों. त्यांवरून उपरिनिर्दिष्ट संस्थेचें स्वदेशावरील अप्रतिम प्रेम वाचकांस दिसून येईलच.

सरकारी निर्णयः— पण सरकारनें स्थानिक पार्लमेंटच्या अनुमोदनानें पुढें दर्शविल्याप्रमाणें मराठी शिक्षणाचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहेः-- पेडणें, सांखळी, फोंडें, सत्तरी, सांगें, केंपें व काणकोण किंवा नवीन काबिजादींतील कोणत्याहि तालुक्यांत जेथें हिंदु लोकवस्तीचें प्रमाण जास्त असेल तेथें सरकारी मराठी शाळा स्थापण्यांत येऊन त्यांत सात इयंतापर्यंत शिक्षण असावें. पैकीं पहिल्या चार इयता निवळ मराठीच्याच असून शेवटच्या तीन पोर्तुगीज व मराठी अशा मिश्र शिक्षणाच्या असाव्या. प्रत्येक शाळेला एक शिक्षक असून, मुलांची संख्या ५० वर गेल्यास त्याला एक मदतगार नेमण्यात येईल.प्रस्तुत शाळांचा शिक्षक केवळ येथील नोर्मालचा कोर्स व लिसेव सेंत्रालांतील मराठी परीक्षेचा दाखला असलेल्यानांच होतां येऊन ज्या शाळेंत विसांहून कमी मुलें आढळून येतील ती बंद केली जाईल. या शाळांसंबंधीं निराळी घटना होणार असून तिचा अम्मल इतर खासगी शाळांवरहि चालणार आहे ! मराठीस दिलेला हा आश्रय कमी ह्मणूनच कीं काय नकळे नोर्माल स्कूल व कोमेर्सियाल इंस्तितुतच्या शाळांतील मुलांस पाठशाळेंतील प्रोफेसरांकडून मराठी शिक्षण दिलें जाईल, असें ठरविलें आहे! काय, आहे कीं नाहीं 'मजा'.?

वर्तमानसार

— मुंबई येथें गेल्या २६ तारखेस आमचे संपादक श्री. हेगडे देसाई यांचें 'संघशक्ति' या विषयावर व्याख्यान झालें.

—मडकई, फोंडें येथील श्री सरस्वती वाचनमंदिरांत श्री. अनंत जि. कामत यांच्या अध्यक्षते खालीं जंगी सभा भरून तींत प्रो. भणें श्री. नारायण बा. कामत, भिकू य. कामत, वामन व्यं. कामत, रा. ल. नेत्रेंकर इत्यादि गृहस्थांचीं हिंद परिषदेच्या आवश्यकते संबंधानें अत्यंत जोरदार भाषणें झालीं असें तेथील एकभारतमित्र कळवितात.

भारत डिफेन्सफंड

श्री. विश्वकुमार	५ रु.
बाबलू व्यं. पडियार, शिरवडें	१ रु.
देऊ नाईक, ,,	८ आ.
जयवंत प्र. सरदेसाई, कुंभारजुवें	१ रु.

Ano V.—Numero 28 —1920 | Quepem, Quinta-feira 7 de Outubro

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
India Portuguesa...... 3-00-00
India Inglesa............ 3-08-00
Numero Avulso.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—**Bharat**

भारत
BHARAT
SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया........... ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणें. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. | केपें-गुरुवार, तारीख ७ माहे अक्टोबर सन १९२० | अंक २८ वा.

Em pratos limpos...

O sr. Menezes Bragança, ilustre director do *Debate*, no seu lindo artigo *Em boa paz* declarando-se contra tudo quanto n'esta nossa piquenina terra represente um factor de disassociação a dispersar e fragmentar este agregado social diz que não é *sem pena* que vê o movimento que na classe hindù, desde ha pouco, se está esboçando, porque, opina ele, esse movimento tem todos os visos de tender á formação de um grupo á parte, como que a quererem separar-se ainda mais da fracção cristã.

O sr. Menezes Bragança ocupa um logar de invulgar destaque entre os jornalistas e homens publicos d'esta nossa pequenina terra. E' um dos poucos que sabem escrever com correcção, com graça e com elegancia a formosa lingua de Camões. A sua cultura solida e selecta, o seu profundo conhecimento dos negócios publicos, o seu criterio desempoeirado, as suas vistas largas e o seu patriotismo impõe-no ao respeito e a consideração de todos. N'uma palavra, o director do *Debate* è uma das poucas notabilidades da nossa terra.

O artigo a que nos referimos é indubitavelmente magistral, como o são todos os que a sua brilhante pena produz. A epigrafe é dôce e sugestiva e as sensatas considerações que borda são dignas de serem meditadas pelo elemento ilustrado e pensante do paiz. Nessas linhas escritas sem duvida, com a milhor das intenções, retrata-se nitida a sua alma de verdadeiro patriota que anela a harmonia, a concordia, a confraternisação intima de todas as classes que constituem o povo indò-portuguez para que do esforço conjugado de todos advenha para esta nossa terra um futuro largo e risonho.

Simplismente, o movimento da classe hindu tendente a se separar da fracção cristã e que arrancou á pena do ilustre director do *Debate* aquele excelente artigo não pertence ao gremio das cousas riaes.

¿Qual è esse movimento da classe hindu que tende a cavar abismo entre ela e a comunidade cristã e que porisso vē com pena?

A classe hindu, oprimida e vexada, desprezada e vilipendiada durante seculos do regime monarquico jazeu n'um vesanico letargo, n'uma estagnação nirvanica, sofrendo com resignação, com santa paciencia os ultrajes á sua religião as ofensas dos seus direitos e os insultos á sua dignidade.

Caiu a Monarquia com o peso de seus erros, abusos e imoralidades e sobre os seus escombros se erigiu o sumptuoso edificio daRepublica.Onovo regime trouxe a igualdade politica e civil de cidadãos sem distincção de classes e credo. Cessaram as odïosas distinções que se faziam entre cristãos e hindus,baseadas principalmente na diferença de religiões. E os hindus viram com intima satisfação dissipar de vez para sempre as negras nuvens de que se achava toldado o seu orisonte politico e social.

Assim, pois, com o feliz advento do novo regime removeram-se as peias que d'antes entravavam o avanço dos hindus e então eles iniciaram com intusiasmo e ardor o movimento conducente á regeneração politica e social, estabelecendo escolas e colegios, bibliotecas e gabinetes de leitura,fundando jornais e institutos, promovendo conferencias e sessões literarias e interessando-se pelos negocios publicos.

Esse movimento vai-se generalisando paulatinamente e tornando-se cada vez mais intenso. Mercê desse movimento, a classe hindu vai sofrendo uma notavel transformação dos seus *leaders* e orientadores, acalentam a sólida esperança de que não tardará muito que ela logre ocupar o logar a que tem jùs na politica do paiz para de mãos dadas com a comunidade cristã promover o progresso da sua terra natal.

E' esse o moviemnto que o sr. Menezes Bragança vê com pena?

Patriota ardente, esse movimento só lhe deve merecer simpatia e apoio como o tem merecido a muitos dos nossos irmãos cristãos que o saudam com sincero intusiasmo porque n'ele veem os simptomas do ressurgimento d'esta nossa entranhada terra.

E não podemos admitir que o ilustre director do *Debate* n'aquele seu artigo se tenha referido a esse movimento porque vai para vinte anos que este se iniciou e o sr. Menezes Bragança è só agora que soltou o seu grito de alarme, aconselhando os hindus a mudarem do rumo errado (?!) e frisando a instante necessidade da confraternisação das duas comunidades: cristã e hindu.

Qual è, então, o movimento que desde há pouco se está esboçando na classe hindu e em que o sr. Menezes Bragança lobrigou tendencias separatistas?

Ainda não há muito, a classe hindu agitou-se por causa do ensino marata. Circulou por todos os cantos e recantos da provincia a noticia de que no projecto da reorganisação do ensino publico elaborado pelo sr. Governador Geral e prestes a ser discutido no Conselho do Governo não continha providencias tendentes á solução satisfatoria do problema do ensino marata. Dolorosamente supreendida por essa noticia, a classe hindu reuniu-se em comicios e dirigiu mensagens telegraficas e repaesentações ao ilustre Chefe da Provincia solicitando a merecida protecção oficial á lingua marata.

Teria sido mobil do artigo *Em boa paz* essa agitação da classe hindu?

Quer-nos parecer que não. Esse movimento foi absolutamente inofensivo. Não è ele tendente a prejudicar os interesses da classe cristã, antes pelo contrario. Os hindus não podem de forma alguma abandonar a lingua marata, a sua lingua materna. Tanto o instincto natural como o conjuncto de circunstancias poderosas demandam a difusão do ensino marata no seio da classe hindu.

E os hindus constituindo 50% da população da India Portuguèza, julgou-se no direito de reclamar do Governo o fomento d'essa lingua e esperam confiadamente que o nobre Chefe da Provincia e o Exmo. Conselho do Governo saberão resolver o assumpto consoante as necessidades do povo hindu e os recursos financeiros do Estado.

Vamos adiante.

Fez, ha pouco, giro da imprensa do paiz a noticia de que a classe hindu projectava a fundação d'um Congresso ou Conferencia.

Teria esta noticia levado ao espirito do sr. Menezes Bragança a convicção ou pelo menos a suspeita de que os hindus pretendiam separar-se policicamente de seus irmãos cristãos?

Efetivamente os hindus pensam hoje na fudação d'uma Conferencia privativa da sua classe.

Quem estas linhas escreve è um dos que tem assumido a iniciativa d'esse movimento. Mas diga-se, em homenagem à verdade, que a projetada Conferencia tem por fim o levantamento do nivel intelectual e moral e o progredimento social da classe. Essa conferencia visa a conglobar em um foco as energias despersas dos diferentes elementos de que a classe hindu se compõe, encaminhando-as para o bem do Paiz. Há um grande numero de assumptos e problemas complexos que afectam os inseresses tão só da classe hindu e que não podendo ser ventilados no Congresso Provincial requerem impreterivelmente a inauguração d'uma conferencia privativa da classe. Há diversos males de que se enferma a classe hindu e a Conferencia pretende levar-lhes re-

भारत

गुरुवार भाद्रपद व. १० मी. १८४२

हिंदु--खिस्ती--ऐक्य

गोमांतकस्थ हिंदु, खिस्ती लोकांपासून दूर राहतात व राजकारण किंवा सामाजिक सुधारणा यांच्या होऊं शकणाऱ्या व्यवस्थित प्रगतीस आपल्या धर्मजन्य असहकारितेमुळें अडथळा करितात अशा बद्दलचें रडगाणें गाऊन आपलें सगळें काय तें हिंदूंच्या कारणानें अडून राहिलें आहे असें सांगण्यांस त्यांस धन्यता वाटत होती. येथपर्यंत त्यांच्या दृष्टीनें सर्व कांहीं ठीक चालत होतें. इतक्यांत कालांतराबरोबर सहजासहजीं राज्यव्यवस्थेंत फेरफार होऊन रिपब्लिकन स्वातंत्र्य अवतीर्ण झाल्यावेळीं, एकजुटीनें व परस्पर सहायानें खिस्ती लोकांबरोबर राजकीय क्षेत्रांत हिंदु पुढें सरण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं न लागलीं तोंच ख्रिस्ती लोकांच्या पोटांत असूयेच्या ज्वाळा भडकून वेळीं अवेळीं तिची दाहकता त्यांच्या तोंडांतून निघत असल्याचें प्रत्यहीं दिसतेंच आहे. वास्तविक वरील दोन प्रकारच्या वागणुका हिंदूंशीं ठेवण्यांत खिस्ती लोकांचा मतलब कोणता आहे हें कोणीतरी सांगेलच; तथापि त्यांत खरा तथ्यांश किती आहे हें पाहूं.

अगोदरपासून हिंदु समाजापासून खिस्ती वेगळे करण्याच्या कामीं इंकिजिसावांत दिसून आलेली भीषण क्रूरता व नंतर निराळा झालेल्या समाजानें उचललेल्या अंतर्बाह्य चालीरीति हीं स्वयंसिद्ध कारणेंच दोनहि समाजांची तोंडें दोन दिशांस वळविण्यांस पुरेशीं झालीं. व हिंदुसमाजाचें तोंड पूर्वेकडे अखिल भारताकडे वळलें व खिस्ती जनतेचें तोंड पश्चिमेकडे अर्थात युरोपियन आचारविचारांकडे वळलें. तोंडें परस्पर विरुद्ध दिशांस गेल्यानंतर एकाची पाठ दुसऱ्याच्या पाठीकडे वळून छत्तीसांचा आंकडा तयार झाला. अशा स्थितींत सामाजिक सुधारणा करण्यांस प्रत्येक समाजास कोणी आडकाठी केली असें वाटत नाहीं. व राजकीय बाबतींत तर खिस्ती लोकांचा बराच फायदा झाला. खुद्द मोनार्कींत देखील हिंदु व हिंदुधर्म यांवर इतकी करडी नजर होती कीं, त्यांचें प्रत्यक्ष नांव न उच्चारतां "जेंतियु" व "जेतिलीस्मु" (हलके लोक व हलका धर्म) या नावांनीं त्यांस संबोधित असून इकडे गोव्यांत सुद्धां हिंदूंचा धार्मिक बाबतींत अपमान करण्याची संधि दवडली जात नसे. पोर्तुगीज शाळांचे शिक्षक होण्यास हिंदु नालायक होत अशी हिंदुत्वाची हेटाळणी होत असतानां केवळ धाडस करून बाशारेल होण्यासाठीं पोर्तुगालास जाण्याचा कोणी हिंदु तरुण हिय्या करिता तर त्यास लायक अशी जागा मिळती काय? ह्या प्रश्नाचें उत्तर नकारार्थी दिल्यास अस्तंगत मोनार्कींतील प्रखर खिस्ती लोकांवर टपका दिल्यासारखें होईल. पण तें ऐतिहासिक सत्य आहे. धर्मासारख्या परपीडारहित गोष्टींत प्रोफेसर न होण्यासंबंधीं जर एवढा कटाक्ष तर बाशारेल होऊन योग्य ती जागा पटकावल्यास प्रत्यक्ष पोर्तुगीज न्यायदेवतेचा अपमान होऊन राजकीय वातावरण विषारी झाल्याचें सिद्ध करण्यास फारसा अवकाश लागणार नव्हता. ह्यावरून, धर्मावर जास्त भिस्त ठेवल्यामुळें हिंदुसमाज मागें पडला असें खिस्ती लोकांचें ह्मणणें साफ खोटें असून रिपब्लिक स्थापने पासूनच हिंदुत्वावरील दडपण गेल्यामुळें हिंदूंच्या कर्तबगारीस तरतरी येऊन त्यांचें पाऊल बहुतेक बाबतींत ख्रिस्ती लोकांशीं समांतर पडत आहे. व खिस्ती लोकांची गोव्यांत उन्नति करण्यांस खिस्ती धर्मच कारणीभूत झाला असें सिद्ध करणाऱ्या लोकांनीं असें पाहिलें पाहिजे कीं जीं कार्यें ख्रिस्ती धर्म चारशें वर्षांत करूं शकला तींच कार्यें करण्यास दडपणांतून मुक्त झालेलें हिंदुत्व दहा वर्षांच्या आंत सिद्ध झालें हेंच कायतें आमच्या धर्माचें रहस्य.

हिंदूंची प्रगति ह्मणजे खिस्ती लोकांच्या आचार विचारांचे अनुकरण असें समजून कोणी एकादा खिस्ती सुख मानील तर असें समजण्यापर्यंत त्यानें आपल्या कल्पनेची धांव नेऊं नये. पाश्चात्यांचें जें अनुकरण करावयाचें तें हिंदु संस्कृति कायम ठेऊनच केलें पाहिजे ह्याची पूर्ण जाणीव हिंदूंस आहे. स्वदेशाची प्रीति पार नष्ट करणारी सयाह्यांतर सुधारणा अंगीकृत केलेल्या खिस्ती समाजाचें स्वरूप डोळ्यांपुढें असे तोंपर्यंत हिंदुत्वांत किती महत्व आहे हें आह्मांस कधींच विसरतां येणार नाहीं. धर्माच्या मूलतत्वांस बाधा न आणितील अशीं बाह्य देखाव्यापुरतीं व देशकालास इष्ट असणारीं उपांगें स्वीकारून मूळ संस्कृति कायम ठेवण्यातच हिंदुत्वाची खरी थोरवी आहे. तीं चिन्हें खिस्ती समाजाचें अनुकरण करण्याचीं नसून बाह्य पेहेरावांतच सुधारणा आहे असें समजणाऱ्यांस, ह्याहि गोष्टींत हिंदु मागें नाहींत असें दाखविण्या पलीकडे पाश्चात्य आचारांशीं आह्मांस कांहींच कर्तव्य नाहीं. ह्मणजे एकंदरींत 'हिंदुधर्माच्या-जुन्या व प्रगतिस्तंभक चाली सोडल्यामुळें हिंदु सुधारले' असें आमचें अभिनंदन करण्यांत ख्रिस्ती धन्यता मानितील, तर "वाहवा! हिंदुत्व कायम ठेऊन प्रगतिपर पेहराव चढविलेले हिंदु धन्य आहेत" असें ह्मणवून घेण्यांत हिंदूनीं धन्यता मानिली पाहिजे.

थोड्या शब्दांत सांगावयाचें ह्मणजे धार्मिक गोष्टींत हिंदूंचा खिस्ती लोकांत मिलाफ होणें शक्य नव्हतें व आजहि शक्य नाहीं. त्यांपासून झालेल्या छत्तीसांच्या आंकड्याऐवजीं त्रेसष्टांचा आंकडा होण्यांस हिंदु-खिस्ती लोकांनीं परस्पर सहानुभूति बाळगून गोव्यांचें हित केलें पाहिजे. न पेक्षां ३६ काय कीं ६३ काय शेवटीं "o vos fóra nada" हें ठरलेलंच आहे.

नित्रासांव]फोंडा; दत्तू झाबळू शेणवीं बोरकर [कोमुनिदादींचे आमानुयेंस] फोंडा; कल्याण गणेश तळवडकर [आदमिनित्रासांवांतील आमानुयेंस] फोंडा; रा. भिकोबा प्रभू शिक्रे [आदमिनित्रासांवांतील कामदार]; रघुवीर जगन्नाथ हेदे, शिरोडें; सदाशिव शेणवीं केसरे (जंगल कचेरींतील कामदार)फोंडा; ह. प. सखाराम नारायण करंडे, कळ्ळें; रामकृष्ण नरहर वझे, (गवई) बांदिवडें; श्रीधर केशव कामत, कुंडई; रामचंद्र पांडुरंग शेणवींकुंकळीयेंकर, कुंकळीयें;.

(चालू)

वर्गणी पाठवा

ब्रिटिश हिंदुस्थानांतील व येथील ज्या वर्गणीदारांनीं अजून वर्गणी चुकती केली नसेल, त्यांनीं ती पाठविण्याची कृपा करावी.

स्फुट विचार

कर वाढविले!:— करवाढीविरुद्ध उपस्थित झालेल्या योग्य तक्रारींला काडीचेंहि महत्व न देतां अगडबंब व भपकेबाज सुधारणांच्या नावांखालीं आमच्या स्थानिक पार्लमेंटकडून गोमांतकीय जनतेच्या हलक्या डोक्यावर नवीन करांचें जड ओझें लादण्याचें शतकृत्य करण्यांत आलें आहे! नवीन कर न वाढवितां, केवळ अनावश्यक कामीं खर्च करण्यांत येणाऱ्या भक्कम रकमांस आळा घालण्याचें कर वाढविणाऱ्यानीं धैर्य दाखविलें असतें तर सुधारणांच्या सुंदर व प्रेक्षणीय विमानांनीं आपला अनुपमेय पल्ला आस्थे आस्थे गांठला असता; पण तसें करून दांडग्या नोकरशाहीच्या लांडग्या रोषास तोंड देण्याची धमक उपरोक्त पार्लमेंटच्या अंगीं नसल्यानें, त्यानें करवाढीचा सोपा व निरुपद्रवी मार्गच स्वीकारून नोकरशाहीकडून वाहवा व लोकशाहीकडून शाप मिळविण्यांत कांहींच कसूर केली नाहीं!

फंडांचा सुकाळ:— बुद्धिमान सरकारच्या सुपिक डोक्यांत प्रसवलेल्या अपूर्व सुधारणांस मूर्त स्वरूप आणण्यासाठीं नानाविध तऱ्हेच्या करानीं भरून काढण्याचे फंड उभारण्यांत आले आहेत. पैकीं शिक्षण फंडाच्या उत्पन्नांत खालील नवीन करांचा समावेश होतो:—

१ प्रत्येक गोव्यांतील इसमाला गोव्या बाहेरून परत गोव्यांत येतानां प्रत्येकदां सहा आणे कर द्यावा लागेल.

२ गोव्या बाहेर जातांना तीन आणे.

३ विदेशी प्रत्येक ग्यालन दारूला—मग ती कोणत्याहि जातीची असो—आठ आणे.

४ प्रत्येक ग्यालन स्वदेशी दारूला एक रुपया आठ आणे.

५ सेरवेझच्या (बीर) प्रत्येक ग्यालनला चार आणे सहा पै.

६ चिरुट किंवा सिगरेटच्या प्रत्येक शेराला एक रुपया.

७ तंबाकू [चूर्ण किंवा पाकळ्या] व तपकिरीच्या प्रत्येक शेराला एक रुपया कर द्यावा लागेल-

अंक एक व दोनच्या कलमांत लादण्यांत आलेल्या करांचें खरें कारण आह्माला समजत नाहीं! पण इतक्यांत हें फंडगुंडांचें बडें बंड थंड पडत. संपत—नाहीं!

सुधारणोत्तेजक फंड:— या फंडांत खालील कराचा अंतर्भाव केला आहे:—

१	खासगी मोटार	२४ रु.
२	भाड्याच्या मोटारची प्रत्येक जागा	४ रु.
३	कमींत कमी उत्पन्न	२४ रु.
४	खासगी घोड्यांची गाडी	१२ रु.
५	भाड्याच्या घोड्यांची गाडी	८ रु.
६	,, बैलाची अगर रेड्यांची गाडी	६ रु.
७	ओझें वाहण्याची प्रत्येक बैलांचीं, रेड्यांची अगर घोड्यांची गाडी	४॥ रु.
८	प्रत्येक ५ होडीवाल्या लोकांची होडी	२ रु.
९	पांच होडीवाल्यापेक्षां कमी लोकांची प्रत्येक होडी	१ रु.
१०	प्रत्येक मोटार सायकल	९ रु.
११	दोन इसमांची प्रत्येक मोटार सायकल	१२ रु.
१२	प्रत्येक बायसिकल	१ रु. ८ आणे
१३	प्रत्येक घोडा किंवा खेचर	१ रु.
१४	प्रत्येक हत्ती	२४ रु.
१५	प्रत्येक पहिल्या दर्जाचें घर	१ रु. ८आ.
१६	दुसऱ्या दर्जाचें	१ रु.
१७	तिसऱ्या दर्जाचें	१ रु.

येणें प्रमाणें या सुधारणोत्तेजक फंडाच्या उत्पन्नाच्या बाबी आहेत. या व इतर करांबरोबर टक्कर मारण्यास महागाईनें त्रस्त झालेली गोमांतकीय गरीब व औद्योगिक अवनतीमुळें इतस्ततः भटकणारी जनता शक्य आहे कीं काय हे थोड्यांत दिसून येणार आहे. ह्मणून सरकारविरुद्ध बोटें मोडून करांसंबंधीं निषेध व्यक्त करण्याची कामगिरी, 'समूळ तळपट' च्या भविष्य काळावरच लोटलेली बरी, असें आह्मास वाटतें! दुसरें, आमचें सुखी राज्य प्रजासत्ताक असल्यानें प्रजेनें कितीहि मोठ्यानें करांविरुद्ध आरडाओरड केली तरी तिचा उपयोग होणार नाहीं! तेव्हां आमच्या पराक्रमी सरकारला भविष्यकाल तरी शहाणपणा शिकवो, इतकेंच इच्छून वरील करांच्या डरानें येथेंच तात्पुर्ता विराम पावतों.

वर्तमानसार

—काणकोणच्या रस्त्यावर मोटारखालीं सांपडून एक गाडीवाला मरण पावला!

—सरकारी आगबोटींवरील कामदारानीं आपल्या पगारवाढीसाठीं संप पुकारला होता. ही संपाची सांथ कोठपर्यंत प्रसृत पावेल हें समजत नाही!

—प्राथमिक शिक्षणांच्या सरकारी प्रोफेसरांस या पुढें १४०रु. दरमहा पगार होईल, अशा अर्थाची पोर्तुगालहून बातमी आली आहे.

—रिपब्लिकच्या ११ व्या वाढदिवसानिमित्त गोव्यांत ठिकठिकाणीं मोठा आनंदोत्सव करण्यांत आला. पेडणें तालुक्यांत तर या उत्सवास अपूर्व स्वरूप आलें होतें.

— दिवयेथील वादळानें अनाथ बनलेल्या लोकांस मदत पुरविण्यासाठीं म्हापसें येथें नाटकाचे दोन प्रयोग करण्यांत येऊन त्यांचें उत्पन्न सदरील लोकांस रवाना करण्यांत आलें. पणजींतहि या स्तुत्य हेतूनें एक नाटक प्रयोग करण्यांत आला होता.

—येथील मुनिसिपालटीनें ४ आण्यांचा वेटबिगारचा कर ८ आणे केला आहे. या वाढीचा सदुपयोग होवो असें इच्छितों.

—हिंदुस्थानांत असहकारितेची चळवळ जोरानें चालू असून हिंदुमुसलमानांची एकी दिवसेंदिवस जास्त दृढ होत चालली आहे. आणि गोव्यांत...?

—रा. वि. पु. कुर्चडकर हे गोमांतकांतील हिंदु गृहस्थ स्वखुषीनें आपली सांपत्तिक स्थिति सुधरण्यासाठीं आफ्रिकेस रवाना झाले. स्वखुषीनें आफ्रिकेंत जाणारे हे दुसरे हिंदु तरुण होत.

—गोमांतकांतील पिकांची स्थिति यंदा समाधानकारक आहे, असें कळतें.

—मुंबईंतील पोस्टमनांचा संप अजून चालूच आहे!

भारत डिफेन्सफंड

श्री. गोविंद सखाराम पाणदीकर मडगांव १रु.
,, प्रो. गिरी गणेश पै काकोडे कुंकळ्ळी २रु.
,, राणू विष्णुदास केणी रेबोल ,, १रु.
,, त्रिविक्रम विष्णु पै वैद्य ,, १रु.

ANO V.—NUMERO 29—1920 · 109 Pangim QUEPEM, QUINTA-FEIRA 14 DE OUTUBRO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas

INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios

Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—**Bharat**

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर

गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर

मराठी दर ओळीस दोन आणें. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें—गुरुवार, तारीख १४ माहे अक्टोबर सन १९२० अंक २९ वा.

Ainda o marata

Em resposta ao meu modesto artigo publicado no *Bharat* de 16 do mez passado "Sobre o marata" surge ao meu encontro o sr. Dr. Bragança Pereira, no *Heraldo* n°. 3625, atribuindo-me conceitos que aliás não constam do referido meu escrito.

Diz o talentoso escritor que neguei que a lingua oficial do reino de Bijapur, em 1535, fosse o marati.

Não sr. Não neguei tal cousa, o que, de resto, se depreende do dito meu artigo, por quanto se fosse essa a minha opinião não me custaria fazer uma afirmação categorica como a fiz com respeito aos reinantes antigos, como Mauria, Cadamba e outros, em vez de servir-me de hipoteses, de que usei para combater em principio o seguinte asserto:-

"Que da *união matrimonial* de Abdul Khan, fundador do reino de Bijapnr *proveiu* ser marati a lingua oficial desse reino, conclusão do artigo que veiu publicado no *Oriente Portuguez*, concebido nos seguintes termos:-

."O turco Abdul Khan fundador do reino de Bijapur casou com uma marata, e cerca de 1535, o marati passou a ser a lingua oficial do reino"

Isto, segundo o meu fraco modo de pensar, entendi reduzi-lo a termos claros para evitar a ambiguidade e fixar o ponto de partida da minha critica.

Se, porem, o Dr. assegura que foi mal traduzido o sentido que presidiu ás suas expressões, não terei duvida alguma em retirar-me a critica, quanto a esta parte.

Mas fosse qual fosse a lingua oficial do reinante de Bijapur, fosse qual fosse o motivo porque ela tivesse sido adoptada, não é este o ponto principal da questão que temos a resolver: é se, efetivamente, o dominante muçulmano de Bijapur introduziu nas comunidades das Novas Conquistas o marati como diz o sr. Dr. cujas palavras tentuais, ...*Dai o emprego do marati na escrituração das comunidades das Novas Conquistas*, seguidas ao asserto já referido tem sido o dogma dos proconcanistas.

Para demonstrar a inanidade desta ilação descrevi a forma da escrituração nos documentos oficiais, seguida pelo Governo inglez e que è feita na lingua peculiar de cada distrïto, por a administração deste Governo ser vasada, em geral, nos móldes da dos reinos que o precederam; e para maior realce puz em relevo a organisação autonoma em tempos antigos das nossas comunidades.

Ranadĕ foi serventuario do governo. Ascendeu á mais alta posição oficial que no seu tempo era dado a um indio ocupar. Abiscoitou chorudos vencimentos e alcançou titulos honorificos e condecorações e só nos lazeres que lhe permetia a sua vida funcional tratou dos assuntos de interesse publico. Tilak que poderia ter ocupado identica posição oficial, caso tivesse pensado no seu engrandecimento pessoal, consagrou-se de corpo e alma e desde os bancos da escola atè o derradeiro momento da sua vida ao serviço da sua entranhada Patria-á regeneração do povo indiano. Gokhale enveredou--se pelo caminho tapisado de flôres, mantendo relações amistosas com os membros da burocracia ingleza, pelo que foi *persona grata* nas regiões do Poder. Tilak optou pela vereda semeada de espinhos e cardos arrastando as iras da poderosa oligarquia burocratica e batalhando pelo povo sempre com a mesma coragem inquebrantavel, com a mesma fè imperterrita e com o mesmo desassombro admiravel.

E diga-se de passagem que as opiniões politicas de Tilak que ao principio eram tidas na conta de meras utopias e o seu metodo politico que era taxado de nocivo aos interesses do paiz são hoje perfilhadas e seguidas pela maioria de indios. Houve tempo em que Tilak foi averbado de visionario, utopista ou demagogo. Mas todos hoje reconhecem que a Ele mais do que a nenhum outro se deve o rapido e progressivo avanço da India no campo das reivindicações politicas.

Seria uma rematada estupidez pretender que o patriotismo se consubstanciou apenas em Tilak. O patriotismo nunca foi nem jamais será apanagio de um determinado individuo.

Sem falar de outros paizes, na visinha India houve e há muitos patriotas como os houve e ha n'esta nossa pequenina terra e um d'eles é certamente o sr. Menezes Bragança.

Simplismente há que distiuguir. Ha que aferir o quilate do patriotismo. Em Tilak o patriotismo atingiu o seu ponto culminante. Foi ele apostolo, heroe e martir.

Foi um predestinado

E', portanto, certo que para os povos indianos o *tilakismo* traduz a culminação do amor patriotico. Os outros caudilhos indianos foram e são apenas patriotas. Tilak foi seu principe ou prototipo. Os outros dirigentes da opinião indiana celebrisaram-se pelas suas determinadas qualidades civicas e morais. Tilak possuiu todas essas qualidades e em elevado grau. Os outros indianos constituem por assim dizer, diversas parcelas e Tilak representa a sua soma. Eis a diferença. Eis o que è privativo de Tilak. E eis finalmente o que pode bastar para a justificação do emprego da palavra *tilakismo* como sinonimo da culminação do amor patriotico.

× × ×

Mas que quer traduzir o tilakismo do jornal hindú *Bharat*! Resume ele o metodo de realisações politicas?

A nossa situação politica difere fundamentalmente da do indio, nosso visinho Aqui o metropolitano e o colonial-o europeu e o indigena vivem num regime da perfeita igualdade Ali o nativo vive num plano inferior ao do inglez. Nòs somos cidadãos, eles são subditos. O nosso regime autonomico é uma concessão, uma dadiva da liberal nação portugueza. As *reformas politicas* da visinha India e que não satisfazem às aspirações do povo indiano são o fructo duma lucta politica sem treguas, travada entre este e o governo inglez. A politica colonial de Portugal é diferente da da Inglaterra. E o caracter e os costumes das raças portugueza e ingleza são tambem diferentes.

O *Bharat* e os hindùs goezes sabem demais que a nossa India é politicamente distincta daquela em que Tilak viveu e luctou para que seja mister que o sr. Menezes *Bragança* lhes venha dizer que o *tilakismo* como metodo de realisações politicas é absolutamente inaplicavel em o nosso meio. Mas não diga sua exa que não nescessitamos do *tilakismo* para nada, *Não*, por Deus, não. Nós necessitamos do *tilakismo*, mas é apenas num sentido em que essa palavra foi empregada pelo *Bharat*.

Que significado tem, então, o tilakismo do *Bharat* para esta nossa terra que vive e vive numa orbita politica diferente?

O *tilakismo* è o conjuncto das qualidades que concorreram para se imortalisar o seu aureolado nome. Vasto e profundo saber, copiosissima erudição, actividade fenomenal, abnegação santa, acendrado patriotismo, inquebrantavel coragem, caracter impoluto, admiravel perspicacia, longanimidade rara, espirito de sacrificio, inabalavel fé, inteireza moral, espirito publico-estas e muitas outras qualidades se resumem na palavra-tilakismo. Com quanto a obra politica de Tilak tenha sido divergentemente julgada pelos representantes da opinião britanica e pelos dirigentes da opinião indiana é, todavia, certo que não há duas opiniões sobre a sua grande envergadura intelectual e moral. Todos são unanimes em reconhecer que Tilak foi o maior entre os maiores caudilhos populares da India.

Ponhamos, portanto, de banda os processos do combate politico de Tilak, não sò porque eles são inaplicaveis a esta nossa pequenina

नाहीं. या त्यांच्या उपकारामुळें व लोकमान्यांविषयीं आमच्यांत वसत असलेल्या पूज्यबुद्धीमुळें "श्री सरस्वतीसेवकमंडळानें" लोकमान्यांच्या फोटोचा अनावरण विधी करण्याचें योजिले आहे, हें योग्य होय. या प्रसंगीं लोकमान्यांच्या उभय सहाध्यायांकडून त्यांचें गुणवर्णन ऐकण्याची सर्वांना फार इच्छा आहे ती त्यांनीं तृप्त करावी अशी मी विनंति करितों.

गेल्या सालीं प्रो. परांजपे व श्री. दामले यांच्या सान्निध्यानें तृतीय सरस्वत्युत्सवास आणि श्री दामोदर वाचनमंदिराच्या द्वितीय वाढदिवस समारंभास जशी शोभा आली व त्या प्रसंगीं व्याख्यानमाला जशी यशस्वी होऊन सर्वांना उल्हास उत्पन्न झाला, तशाच सारखा आनंद यंदाहि सर्वांस उपभोगण्यास मिळेल अशी मला आशा आहे. परदेशगमनासंबंधीं बोलतांना बॅ. राव यांचें अभिनंदन करून यंदां पोर्तुगालास गेलेल्या आणखी दोन विद्यार्थ्यांचा नामनिर्देश करून त्यांचें शुभ चिंतिलें. त्याचप्रमाणें गेल्या सालच्या "उपयुक्त ग्रंथ माले"च्या उपक्रमाचा उल्लेख करून तिचें काम कोठपर्यंत पोंचलें आहे याचा खुलासा केला. व रा. ब. वैद्य यांस मालेचें पहिलें पुष्प जें "पोर्तुगालचा इतिहास" त्याच्या संशोधनाचें काम करण्यास विनंति केली. शिक्षणाच्या पुनर्घटनेच्या बिलांत मराठी भाषेचा समावेश करण्याबद्दल गोमांतकस्थांनीं जी जोराची चळवळ केली व तिचा जो इश्य परिणाम सरकारनें मराठी संबंधानें थोडी बहुत सोय करण्याचें कबूल केलें या संबंधीं माहिती सांगतांना गोमांतकांतील मराठी वृत्तपत्रें, सार्वजनिक संस्था, सुशिक्षितवर्ग वगैरेंचा उल्लेख करून या पुढेंहि जरूर त्या वेळीं अशाच प्रकारें जुटीनें प्रयत्न करण्यास सर्वांस प्रार्थना करून सरकारच्या धोरणाबद्दल संतोष व्यक्त केला. नंतर "श्री दामोदर वाचनमंदिराच्या" सुव्यवस्थेबद्दल व त्याचा हजारों लोक फायदा घेतात, याचें दिग्दर्शन करून सर्वांस या वाचनालयास मदत करण्यास विनंति केली. शेवटीं सरस्वती सेवक मंडळाचे समाजजागृतिचे प्रयत्न सुफलदायी होऊन त्यांचीं गोड फळें गोमांतकजनतेस चाखावयास मिळोत अशी श्रीसरस्वतीचे चरणीं प्रार्थना करून आपलें भाषण संपविलें.

नंतर येथील प्रसिद्ध डॉ. श्री. वासुदेव राव केरकर अध्यक्षांची सूचना करितांना ह्मणाले; आजच्या सारख्या सरस्वतीच्या उत्सवसमारंभाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्यास तिचे आवडते व निःसीम भक्तच पाहिजे होते. आमच्या विनंतीस मान देऊन रा. ब. वैद्य आणि दे. देशपांडे आज येथें आले आहेत. त्यांची ओळख करून देतांना माझे मित्र रा. दलाल यांनीं जी शब्द योजना केली त्या पेक्षां त्यांची विद्वता, त्यांची योग्यता, फारच मोठी आहे. ती वर्णन करण्याचे भानगडींत न पडतां इतकेंच सुचवितों कीं, श्री सरस्वती सेवक मंडळानें यंदा महाराष्ट्राचा सिंह, हिंदुस्थानातील सामाजिक व राजकीय चळवळीचा गुरू, महाराष्ट्राचा अनभिषिक्त राजा आणि जगांतील एकंदर मनुष्य प्राण्याला दिपवून सोडणारा देदिप्यमान हिरा—लो. टिळक महाराज यास आजचें अध्यक्षस्थान देण्यांचें ठरविलें होतें, व त्यांजकडून या कामीं संमतीही मिळाली होती. परंतु आमच्या दुर्दैवानें निर्घृण काळाच्या अत्यंत निर्दयपणामुळें तें रत्न आह्मांस लाभलें नाहीं. याबद्दल दुःख प्रदर्शनाचा ठराव सभेपुढें येणारच. पण त्याच सिंहाचा कलिजा त्यांचें हृदय आज ह्या ठिकाणीं हजर आहे. त्या लोकमान्यांच्या हृदयास रा. ब. वैद्य यांस अध्यक्षस्थानीं विराजमान होण्यास मी नम्र विनंति करितों. या सूचनेस रा. रा. कृष्णराव हेगडे यांनीं अनुमोदन दिल्यावर टाळ्यांच्या गजरांत रा. ब. वैद्य हे अध्यक्षस्थानीं विराजमान झाले.

भारत

गुरुवार आश्विन कृ. ९ मी १८४२

करांचें राज्य.

कोणत्याहि राष्ट्रापेक्षां पोर्तुगीज हिंदुस्थानांतील लोकांची स्थिति संपन्न असल्याची हाकाटी खुद्द गव्हर्नर साहेबांनीं सुरू केल्यापासून ही कोणत्या भावी कार्याचें पूर्वरूप आहे हें सहज समजण्यासारखें होतें व तसा कांगावा केल्याशिवाय उजळ माथ्यानें नवे कर लादण्याची तयारी होणें, निदान त्यांचा दृष्टीनें असंभवनीय होतें. वास्तविक पाहतां, जमीनमहसुलाची फारकत सरकारीं तिजोरींत योग्य मुदतींत न झाल्यामुळें तिचा अवधि वर्षानुवर्षे वाढविणें भाग पडतें. इतकेंहिकरून त्या वाढविलेल्या मुदतींत देखील पैशाची फारकत न होतां ते वसूल करण्यास कायदेशीर उपाय करण्यापर्यंत मजल पोंचते. अशा रीतीनें खालावलेल्या सांपत्तिक स्थितीच्या दीन दशेचें रोखठोक माप पदरांत पडत असतां केवळ पांढरपेशा लोकांचे भपकेदार पोषाख पाहून जर सरकारास हिंदी पोर्तुगीज नागरिकांची स्थिति संपन्नतायुक्त वाटूं लागली तर वाढत्या नोकरशाहींत नवीन कामदारांची भर घालून त्या संपन्नतेचा फायदा त्यांच्या पगारखर्चाकडे वेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं हें सिद्ध होतें!

गोव्यांतील मुख्य उत्पन्नाची जननी जी जमीन ती तर दिवसेंदिवस निकस होत आहे. इतर सुधारलेल्या देशांत व आमच्या शेजारीं ब्रिटिश अमलांत, राज्यकर्ते जमीनीचें उत्पन्न वाढविण्याच्या कामीं नव्या नव्या साधनांची योजना करून गरज पडल्यास त्यासाठीं लोकांस सवलती सुधां देतात. पण इकडे पहावें तर, निस्तेज व दिवसेंदिवस पिकांत कमी असलेल्या जमिनीवर जास्त कर आकारून, ती सुधारण्यासाठीं करण्याची नवीन उपाययोजना बाजूला ठेवून, नवे नूतन व अनावश्यक कामदार नेमण्यांत आमचें सरकार इतकें वाकबगार झालें आहे कीं, त्याचें डोकें कसले कसले नवीन हुद्दे शोधून काढील हें कोणासच माहित नसून, ज्याची नेमणूक होत आहे त्यास सुधां स्वता आपण त्या हुद्द्यास कितपत पात्र आहों हेंच समजत नाहीं. व गोव्यांत तर इतकीं कामें, सरकारी कामदारांशिवाय अडून राहिलीं आहेत कीं गोव्यांतील सगळ्या लोकांच्या नेमणुका त्या कामांवर करूनहि पोर्तुगालांतील वड्या साहेबांस पाहिजे तितक्य भरपूर जागा मिळतील! आणि करांचे प्रमाण वाढत राहिल्यास जमिनी ओस पडून सगळे जमीनदार नोकरशाहींत शिरतील! हें कोणासहि अतिशयोक्तिपूर्ण वाटावयास नको कल्पनेला देखील खोट्या वाटणाऱ्या ह्या गोष्टी व्यवहारांत खऱ्या झालेल्या पाहण्याचें दुर्दैवी हिंदी–पोर्तुगीज प्रजेच्या नशिबांत आलें आहे.

अर्थशास्त्राचा असा एक नियम आहे कीं, मिजासखोर जिनसांस आळा पडण्याकरितां त्यांवर ज्यास्त कर आकारला पाहिजे ह्या दृष्टीनें पाहूं गेल्यास दारू, तंबाकू वगैरे जिनसांवर लादलेल्या करांमुळें त्या त्या अनावश्यक वस्तूंच्या वाढत्या खपास आळा पडून तसल्या मादक पदार्थांचा त्याग निदान परिमित सेवन करण्याच्या बाबतींत तरी करांचा फायदा मिळेल अशी आशा करण्यास जागा आहे. पण भाड्याच्या गाड्या होड्या, बैलरेडे, व गाढवघोडे हीं जीं कामकरी लोकांच्या दैनिक उदरनिर्वाहाचीं साधनें होत, त्यांवर आज महागाईच्या दिवसांत करांचें करकरतें चाक फिरविण्याची बुद्धि सरकारास सुचावी हें मात्र अर्थशास्त्रसंमत नसून त्यापासून प्रजाक्षोभ होऊन अनर्थ ओढवण्याचा संभव आहे. हें, खरें न लपवितां सत्य, बोलण्यासारखें आहे. कां कीं? लोकांस तर सरकारी नोकर व कर हे दोनहि समप्रमाणांत वाढलेले दिसतात व, पोर्तुगीज हिंदुस्थान हें नोकरशाहीचें साम्राज्य कीं करांचें राज्य? असा भ्रममूलक प्रश्न मनांत येऊन, हें करांचेंच राज्य! असें ह्मणण्याकडे ज्यास्त प्रवृत्ति होते. ह्या राज्याची सत्ता घरें गाड्या, होड्या, घोडे वगैरे सजीव व निर्जीव वस्तूंवर चालत असल्यावरून स्थिर, चर भूमि, जल, ह्या सर्वांसच व्यापून अद्यापहि शिल्लक राहिलीच आहे! दुसऱ्या बाजूनेंहि पाहिलें असतां, जर कर वाढविण्याच्याच कामीं ह्या राज्याचें अस्तित्व दिसून येतें, तर हें करांचेंच राज्य असें कां ह्मणूं नये?

स्फुट विचार

शेतकी खातें:– व्यवहारशून्य पोर्तुगीज शेतकीखात्याकडून कांहीं तरी उपयुक्त कामगिरी बजावली जावी या उच्च हेतूनें रावबहादूर केळकर यां सारख्या ब्रिटिश शेतकीव्यवहारकुशल गृहस्थांची त्या खात्यांत नेमणूक करण्यांत आली असावी अशी आमची पूर्ण समजूत होऊन सदरहू नेमणूकीमुळें आह्मीं आनंद प्रदर्शित केला होता. परंतु 'दुःखिताचे घरीं आनंद जास्ती वेळ टिकत नाहीं' या पोर्तुगीज ह्मणीप्रमाणें आमचा आनंद नष्ट करणाऱ्या कांहीं गोष्टी आमच्या ऐकण्यांत आल्या आहेत! रावबहादूर केळकरांची नेमणूक होऊन आज किती तरी दिवस लोटले. पण त्यांवर कोणती कामगिरी संपविली आहे, हें जनतेला अजून कळलेलें नाहीं! उलट असें सांगतात कीं पुष्कळ प्रयासानीं आपल्या जाग्याचा चार्ज घेतल्यावर सुधाहि त्यांस-- आज तारीखपर्यंत-- कसलेंच काम सांगण्यांत आलें नसून त्यांच्या ऑफिसखर्चापूर्तिहि व्यवस्था लाविलेली नाहीं! कोण हा अंधःकार? अशानें कां शेतकी सुधारणा होणार? ईश्वर करो आणि वरील खात्याच्या आळसाच्या दूषित हवेच्या परिणामाची इतक्यांतच इतिश्री होऊन रा. ब. केळकरांच्या हातून गोमांतकीय शेतकीची कांहीतरी सेवा घडण्याचा सुमंगल प्रसंग लवकरच येवो! सध्या इतकेंच इच्छिल्याशिवाय अन्योपाय नाहीं!

युद्धस्टांप:– अजून वसूल करण्यांत येत असल्याचें पाहून सखेदाश्चर्य वाटतें- युद्धस्टांपाच्या बाबतींत कोणाचा पायपोस कोणांत नाहीं अशीच स्थिति आतांपर्यंत चालू असून केपें कोमीकात तर वरील कर चोपून घेण्यांत येत आहे! युद्धस्टांप प्रकरणांत न्यायखात्याचें धोरण अत्यंत उदार असून या कामीं माजलेला घोंटाळा जमाबंदिखात्याकडून उपस्थितकरण्यात आला आहे. कोणत्याहि राष्ट्रांत न्यायखातें स्वतंत्र मानलें जातें त्यानें केलेले ठराव मान्य केले जातात! परंतु येथें मात्र सर्वच आंधळा कारभार! या पुढें तरी असा प्रकार न होण्यासाठीं आमचें सरकार खबरदारी घेण्यांचें शहाणपण दाखवील व वरील गोष्टीमुळें आपल्या तोंड्या तोंडास लागलेला काळिमा पुसून टाकण्याचा सक्रिय प्रयत्न करील अशी आह्मांस आशा आहे.

वर्तमानसार

—पूर्वी प्रसिद्ध झाल्याप्रमाणें कुंकळी येथील श्री सरस्वती–लक्ष्मीवाचनमंदिराचा वाढदिवस आमच्या संपादकांच्या अध्यक्षतेखालीं थाटानें पार पडला. प्रसंगास अनुसरून रा. त्रिविक्रम वैद्य, गोपिनाथ कुराडे, नारायणराव कुंदे, राणू केणी व कित्येक गृहस्थांचीं व मुलांचीं भाषणें होऊन, उत्सवानिमित्त भरलेल्या या सभेंत, राजकीय स्वरूपाचे कित्येक ठरावहि पास करण्यांत आले. विस्तृत माहिती रिपोर्ट आल्यानंतर प्रसिद्ध केली जाईल.

साभार स्वीकार

किंमत, टिकाऊपणा व सौंदर्य या तिन्हीं गुणांमुळें मेसर्स कामत, कुडेंकर आणि कंपनी, कुंडई, यां कडून तयार करण्यांत येणाऱ्या मखमालीच्या टोप्या वापरण्याला लायक असतात, ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. बाहेरून येणाऱ्या टोप्यांपेक्षां सुधां सदरहू कंपनीच्या टोप्या वरील गुणसमुच्चयामुळें श्रेष्ठ ठरतात, असेंच त्या टोप्या वापरणाऱ्यांला वाटल्याखेरीज रहाणार नाहीं अशी आमची पूर्ण खात्री आहे. आमच्या 'टोपीवाल्या' लोकानी या गोष्टींचा अनुभव घ्यावा.

प्रवचनें व भजन

नित्य संध्याकाळीं भारतआफिसांतील सार्वजनिक दिवाणखान्यांत साडेसहा ते साडे सात व साडे सात ते साडे आठ वाजतां धार्मिक व राष्ट्रीय प्रवचनें व भजन होत असून त्यांला साधारण समाज जमत असतो. धार्मिक व राष्ट्रीय चळवळ अव्याहत चालू रहावी या पवित्र हेतूनें वरील उपक्रम भारतमंडळाकडून करण्यांत आला आहे. देवभक्त व राष्ट्रभक्त जनता वरील सार्वजनिक चळवळीचा फायदा घेऊन मंडळास प्रोत्साहन देईल, अशी पूर्ण खात्री आहे.

भारत मंडळ.

जाहीर आमंत्रण

श्री शांतादुर्गा वाचनमंदीर, कुंकळी, या संस्थेचा द्वितीय वाढदिवस समारंभ कार्तिक शु. प्रतिपदा ता. ११ गुरुवार माहे नव्हेंबर सन १९२० रोजीं साजरा करण्यांत येणार आहे. या सार्वजनिक उत्सवास येण्यांची सर्वांस अत्यादरपूर्वक विनंति आहे.

स. न. से.

त्रिविक्रम वि. वैद्य.

(सं. भा.)

ANNO V.—NUMERO 33 —1920 QUEPEM QUINTA-FEIRA 11 DE NOVEMBRO

Govinda P. Hegde Dessai
Director e Editor

Assinaturas

INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA.............. 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios

Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—**Bharat**

भारत

BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर

गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास.......... ०-०१-००

जाहिरातींचे दर

मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें—गुरुवार, तारीख ११ माहे नवंबर सन १९२० अंक ३३ वा.

BIS DAT...

Decorreu já algum tempo que se instalou em Mormugão a tão notabilisada Comissão de Milhoramentos.

¿ Que beneficios promoveu êla durante todo êsse tempo em prol do *futuro* cidade que ao *presente* ostenta só o seu glorioso *passado* ?

Mezes atraz estivemos em Vasco da Gama, por signal,êm um dia bastante chuvoso. E o que lá vimos, foram as estradas valetas respectivas a trasbordar dagua de chuva, impossibilitando, cá e lá, transito a pessoas, animais e veiculos.

A não ser esta *novidade* que o nosso espirito recusa chamar-lhe *milhoramento*, não vimos coisa alguma que nos revelasse a boa ou má aplicação do dinheiro dos impostos criados e arrecadados para milhoramentos *comovidamente* anunciados !

Será que a Comissão esteja, ainda,delineando planos e arqui tectando projectos para, *duma só assentada*, dar ao Povo tudo ou uma boa parte do prometido ?

Se è isto, pedimos lincença para convidar-lhe a esclarecida atenção para o seguinte aforismo:

Bis *dat qui* cito *dat.*

Dá duas vezes quem dá imediatamente.

¿ Mas os automoveis, *caminhões*, palacio de...loucura ?

Deixe-os a Comissão para dêles ocupar ultimamente que o seu principal papel— se é que quere ser coerente com o principio que a gerou. tem de circunscrever-se a transformar a sede do seu estabelecimento, pelas obras que convençam o contribuinte do bom e condigno emprego do seu dinheiro.

Sò por este andar ê que a Comissão de Milhoramentos de Mormugão poderá ainda inspirar ao Povo confiança que-mau ê dizer mas pior ê ocultar-vai, a pouco e pouco, liminuindo.

E a diminuição da confiança popular é um mal cujas consequencias não constituirão, naturalmente, nenhum incentivo á mesma Comissão.

Não—cooperação

O Congresso Nacional Indiano que se reuniu extraordinariamente na capital da provincia de Bengala aprovou por maioria de votos o movimento de não-cooperação do grande patriota *Mahatma* Gandhi, como meio mais eficaz para a conquista da autonomia politica. Por sua vez o governo da India *Britanica* tambem se esforça, pelo visto,por anular o mesmo movimento. Està-se travando portanto um grande conflito entre o povo e a burocracia do territorio visinho, e para o qual se acham concentradas as atenções do mundo inteiro.

O *Congresso* consequentemente o povo da India Britanica, veiu, trabalhando, desde longos anos, com grande afinco pela obtenção do *home rule*, fazendo para èste fim grandes sacrificios,e dando á humanidade toda o exemplo do seu abnegado patriotismo.

E' muito para admirar e louvar o esforço disinteressado e altruista dos patriotas da India visinha e a aliança dos mahometanos com os hindûs, os quais ambos, esquecendo dissensões intestinas se confraternisaram para o levantamento,politico, social e intelectual da sua estremecida Pátria.

Patriotas como MahatmáGandhi Lalá Lajpatrai e Bepinchandra Pal, pondo-se á testa da massa popular e desprezando toda a sorte de ameaças da burocracia oligarquica estão, hoje, agitando quasi toda a peninsula indiana com mira à sua terra de promissão.

Não há duvida que o movimento de não—cooperação é *de* recente data, mas é muito para elogiar o progrsseo que ele fez com poucos mezes.

Julgou-se por muito tempo em que qualquer iniciativa do progresso na India fenecia mercê da diversidade de crenças e credos dos seus povos e com quanto isto em parte tenha o cunho da verdade o grande patriota Gandhi provou todavia, irrefutavelmente, serem as dissensões religiosas uma questão bastante secundaria no campo politico na esfera do movimento da independencia da Patria, a cuja salvação impende a *todo o* cidadão o sacrosanto dever de não só sacrificar os seus haveres mas tambem a sua vida.

As iniciativas que os *leaders* indianos empregaram, até hoje, em prol de sua emancipação foram, relativamente, suaves, devido á confiança que lhes inspirava o governo imperial inglez; porem os successos do Punjab tintos de sangue e a reducção vergonhosa do dominio da Turquia no recente tratado da Conferencia de Paz puzeram em evidencia o *ledo* engano em que viviam, ficando, por necessidade, obrigados a seguir uma politica mais energica e adoptar uma tactica mais prudente: eis a razão do *Mahatmä* triunfar a sua não-cooperação no *Congresso.*

Os sucessos do Punjab desmascararam, por completo,o sistema inglez de governar a India á força de espada, e provaram á saciedade que a justiça britanica sempre se inclina a favor de *pele branca*, tendo em pouca conta a vida e haveres dos nativos.

O referido tratado da redução do dominio da Turquia, não trouxe, menos descontentamento nos espiritos dos mahometanos, que nele reconheceram a pouca sinceridade de afeição que os inglezes lhes dispensavam e se convenceram de que tal afeição era um meio de disarmonisa-los com os hindus.

A pouca energia das medidas até aqui usadas, as lágrimas das vitimas do Punjab e a afição dos Mahomentanos, haviam creado na consciencia pública a necessidade de um *Messias* que com sua doutrina pudesse levar a India ao caminho directo da sua emancipação. Esta necessidade satisfez a Providencia sob a forma do patriota Gandhi, cuja não-cooperação a India inteira está seguindo, a passo gradualmente apressado. A anciedade com que se esperava a vinda *do* mesmo *Messias* e á sua doutrina, viram se claramente na referida reunião extraordinaria do Congresso que com maioria esmagadora dos seus votos adoptou a não-cooperação como um poderoso meio de subjugar a tirania da burocracia britanica

Não podemos deixar de admirar tambem a rapidez de propaganda que se faz, afim de generalisar-se a nova doutrina aprovada pelo Congresso.

A imprensa, as conferencias em varios pontos, as resignações de cargos honorarios e tributarios, em fim todo o movimento politico da India Britanica, leva-nos a crer que em pouco tempo o *Mahatmà* Gandhi não pode deixar de triunfar, proporcionando á India um futuro bem prospero.

Não negamos que a não-cooperação tenha adversarios que a todo o transe a quieram sufocar; mas não podemos supôr que taes adversarios consiguirão o seu fim.

E' grande honra á India ter no seu seio um filho tàs patriota como o *Mahatmà* Ganhdi.

Quando teremos entre nòs um Gandhi ?

Só o futuro nos poderá responder.

Esvonta Butò S. Regò

ECOS & CRITICA

Vidia-prassar

Este nosso colega de Pondã aumentou o seu formato, sendo tambem de boa qualidade o papel em que se imprime.

Nossas felicitações pelo seu progresso.

Caso Magnier

Duma pessoa que conhece de fundo este caso, solicitamos esclarecimentos necessarios que orientem o publico sobre o mesmo, devidamente.

Urge providenciar !

Para o artigo que com este titulo se lê noutro lugar, chamamos a atenção de Sua Exa. o sr. Governador Geral para os fins convinientes.

Taxa de guerra

Até que finalmente, rebelde à todos os tratamentos da sra. dra. Interpretação exalou o seu derradeiro suspiro a incomoda Taxa de guerra.

Nossas sentidas condolencias ao sr. Estado por uma tão grande perda.

Franquia postal

Morreu a Taxa de guerra e renasceu ao Estado a Franquia Postal. Morreu a rainha Taxa e é posta em seu lugar a rainha Franquia

E' caso para enviar condolencias e felicitações ao mesmo tempo.

E' um caso engraçado e desgraçado......

देवीस – परमेश्वराच्या दैदिप्य मान आणि प्रकाशमान सत्यस्वरूपास आपल्या आवडल्या विण्याप्रमाणे अत्यंत आवडतें असतें. ह्मणून एकीनें कार्य करण्यांत चित्स्वरुपी सरस्वती देवीचें अधिष्ठान असल्यामुळें तें कार्य सदोदित हितपरिणामीं, आनंददायक व यशस्वी होत असतें यांत शंका नाहीं.

अशा प्रकारें अध्यात्मिक स्वरुपाचा अर्थ सांगून त्या सच्चितानंद प्रभूच्या सत्त्वमय शक्तीचें तुह्मीं पूजन करीत अहां. जिची आराधना करीत आहां, तिच मर्म पूर्ण लक्षांत घेऊन तिची उपासना करा. ती "जाज्वा पहा" ह्मणजे अज्ञान नाशिनी शुद्ध सत्वमयी – प्रकाशमान ज्ञानदेवी आपला वरदहस्त तुमच्या मस्तकावर ठेवील, असें उपदेशिलें.

भारत

गुरुवार कार्तिक शु. १ दा १८४२

राजकारण

आज प्रत्येक सुधारलेल्या किंवा सुधारूं पाहणाऱ्या देशांतील लोकांस आपली राजकीय स्थिति शक्य तितकी उच्च दर्जाची असावी असें वाटत आहे. पण त्या कामासाठीं पाहिजे असलेली तयारी ज्यानीं केली त्यांसच ती स्थिति प्राप्त करून घेतां येते, हें फ्रान्सांतील राज्यक्रांतीनें उदाहरण घालून दिल्यापासून पाहण्यास मिळत आहे. सुधारणेची परमावधि झाली ह्मणजे, राजकीय स्वातंत्र्य मिळवितां येतें हा जुना अनुभव खोटा ठरून कोणत्याहि रीतीनें राजकीय स्वातंत्र्य मिळविलें ह्मणजे तो देश सुधारला आहे असें मानण्यांत येतें.

कांहीं वर्षांपूर्वी ज्यांचा क्रयविक्रय केला जात असे, असे निग्रो–जे पारतंत्र्य हाच आपला जन्मसिद्ध हक्क असें समजत असत –तेच आज स्वातंत्र्याविषयीं धडपडून आफ्रिका ही केवळ आपणा स्वतासाठींच हे तत्व प्रतिपादित आहेत. अशा काळीं हिंदी लोकां सारख्यांवर व त्यांतहि गोमांतकीय हिंदी लोकांवर आपल्या राजकारणांतील दोष लक्षांत घेऊन ते दुरुस्त करण्याविषयीं किती आतुरता दिसून आली! दोषांची दुरुस्ती करण्यासाठीं अथवा करविण्यांस भाग पाडण्यासाठीं, अगोदर ते दोष कोणते व कसल्या स्वरूपाचे हें ध्यानांत घेतलें पाहिजे. ह्मणून इकडील लोकांस राजकारण समजून त्याचें आकलन करण्यांची बुद्धि उत्पन्न झाली पाहिजे. इकडील राजकारण अरेरावीचें किंवा घेबंदशाहीनें चाललें असल्यामुळें त्याकडे लक्ष्य देण्यास सुधां बहुतेकांस कंटाळा येण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ, मुर्गांवच्या ज्युलगादाचें कोमांकीत रुपांतर झालें असें ऐकून तेथें असल्या द्रव्यसंहारक व अनावश्यक घडामोडीची गरज नव्हती असें कित्येकांस वाटलें असेलच पण इतक्यांत, जन्मित बालक ज्याप्रमाणें मृत जन्मून जन्ममृत्यूंच्या सांगडीची स्पष्ट व तादृश्य खात्री पटवितें त्याप्रमाणें पोर्तुगीज कायद्यांच्या जन्माबरोबर त्यांच्या मार्गे मृत्यु लागतो असें कोमार्कांऐवजीं ज्युलगादच

स्फुट विचार

आमचें स्वराज्य!:– पाश्चात्य देशाकडे दृष्टि फेंकल्यास असें आढळून येईल कीं, प्रजेकडून जेव्हां जोराची मागणी झाली, दंगे, धोपे, बंडें व लढाया झाल्या, तेव्हां कोठें त्यांचे अधिकार त्यांना मिळाले; तसेंच हिंदुस्थानांत ब्रिटिश सत्तेखालीं असणाऱ्या लोकांनीं निरनिराळ्या संस्था कॉन्फरन्स, इंडियन नॅशनल कॉंग्रेस व मॉसलेमलीग, यां सारख्या राजकीय संस्था स्थापून सतत चळवळ चालू ठेवून कित्येक वर्षांपासून मागणी केली तेव्हां कोठें त्यानां किंचितसे हक्क मिळाले. परंतु आमच्या-- पोर्तुगीज सरकारनें आह्मा गोमांतकस्थानां आपण होऊनच आनंदानें स्वराज्य दान दिलें! ह्मणून हें स्वराज्य नुसतें नावाचेंच झालें असून पोर्तुगीज मुत्सद्यांनां त्यांत पाहिजे तेव्हां ढवळा ढवळ करितां येते.

आमचा आळसः–सध्याच्याच करांची जनतेकडून वेळीं फेड व झाल्यामुळें कितीतरी लोकांच्या शेतवाड्या वगैरे जप्त होत असतात हें प्रत्येक ठिकाणीं नजर दिल्यास कळून येण्यासारखें आहे. असें असतांना गोमांतकीय जनतेवर नवीन कर लादण्याचें शतकृत्य करण्यांत आलें आहे. ह्यामुळें स्वराज्य (!) आह्मांला सुखकारक होण्या ऐवजीं अतिशय त्रासकारकच झालें आहे. आणि ह्याचें कारणहि पण दुसरें तिसरें कांहींएक नसून आह्मीं खऱ्या स्वराज्याची प्राप्ति करून घेण्याची बाजू सोडून देऊन कुंभकर्णासारखे घोरत पडलों आहोंत हेंच होय, असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. ह्या आमच्या आळसानेंच स्वराज्यसत्तेचा फायदा लोकांना भयंकर कर वाढीच्या रुपांतच घ्यावा लागत आहे!

आमचें कर्तव्य:– गोमांतकीय बंधूनो कृपा करून आतां तरी हा आळस सोडा! उठा! जागे व्हा! डोळे उघडून पहा! ही वेळ झोपण्याची नसून सभा, व्याख्यानें इत्यादि मार्गानें जास्ती प्रमाणावर चळवळ चालू ठेऊन आमची राजकीय स्थिति सुधारण्याची आहे. हें पवित्र कार्य एकट्याचें नसून पोर्तुगीज इंडियेंतील प्रत्येक सुशिक्षिताचें व धनिकाचें आहे. या कार्याला स्फूर्तिदायक चलन देण्याच कर्तव्य सुशिक्षितांवरच आहे. जर ते या पवित्र कार्याबद्दल निष्काळजी राहून आपली जबाबदारी न ओळखतां आपल्याच सुखाकडे पाहून स्वस्थ बसतील तर ते स्वदेशाच्या, आपल्या मातृभूमीच्या प्रियतम गोमांतकाच्या नाशास कारणी भूत होतील. या कार्याबद्दल पवित्र अंतःकरणानें हातभार लावून यश मिळविण्याची खटपट करूं तरच आह्मांला खरें व टिकाऊ सौख्य लाभेल.

चोरांचा सुकाळ!:- माजोर्डेंथें भरदिवसा कित्येक उडाणटप्पू बदमाषांनीं सार्वजनिक शांततेचा भंग करण्याचा नित्य उपक्रम चालू ठेविला असून तेथील स्थानिक अधिकाऱ्यांकडून त्यांच्या अमानुष

कायम राखल्याचें ऐकून आश्चर्य वाटेल. पण ही गोड गोष्ट सरकारच्या तिजोरींत भर घालणारी आहे असें पाहून समाधानास थोडी तरी जागा असल्याबद्दल आनंद वाटतो. शिवाय, बरें किंवा वाईट असलें तरी तें आमचेंच राजकारण आहे ह्मणून त्याकडेच लक्ष्य देणें हें आमचें आद्य कर्तव्य आहे, हें सांगणें नकोच.

कृत्यांस आळा घालण्याचें काम पार पडत नाही! आज कुणाच्या घरावर दरोडा घाल तर उद्यां भर रस्त्यांत कुणाच्या अंगावरील दागिने उचाड असा प्रकार अप्रतिबंध सुरू आहे! वरील लोकांची मजल विसविस जणांच्या तुकड्या बनवून अत्यंत बेपर्वाईनें व्यक्तिस्वातंत्र्यावर हल्ला घालण्यापर्यंत पोंचली आहे, हें कळून तर आह्मांला अत्यंत वाईट वाटतें. सासष्टीसारखा सुधारणेंत पुढें असलेल्या एका तालुक्यांतील प्रसिद्ध प्रदेशांत उपरिनिर्दिष्ट बंगाली माजावी व तिचा प्रतिकार करण्याचं सामर्थ्य तेथील अधिकाऱ्यांत नसावें ही गोष्ट जितकी आश्चर्याची आहे तितकीच किंबहुना कांकणभर जास्त रिपब्लिकन सत्तेस काजळ फांसणारी आहे, हें कोणीहि कबूल करील-

स्वार्थत्यागाचें दिवाळें:– मुर्गाव येथें स्थापन झालेल्या शहरसुधराई कमेटीनें तेथें एक भव्य राजवाडा बांधून सुधारणेच्या कार्याची मुहूर्तमेढ पेरण्याचा ठराव केला आहे, अशी दाट वदंता पसरली असून वरील कमेटीच्या ठरावाविषयीं कांहीं लोक--पक्षीय वृतपत्रांनीं आपली नापसंती प्रदर्शित करण्याचें कर्तव्यहि योग्य रीतीनें पार पाडलें आहे- शहरसुधराई कमेटीविरुद्ध आमचें प्रामाणिक मत पूर्वीपासूनच असून तिजकडून कसल्याहि प्रकारच्या सुधारणा तर होणार नाहींतच उलट तन्निमित्त लादण्यांत आलेल्यां नवीन करांचें जूं मात्र शांतताप्रिय लोकांच्या मानेवर अव्याहत लटकतें रहाणार, अशीहि आमची दृढ समजूत आहे; कांकीं, स्वार्थत्यागाच्या बाजारांत पोर्तुगीज नोकरशाहीचें दिवाळें वाजल्याचा गवगवा झाल्यास बरेच दिवस लोटले असून, ही स्थिति बदलल्याची वार्ता जों पर्यंत आमच्या कानावर येणार नाहीं तोंपर्यंत आमच्यानीं शहरसुधराईकमेटीच्या कोणत्याहि अभिवचनांवर विश्वास ठेववत नाहीं.

आभार प्रदर्शन:—पणजीच्या श्री सरस्वती वाचनमंदिराच्या वाढदिवसोत्सवास, ह्मापशेच्या सारस्वतविद्यालयातर्फे साजरा करण्यांत आलेल्या सरस्वत्युत्सवास, मडगांवच्या श्रीसरस्वती सेवक मंडळाकडून पार पाडण्यांत आलेल्या श्रीदामोदरवाचनमंदिराच्या वाढदिवस समारंभास व सरस्वत्युत्सवास, कुंकळ्ळीच्या श्री लक्ष्मीसरस्वती वाचनमंदिराच्या वाढदिवसास, सांखळी येथील सन्मित्र समाजतर्फे दो. सा. दे आन्हीयांग वाचनमंदिराच्या ९ व्या वाढदिवस संमेलन समारंभास, ह्मापसें येथील श्री देवश वाचनालयाच्या विद्यमानें साजरा करण्यांत येणाऱ्या श्री लक्ष्मीपूजनोत्सवास, कुंभारजुवें येथील श्रीशांतादुर्गावाचनालयाच्या ११ व्या वाढदिवस समारंभास, कळंगूट येथील श्रीलक्ष्मीपूजनोत्सवास, कुंकळ्ळी येथील श्री शांतादुर्गावाचनमंदिराच्या द्वितीय वाढदिवस समारंभास व जांबावली येथील मराठाशिक्षणसमाजाच्या सप्तम व तिजमार्फत चालविण्यांत येणाऱ्या बालसरस्वती वाचनमंदिराच्या द्वितीय वाढदिवसास हजर रहाण्याविषयीं आह्मांस त्या त्या संस्थांच्या देशभक्त व शिक्षणप्रिय चालकांकडून आमंत्रणें आल्याबद्दल त्यांचे आह्मीं फार फार आभारी आहोंत.

सूचना--- पेपर अगर छापखान्याचें कोणतेंहि सामान पाहिजे असलेल्यानीं मनेजर भारतकडे मागणी करावी.

वर्तमानसार

— पणजीच्या मेडिकल स्कूलचा ७८वा वाढदिवस मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला.

— बार्देसचे प्रसिद्ध जमिनदार सि. बेनेदित मास्कारेंजस यानीं दिवच्या अनाथांस ५०० रुपयांची देणगी दिली. अभिनंदनीय.

—श्री. दत्ताराम लिंगु दळवी हे वकिलीच्या परीक्षेत पास झाले.

—मुर्गांवच्या शहरसुधराईकमेटीनें गव्हर्नरसाहेबांस रहाण्यासाठीं तेथें एक राजवाडा बांधण्याचें ठरविलें आहे, असें ह्मणतात! 'मजा आला.'!

—भारतऑफिसांतील धार्मिक व राष्ट्रीय प्रवचनास व भजनास बरीच मंडळी जमत असून निर्दिष्ट कार्यास सज्जनाकडून अभिनंदनीय सहानुभूति मिळत आहे.

—पैंगीण येथें वाघांचा सुळसुळाट माजला असून गुरांची पुष्कळ हानि होत असल्याचें एक 'गोरक्षक' कळवितात.

—म. गांधीच्या दर्शनास गोव्यांतील बरीच मंडळी बेळगांवला गेली होती, हें कळविण्यांस आनंद वाटतो.

वर्गणीची पोंच

श्री. कीर बाबू वेळीप, कुर्डी		३ रु.
,, घनःश्याम शेणवीं सांवर्डेकर	सावर्डें	३ रु.
,, दत्ताराम सखाराम बांदेकर	,,	३ रु.
,, रामनाथ शेणवीं सांवर्डेकर	,,	२ रु.
,, सोमा शेणवी आगशीकर	पणजी	३ रु.
,, डॉ इजिप्सी सौजा,	,, ,,	३ रु.
,, पुरुषोत्तम शेणवी नावेलकर	,,	३ रु.
,, दत्तात्रय आपा सरमळकर	,,	३ रु.
,, डॉ. आत्माराम गो. बोरकर	,,	२ रु.
,, नारायण शेणवी नयसेंकर	,,	१॥ रु.
,, वासुदेव नारायण शेट गुजीर	,,	१॥ रु.
,, महादेव शेणवी भोवे व काकुले	,,	१॥ रु.
,, शिवलींगाप्पा व्यापारी	,, ,,	१॥ रु.
,, आत्माराम शेणवी शिरोडकर	,,	१ रु.

श्रीमहालक्ष्मी संस्था

करद्वयेन कमलेन धारयंती स्वलीलयः॥
हारनूपूर संयुक्त लक्ष्मिदेवीं नमाम्यहं ॥

कालरोजीं गोरज मुहूर्तावर आह्मीं श्री.महालक्ष्मीच्या पार्थीव प्रतिमेचा सहावा वार्षिक पूजनोत्सव सुरू केला असून पांच दिवस (ता. १५-११-१९२०) पर्यंत चालू राहून प्रत्येक रात्रीं ८ ते १०॥ वाजे पर्यंत भजन, पुढें १०॥ पासून ११॥ पर्यंत पुराण व आरत्या होऊन श्रीचा नैवेद्य-प्रसाद वांटण्यांत येईल-तरी सर्व लक्ष्मीभक्तांस या सार्वजनिक व धार्मिक उत्सवास श्रीमल्लिकार्जुन देवस्थानीं अगत्य पूर्वक हजर राहण्याची सदरहू संघेची सविनय विनंति आहे.

मळकर्णें ता. ११-११-२०

आ. नम्र

नारायण हरि शे. मळकर्णेकर
देऊ राम प्रभू चोडणेकर
माधव वि. प्रभू चोडणेकर
रामचंद्र पांडुरंग दवें
अनंत पुरुषोत्तम रावणकर
उत्सव कमेटी

अनंत मागी मळकर्णेकर
सेक्रेटरी

ANNO V.—NUMERO 34—1920

QUEPEM QUINTA-FEIRA 18 DE NOVEMBRO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas

India Portuguesa...... 3-00-00
India Inglesa............ 3-08-00
Numero Avulso......... 0-01-00

Anuncios

Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—**Bharat**

भारत

BHARAT

SEMANARIO

Tipografia **Pundolica**—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर

गोव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर

मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें—गुरुवार, तारीख १८ माहे नवंबर सन १९२० अंक ३४ वा

HINDU SAMAJ

Com esta denominação installou-se em Rivona do concelho de Sanguem uma instituição, tendo por fim promover desenvolvimento industrial e agricola do nosso Paiz, sem distinção de classes nem de castas.

A palavra *Hindu* que constitui a primeira parte do nome da associação não tem al significação restrita, ficándo nesta abrangidos, apenas, hindus: está, pelo contrario, tomada na acepção mais lata, podendo quem quere, inscrever-se socio dela, uma vez que preencha as condições impostas pelos estatutos do *Hindu-Samaj*, estatutos que, a regular por uma copia manuscrita que temos presente, porisso que eles não foram ainda submetidos á aprovação do Governo, ainda que discutidos e difinidos pelos socios fundadores, como iamos dizendo, os estatutos do *Hindu-Samaj* tem obedecido na sua feitura ao espirito rasgadamente liberal da epoca.

E', portanto, o *Hindu-Samaj* uma associação de interesse publico, digna de ser auxiliada e animada por todos quantos desejam ver levantada e milhorada a situação financeira da nossa terra, cuja salvação —vá o safado lugar comum—depende únicamente do seu desenvolvimento industrial e agricola, objectivo que caraterisa o simpatico e patriotico *Samaj*.

Informações mais esmiuçadas sobre esta associação fornece-las-hemos aos nossos leitores, oportunamente. No entanto garantimos-lhes que não será mal empregado o apoio que se dignarem dipensar-lhe.

E' fundador do *Hindu Samaj* o sr. Vassudeva Vitol Porobo Dessai, diplomado na escola de artes e oficios de Baroda, *Kala-Bhuvan*, com os cursos de quimico analista e desenhador, possuindo, igualmente, conhecimentos uteis da agricultura pratica.

Pelas relações que nos prendem ao promotor do *Samaj*, abstemo-nos de bordar quaisquer considerações sobre a sua individualidade, apetecendo, apenas, á nova *Sociedade* prosperidades *ad multos anos*.

Impostos

Ninguem olvida que o Estado de cuja entidade social-politica já vimos de gisar um palido esboço exerce a sua acção por seus agentes. Como há que volver a atenção pelos negocios publicos, providenciando e provendo ás necessidades colectivas, a Sociedade encarregou desse cuidado o Estado, a fim de satisfazer ás despezas mediante uma *quota parte* dos rendimentos dos membros dela. E' o que modernamente se chama *imposto*, sendo conhecido na antiguidade pela designação de *dizimo* ou *gabela*.

O seu estudo maduro deve ser a constante preocupação dos homens d'Estado, dos economistas, dos agentes da opinião publica, dos publicistas, em fim. Porem, infelizmente, alguns governantes, sem o mais leve criterio, sem noção da engrenagem financial, nem a mais tenue pincelada da sciencia economica, se comprazem em criar *receita* por meio de...*novas* contribuições! Estabeleceu-se então uma visivel incompatibilidade entre o governo e o povo. E' um antagonismo que fervilha solapado entre esses organismos sociais como a lenta fermentação de um vesuvio prestes a rebentar. Convem, por isso, evitar esse descontentamento que se vai propinando pelas populações ante a medonha perspetiva da criação de um....imposto!

Especialistas nesse melindroso assunto, como Montesquieu (,Espr. des Lois", liv. XIII, cap. 1), Mirabeau („Adr. sur la Contrib. Patr.") Girardin (" L'Impot ", pg. 229) e Puynode ("De la Mon., Credit et l'Impot.", pg 70)-são acordes em admitir que o imposto é necessário para assegurar á nação o pleno goso de seus direitos, a eficaz protecção de seus interesses, o livre exercicio de suas faculdades. *Mas* é preciso que o imposto seja equitativo, proporcional, igualitario.

A moderação e a racionalidade dele, a sua necessidade e a sua vantagem são os principais elementos da sua constituição. A justiça deve ser o seu remate, porque a justiça é que faz as nações grandes e felizes. -"Justitia elevat gentes" [Par., XIV, 34].

E Montelembert apostrofára no seio do senado do imperio: "Os povos tem necessidade de ter razão do que fazem os seus dirigentes,". Estes, por exemplo, não devem ater-se sómente ás necessidades imaginarias, ás vanglorias do luxuoso bródio orçamental; nem devem entreter-se com as vantagens fantasiosas de um *projeto extraordinario* ou de seus efeitos problematicos,-como de bom tino observa *J.* Garnier, na sua obra" Elem. de Finances", pgs. 26 e 27, sendo axiomatico que o imposto deve "estar em proporção com as vantagens que dele possa *auferir* o contribuinte," -consoante opina Sully.

Sob esse aspecto, a bitola da contribuição incidenda não deve regular-se segundo o que o povo *pode* pagar, mas restringir-se ao que *deve* dar, em equivalencia ao serviço publico ou vantagem que lhe prestar o Estado. A parcimonia nas despezas publicas, assim como a minoração no imposto são preconisadas pelo insigne J. B. Say, quando escreveu:-"Le meilleur de tous les plans de finance est *de depenser peu*, est le meilleur de tous les impots est le *plus petit*" [Vide "Traité d'Econom Polit.", liv. III, cap. 9].

E' nessa orientação que foi elaborado o relatorio que precede ao Dec. de 16 de março de 1832, onde se consignou este memoravel conceito que, para o cumulo da nossa disdita, é desconhecido, se não menosprezado, pelos nossos palinuros que timoneam á mercê da sorte a barca do Estado; pois lê-se aí que o judicioso problema das finanças consiste em "...fazer de modo que o Povo *pague menos*, e o Tesouro receba mais"!

E o economista J. de Droz acrescenta:—"Aprés avoir réfléchi sur les imposts, on voit qu'ils *ont tous des inconvenients graves*, et on finit pour dire que le meilleur ministre des finances est celui qui *fait le moins payer*"! (continua)

Soares Rebelo

N. da R.

O presente artigo como o publicado sob a epigrafe de *Estado* são da serie da *Jurisprudencia Administrativa*.

BALCAO PROVINCIANO

Reabriu-se, por fim, o nosso *Parlamento provinciano*, com duas sessões, matutina e vespertina, durante o dia *civil*. E' presidido, invariavelmente e fora das horas das repartições, pelo nosso amigo de maiusculo estomago e miniscula cabeça...do mundo de fantasias. São apresentadas, discutidas, aprovadas e executadas diversas propostas do domestico interesse de cidadãos e da publica utilidade.

Como, porem, tudo não è para todos nem o mel para a bôca do asno, trataremos, apenas, do que mais importa...ao nosso convencionalismo, já que dele è a epoca.

A proposta mais palpitante que se discutiu no nosso *Parlamento* e em que tomaram parte todos os conselheiros *natos* e *assistentes* (que correspondem aos *eleitos* do nosso Parlamentos Colonial) incidiu sobre a vida privada e publica do agronomo contratado sr. Kelker.

—Meus senhores, dizia o presidente com a sua voz de trovão jupiterico—isto vai cada vez pior. Pior, pior e pior! Tres vezes pior! Pois que?! Trouxeram a Kelker para trazer á luz do campo de Patrica e da existencia rial a nossa agricultura, deslocando-se á sua *rica* Inspecção dos abstractos dominios de Teoria.

¿ Mas que espectaculo se disenrola ante a nossa vista? O sr. Kelker não faz nada, porque nada se lhe exige...a não ser que faça *boa digestão* para que não adoeça pelo *nirvanismo* em que lhe meteram o *activo* e laborioso espirito do *velho retirado*...

São coisas nossas. E isto prova que tudo nos sai exactamente contrario do que se pensa, do que se deseja e do que todos querem que suceda!

Proponho, porisso, que se lavre na acta *d'ordem da tarde* o mais veemente protesto contra *o* referido *Estado* de... coisas na certeza de que serei por todos secundado nesta minha proposta-Vamos, meus senhores!

Pressurosos, acudiram todos

हजर राहिलेल्या प्रेक्षकसमुहाबद्दल कृतज्ञता व्यक्त केल्यावर श्री सरस्वती देवीच्या जयजयकारांत सभेची समाप्ति झाल्यानें अध्यक्षांनी जाहीर केलें. नंतर रात्रौ हरिकीर्तन आरत्या प्रसाद वगैरे होऊन उत्सवाची परिसमाप्ति झाली.

श्रीशांतादुर्गा वाचनमंदीर

कुंकळ्ळी येथील या संस्थेचा द्वितीय वार्षिक समारंभ पडगांवचे श्री. पुंडलीक वामन विर्जिनकर यांचे अध्यक्षतेखालीं थाटानें पार पडला. प्रथम अहवाल वाचन होऊन कित्येक सद्गृहस्थांकडून आलेलीं पत्रें व तारा वाचून दाखविण्यांत आल्यावर प्रो. गिरी गणेश पै काकोडे यांचें "शिक्षणाची पुनर्घटना,, श्री. त्रिविक्रम विष्णु पै वैद्य यांचें "मद्यपान व जुगार' श्री. राणु विष्णुदास केणी यांचें "संस्कृत शिक्षणाची आवश्यकता,, श्री. विष्णु रघुनाथ भट यांचें "संस्कृत शिक्षणाची व्यवहार्य योजना,, श्री. व्यंकटेश विष्णु वैद्य यांचें "शारीरिक उन्नति,' श्री.भास्कर [illegible] यांचें [illegible] व कर्तव्य,, श्री. विष्णु रंगाजी शेळडेंकर यांचें "शिक्षण" या विषयावर व्याख्यानें व निबंधवाचन होऊन विडे, तुरे, गुलाब वांटण्यांत आल्यावर समारंभ आटोपला.

—मराठा शिक्षण प्रसारक समाज व बाल सरस्वती वाचनमंदीर या उभय संस्थांचा वाढदिवस बुधवार ता. १०।११।१९२० रोजीं मोठ्या थाटानें पार पडला.

—कुसमण येथील यंदांचा लक्ष्मीपूजनोत्सव मोठ्या थाटानें पार पडला. उत्सवाचे अध्यक्ष श्री. पंढरीनाथ शे. शिरवैकर यानीं आपल्या कामांत कसलेंच उणें पडूं दिलें नाहीं.

—भारत मंडळाच्या सार्वजनिक दिवाणखान्यांत दीपवाळी निमित्त प्रसिद्ध ह. भ. प. यशवंत भेंडे यांचें 'आधीं प्रपंच करावा नेटका, मग लागावें परमार्थविवेका' या दाखलीवर सुश्राव्य प्रवचन झालें.

—मळकर्णें येथील श्री लक्ष्मीसंस्थेमार्फत लक्ष्मीपूजनोत्सव ६ दिवस चालू राहून मोठ्या थाटानें पार पडला सदरहू उत्सवानिमित्त आमच्या संपादकाचे 'एक एका साह्य करूं। अवघे धरूं सुपंथ॥ या अभंगावर प्रवचन झालें.

—रिवण येथेंहि हिंदुसभेमार्फत तीन दिवस लक्ष्मीपूजनोत्सव सुरू होता. श्री. वा. वि. देसाई व नारायण भा. नाईक यांचीं 'संघशक्ति'व 'दैव व प्रयत्न' या विषयांवर भाषणें झालीं. 'हिंदुसभेनें' भारतोदय नांवाचें मासिक लवकरच प्रसिद्ध करण्याचेंहि ठरविलें आहे.

—दीपवाळीच्या सुमुहुर्तावर सांगें येथे उन्नतिसमाज संघेमार्फत "श्रीदत्तवाचनमंदीर" नावांचें वाचनालय उघडण्यांत आलें. या कामानिमित्त भरलेल्या सभेस ५ वाजतां सुरुवात झाली. प्रथमतः प्रो. शिवराम संजगिरी यांचे सूचनेवरून टाळ्यांच्या गजरांत रा. शिवराम गो. वेणकार यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारल्यावर रा. सदाशिव प्र. भाटकार यांचें "वाचनालयाची आवश्यकता" या विषयावर भाषण झालें. नंतर त्याच विषयावर रा. गजानन नाडकर्णी, कृष्ण संजगिरी व श्रीपादराव वालावलीकर यांचीं पोर्तुगीज भाषेंत व्याख्यानें झालीं. पुढें श्री. पंढरीनाथ मु. सालेलकर यानीं आपल्या शाळेंतील मुलांस उद्देशून लिहून आणलेला निबंध वाचला. शेवटीं रा. बाबले कोसंबी यांचें भाषण झाल्यावर समारोप होऊन सभेचें काम निर्विघ्नपणें पार पडलें. वाचनालयास मदत म्हणून बसल्या बैठकींत २०० रुपये जमले.

भारत

गुरुवार कार्तिक शु. ७ मी १८४२

पाहिजे 'जातीचे'!

चालू नव्हेंबरांत कोंग्रेस प्रोव्हींसियालचें चौथें अधिवेशन व्हावयाचें असून त्याची तयारी करण्यांत बरेच दिवस पासून खटपट चालली आहे. सरकारच्या सहानुभूतीच्या कृपाछत्राखालीं वर्षांतून एकदां कोंग्रेसची बैठक व्हावयाची असल्यामुळें व तींत सरकारी व बिनसरकारी लोकांस भाग घेतां येत असल्याकारणानें प्रजेचीं सगळीं गाऱ्हाणीं सरकारच्या कानावर पडून त्यांचें निवारण करण्याचें कार्य सरकारकडून होण्याच्या बाबतींत, गोव्यांतील लोकांची आर्थिक उन्नतावस्था घडून येण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणें निरनिराळ्या व दूर ठिकाणाहून येऊन कोंग्रेसांत एकत्र होणाऱ्या प्रतिधींनीं गोमांतकच्या गरजा कोणत्या व त्यांतील अत्यावश्यक कोणत्या हें लक्षांत घेऊन त्या सुधारण्याचें कार्य अमलांत आणणें सुलभ पडेल,हाच काय तो कोंग्रेस प्रोव्हींसियाल अस्तित्वांत येण्याचा मुख्य उद्देश. पण तो सिद्धीस जाणें किंवा न जाणें हें कोंग्रेसिस्तांच्या कर्तव्यशीलतेवर अथवा कामचुकारूपणावर अवलंबून आहे. एखादा उत्तम ठराव पास होणें, सगळ्या गरजांत अत्यंत महत्वाच्या गरजांचा ऊहापोह करून त्या निवारण्यांची उपाययोजना करणें गोव्यांतील विचारी लोकांच्या विचारसरणीच्या धोरणानें व एकदिलानें उन्नति मार्ग आंखणें अशीं एकाहून एक विशेष जबाबदारीचीं कृत्यें करणें हीं जरीं कोंग्रेसचीं कर्तव्यें आहेत तसेंच त्या पास झालेल्या ठरावांस सक्रिय अस्तित्वाचें मूर्त स्वरूप प्राप्त करून देणें हेंहि पण अतिशय जबाबदारीच्या कामगिरीचें आचरण आहे ही गोष्ट विसरतां येणार नाहीं.

सरकार हें प्रजेपाशीं अनेक नियमांनीं बद्ध झालेलें असतें; पण त्या नियमाचे पाश अंगवळणी पडले असल्यावरून त्यांची आठवण त्यास न राहाणें हें स्वाभाविक आहे. म्हणून ज्या वेळीं सरकारच्या कर्तव्याची जागृति काण्याचा प्रसंग येतो त्या वेळीं त्या नियमाचे पाश प्रजेकडून आंवळल्यावांचून सरकारास आपल्या कर्तव्याचीआठवण पडत नाहीं. असा अनुभव आहे. कोंग्रेस प्रोव्हींसियाल कडून पास झालेले ठराव अस्तित्वांत येणें किंवा न येणें हें सरकारी सहायावर अवलंबित झालेले दिसेल त्या वेळीं सरकारास तें देणें भाग पाडण्याकडे प्रयत्नाची शिकस्त केली पाहिजे. ह्या कामीं, म्हणजे सरकारच्या कर्तव्याची जागृति करण्यासाटीं अशी एक अगत्याची अट आहे कीं प्रत्येक नागरिकास स्वदेशाशीं आपलें कळकळीचें कर्तव्य काय ह्याची जाणीव असली पाहिजे. सुधारणा झाली पाहिजे असें सगळ्यांसच वाटतें. तथापि त्या कशा अमलांत आणाव्या ह्या उपायांचीं जाणीव नसल्या कारणं 'योजकस्तत्र दुर्लभ' ह्या न्यायानें, अखेरीस सुखकारक परिणाम दृश्य स्वरूपांत पाहण्यास मिळत नाहीं. सर्वत्र सुधारणा पाहिजेत असें म्हणून वरवर केवळ पांडित्य दाखविण्याकरितां कांग्रेसांत भाषण करून कार्यसिद्धीची अपेक्षा करणें म्हणजे तोंडानें भात झटल्याबरोबर जेवण उरक. ल्याचा बहाणा करणें होय. पण अशानें खऱ्या भुकेचें शमन थोडेंच होण्यासारखें आहे. ह्याच दृष्टिकेंद्रानें कांग्रेसांतील भाषणें व ठराव ह्यांकडे पांहूं लागलों तर वरील क्षुधा तृप्त न होण्याची उपमा त्या ठरावांस सुधां लागू पडते असें दिसेल. मात्र क्षुधेऐवजीं पोटांतील अंतरींची तळमळ हे शद्ब घेतले पाहिजेत. सारांश हाच कीं आह्मांस आमचें कर्तव्य कळल्या खेरीज सरकारच्या कर्तव्याची ओळख होणार नाहीं व झाली तरी सरकारास त्याचीं कर्तव्यें करणें भाग पाडतां येणार नाहीं.

पुष्कळदां; सगळ्यांचें काम तें कोणाचेंच नव्हे असें समजण्याकडे बहुतेकांची प्रवृति असल्यामुळें कोंग्रेसांत भाग घेण्याच्या कामीं अनेक जण टाळाटाळ करितात. अशा रीतीनें होतें काय तर सार्वजनिक कार्याची उत्सुकता न वाढतां शिथिल पडते. जर गोमांतकस्थांसच कोंग्रेसाविषयीं ओढा नाहीं तर सरकारावर त्यांचें वजन कसें पडावें? ह्याकरितां कोंग्रेसांत भाग घेऊन तो अस्तित्वांत ठेवण्याचा स्तुत्य उद्देश तडीस नेण्याचें कार्य खोळंबूं देऊं नये.

स्फुट विचार

अनाथांस मदतः— दिव येथील वादळांत सांपडून अनाथ बनलेल्या लोकास मदत पुरविण्यासाटीं जी इकडील लोकांनी सहानुभूति दाखविली ती फार प्रशंसनीय होय. ग्रामसंस्थांतून, देवाळयांतून किंवा हरेक लोकोपयोगी संस्थातून ज्या थोड्या बहूत रकमा मदतीदाखल देण्यांत आल्या त्या, त्या त्या संस्थांच्या चालकांच्या व पालकांच्या उदारंतःकरण्याची साक्ष पटवीत आहेत. पणजीच्या मेडिकल स्कुलानें तर मुद्दाम १ नाटक प्रयोग करून त्याचें उत्पन्न वरील कामीं दिलें हें त्या स्कुलाच्या प्रोफेसर साहेबांस फार भुषणावह आहे. या प्रमाणें 'एकास दुःख प्राप्त झालें असतां दुसऱ्यानें त्याकडे कानाडोळा न करतां शक्य तितकें सहाय्य करावें' या तत्वाचा प्रसार झालेला पाहून कोणासहि समाधान वाटल्यावांचून रहाणार नाहीं. एकमेकां विषयीं कळकळ वाळगणें हें मानवी प्राण्याचें एक पवित्र कर्तव्य कर्म आहे त्याकडे दुर्लक्ष्य करणें अन्याय्य होय.

पगारवाढः— गेल्या आठवड्यांतील सरकारी ग्याझेटवर, मामलेदारांच्या व आणखी कांहीं कामदारांच्या पगार वाढीचे आंकडे प्रसिद्ध झाले आहेत. पगार वाढीच्या लाटेचे तुषार ज्युदिस्याल, मिलितार वगैरे सर्व खात्यांतील कामदारांवर उडून ते शांत झाल्यामुळें मामलेदार व इतर सर्वहटांस तसल्या शांततेचा उपभोग घेण्यासच न मिळाल्यामुळें, त्यांच्या आंगची होणारी आग आतां खरोखर विझून जावून त्यांचे खिसे मात्र आतां गरम होतील यात संशय नाहीं. पगार वाढीच्या लाटेनें नोकरशाहीला गार केलें खरें; परंतु त्याच लाटेंत लोकशाही करवाढीच्या डोहांत गटकळ्या खात राहील. अशा या गटकळ्या खातां खातां गलितगात्र करवाले 'राम' न म्हणतां सुरक्षित कसे पार पडतील हाच प्रश्न सध्या समाजधुरिणांसमोर उभा राहिला आहे.

ठिकठिकाणचे रा. उत्सव:— या सदराखालीं प्रसिद्ध झालेल्या मजकुरावरून हिंदुसमाजांत किती झपाट्यानें राष्ट्रीय व धार्मिक जागृति होत आहे, हें सर्वांस कळून आनंद वाटल्याशिवाय खास रहाणार नाहीं, अशी आमची खात्री आहे. हिंदुसमाजाच्या या वाढत्या जागृतीबद्दल आह्मीं त्याचें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करून, उत्सवांच्या एकंदर चालक मंडळीस विनवितों कीं, त्यानीं त्या त्या उत्सवांत दाखविलेले, उत्साहयुक्त जोम, अभिनंदनीय चिकाटी, अप्रतिम प्रेम, इत्यादि देशहितवर्धक गुण वाढत्याच प्रमाणांत ठेऊन अनेक आपत्तींत गटकळ्या खात असलेल्या आमच्या प्रिय गोमांतकच्या मुक्ततेचें श्रेय घ्यावें. अर्थात् 'उत्सव तर मोठ्या थाटानें पार पडला. आतां काय? वाचलों जगलों तर पुढें पाहून घेऊं!' असल्या प्रकारच्या जुन्या विचारसरणीला कायमचा फांटा देऊन, उत्सवानिमित्त उत्पन्न झालेल्या जागृतीची काळजीपूर्वक जोपासना करणें, हेंच सध्याच्या परिस्थितींत आपलें खरें कर्तव्य आहे, हें प्रत्येकानें ध्यानांत ठेविलें पाहिजे, यांत संशय नाहीं.

कांग्रेस प्रोव्हींसियालः— उपरिनिर्दिष्ट गुणाचा अभाव असला म्हणजे कशी फजिती होते याचें ताजें प्रत्यंतर पहावयाचें असल्यास चालू महिन्याच्या २५ तारखेस भरवूं घातलेल्या कांग्रेसच्या डेलिगेटांच्या संख्येंत मिळणार आहे. ज्या कांग्रेसांत प्रथम प्रथम प्रतिनिधींची गर्दी उसळत असे त्याच कांग्रेसांत यंदां अवघे ४०।४५ च डेलिगेट जमणार आहेत. ही दुःखाची गोष्ट आह्मांला काय शिकविते? कीं, कोणत्याहि कार्यारंभीं दिसून येणारा उत्साह वृद्धिंगत न झाल्यास, अगर न टिकल्यास, त्या उत्साहाबरोबरच कार्याचीहि होळी होते. म्हणून हिंदुसमाजांत सध्या दृष्टीस पडत असलेली जागृतीची तेजस्वी ज्योत सतत पेटती रहाण्यास, जोम, चिकाटी व प्रेम हे गुण वाढत्याच प्रमाणांत ठेवणें हें प्रत्येक देशभक्तांचें सांप्रतचें अत्यंत महत्वाचें कर्तव्य होय. तें कोणीहि विसरतां कामा नये.

वर्तमानसार

—बोरी येथें न्हावी लोकानीं संप केला होता असें तेथील एक 'क्ष' कळवितात.

'भारत' ऑफिसांत आमच्या संपादकांशिवाय श्री. सदाशिव सा. भाटकर, जयवंत मळकर्णेकर व अनंत रा. शिरवैकर यांचीं धार्मिक व राष्ट्रीय प्रवचनें झालीं.

—स्थलसंकोचामुळें रावबहादूर ग. स. केळकर यांचें पत्र येत्या अंकावर प्रसिद्ध करण्यासाटीं ठेवावें लागत आहे.

भाविकांस विनंति.

श्री एकादशीमंडळ, कुंकळ्ळी सांवरकट्टा या संस्थेचा द्वितीय वार्षिकोत्सव येत्या कार्तिक शु॥ ११ दशीं सोमवार ता. २२-११-१९२० रोजीं संध्याकाळीं कोनकीजतां प्रवचन वगैरे होऊन साजरा होणार आहे. रात्रौ सात वाजतां भजन व मिरवणूकहि होईल. या सार्वजनिक उत्सवास येण्याबद्दल भाविक लोकांस प्रेमपूर्वक विनंति आहे.

संस्थेचा नम्र सेक्रेटरी
राणु विष्णुदास केणी रोबोस

ANNO V.—NUMERO 35—1920 QUEPEM QUINTA-FEIRA 25 DE NOVEMBRO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas

India Portuguesa...... 3-00-00
India Inglesa.............. 3-08-00
Numero Avulso.......... 0-01-00

Anuncios

Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत

BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर

गोव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर

मराठी दर ओळीस दोन आणें. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें—गुरुवार, तारीख २५ माहे नवंबर सन १९२० अंक ३५ वा.

UMA CARTA

Quanto á 3a. razão em que o sr. Rau Bahadur se refere á diversidade de condições relativas ao solo, clima e agua, á rotina e preconceitos de agricultores etc., não é ela, igualmente, de peso, porisso que a nossa Direcção poderia vencer tais obstaculos se, durante a sua longa existencia de 8 anos e pico trabalhasse naquele sentido, em vez de adorar o *regime de papelada*.

Se o sr. Kelker procurasse conhecer bem a historia do passado da Direcção de Serviços Agricolas e Florestais, não avançaria certamente o que avançou na sua 3a. razão.

De resto, *toda a gente sabe* que as dificuldades apresentadas na mesma *razão* eram de molde a ser desfeitas com pequeno esforço, pois bastava tirar apenas o partido do resultado das experiencias da Repartição de Agricultura da Presidencia de Bombaim cujos terrenos não diferem lá muito dos nossos, estructuralmente.

Nada disso se fez e daí a critica que o ilustre funcionario contratado procura inutilmente e sem exito neutralisa-la

E, finalmente, a 4a razão "da simples nomeação do director não poder progredir a agricultura, porisso que, sendo o seu principal papel dirigir o pessoal subordinado, o mesmo director não dispõe de tempo para percorrer aldeias e aldeolas" e, sem mais nem menos, *irmã gemea* doutras, isto é, completamente distituida de fundamento, pois não há nenhum principio agronomico que faça circunscrever o papel do director duma repartição de Agricultura tão somente á direcção e fiscalisação do pessoal subordinado.

Em suma, o *quadrado...racional* em que se alicerça o fragil edificio da defesa do passado da Direcção de Serviços Agricolas e Florestais, não tem cabimento no dominio geometrico da rialidade.

Não importa, porem, o passado, agora que a mesma Direcção e o seu agronomo contratado manifestam o seu patriotico empenho de introduzir melhoramentos apropriados na nossa agricultura, pondo-se em contacto intimo com os agricultores do paiz e relegindo ao se undario plano o tal *regime de papelada*, mal que *piormente* dislustra o brilho do *nosso milhor* sistema administrativo.

Estamos certos que os nossos agricultores e outros interessados empenhar-se-hão em aproveitar o esforço e boa vontade da Direcção de Serviços Agricolas e Florestais, passando uma esponja de completo esquecimento por sobre o *quadro...preto* do passado dêla.

E temos dito.

Serviço postal

Recebemos algumas cartas de Rivona e Curdi, do concelho de Sanguem, nas quais os seus autores se queixam da ausencia absoluta de distribuidores naqueles aldeas.

Trataremos deste assunto mais de espaço.

Impostos

Ora agora já meneado o assunto sob a sua silhueta moral e filosofica, esta pálpá lo sob o seu aspeto economico. Há regras irrefragaveis de cuja rigorosa observancia depende o equilibrio financeiro de uma nação ou estado, e que não devem ser postas ao olvido pelos nossos governantes, sob pena de a sua acção ser nociva ao povo.

Necker doutrinara que "*não é permetido estabelecer* um imposto antes de se pensar nos *recursos* que podem produzir a ordem e a economia"; ao que acresce o seguinte conceito de Dumet de Vorgues:- "um Estado bem ordenado deve dispor a sua administração segundo as *recetas que racionalmente* pode obter".

E' este o mais rudimentar principio que deve presidir a qualquer plano de criação do imposto, e que parece estar infiltrado nas regras estabelecidas pelos §§ 1o e 2o do art. 111 da Carta Organica.

Porem nós não temos essa orientação que os economistas de paizes cultos aconselham a todos que por dever do oficio empunham a direcção administrativa de uma provincia. A criação de um imposto sem coexistir a fonte de receita que a possa suportar, é um contrasenso visivel, um erro injustificavel, que não honra o autor do projeto ou projectos, nem lisongeia a vaidade da iniciativa.

Só poderá atestar a ausencia do senso politico e revelar a afirmação de principios anti-economicos.

O professor Baudrillart, no seu "Man. d'Econ. Politique", escreve a este respeito:

"Toute infraction á cette règle ne saurait causer qu'un *trouble* dans la situation respective des diferentes classes et porte *graviment prejudice* á l'ensemble ..."

E o notavel estadista M. de Audiffret, na sua obra "Syst. Financ de la France", consigna este conselho:

"Une *imprudente* disposition fiscale... comprimerait l'essort du genie et *la prosperité* d'un grand peuple".

J. B. Say, hostilisando tais ideias que fervilham nos cerebros dalguns pilotos da náu publica, mal avisados e pouco adestrados na gerencia do Erario, emitia o seguinte juizo como quem acabava de sorver o ultimo trago no calix de amargura.

"Du moment que cette valeur est payée par le contribuable, elle *est perdu* pour lui; du moment qu'elle est *consommeé par le governement*, elle est *perdu* par tout le monde et ne se reverse pint dans la societé...!! (Vide "Traite d'Econ. *Polit*" *liv III, cap 9*)

Mas os nossos ... estadistas olham as *coisas publicas* por um prisma diamentalmente avesso aos ditames dos economistas de cotação mundial, como se evidenciou quando da aprovação do insigne *projeto* de criação de novas imposições,- de envolta com a aluviar de projectos, analogamente...famosos!

E' que somos uns optimistas até á obsecação, a aspirarmos pelas cebolas do Exito, antolhando uma prosperidade parasdisiaca nesses tempos que estão deslisando sob a negra carranca de...*vacas magras*!

Sacrifica-se um exiguo *presente* com mira num futuro de ... problematica vantagem!

Triste orientação, anti-economica, anti-patriotica!

Havemos de concluir.

Soares Rebelo

Erratas.-No artigo *O Estado*, onde se lê-conforme os seus cotados publicistas-amalgadas-corrija-se-os mais cotados-amalgamados-

No artigo *Impostos*, onde se lê--em nortear pelos ensinamentos aqueles estadistas--, corrija--se-em nortear-se... daqueles economistas.

O Diario da Noite

Completou um ano da sua fundação este importante diario da capital que com a seriedade que o caracterisa está prestando ao Paiz relevantes serviços.

Nossas felicitações.

त्यांचें हें ह्मणणें कबूल आहे; परंतु मुंबई इलाख्यामध्यें निर्माण झालेल्या शेतकीखात्यानें ज्या बावीस वर्षांत कांहीं कामगिरी केली नाही त्या अवधींत आमच्या ८-९ वर्षांच्या वयाच्या शेतकीखात्यानें केलेला अडाणीपणा खात्रीनें केला नसावा. कारण त्या शेतकीखात्या पासून लोकांस २२ वर्षांत कांहीं फायदा झाला नाहीं तरी ह्या शेतकीखात्यामुळें ८-९ वर्षांच्या मुदतींत जसें नुकसान झालें तसें तरी खास झालें नसेल.

देशांत किंवा प्रांतात शेतकीखातें निर्माण करण्याचा हेतु अडतेली शेती सुधारण्याचा असून शिवाय साधल्यास नवीन प्रकारची लागवड, जर ती फायदेशीर होण्याचा संभव असला तर; चालू करावयाचा असतो. असलेली शेती सुधारण्याची किंवा नवीन प्रकारची लागवड लोकांत चालू करावयाची असल्यास त्या बाबतींत प्रयोग करून जे अनुभव येत जातील ते लोकांच्या नजरेस आणून जे फायदेशीर ठरतील त्यांच्याच अनुरोधानें शेतीसुधारण्याचें काम शेतकी खात्याचें असतें. आपलें अस्तित्व लोकांच्या निदर्शनास आणण्यांकरितां, ज्यावेळीं गांवांत बियाचा तुटवडा पडेल त्यावेळीं स्वतः कोणत्याच तऱ्हेचा अनुभव न घेतां, कुठल्यातरी गावांतून कसलें तरी बीं आणून, स्वतःच्या शास्त्रीय ज्ञानाच्या असलेल्या फायदेशीर दारूखान्याच्या जोरावर, तें लोकांस, मोफत किंवा विकत देऊन बहुतेकांचें नुकसान करण्याचें काम शेतकी खात्याचें नसावें अशी माझी प्रामाणिक समजूत आहे. किंवा हवा, जमीन व पाणी या बाबतींत कांहीं तरी सारखेपणा असलेल्या शेजारच्या शेतकीचा अनुभव घेऊन ते अमलांत आणण्याऐवजीं वरील बाबतींत अगदीं उलट असलेल्या ठिकाणच्या व जातीच्या शेतीचा एकदम स्वीकार करण्याचा प्रयत्न करून व आपण आपलें कर्तव्य बजावतों हें दाखवून लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्यासाठींही तें निर्माण झालेलें नसावें. परंतु ह्या धोपटमार्गी सिद्धांताप्रमाणें वर्तन झाल्यास शेतकीखात्याच्या शास्त्रीय ज्ञानास काळीमा लागेल ह्मणूनच कीं काय त्याच्या उलट आमचें शेतकीखातें वागत असावें असें दिसतें. अथवा ह्यांत आश्चर्य तें कसलें? आमच्या नामदार व उदार पोर्तुगीज सरकारच्या बहुतेक खात्यांपैकींच हेंही एक असल्यामुळें वास्तविक परिस्थितीची व ह्या खात्याची फारकत असल्यास नवल नाही. शिवाय गोव्यांतील गरीब प्रजेस आलेल्या अनिष्ट ग्रहांपैकीं स्वतःच्या एकादशस्थानास गुरु आणून बसवणारा व स्वयंप्रकाशित होण्याचा प्रयत्न करणारा असा हा एखादा नवीनच ग्रह असावा असेंही आज पर्यंतच्या अनुभवावरून ह्मणावें लागतें!

आमच्यांत अशी एक ह्मण आहे कीं, "मुलाचे गुण पाळण्यांत दिसतात". मुंबई इलाख्यांतील शेतकी खात्यानें जें काम आज बजावलेलं आहे तें होण्याचे गूण त्या खात्याच्या जन्मापासूनच लोकांच्या निदर्शनास येत होते. एवढेच नव्हे तर लोकांसाठींच आपला जन्म आहे असें त्या खात्याच्या लक्षांत असून शेतकऱ्यांचें हित व्हावें ह्मणूनच त्या कडून अप्रतिहत प्रयत्न होत होते. त्यांच्या इच्छेविरुद्ध कोणतेंही वर्तन त्या खात्याकडून होत नसून सहानुभूतिपूर्वक लोकांस आपल्या अनुभवाचा फायदा तें तिकडील शेतकऱ्यांस

भारत

गुरुवार कार्तिक व. ३० शा १८४२

'हिंदु-समाज'

जपानसारख्या चिमुकल्या राष्ट्राचें उदाहरण डोळ्यांसमोर धरलें तर त्या राष्ट्राची आकस्मिक उन्नति व उत्कर्ष पाहून कोणासहि आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. १९०३ सालच्या रुसो-जपानी युद्धाच्या पूर्वी तें एक सध्याच्या पोर्तुगीज राष्ट्रासारखें राष्ट्र आहे या व्यतिरिक्त दुसरी कसलीहि कल्पना मनांत येणें शक्य नव्हतें. तीच कल्पना आज कायम आहे काय? दोन दशकांच्या अवधींत त्यानें जी प्रतिष्ठा व जें वैभव मिळविलें त्यामुळें अखिल जग दिपून गेलें नाहीं काय? ही उन्नति इतक्या थोड्या अवधींत झालेली आहे कीं, असें घडणें प्रथम दर्शनी अशक्य वाटतें!

जपानच्या उन्नतीच्या मुळाशीं काय आहे, या उन्नतीचा पाया कोणत्या तत्वावर उभारला गेला आहे हें, जपानचे बादशहा मिकाडो यांचे उद्गार वाचले ह्मणजे, सहज कळण्यासारखें आहे. "आमच्या राज्यांतल्या प्रत्येक खेडेगावांतील कुटुंब सुशिक्षित झालें पाहिजे. नव्हे तर प्रत्येक कुटुंबांतील प्रत्येक मनुष्य सुशिक्षित बनला पाहिजे." शिक्षण खात्याचे नियम करतेवेळचे हें त्यांचे उद्गार आहेत.

वाङ्मयशिक्षण हें राष्ट्राच्या उन्नतीचें एक महत्वाचें साधन असलें तरी खरी उन्नति त्या राष्ट्राच्या सांपत्तिक स्थितीवरच अवलंबून असते. राष्ट्र सुसंपन्न असलें, राष्ट्राच्या मागें उदरंभरणाची काळजी नसली ह्मणजे त्याला शांत चित्तानें विचार करावयास वेळ मिळतो व त्याकडून निरनिराळे प्रचंड शोध लागतात,

गोवा प्रांत किंवा हिंदुस्थान यांची स्थिति विचार करण्यायोग्य समाधानकारक आहे काय? एका काळीं ज्यांची पूर्ण मालकी होती त्या संपत्तीची राजरोस लूट चाललेली पाहून, नवे शोध लावण्याजोगी त्याची मानसिक स्थिति स्वस्थ आहे काय? उदरंभरण कसें होईल हीच विवंचना ज्यांच्यामागें लागलेली आहे त्यांची डोकीं नवे शोध लावण्यालायक शांत असतील काय? आमचा देश भुकेकंगाल होत चालल्यामुळें आमच्या शिक्षणाचीहि शोचनीय स्थिति होत चालली आहे. जीवनार्थ कलह 'आ' पसरून प्रत्येकाच्या पाठीमागें लागल्यामुळें व शिक्षण हें नोकरीच्या पगाररूपी एक अल्पसें साधन असल्यामुळें नोकरीसाठीच शिकणारे फार! जे जास्त शिकतात ते जास्त पगाराकरितां! निवळ ज्ञानार्थ शिकणारे फार कमी! अशी स्थिति असतां देश संपन्न होण्याची आशाच नको. हरेक गोष्टीसाठीं जें आह्मांस परकीयांकडे पहावें लागत आहे ही परिस्थिति बदललीच पाहिजे. व ती बदलण्यासाठीं आमच्या राष्ट्राची सांपत्तिक स्थितीची वाढ करण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे हें निर्विवाद आहे. आपल्या देशांत उद्योगधंदे स्थापणें, कलाकौशल्य शिकविण्याच्या शाळा व कारखाने उभारणें, हींच राष्ट्राच्या संपत्तीचीं खरीं साधनें होत. ज्या देशांत हीं साधनें नाहींत तो देश विपन्नावस्थेच्या खोल अंधःकार गर्तेंत पडल्याविना राहणार नाहीं. ह्या कामीं परिपोषक असें सरकारी सहाय्य मिळणें शक्य नाहीं हें निदान, सध्याचे गोव्यांचे गवर्नर सिं. मोरायस यांचे परवांचे सोन्यांचे बोल ज्यांनीं ऐकिले किंवा वाचले असतील त्यानां पटलेंच पाहिजे. अशा परिस्थितींत आमच्या भांडवलवाल्यांनीं--श्रीमंतानीं - पुढें सरसावलें पाहिजे.

आपल्या देशांत योग्य कामधंदा न मिळाल्यामुळें किती तरी लोक परक्या ठिकाणीं जात आहेत व त्यांच्या उत्कर्षाकरितां त्यांना मनाविरुद्ध काम करावें लागत आहे. ज्या शेंकडो परकी व्यापारी कंपन्या हिंदुस्थानभर पसरल्या आहेत व ज्यांची एकसारखी भरभराट होत आहे ती कशामुळें? आह्मी हिंदुस्थानवासी भांडवलवाले नामर्द ठरलों ह्मणून. नाहीं तर ह्या कंपन्या हिंदुस्थानांतील द्रव्यरूपी लोणी घुसळून काढून आपापल्या देशांत रवाना करतेना व आह्मीं जे त्यांच्याकडे नोकरी करितों त्याबद्दल ते दोन दिडक्यारुपी ताक आमच्या हातावर टिचतेना! पण त्यांचा तरी यांत काय अन्याय? मुळींच हात पाय पसरण्यासाठीं जर भटाला ओसरी देऊन आपण अंगणांत जाऊन उभा राहिलों तर यांत त्याचा काय दोष? पुष्कळ अक्षरांची एकेक लांब शेपटी अडकवून घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांपुढें लांगूलचालन करण्यांत जर आह्मांला श्रेष्ठतर इतिकर्तव्य वाटलें व महिन्याकांठी हातीं पगार पडला ह्मणजे मोक्षपदाची एक पायरी चढल्यासारखें वाटलें तर परक्यांकडे काय दोष? तर आमचें आह्मींच पाहिलें पाहिजे, ते आमचे हक्क आह्मांला देतील किंवा देण्याचा प्रयत्न करतील अशी कल्पना सुद्धां होऊं देऊं नये. अचानक हवोलें सांपडलें तरी तें परत करणारे 'चीनचे खरे व्यापारी' ते नाहींत हें लक्षांत ठेऊनच आह्मीं पुढें सरसावलें पाहिजे. नाहीं तर ज्यांनीं आमची मुस्कटदाबी केली आहे ते उद्यां आह्मांला अंधार कोठडींत ढकलण्यांस कमी करणार नाहींत.

विविध प्रकारचे धंदे चालावे व त्यायोगें आमच्या मातृदेशाची संपत्ति वाढावी या उद्देशानें वरील नावांची संस्था स्थापन झाली आहे. तिचें खरेंखुरें कार्य लोकांच्या उदार आश्रयावर अवलंबून आहे हें उघड आहे. संस्थेचें एकंदर कार्य विधायक व अखिल हिंदुसमाजाच्या सांपत्तिक उन्नतिप्रीत्यर्थ असल्यानें आमचे हिंदबांधव तिला आपापल्या शक्त्यनुसार सहाय्य करण्यांचें कर्तव्य योग्य रीतीनें बजावतील अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे.

यशवंत वि. प्र. देसाई

अननसें पाहिजेत

स्फुट विचार

असहकारिता:--येथील कांहीं खिस्ती पत्रानीं महात्मा गांधींच्या असहकारितेविरुद्ध कोल्हेकुई आरंभिली असून असहकारितेचें निरर्थकत्व सिद्ध करण्याप्रीत्यर्थ 'अव्यापारेषु' प्रयत्नांचा एकसारखा सपाटा चालविला आहे. असहकारितेच्या चळवळीपासून स्वराज्याचा प्रश्न सुटेल किंवा नाहीं याकडे पहाण्याचें तूर्त तरी कारण नाहीं. परंतु आह्मांला आश्चर्य वाटतें तें वरील पत्र कारांच्या बेजबाबदार व अनुदार टीका केल्याचें! ज्यानां स्वार्थत्याग ह्मणजे काय हें ऐकून सुद्धां माहीत नाहीं अशानी आपला अगदींच संबंध नसलेल्या चळवळींविरुद्ध कागदी घोडे चालविण्यास निधड्या छातीनें पुढें सरसावणें ह्मणजे पहिल्या नंबरचा मूर्खपणा करण्यासारखें नव्हे काय? परंतु त्यांचा तरी अन्याय कसचा? शेजारच्या अंग्लोइंडियन पत्रांतून जें कांहीं खोटेंनाटें नाणं त्यांच्या खिशांत उतरतें, त्यांचा ते सारासार विचार न करितां उपयोग करीत असतात. आमच्या हिंदुबांधवानां प्रस्तुत विषयासंबंधानें स्वतंत्र मत बनविण्याचीं खरींखुरीं साधनें असल्यावरून ते वरील पत्रकारांच्या खोट्या नाण्यानें फसले जाणार नाहींत अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे.

--केवळ सामानाची एक व्यागीज मागें राहिल्यामुळें राजापुरकर नाटक मंडळीनें गेल्या शनिवारीं जाहीर केलेला "पुंडलीक" नाटकाचा प्रयोग झाला नाहीं.

--'मेस लितेरारिउ हिंदु' या उपयुक्त संस्थेची दिवसेंदिवस होत असलेली प्रगति पाहून आह्मांस अत्यानंद होत आहे. संस्थेच्या चालकांस आह्मी अभिनंदन करितों.

ANO V.—NUMERO 38—1920

Pangim QUEPEM QUINTA-FEIRA 16 DE DEZEMBRO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
India Portugueza...... 3-00-00
India Inglesa............ 3-08-00
Numero Avulso.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया........ ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें-गुरुवार, तारीख १६ माहे डिसेंबर सन १९२० अंक ३८ वा.

BOA PAGA!

Não padece duvida que a classe hindu foi quem recebeu aqui com o mais sincero entusiasmo o regime de 5 de Outubro, suplantando poderosamenmente a influencia dos seus adversarios que, por artes de berliques e berloques procuravam empanar-lhe o brilho.

A classe hindu foi quem envidou os seus milhores esforços para que fosse abafado o sinistro grito de *A Alegria dos Hindus*, motivada pela implantação da Republica, *è o lucto dos cristãos*".

A *prestimosa* e *trabalhadora* classe hindu foi, finalmente, quem deu á Republica o seu valioso apoio, fez por ela verdadeiros sacrificios e gastou em prol do triunfo do novo regeme a sua milhor energia.

¿E a Republica como lhe pagou este mùltiplo e importante serviço?

¿Com que premio a galardoou?

¿Que remuneração condigna lhe conferiu em troca da sua dedicação pela Republica?

Sem mais nem menos, a morte no campo politico, privando-a do voto, unico direito comprobativo da existencia politica, unica prova do reconhecimento da qualidade de cidadão portuguez!

O hindu que souber únicamente a sua lingua máterna—o marata—, desconhecendo o portuguez, de resto por culpa do Estado, não è cidadão portuguez: ele não pode votar, ele não pode manifestar-se na administração dos negocios pùblicos, não pode tugir nem mugir sobre o bom ou mau uso que se fizer do *seu* dinheiro!

Boa paga!

Quiseram *emendar* ou *remendar* a Carta Organica e na *emenda* que saiu pior que o soneto ou no remendo que è um verdadeiro farrafo assassinaram...o bom senso e com ele a existencia politica da classe hindu!

Bonita emenda!. Lindo remendo.

E mais linda e mais bonita do que *isto*, è a paga á classe hindu pelos seus sacrificios!!!

Bôa paga!

Caminho a seguir

No presente momento ouve-se por toda a parte o brado unissono de que è sobremaneira assustadora a crise que assoberba esta nossa pequenina terra e todos a *una voce* proclamam alto e bom som que essa pavorosa crise demanda impreterivelmente a união de todas as forças vivas do paiz, a cooperação disinteressada de todos os elementos uteis á fraternisação intima de todas as classes de que se compõe o povo d'este torrão.

São principalmente os nossos homens publicos, os que lidam na arena da imprensa periodica que se fazem portavozes d'essas afirmações que representam indubitavelmente a expressão da verdade nua e crua. Mas-doloroso é accentua-lo-é precisamente d'esses nossos politicos que parte o, mais triste e degradante exemplo da desunião, da discordia, da dissensão. Advogam insistentemente em teoria as encantadoras doutrinas de paz, amor e concordia e na pratica lhes opõem o mais formal desmentido. Apostolam a tolerancia, a moderação a correcção, o comedimento e deixam vêr á evidencia que entre as suas palavras e os seus actos existe uma flagrante contradicção. Lamentam amargamente a carencia do espirito publico e da solidariedade social n'este nosso pequenino meio e no entanto persistem em cultivar, a seu modo, a *esplendida isolação*, dedignando-se de se promiscuir com a grande massa de analfabetos ou de medianamente instruidos.

E' diveras lamentavel a situação em que vegetamos. Varios são os factores que contribuiram para a nossa degeneração. Mas não está muito arredio da verdadade quem afirma que uma das principais causas d'esse mal-estar encontra-se na disunião entre os nossos homens publicos, entre os que se inculcam defensores da causa popular, entre os que passam por dirigentes da opinião publica.

Essa disunião, esses dissidios intestinos dos nossos homens publicos teem-nos feito muito mal.

Tem redundado em detrimento dos mais sagrados interesses da mãe-patria. Esse espirito da discordia e do afartamento que carcterisa os politicos d'esta terra tem dificultado senão de todo impossibilitado o concerto de vontades em prol da causa publica, pulverisando o já de si reduzido numero dos homens publicos em vontades insuladas e esterilisando as iniciativas conducentes ao bem publico. Esse espirito tem-se desentranhado n'uma farta messe de odios, rancores, despeitos e invejas. E esse maldito espirito tem contribuido poderosamente para se fincar na alma popular a haste da descrença no tocante ao progresso do paiz e dirivadamente tem dado margem ao pessimismo e á indiferença do grosso da população pela marcha dos negocios publicos.

Que é que traz assim disunidos e afastados uns de outros os nossos politicos, os nossos homens publicos? E' a intolerancia, é a vaidade, ê o egoismo é finalmente a fraca compreenção dos deveres civicos que tem originado esse induvidualismo que vemos com a verdadeira dor d'alma campear infrene n'este nosso pequenino meio. São essas paixões que nos tem arrastado a esse miseravel estado de coisas. São elas a principal causa da nossa decadencia e serão elas que nos precipitarão para o abismo da ruina se, não querendo abrir olhos á realidade, persistirmos obstinadamente n'uma orientação auto-destruidora e teimarmos em não mudar do rumo errado que seguimos.

A divergencia de opiniões pode ser que tenha nascido com os primeiros dous homens vindos a este mundo e que continue a existir emquanto dous homens ficarem n'este globo terraqueo. Compreende-se perfeitamente que haja divergencia de opiniões, diversidade de pontos de vista, diferença de principios. O criterio de todos não pode ser o mesmo.

Mas o que não faz sentido è que essa devergencia de opiniões se transforme em rivalidades pessoaes, em antagonismos irreductiveis ou em inimizades.

O que não se percebe é que as pugnas se resvalem do campo de ideias e doutrinas para o terreno de pessoas, abrindo um hiato entre os contendores. O que repugna è que se anteponha o interesse pessoal ao interesse colectivo, o egoismo ao altruismo, o amor proprio ao amor da mãe-patria.

O povo deste pobre torrão divide-se em quatro classes principais: descendentes dos portuguezes ou luso-indianos, hindus, cristãos nativos ou hindus cristianisados e mahometanos. Essas classes ainda se fragmentam em varias facções

Exames de direito

Fizeram-nos nesta comarca, obtendo brilhantes resultados os srs. Aires Manuel Barreto (2MB e 1B), José Lourenço de Sousa Morais. (1MB e 2B) e Ananta Raiá Sirvoicar (1MB e 2B).

O optimo resultado dos exames honra grandemente não só aos diligentes e inteligentes examinados, mas tambem atesta mais uma vez a superioridade do metodo de ensino do seu Mestre, Dr. João de Figueiredo, abalisado e mui procurado jurisconsulto, a quem e aos seus bons discipulos apresentamos as nossas cordiaes felicitações.

Prestaram, tambem, exames de direito os sr. L. M. Condorceth Pereira, nesta comarca e Zoivonta Sinai Molcornencar na de Bicholim, saindo ambos aprovados.

O sr. Molcornencar que alcançou 1MB e 2B foi tambem discipulo do sr. dr. Figueiredo, o que registamos aqui com maximo prazer.

Parabens mais uma vez, ao distincto homem de leis sr. dr. Figueiredo e aos srs. Pereira e Molcornencar.

E a todos os novos advogados desejamos uma carreira, cheia de prosperidades.

भारत

गुरुवार मार्गशिर्ष शु॥ ६ शके १८४२

आमचें स्वराज्य

अति कृपणाला कल्पवृक्ष प्रसन्न व्हावा पण त्याकडे काय मागून घ्यावें हें त्यास कळूं नये; मागण्याची इच्छा आहे पण मागतां येऊं नये अशी एक चमत्कारिक अवस्था गोवा प्रांताची 'स्वराज्य' मिळाल्यावर झाली आहे. आकस्मिक श्रीमंती आल्यावर ती कशी उपभोगावी हें कांहीं काळ पर्यंत दरिद्याला समजत नाहीं तशी गोवा प्रांताची स्थिति झाली आहे. ह्याचें कारण काय? भविष्यकाळीं अमुक होईल व तसें झालें म्हणजे अमुकें करीन अशी एक प्रकारची पूर्व तयारी करावी लागत असते तिचा अत्यंताभाव असल्यामुळें स्वराज्याचा उपभोग कसा घ्यावा हेंच समजेनासें झालें आहे !

ब्रिटिश हिंदुस्थानवासी पुढारी स्वराज्यसुंदरीच्या कृपाकटाक्षाकरितां कोण अट्टाहास करीत आहेत हें सर्वश्रुतच आहे. स्वराज्याकरितां ते मुकतेच अविश्रांत प्रयत्न करित नसून अर्ध्या शतकापेक्षांहि जास्ती काळ पावेतों लढत आहेत. स्वराज्यसुंदरीची नुसती छाया दिसण्याचा संभव आहे न आहे इतक्यांतच ती प्रसन्न झाल्यावर तिच्या योग्यतेनुरूप बडदास्त कशी ठेवावी हा प्रश्न त्यांच्यापुढें एव्हांच उभा राहिला आहे.

गोवा प्रांताला स्वराज्य लाभण्यापूर्वी अशी परिस्थिती उपस्थित झाली नव्हती. अखिल हिंदुस्थान राष्ट्रीय परिषदे (All India National Congress) सारखी परिषद भरावी लागली नाहीं, जहाल व्हावें कीं मवाळ व्हावें किंवा दोनही मतांचा अवलंब करून वेळ पाहून तुतोडी व्हावें ही अडचण आली नाहीं; स्वराज्य संघ बनवावा लागला नाहीं किंवा गांवोगांव फिरून लोकांत जागृति उत्पन्न होण्यासाठीं व्याख्यानें देण्याच्या एजन्स्याहि स्थापाव्या लागल्या नाहींत. असें असतां किंबहुना असें करण्यास वाव न देतां अकस्मात् (?) चारशें वर्षांनंतर तिची आराधना केली नसतां स्वराज्यसुंदरी स्वाभिमान सोडून प्रसन्न झाली तिची बडदास्त ठेविण्यांत येऊं नये यांत कांहींच आश्चर्य नाहीं!

कधींच न येणारा श्रीमंत पाहुणा आपल्या घरीं यावा व त्याची योग्य बडदास्त ठेवण्यासाठीं त्याच्या योग्य पदार्थांची पूर्व योजना झाली नसल्यानें यजमान किंकर्तव्यमूढ होऊन जावा, अशाच प्रकारची अवस्था गोवा प्रांतस्थ यजमानांची स्वराज्य पाहुण्याला पाहून झाली आहे.

स्वराज्याला पात्र असो किंवा नसो, मानसिक व सांपत्तिक उन्नति झालेली असो किंवा नसो, कलाकौशल्य व उद्योगधंदे यांची वाढ झालेली असो किंवा नसो, किंवा हरघडी जीवन कलहार्थ लागणाऱ्या क्षुल्लक पदार्थांकरितां सुद्धां परक्या कडे तोंड वेंगाळावें लागो, स्वराज्य मिळालें आहे एवढें खरें व याचें खरें इंगित आपणावरची राज्यपद्धतीची जबाबदारी काढून पळत्या चोराची लंगोटी पकडण्यांत आहे असें दिसून येईल. नाहींतर तंबाखु, मोटार, घोडागाडी, सटारें इत्यादिकावर परवानगी (licença) खेरीज निराळे कर बसविण्याची सरकारास बुद्धीच उपजली नसती! बरें एवढें हें कराचें डोईजड ओझें खरोखर जनतेवर लादण्यांत आलें तर त्यायोगें जी तिजोर भरती होईल त्याचा विनियोग कसा होईल तर शिक्षणाच्या मिषानें नोकरशाहीचा पगार वाढविण्यांत! नवे नवे हुद्देनिर्माण करून लठ्ठ पगार देण्यांत व चैन भागविण्यांत !!! बाकी जे खरे हक्कदार ते पाहिजे तर भीक मागून पोट भरोत !

वरील कराविषयीं विवेचन करतांनां आमचे बंधु विद्याप्रसार म्हणतात कीं, तंबाखूवर जादा कर लादल्यानें तें व्यसन एक तर कमी होईल किंवा बेसुमार वाढेल बेसुमार कां वाढेल तें ते सांगत नाहींत. पैशाची किंमत कमी झालेल्या परिस्थितींत तें व्यसन कमी होणें दुरापास्त आहे हें दारूच्या वाढत्या खपावरून सहज दिसून येण्यासारखें आहे. सरकाराला गोवा प्रांताचीं व्यसनें कमी करण्याची सदिच्छा आहे तर तें गोमांतकियांवरचे जादे कर कां बसवितें? तंबाखूच्या आयातीवरच कां निर्बंध घालीत नाहीं ? युरोपची दारू इकडे आणूं नये असा निर्बंध कां घालीत नाहीं? देशी दारू अमुक ग्यालन पेक्षां जास्ती तयार करू नये किंवा आपल्या देशांत विकूं नये असा आळा कां घालीत नाहीं.

एवंच "न मागतां दान देणाऱ्या, या दान शूर [illegible] कल्याण करावें असें आहे तर गोमांतकीय वस्तुस्थिति आलोडन करावयाला पाहिजे व हे जादे कर व लठ्ठ पगारवाली नोकरशाही गोवा प्रांताला झेंपेल कीं काय यांचा पूर्ण विचार करावयास पाहिजे.

नोकरशाहींत जे कोण एतद्देशीय लोक आहेत त्यांचें नुकसान होणार नाहींच कारण इकडून दोन पैसे गेले तर तिकडून चार आणे मिळण्याचा संभव असतो म्हणून हे लोक सुद्धां त्यांच्याच तंत्रानें वागत असलेले दृष्टीस पडतात ! एतद्देशीय नोकर शाहीची स्वार्थपरायणता व तद्देशीय नोकरशाहीचा बेदरकार कारभार यांची सांगड जुळावी हें सहाजिक आहे. प्रजेनें स्वसुखासाठीं निवडलेल्या नोकरशाहीची सत्ता स्वराज्य मिळालेल्या लोकशाहीवर "नाकापेक्षां मोतीं जड" या न्यायानें अप्रतिहत लागू व्हावी हें अखिल जगांत पहिलेंच उदाहरण आहे!

प्रसिडेंट विलसन यांनीं राष्ट्रसंघाची योजना सिनेट मध्यें मांडली असतांनां सिनेटर रीड यांनीं उच्चारलेल्या वाक्यांत हेंच रहस्य भरलें आहे. ते म्हणाले: ज्या एकोणचाळीस कोटी लोकांत मुठभर परकी लोक आपला अंमल गाजवूं शकतात त्या हिंदुस्थानाला आमच्या बरोबर बसण्याचा मान दिला जात आहे अशा योजनेस धिक्कार असो ! व त्यावरोबरच स्वराज्य व मतस्वातंत्र्याचा अधिकार दिला गेला असूनहि त्यांचा योग्य उपयोग न करितां नोकरशाहीच्या जुलूम मुकाट्यानें सहन करणाऱ्या मोघाप्रांतस्थांच्या गचाळ वृत्तीसहि धिक्कार असो !

स्फुट विचार

मताधिकारः—ज्या कोणास पोर्तुगीज भाषा अवगत नसेल–मग तो इतर कोणत्याहि भाषांत पारंगत असो–त्याला स्वराज्यांतर्गत होणाऱ्या बहुविध निवडणुकींत मताधिकार नाहीं. अर्थात राजकीय दृष्ट्या तो असून नसून सारखाच ! स्वराज्याच्या तिसऱ्या आवृत्तींतील या अनुदार व मूर्ख धोरणाबद्दल आम्हीं बेळीचें विरोध प्रदर्शित केला होता; परंतु त्याचा बिलकूल परिणाम झाला नाहीं, असें होऊं घातलेल्या निवडणुकींच्या पूर्व तयारीकडे नजर फेंकिली म्हणजे दिसून येतें. 'करील त्याचा कारभार व मारील त्याची तरवार' अशा बेबंद स्थितींत आमची राज्यनौका हांकिली जात असल्यामुळें, त्याचा शेवट काय होईल, हें दिसतच आहे ! ईश्वर करो आणि आमच्या राज्यावर ओढूं पहाणाऱ्या आपत्तीचा नायनाट करण्यास योग्य 'राष्ट्रसूत्रधार' निपजोत !

चळवळः— परंतु आम्हीं असेंच हात जोडून बसणें योग्य आहे काय ? आमच्या गत हक्कप्राप्तर्थं आम्हीं सनदशीर चळवळीनें सरकारच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालण्याचें निरपेक्ष कर्तव्य बजाविलें पाहिजे. निष्कामबुद्धीनें केलेल्या प्रयत्नास यश हें अचूक ठेविलेलेंच आहे. हिंदु बांधवं हो उठा! व मताधिकाराचा हक्क मिळविल्याशिवाय स्वस्थ बसूं नका! मताधिकाराशिवाय आम्हांला राजकीय अस्तित्व नाहीं हें लक्षांत आणा व एक नेटानें व जुटीनें कामास [illegible]

पत्रव्यवहार

राजापुरकर संगीत नाटक मंडळी गेल्या गुरुवारीं येथें आली व ब्रिटिशव्यवस्थेस अनुसरून त्यांनीं शनिवारीं पुंडलीक नाटकाची जाहिरात प्रसिद्ध केली. त्याप्रमाणें परकी गांवचीं बरीच शोकी मंडळी ही मडगांवीं आली; परंतु पोर्तुगीज राज्य व्यवस्थेच्या मेंगळूपणामुळें–किंवा अधिकाऱ्यांच्या निष्काळजीमुळें म्हणा पाहिजे तर नाटकाचें सामान वेळेवर कुळेंच्या जकात खात्याकडून न सुटल्यामुळें शनिवारीं नाटकाचा प्रयोग होऊं शकला नाहीं. आलेल्या परकी लोकांस गोते खात परत स्वस्थळीं जावें लागलें ! हाच प्रकार जर इंग्रजी अमलांत झाला असता तर नाटकवाल्यांवर लोकांनीं नुकसानीचा दावा केला असता. वास्तविक नाटक्यांचा अन्याय नव्हता. पण रंग पाहून प्रयोग राहिल्याचें जाहीर करणें त्यांचें कर्तव्य होतें. गांवांत सुद्धां प्रसिद्ध ठिकाणीं जाहिराती डकविल्या. गेल्या त्या ऐन वेळीं तरीं काढल्या किंवा नाहीं. हें समजलें नाहीं. पण 'जसा धनी तसा चाकर' या म्हणीप्रमाणें झालें तें बरें झालें. त्यानंतर थोडें थोडें करून सर्व सामान एकदांचें शुक्रवार शनिवारपर्यंत मडगांवीं पोंचलें व पुनः सदर नाटकाच्या जाहिराती प्रसिद्ध झाल्या. या ३।४ सालांत इकडे नाटकमंडळी न आल्यामुळें टिकिटांसाठीं मंडळीच्या बिऱ्हाडीं शनिवार सकाळ पासूनच लोकांची गर्दी जमूं लागली, त्यांतच आम्हीं सुद्धां भर घालून टिकिट मिळविलें. खेळास सुरुवात ९ वाजतां होणार अशी जाहिरात होती त्या प्रमाणें आम्हीं ९।।ला थिएटरपाशीं आलों. पहातों तों त्याच्याही अगोदर १५।२० मिनिटें नाटकास सुरुवात होऊन एक प्रवेश उरकला ! ही एक नवीन टूम पहाण्यांत आली. आजपर्यंत जाहिरातींतील वेळा पेक्षां ५।१० मिनिटें सुरुवातीला जास्त लागत असलेलीं पाहिलीं होतीं, पण इतर सीन सीनरी प्रमाणें हा ही नवीन सीन असेल अशी कल्पना करून राहिलेलें नाटक पाहण्यासाठीं थिएटरांत प्रवेश केला. प्रेक्षक समुदाय बराच जमला होता. बायका मुलांस माडीवर बसण्याची व्यवस्था होती. खुर्च्या, बांक, पीठ, वरची खालची जागा प्रेक्षकसमुदायानें पूर्ण व्यापली होती. टिकिटें संपल्यामुळें व आंत जागा न राहिल्यामुळें कित्येक मंडळी परतही गेली. माडीवर मात्र रिकामी जागा होती पण तिकडे पुरुषांनां बसण्याची जागा निराळी न ठेवल्यामुळें त्यानां तेथें बसणें शक्य नव्हतें. पीठ–जमिनीवर बसणाऱ्या लोकांसाठीं उतरत्या फळ्यांची सोय नसल्यामुळें मागें बसलेल्या मंडळीस पुढें बसणाऱ्यांचीं शिरस्त्राणें आडवीं येऊं लागल्यानें मध्यें मध्यें सीन पहाण्याकरितां मंडळीं उभीं राहत असें त्यामुळें मागच्या बाजूस एकदम गोंगाट होई त्या क्षणीं खुर्चीवाल्या मंडळीचें लक्ष तिकडे क्षणमात्र वेधलें जाई पण असें फार वेळ झालें नाहीं. कारण मग गोंगाटाचें धोरण लक्षांत आलें.

आतां नाटकांतील गुण दोषाचे थोडे [illegible] घेतां. नाटक पौराणिक असून कथानक सद्बोधक आहे. पात्रें बरीं आहेत. कामेंही चांगलीं करतात. त्यांत जन्हुशर्मा व सत्यवती, पुंडलीक व चमकाजी, शिवाजी व लंबोदरशेट यांचीं कामें बाकी पात्रांपेक्षां चांगलीं होतात.

जखाईचें काम करणारें पात्र ही बरें आहे. जखाईच्या बापाचें काम फार चांगलें झालें. सोनार, काळुराम, पंतबाजी यांच्याही भूमिका बऱ्या वठल्या, परंतु त्यांत ज्या माकडचेष्टा आहेत त्यांचा थोडा अतिरेक केला जातो आणि एकमेकांचीं तींच तींच भाषणें उपरोधिकपणें परस्परांनीं उच्चारण्यांत फाजील वेळ पुनरुक्ति केल्यामुळें प्रेक्षकमंडळींत जरी हंशा पिकतो तरी त्याचा कंटाळा येतो. सत्यवती, पुंडलीक व जखाई यांच्या मधील संवादांत तर शब्दोच्चारांस विलक्षण हेल प्रत्येक शब्दागणिक दिल्यामुळें त्यांत रहस्य उरत नाहीं. नाटकांतील नारदाची भूमिका गळून तितका अवकाश सदरहू माकडचेष्टांत गमावला गेला तें योग्य वाटलें नाहीं. गाण्याचें अंग म्हणजे ईश्वरदत्त आवाजाची देणगी बहुतेक पात्रांस नसल्यामुळें गायनास उत्तम रंग चढत नाहीं त्यास व्यक्तीचा इलाज नाहीं. कथानकांतही फक्त ईशप्रार्थना व गुणवर्णन या शिवाय इतरत्र असलेली कविता गाळली तरी बेरंग दिसणार नाहीं. कारण संविधानकास प्रोज पेरेग्राव खुलण्यासारखें आहे.

विजेच्या प्रकाशांत सीन सिनरीचीं कामें चांगलीं दाखविलीं जातात व गोवाप्रांतीय मंडळीस [प्रवास न करणाऱ्यांस] ही गोष्ट अगदींच नवीन आहे त्यामुळें ते अद्भुत दिसणारे देखावे पाहाण्यास उत्तरोत्तर बरीच

ANNO V — NUMERO 39 — 1920 QUEPEM QUINTA-FEIRA 23 DE DEZEMBRO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA.......... 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें–गुरुवार, तारीख २३ माहे डिसेंबर सन १९२० अंक ३९ वा.

TIME IS MONEY

Foram anunciadas para os dias 8, 9 e 10 do corrente experiencias praticas pelo novo arado, em qualquer varzea situada nas proximidades da igreja de Margão

O *Bharat* publicou o respectivo anuncio-carta do punho do sr. Kelker na sua secção marata e, em sua consequencia, muitos agrícultores e proprietarios deste concelho de Quepem se dirigiram para lá, *somente* para apreciar as vantagens do referido arado.

! Qual não foi, porem, o espanto deles, quando viram que no dia8, se não realisava nenhuma experiencia pratica, tão aparatosamente annunciada!

Certamente, o sr. Rau Bahadur se não sentiria com a coragem de fazer o que fez em Margão, na sua terra, onde, como se sabe, se presta, com religioso acatamento, culto ao *Time is money*.

Na rialdade, o agronomo contratado, chorudamente pago pelas comunidades se não atreveria a incomodar a gente, com maçadas a que a obrigou inutilmente, se estivesse em Poona.

E è com o auxilio dum similhante *tecnico*, que se pretende levantar a nossa agricultura!

¿ Ou será que o sr. Kelker, afastado da sua terra e do sistema britanico, ande já esquecido de que o *tempo è dinheiro e faltar ao prometido é um crime*?

Esperamos que, pelo menos para o futuro, o sr. agronomo contratado não troçará do publico nem das comunidades que o pagam.

Com tal esperança, sacrificamos este importante espaço do nosso modesto jornal.

Caminho a seguir

E' perfeitamente logico que cada classe ou fracção tenha as suas instituições privativas e os seus orgãos especiaes distinados a defender os seus direitos e a zelar os seus interesses tendo, porem, todos o cuidado de que os seus movimentos não sejam tendentes a prejudicar os interesses alheios. E' natural que haja divergencia de opiniões entre os representantes d'essas diversas classes e mesmo entre os d'uma mesma classe, fracção ou agrupamento e é legitimo que cada qual manifeste o seu sentir e exprima o seu pensamento.

Mas acima de todas essas divergencias está o culto da patria que é de todos. Ha problemas que envolvem os interesses de todas as colectividades e cuja solução impende a todos porque d'ela depende o progresso do paiz. Ha casos em que todas as divergencias teem de cessar, todas as pugnas teem de terminar para que todos possam cerrar fileiras e combater como um só homem. Quando o interesse do paiz se ergue dara falar, o interesse da pessôa ou da classe tem de se calar.

N'esses casos é indispensavel que os representantes de todas as classes, facções ou agrupamentos todos que se dedicam á causa publica dondo de parte as suas misquinhas conveniencias pessoaes, deitando ás malvas o seu egoismo e a sua vaidade e votando ao seu ostracismo as rivalidades pessoaes, os rancores e os antagonismos privados se unam para acharem soluções satisfatorias aos multiplos problemas que assoberbam o paiz.

E' pena que sem embargo das experiencias dum longo passado os nossos homens publicos não se compenetrem da instante necessidade de se unirem pelo menos em casos em que isto seja necessario. E' para lamentar que os nossos politicos gastem toda a sua energia em luctas estereis, polemicas irritantes e se digladiem por umas questões de *lana caprina* e de politica bairrista.

Lá em cima o nobre Chefe da Provincia estuda os diversos assuntos, elabora os planos do fomento e ensino e projecta o lançamento de novos impostos para a integral execução d'esses suberbos planos. O Conselho do Governo em que prepondera em numero o elemento electivo ou popular aprova esses projectos após a necessaria discussão.

Cá em abaixo, o espirito do povo inteiro se sente acabrunhado ante a prespectiva d'esses impostos e contribuições. As massas populares aterradas pela visão de novos encargos murmuram contra a sua triste sorte

E na arena da imprensa periodica, os nossos homens públicos, os nossos politicos se emaranham em polenicas, barafustam, atiram-se com furias uns aos outros e se requintam em ataques reciprocos, oferecendo o triste espectaculo da disunião e discordia. Se uns atacam o governo outros o defendem. Se uns o apoiam, outros lhe movem uma ferrenha oposição. Uns são pela reducção do numero de burocratas. Outros querem a compressão das despezas publicas com a reducção tanto do numero como dos vencimentos dos funcionarios.

Mas de que serve essa lúcta travada entre os nossos homens publicos? Que é que lucra o povo com esse jogo de palavras? Paráque esses longos artigos de fundo, para que esses sueltos e para que esses comentarios? Para inglez ver?

O Governo não liga nenhuma importancia a essa campanha e a esse celeuma e o povo não aufere dele nenhuma vantagem. E a razão e obvia. E' que não há união, não há acordo entre os nossos homens publicos e estes curam mais do seu egoismo e vaidade do que dos interesses do Povo de quem se dizem defensores e em cujo nome falam.

O povo precisa de saber se efectivamente as despezas publicas que se consideram superfluas são tão avultadas que o seu corte possa dar lugar a um *superávit* capaz de fazer face aos encargos resultantes dos projectos do ensino e fomento, dispensando conseguintemente os novos impostos ou contribuições. O Povo precisa de saber se pelo menos há possibilidade de se equilibrar o orçamento com a extinção do *deficit* pela compressão das despezas publicas atenuando-se assim o peso dos novos impostos.

Para que isto se possa apurar è mister que os nossos homens publicos pondo de parte o seu egoismo e a sua vaidade se reunam n'uma plataforma comum e discutam serena e desapaixonadamente o magno assunto. E' necessario que n'essa reunião os nossos caudilhos dêem provas da sua coragem civica, enumerando as sinecuras, as demasias e as excrecencias cujo corte se imponha e formulando em termos claros e insofismaveis propostas concretas e fundamentadas para ser submetidas á apreciação do Governo.

E' necessario que quando por ventura não haja uniformidade de vistas a minoria acate as resoluções da maioria, em nome da disciplina e dos sagrados interesses do paiz. E' indispensavel que os nossos homens publicos dêem maxima publicidade a essas resoluções ou propostas, fazendo por meio d'uma intensa propaganda pela imprensa e conferencias integrar n'esse movimento todo o povo desta terrinha para que em resultado de chamada *pressão de fora* ou *the pression from without* como dizem os inglezes, o governo satisfaça o desiderato popular. E é finalmente indispensavavel que caso a maioria dos nossos homens publicos chegue a conclusão de que não há possibilidade de se equilibrar as finanças publicas sem desorganisação dos serviços ou sem prejuizo do funccionamento regular da màquina burocratica, todos se unam para se acercar do povo e o convençam ou o animem a sem murmurio mas sim de cara alegre pagar os impostos com mira n'um Porvir ditoso.

E' assim que temos de proceder. E' este, no nosso fraco modo de pensar o verdadeiro caminho a seguir na presente conjuntura.

Bascora P. Rau Sar Dessay

BHARAT

Por motivos supervenientes foi adiado o julgamento do BHARAT que estava designado para ontem.

Oportunamente, anunciaremos o novo dia.

भारत

गुरुवार मार्गशिर शु॥ १३ शी १८४२

असहकारितेचा अर्थ

आमच्या प्रांतबंधूंस शेजारच्या राजकीय वातावरणाची खरीखुरी कल्पना व्हावी या हेतूनें आम्हीं शिरोभागांतील विषयाचें विवेचन करण्याचें योजिलें आहे. शेजारधर्मास अनुसरून मधून मधून अखिल हिंदी राजकारणाची चर्चा केल्यास आमच्या वाचकांचा फायदा झाल्याखेरीज रहाणार नाहीं, अशी आमची खात्री आहे.

अखिल प्राणिमात्रानां प्रिय असलेली स्वतंत्रता आज महात्मा गांधींच्या जनकत्वाखालीं असहकारिता या रूपानें जन्म घेऊन प्रत्येक हिंदूला आपल्या कर्तव्याची जाणीव करून देत आहे. लो. टिळकांच्या वेळीं हीच असहकारिता स्वावलंबनाच्या रूपानें अवतरली होती. व शिवाजी महाराजांच्या काळीं हीच असहकारिता स्वराज्य या नावानें स्वयंभू अवतीर्ण झाली होती. एवढेंच नव्हे तर पुराणोक्त काळीं परमेश्वरानें जे दहा अवतार घेतल्याचें रूपक आहे त्याचें कारणहि हीच स्वतंत्रता उर्फ असहकारिता! ज्या ज्या काळीं राज्याधिकारी जुलमी निपजले, ज्या ज्या वेळीं, नोकरशाही लोकशाहीच्या नैसर्गिक मानधनावर दडपशाहीनें अत्याचार करूं लागली, ज्या ज्या वेळीं, हमकरेसो कायदा हें तत्व राज्याधिकाऱ्यानां थै थै नाचवूं लागलें त्या त्या काळीं 'संभवामि युगे युगे' या श्रीकृष्ण भगवानाच्या उक्तीप्रमाणें महात्मा गांधीसारखे राज महंत निर्माण झाले व त्यांकडून त्या जुलमाचा, दडपशाहीचा, अत्याचाराचा व 'हम करेसो कायदा, या राक्षसी तत्वाचा नायनाट करविला गेला. अवतारांचें रहस्य स्वातंत्र्यांत आहे असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं.

असहकारिता ही हिंदवासियांस अपूर्व नाहीं. देव, गाय व ब्राह्मण यांचा होत असलेला अनन्वित छळ पाहून शिवाजी महाराज्यांची जी वृत्ति झाली व त्यामुळें स्वयंस्फूर्तीनें स्वराज्य स्थापनेचें त्यांच्याकडून जें अलौकिक पुरुषार्थाचें व पुण्याईचें कार्य घडलें तशीच एकेक हल्लींचे अरेरावी कायदे पाहून महात्मा गांधींची अवस्था झाली असली पाहिजे. पण शिवाजी महाराजच फक्त तेवढे या वृत्तीच बनले होते असें नाहीं, तर ज्यानां ज्यानां त्या काळच्या वस्तुस्थितीचें यथार्थ ज्ञान झालें होतें त्यां चं दि तीच अवस्था झाली होती. त्यानां नेता पाहिजे होता व तो ज्या वेळीं त्यानां मिळाला त्याच वेळीं स्वराज्य स्थापनेचें कार्य सुरू झालें. ही असहकारिता हि अशीच प्रगट झाली आहे. ज्याना ज्याना हल्लींची कावेबाज राज्यपद्धति समजून चुकली होती, त्यांच्या मनांत असहकारिता बाणलेलीच होती पण ती प्रगट करण्याचें अलौकिक दैविक तेज त्यांच्या अंगीं नसल्यामुळें लो. टिळक व महात्मा गांधी सारखे नेते मिळे पर्यंत गुप्त राहिली होती परंतु त्यानीं पुढारीपणा पत्करल्यावरोबर तें स्वातंत्र्य, स्वावलंबन व असहकारिता या रूपानें तळपूं लागलें! हिंद मातेच्या दुर्दैवानें स्वावलंबनाचे कट्टे पुरस्कर्ते अकालीं अस्तंगत झाले; व हें जरी ईश्वरेच्छेनें घडून आलें असलें तरी तसल्या हिंदमातेच्या किती खऱ्या पुत्रांना आपलें ध्येय साध्य होईपर्यंत स्वखुषीनें आत्मसमर्पण करावें लागेल हें त्या जगन्नियंत्यास ठाऊक! स्वजनाविषयीं सहानुभूति ह्मणजे परक्यांविषयीं तिरस्कार असें जरी नसलें तरी परक्यांच्या दुष्ट वासनाविषयीं अंगांत तिरस्कार बाणल्यावांचून स्वजनाविषयीं सहानुभूति वाटणें सध्यस्थितींत शक्य नाहीं. ह्मणून परक्यांचे जितके जितके अधिक दोष आमच्या दृष्टोत्पत्तीस येतील त्यांचे जितके ह्मणून जुलूम, अत्याचार यांचा पाढा आमच्या समोर वाजला जाईल तितकीं तितकीं कदाचित् आमचीं अंतःकरणें त्यांच्या दोषांबद्दलच्या तिरस्कारानें व्यापून गेल्याशिवाय राहणार नाहींत. परक्यांची मदत घेऊन घरांतील तंटे मिटविण्याची बुद्धि कोणत्या कुवेळीं आठवली परमेश्वर जाणे! पण त्यानीं इसापनीतींतील मांजराच्या लोण्याविषयींची तक्रार वानरानें जसी लोणी स्वतःच मट्ट करून मिटविली त्याच प्रकारें हेहि तंटे मिटविले गेले! जवळ जवळ दोन शतकें एकसारखे श्रम करून तुह्मीं दमलां आहांत, आतां तुह्मीं विश्रांति घ्या हा त्यांचा बुद्धिवाद आह्मांला पटला. आज कोण अफगाण उठले; सरकार आपलें परभारें निवारण करतें. आज कोण पेंढारी लुटालूट करीत आहेत; केला त्यांचा बंदोबस्त परभारेंच्. शस्त्र घेण्याचे श्रम नकोत ह्मणून शस्त्राचा कायदा सुद्धां पास करून अमलांत आणला.

एकसारखे पारतंत्र्यांत पुष्कळ काळ काढल्यामुळें स्वाभिमान व कर्तव्य लुप्त होऊन जावें हें साहजिक आहे. पूर्वजांच्या अंगच्या शौर्यादिगुणाची सुद्धां आठवण आह्मांस राहिली नाहीं. हिंदमनोभूमिअशी ओस पडली त्याचें कारण वर दिलेंच आहे. हिंद जनतेचा स्वाभिमान जागृत नव्हता व ती या अनिष्ट शांततेच्या भरांत पूर्ण सुखलोलुप बनून खुशाल कुंभकर्णी झोंप ताणूं लागली. व जे कोणी अर्धवट जागे होते त्यानां कोणास जाहिरनामे व आश्वासनानें थोपटून कोणास कायद्याचा बागुलबोवा दाखवून तर कोणास पाश्चात्य शिक्षणाची मनोहर रसणी दाखवून निजविलें, व या अवदसेनें पूर्ण घेरल्यावर केसांनीं गळा कापण्यास सुरुवात केली. नंतर कोठें हे धडपडून जागे व्हावयास लागले व प्रतिकार करण्याच्या मार्गास लागले. दीर्घकाळ झोंपा ताणल्यामुळें त्यांच्या पोटांत भुकेनें कहर करून सोडला व त्यामुळें अंगतेज तर केव्हांच नाहींसें झालें होतें व कांहीं तरी पहिल्यान्दा खाऊं ह्मटलें तर या परकी तेलगु ब्राह्मणानीं त्याचा केव्हांच अपहार केलेला दिसून आला-आतां राहिला एक मार्ग व तो ह्मणजे फुगवी हाच होय. ही रुसवाफुगवी ह्मणजेच असहकारिता.

आमचें अपहार केलेले आह्मांला परत द्या नाहींतर आह्मीं कायदे कौन्सीलांत बसणार नाहीं. आमचें आह्मांला परत द्या नाहींतर आह्मीं ज्युरींत पाय ठेवणार नाहीं, आमचे हक्क आह्मांला द्या नाहीं तर तुमचा माल आह्मीं वापरणार नाहीं इत्यादि ही रुसवाफुगवी अगर असहकारिताच आहे. पण हीरुसवा फुगवी या हिरण्यकश्यपूला कशी आवडावी? बाकी शेवटी तें न आवडल्यानें त्याची जी शोचनीय अवस्था झाली 'तीच गती या याची' हें ठरलेलेंच आहे.

हिंदु-स्थानचीं राज्यसूत्रें त्यांच्या हातीं यद्रिच्छेनें गेलीं आहेत पण ते जात्या स्वतंत्रता प्रिय व आकाशांतील बापाच्या मुलांचे—ख्रिस्ताचे एकनिष्ट भक्त या करितां त्यांची नीतिमत्ता असाधारण असल्यामुळें त्यांच्याकडून आह्मांला आमच्या हिताचेच मार्ग दाखविले जातील अशी आशा होती व संपूर्ण हिंदुस्थान हातावर चढेपर्यंत कमी अधिक प्रमाणानें, औपचारिक ह्मणा किंवा कसेंहि ह्मणा, तेंच धोरण स्वीकारलें होतें. जेव्हां हिंदुस्थान पूर्ण परावलंबी बनला, कर्तव्याची त्याला जेव्हां पूर्ण विस्मृति पडली तेव्हां जाहिरनाम्याच्या मूलधापानीं त्याची दिशाभूल होणें साहाजिक होतें व त्यानां आपलें मायावी रूप टाकून खऱ्या स्वरूपानें अखिल हिंदुस्थानांत धांगडधिंगा घालण्यास हीच वेळ मिळाली. अशी ही वस्तुस्थिति आहे. पाश्चात्यांची स्वतंत्रप्रियता ह्मणजे दुसऱ्या देशाना गुलाम करून त्यांचें सर्वस्व लुबाडणें व नीतिमत्ता ह्मणजे जीत राष्ट्राचा नैसर्गिक मान धनावर अत्याचार करणें हें विचारांती कळून येण्याजोगें आहे. निदान हिंदुस्थानाला तरी याचा पूर्ण अनुभव आहे. हात पाय हालविल्यावांचून आतां तरणोपाय नाहीं असें दिसून येऊं लागलें. जसजसें दडपशायीचे कायदे हिंदुस्थानांवर लादण्यांत येऊं लागले तेव्हां कोठें स्वाभिमान जागृत होऊं लागला व त्याचें मूर्त स्वरूप ह्मणजे राष्ट्रीय परिषद हें होय. अरेच्या! हे जागे होऊं लागले, यानां वेळींच बागलबुवा दाखवून गप केलें पाहिजे असें वाटून नवे नवे दडपशाहीचे कायदे हमेशा पास होऊं लागले. पण अनादिकालापासून जे स्वातंत्र्यांत लोळत होते त्यानां मध्यंतरी आश्वासनरूपी औषधानीं गुंगी आली ह्मणूनच झोंपेतील ते कायमचे काय? आपल्या बापजाद्याच्या पराक्रमाचा विसर त्यानां एका डोजांत पडणें शक्य आहे काय किंवा -शिक्षणरूपी भाकरीचा लहानसा चतकोर तुकडा तोंडावर फेकून दिला ह्मणून ते आपला नैसर्गिक हक्क स्वतंत्रतेचा कायमचा अपहार या पाश्चात्यांनां करूं देतील कीं काय? हें आमच्या जेसानां अगदींच अशक्य.

राजकारणांत हिंदु व युरोपियन असा स्पष्ट भेद ज्या वेळीं करण्यांत आला त्याच वेळीं राष्ट्रीयपरिषदेच्या रूपानें असहकारितेचें बीज पेरलें गेलें. वंगभंगामुळें "स्वदेशी" भावनेची पाळें मुळें आलीं. मुख स्वातंत्र्य व लेखणी स्वातंत्र्य नष्ट करण्यासारखें कायद्यांचें जलतुषार त्याला अंकूर येण्यास कारण झाले व पावलो पावलीं झालेल्या रौलट बिलाच्या योगानें तो फुलूं लागला आहे. ज्यावेळीं ह्यापेक्षां अधिक कडक कायदे अमलांत आणिले जातील त्या वेळीं या असहकारितेच्या वृक्षाला स्वातंत्र्याचीं, स्वराज्याचीं गोड व मधुर फळें आल्याविना राहणार नाहींत.

विदेशीय चालीरीति, विदेशीय माल, विदेशीय दुष्ट लोक व स्वदेशघातक विचार यांच्यावर ही असहकारिता पुकारली आहे!

असहकारिता हें स्वदेशीचें व्रत आहे. आपल्या देशांत उद्योग धंदेवाढवून कारखानें स्थापणें व शेतकीची सुधारणा करून उभय बाजूनें स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न करावा असा तिचा स्पष्ट हेतु आहे.

स्फुट विचार

शोचनीय स्थिति—: येथील कांहीं वडे अधिकारी आरोग्याभाव अगर दुसरी कसलीहि नकली सबब पुढें करून, गोवासरकारकडून सहा अगर नऊ महिन्याची रजा उपटून पोर्तुगालास जाण्याची संधि साधतात; व तेथें गेल्यावर जास्ती पगारांच्या नवीन हुद्यांची शिकार करून आपला तळीराम गार करतात! इकडे त्यांच्या गैरहजिरीमुळें त्यांकडून चालविलीं जात असलेल्या कामांत घालमेल न होण्यासाठीं जादा खर्च करावा लागून, शिवाय त्यांचा व त्यांच्या साहेबी कुटुंबांचा साहेबी प्रवासाचा बोजा स्थानिक सरकारच्या डोक्यावर पडतो तो निराळाच. मिळून दोन्ही बाजूनीं सदरील नोकरशाहीचीं दुखणीं लोकशाहीस फारच बाधक होतात. परंतु आह्मांस मजा वाटते ती हीच कीं, आजारी [?] असलेले हे सुकुमार व नाजूक प्रकृतीचे अधिकारी पोर्तुगालास पोंचतांच रजा संपण्यापूर्वीच साफ बरे होऊन नवीन कामें पाहण्यास ताजेतवाने होतात! व आमचें मठ्ठ सरकार या शोचनिय स्थितीकडे कांहींच लक्ष न पुरवितां त्यांचे चाळे कौतुकानें सहन करितें. 'करिल त्याचा कारभार व मारील त्याची तरवार' या तत्वाचा हा परिणाम नव्हे तर काय?

मि. कोस्ताचे मित्रः—गेल्या अंकीं मि. प्राजेरीस द कोस्त यांच्या कर्तबगारीसंबंधानें कांहीं टीकात्मक मजकूर आह्मीं प्रसिद्ध केला होता. वास्तविक पहातां त्यांत लोकमत निदर्शनाशिवाय दुसरा कसलाहि 'अव्यापारेषु व्यापार' केलेला नव्हता. असें असतां त्यांचे मित्र डॉ. राव यांस तो मजकूर आक्षेपार्ह वाटून त्यानीं मि. कोस्त व त्यांची कामगिरी या विषयीं भारतास अनुलक्षून मडगांवच्या 'तेम्हांत' एक पत्र प्रसिद्ध केलें आहे. या पत्राचें उत्तर आह्मीं येत्या अंकांत देणार असून शिवाय निवळ मराठी वाचकांच्या सोयीसाठीं डॉक्टर साहेबांच्या पत्राचें व आमच्या उत्तराचें हे भाषांतर मराठी भागांत देणार आहों. सध्या इतकेंच लिहिलें ह्मणजे बस आहे कीं, मि. कोस्त यांच्या पाशीं आमचें व्यक्तिदृष्ट्या कसलेंच वांकडें नसून, केवळ सार्वजनिक दृष्ट्या त्यांच्या कार्यासंबधीं आमचा तीव्र मतभेद आहे. त्याची कारणें लवकरच कळणार असल्यानें कोणत्या बाजूनें गैरसमज होत आहे, हें सर्वाला कळून येईलच.

सूचना

आजपर्यंत आह्मीं सार्वजनिक संस्थांस मोफत भारत पाठवित होतों; परंतु येत्या अंकापासून ज्यांकडून एक रुपयाची मदत येईल त्यानांच भारत सुरू राहील. भारत प्रकाशनाच्या कामांत नफा तर बिलकूल नाहींच; परंतु होणाऱ्या तोट्यांत कांहीं तरी कमतरता यावी या एकाच हेतूनें मोठ्या नाखुषीनें ही सूचना द्यावी लागत आहे.

भारतावरील खटला

काल व्हावयाचा भाराचा चुलगामेत अनेक व अपरिहार्य कारणामुळें झाला नाहीं. येत्या अंकांत खटल्याच्या सुनावणीचा तीन दिवस कळविला जाईल.

ANNO V — NUMERO 40 — 1920 · QUEPEM QUINTA-FEIRA 30 DE DEZEMBRO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA........... 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico.—Bharat

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica,—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचें दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया........... ३-०८-००
किरकोळ अंकास.......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणें. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें-गुरुवार, तारीख ३० माहे डिसेंबर सन १९२० अंक ४०वा.

GANDHISMO

O *Mahatmá* Gandhi è quem, presentemente, gosa de raro previlegio de ter maior numero de adeptos e admiradores na vasta peninsula industanica, sendo a sua doutrina de *Não cooperação*, reconhecida, geralmente, como um meio poderoso e infalivel da conquista do *swaraja*.

Verdade é que uma reduzida parcela de moderados reputa a politica do Gandhi ou seja *Gandhismo* uma insuperavel barreira no caminho da obtenção do *Home rule*; mas este modo de *ver* e *crer* dos referidos moderados e o seu consequente proceder não tem surtido nem podem surtir resultados palpaveis, porquanto no incomensuravel oceano pacifico do movimento de *não cooperação*, a *cooperação* representa uma gota dagua que se evapora...

Tal è a preponderancia que o *Gandismo* está hoje exercendo na nossa visinhança, tal è a importancia que o movimento de *não cooperação* atingiu durante pouquissimo tempo.

¿ Porque è que o *Mahatmà* e a sua politica alcançaram um triunfo, nunca sonhado, aponto dalguns jornais importantes de Londres, como *Times*, solicitarem do respectivo governo medidas que restabeleçam paz e socego na India ?

त्या खऱ्या देशभक्तांच्या मालिकेंत गुंतून ती माला विटाळूं पहात आहे. "कुठें इंद्राचा ऐरावत व कुठें शामभटाची तट्टाणी !!" या प्रमाणें त्यानें हें सोंग घेऊन लोकांना फसवून पैसे मिळवून आपली तुंबडी भरविण्याचा तूर्त सपाटा चालू केला आहे. तरी सर्वांनीं या ढोंग्याच्या मुलथा।ाना भुलून आपला अमोल्यवेळ, कीर्ति व धन या त्रिकुटाला पारखे होऊं नये अशी नम्र विनंति आहे.

आत्रेय

श्री पूर्णाश्रमस्वामी विपयीं कोणीहि गैरसमज करून घेण्याचें कारण नाही. आधुनिक कालास योग्य असेंच स्वामीचें आचरण असून ठिकठिकाणीं अत्यंत परिश्रमानें शाळा स्थापून व पुष्कळ त्रास सोसून व्याख्यानद्वारा, स्वामी बजावीत असलेली गोमांतकाची सेवा अपूर्व आहे. या मुळें आमचा देश त्याचा सदैव आभारी राहील. स्वामीशीं आमचा परिचय असून त्यांच्या निरपेक्ष राष्ट्र व धर्म कार्याचा व पूज्य व्यक्तीचा आह्मांस पूर्णाभिमान आहे.

——— सं. भारत

पांढरपेशांचे अत्याचार

घेजवाबदार व रिकामटेंकड्या ग्राम कंटकांच्या बलकांवावरील सभांचें वर्णन 'भारतांतील' पोर्तुगीज भागांतून प्रसिद्ध होत असतें. त्याप्रमाणें मराठींतूनहि तसें एकादें "वस्तु स्थितिदर्शन, आलें असतें तर बरें झालें असतें. कांकीं, कित्येक ठिकाणीं समाजांतून प्रतिष्ठितपणें मिरविणाऱ्या व्यक्तींचीं खरीं स्वरूपें कशीं काय असतात, व त्यांचें अस्तित्व समाजाच्या अधोगतीला कसें सहायक होतें याचें अविष्करण होऊन "पुढच्यास ठेंच मागचा शहाणा" या ह्मणी प्रमाणें इतरानाहि बोधपर झालें असतें! अलिकडे कित्येक ठिकाणीं जनतेच्या दृष्टीसमोर असलेल्या गृहस्थांकडून जे अनाचार होतात ते पाहिले ह्मणजे जीव आश्चर्यानें व दुःखानें व्यग्र होऊन जातो. मडगांव शहर अलिकडे व्यापार तसेंच सार्वजनिक चळवळींमुळें बाहेरच्या लोकांच्या डोळ्यांत भरूं लागलें आहे. पण व्यापाराबरोबर 'फाटिंगपणा'हि जास्त दिसून येतो. तसाच सार्वजनिक कार्यां बरोबर अनाचारहि झालेले पहाण्यांत येतात! गुदस्तां "दामोदर विद्याभुवनांत" जो "सरस्वती--उत्सव" झाला त्यामुळें होणाऱ्या आनंदाचा अनुभव घेसों न घेतों तोंच शेजारच्या जागेवरील मुद्दाम राखून ठेवलेल्या घरांत जुगाराच्या किंकाळ्या व मारामाऱ्याहि कानावर आल्या! त्यामुळें उत्सवाची नैतिक बाजू कशी ढांसळली गेली याकडे कोणी लक्ष दिलें नाहीं! परवांच पहाना? विद्याभुवनांतील मौज ! आधीं विद्याभुवन हें नाव ठेवून त्यांत थियेटर करावयाचें नव्हतें – पण हा प्रश्न चालकांचा आहे; मला त्याची पंचाईत कशाला? मी राजापुरकर नाटक मंडळीच्या नाटकास गेलों होतों. विद्याभुवनाजवळ गेल्यावर मला मसाल्याचा वास आला ह्मणून मी पहातों तों एका चहाच्या दुकानावर "येथें उत्तम मटण मिळेल" अशी पाटी लावली असून तो जिन्नस घेण्याकरितां गिऱ्हाइकची मारे गर्दी झालेली आहे. पाटी मागून माझा कुत्रा येत होता तो मध्येंच आडवा होऊन शेजारीं असलेल्या पिंपळाच्या मुळाशीं बराच वेळ हुंगरत व शिंकरत राहूं लागला. चौकशी अंतीं कळलें कीं, त्या ठिकाणीं सकाळींच मेषयज्ञ झाला असून तीच सागुती विकत ठेवली आहे!

विद्याभुवनांच्या चालकांच्या उदार आश्रयाखालीं हीं चहाची दुकानें उघडलीं गेलीं असून त्यांत ह्या सर्व सोयी करण्यांत आल्या होत्या! सागुती खाणारे लोक ती वातड असल्याबद्दल तक्रार करीत होते, या वरून जिवानिशीं जाणारे प्राणी ह्मणजे शेळयाच असाव्यात असें अनुमान झालें. संपादक महाराज! असले प्रकार चारचौघांत विजेच्या प्रकाशांत व सार्वजनिक जागीं उघडपणें होऊं लागले तर त्या ठिकाणची नीतिमत्ता किती खालावली आहे याचा विचार कोणासहि करतां येईल! उत्सव कितीहि थाटानें साजरे केले गेले तथापि जों पर्यंत असले तिरस्कारणीय प्रकार बंद झाले नाहींत, तोंपर्यंत सगळें अरण्यरुदनवत्‌च होय. शिवाय "विद्याभुवन' या नावाला तर तें काळिमा लागण्यासारखेंच आहे, हें कोणीहि कबूल करील. मडगांव, सुरगांव, डिचोली, पणजी याठिकाणीं "गिऱ्हाद" तर मूर्तस्वरूपानें अवतीर्ण झाला आहे, त्याला तळीरामाच्या ह्मणण्याप्रमाणें 'प्रतिष्ठितस्वरूप' येण्याची खटपट ज्या माणसांकडून होते, तीं माणसें तर दुर्दशेला पोंचतीलच पण त्यांच्या नेतृत्वाखालीं होणारे कसलेहि प्रयत्न बेगडीच्या न्यायाप्रमाणेंच अल्पकाल टिकतील यांत शंका नाहीं. संत तुकाराम यांच्या भक्तानीं वैकुंठाच्या वाटेवर बरीच 'तयारी करून ठेविली आहे ह्मणावयाची!

मुशाफ M. N.

भारत

गुरुवार पौष व॥ ४ थी १८४२

उद्योगी बना !

देशाच्या उत्कर्षाचा मुख्य संबध सांपत्तिक स्थितीशीं आहे. जगाच्या इतिहासाकडे पाहिलें तर राष्ट्राच्या उन्नतीचीं कारणें अनेक असलीं तरी त्यांत सांपत्तिक मुख्य आहेत. असें सिद्ध होतें. मराठेशाही बुडण्यास तिची सांपत्तिक दुःस्थिति कारण झाली, असें विद्वानाचें मत आहे. बाजीराव, थोरलेमाधवराव, नाना फडणवीस वगैरे मंडळींना आपापलीं कामें तडीस नेण्यास पैशाची अडचण घडोघडी त्रास देत होती. शिंदे, होळकर वगैरेंचा पराजय होण्यास तीच अडचण कारण झाली. प्रचंड मोंगलबादशाही संपत्तिक्षयामुळें लयास गेली, व युरोपियन राष्ट्रांस हिंदुस्थान जिंकितां आलें तें या संपत्तीच्याच जोरावर. फ्रांस देशांत अनेक राजक्रांत्या झाल्या, त्यांतून तो देश बचावत गेला तो केवळ संपत्तीच्या जोरावर. नेपोलियनची कीर्ति युद्धकलेंत विशेष आहे पण बारकाईनें विचार केला असतां त्यानें देशाची सांपत्तिक स्थिती सुधारण्याचे तात्कालिक उपाय योजिले त्यांतच त्यांचें शहाणपण व करामत दिसून येते. असें सामान्यतः इतिहासकरांचें मत आहे. इसवीसन १८७० त जर्मनीनें फ्रेंच राष्ट्रास जिंकिलें, तेव्हां एवढा जबरदस्त दंड जर्मनीनें फ्रांस पासून घेतला कीं, ह्या अरिष्टांतून आतां फ्रांस डोकें वर काढील असें जर्मनीला वाटलें नव्हतें. पण ह्या अरिष्टानें फ्रेंच राष्ट्र डगमगलें तर नाहींच उलट, त्या अरिष्टामुळें त्यास जास्तच चेव येऊन त्यानें आपली सांपत्तिक स्थिति सुधारण्यास आरंभ केला, आणि दहा पांच वर्षांत जर्मनीचें कर्ज फेडून टाकून पुनः जर्मनीशीं दोन हात करण्याची तयारी केली.

सामाजिक, नैतिक व० बाबतींत तर आमची सुधारणा झालीच पाहिजे, परंतु सांपत्तिक प्रश्न सर्वांत अतिशय महत्वाचा आहे असें दिसून येईल. आज आह्मीं गोमांतकवासी सर्वथैव हीन झालों आहों. आपली सांपत्तिक स्थिति सुधारण्यास कोणते उपाय करावे; ह्याचा आपल्या पुढाऱ्यांनीं आणि विद्वानांनीं शोधक बुद्धीनें विचार केला पाहिजे.' आपल्या संपत्तीचे उगम कशांत आहेत, हें प्रथम ठरविलें पाहिजे. भांडवल, शेतकी व इतर उद्योगधंदे, कसब आणि मालाची विपुलता हे आपल्या संपत्तीचे झरे आहेत. आपली स्थिति पराधीन असल्यामुळें हे संपत्तीचे उगम थोडेबहुत आपल्या हातांत नाहींत; तथापि आपल्या हातांत जेवढें आहे तेवढें तरी आपण प्रथम मनापासून केलें पाहिजे. उद्योग सर्वथैव आपल्या हातीं आहे. त्याला पैशाचें सहाय्य पाहिजे ही गोष्ट खरी; पण आपला गोमांतक आळस टांकून खडबडून जागा होईल तर उद्योगाच्या जोरावर त्याला सर्व कांहीं करितां येईल. उद्योगं पुरुष लक्षणं.

स्फुट विचार

जिव्हाळ्याचा संदेशः— आमचे सन्माननीय मित्र श्रीमंत रा. फट्टू बाबू शेणवीं कैंकरे, कुंभारजवें हे लिहितात कीं:—

"पोर्तुगीज वसाहतींच्या स्वराज्यविपयक कायद्यांत महत्वाचे फेरफार करण्यांत आले असून लेजिस्लेटीव कौन्सिल व एक्झिक्यूटीव कौन्सिल [कोंसेल्य लेजिस्लातीव व कोंसेल्य एझेकुतीव] अशीं दोन मंडळें निर्माण करण्यांत आलीं आहेत, ही गोष्ट सर्व विश्रुत आहेच; पैकीं लेजिस्लटीव कौन्सिलच्या वेगवेगळ्या लोकनियुक्त प्रतिनिधींची निवड चालू जानेवारी महिन्यांत होणार असून सरकारी बोलेतींवर प्रसिद्ध झालेल्या हुकुमान्वयें म्युनिसिपालटींच्या आफिसांतून मतदारांच्या यादाहि तयार झालेल्या आहेत. प्रतिनिधींच्या निवडणुकीचा समारंभ उरकण्याचा दिवस जवळ येत चालला असतां अद्याप आमच्या हिंदुसमाजांत या संबंधाची कोणतीच हालचाल दिसून येत नाहीं, ही आश्चर्याची गोष्ट आहे. सर्व हिंदु मतदारांनीं आपल्या समाजाच्या हितावर दृष्टि ठेवून, एकजुटीनें नेटाचा प्रयत्न केल्यास, ग्रामसंस्था, जास्ती कर देणारे, व नवीन काबिजादींतील महाल या तीन वेगवेगळया मतदार संघातर्फे तीन हिंदु प्रतिनिधी आह्मांला कोन्सिलांत पाठविणें शक्य आहे. श्रीयुत गोपाळ कृष्ण गुडे, डॉ. महादेव मंगेश शिरवैकर, श्रीयुत भास्कर रुद्राजी नाईक प्रतापराव सरदेसाई, डॉ. व्यंकटेशराव देसाई, श्री. नारायण बांदोडकर, श्री. सखाराम शेणवीं धुमे इत्यादि नागरिक निवडून येण्यास लायक आहेत असें आमचेंच नव्हे तर बऱ्याच हिंदु विचारी नागरिकाचें मत दिसून येतें. पण या कामी एकवाक्यतेनें प्रयत्न झाले पाहिजेत. हा हिंदु समाजाच्या हिताचा प्रश्न आहे. या कामी कसूर करणें व आतां तर दिरंगाई करणें इष्ट नाहीं. तेव्हां सर्व महालांच्या हिंदु मतदारानीं शक्य त्या संघातर्फे वरील नागरिकांपैकीं प्रतिनिधी निवडून येण्याची चळवळ करावी, अशी आमची प्रेमाची व कळकळीची विनंति आहे".

सदरहु नामनिर्शींत आमच्या संपादकाच्या नावांचाहि उल्लेख होता; पण गेल्याच्या मागील अंकांत प्रसिद्ध झालेल्या 'खुलाशांत' नमूद केलेल्या कारणांमुळें ते कोन्सिलांत शिरणार नसल्यानें वरील लिस्टांतून त्यांचें नांव आह्मीं कमी केलें आहे. त्याबद्दल श्री कैंकरे आह्मांवर रागावणार नाहींत, अशी उमेद आहे.

आमची विनंतिः—आजच्या अंकाच्या पोर्तुगीज भागांत आमचे दुसरे प्रेमळ मित्र प्रो. दत्ताराम गोबिंद कामत यांचेंहि एक पत्र येत्या निवडणुकी संबंधानें प्रसिद्ध झालें आहे. श्री. कैंकऱ्या प्रमाणें तेहि आपलें कर्तव्य बजाविण्याविषयीं मतदारांस कळकळीची विनंति करून निवडून येण्यास सर्वथैव पात्र अशा गृहस्थांचीं नांवें सुचवितात. या बाबतींत आमच्या दोन्ही मित्रांच्या ह्मणण्यांत बहुतेक एकवाक्यता आढळून येते. आमच्या मतें वरील नामनिर्शींत डॉ. सखाराम लाड रहाणार ह्मापसें यांच्या नावांचाहि समावेश होणें योग्य आहे; कां कीं, याहि नागरिकांच्या अंगांत कोन्सिलांत योग्य रीतीनें काम पार पाडण्यास लागणारे गुण वसत असून, केवळ लोकहितासाठीं झटण्यास ते मागें पुढें पाहाणारे नाहींत, अशी आमची समजूत आहे. कसेंहि असो, निवडणुकीच्या कार्यांत हिंदु मतदारानीं स्वस्थ न बसतां मागील दोन अंकांत सुचविल्याप्रमाणें, स्वकर्तव्य योग्य रीतीनें बजावण्यास शिकस्तीचे प्रयत्न केले पाहिजेत. व तसें करण्याविषयीं सर्व मतदारांस आमची प्रेमाची विनंति आहे.

सार्वजनिक फंडास मदतः— येत्या शनिवार ता' १५ रोजीं राजापुकर नाटकमंडळीनें आपल्या लोकप्रिय संत तुकाराम नाटकाच्या प्रयोगाचें उत्पन्न सार्वजनिक फंडार्थ अर्पण करण्याचें ठरविल्या बद्दल आह्मीं मंडळीचें सप्रेम अभिनंदन करतों. केवळ मडगांवकरांच्या विनंतीचा आदर करून, रा. रा. राणे यानीं व्यक्त केलेला उदारपणा आजपर्यंत बऱ्यास सार्वजनिक फंडास केलेल्या मदतरूपी भक्कम देवळावरचा कळसच आहे असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. या प्रयोगास सर्वांनी हजर राहून स्वार्थ व परमार्थ साधावा अशी आमची सर्व राष्ट्रप्रेमी लोकांस आग्रहाची विनंति आहे.

वर्तमानसार

—जाहिरातीच्या पत्रांत जाहीर केलेल्या 'कुसुमचंपा' नाटकाचा प्रयोग येत्या सोमवारीं होणार नाहीं.

—कवळें येथून श्री. विठ्ठल निळकंठ दळवी हे लिहितात: गेल्या गुरुवारच्या भारतांतील वर्तमानसारांत डाकोळ व प्रियोळ एथील शाळा मराठा - गायक-समाजानें उघडल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे; तीं चुकीची असल्यावरून पुढील अंकांत दुरुस्ती व्हावी अशी विनंति करतो. गोव्यांत वर्षांतून कांहीं काळ राहात असलेले श्रीस्वामी पूर्णाश्रम, यांच्या खटपटीनें त्यात्या ठिकाणच्या प्रमुख गृहस्थांकडून या शाळा उघडल्या गेल्या आहेत. त्या गायक समाजानेंच उघडल्या आहेत असें नाहीं. डाकोळला गायक - समाजाची वस्ती जास्त असल्यानें त्यांच्या कडून इतर लोकांपेक्षां जवळ जवळ दुप्पट तिप्पट मदत झाली आहे. तर प्रियोळला गायक - समाजाची वस्ती नसल्यानें तिकडे ती शाळा तेथील

ANO V.—NUMERO 43—1921 QUEPEM QUINTA-FEIRA 20 DE JANEIR

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............. 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणें. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें-गुरुवार, तारीख २० माहे जानेवारी सन १९२१ अंक ४३वा.

UM REMEDIO

Qui habet aures audiendi, audiat
Evangelho

A greve dos lavradores de palmeiras determinou ao tesouro publico um prejuizo mensal de oitenta mil rupias.

Nas serias dificuldades financeiras em que presentemente se está debatendo, sem solução difinitiva, o nosso depauperado Paiz, a diminuição na renda ou receita publica, da referida importancia representa sem mais nem menos—*sobre queda coice.*

Não se diga, porem, que esse *incidente* financeiro, gerado pela nunca esperada greve é refractario á cura. Não; é um mal curavel, felizmente, quando haja uma bôa vontade, dicidida e inabalavel, por parte do elemento burocratico, pago pingue e chorudamente.

E' que, se cada funcionario graudo, compenetrado da gravidade da situação se dispuser ao sacrificio dalgumas desenas de rupias no seu vencimento, relativo ao corrente mez ou ao tempo em que durar a greve, o remedio contra o mesmo mal será eficacissimo.

Como vêm, o remedio depende do patriotismo dos funcionarios referidos que podem perfeitamente livrar o governo da melindrosa situação em que o meteu a greve.

Vem males para o bem.

A greve è um dêles, pois vai demonstrar, praticamente, que o Paiz tem a dita de possuir o *bem* de ser patriotica a sua burocracia.

Enganamo-nos?

Os factos no-lo dirão.

Mau sinal

Julgavamos que a eleição de vogal pelas Novas Conquistas para o Conselho Legislativo não seria disputada, em razão da coezão politica que supunhamos existir nos seus habitantes.

Estamos, porem, vendo o contrario.

A união apregoada da classe hindu não passa, portanto, de imaginaria, o patriotismo não vale mais que o egoismo e a abnegação não é outra coisa se não comodismo salutar....

Caso Rau---Prazeres

A natureza fez-me pertencer ao sexo, que vòs homens chamais fraco; porem, faça-se a justiça, todos veem na nossa fraquesa a maior das...forças. Não se admire, portanto de que seja muito atrevida em ir ter consigo hoje para uma entrevista-se assim se pode dizer. E' um momento apenas. Sei muito bem que é um grande sacrificio para V. habituado a conferencias e consultas politicas, ouvir uma dêbil criatura como eu. Mas tenha paciencia e me ature um bocado, visto que o maior pecado è...ouvir uma mulher.

Desde que a luz de razão abriu-me o mundo de realidades, comecei a acompanhar com muita simpatia e estima a evolução da sua classe, hoje poderosa, hontem mesquinha, despresada sob um regime que tinha por religião aquela que me fizeram beber com agua Benta... Os hindus emaciparam-se, ao clarão da Republica pela sua grande força de vontade, sacrificios e amor pela India e Portugal. Ao clarão da Republica ...que é, minha senhora? Dir me há V. Lembra-se do ano de 1910? Transportemo-nos para aquela dada celebre nos anais desta terra, em que os seus correligionarios corriam em colunas cerradas para encher a urna com o sr. Prazeres da Costa. Foi uma prova palpitante e sensacional de união sob o Condão Republicano, logo após a implantação do Regime atual E tambem a ingratidão de sua Exa. não deixou de ser menos palpitante e sensacional, visto que para sempre (?) olvídou os favores daqueles que fizeram dêle deputado, primeiro, e depois senador, colonial distincto ...que sei eu?–Mas não deixou de se reatar pela amizade maior que d'antes aos que tinham sido adversarios dele ao tempo de eleições. E assim foi e vai anichando (do Dr. Ráu?) os parentes e estranhos com decretos de mera competencia.

Que culpa tem ele se os hindus não solicitaram? Pergunta o Dr. Rau.

O hindu sabe exigir; pois ele só recebe em troca dos serviços prestados. E ao snr. Costa estes são mil e um. Solicitaram alguns afirma V. Eu não os condeno por serem exepção—mas que nunca foram atendidos, e o Snr. Rau suponho mas não afirmo que foi atendido, quando quiz anichar (è meu) um de sua familia.

Ele não podia adivinhar os nomes, diz o ilustre delegado. Por favor me diga V. não estava lá o doutor, a quem a sua classe deu uma demonstração sem igual no passado nesta terra, não estava ele para cochichar aos ouvidos do senador nomes dos hindus ilustrados que são hoje em grande numero? Certamente eles não foram cursar na metrepole—verbo tão queridinho do bacharel, mas afirmo e não duvido que V. concorde comigo que eles são competentissimos. Para saber isto não ê preciso ir *cursar*, basta entrar nas diversas repartições.

Mais um momento, sr. Redactor e basta. Lêu a opinião da *Terrã* sobre a carta do Dr. Rau? pois fique sabendo que a sincceridade do jornalista e a missiva sincera tornaram suspeito o cidadão insuspeito que ele era............

Com a publicação desta ficará bastante grata uma criada de V.

Magdalena

ECOS & CRITICA

Serviço telegrafo-postal

Do sr. Agapito Lourenço, de Cuncolim:—

"Pelos modos, meteram num caos o serviço telegrafo-postal que levou rios de tinta á imprensa e que dia a dia se vai tornando mais irregular, dando-se a regra de os telegramas urgentes serem recebidos alguns dias depois da sua chegada á estação, onde ficam obrigados a tomar fôlego.

Há dias deu-se um caso curioso: um individio recebeu um telegrama urgente que um dia antes estava na estação descançando e que noticiava o estado grave dum filho do distinatario. Este mui assustado correu á estação de Cuncolim para emitir um telegrama, lá pelas onze horas, pedindo noticias, e, baldado empenho, voltou com a seguinte resposta dos senhores empregados: Hom'essa! Venha, se quizer pelas 3 horas da tardinha, que temos de jantar e descançar.

Nisto não há deturpação, nem erro de informação, é um facto.

Em Rachol, onde, apezar de duas malas, de manhã e tarde, è unico o distribuidor do serviço telegrafo-postal, tambem se dá o mesmo e com frequencia.

Em segundo lugar, o serviço encontra-se tão mal distribudo, que um só distribuidor tem de ir dum extremo a outro, sendo evidente que a consequencia ē ficar a correspondencia parada nas mãos do mesmo que anda a trabalhar desde 6 de manhã atè 8 de noite, merecendo-nos por isso muita compaixão"

Providencias, providencias!

Trapalhada de ... Sanguem

Em aditamento á nossa local publicada na edição passada sobre as irregularidades nas contas da extincta comissão municipal de Sanguem, informa o nosso *reporter* o seguinte:—

Que, de facto, foram descobertas falsificações na escrituração da contabilidade.

Que se verificou existirem recibos, importancias constantes dos quais não foram receitadas.

Que as contas relativas a alguns anos decorridos não foram submetidas á aprovação do Tribunal competente.

O nosso *reporter* conta-nos, ainda, muitas coisas bonitas...

E notem que todos èsses escandalos se desenrolaram nas gerencias da Comissão municipal desde o seu presidente administrador sr. Faure da Rosa, *amigo desinteressado* da India, do seu *leite*, da cultura da *borra cha*, do famoso *Kesri*— e *tuti quanti*.

Quem sabe se viria á luz de publicidade a tal *trapalhada* se não fôsse o zelo da Camara Municipal actual!

Cá está, pois, mais uma prova irrefragavel da superioridade da Camara sobre a comissão cujos presidentes, desde o dito

हें दुसरें नांव मात्र आलें, पण ज्या गोष्टी मोनार्कीत घडत नव्हत्या त्या गोष्टी—मोनार्कीत जे अधिकारारूढ नव्हते व जे मोनार्कीतल्या अधिकाऱ्यांवर त्यांच्या अंमलबजावणी विषयीं तोंडसुख घेत होते, त्यांकडून–या रेपुब्लिकांत घडूं लागलेल्या पाहून आश्चर्य वाटतें ! येराल्द ह्मणतो.–Nunca vimos em outros tempos que se fizessem tantos inqueritos e sindicancias e sobretudo que custassem tanto dinheiro! (Heraldo n. 3705 ano XIII domingo 9 de Janeiro de 1921.

कोंसिल्य दु गोव्हेर्नोंत लोकनियुक्त सभासद् निवडून येण्याविषयीं प्रथमतः लोकांचीं आर्जवें करितात व निवडून येतात. पण मग तें स्थान प्राप्त झाल्यावर लोकांच्या गरजा काय आहेत, तें लोकांकडून समजून न घेतां ह्मणजे जनतेच्या दृष्टीनें न पहातां, आपणास जें काय बरें वाटेल तें–ह्मणजे आपल्या दृष्टीस जें काय बरें वाईट दिसेल तें त्या कोंसेल्यांत ठराव रूपानें आणितात किंवा आणिलेल्या ठरावावर चर्चा करून मत देतात ! आणि आपल्या शहाणपणाचा दिमाख मिरवूं पहातात ! यांनीं जो काय ठराव आणिला असेल, तो, सरकार, ते लोकनियुक्त सभासद असल्यावरून लोकांच्या गरजेचा समजतें. पण वस्तुस्थिति याच्या विरुद्ध असते !

लोकनियुक्त सभासद निवडून आल्या पासून केव्हां तरी लोकांच्या गरजा काय आहेत, हें समजून घेण्यासाठीं, त्यांनीं लोकांपाशीं येऊन तत्संबंधीं विचारपूस केली आहे काय ? कधीं नाहीं ! सरकारी सभासदांप्रमाणें यांनींहि आपल्या स्वतःच्या बुद्धीस व सरकारी सभासदांस जें काय बरें वाईट वाटेल, तेवढेंच एकतर्फी —पण बहुजन समाजाच्या नावांखालीं ठरावांच्या रूपानें कोन्सिलांत आणून पास करून घेतलें आहे किंवा अनुकूल मत दिलें आहे मग त्या पासून बहुजनसमाजाचा फायदा होईल किंवा नुकसान होईल याकडे त्यांनीं पाहिलेलें नाहीं. कांहीं तर नुसते खुर्चीवर बसून "होय वा किंवा नाहीं वा" या पलीकडे कांहींच करूं शकले नाहींत. असल्यांस निवडून देण्यापेक्षां ह्मणजे "मळमळीत सौभाग्यापेक्षां ढळढळीत वैधव्य" ह्मणजे न निवडलेलेंच बरें वाटतें !

जर लोकनियुक्त सभासद बहुजनसमाजाच्या बऱ्यावाईटाकडे पहाणारे होते, तर ते लोकांकडे– निदान ज्यांनीं आपणास निवडिलें असेल त्याकडे तरी येऊन त्यांच्या गरजा काय आहेत हें समजून घेणार होते. आपल्या दृष्टीनेंच पहाणार नव्हते ! आणि अशामुळेंच आज ते सभासद लोक टीकेस पात्र होत आहेत. अशांतल्या स्वार्थी किंवा आपमतलबी अथवा एकलकोंडे स्वभावाच्या मनुष्यास–मग तो कितीहि विद्वान किंवा श्रीमंत असो त्यास आपलें मत देऊन नुकसान करून घेऊं नये. तर जो समाजांत येऊन समाजाचें हित कशांत आहे, व समाजाचें हित कशा प्रकारें होईल इत्यादि लक्ष्यांत घेऊन तें सरकारास विदीत करील व सरकारचें मत जनतेस कळवून, त्यावर तिचें मत घेऊन मग स्वतःचें मत सरकारास देईल त्यासच निवडावें. व अशाच मनुष्यानें पुढें येऊन स्वतःस निवडून घ्यावें. इतरांनीं पुढें येऊन हंसें करून घेऊं नये. व समाजाचें नुकसानहि करूं नये अशी त्यांस प्रांजलपणें नम्रपणाची सूचना आहे. एस्. एच्.

भारत

गुरुवार पौष शु॥ ११ शी १८४२

आधीं कळस मग पाया !

परमेश्वरी कृपेनें हिंदुसमाजांस राजकीय हक्कांपासून अलग ठेवण्यास राजसत्तेचा अंधःकार नष्ट होऊन, त्याला प्रजासत्तेच्या उज्वल प्रकाशांत समान हक्काचें फर्मान दाखल करण्यात आलें तो व या नंतर दहा वर्षांच्या अत्यल्प काळांत 'आंधळा मागतो एक डोळा तर देव देतो दोन डोळे' अशी भावना होणारा गोवाप्रांताला स्वराज्य–स्वातंत्र्यदानाचा दिवस, हे अखिल गोमांतकीय हिंदुसमाजाला अपूर्व आनंदाचे, पर्वणीचे किंबहुना आपल्या कर्तव्यांत स्फूर्तीचे वाटले असावे व आपला उर्जितावस्थेचा लखलखित काळ अगदीं समीप आला असेंहि त्यास वाटलें असावें यांत कांहींच आश्चर्य नाहीं. हा काळ हिंदुसमाजाच्या जागृतीचा किंवा क्रांतीचाहि होता असें ह्मणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. पण ही क्रांति झाली किंवा होत आहे अशीं चिन्हें दृग्गोचर होत नाहींत हें समाजाचें दुर्दैवच समजलें पाहिजे.

असें होण्याच्या कारणांपैकीं सरकारची आमच्याविषयीं अनास्था हें एक कारण असलें तरी आमच्या समाजाची 'आपण आपणास देव समस्तांस' अशी वैयक्तिक वृत्ति, स्वराज्यास पात्र होण्यासाठीं योग्य प्रयत्नाचा असलेला अत्यंताभाव व 'आधीं कळस मग पाया' हें धोरण हींहि कारणें त्याला आघाडी मारण्यास देत नाहींत हें लक्षांत ठेविले पाहिजे. व जोंपर्यंत हीं कारणें आमच्या समाजांत दृढ मूळ धरून राहतील तोंपर्यंत आह्मीं निकृष्टावस्थेच्या फेऱ्यांतून सुटूं, आह्मी विपन्नावस्थेच्या खोल गर्तेतून वर येऊं किंवा अधःपातापासून मुक्त होऊं असें मानणें शुद्ध वेडेपणा आहे हें आमच्या समाजाधुरींणीं मनांत बाणवून त्याप्रमाणें योग्य दिशेनें प्रयत्न केले पाहिजेत हेंहि उघड आहे.

आमच्या ख्रिश्चन बंधुसमाजाची सध्या चैन असल्यामुळें त्यांच्या विषयीं प्रस्तुत कांहीं ह्मणावयाचें नाहीं; कारण 'आपल्या डोळ्यांतील मुसळ' दूर केल्याशिवाय 'अधिकार तैसा उपदेश' करण्याला आह्मीं पात्र होणार नाहीं, ह्मणून पहिल्यांदां आह्मी, आमच्या समाजधुरिणांनीं, आमच्या समाजाच्या अंतःकरणावर संघशक्तीचें व परस्परा नुकंपेचें महत्व पक्कें प्रस्थापित करून त्यास इष्ट वळण लावण्याचे, नैतिक व सांपत्तिक स्थिति सुधारून स्वराज्यासाठीं खरी पात्रता अंगीं आणण्याचें व नंतर राजकीय हक्कांसाठीं सनदशीर रीतीनें योग्य किंवा लायक होण्याचे कसून प्रयत्न केले पाहिजेत हें निर्विवाद आहे.

प्रत्येक प्राणीमात्र स्वार्थी आहे. एखादा अति कृपणध्या किंवा एखादा जीवन्मुक्त घ्या. एक द्रव्याचा लोभी तर दुसरा परमार्थाचा–मोक्षाचा लोभी. दोघेहि स्वार्थी; पण पहिल्यावर लोभी आपलपोट्या अशा विशेषणाचा भडिमार होतो तर दुसऱ्याची निस्वार्थी, निस्पृह, परार्थी देह कष्टविणारा अशी कीर्ति होते. याचें कारण काय ? तर पहिल्या प्रकारच्या स्वार्थ्याची दृष्टि फक्त आपल्यापुर्ती, आपल्या कुटुंबापुर्ती किंवा आपल्या नातलगांपुर्ती असते पण दुसऱ्या प्रकारचा स्वार्थी आपला समाज किंवा अखिल जग आपलेंच कुटुंब समजतो. एकाचा स्वार्थ संकुचित, वैयक्तिक तर दुसऱ्याचा विस्तृत व विधायक एवढाच त्यांत फरक आहे. आमच्या समाजांत या वैयक्तिक स्वार्थाची भयंकर ज्वाळा पसरली आहे व आपल्या कर्तव्याचा हा एवढाच गोल आहे असें समजतात; पण या गोलाच्या कांहीं अंतरावर जरा विस्तृत असा समाजगोल आहे व त्यांकडे आपलें लक्ष्य वेधलें पाहिजे व या बहिर्गोलाची समाजाची जी दशा होणार तीच अंतर्गोलाची–व्यक्तीची होईल हें ते उमजत नाहींत. अशा स्थितींत 'वसुधैव कुटुंबकम्' मानण्याचें दूरच राहिलें. या अनाद्यंत विधायक व विस्तृत गोलाचा टापू आकळतां न आल्यानें किंवा संत तुकाराम नाटकांतील संन्याशी, रामेश्वरपंत व मंबाजीबुआ यांच्या प्रमाणें 'अहोरूप महोध्वनि' अशी आत्मप्रशंसा करण्यांत गढून गेल्यामुळें समाजाच्या दैनावस्थेकडे लक्ष्य देण्यास वाव मिळूं नये यांत कांहीं आश्चर्य नाहीं. अशा वृत्तीवर 'मुले कुठारः' घालणें समाजपुढाऱ्यांचें पवित्र कर्तव्य आहे.

प्रत्येक हिंदुव्यक्तीला हा समाज आपला आहे अशी भावना झाली. प्रत्येक व्यक्तीच्या स्वार्थी दृष्टीची मजल येथवर पोंचली कीं आमच्या समाजाचें अधःपतन होईल अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. आमच्यांत ऐक्य वाढेल व सध्या, काडीच्या गरजेसाठीं सुद्धां परक्यांकडे 'भिक्षांदेही' करावी लागते, ती लागणार नाहीं. परकी नोकरशाही जी आमच्यावर अरेरावी करीत आहे तिला आळा पडेल. अगदीं जरुरीपुरत्या अन्नवस्त्राची मागणी परक्यांकडे करावी लागत आहे याची शरम वाटून तें आह्मीं उत्पन्न करण्यास शकूं अशी धमक अंगीं येईल व अशा प्रकारें शेतकी सुधारली, कला व निरनिराळ्या धंद्याचे प्रचंड कारखाने उभारण्यांत आले ह्मणजे प्रस्तुतच्या निकृष्टावस्थेच्या गर्तेतून वर येण्यास मुळींच उशीर लागणार नाहीं. समाजाची सांपत्तिक स्थिति उत्तम असून, जो स्वतःच्या कर्तबगारीवर विश्रामूं शकतो तोच समाज किंवा देश स्वराज्याला पात्र होतो.

अशी वस्तुस्थिति प्राप्त होण्यास न झटतां केवळ स्वार्थाच्या वाफफळ बडबडींत काळ कंठून राजकीय सत्तेसाठींच ह्पापणें ह्मणजे 'कळस' उभारून नंतर इमारतीचा पाया तयार कर, ह्यासारख्या हास्यास्पद, निरर्थक व अशक्य गोष्टीत मूर्त स्वरूप देण्याचा अव्यापारेषु व्यापार करणें होय,हें कोणीहि कबूल करील.

—गेल्या शनिवारीं रात्रौ भारत ऑफिसांत 'हिंदु, इस्लामी व ख्रिस्ती धर्म आणी महात्मा गांधीची असहकारिता, या विषयावर आमच्या संपादकांचें जाहीर प्रवचन झालें. पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणें आमच्या ऑफिसांतील मुद्दाम राखून ठेवलेल्या दिवाणखान्यांत नित्य रात्रौ धर्म व राजकारण यांवर प्रवचनें होत असतात. श्रोत्यांचा जमाव वाढत्याप्रमाणावर आहे, हें कळविण्यास समाधान वाटतें.

स्फुट विचार

भंडाऱ्यांचा संप:— या संपामुळें सरकारला नुसत्या जानेवारी महिन्यांत ८० हजार रुपयांचें नुकसान झालें ! चालू असलेल्या दुष्काळाच्या काळांत हा तेरावा महिना त्याला अत्यंत जाचक होईल, हें उघड आहे. अजून संपाचा शेवट झाला नसून, त्याच्या कायमच्या निकालाला किती अवधि लागेल, हें सांगवत नाहीं. पण या आजारावर औषध नाहींच, असा मात्र कोणी आपला चुकीचा समज करून घेऊं नये. प्रत्येक बड्या अम्मलदारानें–संप चालू असेपर्यंत, आपल्या मासिक वेतनांतून ५० । १०० रुपयांची झीज सोसण्याची देशाभिमानी कळकळ व्यक्त केल्यास, संपानें उत्पन्न झालेल्या बिकट स्थितींतूनहि क्षम्यता प्राप्त होऊन, सरकारला शांत रीतीनें श्वासोच्छ्वास करण्यास वाव मिळणार आहे. देशासाठीं स्वार्थत्याग करण्याची मोठ्या नोकरशाहीची पूर्ण तयारी असल्यासच, भंडाऱ्यांनीं जन्म दिलेला वरील 'तेरावा' महिना त्रासदायक होणार नाही. उलटपक्षीं नोकरशाहीचा स्वदेशाभिमान पोटांतच 'गडप, होउन, त्याच्या पलीकडे न गेल्यास मात्र कठीण प्रसंग ओढवणार खरा !

येत्या निवडणुका:— येत्या निवडणुकींत नवीन व जुन्या काविजादींतील हिंदुमतदारांचें पूर्ण ऐक्य दृष्टीस पडून येईल, अशी आह्मांस आशा होती; परंतु ती निष्फळ ठरली! इतकेंच नव्हे, तर खुद्द नवीन काविजादींतील लोकांत जी मागें एकी अनुभवण्यास मिळत होती, ती सुद्धां येत्या निवडणुकींत पहावयास मिळणार नाहीं. असेंच इलेक्शनच्या एकंदर धोरणावरून मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें! निवडणुकींत पक्ष असूं नयेत, मत वैचित्र्य असूं नये असें आमचें ह्मणणें नाहीं; पक्ष पाहिजेत; मत वैचित्र्य पाहिजे, सर्व कांहीं पाहिजे. पण या सर्व गोष्टी परिस्थितीवर अवलंबून असतात. सांप्रतची हिंदु लोकांची राजकीय स्थिति परस्परांत झगडून, रणें माजविण्यासारखी नाहीं, हें कोणीहि समंजस कबूल केल्याशिवाय रहाणार नाहीं. ह्मणूनच आह्मांला येत्या निवडणुकींतील 'चुरस' अनिष्ट वाटते-

डॉ. व्यंकटेश देसाई:— नवीन काविजादीतर्फे लेजिस्लातीव कोन्सिलांत निवडून येण्यासाठीं हे उत्साही देशभक्त बहुमतानें उभे राहिले आहेत. त्यांनी आजपर्यंत देशहितासाठीं थोडाबहुत स्वार्थत्याग केला असून हिंदुलोकांचे हितसंबंध योग्य रीतीनें पाळले जाण्यास जी कोणताहि मेंबराच्या अंगांत पात्रता असावयास पाहिजे ती डॉ. व्यंकटेशरावजींच्या अंगांत पूर्णपणें वसत आहे, असें आह्मीं खात्रीनें सांगतों. त्यांचा देशाभिमान नकली व पोलका, नसून खरा आहे, इतकें कळविलें ह्मणजे नवीन काविजादींतील मतदार नागरिक ते निवडून येण्यापीत्यर्थ कायावाचामनें झटतील,अशी आह्मांस आशा आहे.

वर्तमानसार

—भारतावरील खटल्याच्या सुनावणीस येत्या महिन्याच्या १७ व्या तारखेस पुन्हा सुरुवात होईल.

—पूर्वी जाहीर झाल्या प्रमाणें सांगे येथील 'श्रीविठ्ठल सेवक मंडळा'' मार्फत ता. १-१ रोजीं "श्री पाईक देव प्रासादिक लो. टिळक वाचनालय" उघडण्याचा समारंभ मोठ्या थाटानें पार पडला. सकाळीं श्रीसत्यनारायण व्रत करण्यांत आलें. संध्याकाळीं मुलांची

ANNO V. — NUMERO 44 — 1921 | QUEPEM QUINTA-FEIRA 27 DE JANEIRO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें—गुरुवार, तारीख २७ माहे जानेवारी सन १९२१ अंक ४४वा.

SENÃO,... NÃO!

E' facto incontroverso que muitos dos administradores de comunidades das Velhas e Novas Conquistas exerceram em nome do Governo ou dos seus agentes forte e energica pressão nos seus subordinados, na eleição dos vogaes efectivo e suplente, por aquelas associações.

¿Terá, de facto, havido ordens *secretas de cima* para aqueles funcionarios procederem da injusta forma como procederam?

¿Ou terá havido nessa *trapalhada* toda abuso do nome do Governo contra o candidato popular?

A ser verdadeira qualquer das duas alternativas, o que se passou é simplesmente condenavel, superlativamente lamentavel, porisso que num e noutro caso fica patente a nossa manifesta incompetencia para a autonomia.

¿E', por ventura, digno de autonomia um Paiz cujo governo galopina, com todo o desaforo, embrulhado na capa de neutralidade e cujos administradores, escolhidos dentre os homens de caracter e *independencia* obedecem, ás cegas, ao principio sintetisado no rude dito vulgar Senhor mandar, eu andar?

¿Pode lá prosperar civicamente uma terra cujos homens chamados de caracter e independencia, uma vez guindados ás posições burocraticas dalguma importancia, se prestam á *toda a obra* dos seus superiores, em prejuizo da sua propria dignidade e da do Povo que os subsístenta e de quem, porisso, deviam, únicamente, satisfazer a vontades licitas e justas?

Outro caminho, senhores, que levará directamente para o abismo da completa falencia moral o que estão habituados a trilhar, por mal dos nossos pecados!

Haja independencia a valer, posto de parte o servilismo e votado ao despreso o preito á *instituição* de *salamaleques*!

Fóra com o mal entendido egoismo que afinal de contas não conhece limites nem honra e ante o qual os fins justificam os...meios!

Sò então é que o Paiz pode entrar na *vida nova* por que tanto se aspira e suspira.

Senão,.. não.!

A pouca vergonha!

Publicamos noutro lugar os suplementos que fizemos circular aqui a proposito da franca intervenção do administrador do concelho na eleição do vogal pelas comunidades.

Pela sua leitura poderão bem calcular a condenavel atitude que *em nome do Governo* assumiu o sr. Antão, desprestigiando-se e a decantada neutralidade governamental que, pelos modos passou á historia!

Vergonha das vergonhas!

Não suponham que estamos a acusar o administrador sr. Antão...no ar e que a nossa campanha contra essa autoridade è filha da politiquice mesquinha. Não. Estamos habilitados á provar, a toda a hora, o seguinte:

—Que o sr. Antão ameaçou, *melifluamente*, certos escrivães de comunidades com perseguições, no caso de não arranjarem procuradores .. administrativos.

—Que os empregados da administração e um regedor andaram a galopinar, a torto e a direito, em obediencia ás ordens do seu *dono*.

—Que as listas da candidatura ...administrativa foram fabricadas na administração, sendo escritos os nomes do candidato oficial e seu suplente pelo empregado de *maior estima* do sr Antão, Pondorinata

—Que finalmente o sr. Administrador do concelho fez tudo o que podia, para angariar o *maximum* para não dizer o *totum* da votação á *sua lista*.

Sobre todos êsses factos possuimos provas esmagadoras.

Como, porem, a lista popular triunfou por uma maioria formidavel que fez em cacos os manejos administrativos, não desejamos mais gastar *cêra* *com ruins defuntos*, lamentando sinceramente, apenas, a *pouca vergonha* que empanou o brilho da chamada *neutralidade oficial*.

Não se ponha fecho a estas rapidas linhas sem se consignar aqui o agradecimento cordial do *Bharat* aos dignos procuradores das comunidades que, firmes e resolutos, votaram no candidato popular,, pregando uma lição mestra á *sabujice* administrativa è salvando o patriotismo do concelho que se rejubila-com orgulho o dizemos-da honrosa victoria que cá alcançou o candidato popular pela sua grande simpatia e enorme influencia.

3 Suplementos

AS URNAS!

Cidadãos

O Paiz, representado pelos seus filhos mais em evidencia na politica manifestou, sem discrepancia de opiniões o desejo de ver eleito vogal efectivo pelas comunidades de Goa o distincto causidico sr. *Doutor Francisco Xavier João Filomeno da Piedade Figueiredo*, cujas excepcionaes faculdades de trabalho, aliadas a uma inteligencia invulgar garantem cumprimento integral da patriotica missão que lhe vai ser confiada.

E' portanto, dever sagrado de todo o qualquer procurador das comunidade, sobre tudo deste concelho, dar o seu voto ao referido sr. Dr. Figueiredo.

Consta, porem, que o sr Alfredo Peregrino Antão, administrador deste concelho, divorciado, infelizmente da sua obrigação de manter-se neutro á pugna eleitoral está, por meios inconfessaveis, quer por ameaças, quere por promessas, usando da sua qualidade funcional para angariar votos a favor do candidato sr. *Xavier Martins*, que para nós é completamente disconhecido.

O *Bharat* tomará conta do caso muito embora esteja convencido de que a victoria do sr. Figueiredo será um facto se é que existe patriotismo nesta terra.

A' urna, pois, srs. procuradores das comunidades pelo sr. *Dr. Figueiredo* e seu suplente sr. *Sergio Rego* que tambem nos consta ser um verdadeiro patriota.

Quepem, 21 de janeiro de 1921.

1 *G. P. Hegdo Dessai*
Director do *Bharat*

CAUTELA E CORAGEM!

Srs. Procuradores das comunidades

O *Bharat* sabe que sois patriotas e porisso nutre a certesa absoluta de que, em peso, ireis, amanhã, votar no candidato popular sr. Dr. João de Figueiredo.

Tende, porem, cautela que o sr. Alfredo Antão, administrador do concelho, não satisfeito com os vergonhosos manejos eleiçoeiros que muito o disacreditam e a que nos referimos no *Suplemento* d'hontem está, não obstante, procurando tambem desprestigiar o Governo, significando aos seus subordinados, por artes de berliques e berloques, que existe candidatura oficial, o que é falso.

Curvamo-nos a cabeça ante essa feia atitude do sr. Antão que tenta, desgraçadamente, manchar com o seu jesuitico trabalho de *sapa* a pura neutralidade governamental.

Vòs, porem, srs. procuradores das comunidades, sois, completamente, donos de vossos actos e não criaturas do sr. administrador, nem dos seus subordinados.

Firmes e despreocupados, ide, pois votar, amanhã, no tribuno popular sr dr. João de Figueiredo.

A' urna!

Quepem 22 de Janeiro de 1920

G. P. Hegdõ Dessai
2 Director do *Bharat*

GRANDE TRIUNFO!

Uma verdeira victoria!

Srs. Procuradores das Comunidades,

A vós que cumpristes o sacrossanto dever patriotico de votar no sr. Dr. Figueiredo e seu suplente, impassiveis ás maquinações de certos *judas* que fizeram o uso do nome do Governo para servir os seus apaniguados, consigna o *Bharat* os seus rendidos agradecimentos.

O *Sr.* Dr. Figueiredo e seu suplente obtiveram, como o *sabeis*, 18 votos, tendo alcançado á lista adversa *apenas* 6 e isto mesmo dos *subordinados* do Administrador do Concelho.

Vòs, srs. Procuradores deste con-

भारत

गुरुवार पौष छ।। ४ थी १८४२

प्रयत्नशक्ति वाढवा !

आशा व निराशा या दोन गोष्टींचा मनुष्यावर मोठा विलक्षण परिणाम होतो सामान्य लोकांना जोपर्यंत एखाद्या गोष्टींत कांहीं आशा असते तोंपर्यंत ते तींत अगदीं मन घालून मोठ्या नेटानें काम करितात; परंतु, तेंच थोडीशी निराशेची छाया दिसतांच, अगदीं गर्भगळीत होऊन हातचें काम टाकून देतात व कोणत्याहि प्रकारें अधिक प्रयत्न न करितां नशिबाला दोष देत स्वस्थ बसतात.

परंतु आशेनें फुगून जाणें अथवा निराशेमुळें आपलें धैर्य खचूं देणें हें शहाण्या मनुष्याचें काम नव्हे, उलट प्रयत्नांवर भरंवसा ठेवून कितीहि वेळां अपयश आलें तरी यशःप्राप्ति होईपर्यंत पुनः पुनः प्रयत्न करून पहाणें यांतच खरें दूरदर्शित्व आहे. आणि हे गुण ज्यांत आहेत तोच अढळ धैर्याचा मनुष्य होय.

सामान्य व्यवहारांतहि मनुष्यास कसोटीस लावणारे अनेक प्रसंग येतात; तथापि अशा प्रसंगी सदसद्विवेकाची कास बळकट धरून काम केल्यास आपल्या मनाला एका प्रकारचें धैर्य येऊन कोणत्याहि कार्याचा प्रयत्न करण्याची हुरारी येते. आणि जो मनुष्य धैर्यानें प्रयत्न करितो त्याला केव्हां तरी यशःप्राप्ति होतेच होते. परंतु, तेंच त्यानें आळसी होऊन हातपाय गाळल्यास त्याचेकडून हुषारीचे प्रयत्न होत नाहींत आणि अर्थातच यशाचा संभवहि फारच कचित असतो.

प्रयत्नशक्तीचें उदाहरण हेंच पहाना ! स्वराज्याचा मार्ग सोपा व सरळ नसून कंटकमय व त्रासदायक, हें खरें. तथापि शिवाजी महाराजांनीं एका प्रयत्नशक्तीनेंच तोरणें गड घेऊन हिंदी स्वराज्याचें मंगल तोरण बांधिलें. तो काल बाल्यावस्थेचा होता-स्वराज्याच्या ह्या लहानशा रोपट्याला नुकतीच पालवी फुटूं लागली होती. परंतु या रोपट्याला पालवी फुटूं न देतां तें तसेंच तोडावयाचा विचार करून विजापुरकरांनीं रुस्तुमजमान, बाजीशामराव, अफझुलखान वगैरे काळरूपी कुऱ्हाडी पाठविल्या. परंतु एका प्रयत्नाच्याच जोरावर महाराजांनीं त्या भयंकर कुऱ्हाडी हतबल करून टाकल्या. अशा रीतीनें ह्या रोपट्याचें रूपांतर हळुहळू वृक्षांत होऊन त्याला फांद्या फुटूं लागल्या. सर्व महाराष्ट्र व हळुहळू इतर प्रदेशहि या वृक्षाच्या शीतल छायेचा आश्रय करूं लागले.

शिवाजीमहाराजांकडे सैन्याचा बळकट पुरवठा नसतांना सुद्धां, एका प्रयत्नशक्तीनेंच अवरंगजेबासारख्यांना भूमीला हात टेंकण्यास लाविलें.

प्रस्तुत, शिवाजी महाराजापेक्षां दसपट जहागिऱ्या असणारे संस्थानिक कां थोडे आहेत? कां त्या संस्थानिकांजवळ शिपाई नाहींत? कां घोडे नाहींत? कां त्यांना पगार देण्याला पैसा नाहीं? सर्व आहे पण ते शिवाजी महाराज कोठें आहेत? महाराजामध्यें जी प्रयत्नशक्ति होती, जें सामर्थ्य होतें, जें लोकोत्तर धैर्य होतें, ज्या सर्वांच्या मति थक्क करणाऱ्या कल्पना होत्या, जीं सर्वांचीं मनें वेधून घेऊन आपलींशी करून घेण्याची शक्ति होती ती कोणामध्यें नाहीं. महाराजांच्या वेळची परिस्थिति हल्लीं नाहीं असें कोणी ह्मणेल, पण परिस्थिति केव्हांहि आणली असतां येणार आहे, मात्र ती आणणारा कोणी पाहिजे असतो.

एकदां बादशाही सैन्य महाराजांना पकडण्याकरितां चारहि बाजूंनी सारखें हिंडत होतें. महाराजहि ह्यावेळीं एकटेच आपल्या घोड्यावर स्वार होऊन यवनांना हुकांड्या देत त्यांच्या हातून निसटून जात होते. पण ते एकटे आणि बादशाही सेना अफाट ! तेव्हा त्यांनीं निसटून तरी कोठें जावें? जिकडे जावें तिकडे बादशाही फौजेचा गराडा. नाहीं अन्न, नाहीं पाणी, नाहीं झोंप कीं नाहीं एक घटकाभर विश्रांति. रात्र दिवस त्या अफाट सेनेच्या हातावर तुरी देऊन निसटण्याचा प्रयत्न! याला ह्मणावें धैर्य, याला ह्मणावा दृढनिश्चय, याला ह्मणावें स्वदेशप्रीति, याला ह्मणावें धर्मसंरक्षण आणि यालाच ह्मणावें प्रयत्नशक्ति. कसलेहि बिकट प्रसंग येवोत, कितीहि त्रास पडो, आपल्या निश्चयापासून यत्किंचितहि ढळावयाचें नाहीं! नाहींतर आता थोड्याशा जरबीनें कोणी कांहीं विचारिलें तर त्या प्रश्नाचें उत्तर देणें बाजूला राहून साष्टांग नमस्कार घालावयाचा !

शिवाजी महाराजांप्रमाणें प्रयत्न, निश्चय, धैर्य आणि स्वाभिमान, हे गुण धरावे तेव्हांच कोणतेंहि कार्य शेवटास जात असतें.

आमच्यांत आज जर कोणती मोठी उणीव भासत असेल तर ती प्रयत्नशक्तीचीच होय, असें पुष्कळ लोक कबूल करतील. ह्या प्रयत्नशक्तीच्याच अभावीं आह्यांकडून कोणतेंहि कार्य होत नसतें. असें सोड्या कष्टानें ह्मणावें लागतें. एखाद्यानें कोणत्याहि कार्याला आरंभ केला कीं दुसरा आलाच तेथें त्याचें धैर्य खचवायला. हें काय आरंभिलें आहे हो? हें काम करण्याची आमच्यांत अद्यापि योग्यता आली नाहीं ! इ. इ. सांगून त्या कामास दुजोरा देण्याचें तर बाजूलाच राहिलें, उलट त्याचें धैर्य खचवून चालता झाला ! हा तर मुळचाच हताश होता, त्यांत याला अशी पुष्टि मिळाल्यावर मग काय विचारितां ! बसलाच तो हात पाय पांघरून.

महाराष्ट्राचे सांप्रतचे शिवाजी म. गांधी हाच उपदेश जगाला करीत आहेत; "प्रयत्न शक्ति वाढवून आत्मबल वृद्धिंगत करा, ह्मणजे तुह्मांला त्यागाचें व संयमाचें महत्व समजून येईल. व एकदां या उच्च तत्वांची खरी जाणीव झाली ह्मणजे तुह्मांला अशक्य असें या जगांत कांहींच रहाणार नाहीं." असें ते आह्मांला सांगत आहेत.

केवळ एका प्रयत्नशक्तीच्या अभावीं आह्मी अशा स्थितींत कुजत पडलों आहोंत. आतांहि आह्मीं असें हातपाय गाळीत बसणें योग्य नाहीं. प्रिय गोमांतकीय बंधूंनो, जगावर सूक्ष्म दृष्टि [illegible], ह्मणजे आमच्यांत [illegible] कोणती न्यूनता आहे हें आपल्याला सहज दिसून येईल.

आमच्यापैकीं कांहीं मंडळीनें प्रयत्नशक्तीच्याच जोरावर गोमांतकास हितकारक अशीं बरींच कृत्यें करण्याचा निश्चय केलेला दिसतो. याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तेवढें थोडेंच आहे.

स्फुट विचार

आवतोनोमीय कोठें राहिली ? :—ग्रामसंस्था (communidades) तर्फे प्रोकुरादोरांकडून झालेल्या निवडणुकींत, सरकारनें उघड उघड दाखविलेला पक्षपात किती तिरस्करणीय स्वरूपाचा होता, हें आज सगळ्यांस कळून चुकलेंच आहे. ज्या गोष्टींत केवळ लोकपक्षाचेंच वर्चस्व असावें असें कायद्यानेंच ठरविलें आहे त्या गोष्टींत आपलें वोट शिरकावण्यांत सरकारनें कायद्यासच हरताळ फांसला असें नसून जनतेचे अधिकार कस्पटासमान लेखिले ! असें करावयाचें असतें तर ग्रामसंस्थाच्या प्रोकुरादोरांस एक नामदार निवडून देण्याचा हक्क तरी कां दिला ? व असा दुटप्पीपणा करणाऱ्या सरकारचें धोरण जनतेस माहित झाल्यानंतर त्याच्या इच्छेपुढें मान वाकविण्याची लालसा जर झुगारून देण्या इतका धीटपणा आमच्यांत नाहीं तर आज आवतोनोमीचें स्तोम ते कोठें राहिलें ?

वेळेवर पारख होते:— आह्मांस स्वराज्य 'ाद्विजे व पोर्तुगीज नागरिक या नात्यानें आमच्या कर्तव्यांची बजावणी कशा-प्रकारें व्हावी याची चर्चा वर्तमान पत्रांवर, खाजगी सभांत, भाषणात मोठ्या जोरानें केलेली वाचण्यास व ऐकण्यास मिळते पण खऱ्या कर्तव्याची वेळ आली, कीं तीं कर्तव्यें बाजूस राहून सरकारापुढें हांजी करण्याचा जरा प्रसंग मिळाल्यास तो न दवडण्याकडे सुज्ञ ह्मणविणाऱ्यांची प्रवृत्ति दिसून आली ह्मणजे फक्त संभाषणें व लेख यांच्या भपक्यावर फसून न जातां वेळ पडली ह्मणजे खऱ्या कर्तव्याची कशी पारख होते याचें प्रत्यंतर वरील निवडणुकीवरून दिसून आलें.

डॉ. व्यंकटेश सू. सरदेसाई:—हे तरुण व होतकरू वकील नवीन काबिजादींतर्फे निवडले गेले ही समाधानाची गोष्ट आहे. ह्या निवडणुकींत कोणत्याच आडमार्गाचें अवलंबन केलेलें दृष्टीस तर पडलें नाहींच, पण उलट सगळ्या नवीन काबिजादींतील नागरिकांनीं एक समयावच्छेदेंकरून त्यांच्या उमेदवारीस मान्यता दाखविली हें जसें श्रीयुत देसाई यास स्फूर्तिदायक आहे तसेंच नागरिकांस व त्यांच्या पुढाऱ्यांस भूषणावह आहे. आतां श्रीयुत देसाई यांस मिळालेल्या विजयाबद्दल त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करून, त्यांस प्राप्त झालेल्या अधिकारांत लोकोपयुक्त कामें करण्यास मिळालेल्या सवडीचा उपयोग लोकांच्या मनांत त्यांविषयीं असलेला आदर वाढविण्यास कारणीभूत होवो अशी इच्छा प्रदर्शित करितों.—

ऐक्य भावना:— येथें नमुद करण्यास आनंद वाटतो कीं, नवीन काबिजादीच्या तर्फेनें उभे राहिलेले दुसरे उमेदवार श्रीयुत भास्करराव देसाई हे, आपल्या वां. जूची तयारी असताहि समाजांत दुफळी न माजविण्याच्या हेतूनें व खुशीनें उमेदवारींतून मागें सरले. अशा प्रकारें आपल्या मनाचा मोठेपणा दाखविण्यात त्यांनीं जें उदाहरण घालून दिलें त्याबद्दल ते कौतुकास पात्र आहेत ह्यांत शंका नाही. समाजांत वंजबंजपुरीचें साम्राज्य न होतां त्यांत ऐक्यभावना निरंतर जागृत राहण्यास असला स्वार्थत्याग पाहिजे, हें कोणीहि कबूल करील. ह्मणूनच आह्मी श्री. देसाई यांच्या या कृत्याबद्दल प्रेमपूर्वक अभिनंदन करितो.

भिऊं नका!:—ह. भ. प. दामोदरबुवा रिसबूड हे आपल्या भक्तिरसपरिप्लुत कीर्तनांत सद्यस्थितीस अनुलक्षून प्रचलित राजकारणावर मुद्देसूद, हृदयस्पर्शी व निर्भिड विचार प्रदर्शित करतात, हें कित्येक देशबुडव्या 'गोस्वाम्यांस' नावडून त्यांनीं सरकारास निनांवीं पत्रें लिहून त्याची तेथून उचलबांगडी होण्याप्रीत्यर्थ लज्जास्पद प्रयत्न केले, असें पणजीहून आलेल्या एका पत्रावरून समजतें! इतकेंच नव्हे, तर बुवांस कैदसुद्धां करण्यांत येऊन हद्दपारीची अरेरावी शिक्षा ठोठावण्यापर्यंत मजल येऊन पोंचली, असेंहि त्या पत्रावरून कळतें. कित्येक मंडळी देश व गोभक्त रिसबुडास सरकारीत्या या पुढें त्रास होऊं नयेत याहि हेतूनें झटत आहेत, हेंहि आह्मांला आमचा बातमीदार ज्ञात करीत आहे. या प्रकरणाचा निकाल समाधानकारक लागून आमच्या 'शहाण्या मावाप' सरकारकडून कसलाहि अत्याचार होऊं नये असें इच्छितों. पोर्तगीज सत्ताधारी लोकांनो, भिऊं नका! रिसबुडासारख्याच्या निरुपद्रवी भाषणानें तुमच्या सत्तेचें खोबरें होईल असा संशय स्वप्नांतसुद्धां आणूं नका! समता, बंधुप्रीति व स्वतंत्रता या उच्चतम तत्वांस जों पर्यंत तुह्मांकडून मान दिला जाईल तोंपर्यंत तुह्मांला कशाचीहि भीति नाहीं. उलटपक्षीं काय होईल याचें भविष्य वर्तविण्याचें कारण नाहीं...

वर्तमानसार

—चालू महिन्यांतील भंडारी लोकांच्या संपामुळें सरकारी तिजोरीस ८००० रुपयांचा तुटवडा आला.

—बडोद्याचे गायकवाड सरकार हे युरोपांत १ लक्ष किंमतीच्या जमिनी विकत घेण्याच्या विचारांत आहेत असें कळतें!

—सांगें येथील जमिनीच्या सान्याच्या सरकारी उत्पन्नांत दरवर्षी २५०० रुपयांची वाढ होईल असें तिकडील मुख्याधिकाऱ्यानें सरकारास कळविल्यावरून, मुगुळी, कोटारली भाटी, कुर्पे, विचुंद्र, कोडली, धांदोळ व सांतोण येथील लोकांच्या शेतांची व बागायतांची पुनः तपासणी करावी असा हुकूम प्रसिद्ध झाला आहे.

—श्री. सदाशिव शेणवी सुखठणकर यांची इकडील सेक्रेतारी द फाजेंदच्या जागेवर नेमणूक होऊन ते आपल्या कामावर रुजू झाल्यास आज बरेच दिवस झाले. रा. सदाशिवरावजी हे आपल्या अधिकाराच्या योग्य वर्तनामुळें व आंगच्या सौजन्यामुळें जसें ठिकठिकाणीं लोकादरास पात्र झाले आहेत, त्याच प्रमाणें इकडेहि आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावून आपल्या निष्कलंक कीर्तीत सहानुभूतीची भर घालतील अशी [illegible] आशा आहे.

—पोर्तुगालांतील दोघां वार्डांनीं तिकडील राजकीय कैद्यांस मुक्त करण्याविषयीं पार्लमेंटाकडे मागणी केली आहे !

एक जबरदस्त शंका

आपल्या मायदेशाचें कोणत्याहि [illegible] एतद्देश, हातावर शिर घेऊन सोजिरांवर निघालेल्या शूर लढवय्यांप्रमाणें, हरएक संकटांस व हाल अपेष्टांस तोंड देऊन गोव्यांतील मराठी वृत्तपत्रकार कायावाचामनेंकरून अविश्रांत परिश्रम करीत आहेत हें [illegible] कळकळीचा [illegible]

ANO V — NUMERO 45 — 1921 QUEPEM QUINTA-FEIRA 3 DE FEVEREIRO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas

INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA.............. 3-08-00
NUMERO AVULSO.........0-01-00

Anuncios

Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत

BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर

गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर

मराठी दर ओळीस दोन आणे. कायमबंधा जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठर विण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें-गुरुवार, तारीख ३ माहे फेब्रुवारी सन १९२१ अंक ४५वा.

NO CONCELHO DE PONDA

UM IMPONENTE PAN-SUPARI

Uma reunião importante em que se difine a acção da classe hindu no progresso do paiz

VIVA Á INDIA PORTUGUEZA !

Domingo passado, realisou-se o apuramento da eleição dos vogais efectivo e suplente pelas N. Conquistas. Ao mesmo acto em que tomaram parte portadores de actas de todas as assembléas onde houve votação, assistiram, tambem, muitos cavalheiros de distaque das Novas e Velhas Conquistas, para manifestar em pessôa a sua simpatia aos ilustres eleitos e difinir a acção da classe hindú no progresso do Páiz.

Terminados os trabalhos do apuramento e feita a proclamação dos candidates eleitos srs. dr. Venctexa Dessai e Xivagi Dulbá Naique Prataprau 1° Sar Dessay, foi a êstes dedicado um *pan-supari*, sob a presidencia do vice-presidente da Camara Municipal de Pondá, sr. Gopal Hori Vaidia, secretariado pelo nosso director.

Nessa rëunião festiva que foi aberta pelo prof. sr. Xantarama Singbal, tomaram palavra, alem do sr. presidente e secretario, os srs. Datarama Govinda Camotim, Vassudeva Loximona Rajadix, Balcrisna Vamona Sinai Sanvordencar e Datatria Venctexa Poi, os quais frisaram nos seus eloquentes discursos, entrecortados de entusiasticos *apoiados* e palmas a necessidade de difinir a acção politica da classe hindú de Goa, de cooperar os irmãos cristãos nos assuntos de interesse geral do Paiz, de activar por todos os meios ao alcance a instrução pelas camadas sociais em que a numerosa classe hindú se acha dividida.

Numa palavra, os ilustres oradores cujas sensatas palavras lhes saiam—convencemo-nos disto—do recondito dalma, fizeram, em traços gerais, resenha completa de todas as reformas urgentes que o engradecimento rapido da nossa classe exige para que, irmanada com os não hindús, possa condignamente trabalhar em prol do bem estar da Patria comum.

Emetida a opinião presidencial sobre os fluentes discursos, o sr. Poi, distincto professor do Colegio Almeida ofereceu, em nome dos reunidos e a pedido do sr. presidente, colares de flôres naturais e *pan-supari* aos eleitos populares, patenteando-lhes as graves responsabilidades das elevadas funcções que iam assumir. O sr. dr. Venctexa Dessai, vogal efectivo pelas N. C. agradeceu, muito comovido, em seu nome e no do sr. Xivagi, seu suplente, a enternecedora demonstração, prometendo empregar em prol do Paiz o *maximum* de seus esforços.

Depois disto, o sr. presidente imterrompeu a sessão por 10 minutos, terminados os quais o nosso director, com a devida permissão do sr. Vaidia fez uma pequena confererencia em que sintetisou o *desideratum* da classe hindú, representada pela assemblêa, constituida da maioria dos hindús importantes das N. e V. Conquistas.

Concluida a conferencia, foi deliberado unanimemente o seguinte:—

1° Fundar um centro hindú com a denominação de *Pragatica Sanga* com séde em Pondá (cassabé), *Sanga* que terá as suas ramificações em todos os concelhos de Gôa.

Para os trabalhos preparatorios e organisação dos estatutos do *Sanga*, foi escolhida uma comissão composta de sete cavalheiros presentes.

2° Levar o maior numero possivel de aderentes para o proximo Congresso Provincial da India Portuguesa, mostrando, praticamente, que a classe hindú não só nunca pensou promover movimentos separatistas, mas tambem, pelo contrario, êla procura sempre secundar indistinctamente quaisquer iniciativas patrioticas, vennam donde vierem.

Tomadas estas deliberações foi, para a concretisação da primeira, aberta uma subscrição entre os assistentes que, com a espontaneidade nunca dantes vista, concorreram para êla, num gesto que, grandemente, os dignifica e nobilita, tendo-se apurado na propria reunião uma importancia consideravel.

Finalmente, consignado um voto de agradecimento ao sr. presidente dassembléa e ilustres assistentes, findou o *pan-supari* que pelo seu brilhante e comovedor exito ficará sempre registado com letras de oiro nos anais da historia politica da classe hiudú.

Agora é que o *Bharat* pode declarar com cabeça erguida que a classe hindú há de progredir, vencendo com denodo as bareiras que lhe oferecerem resistencia ao levantamento.

O *Pragatica-Sanga*-diga se em pouco-propõe-se preencher todas as necessidades materiais, morais e economicas da classe Hindú.

Ecos e Critica

O sr. Antão

Mau grado nosso, ficamos constrangidos a tratar de proesas *post-eleitorais* do sr. Administrador do concelho. Mas é facto que "quem faz o que quere experimenta o que não quere" Tal e qual.

O sr. Antão com o fim de salvar a sua responsabilidade... eleitoral está, segundo nos dizem, estorquindo declarações a alguns escriváis de comunidades, *seus dependentes e subordinados* para *legalmente dos-*

भारत

गुरुवार पौष व॥ ११ शके १८४२

फोंडें येथील अपूर्व समारंभ

चिरस्मरणीय पानसुपारी

प्रागतिक संघाची स्थापना

रुपयांचा वर्षाव !

ता. ३०-१-९२१ हा दिवस आमच्या राष्ट्रीय चळवळीच्या इतिहासांत सुवर्णाक्षरानीं लिहिला जाईल, यांत बिलकूल संशय नाहीं; कांकीं याच शुभ दिवशीं कसबा फोंडें येथें पानसुपारीच्या निमित्त भरलेल्या चिरस्मणीय सभेंत खऱ्या देशहित स्फूतीचा उदय झालेला सर्वांस दिसून आला! याच मंगल दिवशीं नव्या व जुन्या कांविजादींतील उत्साही देशभक्तानीं आपल्या प्रियतम मायभूमीसाठीं पाहिजे तसला व पाहिजे तेव्हां स्वार्थत्याग करण्यास तयार असल्याचें आपल्या आवेशयुक्त सुंदर भाषणांनीं व निःस्वार्थ देणग्यानीं जाहीर केलें! याच आनंदमय दिवशीं गोव्यांतील हिंदु नागरिकानीं विशेष गाजावाजाच्या भरीस न पडता अंतःप्रेरणेनें प्रागतिक संघ नावांची हिंदूंच्या सर्व आकांक्षा राजरोस तडीस नेणारी तेजस्वी संस्था स्थापून आपल्या सर्व चळवळींस संघटीत स्वरूपाचें चलन दिलें!

थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे हिंदु देशभक्तानीं उपरोक्त, शुभ, मंगल व आनंदमय दिवशीं एकंदर लोकहिताच्या चळवळींत दिसून येणाऱ्या 'कोणाचा पायपोस कोणांत नाहीं' अशा शोचनीय प्रकारास कायमचा आळा घालून अंतःकरणाच्या तळमळीनें देशहितवर्धक कृतींचें धोरण निश्चित केलें. प्रेम, श्रद्धा व भक्ति या उच्चतम भावनाचा पूर्ण मिलाफ झालेला वरील सभेंत पहावयास मिळून, अत्यंत धन्यता वाटली, हें लिहितानां आह्मांस आनंदाचें भरतें येतें. या अपूर्व समारंभाची

उत्साहजनक हकीगत

संक्षेपतः खालील प्रमाणें आहे.

❀ ❀ ❀

नवीन कांविजादीतर्फे बहुमतानें निवडून आलेले मेंबर दो. व्यंकटेश राव देसाई व त्यांचे मदतनीस श्री. शिवाजी दु. प्रतापराव मुख्य सरदेसाई यांस हिंदुसमाजाकडून 'विद्याप्रसार' कार्यालयांत मागें उल्लेखिलेली पान सुपारी देण्यांत आली. या आनंददायक समारंभाचें अध्यक्षस्थान श्री. गोपाळ हरी वैद्य यांनीं सुशोभित करण्याविषयीं प्रो. शांताराम शिंगवाळ यांच्या सूचनेला बाळ यांच्या गजरांत अनुमोदन मिळाल्यावर अध्यक्ष स्थानापन्न झाले. त्यांनीं सभेच्या सेक्रेटरीचें काम करण्यास आमच्या संपादकांस बोलाविलें याससि सभेचें अनुमोदन मिळतांच सभेच्या कामास सुरवात झाली. प्रथमतः

प्रो. दत्ताराम गोविंद कामत

यांनीं पोर्तुगीज भाषेंत, पानसुपारीचें महत्व व या मंगल प्रसंगींच हिंदुसमाजाच्या आकांक्षांस मूर्त स्वरूप देण्याच्या संघटीत प्रयत्नाची आवश्यकता इ. मुद्यांची योग्य प्रकारें मांडणी करून आमच्यांत सामाजिक व राजकीय सुधारणांची उत्तम रीतीनें जोपासना होण्यास, हिंदूंच्या सर्व चळवळीचें धोरण आजच निश्चित व्हावें असें सांगितलें. त्या नंतर

श्री. वासुदेव लक्ष्मण राजाध्यक्ष यांचें मनोवेधक व मार्मिक भाषण झालें. त्यांत त्यानीं निवडून आलेल्या प्रतिनिधींकडून लोकहिताचीं कामें योग्य प्रकारें बजाविलीं जाण्यासाठीं समाजाच्या व वर्तमानपत्रकर्त्यांच्या कर्तव्याचें धोरण कोणतें असावें याचें दिग्दर्शन केलें. त्यांचें भाषण संपल्यावर

प्रो. बाळकृष्ण वामन सांवर्डेकर

यांनीं संघटीत प्रयत्नाच्या शक्याशक्यतेचा प्रश्न पुढें मांडून, त्यावर मुद्देसूद भाषण केलें व आमची उन्नतावस्था होण्यास अशा प्रकारचेच प्रयत्न झाले पाहिजेत असें सांगून यद्विषयींचा कार्यक्रम ठरविण्यास एक मंडळ नेमण्यांत यावें असें आपलें मत प्रदर्शित केलें. श्री. सांवर्डेकरां मागून आल्मेद कालेजचे प्रो.

श्री दत्तात्रय व्यंकटेश पई

यांचेंहि उपरोक्त विषयांवर जोरदार व स्फूर्तिदायक असें भाषण झालें. त्यांत त्यानीं समाजहिताचीं कामें शेवटास नेण्यास शब्दा पेक्षां कृतीची, मनाच्या तळमळीची किती आवश्यकता आहे याचें स्पष्ट व निर्भिड भाषेंत विवेचन करून वरील वक्त्याच्या भाषणास आपलें अनुमोदन दिलें.

नंतर पानसुपारी अर्पण करण्याचा समारंभ होऊन समारोपादाखल भाषण झाल्यावर सभेनें दहा मिनिटें विश्रांति घेतली. फिरुन सभेस प्रारंभ होतांच अध्यक्षांच्या परवानगीनें आमच्या संपादकानें "नेव [देश] असे ज्याच्या चित्तीं, त्याची

भरावी संगती

या तुकारामोक्तीवर प्रवचन केलें. प्रवचन आटोपतांच सभेंत मोठ्या उत्साहानें कसबा फोंडें येथें हिंदूंच्या सर्व सार्वजनिक हितसंबंधास जपण्यास योग्य अशा

प्रागतिक संघ

नांवाच्या संस्थेची मुहूर्त मेढ टाळ्यांच्या प्रचंड गजरांत रोवण्यांत येऊन तिची संघटना व तदंतर्गत इतर व्यवस्था ठरविण्यासाठीं सात गृहस्थांची एक कांम चलाऊ कमेटी निवडण्यांत आली. या अत्यंत महत्वाच्या कामीं लागणाऱ्या खर्चाचा प्रश्न निघतांच अध्यक्षांच्या मेजावर

रुपयांचा वर्षाव

झाला. या एकाच गोष्टीवरून हींदुसमाजांतील सांप्रतची जागृति कागदी घोडे नाचवून टांकानीं कारवाई करण्याची नसून, उलट तिचा उगम अंतःकरणाच्या तळमळी पासूनच आहे, हें कोणासहि कळून येईल.

❀ ❀ ❀

एकंदरींत फोंड्याची सभा राष्ट्र कार्याच्या दृष्टीनें किती महत्वाचीं आहे, हें आह्मीं दिलेल्या अल्प माहितीवरून सभेस हजर नसलेल्या आमच्या इतर देशभक्तांस समजून येईल.

सार्वजनिक चळवळींत आजपर्यंत ज्या गोष्टीचीं आह्मांस उणीव भासत होती, ती फोंड्यांत जमलेल्या निःस्वार्थी, निरपेक्ष व जोमदार देशसेवकांकडून भरून आल्याबद्दल आह्मी त्यांचें सकौतुक अभिनंदन करून, त्यांनी अत्यंत कळकळीनें आखलेला मार्ग पूर्ण रीतीनें यशस्वी होवो, अशीं परमेश्वरापाळीं श्रद्धापूर्वक करुणा भाकितों.

प्रागतिक संघकी जय !

स्फुट विचार

स्पष्टिकरणः— लोलयें-काणकोण येथें जुगाराचें 'थैमान नृत्य' चालू असल्याचें लिहून आल्यामुळें, जुगारासंबंधीं खरमरीत टीका करून भारताच्या पोर्तुगीज व मराठी भागांत दोन स्फुट लिहिले गेले होते, हें आमच्या वाचकांस आठवतच असेल. त्या टीकेंत केवळ आह्मीं जुगाऱ्यांचाच अंतर्भाव केला होता. जुगारापासून जुगाऱ्यांची कशी शोचनीय स्थिति होते याचें वर्णन करून, या भयंकर व्यसनाच्या मायाजाळांत या पुढें कोणीहि पडूंनये असें लोकहिताच्या दृष्टीनें आह्मीं तेथील जुगाऱ्यांस बजाविलें होतें. अर्थात् जुगाऱ्यांशिवाय इतर कोणत्याहि सद्गृहस्थांस उपरिनिर्दिष्ट स्फुटांतील टीका लागू होत नाहीं, हें उघड आहे. अशी वास्तविक स्थिति असतां आह्मांस कळतें कीं, जुगारावरील उपरोक्त टीकेनें एकंदर लोलयेंगावांतील लोकांत गैरसमज माजला असून, भारताविषयीं त्यांचीं मनें साशंक बनलीं आहेत ! वर केलेल्या स्पष्ट खुलाशाकडे नजर पुरवून, आतांतरी लोलयेंकर बंधु आपल्या मनांतील तेढ दूर सारतील, अशी आह्मांस उमेद आहे. भारताचा जन्म लोकहितासाठीं आहे. निरपराधी लोकांच्या निरपराधी कृत्यांवर कसल्याहि दुष्ट हेतूनें तोंडसुख घेण्यासाठीं नव्हे हें त्यांनीं पूर्ण लक्ष्यांत ठेवावें, अशीहि आमची त्यांस सूचना आहे.

वर्तमानसार

—लोलयें येथें श्री दामोदर देवालयांत मराठी प्राथमिक शिक्षणाची शाळा गांवच्या प्रमुख मंडळींच्या उपक्रमानें आज १-६ महिन्या पासून चालू झाली आहे. शाळेचे शिक्षक रा. शेषगिरी पद्मनाभ प्रभु देसाई हे होत—शाळेंत मोफतहि शिक्षण देण्यांत येत असतें. सध्याच्या काळांत विद्येची महति कोणासहि नव्यानें सांगण्याची गरज नाहीं, वरून लोलयेंकरानीं उपरोक्त शाळेंत आपलीं मुलें पाठवून शिक्षणासारख्या पवित्र कार्यास सहाय्य करावें अशी त्यांस आमची विनंति आहे.

—सांगे तालुक्यांतील कांहीं गावांत जमीन महसुलाची फेरतपासणी होण्याचें ठरल्यावरून तेथील लोकांत असंतोष माजला आहे! सांप्रतच्या हलाख स्थितींत चलाख नोकरशाहीचें वरील धोरण आह्मास बिलकूल पसंत नाहीं!

—गेल्या शुक्रवारीं पणजी येथील श्रीमहालक्ष्मीच्या देवालयांत आमच्या संपादकांचें नलगे मुक्तिधन संपदा। संत संग देगा सदा॥ याविषयावर धार्मिक व राष्ट्रीय प्रवचन झालें.

—फोंड्याच्या ३० तारखेच्या सभेंत श्री. सिताराम केरकर यांच्या सूचनेनुरूप येत्या कांग्रेस प्रोव्हींसियालच्या अधिवेशनास शक्य तितके जास्ती प्रतिनिधी मिळविण्याचें ठरून शेतकींस उत्तेजक अशी गोहत्याप्रतिबंधक चळवळ सदरहु संस्थेद्वारा करण्याचेंहि ठरलें. मोठ्या समाधानाचीं गोष्ट !

नेणेंचि कांहीं ॥ आपपर जया नाहीं ॥ चैतन्य जैसें ॥" ही ज्ञानेश्वरींतील उक्ति तंतोतंत त्यांना लागू पडते, कारण नामधारी मौलानांची सांखळींत डाळ शिजली नाहीं, पण पूर्णाश्रमी यतिमहाराजांच्या वगवशिल्यानें मौलानांला 'म्हातारीचे पापड' वाळविण्यास पिंपळाच्या पारावर क्षणभर थारा मिळाला, शिवाय यतिमहाराज स्नान उरकून आल्यावर आपपरभेद न बाळगितां त्यांनीं मौलानास मनोभावें हात जोडून नमस्कार केला, ह्या वरून ते समदृष्टीनें भूतमात्राचेठायीं पाहणारे आहेत असेंच सामान्यतः ह्मटलें पाहिजे, परंतु विचारशक्तीला फाजील ताण दिल्याच्या योगें, हरिभक्तिपरायण दामोदरबुवा रिसबुडांची पणजींत संभावना होऊन 'बोलशेविस्त रिसबुड' ह्या विशेषणास ते पात्र झाले तशा प्रकारची पुनरावृत्ति एखादे प्रसंगीं घडण्याची पाळी न येवो ह्मणजे झालें. रावबहादुर चिंतामणराव वैद्य ह्यांच्या पोक्त व्याख्यानाच्या नुसत्या गोडवाऱ्यानें आमच्या मनांत रावबहादुरांसंबंधानें आदर बुद्धि उत्पन्न झाली तशी सहानुभूति यतिमहाराजांच्या प्रत्यक्ष दर्शनानें एकंदर ब्रह्मवृंदांत इकडे प्राप्त झाली असें मात्र नव्हे.

श्रीतुकाराम साधु, श्रीसमर्थ रामदास स्वामी श्रीरामकृष्ण परमहंस, श्रीसिद्धारूढ स्वामी इत्यादिक महानुभावांचा अखंड यशोदुंदुभि जो दशदिशांला गाजत आहे त्याचें कारण सोंगाप्रमाणें बतावणी करण्यांत दिसून आलेली त्यांचीं तत्परता होय; तेव्हां, सर्वसंमत असा व्यवहार्य कार्यक्रम श्रीपूर्णाश्रमी ह्यांनीं आंखला ह्मणजे त्यांचें नांव कलिकल्मष हरण करणारें खचित होईल. 'झांकलेली मूठ सवालाखाची.

सारस्वत

ANNO V. — NUMERO 46 — 1921 | QUEPEM QUINTA-FEIRA 10 DE FEVEREIRO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas

INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios

Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत

BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर

गोव्यांत (वार्षिक)........ ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास.......... ०-०१-००

जाहिरातींचे दर

मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारे ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें–गुरुवार, तारीख १० माहे फेब्रुवारी सन १९२१ अंक ४६वा.

O NOSSO MOVIMENTO

Nunc est bibendum

Ao registar a grata noticia da importante reunião de Pondá, o *Bharat* manifestou o seu imenso jubilo pela forma agradavel como a classe hindú difinira a sua acção no progresso do paiz, frisando com o entusiasmo de que era capaz, que a alegre data em que, á bôa hora, se promoveu a mencionada reunião, ficaria marcada com letras de oiro nos anais da historia dos movimentos progressivos da classe hindú.

Teremos exagerado a importancia do que se passou na cassabè de Pondá, no dia 30 do mez p. f ?

Não, certamente.

Temos assistido a muitas reuniões; mas em nenhuma delas ouvimos falar a *alma colectiva* com o calor patriotico que se desenvolveu na de Pondá, em nenhuma delas vimos o *corção colectivo* a trasbordar um desinteresse tão puro como o que notamos com indiscritivel prazer no *pan-supari* que a classe hindú dedicou aos seus representantes pelas Novas Conquistas, em nenhuma delas em fim, tivemos a intima satisfação de admirar a conjugação indissoluvel da *palavra* com a *alma*, tão bem como na assemblêa de Antruz.

Dai o nosso jubilo, o nosso contentamento.

Oportunamente, delinearemos pormenorisadamente o programa do *Pragatica-Sanga*. No entanto, porem, podemos afirmar que tal centro, nascido da reunião dos representantes de todos os concelhos habitados pelos hindús, imprimiu uniformidade á diversidade d'acção que, á mingua de quem a aproveitasse devidamente, resultava inútil, como agua na arêa.

Com a fundação do *Pragatica-Sanga*, evitou-se, pois, desperdicio de energias que, sem norte, movimentavam-se, isoladamente, sem necessaria unidade, requesito que torna importante e prestigiosa qualquer acção publica.

Não só isto. O *Pragatica Sanga* facilitou, inda mais, convivio com os nossos irmãos cristãos, filhos da mesma mãe Patria, adoptando medidas tendentes á rapida consecução desse fim.

A prova disto está no facto de se ter deliberado, de comum acôrdo, levar o maior numero possivel de aderentes ao Congresso Provincial para que a classe hindú, posta de contacto intimo com a cristã, possam ambas, confraternisadas e unidas num só *todo*, trabalhar, harmonicamente, pelo levantamento do nosso Paiz.

Dora em diante, todos os movimentos, seja qual fôr a sua determinante, obedecerão ás inspirações do *Pragatica-Sanga* cujo directorio, constituido de cidadãos eleitos, regulará a marcha dos mesmos movimentos.

Há ainda mais. O *Sanga* não há de limitar-se, apenas, a *fazer eleições*, feição principal dos partidos politicos *di cá*, geralmente falando.

Pelo contrario. Há de procurar, sem espalhafatos... mirabolantes, criar nas massas populares a chamada *consciencia civica*, por meio de propaganda oral, levada a efeito pelos voluntarios ás ordens do seu directorio.

Estes voluntarios, quais missionarios americanos, orientarão o Povo, numa linguagem que lhe fôr accessivel á inteligencia sobre o que vem a ser o regime democratico que nos governa, as suas leis, postas em vigor no Estado da India Portuguesa, numa palavra, sobre tudo o que preciso fôr, para que os *pequenos*, os *operarios*, os considerados *inuteis* e, como tais, despresiveis, compenetrados dos seus deveres para com a ditosa Patria tão amada, se habilitem a cumpri-las condignamente.

E' o principal objectivo do *Pragatica-Sanga*, objectivo que é, segundo o nosso modo de vêr, completamente adequado ás circunstancias do meio e tempo em que vive a nossa sociedade.

E', porisso mesmo, sem limites o nosso infinito prazer pela reunião da cassabê de Pondá, que *demonstrou que tinha soado já a hora de trabalhar a valer, trabalhar com desinteresse e abnegação*.

Viva o Pragatica-Sanga!

Dardos & Cardos

Está salva a Patria !

Todos sabem que o Estado da India é um Paiz essencialmente agricola. Sabem e sabiam esta velha verdade, desde o primeiro triunfo do *Terribil*.

Todos os nossos estadistas, porem, limitaram-se a devorar, á porfia, a *essencia agricola* do nosso Paiz com discursos bombaticos, relatorios fulminantes, palavreado sonante e outras coisas que indicam *muita parla e pouca uva*. Até o Congresso Provincial, nata da intelectualidade nativa não foi, até aqui, capaz de levantar agricolamente a nossa *essencialmente* agricola terra, preenchendo o *deficit cerealifero*, sonho dourado de todos os patriotas passados, presentes e futuros.

E' que esta sublime honra, a honra da salvação da Patria estava reservada, segundo a profecia... agricola do sr. *Panurgio* do *Diario da Noite*, a um Messias que sem nenhum encargo ao exausto tesouro nem á magra algibeira do contribuinte prometesse assumir o cargo de mandar para o diabo que o carregue o tal satanico *dificit* e mais *son père*.

Está salva, portanto, a Patria !

¿ Mas quem è aquele Messias, tão aspirado e suspirado?

E', sem mais nem menos, o sr. dr. A. Peregrino Antão, *capaz* ex-administrador da Sociedade Patriotica de Uguem, *incapaz* ex-delegado de saude de Margão e *rapaz fiscal* de Quepem.

Entende o sr. *Panurgio* que o sr. dr. Antão, por causa do seu *peregrino* condão deve ser mandado para Canacona e daqui para Sanguem, operada a sua *maravilha agricola* do *superavit* cerealifero em Quepem.

Nós desejamos ainda mais: que o *Grande Messias* seja, depois de tudo aquilo, deslocado para Satari e daqui para a Praganã Navar Aveli para o complemento da obra cerealifera !

E viva o sr. *Messias*.. Antão!

Regime de papelada

Há, por ai, muita gente que se insurge contra o *regime de papelada*.

Quanto a nós, tal regime é sobremaneira simpatico, em razão do comodo comodismo que o caracterisa, comodismo que gera *paciencia...socratica*.

Regime de papelada cria-nos o prestigio filosofico de Socrates que não foi *qualquer coisa*.

Recentemente, o mesmo afamado sistema *papirico* provou que tinha tambem a vantagem de mandar desta para milhor cidadãos, residentes nas terras como Pirla ou Morpila, do Bali, do concelho de Quepem onde muitos—50 cavalheiros—abalaram para o reino do Plutão ou Jupiter, cançados de esperar providencias antivariolicas que morreram afogadas no mar encapelado do referido *regime* que, desta feita, livrou o pobre mundo do Cristo de outros tantos importunos que lhe disputavam o pão quotidiano.

Ainda, portanto, falando do sobredito regime sob o ponto da vista do principio *daquele* ministro francez que desejou reduzida a população, è um bem de universal importancia.

Tenha, póis, longa dura o *regime de papelada* !

Os adidos...

Lá porque foram preteridos os adidos nas nomeações de 3os aspirantes da Fazenda, houve por ai barulho infernal.

Não tem razão os berradores, pois os *adidos* ficaram *adiados* por não terem nenhuns prestimos quanto mais para exercicio das elevadas e intrincadas funcções de *terceiros aspirantes* que no negocio fazendario representam um *terceiro estado* no *Estado* da India

भारत

गुरुवार माघ शु॥ २ या १८४२

काय पाहिजे ?

कोणत्याहि राष्ट्राची संपन्नता व सुस्थिति त्याच्या आर्थिक प्रगतीवर सर्वथा अवलंबून असते. ती वाढविण्यासाठीं उद्योगधंदा व कलाकौशल्य यांचा अभ्युदय होणें हें तर फार आवश्यक आहे. पण त्या बरोबरच शक्य त्या खर्चाऊ बाबतींस आळा घालणें हेंहि कार्य इष्ट हेतु तडीस नेण्याच्या कामी अत्यंत उपयुक्त होईल. असें प्रत्येक राष्ट्रहितचिंतक मनुष्यानें सदैव लक्ष्यांत बाळगलें पाहिजें. ह्मणजे वायफळ शब्दांपेक्षां व्यावहारिक आचरणापासून किती फायदे होतात ह्याचें स्पष्ट चित्र डोळ्यांपुढें दिसण्यास उशीर लागणार नाहीं. तूर्त हे विचार सुचविण्यास पोर्तुगीज सरकारची कफल्लक तिजोरी कारणीभूत झाली असून ती सुधारण्यास वरील उपायांचें अवलंबन केलें पाहिजे हें सांगणें सहज ओघास आलें आहे. आमच्या सरकारच्या किंवा नागरिकांच्या मनोराज्यांत केवढेहि मोठाले संपत्युत्पादक कारखाने उभारण्याचें घाटत असलें तरी व असें केलें पाहिजे तसें झालें पाहिजे अशा प्रकारच्या कितीहि कल्पना त्यांनीं केल्या तरी, तूर्त राष्ट्राची संपत्ति वाढविण्याचे शीघ्र आणि साधे उपाय ह्मटले ह्मणजे सरकारी तिजोरींतून निरर्थक टाळतां येण्यासारखा खर्च कमी करणें होय. कोणत्याहि आणीबाणीच्या प्रसंगी कार्याच्या खऱ्या मूळ कारणास हात पडला नाहीं तर वरकरणी कृतीनें कठीण प्रसंग टळेल अशा समजानें, त्या कृतीचा दुरुपयोग होऊनहि, अगोदरच्याहून ज्यास्त बिघडलेल्या स्थितीचा अनुभव घेणें चुकत नाहीं. ह्या आमच्या विचाराशीं सि. ब्रीत कामाश या सुप्रसिद्ध लेखकाचीं मतें किती जुळत आहेत हें पुढील उताऱ्यावरून कळून येईल. त्यावरून आमच्या नोकरशाहीपासून राष्ट्रोन्नतीला कसा हातभार लागण्या सारखा आहे तें दिसून येईल. ते ह्मणतातः—

"मोठ्या स्वार्थत्यागाच्या वेळीं अशी कोणतीहि रकम नाहीं कीं जी क्षुल्लक समजली जाईल.................... सरकारी आफिसें, स्त्री-पुरुष-नोकरशाहीनें गजबजून गेलीं असून त्यांतील बहुतेकांची योजना, प्रचलित कायद्याच्याच नियमाचें अतिक्रमण करून करण्यांत आली आहे. आणि अनेकांचीं खोगीर भरती तर मुलकी खात्याच्या नैतिक व अनुपेक्षणीय कलमांकडे दुर्लक्ष करून, केली गेली आहे."

"कर देणारे तर असें जाणतात कीं, सरकार केवळ जें काय आवश्यक अशाच कामांत खर्च करून सार्वजनिक, उपयुक्त कार्यांची अंमलबजावणी करण्याची हमी देत असतें ह्मणून, ते ना खुषीनें झालें तरी, फारीग करावयाचें तें केल्यावांचून राहत नाहींत. व त्यांस जितक्या ज्यास्त सवलती मिळतील तितक्या सुलभतेनें ते फारीग करितात.............."

ह्मणून कराच्याहि बाबतींत तिजोरीचा तुटवडा भरून येण्याची अपेक्षा व्यर्थ आहे असें ठरत असल्यामुळें आर्थिक अवनति सुधारण्यास वरील सुप्रसिद्ध लेखक काय ह्मणतात तें पाहूं:—

"ज्यांस सरकारी तिजोरींतून बिनहरकत मुबलक पैसा मिळतो असे अनेक देशाभिमानीं, देशाबाहेर चेक घेऊन गेल्याशिवाय एकहि दिवस सुना जात नाहीं. ते कोणत्याहि उच्च दर्जाच्या हुद्यावर जातात........ ....अशा वेळीं सरकारपासून कांहीं देखील न घेणाऱ्या कामगार लोकांनीं, सरकारनें नेमिलेल्या रिकामटेकड्या नोकरशाहीसाठीं स्वार्थत्याग करावा असें ह्मणणें तरी न्याय्य होईल काय? कदापि नाहीं.

"सरकारी नोकरशाहीची पुनर्घटना लवकर होऊन ती बीनभपकेबाज कमी केली पाहिजे. त्याचप्रमाणें, त्या नोकरशाहींत आपल्या महत्वानें लायक माणसांचा भरणा होऊन त्यांकडून होणारें काम उपयुक्त होईल अशी तरतूद केली पाहिजे."

"इंग्लंडा इतकेंच आह्मांतहि आलमिरांत आहेत. व खाडी बाहेर, निघण्या सारखीं देखील जहाजें नाहीं सुटल्यास चालेल. आह्मांस पाहिजे त्याहून आठपटीनें अधिक कोर्नेल मेदिकु आहेत" इ. इ. इ.

वास्तविक पाहतां सि. कामाश यानीं पोर्तुगालचें वर्णन यथार्थ केलें आहे.

तरी त्याच मालिकेंत पोर्तुगालच्या आवडत्या वसाहतीचें, अर्थात् पोर्तुगीज इंडियेचें नांव गोवण्यास कोणतीच हरकत नाहीं. इतका सारखेपणा दोहोंतहि आहे असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. ही दुःस्थिति सुधारण्यास सि. कामाश याचे उल्लेखिलेले विचार कारणीभूत होऊन ते अमलांत आणले जातील असें इच्छितों.

स्फुट विचार

जमीनदारांची चळवळ:— सांगे तालुक्यांतील जमिनदारांची एक प्रचंड सभा चालू महिन्याच्या ७ तारखेस तेथील श्रीपांडुरंगाच्या देवळासमोरील मुद्दाम उभारलेल्या मंडपांत भरली होती. गेल्या चार वर्षामागें ठरविण्यांत आलेल्या जमिनीच्या करांची फेरतपासणी होण्यासाठीं प्रसिद्ध झालेल्या सरकारी हुकुमाचा निषेध करून गव्हर्नरांपाशीं योग्य दाद मागणें, हा सभेचा उद्देश होता. सभेस ३०० वर ठिकाणदार हजर होते. अध्यक्षस्थान सि. मिरांद बार्णी मंडीत केलें होतें. सभेच्या सेक्रेटरींच्या जागीं श्री. दो. अनंत राया शिरवैकर व सांकोर्डेकर यांची एकमतानें योजना झाली होती. कार्याविषयीं सर्वत्र उत्साह दिसत होता. या वरून दिवसें दिवस लोकांत स्वकर्तव्याची जाणीव शुक्लेंदुवत् वृद्धिंगत होत आहे, असें शुभसूचक विधान करण्यास कोणतीच हरकत नाहीं. सभेचा कार्यक्रम आटोपतांच, आमच्या संपादकांचें 'जरी व्हावा तुज देव, तरी सुलभ उपाव, करीं मस्तक ठेंगणा, लागे संतांच्या चरणा (जरी व्हावा तुज देश तरी सोपा उपदेश, करीं मस्तक ठेंगणा, लागे गांधीच्या चरणा) या विषयावर प्रवचन झालें. जमीनदारांची चळवळ पूर्णपणें यशस्वी होवो, अशी परमेश्वरापाशीं करुणा भाकितों.

—ता. १९-१-२१ रोजीं गव्हर्नर साहेबांचें मुंबई येथें मोठ्या थाटानें स्वागत करण्यांत आलें.

विचारी लोकांकरितां !

जोंवरी दुर्दशा भोगी चितोड नगरी अशी।
तों त्या सुखविलासांची नसो स्मृतीही मानसीं॥
महाराणा प्रतापसिंह

मनुष्याचा स्वभाव निसर्गतःच उत्सवप्रिय असतो, व गोमातकांत तर हा गुणधर्म सुखसंपत्तीच्या वेळींच उचंबळलेला दिसून येतो असें नाहीं, तर विपन्नावस्थेच्या प्रसंगींही त्याची जाणीव झाल्याशिवाय रहात नाहीं. दुःखानें गांजलेला व दारिद्र्यानें पीडलेला हिंदुसमाज इतर बाबतींत कितीही अंगळ मंगळ करो, पण काला, जात्रा, शिगमा या उत्सवांच्या बाबतींत कधींही निरुत्साह दाखविणार नाहीं! नाटक मंडळी आणण्याचा कितीही त्रास पडला तरी तो सोसून रात्रीचा काला करण्यास, कलावंतींना प्रसंगीं दुप्पट पैसे देऊन अगर वशिला लावून गवळणका. त्यांचा थाट उडविण्यास, देवस्थानांतील होणाऱ्या जत्रांना आपल्या चैनीखातर बीभत्स रूप देण्यास व शिमग्याच्या दिवसांत हमामा घालण्यास, जी उत्सुकता व तत्परता हिंदुसमाजांत दिसून येते, ती औरच ह्मटली पाहिजे!

पण या प्रकारांसंबंधानें क्षणभर स्थिरमन करून विचार केला तर आपणास काय दिसतें ?

हिंदुसमाजाकडून होणारे हे प्रकार आजच्या काळांत व परिस्थितींत योग्य आहेत काय? उत्सवांच्या नांवाखालीं अनेक तिरस्करणीय व हिंदुसमाजाच्या आजच्या दर्जास सर्वथा कलंक लागणारे असे प्रकार जे सदहू प्रसंगीं चालू असतात ते तसेच पुढें चालविणें योग्य आहे काय? या जत्रांना, या काल्यांना व शिमग्यांना योग्य वळण देणें इष्ट नाहीं काय? ज्या लोकांनीं ज्या परिस्थितींत हे उत्सव सुरू केले, ते लोक व ती परिस्थिति बदलून गेली. असें असतां ते उत्सव मात्र मूळच्याच स्थितींत चालू ठेवणें ह्मणजे आपणास जगाच्या रहाटीची व बदलत्या काळाची जाणीव नाहीं असेंच सिद्ध होत नाहीं काय? तेव्हां या सर्व उत्सवांना आतां निराळें वळण देण्याचा समय येऊन ठेपला आहे याचा आतां विचार झाला पाहिजे.

जत्रांच्या सत्रास आतां कुठें तोंड लागलें आहे. इतक्यांत आपले प्रयत्न झाले पाहिजेत. या दिवसांत कवळेंची जत्रा चालू आहे. याठिकाणीं गोमांतकांतील ब्राह्मण समाजाच्या एका शाखेंतील बहुतेक मंडळी जमलेली आहे. तेव्हां त्यांनीं या जत्रेंत इष्ट त्या सुधारणा करून इतरानां उदाहरण घालून देणें अगत्याचें आहे. देवस्थानास अगर आसपास होणारा जुगार प्रसंगी पडेल ते श्रम करून अगर सरकारी मदतीनें बंद झाला पाहिजे; रथ किंवा पालखी साठीं कलांवतींची मनधरणी न करितां भजनाचे प्रचार सुरू झाले पाहिजेत; या कामीं तरुणांनीं पुढें होऊन विचारी वडीलजनाचें मन वळवून लोकमत बनविलें पाहिजें; या लोकसमुदायांची संधि साधून देशांतील राजकारणाविषयींची चर्चा सुशिक्षित लोकांकडून झाली पाहिजे; हिंदु समाजांतील बराच भाग येथें येणार असल्यानें स्वसमाजाच्या उन्नतीविषयीं कोणते प्रयत्न झाले पाहिजेत याची जाणीव उत्पन्न करणारीं व्याख्यानें केलीं पाहिजेत, व अशा रीतीनें या उत्सवाचें स्वरूप बदलून त्यांनां अधिक उदात्त, उपयुक्त, गंभीर व कार्यकर असें केलें पाहिजे. जत्रा चालू असतां सगळीकडे कचरा, घाणेरडें पाणी, शौचविधि इत्यादिकांमुळें जी दुषित हवा होते व जिकडे तिकडे सगळी जागा नासून जाते, तीजविषयीं खबरदारी कार्यकारी कमेटीनें घेतली पाहिजे. हा आरोग्याचा प्रश्न त्यांनीं त्याचप्रमाणें फोंड्याचे मामलेदार व सरकारी डाक्टर यांनीं हातांत घेण्यासारखा आहे. ते त्याजबद्दल पूर्णपणें जबाबदार आहेत !

याच वेळीं देवस्थानांत करतां येणाऱ्या सुधारणांकडे महाजन मंडळीनें लक्ष पुरविणें जरूर आहे. कवळें येथें शाळेचें निमित्य करून मागें तेथील कांहीं आरंभशूर गृहस्थानीं माजी गव्हर्नरसाहेबांना मोठा थाटमाट करून आणल्याचें लोकांच्या स्मरणांत असेलच. लोकपक्षास अप्रिय अशा या अधिकाऱ्याचा जयजयकार करण्यांत चालकांचा कोणता हेतु होता, हे लोकांनीं त्या वेळीं तर्कानें जाणलें असेल, पण या निमित्तानें एक शाळा अस्तित्वांत येईल ह्मणून त्या वेळचा लोकांचा खेद कांहींसा संतोषमिश्रित होता. पण आतां पहातों तो या प्रकारामुळें शेवटीं कोणतीच गोष्ट व कोणताहि हेतु साध्य झाला नाहीं. ह्माडदोळ येथें रात्रीचें नाटक झालें, त्यांत अर्जुनाचा त्रिदंडी संन्यास सुभद्रेच्या प्राप्तर्थ तरी होता, पण कवळ्यांस झालेल्या या दिवसाच्या नाटकांत सगळ्यांचीं सोंगें फुकट गेलीं !

ही शाळा कोणत्या पोटांत उत्पन्न झाली व कोणत्या रोगानें मेली याचा विचार महाजनांतील विचारी लोकांनीं अवश्य करावा अशी माझी त्यांनां विनंति आहे. शाळा जन्मास येऊन 'भांडार भरपूर' असी कीर्ति गाजत असलेल्या श्रीशांतादुर्गेच्या स्थळीं विद्यालय स्थापलें जाऊन, तें लवकरच नामशेष व्हावें, हा देवस्थानास व महाजनमंडळीस कलंक आहे, असें मीं समजतों. या बद्दल जबाबदार व अब्रूदार लोकांनीं चौकशी करून हा कलंक धुवून काढला पाहिजे, यांत शंका नाहीं. तरच 'कवळेंकर' ह्मणवून घेतल्याचें सार्थक !

या जत्रेंत असा कांहीं तरी नवीन प्रकार होईल व एकंदर कार्यक्रमाविषयीं समजस लोकानां आवडेल असा व्यवहार घडलेला ऐकू येईल, अशी मी उमेद धरतों.

"पुरुषोत्तम"

वर्तमानसार

—नवीन लेजिस्लातीव कोन्सिलाची पहिली बैठक येत्या १२ तारखेला भरणार आहे.

—शेतकरी व जमीनदार लोकांच्या व तीनें कोंसेल्य लेजिस्लातीवांतील मेंबर निवडण्याचा दिवस ता. १३ फेब्रुवारी हा ठरविला आहे.

—ठिकठिकाणीं इन्फ्लुएन्झा ताप, देवी इ. रोग पसरले आहेत.

—यंदा आंब्यांचें उत्पन्न भरपूर येईलसें दिसतें. मोहर चांगला आला आहे.

—दीव येथील अनाथ लोकांस साह्य करण्याच्या स्तुत्य हेतूनें मडगांवांत ख्रिश्चन मंडळी कडून एक Recita करण्यांत येऊन, त्याचें सर्व उत्पन्न सदरहू फंडास देण्यांत आलें.

—जांबावली येथिल मराठा शिक्षणप्रसारक समाजास बांदिवडें येथिल श्रीमती नबू बाई विश्वनाथ काटकर या गायक भगीनीनें १५१ रुपयांची देणगी दिल्याचें कळतें.

—मुरगांवच्या शहर सुधाराई कमिटीनें ह्मापसें येथें मोटार गाड्या सुरू करण्याचा ठराव केला आहे.

ANO V.—NUMERO 47—1921 QUEPEM QUINTA-FEIRA 17 DE FEVEREIRO

A Bibliotheca Nacional Pangim

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—**Bharat**

भारत

BHARAT

SEMANARIO

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)...... १-००-००
ब्रिटिश इंडिया........ ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रानें ठर विण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

...—Quepém

वर्ष ५ वें. ...फ्रुवारी सन १९२१ अंक ४७वा.

COMO

Pr...

Temos dito, vezes s... ta, que a verdad‹eira› pr... dade do nosso Paiz sò se... notar, quando houver ... propaganda intensa por to... as camadas sociais, dos salu‹ta›res principios da educação civica, que as habilitem para compreender, nitidamente e sem auxilio doutrem, o que se passa no mundo politico que as rodêa. Enquanto se não fizer isto, é inutil esperar que o nosso Povo, acordado do lamentavel marasmo em que hoje está vegetando, tome interesse a valer pelos nego‹cios› públicos em que é indispensavel a sua conscienciosa intervenção.

Da ininterruta propaganda da educação civica pelo Pôvo depende, pois, a criação da *consciencia civica* nêle, condição *sine qua non* do nosso levantamento.

Mas a imprensa? Não está ela a, todos os dias, incutir nas massas populares principios de tal sciencia, procurando com verdadeiros sacrificios, criar nelas a *consciencia civica* de que se faz tanto alarde e orienta-las sobre a seu *modus faciendi* em diferentes campos de sua actividade?

Perguntaremos, porêm, a nosso turno:

¿Quantos dos nossos *cidadãos republicanos* sabem lêr, quantos dêles recebem jornais, quantos dêles percebem do que lêm e, finalmente, quantos dêles se dispõe a, prontamente, obedecer ás justas e beneficas determinações da imprensa?

Certamente, êste quistionario não poderá ter respostas animadoras, pois o chamado propriamente *Povo* sabe pouco da *poda*, e portanto, não lê jornais, conservando-se, naturalmente, refractario á sua propaganda. Para o Povo, a imprensa não existe Para êle, o jornal é um ilustre disconhecido como a Carta Organica, mais a Republica e todo o

noss... ocas... veze... Paiz... mit... ...

... ente... que, ... ricanos ... altar do ... percorrem ... das Novas e Vel... Fitas, ensinando aos cid... nossa *publicanos*, na linguag... lhes fôr acessivel á inte... cia, os deveres e as obriga... que como tais lhes cabem.

E verão, então, como ... fria se levanta e como o ... se manifesta no campo ... co que lhe diz respeito.

Uma propaganda oral... bem organisada, pois, repre... senta um meio preponderan‹t›e de despertar o nosso Pov‹o› do modorrento estado em q‹ue› se encontra imerso.

E porque o *Pragatica* ... *Sanga* vai lançar mão desta pro paganda é que com i‹m›menso alvoroço apoiamos a sua fundação.

"Serenamente"

Com êste titulo, recebemos um belo artigo do sr. *Gurudás* que com grande prazer publicaremos na ediçã‹o› imediata.

...न व तेथील सेवा ...ण्यास तयार झाल्या ...श घडा जांबावली ...ण्याचें निश्चित केलें ...नर खरें असेल तर ... अपूर्व योगायोग, ...लेली संधि दवडूं ...नें. शिरस्थाच्या ...चास एकदम ...स नायकीणीं ...किंबहुना ...सुद्धां ...यक्रम ...गत ...

...सामर्थ्यावर अवलंबून आहे. बोलाच वि भात व बोलाचिये कढी हीं ...णानें मनांतील मांड्याप्रमाणें कितीहि रुचकर व पथ्यकर असलीं तरी ध्येय संपादनाच्या प्रत्यक्ष समाराधनेंत त्यांचा काहीं चाहि उपयोग होणें सध्याच्या कृतीच्या कालांत तरी कदापि शक्य नाहीं. वायफळ बडबडीनें जेथें तेथें गडबड माजवून स्वीकृत कार्याची नकली तडफड व्यक्त करण्याच्या ढोंगी लोकांची ड‹ाळ› शिजण्याचा काल बराच मागें राहीला आहे. सांप्रतचा काल हा प्रयत्नाचा काल आहे. सध्याचें युग हें कृतीचें युग आहे, हें ध्येय संपादन करूं इच्छिणाऱ्या प्रत्येक माणसानें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

आमच्या सध्याच्या चळवळीचें ध्येय म्हणजे लोकांत स्वराज्याविषयीं स‹त्›पात्रता उत्पन्न करण्याचें आहे. स्व‹राज्या›चा कारभार उत्तम व नमुनेदार री‹तीनें चा›लविण्यास ज्या कांहीं बहुमोल गुणांची गोमांतकीय 'नेटीव' जनतेला आवश्यकता आहे, त्या गुणाची पूर्णत्वानें वृद्धि करण्याचें आहे. हें कार्य अर्थात् बरेंच बिकट असल्यानें, प्रयत्नसामर्थ्याची परमावधि झाल्याखेरीज यश प्राप्तीची आशा धरणें ...गादीं वेडेपणाचें आहे, हें कोणीहि कबूल ...

...तु 'लोकांत उपरिनिर्दिष्ट गुणाची वाढ ...' ...मानपत्रकर्ते नेहमीं झटत ...सतात. लोकांनीं काय काय केलें असतां ... ...ज्यास पात्र होतील हें ते बजावीत ... अशा वेळीं ध्येयांत काठिण्य तें ...?' असा कोणी प्रश्न करण्याचा ... आम्हीं त्याला उलट असें ... नाहीं ... पत्राच्या ... झाले ...

...धिक... अवलंब कर... नाहीं.

'धर्म... प्रवचनान... व राजकीय... आत्मविश्वा... विश्वव्यापी... बंधुप्रेम इत्यादि... मनांत बिंबवून ... काढीचे व अंतः... करण्यास लावण... असें म्हणण्यास ज...

प्रवचनांच्या ... निश्चय असून या... प्रमाणानें प्रयत्न... असें आम्हांस व... सर्व तऱ्हेच्या जन... रूप होऊन, प्र... कामास अ... ...

‹V›elhas Manhas

‹No›sso colega da "Tribu‹na›" ...niu muito cedo e acor‹dou› ... tarde.

...as de um velho ...ecido nas *glorio‹sas›* chicaneiras do fôro, ... colega, no seu ultimo ... formidavel e estu‹pen›do *acusatorio* contra ...o de Figueiredo, cujo ...e resto, nem sequer ...ver Fala do Desti... D. grande), provando ...aciedade que a sua ...de não saiu ainda do ...*teologico* dos latinos ...lo, que acreditavam ...e, muito piamente, no ...obre criatura!

...carda esquece-se, porêm, ... *vozes do burro não* ... *céu.*

...reça, porisso, que ... "*em paz e às* ... da pitoresca frase ... Garret, mas para ...*a di cà*, que lhe ... caso; mentiras, se não ... é par *feito sublime*, va... ...ar pel... lhe umas poucas ...*ogo.*

... o colega que "*no* ...*aça 1918*," na assem... Quepem fez parte da ...oral um *pronuncia‹mento›* ...nela votaram os pro... gerentes das saca... Bonita novidade nos ... haja dúvida-Mas diga... colega, aqui á puridade: ...se explica porque diabo, ...do tamanhas ilegalidades, ...em um sequer dos 6 procuradores que votaram no sr. Lino Valerio de Sousa, protestou ?!

Afirma que os mesarios da assembleia de Canacona, *excepto um*, ignoravam a lingua portuguesa e que a acta foi escrita por pessôa extranha á assembleia. Como sabe o colega isso? Não poderia, por ventura, a acta ter sido escrita pelo mesario que sabia a lingua portugueza? Figuremos, porem, outra hipotese: a de nenhum dos mesarios saber a lingua portugueza. *Quid juris?*

Entende o colega que não deveria haver eleição? Ou que, ...vendo, não se deveria la‹vrar› ...acta? ou que esta deveria ser escrita em marata? Diga, fale.........

Tratando da eleição de Pondá, dá ao Presidente da assemblêa o *dom de ubiquidade* que *si vera est fama*, só possuiu, e por unica vêz, Santo Antonio!

Sustenta que o sr. dr. Figueiredo era ineligivel por ao tempo ser *sustituto* (sic) do Juiz de direito da comarca de Quepem e cita, em abôno da sua opinião, o n.º ... do art.º 6 e o n.º 3.º do art.º 7.º do Codigo Eleitoral. Ah, colega! Nunca esperavamos de si um tamanho despauterio! Pois o colega que se mostra tão sabedor de leis, dá simelhante *raia*?

Está certo de que leu aquelas disposições e que, se as leu as percebeu? Leia mais uma vez e confesse que disse asneira e asneira grossa.

Com o maior desplante, afirma que o sr. dr. Figueiredo se serviu da galopinagem oficial em 1918—Façamos uma aposta, colega, sim? Peça um inquerito tanto sobre a eleição passada como sobre a presente, presidido por um magistrado judicial, e veremos de que lado está a verdade.

Apostamos dobrado contra singelo que o colega perde. Valeu?

ECOS & CRITICA

Eleição

Realisou-se no ultimo domingo com muito entusiasmo a eleição de um representante para Conselho Legislativo da Associação de Agricultores e Proprietarios. Foi eleito por unanimidade para efectivo o nosso querido amigo sr. dr. João de Figueiredo. Para suplente foi eleito o sr. Aquino de Noronha que obteve 15 votos, tendo obtido tambem 10 votos o sr. dr. Leandro Pereira, 3 o sr dr. Lourenço Caitano Monteiro e 1 o sr. Libario Pereira.

Nossos parabens aos ilustres eleitos, especialisando o sr. dr- Figueiredo.

Ao sr. Governador

Chamemos a atenção de sua exa Snr. Governador Geral

178

१०) सगळा खर्च बिचाऱ्या या इंदे-
च्या गरीब तिजोरीवर लादण्यांत आला
आहे. नशीब तिचें!

एस्. एन्.

मडगांवकरांनों, ही संधि दवडूं नका!

गोमांतकांतील बहुतेक देवस्थानांच्या उत्सवांतील मुख्यांगांपैकीं एक अंग ह्मणजे नायकीणीचे नाच होत. फार दिवसांच्या सहवासामुळे ही चाल बंद पाडण्यास महाजनमंडळीच्या जीवावर येत असे. पण आतां ईश्वरीनेमामुळेंच कीं काय सुधारलेल्या नायकीणीं आपण होऊनच देवालयांतील कामकाज किंवा देवस्थान व तेथील सेवा चाकरीची फारकत करण्यास तयार झाल्या आहेत व याचा पहिला धडा जांबावली निवासी यानीं घालून देण्याचें निश्चित केलें आहे, असें समजतें. हें जर खरें असेल तर मडगांवकर बहादरांनो, हा अपूर्व योगायोग, ही बिनसायासानें प्राप्त झालेली संधि दवडूं नका! तुह्मी आपल्या हिकमतीनें शिमग्याच्या उत्सवांतील नायकीणींच्या नाचास एकदम फांटा द्या! शिमग्याच्या उत्सवास नायकीणीं नसल्यास देवाची तुह्मावर इतराजी किंबहुना अवकृपा होईल या कल्पनेस थारा सुद्धां देऊं नका! पुढें आंखलेला कार्यक्रम तुह्मी यंदाचे शिमग्यात मुकर केल्यास करमणूकीपरी करमणूक होईल व देवाच्या नामस्मरणाचा सर्वांना लाभ दिल्याबद्दल तुमची सर्वत्र वाहवाच होईल. प्रतिवार्षिक पद्धतीप्रमाणें कोणत्याहि नायकीणीनां आमंत्रण करून त्यांकडून नकारार्थी उत्तर मिळून पश्चात्ताप पावण्यापूर्वीच त्या लोकानां आमंत्रण करण्याचें अजिबात टाळा. व त्या ऐवजीं शिमग्यातील सहाहि दिवसांत सगुणभक्तीचा महिमा गावून श्रीसंस्थान जांबावली हे पंढरीक्षेत्र बनवून टाका. शक्य असल्यास सुप्रसिद्ध हरिभक्तांचीं प्रवचनें, किर्तनें वगैरे करा. शिमग्यास आज १॥-२ महिन्याचा अवकाश आहे. इतक्या कालांत मडगांवकरांनीं मनावर घेतल्यास ते भजनीमंडळ तयार करूं शकतील. ज्याप्रमाणें श्रीस्थल सांखळी येथें दत्तमहाराज्यांच्या पालखीची मिरवणूक तुमच्या पद्यांच्या गाण्यांत होते, तसा प्रघात पाडण्यास तुमच्यांत होतकरू तरुण मंडळी मिळूं शकेल. नाहीं असें नाहीं. अशा कार्यां यंदांच थोडे परिश्रम करावे लागणार, ही गोष्ट खरी पण यामुळें-या तुमच्या कृतीनें इतर सर्व देवस्थानांसहि तुमचा किता गिरविण्यास जास्त उत्साह येईल व सर्व मंडळी तुमचेंच अनुकरण केल्यावांचून राहणार नाहीं. ही प्रेमाची सूचना. ही प्रेमाची प्रार्थना आहे. याचा सर्वांनीं विचार करून तयारीला लागावें एवढीच विनंति आहे.

सकाळीं ८ ते १० वा. भजन

संध्याकाळीं ५ ते ७ मेळ्याची मिरवणूक.

रात्रौ ८ ते १० कीर्तन अगर प्रवचन.

रात्रौ ११ नंतर नाटकाचे प्रयोग.

प्रत्येक 'पेण्याला' एकेक संगीत पद चांगल्या गाणाऱ्यांकडून ह्मणवून श्रीदामोदराच्या नावांच्या गजरांत व जयजयकारांत पालखीची मिरवणूक शांततेनें काढणें वगैरे.

एक प्रवासी

भारत

गुरुवार माघ शु॥ १० मी १८४२

अवघे व्हा देशभक्तच!

एकदां कोणतेंहि ध्येय निश्चित ठरलें ह्मणजे त्या ध्येयास मूर्त स्वरूप येणें हें सर्वतोपरी प्रयत्नसामर्थ्यावर अवलंबून आहे. बोलाचि भात व बोलाचिये कढी हीं ध्यानीं मनांतील मांड्यांप्रमाणें कितीहि रुचकर व पथ्यकर असलीं तरी ध्येय संपादनाच्या प्रत्यक्ष समाराधनेंत त्यांचा काहीच उपयोग होणें सध्याच्या कृतीच्या कालांत तरी कदापि शक्य नाहीं. वायफळ बडबडीनें जेथें तेथें गडबड माजवून स्वीकृत कार्याची नकली तडफड व्यक्त करण्याच्या ढोंगी लोकांची डाळ शिजण्याचा काळ बराच मागें राहीला आहे. सांप्रतचा काल हा प्रयत्नाचा काल आहे. सध्याचें युग हें कृतीचें युग आहे, हें ध्येय संपादन करूं इच्छिणाऱ्या प्रत्येक माणसानें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

आमच्या सध्याच्या चळवळीचें ध्येय झटलें ह्मणजे लोकांत स्वराज्याविषयीं सर्वांगीण पात्रता उत्पन्न करण्याचें आहे. स्वराज्याचा कारभार उत्तम व नमुनेदार रीतीनें चालविण्यास ज्या कांहीं बहुमोल गुणाची गोमांतकीय 'नेटीव' जनतेला आवश्यकता आहे, त्या गुणाची पूर्णत्वानें वृद्धि करण्याचें आहे. हें कार्य अर्थात् बरेंच बिकट असल्यानें, प्रयत्नसामर्थ्याची परमावधि झाल्याखेरीज यशप्राप्तीची आशा धरणें अगदीं वेडेपणाचे आहे, हें कोणीहि कबूल करील.

परंतु 'लोकांत उपरिनिर्दिष्ट गुणाची वाढ होण्याप्रीत्यर्थ वर्तमानपत्रकर्ते नेहमीं झटत असतात. लोकांनीं काय काय केलें असतां ते स्वराज्यास पात्र होतील हें ते बजावीत असतातच. मग वरील ध्येयांत काठिण्य तें कुठें राहिलें?' असा कोणीहि प्रश्न करण्याचा संभव आहे. पण आह्मी त्याला उलट असें विचारतों: सभ्य गृहस्थ, केवळ वर्तमानपत्रांच्या चळवळीनें जगांत कितीशा क्रांत्या झाल्या आहेत? नुसत्या वर्तमानपत्रांच्या वाचनानें किती लोक स्वराज्याला पात्र झाले आहेत? फार दूर कशाला, शेजारीं चाललेली असहकार योगाची तेजस्वी चळवळ ही फक्त वर्तमानपत्रांची कार्यनिष्पत्ति असा आपला समज बनला आहे कीं काय? तसा बनला असल्यास तो चुकीचा आहे, हें लक्ष्यांत ठेवा.

शिक्षणांत आघाडी मारलेल्या राष्ट्रांत वर्तमानपत्रांची कामगिरी उक्त हेतूंस पोषक या दृष्टीनें महत्वाची ठरते हें जरी खरें असलें, तरी आमच्या सारख्या अनेक कारणानीं शिक्षण व राजकारण या दोन गोष्टींत मागसलेल्या राष्ट्रांत सरकारदरबार व मूठभर सुशिक्षित लोक याशिवाय 'इतरे' जनांस वर्तमान पत्राचा तादृश्य उपयोग होत नाहीं, हें अनुभवसिद्ध आहे. अर्थात आमची ध्येयसाध्याची तहान वर्तमानपत्रांच्या अत्यंत खोल विहिरींतील पाण्यानें तृप्त करून घेण्याची इच्छा करणें ह्मणजे जवळ जवळ मृगजळानें तृषेच्या वेदनेंतून मुक्त होण्याची हांव बाळगण्यासारखें मूर्खपणाचें आहे.

जर आमचें ध्येय नुसत्या वर्तमानपत्रानीं यशस्वी होणार नाहीं तरहोणार तरी कशानें? प्रवचनानीं, असा आमचा स्पष्ट अभिप्राय आहे. प्रवचनाच्या जवळच्या मार्गानें ध्येयाचा पल्ला गांठणें जितकें हितकर होईल तितकें दुसऱ्या कोणत्याहि रस्त्यानें होणार नाहीं, अशी आमची प्रामाणिक समजूत दृढ बनल्यामुळें ध्येय संपादनार्थ आह्मीं प्रवचनाचा मार्ग हे शक्त्यनुसार आक्रमिण्याचा परिपाठ ठेविला आहे. मात्र खरें कीं, हा मार्ग जवळचा असल्यावरून पुष्कळ दगदगीचा, आहे. व ह्मणूनच प्रयत्नसामर्थ्याची परमावधि करण्यास तयार असल्याखेरीज त्याचा अवलंब करणें तितकें फायदेशीर होणार नाहीं.

'धर्म व राजकारण' या गोष्टींचा प्रसार प्रवचनानीं होण्यास सुलभ पडतें. धार्मिक व राजकीय दृष्ट्या कसें वागलें पाहिजे आत्मविश्वास, आत्मयश, निस्वार्थीपणा विश्वव्यापी प्रेम, समता, ...
बंधुप्रेम इत्यादि गोष्टींची मह...
मनांत बिंबवून इष्ट ध्येय प्र...
कोटीचे व अंतःकरणाच्या ...
करण्यास लावणारी शक्ति प्र...
असें ह्मणण्यास जागा अ...

प्रवचनांच्या कार्यश...
निष्ठ असून या मार्गा...
प्रमाणानें प्रयत्न होणें...
असें आह्मांस वाटतें...
सर्व तऱ्हेच्या जन...
रूप होऊन, प्र...
कांमास अ...

स्फुट विचार

दौऱ्याचा परिणामः—सि. गोव्हेर्नादोर साहेब दमण, दिव इ. ठिकाणीं फिरून आल्याची बातमी सर्वश्रुत आहे. प्रवास खर्चासाठीं ५० हजार रुपयांची सरकारांतून मंजूर झालेली रकम, गोवा तिजोरीच्या हलाख स्थितीच्या मानानें, बरीच भक्कम आहे अशी बोलवाहि आहे. एरवींच कांचनाभावामुळें कमी पैशाच्या लहान नोकरांचे सहासहा महिन्याचे पगार देणें आहेत असें कळतें. अशा स्थितींत, गोव्हेर्नादोर साहेब आपल्या दौऱ्याचा बेत २ दिवस पुढें ढकलते तर बरें झालें असतें, असें बहुतेक वर्तमानपत्रांचें ह्मणणें आहे. दौऱ्याचा परिणाम 'दुष्काळां... हिना' असा न होऊन नोकरांचा पगार... न व्हावा ... मह...

अंक ४८वा.

BHARAT

DIRECTOR

Relação de Nova-Goa

RES

... seu nenhum valor ... prova com os de... das proprias testi... da acusação que o di... do "Bharat" é activo, ... trabalhador e acerrimo defen... os interesses do paiz.

... cara o Estado nos seus ... sos aspectos, demons... ndo que o artigo incrimina... o nada o ... fendeu.

... os elementos consti... dos artos. citados pelo ... agente do M. P. e prova ... odos eles são inaplicaveis ... caso; demonstra que o ... P. é parte ilegitima para ... ar pelos crimes previs... os artos 407, 410, e 411 ... codigo penal, visto serem ... es particulares. Faz a ana... dos §2° e 8° do artigo 7° do Dec. de 29 de Março de 1890 (lei de imprensa) e prova, com argumentos irrespondiveis, que o Estado, em caso algum pode ser conside... do, por mais que se queira ... er o espirito da lei, como ... "corporação" a que o ... mo arto. se refere, êm face ... que se acha difinido nos ... ersos artigos do codigo ci... ... ne a propria acusa... foi capaz de classificar ... crime, visto ter cita... disposições de lei, ... se do velho prin...: *non bis in idem.*

... por uma eloquen... pedindo a anula... sso por falta do ... elito, ou, quando ... ão entenda, a absol... réu por não ter o ... timidade para o acu...

... sso querido defensor ... iasticamente cumpri... lo pelo seu patriotico ...

(Marathi fragments visible beside the clipping: ...जनता कांहीं खात्री... अशा ... लागला... या दोन ... भिन्न ... पर्याय ... पल्या नवीन ... होते. शिवाय, मुद्धां सर्पण वगैरे कडे खर्च होत उत्पन्न होणाऱ्या नुकसान होतें. कदाचित त्या ... लें नैसर्गिक ... वर्षानुवर्ष व ... पोकाळ अथवा पडत असेल ... पीक एकदम ... खतयुक्त ... यी जाऊ.)

Terminada a oração da defesa, perguntou o sr. Juiz ao reu se queria alegar mais alguma cousa em sua defeza, respondendo este negativamente; e logo o mesmo sr. juiz declarou suspensa a audiencia por meia hora, após a qual proferiu a seguinte:

Sentença

A f. 20 v. o M. Agente do M P nesta comarca, acusa o réu, Govinda Pundolica Hegdò Dessay, director e editor do jornal "Bharat" que se publica na séde desta comarca, de ter incorrido na sancção dos artos. 407, 410 e 411 do cod. Pen. e 7° §2° e 8° do Decreto no. 1 de 29 de Março de 1890, pelo seu artigo "Taxa de guerra", inserto no n°. 7° do 5°. ano de 6 de maio p. f. do referido periodico, cuja responsabilidade o Réu assumiu, devendo, pois, ser condenado nas penalidades previstas

O Reu negou-se a responder às perguntas, tendo sido produzida a defesa verbal afl.

Pela acusação foram inquiridas duas testimunhas; pela defeza: nenhuma.

Alegaram, oralmente, as partes e observadas foram em julgamento, todas as formalidades de lei.

O que tudo visto.

Não procede a incriminação do Reu nas citadas disposições;

Porquanto:

Os artos. 407 e 410 sò se referem á difamação e injuria contra particulares.

O arto. 411 do cod. Pen. e § 2° do arto. 7°. do cit. Dec não são aplicaveis ao caso dos autos, visto, alvejando o Réu o "Estado", não pode esta

ANNO V.—NUMERO 48—1921

QUEPEM QUINTA-FEIRA 24 DE FEVEREIRO

Govinda P. Hegde Dessai
Director e Editor

Assinatura
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया........... ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००

जाहिरातींचे दर
प्रत्येक ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें-गुरुवार, तारीख २४ माहे फेब्रुवारी सन १९२१ अंक ४८वा.

O JULGAMENTO DO BHARAT

E' ABSOLVIDO O NOSSO DIRECTOR

O M. P. recorreu da sentença para a Relação de Nova-Goa

OUTROS PORMENORES

Como já o publicamos, realisou-se no dia 16 do corrente o julgamento do nosso director pelo seu artigo *"Taxa de guerra"* que se encontra no n.º 7 de 6 de maio do ano p. f.

O nosso director, acompanhado do seu ilustre defensor e do pessoal da redacção e tipografia e de varios cavalheiros que são seus amigos, compareceu ás 12 ½ horas no tribunal.

A'hora marcada constituiu-se o tribunal declarando o nosso director na altura competente que se recusava a responder.

O defensor do réu, em defesa verbal, alegou a nulidade do processo por falta do corpo de delicto.

Inquiriram-se, em seguida, as testimunhas d'acusação cujos depoimentos seguem:

1 a

Xec Daud disse:

Que circulam pela estação postal desta localidade mais de 600 exemplares do jornal Bharat. O reu é bem comportado, trabalhador, activo e muito desejoso do bem da sua terra.

2 a

Naziazeno Jacob Antão disse:

Que pelo correio desta localidade circulam mais de 600 exemplares do jornal *Bharat* de que è redactor e director o réu. Disse que é bem comportado o R. Pergunta o se no seu jornal o mesmo reu defendia os interesses da terra ou cumprimento da lei, ou tinha simplesmente o prurido de escrivinhar, respondeu que não tinha o depoente tido ocasião de ler continuadamente o mesmo periodico, mas pela rara leitura ou antes por alguns numeros que tem lido do mesmo jornal, parece-lhe que o mesmo réu tem o intuito de defender os interesses da terra. E esta idea confirma-se pela leitura do mesmo artigo a que agora procedeu.

A defesa não indicou testimunhas, por estar certa de que o processo não tinha viabilidade alguma.

Em seguida, o Mmo. Juiz deu palavra ao M. Agente do M. P. que se limitou a pedir justiça.

Falou, ao depois, o nosso defensor.

Temos pena de não podermos dar na integra o belo discurso que o sr. dr. João de Figueiredo proferiu em nossa defesa. Damos, porisso, unicamente os topicos daquela brilhante peça literaria que foi escutada, com encanto, pelas numerosas pessoas que assistiram ao julgamento.

Começou o sr. dr. Figueiredo por encarar *o crime* nos seus tres aspectos: *social juridico e penal*, desenvolvendo as suas caracteristicas diferenciaes; analisa os artos. 1.º, 5.º, 15.º e 18.º do Codigo penal, frisando as condições de *voluntariedade*, exigidas por lei, expõe a evolução por que passou o *crime* e a maneira como este é encarado pelas *escolas criminalistas* predominantes.

Faz o elogio da imprensa e demonstra, com voz comovida, a compreensão que o director do *Bharat* tem da alta e sublime missão que lhe incumbe assumir na nossa sociedade.

Analisa o exame directo e demonstra o seu nenhum valor probatorio; prova com os depoimentos das proprias testimunhas da acusação que o director do "Bharat" é activo, trabalhador e acerrimo defensor dos interesses do paiz.

Encara o Estado nos seus diversos aspectos, demonstrando que o artigo incriminado em nada o ofendeu.

Analisa os elementos constitutivos dos artos. citados pelo digno agente do M. P. e prova que todos êles são inaplicaveis ao caso; demonstra que o M. P. é parte ilegitima para acusar pelos crimes previstos nos artos. 407, 410, e 411 do codigo penal, visto serem crimes particulares. Faz a analise dos §2.º e 8.º do artigo 7.º do Dec. de 29 de Março de 1890 (lei de imprensa) e prova, com argumentos irrespondiveis, que o Estado, em caso algum pode ser considerado, por mais que se queira torcer o espirito da lei, como uma "corporação" a que o mesmo arto. se refere, êm face do que se acha difinido nos diversos artigos do codigo civil. Frisa que a propria acusação não foi capaz de classificar o suposto crime, visto ter citado varias disposições de lei, esquecendo-se do velho principio juridico: *non bis in idem*.

E termina por uma eloquente peroração, pedindo a anulação do processo por falta do corpo de delito, ou, quando assim se não entenda, a absolvição do réu por não ter o M. P. legitimidade para o acusar.

O nosso querido defensor foi entusiasticamente cumprimentado pelo seu patriotico discurso.

Terminada a oração da defesa, perguntou o sr. Juiz ao reu se queria alegar mais alguma cousa em sua defeza, respondendo este negativamente; e logo o mesmo sr. juiz declarou suspensa a audiencia por meia hora, após a qual proferiu a seguinte:

Sentença

A f. 20 v. o M. Agente do M. P. nesta comarca, acusa o réu, Govinda Pundolica Hegdò Dessay, director e editor do jornal "Bharat" que se publica na séde desta comarca, de ter incorrido na sancção dos artos. 407, 410 e 411 do cod. Pen. e 7.º §2.º e 8.º do Decreto no. 1 de 29 de Março de 1890, pelo seu artigo "Taxa de guerra", inserto no n.º 7.º do 5.º ano de 6 de maio p. f. do referido periodico, cuja responsabilidade o Réu assumiu, devendo, pois, ser condenado nas penalidades previstas

O Reu negou-se a responder ás perguntas, tendo sido produzida a defesa verbal afl.

Pela acusação foram inquiridas duas testimunhas; pela defeza: nenhuma.

Alegaram, oralmente, as partes e observadas foram em julgamento, todas as formalidades de lei.

O que tudo visto.

Não procede a incriminação do Reu nas citadas disposições;

Porquanto:

Os artos. 407 e 410 sò se referem á difamação e injuria contra particulares.

O arto. 411 do cod. Pen. e § 2.º do arto. 7.º. do cit. Dec. não são aplicaveis ao caso dos autos, visto, alvejando o Réu o "Estado", não pode esta

ण्यांत आली.

हें सर्व लक्षीं घेऊन उपरोक्त कलमांत निर्दिष्ट केलेला गुन्हा आरोपीवर शाबीत होत नाहीं;

कारण;

४०७ व ४१० हीं कलमें [सरकार व्यतिरिक्त] इतर लोकांच्या बेअब्रू संबंधानें लागू होणारीं आहेत.

पिनल कोडचें ४११ कलम व सदरहु हुकुमनाम्याच्या ७ व्या कलमाचा २ रा प्यारा हीं या खटल्याला लागू होत नाहींत; कारण आरोपीनें संबोधिलेल्या "सरकार" या शब्दांत सिव्हील कोडच्या ३७ व्या कलमा बरहुकूम विशिष्ट संस्थेचा समावेश होत नाहीं, आणि, कदाचित्, या शेवटच्या शब्दांत त्याचा संभव करण्याचा प्रयत्न केल्यास तर हा मुकदमा आपोआपच अयोग्य ठरतो.

रेपुब्लिकच्या संघटनेच्या १ ल्या कलमाप्रमाणें 'सरकार' ह्मणजे 'पोर्तुगीच राष्ट्र' असा बोध होत असल्यानें, सरकारी सत्ता चालविणारी संस्था किंवा राजकीय दृष्ट्या मानण्यांत आलेला एकादा अधिकार असें ह्मणतां येत नाहीं, पण 'सगळें सरकार, असेंच त्या पासून निष्पन्न होतें, आणि त्यांत राष्ट्रीय सार्वभौमत्व दर्शविणाऱ्या सरकारात सगळ्या संस्थांचा व राजकीय दृष्ट्या योग्य रीतीनें मानल्या गेलेल्या सर्व अधिकारांचा अंतर्भाव होतो.

वरील उल्लेखामुळें व पिनल कोडच्या १, ५, १५. व १८ कलमाप्रमाणें, आरोपीवर गुन्हा शाबीत होत नसल्यावरून दिन कुरत (सन्कारी कामदारांचे पैसे), त्यांस सोडून देतों व दोषमुक्त ठरवितों.

ता. १६ फेब्रुवारी सन १९२१.

मानुयेल आंतोन्यु द काद्रुस

हा निकाल वाचल्यावर जज्जानी आमच्या संपादकांस अनुलक्षून असें सांगितलें कीं, खऱ्या खुऱ्या गोष्टी बोलण्यांत सुद्धां मुत्सद्देगिरी लढविण्याचा हा काळ असल्यानें कुशलतेनें वागणें सर्वतोपरी इष्ट आहे.

सरकारी वकील आ. राव यांनी त्या निकालावर अपील केलें.

सरते शेवटीं आमचे संपादक निर्दोषी ठरून सत्याचा जय झाल्याबद्दल पुष्कळ मित्रांनीं त्यांस प्रेमालिंगनें दिलीं.

वर्तमानसार

—लिस्बन येथें वर्तमानपत्रांच्या छापखान्यातील कामकरी लोकांनीं संप केल्यामुळें सर्व पत्रें बंद झालीं आहेत.

—ड्युक ऑफ कॅनाट यांच्या स्वागतास हजर राहण्याकरितां आमचे गव्हर्नर साहेब ता. १७ रोजीं मुंबईस गेले.

—कवळें येथील श्री शांतादुर्गा देवीस मुंबईतील एका भाविकाकडून सरासरी १॥ हजार रुपयांचा एक मोत्यांचा दागिना अर्पण करण्यांत आला.

—महात्मा गांधींच्या नांवच्या चलनी नोटा छापण्यांत येऊन त्यांचा ब्रिटिश इंडियेंत देवघेवहि होते, असें ऐकण्यांत येतें!

—इकडील न्याय.धिशांची बदली तिमोरास झाली असल्याची बोलवा आहे!

—गेल्या एकादशीला कुंकळी येथील श्रीलक्ष्मीसरस्वती विद्यामंदिरांत आमच्या संपादकाचें करे नाठवींसी कृपाळुदेवासी पोशितो जगासी एकलाची, ह्या तुकारामोक्तीवर प्रवचन झालें.

भारत

गुरुवार माघ कृ॥ २ या १८४२

सत्यमेव जयते !

चालू महिन्याच्या १६ व्या तारखेस भारतावरील खटल्याची सुनावणी होऊन त्यांत भारत पूर्ण दोषमुक्त झाला व 'सत्याचा जय होतो सर्वदा' हें त्रिकालाबाधित तत्व आमच्या पूर्ण निदर्शनास आणून दिलें, ही त्या परम मंगलदायक प्रभूची कृपा होय.

वरील निकाल जरी कायमचा नसला, सरकारी तर्फे या निकालावर अपील करण्यांत आलेलें असलें व त्याचा निकाल कसाहि होणार असला तरी अंगीकृत कार्या-पासून भारत यत्किंचितहि पराङ्मुख होणार नाहीं. आमची आबाळी आबाळ होत आहे, आह्मी निकृष्टावस्थेच्या अंधःकारगर्तेत लोळत आहोंत व या कामीं आमचें सरकार अनास्थापूर्वक मनमुराद वागतें व त्याचीं प्रत्यक्ष ताजीं उदाहरणें जनतेच्या व सरकारच्यापुढें मांडल्यानें तो अन्याय होतो किंवा स्वराज्याधिकार व स्वमताधिकार ह्या पवित्र अधिकारांचीं जोड आमच्या सरकाराकडून मिळालेली असल्यामुळें आमचे स्वतंत्रतेचे एकूण एक हक्क सरकारास प्रतिभेट ह्मणून देण्यांत व त्याच्या ताटाखालची मांजरें बनण्यांत आह्मीं आमचे हक्क गमावीत आहोंत, स्वतंत्रता व मताधिकार हा आमचा नैसर्गिक हक्क आहे, त्यांचें योग्य दिशेनें रक्षण करा नाहीं तर आमच्या सर्वस्वावर मुलेः कुठारः फिरेल अशा प्रकारचे बुद्धिवाद जनतेला केल्यानें यांत अन्याय होतो असें आह्मांस बिलकूल वाटत नाहीं.

आमच्या सरकारच्या 'खावे त्याला खवखवे' या कोत्या समजुतीमुळें अशा प्रकारच्या बुद्धिवादानीं, अशा प्रकारच्या प्रयत्नानीं, डळमळीत व नोकरशाहीच्या डोलाऱ्यावर उभारलेल्या आपल्या बडेजावास धोक पोंचा देतील, आपल्या इज्जतीस मानणार नाहींत, असें वाटणें साहाजिक आहे, पण स्वातंत्र्यप्रिय भारताचें ध्येय अराजकत्व माजवण्याचें किंवा सरकारविषयीं लोकांत अप्रीति उत्पन्न करण्याचें नसून, जनतेस आपल्या योग्य हक्कांची जाणीव करून देऊन व दयाळू सरकारकडून जें चुकून एकादे वेळीं अनीतीचें व अन्यायाचें अवलंबन होतें त्याला आळा घालावा व राजा व प्रजा यांचें जें एक प्रकारचें बापलेकासारखें नातें असतें तें नातें कायम राखण्यासाठीं दोघांचेंहि एकीकरण करावें असेंच आहे.

सुसंस्कृत मुलानें आपल्या वडीलानीं केलेलें एकादें अन्यायमूलक कृत्य करणें योग्य नव्हतें असें आपल्या लहान व असंमजस भावंडानां सांगितलें व त्या कृत्याचा परिणाम आपणावर होऊं नये याबद्दल वडीलांपाशीं आर्जवोद्गार काढले तर त्यांत कोणता अन्याय होतो? उलट वडिलानीं ती चूक दुरुस्त केली पाहिजे तरच त्याचा इतमाम कायम राहणें शक्य आहे.

आमच्या सरकारनें अमूक एक कृत्य आमच्या हेतूस व हक्कांस विघातक असें केलें आहे ह्मणून एखाद्या पुढाऱ्यानें आपल्या इतर बांधवांस सांगितलें व त्याचा वेळींच प्रतिकार केला तर त्यांत सरकारचा कोणता अन्याय केल्यासारखा होतो? सरकारच्या हातून चूक घडली तर ती चूक या सदरांत येत नाहीं कीं काय? ती त्याच्या निदर्शनास आणून दिल्यानें त्याचें खरें हित चिंतणाऱ्या व सर्वस्वी स्वदेशोन्नति करितां वाहून घेतलेल्या भारताला शिक्षा कशी होईल? मुलगा वयांत आल्यावर कायद्या बरहुकुम पालकांकडून त्याचा हक्क त्याला देवविते, त्याच सरकारनें आपली प्रजा आज चारशें वर्षांनंतर वयांत आल्यावर त्याच्या हक्कांवर व अधिकारांवर दडपशाही करणें ह्मणजे कायदा आमच्यासाठीं नाहीं ह्मणण्यासारखेंच आहे. कायदा जर राव, रंक ओळखीत नाही तर त्यानें राजा व प्रजा, अधिकारी व अनधिकारी असा पक्ष भेद कां मानावा, बुद्ध कायदा जर तसें ह्मणत नाहीं तर त्याच्यावर ही दडपशाही कां करावी?

ज्यानां हक्काची जाणीव झालेली आहे, त्यानां हक्क देण्यांत जर बापाकडून कसूर झाली तर मुलांकडून त्यांचा योग्य बडेजाव राहील काय? त्याच्या विषयीं मुलांच्या अंतःकरणांत सहानुभूति व प्रेम वास करील काय? व्यावहारीक दृष्टया तें अशक्य असें दिसून येईल. आपल्या प्रजेशीं असलेलें आपलें योग्य कर्तव्य सरकारनें बजाविलें नाहीं तर प्रजेंत असंतोष माजणें साहजिक आहे. आमचें दयाळू व "मायबाप" सरकार हें लक्ष्यांत घेईल व आपलें त्याप्रमाणें धोरण ठेऊन माय देशा करितां झटणाऱ्या भारतावर आपल्या विषयीं टीका करण्याचे प्रसंग होतां होई तों कमीं आणील अशी आह्मांस बळकट आशा आहे.

स्फुट विचार

डॉ. प्रो. सिनारीः—गोमांतकीय हिंदुसमाजांत ज्या कित्येक व्यक्ति आपल्या बुद्धिसामर्थ्यानें लोकादरास पात्र झाल्या आहेत, त्यांत लिसेव सेंत्रालचे भौतिक शास्त्राचे विद्वान प्रोफेसर डॉ. विठ्ठल रामचंद्र सिनारी यांचा प्रामुख्यानें समावेश होतो. केवळ उत्तम प्रोफेसर व उत्तम डॉक्टर या दोन लोकोपयोगीं गुणामुळेंच ते लोकप्रिय झाले नसून परहिततत्परता व निःस्वार्थीपणा या बहुमोल सात्विक वृत्तीमुळें हि ते जनतेस वंदनीय झाले आहेत. याचें प्रत्यक्ष उदाहरण ह्मणजे गेल्या दिवसांत म्हापशें येथें [illegible] सार्वजनिक रीतीनें झालेला सन्मा[illegible]य. अशा प्रकारचा सन्मानोत्सव [illegible] कचित्च दृष्टीस पडतो, इतकें सांगितलें ह्मणजे त्याच्या थोरवीची कल्पना मनांत बिंबेल. वरील समारंभाचें विस्तृत वर्णन देण्याचें आमच्या मनांत फार होतें; परंतु स्थलाभावामुळें आमच्या इच्छेला मूर्त स्वरूप देणें शक्य नसल्यावरून दिलगिरी वाटते. असो. डॉ. प्रो. सिनारी हे लोकोपयुक्त कार्यें करण्यास चिरायु होवोत अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करितों.

"सामर्थ्य आहे चळवळीचें":—सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील तयाचें। परंतु परमेश्वराचें। अधिष्ठान पाहिजे॥ या समर्थोक्तीचें ताजें प्रत्यंतर सांगेकरांच्या चळवळींत पहावयास मिळून संघशक्तीमुळें जगांत केवढी मोठी कामगिरी बजावतां येते, हें प्रत्येकाच्या हृत्पटलावर ठास बिंबून गेल्याशिवाय रहाणार नाहीं. करवाढीसाठीं जमिनीची फेर तपासणी करण्याचा हुकूमनामा बंद ठेवून सरकारनें आपलें शहाणपणाचें धोरण दाखविलें. हें त्याप भूषणावह होय. तात्पर्य, सांगावयाचें एवढेंच कीं, सार्वजनिकहिताच्या कोणत्याहि चळवळींत एकोप्यानें व शुद्धांतःकरणानें काम केल्यास त्यांत यशप्राप्ति ही ठेविलेली आहेच सांगेकरानीं घालून दिलेला हा धडा इतर महालांतील लोकहि, जनहिताच्या कामांत सदोदीत डोळ्यापुढें ठेवतील अशी आह्मांस आशा आहे. या विजयाबद्दल सांगेंकरांचें आह्मीं मनःपूर्वक अभिनंदन करितों.

घटनाः— गेल्या महिन्याच्या ३० तारखेस फोंडें येथें स्थापण्यांत आलेल्या 'प्रागतिक संघा'ची घटना तयार झाली असून 'विद्याप्रसार' कार्यालयांत, पाहिजे त्यांस ती पाहण्यास मिळेल. येत्या २७ तारखेस कोंग्रेस प्रोव्हींसियालच्या वेळीं पणजीं येथें नवीन व जुन्या काबिजादींतील बहुतेक हिंदुसमाज एकत्र व्हावयाचा असल्यामुळें, त्या घटनेवर कोणास कांहीं सूचना करावयाच्या असल्यास, त्या वेळीं करण्यास मिळतील. वादविवादांत योग्य ते फेरफार करून घटनेस कायमचें स्वरूप देण्यांत येऊन ती लगेच सरकारांत पास होण्यासाठीं पाठविली जाईल.

हीच वेळ आहे !:—थोड्याच दिवसांनीं कोंसेल्य लेजिस्लातीवांत चालू सालचें गोवा, दमण व दीव या प्रांतांचें जमाखर्चाचें अंदाज पत्रक वादविवादासाठीं पुढें येणार आहे. सरकारी तिजोरीस लागलेल्या धनक्षयाच्या रोगावर योग्य त्या उपायांची योजना करण्यास ही संधि फार उत्तम आहे. या कोंसेल्यांतील बहुतेक लोकपक्षाचे सभासद हे अस्सल स्वदेश भक्त असल्यामुळें त्यांकडून देशविघातक कृत्यें करण्यांत येतील अशी शंका सुद्धां घेण्याचें कोणास कारण नाहीं. उपरोक्त बजेटांतील प्रत्येक सिव्हीलला त्यांतील खर्चा कलमाच्या उपयुक्ततेकडे व आवश्यकतेकडे नजर फेंकल्यास त्यांत पुष्कळ कलमांची छाननी करण्यांस भरपूर जागा आहे, असें आह्मांस वाटतें. मिलिटरी खात्यांत जी भयंकर पगारवाढ दृष्टीस पडते तीसहि आळा घालण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. बजेटाची रीतसर तपासणी झाल्यास 'थेंबे थेंबे तळें सांचे, या न्यायानें गोवा सरकारचें भांडार वरील रोगापासून मुक्त होण्यास कालावधि लागणार नसून प्रजेवर नवेनवे कर लादण्याचा अनिष्ट प्रसंग केव्हांहि येणार नाहीं, अशी आमची अटकळ आहे. घोडा मैदान जवळच असल्यानें यद्विषयीं जास्त ऊहापोह आह्मीं आज करीत नाहीं.

वर्गणीची पोंच

श्री.	पंढरिनाथ शे. खरंगटे.		२रु.१२आ
,,	वैकुंठ गोविंद घार्से,		३ रु.
,,	भिकाजी उसो नार्वेकर,	मडगांव	३ रु.
,,	सदाशिव व्ही. केंकरे	,,	३ रु.
,,	दामोदर व्ही. नाईक,	,,	३ रु.
,,	भिकाजी पी. पै,	,,	१ रु. ८आ.
,,	सदाशिव शेणवी कैसरे	,,	१ रु. ८आ.
,,	नारायण फटू शेणवी आंबे,	कुंकळ्ळी	२रु.८
,,	राणू विष्णुदास केणी रोबोल	,,	१॥रु
	पद्मनाभ सगूण केणी रोबोल	,,	३रु.

—कांग्रेसमुळें भारताचा येत्या आठवड्याचा अंक प्रसिद्ध होणार नाहीं.

184

ANO V.—NUMERO 49—1921 QUEPEM QUINTA-FEIRA 10 DE MARÇO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
India Portuguesa...... 3-00-00
India Inglesa............ 3-08-00
Numero Avulso.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोंव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया......... ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००

जाहिरातींचे दर.
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पत्ता—भारत

वर्ष ५ वें. केपें, गुरुवार, तारीख १० माहे मार्च सन १९२१ अंक ४९वा.

O 4.º CONGRESSO PROVINCIAL DA India Portuguesa

Depois de alguns adiamentos, determinados por varias circunstancias, realisou-se, por fim, este nosso Congresso com a assistencia dum grande número de aderentes de diversos pontos do Estado da India Portuguesa.

Fiel á sua deliberação, aprovada na reunião de Pondá, a classe hindu levou tambem para lá muitos representantes seus, alguns dos quais tomasam parte activa nas discursões dos assuntos ventilados nas sessões do mesmo Congresso, o que indica que os hindus estão dispostos a trabalhar tambem deste lado pelo progredimento da nossa terra.

E'-nos muito grato registar esta circunstancia. Comove nos em regra a atitude da classe hindú em todos os movimentos em prol do bem estar do Paiz, movimentos que secunda com verdadeira abnegação quando se convença de sua utilidade. O entusiasmo, manifestado pela classe hindú no Congresso, então, não sò nos encheu duma comoção sem limites, mas tambem consolidou-nos a esperança de que o Paiz entrará a breve trecho no caminho da verdadeira felicidade.

Desde a sessão inaugural até a plenaria, tudo decorreu muito animado. Os discursos dos srs. presidentes efectivo e honorario do Congresso Luiz de Menezes Bragança e dr. Jaime de Morais produziram nos assistentes impressão agradabilissima.

Simplesmente, na discussão do principal assunto em que incidiu a acção dos congressistas, confirmou-se, indirectamente embora, a pouca prestabilidade da Inspecção d'Agricultura, que apezar de contar uma longa existencia, não foi capaz de apurar dados certos, tendentes á resolução satisfatoria da importante questão do *deficit cerialifero*, isto é, da magna questão da *vida*!

Ouvimos até-máu é dizer, mas pior é oculta-lo-apartes, opinando a extincção da mesma repartição, tal como se acha organisada e que representa, segundo êles, um verdadeiro sorvedouro do tesouro público. Alguns ainda indicavam-sempre em apartes chistosos, é claro -a eliminação da referida Inspecção, como meio de preencher o *deficit cerialifero*!

Como quere que seja, o certo, porêm, é que os creditos da Direcção dos Serviços Agricolas estão abalados na opinião pública, dum modo consideravel, não podendo nem os *maravilhosos pos dos ossos* do Raubahadur sr. Kelker nem as pitorescas prelecções do sr. Pedro Correia Afonso tirar da cabeça da gente tal impressão.

Sob diferentes assuntos foi encarado o problema do *deficit cerialifero* no Congresso Provincial que acaba de realisar-se. Entre outras coisas, o 4º Congresso recomendou ao 5 protecção aos animais, uteis á agricultura.

Segundo o nosso humilde modo de pensar, essa protecção deve consistir em privar absolutamente o gado *vacum* do sinistro contacto do açougue, que é, como se tem visto, pior inimigo dagricultura.

E' assim que pensa tambem a classe hindú proteger os animais de lavoura. Para conseguir êsse fim, ha de empregar todos os seus esforços, convencendo, dantemão, o que está habituado a comer *a vaca*, da imprescendivel necessidade de substitui-la por outra carne...

Mas temos muito tempo para tratar deste assunto.

Por hoje ficamos, portanto, aqui, exteriorisando a nossa alegria pela forma brilhante como se efectuaram os trabalhos do 4º Congresso Provincial da India Portuguesa.

Pragatica—Sanga

A absoluta falta de espaço inibe-nos de dar na integra a interessante carta do nosso amigo sr. S. R. Dumò, carta cuja parte final é a seguinte:-

Fiquei deveras animado com a fundação do *Pragatica-Sanga*.

Semelhante movimento è a melhor forma não sò de impulsionar energias e actividades em prol do progresso do paiz, mas tambem é a melhor forma de implantar civismo na população e preparar cidadãos mediante o exercicio de seus direitos e deveres. O progresso moral e material de todas as nações civilisadas tem origem em semelhantes propagandas E semelhante propaganda é a melhor forma de educar o povo no civismo, nos seus direitos, nos seus deveres

A educação civica tem pois por fim formar o cidadão ensinando-o a conhecer as instituições do seu paiz e mantendo-lhes regras de conducta firmes e seguras que o dirijam na vida publica.

E assim a educação civica é a base da sociedade que representa o povo. E este povo como não é constituido apenas do elemento ilustrado, mas tambem dos proletarios e d'outros que formam o gêral da população, cabe aos cultos e intelectuaes patriotas que tem amor ao paiz, o dever civico de desenvolver o habito e senso politico em todas as classes sociaes implantando n'elas o civismo.

Efectivamente, a reunião de Pondá demonstrando o seu amor á educação civica provou que a classe hindù trabalha por hombrear com os seus irmãos cristãos e cooperar com eles na grande obra de levantamento da India Portuguesa e com o governo d'esta Provincia á cuja testa témos por felicidade quem com superior talento, notaveis faculdades de trabalho e acendrado patriotismo está trabalhando pelo ressurgimento economico e social d'esta terra.

Que o "Pragatica Sanga" seja bem sucedido e concorra para o progredimento do nosso paiz são meus votos.

S. R. Dumó

Conferencia

Como haviamos anunciado, realisou-se no dia 24 do mez findo a conferencia do sr. dr. João de Figueiredo. A vasta sala da redação do "Bharat", onde a conferencia teve lugar estava artisticamente ornamentada com galhardetes, palmas e lindos quadros, sobresaindo os retratos dos grandes e intemeratos patriotas indios. A sala estava cheia á cunha. Grandes e pequenos, ricos e pobres, sem distinção de côres e castas, vinham escutar a palavra quente e sugestiva do sr. dr. Figueiredo e manifestar-lhe a homenagem do apreço e simpatia em que é tido.

Antes da hora marcada os socios do "Balonati-Samaj" pediram ao ilustre conferente a finesa de se fotografar com eles a fim de conservarem na sua biblioteca uma recordação perduravel da gentileza com que accedêra prontamente ao convite da direcção. O sr. dr. Figueiredo agradeceu a lembrança e assim o "Balonati-Samaj" poude obter uma artistica fotografia.

A' hora marcada, constituiu se a assemblea. O nosso director, a pedido da direcção do "Balonati-Samaj" explicou o fim da reùnião e em palavras de alto apreço delineou a pessoa do douto conferente, frisando especialmente os dedicados e desinteressados serviços por ele prestados, quere como avogado, quere como simples cidadão, tendo sido calorosamente aplaudido.

Fala, em seguida, o ilustre conferente. Começa por agradecer ao nosso director as lisongeiras palavras que acaba de lhe dirigir. Não se julga merecedor delas, considerando-as somente filhas da extrema amizade que lhe consagra

घेतला होता. कांग्रेसांत पास झालेल्या ठरावाचें सार काढण्याचें काम करून ही सभा ७ वाजण्याच्या सुमारास बरखास्त झाली.

रात्रीच्या ८ वाजण्याच्या सुमारास पुनः परिषदेच्या शेवटच्या सभेचें काम सुरू झालें. कांग्रेसच्या घटनेच्या नियमावलींत फेरफार व इतर कांहीं विषयांचा या सभेंत ऊहापोह झाला. घटनेच्या नियमांत असें एक कलम होतें कीं यंदाच्या कांग्रेसचे उपाध्यक्ष [Vice presidente] हे पुढल्या कांग्रेसचे अध्यक्ष व्हावे. परंतु या कलमावर बहुमत प्रतिकूल असल्यामुळें अध्यक्ष व इतर मेंबरांची निवड गुप्त रीत्या मतें (escrutinio secreto) घेऊन व्हावी, असें ठरलें. याप्रमाणें बहुमतानें मि. तेत्रांदोर मिरांद व दुसरे कांहीं गृहस्थ हे पुढच्या कांग्रेसचे अध्यक्ष व सभासद निवडून आले. पण ऐनवेळीं या सर्वांनीं आपापले राजीनामे मागितल्यामुळें कांग्रेस नामशेष होते कीं काय अशी सर्वांस धास्ती पडली. शेवटीं तडजोड होऊन वरील ठराव माघारा घेण्यांत येऊन घटनेचें उपरोक्त कलम कायम राखण्यांत आलें. व यंदाचे उपाध्यक्ष मि. आंतोन्यु मारीय द कुंन्य, 'हेराल्द' पत्राचे संपादक यांस पुढचे कांग्रेसच्या अध्यक्षांचा मान मिळाला.

या प्रांतीक परिषदेंत वर उल्लेख केलेल्या शेतकीविषयक ठरावांशिवाय खालील कलमेंहि पास करण्यांत आलीं:—

—प्रतिनिधींच्या फीचे दर ५ रुपयां ऐवजीं ३ रुपये.

—प्रत्येक महालांतील १० कामकऱ्यांस फीशिवाय कांग्रेसांत येण्याची परवानगी.

—कांग्रेस भरण्याची मुदत २-२ वर्षें.

—कांग्रेस पणजीशिवाय इतर कोणत्याहि महालांत भरण्याची मोकळीक.

—आणा फंड जमविण्यासाठीं एक कमिटी.

—नवीन काबीजादींतील ओसाड जमिनी लागवडीस आणणें. इ. विषय पास झाल्यावर, सभेचें काम पहाटेच्या सुमारास संपलें.

एकंदर विवेचनावरून कांग्रेसची सर्व साधारण माहिती आमच्या वाचकांच्या लक्ष्यांत येईलच; परंतु कांग्रेसांत पास झालेल्या ठरावांची अंमल बजावणी होण्यास सरकारचें प्रोत्साहन पाहिजे, तें कितपत मिळतें तें पाहणें आहे. वायफळ शब्दांपेक्षां परिणाम कारक कार्याचें क्षेत्र जेव्हां पहाण्यास मिळेल तेव्हांच उपरोक्त कांग्रेसचें साफल्य झालें असें समजूं. न पेक्षां 'कलावंती नाचे ह्मणून जोगीणहि नाचे', या न्यायानें ब्रिटिश हिंदुस्थानांत कांग्रेस भरते ह्मणून इकडेहि आह्मीं भरवितों असें देखादेखीचें सोंग होऊन, आमची कांग्रेस ह्मणजे एक हास्यरस प्रधान नाटकच होऊन बसेल, हें उघड आहे.

—पूर्वीं प्रसिद्ध केल्याप्रमाणें मडगांवच्या श्री दामोदर भुवनांत दासनवमीच्या उत्सवप्रसंगीं आमच्या संपादकांचें 'नाहीं देवापाशीं मोक्षाचें गाठोळें, आणोनी निराळें द्यावें हातीं' या तुकारामोक्तीवर प्रवचन झालें.

—'आलें फळ तेंव्हां राहील पिकोन जरी तें जतन केलें देंठीं' या विषयावरहि गेल्या आठवड्यांत कुंकळ्ळी येथील लक्ष्मी-सरस्वती विद्यामंदिरांत आमच्या संपादकांचें जाहीर प्रवचन झालें.

भारत

गुरुवार, माघ व. १ दा. १८४२

गेली प्रांतिक परिषद

यंदाच्या कांग्रेसचें अधिवेशन निर्विघ्नपणें पार पडून त्यांत प्रमुखत्वानें शेतकी सुधारणेची सांगोपांग चर्चा करण्यांत आली, हें दुसरीकडे प्रसिद्ध झालेल्या कांग्रेस वर्तमानावरून वाचकांस कळलेंच असेल.

प्रांतिक परिषदेनें शिरावर घेतलेलें पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्याचें कार्य राष्ट्रहिताच्या दृष्टीनें किती महत्वाचें व व्यापक आहे हें सांगण्याची थोडी सुद्धां जरूरी वाटत नाहीं. एकंदर गोवा प्रांताच्या मुख्य अन्नाची ह्मणजे तांदळाची टंचाई दूर व्हावी व चतकोर भाकरीसाठीं ब्रिटिश हिंदुस्थानांकडे तोंड पसरण्याची लज्जास्पद स्थिति होतां होईतों टाळावी एतदर्थ त्या कार्याची दिशा विचारपूर्वक आंखण्यासाठीं गोव्यांतील सगळ्या महालांतील प्रतिनिधी जमले होते. गेल्या वर्षी महागाईच्या आणि दुष्काळाच्या दिवसांत भरपूर पैसे असलेल्या श्रीमंतांस तसेंच अन्नास मोताद झालेल्या गरिबांस सारखीच यातायात सोसावी लागून 'दे माय धरणी ठाय' अशी त्यांची झालेली अनुकंपनीय दशा कोणाच्याच स्मरणांतून अझून गेली नसेल! या साठीं परिषदेंत ठरविल्याप्रमाणें एक सुद्धां ओसाड जमीन न राहूं देतां, देशाच्या सुबत्तेस हातभार लावण्याचें पवित्र काम बजाविणें हें प्रजेचें त्याचप्रमाणें राजकर्त्यांचें कर्तव्य होय. कांग्रेसमध्यें पास झालेल्या ठरावांस मूर्त स्वरूप आल्यासच मात्र इच्छित ध्येय साधून गत आपत्तींची पुनरावृत्ति होणार नाहीं. उलट पक्षीं कांग्रेसची सर्व शक्ति कागदांत किंवा बोलण्यांतच नष्ट झाली तर मात्र अर्थांत सारेंच ओम फस् होईल हें उघड आहे. व कोणत्याहि मृत संस्थेपेक्षां कांग्रेसला जास्त महत्व येणें शक्य नाहीं.

यंदाच्या कांग्रेसांत घडल्याप्रमाणें, देशोपयोगी ह्मणून एकदां पसार केलेले ठराव पुढच्या अधिवेशनांत अशक्य कोटींत गणून त्यांविषयीं निराशाजनक उद्गार काढण्याचा उपद्व्याप चालू ठेविल्यास कांग्रेसद्वारा आमची स्थिति सुधारणें कदापिहि शक्य नाहीं, हेंहि लक्ष्यांत बाळगिलें पाहिजे.

उदाहरणार्थ, गेल्या कांग्रेसांत कांचेच्या कारखान्यासाठीं उभारण्यांत आलेल्या 'आगाफंड'चा यंदाच्या परिषदेंत पु. फज्जा उडून कांग्रेसची अब्रु कांचेप्रमाणेंच फुटून जाते कीं काय, अशी क्षणभर भ्रांति उत्पन्न झाली होती, परंतु यद्विषयींच्या शंकाकुशंकांचें योग्य वेळीं निरसन होऊन पुढील मार्ग आक्रमणें निष्कंटक झालें ही समाधानाची गोष्ट होय!

उपरोक्त स्थिति यंदाच्या पास झालेल्या देशाच्या सुबत्तेच्या ठरावांच्या आड न येतां त्यांचें कार्य उत्तमप्रकारें पार पडल्यास कांग्रेससाठीं सोसलेली झीज, खिशास लागलेला चट्टा व या उन्हाळ्यांत पणजीमध्यें काढलेला त्रास यांचें साफल्य झालें असें आह्मीं समजूं!

शेतकी सुधारणेकडे निकट संबंध अस-

स्फुट विचार

दोन उपयुक्त संस्थाः— कांग्रेसनिमित्त जमलेल्या हिंदूंनीं 'प्रागतिक संघ' व 'हिंदु विद्यार्थी सहाय्यक फंड' या दोन्ही उपयुक्त संस्थांच्या घटना तात्पूर्त्या पास करून कार्याची दिशा आंखून दिली, हें फार बरें झालें. आतां मुख्य काम प्रचारकांचेंच आहे. ज्या मानानें ते स्वार्थत्यागपूर्वक झटून, खऱ्या कळकळीनें व तळमळीनें उपरोक्त संस्थांच्या अभ्युदयार्थ प्रयत्न करितील त्या मानानें त्यांचें कार्य विशेष कालावधि न लागतां यशस्वी होणार आहे. उलट पक्षीं ते जर आपापल्या घरीं सुख शय्येवर पहुडून 'युक्तीच्या गोष्टी' सांगण्यांतच धन्यता मानण्याचेंच 'गोड' कर्तव्य बजावण्यास पहातील तर कार्यनिष्पत्तीच्या दृष्टीनें उपरोक्त संस्थांच्या वांट्यास 'कडू' अनुभवाशिवाय दुसरें कांहीहि येणार नाहीं. प्रचारकानो, हें लक्ष्यांत ठेवून ताबडतोब कार्यास वाहून घ्या! तुह्मीं हाडाचीं काडें करण्यास तयार झाल्याखेरीज 'प्रागतिक संघाची' प्रगति होणें व 'सहाय्यक फंडास' सहाय्य मिळणें कदापिच शक्य नाहीं, हें मनःपटलावर खोदून ठेवा! तुमच्या आचरणावर, तुमच्या परिश्रमावर व तुमच्या 'धक्के चपेटे, खाण्याच्या वृत्तीवर वरील संस्थांची यशस्विता अवलंबून आहे, हें सतत अंतःकरणांत आठवून कार्यार्थ कंबरा बांधा! चला, उठा!!

हिंदु समाजः— गेल्या शिवरात्रीच्या दिवशीं रिवण येथील या उपयुक्त व देशहितवर्धक संस्थेचा तृतीय वाढ दिवस समारंभ आमच्या संपादकांच्या अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. या प्रसंगीं श्रीयुत यशवंत वि. देसाई, नारायण भा. नाईक, अनंत भगवंत नाईक, वासुदेव वि. देसाई व सांबळाराम ह. पाण्डीकर इत्यादि समाज [illegible] तरुणांचीं जोरदार भाषणें झालीं. याच सभेंत भारतोदय प्रसिद्ध झा[illegible] जाहीर होऊन, त्याच्या पहिल्या अंकाच्या प्रति सभासदांस वाटण्यांत आल्या. 'हिंदुसमाज' चालकांच्या वर्तनांत दिसून येत असलेली 'मिशनरी' चिकाटी खरोखर फार प्रशंसनीय असून त्यामुळें सदरहू संस्था थोडक्याच अवधींत नावांरूपास चढेल, अशी खात्री वाटते. ईश्वर करो आणि [illegible] मूर्त स्वरूप आल्याचें पहाण्याचा सुयोग आह्मांला लवकरच येवो! सभेचें काम आटोपतांच आमच्या संपादकांचें 'संसारा आलीया एक सुख आहे, [illegible]उठावे पाये देवाजीचे [स्वदेशाचे]' या तुकारामोक्तीवर, धार्मिक व राष्ट्रीय प्रवचन झालें.

लेल्या [illegible]राहोरांच्या संवर्धनांच्या विषयास पुढच्या [illegible] कांग्रेसांत अग्रस्थान मिळालेलें पाहूनहि [illegible] आह्मांस समाधान वाटलें. या उपयुक्त विषयावर प्रत्येकास सुचणारे विचार कांग्रेस [illegible] मेटीस योग्य वेळीं कळविण्यास कोणीच अंतर करूं नये अशी आमची आग्रहाची विनंति आहे.

शेवटीं 'प्रागतिक संघा'चे वेळीं पास केलेला ठराव पाळला गेल्यानें आह्मीं आमच्या हिंदु बांधवांचें अभिनंदन करितों. व यंदां जसें उत्साहानें त्यांकडून काम केलें गेलें त्या पेक्षांहि जास्त उत्साहानें व नेटानें पुढच्या कांग्रेसांत भाग घेऊन ते देशविधायक कार्य करण्याचें कर्तव्य अत्यंत चिकाटीनें व उत्साहानें बजावतील अशी बळकट आशा आहे.

विद्याराधना

कोणताही समाज जर उन्नत झाला पाहिजे, तर तो सुशिक्षणानें सुसंस्कृत झाला पाहिजे. ह्मणजे विद्यादेवीची आराधना करून, तीस प्रसन्न करून घेतलें पाहिजे व तिची कृपा संपादन केली पाहिजे; त्याशिवाय उन्नति होणें शक्य नाहीं. एक कवि ह्मणतो:— विद्यानाम नरस्य रूप मधिकं प्रच्छन्न गुप्तं धनं। विद्या भोगकरी, यशःसुख करी विद्या गुरुदैवतं।..... विद्या विहीनः पशुः' पण हें विद्याराधन नेमनिष्ठेनें व सतत ह्मणजे तिची पूर्ण कृपा होई पर्यंत झालें पाहिजे; नपेक्षां ह्मणजे नेमनिष्ठा न बाळगितां व जप तप आराधना न करितां किंवा एक दोन दिवस करून' विद्या अल्पपरी गर्व शिरोमणी' अशांतील स्थिति झाली ह्मणजे मग त्याच्या अवनतावस्थेस पारावारच नसतो. कारण तिची पूर्णपणें आराधना न झाल्यामुळें, कृपा होण्याचे ऐवजीं अवकृपा होणें ह्मणजे अधोगती प्राप्त होणें होय. यासाठीं प्रत्येकाकडून विद्यादेवीची पूर्ण आराधना होणें इष्ट आहे.

देवाची नित्य नेमनिष्ठेनें आराधना करण्यासाठीं जशी गांवोगांव अनेक ग्रामदेवालयें व महाजनदेवालयें स्थपना केलेलीं असून त्यांस, ग्रामसंस्था (Comunidades) महाजन व सरकार यांकडून ज्याप्रमाणें वार्षिक किंवा हंगामी देणग्या मिळालेल्या आहेत, त्याप्रमाणेंच गांवोगांव विद्या देवींचीं आलयें स्थापन होऊन त्यांस ही ग्रामसंस्था मुनिसिपालट्या, ज्यूंत लोकाल, देवालयें, महाजन व सरकार यांकडून वार्षिक किंवा हंगामी देणग्या मिळाल्या पाहिजेत.

देवालय हें जसें देवाचें वसतिस्थान त्याप्रमाणें विद्यादेवीचें स्थान ह्मणजे ग्रंथसंग्रहालयें किंवा वाचन-मंदिरें, शाळा, कॉलेजें, युनिव्हर्सिटी हें होय. प्रत्येक गांवोगावीं जशी देवालयाची आवश्यकता आहे व देवालयास ज्याप्रमाणें ग्रामसंस्था व ग्रामनिवासी लोक यांकडून वार्षिक किंवा हंगामी देणग्या देण्यांत येतात, त्याप्रमाणें त्यांसही ग्रामसंस्था, जून्त लोकाल (junta local) ग्रामदेवालयें व ग्रामनिवासी जन यांकडून वार्षिक व हंगामी देणग्या देण्यांत आल्या पाहिजेत. व या शिवाय ज्याप्रमाणें महाजनाच्या विशिष्ट देवतेचीं देवालयें आहेत व त्यांस त्यां कडून व इतरांकडून देणग्या मिळतात, त्याप्रमाणें प्रत्येक महालनिहाय एकेक मोठें ग्रंथसंग्रहालय व कालेज स्थापण्यांत येऊन त्यांस मुनिसिपालटी, महाजन देवाची देवालयें, महालनिवासी महाजन, ज्यूंत लोकाल, सरकार वगैरे कडून वार्षिक व हंगामी देणग्या मिळाल्या पाहिजेत आणि असें झालें तरच सर्वांस विद्यादेवीच्या मंदिरांत आराधना करण्यास जाण्यास मिळेल. व हाच खरा तरणोपाय होईल. तर आमचा समाज इकडे आपलें लक्ष्य पुरवून, तशी सोय करील काय?

एस. एच्

वर्तमानसार

—चालू महिन्याच्या १५ तारखेपासून गोव्यांतील आगगाड्यांचा टाईम पुन्हां बदलणार असें ह्मणतात.

—येत्या रविवारापासून प्रत्येक आठवड्यांत येथील 'बालोन्नति समाजांत' पोर्तुगेज व्याख्यानमाला सुरू होणार आहे.

ANNO V. — NUMERO 50 — 1921 QUEPEM QUINTA-FEIRA 17 DE MARSO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............. 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)........ ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास.......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
दराची दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारे ठरविण्यांत येतील.

तारेचा पता—भारत

वर्ष ५ वें. केपें, गुरुवार, तारीख १७ माहे मार्च सन १९२१ अंक ५०वा.

POLITICA PORTUGUESA

Não são, certamente, animadoras as noticias que nos trouxe a ultima mala de Portugal.

Parece que ali se sente imenso a falta de quem, com seu imaculado prestigio e superior tino politico ponha, dum modo radical e eficaz, freio á tendencia demagogica do elemento, afeiçoado a promover, por *dá cá aquela palha*, a proposito e desproposito de tudo, perturbações intestinas na sociedade e estabeleça harmonia perduravel entre os filhos da mesma Patria, harmonia tão necessaria para o regular andamento dos negocios públicos, na presente crise que o mundo todo atravessa.

A *união sagrada* que pelos principios que a determinaram prometia, no seu inicio, uma paz de bôa duração, deu ao que se vê, em droga, não tendo sido capaz de imprimir como se esperava, estabilidade á politica portuguesa.

Uma espesso veu negro de tristeza nos cobre a alma, quando-nos chegam aos ouvidos boatos alarmantes, como o da sinistra morte do capitão Agusto Neupart, boatos que indicam a temivel recrudescencia do pior mal que pode minar uma sociedade, liquidar um povo, por mais nobres e arcaicos que sejam os seus pergaminhos e reduzir á nulidade uma raça, por mais valente que tenha sido, no seu glorioso passado: a demagogia.

A demagogia! Quem pode duvidar de que ela venha a ser o pior mal?

E Portugal, por um conjuto de circunstancias que é extemporaneo enumerar, se achá, infelizmente, enfermado do mesmo mal. E' este que o tem debilitado dumá forma que mete serios cuidados!

A salvação da *Mãe-Patria* depende, portanto, da extincção da demagogia e ressurgimento duma harmonia que confraternise todos os cidadãos portuguezes, movidos pelo único fim do bem-estar do berço comum.

Ambições mesquinhas, egoismo incomensuravel, sêde de grandezas e opulencias, febre de mando, tudo isso tem de desaparecer para sempre, do seio da Patria para esta poder entrar numa vida de *Trabalho e Ordem.*

¿Quando surgirá o Messias redentor da demagogia que felicite a Mãe-Patria, libertando-a dos empecilhos que entorpecem o seu ingresso no Progresso?

¿Quando raiará este glorioso dia?

época? Ou por que o publico tivesse já perdido a esperança do seu futuro prospero pela constante pressão do Terreiro do Paço, dificultando o curso regular da administração da Provincia, Terreiro do Paço que deu ao nosso ex-Conselho do Governo o aspecto da antiga Junta Geral da Provincia, criada pelo Rebelo da Silva pelo Decreto de 1869? Ou, finalmente, porque a orientação do extincto Conselho do Governo se tenha limitado ao aumento das despezas com criação de novos encargos?

Pode ser talvez o conjuncto de todas estas coisas que tenham originado a situação discrita.

Mas seja qual for o motivo होचो, असे अंत causado o desespe... so paiz pacifico e pacato शेत vem d'ora em diante ficarmos para sempre de espectativa, de braços cruzados, votando ao ostracismo os problemas dos nossos legitimos interesses, dando tão somente largas á critica facil e barata?

Não. Isto não convem deforma alguma se não quizermos macular-nos com o espirito de *pat...riotas de feira franca.*

O alto e humanitario fim que presidiu á outorga da autonomia ás colonias foi o de poderem exercer elas a sua actividade, livre de quaisquer peias, para assim poderem prosperar dentro dos seus proprios recursos, sendo por isso vadado ao Poder Central tomar quaisquer providencias que directamente interessem á Provincia sem precedencia da previa informação do Governo Geral, *a não ser que da falta de tais providencias resulte prejuizo irreparavel,* ** mas é para lastimar que o Terreiro do Paço como se em tudo achasse prejuizo irreparavel foi agravando a situação da Provincia já de per si bastante precaria, devido ao seu pavoroso deficit, e para o cumulo da desgraça é ainda mimosiada com o encargo do padroado, despeza que devia pertencer ao tesouro da Metropole!

Não há duvida que todas as nossas leis são encantadoras e teorica mente belas na essencia, mas na pratica o que se nota é o carro diante dos bois.

Não é este o logar proprio para se tratar da utilidade ou inutilidade das missões religiosas, mas o certo é que se a situação financeira da Metropole não permitia acarretar despezas do padroado ¿não seria por ventura, de boa norma politica suspender por ora este encargo, em vez de lança-lo sobre a colonia que se debate em apuros por falta de meios para varios melhoramentos necessarios?

Abordando os assuntos do mais vital interesse do nosso desditoso paiz, o ponto topico e mais delicado que se antolha á vista é o da compressão das despezas para suprimir o nosso *deficit* orçamental, sem o que nenhuma empreza é possivel *materialmente.*

Para se equilibrar o orçamento longe de se pensar na reducção dos serviços ao minimo e procurar outras fontes da receita apresentam o alvitre de lançar mãos dos impostos ou aumentar os existentes nomeadamente o imposto predial que segundo certo Catão não é proporcional ao aumento de rendas actualmente obtido pelos proprietarios devido á elevação dos preços dos seus productos!!!

Haverá nisto a origem do indiferentismo notado nas ultimas eleições?

** Esta disposição ligeiramente modificada se encontra tambem na legislação actual respeitante ao suprimento de voto dos repectivos conselhos no caso da recusa.

Serenamente

Realisaram-se as eleições dos vogais que hão de fazer parte na constituição do nosso Conselho Legislativo.

Mas o que se notou desta vez com respeito a estas eleições? E' que o paiz se apresentou calmo, quasi abstencionista.

Se, quem não conhece de perto, a psicologia morbida do nosso povo tiver, por curiosidade, tomado a nota do maximo alvoroço do povo indiano, ao principio, pelo advento da autonomia, quando foi da promulgação da Carta Organica, o seu entusiasmo nas primeiras eleições havidas em 1918 para escolha dos seus mandatarios ao extincto Conselho do Governo, não pode deixar de extranhar o esmorecimento e apatia do mesmo povo nas ultimas eleições!

Donde viria tamanho descorçoamento, tamanho indiferentismo?

A que poderia atribuir-se esta atitude, indigna d'um povo que se diz adiantado na civilisação?

Se-lo-ia por ventura por julgar-se vexado pelo cerceamento de varias atribuições concedidas na revogada Carta Organica, por parte do Governo Central que não vasou a nova reforma administrativa em disposições liberaes consentaneas com o espirito da

Expediente

Com o presente numero, o *Bharat* completou o seu quinto ano de publicação. Aqueles dos assinantes que não tiverem ainda satisfeito a importancia da assinatura do referido ano, tenham a bondade de saldá-la, prontamente, em atenção á carestia que está atravessando o Paiz.

A Administração

ANNO V. — NUMERO 50 — 1921 QUEPEM QUINTA-FEIRA 17 DE MARÇO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

Endereço telegrafico—Bharat

भारत
BHARAT

SEMANARIO

Tipografia Pundolica—Quepém

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)........ ३-००-००
ब्रिटिश इंडिया............ ३-०८-००
किरकोळ अंकास.......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
दराठी दर ओळीस दोन आणें. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

तारेचा पता—भारत

वर्ष ५ वें. केपें, गुरुवार, तारीख १७ माहे मार्च सन १९२१ अंक ५०वा.

POLITICA PORTUGUESA

Não são, certamente, animadoras as noticias que nos trouxe a ultima mala de Portugal.

Parece que ali se sente imenso a falta de quem, com seu imaculado prestigio e superior tino politico ponha, dum modo radical e eficaz, freio á tendencia demagogica do elemento, afeiçoado a promover, por *dá cá aquela palha*, a proposito e desproposito de tudo, perturbações intestinas na sociedade e estabeleça harmonia perduravel entre os filhos da mesma Patria, harmonia tão necessaria para o regular andamento dos negocios públicos, na presente crise que o mundo todo atravessa.

A *união sagrada* que pelos principios que a determinaram prometia, no seu inicio, uma paz de bôa duração, deu ao que se vê, em droga, não tendo sido capaz de imprimir como se esperava, estabilidade á politica portuguesa.

Uma espesso veu negro de tristeza nos cobre a alma, quando-nos chegam aos ouvidos boatos alarmantes, como o da sinistra morte do capitão Agusto Neupart, boatos que indicam a temivel recrudescencia do pior mal que pode minar uma sociedade, liquidar um povo, por mais nobres e arcaicos que sejam os seus pergaminhos e reduzir á nulidade uma raça, por mais valente que tenha sido, no seu glorioso passado: a demagogia.

A demagogia! Quem pode duvidar de que éla venha a ser o pior mal?

E Portugal, por um conjuto de circunstancias que é extemporaneo enumerar, se achá, infelizmente, enfermado do mesmo mal. E' este que o tem debilitado dumá forma que mete serios cuidados!

A salvação da *Mãe-Patria* depende, portanto, da extincção da demagogia e ressurgimento duma harmonia que confraternise todos os cidadãos portuguezes, movidos pelo único fim do bem-estar do berço comum.

Ambições mesquinhas, egoismo incomensuravel, sêde de grandezas e opulencias, febre de mando, tudo isso tem de desaparecer para sempre, do seio da Patria para esta poder entrar numa vida de *Trabalho e Ordem*.

¿Quando surgirá o Messias redentor da demagogia que felicite a Mãe-Patria, libertando-a dos empecilhos que entorpecem o seu ingresso no Progresso?

¿Quando raiará este glorioso dia?

época? Ou por que o publico tivesse já perdido a esperança do seu futuro prospero pela constante pressão do Terreiro do Paço, dificultando o curso regular da administração da Provincia, Terreiro do Paço que deu ao nosso ex-Conselho do Governo o aspecto da antiga Junta Geral da Provincia, criada pelo Rebelo da Silva pelo Decreto de 1869? Ou, finalmente, porque a orientação do extincto Conselho do Governo se tenha limitado ao aumento das despezas com criação de novos encargos?

Pode ser talvez o conjuncto de todas estas coisas que tenham originado a situação discrita.

Mas seja qual for o motivo [illegible] causado o desespe[illegible] do paiz pacifico e pa[illegible]vem d'ora em diante ficarmos para sempre de espectativa, de braços cruzados, votando ao ostracismo os problemas dos nossos legitimos interesses, dando tão somente largas á critica facil e barata?

Não. Isto não convem de forma alguma se não quizermos macular-nos com o espirito de *patriotas de feira franca*.

O alto e humanitario fim que presidiu á outorga da autonomia ás colonias foi o de poderem exercer elas a sua actividade, livre de quaisquer peias, para assim poderem prosperar dentro dos seus proprios recursos, sendo por isso vadado ao Poder Central tomar quaisquer providencias que directamente nteressem á Provincia sem precedencia da previa informação do Governo Geral, *a não ser que da falta de tais providencias resulte prejuizo irreparavel*, *, mas é para lastimar que o Terreiro do Paço como se em tudo achasse prejuizo irreparavel foi agravando a situação da Provincia já de per si bastante pracaria, devido ao seu pavoroso *deficit*, e para o cumulo da desgraça é ainda mimosiada com o encargo do padroado, despeza que devia pertencer ao tesouro da Metropole!

Não há duvida que todas as nossas leis são encantadoras e teorica mente belas na essencia, mas na pratica o que se nota é o carro diante dos bois.

Não é este o logar proprio para se tratar da utilidade ou inutilidade das missões religiosas, mas o certo é que se a situação financeira da Metropole não permitia acarretar despezas do padroado ¿não seria por ventura, de boa norma politica suspender por ora este encargo, em vez de lança-lo sobre a colonia que se debete em apuros por falta de meios para varios melhoramentos necessarios?

Abordando os assuntos do mais vital interesse do nosso desditoso paiz, o ponto topico e mais delicado que se antolha á vista è o da compressão das despezas para suprimir o nosso *deficit* orçamental, sem o que nenhuma empreza è possivel *materialmente*.

Para se equilibrar o orçamento longe de se pensar na reducção dos serviços ao minimo e procurar outras fontes da receita apresentam o alvitre de lançar mãos dos impostos ou aumentar os existentes nomeadamente o imposto predial que segundo certo Catão não ê proporcional ao aumento de rendas actualmente obtido pelos proprietarios devido á elevação dos preços dos seus productos!!!

Haverá nisto a origem do indiferentismo notado nas ultimas eleições?

* Esta disposição ligeiramente modificada se encontra tambem na legislação actual respeitante ao suprimento de voto dos repectivos conselhos no caso da recusa.

Serenamente

Realisaram-se as eleições dos vogais que hão de fazer parte na constituição do nosso Conselho Legislativo.

Mas o que se notou desta vez com respeito a estas eleições? E' que o paiz se apresentou calmo, quasi abstencionista.

Se, quem não conhece de perto, a psicologia morbida do nosso povo tiver, por curiosidade, tomado a nota do maximo alvoroço do povo indiano, ao principio, pelo advento da autonomia, quando foi da promulgação da Carta Organica, o seu entusiasmo nas primeiras eleições havidas em 1918 para escolha dos seus mandatarios ao extincto Conselho do Governo, não pode deixar de extranhar o esmorecimento e apatia do mesmo povo nas ultimas eleições!

Donde viria tamanho descorçoamento, tamanho indiferentismo?

A que poderia atribuir-se esta atitude, indigna d'um povo que se diz adiantado na civilisação?

Se-lo-ia por ventura por julgar-se vexado pelo cerceamento de varias atribuições concedidas na revogada Carta Organica, por parte do Governo Central que não vasou a nova reforma administrativa em disposições liberaes consentaneas com o espirito da

Expediente

Com o presente numero, o *Bharat* completou o seu quinto ano de publicação. Aqueles dos assinantes que não tiverem ainda satisfeito a importancia da assinatura do referido ano, tenham a bondade de salda-la, prontamente, em atenção á carestia que está atravessando o Paiz.

A Administração

भारत

गुरुवार, माघ व. ८ मी १८४२

आमची सांपत्तिक उन्नति कशी होईल ?

अत्यंत श्रीमान व वैभवशाली देशामध्यें आमच्या ह्या देशाची गणना होण्यास आह्मीं कोणकोणते उपाय योजले पाहिजेत या विषयाकडे आजकाल आमच्याकडील आधुनिक सुशिक्षित वर्गाचें बरेंच लक्ष्य वेधून राहिलें आहे. हें एक सुचिन्ह खरें पण त्यांच्या उपाया संबंधानें मात्र बराच मतभेद आहे.

कांहीं पुढाऱ्याचें मत असें दिसतें कीं, आह्मांस स्वातंत्र्य व तदनुषंगिक राजकीय हक्क जसेजसे अधिकाधिक मिळत जातील तसतसें देश पुढें सुधारणेचें पाऊल पडेल.कांहींच्या मतें समाजांत स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह पुनर्विवाह व या सारख्या दुसऱ्या अनेक सुधारणा जारीनें अमलांत आल्याशिवाय कांही एक देशहित होणार नाहीं अशा समजुतीस आश्रय देऊन त्या धोरणानेंच त्यांची चळवळ चाललेली असते. कित्येकांचीं मतें, राजकीय व सामाजिक सुधारणा बरोबर व्हावी अशीं आहेत व त्याचप्रमाणें सामाजिक सुधारणा आधीं व्हावी किंवा राजकीय आधीं व्हावी हाहि वाद बराच ऐकूं येतो. निरनिराळ्याचें धोरण वेगवेगळे असलें व त्याला परिपोषक असे त्याचें प्रयत्न होत असले तरी एकंदरींत आमचें पाऊल पुढें पडावयाचें तसें तें पडत आहे असें ह्मणण्यास विशेषसा आधार नाहीं. दारिद्र्यरूपी काळ मुखांतून जर आमची आर्य भू सांपत्तिक बळानें सोडविली गेली नाहीं तर आमच्या पुढाऱ्यांच्या सांपत्तिक उन्नति व्यतिरिक्त प्रयत्नाना मूर्त स्वरूप येऊन त्यायोगें आमचें विशेष कल्याण होईल असें वाटत नाहीं. शिवाय थोडथोड्यांचा इच्छींचा क्रम उर्फ धोपट मार्ग या हेतूंस बराच विघातक आहे ह्याबद्दल शंका नाहीं.

हल्लीं इतस्ततः नजर फेंकली तर आमचा सर्व कल उदरं भरणार्थ नोकरीकडे गेलेला दिसून येतो, नोकरीशिवाय तरणोपाय नाहीं अशा नष्ट, भ्रष्ट व गैर समजुतीस थारा देऊन आह्मी मिळेल त्या पगारावर तिकडेच धांव घेतों. तद्व्यतिरिक्त त्यांच्या मतें रिकाम्या सांपडलेल्या वेळांत, नोकरीचा शीण दूर करण्यास एखाद्या क्लबांतून किंवा इतर ठिकाणीं स्वेच्छ बसून गप्पीदासांचीं कीर्तनें करणें लोकांच्या कुचाळ्या व निंदाकरणें इत्यादि गोष्टी आवश्यक आहेत असें त्यांना वाटतें ! कोण हा अंधःकार ! काय हें अज्ञान!

अशा या काळयाकुट्ट अज्ञानांधःकारांतहि थोडथोडीं आशेचीं किरणें चमकूं लागलीं आहेत. शेतकी व इतर धंदे शिक्षणाचा प्रसार सर्वत्र होऊन त्यांची सुधारणा झाल्याशिवाय व हिंदुस्थानांतील प्राचीन व अर्वाचीन कला कौशल्याचें पुनरुज्जीवन केल्या शिवाय आमच्या देशाला उर्जितावस्था येणे कठीण असें आतां ठाम वाटूं लागलें आहे.

उद्योगी राष्ट्राकरितां संधि सदा तयार असते. त्या संधीचा फायदा घेण्यास मात्र सदैव तयार असलें पाहिजे. जपान व अमेरिका या राष्ट्रांनीं गेल्या महायुद्धाची संधि साधून आपापल्या देशांत सोन्याचा धूर निघण्यास लाविलें. इतर देशाप्रमाणें हिंदुस्थानी व्यापारी दळणवळण धोक्याचें व कठीण झाल्यामुळे हिंदुस्थानालाहि ही संधि आली होती पण ती साधली मात्र नाहीं. अमेरिकेचा परराष्ट्राशीं व्यापार १९१३ सालीं ६०००००००० डॉलर्सचा होता तो १९१८ त २०३१०००००० डॉलर्सचा झाला ह्मणजे त्यांनीं आपल्या उत्पन्नाची वाढ जवळ जवळ चौपटीनें केली. हिंदुस्थाननें कांहींच फायदा मिळविला नाहीं असें नाहीं,परंतु त्यांतील बहुतेक भाग परकी लोकांकडेच गेला.अशा वेळीं स्थानिक उत्पन्न वाढविलें असतें देशी कच्चा माल, देशी कष्टमेहनत व देशीं तयार माल झाला असता तर या कष्टमेहनतीरूपी फायदा परकीयांकडे न जातां त्यांवर बिचाऱ्या हजारों गरीब. दुबळ्याचा निर्वाह चालला असता; पण ती अपूर्व संधि गेली ह्मणूनहि स्वस्थ बसतां कामा नये. नवीन उद्योग धंद्याचें ज्ञान लोकांस करून दिलें पाहिजे. तत्प्रीत्यर्थ लागणारा कच्चा माल आपल्याच देशांत मिळविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत मग ते भूमिगत,भूस्तर किंवा भूपृष्ठावरचे असोत, ते पैदा करण्याची विद्या मात्र देशभर फैलावली पाहिजे.कच्च्या मालाची विपुलता झाल्यावर यंत्र कला व शास्त्रीय ज्ञान यांच्या सहायानें पक्का माल तयार करण्याची कृति,तो फायदेशीर पडावा ह्मणून थोड्या मेहनतींत अधिक माल तयार होण्याची युक्ति व त्याच्याशीं स्पर्धा करणाऱ्या मालाशीं टिकण्याची कलत्ति यांचें ज्ञान संपादन केलें पाहिजे.

सर्व खरें. पण 'सर्वारंभा स्तंडुला प्रस्थमुलाः' या न्यायानें उपरोक्त कार्य द्रव्याभावीं तडीस जाणें शक्य नाहीं हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. ह्मणून ठिकठिकाणीं पतपेढ्यांचीं स्थापना होऊन त्यांच्या कडून किंवा इतर भांडवलवाले लोकांकडून अशीं कामें करणाऱ्यांना वेळोवेळ मदत झाली पाहिजे. या प्रीत्यर्थ ह्मटणारे उच्च ज्ञान संपन्न असले तर तें अत्युत्तमच आहे.

विशेष आनंदाची गोष्ट ही आहे कीं, कांहीं तरूण होतकरू मंडळी स्वखुषीनें व आवडीनें या मार्गाचें अवलंबन करून आपल्या इतर बंधूस कित्ता घालून देत आहेत यावद्दल त्यांचें अभिनंदन करावें तेवढें थोडेंच आहे कारण त्यांच्यांवर आमची सांपत्तिक उन्नति अवलंबून आहे.

नवीन वर्षारंभ

येत्या अंकापासून भारताच्या नवीन वर्षास आरंभ होणार असल्यानें, ज्या आश्रयदात्यांकडून अजून वर्गणीची फेड झाली नसेल, त्यांनीं कृपा करून आपापली वर्गणी टपालानें पाठवून आह्मांला आभारांत ठेवावें 'भारता'चे देशहितेच्छु एजंट हे वसुलीच्या कामांत नेहमीप्रमाणेंच चिकाटी दाखवतील अशी आशा आहे.

मॅनेजर भारत

स्फुट विचार

पोर्तुगालची स्थितिः— पोर्तुगालांत रिपब्लिक राज्यपद्धतीची प्राणप्रतिष्ठा होऊन दहा वर्षापेक्षां जास्त काळ लोटला; परंतु कोणत्याहि देशाची प्रगति होण्याला अत्यंतावश्यक अशी जी शांतता तिचा लाभ अजून पोर्तुगालला झाला नाहीं, ही फार दुःखाची गोष्ट होय ! तेथील सध्याचें राजकीय वातावरण इतकें प्रक्षुब्ध झालें आहे कीं; त्यावरून पोर्तुगीज लोकांची भविष्यकाळीं काय स्थिति होईल, हें सांगणें फार कठीण आहे ! भर रस्त्यावर खून, दरवडे, संप इत्यादि अनिष्ट प्रकारांस जणूं काय ऊतच आला असल्यामुळे, वास्कोडिगामाची पूज्य मायभूमि सुधारणा पंथ आक्रमिण्यास कधींच लायक न होतां केव्हां तरी काळाच्या विशाळ पोटांत गडप होईल, अशी भीति वाटावयास लागली आहे ! ही आमची भीति निराधार ठरो !

भारतोदयः— रिवण येथील 'हिंदुसमाजाच्या चालकत्वाखालीं वरील नावांचें मासिक गेल्या शिवरात्रीपासून प्रसिद्ध व्हावयास लागलें असून त्याच्या पहिल्या अंकाची भेट आह्मांस आली आहे. 'भारतोदयां'तील उपयुक्त विषयामुळें तो सर्व ठिकाणीं लोकमान्य होईल अशी खात्री वाटते. शास्त्रीय विषयांची अभिरुचि उत्पन्न करून समाजांत उद्योगधंद्याची वाढ होण्याप्रीत्यर्थ अव्याहत झटण्याचें सदरहू मासिकाचें सांप्रतच्या काळास सर्व दृष्टीनीं योग्य असेंच उच्च ध्येय असल्यावरून 'भारतोदयाला' विशेषतः तरुणांकडून बराच आश्रय मिळेल असेंहि आह्मांस वाटतें. या मासिकाची भरभराटी होऊन, हिंदु समाजाच्या देशहितवर्धक हेतूंस मूर्त स्वरूप थोड्याच अवधींत प्राप्त होवो, असें अंतःकरणपूर्वक इच्छितों.

सरकारी शेतकी खातें:— या खात्याच्या पुणेरी शास्त्रज्ञाकडून कुठें कुठें भुइमुगाचें बीं पाठविण्यात आलें असून, त्याच्या पिकासंबंधीं सविस्तर माहिती मागवून रावबहादुर केळकरांच्या सहीनें कित्येकांस 'विनंतिपत्रें'हि गेलीं आहेत, असें समजतें. अशा सारखीं 'महत्वाचीं' कामें करण्यास श्री. केळकरांसारख्या ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध 'शेतकऱ्यांची' आह्मांस खास गरज नव्हती ! ५०० । ७०० रुपयांच्या भक्कम पगाराचें रूपांतर जर वरील सारख्या परोपदेशी पांडित्यां'च्याच गोष्टींत व्हावयास लागलें, तर शेतकीखात्यासंबंधीं लोकांत वाढत असलेल्या असंतोषांत भर पाडण्याखेरीज त्यापासून दुसरें कांहीं निष्पन्न होईल असें आह्मांस वाटत नाहीं ! बुद्धिवाद व युक्तिवाद सांगणारे लोक आमच्यांत कमी आहेत, अशांतला बिलकूल प्रकार नाहीं. आह्मांस 'कृतीनें' शेतकी सुधारणा घडवून आणणारे तज्ज्ञ पाहिजे आहेत. व हें 'कृतीचें' कार्य सांप्रतच्या शेतकी नोकरशाहीकडून होत नसेल तर तीनें लोकमतांकडे तरी नजर पुरवून दुसरा कसलाहि धंदा स्वीकारावा, अशीं सूचना आहे. बाकीं घाम निघेपर्यंत काम केल्याशिवाय सरकारी तिजोरींतून नियमितपणें दाम उपटणें हें शुद्ध 'संभावित लुटारूपणाचें' लक्षण आहे, हें कोणीहि कबूल केल्याशिवाय रहाणार नाहीं.

पुन्हां एकदांः— 'प्रागतिक संघ' व 'विद्यार्थी सहाय्यक फंड' या दोन्हीं संस्थांचीं ध्येयें यशस्वी होण्यास, त्यांच्या प्रचारकांनीं मनस्वी झटलें पाहिजे, हें आह्मीं पुन्हां एकदां येथें निक्षून सांगतों. प्रचारकांच्या कार्यावर संस्थांच्या प्रगतीची इमारत उभारली जाणार आहे. अर्थात ज्या मानानें तें कार्य कळकळीनें व निस्वार्थ बुद्धीनें होईल त्या मानानें ती सुदृढ व टिकाऊ होणार आहे. न पक्षां 'प्रचारक' शक्तींचा व्यय 'नकली एकोप्याच्या' गोष्टी कथनांतच होऊं लागला, तर आहे त्या परिस्थितींत विशेष फरक पडेल असें आह्मांस मुळींच वाटत नाहीं.प्रचारकांनो, उठा, कंबरा बांधा व एकदम कार्यास सुरुवात करा ! शुभस्य करण शिघ्रं !

गोवा विद्याप्रसारक मंडळः— फोंडें येथील या देशसेवेस वाहून घेतलेल्या संस्थेच्या चालक मंडळीनें गव्हर्नर साहेबांची मुद्दाम भेट घेऊन संस्थेला बरीच महत्वाचीं मदत मिळवून देण्याचें श्रेय संपादन केलें हें त्यास भूषणावह होय. तसेंच इतर व्यापारी गृहस्थांचेंहि सहाय्य प्राप्त करून घेण्याप्रीत्यर्थ आमचे प्रेमळ व्यवसायबंधु श्री. रामचंद्र पांडुरंग वैद्य व सीताराम केरकर, 'विद्याप्रसाराचे' सन्माननीय संपादक व सेक्रेटरी, या उभयतानीं दाखविलेली चिकाटी त्यांच्या अंतःकरणांत वसत असलेल्या जनहिताच्या खऱ्या कळकळीचें खासें प्रत्यंतर असल्यानें आह्मीं त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करून 'विद्याप्रसारक मंडळाची' दिवसें दिवस भरभराटी होवो, असें परमेश्वरापाशीं मागतों.

आभार प्रदर्शन

पांचव्या वर्षाचा हा शेवटचा अंक असल्यावरून ज्या ज्या गृहस्थानीं निःस्वार्थ बुद्धीनें भारताला निरनिराळ्या रीतीनें मदत पुरवून त्याकडून देशसेवा करून घेतली त्यांचे सद्गदित अंतःकरणानें आभार मानल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं.

उदार आश्रयदाते, विद्वान लेखक (विशषतः श्री. सारस्वत व एस् एच) उद्योगप्रिय जाहिरातीं देणारे, प्रेमळ वाचक व अभिमान्युक्त उत्साही कंपोझिटर यांच्याच सहाय्यानें भारत थोडीबहुत देशसेवा करण्यास शकला हें आह्मीं येथें प्रसिद्धपणें कबूल करून, उपरोक्त सेवेचें सर्व श्रेय त्यांसच अर्पण करण्यास आह्मांला मोठी धन्यता वाटते. हे सर्व भारतमित्र यासालाप्रमाणें पुढेंहि आह्मांला मदत करून देशहिताचें कार्य अखंड चालवितील अशी सबळ आशा आहे.

संपादक

'—येत्या महिन्याच्या पहिल्या तारखेपासून 'उ'येराल्द' पत्र पुन्हा सुरू होईल अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे.

ANO VI — NUMERO 1 — 1921 QUEPEM QUINTA-FEIRA 24 DE MARÇO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA......... 3-08-00
NUMERO AVULSO......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत

BHARAT

गोविंद पुंडळीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)........ ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास.......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें. केपें, गुरुवार, तारीख २४ माहे मार्च सन १९२१ अंक १ ला.

O BHARAT

Com o ano que decorreu, o *Bharat* completou um lustro.

¿Que fez ele durante o longo periodo de cinco anos, que serviços prestou ao Paiz e que de sacrificios se impôs para lialmente cumprir á risca o programa traçado na primeira coluna do primeiro numero do seu primeiro ano?

Não nos compete responder a este triplice questionario. Fa-lo-há a Historia com o seu criterio analitico e espirito justiceiro, subordinados á imparcialidade que torna todo e qualquer *veridictum* da *Mestra da Vida*, absolutamente insuceptivel de recursos de agravo ou apelação.

Ao iniciar, portanto, o 6º ano da sua publicação, o *Bharat* tem muito pouco a dizer ao seu generoso e amavel publico ilustrado, a não ser que continuará a trabalhar pelos sagrados interesses da terra natal que com todas as veras da sua alma estremece, com os mesmos sentimentos que presidiram sempre á sua obra o que por outras palavras sinifica que o *Bharat* há de trilhar, enquanto vida tiver, o caminho recto e porisso mesmo mais curto que está habituado a percorrer, desde o principio.

E para isso conta-é superfluo acentuar-com o dicidido e cordeal apoio dos seus estimáveis leitores que sempre o animaram e protegeram por uma forma tão cativante e patriotica que o *Bharat*, pobre na materia da retorica não possui expressão adequada para lhes exteriorisar, em toda a plenitude, a sua gratidão.

Dito isto, vai ele adiante que a comoção lhe embarga a voz.

Dardos e Cardos

Ajudas...

Todo o funcionario é remunerado, porque...é funcionario. Para ele poder mexer-se, precisa ser *ajudado*. O direito á remuneração é criado pela qualidada funcional, representando a *ajuda* o premio do trabalho.

Um chefe da conservação de estradas recebe ao cabo de mez uns tantos mil reis, porque é *filho* do Estado; mas sem que seja *ajudado*, não é capaz de inspeccionar estrada alguma, por muis rial que seja!

Ajudas, eis tudo !

E há quem condene a empregomania, profissão que é a mais garantida de todas, oficio que menos sacrificios exige e vida que menos di-sabores proporciona.

E, depois há *ajudas* que ajudam ajudar, á custa do *pai*, toda a sorte de ocios e toda a casta de *prazeres*, quando, haja *costas* quentes...

O sr. Kelker

Todos conhecem éste *portento*. .agricola de Poona que de mais a mais. é um Rau Saheb, isto é, titular dos quatro costados.

Ora o nosso governo colocando o no já achatado nariz *mostardado* das Comunides prestou relevantes serviços se não á nossa agricultura pelo menos á *bolsicultura* do britanico *saiba* cuja agricola atenção, segundo se rumoreja por ai fora, acha-se concentrada, unicamente, na colecção de maior quantitativo de dinheiro sonante, á custa de chorudas *ajudas* que-faça-se a justiça-ajudam preponderantemente a grande obra de aliviar o erario publico do insuportavel peso do mesmo.ar... dinheiro *sonante*.

E' felisardo o nosso tecnico como os seus demais ajudadores!

E a agricultura?

Que o demo a carregue !

Agricultura ? Administrem ás raizes das plantas uma bôa doze de instrucções.. *papiricas*, reforçada com uma porção *quantum satis* de prelecções tecnicas e mais *pos de ossos* em que na opinião do sr. Kelker reside a salvação agricola do nosso essencialmente agricola Paiz.

Agricultura? Que a proteja o Separado se o quizer.

Milhoramentos

O ún;co serviço de automoveis que a maravilhosa Comissão de Milnoramentos está prestando ao Paiz, vai milhor, graças aos patrioticos esforços do sr. Maravilhas !

ECOS & CRITICA

Regime de papelada

Um dos piores males que enfermam a nossa acção administrativa é o regime de papelada. Por mais insignificante que seja uma ptetenção, tem de esta passar por mileuma formalidades, até a sua *rial solução*. Se o interessado não entrar em qualquer repartição, munido da paciencia socratica, é possivel que caia lá *sem sentidos* diante dum longo e vistoso cortejo das belas belesas do belo regime de papelada.

Não pode ser. O regime de papelada tem de ser abolido, isto é, reduzido á sua expressão mais simples, porque da forma como se encontra organisado não faz nenhum sentido: faz sò perder sentidos ao tal interessado.

Torna-se, porisso, necessario que os governantes adoptem sobre o assunto providencias urgentes que reorganisem o mesmo regime, por forma que a gente não tenha que perder tempo e dinheiro que supomos ser dalgum valor nesse periodo de *vacas magras*.

Digne-se de faze-lo, sr. Governador Geral.

Jornal do Comercio

Agradecemos a visita deste nosso presado colega da Metropole que defende os interesses da India por uma forma tão brilhante que o torna, sob todos os pontos de vista, digno da grãtidão dos filhos desta terra.

Nos numeros que recebemos lêmos sensacionais artigos da lavra do distincto colonial e grande estadista sr. dr. Santana Rodrigues.

Muito obrigados, pois.

Urge providenciar

Recebemos a seguinte carta:-

A saltiagem por ser um recurso facil ao alcance de quem tenta apoderar-se do alheio, surpreende o publico, neste concelho em varias partes.

No dia 17 de janeiro p. f. foram roubadas duas casas na cassabê de Bicholim com arrombamento de portas, ás duas horas de noite: sendo uma situada nos arrabaldes da mesma e em que existia a roupa e outros ojectos do sr. capitão reformado Afonso Mendes, tendo os gatunos levado os panos da sela de vestir, e outros objectos do valor total de quase 1000 rupias.

As caixas que continham aqueles objectos foram encontradas desmanteladas em um predio de Bordem !

A outra casa era dum jornaleiro chamado Douló situada no bairo Gaudiacho vaddó, e o qual sofreu o prejuizo de trinta rupias em notas, vasos de cobre, panos e outros uteusilios do valor de mais de 40 rupias !!

Até hojé não se descobriu o paradeiro dos gatunos.

Consolava-nos porem a grata noticia de que o ilustre administrador do concelho tomara telegraficamente medidas urgentes, ordenando aos respectivos regedores " para que tomassem relação dos objectos roubados para as necessarias indagações nos outros concelhos."

E ainda que se diga que "raras vezez se descobrem nesta terra os autores dos... crimes; circustancias fortuitas só contribuem para que em uma ou outra ocasião caiam sob o rigor da lei, e das autoridades pouco ou nada se pode esperar" por momentos todavia nos animaram aquelas medidas urgentes do ilustre chefe do concelho, incutindo-nos a certesa plena de que não havia que recear mais proezas dessas:

Mas infeliz foi o concelho nessas "coisas nossas" !

Pois começaram de novo as proezas e no dia 15 do corrente arrombou-se á alta noite a casa de Pennado Afonso, situada no bairo dos ourives da cassabê e levaram-lhe 100 rupias em moeda, roupa joias de oiro, e outros objectos do valor total de mais de 800 rupias ! ! !...

Tem produzido isto, porisso, pánico nos habitantes daqui.

Venham portanto *novas medidas* alem das já adoptadas, que ponham termo difinitivo á terrivel saltiagem

Podemos espera-lo ?

X. Dias

N. da R. Secundando o justo pedido do nosso solicito correspondente, esperamos tambem a nosso turno, nao interrogativamente, mas afirmativamente, que as autoridades administrativas e policiaes do concelho de Sanquelim

भारत

गुरुवार फाल्गुन शु० १ दा १८४६

पांच वर्षानंतर !

॥ सत्कार्यी ज्याचा दृढ निश्चय।
त्याला कधीं नये अपजय ॥

पांच वर्षे संपून, आजच्या अंकानें भारत प्रकाशनाच्या सहाव्या वर्षास प्रारंभ झाला! या अवधींत त्यावर नाना तऱ्हेची संकटपरंपरा कोसळली, नाना आपत्तीशीं त्याला टक्कर द्यावी लागली व नाना अडचणीशीं त्याला झगडावें लागलें; परंतु परमेश्वर कृपेनें तितक्यांतूनहि तो सुरळीतपणें निभावून पूर्वीपेक्षांहि जास्ती उत्साहानें, जास्ती नेटानें व जास्ती धैर्यानें आपल्या पवित्रमायदेशाची व उदार देशबांधवांची सेवा करण्यास शक्य होत आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय.

गेल्या पांच वर्षांत भारतानें कोणती देशसेवा बजावली, याचा आढावा काढणें त्याचें काम नाहीं. तें कर्तव्य इतिहासाचें आहे. भारताच्या कामगिरीवर इतिहास जें कांहीं आपलें निःपक्षपाती मत देईल तेंच मत खरें असूं शकेल, हें कोणीहि कबूल करील. निदान आमची तरी वरीलगोष्टीवरच पूर्ण श्रद्धा आहे.

भारताच्या भूतकालासंबंधीं आम्ही आणखीं जास्ती कांहीं लिहूं इच्छित नाहीं. भविष्यकाळाविषयीं ह्मणाल तर मात्र इतकेंच जाहीर केलें ह्मणजे पुरे आहे कीं, टांकाची कारवाई करण्यांत व कागदी घोडे नाचविण्यांत धन्यता न मानतां, भारत, ठरलेल्या देशकार्याकडे जाणाऱ्या मार्गाचेंच आजपर्यंत व्यक्त केलेल्या धैर्यानें आक्रमण करील. मग या कामीं कितीहि त्रास सहन करावा लागला तरी त्याला त्याची पर्वा नाहीं. 'धक्के चपेटे' खाणें हें त्याचें ब्रीदच होऊन बसलें आहे !

परंतु कितीहि आपदा सोसण्याची भारताकडून कडेकोट तयारी असली, कसल्याहि भयंकर संकटांस तोंड देण्यास तो निधड्या छातीनें पुढें सरसावला व कसल्याहि आपत्तीशीं दोन हात करण्यास त्याला काडीचीहि दिक्कत वाटत नसली तरी लोकाश्रयाचें पूर्ण पाठबळ मिळाल्याखेरीज त्याला अंगीकृत कार्यार्थ झटण्यास आवश्यक तितका हुरूप येणें अर्थात् अशक्य असल्यावरून, आमचे प्रियतम व कृपाळू बांधव, आजपर्यंत ज्या देशहित. बुद्धीनें त्यानीं भारताला कुरवाळून धरलें त्याचभावनेनें ते त्याला पुढेंहि मदत पुरवितील, अशी शेवटीं बळकट खात्री बाळगून पांचवर्षानंतरचें हें अल्पसें हितगूज इतक्यांतच आटोपतें घेतों.

—हिंदु विद्यार्थी सहाय्यक संघातर्फे पणजीच्या श्रीमहालक्ष्मीच्या देवालयांत "गोमांतकाच्या उन्नतिप्रीत्यर्थ प्रयत्न" या विषयावर श्री० भोसले, बी. ए. (रायचंदर) यांचें सुश्राव्य व विचारपरिप्लुत व्याख्यान झालें असें एक वाटसरू लिहितात. सभेचें अध्यक्षस्थान श्री. शिवा फट्ट पै आंग्ले या विद्वान तरुणानीं मंडित केलें होतें.

स्फुट विचार

एक शुभ वर्तमानः— बेसुमार बोकाळलेल्या नोकरशाहीच्या नुकसानकारक संख्येस आळा घालण्याच्या धैर्यशाली विचारांत आमचे गव्हर्नरसाहेब गुंतून गेले आहेत. हें शुभवर्तमान कळून कोणाच्याहि अंतःकरणांत आनंदाच्या लाटा उसळल्याशिवाय रहाणार नाहींत. वाजवीपेक्षां फाजील नोकर बाळगणें वैभवसंपन्न राष्ट्रांत कदाचित् पचेल; परंतु आमच्या सारख्या सुदामी राष्ट्रांत या धोरणाचा अवलंब करणें ह्मणजे जाणून बुजून त्याच्या सत्यानाशास कारणीभूत होणे होय, यांत संशय नाहीं. उशिरां कां होईना, हें साधें तत्व नजरेसमोर ठेवून, तदनुसार वर्तण्याची खंबीर इच्छा प्रकट केल्याबद्दल गव्हर्नरसाहेब स्तुतीस पात्र आहेत, हें कोणीहि कबूल करील. डॉ. मोरायस् कृत या 'शुभवर्तमानाची' व्यापकता व त्यापासून सांपत्तिक स्थितींत होणाऱ्या क्रांतीचें खरें स्वरूप, या दोन गोष्टी कळल्याशिवाय एव्हांच प्रस्तुत विषयावर जास्ती चर्चा करणें बरेंच धाडसाचें असल्यावरून यासंबंधीं पूर्ण माहिती मिळतांच आमचे विचार प्रदर्शित करण्याचें कर्तव्य ठेवून, सध्या येथेंच विसावा घेतों.

हा घ्या पुरावा !:— वरिष्ठ सरकारच्या दिवाळखोरपणामुळें तिजोरीची स्थिति हलाख बनल्याची ओरड आज कित्येक दिवसां पासून आम्हीं करीत आलों आहोंत. एकंदर लोकपक्षीय पत्रांनीं उपरोक्त अदूरदृष्टिदर्शक धोरणाबद्दल वेळोवेळीं नापसंती व्यक्तकरून तें बदलण्याविषयीं सरकारास योग्य शब्दांनीं सुचविलें होतें. परंतु लोकसत्ताक सरकारनें लोकमताची बिलकूल पर्वा न करतां आपलें स्वार्थी वर्तन तसेंच अबाधित चालू ठेविलें! आतां अशी स्थिति प्राप्त झाली आहे कीं, नोकरशाहीच्या मासिक वेतनास पुरेसे पैसेसुद्धां तिजोरींत शिल्लक नसून, ज्या नोकरांस २००।३०० वर रु० दरमहा पगार द्यावा लागतो त्यास ५० वर रुपये मिळत नाहींत! सरकारी तिजोरींत पैसे नाहीत व भरपूर पगाराशिवाय नोकरशाहीचें 'पोटगाडें' चालत नाहीं, असा 'इकडे आड व तिकडे विहीर' प्रसंग ओढवला आहे. 'आतां तरीपुढें' वर्तमानपत्रकर्त्यांच्या उपदेशानुरूप सरकार आपलें धोरण आंखून, सांप्रत ज्या बिकट परिस्थितीशीं त्याला झगडावें लागत आहे, तशी परिस्थिति फिरून उत्पन्न न होण्यासाठीं कसून प्रयत्न करील अशी आह्मांस आशा आहे. कसल्याहि नाटकांत झालें तरी रुपयांचें सोंग आणणें कठिण असतें, याचा उपरोक्त उदाहरण हा उत्तम पुरावा नव्हे काय?

नोकरशाहीची चळवळ— निरनिराळ्या खात्यांतील नोकरांचा पगार भिन्नभिन्न असल्यावरून, ही भिन्नता नष्ट होऊन सर्व ऑफिसांतील लोकांच्या वेतनांत समता असावी, एतदर्थ येथील नोकरशाहीनें जोराची खटपट चालविली आहे. सर्व साधारण रीत्या एकंदर खात्यांची योग्यता एक सारखीच असतां, थोड्या खात्यांतील लोकांस बेसुमार जास्त पगार मिळावा व थोड्या खात्यांतील नोकरांस बेसुमार कमी देण्यांत यावा, हें कोणत्याहि दृष्टीनें योग्य नाहीं. समतेच्या भक्कम पायावर उभारलेल्या राज्य पद्धतीस तर ही गोष्ट अत्यंत लाजिरवाणी होय! अशा स्थितींत उपरिनिर्दिष्ट चळवळीचें कौतुक वाटणें साहजिकच आहे. मात्र असें आहे कीं, समतेच्या [illegible] करतानां, ज्या खात्यांतील नोकरांचा [illegible] र कमी आहे, तेंच प्रमाण ठेवण्यांत यावें. असें झाल्यासच [illegible] रीस फायदा होणार असून उपरोक्त सम[illegible] चळवळीपासून लोकांस खरें समाधान [illegible] णार आहे. नाहीं तर 'सगळें [illegible]' असाच प्रकार होण्याचा संभव फार.

बाप दाखवा, नाहींतर श्राद्ध बाढा

महाशय, तुमची ती परिषद् कुठें गेली ?

कांहीं महिन्यांमागें आपल्या लोकप्रिय भारतानें अखिल गोमांतकीय हिंदु-परिषदेची प्राणप्रतिष्ठा लवकरच होणार असल्याचें शुभवर्तमान प्रसिद्ध केलें होतें. अलिकडे जाग्रत होत चाललेल्या हिंदुसमाजांत या बातमीनें विलक्षण खळबळ उडून गेली व या कल्पनेचा सर्वत्र आदरानें, उत्साहानें व कौतुकानें विचार होऊं लागला. परिषदेची आवश्यकता व उपयुक्तता हीं सर्वांस पूर्णपणें पटली असतां तिच्या शक्यतेसंबधीं एक दोन लेखकांनीं संशय प्रदर्शित केल्यावरून या महत्वाच्या विषयाची भारत पत्रांत

> **'भारत हमारा देश है'**
>
> भारत पत्र सर्व जनतेचें असल्यावरून खऱ्या देशहित बुद्धीनें पाठविलेल्या लेखांस केवळ हक्क ह्मणून साभार-पूर्वक स्थळ दिलें जाईल.
>
> संपादक

बरीच चर्चा झाली व शेवटीं परिषदेच्या कल्पनेस लोकमत बरेंच अनुकूल आहे असें पूर्णपणें दिसून आलें. वरील वादविवादाच्या समारोपांत भारतानें एकंदर शंकांचें समाधान करून व हिंदुपरिषदेची अवश्यकता उपयुक्तता व शक्यता हीं लोकांच्या निदर्शनास आणून देऊन सर्वांनीं आपल्यांतील दुरीभाव्याला फांटा देऊन, भेदभाव बाजूस ठेऊन व देशहिताच्या उच्च भावनेनें प्रेरित होऊन [illegible] अस्त्वांत येण्यासाठीं व ती पू[illegible] करण्यासाठी शक्य ते प्रयत्न [illegible] चळवळीचा व आग्रहाचा इ[illegible] पारा दिला. या समारोपापूर्वी श्रीयुत भास्करराव सरदेसाई यांनीं भारतमध्यें प्रसिद्ध झालेल्या आपल्या पत्रांत केलेल्या विनंतीस अनुसरून परिषदेंत भाग घेऊं इच्छिणाऱ्या बऱ्याच गृहस्थांनीं आपलीं नांवें भारतांत प्रसिद्ध करण्यासाठीं पाठविलीं.

हीं नांवनिशी जादापत्रकांतून प्रसिद्ध करण्यांत येईल असें भारत पत्रांतून जाहीर रीतीनें अश्वासन देण्यांत आलें होतें. या होऊं घातलेल्या परिषदेसंबधीं अलिकडे सर्वत्र सामसूम दिसून येत आहे. प्रवर्तकांकडून या बाबतींत कांहींच खुलासा प्रसिद्ध झाल्याचें पहाण्यांत किंवा ऐकिवांतसुद्धां नाहीं. याचा अर्थ काय! लोकांनीं या बाबतींत काय समजावयाचें? श्रीयुत भास्करराव सरदेसाई व आपण स्वतः यांच्यावर या बाबतींत बरीच जबाबदारी येते; हें उघड आहे. मीं परिषदेचा पूर्ण हितचिंतक असून या संस्थेच्या कार्यास काया वाचा मनानें हातभार लावण्याचा माझा दृढ निश्चय असल्यावरून मीं माझें नांव आपणाकडे पाठवून दिलें होतें. आणि याच नात्यानें या हिंदुपरिषदेच्या बाबतींत आपणाकडे जाब विचारण्याचें कर्तव्य मीं करित आहें. तेव्हां माझ्या स्पष्टोक्तीबद्दल क्षमा करून या संबंधाचा खुलासा आपण कराल अशी मलाआशा आहे कळावें हे वि.

उत्तम वामन देसाई

[श्री. देसाई यांकडून विचारण्यांत आलेल्या जाबाचा खुलासा करण्यास आजच जरी आह्मांस अवकाश नसला, तरी त्यांस आह्मीं इतकें सांगण्यास शकतों कीं, हिंदुपरिषदेची कल्पना नष्ट झाली नसून तिला लवकरच मूर्त स्वरूप येणार आहे, याची त्यांनीं पूर्ण खात्री बाळगावी]

संपादक

Essa ... dom ... icipali ... tra, Ujj ... culos ... muito c ... sercio po ... conc ... há ... ent Sm ... India, ... re ... pleto a ... ão. ... muni

आभार स्वीकार

वैद्यमित्र (मासिक):— हें मासिक मुंबई येथें आयुर्वेदमार्तंड श्री. रघुनाथ अनंतशास्त्री पटवर्धन यांच्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध होत असतें. यांतील विषय वैद्यशास्त्र दृष्टीनें अत्यंत उपयुक्त व महत्वाचे असतात. वैद्यलोकांस तर सदर्हु मासिकापासून बराच उपयोग होणार आहे, असें आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या अंकांवरून ह्मणण्यास हरकत नाहीं.

महाराष्ट्र—सारस्वत (त्रैमासिक) :— हें उपयुक्त त्रैमासिक श्री. गणपत विश्वनाथ लाड व वामन मंगेश दुभाषी यांच्या संपादकत्वाखालीं मुंबई येथें प्रसिद्ध होत असतें. यांतील विषय मुख्यतें सारस्वत ज्ञातींच्या उन्नतीस अत्यंत पोषक असून, सर्व दृष्टींनीं भारदस्त असतात. लोकाश्रयास पात्र.

वर्तमानसार

—गेल्या आठवड्यांत शिरवडें येथील श्री शिवनाथाच्या देवालयांत आमच्या संपादकांचें 'हेंचि देवासीं (देशासीं) मागत चरणसेवा अखंडीत' या नामदेव महाराजांच्या अभंगावर प्रवचन झालें. तळावली, येथील श्री महालक्ष्मीच्या देवालयांतहि [illegible] आठवड्यांत, आमच्या संपादकांचें 'देह जावो ... अथवा राहो' या श्लोकीवर दुसरें प्रवचन झालें.

—सरकारी नोकरांची संख्या योग्य प्रमाणावर आणण्याप्रीत्यर्थ गव्हर्नर साहेब नेटाचे प्रयत्न करीत असल्याचें कळतें. स्तुत्य!

—शिरवडें येथील श्री शिवनाथ वाचनमंदिराची स्वतंत्र इमारत तयार झाली असून; लवकरच सदरील वाचनालयाची स्थापना तींत होणार आहे, असें एक वाचक कळवितात.

— गोवा नीतिवर्धक व शिक्षणप्रसारक मंडळाच्या पहिल्या परिषदेस हजर रहाण्याविषयीं आलेल्या आमंत्रणाबद्दल आह्मी आभारी आहोंत.

—प्रागतिक सभेची घटना विद्याप्रसार पत्रांत प्रसिद्ध व्हावयास लागली आहे. त्याकडे सर्व हिंदूंनीं नजर पुरवावी, अशी त्यांस आमची अल्पमत्याची विनंति आहे.

ANO VI — NUMERO 2 — 1921   QUEPEM   QUINTA-FEIRA 31 DE MARÇO

Govinda P. Hegde Dessai
Director e Editor

Assinaturas
India Portuguesa...... 3-00-00
India Inglesa............ 3-08-00
Numero Avulso.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत

BHARAT

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें.   केपें, गुरुवार, तारीख ३१ माहे मार्च सन १९२१   अंक २ रा.

Conselho Legislativo

Entrou em acção com seus novos vogais eleitos êste Conselho, *dadiva* da *nova* Carta Organica.

A imprensa do Paiz pronunciou-se, em tempo, sobre o valor politico do mesmo diploma que na sua opinião, é *edição piorada* da extincta autonomia.

Apesar disto, porem, animanos a certesa de que os vogais eleitos, alguns dos quais são patriotas de reconhecida competencia, hão de envidar os seus melhores esforços no sentido de termos uma autonomia digna dêste nome e digna dum povo civilisado e adiantado como o nosso.

E' para essa nobre missão que eles foram eleitos. Está lhes reservada essa grande obra: concecução duma autonomia autonoma.

No concelho Legislativo figura tambem elemento popular, conscio das mais urgentes necessidades do Povo que o elegeu. Cabe-lhes, porisso, a obrigação de, a qualquer titulo ou pretetxo que seja, não sobrecarrega-lo de impostos.

É' que está exausta a *capacinade contribuitiva* do contribuinte do Estado da India onde o proletariado está lutando com serias dificuldades da vida.

Deseja o Conselho Legislativo promover milhoramentos?

Faça-o a dentro dos recursos do tesouro.

Mas dir-se-há: o nosso estado financeiro não permite nenhum milhoramento, tão pobre êle é, actualmente.

Simplifique-se o regime de papelada, reduza-se a sua expressão mais simples a burocracia e haja diminuição de vencimentos fabulosos.

E verá, então, que com a *compressão das despezas*, è possivel, ainda, fazer alguma coisa em beneficio do Paiz.

Medite nisto o Conselho Legislativo!

Ao sr. Governador Geral

De há muito tempo para cá, o sr. Antão, administrador do Concelho está praticando irregularidades no exercicio de suas funcções, motivo que determinou uma representação contra o mesmo funcionario.

Para este assunto de capital importancia, limitamo-nos, por hoje, a chamar a atenção de Sua Excia.

AUTONOMIA

Ninguem é mais interessado nos negocios do seu paiz do que os seus naturais. Porque é perfeitamente natural, sugere Fonblanque, que os que teem n'ele empenhados o seu bem-estar e prosperidade, que serão as primeiras e principais victimas de uma administração negligente ou má, sejam mais competentes em conhecer o que se deve fazer, do que os estranhos, que não teem, por mais bem intencionados que sejam, nem os mesmos conhecimentos nem a mesma experiencia"

Tradições seculares de cultura, tendencia arreigada de autonomia, resistencia persistente, ora activa, ora passiva, a inovações estranhas, espirito de rectidão, respeito notavel pela lei e solido principios de economia são qualidades,que mantidas atravez de seculos de sujeição e de inconsciencia politica, denunciam iniludivelmente capacidade para a gestão parcimoniosa dos negocios publicos. O sentimento da autonomia é uma tradição persistente no povo indiano. Vencido e esmagado na sua exteriorisação, ele subsiste no instincto da raça, donde renascerá, como das suas cinzas, a Pheniz antiga.

O povo da India, diz H. Cotton, tem uma instinctiva capacidade para o *self-government* local. O povo indiano, reconhece Sir John Lawrence, está muito capaz de administrar os seus negocios; o sentimento municipal está n'ele profundamente arreigado. As comunidades de aldeia, cada uma das quais é uma pequena republica, persistindo atravez de seculos de dissolução politica, são exemplo vivo do poder de estabilidade das instituições nativas.

E' de facto, revelação assigurada, que os municipios e as comunas hindus eram instituições representativas de administração autonoma.

Desde a mais alta antiguidade, a India tinha, quais republicas modernas, organisado o seu sistema de administração local. "A existencia de governo local autonomo na India, antiga e medieval é um facto confirmado" A comunidade da aldeia auferia amplos poderes, era soberana na area da sua jurisdição. Embora sob controle superior, exercia a justiça e tinha o direito de *referendum* na promulgação das leis.

Sir Sankar Nair, antigo Ministro de Educação na India, escrevendo na Modern Rewiew, a proposito do *panchayat* aldeão, no Sul da India, conta com minucioso detalhe o processo de eleição dessas assembleas locais entre os anos de 908 a 921, chamando a atenção sobre um facto que tanta agitação desperta na opinião publica actualmente e que afinal, homens d'Estado hindus, n'uma previsão milenaria haviam proclamado: o direito do voto e elegibilidade da mulher. Sir Nair regista que segundo o R. Archeological Depart dos anos citados, as mulheres tinham direito de voto e do comite de justiça pard[illegible]va uma mulher.

Essa [illegible]tonomia subia de ponto no dominio municipal. As municipalidades de Pataliputra, Ujj[illegible] Kanoj, e, nos seculos [illegible]rnos, Vijanagar, muito c[illegible]cida do antigo comercio portuguez, são a mais alta concenção municipal de que há exemplo. Refere Vicent Smith no Barly-Historya of India, que seculos antes de Cristo, as municipalidades hindus realisavam o tipo mais completo do governo autonomo.

A municipalidade de Pataliputra, capital de Chandragupta, estava pela sua alta importancia e enorme extensão, a cargo duma comissão eleita de trinta membros, que devidos em comites de cinco, superintendiam n'uma larga indipendencia sobre as artes e industrias, construções e embelezamento, imigração, saneamento e assistencia, estatistica, registo demografico etc.

É de crêr que um regime municipal tão correto que deixa perder de vista os direitos municipais modernos, não fosse alcançado em curto periodo de tempo; era, sem duvida, lição de seculos. Vicent Smitt regista com notavel desenvolvimento a evolução demorada do sistema municipal na India.

Tal era e espirito da liberdade, tal o respeito pelos interesses do povo, que se pode dizer sem ousadia, nunca o rei promulgou uma lei sem o *referendum* das corporações interessadas. A isto se deveu a prodigiosa prosperidade que fez da India o paiz encantado, que dela fez o objectivo magnetico de todos os aventureiros, o refeitorio anciado de todos os esfomeados. Bernier, dando conta a Colbert, ministro da França do que era a India no seculo XVII, diz:" Este Hindustão é um abismo em que o ouro e a prata encontram milhares de entradas e nem uma só saida.

Para dar idea de como eram modestos todos os ditirambos sobre a opulencia das povoações indianas, basta recordar que, segundo uma estatistica do tempo, só uma aldeia de Bengala exportava o modesto peso de 22.000 fardos de seda. no modico válor de 2-200-000 libras.

Este alto sentimento de livre administração encontrou-o Afonso de Albuquerque, que, no prudente espirito de tolerancia -que é ao mesmo tempo um grande golpe de sagacidade politica- perante um compromisso formal, obrigou-se a não se imiscuir na administração local.

Sir Richard Temple, homem publico inglez, que em 1880 era governador de Bombaim, n'um relatorio que muito o honra, em uma tal e qual indipendencia, estabelecendo um paralelo entre a administração ingleza e a dos estados autonomos, lamenta a excelencia e a prosperidade da administração indigena, sentindo não poder deixar de confessar que dentro do ultimo seculo tinha havido na India não so bons soberanos, mas tambem bons ministros e grandes homens de Estado, taes como em Myssore, Indore Gwallior, Hiderabad, etc.

A Inglaterra, apoz o curto periodo de intolerancia administrativa e legislativa, reconheceu a sombria falencia do seu sistema burocratico centralisado e restabeleceu assustada, já lá vão 35 anos, o self-government local, e hoje, a opinião publica indigena, fortalecida e unificada pelo Congresso Nacional Indiano impoz ao governo inglez uma autonomia provincial larga com a confederação dos estados da India

भारत

गुरुवार फाल्गुन व० ८ मी १८४६

अंतःकरणें एकवटा !

म्हणजे कधींच भंग न पावणारी अशी राष्ट्रहितवर्धक एकी घडून येण्यास मिनिटाचाहि अवकाश नको, हा श्रीस्वामी रामतीर्थ यांचा अमृततुल्य उपदेश प्रत्यहीं नजरेसमोर ठेवून स्वदेशहितार्थ अविश्रांत झटल्याखेरीज स्वराज्याचा पल्ला गांठणें कदापिहि शक्य नाहीं. एकीकडून ऐक्यसंवर्धनाबद्दल चित्ताकर्षक लेख लिहून दुसरीकडून 'उखाळ्यापाखाळ्यां'नीं आपल्या सैतानी वृत्तीस वहकूं देणारे प्राणी कदाचित् उत्तम लेखक असूं शकतील, परंतु ते स्वदेशभक्त खास नाहींत, अशी आमची प्रामाणिक समजूत आहे.

आत्मप्रौढीसारख्या नीच मनोवृत्तीस बळी पडून दुसऱ्यांचे चावे घेण्यांत ज्यानां आपण स्वदेशाची उत्तम कामगिरी बजावतों असें वाटतें त्या व्यक्तींकडून वास्तविक कोणाचेंच हित होत नसून, उलट त्यांचा स्वताचाच मात्र हटकून नाश होत असतो, असा शहाणे लोकांचा अनुभव आहे. अशी खरी स्थिति असतां देशहिताच्या अगडबंब नावांखाली समाजांत व्यक्तिद्वेषानें हैदोस घालण्याचा ज्या कांहीं प्रेमशून्य, स्वार्थी व आपमतलबी गृहस्थांकडून प्रयत्न होत आहे त्याला काय म्हणावें? परस्परांची अंतःकरणें बुद्धिपुरस्सर दुखविलीं गेलीं तर तीं लवकर एकवटण्याच्या स्थितीला पोंचतील काय? परकीयांकडून भलभलत्या मिषानें त्रास दिले जातात त्यांचा उखाळ्या पाखाळ्यानीं वचपा भरून निघेल काय?

तात्पर्य, अंतःकरणें एकवटून दृढतम ऐक्यानें स्वराज्याची पवित्र गुढी रोवण्यास व्यक्ति द्वेषासारख्या निंद्य गोष्टींस कायमचा फांटा देणें जरूर आहे. प्रसंगीं 'वेड्यांस वेडे म्हणूं नये, वर्म कोणाचें बोलूं नये, ही श्री समर्थांची शिकवण सतत ध्यानांत बाळगून कसलाहि गाजावाजा न करतां राष्ट्र देवतेप्रीत्यर्थ आत्मसमर्पण करण्याला एका पायानें पुढें सरसावल्यासच मात्र स्वदेशोद्धार होणें शक्य आहे.

एकीशिवाय आमचा निभाव नाही, अशी ज्यांची पूर्ण खात्री झाली आहे त्यानीं यापुढें तरी द्वेषमूलक विचारांस किंवा लेखांस बिलकूल थारा देतां कामा नये. 'दुसऱ्याच्या दुःखें दुखवावें। परसुखें सुखवावें॥ प्राणिमात्र मेळवावें। बऱ्या शब्दें' ही श्री समर्थांची शिकवण कृतींत उतरविण्याचा ज्याला त्याला हव्यास लागल्याखेरीज अंतःकरणें एकवटण्याची आशाच नको. व जोंपर्यंत परस्परांचीं अंतःकरणें प्रेमग्रंथीनीं जखडलीं जाणार नाहींत तोंपर्यंत देशहिताच्या लंबेलंबे बाता निवळ वल्गना आहेत! अंतःकरणें एकवटा! हा स्वामीरामतीर्थांचा दिव्योपदेश मनःपटलावर खोदून तदनुसार कर्तव्यदिशा आंखल्यासच 'स्वराज्याचें' अंतीम ध्येय हस्तगत होणें शक्य आहे. नुसत्या बेजबाबदार चकाट्यानीं व अभिमानशून्य लेखानीं देशोन्नति साधण्याची मनीषा बाळ-

स्फुट विचार

सारस्वत ब्रा. समाजः—मडगांवच्या या संस्थेच्या वाढदिवसोत्सवास येत्या महिन्याच्या ९ तारखेला सुरवात होऊन त्याच महिन्याच्या १५ तारखेला उत्सवसमाप्ति होणार आहे. उत्सवाचा कार्यक्रम व व्याख्यात्यांची पात्रता या संबंधी योग्य ती माहिती याच अंकांत दुसरीकडे प्रसिद्ध झाली असल्यामुळें तिचा येथें पुनरोचार करण्याचें कारण नाही. समाजानें उघडलेल्या या पवित्र ज्ञानसत्रांत आमचे प्रेमळ देशबांधव स्वागमनानें भाग घेऊन चालकांच्या अविश्रांत परिश्रमाचें चीज करतील अशी आम्हांस बळकट आशा आहे.

आमची 'आवतोनोमी' :— पोर्तुगाल सरकारनें गोवाप्रांत व इतर वसाहतींस अर्पण केलेलें स्वराज्य किती नादान आहे याचें यथार्थ वर्णन केलेला एक मुद्देसूद लेख आजच्या पोर्तुगीज भागांत प्रसिद्ध झाला आहे. प्रस्तुत लेख सध्या पोर्तुगालांत वास्तव्य करणारे आमचे धीरोदात्त व विद्वान प्रांतबंधु डॉ. सांतान रुद्रीगीस यांच्या खंबीर लेखणींतून उतरलेला असून त्याची विचारसरणी येथील एकंदर जनतेस पटल्याखेरीज खास रहाणार नाही. ते आपल्या ओजस्वी लेखाच्या प्रारंभीं म्हणतात "—परकी लोकांचे विचार कितीहि दिलदार असोत, ते आपल्या ज्ञानाची व अनुभवाची कितीहि शेखी मिरवोत व आपल्या औदार्य बुद्धीचें सत्यत्व बिंबविण्याचा कितीहि दांडगा प्रयत्न करोत; परंतु जीत लोक जितक्या उत्तम रीतीनें आपला कारभार पहातील तितक्या उत्तम रीतीनें तो चालविण्यास जेते कदापिहि शकणार नाहींत" आम्हांस काय किंवा इंग्रजी हिंदुस्थानांतील बंधूंस काय, स्वराज्याची आवश्यकता कां आहे, या प्रश्नाचें उत्तर उपरोक्त विचारांत पूर्णत्वानें ग्रथीत झालेलें आढळून येतें, यांत संशय नाहीं.

वर्तमानसार

—कौंसिल्य लेजिस्लातीव्हाच्या बैठकींस कालपासून सुरवात झाली.

—येथील तावेलियांव रा० रा० लिंगुर० दळवी यांच्या विरुद्ध हायकोर्टाच्या अध्यक्षांकडे कुंकळ्ळींतील एका इसमानें फिर्याद केल्याची दाट वदंता आहे!

—इकडील मामलेदार सिं. आंतांव व अन्य एक कामदार यां विरुद्धहि एक फिर्याद गव्हर्नरसाहेबांकडे गेल्याचें कळतें.

—खोरवडा, वांदिवडें येथें आमच्या संपादकांची दोन प्रवचनें झालीं. 'अंतर्यामी आधीं, होईजे निर्मळ, तेणें तुटे मूळ, संसाराचें' व 'हीच थोर भक्ति आवडते देवा (देशा), संकल्पावी माया (आशा) संसाराची, हे विषय होते.

गणें म्हणजे हलाहल प्राशनानें आरोग्यवृद्धीची हांव बाळगण्यासारखें अत्यंत मूर्खपणाचें लक्षण आहे.

प्रिय बांधव हो, अंतःकरणें एकवटा ! आपापसांतील द्वेषभावास कायमची तिलांजली देऊन दिलसफाई घडवून आणा! वाईट मनोवृत्तींस सपशेल मूठमाती देऊन दिलजमाईचा शुभ झेंडा फडकवा!

द्वेष विसरा! उखाळ्या पाखाळ्या काढून भांडूं नका. असें झाल्यासच मात्र अंतःकरणें एकवटून राष्ट्रोन्नति होईल.

शेती वाढवा, व्याख्यानाला चला

कृषिकर्म

उत्क्रांतीस आरंभ झाल्यापासून आजपर्यंत स्वतःचा पाला पातेरा मुळांत पडून तो खताच्या रूपानें शोषण करण्याची पिढीजाद सवय प्रत्येक झाडाच्या जातीस जडल्यामुळें दरएक जातीच्या झाडांस त्याच जातीच्या पालापातेऱ्याचें खत मानवणार हें उघड सिद्ध होत असतें. म्हणून शक्य त्या मानानें सजातीय वनस्पतीपासून झालेल्या खतास मुकूं देऊं नये. याचप्रकारें, फलहीन झाडें बागायतांत असल्यास त्यांचीं पालेंमुळें म्हणून ती नाहींशीं करण्याची चाल आहे. अशा चालीपासून फायद्यापेक्षां बागास नुकसान होण्याचा संभव असतो. त्या झाडांमुळें ऊन्हाचा त्रास बागायतांतील भूमीस बाधत नाहीं. शिवाय, त्यांच्या पाल्यापातेऱ्याचा खताच्या कामीं उपयोग होत असतो. तीं झाडें बागांत मोकळेपणीं फिरण्यास व कष्ट मेहनत करण्यास अडथळा करीत असतील तर फक्त मेरांवरच राखिल्यास हरकत नाहीं. त्या फळहीन झाडांचें किंवा कमी प्रतीच्या झाडांचें साबट उंच प्रतीच्या फलोत्पत्तिक झाडांस होत असेल तर तेवढें साबट मात्र छाटून टाकावें. बहुतेक फलोत्पत्तिक झाडें ओझरती छाया असलेल्या जागीं जन्म, विकास व मरण पावणारीं होत. यामुळें त्यानां तशी अनुकूल परिस्थिति उत्पन्न केल्यावांचून त्यांचा विकास होणें शक्य नाहीं. बागायतांतील फलोत्पत्तिक झाडें ज्या मानानें थोर होत जातील त्या मानानें त्यांचीं पाळें मुळें मोठीं व लांब होत जातात. व दूरचें खत ओढून घेऊन आपला निर्वाह करितात. पण, लांबू, कळक, भिल्ल, केळ, ऊंस इत्यादि झाडाचीं पाळें आकारानें स्थूल न होतां लहानपणापेक्षां मोठेपणीं त्यांचा झुबका विस्तार पावून सभोवार पसरतो. अशा रीतीनें जवळपासचें खत भराभर ओढून त्या झाडांस आपला सदृढपणा संभाळतां येतो. येणेंकरून तेवढी जागा मात्र अगदीं निस्तेज होऊन जात असते, कदाचित्, नैसर्गिकपणें किंवा कृत्रिमपणें सर्वांना भरपूर खत मिळत असल्यास गोष्ट निराळी. तसें नसल्यास, तीं झाडें उपटून बागायतापासून दूर अंतरावर लावावींत.

विशेष ओलावा असलेल्या बागायतांत काजूचीं झाडें असल्यास हरकत नाहीं. पण तशी सोय नसलेल्या बागायतांत तीं झाडें असतील तर ऐन उन्हाळ्यांत म्हणजे ज्या दिवसांत ओलाव्याची फार गरज असते त्या दिवसांत स्वताच्या फळांच्या पोषणार्थ त्या जमिनींतील ओलावा भराभर शोषून घेत असतात. ह्या योगें, त्या भूमींतील ओलावा कमी होत जाऊन त्या मानानें उच्च जातीच्या फलोत्पत्तिक झाडांचें नुकसान होण्याचा संभव असतो. यास्तव, बागायतवाल्यानीं आपआपल्या बागायतांची योग्यता पाहून तशी व्यवस्था राखावी. काजूच्या पाल्यापातेऱ्याचा उपयोग खताच्या कामीं व्हावा तसा होत नाहीं असा अनुभव आहे.

एकाद्या बागायतांत, उंचवटा अगर डोंगर यांपासून येणाऱ्या झऱ्याच्या पाण्याचा उपयोग बागायतास होत असून, त्या डोंगरावर मुजरद लाविलेलीं किंवा स्वाभाविक माजलेलीं झाडें इतर बाबतींत हितावह असलीं तरी झऱ्यांतील पाण्यासंबंधानें हितावह होणार नाहींत, कारण झाडांच्या पानांस उन्हाचा त्रास बाधत असेल त्या प्रमाणानें कमी अधिक वाफ, तीं हवेंत सोडीत असतात. अशा प्रकारचा त्या पानांत असलेला धर्म, उन्हाळ्यांत सूर्याच्या लांब किरणांच्या प्रखर त्रासानें वाढत्या प्रमाणांवर असतो. येणें करून, त्या जमिनींतील ओलावा पाळानीं शोषण केल्यानंतर तींत रुक्षता आल्यानें झऱ्यांत येणारें पाणी स्थितिस्थापकतेनुरूप तींत ओढलें गेलें जातें. शिवाय, झऱ्यांत येणाऱ्या पाण्यांत त्या झाडांचीं पाळें ओलाव्यासाठीं आलीं असतील तर तींहि पाणी शोषण करितील. व अशा तऱ्हेनें झऱ्यांत येणारें पाणी कमी होत जाईल.

बागायतांतील पोफळीच्या सोटांवर दक्षणायणांतील दुपारचें आडवें ऊन्ह पडूं देऊं नये. कारण, त्या ऊन्हामुळें त्यांचे सोट करपून कंगाल स्थितींत मरून जातात. यास्तव पोफळी लावण्या अगोदर दक्षिण बाजूस फणस, आंबे, ऊंड, इत्यादि छाया देणारीं झाडें लावून त्यापासून ऊन्हाचा त्रास न होईल असा बेत राखावा. मस्तकावरील लांब किरणाच्या योगें, बहुतेक वनस्पतींस लागू असलेल्या सर्व साधारण नियमानुरूप पोफळीच्या झाडांस बाधा न होतां प्रफुल्लित पणाच येत असतो.

पी. एम्.

मडगांव येथील सा० ब्रा० समाज वार्षिकोत्सव

या वार्षिकोत्सवाचे चालू सालचे अध्यक्ष श्री. परूळकर हे होणार असें म्हणतात. मुंबईच्या गौडसा० ब्राह्मणसमाजांतील हे प्रमुख व वजनदार गृहस्थ असून तेथील सारस्वत ज्ञातींतीलच नव्हे तर मुंबापुरींतील प्रमुख सार्वजनिक संस्थांतील कार्यकारी मंडळांत अग्रभागीं विराजमान असणाऱ्या गडळींपैकीं आहेत; मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मिलओनर्स असोसिएन, निरनिराळ्या औद्योगिक संस्था, मराठा प्रोव्हिडंट फंड सा.वि. सहायक मंडळी, सारस्वत बेंकिंग सोसायटी, सारस्वत ज्ञातींचीं देवालयें व धर्मार्थ संस्था यांचे ट्रस्टी, दाभोलकर स्कॉलरशिप्स बोर्ड इत्यादि संस्थांत मान्यतेच्या जागीं निरनिराळ्या रूपानें हे आहेत. विशेषतः औद्योगिक बाबतींतील यांची कामगिरी वाखाणण्या जोगी आहे. असा अष्टपैलू वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध गृहस्थ यंदा या समारंभाच्या वार्षिकोत्सवं प्रसंगीं अध्यक्ष पदारूढ झाल्यास त्यांचें भाषण त्यांचे थोर दर्जास साजेसेंच होईल यांत शंका नाहीं. व्याख्यान मालेंतील गोमांतकांतील आमचे प्रांतबंधु वक्ते मंडळीच्या परिचयाचेच आहेत. बाहेरच्या वक्त्यां पैकीं डॉ. सावारकर यांनें "राष्ट्रीय जीवन" गोव्यांत नवजीवन उत्पन्न करील यांत तिळमात्र संदेह नाहीं. श्रीयुत सहस्त्रबुद्धे व रा० चित्रे यांची मधुरवाणी मद्यपानाचे दुष्परिणाम त्याचप्रमाणें जनसेवेची कामगिरी वर्णन करणार असून मॅजिकलॅंटर्नच्या देखाव्यानीं मद्यपानाचे दुष्परिणाम पहात असतां कैक "तळीराम " शुद्धीवर न आले तरी आमच्या भावी पिढीस हीं व्याख्यानें खात्रीनें बोधप्रद होतील.

एकंदरीत चालू सालची समाजाची व्याख्यानमाला तिच्या मागील कीर्तीत भर घालण्याजोगी असून केवळ आमंत्रणाचीच वाट न पाहतां प्रत्येक हिंदुमात्र हजर राहून समारंभास शोभा आणील व चालकांच्या श्रमानें चीज करून स्वतःचाही फायदा करून घेईल अशी आशा आहे.

फिरस्ता

ANNO VI — NUMERO 3 — 1921 QUEPEM QUINTA-FEIRA 7 DE ABRIL

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA........ 3-08-00
NUMERO AVULSO......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत

BHARAT

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास.......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें. केपें, गुरुवार, तारीख ७ माहे एप्रिल सन १९२१ अंक ३ रा.

Como interessar o Povo em diferentes assuntos que lhe dizem respeito?

PROPAGANDISTAS MISSIONARIOS.

Por mais entusiasticas lôas que os nossos patriotas cantem á elevação do grau educativo e instructivo do nosso Paiz, a verdade é que o nosso Povo deixa, ainda, muito a desejar nêste sentido.

Ninguem alimente ilusões nem anteponha amor proprio á genuina expressão da verdade: não se encontra devidamente educado e instruido o nosso Povo.

Governantes e governados são responsaveis da não generalisação da educação e instrução populares, porque nem uns nem outros souberam ou puderam cumprir os deveres inerentes ás suas qualidades. E daí o nosso atrazo.

O que os portuguezes não foram capazes de levar a efeito durante o longo periodo de mais de quatro seculos na sua India, os inglezes conseguiram-no na sua em uns 150 anos.

Sob qualquer ponto que se encare o adiantamento dos nossos visinhos, êle, a olhos vistos, leva palmas ao nosso.

Ao passo que o desenvolvimento industrial na India britanica vai, a passos acelerados, trilhando a senda do crescente progresso, nós estamos, no tocante ao mesmo assunto, no sitio em que *ad majorem Dei glóriam* houve por bem colocar-nos o *terribil* Afonso de Albuquerque!

Comercialmente falándo, o nosso movimento limita-se, todo junto, ao valor de transacções que realisa um só *Koja* ou *baniá* de Bombaim!!

D'agricultura nem é bom falar, para que a Direcção de Serviços Agricolas e mais os seus sabios e competentes tecnicos não nos façam calar com suas instrucções *papíricas* e demonstrações praticas de altolá com élas, de mais a mais adubadas com os maravilhosos pós de ossos!!!

E a educação e instrucção propriamente ditas?

Comparem a indiferença daqui com a actividade dali; façam ô confronto da nossa politica de interesses bairriguistas com a não cooperação do *Mahatma Gandhi*; e ponham em paralelo, finalmente, a nossa tendencia burocratica com o espirito altamente patriotico dos nossos visinhos!

E na sobredita comparação no referido confronto e no aludido paralelo, encontrarão respostas concludentes e irrefutaveis á tal pergunta.

Reconhecido, pois, o nosso atrazo, cabe aos governantes e governados o dever de, sem mais perda de tempo, ambos envidarem os seus esforços titanicos para combate-lo radicalmente: os governantes reduzindo a expressão mais simples a sua fauna burocratica e aplicando a economia resultante dessa *melindrosa operação* á consecução dos fins acima indicados; e os governados fomentando e animando iniciativas particulares, tendentes a secundarem os mesmos fins.

Antes de tudo, é, porem, necessario que os patriotas promovam, por intermedio de seus propagandistas, exclusivamente escolhidos para esta missão propaganda intensa nas massas populares, dos sólidos e salutares principios da educação civica, para que élas, compenetradas da sua força, tomem um verdadeiro empenho pela sua autonomia.

Sem isto nada feito.

Propagandistas missionarios em toda a parte, propagandistas nas cidades propagandistas nas aldeas, propagandistas nos bairos, propagandistas em todos os meios, em todos os cantos e recantos.

Só assim podemos conseguir o fim que temos em vista.

Conferencias

Realisou duas em Rivona a convite da Direcção do Hindú Samaj, sobre a educação civica, o nosso director. E mais duas no concelho de Pondá.

PELA INDIA

As razões da sua autonomia.

A administração portugueza, postergando o compromisso inicial, n'um *trop de zéle* fanatico, subverteu as suas leis privativas, negou o seu direito de propriedade, aniquilou a sua vida local. Com um regime de verdadeira intolerancia civil e religiosa destruindo a sua engrenagem economica e estancando toda a livre iniciativa, conduziu a sociedade indigena a um estado da dissolução espiritual. A centralisação não so fez que os indigenas se desinteressassem dos negocios publicos do seu paiz como desvertuando todo o sentido das suas tradições que constituem, afinal, a substancia moral d'uma raça desarmou todas as suas legitimas aspirações ao progresso evolutivo e á prosperidade economica.

Quatro seculos decorridos, a experiencia está feita, a demonstração é concludente. O self-government é uma necessidade vital, urge não adial-a.

De resto, o resultado, era inevitavel. Homens de Estado, sem conhecimento das pessoas ou dos habitos da vida social indiana, que recorrem mais de vezes, quando se encontram na India, ao expediente de assumir ares de afectada superioridade, fatalmente se subordinariam ao primeiro adventicio que lhes surgisse com esgares de entendido. Funcionarios comissionarios, consome-os a ambição snob de se tornarem notaveis, impondo os seus elixires administrativos, sem atenção ás instituições e ás necessidades do povo, que taes reformas vão afectar. D'ai o caos inevitavel: tal a confusão na instituição dos serviços publicos.

Portarias, decretos e leis, caindo em catadupas, desencontradas e contraditorias, asfixiram toda a iniciativa individual e colectiva.

A autonomia deve iniciar-se pois, pelas autarquias locaes, municipais e comunaes, suficientemente ampla para desenvolver pelo sentimento da responsabilidade o dever da iniciativa e devidamente regrada em ordem a manter a liberdade de acção dessas corporações, dentro dos limites das suas faculdades.

Autonomia sob tutela vexante, sujeita á censura e á intervenção superior sem limite, será a morte d'essa instituição.

Instituições locaes sem tutela, são como instrumento de revivescencia civica, o primeiro passo no desenvolvimento das fontes criadoras adormecidas. Pelo sentimento da responsabilidade renascerá o sentimento da indipendencia, da indipendencia do pensamento tão necessario para expurgar a representação nativa do vicio de subserviencia.

Só assim, restituidas ao paiz as suas instituições tradicionais, reabilitadas as suas tradições, fortalecida a consciencia colectiva, só assim é que o paiz poderá reentrar no seu antigo explendor. Porque o povo não pode continuar a progredir, uma vez esquartejado nas suas crenças, nos seus usos, na continuidade da sua experiencia historica, em tudo o que constitue, em fim, a sua herança colectiva, substancia moral da raça.

Santana Rodrigues

ECOS & CRITICA

Contra-representaçao

A Sua Exc.a Snr. Governador Geral dirigiram, há dias, uma represedtação os habitantes do Concelho de Quepem contra o seu administrador sr. Antão.

As acusações que contra êste são formuladas, patenteam bem claramente que o sr. Antão dificilmente poderá delas defender-se por maiores esforços que desenvolva nesse sentido.

Mas a tal contra-representação que os seus amigos privados e agradecidos vão promover-lhe, a pedido?

Ah! E' vercade. Isso não tira nem põe, pois os factos são tão concretos que por *si* só pulverisarão um bom numero de contra-representações...

Em todo o caso a ver vamos o que tudo aquilo dá.

स्फुट विचार

देशसेवाः— जनतेंत जागृति उत्पन्न होऊन तिला कर्तव्य ओळख करून देण्यासाठीं केवळ देशसेवेसच वाहिलेल्या माणसांची आवश्यकता आहे हें जरी खरें असलें, तरी व्यवसायापरी व्यवसाय सांभाळून कांहीं तरी उपयुक्त स्वदेशसेवा बजावण्याची सदिच्छा असणाऱ्या योग्य सुखवस्तु गृहस्थांचीहि उपरोक्त कामीं जरूरी आहे. 'जनसेवा-देशसेवा ही ईश्वरसेवा' हें तत्व पूर्णपणें मनांत बिंबलें असून जे लोक, शक्य असतांहि, आपला फुरसतीचा काळ, मजेंतच घालण्यास सोकावले आहेत त्यांनीं तो काळ देशसेवेप्रीत्यर्थ अर्पिल्यास त्यांस फार भूषणावह होणार आहे. उदाहरणार्थ आमच्यांत बरेच हरिभक्त परायण हरिदास आहेत. त्यांतील कित्येक आपणांस उदरदास म्हणवून घेतात. असें जरी असलें तरी ते रात्रंदिवस उदरदास्यांतच रममाण झालेले असतात अशांतला प्रकार नाहीं. फावलेल्या वेळांत देशसेवा करण्याचें व्रत त्यानीं आचरिलें असतें तर त्यांच्यां हातून बरीच महत्वाची कामगिरी झाली असती! पण लक्ष्यांत कोण घेतो?

गोरक्षण करा व पुष्ट बना!

गोमाताकी जय!

'कोणाचा पुत्र मोठा' असा बादशहानें बिरबलास प्रश्न केला होता, आणि त्यावर 'गाईचा पुत्र मोठा' असें बिरबलानें त्यास उत्तर केलें होतें, हें वाचकांस ठाऊक आहेच. बिरबलानें उगाच कांहीं तरी उत्तर केलें नव्हतें; व तसें असतें तर बादशहा सुद्धां त्यावर खूष झाला नसता. तर खरोखर मोठेपणाचा गुण गाईच्या पुत्रांत वसत असल्यामुळें, त्यास बिरबलानें मुख्य-स्थानीं लेखिलें होतें. आजला जगांत जी एवढी शेतीची पेरणी होत आहे, ती गोपुत्रामुळेंच नव्हे काय? सांप्रत यांत्रिक कलेनें जरी पेरणीचें थोडें फार कार्य होतें, तरी गरीब गुरीब लोकास स्वस्तपणांत पेरणी करून धान्य कमावण्यास गोपुत्राशिवाय दुसरें उत्तम साधन नाहीं. त्या शिवाय गाडी वगैरे ओढण्याच्यां कामीं या जनावरांचा पुष्कळ उपयोग होतोच.

गाईची उपयुक्तता तर सर्वांत विशेष आहे. आणि म्हणूनच आमच्या शास्त्रकर्त्यांनीं तीस 'कामधेनू ही संज्ञा देऊन तिची उच्चस्थानीं गणना केली आहे. आणि खरोखर पाहूं गेलें तर, ही तिची योग्यता अस्थानीं नाहीं. खरोखरच ती कामधेनू आहे. पहाना, गाईपासून जें दुध मिळतें, तें कोणास नको आहे! मातेच्या दुधासमान असलेलें गाईचें दुध सर्व जातींच्या लोकांस हवें आहे. जसें दुध चांगलें, तसेंच त्याचें ताक, दहीं, लोणी, तूप इत्यादिही चांगलें आहे. हे इतके पदार्थ जितके पौष्टिक, सत्वयुक्त व सात्विक आहेत, तितके अन्य नाहींत. रोगांवर सुद्धां यांचा उपयोग होत असतो. बरें, याच पदार्थांचा उपयोग होत असून, गाईपासून होणाऱ्या मल मूत्राचा तितका तादृश्य फायदा नाही, असें नाहीं. गाईचें मलमूत्र सुद्धां उपयोगी आहे. घराच्या आंतील व बाहेरील घाण नाहींशी करून स्वच्छता करण्यास गाईच्या शेणासारखें दुसरें साधन नाहीं; इतकेंच नव्हे, तर शरीराची अंतर शुद्धी सुद्धां गाईच्या मलमूत्रानें होते. पंचगव्य म्हणून जें एक पेय करितात त्यांत गाईपासून होणाऱ्या पदार्थांचाच समावेश होतो, व तें शरीराच्या अंतर शुद्धीवर फार दिव्यौषध आहे. गाईचें मलमूत्र अनेक रोगांवर फार गुणकारी आहे. इतकेंच नव्हे तर याही पेक्षां त्याचा ज्यास्त उपयोग खत करण्याकडे होतो. गाईच्या मलमूत्रासारखें दुसरें उत्तम खत नाहीं. याशिवाय गाईचा मळ सुकविल्यास सर्पणाकडेही त्याचा उपयोग होतो; व त्याची रक्षा दांत साफ करण्याकडे उपयोगी पडते. अशा तऱ्हेच्या या सर्वस्वी उपयुक्त जनावरांचा आमच्या मुसलमान बंधूंकडून, आपल्या व खिस्ती समाजाच्या रुचिपूर्तते करितां, निर्दयपणें खून होऊन, हिंस्र जनावरांपेक्षां या मानवजनावरांकडून (animaes racionaes) त्यांचा भयंकर संहार होऊं लागला!

दर वर्षास या सगळ्या हिंदुस्थानांत या निरुपद्रवी व उपयुक्त जनावरांचे लाखांवर बळी पडूं लागले! यंदांच्या वर्षी या सगळ्या हिंदुस्थानच्या वधस्थानीं (matadouro) सुमारें ९५७५० गुरें मारली गेलीं. एकट्या हुबळीच्या वधस्थानीं या ५वर्षांत १०५७५ गुरें बळी पडलीं. अशा तऱ्हेनें सर्व मानव जातीस अत्यंत उपयुक्त असलेल्या या जनावरांचा मनुष्य जातीच्याच एका विशिष्ट भागाकडून मांसाच्या गोडीमुळें भयंकर संहार होऊं लागल्यामुळें या उपयुक्त जनावराची टंचाई भासणें साहजीकच आहे. आणि त्याप्रमाणें ती भासूंही लागली!

शेतकरी लोकांस शेत मशागतीच्या कामीं हीं जनावरें दुर्मिळ होऊं लागलीं! त्यामुळें पुष्कळ शेतजमिनी पडीत स्थितींत राहूं लागल्या. शेतांस खत मिळेनासें झालें आणि तेणें करून धान्याचें पीक कमी होऊं लागलें. धान्याचे कमी झाल्यामुळें महर्गता वाढली; महर्गतेमुळें गरीब लोकांच्या उपासमार होऊं लागली; पूर्वींचे लोक दुध, दहीं, ताक, तूप लोणी इत्यादि गाईपासून होणारे पौष्टिक व सात्विक पदार्थ सेवन करून पुष्ट होत, ते ह्या वर्षांनीं दुर्मिल व महाग झाल्यानें, सांप्रतचे लोक कृश व सत्वहीन होऊं लागले! उपासमारीचा प्रसंग आल्यानें गरीब शेतकरी लोक सुद्धां आपलीं गुरें त्यांची उपयुक्तता विसरून, कसाई लोकांस, किंमत ज्यास्त मिळते म्हणून विकूं लागले! आणि अशा रीतीनें एका गोच्या अभावीं सर्व तऱ्हेची विपत्ति सगळ्या मानव जातींवर —विशेषतः दुध, तूप, दहीं वगैरे ज्यांचें नित्याचें सेवन करण्याचें आहे, अशा हिंदुजातीवर—येऊन कोसळली! यांतून तिची केव्हां सुटका होईल, तें एका जगनियंत्यास च ठाऊक!

अशिक्षित व धर्मवेडे म्हणण्यात येणाऱ्या मुसलमानाकडूनच या उपयुक्त जनावराचा वध होत असे! पण सुदैवानें त्यांच्या बुद्धीवर सुशिक्षणाचा परिणाम झाल्यानें म्हणा किंवा परिस्थितीमुळें म्हणा, त्यांच्या कडून सुद्धां या जनावरांविषयीं सहानभूति दाखविण्यांत येऊन, पूर्वीप्रमाणें त्यांच्याकडून गुरांचा संहार होण्यास आळा पडला!

अफगाणस्थानच्या अमिरानें तर आपल्या राज्यांत सार्वजनिक ठरावानें या उपयुक्त जनावरांच्या वधाची बंदीच केली! इतकेंच नव्हे, तर, ज्या बकरीद (Bakarid) वारख्या मुख्य सणाच्या प्रसंगीं या असंख्य जनावरांचा बळी घेण्यात येई, त्या प्रसंगीं सुद्धां त्यानें ती संख्या अतिशय कमी केली! असें शेजारच्या हिंदुस्थानच्या मराठी वृतपत्रांवरून कळून येतें.

आमच्या मुसलमान बंधूंकडून गोमातेविषयीं ही जी सहानुभूति दाखविण्यात आली, त्याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेतच. परंतु सुशिक्षित म्हणविण्यांत येणाऱ्या खिस्ती बांधवांकडून मात्र, तिजविषयीं सहानुभूति दाखविण्यांत येत नाहीं आणि मांसाशनही बंद करण्यांत येत नाहीं; याबद्दल त्यांची निंदा करावी तितकी थोडीच.

आमच्या गोमांतकस्थ मुसलमानबंधूकडूनही अलिकडे कांहीं ठिकाणीं गोवध बंद करण्यांत आला असल्याचें व त्यामुळें तो खिस्तीयनांकडूनच होत असल्याचें कळतें. हें जर खरें असेल तर मुसलमानबंधू प्रसंशेस पात्र असून, खिस्तीयन निंदेस पात्र आहेत.

मुसलमानाकडून होणाऱ्या गोवधास तर कांहींसा आळा बसलाच; तरीं तो त्यांकडून अगदींच बंद होण्यास व खिस्तीजनाकडून मुळींच न होण्यास आतां राहिलेला उपाय म्हटला म्हणजे गोरक्षणच होय. होतां होईतो प्रत्येकानें गुरांचें रक्षण करावें, आणि कठीण प्रसंग आला तरी सुद्धां त्यांस कसायांस विकण्याचे बंद करावें. कदाचित् जे कोणी आपत्कालामुळें निरुपायानें आपलीं गुरें विकण्यास तयार होतील, त्यांकडून तीं विकत घेण्यासाठीं व त्यांचें रक्षण करून शेतीवगैरेच्या कामीं त्यांचा उपयोग करण्यासाठीं "गोरक्षणमंडळ्या" प्रत्येक गांवोगांवीं व शहरोशहरीं स्थापण्यांत याव्या. अशा मंडळ्या कांहीं कांहीं ठिकाणीं स्थापन झालेल्या ऐकिवांत येतात; पण त्यांकडून कांहीं कार्य झाल्याचें मात्र कळून येत नाही! ही किती खेदाची गोष्ट बरें! असें होणें योग्य नव्हे. गाईचा अभिमान असलेल्या व तिची उपयुक्तता जाणणाऱ्या धनिकांनीं आपल्या द्रव्याचा उपयोग तिच्या रक्षणाकडे करावा. गोरक्षणाचा खरा मार्ग हाच होय.

शेवटीं जातां जातां आमच्या शेजारीं हिंदुस्थानवासी बांधवांस इतकीच प्रेमाची सूचना आहे कीं, त्यांनीं तिकडून इकडे वधासाठीं गुरें घेऊन येणाऱ्या कसायांस—मग ते तिकडचे—बहुधा तिकडचेच असतात—किंवा इकडचे मुसलमान असोत, किंवा खिस्ती असोत— गुरें मिळण्याची बंदी करावी; म्हणजे स्वतः त्यांस गुरें विकू नयेत, व विकण्यास इतरांस मनाई करावी कारण तिकडूनच इकडे प्रतिवर्षी जीं हजारों गुरें विकण्यासाठीं येतात—हीं विशेषेंकरून तिकडील मुसलमानच इकडे आणतात. व तीं बहुतेक कसायाच्या वधस्थानीं बळी पडतात; आणि अशा रीतीनें त्यांचा भयंकर संहार होऊन, शेतकी वगैरे कामांस जी गुरांची इकडे टंचाई भासते तीस आळा पडून, लोकानां विपुल धान्य, व भरपूर दुधतूप, लोणीं दहीं वगैरे मिळूं लागेल व तेणें करून सर्व समाज पुष्ट व सत्व संपन्न होतील. ज्यांस शेतकी कामाकडे किंवा दुध दुभत्याकडेच गुरांची जरुरी असेल, त्यांसच खात्रीकरून मग गुरें विकण्यांत यावीं; इतरांस न मिळण्याची व्यवस्था करण्यांत यावी.

गोमांतकस्थ मुसलमानबंधूंसही आमची अशी प्रेमांची सूचना आहे कीं, त्यांनींही यापुढें सदर गुरांची उपयुक्तता लक्ष्यांत आणून गोवध [करण्याचा] अगदीं बंद करावा. त्याचप्रमाणें खिस्ती बांधवांपाशींही नम्र विनंति आहे कीं, त्यांनींही यापुढें गोमांसाशन अगदींच सोडून देऊन—अथवा मांसाची गोडी लागलींच असल्यास इतर निरुपयोगी जनावरांचें मांस भक्षण करून गोवध बंद करण्याचें श्रेय घ्यावें. या माझ्या नम्र व प्रेमळ सूचनेकडे किंवा विनंतीकडे माझे देशबांधव लक्ष्य देऊन वर्तन करितील अशी आशा केल्यास ती निष्फळ ठरेल काय? वाटत नाहीं. तरी तीचे फलाफल अनुभव यापुढें सांगेलच! "सत्य संकल्पाचा दाता भगवान" ही माझी इच्छा पूर्ण करो, अशी त्यापाशीं मागणी करून हा लांबलेला लेख येथेंच संपवितों.

श्रीपाद गो. शे. हेदे

सारस्वत ब्राह्मण समाज

व्याख्यानमालेची कार्यक्रम-पत्रिका

९-४-२१	वाढदिवस समारंभ.	
१०-४-२१	श्री. पुरुषोत्तम श्रीनिवास सुकेरकर	आमचीं देवस्थानें.
११-४-२१	श्री. सुब्राव रामकृष्ण सामंत	हिंदी लोक व फिरंगी संस्कृति
१२-४-२१	डॉ. नारायण दामोदर सावरकर	राष्ट्रीय जीवन
१३-४-२१	श्री. अनंत विनायक चित्रे, बी. ए.	मद्यपान
१४-४-२१	श्री. गंगाधर नीलकंट सहस्रबुद्धे बी. ए.	[illegible]
१५-४-२१	समारोप	

वि. सू.:—प्रत्येक व्याख्यानास स्टॅ. टा. ७॥ ला सुरवात होईल. ता. १६ व १४ रोजीं विषयास अनुरूप अशीं चित्रें म्याजिक ल्यांटर्नमधून दाखविण्यांत येतील.

पुढच्या अंकीं श्री. आर. पी. हेदे या नवीन कवीची कविता प्रसिद्ध होईल.

ANNO VI.—NUMERO 4 —1921 QUEPEM QUINTA-FEIRA 14 DE ABRIL

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinaturas
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत
BHARAT

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया........... ३-०८-००
किरकोळ अंकास........... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारे ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें. केपें, गुरुवार, तारीख १४ माहे एप्रिल सन १९२१ अंक ४ था.

Saibam quantos...

Os sensacionais artigos do eminente patriota e distincto filho desta terra sr. dr. Santana Rodrigues, publicados nas colunas do *Bharat* demonstram á saciedade que a nossa autonomia é uma mera ficção, uma garrafa velha com rotulo novo, nem valendo caracol, no tocante ao significativo sentido que a palavra *autonomia* aliás encerra!

Autonomia é a faculdade de poder alguem governar a sua vida dentro das atribuições limitadas pelo poder central que nelas não pode interferir-se, seja a que titulo fôr, havendo assuntos *taxativamente*, marcados pela lei, resoluções respeitantes aos quais entrarão só em vigor, depois de sancionados pelo mesmo poder central.

E'esta a difinição da primeira parte da autonomia outorgada pelo governo inglez á India visinha. Nas atribuições concedidas aos seus *subditos nativos*, o ministerio da Inglaterra não tuje nem muje: consente que eles se governem á vontade.

Entre nòs sucede, precisamente, o contrario A *autonomia* confere-nos o direito de confeccionarmos o nosso orçamento; e todavia ninguem sabe o momento em que há de vir *de cima* qualquer decreto ou uma serie dêles desorganisando ou antes inutilisando todo o trabalho feito ! ...

Não só isto. Temos ainda o temivel *veto* a pesar sobre a colonia *autonoma* (?). podendo o seu chefe, quando lhe dér na gana, fazer ver navios e contar estrelas do céu aos membros dos Conselhos Legislativo e Executivo e *tuti quanti*...!

Que autonomia é essa?!

Os nossos vizinhos tem poucos direitos mas todos bem sòlidos, bem fixos, bem intangiveis. E nós temos muitos mas todos violaveis, mutaveis como as fases da lua!

Pode lá ser isso?

Mas parece que nas regiões oficiais se pensa que o nosso contribuinte que *paga e não bufa*, há de poder continuar a pagar e a não bufar eternamente, que êle tem dinheiro em caixas repletas douro, que êle é rico, que ele, sabemos lá que mais !

Mais duma vez se acentuou que eram falhas do fundamento versões da riquesa que por ai correm. Não há, todavia, quem as tire da cabeça dos nossos Governantes a falsa e ilusoria impressão que as mesmas versões nêla incutiram á má hora ! !

* * *

Constrange-nos a alma tudo isso. Não sabemos aonde irá parar e em que irà degenerar a nossa caótica situação

O Povo é *eterna criança*, sendo o seu *tutor* o governo que tem a obrigação legal e moral de zelar pelos seus interesses vitais, diz-se.

Cá, porem, tudo nos autorisa a supôr o contrario. Cá, os do poleiro mestrm-se impossiveis ás lagrimas quentes. ao chôro justificado da mesma criança ! Cá, o governo pretende, pelo visto, tratar, apenas, de si e dos seus membros superiores e inferiores, anteriores e posterieres. Cá, finalmente, é o que estamos a ver: cada um para si e Deus para todos...

Funcionarios, é dêles o reino de novos *aumentos*; contribuintes, é dêles o inferno de novos *impóstos* ! Iufelizes éstes e felizes aqueles !

Nestas condições ¿ porque razão censuraremos a tendencia para a empregomania que se nota entre nós com grande força ?

Que faz o Povo ?

E' certo que vão ser criados novos impostos. Que faz o Povo? Manter silencio ?

¿Porque, então, se queixa da sua incapacidade contribuitiva, da sua miseria, da sua fome ?

Saibam, porem, que quem não pode pagar quem é perseguido pela miseria e quem é torturado pela fome, não se cala: exteriorisa o que lhe vai pela alma.

Que faz o Povo ?

Se se conservar calado como *até aqui* continuará a pensar-se nas regiões oficiais que o Povo não leva a mal, antes pelo contrario, a criação de novos inpostos contra a qual na sua conversa de balcões protesta aliás vehamente lhe agrado muito!

A. Imprensa cumpriu o seu dever, esforçando-se por compenetrar o governo do que o Povo pensa sobre novos aumentos e novos impostos. Não bastou.

E' preciso. portanto, que o Povo, se é que julga ficar oprimido com a criação de novos impostos, se manifesta directamente em comicios faça ecôar a sua voz até ao Tereiro do Paço

Se não, será certa a sua ruina.

Aos eleitores hindus

No dia 10 do proximo mez de julho realisar-se-hão eleições de deputado e senador pela India. Deve reinar daqui daqui há pouco o caciquismo eleitoral por banda de certos *tipos* amigos, parentes e vizinhos doutros que naturalmente prometarão mundos e fundos pára a consecução de seus fins.

Nenhum leitor hindu comprometa a usa palavra a bem da classe, enquanto o *Pragatica-Sauga*, não indique os seus candidatos.

Esperamos ser atendidos.

ECOS & CRITICA

Regime dc "chega"

O Governo tem instituidas colonias penais para castigo do grandes criminosos Naturalmente deve ter que gastar muito ua manutenção das mesmas colonias.

Ora o Governo podia alcançar uma enorme economia abolindo-as e obrigando os mesmos criminosos a viajar diariamente e nas primeiras classes durante o inverno pelas lanchas que se dirigem de Sanvordem a Pangim e vice versa. Seria-lhes o maior castigo e bem cedo lhes chegaria o arrependimento, se é que o castigo é infligido para êste fim.

Pois é verdade. Viajar por estes dias chuvosos pelas lanchas de baucos quebrados e lonas esfarrafadas é sujeitar-se ao máior contra-tempo.

Que os da cima o experimentem !

A Renovaçao

Saiu á luz de publicidade o 1° no. do 2° ano da *Renovação*, transformada em revista puramente marata. São importantes os artigos que insere, sobretudo o do sr. Puruxotoma Sinai Suquercar, intitulado *Nossos Templos*.

Longa dura e muitas prosperidades lhe apetecemos *ab imo pectore*.

A equiparação

Um curioso comerciante escreve-nos para solicitarmos. do

परंतु, तेवढ्या धान्याचे दर तुह्मीं तरेच ठरवा. ह्मणजे तुह्मांलाहि नुकसानीची भीति नाहीं.

विठल शेट.—चला, चला, आह्माला गोष्टी सांगायला आले आहेत. अडचणीच्या वेळीं व अडणाऱ्या व्यापारावर आह्मीं चार पैसे मिळवूं नयेत तर काय करावें.

चला आह्मांला तुमचीं तीं व्याख्यानें पुरे आहेत. लोक मरेनांत बापडे. मग आह्मींच त्यांच्या घरांचे मालक होऊं.

वि०—हरी शेट, या विषयीं तुमचें हरी काय मत आहे ?

हरी शेट०—विठलशेटनें सांगितलें तेंच माझेंहि आहे.

वि०—पुंडलीक शेट, तुमचें काय ?

पुंडलीक शे०—मीच काय त्यांच्या बाहेर आहे ?

न०—अरेरे ! किती नीच आहेत रे हे लोक ! ! गरीब रयतेच्या पोटासाटीं, स्वदेशबंधूंच्या संरक्षणासाटी भारताच्या उदयासाठीं पैसेवाल्यांनीं स्वदेशांत तऱ्हेतऱ्हेचे कारखाने काढून दुःखदमय स्थितींत कुजत पडलेल्या स्वदेशबंधूंस आश्रय देणें हें स्वदेशांतील प्रत्येक लक्ष्मी पुत्राचें काम आहे. ज्यानां तसे पैसे खर्च करण्याची ताकद नसून इतर तऱ्हेनें आपल्या देशबंधूंस सहाय्य करणें शक्य आहे, त्यानीं त्या त्या तऱ्हेनें सहाय्य करून भारतोदयाच्या पुण्यकृत्यांत भागिदार होणें, हें खरोखरच पवित्र कर्तव्य होय. असें असतां पुंडलीक, वरदा, हरी आणि विठल, जर तुह्मीं लोककल्याणाकडे दुर्लक्ष करून मिळेल त्या तऱ्हेनें व्यापारावर महागाई चढवून गरीब रयतेला सुद्धां लुटाल तर तुह्मीं चौघेहि, पुंडलीक, वरदा, हरी आणि विठल, खरोखरच "पुंडलीक वरदा हरी विठल' करीत दारोदार भिक्षेकरितां भटकणार. व त्याच प्रमाणें इतर व्यापारीहि जर का तुमचेंच अनुकरण करतील तर तेहि तुमच्याच सारखे 'भवति भिक्षान् देहि' करणार खास. चल विरेंद्र या दुष्टांच्या जवळ सुद्धां राहणें मला असह्य होत आहे.

साभार स्वीकार

विद्यार्थी (साप्ताहिक):— नेहमीच ओजस्वी व खणखणीत लेखांनीं ओतप्रत भरलेलें व मराठी, इंग्लिश व हिंदी भाषेंत लिहिलेलें हें राष्ट्रीय विचारांचें विद्यार्थ्यांस फार उपयुक्त पत्र २७ बुधवार पेठ पुणें येथें रा. नारायण विठ्ठल गाडगीळ, प्रेसिडेन्ट—शारदामंदिर शिरूर, यांच्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध होत असतें. वा. व. ट. हा. ३ रु. ६ आ.

आर्यावर्त (साप्ताहिक):— हेंहि पत्र राष्ट्रीय पक्षाचेंच असून तें सुर्जी-अंजनगांव येथें प्रसिद्ध होतें. 'आर्यावर्तातील लेख मननीय असतात. संपादक स. पुरुषोत्तम गोपाळ लातुरकर. वा. व. ट. हा. सह ३ रु. २ आ.

गौड सारस्वत ब्रा० ज्ञातिवृत्त (मासिक):— सा. ब्राह्मणाच्या हितासाठीं झटणाऱ्या अत्यंत स्तुत्य उद्देशानें प्रसिद्ध होऊं लागलेल्या या मासिक पत्राचा प्रथमांक वाचनीय आहे. विस्तृत अभिप्राय पुढें. संपादकः— स. गणेश रामचंद्र शर्मा. प्रसिद्धीचें ठिकाणः— खानापूर वा. व. ट. हा. सह अत्यंत कमी १ रु. १२ आ.

काव्यरत्नावली (मासिक):— हें मासिक जळगांव येथें रा. फडणीस यांच्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध होत असतें. काव्याभिमान्यास व काव्यलेखकांना फार उपयुक्त. वा. व. ट. हा. सह दीड रु.

भारत

गुरुवार जेष्ठ कृ० ३ या १८४३

स्वस्थ बसूं नका !

पुष्कळ वादविवादानंतर कौंसेल्य लेझिस्लातीवच्या बैटकींत पगार वाढीच्या बिन अंकी नाटकास प्रारंभ होऊन, त्याचा शेवट थोड्या फार प्रमाणानें नोकरशाहीस आनंदपर्यवसायी होइल, अशीं स्पष्ट चिन्हें दिसावयास लागलीं आहेत. अर्थात् तूटीनें फाटलेल्या बजेटावरील चर्चेच्या प्रहसनाचा पडदा उघडतांच करवाढीचें भीषण पात्र सदरील लोक व राज्यपक्षीय संस्थेच्या रंगभूमीवर थैमान घालावयास लागलें असल्यास आश्चर्य नाहीं.

करवाढीच्या धोंड्यानें लोकशाहीचें डोकें छिन्नविछिन्न केलें जाईल यांत आतां काडीचाहि संशय नाहीं. करवाढीपासून जनतेवर ओढवणाऱ्या संकटपरंपरेचें अतिस्फुरण आह्मीं अनेकदां व अनेकरीतीनें केलेंच आहे. चर्वितचर्वणाच्या आरोपभयास्तव त्यांचा पुनरोच्चार करणें आह्मांस इष्ट वाटत नाहीं. सध्या आह्मास इतकेंच सांगावयाचें आहे कीं, गोमांतकीय नागरिक हो, करवाढीच्या या दुर्धर प्रसंगीं स्वस्थ बसू नका ! उठा व सव शक्ति एकवटून सभांच्या रूपानें सरकारास कळवा कीं, करवाढीचें अत्याचारी धोरण आपणाला पसंत नाहीं ! महागाईची प्रखरता नोकरशाहीसच जाचते व 'इतर' जनांस जाचत नाहीं अशांतला कांहींच प्रकार नसल्यानें, देतों त्यापेक्षां जास्ती कर आपणाकडून दिले जाणें सर्व बाजूनीं अशक्य आहे.

गोमांतकीय नागरिक हो, स्वस्थ बसू नका ! ही वेळ चकाट्या पिटण्याची नाहीं, निरर्थक गप्पाष्टकांत कालावयाची नाहीं ! स्वस्थ बसाल तर कराच्या राक्षसी दडपणाखालीं चेंगरले जाऊन नामशेष व्हाल, हें पूर्ण लक्ष्यांत बाळगा ! तुमच्या पैशाचा विनियोग कशा रीतीनें केला जातो याची आधीं अगदीं बारकाईनें चौकशी करून त्याविषयीं तुमचें बनेल तें मत निर्भिड व निर्भयपणें सरकारसमोर सांगा व सनदशीर मार्गानें तुमच्या खऱ्या गृह व ग्रहस्थितीची जाणीव करून द्या.

'मागेल तें धावें, तुसीं असावें' या निर्जिव निःसत्व ग्रंथाचें आक्रमण करणें ह्मणजे राजकीय दृष्ट्या भयंकर पाप आचरणें होय. ह्मणून त्या पंथापासून, नागरिक हो, तुह्मीं दूर रहा व स्वस्थ न बसतां करवाढीच्या संकटनिवारणार्थ अत्यंत झिलेपणानें झटा !

गोमांतकीय नागरिक हो स्वस्थ बसूं नका ! उठा व ग्रासूं पहाणाऱ्या करवाढीच्या संकटाचा धुव्वा उडवून द्या ! तरच तुह्मीं जगाल, तरच तुमची किर्ति उज्वल राहील. उलटपक्षीं पांघरूण तोंडावर ओढून निद्रानंदांत घोरतच पडाल तर घो [illegible] तुमचें राजकीय

स्फुट विचार

करवाढीची धाड:—गोमांतकीय जनतेवर करवाढीची धाड येणार यांत आतां थोडासुद्धां संशय नाहीं हें, पगारवाढ लेजिस्लातीव्ह कौंसिल्यांत पास झाल्यावरून वाचकांस समजलेंच असेल. करवाढीविरुद्ध कुरकुर करणाऱ्या लोकांनीं अर्थात अशा वेळीं स्वस्थ बसतां कामा नये. अग्रलेखांत सुचविल्याप्रमाणें सर्व शक्ति एकवटून लोकानीं आपला असंतोष सनदशीर मार्गानें प्रदर्शीत केला पाहिजे व सरकार दरबारांत दाद लावून घेण्याप्रीत्यर्थ आटोकाट प्रयत्न केले पाहिजेत. या सूचनेकडे दुर्लक्ष झाल्यास आधींच महागाईनें हलाख बनलेली जनता थोड्याच अवधींत नामशेष झाल्याखेरीज खास रहाणार नाहीं. हें उघड आहे. तेव्हां, गोमांतकीय नागरिक हो, उठा व आपल्या चळवळींच्या तेजोबलानें करवाढीच्या अनिष्ट धाडीपासून मुक्तता करून घ्या !

येत्या निवडणुका:—येत्या जुलई महिन्याच्या १० तारखेला गोव्यातर्फे देपुताद व सेनादोर यांच्या निवडणुका व्हावयाच्या असून अनुक्रमें सि बोवेल मोत व प्राझेरीस देकोस्त हे दोन उमेदवार उभे राहिले आहेत, अशी दाट वदंता आहे. इंडियेतर्फे देपुतादाची माळ कोणाच्या गळ्यांत घालावी

मार्ने अवतर्ण झालें आहे. छापखान्याची स्वतंत्र व्यवस्था असल्यावरून, सुंदर छपाई व नमुनेदार नियमितपणा या दोन महत्वाच्या गोष्टींतहि नवजीवन कोणास हार जाणार नाहीं अशी अटकळ आहे. नवजीवनाच्या हातून अव्याहत देशसेवेचें व्रत आचरलें जाऊन, संपादकांचा पवित्र हेतु तडीस जावो, असें अंतकरण पूर्वक इच्छितों.

येत्या चातुर्मासांत:— आमचे संपादक फिरतीवर निघणार आहेत. आपणाकडून शक्य तितकी लोकजागृति करण्यास ते कांहींच कसूर करणार नाहींत. मात्र ठिकठिकाणीं त्यांस जनतेकडून सहाय्य मिळालें पाहिजे व तें मिळेल अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे.

वर्तमानसार

—सि. मिनेज ब्रागांस हे सरकारतर्फे देपुताद निवडून येण्यासाठीं उमेदवार आहेत, असें पणजीच्या एका दैनिकास कळलें आहे.

—गेल्या रवियारीं येथील नदीस मोठा पूर येऊन आजूबाजूंची थोडीबहूत नाशाडी झाली.

—पैंगिणचें सारस्वत—गायक प्रकरण विकोपास गेल्याचें समजतें.

हिंदु नागरिक हो, इकडे पहा

येत्या महिन्याच्या १० तारखेला देपुताद व सेनादोर यांच्या निवडणुका होणार आहेत.
या महत्वाच्या जाग्यावर कोणाची योजना व्हावी हें प्रागतिकसंघ ठरविणार आहे. तेव्हां कोणीहि कसल्याहि भूल थापांस बळी पडून वचनबद्ध होऊं नये अशी आग्रहाची सूचना आहे.

तसेंच सेनादोर कोण व्हावा, हें प्रागतिक संघ निश्चित करणार असून योग्य वेळीं व योग्य मार्गानें आपली योजना सर्व हिंदूंस जाहीर करणार आहे. तोंपर्यंत कोणीहि उपरिनिर्दिष्ट निवडणुकींचे बाबतींत वचनबद्ध होऊं नये, अशी सर्व हिंदु नागरिकांस कळकळीची विनंति आहे.

पोर्तुगालची परिस्थिति:—गेल्या दिवसांमागें पोर्तुगालांत कांहीं मिलिटरी व आजरिकांनीं बंड करून डॉ० बेर्नार्दीन माशादु यांच्या अध्यक्षतेखाली अधिकारारूढ असलेल्या प्रधानमंडळास राजीनामा देण्यास भाग पाडलें ! नवीन प्रधान मंडळानें नवीन निवडणुका करण्याचें ठरवून; जुन्या पार्लमेंटास निजधामास पाठविण्याचें पुण्य संपादन केलें. व याच कारणामुळे इंडियेंत येत्या जुलई महिन्याच्या १० तारखेला निवडणुका होणार आहेत. यापुढें तरी पोर्तुगालांत शांतता देवीचें साम्राज्य प्रस्थापित होऊन, हरेक सुधारणेंचे मार्ग मोकळे होवोत असें इच्छितों.

नवजीवन:—साप्ताहिक पत्राच्या स्वरूपांत एक वर्ष जनसेवा बजावून, दुसऱ्या वर्षापासून नवजीवन मासिक पुस्तकरू-

अस्तित्व पार विरून गेल्या शिवाय रहाणार नाहीं. हें पूर्ण ध्यानांत ठेवा ;

उठा ! नागरिक हो उठा ! व सनदशीर मार्गानें कर्तव्य बजावून सरकारला जिवंतपणाची जिवंत साक्ष जिवंत रीतीनें पटवा !

[illegible] नका ! [illegible]

भारत संरक्षक फंड

रा. पुरुषोत्तम प्र. नाबेलकर, रायबंदर ३ रु.
रा. दत्तात्रय आपा सरमळकर पणजी २ रु.
रा. वै रामचंद्र पांडुरंग वैद्य पणजी २५ रु.
रा. फटु मुकुंद प्र. देसाई, रिवण १५ रु.
रा. बुके गोविंद प्रभू देसाई, रिवण ८ रु.
रा भिकू वि सांवारी, कुडें १० रु.

सूचना भारत पुनरुज्जीवन फंडाची रक्कम याच फंडांत जमा केली आहे.

गैरसोय दूर झाली

पणजी येथील कोणत्याहि सरकारी कचेऱ्यांतील, कोर्टातील, हायकोर्टातील (रेलासांव) तसेंच पोर्तुगालच्या कोणत्याहि वरीष्ठ कोर्टातील कामें

आ. शिज गोंमिस फेरेर
श्रीधर कामत शंखवाळकर
व्यंकटेश वि राव सरदेसाई
वकील व सालिसिटर्स

यांच्या नवीनच स्थापलेल्या ऑफिसांतून अत्यंत चोखपणानें योग्य वेतन घेऊन केलीं जातात. अनुभव घ्या व नाहक प्रवास खर्च वांचवा ! सर्व तऱ्हेचा पत्रव्यवहार खालील पत्तावरः—

व्यंकटेश वि. राव सरदेसाई
पणजी गोवा.

ANO VI.—NUMERO 14 —1921 QUEPEM QUINTA-FEIRA 30 DE JUNHO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinatura
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत
BHARAT

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारे ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें. केपें, गुरुवार, तारीख ३० माहे जून सन १९२१ अंक १४ वा.

AOS APOLOGISTAS DOS IMPOSTOS

> Nem tudo o que luz é ouro; o esplendor dos bailes é ficticio; o brilho das festas é artificial.

O nosso Povo é muito amigo de *aparencias*. Tenta, em regra, exibir por elas a sua *superioridade* que está muito longe de possuir, na rialdade, o que faz que os estranhos que lhe não conheçam a scicologia, façam dêle idêa diversa do que é.

Mas *nem tudo o que luz é ouro*; e porisso a riquesa e o luxo de que o indio está habituado a fazer exposição não passam de, bem observados e analisados, aparentes. Desta verdade núa e crúa convence-se quem, livre de preocupações de qualquer ordem, teve a paciencia de estudar as verdadeiras condições do nosso meio.

Leiam os seguintes trechos da entrevista que o sr. Majôr Leite Magalhães concedeu ao nosso presado colega do *Diario da Noite*, entrevista na qual o ilustre oficial a que uma inteligencia invulgar alia profundo conhecimento do nosso paiz corrobora o que acima deixamos escrito. Ei-los:-

"Quanto ao paiz—respondeu nos...deve reconhecer que muito fantasiei antes de poisar os olhos nesta realidade tristissima que é a sua pobreza. Eu trazia na mente não sei que visão dourada dum paiz de luxo e magnificencia, onde palacios brancos emergia de parques opulentos, terra de fadas e de principes vestidos de seda e oiro, fulgurantes de esmeraldas e rubis...como naqueles tempos em que Camões cantava:

Já chegaram perto.............
Dos jardins odoriferos formosos,
Que em si escondem os regios aposentos.
Altos de torres não, mas sumptuosos

E mais ainda:

Sabei que estais na India onde se estende.
Diverso povo rico e prosperado
De ouro luzente e fina pedraria
Cheiro suave ardente especiaria

Calcule agora V. o meu assombro ao deparar esta desgraça !... Riquezas, maravilhas, esplendores enfim todos os encantamentos que eu sonhara, onde estavam eles, que os não via ? Que vendaval de morte os teria aniquilado ?

Perante o meu olhar não surgiam senão ruinas: ruinas de fortes, ruinas de templos ruinas de palacios. Era toda a grandeza antiga a converter-se em pó, como um cadaver. E compênsadoramente, eu não vi nenhum sintoma de transformação a realizar-se pelo trabalho.

Que o antigo fausto tivesse desaparecido ainda se explica: assim sucedeu em toda a parte onde as organizações feudais e autocraticas baquearam ante as conquistas populares. Mas o que não se explica é esta vida inerte em que cada qual parece esperar a chuva de ouro da Divina Providencia como se cada ano que passa, não fosse um ano do progresso que se perde, ocasionando prejuizos irreparaveis.

E eu pergunto:- desde que daqui partiu o ultimo galeão transportando os restos da opulencia antigá, o que tem feito o Estado para milhorar as condições do povo e o que tem feito o povo para enriquecer a economia do seu paiz ? O que é que hoje se vê por toda a parte senão ... um comercio rudimentar uma agricultura rudimentar e uma industria rudimentar ?

Por outro lado - o que tem sido a nossa administração senão uma administração de perdularios numa casa de miseria ?

Paiz de prodigiosa fertilidade como é este, porque não seguiu êle a par e passo a evolução gigantesca da India vizinha, se o povo é o mesmo e se as condições naturais da terra em nada lhe são inferiores...antes pelo contrario?

E' fora da duvida que a indolencia do povo talvez motivada pela modestia das suas ambições e pela pequenes das suas necessidades tem contribuido em grande parte para o atraso economico em que vive. Mas, tambem quão grandes são as nossas culpas relativamente ao estado misero a que se chegou !... Veja V. as Novas-Conquistas, essa imensa região inculta onde uma população definha e morre ao abandono como se a terra e o braço não fossem hoje as maiores riquezas que os Estados contam !... Veja V. as Velhas-Conquistas, onde á mingua de recursos e de exemplos frisantes se produz pouco e mal e donde o trabalhador se ausenta na ansia de proventos que a terra lhe não dá !... Quais são os meios de vida e de luta que o Estado faculta ao produtor? Não conheço nenhum.

Já S. Excia o Governador Geral, num dos seus discursos pintou com as cores sombrias o quadro desolador que nesta India a nossa apreciação descobre quanto a progresso e a beneficios. E' um sudario!... E já vê o meu amigo que sobre este ponto as impressões que levo do paiz são inteiramente diferentes daquelas que trazia indo a morder me na alma como um pensamento acerbo, esta convicção em que exprimo toda a minha magua:- *a India é digna de milhor sorte.*"

Pois a verdade. *A India é digna de melhor sorte*, porque não obstante o esplendor (que é ficticio) dos bailes e o brilho (que é artificial) das festas, ela *é pobre*.

E quem é pobre não pode nem deve pagar mais.

A criação de novos impostos é inoportuna, pois.

Sim; ela é inoportuna e iniqua e, portanto, em ultima analise, inaceitavel.

¿Quererão os apologistas dos impostos que o contribuinte indiano se sujeite, submissamente, passivamente, ao que é, reconhecidamente, comprovadamente, inaceitavel ?

Para meditar....

Dos grandes tudo é grande, diz um ditado concanim; E efectivamente assim é. Um acto que sendo praticado por um *pequeno* seria considerado como crime *previsto e punivel* pelo codigo penal, é reputado como *acção* mais natural, quando tenha origem no capricho dum *grande*.

Nesta ordem de ideas positivas a exigencia de novos impostos ou *sacrificios* por parte do Estado que é *grande* é uma *acção* mais natural e a recusa, de resto justificada, do contribuinte que é *pequeno*, á satisfação da mesma exigencia, importa já crime *previsto* e *punivel* pelo codigo penal.

Porque *dos grandes tudo é grande !*

* * *

A honra e proveito não cabem no mesmo cesto, reza um outro ditado dos *pequenos*. Sim, dos *pequenos*, porque com os *grandes* tal dictado perde toda a sua força...aplicativa.

Se não, vejam. O sr. Prazeres da Costa é *grande* e porisso mesmo disfruta a *honra* de senador e *proveito* das funções de auditor geral.

—Mas, actualmenee o sr. Costa não é senador, dir-se há.

Não importa, pois o sr. Prazeres que *nasceu* senador há de, graças ao valioso concurso de seus *amigos*, *parentes* e *vizinhos* eternisar-se no referido honroso cargo de senador

Portanto: *a honra e proveito cabem no mesmo cesto tratando-se dos grandes*... O dictado em voga é dos *pequenos*.

* * *

Quem tem, paga, quem não tem, recebe. O proprietario possui propriedades e porisso paga, e o funcionario não as tem, porisso recebe do que o proprietario paga.

¿De quem é milhor a situação, a do proprietario ou funcionario ?

Segundo um nosso vizinho que vendeu todo o patrimonio e *matrimonio* para alcançar o elevado cargo de regedor substituto, é sempre preferivel ser funcionario pelos motivos acima expendidos e mais porque a qualidade lucrativa dum empregado é garantia segura do goso de pandegas á custa de quem teve a desdita de ser proprietario.

Porque *quem tem paga quem não tem recebe*...

* * *

Chega-se o bem para o bem e o mal para quem o tem. O *gandhismo* é um bem, até segundo a convicção reverenda dum padre americano. O elemento popular, então, tendo na conta da poderosa mas pacifica arma para a conquista de suas reivindicações.

Mas o que é *bem* para uma

भारत

गुरुवार जेष्ट कृ० ९ मी १८४३

आजहि पुन्हां तेंच !

आमच्या प्रांताची तुलना पोर्तुगालाशीं केली तर असें दिसून येईल कीं, सांपत्तिक दृष्ट्या उभय पिता पुत्रांचा प्रवास एकाच अवनतीच्या मोटारींतून चालू आहे ! कित्येक बाबतींत 'बापा पेक्षां बेटा सवाई' जरी असला तरी एकंदरींत उभयतांसहि एकाच जातीच्या व भीतीच्या संकटाशीं टक्कर द्यावी लागत आहे, हें खालील उद्गारांवरून सहज सिद्ध होतें. हे उद्गार खुद्द पोर्तुगालच्याच एका माजी प्रधानाने असल्यावरून, अत्यंत महत्वाचें आहेत, हें कोणीहि कबूल करील. ते म्हणतातः—

"आमची तिजोरी अत्यंत भयंकर हलाखीच्या समुद्रांत गटंगळ्या खात असल्यावरून, परराष्ट्रांत, कोणतेंहि सांपत्तिक गोष्टींत संबंध असलेलें कार्य घडवून आणण्यास धैर्य होत नाहीं. महागाईचा कडक अमल जरी चोंहो बाजूंनीं तीव्रतेनें सुरू आहे, तरी नोकरशाहीची पगार वाढ होणें शक्य नाहीं; कां कीं, या ओपरेशनमुळें होणारी इजा सहन करण्यासारखी तिजोरीची प्रकृति धडधाकड नाहीं. या खऱ्या स्थितीकडे मुद्दाम डोळेझांक करून पगार वाढीचें याचनात्मक टुमणें लावणें कोणासहि झालें तरी लाजीरवाणेंच वाटलें पाहिजे. कोठेंहि जरा उत्पन्नाची वाढ झाल्यास गवगवा झाला कीं पुरे, जिकडून तिकडून तिजोरीवर मारे हल्ल्यांवर हल्ले होऊं लागतात ! अशा स्थितींत राष्ट्र शकट चालविणें अत्यंत कठीण होय. अमुक अमुक नोकरांचा पगार अमुक अमुक रीतीनें वाढविण्याची शक्यता दाखवून कागदावर बोलें दाखविणें फार सोपें आहे मात्र तीं कृतींत उतरविणें अशक्य कोटींतलें आहे. म्हणूनच जेथें तेथें छाटाछाट करण्याचा मला निर्धार आहे—मग त्या छाटाछाटीपासून कितीहि असंतोष उत्पन्न झाला तरी त्याला तोंड देण्याची माझी तयारी आहे. खरोखर, नोकरशाहीच्या घटनेंत क्रांति झाली पाहिजे, कां कीं, सर्वत्र अनावश्यक नोकरांचाच सुळसुळाट माजून राहिला आहे.".

करवाढीचें समर्थन करणाऱ्या गोऱ्या व त्यांचीच 'री' ओढणाऱ्या काळ्या 'अदमिनीं' उपरोक्त विचारापासून शिकावयाचा धडा अवश्य पाठ करावा, अशी आमची स्वजन प्रेमाची सूचना आहे.

कोणत्याहि दृष्टीनें सांप्रतचा काळ करवाढीला योग्य नाहीं, हें अनेकदां 'भारतानें' सिद्ध केलें आहे. जुन्याच करांच्या मारानें जेथें जनता हवालदील बनली आहे, कर चुकते करून जो उत्पन्नाचा थोडासा अवशेष शिल्लक रहातो, त्याचा मोठासा भाग जेथें इंफ्लुएंजा, महागाई, देवी इत्यादिनेक आपत्तींकडून निर्दयपणें आकर्षण केला जातो, पोटाचा प्रश्न सुटणें अशक्य झाल्यावरून जेथें परदेशांत द्रव्यसंपादनार्थ जाणाऱ्या लोकांची संख्या वाढत्याच प्रमाणावर आहे, तेथें नवीन कर वाढविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे पडलेल्यावर अमानुषपणें लाथांचा मारा करण्यासारखें दुष्टपणाचे काम नव्हे काय ?

अठराव्या शतकांत फ्रान्स देशांत प्रस्तुत ज्या तऱ्हेचा सांपत्तिक सांवळा गोंधळ आमच्या देशांत नजरेस येतो, त्याच प्रकारचा बेबंद कारभार दृष्टीस पडत होता. लोकमताची बिलकूल पर्वा न करतां, त्या काळच्या फ्रेंच राजकर्त्यांनीं करवाढविण्याचा धूम सपाटा सुरू ठेवला होता. त्याचा परिणाम काय झाला, हें इतिहासज्ञांस नव्यानें सांगण्याची आवश्यकता नाहीं. करवाढींच्या व इतर अमानुष कृत्यांच्या छळानीं त्रासून, तेथील जनतेनें अखेर आपल्या अरेरावी शत्रूचा खरपूस समाचार घेतला !

जी जनता भेकड व अभिमानशून्य मानली जात असे, जे लोक अधिकाऱ्यांस देवापेक्षांहि जास्त वचकत असत, ज्यांस देशाभिमान कशाशीं खातात हें सुद्धां माहीत नव्हतें, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे जी जनता गोगलगाईपेक्षांहि 'मऊ' समजली जात असे, त्याच जनतेकडून सर्व जगास थक्क करून सोडणारी राजक्रांति झाली, ही लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

सारासार विचार न करितां, केवळ 'मऊ' म्हणून एक सारखें उकरीत राहणें स्वार्थदृष्ट्या कितीहि मजेचें असलें तरी या मजेचा शेवट घातक झाल्याखेरीज रहात नाहीं, हे सत्य नजरेसमोर ठेऊन कर वाढवूं इच्छिणारांनीं आपलें करवाढीसंबंधानें धोरण निश्चित केलें पाहिजे. 'गोमांतकांतील जनता करवाढीविरुद्ध कांहीं काळ वोंवलत बसेल; पण, ऐन वेळीं, कर चुकते करण्याचा समय पोंचला म्हणजे, निमूटपणें कां कां कूं न करितां ती ते सरकारांत पोंचते करील, असा चुकीचा समज करून करवाढीचें अरेरावी व दुष्ट कृत्य राज्यकर्त्यांकडून आचरलें जाणार नाहीं, अशी अजून आम्हांस उमेद आहे. इतक्यां परोपरीनें विनविलें असतां करवाढ होईल तर त्यापासून भयंकर परिणाम होईल, हें पूर्ण लक्ष्यांत ठेवावें.

स्फुट विचार

आवतोनोमीचें खरें स्वरूपः—आम्हांस मिळालेल्या आवतोनोमी ऊर्फ स्वराज्यासंबंधानें परकी लोकांची, विशेषतः आमच्या शेजारच्या ब्रिटिश बंधूंची, अशी समजूत बनलेली आहे कीं, हरेक प्रांतिक कारभाराविषयीं आम्हांस पोर्तुगालवर अवलंबून रहाण्याचें कारण नसून, जरूर त्या सुधारणाहि अमलांत आणण्याची आम्हांस पूर्ण मोकळीक आहे. परंतु वस्तुस्थिति अगदीं याच्या उलट असल्यानें, येथील राज्यव्यवस्थेसंबंधानें, क्षुल्लक बाबतींतसुद्धां, पान हलविणें कसें अशक्य आहे, हें आतां उघड उघड येथील जनतेस कळून चुकलें आहे. प्रांताचें मत न घेता, पोर्तुगालनें मनांस मानेल तशा कायद्यांचें पीक पिकविणें तब्यतीनुसार कायद्यांत फरक करणें इत्यादि गोष्टी स्वराज्यनिदर्शक नसून 'सुराराज्या'चांच बेबंद अमल दर्शविणाऱ्या आहेत, हें कोण नाकबूल करील ? या विपर्याचें ताजें प्रत्यंतर चालू मा. ९ तारखेच्या कोंसिल्य लेजिस्लातीव्हाच्या बैठकींत जनतेस पहावयास मिळालें ! मोठमोठ्या कामगारांचे पगार ठरवून प्रसिद्ध केलेल्या कायद्यांत, प्रांताचें मत न विचारल्यामुळें, सदरहू कोंसिल्याच्या लोकपक्षीय मेंबरानीं आपली नापसंती दर्शवून उपरोक्त बैठकींत वसाहतीच्या प्रधानास सादर करण्याकरितां एक 'संदेश' पुढें आणला. पण उदारमतवादी गव्हर्नरानीं त्यास अराजकत्वाचा शिक्का ठोकण्यास कमी केलें नाहीं ! प्रांताचें मत न अजमावतां पाहिजे तसले कायदे करावयाचे व त्या विरुद्ध 'स्वराज्य भूषित' लोकांनीं नापसंती व्यक्त केल्यास, त्यांच्या या कृत्यास अराजकत्वाच्या कोटींत लोटून देण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न करावयाचा हें 'सुराराज्याचें' नव्हे तर दुसऱ्या कशाचें लक्षण आहे बरें ?

'अंदरकी बात राम जानें':—मुरगांवची मुंबई बनविण्यासाठीं वास्कोडीगामा येथें एक शहरसुधराई कमेटी स्थापन झाल्याचें बहुतेकांस माहीत असेलच. या कमेटीनें शहर सुधारण्याचें कार्य किती अंशाने पार पाडलें आहे, हें पुढें एखादे वेळीं पाहूं. प्रस्तुत आम्हांस इतकेंच सांगावयाचें आहे कीं, कमेटीनें शिरावर घेतलेलें 'मोटार सर्व्हीसचें' काम अत्यंत वाईट रीतीनें चालू आहे ! एक तर पुष्कळ पैसे देऊन खरेदी केलेल्या मोटारी कुचकामाच्या असून प्रवाशूंची शंभर वर्षे केव्हां भरतील याचा नेम नसतो व दुसरें असें कीं, केवळ मोटारींच्या प्रकाशावर अवलंबून राहिल्यास प्रवाशूंचा केव्हां घात होईल याचा, निश्चित वेळापत्रकाभावामुळें, विश्वास नाहीं ! वास्तविक शहरसुधराई कमेटीनें शहरसुधरण्याचेंच यश कंकण हातास बेढावण्याचें; परंतु हें कर्तव्य बाजूस सारून खटाऱ्यासारख्या मोटारानीं लोकांस नुकसान करण्याचा विडा उचलावा, या कमेटीच्या 'अन्यापारेषु' व्यापारास काय म्हणावें, हेंच मुळीं आम्हांस समजत नाहीं ! इतकेंहि असून कमेटीविषयीं लोकमत कलुषित आहे तें आहेच. 'मोटारींची किंमत फुगवितात या धंद्यांत कसली नाडानाडी चालली आहे हें एक ईश्वरासच ठाऊक ! अंदरकी बात राम जानें इत्यादि प्रकारचे टीकात्मक आरोप कमेटीविरुद्ध केलेले जिकडे तिकडे ऐकूं येतातच ! अशा स्थितींत कमेटीनें आपली सर्व शक्ति शहरसुधरण्याच्याच कामी लावण्याचा निश्चय केला असता तर फार बरें झालें असतें, असें आम्हांस वाटतें.

हाच समय आहे !:—हिंदु लोकांत दिसून येत असलेली एकी नकली व टिकाऊ नसून खरी व टिकाऊ आहे, हें सिद्ध करण्याचा समय येत्या १० तारखेच्या निवडणुकीच्या दिवशीं हिंदु नागरिकांस सांपडणार आहे. सदरहू दिवशीं सर्व नागरिक, प्रागतिक संघानें मान्य केलेल्या उमेदवारांसच मत देऊन, संघाच्या कीर्तीत भर घालण्याचा प्रयत्न करतील, अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे. ऐन वेळीं 'सांवळा गोंधळ' माजूं नये म्हणूनच तर निवडणुकीची बाबत प्रागतिक संघानें आपल्या शिरावर घेतली आहे. हेंहि कारण नजरेसमोर ठेवून हिंदुजनता आपलें कर्तव्य निःस्वार्थ व निर्भिडपणें बजावतील अशी आम्हांस उमेद आहे.

यमयातनाः—पावसाच्या दिवसांत सांवर्डेहून पणजीपर्यंत व पणजीहून सांवर्डेपर्यंत बोटीनें प्रवास करणें म्हणजे यमयातनाची रुचि चाखण्यासारखेंच आहे ! प्रवासूंची अतोनात गर्दी कोसळत असल्यावरून व त्यांस पाहिजे तितक्या जाग्यांची सोय नसल्यावरून अर्थात सर्वांचीच हवेलंडी उडून जाते. निर्जीव मालापेक्षां जास्त व्यवस्थित रीतीनें त्यांची सोय लागत नाहीं. इतकें सांगितलें म्हणजे बोटीवरील प्रवासूच्यां खऱ्या स्थितीची कल्पना चटदिशीं होईल. पहिल्या वर्गाच्या उतारूंची तर याहि पेक्षां जास्त अनुकंपनीय स्थिति असते ! चौपट पैसे भरून बिचाऱ्यांना पावसाच्या अखंड सरींच्या अखंड माराखालीं प्रवास करावा लागतो ! शिवाय एखाद दुसऱ्याला कामगारांकडून चापटपोळ्यांची पथ्थकर मेजवानी मिळते ती निराळीच ! अंधेर नगरी आहे झालें !...

> ## आभारप्रदर्शन
>
> पणजीच्या कृपाळू आश्रयदात्यांनीं तावडतोब वर्गणीची फेड करून भारतास महत्वाची मदत केल्याबद्दल भारत त्यांचा फार आभारी आहे.

वर्तमानसार

—सि. प्राजेरीस दे कोस्त यांची निवडणूक यशस्वी होण्यांसाठीं त्यांच्या स्वार्थी मित्राचे गुप्त प्रयत्न मोठ्या जारीनें सुरू असल्याची दाट वदंता आहे. ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी ! दुसरें काय ?

—आज रोजीं फोंडें येथें भरणाऱ्या प्रागतिक संघाच्या सभेचा निकाल सर्व लोकांस तावडतोब जाहीर केला जाईल.

—गेल्या व चालू आठवड्यांत पाऊस न पडल्यामुळें शेतकरी वर्ग चिंताक्रांत झाला आहे. कर वाढवा !!!.

साभार स्वीकार

वर्षफळ (पुस्तक):— दुर्गति संवत्सरचें साम्रफळ ज्यांत वर्तविलेलें आहे असें हें पुस्तक वैद्य काशीनाथ भास्कर लोककल्याण, आर्यवैद्यक बोधाचे संपादक यानीं तयार केलें असून त्याची किंमत १ रुपया आहे. ज्योतिषावर विश्वास असलेल्या लोकानीं अवश्य अनुभव घेऊन पहावा.

इतर वस्तु (फोटो) श्री. मनेजर चित्रशाळा, पुणें या कडून महात्मा गांधीं याची रंगीत तसबीर आम्हांकडें अभिप्रायार्थ आली आहे. अलीकडे महात्माजी आपलीं फोटो काढूं देत नाहींत, यामुळें त्यांच्या तरुणपणांतील एका फोटोवरून ही रंगीत तसबीर तयार करण्यांत आली आहे. तसबिरीचा आकार १५×२० इंच असून किंमत फक्त आठ आणे ठेवण्यांत आली आहे. या तसबीरीबरोबर अलीबंधूंचीहि तसबीर पाठविली आहे. किंमत ८।, साइज १०×१४.

ANNO VI.—NUMERO 15—1921 QUEPEM QUINTA-FEIRA 7 DE JULHO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinatura
INDIA PORTUGUESA........3-00-00
INDIA INGLESA..........3-08-00
NUMERO AVULSO..........0-01-00

Anuncios
Anuncio por linha........0-01-00
Para longo praso contrato especial.

भारत

BHARAT

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास.......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारे ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें. केपें, गुरुवार, तारीख ७ माहे जुलै सन १९२१ अंक १५ वा.

A' URNA, ELEITORES!

Em breves dias é a India Portuguesa novamente chamada a usar do mais nobre direito que nenhum cidadão deve abdicar, porque, fazendo-o, irá provar que não está á altura de usar dessa regalia que a Metropole nos concedeu.

Temos de eleger o nosso deputado. O voto deve ser a manifestação mais sincera do nosso modo de sentir, tem de recair naquele que, sob todos os pontos de vista, nos possa representar no Parlamento, conhecendo de perto as necessidades urgentes do Paiz de que vai ser interprete.

Até hoje temos tido como nosso representante o Sr. Prazeres da Costa, filho ilustre da India Portugueza, mas sucede que exercendo êle os elevados cargos de Auditor geral e vogal do Conselho Colonial e tendo todo o tempo por completo absorvido no seu desempenho, não podemos nem devemos exigir dele nós, os eleitores, maiores sacrificios, reelegendo-o.

Será certamente deshumano, não podemos, nem devemos fazê-lo.

Resta-nos, portanto, apresentar aos eleitores nossos com cidadãos outro nome e fazemo-lo com toda a segurança de que será aceite com entusiasmo.

Elejamos o Dr. Indalencio Froilano de Melo.

Quem está por ai que não conheça este ilustre filho da India.?

Poderá alguem negar-lhe qualidades de inteligencia e todas as mais indispensaveis para ser o nosso representante no Parlamento?

Froilano de Melo na sua passagem pela India, soube pelo seu trabalho, pelo seu caracter, pela sua indipendencia, conquistar a admiração, respeito e simpatia em todas as camadas sociais.

As suas qualidades como homem de sciencia, manifestadas aqui, reconhecidas e apreciadas em Portugal e na India Britanica, são outras tantas recomendações para lembrarmo-nos do seu nome, hoje que a India Portuguesa tem de falar pela boca das urnas.

Froilano de Melo esteve sempre á frente de todos os movimentos em que a India Portugueza teve de fazer ouvir as suas necessidades.

A sua palavra fluente, incisiva e empolgante fez-se muitas vezes ouvir em publico soube convencer os indiferentes, ascendeu a chama do patriotismo em nós todos e far-se ha ouvir no Parlamento interpretando o sentir da India.

Cidadãos da India Portugueza! A' urna pelo Dr. Froilano de Melo.

Vamos uzar do mais nobre direito civico convencidos de que contribuimos com uma pequena parcela do nosso esforço para o bem estar e progresso da India Portugueza.

A' urna pelo cidadão Froilano de Melo!

A' urna! A' urna!!

Venctexa Sar Dessay.

Pelo *Pragatica Sangh*

Reparos

Notas portuguesas

Causa nojo ver notas portuguezas que circulam no mercado.

O seu papel está sujo e roto, de maneira que produz um descredito não só no paiz mas ainda no extrangeiro que aliás mesmo está a ver-nos com olho de despreso.

Não há maneira de evitar esse descredito? Pois sejam elas recolhidas ao tesouro publico, sejam inutilisadas e substituidas por papel bom, limpo e forte. E' o que pedimos ao sr. Governador Geral para levantar-nos de pouca consideração em que estamos perante o estrangeiro.

Impostos

O assumpto momentoso que deve merecer mais atenção ao governo é o *deficit* financeiro deste paiz. Para acaba-lo, pensa-se em criação de mais impostos e elevação dos existentes, mas impostos que se pagam sem ser pagaveis são dividas a quem paga e quem paga com dividas se arruina em breve e o contribuinte arruinado representa "Estado arruinado" Daqui se vê que o alvitre de mais impostos que não se pode pagar é contraproducente. Neste caso, o bom senso aconselha economia e suspensão das despesas sem leis Doutra maneira é impossivel chegar ao desejado.

Para esse fim é necessario que todos façam um pequeno sacrificio, tanto os que contribuem, como os que recebem e esses mais do que aqueles, pois aos primeiros não deixa de doer e aos segundos não tanto deixar de receber uma pequena parte.

Em crises desta natureza sempre se pensa em medidas extraordinarias.

Um abatimento de 10 o/o no pagamento dos empregados e um lançamento de 5 o/o na contribuição durante só 3 anos parece que aliviaria a nossa desesperada situação financeira.

Adolfo Diniz

5° CONGRESSO PROVINCIAL DA INDIA PORTUGUESA

Em harmonia com o preceituado na sua Lei Organica, reuniu-se no salão das Paços do Concelho ás 16 horas sob a presidencia do sr. dr. Antonio Maria da Cunha a Comissão Central do 5° Congresso Provincial da India Portuguesa estando presentes os sr. vice presidente Francisco Xavier Teodosio de Miranda, secretario geral Roberto Bruto da Costa, secretario dr. Vitola Porobo Sinari, tesoureiro Cristovão Fernandes e os vogais da Comissão Executiva srs. Celtorio G. Lobo, Antonio Aydar Barreto, Sitarama Quirodi e Biscora Pratapráu-Sar Dessai não tendo podido comparecer os da de contas sr. Tomé José Pinto e Narana Zandoicar.

Depois dos preliminares e assentes alguns pontos foram propostos varios assumptos a versar na sessão ordinaria do 5° Congresso que se deve realisar em 25 de Novembro de 1922 e após a devida discussão e tendo em vista varias circunstancias foram designados os seguintes:

I

Estudo das condições em que poderá ser implantada na India Portuguesa o Cooperativismo Agricola.

II

Balanço comercial. A nossa exportação e importação. Meios praticos de aumentar a exportação.

Compreenderá o estudo dos meios a empregar para melhor colocação dos nossos produtos agricolas nos mercados estrangeiros tendo em vista: 1° a libertação do comercio intermediario, 2° a escolha dos mercados do destino, 3° a valorização dos produtos pela seleção das qualidades pela sua transformação e pelo afastamento de qualquer concorrencia desleal)

III

Estudo dos meios praticos de organisar a proteção ao gado (XV Conclusão do 4° Congresso Provincial)

—deliberou-se mais que fosse designado o prazo, improrogavel, de 6 mezes de 1 de Julho a 31 de Dezembro de 1922 para a apresentação de Memorias versando os assuntos designados, não devendo essas Memorias exceder a 20 paginas de papel *foolscap* escritas ou dactilografadas de um só lado devendo trazer á parte um Resumo e as respectivas Conclusões.

—Foi resolvido mais que se iniciasse a inscrissão dos Congressistas em 1 de Julho seguinte, ficando aberta a inscrições dessa data em diante. (São escritos como Congressistas 1° 2° — Os individuos que comunicarem a sua adesão mediante o pagamento da taxa de tres rupias. 3° — E as corporações que aderirem pagando a taxa de 30 rupias por cada Municipio das Velhas Conquistas 15 por cada um dos outros concelhos e 10 por cada Comunidade Agricola ou qualquer pessoa moral Ar. 13° da *Lei Organica do Congresso Provincial da India Portuguesa.*)

Por mar e por terra

Assim como por ocasião de guerra, multiplicam-se mentiras por mar e por terra, do mesmo modo por ocasião de eleições fazem-se circular palões por todos os balcões... intrujões.

Dos que se referirem ao movimento eleitoral do *Pragatica Sangh* tomaremos conta em suplementos ao *Bharat* que se publicarão em todas as segundas e sextas até o dia das eleições. Vão dentro lugar os que sairam em portuguez e marata na segunda passada.

भारत

गुरुवार आषाढ शु० २ या१८४३

स्फुट विचार

येत्या निवडणुका:— चालू महिन्याच्या १० तारखेस होणाऱ्या देपुताद व सेनादोर यांच्या निवडणुका याच महिन्याच्या २४ तारखेस होणार असें सरकारी ग्याझेटवर प्रसिद्ध झालें असून, प्रागतिक संघानें आपला पाठिंबा दे० फ्रोइलानु दे मेलु यांस देण्याचें ठरविलें आहे, हें दुसरीकडे छापलेल्या ४ तारखेच्या पुरवणीवरून वाचकांस कळलेंच असेल. दे० मेलु यांच्या उमेदवारीसंबंधानें ठिकठिकाणाहून प्रोत्साहनपर व उत्साहजनक तारांचा व पत्रांचा पाऊस पडत असून, एकंदरींत जयप्राप्तीची माळ डॉ. फ्रोइलानाच्याच गळ्यांत पडेल, अशीं स्पष्ट चिन्हें दृष्टिगोचर होत आहेत, ही समाधानाची गोष्ट होय. देशहिताच्या वरपांगी हेतूनें आपला व आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांचा व आप्तमित्रांचा अंतःकरणपूर्वक स्वार्थ साधण्याचेंच ज्या प्रतिनिधीस आपलें वजन खर्चण्याचें स्वदेशहितघातक 'व्यसन' जडलें आहे, त्याच्या विषयीं, कांहीं उपकारी व स्वार्थलंपट नोकर वगळले तर, सर्व नागरिकांचीं मनें अगदीं विटलीं असल्यास नवल नाहीं. पोटासाठीं मतविक्रय करणारांची योग्य शोभा करून, स्वदेशोन्नतीसाठीं तळमळणारे देशभक्त निःस्वार्थपणें झटून दे० मेलु यांस विजय मिळवून देतील अशी आह्मांस उमेद आहे.

लक्ष्यांत ठेवा! :— निवडणुकीचा काळ ह्मणजे कंड्यांचा सुकाळ, अशी स्थिति असल्यावरून कसल्याहि बातम्यावर चटदिशीं विश्वास ठेवण्याच्या भरीस कोणीहि पडूं नये. खरें वर्तमान आह्मीं वेळोवेळीं पुरवण्या प्रसिद्ध करूत वाचकांस कळविणार आहों हें लक्ष्यांत ठेवण्याविषयीं विनंति आहे.

'हम करेसो कायदा':— रिपब्लिकची प्राणप्रतिष्ठा होऊन दहा वर्षें गुजरलीं पण मोनार्कीच्या वेळच्या 'हम करेसो कायदा' या सैतानी वृत्तीचा समूळ उच्छेद झालेला दिसून येत नाहीं, ही दुःखाची गोष्ट होय. असें ह्मणण्याचें कारण हेंच कीं, गेल्या दिवसांमागें गव्हर्नरसाहेबानीं मडगांव येथील पाठशाळेतील रिकाम्या झालेल्या शिक्षकांच्या जागांवर' कायद्याचे नियम बाजूस ठेऊन, केवळ आपल्या मित्रांस खूष राखण्यासाठीं, नालायक इसमांची नेमणूक केली! या विषयासंबंधीं पोर्तुगीज पत्रांत डॉ. मोराइसविरुद्ध खरमरीत टीका होत असून, एकवाक्यतेनें त्यांस दोषी ठरविण्यांत येत आहे. परंतु गव्हर्नरसाहेबांच्या रक्तांत 'हम करेसो कायद्या'चें विष खेळत असल्यावरून सदरहू नेमणुका अजून कायमच आहेत! अशा स्थितींत आह्मीं आणखीं जास्त तें काय लिहिणार?!

ह. भ. प. रिसबुड:— या बोवांचीं कीर्तनें सध्या गोव्यांत सुरू असून, त्यांपासून श्रोत्यांचें बरेंच कल्याण होणार आहे. बोवानीं विषयप्रतिपादनांत सध्या पेक्षां जास्त गांभीर्य व्यक्त करण्याचा परिपाठ ठेविल्यास त्यांचीं देशहितपर कीर्तनें सर्वमान्य होण्यास उशीर लागणार नाहीं, अशी त्यांस आमची प्रेमाची सूचना आहे.

धर्म व आचार

(ले. श्री. गो. हेदे)

एकधर्मी असतांना आचारविचारांत व रीतिभातींत भिन्न मतें झाल्यामुळें मुळच्या एका धर्मातून व आचारांतून, भिन्नभिन्न मतांमुळें निराळे होऊन, एका धर्माचे अनेक व भिन्न भिन्न धर्म व आचार विचार निर्माण झाले. व त्याच्या त्या भिन्नभिन्न विचारानुसार, स्थिति, काल व स्थलानुसार भिन्न भिन्न चालीरीति निर्माण झाल्या. तेव्हां आचार हें धर्माचें द्योतक आहे; व हें मागें सांगितलें आहे. आणि ह्मणूनच आमच्या परमपूज्य शास्त्रकारांनीं "सर्वांग मानामाचारः प्रथमं परि कल्पते। आचार प्रभवो धर्मो धर्मस्य प्रभुरच्युतः॥ असा सिद्धांत करून ठेविला असावा. प्रभु अच्युत या पासून धर्म व धर्मापासून आचार, तेव्हां सर्वांच्या अगोदर आचार हा पहिला कल्पिला आहे. व ही कल्पना वरील माझ्या प्रमाणावरून खरी ठरते. कांतर जसें जगाच्या प्रारंभीं मनुष्य आदिकरून सर्व वस्तुजात ईश्वराकडूनच निर्माण झाली, तसाच त्याकडून धर्महि निर्माण झाला असावा. कारण जर जगच ईश्वर रचीत आहे, व मनुष्य आदिकरून सर्व वस्तुजात त्यानेंच निर्माण केली, व मनुष्य हा जन्मतःच अज्ञानावस्थेंत असतो, व तो सर्व वस्तु ईश्वर रचीतच भोगतो, तर हा धर्महीं त्याला ईश्वरापासूनच मिळाला पाहिजे. मुलास अज्ञानावस्थेंतून सज्ञानवस्थेंत येण्यास जसा गुरु लागतो व त्याला जें ज्ञान मिळतें तें गुरुपासूनच मिळतें, गुरुकडून ज्ञान मिळालें नसतें तर तो अज्ञानीच राहिला असता. तेव्हां त्याचें तें ज्ञान जसें गुरुप्रणीत असतें, त्याचें स्वतःचें नसतें व त्याचें तें स्वतःचें असणें शक्य नाहीं, तशीच धर्माची गोष्ट आहे. ईश्वरानें प्रथमतः मनुष्य निर्माण केला, त्यास ज्ञान दिलें व धर्म सांगितला. तेव्हां मूळ धर्म हा ईश्वरप्रणीतच मानिला पाहिजे. २ रें. यद्यपि मनुष्य रचीत असला तरी तो पर्यायेंकरून ईश्वर रचीतच होतो. मनुष्यास जें ज्ञान आहे तें त्यास ईश्वरानेंच दिलें आहे. तें त्याचें स्वतःचें नव्हे. कारण मानवेतर प्राण्यास ज्ञान नसतें. तेव्हां हा जो धर्म आहे तो जरी ईश्वरप्रणीत नसून मानव रचीत आहे(असें घटकाभर मानलें) तरी तो त्या ज्ञानाच्या योगानें केला असल्यानें तो ईश्वर प्रणीतच ह्मटला पाहिजे. कारण जें मनुष्य करितो तें त्याचें स्वतःचें नव्हे तर तें ईश्वरप्रणीतच होय! व ह्मणून वर तसें ह्मटलेलें असावें.

धर्माशिवाय त्याचा आचार ह्मणून निराळा नसता तर अमुक धर्म, तो कोणत्या प्रकारचा व त्या धर्माचे लोक कोणत्या प्रकारचे हें ओळखण्यास कठीण पडलें असतें. परंतु प्रत्येक धर्माचा आचार निराळा असल्यावरून अमुक मनुष्य अमुक या धर्माचा आहे हें तात्काळ ओळखितां येतें. हा आचार नसता तर ओळखितां आलें नसतें.

आचार हा शब्द आचरणें ह्या क्रियापदाच्या धातूपासून झाला आहे. त्याचा अर्थ:— शास्त्रांत सांगितलेलें कर्मादिकांविषयीं जे विधिनिषेध त्याचें पालन करून जें वर्तन तें, किंवा वर्तन प्रकार तो" असा आहे. "शास्त्रोक्त स्नान संध्यादिक जो आचार आणि कर्तव्याकर्तव्य जो विचार तो आचार विचार होय. अशी आचार विचाराची व्याख्या आहे.

आचाराप्रमाणेंच चालीरीतिहि धर्माचीं द्योतकें-निशाणी- आहेत. प्रत्येक धर्माच्या आचारविचारांप्रमाणेंच चालीरीतिहि निराळ्या असतात, हें वर सांगितलेंच आहे. चालीरीति ह्मणजे बोलणें, चालणें, (चलन वलन करणें) इत्यादि व्यापार करण्याने जे देशभेद, कर्तृभेदादि निरनिराळे अनेक प्रकार त्या, किंवा प्रकारभेदें करून भिन्न भिन्न जे वर्तन प्रकार त्या चालीरीति ह्या देश, काल, स्थिति धर्म व समाज यांवर अवलंबून आहेत. कारण त्या माणसाच्या चलन वलन करण्याच्या क्रिया आहेत. त्या एका कालीं असलेल्या दुसऱ्या कालांत टिकण्याचा संभव नाहीं. कारण त्या चलन वलन करण्याच्या क्रिया असल्यानें, एका कालीं, त्या कालास स्थितीस वगैरे अनुसरून घातलेल्या दुसऱ्याकालीं ठेवण्यास, त्या कालासारखा दुसरा येणारा काल वगैरे नसल्यामुळें व तो नवा असल्यानें ह्या नव्या कालीं जुन्या कालाचें चलन वलन उपयोगी पडणार नाहीं. चलनवलन करण्यास त्यायोगें व्यत्यय येईल. तेव्हां व्यत्यय न येण्यास व सुरळीतपणें चालून सुखदायक होण्यास नव्या कालाप्रमाणें नव्या चालीरीति झाल्या पाहिजेत. निघून जाणाऱ्या जुन्या कालाप्रमाणें जुन्या चालीरीति सोडून दिल्या पाहिजेत. उदाहरणार्थ, राजा जसा काल स्थितिप्रमाणें कोदिगांत [कायद्यांत] आवश्यक ते फेरफार करितो तसेंच चालीरीतींचें आहे. पण त्या सोडून देताना व नव्या घेतानां [चालीरीतींत सुधारणा घडवून आणताना] एकमेकांविरुद्ध करूं नये. तर पूर्व चालीस धरून नव्या कालानुसार आवश्यक त्या नव्या चाली कराव्या; ह्मणजे जुन्या काळच्या नव्या मनूत अडतात त्या सोडून देऊन नवीन प्राप्त कालानुसार त्या सारख्याच, प्राप्त कालास सोईवार व आवश्यक अशा चालीरीति नवीन घालाव्या; पूर्वीच्याही अगदीं सोडूं नयेत व ठेऊंही नयेत. ह्मणजे ज्या प्रमाणें एखादा वैद्य एकाच रोगावर असलेलें औषध, त्याच रोगाच्या निरनिराळ्या माणसांस देताना प्रकृतिमानाप्रमाणें निरनिराळ्या अनुपानांतून देतो, तद्वत चालीरीतींत परिस्थित्यनुसार बदल झाला पाहिजे. ह्मणजे ज्याप्रमाणें एकच औषध पण ज्याच्या त्याच्या प्रकृतीप्रमाणें निरनिराळ्या अनुपानांतून दिल्यामुळें त्यांस सुखावह होतें तद्वत् चालीरीतींचें आहे. ह्मणजे योग्य परिस्थितीप्रमाणें चालीरीतींत योग्य ते फेरफार झाल्यास त्यापासून सुखच होईल. कारण त्या चलनवलन करण्याच्या क्रिया असल्यामुळें, अमक्यानें अमक्याच तरेनें चलनवलन [हालचाल करणें) करावें, असें अमुक एकाकालीं सांगून तें तसेंच दुसऱ्याकालीं चालविण्यास सांगितलें तर तें किती उपयोगाचें होईल? व अशा तरेचें करणें ह्मणजे कैदीपणा होय. कैदीसुद्धां आपल्या बंधनावस्थेंत आपणास पाहिजे तसें, पाहिजे त्या वेळीं, गरज पडेल तसें चलन वलन करितो; व असेंच करण्यानें खरें सुख आहे. तरी पण चलन वलन करितानां काळ, स्थिति, व स्थळ पाहून, विचारपूर्वक किंवा आपणापूर्वी योग्य प्रकारें केलेल्याचें अनुकरण करून अथवा विचारून किंवा एकमेकांत विचार करून सोईवार व सुखदायक असें कारणपरत्वें चलन वलन करावें. आणि अशाच हालचाली पासून सुख होईल. [चालू]

मडगांवची परिस्थिति

A UNIAO FAZ FORÇA

राहिलां जरी एक जुटी
मग काय विचारतां बळकटी

सत्य असेल तें बोलणार
व शक्य असेल तें करणार
आगरकर

सुधारणेच्या बाबतींत सर्वस्वी मागसलेल्या ह्या लहानशा टापूंतील रहिवाशांपैकीं सुशिक्षित ह्मणून नांवाजलेल्या लोकांत मडगांवस्थांची गणना होते.

मडगांवकर मंडळी सुशिक्षित आहे, ह्यांत संदेह नाहीं, पण केवळ हट्टास पेटून आपल्या सुधारणेच्या आड येणारी जी दुही तिच्या उच्चाटनार्थ ही सुशिक्षित मंडळी झटत नाहीं, ही आश्चर्याची गोष्ट नव्हे काय?

मडगावांत दोन संस्था आहेत पण त्यांची उत्पत्ति केवळ फाटाफुटीच्या पायीं झाली आहे.

माझ्या मतें एक संस्था असूनही ती जर एकमतानें चालत असली तर तिच्या हातून जितकें देशकार्य घडून येणार आहे, तितकें फुटीनें उत्पत्तीप्रत पावलेल्या हजारों संस्थांपासून घडून येणार नाहीं व हीच गोष्ट मडगांवास लागू होते. परस्परस्पर्धेमुळें ह्या संस्था जरी वाढत्या प्रमाणांत आहेत, तरी देशकार्याच्या बाबतींत केवळ स्पर्धेमुळें उत्पन्न झालेलें हें वाढतें प्रमाण बिलकूल उपयोगी नाहीं, ही गोष्ट कोणासहि नाकबूल करितां येणार नाहीं. मागचे सर्व द्वेषभाव विसरून जाऊन जर एव्हांपासूनच मडगांवकर एकी घडवून आणतील, तर दुही नांदेपर्यंत जी कामगिरी त्यांच्या हातून होणार नाहीं ती ह्या अवधींत घडून येणार आहे व त्याचप्रमाणें ह्यापासून दुसऱ्या मागसलेल्या लोकांस धडा घालून दिल्यासारखें होणार आहे.

संस्था स्थापन करून देशकार्य करण्याची कामगिरी तर दूरच राहिली, पण उलट दुहीचा धडा घालून दिल्याचा दोष मात्र खचित मडगांवकरांस चिकटल्याशिवाय राहाणार नाहीं.

आतां देशोन्नतीचा काळ आहे आणि अशा वेळीं देशकार्यास अत्यंतावश्यक अशीं एकी सोडून देऊन तिच्या ऐवजीं दुही घेऊन बसण्यासारखी आश्चर्याची व अपकर्षाची गोष्ट दुसरी कोणतीच नाहीं, व त्यांत त्यात्यांत मडगांवस्थांसारख्या शहाण्या लोकानीं अशीं दुही घेऊन बसणें ह्मणजे त्यापासून एक मोठी हानि करणें असून शिवाय शहाण्यानीं आरंभिलेला हा लपंडाव देशास खचित जाचक झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

कोणत्याहीं कारणामुळें दुही माजलेली आहे, ही गोष्ट खरी आहे, पण संस्था स्थापन करून तीजपासून देशाची सुधारणा व्हावी असें जर मडगांवस्थ इच्छित असतील, तर खचित त्या कामीं त्यांस यश येणार नाहीं व अर्थात संस्था स्थापनेपासून कांहीं तरी कार्यनिष्पत्ति व्हावी असें वाटत असल्यास कोणत्याहि कारणामुळें माजलेला हा बखेडा मोडण्याच्या कामीं मडगांवस्थानीं झटणें ह्मणजेच एक कार्यनिष्पति असून तीजपासून बरेंच देशकार्य होणार आहे. असो.

मी एक मडगांवस्थ आहे व आपल्या

ANO VI.—NUMERO 16 — 1921 | QUEPEM QUINTA-FEIRA 14 DE JULHO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinatura
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............. 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत

BHARAT

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया........... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें. | केपें, गुरुवार, तारीख १४ माहे जुलै सन १९२१ | अंक १६ वा.

A representação Parlamentar da India

Concedida a autonomia, uma representação politica no parlamento metropolitano seria, no dizer de muitos, uma infantilidade, quando não um trambolho para o exercicio livre da uma administração autonoma Ha quem suponha mesmo, e com notavel auctoridade, que a autonomia e representação parlamentar, enlaçando-se mutuamente, perderiam, a favor uma da outra, deveres e atribuições que, velando uns e cerceando outras, falseariam a sua missão. Simplismente, quem assim pensa, esquece, porventura, na fé duma concepção politica ideal, que, mesmo dentro da mais ampla autonomia, é mantida á soberania nacional, inherente ao Congresso Nacional, o alto poder de intervenção na administração local, mais ampla, mais rasgadamente liberal. Ninguem melhor, mais competentemente habilitado que os representantes politicos da localidade para informar regular e serenamente a oportunidade ou a inconveniencia dessa intervenção e facilitar o exercicio salutar de tão alto poder.

Aproveitaria a provincia que defensores auctorisados tomassem a seu cargo os seus grandes interesses; aproveitaria a metropole que o exercicio do direito de *voto* se realisasse no mais pleno conhecimento de causa e, por este modo, laços de fraternidade politica vinculassem os mais afastados districtos da Soberania Politica.

Marnoco e Sousa, notavel jurisconsulto portugues, abordando com afoitesa o problema da autonomia colonial, sentenciou: que a existencia duma representação colonial é o vinculo moral, mais forte que pode unir as diferentes partes da nação. Mas, já antes dele, amparavam-na, sem receio, Hume, Howe, Helderich distinctos colonialistas extrangeiros.

A concessão de autonomia com representação parlamentar teria, pois, a superior vantagem de, permitindo a provincia desenvolver-se, segundo as suas proprias instituições facilitar o exercicio dos direitos de soberania, sem atrictos detestaveis; e a fraternidade das relações politicas favoreceria o desenvolvimento expontaneo de um sistema federal, base unica de possivel dependencia entre povos afastados e diversos.

Ao regimen de autonomia e assimilação *á là longue* que Afonso d'Albuquerque imaginou e que mal teve tempo de ver realisar, substituiu-se subrepticiamente um regimen de assimilação forçada em que se arrancaram violenatmente aos hindus as suas instituições e o seu culto, se vexaram os seus naturais mentores e nessa hecatombe das suas mais sagradas tradições mais parecida com o cahos antes da conhecida façanha do Jehovah instalaram as instituições cristãs. Aconteceu-lhes então exactamente o que acontéce a quem é lançado abruptamente n'uma terra hostil de que não conhece nem a lingua nem os usos e de que sò conhece a hostilidade e as violencias, ao terror sucede um periodo de infantilismo em quem olhando aqui e alem, respirando acolá pontos de semelhança, analogias dispersas procura reconstituir a memoria dos seus conhecimentos antigos e reatar o curso dos seus pensamentos

No campo administrativo a polemele foi sem conto. Toda a Legislação de Portugal cahiu torrencialmente sobre a provincia e, na torrente desapareceu, vergastada pela onda, toda a legislação peculiar, mais solida e mais secular. Desconhecendo como desconhece a idiosincrasia particular da sociedade indiana nem curando de conhece-la, esperava o fanatismo luso cristão proclamando-se como unica verdade, que a graça do seu *Deus* quebraria sem escrupulos, uma tradição secular de usos e costumes, de modo a ser promptamente comprehendido pelo espirito indiano o espirito cristão talves como no Evangelho os Apostolos pelas sete linguas do Mundo!

Tentativas não faltaram para pôr dique a essa incontinencia legislativa, mas essas tentativas resultaram sem rebate.

Sant'Ana Rodrigues (conti.-)

Como classificar?!

Não sabemos como classificar o selvatico, cobarde e vergonhoso rapto de que foi victima o redactor da *Terra* que foi, tambem cruelmente espancado.

Folhe'amos, pagina por pagina linha per linha, e—palavra!— palavra por palavra todos os diccionarios que embelesam a nossa pobre livraria, desde os de Roquete e João de Deus atè o do Candido e não encontramos neles—francamente o dizemos —adjectivo, que se adoptasse ao caso traduzindo fielmente o grau da intensidade da indignação que em nós produziu o abominavel atentado:

Como classifica-lo, pois?

Suprema vergonha aquem tal crime praticou, desdouro da natureza quem o premiditou!

Mas disem-nos os bondosos velhos cá da vizinhança que é prudente reservarmos os comentos para *depois*... Faça-se-lhes a vontade, que o caso não é tão *grave*, ainda que gravissimo o estado do raptado. E, porisso, limitamonos por hoje a registar aqui o nosso veementissimo protesto contra a selvageria exercida na intrepida pessoa do director da *Terra* a quem desejamos, de fundo d'alma, pronto restabelecimento.

DESFAZENDO INTRIGAS

Bem o diziamos: por ocasião das eleições multiplicam-se palões por balcões... intrujões!

Alem dos desfeitos em suplementos somos forçados a reduzir as suas justas proporções mais os seguintes palões:-

1°

E' distituido de fundamento o palão (o palão sempre é distituido de fundamento) de que o movimento eleitoral da classe hindu visa pregar uma lição mestre (quem tal diria!) à ilustre classe cristã que os hindus procuram no dizer do palão suplanta-la!

Devem ser verdadeiramente almas do diabo os que tal historieta fantasiaram!

A candidatura do dr. Melo que é *cristão* foi apresentada por cristãos e *não cristãos*; o *Pragatica Sangh* que é uma organisação politica dos hindus simpatisando-se com o ilustre sabio que reune em si mais do que ninguem sem disprimor a quem quer todos os requisitos para dignamento o representar a India no Parlamento apoiou-a.

Nada mais natural, nada justo.

¿Onde há, pois, nisso o intento de pregar lições e fomentar *classismos*. onde o movimento de suplantar cristãos?

Se trabalhar pêlo triunfo da candidatura dum *cristão*, secundando os desejos dos *cristãos* é *aquilo*, então... temos conversado!

2°

E' igualmente falso que o director do *Bharat* tenha solicitado com reiterados pedidos *qualquer lugar* ao sr. Prazeres da Costa e que por este ter-lhe recusado a satisfação o *Bharat* esteja guerreiando a candidatura do ilustre auditor geral.

Verdade é que o redactor desta folha permitiu-se indicar ao então *seu deputado* nomes de cavalheiros distinctos da classe hindu para que por ele lhes fosse melhorada a situação porque eram disto dignos, talvez mais do que muitos ouros...

Mas perguntamos:

¿A que vem esse passado remoto de belos tempos de *promessa*?

¿Estamos por ventura guerreando a candidatura do sr. Prazeres por questões ou ressentimentos pessoaes se é que se supõe have-los?

¿Foi a humilde pessoa do director do *Bharat* que sugeriu na reunião do *Pragatica Sangh* a idea de oposição?

Não, não, não. O *Pragatica Sangh* considerando, talvez não ser *propriedade privativa* do sr. Prazeres da Costa o lugar do deputado ou senador e entendendo quiçá que não valia a pena maçar de mais o digno auditor geral e inteligente vogal do Conselho Colonial, apoiou a candidatura do verdadeiro patriota e grande orador Dr. Froilano de Melo.

E nós que somos um dos membros do directorio do mesmo *Sangh* tinhamos de cumprir a determinação desta agremeação politica, o que estamos fazendo por todos os meios ao nosso alcance.

¿Há em tudo isso qualpuer coisa de estranhar?

Diabolicas criaturas que por *caminhos tão escusos* procuram servir ao seu *senhor*!

Diabolicos, não haja duvida! Mas as intrigas não pegam.

भा र त

गुरुवार आषाढ शुं० १० मी १४८६

स्फुट विचार

नीचपणाचा कळस:— गेल्या आठवड्यांत मडगांवच्या 'आ तेन्द' पत्राच्या संपादकांवर अचानक रीतीनें हल्ला करण्यांत येऊन त्यांस बेदम झोडपण्यांत आलें ! या मारामुळें त्यांचा उजवा हात बहुतेक निकामीं झाला असून, ते सध्या मडगांवच्या ओस्पिसच्या हास्पिटलांत विव्हळत पडले आहेत ! हल्ला करणारे इसम असेच कोणी तरी 'राणे' किंवा 'सांवत' नसून चार मिलिटरी ऑफिसर होते. या आफिसरांनीं सदरहू आमच्या व्यवसाय बंधूस अनेक भूलथापांनीं मोटारींत बसवून कुंकळ्ळी पर्यंत नेलें, व तेथें कांहीं गोष्टीसंबंधीं चर्चा झाल्यावर चौघे आफिसरांपैकीं पायद्योस सोरेर नांवांच्या एका शूरानें 'आ तेन्द' कर्त्यांस मध्यंतरीं अत्यंत क्रूरपणें चोप देऊन परत मडगांव येथें त्यांच्या आफिसांत पोंचतें केलें ! नंतर त्याच्या मित्रांनीं त्यांस उपरिनिर्दिष्ट हास्पिटलांत नेलें. असा हा हल्ल्याचा आटपशीर सारांश आहे. वरील मिलटऱ्यांच्या नीचपणाच्या कळसास कोणतें नाव द्यावें हेंच मुळीं आह्मांस समजत नाहीं. बाकी त्यांचा समज जर सरकारच्या कृत्यांवर सणसणीत टीका करणाऱ्या पत्रांची उपरोक्त यतकृत्यानें मुस्कटदाबी करण्याचा होता, तर तो सपशेल फसला असें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें

लोक काय बोलतात:— ज्या चौघां आफिसरांनीं गोऱ्या मिलिटरी इभ्रतीस काळिमा फांसण्यास उपरोक्त हल्ला केला, त्यांत एक खास गव्हर्नर जनरलच्या हाताखालचा 'आजुदांत' होता. त्यामुळें कांहीं लोक 'खुद्द साहेबमजकुरांचें अंग त्यांत आहे, न पेक्षां वरील गोऱ्यांकडून भरदिवसा इतकें काळें कृत्य कदापि घडून आलें नसतें !' असा सखोद्गार काढण्यास कचरत नाहींत !... पण असो. या नाटकाचा शेवटचा अंक समाप्त झाल्यावर, या संबंधीं आमचे विचार आह्मीं नमूद करणार असल्यामुळें, हल्ला करणाऱ्या गोऱ्या ठगांविषयीं तीव्र निषेध व आमच्या 'जखमी' व्यवसायबंधूविषयीं पूर्ण सहानुभूति व्यक्त करून, सध्या हा विषय इतक्यांतच आटोपता घेतों.

चोऱ्यांचा सुकाळ:— खांडोळें[फोंडें] येथें व आणखीं कित्येक ठिकाणीं चोऱ्यांस ऊत आला असून, त्यामुळें पुष्कळ जमीनदारांस निमूटपणें नुकसान सोसावें लागत आहे ! नवीन काबिजादींतील जमिनीवर जुन्या काबिजादींतील जमिनीप्रमाणेंच कर लादण्यांत येत असतां, येथें शांततेनें जमिनीचा उपभोग घ्यावयास मिळावा व तेथील जमिनी चोरांची वसतीस्थानें बनावीं, हें आश्चर्य नव्हे काय ? पण सांप्रतच्या आश्रमाच्या काळांत वरील प्रकार दृष्टीस पडला नसता, तर मात्र आश्चर्य होतें, असेंच ह्मटलें बरें !

भाविकांस विनंति.

सालाबादांप्रमाणें येत्या आषाढ शु॥ ११ दशी शुक्रवार ता. १५-७-२१ रोजीं येथील श्रीलक्ष्मीसरस्वतीमंदिरांत भजनी सप्तप्रहरोत्सवास येऊन साजरा करावा अशी भाविकांस अत्याग्रहाची नम्र विनंति आहे.

कुंकळ्ळी, सांवरकट्टा—

ए. भ. मंडळ

R. Q. R.

धर्म व आचार

(ले. श्री. गो. हेदे)

जर आपल्या चालीरीति पसंत न वाटून दुसऱ्याच्या पसंत वाटल्या व आपल्या सोंडून दुसऱ्यांच्या चालीरीतींचें अनुकरण करावेसें वाटलें तर आपल्या सोडतांना व दुसऱ्यांच्या घेतांना चांगला विचार करून घ्याव्या;नाहीं तर त्यापासून अपाय होण्याची भीति आहे. ती भीति अशी:— दुसऱ्यांच्या चालीरीति पसंत वाटून त्याचें अनुकरण करावें, अशी इच्छा होते वेळीं आपणाशीच असा विचार केला पाहिजे कीं, आपणास पसंत नसलेल्या आपल्या चालीरीति खरोखरच वाईट आहे काय ? वाईट त्या कां व कशा आहेत हेंहि शोधिलें पाहिजे. तसेंच दुसऱ्याच्या पसंत वाटणाऱ्या चालीरीति खरोखरच चांगल्या आहेत काय ? किंवा त्या वरच भुलविणाऱ्या आहेत, त्यांच्यांत आपल्या पेक्षां चांगला गुण कोणता आहे; आपल्या चालीरीतींत व त्यांच्यांत बरें वाईट तें अंतर काय आहे; तसेंच आपण व दुसरा सर्व बाबतींत ह्मणजे स्वभावांत, प्रकृतींत सारखे असून, शिवाय दोघांची स्थिति काल व स्थल सम आहेत काय, इत्यादि सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्या पाहिजेत व बारीक दृष्टीनें पाहून विचार केल्यावर, आपल्यांत व त्याच्यांत कांहींच व कोणत्याच बाबतींत अंतर नसल्यास व त्यांच्या पसंत वाटल्यास बेलाशक घ्याव्या; पण तेंच जर कां, याच्यां अगदीं उलट असेल व त्या पसंत वाटून, घ्याव्या वाटल्यावर कधींच घेऊं नयेत. त्याचें कारण असें आहे. प्रत्येकाच्या चालीरीति त्यांच्या स्थिति, काल स्थल व धर्म यां परत्वें असतात. तेव्हां या बाबतींत जर दोघांचें अगदीं उलट अंतर असेल तर तितकेंच अंतर त्यांच्या अनुकरण बाबतींत येईल व तें मग त्यास अपाय करणार ! यांचें स्पष्ट उदाहरण दाखविण्याची जरूरी नाहीं. कारण, एकाच्या उलट दुसरें असतां त्यापासून परिणाम काय होईल हें प्रत्येकास माहीत असेलच-

सध्या आह्मीं हिंदुस्थानांतील आर्यधर्माच्या हिंदु लोकांनीं आमचा सनातन धर्म त्याचा आचार विचार व चालीरीति टाकून देऊन परकीयांचा (युरोपियनांचा) धर्म, आचार विचार व चालीरीति उचलल्या (स्वीकारल्या) आहेत, ही किती खेदाची गोष्ट आहे. पहा, त्यांच्यांत [परकीयांत व आह्मांत, स्थिति, काल, स्थल, धर्म वगैरे परत्वें जमीन अस्मानाइतकें अंतर आहे व तें असें:— त्यांचा देश थंड, आमचा शितोष्ण; त्यांची स्थिति निराळी व आमची निराळी; ह्मणजे ते स्वतंत्र, आह्मी परतंत्र; त्यांचा उन्नतिकाळ व आमचा अवनति काल; त्यांचा धर्म निराळा व आमचा निराळा; आमचे आचारविचार व रीतिभाति निराळ्या व त्यांचे आचारविचार व रीतिभाती निराळ्या असें अगदीं परस्पर उलट अंतर आहे. त्यांच्या देशकाल मानाप्रमाणें त्यांच्या चालीरीति आहेत. व धर्माप्रमाणें आचारविचार आहेत. आमच्या देशच्या शितोष्ण काल मानाप्रमाणें आमच्या चाली रीति असून, आमच्या धर्माप्रमाणें आमचे आचार विचार आहेत- ह्मणजे आमच्या देशाच्या सोईच्या मानानें आमचा धर्म आचारविचार व चालीरीति असल्यानें, ह्याच आह्मांस सुखावह आहेत. त्यांची [युरोपियन वगैरेंचा) देशच्या सोईच्या मानानें त्यांचा धर्म, आचारविचार व रीतिभाति असून त्या त्यांस सुखदायक आहेत. असें असतां आह्मीं, आमच्या देशास, स्थितीस, व कालास अनुसरून असलेला आमचा धर्म, आचार [कर्म] व रीति, सोडून देऊन दुसऱ्या देशचा धर्म आचार, व चाली–जरी त्या, त्या देशाला अनुसरून असल्या व त्या योगें तेथें त्यांस सुख होत असलें तरी त्या; ज्या आमच्या देशाशीं, स्थितीशीं कालाशीं व धर्म, आचार व चाली यांशीं अगदीं उलट आहेत, व शिवाय अपायकारक आहेत, त्या आह्मी घेऊं लागलों आहोंत व त्यापासून किती अपाय व नुकसान होत आहे याचा कोणीच सुशिक्षित किंवा अशिक्षित, तरुण किंवा वृद्ध, विचार करित नाहीं ही किती खेदाची गोष्ट आहे बरें ! आमचा धर्म आमचा आचारविचार, व आमच्या चालीरीति, आमचा देश, काल, परिस्थित्यनुसार असल्यानें त्या पासून आह्मांस खरें सुख होणार, तें त्या पासून प्रमाणांत अगदीं उलट असलेल्या, धर्म, आचार विचार व चालीरीति यांपासून कधींच मिळणार नाहीं. हें निःसंशय सिद्ध होय ! उलट अपायच होणार ! आमचा धर्म आमचे आचारविचार व आमच्या चालीरीति त्यां पासून कसें सुख आहे तें मी पुढें दाखविणार आहे.

समाजबांधवांस इषारा !

वांचक हो,

पोर्तुगालमधील नवीन पार्लमेंटमध्यें पोर्तुगीज इंडिया [गोवें, दमण, दीव] च्या तर्फेनें जे दोन सभासद [देपुताद व सेनादोर] जावयाचे, त्यांच्या निवडणुका [एलैसाव] करितां, चालू जुलई महिन्या २४ वी तारीख हा दिवस नेमला गेला आहे.

निवडणुकांचें समारंभ आजपर्यंत पुष्कळदां होऊन गेले आहेत. तेव्हां त्याविषयीं विशेष कांहीं सांगावयाची जरूरी नाहीं. ह्मणून, हिंदुसमाजांतील मतदारानीं आपलीं मतें या प्रसगीं कोणाला द्यावीं हेंच काय तें आतां पहावयाचें आहे.

राजकीय स्वरूपाचे पुष्कळसे प्रश्न असे असतात कीं, त्यांसंबंधांचा निश्चय करावयाचा असतांना तद्विषयक एकंदर साधकबाधक कारणें—– विशेषतः पक्षप्रतिपक्षांच्या सामान्यास सुरुवात होत असतां—– प्रसिद्धपणें मांडण्यासारखीं नसतात. कारण, सर्वच कांहीं उघड करून सांगणें, भावी यशप्राप्तीच्या दृष्टीनें, इष्ट नसतें.

ह्मणून या ठिकाणीं आह्मीं एवढेंच सांगतों कीं, हिंदुसमाजाच्या हितसंबंधांच्या सर्व दृष्टींनीं विचार करून चालू निवडणुकींत देपुतादच्या जागेकरितां येथील प्रसिद्ध वक्ते व देशभक्त दौतोर फ्रोइलानु दे मेलु यानांच सर्व हिंदु मतदारांनीं आपलीं मतें द्यावीं असें 'प्रागतिक संघाच्या' येथ मुक्कामीं भरलेल्या बैठकींत सर्वानुमतें ठरविण्यांत आलें आहे.

दौतोर फ्रोइलानु द मेलु हे गोमांतकांतील अत्यंत उत्कृष्ट अशा दोन तीन वक्त्यांपैकीं एक आहेत; त्यांची बुद्धिमत्ता व विद्वत्ता वाखणण्यासारखी आहे; इकडील लोकपक्षाची सर्वांत मोठी राजकीय संस्था जी 'कोंग्रेस प्रोवींसियाल' तिचे ते एक आधारस्तंभ आहेत, शास्त्रज्ञ या नात्यानें तर त्यांची कीर्ती आज सर्व सुधारलेल्या राष्ट्रांतून दुमदुमत आहे. इत्यादि गोष्टी ज्याना ठाऊक आहेत, त्याना 'प्रागतिक संघानें' केलेली ही निवड यथायोग्य झाली हें सहज कळून येण्यासारखें आहे.

त्याचप्रमाणें सेनादोरच्या जागेकरितां उभे राहिलेल्या उमेदवारांपैकीं हिंदुसमाजाच्या हितसंबंधाच्या दृष्टीनें, कापितांव तेनेंत बोबेल मोत यांना आह्मीं आपलीं मतें द्यावीं असेंही ठरविण्यांत आलें आहे.

केवळ हिंदुसमाजाची राजकीय उन्नति हेंच ध्येय डोळ्यांपुढें ठेवून 'प्रागतिक संघ' या संस्थेची उभारणी झालेली आहे ही गोष्ट आतां कोणास नव्यानें सांगावयास नको. अर्थांत 'प्रागतिक संघाच्या या ठरावास अनुसरून वागण्यांतच हिंदुसमाजाचें हित आहें हें आणखी निराळें सांगण्याची जरूरी वाटत नाहीं.

पार्लमेंट व तत्सदृश इतर यांकरितां प्रतिनिधि निवडण्याचा प्रजेला असलेला हा हक्क अत्यंत महत्वाचा आहे; व ह्मणून तो योग्य रीतीनें बजावला जाण्याची फारच जरूरी आहे. परंतु [एक दोन प्रसंग खेरीज) करून आमच्या समाजाकडून आजवर या बाबतींत शोचनीय असें औदासिन्यच दाखविण्यात आलें आहे ही गोष्ट इष्ट नाहीं. अशा प्रसंगीं उदासीन राहणाराना कांहीं कांहीं बाबतींत चालू राज्यव्यवस्था जर स्वःताला जाचक होत असेल; तर त्याविरुद्ध तक्रार करण्याचा हक्क पोंचत नाहीं.

ह्मणून

चालू व्यवस्थेंत इष्ट अशा प्रकारचे फेरफार आपल्याला हळू हळू करून घ्यावयाचे आहेत ही गोष्ट लक्षीं धरून,

त्या करितां आपल्या हक्कांचा योग्य उपयोग करून घेण्याचे कामीं कसूर होतां कामा नये: याची पूर्ण जाणीव मनांत बाळगून,

आणि या कामीं जरी थोडी मेहनत दगदग, वेळ आणि पैसा यांची झीज, हीं सोसावीं लागलीं तरी, अशी संधी पांच वर्षांतून एकदांच यावयाची असते कडे लक्ष देऊन तीं सोसून,

हिंदु समाज यावेळीं आपल्या पालनाच्या कामीं माघार घेणार नाहीं अशी आह्मीं आशा करितो.

रामचंद्र पांडुरंग वैद्य
भास्कर महाबल बोरकर
शांताराम सदाशिव साखरदांडे
भास्कर रुद्राजी ता० प्र० सरदेसाई
सीताराम विश्वंभर केरयेकर
पांडुरंग केशव कामत झामाई
बाळकृष्ण लाड० ना. प्र. सरदेसाई
शांताराम धर्माजी डांगी
हिरबा विनायक सांवर्डेकर
बाळकृष्ण वामन सांवर्डेकर
विनायक सखाराम पिसुर्लेकर
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
महादेव श्रीनिवास भोबे काकुडे
रावजी दत्तू महात्मे
शांबा कृष्णाजी सूर्यराव सरदेसाई
वासुदेव लक्ष्मण राजाध्यक्ष
रघुनाथ वामन गुडे
व्यंकटेश विनायक सू० सरदेसाई
रघुनाथ अनंत भांडारी
बाळकृष्ण दत्ताराम साखरदांडे
दत्ताराम गोविंद [illegible]
बापू शिर[illegible]

ANO VI.—NUMERO 17 —1921 QUEPEM QUINTA-FEIRA 21 DE JULHO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinatura
India Portuguesa...... 3-00-00
India Inglesa............ 3-08-00
Numero Avulso.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत
BHARAT

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें. केपें, गुरुवार, तारीख २१ माहे जुलै सन १९२१ अंक १७ वा.

DOIS PRIMOS DO SR. PRAZERES DA COSTA

Egoismo, favoritismo ou... comodismo ?

Duas perguntas sugestivas

1a.— Sendo elevado a central o Liceu em Nova-Goa em 31 de Maio de 1919, foi nomeado professor de inglez do mesmo liceu em 17 de Junho de 1919 o sr. Augusto Monteiro aqui residente. Como seria possivel isto ? Com 17 dias o homem teve tempo de enviar os seus documentos, tempo em que as malas eram tão irregulares ?

2a.— Quais as habilitações do sr. Pe. Leão ? Este padre só tem a 7a classe de letras, e, no entanto é professor do liceu de sciencias. Como seria possivel isto ? Tanto um como o outro são primos do sr. Prazeres.

A representação Parlamentar da India

O vendaval revolucionario que soprou pela Europa ahi pelos principios do seculo, que a ironia chamou da Luz, que fazendo taboa raza de todos os mitos do passado, repeliu o fanatismo cristão, substituindo-o *malgre lui*, por outro fanatismo o fanatismo egualitario incontestavelmente mais suave mas pelas consequencias sociaes mais desastroso. Se todos os homens são eguaes e toda a gente é como todaa gente as mesmas leis devem ser aplicadas a todos os paizes."

D'ahi novo tumulto social, a mesma confusão, um caos identico.

A pouco e pouco esse perigoso nihilismo se vai descarregando e a borrasca egualitaria se vai desanuviando.

Reconheceu-se já que as necessidades dos povos são como as necessidades dos homens, diversas segundo o solo que habitam, os usos que cultivam, segundo as tradições que criaram e desenvolveram e que ninguem melhor do que eles proprios para fazer sentir os males de que enfermam como para sugerir os remedios mais adequados.

Nasceu d'ahi a representação parlamentar e n'um grau crescendo a autonomia regional com representação federal.

Em Portugal a representação politica das colonias é contemporanea da Constituição de 1822. A lei de 9 de Abril de 1836, reconhecendo o alto valor das instituições indianas o elevado nivel de sua cultura e as provas de ininterrupta lealdade de que fazia prova de ha seculos concedeu ao Estado deGoa seis representantes quatro deputados e dois senadores, numericamênte superior a qualquer das outras possessões Pela queda da Constituição de 1836 desapareceram os senadores, mas a legislação relativa aos deputados manteve-se até 1869, em que uma mal entendida preocupação de reduzir a representação colonial tirou aoEstado de Goa dois representantes, mantendo comtudo a superioriedade da sua representação sobre a das outras possessões.

A lei de 8 de *Maio* de 1878 novamente elevou a tres os seus representantes, o que esteve em vigor até 28 de Março de 1895, data em que um achanhado espirito de regêdoria eleitoral então alternando entre os partidos progressista e regenerador reduziu essa representação a um, nivelando todas as colonias.

Reconsiderando a lei de 26 de Julho de 1890 desdobrou a India em dois circulos e assim se permaneceu até ás Constituintes da Republica.

A instabilidade politica e as exigencias partidarias que se seguiram ao periodo de acalmia apoz a implantação do novo regimen novamente exigiram do Estado de Goa os sacrificios de um dos seus representantes;e aqui está como Goá, de mal a pior, tem hoje graças a Egualdade, um e unico circulo.

A constituição do Estado não distingue para os efeitos da soberania Nacional as provincias ultramarinas e as provincias continentaes. Umas e outras auferem as mesmas regalias e os mesmos direitos. Para que essa louvavel promessa não seja para *èpatãr* o indiano é mister que ela se cumpra

Goa pode arcar sem receio com um paralelo com as provincias continentais. Se là os que sabem escrever portugues são em numero ligeiramente inferior, cá poucos sabem por essas provincias fóra cualquer das duas linguas a mais o inglez e o maratha que lá são tão conhecidas como o portuguez.

Os goezes ocupam no Continente, no ultramar, no estrangeiro elevadas posições, Nas sciencias em medicina no direito na burocracia,muitos dos notaveis homens publicos conhecidos como portuguezes são da origem goesa.Lá na propria provincia há centenas de medicos, advogados, professores, padres, agronomos, proprietarios Nada há, pois que justifique tão desleal quanto arbitrario cerceamento das suas regalias.

E', pois, da inteira justiça que ao Estado de Goa se conceda uma representação proporciônal ao numero dos seus eleitores e se lhe restitua a representação que ao sabor do caciquismo continental lhe foi subtraida. Assim o exige a justiça e a coherencia dos principios democraticos.

Sant'Ana Rodrigues

ECOS & CRITICA

O nosso Jornal.

Devido á ausencia do nosso revisor saiu muito mal revista a edição transacta do nosso jornal pelo que pedimos desculpa aos nossos amaveis leitores

Pragatica Sangh

Pretende-se diminuir o valor politico desta agremeação politica hindu, dizendo-se que o *Sangh* não é de *todos os hindus*.

Fiquem, porem, sabendo tobos que o *Pragatica Sangh é de todos os hindus* que anseam ver levantada á sua classe e que são incapazes de negociar os seus votos para conveniencias pessoaes.

Há por ai um e outro ricaço hindu afirmando o contrario ? Surge por ai qualquer grupo de manifestantes hindus a favor do sr. Prazeres da Costa contra a determinação do *Pragatica Sangh* ?

Não é o patriotismo, não são os principios mas sim as conveniencias particulares e pessoaes que os levam a proceder daquela forma pouco ou nada recomendavel, não podendo, portanto, o esforço individual daqueles *poucos senhores* influir no *Sangh* para diminuir-lhe o valor politico.

E, depois, uma andorinha não faz verão. A pretensão, por conseguinte de desprestigiar o *Sangh* não passa dum arranjo eleitoral...desculpavel.

Um telegrama...falso

Em 17 do corrente houve em Navelim de Salsete uma reunião dos parentes, amigos e vizinhos do sr. Prazeres da Costa para lhe agradecerem naturalmente os fávores já recebidos e abrirem novos caminhos para novos pedidos como por ai se berra.

Ora, para a mesma reunião se revistir do *desusado* brilho os promotores da reunião bateram pês para passeatas e mãos para cartas solicitando adesões e telegramas á sobredita reunião dos parentes, amigos e vizinhos do sr. Costa.

E vitima desta solicitação, um advogado daqui enviou ao presidente da reunião de Navelim um telegrama *adesivo*

गोमांतकीय हिंदु बांधवांस इशारा

व

प्रागतिक संघाविषयीं आवश्यक खुलासा

बांधव हो,

येत्या २४ तारखेस पोर्तुगेज इंडियातर्फे १ देपुताद व १ सेनादोर असे दोन मेंबर निवडावयाचे आहेत हें सर्वांस कळून चुकलेंच आहे. देपुतादचे जागेसाठीं दोतोर फ्रोइलान द मेल व सिं० प्राजेरिस द कोस्त हे दोन उमेदवार असून या दोघांचे बाजूनें अर्थातच दोन पक्ष गोव्यांत झालेले आहेत.

आजपर्यंत राजकीय बाबतींत हिंदु तेवढे एकवाक्यतेनें वागणारे असा जो सर्वत्र लौकिक आहे तो सर्व हिंदु मतदार या खेपेसहि संभाळतील अशी आह्मीं आशा करितों.

दोतोर फ्रोइलान यांच्या बाजूनें जो ख्रिस्ती पक्ष आहे, त्यास प्रागतिक संघानें पाठिंबा दिला आहे. प्रागतिक संघ ही संस्था गोमांतकांतील बऱ्याच हिंदूनीं अखिल गोमांतकीय जनतेच्या, विशेषतः राजकीय बाबतींत, शक्य तितक्या एकवाक्यतेनें, उन्नतीसाठीं स्थापन केली आहे.

एकंदर हिंदु जनतेचें राजकीय धोरण एकसूत्रीपणानें चालू रहावें, व गोमांतकस्थ ख्रिस्ती, युरोशियन, मुसलमान इत्यादि कोणत्याहि लोकांशीं विरोध न करितां, किंबहुना त्या सर्वांचें संतोषपूर्वक साह्य आपणास मिळावें आणि आपणहि त्यांना साह्य करून एकंदरींत सर्वानुमतें राष्ट्रीय ऐक्याची भावना जागृत करावी, स्थिर करावी व पोर्तुगीज रिपब्लिक राजपद्धति सर्वांस सारखी उपभोगावयास मिळावी हाच प्रागतिक संघाचा अंतिम उद्देश आहे.

प्रागतिक संघांत हिंदु ज्ञातिभेदाचे विषमतेस—राजकीय बाबतींत — मुळींच वाव दिलेला नाहीं, आणि देशाची सर्वांगीण उन्नति कशी घडवून आणावी या संबंधाचाच त्याचा प्रयत्न आहे. केवळ हिंदूंचाच एक वेगळा पक्ष करून इतरांशीं फटकून वागावें हेंहि प्रागतिक संघाचें उद्दिष्ट नाहीं.

इतकें स्पष्ट समजल्यानंतरहि प्रागतिक संघ कोणी केला व तो काय आहे, कसा आहे वगैरे चर्चेला आणखीं अवकाशच राहत नाहीं आणि तशी चर्चा करीत बसण्याचीहि ही वेळ नव्हे हें विचारी गृहस्थांस सांगावयास नकोच.

ही वेळ परीक्षेची, आणि हिंदु जनतेची इभ्रत, लौकिक व राजकीय दर्जा सांभाळून वाढविण्याची आहे ह्मणून सर्वांनी या वेळीं एकीनेंच वागणें जरूरीचें आहे.

ह्मणून

येत्या २४ तारखेच्या निवडणुकींत, सर्व हिंदूनीं, देपुताद दोतोर फ्रोइलानु द मेलु व सेनादोर कापितांव तेनेंत बोर्बेल मोत यांसच मतें द्यावीं अशी सर्वांपाशीं विनंति आहे.

पणजी, १५ ७–९२१

प्रागतिक संघातर्फे
व्यंकटेश विनायक सू रदेसाई

चुकीची दुरुस्ती. पूर्वीच्या जाहीर पत्रकांमध्यें दिलेल्या सह्यांत, श्रीयुत शांताराम बाळकृष्ण साखरदांडे यांच्या ऐवजीं श्री.शांताराम सदाशिव साखरदांडे यांचें नांव दोहोंच्या सारखेपणामुळें नजर चुकीनें छापलें गेलें आहे.

आहे. उद्यां दारू दुकानदारांपुढें त्याचें व्याख्यान होणार. आजपर्यंत झालेले ब्रिटिश हिंदुस्थानांतील पुढारी व्याख्यानें देऊन थांबत. म. गांधी हातीं घेतलेल्या गोष्टी हरप्रकारें तडीस नेल्यावांचून थांबत नाहींत; व त्यांच्या स्वार्थत्यागामुळें यशहि मिळत चाललें आहे. आज जगांतील सर्वांत मोठे मनुष्य ह्मणजे म. गांधी अशी डॉ. रविंद्रनाथ, लालालजपतराय व अमेरिकेंतील रे. होम्स यांची साक्ष आहे. लेनीनचें कर्तव्य व रोलंडचें उच्च ध्येय यांचें संमीलन म. गांधींत झालें आहे रे० होम्स यांनीं एका उपासना प्रसंगीं सांगितलें. असा महात्मा ज्या देशाला लाभला तो तो धन्य! ज्या मातेच्या उदरीं आला ती माता धन्य! ज्याना असा पुढारी लाभला तोहि धन्य!

आमच्या गोमांतकांत असा महात्मा जन्माला यावा अशीं सर्व अवनतीला गेलेल्या देशाची काळजी बाळगणाऱ्या सर्वेश्वराकडे प्रार्थना करून तूर्त आपली रजा घेतों.

विष्णुशर्मा.

—नापितोद्धारासाठीं पणजी येथें नापितोदय नावांचें मासिक प्रसिद्ध व्हावयास लागलें असून त्याचे संपादक श्री वि. पो. कालेकर हे आहेत. दीर्घायु होवो.

भारत

गुरुवार आषाढ कृ० १ दा १८८६

स्फुट विचार

प्रागतिक संघः— ही सार्वजनिक संस्था सर्व हिंदूंची नसून नुसत्या थोड्या हिंदूंची आहे, असें भासविण्याचा कित्येकां कडून प्रयत्न होत असलेला पाहून सखेदाश्चर्य वाटतें! गोमांतकांतील सर्व हिंदूंच्या राजकीय आकांक्षा तृप्त होण्याप्रीत्यर्थ सार्वजनिक रीतीनें वरील संघ स्थापिला गेला असतां, कांहीं लब्धप्रतिष्ठानीं केवळ स्वार्थास बळी पडून व आमच्या हितशत्रूंच्या कूलथापांनीं फसून जाऊन, संघाचें महत्व कमीं करण्याचा देशहितविघातक आततायीपणा करण्यास पुढें सरसावणें ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय! तरी बरें कीं, सदर्हू अल्पसंख्याक मंडळींत जबाबदार लोकांचा समावेश होत नाहीं. तसें असतें तर धास्ती बाळगण्यास जागा होती. असो. निवडणुकींचा काळ लोटल्यानंतर सवडीनुसार प्रस्तुत विषयावर विस्तृत रीतीनें आमचे विचार प्रदर्शित करूं.

करवाढः— करवाढीची भयंकर धाड असभ्या उन्नतीला आड येऊन, सार्वजनिक शांततेचा भंग होण्यापर्यंत तिची मजल जाईल, असें उघड उघड दिसून येत असतांहि ज्या अर्थी वरिष्ठ नोकरशाही कडून कर वाढविण्याचें निश्चित होत आहे, त्या अर्थी ती स्वताच्याच हातानें जाणून बुजून आपल्या अधोगतीचा खड्डा तयार करीत आहे, असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें! आमची अशी समजूत आहे कीं, सदर बाबतींत गोमांतकांतील जनतेनें सर्व शक्ति एकवटून सरकारास जोराचा विरोध केला असता, तर करवृद्धीची घोडचूक त्याच्याकडून घडती ना. पण उपयोग काय? जो तो आपापल्या सौख्यांत जेथें पूर्णपणें रममाण होऊन गेला आहे, तेथें ह्या नसत्या भानगडीची विचारपूस करतोय कोण? एखाद्या निवडणुकींत गोंधळ माजविण्याचा धंदा असता किंवा एखादें ग्रामण्य 'शिजवावयाचें' असतें, तर गोष्ट निराळी होती! असले 'महत्वाचे' विषय सोडून सदरहू मंडळी करवाढीसारख्या अप्रिय व त्रासदायक राजकीय घडामोडींत कशाला डोकें खुपसील?

निवडणुकीची धामधूमः— कोलोनीचे प्रधान सि. सेलेस्तीन द आलमेद हे सेनादोराच्या जागेसाठीं उभे राहिले असून कोंस्तातीन द सांतुस यानीं आपली उमेदवारी माघारी घेतल्याची वर्दंता आहे आतां सेनादोराच्या जागेसाठीं सदरहू प्रधानजीची स्वारी व बोर्बेल मोत, हे दोघेच उमेदवार असून, देपुतादाच्या जागेसाठीं सि. प्राजेरीस द कोस्त व डॉ. फ्रोइलान द मेल हे उभे आहेत. मध्यंतरीं फ्रोइलान द मेल यानींहि आपली उमेदवारी माघारी घेतल्याची हूल उठविण्यांत आली होती परंतु तींत अर्थ नाहीं, हें दुसरीकडे प्रसिद्ध केलेल्या जाहीर पत्रकावरून सर्वांस समजलेंच असेल. हिंदूंच्या इभ्रतीसाठीं, हिंदुमतदार बोर्बेल मोत व मेल यांसच मतें देऊन आपली कीर्ति वाढवितील, अशी आह्मांस खात्री आहे. निवडणुकीच्या धामधुमींत पुष्कळ ससे, कुत्रीं व इतर जनावरें आपला स्वार्थ साधून घेण्याच्या गडबडींत दुसऱ्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतील. तिकडे योग्य नजर पुरवून आमचे समाजबांधव आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावतील, अशीहि आह्मांस उमेद आहे.

—पणजींतील पाठशाळेंतील–लिसेवांतील–युरोपियन प्रोफेसरानीं आपल्या जागेचा राजिनामा दिल्याचें कळतें. या राजिनाम्याचा संबंध 'आ तेम्प' पत्राच्या संपादकांवर झालेल्या युरोपियन हल्ल्याशीं आहे, असें ह्मणतात!

अनुकरणीय नमुनें

या विसाव्या शतकाचा प्रभावच कांहीं और आहे. या कालांत कोणाचे विचार कोणत्या क्षणीं बदलतील याची अटकळ करतां येत नाहीं. जे बॅ. गांधी एका कालीं सरकारचें गळ्यांतील ताईत व मवाळ पक्षाचे एक अध्वर्यु होते तेच आज सर्व जनतेचे आधारस्तंभ होऊन महात्मा या पदवीस पोंचावे व सरकारशीं पूर्ण असहकारिता करण्याचें सुरू होऊन लोकमान्य टिळकांपेक्षांही जहाल बनावे, याला कालाचा महिमा नव्हे असें कोण ह्मणेल?

हे विचार सुचण्याचें कारण मडगांवचे एक नागरिक श्रीयुत पंढरिनाथ या. हेगडे यांनीं आपल्या परवांचे अत्यवस्थस्थितींत आपल्या सुहृद स्नेह्यांसमोर काढलेले उद्गार हें होय. परमेश्वरकृपेनें ते त्या दुखण्यांतून बरे झाले ही खरोखर मोठ्या भाग्याची गोष्ट होय. आतां ते आपल्या इच्छेप्रमाणें स्वःताचें सर्व कांहीं करणार आहेत यांत संदेह नाहीं.

पुष्कळशा डॉक्टर व वैद्यांकडून उपचार होऊन ज्या वेळीं त्यांनां आपल्या प्रकृतींत कांहींच फरक पडण्याची आशा दिसली नाहीं, त्या समयीं एके दिवशीं सकाळीं आपल्याजवळ सर्व आप्तमित्रांना बोलावून शांतवृत्तीनें सांगितलें कीं, मी कांहीं या दुखण्यांतून आतां बरा होत नाहीं करितां तुह्मीं सर्वांनीं मिळून माझी एकच इच्छा तृप्त करावी. ती ह्मणजे माझ्या संकल्पाप्रमाणें माझी अर्धी इष्टेट सार्वजनिक कार्यासाठीं उपयोगांत आणणें ही होय. या कार्यापैकीं मी स्त्रीशिक्षणास विशेष महत्व देत असल्याकारणानें मडगावांत एक कन्याशाळा काढून या रकमेंतून तिचा खर्च करावा, वगैरे. हें शब्द पुरे होतात न होतात तोंच सर्वांना त्यांच्या या निराशेच्या उद्गारामुळें दुःखावेग तर आवरेना पण त्यांच्या या शुभ संकल्पाबद्दल गहींवर दाटून प्रेमाश्रु निघाले याचें वर्णन करवत नाहीं. अत्यावस्थेंतहि सार्वजनिक हिताची कळकळ व्यक्त करणारीं निदान मडगांवांत तरी हीं पहिली व्यक्ति होय.

गेल्या वीस वर्षांपूर्वीं रा. हेगडे यांचें विचार अशा प्रकारचे होतील असें कोणीही भाकीत केलें नसतें. पण हा सारा प्रभाव नव्या मन्वतराचा असल्या कारणानें जगांतील रहाटींच्या अनुभवावरून त्यांनीं कोणाचाहि मुलगा दत्तक घेण्या ऐवजीं कन्याशाळारूपी एका मुलीला जन्म देण्याचा संकल्प जाहीर करून आपला किंवा इतर धनिकांना गिरविण्यास लावण्याचा निश्चय केल्याबद्दल ते खरोखर स्तुतीस व अभिनंदनास पात्र आहेत.

वरील नमुना जरी नंतरचा असला तरी तो फार अनुकरणीय व आदरणीय असल्या कारणानें प्रथम देणें भाग आहे. दुसऱ्या नमुन्यासंबंधानें लिहावयाचें ह्मणजे रा. हेगडे यांचा संकल्प गुरूवर ताण करणारा आहे. किंबहुना गुरुपेक्षां शिष्याचे विचारांत लोकहिताची कळकळ विशेष असल्यामुळें सर्वांकडूनच त्यांची वहावा होईल, यांत शंका नाहीं खरोखर अशा कामीं मनुष्य नुसता विद्वान असून उपयोगीं नाहीं. त्याला "पाहिजे जातीचे" हीच गोष्ट खरी.

नपेक्षां ब्र. भू. सुब्रमण्यानंदतीर्थानीं— एका विद्वान, पंडित, वजनदार व विश्वाभिमानयुक्त संन्यस्थ व्यक्तीनें–आपल्या–इष्टेटीचे वांटणी एका कंजूष प्रापंचिक्या प्रमाणें केली नसती. नेतर्लीसारख्या जंगलांतील एका असंस्कृत गांवकर मरणसमयीं आपल्या मिळकतीची जीं वासलात लावण्यास उद्युक्त झाला असता तशीच तीर्थानीं आपल्या स्थावर मिळकतीचीं स्थिति केली असें सर्व लोक ह्मणत आहेत. बाकी त्यानां सर्व कांहीं उपयुक्त तें करण्यास अगाध नव्हतें. कारण त्यांच्या मनाच्या खंबीरपणाची ओळख सर्वांनाच असल्यामुळें इस्टेटीसंबंधानें ते आपला उदारपणा दाखवितील अशी बहुतेकांस अटकळ होती. फक्त एका "दामोदर विद्यालया" साठींच जर त्यानीं आपली इस्टेट बहाल केली असती तर आल्मेद कालेजप्रमाणें तेंही विद्यालय मोफत शिक्षण देण्यास समर्थ झालें असतें. व या बद्दलचे बरेचसें श्रेय यतिवर्यांना मिळून त्यांचे सर्वांकडून धन्यवाद गाईले जाणार होते. पण हें किंवा असलें श्रेय संपादण्यास कोण पुढें येतो तें पहावयाचें आहे. असो, या नवीन मनूतील दोन नमुन्यांपैकीं सुशिक्षित जनता कोणता पसंत ठरविते हें ठरविण्याचें काम वाचकांवरच सोंपवितों.

आपला
यंन. श्रीपाद.

ANO VI.— NUMERO 18 —1921 · QUEPEM QUINTA-FEIRA 28 DE JULHO

Govinda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinatura
[...] Portuguesa...... 3-00-00
[...] a Inglesa............. 3-08-00
[...]mero Avulso.......... 0-01-00

Anuncios
[...]uncio por linha...... 00-01-00
[...]ara longo praso contrato especial.

भारत

BHARAT

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें. केपें, गुरुवार, तारीख २८ माहे जुलै सन १९२१ अंक १८ वा.

O PAIS MANIFESTANDO-SE CONTRA NOVOS IMPOSTOS

Os impostos ora existentes nao deixam nascer nem morrer em paz, diz o sr. P. V. Virgincar

Um comicio muito concorrido !

Como já é do dominio público, realisou-se na vila de Margão um grande comicio dos habitantes da India Portuguesa, sob a presidencia do distincto causidico sr. dr. Caitano Filipe Colaço, para se protestar contra o extemporaneo, incomodo e indevido lançamento de novos impostos.

A concorrencia era verdadeiramente consideravel, tendo no patriotico comicio figurado pessoas de distaque em todas as classes sociais em que se divide a India Portugueza que em peso se pronunciou, constitucionalmente, contra novos tributos.

O *Bharat* que condenou *in limine* o absurdo de tais impostos, deu já a sua plena e incondicional adesão á grandiosa manifestação antitributaria de Margão, juntamente com a dos proprietarios e cidadãos que lhe apoiam a orientação, adesão que torna publica nêste lugar de honra.

Mas vejamos mais uma vez as razões por que a India Portugueza não pode nem deve pagar mais impostos cuja historia circunstanciada e fazes progressivas por que passaram discreveu-as o ilustre presidente.

Diremo-lo nas expressões do digno patriota e fluente orador sr. Pundolica Vamona Virgincar, um dos nossos correligionarios que nobilitam o *Pragatica Sangh*.

Frisou o ilustre membro desta associação que sendo altamente onerosos os proprios impostos ora existentes, seria dishumano lançar-se novos, sobretudo nas circunstancias actuais em que o Paiz se està debatendo numa miseria, capaz de enternecer até pedras, afirmando:

"O imposto, na antiguìdade, representava a decima parte das rendas liquidas, distinando-se a dois fins principaes, o da manutenção do socego publico interno e o do custeamento das despezas de guerras contra os estrangeiros, no caso de invasões. Desde o tempo de *Manú* ate muito depois dele, o imposto consistiu na referida decima parte, tendo sampre reinado harmonia a paz, duas rodas do carro triunfal do Progresso, entre governantes e governados. Nunca, então, foi preciso lançar-se mão de ...*taxas de guerra* como se féz por ocasião do ultimo conflito mundial, nem onerar o contribuinte com novos encargos, a titulo de *milhoramentos*, nem tão pouco incomodar o zé pagante por *dà cà aquela palha*.. como é *moda* na actualdade. E continuou:

Ninguem suponha que o imposto na epoca presente é, apenas, o que se comprova pelos chamados *talões*; não; pois o contribuinte da India Portuguesa paga *indirectamente* impostos por tudo, os quais não o *deixam nascer nem morrer em paz*.

Logo depois de se levantar da cama, éle paga imposto pelos pós dentifricios que emprega para limpar dentes, paga-o pelo vestuario que lhe embelesa o corpo, paga-o pelos livros que lê e pelas cartas que escreve, pága-o pela caneta, pela tinta, pela bengala e, em fim, paga-o, sempre, por todas as coisas de que faz uso, até se deitar na cama ...ferrea pela qual tambem tem de pagar...

Prosseguindo nas suas considerações justificativas da condenação de novos impostos o sr. Virgincar teve as seguintes frasas:

Se alguem, cançado de aguentar tanto imposto, render a sua *tributada* alma ao Creador, ainda em cadaver fica sujeito á poderosa acção de impostos... do registo civil.. O pesadelo de custas do *inventario orfanologico* que, muitas vezes longe de assegurar herança aos menores, traga-a cruelmente, nem deixa, então, morrer em paz.

Encontrando-se portanto, o contribuinte indio submergido, totalmente, no pacifico oceano dos impostos ¿como poderá ele suportar a perseguição de novas ondas ou antes vagas de novos tributos? ¿Para que serve aumentar rendas se se multiplicam tambem as despezas? O principio de bôa administração subordina-se á regra de aumentar rendas e diminuir despezas. Quem o não respeitar terà de curtir, infalivelmente, a miseria.

A Nação Portuguesa é ciosa de honra e bom nome não registando a Historia nem um facto comprobativo de que ela fez sacrificios pela sede de dinheiro A sua preocupação foi sempre conquistar bôa fama E, porisso, é de esperar que se não lancem novos tributos para se mitigar a sêde de...dinheiro."

¿Que mais é preciso para se demonstrar a verdade tantas vezes por nós proclamada de que a capacidade contribuitiva do Povo da *India* Portuguesa està já exausta ?

O grande comicio de Margão, importante por todos os aspectos sob que se encare, foi, em ultima analise, uma inequivoca prova do civismo, digna de se registar na historia com letras de oiro.

Falou nele o Paiz inteiro que reprovou o lançamento de novos impostos, extemporaneos incomodos e indevidos.

¿Terá, agora, o governo forças para trilhar a escabrosa senda de novos impostos, disrespeitando o sentir unanime do Povo ?

¿Sentir-se-hão os *palacianos* capazes de defender as *novidades tributarias* ?

Se o nosso governo é do Povo pelo Povo e para o Povo compete-lhe pela sua propria natureza, queira ou não queira, curvar-se reverente e submisso ante a vontade do Povo, manifestada no grande comicio de Margão a cujos promotores consignamos aqui, em nome da Redação do *Bharat*, o nosso sincero agradecimento pela obra patriotica que acabaram de praticar.

ECOS & CRITICA

Brincadeira de mau gosto

O Diario da Noite de 23 do corrente registou uma *noticia sensacional*, informando que o nosso director declarara que *a lista daquele nosso colega se impunha*.

A referida edição do *Diario* recebemo-la, justamente, quando estavamos a trabalhar na assemblea eleitoral de Cusmane a favor da lista secundada pelo *Pragatica Sangh* a que compromissos de honra ligam indissoluvelmente o nosso director que porisso imediatamente escreveu á Redação do aludido diario nocturno uma carta urgente demonstrativa da falsidade da mesma declaração

Calculamos que a *sensacional noticia* da nossa declaração transmitida á *ultimã hora* ao *Diario* foi naturalmente, uma brincadeira . . . eleitoral, mas de mau gosto,

De resto, quem leu bem a tal *sensacional noticia* da *vespera* do acto eleitoral, noticia que não tem pés nem cabeça, pois não consta dela *a quem* e *onde declarou* o nosso director, deve ter verificado a sua inexatidão, dadas as nossas relações...cortados para com o sr. Prazeres da Costa, a respeito de quem, ainda na ultima edição dissemos coisas de alto lá com elas.

E quem sabe se o palão *declaratorio* que impigiram áquele nosso ilustre colega foi originado por taes coisas!

Em todo o caso, fique cá corrigida a noticia que muito nos espantou.

Ainda a noticia sensacional

Espantou-nos de facto-para que oculta-lo?- a noticia sensa

भारत

गुरुवार आषाढ व० ८ मी १८४२

करांविरुद्ध चळवळ

मडगांवची जंगी सभा

गेली १९ वी तारीख आमच्या राजकीय चळवळीच्या इतिहासांत चिरस्मरणीय होऊन राहील यांत संशय नाहीं; कांकीं सदर्हू दिवशीं गोमांतकांतील जनतेनें मडगांव येथें प्रचंड सभा भरवून, एकसमयावच्छेदें करवाढीसंबंधीं आपली नापसंती व्यक्त केली. आह्मीं गेल्या अंकांतील एका स्फुटांत नवीन करांच्या बाबतींत लोकांनीं, त्यांतल्या त्यांत हिंदूंनीं, स्वीकारलेल्या मुग्धतेबद्दल तीव्र निषेध प्रदर्शित केला होता; व तसें करण्यास आह्मांस कारणेंहि सबळ होतीं, हें कोणीहि कबूल करील; तो स्फुट प्रसिद्ध होण्यापूर्वींच कांहीं खिस्ती पुढाऱ्यांच्या अविश्रांत परिश्रमानीं--उशिरां कां होईनां—उपरिनिर्दिष्ट सभा भरली जाऊन ती यशस्वितेनें पारहि पडली, ही मोठ्या समाधानाची गोष्ट होय. असो.

सांप्रतच्या हलाख स्थितींत कर वाढविणें किती दुष्टपणाचें आहे, हें आम्हीं अनेकदां सरकारच्या नजरेस आणलेंच आहे. आतां करांसंबंधीं वरील सभेंत दे० पुंडलीक वामन विर्जिनकर यांनीं मांडलेल्या विचारांचा गोषवारा देऊन प्रस्तुत विषयाची रजा घेतो.

"देशबंधू हो, सरकारनें आमच्यावर नवीन कर लादण्याच्या जो विचार ठरविला आहे, त्यांचा प्रतिकार करण्याकरितां आज आह्मीं येथें जमलों आहों. सरकारला उत्पन्नाचा दशांश भाग द्यावा. व त्यानें त्याचा उपयोग परचक्रनिवारणार्थ व गावांत शांतता राखण्याप्रीत्यर्थ करावा, असें मनुस्मृति सांगते. पण आतां पहावें तों आह्मीं पूर्वीं पेक्षां किती तरी पट ज्यास्ती कर देत असून, सरकारची मुळींच भरती होत नाहीं. लढाई वगैरे झाल्यास, गावांत रोगराई उद्भवल्यास, शहर सुधारणा करणें झाल्यास, साप द गेन्द, इंपोस्त दे मिल्योरामेंत दे मुंगांव वगैरे वगैरे नवीन नवीन नांवें देऊन, आमच्या डोक्यावर कर लादण्यास तें कमी करीत नाहीं. इतक्यानेंहि भुकेबंगाल बनलेल्या सरकारची तृप्ति न होऊन, नवीन करांचा मसुदा पुढें करण्यांत आला आहे.

देशबांधव हो, आम्हीं नखशिखांत इंपोस्तमय बनलों आहों. सकाळीं उठून दांत घांसण्याकरतां दंतमंजनाची डबी घेतली तर तिजवर इंपोस्त. चहा काफी घेऊं लागलो, तिजवर इंपोस्त. साखर घ्या तिजवर इंपोस्त. पोटाचीं भूक शमविण्याकरतां बाजारांतून कसल्याहि प्रकारचें धान्य आणा, त्याच्यावर इंपोस्त, पायांत घालण्यास जोडा घ्या, त्याच्यावर इंपोस्त. धोतर घ्या, त्याच्यावर इंपोस्त. अंगांत घालण्यास कोट घ्या, त्यावर इंपोस्त. डोक्यावर टोपी घाला, तिजावर इंपोस्त. हातांत छडी घ्या, तिजवर इंपोस्त लिहिण्याकरतां कागद, पेन, शाई कांहीं घ्या, त्याच्यावर इंपोस्त. दिवसभर कामकाज करून विश्रांति घेण्याकरितां बिछान्यावर पडावें तों त्यालाहि इंपोस्त. एवंच इंपोस्ताचें पिशाच कशाहि तऱ्हेनें आह्मांस सोडीत नाहीं. त्यांच्या त्रासांतून जरी आम्हीं मेलों. तरी पण रजिस्त सिविलाचा इंपोस्त. मरताना तरी स्वस्थ चित्तानें तरी मरतां येतें काय? नाहीं. मरणोत्तर इर्वेंतार होऊन राहिलेले चार माड, किंवा शेताचा तुकडा इर्वेंताराच्या कुस्तांस पावणेवर पडून जाणार या काळजीची धुग धुग अशा इंपोस्तरूपी समुद्रांत आम्हीं बुडालों असतानां आमचें दयाळू सरकार आणखी इंपोस्त लादण्याची तयारी करतें, व तें सर्व आम्हीं सोसणार ना?

स्फुट विचार

दोन पत्रकें:— गेल्या देपुताद व सेनादोर यांच्या निवडणुकीच्या धामधुमींत कांहीं सुशिक्षित व वजनदार गृहस्थांच्या नावांवर जीं दोन हस्तपत्रकें पोर्तुगीज व मराठी या भाषांतून सि. प्राजेरीस द कोस्त यांची लायकी सिद्ध करण्याच्या निमित्तानें प्रसिद्ध झालीं, त्यांतील पोर्तुगीज पत्रकांत विरुद्ध पक्षाबद्दल जी शिष्टाचाराची मर्यादा राखण्यांत आली ती त्याच्या मराठी भाषांतर बजा पत्रकांत उल्लंघन केली गेली आहे. तीं शिष्टाचाराचा भंग करणारी खोडसाळ विधानें, त्यांत ज्या सद्गृहस्थांच्या सह्या आहेत त्या सर्वांस पसंत असतील असें आह्मांस तरी वाटत नाहीं. बहुधा पोर्तुगीज पत्रावर सह्या मिळवून, नंतर त्याचें मराठी भाषांतर करतानां कोणी उलट्या काळजाच्या माणसानें त्यांत विरुद्ध पक्षाबद्दल व प्रागतिक संघाबद्दल दुष्ट विधानें धुसडून देऊन, त्या गृहस्थांच्या नावांचा व त्यांच्या पसंतीचा दुरुपयोग केला असावा असेंच आमची मनोदेवता आह्मांस सांगत आहे.

प्रागतिक संघ:— सदर्हू पत्रकांत "प्रागतिक संघ हा सर्व हिंदुसमाजानें स्थापलेला नसून तो हिंदुसमाजांतील कांहीं विशिष्ट व्यक्तींच्या महत्त्वाकांक्षेचें द्योतक आहे' असें जें एक विधान केलें आहे, त्याबद्दल आह्मांस इतकेंच सांगावयाचें आहे कीं त्यानीं लवकरच प्रसिद्ध होणाऱ्या संघाच्या कार्यकारी मंडळाच्या जाहीर विनंति पत्रांतील खुलासा अवश्य वाचावा व संघाची घटनासुकें जीं वाटण्यांत येत आहेत तींहि लक्षपूर्वक वाचुन संघ हा विशिष्ट व्यक्तींचा कीं सर्व हिंदूंचा आहे याची खात्री करून घ्यावी. कदाचित् घटना त्यांस पहावयास मिळाली नसल्यास कार्यकारी मंडळाच्या सेक्रेटरीकडे ती मागवि. त्यास अवश्य मिळेल अशी आह्मीं त्यांस हमी देतों. तसें न करितां विकारवश होऊन आपल्या सदसद्विवेक बुद्धीचा त्यानीं खून करून घेऊं नये अशी आमची त्यांस प्रेमळ सूचना आहे.

संघाची महात्त्वाकांक्षा:—संघ हा महत्त्वाकांक्षेचे एक द्योतक, आहे ही पत्रकांत नमूद केलेली गोष्ट मात्र खरी आहे. हें येथें कबूल केल्याशिवाय रहावत नाहीं. मात्र ती महात्त्वाकांक्षा क्षुद्र, शह्वच्छल, माजवून समाजांत तट पाडण्याची अगर त्यानीं ह्या टल्याप्रमाणें जनतेस फसविण्याची नसून हिंदुसमाजाचें विस्कळीत असलेलें लोकमत एकत्र व सुसंघटीत करून, त्यांच्यांत कर्तव्य जागृति करून देऊन, त्याच्या जोरावर आपले नैसर्गीक हक्क मिळवून देशाची सर्वांगीण उन्नति व्हावी हीच आहे आणि ही महात्वाकांक्षा सिद्धीस जाण्यास देशांतील विचारी व कर्तत्ववान लोक कार्यायुक्त होऊन पुढें सरसावले पाहिजेत. ह्मणूनच पत्रकांतील गृहस्थांस आमची अशी आग्रहाची सूचना आहे कीं त्यानीं संघ हा सर्व हिंदु जनतेचा नाहीं असें ह्मणून कर्तव्यविन्मुख होऊन निराळे राहण्यापेक्षां संघाचीं सूत्रें हातांत घेण्यास पुढें येऊन समाजाचे नेते होण्याचा मान संपादण्याची महत्त्वाकांक्षा धरावी. घोडा मैदान जवळच आहे.

वर्तमानसार

—डॉ. फ्रोइलान द मेलु यानीं आपली उमेदवारी काढून घेतल्याची दाट वदंता पसरली असतांहि. त्यांस १९८८ व बोवेल मोतांस १३५० मतें मिळालीं! प्राझेरीस व आलमेद यांस-त्यांच्या 'मोटोवानीं' हाडाचीं काडें केलीं असतांहि—अनुक्रमें ३२४८ व २७८७ मतें मिळालीं.

—गव्हर्नर जनरल डॉ ज्याइम मोराइस व सेक्रेटरी डॉ. पैंद्योत व्हियेर हे लवकरच निजधामास जाणार असल्याची बातमी सर्वतोमुखीं झाली आहे!...?

—सर्व्हेखातें (जमिन मोजणारें) व शेतकी खातें, हीं दोन्हींहि खातीं काढून टाकण्याचा पोर्तुगाल सरकारचा विचार आहे अशी बोलवा आहे.

स्वदेशभक्तांनो!

गोमांतक देशाचा आज बऱ्याच वर्षांचा इतिहास अतिशय दुःखमय आहे, परंतु त्याची आतां इतकी परमावधी झाली आहे कीं, स्वसत्ताक राज्य संपादन करण्याकरितां आपल्यांतील निरनिराळ्या जातींच्या व धर्माच्या लोकानीं आपली सर्वांची दृढ एकजूट केलीच पाहिजे अशी सांप्रत वेळ येऊन ठेपली आहे. संघशक्तीवाचून कोणताहि प्रयत्न सफल व्हावयाचा नाहीं. गोमांतकांतल्या काळजाच्या रक्ताचा प्रतिवर्षी जो निव्वळ शोष चालला आहे त्याच्या भयंकर परिणामाचें प्रतिबिंब उठविण्याचा मी मुळींच प्रयत्न करीत नाहीं. परकी सत्तेचा हा प्रभाव आहे. गोमांतकाच्या हितास पायाखालीं तुडवून आपल्या सत्तेच्या जोरावर जाणून बुजून आमच्या राज्य कर्त्यांनी जो द्रव्यशोष एकसारखा चालू ठेवला आहे तो पाहून प्रत्येक गोमांतकवासीयाचें काळीज चर्र झाल्यावांचून राहील काय? नुसत्या बडबडीनें कांहीं तरी न्याय मिळेल असें जें कांहीं वर्षांपूर्वीं आपणास वाटत होतें त्या बाबतींतही आज आपल्या सर्वांची निराशा झाली आहे. सरकाराला आपली बिलकूल पर्वा नाहीं. आपल्या स्वतःच्या अंगाला लागलेल्या ह्या रक्त शोषून घेणाऱ्या व अबाधित चालणाऱ्या तुंबडीपासून सुटका करून घेण्याच्या कामीं आपणच सर्वांनीं आपल्या हिताकडे बघितलें पाहिजे. अवघ्या चाळीस वर्षांच्या अवधींत जपाननें जुनी राज्यपद्धति सुधारून दिली, जातींजातींचा अडथळा मोडला पाश्चात्य ज्ञान अंगीं बाणून घेतलें व जे पांच कोटीं लोक नांगर हांकीत होते व पितरांची पूजा करीत हो ते त्याना पृथ्वींतील सर्वांहून बलाढ्य व श्रेष्ट राष्ट्र करून सोडलें. तसेंच आमचें हें गोमांतक पूर्ण उन्नतीस पोचलेलें पहाण्याचा भावी सोन्याचा दिवस लवकर उगवो अशी ईश्वर चरणीं प्रार्थना आहे.

महात्मा गांधी हे परदेशी माल न वापरण्याबद्दल आमच्या महाराष्ट्राला उपदेश करीत आहेत. गोमांतकांतही ह्या चळवळीचा थोडाफार परिणाम होत आहे व घडलाहि आहे. परदेशी साखर कशी तयार करितात ह्या विषयींची माहिती न्यूयार्क मधील 'वर्ल्ड' नावाच्या पत्रांत खालील प्रमाणें प्रसिद्ध झाली आहे. माहिती वाचून आमचे प्रेमळ वाचक परदेशी साखरेस बहिष्कार घालतील अशी फार फार आशा आहे.

'लहान मोठ्या मनुष्यांच्या प्रेताचें मांस मेलेला मनुष्य कोणत्या रोगानें मरण पावला हें न पाहतां साखर शुद्ध करण्याच्या कामी लावलें जात आहे. महारोगानें कुजलेल्या मनुष्याचेंहि मांस फुकट जाऊं देत नाहींत. कारखान्यांतील मजूर लोक जमिनीवर थुंकतात किंवा कफाचीं ढरकलें फेंकतात तीं देखील काळजीपूर्वक एका बाटलींत जमवितात व त्याचा उपयोग साखर शुद्ध करण्याकडे करितात गरीब लोक पैशाच्या आशेनें आपल्या नातलगांचीं प्रेतें विकत देतात. त्यांचे कारखानदार गिऱ्हाईक असतें ही साखर आमच्या देशीं येत असते व तिचा उपयोग आह्मीं देवाला नैवेद्य दाखविण्याकडे व स्वतः खाण्याकडे आवडीनें करीत असतों' चहालासुद्धां चहाचे पानावर कुत्र्याच्या मुताचें छत्रीप्रमाणें एक प्रकारची बुरशी (Fungus) चढते व त्ययोगें पानांस काळा रंग चढून त्यांत एक प्रकारचा स्वाद उत्पन्न होतो. ह्या शिवाय चहांत टॅनिक, थीन व ॲरोमॅटिक हीं तीन विषारी द्रव्यें अत्यंत घातक असतात. त्यायोगानें मेंदूचे रोग, फेंफरें, मूत्राशयाचे रोग, नाना प्रकारचे मेह, विशेषतः मधुमेह धुपणी, धातुक्षीणता वगैरे विकार उद्भवतात. ('चहाचे दुष्परिणाम' ह्या पुस्तकांत चहाच्या परिणामाचें भयंकर चित्र रेखाटलें आहे. किं. ३ पै असून पत्ता:— विनायक प. भागवत, वकील, चाळीसगांव जिल्हा खानदेश)

शेवटीं प्रार्थना हीच कीं सर्वांनीं शक्य त्या गोष्टींत आपल्या सांपत्तिक दृष्टीनें व पुढील पिढीचे उद्धाराकरितां अशा घाणेरड्या परदेशी मालाला बहिष्कार घालून देशाचा उत्कर्ष करण्याकरितां झटावें व अशा प्रसंगी परमेश्वरी कृपेचा पर्जन्यां आमच्या ह्या प्रिय गोमांतकांत पडावा व नाना प्रकारच्या गोवधादि महापातकांनीं होरपळून जाऊन विव्हळ झालेली ही पुण्यभूमि शीतल, स्नेहमयी, व स्वातंत्र्याचें नंदनवन बनावें अशी इच्छा करून भारताचा त्रिवार जयजयकार करितों.

सर्वांचा नम्र

ता. १५-७-२१ } भाळचंद्र विष्णु खोलकर
श्रीदुर्गादत्तमंदिर } माशेल, गोवा

o VI.—NUMERO 19—1921 QUEPEM QUINTA-FEIRA 4 DE AGOSTO

inda P. Hegdo Dessai
Director e Editor

Assinatura
A PORTUGUESA...... 3-00-00
IA INGLESA............. 3-08-00
MERO AVULSO.........0-01-00

Anuncios
ncio por linha...... 00-01-00
ra longo praso contrato especial.

भारत
BHARAT

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें. केपें, गुरुवार, तारीख ४ माहे आगस्ट सन १९२१ अंक १९ वा

ACHA--SE FEITA A EXPERIENCIA ! !

Falaram os numeros

Grande Triunfo do Pragatica Sangh !

Nas ultimas eleições de deputado e senador ficou exuberantemente comprovada a incontestavel influencia politica do *Pragatica Sangh.* Não é uma afirmação atirada ao ar; não. E'reforçada pela eloquenciados numeros que não sabem mentir como qualquer palão eleitoral.

Pois é verdade. Apesar da desistencia do candidato Melo teve este sobre o adversario uma quarta parte de votos, o que, dada a interrupção súbita da propaganda eleitoral da nossa lista, motivada pela mesma desistencia, representa para nòs um verdadeiro triunfo, sabida a circunstancia do emprego do *maximum* de empenhos e valias a favor da lista adversa, por banda dalguns chefes de repartições, *dependentes* e *agradecidos* do candidato a deputado da mesma que tambem encontrou decidido apoio de seus *parentes vizinhos e amigos* !

Que indica tudo isto ?

Que o *Pragatica Sangh* é uma organisação politica que se impõe pela sua força, pela disciplina que a caracterisa.

Que já se desfez a lenda de que o sr. Prazeres da Costa era *proclāmado*, afugentando do campo seus adversarios, quando apresentasse a sua candidatura para deputado ou senador.

Que o mesmo sr. Costa não é já idolo da India Portuguesa, conquanto o seja de seus beneficiados e *salamalequeiros.*

Que, finalmente, o digno auditor geral perdeu quasi por completo a simpatia que aqui gosava, por tantos absurdos a que fez ligar, á má hora, o seu nome.

E' nêste sentido que dizemos ter alcançado triunfo a nossa lista. Desejavamos que sua exa. se convencessé de que a classe hindu estava descontente por alguns dos seus actos. E conseguimos a satisfação deste nosso desejo, apesar de terem por ai pululado *manifestos tendentes* a, *a seu modo, reduzirem á nulidade* a importancia do *Pragatica Sangh.*

Está feita a experiencia, felizmente com grande proveito ao *Sangh*, que jà sabe, agora o que tem a fazer para no futuro calar de vez as *más* linguas que se mexeram, isto é que *se manifestaram*, impoliticamente, mercê dos manejos jesuiticos dalguns funcionarios e amigos dependentes do auditor-mór.

Digam o que disserem os partidarios do sr. Prazeres da Costa, este não se julgará victorioso com a diminuta maioria que arranjaram á sua lista. Cremos mesmo que se considerará estrondosamente derrotado.

* * *

Mas disse-nos uma vez o sr. dr. Rau na discussão que o *Bharat* teve com o mesmo magistrado, que o sr. Prazeres da Costa tinha muitos projectos de beneficios com que favorecer *especialmente* a classe hindu. Afirmaram os que sendo inimigos dhontem, secundaram à ultima hora a sua candidatura, que a India Portuguesa na crise actual, só tem que lucrar com a sua eleição.

A eleição está ganha. Venham, portanto, daí os tais projectos de beneficios, venham os tais lucros, para que se não diga que *aquilo* não passava de *palões*...eleitorais.

E, depois, os eleitos não são apenas representantes dos que os elegeram, *são-no* de toda a India Portuguesa. Assiste, portanto, tambem a nós o direito de exigir o cumprimento rigoroso de promessas solenemente feitas por intermedio de seus agentes.

Mas quedemo-nos aqui, á espera da satisfação das mesmas promessas...

Em boa paz

O nosso ilustre colega do *Diario da Noite* volta a insistir que a tal declaração eleitoral, atribuida ao nosso director e publicada na *vespara* do acto eleitoral tem *pês* e *cabeça*, acrescentando que pessoas que lhe merecem inteira confiança lhe transmitiram, *à ultima hora*, a *noticia sensacional* da mesma declaração que, porisso, é verdadeira, que não foi *truc* . . . etc.

Sim ? Porquê, então, gastou tanta prosa para, a seu modo, comprovar a aliás suposta veracidade da aludida declaração ?

Dissesse em termos claros os *nomes* de quem lhe transmitiu a *sensacional noticia* e o *lugar* onde o nosso director, *num gesto que o nobilita* (quem tal diria ?)declarou que a lista do *Diario se impunha.* E estava liquidado o *caso*. Não acha?

Faça-o, ao menos, agora, pedimos-lhe, sem mais ambages nem rodeios que a simplicidade da questão dispensa absolutamente.

Impressionou-nos, desagradavelmente, é claro, o sensacional informo, tanto mais que não fizeramos naquela publicação nenhuma alusão a sua exia.

¿Que *explicação* ou *satisfação* desejaria porêm o mesmo professor a cavalo-marinho?

Não o sabemos nem o calculamos. Nem tão pouco o acreditamos. Mas se sua excia quizer de nós qualquer coisa, pedimos-lho a fineza de nos procurar aqui em Quepem e á toda a hora na nossa modesta redação, prevenindo-lho, porém, ao mesmo tempo, que não estamos familiarisados nem com o cávalo-marinho nem com a ...gimnastica. Nem nunca aspiramos ás portas... de celebridade por duelos ou scenas de pugilato que sempre reprovamos por incompativeis com a nossa educação oriental.

Estava pronta esta local quando recebemos a seguinte carta:

Exmo. Sr.

Li hoje o suplemento do jornal da sua direcção. Nele diz VExcia. que no proximo numero falará tambem dos outros professores que proibiram o uso do CANDHI-CAP. Como sou um daqueles que proibiram o uso daquele cap, previno que VEcia passará maus dias se falar no seu jornal, qualquer coisa à meu respeito. Excuso-me de justificar a minha atitude para com os meus alunos.

Posto isto me assigno.

Nova-Goa De VExa.
19/8/21 *Alberto Martins*

Com que então, a liberdade de imprensa è um ar que lhe deu?

Onde estamos e para onde marchamos?

Já não vivemos na Republica?

Que no-lo digam para que abadonemos de vez uma terra em que impera mais o absolutismo pessoal do que o liberalismo legal!

Chamamos para o assunto a atenção do sr. Governador Geral.

भारत

गुरुवार श्रावण व० ७ मी १८४३

गांधी टोपी

गांधी-टोपी या नावानें ओळखलें जाणारें शिरोभूषण आज बहुतेक सगळ्यांच्या परिचयाचें झालें असल्याकारणानें त्याचें वर्णन करण्यापेक्षां त्याच्या उपयुक्ततेसंबंधानें दोन शब्द लिहिणें अगत्याचें आहे.

अगोदर असें पाहिलें पाहिजे कीं, गांधीची विचारसरणी, शक्य तितका साधेपणा व अंतःकरणाच्या वाचेशीं कृतीचा मेळ या दोन प्रमुख तत्वांवर उभारली गेली असून, जें काय ह्मणून त्या विचारसरणीला पुढें त्याचा अवलंब करण्यास कोणाची भीड भाड धरावयाची नाहीं. असा प्रकार त्या महात्म्याच्या कृतींत जसा काय मूर्तिमंतच दिसत आहे. मग त्या पासून आर्थिक, मानसिक किंबहुना शारीरिक आपत्ति ओढवल्या तरी त्यानां देखील तुच्छ मानून इच्छित ध्येय साध्य होईपर्यंत पाऊल मागें घ्यावयाचें नाहीं. गांधी टोपीच्या उपयुक्तेविषयीं लिहावयाचें असतानां जरा विषयांतर करण्याचें कारण हेंच कीं त्या टोपींत महात्मा गांधीच्या सगळया सद्गुणाचें समुच्चय रूपाने एकीकरण झालें असल्यामुळें ती कोणींहि मस्तकीं धारण करण्या इतकी खास पवित्र आहे.

साधेपणाविषयीं पाहिलें तर, गांधी टोपी इतकें सुलभ, सुबक व सुलक्षणयुक्त मस्तकाच्छादन क्वचित् एखादें असेल कीं काय संशयच आहे. शिवाय, तें एका अत्यंत उज्वल देशभक्ताकडून प्रचारांत आहे, ह्मणून त्या टोपीची आकृति किंवा किंमत यांकडे पाहून ती त्याज्य समजणें हें देखील वेडगळपणाचें होईल. 'महा जनो येन गतः पंथ' ह्या दृष्टीनें पाहिलें तरी रे० गांधी हे महाजनाहूनहि अधिक, ह्मणजे महात्मे आहेत. सबब, त्यानीं स्वीकारलेल्या राष्ट्रीय पक्षाचें चिन्ह जें गांधी टोपी तें वापरण्यांत खरोखरच पुण्य आहे यांत संशय नाहीं.

आनंदाची गोष्ट ही कीं गोमांतकांतील भावी पिढीचे आद्य स्तंभ असे जे कालेजांतील विद्यार्थी त्यानीं, गांधी टोपी स्वतः वापरून तिचा फैलाव करण्याची तयारीच करून न थांबतां त्या महात्म्याचीं तत्वें कृतींत उतरविण्याचा आरंभ करण्यापर्यंत मजल नेली हें त्यांस खरोखरच भूषणावह असून इतरांस अनुकरणीय आहे.

पाद्रीच्या अरेरावी वर्तनामुळें आह्मांस ही पुरवणी काढावी लागली, त्यांस युक्तीच्या चार गोष्टी सांगितल्या शिवाय आमच्यानें लेखणी खालीं ठेववत नाहीं. त्यांनीं ह्यापुढें आपली सर्व शक्ति धार्मिक गोष्टींत आपल्या मेंढरांच्या तारणांत व धर्मोपदेशांत खर्च करावी. व हें विसरूं नयें कीं," मध हा जसा गाढवांसाठीं नाहीं, त्याच प्रमाणें लिसेव हा पाद्रींस नव्हे. तेथें जाणारांस विद्यार्थीकडे कसें वागावें हें समजणें आवश्यक आहे.

लिसेवांत नव्हे पण इगर्जेंत येसेल्ल पाद्रींनीं असलें पाहिजे. ती त्यांची जागा आहे व तेथेंच त्यानीं आपण केलेल्या कृत्यासंबंधीं विचार केल्यास, आह्मीं ज्या ह्या चार ओळी लिहिल्या आहेत त्यांत त्यांस आमचा दोष दिसणार नाहीं.

पुरवणी, भारत अंक २०
केपें ता. १७-८-२१

स्फुट विचार

गांधी-टोपीः— पणजीच्या सेंत्राल पाठशाळेच्या कांहीं हिंदु विद्यार्थ्यांनीं डोक्यावर गांधी-टोपी धारण केल्यामुळें त्या विद्यालयाच्या कांहीं अध्यापकांचीं डोकीं भणाणून जाऊन गेला आठवडा पणजी शहरांत मोठ्या गडबडीचा गेला. महात्मा गांधींनीं आपल्या मायभूमीस सैतानी राज्यव्यवस्थेच्या क्रूर दाढेंतून मुक्त करण्याच्या अत्युच्च भावनेनें चालू केलेल्या न्याय्य चळवळीविषयीं सहानुभूति प्रकटविण्याच्या उद्देशानें ह्मणा अगर साधेपणा, स्वच्छता व अल्प किंमत या गुणत्रयीस भुलून ह्मणा, कांहीं विद्यार्थ्यांनीं स्वयंप्रेरणेनें प्रथमतः वरील टोपीचा गौरवयुक्त उपयोग केला. नंतर सहजच तिचा ज्यास्त प्रमाणांत प्रसार होऊं लागला; पण जसजसा गांधी टोपीचा बोलबाला वृद्धिंगत पावू लागला तसतसा सदरील पाठशाळेच्या कांहीं बेअकली शिक्षकांचा नकली नीतिधैर्य अस्तंगत होऊं लागला. त्याचा परिणाम असा झाला कीं, गांधी टोपीवाल्यांस वर्गांत प्रवेश करण्यास त्यांकडून बेमूर्वतखोरपणें मज्जाव होऊं लागला. आलवेर्त मारतींस सारख्या आडदांडवृत्तीच्या अध्यापकांकडून तर धमकीचे प्रयोग होण्यास सुरवात झाली. गोष्ट इतक्यावरच थांबली असती तर बरें झालें असतें; परंतु दुर्दैवानें तसें न होतां, गांधी-टोपी प्रकरणानें सर्व हिंदुविद्यार्थ्यांत खळबळ उडवून दिली.

भडका उडालाः— गांधी-टोपीच्या जोर प्रसारानें शेवटीं असें झालें कीं, पाठशाळेचे कामचलाऊ मुख्याध्यापकांकडून प्रसिद्ध रीतीनें विद्यार्थ्यांचाच नव्हे तर एकंदर हिंदुजनतेचा अवहेलनात्मक उद्गारानीं अत्यंत बेजबाबदार व निंद्यपणें अपमान करण्यांत आला. [दुसरीकडे दिलेल्या पुरवणींच्या भाषांतरावरून वाचकांस पाद्रीं साहेबांच्या त्या लांछनास्पद उद्गारांची पूर्ण कल्पना होईल] ज्या दिवशीं ही गोष्ट घडली त्या दिवशीं आमचे संपादक तेथें असल्यावरून, सहजच त्यानीं पोर्तुगीज पुरवणी काढून उपरोक्त अमंगल वाणीबद्दल तावडतोब तीव्र निषेध व्यक्त केला. विद्यार्थ्यांचीहि मनें प्रक्षुब्ध झालेलींच होतीं. त्यामुळें त्यानीं एकवाक्यतेनें गांधी-टोपी धारण करून पाठशाळेंत प्रवेश केला. या अपूर्व प्रकारानें टोपी विरुद्ध हालचाल करणारे शिक्षक आश्चर्य व राग यानीं वेडे होण्याच्या बेतांत आले व त्यानीं टोपी संबंधानें (अ) विचार करण्यासाठीं सर्व शिक्षकवर्गाची एक सभा भरवली. परंतु टोपीचें समर्थन करणाऱ्या पक्षाचें संख्याबळ अधिक पडल्यावरून तसेंच पोषाखासंबंधीं कायद्यांत कसलाच प्रतिबंध नसल्यामुळें अर्थात् सगळें ओमफस् होऊन, मुख्याध्यापकानीं गव्हर्नरसाहेबांची भेट घेऊन पुढील कर्तव्याचें धोरण निश्चित करावें असें ठरलें, व तदनुसार त्यानीं गव्हर्नरसाहेबांच्या घेतलेल्या भेटींत साहेबमजकुरांनीं टोपीस कसलाहि प्रतिबंध करण्याचें कारण नाही, असें चक्क बजावलें असें म्हणतात. व या गोष्टींत बराच तथ्यांश आहे असें, भेटीच्या दुसऱ्या दिवसापासून टोपीला कोणाकडूनहि कसलीच आडकाठी करण्यांत आली नाहीं, यावरून सिद्ध होतें.

विद्यार्थ्यांचा स्वार्थत्यागः— गांधी टोपीच्या बाबतींत हिंदु विद्यार्थ्यांनीं व्यक्त केलेला स्वार्थत्याग खरोखर विद्यार्थ्यांच्या चळवळींत सुवर्णाक्षरानीं नमूद करून ठेवण्यासारखा आहे. केवळ ध्येयाकडे दृष्टि ठेवून प्रोफेसरांच्या किंवा पालकांच्या इतराजीची काडीचीहि पर्वा न करतां, विद्यार्थ्यांनीं आपली बाजु अखेरपर्यंत संभाळून विजय संपादन केला, हें लिहिण्यास आम्हांस फार अभिमान वाटत आहे. विद्यार्थी हे राष्ट्राचे खरे आधारस्तंभ आहेत. अर्थात् वरील भावना त्यांच्यांत वृद्धिंगत व दृढ होत गेल्यास देशाचा भाग्योदय दूर नाहीं हें उघड आहे. आमच्या पूर्वपुण्याईनें सदरील चळवळ प्रत्यक्ष पहाण्यास मिळाल्याबद्दल आह्मीं आह्मांस मोठे भाग्यवान समजतों. असो. विद्यार्थ्यांनी दाखविलेल्या नेटाबद्दल अभिनंदन करून त्यांचें कल्याण इच्छितों.

प्रोफेसर सिनारीः—वास्तविक पहातां सेंत्राल पाठशाळेंत डॉ० सिनाऱ्यांसारखे हिंदु अध्यापक असतां टोपीसंबंधानें एवढा गोंधळ माजावा हे आश्चर्य आहे. टोपीचें निर्दोषत्व सिद्ध करून प्रोफेसरसाहेबानीं पूर्वीपासूनच तिजविषयींचा संशय दूर घालवला असता तर ज्या थरावर गोष्टी गेल्या त्या थरापर्यंत त्या मुळींच गेल्या नसत्या अशी आमची खात्री आहे. परंतु डॉ० सिनाऱ्यांनींच उलट टोपीविरुद्ध गिल्ला करून तिचा त्याग करण्याविषयीं विद्यार्थीस उपदेश करण्याचा एकसारखा सपाटा चालू ठेवला, ही दुःखाची गोष्ट होय! डॉ० सिनाऱ्यांस आह्मीं आमचे मित्र, समाजाचे नेते व स्वदेशाचे भक्त समजत होतों. पण ह्मापसेंहून त्यांचें पणजींत स्थलांतर होतांच त्यांच्यांत वसत असलेल्या सद्गुणानीं कोठें तरी दडी दिली तर नकळे! तात्पर्य 'गांधी टोपी प्रकरण' विकोपास जाण्यास, प्रो सिनारी हेच प्रामुख्यानें कारणीभूत आहेत असा त्यांच्यावर आमचा स्पष्ट आरोप आहे. व तो निराधार नाहीं हें वाचकांनीं ताडलेंच असेल.

एक नवीनच प्रकरणः—पणजीं येथें आमची पोर्तुगीज पुरवणी प्रसिद्ध होतांच आलवेर्त मारतींस नांवाचे एक वरील पाठशाळेचे शिक्षक—ज्यांची गांधीटोपीवर करडी नजर होती—हातांत काठी व खिशांत रिव्हलवर घेऊन आमच्या संपादकांच्या शोधार्थ निघाल्याची बातमी कानांवर आपटली. या बातमीच्या सत्यतेबद्दल आह्मांस संशयच होता. पण त्यांच्याकडून आलेल्या एका पत्रावरून आमचा तो संशय पूर्णपणें फिटला. आलवेर्त मारतींस आपल्या पत्रांत ह्मणतातः—"मीं आपल्या पत्राची पुरवणी वाचली. त्यांत टोपीविरुद्ध असलेल्या शिक्षकांचा येत्या अंकांत [?] समाचार घेणार असल्याचें आपण लिहिलें आहे. व मीहि एक टोपीला प्रतिबंध करणारांपैकीं असल्यामुळें आपणास बजावतों कीं, जर आपल्या पत्रांत मजविषयीं कोणत्याहि गोष्टीचा उल्लेख होईल, तर आपणास वाईट काळ कंठावा लागेल हें खूप समजून रहावें..." हें वाचून आह्मीं नव्या प्रजासत्ताक राज्यांत आहों कीं जुन्या झारशाहींत आहों, हेंच आह्मांस समजत नाहीं! हें नीतिमान पोर्तुगीज लोकांचें राज्य आहे कीं अनीतिमान उपटसुंभाचें साम्राज्य आहे, या विषयीं आह्मीं सरकारास लेखी प्रश्न केला आहे. त्याचें उत्तर येतांच—व तोंपर्यंत मारतींसाच्या हातून आमचे संपादक जीवंत राहिल्यास—या विषयीं ज्यास्ती चर्चा करूं.

एक खुलासाः—गेल्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या काल्पनिक सृष्टींतील 'गोमांतकाच्या प्रवासांत' 'भागिरथी' ओतल्याचा उल्लेख आहे. या संबंधीं कोणाचा गैरसमज होऊं नये ह्मणून कळवितों कीं, 'भागिरथी' ओतणें हें कडक कायद्यानीं ठरविलें असल्यावरून तसें करण्याशिवाय त्या कामावरील हिंदु अगर खिस्ती डाक्टरांस गत्यंतर नाहीं. दोष डाक्टरांचा नव्हे कायद्याचा आहे. त्याला डाक्टर काय करतील?

कृतघ्नतेचा आभास

एका उदार अंतःकरणाच्या मनुष्यानें अपरिमीत झीज सोसून, अनेक जिवावरच्या प्रसंगांस तोंड देऊन दुसऱ्याचें हित साधण्याची पराकाष्टा करावी, त्यांत त्याच्या दृष्टीनें यशही मिळावें. आणि शेवटीं त्या दुसऱ्या प्राण्यानें ते उपकार न स्मरतां आपल्या उपकारकर्त्यावर उलटावें! अशा वेळीं त्या उपकारकर्त्याची मनःस्थिति काय होत असेल, त्याला त्या आपल्या कृतींचा किती पश्चात्ताप होत असेल हें ज्याचें त्यालाच माहीत. इतरांना त्याची नीटशी कल्पना व्हावयाची नाहीं.

सर्वांसच सर्व प्रसंगांचा प्रत्यक्ष अनुभव येत नाहीं. ह्मणूनच विचारी पुरुषांनी अनेक गोष्टींच्या रूपानें तें ज्ञान जनतेस देण्याचा प्रयत्न केलेला असतो. गांवढेकऱ्यानें बर्फांतील मृत सर्पास शेगडीजवळ ठेऊन ताजातवाना केला; परंतु उपकारांची विस्मृति होऊन तो सर्प उपकारकर्त्यावर उलटतांच गांवढेकऱ्यास त्याचा जो संताप आला तो त्यानें त्या सापाचे एक घाव दोन तुकडे करून कृतीनेंच व्यक्त केला. फार कशाला सर्व सद्गुणाचा पुतळा जो बायबलांतील ईश्वर, त्यानें मोठ्या प्रेमानें स्वतः सारख्या उत्पन्न केलेल्या पहिल्या मानवीं जोडप्याला [आदांव आणि यव्ह] "पाराइजा" सारख्या सुखसमृद्धियुक्त जागेंत स्थानापन्न करून त्याला कसलीही ददांत लागूं नये अशी व्यवस्था केली; परंतु या उपकृतीची जाणीव मनांत न बाळगतां त्या आद्य पितरांनीं, सृष्टिकर्त्यानें घालून दिलेल्या नियमाचें यत्किंचितही उल्लंघन करतांच, एकदम त्यांसच नव्हे तर त्यांच्यापासून उत्पन्न होणाऱ्या अखिल मानव जातीस शापबद्ध करून टाकलें. दयेचीं खाण, करुणेचा सागर, आणि पवित्र अंतःकरणाच्या आकाशांतील बापाची जर ही स्थिति तर मग मानवी अंतःकरणें कृतघ्नतेमुळें व पश्चात्तापजन्यक्रोधानें दग्ध व्हावीं यांत नवल तें काय? असाच कांहींसा प्रकार आमच्या गोमांतकीय ख्रिस्तीबंधूनीं पोर्तुगीज लोकांशीं केला आहे. दयाळू पोर्तुगीज लोकांनीं आमच्या खिस्तीबंधूंस आदांव आणि यव्हेचा धडा पहिल्यानें घोकण्यास देऊन उपकारकर्त्यांशीं कृतज्ञ असावें हें तत्व हृदयावर कोरण्याचा जो प्रयत्न केला तो बऱ्याच अंशीं सफल झाल्याचेंही समाधान त्यांस लाभलें. पण आतां पहावें तर उलटीच खूण अनुभवास येऊं लागली. खिस्ती बंधूच्या मनावर कोरलेली तीं अक्षरें हळूहळू पुसट होत जात असून कृतघ्नतेचीं लक्षणें दिसून येऊं लागलीं आहेत! दयाळु पोर्तुगीज लोकांना नेटीव लोकांच्या या कृतघ्नतेबद्दल काय वाटत असेल? परंतु हीं

भारत

गुरुवार श्रावण व० ७ सी १८४३

गांधी टोपी

गांधी-टोपी या नावानें ओळखलें जाणारें शिरोभूषण आज बहुतेक सगळ्यांच्या परिचयाचें झालें असल्याकारणानें त्याचें वर्णन करण्यापेक्षां त्याच्या उपयुक्ततेसंबंधानें दोन शब्द लिहिणें अगत्याचें आहे.

अगोदर असें पाहिलें पाहिजे कीं, गांधीची विचारसरणी, शक्य तितका साधेपणा व अंतःकरणाच्या वाचेशीं कृतीचा मेळ या दोन प्रमुख तत्त्वांवर उभारली गेली असून, जें काय ह्मणून त्या विचारसरणीला पुळेल त्याचा अवलंब करण्यास कोणाची भीड भाड धरावयाची नाहीं. अशा प्रकार त्या महात्म्याच्या कृतींत जसा काय मूर्तिमंतच दिसत आहे. मग त्या पासून आर्थिक, मानसिक किंबहुना शारीरिक आपत्ति ओढवल्या तरी त्यानां देखील तुच्छ मानून इच्छित ध्येय साध्य होईपर्यंत पाऊल मागें घ्यावयाचें नाहीं. गांधी-टोपीच्या उपयुक्तेविषयीं लिहावयाचें असतानां जरा विषयांतर करण्याचें कारण हेंच कीं त्या टोपींत महात्मा गांधीच्या सगळ्या सद्गुणाचें समुच्चय रूपाने एकीकरण झालें असल्यामुळें ती कोणांहि मस्तकीं धारण करण्या इतकी खास पवित्र आहे.

साधेपणाविषयीं पाहिलें तर, गांधी टोपी इतकें सुलभ, सुबक व सुलक्षणयुक्त मस्तकाच्छादन क्वचित् एखादें असेल कीं काय संशयच आहे. शिवाय, तें एका अत्यंत उज्वल देशभक्ताकडून प्रचारांत आहे, ह्मणून त्या टोपीची आकृति किंवा किंमत यांकडे पाहून ती त्याज्य समजणें हें देखील वेडगळपणाचें होईल. 'महा जनो येन गतः पंथ' ह्या दृष्टीनें पाहिलें तरी दे० गांधी हे महाजनाहूनहि अधिक, ह्मणजे महात्मे आहेत. सबब, त्यानीं स्वीकारलेल्या राष्ट्रीय पक्षाचें चिन्ह जें गांधी टोपी तें वापरण्यांत खरोखरच पुण्य आहे यांत संशय नाहीं.

आनंदाची गोष्ट ही कीं गोमांतकांतील भावी पिढीचे आद्य स्तंभ असे जे काळेजांतील विद्यार्थी त्यानीं, गांधी टोपी स्वतः वापरून तिचा फैलाव करण्याची तयारीच करून न थांबतां त्या महात्म्याचीं तत्वें कृतींत उतरविण्याचा आरंभ करण्यापर्यंत मजल नेली हें त्यांस खरोखरच भूषणावह असून इतरांस अनुकरणीय आहे.

पाद्रीच्या अरेरावी वर्तनामुळें आह्मांस ही पुरवणी काढावी लागली, त्यांस युक्तीच्या चार गोष्टी सांगितल्या शिवाय आमच्यानें लेखणी खालीं ठेववत नाहीं. त्यानीं ह्मापुढें आपली सर्व शक्ति धार्मिक गोष्टींत आपल्या मेंढरांच्या तारणांत व धर्मोपदेशांत खर्च करावी. व हें विसरूं नये कीं, मध हा जसा गाढवांसाठीं नाहीं, त्याच प्रमाणें लिसेव हा पाद्रींस नव्हे. तेथें जाणारांस विद्यार्थाकडे कसें वागावें हें समजणें आवश्यक आहे.

लिसेवांत नव्हे पण इगजेंत येसेव्ह पाद्रीनीं असलें पाहिजे. ती त्यांची जागा आहे व तेथेंच त्यानीं आपण केलेल्या कृत्यासंबंधीं विचार केल्यास, आह्मीं ज्या ह्या चार ओळी लिहिल्या आहेत त्यांत त्यांस आमचा दोष दिसणार नाहीं.

पुरवणी, भारत अंक २०
केपें ता. १७-८-२१

स्फुट विचार

गांधी-टोपीः— पणजीच्या सेंत्राल पाठशाळेच्या कांहीं हिंदु विद्यार्थ्यानीं डोक्यावर गांधी-टोपी धारण केल्यामुळें त्या विद्यालयाच्या कांहीं अध्यापकांचीं डोकीं भणाणून जाऊन गेला आठवडा पणजी शहरांत मोठ्या गडबडीचा गेला. महात्मा गांधीनीं आपल्या मायभूमीस सैतानी राज्यव्यवस्थेच्या क्रूर दाढेंतून मुक्त करण्याच्या अत्युच्च भावनेनें चालू केलेल्या न्याय्य चळवळीविषयीं सहानुभूति प्रकटविण्याच्या उद्देशानें ह्मणा अगर साधेपणा, स्वच्छता व अल्प किंमत या गुणत्रयीस भुलून ह्मणा, कांहीं विद्यार्थ्यानीं स्वयंप्रेरणेनें प्रथमतः वरील टोपीचा गौरवयुक्त उपयोग केला. नंतर सहजच तिचा ज्यास्त प्रमाणांत प्रसार होऊं लागला; पण जसजसा गांधी टोपीचा बोलबाला वृद्धिंगत पावूं लागला तसतसा सदरील पाठशाळेच्या कांहीं बेअकली शिक्षकांचा नकली नीतिसूर्य अस्तंगत होऊं लागला. त्याचा परिणाम असा झाला कीं, गांधी टोपीवाल्यांस वर्गांत प्रवेश करण्यास त्यांकडून बेमूर्तखोरपणें मनाव होऊं लागला. आलवेतें मारतींस सारख्या आडदांडवृत्तीच्या अध्यापकांकडून तर धमकीचे प्रयोग होण्यास सुरवात झाली. गोष्ट इतक्यावरच थांबली असती तर बरें झालें असतें; परंतु दुर्दैवानें तसें न होतां, गांधी-टोपी प्रकरणानें सर्व हिंदुविद्यार्थ्यांत खळबळ उडवून दिली.

भडका उडालाः— गांधी-टोपीच्या जोर प्रसारानें शेवटीं असें झालें कीं, पाठशाळेचे कामचलाऊ मुख्याध्यापकांकडून प्रसिद्ध रीतीनें विद्यार्थ्यांचाच नव्हे तर एकंदर हिंदुजनतेचा अवहेलनात्मक उद्गारानीं अत्यंत बेजबाबदार व निंद्यपणें अपमान करण्यांत आला. [दुसरीकडे दिलेल्या पुरवणींतल्या भाषांतरावरून वाचकांस पाद्री साहेबांच्या त्या लांछनास्पद उद्गारांची पूर्ण कल्पना होईल] ज्या दिवशीं ही गोष्ट घडली त्या दिवशीं आमचे संपादक तेथें असल्या. वरून, सहजच त्यानीं पोर्तुगीज पुरवणी काढून उपरोक्त अमंगल वाणीबद्दल ताबडतोब तीव्र निषेध व्यक्त केला. विद्यार्थ्यांचीहि मनें प्रक्षुब्ध झालेलींच होतीं. त्यामुळें त्यानीं एकवाक्यतेनें गांधी-टोपी धारण करून पाठशाळेंत प्रवेश केला. या अपूर्व प्रकारानें टोपी विरुद्ध हालचाल करणारे शिक्षक आश्चर्य व राग यानीं वेडे होण्याच्या बेतांत आले व त्यानीं टोपी संबंधानें (अ) विचार करण्यासाठीं सर्व शिक्षकवर्गाची एक सभा भरवली. परंतु टोपीचें समर्थन करणाऱ्या पक्षाचें संख्याबळ अधिक पडल्यावरून तसेंच पोषाखासंबंधीं कायद्यांत कसलाच प्रतिबंध नसल्यामुळें अर्थात् सगळें ओमफस् होऊन, मुख्याध्यापकानीं गव्हर्नरसाहेबांची भेट घेऊन पुढील कर्तव्याचें धोरण निश्चित करावें असें ठरलें, व तदनुसार त्यानीं गव्हर्नरसाहेबांच्या घेतलेल्या भेटींत साहेबमजकुरानीं टोपीस कसलाहि प्रतिबंध करण्याचें कारण नाहीं, असें चक्क बजावलें असें म्हणतात. व या गोष्टींत बराच तथ्यांश आहे असें, भेटीच्या दुसऱ्या दिवसापासून टोपीला कोणाकडूनहि कसलीच आडकाठी करण्यांत आली नाहीं, यावरून सिद्ध होतें.

विद्यार्थ्यांचा स्वार्थत्यागः— गांधी टोपीच्या बाबतींत हिंदु विद्यार्थ्यानीं व्यक्त केलेला स्वार्थत्याग खरोखर विद्यार्थ्यांच्या चळवळींत सुवर्णाक्षरानीं नमूद करून ठेवण्यासारखा आहे. केवळ ध्येयाकडे दृष्टि ठेवून प्रोफेसरांच्या किंवा पालकांच्या इतराजीची काडीचीहि पर्वा न करतां, विद्यार्थ्यानीं आपली बाजु अखेरपर्यंत संभाळून विजय संपादन केला, हें लिहिण्यास आम्हांस फार अभिमान वाटत आहे. विद्यार्थी हे राष्ट्राचे खरे आधारस्तंभ आहेत. अर्थात् वरील भावना त्यांच्यांत वृद्धिंगत व दृढ होत गेल्यास देशाचा भाग्योदय दूर नाहीं हें उघड आहे. आमच्या पूर्वपुण्याईनें सदरील चळवळ प्रत्यक्ष पहाण्यास मिळाल्याबद्दल आह्मीं आह्मांस मोठे भाग्यवान समजतों. असो. विद्यार्थ्यानी दाखविलेल्या नेटाबद्दल अभिनंदन करून त्याचें कल्याण इच्छितों.

प्रोफेसर सिनारीः— वास्तविक पहातां सेंत्राल पाठशाळेंत डॉ० सिनाऱ्यांसारखे हिंदु अध्यापक असतां टोपीसंबंधानें एवढा गोंधळ माजावा हे आश्चर्य आहे. टोपीचें निर्दोषत्व सिद्ध करून प्रोफेसरसाहेबानीं पूर्वीपासूनच तिजविषयींचा संशय दूर घालवला असता तर ज्या थरावर गोष्टी गेल्या त्या थरापर्यंत त्या मुळींच गेल्या नसत्या अशी आमची खात्री आहे. परंतु डॉ० सिनाऱ्यांनींच उलट टोपीविरुद्ध गिल्ला करून तिचा त्याग करण्याविषयीं विद्यार्थ्यांस उपदेश करण्याचा एकसारखा सपाटा चालू ठेवला, ही दुःखाची गोष्ट होय! डॉ० सिनाऱ्यांस आह्मीं आमचे मित्र, समाजाचे नेते व स्वदेशाचे भक्त समजत होतों. पण ह्मापर्हेंहून त्यांचें पणजींत स्थलांतर होतांच त्यांच्यांत वसत असलेल्या सद्गुणानीं कोठें तरी दडी दिली तर नकळे! तात्पर्य 'गांधी टोपी प्रकरण' विकोपास जाण्यास, प्रो सिनारी हेच प्रामुख्यानें कारणीभूत आहेत असा त्यांच्यावर आमचा स्पष्ट आरोप आहे. व तो निराधार नाहीं हें वाचकांनीं ताडलेंच असेल.

एक नवीनच प्रकरणः— पणजीं येथें आमची पोर्तुगीज पुरवणी प्रसिद्ध होतांच आलवेतें मारतींस नावांचे एक वरील पाठशाळेचे शिक्षक—ज्यांची गांधीटोपीवर करडी नजर होती—हातांत काठी व खिशांत रिव्हलवर घेऊन आमच्या संपादकांच्या शोधार्थ निघाल्याची बातमी कानांवर आपटली. या बातमीच्या सत्यतेबद्दल आह्मांस संशयच होता. पण त्यांच्याकडून आलेल्या एका पत्रावरून आमचा तो संशय पूर्णपणें फिटला. आलवेतें मारतींस आपल्या पत्रांत ह्मणतातः—"मीं आपल्या पत्राची पुरवणी वाचली. त्यांत टोपीविरुद्ध असलेल्या शिक्षकांचा येत्या अंकांत [?] समाचार घेणार असल्याचें आश्वन लिहिलें आहे. व मीहि एक टोपीला प्रतिबंध करणारांपैकीं असल्यामुळें आपणास बजावतों कीं, जर आपल्या पत्रांत मजविषयीं कोणत्याहि गोष्टीचा उल्लेख होईल, तर आपणास वाईट काळ कंठावा लागेल हें खूप समजून रहावें..." हें वाचून आम्हीं नव्या प्रजासत्ताक राज्यांत आहों कीं जुन्या झारशाहींत आहों, हेंच आह्मांस समजत नाहीं! हें नीतिमान पोर्तुगीज लोकांचें राज्य आहे कीं अनीतिमान उपटसुंभाचें साम्राज्य आहे, या विषयीं आम्हीं सरकारास लेखी प्रश्न केला आहे. त्याचें उत्तर येतांच—व तोंपर्यंत मारतींसाच्या हातून आमचे संपादक जीवंत राहिल्यास—या विषयीं ज्यास्ती चर्चा करूं.

एक खुलासाः— गेल्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या काल्पनिक सृष्टींतील 'गोमांतकाच्या प्रवासांत' 'भागिरथी' ओतल्याचा उल्लेख आहे. या संबंधीं कोणाचा गैरसमज होऊं नये ह्मणून कळवितों कीं, 'भागिरथी' ओतणें हें कडक कायद्यानीं ठरविलें असल्यावरून तसें करण्याशिवाय त्या कामावरील हिंदु अगर खिस्ती डाक्टरांस गत्यंतर नाहीं. दोष डाक्टरांचा नव्हे कायद्याचा आहे. त्याला डाक्टर काय करतील?

कृतघ्नतेचा आभास

एका उदार अंतःकरणाच्या मनुष्यानें अपरिमीत झीज सोसून, अनेक जिवावरच्या प्रसंगांस तोंड देऊन दुसऱ्याचें हित साधण्याची पराकाष्टा करावी, त्यांत त्याच्या दृष्टीनें यशही मिळावें. आणि शेवटीं त्या दुसऱ्या प्राण्यानें ते उपकार न स्मरतां आपल्या उपकारकर्त्यावर उलटावें! अशा वेळीं त्या उपकारकर्त्याची मनःस्थिति काय होत असेल, त्याला त्या आपल्या कृतींचा किती पश्चात्ताप होत असेल हें ज्याचें त्यालाच माहीत. इतरांना त्याची नीटशी कल्पना व्हावयाची नाहीं.

सर्वांसच सर्व प्रसंगांचा प्रत्यक्ष अनुभव येत नाहीं. ह्मणूनच विचारी पुरुषांनी अनेक गोष्टींच्या रूपानें तें ज्ञान जनतेस देण्याचा प्रयत्न केलेला असतो. गांवढेकऱ्यानें बर्फाहीं मृत सर्पास शेगडीजवळ ठेऊन ताजातवाना केला; परंतु उपकारांची विस्मृति होऊन तो सर्प उपकारकर्त्यावर उलटतांच गांवढेकऱ्यास त्याचा जो संताप आला तो त्यानें त्या सापाचे एक घाव दोन तुकडे करून कृतीनेंच व्यक्त केला. फार कशाला सर्व सद्गुणाचा पुतळा जो बायबलांतील ईश्वर, त्यानें मोठ्या प्रेमानें स्वतः सारख्या उत्पन्न केलेल्या पहिल्या मानवीं जोडप्याला [आदांव आणि यव्ह] "पाराइजा" सारख्या सुखसमृद्धियुक्त जागेंत स्थानापन्न करून त्याला कसलीही ददात लागूं नये अशी व्यवस्था केली; परंतु या उपकृतीची जाणीव मनांत न बाळगतां त्या आद्य पितरांनीं, सृष्टिकर्त्यानें घालून दिलेल्या नियमाचें यत्किंचितही उल्लंघन करतांच, एकदम त्यांसच नव्हे तर त्यांच्यापासून उत्पन्न होणाऱ्या अखिल मानव जातीस शापबद्ध करून टाकलें. दयेची खाण, करुणेचा सागर, आणि पवित्र अंतःकरणाच्या आकाशांतील बापाची जर ही स्थिति तर मग मानवी अंतःकरणें कृतघ्नतेमुळें घं पश्चात्तप्तजन्यक्रोधानें दग्ध व्हावीं यांत नवल तें काय? असाच कांहींसा प्रकार आमच्या गोमांतकीय ख्रिस्तीबंधूनी पोर्तुगीज लोकांशीं केला आहे. दयाळू पोर्तुगीज लोकांनीं आमच्या खिस्तीबंधूस आदांव आणि यव्हेचा धडा पढिल्यानें घोकण्यास देऊन उपकारकर्त्यांशीं कृतज्ञ असावें हें तत्व हृदयावर कोरण्याचा जो प्रयत्न केला तो बऱ्याच अंशीं सफल झाल्याचेंही समाधान त्यांस लाभलें. पण आतां पहावें तर उलटीच खूण अनुभवास येऊं लागली. खिस्ती बंधूच्या मनावर कोरलेली तीं अक्षरें हळूहळू पुसट होत जात असून कृतघ्नतेचीं लक्षणें दिसून येऊं लागलीं आहेत! दयाळु पोर्तुगीज लोकांना नेटीव लोकांच्या या कृतघ्नतेबद्दल काय वाटत असेल? परंतु हीं

ANO VI.—NUMERO 23—1921 QUEPEM QUINTA-FEIRA 1 DE SETEMBRO

Govinda P. Hegde Dessai
Director e Editor

Assinatura
INDIA PORTUGUEZA...... 3-00-00
INDIA INGLEZA........... 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत
BHARAT

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
संपादक व प्रकाशक

वर्गणीचे दर
गोंव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया......... ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें. केपें, गुरुवार, तारीख १ माहे सप्टेंबर सन १९२१ अंक २३ वां.

A PROPOSITO...

A carta que algum mál intencionado nos enviou, abusando do nome do ilustre professor sr. Alberto Martins provocou-nos as linhas que seguem. E' claro que elas não dizem respeito a ninguem quere individualmente, quere colectivamente: representam apenas um artigo doutrinario sem intuito de ferir melindres de quem quere, muito menos do referido sr. Martins que tivemos sempre na conta de cavalheiro sincero.

Ora vejamos O assunto da referida carta faz suscitar os seguintes dois pontos:-

1 º ¿ Deve um jornalista abster-se de falar no seu jornal qualquer coisa a respeito duma pessoa culpada, quando esta o ameace por carta?

2 º ¿ Pode o mesmo jornalista envolver na sua critica as relações publicas entre professores e alunos ?

E' o que vamos a ver em poucas palavras. A Constituição da Republica Portuguesa sob cujo manto protector vivemos todos nós garante a liberdade de expressão, quere esta se manifeste por palavra falada em discursos, quere se exerça por palavra escrita em jornais, revistas ou livros. E, assim como cada um pode fazer o que quiser, contanto que não ofenda os direitos doutrem e a moral publica, do mesmo modo pode qualquer cidadão usar do direito da liberdade de expressão, contanto que respeite aquela condição, sob pena de, no caso contrario, incorrer na sancção penal, estabelecida pela respectiva regulamentação.

¿Abusou alguem do direito da liberdade de expressão contra um cidadão ?

Que este cidadão tenha a paciencia de arrasta-lo para os tribunais competentes e de não procurar maltrata-lo com atentados cujo dominio deixou, há muito tempo, de existir.

Do exposto resulta, como consequencia logica que ameaçar um jornalista no pleno gôso do seu direito da liberdade de expressão é praticar um crime contra a Constituição Republicana, indicativo da pouca fé nas instituições que nos regem.

¿Mas o jornalista deve sacrificar a sua caneta no *altar* da ameaça ?

Entendemosque não; porque nêste caso o seu acto importaria, alem de sua completa e monumental liquidação pessoal, uma traição áqueles cujos interesses jurou defender no limite-e maximo-de suas forças. Ao jornalista ameaçado não é permetido, portanto deixar de presseguir na sua missão, só porque corre o risco a sua integridade fisica.

Em conclusão: *não dêve um jornalista abster-se de falar no seu jornal qualquer cousa a respeito duma pessoa culpada, quando esta o ameace por carta.*

Estudemos, agora, o segundo ponto da carta de que se trata.

Sabe-se que no erario público entra o dinheiro dos contribuintes e que com a parte do mesmo dinheiro é pago o professorado de estabelecimentos publicos.

Ora, quem cumpre a obrigação de pagar alguem, adquire, com o cumprimento desta obrigação, o natural direito de velar pelos actos públicos desse alguem.

Os contribuintes que pagam um professor tem seus filhos nos referidos estabelecimentos. Logo podem os mesmos contribuintes-sem favor-zelar pelas relações *publicas* entre os seus já referidos filhos e professor ao qual cabe o dever de justificar todos os seus actos *públicos*.

O mesmo prof. não pode, portanto, furtar-se ou *excusar-se de justificar a sua atitude para com os seus alunos* quando a isto seja intimado pelos contribuintes, no número dos quais conta o director do *Bharat*, acrescendo tambem a circunstancia de ser êle um jornalista representante dos mesmos, gosando por esta dupla razão do amplo direito de exigir do mesmo o cumprimento da obrigação de *justificar a sua atitude* para com os seus alunos.

Conclui-se, portanto, daqui, que *um jornalista pode envolver na sua critica as relações publicas entre professores e alunos.*

O Gandhicap

Quem promete na divida se mete. Nós que prometemos demonstrar a culpabilidade do sr. dr. Sinari na questão do uso do *Gandhicap*, metemonos portanto na divida imprescrevivel de tratar do prometido. E crêmos que não somos máus pagadores-modestia á parte.

Pois é verdade. O sr. Sinari não procurando, logo ao principio, desfazer com a sua autoridade incontestavel, a errada interpretação que por parte dalguns seus colegas se deu ao uso do *Gandhicap* tornou-se *ipso facto* responsavel de tudo o que de desagradavel se passou em volta do referido *cap*.

Sua excia é um hindu puritano, lê jornais e revistas marátas, conhece, talvez milhor do que nós, o *gandhismo* e sabe que a doutrina do Gandhi nunca pode sinificar entre nós *sinal da revolta*.

O sr dr. Sinari não ignora tambem que a classe hindu está satisfeita com a implantação da Republica, que ela é incapaz de fomentar qualquer agitação, tendente a abalar a soberania nacional e que se se simpatisa com o *gandhismo* é porque êste oferece todas as condições de imprimir simplicidade á sua vida e libertar os seus irmãos da visinha India das fauces hiantes do britanico absolutismo burocratico.

Sua excia conviveu com os hindus, já como seu medico predilecto, já como um dos seus proeminentes membros, sendo de presumir que em ambas estas qualidades, o sr. prof. Sinari só deve ter tido ocasiões de se certificar do que acima deixamos escrito.

E agora permita-nos as seguintes perguntas:-

¿Não era a obrigação do sr. dr. Sinari vulgarisar o verdadeiro sentido do *Gandhismo* entre os professores a quem o uso do *Gandhicap* se afigurava *sinal da revolta* ?

¿Não lhe cabia o dever de, sem perda de tempo, explicar-lhes a inocencia do mesmo *cap*?

E' nossa convicção firme de que, se o sr. dr. Sinari cumprisse, cabalmente, este seu imprescindivel dever não se criaria a lamentavel confusão que se formou em rédor do uso do *Gandhicap*. Não lhe parece ?

Eis a razão por que o acusamos de responsavel do incidente *Gandhicap*.

¿ E' errado o nosso juiso, é falsa a nossa acusação ?

Prove-o o sr. dr. Sinari, a quem de bom grado oferecemos as colunas do *Bharat* para, querendo, como se diria na giria forense, dizer de sua justiça.

Uma carta

Sr. Director do *Bharat*

A proposito da sua local "A ameaça" publicada no ultimo numero do seu jornal, a bem da verdade que convem antes de tudo restabelecida, devo dizer-lhe que a fantastica carta a que se alude e em que o nome do meu ilustre amº Sr. Alberto Martins, digno profêsor do Liceu se acha envolvido não é da lavra deste professor, o que se depreende da minha entrevista com ele, sendo porisso crivel que a suposta *carta* representa um jogo de quaisquer mexeriqueiros infames

Devo frisar nesta ocasião que o professor A. Martins nunca foi inimigo da nossa classe, sendo, portanto, absolutamente, distituido da verdade todo o boato com que por ventura em seu nome, tenham querido especular o caso.

De V. etc.
Madeva Caculò

Esta carta do nosso presado amigo sr Caculò e mais o telegrama que recebemos do Sr. chefe de gabinete de exa. Sr. Governador geral, a quem expuseramos o casa da carta deixam ver que esta não partiu do Sr. Alberto Martins, o que muito estimamos.

¿ Mas porquê é que o sr. Martins se não dignou de transmitir-nos isto mesmo directamente? De resto nunca o consideramos como inimigo dos hindus, pela simples razão de pertencer sua excia a uma classe que tambem lhes é simpatica.

Eis o conteudo do telegrama.

S Exa. Governador encarrega-me comunicar-lhe que professor indicado sua exposição não lhe escreveu carta alguma.

Aos 25 de Agosto de 1921

A sua exa Sr. Governador Geral, agradecemos a gentilesa de ter-nos prontamente atendido á exposição.

Muito obrigados

E ponto sobre o caso *Gandhicap*.

अशा एका विलक्षण जातीचे प्राणी आहेत कीं, त्यांच्यानें कांहीं करवत नाहीं. त्यांचा धंदा केवळ फावल्या वेळीं लोक निंदा करण्याचा आहे. अशांच्या कोल्हेकुईकडे बिलकूल लक्ष न पुरवितां, आपला स्वदेशहिताचा धंदा निर्मळ अंतःकरणानें चालू ठेवण्याचा हा मनु आहे.

म्हणूनच बंधु भागिनीनों, उपरिनिर्दिष्ट सुलक्षणी विद्यार्थ्यांचे प्रतिज्ञा-बोल हृत्पटावर खोदून, आत्मोन्नति साध्य करून घेण्याच्या मार्गास झपाट्यानें लागा! गांधी-टोपी प्रकरणानें, आमच्या वीर विद्यार्थ्यांत वसत असलेला स्वदेशाभिमान व एकीचें महत्व, या दोन गोष्टींचें अस्तित्व सिद्ध करून, आमची भावी कर्तव्यरेखा स्पष्ट रीतीनें आंखिली आहे. आतां वेळ दवडण्यांत हंशील नाहीं. पुढें या व स्वदेशोन्नतीस अंतःकरणपूर्वक हातभार लावा!

स्फुट विचार

गांधी-टोपीः—पणजीच्या पाठशाळेंतील कांहीं असमंजस व भित्रे प्रोफेसरांनीं उपस्थीत केलेल्या गांधी-टोपी प्रकरणासंबंधीं गेल्या आठवड्यांत डेली हेरल्ड [Heraldo) वर दोन पत्रें प्रसिद्ध झालीं. पैकीं एक त्या पाठशाळेच्या सहाव्या क्लासांतील खिस्ती विद्यार्थ्यांचें असून दुसरें त्याच वर्गांतील हिंदु विद्यार्थ्यांचें आहे. प्रोफेसर आल्मेद यानीं हिंदूंचीं अंतःकरणें दुखण्यासारखीं वाक्येंच उच्चारलीं न व्हतीं; केवळ गांधी-टोपीला डोक्याला आधार देणें म्हणजे उघड उघड बंडास उत्तेजन देण्यासारखें असल्यावरून त्या टोपीचा उपयोग करणें अप्रशस्त आहे इतकेंच त्या पाद्रीचें म्हणणें होतें, हें प्रस्थापित करणारे सदरहू खिस्ती विद्यार्थ्यांनीं आपल्या पत्रांत मल्लीनाथी लढविली होती. परंतु हिंदु विद्यार्थ्यांनीं आपल्या उत्तरांत खिस्ती सहाध्यायांच्या डोळ्यांत झगझणीत अंजन घातलें असून आम्हीं प्रसिद्ध केलेल्या पुरवणींतील आल्मेदाच्या तोंडचीं मुक्ताफळें कशीं सत्यास धरून आहेत हें त्यानीं अत्यंत बाणेदार व निस्पृहपणें सिद्ध करण्याचें यशस्वी श्रेय संपादिलें आहे.

हिंदु विरुद्ध खिस्तीः—वरील दोन्हीं पत्रांच्या सारांशावरून चाणाक्ष वाचकांच्या लक्ष्यांत येऊन चुकलेंच असेल कीं, हिंदु व खिस्ती या परस्पर समाजाचे राष्ट्रीय दृष्टिकोण संस्कृतिभिन्नत्वामुळें परस्पर विरुद्ध बनून गेल्यावरून राष्ट्रकार्यात उभयतांची सहकारिता दृष्टोत्पत्तीस पडणें दिवसेंदिवस कठीणच होत आहे. असें नसतें तर आपल्या जातभाई प्रोफेसराची लंगडी बाजु—केवळ तो खिस्ती म्हणून—सांवरून धरण्याचा लांछनास्पद चावटपणा उपरिनिर्दिष्ट खिस्त्यानीं कदापीच केला नसता, हें उघड आहे. या गोष्टीपासून हिंदु लोकांनीं शिकावयाचा धडा ते योग्य प्रकारें शिकून आपलें पुढील धोरण परिस्थितीस साजेसेंच आंखतील, अशी आशा आहे.

अभिनंदनः—ज्या सहाव्या वर्गाच्या हिंदु विद्यार्थ्यांनीं प्रत्यक्ष आपल्या प्रोफेसरांची भीडभाड न बाळगितां हिंदु समाजाची लज्या रक्षणाचे कामीं तत्परता दाखविली, त्या देशभक्त व शूर तरुणाची सद्गदित अंतःकरणानें पाठ थोपटल्यशिवाय आमच्यानें रहावत नाहीं. असे करारी निःस्वार्थी व स्वतंत्र बाण्याचे सुपुत्र जेव्हां आमच्या देशांत जेथें तेथें निपजावयास लागतील, तेव्हांच गोमंतकचा भाग्यरवि पूर्ण प्रकाशीत होणार आहे. असो. उपरोक्त विद्यार्थ्यांनीं व्यक्त केलेला स्वदेशाभिमान, हिंदु जनता कदापिहि विसरणार नाहीं, अशी उमेद बाळगितों.

छत्र्यांचा कारखानाः—कुंडईचे प्रसिद्ध नागरिक श्री. श्रीधर कामत कुंडईकर यानीं छत्र्या तयार करण्याचा नवीनच कारखाना उभारण्याची तजवीज केली असून तत्प्रीत्यर्थ एक कंपनीहि स्थापण्याची आपली इच्छा त्यानीं भारतद्वारा प्रगट केली असल्याचें वाचकांस आठवत असेलच. श्री. श्रीधरपंतानीं टोप्यांच्या कारखान्यांनें, कोणतीहि औद्योगिक संस्था पूर्णत्वानें यशस्वी होण्यास लागणाऱ्या चिकाटी व प्रामाणिकपणा—या बहुमोल गुणाची ओळख गोमांतकीय जनतेस करून दिली असल्यावरून, त्यांच्या या नूतन कल्पनेसहि लोकाश्रय मिळणें सर्व दृष्टीनीं योग्य आहे, असेंच कोणीहि कबूल करील. नुसत्या बोलघेवडेपणानें व नकली स्वदेशप्रेमाच्या त्याज्य प्रदर्शनानें कोणतेंहि राष्ट्र सुधरत नसतें. 'बोलाचाचीं' भात कितीहि 'कर्णमधूर' असला तरी त्यानें क्षुधाशांति केल्याचें कोठेंहि ऐकिवांत नाहीं! म्हणूनच आमच्या स्वदेशप्रेमी वाचकांस अत्याग्रहाची विनंति आहे कीं, त्यानीं श्री. कामत यांच्या होऊं घातलेल्या छत्र्यांच्या कारखान्यास शक्य तितकी सांपत्तिक मदत पुरवून स्वतःचा स्वार्थ व देशाचा परमार्थ साधण्याची संधि वायां दवडूं नये. औद्योगिक उन्नतीचें महत्व न समजणारे हरीचे लाल आमच्या समाजांत असतील, असें आम्हांस वाटत नसल्यावरून या संबंधीं ज्यास्ती लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. राष्ट्रीय प्रपंचाचा गाडा बिनधोकपणें चालण्यास, औद्योगिक उन्नतीचीं चक्रें शाबूत असलींच पाहिजेत, हें व्यवहारिक सत्य आतां लोकांच्या इतकें अंगवळणी पडलें आहे कीं, त्याविषयीं विशेष चर्चा करणेंच मुळीं अप्रासंगिक होईल, असें वाटतें.

दारू विरुद्ध चळवळः—सांवर्डे येथें चालू असलेल्या पिकेटींगमुळें तेथें दारूचा खप पुष्कळ उतरलेला असून थोडक्यांत तो पुरा बंद होईल, अशीं सुचिन्हें दृष्टीस पडावयास लागलीं आहेत. काकोडें बांदोडें व इतर कांहीं ठिकाणीं पिकेटींगला येत्या जानेवारी महिन्यापासून जोर येणार असून गोव्यांतील दारूच्या गुत्यांची व दारुड्यांची संख्या बरीच कमी होईल, असें भविष्य वर्तविण्यास बरीच जागा आहे. कदाचित् सुरीला माड न देण्याचें जें किरस्तांच्या मनांत घोळत आहे तें अमलांत आल्यास दारूच्या व्यसनाची हकालपट्टी होण्यास कालावधी नको. एकंदरीत दारूविरुद्ध चळवळींत दिसून येत असलेला उत्साह अपूर्व असून, त्यापासून गोमांतकाचें कोटकल्याण होईल, यांत संशय नाहीं.

वर्तमानसार

—पूर्वी जाहीर केल्या प्रमाणें ता. २८ रोजीं मडगांव येथें रा. नार्वेकर यांच्या वाड्यांत "बालचमू" मंडळातर्फे, श्रीयुत विर्जिनकर यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरविण्यांत आली. सभेंत पणजी येथें लिसेवाच्या अध्यापकानीं विद्यार्थ्यांशीं केलेल्या गैरवर्तनाबद्दल निषेधप्रदर्शक ठराव पास करण्यांत आला. व ज्या विद्यार्थ्यांनीं अध्यापकांचें गैरवर्तन उघडकीस आणण्याबद्दल बरेंच धाडस केले, त्यांचें पत्रद्वारें अभिनंदन करण्याचें ठरलें. नंतर आमच्या संपादकांचें 'तरीच जन्मा यावें दास ईश्वराचें (स्वदेशाचें) व्हावें या अभंगावर प्रवचन झालें. त्याच अभंगावर श्रीयुत विर्जिनकर यानींहि थोडेंसें पण परिणामकारक भाषण केल्यावर सभा बरखास्त करण्यांत आली.

—मडगांव येथें असतानाच आयत्या वेळीं, काकोडकर मंडळीकडून सप्ताहाच्या समाप्तीच्या वेळीं प्रवचन करण्याविषयीं आमन्त्रण आल्यावरून श्री. विर्जिनकर यांस बरोबर घेऊन आमचे संपादक सोमवारीं १० वाजतां काकोडें येथें येऊन पोंहचले. सप्ताहाच्या निमित्तानें जमलेल्या लोकसमुहापुढें त्यांचें "हेचि थोर भक्ति आवडती देवा (देशा) संकल्पावि माया (आशा) संसाराची" या अभंगावर प्रवचन झालें. श्री. विर्जिनकर यांस "स्वदेशी" या विषयावर व्याख्यान देण्यास विनंति केल्यावरून, त्यानीं त्या विषयावर परिणामकारक भाषण केलें. काकोडकर, कुडचडकर वगैरे मंडळीनीं मद्यपान निषेधाविषयीं केलेल्या चळवळींबद्दल त्यानीं त्यांचे आभार मानले. त्याच वेळी, समयास अनुसरून श्री. शंभू सदाशिव शेणवीं काकोडकर, आत्माराम महादेव साळे, भास्कर रामकृष्ण काकोडकर व विराध्या मजगी यांचीं उपयुक्त भाषणें झालीं.

प्रागतिक संघ वार्ता

संघाचे खजिनदार श्री. रघुनाथ अनंत भांडारे व स्वयंसेवक रा. वि. का. प्रियोळकर हे संघास सभासद मिळविण्याकरितां मुंबईस गेले असून त्यांस तिकडील गोमांतकीय हिंदुबांधवांकडून योग्य साह्य मिळत असल्याचें समजतें.

पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणें गेल्या २० तारखेस फोंडें येथें प्रागतिकसंघकार्यालयांत संघाच्या का. मंडळाचे सभासद व स्वयंसेवक यांची सभा, श्री. भास्कर र. नाईक प्र. सरदेसाई यांच्या अध्यक्षतेखालीं भरून संघाचें पुढील कार्य शक्य तितकें लवकर व व्यवस्थीत होण्याबद्दल कांहीं निश्चित योजना करण्यांत येऊन सभासद मिळविण्याच्या कामावर ठिकठिकाणीं स्वयंसेवकांची निवड करण्यांत आली. संघाचे सेक्रेटरी श्री. पु. श्री सुकेरकर व स्वयंसेवक श्री. ज. वि. कामत यानीं अवेडें कोठंब, असोळडें, वगैरे ठिकाणीं जाऊन मध्यवर्ती कमिटिचे तेथील सभासद श्री. उत्तम पांडुरंग गांवस देसाई व बाबु शिवराम प्रभू देसाई यांच्या मदतीनें बरेच सभासद मिळविले. आणखी सभासद मिळविण्याचें काम सदरदेसाईद्वयानीं पतकरिलें आहे.

गेल्या आठवड्यांत श्री. हेगडे देसाई व श्री. पु. श्री. सुकेरकर यांनीं कुकळ्ळी व असोळणें येथें जाऊन संघाची माहिती करून दिली. या कामीं तिकडील रा. भगवंत केणी व रा. त्रिविक्रम विष्णु पै वैद्य यानीं त्यांस मनःपूर्वक सहाय्य केलें हें त्यास भूषणावह आहे.

पा. येसेलस विरुद्ध प्रसिद्ध झालेल्या पुरवणीमुळें भारतावर खटला झाला असल्याचें कळतें. ठीक आहे!

मुंबईचें पत्र.

पहिलें पत्र पाठवून बरेच दिवस झाले, दुसरें पत्र केव्हां वाचावयास मिळेल इतकी उत्सुकता वाढविण्याचा चटकदारपणा प्रस्तुत बातमीदाराच्या पत्रांत नसतो ह्याची जाणीव स्वतः लेखकास आहे; म्हणूनच 'भारताच्या' वाचकवर्गास व लेखकास विलंबाची पर्वा नाहीं.

आगष्टची १ ली तारीख आली व गेलीहि. हिंदुस्थानच्या इतिहासांत अशा अगणित आगष्टच्या १ ल्या तारखा येऊन गेल्या; परंतु १९२० व १९२१ सालांतील तारखा-पुढच्या किती हें कालालाच माहीत-त्रि. हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं नोंदल्या जातील. गतसालीं ह्याच तारखेस एका लोकाग्रणीचा अस्त व एकसमयावच्छेदें करून दुसऱ्या लोकाग्रणीचा उदय झाला. गांधीयुगाचा प्रांरंभ झाला पण टिळकयुग समाप्त झालें नाहीं. एक कोटी रुपये जमविले टिळकांच्या नावावर. राष्ट्रानें स्वदेशी व्रताचा स्वीकार टिळकांच्या पुण्यतिथीदिवशीं त्यांच्या स्मरणार्थ केला. आदल्या दिवशीं जुलई ३१ तारखेस सोभानीयांच्या एल्फीन्स्टन मिलच्या कंपाउंडांत कपड्याची होळी झाली ही केवळ होळी नसून म. गांधी या यजमानानें स्वदेशी व्रताचें कंकण बांधून स्वराज्य देवतेस प्रसन्न करण्याकरतां केलेला यज्ञच होय. स्वदेशी हें साधन नसून स्वराज्याइतकेंच साध्य आहे. असें म. गांधीनीं विद्यार्थ्यांपुढें झालेल्या आपल्या भाषणांत सांगितलें होतें. म. गांधी स्वदेशीला धर्म समजतात. स्वराज्य मिळालें तरी स्वदेशी व्रत अखंड चालविलें पाहिजे. कौन्सिल, शाळा व कोर्ट यांवरील बहिष्कार हें नोकरशाहीची इज्जत कमी करण्याचें साधन आहे. तसें स्वदेशी हें साधन नव्हे. स्वदेशीव्रताचें पालन धार्मिक बुद्धीनें केलें पाहिजे.

दुसऱ्या दिवशीं, आगष्ट १ ल्या तारखेस चौपाटीवर प्रचंड जाहीर सभा भरली. इतका लोकसमुदाय एका स्थलीं व एकाकाळीं मुंबईत दोनदांच दिसला. दोनहि वेळा आगष्ट १ ल्या तारखेसच. सभेची हकीकत लोकमान्य, केसरी वगैरे पत्रांतून भारताच्या वाचकांनीं इतक्यांत वाचली असेलच. तेव्हां पासूनच स्वदेशी खादीचा खप वाढला आहे. जिकडे तिकडे गांधी-टोपी—गांधींच्या म्हणण्याप्रमाणें स्वराज्य टोपी—दिसत आहे. सप्टेंबर ३० तारखेपर्यंत ऑलइंडिया काँग्रेस कमिटिमार्फत हिंदुस्थानानें कपड्याच्या बाबतींत पूर्ण स्वदेशी व्हावें म्हणून म. गांधींनीं फर्मान सोडलें आहे. राष्टीय शाळांतून सूत काढणें व विणणें शिकविण्यांत येणार आहे. कोष्ट्याचीं खानेसुमारी होणार व त्यांस स्वदेशी सूताचा पुरवठा करणार आहेत. आतिया बेगमनें भरविलेलें खादीप्रदर्शन अत्यंत यशस्वी झालें. अखिल भारत वर्षीय प्रदर्शन डिसेंबरच्या सुमाराला भरविलें जाण्याचा संभव आहे. मुंबईत सध्या दारूच्या दुकानापुढील पिकेटिंग बंद आहे. सप्टेंबर नंतर जोरानें सुरू होईल. पार्शी लोकांत गांधीच्या मतांचा फैलाव बेंडोरजी फ्रामजी भरुचा यांच्या परिश्रमानें अत्यंत जोरानें झाला आहे. पारशी राजकीय सभा स्थापन झाली असून तिच्या तर्फे मोठमोठ्या सभा भरत आहेत. पार्शी लोकांत स्वदेशीचाहि प्रसार होऊं लागला आहे. बेळगांववाला नांवाचे ग्रहस्थ दर महा ५ हजार प्रमाणें सहा महिने पर्यंत चरकांच्या व स्वदेशी सूताच्या प्रसारार्थ खर्च करणार आहेत. पार्शी लोक गांधी टोप्याच वापरतात. इतकेंच नव्हे तर खादीचा पोषाखहि वापरू लागले आहेत विशेष कौतुकाची गोष्ट ही कीं पया-

ANO VI — No. 24 — Quepem
Quinta-feira 8-9-1921

श्रीगणेश ... खास अंक

वर्ष ६ वें.—अंक २४—केपें, गुरुवार
ता. ८ माहे सप्टेंबर सन १९२१

MENTIRA

¿ Que são muitas das convenções sociais muitas dessas coisas *eternas* e poderosas, diante das quais os homens tremem pelas quais apostrofam, lutam e se dilaceram, se não mentira !

Trabalhamos pela mentira. Gritamos e enfurecemo-nos pela mentira. E mesmo aquilo que segredamos, ás escondidas, á nossa propria alma, é a mentira com que nos queremos desfigurar e com que pretendemos convencer-nos a nos proprios...

Que são a maior parte das nossas afirmações, a maior parte dos nossos juramentos solenes, a maior parte dos nossos protestos d'amor, se não mentira.

Raul Proença

भारत
BHARAT

VICIOS...

Faz dó, faz verdadeiramente dó vêr como esses homens, professores das principais escolas do Paiz, socios dos institutos scientificos, literatos, artistas que toda a sua vida andarem a esconder a sua incapacidade fundamental sob crachás, medalhas e far las da Academia, vêr como êsses homens repentinamente, é com uma ingenuidade enternecidora de papalvos nem documentar a historia e gritar bem alto aos ouvidos dos vindouros, a incrivel chatesa das suas ideas, as faltas dos seus pontos de vista e a nudeza frigorifica do seu cerebro inutil.

Raul Proença

वर्ष ६ वें. केपें, गुरुवार, तारीख ८ माहे सप्टेंबर सन १९२१ अंक २४ वा.

MAIS UM PROCESSO!

Um terrivel medo se apoderou de nós, quando informes fidedignos nos confirmaram a noticia do processo crime contra o nosso jornal pelo seu suplemento de 17 do mez findo.

Medo de condenação ? Terror de prisão ? Nunca nos preocupou nem uma nem outra coisa. O director do *Bharat* nunca fez caso de processos crimes, motivados pelos seus modestos escritos, porque nunca pôz no papel coisa alguma que lhe trouxesse remorso á Consciencia, porque nunca traçou linha alguma que se arredasse um apice sequere da Verdade, porque nunca avançou argumento algum que tivesse por fim adulterar a origem de actos e factos, e, finalmente, porque nunca acusou pessoa alguma que não estivesse nas condições de ser acusada.

E, não obstante, um terrivel mêdo se apossou de nós, quando nos certificamos da instauração do presente processo crime á quêixa do sr. Pe Almeida.

E' que recêamos que no decurso do mesmo processo neste *proceloso oceano* de declarações e depoimentos tenhamos de lamentar formidaveis naufragios de caracteres tidos serios e de consciencias consideradas puras. E' que temos medo de que no *mercado* das mesmas declarações e depoimentos tenhamos de carpir falencias da probidade de cavalheiros de *palavras do Rei*.

O terrivel mêdo que nos acabrunha o espirito, os receios que nos assaltam a alma são pois bem justificaveis, porquanto se nota infelizmente da banda dos nossos adversarios, decidida tendencia para negar...

¿Com que, então, são *falsas* as palavras ofensivas e insultosas que o sr. Pe. Excelso d'Almeida proferiu, incomodando a classe hindu ?

¿Representarão elas producto da méra invencionice, gerada por qualquer sentimento de odio ou vingança ?

¿ Mas odio de que, vingança porque ?

¿Por ventura o sr. Reitôr interino, dominado pelas falsas preocupações de prestigio pretenderá inverter o mundo de coisas ?

Praza a Deus que o nosso mêdo, os nossos receios sejam disfeitos e que a Verdade triunfe.

De resto, é de todos sabido que o hindu é incapaz de inventar coisas que comprometam quem quer, muito menos os seus superiores por quem está habituado, por indole e por educação, a professar uma verdadeira veneração que roça pela submissão.

Mas tanto pior para quem pretender esmagar a Verdade, porque nunca o conseguirá por ser empresa impossivel.

Verdade, esmagada ? Nunca. Poderá ficar cançada por algum tempo; mas, finalmente, ressurgirá triunfante, ofuscando com resplandecente brilho os seus detratores.

Ecos & Critica

O Gandhicap...

Pelos modos, o *Gandhicap* é mais revolucionario do que o proprio *mahatma Gandhi*, com a diferença de que, ao passo que este fomenta *revoluções* (!) de povos contra a bucracia absoluta e teocratica da sua Patria, o *cap* do mesmo tende, entre nós, a revolucionarar caracteres sérios !

Se não fora isto verdade, não haveria o proposito de envolver por espirito de chicana no processo contra nós instaurado os nossos amigos srs. dr. Venctexa Sardessai e Datarama Govinda Camotim, dois dos proeminentes membros da nossa classe.

Mas perdem tempo os que pensam incomodar os nossos referidos amigos que não tiveram nenhuma interferencia directa nem indirecta no suplemento que publicamos no dia 17 do mez p. findo.

O director do *Bharat* e sò êste é que é responsavel do mesmo suplemento e não quere que por sua causa sofram os que nada tem com o caso.

Fiquem-no sabendo, duma vez para sempre !

O Sr Alberto Martins

Dizem-nos que devido ás informações dêste senhor foram envolvidos no processo crime, pelo sr. Pe Excelso d'Almeida os nóssos referidos amigos Dessai e Camotim.

¿ Mas onde é que o sr. professor Alberto Martins encontrou elementos para asseverar ao sr. Almeida a conivencia dos srs. Déssai e Camotin no *crime* da publicação e distribuição do suplemento, protestando contra as insolentes ofensas do dito padre ?

Ainda o Gandhicap

O *cap* do *mahatma* Gandhi não é simbolo de revolução; é um boné tão inofensivo como qualquer coisa que se destina a cobrir...cabeças humanas, isto é, cabeças dos *animais racionais*.

E', pelo menos, êste o conceito em que o mesmo *cap* é tido nas britanicas regiões oficiais E a prova disto está em que o seu uso è facultado em todas as repartições publicas, com a secretaria do governo etc.

Só, aqui, entre nòs é que houve criaturas a quem o *Gandhicap* foi capaz de transtornar a mioleira, desordenar a digestão e roubar o sono !!!...

¿Será, porque os ventos liberais do democratismo, implantado, aqui, há mais duma década não conseguiram varrer, ainda, a poeira reaccionaria de sobre os olhos, ofuscados pelo fanatismo ferrenho ?

Francamente

Pelo que se está passando em rèdor do caso *Gandhicap*, parece que o Satanaz pretende abandonar o seu *amado* inferno para sómente se estabelecer nêsta terra que aliás mesmo, goza da reputação...diabolica. Pois, se o diabo do Satanaz fosse *entidade extranha* em todo ésse *embroglio*, não seriam, certamente, envolvidos no processo crime contra o *Bharat*, os nossos prestigiosos correligionarios srs. dr. Venctexa Sardessai e Datarama Camotim, os quais ambos— repita-se mais uma vez— não tiveram interferencia directa nem indirecta na confecção, publicação e distribuição do *criminoso* suplemento, cuja responsabilidade, toda e inteira, pertence exclusivamente ao director do *Bharat*, que a seu tempo será exhuberantemente, comprovado, juntamente com muitas coisas bonitas que oferecerão pasto abundante para diversão pública.

Francamente o dizemos!

Alcance

Crêmos que os que meteram no processo crime contra nós, os nomes dos nossos ilustrados amigos srs. dr. Dessai e Camotim, não alcançaram, infelizmente, a gravidade dêssa sua abominavel *chicana*.

Pois concitaram contra si má vontade de todos os hindus que se com as detestaveis ofensas que nos obrigaram a publicação do suplemento, objecto do referido processo se julgavam feridos, uma vez, na sua dignidade, considerar-se-hão, agora, insultados dez vezes, senão mais, com a mencionada *chicana*.

Não mediram os nossos inimigos o alcance de seu passo impensado, impolitico e, talvez, odioso.

Tanto *pior* para êles e tanto milhor para nós que, segundo todas as probablidades, teremos a dita de ver bem difinida a nossa orientação politica, a orientação do *PragaticSangh*.

Fiquem sabendo

Existem entre nós, hindús, alguns judas *influentes* que, quando se lhes exija a responsabilidade de seus actos publicos, tem invariavelmente, estas palavras que bem marcam a sua craveira moral: "O que sou é devido, ùnicamente, aos meus esforços e não á classe, á qual nada devo, não tenho, portanto de dar coutas a ninguem de meus actos, bons ou máos."

? Mas porque é que, então, esses judas solicitam indirectamente e aceitam directamente as manifestações *da classe, á qual nada devem*, comprometendo-a em diversas ocasiões politicas na suposta qualidade de seus dirigentes ? !

Fiquem sabendo, agora, que a classe tambem os despresa, já que a desconsideram, orgulhosamente.

Nós não precisamos daqueles que não precisam de nós ...

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai

ANO VI — NUMERO 25 — 1921 QUEPEM QINTA-FEIRA 15 DE SETEMBRO

Director e Editor
ovinda P. Hegdo Dessai

Assinatura
NDIA PORTUGUESA...... 3-00-00
NDIA INGLESA............ 3-08-00
JUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें. केपें, गुरुवार, तारीख १५ माहे सप्टेंबर सन १९२१ अंक २५ वा.

O nosso suplemento incriminado

E' com grande pena que pegamos hoje na caneta, pois, máu grado nosso, somos obrigados a verberar as insolencias de quem por algum tempo foi nosso respeitado professor.

Trata-se, sem mais nem menos, do sr. Pe Excelso d'Almeida a quem, pelos modos fez perder as estribeiras o uso do Gandhicap, pois sua reverencia, num assomo de indignação, de resto injustificada vomitou em plena aula os seguintes insultos, dirigindo-se á academia hindu, com a cabeça ornada do mesmo *tapi*:- "*O' gentio, o'animal irracional, porque usou o bonê do Gandhi ?... Se o tesouro está depauperado é devido aos gentios que tem varios empregados ...Eles foram promotores das 19 revoltas havidas em Goa.*

...Os gentios devem ser expulsos desde jà desta terra...Acho ridiculo que a constituição de 1822 tenha conferido iguais regalias aos cristãos e gentios ...Bastava que viesse um decreto que exterminasse todos os gentios."

Parece incrivel mas é verdade que o sr. Pe. Almeida proferiu esses desparates altamente ofensivos do prestigio da Republica e da dignidade do Povo hindu desta colonia, revelando a podridão do seu coração *crente*, operada talvez pelo *jesuitismo* condenavel e exteriorisando ao mesmo tempo o seu mal contido odio á classe hindu.

¿Mas porque é que o inocente Gandhicap fez subir-lhe a mostarda ao nariz ?

¿Que de perigoso enxergou o *piedoso* reverendo no seu uso, a ponto de cuspir contra a laboriosa, prestante e pacifica classe hindu aqueles felinos insultos ?

¿Porventura, o sr. Excelso anda já esquecido, velho como o é ,da censura aplicada ao seu antigo colega Pe Saldanha junior pelo primeiro governador republicano, por o mesmo professor de latim ter tido o arrojo de insultar os hindus com palavras aliás muito menos incomodosas do que as que proferiu ?

¿Mas que indica o uso do Gandhicap ? Guerra ao catolicismo ? Guerra ás instituições que felizmente nos regem ?

Não, sr. Padre. O uso do Gandhicap tem este fim principal: o de manifestar a nossa simpatia ao movimento do Mahatmá Gandhi, tendente a libertar os nossos irmãos da India Britanica das garras do absolutismo, direito êste que sendo natural não pode ser violado por quem quere.

Se amanhã, por exemplo, os portugueses do Brazil promoverem alguma agitação em seu beneficio e se nesta tarefa os portugueses de Portugal se pronunciarem favoravelmente ¿achará nisto alguma coisa de extraordinario o governo deste ultimo Paiz ?

Se não, ¿porque tanta algazarra em volta do uso do mesmo *tapi* ?

Alem disto, o Gandhicap foi adoptado pela sua baratesa e pelo louvavel intuito de se imprimir incentivo á industria local (*swadeshismo*). Por forma que se sua reverencia conseguir amanhã fornecer o mercado de *tapis*, feitos cá em Goa e que possam ser vendidos por um preço igual ao do Gandhicap, a academia hindu e outros que o colocam nas suas cabeças, não terão duvida alguma, creia, em utilisa-lòs de preferencia, baptisando-os com o nome de *Excelso cap*.

Não se acha oculto,portanto, qualquer outro fim *politico* no comodo e altruista uso do Gandhicap, alem dos expostos. E tanto isto è verdade que os proprios professores europeus e quase todos os nativos o consentem, o ánimam, dotados como o são de sentimentos liberais e patrioticos,se bem que tenha havido um e outro que procuraram intimidar quem usasse o Gandhicap, facto êste sobre que bordaremos as nossas considerações, depois de nos certificarmos dêle, pois tal intimidação importa uma flagrante afronta á Liberdade individual, garantida pela Constituição da Republica Portuguesa que veneramos.

Diga-se de passagem e com verdadeiro desvanecimento que o uso do Gandhicap não se limita apenas á classe hindu, estende-se tambem á cristã ainda que numa escala reduzida, o que igualmente comprova a inocencia do mesmo *tapi*.

Crêmos, porem, que, se á testa do Liceu Central estivesse o venerando, brioso e liberal general sr. Antonio Martins que infelizmente se encontra doente, nem o sr. Pe. Almeida nem qualquer outro se sentiriam capazes de praticar asneiras que cometeram e contra as quais apressamo-nos a protestar com toda a veemencia, chamando para o presente assunto a atenção de sua exa. sr. Governador Geral, sobretudo, porque êlas são duplamente graves por partirem duma individualidade que alem de ser professor do Liceu Afonso d'Albuquerque è hoje desgraçadamente o seu reitor, cargo que lhe impendia o dever de ser mais delicado e mais sério.

Não podemos terminar este *suplemento*, provocado pela urgencia do assunto sem aconselhar ao *piedoso e crente* padre a concentração exclusiva do seu espirito nas coisas religiosas, na salvação das almas de suas ovelhas e nas missas, que nem tudo é para todos... nem o Liceu é para os padres que como sua reverencia nem sabem tratar os seus alunos com os mais comesinhos sentimentos de urbanidade.

Não é o Liceu, é á Egreja onde o sr. Pe Excelso d'Almeida deve estar. E' ali o seu lugar. E' ali que êle deve medir o alcance *politico* das expressões insultosas que irresponsavelmente atirou á face da classe hindu. E' ali que ele finalmente, se convencerá de que não temos culpa das presentes linhas.

(Sup. ao N° 20 do Bharat)
17-8 1921

ECOS & CRITICA

Os maratas

Os hindus maratas conhecidos com o nome de *Kxetrias*, residentes em Goa estão envidando os milhores esforços em pról do seu levantamento material, moral e intelectual. Aprazნos registar que os ilustrados e proeminentes membros da mesma classe conseguiram graças á sua desinteressada e intensa propaganda e em um praso relativamente breve, criar uma pronunciada tendencia para a união que é a chave de todos os progressos.

A prova do que afirmamos tivemo-la, quando a convite do sr. Sadá Rauto Dessai fomos fazer uma conferencia em Assoldá, no dia 9 do corrente. Pois na conversa que tivemos o prazer de entabolar com os principais dirigentes dos maratas *Kxetrias* que assistiram á referida conferencia, como os srs. Babu Siurama Porobo Dessai, de Cotombi, Crisna Sadassiva Rauto Dessai, de Assoldá, Rama Gaunço Dessai, de Xeldem e Utoma Panduronga Gaunço Desssai e Xabá Ramachondra Gaunço Dessai, de Avedem, encontramos elementos concretos e positivos para a asserção que acaba de avançar-se.

Decididamente, é o feliz prenuncio da prosperidade da classe hindu este do patriotico movimento dos *Kxetrias*, briosos e generosos descedentes das nobres familias que pelos seus hiroicismos se nobilitaram no tempo do Grande Xivagi e seus sucessores.

E' disnecessario rematar que só desejamos seja coroado do milhor exito o simpatico movimento daqueles nossos bons e verdadeiros irmãos.

Nem carne nem peixe

Francamente, a autonomia financeira com que *generosamente* nos mimosiaram os do Terreiro do Paço não é nem *carne* nem *peixe*.

Pois se essa *dadiva* é autonomia ¿como se explica que o governo central, por *da ca aquela palha*, se intrometa nas magras finanças da Provincia jà *autonomizada* sem a sua audição ?

Ficamos por hoje, nesta simples interrogação, pois a classe hindu pensa em pedir providencias á Metropole sobre a sua referida ruidosa e inoportuna interferencia, por meios puramente constitucionais, claro està

Pragatica Sangh

Contam-se não em dezenas mas sim em centenas as inscrições que semanariamente se fazem no *Sangh*, graças á propaganda patriotica dos seus voluntarios cuja acção se estende, ainda, para os pontos mais afastados das sêdes dos concelhos e aldeias das Velhas e Novas Conquistas. Podemos desde já afirmar, sem receio de desmentido, que o *Sangh* dispõe duma força incontestavelmente de grande valor social e politico.

Com imenso jubilo registamos aqui esta boa nova.

O Gandhicap

Puzeramos ponto no incidente provocado pelo *Gandhicap*; mas o processo crime contra o nosso jornal pelo seu suple-

शिक्षणाविषयीं लोकमतः—कित्येक व्यवहारज्ञ विद्वानांचें ह्मणणें असें आहे कीं, सांप्रत त्यांकडून ज्या रीतीनें मुलांस मध्यम प्रतीचें शिक्षण दिलें जातें, तें 'कुचकामीं' निरुपयोगी व 'निवळ आळशी नोकर बनविणारें' असल्यावरून, मुळीं लिसेवांसच मूठमाती दिलेली बरी. त्यांच्या मतें गोव्यांतहि ब्रिटिश हिंदुस्थानांतल्याप्रमाणेंच शिक्षणदानाची बाब अगदीं स्वतंत्र प्रयत्नावर सोंपवून सरकारनें केवळ त्यावर देखरेख ठेवावी व शक्त्यनुसार व योग्यतेप्रमाणें त्याला आर्थिक मदत करावी. हें मत तिजोरीस बचत करणारें व शिक्षकवर्गाची इज्जत रक्षणारें असल्यावरून विचारार्ह आहे हें कोणीहि कबूल करील. दुसरें, शिक्षणाची बाब स्वतंत्र झाल्यास ज्या मुलांचे जे शिक्षक तेच त्यांचे परीक्षक होणें अर्थात अशक्य होऊन सध्या प्रमाणें अप्रतिबंध हैदोस घालणाऱ्या कित्येक नामधारी शिक्षकांच्या मर्कट छापाच्या वृत्तीस आपोआपच कायमचा आळा बसेल, हा फायदा कांहीं कमी महत्वाचा नाहीं.

लक्ष्यांत ठेवा!:—वरील विवेचनावरून, निवळ स्वार्थास बळी पडून 'लिसेव नासियोनाळाचा' हेतु फलद्रूप होण्याप्रीत्यर्थ प्रयत्न झाल्यास तादृश्य फायदा तर बिलकूल निष्पन्न होणार नाहीं हें सिद्ध आहे. मात्र त्यामुळें नवीन कर लादविण्याचें नवें कोलीत नोकरशाही शिपायांच्या हातांत आयतेंच सांपडून लोकशाहीच्या घरास असंतोषाचा वडवानळ लागल्याशिवाय रहाणार नाहीं हें लक्षांत ठेवलेलें बरें. अशा घोटाळ्याच्या प्रश्नीं लिसेव नासियोनालाची मागणी गुलदस्तांत ठेवणेंच इष्ट आहे, यांत संशय नाहीं.

क्षत्रिय मराठ्यांची चळवळ:—लिहिण्यास आनंद वाटतो कीं, या पराक्रमी ज्ञातींतील तरुण, सुशिक्षित व होतकरू श्री. बाबु शिवराम प्रभू देसाई, कोठंबी, प्रभृति ग्रहस्थांच्या अविश्रांत श्रमामुळें त्या समाजांत तेजस्वी जागृति व्हावयास लागली असून, लवकरच समाजशिक्षणोन्नतीसाठीं ठिकठिकाणीं मराठी शाळा उघडण्यांत येणार आहेत. सध्या दिसून येणाऱ्या उत्साहाचा जोर कमी न पडण्यासाठीं व्याख्यानें व प्रवचनें यांच्या द्वारा लोकजागृतीचें कार्य अव्याहत सुरू ठेवण्याचें क्षत्रिय समाजानें ठरविलें असून, एक नियतकालिकहि प्रसिद्ध करण्याचें सुरू केलें आहे. एकंदरींत परकी सत्तेच्या दडपशाहीमुळें लोप पावत असलेलें क्षात्रतेज उत्तरोत्तर चळवळीच्या आघातानें पुन्हां विशेष जोरानें उद्दीप्त होण्याचीं सुचिन्हें स्पष्ट दृग्गोचर व्हावयास लागलीं असून, गतकालिन वैभव हस्तगत करण्यास तो उदारधी समाज शकेल, असें भविष्य वर्तविण्यास बरीच जागा आहे. सर्व समाजांच्या न्याय्य व योग्य चळवळीप्रमाणेंच, क्षत्रिय मराठ्यांच्या चळवळीसहि सुयश इच्छितों.

— कांहीं कारणामुळें बंद असलेलें **'भारतोदय' मासिक** लवकरच पुन्हा सुरू होणार असून तिसरा अंक सप्टेंबर अखेर प्रसिद्ध होईल, असें संपादक कळवितात.

कोणी कोणास हंसूं नये

भारताच्या ता. १८ आगष्टच्या अंकांत प्रसिद्ध झालेला "माझा गोव्याचा प्रवास" हा लेख वाचून मला सखेदाश्चर्य वाटलें! आज काल मुंबईंतील रहिवाशांची आपल्या कुलदेवतावर किती श्रद्धा असते हें दिसून येतच आहे, तशांत कांहीं जर भाविक लोक असलेच तर त्या लेखकाच्या कच्या प्रसिद्ध झालेल्या अनुभवामुळें त्यांचा आपल्या कुल देवता दर्शनोत्साह भंग होण्याचा बराचसा संभव आहे. सदर्हू लेखकानें गोमांतकांतील व्यवस्थेसंबंधानें जर बारीक चौकशी केली असती तर बेबंदशाही व धागडधिंगा हीं विशेषणें त्यांनीं लागू केलींच नसतीं.

मुंबई शहर ह्मणजे सर्व सांसर्गिक रोगांचें माहेरघरच आहे, ह्मणून अशा सांसर्गिक रोगांचा गोमांतकांत फैलाव होऊं नये ह्मणून इकडून जाणाऱ्या प्रवाशांस तपासण्यासाठीं गोवासरकारनें सॅनिटरी इन्स्पेक्टर ठेवला आहे. यांत वावगें तें काय झालें?

अलिकडील डॉक्टर लोकानीं द्रव पदार्थात रोग जंतु असतात असा शोध लावला असल्यामुळें, सदर्हू काशीयात्रेकरूंस तो भागीरथीचा तांब्या समुद्रांत ओतण्यास लावला असेल, परंतु त्या यात्रेकरूनें जर त्या पवित्र पाण्याविषयी डॉक्टरची समजूत करून दिली असती, तर त्याच्यावर तो बाहेर ओतण्याचा प्रसंग खात्रीनें आला नसता; कारण गोमांतकांतील प्रत्येक हिंदु कुटुंबांत एक तरी भागीरथीची कुपी असतेच, ती त्यानी कशी नेली बरें?

बंदरांत उतरल्यावर उतारूंचीं नावें लिहून घेण्याचा उद्देश असा आहे कीं, मुंबईहून गेलेल्या उतारूंपैकीं तिकडे गेल्यावर जर एखादा सांसर्गिक रोगानें पछाडला गेला तर त्याचें उत्पत्तिस्थान कळून यावें, व दुसरें असें कीं ब्रिटिश इंडियामधील एखादा गुन्हेगार, इकडून गोव्यास फरारी झालेला असला, तर मागें पुढें चौकशीच्या वेळीं त्याचें नांव नोंदबुकांत सांपडावें, यांत गैर तें काय आहे?

जामीन घेतात, त्याचेंहि कारण असें कीं एखादा प्रवासी अशा गुन्हेगारांपैकीं, अगर रोगग्रस्तांपैकीं नाहीं, हें खात्री करण्यासाठीं असतें. एखाद्या प्रवाशाच्या ओळखीचा तिकडे कोणीच नसला, तर तिकडे गेल्यावर आपला मुक्काम कोठें असणार हें सांगितलें, कीं, त्या प्रवाशाबरोबर एक पोलजर दिला जातो, व त्या गांवीं गेल्यावर तिकडच्या रजिदोराची गांठ घालून देतात व मग त्या प्रवाशानें २।३ दिवस तिकडे हजिरी यावी लागते, यामुळें एखाद्याला विशेष गैरसोय होते असें वाटत नाहीं. अर्थात ज्याना अशी व्यवस्था करून घ्यावयाची नसते, ते लोक लक्ष्मीला पुढें करतात, व तिच्या प्रभावामुळें आपली सुटका करून घेतात. हा लक्ष्मीचा प्रभाव तिकडेच चालतो, व ब्रिटिश हद्दींत चालत नाहीं असें नाहीं. मी जेव्हां पहिल्यानेंच मुंबईस आलों, त्या वेळीं माझ्याबरोबर मी २ मानकुराद आंब्याचे करंडे घतले होते. आगची बोट मुंबईस पोंचतांच ते दोनहि करंडे व माझी ट्रंक छपऱ्यांत उतरविली. छपऱ्यांत येऊन २ तास झाले, तरी आमची दाद कस्टम ऑफिसरकडेच लागेना, व मला तर केव्हां एक वेळ बाहेर सुटतों असें झालें होतें. मीं सहज असा फिरून बाकी लोकांची तपासणी चालत होती ती पाहूं लागलों; माझ्या बरोबरच एक इसम आला होता. त्याच्या ट्रंकाची तपासणी सुरू झाली. त्याच्या ट्रंकांत, कांहीं पापड, सांडगे, कोकम व सिगारेटच्या तंबाकूचा एक पुडा होता, त्याचें कस्टम त्यानें एवढें आकारलें कीं तेवढ्या रकमेंत, त्या वस्तु मुंबईंत विकत मिळाल्या असत्या. तशाच वस्तु माझ्या इकडे होत्याच. तेव्हां आतां काय करावें या विचारांत मी होतों, एवढ्यांत माझे मित्र "विठ्ठलराव" हे मुंबईचे जुनें रहिवाशी मला दिसले, त्यानीं मला हळूच सांगितलें कीं, त्या साहेबाबरोबर जो पट्टेवाला फिरत आहे, त्याला पांच आणे दे. मी लगेच ती सूचना अमलांत आणली. परंतु तो शिपाई ह्मणाला, आणखीं एक रुपया द्या, ह्मणजे तुह्मी लवकर मोकळे व्हाल. त्याप्रमाणें मी करतांच त्यानें साहेबाला कानमंत्र सांगितला, व साहेबानें हातांतील खडु माझ्या सामानावर ओढला व लेके ज्याव, असें सांगितलें. या वरून लक्ष्मीचा प्रभाव इकडेहि लागू पडतोच. आपल्या डोळ्यांतील मुसळ दिसत नाहीं, परंतु दुसऱ्याचे डोळ्यांतील किसर दिसतें ह्मणतात तें यालाच!

बाफोराविषयीं तर सदर्हू लेखकानें अतिशयोक्तीच केलेली आहे. बाफोरावर ऊन लागतें, त्या बाजूस बहुतकरून पडदे लावतात. तिकडे मुंबईसारखीं सर्व साधनें नसल्यामुळें, दुरुस्ती वगैरे तावडतोब होत नसते हें खरें, परंतु लेखक लिहितात त्या प्रमाणें, कोरडा पडून, अगर जल समाधी मिळून मेलेला मनुष्य अजून ऐकिवांत नाहीं. बाफोरामध्यें नियमित उतारू घेत नाहींत हें दूषण गोमांतकांतील बाफोर वाल्यांसच लावावयास नको, कारण ज्यानें गोव्याहून मुंबईस येणाऱ्या ब्रिटिश अंमलदारांच्या देखरेखीखालीं बोटींतून प्रवास केला असेल, त्याला त्याची बरोबर कल्पना होईल. पणजी बंदर सुटून वेंगुर्लेबंदर येई पर्यंत सर्व व्यवस्था ठीक असते, परंतु वेंगुर्ले बंदर सुटल्यावर पुढच्या बंदरांत एवढे पॅसेंजर बोटींत घेतात, कीं [illegible] सर्व लोकांस फर्स्टक्लासमध्यें सुद्धां आणून कोंबतात. व तिकडे जी कांहीं मग अव्यवस्था होते ती कल्पना मनांत आणली तर सुद्धां ओंकारी येते. इकडेहि वस्तुस्थिति जर अशी आहे तर "कोणी कोणास हंसूं नये" व अशा उथळ पाखाळ्या वर गोमांतकांत प्रवास करूं इच्छिणाऱ्या कोणीहि नवीन मनुष्यानें विश्वास ठेवूं नये अशी बंधु भागिनींस माझी नम्र सूचना आहे.

बाळकृष्ण नुज
गोमांतकस्थ मुम्बापुरवासी

हिंदुद्वेष्टे शिक्षक

[ले० रामचंद्र सोनबा कामत, हापसें]

पणजी येथील लिसेवांतील कांहीं विद्यार्थी गांधी टोपी घालून वर्गांत आल्यामुळें, त्या टोपीचा तो शुभ्र वर्ण, हिंदवासीयांच्या हृदयामध्यें राष्ट्रीय भावना उद्दीपन करणारी ती शुभ्र ज्योत, परकीयांचे अंध अनुकरण करण्यास लावलेल्या [illegible]तीस आला घालून आमच्या रोमरोमांत आत्मविश्वास उत्पन्न करणारें त्या शुभ्र टोपीचें प्रखर तेज या लिसेवांतील कित्येक अर्धमन्य प्रोफेसरांस असह्य झाल्यामुळें हिंदु विद्यार्थ्यांस उद्देशून एकंदर हिंदुसमाजाविरुद्ध कुत्सित अद्वातद्वा व निर्गल असे प्रलाप काढण्यांस त्यानीं सुरवात केलेली आहे. हे उद्गार इतके कोते व पोरकट आहेत कीं, ते त्यांच्या क्षुद्र बुद्धीचें व मूर्खपणाचें एक प्रकारचे आविष्करणच आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. व या दृष्टीनें पाहिलें असतां त्याची विशेष चर्चा करणें ह्मणजे त्यास एकप्रकारचें महत्व दिल्यासारखें होतें हेंही पण आह्मीं जाणून आहों. परंतु आमच्या तरुण पिढीस सुशिक्षण देण्याचें जबाबदारीचें व जोखमीचें कार्य ज्या अर्थी त्यांवर सोंपविण्यांत आलेलें आहे त्या अर्थी ही अत्यंत पवित्र कामगिरी करण्यास ते किती नालायक आहेत हें सर्व लोकांच्या व विशेषेंकरून त्यांची नेमणूक करणाऱ्या नोकरशाहीच्या निदर्शनास आणणें हें आह्मी आमचें पहिलें कर्तव्य कर्म समजतों.

वास्तविक पाहिलें असतां गेल्या थोड्या वर्षांपासून होत असलेला व कोणाच्याही दृष्टीस ठळकपणें दिसून येणारा या गोमांतकांतील हिंदु लोकांचा उत्कर्ष या स्वयंमन्यांस सहन न झाल्यामुळेंच त्यांच्या मुखांतून वेळीं अवेळीं अशा प्रकारचे उद्गार बाहेर पडत असतात. गांधी टोपीला निमित्त मात्र करून ते आपल्या हृदयांत पुष्कळ दिवस पर्यंत सांठवून ठेवलेलें वीष बाहेर ओकीत आहेत. यानां असें वाटतें कीं आह्मीं यूरोपियन भाषा बोलतों यूरोपियन पोषाख करतों, युरोपियन रीतिरिवाज आचरितों, आमचा व त्यांचा एक धर्म फरक काय तो केवळ रक्ताचा. हिंदुस्थानांत जन्म दिल्याबद्दल ते आपल्या आकाशांतील बापाला किती तरी दोष देत असतील, व त्यांच्या अंगांत खेळणारें तें काळें रक्त त्यांस इतकें तुच्छ व तिरस्करणीय वाटतें कीं तें कसें तरी पिळून काढतां आलें असतें तर तें त्यानीं केव्हांच काढून टाकलें असतें. फक्त रक्ताची बाब खेरीज करून बाकी एकंदर बाबतीत युरोपियन लोकांच्या आपण इतके जवळ असतानां इ. स. १८२२ च्या कायद्याप्रमाणें हिंदु व ख्रिश्चन यांचा समान दर्जा लेखिला जावा याबद्दल त्यांच्या पोटांत कळ उत्पन्न झाली असल्यास मोठेंसें नवल नाहीं. व त्या कळीच्या तिडकीसरसे ते सरकारास आर्तस्वरानें अशी याचना करीत आहेत कीं त्या वेळीं एक चूक झाली ती झाली. आतां तरी एक स्पेशल कायदा करून या रानटी हिंदु लोकांना गोव्याच्या हद्दींतून एकदम बाहेर हांकलून द्या!

सि. आराऊज मास्करेंजस या नावांचे मडगांवाहून पणजीच्या लिसेवांत बदलून आलेल्या एका तरुण प्रोफेसरांनीं तर एक फारच अजब शोध लाविलेला आहे. ते ह्मणतात कीं हिंदु लोकाना पोर्तुगीज भाषेचे उच्चार चांगल्या रीतीनें करतां येत नाहींत. याचें कारण ते डुकराचें मांस खात नाहींत. डुकराच्या मांसांत असा कांहीं विलक्षण गुण आहे कीं, तें खाल्यावरोबर गळ्यांतील शिरांवर परिणाम होऊन तें खाणारांस पोर्तुगीज भाषा उत्तम रीतीनें बोलतां येते. त्याप्रमाणें हिंदूंच्या मस्तकावर जोंपर्यंत शेंडी आहे तों पर्यंत त्यांस पोर्तुगीज भाषा चांगल्या रीतीनें कधींही बोलतां यावयाची नाहीं. या प्रोफेसर साहेबांस आमची अशी शिफारस आहे कीं, त्यांनीं हा आपला अपूर्व शोध अमेरिकेंतील शास्त्रज्ञांच्या परिषदेपुढें ठेवावा. ह्मणजे त्यांच्या अलौकिक कल्पकतेबद्दल व असामान्य बुद्धिमत्तेबद्दल त्यांस एक जाडें सर्टिफिकेट मिळाल्यावांचून कधींही रहाणार नाहीं तोंपर्यंत त्यानीं या आपल्या अजब शोधाचें सर्व यूरोपियन देशांतून पेटन्ट मिळवावें ह्मणजे या शोधाच्या नाकिर्दीबद्दल त्यांस धास्ती बाळगण्याचें कारण नाहीं. मला वाटतें आमच्या स्त्रीनीं नरदेह पावनी नाही प्रगेह कंठ नतीरपि' असें जें ह्मटलें आहे तें याच करतां!

[पुढें चालू]

ANO VI — NUMERO 26 — 1921

QUEPEM QUINTA-FEIRA 22 DE SETEMBRO

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai

Assinatura
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............. 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें.] केपें, गुरुवार, तारीख २२ माहे सप्टेंबर सन १९२१ [अंक २६ वा.

UM DEVER

O Governo da Metropole concedeu-nos, num rasgo proprio da galhardia lusitana, a autonomia financeira. E o Povo da India tiraria dela proveito em beneficio do seu desenvolvimento economico, se os que lha outorgaram, o deixassem em paz sem procurar incomoda-lo, como ao presente sucede, experiencia da execução do referido diploma politico.

E' verdade. Os do Terreiro do Paço vão centralisando nas suas mãos a administração colonial; e, o que é pior, vão aumentando vencimentos dos funcionarios e encargos das colonias, sem a sua audição.

E' êste o incoveniente que neutralisa, flagrantemente, toda a importancia autonoma da nossa autonomia, tornando-a antes uma *dadivà* de nenhum efeito ou, mais claramente, de resultados contraproducentes.

Ou temos autonomia ou não a temos. Se a temos, não atinamos, francamente, com a intervenção *ilegal* a *anormal* dos de cima na marcha legal e normal execução do diploma de que se trata.

Mas vejamos o que diz o § 2° do art. 3° da Lei n° 1005, de 7 de agosto de 1920:

O exercicio da competencia atribuido ao poder executivo será sempre precedido de informação do conselho legialativo da Colonia ou Colonias para as quais se pretender legislar, devendo o poder executivo submeter ao Congresso da Republica os actos que praticar contra essa informação.

¿ Tem á vista alguma justificação legal a interferencia metropolitana nas nossas atribuições autonomicas ?

Mas é possivel que os defensores de tal interferencia, se os há, apontem nos o art 3° da Lei n° 1022 de 20 de agosto de 1920 e a secção 1 a. base 5 a. do decreto no. 7008 que, dirão, légitimam a mesma interferencia do Governo Central.

Sucede, porem, que esta ultima legislação não é constitucional e, porisso, tem de subordinar-se fatalmente, a que, como a citada lei no. 1005, o é; não há meio termo.

A pronta revogação das disposições não constitucionais já referidas e o imediato cumprimento das constitucionais, tambem já mencionadas impõe-se, pois para desaparecer a contradição que existe entre elas E assim nenhuns vencimentos ou despesas devem ser autorisadas pelo Governo da Metropole sem ouvir o Conselho Legilativo da India, salvo quando a Metropole as queira pagar á sua custa, o que tambem parece-nos que está dito numa das bases da administração financeira codificadas pelo citado decreto no: 7008 que é de 9 de outubro de 1920, se a memoria não nos engana.

Cabe a todo o cidadão indo-portuguez o dever de traballiar para conseguir êste desiderato para o brilho e seriedade *da Autonomia*.

Educação e Instrucção

Nesta terra onde infelizmente não abundam cegos. como creio, toda a gente vê que é a instrução que se tem aparentemente e com aplauso do publico adiantado a pssos gigantescos na senda do progreso, prometendo de futuro preparar bons cidadãos que, se Deus permitir auxiliarão a Patria a bem morrer.

E' da instrução que depende o futuro duma nacionalidade Instruir e educar os cidadãos de amanhã é o tema que mais deve interessar e preocupar aos cidadãos de hoje, porque não ignoram que o actual nivel moral e intelectual dêste país anda a mil maravilhas.

E' o comicio de Margão que me obriga a pegar na pena, em plena velhice, quando tinha o direito de andar alheio a todos os factos.

No meu tempo, há mais dum meio século, a mocidade estudiosa sabia e estudava muito mais e os homens de então eram superiores aos homens de hoje.

¿E' a raça que se degenerou? Não senhores. O Motivo é outro. Depois de lerem êste modesto artigo o saberão. Ouçam-me.

E' somente a instrução que fornecerá aos cidadãos de amanhã as armas para grande combateda vida, que dia a dia se vai tornado mais complicado e mais terrivel Porisso os cidadãos de hoje devem educar bem os cidadãos de amanhã, de milhor maneira, não poupando para isto o que for preciso e estiver ao seu alcance.

Não basta para isto que os cidadãos de amanhã tenham cursos, é preciso que eles saibam, que eles sejam educados e instruidos aliás teremos burroides cartados e malcriados.

Há muita gente que julga que, com a criação de novos liceus, se elevará automaticamente o nivel moral e intectual da geração nova, o que è um grande desparate, desde o momento que toda a gente viu, quando de elevação do Liceu Nacional de Pangim a Central; vieram da Metrópole professores incompetentes, alguns deles sem o 7° ano dos liceus; como por exêmplo o professor de sciências naturais, que tem além do 5° ano do liceu apenas o curso complementar de letras; e um professor nomeado para a disciplina de Inglés sem o 1° ano do curso do liceu, tendo apenas um reles curso *matriculation* em Bombaim; etc. etc etc.

No comicinsinho reunido em Margão, em que tomaram parte poucos cavalheiros da vila e numerosas crianças, houve um cavalheiro que pedira a urgente elevação do Liceu de Margão a Nacional so porque tinha um filho [como ele proprio disse no dito comicio] estudante do liceu, a quem tinha de sustentar no colégio, gastando da sua magra algibeira 30 rupias, dinheiro este que, se houvesse um Liceu Nacional em Margão ficaria no seu cofresinho para dotar as filhas.

Esta gente parece que é positivamente inconsciente e inocente ao ponto de eles proprios quererem ser comidos por certos afilhados ignorantes e incompetentes dum certo indio que levanta bem alto o nome da sua terra na Metropole.

Ainda há um mez nos foi enviado um carvão animal de Portugal como professor de histórias, prova evidente de que o tal simbolo indiano como lhe chamou, num discurso um Fernandes da graxa, ama muito a sua terra natal e tem os seus patricios em muita consideração, não tarda que venham ainda mais curiosos exemplares, quando for elevado a Nacional o actual disgraçado Liceu Municipal de Margão, porquê as primeiras nomeações não precisam de concurso.

Se amanhã por uma suposta felicidade, alias disgraçadamente para este país o liceu de Margão for elevado a Nacional, haverá musica, foguetes, mil festejos e ao cair da tarde iluminar-se-há a vila e depois algum patriota de fraque fará um brilhante discurso, todo o vocabulario em entusiasmo, enaltecendo com calor as mil e uma provas de patriotismo do grande *simbolo indiano* e no dia seguinte irão ditar as aulas alguns ignorantes de mão baixa.

A India Portuguesa com mais milhão de habitantes e 90 por cento de analfabetos tem uma Escola Medica, um Liceu Central, dois Liceus Municipais, uma Escola Normal, centos de Escolas Primarias e diversas Escolas Inglesas e Maratas.

Entre os numerosos analfabetos contam-se doze medicos; oito professores dos Liceus; vinte e quatro advogados e assim por diante.

Custa crer que nesta terra haja cegos que não vejam o que se passa nos nossos Liceus ao ponto de quererem mais um dêstes colleirn, em Margão.

Em vez de tres agregados ao Liceu de Nova Goa foram para o Liceu da Margão como professores do 1°, 3° e 4° grupo respectivamente, um poetico politiqueiro, um empregado da Fazenda e um filho dum conselheiro, sendo o último de 18 anos de idade mais competente do que os outros que não tem nada além do 5° ano do Liceu, tendo o primeiro saido reprovado de ultima vez em Português e passado somente no ano passado depois dum miseravel exame com 10 valores.

Moralmente falando sei o que eles são, mas quem visitar o liceu de Margão, se tiver uma alma curiosa, pegando empregado pela orelha o fará correr aos ponta pés, para que o asno saiba que o mel não foi feito para a sua boca; ao politiqueiro dará algum casaco velho e decente para que substitua por êste o de alpaca, seu companheiro fiel desde os bancos de Seminario e lhe ensinará alguma coisa de cozinha, que talvez tenha mais gêsto para aquilo do que para poeta e professor; e finalmente pegará do filho de conselheiro um babasinho magri

भा र त

गुरुवार भाद्रपद व० ५ मी १८४३

आमचें स्वराज्य !

'आर्थिक स्वराज्य' या जिभेत पाणी उत्पन्न करणाऱ्या नावाखालीं साम्राज्य सरकारनें आह्मांस अर्पण केलेला भाकरीचा तुकडा किती निरस आहे, याचें विवेचन आह्मीं अनेकदां करीत आलों आहोंच; परंतु या महत्वाच्या बाबतींत जनतेनें जितकें लक्ष घालावयास पाहिजे तितकें न घातल्यामुळें प्रस्तुत विषयावर आज पुन्हा दोन शब्द लिहावयाचें योजिलें आहे.

ज्या कायद्यान्वयें पोर्तुगालसरकारनें आह्मांस आर्थिक स्वराज्याचा अहेर केला आहे, त्यांत स्पष्ट रीतीनें ह्मटलें आहे कीं, येथील सरकारकडून विचारी लोकमत व सांपत्तिक ऐपत या उभय गोष्टींत अनुसरून जें आर्थिक धोरण निश्चित केलें जाईल, त्यांत कसल्यांहि सबबीनें चंचूप्रवेश करण्याचा वसाहतीच्या प्रधानास हक्क नाहीं. अर्थात् प्रांतावर नवीन कर लादणें अगर जुनें कमी करणें, आवश्यकतेप्रमाणें नवीन उपयुक्त खाती निर्माण करणें अगर अनावश्यक व भपकेबाज 'ऑफिसांस' मूठमाती देणें इत्यादि वसाहतीच्या फायदेशीर व फायदेशीर कारभारांत वरिष्ट सरकारास निष्कारण व 'अव्यापारेषु' ढवळाढवळीनें खळबळ उडवून देण्याचा कसलाच अधिकार पोंचत नाहीं, हें उघड आहे.

परंतु फार दुःखाची गोष्ट ही कीं, विचारी लोकमत व सांपत्तिक ऐपत या दोन्हीबाजूकडे पूर्ण दुर्लक्ष करून, पोर्तुगालनें आमचें 'आर्थिक' स्वराज्य अगदीं 'निरर्थक' बनविण्याचा मारे हदेलपष्पी व 'मुसळ प्रवेशी' सपाटा चालविला आहे. आह्मी व्यक्तिशः कितीहि कंठशोष केला, कितीहि रागावल्याची जाणीव करून दिली, कितीहि तीव्र शब्दांनीं नापसंती दर्शविली, तरी सुद्धां श्वेतवर्णीय युरोपीय वड्या नोकरशाहीच्या अनेकविध कृष्ण कृत्यांनीं आमची 'सनद' विधवेच्या शुभ्र कपाळा प्रमाणें 'पांढरी फटफटीत' करण्याचा सैतानी मनोवृत्तीस काडी इतकाहि आळा पडलेला नजरेस येत नाहीं !

अशी अनुकंपनीय स्थिति या पुढें सतत चाललेली अवलोकणें, ह्मणजे मळमळित सौभाग्यांतच आनंदोर्मीच्या क्षीरसागरांतील दुर्मिळ सुख अनुभवनीय असल्याचा प्रत्यक्ष कबुली जबाब देणें होय. त्या पेक्षां उपरिनिर्दिष्ट दिखाऊ आवतोनोमीच्या सौभाग्यतिलकविरहित ढळढळीत वैधव्यदुःख सहन करणें बरें नव्हे, असें सहसा कोणीहि ह्मणणार नाहीं !

ही गोष्ट झाली रुसव्याची प्ररंतु राजकीय 'प्रेमकलहांत' रुसव्यानें कुठें निष्पन्न झालें आहे ? कांहींच नाहीं आणि आह्मांस तर स्वराज्याचा मान राखण्यासाठीं आमची मान कापणाऱ्या बेजबाबदार व उद्दट मनोवृत्तीचा बिमोड करावयाचा आहे आमच्या मानेवरचें वरिष्ट सरकारच्या असह्य ढवळाढवळीचें जड जूं जमीनदोस्त करणें आहे.

कसाहि प्रकारानें उक्त हेतु पार पडणें अर्थात् जरूर आहे. आमच्या मतें हा हेतु

तडीस नेण्याची जोखीम 'प्रागतिक संघानें, आपल्या शिरावर घेतल्यास, त्याला यश मिळाल्याखेरीज खास रहाणार नाहीं, अशी आंमची मनोदेवता आह्मास सांगत आहे. ठिकठिकाणचें लोकमत अजमावून, प्रागतिक संघानें काळजीपूर्वक सदरील हेतु सिध्यर्थ वरिष्ठ सरकारापाशीं नोटिशीवजा विनंति करण्याचा संघटीत प्रयत्न केल्यास, त्यांत त्याला यश मिळण्यासारखी आजची स्थिति आहे, असें, संघाच्या प्रस्तुतच्या लौकिकामुळें, तसेंच त्याच्या शुक्लेंदुवत् वृद्धि पावणाऱ्या स्फूर्तिदायक लोकप्रियतेमुळें, आह्मांस वाटत आहे. दुसरें 'यत्नेन सर्वे वशः' हें तर ठरलेलेंच आहे.

लिसेव सैंत्राळच्या हिंदु विद्यार्थ्यांस विनंति

विद्यार्थी बंधूनो, गेल्या महिन्यांत तुह्मांपैकीं कांहींजण महात्मा गांधीनें पसंत केलेली व इंग्रजी हिंदुस्थानांत जिचा सपाट्यानें प्रसार होत आहे ती साधी व पांच सहा आण्यास मिळणारी खादीची पांढरी टोपी वापरून लिसेवांत गेल्याबद्दल, तेथील प्रोफेसर पा. आल्मेद यानीं जो त्यांचा, त्यानीं वापरलेल्या टोपींचा व तुमच्या धर्मबंधूचा, अनेक असभ्य व निंदात्मक शब्दांनीं अपमान केला व त्यास तुह्मीं सर्वांनीं जें कृतीचें उत्तर दिलें तें आज सर्वतोमुखी झालें आहेच. त्या प्रकरणांत तुह्मीं दाखविलेला स्वाभिमान, तुमच्यांत दिसून आलेली एकी व नुकसान सोसण्याची तयारी हीं पाहून, सर्व हिंदु तुमची पाठ थोपटून तुमचें कौतुक करीत आहेत व खिस्ती बंधु देखील आश्चर्यानें दिग्मूढ बनले आहेत. हें जरी सर्व खरें असलें तरी कांहीं प्रतिष्ठित व दुबळ्या पण प्रेमळ मनांच्या ज्ञातिगृहस्थांकडून तुह्मांवर उतावळेपणाचा हट्टवादीपणाचा व आत्मघातकीपणाचा जो आरोप बळेंच चिकटविण्यात येत आहे तो पुसून काढण्यासारखें वर्तन तुह्मांकडून अद्याप झालेलें दिसत नाहीं व ऐकीवांतही येत नाहीं. यावरून खालील सवालात्मक चार शब्द लिहून या पत्राची उपयुक्त जागा अडवीत आहें.

सवाल १ लाः आजच्या महागाईच्या काळांत स्वतः काटकसर करून दुसऱ्यांसही उदाहरण घालून द्यावें या म. गांधीच्या तत्वाबरहुकूम तुह्मीं वागत आहां हें जर खरें असेल, तर ती काटकसर फक्त एका खादीच्या टोपीनें साध्य होणारी नसून तुमच्या आंगावरील उंची उंची धोतरजोडे अथवा पाटलुणी, आंगरखे, सदरे, कोलर, पट्टे, पायांतील मोल्यवान बूट वगैरेंच्या त्यागानेंच साध्य होण्यासारखी आहे. तर त्या संबंधीनीं तुम्हीं काय तजवीज केली आहे ?

सवाल २ राः--गांधी टोपी स्वच्छ, साधी व हलकी ह्मणून तुम्हीं पसंत केली असेल तर तुमच्या डोईवरील केंसाच्या भारानें, गळ्यांतील पट्यानें आंगांत असलेल्या भारी जाड लोंकरींच्या अगर दुसऱ्या कापडाच्या आंगरख्यानें व कुडत्यानीं व पाय आंवळून धरणाऱ्या त्या पायमोजे बुटांनीं ती स्वच्छता, साधेपणा व हलकेपणा तुह्मांस साध्य होणार असें वाटत आहे काय ? नसल्यास त्याबद्दल तुम्हीं काय विचार केला आहे ?

सवाल ३ राः--गांधी टोपी स्वदेशी आहे ह्मणून स्वदेशीच्या अभिमानानें तुम्हीं वापरीत असाल, तर फक्त सहा आण्याची स्वदेशी टोपी वापरून इतर अनेक साखर चहा, कपडे, बटन, बुट, कोलर, पट्टे, बिस्कीटें वगैरे परदेशी वस्तू गरज नसतांही वापरल्यानें तुमच्या स्वदेशीच्या अभिमानाची किंमत काय आहे व याचा विचार तुम्हीं काय केला आहे ?

हे तीन सवाल तुह्मांपुढें मांडण्यांत येत आहेत. यांत लेखकाच्या मनांत, तुमचा अवसानभंग करणें, तुमच्या दृढनिश्चयापासून तुह्मांस खालीं ओढणें अथवा नसतेच दोष तुमच्या पदरांत बांधणें वगैरेंसारखा हेतु नसून फक्त तुह्मीं सत्याविषयींची आवड राखून आरंभिलेली तात्विक चळवळ निर्दोषी, अर्थपूर्ण व फायदेशीर होऊन, महागाईनें त्रस्त झालेल्या तुमच्या पालकांस, वेळेवर तुमच्या खर्चाची रसद पोंचवितां पोंचवितां जे कष्ट पडतात ते या चळवळीनें कांहीं अंशीं कमी झाले —होतील अशी लेखकाची खात्री आहे— तर व्हावे , इतकांच आहे. तुम्हींही पण यूरोपियन पोषाखानें नखशिखांत नटत असलेल्या कांहीं नामदार डाक्टर, प्रोफेसर्स व इतर स्वधर्मीय गृहस्थाचें उदाहरण न घेतां वरील सवालांस कृतीनेंच उत्तर देऊन काटकसर व हिंदी संस्कृती याचें पोषण करण्यास झटाल अशी आशा आहे.

या शिवाय जातां जातां आणखी एक सवाल तुह्मांपुढें करण्याची परवानगी घेतों. गेल्या ११ आगष्टच्या भारतावर प्री. आरावृझ साहेबांनीं तुह्मांस उद्देशून काढलेले कांहीं अनुदारपणाचे उद्गार प्रसिद्ध झाले आहेत ते तुह्मांस माहीत असलेंच पाहिजेत. त्यांत हिंदु लोक शेंडी काढल्याशिवाय पोर्तुगीज भाषा भिज्ञ होण्यास लायक होणार नाहींत असा तुह्मांस टपका दिला आहे. या अद्भुत शोधांत सत्याचा अंश कितपत असेल हा जरी प्रश्न बाजूस ठेविला तरी पण तुह्मांपैकीं कांहीं जणानीं त्यापूर्वीच शेंडीस फाटा दिलेला असल्यामुळें त्या अर्ध्या हळकुंडाचें "गोऱ्या" झालेल्या साहेबांस तुमच्यानीं सहज तोंड घशीं पाडतां आलें असतें. आणि बाप दाखव नाहीं तर श्राद्ध बाढ या न्यायानें त्यांसही शेंडी नसलेल्या हिंदूंच्या कपाळावर पोर्तगीज भाषाभिज्ञतेचा छाप भारणें अगर आपले शब्द परत घेणें यापैकीं कोणत्याही एका गोष्टीचा अवलंब करणें भाग झालें असतें. असो. तो प्रसंग टळून गेला. आतां यापुढें प्रो. साहेबांस उत्तर देणें तें कृतीनेंच दिलें पाहिजे. व तें तुह्मांपैकीं कांहींजण शेंडीस फांटा देऊन डोंईवर केसांचें रान माजवून छिचोर बायकांप्रमाणें उलटे सुलटे भांग काढून रंगेल व नाटकी बनले आहेत व कांहीं हळुहळु त्या वांधीस पळी पडण्याच्या मार्गास लागले आहेत त्यांस ताळ्यावर आणणें व त्यांस डोईवर शेंडीची स्थापना करण्यास भाग पाडणें हेंच होय. आजपर्यंत शेंडीच्या त्यागानें व डोईवर केस वाढविण्यानें सभ्यतेस आंचवण्याशिवाय आणि सुश व जुन्या पद्धतीच्या लोकांचीं खुद्द तुमच्या पूज्य आईबापांचीं, मनें दुखविण्याशिवाय तुह्मीं कोणता फायदा करून घेतला आहे? थंडीची बाधा होऊं नये ह्मणून निसर्गदेवतेनें केंसांची जोड दिली आहे. तिचा उपयोग थंड प्रदेशांतील [युरोप वगैरे] लोक ज्या रीतीनें करून घेतात तीच रीति तुह्मां आह्मां उष्ण प्रदेशांतील हिंदी लोकांस फायदेशीर होणारी आहे अशी तुमची कल्पना आहे काय ? असल्यास ती भ्रामक होय ज्या लोकांस निसर्गाचा फायदा घेतां येतो त्यांसच सुधारलेले "civilisado" लोक असें ह्मणणें अथवा ह्मणवून घेणें शोभेल. पाश्चातलेले 'अदूरदर्शी हिंदु लोक युरोपियन सुधारणेचा कितीहि टेंभा फिरवीत असले तरी त्यांची "मूढःपर प्रत्ययनेयबुद्धीः" या न्यायानें मूर्खांच्या कोटींतच गणना करून आमच्या पूज्य पूर्वज्यांनीं आमच्या परिस्थितीस साजेल अशा तऱ्हेनें घालून दिलेल्या साध्या व सोप्या चालीरितींत व आचारांत प्रसंगीं किंचित् फेरफार करणें झाल्यास ते "संतः परिक्षान्यतरद्भजंते" यावर दृष्टि ठेवूनच केले पाहिजेत, या दृष्टीनें विचार करण्याचे प्रयत्न आजपर्यंत झाले नाहींत. ते करण्याची सुबुद्धि परमेश्वर तुह्मांस प्राप्त करून देवो अशी विनंति करून तुमची रजा घेतों.

अनंतचतुर्दशी शके १८४३ पारोडें.	तुमचा नम्र सेवक जनार्दन वि. कामत

वर्तमानसार

— गेल्या शुक्रवारीं आमच्या संपादकांचें अनंतचतुर्दशीनिमित्त रिवण येथें प्रवचन झालें.

—फळंगूट येथील श्री. विठ्ठल शेट रायकर यांच्या प्रयत्नानें तेथील दैवज्ञ ब्राह्मण व इतर हिंदुसमाजांतील लोकांची एकी दृढ झाली. आनंदाची गोष्ट.

— गेल्या शनिवारी दो. वैकुंठ सांवळो शिरवैकर यांच्या वाड्यांत आमच्या संपादकांचें श्री सत्यनारायणासमोर दुसरें प्रवचन झालें.

प्रागतिक संघ वार्ता.

संघाचे फोंडें येथील स्वयंसेवकांनीं दुर्भाट तळावली व आडपई येथें जाऊन सभासद मिळवायाचें काम केलें. त्याचप्रमाणें कार्यकारी कमेटीचे सभासद शा. घ. डांगी व मा. रु. प्र. देसाई यांच्याकडून बोरी, वाडी सांकवाळ वगैरे ठिणाणीं सभासद मिळवायाचें काम चालू आहे.

गेल्याच्या मागील व गेल्या आठवड्यांत हेगडे देसाई यानीं रिवण येथें तेथील पुढाऱ्यांच्या मदतीनें बरेच सभासद मिळविले.

मुंबईस गेलेले स्वयंसेवक रघुनाथ अ. भांडारी व वि. का. प्रियोळकर हे गेल्याच्या मागील आठवड्यांत परत आले.

तिकडे मुंबापुरस्थ गोमांतकीयांच्या मुंबईस भरलेल्या सभेंत संघाच्या मध्यवर्ति मंडळाचे सभासद रा. यशवंत सू. सू. सरदेसाई यांनीं आपल्या रसाळ वाणीनें संघाविषयीं माहिती सांगितली. मुंबईत जवळ जवळ ७५ सभासद झाले आहेत.

सांगें व केपें कोसेइयांत संघाचें काम, मध्यवर्ति मंडळाचे सभासद रा. बाबू शिवराम प्रभु देसाई, दो. सुब्राव विठ्ठल देसाई वगैरेंनीं नेटानें चालवलें आहे.

ANNO VI—NUMERO 27—1921 QUEPEM QUINTA-FEIRA 29 DE SETEMBRO

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai
Assinatura
India Portuguesa...... 3-00-00
India Inglesa............ 3-08-00
Numero Avulso.......... 0-01-00
Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया............ ३-०८-००
किरकोळ अंकास........... ०-०१-००
जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें.] केपें, गुरुवार, तारीख २९ माहे सप्टेंबर सन १९२१ [अंक २७ वा.

DE RELANCE...

O serviço da nossa navegação fluvial que antes ia mal desde o Agosto findo vai pior não havendo quem ponha cobro ao verdadeiro *charivari* que o está desacreditando.

Não há horas certas das saidas de lanchas como as não há de suas chegadas, não sendo raro faltarem carreiras anunciadas.

Afirmar, portanto, que o referido serviço anda, lamentavelmente, á matroca é o mesmo que dizer que a côr d'ouro puro é vermelha, que o numero dois, multiplicado por dois dá quatro e que é, finalmente, *avançar* uma afirmação absolutamente verdadeira, incontestavel, sob todos os pontos de vista.

¿Que é que tem feito o governo para expurgar a navegação do mal, já transformado em cronico, que a enferma, deslustrando o brilho do nome portuguez perante os estrangeiros que visitam o nosso Paiz? Nada que nos conste.

Incomoda-nos imenso o termos que vêr muito mal servido o nosso Povo, este Povo que paga e não bufa, nas lanchas contra as quais são sem conta nem medida as censuras, de resto, justificadas que de todos os lados chovem.

Mas se o governo se vê na impossibilidade de arcar com a responsabilidade, inerente ao importante serviço da navegação fluvial, ¿ porque é que não há de confia-lo á iniciativa particular com condições e clausulas que lhe garantam o maximo proveito?

Um proprietario quando não possa administrar por si, devidamente, a sua propriedade, dá esta de arrendamento a quem, alem de a conservar bem, lhe pague a merecida pensão.

No estado a que está reduzida, actualmente, a nossa navegação, seria de boa prudencia imitar o governo o exemplo do referido proprietario.

¿Quere o governo manter sob sua responsabilidade a navegação de que se trata?

Administre-a, então, como deve, dando pronto remedio á enfermidade que está, á porfia, molestando as conveniencias publicas.

Do contrario, siga o exemplo acima indicado, para o bem seu e do publico que empreende viagens pelas lanchas do Estado.

Não há meio termo.

E, depois, quando o governo confie a outrem êste serviço, não terá que aturar com greves inoportunas, *flexibilidade* imprevista do horario, accidentes inesperados e desesperados, lenha molhada, humida e viva, naulos exagerados e finalmente com tantas coisas e loisas, capazes de fazerem perder paciencia ás pedras da calçada da linda "Avenida da Republica."

ECOS & CRITICA

O nosso processo

Vai correndo os seus tramites legais, está visto.

Consta-nos, porem, que da banda dos nossos advérsarios se está tentando evolver, com maroteira *estudada*, no ról de reus mais os nomes dos *seis* estudantes hindus que opuseram o formal desmentido á *filosofica* declaração dos seus colegas cristãos, tendente a neutralisar a *essencia* e a *forma* das expressões insultosas, saidas da reverenda boca do sr. reitor interino; e isto com o manifesto intento de obstar a que os referidos estudantes hindus vão fazer-nos a defesa na audiencia do julgamento, quando, por ventura, o solicitar-mos para o esclarecimento da verdade, porquanto é sabido que uma mesma pessoa não pode, como sucede com quaisquer funcções públicas, acumular o duplo papél de réu e testimunha da defesa

Como, porem, é um *consta* em que se alicerça o edificio de nossas informações, abstemo-nos de as comentar já, aguardando para isso ocasião oportuna.

Dr. João de Figueiredo

E' o nosso defensor êste distincto advogado a quem o *Bharat* deve serviços de incalculavel valor.

Em todas as questões crimes em que foi envolvido o nosso modesto jornal, é a bem ponderada intervenção do sr. dr. Figueiredo que o tem libertado, com grande satisfação para nós e gloria para êle.

Esperamos que tambem desta vez os seus desinteressados esforços serão coroados de bom exito, levantando bem alto o nome já ilustro do afamado causidico que á qualidade de profissional distincto, reune a de ser um patriota ás direitas, de sentimentos verdadeiramente liberais.

Sim, esperamo-lo.

Concurso e prazo

Como sabem, foi aberto e até encerrado o concurso para o preenchimento de vagas de professores do Liceu Municipal de Margão.

Até encerrado- dissemos nós, mas não é bem isso. *Estava encerrado*- é o que deviamos escrever, pois ainda depois de *encerrado*, pretende-se *prorogar o praso* para poder entrar no mesmo concurso aquele a quem faltam cadeiras anexas e que conta completa-las na proxima epoca que há de ser o terminus da caprichosa e absurda prorogação!...

Parece incrivel mas é verdade! E uma verdade que pressupõe e denuncia um favoritismo, identico ao dos historicos tempos do *quero, posso e mando*.

Não pode ser.

¿Mas o sr. dr. Jaime de Morais sancionará essa pouca vergonha?

Desgrça completa

Dizem que foi elevado a Nacional o Liceu Margão, tendo sido nomeado seu reitor o sr. Sales de Aandrade e seus professores alguns afilhados do *Simbolo Indiano* que vai brutalmente desgraçando o Paiz

Trataremos do assunto na semana seguinte.

Os nossos autos

A carreira de automoveis ou caminhões de Panguim para Mormugão e vice-versa é uma beleza ... de hortaliça, quanto á conveniencia e comodismo publicos.

Duma vêz, venderam-nos na competente estação de Margão, quando a carreira se fazia dêsta vila, um bilhete para Pangim e ficamos em Agacaim com os nossos companheiros.. de desgraça sem automovel nem caminhão algum, até 12 horas, nós que sairamos de Margão ás 6 horas, praso que depois de esgotado com a nossa paciencia, arranjamos um trem...salvador que nos trouxe a nossas espensas para Pangim ás 16 horas

Doutra vez-e ainda recentemente-tendo saido do Vasco ás *nove*, chegamos a Pangim só as *quinze* horas !!,

E chamam *comissão de milhoramentos* a uma comissão que só mimoseá o publico com *pioramentos* de toda a sorte e casta, prejudicando-o nos seus negocios e...saude!

Se não há maneira de dirigir convenientemente a tal carreira, acabem com ela. Mas, por quem é, não o incomodem! E em troca do dinheiro que recebem adiantado...!!!

Favoritismo

E' positivamente, um mal de pior especie o favoritismo que se observa em certas-para não dizer todas-repartições do Estado, com pessimas consequências para a seriedade do nosso tino administrativo. Há mezes, foram preenchidas interinamente as vagas de professores do Liceu Municipal; mas a seriedade dêste preenchimento foi deslustrada, como por si se berra, pelo condenavel favoritismo.

E como se tudo isso fôsse pouco, procuram agora prorogar o praso, assunto a que se referiu noutra local!

Resta agor ver se o Sr. Dr. Jaime de Morais consente deixar correr êste marfim *favoitista-per seculo seculorum*.

¿ Mas porque é que não havemos de seguir na administração dos negocios públicos da Provincia o salutar e altamente moral exemplo do Sr. Dr. Brito Camacho, Alto Comissario de Moçambique?

Experimentem que a experiencia só nos será vantajosa.

Incompativel?

Para se protestar contra a agressão de que foi vitima o nosso colega sr. Liberio Pereira, reunira-se em tempo na residencia do sr. Elino Colaço um comicio, em Margão, como se sabe.

Na firme convicção de que o mesmo comicio era, simplesmente, do protesto contra a tal agressão, muitos cavalheiros e corporações lhe enviaram suas adesões, espontaneamente.

Vê-se, agora, porem, que no mesmo comicio abusou-se lamentavelmente da bôa fé dos sêus aderentes, procurando, extemporaneamente, insinuar-se que o sr. Governador Geral era *incompativel* com a Colonia.

Mas não era para isso que se reunira o comicio cujo programa limitava-se apenas ao protesto contra a agressão que por nós foi, então, verberada com palavras durissimas.

भारत

गुरुवार भाद्रपद व० १३ शके १८४३

स्फुट विचार

तत्व व तपशीलः— गांधी–टोपी प्रकरणांत निर्भय व निःस्वार्थपणें व्यक्त केलेल्या उज्वल स्वाभिमानानें पणजीच्या पाठशाळेच्या विद्यार्थ्यांनीं महात्माजीनें स्वदेशीचें देशोद्धारक तत्व कबूल असल्याचें कृतीनें सिद्ध केलेंच आहे. तें तत्व आतां तपशील रूपानें कायमचें अमलांत आणून संपादिलेल्या कीर्तिकांत भर घालणें, हें अर्थात् विद्यार्थ्यांचें अवश्य कर्तव्य बनून राहिलें आहे. 'देह जावो अथवा राहो, गांधी टोपी माझा भावो' अशी ज्यांनीं आपली भावना प्रगट केली त्यांनीं आजन्म शक्य तितकें स्वदेशीव्रत आचरलेंच पाहिजे; त्या शिवाय दुसरा तरणोपाय नाहीं. केवळ मजा म्हणून दोन दिवस गांधी टोपी वापरली व तिसऱ्या दिवशीं 'घेरे माझ्या मागल्या' अशी निंदास्पद स्थिति झाली तर गांधी –टोपी प्रकरणाचें महत्व एकाद्या पोरखेळापेक्षां जास्ती होईल, असें आम्हांस वाटत नाहीं. आम्हांस अशी उमेद आहे कीं, आमच्या विद्यार्थ्यांनी तपशील रूपानें म. गांधींनें स्वदेशीचें तत्व सदैव अमलांत आणून आपल्या कीर्तीत भर घालण्याच्या कामीं केव्हांहि अंतर करणार नाहीं.

दडपशाही व जुलूमः— जगांतील प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा इतिहास ज्यानां अवगत आहे त्यानां दडपशाही व जुलूम यांपासून लोककल्याणाच्या दृष्टीनें कमकसे शुभ परिणाम घडून येतात, याचें विवेचन करण्याचें कारण नाहीं दडपशाहीच्या सीमेवर स्वातंत्र्याची सुलभता अवलंबून आहे, हें साधें सत्य आतां पोरासोरांच्यासुद्धां अंगवळणीं पडलें आहे. अशा स्थितींत शहाणपणाचा टेंभा मिरवणाऱ्या ब्रिटिशसरकारनें अलीबंधूंना कैद करून साम्राज्यसत्ता दृढ करण्याचें श्रेय संपादिलें आहे, असें कोणीहि म्हणणार नाहीं 'विनाशकाल आल्यास अल्या : म्हणजे बुद्धि विपरीत होते' या न्यायास हिंदुस्थानसरकार तरी कसें अपवाद होईल ?

निषेधणाचा कळसः— तेव्हां पणज्या संपादकावर अमानक रीतीनें पडलेल्या हल्ल्यासंबंधीं निषेध व्यक्त करण्यासाठीं मडगांव येथें तेथील सि. बेलीन कुलास नावांच्या गृहस्थाच्या अध्यक्षतेखालीं एक जाहीर सभा भरली होती, हें वाचकांस आठवत असेलच. निषेधप्रदर्शनाशिवाय या सभेचा दुसरा कोणताहि उद्देश असणें शक्य नाहीं, अशा दृढ व प्रामाणिक समजुतीनें पुष्कळ लोक व मुनिसिपालट्यांकडून सदरहू सभेस सहानुभूतिपर तारा सुद्धां पाठविण्यांत आल्या होत्या. परंतु दुःखाची गोष्ट कीं, निषेध प्रदर्शनाशिवाय, लोकांच्या विश्वासाचा फायदा घेऊन अध्यक्ष महाशयांनीं सभेच्या सेक्रेटरींच्या मान्यतेनें

रावाची आम्हांस कां गरज आहे हें कळून येईल हुकूमाच्या गोटांत शिरून त्यांच्या पोटांत काय आहे हेंच पुष्कळदां कळलें पाहिजे असल्याचें आमचाच इतिहास सांगतो.

केपें २४–९–९२१ } ज. घ. मळकर्णेकर

कोचीनीला गव्हर्नर असावा आहेत' अशा अर्थाची बेमालूमपणें पोर्तुगाल सरकारास–लोकांच्या नावांनें तार पाठवून, जगांत आपलें हंसें करून घेतलें आहे ! व या कृष्णकृत्यांत खुद्द स्वतःस "यशवंती' उपपद लावून, दुसऱ्यांच्या नादक, कुत्सित व अर्थशून्य कुचाळकीच्या तुतारीनें देशभक्त, लोकमान्य व महात्मा या पदव्यांपेक्षांहि श्रेष्ट पदवी कमावलेले लुंडबुडे भाईसाहेब सामील होते, हें कळून तर आम्हांस असल्या "परिचित" विभूतींची कींव येते ! जिल्हाची खोड...

हिंदु व ख्रिस्तीः— हे गोमांतकांतील दोन प्रमुख समाज असून, त्यांच्यांत परस्परांत जसा एकोपा असावयास पाहिजे होता तसा नाहीं, हें मोठ्या दुःखानें कबूल करावें लागतें. हिंदूंच्या भरभराटीनें कांहीं ख्रिस्त्यांच्या नाकास असुयाशीच्या मिरच्या झोंबत असून, त्यांची त्यांची चांगलीच तारांबळ होते आहे, असें, ख्रिस्त्यांच्या तोंडांतून वेळीं अवेळीं निघत असलेल्या अनुदार मुक्ताफळांवरून, म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. फार कशाला ? गेल्या दिवसांमागें आमच्या संपादकांस खि. आलवेस भारतीं माऊला नावानें एक धमकीचें पत्र आलें होतें, हें बहुतेकांस आठवत असेलच. हें धमकीचें पत्र म्हणजे निव्वळ मतस्वातंत्र्याची मुस्कटदाबी असल्यावरून, त्यासंबंधीं दाद मागून ख्रिस्तेक ख्रिस्ती मूल–पत्रकारास आमच्या संपादकानें पत्र लिहिलीं. परंतु त्यांपैकीं बऱ्याच जणानी मुग्धता स्वीकारून आपल्या कुजक्या मनोवृत्तीचें प्रदर्शन केलें. एका मडगांवकरांच्या लड पत्रकारानें तर 'ज्याचें त्यानें पहावें' असा साफ पण तोंडी जवाब आम्हांस पाठवून आपली ख्रिस्ती परोपकार बुद्धि व्यक्त केली ! अशा धोरणानें हिंदु व ख्रिस्ती या उभय समाजांत प्रेम नांदेल व त्यांनीं अंतःकरणें ऐक्यरज्जूनें निगडीत होतील, अशी आशा करणें शुद्ध वेडेपणाचें होय.

अभिनंदनः— आमचे तरुण व होतकरू मित्र श्री. राजाराम शे. केळेकर व नारायण शर्मा गेट कळंगूटकर या उभयतानीं अनुक्रमें वैद्यकीचा व फार्मासीचा कोर्स यशस्वी रीतीनें संपविल्यामुळें, आम्ही त्यांचें अभिनंदन करितों. दोघांच्याहि सुसंस्कृत मनांत आपल्या पूज्य देश विषयीं, उत्कट प्रेम वसत असल्यावरून, स्वपराक्रमाच्या जोरावर मिळविलेल्या या नवीन स्वतंत्र धंद्याचा दर्जा राखूनहि ते देशोद्धारार्थ झटतील अशी आम्हांस उमेद आहे. दोघांच्याहि अंगांत आपापल्या धंद्यांचा 'प्रपंच' सांधून लोकहिताचा 'परमार्थ' संपादन करण्यास लागणाऱ्या श्रेष्ट गुणांचा विकास झालेला नजरेस येत असल्यावरून, आमची सदरील उमेद अनाठायीं होईल हें शक्यच नाहीं.

शारदा पीठाचे जगद्गुरुः— श्रीक्षेत्र द्वारका येथील शारदापीठाचे जगद्गुरु श्रीशंकराचार्य यांवर, अलीबंधूवर ठेवलेला आरोप ठेवून, त्यांसहि इं. सरकारनें पकडल्याचें ऐकून प्रत्येक हिंदूच्या मनांत अत्यंत खेद व दुःख वाटल्यावांचून राहणार नाहीं. हिंदुसमाजांतील सर्व व्यक्तींनें, उपरोक्त मठाधीं जरी शिष्यत्वाचें नातें नसलें, तरी आद्यशंकराचार्यांनीं हिंदूधर्माची केलेली महत्वाची कामगिरी इतकी मोठी आहे कीं, त्यांच्या नावाशीं संलग्न असलेल्या या धर्मसंस्थाविषयींचा आदरभाव–त्यानीं त्या स्थापन केल्यास आज हजारों वर्षें झालीं तरी एकसारखा कायम आहे. येथील हिंदुसमाजांतील बहुसंख्याक लोक श्रीशृंगेरीमठाच्या शिष्यवर्गापैकीं आहेत; त्यांस म इतर हिंदु लोकांस श्रीजगद्गुरु व त्यांचे शिष्य श्रीभास्करतीर्थ यांच्या अटकेचें वर्तमान ऐकून फार हळहळ व संताप वाटणें साहजिक आहे म्हणून आमच्या सरकारास आमची अशी नम्र विनंति आहे कीं, त्यानीं आपल्या दोस्त म्हणविणाऱ्या ब्रिटिश सरकारशीं रदबदली करून लोकांच्या धर्मसमजुतीस धक्का न लागेल अशी अवश्य तजवीज ठेवावी.

वर्तमानसार

—प्रियोळ, फोंडें येथील बातमीदार कळवितात कीं, गेल्या भाद्रपद कृष्ण २ सोमवारीं म्हाडदोळ येथील श्री म्हाळसा देवीच्या आलयांत तेथील माळी समाजाचा वार्षिक—पूजा व श्री सत्यनारायण पूजा समारंभ उत्तम रीतीनें पार पडला. उत्सवांत सर्वांच्या परिचयाचे गोरक्षण फंडांचें प्रचारक व श्री समर्थ सांप्रदायी ह. भ. प. रिसबुडबुवा यांचें सुश्राव्य कीर्तन झालें. कीर्तनाच्या उत्तरभागांत, येथील देवालयांतून आजपर्यंत चालत आलेले नाच, तमाशे व नाटकें यांस फांटा देऊन शुद्ध व सात्विक भक्तीस पोषक असें भजन पूजन कीर्तनादि प्रकार चालू ठेवण्याविषयीं त्याच प्रमाणें जुगार, रंडी, भांडी ह्यां पासून अलिप्त राहण्याबद्दल उपदेश केला. शेवटीं गोरक्षण फंडाची पेटी फिरविली.

—गेल्या आठवड्यांत वेरें व नेरूल या उभय ठिकाणीं आमच्या संपादकांचीं प्रवचनें झालीं.

—अलीबंधूंना कैद केल्याबद्दल हिंदुस्थान सरकारला पश्चात्ताप करावा लागेल अशी राजकारणांत कसलेल्या विद्वानाची समजूत आहे. हातच्या कांकणास आरसा नको

—मोपल्यांनीं आपल्या स्वतंत्र राज्याची उभारणी केल्याची बोलवा आहे.

—भारतावर करण्यांत आलेल्या खटल्यास रंग येत चालला आहे

—सरकारी खास परवानगी मिळेपर्यंत आजपर्यंत पुरवणीच्या रूपानें प्रसिद्ध होत असलेलीं विद्याप्रसार, स्वयंसेवक, भारतोदय व न निरोदय हीं पत्र–मासिकें बंद रहाणार आहेत ! मुद्रण स्वातंत्र्याची लीला !

—येत्या दसऱ्याच्या उत्सवांत पेडणें येथें स्थापन झालेल्या शीलोन्नति समाजा मार्फत एकादशी पासून पौर्णिमेपर्यंत व्याख्यानमाला सुरू करण्याचा ठराव एकमतें पास झाला.

गांधी--टोपी

(कवि इंदिरातनय–शिरवडें)

ही गांधी टोपी । परम प्रतापी !
जी * * * शाहीतें ठायिं ठायिं तापी !१
दिसे वरुनि साधी, परि कुजना बाधी !
चंद्रमा न सुखद जेविं तस्करां कदापी २
सतत तळमळतीं, हृदयीं जळफळती ।
आक्रंदती, वडवडती जेविं जन सुपापी ३
इजमुळेंचि गुरुजी --बनले अमित पाजी ।
तद्विवेक ज्ञान बुद्धि हीच टोपि लोपी ! ४
वंदूं आदरें ही ! रक्षूं धायि धायी —
रिपुं; रघुनाथ नम्र बांधवा निरोपी ५

महत्वाचा ठराव

[ले० वि० ग० जावडेकर, धुळें]

Ora a falta de comunicações directas das repartições publicas com os interessados origina, alem de mil transtornos, frequentes mal-entendidos e critica azêda do elemento popular contra o oficial, o que os distancia tambem com graves prejuisos á harmonia administrativa.

Torna-se, por consequencia, mister que se estabeleçam tais comunicações, se é que querem presar *soberania popular*, comunicações que não trarão nenhum encargo ao Estado, dada a sua superabundancia de empregados, aliada á facilidade postal. E o papel não lhe absorverá muito dinheiro...

Se a Republica é o governo do Povo pelo Povo para a felicidade do Povo, cabe-lhe, para o brilho da coerencia dos principios democraticos a obrigação de introduzir na sua administração o sistema de comunicações retro-esboçado.

Em nomê do Povo pedimo-lo aos competentes.

Uma carta

Recebemos uma carta do sr. Ramachondra Naique, de Margão, esforçando-se, mais uma vez, por defender nêla a sua dama ou antes o seu *cavalheiro-o manipanso.*

Na sua carta, o sr. Naique fala, tambêm do sr, Carlos Frias cujos argumentos tenta de novo, rebater.

O Bharat dá nas suas colunas cabida a todas as opiniões, quando venham decentemente formuladas. E como a carta de que se trata está nêstas codições, publica-la-hemos na nossa edição seguinte.

ECOS & CRITICA

Sinal da queda

No artigo que publicamos na edição passada com êste titulo, devem os leitores ter visto que o *alegre* Sol vai marchando directamente para o ocaso.

A ninguem estranhará tal natural acontecimento, sôbretudo, porque todos, ainda aqueles que o tinham endeusado para a farta satisfação de seus fins estomacais, sabiam que a escada por onde subia ao pinaculo da gloria o sr. Przeres da Costa era duma madeira de consistencia efemera.

Não è, tambem, para admirar que *quem faz o que quere, experimenta o que não quere.*

A queda do sr. Costa è, portanto, um facto, perfeitamente, logico, naturalmente *racional.* Leiam agora o que escreve *o Tempo* a proposito do nosso

"manipanso"

Durante a suspensão de *O Tempo* o "manipanso" deu que falar de si, cometendo mais proezas! Agarrado ao Celestino arranjou dois decretos inconstitucionais, criando dois empregos, fortemente remunerados, para colocar neles dois dos seus *engraxadores*; e, agora, *empurra* o Celestino para modificar no Senado a tal decantada reforma no sentido de não se lhes tirar a *tribuneca*, que para seu uso arranjou naquela barafunda, a que se dá o nome de ministerio das colonias.

Nem de encomenda-se arranjava um Celestino, tal como o medico da Aldeia Galega, para servir os interesses de manipanso" ... Um *estadista*, de escada abaixo ao serviço de uma verdadeira nulidade, que mercé da manha canarinacia, consegue tudo quanto quer para si e para os seus apaniguados.

Este "manipanso", como todos os inferiores de intelecto gosta de ter uma côrte de bajuladores. E' vel-os inundando, diáriamente, o ministerio das colonias.

Registando...

A Comissão de Melhoramentos de Mormugão providenciou, imediatamente, sobre os factos tratados na nossa local *Os nossos autos*. E com uma actividade que muito a honra.

Na correspondencia epistolar, trocada entre o sr. Superintendente da Comissão e o director do *Bharat*, teve este a feliz ocasião de ver que a Comissão de Milhoramentos está animada de melhores desejos de bem servir o publico, atendendo a suas reclamações, directamente dirigidas.

Estimamo-lo, porque outro não é o desejo do Povo que, sendo pouco exigente *a criança eterna* quere apenas que as suas reclamações sejam atendidas com carinho.

A desgraça nunca vem só

O nosso director passou pelo profundo disgosto de perder o seu filho Ramacrisna, único legado da sua extincta esposa.

O triste acontecimento bem demonstra que a *desgraça nunca vem sò*. Foi o prenuncio da mesma tetrica ocorrencia que inibiu o nosso director de aceitar convites que por ocasião do *Vijia Dossimi* varias associações hindus lhe fizeram com uma amabilidade que muito o cativa, para conferencias de propaganda civica, convites que nem poude agradecer, o que, porem, faz agora, por este meio, na previa certesa de que se dignarão desculpar-lhe a falta, de resto, absolutamente, involuntaria.

E, como o melhor remedio contra cruciantes dores que oprimam e dilacerem corações reside na concentração do espirito no Bem Publico, o director do *Bharat* seguiu hontem para o concelho de Canacona onde fará uma série de conferencias de propaganda civica, em dias seguidos.

Receios infundados

O sr. Datarama Govinda Camotim, um dos hindus influentes e nosso prestigioso correligionario manifestou publicamente, em qualquer parte, os receios que lhe assaltam o espirito, de que alguns hindus importantes pretendam pelo seu movimento separar-se dos seus irmãos cristãos, o que, na sincera opinião do sr. Camotim representa um perigo social da pior especie, provocador do nosso fatal retrocesso.

Permita-nos, porem o nosso amigo a liberdade de lhe garantirmos que são infundados os seus receios, pois nenhum hindu que se presa de ser patriota alberga na sua cabeça a condenavel idea de odiar quem quere e muito menos a liberal classe cristã que sempre

ब्रिटिश हिंदुस्थानांतील

ज्या वर्गणीदारांकडून अजून चालू वर्षाच्या वर्गणीची फेड झाली नसेल, त्यांच्या नावानें ३२ व्या अंकाची व्ही. पी. रवाना होईल. ती ते स्वीकारून भारतास आभारांत ठेवतील अशी आशा आहे.

मॅनेजर भारत

भा र त

गुरुवार आश्विन व० ४ थी १८४३

स्फुट विचार

व्याख्यान-आठवडाः—गेल्याच्या मागील आठवड्यांत ठिकठिकाणच्या सार्वजनिक संस्थांनीं श्रीसरस्वतीपूजनोत्सवानिमित्त व्याख्यानमालाद्वारा लोक जागृतीच्या कामीं मोठ्या प्रमाणानें हातभार लावून पुष्कळ पुण्य संपादन केलें. पेडणें, म्हापशें, कळंगूट, पणजी, रायबंदर, कुंभारजुवें, मडकई, मुरगांव, मडगांव, केपें इत्यादिअनेक ठिकाणीं बहुविध विषयांवर व्याख्यानें-प्रवचनें झालीं. त्यांस लोकसमूहहि अपूर्व जमत असे. ह. भ. परायण पांगारकरबुवांखेरीज इतर सर्व वक्ते गोमांतकांतीलच होते, ही विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट होय. उत्सवांच्या एकंदर हकीकतींवरून, हिंदु समाजांत देशहिताविषयींची तळमळ दिवसेंदिवस वृद्धिंगत पावत असून, आमच्या चळवळींस "टिकाऊ" कार्यक्षमता प्राप्त होण्यास जास्त कालावधि लागणार नाहीं, असें विधान केल्यास तें चुकीचें ठरेल असें आह्मांस वाटत नाहीं. मात्र यंदां दृष्टोत्पत्तीस आलेली चिकाटी वाढविण्यास निदान कमी न होण्यास त्या त्या संस्थांच्या चालकांनीं अंतःकरणपूर्वक झटलें पाहिजे. दिखाऊ गाजावाजाच्या काळ केव्हांच निघून गेला असून सत्य तेंच शिल्लक रहाणार आहे, हें प्रत्येक देशहितचिंतकानें लक्ष्यांत वाळगिणें जरूर आहे.

नवीन करांची वसुलीः— चालू महिन्याचे १५ तारखेपासून गोव्याच्या हद्दींत येणाऱ्या व हद्दीबाहेर जाणाऱ्यांवर लादलेला ३ आण्याचा कर वसूल करण्यांत येऊं लागला असून, १० वर्षांखालील मुलांस व विशिष्ट प्रसंगीं कित्येक सरकारी कामदारांस सदरील कर माफ ठरविण्यांत आला आहे. या "सैतानी" करासंबंधीं आह्मी आमचे विचार पूर्वी नमूद केलेच आहेत. आतां आणखी त्यांत भर घालण्यात विशेष तथ्य आहे, असें आह्मांस वाटत नाहीं. बाकी एक गोष्ट खरी कीं, या ये जाच्या कराच्या उत्पन्नानें, तिजोरीचा खळगा भरून तर निघणार नाहींच नाहीं, उलट त्याचें उधळपट्टीला मात्र बेसुमार अवसान आवयास लागेल. 'बुडत्याचा पाय खोलं' अशी तिजोरीची शोचनीय स्थिति असल्यावरून उपरोक्त विधान अतिशयोक्तीच्या चष्म्यानें पहाण्याचें फाजील शहाणपण करण्याऱ्यांनाहि भजणार नाहीं, असा भास होतो.

—गजी येथें गेल्या ता. ११-१२ रोजीं मुंड संस्थेच्या विद्यमानें डॉ. आत्मारामकर व ना. देसाई यांच्या अध्यक्षतेखा व्याख्यानें झाली.

श्रीमंत (!) आजोबांस

[भ्रामक श्रीमंतीच्या कल्पनेनें वृद्ध आजोबांनीं स्वदेशभक्तांची केलेली निंदा ऐकून विषाद कां वाटणार नाहीं ?]

भ्रम का झाला तुमच्या मतिला। गेली विवेक शक्ति लयाला।
कीं सांगा वृद्धापकालिं या- मानवते मुकलां? १।
माय व्याकुळा शोकिं बुडाली। ना सौख्य रती कवणा भाली।
तरि समजावें तुह्मि आपणा-केवीं सुखशाली ? २॥
ते दिन दास्याचे मावळुनी। अश्रु वाहती अविरल नयनीं।
वैभवयुत वरुनी परि तळमळ अन्नाविण सदनीं ! ३॥
परसेवा वाटे सुखकारी। दुष्कर्मातें मनिं जी विखरी।
काया वाचा मन उपरमलीं तस्करणीं शरीं ! ४॥
राष्ट्रवीर संगरा ठाकती। क्रोधाच्या ततलोद्दमूर्ति।
घोर भयंकर अधोगती आतां रिपु नशिबीं ती ! ५॥
प्रश्न मोडितां त्यांचें कोटें। मिळे आसरा तुह्मां कोठें ?
स्वदेश भक्तांच्या जीवावरि भराल मग पोटें. ६॥
वेळींच तरी सावध व्हावें। अविवेकें न तयां निंदावें।
परि वंदावें संतत; रघुनाथ विनवितो भावें ७॥

इंदिरातनय, शिरवडें.

प्रासंगिक विचार

(माशेल, गोवा येथील श्रीदुर्गादत्तमंदिरांतून)

माझ्या बुद्धीचा मी मालक आहें. देवानें इतरांप्रमाणें मलाही डोकें दिलें आहे माझ्या विचारा अंतीं मला वाटेल तसा श्रीही एखाद्या वचनाचा अर्थ करून मला प्रशस्त वाटेल तेथें तेथें तसतसा उपयोग मी कां करूं नये असा प्रश्न करणाऱ्या 'कोन्योऽस्ति सदृशोमम' वाटणाऱ्या एखाद्या मिथ्याज्ञानदृप्तास त्याच्याच तोडीच्या बुद्धिकक्षेंतील विद्वानास त्याच्याच प्रमाणें युक्तिवाद करून समाधान करितां येणें फारसें शक्य नसलें तरी "यो बुद्धेः परतस्तुसः" ची ओळख झालेल्या महाभागास हा वरील पोरकट खेळखंडोबा काडीइतकाही महत्वाचा वाटत नाहीं स्वतंत्र विचाराच्या वादळांत सांपडलेल्या ह्या कर्मैकपटु कर्मैकाधिकारी देहात्मधीमंताचीं तारवें स्वतःच्या बुद्धिचलांच्यां खडकावर आपटून फुटूं लागलीं तरी ज्यानां गुरुकर्णधाराची आवश्यकता वाटूं लागली नाहीं, त्यांची कींवच केली पाहिजे. त्यांच्या 'मा फलेषु कदाचन' मंत्रानें प्रतिष्ठा झालेल्या अपेक्षी पुरुषार्थी देवतेचें गुरुपरंपराहीन दुर्भागी प्राण्यानां यांतील दिव्य रहस्यें कळावीं कशीं? ह्या "इंटेलेक्च्युअल जांयटस" अथवा उन्मत्त ज्ञानभुजंगांस मुठींत कोण शहाणा मागून कशास धरणार ? जेथें इंटेलेक्ट ह्मणजे अक्षोड बुद्धिमत्ताच एकटी वाढली आहे तेथें इंटेलिजन्स जे इंटियुशन अथवा अंतःसंवेदना, बुद्धिप्रसाद इत्यादि सामुग्री कोठची असणार ? आणि सत्यज्ञान तर "बुद्धिप्रसादजं" आहे. परंतु गुरुपरंपरा ह्मणजे अंधश्रद्धा वाढविण्याचाच एक मोठा कारखाना होय असें ज्या ज्ञानलव दुर्विदग्धाना वाटत असेल त्याचें समाधान "ब्रह्मापिनरं नरंजयति" अशा घनघोर अपराध्यास अशा भयंकर वंडखोरास सनातनधर्मसंप्रदायी कोर्टानीं "आउट लॉच" ठरविला पाहिजे मस्तकाचा घाम उतरेपर्यंत तरी अशाच्या वाटेस कोणी जाऊं नये. सर्पाचे दात पाडून हातीं धरूं जाणणाऱ्या मंत्रिकावांचून इतरानें त्या ज्ञानभुजंगाजवळ जाऊं ही नये फणा सुंदर दिसते ह्मणून त्या नागोबास उरावर घेतां कामा नये. नागपंचमीसारख्या सणावारी वाटाणें, लाह्या, दूध इ० वगैरे जिन्नस त्यास किंवा त्याच्या प्रतिमेस समर्पण करावेत करावे. भगवंताची ती एक विभूतीच आहे; परंतु ती पूजा लगट करून करितां नये. वंदनीय व पूजनीयच तो. पण आश्रयणीय नव्हे. "तुका ह्मणे सर्प विंचू नारायण। वंदावे दुरून शिवूं नये."

गीतेंतील काहीं वचनाप्रमाणें उपनिषदांमधील ही काहीं वचनें हल्लीं भाषणांत व लेखांत घुसडून देण्याची टूम निघाली आहे "उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्नि बोधत" हें यापैकींच एक होय "सामर्थ्य आहे चळवळीचें। जो करील त्याचें। परी आधीं भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे॥" ही रामदासी परमवंदनीय व मननीय उक्ति तिसऱ्या चवथ्या इयत्तेतील पोरासही हल्लीं तोंडपाठ झाली आहे. पण दुर्दैवानें कशी देखतभूल पडली आहे पहा. आमचे आह्मीं कसे पढत मूर्ख बनत चाललो आहों त्याची कल्पनाही करणें कठीण आहे.

"सामर्थ्य आहे चळवळीचें। जो करील त्याचें" हें वचन उराशीं बाळगून त्यावर व्याख्यानें झोडणारे, रकान्यावर रकानें लिहिणारे व दोन चार हजार श्रोतृवृंदास तल्लीन करून सोडणारे, पुराण सांगणारे वक्ते व लेखक कमीं आहेत काय ? पण आधीं भगवंताचें अधिष्ठान पाहिजे ह्मणून समर्थांनी जें सांगितलें आहे त्याचा विचार कोणी कितीसा केला आहे? भक्तिज्ञानवर्धक इ० धार्मिक [?] लेखाचें मासिक अगर साप्ताहिक अथवा पाक्षिक पत्र काढणें हें फार उपकारक कृत्य होय यांत संशय नाहीं. परंतु भगवदधिष्ठान संपादण्याचा प्रत्यक्ष यत्न, कर्मानुष्ठान नित्य नेमाने अत्यंत कळकळीनें करण्यांत इमानें इतबारें आपण त्या त्या पाक्षिक मासिकादिकांचे संपादक लेखक अगर वाचक कितीसा वेळ घालवितां बरें !

वर्गणी पाठवा !

ज्या आश्रयदात्यांकडून अजून मागील वर्षाच्या बाकीची फेड झाली नसेल त्यानीं ती तावडतोब चालू सालच्या वर्गणीसह चुकती करण्याची कृपा करावी. आमच्या एजंटांपाशीं वर्गणी देण्यास कोणीहि दिरंगाई करणार नाहीं अशी उमेद आहे.

म. भारत

काणकोण महालांत

खालीं नमूद केलेल्या दिवशीं आमच्या संपादकाचीं प्रवचनें होतीलः

वार	ता.	गांव	जागा
गुरुवार	२०।१०।२१	नगर्से	सरस्वतीमंदीर
शुक्रवार	२१-१०	माशें	श्री निराकाराचें देवालय
शनिवार	२२-१०	लोलयें	श्री केशवाचें देवालय
रविवार	२३-१०	पैंगीण	श्री नारायणाचें देवालय
सोमवार	२४-१०	पर्तगाळ	श्री स्वामीचा मठ
मंगळवार	२५ १०	काणकोण	श्री मल्लिकार्जुनाचें देवालय

प्रवचनाला संध्याकाळीं ६ वाजतां प्रारंभ होईल सवडीप्रमाणें प्रवचनांची संख्या कमीअधिक केली जाईल. प्रत्येक ठिकाणीं इतर गृहस्थांचीहि भाषणें होतील.

भारत मंडळ

ब्रिटिश हिंदुस्थानः—दडपशाही जोरांत असून 'रावणी' नोकरशाहीनें असहकारितावाद्यांस राजरोसपणें छळण्याचा आपला दुष्ट व आततायी क्रम तसाच चालू ठेविला आहे. गेल्या दिवसांमागें बेळगांवचे दे० गंगाधर राव देशपांडे यांस कैद करण्यांत आलें! परंतु समाधानाची गोष्ट ही कीं. जों जों नोकरशाही असहकारिता चिरडून टाकण्याच्या प्रयत्नांत शक्तिसर्वस्व वेंचीत आहे, तों तों असहकारयोग्यांची संख्या वाढतच आहे! यावरून आमच्या शेजारच्या राष्ट्रांत स्वराज्य मिळविण्याची आकांक्षा कशा तीव्रतेनें जागृत झाली आहे, याचें अनुमान सहजच होण्यासारखें आहे. स्वार्थपरायणतेनें अंध बनून नोकरशाहीसंबोवतीं घुंगिझेल्यांचें काम करणाऱ्या येथील शिष्ट लोकांनीं वरील उदाहरण सतत दृष्टीसमोर ठेवून या पुढें तरी आपला वर्तनक्रम सुधारण्याचा प्रयत्न करावा अशी आमची त्यांस सूचना आहे.

क्षमा व आभार

श्रीसरस्वती पूजनोत्सवप्रसंगीं प्रवचनें करण्यासाठीं ठिकठिकाणच्या संस्थांकडून आमच्या संपादकांस अनेक आमंत्रणें आलीं होतीं. परंतु त्यांच्या रामकृष्ण नामक एकुलत्या एका मुलाच्या प्रथम, दुखण्यानें व नंतर, त्याच्या हृदयद्रावक निधनानें त्यांजवर ओढवलेल्या दुःखदायक आपत्तीमुळें, त्यांस एकहि आमंत्रण स्वीकारणें शक्य झालें नाहीं. या बद्दल त्या त्या संस्था आमच्या संपादकांस क्षमा करतील अशी आशा आहे. प्रवचनें करण्यासाठीं तसेंच उत्सवांस हजर रहाण्याविषयीं आलेल्या ठिकठिकाणच्या संस्थांच्या आमंत्रणपत्रिकांबद्दल भारतकार त्यांचा फार आभारी आहे.

भारत मंडळ

— मुरगांवच्या उत्सवाचें बातमीपत्र येत्या अंकांत प्रसिद्ध होईल.

— पणजी शहरामध्यें आश्विन शु० १ दा रविवारीं 'गोमांतकीय मराठी शिक्षक संमेलनाचें १ लें अधिवेशन' भरविण्यांत आलें. सदरहू प्रसंगीं बरीचशी शिक्षक मंडळीं जमून गोव्यांतील सर्व मराठी शाळांत शिक्षण वगैरे एका नमुन्यावर असण्याबद्दल त्यांच्यांत ठराव पास झाले. दुसरें व तिसरें संमेलन म्हापसें व मडगांव येथें लौकरच भरण्यांत येणार आहे असें कळतें.

ANO VI—NUMERO 31—1921 QUEPEM QUINTA-FEIRA 27 DE OUTUBRO

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai

Assinatura
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें.] केंपें, गुरुवार, तारीख २७ माहे अक्टोबर सन १९२१ [अंक ३१ वा.

O SR. CELESTINO

Quanto se trabalhou pelo triunfo dêste *Salvador* ex-ministro das Colonias. nas ultimas eleições, quanta peta se pregou para o mesmo senhor *amigo* do *manipanso* ter assento no Senado e quanta artimanha se di senvolveu em defesa do *venerando* republicano preistorico, todos o sabem.

Nós, entã o, previramos as belesas com que o sr. Celestino da Almeida de mãos dadas ao *Simbolo Indiano*, havia de mimosear-nos. Mas atribuiram-nos propositos... inconfessaveis.

Vejam, agora, o que diz a proposito do mesmo senhor, o orgão do Partido Indiano, unico partido que, apesar de tantas vicissitudes e contratempos porque teve a infelicidade de passar, impõe-se, ainda como sempre, á cousideração do elemento ilustrado do Paiz

São trechos dum artigo intitulado *Eleições e inspecções*, publicado na edição de 15 de outubro de 1921.

Por eles o leitor poderá aquilatar a modalidade de ser de certos politicões, cá da terra:-

Ei-lo-

Enquanto, ainda não arrefecia o entusiasmo eleitoral; o representante da India na metropole brindava os seus eleitores com dadivas verdadeiramente generosas que, em vez, de lhes dar a tão desejada compressão de despezas traziam um aumento que por força devia aumentar os impostos. Ao mesmo tempo que mandava executar o decreto da equiparação. fazia uma reorganisação dos serviços dos correios e telegrafos, e com um telegrama pressuroso mandava suspender o concurso para delegados de saude por causa de uma outra reorganisação.

Mas não pararam por aqui as dadivas do representante da India para os seus eleitores. O sr. Celestino da Almeida, a hora em que ia deixar a sua pasta, veio brindar ainda com novas dadivas criando uma "inspecção das associações agricolas ou comunais", que segundo dizem vai custar dez a doze mil rupias, do vencimentos, alem de uma *repartição instalada sob proposta do inspector* e uma "cadeira de higiene e puericultura" na Escola Normal com sete a oito mil rupias de vencimentos.

O nosso representante já não satisfeito de sacudir, para dadivas, os cofres do Estado, ainda se lança depois de todo o entusiasmo dos seus eleitores, aos particulares fazendo desta vez um assalto aos cofres do que se chamam as *comunidades agricolas da India*, ainda com a sem cerimonia de acrescentar a palavra *comunais* porque podiam elas, as pobres comunidades, deixarem de ser *associações agricolas* escapando, assim a este golpe...

Pois é verdade. Os propugnatores da candidatura do sr. Celestino de Almeida senador pela India tem estado por estes ultimos tempos a encherem a bôca com a palavra *tubarões* conjugada com uma outra a *compressão de despezas.* Mas o representante eleito com tanto ardor ainda nos continua a mandar novos tubarões e, para mais, para sinecuras que anda parelhas com verdadeiros escandalos. Estão caladinhos porque são os filhos da India que vão lá ficar aniciados? Pois é exactamente por isso que mais o combatemos. Não compreendemos que não haja tubarões indios; se é que há metropolitanos. Tubarões se é que os há, são todos eles de qualquer procedencia que eles sejam.

Veio a supressão dos *serviços dispensaveis*? Veio a suspensão *dos adiaveis*? Veio a redução dos imprescendiveis? Veio a limitação dos *quadros dos funcionalismo ao estritamente necessario*? Não Nada disto veio E o sr. Celestino de Almeida foi se, embora da pasta das colonias Mas infelizmente não foi sem dispachar as petições dos eleitores E foi distribuindo, largamente a ... sopa...com escandaloso *aumento de despezas*, em vez da tão desejada *compressão* !...

Estamos vingados ! E não o dizemos com o prazer. Dizemo-lo com tristeza.

UM PLANO

Sugéria ao Governo um plano do ensino, que é o seguinte.

Que desde já devem ser convertidas em moveis todas as escolas fixas primarias de portuguesa marata e gujerate e transferidas as que tiverem frequencias menos de 20, para as localidades onde se provem necessarias e úteis como o despõe o § 1° do art 2° das alterações ao regulamento vigente da instrução primaria

L. P

Uma carta

Como o prometeramos, publicamos, a seguir a carta do sr. Naique

Desnecessario é dizer que não concordamos absolutamente com o modo de ver do autor da carta que na parte que nos toca, será refutada logo que o sr. *Carlos Frias* produza a sua defesa, querendo.

Ver-se-há então, que o sr. Prazeres da Costa, justa e apropriadamente cognominado *manipanso* pelo *Tempo* fazendo vontades e ouvidos á baixa clientela só traiu os interesses da India, cuja maioria indipendente e experimentada só o tem na conta do ... incompativel com os interesses da *Provincia*'

E' claro que não discutiremos a pessoa ...*privada* do sr, Costa. A critica versará, como até aqui, sobre os seus actos ,*impessoalmente*.

E' o sistema, seguido cá em casa, e dele não nos afastaremos nem um apice, por causa alguma deste mundo. pelo menos enquanto tivermos, como hoje. completa liberdade de acção na direcção do *Bharat*. Mas basta...por hoje.

Eis a carta do sr. Ramachandra Venctexa Naique:-

Sr. Redactor do *Bharat*.

Nunca imaginei que a brilhante pena de V. produzisse um escrito tão anti-politico como o artigo *Sinal de queda*. V. meramente baseando-se nas suposições e publicações de alguns jornais da metropole tirou dêles a conclusão de que já começou quedar a *fama* de sr. Prazeres da Costa em Portugal e se alude como primeiro *sinal* disto a extincção da Auditoria Geral. O publico bem avaliará esse "sinal" justificativo da queda, quando lerem que a Auditoria Geral se acha extincta.

Tomo pois a liberdade de dizer a V. embora com atrevimento, que os portugueses não são tão tolos para estarem iludidos dum *patriotismo interesseiro* e, de mais a mais, quando o caso for com um *Indio*.

Pois se a critica dos jornais anuncia seguramente a queda da pessoa criticada, podem se dai concluir então que a *fama* de *Mahatma Gandhi* tambem em breve já estará *quedada.* Elucidarei o assunto oportunamente, mas afirmo com toda a convicção que a *fama* dum patriota conservar-se-há sempre intacta e ainda multiplicada, sempre que o amor da patria fique puro no seu coração. Pelo contrario os escritos como o artigo *Sinal de queda* provarão ser apenas sinal da queda do sentimento de gratidão. Não é a critica dos jornaes nem mesmo a derrota politica que anunciam sempre a queda dum patriota.

Quanto aos meus argumentos sobre a carta do sr. Frias, desejei sempre a apreciação do publico e que este dirá, se eu tenho trabalhado em *vão* ou com *razão* para desfazer os do sr. Frias, porque menos me admireu a leitura do artigo *Educação e Instrucção* escrito impacientemente e o qual em nada justifica o preenchimento das tres colunas do seu apreciado jornal, mas que só faz ressucitar o antigo regime da literatura politica da antiga *epoca morta*, que só entretinha os comtemporaneos escritores ou politiqueiros que andavam a reboque dos seus chefes a depreciar os seus adversarios sem se preocuparem em persuadir os seus leitores tocando directamente no assunto principal ou o ponto em questão.

Ora são dois os pontos em questão no assunto do Liceu de Margão que obrigou o velho a pegar na pena.

O primeiro é do pedido da *elevação* do Liceu de Margão Nacional e o segundo é da *competencia* dos seus professores.

Vamos ao ponto:-

O sr, Frias discorda fortemente deste ponto e diz, impacientemente que os que pedem elevação do *Liceu sao crianças malcriados* que *estao a troçar do Governo.* Diz ele tambem que estas crianções dos Liceus são feitos só para servir aos protegidos de *alguem*, incompetentes para o professorado.

Mas assim como não será uma tolice creio, ainda segundo o velho modo de ver do sr, Frias, construir uma casa ainda que haja a probabilidade de ser excavada pelos ratos, do mesmo modo não o é ainda que haja a probalidade de serem nomeados professores incompetentes, solicitar a pretendida elevação.

Nós cimentamos o alicerce da nossa casa para não ser esta excavada pelos ratos. Do mesmo modo, se recearmos nomeações dos professores incompetentes trabalhemos por remediar esse mal, ainda suposto, que será o nosso segundo dever sendo de pedir a elevação o primeiro.

No que toca ao segundo ponto, diz o sr. Frias que os professores X. Y. Z. são incom

प्रासंगिक विचार

(के० शिरवईकर, एल्. एम्.)

प्रजा व सरकार यांचें परस्परांशीं नातें एकच असतें. म्हणजे, प्रजा म्हणजे सरकार व उलट सरकार म्हणजे प्रजा आणि म्हणू. नच कोणतेंही सरकार, आपल्या प्रजेच्या हिताविषयीं दक्ष असतें व प्रजाही सरकारचें हित पहाते, ज्या देशांतील सरकार व प्रजा मिळून एकच असते तेथील ही गोष्ट झाली; परंतु ज्या देशांत प्रजा निराळी व सरकार निराळें, त्या देशांत मात्र वरील नियमास बाध येतो. तरी सरकार या नावांत प्रजेचाही समावेश होत असल्यानें वरील नियमास बाध देण्यास प्रजाच कांहींशी कारणीभूत होते. कारण परकी सरकार जरी झालें, तरी तें सर्व काहीं आपलें हिताहित पहात नसतें; थोडें तरी विदेशी प्रजेचें हित पहात असतें व तें पहातांना, त्यास स्वतःस तितकी दृष्टी नसल्यानें, तें आपल्या दृष्टीस प्रजेच्या दृष्टीचा चष्मा घेऊन, त्यानें पहात असतें व जें काय करायचें, तें करीत असतें. हे प्रजेच्या दृष्टीनें जन्मे जर चांगले असले तर सरकारास चांगलें दृष्टीस पडून, तें चांगलें करतें; पण जर का बाहेरून हे दिसण्यांत चांगले दिसून, आंतून वाईट असले तर मग कावळ्या काय दिसायास लागून कावळ्या काय होतें. आणि असें होतें म्हणून मग सरकार आपणास प्रजेच्या दृष्टीचा चष्मा निवडून काढण्यास प्रजेसच सांगतें. आणि लोकापवादांतून मुक्त होतें, व प्रजाही तो निवडून देते. पण मग सरकार त्यास आपल्या बगलेंत मारून, आपल्या विकारानें त्यास विकार करितें. व सरकाराच्या विकारानें प्रजेचे चष्मे एकदां विकृत झाले म्हणजे मग त्यांतून प्रजेची नजर जाते व त्या जागीं सरकार व स्वतः पुरती नजर तयार होते व अशी नजर तयार झाली म्हणजे मग एकंदर प्रजेचें अहित होतें व प्रजेस आपण निवडून दिल्याचा पश्चात्ताप होतो.

सूतं आमच्या गोमंतकांत अशीच स्थिति दृष्टीस पडते. सरकार परकी लोकांचें, पण त्यानें आम्हांस आवतोनोमी देऊन, प्रजा व सरकार एक केलें व तेथील लोक राज्यकारभारांत घेऊन, प्रजापक्षीय लोक सल्ला मसलतींत घेतले. इतकें जरी केलें, तरी ह्या लोकांसेरीज इतर प्रजेचें अहित आहे, तें आहेच. तें प्रजेस आवतोनोमी मिळाली म्हणून नाहींसें झालें नाहीं. याचें कारण विदेशी सरकार तर आहेच, पण विदेशी सरकारपेक्षां स्वदेशी लोकच अधिक कारणीभूत आहेत. पहाना, राज्यकारभारांत शिरकाव होण्यापूर्वी हे लोक स्वदेशभक्तीच्या [patriotismo] नांवावर लेख लिहितात वर्तमान पत्रें काढितात, सभांतून भाषणें करितात व सरकारचीं व लोकांचीं मनें आपल्या चित्तवेधक लेखणीनें व भाषणानें आकर्षण करितात. परंतु हा सर्व चित्ताकर्षकपणा सरकारची रुपेरी बेडी हातात पडली म्हणजे नाहींसा होतो. अशा चित्ताकर्षक लोकांस सरकार लोंच आपल्या कृष्ण कृत्यांवर पांघरूण पाडण्यासाठीं आपल्या बगलेंत घेऊन रुपेरी बेडी घालतें. व चित्ताकर्षक वाणीनें व लेखणीने भुलून गेलेले व निवडून दिलेले लोक अशा कपटपटु देशभक्तांच्या मायावी वाणीस व लेखणीस फसून, उलट बळी पडतात. व सरकार विजयी होतें. अशा तऱ्हेचे देशभक्त आजपर्यंत अनेक होऊन गेले व होऊं पहात आहेत. अशा देशभक्तांच्या योगानें, त्यांच्या स्वोन्नतिखेरीज देशोन्नति होईल काय!

अशा या वरील तऱ्हेच्या देशभक्तांच्या योगानें उन्नति व्हावयाची, ती अशी कीं, आपल्या इष्टमित्रांचा व सगे सोयऱ्यांचा राज्यकारभारांत विनाकारण प्रवेश करून, लोकांच्या खऱ्या हक्काची पायमल्ली करायची स्वतःच्या व त्यांच्या पोषणार्थ पगारांत वाढ करून घेऊन ती तिजोरींत नसल्यामुळें, तिचा अवजड बोजा लोकांच्या डोईवर बळेंच लादण्यासाठीं देशाबाहेर आल्या गेल्यास तीन आणे कर, जमन मरण खाण्यास कर, धंद्यावर कर, इस्टेटीवर अधिकाधिक कर, असे एक ना अनेक लहान मोठे कर बसवून लोकांस हतवीर्य बनवायाचें व 'बुडत्याचा पाय अधिकच खोलांत' जावयाचा! एकीकडे महागता दिवसेंदिवस आपलें भीषण स्वरूप दाखवून जनतेस भेवडावीत आहे, तर दुसरीकडे पीक वगैरे चांगलें न झाल्यामुळें उत्पन्नांत तूट पडत आहे, आणि अशा स्थितींत करांचें ओझें दिवसेंदिवस जास्त होत आहे; उद्योगधंद्याची वाढ नाहीं; बाहेरून येण्याजाण्यास दंड, अशा स्थितींत उन्नति किंवा अवनति होईल हें आणखीं सांगितलें पाहिजे काय? बरें, जनतेकडून कराच्या रूपानें पैसे घेऊन व त्यांतून तिचे भाऊबंद पोसून तरी जनतेस फायदा आहे काय?

ओब्रस पुब्लिकस [obras publicas] खातें आहे कामस म्युनिसिपाल आहे व ज्युंत लोकाल आहे; इतकें असुनही लोकांस मोठार-गाड्यांचें लोढाच; पण साधारण पाय वाट तरी चांगली आहे काय? नदीवर पूल नाहींत, पण खंदकावर किंवा चरांवर अथवा ओहोळांवर, जाण्यायेण्यास तरी साकवा आहेत काय? नवीन व जुने रस्ते साफसुफ करून त्यांच्या सभा व तीं दोन्ही बाजूनें झाडें लावल्यास लोकांस सावली मिळून, सरकारासही लोकावर कर न बसवितां, उत्पन्न मिळेल. पण असें सरकारनें केलें आहे काय? अनुभवासाठीं लोकांकडून करांच्या रूपानें घेतलेला पैसा निरुपयोगी करावा व नवीन कामें [obras] करण्यासाठीं पुनः पुनः करांचें शेंपूट वाढवावें व लुटारूसीचें पोषण करावें, व कोणी देशभक्तीच्या नावावर तें चव्हाट्यावर आणूं पाहिल्यास किंवा लोकांनीं निवडून दिलेल्यांनीं उघडकीस आणूं केल्यास त्यांस रुपेरी बेडीनें जखडून आंवळून टाकावा व तोही मंत्रानें भारल्या सारखा होऊन निःस्तब्ध व्हावा! ही देशोन्नति किंवा देशाची अधोगति?! कोण याचें उत्तर देईल बरें! खरे निरपेक्ष देशभक्त इकडे कितीसे सांपडतील!

देशभक्ति वेगळी व पोट भक्ति वेगळी

जोंपर्यंत देशभक्तीच्या नांवावर ढिंदोळ घालण्यात येतो व एकदां का रुपेरी बेडी हातांत पडली म्हणजे देशभक्ती लुळी पडते, असा आजचा अनुभव सांगतो लो० टिळकांसारखे, म० गांधी सारखे निरपेक्ष खरे देशभक्त पुढारी सोडाच; पण साधारण इंग्लिश हिंदुस्थानांतील देशभक्तांच्या तोडीचा हजारांत एखादा पण येथें देशभक्त सांपडेल काय? आजपर्यंतच्या अनुभवावरून शंकाच आहे!

येथील खिस्ती समाजांत तर विशेषेंकरून देशभक्तीपेक्षां पोटभक्तीच विशेष दृष्टीस पडते. त्यांना 'स्व' पेक्षां 'प' वरच जास्त अभिमान आहे. कसा तो पहा त्यांची परकी भाषा, परकी पोषाख; परकी धर्म, परकी आचार विचार, परकी आहार विहार, पोट भक्ति, परकीयांशी दोस्ती, परकी यांचें अभिष्ट चिंतन इत्यादि सर्व कांहीं 'प' कारच खिस्तीयनात वास करीत असून, स्वदेशबांधवांशीं म्हणजे हिंदु लोकांशीं निराळेपणा करणें, त्यांस 'जेंतीय' (रानटी) या नावानें हिणविणें–म्हणजे जणूं काय आपणच सुशिक्षित हिंदु व खिस्ती एकाच कोंकण मुलुखांत वास्तव्य करीत असतां, हिंदूसच खिस्तीयनानीं 'कोंकणें' असें अज्ञानानें म्हणून आपण पोर्तुगेज समजणें इ. स्वविरुद्ध प्रकार दृष्टीस पडतो. तरी आतांशा कुठें, युरोपियनशीं, यांकडें आल्यानें, स्वाभिमानाचें थोडेंसें वारें थोड्या यांकडे आलेल्या खिस्तीयनाच्या अंगीं खेळूं लागलें आहे म्हणजे दृष्टि बाहेर होती, ती अंतर्मुख होऊं लागली आहे इतकेंच नव्हे, तर ज्याप्रमाणें इंग्लिश हिंदुस्थानांत हिंदुमुसलमानांच्या एकोपा झाला आहे, त्याप्रमाणें आम्हीही–हिंदु व खिस्तीयनानीं मिळून- इकडे केला पाहिजे, असें खिस्ती लोकांतील कांहीं युरोपियनशीं यांकडे आलेले तूर्त म्हणूं लागले आहेत! तरी ज्यांची दृष्टि अजून अंतर्मुख झाली नाहीं व जे अजून बहिर्मुखच आहेत, असे पाद्री येरोस्स सारखे लिसेव सेंत्रालांतील खिस्ती प्रोफेसर मात्र हिंदूशीं फडकून वागत आहेतच! अशा ह्या 'प' कारभिमानीं लोकांकडून देशोन्नति होईल काय! मग हा सर्व वाणी–लेखनाचा फुकट बोभाटा कां?

स्वदेश, स्वसमाज व स्वधर्म यांचा ज्यांना अभिमान नाहीं, त्यांचा पढतमूर्खपणा कशाला हवा? तिकडे इंग्रज हिंदुस्थानांत खरे देशभक्त म. गांधी सांगत आहे म्हणून आम्ही इकडे गांधी टोपी वापरावी. खरें आहे; पण नुसती गांधी टोपी वापरूनच काम भागत नाहीं. तर तिजबरोबर इतर गांधी पेहराव असला पाहिजे गांधी खाणें खाणें पिणें असलें पाहिजे, गांधी आचार विचार असले पाहिजेत गांधी धर्म असला पाहिजे. एकंदरींत सर्व गांधीमय म्हणजे 'स्व' मय झालें पाहिजे, तरच गांधींच्या टोपीचा विजय म्हणावयाचा! न पेक्षां नुसता प्रदर्शनी देखादेखीचा प्रकार का? तो नको आहे. 'स्वधर्मे निधनं श्रेयं। परधर्मे भयावहः॥' हें गीता वचनच खरें व तें सर्वांनीं लक्ष्यांत ठेऊन याप्रमाणेंच आपलें वर्तन ठेविलें पाहिजे. आणि तेव्हांच मोक्षाची–स्वतंत्रता स्वराज्य यांची प्राप्ति होईल. म. गांधींचा उपदेश खोटा नाहीं.

रीस सारख्या संस्थेची वाटणारी उणीव, श्री. शिवाजी महात्मे, शांताराम सरदेसाई, राम नाईक वगैरेंच्या खटपटीनें भरून निघाल्याबद्दल हे व संस्थेचे इतर नामांकित वजनदार व सुधारणाप्रिय गृहस्थ सर्वथैव स्तुतीस पात्र आहेत. सुधारणेचें केंद्रस्थान अशा पणजी शहरांत उपरिनिर्दिष्ट संस्था दिवसेंदिवस भरभराटीस आल्याशिवाय रहाणार नाहीं, अशी उमेद वाटते. ती सार्थ होवो, अशी परमेश्वरापाशीं करुणा भाकतों.

मुरगाव शिक्षण संघ

गेल्या साली 'मुरगांव शिक्षण संघ' या नावांची एक विद्याप्रसारक संस्था या शहरामध्यें स्थापन झाल्याची माहिती आपल्या वाचकांना असेलच. सदरहु संस्थेमार्फत यंदां सरस्वती पूजनाचा समारंभ गेल्या ७ तारखेस करण्यांत आला होता. या समारंभाच्या दुसऱ्या दिवशीं श्री सरस्वती देवी समोर, श्री. दो. सुभाय विठ्ठल प्र. देसाई यांचें १॥ तास पर्यंत फारच गंभीर उपदेशपर व परिणामकारक असें 'सुखाची गुरुकिल्ली' या विषयावर प्रवचन झालें.

प्रथमतः सरस्वती पूजनाची आवश्यकता व महत्व तसेंच तें करण्याची खरी पद्धति अर्थात विद्याव्यासंग होय. असें सांगून रा. देसाई म्हणाले, आज जगामध्यें सुखाच्या प्राप्तीकरितां प्रत्येक मनुष्य खटपट करीत असतो. परंतु त्याच्या अनुभवाला तें सुख मुळींच येत नाहीं किंवा आले तरी ते फारच कमी प्रमाणावर येतें हें कशामुळें? तर मनुष्य मात्राला जसजशी सुखाच्या सोयी व पैशाची अनुकूलता प्राप्त होत असते तसतशा त्याच्या गरजा व त्यांबरोबरच नवीन आशा वाढत असतात. आणि गरजा वाढूं लागल्या म्हणजे मनामध्यें अस्वस्थता वाढूं लागते. स्वस्थतेचा अभाव झाला म्हणजे सुख आपणापासून पळून जातें व आपण नेहमी चिंतामग्न व दुःखी होऊन जातों. या चिंतेतून व दुःखांतून आपली मुक्तता करून घेणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य होय. समजा, फदाम भक्षण करणारा व जाडीं भरडीं वस्त्रें परिधान करून आपला जीवनक्रम समाधानानें व आनंदानें अर्थात सुखानें चालणारा एक शेतकरी आहे व मोठमोठ्या चैनीमध्यें आयुष्य घालणारा व आपल्या चैनी भागविण्यास आपणाकडे भरपूर पैसा नाहीं याबद्दल दुःख करणारा एक धनाधीश आहे. या उभयतांमध्यें प्रचलित कल्पनाप्रमाणें सुखाचें सर्वसाधन जो पैसा त्या पैशाचें फारच मोठें अंतर आहे असें असतांहि तो शेतकरी या धनाढ्य गृहस्थापेक्षां खरोखरच सुखी असतो. यावरून असें सिद्ध होत आहे कीं, विपुल पैसा मिळवणें हेंच कांहीं सुखाचें लक्षण नव्हे. सर्वच लोकांच्या सुखाच्या कल्पना कांहीं एकच नसतात. व त्या कल्पना जरी भिन्न भिन्न असूं शकल्या तरी साधनप्राप्तीच्या दृष्टीनें त्या मनुष्याला दुःखालाच कारणीभूत होत असतात. याचें खरें कारण म्हटलें म्हणजे एक तर आपल्या परिस्थितीप्रमाणें मिळेल त्यांत संतुष्ट असण्याच्या समाधान वृत्तीचा अभाव आणि दुसरें उत्तरोत्तर वाढणाऱ्या गरजा आपल्या गरजा शक्य तितक्या कमी करणें आणि दुसऱ्यांच्या सुखाविषयीं वाटणारा मत्सर व तज्जन्य विकार नाहींसे करून चित्तामध्यें समाधान ठेवणें हेंच खऱ्या सुखाचें लक्षण होय. संसारामध्यें उत्पन्न होणाऱ्या संकटांच्या वेळीं धैर्य धरणें भूतमात्रांकडे प्रेमाचें वर्तन करणें आणि शुद्ध भावानें ईश्वराच्या ठिकाणीं निष्ठा ठेवून आपल्या स्थितीबद्दल अस्वस्थ न राहतां चित्ती असों द्यावें समाधान या उक्तिप्रमाणें आपलें वर्तन ठेवणें हीच 'सुखाची गुरुकिल्ली' होय. इत्यादि—

दुसऱ्या दिवशीं सकाळीं शाळेचे शिक्षक रा. स. जयवंत पां. देसाई यांनीं मुलांना फार सुंदर व उपयुक्त असा उपदेश केला आणि नंतर सरस्वतीचें विसर्जन थाटानें करण्यांत आलें.

एक प्रेक्षक

ANO VI — NUMERO 32 — 1921 QUEPEM QUINTA-FEIRA 3 DE NOVEMBRO

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai

Assinatura
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............. 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें.] केपें, गुरुवार, तारीख ३ माहे नव्हंबर सन १९२१ [अंक ३२ वा.

TRES TANGAS

Nunca nenhum imposto foi tão mal recebido como o de entrada e saida para dentro e fóra da Provincia-o de *tres tangas*.

Todo o imposto é, por via de regra, mal aceito, sobretudo quando o contribuinte alie á ignorancia da razão de ser de tributos a dificuldade da vida, facto que geralmente se observa no meio em que a instrução deixa muito a desejar.

Com o imposto de *tres tangas*, porem, o caso muda de figura...para pior. Ainda o elemento ilustrado, conhecedor perfeito da sua obrigação de ajudar a maquina administrativa na proporção de seus haveres, estabelecida pelo Estado por sua intervenção, como cidadão proprietario, como iamos dizendo, ainda o elemento ilustrado considera-se insultado por tal imposto de *doze poiçàs...e pico*.

Não è uma afirmação que atiramos ao ar, sem alcance do seu peso. Náo. Ela é fundamentada, tanto mais que representa resultado da observação e analise directas.

E' verdade. Quando há dias percorremos, em objecto da propaganda civica, as aldeas que constituem o vasto e populoso concelho de Canacona, tivemos só a desdita de enchermos os ouvidos com os mais veementes protestos de indignação contra o referido infeliz imposto de *tres tangas*, rotados mais de corações ilustrados do que dos da classe iletrada. E-diga-se a verdade -voltamos da nossa excurção desagradavelmente impressionados pelo copioso chuveiro de pragas contra o tributo de *tres tangas* e contra os que concorreram para o seu lançamento.

Evidentemente, é máu tal sinal. E' mau ao Estado, é mau ao Povo, porque tanto este como aquele terão de, á má cara, aguentar consequencias de descontentamento publico, quando este as gere, o que-é, de resto, desnecessario acentuar,-desejamos que não suceda, para não termos que lamentar mais desgraças.

Chamando, porisso, para o assunto a atenção de Sua Excia o Sr. Governador Geral e do Exmo Conselho Legislativo-e sem mais explicações que o caso absolutamente dispensa -esperamos que será, imediatamente, extincto o desastrada imposto de *tres tangas*, extinção que se impõe para o bom nome do nosso governo e para o do Paiz em que vivemos.

Resultarão disso *prejuizos* ? Que o Governo os supra pela imposição de quaisquer novos impostos menos sensiveis e mais humanos.

Por quem é, acabe, porem, já com o de *tres tangas*.

ECOS & CRITICA

Deus salve Portugal

Impressionaram-nos tristemente os ultimos acontecimentos que se desenrolaram no agitado seio da Metropole, pondo tetrico fecho ás existencias utilissimas daqueles que, já pelo seu passado sem macula, já pelo seu prometedor futuro personificavam a gloria da Republica, legitimo orgulho de Portugal.

Mataram a Machado Santos, fundador da Republica. Tiraram, cruelmente, vida a Antonio Granjo. Inutilisaram mais algumas existencias importantes... Ninguem sabe o feliz dia em que uma paz sólida e duradoura se estabelecerá na outrora florescente Patria de Luis de Camões; ninguem sabe a data aspirada e suspirada em que em Portugal voltará a ordem.

Estando nesta altura da presente local, chega-nos á máo uma nota de Administração do Concelho, concebida nos seguintes termos:-

Para essa redacção se dignar desmentir quaisquer boatos tendenciosos se comunica, de ordem superior e para sua ilucidação, que telegramas de Madrid, manifestamente suspeitos publicados nos jornais de Bombaim referindo acontecimentos passados na Metropole, trazem noticias que carecem absolutamente da confirmação.

A Repartição do Gabinete, por intermedio da Imprensa das Colonias tornará publicas informações oficiaes que for recebendo.

O nosso maior desejo é que se não confirmem as alarmantes noticias que nos transmitem os telegramas da *Reuter*.

E' que somos amigos sinceros de Portugal cujo progresso juntamente com o do nosso Paiz, foi e é a nossa eterna preocupação.

Deus salve, pois, Portugal !

Elucidando...

Noutro lugar encontrarão os leitores uma carta *elucidativa* do sr. Srinivassa Voicuntá Sinai Dempó, como resposta ao que lhe dissemos, comentando a sua epistola de 26 de Setembro findo.

Na mesma carta, o seu ilustre autor tenta mas em vão rebater as nossas afirmações, procurando a seu talente dar a certas palavras significados que convem a Sua Excia.

Bem quiseramos tira-lo do doce engano em que, segundo parece, o induziram os do séquito para seus fins politicos; mas Sua Excia considera como findo o assunto, não *desejando mais replica nem treplica* sobre ele. Temos, porisso, de, forçosamente, desistir do nosso inocente proposito.

Permita-nos, no entretanto, a franquesa de lhe declararmos que o sr. Dempó gastou inutilmente o fosforo para no final de contas e á moda da escusa de mau pagador dizer em publico e raso que não queria ser socio do *Sangh*, o que logo ao principio podia ter feito sem mais espalhafato de que, mal aconselhado lançou, precipitadamente, mão-supomo-lo - naturalmente, com o intuito mal mascarado de depreciar o mesmo *Sangh* no meio que o não conheça.

Pode, porem, o sr. Dempò estar certo que foi redondamente ludibriado por quem o persuadiu de que com tais processos conseguiria enfraquecer a já sólidamente e *difinitivamente* instalada associação de *Pragatica Sangh* cuja força teve o publico a ocasião de aquilatar, quando de ultimas eleições, em que a ilustre familia do sr. Dempò com os do seu grupo, *patriotas desinteressados*, opuseram-nos guerra sem treguas...

Mas, como o carvão por mais que se lave com agua limpa, nunca perde a sua negrura, assim parece nos que nunca seremos capazes de tirar a sua excia, da sua confusão por mais fundamentados argumentos que lhe ofereçamos...

Mas iamo-nos esquecendo: *dos grandes tudo è grande*.

E fique o sr. Dempó na sua *arcaica grandesa*, que pelo menos assim não será apoquentado por certos *bajulado res*, que tem por habito inveterado de sacrificar no altar de seus interesses estomacais-vejam a historia da politica *passada*-individuos inocentes mas com bastos meios...

Voltaremos oportunamente a isto não para replica ou treplica mas para explicações necessarias...para a sciencia do publico e consciencia do sr. Dempó e dos que o cercam *pro domo sua*.

Incompreensivel!

O Governo local concedeu autorização a um professor do Liceu Central Afonso d'Albuquerque para á, custa de finanças publicas, ir aperfeiçoar-se ou *especialisar-se là fora* nas materias que constituem a sua disciplina que no caso é o desenho.

Perguntamos: ¿Porquê é que o Governo não escolheu, entao, um professor, já *aperfeiçoado* ou *especialisado* no desenho para não obrigar o actual á maçadas de viagem e o Estado não ter que gastar agora somas importantes de dinheiro ?

Amanhã, o professor de Sciencias naturais, ou qualquer outro, igualmente desejará *aperfeiçoar-se* ou *especialisar-se* nas suas *especialidades*. E o Governo para ser coerente terá forçosamente de acceder-lhes ao desejo.

Que é isto ? Francamente o não compreendemos !

Insuportavel

Não sabemos o motivo, porque o sr. administrador do concelho protela despachar pretenções de licenças para corte de lenha nos predios particulares, concorrendo, assim para os interessados sofrerem danos incalculaveis.

Consta-nos que pela ausencia de quem imforme as mesmas pretenções, o sr. dr. Antão fica obrigado á pôr pedras sobre elas.

¿ Com que, então, o público deve pagar as favas por culpa dos outros ?

Rialmente, è insuportavel tudo isto, sobretudo, porque contribui para o descredito da administração de nossos negocios publicos.

Chamamos para o assunto a atenção de Sua Exa sr. Governador Geral para que se digne determinar que sejam imediatamente despachados os pedidos de licenças para corte de lenha, pendentes, há já algum tempo.

माणांत येऊं लागतात तसतशीं तीं सहन करण्याची समाजाच्या अंगांतील शक्ति व त्यांपासून आपला बचाव करून घेण्याची युक्ति व मार्ग हेहि अधिक प्रमाणांत कळूं लागतात. आणि संकटें, अडचणी हीं मधून मधून उत्पन्न होत असलीं तरच एकंदर कार्याची महती व मातब्बरी. त्यामुळें कालांतरानें त्याचें स्वरूप अधिक उज्वल होत असतें, कालांतरानें त्याला अधिक सौंदर्य प्राप्त होत असतें. त्यांत कितिहि अडचणी किंवा संकटें आलीं तरी फिकीर नाहीं. सद्हेतूनें प्रेरित होऊन निःस्वार्थ व परोपकारबुद्धीनें सत्कार्यें व आपलें कर्तव्य करीत राहणारांचा परमेश्वर साह्यकर्ता आहे. दीनांचा, अनाथांचा, अनन्य शरणागतांचा, भक्तांचा तो कैवारी आहे. तो मार्ग दाखवील, आलेल्या संकटांपासून संरक्षण करील, इष्ट स्थळीं नेऊन पोंचवील. मात्र समाजानें व त्यांतील कार्यकर्त्या व्यक्तींनीं आपलें कार्य पवित्र अंतःकरणानें, सद्बुद्धीनें व एकनिष्ठपणें करीत राहिलें ह्मणजे झालें. कार्यांत जी एक शक्ति निर्माण होते, जें एक अतर्क्य दिव्य तेज उत्पन्न होतें तें यांच्याचमुळें. या शक्तीपुढें या तेजापुढें संकटें हतवीर्य होतात. त्यांचें चालेनासें होतें; यशःप्राप्ती होते, सत्कार्यें सिद्धीस जातात. नीच मनोवृत्ति, ढोंगीपणा भोंदूपणा, खरी कळकळ व निस्वार्थी प्रेम यांचा अभाव, नसता गर्व, भलता ताठा, वैयक्तिक व अनीतिमूलक धनतृष्णा, नुसत्या मानमान्यतेची फुकट हांव, अंगीं पात्रता नसतां व [illegible] नसतां सत्ता गाजविण्याची अनिवार घातुक इच्छा हीं सत्कार्यांत येणारीं विघ्नें होत. समाजावर ओढवणाऱ्या आपत्ति होत. कार्यनौका उध्वस्थ करून टाकणारे हे अदृश्य सुरंग होत. यांच्यामुळें उच्च विचार, उदात्त तत्वें व पवित्र ध्येयें यांचा लोप होऊं लागतो, तीं दडपलीं जाऊं लागतात. यांच्यामुळें समाजांत नस्ते घोटाळे व नस्ती अंदाधुंदी माजून रहाते; तो विस्कळित होतो, तो हतवीर्य होऊं लागतो; त्याचें तेज धमी धमी होऊं लागतें, कित्येक प्रसंगीं वरून वरून जरी त्याची प्रगति होत आहे असें दिसत असलें तरी न कळत तो अधोगतीला जात असतो. परिणामी त्याला दुःखच भोगावें लागतें यांच्यामुळें समाजाच्या वाढीला जबरदस्त धोका पोंचून ती खुंटली जाऊं लागते. य इच्छेनें जीं कांहीं थोडीबहुत वाढ होईल. तीही, रोगट, पापी व निसत्व अशीच होईल आतां हें खरें आहे कीं, आपल्या कर्तव्याप्रमाणें वागावयाचें, महत्कृत्यें पार पाडावयाचीं व चांगल्या गोष्टी घडवून आणावयाच्या ह्मणजे भोंवतालची परिस्थिति सदैव स्फूर्तिदायक व उत्साह जनकच असेल असें नाहीं. ती कधीं अनुकूल तर कधीं प्रतिकूल अशीच असणार. कार्याला उपयुक्त असणारीं साधनें वेताआंतचींच असतात. कित्येक प्रसंगीं तर त्यांचा अभावच असल्यामुळें तीं नवीन उत्पन्नच करावीं लागत असतात, किंवा असलेल्या साधनाचाच काळजीपूर्वक व मोठ्या शिताफीनें उपयोग करून घेणें जरूर असतें. द्रव्यबळ व मनुष्यबळ यांची कधीं ढणीव भासत नाहीं असें बहुधा क्वचितच होत असतें. कार्याम[illegible] जो वारंवार कमीपणा येत असतो, त्याचें तरी हींच बलवत्तर कारणें होत. भोंवताल[illegible] समाजामधून व स्नेही मंडळीकडून जितकी व ज्या प्रकारची मदत मिळणें अवश्य असतें तितकीच ती मिळणें हें काम फारच श्रमाचें असतें. महत्प्रयासानेंच साध्य होणारी ती गोष्ट आहे. हातीं घेतलेल्या विषयाचें योग्य, खरें व सांगोपांग ज्ञान झालेलें असावयास पाहिजे. वस्तुस्थितीचें विचारपूर्वक पूर्ण आकलन झालेलें असावयास पाहिजे. नाहींतर त्याच्या अभावीं हातून भलताच अयोग्य, निरुपयोगी अगर विघातक गोष्टी घडण्याचा बराच संभव असतो. त्याचप्रमाणें कार्याच्या दृष्टीनें अवश्य असणारी योग्य शिस्त व इष्ट असलेला सुव्यवस्थितपणा व सुसंघटितपणा यांच्या अभावींहि कार्य अडखळूं लागतें, बिघडूं लागतें. प्रसंगीं इष्ट फलप्राप्ति तर बाजूलाच राहिली, पण नसती संकटपरंपरा हरीक ओढवण्याचा संभव असतो. परंतु या सर्व गोष्टी साध्य होऊन कार्याचा योग्य प्रकारें उठाव होणें ह्मणजे कांहीं लहान सहान गोष्ट नाहीं. हें कार्य बऱ्याच श्रमाचें व दगदगीचें असून त्याला बऱ्याच वर्षांचा अनुभवहि लागत असतो. शुद्ध ज्ञान व बऱ्याचशा वर्षांच्या तपश्चर्येचीहि याला भर घालावी लागते. आणि जर एखाद्या कार्याला कांहीं थोडक्या मंडळीनीं कां होईना पण वाहून घेतलें असेल, त्यांवर त्यांची निष्ठा असेल, प्रेम असेल, भक्ति असेल, त्याकरितां अंगीं अवश्य असणारें सामर्थ्य कमाविलें जाईल, योग्य मार्गानें प्रयत्न केले जातील, तर त्यांत यश आल्यावांचून रहाणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर तेणेंकरून समाजाची उन्नति होईल, भरभराट होईल, तो मान्यता पावेल. सुखसमृद्धि त्याच्या दासी होऊन राहतील."

स्फुट विचार

पोर्तुगालांत बंडाळी:—गेल्याच्या मागील आठवड्यांत पोर्तुगालांत मिलिटरी स्वरूपाचें बंड होऊन, रिपब्लिकचे आद्य संस्थापक माशादु सांतूस, शेवटच्या प्रधान मंडळाचे लोकप्रिय अध्यक्ष व इतर कांहीं नामांकित व लोकांच्या दृष्टीसमोर झळकणारे पुढारी अत्यंत शोचनीय रीतीनें सदरहू बंडाचे भक्ष्यस्थानीं पडले! रिपब्लिकच्या स्थापनेपासून हें बंड पहिलेंच जरी नसलें, तरी या खेपेला जितके सन्माननीय लोक मृत्यूमुखीं पडले, तितके यापूर्वी कधींच पडले नाहींत असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. व याच कारणामुळें इकडे शेवटच्या गडबडीमुळें बरीच चळवळ उडाली. या नूतन बंडापासून निष्कर्ष निघतो तो इतकाच कीं, पोर्तुगाल देशांतून शांतता देवीनें धूम ठोकली असून, तेथें कोणकोणते नवीन पण अनिष्ट प्रकार यापुढें घडून येतील, याचें भविष्य वर्तविणें फार कठीण आहे! कांहीं राजकारणी गृहस्थांचें ह्मणणें तर असें आहे कीं, शेवटच्या बंडांत 'बोलशेविस्त' लोकांचें बोट असल्या वरून वरील सारखे अनन्वित खून पाडले गेले! कसेंहि असो पोर्तुगालचें राजकीय वातावरण चांगलें नाहीं, हें खास.

प्रागतिक संघः—काणकोणच्या सारस्वत व क्षत्रीय मराठे तरुणांच्या अविश्रांत परिश्रमानें तेथें प्रागतिक संघास बरेच मेंबर मिळाले असून त्यांच्या संख्येंत दिवसेंदिवस उत्साहजनक भर पडत आहे, ही आनंदाची गोष्ट होय. आयत्या पीठावर रेघा ओढून फावल्या वेळांत आत्मघातकी 'फोयत्यानें' बंगावर वार करण्याचा कितीहि श्रीमंती प्रयत्न झाला, तरी तो सांप्रतच्या मन्वंतरांत कसा निष्फल होतो, याचें ताजें प्रत्यंतर कोणासहि पहावयाचें असल्यास त्यानें काणकोण पर्यंत एक फेरफटका करून यावा, अशी आमची त्यास सूचना आहे. बाजाद्यांच्या नावांवर जनतेंत दिशाभूल करण्याचा काळ केव्हांच संपला असून सध्याचें युग हें केवळ विचारस्वातंत्र्याचें आहे, हें मारून मुटकून राजकारणी बनूं पहाणाऱ्या प्रतिष्ठित लोकांनीं ध्यानांत ठेवल्यास, त्यांना त्यापासून बराच फायदा होणार आहे, अशी आमची प्रामाणिक समजूत आहे. संघाच्या अभ्युदयाप्रीत्यर्थ झटत असलेल्या काणकोणच्या तरुण क्षत्रीय मराठे व सारस्वत या उभय वर्गांचें आह्मीं साभारपूर्वक अभिनंदन करितों.

निनावीं पत्रेंः—'गोव्याचा' या सहीनें आह्मांला एक निनावीं लांबलचक पत्र आलें असून, त्यांत अदृश्य लेखकानें एका विशिष्ट हेतूनें आपल्या विचाराचे तारे सनमुराद तोडले आहेत. गेल्या कांहीं वर्षा मागें आह्मांस सदरहू पत्राच्या नावाच्या पेंच एका गोमांतकीय 'पुणेरी येलींगकराचें' भलें लांब पत्र आलें होतें. तें अझून पर्यंत आमच्या टेबलावर असून, त्याचा केवळ मजेखातर उपयोगहि केला जाईल. वरील नमून्याचीं आह्मांस प्रत्यहीं नवीन नवीन पत्रें येतच असतात; परंतु त्यांच्या प्रकाशनापासून मजेशिवाय दुसरा कसलाहि अर्थ निघणें शक्य नसल्यावरून, योग्य प्रसंगीं त्यांचा विचार केला जाईल, इतकेंच आह्मांस आज आमच्या निनावीं परिचितांस सुचवावयाचें आहे. केवळ झाडाआड राहून मजेखातर गाळीवारानें हिंसा करण्याचा अधर्म आह्मांला मान्य नाहीं, हें अर्थात उघड सिद्ध होतें.

काणकोणांत प्रवचनें:—पूर्वी प्रसिद्ध केलेला प्रवचनाचा कार्यक्रम योग्य रीतीनें पार पडला. शिवाय 'बालबंधु समाजाच्या' आग्रहानरून एक प्रवचन जास्ती झालें. लोकजागृतीच्या कार्यास हातभार लावण्याच्या उद्देशानें मडगांवचे रा. पुंडलीक वामन विर्जिनकर यांसहि मुद्दाम काणकोणांत नेण्यांत आलें होतें. रा. विर्जिनकरांच्या विचारपरिप्लुत व जोरदार व्याख्यानांशिवाय, रा. दत्तत्रय पुंडलीक गांयतोंडे, रा. विष्णु भट साने, वासुदेव लक्ष्मण राजाध्यक्ष, यशवंत भेंडे, दत्तात्रय रामकृष्ण दलाल व शंकर शेणवी नगर्सेकर यांचीं मुद्देसूद भाषणें झालीं. एकंदरींत काणकोण महालांतील निस्वार्थी लोकांच्या प्रेमळ मदतीनें प्रवचनाचा आठवडा तेथें मोठ्या उत्साहानें पार पडल्याबद्दल समस्त काणकोणकर बंधूंचे आह्मीं फार फार आभारी आहों.

वर्तमानसार

—कुंभारजुवें येथील श्रीशारदाविद्यालयांत श्रीशारदोत्सव साजरा करण्यात आला. त्यांत ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर महाशय रामचंद्र कृष्ण कामत चंदगडकर वे. शा. सं. अनंत यज्ञेश्वर धुपकर, पो. सांरवडेंकर, प्रो. भरणे, रा. प. पां. दलाल. रा. सामंत यांचीं व्याख्यानें झालीं. बालस्वयंसेवकांची कामगिरी वाखाणण्याजोगी होती एकंदरींत उत्सव फार उत्साहपूर्ण व भाविउन्नति सूचक झाला. सदर उत्सवांत फटाक्यांस पूर्ण बहिष्कार घातला होता.

जाहिर विनंति

ज्या थोर विभूतीनें इस्लामि धर्मवेडाच्या काळांत कोसळलेलें हिंदूंच्या धार्मिक व राजकीय जिनिल्यावरचें गंडांतर स्वपराक्रमानें टाळून प्रत्येक हिंदु ह्मणविणाऱ्या गृहस्थांच्या सदैव आदरयुक्त स्मरणास स्वतःस पात्र करून घेतलें त्या परमपूज्य श्रीशिवरायांची ओळख करून देण्याची मुळींच आवश्यकता नाहीं.

हिंदु, या सदराखालीं येणारी कोणतीही व्यक्ति, मग ती स्त्री असो अथवा पुरुष असो, ब्राह्मण असो किंवा अब्राह्मण असो, सद्यः ब्रिटिश अमलाखालीं नांदणारी असो, अगर पोर्तुगीज नागरिकत्वाचा उपभोग घेणारी असो श्रीशिवबांच्या उपकारकक्षेंतून तिला अलग राहतां येणें शक्य नाहीं. कारण हिंदुधर्मसंरक्षण व श्रीशिवाजी, यांचा इतका आत्यंतिक मिलाफ झालेला आहे. हें कोणासच सांगण्याचें कारण नाहीं. इतकें तें प्रत्येक हिंदपुत्राच्या अंतःकरणांतून बिंबलेलें आहे. आजच्या जगांतील अत्यंत थोर अशा ब्रिटिश साम्राज्याचे युवराज प्रिन्स ऑफ वेल्स, ह्मणजे हिंदुस्थान देशाचा सद्यःचा विदेशीय व विजातीय भावी स्वामी यांच्या हस्तें, स्वराज्यसंस्थापक व स्वधर्म संरक्षक श्रीशिवाजी यांच्या स्मारकाची कोनशिला बसविण्याचा अत्यंत व अभिनंदनीय समारंभ पुणें येथें येत्या नव्हेंबरच्या १९ तारखेस साजरा होणार आहे. गोमांतकवासीय हिंदूंनीं या समारंभाकडे, आमच्या मतें, दोन दृष्टीनीं पाहणें अवश्य आहे. त्या दोन दृष्टि ह्मणजे, श्रीशिवराय हे हिंदुधर्म व हिंदुसंस्कृति यांचे वंदनीय रक्षक होऊन गेले असल्यामुळें त्यांच्या होत असलेल्या स्मारकाबद्दल वाटणारा साहजिक आनंद व आदर दृष्टि ही एक, व ब्रिटिश सरकार हें आह्मां पोर्तुगीज नागरिकांचें मित्र सरकार असल्यामुळें त्या सरकारचे भावी राजे प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हस्तें होऊं घातलेला एतद्देशीय स्वराज्य संस्थापक श्रीशिवराय यांच्या स्मारकाबद्दल वाटणारी संसारणीय मित्रभावि दृष्टि, ही दुसरी.

एवंच गोमांतकस्थ शिवभक्तांनीं, अखिल हिंदुस्थानासाठीं पुणें येथें होत असलेला श्रीशिवाजी राजे यांच्या स्मारकाबद्दल, आदर दाखविणें दोन्ही दृष्टीनीं योग्य आहे हें कोणाच्याही लक्ष्यांत येण्यासारखें आहे.

तेव्हां ज्या कोणाची उपरनिर्दिष्ट समारंभास पुणें येथें हजर राहण्याची इच्छा व सयारी असेल त्यानीं नव्हेंबरची ७-८ तारीखपर्यंत खालीं सही करणार याकडे कळविण्याची मेहरबानी करावी. तसेंच ज्या कोणास श्रीशिवरायांच्या होणार असलेल्या प्रचंड स्मारक कार्यांतील, या आपल्या प्रांतामार्फत, अल्पस्वल्प तरी कामगिरी व्हावी असें वाटत असेल त्यांनीं आपापल्या शक्त्यनुसार जी कांहीं आर्थिक मदत पाठवितां येईल ती पाठविल्यास आदरपूर्वक स्वीकारण्यांत येईल. तसेंच कांहीं व्यवहार्य सूचना आल्यासही त्यांचा आस्थापूर्वक विचार केला जाईल.

लोकांकडून येणाऱ्या सूचना, डेप्युटेशनमध्यें भाग घेणाऱ्यांची संख्या व तयारी, श्रीशिवभक्तांकडून होणार असलेली आर्थिक मदत वगैरे लक्षांत घेऊन नव्हेंबरच्या ८ तारखेस पुढचा कार्यक्रम ठरवून, समारंभास हजर राहणार असलेल्या गृहस्थांस तपशीलवार कळविण्यांत येईल.

गोवा–फोंडा–बांदिवडें, ता. २२-१०-१९२१

सर्वांचा नम्र सेवक
नारायण अ० शे० बांदिवडेकर
डायरेक्टर आल्मैद कॉलेज
श्री. शि. स्मा. क. एक घटक

Ano VI — Numero 33 — 1921 Quepem quinta-feira 10 de Novembro

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai

Assinatura
India Portuguesa...... 3-00-00
India Inglesa............ 3-08-00
Numero Avulso.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें.] केपें, गुरुवार, तारीख १० माहे नव्हेंबर सन १९२१ [अंक ३३ वा.

PARA A HISTORIA...

Dum velho e experimentado cavalheiro que se encobre sob o seudonimo de *Finorio* recebemos a seguinte carta que de bom grado publicamos neste lugar:

Sr. Director do *Bharat*

As cartas do sr. Srinivossa V. Sunta Sinai Dempó e as respostas que V. lhes deu, espevitaram-me o prurido de rabiscar, *ao correr do pelo* estas desataviadas linhas cuja publicação peço a V. encarecidamente.

Eu conheço, sr. Director, a ilustre familia Dempó; tive, mesmo, a oportunidade de, quando ainda novo, apreciar de perto as belas qualidades do extincto *Barão* da mesma familia e porisso posso afirmar a V. que nas referidas cartas *de oposição ao Pragatica Sangh* o sr. Dempó *agiu passivamente* para ser util a um do seu séquito-desbul, ou na adopção do termo de V... o qual do tal sequito alberga no seu ambicioso coração a cronica esperança de, por intermedio do *simbolo indiano*, avolumar o grupo de professores do Liceu Central.

Eu me explico milhor, sr. Director; o actual representante-administrador da familia Dempó pediu, há já muito tempo, ao sr. Prazeres da Costa, o favor de meter no Liceu de Nova-Goa ao tal do sequito albergando no seu coração a *cronica* esperança (medicamente falando) de ser *magister*, pedido que o mesmo sr. Costa tem prometido concretisar...

Ora, como o *Pragatica Sangh*, de ultima vez, não apoiou a candidatura do referido sr. Costa para deputado ou antes guerreou-a, o que naturalmente deve te-lo incomodado, era preciso que o sr. Dempó, para que o seu importante pedido não *partisse* qualquer *cobra* (valha-nos a sciencia de parto), mestrasse, custasse o que custasse a sua ... operação com o mesmo *Sangh*... E é o que sucedo.

Na India é grave o mal do empregomania. Por causa do emprego vende se aqui o caracter, sugeitando-se a toda a casta de humilhações. Eu vi um funcionario de fazenda guardar cabras e colher predios do seu superior hierarquico. Surpreendi-o até em companhia doutro nas conquistas nocturnas.

Toda a regra tem excepção. Há portanto empregados indipendentes. O *Pragatica Sangh* deve contar com o apoio destes ultimos, procurando isolar-se dos *animais ...racionaes* da primeira especie.

Já vê, por consequencia V. o motivo das cartas do sr. Dempó opondo-se ao *Sangh*. Mais detalhes se preciso for, da-los-hei a V. oportunamente.

Nova-Goa 5/11/921 — De V. *Finorio*

Parece que o sr. *Finorio* bebe de *fino* nas regiões palacianas do sr. Dempó. Por hoje, limitamo-nos a registar *para a historia* a carta do sr *Finorio* sobre a qual bordaremos as nossas considerações oportunamente. E o caso não é para menos certamente.

Até breve, pois,

Em legitima defeza

Sr. Director do *Bharat*.

Após um mez e meio surge no apreciado jornal que V. superiormente dirige, uma carta tentando, mas em vão, como bem diz V. rebater o que eu disse no meu artigo Educação e Instrução. Santa demora, sr. Naique para afinal *nurem parere*!!

Eu, sr. Director, limitar-me hei a responder a parte que me diz respeito. V. com superior criterio com que criteriozamente encara todos os negocios, dirá de sua justiça.

Antes de mais lamenta o sr. Naique que eu seja um genuino portuguez não produzindo provas suficientes que calassem no seu animo. Ora eu achava ser mais que bastante o que disse em abôno das minhas assetções; mas já que não foi suficiente, eis-me aqui rogando mais uma vez a V. um cantinho do seu jornal.

O sr. Naique certamente não sabe o que se passou no comicio de Margão que pediu a elevação em questão. Do contrario não teria dito que, em principio, ela tem razão de ser.

O sr. Bras da Costa que não é nenhum pedaço de asno, propôs que fosse pedido ao sr. Ministro das colonias a elevação do Liceu Municipal a Nacional, *sendo preenchido o quadro dos professores após concurso por provas praticas*, condição sem a qual não queria a elevação.

Não haja duvida que o sr. Brás da Costa disse muito em muito poucas palavras. Ele sabe que é nocivo ao ensino e educação uma criatura como o sr. Cota Cruz que diariamente afirma que o professor só se faz com a pratica, afirmação que o sr. Naique perfilha.

Francamente, sr. Director não percebo o que isto seja. Ou bem que o sr. Cota Cruz sabe ou não sabe. Se sabe não há mais necessidade de pratica. Se não sabe, outro rumo.

Que um professor adquire mais conhecimentos com a pratica é certo. Dahi a dizer que um professor só se faz com a pratica, vai uma grande distancia. Em nenhum estabelecimento há professores que verdadeiramente o serão só no seculo seguinte após a pratica para a qual são precisos ao menos 100 anos á horrenda, fera, ingente e temerosa cabeça do sr. Cota Cruz.

E' bem notorio que, muitas vezes o governo manda para o extrangeiro homens que se especializem neste ou naquele ramo. Seguindo o criterio dos srs Cota Cruz e Naique bem podia o governo economizar uma bôa soma esperando que eles se especializassem com a pratica.

O concurso por provas praticas, publicas ate aqui tem dado resultados satisfatorios e para prova tem o sr. Naique o sr. Pe. Excelso d' Almeida que no primeiro ano da sua carreira era já senhor da materia de Geografia e Historia, os srs. professores agregados ao Liceu Central vindos de Margão, etc. As nomiações de confiança de ministro que sobre não darem resultados bons são perigosissimas ao ensino e educação incidem geralmente em pessoas incompetentes e para prova lá tem o sr. Augusto Monteiro, um rapazola dos seus 21 anos a educar e instruir sem saber portugues, homens dos seus 27 a 28 anos que não faltam no Liceu, o sr. Cota Cruz suspirando pela pratica para ser professor que salve, ao menos, a aparencia pois ele não percebe patavina da Geografia e Historia a ponto de dizer ao que me consta em resposta a um aluno que não podera dizer de pé para mão onde ficava situada a Lombardia a não ser com muita pratica.

Toda a gente sabe que as primeiras nomiações são de confiança do ministro e como geralmente este despacha cruzes não é aceitavel em principio a elevação como se disse no proprio comicio.

Alem das razões acima expostas leia o sr. Naique o que o ilustrado professor do Liceu sr. Dr. Benedito Gomes disse ao redactor do jornal A Provincia. E se não ficar satisfeito espere pela acta duma das ultimas sessões do Conselho Legislativo, em que o sr. Governador Geral falando de representação da India, disse que não sabia o que a India queria fazer com tantos estabelecimentos do ensino secundario quando não tinha nem uma escola superior bem montada..

O sr. Naique não sabe, como uns poucos de anos que a mocidade passa no Liceu, possam influir na sociedade. Ela finge ignorar o ditado que diz: *De pequenino se torce o pepino*

Eu acho que se deve pedir que seja melhorado o actual Liceu Central com um laboratorio em que se possa trabalhar, uma beblioteca etc. etc..

Eu acho que se deve melhorar e reorganizar o ensino normal. Eu acho que se crie em Margão um colegio de sexo femenino.

O que eu não quero é que se peça a elevação dum Liceu Municipal a Nacional, havendo tanta coiza por fazer de urgente necessidade.

O pior é que o Celestino levou a melhor, prometendo tudo, contanto que o fizessem senador. E depois de o ser criou alguns *lugarões*. Onde estaria o simbolo indiano?

Onde estaria o ratão que róe mensalmente bons mil reis no lugar de que se reclama a extinção?

E digam lá depois que o homem é patriota só porque com a sua influencia fossam a gaméla orçamental alguns parentes e amigos!

Eu não exijo que todas as vagas para lugares de professores do Liceu sejam preenchidas com homens como o sr. Messias Gomes. O que eu exijo, em prol da Patria futura, em nome da sciencia ultrajada, é que seja, desde já, desligado do serviço o sr. Cota Cruz, o qual só deve ocupar o lugar depois da pratica a qual deve fazer em casa e não á custa de algumas gerações.

Um sensato que não quer seu dinheiro disperdiçado antes de construir uma casa trata, por exemplo, de exterminar os ratos se os houver. Se o não poder deve escusar-se de construi-la, porque construindo corre o risco de cair, depois de algum tempo. Isto me ensina a minha velhice. O sr. Naique nem foi feliz numa comparação.

Cidadãos da minha patria!

Esforcemo-nos por exterminar esses ratões e ratinhos que roem os alicerces da Patria querida!! Eu me esforçarei, antes de mais, por calar este ratinho do Naique que me róe tempo e paciencia e

भारत

गुरुवार कार्तिक शु० १० मी. १८४३.

स्फुट विचार

"नारायणीय" जाहीर विनंतिः— केवळ 'विचार स्वातंत्र्याचें' प्रदर्शन व्हावें व तन्निमित्त श्रीशिवाजी स्मारकोत्सवाविषयीं गोमांतकीय लोकमताचा ठावहि पहाता यावा हा दुहेरी हेतूनें प्रो. नारायण बांदोडकर यांची 'जाहीर विनंति' आह्मी गेल्या अंकी 'जशाची त्शी' प्रसिद्ध केली होती, हें चाणाक्ष वाचकानीं ताडलेंच असेल. खुद्द पुण्यांतीलच केसरी, श्रीशिवाजी इ. वजनदार पत्रानीं ज्या उत्सवाविरुद्ध धूर्त नोकरशाहीच्या स्वार्थी व निलाजऱ्या लपंडावाची विस्तृत मीमांसा करून तीव्र बहिष्कार पुकारला, त्या नकली व बेअकली उत्सवाला 'भारता'ची काडी इतकी तरी सहानुभूति असणें संभवनीय आहे काय ! अर्थात् नाहीं. पण आमच्या इच्छेप्रमाणें, सदरहू "नारायणीय" जाहीर विनंतीच्या प्रकाशनानें, आमचे स्वाभिमानी प्रांतबंधु श्रीशिवाजी उत्सवाविरुद्धच नव्हे तर परदेशी युवराज स्वागताविरुद्धहि असून, या दोन्ही गोष्टींना सहानुभूति दर्शविणें त्यानां गोहत्ते इतकेंच पाप मूलक वाटत आहे असें 'वाचक,सामंत', 'चोरणी', 'मराठा', 'प्रताप', 'तरवार', 'खुदीराम', 'भोळा', इत्यादि गृहस्थांच्या जोरदार पत्रांवरू आह्मांस पहावयास सांपडलें, हें आह्मीं मोठें भाग्यच समजतों. आह्मांस वाईट वाटतें तें प्रोफेसर मजकुरांच्या 'पदल शहाणेपणाचें !. प्रो. नारायणरावांच्या राजकीय ज्ञानाविषयीं आमची कल्पना निराळीच होती; पण ती केवळ भ्रममूलक होती हें त्यांच्याच 'विनंतीनें' आतां सिद्ध केलें ! रा. बांदोडकरांचा 'स्वदेशाभिमान, (!) गाढीय कुतकाचे वडे खाण्यापर्यंत वोकाळलेला पाहून आमचें अंतःकरण तीळ तीळ तुटतें. थापुढें तरी ते सदरील सारख्या उपद्व्यापानें 'विचारस्वातंत्र्याच्या' शेखमहंमदी मनोराज्यांत शिरून नोकरशाहीच्या फाटक्या तुटक्या विजारीच्या स्वार्थी मैत्रीस हपापणार नाहींत व कल्पनेच्या भरारींचा 'विचित्र नाद' सोडून आपलें कर्तव्य बजावण्यांतच शक्तिसर्वस्व वेंचतील, अशी आह्मांस उमेद आहे.

न समजणारा आपल्या हिंदु समाजांत तरी एक सुद्धां मिळणार नाहीं. या करितां प्रत्येक हिंदुवासीयानें निदान एक तरी गाय बाळगावी. त्या पासून तोटा न होतां फायदाच होईल. आज कसायीखान्यात होत असलेला गोवध बंद करण्यासाठीं आपण तनमन धनें झटलें पाहिजे.

स्वराज्य मिळावें ह्मणून महात्मा गांधी व दुसरे अनेक देशभक्त सर्वस्वावर लाथ मारून उपदेश करीत फिरत आहेत हें आपल्याला माहित आहेच. स्वदेशी कपडा वापरा. स्वदेशी धंद्यास उत्तेजन द्या. दारू व चहा पिऊं नका. गाईची अखंड सेवा करा. इ.

वरील सगळ्याचें महत्व समजण्यास शिक्षणाची जरुरी आहे. ह्मणून सभ्य गृहस्थ हो, आपल्या मुलांमुलीनां शाळेंत पाठवा, हयगय करूं नका !

शिक्षण हेंच स्वराज्याचा ओ ना मा

पोर्तुगालची परिस्थितिः— शेंवटल्या बंडाचे यशस्वी कर्णधार सि. मारीय कुयेल्य यांच्या अध्यक्षतेखालीं नवीन प्रधानमंडळ बनून त्यानें आपल्या हातांत सर्व राजकीय तावा नियंत्रित केला होता, परंतु याहि प्रधानमंडळांत दुफळी उत्पन्न झाल्यामुळें, कुयेल्यमजकूर आपल्या जागेचा राजीनामा खरडण्याच्या बेतांत आहेत अशी बोलवा आहे. यावरून राजकीय वातावरण शांत होऊन, उद्योगधंदे सुव्यवस्थित रीतीनें चालू होण्यास अजून बराच कालावधि आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं कोलोनींस दिलेल्या स्वराज्य भिक्षेचा सनदांत फेरबदल करण्याचा नवीन कायदा उपरोक्त प्रधानमंडळाकडून तें टिकल्यास लवकरच प्रसिद्ध केला जाणार असून, देपुताद व सेनादोर यांच्या निवडणुकाहि फिरून होणार आहेत असा एकंदर रोख दिसतो. सर्व वस्तुस्थितीनां कदाचित नवीनच आवर्तांनीं मिळून तदंतरगत् नवीन कोन्सिलांचा त्रास श्रीमन्मथाही पुन्हा ह्मणावा लागेल. तात्पर्य काय होईल व काय नाहीं व काहीं झालें तरी तें टिकेल कीं फिसकटेल, हें अजमावण्याचें काम अत्यंत कठिण झालें आहे. भविष्यकाळाच्या पोटांत शिरणें सदांच सोपें असतें असें नाहीं. इतक्यांत प्रधानमंडळ पडल्याची बातमी आहे!

दोन शोचनीय मृत्यू :— कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें कीं मडगांवचे प्रसिद्ध व्यापारी व सारस्वतसमाजाचें एक संस्थापक-सभासद भिकाजी ऊर्फ सोनु पै भले यांस गेल्या दिवसांमागें त्यांच्या रहात्या घरांत देवाज्ञा झाली ! त्यांच्या दुःखजनक निधनामुळें सा. समाजाचा एक तरुण व खंबीर आधारस्तंभ तर कोसळलाच, शिवाय हरेक सार्वजनिक कामास मोठ्या कळकळीनें हातभार लावणारा एक उदार गृहस्थ, मडगांवशहरास कायमचा अंतरला! थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे ते नावाप्रमाणें खरोखरच 'भले' होते. ज्या क्लेशदायक आजारानें भले यांचा बळी घेतला, त्या दुष्ट दुखण्यानें मडगांवचे तरुण विद्यार्थी बिर्जिनकर स्वर्गवासी झाले, त्याच रोगानें पणजीचे चलाख व होतकरू विद्यार्थी विनायक साखरदांडे हे सार्वजनिक चळवळींत प्रामुख्यानें भाग घेणारे दुसरे तरुण गेल्या थोड्या दिवसा मागेंच कैलासवासी झाले ! गांधीटोपी-प्रकरणांत यांनी अलौकिक कामगिरी बजावली होती! 'गिरू' या गोड नावानें त्यांच त्यांचे सहाध्यायी

आहे असें सांगून त्यांनीं आपलें भाषण टाळ्यांच्या प्रचंड ध्वनींत संपविलें.

दुसऱ्या दिवशीं सरस्वती विसर्जनापूर्वी शाळा मास्तरनें तयार केलेलीं परमेश्वर स्तुतीपर पदें मुलांकडून ह्मणविण्यांत आलीं. एकंदरींत यंदांचा उत्सव अपूर्व असा होता.

सदर शाळेंत सध्या ६० मुलांची संख्या आहे. परंतु आर्थिक अडचणीमुळें व संघटनात्मक शक्ति नसल्यामुळें तूर्त इकडील मुर्गांव-हरबर रहिवासी, ब्रिटिश कस्टम व रेल्वे कारकून यांकडून मासिक वर्गणी रूपानें ठराविक मदत होऊन तूर्तच्या बालपिढीच्या शिक्षण विषयक बहुतेक गरजा भागून ती एक नमूनेदार शाळा होणार असें दिसून येतें.

मुर्गांव-हरबर, ता. १०-१०-२१

रा. शा. वृणाईत

संबोधित असत ! आधींच गोव्यांत त्यांच्या कळकळीनें स्वदेशहितार्थ झटणाऱ्यांची संख्या कमी ! अशा स्थितींत उपरिनिर्दिष्ट शोचनीय निधनांमुळें, सार्वजनिकहितदृष्ट्या किती नुकसान झालें असेल याची सहज कल्पना होईल. ईश्वर मृतांच्या आत्म्यांस शांति देवो !

गोमांतकीय मराठी शिक्षक संमेलन

जाहीर विनंति

या संमेलनाचें दुसरें अधिवेशन मडगांव येथें श्री दामोदर विद्यालयांत, श्री. रा. रा. परशुराम रामचंद्र सिनारी, हेडमास्तर, सारस्वत विद्यालय ह्मापसे यांच्या अध्यक्षतेखालीं ता. १३ नवंबर १९२१ रविवार रोजीं भरणार आहे; तरी या देशकार्यास भाग घेऊन सर्व शिक्षक मित्रांनीं व शिक्षणाभिमानी सद्गृहस्थानीं हजर राहावें अशी विनंति आहे. संमेलन रविवारीं सकाळीं भरण्याचें असल्यानें शनिवारीं सायंकाळपर्यंत येथें येऊन पोहोंचण्याची कृपा करावी.

चिटणीस गोमांतकीय मराठी शिक्षक संमेलन. मडगांव, गोवा.

सारस्वत ब्राह्मण समाज मडगांव

या संस्थेचे एक संस्थापक सभासद प. वा. भिकाजी पुरुषोत्तम ऊर्फ सोनु पै भले, यांच्या अत्यंत शोचनीय निधनाविषयीं दुःख प्रदर्शित करण्याकरितां संस्थेतर्फे तिच्या दिवाणखान्यांत येत्या ता. १४ माहे नवंबर सोमवार रोजीं सायंकाळीं (स्टं. टा.) ७॥ वाजतां सभा भरणार आहे, तरी संस्थेचे सभासद, त्यांचे मित्र व चाहते यांनीं हजर राहण्याची कृपा करावी.

ता ५।११।१९२१. स. न.

दे. श. नायक सेक्रेटरी.

—येत्या ता. १८ रोजीं संध्याकाळीं ५ वाजतां येथील बालोन्नति समाजाचा प्रथम वाढदिवस समारंभ संस्थेच्या दिवाणखान्यांत सांजरा होणार असून, सदरहू प्रसंगीं कित्येक गृहस्थांचीं व्याख्यानें होणार आहेत. सर्वांस येण्याची विनंति आहे, असें संस्थेचे सेक्रेटरी कळवितात.

—येत्या ता. १३ रोजीं ५ वाजतां कुंकळ्ळी येथील श्री शांतादुर्गा वाचनमंदिराचा तृतीय वाढदिवस समारंभ साजरा होणार आहे.

जुगार-पाडवा

(ले० विरोधी)

जुगार पाडवा हा शब्दप्रयोग वाचून भारताचे हजारो वाचक बुचकळ्यांत पडल्याशिवाय राहणार नाहींत. आपआपसांत अर्थबोध झाला नाहीं तर पंचांगाचीं पानें चाळून कोठें तरी हा शब्द सांपडेल ह्मणून उत्सुकतेनें पाहतील. पण त्यांत त्यांना काय सांपडेल ? येऊन जाऊन चैत्र शु० १ देस येणारी संवत्सर प्रतिपदा संसार पाडवा आणि कार्तिक शु० देस येणारी बलि प्रतिपदा हा गुरांचा पाडवा. उभ्या वर्षांत बारा बारा चोवीस पाडवे येत असले तरी वरील दोन पाडव्यांशिवाय तितकाच किंवा कमी अधिक महत्त्व असलेला तिसरा पाडवा कोणाच्याही ऐकिवांत नसेल मग पंचांगांत तरी कोठून सांपडणार ? जुन्या केतकरी, पटवर्धनी, सावनूर वगैरे पंचांगांत नाहीं ह्मणून कोणाचेंही लक्ष पं. प्र. कमिटिच्या ऊर्फ टिळक पंचांगाकडे वळणें साहजिक आहे. व तें तसें वळलें ह्मणून त्यांत तरी तो थोडाच सांपडणार आहे ! !

श्रीशंकराचार्य, मध्वाचार्य, शिवाजी, टिळक वगैरे महापुरुषांच्या जयंत्या पाळण्याची नवी चाल महाराष्ट्रीय पंचांगकरांनीं घातली आहे; त्याच प्रमाणें पुढें मागें आमच्या गोमांतकांत एखादा पंचांगकर्ता जन्मास आला तर मात्र त्याकडून जुगार पाडव्याचा योग्य मान राखला जाणार अशी हमी देऊन मुख्य विषयाकडे वळलेलें बरें. आजपासून सुरू होणारें नवें वर्ष चांगल्या प्रकारें जावें ह्मणून संवत्सर प्रतिपदेच्या दिवशीं मंगल स्नान, कडुनिंबप्राशन, गुढ्या तोरणें उभारणें व गोडगोडसें खाणें वगैरे प्रकार प्रत्येक हिंदु कुटुंबांत आचरले जातात. त्याचप्रमाणें मनुष्याच्या जीवनास आवश्यक अशा शेतकी धंद्यास मुख्यत्वेंकरून साधनीभूत होणाऱ्या गुरांचें पूजन करणें त्यांस चित्रविचित्र पुष्पमालादिकांनीं शृंगारणें वगैरे प्रकारानीं बलिप्रदेचा दिवस साजरा करितात. यावरून जुगार पाडवा हा एखाद्या शुद्ध अगर वद्य प्रतिपदेच्या दिवशीं होणारा सण असेल अशी कोणीही कल्पना करून घेऊं नये. कोणत्याही प्रतिपदेच्या दिवसाशीं त्याचा संबंध नाहीं वर जुगाराच्या धंद्याला ज्या दिवसापासून आरंभ होतो त्याच दिवसाला त्या कार्याच्या महत्वाच्या मानानें "जुगार पाडवा" ह्मणण्याची चाल पडून गेली आहे. जुगारी लोक आपल्या आवडत्या धंद्याची वर्ष भर चलती होऊन बरकत यावी ह्मणून हा सण साजरा करण्याच्या ठिकाणीं, घरांतील कोणत्याही अडचणी बाजूस सारून जात असतात. तेथें जाऊन धंदा सुरू करण्याच्या पवित्र कार्यांत हातभार लावला ह्मणजे तो सण साजरा झाला. इतर सणांप्रमाणें हा सण साजरा करण्यास कोणत्याही देवतेचीं, कोणत्याही वस्तूंची निदान भटभिक्षुकांचीं देखील गरज नसते. फक्त नित्याचेंच जुगाराचेंच साधन असलें ह्मणजे झालें. दारू नायकिणी वगैरेंचा समावेश त्यांत होत असतोच.

हा सण साजरा होण्याचा मान सांगें व मारोळ येथील देवस्थानास मिळत आहे. कार्तिक शुद्ध ११ शी ह्मणजे प्रबोधिनी एकादशीस चातुर्मास समाप्ति झाली कीं द्वादशीच्या दिवशीं होणाऱ्या तुळसी विवाहाच्या निमित्तानें लग्नें, मुंजी व उपरोक्त देवस्थानांतून होणाऱ्या काल्याच्या निमित्तानें, काले, जत्रा वगैरेंस मोकळीक होत असते. उपवर झालेल्या मुलींचे बाप ज्याप्रमाणें चातुर्मास संपल्यानंतर योग्य नवरा शोधण्यास फिरतीवर असतात त्याचप्रमाणें जुगारी लोक आपल्या धंद्याच्या मागें, काले जत्रांतून फिरत असतात. कारण त्या धंद्यास देवस्थानच्या महोत्सवांत आश्रय हटकून मिळतो; हें सर्वांस माहीत आहेच.

वरील मान पटकावणाऱ्या देवस्थानांस त्यामुळें फार धन्यता वाटणें साहजिक असलें तरी जुगारासारख्या नीच, घरबुडव्या व इतर अनेक व्यसनांस जन्म देऊन येणाऱ्या व्यसनांस आश्रय देऊन समाजनाशाचें श्रेय आपणाकडून कसें संपादन होत आहे, याचा अंतःकरणपूर्वक विचार त्यांकडून होणें तितकेंच अगत्याचें आहे.

जो धंदा समाजाच्या तिरस्कारास पात्र झाला आहे त्यास देवस्थानांतून आश्रय मिळणें ह्मणजे देवस्थानासारख्या संस्था निर्माण करणाऱ्यांच्या पूज्य हेतूचा विपर्यास करणें होय. जुगार हें व्यसन समाजास किती घातक आहे हें भारत, विद्याप्रसार वगैरेंच्या वाचकांस सांगण्याची आवश्यकता नसली

ANO VI—NUMERO 34 —1921 QUEPEM QUINTA-FEIRA 17 DE NOVEMBRO

भारत

BHARAT

[Di]rector e Editor
[G]. P. Hegdo Dessai

Assinatura
[India] Portuguesa...... 3-00-00
[India] Inglesa.............. 3-08-00
[Nume]ro Avulso.......... 0-01-00

Anuncios
[Anun]cio por linha...... 00-01-00
[Para] longo praso contrato es[pecial]

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)........ ३-००-००
ब्रिटिश इंडिया.............. ३-०८-००
किरकोळ अंकास.......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें.] केपें, गुरुवार, तारीख १७ माहे नव्हेंबर सन १९२१ [अंक ३४ वां.

Eterna Cantilena

Canta-se sempre a aria de que as Novas Conquistas representam um verdadeiro manancial da riquesa publica que —continua-se a recitar—devidamente explorada, é capaz de matar de vez o assustador *deficit* que nos assoberba.

Canta-se e recita-se; mas a aspirada riquesa pública, lá, das entranhas do solo virgem das vastas e ferteis planicies das referidas N. C., dorme como de sempre o seu tranquilo sono sem que qualquer iniciativa de caracter oficial vá perturbar-lho!

E' o menos, porque se trata duma coisa cuja existencia ninguem apreciou ainda e resta por avaliar.

O que porem não é admissivel e nos contrista deveras, é o indiferentismo a que por parte do governo é votado desde tempos *imemoriais* o Povo dalgumas regiões daquelas *Conquistas*, sobretudo no tocante ao problema sanitario que lhe diz respeito.

Todos sabem que a população das aldeias de Astrágar e Embarbacem vai decresscendo consideravelmente, de ano em ano, sem porem ai ser acentuada a influencia da emigração. Nas mesmas aldeias registam-se *civilmente* muitos obitos. Sente-se igualmente a falta do braço.

E' que um horrivel paludismo com o longo cortejo doutros males déle dirivados está a olhos vistos, definhando a vida naquelas paragens, inutilisando-a á maior parte de seus habitantes para *stuggle for life*.

O paludismo é o maior inimigo que está ai operando progressivo descrescimento na população, reduzindo a que sobrevive com sacrificios mil, a um estado que mete comiseração.

¿Que fez o governo, até á presente data para livrar as mesmas regiões do paludismo?

Pediu-se-lhe, rogou-se-lhe e, todavia, todos os pedidos e todos os rogos não foram capazes de disviar a atenção do governo para aquele importante assunto, sem cuja solução pronta e imediata, é inutil esperar que as Novas Conquistas progridam ou pelo menos experimente a situação que, há vinte anos atraz disfrutavam.

Não é, certamente, esta a vez primeira em que tocamos no paludismo. A ele temonos referido frequentemente; mas em vão.

Isto assim não pode nem deve ser. O governo, custe o que custar, tem de tomar a peito a urgente solução do problema...palustre se é que deseja que sejam ainda habitadas *pelos homens* as mencionadas aldeias de Astragar e Embarbacem.

Mais uma vez lho solicitamos.

ECOS & CRITICA

Peditorio

Dizem-nos que alguns amigos do sr. dr. Antão, administrador do Concelho estão arranjando uma representação ao sr. Presidente da Republica, pedindo a sua conservação

Está bem, porque é livre ao benificiado manifestar-se pelo seu benfeitor.

O que não está bem é que se procure siníficar na referida *manifestação* que a vontade do beneficiado é a vontade do Povo.

Isto é que não pode ser porque o beneficiado é...benificiado e o Povo é...o Povo.

E o Povo se desinteressa, por completo, da mesma representação pela simples razão de se ter desinteressado dêle o *benfeitor dalguns*. E' lógico, è justo.

O sr. Kelker

Pelo que se lê no *Ultramar* parece que o agronomo sr. Kelker que das comunidades recebe a condigna para não dizer fabulosa paga, entende que promovendo-se e intensificando-se certas culturas, será facil achar solução ao *deficit* cerialifero com que estamos luctando.

O sr. Kelker entende *isto* em Margão. A inspecção da agricultura entende tambem coisas milhores mas na sua comoda repartição de Pangim. Mas para que servem tais *entendimentos* se é que o agricultor, agarrado á rotina e preso ás garras do analfabetismo não pode *ipso facto* ter deles (entendimentos) conhecimento?

Nem o referido tecnico contratado mora numa região cercada das moradas de agricultores com os quais comunique, praticamente, a sua sciencia nem a Repartição da Direcção dos serviços agricolas se encontra instalada em um ponto donde os mesmos agricultores possam tirar vantagens para a sua agricultura, sem dispendio nem maçadas.

De resto, não é preciso que o sr. Kelker nos venha dizer que *isto è assim, que aquilo è assado*. Estamos *supersaturados* de tais *novidades* muito *velhas*.

E' mister que a respeito delas se entenda *directamente* com os mencionados agricultores, se é que, em troca do dinheiro que recebe, pretende ser util á nossa agricultura.

Pois, não!

Sinal de queda

No artigo e local dêsta epigrafe dissemos o suficiente para provar á saciedade que o sr. Prazeres da Costa sob diversos titulos e variados pretextos que sò a imaginação fecunda dum *manipanso* e *simbolo indiano* podia engendrar ás mil maravilhas, concorreu apenas para desgraçar a India.

Bem sabemos que esta afirmação tantas vezes por nós repetida diriva contra nós raiva daqueles que foram e esperam ser contemplados pelo sr. Costa, sendo até possivel que nos atribuam propositos menos leaes.

Mas ninguem nos tira da cabeça, nem mesmo a prosa do sr. Naique, a proposito de quem traçamos as presentes linhas, a convicção de que a Historia que é a Mestra da vida nos fará razão, ainda no animo e consciencia daqueles que praticam o erro de nos julgar, injustamente.

E' o que acrescentamos, com a devida venia do sr. Naique, ao que deixamos escrito no *Sinal de queda*..

E quanto ás considerações do sr. *Carlos Frias*, dizemos sem mais comentarios que com élas estamos de perfeito acordo.

Propaganda

Vezes sem conta frisamos a necessidade da propaganda do civismo nas massas populares, propaganda que tem de ser feita numa linguagem que lhes seja accessivel á inteligencia.

E' que o nosso povo, já porque não dispõe de tempo nem de dinheiro necessarios, já porque, na sua maioria, por não saber ler, nada fica sabendo do que, em seu nome, os seus seudo-representantes vão pregando justa ou injustamente nos seus orgãos, talvez na doce ilusão de que lhe prestam serviços importantes...

Torna-se, porisso, necessario que individuos competentes se dediquem, de corpo e alma, á missão de propaganda de ideas democraticas, deixando sempre o Povo ao corrente do que se passa em seu redor no mundo social e politico.

Sem isto, nada feito.

Balonati Samaj

E' amanhã que se realisa o 1° aniversario de fundação desta associação que no decurso de longos doze mezes prestou serviços de valor a esta aldêa, ora franqueando ao publico seus livros ora promovendo. comferencias.

Uma entrevista

O *Diario de Noiticias* publica uma interessante entrevista do sr. dr. Santana Rodrigues sobre as coisas da India.

Nêla o entrevistado revela um talento invulgar.

E', pois, digna de ser lida a mesma entrevista.

Dr. Santana Rodrigues

Este insigne patriota e estudioso estadista está prestando á India relevantes serviços sem grandes espalhafatos.

São brilhantes os seus artigos, é fulgurante a sua pena, é acrisolado o seu empenho para ver feliz a terra que lhe é berço.

Por tudo isso, o *Bharat* que é seu admirador sincero e entusiasta, consigna nas suas modestas colunas os seus agradecimentos.

Cartas

Recebemos inumeras cartas a proposito das que publicou na imprensa o sr. Srinivassa Voicunta Sinai Dempò, no tocante ao **Pragatica Sangh**.

Algumas delas são escritas numa linguagem virulenta incompativel com a orientação do nosso jornal.

Sentimos, porisso, não poder publica-las.

Agradecendo

Recebemss e agradecemos relatorios da Gerência da Direcção do Albergue do S. C. de Jesús de Margão e do Albergue do S. C. de Jesús.

Festa e fama

A folha oficial já anuncia em suplemento a *festa*...eleitoral que precedida da respectiva *fama* terá lugar, no dia 11 do proximo mez de dezembro.

भारत

गुरुवार कार्तिक व० २ या. १८४३

स्फुट विचार

'येरे माझ्या मागल्या :—गेल्या डिसेंबरच्या ११ तारखेला पोर्तुगीज इंडियेतर्फे देपुताद व सेनादोर यांची पुन्हां निवडणूक होणार असल्याचें सरकार रीत्या प्रसिद्ध झालें आहे. या नवीन निवडणुकांत्वयें भरणाऱ्या पार्लमेंट व सिनेट सभांच्या स्थायिकपणाबद्दल मन कितीहि साशंक असलें तरी प्रत्येक नागरिकानें आपल्या मतदारीचा हक्क बजावण्याचे कामीं हेळसांड करतां कामा नये. हिंदूनीं कोणास मतें द्यावीं, हें प्रागतिक संघ लवकरच ठरविणार आहे. तों पर्यंत कोणीहि कसल्याहि सबबीवर 'वोता'विषयीं दुसऱ्यांकडे वचन बद्ध होऊं नये, अशी आमची सूचना आहे या सूचनेकडे एकीचें महत्व ओळखणाऱ्या हिंदूंचें दुर्लक्ष होणार नाहीं अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे.

दोन खून:--बार्देस प्रांतांत एका प्रतिष्ठित इसमानें दुसऱ्या एका त्याच्याच दर्जाच्या व्यक्तीस खासगी द्वेषास बळी पडून भर रस्त्यांत गोळीनें ठार केलें! मयत व खुनी हे उभयतांहि ख्रिस्ती जाती पैकीं असून साधारण शिक्षितहि असल्याचें कळतें. दुसरा खून काणकोण मुक्कामीं हिंदु जातींत घडून आला. एका इसमानें आपले नारळ चोरतानां पाहून रागाच्या भरांत चोरावर गोळी झाडली व ही गोळी मर्मस्थानीं लागून चोराचें तावडतोब प्राणोत्क्रमण झालें! ब्रिटिश हिंदुस्थानांत लोकसंख्येच्या मानानें उपरिनिर्दिष्ट सारखे खून हरहमेश पडलेले ऐकूं येत असल्यावरून, त्यांपासून लोकानां संवयीमुळें सहसा नवनवलाई वाटत नसते. परंतु गोव्याची गोष्ठ निराळी. येथें खून ह्मणजे दुर्मिळच. अशा स्थितींत वरील दोन्हीं खूनांमुळें येथील लोकांच्या अंतःकरणांत कशी खळबळ उडाली असेल, याचें अनुमान करण्यास कोणासहि कठिण जाणार नाहीं. खूनाच्या बुडाशीं असलेल्या क्षुल्लक कारणांकडे नजर पुरविली तर आश्चर्यानें मन थक्क होणें गैरवाजवी नाहीं. असेंच ह्मणावें लागतें. असो. प्रस्तुत अत्याचारांचा येथें उल्लेख करण्याचें कारण हेंच कीं, कित्येकांकडून उपरोक्त खूनाचा संबंध बोलशेव्हिक तत्वप्रसाराकडे लावण्याचा बादरायणी उपद्याप होत असून महात्मा लेनीनच्या उज्वल कीर्तीस बाध [!] आणण्याचा 'अव्यापारेषु' प्रयत्न होत आहे! परंतु त्यांचें कुठें चुकत आहे, हें विशद करून सांगण्याची आवश्यकताच नाहीं. इतकी त्यांची चूक ढोबळ आहे.

एक उपयुक्त पुस्तक:--फिरंगी संस्कृती पासून गोमांतकस्थ हिंदी लोकांचें किती भयंकर नुकसान झालें व होत आहे हें पहावयाचें असल्यास जिज्ञासूनीं प्रो. सुब्राय रामकृष्ण सामंत यांचें 'गोमांतकस्थ हिंदी लोक व फिरंगी संस्कृति' हें उपयुक्त पुस्तक लक्ष्यपूर्वक वाचण्याची तसदी घ्यावी. चटकदार विषयरचना, चित्ताल्हादक भाषा, सुंदर छपाई इत्यादि विरळा गुणांमुळेंहि प्रोफेसर मजकुरांचें उपरिनिर्दिष्ट पुस्तक संग्राह्य असेंच झालें आहे. प्रो. सामंतांच्या पुस्तकावर विस्तृत अभिप्राय देण्याचा आमचा मानस असल्यावरून सध्या त्याविषयीं यापेक्षां जास्ती लिहिण्याचें आह्मीं मुद्दाम टाळतों.

भारताचा आकार:--विषयांच्या गर्दीमुळें अनेकदां आह्मांस आजच्याप्रमाणें अग्रलेखांचें कार्य स्फुटांवरच भागवून घ्यावें लागतें. तसें होऊं नये व वाचकांस भरपूर मजकूर वाचावयास मिळावा, या हेतूनें येत्या ७ व्या वर्षापासून भारताचा आकार दीडपटीनें वाढविण्याचा विचार आहे. ह्या विचारास मूर्त स्वरूप येणें अर्थात् परमेश्वराची कृपादृष्टि व आश्रयदात्यांचें उत्तेजन या दोन गोष्टींवर अवलंबून आहे, हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं.

हाणी अंगवळणी पडेल. आज वर्षभर ही चळवळ चालत असून ही आमच्या पुढाऱ्यांनां ह्या बाजूनें चळवळ करण्यास दुर्दैवानें सवड मिळालीच नाहीं. परंतु युवराजांवर बहिष्कार घालणाऱ्या कॉंग्रेसची जी आज्ञा झाली आहे ती धाब्यावर बसवून श्री शिवाजी स्मारकाच्या नावांवर युवराजांचें दर्शन घेण्यास मोठ्या कळकळीची जाहीर विनंति करण्यांत आली आहे.

हिंदुस्थानांतील प्रत्येक व्यक्तीचें अंतःकरण स्वातंत्र्यासाठीं तनमन अर्पिलेल्या भारत भूमीच्या सुपुत्राबद्दल, प्रेम, आदर व भक्ति यानीं ओथंबलेलें आहे. त्यांचें स्मारक व्हावें, त्यांच्या पुतळ्याचें दर रोज दर्शन व्हावें असें प्रत्येकास वाटणारच. परंतु आजचा प्रसंग दुर्धर आहे. आज त्याणी ब्रिटिशांच्या नाहक छळास कंटाळून अनत्याचारी लढाई पुकारली आहे. महाराजानीं जें कार्य केलें त्याचें पुनर्जीवन करण्याचा त्यांचा निश्चय आहे. मग त्या पेक्षां उज्ज्वल स्मारक तें कोणतें! शिवाजी महाराज काहीं आजच दिवंगत झाले नाहींत ज्या वेळीं हे उदारधी आंग्लवीर महाराजानां गुरटे लोकांचा नाईक, खुनी, दरवडेखोर इत्यादि विशेषणें देण्यांत गुंतलेले होते, त्या वेळीं लोकमान्यानीं सरकारच्या डुरकावणेंस न डरतां शिवाजी उत्सव सुरू केला वतो अद्यापिहि चालत आहे. आज इतकीं वर्षें महाराजांकडे कुत्सित दृष्टया पहाणाऱ्यांस यंदांच प्रेमाचा पान्हा फुटण्याचें कारण न समजण्याइतकी जनता खुळी नाहीं. महाराजांची अलौकिक बुद्धि, अप्रतिम मुत्सद्दीपणा जीनें सिद्ध करून दिला, महाराजांस लाविलेल्या कलंकाच्या ठिकऱ्या उडविल्या ती जनता तर बहिष्कार घालीत आहे तर पुण्यांत आह्मीं जाऊन उत्सव साजरा करणें गर्हणीय नव्हे काय! महाराजासंबंधीं प्रेम दर्शवावयाचे दुसरे अनेक मार्ग आहेत. त्यांकडे लक्ष्य न देतां पुण्यास जाणें ह्मणजे फक्त कालाचा अपव्यय करून स्वतःच्या गुलामगिरीचें प्रदर्शन करणें आहे.

प्रताप

गैरसमज नको!

३ नवंबर १९२१ च्या भारत पत्रांत जाहीर विनंति या मथाळ्याखाली जो मजकूर प्रसिद्ध झाला आहे त्या विषयीं थोडेंसे स्पष्टिकरण करणें इष्ट वाटतें.

पत्रकर्ता या नात्यानें आपलें स्वतःचें मत कांहींही जरी असलें किंवा पत्र पाठविणाराही जरी कोणत्याही मताचा असला, तरी त्या बद्दल माझें कांहीं ह्मणणें नाहीं. परंतु 'डायरेक्टर आल्मेद कालेज' या नावानें हा मजकूर प्रसिद्ध झाला असल्याकारणानें त्या संस्थेच्या चालकांच्या मतां संबंधानें लोकांचा गैर समज होऊं नये ह्मणून येथें थोडें दिग्दर्शन करावेंसें वाटतें.

श्री शिवाजीस्मारकासंबंधानें आह्मांला कितीहि जरी आदर वाटत असला, तरीही ब्रिटिश हिंदुस्थानांतील आमच्या बांधवांच्या राजकीय बाबतींत झालेल्या विषण्ण मनःस्थितीकडे लक्ष्य पुरविल्यास त्यांच्याशीं सहानुभूति दाखवून त्यांचे गोमांतकीय बंधु या नात्यानें वरील स्मारक समारंभांत भाग न घेणें हें आह्मांसही योग्यच ठरत आहे.

व्यक्ति व्यक्तीचीं निरनिराळीं मतें असूं शकतील आणि तीं तशीं असल्याबद्दल एकाला आपलीं मतें बरोबर वाटून त्यानें तीं दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न करणें हें केव्हांही योग्य होणार नाहीं, व आपल्या पत्रांत प्रसिद्ध झालेल्या मजकुराशीं तर एका संस्थेचा संबंध येत असल्याकारणानें त्या संस्थेचा एक हितचिंतक या नात्यानें तें तसें होऊं न देणें हें मला योग्य वाटणें साहजिक आहे, व आपणासही तसें वाटून वरील मजकूर आपण प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

शांताराम सू. शिंगबाळ.

हें स्मारक कसचें?!

आपल्या भारत वृत्तपत्राच्या ३-११-२१ च्या अंकांतील आल्मेद कॉलेजचे डायरेक्टर रा. नारायण अ० शे० बांदिवडेकर यांनीं गोमांतकीय हिंदु समाजास केलेल्या जाहीर विनंतीनें समाजाची दिशाभूल होण्याचा संभव असल्याचें वाटल्यामुळें आपल्या अमोलिक पत्राचा आश्रय घेणें भाग पडत आहे व तो आपल्या उदार मदवादी पत्राकडून मिळेल अशी आशा धरून खालील दोन ओळी लिहिण्याचें मी धाडस करीत आहें.

हिंदुधर्म संरक्षक श्री छत्रपति शिवरायांच्याबद्दल आदर नसलेली व्यक्ति हिंदु या नांवाला योग्य नव्हे. अशा परमपूज्य विभूतीचें स्मारक करण्याच्या आड येण्याचें महत्पाप हिंदु तरी खात्रीनें करणार नाहींच. पण आज ज्यांच्या हातून हें स्मारक होऊं घातलेलें आहे व हें स्मारक ज्या स्थितींत होत आहे त्याला मदत तर राहोच पण नुसती संमती दर्शविणें ह्मणजे राजसेवेच्या नांवाखाल देशद्रोह करणें होय. रा. रा. बांदिवडेकराच्या मताप्रमाणेंच गोमांतकवासीयांनीं ह्या सरकारकडे दोन दृष्टीनें पाहायाचें ठरलें तरी गोमांतकवासीयाना तूर्त होऊं घातलेल्या स्मारकास संमती देतां येणें शक्यच नाहीं. गोमांतक आज स्वराज्याचा उपभोग घेत आहे. श्री शिवरायानीं ज्या स्वराज्यासाठीं स्वतःचा देह झिजविला त्याचा आज गोमांतकीय हिंदुसमाजाला [त्यांच्यांत कर्तबगारी असली तर], पूर्ण उपभोग घेण्याची मुभा आहे. व ज्या हिंदुस्थानांत ज्या शूर वीर मावळे लोकांच्या सहवासांत श्री शिवरायांनीं स्वराज्या

✓ परदेशीं रवाना होत असतात, ब्राह्मणाचा ह्मणजे ब्रह्मविद्या संरक्षकांचा, हिंदु धर्म आणि हिंदु संस्कृति यांच्या अभिमान्यांचा एकसारखा छळ होत असतो, लागाबांधा नसतां परक्या धर्मास गरीब रयतेच्या पैशांतून तनखा देण्यांत येतो, त्या गोमांस भक्षक व हिंदुधर्म द्वेष्टया इंग्रजांच्या राजपुत्रांकडून जर कां विटाळ घडला तर त्यांत त्या महात्म्याच्या मनास डागण्या दिल्या सारखें होणार नाहीं काय?

ज्याणें यमाच्या दाढेंत असल्याप्रमाणें दिल्ली दरबारांत असतां, शहानशहा औरंगजेब बादशहा यांस तो केवळ परकी, परधर्मी, हिंदुद्वेष्टा ह्मणून, दरबारी कायद्याचा भंग करूनही कुर्निसात केली नाहीं त्या छत्रपति शिवरायाचें छत्र धारण करण्यास उमेदवारी करणाऱ्या उमेदवारी करणाऱ्या युवराजांसमोर त्याच छत्रपतीचे वंशज व इतर राजे महाराजे, आपल्या पारतंत्र्याची शरम न बाळगितां केवळ ऐश्वर्याचा दिमाख दाखविण्यास आलेले पाहतांच हिंदवी स्वराज्य स्थापिणाऱ्या महाराष्ट्र कन्येला आणि भूपती शिवाजीला आनंद होईल काय?

आपल्या प्रजेला पोटच्या पोरांप्रमाणें मानणाऱ्या शिवरायाला त्याच प्रजेच्या पैशांतून चाललेला हा अपरंपार खर्च त्यानां सहन होईल काय?

लोक राज्याचा किंचित तरीं अनुभव घेणारी पोर्तुगीज हिंदुस्थानांतील जनता आपल्या प्रजेस नाहक छळणाऱ्या, तिचे खून पाडणाऱ्या इंग्रज सरकारचे दोस्त राहणें संभवनीय आहे काय?

या सर्व प्रश्नाचा खुलासा करण्याची विनंति करून रा. बांदिवडेकरांचा निरोप घेतों.

पारोडें ज. वि. कामत

काय हें?!

सध्या महात्मा गांधी ज्याला जगांतील अद्वितीय विभूति, ख्रिस्टचा दुसरा अवतार अशी पदवी सुधारलेल्या पाश्चात राष्ट्रांतील विद्वानांनीं दिलेली आहे, अशाच्या नेतृत्वा खालीं जी जोराची 'न भूतो न भविष्यति' चळवळ चालली आहे त्यांत रावा पासून रंकापर्यंत भाग घेण्यास सवड ठेवली असून अठरा विश्वे दारिद्र्यपंकांत रुतलेल्या गोमांतकासही आपलें कर्तव्य बजावणें शक्य झालें आहे. विशेषतः परदेशी वस्त्रांवर बहिष्कार व चरके हात मागाचा प्रसार जारीनें करण्यास हातभार लाविल्यास सध्या जें आंग्लफेशन आमच्यांत बोकाळलें आहे त्यास आळा पडून साधी परंतु सुखकर र-

---

वर्तमानसार

—गेल्या रविवारीं कुंकळ्ळी येथील श्री शांतादुर्गा वाचनमंदिराचा तृतीय वाढदिवस समारंभ आमच्या संपादकांच्या अध्यक्षतेखालीं पार पडला. प्रसंगास अनुसरून श्री. जना वि. कामत, पुं. वा. विर्जिनकर, विष्णु रं. शेळडेकर व अनंत पै वेर्णेकर यांचीं सुश्राव्य भाषणें झालीं. उत्सवारंभीं श्री. भास्कर भ. केणी यानीं स्वतः रचलेलीं पदें सुस्वर आवाजांत गाऊन प्रेक्षकांचें स्वागत केलें. श्री. व्यं. वि. वैद्य यांकडून रिपोर्ट वाचन व श्री. त्रि. वि. वैद्य यांकडून आभारप्रदर्शन झाल्यावर उत्सव समाप्ति झाली. नंतर आमच्या संपादकांचे प्रवचन झालें.

--मराठी शिक्षक संमेलनाची हकीकत, महानुभाव पांगारकर यांचें भाषण वगैरे येत्या अंकीं.

भारताच्या

एजंटांस विनति करण्यंत येते कीं, त्यानीं वसूल झालेली वर्गणी तावडतोब पाठवून देण्याची कृपा करावी.

म. भारत.

ANO VI — NUMERO 35. — 1921 QUEPEM QUINTA-FEIRA 24 DE NOVEMBRO

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai

Assinatura
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास.......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें.] केपें, गुरुवार, तारीख २४ माहे नव्हंबर सन १९२१ [अंक ३५ वा.

UMA ENTREVISTA

Diz Lord Birkenhead: que a India, sobre ser o maior mercado de além-mar para os fabricantes britanicos é ao mesmo tempo, quem fornece a imensa quantidade de generos alimenticios e as materias primas necessarias ás industrias inglesas; que antes de guerra, mais de 63% da importação total na India vinha da Grâ-Bretanha: que só as fabricas de Lancashire exportavam para lá algodáo no valor de 30 milhões de libras por ano, que durante, a guerra, os contigentes indianos alêm das suas brilhantes campanhas no Egito, na Mesopotamia, nos Dardanelos e na Palestina foram os que salvaram os portos do Canal da Mancha na campanha de 1914-15, e a India foi a unica fonte incondicional de abastecimentos de material para o fabrico de munições.

Por outro lado no *New India*, Henry Cotton, alto magistrado durante 35 anos na India, escreve: "Em todos os tempos e, especialmente, desde que a India está sob o governo da rainha, a despesa da administração tem sido maior que o rendimento que ela produz". "E' literariamente verdade que as obras produtivas da India, longe de pagarem o seu juro, em muitos casos não pagam as despezas da sua execução...".

"E para acabar, este comentario de Sir John Shore: "Drenou-se largamente a sua riqueza e as suas energias foram destruidas por um sordida sistema de leis, pelas quais os interesses de milhões foram dados em holocausto aos interesses de uns poucos. O gradual empobrecimento do povo e do pais, pela administração do governo britanico, produziu a falencia dos grandes mercadores indianos".

E' facto que as leis não admitem diferenças de raças, nem de dominados e dominadores. Mas o desmentido existe em cada passo.

"Wilson eminente historiador da India, comentando a intolerancia com que se protegeram as manifacturas de Manchester a Lancashire, diz: "*Elas foram mantidas pelo sacrificio das mànifacturas indianas*". E Mr. Duff acrescenta: Como exigencia de injustiça fiscal o Indian Act de 1896 não tem que se lhe compare em qualquer país civilisado nos tempos modernos.

Há na verdade, largas concessões feitas nos ultimos anos, mas são devidas á agitação nacionalista e ao perigo que ameaça a soberania inglesa.

"Vincent Smith (Oxford) no seu *Early History of India* observa que "soberania imperial sobre toda India não é desconhecida dos hindus" Antes do advento dos mahomentanos o continente indiano foi territorio hindu e foram hindus os soberanos que o governaram sobre uma extensão igual ao actual imperio indiano. A India limitada por mar e por montanhas é indisputavelmente uma unidade geografica com um unico nome e com uma civilisação homogenea, ainda que algumas classes tenham lá entrado em periodos diversos"

"Sir Herbert Risley disse na *R. Asiatic Society:* "A ideia de nacionalidade veiu da India. A unidade politica é o natural resultado de tres unidades constituintes; e todos sabem que se os ingleses fossem menos felizes os "maratas" teriām soldado as provincias da India numa nação"

Conheço-diz Sir Sumner Maine-que a impressáo popular aqui é de que a sociedade indiana está dividida por assim dizer em numerosos "strata" horizontais representando cada um uma casta. E' um perfeito erro...

De resto se as diferenças de raças e de lingua fossem motivo para os indios não se constituirem nação, náo seriam nações a Suissa, a Alemanha a Espanha, a America e a propria Inglaterra.

H. Cotton: "homens que falam o ingles melhor que muitos ingleses que lêem Mill e Comte, Max Muller e Mainé, que ocupam um lugar com distinção no tribunal judicial, que administram os negocios dos Estados indigenas de muitos milhões de habitantes que gerem as fábricas de algodão e dirigem as mais complicadas operações do comercio que redijem jornais em inglês e correspondem em perfeita igualdade com os escritores da Europa não podem continuar a ser notados com raça inferior".

"Sir Richard Temple reconhece que, em geral os Estados autonomos são tambem os melhor administrados que os dominios ingleses, e, em diversos relatorios, se confirma que há na India, estadistas e soberanos que rivalizariam com os melhores da Europa'

"Max Mullêr ensina: Em todas as questões do dia-educação popular, educação superior, representação parlamentar, codificação das leis, finança, emigração, leis sobre pobreza em parte nenhuma se encontra melhor que na India"

"E, finalmente Wilson falando da [elite] indiana, escreveu: 'Observei neles maneiras polidas clareza e capacidade de compreensão, sentimentos liberais e independencia de principios que os teriam tornado 'gentlemen' em qualquer paiz do mundo.

O nacionalismo indiano é estruturalmente tradicionalista; inspira-se nos 'Vedas'. As ideias da igualidade e fraternidade não lhe são estrnhas: ninguem as teve mais completas que o 'vedismo' e o 'budismo' enquanto o cristianismo as reservava para os homens, a India estendeu-as a todos os seres vivos. A Republica sob todas as formas não lhes era disconhecida segundo o prof. Rhys David, Smith, Meerindle e outros. Nos tempos passados o nacionalismo em todos os paizes era orientado pela aristocracia e pelo clero, hoje a élite, dirigente sai do povo. Sob toda esta forma iniciou-se em 1884 pela fundação do Congresso Nacional Indiano, onde se reunem anualmente todos os indianos sem exclusáo de casta ou credo O ultimo Congresso resolveu apoiar por maioria absoluta o plano do grande patrioto Gandhi,,.

E o nosso entrevistado remata as suas considerações acentuando que a pregação do Gandhi è pacifista embora a luta, o dervamento de sangue tenha de vir a ser um facto doloroso, apoia-se em depoimentos de ingleses ilustres para demonstrar que os 'rajahs' não tem influencia alguma no pais, e afirma-nos que não ha odio aos brancos mas apenas uma natural aversão por aqueles que cometem desmandos ou violencias rematando a sua exposição com novas citações de Cottono de Mazelliero em reforço do que nos disse na ultima parte da nossa palestra sobre o movimento indiano que se nos afigura ficar agora suficientemente esclarecido.

Uma defesa... ilegitima

Sr. Director do *Bharat*.

Antes de tudo não posso deixar de exprimir os meus sinceros arrependimentos por ter produzido, na minha replica mais uma oportunidade ao sr. Frias para deslustrar os professores do Liceu, lamentando que eles não tivessem idade e *barba dum bode* e por ter *mudo* tempo e *paciencia* do velho, que aliás serveria do seu tempo em prol da salvaçao da sua querida patria, como ele diz exterminando os *ratos*, embora o *gato* se ache vestido, hipocritamente, duma mascara de Carlos Frias, de Aldonã. Um *gato* com os seus receios de vir dismascarado á frente dos *ratos* para extermina-los!

Ora voltando para o assunto da **legitima defeza** do sr. Frias, tenho que dizer que ela se acha quasi distituida de fundamentos... E se acha cheia de picardias ao sr. Augusto Monteiro, de seus novos projectos da instrução, da exposição duma vil intenção, respeito ao sr. Cota Cruz, de seus inoportunos elogios da promessa de disratação da sua patria, das informações disnecessarias do comicio e do Consèlho Legislativo, das palavras como se fossem sacramentais do Dr. Braz da Costa etc. etc. E em fim todo o dilirio que nunca defende ninguem

Pois, mais uma véz, torno a repetir que as cadeiras de professores sempre devem ser providas por meio de escolha do prudente criterio do ministro e não por meio do concurso tendo exclusivamente em vista os diplomas.

Digo isso com sinceridade porque no caso dessa escolha, bem pode ver-se se o professor è competente ou não, lançando uma vista sobre *outros* atributos essensialmente necessarios a um professor alem da competencia do leccionamento da respectiva cadeira.

Porque um professor é instructor e *educador* tambem. Ou é antes *educador* do que instructor.

Os diplomas, talvez, justifiquem competencia da respectiva cadeira, mas nunca que

भारत

गुरुवार कार्तिक व० ८ शी. १८४३

आह्मी व आमचे शेजारी

हिंदुस्तानच्या कोणत्याहि नकाशावर विहंगम दृष्टि फेंकल्यास मालवणच्या खालीं एक काळा ठिपका सहज दृष्टीस पडेल. बिचाऱ्या नकाशेकर्त्यास या प्रांताच्या परावलंबतेची इतकी कांहीं बालंबाल खात्री पटली आहे कीं, ते, तो देश पोर्तुगिझ सरकारच्या ताब्यात असूनहि चंद्रनगर वगैरे प्रांताप्रमाणें भिन्न रंगांत न देतां, बिनदिक्कत ब्रिटिश हिंदुस्थानांत मिसळून टाकितात. ह्या संबंधीं त्यांना दोष देणें ह्मणजे आमचें अज्ञान प्रदर्शित करण्यासारखें आहे. कारण, गोमांतक हा ब्रि. हिंदुस्थानाशीं इतका कांहीं संलग्न झाला आहे, त्यांच्या आचार विचाराशीं आमची इतकी कांहीं मेसळ झाली आहे, त्यांच्याशीं आह्मी इतकें कांहीं तादात्म्य होण्याच्या मार्गास लागलों आहोंत कीं, आज त्यांच्याशीं फटकून वागण्याचा आत्मघातकी निश्चय करणें ह्मणजे आमच्याच हातानें आमच्याच पायावर कुऱ्हाड घालण्यासारखें आहे. प्रो. आराऊज मासकारेंजस यानीं मी गव्हर्नर झालों असतों तर ब्रि. हिंदुस्थानातील मराठी वर्तमान पत्रे बंद केलीं असतीं असें जें सांगितलें, तें खरोखरच आमच्या स्थितीचा पूर्ण विचार करून ह्मटलें यांत संशय नाहीं. याच वर्तमानपत्रानीं आह्मांस स्वतःसंबंधीं विचार करण्यास शिकविलें, आमची संस्कृति, देशाभिमान व स्वाभिमान जागृत केले. नखशिखांत युरोपियन बनून पोर्तुगालांतील बडाबापसे वेड्यांच्या नावानें "व्हीवा" घालून आमच्या गुलामगिरीचें प्रदर्शन करण्यास लाज वाटूं लागली. आमचा प्रिय गोमांतक एके काळीं वैभव शिखरास पोंचलेला होता. कला कौशल्य व्यापार धंदा व बुद्धिमता ह्या बाबतींत हार जाणारा नव्हता, असें असतां आज 'लंडन टाइम्स' सारख्या वजनदार पत्रानें गोमांतक या नावांचा शिंपी व स्वयंपाकी प्रसवणारा देश आहे असें ह्मणण्यासारख्या निकृष्ट स्थितींत पोंचण्याची कारणें शोधण्याकडे आमची प्रवृत्ति होऊं लागली या सर्वांचें श्रेय आमच्या ब्रि. हिंदुबांधवांस आहे हें कोणासहि प्रांजलपणें कबूल करावें लागेल. आमची उन्नति अगर अवनति ब्रि. हिंदुस्थानाबरोबरच होणार हें सूर्य प्रकाशा इतकें स्पष्ट दिसत असतानांहि त्यास खीळ घालण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे पूर्ण वेगांत असलेल्या धांवत्या आगगाडीस हातानीं थोपवून धरण्यास उद्युक्त होण्यासारखें दुष्कर व हास्यास्पद आहे हें कोणासहि कबूल करावें लागेल.

चालू शतकांत ब्रि. हिंदुस्थानांत स्वराज्य प्रीत्यर्थ, ज्या प्रचंड चळवळी झाल्या त्यांनां आह्मीं पूर्ण सहानभूति, शाब्दिक कां होईना, देऊन आमचें कर्तव्य अल्प प्रमाणानें तरी बजाविलें आहे. कोणत्याहि इसमानें विवक्षित कार्यास हात घातल्या. नंतर तो आपल्या अनुयायांच्या प्रोत्साहन पेक्षां शेजारच्या तटस्थ लोकांच्या मताचें जास्त निरीक्षण करीत असतो. व ह्या लोकांकडून जेव्हां त्यांना सहानुभूति मिळते तेव्हां त्यास ज्यास्त स्फूर्ति, निदान मानसिक समाधान तरी मिळत असतें. आतां ब्रि. हिंदुस्थानावर पूर्णपणें अवलंबून असलेल्या गोमांतकानें कोरड्या सहानुभूतिपेक्षां जास्त कांहीं करणें अशक्य आहे. यांत संशय नाहीं. नुसत्या शाब्दिक सहानुभूतिमुळें आमच्या मायदेशाला इजा व्हावयास असतो. परंतु आज चारी बाजूंवर गुलामगिरींत खितपत पडलेल्या स्वाभिमानास मुकलेल्या गोमांतकास विचारी व समजदार लोक दोष देणार नाहींत. आहातच जर मुळींच पाणी नाहीं तर पोहऱ्यांत कुठून येणार याची प्रत्येकाला जाणीव असते. परंतु या कोरड्या सहानुभूतीवरसुद्धां जेव्हां हातमार घालण्याचा प्रयत्न करण्यांत येतो, तेव्हां मात्र या स्वयंमान्य शिलेदारांच्या अविचाराची कमाल होत असते.

तात्पर्य, आमच्या शेजारांच्या हरेक देशहितविषयक चळवळीनां निरपेक्ष सहानुभूति दर्शविणें अर्थात आमचें पवित्रतम कर्तव्य ठरतें, हें ओघानेंच सिद्ध होतें.

वर्तमानसार

--पूर्वी प्रसिद्ध झाल्याप्रमाणें ता. १८ रोजीं येथील बालोन्नतिसमाजाचा प्रथम वार्षिकदिवस समारंभ श्री दो. सुब्राय वि. प्र. देसाई, सांवर्डे, यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटानें पार पडला. उत्सवाला मुसलमानबंधूनीं आपल्या आगमनानें विशेष शोभा आणली होती. समयास अनुसरून श्रीं. दो. जयवंत ध. मळकर्णेकर, रा. राजाराम रा. शिरवैकर व दो. शिवाजी शाभा देसाई यांचीं भाषणें झाल्यावर आमच्या संपादकांचें प्रवचन होऊन हिंदुमुसलमानकी जयांच्या गर्जनेंत उत्सव समाप्ति झाली. याच प्रसंगीं संस्थेतर्फे उपरिनिर्दिष्ट दो. शिवाजी देसाई यांकडून रा. शिरवैकर यांस त्यानीं बजावलेल्या निरपेक्ष कामगिरीची आठवण ह्मणून रौप्य पदक अर्पण करण्यांत आलें.

जाहीर आमंत्रण

येत्या ११ डिसेंबर रविवार रोजीं पो. इंडियातर्फे देपुताद व सेनादोर यांच्या निवडणुकी व्हावयाच्या असल्याचें सर्वांस माहीत असेलच. या बाबतींत हिंदुसमाजामध्यें मतभेद न होतां एकतंत्रीपणा रहाणें अवश्य आहे. अर्थात हिंदुसमाजाचें या बाबतींत धोरण निश्चित करण्याकरतां सर्व हिंदुनागरिकांची जाहीर सभा येत्या ता. १ डिसेंबर रोजीं प्रागतिक संघातर्फे पणजी मुक्कामीं सहकारी व्यापारी संघाच्या दिवाणखान्यांत संध्याकाळचे ७ वाजतां भरविण्याचें ठरविलें आहे. तेव्हां एकंदर हिंदु नागरिकांनीं हजर रहावें अशी सर्वांस अत्याग्रहाची विनंति आहे.

आपला नम्र.

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई

अध्यक्ष प्रा. संघ.

पुरुषोत्तम श्री. सुकेरकर

सेक्रेटरी.

दुखवट्याची सभा

O sr. ministro Celestino de Almeida por cuja eleição o sr. Prazeres da Costa tanto se empenhou ultimamente publicou uns poucos de decretos que atingem directamente a India. O primeiro foi o dos Correios e Telegrafos que trazia para aqui um inspector da *2* a. classe em vez de 3a, e um aumento de metade de categoria com diuturnidade aos funcionarios desse seviço. Veiu a seguir um outro regulando as condições de concurso para delegados de saude e em que ficavam deitados a margem *todos os diplomados* pela Escola Medica de Goa, isto é, os medicos da Escola de Goa nem podiam prestar para delegados de saude na sua propria terra.

E como se tudo isso fosse pouco vieram, finalmente mais dois decretos, um que criava uma cadeira de *puericultura* na Escola Normal com um vencimento de mais de *6 mil rupias* e o outro que criava uma *inspecção das comunidades*. Quer isto dizer que o sr Prazeres da Costa, querendo aumentar os seus amigos à custa do tesouro do Estado, garantindo, assim, a sua reeleição *per omnia secula*, tratou agora, de meter em contribuição as comunidades da India a que os amigos do povo costumam aqui chamar *amparo dos orfãos e viuvas*.

E a tal comedia da elevação do Liceu Municipal de Margão a Nacional, que no famoso comicio efectuado na mesma vila desandou em força de entremes... com o [illegible]

so episodio de telegramas contraditorios enviados ao eterno representante da India, a deixarem transparecer uma briga entre os parceiros ?...— Que me diz a isto o eleitor da India que poucos dias antes vira os mesmos actores a clamarem contra o deficit ? Ainda não se esqueceu, de certo de que a chamada reclamação da India em favor do Liceu Nacional era um *truc* de tornaviagem engendrado nos corredores do Terreiro do Paço onde se preparavam os nichos para pintar de *aspiração popular*, o que era apenas uma autentica necessidade de arrumar á mesa do orçamento varios pretendentes, quando se viu que a vereação da Camara Municipal de Salcete —— e honra lhe seja —— se não prestava ao jogo dos interessados na futura reitoria e no futuro corpo docente, desparando um telegrama, em nome *dos povos de Salsete* a gritar por um Liceu Municipal, como as crianças gulosas pedem emulsão *Scot*, foi, então que surgiu a luminosa artimanha de comicio em nome dos *pais de filhos*, promovida por cidadãos alguns dos quais, tão desinteressados que não consta que séjam pais. E com quem é que contavam no Terreiro de Paço todos esses *pais de filhos* pára a efectivação dessa particularissima aspiração que tinha a grande vantagem de agravar o nosso deficit? E que autoridáde moral e politica pode ter como representante dos povos

da India o sr. Prazeres da Costa que é o procurador nato de todos esses interesses que os decretos citados ou outros por vir visam a arrumar ?

Ecco...

Quando menos esperava vejo no mui lido jornal de V. uma coluna e *pico* da proza do Sr. Naique, não obstante o que eu disse no meu artigo passado. Tambem desta vez, queixa-se da falta de provas. Mas que provas que eú não tenha dito quer o sr. Naique ! ?

Seja mais claro e diga concretamente o que eu afirmei sem elas, pois não estou disposto nem obrigado a advinhar o que ele quere.

Afinal parece-me que o sr. Naique labora numa grande confusão mental. Doutra maneira não se explica que ele depois de tanta trapalhada, diga que na escolha de professor, haja em vista não só a sua sciencia mas tambem a educação que poderá ministrar, ponto em que eu mais insisti [illegible]

Acrescenta-se a isto que eu nunca disse que os diplomas eram o melhor meio da escolha do professor, antes pelo contrario, sei que as mais das vezes os diplomas não são expressão fiel da verdade

De tudo isto concluo que o sr Naique nem sabe ó que escreve, não tomando em consideração *ruido* que é coisa bem diferente do *roido*.

Desta vez o sr. Naique, apatetado pela franquesa com que encarei a elevação diz uma novidade. Que eu apareço em publico sob a mascara de Carlos Frias. O sr. Naique queira dizer me como deseja que eu apareça. Sempre me pareceu que era indiferente que eu aparecesse de mascara casaca, sobre-casaca ou langotim. De resto pela minha certidão do baptismo sei que o Pe. F... baptisou e fez mais coisas a individuo de sexo masculino a quem foi dado o nome de *Carlos Frias*. O sr. Naique diga sem rebuços se deseja que eu mude de nome. Se quizer, repito, tenhe bondade de mo dizer.

Tenho *2* sobrinhos, estudantes do Liceu. Um deles escreve-me uma longa carta de 5 folhas em unico periodo(o que não me admira visto ter sido há tempos, aluno do Sr. Ferreira de Fonseca) comunicando-me que o sr. Cota Cruz estava zangadinho, ameaçando o ceu, a terra e o mar, irado depois da leitura do meu artigo anterior.

Concluindo: não julgue o sr. Naique que eu me excusarei de criticar o que mé parecer mal embora tenha de indicar nomes. Nestes ultimos tempos, por exemplo parece-me mal a nomeação do sr. Rosendo Barreto Xavier.

O Governo local, com autorização superior abre o concurso para professores do Liceu de Márgão e o governo da Metropole nomeia o sr. Rosendo Barreto Xavier indipendentemente do concurso.

Que lhe parece, sr. Naique? Não acha bonito ?...

Carlos Frias

Ponto final

O prometido é devido. Publicando noutro lugar o segundo comunicado do sr. Naique, cumprimos- pois a nossa promessa.

No seu escrito, o admirador *incondicional do Simbolo Indiano* atribue-lhe , com uma cegueira indi culpavel, o desenvolvimento instrutivo da India Portuguesa cujas ruinas aliás, êle cavou para garantir o seu estomago e o dos rafeiros que lhe foram lamber os pés

E' sabido de todos que o nosso descalabro economico è devido tão somente, á obra altamente anti politica e antipatriotica do sr. Prazeres que não poupou ocasião alguma de, sob o falso pretexto de servir o seu Paiz, desgraça-lo *criando instituições* para colocar seus parentes e aderentes.

O sr. Naique pode estar certo que a Historia estigmatisará o seu idolo com o ferrete de *maior inimigo* da India Portuguesa. Lêia tambem, o que está dito, noutro lugar, a proposito do sr Costa para formar a sua convicção sobre o Simbolo.

E ponto final sobre êste assuto que por mais *alegre* que seja, vai causando fastidio, aborrecendo nos- e crêmos- os nossos leitores tambem.

O sabão não tem propriedade de limpar o carvão, da sua côr negra. Não é verdade, sr Naique?

Verdade antes de tudo

O sr, Cota Cruz, professor do Liceu Central de Nova Gôa foi

वाढते ह्मणून कायद्यांत प्रतिबंधक कलम घालण्यांत यावें. दारूच्या दुकानदारास दुसऱ्या मालाची विक्री खरेदी त्या दुकानावर करतां येत नाहीं याची जाणीव मक्तेदारास होण्यासाठीं त्या कलमाची पुनरावृत्ति या बीलांत अगत्यपूर्वक करण्यांत यावी.

मक्तेदारानें दारू कोणास विकूं नये या प्रश्नाचा विचार डा. मिरांद यानीं आपल्या सूचनेच्या ठरावांत केला होता. पण तो ठराव तसा पास झाला नाहीं याबद्दल कोणासहि खेदच वाटेल. या सूचनेवर ना. गव्हर्नर साहेबानीं जी उपसूचना आणून पास करून घेतली तीमुळें बीलांत बरेंच वैगुण्य राहिलें आहे. कोणत्या अज्ञान व्यक्तीस दारू विकूं नये, याबद्दल डा. मिरांद व डा. जाईम मोराईस यांचें एक मत आहे. पण क्रियांत कोणत्याहि वेळीं दारू विकूं नये असें डा. मिरांद ह्मणत होते तर ती फक्त सूर्यास्तानंतर विकूं नये असें मोराईस साहेबांचें ह्मणणें कायदे मंडळानें, फार आढेवेढे न घेतां पास करून टाकलें. पहिला मुद्दा अज्ञानदशेसंबंधाचा; सोळा वर्षांखालील तो पूर्ण अज्ञान आणि सोळा वर्षांवरील पण एकवीस वर्षांखालील तो अपूर्ण अज्ञान असे त्यांत दोन भेद आहेत. कोणत्याहि सरकारी कायद्यानें या दोनहि दशेंतील अज्ञानास स्वतंत्रता नाहीं; त्यांस स्वतःच्या कारभारास सुद्धां आईबापांची व त्यांच्या अभावीं तिऱ्हाईत पालकाचा आश्रय घ्यावा लागतो. खुद्द न्यायकोर्टात न्यायाधिशासमोर आणि पोरक्या मुलांचें आश्रयस्थान अशा सरकारी अधिकाऱ्यांसमोर केलेला कोणताहि व्यवहार कायदेशीर ठरत नाहीं व संपत्तिनाश, अब्रूनाश व देहनाश कारणीभूत होणारें व्यसन जडवून घेण्यास मात्र दुसरी अशी दशा उपयोगी पडावी याचें कोडें उभय डाक्टर साहेबानींच उकलून सांगावें, हेंच बरें. त्याच्या त्या दुसऱ्या अज्ञदशेचा फायदा सरकारी अधिकारीसुद्धां घेण्यास कसे करणार नाहींत. आणि कलाल लोक मात्र घेणार नाहींत असा सरकारचा समज आहे काय ? काय, आहे तरी काय ? अज्ञानतेच्या दोनहि दशा जमेस धरण्यास सरकारास इतकें कठिण वाटत आहे तर सरकारच्या पोटांत मद्यपानाच्या या अनीतिकारक व्यसनास आळा घालण्या इतका जिव्हाळाच नाहीं हें खास. येऊन जाऊन त्यांची नजर उत्पन्नावर. मद्यपान प्रतिबंधाची गोष्ट आली कीं त्याच्या पोटांत धडकी भरलीच ह्मणून समजावयाचें; मग आलेली हुडहुडी दाबून कसें तरी गोड गोड शब्दानीं मारून न्यावयाचें. परंतु उत्पन्नावरचें आपलें बोट हालवावयाचें नाहीं. मूळच्यापेक्षां ५० टक्के वाढवावयाचें त्यांत काय साधणार तें त्यांसच माहीत.

स्फुट विचार

करांचा बोजा:—तीन आणे कराच्या अवजड बोजानें गांजलेल्या सरहद्दीवरील लोकांनीं गव्हर्नरसाहेबांस आपलीं दुःखें कळवून तो जाचक कर रद्द करण्याविषयीं विनंति केली आहे. हा विनंति-अर्ज अर्जदारांच्या इच्छेनुरूप ना. डॉ. अंकदेश देसाई यानीं स्वतः डॉ. मोराइस यांच्या हातीं देऊन, तीन आणे करांपासून उत्पन्न झालेल्या अडचणींचें सांगोपांग वर्णन केलें. या कराचा बोजा किती असह्य आहे, हें आह्मीं बऱ्याचवेळीं सरकारच्या कानावर घातलेंच आहे. 'येन केन प्रकारेण' कर वसूल करण्यास सोकावलेली नोकरशाही आतां तरी शुद्धीवर येऊन सदरील निंद्य व अमानुष करापासून गोमांतकांतील व गोमांतकाबाहेरील जनतेस मुक्त करील अशी आशा आहे. तीन आणे कराच्या साडेसातीचें समूळ उच्चाटन होण्यासाठीं ना॰ देसाई यानीं केलेल्या अविश्रांत परिश्रमाबद्दल—मग ते परिश्रम फलद्रूप होवोत अगर न होवोत—जनता त्यांची सदैव आभारी राहील, यांत संशय नाहीं. अंतःकरणपूर्वक प्रयत्न करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. फळ येणें न येणें हें परमेश्वराधीन आहे.

सरकारी देणें:-चालू महिन्याच्या अखेरपर्यंत जमिनीवरील मागील वर्षांच्या करांचें देणें बिनव्याज व बिनदंड चुकतें करण्याची सरकारनें सवलत दिली होती. परंतु ही सवलत, सेलाची बाब त्यांत जमेस न धरल्यामुळें कशी निरुपयोगी ठरत होती, हें आम्हीं पोर्तुगीज भागांत सप्रमाण सिद्ध करून 'सेल' माफ करण्याची जरूरी सरकारास पटविली होती. त्या प्रमाणें सरकारनें आमचें ह्मणणें लक्षांत घेऊन व्याज, दंड व सेल माफ करून मागील 'प्रेदियाल' चुकतें करण्याची सवड दिली आहे. तिचा योग्य फायदा घेऊन सरकारचे देणेदार सरकारच्या ऋणांतून आपणांस मोकळे करून घेतील अशी आशा आहे. 'इंतिमचांव इश्चिकुसांव-गुब्रुलवांव' या त्रयीच्या जाचांतून अत्यंत फायदेशीर रीतीचें मुक्त होण्यास उपरिनिर्दिष्ट सारखी संधि क्वचित्च प्राप्त होत असते. याकडे दृष्टि देऊन लोक या कामीं हलगर्जीपणानें मागाहून पश्चात्ताप होण्यास कारण ठेवणार नाहींत, अशी उमेद आहे. सदरील सवलतीबद्दल जनता सरकारची सदैव आभारी राहील यांत संशय नाहीं.

निवडणुका दूरावल्या:—ता. ११ रोजीं होणाऱ्या निवडणुकींचा समारंभ येत्या जानेवारी महिन्यांत पार पाडण्याचें ठरविलें आहे ! परंतु पोर्तुगालच्या परिस्थितीचा नाजूकपणा वाढत्याच प्रमाणावर असल्यावरून मध्यंतरीं कसल्याहि भानगडी उपस्थित न होतां नवीन ठरविलेल्या दिवशीं त्या निवडणुका पार पडतील असेंहि ह्मणतां येत नाहीं ! पोर्तुगालची स्थिति इतकी अनिश्चित आहे कीं, त्या संबंधीं कसलेंहि भविष्य वर्तविणें फार धोक्याचें आहे, हें कोणीहि कबूल करील.

रा. ब. भांडारे—सारस्वत ज्ञातींतील सुप्रसिद्ध गृहस्थ रा. ब. सदानंद त्रिंबक भांडारे यानां मुंबई येथें ता. २१ नव्हेंबर १९२१ रोजीं देवाज्ञा झाल्याचें कळविण्यास परम वाईट वाटतें. रा. ब. भांडारे यानीं समाजहितविषयक कार्यांत बराच स्वार्थत्याग सोसलेला असून, सारस्वत ज्ञातीचा दर्जा वाढविण्यासाठीं यथाशक्य तितके प्रयत्न केलेले आहेत. त्यांचें खासगी आचरणहि धुतलेल्या शुद्ध तांदळांप्रमाणें पवित्र होतें. एकंदरींत रावबहादुरांच्या अत्यंत शोचनीय निधनानें सारस्वत ज्ञातीचेंच नव्हे तर पर्यायानें सबंध देशाचेंहि नुकसान झालेलें आहे ! परमेश्वर मृताच्या आत्म्यास शांति देवो !

—गेल्या अंकांतील अग्रलेखांत १२ टक्के व ५० टक्के या ऐवजीं १० व १५ टक्के असे शब्द चुकून पडले.

मोफत वाचनालयें

[मडकई येथील श्रीसरस्वतीवाचनमंदिराच्या वाढदिवसाच्या सभेंत वाचलेला निबंध]

वाचनालयें ह्मणजे मोफत लोकशाळा होत. या शाळांत सर्व जातीच्या, सर्व धर्माच्या व सर्व वर्गाच्या ज्ञानाभिलाषी जनांस वेळ, पैसा, व इयत्ता याची कोणतीच मर्यादा न ठेवतां सार्वत्रिक शिक्षण दानाचें काम जसें होत आहे तसें व त्या तऱ्हेचें काम करण्यास येथील शाळा व कॉलेजें सुद्धां असमर्थ आहेत. शाळा व कालेजें यांत जाणाऱ्यांची संख्या सुधारलेल्या देशांत बहुतेक नियमितच रहाणार पण वाचनालय ही शाळाच अशी आहे कीं, येथें विद्यार्थी वर्गास नियमित करणारी अशी कोणतीच अडचण असणें शक्य नाहीं. वाचनालयांची संघटना करणें व ती चालविणें या गोष्टी लोकांनीं लोकांकरितां व लोकांच्याच सहाय्यानें चालविलेल्या असल्यामुळें त्यांचा उपयोग सार्वजनिक व सार्वत्रिक शिक्षणाचा लोकांत प्रसार करण्याकडे होत आहे. सक्तीच्या व मोफत प्राथमिक शाळांतील शिक्षणानें लोक साक्षर बनतील एवढेंच; पण बहुश्रुतपणा व देशांतील सार्वजनिक प्रश्न सोडविण्याची कार्यक्षमता हे गुण त्याच्या अंगांत येण्याची आवश्यकता असल्यास मोफत वाचनालयें काढून वाचनाभिरुचि-वाचनाची सदभिरुचि—वाढविल्याशिवाय दुसरें गत्यंतर नाहीं. समाजसेवा करण्यास तयार असलेल्या अनेक होतकरू, उत्साही व स्वार्थत्यागी तरुणांनीं आतां मोफत वाचनालयें चालवून समाजसेवा करण्याचा एक नवीन मार्ग मोकळा झाला आहे. अनेक घरगुती वाचनालयें व श्रीमंत लोकांच्या कोनाकोपऱ्यांतून पडलेलीं पुस्तकें, वर्तमानपत्रें व मासिकें एका ठिकाणीं करून त्यांचें जर एक मोफत वाचनालय काढलें तर त्याचा उपयोग सर्वांस होऊन सार्वत्रिक शिक्षणास उपयुक्त मदत केल्यासारखें होणार आहे. या वाचनालयांची सर्व ठिकाणीं सुव्यवस्थित स्थापना करणें हें एक राष्ट्रीय शिक्षणाचें महत्वाचें अंग आहे. शाळांमधून देण्यांत येत असणारें शिक्षण पुढें चालू ठेवण्याला वाचनालयें हींच साधनें आहेत शिक्षण प्रसाराच्या कामीं वाचनालयांचा उपयोग शाळा किंवा कॉलेजें यांच्या पेक्षांही अधिक आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आमच्या गरीब, साक्षर, व निरक्षर लोकांना सामाजिक, धार्मिक, राजकीय व शास्त्रीय विषयांसंबंधीं उत्तमोत्तम वाङ्मय फुकट वाचण्याची मुबलक सोय व संधि मिळावी एवढें जरी काम तूर्त या मोफत वाचनालयांपासून होत राहिलें तरी देखील सार्वत्रिक शिक्षणाची मोठीच कामगिरी होणार आहे. हीं वाचनालयें योग्य तत्वांवर लहान लहान गांवोगांवीं जर निर्माण होतील, तर देशांतील पर्वतप्राय अज्ञानराशीचा लवकरच नाश होण्याची उत्तम साधनें हातीं येतील व लोकशिक्षण, परस्परसहाय्य वगैरे देशोन्नतीला अवश्य असणाऱ्या उत्तम गुणाचा जनतेस लाभ होईल. आमच्या तरुण पिढीची शिक्षणविषयक दैना थोडी दूर व्हावी व आपल्या मायभाषेची यथामती कार्यकारी वाङ्मयात्मकसेवा नीटपणें करितां यावी या पवित्र उद्देशानें गोमांतकांत अशा सन्मान्य संस्था स्थापन झाल्या आहेत. या संस्थांतून शिक्षणविषयक प्रश्नावर प्रकाश पाडणारी पाश्चात्य देशांतील उपयुक्त व प्रेरणात्मक अशा माहितीचा प्रसार करणारी तरुण पिढीच्या ज्ञानांत भर घालून तिला उद्योन्मुख, विजयोत्सुक व कर्मवीर बनविणारीं लहानमोठीं पुस्तकें संग्रहीत करणें हें चालकांचें मुख्य कर्तव्य आहे. तरुणपिढी हा राष्ट्राचा आधारस्तंभ आहे. ती राष्ट्राचें जीवन आहे. राष्ट्ररूपी शरीराचा तो आत्मा आहे. जगांतील इतिहासांतील कोणतीही महत्वाची गोष्ट घ्या ती तरुणानींच घडवून आणिली आहे, असें दिसून येईल. कोणतीही क्रांति घ्या, तींत तरुणांनींच पुढाकार घेतल्याचें आढळेल. तरुणाची बुद्धि विशेष परिपक्व झाली नसल्यानें व अनुभवजन्य ज्ञान त्यानां मिळालें नसल्यानें त्याच्यांत उतावळेपणा व पर्यायानें थोडेंसें न्यून असलें तरी त्यांचें रक्त उसळत असल्यानें व त्यांच्यांत एक विशिष्ट प्रकारचा जोम व धमक असल्या नें, यांत फारसा विचार करीत बसावयाचें कारण नाहीं. कांहीं तरी क्रिया करावयाची आहे, चळवळ किंवा धडपड करावयाची आहे अशा बाबतींत तेच फार उपयोगी असतात. व हल्लींचे तरुण पुढें विचारवंत व पोक्त असे पुढारी व राष्ट्राचे नेते होणार असल्यानें तरुणाच्या योग्यायोग्यतेवर राष्ट्राचा अभ्युदय अवलंबून आहे. जे तरुण धाडसी नाहींत, ज्यांच्यांत उत्साह नाहीं, स्वातंत्र्याची ज्यानां चाड नाहीं, आपल्या राष्ट्रासंबंधीच्या आपल्या कर्तव्याची ज्यानां जाणीव नाहीं व आपल्या राष्ट्राकरितां लागेल तो स्वार्थत्याग करण्याची ज्यांची तयारी नाहीं अशांनीं कितीही ज्ञान मिळविलें, कितीहि विचार केला व आपल्या बुद्धिमत्तेचा कितीही प्रभाव दाखविला तरी राष्ट्राचे नेते होण्याची योग्यता त्यांचे अंगीं येणें कधींही शक्य नाहीं. शिक्षणाचा वास्तविक उद्देश ह्मटला ह्मणजे देशांतील लोकांचीं मनें सुसंस्कृत करणें हा होय. ज्या शिक्षणानें लोकांचे उद्योग धंद्याचें ज्ञान वाढेल, अब्रूनें व स्वतंत्र रीतीनें उदरनिर्वाह करितां येईल, नीतिमत्ता व स्वदेशप्रीति हीं वाढतील, समाजांत दर्जा वाढेल बरें कोणतें वाईट कोणतें हें जाणण्याची पात्रता अंगीं येईल, एक जुटीनें राष्ट्रकार्य करण्याची पात्रता अंगीं येईल, राजकीय दास्यत्व नष्ट करण्याचें सामर्थ्य व कळकळ हीं मनांत उत्पन्न होतील, धर्म-बुद्धि जागृत होईल व एकंदरींत समाजाची स्थिति सुधारण्याची ऐपत अंगीं येईल अशा तऱ्हेच्या शिक्षणाची आपल्या राष्ट्राला आज अत्यंत जरूरी आहे. पण सध्या सुरू असलेल्या शिक्षणापासून दास्यत्व उपभोगण्याची पात्रता मात्र अंगीं पूर्ण भिनत चालली आहे. स्व—देश, स्व-धर्म, व स्व-भाषा यांचीं रीति या वाईट असून, परकीय धर्म, भाषा हीं उच्च आहेत अशीही मनोभावना होत चालली आहे. आज शाळा व कालेजें यांत हजारो विद्यार्थी शिकत आहेत. पण हे कशासाठीं ! नोकरीसाठीं ! ह्मणजेच पर्यायानें असें ह्मणतां येईल कीं, सध्या आमच्या सरकारानें शिक्षणाचे दरवाजे सताड उघडे आहेत व उघडीत आहे त्याचा अंतस्थ हेतु प्रजेचीं मनें सुसंस्कृत करणें हा नसून नोकरशाहीचे चाकर बनविण्याचें आहे सरकार परधर्मीय ह्मणून धंदे शिक्षण, शारीरिक शिक्षण त्याचप्रमाणें धर्मशिक्षणही नाहीं हें खरोखरच आमच्या राष्ट्राचें दुर्दैव समजलें पाहिजे. मुद्रणकलेच्या शोधीबरोबरच 'वाचनालय' ही संस्था नांवारूपास

ANNO I — NUMERO 40 — 1921 QUEPEM QUINTA-FEIRA DE 29 DEZEMBRO

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai

Assinatura
India Portuguesa...... 3-00-00
India Inglesa.............. 3-08-00
Numero Avulso..........0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें.] केपें, गुरुवार, तारीख २९ माहे डिसेंबर सन १९२१ [अंक ४० वा.

Concelho de Pondá

E' sentir publico que os serviços actualmente acumulados a cargo do administrador do concelho de Pondá, de maneira como correm, em nada satisfazem ás suas aspirações nem correspondem ás suas necessidades; e as diversas fases por que a mesma administração passou, demonstram que elas visaram antes o interesse pessoal do que a utilidade publica.

E' principio assente que as instituições locais devem sempre acompanhar a evolução social por forma que sejam elas dignas do regime do governo e do estado adiantado da civilisação dos povos, mas é pena confessar que não só na vigencia da *ominosa* monarquia, mas ainda depois da proclamação da *luminosa* republica tão aspirada, o modo administrativo das Novas Conquistas, longe de ser pautado por estes principios, foi antes sofrendo retrocesso em varios pontos.

Não póde haver instituições perpetuas, porque não há sociedades estacionarias. Extinctas as antigas administrações fiscais pelo Decreto de 14 de Dezembro de 1880 foram criados os logares de administradores dos concelhos nas Novas Conquistas, incumbindo a essas entidades a superitendencia de outras corporações como as comuidades, mazanias, mesquitas etc.; mas tendo logo a experiencia demonstrado as desvantagens dessas acumulações e centralisação de serviços em uma só pessoa foram pela Port. Prov. nº 500 de 1883 encarregados de superitendencia das mazanias, mesquitas e confrarias os seus substitutos, medida que é justificada, entre outros, num seguinte considerando da mencionada Portaria:—

' Considerando que em quanto nos concelhos das Ilhas, Salcete e Bardez existem tres autoridades: administrador do concelho, administrador das comunidades e substituto do administrador com mencionados encargos; o serviço que a cada um incumbe em separado se reune nos concelhos das Novas Conquistas em um unico administrador *resultando daqui por motivo de facil intuição que este não possa prestar a devida atenção aos variados e multiplices serviços que lhes são cometidos*" (O italico é nosso). Mas, volvidos anos, em 1899 pela Port. Prov. nº 385 foram incumbidas, outra vez, aos administradores dos concelhos as funcções da superitendencia das corporações, no intervalo, confiadas aos seus substitutos, alegando a diminuição das despezas, falta dos substitutos e mais cousas e lousas.

Manteve-se este estado de cousas por espaço de dois anos a mais e tendo se reconhecido que isto não convinha continuar no concelho de Pondá, por ali ser *demasiado o serviço* a cargo do administrador (o que aliás é evidente segundo a Cit. Port. de 1883), foi pela Port. Prov. nº 287 de 1901, incumbida no concelho de Pondá a superintendencia das mazanias, mesquitas etc, outra vez, ao respectivo substituto, tirando-a das mãos do administrador; mas apareceu finalmente a Port Prov. nº 156 de 1904 que com o fundamento muito laconico de *subsistirem os motivos da citada Port.* nº 207 de 1901 para riscar que tudo o se tenha passado antes entregou talvez para sempre, as ditas superintendencias ao administrador do referido concelho.

Que dança macabra!

Não só isso; e como que para o cumulo foi o dito administrador do concelho de Pondá encarregado das funcções de administrador das matas de Goa, continuando esta ultima acumulação tambem quase sempre, com administradores do dito concelho, sucessivamente nomeados

Que se conclue de tudo isso?

¿ Seria, por ventura, admissivel que os serviços a cargo do administrador do concelho de Pondá reconhecidos por *demasiados* em documentos autenticos tivessem sido de tal sorte reduzidos que o mesmo administrador pudesse acumular ainda outros cargos de não somenos importancia?

Atestam as variadissimas estatisticas de uma forma precisa e categorica que em todas as repartições tem aumentado os serviços em progressão geometrica, o que é comprovado ainda pelas constantes providencias dimanadas do governo com o fim de descentralisar os mesmos serviços.

Sendo isto uma verdade nua e crua, admitir-se que só na administração do concelho de Pondá tenham diminuido os serviços e isto ainda depois da promulgação do codigo das comunidades de 1904 que tem complicado varios dos trabalhos das comunidades, seria um contra senso rediculo!

Para corroborar o conceito que deixamos estampado nas modestas linhas do presente escrito não temos de ir muito longe.

E' saber da mesma administração o numero de pretenções dos interessados que cada dia vão amontoando as suas instantes por falta de dicisões e devido aviamento, durante não só de meses mas ainda de anos.

São factos concretos, testimunhas eloquentes de toda a verdade.

E' dai maior o prejuizo.

Uma prentenção por exemplo dum interessado da comunidade entrada nessa administração para levantar os seus proventos antes de começar a correr a sua prescrição só tem a dita de sacudir a poeira das instantes da mesma administração, concluido que seja o periodo necessario para se operar a mesma prescrição!!!

¿Quem é responsavel nestas condições para reparar os prejuizos a que o publico esteja sujeito só pelo empenho obstinado de deixar correr o marfim como de sempre da parte das instancias oficiaes?

E' o *zê povinho* quem paga as favas pelos seus pecados.

Não pensem, caros leitores que no move a intenção, de leve que seja, de molestar a pessoa do actual administrador do concelho de Pondá sr. Lopes Pereira, criticando os seus actos ou atacando a sua competencia. Longe de nós tais ideas; porque é a nossa funda convicção que o Governo escolhe só pessoas competentes para as funcções publicas, mas por mais competente que ele seja, por maior zelo com que o mesmo sr. queira exercer a sua actividade, por maior energia que Sua Excia pretenda empregar no estudo dos negocios, do seu cargo, é claro, todavia, que hão de ficar estes expostos para sempre á maior incuria em quanto o Governo não tome devidas providencias para remediar o mal.

Ainda ha mais.

A norma corrente dum bom governo é procurar regularisar a sua forma administrativa quanto possivel, adaptavel, ás necessidades peculiares de cada localidade e ao seu estado social.

Ora o concelho de Pondá sendo mais adiantado de todos os concelhos das Novas Conquistas, não só pelo grande numero de comunidades bem movimentadas, mas tambem pelas ricas mazanias dos templos hindus coeficientes importantes da economia social, que o Governo não pode votar ao ostracismo, como tem procedido até aqui, o regime a adoptar não pode ser igual a outros concelhos das Novas Conquistas,

Se ainda não tem soado á hora de o concelho de Pondá ter as administrações privativas a par , dos concelhos das Velhas Conquistas, exigem as circunstancias, quanto antes, a discentralisação dos serviços a cargo do actual administrador para a moralidade e decoro das instituições, se não de todas, ao menos das comunidades ou mazanias; e quando isto não possa realisar-se por motivos de força maior pedimos a Sua Excia o sr. Governador Geral providencias no sentido de modificar leis de prescrições e de outros prasos marcados nos codigos e regulamentos em vigor abrindo uma excepção respeito ao concelho de Pondá emquanto tiverem que continuar a sua administração no estado actual

Gurudás

ECOS & CRITICA

Um pedido justo

De diferentes partes das Novas e Velhas Conquistas estamos recebendo constantes cartas em que se nos pede que solicitemos do Governo moratoria para o pagamento da divida atrazada das comunidades, confrarias e mazanias.

E' justo o pedido, dada a terrivel carestia que, sem dó nem piedade está oprimindo o Paiz, inteiro, tendo reduzido até á miseria franciscana, muitas das nossas familias.

Torna-se necessario, portanto, que Sua Excia o sr. Governador Geral que deve conhecer, sobejamente, a desoladora situação economica em que o nosso Povo se atormenta, atendá prontamente, á sua suplica.

भारत

गुरुवार पौष्य शु० १ दा० १८४३

अबकारीचा मक्ता

स्त्रीजातीस दारू विकण्याचें बंद करणें हें जसें न्यायास व नीतीस अनुसरून आहे. तसेंच स्त्रीयांनीं दारू विकण्याचेंहि बंद झालें पाहिजे. अथवा मागील एका अंकांत, दारूच्या मक्तेदार होण्यास जो नियम घातला पाहिजे, म्हणून आम्हीं सांगितलें होतें, तोच नियम, मक्तेदाराच्या जबाबदारीखाल दुकानें उघडणाऱ्या अगर त्या दुकानांतून दारू विकावयास बसणाऱ्या सर्व इसमास लागू केला पाहिजे. तो नियम म्हणजे साक्षरतेचा, सज्ञानतेचा, पुरुषत्वाचा आणि चांगल्या वर्तणुकीचा दाखला दाखविणें हा होय. नाहीं तर मिळेल त्यानें दारूचें दुकान उघडावें, समाज व सरकार यांस फसवून धंदा चालवावा आणि लोकांच्या व्यसनाधिनतेचा फायदा घेऊन आपण गबर व्हावें हा क्रम तसाच सुरू राहील. यांत सरकारास सांपत्तिकदृष्ट्या फायदा असला तरी समाजाची आणि त्या बरोबर सरकारची नैतिक अधोगति झाल्याशिवाय राहणार नाहीं हे खास.

प्रत्येक गांव अथवा गांवांचें गट, यांतील दुकानांची संख्या नियमित करितांना त्या त्या गांवांतून जत्रा वगैरे प्रसंगीं उघडणारीं हंगामीं दुकानें जमेस धरतां येत नाहींत. कांहीं प्रसिद्ध ठिकाणच्या जत्रा, बाजार यांमधून दुकानें उघडण्याचा परवाना देण्यास सरकारनें आपणांस सवलत ठेऊन, कायद्याची थट्टा करण्यास लोकांस एक साधन ठेविलें आहे. कोणत्याहि धर्माच्या देवस्थानांतील जत्रांत किंवा त्या प्रसंगीं भरणाऱ्या बाजारांत जमणारे लोक, एकधर्मश्रद्धेनें अथवा प्रापंचिक व्यवहाराच्या निमित्तानें आलेले असतात. त्यांच्या त्या धर्मश्रद्धेस तसेंच त्या प्रापंचिक व्यवहारदक्षतेस पायावर बसवून, आपल्या नादीं लावण्याची शक्ति दारूवाईच्या आंगीं आहे. हें ओळखूनहि, सरकारनें अशा सार्वजनिक प्रसंगीं देखील तीस मुभा देणारें एक कलम राखावें हें कशाचें द्योतक बरें ? लोकहितबुद्धीचें कीं स्वार्थतत्परतेचें ? याचा उलगडा त्याचा त्यानेंच करावा. नाहीं तर त्यापेक्षां कायद्यांत दुरुस्ती करून जत्रा वगैरे ठिकाणीं दारूचीं दुकानें उघडण्यास साफ बंदी करून स्वच्छपणा राखलेला बरा.

कलम ८ मध्यें धार्मिक मंदिरें, शाळा आणि सार्वजनिक कचेऱ्या यांपासून २५० मेत्रांखालील अंतरांत दारूचीं दुकानें उघडूं नयेत असें म्हणून, लागोपाठ तें अंतर गव्हर्नर जनरलच्या खास परवानगीनें १५० मेत्रांपर्यंत कमी करितां येईल अशी सवलत ठेविली आहे. पूर्वीचीच बंदी कायम केली असती तर, त्या कक्षेंत न येणारी, अशी जागा, दुकानें उघडण्यास राहणार नाहीं म्हणून, मक्ता घेण्यास कोणीहि इसम पुढें न आल्यानें आपलें उत्पन्न बुडेल अशी निराधार भीति उत्पन्न होऊनच सरकारनें वरील सवलत ठेवली आहे यांत संशय नाहीं. व हें खरें मानलें तर, "सरकारची नजर काय ती उत्पन्नावर" या आमच्या म्हणण्यासच बळकटी येते. असो. कायद्यांत सवलत असली तरी मक्तेदारास तिचा फायदा देणें न देणें सरकारच्या मर्जीवर आहे. तेव्हां सरकारनें आपल्याच हेतूशीं विसंगत होईल असें वर्तन कधींहि ठेवूं नये. यांच कलमांतील धार्मिक मंदिरें, देवळें, व सार्वजनिक कचेऱ्या, यांच्या यादींत, रेल्वे स्टेशनें आणि आगबोटींचे धक्के यांचा, स्पष्ट शब्दांनीं समावेश करावयास पाहिजे होता; कारण सार्वजनिक कचेऱ्यांत त्यांचा अंतर्भाव होणारा आहे. हें जरी खरें असलें तरी कित्येक वेळां कायद्याचा अर्थ ठरविणारे अधिकारी तज्ञ असतातच असें नाहीं. त्यांत दारूवाईशीं गांठ. अगदीं कोरडी असलेली जीभ ओली करून टाकण्याची कला तिला साधलेली ! मग काय विचारतां ? एक वेळ नजर पडली कीं पुरे? तिची कड घ्यावीसें कोणासहि वाटेल. या साठीं कलमांत स्पष्ट खुलासा झालेला बरा. पण त्या पूर्वी सरकारनें आपल्या आगबोटींवर मक्त्यानें दिलेलीं देशी परदेशी दारूचीं दुकानें उठविलीं पाहिजेत. त्या दुकानांपासून दारू पिणाऱ्यांच्याच खिशास आणि आरोग्यास धक्का बसेल यांत संशय नाहीं पण त्या बरोबर दारूच्या आंगांत नवे दारूबाज निर्माण करण्याची शक्ति आहे. हेंहि विसरून चालणार नाहीं. बरोबरच्या नात्यानें चार चैनी गृहस्थ बसले असतां प्रवासाच्या रिकाम्या वेळांत एकमेकांच्या भीडेभाडेनें दारूचे शिसे रिकामे करितांना पुष्कळांनीं पाहिलेंच असेल. ते सारे मूळचे दारूबाज होते अशांतला भाग नाहीं. तर फक्त आपल्या पदरांत कृपणतेचा अथवा गंवढीपणाचा दोष पडण्याचें टाळावें म्हणूनच त्या घातकी व्यसनास ते बळी पडलेले असतात. आगबोटीच्या प्रवासाची दगदग आणि कंटाळा घालविण्याच्या निमित्तानें कित्येक वरचेवर दारूचे ग्लास झोंकून त्या निशेंत तर्र पडलेले असतात. त्यांची ती मजा पाहण्याचा सुयोग आणि आसपास पसरलेली नरकापेक्षांहि कठीण वाटणारी, दारूची घाण सहन करण्याचा कुयोग, बिचाऱ्या बिनदारूबाजांस वरचेवर प्राप्त होत असतात. पानस्वातंत्र्याची कोण ही विटंबना !! केवल पशुवृत्तीतच ज्यांचें आयुष्य जात आहे त्या मद्यपि लोकांचे लाड पुरविण्यासाठीं, मानवी स्थितीस अजून पोंचलेले नाहींत अशा बहुजन समुदायाची, सरकारनें देखील पर्वा करूं नये हें केवढें आश्चर्य !! आतां सनू बदलला आहे. सरकारहि बदलत चाललेलें दिसत आहे म्हणून सरकारास आम्ही हाकेनें कळवितो कीं, दारूचें व्यसन कमी व्हावें असें आपण सांगतां तें खरें असेल तर प्रवासाच्या रिकाम्या वेळांत आपल्या जबड्यांत ओढून घेणारीं हीं बोटीवरील दारूचीं दुकानें आधीं बंद करा; आणि दारू पासून अलिप्त असणाऱ्या इतर जनांना दुवा घ्या.

———

नांच दिसेल. पत्राच्या शेवटीं श्री. बांदिवडेकर आपल्या आक्षेपकानां हिणविण्यासाठीं गोमांतकांत श्री शिवाजी महाराजांचें स्मारक घडवून आणण्याचें आव्हान करितात. यांत त्यांचा हेतु शुद्ध असेल व फुटकळी उकळी [illegible] आपल्यापुरतीच नसेल तर त्यानींच पुढें सरून उपक्रम करावा. शक्य ती मदत करण्याचें अभिवचन भारतकाराप्रमाणेंच मी माझ्या व माझ्या अनेक मित्रांतर्फे देऊन त्यांची रजा घेतों.

ज. वि. कामत

स्फुट विचार

मतदार व्हा!:—राजकीय दृष्टीनें मतदाराला किती महत्व असतें हें आज कोणास नव्यानें सांगावयास पाहिजे असें नाहीं. ज्याला मत नाहीं त्याला निवडणुकींत कोणीहि विचारीत नाहीं. त्याकडे ढुंकून सुद्धां पाहणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्याला, आपल्याकडून वसूल करण्यात येत असलेल्या करांचा सदुपयोग होतो किंवा दुरुपयोग होतो, या संबंधीं सरकारास जबाब विचारण्याचा कांहींच अधिकार नसतो. एकंच तो असून नसून सारखाच ! असे 'असून नसून सारखेच' या वर्गांत मोडणारे आमच्या हिंदुजनतेंत पुष्कळ लोक आहेत. त्यानीं, सांप्रतची मुनिसिपालटीनीं दिलेली संधि साधून, मतदाराच्या नोंदबुकांत आपला समावेश करून घ्यावा, अशी आमची त्यांस फिरून विनंति आहे. प्रागतिक संघाच्या स्वयंसेवकांनीं तर प्रस्तुतची वार्षिक पर्वणी साधून घेण्यांत कुचराई करितां कामा नये, हेंहि बजाविल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं.

पोर्तुगालचीं परिस्थिति:—पूर्वपदावरच असून, ती लवकर सुधरण्याचीं चिन्हें दिसत नाहींत. चालू प्रधानमंडळांत, सर्व तऱ्हेच्या पक्षाचे गृहस्थ असून, दुहीच्या अग्नीनें त्यांत असलेल्या दिखाऊ ऐक्याची केव्हां राखरांगोळी होईल याचा भरंवसा नाहीं. एकाच पक्षाच्या लोकांचें प्रधानमंडळ असतानां जर तें महिन्यापेक्षां जास्ती टिकूं शकत नाहीं, तर भिन्न लोकांचें सदरील मंडळ दिवसांपेक्षां जास्ती टिकणें शक्य वाटत नाहीं; हें उघड आहे. घोडा मैदान जवळच आहे. पहावें काय होतें तें !

इकडे लक्ष द्या:—सरकारी अधिकाऱ्यांसंबंधीं अगर कोणत्याहि गोष्टीविषयीं कोणीहि कशाहि प्रकारच्या तक्रारी आमच्यांस कळविल्यास, त्यांची योग्य दाद आमच्या खर्चानें ताबडतोब लावण्याची आम्हीं खास व्यवस्था केली आहे. मात्र त्या तक्रारी आम्हांस कळविण्यात येतील त्या सार्वजनिक स्वरूपाच्या असून तक्रारी पाठविणारे इसम आमच्या ओळखीचे असले पाहिजेत. निदान आमच्या ओळखीच्या गृहस्थांच्या परिचयाचे तरी असले पाहिजेत. ठिकठिकाणीं भारताचे एजंट आहेतच. त्यांच्या तर्फे कसलीहि 'तक्रार' आमच्या आफिसांत आल्यास तिचा विचार ताबडतोब होईल. तक्रारीसंबंधीं करण्यांत आलेल्या चौकशीचा रिपोर्ट आमच्या खर्चानें ज्याला त्याला लगेच पाठविला जाईल. सरकारी बेमुर्वतखोर अमलदारांच्या गांजणुकीनें त्रास पावत असलेल्या लोकांनीं इकडे लक्ष द्यावें.

अधिकारी आणि निवडणुका:—मुलकी खात्यांतील कांहीं काळ मुख्य पदारूढ असलेले सि. आलफ्रेद रद्रीगीस हे, त्या जागीं नवीन गृहस्थाची आकस्मिक रीतीनें नेमणूक झाल्यानें, पदच्युत झाल्याचें वर्तमान 'भारता'च्या गेल्या अंकीं प्रसिद्ध झालेंच आहे. सदरील पदावर विराजमान असतानां सि. रद्रीगीस साहेबानीं प्राजेरीत द कोस्ताच्या प्रत्येक निवडणुकींत हरएक तऱ्हेनें हैदोस घालण्यास कमी केलें नाहीं ! आपल्या हितकर्त्या मित्राची मर्जी राखण्यासाठीं, त्यानीं, भरदिवसा, कोणाचीहि पर्वा न करतां निवडणुकीसंबंधीं एकंदर कायदे

सत्तेच्या जोरावर पायाखालीं तुडविले व आपल्या हाताखालील नोकरांनांहि खुशाल तुडवावयास लाविले ! कोणास धमक्यावजा सूचना दिल्या तर कोणास विनंतिवजा शिफारसी दिल्या. तात्पर्य निवडणुकींत लुडबुड करण्याचा कोणताहि वाममार्ग आक्रमिण्याचा त्यानीं शिल्लक ठेविला नाहीं. यापुढें तरी सरकारी अधिकाऱ्यानीं स्वसत्तेचा उपयोग निवडणुकीच्या कार्यांत करून, कायद्याच्या पायमल्लीनें आपल्या नावांस कलंक लावूं नये अशी आमची त्यांस प्रेमाची शिफारस आहे.

वर्तमानसार

—पोर्तुगालांत राज्यक्रांति होऊन, तिचा बणवा मुख्य मुख्य शहरांत पसरल्याची तार आली होती. या तारेंत तेथील सर्व हॉस्पिटलें जखमी लोकांनीं चिकार भरून गेलीं होतीं, असेंहि म्हटलें होतें ! परंतु सदरील बातमी वस्तुस्थितीस धरून नसून ती मागाहून प्रसिद्ध झालें आहे ! 'अंदरकी खरी बात राम जानें' !

—माजी प्रसिद्ध पोर्तुगीज ट्रांसलेटर दोतोर वामन घांटकार यांस पणजी या कोर्टांत वकिली करण्याची सनद मिळाली असल्याचें कळविण्यास आनंद वाटतो.

—बंगालच्या लोकप्रिय अमृतबजार पत्रिकेच्या संपादकांस कैद केलें आहे. दडपशाहीचा आततायीपणा !

—डिचोलीचें रेपार्तीसांव द फाजेंद त्याच्या अनावश्यकतेमुळें उठविलें जाईल, असें सरकाररीत्या प्रसिद्ध झालें आहे.

—लेजिस्लेटिव कौन्सिलच्या बैठकी येत्या फेब्रुवारी महिन्यांत पुन्हा सुरू होणार आहेत.

—लोरेंस मार्कीसच्या जकात खात्यांतील तिजोरींत सोळा हजार गिनी बेपत्ता झाल्याचें वर्तमान आहे. सरकारी तपास चालू आहे.

—'व्हांग्वार्द' नांवाच्या पत्रांत १९ आक्टोबरच्या भीषण रात्रीं 'कापले' जाणाऱ्यांची नोंद प्रसिद्ध झाली आहे. त्यांत ५२ राजकीय पुढारी, १७ वर्तमानपत्रकार व ३५ बँकर व व्यापारी इत्यादि लोकांचा समावेश होतो. सदरील ५२ पुढाऱ्यांत खुद्द रिपब्लिकच्या अध्यक्षाचाहि नामनिर्देश आहे ! काय ही अधोगति ?

—सरकारपक्षानें सर्वशक्ति वेंचली असतांहि, बनारस येथील रहिवाश्यानीं युवराजांच्या स्वागतावर पूर्ण बहिष्कार घातला.

—कलकत्याच्या दहा हजार मजुरानीं संप पुकारला आहे.

—जखमी पंजाब हें पुस्तक सरकार जमा करण्यांत आलें आहे ! इंग्रजी अमदानींत यापुढें इतिहास सुद्धां सरकार जमा होण्याचीं दुश्चिन्हें भासत आहेत !....

ANO VI — NUMERO 41 — 1922 QUEPEM QUINTA-FEIRA DE 5 JANEIRO

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai
Assinatura
India Portuguesa...... 3-00-00
India Inglesa............ 3-08-00
N... Avulso......... 0-01-00
Anuncios
...r linha...... 00-01-00
...o praso contrato es-

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००
जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठर विण्यांत येतील.

...६ वें.] केपें, गुरुवार, तारीख ५ माहे जानेवारी सन १९२२ [अंक ४१ वा.

Novas Conquistas

Vezes sem conta temo-nos insurgido contra o indiferentismo oficial em relação ao fomento das Novas Conquistas e, vezes sem conta, tambem, chamado a atenção do Governo para a triste sorte dêssas terras que a pouco e pauco, por incuria e negligencia oficiaes, se vão desvalorisando, visivelmente.

Diz-se que até a pedra amolece pelo bater constante de gotas de agua; mas dúvidas fundadas nos ensombram o espirito, quando vemos conservar-se *intacto o coração* do Governo que não deve ser—supunhamos—tão duro como pedra, ao copioso pranto duns sêres humanos que lhe gritam por socorro, há já . . . . seculos.

Evidentemente, tal estado deprimente demanda pronta modificação. E já que o governo não pode ou não quere tratar disto, é ao Povo daquelas paragens que incumbe a inadiavel obrigação de promover num esforço conjugado, os meios de salvação propria se é que deseja viver, luctando com o paludismo e a falta da segurança da propriedade, males a que não tem podido dar remedio eficaz nem os medicos de partido, nomeados, cá e lá, com juridicçõis extensissimas, nem os postos policiais, instalados, recentemente.

Segundo o nosso modo de vêr, ás Camaras Municipais das N. Conquistas, como corporações genuinamente representantes do mesmo Povo, é que cabe tal papel com o apoio moral do Governo.

E, porisso, passamos a indicar, a seguir, os alvitres que se nos afiguram viaveis, quando nisto haja boa vontade do Governo e das Camaras, conjuntamente. Ei-los:—

As Camaras Municipais das Novas Conquistas deliberem:—

1°

Solicitar do Governo autorisação para que todas as Camaras conjuntamente possam abrir uma e única lotaria, permetida pela Carta Organica em vigor, afim de com o seu lucro, fundar estabelecimentos de beneficiencia e caridade em prol dos habitantes das referidas regiões e em especial socorrer, mediante pensões, ás viuvas indús que se encontrarem sem meios de subsistencia, visto que a experiencia tem, por completo, demonstrado que o auxilio que presentemente dispensam as instituições pias (Santa Casa e Hospicio) não é aproveitado por diferentes razões, pela clase hindu.

2°

Estabelecer nos orçamentos verbas indispensaveis para se poder acudir prontamente aos doentes pobres e necessitados que estejam sofrendo o paludismo e que nas ocasiões de quaisquer epidemias agonisem por falta de alimentos e medicamentos.

3°

Organisar Bibliotecas circulantes conforme capacidade financeira de cada Camara para milhor propaganda de instrucção nos cantos e recantos e nas classes proletarias, devendo para isso sendo mister, pedir a cooperação das comunidades da sua jurisdicção.

4°

Instituir premios escolares para os alunos mais novos di concelho que obtiverem distincção nos exames do 1° e 2° graus.

5°

Organisar uma *escola industrial de artes e oficios* devendo a sede deste instituto fixar-se na Cassabé de Pondá que é centro das mesmas regiões, construindo-se edificios proprios para tal fim.

Pensem, pois, nestes alvitres as referidas Camaras, que ainda é tempo.

ECOS & CRITICA

Muita parra

Muita parra e pouca uva, eis a que ficou reduzido o caso da concessão Magnier. Desde as primeiras negociações, até ás presentes complicações, tudo nesse contrato oficial correu irregular, ainda que relatorios extensos com não menos extensas discripções tenham que rido demonstrar *oficialmente* o contrario.

E' certo que o mesmo contrato distoa da seriedade e, portanto, não há razão para continuar a vigorar, da forma como está vigorando em prejuiso das matas nacionais.

¿E não dirão o motivo porque o sr. enginheiro Zuzarte Mendonça, que não é nenhum oficial do exercito metropolitano em serviço nesta colonia, há de estar exercendo, contra a letra da respectiva portaria, as funcções de delegado do governo, criadas pela mesma concessão?

¿Estaremos, porventura, na maré cheia do proteccionismo?

Gandhi...

A ultima conflagração mundial demonstrou á sociedade que vale mais a força dalma, que a do corpo.

Na guerra politica que continua renhida entre a Inglaterra e India predomina, igualmente, o inquebrantavel poder dalma.

Como sabem, o *Mahatmà* Gandhi é a personificação do poder d'alma; e, porisso mesmo êle foi guindado á mais elevada posição de *Dictador popular* de todo o Industão.

Não resta, pois, dúvida de que Gandhi é o Cristo modesto, nome por que é conhecido nas mais cultas regiões d'America.

Viva o Mahatmá *ad multos anos*!

Dispotismo britanico

Vai subindo de intensidade o dispotismo da burocracia britanica contra os patriotas do visinho territorio. Naturalmente os inglezes continuam a considerar-se *enviados* de Deus-o *Deus* dêles é o insaciavel estomago-para governar a India que é só dos indios. Gandhi demonstrou-lhes, porem, que andam mal persuadidos, que a epoca que atravessamos, não é de molde a que o hospede interesseiro se aposse dos haveres do dono de casa hospitaleiro, que finalmente, estamos numa epoca em que cada um deve possuir o que fôr seu e só seu.

Mas o hospede britanico está no ultimo grau de espasmo e a nós, como estranhos espectadores *curiosos*, cabe apenas o papel de aguardarmos a hora fatal: é o que nós estamos fazendo.

Merecido!

O Ministro do Conselho executivo da India, Pandit Jegat Narayan foi expulso do palacio pela sua propria esposa. Sabem porque? Porque o mesmo senhor continuava recebendo ao cabo de cada mez a importancia de cinco mil rupias é desempenhando as funcções de ministro, apesar da burocracia britanica estar, barbaramente, perseguindo os patriotas indianos.

¿Que dirão a isto as senhoras cá do Paiz embebidas nas noções da economia domestica e educação civica?

A proposito

Quando outro dia, estivemos em *Sanquelim*, tivemos o prazer de visitar o nosso presado amigo sr. Gades S. Sirodcar que é conhecido ali e justamente como homem recto, indipendente e caridoso. Nosobrado onde fomos recebidos amavelmente pelo excelente cavalheiro entrou, logo, na nossa vista o seguinte ditado, escrito em bôa caligrafia num lindo papelão, *Cada um para si e Deus para todos*

E' muito prática a filosofia dêste ditado que parece ser o norte de cada um de nós até da burocracia que tambem é constituida dos nossos semilhantes

Não é para admirar, portanto, que ela, a burocracia, sempre necessitada, procure *melhoria* na sua situação e o contribuinte tambem necessitado *menoria* nos seus impostos, sempre em tom lacrimoso.

E que cada um é para si e Deus é para todos

Pragas

Semana passada, tivemos de empreender uma viagem para territorio britanico da duração de dois dias apenas. Na ida e na volta desde a estação de Colêm até á do Caransol e desde esta até á de Colem, o topico da conversa incidiu invariavelmente sobre o duro imposto de tres tangas e real e meio, ouvindo-se de todos os lados pragas temiveis e só estas!

Se não por outros motivos, pelo menos para evitar tais pragas que tristemente nós feriram os sentimentos de patriotismo urge que o nosso Governo acabe com o referido imposto de tres tangas para seu bom nome que tambem é nosso

E, depois, as pragas do Povo são pragas de Deus, porque a vóz do Povo é a vóz de Deus-*Vox populi, vox Dei*

Portanto, se a Republica não faz caso de Deus, deve fazê-lo, pelo menos, do Povo que, quando zangado, não é nenhuma criança.

आहे कीं तिच्या पुढें बुरोक्रॅसीच्या हलक्या डोलाऱ्याचा निभाव लागणें कोणाहि विचारी माणसाला शक्य वाढणें संभवनीय नाहीं. किंवा पिनलकोडासारख्या गंजलेल्या व आर्मेडमेंटसारख्या कच्चा लोखंडाच्या अधिकारी वर्गानें लोकमताच्या पाण्याशिवाय बनविलेल्या शस्त्राचा महात्माजींच्या असहकाररूपी तेजस्वी अस्त्राचा प्रतिकार करण्यास उपयोग होईल असें ह्मणणें शुद्ध वेडेपणाचें आहे. भगवान श्रीकृष्णासारखे योगेश्वर महात्माजी व त्यांच्या तालमींत तयार झालेली अर्जुनासारखी धनुर्धर जनता ज्या बाजूस आहे त्या लोकशाहीचा विजय हा झालाच पाहिजे.

आमचा इकडील अधिकारी वर्ग ह्या गोष्टीकडे लक्ष देऊन वेळींच सावध होईल तर प्रस्तरास पावणारी ही लांट इथपर्यंत आदळणें बंद होईल अशी आशा करण्यास जागा आहे काय ?

स्फुट विचार

महाजनबंधूंस विनंतिः—एक भजनप्रीय लिहितातः- कोणतीहि धार्मिक अगर सामाजिक चाल समाजामध्यें एकदां रूढ होऊन बसली कीं मग तिचें उच्चाटन तसाच कांहीं तरी आकस्मिक प्रकार झाल्या शिवाय सहसा होत नसतें. हे विचार सुचण्याचें कारण गांव काकोडें येथील देवाच्या पालखीपुढें कलांवती नाचण्याची चाल तेथील महाजन मंडळीच्या स्तुत्य उपक्रमानें बंद होऊन तेथें भजनाची चाल प्रचारांत आली हें होय. देवाच्या पालखीपुढें भजन करण्याची चाल प्रस्तुत सांखळी व वेरें या दोन जागांशिवाय अन्यत्र कोठेंहि असलेली आमच्या ऐकिवांत नाहीं. फोंडें महालांतील जत्रादि उत्सव प्रसंगीं तर कलावंतीणीचा नाच व जुगाराचा धांगडधिंगा ही हल्लीं कांहीं रूढ होऊन राहिलीं आहेत कीं हे दोन प्रकार नसले तर उत्सवाचें जणूं स्वारस्यच गेलें असें कित्येक महाशयांना वाटतें. इतकेंच नव्हे तर यंदा जुगाराला सरकारी अधिकाऱ्यांकडून मनाई हुकूम सुटल्याकारणानें जत्रा अगदीं कुचकामी झाली असेंहि ह्मणणारे हरीचेलाल असल्या समाजामध्यें कांहीं कमी आढळत नाहींत. जुगाराच्या पांयीं अगदीं हलकटपणा स्वीकारून एखाद्या शिपायाची सुद्धां मनधरणी करण्याला अनमान न करणारा एखादा ऐदी गृहस्थ पाहिला ह्मणजे या गोष्टीची साक्ष पटते. पालखीपुढें नृत्यांगनाचा घोळका नसला तर मग उत्सवप्रसंगीं प्रस्तुत होत असलेला जमाव होणें कदापि शक्य नाहीं, अशी कित्येकानां शंका वाटते कदाचित् हा नाच मनाची एकतानता करून अगदीं तन्मय वृत्तीनें अवलोकन करणें हेंहि एक भक्तिमार्गाचें साधन असेल. सार्वभौम अशा रावणाला विरोधी भक्तीच्या योगानें ज्याप्रमाणें मोक्षपदप्राप्ति करून घेतां आली तद्वत ह्या कलियुगामध्यें चालत्या बोलत्या देवतांचें अगदीं सकाळ संध्याकाळ दर्शन घडलें व अभिमानानें निष्टापूर्वक त्यांची सेवा करून गायनादि गुणांचें कौतुक केलें असतां तो मंगलमय प्रभू प्रसन्न होईल असाहि कदाचित् त्यांचा भावार्थ असेल. नाहीं कोणीं ह्मणावें ? व ह्याच दृष्टीनें जणूं आपल्या नैतिक अधःपातावर पांघरूण घालण्यासाठींच कांहीं महाशये असेंहि ह्मणण्याचें धाडस करीत असतात कीं, अशा स्त्रियांकडे आपण पापी नजरेनें पाहण्याची काय जरूर ? केवळ त्यांच्या आंगांतल्या गायनकलेंकडे लक्ष पुरवावें ह्मणजे बस्स. सकृद्दर्शनीं ही विचार सरणी बरोबर वाटते. मात्र अशा निर्मल दृष्टीनें पाहणारे शुकाचार्य मात्र हवे आहेत. परंतु अनुभव पाहिला असतां मात्र याच्या उलट दृष्टीस पडतो ही गोष्ट कोणीहि निःपक्षपाती मनुष्य कबूल करील. एकंदरींत आमच्या मतें ह्या दोनहि चालींचा नायनाट होऊन जर पालखीपुढें भजनाचा प्रघात सुरू होईल तर त्यामुळें परोपरीनें फायदे आहेत. तेव्हां सध्या चालून आलेली संधि न दवडतां तावडतोब एकंदर देवालयाच्या महाजनमंडळीनें जुगार व देवदासींच्या वर्तनादि घातक प्रकारानां आळा बसण्यासाठीं जोराची खटपट करावी. व तेवढ्याच हेतूनें ही विनंति केली आहे.

आमची शिफारसः—'भजनप्रीया'ची वरील विनंति विचार करण्यासारखी आहे. हें कोणीहि कबूल करील. ज्या नैतिक अधोगतींत सध्या कलावंती मंडळी खिचपत पडली आहे, त्या स्थितींत त्यांचा अपवित्र संबंध देवालयांतील अनेक पवित्र उत्सवाशीं असणें किती किळसवाणें आहे, हें आह्मीं अनेकदां सिद्ध केलेंच आहे. देवस्थानांच्या इभ्रतीसाठीं व खुद्द सदरील मंडळीच्या उद्धारासाठीं ह्मणून तरी निदान देव व देवदासी यांची ताटातूट होणें जरूर आहे. व याच हेतूनें उपरोक्त विनंति महाजनानीं लक्ष्यांत ध्यावी, अशी आमची त्यांस शिफारस आहे.

राष्ट्रीय सभाः—सध्या चालू असलेल्या धरपकडीमुळें ब्रिटिश हिंदुस्थानांतील यंदांची राष्ट्रीय सभा भरते कीं नाहीं ह्याचा संशय होता. परंतु म० गांधींच्या बुद्धिप्रभावानें गेल्या २७ तारखेस पूर्वी ठरविल्याप्रमाणें अहमदाबाद येथें तिच्या बैठकी पार पडल्या. नेमस्त केलेले अध्यक्ष दे० चित्तरंजन दास हे राष्ट्रकार्यासाठीं तुरुंगांत गेले असल्यामुळें, ऐन वेळीं दे० हकीम अजमलखान ह्यांस अध्यक्ष निवडण्यांत आलें. अध्यक्षांचें भाषण व देशभक्त दास व त्यांच्या पत्नीचे श्री. सरोजिनीबाई नाइडू यानीं वाचलेले संदेश ऐकून सभेवर विलक्षण परिणाम झाला. ह्या सभेंतील महत्वाचा व मुख्य ठराव ह्मटला ह्मणजे, राष्ट्रीय सभेच्या कार्यकारी कौन्सिलचे डिक्टेटर च्या जागीं महात्माजींची झालेली कायमची निवडणूक, हा होय. त्यानां आपला पाहिजे तो वारस निवडण्याचाहि अधिकार दिला गेला आहे. महात्माजी ह्यापुढें स्वयंसेवकांचीं पथकें निर्माण करण्यांतच विशेष मेहनत घेणार असून दुसऱ्या चळवळींवर तूर्त भर देण्याचा त्यांचा विचार नाहीं.

वर्तमानसार

—येत्या निवडणुकींत देपुतादच्या जागेसाठीं प्राजेरीस दा कोस्त ह्यांस उभें केलें असून, सेनादोरीचे उमेदवार कोंस्तांतीन सांतुस व बोवेल मोंत हे आहेत.

—गेल्या २९ तारखेस सि. आलपोई, कापितांव स्टोक्लर व जेरोनिम कात्र हे एका स्पेशल बोटीनें लोटली येथें कांहीं सरकारी कामासाठीं गेले होते असल्याचें समजतें. काय असेल बरें ?

—गेल्या गुरुवारीं व शुक्रवारीं सांगें येथील श्री पांडुरंगाच्या व दत्ताच्या देवालयांत आमच्या संपादकांचीं प्रवचनें झालीं.

—आमच्या प्रांताच्या बजेटाचा मसुदा पाठविण्याविषयीं ना. गव्हर्नरसाहेबांस वरिष्ट सरकारचा हुकूम आला आहे.

—सि. आलफ्रेद रुद्रीगीस हे पेन्शन घेणार असल्याची दाट वदंता आहे.

—२२ ब्रिटिश ऑफिसर व ४० सजेंटस लोकानीं गेल्या महिन्यांत आमच्या गोव्यास भेट दिली. या भेटीच्या बुडाशीं काय असेल बरें ?

—ब्राझील येथें भरविण्यांत येणाऱ्या अंतर राष्टीय प्रदर्शनास आपला प्रतिनिधी नेमण्या विषयीं आमच्या गव्हरनरसाहेबांस तेथून तार आली आहे.

—पोर्तुगीज पार्लमेंटच्या सभासदांस जो भत्ता मिळत असे तो बंद करण्यांत येईल ह्मणतात.

...लॉर्ड सिंहाच्या राजीनाम्यानें रिकामी पडलेली जागा नामदार शास्त्र्यां कडून भरून काढली जाणार आहे !

...ब्रिटिश नोकरशाहीची दडपशाही लंडन टाइम्सला मान्य आहे. मान्य नसती तर मात्र आश्चर्य होतें !

— गेल्या सोमवारींहि आमच्या संपादकांचें एक प्रवचन काकोडें येथील श्री महादेवाच्या देवालयांत झालें. "घालिं देवावरी भार, तोचि पाववी पैलपार, मानवाची नको आशा। स्मरें वारे तूं जगदीशा, हा विषय होता.

—काकोडें येथील श्रीमहादेवालयांत, कलांवतीणीच्या नाचास कायमची बंदी करण्यांत आली. या स्तुत्य उपक्रमाचें अनुकरण इतर देवस्थानांतहि तावडतोब होईल काय ?

— पोर्तुगालची यादवी पूर्वीप्रमाणेंच पण गुप्त स्वरूपांत सुरूच आहे ! 'विनाश काले विपरीत बुद्धि'.

खुलासा

भारताच्या चालू २२ डिसेंबरच्या ३९ व्या अंकांतील स्फुट विचारांत "श्रीदत्तजयंति" ह्या सदराखालीं केलेल्या विधानांची जबाबदारी सन्मान्य भारतकारांनीं स्वतःवर लादून घेतली असली, तथापि, माहितगाराच्या मदतीशिवाय तीं लेखणींतून भारतांत उतरलीं नाहींत. सांखळींतील देवस्थानाच्या गोष्टीपासून भारतकार अलिप्त आहेत व अपरिचितहि आहेत, तेव्हां यद्विषयीं यथार्थ खुलासा करून, झालेला, गैरसमज घालविणें फार अगत्याचें आहे.

सन १९१२ पर्यंत सांखळींतील महाजनाच्या इच्छेवरून श्रीमंत विष्णु गिरिधर शेणवीं धेंपे ह्यानीं श्रीदत्तजयंतीचा उत्सव साजरा केलेला आहे, तन्निमित्त एकीवेकीच्या वाऱ्याची झुळूक लागली असल्याचा प्रत्यक्ष पुरावा कोठें उपलब्ध नाहीं, इतकेंच नसून संस्थानच्या भण्डारांत फंडाची रक्कम जोंपर्यंत दाखल झाली नाहीं तोंपर्यंत तो स्वतः ठेवलेला उत्सव" असें देखील श्रीमंत धेंपे ह्मणत नाहींत. सदरहू उत्सव अखंडित चालावा या उद्देशानें यंदांच्या श्रीदत्तजयंतीच्या तिसरे दिवशीं [१६ डिसेंबरास] श्रीमंत धेंपे ह्यांच्या तर्फे उत्सवाची व्यवस्था पाहणारांच्या विनंतीवरून सांखळींतील गौडसारस्वत ब्रह्मवृंदाची श्रीच्या अग्रशाळेंत सभा भरवून फंड कायम ठेवण्याचा प्रस्ताव निघाला असतां मंडळीची मान्यता मिळाली व तत्संबंधींची व्यवस्था तूर्त चालू आहे.

श्रीमंत दाभोळकरानीं आंग कां काढून घेतलें ह्याचा विचार मला कर्तव्य नाहीं, किंबहुना श्रीमंत दाभोळकर ह्यांना त्याबद्दल कोणी दोष दिलेला नाहीं, तसेंच दाभोळकरांचा उत्सव विशेष थाटमाटानें होत असे, अर्थात धेंपे ह्यांचकडून होणारा उत्सव कमी प्रतीचा आहे असें माहीतगारानें भारतकारांस जाणून दिलें हेंहि पण दाभोळकरांस खपणार नाहीं, कांकीं ते कीर्तीस हपापलेले नाहींत. वास्तविक, दाभोळकरांच्या वेळीं उत्सवास जो खर्च येई त्याच्या पेक्षां जास्तप्रमाणानें महागाईमुळें वर्तमान काळीं धेंप्यांस व्यय करावा लागतो इतकेंहि असून न्यूनता झाल्याचा धेंप्यांवर कोणी आरोप ठेविला असेंहि मुळीच ऐकिवांत नाहीं.

आमच्या सरकारकडून बसविण्यांत येणारा नवीन कर प्रजेला डोईजड होणार असें सन्मान्य भारतकाराचें मत आहे, कारण महागाईचा भयंकर परिणाम, तसेंच जिराईत बागाईत उत्पन्नांत समतोलपणा नसणें. त्यामध्यें मिरासदारांची व इतर जनतेची हलाख स्थिति झाली आहे. अशा स्थितींत सांखळींतील सारस्वत समाजांत तीन चार हजार रुपये सहज गोळा होतील असा अंदाज करणें शक्य नाहीं. देवकार्यास मदत, विद्यावृद्धीस हातभार, सार्वजनिक कामास सहाय, स्मारकास वर्गणी, धर्मकृत्यांस पाठिंबा, शिवाय स्वतःच्या निर्वाहाचा व कपड्या लत्याचा वगैरे खर्च,-अशा तऱ्हेचे लकडे जर प्रत्येक सुशिक्षित ह्मणविणाराच्या मागें आहेत तर पैशाची सुबत्ता असण्याचा तर्क जरा बाजूस ठेवणें जरूर आहे.

प्रागतिक संघः—संघानें शेवटच्या निवडणुकींत भाग घेतल्यामुळें कित्येकांकडून त्याविरुद्ध भलभलते आरोप करण्यांत आले होते. त्याला उत्तर याप्रमाणें आहे. "राजकीय सामाजिक वगैरे हरेक बाबतींत हिंदुसमाजाला अगदीं पद्धतशीर रीतीनें पुढें पाऊल टाकतां यावें व निष्फळ वजबजपुरी न माजतां कोणतीहि हातीं घेतलेली चळवळ यशस्वी होण्यास सहाय्य व्हावें एवढ्यासाठीं प्रागतिक संघाचा जन्म आहे. ही गोष्ट आतां प्रत्येकाला कळून चुकली आहे. शिवाय या संघानें थोड्याच काळामध्यें संपादन केलेल्या यशामुळे ठिकठिकाणीं विशेषतः युरोपियन अधिकारी वर्गांमध्यें आदर उत्पन्न होऊं लागलेला आहे हेंहि उघडपणें सांगण्याची आवश्यकता नाहीं. कारण ही गोष्ट आता सूर्यप्रकाशाप्रमाणें स्वच्छ होऊन राहिली आहे. असें असतां विकारवशतेच्या भरी पडून कांहीं कुऱ्हाडीचे दांडे प्रस्तुत संघ ह्मणजे मूठभर चळवळ्या लोकांचा उपद्व्याप आहे त्यांत कांहीं जीव नाहीं वगैरे प्रतिपादन करीत असलेले आढळतात. इतकेंच नव्हे तर संघाकडून एखाद्या सार्वजनिक कार्याला आरंभ झाला ह्मणजे नानाप्रकारचे व्यूह रचून तें कार्य हाणून पाडण्याला सुद्धां ही मंडळी एका पायावर तयार ! आपसांतील यादवी ह्मणतात ती हींच ! या देशद्रोही महाशयांनीं जर आपलीं कुकृत्यें क्षणभर बाजूला ठेवून व संघाची बाजू प्रसंगीं चुकत असल्यास योग्य दिशा सुचवून त्यास सावरण्याचा प्रयत्न करून कौरव पांडवांप्रमाणें परक्यांबरोबर टक्कर देतानां १०५ होण्याची मनाची तयारी दाखविली असती तर त्यामुळें किती बहार उडाली असती !! एकीचें सामर्थ्य किती आहे याची अंधुकशी कल्पना आपल्या हिंदुसमाजानें गतसालीं 'कॉंग्रेस प्रोव्हिंसियाल' च्या बैठकीमध्यें प्रतिपक्षाच्या नजरेस आणून दिली नाहीं काय ? उपरोक्त देशहितविघातक प्रकारानीं क्षणभर स्वार्थ साधतां येतो ही गोष्ट कबूल आहे; परंतु क्षणिक सुखासाठीं दुसरीकडे हजारो देशबांधवाना तोंडघशीं पाडून आपण बादवा मिळविणें हें वर्तन आमच्या मतें अन्यायाचें आहे. हा स्वजनद्रोह आहे हा आत्मघातकीपणा आहे, हें 'आपलें नाक कापून दुसऱ्यास अपशकून' करण्यासारखें हास्यास्पद आहे. इतकेंच नव्हे तर हें 'नामर्दपणाचें लक्षण आहे. धिक्कार असो अशा स्वजनहित घातकी लोकानां !! बाकी आतां रीतीनें कोंबडा झांकला ह्मणून उजाडावयाचें थोडेंच राहणार आहे. उघड सांगावयाचें ह्मणजे 'कीं तो तिळ तडफुटे आगखी भरानें' या न्यायानें प्रागतिक संघ आपलें कार्य अगदीं नेटानें व धैर्यानें पुढें चालविणार हें खास.' हे एका 'संघाभिमान्याचे' शहाणपणाचे विचार कोणास मान्य होणार नाहींत ?

पत्ता लागला !—'एक प्रवासी' याकडून आह्मांस खालील पत्र आलें आहे:- ब्रिटिश इंडियेंतून गोव्यांत येणारीं वर्तमानपत्रें किंवा मासिकें कित्येक वेळीं गहाळ होत असल्यानें ज्याचीं त्याला दिनचूक पोंचत नांहींत अशी बहुतेकांची ओरड असतेच. आज कुणाचा केसरी नाहीं, उद्यां कुणाचें चित्रमयजगत नाहीं, परवां कुणाचा लोकमान्यच नाहीं, तर एके दिवस कुणाची प्रफुल्लताच नाहीं, अशा तऱ्हेनें कित्येक वर्तमानपत्रें पुष्कळदां गहाळ होत असतात. परंतु तीं गहाळ होण्याचें कारण अद्यापि कुणाला समजलें नव्हतें. तें मला परवां सहजींच समजलें. माझ्या स्वताच्या डोळ्यानीं मी पाहिलें...एक दिवस मी कांहीं कामासाठीं बेळगांवला गेलों होतों. काम करून परत येतानां मेल ट्रेननेंच आलों. साडेतीनच्या सुमारास आमची ट्रेन कुळें (Colem) स्टेशनवर उभी राहिली. इतक्यात स्टेशनवर उभे असलेले दोन इसम ट्रेनमधील पोष्टव्हानकडे आले व आंत उभा असलेल्या एका खालच्या दर्जाच्या नोकरास त्यानीं पुढील प्रश्न केला, "कितेरे, आज केसरी बी आया ?' ना, हें यात किते आया.' त्या कडून उत्तर आलें. 'दी' असें ह्मणून त्यांतील एकानें आपला हात पुढें केला व आंत टेबलावर असलेली प्रफुल्लता घेऊन ते दोघेहि तडक तिथून निघाले. त्यांचे वाचन झाल्यावर तरी त ती परत आणून देतील असा माझा समज होता. परंतु गाडी सुटेपर्यंत त्यांनीं ती स्टेशनवरील बांकावर बसून वाचली व नंतर त्यांतीलच एकानें ती आपल्या खिशांत कोंबून ते दोघेहि पोष्टव्हानपासून कांहीं दूर असलेल्या एका डब्यांत जाऊन बसले. गाडी चालू झाली. इतक्या दिवसपर्यंत राजरोस चालत असलेल्या या गोष्टीचा मला पत्ता लागला. तो आज जाहीर रीतीनें मी सगळ्यापुढें मांडीत आहें. पुढील काम मात्र एकट्याचें नसून सगळ्यांचें आहे. तेव्हां गोमांतकीय बांधव इकडे लक्ष देऊन या रोगास आतां जालीम मात्रा देतील अशी आशा करितों.

प्रस्तुत विषयासंबंधीं आमचे टपालाचें अधिकारी योग्य त्या उपायांची योजना करून, लोकांचा दुवा घेतील अशी खात्री आहे.

आदे असें ह्मणणें किती धाडसाचें आहे हें वाचक पहातील.

—तटस्थ

वर्तमानसार

—मडगांवच्या बालचमूचीं गेल्या ता. ४ ची सभा रा. रा. यशवंत सू. सरदेसाई ह्यांच्या अध्यक्षतेखालीं निर्विघ्नपणें पार पडली. फिरतीसाठीं निघालेले 'आह्मेद कॉलेजचे' सुमारें ३५ विद्यार्थी आपल्या दोन अध्यापकांसह समेस हजर होते. 'बालचमूचें पुढील धोरण,' ह्या विषयावर श्री. नरसिंह दा. कीर्तनी, रा. नी. शि. दळवी रा. भिकाजी उसो नाईकर, रा. तिंडकर मास्तर, रा. दामोदर पै रायतुरकर वगैरे वक्त्यांचीं भाषणें झालीं.

जाहीर विनंति

शालाबादप्रमाणें मडगांव येथें श्रीदामोदरविद्याभुवनांत श्रीसरस्वतीसेवकमंडळातर्फे श्रीदासनवमीचा वार्षिक उत्सवसमारंभ ता. १९ मिनहु रविवार रोजीं सायंकाळीं ७ वाजतां साजरा होणार आहे. सर्व देशबंधूंनीं उत्सवास हजर राहून समर्थाविषयींची पुज्यबुद्धि व्यक्त करावी अशी नम्र विनंति आहे.

आ. नम्र

मडगांव ता. १२-२-२३ | दामोदर श्री. नायक | स. श्री. से. मंडळ

Anno VI — Numero 48 — 1922 QUEPEM QUINTA-FEIRA 23 DE FEVEREIRO

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai
Assinatura
India Portuguesa...... 3-00-00
ia Inglesa............. 3-08-00
mero Avulso.......... 0-01-00
Anuncios
uncio por linha...... 00-01-00
ra longo praso contrato es-
cial.

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००
जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमचे
जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारे ठर
विण्यांत येतील.

वर्ष ६ वें.] केपें, गुरुवार, तारीख २३ माहे फेब्रुवारी सन १९२२ [अंक ४८ वा.

IMPOSTOS

Disse-se e repitiu-se, vezes sem conta, que a capacidade contribuitiva do habitante da India Portuguesa está já exgotada, há já muito tempo.

Disse-se e repetiu-se isto, quando á testa do governo da Provincia estava o sr. Freitas Ribeiro, tendo tido plena confirmação do elemento popular do então conselho de Governo.

Foi o sr. Ribeiro e sucedeu-lhe o actual governador geral sr. dr- Jaime de Morais, o qual depois de longos mezes de estudo, mostrou tendencias de aumentar impostos por entender ser impossivel acudir, doutra forma, á solução urgente de varios problemas da vida economica da Provincia, incluindo o equilibrio financeiro.

A imprensa do Paiz demoustrou-lhe, então, com dados positivos e concretos que não era nada conforme com a critica situação do contribuinte goêz o intuito *tributario* de Sua Excia, pois o proprietario da India mal podia arcar com os proprios impostos vigentes que lhe levavam *coiro e cabelo*, reduzindo-o a uma situação, verdadeiramente, lamentavel.

E para a cabal prova do que afirmava, a mencionada imprensa pôz de confronto o *maximum* de tributos que cá se pagava com o que lá fora, nos chamados paizes cultos, se arrecadava, concluindo sem sofismas, que a final de contas, nós pagavamos menos que os outros, como contrariamente se pretendia apregoar.

O sr. dr. Jaime de Morais porem, fez ás justas considerações da imprensa ouvidos de mercador e com a ajuda do *seu* conselho vai agravando a situação do Paiz com novos e pesados impostos !...

Depois do imposto da emigração que pessimas impressões tem produzido, cá dentro e lá fora, vem agora bater-nos á porta os impostos de selo e de casas... ninguem sabendo o momento, quando terminará a marcha *triunfal* dêsse fatidico e sinistro carro...tributario ! ! !

Evidentemente é máu o caminho...tributario que os governantes estão trilhando, ligando pouca importancia *ás* reclamações do Povo. E' mau e perigoso, porque nas epocas democraticas que estamos atravessando podem daí vir consequencias das mais funestas, sabido que a paciencia, como qualquer pedaço de borracha, tambem tem o seu limite e que é avisados não ultrapassa-lo.

Até a formiga que é um ser duma das infimas classes da criação, insurge-se contra quem a esmague, sem mesmo medir-lhe a *força*.

E o Povo da India Portuguesa que se nos afigura mais *alguma coisa* do que a sobredita formiga, ¿conservar-se-há *eternamente* indiferente a maus tratos...tributarios que se lhes estão infligindo, sem fazer caso do seu estado que denuucia uma pobresa, verdadeiramente, franciscana ?

Certamente que não.

¿E' prudente nestas condições lançar novos impostos?

Isto anima !

Em um vasto salão das casas dos acreditados e conhecidos comerciantes de Pangim, srs. Matmó e irmãos realisou se, no dia 6 do corrente, uma reunião dos principais membros e amigos do *Pragatica-Sangh*, sob a presidencia do sr. dr. Atmarama Govinda Borcar.

Nessa reunião em que se viam representantes de todos os concelhos do territorio da India Portuguesa, trocaram-se impressões sobre diferentes assuntos referentes ao *Sangh*, tendo o sr. dr. Borcar, na qualidade de vice-presidente em exercicio da mesma associação proferido um discurso que pela sua elegancia e sinceridade produziu o mais satisfatorio efeito na numerosa e selecta assistencia que o entrecortava de quando em vez, com aplausos delirantes.

O distincto e popular clinico dr. Borcar justificou no seu monumental discurso a atitude do *Sangh* nas eleições do dia 29, relatou as vantagens que dela tinham advindo á associação; frisou a necessidade, sem preocupações de vaidades pessoais e espalhafatos egoistas, generalisar, a breve trecho, a benefica acção do movimento civico, inaugurado á bôa hora, pelo *Pragatica Sangh* e, finalmente, exprimiu o seu ardente desejo de ver levantado o hindu á altura do seu irmão cristão, para que ambos, pelo mesmo grau de educação e competencia determinem a prosperidade da Patria comum,

Tal foi a impressão do fluente verbo do presidente que na propria reunião formularam-se compromissos solenes de cada um despender o *maximum* de suas energias para o *Pragatica-Sangh* tornar, em pouco tempo, uma agremiação politica que inspire respeito e consideração, quere ao governo, quere a seus adversarios, o que de resto está em via de suceder.

Isto nos anima, sobremaneira, a nós que, como obscuros propagandistas do *Sangh* alimentamos a ambição da união de todos os elementos que constituem a classe dos que pensam unicamente no bem estar da Patria.

Apraz-nos registar, tambem que foi produzido, na referida memoravel reunião, um lindo discurso pelo distincto escritor e conhecido patriota sr. Xamba Rau Sar Dessai que explicou largamente a orientação e o fim do *Sangh* no que igualmente, foi aplaudido.

Deu-se por terminada a reunião com um delicioso e rico chá aos assistentes que levaram dêsse dia as mais gratas recordações.

Aos patrioticos e desinteressados promotores da reunião, nossos sinceros agradecimentos.

ECOS & CRITICA

Mâdeva Caculo'

Pelas informações que chegaram até nós, parece que alguns mal intencionados espiritos procuram adulterar o desinteresse politico deste nosso ilustre correligionario, propalando com as suas linguas viperinas, que o sr. Caculó fêz-se politico para conquistar influencia e seus fins privados!

Mas ¿ que *influencia* e que fins *privados* pretenderá o nosso distincto correligionario conseguir com a politica, êle que, como comerciante, é indipendente ?

Não serão, naturalmente, capazes de responder, os *traficantes*. Fiquem, pois, sabendo todos e duma vez para sempre que Caculó tem únicamente em mira o levantamento da sua classe e nêste sentido emprega e sempre empregou sem menor ruido nem pequeno espalhafato o milhor de suas energias, o que a seu tempo saberão, á ma cara.

A classe hindu deve-lhe, sim, muitos favores, sendo, portanto, injusto que se procure adulterar a sua patriotica obra, cheia de sacrificios que só o nobilitam.

De resto, Madeva Caculó e outros membros proeminentes do *Pragatica Sangh* não são ciosos de glorias faceis nem de adjectivos bombasticos. Nem tão pouco êles dispõe de tempo para entreter *ocios* dos mal intencionados, porque conhecem bem o meio em que agem.

E, depois Caculó e outros que o admiram preferem como nós falso discredito pessoal ao bem estar do seu Paiz, que é a unica sua preocupação que não lhes deixa vagar se quer para enxotar as *moscas daninhas* que tentam, jesuiticamente, perturbar-lhes a paciencia *leonina*...

Fiquem-no sabendo !

Paciencias...

O triunfo de Bobela Mota, apesar de traficancias eleitorais da chamada lista *popular* poz freio á lingua de muito pescador que não cabia de contente em si pelo ante-goso da *victoria* que *á ultima hora* lhe mostrou as costas — *frias*, a zombár cruelmente !

Console-se que o que se não pode remediar, remediado fica !

Oficial ?

Os da lista *popular* pretendem iusinuar que é *oficiàl* a lista Helder-Bobela e que é *popular* a lista Costa-Santos.

Ainda nisto, como no resto, não tem razão os populares, porque em ambos os partidos trabalharam funcionarios publicos, podendo dizer-se que na lista *popular* houve mais empenho *oficial* que noutra, o que ninguem pode pôr em duvida,

¿E só tem a desfaçatez de chamar *oficial* a lista Helder-Bobela ? !

Engraçados...com a desgraça da derrota, os *populares*, não haja duvida !

Distinctivo

A politica hindu se distingue da cristã pelo acentuado sentimento de desinteresse.

O verdadeiro politico hindu não deseja espalhafato do seu nome nem pretende que o

सांप्रतच्या निवडलेल्या कार्यकारी कमिटीनें तूर्त परिस्थितीचा सारासार विचार करून संघानें निवडणुकींत भाग घेऊन अमक्या अमक्या उमेदवारांस सहानुभूति दाखवावी असें ठरविल्याचें जाहीर होतांच, अवघ्या ३।४ दिवसांच्या मुदतींत हेल्डेर रिबेरसारख्या "अल्पपरिचित" गृहस्थांस जवळ जवळ दोन हजार मतें मिळालीं ती केवळ समाजांत संघाविषयींची आत्मिक भावना वाढत चालल्या मुळेंच होय. यावरून हिंदुसमाजांत या निवडणुकांसंबंधीं एक मतच होतें असें कोणीहि आपला समज करून घेऊं नये. खुद्द संघाच्या चालकांत किंवा कार्यकारी कमिटींत जर मतभिन्नत्व दिसत होतें तर हें "भिन्न रुचिर्हि लोकः" या न्यायानें समाजांत दिसल्यास नवल नाहीं. समाज काय किंवा संस्था काय, त्यांत मतभेद असणें संभवनीय आहे. किंबहुना मतभेद असणें हें समाजाच्या अगर संस्थेच्या जिवंतपणाचें लक्षण मानण्यांत येतें मात्र ते मतभेद प्रामाणिकपणाचे असावयास पाहिजेत.

एक अथवा अनेक व्यक्ति शहाणपणाच्या अगर विद्वत्तेच्या फाजील घमेंडींत समाजानें किंवा संस्थेनें आपल्याच मतांचा पुरस्कार करावा, सर्व व्यवहार आपल्याच मतानें चालावा असा दुराग्रह धरूं पाहतील तर, तें सध्याच्या कालांत शोभणार नाहीं. पूर्वींचा बादशाही काळ जाऊन त्याच्या मागोमाग सरदारशाहीहि निस्तेज होत चालली व आतां लोकशाहीचा काळ चालू आहे. या काळांत, जें कांहीं बहुमतानें ठरलें गेलें असेल तेंच समाजानें अथवा संस्थेनें मान्य करावयाचें; हेंच सुधारलेल्या राजकारणाचें धोरण दिसून येतें. आमच्या हिंदुस्थानांत देवस्थानें, ग्रामसंस्था वगैरेचा कारभार पुरातनकालापासून याच तत्त्वावर चालू असल्याचें सर्वांस ठाऊक आहेच. या नियमास अनुसरून संघाचीं सर्व कामें होत आहेत व यापुढेंहि तीं तशींच चालवावयाचीं आहेत. गेल्या ता. १ डिसेंबर रोजीं पणजी येथें व्हापारी संघाच्या दिवाणखान्यांत भरलेल्या जाहीर सभेंत अधिकार दिल्यामुळें आणि बहुमत निवडणुकींत भाग घेण्याच्या बाजूचें पडल्यामुळें, संघाच्या कामचलाऊ मंडळीनें बहुमतास मान देऊनच निवडणुकींत भाग घेण्याचें ठरविलें. कां. क. चे सन्मान्य सेक्रेटरी श्री पु. श्री सुकेरकर याचे मत तर विरुद्ध बाजूचें होतें. त्यांचें म्हणणें असें होतें की "संघ अद्याप बाल्यदशेंतच आहे", सभासद मिळविणें, कौंसिल्य:निहाय कमिट्या स्थापणें, मध्यवर्ती मंडळ व कार्यकारी कमिटी निवडणें वगैरे कामें व्हावयाचीं आहेत; अर्थात यावरून आणखीं इतरहि अनेक कारणावरून निवडणुकीसारख्या वादग्रस्त प्रश्नांत शिरणें इतक्यांतच शहाणपणाचें होणार नाहीं. उलट बाजूचें म्हणणें पडलें कीं, "संघानें राजकारणांत भाग घेऊनच समाजांत व सरकारांत आपलें वजन वाढवावयाचें आहे; इतर कामें हळूहळू होत राहणार; निवडणुका कांहीं फिरफिरून येणाऱ्या नाहींत; तेव्हां मध्येंच प्राप्त झालेल्या या संधीचा फायदा घेऊन संघानें आपलें कर्तव्य बजावून व अनुभव मिळवावयाचा आहे, वगैरे वगैरे" हा वाद असाच चालू असतां कमिटींतील मंडळींनीं, निवडणुकीस अगदीं थोडे दिवस असतानां संघानें तींत भाग घेण्याची ज्यास्त आवश्यकता वाटू लागली. त्यानंतर घाईघाईनें काम करावें लागल्यामुळें रितसरपणांत थोडासा व्यत्यय आला व येणें करून परस्पर गैरसमजास जागा राहिली. परंतु त्यांत बुद्धिपुरःसर असें कांहींच नव्हतें. उपरिनिर्दिष्ट मतभेद हे प्रामाणिक स्वरूपाचे होते. अर्थात त्यांत वैमनस्यास थारा नव्हताच. याच संधींत उ येराल्द वगैरें पत्रांतून संघाच्या सेक्रेटरींच्या नांवानें परस्पर विरोधी सारा प्रसिद्ध झालेल्या पाहून, पुष्कळांनीं संघाविषयीं खोडसाळ विधानें करण्यास सुरवात केली आहे. तीं खोडून काढण्याच्या भरीस पडून, वाचकांच्या मेंदूस शीण देण्याची आमची इच्छा नाहीं. तथापि इतकें कळविणें भाग आहे कीं, कोणत्याहि बाबतींत आपला मतभेद असला तर, तो संघानें मान्य केलाच पाहिजे असें म्हणण्या इतके रा. सुकेरकर खास दुराग्रही नाहींत. त्यांनीं आजपर्यंत संघाची बहुमोल कामगिरी केली आहे. आणि यापुढें ती तसीच चालविण्याचा त्यांचा दृढनिश्चय कायम आहे. संघाच्या ठरावांपुढें स्वतःच्या मतांचा न्यास करण्याइतकी त्यांची तयारी आहे. तरी पण आपलें मत स्पष्ट शब्दांनीं पुढें मांडण्यास व विरुद्ध मतें आदर पूर्वक ऐकून घेण्यास ते कमी करीत नाहींत. एकंदरींत संघाचा सर्व लहान मोठा कारभार व व्यवस्था पूर्ण लोकमतानुवर्ति राहावींत असेंच इतर चालकांप्रमाणें त्यांचें धोरण आहे. झालेल्या प्रकाराबद्दल; कार्यकारी कमिटींत असो किंवा इतर हितचिंतक मंडळींत असो, कोणतेंहि वैमनस्य राहिलेलें नसून; यापुढें संघाचें काम जोरानें चालविण्याचीच प्रवृत्ति सर्वांत दिसूं लागली आहे हें सुचिन्ह होय. यापुढें संघाबद्दल कोणीहि निराश होण्याचें कारण नाहीं. हस्तेंपरहस्तें मदत करून त्याची कार्यक्षमता वाढवावी आणि संघ म्हणजे हिंदुसमाज व हिंदुसमाज म्हणजेच संघ असी ओळख सरकार व इतर जनता यांस पटवून द्यावी अशी आमची समाजबांधवांस प्रेमपूर्वक प्रार्थना आहे.

स्फुट विचार

नमूनेदार समारंभः— गेल्या ६ तारखेस पणजी येथें निवडणुकीच्या जनरल सभेनिमित्त जमलेल्या ठिकठिकाणच्या हिंदु गृहस्थांस, संघाच्या तेथील सभासदांकडून, महात्मे यांच्या वाड्यांत, चहापाटी देण्याचा जो नमुनेदार समारंभ झाला, त्यावरून आमच्या अग्रलेखांतील विधानास बरीच बळकटी येते. उपरोक्त समारंभांत हिंदुगृहस्थां शिवाय मुसलमान, पारशी, ख्रिस्ती वगैरे गृहस्थांनींहि भाग घेतला होता. दमण आणि दीव येथील गृहस्थांची श्री शांबाराव देसाई यांनीं सर्वांस ओळख करून दिल्यानंतर आमंत्रित पाहुण्यांस उद्देशून संघाचे उपाध्यक्ष डॉ. आ. गो. बोरकर यांनीं जें सुंदर, कळकळीनें भरलेलें आणि स्फूर्तिदायक असें भाषण केलें, त्याचा सुपरिणाम श्रोतवृंदांत झाल्याशिवाय राहणार नाहीं. श्री. शांबारावजींनींहि बराच वेळ भाषण करून, संघाविषयीं आमचें कर्तव्य काय आहे याचें विवेचन करून या लोकोपयोगी कार्यास हातभार लावण्याविषयीं सर्वांस विनंति केली व आमंत्रणास मान दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. उभय वक्त्यांचें भाषण चालू असतानां मधून मधून टाळ्यांचा गजर होत होता. सदरील समारंभामुळें सर्व जनतेंत प्रागतिक संघाविषयीं किती प्रेम व आदर वाटत आहे हें चांगलेंच दिसून आलें. या दृष्टीनीं उपरोक्त समारंभ घडवून आणणाऱ्यांचें अभिनंदन पूर्वक आभार मानणें रास्त आहे.

करांची वाढः—आर्थिक स्वातंत्र्य [autonomia financeira] हें नांव कानांस गोड लागणारें असलें तरी आम्हांस मात्र त्याचा उलटा अनुभव येऊं लागला आहे. मनुष्य जातीस लाजविणारा आणि सर्वांच्या तिरस्कारास पात्र झालेला शिरकातीचा तीन आण्याचा कर घालून त्याचा वसूल होऊं लागल्यास कांहीं महिने लोटतात न लोटतात तोंच घरपट्टीचा नवा कर घातल्याचें जाहीर झालें. त्याची जाणीव जनतेस अद्याप नवीनच आहे, इतक्यांत स्टांपाच्या कायद्यांत सुधारणा करून त्यांत भयंकर वाढ केल्याचें सरकारी बोलेतीवर प्रसिद्ध होऊन त्या प्रमाणें वसुलीहि होऊं लागली आहे! महागाईनें आधींच त्रस्त होऊन दिवस कठीन असलेली जनता नवनव्या नव्या करांच्या माऱ्यांनीं, अधिकाधिक क्षीण होत चालल्याचें दिसत असतां आणि शेजारच्या हद्दींत कायदेभंगाची चळवळ जोरानें सुरू असतां आपणांस डेमोक्रॅटिक व लोकसत्ताक म्हणवून घेणारें येथील सरकार लोकानुरंजनाचें आपलें कर्तव्य बाजूस ठेवून उलट चिडवितच आहे हें देशाचें दुर्दैव नव्हे काय!

स्टांपचा कायदा—स्टांपच्या नव्या कायद्यानें गरीब, श्रीमंत, व्यापारी, जमिनदार, ग्रामसंस्था, देवस्थानें, खाणावळी, चहादुकानें वगैरे सर्वांस सारखाच चट्टा बसणार आहे. इतकेंच नव्हे, स्टांपच्या टिकटांहि पूर्वींपेक्षां ज्यास्ती रेसांच्या लागणार आहेत. रेजीस्तिव्हीलच्या भानगडी व त्यामुळें येणारा आठदहा रुपयांचा खर्च टाळण्याकरतां बार्क, आरंवदें, मणेरी वगैरे सारख्या हद्दीवरील ठिकाणीं जाऊन कुचेवत कुचेवत औटघटकांत लग्नगोंधळ उरकून येण्याचें पत्करिलें तरी तें लग्न कायदेशीर होण्यास त्या भानगडी व खर्च करणें चुकत नसल्यावरून आर्धीच नाराज असलेल्या जनतेस नव्या कायद्यानें आईबापांच्या संमतीसाठीं १५०० रेसांचा स्टांप लावण्यास भाग पाडल्यामुळें ती संतप्त होईल हें सांगावयास नको. अशल्या संतापाच्या भरांत कायदेमंडळाच्या लोकनियुक्त सभासदांच्या नांवानें खडे फोडणें साहजिक असलें तरी खर्चाची अपरंपार वाढ करविण्यास कारणीभूत असलेल्या सिनोर प्राझेरीस दा कोस्तासच या करांच्या वाढीचें सगळें श्रेय देणें योग्य आहे.

सांप्रत हिंदु सभा — बार्देस महालांतील सर्व हिंदूंची पूर्ण एकी व्हावी व परस्परांत प्रेम नांदावें या हेतूनें (?) गेल्या आठवड्यांत म्हापसें येथें सदरील नांवाच्या संस्थेचा पाया घालण्यांत आला आहे! उपरिनिर्दिष्ट ध्येयाप्रीत्यर्थ 'प्रागतिक संघा' सारखी उपयुक्त संस्था उज्वल स्वरूपानें अस्तित्वांत असतां, 'सांप्रत'च्या सभेचा वेकी दर्शक उपक्रम कां व्हावा-- व तोहि एकीचा सुंदर व हृदयस्पर्शी नांवाखालीं हें आम्हांस समजत नाहीं! सांप्रत हिंदु-सभे संबंधानें स्वतः आम्हीं व आमच्यो मुद्दाम तेथें पाठविलेल्या प्रतिनिधीनें मिळविलेल्या गुप्त व प्रगट माहितीवरून वरील विधानास पुष्टिच येते, हें येत्या अंकांतील सविस्तर वर्तमानावरून वाचकांस कळून येणार असल्यामुळें, प्रस्तुत विषयावर आतांच जास्ती लिहिणें आम्हांस प्रशस्त वाटत नाहीं.

वर्तमानसार

—भारतमित्राचा तिसरा अंक प्रसिद्ध झाला असून तो मागील अंकाप्रमाणेंच उपयुक्त निघाला आहे.

—सांगे येथील देशहितचिंतक तरुण व प्रसिद्ध ज्योतिषी श्री. नारायण अनंत नाईक पाटणकर यांनीं सांगली संमेलनाच्या ठरावास अनुसरून तयार झालेलें संवत् १९७८–७९ व शालिवाहन शक १८४४ चें 'शुद्ध पंचांग' प्रसिद्ध केलें असून, त्यांत संकलित झालेल्या अत्यंत उपयुक्त माहितीवरून तें संग्राह्य झालें आहे. कि. अवघी १। आणा.

—कुंकळ्ळीचे प्रसिद्ध व्यापारी व लोकप्रिय पुढारी रा. नारायण केशव केंणी रोंबोल यांस गेल्या दिवसांत काळजाच्या विकारानें एकाएकीं देवाज्ञा झाली हें कळविण्यास वाईट वाटतें!

—रोमचे पाप (धर्माध्यक्ष) वेंत हे ख्रिस्तीवासी होऊन, त्यांच्या जागीं पीयें यांची निवडूक झाली आहे.

माशेलांत आदमिनिस्त्रादोर

माशेल गांवांत आपापसांतील चुरशीमुळें जितके तंटे उपस्थित होतात, तितके गोव्यांत दुसरीकडे कोठेंही होत नसतील म्हणतात. गेल्या दिवसांत माशेलांतील कोणी व्यापाऱ्यानें रोगोत्पादक अशी खराब मिरची पोतीं आणून विकण्यास आरंभ केल्याबद्दलची 'कैत' आदमिनिस्त्रादोर यांस केल्यामुळें, साहेब मजकूर आले होते. त्यांनीं तीं पूर्वींच पकडून ठेवलेलीं पोतीं समक्ष पाहून जाळून टाकलीं. पोतीं सुमारें ५० होतीं! दुसरें, फारेंत यांच्या शांतादुर्गेच्या देवळांत हल्लींच 'कोमिसाव' पडलें आहे. तें हितचिंतक म्हणविणाऱ्या एक दोन इसमांस नको झाल्यामुळें त्यांनीं त्यांविरुद्ध पुष्कळ खटपट केली; परंतु ती सर्व व्यर्थ गेली. या चुरशीमुळें, त्यापैकीं एकट्यानें (एका महाजनानें) देवीच्या उत्सवमूर्तीच्या दागिन्यांच्या पेटीची चावी आपल्याकडे नेऊन ठेविली व मार्च शुद्ध ५ मींच्या वार्षिक उत्सवाची खोटी केली! पंचांनीं ही हकीकत दुसऱ्या दिवशीं आदमिनिस्त्रादोर यांस अर्जानें कळविली. त्यांनीं सदरहू पेटी पूजारी भटाकडून घेऊन साक्षीदारासमक्ष ओरबंद करून ठेवण्याबद्दल माशेलांतील रेजिदोरास कळविलें. रेजिदोरानें लगेच हुकमाची अंमलबजावणी केली. स्वतंत्रता पाहिजे असेल तर प्रथम बंदीवास सोसला पाहिजे. हें अलीकडील तत्व देवीनें अमलांत आणलें. आज रोजीं आदमिनिस्त्रादोरसाहेब या देवळांत येऊन त्यांनीं ती पेटी बाहेर आणवून सर्वांसमक्ष लोहाराकडून कुलपें निखळवून आपल्या कामदारांमार्फत तिच्यांतील सर्व जिनसांची यादी वगैरे करून, त्या जिनसा पंचांच्या ताब्यांत केल्या. हिंदु लोक आपसांत तंटे करून देवाचे उत्सवहि बंद पाडतात व त्यांचा निकाल करण्यास आम्हांस यावें लागतें ही मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे असे त्यांनीं उद्गार काढले! या उद्गारांचा सर्व हिंदू लोकांनीं विचार करण्यासारखा आहे.

माशेल, ता. ९।२।३३ — एक माशेलकर

ANNO VI — NUMERO 40 — 1921 QUEPEM QUINTA-FEIRA DE 29 DEZEMBRO

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai

Assinatura
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA............ 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00
...01-00
...0 es-

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई

वर्गणीचे दर
पोर्तुगीज (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें.] केपें, गुरुवार, तारीख २९ माहे डिसेंबर सन १९२१ [अंक ४० वा:

Concelho de Pondá

E' sentir publico que os serviços actualmente acumulados a cargo do administrador do concelho de Pondá, de maneira como correm; em nada satisfazem ás suas aspirações nem correspondem ás suas necessidades; e as diversas fases por que a mesma administração passou, demonstram que elas visaram antes o interesse pessoal do que a utilidade publica.

E' principio assente que as instituições locais devem sempre acompanhar a evolução social por forma que sejam elas dignas do regime do governo e do estado adiantado da civilisação dos povos, mas é pena confessar que não só na vigencia da *ominosa* monarquia, mas ainda depois da proclamação da *luminosa* republica tão aspirada, o modo administrativo das Novas Conquistas, longe de ser pautado por estes principios, foi antes sofrendo retrocesso em varios pontos.

Não pode haver instituições perpetuas, porque não ha sociedades estacionarias. Extinctas as antigas administrações fiscais pelo Decreto de 14 de Dezembro de 1880 foram criados os logares de administradores dos concelhos nas Novas Conquistas, incumbindo á essas entidades a superitendencia de outras corporações como as comuidades, mazanias, mesquitas etc.; mas tendo logo a experiencia demonstrado as desvantagens dessas acumulações e centralisação de serviços em uma só pessoa foram pela Port. Prov. n° 500 de 1883 encarregados de superitendencia das mazanias, mesquitas e confrarias os seus substitutos, medida que é justificada, entre outros, num seguinte considerando da mencionada Portaria:—

"Considerando que emquanto nos concelhos das Ilhas, Salcete e Bardez existem tres autoridades: administrador do concelho, administrador das comunidedes e substituto do administrador com mencionados encargos; o serviço que a cada um incumbe em separado se reune nos concelhos das Novas Conquistas em um unico administrador *resultando daqui por motivo de facil intuição que este não possa prestar a devida atenção aos variados e multiplices serviços que lhes são cometidos*" (O italico é nosso). Mas, volvidos anos, em 1899 pela Port. Prov. n° 385 foram incumbidas, outra vez, aos administradores dos concelhos as funcções da superitendencia das corporações, no intervalo, confiadas aos seus substitutos, alegando a diminuição das despezas, falta dos substitutos e mais cousas e lousas.

Manteve-se este estado de cousas por espaço de dois anos a mais e tendo se reconhecido que isto não convinha continuar no concelho de Pondá, por ali ser *demasiado o serviço* a cargo do administrador (o que aliás é evidente segundo a Cit. Port. de 1883), foi pela Port. Prov. n° 287 de 1901, incumbida no concelho de Pondá a superintendencia das mazanias, mesquitas etc, outra vez, ao respectivo substituto, tirando-a das mãos do administrador; mas apareceu finalmente a Port. Prov. n° 256 de 1904 que com o fundamento muito laconico de *subsistirem os motivos da citada Port.* n° 207 de 1901 para riscar que tudo o se tenha passado antes entregou talvez para sempre, as ditas superintendencias ao administrador do referido concelho.

Que dança macabra!

Não só isso; e como que para o cumulo foi o dito administrador do concelho de Pondá encarregado das funcções de administrador das matas de Goa, continuando esta ultima acumulação tambem quase sempre, com administradores do dito concelho, sucessivamente nomeados.

Que se conclue de tudo isso?

¿ Seria, por ventura, admissivel que os serviços a cargo do administrador do concelho de Pondá reconhecidos por *demasiados* em documentos autenticos tivessem sido de tal sorte reduzidos que o mesmo administrador pudesse acumular ainda outros cargos de não somenos importancia?

Atestam as variadissimas estatisticas de uma forma precisa e categorica que em todas as repartições tem aumentado os serviços em progressão geometrica, o que é comprovado ainda pelas constantes providencias dimanadas do governo com o fim de descentralisar os mesmos serviços.

Sendo isto uma verdade nua e crua, admitir-se que só na administração do concelho de Pondá tenham diminuido os serviços e isto ainda depois da promulgação do codigo das comunidades de 1904 que tem complicado varios dos trabalhos das comunidades, seria um contra senso rediculo!

Para corroborar o conceito que deixamos estampado nas modestas linhas do presente escrito não temos de ir muito longe.

E' saber da mesma administração o numero de pretenções dos interessados que cada dia vão amontoando as suas instantes por falta de dicisões e devido aviamento, durante não só de meses mas ainda de anos.

São factos concretos, testimunhas eloquentes de toda a verdade.

E' dai maior o prejuizo.

Uma preutenção por exemplo dum interessado da comunidade entrada nessa administração para levantar os seus proventos antes de começar a correr a sua prescrição só tem a dita de sacudir a poeira das instantes da mesma administração, concluido que seja o periodo necessario para se operar a mesma prescrição!!!

¿Quem é responsavel nestas condições para reparar os prejuizos a que o publico esteja sujeito só pelo empenho obstinado de deixar correr o marfim como de sempre da parte das instancias oficiaes?

E' o *zé povinho* quem paga as favas pelos seus pecados.

Não pensem, caros leitores que nos move a intenção, de leve que seja, de molestar a pessoa do actual administrador do concelho de Pondá sr. Lopes Pereira, criticando os seus actos ou atacando a sua competencia. Longe de nós tais ideas; porque é a nossa funda convicção que o Governo escolhe só pessoas competentes para as funcções publicas, mas por mais competente que ele seja, por maior zelo com que o mesmo sr. queira exercer a sua actividade, por maior energia que Sua Excia pretenda empregar no estudo dos negocios, do seu cargo, é claro, todavia, que hão de ficar estes expostos para sempre á maior incuria em quanto o Governo não tome devidas providencias para remediar o mal.

Ainda ha mais.

A' norma corrente dum bom governo é procurar regularisar a sua forma administrativa quanto possivel, adaptavel, ás necessidades peculiares de cada localidade e ao seu estado social.

Ora o concelho de Pondá sendo mais adiantado de todos os concelhos das Novas Conquistas, não só pelo grande numero de comunidades bem movimentadas, mas tambem pelas ricas mazanias dos templos hindus coeficientes importantes da economia social, que o Governo não pode votar ao ostracismo, como tem procedido até aqui, o regime a adoptar não pode ser igual a outros concelhos das Novas Conquistas,

Se ainda não tem soado a hora de o concelho de Pondá ter as administrações privativas a par dos concelhos das Velhas Conquistas, exigem as circunstancias, quanto antes, a discentralisação dos serviços a cargo do actual administrador para a moralidade e decoro das instituições, se não de todas, ao menos das comunidades ou mazanias; e quando isto não possa realisar-se por motivos de força maior pedimos a Sua Excia o sr. Governador Geral providencias no sentido de modificar leis de prescrições e de outros prasos marcados nos codigos e regulamentos em vigor abrindo uma excepção respeito ao concelho de Pondá emquanto tiverem que continuar a sua administração no estado actual

Gurudas

ECOS & CRITICA

Um pedido justo

De diferentes partes das Novas e Velhas Conquistas estamos recebendo constantes cartas em que se nos pede que solicitemos do Governo moratoria para o pagamento da divida atrazada das comunidades, confrarias e mazanias.

E' justo o pedido, dada a terrivel carestia que, sem dó nem piedade está oprimindo o Paiz inteiro, tendo reduzido até á miseria franciscana, muitas das nossas familias.

Torna-se necessario, portanto, que Sua Excia o sr. Governador Geral que deve conhecer, sobejamente, a desoladora situação economica em que o nosso Povo se atormenta, atenda prontamente, á sua suplica.

भारत

गुरुवार पौष्य शु० १ दा० १८४३

अबकारीचा मक्ता

स्त्रीजातीस दारू विकण्याचें बंद करणें हें जसें न्यायास व नीतीस अनुसरून आहे. तसेंच स्त्रीयांनीं दारू विकण्याचेंहि बंद झालें पाहिजे. अथवा मागील एका अंकांत, दारूचा मक्तेदार होण्यास जो नियम घातला पाहिजे, म्हणून आह्मीं सांगितलें होतें, तोच नियम, मक्तेदाराच्या जबाबदारीखाल दुकानें उघडणाऱ्या अगर त्या दुकानांतून दारू विकावयास बसणाऱ्या सर्व इसमांस लागू केला पाहिजे. तो नियम ह्मणजे साक्षरतेचा, सज्ञानतेचा, पुरुषत्वाचा आणि चांगल्या वर्तणुकीचा दाखला दाखविणें हा होय. नाहीं तर मिळेल त्यानें दारूचें दुकान उघडावें, समाज व सरकार यांस फसवून धंदा चालवावा आणि लोकांच्या व्यसनाधिनतेचा फायदा घेऊन आपण गबर व्हावें हा क्रम तसाच सुरू राहील. यांत सरकारास सांपत्तिकदृष्ट्या फायदा असला तरी समाजाची आणि त्या बरोबर सरकारची नैतिक अधोगति झाल्याशिवाय राहणार नाहीं हें खास.

प्रत्येक गांव अथवा गांवांचें गट, यांतील दुकानांची संख्या नियमित करितांना त्या त्या गावांतून जत्रा वगैरे प्रसंगीं उघडणारीं हंगामी दुकानें जमेस धरतां येत नाहींत. कांहीं प्रसिद्ध ठिकाणच्या जत्रा, बाजार यांमधून दु[illegible]नें उघडण्याची परवाना देण्यास, स[illegible] ठेऊन, [illegible] करण्या[illegible] लोकांस एक साधन ठेविलें [illegible]. कोणत्याहि धर्माच्या देवस्थानातील जत्रांत किंवा त्या प्रसंगीं भरणाऱ्या बाजारांत जमणारे लोक, एकधर्मश्रद्धेनें अथवा प्रापंचिक व्यवहाराच्या निमित्तानें आलेले असतात. त्यांच्या त्या धर्मश्रद्धेस तसेंच त्या प्रापंचिक व्यवहारदक्षतेस धाब्यावर बसवून, आपल्या नादीं लावण्याची शक्ति दारूबाईच्या आंगीं आहे. हें ओळखूनहि, सरकारनें अशा सार्वजनिक प्रसंगीं देखील तीस मुभा ठेवणारें एक कलम राखावें हें कशाचें द्योतक बरें? लोकहितबुद्धीचें कीं स्वार्थतत्परतेचें? याचा उलगडा त्याचा त्यानेंच करावा. नाहीं तर त्यापेक्षां कायद्यांत दुरुस्ती करून जत्रा वगैरे ठिकाणीं दारूचीं दुकानें उघडण्यास साफ बंदी करून सचेपणा राखलेला बरा.

कलम ८ मध्यें धार्मिक मंदिरें, शाळा आणि सार्वजनिक कचेऱ्या यांपासून २५० मेत्रांखालील अंतरांत दारूचीं दुकानें उघडूं नयेत असें ह्मणून, लागोपाठ तें अंतर गव्हर्नर जनरलच्या खास परवानगीनें १५० मेत्रांपर्यंत कमी करितां येईल अशी सवलत ठेविली आहे. पूर्वीचीच बंदी कायम केली असती तर, त्या कक्षेंत न येणारीं, अशी जागा, दुकानें उघडण्यास राहणार नाहीं ह्मणून, मक्ता घेण्यास कोणीहि इसम पुढें न आल्यानें आपलें उत्पन्न बुडेल अशी निराधार भीति उत्पन्न होऊनच सरकारनें वरील सवलत ठेवली आहे यांत संशय नाहीं. व हें खरें मानलें तर, "सरकारची नजर काय ती उत्पन्नावर" या आमच्या ह्मणण्यासच बळकटी येते असो. कायद्यांत सवलत असली तरी मक्तेदारास तिचा फायदा देणें न देणें सरकारच्या मर्जीवर आहे. तेव्हां सरकारनें आपल्याच हेतूशीं विसंगत होईल असें वर्तन कधींहि ठेवूं नये. याच कलमांतील धार्मिक मंदिरें, देवळें, व सार्वजनिक कचेऱ्या, यांच्या यादींत, रेल्वे स्टेशनें आणि आगबोटीचे धक्के यांचा, स्पष्ट शब्दांनीं समावेश करावयास पाहिजे होता; कारण सार्वजनिक कचेऱ्यांत त्यांचा अंतर्भाव होणारा आहे. हें जरी खरें असलें तरी कित्येक वेळां कायद्याचा अर्थ ठरविणारे अधिकारी तज्ञ असतातच असें नाहीं. त्यांत दारूबाईशीं गांठ. अगदीं कोरडी असलेली जीभ ओली करून टाकण्याची कला तिला साधवेल! मग काय विचारतां? एक वेळ नजर पडली कीं पुरे? तिची कड घ्यावीसें कोणासहि वाटेल. या साठीं कलमांत स्पष्ट खुलासा झालेला बरा.पण त्या पूर्वी सरकारनें आपल्या आगबोटींवर मक्त्यानें दिलेलीं देशी परदेशी दारूचीं दुकानें उठविलीं पाहिजेत. त्या दुकानांतून दारू पिणाऱ्यांच्याच खिशास आणि आरोग्यास चट्टा बसेल यांत संशय नाहीं [illegible] त्या बरोबर दारूच्या आंगांत नवे दारूबाज निर्माण करण्याची शक्ति आहे. हेंहि विसरून चालणार नाहीं. बरोबरच्या नात्यानें चार सभ्य गृहस्थ बसले असतां प्रवासाच्या रिकाम्या वेळांत एकमेकांच्या भीडेभाडेनें दारूचे शिसे रिकामे करितांना पुष्कळांनीं पाहिलेंच असेल तें सारे मूळचे दारूबाज होते अशांतला भाग नाहीं. तर फक्त आपल्या पदरांत कृपणतेचा अथवा गावंढीपणाचा दोष पडण्याचें टाळावें ह्मणूनच त्या घातकी व्यसनास ते बळी पडलेले असतात. आगबोटीच्या प्रवासाची दगदग आणि कंटाळा घालविण्याच्या निमित्तानें कित्येक वरचेवर दारूचे ग्लास झोकून त्या निशेंत तर्र पडलेले असतात. त्यांची ती मजा पाहण्याचा सुयोग आणि आसपास पसरलेली नरकापेक्षांहि कठीण वाटणारी, दारूची घाण सहन करण्याचा कुयोग, बिचाऱ्या बिनदारूबाजांस वरचेवर प्राप्त होत असतात. पानखातंभ्याची कोण ही विटंबना!! केवळ पशुवृत्तींतच ज्यांचें आयुष्य जात आहे त्या मद्यपि लोकांचे लाड पुरविण्यासाठीं, मानवी स्थितीस अद्याप विटलें नाहींत अशा बहुजन समुदायाची, सरकारनें देखील पर्वा करूं नये हें केवढें आश्चर्य!! आतां मनू बदललेला आहे. सरकारहि बदलत चालल्याचें दिसत आहे ह्मणून सरकारास आह्मी हक्कानें कळवितों कीं, दारूचें व्यसन कमी व्हावें असें आपण सांगतां तें खरें असेल तर प्रवासाच्या रिकाम्या वेळांत आपल्या जबड्यांत ओढून घेणारीं हीं बोटीवरील दारूचीं दुकानें आधीं बंद करा; आणि दारूपासून अलिप्त असणाऱ्या इतर जनांचा दुवा घ्या.

नीं दिसेल, पत्राच्या शेवटीं श्री. बांदिवडेकर आपल्या आक्षेपकांना हिणविण्यासाठीं गोमांतकांत श्री शिवाजी महाराजांचें स्मारक घडवून आणण्याचें आव्हान करितात. यांत त्यांचा हेतु शुद्ध असेल व फुटकेली उकळी युवराज स्वागतापुरतीच नसेल तर त्यानींच पुढें सरून उपक्रम करावा. शक्य ती मदत करण्याचें अभिवचन भारतकाराप्रमाणेंच मी माझ्या व माझ्या अनेक मित्रांतर्फे देऊन त्यांची रजा घेतों.

ज. बि. कामत

स्फुट विचार

मतदार व्हा!:—राजकीय दृष्टीनें मतदाराला किती महत्व असतें हें आज कोणास नव्यानें सांगावयास पाहिजे असें नाहीं. ज्याला मत नाहीं त्याला निवडणुकींत कोणीहि विचारीत नाहीं. त्याकडे ढुंकून सुद्धां पाहणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्याला, आपल्याकडून वसूल करण्यात येत असलेल्या करांचा सदुपयोग होतो किंवा दुरुपयोग होतो, या संबंधीं सरकारास जबाब विचारण्याचा कांहींच अधिकार नसतो. एवंच तो असून नसून सारखाच! असे 'असून नसून सारखेच' या वर्गांत मोडणारे आमच्या हिंदुजनतेंत पुष्कळ लोक आहेत. त्यानीं, सांप्रतची मुनिसिपालटीनीं दिलेली संधि साधून, मतदाराच्या नोंदबुकांत आपला समावेश करून घ्यावा, अशी आमची त्यांस फिरून विनंति आहे. प्रांतिक संघाच्या स्वयंसेवकांनीं तर प्रस्तुतची वार्षिक पर्वणी साधून घेण्यांत कुचराई करितां कामा नये, हेंहि बजाविल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं.

पोर्तुगालची परिस्थिति:—पूर्वपदावरच असून, ती लवकर सुधरण्याचीं चिन्हें दिसत नाहींत. चालू प्रधानमंडळांत सर्व तऱ्हेच्या पक्षाचे गृहस्थ असून, दुहीच्या अग्नीनें त्यांत असलेल्या दिखाऊ ऐक्याची केव्हां राखरांगोळी होईल याचा भरंवसा नाहीं. एकाच पक्षाच्या लोकांचें प्रधानमंडळ असतानां जर तें महिन्यापेक्षां जास्ती टिकूं शकत नाहीं, तर भिन्न लोकांचें सदरील मंडळ दिवसांपेक्षां जास्ती टिकणें शक्य वाटत नाहीं, हें उघड आहे. घोडा मैदान जवळच आहे. पहावें काय होतें तें!

इकडे लक्ष द्या:—सरकारी अधिकाऱ्यांसंबंधीं अगर कोणत्याहि गोष्टीविषयीं कोणीहि कशाहि प्रकारच्या तक्रारी आह्मांस कळविल्यास, त्यांची योग्य दाद आमच्या खर्चानें तावडतोब लावण्याची आह्मीं खास व्यवस्था केली आहे. मात्र ज्या तक्रारी आह्मांस कळविण्यांत येतील त्या सार्वजनिक स्वरूपाच्या असून तक्रारी पाठविणारे इसम आमच्या ओळखीचे असले पाहिजेत. निदान आमच्या ओळखीच्या गृहस्थांच्या परिचयाचे तरी असले पाहिजेत. ठिकठिकाणीं भारताचे एजंट आहेतच. त्यांच्या तर्फे कसलीहि 'तक्रार' आमच्या आफिसांत आल्यास तिचा विचार तावडतोब होईल. तक्रारीसंबंधीं करण्यांत आलेल्या चौकशीचा रिपोर्ट आमच्या खर्चानें ज्याला त्याला लगेच पाठविला जाईल. सरकारी बेमुर्वतखोर अमलदारांच्या गांजणुकीनें त्रास पावत असलेल्या लोकांनीं इकडे लक्ष द्यावें.

अधिकारी आणि निवडणुका:—मुलकी खात्यांतील कांहीं काळ मुख्य पदारूढ असलेले सि. आलफ्रेद रद्रीगीस् हे, त्या जागीं नवीन गृहस्थाची आकस्मिक रीतीनें नेमणूक झाल्यानें, पदच्युत झाल्याचें वर्तमान 'भारता'च्या गेल्या अंकीं प्रसिद्ध झालेंच आहे. सदरील पदावर विराजमान; असतांना सि. रद्रीगीस साहेबानीं प्रांजेरीस द कोस्ताच्या प्रत्येक निवडणुकींत हरएक तऱ्हेनें हैदोस घालण्यास कमी केलें नाहीं! आपल्या हितकर्त्या मित्राची मर्जी राखण्यासाठीं, त्यानीं, भरदिवसा, कोणाचीहि पर्वा न करतां निवडणुकीसंबंधीं एकंदर कायदे सत्तेच्या जोरावर पायाखालीं तुडविले व आपल्या हाताखालील नोकरांनाहि खुशाल तुडवावयास लाविले! कोणास धमक्यावजा सूचना दिल्या तर कोणास विनंतिवजा अभिवचनें दिलीं. तात्पर्य निवडणुकींत लुडबुड करण्याचा कोणताहि वाममार्ग आक्रमिण्याचा त्यानीं शिल्लक ठेविला नाहीं. यापुढें तरी सरकारी अधिकाऱ्यानीं स्वसत्तेचा उपयोग निवडणुकीच्या कार्यांत करून, कायद्याच्या पायमल्लीनें आपल्या नांवास कलंक लावूं नये अशी आमची त्यांस प्रेमाची शिफारस आहे.

वर्तमानसार

—पोर्तुगालांत राज्यक्रांति होऊन, तिचा वणवा मुख्य मुख्य शहरांत पसरल्याची तार आली होती. या तारेंत तेथील सर्व हॉस्पिटलें जखमी लोकानीं चिकार भरून गेलीं होतीं, असेंहि ह्मटलें होतें! परंतु सदरील बातमी वस्तुस्थितीस धरून नसल्याचें मागाहून प्रसिद्ध झालें आहे! 'अंदरकी खरी बात राम जानें'!

—माजी प्रसिद्ध पोर्तुगीज ट्रांसलेटर दोतोर वामन घांटकार यांस पणजीच्या कोर्टांत वकिली करण्याची सनद मिळाली असल्याचें कळविण्यास आनंद वाटतो.

—बंगालच्या लोकप्रिय अमृतबजार पत्रिकेच्या संपादकांस कैद केलें आहे. दंडपशाहीचा आततायीपणा!

—डिचोलींचें रेपार्तीसांव द फाजेंद त्याच्या अनावश्यकतेमुळें उठविलें जाईल, असें सरकाररीत्या प्रसिद्ध झालें आहे.

—लेजिस्लेटिव कौन्सिलच्या बैठकी येत्या फेब्रुवारी महिन्यांत पुन्हा सुरू होणार आहेत.

—लोरेंस मार्कीसच्या जकात खात्यांतील तिजोरींत सोळा हजार गिनी बेपत्ता झाल्याचें वर्तमान आहे. सरकारी तपास चालू आहे.

—'व्हांग्वार्द नावाच्या पत्रांत १९ आक्टोबरच्या भीषण रात्रीं 'कापले' जाणाऱ्यांची नोंद प्रसिद्ध झाली आहे. त्यांत ५२ राजकीय पुढारी, १७ वर्तमानपत्रकार व ३५ बेंकर व व्यापारी इत्यादि लोकांचा समावेश होतो. सदरील ५२ पुढाऱ्यांत खुद्द रिपब्लिकच्या अध्यक्षाचाहि नामनिर्देश आहे! काय ही अधोगति!

—सरकारपक्षानें सर्वशक्ति वेचली असतांहि, बनारस येथील रहिवाश्यानीं युवराजांच्या स्वागतावर पूर्ण बहिष्कार घातला.

—कलकत्याच्या दहा हजार मजुरांनीं संप पुकारला आहे.

—जखमी पंजाब हें पुस्तक सरकार जमा करण्यांत आलें आहे! इंग्रजी अमदानींत यापुढें इतिहास सुद्धां सरकार जमा होण्याचीं दुःचिन्हें भासत आहेत!

PAGODE DE XRI XANTADURGÁ DE CUNCOLCARINA DE FATORPA

No dia 9 do Janeiro pelas 13 horas serão arrematadas em hasta publica, jo as de ouro e prata e roupa julgadas inserviveis, pertecentes ao cofre do dito Pagode.

Os pretendentes compareçam no dito Pagode no dia e horas marcados com fiança idonea.

Oe scrivão da meza administrativa. 9

Rama Pandu Naique

Aos 22 de Dezembro de 1921

ANO VI — NUMERO 50 — 1922 QUEPEM QUINTA-FEIRA 9 DE MARÇO

Director e Editor
Govinda P. Hegde ...

Annuncios
... por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... १-००-००
ब्रिटिश इंडिया........... १-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००
जाहिरातींचे दर
दराची दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातीचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ६ वें.] केपें, गुरुवार, तारीख ९ माहे मार्च सन १९२२ [अंक ५० वा.

Ao findar do ano

Com o presente numero, o *Bharat* completa o seu sexto ano.

Não lhe compete analisar a sua bôa ou má acção de um ano inteiro, papel que pertence á Historia, Mestra da vida.

Tem apenas a confessar ao publico que o subsidia, que ele poz todo o seu cuidado, todo o seu desvelo e toda a sua bôa vontade no cumprimento consciencióso do programa que se impôz, o de contribuir com o seu contingente para o bem estar do nosso Paiz que extremecemos com todas *as* veras de nossa alma.

¿Podia e devia o *Bharat* ter produzido mais do que fez? Mas quem dá o que pode, não está obrigado a mais. E o nosso jornal, durante o ano que vai findar, deu o que poude.

Bem sabemos que o *Bharat* se ressente, em grande escala, da falta de requisitos indispensaveis para ser um jornal á altura, adequado em todos os sentidos á epoca que estamos a atravessar.

Isto não quere, porem, dizer que deixamos de envidar os nossos esforços para preencher a aluuida lacuna. Antes pelo contrario, temos feito o impossivel para milhorar as condições do *Bharat*.

Assim, a partir do novo ano que começa na primeira quinta do proximo mez de abril, publicar-se-há o nosso jornal completamente transformado, material e substancialmente, para o que contamos receber na primeira quisena do corrente material necessario, já requisitado.

E' que desejamos que a nossa existencia, de resto, disvaliosa concorra, embora insignificantemente, só para a felicidade desta terra que nos é berço com o apoio imprescindivel do público ilustrado a quem não temos palavras para agradecer o generoso acolhimento, dispensado ao *Bharat* desde a sua aparição.

A missão dum jornal é, como a dum bom juiz, de ser recto. O *Bharat* julga-se habilitado a dizer que a compriu com honestidade, o que é corroborado pela sua atitude de intransigencia, ainda tratando de seus milhores amigos, alguns dos quais, contudo, não souberam compreende-lo, triste é constata-lo.

Que fazer? E' o feitio que trouxemos com o berço e será possivel que só a tumba no-lo leve.

Com orgulho, porem, registamos que nunca elogiamos nem condenamos só por mero *prurido* de elogiar ou condenar, nem tão pouco fizemos a mais ligeira alusão á vida privada de cidadãos que consideramo-la intangivel, sobretudo num meio onde se acentua a tendencia de interpretar factos e apreciar pessoas pelas exterioridades banais, quase sempre enganadoras.

Não podemos completar o presente artiguinho sem consignar, mais uma vez, o nosso agradecimento aos sinceros e solicitos assignantes do *Bharat*.

Finalmente pedimos licença para que nos consintam refazermo-nos durante o descanço legal para trabalhos do novo ano.

Conto politico

Era uma vez um ladrão que, depois de exgotar todos os meios vulgares d'arte de apoderar-se do alheio, concebeu o extraordinario plano de assenhorar-se do tesouro particular do proprio Rei da terra que êle habitava.

Com este proposito, o dito *amigo do alheio* introduziu-se na residencia real, pelo emprego de *utensilios* aconselhados pela sua sciencia e, quando pretendia entrar no comprimento onde estava guardado o objecto de sua cubiça, deteve-o no caminho a seguinte conversa, entabulada entre o Rei e a Rainha:-

O Rei:- Querida esposa, é preciso, custe o que custar, dar de casar a nossa unica filha solteira a qualquer ásceta, porque é êste o desejo da princesa.

A Rainha:- Tens razão. Não convem contrariar a vontade do ser do nosso proprio ser. Peço-te, portanto, que envies, mesmo amanhã o seu ministro á procurá do noivo que não lhe será dificil encontrar entre numerosos ascetas que habitam a margem direita do rio Krisna.

O Rei:- Estejas discançada que será cumprida a tua vontade, sim!

O ladrão a quem não escapou nenhuma palavra da referida conversa, saiu, pé ante pé, do palacio e desistindo da idea que o levara para lá, dirigiu-se para a margem do rio Krisna em trajo de asceta para alcançar a *mão* da princesa.

No dia seguinte esteve, de facto, ai, o ministro real, propondo a cada um dos ascetas casamento com a princesa real; ninguem, porem, aceitou-lhe a proposta; somente ao ladrão pareceu não desagradar o pedido ministerial.

O rei, conhecedor do resultado da diligencia do seu enviado, mandou para lá o melhor carro, acompanhado de principais entidades do seu reino para trazer ao palacio o seu futuro genro.

O nosso ladrão, quando se viu hourado duma forma principesca, apesar de que era, apenas, um falso asceta, arrependeu-se de sua vida de latrocinios, porque pensou que, se era tratado daquela maneira na sua actual posição, seria, com maioria de razões alvo de melhores provas de consideração por parte do elemento secular, se fosse verdadeiro *botrogui* e, regeitando o casamento solicitado com a princesa real, fez-se, com o decorrer do tempo, um santo afamado.

¿Poderá aplicar-se a moralidade do presente conto aos *inspiradores* primitivos de qualquer *novidade* desta terra?

O futuro no-lo dirá.

Aos assignantes do BHARAT!

Com este numero, o BHARAT vai completar o seu corrente ano de publicaçao, devendo começar o novo que e' setimo, no proximo mez de abril

A partir do novo serao introduzidos os seguintes aperfeiçoamentos:

Tipo novo e sorteado
Impressão arte moderna
Imformaçoes mais desenvolvidas
Colaboração selecta
Critica imparcial

Apesar destês melhoramentos, a assinatura será porem a mesma.

Pagamento adiantado

ECOS & CRITICA

Cá e lá

A classe comercial de Moçambique está discontente com o seu Alto Comissario por este ter imprimido á imposição de impostos a velocidade do mais veloz automovel...

Ignoramos, porem, o modo como se faz a aplicação dos mesmos impostos naquela provincia para apreciarmos o descontentamento dos *traficantes* africanos cuja capacidade contributiva não sabemos igualmente se está ou não exausta.

Se, todavia, as condições dali são em tudo identicas ás daqui, as *victimas* do Alto Comissario devem julgar-se felizes, sabendo que tem nas *victimas* do dr. Jaime de Morais e do seu Conselho Legislativo companheiros na desgraça!...

Cá e lá más fades há!

भारत

गुरुवार फाल्गुन शु० ११ शी १८४३

६ व्या वर्षाखेर—

आजचा अंक हा भारताचा सहाव्या वर्षाचा शेवटचा अंक होय. गत साला प्रमाणेंच याहि वर्षी भारतावर अनेक संकटें कोसळलीं;परंतु त्या सर्वांचा परिहार करून, तो नियमितपणें लोकसेवा बजावण्यास शकला, हें केवळ परमेश्वराच्या कृपादृष्टीचें फळ होय, अशी आमची भाविक समजूत आहे.

भारताची सहाव्या वर्षाची कामगिरी जनतेसमोर आहेच. तीज संबंधानें कसलेंहि मत व्यक्त करण्याचा त्याला अधिकार नाहीं.तें काम इतिहासाचें आहे.इतकें मात्र नमूद करण्याला त्याला धन्यता वाटते कीं, अंगीकृत कार्यासाठीं शक्तिसर्वस्व वेंचण्यास त्यानें कधीच माघार घेतली नाहीं.

भारतपत्र पूर्ण लोकमान्य होण्यास अजून त्यात पुष्कळ सुधारणा झाल्या पाहिजेत, हें आह्मास कळत नाहीं असें नाहीं.उलट त्या सुधारणा अमलांत आणण्याविषयीं आमचे प्रयत्न अव्याहत चालू असून,त्याचे थोडेसें दृश्य फळहि नव्या वर्षारंभापासून सहृदय वाचकांच्या नजरेस येणार आहे.

सहाव्या वर्षाच्या अवधींत 'भारता'संबंधीं नाना तऱ्हेचे टीकात्मक उद्गार ऐकण्यात आले. कित्येकांनीं गौरवपर वाक्यांनीं त्यास उत्तेजित करण्याचे सात्त्विक परिश्रम केले, तर कित्येकांनीं मळमळत्या कुत्सित शब्दांनीं त्याचा हिरमोड करण्याचा तामसी प्रयत्न केला; परंतु लिहिण्यास आनंद वाटतो कीं, अध्यात्मग्रंथाच्या श्रद्धापूर्वक पारायणानें जगाच्या खऱ्या ज्ञानाची श्रेष्ठतम योग्यता अंतःकरणास पूर्ण रीतीनें पटल्यामुळें, स्तुतीनें जसा 'भारत' अहंकारापासून दूरवर अलिप्त राहिला, तसाच तो निंदात्मक काल्पनिक आरोपानींहि कधींच दुःखी पावला नाहीं. केवळ अंगीकृत ध्येयाकडे दृष्टिकेंद्र स्थिर करून, कसल्याहि तर्ककुतर्कांस अथवा क्षुल्लक वादविवादांस कांहींहि महत्व न देतां, त्यानें आपली लोकोपयोगी कामगिरी स्वशक्त्यनुसार बजावलेली वाचकांच्या अवलोकनांत आलीच आहे.

उपरिनिर्दिष्ट भावना दृढ होऊन, आपलें अस्तित्व जनताजनार्दनाच्या सेवेसाठींच खर्ची पडावें अशीच रात्रंदिन भारत परमेश्वराला करुणा भाकीत आहे. तो सर्वशक्तिमान प्रभु, अनाथांचा कैवारी व भक्तकाम कल्पद्रुम त्याचे पवित्र हेतु पुरविल्याशिवाय कदापि रहाणार नाहीं. अशी आह्मास निष्ठापूर्वक खात्री आहे.

सहाव्या वर्षाच्या शेवटीं, या पेक्षां जास्त तें आम्ही काय लिहिणार?

—पोर्तुगालची गडबड 'शांत' झाल्याची बातमी आहे.

स्फुट विचार

'हिंदु सभा' पुन्हां एकदां:—आपणांच्या हिंदु-सभेसंबंधीं प्रसिद्ध झालेल्या गतांकांतील लेखावरून भारताच्या ४८ व्या अंकांतील 'सभे'वरील स्फुट किती सार्थ होता हें मर्मज्ञ वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. खरी वस्तुस्थिति जनतेसमोर यावी इतकाच तो मजकूर लिहिण्यांत आमचा शुद्ध हेतु होता. प्रागतिक संघ अस्तित्वांत असताना त्याला विरोध करणारी दुसरी कसलीच हिंदूंची संस्था स्थापिली जाऊं नये असें आह्मांस, हिंदुसमाज हितदृष्ट्या वाटणें साहजिक होतें, हें कोणीहि कबूल करील. ज्या अर्थी आतां हिंदु-सभेला उदार स्वरूप प्राप्त झालें असून, तीचें ध्येय संघाच्या ध्येयाला पोषकच बनत चालल्याचें समजतें, त्या अर्थी त्या संस्थेचें अंतःकरणपूर्वक कल्याण इच्छिणें हें आमचें आह्मीं पवित्रतम कर्तव्य समजतों व तें पुन्हां एकदां आह्मीं मोठ्या आनंदानें येथें पार पाडतों.

अव्यवस्था कोठें आहे?:—वेरें बार्देस येथें श्रीशांतादुर्गा वा. मं नावांची संस्था असून, तिचें कार्य समाधानकारक रीतीनें चालत असल्याचें कळविण्यास आनंद वाटतो. मागें एकदां या संस्थेच्या भेटीचा सुयोग आह्मांस आला होता. त्यावेळीं तेथील एकंदर टापटिप अवलोकण्याची प्रत्यक्ष संधि मिळाली. पण...टपालाच्या अव्यवस्थेमुळें एखाद दुसरें पत्र किंवा मासिक हमेश गहाळ होत असल्याची कुरकुर कानीं पडून मन घोंटाळ्यांत पडलें! आमच्या म्हणण्याची सत्यता पहावयाची असल्यास श्रीयुत मोरमकर, विविधज्ञानविस्ताराचे व्यवस्थापक, यांकडून सदर्हू संस्थेच्या सेक्रेटरीस आलेलें खालील आशयाचें पत्र वाचावें:—आपलें पत्र पाहून फार समाधान वाटलें. आणि गोंव्यांतील टपाल मंडळीचा आपल्या लायब्ररीवरहि परिणाम झालेला पाहून खेद झाला. त्याला उपाय म्हणजे संघ वर्षाचे अंक दर्वी असेरीस रजिष्टर पोष्टानें पाठविणें हा होय!... ...'मनोरंजन' 'नवयुग' विविधज्ञानविस्तार वगैरे आपणाकडे येणाऱ्या वर्तमानपत्रांच्या व मासिकांच्या आफिसांत खरोखरच अव्यवस्था आहे कीं, गोंव्यांतील लेटरपोस्टांत अव्यवस्था आहे देव जाणे! मजकडे गोव्यांतील वर्गणीदारांचीं अंक न पोंहोंचल्याचीं इतकीं पत्रें आहेत कीं तीं पाहून अव्यवस्था कोठें आहे याचा उलगडा सहज होण्यासारखा आहे. आतां अमूक महिन्यांचा अंक बरोबर अमूक तारखेस पोष्टांत पडेल हें सांगणें सध्या तरी माझे शक्तीच्या बाहेर आहे. जगांत आज काय चाललें आहे, यांकडे लक्ष दिल्यास आपणास याचें उत्तर बरोबर मिळणार आहे. या पत्रासोबत नोव्हेंबर डिसेंबरचे अंक पाठवीत आहे ते तरी बिनचूक पोंचोत म्हणजे झालें. ही अव्यवस्था केव्हां सुधारेल तें एक हरीच जाणे!

वर्गणीदारांस विनंति;—सहाव्या वर्षाचे ५० अंक नियमितपणें प्रसिद्ध करून 'भारत' आपल्या कर्तव्यांतून मुक्त झाला आहे. हें कर्तव्य पार पाडतानां त्याला हा कीयांहेर सांपत्तिक क्षीण सोसावी लागली आहे. ही स्थिति लक्षांत आणून वर्गणीदारांनींहि कोणत्याहि मार्गानें वर्गणीची फेड करून आपलें कर्तव्य बजावणें जरूर आहे. त्यांतहि नवीन सुधारणानिमित्त त्याला नवीन जबाबदारीशीं तोंड द्यावें लागणार आहे. अशा नाजुक परिस्थितींत आमचे प्रेमळ आश्रयदाते 'भारताच्या' ऋणांतून मोकळे होऊन उलट आपल्या अमित उपकारांनीं आह्मांस ऋणी करतील अशी आशा आहे—नव्हे तसें करण्याविषयीं आमची त्यांस आर्जवपूर्वक विनंति आहे.

विचारतरंग

हिंदुसमाजाचा राजकीय बाबतीमध्यें ख्रिस्ती समाजाशीं छतिसांचा आंकडा असणें परिणामीं घातक आहे अशी कित्येक मंडळीची प्रामाणिक समजूत आहे. होय. आह्मीहि तेंच म्हणतों. परंतु त्याबरोबर हिंदुसमाजानें स्वोन्नतीसाठीं सांप्रत स्वीकारलेलें धोरणच इष्ट व जरूर आहे असेंहि म्हणण्याची परवानगी घेतों. कारण कांहीं कांहीं बाबतींत विशिष्ट प्रयत्न झाले तरच हिंदुसमाजाचें डोकें वर येण्याचा संभव आहे. येरवीं मुळींच नाहीं. उघड सांगावयाचें म्हणजे दुसऱ्यावर विसंबून राष्ट्रकार्य साधून घेण्यांचे दिवस आज उरले नाहींत.

शिवाय ज्या समाजामध्यें हिंदूंचा आनंद हा त्या समाजाला सुतकाप्रमाणें आहे असें उघड उघड प्रतिपादन केलें जात असे, ज्या समाजामध्यें एकाद्या लायक हिंदु गृहस्थाला सरकारनें वरिष्ठ अधिकाराची जागा दिली म्हणजे टीकेचा भडिमार होई, ज्या समाजाचे अध्वर्यु स्वतःच्या फायद्यासाठीं हिंदुसमाजाचे वाजवी हक्क पायाखालीं तुडवून त्याचें डोकें वर येण्यास नेहमी आड येत असत, ज्या समाजांतील पुढाऱ्यांची वागणूक केवळ माझा तो बाब्या व दुसऱ्याचें तें कारटें' अशी वारंवार दृष्टोत्पत्तीस येत असते व ज्या समाजांतील जबाबदार व्यक्तींनीं हिंदूंच्या हिताचा प्रश्न आला असतां आजपर्यंत कानावर हात ठेवून स्वस्थ मजा पहात राहिल्याशिवाय दुसरें तिसरें कांहीं केलें नाहीं. तो समाज आपल्या समाजाला योग्य दिशा दाखवून अगर मोकळ्या मनानें खांद्यास खांदा भिडवून पुढें आणील अशी आशा करणें म्हणजे शुद्ध वेडेपणाचें आहे. या गोष्टीचें प्रत्यंतर पहावयाचें असल्यास आपण पुढील एकच गोष्ट उदाहरणादाखल घेऊं.

वरिष्ठ सरकारकडून गोव्याच्या लेजिस्लेटीव कौन्सिलला बिनसरकारी मेंबरांची वाटणी झाली व संबंध नवीन काबिजादींतील प्रजेला फक्त एकच मेंबर निवडून देण्याचा हक्क प्राप्त झाला. त्यावेळीं कितीशा ख्रिश्चन पत्रकारांनीं अगर पुढाऱ्यांनीं या अन्यायाविरुद्ध आपलें प्रामाणिक मत जाहीर केलें?! केवळ मत जाहीर करण्याइतकाहि उदारपणा ज्या समाजामध्यें आढळून येत नाहीं उलट रा. शिरवईकर यानां मामलेदारीची जागा बहाल करणें म्हणजे सरकारनें पंचमहापातकांपैकीं एक आचरण करणें होय असें ज्या समाजाला वाटलें तो समाज हिंदु-समाजाच्या सुखाची कितीशी काळजी घेईल हें दिसतच आहे! इतकेंच नव्हे तर युरोपियन लोकांची सहानुभूति उर्फ समतोलबुद्धि जर मुळाशीं नसती तर हिंदु-समाज एक पाऊलहि पुढें सरता ना.मागील गोष्टी उकरून काढण्यांत हंशील नाहीं ही गोष्ट आह्मांला कबूल आहे. त्याचप्रमाणें आमच्या ख्रिस्ती बांधवांमध्यें उदार मतवादी लोक अगदीं नाहींत असें आमचें म्हणणें नाहीं; किंवा हिंदुसमाजानें 'सवतासुभा' स्थापन करून आपला राजकीय मार्ग आक्रमण करावा असेंहि आमचें म्हणणें नाहीं तर त्यानें स्वतःच्या पायावर उभें राहण्यास शिकावें इतकी आमची शिफारस आहे. व सुदैवानें तो तें शिकत चालला आहे ही गोष्ट महत्त्वाचीच आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हिंदुसमाजानें ख्रिस्तीसमाजाशीं यापुढें जरूर तेथें सहकार्य करून व इतर बाबतींत विरोध अगर निराळे प्रयत्न अशा धोरणानें वागलें पाहिजे.

एकदां एका जर्मन उद्दाम मिजासखोर ख्रिस्ती पाद्रीनें आकाशस्थ बापासंबंधीं कोंकणीमध्यें पुराण सांगताना उदाहरणादाखल पुढील शब्द उच्चारले: 'तॉ इतकॉ वास्ट कीं कॉंकण्याच्या बॉटापास्ट'.शाबास! भलेबहादर! जीते रहो पठ्ठे! हातानें कांहीं होत नसलें म्हणजे मनुष्य निदान तोंडानें तरी आपली हौस पुरवून घेत असतो म्हणतात. तशांतली गोष्ट. अहो पाद्रीसाहेब! यापुढें जरा सांभाळून बोलण्याची सवय करा! कारण सांप्रत जेथें तेथें यथेच्छ धुडगूस घालण्याजोगा राजसत्तेचा काल नाहीं. हें लोकसत्तेचें युग आहे हें विसरूं नका! कदाचित् एखाद्या वेळीं खड्ड्यांत पडाल.

हिंदूंच्या भटांसंबंधीं वाईट विधान उर्फ तुच्छतादर्शक उद्गार सदर ख्रिस्तीपुराणीकांनीं कां काढलें हा प्रश्न अजून आह्माला सोडवतां आला नाहीं. हिंदूंचा कोणताहि धार्मिक विधि सांगणारा पुरोहीत आगाऊ दक्षणा उपटीत नसतो व 'पाद्रीमंडळ' नेहमी श्रीमंत व गरीब हा भेदभाव न ठेवतां केव्हांहि— आगाऊ फी घेतल्याशिवाय व तीहि चोपून, बाहेर पाऊल टाकीत नसतें. कदाचित गरीब निरुपद्रवी हिंदु पुरोहीताचा अल्पसंतुष्टपणा व आपल्या जातभाईवरील विश्वास या गोष्टी ऐकून उपरोक्त पाद्रीमहाशयानीं आपल्या काळ्याकुट्ट अंतःकरणामध्यें द्वेषबुद्धीला थारा दिला असेल काय?! तरंगिणी

—'भारताच्या' नव्या स्वरूपांत फोटो देण्याचीहि व्यवस्था केली आहे.

-नवीन वर्षाच्या पहिल्या अंकी आह्मांस भेट देत असलेल्या नवीन मासिकांची, पत्रांची व पुस्तकांची पोंच दिली जाईल.

परमेश्वरानंतर 'भारत' सहाव्या वर्षाच्या शेवटीं खालील लोकांचा आभारी आहे:...

१ ज्या आश्रयदात्यांनीं त्याला वर्गणी व ... निरपेक्ष मदत करून त्याच्या अभ्युदयाविषयीं कळकळ दाखविली.

२ ज्या कंपोझिटर मित्रांनीं वेतनावरच नजर ठेवून नव्हे तर भारताची उन्नति व्हावी या शुद्ध हेतूनेंहि पडेल तें काम करून छीनें पार पाडून त्याला नियमितपणें चालण्यांत हिंमत दिली. या मित्रांपैकीं मुकुंद जगन्नाथ दळवी, श्रीपाद नीलकंठ मेढे, व नारायण सखाराम मेढे यांचा सप्रेम उल्लेख करण्यास त्याला समाधान वाटतें.

३ ज्या निरक्षरांनीं लोकांत मळमळते गैरसमज पसरवून त्याला शांतचित्त व कार्यक्षम बनविण्याचें अप्रत्यक्ष पुण्य संपादन केलें.

ANNO VII — NUMERO 1 — 1922 QUEPEM QUINTA-FEIRA 6 DE ABRIL

Director e Editor
…nda P. Hegdo Dessai

Assinatura
India Portuguesa...... 3-00-00
India Inglesa............. 3-08-00
Numero Avulso.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo prazo contrato especial.

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००
जाहिरातींचे दर
दरओळ दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारे ठरविण्यांत येतील.

वर्ष ७ वें.] केपें, गुरुवार, तारीख ६ माहे एप्रिल सन १९२२ [खास अंक १ ला.

O sr. N. C. Kelker, paladino das liberdades indianas em Goa!

O talentoso redactor do Kessari, semanario a que os hindus devem tanto o seu desenvolvimento instrutivo e educativo foi recebido com inequivocas provas de simpatia e estima desde COLEM a MARGAO

O EMINENTE PATRIOTA VISITOU OS CONCELHOS DE PONDA E DAS ILHAS

O director do Maratha manifestou o seu contentamento pelo desejo que os hindus de Goa nutrem do seu levantamento POLITICO E SOCIAL

DISCURSOU NO SARASVAT BRAMAN SAMAJ E DAMODAR VIDIABHUVANA DE MARGAO

INDIA IS ONE AND INDIVISIBLE

O sr. N. C. Kelker, no brilhante discurso que proferiu no dia 30 do mez p. f. no salão do S. B. S. de Margão, demonstrou com argumentos inatacaveis que, apesar da diversidade de governos que imperam na vasta peninsula industanica *ela era una e indivisivel*.

E' possivel, porem, que surja por ai alguem com *pretensão* de desfazer tal afirmação do talentoso redactor do *Kessari*; mas não conseguirá vinga-la, porque a propria natureza lhe oporá uma barreira invencivel, persuadindo-o de que nunca se divide nem se fragmenta um paiz que e orogràficamente é *uno*.

E' verdade. A disposição geografica é indestructivel e a situação politica está sujeita a varias alterações, consoante o desenvolvimento educativo e instructivo do meio a quem ela diga respeito.

Na mesma sua conferencia o eminente patriota provou tambem que a peninsula industanica era *una* e *indivisivel*, religiosamente, asseverando que não passavam de aparentes as divergencias de primitivas religiões que, em ultima analise eram ramificações duma só.

Descrevendo a situação politica dos povos que vivem debaixo dos governos britanico, portuguez e dos Estados nativos, o sr. *Kelker* chegou, ainda á conclusão de que a *India era una e indivisivel*, porque frisou-por toda a parte reina o mesmo descontentamento, a mesma agitação, o mesmo dessassocego.

Para corroborar esta sua ultima asserção citou exemplos do despotismo que oprime os subditos dos *rajàs* dos estados nativos, da hipocrisia da burocracia britanica e da impotencia do regime democratico portugues de felicitar os seus cidadaos.

O intemerato redactor do mais popular semanario de Poona comparou e bem a felicidade proporcionada aos cidadaos portugueses da India pela autonomia, *outorga* de Portugal com a que disfrutam as mulheres do *Zenana* (Gineceu) de qualquer antigo rei mouro, amigo da poligamia.

* * *

Muito nos rejubilou a encantadora conferencia do sr. Kelker, porque contribuiu preponderantemente para justificar mais uma vez a doutrina que o *Bharat* seguiu: a necessidade de acompanharmos e adoptarmo-nos na vida pratica segundo as nossas condições especiais, o movimento politico dos nossos irmãos da visinha India de que corografica e religiosamente (e pára que ocultar?- tambem, quanto ao descontentamento) fazemos parte integrante.

India is one and indivisible deve ser pois, a divisa de todo o movimento que tenda á prosperidade da India e á felicidade politica dos seus habitantes

E crêmos que ninguem nos quererá mal porisso, porque ninguem condenou uma aspiração justa, um desejo legitimo e um fim natural.

ECOS & CRITICA

Sarasvat B Samaj

Realisou-se com desusada pompa e numerosa concorrencia a serie de conferencias promovidas por esta simpatica associação instructiva de Margão.

Deu ela este ano ao publico o prazer de poder ouvir e admirar oradores dos mais distinctos como N. C. Kelker e a sra. dra. Indumatibai Naique, que esteve em Goa acompanhada do seu marido dr. R. B. Naique e o qual presidiu á conferencia de sua esposa.

O *Samaj* prestou, pois, como de sempre e mais uma vez o importante serviço ao publico, proporcionando lhe o ensejo de saborear conferencias brilhantes; os oradores tambem desempenharam com uma competencia que muito os nobilita, os seus papeis.

Não basta, porem.

Preciso se torna igualmente que todos nós tiremos do utilissimo esforço do *Samaj* e dos conferentes proveito para a nossa vida pratica.

O contrario será uma semente lançada no solo pedregoso não passando tudo aquilo duma festa cujo brilhantismo não tem mais idade do que a duma rosa de Malherbe, a falar a verdade.

Agradecendo

Agradecemos muito penhorados as mensagens de felicitações que o *Bharat* recebeu e continua recebendo pela sua entrada no setimo ano.

O *Bharat* consigna tambem o seu agradecimento áqueles que benevolamente pagaram as suas assignaturas.

Para a semana

Recebemos uma carta de Mapuçá em que se queixa de franca protecção que o sr. sargento Nogár dessa vila está dispensando ao jogo de azar, em troca de *fabuloso premio* diario que está impunemente e em plena luz do dia estorquindo aos desenvergonhados jogadores.

A ser verdade o que nos informam-é a carta que nos veiu remetida é do punho duma pessoa que nos merece a inteira fé- é simplesmente para lamentar que se tenha feito ladrão quem era encarregado de prende-lo...

O *Bharat* sempre substentou guerra sem treguas contra a jogatina e portanto fará tudo o que necessario fôr, para que ela se coiba em Mapuçá,

किंवा निकट आहे, हें येथें विशद करून सांगण्याचें कारण नाहीं. स्वदेशी स्वराज्याचा आत्मा आहे हें जगजाहीर आहेच. मात्र स्वदेशीच्या उपासनेंत दांभिकपणा बिलकूल उपयोगाचा नाहीं. स्वदेशभक्तांच्या मर्जीतून उतरूं नये म्हणून त्यांस चकविण्यासाठीं एखादवेळीं खादी वापरली व पेटवाज भाषणांत तिची तरफदारी केली म्हणून स्वदेशीचें पाऊल पुढें पडणें शक्य नाहीं. स्वदेशीचा जय अंतःकरणाच्या तळमळीपासूनच होणार आहे. अपकर्यानें नव्हे, हें प्रत्येकानें लक्ष्यांत ठेवल्यासच देशाचें कल्याण होणार आहे. असो.

म्हणून गोमांतकांतील सर्व जनतेस स्वदेशी व्रत आचरणाविषयीं आम्ही प्रार्थना केल्यास ती अनाठाई होणार नाहीं अशी आमची मनोदेवता आम्हांस साक्ष देत आहे. 'चरका व खादी यांवर भर द्या' हा म. गांधींचा संदेश अंतःकरणांत बिंबवून प्रत्येक गोमांतकीय नागरिक स्वदेशोद्धारार्थ झटेल अशीहि आशा आम्हांस खात्री आहे.

स्फुट विचार

सारस्वत ब्रा. समाजः---मडगांवच्या या उपयुक्त संस्थेची यंदाची व्याख्यानमाला अत्यंत यशस्वी रीतीनें पार पडली हें नमूद करण्यास आनंद वाटतो. दे० केळकर, डॉ. नाईक धांपला, वे. शा. सं. यज्ञेश्वर शास्त्री इ. थोर व्याख्यात्यांच्या आगमनानें मालेस पराकाष्ठेचें महत्व आलें होतें. या विद्वान व्यक्तींच्या विद्वत्तेनें ओथंबलेल्या भाषणाचा अपूर्व लाभ गोमांतकीय जनतेस करून दिल्याबद्दल समाजाविषयीं लोकांत वसत असलेलें प्रेम व कृतज्ञता यांत भरच पडत चालेल यांत संशय नाहीं. मात्र समाजिष्टांनीं व लोकांनीं बोलघेवडेपणाच्या आरोपास पात्र न होण्यासाठीं व्याख्यात्यांनीं पाजलेलें उपदेशामृत कृतींत उतरवून कीर्तिरूपानें अमर होण्याच्या प्रयत्नास आतांपासूनच लागलें पाहिजे. नाहीं तर व्याख्यानमालेचा निवळ खेळखंडोबा होऊन बसेल. किंबहुना चालविणें व्यर्थ आहे. ही समर्थांची शिकवण दृष्टीसमोर बाळगून प्रत्येकानें कार्यास लागलें पाहिजे. असो. 'समाजा'च्या देशहित वर्धक कामगिरी बद्दल आम्ही त्याचें प्रेमानें अभिनंदन करितो.

अभिनंदनः—कळविण्यास आनंद वाटतो कीं, मडगांवच्या ओदेलेनाहीत उ.

पडलेल्या सुईणीच्या कोर्साचें शिक्षण घेऊन दुसऱ्या वर्षाच्या परीक्षेस बसलेल्या श्री. राधाबाई आपसेंकर, अनसुयाबाई खोलकर रत्नेंबाई रायकर व चंद्रभागाबाई देसाई या अनुक्रमें १७, १६, १५ व १० मार्कांनीं उत्तीर्ण झाल्या. लोकापवादाची कोणतीहि पर्वा न करितां मनुष्यजातीस आवश्यक असलेल्या या धंद्याचें ज्ञान संपादन करून हिंदु सुईणीच्या तुटपुंज्या संख्येंत भर घातल्याबद्दल उपरोक्त बायांचें आम्ही अभिनंदन करितों. तसेंच सरकारनें केवळ हिंदुस्त्रियांसाठीं म्हणून दिलेल्या या सवलतीचा फायदा इतर हिंदु स्त्रियानींहि घ्यावा याबद्दल शिफारस करितों.

वर्गणीदारांस सूचना

ज्यानीं अजून वर्गणी पाठविली नसेल त्यानीं तिची चालू महिन्याच्या १५ तारखेपर्यंत फेड करून आम्हांस आभारांत ठेवावें अशी सूचना आहे. या अवधींत ज्याकडून वर्गणी न येईल त्यास 'भारत' बंद करण्यात येईल.

वर्तमानसार

—श्री. श० पं पाणदीकर, ज. शे. कारापुरकर, रा. वि. केणी व ल. शे. नगर्सेकर हे आमोड्याहून परत येत असतानां राय येथील कांहीं दारूबाज गांवगुंडांच्या तावडींत सांपडले जाऊन त्यांस बराच मार बसला. हें कळविण्यास फार वाईट वाटतें. पावलोपावलीं स्थापन झालेल्या दारू दुकानाचे दुष्परिणाम निरुपद्रवी मार्गस्थ लोकांस कसे भोगावे लागतात याचें हें एक ताजें उदाहरण आहे. प्रजा रक्षणार्थ दक्ष म्हणविणारें सरकार इकडे लक्ष देईल काय?

—श्रीकैवल्यमठाचे स्वामीमहाराज केरीं सांगें, काकोडें, कुडचडें, व्होडर, सळकर्णें पंचवाडी, असोळडें, देऊळमळ, सांवर्डें, शिरोडें, बोरी, लोटली वगैरे ठिकाणीं संचार आटपून कवळें येथील मठांत विश्रांति घेत आहेत. कांहीं दिवसांनीं श्रीचा संचार फोंडें व इतर राहिलेल्या भागांत होऊन परत येताना त्यांचें मडगांव शहरांत आगमन होणार आहे.

—कुडचडें येथें श्रीमत्पूर्णानंद सरस्वतीस्वामी महाराजांचा मुक्काम असताना आमच्या संपादकांचें त्यांच्या समोर प्रवचन झालें. प्रवचन द्वारा लोकजागृति करण्याचा हा मार्ग महाराजांस फार पसंत वाटून तो उत्तरोत्तर यशस्वी होण्याबद्दल आपला आशीर्वाद दिला. तथास्तु!

— शेण्या पंधरवड्यांत कुडचडें, सांवर्डें बांदिवडें, मडकई व बिठोण इत्यादि ठिकाणीं आमच्या संपादकाचीं प्रवचनें झालीं.

गोव्यांत दे० केळकर

ता. २९।३।२२ रोजीं प्रख्यात केसरी पत्राचे विद्वान संपादक दे० तात्यासाहेब केळकर यांचें मडगांव येथें शुभागमन होऊन दुसऱ्या दिवशीं रात्रौ त्यांचें तेथील सारस्वत ब्राह्मण समाजाच्या दिवाणखान्यांत जाहीर व्याख्यान झालें. व्याख्यानास लोकांची अतोनात गर्दी उसळली होती. दिवाणखाना तर चिकार भरून गेला होता. शिवाय बाजूच्या रस्त्यावर लोकांचे थव्याचे थवे नजरेस पडत होते. प्रास्ताविक उपचारांनंतर दे० केळकर यांनीं आपल्या भाषणास आरंभ केला.

ते म्हणालेः—आजच्या सभेच्या अध्यक्षांनीं (श्री. शांबाराव सरदेसाई) माझा परिचय करून देतानां दोन सन्माननीय विशेषणानीं मला संबोधिलें. पहिलें मी केसरीचा संपादक हें होय. व ही गोष्ट खरीहि आहे. संपादकाच्या खोलींत बसून मी केसरीच्या हजारो वाचकांशीं संभाषणवत् विचार प्रदर्शित करितों. व तेच आज प्रत्यक्ष लोकांसमोर मांडण्यास मिळत आहेत याविषयीं मला आनंदहि वाटतो. संपादकांचें कर्तव्यहि हेंच असतें कीं कोणतेंहि मत लोकांवर लादतांना लोकमताशीं विसंगत असतां नये, व हें लक्षांत न धरिल्यास संपादकपण व्यर्थ होय हेंहि खरें आहे. लो. टिळक असतानांहि मी केसरीचा संपादक होतों. व आतांहि माझे विचार अल्पप्रमाणांत पण लोकांस मानतात याविषयीं मला खात्री व अनुभव आहे. असो. अध्यक्षानीं मला दुसरें दिलेलें माननीय विशेषण त्यांच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे मी एक महाराष्ट्राचा लोकप्रिय पुढारी हें होय. हें मात्र मोकळ्या मनानें मला स्वीकारतां येत नाहीं. प्रस्तुत काळांत पुढारी असा एक असणें बरोबर नाहीं प्रत्येकानें कर्तव्याबद्दल पुढारीपण धरण्याचा हा समय असून कोणाहि पुढाऱ्यांची वाट पहात न रहातां समोरच्या कार्यार्थ झटलें पाहिजे. गेल्या काळांत लो. टिळक हे होऊन गेले [टाळ्यांचा कडकडाट] व आतां म. गांधी [टा. क.] हे पुढारी आहेत. लोकमान्य असतानां आम्हाला वाटे, टिळक आहेत कांहीं चिंता नाहीं म्हणुन स्वस्थ बसूं. पण अशी स्थिति बरोबर नाहीं. पुढारी हा त्याच्या विशेष जबाबदारीपुरता जास्त असेल पण हा अधिकार सर्वांनीच धरून वागलें पाहिजे. श्रीकृष्णानीं गोवर्धन पर्वत उचललापण त्याला गोपांचेंहि साह्य कारण झालें; असें म्हणतां येईल. असो. तूर्त पुढारी म्हणून महात्मा गांधी आहेत. लो. टिळक व त्यांच्यांत विशेष मतभेद नसून टिळकानीं जें सूत्र रूपांत सांगितलें तेंच आतां महात्माजी सांगत आहेत इतकेंच. स्वराज्य मिळविणें हाच उद्देश. तूर्त हिंदुस्थानांत तीन प्रकारचीं राज्यें आहेत; खास इंग्रजांच्या अमलाखालीं असलेलें राज्य, संस्थानी राज्यें व रिपब्लिकच्या सत्तेखालीं असलेलें तुमचें राज्य. स्वजातीचे राजे असलेलें हिंदु स्वराज्य नाहींच आतां संस्थानिकांची तऱ्हा पहा. आम्ही स्वराज्य मागतों तर आम्हांस युरोपियन बजावतात "स्वराज्य हवें ना? तर चला कोल्हापुरांत". पहा ही आमच्या संस्थानिकांची बहादुरी. शिवाजी महाराजांचे वंशज म्हणून कोल्हापूरकर आम्हांस वंदनीयच पण त्यांच्या राज्यांत

पाय ठेवण्याचीहि आम्हांस परवानगी असावी ना? संस्थान केवढेंहि लहान असो. त्यांना फांशी देण्यापर्यंतचा अधिकार! अशा अरेरावी पणानें कांहीं संस्थानांत बंडेंहि होतील असा माझा अजमास आहे. तुमच्या गोमांतकांत स्वराज्य मिळाल्यानें तुम्ही पण सुखी असावें; पण तेंहि मला दिसत नाहीं. व आम्ही तुम्ही सत्तेनें परकी पण धर्म, संस्कृति वगैरेनीं व आम्हांस स्वराज्य न मिळून व तुम्हांस मिळून सारखेच सुखदुःखी आहों. पण युरोपांत तरी प्रजा सत्ताक राज्याचें सुख आहे कुठें? रशियन म्हटला कीं तूर्त किळसवाणे शब्द निघतात. फ्रान्स तर अपुऱ्याच सुखाचा. जर्मनी एका डोळ्यानें रिपब्लिक पहातो व दुसऱ्यानें राजाची अपेक्षा करितो. इंग्लंडांत तर कोणती राजसत्ता आहे हेंच निवडतां येत नाहीं. सूत्रधारी बाहुल्याप्रमाणें राजा हालचाल करितो. व कांहीं ५-७ व्यक्तीच राज्यधुरा वहातात. प्रतिनिधित्व केवळ नावाचें आहे. खरी स्थिति दुसरीच आहे.. हाउस ऑफ कॉमन्स मध्यें सातशें सभासद असावयाचे पण सभागृहांत मात्र तीनशेंहि बसण्याच्या जागा नाहींत. हें मीं स्वतः पाहिलें आहे. मिळून सर्व दिखाऊ असून खरी सुराज्य पद्धति तर नाहींच. इंग्रज म्हणतात आम्ही सुराज्य चालविलें आहे पण "स्वराज्याची तहान सुराज्यानें भागत नाहीं-" हा सिद्धांत आहे. मात्र गोमांतकची स्थिति पाहिली म्हणजे "सुराज्याची तहान स्वराज्यानेंहि भागत नाहीं" असें म्हणणें भाग झालें आहे. पण अशा विचारानीं भांबावून न जातां, आपल्या समोरील कार्यार्थ झटलें पाहिजे...............:

...मोठी भाकरी एकदम कशी खावी हा विचार मनांत न आणतां तीचा एक एक तुकडा मोडून खाण्यास जसा प्रारंभ करितो; तद्वतच या कामी पुढें सरलें पाहिजे. परस्पर विरुद्ध मतें ऐकून तुम्ही गोंधळांत पडूं नका तुम्ही म्हणाल, गांधींचें एकमत व टिळकांचें दुसरेंच. आतां ऐकावें कुणाचें? तर ऐका. माझा व टिळकांचा निदान २५ वर्षांचा परिचय होता. म. गांधींचाहि थोडाबहुत आहे. टिळक प्रवृत्ति मार्गी, गांधी निवृत्ति मार्गी. लोकमान्यांचें कोणतेंही धारण लोकांत मान्य होईल असेंच होतें. गांधी म्हणतात माझें मत जनतेनें ऐकलेंच पाहिजे लोकस्वभावाचें एकीकरण होईल, आचरणांत येईल असेंच कांहीं पाहिजे. यांतच टिळकांचें टिळकत्व आहे. महात्माजी म्हणतात आपण टिळकांचे शिष्य नाहींत महाराष्ट्रीयहि तेंच म्हणतात. आपण गांधींस गुरु मानीत नाहीं. पण थोडा मतभेद वगळून गांधींचें म्हणणें ऐकीस पटण्याचें आहे व्यवहारसार; स्वदेशी वगैरे आपणहि अमलांत आणल्यानें हा व्यवहार संबंधानीं आमचा तुमचा परिचय अधिक दृढ होईल. एकमेकास दूर लोटणें उचित नाहीं. उभयतांची स्थिति तत्वतः एकच. आपण सुखी असाल अशा उद्देशानें मीं आलों तों "एकादशीच्या घरीं शिवरात्री" प्रमाणेंच झालें. तुम्ही आपल्या गाऱ्हाणीं स्वराज्याची मागणी नेटानें करून धडपड करणारांकडे मांडली पाहिजेत व लोकमान्यांच्या सूत्रांतील म. गांधींचें भाष्यच आहे याकडे नजर ठेऊन त्यांच्या शिकवणीचा कार्यक्रम आंखला पाहिजे. ही वेळ निद्रा घेण्याची नाहीं इ. इ.

खास वार्ताहर

ANO VII — NUMERO 2 — 1922 QUEPEM QUINTA-FEIRA 13 DE ABRIL

Director e Editor
., Hegdo Dessai
inatura
UGUESA...... 3-00-00
SA...... 3-08-00
ULSO...... 0-01-00
nuncios
r linha...... 00-01-00
praso contrato es-

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
वर्गणीचे दर
पोर्तुगाल (वार्षिक)........ ३-००-००
ब्रिटिश इंडिया........ ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००
जाहिरातींचे दर
दराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

७ वें.] केपें, गुरुवार, तारीख १३ माहे एप्रिल सन १९२२ [खास अंक २ रा.

UM BRILHANTE DISCURSO SOBRE SVADESHISMO

Quem o proferiu e' uma senhora, sectaria do MAHATMA GANDHI e a qual esteve em GOA, acompanhada do seu ilustre marido Dr. Naique, tambem gandhista.

A Dra Indumati--e' o seu nome--mostrou com argumentos incontestaveis que no SVADESHI e' que seria erguido o belo edificio da felicidade da INDIA.

"FELIZ O POVO QUE VIVE NA LIBERDADE" —EXCLAMA NUM ENTUSIASMO DELIRANTE O SR DR. NAIQUE

O SVADESHISMO

Na brilhante conferencia que a sra. dra. Indumatibai fez no salão do *Sarasvat B. Samaj*, de Margão sob a presidencia do sr. dr Naique, seu marido, convenceu o numeroso e selecto auditorio que lhe absorvia as palavras, da imediata generalisação do *Svadeshismo* por todos os habitantes da India.

A ilustre conferente encarou a sua tese sob todos os aspectos: economico, politico, moral, social e religioso.

Descrevendo a importancia economica do *Svadeshismo*, a dra. Indumatibai enumerou as incalculaveis vantagens que aufere quem utilisa só objectos produzidos na India, nunca tendo que lamentar o *deficit* no seu orçamento domestico, uma vez que se habitue tambem a levar uma vida simples, despida da furia luxuosa, filha da ostentação iluseria e aparente.

Crêmos que sôbre este ponto não pode haver duas opiniões. A simplicidade no vestuario, tão comicamente dificultado pelas exigencias da chamada *civilisação* é aconselhada no nosso meio pela comodidade higienica que *em plena luz do dia* se sacrifica cruelmente em flagrante prejuiso de saude...

O trajo *civilisado*, mesmo nos paizes de sua origem, vai criando, dia a dia, muito inimigo, sobretudo pelas abruptas variações da *moda* a que está sujeito. Basta saber-se que lá na Europa, por exemplo, muito mancebo da fortuna mediana prefere impor-se a vida celibataria a levar a de casado, simplesmente para não ter de mortificar-se com crescentes exigencias *tragicas* de suas caras metades e muita menina segue *caminho errado* para manter o seu falso luxo.

Segundo a ilustre senhora, a conquista do *Svarajia* depende de bom exercicio do *Svadeshismo*, que, quanto mais depressa estender a sua acção, tanto mais depressa compelirá a *traficante* burocracia britanica a ceder á India aquele supremo previlegio politico.

Falando do aspecto moral do *Svadeshismo* a dra. Indumati disse que nas grandes fabricas de tecidos, os proprietarios conseguem atrair para seu trabalho mulheres de campo, com promessas de grandes vantagens, mas que deslocadas assim da agricultura, que muito prejudicam e tendo más companhias nas cidades, disviam-se da sua boa conducta, sobretudo pela sua boçalidade.

Convem notar-se aqui que o *Svadeshismo* é o emprego de tudo o que a India produs sem auxilio de maquinas extrangeiras a não ser, obtido pelo do *charkà*, aparelho de tecer a linha e simbolo da bandeira do movimento de Gandhi.

Ora as grandes fabricas de roupas estabelecem, sempre, entre o capital (proprietarios) e o trabalho (operarios) dissenções interminaveis e funestas, perturbando a paz social, o que se evita pelo *Svadeshismo*.

E, finalmente, quanto á religião, essa rematou a desinteressada propagandista do *Svadeshismo*- reprova o uso do que não seja produzido na India.

* * *

Estamos, plenamente, de à cordo com a bela doutrina, expendida pela patriotica dra. O *Bharat*-atesta o seu passado,-patrocinou os mesmos principios por mais duma vez. O movimento do *Gandhicap* que deu que falar tanto, se não inspirou noutro ideal senão no do *Svadeshismo* que, se é recomendado para conquistar o *svarajia*, não o é menos para conserva-lo, já alcançado.

E' disnecessario encarecer portanto, o papel importante que o *Svadeshismo* desempenha no destino industrial dos paizes, sobretudo dos que se atormentam na decadencia financeira, tal como o nosso.

Que os patriotas, cá da terra pensem-pedimos- maduramente no que nos ensina a ilustre oradora!

ECOS & CRITICA

Dr. A. G. Borcar

Este nosso presado amigo, na qualidade de presidente da conferencia do nosso outro igualmente presado amigo sr. Xamba Rau Dessai proferiu no salão do *Sarasvat B. Samaj* de Margão, um discurso brilhante como o são todos que saem da bôca do dr. Borcar, ornamento da nossa classe.

O recorrido, popular e simpatico clinico, num rasgo do patriotismo que o caracterisa, anunciou o seu ardente desejo de vêr unidos os partidos em que se acham divididos os hindus de Margão, declarando ao mesmo tempo que, êle estava disposto a fazer toda a sorte de sacrificios em prol da consecução do mesmo fim, o que muito comoveu o numeroso auditorio que o estava escutando com o mais rigoroso scilencio.

¿Os briosos hindus de Margão farão vontade ao dr. Borcar, um dos hindus que almejam *ab imo pectore* o seu bem?

O tempo no-lo dirá.

Colonia ?

O primoroso escritor e erudito pensador sr. Xambarau Dessai, na sua conferencia do *Samaj* de Margão, provou exuberantemente que a India Portuguesa não é *colonia*, como, por ai, se procura, por ignorancia, insinuar. Tambem o *Bharat* acha que o nosso ilustre amigo tem razão, tanto mais que acabamos de substentar a mesma doutrina nas nossas modestas colunas, não há muito.

Esperem, porem, que registemos aqui, mais de espaço-mas oportunamente -os argumentos desenvolvidos da admiravel tese de Xambarau!!

Pundolica V. Virginacar

Sob a presidencia do sr dr. Corrêa Afonso, pai, fez o sr. Virginacar uma conferencia em concanim no *Samaj* de Margão.

O conferente referiu-se circunstanciadamente, ao vestuario e outras *belesas*, introduzidas no nosso meio pela *civilisação*, numa linguagem que a todos os assistentes agradou, como nos consta.

As relações de amizade e

स्फुट विचार

'आनंदी आनंद:' !:— सि. प्राजेरीस हे कोस्त व त्याचे अनुयायी कोंस्तातीन द कांतुस हे अनुक्रमें देपुताद व सेनादोर निवडून आल्यामुळें त्यांच्या येथील मित्रांनी बँडच्या सुस्वर आवाजांत व फटाक्यांच्या बेसूर गर्जनेंत दारूचीं पिपांचीं पिपें खलास करून आपला आनंद व्यक्त केला! कित्येक आनवृत्तीच्या बेशरम लोकांनीं तर अशा 'आनंदाच्या' वेळींहि आपल्या प्रतिपक्षांतील कांहीं व्यक्तीला हिणविण्याची अलभ्य संधि दवडली नाहीं ! सि. कोस्तांचें कार्य देशास किती विघातक झालें आहे, हें मशहूर असतां, केवळ त्यांचें राजकीय अस्तित्व कांहींकांच्या पोटाच्या खळग्या भरण्यास कारणीभूत झालें म्हणून, त्यांनीं जनाची व मनाची भीडभाड एकदम सोडून 'आनंदीआनंद' करावा, हें पोटाच्या दृष्टीनें 'योग्य' असलें तरी राष्ट्रहितास अत्यंत अपायकारक आहे. परंतु पोटापुढें ज्यांना राष्ट्राची मातबरी वाटत नाहीं, त्यांना आमचा हा बुद्धिवाद कसा रुचेल ?

'फुटका' कारभार:— रायतूर व कुंभार्ट या दोन्ही ठिकाणचे 'धक्के, निकामी झाल्यास आज पुष्कळ दिवस झाले. धक्यांना पहातांच अंतःकरणास धक्का पोंचविणाऱ्या या शोचनीय स्थितीचें अनेकदां वर्णन केलें असतांहि, आमच्या सरकारच्या फुटक्या कारभाराचें तें धक्यांचा स्वरूपांत असलेलें फुटकें चिन्ह कायम आहे तें आहेच ! पैशाच्या अभावीं उपरोक्त काम पार पडत नाहीं म्हणावें तर अनावश्यक तमाशांत सरकारकडून सार्वजनिक संपत्तीचा चुराडा होत असलेला प्रत्यहीं अवलोकनांत येतो ! बरें, तज्ञ माणसांच्या तुटवड्यामुळें धक्याचें काम बंद आहे म्हणावें, तर जिकडे तिकडे त्या लोकांनीं भरलेल्या मोटारी इतस्ततः उंडत असलेल्या नजरेस येतात ! तात्पर्य द्रव्यबल आहे, मनुष्यबल आहे पण काम मात्र होत नाहीं, याचें काय कारण असावें बरें ? कदाचित् धक्यांच्या अव्यवस्थेमुळें प्राणहानी झाल्याखेरीज सदरहू कामांत सरकार मामूल वहिवाटीस अनुसरून आपलें चित्त घालणार नाहीं, असा प्रकार मात्र असल्यास नकळे !

तात्यासाहेब केळकर

श्रीदामोदर वि. भुवन, मडगांवें

श्रीदामोदर विद्याभुवनांत श्रीयुत नरसोपंत केळकर यानां पानसुपारी देण्यांत आली. या प्रसंगीं श्रीयुत दलाल यांनीं तात्यासाहेबांस ज्ञानामृताचे दोन शब्द सांगण्याची विनंति केली तेव्हां देशभक्त केळकर हे म्हणालेः- आज येथें भाषण करण्याविषयीं मला पूर्व सूचना नव्हती; वरून एकदम भाषण करणें शक्य होणार नाहीं. खेळण्याची एक बाहुली असते तिचें पोट दाबल्यावर ती शब्द करिते तशा कांहीं मी नसून एकदम लोकजमाव पाहिला म्हणजे मला भाषा फुटत नाहीं. असो. तथापि विनंतीचा अनादर होऊं नये म्हणून मी थोडक्यांत सांगतों कीं, श्री. दलाल यांनीं उल्लेखिल्याप्रमाणें एथें निदान ज्ञानप्रसाराच्या बाबतींत तुम्ही अलग नाहीं असें मला वाटतें. या संस्थेचें ध्येय शिक्षण आणि ज्ञानप्रसार हेंच असल्यानें तीचें कोणीहि अभिनंदनच करील. आणि आपण या बाबतींत कोणताहि मतभेद बाळगूं नये हेंच हितावह होय. "मडगांव हें एक व अभंग आहे' असें म्हणण्यांत जास्त भूषण आहे. म्हणून या बाबतींत मतभेद धरूं नये. आतां आमचें पुणें भांडखोरीबद्दल प्रसिद्ध असतां त्यांतील मीहि एक तंटेखोर इसम आपणास ऐक्याची शिफारस करितों हें विचित्र वाटेल; पण जसा मद्यपीच मद्यपानं निषेधास जास्त योग्य ठरतो तसाच मीहि हें सांगतों असें पाहिजे तर माना. पण मी जरी एक विशिष्ट पक्षाशीं निगडीत असलों तरी होईल तेवढें समाजाशीं मिळतें घेऊन तेढ कमी करावी याच मताचा मी आहे. नंतर रा. दलाल यांनीं पेल्या सरस्वत्युत्साहास दिलेल्या निमंत्रणास उद्देशून केळकर म्हणाले— आजच इतक्या नंतरचें निमंत्रण स्वीकारणें कठीण व आज एका पक्षानें आणिलें व उद्यां दुसरा आणील, पण यांत मला तर हित वाटत नाहीं. आतां माझ्या येण्यानें जर ही तुटी मोडून मडगांव हें एक होत असेल तर कितीहि अडचणी सोसून एकदां सोडून अनेकदांहि येईन पण याचा मोबदला म्हणून जातानां ऐक्याचें सर्टिफिकेट बरोबर घालीन हें विसरूं नका. माझ्यासारख्या इसमाकडून जर हें ऐक्याचें कार्य होईल तर मला त्यांत आनंद आहे एरवीं आलों काय गेलों काय ? तरी माझें येणें सर्वस्वी तुम्हांवरच अवलंबून आहे. पाहिजे तर आणा. एरवीं पाहिजे तर येईन. माझ्या मनांत गोव्यांत ४–५ दिवस फिरून ओळख करून घ्यावयाची आहे. व त्यासाठीं मी लवकरच येणार आहें. (इतकें बोलल्यावर आभार वगैरे मानून सर्वांस अत्तर हारतुरे देण्यांत आले व हा नमूनेदार समारंभ आटोपून श्री केळकरांनीं वाचनालय वगैरे पाहिलें.)

सारस्वत ब्रा. समाज

नंतर ७॥ वाजतां रोजच्याप्रमाणें "सारस्वत ब्राह्मण समाजांत" सर्वांबरोबर केळकरहि गेले होते. व्याख्याते एकंसभेकर शास्त्री हे असून अध्यक्ष श्री.सामंत हे होते. रा. सामंतानीं आजचा विषय "हिंदुधर्म" हा असल्यानें व केळकरांसारखे विद्वान इंजर असल्यानें त्यांनींच अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी सूचना केली. ती मान्य झाल्यानें श्री केळकर हे अध्यक्षस्थानीं बसून म्हणाले— मी कांहीं इकडे खोखो खेळण्यासाठीं आलों नाहीं. पण माझ्या नशिबीं आज एका व्यक्तीस स्थानच्युत करून त्यांस खो देण्याचें आलें हें मात्र खरें. आतां मी आजच्या विषयास योग्य असेन असें मला वाटत नाहीं .शास्त्रीबुवांत व माझ्यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे. असो. मी त्यांना आपलें व्याख्यान देण्यास विनंति करितों— नंतर वे. एकसंभेकर शास्त्री यांनीं हिंदुधर्माचें श्रुतिस्मृत्याधारें व ज्ञानेश्वर एकनाथादींच्या उक्तींनीं सुंदर विवेचन करून व धर्माधिकार सर्वांस असून गुणकर्मविभागानें व स्वधर्म पालनानें कोणीहि ब्राह्मण होऊं शकतो, व यास जाबाल ऋषीचें उदाहरण देऊन ऋषी म्हणजे गति व येगत्यर्थाः ते ज्ञानार्थाः" या व्याकरण नियमानें ऋषी हे ज्ञानवान होते म्हणून हा हिंदु धर्म त्यांनीं कथन केला. व तो वेदधारें श्रेष्ठ असल्यानें त्यास स्तुतिनिंदा सारखीच. इत्यादि सांगून या धर्माचें आचरण करण्याचा उपदेश केला व आपलें भाषण संपविलें. नंतर श्री. सामंत यांनीं आधुनिक चिकित्सक हे कोणत्याहि बाबींत धर्म कमी मानितात असें जुन्यांनीं समजूं नये. आमचा धर्म अनेक दृष्टींनीं श्रेष्ठ ठरतो व जुन्याची समजुतीहून निराळ्या दृष्टींनीं नवे त्याकडे पहातात इतकेंच. इत्यादि सांगून त्यांनीं भाषण संपविलें. यानंतर सांगें येथील रा. नारायण अनंत नाईक पाटणकर हे अध्यक्षांकडे परवानगी मागून म्हणाले:— आमच्या शास्त्रकारांनीं " धर्म " म्हणजे काय सांगितलें आहे याविषयीं थोडक्यांत माझ्या मतानें दोन शब्द सांगणार आहें. "धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठाः" म्हणजे धर्मच जगाला कारण आहे असें श्रुति सांगते व तो धर्म म्हणजे काय हें इतरांप्रमाणें भारतांत कर्णपर्वांत व शांतिपर्वांतहि सांगितलें आहे. "धारणात् धर्म मित्याहुः धर्मो धारयते प्रजा ॥ यत्स्याद्धारण संयुक्त सधर्म इति निश्चयः ॥१॥' म्हणजे 'प्रजेनें जो धारण केला जातो तो धर्म' इत्यादि सांगितलें आहे. 'चोदनाल क्षणोऽर्थो धर्मः' असें हे म्हटलें असून, न्याय शास्त्रांत 'अनुकूल कर्म जन्यो धर्मः' 'निषिद्ध कर्म जन्योऽधर्मः' अशी ही धर्माची व्याख्या केली आहे. धर्म हा कालपरत्वें फेरफारास योग्य होतो. मनुस्मृति कालिन् तत्वें आतां सर्वच उपयोगी नसल्यानें त्यांचा धर्मसिंध्वादि निबंधांत दूरदृष्टीनें निषेध केला आहे. अहिंसा सत्यमस्तेयं...... इत्यादि तत्त्वांत व दशलक्षणीक धर्मांत हींच सनातन तत्वें असल्यानें 'एषधर्मः सनातनः' म्हणजे या त्रिकालाबाधीत अखंड धर्माचीं सूक्ष्म तत्वें होत. हा अतिशय पुरातन असून १५ हजार वर्षांपूर्वी याचा पाया घातला आहे. याचे दोन भाग असून एक प्रवृत्ति व. कर्ममार्ग व दुसरा निवृत्ति व. संन्यास मार्ग. पण प्रस्तुत हा कर्ममार्गच उपयोगी असल्यानें लो. टिळकांनीं आपला प्रसिद्ध गीतारहस्य ग्रंथ लिहून सर्वांसमोर ठेविला असून सर्वांस त्यांचीं तत्वें पटत चाललीं आहेत. इत्यादि सांगून आपलें भाषण संपविलें. शेवटीं समारोपार्थ भाषणास श्री. केळकर हे उभे राहिले व म्हणाले— मुख्य व्याख्यात्यानीं जुन्या पद्धतीनें धर्मांतील कांहीं भाग सांगितला, दुसऱ्या दोघां उपवक्त्यांनींहि त्यावर भाषण केलें. पहिले सामंत यांनींहि बरेच विचार प्रगट केले. पण त्यांचें जुन्यावर आरोप ठेवण्याचें विधान मला मान्य नाहीं. मी म्हणतों आधुनिक चिकित्सकांनीं धर्म सुधारणार्थ कोणते यत्न केले आहेत ? जुने पण चिकित्सकांच्या धर्मश्रद्धेविषयीं संशय कोठें घेतात ? उगीच जुन्यावर घसरूं नये दुसऱ्या उपवक्त्यांचेंहि भाषण 'उत्तमनिबंधांत गोवण्या जोगें' असल्यानें तें हि मननीय आहे. धर्म हा विषयच असा आहे कीं त्यावर बोलावें तेवढें थोडेंच. धर्मविषयक जुन्या नव्यांची दृष्टि निरनिराळी एवढेंच. या धर्माच्या विषयांत गीतेंत सांगितल्याप्रमाणें 'तद्विद्धिप्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया' या प्रमाणें जुन्यासहि नमस्कार करून धर्मार्थ सेवा करून नाना प्रश्नहि विचारावे. म्हणजे असल्या प्रश्नोत्तरानें शुद्धतत्वाचरण करील. एवढें असल्यास कांहींच वाईट होणार नाहीं. जुन्यानीं जर आजपर्यंत धर्म ठेविला नसता तर आतांचे तुम्ही काय करणार होतां ? शास्त्रीबुवानीं आतांच एक महत्वाची कबूली दिली आहे कीं सर्वांस वेद मोकळा आहे. यास प्रत्यवाय असला तरी तो मी काढूं इच्छित नाहीं. मी असें म्हणतों कीं तर मग ब्राह्मणेतरांदिकांचीं अस्वस्थ मान्दाणीं कां असतात ? जर ब्राह्मणानीं शूद्रांच्या हितार्थ वेदविद्या संभाळली आहे तर मग तें तरी ब्राह्मणांनीं सिद्ध करून दाखविलें पाहिजे. नपेक्षां हें ब्राह्मणांनीं स्वार्थापोटीं केलें आहे असें लोक म्हणतील.शूद्रादि गटारांत लोळल्यास त्यास तुम्ही सन्मार्गास कां लावीत नाहीं? तेव्हां त्याचें फळ ते भोगती असें म्हणतां. मग तो वेदविद्या शिकून अधोगतीस जाणार तर मग त्यास तारण्यास्तव तुम्ही वेदास स्पर्श करूं न देण्याचें पुण्य करितां. हा निव्वळ ढोंगीपणा व स्वार्थपणा नव्हे काय ? यांत तुमचें काय जातें ? शास्त्रीबुवानीं नुकतेंच सांगितलें आहे कीं— सिद्धपाक असतां स्वयंपाकाची गरज काय ? पण ब्राह्मणानें वेदविद्याच सोडल्यास सिद्धपाकाभावीं मरून जावें कीं काय ? म्हणून जर अंतःकरणयुक्त शूद्राची किंवा कोणाची भावना मी 'हिंदु' हीच झालेली असेल तर तुम्हीं बिनतक्रार त्यास अधिकारी मानला पाहिजे, शंकराचार्य हे मतदार असून कशाही ही न्यायाधीश आहे. लोकांत रीतिरिवाजांत जें तत्व प्रचारांत येईल त्यास शंकराचार्यांनीं शिक्का मारल्याचा म्हणजे तो त्यांस पसंत आहे हें समजतें. पण या उपरहि जुन्यांनीं वरील तिन्ही मार्ग शिकणाऱ्यास ज्या प्रमाणें इंग्रज आम्हांस अपात्र म्हणतात म्हणून आम्ही कायदा भंगहि करितों, त्या प्रमाणें धर्माच्या बाबतींतहि शास्त्रीबुवांच्या परवानगीनें मी असें म्हणतों कीं कायदा भंगहि केला पाहिजे. लोकमान्यांनीं यासाठीं 'हिंदूचें' लक्षण असें केलें होतें- प्रामाण्य बुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ॥ उपास्या नामनियमः श्रैतद्धर्मस्य लक्षणं" इ. तूर्त नवी स्मृति पाहिजे. व ती जनतेच्या विश्वासूनेंच लिहिली पाहिजे. लोकमान्यांनीं ती लिहिली असती तर जनतेस खास मान्य झाली असती. लोकमान्यानीं पंचांगांत सुधारणा केली व ती जनतेस मान्य झाली; तर हेंहि अमान्य होणार नव्हतें. पंचांगांत जशी सुधारणा अवश्य झाली तशी धर्मांतहि पाहिजे. या विषयीं तुम्ही प्रयत्न मात्र केला पाहिजे. नुसत्या वार्तांनी भागणार नाहीं तर तुमचें तें चिकित्साबुद्धी चें आंठोळे खुंटीस काढून लावा, न पेक्षां इंग्रजांस लांगून बांटलेल्यांस स्वधर्मांत घेण्यासारखे 'घरे पर लहान थोर' या उक्तीप्रमाणें व गोव्यांतहि असावयास असें कर्तव्य करण्यास लागा. इतकेंच सांगून नियमाहून जास्त वेळ झाल्यानें मी हे शब्द येथेंच संपवितो.

नंतर आभारप्रदर्शनादि होऊन सभा खलास झाली.

खास बातमीदार.

—नवीन व्यवस्थेचा जम बसेपर्यंत दुर्लक्ष करण्याविषयीं सर्वांस प्रार्थना आहे.

सं. भारत

ANO VII — NUMERO 8 — 1922

QUEPEM QUINTA-FEIRA 20 DE ABRIL

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai
Assinatura
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA.... 3-08-00
NUMERO AVULSO.... 0-01-00
Anuncio
Anuncio por linha ... ...-01-00
Para longo praso ... ... o especial.

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडळीक हेगडे देसाई
वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००
आहिरातींचे दर
दराची दर ओळीस दोन आणे. कायमचे आहिरातींचे दर ठरल्या प्रमाणे ठरतील.

वर्ष ७ वें.] केपें, गुरुवार, तारीख २० माहे एप्रिल सन १९२२ [खास अंक ३ रा.

AGRICULTURA-COMERCIO-E EMPREGO

Na ordem de profissões, os antigos colocaram A AGRICULTURA em primeiro lugar, O COMERCIO em segundo e O EMPREGO em terceiro lugar.

Segundo eles, a agricultura e' otima, o comercio suficiente e o emprego mediocre.

SEJAMOS, POIS, AGRICULTORES, PORQUE GOA E' UM PAIZ ESSENCIALMENTE AGRICOLA

Á AGRICULTURA

Diz-se que Goa é um paiz essenncialmente agricola. Canta-se a área de que existem pelo paiz dentro extensas planicies ferteis que, devidamente cultivadas, ajudariam muito a solução do problema da subsistencia pública actualmente á mercê dos extranhos que não poupam ocasião de explorar-nos a deficiencia... agricola.

E, todavia, é á agricultura que, na pratica, dedicamos menos cuidados, votando-a quase ao despreso. E' neste único assunto que os governantes e góvernados andam de braços dados descurando-o.

E' muito deprimente êste estado de coisas á nós que passamos por descedentes dos celebres autores de *Mahabharat*, *Ramaena* e *Xancuntala* e os quais colocaram a agricultura em primeiro lugar, na ordem de profisssões, chamando-lhe o *melhor dos oficios*.

Infelizmente, porem, o que aos nossos sabios e experimentados avoengos se afigurou *otimo*, á nòs, seus indignos representantes, provoca despreso e o que nêles produzia repulsa, agrada-nos deveras: a empregomania.

A empregomania! ... E' ela que está invadindo, sem oposição, a população inteira do Estado da India onde, quem não seja empregado publico, grande ou pequeno, não gosa de consideração alguma no Povo...

Funcções publicas, eis para onde convergem as intimas aspirações dos nossos intelectuaes que se julgam disgraçados quando não tenham de receber ordens de seus *superiores hierarquicos*.

A empregomania tem sido no nosso preguiçoso meio uma doença geral, a ponto de atacar ainda os que se formam medicos e advogados.

¿Que indica tudo isso?

Que as nossas *forças vivas* estão *mortas*, isto é, preguiçosas, tendendo para uma vida indolente, inactiva e pior do que tudo isto completamente *irresponsavel*.

E o aforismo dos antigos "otima é a agricultura, suficiente é o comercio e mediocre é o emprego" está actualmente transformado no seguinte:

Otimo é o *emprego*, *suficiente* é o *comercio* e *mediocre* é *a agricultura*!

Como vem, é a empregomania que nos fez mediocres, compelindo-nos a despresarmos o que os nossos otimos ascendentes ensinaram-nos a respeitar em primeiro lugar.

Ora, quem não tem sentimentos de veneração pelo seu brilhante passado e pelos seus gloriosos avoengos, não tem direito a considerar-se seu digno representante. Não; despresando a agricultura, menospresamos, portanto, a nossa propria dignidade, renunciando a um dos mais sacrossantos direitos.

Isto assim não pode nem deve ser. Será vergonha deixar manter-se a actual apatia ou antes antipatia pela agricultura dedicando-se apenas á cultura da empregomania ou por outra, da preguiça que é mãe de todos os vicios.

Não. Não pode ser! E, sobretudo, porque Goa é um paiz essencialmete agricola, dotado de admiraveis riquezas naturais.

Sejamos, pois, agricultores para a honra e prestigio do nosso brilhante passado.

COISAS & LOISAS

Uma idea...

Temos hoje impostos de toda a sorte que, como se sabe, dão radical corte na já de por si magra algibeira do pobre zé-pagante.

Apesar desta *avalanche* de novas receitas, porem, lê-se e ouve-se que muitos empregados choramingam, porque são pagos irregularmente, fazendo de quando em vez, maçar a santa paciencia do governo, acoçados pelas exigencias do estomago.

Condoe-nos, imenso, a atribulada vida do governo e dos seus famintos serventuarios, simultaneamente; e, porisso, divulgamos um nosso *segredo* que, entendemos, atacará o mal de raiz.

Esse *segredo* consiste em determinar o governo o lançamento de mais um imposto e êste deve ser o ultimo da entrada e saida dos alimentos que forem utilisados pelos individuos que cá tiverem residencia permanente, de anos, mezes, dias, horas, minutos ou de segundos, notando-se que a lei que regulamentar a nova contribuição não deve, tratando do capitulo da especificação de individuos, fazer distincção nem de sexos, nem de idades, nem tão pouco de condições sociais, porisso que o contrario iria ofender o brilho da *Igualdade* do regime em que vivemos.

Unica coisa que o governo deve ter em vista na fixação da taxa da entrada... dos tais alimentos pelo orgão competente que é a bôca e saida dos ditos pelo correspondente canal, diziamos, deve ter em vista na fixação da taxa que esta não pode ser superior ao valor dos referidos alimentos *primitivos ... e dirivados* para que não haja por parte das chamadas *forças vivas* do Paiz algazarra impertinente.

Cremos que com o producto da nova e *secreta* imposição de que se trata não só morrerá o seu *deficit* mas tambem passará dêste para melhor *o sr. seu pai* que é feito das lagrimas dos tais serventuarios.

Cá fica a *genial* idea. Tire agora proveito quem tem o dever de faze-lo.

Dores..!

As palavras terminadas em dôr causam, ás mais das vezes dôr, excepto a palavra *irrigador* que alivia a *dor*, - dispensem-nos o emprego do caso do pronome pessoal *a*, de que, de resto, não fazemos... *caso*.

Para o exemplo do que acima fica dito citaremos as seguintes palavras: governador, administrador, regedor, procurador, conservador, credor e etc e tal. até o postal distribuidor.

As entidades designadas por aquelas terminações *dores* provocam, ás mais das vezes justificadamente ou injustificadamente as mais violêntas... *dores*!

Boa piada, não há duvida!

Estufa da Colem

Publicaremos no n.° imediato algumas *belesas* sobre esta estufa de marca *comilona* que hoje não dispômos de espaço.

सरकार व कर

प्रजेची आबादानी असो वा नसो, सरकारी खजिन्यांत तूट आली कीं, कराचा वरवंटा प्रजेच्या डोईवर फिरलाच.—प्रजा हाच कीं वत्स भूधेनुकेचा । दया तूं करी फार संभाळ याचा । या मागील कल्पुक्तीप्रमाणें प्रजेचा फार संभाळ करण्याच्या पवित्र कर्तव्या ऐवजीं आतांचीं सरकारें तिला नाच करण्यांकडेच आपल्या कर्तव्याची दिशा ठेवितात. प्रजेची बरी वाईट स्थिति लक्षांत न आणितां तिजोरींत तूट आली म्हणून अन्य उपायांनीं ती भरून काढण्याच्या भरीस न पडतां आधीं कराच्या भारानें मेधाकुटीस आलेल्या आपल्या गरीब प्रजेवर उंटादि जनावरांवर लादतात त्या प्रमाणें नवीन करांचें ओझें लादून तिला अगदीं जमिनदोस्त करून टाकावें, हें खरोखरच प्रस्तुतच्या कालांतील सुधारलेल्या सरकारास अतिशयच निंदास्पद होय. मागील कालांतील एकांडी व रानटी सरकारास कदाचित् तें शोभलें असतें, परंतु सध्याच्या सुधारलेल्या व बहुतंत्री सरकारास मात्र तें खचित शोभण्यासारखें नाहीं.

सरकार स्वकीय असो वा परकीय असो तें प्रजेवर एक सारखें कराचें ओझें लादू लागलें म्हणजे निर्बल, दुर्बल, निःशस्त्र व सात्विक असलेली प्रजा, माणसाळलेल्या व धन्यास भिऊन वागणाऱ्या जनावराप्रमाणें कांहीं काल तें कराचें ओझें सहन करिते, व 'मागेल तें द्यावें सुखी असावें' या म्हणानुसार पोटास चिमटा बांधून सरकारास कर देते, परंतु तीच प्रजा जर तामस किंवा राजस वृत्तीची व सरकाचें भय न बाळगणारी असली म्हणजे दंगा करूं लागते. प्रजेंत —मग ती सात्विक असो वा राजस किंवा तामस असो, तसेंच ती निःशस्त्र असो वा सशस्त्र असो, एकदां सरकारविषयीं असंतोषाचें वारें पसरलें म्हणजे मग त्याचा परिणाम मोनार्कींचें रेपुब्लीक करण्यांत व रेपुब्लीकचें आणखी तसेंच कांहीं करण्यांत पर्यवसान होते, हें सर्वांस ठाऊक आहेच. सध्याची पोर्तुगालची स्थिति व शेजारच्या ब्रिटिश हिंदुस्थानची स्थिति पाहिली म्हणजे वरील विधानांत सत्यत्व किती आहे, हें कळून येतें. परंतु एकाचें बरें वाईट उदाहरण पाहून दुसऱ्यानें सावध व्हावें, पण असें कधीं कधीं घडत नाहीं तर पूर्वींचीच आपली दुष्ट पद्धति गिरविलेली दृष्टीस पडते.

हें इतकें लिहिण्याचें कारण सरकारनें घातलेले सध्याचे घरपट्टी, स्टांपादि कर होत वास्तविक पाहतां आधींच कराच्या अवजड ओझ्याखालीं दडपल्या गेलेल्या गोमांतकीय गरीब प्रजेवर घरपट्टी, स्टांपादि नवीन कर घालणें योग्य नव्हतें. कारण, पूर्वींच्या जमीन महसुलांत या कराची योजना झालेली आहेच. स्टांपाचा कर तर पूर्वीं होताच. असें असतां तो कर अपुरा पाडूनच कीं काय पुन्हां घरपट्टी या नावांखालीं आणखी नवा जादा कर बसवावा हें प्रजेचें दुर्भाग्यच होय. एकाच्या कल्याणासाठीं दुसऱ्याचें अकल्याण करावें असा सरकारचा हेतु दिसतो. सरकार प्रमाणें लेजिस्लेटीव कोन्सीलांतील प्रजेचे हित-चिंतकही [representantes] सरकारचेच हितचिंतक बनलेले पाहून पराकाष्टेचें दुःख होतें.

मुळचाच गोमांतक हा लहान प्रदेश. लहान प्रदेशांतील लोकवस्तीही अर्थातच थोडी. अशा ह्या थोड्या लोकवस्तीवर जर कर बहुत लादले गेले तरी ती बिचारी जगेल कशी याचीच काळजी वाटते! प्रदेश लहान, पण लहान प्रदेशांतील पडित जमीन मात्र जास्त असल्यामुळें, व लागवड होणाऱ्या थोड्या जमिनींतही उत्पन्न थोंडेंच येत असल्यामुळें व उद्योग धंदेही थोडेच असल्यामुळें, अठरा विश्वे दारिद्र्य पंकांत लोळणाऱ्या गोमांतकीय प्रजेवर करांचें ओझें मात्र जास्त लादलेलें पाहून सरकारास प्रजेचें कांहींही होवो पण आपली तुंबडी भरो, एवढेंच पाहावयाचें आहे कम अपुरी होईल; अर्थात त्यांत छाटाछाट करून काटकसर करण्याच्या ऐवजीं उलट नोकरांच्या पगाराची अतिशयच वाढ करून, ती वाढ भरून काढण्यास, सरकार जवळ असलेला निर्वाणीचा उपाय म्हणजे प्रजेवरील करांची वाढ, ती करण्यांत आली. प्रजा उपाशी मेली तर घटकाभर चालेल; पण सरकारी नोकर जे प्रजेचेच घटकावयव, ते मात्र खाऊन पिऊन सुखी असले पाहिजेत. कां? तर चिरूट चिलमें ओढून चार पांच तास कचेऱ्यांत कलमबंदीचें काम करून श्रांत होतात म्हणून; आणि जी बापडी गरीब प्रजा, दिवसभर काबाडकष्ट करून निढळाच्या घामानें जेमतेम पोटास मिळविते न मिळविते, जें भाटकार, ज्यांचें उत्पन्न मुळांतच कमी व जें मजुरीस व सरकारी फाळ्यासच महाग होतें. मग सध्याच्या वाढत्या महागाईंत जीवनार्थ साधनास तें कितपत उपयोगी पडेल हें आणखी सांगावयास नकोच, जे उद्योगी व्यापारी ज्यांचा उद्योग व्यापार नांवाचाच असून, जेम तेम पोटांपाण्यापुरता असतो वा नसतो, या सर्वांनीं, आपली कष्टमय स्थिति बाजूस, स्वतःच्या पोटासाठीं मिळविलेलें, प्रथमतः वरील वा

वाटतें. आणि याकडें आपले लेजिस्लेटिव कोन्सीलांतील लोकनियुक्त सभासद, जे निवडून येण्यापूर्वी जनतेस गोड आश्वासनें व भूलथापा देऊन आपणास निवडून देण्यासाठीं तिची मनधरणी करितात ते, कानां डोळा करीत असलेले पाहून त्याची; सुरी त्याच्या उरीं पडलेली पाहून फार दुःख होतें.

प्रजेवर असलेले कर कमी करण्याचें सोडून देऊन, असलेल्या करांतच नवीन करांची भरती करण्याचें कारण जर शोधायाला गेलों तर तें असें आढळून येतें कीं सरकारी नोकरांचा वाढता पगार देण्यांस सरकारी तिजोरीत द्रव्याची उणीव असणें हें होय.

गोमांतक हा प्रदेश लहान म्हणून वर सांगितलेंच आहे. लहान प्रदेशाच्या मानानें येथील एक दोन बाबी खेरीज करून बाकी सर्व कांहीं लहान प्रमाणांतच असलेलें दिसून येतें. वर सांगितलेल्या दोन बाबी मात्र मोठ्या आहेत व त्या म्हणजे एक करपट्टी व दुसरी सरकारी नोकर व त्यांचा पगार.

ह्या प्रदेशाच्या मानानें तूर्त येथें असलेल्या इतक्या सरकारी खात्यांची व त्यांतील नोकरांची मुळींच जरूरी नव्हती. अर्थात वाजवीपेक्षां फाजील खातीं व नोकरचाकर ठेवूनहि त्यांचा असलेला पगार महागाईच्या निमित्यानें मोठ्या प्रमाणांत वाढविण्यांत आला. मूळचींच खातीं व त्यांतील नोकर चाकर यांच्या खर्चास तिजोरींतील रख्या सरकारी बांधकामांकरितां देऊन, नंतर थोडें फार शिल्लक राहिल्यास आपण सेवन करावें किंवा नच शिल्लक राहिल्यास अनशेपोटीं राहून दिवस कंठावे! कोण हा जुलूम!!

सुधारलेल्या विसाव्या शतकांत—ज्यांत Governo do povo pelo povo; अथवा Oh povo, tu és meu Deus असलीं उच्चतत्त्वें व नारे सांगण्यांत येतात; असा रानटी प्रकार व्हावा काय? पहा या Governo do povo pelo povo राज्यांत प्रजेवर कोणकोणते कर आहेत ते मनुष्य मातेच्या उदरांतून निर्माण झाल्याबरोबर त्याला कर (जनन पट्टी येथून करांस सुरवात होते.) जो रस्त्यांनें चालू लागल्याबरोबर कर, म्हणजे मार्गपट्टी; एकट्यानेंच या जगांत रहाणें कठीण, म्हणून दुसरीची सोय करतेवेळीं म्हणजे वैवाहिक कर; दोघांच्या पोटांपाण्याची तजवीज लावण्यासाठीं म्हणून उद्योग धंदा किंवा व्यापार सुरू केल्यास, त्यावर अनेक कर; जमीन लागवडीस आणिली म्हणून, तिच्या उत्पन्नावर जब्बर कर. देवत्थें राहण्यासाठीं बांधलेल्या गृहाला कर; आपल्या देशाहून दुसऱ्या देशीं जाणार म्हटल्यास; येता जाता कर; अखेर मेला म्हणून कर; असे एक ना अनेक कर, कीं ज्यांची यादी देऊं गेल्यास महाभारता एवढा प्रचंड ग्रंथ लिहावा लागेल! सरकारास अर्जे वगैरे करावयास ह्या कागद निरुपयोगी ठरवून पार आठ आण्यांचा सेलाद कागद उपयोगांत आणिला, त्यावर गेल्या रोजामार्गें पुढें स्टांप म्हणून अडीच आण्यांचा सेल बसविला गेला., आणि आतां ३० ओळींचा सेलाद कागद २५ ओळींचा करून त्यावर आणखी ५० रैस जादा बसविण्यांत आला. अशीच स्टांपात आणखी वाढ करण्यांत आली आहे! कोण हा जुलूम!

अशा ह्या विराट स्वरूपी करांतून गोमांतकीय गरीब बापडी प्रजा कशी वांचेल हें त्या एका निर्माणकर्त्यासच ठाऊक!

राज्य सुव्यवस्थेसाठीं सरकारास कर देणें हें प्रजेचें कर्तव्य होय. पण तें देणें मर्यादेबाहेर गेलें म्हणजे मग तेथें कर्तव्य उरत नाहीं. तर तो मग जबरीचा रामराम होतो! पूर्वीं (म्हणजे १७१६) मोनार्कीत धर्मवेड्या पोर्तुगीज सरकारनें हिंदुलोकांच्या शेंडीवर कर घातला होता, व तो पुढें काहीं काळानें रद्द करण्यांत आला! अशासारखाच एखादा कर यापुढें न येवो म्हणजे झालें!

निरुपद्रवी प्राण्यासच कोणी उपद्रव करितो, या न्यायानें सरकारही निरुपद्रवी प्रजेवरच आपल्या करांचें ओझें लादतें. आणि याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हटलें म्हणजे घरपट्टी, येता जाता कर, सत्तरी, सांगें, काणकोण व बाळ्ळीचा प्रांत म्हणजे ज्यांत मागें सांगितलेली तामसवृत्तीची प्रजा रहाते, त्यांस लागू केलेला नाहीं, हें होय! [वोलेंती नं० ९ पहा.]

यावरून सरकार काय दाखवून देतें, सर्व कर नको असल्यास सत्तरी वगैरे प्रांतांतील लोकांप्रमाणेंच इतर प्रांतांतील लोकांनीं ता मसीवृत्तीचे बनावें, म्हणजे मग त्यांवर करांचें ओझें लादलें जाणार नाहीं.

भक्तांमधून होते. डॉक्टरसाहेबांच्या इच्छे-प्रमाणें कमेटी स्थापन केली गेली असती तर सारस्वताच्या समाजाचें वजन सध्या पेक्षां कांहीं तरी जास्त वाढलें असतें. परंतु ती स्थापन न झाल्यानें समाजाच्या इभ्रतीस धक्का पोंचण्याची भीतिहि पण नव्हती. असें असतां 'समाजाच्या अभिमानें झटपटीनें गोव्यांत सूतकमेटी स्थापली गेली' अशा अर्थाच्या बातम्या बाहेरच्या पत्रांत प्रसिद्ध करण्याची 'खास व तमीदारांस' कसली आवश्यकता होती हें समजणें कठिण आहे. कदाचित् समाज सदरील कमेटी स्थापन करण्यांच्या विचारांत असेल. नाहीं कोणी म्हणावें ? पण 'करण्या आधीच सांगण्याच्या व्यामोहास बातमीदारानीं बळी पडणें हें आश्चर्य नव्हे काय ? पण बातमीदार तरी बापडे काय करतील ? कांहीं तरी लिहून लेखनपटुत्व सिद्ध केलें पाहिजे गोव्यांत नामांकित लेखक असल्याची खात्री परकीयांस कशाहि रितीनें पटवून दिली पाहिजे. दिली सूतकमेटीची लोणकढी गरमागरम थाप ! कांहीं तरी 'दडपून देतों प्रेसाला' ! म्हणजे कर्तव्य आटोपलें.

जुगारः—जुगाराच्या नावानें प्रत्यहीं जिकडे तिकडे नाव असताना त्याला आळा घालणाचें तें एका बाजूसच राहून उलट लग्नासारख्या मंगल कार्यांत या अमंगल खेळानें मोठ्या आदरानें स्वागत व्हावें हें दुर्दैव होय ! एकीकडे समाजाचे पुढारी म्हणून जिकडे तिकडे डिंगाणा चालवयाचा व दुसरीकडे जुगारासारख्या समाजविध्वंसक 'चामनी' कृत्यांस प्रोत्साहन द्यावयाचें, या नांव नष्ट करणाऱ्या प्रकाराला कोणतें नांव द्यावें हेंच मुळीं आम्हांला समजत नाहीं ! जेथें तेथें जुगारास सरकाररित्या प्रतिबंध होत आहे. जुगारामुळें कुटुंबाचीं कुटुंबें धूळ खात पडलीं आहेत. जुगारात समाजस्वास्थ्याची घडी बिघडत आहे. जुगारानें नैतिक स्थिति खालावत आहे. एवंच जुगार हा सर्व दृष्टीनीं समाजस्वास्थ्याला परम विघातक आहे. असें सिद्ध झालें असतां, खुद्द प्रतिष्ठित पणाचा टेंभा मिरविणाऱ्या गृहस्थांकडूनच जुगाराची पूजा 'बांधली' जावी, हें अगदीं अप्रशस्त होय. हें कोणीहि कबूल करील. असो. या पुढें तरी आमचे प्रतिष्ठित लोक जुगाराची प्रतिष्ठा वाढवून आपली अप्रतिष्ठा करून घेणार नाहींत, अशी उमेद आहे.

हलकटपणाः—येथील मामलेदार आंद्राष यानीं फातर्पें येथील एका देवालयाच्या चौकावर बूटांसह जाऊन तेथील हिंदूंचीं मनें दुखविण्याचें पाप आचरल्याचें वर्तमान आम्हीं गेल्या अंकीं प्रसिद्ध केलें आहेच. प्रस्तुत अंकांतील पोर्तुगीज भागांत साहेब मजकुरांच्या उपरिनिर्दिष्ट हलकटपणाबद्दल आम्हीं स्पष्ट शब्दांनीं निषेध व्यक्त केला असल्यानें आतां जास्ती कांहीं लिहिण्याचें राहिलें नाहीं. तरी पण आतांवसारख्या 'कंट्री' साहेबांकडून वरीलसारख्या लीला कोठेंहि घडून आल्यास हिंदूनीं डोळे मिटून स्वस्थ न राहतां तावडतोब योग्य उपायांचा अवलंब करण्यास धैर्यानें पुढें सरसावलें पाहिजे, इतकें सुचविणें आमचें कर्तव्य आहे, असें आम्हीं समजतों.

दौराः—येत्या आठवड्यांत कांहीं प्रेमळ व देशहितेच्छू मित्रांसह भारतसंपादक दौऱ्यावर निघणार आहेत. जनतेकडून त्यानां नेहमींप्रमाणेंच हरतऱ्हेचें सहाय्य पुरविलें जाईल अशी उमेद वाटते. लोकजागृति हा दौऱ्याचा मुख्य उद्देश असल्यावरून, त्यांचें हें कार्य ते लोकांचेंच कार्य आहे, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. जनताजनार्दनाचे आम्हीं नम्र दास असल्यानें त्यांच्या अगणित उपकारांतून आम्हीं कधींच उतराई होणें शक्य नाहीं, हें सांगावयास पाहिजे काय ?

ठार कराः—ज्या राज्यांत चोर शिरजोरपणानें वागतात, न्यायाध्यीश कायद्याच्या नांवाखालीं अन्याय करून मित्रप्रेम जोडतात, दिवसाढवळ्या सार्वजनिक तिजोरीवर डल्ला मारणारे महाशय सरकारदरबारांत उजळमाथ्यानें हिंडतात फिरतात उघड पुरावे मांडले असतां त्याचा विचार तर होत नाहींच, उलट थट्टा मात्र होते, एकंदरींत ज्या राज्यांत कोणाचा पायपोस कोणांत नाहीं अशी स्थिति असते, तेथील सुधारणा बंदुकीशिवाय दुसऱ्या कोणत्याहि उपायानें होणें शक्य नाहीं. 'ठार करा' हा चतुराक्षरी मंत्रच त्या बेबंदशाहीच्या समंधाला गाडण्याला समर्थ आहे. इतर उपाय केवळ नावांचेच ठरतात, अशा अर्थाचे विचार पोर्तुगालच्या एका पत्रांत प्रसिद्ध झाले आहेत. आमच्या सारख्या सात्विक प्रकृतींच्या लोकांस ती विचार सरणी मानवणें अशक्य होय. युरोपियनांचा मार्ग निराळा, आमची दिशा वेगळी, युरोपियनाची भिस्त बंदुकीवर तर आमचा विश्वास आत्मिक बळावर. त्यांच्या चळवळीचें महत्व रक्तपातांत तर आमच्या खटपटीचें रहस्य सहनशीलतेंत. ते तामसी तर आम्हीं सात्विक. म्हणूनच ते बंदुकीला भजतात तर आम्हीं असहकारितेची आराधना करितों. 'ठार करा' हें तत्व अर्थांत येथील जमिनींत रुजणें अशक्य वाटतें.

वर्तमानसार

—आवतोनोमीनें करवाढीशिवाय दुसरें कोणतेंच सत्कृत्य केलें नाहीं, असें एक लेखक 'ड येराल्द' पत्रांत लिहितो.

—बजेटवर वादविवाद करण्यासाठीं लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या बैठका चालू आहेत.

—येथील जज्जांची नेमणूक आफ्रिकेच्या एका हायकोर्टांत झाली असून पणजीच्या कोसेर्वादोरांची नेमणूक त्यांच्या जागीं झाली आहे.

—डॉ. फ्रोइलान द मेल हे परत गोव्यांत आले असून, पणजीच्या धक्यावर त्यांचें मोठ्या थाटानें स्वागत करण्यात आलें. या स्वागतांत सर्व जातीच्या व पंथाच्या सरकारी व बिनसरकारी लोकांनीं उत्साहपूर्वक भाग घेतला होता.

—येथील देसेंगाद राव यांची नेमणूक मडगांवच्या कोर्टांत होणार असल्याची दाट वदंता आहे.

—कवळेंच्या श्रीशांतादुर्गेच्या कमिशन मंडळांत महाजन मंडळीचाच समावेश होणार असल्याचें कळतें.

—आमचे मित्र रा. अनंत शिरयेकर यानीं आपलें वकिलीचें ऑफिस मडगांव येथें आपल्या रहात्या घरांत उघडलें आहे.

वर्गणी पाठवा वर्गणी पाठवा !

वसूलदाराची वाट न पहातां टपालमार्गानें वर्गणी पाठवा

नवीन व्यवस्थे प्रीत्यर्थ

तीन हजारांवर खर्च आला असून जवळ जवळ तितक्याच रकमेच्या कर्जाचा बोजा

भारताच्या शिरावर बसलेला आहे

भारताच्या ध्येयाकडे लक्ष देऊन आमचे देशबांधव वर्गणीदार असल्या संकटांत आपलें कर्तव्य बजावून त्यास मदत करतील अशी आशा आहे.

म. भारत

आगमन आणि प्रयाण

"प्रथमंतु गुरुः पूज्यं ततश्चैव ममार्चनम् ॥"

गुरूला पहिल्यानें भजावें व नंतर आपलें पूजन करावें असें भगवान श्रीकृष्णानीं म्हटलें आहे. आर्य लोकांत अनेक पंथ असून त्यांतील प्रत्येक पंथाचे निरनिराळे धर्मगुरु आहेत. ते सर्वानां पूज्य आहेत. गुरु संचारार्थ निघाले म्हणजे मुक्काम होईल त्या त्या ठिकाणीं शिष्यवृंदाकडून पादपूजेच्या द्वारें किंवा अन्य प्रकारें यथाशक्त्या सेवा करण्याचा परिपाठ आहे.

आपल्या गोमांतकांतील शैव संप्रदायाचे सांप्रतचे सर्व वंद्य धर्मगुरु श्रीमत्पूर्णानंद सरस्वती गौडपादाचार्य स्वामी महाराज हे श्रीगोकर्ण मठांतून संचार करीत निघाले. ते चालू मेच्या २४ तारखेस रात्रीचे ९ वाजतां सांखळी बंदरांत प्राप्त झाले. स्वागतार्थ हजर असलेल्या स्मार्थ आणि वैष्णव वर्गांतील सदगृहस्थानीं थाटाचा सत्कार करून गुरुस्वामींना वाद्यांच्या गजरांत व किटसन, मशाली, चंद्रजोति ह्यांच्या प्रकाशांत सांखळीतील मठांत नेऊन पोंचविलें. दुसरे दिवशीं सार्वत्रिक भिक्षा होऊन त्या नंतर सवडी प्रमाणें कोणी कोणी पादपूजा केली. एकंदरींत गुरुस्वामींचा मान मरातब उत्तम प्रकारचा होऊन संतुष्ट गुरूंनीं श्रीं प्रयाण २७ तारखेस दुपारच्या बारांवर तीन वाजतां घडून आलें.

श्रींचा लवाजमा दांडगा आहे. शास्त्री मंडळ, कारभारी, कारकून, शिबंदी शिपाई, भोई, नोकर चाकर मिळून पन्नासांवर नंबर होईल. पालखी शिवाय मेणाही स्वारीबरोबर असतो. श्रींच्या दक्षतेमुळें संस्थानची व्यवस्था समाधानकारक आहे. कैवल्यपूर मठाचा जीर्णोद्धार करण्याकडे प्रस्तुत श्रींचें लक्ष्य वेधून गेलें आहे. सांखळीच्या मठांतही सुधारणा व्हावी असें मानस दिसून येतें.

शास्त्रीमंडळांत विद्वद्वर्य ज्ञानेश्वर शास्त्री एकसंबेकर हे प्रमुख होत. कांहीं काळामागें हे श्रीसंकेश्वर मठाधिपतींच्या पदरीं होते. धार्मिक विषयावर यांचें एक सुश्राव्य व्याख्यान ऐकण्याचा सांखळीतील सद्भक्तवृंदास लाभ घडला. हें व्याख्यान सवडी प्रमाणें प्रसिद्ध करण्याचा विचार आहे.

पंडितवर्य करंडे शास्त्री ह्यांच्या कैवल्यपूर मठाचा संक्षिप्त इतिहासांत गुरुपरंपरेचा बोध नाहीं. कारण, संस्थानच्या दप्तरांत तसें साधन उपलब्ध नाहीं; तथापि प्रत्यक्ष देवळ्या दिलेल्या माहितीच्या द्वारें सांप्रतचे आपले धर्मगुरु परंपरेच्या क्रमानें चौथ्या इसमाचे असून नामाभिधानाच्या नंबरवारीनें तिसरे आहेत. अधिकारारूढ झाल्याची मिति शके १८२० विलंबनाम संवत्सर मार्गशीर्ष शुद्ध १२ शनिवार होय. श्रीमंत गौडपादाचार्य ही परंपरागत पदवी प्राप्त झाली आहे. श्रीमंत गौडपादाचार्य हे गादीचे आदिपुरुष होत. ह्यानींच आर्य श्रीमच्छंकराचार्यांना उपदेश दिला होता. अशी उपरिनिर्दिष्ट इतिहासांत माहिती सांपडते.

कैवल्यपूर मठ हा फार पुरातन काळचा आहे, म्हणजे शके १५५२ पुढील काळचा असावा. ह्या आद्य मठांत पहिले श्रीमत् सच्चिदानंद स्वामी महाराजांचा प्रथमतः निवास झाला. त्यावेळीं ह्यांची नैष्ठिकाची परंपरा होती. ह्या संस्थानचे एकंदर अठरा मठ आहेत. त्यांतील फार अर्वाचीन आणि भव्य असा श्री गोकर्ण क्षेत्रांतील होय. ह्या मठांत अजब चमत्कारानें श्री चक्रवर्ति लिंगाची संस्थापना झाली हें सर्वविश्रुत आहे.

श्रीमत्पूर्णानंद सरस्वती स्वामींचें वर्तमान ४५ वर्षांच्या आंत असावें. हे गोरगरिबांचे कनवाळु तसेच त्यानां समदृष्टीनें बघणारे आहेत. ह्या गोष्टीचीं उदाहरणें एक वर्ष पर्यंत सांखळीच्या मठांत श्रीसन्निधीं वास्तव्य केलेल्या एका सांखळीतीलच शैव संप्रदायी सदगृहस्थानें दिलीं आहेत. दानशक्तिही पण संतोषजनक आहे. प्रस्यंतरा दाखल ह्यापर्शेंच्या सारस्वत विद्यालयास दोनशें एक रुपये व पणजींतील मुष्टिफंड संस्थेच्या शाळेस एकशें एक रुपये नुकतेंच बहाल केले असल्याचें ऐकलेलें वर्तमान पुरें आहे.

श्रीगुरुस्वामींच्या आगमनानें शिष्यवृंदावर अनुग्रह झाला. बरोबर वीस वर्षांनंतर हा योग आला. श्री संस्थानच्या गादीची उत्तरोत्तर भरभराट होत जाऊन श्रीगुरुस्वामींना दीर्घायुरारोग्यता प्राप्त व्हावी अशी शिष्यवृंदाची परमेश्वरापाशीं अनन्य भावें प्रार्थना आहे.

डि. कं. ४ आणे. सारस्वत

Anno VII — Numero 11 — 1922 | Quepem Quinta-Feira 15 de Junho

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai
Assinatura
India Portuguesa...... 3-00-00
India Inglesa............ 3-08-00
Numero Avulso.......... 0-01-00
Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास.......... ०-०१-००
जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमचे जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ७ वें.] केपें, गुरुवार, तारीख १५ मोह जून सन १९२२ [खास अंक ११ वा.

Patriotismo, sinonimo de....estomago-Estomago, mola real de tudo-Tudo tende para o egoismo-Egoismo, mobil de acção patriotica.

VERDADES DURAS

E' raro ver-se entre nós o verdadeiro patriotismo. Em geral, êste nobre sentimento que dignifica pessoas e glorifica nações, não passa para muitos *patriotaças* de nossa terra dum meio de intrujar comodamente os papalvos e incautos.

Patriotismo! E' êle para muita gente sinonimo de estomago. Tal gente não é capaz de praticar acto algum .. *patriotico* de quê não lhe resulte algùma utilidade ao estomago, em redor do qual giram todas as suas acções e ...*fracções* politicas, todas as suas atitudes e maneiras... *civilisadas*

Numa palavra: o estomago é a mola real de toda a agitação, consciente e inconsciente daquela gente. Tudo nela tende para o egoismo, para a cultura metodica do *Eu*, interesseiro e utilitario.

Núnca quizemos mal ás pessoas que trabalham pelo seu levantamento pessoal pelos meios legais e morais, facultados pela sua condição social. Pelo contrario, sempre as estimamos por acha-las dignas dêste sentimento, a que criam incontestavel jùs pela importancia que imprimem á sociedade onde nascem. E, depois, elas não agem com trages embusteiros do patriotismo berrante e espalhafatoso: seguem no limite de suas forças o plano de vida, dante-mão traçado.

Não é esta, porem, a orientação dos chamados *patriotaças*. Esses senhores de resto, sem ninguem lhes pedir declaram-se, aos quatro ventos, *pais* da *Patria*; desenvolvem todo o seu empenho em provar que êles nasceram, vivem e morrerão *Pro Patria*; juram por todos os santos e... diabos deste e doutro mundo qué o seu pensamento, a sua atenção, a sua movimentação, tudo, em fim, *é doado sine conditione*– desculpem-nos o estilo tabelioso–à Patria, porque lhe pertencem de corpo e alma; e, finalmente, procuram convencer ao Povo que, se a Patria ainda não *pereceu*, se os cidadãos ainda não esticaram *a canela* e se não deixamos de possuir até ao presente a autonomia, é tudo isto unicamente devido aos titanicos–não confundam com o adjectivo *semilhante satanicos*–esforços deles, pais da Patria.

Mas, se dum lado, aparentam, magnificamente mascaradas, tais *virtudes* de alto valor civico, doutro, não poupam ocasião *viciosa* de satisfazer ás exigencias do ..egoismo que é mobil de toda a sua acção patriotica.

Não fosse assim, o nosso Paiz estaria a fulgurar, com esplendor, no apogeu do progresso, em vez de estar luctando com a mais triste decadencia. Se fosse verdadeiro e não de pechisbeque o patriotismo que por aí fora se exibe, não teriamos, certamente, a desdita de vêrmos, cada vez mais arruinada a nossa querida Patria e, cada vez mais abatido, o nosso Zé-povinho!

E' esta uma verdade que incomoda, mas é sempre uma ...verdade, de mais a mais, verdadeiramente verdadeira.

ECOS & CRITICA

Vergonha da Republica

O jornal metropolitano *A Manhã*, de 13 de Maio p. f. publica, no relato de Camara dos Deputados, entre outras coisas, o seguinte:–

O sr. Dr. Alvaro de Castro, antes de se encerrar a sessão chama a atenção do Governo para o facto do Auditor da Fazenda da India tornar publicos os relatorios confidenciais, enviados ao Ministro das Colonias. O orador classifica aquele funcionario de "vergonha da Republica",

O sr. Dr. Alvaro da Castro tem razão, quando estigmatisa com o ferrete de *Vergonha da Republica* um funcionario que divulga os segredos do Estado. E *vergonha* com *V* grande!

Uma semilhante *vergonha*, em parte, alguma se toleraria: cortar-se-hia...*cerce*.

Mas nas terras portuguesas, de tudo se tira proveito—ainda da *Vergonha da Republica*. Tudo se consente – ainda a *vergonha* da... *Vergonha da Republica*.

E', pois, para lamentar que o erario publico tenha de substentar a vergonhosa vergonha da... *Vergonha da Republica*..

O sr. Paulo da Gama

O *Bharat* enganou-se de facto –confessa-o publicamente –quando teve a ingenuidade de supor seudonimo o... nome de *verdade Paulo da Gama*; pois este historico nome de *verdade*, festejado no passado monarquico e no presente... *autonomico* pertence, rialmente, a um filho do nosso concelho, visto a aldeia Molcornem lhe fazer parte de sua jurisdicção judicial, administrativa e...*politica*– informações estas que com outras nos foram prestadas pelo nosso *enviado especial* que para aquela aldea se dirigira, quando, com a então infausta noticia do suicidio...frustrado do ilustrado escritor, ficara sossobrado todo o mundo...autonomico e *son pere* que è, como se sabe o sr. tabelião Teodore Miranda

Muito antes, pois, de *O Heraldo* ter tido a captivante finesa de nos tirar do...engano, o que em todo o caso lhe agradecemos muito penhorados, estavamos, graças ao nosso referido *reporter* e...ao suicidio do querido resuscitado... ao facto do seu nome...de *verdade* e...da *verdade* dos acontecimentos sensacionais de que foi teatro momentaneo a importante cidade, perdão, aldea de Molcornem, onde o sr. Paulo da Gama que antes do seu suicidio... passageiro era apenas conhecido de politicos e homens de letras que actualmente aí abundam, è, agora, adorado com devoção sem limites por toda a população molcornense que o vê, todos os dias, á hora de seu passeio.

Tambem o nosso *enviado* teve o prazer de admirar de perto a esbelta, insinuante e simpatica figura do sr. Paulo da Gama que, no seu entender, se parece muito com o sr. José Ignacio de Loiola, antigo redactor dos jornais *A India Portuguesa*, *Popular*, *Rebate*, e *Lanterna* e moderno administrador das Comunidádos do concelho de Salsete. E', em fim, possivel haver duas ou mais pessoas da mesma parecença e semelhança. Ainda conosco se dà este caso...*semilhante*...A aldea Molcornem dista apenas da nossa redacção duas leguas Temos até lá estado, antes da *outorga* da autonomia...redemptora. Encontramo-la, então muito povoada pelos ... taverneiros e agricultores e pouco ou nada habitada pelas individualidades da envergadura do sr. Gama. Eis o motivo por que a nossa atenção se não fixou lá, ...até á... *evolução vital* do talentoso sr. Paulo.

Longe estavamos, porisso, de pensar que Molcornem se transformaria *tão cedo* em... *Athenas*, no que, como se via, nos enganamos redondamente; pois, desde que començou a vigorar o regime autonomico com os seus deputados... populares, aquela aldêa foi entrando na *vida nova* e hoje, após tres anos da duração da autonomia...redemptora ela é o que é e...não era antes, uma *Athenas* verdadeira,- graças ás medidas decretadas pelo governo da descentralisação autonomica.

¿ Como se explica, então, que o sr. Paulo da Cama sendo natural, morador e residente daquela áldeia, tão beneficiada pela autonomia desconheça esta importante circunstancia...*local* que por si só reduz....*localmente* a nada os seus argumentos na discussão... autonomica com o sr. Teodoro Miranda a quem o aludido milagre ... experimental de autonomia dá nela razão . . . *local, inteira* e *completa*? – Objectar-se-há.

E' que o sr. Paulo da Gama á fina perspicacia do qual não deve certamente ter escapado tal *prodigio*, não lhe ligou importancia, por entender, naturalmente, como nós, que a sua linda terra natal, apesar de todo o seu esplendor . . . autonomico não representava, a final de contas, uma fracção dispresivel na resolução do grande problema . , . autonomico do vastissimo territorio da India Portuguesa. E fez bem, porque sacrificou nobremente o interesse privado da sua localidade no altar do interesse geral da Provincia, e que ainda mais o nobilita.

सेची मूठ ठेऊन लूट जमविण्यांचा सपाटा चालू ठेविला आहे! एवंच असा या नांवाच्या 'प्रजासत्ताक' राज्यपद्धतीचा सांप्रतचा नांवलौकिक आहे. असो.

पण या नावांच्या रिपब्लिकच्या नांवानें शंख करून अधिकारारूढ असलेली शंखनोकरशाही थोडीच ताळ्यावर येणार आहे. शंखध्वनि पेक्षां कांहीं तरी जास्त उपयुक्त कार्य करणें सध्याच्या 'घोसाळकरी' कारभाराला व करभाराला कंटाळलेल्या लोकांचें कर्तव्य होय. 'जात आहेत ते दिवस खरे, उगाच या राजकारणासारख्या त्रासदायक भानगडींत कां पडा! अशा तऱ्हेचीं 'थंड' विचारसरणी बिलकूल कामाची नाहीं. उलट 'काय होइल तें होवो, कितीहि त्रास सहन करावा लागला तरी हरकत नाहीं, देह जावो अथवा राहो, मला नाहक छळणाऱ्या क्रूर व निर्लज्य शत्रूचीं हड्डी नरम केल्याशिवाय मी स्वस्थ रहाणार नाहीं', अशा विचारानें सनदशीर मार्गाची कास धरून कांहीं तरी कृति करावयास मोठ्या धैर्यानें स्वार्थत्याग पूर्वक पुढें सरसावलें पाहिजे. 'खाना पिना, मजा मारना' हा 'मट्टीमें मिल जाना' अशा सारखा सर्वथैव त्याज्य पंथ असल्यानें इष्ट ध्येय साध्य होईपर्यंत त्याला रजा देणें अत्यावश्यक आहे.

शेवटीं इतकेंच सांगावयाचें आहे कीं, प्रसंग फार कठिण आहे. अत्यंत बिकट आहे. त्याकडे दुर्लक्ष केल्यास परिणाम वाईट होणार आहे. तेव्हां एकदिलानें सर्वशक्ति एकवटून प्रतिपक्षावर जोरानें हल्ला करा!

स्फुट विचार

सुरा-राज्य...:— गोव्यांस दिलेलें स्वराज्य हें स्वराज्य नसून सुरा-राज्य कसें आहे, हें आह्मीं अनेकदां वाचकांस दाखविलेलेंच आहे. स्वराज्य ह्मणजे आपली राज्यव्यवस्था आपण पहावयाची; त्यांत दुसऱ्यानीं कोणत्याहि मिषानें हात घालावयाचा नाहीं. गोव्यास मिळालेलें स्वराज्य आर्थिक स्वरूपाचें आहे, असें सांगण्यांत येतें. अर्थात आमच्या आर्थिक बाबतींत कसल्याहि निमित्तानें वरिष्ट सरकारला आपलें थोबडें शिरकावण्याचा कोणताच हक्क नाहीं, हें अगदीं उघड होतें. पण या उघड व्यवहारांत उघड उघड बिघाड करण्यांचा जणूं कार्य पोर्तुगाल सरकारनें पणच उचललेला असल्यानें स्वराज्याचें रूपांतर सुरा-राज्यांत झालें आहे. यावरून आह्मीं प्रतिष्ठित दारूबाजांच्या कबजांत सांपडलों असून; हे राजश्री आह्मांस केव्हां गटारांत स्वतः बरोबर मोक्ष देतील हें सांगवत नाहीं. दारूचा अमलच मोठा विलक्षण आहे. एकतंत्री राज्यसत्तेचा अमल कदाचित् परवडेल. पण दारूचा अमल सहन करणें मानवी शक्तीच्या बाहेरचें आहे: निदान आमचा तरी अशी समजूत झालेली आहे. अशा या 'धुंद व लालबुंद' प्रसंगीं कोणता देव आमचें संरक्षण करणार आहे, तें पहावयाचें आहे.

'एकच उरला':— सध्याची राजकीय स्थिति अत्यंत बिकट आहे; तीजमुळें प्रजा

एकसारखी खंगत चालली आहे. तिच्यांत कसलेंच त्राण उरलेलें नाहीं. ती कंगाल व भूकेकंगाल बनली आहे. करानीं कर बांधले गेल्यामुळें, करानें तिला सर केलें आहे. ती शोकानें ऊर बडवित आहे, पण दुःखमुक्त करण्याऐवजीं सरकार तिला 'मर' ह्मणूनच धमकी देत आहे. अशा शोचनीय स्थितींतून मुक्त होण्याला तिला एकच उपाय उरला आहे. व तो हाच कीं, नैसर्गिक हक्कांला विरोध आणणाऱ्या करांला कायदेशीर न मानून ते चुकते न करण्याचा ठाम निश्चय करणें. आणि तोहि सामुदायिक पद्धतीनें. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे असहकारिता करून कष्ट सोसल्याशिवाय बेभान सरकार भानावर येणें कठिण आहे.

जुनें व नवें:— 'जुनें तें सोनें' व 'नवें तें हवें' हें तत्व आमच्या शहाण्या सरकारास पूर्णत्वानें पटल्याचें दिसतें. ह्मणूनच तें ठिकठिकाणचे मोडके तोडके जुनें घडे सोन्याप्रमाणें सांभाळीत असून, नव्या बोटी आणण्यासाठीं नवें कर्ज काढण्याच्या विचारांत आहे. इतकेंच नव्हे तर मोनार्कींचा जुना एकतंत्रीपणा तो केवळ 'जुना'

सून निःसत्व व आळशी बनलेलीं मुलें समाजास जास्त त्रासदायक आहेत. कदाचित् त्या उनाडांचा कृषिकर्माकडे किंवा इतर कसल्याहि त्याच प्रकारच्या उपयुक्त कामाकडे उपयोग होण्याचा संभव आहे. लिसेवांतील कर्में शिक्षण घेऊन निःसत्व व आळशी बनलेल्या 'प्रतिष्टित' विद्वानाचा मात्र कसल्याहि कार्यांत उपयोग होणें शक्य नाहीं. हे दगड असून ते वीट आहेत.

अडतें कुठें?:—गोव्याची सांपत्तिक स्थिति दिवसें दिवस जास्त भानगडीची बनत चालली आहे, हें लोकांप्रमाणेंच केव्हां केव्हां सरकारलाहि वाटत असतें. यावरून कोणीहि आपली चुकीची समजूत ऊर्फ समजूतीची चूक करून घेऊं नये कीं, सरकार लोकांच्या अनुकंपनीय स्थितीमुळें झुरणीस लागलें आहे! चुकूनसुद्धां असा पापी विचार मनांत आणण्यांची धिटाइधाई कोणीहि करूं नये. गोव्याच्या अडचणीच्या सांपत्तिक स्थितीपासून सरकारला वाईट वाटण्याचीं कारणें निराळींच असून जनतेच्या सुखदुःखाकडे त्यांचा काडीचाहि संबंध नाहीं. त्या कारणापकीं एक मुख्य कारण असें आहे कीं, बेमालुम रितीनें आणखी

वर्गणी पाठवा वर्गणी पाठवा!

बसूलदाराची वाट न पहातां टपालमार्गानें वर्गणी पाठवा

नवीन व्यवस्थे प्रीत्यर्थ

तीन हजारांवर खर्च आला असून जवळ जवळ तितक्याच रकमेच्या कर्जाचा बोजा

भारताच्या शिरावर बसलेला आहे

भारताच्या ध्येयाकडे लक्ष देऊन आमचे देशबांधव वर्गणीदार असल्या संकटांत आपलें कर्तव्य बजावून त्यास मदत करतील अशी आशा आहे.

स. भारत

असल्यावरून रिपब्लिकन सरकारनें त्याला सोन्याप्रमाणें आपल्या उराशीं घट्ट कवटाळून धरिलें आहे. 'जुनें तें सोनें व नवें तें हवें' या जुन्या नव्या मिश्र तत्वाची कीर्ति आपल्या उदार धोरणानें आमच्या तत्वनिष्ट सरकारनें मोठ्या कुशलतेनें राखल्याबद्दल जुनें व नवें अशे दोन्हीहि वर्गांतील लोक त्याचें अंतःकरणपूर्वक अभिनंदन केल्याशिवाय रहाणार नाहींत.

लिसेवांतील शिक्षण:— आमच्या लिसेवांतून देण्यांत येत असलेलें शिक्षण निरुपयोगी असून तें विद्यार्थी वर्गाला निःसत्व अविचारी व आळशी बनवितें अशी त्या शिक्षणाविरुद्ध खरमरीत टीका झालेली ऐकण्यांत येते. परंतु मुलाचे पालक मुलांनां लिसेवांत कोंबल्याशिवाय रहात नाहींत हें आश्चर्य नव्हे काय? "लिसेवांतील शिक्षण वाईट खरें, पण काय करायें? दुसरी कसलीच सोय नसल्यानें मुलें उनाड होतील, या भयानें त्यांस लिसेवांत पाठवावीं लागतात. अडला हरि गाढवाचे पाय धरी. दुसरें काय?" असे उद्गारहि कित्येकांकडून ऐकण्यांत येतात! पण आमचा अनुभव आहे कीं, लिसेवांतील शिक्षण न

नवीन कर लादण्यांस कोणतेंच साधन बाकी राहिलेलें नाहीं जन्मापासून तों मरणापर्यंत शेंडीपासून तो बूटांपर्यंत, जमिनींपासून तों जानापर्यंत, जें कांहीं होतें नव्हतें त्यावर कर लादण्यांत तर केव्हांच आले आहेत. आतां नवीन करानें सजविण्यासारखें कांहींच शिल्लक उरलेलें नाहीं; ह्मणूनच सरकारची जरा 'कुचमणीची' अवस्था झालेली आहे पण अडते कुठें? हा प्रश्न सरकारनें आपल्या सल्लागार मंडळासमोर टाकल्यास त्याचा हवा तसा निकाल लावून, सरकारला दुःखमुक्त करण्याची ताकद अजून त्याच्या मित्रांत जीव धरून राहिलेली आहे प्रश्न काय तो प्रश्न टाकण्याचाच. प्रश्न टाकला कीं तावडतोब निकाल. प्रश्नाचा व ...जनतेचा, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

वर्तमानसार

—असोळणें येथील श्रीवेताळ प्रासादिक ज्ञानमंदिर संस्थेच्या विद्यमानें गेल्याच्या मागील आठवड्यांत तेथें आमच्या संपादकाचें प्रवचन झालें.

—केपें, डिचोली व दमण येथील कोमार्कें काढून त्या ठिकाणीं जुकगाद बसविण्यांत यावे, अशा अर्थाचा एक ठराव दोजुवांव द फिग्रेद यानीं लेझिस्लातीव्ह कोन्सिलांत दाखविला आहे. स्तुत्य.

—आमचे मित्र व विद्वान प्रोफेसर श्री. पांडुरंग शे. पिसुर्लेकर यानां सत्तर महालच्या मुनिसिपालटीनें, त्यानीं बजावलेल्या शिक्षणविषयक उत्कृष्ठ कामगिरीबद्दल, गोरवपर संदेश पाठविला असून, त्यास वरिष्ठ सरकारचा बहुमानात्मक शब्दांचा दुजोरा आहे. या सन्मानाबद्दल आह्मी प्रोफेसरसाहेबाचें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करितों.

—लिसेव सेंत्रालचा फिरून लिसेव नासियोनाल (पांच क्लासांचा) होईल, असें कळतें.

—गागु कुतिज्य व साकादूर कावाल यानी आपला हवेंतील प्रवास सुखरूपपणें पुरा केला.

—मडगांवच्या 'तेन्ह' पत्रावर खटला करण्यांत आला आहे.

—दैनिक लोकसंग्रह यापुढें साप्ताहिक स्वरूपांत प्रसिद्ध होणार आहे.

सुरगांव--शिक्षण--संघ

(आमच्या बातमीदाराकडून)

ता. १४।५।२२ रोजीं या संस्थेच्या कार्यालयांत बक्षीस समारंभ साजरा करण्यांत आला. कार्यालयास गुढया, तोरणें, पताका यांच्या समावामुळें भासणारी कृत्रिम शोभेची उणीव अध्यक्षांच्या टेबलावर ठेवलेल्या हिंदुस्थानांतील लोकांचें प्रापंचिक व आध्यात्मिक बल वाढविणाऱ्या सुताच्या चरक्यानें भरून काढली होती. चरक्यांजवळच शाळेंतील विद्यार्थ्यांनीं काढलेल्या सुताच्या गुंड्या नावांनीशीं मांडण्यांत आल्या होत्या. चरका रा. शशिधर नारायण वार्खें बी. एस. यन. कंपनीचे हेडक्लार्क यांच्याकडून देणगीदाखल दिला गेला होता, असें त्यावर असलेल्या नांवावरून कळून येत होतें.

सभास्थानीं शहरांतील प्रमुख मंडळी आल्यावर समारंभास ५ वाजता सुरवात झाली. रीतीप्रमाणें श्री. भिकाजी पांडुरंग वालावलकर यांची अध्यक्षस्थानीं योजना झाल्यावर मुलांमुलींकडून मधूर आवाजांत स्वागतपर व ईशस्तुतिपर पद्ये ह्मणण्यांत आलीं. नंतर संस्थेचे सेक्रेटरी श्री. मुकुंद वि. ना. प्रतापराव सरदेसाई यांनीं पुढील आशयाचें भाषण केलें. ते ह्मणाले:-'सद्गृहस्थ हो, देशाच्या उन्नतीचीं जीं निरनिराळीं साधनें आहेत त्यांत मातृ भाषेतून शिक्षण देणें हें एक होय. कोणताही समाज कर्तृत्ववान, स्वावलंबी व जोमदार बनणें झाल्यास त्याला आपली स्वभाषा, आपली पूर्वपरंपरा, आपली प्राचीन संस्कृति व आपल्या पूर्वजांच्या कर्तबगारीचा इतिहास याची ओळख होणें जरूर असतें आणि ही ओळख आपल्या मातृभाषेतून झाली तर तिचा परिणाम ज्यास्त टिकाऊ व अधिक फलप्रद असतो हें सांगावयास नकोच. गोमांतकीय समाजाची जी अधोगती झालेली आहे किंबहुना प्रगतीच्या मार्गावर येतांनां जो जो कच खात आहे त्याला कारण मातृभाषेविषयींचें त्याचें औदासिन्य हें होय. गोमांतक हा प्रांत महाराष्ट्राचा

ANNO VII — NUMERO 12 — 1922 QUEPEM QUINTA-FEIRA 22 DE JUNHO

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai
As[illegible]ra
India Por[illegible] 3-00-00
India In[illegible] [illegible]-08-00
Numer[illegible] [illegible]0-01-00
A[illegible] [illegible]a...... 00-01-00
[illegible]uso contrato es-

भारत

BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००
जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आगे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ७ वें.] केपें, गुरुवार, तारीख २२ मोह जून सन १९२२ [खास' अंक १२ वा.

À auditoria fiscal

O Paiz pronunciou-se em pêso contra esta *inutilidade* que, como sabem, em vez de simplificar as coisas fazendarias, complicou-as. Ela representa, sem mais nem menos um luxo na miseria.

E, todavia, a Auditoria passa cada vez melhor da sua importante saude, não havendo força alguma que lhe faça reduzir a idade de... ferro. E' triste mas é verdade.

O Povo não alcançou nem alcança vantagem alguma da existencia dela, que pelo contrario lhe faz tardar as dependencias por causa de seus *vistos*.

¿ Lucrou, pelo menos, o Governo com ela ?

Não; pois foi desacriditado pela publicação de relatorios confidenciais, como se viu na edição passada.

¿ Não se impõe nestas condições a sua extinção ou, quando não, a reducção á *sua expressão mais simples* ?

¿ Não resultaria da mêsma extincção uma economia razoavel ao tesouro público ?

Quando o *deficit* é de 17 laques de rupias, forçóso se torna acabar com sinecuras e luxos que só se toleram, quando o Paiz navega naabastança.

E sobejamente está provado que a Auditoria Fiscal da India é uma sinecura e é um luxo na... miseria.

FARAZES ...

Inserimos noutro lugar a anunciada carta-resposta do sr. Nanum Tarcar Pernencar, referente ao assunto de *Farazes*. E' ela, como se sabe, destinada aos srs. *Moropanta, Vamona, Tucarama* e... a nós tambem.

Queira ou não, é forçoso, pois, que o *Bharat* diga de sua justiça na *injustiça* que lhe faz na sua epistola o sr. Nanum, atribuindo-lhe propositos que ele nunca os albergou... E depois, provocado por nós é que o ilustrado barbeiro quebrou o seu scilencio de... oiro.

Lêmos, relêmos e tornamos a lêr a brilhante carta do sr. Pernencar; mas sentimos confessar que não enxergâmos nêla cousa alguma que se relacionasse directamente com o *ponto principal* dos nossos ligeiros comentos.

E' que parece que o sr. Nanum não leu bem o que escrevemos ou se o leu bem não o comprenden bem, ou, se o compreendeu bem, não o assimilou bem ou, ainda, se o assimilou bem, não foi bem capaz de manter-se sereno e... na *linha direita*, porque, então, nao teria a *superficialidade indisculpavêl* de chamar...alhos aos bogalhos, ... vice-versa e trapalhada.

Não esperavamos, francamente, semilhante... por parte do sr. Nanum *cujos esforços para o progresso das classes analfabetas são conhecidos do publico, esforços que concorreriam ainda que indirectamente para o despertar de energias duma parte da população bramane...*

E' pois, verdade qne o *Bharat* não cobriu o sr. Nanum nem a sua classe de doestos, como levianameute lhe aprouve afirma-lo, ... *á falta de razões com quais pudesse justificar a inviabilidade da sua... carta* que basta pelo menos, que... *acredite* o nosso jornal...

¿ Mas que è que disse o *Bharat propriamente* na questão de farazes ? *Nada*, por enquanto, pois mais duma vez declaramos que sò emitiriamos a nossa opinião depois da conclusão da discussão que ainda não acabou nem começou. Não foi isso ?

¿ A que veiu, então, a local **Mais um** do *Bharat* n ° 8 ?- Perguntar-nos-há o esforçado paladino e *bemfeitor... das classes analfabetas* e... *duma parte da população bramane.*

E' para significar simplesmente, que "quem não fez o e que podia e devia fazer na sua classe, não tinha direito nem competencia para aconselhar a outros que nas suas classes o fizessem." E nada mais.

Só tanto bastou para o sr. Nanum perder a tramontana e após um parto laborioso dar á luz de... publicidade incoveniencias que bem poderia dispensar... para os seus créditos.

Não temos procuração dos srs. *Moropanta, Vamona, Tucarama e duma parte da população dos bramanes* para os defendermos; mas, quanto a nós, vê-se que o sr. Nanum fez-nos flagrante injustiça, encabeçando-nos *carapuças* que se nos não ajustam.

E' caso para dizer que o sr. Tarcar *falhou* com o n°. da porta e foi parar em... maus lençoes na pressa que quiz imprimir ao seu andar... *reformista* para ensinar-nos e aos bramanes que os farazes eram dignos da melhor sorte, porisso que os proprios *Suami Vivecanonda e Mahatma Gandhi* eram da sua opinião... dele.

¿ Onde, porém, desencantou o sr. Nanum a nossa desafeição pela redenção da classe dos farazes e outras... despresadas ?

¿ Onde, quando e como descobriu o encarniçado inimigo do *detéstavel Peshivismo* que o *Bharat* era contra... o despertar de energias da população dos farazes ?

Estamos em crêr que não será capaz de no-lo responder.

E' certo, todavia, que o *Bharat* achou e continua a achar que o sr. Nanum, que apesar de poder fazer muito em beneficio da classe dos farazes na sua, não fez nada nem consta que está em via de o fazer por motivos futeis não devia cair no disparate de dar conselhos a outrem para o fazer; porque resultaria inutil tal, empresa... despropositada como sucederà, se ainda não sucedeu.

Quem tem telhado de vidro não deve atirar pedras ao do visinho, bem diz a filosofia popular e que o sr. Tarcar esqueceu-se de... lembrar, de proposito.

Mas o sr. Nanum fala ainda na sua carta da responsabilidade dos bramanes no assunto contra-vertido. Tambem, pelo mesmo motivo, não tem razão, porquanto quem não cumpriu o dever de sua responsabilidade não pode intrometer-se no cumprimento do da responsabilidade doutrem. Um bebado que não deixou de beber, não deve pregar a outros bebados que deixem de beber. Um individuo cuja casa exige uma *vassourada monumental* não tem competencia nem autoridade para meter o seu nariz na sujidade alhêa... E é só isto.

De resto, fique o sr. Tarcar sabendo que os bramanes não precisam como nunca precisaram, louvado Deus, de seus conselhos... gratuitos, porque felismente nunca faltou entre eles elemento que promovesse o *despertar de suas energias* juntamente com o doutras classes sociaes indistintamente, o que alias não deve iguorar. *Chacum dans son metier.*

O resto é com outros e portanto è inutil gastar mais tempo. Não é, sr. Nanum ?

N. da R.

A carta-respasta a que o presente artigo diz respeito teve ainda de ser reservada para a edição seguinte do *Bharat*, juntamente com outra materia já composta e compaginada. E' que, á ultima hora, por desarranjo da maquina de impressão ficamos forçados a publicar, como se vê, só a metade do *Bharat*, o que sendo consequencia das circunstancias da força maior torna se *ipso facto* digno de ser desculpado.

O *Bharat* seguinte terá, como de costume, quarto paginas.

Estão paradas na redacção muitas correspondencias, algumas delas de grande urgencia.

Publica-la-hemos na edição da semana seguinte.

Louvor merecido

O distincto professor Sr. Panduronga Pissurlencar recebeu o seguinte oficio: —

Para os devidos efeitos, se comunica, que Sua Exa. o Sr. Governador Geral, conformando-se com o parecer do Conselho de Instrucção Publica, que ele com muito agrado tomou conhecimento do louvor que lhe foi consignado pela Comissão Municipal de Satari na acta da sua sessão de 17 de Abril de 1917.

Se Sua Exa. o Sr. Governador Geral recebeu com agrado esse louvor, a Inspecção de Instrucção Primaria, perfilha o mesmo agrado de Sua Exa. acrescentando que deposita toda a confiança no professor louvado, esperando que de futuro o mesmo professor continuará a desempenhar com toda a competencia, lealdade e civismo a nobre missão de professor e educador de que o Estado o investiu.

São estes os ardentes votos desta Repartição.

Saude e Fraternidade.

Repartição da Inspecção de Instrucção Primaria em Nova Gôa, 4 de Maio de 1922.

O Inspector Primario
(a) *A. Alves Prudente*

Nossos parabens ao digno professor louvado.

ANO VII — NUMERO 13 — 1922 QUEPEM QUINTA-FEIRA 29 DE JUNHO

Director e Editor
[Go]vinda P. Hegdo Dessai
Assinatura
[In]dia Portuguesa...... 3-00-00
[In]dia Inglesa............. 3-08-00
[N]umero Avulso.......... 0-01-00
Anuncios
[A]nuncio por linha...... 00-01-00
[P]ara longo praso contrato es[p]ecial.

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... १-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००
जाहिरातींचे दर
दरओळीस दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ७ वें.] केपें, गुरुवार, तारीख २९ माहे जून सन १९२२ [खास अंक १३ वा.

PROTESTANDO...

O governo local acaba de nomear professor auxiliar do Liceu Afonso de Albuquerque a um militar, sob sua responsabilidade, mas contra a disposição legal. O Governo local cometeu, portanto, uma ilegalidade sob sua responsabilidade. E um acto ilegal, comquanto praticado sob a responsabilidade de quem quere que seja, merece só protestos. Sobre isto não pode haver duas opiniões.

O sr. Ramochondra Sridhar Poi concorreu para o lugar de professor auxiliar do mencionado Liceu; foi classificado e correu o boato de que ia ser nomeado. Não acabou. O sr. Poi teve até guia para ser presente á Junta de Saude. E, quando ia submeter-se ao exame dela, disseram-lhe que o lugar para ocupar o qual êle fôra chamado, estava já preenchido por um.. militar, sob a responsabilidade do governo local.

E' espantoso, é piramidal e é... triste! Pelos modos parece que tem razão o outro que diz que *quem não tem padrinhos morre mouro*. E o nosso amigo Ramachondra Poi não possui outros *padrinhos* senão o seu formoso talento e belo caracter, coisas que na nossa terra não encontram terreno fertil para medrar...

E' triste mas é verdade. E é uma verdade que cava a ruina do chamado *prestigio de autoridade* Mas é inutil gastar a cera com ... ruins defuntos e porisso limitamo-nos a registar nas colunas do *Bharat* o nosso veemente protesto contra uma *ilegalidade... responsavel* que o governo local acaba de perpetrar.

Para averiguar

Informam-nos, não sabemos com que visos de verdade que um engenheiro não larga um real das ajudas de custo que o orçamento da provincia lhe consigna, quando em inspecção.

E dizem que na falta do serviço o sr. engenheiro enfia o automovel para as bandas de Cortalim para ver o trabalho dos dois cantoneiros, que por si andam a mourejar.

Seria bom averiguar estes e outros factos que sendo verdadeiros dão a ideia de como desaparece o dinheiro dos contribuintes e de como se faz a engorda dos tubarões.

Coisas e Loisas

Premio nobre...

A *razão* é uma bôa palavra que, pelos importantes favores com que serve á Humanidade torna-se, sem favor, merecedora de ser tratada, com todas as honras, nas colunas dum jornal.

Não è sem razão que se diz que o homem é *rei dos animais... irracionais* por ser senhor e possuidor da *razão*, distinctivo da natureza humana. A *razao* é .. a razão de ser de todas as coisas visiveis e invisiveis concretas e abstactas, apalpaveis e inapalpaveis.

A *razao* è um artigo mas não è como qualquer artigo de fundo dum jornaleco, destinado á determinada pessoa, politica, sciencia ou... falencia è um artigo de que tirios e troianos, gregos e romanos— ou para encurtar razões—amigos e inimigos podem igualmente e *ad libitum* tirar proveito.

Dois litigantes litigam, baseando-se ambos na *razão*. Se a petição inicial duma causa se estriba na razão, a contestação da mesma petição tem tambem forte esteio na mesma *razão*. E o que se respeita em relação a estes importantes factores da demanda que são antecedentes, observa-se, igualmente, no tocante à réplica, treplica, alegações e contra-alegações que são consequentes.

Isto é: acusa-se com *razão*, contesta-se com *razão*, replica-se com razão, treplica-se com razão, alega-se com razão e contra alega-se, tambem, com... razão.

Mas não acabou aqui a discrição da razão: lançam-se despachos com razão, proferem se sentenças com razão, despachos e sentenças que são confirmados, alterados e revogados, tambem, com razão.

Preso por ter razão e preso por não ter razão. E' o mesmo ditado que por causa da e fonia degenerou, com o decorrer do tempo, no seguinte: preso por ter *cão* e prêso por não ter *cão*.

Matematicamente falando, a razão está na mesma razão do ... *cão*.

E' com razão se diz, pois, que a razão *é* do uso universal accessivel a todas as inteligencias, a todas as algibeiras, a todos os apetites e a todos os gostos e desgostos. . .

Deus nos fêz pobres; eis a razão por quê não podemos oferecer um *premio nobre* que merece com razão o inventor da palavra **Razao.**

Temos, ainda, muita coisa e loisa para dizer sobre a razão mas temos tambem razão para não o fazer por escassez do tempo e espaço. E oremos que a uma razão que deve ser respeitada por todo o homem de ... razão.

Imposto capital

Quando-se lançou o imposto de emigração, essa belesa de *capital* importancia, as grandes cabeças que o geraram, justificaram a sua injusta criação, dizendo que tal imposto havia de pôr freio á drenagem para o extrangeiro da nossa gente, facto que doutro lado abarataria o *braço*.

A experiencia demonstra, porêm, que falhou o calculo. . . calculado no meio do gabinete calculador, porque a emigração e o braço continuam, como dantes, na mesma situação ou proporção.

Mas o imposto lançado com aquela justificação avulsa ou antes *convulsa* não perde o seu vigor, pois, com rigor se está arrecadando.

E entretanto, è logico o que está sucedendo nesta terra em que o *sim* significa *não* e o *haver* significa *dever*.

¿ Não è verdade que o mesmo imposto se relaciona com a politica que, na sua essencia, è uma bailadeira de. . . mil palavras e outros tantos *amores*?

P. M. Lada

Nos ultimos exames de matriculation da Universidade de Bombaim foi entre todos os candidatos classificado em 1.° lugar, obtendo por isso uma medalha de ouro, Parxotama Manguexa Lada, rapaz de 17 anos natural de Camorlim de *Bardez* e residente em Vasco da Gama.

Nas materias de *Sanscrito* teve scholarship de 216 rupias annuaes por dois anos e ganhou tambem o premio de 190 rupias instituido por Dorabai Franji Cama.

O esperançoso rapaz é filho do sr. Manguexa Atmarama Lada, conhecido empregado da companhia *Standard Oil de Mormugão*.

Carta--resposta

Em vista do *aviso ao publico* do ilustre presidente da comissão nomeada pelo Governo para a reforma do regulamento das mazanias dos pagodes, apresentei umas propostas, por julgar que concorreriam para a prosperidade dos referidos templos e do progresso da classe hindu, interessado como sou no assunto.

Sobre essas propostas publicou VExa. no jornal *Bharat* da sua mui digna direcção, correspondencias firmadas com os pseudónimos de *Moropanta Vamona* e *Tucarama*, em que, longe de refutarem ou contestarem as mesmas propostas e que não puderam negar que sejam liberaes, muito fóra de proposito, esquecendo-se de que nas questões de interesse publico ou em questões de principios é vedado a quem é bem educado descer ao campo pessoal, cobriram-me e á classe do barbeiros de doestos, á falta de razões com quais pudessem justificar a inviabilidade dos meus alvitres, pretendendo tambem enredar o assunto.

Francamente não esperava semelhante...... por parte dos que se dizem instruidos e civilisados ou dos que andam de luva calçada,...... que certamente perderam uma boa ocasião de estarem calados.

Pelas castas não se medem pessoas,—as pessoas medem-se pelo seu saber e caracter.

Como nunca quiz azedar questiunculas, não queria responder a esses correspondentes anonimos, mas como provocado na local = Mais um = do *Bharat* n.° 8 do corrente ano, e, por isso passo a dizer o que se me oferece.

Trata-se de, por meio de mazanias de pagodes, infundir a instrução, impondo-se-lhes a obrigação de, a exemplo de escolas paroquiais cristãs, criarem nos templos e subsidiarem escolas de marata com o ensino de doutrina hindú, etc etc; aproveitando de ocasião de que se está fazendo um novo projecto de reorganisação dessas mazanias, pela primeira vez confiado pelo Governo únicamente a castas hindus.

Opõe-se a esse disiderato o ilustre director do Bharat? assim o digo com clareza.

Sobre as castas chamadas dos firazes, alparqueiros etc. que mais perturbaram os cere-

जम खर्च करून स्वदेशी चळवळ कायम ठेवण्याच्या प्रयत्नास लागलें पाहिजे. अशा रितीनें आपल्या जन्मभूमीचे थोडेबहूत तरी उपकार फेडल्यासारखें होईल. शिवाय विद्यार्थी या सुट्टीत आपापल्या भाडोत्री गुरूचेहि गुलाम नसल्यामुळें त्यांस स्वतंत्रपणें योग्यती चळवळ हवी तशी करण्यास कोणतीच हरकत नाहीं.

स्फुट विचार

अभिनंदनः— पणजीच्या पाठशाळेंतील बुद्धिवान विद्यार्थी रा. पंढरी कामत यांस 'मादाम नोव्हायस' व 'फेर्नांद कुंज्य' हीं बक्षिसें मिळाल्याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करितों. आपल्या तेजस्वी बुद्धिप्रभावानें सदरहू बक्षिसें पटकावणारे रा. कामत हे पहिलेच हिंदु होत. इतकें सांगितलें म्हणजे त्यांची गणीत व इतर विषयांतील अप्रतिम हुषारी निःशंकपणें सिद्ध होते. रा. कामत यांचा स्वभावहि सात्विक असल्यामुळें दुःखानें पोळलेल्या आपल्या देशबांधवांस ते, शिक्षणक्रम पुरा झाल्यावर, शक्य तें सहाय्य पुरवून, आपल्या बुद्धिमत्तेचा उपयोग लोकहितार्थहि करतील अशी आम्हांस आशा आहे. एकंदरीत कामत यानीं आपलाच नव्हे तर गोव्यांतील सर्व हिंदु लोकांचा [illegible]िक वादविवादाबद्दल आदरांत त्यांचा फार अभिमान वाटतो. आमचे दुसरे तरुण विद्यार्थी रा. पुरुषोत्तम मंगेश काळे यांचेंहि आम्ही त्यांना म्याट्रिकुलेशन परीक्षेच्या संस्कृत विषयांत २१६ रुपयांची द्विवार्षिक स्कॉलरशिप मिळाल्याबद्दल प्रेमपुरस्सर अभिनंदन करितों. हिंदु विद्यार्थ्यांचा उत्कर्ष ऐकून भारताचें हृदय प्रेमानें भरून येतें. गोव्यांत व गोव्याबाहेर आरपरसा अध्ययनानें हिंदूंच्या कीर्तित भर घालणाऱ्या शिक्षणप्रिय तरुणाचा अभिमान कोणास वाटणार नाहीं? ईश्वर करो आणि सदरहू सारखे तरुण आमच्यांत पुष्कळ निघोत!

'हम करेसो कायदा':- हें आसुरी तत्व आमच्या नोकरशाहीच्या इतकें बळणीं पडलें आहे कीं, त्यापुढें तिची न्यायबुद्धि अनेकदां भ्रष्ट झालेली पहाण्यांत येते. हा प्रकार अनिष्ट आहे हें जितकें खरें आहे तितकेंच त्याविरुद्ध जनतेकडून जो याचा विरोध होत नाहीं हेंहि खरें आहे! याचें ताजें प्रत्यंतर म्हणजे आमचे विद्वानमित्र रा. रामचंद्र श्रीधर पै यांच्या पणजीच्या पाठशाळेंतील प्रोफेसरांच्या हंगामी हुद्यावर होऊं घातलेल्या नेमणुकी संबंधीं नोकरशाहीनें व्यक्त केलेलें दुटप्पी धोरण हें होय. कोणत्याहि मिलिटरी गृहस्थाची त्या जागीं नेमणूक होऊं नये असें कायद्यानें ठरविलें असल्यामुळें त्यांच्या ऐवजीं रा. पै यांची योजना करण्याचें ठरून, तदनुसार त्यांस आमंत्रणहि देण्यांत आलें. त्याप्रमाणें ते जाण्याच्या तयारींत असतांच उपरोक्त जागा भरली गेली, असें रा. पै यांस कळविण्यांत आलें. आश्चर्याची गोष्ट ही हीच कीं, यांच्या ऐवजी एका मिलिटरी गृहस्थाचीच नेमणूक झाली! कोण हा दळढ [illegible] अन्याय!? असे अन्याय ज्या बेमूर्वतखोर नोकरशाहीकडून हरहमेश आचरले जातात, त्या नोकरशाहीचें आयुष्य संपुष्टांतच आलें आहे असें म्हणणें प्राप्त. [illegible] तिच्या [illegible] पक्षाची आज [illegible].

श्रीगुरुपूर्णानंद स्वामी

श्रीखळ सांखळीहून निघाल्यानंतर माशेलांतून कुंभारजुव्यांस येऊन श्रीमत्पूर्णानंद स्वामींनीं ता. ८।६।२२ रोजीं श्रीशारदा विद्यालयास भेट दिली मंडळीचा थाट अपूर्व होता. स्वामीच्या आगमनप्रसंगीं हातांत गुढया घेतलेले विद्यार्थी दुतर्फा जयजयकार करीत गंभीरपणें चालले होते. विद्यालयाचे मुख्य दरवाजावर 'श्रीपूर्णानंद स्वामी महाराजकी जय' असा कापडाच्या लडीच्या ठळक अक्षरांचा बोर्ड लाविला होता. चित्रविचित्र रंगाच्या पताका, तोरणें, पुष्पहार व पल्लवांनीं विद्यालय आलंकृत केल्यामुळें सभास्थानास अत्यंत रमणीयता आली होती. श्रीस्वामी महाराजांस भव्य सिंहासन केलें होतें. त्याचे उजवीकडे नकाशे, फोटो वगैरे लाविले असून डाव्या बाजूस मुलांनीं केलेल्या कलाकौशल्याच्या वस्तूंचें प्रदर्शन मांडिलें होतें. त्यांत चरके, चरक्यावर काढलेलें सूत, त्या सुताची खादी, टुवाल, टोप्या, भेंडाचीं फुलें, तुरे, झाडें वगैरे पदार्थ, मातीचीं व कागदी लगद्याचीं फळें भांडीं वगैरे वस्तू, रमणीय पांखरें, काड्यांच्या चटया, काड्यांच्या व स्ट्रीरच्या पंख्या, निरनिराळया प्रकारच्या व्यागा इत्यादि वस्तु मांडिल्या होत्या. काचेच्या मण्याच्या रम्य आकृती, मुलांचीं अक्षरें, ड्रॉईंगच्या चोपड्या वगैरे मांडल्या होत्या. शाळेच्या महादरवाज्यापासून [illegible] उनापर्यंत दुतर्फा विद्यार्थी उभे राहून स्वामींस मानवंदना करून दिला. स्वामी स्थानापन्न होतांच पाद्यपूजेच्या वेळीं मुलांच्या दोन टोळया करून श्री दिगंबरदास कृत 'श्रीमत्पूर्णानंद स्तवनाष्टक' स्तोत्र गाइलें गेलें. त्यानंतर रा. सामंत मास्तर कृत 'स्वागत गुरुचरणाला' व 'आजि धन्य दीन हा' हीं पद्यें मुलांनीं तबला पेटीच्या सुरावर गाईलीं. नंतर रा. सामंत हे स्वागतपर भाषणांत म्हणाले–आजचा हा अपूर्व सुयोग संस्थेच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं नमूद करण्यासारखा आहे. या सुप्रसंगीं अंतःकरणांत उसळणाऱ्या आनंदोर्मींचें यथातथ्य चित्र रेखाटणें अशक्य आहे. आशावादी मनुष्यानें या बाबतींत यशस्वी होण्याचा एकच मार्ग मला दिसतो व तो श्रींचें नामोच्चरण करणें हा होय. अंतःकरणाची स्थिति कशी झाली आहे हें ह्यावरूनच दिसून येईल. [पूर्ण- आनंद] चित्त आणि वाचा या मध्यें एकतानता झाली आहे. पूर्णानंद पूर्णानंद असा आंत बाहेर ध्वनि निघत आहे. आनंदाची पूर्ति परमावधि–म्हणजेच भगवत्स्वरूप. धर्माचें अंतीम ध्येय मोक्ष आहे. मोक्ष म्हणजे कैवल्य हे आजचे स्वामी तर कैवल्यपदाचे (कवळें मठाचे) अधिपतीच आहेत. अशा ह्या थोर भगवन्मूर्तीचें व इतर मंडळीचें योग्य स्वागत आमचेकडून झालें नाहीं तरी आगमनानें आनंदसागरांत पोहणाऱ्या ह्या बालचमूकडे पाहिलें असतां त्याचें निर्व्याज प्रेमामुळें सर्व उणीवांची भरपाई होईल अशी उमेद बाळगून श्रीसेवेच्या पुढील कार्यक्रमास अनुज्ञा देतों'. इतकें सांगून त्यांनीं आपलें भाषण पुरे केलें. नंतर ह्या समारंभासाठीं तयार केलेलीं पद्यें मुलामुलींनीं म्हटल्यानंतर [illegible] टाळ्यानंतर शाळेचा उद्देश वाल म्हणून दाखविण्यांत आला, नंतर ड्रिल, चरक्यावर सूत काढणें, मुलांचे गद्य पद्य संवाद गाणीं वगैरे झाल्यावर कीबरोबर असलेले वे. शा. सं. ज्ञानेश्वरशास्त्री एकसंभेकर यांचें 'विद्यार्थ्यांचें कर्तव्य' या विषयावर भाषण झालें. नंतर श्री सामंत यानीं योग्य शब्दांत आभार मानिले व मुलांनीं 'वंदे मातरम्' पद म्हटलें. मुलांनीं काढलेल्या सुताचा हार श्रीस अर्पण करतेवेळीं रा. सामंत म्हणाले–श्रींनीं समाजाचीं सूत्रें हातीं धरलीं आहेत. श्रीशारदा विद्यालयाचे हें प्रेमसूत्रही, स्वामीच्या गळयांत पडावें अशी आपल्या ह्या छात्रवर्गाची इच्छा असल्यानें त्यांनीं मला पुढें केलें आहे. धर्मासनावर असलेल्या श्रीच्या कंटीं माला अर्पण करण्यास संकल्पाला योग्य शास्त्री येथें आहेतच. तेव्हां श्रीची ज्ञानेश्वरशास्त्री यानीं ही माला श्रींच्या कंटीं अर्पण करून आमचा संकल्प सिद्धीस न्यावा अशी मी विज्ञप्ति करितों. नंतर शास्त्रीबुवांनीं ही माला अर्पण केल्यावर श्रीस्वामीमहाराजांनीं ही गंभीरपणें अल्पाक्षर पण गंभीरार्थ असें मधूर व उत्तेजनपर भाषण अत्यंत सद्गदितपणें केलें. त्याचा आशय असा होता:—आमच्या सर्व प्रवासांत अशा खेडेगावांत इतक्या उत्तम रितीनें चालविलेली शाळा ही आम्ही पहिलीच पहात आहों. या विद्यालयाच्या अशा अभिनव व्यवस्थेबद्दल गांवची प्रमुख मंडळी स्तुतीस पात्र आहेच. तरी पण विशेष श्रेय अत्यंत बुद्धिवान आणि निर्लोभी देशभक्त रा. सामंत मास्तर यानांच देणें योग्य आहे. त्यांच्या एकनिष्ठ इतर पंतोजीनींही त्यांचा सहवास सोडूं नये आणि ह्या पवित्र कार्यांतच सारे संतानीं देह झिजवावा आणि हा गांव आणि हा प्रांत उर्जित दशेस आणावा अशी ह्या संस्थानची फार इच्छा आहे. मुलांनां देण्यांत येत असलेलें पुस्तकी आणि इतर कला कौशल्याचें शिक्षण वगैरे पाहातां त्यांचा जेवढा गौरव करावा तेवढा थोडा वाटतो. शाळा पाहण्यास येणाऱ्या सर्व रसिक सज्जनांनीं शक्य तेवढें सहाय्य या विद्यालयास करावें अशीच इच्छा श्री भगवानी शंकर चरणी करून आमच्या संस्थानातून यथाशक्ति स्वल्प देणगी म्हणून या विद्यालयाची अधिष्ठात्री देवता श्रीशारदांबा देवीच्या चरणीं १०१ एकशेंएक रुपये अर्पण केले जात आहेत इत्यादि, इ० या समयोचित प्रासादिक भाषणाबद्दल व देऊं केलेल्या द्रव्य सहाय्याबद्दल टाळ्यांच्या प्रचंड गजरांत श्रींचे सर्वांनी मनःपूर्वक आभार मानून समारंभाचें काम संपविण्यांत आलें. आणि मग तेथून श्रींची स्वारी पालखींतून पूर्वीच्याच थाटानें श्रीमंत केंकरे यांच्या घरीं पोंचविण्यांत आली.

दुसऱ्या दिवशीं ठरीव संकेताप्रमाणें माशेलांतून वाजत गाजत खांडोळें येथें त्यांना श्रीमंत भालचंद्र शेणवी खंडेपारकर यांच्या घरीं पोंचविण्यांत आलें. बाहेर दिगंबरदासकृत स्वामीस्तोत्राच्या छापील प्रति लोकांनां वाटण्यांत आल्या. माशेलांतही स्वामी भक्त मंडळीचीं मागच्या आठवड्यांत वे. शा. सं. गणेश भट सुळकणकर वैद्यराज यांच्या घरीं स्वामींना सार्वजनिक भिक्षा आणि तीनचार ठिकाणीं पाद्यपूजेचे समारंभ झाले होतेच. कळावें.

आपला:–एक प्रेक्षक बातमीदार
'विष्णुतनय'

व्याख्यान.

"विद्वान सर्वत्र पूज्यते"

आगमन आणि प्रयाण ह्या [illegible] ठरल्या प्रमाणें वेदशास्त्रविशारद ज्ञानेश्वर शास्त्री एकसंबेकर ह्यांचें आज धार्मिक व्याख्यान प्रसिद्ध करण्यांत येत आहे. शास्त्रीबुवांच्या नांवामागें जोडलेलें विशेषण औपचारिक रित्या अगर नांव सालंकृत करण्याच्या इराद्यानें नव्हे. ते जितके वयोवृद्ध तितकेच ज्ञानवृद्ध आहेत. ज्ञान ह्याचा "ज्ञप्तिज्ञान" असा विग्रह होतो. ज्ञप्ति म्हणजे अवबोधन अथवा ओळखणें. श्रुतिस्मृतीची ह्यांना पुरी ओळख आहे म्हणून वेदशास्त्रविशारद ह्या बहुमान वाचक पदास ते पात्र होतात. ज्ञानेश्वर हें नांव देखील त्याना साजण्याजोगेंच आहे. अशा प्रतीचे पंडित सारस्वतवृंदांत असणें हें आपल्या ज्ञातीस भूषणावह आहे.

शास्त्रीबुवा विद्वान असले तरी मनाचे मोकळे व निगर्वी आहेत. राहणी साधी, बोलणें प्रेमळ, ह्या सर्वत्र गुणसमुच्चयाचा अनुभव त्यांचा परिचय घडला नाहीं. अशानां येणें कठिण.

मोनार्कीत 'राजा करील ती पूर्वदिशा' 'हम करेसो कायदा' एकतंत्री राज्यपद्धति 'प्रजेच्या हक्कांची पायमल्ली' 'तिजोरीत तूट' 'अधिकारी लोकांची चंगळ' 'अधिकार त्यांचा व्यवहार' 'गावे त्यास फावे' 'अधिकारी लोकांकडून तिजोरींतील पैशांची पाहिजे तशी उधळपट्टी' प्रजेवर जुलूम व अनेक कर' अशा अनेक कारणामुळें प्रजेंतील बिन अधिकारी व प्रजापक्षीय लोकांस मोनार्की नकोशी होऊन त्यांनीं प्रजेच्या सहाय्यानें ती नाहींशी करून तिच्याजागीं रेपुब्लिक निर्माण केल्यास आजका १०।१२ वर्षे होत आलीं. पण इतक्या अवधींत ज्या कारणामुळें मोनार्की नाहींशी झाली, तीं कारणें मोनार्कीबरोबर नाहींशी व्हावयाचीं, तीं मात्र नाहींशी झालीं नाहींत, तर उत्तरोत्तर रेपुब्लिक या गोड व सुंदर नावांखालीं वृद्धिंगतच होत असल्याचीं दिसून येतात. सांप्रतचें रेपुब्लिक ह्मणजे नांवाप्रमाणें खरें रेपुब्लिक दिसत नसून, रेपुब्लिक या नावांखालीं दिवसाढवळ्या सांवळा गोंधळ घालणाऱ्यांचा तो एक प्रकारचा ब्युराक्रसीचा तमाशा किंवा फार्स असल्याचें दिसून येतें. खरें रेपुब्लिक ह्मणजे प्रजासत्तात्मक [Governo do povo pelo povo)असावयाचें व त्यांत प्रजेस हितकर तेंच घडून यावयाचें. तूर्तचें रेपुब्लिक ह्मणजे अधिकारी सत्तात्मक प्रजेवरील राज्य(Governo da Burocracia sobre o povo] असल्याचें दिसून येतें. व त्यांत अधिकाऱ्यांस हितकर तेंच घडून येऊन, प्रजेचें अहित होत असलेलें दिसून येतें. मोनार्की हें नांव व ब्रागांसराजघराणें हीं मात्र नाहींशीं झालीं खरी, पण रेपुब्लिक ह्या नांवाखालीं मोनार्कीतीच दुष्ट पद्धत वावरत असल्याची दृष्टीस पडते. व या पद्धतींत रेपुब्लिकचा नुसता वर वर तमाशा किंवा फार्स दाखविण्याचा मात्र प्रकार दिसतो. ह्मणजे नांवात फरक पण कृती पूर्वींचीच !

ऊंस ज्याप्रमाणें चरकांत पिळला जाऊन निःसत्व होतो, त्याप्रमाणें जर प्रजा अधिकाऱ्यांच्या चरकांत पिळली जाऊन निःसत्व झाली, तर ती जगेल कशी ह्मणायाचो शंकाच आहे. आधींच महर्घतेच्या चरकांत पिळली जाऊन, त्यांतून कशी बशी जीव धारण करून राहिलेली प्रजा, अधिकाऱ्यांचे चोंचले पुरविण्यासाठीं वाढविलेल्या पगाराची भरती करण्यासाठीं वाढविलेल्या व नवीन घातलेल्या व घालूं पाहणाऱ्या अनेक करांच्या चरक्यांत जर पिळली गेली, तर ती जगण्याची आशा थोडीच !

युरोपांतील महायुद्धानें जगावर महर्घतेची आपत्ति आणून सोडिली आणि पोर्तुगालांतील रेपुब्लिकनें आपल्या गरीब प्रजेवर करांची आपत्ति आणून टाकिली ! अशा ह्या दोन आपत्तींच्या कातरींत सांपडलेली मूठभर गोमांतकीय गरीब प्रजा, त्यांशीं कशी टक्कर मारून निभावेल, याचा अंदाज करण्यास भविष्यवाद्यापाशीं जाण्याची जरूरी नाहीं. तो प्रत्येकास सहज करितां येणासारखा आहे.

पहा, तूर्तच्या मनूंत प्रजेची कशी दैनावस्था आहे ती—

जे तांदळांचा मोण पूर्वी ८।१० रुपयांस मिळत असे, त्यास आतां १५।२० रुपये पडतात. मीठ, मिर्च्या, कांदे, दाळ, तेल, गूळ, साखर, गहूं, मूग इत्याद्यनेक आद्य आवश्यकतेच्या जिन्नसाची(artigos) किंमती पूर्वी पेक्षां आतां दुप्पटी-तिप्पटीनें वाढलेल्या आहेत वस्त्रप्रावरणाची. किंमत तर चौपटीवर गेली आहे. मोल मजुरीही फारच वाढली आहे. ह्मणजे पूर्वी जर मजूर दोन तीन आण्यास मिळत असत, तर ते आतां आठ, बारा, किंवा रुपया दर दिवसास मजूरी मागतात. अशी प्रत्येक वस्तूची किंमत वाढलेली आहे. वस्तूच्या किंमती वाढलेल्या आहेत ह्मणून खर्चांत काटकसर होण्याची नाहीं. कारण जग जसजसें सुधारत जात आहे, तसतशा मनुष्याच्या गरजा वाढत जावून खर्चही फार होऊं लागला आहे. पण खर्च वाढूं लागला आहे, त्या मानानें उत्पन्न वाढूं लागलेलें नाहीं. जरी उत्पन्नांच्या किंमतींत वाढ होत असली, तरी ती वाढ सतत टिकत नाहीं. कमजास्त होते. उत्पन्नाच्या किंमतींत कमजास्तपणा होतो, तद्वत उत्पन्नांतही कमजास्तपणा येतो. बहुधा उत्पन्न हें पाऊस पाणी, जमिनीची मशागत वगैरेवर अवलंबून असल्यामुळें व सांप्रत पाऊसपाण्याचा तुटवडाच असल्यामुळें किंवा दारिद्र्यामुळें व वाढत्या मजूरीमुळें जमिनीची मशागत थोडी किंवा मुळींच होत नसल्यामुळें तर तें कमीच येतें. अशा ह्या दुष्काळ स्थितींत करांचा जर सुकाळ झाला व उठल्या सुटल्यास करांचें शेंपूट, मारुतीच्या शेंपटाप्रमाणें वाढूं लागून त्यांत जर गरीब बापडी प्रजा बांधली गेली, तर ती बिचारी स्वकीय देहांत जीव धारण करून कशी राहील, हें समजत नाहीं.

जमीनदारांची स्थिति तर फारच शोचनीय आहे. 'जितका व्याप, तितका संताप' हा न्याय जरी खरा आहे व 'महापूरांत झाडें जाती व तेथें लव्हाळें वांचती' असा जरी सिद्धांत आहे, तरी चालू महर्घतेच्या पुरांत लव्हाळेच (ह्मणचे लहान लहान जमिनदार) वाहून जाण्याचा विशेष संभव आहे. सरकारी नोकर, मजूर, व्यापारी, किंवा, मोठमोठे जमीनदार या महर्घतेच्या महापुरांत वाहून जाण्याचा तितका संभव नाहीं, कारण महागाईचा पूर वाढत जातो तस तसा त्याच्या वस्तूच्या किंमतीचा पूरही वाढत जातो. या महर्घतेंत व्यापारावर कर बसविला तर व्यापारी लोक आपला महाग व्यापार जास्त महाग करितील, मजूरांवर कर बसविला तर ते आपली मजूरी वाढवितील, मोठमोठ्या जमिनदारांवर कर बसविला तर तेही त्यांतून कसे बसे निभावतील, सरकारी नोकरांवर तर कर मुळींच बसत नसतो. उलट महागाईच्या निमित्तानें त्यांच्यासाठीं करांची वाढ करण्यांत येऊन, ती बिचाऱ्या गरीब प्रजेवर लादण्यांत येते. जणूं काय या गरीब प्रजेस महागाई लागत नाहीं. असो. येऊन जाऊन राहिले ते गरीब बापडे लहान लहान जमिनदार. यांची मात्र बिकट स्थिति ! असें आहे तरी महर्घता ही सर्वांसच डाचते आहे आणि त्यांतही कर वाढूं लागले तर तेही सर्वांसच कमी अधिक प्रमाणानें बाधक झाल्यावांचून राहणार नाहींत. मग अशा स्थितींत गरीब बापडी प्रजा आपला संसार सुखाचा कसा करील ? कारण सर्वच जर वाढूं लागलें, तर ही वाढ सोसणार व देणार कोण ? अर्थात ज्या प्रजेचा संसार सुखाचा नाहीं. तिथें सुराज्य(republica) आहे असें कोणी ह्मणावें ?

सर्व बाबतींत दिवसेंदिवस जर वाढच होत जाईल व तीस जर वेळींच आळा पडला नाहीं, तर प्रजेची फारच दुःस्थिति झाल्याविना राहणार नाहीं. ही दुःस्थिति नाहींशी करण्याचा प्रयत्न जर प्रजापक्षीय सरकार कडून झाला नाहीं, तर तो लोकांकडून तरी व्हावयास पाहिजे. पुराणांतील मेरू पर्वत ज्या प्रमाणें उंच उंच वाढूं लागून गगन मंडळास पोंचला व दिनकरास आच्छादून टाकून सर्व लोकांचे व्यवहार बंद पाडिले तसाच तूर्तच्या वाढीचा (aumentos) प्रकार होण्याचा संभव दिसतो. तेव्हां ज्या प्रमाणें पुराणकाळच्या लोकांनीं मेरू पर्वताची वाढ खुंटवून, तो पुनः जमीनदोस्त होण्याचा प्रयत्न केला, ह्मणजे अगस्ती ऋषीस त्याच्या समोर पाठवून त्यास जमिनदोस्त करून टाकिला. तद्वत सांप्रतच्या सरकारकडून नाहीं तर सगळ्या जनतेकडून तरी सर्व बाबतींतील वाढ विशेषत: करांच्या बाबतींत तरी नाहींशी होण्यास कांहीं उपाय होणें जरूर आहे.

सांप्रतच्या महर्घतेंत कराची वाढ करून प्रजेचा जीवनकलह भयंकर करण्याच्या ऐवजीं जर रेपुब्लिकन सरकारकडून उद्योगधंद्याची वाढ, शेती भातीची वाढ, कलाकौशल्याची वाढ झाली असती, तर सरकारचे प्रजेवर मोठे उपकार झाले असते व प्रजाही सरकारास कृतज्ञ राहिली असती व तेव्हांच लोकांचें खरें राज्य [republica] ह्मणतां आलें असतें. आणि प्रजेकडूनही मग आनंदानें किंचित कर वाढ सोसण्यांत आली असती पण रेपुब्लिकन सरकार आपलें प्रजेच्या उन्नतीचें खरें कर्तव्य विसरून जाऊन उपकाराच्या ऐवजीं अपकारच करूं लागलें आहे, असें मोठ्या खेदानें ह्मणावें लागतें.

बरें, इतकी करवाढ करूनही कामें बरोबर होतात काय ? प्रजा आपण स्वतः अनशेपोटीं राहून, आपल्या निढळाच्या घामाचा पैसा करांच्या रूपानें सरकारी तिजोरींत ओतीत आहे. तरी तिजोरीची भरती होते काय ? दोन्हीं प्रश्नांस 'नाहीं' हेंच उत्तर होय. मार्ग सुस्थितींत नाहींत; नदी वरील पूल कांहीं अर्धवट स्थितींत असलेलें तर कांहीं पडीत स्थितींत राहिलेले; धक्के 'पाण्यास्तम्पयन्तु' झालेले; वाफूर मोडकळीस आलेले, पूर्ण झालेलीं कामें दुरुस्तीच्या अभावीं मोडकळीच्या मार्गास लागलेलीं ! तिजोरीचें पोट तर सदांच रिकामी झालेलें !

प्रजेची दुःस्थिति समजून घेण्यास, राज्यांत काय काय प्रकार चालले आहेत, ते जाणण्यास सरकारची फेरी किंवा दौरा वर्षांतून एकदां तरी राज्यांतून झाली पाहिजे. व ती शहरांतूनच नव्हे, तर प्रत्येक खेड्यापाड्यांतून सुद्धां व्हावयास पाहिजे आणि तेव्हांच प्रजेची दुःस्थिति सरकारास कळून येईल. मात्र लोकांनीं तेव्हां आपल्या दारिद्र्याचें खरें प्रदर्शन करण्याऐवजीं खोट्या, दिखाऊ व बनावट श्रीमंतीचें प्रदर्शन करितां कामा नये. कारण असें केलें ह्मणजे मग त्याचा परिणाम अनर्थकारक होतो. हें का. फ्रेत रिबैर व सध्याचे गव्हर्नरच्या स्वारीच्या फेरीच्या प्रसंगीं लोकांस कळून चुकलेंच असेल.

कदाचित् सरकार डोळे उघडून प्रजेची दुःस्थिति अवलोकन न करील, तर ती सरकारच्या नजरेसमोर, लोक प्रतिनिधींनीं [representantes do povo] तरी आणिली पाहिजे व या कामीं त्यांनीं तरी आपण निवडून आलेल्या तालुक्यांतील प्रत्येक गावांतूनच फिरून लोकस्थितीची खरी जाणीव करून घेतली पाहिजे, नपेक्षां दरबारखान्यांत बसून स्वतःच्या विचारास येईल तें किंवा सरकारच्या विचारास येईल तें 'होय किंवा नाहीं' करून, शेवटीं सरकारच्या रोषास पात्र न होण्याच्या इरादानें आपणांस ज्यांनीं निवडून दिलें, त्यांशीं कृतघ्न होऊन, आपला मनोरथ सरकारकडून सिद्ध करून घेण्याकरितां, सरकारचीच शेवटीं 'री' ओढून प्रजेवर करांचें ओझें लादण्यांत हातभार लावून उपकाराचा मोबदला अपकारानें तरी फेडला पाहिजे. आणि ह्यांचें काम सभासदाच्या संस्थानीं तरी करायास पाहिजे; न पेक्षां सर्वांनींच आपआपल्या इष्ट हेतु सिध्यर्थ प्रासंगिक चळवळ व कामें करून शेवटीं मुग्धावस्था स्वीकारून रहाणें हें केव्हांच कोणासही इष्ट नव्हे. कारण त्या योगें सर्वांनाच—खाजगी जरी कांहींच फायदा झाला तरी—सार्वत्रिक नुकसान हें सोसावें लागणारच व सरकारासही 'हम करेसो कायदा' इष्ट नाहीं. कारण त्या योगें रशिया सारखी भयंकर स्थिति प्राप्त होण्याचा संभव फार, हें सरकारनें पक्कें लक्षांत ठेवून आपल्या राज्यकारभाराची योग्य दिशा ठेवावी एवढें प्रांजळपणें सुचवून हा [illegible] लेख येथेंच संपवितों.

एस एच

एक सूचना

महाराष्ट्रांत सार्वजनिक रीतीनें देवतांचे उत्सव करून एक प्रकारचें धार्मिक व सामाजिक संमेलन करण्याचा प्रघात लो. टिळकानीं सुरू केल्यापासून त्याचीं गोड फळें दिसूं लागलीं आहेत. विशेषतः श्री गणपत्युत्सवानें सर्व महाराष्ट्रांत कशी जागृति झाली आहे हें सर्वांस विदित आहेच. अशा प्रकारच्या सार्वजनिक उत्सवांनीं लोकांनो संघटित कार्य करण्याची संवय लागून त्यायोगें एकत्र जमून विचार विनिमय करतां येतो. गोमांतकांतही अशा प्रकारचे कांहीं उत्सव चालू आहेतच. तथापि गणपति ही सर्वांची देवता असून प्रत्येक धर्मकार्यांत विघ्नहर्ता ह्मणून त्यास अग्रपूजेचा मान देण्यांत येतो.

महाराष्ट्राप्रमाणें हाही उत्सव येथें सुरू केल्यास गोमांतकांत एक नवीन संघटनेची भर पडेल.

तरी गोमांतकस्थ सर्व बांधवांस गांवोगांव अशा प्रकारचे सार्वजनिक स्वरूपाचें गणपत्युत्सव करून धार्मिक व सामाजिक जागृति करण्यास उत्साहानें पुढें यावें अशी विनंति आहे.

यंदां पणजी येथें कांहीं तरुण उत्साही मंडळीनीं सार्वजनिक गणपती बसवून पांच दिवस पर्यंत व्याख्यानें, पुराणें, कीर्तनें वगैरे प्रकारानें ज्ञानसत्र उघडण्याचें ठरविलें आहे असें कळतें. ही गोष्ट खरी असल्यास पणजीची तरुण मंडळी स्तुतीस पात्र आहे. त्यानीं कोणत्याही अडचणींस न जुमानतां हें विघ्नहराचें कार्य अवश्य हातीं घ्यावें व इतरानींही त्यांचे अनुकरण गावोगांव करावें अशी विनंति आहे.

एक गोमांतकस्थ

ANO VII — NUMERO 22 — 1922

QUEPEM QUINTA—FEIRA 7 DE SETEMBRO

Director e Editor
[Go]vinda P. Hegdo Dessai
Assinatura
[Índi]a Portuguesa...... 3-00-00
[Índia] Inglesa.............. 3-08-00
[Nume]ro Avulso.........0-01-00
Anuncios
[Prec]io por linha...... 00-01-00
[A l]ongo praso contrato es[pecial]

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)...... १-००-००
ब्रिटिश इंडिया.......... १-०८-००
किरकोळ अंकास........ ०-०१-००
जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमचा जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

[व]र्ष ७ वें.] केपें, गुरुवार, तारीख ७ माहे सप्टेंबर सन १९२२ [खास अंक २२ वा

Pelos Liceus

O *Bharat*, se não é àvido duma popularidade barata, não é, tambem, amigo do sorriso protector da burocracia reinante. Nem uma nem outra coisa o preocupam minimamente, circunscrevendo-se a esfera de sua acção ao seguinte principio: "Cumpra cada um o seu dever sem esperança nos resultados".

Pouco lhe importa, portanto, que duma e doutra banda surjam comentos desfavoraveis mas *parciais* á sua orientação que nem porisso o *Bharat* se arredará um apice se quere do recto caminho de *esclarecer* com afirmações verdadeiras, escrupulosamente formuladas.

Fazemos estas considerações preambulares para que ninguem se dê o incomodo de malsinar-nos as intenções que são sinceras, sempre desprovidas do interesse *castista* ou *classista* e despidas da côr... *politica.*

E' a essa orientação insuspeita que se subordinou sempre a nossa critica jornalistica na qual esforçamo-nos por não atingir nunca a vida privada de cidadãos. São factos que dispensam a prova.

Pois bem. Tambem á mesma orientação obedeceram os nossos reparos sobre a guerra franca, declarada aos candidatos hindus para professores nos Liceus de Nova-Goa e Margão.

O Sr. Ramachondra Sridar Poi foi classificado *legalmente* para ocupar *competentemente* uma das vagas de professor provisorio do Liceu Central de Nova-Goa. E, todavia, chegada a sua vez, é injustamente posto de lado.

O sr. Atmarama Xembú Poi Palondicar devia, igualmente, ser nomeado para o lugar dum professor auxiliar do Liceu Municipal de Margão, mas o director deste estabelecimento recebeu á ultima hora tantos pedidos da transferencia para o ensino domestico de *alunos cristãos do 2° ano* que, máu grado seu, viu-se na dura necessidade de pro[por] ao Governo a desnecessi[dade d]a mesma nomeação.

[Não] é significativo o ines[perado apa]recimento de pedi[do]s da transferen[cia, sendo o es]tado sanitario da vila de Margão ser dos milhores e não serem nada reprovaveis as condições higienicas do edificio, onde funcciona o Liceu Municipal da mesma vila?

Dir-se-há, porem, que os aludidos hindus são novos e sem pratica de leccionamento e, porisso, a sua entrada nos Liceus, ainda que legal, seria prejudicial ao ensino.

Tal objecção não *pega*, sabido que todos os professores que actualmente ocupam diversas cadeiras daqueles estabelecimentos não se sujeitaram ás previas provas d*arte de saber leccionar*...

Podemos mesmo afirmar sem receio de desmentido, que os jovens, inteligentes e bem formados Pois não são em nada inferiores a muitos daqueles que hoje competentemente desempenham as funcções de professores nos Liceus de que se trata.

¿ E' nestas condições discabida a suspeita que nos assalta o espirito de que nos casos a que nos referimos campêa infrene o odio á classe hindu? Que no-lo digam.

E terminamos o presente artigo com a seguinte carta do sr. *Amadeu Sancada*, da epigrafe de *Um caso bastante curioso no Liceu Central:*-

"O Liceu Central Afonso de Albuquerque resolvên abrir novo concurso para o provimento de duas vagas para professores provisorios do mesmo, existindo ainda um candidato que recebeu guia para se apresentar á junta mas Sua Ecia o Sr. Governador Geral atendendo que o candidato pela 1a. vez ia leccionar, nomeou dois oficiais do exercito.

Resolveu o Conselho Escolar do liceu abrir novo concurso, mas não sei baseado em que, visto o regulamento, tanto o de 1905 como o de 1919 nos seus artigos constatai o seguinte:

"Quando se derem quaisquer vagas neste estabelecimento, abrir-se-há um concurso documental e feita a classificação, serão mandadas as propostas pela Reitoria, ao Governo e este em portaria nomea-los-há.

Caso a vaga seja dum professor efectivo, como ao presente, o professor provisorio mais classificado será nomeado professor interino e será nomeado um outro em substituição do provisorio mais classificado."

Pois o que se dá no Liceu Central é só isto, e resolvem abrir um novo concurso havendo ainda um candidato que deve ser nomeado professor.

O Conselho resolveu mas os competentes não devem deixar passar semilhante facto de injustiça, principalmente no Liceu que é a unica escola do curso secundario neste nosso paiz.

O candidato a professor é o Sr. Ramachondra Sridora Poi que possui documentos superiores a muitos que ali leccionam.

E' de todos conhecido o talento daquele rapaz que requereu para o logar de professor provisorio e injustamente classificado ainda lhe fazem guerra.

O candidato reclamou contra o que o Conselho resolveu e porisso espero que S Ecia. o Sr. Governador abra os olhos contra tal irregularidade praticada que será uma vergonha para o povo se fôr nomeado algum outro candidato do novo concurso que o Conselho Escolar resolveu abrir.

ECOS & CRITICA

Gremio Literario Hindu

Esta simpatica associação vai breve promover uma conferencia do talentoso e proficiente professor e homem de letras sr. dr. Benedito Gomes.

Louvamos, sinceramente, este digno passo do popular Gremio, constituido, na sua maioria, pela briosa Academia Hindu que sempre merece ao *Bharat* a mais cordial estima.

Prof. Visvonata Sirvoicar

Está já á testa da escola primaria da cassabé o distincto professor sr. Visvonata Siurama S. Sirvoicar qué é tambem um espirito culto como poucos que cá existem.

O sr. Sirvoicar não é só professor distincto e espirito culto: ê tambem um patriota sincero que sem exibicionismos baratos está servindo ao Paiz, como exemplar educador das crianças que o ê.

O *Bharat*, juntamente com a cassabē, réjubila-se imenso pela colocação de Sua Excia na referida escola.

Sa' Manta

A partir do seguinte numero do *Bharāt*, encetaremos a publicação da serie de brilhantes artigos do *sr. Sa' Manta* sobre a origem do Shivagi, artigos que prometem produzir grande sensação no Paiz.

A proposito acusamos tambem a recepção dos artigos do escritor publico sr. Voicunta Suria Rau Sar Dessai e do nosso assiduo colaborador sr. *Mesmo*, os quais o *Bharat* inserirá nas suas colunas com maximo prazer, na primeira oportunidade.

Divertido mas ilogico!

A Direcção das Obras Publicas acaba de praticar um acto que ē, sem duvida, divertido mas é...ilogico.

Referimo-nos áquele em virtude do qual mandou pagar ao empreteiro da obra da ponte de Sanguem que não terminou o seu trabalho, deixando de ordenar o pagamento ao empreteiro da mesma obra que há já tempo deu por concluida a sua missãs!

¿ Que dizem a isto, hein? E' que a Justiça humana nem sempre ē justa e que nem sempre a Direcção das Publicas Obras e *direita*...

Ainda é cedo!

Na Secção " Diz-se... " do nosso colega "Diario da Noite" lê-se:

"Que foi aprovada com varias modificações a Reforma do Ensino, da autoria do Sr. Dr. Jaime de Moraes, na parte relativa ao ensino primario e secundario.

Que desde que se soube dessa aprovação até a presente hora foram dirigidos para a Metropole proximamente 50 telegramas."

Muita coisa se tem dito na referida secção daquele nosso colega da capital, sem fundamento algum, mas a noticia que acabamos de transcrever deve ser verdadeira, por isso convinha saber-se a quem foram dirigidos os 50 telegramas expedidos para Lisboa, certamente polos que pretendem a nichar-se nos novos lugares creados pela Reforma do Ensino.

Comquanto saibamos de antemão que vamos desagradar a muitos que provavelmente vão ficar desiludidos, podemos

दामि घुपसत राहतो तो निराळाच ! वास्तविक पाहतां तत्त्व हें निराळें व व्यक्तिहि निराळी. वादाच्या सामन्यांत एकाचा संबंध दुसऱ्याशीं नसतो. पण कित्येक लोक ही साधी गोष्ट वादाच्या भरांत पार विसरून जातात व विनाकारण शांतिभंगाचें पाप आपल्या पदरीं बांधून घेतात. आमच्या गोमांतकभक्तांची लेखनपद्धति होतां होईतों निर्दोष रहावी म्हणून त्यांनीं यापुढें आपल्या लेखांत व्यक्तिविषयक चर्चेस थारा देऊं नये अशी आमची त्यांस प्रेमळ सूचना आहे.

आमचा ठराव:— निदान आम्ही तरी या पुढें व्यक्तिविषयक चर्चेनें व्यापलेल्या वादविषयक कोणत्याहि मजकुरास थारा न देण्याचें अगदीं पक्कें ठरविलें आहे. मग त्यापासून आम्हांस कोणाचाहि रोष सहन करावा लागला तरी हरकत नाहीं ! कुत्सित बुद्धीनें लिहिलेल्या आपल्या टवाळ व चवचाल लेखांस 'भारतांत' जागा न मिळाल्यामुळें पुष्कळ भाईबंधांनीं आम्हां विरुद्ध, तोंडीं व लेखी, नसत्या आळांचें अवडंबर रचण्याचा वेळीं अवेळीं अव्यापारेषु व्यापार करण्यास कमी केलेलें नाहीं. पण असल्या बुजगावण्यानीं भंग होण्यासारखी आमची मनःशांति लेची पेची नाहीं, ही आम्हीं परमेश्वराची अपूर्व देणगी समजतों. शिवाय 'सत्यमेव जयते' या तत्त्वावर आमची पूर्ण भिस्त असल्यामुळें, आम्हां विरुद्ध बाणून बुजून पसरण्यांत येत असलेल्या गैरसमजांविषयीं आम्हीं पूर्ण बेफिकीर असतों, याची साक्ष अनेकांस पटलेलीच आहे. असो. तात्पर्य काय कीं, कसल्याहि अवकृपेची पर्वा न बाळगतां 'भारत' उपरोक्त ठराव अक्षरशः पाळण्यास मागें पुढें पहाणार नाहीं.

कोण हा मूर्खपणा ! :— 'मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाहीं' या म्हणीचें रूपांतर 'मेल्याशिवाय धक्के सुधरत नाहींत' असें केल्यास अतिशयोक्तीचें माप् माथीं बसेल असें वाटत नाहीं ! सरकारी वाफरचे धक्के मोडून प्रवाशांचे हाल होऊं लागल्यास आज किती तरी महिने झाले. परंतु धक्यांची शोचनीय स्थिति कायम आहे ती आहेच ! कोण हा सरकारचा मूर्खपणा ! असला मूर्खपणा ज्याच्या नखशिखांत ओतप्रत भरून गेलेला आहे, अशा गचाळ सरकारनें नाव्हेगासांव सारखी महत्त्वाची बाब आपल्या अक्कलशून्य डोक्यावर कां घ्यावी हें समजणें फार कठिण आहे ! पण कोळसा उगळावा तितका काळाच !

हिंदु व खिस्ती:— लिसेवच्या एक दोन प्रोफेसरच्या नेमणुकींत उघड झालेल्या धोरणामुळें 'हिंदु व खिस्ती' असे दोन पक्ष उत्पन्न होऊं पहात असून त्यांचा परिणाम राष्ट्रहिताला फार विघातक होणार आहे. पोर्तुगीज भागांत याविषयीं सांगोपांग चर्चा चालू आहेच. आमच्या बंधूनीं सावध रहाण्याविषयीं आगगाडींतील धोक्याच्या सूचनेवजा त्या गोष्टीचा येथें उल्लेख मात्र केला जात आहे. विशेष चर्चा सवडीनुसार होईलच.

— काकोडे येथील यंदांचा सप्ताह मोठ्या उत्साहानें पार पडला. क्षत्रिय मराठे व सारस्वत ब्राह्मण या उभय वर्गांतील एकोप्याचें फळ उपरोक्त गोष्टींवरून दिसून आल्यास नवल नाहीं.

— ... अडीच रुपयाच्या ... चालू झाल्या.

लिसेइस्तांवरील नसते आळ

नं. २

प्रीय भारतकर्ते यांस—आपल्या लोकप्रीय वृत्तपत्रांत 'दुर्दैवाचे विचित्र पुतळे' या लेखास मी दिलेल्या उत्तरानंतर लिसेवांतील शिक्षण असें नांव असलेला व नावांप्रमाणें कृति न करणारा बेजबाबदार लेख व लागोपाठ त्याचा वडील भाऊ 'दुर्दैवाचे विचित्र पुतळे न. २, हा लेख मला वाचावयास मिळाला.

खरें पाहिलें असतां मागील लेखांत मीं त्यांचे मुद्दे खोडले असून मुद्दां उगाच फाजील चिवटपणा धरून मारे कॉलमच्या कॉलम भरडपट्टी खरडणाऱ्या भोंसल्यांस मी उत्तरच न द्यावयास पाहिजे होतें. पण मूळ मुद्यांस सोडून गेलेल्या त्यांच्या विचारांस ताळ्यावर आणण्याकरतांच आपल्या मतानें कांठोकांठ भरलेल्या त्यांच्या बुद्धिमत्तेच्या घड्यावर मी निष्फळ पाणी ओतीत आहें.

समजा, रा. भोंसल्यांच्या मताप्रमाणें आम्हीं भराभर लिसेव सोडले, तर राज्यकर्त्याकडून विशेष प्रकारचे हक्क आम्हीं कोणत्या भाषेच्या सहायानें घेऊं ? निवडणुका हिंदूंच्या वतीनें कशा होणार ? कौन्सिलांतल्या आम्हांस हानिकारक अशा बिलांपासून आमचें रक्षण कोण करणार ? पोर्तुगीज भाषेच्या सहायानें इथल्या नेटीव खिश्चनांनीं मोठमोठ्या सर्व जागा व्यापल्यावर, आमच्या पोटावर चाललेल्या त्यांच्या थैमानास अटकाव कोण करणार ? इंग्रजी शिकावें वगैरे कानांस गोड वाटणारे असे युक्तिवाद सांगण्यापेक्षां विशेष स्पष्ट रीतीनें एकदम इंग्रजी हिंदुस्थानांत जाऊन आमचें गोंय गोवें येथील बाप्या खिश्चनांना खालीं करून द्यावें असें ते कां म्हणत नाहींत !

माझ्या लेखांत निर्दिष्ट केलेल्या मुद्यांचें उत्तर सुसंगत रीतीनें रा. भोंसले जोंपर्यंत न देतील तों पर्यंत त्यांचा प्रयत्न सफळ झाला असें कोणताही सूज्ञ वाचक म्हणणार नाहीं. अनेक जाडे जाडे शब्द व इंग्लिशच्या डझन अपशब्द यांनीं कांहीं मुद्दे खोडले जात नसतात हें रा. भोंसल्यानीं ध्यानांत धरावें.

माझ्या लिसेवांतल्या थोड्याशा शिक्षणांचा व मी निर्दिष्ट केलेल्या मुद्यांचा परस्पर संबंध काय ? रा. भोंसल्यास व्यक्तिद्वेष किंवा शब्दछल करावयाचा आहे काय ? जर तसें नसतें तर 'बायकी थाटाचें नांव असलेला लेख' 'सेगुंद ग्रावाच्या येशामीचा परिणाम' 'विचित्र' मग काय होईल तें होईल असा संकल्प करून लिहिणारास 'अविचारी' 'अद्वातद्वा विचारसरणीवाला' 'ठोंग्या' 'उलथा घडा' उतावळा हे शब्द वापरणाचें त्यानां कारण काय ?

कोंकणी भाषेसंबंधीं मी केलेल्या स्पष्टिकरणास व आणखी एक दोन मुद्यांस योग्य उत्तर देतां येत नाहीं असें त्यांस वाट त्यामुळें तो विषयच इतक्या घोटाळ्याचा आहे कीं, असंबद्धतेच्या योगानें न समजल्यामुळें यास उत्तर देणें योग्य नाहीं. अशी गुळगुळीत वाक्यांची पळवाट रा. भोंसल्यानीं चांगलीच शोधून काढली म्हणावयाची !

म्हणे लिसेवाच्या शिक्षणांचा चांगला उपयोग व्हावयाचा राहून अत्यंत घातुक परिणाम झालेले आहेत ! आज लिसेवांतले चारशें पांचशें मुलांचे पालक खुळे व त्यानां बुद्धि शिकवूं पहाणारे हे भोंसले शहाणे ! ही गोष्ट निदान रा. भोंसल्यांच्या मनाला तरी खरी वाटत असेल काय ?

आम्हीं कसले वेडेचार केले आहेत ! या सिध्या प्रश्नांस उत्तर द्यावयाचें सोडून उलट ठोंग्या ही शिवी हांसडण्यांत त्यांनीं पुरुषार्थ मानला आहे !!

आपल्या लेखाचा मतितार्थ मला समजलेला नाहीं वगैरे असल्याच कांहीं गुळमुळीत वाक्यांनीं पळवाट काढण्याचे दिवस निदान सध्या तरी उरले नाहींत. हें रा. भोंसल्यांनीं खूप समजावें. मला जर लेख नं. १ समजला नाहीं तर लेख नं. २ तरी कां समजावा ? ज्यानां आपण केलेल्या विधानाचें नीट समर्थन करतां येत नाहीं त्यानीं लेख तरी कां लिहावे ?

मालवीय, घोष, दास वगैरे पांच पंचवीस नांवें एका सपाट्यानें घेणाऱ्या रा. भोंसल्यांस मी इतकेंच विचारतों कीं हिंदुस्थान केवढें व गोंयें केवढें ? हिंदुस्थानची लोकसंख्या व गोंयाची लोकसंख्या यांची तुलना तरी करतां येते काय ? हिंदुस्थानच्या १४०० विद्वानांस किंवा पुढाऱ्यांस गोंयांत एक विद्वान अथवा पुढारी पडतो. शिवाय हिंदुस्थानच्या सारखी अनेक देशभक्त आपोआप होण्यासारखी—सुदैवाची म्हणा अगर दुर्दैवाची म्हणा परिस्थिति गोंयांस सध्यापर्यंत तरी नाहीं.

अनेक ढोबळ व ऱ्हस्व दीर्घाच्या चुका ज्यांच्या लेखांत आढळतात त्यांनीं दुसऱ्यांस व्याकरण शिकविण्यांचा हास्यास्पद आव कां आणावा? उलट पक्षीं आपल्या नं. २ च्या सदरांत निर्दिष्ट केलेले शब्द प्रयोग चूका आहेत असें त्यानीं सिद्ध करावें नाहीं तर मी त्यांस जाहीर रीतीनें ठोंग्या म्हणेन.

'भरत खंडांत इंग्रजी शिकलेल्या लोकांनीं स्वदेशाभिमान जागृत केला' हें म्हणणें जरी खरें असलें तरी तो इंग्रजी शिक्षणानें उत्पन्न केला हें म्हणणें अयुक्तिक दिसतें. याचें कारण इंग्रजीच्या सहायानें त्यांस झालेलें वस्तुस्थितिज्ञान हेंच होय. इंग्रजी विद्याविहीन लोकसुद्धां जाज्वल्य देशभक्त असतात. आमच्या राष्ट्रांत जे पूर्वीं अनेक नरपुत्र होऊन गेले ते इंग्रजी शिकले होते काय ?

अधिकाराच्या धुंदींत तारवटलेल्या अधिकाऱ्यांची गुर्मी जर कोणीं नरम केली असेल तर आम्हीं लिसेइस्तांनीं—किंवा भोंसल्यांच्या दृष्टीनें पाहिल्यास- दुर्दैवाच्या विचित्र पुतळ्यानीं केलेल्या गांधी टोपी चळवळीनेंच होय.

गेल्या दोन चार महिन्यापासून एक दोन लेखक (!) व्यक्तिद्वेष किंवा क्षुल्लक गैरसमज यांस बळी पडून लिसेवाच्या नांवांवर खडे फोडीत असतात, त्यांना मी इतकेंच सुचवितों कीं सध्या लिसेवांत जो गोंधळ चालत आहे त्याचें कारण लिसेवांतील 'शिक्षण दोष' हें नसून शिक्षकांचा व शिक्षणपद्धतीचा दोष हें होय.

यापुढें तरी रा. भोंसले हे ताळ्यावर येतील व इतरहि लेखक उगीच कांहीं तरी न लिहितां आपले याच संबंधाचे मननीय विचार प्रदर्शित करतील अशी आशा करतों

— भारतमित्र श्री. वोडस, खोळकर रायतूरकर, इत्यादिकाचे लेख स्थलाभावीं सवडीनुसार पण खात्रीनें प्रसिद्ध होतील.

इंग्रजी वाङ्मय जरी केवढेंही मोठें असलें तरी आम्हां गोमांतकस्यांस पोर्तुगीज भाषेच्या मानानें तें इकडे निरुपयोगीच आहे असें म्हटलें तरी चालेल. बाकी दुय्यम शिक्षण या नात्यानें जर तें पदरीं असलें तर फार चांगलें. असो. मूर्त इतकेंच सांगून आपला निरोप घेतों.

शळापकीकर

पोर्तुगीज विरुद्ध इंग्लिश

भारताच्या गेल्या तीन अंकांपासून "दुर्दैवाचे विचित्र पुतळे" व "लिसेइस्तांवरील नुसते आळ" या मथळ्यांखालीं पोर्तुगीज व इंग्लिश शिक्षणाविषयीं चर्चा चाललेली आहे. ती वाचून मलाही त्याविषयीं जे विचार सुचले ते लिहावेसे वाटले. म्हणून हा लेख लिहिण्याचें मी धाडस करीत आहे.

कांहीं जणाचें मत असें आहे कीं, इंग्रजी विद्या ही जणुं वाघिणीचें दूध आहे. आणि त्याच दुधाच्या जोरावर आम्ही स्वतंत्र होऊं. पण इथें सहजच असा एक प्रश्न उद्भवतो कीं, शिवाजी सारखे, महादजी सारखे अशा मोंगलांशीं झगडून, स्वतंत्र मिळविणारे, राजकारणपटु इ. जे वीरपुरुष इतिहासामध्यें प्रसिद्ध आहेत ते कुठें हें वाघिणीचें दूध (इंग्रजी शिक्षण) प्यायाला गेले होते ? असो. रा. भोंसले लिहितात कीं तुम्हीं हें पोर्तुगीज शिक्षण सोडून ज्या शिक्षणापासून लोकमान्य, तेलंग, रानडे गांधी इत्यादि लोकांसारखे लोक निपजतात. आणि ज्या पासून स्वातंत्र्य मिळतें असें तें वाघिणीचें दूध, म्हणजे इंग्रजी शिक्षण, मिळविण्यास जा. माझा त्यांस असा प्रश्न आहे कीं, जर तें शिक्षण स्वातंत्र्य देणारें आहे, तर म. गांधी सारखे पुढारी "तुम्हांस जर स्वराज्य पाहिजे तर इंग्रजी शाळांवर बहिष्कार घाला, तें वाघिणीचें दूध नसून मेष पाच बनविणारें एक अमली पेय आहे असें कां सांगतात ? "परीमाणचें त्याच्याविरुद्ध ओरड कां करतात ? आज शें दीडशें वर्षें पर्यंत वाघिणीचें दूध पीत असलेले लोक अजूनपर्यंत पारतंत्र्यामध्यें खितपत कां पडलेले आहेत ?

त्याचें दुसरें असें म्हणणें आहे कीं, तेथें आपलेपणाविषयीं माहिती मिळते आणि स्वाभिमानी असे पुरुष निपजतात. यावर असा प्रश्न येतो कीं, तेथें आज लक्षावधी लोक शिकत असतां स्वाभिमानी असे अवघे हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच लोक कां असावे ? तें शिक्षण जर असें गुणकारी आहे तर प्रत्येक शिकणाऱ्यास त्याचा गुण कां मिळूं नये ? थोड्यांसच कां मिळावा ? याचीं दोन कारणें असूं शकतात एक, ते लोकच तसे मद्व असले पाहिजेत, नाहीं तर शिक्षण तरी सदोष असलें पाहिजे. पहिलें कारण आम्हांस मान्य करतां येत नाहीं, कारण, पूर्वी ज्या हिंदुस्थानांत शिक्षण मिळण्यास कठीण असून तें थोड्यांसच मिळत असतां मोठमोठे नामांकित पुरुष निपजत असत, त्याच देशांत अवघ्या शेंदोनशें वर्षांच्या अवधींत लोक मद्व बनतील हें संभवनीय नाहीं. यावरून आम्हांस दुसरेंच कारण खरें म्हणावें लागतें.

परिस्थिति हा एक उत्तम शिक्षक आहे प्रत्येक प्राण्याचा स्वभावतः गुणधर्मच असा आहे कीं, आपण स्वतंत्र असावें अशी त्याची इच्छा असते. आणि एखाद्याची

शांति धुमसत राहतो तो निराळाच ! वास्तविक पाहतां तत्व हें निराळें व व्यक्तिहि निराळी. वादाच्या सामग्यांत एकाचा संबंध दुसऱ्याशीं नसतो. पण कित्येक लोक ही साधी गोष्ट वादाच्या भरांत पार विसरून जातात व विनाकारण शांतिभंगाचें पाप आपल्या पदरीं बांधून घेतात. आमच्या गोमांतकभक्तांची लेखनपद्धति होतां होईतों निर्दोष रहावी म्हणून त्यानीं यापुढें आपल्या लेखांत व्यक्तिविषयक चर्चेस थारा देऊं नये अशी आमची त्यांस प्रेमळ सूचना आहे.

आमचा ठरावः— निदान आम्ही तरी या पुढें व्यक्तिविषयक चर्चेनें व्यापलेल्या वादविषयक कोणत्याहि मजकुरास थारा न देण्याचें अगदीं पक्कें ठरविलें आहे मग त्यापासून आम्हांस कोणाचाहि रोष सहन करावा लागला तरी हरकत नाहीं ! कुत्सित बुद्धीनें लिहिलेल्या आपल्या टवाळ व चवचाल लेखांस 'भारतांत' जागा न मिळाल्यामुळें पुष्कळ भाईबंधानीं आम्हां विरुद्ध, तोंडीं व लेखी, नसत्या आळांचें अवडंबर रचण्याचा वेळीं अवेळीं अव्यापारेषु व्यापार करण्यास कमी केलेलें नाहीं. पण असल्या बुजगावण्यानीं भंग होण्याइतकी आमची मनःशांति लेची पेची नाहीं, ही आम्हीं परमेश्वराची अपूर्व देणगी समजतों. शिवाय 'सत्यमेव जयते' या तत्वावर आमची पूर्ण भिस्त असल्यावरून, आम्हां विरुद्ध जाणून बुजून पसरण्यांत येत असलेल्या गैरसमजांविषयीं आम्हीं पूर्ण बेफिकीर असतों, याची साक्ष अनेकांस पटलेलीच आहे. असो. तात्पर्य काय कीं, कसल्याहि अवकृपेची पर्वा न बाळगतां 'भारत' उपरोक्त ठराव अक्षरशः पाळण्यास मागें पुढें पहाणार नाहीं.

कोण हा मूर्खपणा ? :— 'मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाहीं' या म्हणीचें रूपांतर 'मेल्याशिवाय घरें सुधरत नाहींत' असें केल्यास अतिशयोक्तीचें माप माथीं बसेल असें वाटत नाहीं ! सरकारी वाफाचे घरें मोडून प्रजासूंचे हाल होऊं लागल्यास आज कित्ती तरी महिने झाले. परंतु घरांची शोचनीय स्थिति कायम आहे ती आहेच ! कोण हा सरकारचा मूर्खपणा ? असला मूर्खपणा ज्याच्या नखशिखांत ओतप्रत भरून गेलेला आहे, अशा गचाळ सरकारनें नाव्हेगासांत्र सारखी महत्त्वाची बाब आपल्या अकल शून्य डोक्यावर कां घ्यावी हें समजणें फार कठिण आहे ! पण कोळसा उगळावा तितका काळाच !

हिंदु व ख्रिस्ती:— लिसेच्या एक दोन प्रोफेसरच्या नेमणुकींत उघड झालेल्या धोरणामुळें 'हिंदु व ख्रिस्ती' असे दोन पक्ष उत्पन्न होऊं पहात असून त्यांचा परिणाम राष्ट्रहिताला फार विघातक होणार आहे. पोर्तुगीज भागांत याविषयीं सांगोपांग चर्चा चालू आहेच.. आमच्या बंधूनीं सावध रहाण्याविषयीं आगगाडींतील धोक्याच्या सूचनेप्रमाणें त्या गोष्टींचा येथें उल्लेख मात्र केला जात आहे. विशेष चर्चा सवडीनुसार होईलच.

— काकोडे येथील यंदांचा सप्ताह मोठ्या उत्साहानें पार पडला. क्षत्रिय मराठे व सारस्वत ब्राह्मण या उभय वर्गांतील एकोप्याचें फळ उपरोक्त गोष्टींवरून आल्यास नवल नाहीं.

— ... अडीच रुपयाच्या झुनरा... चालू झाल्या.

लिसेइस्तांवरील नसते आळ

नं. २

प्रीय भारतकर्ते यांस—आपल्या लोकप्रीय वृत्तपत्रांत 'दुर्दैवाचे विचित्र पुतळे' या लेखास मी दिलेल्या उत्तरानंतर लिसेवांतील शिक्षण, असें नांव असलेला व नावांप्रमाणें कृति न करणारा बेजबाबदार लेख व लागोपाठ त्याचा धाकटा भाऊ 'दुर्दैवाचे विचित्र पुतळे न. २, हा लेख मला वाचावयास मिळाला.

खरें पाहिलें असतां मागील लेखांत मीं त्यांचे मुद्दे खोडले असून सुद्धां उगाच फाजील चिवटपणा धरून मारे कॉलमच्या कॉलम भरडपट्टी खरडणाऱ्या भोंसल्यांस मी उत्तरच न द्यावयास पाहिजे होतें. पण मूळ मुद्यांस सोडून गेलेल्या त्यांच्या विचारांस ताळ्यावर आणण्याकरतांच आपल्या मतानें कोठोकांठ भरलेल्या त्यांच्या बुद्धिमत्तेच्या घड्यावर मी निष्फळ पाणी ओतीत आहें.

समजा, रा. भोंसल्यांच्या मताप्रमाणें आम्हीं भराभर लिसेव सोडले, तर राज्य कर्त्यांकडून विशेष प्रकारचे हक्क आम्हीं कोणत्या भाषेच्या सहायानें घेऊं ? निवडणुका हिंदूंच्या वतीनें कशा होणार ? कौन्सिलांतल्या आम्हांस हानिकारक अशा बिलांपासून आमचें रक्षण कोण करणार ? पोर्तुगीज भाषेच्या सहायानें इथल्या नेटीव खिश्चनानीं मोठमोठ्या सर्व जागा ज्या पत्यावर, आमच्या पोटावर चालवलेल्या त्यांच्या थैमानास अटकाव कोण करणार ? इंग्रजी शिकावें वगैरे कानांस गोड वाटणारे असे युक्तिवाद सांगण्यापेक्षां विशेष स्पष्ट रितीनें एकदम इंग्रजी हिंदुस्थानांत जाऊन आमचें प्रीय गोवें येथील बाटग्या खिश्चनाना खाली करून द्यावें असें ते कां म्हणत नाहींत.!

माझ्या लेखांत निर्दिष्ट केलेल्या मुद्यांचें उत्तर सुसंगत रीतीनें रा. भोंसले जोंपर्यंत न देतील तों पर्यंत त्यांचा प्रयत्न सफळ झाला असें कोणताही सूज्ञ वाचक म्हणणार नाहीं. अनेक जाडे जाडे शब्द व हसनच्या हसन अपशब्द यांनीं कांहीं मुद्दे खोडले जात नसतात हें रा. भोंसल्यानीं ध्यानांत धरावें.

माझ्या लिसेवांतल्या थोड्याशा शिक्षणांचा व मी निर्दिष्ट केलेल्या मुद्यांचा परस्पर संबंध काय ? रा. भोंसल्यास व्यक्तिद्वेष किंवा शब्दछल करावयाचा आहे काय ? जर तसें नसतें तर 'बायकी थाटाचें नांव असलेला लेख 'सेगुंद ग्रावाच्या येशामीचा परिणाम' 'विचित्र' मग काय होईल तें होईल असा संकल्प करून लिहिणारा 'अविचारी' 'अद्वातद्वा विचारसरणीवाला' 'ठोंब्या' 'उलथा धंदा' उतावळा हे शब्द वापरणाचें त्यानां कारण काय?

कोंकणी भाषेसंबंधीं मी केलेल्या स्पष्टीकरणास व आणखी एक दोन मुद्यांस योग्य उत्तर देतां येत नाहीं असें त्यांस वाटल्यामुळें तो विषयच इतक्या घोटाळ्याचा आहे कीं, असंबद्धतेच्या योगानें न समजल्यामुळें यास उत्तर देणें योग्य नाहीं. अशी गुळगुळीत वाक्याची पळवाट रा. भोंसल्यानीं चांगलीच शोधून काढली म्हणावयाची !

म्हणे लिसेवाच्या शिक्षणांचा चांगला उपयोग व्हावयाचा राहून अत्यंत घातुक परिणाम झालेले आहेत ! आज लिसेवांतले चारशें पांचशें मुलांचे पालक खुळे व त्यांनां बुद्धि शिकवूं पहाणारे हे भोंसले शहाणे ! ही गोष्ट निदान रा. भोंसल्यांच्या मनाला तरी खरी वाटत असेल काय ?

आम्हीं कसले वेडेचार केले आहेत ! या सिध्या प्रश्नांस उत्तर द्यावयाचें सोडून उलट ठोंब्या ही शिवी हांसडण्यांत त्यांनीं पुरुषार्थ मानला आहे !!

आपल्या लेखाचा मतितार्थ मला समजलेला नाहीं वगैरे असल्याच कांहीं गुळगुळीत वाक्यांनीं पळवाट काढण्याचे दिवस निदान सध्या तरी उरले नाहींत. हें रा. भोंसल्यांनीं खूप समजावें. मला जर लेख नं. १ समजला नाहीं तर लेख नं. २ तरी कां समजावा ! ज्यानां आपण केलेल्या विधानाचें नीट समर्थन करतां येत नाहीं त्यानीं लेख तरी कां लिहावे ?

मालवीय, घोष, दास वगैरे पांच पंचवीस नांवें एका सपाट्यानें घेणाऱ्या रा भोंसल्यांस मी इतकेंच विचारतों कीं हिंदुस्थान केवढें व गोवें केवढें ? हिंदुस्थानची लोकसंख्या व गोव्याची लोकसंख्या यांची तुलना तरी करतां येते काय ? हिंदुस्थानच्या १४०० विद्वानांस किंवा पुढाऱ्यांस गोव्यांत एक विद्वान अथवा पुढारी पडतो. शिवाय हिंदुस्थानच्या सारखी अनेक देशभक्त आपोआप होण्यासारखी—सुदैवाची म्हणा अगर दुर्दैवाची म्हणा परिस्थिति गोव्यांत सध्यापर्यंत तरी नाहीं.

अनेक ढोबळ व ऱ्हस्व दीर्घाच्या चुका ज्यांच्या लेखांत आढळतात त्यांनीं दुसऱ्यांस व्याकरण शिकविण्याचा हास्यास्पद आव कां आणावा? उलट पक्षीं आपल्या नं. २ च्या सदरांत निर्दिष्ट केलेले शब्द प्रयोग चूका आहेत असें त्यानीं सिद्ध करावें नाहीं तर मी त्यांस जाहीर रीतीनें ठोंब्या म्हणेन.

'भरत खंडांत इंग्रजी शिकलेल्या लोकांनीं स्वदेशाभिमान जागृत केला' हें म्हणणें जरी खरें असलें तरी तो इंग्रजी शिक्षणानें उत्पन्न केला हें म्हणणें अयुक्तिक दिसतें. याचें कारण इंग्रजीच्या सहायानें त्यांस झालेलें वस्तुस्थितिज्ञान हेंच होय. इंग्रजी विद्याविहीन लोकसुद्धां जाज्वल्य देशभक्त असतात. आमच्या राष्ट्रांत जे पूर्वीं अनेक नरपुत्र होऊन गेले ते इंग्रजी शिकले होते काय ?

अधिकाराच्या धुंदींत तारवठलेल्या अधिकाऱ्यांची गुर्मी जर कोणीं नरम केली असेल तर आम्हीं लिसेइस्तांनीं—किंवा भोंसल्यांच्या दृष्टीनें पाहिल्यास—दुर्दैवाच्या विचित्र पुतळ्यानीं केलेल्या गांधी टोपी चळवळीनेंच होय.

गेल्या दोन चार महिन्यापासून एक दोन लेखक (!) व्यक्तिद्वेष किंवा क्षुल्लक गैरसमज यांस बळी पडून लिसेवाच्या नांवांवर खडे फोडीत असतात, त्यांना मी इतकेंच सुचवितों कीं सध्या लिसेवांत जो गोंधळ चालत आहे त्याचें कारण लिसेवांतील 'शिक्षण दोष' हें नसून शिक्षकांचा व शिक्षणपद्धतीचा दोष हें होय.

यापुढें तरी रा. भोंसले हे ताळ्यावर येतील व इतरहि लेखक उगीच कांहीं तरी न लिहितां आपले याच संबंधाचे मननीय विचार प्रदर्शित करतील अशी आशा करतो इंग्रजी वाङ्मय जरी केवढेंही मोठें असलें तरी आम्हां गोमांतकस्थांस पोर्तुगीज भाषेच्या मानानें तें इकडे निरुपयोगीच आहे असें म्हटलें तरी चालेल. बाकी दुय्यम शिक्षण या नात्यानें जर तें पदरीं असलें तर फार चांगलें. असो. सध्या इतकेंच सांगून आपला निरोप घेतों.

[illegible]ळावळीकर

— भारतमित्र श्री. वोडस, खोलकर रायतूरकर, इत्यादिकांचे लेख स्थळाभावीं सवडीनुसार पण खात्रीनें प्रसिद्ध होतील.

पोर्तुगीज विरुद्ध इंग्लिश

भारताच्या गेल्या तीन अंकांपासून "दुर्दैवाचे विचित्र पुतळे" व "लिसेइस्तांवरील नुसते आळ" या मथाळ्यांखालीं पोर्तुगीज व इंग्लिश शिक्षणाविषयीं चर्चा चाललेली आहे. ती वाचून मलाही त्या विषयीं जे विचार सुचले ते लिहावेसे वाटले. म्हणून हा लेख लिहिण्याचें मी धाडस करीत आहे.

कांहीं जणाचें मत असें आहे कीं, इंग्रजी विद्या ही जणुं वाघिणीचें दूध आहे. आणि त्याच दुधाच्या जोरावर आम्ही स्वतंत्र होऊं. पण इथें सहजच असा एक प्रश्न उद्भवतो कीं, शिवाजी सारखे, महादजी सारख्या अशा मोंगलांशीं झगडून, स्वतंत्र मिळविणारे, राजकारणपटु इ. जे वीरपुरुष इतिहासामध्यें प्रसिद्ध आहेत ते कुठें हें वाघिणीचें दूध (इंग्रजी शिक्षण) प्यायाला गेले होते ! असो. रा. भोंसले लिहितात कीं सुधीं हें पोर्तुगीज शिक्षण सोडून ज्या शिक्षणापासून लोकमान्य, तेलंग, रानडे गांधी इत्यादि लोकांसारखे लोक निपजतात. आणि ज्या पासून स्वातंत्र्य मिळतें असें तें वाघिणीचें दूध, म्हणजे इंग्रजी शिक्षण, मिळविण्यास ला. माझा त्यांस असा प्रश्न आहे कीं, जर तें शिक्षण स्वातंत्र्य देणारें आहे, तर म. गांधी सारखे पुढारी "तुम्हांस जर स्वराज्य पाहिजे तर इंग्रजी शाळांवर बहिष्कार टाका, तें वाघिणीचें दूध नसून मेंढ पाच बनविणारें एक अमली पेय आहे असें कां सांगतात ? "वर्तमानपत्रें त्याच्याविरुद्ध ओरड कां करतात ? आज हें दीडशें वर्षे पर्यंत वाघिणीचें दूध पीत असलेले लोक अजूनपर्यंत पारतंत्र्यामध्यें खितपत कां पडलेले आहेत ?

त्यांचें दुसरें असें म्हणणें आहे कीं, तेथें आपलेपणाविषयीं माहिती मिळते आणि स्वाभिमानी असे पुरुष निपजतात. यावर असा प्रश्न येतो कीं, तेथें आज लक्षावधी लोक शिकत असतां स्वाभिमानी असे अनवे हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच लोक कां असावे ? तें शिक्षण जर असें गुणकारी आहे तर प्रत्येक शिकणाऱ्यास त्याचा गुण कां मिळूं नये ? थोड्यांसच कां मिळावा ? याचीं दोन कारणें असूं शकतात एक, ते लोकच तसे मठ्ठ असले पाहिजेत, नाहीं तर शिक्षण तरी सदोष असलें पाहिजे. पहिलें कारण आम्हांस मान्य करतां येत नाहीं, कारण, पूर्वीं ज्या हिंदुस्थानांत शिक्षण मिळण्यास कठीण असून तें थोड्यांसच मिळत असतां मोठमोठे नामांकित पुरुष निपजत असत, त्याच देशांत अवघ्या शेंदोंडशें वर्षांच्या अवधींत लोक मठ्ठ बनतील हें संभवनीय नाहीं. यावरून आम्हांस दुसरेंच कारण खरें म्हणावें लागतें.

परिस्थिति हा एक उत्तम शिक्षक आहे प्रत्येक प्राण्याचा स्वभावतः गुणधर्मच असा आहे कीं, आपण स्वतंत्र असावें अशी त्याची इच्छा असते. आणि एखाद्याची

ANO VII — NUMERO 23 — 1922

QUEPEM QUINTA — FEIRA 14 DE SETEMBRO

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai

Assinatura
INDIA PORTUGUESA...... 3-00-00
INDIA INGLESA.............. 3-08-00
NUMERO AVULSO.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई

वर्गणीचे दर
गोम्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमचे जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

वर्ष ७ वें.] केपें, गुरुवार, तारीख १४ माहे सप्टेंबर सन १९२२ [खास अंक २३ वा

Um Marajá, Mestiço, Mistico e Sobre--natural

A miraculosa maneira de como uma mãe concebe um filho sem união conjugal; de como este filho nasce e cresce em dois logares, simultaneamente; de como o mesmo filho recebe armas dos seus malogrados progenitores; de como o mesmo faz sair do seu peito vozes misticos e sobre-naturais; de como ele é magro e gordo, claro e trigueiro ao mesmo tempo; .e, finalmente de como se inventa a Historia em vez de a narrar: eis o que se encontra magnificamente demonstrado numa grandiosa obra, embora de pequeno formmato, que há pouco deu á luz o seu autor, que tendo o modesto nome de José Joaquim Fragoso, possue uma erudição colossal que causaria inveja ainda áquele celebre Colosso de pedras, erigido sobre o porto de Rhodes !

Um critico rude da classe semicivilizada dos hindus, sem nenhum globulo do sangue portuguez nas suas veias, criticando a dita obra. na gazeta daquela não aportuguezada classe, classificou de tolo a este colosso intelectual, sem se importar da indignação que causaria esta critica a outros colossos,de pedras ou de paus. O director da mesma gazeta que o seguiu com reparos seus mostrou-se estranhado perante a lamentavel atitude do grandioso autor que se meteu nas invenções historicas em vez de fazer colheres de pau !

Após um minucioso estudo da referida obra, porem, fiquei muito admirado deante da maneira pouco decente dos aludidos criticos; pois, a obra em questão era merecidora só de louvores da parte de todos indistinctamente- de seres animados e inanimados. Se os ditos criticos não a apreciaram devidamente, a causa não está naquela obra, mas sim na má fé dos criticos. Os proprios apelidos daqueles zoilos, *Bonslò* e *Dessai* facilitam a solução do problema : naturalmente,são descendentes daqueles historicos Bonslós e Dessais que tantas vezes invadiram os 'nossos" dominios, disrespeitando o 'nosso' clero e disafiando a nossa autoridade, civil e militar. Diante dessa atitude agressiva, é escusado investigar mais provas sobre as relações de consagninidade destes zoilos com os referidos Bonslós e Dessais- Todavia, posso garantir que no autor de "Traços Geneologicos de. Shivaji Maharajá", não faltarão engenhos e artes para fazer uma outra investigação historica, mostrando nitida e claramente que a rudeza destes criticos é o rezultado directo da falta absolnta do sangue portuguez nas suas veias-

E, sendo o que é, a qualidade do seu sangue, é claro que não merecem consideração alguma da parte de quem possue com tanta abundancia o sangue portuguez.

Espero, porem, que o grandioso autor do aludido sangue não me regateará a sua atenção,como o fez aos ditos. Bonslò e Dessai. Pois, o meu sangue não é indigno da sua atenção, visto que ele hoje contem alguns globulos do sangue portuguez, injectados por um medico-cirurgião que me arranjou por intermedio duma sanguessuga expressamente enviada a Portugal, incumbida da onerosa missão de sugar ai sangue mais azul quê houvesse. Quanto á minha erudição e competencia literaria basta citar aqui a relação dos livros que tive o ensejo de consultar a fim de tornar-me merecedor da honrosa atenção do autor de "Traços Geneologicos de Sivaji Marajá ". Pois, emquanto ele diz ter consultado sò quinze obras taes como, "Powade" (lingua marata), "Ballads of the Marathas " (lingna ingleza), 'O Almanak de Goa " (lingua portugueza) " Vicissitudes of Aryan Civilizâtion " (lingua inglesa),"Historia Geneologica da Casa Real" (lingua portugueza), etc. etc; eu tenho, por meu turno, consultado álem de todas elas, varias outras, a saber:-

1 " Trâços Geneologicos de todos os Aryas, Antigos e Modernos" (lingua Telugu).

2 "Historia de Todos os Homens, Vivos e Falecidos' (lingua humana),

3 "Homens no Oriente e no Occidente' (lingua sarracena)

4 "O Almanak de Liliput' (lingua de Liliput)

5 " Historia Geneologica da Casa Real de Utopia" (lingna de utopia).

etc, etc, etc.

Todavia, não faltarão por aí pessoas démais exigentes, que não ficando satisfeitas com ambas as relações de livros mencionados, preguntarão o motivo porque tanto eu, como o sr. Fragoso, não tenhamos consultado nenhuma 'Bakhar ou 'Itihas.

Mas, se dum lado é muito sensata uma pregunta destas não deixa, doutro lado, ser ela impertinente : pois, o fim commum de ambos nós não é o de narrar a Historia, tal qual ela é, mas o de inventala, o que é proprio da nossa erudição e digno dos nossos sangues. Alem disso, estes senhores, dirigindo tal pregunta não farão outra cousa senão atribuir, embora inconscientemente, ao sr. Fragoso e a mim tambem, conhecimento duma tal 'Bakhar, ou competencia de a poder entender, o que representaria um erro indisculpavel. Uma vez que o sr. Fragoso claramente demonstra na sua obra, que alem do tal "Powadò' (poemeto traduzido em inglez pelo Mr. Acworth] ele não percebe nem patavina do marata,¿ não seria contraproducente exigir dele mais o conhecimento duma tal 'Bakhar' ou 'Itihas ? Tendes pasiencia todos vós e ficareis esclarecidos oportunamente sobre a verdade do que acabo de dizer.

E, mais a mais se o sr. Fragoso se atreve a falar sobre a historia e literatura maratas, sem uma piquena noção desta lingua, ¿ quere este facto significar que ele pratica uma tolice ? Certamente, não ! !

Quē não é tolice o que ele pratica, nem ele è tolo, pode provar tambem, quem quizer, pela maneira como ele tem modificado, conforme as suas conviniencias, os sentidos originais de muitas obras citadas; e tambem pela modo como ele tem suprimido, no processo de tradução ou transcrição, muitos factos que produziriam muita fricção entre as provas historicas e as conclusões que delas quiz tirar o astucioso investigador !

Que não é tolo este investigador, prova-se tambem da maneira como ele faz voos, a modo de Maruti, saltando dum livro para outro, do Shaligram para Acworth. de Acworth para Grant Duff, dai para Sirkar e assim sucessivamente mal parando para citar de um nem uma oração inteira; submetendo-se a tanta trapalhada só para dar conhecimento de alguns factos historicos que não são disconhecidos de todo e qualquer estudante primario das escolas maratas, e o que se poderia fazer com toda a facilidade com uma unica obra de Grant Duff.

Que não é tolo este *Maruti* literario prova-se tambem da maneira como ele faz menção de livros como, 'Powade' e 'Acworth, (o primeiro uma colecção de alguns poemetos em marata e o outro uma traducção destes em inglez) a fim de dar a idea do que foi Shahaji e como ele chegou a casar-se com *Jizabai*, e tambem pela maneira como ele, depois de fazer semilhantes comprometedoras referencias, interpreta mal os originaes em marata ou inglez. Como por exemplo nos seguintes casos.

Na pagina 23 da sua obra, diz S. Exa, com muita emfase que o grande historiador, M. Jadunath Sarkar afirmá que Siváji respeitava a Igreja e clero catolicos. Se se vae ver porem a obra original do Sarkar, notamos que o historiador está falando sôbre o assunto referente ao clero e religião hindu, e não a outra qualquer.

Igualmente, na pagina 19, diz o sr. Fragoso citando a autoridade do livro Powade que "Desde o nascimento de Sivaji era Shahaji um Sardar de Nijamshahi" e logo depois dando um salto *marutesco* vem pairar sobre uma nota na pagina 120 do livro de Acworth e acrescenta " E ele (Shahaji) em 1634 tomou a regencia dos dominios deste Nijam." E com isto, quere provar que Shahaji apezar de ter o poder de castigar os mouros que apresionaram a sua mulher em 1633, não os castigou.

Mas, se vamos consultar as obras originais referidas, vemos que Shahaji éra Sardar de Nijam em 1627 quando nascera Sivaji em *Shivner*, mas que, ele tinha largado o serviço do Nijam alguns anos antes da prisão da sua mulher a qual fôra promovida pelo general

देण्यास कचरूं नका! सरकारच्या रोषामुळें प्राप्त होणाऱ्या भ्रामजनक स्थितीनें नामर्द बनूं नका! जेथें जेथ अडचणुकीचे उपाय सनदशीर रितीनें अमलांत आणून सरकारास सळो कीं पळो करून सोडण्यांत मागें पुढें पाहूं नका! असें झाल्यासच मात्र गेलेला मान पुन्हां मिळण्याचा संभव आहे. नाहीं तर सध्या आहे, त्यापेक्षांहि तुमची जास्त दुर्धर अवस्था होणार आहे याची पक्की खूणगांठ बांधा! तुह्मी प्रजासत्ताक राज्याचे खरे कारभारी आहांत. अज्ञातद्वारा उधळण्यांत येणारा सरकारी तिजोरींतील पैसा तुमचा आहे. तुमच्या हिताविरुद्ध कोणतीहि गोष्ट करूं जाणाऱ्यास पूर्ण पारिपत्य करण्याचा तुह्मांला निसर्गदत्त हक्क आहे. नोकरशाही ही तुमची दास आहे. तात्पर्य, नष्ट होऊं पहात असलेला तुमचा स्वाभिमान जागृत करून हट्टी सरकारची हट्टी नरम करण्याच्या मागेस तुह्मी तावडतोब लागलें पाहिजे.

स्फुट विचार

गोमाता:— गोमातेची योग्यता, गोमातेचें श्रेष्ठत्व व गोमातेची उपयुक्तता या गोष्टी हिंदूंस पूर्ण परिचयाच्या आहेत. श्री शिवाजी महाराजांच्या अंतःकरणांत गोमातेविषयीं वसत असलेलें वात्सल्य तर आबालवृद्धांस ज्ञात आहे. अशा स्थितींत गोरक्षणाचें महत्व ठसविण्याचा फिरून फिरून प्रयत्न करणें ह्मणजे व्यर्थ कालक्षेप करणें होय. गोरक्षणाचें महत्व सर्वांना पटलेलेंच आहे, असें धरून चालण्यास अर्थात् काहींच हरकत नाहीं. अशा या अत्यंत महत्वाच्या विषयास कॉंग्रेसींत यशस्वी करण्याप्रीत्यर्थ यत्नांची परमावधि करणें आमचें पवित्रतम कर्तव्य होय. सर्व भेदाभेद विसरून गोभक्षकांच्या डोक्यावर भरदिवसा मिरीं वाटून; कॉंग्रेसीला बहुमतानें गोरक्षण मान्य करण्यास भाग पाडणें गोमांतकांतील सर्व हिंदूंचें मुख्य कर्तव्य ठरतें. या कर्तव्याकडे दुर्लक्ष्य केलें जाणार नाहीं, अशी आह्मांस उमेद आहे.

विजेचे दिवे:— येत्या डिसेंबरांत शव-प्रदर्शनाच्या वेळीं विजेच्या दिव्याची व्यवस्था केली जाणार असल्याचें कळतें. या साठीं अर्थात पैशाची तरतूद झालीच असेल. सन्माननीय मृतांसाठीं विजेची सोय वाईट नाहीं. परंतु जिवंत माणसांसाठीं इस्पितळांची व डॉक्टरांची सुधारणा करण्यास सरकारपाशीं पैसा नसल्याची सबब कानीं आली ह्मणजे मात्र मन त्रासानीं व्यग्र होतें. विजेच्या दिव्यांनीं मृत जिवंत होणार नाहींत. मात्र मोडक्या अवयांच्या धक्कीनें जिवंत प्राणी मृतावस्थेला पोंचणार आहेत, ही साधी गोष्ट आमच्या पढत शहाण्या नोकरशाहीला अजूनहि पटूं नये, हें आश्चर्य जरी नसलें तरी दुर्भाग्याचें लक्षण खास नव्हे.

मडगांवचा लिसेव:— या पाठशालेला दोन तात्पुरत्या शिक्षकांची गरज होती ह्मणून 'कॉंकुर्स' उघडण्यांत आला. या 'कॉंकुर्सा'त अनेक लोकांनीं आपापले अर्ज गुजरले व शेवटीं त्यांचा निकाल होऊन श्री. आत्माराम शंभू पै पाणंदीकर या विद्वान तरुणाचा नंबर दुसरा लागला. अर्थात या हिंदूची एका प्रोफेसरच्या जागीं नेमणूक होणार असल्याची लोकवदंता उठली व कित्येकांस खराखुरा आनंदहि वाटला. पण इतक्यांत उपरोक्त पाठशाळेच्या खिस्ती चालकांनीं केवळ हिंदु प्रोफेसरास तींत मज्जाव व्हावा या अंतिम व दुष्ट हेतूनें आपल्या खात्रीच्या खिस्ती मुलांस पाठशाळा सोडून जाण्यास विनवून त्या मुलांच्यासंख्या बाहुल्यामुळें नवीन शिक्षकांची जरूरी होती तें कारणच मोठ्या धूर्ततेनें काढून टाकलें ह्मणतात! हा अपमानकारक पक्षपात आमचे हिंदु लोक विसरतील तर आमच्या सारखे दुर्दैवी आह्मींच असें ह्मटलें पाहिजे!

प्रेमि लितेरारियु हिंदु:— या पणजीच्या उपयुक्त संस्थेतर्फे वार्षिक व्याख्यानमाला सुरू झाली असून, तींत पणजींत शिक्षणासाठीं वास्तव्य करीत असलेले विद्यार्थ्यांपैकीं अनेक हिंदु विद्यार्थी आस्थापूर्वक भाग घेत असल्याचें कळून आह्मांस अवर्णनीय आनंद होत आहे. श्री. शिवा फटु पै आंग्ले या सारख्या विद्वान व कधींहि गाजावाजा न करितां देशहितार्थ अविश्रांत झटणाऱ्या कळकळीच्या तरुणाचें प्रेमीस पूर्ण व सक्रीय पाठबळ निरपेक्षपणें चालूच असल्याचें ऐकून तर आह्मांस फारच समाधान वाटत आहे. श्री. आंग्ले हे कित्येक वर्षांपासून प्रेमीचे प्राण बनले आहेत, याबद्दल त्यांचें करावें तितकें कौतुक थोडेंच आहे. असो. प्रेमीची व्याख्यानमाला फिरासु होऊन त्यांत भाग घेणाऱ्यांची पोर्तुगीज साहित्य प्रगतीची अनुकरणीय लालसा पूर्ण होवो, अशी आमची परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

बेजबाबदार विधानें!

'भारत' पत्रांत प्रसिद्ध झालेल्या 'दुर्दैवाचे विचित्र पुतळे' या सदराखालीं श्री. भोंसले यांच्या लेखास रा. यशवंत तळावलीकर या नांवाच्या विद्यार्थ्यानें मुद्देसूद व सविनय उत्तर दिलें होतें. त्यास प्रत्युत्तर ह्मणून जो लेख रा. भोंसले यांनीं लिहिला आहे. तो वाचून पाहतां असें वाटतें कीं तळावलीकरांच्या विनयाचा फायदा घेऊन कोणीकडून तरी त्यांच्यावर हल्ला करावा आणि आपलें लेखनपटुत्व लोकांस दाखवावें हाच भोंसल्यांचा मुख्य उद्देश असावा. कारण सदर प्रत्युत्तरांत कोणताही आक्षेप सरळपणें खोडून न काढतां शक्य तेथें (जेथें खुद्द लेखकाचें समाधान झालें किंवा नाहीं याची शंका आहे.) ब्रिटिश इंडियेकडे बोट दाखवून तर कोठें भाषेचाच दोष काढून आपल्या लेखाचें समर्थन करण्याचा त्यांनीं अश्लाघ्य प्रयत्न केला आहे. मात्र तो सपशेल फसला आहे. इतकेंच नव्हे तर 'बुडत्याचा पाय अधिकच खोलांत' या ह्मणी प्रमाणें त्यांची स्थिती झाली आहे. कारण लेख किंवा त्यांचें प्रत्युत्तर लिहितांना स्वतःचें ध्येय स्पष्ट न ठरवितां केवळ पांढऱ्यावर काळें फांसण्याचें येतें एवढ्यावरच भिस्त ठेवल्यामुळें दुसऱ्यांवर काजळाचे फवारे उडविण्यास आरंभ करतांना आपले हात स्वतः काजळानें किती मळीन झाले आहेत हें त्यांनीं पाहिलें सुद्धां नाहीं!

बेजबाबदारीनें लिहीत सुटणें किंवा लिहिलेल्या लेखांवर सह्या करून ते प्रसिद्धीस पाठविण्यापूर्वीं कांहीं विचार केला पाहिजे. रा. तळावकरांच्या लेखावरील बायकीपणाचे आव टाकीत ज्या मर्दानी थाटानें रा. भोंसले लेखणी सरसावून प्रत्युत्तर करण्यास पुढें आले, तो बाणा स्वीकारण्यापूर्वीं त्यांनीं थोडा सभ्यतेचा घुटका घ्यावयाचा होता. कारण त्यांच्या लेखांवरून-किंवा लेखांतील धडपडीवरून असें दिसतें कीं तळावलीकरांनीं उत्तर देण्यांत त्यांचा अक्षम्य गुन्हा केला.

आमची रा. भोंसल्यांस एवढीच सूचना आहे कीं, हें युग जरी मतस्वातंत्र्याचें असलें तरी जबरदस्तीचें नाहीं. देशभक्तीचा आव आणूं इच्छिणारांनीं देखील दुसऱ्यांच्या मतास अवसर दिला पाहिजे. आणि तीं ग्राह्य असल्यास जरूर स्वीकारलीं पाहिजेत. जर रा. भोंसले यांचा प्रयत्न सत्याकरितां असेल तर त्यानीं लक्षांत ठेवावें. ते हेंच कीं, चूक होणें मनुष्य स्वभावास धरून आहे पण ती कबूल करण्याऐवजीं तीचें समर्थन करूं पाहणें मूर्खपणाचें होय. या वादांतील पूर्व पक्ष व उत्तरपक्ष पाहून जें आह्मांस वाटलें तें थोड्या शब्दांत सांगण्याचें आज आह्मीं योजिलें आहे.

१) भोंसले यांचा मुख्य आक्षेप हा आहे कीं, "लिसेव ही विद्यादान करणारी संस्था नसून केवळ दुर्दैवाचे विचित्र पुतळे तयार करणारी एक संस्था आहे."(!)

ही व्याख्या त्यानीं कोणत्या आधारानें केली असेल याची कल्पना होत नाहीं. कोणत्याही विषयावर अभिप्राय देण्यापूर्वीं प्रत्येक मनुष्यानें स्वतःची योग्यता लक्षांत आणून त्या विषयाचें आकलन आपणांकडून किती झालेलें आहे, याचा विचार केला पाहिजे. नाहीं तर कुठल्या मुठल्या स्या विषयाचा गंधहि नाहीं; लिसेव हा पदार्थ कशासी खातात याची कल्पना नाहीं त्यावर वर्तमान पत्रांतून मत देऊन लोकांस उपदेश करण्यास रा. भोंसले यांनीं पुढें येणें ह्मणजे पत्राची उपयुक्त जागा व वाचकांचा वेळ निरर्थक खर्चीं घालून स्वतः हास्यास्पद होणें होय.

"दुर्दैवाचे विचित्र पुतळे तयार करणारी संस्था" ? रा. भोंसल्यांनीं हे शब्द वापरतानां त्यांच्या अर्थाकडे बिलकूल लक्ष्य दिलें नसावें. केवळ ते मराठींत आहेत ह्मणून कोठें तरी ठोकून द्यावे हें सुज्ञपणाचें लक्षण नव्हे. आपण लिहिलेल्या शब्दांची जबाबदारी प्रत्येकानें ओळखली पाहिजे.

आज गोमांतकांत जे दोन समाज—हिंदु आणि खिश्चन—प्रामुख्यानें नांदतात त्यांपैकीं खिश्चन समाज हा शिक्षणांच्या बाबतींत बराच पुढें आहे. या समाजांत मोठमोठे बॅरिस्टर्स, वकील, जज्ज, डॉक्टर्स वृत्तपत्रकार, पुढारी वगैरे लोक असून त्यांच्यापैकीं कांहींनीं बऱ्याच मानांच्या जागा व्यापिलेल्या आहेत. आणि त्या त्यांनीं आपल्या योग्यतेनेंहि चालवून दाखविलेल्या आहेत. या एकंदर समाजाचें शिक्षण लिसेवांत झालेलें आहे याची जाणीव रा. भोंसल्यांस नाहीं काय? बरें, त्यांचा रोख हिंदुसमाजाकडे आहे असें ह्मणावें तर, डॉ. बोरकर, डॉ. लाड, डॉ. साखरदांडे, डॉ लवंदे, बॅरिस्टर राव, नॉर्मल स्कूलाचे प्रो. रामचंद्र नाईक शेलवाळकर, प्रो. सुखठणकर, श्री. शिवा पै आंगले, प्रो. पिसुर्लेकर प्रभृति आमच्या समाजांतील विद्वान गृहस्थ भोंसल्यांच्या मतें 'दुर्दैवाचे विचित्र पुतळे' आहेत काय? आणि हा प्रश्न जरी थोडा वेळ बाजूला ठेवला तरी त्या संस्थेंत हिंदु आणि खिश्चन यांस शिक्षण देण्याच्या बाबतींत भेदाभेद नाहीं, निदान लिसेवांत हिंदूस खिश्चनापेक्षां निराळें शिक्षण देण्यांत येतें असें जोंपर्यंत भोंसल्यांनीं सिद्ध केलें नाहीं तों पर्यंत त्यांनीं लिसेवची व्याख्या वरील प्रमाणें करणें ह्मणजे आडस नसून दिव्यावर झेप घालणाऱ्या पतंगाच्या मूर्खपणासारखें होय.

आतां त्या संस्थेंतील शिक्षणाविषयीं त्यांचें ह्मणणें काय आहे तें पाहूं.

आज काल लिसेवांत मिळणारें शिक्षण अपुरें असून योग्य होत नाहीं ह्मणून हाकाटी चालली आहे. यांत बरेंच तथ्यहि पण आहे, मात्र ह्या हाकाटीचा अर्थ न समजतां फक्त चार चौघांच्या ह्मणण्याला होकार देऊन, सवंग लोकप्रियता मिळविण्याचा रा. भोंसले यांचा प्रयत्न साध्य झाला नसून उलट त्यानीं आपलें हसें करून घेतलें आहे. कारण ह्यांना लिसेवांत शिक्षण मिळतें हें माहीत आहे, त्याच्या अपुरेपणाबद्दल ठोका नाहीं. मात्र ह्या सर्व शिक्षणांचा आक्षेप समाज, देश आणि मातृभाषा यांना कांहींच उपयोग नसल्यानें त्याचा सोय तडफडत आहे. या मुद्या संबंधानें रा. भोंसले यांनीं 'ज्ञान आणि भाषा' या शब्दांची भेसळ करून स्वतःचा बुद्धिभेद केला आहे. कारण लिसेवांतील OH_2, दोखुबांय, दों सेबास्तीयांव इन्तेस्तीन देलगाद इ. ग्रोस यांचें ज्ञान असणें ह्मणजे फिरंगी भाषेंत प्रवीण होणें अशी त्यांची समजूत आहे. व हाच घोटाळा त्यानां पदोपदीं नडलेला आहे याचें आणखी प्रत्यंतर त्यांनीं गाइलेली इंग्रजीची महती वाचतानां दिसून येतें. अमुक्या भाषेंतून शिक्षण झाल्यास ज्ञान प्राप्त होतें. हा एक नवा शोध आहे. आतां मातृभाषेंतून शिक्षण चांगलें होतें. या बद्दल शंका नाहीं. तरी सदर वादाचा मुद्दा पोर्तुगीज आणि इंग्रजी ह्याच भाषासंबंधीं आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. पोर्तुगीज भाषेंतून मिळणाऱ्या शिक्षणाचें ध्येय फक्त नोकरी करण्याचें आहे. असें दाखवून केवळ इंग्रजी युनिवर्सिट्यांनीं तयार केलेले लोक मात्र समाज देश, भाषा, वगैरेंची उन्नति करणारे आहेत असें मानणें अदूरदृष्टीचें होय. उलटपक्षीं युनिवर्सिट्यांत सध्या देण्यांत येणारें शिक्षण नोकरशाही तयार करणारें असल्याचें तेथील सुशिक्षित समाजाचें ह्मणणें असून ह्याचसाठीं स्वतंत्र विद्यापिठें स्थापन करण्याकडे त्यांची खटपट आहे. शिवाय रा. भोंसल्यांनीं उदाहरणार्थ दाखविलेले पुढारी वाङ्मयोपासक वगैरेंचें प्रमाण ३२ कोटी प्रजेशीं किती पडतें? दर वर्षी युनिवर्सिट्यांतून बाहेर पडणाऱ्या हजारो ग्रज्युएटांतून देशभक्त, वाङ्मयोपासक, पुढारी, स्वतंत्र धंदेवाईक किती निघतात व त्यांचें प्रमाण काय आहे याचा विचार

—पणजी येथील प्रसिद्ध व्यापारी गोकुळदास माधवजी शेट गुजर यांच्या पेढीवर चालू महिन्याच्या २६ तारखेस दुपारीं ३ वाजतां एकंदर माल जाहीर लिलावानें विकण्यांत येणार आहे. पूर्वी २९ आगष्टला हा लिलाव व्हावयाचा होता, पण बाजारभाव उतरल्यावरून तहकूब ठेवावा लागला. आतां पूर्वीच्या किंमतींतून १।५ किंमत कमी केली असून या बद्दलची खुलासेवार माहिती आजच्या अंकांत ४ थ्या पानावर प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींत मिळेल. तरी व्यापारी व इतर लोकांनीं ही अमूल्य संधि दवडूं नये.

Ano VII — Numero 24 — 1922

Quepem Quinta-feira 21 de Setembro

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai

Assinatura
India Portuguesa...... 3-00-00
India Inglesa............ 3-08-00
Numero Avulso.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया........... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठर विण्यांत येतील.

वर्ष ७ वें.] केपें, गुरुवार, तारीख २१ माहे सप्टेंबर सन १९२२ [खास अंक २४ वा

Pelo Ensino Primario

(Livro da leitura)

II

Na nossa edição de 24 de Agosto findo, ao concluirmos o nosso artigo acerca dos livros de leitura ultimamente aprovados pelo Governo para o ensino primario, prometeramos voltar ao assunto.

Entretanto, no numero da "Terra" da mesma data, lemos com bastante agrado um artigo subordinado á efigrafe 'Pelo Instrução Primaria", em que o seu autor faz considerações muito justas ácerca dos mesmos livros- apontando alguns dos erros e imperfeições mais importantes de que êles se acham eivados. Estamos plenamente de acordo com o ilustrado articulista da "Terra' e se, não obstante, voltamos a tratar do assunto é porque êle de sua natureza é tão importante que toda a insistencia por nossa parte seria pouca.

Na verdade, o futuro da sociedade está mais do que nunca na nossa escola primaria. Principalmente, desde que a instrução secundaria está sendo tenasmente, sistematicamente cerceada pelas fantasias de tantes pseudo-reformadores que, por mal dos nossos pecados, abundam em terras portuguesas, a instrução ministrada na escola primaria constituirá numa grande maioria dos alunos, o peculio intelectual de toda a vida, a base de todos os conhecimentos.

E somos' porisso, da opinião de que todos os esforços e tentativas que de alguma maneira possam contribuir para tornar mais eficaz e fecunda a instrução primaria deveriam ser bemvindas e aplaudidas,

Não regateariamos, pois, os nossos aplausos aos autores dos livros de que 'se trata se êles correspondessem, pelo menos em parte, ao fim que o Governo provincicial teve em vista, anunciando concurso para novos livros, em substituição dos adoptados na Metropole que o eram tambem aqui. Somos, porem, forçados a concluir, após uma detida leitura dos livros em questão, que êles não só estão longe de realisar o programa de um bom livro de leitura, mas nem mesmo se aproximam da solução desejada,

A escolha dos trechos, feita com que ao acaso, muito deixa a desejar, tanto sob o ponto de vista literario, como pedagogico. A fora os os trechos refereutes ás pedras preciosas, perfeitamente dispensaveis, aos quais se refere o articulista da "Terra" há outros que não contem senão definições geograficas improprias de figurar num livro de leitura. Outros ainda que, não obstante serem fragmentos de prosa devidos a pena dos melhores escritores portugueses ultrapassam pela sua alta significação e interpretação literaria o limite naturalmente traçado a umas leituras para o ensino primario, o que fará com que sejam arrazoados sem o maior sentido para as crianças. Vejam-se, por exemplo, os trechos 'A árvore', 'A Luá', 'Um Justo' e tantos outros que, em razão da sua dificil compreensão, enfadarão por igual o aluno da cidade e da aldeia.

Graficamente e sob o ponto de vista artistico, os livros de leitura que temos diante de nós representam um verdadeiro fracasso.

Em toda a parte está sendo proclamada a virtude educadora da estampa e todos os editos de livros escolares procuram á porfia corresponder aos desejos de professor, por forma que actualmente, a estampa, feita legião, triunfa em todas as publicações destinadas á infancia.

¿ E, enquanto lá fora e mesmo aqui, na vizinha India, muito proximo de nós, os melhores artistas rivalizam em talento para ilustrar a literatura infantil, que aspecto nos oferecem os livros que o nosso Governo acaba de aprovar ? Logo ao abrir o livriuho do 2° grau o aluno encontra, ocupando uma pagina inteira duas grandes manchas pretas que, debalde, pretendem representar os dois heroicos aviadores portugueses ! E depois espalhados por todo o livro, encoutramos bonecos ridiculos, quasi caricaturas, exemplares estafados de uma arte barbara, gravuras que borram as paginas em lugar de as ornar e vão assim de encontro ao fim do educador, pervertendo o sentimento estético e falseando a visão dos pequeninos leitores. E temos aqui dentro do pais, circulando largamente pelas escolas de inglese de marata, esses livros escolares da India Inglesa, lindas edições das casas *Manomillan*, *Zougman's*, etc, eutre os quais e os nossos procurará, quem quer que seja, estabelecer confronto que não será nada lisongeiro para os nossos autores, quere no tocante à acessibilidade dos respectivos preços, quer no tocante ao aspecto exterior e ainda ao conteudo,

Os alemães costumam dizer para a escola o melhor é apenas o suficiente. Nós não levariamos a nossa exigencia a tal ponto, contentar-nos iamos só com o aceitavel, o admissivel.

Não nos move nenhuma má vontade contra os autores dos livros a que nos vimos referindo. Mas manda a verdade que se diga que um livro nas condições em que forem editados os da autoria dos Srs. Prudente e outros não é, nem pode ser um amigo, mas sim, um instrumento de tortura.

E se a sua adopção nas nossas escolas primarias mereceu os preparos dos pais dos alunos, as crianças, por sua vez, tambem protestarão a seu modo, aprendendo contra vontade pouco e mal e desinteressando-se do estudo !

A' janela....

Da nossa janela ve-se um pacifico rio cujas aguas azuladas circundam uma belissima praia, semelhante a um espelho encaixilhado em rica moldura, fazendo realçar mais e mais a alvura das velas pandas dos bateis que voltam da pesca do mar alto, das tones, e dos funis das nossas safadas lanchas: que alegria descuidada que por ai vai, nem um semblante carranoudo sé vé cremos que assim todos os homens do mar, tem um ar franco, folgasão e cômunicativo e como contrasta esse riso humilde com as lagrimas que orvalham as faces de tantos desgraçados que são os *servidores* do Estado principalmente os das provincias de Africa Não ha dinheiro para se lhes pagar e nem para pagar a hora e tempo os funcionarios desta inditosa terra, e com o riso alvar a bailar-lhe nos labios vão criando sinecuras, anichando afilhados,

Gostamos de têr sempre as provas na mão, eis as cartas que jogamos, se lhes sobra coragem para ganhar a pártida apresentem-se na arena, com a mente serena, desempoeirada de paixões e vamos ao torneio. Que é o posto, zootecnico que se pretende criar no palacio do Cabo, que corre risco, como com muita pilheria diz a 'Terra' de os galinaceos, os bovinos e os caprinos irromperem pelas suntuosas salas da residencia governamental? Só agôra é que lhes passou pelo cerebro de promover ó faminto pecuario, melhorando e aperfeiçoando as raças indigenas', só agora, quando na caixa do tesouro do Estado não retine nem um misero caracol ?

Que ê a compra do 5 *belos cavalos*, que nos custaram olhos de cara? Para que nos serve eles ? Para no vasto largo do quartel do corpo de Policia de Pangim alguns previlegiados se exercitarem no jogo do *Polo* e nos exercicios da equitação ? Quando mingua a *ração* para homens como disse o "Heraldo" querem cavalos ? Para lhes dar de comer' a nossa miseria, a nossa desdita, a nossa eterna vergonha ?..

Bem dissera alguem: ' E' fado deste nosso Portugal moderno, *melhorar* tudo as avessas...' Sim, laucem aliás uma vista restrospectiva por tudo o que nos empesta, por essa crapula e vereis uma legião enorme de famintos que cresce sem cessar, para ir banquetear-se á mesa orçamental que não tem já há quanto, mais fatias á distribuir, o que nos faz lembrar uma pitoresca historia que vem narrada num livro de Julho Diniz se a memoria nos não ê rêbelde, ei-la: Havia num convento uma pintura muito grande representando a ceia de Cristo; e era essa pintura a que mais atraia as meditações dum franciscano, Um dia aproximou-se dele um outro frade e lhe perguntou: Que estaes a pensar meu irmão, quando com tanta atenção olhais para esse quadro ? E' que não ha pior modificação e maior tormento ver doze pessoas á mesa e tam pouco de comer encima dela.

O que não faria agora o bom do franciscano vendo essa mesa orçamental e tantos famintos a cumerem? O que nós devemos esperar agora é um frande quere dizer uma mão de ferro, que tenha compaixão deste quadro que diferencia-se doutro por encerrar uma realidade palpavel, uma realidade nua

त्याचा कारभार स्वतः सरकारकडे असून केवळ कंत्राटदारांचे मिडेल मळी पडून नसतीच कुधारकी मिरवणारी नोकरशाही आपल्या व्यवहार ज्ञानशुन्यतेचें जें प्रदर्शन करीत आहे, याचें फार आश्चर्य वाटतें !

सदर बोटींच्या कारभारास आरंभ करतेवेळीं बोटींचे टाइकुजीविषयीं व इतर हरएक व्यवस्थेसंबंधी जी मर्यादा आंखली होती तीच्यावर हुकूम चालूं न देतां, "हम करेसो कायदा" या तत्वान्वयें [बोटींच्या रीपरेर व इतर रंग वगैरे देण्याचें बाबतींतील रक्कम चापून घेण्यांत मात्र मर्यादेचें उल्लंघन बिलकूल झालेलें नाहीं !] वागून आज बोटींची जी निकृष्ट अवस्था झाली आहे, तीच्याकडे वृत्तपत्रकारांनीं कितीहि कंठशोष केला. तरीहि त्याकडे नोकरशाहीचें लक्ष्य जात नाहीं, यावरून काय समजावें ? आम्ही गेल्या एका अंकांत म्हटल्याप्रमाणें एका बोटीनें जगर एका उतारूनें तरी जलसमाधी घेतल्यावांचून सरकारचे डोळे उघडणार नाहींत हें खास.

बोटींच्या धक्क्यांचीहि तीच गोष्ट निदान प्रत्येक सहामाहीला तरी धक्क्याची व बोटींची अधिकारी तज्ज्ञांकडून पहाणी होऊन कुठे काय दुरुस्ती केली पाहिजे याकडे लक्ष्य दिलें असतें तर सगळेच धक्के जे आज अगदीच डबघाईस आले आहेत तसे न होतां त्यानीं काहीं वर्षे काढलीं असतीं. आतां तर धक्क्यांचें सगळेंच काम नवें केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. म्हणजे जें कार्य तत्परतेनें योग्य वेळीं केल्यास पांच रुपये खर्चांतून निभावलें असतें, त्यास आतां पांच हजार रुपये खर्च करणें भाग आहे. त्याच प्रमाणें बोटींच्या उत्पन्नातून ठराविक रिजर्वफंड साल अखेर काढून निराळा ठेवला असता तर प्रतीपांच वर्षांतून एका बोटीचें सामान विकत आणण्यास सुलभ झालें असतें. तूर्तच्या कर्जबाजारीपणांत नवे धक्के बांधणें व नव्या बोटी तयार करणें मुष्कीलीचे असल्यामुळें यापुढें जें कर्ज काढून, असोळणें वगैरे गांव विकून अगर नवी करपट्टी बसवून ही बोटींची आणि धक्क्याची व्यवस्था होते तर पहावी !

सारांश असे पुष्कळ दाखले सांपडतील कीं पोर्तुगीज राज्यकारभारांत व्यवहार ज्ञानशून्यतेचें स्तोम माजल्यामुळें कारभाराच्या गाड्यास खीळ पडण्याची दुश्चिन्हें दिवसेंदिवस जास्त प्रमाणानें दृग्गोचर होत आहेत !

बालोन्नति समाज, केपें

या संस्थेतर्फे विजयादशमीच्या उत्सवानिमित्त चालू महिन्याच्या ता. २७।२८।२९ रोजीं संस्थेच्या दिवाणखान्यांत जाहीर व्याख्यानें होणार आहेत. व्याख्यात्यांचीं नावें व इतर कार्यक्रम दोन दिवस आधीं हस्तपत्रकाच्याद्वारें जाहीर करण्यांत येईल

रा. रा. शिरवैकर, सेक्रेटरी

—येत्या अंकापासून विद्वान लेखक श्री. सु. रा. सामंत यांची लिसेवाच्या शिक्षणासंबंधीं ओजस्वी व विचार परिप्लुत लेखमाला सुरु होईल.

Para o n° seguihte

Por falta de acumulação de materia tivemos de deixar para o n° imediato o brilhante artigo do sr. *Sa Manta*.

दसरा आला !

मुक्या प्राण्याची कत्तल !

दसरा जवळ टेपला. त्या पवित्र दिवशीं सर्वतोपरी वंदनीय आणि पूज्य अशा श्री भगवती देवीच्या आणि क्षत्रिय देवतांच्या पटांगणांत हजारो बकऱ्यांचा, कोंबड्यांचा आणि रेड्यांचा बळी आपले दुष्ट किंवा अनिष्ट हेतु तडीस नेण्याच्या हेतूनें दैवताच्याच 'भगतां'च्या हातून कत्तल होणार आहेत.

संसारांत हिंसा अनेक प्रकारानीं होते. त्यांत पुष्कळशीं माणसें धर्माचें निमित्त पुढें करून हिंसा करताना दृष्टीस पडतात. त्या सर्वांत पहिल्यानें आपण बलिदान आणि यज्ञ यांच्याकडे लक्ष देऊं, हिंदुधर्मशास्त्रांत बलिदानाचें विधान ठिकठिकाणीं करण्यांत आलें आहे. परंतु वास्तविक बलिदान म्हणजे काय किंवा बलिदान म्हणतात कशाला आणि तें करावें तरी कसें या गोष्टीकडे लोक फारच थोडें लक्ष पुरवितात. व आपल्या जिव्हेंद्रियाची लोलुपता पूर्ण करण्यासाठीं देवादिकांची व शक्तींचीं नांवे पुढें करून बलिदानाच्या नावांखालीं बिचाऱ्या निर्दोष प्राण्याची हत्या करितात. खरोखर पाहिलें तर बलिदान म्हणजे काय ? 'देवोद्देशेन यथाविधि पूजोपहार त्यागो बलिः' देवाच्या निमित्तानें विधिपूर्वक पूजेच्या वस्तूचा त्याग हाच 'बलि'शब्दाचा साधा आणि सरळ अर्थ आहे. अर्थात् भक्तजनांकडून मातेच्या अथवा भगवंताच्या प्रेमासाठीं ज्या सर्व प्रकारच्या पूजासाहित्याची आपण प्रभुचरणीं भेट ठेवितों अर्थात् भगवंताच्या पूजेसाठीं जें पूजासाहित्य आणितों व भगवंतचरणीं अर्पण करितों त्याचेंच नांव 'बलिदान' हें होय. या वरून आपणास असें दिसून येईल कीं बलिदानाच्या सरळ आणि सामांन्य व्याख्येंत पशुद्वारा बलिदान करण्याचें कोणत्याही तऱ्हेनें सांगितलें नाहीं. भक्तिपूर्वक व यथाविधि कोणतीही वस्तू (प्राणी नव्हे) देवदेवी यांच्या समोर ठेवावी व त्यानां समर्पण करावी याचें नांव 'बलिदान'. शुद्ध भक्तिभावानें अर्पण केलेल्या अल्पमोलाच्या वस्तूनें जी देवी प्रसन्न होते ती भक्तिरहित, वाटेलतेवढ्या नैवेद्यानें देखील संतुष्ट होत नाहीं. म्हणून आपण खास लक्षांत ठेविलें पाहिजे कीं भक्ति हेंच उपासनेचें मूळ कारण आहे निर्दोष प्राण्यांचा वध, त्यांची निर्दयता, अभक्ति आणि जिव्हेंद्रियाची लोलुपता स्पष्टपणें जाहीर करितों.

देवी ही जगांतील सर्व प्राण्यांची माता आहे. तिचें प्रेम आपल्या संतानावर अर्थात जगांतील सर्व प्राणीमात्रांवर एकसारखेंच असतें. उलट नैसर्गिक नियमाप्रमाणें मनुष्य प्राण्यांपेक्षां श्वापदिकांवर थोडेंसें जास्तच प्रेम असणें साहजिक आहे कारण पश्वादिक मनुष्या पेक्षां लहान आहेत आणि आईची लहान लेंकरांवर जास्त ममता असते अशा परिस्थितींत त्याच तिच्या लाडक्या लेकराना तिच्याच वडील पुत्रांनीं तिच्या समक्ष घेऊन जाऊन तिच्याच नांवानें त्याचा वध करणें हें एक प्रकारचे केवढें तुच्छवादर्शक निर्दय, आणि क्रूरतेचें कृत्य आहे ! याचा बुद्धिमान मनुष्याला सहज विचार करितां येण्यासारखा आहे. याप्रमाणें आईसमक्ष तिच्या लेंकरांना नेऊन त्यांचा वध केल्यानें आई खरोखर कधींही प्रसन्न होऊं शकेल काय ! आणि पुत्राच्या वधानें माता प्रसन्न होईल किंवा होत असेल तर तिला माता -आई- असें खरोखर म्हणतां तरी येईल काय ! खरोखर पाहिलें तर मांस लोलुप मनुष्यें पशुवध करून मातेची प्रसन्नता मिळवितात. व त्याच भयंकर पापाचे भयंकर परिणाम जिकडे तिकडे अनेक रोगराईच्या रूपानें आम्हीं भोगीत असून, मृत्यू आपला कालदंड घेऊन या पृथ्वीवर दत्त म्हणून उभा आहे.

पुष्कळ वेळां कित्येक अज्ञानीं मनुष्यें आपणास पुत्रप्राप्ती व्हावी म्हणून अगर रोगनिवारणार्थ असा नवस करतात कीं—'मला पुत्र (अगर इच्छित प्राप्त) होईल तर देवी तुला मी एक बकरा अर्पण करीन.' समजा वरील नवस रोगनिवारणार्थ केल्यानंतर आयुष्याच्या प्रबलेच्छेनें कदाचित् तो रोगी बरा झाला तर वरील नवस सफल झाल्याच्या खोट्या श्रद्धेनें तो मातेपाशीं जाऊन एका निर्दोष बकऱ्याला क्रूरतेनें मारून त्याचा प्राण घेऊन नवस फेडतो. अशा तऱ्हेचे नवस करणाऱ्यांनीं थोडासा विचार करावयास पाहिजे कीं जर नवस केल्यानें-एका निर्दोष बकऱ्याचा प्राण घेतल्यानें- माता मनुष्यांचें आयुष्य वाढविल तर मग या दुनियेंत कोणीं देखील मरणार नाहीं. आतां येथें आम्हीं असें विचारण्याची परवानगी घेतों कीं नवस केल्यावर कोणीं मेला नाहीं काय ? तर मग मनुष्याला जिवंत ठेवण्याला नवस कशा तऱ्हेनें कारणीभूत होऊं शकतात? सारांश काय कीं रोगी मनुष्याचें आयुष्य शिल्लक असलें तर तुम्हीं नवस केला तरी तो वांचणार व न केला तरी वांचणार आणि मनुष्याचें आयुष्य शिल्लक नसलें तर शेंकडों अथवा हजारों नवस केले तरी तो मरणारच. अतएव नवस करणें हें दोन्हीं दृष्ट्या निरर्थक आहे.

स्वतः श्रीभगवतीमातेनें पद्मोद्भवर खंडांत खालील उक्ति सांगितलेल्या आहेत.

"देवयज्ञे पितृश्राद्धे तथा मांगल्य कर्म्मणि ।
तस्यैव नरके वासो यः कुर्याज्जीवघातनम्॥
मद्याजेन पशून् हत्वा यो भक्षेत् सह बन्धुभिः।
तद्गात्रलोमसंख्याब्देरसिपत्रवनें वसेत्॥
आत्मपुत्रकलत्रादि सुसम्पत्ति कुलेच्छया ।
योदुरात्मा पशून् हन्यात् आत्मादीन् घातयेत् स तु"॥

अर्थात — देवयज्ञ, पितृयज्ञ आणि दुसऱ्या मांगलीक कार्यात जो मनुष्य जीवहिंसा करितो तो नरकलोकाप्रतच जातो.

शिवाय मांस निमित्त पुढें करून पशूंची हिंसा करून जो मनुष्य आपल्या बंधुवर्गासह मांस भक्षण करितो, तो ज्या पशूचा वध केला त्याच्या शरिरावर जितके रोम -केश- असतील तितके वर्षे पावेतों 'असिपत्र' नावांच्या नरकाप्रत जातो. तसेंच जो मनुष्य आत्मा, पुत्र, स्त्री, लक्ष्मी आणि आपलें कूल यांची इच्छा धारण करून पशूचा वध करितो तो स्वतःहाच्याच आत्मा वगैरेंचा नाश करितो.

असो आतां इतकें सांगायाचें आहे कीं संसारांत जीव-दया-अहिंसा या समान कोणताही धर्म नाहीं. तरीं यंदाच्या दसऱ्यांत शक्य त्यानीं व शक्य तेथें हिंसेचा निषेध करून थोडीबहुत तरी मुक्या प्राण्याची मृत्युसंख्या न वाढविण्याची खटपट करावी अशी हात जोडून प्रार्थना आहे. धर्मकार्यें सत्कार्यें अहिंसाधर्माच्या रक्षणा साठींच आहेत. म्हणून दरेक मनुष्याला अशी विनंती करण्यात येत आहे कीं त्यानें आत्मवत् सर्व भूतेषू या भावनेची हृदयांत दृढ स्थापना करून जीवदयेचे - अहिंसा धर्माचें- प्रतिपालन करण्यासाठीं खालील महाभारतांतील श्लोक आपापल्या हृदयपटलावर खोदून ठेवावा.

"अहिंसा परमो धर्मस्तथाऽहिंसा परो दमः
अहिंसा परमं दानमहिंसा परमं तपः"॥

अर्थात- अहिंसा हा परमधर्म आहे, अहिंसा हा परम दम आहे, अहिंसा हें परम दान आहे, आणि अहिंसा हें परम तप आहे.

के. श्री. विष्णुदास—मांशेल

बेजबाबदार विधानें !

(मागील अंकावरून समाप्त)

शोध प्रमाणें इंग्लीश भाषेची महती गाण्याकरितां त्यानीं जी अगडबंब नामावली सुचविली आहे. त्यांतील व्यक्तींची थोरवी इंग्लिश भाषेमुळेंच आहे असें दाखविण्याकरितां त्यानीं किती ओढाताण केली आहे हें पाहिल्यास सखेदाश्चर्य वाटतें. "डॉ. बोस प्रभृती शास्त्रज्ञ जे जगभर प्रसिद्धीस आहे. व त्यानीं जी हिंदुस्थानची किर्ती जगभर केली ती इंग्रजी शिक्षणामुळेंच जंतुशास्त्राच्या बाता मारून नव्हे", (ऐका !) हें वाक्य. वाचून मौवल्यांच्या अगाध ज्ञानाबद्दल हंसावें कीं रडावें ! असो. त्यांची कींव करावी तेवढी थोडीच. त्यांच्या माहितीकरितां इतकेंच कळवितों कीं डॉ. बोस यानीं हिंदुस्थानची कीर्ति जगभर केली ती इंग्रजी वाङ्मयांत प्राविण्य मिळवून किंवा त्या भाषेवर प्रभुत्व गाजवून नव्हे तर मौवल्यानीं उपेक्षिलेल्या "जन्तुशास्त्राच्या बाता मारूनच" कदाचित् त्यानां वाटलें असेल कीं, जन्तु तें काय आणि त्यांवरून नांव कसें मिळवितां येईल? तेव्हां देऊं या त्याना मिरवून.

मात्र याच त्याच्या स्वतःच्या अज्ञानानें त्यांना तोंडघशीं पाडलें, नाहीं तर ते असें लिहिते ना. कारण शास्त्रज्ञांचे शोध भाषेमुळें खोळंबून राहत नाहींत. फार तर काय ते खुणांनीं देखील कळविल्यास तज्ञांकडून त्यांची वाहवा होते. शिवाय दोन तीन वर्षामागें मुंबईत डॉ. बोस यांनीं शंभर शंभर रुपयांचीं टिकीटें लावून जीं व्याख्यानें दिलीं होतीं तीं तेथें इंग्लीश भाषेवर किंवा शिक्षणांवर आपलें श्रेष्ठत्व दाखविण्यास नव्हतीं तर जन्तुशास्त्रासारख्या अति सूक्ष्म आणि गहनविषयावर आजपर्यंत त्यांनीं लावलेले शोध व त्यांचें प्रयोग करून दाखविण्यासाठीं होतीं हें चांगलें लक्षांत ठेवावें.

४) पोर्तुगीज भाषेच्या संपत्तीविषयीं साशंक होऊन "इतर सुधारलेल्या राष्ट्रांशीं तुलना करतां पोर्तुगीज भाषा फारच खालच्या दर्जाची आहे असें एक काल्पनिक मत खुद्द पोर्तुगीज लोकांचें म्हणून रा. मौवल्यानी दिले आहे व ',त्या भाषेंत भाषांतराशिवाय दुसरें कांहीं नाहीं असें सांगतात." यांवरून पेनाच्या फटकाऱ्यासरशीं 'लिसेवाचें थोडें शिक्षण असलेले तळावलीकर छातीवर करून जोरजोरानें पोर्तुगीज भाषा महत्वाची आहे असें म्हणतात हा विचित्रपणा व लिसेवाच्या शिक्षणाचा परिणाम होय' अशी प्रतिपक्षीयावर उलटीं उडी टाकली आहे. आम्हांला वाटतें रा. मौवल्यांनां 'विचित्रपणा, लिसेवांतील शिक्षण' या शब्दांशिवाय आणखीं कांहीं येत नसेल. वादविवादांत कोठेंहि भडूं द्या, शेपं क्षेपेन पूरयेत् या न्यायानें, ढोंग, विचित्रपणा वगैरे शब्दांचा मारा करून त्यानीं पळवाट काढली आहे. आतां त्यांनीं पोर्तुगीज भाषेविषयीं खुद्द पोर्तुगीज लोकांचे म्हणून जें मत दिलें आहे तें त्यांचें स्वतःचें त्या भाषेविषयींचे अज्ञान होय. कारण त्यांत काय आहे हें त्यानां तर ठाऊक नाहीं. म्हणून ते लोक त्या भाषेंत भाषांतराशिवाय कांहीं नाहीं असें सांगतात, यावर फेड विश्वास स्वतःच्या अज्ञानाचा विचार न करतां दुसऱ्यांस अपशब्द देण्यास तयार झालें

ANNO VII — NUMERO 25 — 1922 | QUEPEM QUINTA — FEIRA 28 DE SETEMBRO

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai
Assinatura
India Portugueza...... 3-00-00
...esa...... 3-08-00
... avulso...... 0-01-00
Anuncios
A... linha...... 00-01-00
Pa... caso contrato especial

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई
वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)...... ३-००-००
ब्रिटिश इंडिया...... ३-०८-००
किरकोळ अंकास...... ०-०१-००
जाहिरातीचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातीचे दर समक्ष अगर पत्रद्वारे ठरविण्यांत येतील.

[...] केपें, गुरुवार, तारीख २८ माहे सप्टेंबर सन १९२२ [खास अंक २५ वा,

...araja, Mestiço, Mistico e Sobre--natural

II

Já no nosso primeiro artigo, expuzemos as variadas razões pelas quais não podia ser taxádo dum simples tolo o festejado autor de 'Traços Genealogicos deSivaji Maharajá." Vamos, desta vez, entrar na analise da sua obra.

Poucos dos nossos leitores terão visto êsse exquisito trabalho do sr. Fragoso, apezar de seu ostentoso titulo, e que nos torna forçoso relatar aqui, com toda a serenidade, a *genesis* e o intuito do mesmo.

Os que se acham familliarisados com a historia do Imperio Marata e com os livros de Grant Duff e outros autores citados pelo sr. Fragoso, só se desatarão a rir, depois da leitura do dito opusculo. Para os leitores desta classe, a *obra* do sr. Fragoso, sò servirá da medida para avaliar o grau de quanto é desconhecido neste torrão de Maharastra a sua propria historia, facto este que ainda o proprio sr. Fragoso não ignora, o que se pode calcular pelo atrevimento que têve em lançar á venda no mercado o dito seu opusculo.

S. Excia não deixou de notar tambem que desde que a historia dos maratas não tinha logar no programa do ensino dos nossos estabelecimentos de instrução publica pouca probabilidade havia de encontrar aqui individuos que se dedicassem ao estudo das obras de Grant Duff, Sarkar e outros historiadores. Sendo tais as condições do publico leitor em Goa o sr. Fragoso e outros escrevedores da sua laia, não tem a recear que os seus escritos sejam devidamente criticados e êles...ridicularisados.

Atendendo ao que fica dito, não pode o sr. Fragoso ter culpa, quando escreveu aquele livro na persuasão de que seria acolhido entre nòs como um indianista de distaque e uma autoridade inconfundivel na literatura e historia maratas pelas constantes citas; no seu livro, dos nomes de Grant Duff, Acworth etc, e menção de muitos cousas exquesitas e desconhecidas de nòs, tais como Khandeshowari, Marjan Kharjan, Jauli, Mauli, Bhadrakali, Patravali, etc, etc. Tinha éle razão, quando disso se persuadiu, porque temos á barda exemplos em Goa de muitos individuos terem sido intitulados "orientalistas" quando os seus conhecimentos de coisas do 'Oriente' eram tão solidos como o são do sr. Fragoso no assuuto do seu famoso livro.

Animado, sim, com a idea de se tornar um indianista a todo o custo, o sr. Fragoso resolveu utilisar para este fim a sua tradução versificada dum 'Powadò' marata:-e, enquanto S Exa. estava ocupado neste mister, viu diante de si uma dificuldade insuperavel. E' que o publico leitor portuguez em geral tem pouco interesse nessas coisas dos maratas; e, nestas condições, se S Exa. se metesse em escrever assuntos exclusivamente da historia deste povo, nenhum portuguez genuino se incomodaria em os lêr com vontade como sucedeu. Era, portanto, necessario que a sua obra tivesse ligação com qualquer coisa que dispertasse a atenção dos portuguezes. E é provavelmente nesta altura que o engenhoso autor de Traços Genealogicos', adoptou o seguinte metodo para o seu livro: dividiu-o em duas secções distintas; na primeira encaixou a sua tradução do 'Powadó' no qual encontrava-se glorificado o nome do inclito Sivaji, fundador do Imperio Marata. E' verdade que esta seção servia a S. Exa. para estabelecer a sua autoridade nas materias relativas á literatura e historia maratas. Mas não lhe podia servir para o segundo fim que era de dispertar a atenção dos leitores portugueses que sò gostam de ler coisas portuguesas; e, para conseguir este seu tão almejado desejo, distinou a segunda secção do seu livro para liga-lo a alguma cousa que fosse portuguesa. E aproveitando por isso das trevas de ignorancia que reina entre nós com respeito á historia dos maratas, o astucioso autor empenhou-se em provar que a gloria do inclito Sivaji, cantada no dito powadó era a gloria dos portugueses, insinuando que o hiroe glorificado não tinha puro sangue marata, e que êle tinha uma mãe adultera que se amancebara com um portuguez, concluindo, assim, que a glorificação do tal Sivaji era...a glorificação da raça mestiça e indirectamente da raça lusa-

E' escusado dizer que uma insinuação desta natureza é bem arriscada, pois que se alguem se afoitasse avança-la nos territorios maratas como Kolhapur ou Satara, seria esse alguem alvo de apupos da parte do publico. Mas o sr. Fragoso que não é tolo, sabe muito bem que Goa não é Kolhapur ou Satará, que distam centenas de milhas de Oxel, e que a lingua portuguesa é disconhecida naqueles paizes..

Sendo deste modo garantida a segurança fisica, o sr. Fragoso fortificou-se em seguida contra os ataques morais dos criticos que tornassem publicas as suas falsidades e, assim, com uma astucia, sob todos os titulos digna de louvar, arvorou-se em investigador historico insuspeito, citando à cada passo autoridades de grande calibre mas...transformando o sentido das citações a seu belo talante na certeza de que os grandes nomes de Grant Duff. e Sarkares fariam calar os criticos que ignorassem as obras dos mesmos autores. Depois destas precauções o sr. Fragoso atrevidamente deu á luz, com infeliz sucesso, a sua obra *mestiça*, que havia de coloca-lo num lugar muito elevado na galeria de Indianistas e Orientalistas de Goa.

Uma vez conhecida esta *genesis* da *obra* do sr. Fragoso, não admira a causa de tantas supressões, doturpações, modificações e invenções de que ela está profusamente recheiada.

Se não fosse o abominavel ataque do opusculo contra a honra e castidade duma senhora virtuosa que deixou de existir ha alguns seculos, não cairiamos na tarefa de nos meter com ele, e teriamos deixado campo aberto para ele grangear livremente a fama dum indianista, orientalista ou ainda dum omnisciente. Pouco nos importariamos com isso. Mas' o amigo ultrapassou os limites da paciencia dos conhecedores da historia e literatura maratas e dos trabalhos originais de Grant Duff e outros. Eis porque se torna forçoso desnuda-lo.

Que o tal senhor seja exposto ao publico é necessario por mais duma razão. Em primeiro lugar, porque o livro do sr. Fragoso procura ultrajar a honra e castidade duma mulher inocente e santa que não se acha na situação de poder defender-se duma acusação vil e ignominiosa. Em segundo lugar, porque o golpe é vibrado numa lingua que os seus descendentes ou partidarios ignoram e portanto não há processo de difamação contra o libeloso escritor. Em terceiro lugar, porque o sr Fragoso atribue a grandes autores como Grant Duff, etc, intuitos que eles nunca abrigaram. Em quarto e ultimo logar, porque o intrepido investigador finge que faz tudo *isto* em nome da Historia e da Verdade, pela unica ambição que alimenta de fazer-se um Indianista e Historiador...

Agora, se o livro fôsse um resultado sòmente da ignorancia do escritor não seria ele condenavel. Teriamos simplismente apresentado os seus erros a fim de serem rectificados. Mas o que póde ser facilmente provado, ainda com uma leitura superficial do livro é que o ilustre escritor faz afirmações falsas apesar de existirem diante dos olhos factos exatos nos proprios livros que cita. E' por isso mesmo que ele não só deve ser desmascarado mas tambem ridicularisado. E para que a exposição e o ridiculo sejam perfeitos, deve ser presentado com os proprios factos que ocultou. Com este criterio, havemos de deixar perante o publico, em quanto formos provando a falsidade dos argumentos do sr. Fragoso os proprios livros que ele cita sem mais tratar dos outros trabalhos ou autores.

E' certo que uma mentalidade que se rigosija em chamar adultera a uma senhora inocente e casta, não é uma mentalidade digna de argumentos. Será apenas uma mentalidade para servir dum prototipo de como estamos a arrastar ao cumulo de degeneração a nossa sociedade. A sociedade que tem membros que se orgulham com uma suposta imoralidade dos seus antepassados é uma *sociedade* que se precipita para um abismo de degradação moral e mais nada. O nosso Fragoso tem fornecido, lá fora um, bom exemplo *disso*.

Ele não está porem satisfei-

गुरुवर्य प. रा. मिनारी

[हेडमास्तर सारस्वत-विद्यालय]

गुरुब्रह्मा गुरुर्विष्णु, गुरुर्देवो महेश्वरः
गुरुःसाक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवेनमः

गुरूची योग्यता सर्वांत श्रेष्ठ आहे. कारण भावी सुराज्याचा आधारस्तंभ जी तरुणपिढी तिची उत्तम वाढ करविण्याचें तिच्यांत उत्तम गुणांचा प्रकर्ष करण्याचें तिच्यांत राष्ट्रीयत्वाची कल्पना जागृत करण्याचें, तिच्या शारीरिक, मानसिक व नैतिक शिक्षणाची उन्नति करण्याचें, एवंच तरुणपिढी सुशील, सुनीतिमान, सुशिक्षित करण्याचें काम सुशिक्षकाचें आहे. असे सुशिक्षक फारच विरळा आढळतात. त्यांपैकीं आपल्या विद्वत्तेनें लोकवंद्य झालेल्या एका सुशिक्षकाची थोडी माहिती देत आहें.

हे सुशिक्षक म्हणजे आज ११ वर्षेंपर्यंत विद्यार्थ्यांस विद्यादान पाजून गोमांतकाची ज्यांनीं तनुमनें करून सेवा केली ते वाङ्मयोपासक, सरस्वतीभक्त गुरुवर्य परशुराम रामचंद्र मिनारी हे होत. गु. मिनारी यास सर्व गोमांतकस्थ पूर्णपणें ओळखितच आहेत. आज ११ वर्षें ते म्हापसें येथील सारस्वत विद्यालयाचे हेडमास्तर आहेत. यांचा जन्म वेंगुर्लें तालुक्यांतील आरोली-शिरोडें या गांवीं झाला. गांवठी शाळेंत ४।५ इयत्तांपर्यंत मराठी व एक दोन पुस्तकें संस्कृत इतकाच यांचा अभ्यास झाला. नंतर त्यांनीं जवळ जवळ १७।१८ वर्षें वयाच्या सुमारास, साधारण शिक्षकाची नोकरी केली. व ४।५ वर्षें, अध्ययन सांभाळून, संस्कृत-मराठीचें अध्यापन केलें व अपूर्व विद्वत्ता संपादन केली. नंतर त्यांनीं वयाच्या २५ व्या वर्षी सावंतवाडी संस्थानांत एका शाळेंत नोकरी धरिली व विद्वत्तेच्या बळावर ते गर्ल्सस्कूलच्या हेडमास्तरकीच्या पदावर पोंचले (गर्ल्सस्कूलची हेडमास्तरकी विद्वान व उत्तम शिकविण्याची कला उत्तम साधली आहे, अशांनाच देत असत.) सावंतवाडी संस्थानांत त्यांनीं जवळ जवळ ७+३५ मिळून, ४२ वर्षें शिक्षकाचें काम केलें, व दरकमें योग्य वय घालवून सर्व विद्वज्जनांकडून धन्य म्हणवून घेतलें. या वेळीं यांना वाचनाचा इतका नाद होता कीं, बहुतेक संस्कृत (अध्यात्मिक व धार्मिक) ग्रंथ पुष्कळशीं पारायणें केल्यामुळें त्यांचे जवळ जवळ अथपं ठ झाले होते.

जेव्हां संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेचें दुसरें अधिवेशन म्हापसें येथें भरलें व सारस्वत विद्यालय स्थापन करण्याची योजना केली गेली, त्यावेळीं श्री. अच्युतराव कुंभवडेकर व श्री. बाबामहेश दाभोळकर यांनीं उत्तम शिक्षकांविषयीं सावंतवाडी संस्थानांत चौकशी केली व गु. मिनारी यांची शिफारस, विद्वत्ता, लोकप्रीयता शिकविण्याची पद्धति वगैरे पाहून त्यांनीं शाळाखात्याकडे मागणी केली व मोडखर्च करून त्यांस म्हापसेंस आणिलें आणि २ मार्च १९११ रोजीं सारस्वत विद्यालयाची स्थापना केली.

म्हापशांत त्यावेळीं एकी-बेकीं, ब्राह्मण वाणीं असे निरनिराळे पक्ष होते, व प्रत्येक पक्षाच्या वेगवेगळ्या शाळा होत्या. एकी पक्ष—सं. गो. सा. ब्रा. परिषद पक्ष—यावेळीं जोरांत नव्हता बेकी ब्राह्मण पक्षाकडून तो बहिष्कृत केला गेला होता. यामुळें दणाईत यांच्या घरीं रा. सोयराजी रामचंद्र आरांवदेकर या होतकरू शिक्षकाच्या हाताखालीं जी लहानशी अवघ्या ३९ मुलांची शाळा चालत होती, तिचेंच सारस्वत विद्यालयांत रूपांतर केलें गेलें. नंतर सदरहू मास्तराच्या मदतीमुळें शाळेची उत्तरोत्तर भरभराट होत गेली. व लोक उदार मनानें क्षुल्लक पक्षाभिमानास बळी न पडतां, गु. मिनाऱ्यांच्या अप्रतिम शिक्षणाभिलाषानें आपलीं मुलें सा. वि पाठवूं लागले. लवकरच मराठी सात, पोर्तुगीज दोन, इंग्लिश तीन इयत्तांपर्यंत शिक्षणाची व आठ पर्यंत शिक्षकांची सीमा वाढवली गेली (आज ३०० मुलें, ७ शिक्षक १७।१८ हजारांची इमारत व तितकाच फंड मिळून स्वतःच्या पायांवर उभें राहण्याची संस्थेस योग्यता आली आहे.) याचें कारण गु. मिनारी यांचें शिक्षण हें होय.

ही सारस्वत विद्यालयाची उन्नति व गु. मिनारी यांचें विद्यादान, सुखांत दिवस घालवण्याच्या कालाखानें बदललें नाहीं, त्यानें सच्छिल गृहस्थांवर, त्यांचे हयातींत आकस्मिक दुःखाचा त्यांच्या ज्येष्ठ मुलाच्या निधनाचा आघात केला. येऊं नये होता पण कालाच्या गहन गतीमुळें, दुर्दैवानें वृद्धापकाळीं त्यांचेवर तसा दुर्धर प्रसंग येऊन, त्यांची वृद्धशरीर यष्टि एकाएकीं फारच खालावत गेली आणि विद्यालयाच्या ११ व्या वाढदिवसाचे रात्रीं ज्वर येऊन अत्यवस्थ स्थितींतच त्यांनां त्यांच्या घरीं पोंचवावें लागलें. परंतु त्यांचा प्रेमळ सहवास कांहीं काळ लोकांस मिळावा म्हणून परमेश्वरकृपेनें त्यांची प्रकृति सुधरली गेली पण घरदारापासून दूर, पर गांवीं त्यांच्या गळीत झालेल्या देहयष्टीमुळें त्यांचा सारस्वत विद्यालयास आज अपरिहार्य वियोग होत आहे.

त्यांनीं संस्था स्थापन झाल्यापासून आपल्या परिमित वेतनावर दृष्टी न ठेवतां स्वत्याच्या दिलाच्या कळकळीनें विद्यालयाची, व व्याख्यानद्वारें जनताजनार्दनाची जी सेवा केली व आपल्या ज्ञानाचा फायदा देऊन लोकांना ऋणी करून ठेविलें, त्या त्यांच्या ऋणातून अंशतः तरी उतराई व्हावें या करिता येथील स्थानिक मंडळीनीं वर्गणी जमवून फूल नाहीं फुलाची पाकळी या न्यायानें ३००।३५० रुपयांची थैली, मानपत्र दान इत्यादि समारंभ ललितापंचमी दिवशीं करण्याचें ठरविलें आहे.

हे मार्मिक लेखक व उत्तम वक्ते आहेत, यांची साक्ष विविधज्ञानविस्तार, मासिक मनोरंजन, इ. मासिकांतून वेळोवेळ प्रसिद्ध झालेले लेख (यांच्या मनोरंजनच्या मित्र अंकांतील लेखाची पुष्कळ प्रशंसा झाली आहे.) व जिवबादादा केरकर यांचें चरित्र [हें आरंभीं सध्या संपादक असलेल्या गृहस्थानीं सुमारें ४० पृष्ठें लिहून गु. मिनारी यांकडे तपासावयास दिलें होतें परंतु मास्तरानीं त्याचें ४० पृष्ठांचे ४०० पृष्ठांत स्वतः रूपांतर केलें वत्याच्याच संपादकाखालीं प्रसिद्ध केलें] वगैरे लेख देत आहेत. यानीं अर्धशतकापेक्षां जास्ती काळ अध्यापन कर्मांत घालविला. ब्रिटिश हिंदुस्थानांत यांचे हजारों शिष्य मोठमोठ्यां योग्यतेचे, अधिकाराचे पुरुष झाले आहेत. व ते आपणांस गु. मिनारी मास्तर यांचे शिष्य असें म्हणवून घेण्यांत भूषण मानितात. ज्यांनीं स्वगृहापासून वृद्धापकाळांत सुद्धां दूर राहून, विद्यादानरूपी लोकसेवा करून, अतुल पुण्य संपादन केलें अशा या पुण्य पुरुषाचा लाभ गोमांतकास कांहीं काळ, निदान वर्षास एकदां तरी, होवो ! व जगचालक परमेश्वर गुरुवर्यांस वृद्धापकाळीं समाधान व शांति देवो अशी मागणी मागतों ! तथास्तु !!!

शिवदास.

लिसेव, लिसेवस्थ व लिसेवोत्तीर्ण

ले० १

भारताच्या गेल्या कांहीं अंकांतून, वरील मथळ्याखालीं गोवतां येईल, अशा विषयावर, कांहीं लेखकानीं वादप्रतिवाद चालू केला आहे. अशा प्रतीचा वादप्रतिवाद हें समाजांतील चैतन्याचें लक्षण असल्यामुळें त्याला वृत्तपत्रानीं अवश्य वाव देणें आवश्यक आहे. कित्येकांची अशी समजूत असते कीं कोणत्याही विषयावर पूर्वपक्ष, उत्तरपक्ष होऊं लागले कीं त्याकडे शहाण्या माणसांनीं 'कोंबड्याझुंजी'च्या दृष्टीनें पहावें. परंतु असली समजूत शहाणपणाचें सर्वांत मोठें लक्षण न मानतां दुबळेपणाचें एक लहानसें लक्षण मानणेंच अधिक योग्य होईल. जगांत असें तत्व क्वचित कीं जें वादविवादावांचून सिद्ध झालें, असें तेज क्वचित कीं जें घर्षणावांचून निर्माण झालें, असा रस क्वचित कीं जो पिळण्यावांचून निघाला; फार काय पण, असें धूतबद्ध क्वचित कीं ज्याच्या झोडपण्यावांचून मळ निघाला: अर्थात ज्याला तत्वाची चाड असेल त्यानें वादविवादाला आणि तदनुषंगिक घर्षण मर्दनालाही तयार असलें पाहिजे. उंसाच्या चरकाचे दोन्ही रूळ दोन बाजूला होतील तर रस कसा निघणार? आतां, ही वादविवादक्रिया पुष्कळदां घासाघीसीचें रूप घेते खरी; आणि त्याकरतां पुष्कळसा तेलाचा लेप चक्रांना करावा लागतो खरा; परंतु, जोपर्यंत चक्र परस्पर टेकून, त्यांना तेल माखत माखत राहून, काळ कंठिल्यानें उंसाचा रस निघण्याची शक्यता नाहीं, तोंवर ही घासाघिसीची क्रिया चालू ठेवणें अपरिहार्य आहे. चक्रें एकमेकांवर घांसून, उंसाच्या रसाऐवजीं, स्वतःचा कस काढूं लागलीं तरच तेवढ्यापुरता बंदोबस्त केला कीं झालें परंतु, कित्येक उतावळी किंवा भ्याबळ्या छातीचीं माणसें तशी स्थिति येण्यापूर्वीच 'घासाघीस', 'हटतट', 'बखेडा', 'वितंडवाद' असा शंखनाद सुरू करतात. आणि त्यामुळें सत्यनिर्णयाचें काम तसेंच पडून राहतें.

ज्या विषयावरील वादाचा उल्लेख आम्हीं वर केलेला आहे, त्या वादाच्या बाबतींतही आमच्या समाजांतील कित्येक नाजुक प्रकृतीचीं माणसें इतक्यांतच असा गवगवा करूं लागली आहेत. परंतु प्रत्यक्ष वादविवादाच्या क्रियेप्रतिक्रियेकडे पाहूं लागलों तर तसें कांहींच आढळून येत नाहीं. उलट असेंच आढळून येतें कीं, ही क्रिया अजून किती काळ तरी चालू राहिल्यावांचून तत्वनिर्णय होण्याची अपेक्षाच करतां येत नाहीं. असो. मुद्याचा प्रश्न हा कीं ज्यावर वादविवाद चालू आहे तो विषय वादविवादावांचून निकालांत काढणें शक्य आहे असें कोणत्याही जागृत विचारशक्तीच्या मनुष्याला मानवां येत नसल्यामुळें तो केव्हां ना केव्हां तरी वादविवादाच्या चरकांतून पार जाणें अत्यंत आवश्यक होतें. व ज्या गृहस्थानीं तो त्या चरकांत आणून सोडला त्यांनां दोष न देतां खरा तत्वान्वेषी मनुष्य त्यांचें त्यापुरतें कौतुकच करील हें निश्चित आहे

ह्या वादाला तोंड फुटण्याची पूर्वी एकदां सवड आली होती व त्या वेळींच त्याला पूर्वोत्तर पक्ष होऊन निकालांत काढणें शक्य होतें. परंतु, त्यावेळीं, आतांच्या इतकें, त्या विषयाकडे लोकांचें लक्ष्य वेधलें नव्हतें, म्हणून म्हणा; किंवा ज्या रीतीनें आमच्या समाजांत पूर्वपक्ष करण्याची वहिवाट आहे त्या रीतीनें तो न झाल्यामुळें म्हणा; फारसा वादविवादपटु वाचकांचें त्या वेळीं त्या पूर्वपक्षाकडे लक्ष्य गेलें नाहीं; व ज्यांचें गेलें, त्यानीं उत्तरपक्ष केला नाहीं. मग त्याचें कारण, ते लोक त्याच पक्षाचे असणें हें असो किंवा तशा प्रतीचा पूर्वपक्ष त्यानां उपेक्षणीय वाटला हें असो. आम्हीं हें दुसरेंच कारण ह्या ठिकाणीं गृहित धरून पुढें चालतों. परंतु, प्रस्तुत वादांत त्या पूर्वपक्षांतील कांहीं मुद्दे वादविवादांत भाग घेणाऱ्या लेखकांनीं अवलोकनांत आणल्यास ह्या ठिकाणीं योजलेला दृष्टिकोन स्पष्ट व्हायाला बरें पडेल. असु.

ज्या विषयावर प्रस्तुतचे पूर्वोत्तरपक्ष चालू आहेत त्याच विषयाला अनुलक्षून हा लेख लिहिला जात आहे. एवढ्याकरतां कोणी अशी मात्र गैरसमजुत करून घेऊं नये कीं त्यांतील कोणत्या एकाद्या पक्षावर तुटण्याचा ह्या लेखाचा मतलब असेल. किंवा, जर ह्या लेखांत, चालू वादांत भाग घेणाऱ्या व्यक्तींचा नामनिर्देश, किंवा त्यानीं उपस्थित केलेल्या मुद्यांवर भवति न भवति केली जात आहे, तर, ह्या लेखाचा हेतु असमंज्यावर मात किंवा समंज्यावर कुरघोडी चढवण्याचा असेल, अशा प्रकारचा ह्या लेखाचा उद्देश मुळींच नाहीं असें आगाऊच कळवून ठेवतों. अथवा, खरें बोलायाचें म्हणजे तसा उद्देश बाळगणें शक्यही नाहीं. कारण, ज्या स्वरूपांत सध्याचे पूर्वपक्ष उत्तरपक्ष चालले आहेत त्या स्वरूपांत कोणताही पक्ष सर्वस्वी चूक असें म्हणायाला आधारच नाहीं किंवा, ज्या लेखांतून त्यांचा ऊहापोह चालला आहे त्यांपैकीं असा कोणताही लेख नाहीं कीं, ज्यांतील सर्वच्या सर्व विधानें चूक असतील किंवा उलट सर्वच्या सर्व ग्राह्य असतील. (अर्थात, हें प्रस्तुत लेखाच्या मगदूरापुरतें हें उघड आहे. विशेष मगदूराच्या लेखकाला असेंच तंतोतंत वाटेल असें म्हणवत नाहीं.) असो.

आतां, ह्या 'लिसेव' विषयक वादवि-

ची कशी माती, होईल हें सहज लक्ष्यांत येण्यासारखें आहे! पण हें आमच्या शिक्षक वर्गाच्या ध्यानांत येईल तेव्हां ना? त्यानां तर इतकीं कामें आहेत कीं, तीं पार पाडण्यासच त्यानां मुळीं भरपूर वेळ नाहीं. अशा स्थितींत वर्षाखेर नापास मुलांची संख्या वाढल्यास नवल तें कोणतें?

गोव्याच्या वर्गणीदारांच्या नावानें मागील बाकीसह येत्या अंकापासून व्ही पी. रवाना होतील स्वीकार व्हावा.

म. भारत

--नाथालाल छुडुभाई c/o महादेव काकुले या सुप्रसिद्ध व्यापाऱ्याचे येत्या महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत रंगूनहून मुरगांव येथें एक लाख रुपयाचें तांदळांचे गोण येणार असून ते अगदीं माफक नफ्यानें विकण्यांत येतील असें कळतें.

Ano VII — Numero 26 — 1922

Quepem Quinta—Feira 5 de Outubro

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai

Assinatura
Portuguesa...... 3-00-00
Inglesa............ 3-08-00
Avulso.......... 0-01-00

Anuncios
por linha...... 00-01-00
...go praso contrato es-

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमच्या जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारें ठरविण्यांत येतील.

...७ वें.] केपें, गुरुवार, तारीख ५ माहे अक्टोबर सन १९२२ [खास अंक २६ वा,

...mento Hindu

Na semana proxima finda e mesmo na corrente houve em diferentes partes de Goa conferencias publicas, dedicadas á Deusa *Sarasvati*.

A maneira ordeira como decorreram as mesmas conferencias, o insano trabalho e desinteressado empenho que desenvolveram os patrioticos promotores dêlas e o brilhante exito de que todas foram coroadas, deixaram em nós a indelevel impressão de que vai muito animado o movimento hindu, tendente á sua emancipação politica.

Para evitar equivocos, sobretudo, daqueles que enxergam ou antes fingem enxergar o *espirito de classe* nas manifestações daquela natureza, como há pouco se viu numa carta dum *ilustrado cavalheiro* de Ponda, publicada em qualquer parte, devemos declarar que a expressão *Movimento Hindu* não significa outra coisa senão o que é dimanado da iniciativa dos hindús sem preocupação classista ou castista. Tanto isto é verdade que a quasi todas as conferencias assistiram- a convite dos seus promotores, muitos cristãos que certamente terão notado que os conferentes versaram seus temas sò sobre os assuntos, referentes aos interesses do Paiz em geral e não apenas à classe hindu, particularmente.

¿ Terão atrevimento de mal sinar a *intenção* do movimento hindu, depois desta explicação clara e precisa os seus detratores ?

Balonati Samaj

Esta associação de propaganda civica e literararia realisou tres conferencias por ocasião da ultima festividade de *Vigia-dossomi*, tendo sido todas coroadas de bom exito, o que demonstra que o *Samaj* está em progresso.

E' para estimar que assim tenha sido, sobretudo , porque o *Balonati-Samaj* é a unica instituição do genero acima de todo o concelho de Quepem.

O Bharat

Por causa das festividades de Dossoró e Vigiadossomi em que tomou parte o nosso pessoal publica-se em metade a presente edição do *Bharat*.

Sem reserva....

O notavel advogado Dr. Cunha e Costa, escrevendo no ultimo mez, para 'O Dia' dizia: 'Não é o brasileiro surdo á voz da razão, mas noventa por cento dos seus actos são inspirados pelo sentimento'... E este comentario da justiça nós lembramos e repetimos quando ainda esta semana lemos no 'Heraldo que a acção do sr. Almeida Leite havia justificado a creação da Auditoria que o paiz recebera mal e digamos em tempo-pela qual o mesmo paiz continua e continuará a nutrir sempre a merecida aversão.

E, defacto, o que foi, senão o sentimento, o movel do comentario ou apreciação do 'Heraldo' acerca da Auditoria ?

Nós não contestamos que a Auditoria, como agente da fiscalisação do emprego dos dinheiros publicos seja mais do que legitima e nescessria. Mas concluir daqui que aquela repartição, tal como foi creada e tal como está, seja toleravel, não passa-desculpem-nos o termo-dum verdadeiro crime.

O publico recebeu com palavras de repulsa o decreto que creou as auditorias, porque sabia que o mostrengo, obra infeliz do sr. Prazeres da Costa, embora aparecesse envergando o *trávesti* fiscalisador, não passava de um pretexto para um largo bodo aos afilhados do *anjo tutelar da India*, na frase pitoresca dos devotos de SExcia.

Duvida o ' Heraldo' que assim foi ? Então um momento de exame, e logo pelo criterio que determinou a escolha do pessoal e pela maioria do proprio pessoal escolhido em questão, verá como a sua duvida se dissipa imediatamente como o fumo.

Porque a fiscalisação dos gastos do Estado era indispensavel, indispensavel não se tornava um cofre tam pobre e arrombado como o nosso, ficar sobrecarregado com um peso de quasi 50000 rupias ao ano, quantia exorbitante, fenomenal se tentarmos estabelecer a proporção entre ela e a nossa receita publica. Porque a fiscalisação era indispensavel, indispensavel não era introduzir na Auditoria gente, que de orçamentologia e das finanças, percebe tanto como nós e o *Anjo tutelar da India*, percebemos do...grego e depois quanta gente, santo Deus !- nem que este rincão do Malabar fosse mais vasto e mais rico do que o Brazil /

Dê-se a Cesar o que de Cesar é.

Preste-se ao sr. Almeida Leite toda a homenagem que o seu talento, o seu desassombro, a sua indipendencia exigem da imprensa "livre' e indipendente do paiz. Mas não haja confusões lamentaveis. As boas qualidades do sr. Almeida Leite por maiores e inumeras que elas sejam, acham-se bem longe de cobrir a hediondêz repugnante, horrorosa revoltante do monstro, obra infeliz do sr. Prazeres da Costa.

Agora, antes de concluir, devemos fazer uma declaração. Não é o 'Heraldo" o primeiro a justificar as auditorias, antes dele, alguns, felizmente poucos, entoaram hosanas ás Auditorias. Mas estes são os devotos do *Anjo tutelar da India*. Estão no seu papel.

Alguns deles, coitados, encontram-se de mãos atadas. Os infelizes não podem fazer outra coisa. A opinião dele é a opinião deles. O mesmo não sucede com o "Heraldo jornal extrapartidario, jornal afastado das egrejinhas, porisso mesmo, gosando do merecido previlegio de emitir e fazer opinião...

Alma Velha

Dr. Froilano de Melo

Este sabio luso-indiano, antes de sua partida para Portugal, fez testamento de seus bens, constando-nos que incluiu nêle a sua casa ao *Pragatica Sanga*.

Este rasgo de generosidade brotado dum coração patrioticò que é o do Doutor Melo comoveu-nos imenso, é escusado dize-lo, sobretudo porque o *Sanga* nada tem feito a favor de Sua Excia a ponto de se tornar merecedor dum tão valióso premio: o *Sanga* é amigo do Grande Homem, porque espera que de sua grandesa virão só beneficios ao Paiz cujó bem estar é a unica coisa que os *Sauguistas* tem em mira.

Afigura-se-nos, porisso. que o *Pragatica Sanga* não hade aceitar o importante oferecimento, porque sabemos que a util associação hindu almeja tão somente que o seu leal. sincero, verdadeiro e generoso amigo regresse á India continuando a tornar-lhe prestante a sua existencia, pelo que ela se considerará recompensada do pouco que fez e fará por Sua Excia.

Em todo o caso, porem, o *Sanga* confessa-se muito grato ao ilustre medico por mais aquela prova que é o cumulo duma estima sem limites.

ANNO VII — NUMERO 47 — 1922

QUEPEM QUINTA — FEIRA 12 DE OUTUBRO

Director e Editor
Govinda P. Hegdo Dessai

Assinatura
India Portuguesa...... 3-00-00
India Ingleza.............. 3-08-00
Numero Avulso.......... 0-01-00

Anuncios
Anuncio por linha...... 00-01-00
Para longo praso contrato especial.

भारत
BHARAT

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई

वर्गणीचे दर
गोव्यांत (वार्षिक)....... ३-००-००
ब्रिटिश इंडिया.......... ३-०८-००
किरकोळ अंकास.......... ०-०१-००

जाहिरातींचे दर
मराठी दर ओळीस दोन आणे. कायमचे जाहिरातींचे दर समक्ष अगर पत्रद्वारे ठरविण्यांत येतील.

वर्ष ७ वें.] केपें, गुरुवार, तारीख १२ माहे अक्टोबर सन १९२२ [खास अंक २७ वा,

Um Maraja, Mestiço, Mistico e Sobre-natural

III

Relativamente a civilizagao, coisas, mais, muito ha que pensar e demonstrar, com tudo isto nao obsta que eu obte uma abertura escancarada na quieta superficie terrestre, abertura que num instante me possa tragar do que levantar o veu dos interpostos seculos e vaguear errante nas solitarias margens do Ganges sagrado, para do apice de tanto martirio escalar as *etapes metecicoses*!

Agora a V. Excia, sim, experimente este martirio como...paga da minha magada!

Ao concluir, sr. Redactor ergo os meus rendidos agradecimentos a V. pela insergao desta no jornal da sua mui digna direcgao e creia sera' eternamente perduravel este favor, a quem e".

De V. Excia etc.

Alves Vilar

Pangim, 26--1--1923

Ecos & Critica

Bailadeiras

A danga de bailadeiras representa um verdadeiro luxo na miseria. Sabem-no todos; mas poucos se atrevem a bani-la da costumeira. Honra seja, porisso ao sr. Xantarama Caxinata Danaito, de Colva' que se arrostou com o gigante da Opiniao Publica banindo da cerimonia da *linha* de seus filhos, realisada ha' pouco a danga de bailadeiras.

Bharat

Adquiriu novo material de impressao para bem servir ao Publico que o substenta.

Bem haja

A *UniaoGoana* deBombaim dirigiu uma representagao pedindo a aboligao de varios impostos e inutilidades que determinam o *deficit* que nos oprime o tesouro.

E' para louvar esta atitude daquela simpatica asociagao de Bombaim que desinteressedamente esta" procu

आहे. परंतु एवढ्यावरून इंग्रजी शिक्षणाला मुकून अगर हिंदु तत्व-ज्ञाना मुकून इतर राष्ट्रांनीं या भाषां-पैकी एकादी भाषा स्वराष्ट्रीय केली आहे, असा भाग नाहीं. त्याचप्रमाणें एका विशिष्ट प्रकार अधिक अपला म्हणून इतर राष्ट्राच्या दृष्टीनें विशेष महत्व असा प्रकार नाहीं. ख्रिस्ताचीं सगभर पसरलेलीं असतां वेदांतांचा तत्व व प्रवृत्तीपर वासनाचा अधिक सुख असतां निवृत्तीला विशेष महत्व असलेलें आपण पाहतों.

भाषा म्हणजे ज्ञान अगर अमुक भाषा म्हणजे अमुक प्रकारचा शिक्षणक्रम असा अर्थबोध होत नाहीं हें उघड आहे. राष्ट्राला उपयुक्त असलेलें शिक्षण ज्ञान स्वभाषा खेरीज करून अमुकच भाषेतून दिलें जावें अशी निवड करण्याचें कारण नाहीं. भाषा म्हणजे शिक्षण अ-थवा ज्ञान असें जरी नसलें तरी त्यांचें एकमेकांशीं कार्य कारणतेचा निकट संबंध असतो. कार्य व कीर्ति, धर्म व ध्येय, प्रगति व प्रख्याति हे शब्दसमुच्चय एकमेकांचे संबंध करीत नसून एक दुसऱ्याचें साधन मात्र आहेत असें दाखवितात. त्याच प्रमाणें ज्ञान मिळविण्याला भाषा हें एक साधन आहे. ज्ञान म्हटल्यानें अमुक एक प्रकारची शिक्षणपद्धति आहे असेंहि नाहीं. निरनिराळ्या गोष्टी पाहण्यात ऐक-ण्यांत व वाचण्यांत येतात व तीचे मनावर संस्कार होतात, ज्या गोष्टींचा अनुभव येऊन ज्ञान वाढतें त्यालाच शिक्षण अथवा संस्कृति अशी संज्ञा दिली जाते. शिक्षण शब्द साक्षरता आणि निरक्षरता यांतील भेद दाखवीत नसून, तो ज्ञान व अज्ञान यांमधील फरक दर्शवीत असतो. तेव्हां शिक्षण हें विश्वविद्यालयांतून व्यवहारातून अगर कोणत्याहि भाषेंतून मिळालें असलें तरी त्यामुळें ज्ञानांत कांहीं एक फरक होत नाहीं.

याचा उत्कृष्ट उदाहरण म्हणजे डॉ. रवींद्रनाथ टागोर यांची 'गीतांजली' हें होय. गीतांजलीची अनेक भाषांतून भाषांतरें झालीं आणि इंग्रजी भाषेंतहि त्या ग्रंथाचें भाषांतर झालें असल्यामुळें त्यांच्या वाढत्या प्रख्यातीस' इंग्रजींतलें भाषांतर एक साधन झालें; पण तीवरून त्यांची 'प्रगति झाली असें म्हणतां येईल काय? डॉ. टागोर यांच्या हिंदी संस्कृतींत, ज्ञानांत, विचारांत, गीतांजलीच्या तत्वज्ञानात भाषांतरामुळें विकृति झाली असें कोणी म्हणूं शकेल काय? हिंदी केवळ ज्ञान व त्यांत इंग्रजीमुळें प्रगति झाली अशी नुसती कल्पना करणें म्हणजे सूर्याला दिव्यांची जरूरी आहे असें म्हणण्यांतलाच प्रकार आहे. खऱ्या रत्नाना स्वयंतेज असतें. त्याला चमक आहे असें सांगावें लागत नाहीं. त्याप्रमाणें उच्च संस्कृतीच्या योगानें ज्यांना जगांतरीं प्रख्याति झाली त्यांच्या प्रगतीला इंग्रजी भाषा कारण झाली असें कोणाला वाटत असेल तर त्याच्या दृष्टीनें ढेंकणाच्या (अज्ञानाच्या) संगतीनें हिऱ्यांनाहि तेज चढतें असें म्हटलें पाहिजे.

शिक्षण हें प्रत्येक गोष्टीला आवश्यक असतें यांत मतभेद नाहीं, परंतु त्यापासून मिळणाऱ्या ज्ञानाचे जसे प्रकार वाढत जातात तसे त्यांत मतभेद उत्पन्न होतात. उदाहरणार्थ कित्येकाना वाटतें कीं, आमचा शेतकरी व कारागीर वर्ग पूर्ण अशिक्षित आहे. आणखी कित्येकाना असेंहि वाटतें कीं, तो वर्ग जर पूर्ण अशिक्षित असता तर त्याला शेतकरी किंवा कारागीर अशा संज्ञा मिळाल्याच नसत्या. साक्षरता या दृष्टीनें पहिल्याना तसें दिसतें तर दुसऱ्याना ज्ञानाच्या दृष्टीनें असें दिसतें! कायदे शिकलेल्याना वकील म्हटलें जातें त्याना शेतकरी असें कोणी म्हणत नाहीं. एखाद्याला एखादी उत्कृष्ट कला येत असली व तो निरक्षर असला तर त्याला सुशिक्षित म्हणावें कीं नाहीं हाहि प्रश्न उद्भवतो तेव्हां दोन्हीं प्रकारच्या मतांत तथ्य आहे असें कबूल करावें लागतें. परंतु यांचा संबंध तिऱ्हाईत भाषेशीं लावणें कोणाला मान्य करवणार नाहीं. वास्तविक त्या वर्गाला शिक्षणाची अतिशय जरूरी आहे आणि त्या दिशेनें प्रयत्न होऊं लागले आहेत हें एक सुचिन्ह आहे. पण आमच्या लोकांत व्यापारी तत्व पूर्णपणें मुरलेलें नसल्या कारणानें प्रस्तुत सरकार स्वदेशांतील उत्पादक, धंद्याचे हितसंबंध पाळण्याची विशेष खबरदारी घेत असल्याकारणानें आणि इकडे हातानीं होत असलेल्या कारागीरीपेक्षांहि सुबक व स्वस्त अशी यंत्राच्या साहाय्यानें तयार होऊन परदेशांतून इकडे येत असल्याकारणानें बहुतेक हिंदी कला नामशेष होऊन गेल्या आहेत. शेतीचीहि अशीच दैनावस्था झालेली आहे. वाढता कर, भयंकर गोवध, जमिनीला अत्यंत उपयुक्त असलेला फोस्फरस ज्या हाडांपासून मिळायचा त्याच्या आगबोटीच्या आगबोटी भरून परदेशांत रवाना होणें, गतानुगतिकपणा व पुराण मताभिमान यांच्या योगानें पूर्वीप्रमाणें भूमी पिकें प्रसवीत नाहीं. परंतु ठिकठिकाणीं भरत असलेलीं शेतकी व औद्योगिक प्रदर्शनें निरनिराळ्या ठिकाणीं तयार करण्यांत येत असलेलीं नवीन पद्धतीचीं औतें व खतें, जागोजागीं उघडण्यांत येणारे मॉडेल फार्म गोरक्षण शाळा इत्यादि पाहिलें म्हणजे या बाजूनें प्रयत्न होत नाहींत असें म्हणवत नाहीं. एका नवीन खताचा उपयोग केल्यानें चांगलें पिक येतें किंवा नवीन पद्धतीचा नांगर वापरल्यानें जमीन लवकर तयार होते असें एकाद्या शेतकऱ्याला सांगितले तर तो प्रथम अविश्वास दाखवितो आणि एखादे वेळीं आम्हीं आतांच शेती करूं लागलों कीं काय असेंहि कुचेष्टेचे उत्तर देण्यास कमी करीत नाहीं. हे किंवा अशा प्रकारचे गतानुगतिकत्वाचे ग्रह प्रथमत: दूर करावे लागत असल्यामुळें हें शिक्षण मुंगीच्या पायानें चाललें आहे हें खोटें नाहीं.

शिक्षण द्यावें म्हटल्यानें तें दिलें असें होत नाहीं. तें ग्रहण करण्याची अभिरुचि जनतेंत उत्पन्न करावी लागते त्या शिवाय शिक्षणाचा उपयोग होणें शक्य नाहीं तिच्या अभावीं जनतेचे पैसे व्यर्थ खर्च होऊनहि आमच्या शेतकी खात्यामारखे कसे हाल होत असतात हें नव्यानें सांगण्याची जरूरी नाही. या अभिरुचीच्या अभावीं कला व धंदे शिक्षणाची शाळा बंद करावी लागली इतकेंच नव्हे तर कित्येक ठिकाणच्या प्राथमिक शाळा (escolas primarias) सुद्धां विद्यार्थ्यांभावीं गतप्राण झाल्या! परंतु यांत विशेष खेद मानण्याचें कारण नाहीं. कारण सरकार म्हणजे आमचे माठीच ना? मग ज्या शिक्षणाची जरूरीआम्हाला भासत असेल, ज्या प्रकारच्या शिक्षणाची अभिरुचि आमच्यांत उत्पन्न होईल त्या प्रकारच्या शाळा उघडणें सरकारला भाग आहे. आणि तसें करण्यास सरकार नाखूष असेल तर त्याला भाग पाडणें आमचें कर्तव्य आहे. ज्ञान मिळविण्याकरतां, राष्ट्राची उन्नति साधण्याकरतां आत्मविश्वासाम हृदयाशीं बाळगून, भाषेला अगर शिक्षणक्रमाला दोष न देतां मानसिक, आर्थिक, व राजकीय परतंत्रतेच्या सांखळ्या तडातड तोंडण्यास तयार झालें पाहिजे.

एथवर दिग्दर्शन केलें त्यावरून असें दिसून येईल कीं, अज्ञानापासून व्यवहारापर्यंत प्रत्येक गोष्टीला शिक्षणाची जरुरी आहे. असें असतां व्यापक शब्दाची व्याख्या ऐहिक सुखापर्यंतच असते अशी मर्यादीत होऊं लागली तर भूतें खिदळूं लागल्याचा भास कोणाला बरें होणार नाहीं.

भाषा व शिक्षण यांचा अर्थाअर्थीं संबंध व शिक्षणाची व्यापक रूपरेषा वर थोडक्यांत ध्वनित केली आहे त्यावरून त्यामध्यें भाषेचा प्रश्न उद्भवतो किंवा पोर्तुगीज भाषा गटारगंगा व इंग्रजी भाषा वाघिणीचें दूध असें म्हणतां येत नाहीं. म्हणून मुख्य ध्येय जें शिक्षण व ज्ञान त्याला गौणत्व देऊन भाषेला प्रमुखस्थान देणें केव्हांहि न्याय्य नाहीं. (चालू)

वर्तमानसार

—बिटोण येथें सुहृद्वंद संस्था स्थापन झाली असून तिच्यामार्फत एक मराठी शाळा चालू आहे. या शाळेचें चालकत्व तेथील ब्राम्हणेतर लोकांकडे असून, ती उत्तम प्रकारें चालत आहे, असा ना. ल. रेगे वगैरे तज्ञाचा अभिप्राय आहे, असें एक वाचक लिहितात.

—सांगली संमेलनांत सर्वानुमतें ठरल्याप्रमाणें शुद्ध टिळक पंचांगाचा सर्वत्र प्रसार होत असून रत्नागिरी, गुहागर, दबळीं वगैरे गांवींहि सभा भरून हेंच पंचांग ग्राह्य ठरलें. व गेल्या ग्रहणानें याची सूक्ष्मता सर्वांस पटलीच आहे. तरी सर्वांनीं हें शुद्ध असें टिळक पंचांगच चालू करावें. शके १८४५ चीं शुद्ध पंचांगें उत्तम छापाईचीं निघालीं असून तीं इकडील भागांत नारायण अ. ना. पाटणकर ज्योतिषी, सांगे यांकडे विकत मिळतील तरी जिज्ञासूंनीं त्यांकडून मागवून घ्यावीं, असें एक वाचक सुचवितात.

—कोलवें येथें शांताराम दणाईत यांच्या मुलांच्या व्रतबंध प्रसंगीं आमच्या संपादकांचें प्रवचन झालें. कलावंतीणीच्या नाचगाण्यास प्रतिबंध केल्याबद्दल प्रवर्तकांरांनीं यजमानाचें अभिनंदन केलें.

—'गोमित्रा'चा लेख पोंचला. बाकीचा भाग आमच्याकडे येतांच, अवश्य स्थळ देऊं.

—वर्तमानपत्रकर्त्यांचा एक संघ स्थापन करण्याचें घाटत आहे. संघाच्या कल्पनेस भारतान पूर्ण पाठबळ दिलें आहे.

—विद्यार्थी सहाय्यक फंडासाठीं कांहीं तरुण मंडळी दोन नाटक प्रयोग करणार असल्याचें कळतें.

विचार लहरी

भिन्न रुचिर्हि लोकः व्यक्ति तितक्या प्रकृति. जे मनुष्य ज्या प्रमाणें विचार करतात त्याप्रमाणें त्यांच्या मतांचा ओघ वाहत असतो. भारताचे वाचक पुष्कळ असताल व 'साक्षी'च्या 'विचार लहरी' वाचून प्रत्येकाचे वेगवेगळे समज झाले असतील. व त्याप्रमाणें एखाद्या वाचकास यातलें सत्य शोधून काढण्याची इच्छा होणेंहि साहजिकच होईल. परंतु असत्य विधान करून सत्य शोधून काढण्याचे ते आदिलशाहींतील भोळ्याभावड्यांचे दिवस या विसाव्या शतकांत तरी क्वचित् उगवतील! सदिच्छेनें सत्याचा शोध लावणें असल्यास भारताच्या संपादकांकडून 'साक्षी'स आव्हान करण्यापेक्षां सरस्वती मंदिराच्या कार्यकारी मंडळाकडे विचारपूस केली असती तर मंडळाच्या खासगी भरलेल्या सभेंत झालेल्या वादविवादानें, 'गेलेले गृहस्थ जरी त्र्यस्थ म्हणून आपणास मानीत असले तरी कंपनीकडे खासगी काम करितां ते गेले नव्हते, तर मंदिराचे प्रतिनिधी म्हणून गेले होते.' असा दिलेला निकाल त्याला सहज समजला असता.

* * *

'त्र्यस्थ' म्हणजे त्र्य त्रिवर्ग+स्थ म्हणजे राहणारा. त्रिवर्गांत राहणारा म्हणजे पर्यायानें सरस्वती=मंदीर व नाटक कंपनी यांत मिळून मिसळून असणारा. अशा मनुष्यानें केलेली पृच्छा म्ह. विचारपूस सर्वथैव टाकाऊ ठरवून, आवळा देऊन कोहळा काढण्याच्या इच्छेनें कंपनीनें लादलेल्या अटी 'त्र्यस्थास' न पटल्यामुळें त्याचा बभ्रा झाला. यावरून 'त्र्यस्थाचा' कल कंपनीपेक्षां मंदिराकडे जास्ती झुकला असें सिद्ध होऊन, 'एकतर्फी=नकली-त्र्यस्थ' हाते अशी अटकळ करणें प्राप्त होतें. व यामुळें मराठी भाषेंत गडकऱ्या

terras de Industão a caçar cordeiros.

S. N. Bhopatker

hindus que, em h

रवें आहे. परंतु एवढ्यावरून इंग्रजी शिक्षणाला भुलून अगर हिंदु तत्वज्ञानाला भुलून इतर राष्ट्रांनीं या भाषांपैकीं एकादी भाषा स्वराष्ट्रीय केली आहे, अशांतला भाग नाहीं. त्याचप्रमाणें एका भाषेचा प्रसार अधिक असला म्हणून तिला इतर राष्ट्रांच्या दृष्टीनें विशेष महत्व आहे अशांतला प्रकार नाहीं. ख्रिस्ताची तत्वें जगभर पसरलेलीं असतां वेदांताचें महत्व व प्रवृत्तीपर वासनांचा अधिक सुकाळ असतां निवृत्तीला विशेष महत्व असलेलें आपण पाहतों.

भाषा म्हणजे ज्ञान अगर अमुक भाषा आटली म्हणजे अमुक प्रकारचा शिक्षणक्रम त्याचा अर्थबोध होत नाहीं हें उघड आहे. म्हणून राष्ट्राला उपयुक्त असलेलें शिक्षण व ज्ञान स्वभाषा खेरीज करून अमुकच भाषेंतून दिलें जावें अशी निवड करण्याचें कारणच नाहीं. भाषा म्हणजे शिक्षण अगर ज्ञान असें जरी नसलें तरी त्यांचें एकमेकांशीं कार्य कारणतेचा निकट संबंध असतो. कार्य व कीर्ति, धर्म व ध्येय, प्रगति व प्रख्याति हे शब्दसमुच्चय एकमेकांचे पर्यायबोध करीत नसून एक दुसऱ्याचें साधन मात्र आहेत असें दाखवितात. त्याचप्रमाणें ज्ञान मिळविण्याला भाषा हें एक साधन आहे. ज्ञान म्हटल्यानें अमुक एक प्रकारची शिक्षणपद्धति आहे असेंहि नाहीं. ज्या निरनिराळ्या गोष्टी पाहण्यांत ऐकण्यांत व वाचण्यांत येतात व ज्यांचे मनावर संस्कार होतात, ज्या गोष्टींचा अनुभव येऊन ज्ञान वाढतें त्यालाच शिक्षण अथवा सुसंस्कृति अशी संज्ञा दिली जाते. शिक्षण हा शब्द साक्षरता आणि निरक्षरता यांतील भेद दाखवीत नसून, तो ज्ञान व अज्ञान यांमधील फरक दर्शवीत असतो. तेव्हां शिक्षण हें विश्वविद्यालयांतून व्यवहारांतून अगर कोणत्याहि भाषेंतून मिळालें असलें तरी त्यामुळें ज्ञानांत कांहीं एक फरक होत नाहीं.

याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे डॉ. रवींद्रनाथ टागोर यांची 'गीतांजली' हें होय. गीतांजलीचीं अनेक भाषांतून भाषांतरें झालीं आणि इंग्रजी भाषेंतहि त्या ग्रंथाचें भाषांतर झालें असल्यामुळें त्यांच्या वाढत्या प्रख्यातीस' इंग्रजींतलें भाषांतर एक साधन झालें; पण तीवरून त्यांची 'प्रगति झाली असें म्हणतां येईल काय? डॉ. टागोर यांच्या हिंदी संस्कृतींत, ज्ञानांत, विचारांत, गीतांजलीच्या तत्वज्ञानांत भाषेंतरामुळें विकृति झाली असें कोणी म्हणूं शकेल काय? हिंदी केवळ ज्ञान व त्यांत इंग्रजीमुळें प्रगति झाली अशी नुसती कल्पना करणें म्हणजे सूर्याला दिव्यांची जरूरी आहे असें म्हणण्यांतलाच प्रकार आहे. खऱ्या रत्नाना स्वयंतेज असतें. त्याला चमक आहे असें सांगावें लागत नाहीं. त्याप्रमाणें उच्च संस्कृतीच्या योगानें ज्यांना देशांतरीं प्रख्याति झाली त्यांच्या प्रगतीला इंग्रजी भाषा कारण झाली असें कोणाला वाटत असेल तर त्याच्या दृष्टीनें ढेकणाच्या (अज्ञानाच्या) संगतीनें हिऱ्यांनाहि तेज चढतें असें म्हटलें पाहिजे.

शिक्षण हें प्रत्येक गोष्टीला आवश्यक असतें यांत मतभेद नाहीं, परंतु त्यापासून मिळणाऱ्या ज्ञानाचे जसे प्रकार वाढत जातात तसे त्यांत मतभेद उत्पन्न होतात. उदाहरणार्थ कित्येकांना वाटतें कीं, आमचा शेतकरी व कारागीर वर्ग पूर्ण अशिक्षित आहे. आणखी कित्येकांना असेंहि वाटतें कीं, तो वर्ग जर पूर्ण अशिक्षित असता तर त्याला शेतकरी किंवा कारागीर अशा संज्ञा मिळाल्याच नसत्या. साक्षरता या दृष्टीनें पहिल्याना तसें दिसतें तर दुसऱ्याना ज्ञानाच्या दृष्टीनें असें दिसतें! कायदे शिकलेल्याना वकील म्हटलें जातें त्याना शेतकरी असें कोणी म्हणत नाहीं. एखाद्याला एखादी उत्कृष्ट कला येत असली व तो निरक्षर असला तर त्याला सुशिक्षित म्हणावें कीं नाहीं हाहि प्रश्न उद्भवतो तेव्हां दोन्हीं प्रकारच्या मतांत तथ्य आहे असें कबूल करावें लागतें. परंतु यांचा संबंध तिऱ्हाईत भाषेशीं लावणें कोणाला मान्य करवणार नाहीं. वास्तविक त्या वर्गाला शिक्षणाची अतिशय जरुरी आहे आणि त्या दिशेनें प्रयत्न होऊं लागले आहेत हें एक सुचिन्ह आहे. पण आमच्या लोकांत व्यापारी तत्व पूर्णपणें मुरलेलें नसल्या कारणानें प्रस्तुत सरकार स्वदेशांतील उत्पादक, धंद्यांचे हितसंबंध पाळण्याची विशेष खबरदारी घेत असल्याकारणानें आणि इकडे हातानीं होत असलेल्या कारागीरीपेक्षांहि सुबक व स्वस्त अशी यंत्राच्या साहाय्यानें तयार होऊन परदेशांतून इकडे येत असल्याकारणानें बहुतेक हिंदी कला नामशेष होऊन गेल्या आहेत. शेतीचीहि अशीच दैनावस्था झालेली आहे. वाढता कर, भयंकर गोवध, जमिनीला अत्यंत उपयुक्त असलेला फोस्फरस ज्या हाडांपासून मिळायचा त्याच्या आगबोटीच्या आगबोटी भरून परदेशांत रवाना होणें, गतानुगतिकपणा व पुराणमताभिमान यांच्या योगानें पूर्वीप्रमाणें भूमी पिकें प्रसवीत नाहीं. परंतु ठिकठिकाणीं भरत असलेलीं शेतकी व औद्योगिक प्रदर्शनें निरनिराळ्या ठिकाणीं तयार करण्यांत येत असलेलीं नवीन पद्धतीचीं औतें व खतें, जागोजागीं उघडण्यांत येणारे मॉडेल फार्म गोरक्षण शाळा इत्यादि पाहिलें म्हणजे या बाजूनें प्रयत्न होत नाहींत असें म्हणवत नाहीं. एका नवीन खताचा उपयोग केल्यानें चांगलें पिक येतें किंवा नवीन पद्धतीचा नांगर वापरल्यानें जमीन लवकर तयार होते असें एकाद्या शेतकऱ्याला सांगितलें तर तो प्रथम अविश्वास दाखवितो आणि एखादे वेळीं आम्हीं आतांच शेती करूं लागलों कीं काय असेंहि कुचेष्टेचें उत्तर देण्यास कमी करीत नाहीं. हे किंवा अशा प्रकारचे गतानुगतिकत्वाचे ग्रह प्रथमतः दूर करावे लागत असल्यामुळें हें शिक्षण मुंगीच्या पायानें चाललें आहे हें खोटें नाहीं.

शिक्षण द्यावें म्हटल्यानें तें दिलें असें होत नाहीं. तें ग्रहण करण्याची अभिरुचि जनतेंत उत्पन्न करावी लागते त्या शिवाय शिक्षणाचा उपयोग होणें शक्य नाहीं तिच्या अभावीं जनतेचे पैसे व्यर्थ खर्च होऊनहि आमच्या शेतकी खात्यासारखे कसे हाल होत असतात हें नव्यानें सांगण्याची जरुरी नाहीं. या अभिरुचीच्या अभावीं कला व धंदे शिक्षणाची शाळा बंद करावी लागली इतकेंच नव्हे तर कित्येक ठिकाणच्या प्राथमिक शाळा (escolas primarias) सुद्धां विद्यार्थ्यांच्या अभावीं गतप्राण झाल्या! परंतु यांत विशेष खेद मानण्याचें कारण नाहीं. कारण सरकार म्हणजे आमचे साठींच ना? मग ज्या शिक्षणाची जरुरी आम्हांला भासत असेल, ज्या प्रकारच्या शिक्षणाची अभिरुचि आमच्यांत उत्पन्न होईल त्या प्रकारच्या शाळा उघडणें सरकारला भाग आहे. आणि तसें करण्यास सरकार नाखूष असेल तर त्याला भाग पाडणें आमचें कर्तव्य आहे. ज्ञान मिळविण्याकरतां, राष्ट्राची उन्नति साधण्याकरतां आत्मविश्वासास हृदयाशीं बाळगून, भाषेला अगर शिक्षणक्रमाला दोष न देतां मानसिक, आर्थिक, व राजकीय परतंत्रतेच्या सांखळ्या तडातड तोडण्यास तयार झालें पाहिजे.

एथवर दिग्दर्शन केलें त्यावरून असें दिसून येईल कीं, अज्ञानापासून व्यवहारापर्यंत प्रत्येक गोष्टीला शिक्षणाची जरुरी आहे. असें असतां व्यापक शब्दाची व्याख्या ऐहिक सुखापुरतीच असते अशी मर्यादीत होऊं लागली तर भूतें खिदळूं लागल्याचा भास कोणाला बरें होणार नाहीं.

भाषा व शिक्षण यांचा अर्थाअर्थी संबंध व शिक्षणाची व्यापक रूपरेषा वर थोडक्यांत ध्वनित केली आहे त्यावरून त्यामध्यें भाषेचा प्रश्न उद्भवतो किंवा पोर्तुगीज भाषा गटारगंगा व इंग्रजी भाषा वाघिणीचें दूध असें म्हणतां येत नाहीं. म्हणून मुख्य ध्येय जें शिक्षण व ज्ञान त्याला गौणत्व देऊन भाषेला प्रमुखस्थान देणें केव्हांहि न्याय्य नाहीं. (चालू)

वर्तमानसार

—बिटोग येथें सुष्टिफंड संस्था स्थापन झाली असून तिच्यामार्फत एक मराठी शाळा चालू आहे. या शाळेचे चालकत्व तेथील ब्राम्हणेतर लोकांकडे असून, ती उत्तम प्रकारें चालत आहे, असा ना. ल. रेगे वगैरे तज्ञाचा अभिप्राय आहे, असें एक वाचक लिहितात.

—सांगली संमेलनांत सर्वानुमतें ठरल्याप्रमाणें शुद्ध टिळक पंचांगाचा सर्वत्र प्रसार होत असून रत्नागिरि, गुहागर, दाभोळीं वगैरे गांवींहि सभा भरून हेंच पंचांग ग्राह्य ठरलें. व गेल्या ग्रहणानें याची सूक्ष्मता सर्वांस पटलीच आहे. तरी सर्वांनीं हें शुद्ध असें टिळक पंचांगच चालू करावें. शके १८४५ चीं शुद्ध पंचांगें उत्तम छपाईचीं निघालीं असून तीं इकडील भागांत नारायण अ. ना. पाटणकर ज्योतिषी, सांगे यांकडे विकत मिळतील तरी जिज्ञासूंनीं त्यांकडून मागवून घ्यावीं, असें एक वाचक सुचवितात.

—कोलवें येथें शांताराम दणाईत यांच्या मुलांच्या व्रतबंध प्रसंगीं आमच्या संपादकांचें प्रवचन झालें. कलावंतीणीच्या नाचगाण्यास प्रतिबंध केल्याबद्दल प्रवचनकारांनीं यजमानाचें अभिनंदन केलें.

—'भैमित्र'चा लेख पोंचला. बाकीचा भाग आमच्याकडे येतांच, अवश्य स्थळ देऊं.

—वर्तमानपत्रकर्त्यांचा एक संघ स्थापन करण्याचें घाटत आहे. संघाच्या कल्पनेस भारताने पूर्ण पाठबळ दिलें आहे.

—विद्यार्थी सहाय्यक फंडासाठीं कांहीं तरुण मंडळी दोन नाटक प्रयोग करणार असल्याचें कळतें.

विचार लहरी

भिन्न रुचिर्हि लोकः व्यक्ति तितक्या प्रकृति. जे मनुष्य ज्या प्रमाणें विचार करतात त्याप्रमाणें त्यांच्या मतांना ओघ वाहत असतो. भारताचे वाचक पुष्कळ असतील व 'साक्षी'च्या 'विचार लहरी' वाचून प्रत्येकाचे वेगवेगळे समज झाले असतील. व त्याप्रमाणें एखाद्या वाचकास यांतलें सत्य शोधून काढण्याची इच्छा होणेंहि साहजिकच होईल. परंतु असत्य विधान करून सत्य शोधून काढण्याचे ते आदिलशाहींतील भोळ्याभाबड्यांचे दिवस या विसाव्या शतकांत तरी क्वचित् उगवतील! सदिच्छेनें सत्याचा शोध लावणें असल्यास भारताच्या संपादकांकडून 'साक्षी'स आव्हान करण्यापेक्षां सरस्वती मंदिराच्या कार्यकारी मंडळाकडे विचारपूस केली असती तर मंडळाच्या खासगी भरलेल्या सभेंत झालेल्या वादविवादानें, 'गेलेले गृहस्थ जरी त्रयस्थ म्हणून आपणास मानीत असले तरी कंपनीकडे खासगी कामाकरितां ते गेले नव्हते, तर मंदिराचे प्रतिनिधी म्हणून गेले होते.' असा दिलेला निकाल त्यास सहज समजला असता.

* * *

'त्रयस्थ' म्हणजे त्रय त्रिवर्ग+स्थ म्हणजे राहणारा. त्रिवर्गांत राहणारा म्हणजे पर्यायानें सरस्वती=मंदीर व नाटक कंपनी यांत मिळून मिसळून असणारा. अशा मनुष्यानें केलेली पृच्छा म्ह. विचारपूस सर्वथैव टाकाऊ ठरवून, आवळा देऊन कोहळा काढण्याच्या इच्छेनें कंपनीनें लादलेल्या अटी 'त्रयस्थास' न पटल्यामुळें त्याचा त्रभ्रा झाला. यावरून 'त्रयस्थाचा' कल कंपनीपेक्षां मंदिराकडे जास्ती झुकला असें सिद्ध होऊन, 'एकतर्फी=नकली-त्रयस्थ' होते अशी अटकळ करणें प्राप्त होतें. व यामुळें मराठी भाषेंत गडकऱ्यां

... durante o tem- | ... que hoje em dia anda as terras de Industão a caçar cordeiros, | ... S. N. Bhopatker | ... hindus que, em h...

ANUNCIOS

Por cada linha portugueza, ainda que repetida uma tanga. Anuncios permanentes contrato especial.

ANO VII
Nº 48

ASSINATURA

Por cada ano tres rupias. Pagamento adiantado.

DIRECTOR
G. P. Heg[illegible]y
Querem

भारत
BHARAT.

वर्गणी
सालीना ट. ख.
सह ३ रु.
(आगाऊ)

वर्ष ७
अंक ४८
गुरुवार
ता. ८
मार्च
१९२३

जा. दर
साध्या कालम
च्या दरओळी
स अगर तित-
क्याच जागेला
दोन अ.णे.का
यमच्या जाहि-
रातींचा दर स-
मक्ष अगर पत्र-
द्वारें.

संपादक व प्रकाशक
गो पुं. हेगडे देसाई
केपें–गोवा

O Sr. Fragoso e o seu Maharaja

(Nº 7)

De vez passada, foi apreciada uma das quatro provas em que o sr. Fragoso se basea o maltratamento, que segundo ele, foi dado a Jizabai pelo seu marido. Volvamos desta vez a nossa atenção para as restantes tres.

A' pagina 20 do opusculo do sr. Fragoso, le-se o seguinte:

"Bem pressentia tambem Grant Duff na sua laboriosa investigação historica que havia quaisquer questoes domesticas a influir nos negocios publicos de Shahaji".

E' escusado dizer que o que se le aqui consta duma daquelas *provas* e o que talvez leve os leitores do dito opusculo a suporem que ate' Grant Duff ficasse obrigado a fazer e tivesse efectivamente feito uma investigação "laboriosa" da vida privada de Shahaji e da sua conduta para com a Jizabai; e tambem que, apo's essa investigação, tivesse descoberto quaisquer questoes" entre os conjujes: Shahaji e Jizabai. Mas uma tal suposição sera' um erro duplo. Pois, o que o sr. Fragoso atribui aqui ao grande historiador nao corresponde em nada ao que este de facto tem registado.

Eis o original do Grant Duff, de que o sr. Fragoso se tem feito echo:

"Shahajis political connection with his relations; the Jadhavas of. Sindkhed, which had never been intimate was entirely dissolved from the time of his quitting the Mogul services And Jagdeorao Jadhav, his wife's uncle acted on the side of the Moguls during the war carried on against him. Domestic affairs have great influence on the public conduct of the Marathas"...

E' isto o que o historiador inglez diz. Ve-se daqui que e' bem diferente o que o sr, Fragoso afirma, invocando o nome dele.

Nao podemos admitir que S. Exa. seja tao ignorante no inglez que nao perceba aquele trecho em que Grant Duff se refere em termos claros aos conflitos havidos entre a familia de Jadhav e de Bhonsle – conflitos que' nao sao estranhos a qualquer estudante da historia dos maratas, e que ate sao acentuados por no's no nosso artigo nº 4 onde tivemos o ensejo de referir ao casamento de Shahaji com a filha de Jadhava de Sindkhed. Vejam agora quao astutamente o sr. Fragoso mudou o sentido do original para dar-lhe a forma que lhe convinha! E' preciso notar tambem, que emquanto Grand Duff se refere a "domestic affairs of the Marathas" em geral, o sr. Fragoso restringe o sentido daquela frase so' a Shahaji

Se o sr. Fragoso, escrevendo o supra ditado trecho, nao deturpou, de proposito, a verdade trate entao de explicar o que aquilo e'.

Mas, deturpações desta nao sao nada em comparação as que S.Exa tem teito em abono da sua muite "*laboriosa*" investigação. Pois chegou ate' a forjar uma carta, como mostra-lo-emos oportunamente, para atribui-la ao Shahaji, a fim de tirar dela mais uma das suas *provas*.

Reservando isto para mais tarde, vamos, no entretanto, a' examinar a terceira prova do maltratamento de Jizabai.

Le-se a esse respeito a' pagina 25 do opusculo do sr. Fragoso, que Shahaji distinou para a residencia de Jizabai e Shivaji uma "regiao infestada entao intensamente de toda a qualidade de feras perigosas a ponto de a terem dispovoado quasi por completo: "a No man's land, diz o Sarkar referindo-se ao deserto medonho."

E' neste trecho, mais do que em qualquer outro, que deixa S. Exa. ver...o seu papel de invstigador historico!! Pois, nao so' revela a sua ignorancia da historla como em tantos outros lugares, mas tambem, ao mesmo tempo, da Geografia e do Inglez! E' realmente digna de todo o louvor a audacia deste senhor que tem o arrojo de citar autoridades como Grant Duff e Sarkar, *in and out of season*, sem ser capaz de compreender a significação duma frase tao simples como a *No Man's land*"!

Deixemos o nglez e perdoemos ao sr. Fragoso este equivoco alias' "medonho'" por falta do seu conhecimento.

Nao podemos fazer o mesmo, porem, quanto a sua petulancia de querer arvorar-se em investigador historico sem primeiro tratar de instruir-se devidamente na Ceografla, pois nao se compreende como o sr. Fragoso atribuisse a Puna o que o sr. Sarkar atribue a's matas de Mawal, onde havia os tais "lobos" de que o eximio historiador faz menção e de que o sr. Fragoso fala como "feras perigosas" Tanto isto e' claro que ao designar e descrever este territorio, o sr. Sarkar diz claramente que ele se estendia na base de Sahyadri e tinha o comprimento de 90 milhas e a largura de 12 a 24 milhas: muito mais extenso que o nosso territorio de Goa. Nao obstante isso, afirmar que Jizabai residindo em Puna estava esposta a's feras perigosas e' o mesmo que diser que uma senhora residindo num seu palacio de Pangim esta' esposta a's feras de Satary.

E' facil de entender que sendo Puna' capital do seu vasto *Jaguir*, Shahaji nao podia escolher melhor lugar para a residencia da sua mulher e filho, na vespera da sua partida para o sul da India com a expedição militar enviada pelo Sultao de Bijapur.

Mas ele nao so' escolheu o milhor dos sitios mas tambem mandou construir para a accomodação de Jizabai e Sivaji, uma excelente casa, conhecida nos anais dos maratas como "*Rajmahal*" (palacio real). Ate' o sr. Sarkar se refere (p, 98) a esta casa como a mais das sumptuosas de Puna ate' em 1660, tanto que foi aproveitada pelo grande Shahistekhan, Generalissimo dos Mogoes e tio do imperador Aurangzeb, para o sen alojamento e do seu *harem*. Grant Duff tambem se refeere a esta casa, mandada construir pelo Shahaji como a "Large House" (para. 15, cap. III) em frente destes factos e dados nao e' para estranhar que o sr.Fragoso escrevesse que Shahaji expoz Jizabai a's fe-ras?

Mas nao acaba aqui.ContinuaS. exa. a garantir que Shahaji nao so' foi marido *vingativo*, mas tambem tenta S. Exa. provar que, ele, o imortal "King-maker" dos historiadores do Decao foi um ladrao que nao teve escrupulo de "roubar, expoliar, e reduzir a' miseria a sua propria mulher Com este objectivo escreve o sr, Fragoso o seguinte:

"Jizabai de patrimonio proprio tinha mais de 25 laques be *huns* em propriedades (Sarkar p. 281) que de certo garantiriam largamente a independencia dela e do filho. O facto, porem, deShahaji ter ordenado ao administrador para lhes dar dinheiro para despesas absolutamente necessarias, faz ver que ele estava dispondo de tudo o que pertencia a Jizabai, sendo esta completamente expoliada e reduzida a miseria,

Ora, como vemos, nesfe trecho; o sr. Fargoso tem citado a autoridade do sr, Sarkar ¿ Querem os nossos leitores saber o que este historiador registou a este respeito? Completamente diverso do que diz o nossoFragoso. Pois le-se ai que a propriedade particular de Jizabai que montava em 25 laques de *huns* estava intacta ate' a sua morte em 1674, quando ela foi herdada *in integra* pelo seu filho Sivaji, (tendo Shahajl falecido dez anos antes).

Daqui facilmente se calcula a dislialdade do sr. Fragoso em escrever o supracitado trecho, pervertendo os factos.

Realmente e' forte a sua logica, pois entao, sr. Fragoso, porque Shahaji ordenou ao seu administrador em Puna para dar a Jizebai dinheiro para despezas precisas (note bem e nao "despezas absolutamente necessarias como o disvirtua ¿ Segue-se que Shahaji se dispoz de tudo o que pertencia a Jizabai? Por ventura, ignora S. Exa., o que alia's e' vulgar, que a "Stridhan" da mulher nao e' utilisada nas despezas da casa sob pena do descredito da familia? Alem disso deve ser facil calcular que as despezas *precisas* duma rainha que possue so' de 'stridhana" 25 laques de *huns* deviam montar em alguns laques deles, anualmente. S. Exa porem provavelmente ignora o que valem 25 laques de *huns*. Fique porem sabendo que 25 laques de *huns* valem 17, 500, 000 rupias em moeda corrente, ou mais do triplo do que rende anualmente o Estado da India Portugueza.

Se sabe alguma coisa do marata, o sr. Fragoso, deve pelo menos que na frascologia desta lingua especialmente antiga, e' de etiqueta usar termos mais modestos ainda para indicar grandes *items*. Por exemplo nos tratados de Sivaji realisados com o seu irmao le-se que "tal e tal patte do sev reino fique distinada a' despesa de 'dudhbhata' de fulano ou sicrano.

Ora, 'dudhbhat' quer dizer, literal mente, "leite e arroz.' Logo o sr. Fragoso seguindo a sua magnifica logica deve disparatar que o fulano (o re Vencaji no presente caso) nem tinha meios para a sua subsistencia, e que Sivaji deve estar dispondo de tudo o que a ele pertencia espoliando-o e reduzindo-o a' miseria,

E assim se o nosso proprietario de Oxel for agraciado com qualquer gratificação para as suas dispezas, poderemos concluir que ele foi espoliado do seu valioso patrimonio?

Sa" Manta

Circular

Presados Correligionarios

Procurado, em Abril último por elementos graduados do Partido Republicano Liberal, que preconizavam a conveniencia de se fundirem, no interesse maximo da Republica, em um so' forte agrupamento politico, os dois partidos constitucionais, adversos ao Parido Republicano Portugues, o Directorio do Partido Republicano de Reconstituição Nacional delegou em dois dos seus membros a missão de como representantes do dito Partido Liberal, assentar nas bases da proposta fusão, que seria em resumo, uma atitude comum, previamente concertada, no Congresso e nos trabalhos eleitorais, para mais largo e eficaz entendimento futuro.

Sentiu-se no Partido Liberal a este respeito um certo retraimento emquanto da banda do P. R. P. insistentemente se apregoava que pela inevitável dissolução do P. R. R N. os filiados neste regressariam ou ingressariam nele.

O insucesso da ultima cam-

nho e silencia a campanha dos con

se limitasse a aproveitar destes meios taxal-o-iamos apenas dum qualquer

Bombay, 8-3-23

Gama causador da ruina e des-

असतो. कावळ्याच्या शापानें जग जळत नाहीं. व चिकणमामाच्या देणग्यांनीं शाणे काम होत नाहीं. (कां ? तर त्या मुळीं व. हूण होतच नाहींत.)

परंतु ! सुमुहुर्तावर केलेली गोष्ट म्हणे सफलीच पाहिजे. कारण ? परमेश्वराच्या घरीं असा विलक्षण न्यायाचा प्रकार आहे कीं, कोणतेंहि उदात्त ध्येय, हेतु किंवा विचार भक्तिपुरस्सर व श्रद्धायुक्त अंतःकरणानें मनांत ठाम ठसविलेला असला व त्या विचाराच्या सिद्धीकरितां दृढ उद्योग करून परमेश्वराजवळ आग्रहपूर्वक प्रार्थना करण्यांत येत असली तर अशा विचाराम, हेतूंस, मागणीस परमेश्वर कधींहि विसंबत नाहीं. यामुळें या काकासाहेब दणाईत आदि सच्छिल गृहस्थांच्या दृढ उद्योगास ईश्वरानें मान दिला. व हळूहळू सा. वि.ची भरभराट होऊं लागली व मुलांच्या वाढीबरोबर ७ इयत्ता मराठी, ४ इयत्ता पोर्तुगीज व ४ इ. इंग्लीश पर्यंत शिक्षणक्रम व आठपर्यंत शिक्षकांची सीमा वाढवली गेली. शाळेसाठीं जागेची अडचण भासूं लागल्यामुळें सरकारकडून जमीन बक्षीस घेतली व इमारत बांधण्याचा विचार ठरला.

कोणत्याहि कार्याचा विचार करणें सोपें असतें. जोंपर्यंत मनुष्यानें कार्यास हात घातलेला नसतो, तोंपर्यंत त्यास यशापयशाची फारशी भीति वाटत नसते. असें असें होत गेल्यावर असें असें होत जाणार अशी तो अटकळ बांधत असतो. पण कार्याला हात घातल्यावर प्रथम कांहीं वेळ त्यानें कल्पिल्याप्रमाणें यश येत जाऊन एकदम अडथळ्यास सुरवात झाली असतां त्याची मनःस्थिति मोठीच चमत्कारिक होते. आतां आलें आहे त्याच संकटानें, अपयशानें, दुःख थांबलें असें त्यास वाटूं लागतें; व शंकाकुशंकांनीं त्याचें मन हताश होतें. अशीच स्थिति सेक्रेटरी काका दणाईत याची झाली. हापसेंकर व गोव्यांतील कांहीं गृहस्थांच्या किरकोळ देणग्यांनीं इमारतीचें काम सुरू होऊन पायाचें अर्धें काम पुरें होतें न होतें तोंच लढाईची वावटळ सुरू झाली व दगड चुना इत्यादिकांचे दर ७=८ पट वाढल्यामुळें अर्ध्यावरच इमारतीचें काम बंद झालें.

परदुःखानें मुदित होणाऱ्या निंदकाना शीलवंतांवर संकटरूपी दुर्दैवाचा फांस बसल्यावर आनंद होत असतो. व ते निंदाकुचाळक्यानीं त्यांस बेजार करूं लागतात. अशीच परिस्थिति काकासाहेबांवर येऊन ठेपली. निंदकांच्या निंदीनीं व वरिष्टांच्या बोलांनीं त्यानां निराशेच्या गर्तेत लोटण्यास सुरवात केली. पण ज्या वेळीं दुर्दैवाचा फांस मनुष्याच्या गळयाशीं बसून संकटांनीं त्याचे प्राण कोंडूं पाहतो त्याचवेळीं सुदैवहि आशेच्या रूपानें त्याजभोंवतीं घुटमळून नकळत त्याचें रक्षण करू पाहतें. सुदैवापासून रक्षण होणें किंवा दुर्दैवापासून निष्कृतन होणें हें केवळ मानवी मानसिक बळावर अवलंबून असतें. याच मानसिक बलानें निराशेस निभड्या छातीची टक्कर देऊन श्री. दणाईताना आशेच्या रूपानें मुंबईचा मार्ग दाखविला. व बुडत्यांचा बाप व अडल्यांचा आधार अशा श्री. दाभोळकरानीं तीन हजार रु. देणगी दिली व मुंबईतील आणखी कांहीं सद्गृहस्थांच्या देणग्यांच्या, गंधर्व, किर्लोस्कर, हापसेंकर वगैरे नाटकमंडळ्या व पटवर्धन आदि सर्कसवाल्यांनीं दिलेल्या धर्मार्थ खेळांच्या उत्पन्नाच्या सहाय्यानें इमारतीचें काम पूर्ण होऊन आज ती भव्य स्वरूपानें हापसें शहर शोभवीत आहे. (मुंबईस देणग्या मिळविण्यासाठीं श्री. ग. वि. लाड आदि स्वयंसेवकांनीं श्री. दणाईतांना फार मदत केली.)

शिवाय, कै. बा. वा. तेलंग या तरुणानें आपली अर्धी इस्टेट व पुस्तकसंग्रह दिवंगत होतांना विद्यालयाला अर्पण केला

ता. २ मार्च १९२३ रोजीं सारस्वत विद्यालयाला १२ वर्षें संपून ते १३ वें वर्ष सुरू झालें. या अवधींत उत्साही चालकवर्गानें १५ हजार रु. ची इमारत, १५ हजार रुपयांचा पगार व इतर खर्च, व १५-२० हजार रु फंड मिळून जवळ जवळ अर्ध लाख रुपयांची घडामोड केली सध्या शाळेंत ३०० विद्यार्थी मराठी ६ इयत्तांपर्यंत राष्ट्रीय मराठी शिक्षण [पो. सरकारच्या विलक्षण कायद्यामुळें इंग्लीश व शिक्षकाभावामुळें पोर्तुगीज शिक्षण सध्या बंद आहे.] सात मास्तरांच्या हाताखालीं घेत आहेत

आज हापसें शहरच्या मध्यभागीं परिषदेचें, श्री. दाभोळकर आदि श्रीमंतांच्या उदारतेचें, श्री. काका दणाईत आदि गृहस्थांच्या दृढउद्योगाचें, व गु. सिनारी आदि सच्छीलांच्या परिश्रमाचें स्मारक उज्वल मुखानें देशापुढें उभें आहे.

विद्यालयाच्या उन्नतीसाठीं ज्या ज्या सद्गृहस्थांचे प्रयत्न कारणीभूत झाले त्यांचा उल्लेख विद्यालयाच्या रिपोर्टात होईलच पण शिक्षणाच्या कामांत सर्वांगीण उन्नति करण्यासाठीं झटणाऱ्या गु. सिनारी, राउत रेगे, आरांवदेकर या चौघांचा विशेष उल्लेख करावासा वाटतो. विद्यालयाला जोडलेली लायब्ररी व शारदाव्याख्यानमाला जनताजनार्दनाची उत्तम सेवा बजावीत आहे.

विद्यालयाच्या शिक्षक वर्गानें व चालकांनीं बजावलेल्या कार्याची कीर्ति श्री. नाडकर्णी, पाणंदीर, गडकरी, नाईक, कोसंबी, सुखठणकर, करंडे, कौसेर द कोस्त, दोना प्रोपेर्सीय, पंडीत, श्री. पूर्णानंद सरस्वती स्वामी आदि शेंकडों थोर पुरुषांचा शेरा साक्ष देत आहे.

विद्यालयास सध्या मदतीची अपेक्षा असल्यामुळें श्रीमंतनीं आपल्या गंगाजळीस थोडें भोंक पाडून या सार्वजनिक हिताच्या कार्यास अवश्य मदत करावी.

परमेश्वर श्री. दाभोळकर, काकादणाईत आदि सर्वत्रांस उदंड आयुरारोग्य देऊन त्यांजकडून सा. वि सर्वांगीण उन्नति करून घेवो·

राष्ट्रीय शिक्षण.

ले० मुक्त

बहुधा असें आढळून येतें कीं, प्रत्येक भाषेंत कांहीं नां कांहीं एक विशेष वाङ्मय अधिक प्रमाणानें असतें. संस्कृतांत तत्वज्ञान, फ्रेंच भाषेंत आयुर्वैद्यक, इंग्रजींत व्यापारविषयक, जर्मनींत शास्त्रीय (कलाविषयक) व ग्रीक भाषेंत ऐतिहासिक ज्ञान विशेष असल्याची ख्याति आहे. त्या त्या भाषांत असणाऱ्या ज्ञानाव्यतिरिक्त तुलत्य भाषेला कनिष्ठश्रेष्ठ म्हणण्याचें कोणी धाडस केलें आहे असें ऐकिलें नव्हतें. परंतु तसलाहि एक अपूर्व लोकोत्तर चमत्कार गोवाप्रांतांत कोणत्याशा मासिकांतून वाचण्यास मिळाला आहे ! विशेष आश्चर्याची गोष्ट ही की, जनतेकडून तद्विषयक म्हणण्यासारखा कांहींच ऊहापोह झाला नाहीं. यावरून गोमांतकीय जनता अशा विषयांत बरीच उदासीन असावीसें वाटूं लागतें. किंवा अनुसंस्कारिक पारतंत्र्याची झांपड अजून डोळ्यांवरून उतरली नसल्यानें या विषयाला तीनें महत्वच दिलें नसावें.

कसेंहि असलें तरी शिक्षण हें ऐहीक उन्नतीसाठींच असतें असा जो कित्येकांचा समज आहे त्या समजापासून वरील चमत्काराचा उगम आहे. शिक्षण हें ज्ञान, बुद्धिविकास, आत्मोद्धार व राष्ट्रोन्नति यांच्यासाठीं आवश्यक असतें. अशी भावना असून तें स्वभाषेंतून मिळावें असें सर्वांना वाटत असतें. नॅशनल कॉंग्रेस सारख्या राष्ट्रीय संस्थेला हें तत्व पटलेलें असल्यामुळें तिनें आपल्या कार्यक्रमांत Constructive work) राष्ट्रीय शाळा व विश्वविद्यालयें उघडण्याच्या क्रमाचा समावेश केला आहे. परंतु आमच्या प्रगतीसाठीं 'इंग्रजीची आवश्यकता' आहे असें जे सांगतात त्याना तसें कां वाटत असावें हें स्पष्टपणें समजण्यास मार्ग नाहीं. कोणत्याहि गोष्टीचा निर्णय तज्ज्ञाकडून करून घ्यावा या तत्वाला अनुसरूनहि त्याची कारणपरंपरा ध्यानांत येणें मुष्किलीचें झालें आहे. पण मला एवढें दिसतें कीं, जेथें इंग्रजीचा प्रवाह अविरतपणें चालू आहे, ज्यानां इंग्रजीचें मनमुराद आकंठपान करण्यास संधि मिळाली आहे त्यानांच तिचा कंटाळा आलेला आहे, तेव्हां तींत कांहीं तरी व्यंग आहे हें सिद्ध होतें. ज्या प्रमाणें जेवणाची रुचि जेवणाऱ्यालाच कळते त्याप्रमाणें ज्यानीं इंग्रजीचा आस्वाद घेतला आहे त्यानांच तिचे गुणदोष माहीत असणें शक्य आहे. अशांकडून तिचे गुणदोष समजून न घेतां एकदम अपरिचित व अननुभवी असा एकादा कांहींच्या कांहींच बरळूं लागला तर त्याच्या बरळण्याचा परिणाम त्यालाच 'वेड्याच्या इस्पिटलांत' पाठविण्याच्या तयारींत होईल हें निराळें सांगणें नकोच.

धंदा, व्यापार व नोकरी यासाठींच शिक्षणाची जरुरी आहे असें म्हणणारे कित्येक हा समज अखिल हिंदुस्थानाचा आहे असें म्हणतात. धंदा व व्यापार हीं आर्थिक उन्नतीचीं साधनें असल्यामुळें त्याला शिक्षण हें अवश्य पाहिजेच पण अध्यात्मिक उन्नतीला शिक्षणाची तेवढीच जरूरी आहे. तेव्हां शिक्षणाचें कारण भौतिक उन्नति असा कोणाचा वैयक्तिक समज असला तरी तो सार्वजनिक करूं पाहणें कोणालाहि योग्य नाहीं. अशा प्रकारचे समज रूढ नाहींत असें नाहीं पण ते म्हणजे भौतिक तत्वाच्या आधारें ज्यांच्या समाजांच्या घड्या बसविल्या गेल्या आहेत; व पौंड, डॉलर अगर आर्थिक उन्नति हेंच ज्याचें नीति, धर्म व ज्ञानसर्वस्व होऊन बसलें आहे, अशा विलायती लोकांचे आहेत. आणि त्यांच्या सुदैवानें त्यांच्या समाजाचें हिडीस स्वरूप त्यांच्या नजरेस येत असून त्या सुधारणाचा ओंगळपणा काढून टाकण्यासाठीं हिंदुस्थानाकडे त्यांची आदरबुद्धि वळली आहे ही आम्हांस अभिमानाची गोष्ट आहे. आतां नोकरीविषयीं म्हणावयाचें असलें तर तिचा व शिक्षणाचा कांहींसा संबंध आहे खरा पण प्रगतीविषयीं मात्र बोलण्याची सोय नाहीं. नोकरी म्हणजे उन्नति नाहीं व नोकरी म्हणजे उदरंभरणाच्या एका हेतूशिवाय व्यवसायहि नाहीं. सोन्याचा धूर निघणें जरी बंद झालेलें असलें तरी जरूरीपुरत्या अन्नवस्त्राला पुरे इतकें धान्य व कापूस पिकण्याइतकी हिंद भूमि अजून समृद्ध आहे. पण राज्यकर्त्यांच्या लोकांची तद्देशांत उपासमारी होऊं नये या सद्धेतूनें त्याचा प्रचंड प्रवाह तिकडे वळविला असतां अशा स्थितींत दुष्काळपीडीत झालेल्या हिंदुस्थानांतील अधिकांश जनतेला शिक्षणाचा उपयोग उदरंभरणाकडे करण्याचा प्रसंग यावा यांत नवल नाहीं. प्रत्येक गोष्टीला सापेक्षता असते. साक्षेपता नसल्यानें प्रकृतींत विविधता येत नाहीं. विविधता नसल्यानें निसगनिर्मित जग नामशेष होईल. म्हणून शिक्षणाचें ध्येय जरी उच्च असलें तरी नैसर्गिक अगर आकस्मिक रित्या उत्पन्न झालेल्या परिस्थितीप्रमाणें कोणी धनी तर कोणी नोकर बनत असतात. हिंदुस्थान राष्ट्र आज जरी परतंत्र असलें तरी त्यांतली एकंदर प्रजा नोकर या सदराखालीं येत नाहीं. स्वावलंबनाच्या दृष्टीनें उदरंभरणार्थ नोकरी करणारे नामशेष गणले जातात. म्हणून राष्ट्रीय प्रगतीचे प्रश्न जेव्हां उद्भवतात तेव्हां सर्व सुखास लाथ मारून निःस्पृहता, निःस्वार्थ व कायावाचामनें करून जे लोक स्वदेशाला वाहून घेतात त्यांनांच अधिक महत्व दिलें जातें

चालू

—गोवा गोरक्षक या नावांची संस्था नाना सगूण चोपडेकर यांच्या प्रयत्नानें सुरू झाली आहे. तूर्त संस्थेचें स्थान त्रिकोण येथें असून १०–१२ गाई कसाईलोकांकडून विकत घेऊन पाळल्या जात आहेत.

... silencia a campanha dos con... empe... versos que la' em Go...

...intasse a aproveitar destes meios taxal-o-iamos apenas dum qualquer...

Bombay, 8-3-23

Gama causador da ruina e des-

ANUNCIOS

Por cada linha portuguesa ainda que repetida uma tanga. Anuncios permanentes contra[cto] especial.

NO VII
N° 49
Quinta
15
[...]70

ASSINATURA

Por cada ano tres rupias. Pagamento adiantado.

DIR[ECTOR E] EDITOR
G. F. [...] Dessay
Q[...]a

भारत.

BHARAT.

वर्गणी
सा[.]ीना ट. ख.
सह ३ रु.
(अगाऊ)

वर्ष ७
अंक ४९
गुरुवार
ता. १५
मार्च
१९२३

जा. दर
माध्या कॉलम
च्य दरओळी
७ अगर तित
कमाच जागे-
दोन आणे.क
मच्या जाहि
रातींचा दर स
पक्ष अगर पत्र
द्वारें.

संपादक व प्रकाशक
गो पुं. हेगडे देसाई
केपें-गोवा

CONTRA O ALCOOLISMO

No Concelho de Ponda resolveu-se declarar guerra ao alcoolismo; por ocasião do ultimo sigmo'

QUEM CONTRARIAR O RESOLVIDO EM QUERIM FICARA' OBJECTO DO DESPRESO DA CLASSE QUE O EXCOMUNGARA'.

O simpatico movimento vai ganhando adeptos em todo o Paiz que o secunda

Vivam os promotores da agitacao anti--alcoolica

Um valioso livro

O erudito escritor e integro Juiz da Relação de Nova Goa acaba de dar á luz de publicidade mais um valioso livro como o são todos de sua brilhante lavra, brilhante pela forma e brilhante pela materia

Os indus de Goa e a Republica Portuguesa é o sugestivo titulo do recente trabalho em que o talentoso autor discreve, com uma imparcialidade que lhe é peculiar e mesmo proverbial, a maneira desumana como os bramanes e gentios foram perseguidos pelo feroz jesuitismo desde os vetustos tempos da conquista do Oriente pelos portugueses, baseando o seu importante estudo no sólido e irrefragavel testemunho da Historia.

Numa palavra, a sensacional obra do sr. dr. Noronha representa uma perfeita sintese de tudo o que se acha escrito sobre a perseguição da classe hindu pelo catolicismo, sobre a demolição de seus templos que encerravam riquesas de inestimavel valor, sobre a confiscação dos bens destes templos e das propriedades particulares dos *infieis* (?), sobre a queima dos livros sagrados dos não-convertidos, sobre o desterro destes, e, finalmente, sobre todas as barbaridades com que a dominação portuguesa cumulou os sectarios do induismo.

Alem dos factos historicos que registra, analisando-os e criticando-os, o inteligente autor de *Os indus de Goa e a Republica Portuguesa* borda tambem, considerações varias sobre o progresso havido e a haver da classe hindu, com a implantação do regime democratico. Nem todas estas considerações as podemos perfilhar pelas razões que, oportunamente, passaremos a expor; mas esta circunstancia não diminue em nada o conceito em que temos o livro do sr. dr Noronha a quem a gratidão dos hindus não conhece limites pelo serviço que lhes acaba de prestar.

Consta-nos que alguns dos nossos irmãos cristãos tem declarado guerra sem treguas ao livro de que se trata, desenvolvendo empenhos para que ele não seja vendido, talvez, na persuasão de que, desta feita, lhe farão mal.

Enganam-se, porem, redondamente, visto estarem já exgotados todos os exemplares do referido livro, que tão procurado foi.

¿ Mas porque demonio aqueles nossos irmãos votam ódio ao trabalho do dr. Noronha que se limitou a reproduzir, fielmente, o *sentimento historico*? Devem votar ódio sim, mas á Historia, se é que ainda não estão satisfeitos com a obra realisada pela *cegueira do zelo religioso, ao qual zelo se juntou a cobiça -e o zelo e a cobiça, mancomudados, enroscados, qual de cima qual de baixo*, iniciaram *e levaram a efeito...uma longa e furiosa e sinistra obra de destruição e esbulho, de vexames e perseguiçoes.*

¿ Mas a causa do seu detestavel ódio terá origem no facto de o sr. dr. Noronha ter concorrido para lhes provocar o arrependimento de, por fins inconfessaveis, terem os seus ascendentes renegado a sua primitiva religião?

Sejam claros e nada de desfarces!

De resto, podem rehaver o que perderam, graças ás associações hindus de *Arya-Samaj* de Panjab, *Bram-Samaj* de Bengala e *Hindu-Missionary Society* de Bombaim.

Ecos & Critica

Pensem!

A folha oficial de 16 de Fevereiro oferece ao publico a nota circunstanciada da receita do *abkari*, do ano de 1921, receita que sobe a 9 laques e 16 mil rupias. E' pena que o mapa que regista a referida receita nao fornega elementos que habilitem o leitor a calcular a despesa para poder apreciar a" justa o lucro que o Estado aufere com a desenfreada propagagao do maldido vicio de bebedeira.

Mas, seja qual for a receita exata, impende ao Governo o dever de, pelo menos, dai em diante, coibir o alcoolismo, seguindo neste particular o louvavel exemplo da *Begam* de Bhupal, Estado nativó que nos e' visinho, e que e' mouro sem se incomodar de dirigir as suas vistas pelo que esta" passando na America.

Nao se diga que as nossas bancarrotadas finangas nao poderao comportar um sacrificio de 9 laques e tantas mil rupias, pois o referido Estado Nativo que e' mais pobre do que o nosso riscou do seu orgamento uma receita de 4 laques e meio, proviniente do alcoolismo.

Pensem que o assunto nao e' para menos!

Sigmo' em Ponda'

Escrevem-nos de Ponda' que numa reuniao havida em Querim dos representantes de vinte e sete aldeias do mesmo concelho deliberou-se nao fazer uso de alcool, de *sigmo'* para diante, visto se ter provado ser aquela bebida de incalculaveis prejuisos fisicos, moraes e economices.

De corpo e alma secundamos este simpatico movimento esperando que fara" outro tanto a importante classe de nossos proprietarios, nao dando os seus coqueiros para a lavra de sura como o fez a transacta digna mesa administrativa do Templo hindu de Sri Xantadurga" de Queula', presidida pelo abastado proprietario sr. Cundocar.

O Heraldo

Apertamos a mao a este nosso prezado colega pela subida honra que acaba de ter, de ser processado pela 2a. vez, perquanto estes favores do Governo tem-no feito verdadeiro defensor do Povo e da Verdade cujo triunfo -- garantimos--lhe-- e' certo, por mais que os seus inimigos lho queiram estorvar.

Premio

O sr. Bombi Naique, acreditado comerciante da praça de Margao pede-nos para publicar que oferece um premio de cem rupias a quem traduzir em bom marata e sem omissao alguma o livro do sr. dr. Noronha *Os Indus de Goa e a Redublica Portu-*

श्रीमंत दासविणाऱ्यांनीं करण्याचा प्रयत्न केला तर, त्यांची स्थिति कशी होईल याचा किंचित् तरी विचार करावयास नको काय? अवश्य केला पाहिजे. कारण ते केवढेहि मोठे श्रीमंत असले तरी, व्यक्ति या नात्यानें समाजाचे घटक असल्यामुळें त्यांनीं समाजाचें हित होईल त्याप्रमाणें वागणें, निदान, आपल्या कोणत्याहि कृत्यापासून समाजाचें कोणतेंच अहित होणार नाहीं, याबद्दल पूर्ण खबरदारी घेणें न्याय्य आहे

आधींच गोमांतक प्रांत ह्मणजे अगदीं लहान टापू; त्या टापूंत श्रीमंतीची मर्यादाहि लहान असावयाचीच. या मर्यादेच्या टीं बाजवळ जीं काय दोन चार हिंदु घराणीं दिसून येतात त्यांत पणजी येथील धेंपे घराण्याचा प्रामुख्यानें अंतर्भाव होतो असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. श्रीमंतीबरोबरच सभ्यता, सचोटी, धार्मिकता औदार्य वगैरे गुणहि पिढ्यानुपीढ्या या घराण्यांत आढळून येतात. ह्मणूनच त्या घराण्यांतील व्यक्तींविषयीं आदर व पूज्य भाव वाटत असल्यास नवल नाहीं. तें घराणें श्रीमंतीनें पिढीजाद असून राजधानीच्या शहरांत राहत असल्यामुळें प्रांतभर पसरलेल्या हिंदु समाजाचें लक्ष त्याकडें लागणें आणि कोणत्याहि बाबतींत त्याचें अनुकरण करण्याची सवय जडणें साहजिक आहे. अशा थोर, आदरणीय व अनुकरणीय घराण्यांतील व्यक्तींकडून जेव्हां समाजाचा आणि धर्माचा अनादर झालेला दिसत असतो, तेव्हां, त्यांस केवळ धर्मकार्यासाठीं व पर्यायानें समाजहितासाठीं, त्यांच्या त्या अपराधांची जाणीव करून देण्याचा प्रसंग इतरांवर येतो. असला जाणून बुजून ओढवून घेतलेला प्रसंग कार्याच्या दृष्टीनें मजसारख्यांस असमाधानकारक नसला तरी, भारतकारांस या प्रसिद्धीबद्दल, लोकनिंदेंत पाडणारा असतो. पण भारतकार ते भारतकारच. त्यांना 'कोणी काय ह्मणो या साठीं बळकट प्रेम असावें गाठी ॥ ही कव्युक्ति आवडती झालेलीच आहे. असो. नमनास च कळसाभर तेल जळून गेलें त्यास उपाय नाहीं. आतां मुख्य विषयाकडे वळूं.

उपरिनिर्दिष्ट धेंपे घराण्यांत गेल्या दिवसांत मुंजीलग्नाचे असे लागोपाठ दोन समारंभ झाले. त्यांप्रीत्यर्थ त्या घराण्याचे आजचे मालक श्री. विष्णुबाबा धेंपे यानीं आपला नावलौकिक अधिकाधिक वाढावा या शुद्ध हेतूनें हजारों रुपये खर्च केल्याचें समजतें. सध्यांच्या सामाजिक परिस्थितींत लग्नमुंजींत होणाऱ्या बहुविध खर्चांत नाच गाणें, दारूकाम, जेवणावळी, बँड, दिव्यांची रोषनाई, मुंबई बेळगांवकडील तऱ्हेतऱ्हेचीं पक्वानें वगैरेंत होणारा फाजील व अपचनीय खर्च वांचविण्याचा धडा इतरेजनास घालून देण्याचें महत्कार्य त्यानीं केलें असतें तर त्यांच्या नांवलौकिकांत बरीच भर पडून, आधींच महागाईनें व्याकूळ झालेल्या जनतेकडून कृतज्ञतापूर्वक त्यांस दुवा मिळाला असता. पण दुर्दैव आमचें!! असला जनहित साधण्याचा व जनतारूपी जनार्दनदेवतेकडून शाबासकी मिळविण्याचा सुमंगल प्रसंग त्यानीं आपण होऊन घालविला त्यास कोण काय करणार? 'गेल्याचा शोक वृथा' ह्मणून स्वस्थ बसणेंच बरें झालें असतें. परंतु जळत्या आगींत तेल ओतल्याप्रमाणें गेल्या ता. ५ च्या दियार्य द नोइति (Diario da noite) पत्रांतील, उपरोक्त समारंभाची बातमी वाचून आमचें काळीज जळाल्याप्रमाणें झालें आहे.

ती बातमी साधी आहे पण तिच्या आड समाजहित विघातक कृत्यें दडून बसलीं आहेत तिचा साराश याप्रमाणें:— "सिंयोर विष्णू शे. धेंपे यांच्या वाड्यांत लग्नसमारंभाच्या दिवसांत हजारों आमंत्रित जमलेले होते. दर दिवशीं तीन चार हजार पान पडत होतें. त्याच दिवसांत श्रीमंताकडून आपल्या आमंत्रित खिस्ती गृहस्थानां उत्तम या प्रकारचें जेवण, चांगली आणि उंची दारू आणि थंडगार पेयें अर्पण करण्यांत आलीं." हा मजकूर वाचून वाचकांना विशेष कांहीं न वाटणें साहजिक आहे. बड्या बड्या खिस्ती पाहुण्यांची (त्यांत ते अधिकारी असले तर विशेषच,) मर्जी खप्पा होईल, ते आपली इज्जत घेऊन जातील, अथवा निदान त्यानीं आपणास रानटी न समजतां चांगले सुसंस्कृत (civilizado) ह्मणून समजावें म्हणून; त्यांस मानेल तो आहार व रुचतील तीं पेयें पाहुणचार दाखल देण्याची चाल आजकाल कांहीं लब्धप्रतिष्ठीत आणि स्वत्वशुन्य अशा . हिंदूनीं उघड उघड धर्मांशांस धाब्यावर बसवून चालविली आहे. व गतानुगतिक अशा आमच्या समाजांत ती दुष्ट चाल आपलीशी करून घेण्यास अहमहमिका सुरू झाली आहे. आजपर्यंत 'घरासारखा पाहुणा' ही जुनी सार्थ म्हण प्रचारांत होती तिच्या ऐवजीं 'पाहुण्यासारखं घर' असें म्हणण्याची पाळी आली तरी, या ह्मणीचे दुष्परिणाम मात्र बरेच जाणवूं लागले आहेत. असल्या या धर्मबाह्य आणि समाजानें निंद्य ठरविलेल्या व अनुभवांतीं घातक असलेल्या पाहुणचारास आळा घालण्याचें मनोधैर्य ज्यानीं दाखवावयाचें त्या श्रीमंत धेंप्यानींच जर उलट त्यास प्रोत्साहन दिलें तर समाजाचें दुर्दैव तें दुसरें कसलें असणार?

श्री. धेंपे यानीं आपल्या खिस्ती पाहुण्यांना उत्तम तऱ्हेचें पण पवित्र असें जेवण दिलें असतें, तर त्यानां दोष देण्याचें कांहींच कारण नव्हतें. आम्हांस वाईट वाटतें तें इतकेंच कीं, जेवणाबरोबर खिस्ती पाहुण्याना दारू पाजण्यांत आली हें होय. घरासारखा पाहुणा या न्यायानें पाहुण्यास दारू पाजली तर त्यांच्या घरांतहि सुरादेवी वावरत आहे असा संशय स्वप्नांत सुद्धां कोणास येणार नाहीं परंतु जेव्हां "पाहुण्यासारखें घर" ही नवी ह्मण प्रचारांत येत चालली आहे तेव्हां, पाहुण्याप्रमाणें घरचे यजमानहि सुरादेवीचे उपासक बनण्याची भीति मजसारख्या दुर्बळांस वाटूं लागल्यास ती मात्र निराधार नाहीं, हें कोणीहि थोड्याशा अनुभवानें सांगूं शकेल. श्रीमंताच्या मनांत मद्यपान करणें हेंच महापातक आहे अशी समजूत असेल. पण आह्मी त्यास खात्रीपूर्वक सांगूं शकतों कीं मद्यदान, मद्योत्पादन, मद्यविक्रय करणें आणि करविणें हीं पातकें मद्यपानाइतकींच भयंकर आहेत. ज्याप्रमाणें गुन्हा करणाऱ्या बरोबर गुन्ह्यांस प्रोत्साहन देणारा म्हणजे करविणारा अपराधी ठरतो त्याचप्रमाणें मद्यपान करणाऱ्याबरोबर त्यास प्रोत्साहन देणारेहि अपराधी ठरतात.

वरील सरळ न्यायाचें निरीक्षण केलें तर श्रीमंत धेंपे हे दान केल्याच्या महादोषास पात्र होतात. हिंदुधर्मावरल्याचा दृढ विश्वास असल्यामुळें आपलें कृत्य दोषास्पद आहे कीं काय याचा उलगडा करून घेण्यास ते समर्थ आहेत. आमच्या अल्प समजुती प्रमाणें आह्मी असें सांगं शकतो कीं, आपली चूक कबूल न करण्या इतके ते खास दुराग्रही नाहींत. ते धर्मशील व पापभीरू आहेत. स्वतःच्या ज्ञातींत सवगोळाकाराचें भूत अनिरुद्ध संचार घालूं पाहात आहे. या भोळ्या भावनेनें च त्यानीं, श्री ऐस्थान कवळें येथें संयुक्त पक्षीय लोकाना वाळींत टाकण्याचें महत्कार्य करण्यासाठीं भरलेल्या, पहिल्या परिषदेचें जनकत्व द्रव्यद्वारा, आपणाकडे घेतलें होतें. त्या परिषदेंत पास झालेला लग्नमुंजींत काटकसर करण्याचा महत्वाचा ठराव श्रीमंताच्या जोरावर त्यानीं पायांखालीं तुडविला असला तरी इतर बारीकसारीक ठरावांची अमलबजावणी करण्यास अद्याप ते विसरले नाहीत. हे त्यांचे अमोलीक गुण लक्षांत आणून आह्मीं त्यानां विनंति करितों कीं, श्रीमंत धेंपे महाराज, आपल्या हातून मद्यदानाचें महापातक घडलें आहे, तें पातक योग्य प्रायश्चितानें धुवून टाकणें आपल्या व समाजाच्या हिताच्या दृष्टीनें बरोबर आहे. तेव्हां आज्ञांवरोवर आपण सर्वांहि वंदनीय व परम पूज्य असलेले श्री मत्कमलानाथ तीर्थ स्वामी गुरुमहाराज यांचा अधिकारी सल्ला घेऊन प्रायश्चितपूर्वक शुद्ध व्हावें व समाजांत रूढ झालेली ही पाहुण चाराची नष्ट चाल बंद पाडण्यास मदत करावी. आणि यापुढें मद्यदानाचेंच नव्हे तर, आपल्या बागाइतांतील हजारों नारळीचीं झाडें सुरेस देऊन आपण अप्रत्यक्ष रीत्या त्या कल्पतरूप्रमाणें उपयुक्त हाणून वद्य होऊन राहिलेल्या, झाडांची गर्भहत्या करवतां व मद्योत्पादन करविण्यास कारणीभूत होऊन मद्यपानास प्रोत्साहन देतां तेंहि बंद करावें तुह्माला हिंदुधर्म पुरुषाचे शतशः आशीर्वाद मिळतील व तुमचें भाग्य अधिकाधीक वाढीस लागेल. अधीक उण्या स्पष्टोद्गाराचीं क्षमा असावी.

रंगपंचमी शके १८४४

राष्ट्रीय शिक्षण

ले. मुक्त

भवितव्यतेच्या कालचक्रांत सांपडून आह्मी परतंत्र झालों पण यांत आह्मीं समाधान मानतों काय? कोणताहि देश पारतंत्र्यांत सुख मानण्यास तयार आहे काय! मग युरोपांत एवढा प्रचंड संहार कां झाला! आयर्लंडांत बजबजपुरी कां माजली? कोणत्या कारणानें ग्रीस आणि आंगोरा यांची एकमेकांत अत्याचारी सुरू झाली? हजारों अकाली व देशभक्त हे हाल कां सहन करतात आणि परिचयाच्या शब्दांत विचारावयाचें असलें तर 'देमांदमाहात्म्याचें प्रस्थ कां माजावें? 'मागेल तें द्यावें सुखी असावें' या तत्वाचा अंमल चहूंकडे कां होऊं नये? तसें झालें असतें तर वरील प्रश्नाचें मूळ कारणच नाहींसें झालें असतें. पण तसें होत नाहीं. यावरून प्रत्येकाचा निसर्गसिद्ध हक्क जें स्वातंत्र्य तें मिळविण्याची व्यक्तीची किंवा राष्ट्राची धडपड असते हें सिद्ध होतें. राष्ट्रीय पारतंत्र्याचा हा नियम एका व्यक्तीला लागू केला तर विशालस्वरूप नष्ट होऊन तीचें, गुलामगिरींत, ताबेदारींत अगर नोकरींत रूपांतर होतें. म्हणून उदरनिमित्त बहुकृतवेष: असें असलें तरी व्यक्तिशः सुद्धां नोकरीची तरफदारी होईल असें संभवत नाहीं. इंग्रजी भाषेचा टापू बराच विस्तृत असल्यामुळें त्या भाषेचें थोडेंसें अध्ययन केल्याबरोबर एखादी नोकरी मिळणें शक्य असतें. परंतु राष्ट्राचें व शिक्षणाचें ध्येय नोकर बनवायचें नसतें हें लक्षांत ठेविलें पाहिजे. मनुष्यप्राणी जड तत्वात्मक असल्यानें प्रवृत्तिप्रिय असतो आणि तो स्थियनुकुलतेची वाट पहातो. नोकरी सारख्या अल्पसायासानें उदरंभरण होऊं शकतें असें एकदां त्याला पटलें व त्यांत तो समाधान मनूं लागला म्हणजे मग त्याला स्वाभिमानाची, स्वदेशप्रेमाची, प्रत्येक व्यक्ति राष्ट्राचा घटकावयव आहे या नात्याची आणि राष्ट्राच्या उन्नतीची किंवा अधोगतीच्या जबाबदारीची साफ विस्मृति पडते. व्यक्तिशः अशी विस्मृति पडूं लागली म्हणजे तें राष्ट्र 'गुलामांचें राज्य' बनण्यास कालावधी लागत नाहीं!! [चालू]

—दोतोर नोरोन्य यानीं लिहिलेल्या समग्र ग्रंथांचें उत्तम मराठी भाषांतर करणारास मडगांवचे सु–प्रसिद्ध व्यापारी बोंत्री नाईक यानीं शंभर रुपयांचें बक्षीस ठेविलें असून, तें जाहीर करण्याविषयीं त्यांजकडून आह्मांस लिहून आलें आहे. भाषांतराची निवड भारतावर सोंपविलेली असून त्यावर नाईक आपला कोणताच हक्क सांगणार नाहींत. परकी खिस्ती लोकांकडून हिंदूंवर झालेल्या अत्याचारांची मराठी वाचकांस पूर्ण कल्पना व्हावी या एकाच शुद्ध व परोपकारी हेतूनें उपरिनिर्दिष्ट पारितोषिक ठेवण्यात आलें आहे. याबद्दल नाईकांनें कोण कौतुक करणार नाहीं?

ANNO VII

Por cada linha portuguesa ainda que repetida uma tanga. Anuncios permanentes contracto especial.

DIRECTOR E EDITOR G. P. Hegde Dessay

Quepem Goa

भारत

BHARAT

वर्ष ७ अंक ५० गुरुवार ता २९ मार्च १९२३

संपादक व प्रकाशक गो पु हेगडे देसाई केपें-गोवा

INDUS E CRISTÃOS

O sr. Alves Vilar morador "das undiflavas brumas de verdejantes palmeiras" publicou uma carta no "Bharat" sob o titulo "Em guarda .." com o fim de me fazer a replica em que S. Exa. divorciado da logica e de bom senso, atira-se quixotescamente contra os indus, com uma furia sem outra igual.

De toda essa longa tirada de frases e outra portuguesada de S. Exa., inclusive palavras pouco decentes, infere-se o seguinte:

(1) Que ele (Vilar) leu, [illegible] me lintou e "pues sus...!" quere dizer que a minha carta a [illegible] o tinha a sua razao de ser.

(2) Que Goa e' de facto a Roma do Oriente e um centro da sabedoria mundial e que pensam mal os que querem persuadir-se do contrario.

(3) Que os 'pensadores indigenas' sao estupidos e que ele (Vilar) e' um sabio.

(4) Que eu fiz muito mal quando disse que "os convers[illegible] eram exclusivamente dos cultivadores pescadores etc."

(5) Que a carta em questao de S. Francisco Xavier nao era da sua autoria, mas sim uma tradugao feita em sinal de gratidao ao apostolo!

(6) Que S. Francisco Xavier e' um grande santo, salvador da India, protetor de viuvas(!), louco sublime ... e que o ultimo gume de sangue nas veias do sr. Vilar ebuluciona quando digo que Francisco Xavier nada disto foi.

(7) Que nao e' verdade quando a gente fala que os conversos nao tomam banho, antes pelo contrario sao os indus que nao o tomam.

(8) Que dois indus que actualmente estao em Portugal, estarao por essas horas a saborear Omeletts, roasted beelf etc. na "Hospedaria Coimbra," e que eu sou um mau bicho porque falo contra a obra de S. Francisco Xavier na India.

Eis em poucas palavras o que o sr. Vilar quere dizer, nao falando do seu reportorio de insultos e calunias em que parece ser eximio, e dos quais o seu artigo esta' repleto. Sou um indio, um indu e como tal nao estou educado a dirigir palavras indecentes a quem quer que seja.

A prosa do sr. Vilar em nada prova o contrario do que afirmei e faz apenas argumentos extemporaneos.

Posto isto, vamos a ver se posso arrancar ao sr. Vilar da lama da credulidade, do orgulho insensato e do espirito de ofender a religiao alheia.

A minha carta publicada no n.º 41 do "Bharat" e que era feita no empenho de silenciar a campanha dos conversos que la' em Goa, durante o tempo da exposigao de F. Xavier, arrastavam pelas ruas de amargura os creditos da religiao indu, era muitissimo oportuna. Ela nao so se referia a' carta de Francisco, traduzida pelo sr. Vilar, mas ainda a outros jornais que impensadamente escreviam cousas tendentes a crear odios. Ninguem afirmou que a carta em objeto, altamente ofensiva aos brios dos bramanes e da religiao indu, era invengao exclusivamente do sr. Vilar, o qual, ja que agora ergue a sua voz dizendo que ela e' de lavra do sr. Francisco Xavier, nao temos nenhuma duvida em admitir que o seja. Mas o que parece com a leitura da mesma e' que o tal pe. Francisco Xavier fel-a afim de intrujar os seus colegas de Roma e cantar glorias dos seus servigos que tantos males trouxe a India! Mesmo a tradugao da aludida carta e a sua reprodugao nos jornais modernos importa um crime, porque alem de ser ela ofensiva da religiao indu, contem, ao contrario do que se nota e do que a historia nos conta, referencias falsas sobre os sacerdotes da gloriosa religiao dos Arias. Lembre-se que nao vivemos actualmente naqueles ominosos tempos de fogueiras inquisitorias, nem na monarquia em que tudo era desculpavel a um converso. Estamos na Republica, e a todo o homem e' livre defender-se.

Quanto ao facto de Goa ser Roma do Oriente e um centro da Sabedoria mundial, nao havera' um homem no mundo inteiro, tao vil que o nao reconhega. Centro de Sabedoria Mundial! Porque nao havia de o ser? A demais, ha' ahi intelectuais de grande calibre, ha ai terras que sao conhecidas como Atenas, ha ai liceus, escola medica, aumentos de impostos, igualdade, liberdade, fraternidade.........ha' ainda o incorruptivel corpo de S. Francisco. Que mais e' preciso?

O sr. Vilar, arvorando-se num perfeito europeu 'buzina com a sua boca afona' o seguinte desparate piramidal. "Selecta bufoneria da apelintrada horda dos pensadores indigenas que da imprensa fazem montras das suas asneiras lapidadas em sentengas profundas."

Que 'estupida insolencia da obtuosidade corn[illegible]!!! O sr. Vilar naturalmente nao le os jornais de Portugal cuja leitura o faria certamente convencer de que isto de fazer da imprensa montras das asneiras nao e' dos indigenas, mas sim importado de fora. O proprio artigo do sr. Vilar e' exemplo frisante disto.

O ilustre articulista de "Em guarda..." torce o olho de desconfianga 'como que ve um mentiroso'quando digo que o padre Xavier conseguiu fazer as conversoes aproveitando da ignorancia e a pobreza da gente da camada baixa da sociedade. Mas se ele so se limitasse a aproveitar destes meios taxal-o-iamos apenas dum qualquer missionario que hoje em dia anda as terras de Industao a cagar cordeiros, isto e', a procurar um faminto, um necessitado ou um doente dssamparado a quem se esforga por os santos ol[illegible] o(s) com promessas de 100, 200 ou 300 rupias, o que afinal poucas vezes consegue!

O sr. pe. Francisco fez mui[illegible] as maneiras afim de converter os indus. Quere provas, amigo Vilar? Leia so o ultimo livro do sabio doutor Noronha e nele V. estudara' O sr. pe. Francisco tambem concorreu muito para queima dos livros escritos em marata e assim privar em parte os indus da sua literatura. O Reverendo J. Muray Milchell, celebre missionario protestante e sabio orientalista da presidencia de Bombaim, publicou em 1849 uma memoria sobre a literatura marata (Marathi works composed by the Portuguese) no jornal de R. A. Society n.º XII, 1849, em que diz; "Na India a Religiao Catolica fez diminuta impressao sobre as mais altas clases dos indus. Os conversos sairam exclusivamente das clases mais pobres dos pescadores e cultivadores etc. etc.." E nao venha mais o sr. Vilar ensinar-me ligoes de o sr. Francisco nao ter convertido os indus ignorantes e pobres

O sr. pe. Francisco ainda tem feito na India um acto indisculpavel e muitissimo funesto ao progresso desta terra. E' que com conversoes ele creou gente com outros sentimentos, isto e' gente seudo europeia o que e' e sera de futuro uma grande barreira para o progresso comum da India

Que Pe. Francisco Xavier e' um grande santo salvador da India e protector de viuvas e' coisa que nao admito. Nao sou credulo e nao sou tambem capaz de chamar um santo aquele de quem a historia nao diz bem Se o sr. Vilar julga-o santo (!) que guarde o seu retrato no santuario e va rezando. Nao sera' S. Exa. quem me ha de indicar santos.

Quanto ao que o sr. Vilar fala a respeito dos indus que estao em Portugal, e' escusado dizer que eles sao rapazes que se orgulham de ser indios e indus. Sei com provas que nao gostam o que s. exa. chama *omolets* e *bifs*. O sr. Vilar, parece que no mesmo momento em que 'infesta as 'undiflavas brumas de verdejantes palmeiras'anda tambem a saborear o roasted biffe na Hospedaria Coimbra de Portugal!

Raro e' o indu que se isenta de banhos quotidianos e S. Exa. se diz que viu alguns a burrifarem o seu corpo 'com 2 ou tres chembus,' isto seja tal vez devido a' visinhanga que tem dos admiradores do *santo* ......

Por ultimo, sr. Vilar, cumpre-me dizer que e' louvavel o seu intuito de se defender e traduzir as obras daquele a quem considera como santo, mas o seu sistema adoptado para ambos esses fins nao e' digno dum cavalheiro.

Bombay, 8-3-23

S. N. Bhopatker

Ecos & Critica

Bhalchondra V. Dessai

Após um brilhante exame do sétimo ano, curso de letras obteve a elevada classificação de 15 valores o sr. Bhalchondra V. Dessai

Com orgulho registamos este raro facto, por quanto o sr. Dessai é o primeiro hindú que conquistou tal distincção no referido curso, graças a seu previligiado talento, aliado a um trabalho metodico e inteligente, honrando, desta feita, a numerosa classe a que pertence.

Conhecemos o sr. Bhalchondra. E' mesmo nosso estimado amigo e, porisso, com autoridade, asseveramos que o laureado é homem de sólidos principios, incapaz de antes quebrar que torcer, detestando tudo o que rece pelo aparato enganador.

Com verdadeiro júbilo felicita-se o *Bharat* por tudo isso, felicitando, igualmente, o sr. Dessai, seu dedicado e desinteressado cooperador.

Congresso Provincial

Foram coroadas de melhor exito as sessões do 5.º C. P. cujas conclusões, incluindo a 12a que se refere á restrição do abatimento do gado *vacum*, o que representa fruto dum trabalho aturado dos que anseiam vêr progredido o nosso depauperado e bancarrotado Paiz.

Do fundo do coração desejamos longa vida e muitas prosperidades ao nosso patriotico Congresso.

Desacordo legitimo

O sr. Presidente do 5.º C. P. deu à luz a ideia de festejar o centenario de Vasco da Gama, idea que foi secundada pelo sr. Jaime de Morais.

O *Bharat*, porem, com a veemencia de que é capaz, protesta contra tal idéa, sem receio de que, por esta sua atitude, se digá dêle mal.

E' simples o motivo: foi o Gama causador da ruina e desgraça de numerosas familias hindus que, em boa paz, habitavam a sua India.

रची नेमणूक झाली असून त्यांनीं आपल्या जागेचा चार्ज सुद्धां घेतला! या नवीन 'घाडेची' अर्थात् बिलकूल जरुरी नव्हती. पण वरिष्ट सरकारची नजर राष्ट्राच्या गरजेवरून उठून व्यक्तींच्या गरजेवर स्थीर झालेली असल्यानें, राष्ट्राच्या सुखदुःखाकडे पाहण्याऐवजीं तें आपल्या बगलबच्चांच्याच सोयीकडे विशेष लक्ष पुरवितें, असें मोठ्या खेदानें ह्मणावें लागतें. पोर्तुगाल सरकारला जडलेला हा भयंकर रोग पोर्तुगालचेंच दिवाळें वाजवून स्वस्थ न रहातां, वसाहतीचेंहि असें खोबरें करीत आहे हें सदरील नेमणुकीवरून स्पष्ट सिद्ध होत आहे. यावरून 'बुडत्याचा पाय खोलांत' ही ह्मण प्रस्तुत बाबतींत किती सार्थ आहे, हें आणखी विशेष रीतीनें विशद करण्याचें कारण नाहीं.

गोरक्षणः—गेल्या कांग्रेसनें गोरक्षणाला ह्मणजे गोहत्तेच्या प्रतिबंधतेला शक्य ती मदत पुरविण्याचा ठराव पास केला आहे. या ठरावामुळें यापुढें गोहत्या व्हावयाची टळेल अगर तिला आमच्या अपेक्षेप्रमाणें आळा पडेल असें जर कोणास वाटत असेल तर ती त्याची साफ चूक आहे. तो ठराव पास झाला ही तत्वतः अभिमानाची गोष्ट होय, परंतु जोंपर्यंत कांग्रेसचे खिस्ती पुढारी कंबरा बांधून व्यक्तिशः या बाबतींत परिश्रम करणार नाहींत, तोंपर्यंत ठरावाचा तपशील ठरावांतच 'गडप' होऊन जाईल असें आह्मांस वाटतें. ह्मणून त्या खिस्ती पुढाऱ्यांस आमची सविनय विनंति आहे कीं, त्यांनीं अंतःकरणपूर्वक शेतकीच्या अभ्युदयाकडे लक्ष देऊन, उपरोक्त ठरावास मूर्त स्वरूप येण्याप्रीत्यर्थ अविश्रांत परिश्रम करावा. 'बोलाचाचि भातानें' भूक शमन होणें शक्य नाहीं.

वर्तमानसार.

—ता. १८ रोजीं पणजीचे सुप्रसिद्ध व्यापारी व भारताचे हितचिंतक गणेश रामचंद्र कामत यास एकाएकीं देवाज्ञा झाल्याचें कळविण्यास आह्मां फार दुःख होत आहे. केवळ स्वपराक्रमानें त्यांनां अगदीं कष्ट स्थितींतून व्यापारी बुद्धिमत्तेच्या जोरावर आपला सांपत्तिक उद्धार केला होता.

—गोव्यास भूषणीय असलेले नामदार व्यंकटेश देसाई यांचे कनिष्ट बंधु भास्कर देसाई हे लिसेवांच्या सातव्या वर्षाच्या परीक्षेंत पहिले आल्याबद्दल आह्मी प्रेमपूर्वक अभिनंदन करितों. यशवंत देसाई यांची बुद्धिमत्ता अतिशय तीव्र असल्यावरून ते लवकरच नांवरूपास चढतील, असा भारताचा विश्वास आहे, तो खरा ठरो.

—विद्यावर्धक मंडळ, डिचोली या संस्थेची होत असलेली उन्नति पाहून 'भारता'स फार आनंद होत आहे. सदर संस्थेसंबंधी लिहून आलेली विस्तृत माहिती जागेच्या अभावामुळें सवडीनुसार प्रसिद्ध होईल.

—फोंडें महालची मद्यपान निषेधाची चळवळ अत्यंत जोरांत असून सरकार जेरीस आल्याची वदंता आहे. ऐक्याचा प्रभाव! सदरहू चळवळीचा ठराव सवडीनुसार भारतांत प्रसिद्ध होईल.

—येथें ता० २५ रोजीं कऱ्यांचा (वर्फाचा) जोराचा पाऊस पडून चैत्रांत आषाढाचें सुख अनुभवण्यास मिळालें!

—गोव्यांत असहकारतेच्या तत्वाचा विशेष जोरानें प्रसार व्हावयास लागला असून दुष्ट वृत्तींस आळा पडण्याचीं सुचिन्हें जिकडे तिकडे दिसत आहेत.

—मडगांवचे वैकुंठ नाईक यांस सपत्निक देवाज्ञा झाल्याचें कळविण्यास वाईट वाटतें!

- येत्या रविवारपासून सांगें, केपें, फोंडें, पेडणें व काणकोण येथील फाजेंदांतील मात्रीजविषयक चोपड्या लोकांसाठीं उघड्या ठेवण्यांत येतील. गरजूंनीं त्यांचा फायदा घ्यावा.

--शिक्षणाचे नवीन डायरेक्टर दो. सांतुस हे आपलें नवीन आफीस थाटण्याच्या बेतांत चूर असल्याचें कळतें!

— यंदां व यापुढें सेगुंदग्रावाच्या लेखी व तोंडी परीक्षा एकाच दिवशीं होऊन, प्रत्येक दिवशीं परीक्षेस बसणाऱ्या मुलांची संख्या ५ असेल असें शिक्षण खात्याकडून प्रसिद्ध झालें आहे.

- सांग्यावर दोन मुनिसिपालट्यांचा कारभार चालू असून, लोकांना काय करावें हेंच समजत नाहीं! या संबंधीं लोकांनीं सरकारकडे अनेकदां तक्रार नेली, तारा केल्या डेपुटेशनें पाठविलीं. पण तेथील धावळा-गोंधळ तसाच चालू आहे! 'नैतिक' सरकारची ही अनीति पाहून मन भांबावून जातें!!

—आजच्या पोर्तुगीज अग्रलेखांत एम. एन. भोबटकर या नावांच्या लेखकानें मां. फ्रांसिस्क शाव्हीयेर हे कसे साधु नव्हत हें मुद्देसूदपणें सिद्ध केलें आहे.

—सरकारनें बंदीचा हुकूम केला असतांहि अजूनपर्यंत पिग्मेव नावांचें मिस्तीसी साप्ताहिक चालूच आहे.

—पर्तगाळचा रामनवमीचा उत्सव मागील वर्षांप्रमाणेंच मोठ्या थाटानें पार पडला, असें एक प्रेक्षक लिहितात.

'भारत'

प्रस्तुत अंक हा या वर्षाचा शेवटचा अंक असून ईश-जनकृपेनें येत्या अंकापासून भारताच्या आठव्या वर्षाला प्रारंभ होणार आहे. ज्यांचेकडून मागील वर्गणी अजून यावयाची असेल त्यांनीं ती तात्काळतोब चुकती करावी, अशी विनंति आहे. या वर्षी ज्या ज्या देशहितेच्छु लोकांनीं भारतास हरतऱ्हेचें सहाय्य पुरविलें त्यांचा तो फार आभारी आहे.

मनेजर भारत.

पणजीचें बातमीपत्र

इलेक्ट्रीक रोषनाई

येथील मुनिसिपालटीनें नवीन व्यवस्थेवरोबर इलेक्ट्रीक रोषनाई आणून आपल्या पणजी शहरांत भर घातली आहे खरी पण आजच्या पेक्षां बिटबिटणाऱ्या कंदिलाचीच जास्ती आठवण होते. याचें कारण असें आहे कीं एक ना दोन कुठें ना कुठें तरी पेटत असत. पण आमची रोषनाई एकाच मिनिटांत काळोख आणि लवकरच उजेड अशा आपालिपांच्या खेळांत आहे. कित्येक ठिकाणचे दिवे रात्रीचे ९ वाजल्यानंतर विश्रांतिसुखांत असतात. कित्येक ठिकाणचे पाच दहा दिव्यांतील एकदोन दिवे कमजोर तर कांहीं कांहीं पेटलेले असतात हा सर्व सूत्रधारी खेळ आपली मुनिसिपालटी मुकाट्यानें पाहते. चांगल्या चांगल्या जागीं हमरस्त्यांवर दिवे पेटले ह्मणजे सर्व शहरांत असेच पेटतील असा आपल्या वरिष्ठांचा समज असतो. त्यांनीं लोकांच्या सोईसाठीं शहरांत फिरून अव्यवस्था कुठें आहे हें पाहणें योग्य आहे.

मुनिसिपालटी

आपल्या मुनिसिपालटीनें नवीन पोस्तुर (Postura) करून त्याच्या मागें लोकांस बराच कर लादण्याचा विचार केला असून त्याचा अभ्यास चालला आहे. आपल्याकडे इतके कर आहेत कीं त्यांचा विचार केल्यास लोकांची फारच कींव येते त्यांतच आणखी कर लादण्याची अपेक्षा बाळगणें ह्मणजे एकादशीच्या रात्रीं शिवरात्र आणणें आहे.

अव्यवस्था

सर्वच अव्यवस्थेंत नावेगासावांत एक अव्यवस्था दृष्टीस पडते ती हीच कीं, ऐन वेळीं बोट सोडली जात नाहीं ही होय. यामुळे बऱ्याच लोकांची अव्यवस्था होते. उदाहरणार्थ 'हडदोंगची लाच' ती सोडण्याची वेळ ४॥ वाजतां असते. पण तिकडे गेल्यावर तब्बेतीप्रमाणें व्यवस्था आढळते ती आढळते. पण सोडणार किंवा नाहीं, ही जबाब मिळणें सुद्धां मुष्कीलीचें असतें. सोडण्याची इच्छा नसल्यास त्याप्रमाणें एका दैनिकावर प्रसिद्ध करावें; न पेक्षां एका बोर्डावर लिहून तो बोर्ड लोकांस दृष्टीस पडेल अशा व्यवस्थेशीर जागीं लावणें जरूर आहे.

सार्वजनिक मुत्र्या

कायद्याप्रमाणें सोई असणें आवश्यक आहे. शहरांत कोणत्याहि जागीं लघवी करणें गैरशिस्त आहे खरें. पण त्यासाठीं पुरेशा मुत्र्या बांधणें हें मुनिसिपालट्यांचें काम आहे. याकडे मुनिसिपालटीनें लक्ष द्यावें तसें दिसलेलें आढळत नाहीं. एक दोन मुत्र्या येथें आहेत. पण त्याची इतकी गलिच्छ व्यवस्था आहे कीं नाक दाबून सुद्धां आंत जाणें मुष्कीलीचें असतें. स्वच्छता नसली ह्मणजे अशी स्थिति व्हावयाचीच. सार्वजनिक संडास व मुत्र्यांकडे मुनिसिपालटीनें विशेषतः लक्ष पुरविणें योग्य आहे.

रमेशचंद्र

जुना इतिहास.

गोमांतकस्थ हिंदूंचा छळ

[या सदराखालीं मागें जाहीर केल्याप्रमाणें दोतोर नोरोन्य यांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'गोमांतकस्थ हिंदु व रिपब्लिक' या पुस्तकांतील निवडक उताऱ्यांचें भाषांतर देण्यांत येईल. सं. भारत]

" १५३४ सालीं गोव्यांत बिस्पाद या नावांची खिस्ती धर्मसंस्था स्थापण्यांत आली; परंतु जितक्या जलद व सहजरीत्या बाटे लोकांच्या संख्येंत भर पडेल अशी समजूत होती, तितक्या जलद व सहजरीत्या धर्मप्रसाराचें काम पार पडत नसल्याचें पाहून बिस्पादास जबरीच्या 'परोपकारा'ची जोड देण्यांत आली, असें १५४१ सालच्या ३० जून रोजीं प्रसिद्ध झालेल्या खालील हुकमावरून सिद्ध होतें.

'आकाशांतील बापानें' त्या अनेक वर्षांपासून सैतानाच्या मगरमिठींत सांपडलेल्या राष्ट्राची व लोकांची आठवण केली, व त्याचीच (बापाची] इच्छा झाली कीं तेथील सर्व हिंदु देवालयांचा विध्वंस होऊन, तेथें त्यांपैकीं एकहि शिल्लक राहूं नये".

त्याच वर्षी पणजीचीं एकंदर हिंदु देवालयें जमिनदोस्त करून शहरांत ठिकठिकाणीं खिस्ती मोठमोठीं देवालयें व खेड्यापाड्यांत लहान लहान देवळ्या उभारण्याचें शतकृत्य आचरण्यांत आलें.

राष्ट्रीय शिक्षण

ले. मुक्त

बरें इतकेंहि असून इंग्रजी हिंदुस्थानांत कायमची टिकेल अशी कोणी खात्री देऊं शकतो काय? आजवर जसे निरनिराळ्या धर्माचे, जातीचे व भाषेचे राज्यकर्ते हिंदुस्थानांत होऊन गेले तसेच उद्यां दुसरे कोणी किंवा हिंदुस्थान स्वतंत्र होणें अशक्य नाहीं. तेव्हां भाषेचे सव्यापसव्याचे विचार करीत रिकामटेंकडा काळ दवडण्यापेक्षां स्वभाषेला सुसमृद्ध करण्याचे प्रयत्न करीत राहणें अधिक श्रेयस्कर नाहीं काय?

कोणत्याहि राष्ट्राचा राज्यकर्ता परकी व नवीन असला ह्मणजे त्यांच्या भाषेच्या थोड्याशा शिक्षणानेंहि बडी नोकरी मिळूं शकते. चारशें वर्षांच्या दीर्घावधींत ही स्थिति गोव्याप्रांतात येऊन गेली. शेतीवर उदरनिर्वाह करणारी गोवा प्रांतीय जनता, शेतीकडे दुर्लक्ष करून दीड रुपयाचा सुद्धां नोकर बनण्यासाठीं, एकमेकांशीं स्पर्धा करतांना दिसून येऊं लागली! गोवाप्रांताची इतकी हलाख स्थिति आणि त्यांतील जनतेचा अनुकंपनीय कमकुवतपणा याचें बीज परभाषेचे नोकर, गुलाम हें आहे. आह्मीइतके दुर्बल झालेले आहोंत कीं, स्वराज्या [autonomia] सारखी हे राज्यघटना पेनाच्या एका फटकाऱ्यासरशीं तहकुब (suspensa)

होण्याच्या वेळेला मूग गिळून स्वस्थ बसतो! या जनतेच्या इतर प्रकारच्या आवडीनिवडीकडे सरकारनें जाणून बुजून सुद्धां दुर्लक्ष केलें यांत वावगें काय झालें? आमच्यांत पाणी किती आहे हें ओळखल्यामुळें असें होतें ना? इंग्रजी भाषेविषयी अढाव असें घडलें नसल्यानें कित्येकांना भूरळ पडली असल्यास नवल नाहीं. पण फक्त एक शतकाच्या अवधींत तिचे परिणाम कोठवर पोंचले आहेत याचें नुसतें दिग्दर्शन केलें म्हणजे लॉर्ड मॅकॉलेचें शंभर वर्षांपूर्वीचें भविष्य खरें होण्याचा भास होतो. त्या या म्हणण्याप्रमाणें इंग्रजी शिक्षणक्रमामुळेंच हिंदुलोक, स्वाभिमानाला व पराक्रमाला पारखे झाले आहेत. कित्येक शतकें लोटेपर्यंत ज्याची वाण पडणार नाहीं अशा प्रश्नाचा खल म्हणजे जगांतील लांकूड कोळसा इत्यादि उष्णतोत्पादक द्रव्यें संपुष्टांत आलीं तर उष्णता कशी मिळेल या प्रश्नाचा खल तज्ज्ञ लोक कित्येक वर्षांपासूनच करीत आहेत! आज हिंदुस्थानासमोर शिक्षणाचा प्रश्न भावि स्वातंत्र्याचे दृष्टीनें तेवढाच महत्वाचा नाहीं काय? अन्नवस्त्रासाठीं परक्याकडे पाहणें लागतेंच पण यांच्या नजरेची आवश्यकता जें शिक्षण त्याची ही अपेक्षा ह्या हिंदभूमीनें परमाणे कडे वळावी काय? इतकें अधःपतन होणें शक्यच नाहीं.

चालू

—कळविण्यास दुःख वाटतें कीं श्री. दुर्गाबाई वागळे ऊर्फ चंपाबाई या गेल्या दिवसांत क्षयाच्या आजारानें परलोकवासी झाल्या. बाईचा जन्म कुंकळ्ळी येथील केंकरे घराण्यांत झाला असून कारवारच्या वागळे घराण्यांत तिचें लग्न झालें होतें. दुर्दैवानें बालपणांतच वैधव्याचा घाला पडल्यामुळें, माहेरच्या व सासरच्या वडील माणसांच्या संमतीनें प्रो. कर्वे यांच्या आश्रमांतील अभ्यास आटोपून, पुणें मेडिकल स्कुलांत नियमा क्लासांत त्या शिकत होत्या. मिळवीत असलेल्या ज्ञानाचा फायदा गोमांतकस्थ भगिनींस देत करून द्यावा अशी त्यांची उत्कट इच्छा होती. या इच्छेस मूर्त स्वरूप येण्यापूर्वीं त्यांचें देहावसान झालें, हें खरोखर आमच्या प्रांताचें दुर्दैव होय. ईश्वर मृतात्म्यास शांति देवो.

गोमांतकांतील देशभक्ति.

(चतुर्दशक)

झाली हाय सवंग आजि दिसते तीं देशभक्ति पहा।
जीच्या लागतसे प्रयास करणें प्राप्त्यर्थ पूर्वी महा।

× × ×

सोडोनी घरदार सौख्य सगळें, स्वार्था करोनी दुरा।
यात्र प्राण प्रसंगिहि तांधच होती देशभक्ती खरा।
आजी हाय परंतु ह्या उलट कीं अली स्थिती सौख्यदा (?)।
नाहीं लागत देशभक्त बनण्या आयास भारी कदा।
एखादा लिहुनी ह लेख अथवा व्याख्यान देऊनियां।
तासाच्या अवधींत खास बनतो दे[illegible] महात्माजि हा!।
देशाची दुःखस्थिती जरि नसे ठाऊ[illegible] किंचित।
त्याला, त्याचि नसे मुळींच परवा तो तो नसे वाञ्छित।
ज्याला लेख लिहावयास नकळे व्याख्यान देतां नये।
कि[illegible] ह्या व्यतिरिक्त अन्य दुसरें कांहींच हातीं नसे।
देशाच्या करणीं किमीहि जरि तो कष्टावला, व्यर्थ तें।
त्याचें नांवहि ऐकण्यांत अगदीं येणार नाहीं इथें।

वाडी-फोंडा — अज्ञातवासी.

तरुण भारतास विनंति.

[चाल — भूपती खरे ते]

कविः — विनोदराव-मडगांव.

हे तरुण भारता लाडि देशकाधाला ॥
संतोषीं असल्या आर्यहिंद गातेला ॥१॥
शिवराज भोंसला बाजी, बाळ, तानजी ॥
तसेची [illegible] (२)दास, [३]राय, गांधीजी ॥
तव बांधव किति हे दुःखीं असती जाण ॥
जाणुनी मनीं ते झिजवीं पंचप्राण ॥३॥
गरिब दीन जननि पुरवी तू आस ॥
ही करीत विनंता तुझिया चरणीं बाळ ॥४॥

१ बाळ—बाळ गं. टिळक. २ दास—चि. दास.
३ राय—लाला लजपतराय.

विद्यावर्धक मंडळ, डिचोली.

सुप्रसिद्ध बलवंत संगीत मंडळीचा मुक्काम पणजी शहरात असल्यावेळीं तिनें ३०० रुपये घेऊन आपल्या एका प्रयोगाचें उत्पन्न इकडील 'विद्यावर्धक मंडळा'च्या संस्थेला 'धर्मार्थ' अर्पण केलें. ह्या उत्पन्नाची रक्कम जवळ जवळ तेराशें रुपये भरली व तींत वरील तिनशें व इतर खर्च मिळून ४०० रुपये वजा जातां संस्थेला ९०० रुपये मिळाले. संस्थेला ही मदत मिळवून देण्याच्या कामीं ज्या सद्गृहस्थानीं आपल्या पैशांचा व वेळेचा व्यय करून अविश्रांत खटपट केली त्यांत येथील सुप्रसिद्ध व्यापारी शेटजी दुंडाप्पा इक्षप्पा गाडवी यांच्या नांवाचा प्रामुख्यानें उल्लेख करणें न्याय्य आहे. रा. गाडवी यांनीं आपल्या व्यापारांत उत्तम लौकिक संपादन केला असून सार्वजनिक कार्याबद्दल त्यांच्या अंतःकरणात फार मोठी आस्था व कळकळ वसत असल्यामुळें इकडील सर्व जातीच्या लोकांच्या प्रेमाला व आदराला ते पात्र झाले आहेत. विद्यावर्धक मंडळाच्या संस्थेचे ते एक प्रमुख आधारस्तंभ असून त्यांनीं आपल्या पदरचे ५ हजार रुपये खर्चून एक प्रशस्त इमारत बांधून ती उदार अंतःकरणानें संस्थेला अर्पण केली आहे. ह्या इमारतींत सध्या इंग्रजी व मराठी मिळून सुमारें २०० मुलें शिक्षणाचा लाभ घेत आहेत. शिवाय त्याच इमारतीच्या एका भागात वाचनालयाची स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेची उर्जितावस्था होण्यासाठीं येथील शिक्षणाभिमानी लोकांचे प्रयत्न एकसारखे चालू असून त्यांतल्या त्यांत संस्थेचे उत्साही स्वयंसेवक व चालक मंडळींकीं रा. वामन कोळमुळे, विष्णुपंत कडकडे बाबुराव घोंड, पुरुषोत्तम आळवे, दत्तू काणेकर वगैरे यांचा नामनिर्देश केल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं. सर्वांच्या निःस्वार्थ बुद्धीनें, अंतःकरणाच्या खऱ्या तळमळीनें चाललेल्या या प्रयत्नास इच्छित फळ येऊन ही वरील संस्था चिरायू होवो व गोमांतकीय जनतेच्या प्रगतीस सहाय्य करण्याचें सामर्थ्य तिला लवकर प्राप्त होवो अशी या जगन्नियंत्यापाशीं आमची प्रार्थना आहे.

सीच तो.

ANUNCIOS

Pelo juizo de direito da Comarca de Salcete e cartorio do escrivão do 1.º officio correm editos de 30 dias a contar do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos da §2.º do artigo 197 do Codigo do Processo Civil citando o interessado Carlos Fernandes, marido da interessada Avelina Dias, do Ponsulem de Cancona e ora ausente em Belgão, territorio britanico, em parte incerta para querendo assistir a todos os termos ate final do inventario orfanologico aque se procede nesse juizo por obito de Florinda Miranda que foi de Cuncolim sendo inventariante e cabeça de casal Vitorino Dias da mesma de Cuncolim, e nelos deduzir seus direitos sem prejuizo do seu regular andamento. O que para ser publico se expediu este X.dem 30 de Agosto de 1922:

O escrivão de direito do 1.º of.;
Manuel Jose Sebastiao Lobo

O Juiz de Direito,
ABEL JOAQUIM DE MEIRELES.

Nunca desejamos mal do Vasco nem dos seus bens, nem mesmo da sua religião para que êle e *outros* tivessem exercido barbaridades desumanas nos hindus inocentes!!!

Vasco da Gama representa para hindus o seu maior verdugo, verdugo dos seus templos, verdugo das suas riquezas e verdugo da sua independencia.

¿Nestas condicões pode o *Bharat* deixar de protestar contra a idêa da celebração do centenario de quem foi maior inimigo dos ascendentes dos seus correligionarios?

Responda-nos quem de direito, pondo mao na consciencia inteirando-se da *sciencia historica* do passado!

Contra matas

Estamos ainda coligindo petrechos para a guerra declarada contra os tigres humanos alojados nas matas do Sidlha. Breve se erguerá o pendão do combate, pois.

Leiam

Leiam noutro lugar o artigo do sr. S Ṇ Bhopatkar, e que representa a sintese sentimental dos hindus em relação aos que os despoiaram cruelmente injustamente e barbaramente dos seus teres e haveres.

Terá sôado a hora de desforra?

Em Sanguem

Pelos modos, o que por êstes dias se està a passar em Sanguem no que toca á politica eleitoral é simplesmente triste, parecendo que não há aqui quem ponha termo à pouca vergonha dali.

Os telegramas publicados noutros jornais bem evidênceam quão seria situação vão criando os *intrusos*, com a ajuda do sr Administrador do Concelho, de quem temos pena, porque sempre o supunhamos inc paz da atitude que, com provas na mão, se lhe atribue.

Tomaremos conta do caso de Sanguem, mais de vagar, logo que o espaço no-lo permita. No entanto limitamo-nos a protestar contra *as coisas* dali.

Bravo!

O sr. Xencor Sinai Bendó ajudante de carcereiro da cadêa civil desta comarca pôs, ha dias, á disposição das autoridades um preso que se evadira da mesma cadêa, iludindo, durante a noite, a vigilancia policial.

Este acto do sr. Bendó prova bem que êle é muito zeloso e activo no exercicio de suas unções [illegible] peso de sus responsabilidades.

भारत

गुरुवार चैत्र शु० १२ शी १८४५

पांचवी प्रांतिक कांग्रेस.

पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें गेल्या ता. ११, १२ व १३ रोजीं या कांग्रेसचीं अधिवेशनें पणजी – मुनिसिपालटीच्या दिवाणखान्यांत येगल्दाचे संपादक दो. कुन्ज यांच्या अध्यक्षतेखालीं निर्विघ्नपणें पार पडलीं. परिषदेच्या प्रथम दिवशींच्या अधिवेशनाला मामुलवहिवाटीला अनुसरून ना. गव्हर्नर साहेब व इतर बडेबडे अधिकारी आपापल्या परिवारासह हजर होते. ठिकठिकाणच्या प्रतिनिधींचें प्रमाण जरी फार जास्ती नव्हतें तरी अगदीं कमीहि पण नव्हतें. एकंदरींत पांचवी प्रांतिक कांग्रेस बाह्य दृष्टीनें प्रेक्षणीय झाली होती यांत संशय नाहीं.

अंतरंगाकडे दृष्टिकोण वळविल्यास कांग्रेसचें अस्तित्व प्रांतास लाभदायक झालेंच आहे कींवा या पुढें होईल या संबंधीं मात्र मतभेद होण्याचा बराच संभव आहे पोर्तुगालनें स्वीकारलेल्या 'हमकरेगो' धोरणामुळें जेथें खुद्द लेझिज्लातीव्ह कौंसिल्याच्या ठरावांस बेमुर्वतखोरपणें धाब्यावर बसविण्यांत येतें, लोक प्रतिनिधींच्या मतांला थोडासासुद्धां मान देण्यांत येत नाहीं, त्यांचें ह्मणणें ऐकून घेणेंसुद्धां महापातक गणलें जातें, तेथें कांग्रेससारख्या अर्धवट 'लोकसत्ताक' संस्थेच्या 'बरळण्याकडे' कोण लक्ष देईल? जेथें धन्यालाच कोणी विचारीत नाहीं, तेथें चाकराचा काय पाड?

असो. तात्पर्य ज्या स्थितींत व रीतींत सांप्रत कांग्रेस आपलें कार्य करीत आहे त्या स्थितींत व रीतींत राजकीयदृष्ट्या ती प्रांताला उपयुक्त होते किंवा होईल हा प्रश्नच आहे.

हा व इतर अनेक प्रश्न जर बाजूला ठेविले तर एक गोष्ट मात्र ठळकपणें नजरेस येते, ती ही कीं, कांग्रेसवर हिंदु समाजाचें वजन पडत चाललें आहे. थोड्यावर्षांमागें ज्यानां कस्पटाचासुद्धां मान नव्हता, जेथें तेथें ख्रिस्ती समाजाकडून अनवंशिक प्रवृत्तींमुळें ज्यांची अवहेलना होत होती, त्यांच्याच इच्छेसमोर त्या समाजाला मान वांकवावी लागली, हें, गोहत्येच्या प्रतिबंधास शक्य तितकी मदत करण्याचा ठराव एकमतानें कांग्रेसींत पास झाल्यानें, उघडपणें सिद्ध झालें. हा ठराव ह्मणजे हिंदूंना विजयच होय. या विजयाची तेजस्विता वाढविण्याचा प्रयत्न हिंदुसमाज अधिकाधिक जोमानें कृतींत आणील अशी आशा केल्यास ती निरर्थक ठरेल असें वाटत नाहीं.

व्यापार व शेतकी यांच्या अभिवृद्धीला पोषक असे अनेक ठराव यंदां परिषदेंत पास झालें, हें फार उत्तम झालें; परंतु वास्कोदे गामाच्या शतसांवत्सरिक उत्सवाविषयीं अध्यक्षांकडून करण्यांत आलेला उपक्रम मात्र आह्मांला पसंत नाहीं. या उपक्रमाविरुद्ध तेथल्य तेथें न निषेध व्यक्त व्हावयास पाहिजे होता.

वास्को देगामाचा काळाकुट्ट इतिहास, त्यानें हिंदूंवर केलेले अमानुष अत्याचार. हिंदूंचीं पूज्य देवालयें, हिंदूंचा पवित्र धर्म, हिंदूंचे नामांकित ग्रंथ इत्यादींची राखरांगोळीं होण्याप्रीत्यर्थ त्यानें आचरलेल्या दुष्ट कृत्यांमुळें सदरहू शतसांवत्सरिक उत्सव भारतास कां मान्य नाहीं हें विशेष स्पष्ट रीतीनें सांगण्याचें कारण नाहीं. आमच्या दृष्टीनें वास्को दे गामाची किंमत एखाद्या दरोडेखोरापेक्षां जास्ती ठरत नाहीं. आणि उजळ माथ्यानें दरोडेखरांचे उत्सव साजरे करण्याची जोंपर्यंत अजून टूम अमलांत नाहीं, तोंपर्यंत तरी वास्को दे गामाच्या कसल्याहि उत्सवास हरकत घेणें भारत आपलें कर्तव्य समजणार. मग या समजुतीमुळें त्याला कितीहि लौकिक नुकसान सोसावें लागलें तरी हरकत नाहीं. असो.

कांग्रेसनिमित्त सिनेमा व मुलांचे खेळ दाखविण्याचा 'अजब तमाशा' करण्याचें कारण आह्मांस तरी निदान समजत नाहीं. 'अजब तमाशानीं' चित्तवृत्ति तल्लीन करून घेण्यासारखी देशाची वास मनःस्थिति नहीं. सरकारी नोकर वेळेवर पगार मिळत नसल्यावरून व इतरेजन करांच्या मारानें हवालदील झाल्यावरून दुःखांत होरपळत असतां, कांग्रेसला तमाशे आठवावे, हें देशाचें दुर्दैव नव्हे तर काय?

सध्या कांग्रेससंबंधी लिहिलें तितकें पुरें आहे. त्या वरूत तिची, तिच्या धोरणाची व तिच्या चालकांची थोडीबहूत कल्पना वाचकांस होईलच. आमच्या मतें तिच्यांत कोणकोणत्या सुधारणा होणें जरूर आहेत हे सवडीनुसार लिहिण्याचें कबूल करून वाचकांची सध्या रज घेतों.

Hontem e hoje

O livro do sr. dr. Noronha *Os Indús de Goa e a Republica* patentêa bem o que eram hontem e o que são hoje os hindus de Gôa. Se hontem eram escravos e *materia prima* da zombaria ... *catolica*, hoje são cidadãos livres, graças á implantação do novo regime politico.

Convem, agora, que o odioso espirito da banda dos inimigos do bramanismo se dedique exclusivamente a curar da já conhecida cronica doença que o enferma desgraçadamente. E isto *ad majorem Dei gloriam*!

Decorreram já os dias de sogra e rompeu ja a aurora de ... nora.

Agricultura

Recebemos e agradecemos á Direcção dos Serviços Agricolas deste Estado a "Informação á imprensa" cuja tradução, para a maior vulgarisação, será inserida na secção marata do *Bharat*, como de vez passada.

स्फुट विचार

सारस्वत ब्रा. समाजः—पूर्वी प्रसिद्ध झालेल्या कार्यक्रमांत थोडासा फेरबदल होऊन मडगांवच्या या लोकप्रीय संस्थेची वार्षिक व्याख्यानमाला फार यशस्वी रीतीनें पार पडली, हें कळविण्यास समाधान वाटतें. व्याख्यानमालेद्वारा समाजाकडून बजविण्यांत येत असलेल्या लोकसेवेचें महत्व मागें आह्मीं अनेकदां वर्णन केलेंच आहे. आतां इतकेंच सांगावयाचें कीं, समाजकार्याविषयीं जनतेंत दिवसेंदिवस ज्यास्त प्रेम प्रगट होत असून, सारस्वत समाजाची सर्वांगीण उन्नति व्हावी असेंच सर्वांस अंतःकरणपूर्वक वाटत आहे. संस्थेला स्वतंत्र इमारतीसाठीं सरकारकडून मोफत जागा मिळाली असून तिच्या कामास सुरुवात करण्याचें सामर्थ्य समाजचालकांत उत्पन्न झालें आहे, हें उपरोक्त प्रेमाचें निदर्शक होय, असें कबूल केल्याशिवाय कोणाच्यानेंहि रहावणार नाहीं. असो. सारस्वत ब्राह्मण समाजाची दिवसेंदिवस अभिवृद्धि होऊन, त्याच्याकडून अशीच जनसेवा बजावली जावो, असें इच्छितों. स्थलसंकोचयामुळें व्याख्यानमालेचा अहवाल येत्या अंकीं प्रसिद्ध करण्याचें अभिवचन देऊन, हा अनिष्ठचिंतनपर स्फुट आटोपता घेतों.

प्रागतिक संघः—पूर्वी ठरल्याप्रमाणें गेल्या ता० २४ रोजीं प्रागतिक संघाच्या कार्यकारी कमेटीची सभा मडगांव येथें पूर्वीच्याच जागीं भरली होती. गेल्या ता. १२ रोजीं पणजीच्या बैठकींत पास झालेल्या ठरावांची पुनःश्च चर्चा होऊन येत्या मे महिन्याच्या ५ व ६ तारखांस ठरेल तेथें प्रागतिक परिषद भरविण्याचा नवा ठराव पास करण्यात आला. प्रागतिक संघ अगर परिषद यांविषयीं कोणास कसलीहि माहिती पाहिजे असल्यास त्यानें "सेक्रेटरी प्रागतिक संघ. c/o डॉ. आत्माराम गोविंद बोरकर, पणजी" या पत्यावर पत्रव्यवहार करावा. सदरहू सभेस नामदार दो. देसाइ, दादासाहेब वैद्य, डॉ. सालरदांडे, शांबा राव सरदेसाई, महादेव काकुले यशवंत देसाई, शिवा फ. आंगले, दिरबा सांवर्डेकर, पुंडलीक वा. विर्जिनकर, बोंबी नाईक, जना कामत, उसो नारवेंकर, केशव अनंत नाईक, ना. अ. पाटणकर इत्यादि गृहस्थ हितचिंतक व सभासद या नात्यानें हजर होते. एकंदरींत सभा निर्विघ्नपणें पार पडून संघ अधिकाधिक कार्यक्षम व्हावयास लागला आहे, हें नमूद करण्यास आनंद वाटतो.

बुडत्याचा पाय खोलांतः—प्राथमिक शिक्षणविषयक एकंदर व्यवस्था पूर्वी इंस्पेक्सांव या खात्याकडून राखिली जात असे. तसेंच रैतोर या अधिकाऱ्याकडून लिसेवांतील सर्व व्यवस्था पाहिली जात असे. दोन्हींहि व्यवस्था त्या त्या खात्याकडून उत्तम प्रकारें पार पडत असत. असें असतां त्या खात्यावर एक नवीन दिरेक्तो

बातमीपत्र

श्रीयुत भारतकर्ते यांस सा. न. वि. वि. मी गोव्यांहून आंगोलास जाण्यास निघतानां प्रवासातील हकीगत लिहून पाठवीन असें अनेक मित्रांकडे कबूल केलें होतें. पण प्रत्येकीं पत्रव्यवहार ठेवणें शक्य नसल्यानें आपला आश्रय घेणें भाग आहे व तो तुम्ही देऊन आभारांत ठेवाल अशी खात्री आहे.

काल २१-२-२३ तारखेस १२ वाजतां मला माझ्या मित्रमंडळीनें मुंबईच्या, अलेक्झ ड्रा बंदरांत, नं ४ च्या गोदींत उभी असलेल्या कारोआ बोटींत आणून सोडल्यापासून मी खुशाल आहें. जलप्रवासाची भीति वाटत होती तिचा एकदम न्हास झाला. बोटींत आहें पण गांवात असल्यासारखा आहें. नेहमीपेक्षां बोटींत बायका मुलें व पुरुष मिळून लोकांना बराच भरणा आहे. कोणी हवा खात बेकार पडलेले. कोणी खेळत असलेले, कोणी हास्य विनोद करण्यांत तर कोणी गाण्यांत दंग असलेले, कोणी बायकामुलांस समुद्राची मौज दाखवीत असलेले तर कोणी आवडत्या पुस्तकाशीं रममाण झालेले दिसतात. बोटीवरील नाना चमत्कार पाहिले ह्मणजे निघण्यापूर्वी जी एक प्रकारची भीति वाटत असते ती निघून जाते. बोटींतल्या सोयी पाहिल्या ह्मणजे मन थक होऊन जातें. बोट इतकी स्वच्छ आहे कीं आमच्या मोठमोठ्या श्रीमंतांच्या घरांतूनसुद्धां इतकी स्वच्छता व टापटीप असूं शकणार नाहीं. स ठिकाणीं पायपोस पसरलेले असतात. क्याबीन ह्मणजे खलीमध्यें तर विचारूंच नका. प्रत्येक क्याबिनांत दोन ठिकाणीं एकावर एक असे चार बिछानें, दोन टेबलें, नेसण्यांत गरम लोकरी ब्लांकीट, विजेने फिरणारा पंखा, ..., ज्यांत फणी ब्रश वगैरे सामान आहे अशीं दोन कपाटें, व पिण्याचें पाणी, आरसा, पाण्याचा नळ, प्रत्येक ... निरनिराळे साबण टुवाल वगैरे असून कांहींच न्यून नसतें. सकाळीं ६ वाजतां चहाबरोबर, नंतर ८ वाजतां उकडलेले बटाटे, पाव, खीर, मासळी, शाकभाजी, केळीं व काफी (मांसाहारी लोकांना दोन तीन प्रकारचें मांस) वगैरे देतात. एक नोकर बूट वगैरे स्वच्छ करण्यांकरितां थोरमकाळीं प्रत्येक खोलींत येत असतो. एकंदरींत आमच्या दृष्टीनें सर्व चैनीचा प्रकार अनुभवण्यास सांडून मनाला कांहींच शीण वाटत नसतो. बोट फार मोठी असल्यावरून अद्याप हालल्याचें समजलें नाहीं व पुढेंहि हालणार नाहीं; फक्त दुर्दैवानें एखादें तुफान सांपडलें तर गोष्ट निराळी. नाहीं तर महिन्याचे महिने अशा बोटींतून प्रवास करणें फार मजेचें आहे. प्रत्येक क्याबीनच्या दारांत एक नोकर असतो. जें काय पाहिजे असेल तें त्याजकडून आणवावें. सकाळ संध्याकाळीं थंड अगर गरम पाण्याची आंघोळ करता येते. नोकरांस सांगितलें ह्मणजे तो सर्व व्यवस्था करितो. पणजीहून मुंबइस येणाऱ्या बोटीत फार हाल व त्रास होतात पण इकडे जिकडे तिकडे सुखच सुख. मी आहें त्या क्याबिनमध्यें एक पार्शी, एक गुजराथी, व एक मुसलमान असे तीन प्रवासी आहेत. ते फार प्रेमानें मजकडे वागतात. माझे आंगोलास येणारे खिस्ती सोबती दुसऱ्या खोलींत असतात. नव्या संगतींत जुन्याची आठवण होत नाहीं. नवे सोबती, मी सर्व आफिसचा पोर्तुगीज कामगार असल्यामुळें मला बऱ्याच मानानें वागवितात. मी बरोबर इंग्लंडचा इतिहास, भांडारकरकृत धर्मपर व्याख्यानें व लेख, नवनीत, मराठी श्रीमद्भगवद्गीता, लो. टिळकांचें गीता रहस्य वगैरे पुस्तकें आणिलीं आहेत. कळावें.

या पुढील पत्र दैरेस सालाम येथें मिळाल्यास पाठवीन. मी इष्टस्थळीं पोंचतांच माझ्या नांवीं आपल्या पत्राचा एक अंक पाठविणें. रुदोदीत लोभ असावा हे विनंति

आ. नम्र

उपी बावली कामत

सारस्वत ब्राह्मण समाज, मडगांव

व्याख्यानमालेचा कार्यक्रम

तारीख	व्याख्याते	विषय	अध्यक्ष
१८-३-२३		वाढदिवस समारंभ	
१९-३-२३	रा. सु. रा. सामंत	इंग्लिश व पोर्तुगीज राज्यपद्धति	ना. व्यंकटेशराव सरदेसाई
२०-३-२३	,, कृष्णराव ग. केणी	खिस्तीधर्म	रा. सु. रा. सामंत
२१-३-२३	प्रो. श्रीकृष्ण नी. चाफेकर एम. ए.	मराठी वाङ्मय	रा. शांताराव सरदेसाई
२२-३-२३	रा. अनंत रघुनाथ काळे बी. ए.	लोकशिक्षण	दोतोर वि. रा. सिनारी
२३-३-२३	दोतोर भास्कर म्हा. बोरकर	आर्यवैद्यकाविषयीं कांहीं विचार	भिषग्वर्य रा. पां. वैद्य
२४-३-२३	रा. केशव रा. छापखाने बी. ए. एल्. एल्. बी.	पाश्चात्य संस्कृतीचे संस्कार	रा. शांताराव सरदेसाई

याच दिवशीं व्याख्यानमालेचा समारोप होईल

वि. सू:— प्रत्येक व्याख्यानास स्टँ. टा. ७॥ ला सुरुवात होईल.

guesa. O sr. Naique oferece o dito premio sem reservar para si direito algum sobre a mesma tradugao: e' apenas um estimulo para quem queira verter em marata a importante obra daquele integerrimo magistrado.

Boa e util lembrança a do sr. Bombi.

O Bharat

Nao se publicara' o proximo numero do *Bharat* por os nossos empregados quererem divertir o *Sigmo*, como de costume.

Em volta do protesto

O nosso presado colega d *A India Portuguesa* pretende significar ser discabido o protesto do sr. J. Camotim contra a atitude da Camara Municipal de Salsete no Jubileu Episcopal do sr. Patriarca das Indias Orientais, ha pouco realisado, transcrevendo em defesa de sua afirmaçao uma passagem do discurso do sr. dr. Antonio Jose' de Almeide a favor do catolicismo.

O colega teria razao se citasse alguma deliberaçao do Parlamento para corroborar o que avança, que a cita do discurso do sr. Presidente em nada pode diminuir o valor do protesto do sr. Camotim.

E' que o Presidente da Republica nao e' o Parlamento e o Presidente da Camara nao e' a...Camara.

O argumento da *India Portuguesa* nao sufraga pois, como se diria na linguagem forenes.

Sarasvat B. Samaj

Realiza-se no dia 18 do corrente o aniversario da fundaçao desta associaçao de Margao, devendo haver, por esta ocasiao, uma seria de conferencias sobre diferentes assnutos, serie que sera' inaugurada pelo sr. Karnataki, de Poona.

Notario

A comarca de Bicholim continuara' a ter dois notarios, como ate' aqui.

Ficou, portanto, sem efeito o movimento de *um contra dois*.

O Bharat

Com mais um numero, o *Bharat* vai completar o se'timo ano da sua publicaçao. No proximo mez de abril entra o nosso jorual no novo ano e por isso pedimos aos assinantes a fineza de saldarem *os seus debitos*.

— आराबेकर देसायांच्या ऐतिहासिक घराण्याचे नामांकित चालक गोविंदजी जसवंतराव देसाई यांस देवाज्ञा झाल्याचें कळविण्यांस फार वाईट वाटतें. परमेश्वर मृताच्या आत्मांस शांति देवो.

— स्थल संकोच्यामुळे दो. नोरोज्यांच्या ग्रंथांतील कांहीं भागांचे तयार केलेलें भाषांतर येत्या अंकासाटीं ठेवावें लागलें.

सालाबादप्रमाणें शिमग्यानिमित्त भारताचा येता अंक प्रसिद्ध होणार नाहीं.

भारत

गुरुवार फाल्गुण व० १३ शी १८४४

अबकारी खातें

या खात्याचें १९२१ सालीं, ७७८९४ नारळीचीं, ५३५ ताडमाडाचीं, ३०४५८ खजुरीचीं आणि १६ भिल्लमाडाचीं मिळून १०८९०३ इतकीं झाडें सूर काढण्यास देण्यांत आलीं. त्यांतील ६४९२ ना. झाडांपासून गूळ व इतर झाडांपासून दारू करण्यांत आली. वरील झाडांची सूर काढण्यांस परवानें दिले त्यांचें उत्पन्न ५८३६६२ रु. १३ आ. ४ पै इतकें आलें.

त्याच सालीं, सुरेपासून दारू गाळण्यास २५८८, काजूच्या रसापासून दारू गाळण्यास १२०७ आणि उंसांच्या रसापासून दारू गाळण्यांस ७ मिळून ३८०२ भट्ट्या घालण्यांस आल्या. त्यांस परवानें दिले त्याचें उत्पन्न अनुक्रमें ५१८० रु., ६०३ रु. ८ आ. आणि ३ रु. ८ आ. मिळून ५७८७ रु. इतकें आलें.

त्याच वर्षी काजूच्या व उसांच्या रसापासून दारू गाळण्यांस विशिष्ट कर आहे त्याचें उत्पन्न अनुक्रमें ७७२८१ रु. १०॥ पै आणि सरकारी भट्यांतून डिपोझीट ठेविलेले व सरकारजमा झालेले ३८७ रु. ११ आ. ३ पै मिळून ७७७६८ रु. ४आ. १०॥ पै इतकें आलें.

त्याच सालीं, गांवठी दारूचीं १२७६, सूर विकण्यानीं (दमण व नगरहवेली परगणा येथें) ८७ आणि परदेशी दारूचीं १९६ दुकानें उघडण्यांत आलीं. त्यानां परवानें दिले त्याचें उत्पन्न अनुक्रमें ६२०. ५७, १४७५, आणि ७२५४ मिळून ७८७९६ रु. आलें.

शेवटीं त्याच सालीं दमण, नगर हवेली परगणा आणि दीव येथें दारू गाळण्याचा व विकण्याचा मक्ता दिला त्याचें १७६६०१ रु. २ आ. १॥ पै, इतर [भांग वगैरे] मादक द्रव्यें विकण्याचे परवानें दिले त्यांचें १४४ रु. ४ आणे, फक्त दमण व नगर हवेली परगणा येथें दारूवर घेण्यांत येणाऱ्या १५ टक्के ज्यास्ती कराचें १६६१ रु. ७ आ. ४ पै, दीव येथील कोळसा विक्रीचें ९ रु. १४ आ, छापील तक्ते विक्रिचें ४ रु. ६ आ. ८ पै, निरुपयोगी भांडीं विकण्यांत आलीं त्याचें ३१ रु. व कायदा मोडल्याबद्दल दंड वसूल केला त्याचें १०६२ रु. १० आ. १ पै मिळून १७९५१५ रु. ८ आ. २॥ पै इतकें किरकोळ उत्पन्न आलें.

वरील उत्पन्नाची बेरीज केली तर दारूमुळें सरकारी तिजोरींत एकंदर९१७५१८ रुपयांची भरती होत असते असें ह्मणतां येईल. इतकें उत्पन्न ज्या खात्यापासून मिळतें त्या खात्यासाठीं सरकारास किती खर्च करावा लागतो हें समजण्याचें साधन नसल्यामुळें, वरील उत्पन्नापैकीं सरकारच्या पदरांत निवळ उत्पन्न किती पडतें हें, आजच आमच्यानें सांगवत नाहीं. त्या पुढील सालच्या उत्पन्नाच्या तक्तांत जमेच्या बरोबर खर्चहि दाखविण्याची तजवीज जमाबंदी खात्याकडून व्हावी असी आम्हीं सूचना करितों.

आलेल्या उत्पन्नांतून तिजोरींत निवळ उत्पन्न किती राहण्यासारखें आहे हें, जरी समजत नसलें तरी लोकांच्या खिशांतून दारूपायीं नऊ सवानऊ लाख रुपये स. तिजोरींत जातात ही गोष्ट खरी आहे. आणि फक्त सरकार जर दारूवरील कर ह्मणून लोकांकडून इतकी रकम उपटतें तर कलाल, भंडारी, जमीनदार वगैरे लोक त्याच्या चौपट तरी रकम उपटतात असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. आणि त्याप्रमाणें त्रैराशिक मांडलें तर दारूपायीं पो. हिंदुस्थान, 'अवघा पांच साडे पांच लोकवस्तीचा टीचभर हिंदुस्थान' पंचेचाळीस, सेचाळीस लाख रुपये खर्च करितो असें साहजिक ठरतें.

दरवर्षी दारूसाठीं इतका पैसा खर्च करण्याचें त्राण आमच्या लोकांत आहे कीं काय याचा विचार सरकारनें अथवा जनतेनें कधींच केला नाहीं. तर उलट दारू गाळणें हा एक देशसमृद्धीचा उत्पादक धंदा आहे असेंच या उभय वर्गाचें मत असल्याचें सप्रमाण दिसून येतें. याचें कारण उघडच आहे. आपल्या तिजोरींत नऊ सवानऊ लाखांची भरती होत असल्यामुळें सरकारला तो धंदा द्रव्योत्पादक वाटत असतो. कलाल, भंडारी, यांचें विशेषा धंद्यामुळें बरेच गरम होत असल्यामुळें सरकारप्रमाणेंच त्यांचीहि स्थिति आहे. राहतां राहिला जमीनदार वर्ग. या वर्गाची, पुढल्यावर्षी नारळ पिकून मिळणारें उत्पन्न आदल्यावर्षीच मिळत असल्यामुळें निवळ दिशाभूल होऊन, या धंद्यामुळें आपणासहि बराच फायदा होत आहे असें तो समजत असतो. आणि या सर्वांस फायदा करणारा मद्यपी वर्ग हा बोलून चालून मद्यपीच असल्यानें त्याला तर आपल्या आवडत्या व्यसनापासून आपलें व आपल्या कुटुंबाचें किती नुकसान होत असतें याचें ज्ञान नसणें साहजिक आहे. प्रत्यक्ष दारू पिणार आणि दारूच्यापायीं आपला फायदा करून घेणारा असे दोन वर्ग वगळले तर दारूचा तिटकारा करणारा असा एक तिसरा वर्ग आमच्या समाजांत अद्याप जीव धरून आहे याबद्दल संशय नाहीं. त्यांच्याच जिवावर दारूवर हल्ला करण्याचें धोरण आम्हीं पतकरिलें आहे. त्याची जाणीव सर्वांस व्हावी व पो. हिंदुस्थानच नव्हे तर अखिल अबकारी खात्याच्या अपकारांतून मुक्त व्हावा अशी आमची इच्छा आहे. ती परमेश्वर पूर्ण करो.

मद्यपान आणि मद्यदान.

(ले० विरोधी)

वर्तमानपत्रांत व्यक्तिविषयक टीका येणें योग्य होत नाहीं, तरी पण एखाद्या व्यक्तीकडून घडणारीं कृत्यें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या समाजास बाधक होत चाललीं अगर होण्याचा संभव असला तर त्यांवर व्यक्तिविषयक या नांवाखालीं पांघरूण घालणें रास्त होणार नाहीं. कारण समाज हा व्यक्तिव्यक्ति मिळूनच बनलेला असतो. त्यांची सुधारणा झाली तरच समाजाची किंवा राष्ट्राची सुधारणा होणारी आहे. या दृष्टीनेंच आमच्या लेखांत समाजहित विघातक अशा व्यक्तिविषयक कृत्यांवर टीका करून त्यांतील चुका दाखविणें भाग आहे.

श्रीमंत ह्मणजे त्यांच्या घरांत भरपूर द्रव्यसंग्रह असावयाचा. त्यानीं आपल्या आवडत्या मुलांमुलींच्या मुंजीलग्नसमारंभांत हजारों रुपये उधळले तर आह्मासारख्या गरिबांस कुरकुर करण्याचें कारण नाहीं. परंतु ह्मणतात ना? "ह्मातारी मेली तर हरकत नाहीं पण काळ सोकावतो" तसलीच गत ह्याहि बाबतींत व्हावयास लागते. आणि ती कशी ह्मणाल तर, वाजवीपेक्षां फाजील खर्च करून, आहे त्यापेक्षां मोठा श्रीमंत भासविण्याची हांव प्रथम प्रतीच्या व नंतर हळुहळू आमच्यासारख्या गरीब स्थितींतील घराण्यांतून सुटावयास लागते, आणि ऋण काढून सण साजरा करण्याची प्रवृत्ति वाढावयास लागली ह्मणजे त्याचें पर्यवसान शेखीं त्रिबुनलच्या दरवाज्यावर बापजाद्यांनीं निढळच्या घामानें मिळवून ठेविलेल्या जिनगीचा जाहीर लिलाव होण्यापर्यंत पाळी येण्यांत होत असतें. याला कारण कोण? तर श्रीमंतांचे, श्रीमंतीच्या जोरावर श्रीमंती थाटानें केलेले लग्नमुंजीसमारंभांतील चोंचले.

श्रीमंतापाशीं भरपूर द्रव्याचा सांठा असतो. त्याचें चीज लग्नमुंजीसारख्या समारंभांत मोठा थाटमाट करून, हजारों रुपयांची धूळधाण करून केलें नाहीं तर त्यांच्या घराण्याचा नांवलौकिक तो काय राहिला असा कोणी उत्तरपक्ष करण्यास चुकणार नाहीं. त्यांच्या दृष्टीनें गोष्ट खरी आहे. व अशा रितीनें द्रव्याचा धूर करून श्रीमंतानीं आपल्या वाडत्या नांवलौकिकांत भर घातली तर त्यास आमचीहि हरकत असणार नाहीं. पण मनुष्य हा अनुकरणप्रीय आहे. तो एकाद्या गोष्टीचें अनुकरण करूं गेल्यास, ती बरी आहे कीं बुरी आहे, शक्य आहे कीं अशक्य आहे, याकडे डोळेझांक करतो. याचा अनुभव कोणास नाहीं? तेव्हां श्रीमंतानीं, हातीं मुबलक पैसा आहे ह्मणून मनमुराद रितीनें खर्च करितांना, आपण ज्या समाजांत आहों, त्या समाजावर याचा काय परिणाम होईल, अनुकरणप्रीयतेमुळें नसताच खर्च अंगावर घेण्याचा उद्यार, हातांत पैसा नसलेल्यानीं परंतु, गर्भश्रीमतीचा

पो. किर्लोस्करवाडी जि. सातारा ॥

धिःकार

अकस्मात जों विज पडावी कोसळुनी स्वर्गीची ।
करपुनि जावी फुलती तेणें बाग अहा !. जीवाची ।
अशीच झाली स्थिति ऐकुनी, जिची न इच्छा केली ।
गोष्ट अशी ती हाय ! मध्यें मम आशा तेणें मेली ।
आजवरी जें हृदयीं खोविलें जित्या जिवाचें फूल ।
क्षणांतची तें वाळुनि गेलें, मनास पडली भूल ।
नंदनवन जें केलें धरुनी सत्याची मी कांस ।
असत्य त्या वार्तेनें बनल स्मशान तेंची खास ।
'सत्याचा वाली परमेश्वर' जनांत ऐसें वदती ।
असत्याकडे परि त्वरेनें धांवत वेडे जाती ।
असत्य विना सत्य ह्मणुनियां जगांत कांहीं असतें ।
खरें मानणें कधींच नाहीं, संकट त्यांवर पडतें ।
करुनी भलते सलते दोष रोप दुजांवरि नाना ।
खोल चौकशीविना उगिच जे करिति भ्रष्ट लोकानां ।
मानुनि घेवो हवें तयां तर नीतिमान आपणा ।
सत्यान्वेषी 'क्षुद्र' बोलती अशा कीटकानां ।

वाडी-फोंडा — अज्ञातवासी

ANUNCIOS

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivao do 2 ° oficio que este subscreve na execução hipotecaria intentado por Antá Sinai Quensori de Assolnã e ora seguida pelo seu cessionario F. ti Ori Dessai de Quitol contra Gopala Fondó Naique e mulher do dito de Quitol e outra de Fat r[illegible]a' vao ser ven lidos em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situada em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a estaçao de Sanvordem, no dia 22 do seguinte mez de Março ás 13 horas e pelo preço superior ao de avaliação os seguintes bens- 1 ° uma terca parte do predio rustico denominado Moiquém' da cultura de coqueiros, 2 ° Predio rustico denominado 'Zonguem' da cultura de arroz. 3 ° um deziavo do predio rustico denominado Guevgovo' da cluturs de coqueiros, 4 ° Direito a um 24 avo do predio rustico denominado 'Maddiem' da cultura de coqueiros 5 ° um 24 avo do predio rustico denominado Maddiem' da cultura de coqueiros - 6 ° Direito a um deziavo do predio rustico denominado Gramarosgo da cultura de arroz todos sito em Quitol e discritos respectivamente na conservatoria predial desta comarca sob o n ° 10816, 10817, 10818, 10819, 10820, e 10821 no livro B 30, avaliados em 41: 00: 00 100: 00: 00, 4: 04: 00 4: 02: 08, 5: 00: 00 e 26: 00: 00 tambem respetivamente. Para esta arrematação são citados todos os credores incertos dos ditos executados bem como os quinhoeiros e comproprietarios nos termos e para os fins de lei e a contribuição do registo correrá inteira a cargo do arrematante E para ser publico se expediu este

Xeldam 22 de Fevereiro de 1923

O escrivao de direito
Aires Manuel Barreto

2 O Juiz de Direito,
A. Meireles.

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cártorio de escrivão do 2 oficio Barreto vai ser vendido em hasta publica a porta do tribunal judicial situádo em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirije a estaçao de Sanvordem no dia 20 do seguinte mez de Março as 13 horas pela primeira vez e pelo preço do seu valor o predio rustico denominado "Govingal sito em Loliem, da cultura de arroz, discrito na conservatoria predial desta comarca sob o n ° 14761 af 15 do Livro B 41. do valor de 60 rupias penhorado nos autos civeis de execucão hipotecaria que Caitano Agostinho Fernandes de Loliem como pai administrador do seu filho menor Lourenço Fernandes da mesma promove contra Rosa Fernandes, viuva de Manuel Maria Fernandes, de Loliem e outros como pertencentes aos ditos executados correndo por conta do arrematante a contribuição do Registo por inteiro e as despezas da praça. São por este citados quaisquer credores incertos dos ditos executados e os copr[i]etarios para deduzirem os seus direitos nos termos e para os fins da lei.

E paaa ser publico se expediu este.

Xeldem de Quepem, 19 de Fevereiro de 1923

3 Escrivao de direito
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
A. Meireles

2 vez

पत्ता-भारतमित्र, रिवण-गोवा. | सरदेसाई यांनी माळेचा समारोप करून | 1 पो. किर्लोस्करवाडी जि सातारा ॥

panha eleitoral efectuada pelo P. R. Liberal obrigou este a renovar os seus propositos de fusão, que o Director do P.R. R. N. novamente apreciou em reunião conjunta do Conselho e das Comissões politicas e do Grupo Parlamentar, verificando que talvez metade dos presentes perfilhava a idea de nro ter finalidade o P. R. R. N.— Pois que subsistiam as dúvidas a este respeito, houve necessidade de reservar para a nova reuniao o exame e a discussão de tao complexo e melindroso assunto, vindo-se entretanto no conhecimento de que graduados correligionarios nossos, representando as mais dedicadas agremiações partidarias locais, entendiam nao poder o nosso partido, sem embargo de nao ter diminuido a sua representação no parlamento ou nos corpos administrativos, continuar sustentando, ingloria e inutilmente uma luta, que cada vez mais o afastava do Poder!

Foi entretanto, levado á presidencia da Camara dos Deputados um correligionario nosso, por votação cerrada da minoria Liberal: e com este facto se pretendeu uma maior aproximação entre as forças republicanas da oposição, que divididas, se conservariam estacionarias e todavia precisavam entender-se e organizar-se para a hipotese, presumivelmente proxima de abandonar o poder o actual Governo,

Em nova reunião conjunta dos parlamentares e comissoes politicas do P. R. R. N., o Directorio, constatando que se tinham convertido á idea de uma nova organisação partidaria os mais declarados adversarios dela, e no justo receio de se ver abandonado de quasi todos os seus melhores e mais devotados e valiosos correligionarios da capital e da provincia, anuiu em combinar com os parlamentares do P.L uma acção comum no Congresso onde funcionaria como *leader* da direita republicana o Dr. Alvaro de Castro presidente da comissão executiva do nosso Directorio, cujos restantes membros formariam com delegados do Directorio Liberal a comissao organisadora do grande partido a formar em substituição das fragmentarias forças atribuidas pelos dois aludidos partidos, ás quais viriam oportunamente juntar-se os elementos republicanos dispersos, que actuando isoladamente se afiguram insusceptiveis de dar á Republica a coesão e a estabilidade indispensaveis ao seu progresso normal,

Na mencionada reuniáo conjunta votou a assemblea uma moção de confiança ao Directorio para prosseguir nos trabalhos encetados mas nao deseja o Diretorio faze-lo sem dos seus correligionarios e organismos locais colher a certeza de que entre todos é a este respeito possivelmente perfeita a uniformidade de vistas atenta a disconfiança com que está sendo recebido pelo P. R. P. e pelos seus e nossos adversarios a nova formação partidaria que, sem o proposito de hostilisar ou combater aquele partido, precisa, por bem da Republica interpor-se entre elo e os monarquicos assegurando a defesa do regime e equilibrio politico, em permanente risco emquanto o poder continuar monopolizado pelo mesmo partido cuja hegemonia, constantemente disputada pelos inimigos das instituiçoes, cada vez mais sofrerá e com ola os interesses e a propria vida da Republica

Pelo Directorio

Alvaro de Castro

वर्तमानसार

—येत्या ता. १२ रोजीं प्रागतिक संघाच्या मेंबरानीं त्या दिवशीं तेथें भरणाऱ्या कार्यकारी कमेटीच्या बैठकीस हजर रहावें, अशी संघाच्या अध्यक्षांची अत्याग्रहाची विनंति आहे.

—कवळें येथील श्री शंकराचार्यांच्या नूतन मंदिरासमोरील मंटपांत येत्या चैत्र शु० ५ मी गुरुवार ता. २२-३-२३ रोजीं हिंदुधर्म परिषद भरविण्यांत येणार असून दादासाहेब वैद्य वगैरे पुढाऱ्यांच्या मतानें हरेक धर्मविषयक महत्वाच्या बाबींचा खल होणार आहे असें धर्माधिकारी कळवितात.

– फोंडें तालुक्यांतील ४।५ हजार लोकांची "भलेभय" शिमग्यानिमित्त केरी येथें सभा भरून मद्यपान निषेधाचा ठराव पास करण्यांत आला.

—होलिकोत्सव प्रसंगीं होणाऱ्या विभत्स कृतींस व उच्चारांस सांगें येथें ना. अपाटणकर यानीं मोठ्या प्रयत्नानीं आळा घातल्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

—मडगांवच्या सारस्वत ब्राह्मण समाजाची व्याख्यानमाला यंदा ता. १८ मार्च रोजीं सुरू होऊन ता. २४ रोजीं समाप्त होणार आहे. पहिल्या दिवशीं संस्थेचा वाढदिवस समारंभ असून तो पुण्याचे सुप्रसिद्ध साहित्यभक्त श्रीनिवास नारायण कर्नाटकी यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा होईल. या शिवाय डेक्कन कॉलेजचे प्रोफेसर श्रीकृष्ण नीळकंठ चाफेकर एम. ए., सांगलीचे वकील केशवराव छापखाने बी. ए. एल. एल. बी., दादासाहेब वैद्य, दोतोर भास्कर म्हा. बोरकर, काळे, सामंत, वगैरे वक्त्यांचीं भाषणें होणार असें समाजाचे सेक्रेटरी कळवितात. या व्याख्यानमालेचा रसस्वाद सर्व लोक मनमुराद चाखतील, अशी उमेद आहे.

भारत

गुरुवार फाल्गुण व० ३ शके १८४४

गेला व येता आठवडा

एक उपयुक्त ग्रंथ

पणजी हायकोर्टाचें विद्वान न्यायमूर्ति डॉ. आंतोनियु दे नोरोंञ्ज यानीं 'गोमांतकीय हिंदु व रिपब्लिक' या नावांचा एक ग्रंथ प्रसिद्ध केला असून त्यांत त्यानीं पोर्तुगीज राज्य संस्थापनेपासून हिंदू लोकांचा कसकसा छळ झाला, त्यांच्या पवित्र देवालयांची किती अमानुषपणें बेचिराख करण्यांत आली, त्यांच्या मिळकतींवर किती क्रूरपणें वरवंटा फिरविण्यांत आला इत्यादि ऐतिहासिक माहिती दिली आहे. या माहितीच्या नुसत्या वचनानें अंगांतील रक्त उसळी मारावयास लागून, चित्त खेदानें व्यग्र होतें! मग त्या ग्रंथाच्या मननानें अंतःकरणाची कशी कालवाकालव होईल याची कल्पनाच केली पाहिजे. असो. येत्या अंकापासून उपरिनिर्दिष्ट ग्रंथांतील महत्वाची माहिती भारतांत प्रसिद्ध होणार आहे. त्यावरून आमच्या वाचकांस आमच्या म्हणण्याची प्रत्यक्ष साक्ष पटणारच आहे.

शिमगा व मद्यपान

केरी-फोंडें येथें ४।५ हजार लोकांची प्रचंड सभा भरून, 'भलेभय' शिमग्यानिमित्त दारूला न शिवण्याबद्दलचा ठराव झाल्याचें वर्तमान आम्हीं दुसरीकडे दिलेंच आहे. अशाच प्रकारचा ठराव गेल्यावर्षी सांवर्डें येथ पास करण्यांत येऊन तो मोडणारांस नानानऱ्हेची अपमानकारक शिक्षा देण्यांत येत असे. परंतु ही मद्यपानप्रतिबंधक चळवळ एका महिन्यापेक्षां जास्त टिकावयास शकली नाहीं! व 'येरे माझ्या मागल्या' हीच स्थिति सर्वत्र दिसावयास लागली! अशी हास्यास्पद स्थिति न होण्यासाठीं ठरावबाल्या लोकानीं एव्हांपासूनच खबरदारी घेतली पाहिजे. तरच ते जनतेच्या सहानभूतीस पात्र होतील. हें ते विसरणार नाहींत, अशी आमची उमेद आहे. व या उमेदीस मूर्त स्वरूप येण्याची चिन्हें दृश्य होतांच ठरावबाल्यांस 'भले' म्हणण्यास आम्हीं सरकारच्या बापाचेंसुद्धां कसलेंच 'भय' बाळगिणार नाहींत!

येती कॉंग्रेस.

येत्या ता. ११।१२।१३ रोजीं प्रोव्हिंसियाळ कांग्रेसचें अधिवेशन पणजी येथें भरणार असून त्यांत हरेक विषयांची चर्चा होणार आहे. आम्हीं अनेकदां सुचविल्याप्रमाणें यंदा कांग्रेसींत गोरक्षणाच्या प्रश्नाला महत्व दिलें जावून, शेतकीला व अहिंसा तत्वाला पोषक अशाच रीतीनें तो सोडवला जाईल, अशी आशा करितों. हिंदु कांग्रेसिस्थानीं तर याकडे अवश्य लक्ष पुरवावें.

सारस्वत-विद्यालय.

(लेखक, शिवदास-पणजी-गोवा)

कित्येक योगायोग असे कांहीं विलक्षण असतात कीं, ध्यानीं, मनीं व स्वप्नी देखील नाहींत अशा संकल्पाबाहेरच्या किंवा ध्येया व्यतिरिक्त गोष्टी घडून अकस्मात येतात. अशा कांहीं गोष्टींपैकीं म्हापसें येथील सारस्वत-विद्यालयाची स्थापना ही एक गोष्ट होय.

सन १९१० सालीं सं. गौ. सा. ब्रा. परिषदेचें दुसरें अधिवेशन म्हापसें येथें भरलें होतें. परिषदेचा मुख्य हेतु फुटलेल्या सा. ब्राह्मण समाजाची बिघडलेली घडी बेटी व राजरोस रोटी व्यवहारानें दुरुस्त करविण्याचा—कांहीं क्षुल्लक कारणानें बहिष्कृत मानलेल्या कुडाळ देशकर, पेडणेंकर इत्यादिकांस संयुक्त करावें हाच—होता. (घरीं पेडणेंकर आचाऱ्यानें पकविलेलें व त्यांचेंच पचविलेलें भोजन इत्यादि खाजगी कर्में माफ होतीं. मात्र सार्वजनिक समारंभास त्यांस पंक्तीस घेऊन बसणें अन्यायाचें होतें.) सभेंत वरील हेतुपुष्ट्यर्थ कांहीं ठराव पास झाल्यानंतर, म्हापसेंस परिषदेचें कांहीं तरी स्मारक असावें या हेतूनें एक विद्यालय स्थापन करण्याचा ठराव मांडला गेला व तदीयार्थ वर्गणी घालण्याची विनंति करण्यांत आली. प्रथम अध्यक्ष रा. गांगोली व श्री. शां. दाभोळकर यांनीं अनुक्रमें १ व ५ हजार रु. देणगी दिल्याचें जाहीर केल्याबरोबर ज्याच्या त्याच्या अंगीं दानशूरत्वाचें वारें भरून जो तो, उदार कर्णाच्या उधारी वाण्याचें १० हजारां पर्यंतचे आंकडे बोलूं लागला. कोणी कोणी इमारतीसाठीं दगड, चूना, कौलें, लांकूड इत्यादि लागेल तितकें सामान देण्याचें कबूल केलें, एवंच दोन तासांच्या अवधींत जवळ जवळ एक लाखाची तोंडी देणगी कीर्दींत जमा झाली. पुढें श्री. कुंभवडेकर व श्री. दाभोळकर यानीं सावंतवाडी संस्थानांतून श्री. प. रा. सिनारी या लोकप्रीय विद्वान शिक्षकास आणवून ता. २ मार्च १९११ रोजीं भाड्याच्या जागेंत ३५ मुलांची व दोन मास्तरांची शाळा स्थापन केली. हेडमास्तर सिनारी आसिस्टंट श्री. सो. आगंवदेकर या शिक्षकद्वयांच्या शिक्षणाभिलाषानें इतर शाळांतलीं मुलें विद्यालयाची वाट धरूं लागलीं व हळू हळू सा. वि. चा प्रगतिसूर्य उदय पावूं लागला.

नंतर बोले तैसा चाले। या म्हणीस बाध न येऊं देण्याकरितां दानशूरत्वाचें वारें अंगांतून ओसरल्याबरोबर श्री. दाभोळकर आदि थोडकेच गृहस्थ खेरीज करून बहुतेकानीं देणगीची रकम देणें नाकारिलें, थोड्यांनीं आज उद्यांची उधारी चालविली तर थोड्यानीं दोन वर्षें देणगीचें व्याज देऊन बंद केलें. एकंदरींत भिक्षाधीशांपासून लक्षाधीशांपर्यंत रंकारावानीं वचनास न जागल्यामुळें जनांत हसें करून घेऊन अब्रूस व शीलास काळिमा आणिला

प्रमाणें नवी शब्दरचना केल्याचें श्रेय भा रताच्या वाचकास आयतेंच मिळतें. इत क्यानें तरी भारताच्या 'वाचकाचें' समाधान झाल्यास पुरे !

* * *

'एकतर्फी-नकली-त्रयस्थ ऊर्फ शिष्टमंडळ' यांस कंपनीच्या अटी न पटणें याचाच अर्थ 'वाटाण्याच्या अक्षता मिळणें' असा करतां येईल. कशास कांहीं ठाव न सता एकदम भारत पत्राच्या संपादकांकडे 'साक्षीच्या विचारलहरी' विरुद्ध कांहींतरी विधानें करीत असता, आपल्या चौकस बुद्धीचा अस्पष्ट लंगडेपणा नकळत स्पष्ट होत होता, हें उपरोक्त 'वाचकास' आता चांगलेंच समजलें असेल. व याच करतां त्यांनीं स्वत: याचा खुलासा न मागतां संपादकामार्फत 'साक्षीस आव्हान केलें होतें, असें अनुमान केल्यास तें 'वाचकास' कित पत रुचेल हें पाहणें आहे.

* * *

गेल्या रविवारीं कालापूर येथें झालेल्या विवाह प्रसंगी, कित्येकानां आपल्या प्राणाचे तर कित्येकांना मानाचे बळी द्यावे लागले. ठरविलेल्या कार्यक्रमाच्या वेळेंत दहा मिनिटांचें अंतर पडल्यानें, 'जनरल सेक्रेटरींनीं' आपल्या हुद्याच्या धुंदींत एका स्वयंसेवकाच्या थोबाडींत लगावल्यानें व त्याचप्रमाणें प्रतिक्रियाहि झाल्यानें, जमलेल्या पाहुणेमंडळीस एकादशी घडण्याची वेळ आली होती. परंतु 'गव्हर्नरांच्या' शांत, समंजस व धोरणी स्वभावामुळें हा प्रसंग टळला असें कळतें. या शिवाय साधा परंतु स्वच्छ पोषाख केलेल्या अशा डिचोलीच्या एका इसमाची बैठकींतून हकालपट्टी करणें वगैरे बऱ्याच लीला उपरोक्त 'सेक्रेटरींनीं' दाखविल्या असल्याचें कळतें. परंतु मोठ्यांचे हे छोटे चाळे त्यांच्या सहज पचनीं पडतात !

-साक्षी

तुझें आहे तुजपाशीं ॥ परि तूं जागा चुकलासी

(शा० वि०)

देसी दोष मला उगीच मनुजा, मी काय केलें तुझें ? ।
टाहो नित्य असा कशास वद तूं रे फोडिसी माणसा ।
आहें सिद्ध सदा तुझ्याच सदनीं, मी वाट पाहें तुझी ।
होवोनी अनुरक्त तूं तरि गड्या त्या आळसा राहसी ॥१॥
कटाळा करिसी सदा विटुनियां सन्नाम घ्याया मनीं ।
संघें घेऊनियां तसाच फिरसी त्या दुर्विचारां सदा ।
तैसा तूं शिरसी बळेंच मनुजा त्या रोगाभावे मनीं ।
कैसी मी तरि तेथ येउनि तुला संभाळुनी राहुं रे ॥२॥
सद्बुद्धी, सुविचार, आत्मबल, विवेका सवें घेउनी ।
वारंवार तुला करीत असतें ऐसेंच मी जागृत ।
निद्रेनें परि तूं तसाच राहसी रे घोरत मानवा ।
सौख्याच्या नगशीखरीं मग कसा रे पोंचसी तू वरा ॥३॥
सोडोनी अजि दे विकार अवघे, सन्नाम घे सत्वर ॥
आकांक्षा जबरी धरोन मनुजा उत्साह आणीं मनीं ।
धैर्याची तलवार घेइ स्वकरीं, भेदू महासंकटें ।
नेवोनी तुज ठेवितें बघ कसा रे त्या यशाच्या नगीं ॥४॥

वाडी-फोंडा

अज्ञातवासी

ANUNCIOS

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio de escrivão do 2 oficio Barreto vai ser vendido em hasta publica a porta do tribunal judicial situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirije a estaçaõ de Sanvordem no dia 20 do seguinte mez de Março as 13 horas pela primeira vez e pelo preço do seu valor o predio rustico denominado "Govingal sito em Loliem, da cultura de arroz discrito na conservatoria predial desta comarca sob o n° 14761 af 15 do Livro B 41 do valor de 60 rupias penhorado nos autos civeis de execucão hipotecaria que Caitano Agostinho Fernandes de Loliem como pai administrador do seu filho menor Lourenço Fernandes da mesma promove contra Rosa Fernandes, viuva de Manuel Maria Fernandes, de Loliem e outros como pertencentes aos ditos executados correndo por conta do arrematante a contribuição do Registo por inteiro e as despezas da praça. São por este citados quaisquer credores incertos dos ditos executados e os copritario para deduzirem os seus direitos nos termos e para os fins da lei.

E para ser publico se expediu este.

Xeldem de Quepem, 19 de Fevereiro de 1925

Escrivão de direito
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
A. Meireles

3

rando servir ao Paiz que e' berço aos seus componentes.

Bem haja!

Outro oficio

Os partidos sao, pelos modos, para as partidinhas...reciprocas e nao para promoverem o bem estar geral. E' a impressao que nos oferece, pelo menos, "o *dize tu direi eu*" dos *guerreiros civis do partido indiano.*

Outro oficio, senhores.

Um opu culo

Shivaji com sangue portuguez? eis o titulo dum importante trabalho que acaba de dar a' luz de publicidade o conhecido e acreditado publicista sr. Panduronga Pissurlencar.

O ilustre professor e advogado rebate algumas afirmaçoes gratuitas, avançadas pelo sr. dr. Fragoso no tocante a' origem do Shivaji Maharaja' missao em que revela, como de sempre, um estudo profundo e aturado, estribado nas mais abalisadas autoridades historicas em que o simpatico escritor e' bastante familiar.

Com o seu belo trabalho, o sr. Pissurlencar acaba de prestar um relevante serviço a" historia, criando jus ao agradecimento de todos os admiradores da vida do Shivaji e da sua virtuosa mai Gizabai.

Ao talentoso publicista, os nossos rendidos agradecimentos pela oferta du m exemplar do seu opusculo.

O Heraldo

Deve realisar-se hoje o julgamento deste nosso presado colega que incorreu no desagrado das autoridades porque teve a coragem de dizer verdades.

O processo nao faz mal senao a quem o promove, tratando-se da imprensa como se viu nos quatro processos crimes com que, durante os ultimos dois anos, o *Bharat* teve de lutar.

Sob este ponto de vista felicitamos o sr. Messias Gomes pelo prazer que vai ter de mostrar o que sao, na rialidade, as nossas coisas publicas.

De corpo e alma

Merece incondicional aceitaçao a louvavel idea, sugerida ha' pouco pelo nosso presado colega do *Diario da Noite.*

O Director do *Bharat* deu ja' a sua adesao a' sugestao, tao digna quao necessaria, do referido ilustre confrade, por uma carta que lhe dirigiu no dia 26 do mez f..

Muito estimaremos que a idea duma *Associaçao dos jornalistas* consiga, a breve trecho, conquistar terreno e prosperar.

O Pigmeu

Continua a publicar-se regularmente este jornal, *suspenso...administrativamente* por *ordens superiores.*

Divertida suspensao e' esta que suspende o curso do prestigio das ditas *ordens superiores.*

भारत

गुरुवार फाल्गुण शु॰ १३ शी १८४४

जंगल-खातें

'भटाला दिली ओसरी व भट हात पाय पसरी' ही प्रचारांत असलेली म्हण आमच्या येथील जंगलखात्यास लागू केल्यास अतिशयोक्तीच्या प्रमादास आम्ही पात्र होऊं असें वाटत नाहीं. 'वळी तो कान पिळी' हें जंगली धोरण जंगली लोकाना त्यांच्या जंगली स्वभावानुरूप मान्य असल्यास नवल नाहीं, पण त्याच त्याज्य धोरणाचा अवलंब गोवा सरकारसारख्या एकाद्या सुधारलेल्या अधिकारी संस्थेनें आपल्याहून कमी शक्तीच्या संस्थांच्या मिळकतीला उपसर्ग बाधण्याप्रीत्यर्थ केल्यास हें कृत्य कोणालाहि आश्चर्य सागरांत गटंगळ्या खावयास लावल्याशिवाय रहाणार नाहीं.

नवीन काविजादींतील अस्टग्रार ग्राम संस्थेनें सरकारला फार पुरातन काळीं सिद्ध नामक आपला डोंगर नजर केला होता. त्या वेळीं या डोंगराचें क्षेत्रफळ अवघें सहाशें येक्तार होतें, हें परस्परांत ठरलेल्या करारावरून कोणालाहि सहज कळून येण्यासारखें आहे. सहाशें येक्तारीशिवाय त्या जंगली डोंगरांचा कोणत्याहि भागावर सरकारच्या अर्थात बिलकूल हक्क नाहीं. पण सध्या अशी स्थिति आहे कीं, सरकारला दिलेल्या सहाशें येक्तारीच्या ओसरीवर सरकारनें आपले हातपाय एकविसशें येक्तार ऐसपैस पसरलेले स्पष्टपणें दिसून येतात! केवळ आपल्या मनगटाच्या जोरावर सर्व करार मदारांवर बोळा फिरवून आपल्या जंगली मतेंत सरकारनें घातलेली ही दीड हजार येक्तारींची भर जंगली लोकाना सुद्धां खरी पहावयाला लावील, असें छातीठोक विधान केल्यास वस्तुस्थितीचा विपर्यास केल्याचा दोष आम्हांस खास लागणार नाहीं.

उपरोक्त दीड हजार येक्तारीच्या अरेरावी कमाईंत नुसत्या दानकर्त्या ग्रामसंस्थेच्याच मत्तेचा समावेश झाला असता तर 'जें सर्वांचें तें कोणाचेंच नव्हे' असा 'चालढकली' युक्तिवाद लढवून कदाचित् या जंगली विषयासंबंधीं डोळेझांक करतां आली असती, पण जंगली खात्यानें इतर व्यक्तींच्या जमिनीहि आपल्या घशाखालीं कोंबण्याचा अन्याय केला असल्यानें, या विषयाचा समाचार घेणें क्रमप्राप्त झालें आहे. सरकारकारच्या या जंगली कृत्याचा निषेध करून आपापल्या जमिनी पुन्हः मिळविण्यासाठीं लोकांनीं आतां कंबरा बांधल्या पाहिजेत. मूग गिळून नामर्दपणा स्वीकारतां कामा नये. शक्य तो स्वार्थ त्याग सोसून एक जुटीनें व एक नेटानें 'सिद्धा'च्या उदरांत गडप होऊं पहात असलेल्या जमिनी सरकारकडून हिसकावून घेण्यासाठीं शर्थ वेंचली पाहिजे. एवढ्या मोठ्या बलवान सरकारशीं विरोध बाळगणें योग्य नाहीं, अशा बायकी विचारास मनांत थारा न देतां, आपली मत्ता परत मिळविणें, हें प्रत्येकाचें कर्तव्य होय. कोणत्याहि सबबीवर या कर्तव्याला विसरणें अगर त्यांची चालढकल करणें पाप होय.

सध्या सरकारच्या जंगलखात्यांत 'समरस' करण्यांत आलेल्या खासगी जमिनी स्वतंत्र करणें अगत्याचें आहे. हें तर सिद्ध झालेंच. आतां हें कार्य यशस्वी रीतीनें कसें पार पडेल याचा सर्व दृष्टींनीं सांगोपांग विचार करून तावडतोब त्याच्या सिद्धीला लागलें पाहिजे. या संबंधीं कोणाहि आपलें मत प्रसिद्ध करण्याची इच्छा असेल तर त्याला 'भारतां'त मोठ्या आनंदानें स्थळ देऊं. बाकी आमचें धोरण प्रस्तुतच्या अल्प ओळींवरून वाचकांच्या निदर्शनास आलेंच असेल.

स्फुट विचार

डोईपट्टीः—या पट्टीची हकालपट्टी करण्याच्या हेतूनें मुंबई येथें आमच्या प्रांतबंधूनीं चालविलेली जोराची चळवळ यशस्वी होण्यासाठीं गोव्यांतील लोकांनीं तीस हातभार लावणें सर्वतोपरी योग्य आहे. 'आई जेवूं घालिना व बाप भीक मागूं देइना' अशीच या कराच्या बाबतींत विपरीत स्थिति झालेली आहे. स्वतःच्या जन्मभूमींत पोटाला चिमटे घेण्याचा प्रसंग ओढवूं नये म्हणून, दुःखितांतःकरणानें लोक स्वदेश त्याग करण्यास भाग होतात अशाना कररूपानें छळणें पाषाणहृदयी सरकारा शिवाय दुसऱ्या कोणालाहि परवडलें नसतें.

एक योजनाः—आमची सांगोपांग माहिती महाराष्ट्रीयांस मिळून, गोमांतकाविषयीं त्यांच्यांत प्रेमभाव उत्पन्न व्हावा या हेतूनें एक पुस्तकमाला सुरू करण्याचें योजिलें असून, या हेतुसिद्ध्यर्थ अर्धीमुर्धी तयारीसुद्धां झालेली आहे. ज्या कोणास या कामीं आम्हांला लेखनद्वारा सहाय्य पुरविण्याचें असेल त्यानीं तें अवश्य करून स्वदेशाविषयींचें आपलें कर्तव्य पार पाडावें अशीसूचना आहे.

—सारस्वत-विद्यालय-म्हापसें या संस्थेचा १२ वा वाढदिवस ता. २।३।९२३ रोजीं मोठ्या समारंभानें पार पडणार आहे. या नमूनेदार संस्थेसंबधीं आमच्याकडे शिवदासांचा एक लेख आलेला आहे. तो येत्या अंकीं प्रसिद्ध होईल. संस्थेची भरभराटी इच्छितों

राष्ट्रीय शिक्षण.

ले॰ मुक्त

भूस्तर पदार्थांची हिंदभूमींत जितकी सुपिकता दिसून येते तितकाच मतवैचित्र्याचाहि सुकाळ दिसून येतो. राष्ट्रोन्नतीसाटीं आवश्यक असलेल्या राजकीय, सासामाजिक व आर्थिक या सुधारणात्रयी मनाजोग्या अमलांत आणण्यासाठीं नॅशनल कांग्रस, होमरूल लीग, स्वराज्यसंघ, असहकारिता, खिलाफत इत्यादि जगद्विख्यात संस्था परिश्रमपूर्वक झटत आहेत. मातृभूमीची सेवा करणारे या संस्थांचे हितचिंतक वैयक्तिक दृष्ट्या एकाच धर्माचे, एकाच जातीचे अगर एकाच प्रकारची भाषा बोलणारे नाहींत. परंतु या भिन्नत्वामुळें त्यांच्या ध्येय साधनार्थ होणाऱ्या प्रयत्नास भिन्नत्व आलेलें नाहीं. मतवैचित्र जितकें दिसून येतें त्यापेक्षाहि अधिक भाषावैचित्र्य आढळून येतें. एकच प्रकारची भाषा बोलणाऱ्यांचें एक राष्ट्र असावें अशी व्यवस्था कोणी करूं म्हटलें, तर अखिल जगांत नाहींत इतकीं राष्ट्रें एका हिंदुस्थानांत निर्माण करतां येतील. परंतु या सर्वांना व उपरोक्त सांगितलेल्या राष्ट्रीय संस्थांना इंग्रजी सारखी परकी भाषा प्रगति देणार आहे, किंवा भारतोदयाकरतां इंग्रजी कोंबड्याची आवश्यकता आहे असें केव्हांहि वाटलें नाहीं. उलट प्रतिकुलता दिसून येते. याचें कारण इंग्रजी भाषा या दृष्टीनें वाईट म्हणून नव्हे पण परंपरा अशी चालत आलेली आहे कीं, ज्यांची जी भाषा असते तींत त्यांचे आचार विचार व समज गोंविलेले असतात; आणि भिन्न आचार विचारांचे लोक ती भाषा शिकावयास लागले म्हणजे नैसर्गिक रित्या त्या आचारविचारांचा संस्कार यांच्यावर होतो. संस्कारांचा हा परिणाम तावडतोब दिसून येत नाहीं हें खरें, पण संक्रमण चालून असतें आणि एक वेळ अशी येते कीं, यांच्या समाजाची पूर्वीची शिस्त जाऊन त्याच्या धार्मिक व इतर धार्मिक बंधनें शिथील आणि विस्कळीत होतात. इंग्रजीमुळें हिंदुसमाजास आलेलें हें विकृत स्वरूप आज कमी अधिक प्रमाणानें स्पष्ट दिसत असल्यामुळें राष्ट्रभक्तांचा परकी भाषांवर कटाक्ष असावा हें साहजिक आहे.

ज्ञानाच्या दृष्टीनें इंग्रजी कमी दर्जाची आहे असें मुळींच नाहीं; पण कोणत्याहि भाषेच्या वाङ्मयांत कमली तरी कमतरता ही असतेच. इंग्रजी ही व्यापारी राष्ट्राची भाषा पडल्यामुळें ती भूगोलाच्या बराचशा भागावर चालू आहे आणि त्या पारविषयक बरेंच ज्ञान त्यांत सांठविलेलें आहे, हेंहि खरें आहे; पण हें ज्ञान खेरीज करून इतर प्रकारच्या ज्ञानाकडे वळलों तर इंग्रजीवर निर्वाह भागणार नाहीं. आज हिंदुस्थानांत जितकें तत्वज्ञान आहे तितकें अन्यत्र सांपडणार नाहीं हें वेदांताच्या जगद्विजयावरून सहज कळून येण्या

युक्त शब्दाचा मजप्रमाणेंच अर्थ लावतील अशी खात्री वाटते.

'बळवंत मंडळीशिवाय' असें अपवादसूचक लिहिण्याचें कारण हेंच कीं सदरील मंडळीच्या स्पेशल कोशांत 'धर्मार्थ' शब्दाला भलत्याच अर्थाची योजना केलेली आढळते. हा नवा अर्थ सर्वसंमत होऊं लागल्यास जिकडे तिकडे नवा अनर्थ उत्पन्न होऊन 'धर्मा'ला आपला गाशा त्वरच गुंडाळावा लागेल ! असो.

आतांपर्यंत मंडळीनें आपल्या तीन नाटकांचें उत्पन्न अनुक्रमें सारस्वत समाज, मडगांव, वेरेंकर शिक्षण समाज व विद्यावर्धक समाज, डिचोली अशा तीन संस्थांस प्रत्येकींकडून ३०० रु. घेऊन धर्मार्थ (!) अर्पण केलें. लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट कीं धर्मकार्यानीं उपरोक्त मोबदला घेऊनहि शनिवारचा खेळ किंवा उग्रमंगल नाटकाचा प्रयोग त्या तिन्हीं पैकीं एकाहि संस्थेला दिलेला नाहीं; व खरी स्थिति अशी आहे कीं, शनिवारच्या प्रयोगाशिवाय, इतर दिवसांत करण्यांत येत असलेल्या खेळांचें उत्पन्न क्वचित् ३०० रु. होत असतें ! एका बुधवारचें उत्पन्न तर १०० रुपयां खालीं होतें, अशी मला खात्रीची माहिती आहे.

ज्या खेळाचें उत्पन्न ३०० रु. होण्याचा फारसा संभव नाहीं त्या खेळाची प्राप्ति, ३०० रु. मोबदला घेऊन, एकाद्या संस्थेला नजर केली तर हें कृत्य 'धर्मार्थ' या पवित्र व निःस्वार्थसूचक विशेषणाला पात्र होईल काय ? तर नाहीं, तर या सवद्याला धर्मबंधनानीं जखडण्याचें कारण काय ?

अशा प्रकारचा 'विकृत धर्म' स्वीकारून उपरोक्त संस्थांप्रमाणें लोकांस तसदी देऊं नये, याच सदिच्छेनें येथील सरस्वतीमंदिराच्या विचारी चालकानीं 'धर्मार्थ' खेळापासून दूर रहाण्याचें धोरण स्वीकारलें असावें, असा माझा समज आहे.

तात्पर्य, बळवंतमंडळीनें मांडलेला 'धर्मार्थ' खेळांचा खेळ धर्माशीं मेळ बसवणारा खास नसून, आश्रयदात्यांचा फुकट वेळ घेणारा आहे, असेंच निर्विकार बुद्धीला पटतें. बळवंत मंडळीचे चालक समजस असल्यावरून ते आपल्या 'धर्मार्थ' शब्दाची व्याख्या या पुढच्या कृतीनें बदलतील अशी मला उमेद आहे

पणजी, पणजीकर

साक्षी व नाटकी

पणजी येथील सरस्वतीमंदिरानें बळवंत मंडळीपाशीं 'धर्मार्थ' खेळ कधींहि मागितला नव्हता व ज्या त्रयस्थानें त्या संस्थेसाठीं कंपनीपाशीं खेळाची पृच्छा केली होती त्यास वाटाण्याच्या अक्षताहि मिळाल्या नाहींत, असें एक वाचक 'साक्षीच्या 'विचार लहरीस' अनुलक्षून लिहितात यावर 'साक्षीचें' काय म्हणणें आहे तें कळल्यास अवश्य प्रसिद्ध करूं. सं. भारत

सांवळा गोंधळ

मांगें येथें मुनिसिपल कचेरींत दुरंगी सामना चालू असून सरकारचे प्रतिनिधी मूग गिळून दोन कामांचा हा संग्राम अवलोकन करीत आहेत. उपटसुंभांची निवड कायद्यानें रद्द ठरविली असतांहि, त्यांचे खेळ राजरोस चालू आहेत ! या उपटसुंभानीं आपणास कामगारावर आरूढ होण्यास मिळणार नाहीं या भयानें कामेंच नकोत, अशी आत्मघातकी ओरड करण्यास सुरुवात केली आहे. बातमीदार

वर्तमानसार

—येथील मेडिकल स्कूलांतून तयार झालेल्या डाक्टरांस ब्रिटिश मुलुखांत विनशर्त वैद्यकी करण्याची सवलत तेथील सरकारनें दिली असल्याचें कळतें.

—मुंबईच्या 'उनीयांव गोवान' या संस्थेनें पोर्तुगाल सरकारला एक अर्ज केला असून त्यांत डोईपट्टीची इकालपट्टी व्हावी, अशी विनंति केली आहे. सदरील अर्जात इस्कोल नोर्माल, इंस्तितूत कोमेर्सियाल इत्यादि अनावश्यक खातीं काढून टाकण्याची हि मागणी केली आहे

- पोर्तुगीज रिपब्लिकचे अध्यक्ष आंतोन जुझे आल्मैद हे आंगोल(आफ्रिका) [illegible] वसाहतीला भेट देणार [illegible], परंतु पोर्तुगालांत सांप्रत चालू असलेला धुमाकूळ विकोपास जाण्याचीं दु:चिन्हें दिसत असल्यावरून तो त्यांचा बेत बहुतकरून रहित होईल, अशी तेथील एका वृत्तपत्राची अटकळ आहे.

—येथील कोमुनिदादींचें मागील देणें चुकतें करण्याची मुदत संपली.

—मडगांव व म्हापसें येथील पाठशाळांत परीक्षा देण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांनीं ८ तारीखपर्यंत अर्ज द्यावे, अशी त्या शाळांतील मुख्याध्यापकांनीं सूचना प्रसिद्ध केली आहे.

ANUNCIOS

पोर्तुगेज शिक्षक.

भाग पहिला

या उपयुक्त पुस्तकाच्या मदतीनें कोणत्याही मराठी जाणणाराला थोड्याच दिवसांत पोर्तुगेज भाषेशीं परिचय करून घेतां येतो. किं. ट. ह. सह ६॥ आणे. पुस्तकें खालील ठिकाणीं मिळतात.

सदानंद मुद्रणालय. रायबंदर.
लिव्रारीय कुरेल्यु, पणजी.
रघळू शं. शे. खलप, म्हापसें.
विष्णु भोबे बुकसेलर, ,,
एस राय आणि कंपनी,
केमिस्टस ड्रगिस्टस व जनरल मर्चंटस,
ठाकुरद्वार, मुंबई,

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 1.º oficio Redcar, correm éditos de trinta dias a contar da segunda publicação deste no Boletim Oficial, citando o réo Umor Gan Patan, casado, proprietario, de Sirvoi, ora ausente em Bombaim, em parte incerta, para no praso de dez dias, findo o de editos, pagar a quantia de 162:6:8, proveniente das custas e selos contra ele liquidadas nos autos crimes de policia correccional que lhe promoveu o M. P. bem assim pagar as custas e selos acrescidos e por acrescer, ou em egual praso de dez dias, vir nomear bens á penhora, sob pena de a execução se guir os seus termos á revelia.

E para ser publico se expediu este.

Xeldem, 20 de Janeiro de 1923.

O escrivão de Direito do 1.º oficio,

BABU V. CAMOTIM REDCAR

Verifiquei.

O Juiz de Direito,

2 A. MEIRELES.

2 vez)

पत्ता—भारतमित्र, रिवण गोवा. | सरदेसाई यांनी मालेचा समारोप करून | पो. किर्लोस्करवाडी जि सातारा

Upi Camotim

O estado economico da classe hindu e' bastante precario, devido a' circunstancia de ela se nao afoutar a largar a fronteira da India, ao contrario do que se observa entre os seus conterraneos cristaos.

Felizmente, porem, tal estado de coisas vai mudando de seu rumo e a classe hindu', vai, a pouco e pouco, imprimindo impulso a' emigraçao honesta.

O sr. Upi Camotim e' o primeiro hindu que vai para Angola, contratado pelo governo desta possessao. A breve trecho seguir-lhe-hao outros, procurando melhorar a sua situaçao financeira.

Evidentemente, a necessidade e' a mae de proesas aventurosas e todos sabem que a fortuna ajuda os audazes *fortuna juvat audaces.*

Ao sr. Upi apetecemos uma viagem muito boa e uma carreira muito feliz.

Matas

Esta'-se a levantar planta da regiao matosa concedida ao Estado pela comunidade de Astragar.

Ha' vinte anos atraz, pouco mais ou menos, procedeu-se a demarcaçao da referida regiao; mas tanta arbitrariedade houve na sua efectuaçao que os inexperientes encarregados daquele serviço incluiram com toda a sem-cerimonia propriedades particulares na demarcaçao, por forma que o terreno concedido que se chama *Sidha* aumentou, como que por encanto, e consideravelmente, de sua superficie: o SIDHA que tinha apenas 600 hetares conta actualmente 2100 ditos.

Reclamou-se contra este absolutismo sem nome do Estado; mas a razao do mais forte invalidou a razao do mais fraco...se bem que um rico proprietario de Loutolim poude pregar a' Repartiçao de matas uma tremenda partida apossando se, segundo se diz de que nao era seu.

Mas vai longa esta local e a importancia do assunto exija que sejamos mais explicitos. Nao ha', portanto, outro remedio se nao reservar o resto para o numero imediato em que havemos de trazer a' luz de pubiicidade muita coisa escura que descubrimos no cume do SIDHA.

Uma festa

Realisou-se, ha'pouco, em Sanguem o 2.° aniversario das associaçoes Vithal Sevaca Mandal e Tilak Vachanalai, com grande concorrencia da gente. Na reuniao que por essa ocasiao teve lugar, fizeram o uso de palavra, alem do nosso director, os srs. Sar Dessai prof Venctexa R. Naique, P. V. Virgincar, Balcrisna Marathe, Naraina B. Naique, e Naraina Ananta Patancar, presidente das mesmas associaçoes, a's quais desejamos longa vida

भारत

गुरुवार फाल्गुण शु० ६ शके १८४४

ही आवतोमी कसली ?

'पगारवाढीचा नियम मोठ्या व छोट्या अशा सर्व दर्जाच्या व हुद्यांच्या नोकरांस सरांस सारखा च लागू करण्यांत यावा. व हा नियम मूर्त स्वरूपांत उतरण्यास जी पूर्व तयारी करणें अवश्य असेल ती त्या त्या वसाहतीच्या कोंसेल्य लेझिस्लातीव्हानीं आस्थापूर्वक करावी' असा पोर्तुगीज वसाहतीच्या प्रधानानें एक ठराव केला आहे.

प्रधानजींचा हा ठराव गोमांतकीय स्वराज्य (!) किती लंगडें आहे याची साक्ष पटविण्यास पुरेसा आहे. या हुकूमवजा ठरावावरून वरिष्ठ सरकार आमच्या आवतोनोमीला किती मानतें व आमच्या तिजोरीच्या कफल्लक स्थितीनें किती द्रवतें तेंहि उत्तम प्रकारें समजून येण्यास सोपें पडणार आहे.

ज्या आवतोनोमीच्या कारभारांत करभारानें वरिष्ठ सरकारला निरंकूशपणें धुडगूस घालतां येतो; जिला स्वतंत्रपणें प्रांतिक [illegible] पाऊल टाकतां [illegible] वाव देण्यांत येत नाहीं; थोडक्यात [illegible] म्हणजे, ज्या आवतोनोमीला पोर्तुगाल सरकारच्या प्रत्येक हडेलहप्पी व अरेरावी इच्छेला मानापमानाचें गोवें गुंडाळून ठेवून मान लववावी लागते, ती आवतोनोमी कसली व तें स्वराज्य कसलें ?

आवतोनोमीच्या घटनेनुरूप लोकांनीं स्वार्थत्यागपूर्वक प्रतिनिधी निवडून कोंसेल्य लेझिस्लातीव्ह भरावेत, या प्रतिनिधींनीं लोकस्थितीचा सांगोपांग अभ्यास करून लोककल्याणार्थ स्वार्थत्याग पूर्वक ठराव करावेत; व ते अमलांत येण्याच्या ऐनप्रसंगीं वरिष्ठ सरकारनें त्या सर्व ठरावांवर वस्तरा फिरवून, आवतोनोमीला 'सोंवळी' करण्याचें शतकृत्य घडवून आणावें, या विपरीत प्रकाराला काय नांव द्यावें हेंच आम्हांला समजत नाहीं !

वरिष्ठ सरकारच्या या अनिष्ट वर्तनाला कायमचा आळा घालण्याच्या सदिच्छेनें गतसालीं आमच्या लेझिस्लातीव्ह कोंसेल्यांतील लोकपक्षीय नामदारांनीं आपला निषेध सूचक संदेश तयार करून पोर्तुगालला रवाना केला होता; पण या मानी कृतीचा बिलकूल उपयोग तर झाला नाहींच, उलट तिला अराजकतेचा शिक्का मारण्यांत येऊन, लोकपक्षीय मेंबरांची गळचेपी करण्यांत आली !

आवतोनोमीच्या या लंगड्या तट्टावर चढलेला गोमांतक राजकीय प्रगतिशिखर गांठण्यास कधीं तरी शकेल काय ? आवतोनोमीच्या या मृगजलानें गोमांतकीयांची राजकीय तृष्णा कधीं तरी शमेल काय ! आवतोनोमीच्या हा शुद्ध रेडा कदापिहि स्वतंत्रतेचें दूध देण्यास शकणार नाहीं, यांत संशय बाळगण्याचें कारण आहे काय ?

नाहीं, कधींहि नाहीं. अशा स्थितींत आवतोनोमीचे गोडवे गाण्यांत काय हंशील आहे ! स्वराज्याच्या नावानें नाचण्यांत कोणता फायदा आहे !

तात्पर्य, आमची आवतोनोमी अर्थशुन्य असून तिच्यांत योग्य सुधारणा केली न गेल्यास ती असून नसून सारखीच, असेंच कोणालाहि कबूल करावें लागेल. ज्या आवतोनोमींत कोणत्याहि स्वरूपानें लोककल्याण करण्याचें सामर्थ्य नाहीं, ती आवतोनोमी कसली ?

स्फुट विचार

सांवळा गोंधळः—या मथाळ्याखालीं दुसरीकडे प्रसिद्ध झालेला मजकूर वाचून कोणालाहि सखेदाश्चर्य वाटल्याखेरीज राहणार नाहीं. मुनिसिपालटीच्या खुर्चीवर बसून लोकांच्या नाकांवर मिरीं वांटल्यास सांपडत नाहीं, म्हणून आम्हांस मुनिसिपालटीच नको, अशी आत्मघातकी मागणी करणाऱ्या व्यक्तींस कोणतें नांव द्यावें हेंच आम्हांस समजत नाहीं. परंतु समाधानाची गोष्ट कीं, सदरील मागणी करणारे लोक फक्त एका हाताच्या बोटांच्या संख्येपेक्षां जास्ती नाहींत. [illegible]सिपाल प्रकरणापासून एक गोष्ट मात्र सिद्ध झाली कीं, उपरोक्त माणसांच्या तावडींत जर मुनिसिपालटी सांपडली असती, तर लोकहिताची पायमल्लीच झाली असती.

जंगलखातें:—आमच्या जंगल खात्यांत बऱ्याच वाघिणी व्यालेल्या असून, तिचीं पिल्लं जिकडे तिकडे दडी मारून बसलेलीं आहेत, हें मशहूर आहेच. येत्या अंकापासून त्या पशुपुत्रांची शिकार करण्याची आमचा निश्चय झालेला आहे. ज्या कोणास या शिकारींत भाग घेण्याची इच्छा असेल त्यानीं आपापला दारुगोळा बंदुकांसह आमच्या कचेरींत रवाना करण्याची तातडतोब व्यवस्था करावी, अशी आग्रहाची सूचना आहे.

——येथील फाजेंदाचे सेक्रेटरी सदाशीव शे. सुखटणकर यांची बढती झाल्यामुळें ते काल रोजीं पणजीला रवाना झाले. गेल्या शनिवारीं त्यांच्या इष्टमित्रांनीं त्यानीं या तालुक्यांत बजावलेल्या कामगिरीबद्दल आनंद प्रदर्शित करून, त्यांचें अभिष्ट चिंतिलें. हा समारंभ कै० दो० रुद्राजी शे. शिरवैकर यांच्या येथें पार पडला.

लोक काय बोलतात

तीळ गूळ

शनिवार ता. १३।१।२१ रोजीं आजगांव, सावंतवाडी, येथील श्री देव वेताळ मंदिरांत मराठी व इंग्लिश शाळेच्या [illegible] द्यार्थ्यांपुढें अपवित्र परदेशी साखरेचें स्वरूप समजावून देण्यासाठीं सभा भरली होती. तिची हकीगत सारांश रूपानें देत आहें.

पहिल्यानें इंग्लिश शाळेंतील मास्तर मि० विठ्ठजी बळवंत राव नाडकर्णी यांच्या सूचनेवरून येथील हातमागाचे उत्साही कारखानदार रा. बळवंतराव आपटे यानीं—आपल्यापेक्षां सहस्रपटीनें अधिक विद्वान लोक येथें असतांही कांहीं विशिष्ठ हेतूनें मला अध्यक्षपदाचा मान देण्यांत येत आहे. तो मी मींत मीत पण प्रेमळ अंतःकरणानें स्वीकारतों—असें प्रास्ताविक भाषण करून अध्यक्षस्थान स्वीकारलें. नंतर अध्यक्षांच्या सूचनेवरून येथील रहिवाशी व तरुण रा. अनंत गोपाळ नातू यांनीं—येथील बराचसा शिक्षक वर्ग व विद्वान मंडळी येथें असतांना त्यांच्यापुढें माझी बोलण्याची योग्यता नसतांही अध्यक्षांच्या आग्रहावरून मी बालव्याचें धाडस करितों, असें म्हणून बोलण्यास सुरवात केली. उद्यांच्या संक्रांतीचें नांव 'मकरसंक्रांत' असण्याचे कारण उद्यां रवि मकर राशीला जात आहे. मकरराशीचा स्वामी शनि असून तो रवीचा मुलगा आहे. शनि व रवि यांचें जन्मतःच वैर आहे. शनि हा रवीचे घरांत उद्यां जात आहे. त्या प्रसंगीं शनीला प्रिय जे तीळ व रवीला प्रिय जो गूळ यांचें मिश्रण करून वांटावें. व आपसांतील भेदभाव विसरावे असा शास्त्रीय नियम आहे. परंतु हल्लीं तीळगूळ न वाटतां केवळ मोठेपणाच्या डौलाकरतां परदेशी साखरेचे तीळ (हलवा) वांटण्याचा प्रघात रूढ होत चालला आहे. त्याला आळा घालून हरएक व्यवहारामध्यें गूळच वापरावा. निदान अपवित्र परदेशी साखर न वापरण्याविषयीं कळकळीची विनंति करून वेंगुर्ल्याच्या गोसेवक पत्रांतील (गुरांच्या हाडांरक्तांच्या क्षारानें परदेशी साखर शुभ्र केली जाते वगैरे) परदेशी साखरेचें किळसवाणें स्वरूप वाचून दाखविलें ही साखर न वापरण्यानें व्यवहारांत अपरिहार्य अशा कोणत्याच अडचणी येत नाहींत. असें अध्यक्षांच्या कुटुंबांतील मंडळीनें आपल्या १५ वर्षांच्या अनुभवानें सिद्ध करून दाखविलें आहे. असें सांगून सण हे लहान मुलांच्या हौसेकरतांच असतात. कारण ज्या घरांत मुलें नाहींत तेथें सणाचें विशेष महत्व असत नाहीं. तरी मुलांनीं परदेशी साखर न खाण्याचा निश्चय केल्यास त्यांच्या वडील मंडळीलाहि परदेशी साखर घरांत आणणें अशक्य होईल. वगैरे सप्रमाण सिद्ध करून दाखविलें. व पुन्हां एकदां सर्वांना परदेशी साखर न खाण्याविषयीं आग्रहाची विनंति करून त्यांनीं आपलें भाषण संप[illegible]

गोविंदाग्रजांचें पुण्यस्मरण.

‘ हें कोण बोलिलें बोला ’ ‘ राजहंस माझा निजला ’।
घालुनी ‘गुलाबी कोडें । कोण त्यां उगवत गेला ॥
फुंकुनी शिंग ‘दसऱ्या’चें । आईस ‘मुरलि’चा बनला ॥
कलगीचें गाणें गा‍ । ।
‘घुबडास’ बांधुनी पा‍ ।
‘स्मृतिगीत’ गातची राही ।
वाजउनी ‘घुंगुरवाळा’ । जगताला नि[illegible] आणी ॥ १ ॥
‘जगतास जागवायाला’’ । ‘केशवसुत गाउनि गेले’
हें असें सांगुनी लोकां । जनदुःख निवारण केलें ।
जाहली ‘निराशा गोड’ । ‘हृदयास शांत कुणि केलें ? ॥
‘जीवास बोध’ कुणि केला ? ।
‘प्रेमपाठ’ श्रवणीं घुमला ।
‘अरुण’ही येई उदयाला ।
हरपलेंच ‘निद्रागीत’ । ‘हुरहूर’ ’पळाया लागे ॥ २ ॥
करुनियां ‘प्रेमसंन्यास’ । मन ‘पुण्यप्रभावा’ दावी ॥
‘भावबंधन’ अहा! येतां । ‘एकच प्याला’ सुर लावी
बाळक्या विनोदा करुनि । मुरक्या हंसतां बळवी ॥
वाग्देवीचा सुकुमार ।
रसवंतीचा शाहीर ।
गोविंदाग्रज कवि थोर ।
वंदिला आदरें करुनी । नम्रभाव हृदयीं धरुनी ॥ ३ ॥

* * *

अनुष्टुप.

ज्याच्या काव्यरसीं आजी । भसें मी रंगलो वरा ।
लीन ‘अज्ञातवासी’ हा । गुरुराम पदीं जरा ॥ १ ॥

फोंडा, २३ जानेवारी १९२३.

पुणें अनाथ विद्यार्थी गृह

“हेंच अ. वि. गृह असा एकादा मुलगा निर्माण करील कीं जो पुढें देशाचें नेतृत्व करूं शकेल.” लो. टिळक.

सा. न. वि. वि. केवळ गरीब निराश्रित व होतकरू अशा हिंदू विद्यार्थ्यांचें सर्वतोपरी पालनपोषण व शिक्षण करून त्यांना कार्यक्षम करण्याच्या उद्देशानें पुणें अ वि. गृह गेलीं चरा वर्षें काम करीत असून अशा प्रकारची महाराष्ट्रांतील ही पहिलीच संस्था होय उत्तम प्रकारचें बौद्धिक शिक्षण देऊन त्यानंतर औद्योगिक शिक्षणाची जोड करून द्यावी या उद्देशानें संस्थेनें स्वतःचें महाराष्ट्र विद्यालय (संपूर्ण हायस्कूल) काढलें आहे पांच वर्षांत मॅट्रिक पर्यंतचा अभ्यासक्रम तज्ज्ञांच्या सल्ल्यानें आखण्यांत आला असून संस्थेबाहेरीलही हुशार विद्यार्थ्यांना मोफत घेण्यांत येतें. संस्थेचें पवती मोफत वाचनालय महाराष्ट्रातील पहिलें असून हिंदुस्थान व परदेशांतून संस्थेला भेटीदाखल येणारीं सुमारें १७५ वृत्तपत्र व मासिकें तेथें ठेविलीं जातात. संस्थेचे शालोपयोगी ग्रंथसंग्रह जुनीं पुस्तक जमवून दरसाल रु. ५० ची गरीब विद्यार्थ्यांनां पुस्तकरूपानें मदत करितें. संस्थेंतून तयार झालेले पदवीधर या व इतर संस्थांतून आज प्रत्यक्ष सार्वजनिक कामें करितांना दिसत असून त्यांपैकीं एक औद्योगिक शिक्षणाकरितां अमेरिकेस गेले आहेत.

हें सर्व महाराष्ट्राच्या दातृत्वबुद्धीचें फळ आहे. हें जाणून आपणांकडे व आपल्या इष्टमित्राकडे होणाऱ्या नित्य नैमित्तिक दानधर्माचे प्रसंगीं व इतर वेळीं संस्थेची आठवण होऊन हस्तेंपरहस्तें अनाथ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याविषयीं आपणास विनंति आहे.

व्यवस्थापक– वि. गं. केतकर
६१७ कसबा पुणें.

Ecos & Critica

Agradecendo

Ao distinto publicista e eminente patriota sr. C. Roque da Costa agradecemos o mimo dum exemplar de *Homenagem do Povo de Damao aos heroicos Aviadores Portuguezes Gago Coutinho e Sacadura Cabral.*

E' um trabalho bem feito e no qual se acham compilados alem da discriçao da festa que em houra dos herois teve lugar em 6 de agosto de 1922, discursos dos srs. C. Roque da Costa, dr. Castilino Fernandes, presidente da Camara Municipal de Damao, advogado Diogo de Brito e Fernando Perpetuo da Cruz, governador do mesmo distrito. O folheto regista tambem a alocuçao gratulatoria do sr. Pe. Jose' Maria Pereira da Gama.

Carnaval

foi frouxo, despido da *brincos* populares, devido, naturalmente, pela carestia que traz taciturno e acabrunhado o Povo esfolado pela furia contribuitiva.

Oferece pena essa triste scena...

भारत

गुरुवार माघ व० ३० स्या १८४४

सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं

रायवंदरच्या कसाईखान्याविषयींची हकीगत मागें भारतांत एका स्वतंत्र लेखांत प्रसिद्ध केली होती. अर्ज, मागण्या, विनति, डेपुटेशनें, रेक्लामासावें यांच्या योगें चार आठवडे एक सारखी चळवळ सुरू करून चळवळीचा परिणामहि झाला. गव्हर्नरपर्यंत ही दाद लागून गव्हरनरनीं स्वरी वस्तुस्थिति व लोकवस्तींत असलेला कसाईखाना पाहून लवकरच योग्य व्यवस्था लावण्यांत येईल अशी कळकळीनें जमलेल्या ७०० लोकांस सांगितल्यावर लोकानां संतोष वाटला, पण सांक्रांसीस्काच्या प्रदर्शनाच्या गडबडींत तें अभिवचन तशींच मागें पडून राहिलें.

आतां पूर्वींचा रस्ता सुधरून नवीन रस्ता केला असल्यामुळें, कसाईखाना हमरस्त्यावरच पडला आहे. इतकेंच नव्हे तर ती जागा लहान असल्यामुळें पणजीच्या मांसभक्षक लोकांस पुरेसें मांस मिळण्यासाठीं ८–१० गाईचा नित्यशः वध, कसाईखान्या बाहेर म्हणजे रस्त्यावर होत असतो ! कायद्याच्या दृष्टीनें असे वध वाटेवर होणें गुन्हा आहे; पण 'वळी तो कान पिळी! आमचें तर गाईंना मारतेवेळेचा हिडीस देखावा नजरेसमोर येऊन काळीज चरचरून जातें. व या लोकानां म्हणावें काय हेंच समजत नाहीं ! होडींतून जातानां, रस्त्यांतून जातां येतानां हें आसूरी कृत्य त्या वरच्या खाटिकांकडून होत असलेलें पाहून मन अगदीं तडतडून जातें. हा दिवसेंदिवस होत असलेल्या आसुरी वर्तनाचा पाया दृढ होत चालला आहे असें लोकाना वाटून लोकांकडून पुन्हां सनदशीर चळवळ करण्याचा प्रश्न पुढें येऊ पहात आहे, ही समाधानाची गोष्ट होय.

कायदा असून ज्या कायद्याचा उपयोग हिंदूच्या आकांक्षांकडे, कांहींच्या जिव्हा स्वातंत्र्यासाठीं होत नाहीं तो कायदा कसला ? ती स्वतंत्रता कसली ! बंधुता कसली व ती समता तरी कसली हेंच समजत नाहीं ! !

एकत्रित लोकवस्तींत हमरस्त्यावर असलेल्या कसाईखान्यासाठीं लोकानां जर त्रास होत आहे, लोकांत या विषयीं जर असंतोष आहे तर ह्या लोकांच्या विनंतीकडे लक्ष न देणें हें सरकारास न्याय्य वाटतें काय ? ही स्थिति पोलीतीकुस पक्षाचे पुढारी यांस सांगितल्यास ते या मागणीचें तत्त्व नाकबूल करीत नाहींत. आपल्याकडील कोणताहि पक्ष घेतला कीं त्या पक्षाचे पुढारी या तत्त्वाकडे पाहून मानाच डोलावतात. तुमचें म्हणणें खरें आहे, तुमच्या बद्दल सहानुभूति आहे, वाईटहि वाटतें, पण करायाचें काय ? व्यवहारांत आमचें कांहीं चालत नाहीं, असें रडक्या स्वरानें, नामर्दासारखें सांगून वेळ मारून नेतात !

सर्वांना थोर म्हणून मिरवावयाचें असतें, मिरवतातहि व काम करायाचें झालें, लोकांवर परोपकार करावाचा भाला म्हणजे मात्र कामाची सबब दाखवतात. व हुल्लडशनें आलीं म्हणजे सर्वांनींच यानां मतें आपणास द्यावीं असें वाटतें. म्हणजे मताची मागणी करतानां दिलदारपणा दाखवणें आणि व्यवहारांत निष्ठुरपणा या जोडीकडे पाहिलें म्हणजे इसापनीतींतील अहिंसेवर व्याख्यान देणाऱ्या कोल्ह्या खोंकडाची आठवण होते. यावरून आम्हीं या लोकांना, ढोंगी म्हणत नाहीं. मात्र इतकेंच समजतों कीं, ज्या गोष्टी ते बोलतात त्या घडवून आणण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत नाहीं; सत्ता आड येते. ही मदालसी सत्ता आमच्या हक्काची पायमल्ली करते

उपरोक्त कसाईखाना येथून उठावा असा ठराव पणजी मुनिसिपालटीच्या कमिशननें पास करून घेतला होता; व त्याच्या नवीन उभारणीबद्दल ६००० रुपयांचें एक बील पास केलें हातें असें ऐकतो पण अद्याप डोळें झांकूनच रात्र चालली आहे... कारण समजत नाहीं. नवीन कमिटीनें आपला प्रवेश केला पण तीनेंहि हें काम मनावर घेतलेलें अद्यापि आढळत नाहीं. ही गोष्ट फार आस्ते आस्ते चालत आहे. म्हणे जागा निवडण्यास कमिशनची नेमणूक केली आहे आणि तें कमिशन जागा निवडल्यावर पुढें बांधणी सुरू होईल. नंतर हा कसाईखाना उठेल !...

तरी गोव्यांतील सर्व हिंदूनीं, मुनिसिपालटींतील मेंबरानीं खरी वस्तुस्थिति लक्षांत आणून होतां होइतों. खटपट करून हा नरक संपवावा सरकारहि याकडे योग्य लक्ष पुरवील अशी आशा करितों.

स्फुट विचार

उपयुक्त सुधारणा:—गोवा सरकारच्या बजेटाची इमारत ०र्वे साधारण जनतेस अपरचित अशा पोर्तुगीज रेस नाण्याच्या अस्थीर पायावर उभारली जात असल्यामुळें लोकांची कुरकुर असे परंतु यापुढें बजेटाची रचना रुपयांच्याच पायावर होणार असल्यानें त्या कुरकुरीस जागा रहाणें अर्थात् शक्य नाहीं. मात्र अमलांत येऊं घातलेली ही उपयुक्त सुधारणा साऱ्या गोव्या नोकरशाहीस नुकसानकारक असल्यानें ती अप्रतिहत चालू राहील की नाहीं या विषयीं मन साशंक होऊन, बुचकळ्यांत पडतें. पण ही वृत्ति भविष्यकाळासंबंधींची आहे. वरून बजेटक्रांतीबद्दल वर्तमानकाळीं समाधान व्यक्त करण्यास निदान कसलीच हरकत नाहीं.

धार्मिक शिक्षण:—रिपब्लिक राज्यपद्धतीच्या मूळभूत तत्वानुरूप सार्वजनिक शिक्षण संस्थांत कोणत्याहि धर्मशिक्षणाची पूर्ण मज्जाव आहे. हा कायदेशीर प्रतिबंध अयोग्य असून, त्याला तिलांजली देण्यास मन:पूर्वक झटणें हें प्रत्येक राष्ट्रभक्तांचें कर्तव्य आहे. असें कित्येक पोर्तुगीज पार्लमेंटाच्या सभासदांस वाटून त्यानीं उपरोक्त मज्जाव दूर होण्याप्रीत्यर्थ प्रयत्न केलाहि. पण रिपब्लिक घटनेच्या यद्विषयक मूळ कलमांत फेरफार झाल्याशिवाय धार्मिक शिक्षणाच्या स्वातंत्र्याची चर्चासुद्धां पार्लमेंटांत करणें 'महत्पाप' आहे. असें बहुमतवाल्या सभासदांचें मत पडल्यावरून धार्मिक शिक्षणाचें हें घोडें पुढें दामटण्याचें धैर्य कोणासहि झालें नाहीं.

आले व गेले:—गेल्याच्या मागील गुरुवारीं गव्हरनर साहेबानीं या तालुक्यास भेट दिली. जवरीच्या रामरामांत जितकें प्रेम दिसून येतें, तितकेंच त्यांच्या स्वागताप्रीत्यर्थ ऐनवेळीं घडवून आणलेल्या उत्सवांत दृष्टोत्पत्तीस पडत होतें. खरें व थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे स्वागतोत्सवांत लोकांच्या मनोत्साहाचें अगदीं न्यून होतें. अधिकारी व त्यांचे हस्तक यांच्याशिवाय प्रांताधिपतीच्या स्वागतांत विशेषसा कोणी भाग घेतलाच नाहीं ! ज्यांच्या अमदानींत करांच्या भडिमारानें जनता त्रस्त होऊन भुकेबंगाल होण्याच्या पंथास लागली, त्यांच्या आगमनापासून लोकसागरांत आनंदाच्या लाटा उसळ्या नसल्यास नवल नाहीं. मानपत्रें, उत्तरें वगैरे सर्व तऱ्हेचे शिष्टाचार 'लघुसंधें' प्रमाणें अवघ्या दोन तासांत पार पडून डॉ० जाईम द मोराईस हे आले तसेच कसलाहि अपघात न होतां आपल्या लव्याजम्यानिशीं परत गेले ! या शिवाय 'नवीनोत्तर' कांहीं नाहीं.

मनोधैर्य:—असें समजतें कीं, वासुदेव आत्माराम देशप्रभु ऊर्फ काकासाहेब, 'विस्कोंद दे पेडणें' यांनी चिरंजीव हे लाटली येथें सि. कोंस्तांस्यु मिराद यांच्या विवाह समारंभास हजर राहिले होते त्या प्रसंगीं. ख्रिस्ती समाजांत रूढ असलेल्या दुष्ट, नष्ट शिष्टाचारास अनुसरून यजमानाकडून त्यांच्यापुढें दारूचा पेला ठेवण्यांत आला. काकासाहेबानां स्वतःच्या हिंदुत्वाची व शीलाची जिवंत जाणीव असल्यामुळें त्यानीं तो पेला आभारपूर्वक परत केला. हें त्यांचें कृत्य तेथें हजर असलेल्या एका प्रतिष्ठित व सोवळ्या गृहस्थाला गैरशिस्त वाटून त्यानीं त्या पेल्याचा अनादर होईल, अतएव तो स्वीकारण्यांत यावा, या विषयीं बराच वेळ काकासाहेबाना आग्रह चालविला. पण काकासाहेब मनाचे खंबीर ! म्हणून तसल्या आत्मघातकी सल्यास बळी न पडतां आपलें पूर्वींचेंच म्हणणें त्यानीं कायम राखिलें. ही गोष्ट जर खरी असेल तर काकासाहेब शाबास आहे तुमची ! ! ज्या पेल्यांत शेंकडों विचारी व सुशिक्षित समजले जाणारे, आपलें नीतिधैर्य ठार बुडवितात त्या पेल्याचा इनकार करण्याइतकें मनोधैर्य आपण दाखविलें याबद्दल आपलें अभिनंदन केल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं. आपलें उदाहरण इतर लटपट्याना अनुकरणीय होवो.

पत्ता—भारतमित्र, रिवण-गोवा. | सरदेसाई यानी मालेचा समारोप करून

पो. किर्लोस्करवाडी जि सातारा ॥

— पणजीच्या सुप्रसिद्ध संस्थेस ०० हजार रुपये अर्पण केल्याबद्दल पिग्मेव नात्रांच्या पत्रानें गव्हरनर साहेबानी दोप दिला आहे !

— आग्रा येथें क्षत्रिय महासभेची बैठक श्री. नरसिंह यांच्या अध्यक्षतेखालीं होऊन अवरंगजेबाच्या वेळीं जुलमानें बाटविलेल्या रजपुतांच्या ४॥ लक्ष वशजनां प्रायश्चितपूर्वक पुन: हिंदू धर्मांत घेण्याचा ठराव झाला. जुलमानें बाटविण्यांत आलेल्या आमच्या प्रांतांतील हजारों लोकांना हिंदु करण्याचा समय अजून ठेपलाच नाहीं काय !

— गेल्या दिवसांमागें रावराजे विस्कोंद यांचे चिरंजीव काकासाहेब यांचा मुक्काम मडगांव येथें असताना. त्यानीं तेथील "सारस्वत समाजास' भेट दिली. त्यावेळीं समाजाच्या कांहीं चालकांनीं त्यांस टीपार्टी दिली; व सेक्रेटरीनीं आभार प्रदर्शक भाषणांत संस्थेच्या सद्यस्थितीचें दिग्दर्शन केलें. उत्तरादाखल केलेल्या भाषणांत काकासाहेबांना आपल्या परमपूज्य पित्याच्या कानांवर समाजस्थिति घालण्याचें अभिवचन दिलें.

अरुणोदय

चाल० [भूपति स्वरे ते वैभव०]

संपुनी निशा ही उषा उगवली आतां।
ललकारत आला अरुण 'उठा ! हा सविता !'।
रथ हांकित क्षितिजीं भास्कर येतां त्वरित।
पळवट स्विकारी विधु तारे भयभीत।
आकाश गुलाबी शालू जणुं पांघरुनी।
सामोरी जाई, पंचारति करि धरुनी।
ह्या शुभसमयां खगवृंद उठुनि खडबडुनी।
किलकिलाट स्वर करि; नाचत जण कडकडुनी।
मग कमलें विकसुनि गंध पसरिती प्रेमें।
मकरंद चाखण्या मधुकर फिरती नेमें।
नवसींचन होतां वृक्षलतादि फुलती।
पवनालिंगनहीं होतां हलुहलु डुलती।
[illegible]
हंबरें वाटतें ईशस्तुति ह्या करती।
मित्रास द्यावया अर्घ्ये विप्रजनहे।
नदितिरीं तिष्ठतो. कुणाला [illegible]
शाळेंस चालला विद्यार्थी गण उठुनी।
[illegible]
शेतांत चालले नांगर बैलां धरुनी।
पेरण्या बा[illegible]री, भात, जोंधळे कणी।
ह्या अशा रम्य समयातें। मन स्फुरे।
उत्साह पालवी अळसातें। भय नुरे।
परमेश लिला गयातें। बहु बरें।
वाटतें, पाहुनी सृष्टिसतीच्या मोदा।
'उद्यमा लागणें' ह्या एकच ह्या बोधा।

फोंडा, २५-१ २३ अज्ञातवासी.

Predio rustico denominado "Dercasonapoiquim Guddó" da cultura de coqueiros, descrito sob n.º 16237, e avaliado por 9 : 0:0. Predio rustico denominado "Dercasonapoiquim Guddó" da cultura de coqueiros descrito sob o n.º 16238 e avaliado por 8 :00:0 E predio rustico denominado "Cazoua-Condo" da cultura de coqueiros, descrito sob o n.º 6239 e avaliado por 50:00:00 todos situados em Assoldá —

Estes predios foram penhorados na execução por custas que o M. P promove contra Bagoroti Rautina, viuva de Giú vulgo Ryama Gongo Rauto, de Assoldá, por apenso ao inventario orfanologico a que se procedeu por obito de dito Giú.—Por este são citados todos os credores incertos da dita executada, e bem assim os coproprietarios, nos termos e para os efeitos da lei. Quem os quizer arrematar, compareça nos indicados dia, hora e local, correndo por conta do arrematante as despezas da praça e a contribuição do registo por inteiro.

E para ser publico se expediu este.

Xeldem 16 de Janeiro de 1923.

O escrivão de Direito do 1º oficio,

BABU V. CAMOTIM REDCAR

Verifiquei. O Juiz de Direito,

(2 vez) A. MEIRELES.

ANUNCIOS

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 1º oficio Redcar á instancia do exequente M. P. vão ser vendidos em hasta publica a porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem, no dia 2 de Fevereiro proximo pelas 1[illegible] horas do preço da sua avaliação os seguintes bens: Vigessima oitava parte do predio rustico denominado "Caringalimola" discrito na conservatoria do Registo Predial desta comarca sob o n.º 15689 avaliada por 20: 0: 0 Predio rustico denominado "Mequiecodil tocdo" da cultura de coqueiros, discrito sob o nº 16236, avaliado por 100 : 00 : 00

[illegible] 16236, [illegible]

mesma indiferença todos os crédos religiosos e seus seguidores.

Pessoalmente, pouco me importa que alguem adore a este ou aquele; mas, como cidadão republicano e municipe daqui não posso consentir, sem protesto, que as corporações politicas onde figuram elementos de varias classes pratiquem em seu nome quaisquer inconveniencias, como a que acaba de praticar o municipio de Sanguem que Deus haja na sua Santa guarda E basta.

Sanguem, 4-2 923

Caxinata X. S. Salelcar

N. da R. Os protestos que se leem nas cartas transcritas acima, teem a sua razão de ser sabido que no campo religioso vigora o principio de "Cada classe para si e Deus para todas".

Festas

Foi recebida com festas a noticia da anulação do acto eleitoral da Camara de Sanguem que abusivamente subira ao poder, e' o que nos escrevem dali

Coco e copra

Da Direcçao dos Serviços Agricolas, Florestais e Pecuarios recebemos uma informaçao sobre o preço do coco e da copra no mercado mundial o que sera' inserido na secçao marata para a sua maior publicidade.

A proposito, frisamos a' mesma Re... nosso Paiz; no caso contrario teremos de alargar o quadro de nossos empregados com mais uma entidade, destinada ao mesmo fim, como faz o Estado por causa dos seus reis, alargamento que ira' agravar inda mais o nosso deficit.

Modos de ver

O *Pigmeu* entende que o sr. dr. Jaime de Morais praticou um grande crime por o mesmo governador ter beneficiado a associaçao de *Mustifand* de Pangim com a importancia de mil rupias do lucro de arroz.

Se subsidiar uma instituiçao de instruçao gratuita importasse crime, nao ha' duvida que o sr. dr. Morais seria merecedor dos reparos do imparcial colega. Mas em parte alguma, tal acto foi considerado menos correto, sendo, portanto, suspeita a critica do *Pigmeu*, no tocante a' atitude benevola do governo perante a *Mustifand*.

Pigmeu

Apraz-nos registar que este fogoso periodico passa muito bem de sua importante saude.

—असोळणें येथें गेल्याच्या मार्गल शनिवारीं रा. रा. कृष्ण पै काणे यानीं सार्वजनिक सत्यनारायणोत्सव साजरा केला

—सांग येथील श्री विठ्ठल सेवक मंडळ व टिळक वाचनालय या संस्थांचा द्वितीय वाढदिवस समारंभ येत्या रविवारीं श्री शांबाराव सरदेसाई यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा होणार आहे. याप्रसंगीं सहकारी शास्त्री, विर्जिनकर वगैरे गृहस्थांचीं भाषणें होतील.

भारत

शुक्रवार माघ व० ८ मी १८४४

येत्या कांग्रेसीसाठीं

[पूर्व सूचना]

१) आपली प्रोव्हिंसियल कांग्रेस कोणत्या महिन्यांत भरणार आहे हें सांगण्यास जरी योग्य आधार नाहीं तरी पण यंदाच्या कांग्रेसींत एका महत्वाच्या विषयाचा ऊहापोह होणार हें खास. हा विषय म्हटला म्हणजे 'गोरक्षण' हा होय.

गाई विषयीं आपली पारमार्थिक दृष्टि बाजूला ठेवली तरी पण व्यावहारिक दृष्ट्या हा विषय फारच महत्वाचा असल्यावरून त्या विषयीं लिहिणें अप्रासंगिक नाहीं.

२) आपण आता सर्व तऱ्हेनें परस्वाधीन झालों आहों. आपल्या देशांत आपल्या उपजीविकेस पुरेसें अन्न नाहीं, वस्त्र नाहीं व लोकसंख्येच्या मानानें विचार केल्यास राहण्यास स्वतंत्र घरें सुद्धां नाहींत अशी आपली सांपत्तिक स्थिति असतां प्रजासत्ताक राज्यांतील आपण स्वतंत्र म्हणून मिरविणें शरमेची गोष्ट आहे. करितां आपण स्वतंत्र होण्यास ज्या गोष्टीचा आपणास पहिल्यादा विचार करावयाचा असेल तर तो आपल्या उपजीविकेचा प्रश्न सोडविणें होय. हा प्रश्न सुटल्याशिवाय आ... कधींच यशस्वी होणार नाहींत. करितां आपली स्थिति सुधारण्यास कोणता उपाय योजावा व त्यांत गाईचा किती उपयोग आहे याचा विचार करूं.

३) आपल्याकडे पडंग जमीन, मुबलक पाणी पुष्कळ आहे. पण शेतांत काम करणारे लोक फारच कमी आहेत वरून त्या जमिनी पडंग राहिल्या आहेत. अशा जमिनींत निरुद्योगी सुशिक्षित तरुणानीं शेतीची वाढ करून आपल्या लोकांस आपल्या देशांत पुरेसें धान्य तयार केल्याशिवाय आपला तरुणोपाय नाहीं.

बाहेरून तांदूळ येतो म्हणून आपण पैसे जास्ती देऊनहि आपली दुपारची वेळ मारून नेतों. पण तिकडून निर्गत बंद झाल्यास आपली उपाशीं मरण्यांची पाळी येईल खास. यासाठीं शेतीची वाढ करून आपली देशांतील भिकार स्थिति घालविली पाहिजे. इतकेंच नव्हे तर आपल्या देशांत आवश्यक कला कौशल्य वाढविण्यास एक इंडस्ट्रियल पेनियँकेसारखी संस्था असणें योग्य आहे. याचे शेअर १ रुपयापासून असावे. आपली लोकसंख्या ५ लाख आहे. प्रत्येकानें एका रुपयाचा एक शेअर घेतल्यास पांच लाख रुपये भांडवल जमण्यास उशीर लागणार नाहीं. पैशांचा विनयोग मात्र आपल्या लोकांची सांपत्तिक स्थिति शेती वाढवून कलाकौशल्यास मदत देण्यासाठींच झाला पाहिजे. याचा विचार कांग्रेस सारख्या संस्थेनें हातीं घेतल्यास फार चांगलें व उपयुक्त कार्य होईल.

४) दुसरा जो विषय कांग्रेसीस्ताना सांगावासा वाटतो, तो गोव्यांतील गोवधबंदीचा होय. लोकसंख्येच्या मानानें आपल्याकडे दुधातुपासाठीं पुरेशा गाई नाहींत त्या नाहींत पण शेतीसाठीं सुद्धां गाई नसणें हें आमचें दुर्भाग्य होय. असें असतानां दिवसांतून केवळ जिव्हा लौल्यासाठीं २५ गाईंचा म्हणजे वर्षांतून ९० हजार गाईंचा वध जवळ जवळ आपल्याकडे होत असतो. हा वध बंद करणें देशोन्नतीच्या दृष्टीनें फारच श्रेयस्कर आहे. असा वध दिवसेंदिवस होत गेल्यास पुढें आपली स्थिति शोचनीय होईल यांत मुळींच संशय नाहीं. याकरितां ही भावी आपत्ति दूर करण्यास योग्य उपाय योजिल्याशिवाय भागणार नाहीं.

५) पाश्चात देशांत मांसासाठीं गाईला कधींच मारीत नाहींत. त्या कामीं बैलांचा उपयोग करितात. याचें कारण गाईपासून दूधहि मिळतें व वंश वाढण्यास मदत होते. यासाठीं इंग्लड, फ्रान्स, स्पेन अमेरिका सारख्या सुधारलेल्या राष्ट्रांत तर गाईची जोपासना हिंदुस्थानापेक्षां जास्ती होत आहे. आपल्याकडे गाइ फारच तर ५–७ शेर दूध देतात. पण युरोपा खंडांत बहुतेक देशांतून ५४-५६ शेर दूध देणाऱ्या गाई असतात पंचाईत पडत नाहीं व त्यामुळेंच ते सशक्त असतात.

एकट्या स्विझर्लंड देशांत इतक्या गाई आहेत कीं, तेथील लोक गोदुग्धाच्या व्यापारावर कोट्याधीश झाले असून ते आपल्याकडील दूध सर्व देशांला पाठवूं लागले आहेत. नेसल्स, कोंदेसाद वगैरे डबे आपण वापरतानां पाहिले म्हणजे पुरे.

६] आतां हा होत असलेला वध आपणास कसा बंद करतां येईल याचा विचार करूं. हा वध बंद करण्यास आपणास अनुभवशीर पुढाऱ्यांची जरूरी ज्या प्रमाणें आहे त्याचप्रमाणें निःस्वार्थी कळकळीचा प्रचारकांची आवश्यकता असून त्यांकडून गोरक्षणाचें खरें महत्व लहान थोर लोकांस विशेषतः पटवून देतां आलें पाहिजे. त्यांच्याशीं सहकारिता संभाळून त्यांची मांसभक्षणाची प्रवृत्ति पालटणें जरूर आहे. ठिकठिकाणच्या डाक्टराचा गोमांसाविरुद्ध अभिप्राय घेऊन तो वृत्तपत्रांवर प्रसिद्ध केला पाहिजे.

आजचें युग जागृतीचें आहे. करितां सर्वांस कळतील अशा भाषांनीं वेळोवेळ गोरक्षणांवर आपले विचार प्रगट केले पाहिजेत व अशा तऱ्हेनें लोकमत तयार करून सहकार्यतेनें हा हमेश होत असलेला गुरांचा संहार बंध करून शेती व व्यापार यास गोरक्षणापासून किती फायदा आहे व आपल्या उन्नतीचें खरें मर्म हेंच आहे हें ठिकठिकाणीं लोकमत जागृत करण्यासाठीं व्याख्यानाच्या रूपानें सर्वांस समजेल अशा कोंकणी भाषेत सांगितलें पाहिजे. आपले हिंदुलोक गाईचें महत्व पूर्ण जाणतात व तिचें योग्य तऱ्हेनें पालन करतात. पण ख्रिश्चन बंधूस मात्र हें अद्याप पटत नाहीं तें त्यास उत्तम तऱ्हेनें पटवून या कार्यास त्यांची सहानुभूति मिळविली पाहिजे.

५) दुभत्या, विणाऱ्या व शेतकामाच्या उपयोगी पडणाऱ्या गाईच्या संहारामुळें शेतीवर व दूधदुभत्याच्या पुरवठ्यावर होणारे दुष्परिणाम हिंदूंप्रमाणें ख्रिश्चनांसहि भोगावे लागतात ते एकमेकांच्या ... ध्यानें त्या तऱ्हेनें सरकाराकडून कायदे पास करून, मुनिसिपालट्याकडून प्रतिबंध करून हें कार्य यशस्वी करून घेतलें पाहिजे.

९) आपल्यांत ही तयारी झाल्याव तावडतोब हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांस कळवून त्यांकडून आपणास सहाय्य मागवून तिकडून ज्या गाई इकडे मारण्यासाठीं येतात त्याचा export बंध करण्याची खटपट करावी इतकेंच नव्हे तर तीकडून मारण्य साठीं येणारे मुसलमान जे इकडे येतात त्यानां सुद्धां बंद करण्यांत येईल. चिकाटी, सहानुभूति व ऐकी मात्र पाहिजे. हें कार्य कांग्रेसीच्याद्वारें व्हवें अशी आमची कांग्रेसीस्तांजवळ नम्र विनंति आहे व त्यासाठीं त्यानीं वर दिलेलीं कामें पहिल्यांदा हातांत घेतलीं पाहिजेत.

नुसत्या चटकदार मेमोरी प्रसिद्ध करून ... व आपल्या सारख्या हलाख स्थितींत पैशांचा अनावश्यक वेंच करून विनाकारण वेळेचा व पैशांचा दुरुपयोग करणें योग्य नाहीं.

स्फुट विचार

हुम करेसो कायदा:—गेल्या महिन्याच्या ३० तारखेला येथील ख्रिस्ती धर्माधिपतीची रौप्य जुबिली साजरी करण्यात आली. या समयीं कित्येक मुनिसिपालट्यानीं आनंद प्रदर्शित करून आपल्या प्रतिनिधींमार्फत ख्रिस्ती धर्माध्यक्षांचें अभिनंदन केलें. या 'हुमकरेसो' प्रकाराविरुद्ध जगन्नाथ विष्णु कामत, पारोडें व काशिनाथ शांबा सालेलकर, सांग या उभयतानीं तीव्र निषेध व्यक्त केला असून त्यांचें म्हणणें असें आहे कीं, मुनिसिपालटी ही अनेकविध जातीच्या लोकांची पोलिटिकल संस्था असल्यानें तिला विशिष्ट धर्माच्या एका मान्य किंवा अमान्य व्यक्तीच्या न्यामगी उत्सवांत भाग घेण्याचा बिल्कूल अधिकार नाहीं.

मनु बदलला:—कामत व सालेलकर यांचें उपरोक्त म्हणणें न्यायास धरून नाहीं असें कोण म्हणेल? रिपब्लिक राज्यपद्धतीला कोणताच धर्म मान्य नाहीं. अशा स्थितींत उपरिनिर्दिष्ट काम्राचें आचरण नैरकायदा आहे, यांत संशय नाहीं. पण 'सर्वांचा हात तोंडांत' या न्यायानें

ब्राह्मण बुक ... नागपूर ...

पो. किर्लोस्करवाडी जि सातारा ||

... सरदेसाई यानी भाषणाचा समारोप करून

चल्यावर काम्राच्या प्रिजिदेंतीच्या चिरं जिवानीं त्यांचें स्वागत केलें व कलावंतीणीचा नाच, गायन, उपाहार, मदिरापान वगैरे झाल्यावर सर्व मंडळी मोटारींतून आपल्या निवासस्थानाकडे निघून गेली, व अशा रितीनें दुसऱ्या दिवशींचा पोग्राम आटोपला.

तिसऱ्या दिवशीं सर्व मंडळी कोरगावांस गेली. तेथील देवालयांत कलावंतीणीचा नाच, गायन पाहून देवसांत आली. तेथील नदींत बोटींतून थोडासा जलविहार केल्यावर पुनः बारा साडेबारांच्या सुमारास पेडण्यास येऊन पोंहोंचली. नंतर रेपारतीसांव, पोष्ठ, तेलिग्राफी, देलेगासी द साऊद वगैरे सरकारी आफिसांची पाहाणी झाल्यावर गोवेरनादोर साहेबांची स्वारी श्री. धनुदाजी यांचा हातमागांचा कारखाना पहावयास गेली. सर्व कारखाना व त्यांतच तयार झालेल्या साड्या-वादी इत्यादिकांनीं मढविला होता. सूत कसें काढतात ताणे कसे मांडतात, माग कसे चालवितात या सर्व गोष्टींचें त्यानीं बारीक निरीक्षण केलें. नंतर धनुदाजी यांनीं आपला आद्रेस वाचून दाखविला त्यांत या गोवेरनादोर साहेबांनीं गोव्यांत औद्योगिक प्रगतीस प्रोत्साहन दिलें म्हणून त्यांचा गौरव केलेला होता. त्यांस उत्तर दिल्यावर धनुदाजी यांच्या घरीं त्यांस अल्पाहार देण्यांत आला. संध्याकाळीं भगवतीच्या देवालयांत पालखीचा समारंभ पाहिल्यावर सातकंनीचा खेळ पाहाण्यास सर्व मंडळी गेली. व खेळ आटोपल्यावर खाना वगैरे होऊन तिसऱ्या दिवशींचा प्रोग्राम खलास झाला.

चवथ्या दिवशीं सकाळीं विस्कोंदीच्या बंगल्यावर फोटोग्राफ घेण्याची व्यवस्था केलेली होती. नंतर उपाहार वगैरे होऊन दहा अकरांच्या सुमारास सर्व मंडळी आरोबेकर देसाई यांच्या निमंत्रणावरून मोटारींतून आरोब्यास निघून गेली.

आरोब्यावर देसाई यांच्या घरासमोरील रस्त्यावर दुतर्फा शिपाई उभे केलेले होते देसाई यांचा सरदारी थाटाचा सरंजाम, त्यांचा टोलेजंग वाडा, त्यांतील पूर्वकालीन शस्त्रांनीं भरून गेलेलें शस्त्रागार विशेषतः देसाई यांच्या लहान पौत्रानीं आगमन प्रसंगीं वाचलेला discurso वगैरे एकंदर गोष्टींनीं गोवेरनादोर व त्यांच्या पत्नी अत्यंत खूष झालेलीं दिसलीं. त्या मुलाचा व इतर दर्शनीय वस्तूंचा मुद्दाम फोटोग्राफर आणवून त्यांनीं फोटो काढून घेतला. नंतर त्यांस खाना वगैरे देण्यांत आल्यावर संध्याकाळपर्यंत तेथेंच राहून पांच वाजण्याच्या सुमारास गोवेरनादोर साहेबांची स्वारी पेडणें कोंसेल्यास शेवटचा राम राम ठोकून त्याच वाटेनें आपल्या राजधानीस निघून गेली.

आरोबा सोडल्यावेळीं ह्या पाहुणे मंडळीपैकीं एका कडून उद्गार निघालेले येथें लिहिणें युक्त वाटतें. ते हे. “ आरोबेवर आह्मांस हा प्रत्यक्ष मिळालेला अनुभव व पेडण्यास आह्मांस दिली गेलेली माहिती लक्षांत आणतां वस्तुस्थितीचा इतका विपर्यास आजपर्यंत तरी आमच्या कोठें नजरेस पडला नव्हता ” आह्मांस जरी ह्या त्यांच्या बोलण्याचा रोंख बरोबर समजला नाहीं तरी पण कोठें तरी खल भुजंगानें आपल्या जिव्हास्त्राचा प्रताप गाजविला असावा अशी आमची अटकळ झालीच.

अशा रितीनें इतके दिवस होऊं घातलेला हा गोवेरनादोर साहेबांचा आगमन समारंभ एकदांचा पार पडला. मोटारींचा सुळसुळाट, दिव्यांचा लखलखाट, दारुसामान व फटाक्यांचा कडकडाट इत्यादिच्या योगानें पेडण्यास प्रति मुंबई बनविण्याची विस्कोंद साहेबांची दृढ महत्वाकांक्षा एक लक्षांश हिश्शानें कां होईना पण अंशतः तरी सफल झाली हें कोणासही नाकबूल करतां यावयाचें नाहीं. यांत कोंवड्या डुकराचे किती बळी घेतले, दारूच्या बाटल्यांचे किती बूच उडाले यांचा हिशेब एकादा प्राणीसंरक्षक किंवा मद्यपाननिषेधक मंडळाचा चिटणीस असता तर त्यानें बरोबर दाखविला असता.

गोवेरनादोर याच्या प्रयाणानंतर आदमिनिस्त्रादोर काम्राचे प्रेजीदेंत, विस्कोंद व आरोबेकर देसाई यांस आभार दर्शक तेलिग्राम आल्याचें ऐकतों. त्यांत पहिले दोन शिष्टाचारास अनुसरूनच आहेत पण आरोबेकर देसाई यांच्या सारख्या आद्य घराण्यानें वेळोवेळ दाखविलेल्या राजनिष्ठेबद्दल गौरवपर शब्दांनीं उल्लेख करून अत्यंत प्रेमपुरस्सर त्यानीं त्यांचे अभीष्ट चिंतन केलेलें आहे. विस्कोंद साहेबांस केलेल्या विद्युत् संदेशांत, एखाद्या सेवकाप्रमाणें अहर्निश आपल्या सेवेंत राबल्याबद्दल त्यांचे अत्यंत कृतज्ञतापूर्वक आभार मानलेले आहेत व विस्कोंद साहेब हजारों रुपये खर्च करून यांतच धन्यता मानून घेत आहेत.

ANUNCIOS

Pelo juizo de Direito da Comarca de Qnepem e cartorio do escrivão do 1.° oficio Redcar á instancia do ex quente M. P. vão ser vendidos em hasta publica á porta do Tribunal Judicial desta comarca situado em Xeldem, no dia 2 de Fevereiro proximo pelas 15 horas, pelo preço da sua avaliação os seguintes bens: Vigessima oitava parte do predio rustico denominado "Cariagalimola", descrito na conservatoria do Registo Predial desta comarca sob o n° 15689 avaliada por 20:00:00. Predio rustico denominado "Moquiecodil tucdo" da cultura de coqueiros, descrito sob o n.° 16236, avaliado por 100:00:00 Predio rustico denominado "Dercasonapoiquim Guddó" da cultura de coqueiros, descrito sob n.° 16237, e avaliado por 90:00:00. Predio rustico denominado "Dercasonapoiquim Guddó" da cultura de coqueiros descrito sob o n° 16238 e avaliado por 80:00:0 E predio rustico denominado "Cazona-Condo" da cultura de coqueiros, descrito sob o n.° 16239 e avaliado por 50:00:00 todos situados em Assoldá —

Estes predios foram penhorados na execução por custas que o M. P. promove contra Bagoroti Rautina, viuva de Giú vulgo Ryama Gongó Rauto, de Assoldá, por apenso ao inventario orfanologico a que se procedeu por obito de dito Giú —Por este são citados todos os credores incertos da dita executada, e bem assim os coproprietarios, nos termos e para os efeitos da lei. Quem os quizer arrematar, compareça nos indicados dia, horas e local, correndo por conta do arrematante as despezas da praça e a contribuição do registo por inteiro.

E para ser publico se expediu este.

Xeldem 16 de Janeiro de 1923.

O escrivão de Direito do 1.° oficio,

BABU V. CAMOTIM REDCAR

Verifiquei. O Juiz de Direito,

A. MEIRELES.

प्रसा—भारतमित्र, रिवण गोवा. | सरदेसाई यानी मालेचा समारोप करून | 1 | पो. किर्लोस्करवाडी जि सातारा ॥

Considerando que neste concelho ha cidadaos dotados de bom criterio e conhecedores das necessidades do publico-cidadaos para cuja iniciativa,boa vontade e ponderaçao convem apelar convindando-os a cooperar com a camara no meritorio empenho de promover o bem estar dos municipes;

Proponho: –

1.° Que os cidadaos do rol infra sejam convidados a se reunirem nos paços municipais no dia 1 do seguinte mez dia da sessao da camara, ou em qualquer outro local ate' aquele dia e formular o plano de caminhos que devam ser reparados no corrente ano.

2.° Que da administraçao do concelho se solicitem providencias no sentido de que pelas respetivas regedorias sejam enviadas as relaçoes de caminhos que reclamam concertos.

3.° Que recebidas por esta Camara as relaçoes das regedorias e o plano apresentado pelos cidadaos, se introduzam nele, de acordo com o sr. administrador do concelho, as alteraçoes que as circunstancias aconselharem e confecionado assim difinitivamente e mesmo plano seja ele posto em execuçao.

Ecos & Critica

Pragatica-Sangh

A reuniao desta associaçao politica realisada no dia 27 do mez proximo findo na apalaçada residencia dos acre'ditados e conhecidos negociantes srs. Pandnronga V. Naique e irmaos de Margao foi, a todos os titulos, muito animadora pelas importantes propostas que nela foram aprovadas.

Alem de quase todos os membros [illegible] do Sangh, vi[illegible] cordialidade que deveras nos entusiasmou exteriorisaram a sua melhor boa vontade pelo progresso da associaçao, tendo havido muitas inscriçoes novas.

Os assistentes, na sua maioria, foram hospedados fidalgamente pelos srs irmaos Naiques e pelo ativo secretario do Sangh sr. Puruxotoma Suquercar.

A seguinte reuniao tera' tambem lugar em Margao em 24 do proximo mez de Março.

Sobre as propostas falaremos mais de espaço na seguinte ediçao do BHARAT.

1.° Sargento Counto

O sr. Counto que vegetou por alguns anos em 2.° sargento foi, finalmente, promovido ao posto de 1.° sargento, sendo natural que em um futuro nao muito longinquo se inscreva na lista de oficiais.

O sr. Counto e' o primeiro hindu SARASVATA que alcançou aquele posto, tendo, durante a sua brilhante carreira, dado sobejas provas da sua dedicaçao aos poderes constituidos e demonstrado que os SARASVATAS, quando militares, sabem tambem honrar, igualmente, as suas funcçoes, sendo, porisso, sob todos os pontos de vista, injusta e descabida a proibiçao a que noutro lugar se aludiu. E' que contra factos nao ha' argumentos.

Ao brioso sargento Counto apresenta o BHARAT os seus sinceros cumprimentos pela sua promoçao.

Santo?

Informa-nos o sr. Po. Vigario da egreja desta freguezia, que é infundada a noticia, publicada no BHARAT, sob a epigrafe acima Mas ha tambem quem a confirme.

Aguardemos porem o relato do nosso REPORTER.

भारत

गुरुवार माघ शु० १५ ता १८५४

परावलंबी शिक्षण.

गतांकीं याच मथळयाच्या लेखांत पोर्तुगीज लोकांची सांप्रतची स्थिति लोकांसमोर ठेविली होती. आतां इंग्लिश बहादरां बद्दलहि विचार करूं.

इंग्लिश लोक आपलें संभाळून दुसऱ्याचें संपादन करण्यांत तरबेज; मूळचा व्यापार उद्योग सोडलेला नाहीं; यांत्रिक कलेंत व कलाकौशल्यांत हुषार; शेतकींत पटाईत; कलमबहादर ! एवंच सर्व गुण आज त्यांच्यांत वसत आहेत आणि ह्मणूनच आज सर्व जगावर ते आपला ताबा मिरवित असून, जगांतील सर्व संपत्ति ते आपल्या देशीं नेत आहेत. बरें, इंग्लिश सरकार पक्की प्रजेस कडकपणें वागवितें खरें, पण आपले थोडे गुणहि त्यांस लाविते; स्वतः त्यांची वस्तुस्थिति समजून घेऊन, त्याच्याच चालीनें थोडें आपणहि चालतें त्यांच्या वाङ्मयाचें, शेतीचें व इतर देशस्थितीचें स्वतः ज्ञान करून घेऊन, तें त्यांस त्यांच्या भाषांतून करून देतें; त्यांस प्रथम त्यांच्याच जन्मभाषांतून शिक्षण देतें. आपली भाषाहि त्यांस प्रथम त्यांच्याच भाषांतून शिकवित नाहीं; तरी थोडेंसें तरी मनापासून करीत 'यथाराजा तथाप्रजा' या न्यायानें इंग्रजांचा संसर्ग सहवासाच्या योगानें त्यास लागलेला आहे आणि त्यायोगें तेहि त्यांच्याच प्रमाणें होऊं पहात आहेत. सदाच कदान्न खाणाऱ्यास व पक्वान्नें न पहाणाऱ्यांस पक्वान्नाची गोडी कळत नाहीं व कदान्नच चांगलें लागतें. पण त्यांस थोडें फार पक्वान्न खावयास मिळालें असेल, त्यांस मग कदान्नाचा वीट येतो व ते पक्वान्नच शोधितात. त्याप्रमाणें इंग्लिश प्रजाजनास इंग्लिशांचें पक्वान्न पाहण्यासच व थोडें फार खावयास मिळाल्यामुळें, त्यांस आतां आपणास देण्यांत येत असलेलें अन्न कदान्न वाटून ते त्यांच्याच प्रमाणें आपणहि पक्वान्नें सेवन करूं पहात आहेत ही गोष्ट वेगळी. पण ही जी पक्वान्नाची अभिरुचि त्यांस उत्पन्न झाली ती त्यांनीं त्यांच्या दृष्टीस व जिभेस आपलें पक्वान्न दाखविल्यामुळें किंवा तीं त्यांच्या दृष्टीस पडल्यामुळें; पण त्यांचें कदान्न ह्मणजे आपल्यासारखें मात्र कदान्न नव्हे. आमच्या प्रमाणें त्यांचेंहि कदान्न असतें, तर केळकर साहेब इकडे आले असते काय ? इकडचा असा कोण माणूस तिकडे इंग्लिश सरकारनें कधीं नेला आहे काय ? कां नेतील ? तिकडे अशा माणसांचा अभाव असल्यास ना नेण्याची गोष्ट ! स्वतः इंग्लिशांची एक एक गोष्ट पाहिली ह्मणजे मनुष्य आश्चर्यानें थक्क होऊन जातो ! अशा आश्चर्याच्या गोष्टी तिकडेचशा काय पण इकडे आमच्या मुलुखांत हवेंत तुकामी सुद्धां दृष्टीस पडतात. अशीं कामें तूर्तच्या पोर्तुगेजांकडून झालेलीं दृष्टीस पडत नाहींत. त्यांकडून झालेलीं व दृष्टीस पडत असलेलीं आश्चर्याचीं कामें ह्मणजे वास्तराचा मोडलेला पूल, अर्धवट स्थितींत राहिलेलें बोरीच्या पूलाचें काम इत्यादिनेक मात्र होत ! व हीं कामें पूर्ण करण्यास इकडे ओघानें पुष्कळ खर्चांत पुष्कळ इंजिनियर भला लठ्ठ पगार खात पडलेले असतां, तिकडील एका इंग्लिश कंपनीस कंत्राटानें देण्याचें घाटत असल्याचें कळतें ! मग अशा लोकांस इंग्लिश सरकार तिकडे कसें नेईल ?

नोकरांकडून काम करून घेण्यास धनी हुषार असला पाहिजे. नोकराकडून काम करून घेण्याची अक्कल धन्यांत नसली ह्मणजे नोकरांकडून काम चांगलें वठून येत नाहीं आणि याचेंच प्रत्यंतर केळकर होत. आज किती महिने हे केळकरसाहेब भला मोठा लठ्ठ पगार खात इकडे आहेत [illegible] झालें आहे? शेतींत किंवा शेतकऱ्यांत कांहीं सुधारणा झाल्याची तर कोठेंच दृष्टीस पडत नाहीं. तिजोरींतील पैका मात्र नाहींसा होत आहे. आणि याचें कारण आमच्या सरकारचाच हलगर्जीपणा !

यावरून आह्मी पोर्तुगीज लोकांची नालस्ती करूं पाहतों, असें मात्र कोणीं समजूं नये, त्यांच्या विषयीं पूज्यबुद्धि असल्यावरून, कडू पण परिणामीं गोड औषध जसें मुलांस पाजितात, तसेंच हें लिहिणें आहे. त्यांचा स्वभाव किंवा सहवास पूर्वींसारखा [इंक्विजिसांवच्या कालासारखा] दुष्ट नाहीं आणि आतां तर आह्मांस त्यानीं आवतोनोमी दिली आहे हें खरें; पण त्यांकडून देण्यांत येत असलेलें शिक्षण मात्र व्यवहारिक व देश स्थितीस धरून नसून, तें नुसतें पुस्तकी किंवा पोटपंची व विदेशीपद्धतीचें असल्यावरून इकडच्या लोकांस त्याचा उपयोग नाहीं, एवढेंच सांगण्याचा मूळ उद्देश आहे. आतां 'अप्रियस्यच पथ्यस्य श्रोतावक्ताच दुर्लभः' असें एका कवीनें ह्मटलें आहे तें खरें, पण खरी वस्तुस्थिति निदर्शनास आणल्याशिवाय तींतील वैगुण्य नाहींसें होत नाहीं सबब अप्रिय पण पथ्यकर प्रसंगविशेषीं बोलावें लागतें. चांगलें हें कोणापासूनहि घ्यावें लागतें आणि याच दृष्टीनें इंग्लिशांचें जें चांगलें दिसलें तें दाखविण्यांत आलें, ह्मणून ते किंवा त्यांचें सर्वच कांहीं चांगलें व पोर्तुगिजांचें सर्वच कांहीं वाईट असें दाखविण्याचा मुळीच हेतु नाहीं. बरें वाईट हें दोघांतहि असूं शकेल. आतां पोर्तुगीज शिक्षणविषयीं खुद्द त्यांचाच एक ग्रंथकार काय ह्मणतो पहा: —

"ज्ञानसंपन्न असलेल्या किंवा नसलेल्या राष्ट्रांची तुलना केल्यास पोर्तुगाल व स्पेन सारख्या कांहीं राष्ट्रांला जग व संस्कृतींतील कसल्याच आनंददायक व सौंदर्यकारक वस्तूंची माहिती नाहीं. ह्मणजे कूपमंडूक स्थितींत आहेत. पर, इंग्लंड, फ्रान्स व जर्मनी सारख्या दुसऱ्या कांहीं राष्ट्रांना ज्ञान. सूर्य तळपत आहे, सर्व कांहीं जाणण्यांत येत आहे व सामाजिक मनुष्याच्या सुखाला प्रतिबंध करणारा असा कसलाच अडथळा नाहीं"

असो इकडच्या पोर्तुगिज शिक्षण पद्धतीपेक्षां हिंदुस्थानांतील इंग्लिश शिक्षणपद्धति कांहींशी बरी वाटते. तेथें हिंदुस्थानचा इतिहास व भूगोल, देशी व इंग्लिश भाषेंत शिकविला जातो. संस्कृत वाङ्मय शिकवलें जातें देशी शिक्षण व प्रथमचें कांहीं इंग्लिश शिक्षण देशी भाषेंतून दिलें जातें.

हिंदुस्थान हा शेतकीप्रधान देश असल्यामुळें देशी शेती विषयींहि शिक्षण दिलें जातें; आणि देशी वनस्पतींचीहि माहिती करून देण्यांत येते. इंग्लिश लोक स्वतः स्वदेशी वाङ्मयाचेंच अध्ययन करून स्वस्थ बसणारे नव्हेत. त्यांनाहि दुसऱ्यांच्या वाङ्मयाच्या परिशीलनाची गोडी असते. व हाच त्यांचा विशेष वाखाणण्या जोगा गुण आहे. हिंदुस्थानचें सर्व वाङ्मय त्यांनीं आपलेसें करून टाकिलें आहे. तेथील शिक्षण जरी व्यावहारिक, राष्ट्रीय व निर्मळ स्वरूपाचें नाहीं व ही गोष्ट जरी खरी असली, तरी येथल्या शिक्षणापेक्षां तें पुष्कळ उच्च स्वरूपाचें असावें असें वाटतें. तिकडे शिक्षणांत देशी असें कांहीं तरी आहे, पण तेंच इकडे कोठें आहे ? इकडचें शिक्षण ह्मणजे फार करून सरकारची नोकरी करण्याच्या कामापुरतें ! इकडच्या व्यवहारोपयोगी असें तें नव्हे. कोण ही शोचनीय स्थिति ? अशा निरुपयोगी शिक्षणाला काय ह्मणावें ?

पोर्तुगीज इतिहास इकडे आमच्या काय कामाचा ? आह्मांला प्रथम गोमांतकाचा व हिंदुस्थानच्या इतिहासाचें ज्ञान व्हावयास पाहिजे व मग इतर देशांचें. पण इकडे लक्ष देतो कोण ?

आमच्या तूर्तच्या गव्हर्नरनें इकडच्या पोर्तुगिज शिक्षणांत सुधारणा होण्याविषयींचा एक मसुदा करून तो इकडून पास करून पोर्तुगालांत पास करवून आणण्याकरितां पाठविला आहे. व तो तिकडे कमजास्त फेरफार होऊन पास झाल्याचेंहि वर्तमानपत्रांतून समजून येतें. ह्या मसुद्यांत त्यानीं सुधारणा अशी जरी कांहीं केली असली तरी ती इकडच्या देशस्थितीस अनुसरून व्यावहारिक स्वरूपाची मात्र खास नाहीं. ह्मणून ती त्या दृष्टीनें होण्याविषयीं किंवा करून घेण्याविषयीं सरकारास व जनतेस आमची सूचना आहे.

Sua Excia

Em visita oficial é esperado hoje aqui Sua Exa. o sr. Governador Geral. Agradecemos o convite do sr. Presidente da Camara para sua recepção.

O Heraldo

Completou mais um anno de sua publicaçao este primeiro diario, fundado nas colonias portuguezas pelo sr. Messias Gomes, cujos sacrificios pela manutensao do seu importante e popular jornal sao de todos conhecidos. Felicitamo-lo.

कानां सुखी करीते. अशाच रितीनें बैलहि शेंकडो मण धान्य उत्पन्न करित असतो. शिवाय एका गाईस फार तर आठ किंवा दहा विती होतात. यावरून त्यांची उत्पत्तिहि बकरीमेंढरें, डुकरें, कोंबडीं, बदकें वगैरे प्रमाणें मुबलक होत नाहीं हें सिद्ध आहे. अशा जनावरांची दया न करणें ह्मणजे मानवी महत्वाकांक्षेची आसुरी वृत्तीची कमालच आहे असें ह्मणणें केव्हांहि गैरवाजवी होणार नाहीं, असें आह्मांस वाटतें. गोमांतकामध्यें सान् फ्रान्सिसचें प्रदर्शन चालू होतें. ही आनंदाची गोष्ट होती. तरी त्या बरोबर आमच्या गोमातेची मात्र ठिकठिकाणीं जी कत्तल सुरू झाली ती अक्षम्य होती. तो देखावा पाहून कोणाच्या अंगावर रोमांच उभे रहाणार नाहींत ? असा जर कोणी असेल तर तो निर्दय खाटीकच असला पाहिजे. गेल्या एका भारताचे अंकांत आह्मीं मडगांवचे गोहत्येसंबंधीं लिहिलें होतें. दुःखाची गोष्ट आहे कीं, त्या च प्रमाणें रायबंदर येथें चर्चजवळ खाडीचे किनारी परंतु अगदीं उघड्यावर अशाच रितीनें हा कसाई लोकांच्या खुळखुळ सुरी फिरविण्याचा भयंकर कारखाना उघडलेला आहे. पिळगांवचे वाफरावर पुष्कळशी हिंदूंची गर्दी असते. साष्टीचे वाफरावर तर विचारावयास नकोच. वाफर चालू असतां सहजगत्या सुरीने त्यांचें किळसवाणें प्रदर्शन दिसण्यांत येतें. त्यामुळें हिंदूंचीं मने जे अस्सल धर्माभिमानी असतील त्यांचीं मनें हा देखावा निदर्शनास आल्यामुळें थिथरल्याशिवाय राहत नाहींत. हिंदुधर्माचा अशा रितीनें उघड अपमान होणें हें पोर्तुगीज सरकारच्या न्यायप्रियतेला बाधा आणणारें आहे. करितां याचा विचार पणजीच्या मुनिसिपाल कमेटीनें अवश्य करून हें हिंदूंना अपमानास्पद होणारें कृत्य बंद करून, ती हननकुंडाची जागा तेथून कोठें तरी एकांत ठिकाणीं नेण्यांत यावी. या साठीं रायबंदर येथील हिंदु लोकांनीं ही गोष्ट अमलांत येईपर्यंत न थांबतां झटून प्रयत्न केला पाहिजे. या कार्यांत ख्रिश्चन लोक सुद्धां मनापासून मदत करतील, कारण तें राक्षसी कृत्य त्या णाऱ्या लोकानासुद्धां पाहण्याचें जिवावर येतें. याचें उदाहरण ता. २१-१२-२२ रोजीं हें शरीर पणजीहून तदडी बोटीनें जुने गोवें येथें येत असता कांहीं ख्रिश्चन धर्मानुयायी मद्रासी बायकाना रायबंदरचें अघोरी गोहननाचें कृत्य दृष्टोत्पत्तीस येऊन त्यांच्या हृदयांत कालवाकालव सुरु झाली. व त्या हळहळूं लागल्या. त्यांच्यांत त्यासंबंधीं चर्चा सुरू झालेली या शरीराचे निदर्शनास आली तरी त्यांची भाषा अवगत नसल्यामुळें सहजच त्या भयंकर हननकुंडाकडे लक्ष गेलें व डोळे झांकण्याची पाळी आली. आह्मीं हिंदूनीं तें पाहणें केव्हांहि शक्यच नाहीं. तात्पर्य किरिस्तांव लोकांना सुद्धां हें निचकर्म पाहताना इतकी दया उत्पन्न होते तर हिंदूंचें आदरणीय, पूजनीय, वंदनीय असें जें मर्मस्थान त्याचेच जर करितां सुरी फिरविली तर त्यांचें हृदय करपून जाणार नाहीं काय ? याचा भारतहितेच्छु वाचकगण विचार करतीलच सारांश अशा तऱ्हेनें उघड्या रस्त्यावर गोहत्येचें कृत्य बेकायदेशीरपणानें करण्याचा प्रघात बंद करण्याकडे सरकारचें वेळींच लक्ष वेधावें या हेतूनें ही वाचकांस तसदी देऊन त्यांची रजा घेतों.

"पूर्णाश्रम"

इषारत

[गोमांतकांतील बेजबाबदार लेखकांस]

आद्यकवीचें ×महाकाव्य तें जिव्हेवरि नाचत आलें,
काय असें त्यानीं लिहिलें ?
ज्ञानदेव कृति शिरीं धारण महाराष्ट्र कासया करी—
जरा विचारा करा
आजवरी सन्यास घेउनी गेले किति करूनी त्रागा ?—
रामदास एकचि जागा !
आजवरी कां थोडे झाले अभंग रचण्यांतचि चूर ?—
'तुका ह्मणे' देई धीर !
कोरा कागद काळी शाई करिति टिका भाराभर
स्मरणी परी भांडारकर !
एकेकाची कृती पाहुनी सहज लवे चरणीं माथा .....
पुढति काय बोलू आतां ?
द्वेश मत्सराविणें न चाले काय तुमचि १वार्गिका पुढें—
ह्मणुनि मत्सरा बळी पडे ?
परस्परांचे दोप पाहतां हार खाति कोण कोण ?
जरा करा स्वपरीक्षण
आत्मपरिक्षणं कुणी करावें--बृहस्पती झाले सगळे—
अभिमानें फुटले डोळे !
जीव तळमळे, हृदय धडधडे, आंतड्यांस पडती पीळ
लेख वाचुनीं चवचाल
आशा ज्यांची मनांत केली तेच असे हे वेताळ--
पुरें कोसळे आभाळ !
शब्द सृष्टिचे ईश्वर सगळे परी कुणाचे बोल खडे ?--
प्रथम पाहि जो स्वताकडे !
बरवें अथवा वाईट माना ! भाट न आम्हीं कोणाचे !
सत्य तेंच बोलूं वाचे।
झालें गेलें ! सावध आतां; पुढती अशी गुरु-जन निंदा
कानीं न पडो गोविंदा !

श्रीधरसुत-नायक
मुंबई

×रामायण. १ लेखणी

भारत

pagos os seus escrivaes, procurou-se melhorar a situaçao destes, organisando alguns grupos das mesmas comunidades.

Era sensata a medida tanto mais que o beneficio do aumento de vencimentos, posto em pratica noutras partes, nao teve aplicaçao aqui.

Mas o Boletim Oficial de 9 do corrente anuncia concurso para o preenchimento dalgmas vagas de escrivaes das que actualmente se encontram agrupadas. E isto sem sciencia da administraçao concelhia.

E' claro que o mesmo concurso provocou reclamaçao por parte dos lesados, reclamaçao qua e' justa, a todos os titulos, como a dita administraçao aprouve informa-lo.

E justa, como ela o e' esperamos qne sera' prontamente atendida.

Barulho eleitoral

Noutro lugar inserimos uma local referente a' cha ada posse da camara municipal de Sanguem.

Depo's de pronta a mesma, recebemos uma folha avulsa firmada por Um Eleitor que poe a' mostra em poucas mas claras palavras as perpecias do lamentavel caso.

Aguardamos, anciosamente, o seu desfecho para nos pronunciarmos sobre o mesmo barulho eleitoral.

Coco

Tem baixado consideravelmente o prego deste nosso principal artigo de exportaçao cuja produçao tambem vai diminuindo.

Basta saber-se que palmares que produziam dez mil cocos, dao, hoje em termo medio, mil cocos!

E, todavia e' certo que se pretende inculcar que a situaçao do proprietario e' das melhores...

E' so' ver e crer.

Pigmeu

Consta-nos que foi suspenso pelo Governo este semanario de Pangim pelos motivos que nao sabemos precisar.

Lamentamos o contratempo do nosso presado colega.

Expediente

Pedimos aos nossos assinantes a fineza de saldarem as suas assinaturas em atrazo, que pelos melhoramentos que estamos intr duzindo no *Bharat* não podemos delas prescindir.

लेखणीचे कटाक्ष

—संदेशांतील एका लेखकानें गोमांतकीय मुनिसिपालट्या अगदी स्वतंत्र असून त्यांच्यावर सरकारचें कसलेंच नियंत्रण नाहीं असें छातीठोक विधान ठोकलें आहे. पण—

—येथील स्मशानांतील एका मृत देहांतून रक्त निघाल्याचें 'शुभ वर्तमान' दुसरीकडे दिलें आहे. नवीन कादिंबरींनाहि एखाद्या शाप्रदर्शनाची गर्भधारणा होत आहे कीं काय?

—येत्या अंकीं गोवेर्नादोर यांची पेडण्यास भेट' व 'सांने येथील पोरखेळ' हे लेख प्रसिद्ध होतील.

भारत

गुरुवार माघ शु॰ ९ मी १८४४

परावलंबी शिक्षण.

कोणतेंहि शिक्षण जसें प्रथमत: स्वभाषेंतून मिळणें आवश्यक आहे, तसेंच त्यांतून प्रथमत: स्वदेशांतील वस्तूंचें ज्ञान होणें अत्यावश्यक आहे. असें न होतां जर परभाषेंतूनच परदेशातील वस्तूंचें ज्ञान करून देण्यांत आलें व भाषेविषयीं व स्वदेशांतील वस्तूंविषयीं अज्ञानच राहूं दिलें तर त्या शिक्षणाचा व ज्ञानाचा उपयोग काय? आपल्यांत असलेलें अज्ञान नाहींसें करून, ज्ञानप्राप्ति करून घेणें हेंच शिक्षणाचें मुख्य उद्दीष्ट असतें. आपल्या घरच्या वस्तूंची व व्यवहाराची माहिती नाहीं, आपल्या गांवांतील विवक्षीत स्थळांविषयीं रीतिभाती विषयीं व व्यवहाराविषयीं गैरमाहिती व स्वदेशांतील एकंदर वस्तुस्थितीविषयीं अज्ञान असलें आणि तेंच परदेशांतील नव्हे जगांतील वस्तुस्थितीचें ज्ञान होऊन स्वदेशीं, स्वगांवीं व स्वगृहीं वास्तव्य करावें लागलें, तर आपणास त्या बाह्य ज्ञानाचा आपल्या देशीं गांवीं व गृहीं स्वतःकडे कितीसा उपयोग होईल? जसें 'कूपमंडुक'वत् ज्ञान उपयोगी नाहीं, तसेंच स्वतःविषयीं अज्ञानी राहून बाह्य जगाविषयीं ज्ञानाचा हि तादृश्य फायदा नाहीं. म्हणून प्रत्येक मनुष्यास प्रथम स्वतःविषयीं म्हणजे स्वगृहींच्या, स्वगांवींच्या व स्वदेशींच्या वस्तुस्थितीविषयीं ज्ञान होणें अगत्याचें असून नंतर बाह्य जगाच्या वस्तुस्थितीचें ज्ञान होणें जरूर आहे.

राष्ट्र एकदां जीत झालें म्हणजे त्याचें स्वावलंबन नष्ट होऊन तें अगदीं परावलंबी होतें. असेंच तूर्त आपलें झालें आहे. आमच्यावर राज्य करणाऱ्या परकी लोकांचेंच सर्व कांहीं आम्हांस प्राप्त होत आहे. आमचें स्वताचें म्हणून त्यांत कांहीं नसतें व तसें तें असण्याविषयींहि आम्हीं कधींच प्रयत्न करीत नसतों. 'स्वस्थ रहावें। हरि [परकी राज्यकर्ते] ठेवील तैसें रहावें' हीच आमची परावलंबी वृत्ति असते. आणि म्हणूनच आम्हांसारख्या जीत राष्ट्राची कधींच उन्नति होत नसते. व तें स्वताःविषयीं अज्ञान असतें

हें इतकें लिहिण्याचें कारण सध्या आपणास आमच्या राज्यकर्त्यांकडून मिळत असलेलें शिक्षण हें होय. आम्हांस सध्या जें सरकारकडून शिक्षण मिळतें, तें प्रथम आमच्या भाषेंतून शिक्षण मिळत नाहीं, तसेंच आमच्या देशाच्या इतिहासाचें, भूगोलचें वनस्पतीचें शेतीभातीचें वगैरे ज्ञानहि आम्हास करून देण्यांत येत नसतें. जें काय देण्यांत येत असतें, तें सर्व या देशा बाहेरील असतें. पहा ना, भाषा पोर्तुगीज, इतिहास पोर्तुगीज लोकांचा व जगाचा (बहुधा युरोपचा)! भूगोल थोडासा इकडचा व विशेष पोर्तुगालचा व जगाचा, वनस्पतीचें ज्ञानहि पोर्तुगाल देशांतील! अशा शिक्षणापासून आम्हांस प्रत्यक्ष काय फायदा? ज्ञान हें आम्हांस इकडे कशाशीं खावयाचें आहे? स्वतःविषयीं कांहींच माहिती नाहीं, आणि परकीय देशेपांडित्य काय कामाचें? इकडच्या कोंकणी, मराठी संस्कृत वगैरे देशी वाङ्मयाविषयीं अज्ञान इकडच्या इतिहासाची व भूगोलची थोडी फार माहिती नाहीं, व देशी वनस्पती व शेती विषयींहि अज्ञान! अशा स्थितींत परदेशांतील वस्तुस्थितीचें ज्ञान इकडे राहणाऱ्या लोकांच्या काय उपयोगी?! इकडे कोणीच परकी सरकार व स्वदेशी लोक— लक्ष देत नाहींत आणि याचें कारण आमच्या सरकाराच्या अमलाखालीं प्रजेस झालेली परावलंबनाची संवय हें होय. सरकारास स्वावलंबनाचीच आवश्यकता असते, परकी प्रजेस स्वावलंबी करून परकी सरकारचा फायदा नसतो याचें कारण प्रजेस स्वावलंबी बनविल्यास परकी सरकारास मग आपलें परदेशांतील चंबुगवाळें आटोपतें घेऊन तेथून पलायन करण्याचा प्रसंग येईल, ही भीति असते हें होय. इसापनीतींतील 'कोल्ही व सिंहीणीचें पोर' यांची एक गोष्ट आहे ती अशी —एकदां एका कोल्हीस रानांत एक सिंहीणीचें पिलूं सांपडलें. तें तिनें आपल्या घरीं आणून आपल्या पिलांबरोबर त्याचें संगोपन केलें. कोल्ह्याच्या संगतींत वाढलेल्या सिंहाला कोल्हीचें शिक्षण मिळाल्यामुळें तो स्वतःला विसरला व कोल्ह्यांसारखा वागूं लागला. वास्तविक पहातां कोल्हे हे त्याचें भक्ष होतें. पण ती त्यांची जाणीव कोल्ह्यांच्या सहवासानें व शिक्षणानें कांहीं काल नष्ट झाली व आपणहि कोल्हा असें त्यास स्वतःस वाटूं लागलें. कोल्हीनेंहि यास त्याची जाणीव करून दिली नाहीं कारण त्याची त्यास स्वःताची ओळख करून दिल्यास तो आपल्या पिलांस खाऊन टाकल्याविना कदापि रहाणार नाहीं ही भीति वाटत होती हें होय. अशा योगानें सिंह आपल्या 'स्वत्वास विसरला व निसर्गसिद्ध स्वभावावर कांहीं काल विरजण पडलें. पण त्याच सिंहास जेव्हां का दुसरा, सिंह भेटून त्यानें त्याचें स्वरूपाविष्करण केलें, तेव्हां त्यास आपल्या मूळ स्वरूपाचें ज्ञान झालें व तेव्हांच कोल्ह्यांस त्याचा त्याग करावा लागला! व तो त्यांपासून निराळा होऊन आपल्या कळपांत चालता झाला.

अशीच गोष्ट परकी सरकार व प्रजा यांची आहे; हें एक कारण झालें, दुसरें कारण हें कीं, परकी राज्यकर्त्यांस परकी देशांतील एकंदर वस्तुस्थितीचें यथार्थ ज्ञान करून घेऊन तें मग आपल्या परावलंबी प्रजेस करून देण्याच्या जिज्ञासेचा अभाव असणें. हीं दोन्हीं कारणें आमच्या सरकारास तंतोतंत लागू असून, प्रजेची स्थिती तर इसापनीतींतील वरील गोष्टींतल्या सिंहाप्रमाणें आहे.

बरें, आमच्या राज्यकर्त्यांची स्थितिहि तरी पूर्वीप्रमाणेंच कोठें आहे? ते पूर्वी जल पर्यटन करणारे, शोध लावणारे, व साहस करणारे, व्यापार उदीम करणारे, लढाई मारणारे, दुसऱ्यांस जिंकणारे, व त्यावर आपला अंमल बसविणारे शिल्पशास्त्रज्ञ, यांत्रिक कलेंत निष्णात, शेती करणारे काव्य करणारे, राजकार्य धुरंधर असे होते. पण हे गुण आज त्यांच्यात कोठें आहेत? आज त्यांच्यांत त्यांच्या इतिहासवर्णनाशिवाय कांहीं तरी दृष्टोत्पत्तीस येतें काय? बहुधा याचें नकारार्थींच उत्तर येईल. असें वाटतें. मग असे गुण ज्यांच्यातून अंतर्धान पावले, ते आपल्या प्रजेस स्वावलंबी कसे बनवितील व त्याचें त्यास कसें ज्ञान करून देतील? हें जितकें उघड आहे, तसें 'यथा राजा, तथा प्रजा' हाहि न्याय स्पष्टच आहे, हें आम्हीं निराळें सांगायास नकोच. आमचे ख्रिस्ती बांधव तर 'स्वत्वास' सर्वस्वी पारखे होऊन गोव्यांतील पोर्तुगीज बनलेले आहेत आणि त्यांच्याच कांहींसा—थोडा किंवा जास्त म्हणा— संसर्ग आम्हांस ख्रिस्ती न झालेल्यास लागलेला आहे. अशी आमची स्थिति आहे, तरी शेजारील ब्रिटिश हिंदुस्थानांतील आमच्या बांधवांच्या योगानें आमच्यांत कोठेंशी स्वत्वाच्या जाणिवेची थोडीशी झुळूक उत्पन्न होऊं लागलेली आहे, हा हि त्यातल्या त्यात थोडी समाधानाची गोष्ट आहे. न पेक्षां ॥ ठेविलें पोर्तुगेजें तैसेंचि रहावें। चित्तीं असों द्यावें समाधान ॥ याच स्थितीचें अवलंबन करून राहण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. आज पोर्तुगेज लोक ज्या प्रमाणें कलम बहाद्दरी व नोकरी त्या शिवाय तिसरें कांहीं जाणत नाहीत. युनिव्हर्सिटींतून थोडें फार पोर्तुगेज शिक्षण घेऊन नावांचे ब्यारीष्टर, डाक्टर, इंजिनेयर वगैरे पदवीधर होऊन स्वतःच्या पोटगीकरतां सरकारी खात्यांत कलम बहाद्दरीच्या जागा पटकावतात; इतर धंद्यात पाऊल घेऊन स्वतः तरून, इतरांला तारण्याच्या खटपटींत पडत नाहींत व 'कूपमंडूक'वत् स्थितींतच रहाणें आवडतें. त्याच प्रमाणें आम्हींहि—येथील ख्रिश्चन व आम्हीं हिंदुहि—बनलेलों आहोंत.

—पणजी राष्ट्रीय मराठी शाळेंतील मुलांची सामाही परीक्षा म्हापसेंच्या भारती विद्यालयाचे मुख्याध्यापक नारायणराव रेगे यांच्याकडून घेण्यांत आली. ४० मुलांपैकी ३५ पास झालीं, पैकीं चवथ्या इयत्तेंत १, तिसरींत ७, दुसरींत १२, पहिलींत १२ व इन्फंट वर्गांत ३. परीक्षेच्या दुसऱ्या दिवशीं प्रो. विठ्ठल स. सुखठणकर यांच्या अध्यक्षतेखालीं बक्षीस समारंभ पार पडला. या समयीं अध्यक्षांनीं मार्टीन व सरदेसाई यांनीं कोंकणींत मुलांना गोड उपदेश केला. समारंभी या प्रेसिडेंट गाणें गात गात मुलांनीं चरख्यांवर सूत काढून दाखविलें. मुलांची मिरवणूकहि निघाली होती इ. एक प्रेक्षक कळवतात.

भारत

नवीन मराठी शाळा

मडगांव

[एक प्रेक्षक]

ही शाळा स्थापन होऊन गेल्या दिवाळीला एक वर्ष पुरें झालें. प्रस्तुत शाळेंत चार शिक्षक असून विद्यार्थी व विद्यार्थिनी यांची संख्या जवळ जवळ १९० आहे. मराठी शिक्षण, पांचव्या इयत्तेपर्यंत, नवीन अभ्यासक्रमाप्रमाणें पूर्ण दिलें जात असून दुय्यम भाषा म्हणून थोडें पोर्तुगीज शिक्षण ही दिलें जात आहे. पुढील वर्षापासून प्रिमैर ग्राव पर्यंत पोर्तुगीज शिक्षण येथेंच मिळावें अशी व्यवस्था व्हावयाची आहे. सध्या गोमांतकांत ज्या मोठ्या मराठी शाळा चालत आहेत, त्यांच्या सर्वस्वी तोडीची ही शाळा आहे, असें कोणीहि कबूल करील. पण त्यांतील अभिनंदनीय गोष्ट म्हणजे ही शाळा स्वत: नी. वि. दळवी यांनीं आपल्या मित्रमंडळीच्या सहाय्यानें स्थापन करून चालविली आहे. व त्यास गोविंद दत्तात्रेय तिळवे व रामचंद्र गुंडलीक कुंडाईकर यांच्या सारखे अनुभवी कर्तबगार व छात्रप्रेमी शिक्षक सहाय्यास मिळाले आहेत. दळवी यांनी, गोमांतकांत वेलिंग, वाघोळ, कुंडई, फोंडा, येथें उत्तम शिक्षक म्हणून नांव मिळविलें असून मडगांव येथील श्री दामोदर विद्यालयांत ते ५।६ वर्षे हेडमास्तर म्हणून काम करीत होते. तेथें त्यांनीं किती उत्तम कार्य केलें आहे, तें दामोदर विद्यालयाच्या प्रसिद्ध झालेल्या अहवालावरूनहि कळून येईल, खुद्द मडगांवांत तर त्यांची शाळा बालवृद्धांच्या पूर्ण परिचयाची आहेच.

गेल्या वर्षी मुलांची परीक्षा अ. का. प्रियोळकर, श्री. येसूबाई थळी, हेडमिस्ट्रेस मुलींची शाळा, खेतवाडी, मुंबई, व एस. डी. महाजन-मुंबई या तिघांच्या परीक्षक मंडळानें घेतली. व शाळेच्या अभिप्राय पुस्तकांत त्यांनीं उत्तम असा अभिप्राय नमूद करून ठेवला आहे. शिवाय, शिवाजी कृष्ण पुरुळकर-मुंबई, प्रो. धर्मानंद कोसंबी-अहमदाबाद. श्री स्वामी पूर्णाश्रम महाराज, श्री साधु चैतन्य, श्री स्वामी सच्चिदानंद सरस्वती-प्रचारक सनातन-धर्ममहामंडळ-काशी, इत्यादि सद्गृहस्थांनीं व साधु पुरुषांनीं शाळेस भेट देऊन आपले अभिप्राय लिहून ठेविले आहेत.

अशा शाळेंत आपलीं मुलें पाठवून व हस्ते परहस्तें द्रव्य सहाय्य करून शिक्षकांच्या गुणाचें चीज करणाऱ्या पालकांचें मनःपूर्वक अभिनंदन करून, ही शाळा अधिकाधिक कार्यक्षम होऊन, अनेक सुंदर व्हावी असें इच्छितों.

—श्री डॉ. सिनरी व पांडुरंग शेणवी दणाईत यांचा मुंबईच्या धी गोवा-हिंदु आसोसिएशननें जाहीर सन्मान केल्याचें कळतें.

विचार लहरी

रेजिदोर म्हणजे गांवचा मुख्य अधिकारी. गांवांतील सगळी आदमिनिस्त्रातीव्ह सत्ता त्याच्या हातांत. गांवच्या गांवांत निवडण्याजोगे लहान सहान कज्जेही त्यांमार्फतच तोडले जातात. गांवांतील लोकांस चांगलें वळण लागण्यास व त्याचप्रमाणें वाईटही व्यसनें लावण्यास एक तोच कारणीभूत होत असतो. तात्पर्य सगळ्या गांवच्या लोकांच्या व विशेषत: तरुण पिढीच्या भावी नीतिमत्तेचा पाया त्याच्याकडून घातला जातो. हा अधिकार देण्यास योग्य मनुष्य निवडून काढणें, हें त्या कौंसिल्याच्या आदमिनिस्त्रादोराचें कर्तव्य होय. म्हणूनच त्यांनीं कसल्याही मोहाला बळी न पडतां ही नेमणूक करून, गांवच्या लोकांस, आपल्या कारकीर्दीची योग्य जाणीव करून दिली पाहिजे. हें उघड आहे. उलट या नेमणुकींत आदमिनिस्त्रादोर साहेबानीं थोडासा आप्पलपोटेपणा दाखविला म्हणजे हे रेजिदोर साहेब सुद्धां आप्पलपोटेपणा साधण्यासारखी एखादी आलेली संधि दवडण्यास बिलकूल तयार नसतात. ह्यामुळें त्या गांवांतील सच्छील मनुष्यांवर नाना तऱ्हेचीं संकटें ओढवून निवारण्यास स्वत: आदमिनिस्त्रादोर साहेबांसच भाग पडत असल्यामुळें, ते प्रामाणिक असल्यास त्यांस आपल्या अंधविश्वासाचा पश्चात्ताप झाल्यावांचून रहात नाहीं. अशा तऱ्हेचें एक ताजें व मासलेवाईक उदाहरण फोंडें कौंसिल्यांतील गाशेल गावांत आज पाहण्यास मिळेल.

+ + ×

या गावांत पौष शुद्ध पाणिसे मालिनी पाणिभेची जत्रा दर वर्षी भरत असते. आसपासच्या दहा वीस गावांतील लोकांस या जत्रेइतकी सगळ्या बाबतींत दुसरी सोय नसल्यामुळें इथें मंडळींचा जमाव बराच होत असतो. पालखी, नाटकें वगैरे उत्सव पांच दिवस चालत असतात. शिवाय जत्रेस विशेष शोभा येण्याकरितां म्हणून देवळाचें कोमिसांव व रेजिदोर हे एकमतानें, जुगारास व त्याचप्रमाणें अनेक प्रकारच्या अश्लील करमणुकीच्या खेळांस परवानगी देऊन आपला स्वार्थ साधण्याची आजपर्यंतची वहिवाट होती. परंतु या दोन वर्षांत इकडच्या कांहीं सुशिक्षित तरुणांनीं पुढाकार घेऊन, ह्या वाढत्या जुगारास निदान त्या गांवांत तरी आळा घालण्याचें ठरविलें आहे. हें त्यांस भूषणावहच आहे. त्याचप्रमाणें या कौंसेल्यांतील आदमिनिस्त्रादोर व कामराचे प्रेझीदेंत यांनीं, गांवच्या मंडळीनें केलेल्या अर्जाचा योग्य विचार करून पूर्ण खबरदारी घेतल्यामुळें ह्यापीतिरेंनें उठणाऱ्या 'विचारलहरीं'त सगळे गांवचे तर्फे त्यांचे आभार मानणें हेंही उचितच होईल. परंतु येत्या आलेल्या अनुभवावरून गावांतील रेजिदोर, देवळाचें कोमिसांव व जुगाऱ्यास हस्तें परहस्तें मदत करूनही आपली तडस्तुति [illegible] मित्रमंडळी यांस यापुढें आपले विचार बदलण्याबद्दल खबरदारी घेण्याची प्रेमळ सूचना देणें, हें ही योग्यच होईल. परंतु, आदमिनिस्त्रादोर साहेब कसल्याही मोहाला बळी पडून, त्यांच्या हातून या गावांतील रेजिदोराची योग्य नेमणूक न झाल्यामुळें ह्या सगळ्या भानगडी उपस्थित झाल्या; हें या ठिकाणीं नमूद केल्यावांचून रहवत नाहीं.

* * *

या 'गुलहौशी' मंडळीच्या व त्यांस सर्व प्रकारें मदत करून आपली चिंगळ चालविणाऱ्या आमच्या प्रेमळ मित्रांचा हा डाव फसल्यामुळें, कवळें व फाडदोळ या गांवांतील जत्रांत जुगाराचे अड्डे घालण्याची परवानगी मिळविण्याकरतां, आदमिनिस्त्रादोर साहेब व कामराचे प्रेझीदेंत यांस त्यांनीं अर्ज केले असल्याचें समजतें. तरी आदमिनिस्त्रादोर व कामराचे प्रेझीदेंत यांनीं पूर्ण विचार करून या अर्जाचा योग्य निकाल लावावा; म्हणजे आपल्या कौंसेल्यांतील नागविल्या जाणाऱ्या गरीब [illegible] या लुटारू टोळीच्या कचाट्यातून सुटका केल्याबद्दल सगळ्या कौंसेल्यांतील रयत त्यांस दुवा देईल, व आपल्या क्षणभंगूर सत्तेचा दुरुपयोग केल्याचें पाप त्यांस न लागतां, जागेची जबाबदारी कळल्यामुळें जनतारूपी जनार्दन प्रसन्न होऊन भावी कारकिर्दीबद्दल शुभाशीर्वाद देईल. व हा आशीर्वाद पोलिटिकल दृष्ट्या विचार करण्यासारखा असल्यामुळें तो मिळविण्याकरितां आपली कारकीर्द सुव्यवस्थित व सुखकर करणें, हें अधिकारी मंडळींचें पहिलें कर्तव्यकर्म होय, व ते त्यास जागणार अशी पूर्ण उमेद धरून रजा घेतों.

साक्षी.

1

A' janela....

Vai para tres meses que nao me reclinei no peitoril da minha JANELA tres longos, fastidiosos e inertes meses...

Quantas coisas eu queria contar aos amaveis leitores do "BHARAT" e tambem meus nes ta modesta cronica...

Quanto de importante nao rolou inerme no po' do olvido e do tempo!... Sim, tudo isso la' foi, tudo isso inexoravelmente fugiu-me das maos como o aerostato que sobe sem cessar aos paramos longinquos do azul do ceu...

Porem consolo-me; o pesadelo que me escravisou por tres longos meses vai ser desentorpecido, retribuido por um facto unico, que nao sao as eleições municipaes cuja celeuma viva, crescendo sempre so' nos trouxe a mesma eterna desilusao da politica... ignobil!

Nao, nao e' disso que vamos tentar descrever a traços, pois nao nos e' dado fazer um trabalho mais arduo.

E' da exposiçao do corpo de S. Francisco Xavier que vamos tratar. E' este um acontecimento por muitos motivos notavel que teve lugar por espaço de um mes, em que estava empenhada a nossa propria honra nacional.

Sim, a apoteose, a glorificaçao do heroi que na hora sublime da aventura e do sonho em que Portugal despertava para a realisaçao de feitos homericos animou os nossos avos com palavras de coragem e de fe', foi o mais lidimo acontecimento que sera' escrito em letras de oiro nos anais desta indiosa terra...

Vi' de perto essa romaria incessante, infinita, continua, que acorre aos pe's do Apostolo das Indias.

Vi homens, mulheres e crianças: cristaos, hindus e maometanos. Vi parses, protestantes e...ateus, depor na nave sumptuosa de Bom Jesus, a homenagem sentida, da alma dorida da Humanidade, aos pe's de quem em vida aliviou a acerba dor de coraçoes sem conta, de quem sarou com o balsamo suave do milagre as mais cruciantes dores humanas...

Escrevendo para o "BHARAT" nao fica mal uma homenagem a um heroi de mil batalhas ESPIRITUAES, em que a alma liberta das amarras da materialidade e de utilitarismo piegas, sobe para a sublime eminencia para que anseia, aspira...

Nao fica mal ao "BHARAT", nem lhe pesam as colunas admitir um panegirico sentido ao grande justo, a quem todo o paiz em peso, e todo o estrangeiro viu trazer a expressao da sua admiraçao e devoçao. Sim, nao fica mal ..O que se passou; o que houve sabe a alma do povo, a alma que freme, que palpita em saber a verdade, em relatar a Verdade, pois a "VOX POPULI EST VOX DEI". Consultem-na os que ainda duvidam do que ai se passou. Consultem-no, e verao que o que ele narra e' a pura verdade. Houve 70 e tantos milagres. Nao nos emperra a pena ao escrevermos esta afirmaçao tam categorica. Houve 70 "setenta" e tantos milagres. Milagres evidentes. Milagres que nao admitem tergiversaçoes. Diga-o alias o povo. E tudo isso acabou, tudo isso la' vae mar em fora...Encerrou-se o Corpo do Santo Apostolo e neste solene e triste momento, tudo, tudo levantou ferros...ja' ai nao se ouve buzinas dos automoveis e carros, nem a luz electrica esparge os seus lucilantes raios, tu'do e' negro, frio e sinistro. Cada uma das pedras da Roma do Oriente carpe dolorosamente o desaparecimento de toda essa agitaçao descomunal ininterrupta... Tudo chora lagrimas pungentes, que causa do...E e' so agora que a minha pena nao avança a tinta nao deixa o rasto da sua passagem no papel riscado que rabisco, porque as minhas lagrimas ensoparam-na por completo. Nao posso mais...

Nova Goa, 8-1-923, RAMON DE QUEVEDO.

Revista da India

Consta-nos que um grupo de novos dos nossos conterraneos residentes em Portugal, daqueles em cujos corações vibra o amor pela sua terra, cheio de fé e de esperança vai tomar a iniciativa de formar uma empresa de publicidade para lançar uma revista mensal com o titulo de 'Revista da India" que se propõe promover propaganda e defesa dos interesses indianos.

Será segundo nos dizem, redigida em portuguez, inglez francez e possivelmente em marata e colaborada por indianistas notaveis europeus e indianos, devendo contribuir para divulgar as belezas literarias e artisticas e o profundo saber do pensamento indiano e deste modo procurar levantar o sentimento civico dos nossos patricios.

Esperamos que essa iniciativa, a primeira no genero entre os nossos conterraneos residentes na Metropole encontra entre nos um carinhoso acolhimento e o apoio moral e material.

लेखणीचे कटाक्ष.

—सेंट झेवियरचें शव खस्थानीं ठेवण्यांत आल्यापासून, चमत्काराचें नांव फारसें ऐकूं येत नाहीं. यावरून चमत्कार प्रदर्शनास शवाची विशिष्ट जागींच स्थापना झाली पाहिजे, असा सिद्धांत निघतो. व तो चमत्कारिक नाहीं, असें कोण म्हणेल?

—जर्मनी व फ्रान्स या उभय राष्ट्रांची हुमरी तुमरी सुरू झाली. तूर्क व त्यांचे ब्रिटिश मित्र यांचेंहि एकमेकांत बरें नाहीं. महात्मा लेनीन आजारी आहेत. एवंच युरोपचें वातावरण शांत नाहीं. हे लोक झेवियरच स्मरण कां करीत नाहींत! झेवियरनें आपल्या प्रतापी दंडकाष्ठानें सर्वत्र आनंदाचें साम्राज्य पसरविलें असतें!

—अमेरिकेंत दारूचें उच्चाटन होऊं लागल्यापासून, हरतऱ्हेचे सामाजिक फायदे होत असल्याचें आढळून येत आहे. पण आतां स्वर्गवासी देवाना पाताळांतील त्या उत्क्रांतीकडे लक्ष देण्याचें कारण काय? शिवाय झेवियरच्या शवाचें आम्हास जिवंत सहाय्य आहे!

—हिंदुस्थांत अर्थ नसून जगांत एकच ख्रिस्तीधर्म स्वर्गप्राप्ति करून देण्यास समर्थ आहे, असें झेवियरचें जिवंतपणीं मत होतें! ज्या अर्थी गेल्यानंतर त्याच्या देहांत कांहींच फरक झालेला नाहीं त्या अर्थी त्याच्या उपरोक्त मतांतही बदल होणें अशक्य आहे. बाकी, अंदरकी बात राम जाने!

भारत

गुरुवार माघ शु० १ दा १८४४

मद्यपान प्रतिबंधार्थ

मद्यपान हें किती दुष्परिणामकारण आहे हे जितकें लोकांच्या अवलोकनांत येईल तितकें फायदेशीरच आहे. फार पुरातनकाळीं आमच्या समाजांत मद्यपानाचा किती तिटकारा होता हें, आमच्या समाजस्थिति निदर्शक अशा पुराण ग्रंथांतील दाखल्यांनीं आणि शास्त्रें वगैरे ग्रंथांतील आधारांनीं सिद्ध करितां येईल. तसल्याच एका सर्वसामान्य ग्रंथाचा आधार आज देण्याचें योजिलें आहे. साधारण हिंदुधर्माचें ज्ञान असलेल्यांस 'मनुस्मृति' किंवा 'मानव धर्म सार' हा ग्रंथ अपरिचित असणें संभवनीय नाहीं. हिंदुधर्म म्हणजे आचारप्रधान आणि कर्तव्यप्रधान धर्म आहे. मनुष्यांनी एकमेकांशीं अथवा इतर प्राण्यांशीं कोणत्या रितीनें वागावें, राजाप्रजा, गुरुशिष्य, पितापुत्र, नवराबायको, धनीनोकर वगैरेंचे परस्परांशीं व्यवहार कसे असावे, यांचें उत्तम विवेचन या ग्रंथांत केलेलें आढळेल. तसेंच समाज व व्यक्ति यांस कोणकोणतीं व्यसनें बाधक आहेत, त्यांचें निवारण कसें करावें हेंहि त्यात सविस्तर दाखवून दिलें आहे. तें पाहिल्यास त्या ग्रंथाची हिंदुसमाजास वाटत असलेली किंमत किंवा त्यास देण्यांत आलेलें स्थान किती योग्य आहे हें, चटकन लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं.

ब्रह्महाच सुरापश्च स्तेयीच गुरुतल्पग ॥ एते सर्वे पृथग्ज्ञेया महापातकिनो नराः ॥ २३५ ॥

ब्राह्मणास मारणारा, मद्यप्राशन करणारा, ब्राह्मणाचें द्रव्य हरण करणारा, व गुरुस्त्रीशीं गमन करणारा हे सर्व निरनिराळे महापातकी आहेत असें समजावें.

चतुर्णामपि चैतेषां प्रायश्चित्तमकुर्वताम ॥ शारीरं धनसंयुक्तं दंडं धर्म्यं प्रकल्पयेत ॥ २३६ ॥

प्रायश्चित न करणाऱ्या या चारी प्रकारच्या महापातक्यास शारीरिक व धनसंबंधी धर्मरूप दंड करावा.

गुरुतल्पे भगः कार्यः सुरापाने सुराध्वजः॥ स्तेयेच श्वपदं कार्यं ब्रह्महण्य शिराः पुमान ॥ २३७ ॥

जो गुरुपत्नीशीं गमन करील त्याच्या ललाटावर यावज्जीव राहील असें तापविलेल्या लोखंडानें भगाकृतिसमान चिन्ह काढावें, मद्यपान करणाऱ्याच्या ललाटावर सुराध्वजाकार चिन्ह काढावें, सुवर्णाची जो चोरी करील त्याच्या मस्तकावर कुत्र्याच्या पायाचें चिन्ह डाग देऊन उमटावें व ब्राह्मणाचा ज्यानें घात केला असेल त्याच्या ललाटावर मस्तकशून्य पुरुषाच्या आकृतीचा डाग द्यावा

असंभोज्या ह्यसंयाज्या असंपाठ्या विवाहिनः ॥ चरेयुः पृथिवीं दीनाः सर्व धर्म बहिष्कृताः ॥ २३८ ॥

अशा चिन्हांनीं जे युक्त असतील त्यांस कोणी श्राद्धादिकांचें भोजन घालूं नये. त्यांच्या कडून यज्ञ करवूं नये. त्यांच्याशीं विवाहसंबंध करूं नये. तर दीन व सर्व श्रोतादि कर्म रहित असलेल्या अशा यानीं पृथ्वीवर पर्यटन करावें.

ज्ञातिसंबंधी भिस्त्यक्तव्याः कृतलक्षणाः ॥ निर्दया निर्नमस्कारा स्तन्मनोरनु शासनम ॥ २३९ ॥

ज्ञातीच्या व मातुलादि संबंधी लोकांनी चिन्हयुक्त अशा यांचा त्याग करावा; त्यांच्यावर दया करूं नये व त्यांस नमस्कार करूं नये अशी मनूची आज्ञा आहे.

त्याचप्रमाणें पांचव्या अध्यायांतील नव्वदाव्या श्लोकांत मद्यप्राशन करणाऱ्या द्विजस्त्रियांचें [ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य] और्ध्वदेहिक करू नये असें स्पष्ट सांगितलें आहे.

या सर्व उताऱ्यांवरून, समाजाचें उत्तम व चिकित्सक बुद्धीनें निरीक्षण करून लिहिलेल्या, मनुस्मृति ग्रंथाच्या कर्त्याचा मद्यपानावर किती कटाक्ष होता हें दिसून येईलच.

मद्यपानाचें व्यसन एकसारखें सध्याच्या परिस्थितींत देखील आपला भेसूरपणा दाखवीत आहे; प्राणाहूनहि प्रिय असणाऱ्या धर्मशास्त्रांनीं त्याचा कडक रितीनें निषेध केला आहे; अमेरिके सारख्या सुधारणाशिखरावर आरूढ असलेल्या राष्ट्रानें मद्यपान प्रतिबंधाचे सुपरिणाम सर्व ज्ञान व डोळस जगास स्वतःच्या अनुभवानें पटविले आहेत; महात्मा गांधींचे अनुयायी आपल्या हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती वगैरे बांधवांच्या मदतीनें त्याची हकालपट्टी करण्यास पुढें सरसावले आहेत. इतकें सर्व दिसत असूनहि आम्ही मात्र त्या संबंधीं कोणताच प्रयत्न करूं नये तर उलट प्रत्यक्षाप्रत्यक्ष रितीनें त्यास प्रोत्साहन देत रहावें हें आमच्या अवनतीचें लक्षण नव्हे असें कोण म्हणूं शकेल? कोणीच म्हणणार नाहीं. तर मग ओढवलेली ही अवनति चालवून देण्यास आम्ही कांहीं तरी प्रयत्न करणें इष्ट व उचित नाहीं काय?

मद्यपानापासून लोकांना परावृत्त करणें हा पहिला मार्ग, वर्तमानपत्रकार, इतर लेखक, व्याख्याते, हरिदास पुराणिक, वैद्य धर्मगुरु वगैरेंस साध्य होण्यासारखा आहे व तो त्यानीं स्वीकारणें हें त्यांचें कर्तव्य होय.

मद्यपानप्रतिबंधासारखे कायदे अमलांत आणून करण्याचा हा दुसरा मार्ग, सरकार, म्युनिसिपालिट्या लोकल बोर्डें वगैरेसारख्या संस्थांना स्वीकारावयाचा आहे. परंतु येथील जवळ जवळ अर्धी प्रजा या फ्रांसिस्काच्या कुशीतली हा. ख्रिस्ती असल्यानें आणि सरकारच्या गंगाजळींत नऊ दहा लाखांचा भरती दारूच्या पायीं होत अस-

भारत

गुरुवार पौष० ८ सी १८४४

स्फुट विचार

बालोन्नति समाज-पेडणें:—या समाजाच्या कर्णधारित्वाखालीं चालू असलेली व्याख्यानमाला दिवसें दिवस मोठ्या नेटानें व चिकाटीनें प्रगतिपथ आक्रमित असल्याचें पाहून समाधान वाटतें. यंदांच्या मालेला तर ठिकठिकाणच्या वजनदार गृहस्थांच्या आगमनानें विशेष रंग आला होता. व्याख्यानास लोकसमूह बराच जमत असे. एकंदर व्याख्यानेंहि सरसच वठलीं हें दुसरीकडे दिलेल्या वातमीपत्रावरून वाचकांस कळलेंच असेल. सन्माननीय पुढारी बनुदाजी यांच्या संबंधानें आमच्या बातमीदारानें काढलेले उद्गार अगदीं यथार्थ आहेत. दाजीसाहेब व पेडण्यास ललामभूत असलेले वकीचे विद्वान व उत्साही गृहस्थ आपल्या तालुक्यांतील लोकांच्या उन्नतीप्रीत्यर्थ अशीच खटपट करतील अशी आह्मांस खात्री आहे.

पणजीचा जुगार:—पणजी मुनिसिपालटीच्या नाकावर जुगार अजून थैमान घालीत असलेला किळसवाणा देखावा सुज्ञ लोकांच्या अंतःकरणास पीळ घालण्याचें काम करीतच असून, सरकारी अधिकाऱ्यांचा तिकडे पूर्ण कानाडोळा आहेच. पगार जुगारांत घालवून रोजगाराविषयीं बिकट परिस्थिति उत्पन्न करून, डोकें वडवून घेणारे हरीचे लालहि नजरेस पडतात. तात्पर्य जुगारामुळें जिकडे तिकडे असंतोष पसरला जाऊन, मुनिसिपालटीच्या नांवानें जेथें तेथें खडे फोडलेले ऐकूं येतात! पणजी शिवाय इतर तालुक्यांतील जुगारी चोक तर 'जुगार हा जन्मसिद्ध हक्क असून, त्याची कोणाच्यानेंहि पायमल्ली करतां येत नाहीं' असें उघड उघड प्रतिपादन करावयास लागले आहेत. खुद्द स्थानिक अधिकाऱ्यांची सुद्धां जुगाराच्या बाबतींत कोणीच पर्वा करीनासें झालें आहे. कोणहीशोचनीय स्थिति! आतां तरी सरकारनें जागें होऊन जुगाराला मूठमाती देण्यास पुढें सरसावें, अशी आमची सूचना आहे.

शव प्रदर्शनः—अखेर शव प्रदर्शनाचा समारंभ आटपला. चमत्कारांच्या निराधार केड्यामुळें पुष्कळ लोक झेवियरच्या दर्शनार्थ उत्सुकतेनें धांवत आले! पण सर्वांची फसगत झाली व चमत्कारांचा भ्रमाचा भोपळा फुटला! बाकी झेवियर चमत्कारांचा जनक खरा. तसें नसतें तर गोवे सरकारला डोईपट्टीचें व जुगाराचें सहस्त्रावधी रुपयाचें उत्पन्न तिजोरींत 'गडप' करावयास मिळतें ना! प्रदर्शनापूर्वी जुगार केवळ पडद्या आड चालत असे, परंतु झेवियरच्या कृपेनें तो पडदा दूर झुगारला जावून, जुगार आतां उजळ माथ्यानें विहरावयास लागला, हा काय कमी महत्वाचा चमत्कार? असो. कोळसा उगळावा तितका काळाच!

हा मजकूर तयार झाल्यावर पणजीचा जुगार 'उठल्याचें' कळतें.

बालोन्नति समाज, पेडणें

[आमच्या खास बातमीदाराकडून]

येथील बालोन्नति समाजाची व्याख्यानमाला गेल्या ता. २७ रोजीं सुरू होऊन काल ता. १ ला उत्तम तऱ्हेनें समाप्त झाली. पहिल्या दिवशीं जमलेल्या मंडळीचें समाजातर्फे स्वागत झाल्यावर प्रो. अनंत रघुनाथ काळे बी. ए. 'मुळशी सत्याग्रहांतील शिक्षा भोगून आलेले एक वीर' यांच्या अध्यक्षतेखालीं प्रो. रामचंद्र सोनबा कामत यांचें गोमांतक प्रांत, तेथील हिंदुसमाज व त्यांची पुढील महत्वाची कामगिरी या विषयावर भाषण झालें. अध्यक्षांनींहि समारोपादाखल बोलताना गोमांतक प्रांताचें महत्व प्रतिपादन करून प्रत्येक तरुणानें समाजाच्या उन्नतीसाठीं तयार व्हावें अशी विनंति केली. दुसऱ्या दिवशीं यशवंत सरदेसाई यांच्या अध्यक्षतेखालीं प्रो. काळे यांचें मातृभाषा व इतिहास यांच्या शिक्षणाची आवश्यकता या विषयावर भाषण झालें. अध्यक्षांनीं योग्य शब्दांनीं समारोप केला. तिसऱ्या दिवशीं जनार्दन विष्णु कामत यांच्या अध्यक्षतेखालीं प्रो. बाळकृष्ण वामन सांवर्डेकर यांचें लिसेवांतील हिंदु विद्यार्थ्यांची जबाबदारी या विषयावर भाषण झालें. अध्यक्षांनीं समारोपादाखल बोलतानां हिंदु विद्यार्थ्यांनीं हिंदुत्वाची जाणीव उत्पन्न होण्यासाठीं व त्याची छाप इतर समाजांवर पडण्यासाठीं काय काय करणें आवश्यक आहे याचें दिग्दर्शन केलें. चवथ्या दिवशीं प्रो. सांवर्डेकर यांच्या अध्यक्षतेखालीं ज. वि. कामत यांचें दिशाभूल या विषयावर भाषण झालें. त्यानंतर उपस्थितांपैकी प्रो. काळे, शिवाजी शेट नार्वेकर, यशवंत देसाई व सीताराम शेणवी देसाई यांचीं विषयास अनुसरून भाषणें झालीं. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत प्रत्येकानें दिशाभूलीपासून अलिप्त असणें किती फायद्याचें आहे हें दाखवून राज्यकारभारांत हिंदुसमाजानें भाग घेण्याबद्दल विनंति केली. पांचव्या दिवशीं य. सरदेसाई यांच्या अध्यक्षतेखालीं पुंडलीक वा. विर्जिनकर यांचें सत्वगुणाची वाढ या विषयावर बराच वेळ भाषण झालें. वक्त्यानीं आपल्या भाषणांत श्रीमद्भगवद्गीता, छांदोग्य उपनीषद वगैरे सर्वमान्य ग्रंथांचे आधार देऊन आह्मीं आमच्या आहार विहारांत व इतर हरेक वागणुकी बद्दल करणें किती महत्वाचें आहे हें दाखविलें. त्यानंतर प्रो. काळे, प्रो. सांवर्डेकर, प्रो. दत्ता पै वगैरेंचीं समयानुसार भाषणें झाल्यावर अध्यक्षांनींहि आपल्या भाषणांत सत्वगुणाची वाढ होणें सध्याच्या परिस्थितींत किती इष्ट आहे हें सांगितलें. सहाव्या दिवशीं सकाळीं आठ वाजतां ना. व्यंकटेश सूर्यराव सरदेसाई यांच्या अध्यक्षतेखालीं शिवा फटू पै आंगले यांचें हिंदुधर्म व संस्कृति या विषयावर सुश्राव्य भाषण झालें. अध्यक्षांनीं समारोपादाखल भाषण करितानां, जरी पौर्वात्य आणि पश्चिमात्य या दोन संस्कृति भीन्न दिसतात तरी त्यांत मनुष्यमात्राचें हित साधण्याचाच अंतीम हेतु आहे. म्हणून हिंदूनीं स्वःताची संस्कृति न सोडतां पश्चिमात्य संस्कृतीचाहि आदरपूर्वक परिस्थितीनुसार स्वीकार करणें फायद्याचें आहे असें प्रतिपादन केलें. यानंतर य. सरदेसाई यानी मालेचा समारोप करून पाहुण्यातर्फे समाजाचे व सर्व पेडणेंकरांचे मनःपूर्वक आभार मानले. प्रो. रामचंद्र सो. कामत यानीं समाजातर्फे, सर्व व्याख्याते, उपव्याख्याते, अध्यक्ष व इतर श्रोतसमाज पाहुणे मंडळी यांचे आभार मानल्यावर मुलींकडून आभारपूर्वक पद्यें म्हणविण्यांत आलीं. व तीं उत्तम रितीनें म्हणून दाखविल्याबद्दल त्यांस अध्यक्षांकडून पुस्तकें बक्षीस देण्यात आलीं. या समारंभास अध्यक्ष, व्याख्याते व उपव्याख्याते यांशिवाय पुरुषोत्तम श्री. सुकेरकर, प्रो. शांताराम शिंगबाळ, प्रो. सदानंद दत्ताराम बोरकर र. अ. भांडारी वगैरे पाहुणे मंडळी मुद्दाम आमंत्रणास मान देऊन आली होती. त्यांची रहाण्या उठण्याची वगैरे सर्व तऱ्हेची सोय येथील वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध पुढारी बनुदाजी शे. देसाई यांकडून ठेवण्यांत आली होती. साठी उलटली तरी त्यांचा समाजकार्याविषयींचा उत्साह वर्णनीय आहे, त्यांचें उदाहरण तरुणांना तर मार्गदर्शक आहेच; शिवाय गोव्यांतील इतर श्रीमंतांना अनुकरणीय आहे. या समारंभाच्या निमित्तानें पेडणेकरांस पाहुणे मंडळीचा व त्यांस पेडणेकर मंडळीचा परिचय झाला ही फार महत्वाची व उपयुक्त अशी गोष्ट झाली. त्याचा फायदा प्रत्येक देशकार्यास [illegible] राहणार नाहीं अशी आशा केल्यास ती अस्थानीं होणार नाहीं.

व्याख्यानमालेचा समारंभ समाप्त झाला त्या दिवशीं येथें आणखी दोन संस्थांचे वाढदिवस समारंभ साजरे झाले. पहिला हा. श्रीस्वळनाथ श्रा वाचन मंदीर या संस्थेचा: तो येथील सर्वांच्या जिव्हाळ्याचे डॉ. लाड यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. सेक्रेटरीकडून अहवाल वाचन झाल्यानंतर डॉ. लवंदे, ना. देसाइ, प्रो. काळे, प्रो. पै, य. सरदेसाइ, ज. वि. कामत व रा. सो. कामत यांचीं वाचनसंदर्भ न शिक्षण या विषयावर भाषणें झालीं. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत मराठी शाळा उघडण्यास प्रयत्न करणें किती आवश्यक आहे हें सांगून संस्थेला नवीन इमारत उभारण्यासाठीं खटाटोप करण्यास विनंति केली. नंतर हारतुरे बतासे वाटण्यांत येऊन समारंभ समाप्त झाला.

दुसरा समारंभ हा. शीलोन्नति समाजाचा वाढदिवस समारंभ हा होय. व्याख्यान मालेच्या निमित्तानें जमलेल्या पाहुणेमंडळींस येण्याचें पत्रद्वारें आमंत्रण होतें व ते जाण्यासहि उत्सुक होते परंतु वेळ एकच असल्यानें त्यांस जातां आलें नाहीं या बद्दल त्यांस बरीच दिलगिरी वाटली.

कसवा—पेडणें २-१-२२

—गेल्या दोन तारखेला महाशेल येथें मालवी पूर्णिमेचा उत्सव मोठ्या थाटानें पार पडला, असें एक विठोभचे वर्गणीदार कळवितात.

—येत्या २७ तारखेला मडगांव मुक्कामीं प्रागतिक संघाच्या कार्यकारी मंडळाची खास सभा भरणार आहे.

—दोतोर शांताराम शे. साखरदांडे यांस पणजी येथें वकिली करण्यास सनद मिळाल्याबद्दल आह्मीं त्यांचें अभिनंदन करितों.

—डॉ. कृष्णराव स० सुखठणकर यानीं अळडोणें येथें आपलें चिकित्सालय उघडलें असून, तेथील जनतेचें प्रेम त्यांच्यावर बसत चाललें आहे.

—गेल्या ३० तारखेला सूर्ल-सांखळी येथें सालाबाद प्रमाणें सार्वजनिक सत्यनारायणोत्सव मोठ्या थाटानें साजरा झाला. या निमित्त भरलेल्या सभेचें अध्यक्षस्थान नारायण के० बर्वे यानीं मंडित केलें होतें. बाळकृष्ण वि. मराठे, पांडुरंग ज. गाडगीळ, सखाराम पी. बर्वे, दत्तोपंत भिने, व रामभाऊ केळकर यांचीं जोरदार व्याख्यानें व दत्तारामबुवा फडके व भिकुबुवा बर्वे यांचीं भक्ति रसरिंगत कीर्तनें झालीं, असें गोविंद वि. बर्वे, हे लिहितात.

—नोर्माल स्कूलच्या प्रोफेसरांच्या परीक्षेंत विद्वद्वर्य प्रो. रामचंद्र शंकर नाईक हे पहिले आल्याबद्दल आह्मीं त्यांचें सप्रेम अभिनंदन करितों. प्रो. नाइकांच्या नेमणुकीसंबंधानें कांहीं भानगड उत्थित झाल्याचें वर्तमान आमच्या कानावर आलें आहे. त्याचा योग्य वेळीं विचार करूं.

—शवप्रदर्शनाचा विधि आटोपला. डोईपट्टीच्या उत्पन्नानें नोकरशाहीचा कांहीं महिन्याचा बाकी पगार चुकता झाला.

कारण मी कितीहि जरी या विषयीं लिहिलें तरी, मला वाटतें, ते कधींच उमज णार नाहींत, तेव्हां त्यांस 'चक्षुर्वै सत्यं' हेंच बरें.

प्रत्येक नियमाला अपवाद हा असतो च. तेव्हां एकादा नियम बरोबर आहे किंवा नाहीं हें पहावयास शेळकीं शेळकीं उदाह रणें घेऊन उपयोगी नाहींत. तर तीं सर्व साधारण लागू पडतात कीं काय, हें पा हिलें पाहिजे. तिकडील प्रसिद्ध मनुष्यांचें इकडे उदाहरण देताना व तुलना करताना तिकडच्या व इकडच्या परिस्थितीवरव क्षे त्रफळावरहि अवश्य नजर दिली पाहिजे. एखाद्या देशामध्यें एखादा पुरुष निपजणें हा निसर्गाचा नियम आहे. आज तिकडे तेहतीस कोटी लोकांमध्यें, हजारों मनुष्यें शिकलेलीं असून अवघे हातांच्या बोटांवर मोजण्याइतकेच नामांकित पुरुष कां नि पजावेत ? त्या थोड्याशा लोकांप्रमाणें बा कीच्या कांहीं लोकांनीं रा. भोंसुले सांग तात तसे नुसते शिक्षणरूपी दुधाचे थेंबच जिभेवर ठेवलेले नसून शेरांचे शेर गट्ट केलेले आहेत ते प्रसिद्धीस कां येऊं नयेत ? असा माझा रा. भोंसुल्यांना आणखी एक वेळ प्रश्न आहे. दुधाचा गुणच असा आहे कीं त्यानें सर्वकाळीं सर्वांस सारखाच गुण दिला पाहिजे. पण असें सांगतात कीं कांहीं रोगांवर व विषमज्वरासारख्या ज्वरांवर मात्र त्याचा उलट परिणाम होत असतो, तेव्हां त्या प्रसिद्ध माणसांस सोडून, बाकीच्या सर्वांस तशा प्रकारच्या रोगानें पछाडलें आहे कीं काय हें मात्र कळत नाहीं. असो.

रा. भोंसले, आपल्या लेखांत दुसऱ्यांनीं आपल्यावर अपशब्दांचा मारा केलेला आहे, असा कांगावा करतात. वर्तमानपत्रांवर अपशब्द येण्यास मूळ कारण भोंसले आहेत. हें ते लेख काढून वाचल्यास लगेच समजून येईल. दुसऱ्यानीं अपशब्द उच्चारलेले जर त्यांना खपत नाहींत तर ते वरी दुसऱ्यांवर त्यांचा उपयोग कां करतात ? दुसऱ्यांस अपशब्द वापरण्यास त्यांनींच सुरवात केलेली आहे व कदाचित् दुसऱ्यांनीं तसेच वापरले तर त्यानीं कांगावा कां करावा ? दुसऱ्यांस अपशब्द वापरणें हें हलकटपणाचें काम असून वाईट आहे असें त्यानांहि समजतें, असें मला वाटतें. तेव्हां मी माझ्या लेखांत एकहि अपशब्द लिहिलेला नसून त्यानीं माझ्यावरहि अपशब्दांचा प्रयोग कां केला ?

आजचा हा लेख लिहिण्याचा माझा उद्देश, त्यानीं माझ्याविरुद्ध अपशब्द लिहिले ह्मणून तशाच प्रकारें त्यांचा सूड उगवावा अगर त्यांच्या मुद्याविरुद्ध माझे मुद्दे सिद्ध करावे हा नसून फक्त ते माझे एक देशबंधु व मित्र या नात्यानें त्यांस त्यांच्या भल्याच्या दोन गोष्टी सांगाव्या इतकाच आहे. रा. भोंसले हे साधारण सुशिक्षितांपैकीं असून, लेखक व एडिटर आहेत. तेव्हां, त्यांनी 'शेप की पेन गूयेरा' या न्यायावर अमलं करून वाईट शब्द वापरणें, एकमेकांच्या कुरापती काढणें व अशा प्रकारें ताक सुकर घालून दुसऱ्यांना झगड्यास आव्हान करून उद्युक्त करणें हें त्यांच्या धंद्यास व शीलास फारच हानिकारक आहे.

आज गोव्यांत जितकीं वर्तमानपत्रें व मासिकें असतील तितकीं थोडीं आहेत. तेव्हां ह्यां [नवजीवन सारख्या] मासिकाची अशा रितीनें किंमत कमी करणें ह्मणजे स्वतः त्यांचेंच नुकसान नसून सर्व देशाचेंहि आहे. वर्तमानपत्रें ह्मणजे थोरांपासून लहानापर्यंत वाचीत असतात, त्यांच्या मनाव असा एक परिणाम होणार आहे कीं वर्तमानपत्रें व मासिकें ह्मणजे जाहीर रितीनें झगडण्याची साधनें आहेत. ह्या तऱ्हेनें वर्तमान पत्रांचें नुकसान होऊनहि, समाजास व पर्यायानें देशास किती बरें नुकसान होईल ? करितां माझें त्यांस इतकेंच सांगणें आहे कीं, त्यानीं तसें न करतां, 'अभिमानें उठे मत्सर ॥ मत्सरें ये तिरस्कार ॥ पुढें क्रोधाचा विकार ॥ प्रबळे बळें ॥' ही संतोक्ति नित्य मनामध्यें बाळगून मत्सर, तिरस्कार, क्रोध यांच्यापासून व अपशब्द(शिव्या)या इतक्यांचाहि उत्पादक जो अभिमान तो सोडून देऊन निर्विकार बुद्धीनें, कोणताहि मुद्दा प्रतिपादन करावा आणि आपलें, मासिकांचें व पर्यायानें देशाचेंहि हित साधावें. ते तशा प्रकारें वागतील अशी आशा बाळगून,हा माझा लांबलेला लेख पुरा करतो.

श्री. रा. राजाध्यक्ष

इकडे लक्ष द्या

भारत संस्थेला पुंडलिक प्रेसाशिवाय आतां पद्मावति मिनेव्हांची जोड मिळाली असून, इतर आवश्यक मशिनरीचीहि सध्यत भर पडली आहे या मुळें भारत प्रकाशनाशिवाय कोणतींही पुस्तकें छापण्याची उत्तम सोय झालेली आहे सारिनिर्दिष्ट दोन्हीं कामें व्यवस्थित रीतीनें पार पडण्यासाठीं संस्थेच्या कार्यक्षेत्राची दोन कडे विभागणीं करण्यांत आली आहे. पैकी एकांत केवळ भारत व तदंतरगत् व्यवहाराचा समावेश करण्यांत आला असून दुसरींत तुमच्या छपाई कामाची योजना केली आहे व सर्वांवर एक स्वतंत्र व हुषार मनेजराची नेमणूक करण्यांत आली आहे. वरील गोष्टी विषयींची खुलासेवार माहिती लवकरच प्रसिद्ध होईल.

मालक भारत

Ecos & Critica

O Bharat

A proxima edição do *Bharat* publicar-se há em duas paginas e a seguinte e outras serão impressas na nova maquina com o novo tipo.

Custa acreditar

Consta-nos que o Governo Provincial propoz ao Ministro das Colonias a criação de tres lugares, chorudamente pages Custa-nos acredita-lo.

Se, porem, fôr verdadeiro tal boato, não podemos deixar de protestar cantra ele com toda a veemencia e indignação.

सेंट फ्रान्सिस झेवियरचें

शवप्रदर्शन

आज काल आमच्या गोमांतकांत सेंट फ्रांसिस झेवियरच्या शवप्रदर्शनानिमित्त मोठा उत्सव चालू आहे. जुन्या गोव्याला जणूं नवजीवन प्राप्त झालें आहे. जें गो पडकल पूर्वी भरभराटींत होतें त्याची साक्ष थोड्या अंशांनीं तरी लोकांना आज पटत आहे. आतां तेथें हजारों रुपयांची घडामोड चालते. पणजी शहर तर ह्या दिवसांत प्रति ...च झालें आहे. पण गोपकपट्टणाचें हें ... नव क्षणिक आहे व कांहीं दिवसांनीं तर हें सर्व स्वप्नांत होऊन गेल्यासारखें वाटेल.

आतां पोषाखाच्या, जेवणाच्या वगैरे बाबतींत युरोपियनाप्रमाणें वागणारे, हिंदूंना त्यांचे तीन तोंडाचे, हत्तीच्या तोंडाचे वगैरे विचित्र देव ह्मणून हंसणारे, ज्यांना स्वतांची अशी मातृभाषा नसलेले, व थोडे पोर्तुगीज व थोडे कोंकणी शब्द घालून तयार होणारी घेडगुजरी भाषा बोलणारे आणि बहुतेक सर्व बाबतींत युरोपियनाच्या पावलांवर पाऊल टाकून अंधानुकरण करणारे आमचे सुशिक्षित ख्रिश्चनबंधू, युरोपियनानीं संतपदावर स्थापन केलेल्या युरोपियन फ्रांसिस झेवियरच्या मसाला घालून राखलेल्या शवाचें जे दर्शन करतात व तें प्रेत जशाचें तसें आहे, मसाला वगैरे घालून राखलेलें नाहीं व जर त्याला सुई टोचली तर रक्त येतें, अशी गोष्ट छातीवर हात मारून स्वतः पाहिली असल्याची फुशारकी मारतात, तें पाहून कोणालाही त्यांच्या धर्मवेडेपणाबद्दल व अक्कल शून्यतेबद्दल कींवच करावीशी वाटेल. मागच्या वर्षांप्रमाणें ह्याही वर्षी आंधळ्यांना दृष्टि, मुक्यांना वाचा, रोग्यांना आरोग्य वगैरे दैविक चमत्कार त्या प्रेताचें दर्शन घेतल्यावर झाले. पण जे भक्त त्याचें दर्शन घेण्याकरितां ह्मणून जातात त्यांना सुखरूप घरीं आणून पोंचविण्याचें काम मात्र त्या बिचाऱ्या प्रेताच्यानें होत नसेल. या 'आकाशांतील बापाच्या कोंवळ्या कोकरांपैकीं' थोडीं तरी 'कोंकरें' घोडारस्त्यांच्या तडाक्यांत सांपडून किंवा गर्दींत चेंगरून दुखावतात अथवा स्वर्गवासी होतात. या दिवसांत तर पोर्तुगीज वर्तमानपत्रकारांना या अपघातांशिवाय व दैविक चमत्काराशिवाय दुसरें कांहीच लिहावयास जागा नसते. त्यांना हें ... युग यांत्रिक नसून फक्त 'मिलाग्रींचें' आहे असें वाटतें. नव्हे ठाम मत आहे. असें जरी आहे तरी खुद्द ज्या ठिकाणीं हें शव आहे त्या जुन्या गोव्यांत 'मुके आंधळे पांगळे आणि थोटे' या पंथाचे लोक भिक्षांदेही करीत रस्त्याच्या दोन्हीं बाजूला बसलेले किंवा उभे असतात. त्या बिचाऱ्यांची सेंट फ्रांसिस झेवियरला आठवणच होत नसेल असें वाटतें. कारण कोठें झालें तरी दिव्याखालीं अंधार असतोच.

आतां घटकाभर कल्पना करूं कीं तें प्रेत मसाला वगैरे भरलेलें नसून जशाचें तसें आहे. जीजस ख्राईस्ट हा फ्रांसिस झेवियर पेक्षां कितीतरी पटीनीं श्रेष्ठ होता हें कोणीहि ख्रिश्चन कबूल करील. तेव्हां या बिचाऱ्या ख्राईस्टनें असें कोणतें पाप केलें होतें कीं ज्या योगानें त्याचें प्रेत तसें राहूं नये व त्याच्या पेक्षां कमी दर्जाच्या माणसाचें रहावें. यावरून हें सिद्ध होतें कीं ख्राईस्टच्या वेळीं जरी ही कला [मसाला भरून प्रेत राखण्याची] इजिप्शीयनांना अवगत होती तरी ती युरोप व आशिया यांतील लोकांना माहीत नव्हती व त्यावेळीं आफ्रिकेचा बहुतेक भाग अज्ञात होता. यामुळें त्यांना ख्राईस्टचें शरीर राखतां आलें नाहीं. पण फ्रांसिस झेवियरच्या वेळीं तशी गोष्ट नव्हती. तीनशें वर्षांपूर्वीं इजिप्तचें दळण वळण आशिया व युरोप या खंडांशीं सुरू होतें. त्यावरून त्यांना हें फ्रांसिस झेवियरचें शरीर राखतां आलें.

पण सध्या जुन्या गोव्याला दाखविल्या जाणाऱ्या प्रेतावरून तें मसाला भरलेलें आहे की तें [थोडे लोक ह्मणतात त्या प्रमाणें] फक्त लांकूड व पाय रंगविलेल्या हाडांचा सांपळा आहे हेंच समजत नाहीं. अ:

" भारताचा " येता अंक अर्धा खरूपांत प्रसिद्ध होऊन, त्या पुढील अंकापासून नवीन व्यवस्था अमलांत येईल. ज्यां कडून अजून वर्गणी आली नसेल त्यांनीं ती पाठवून आभारांत ठेवावें.

मनेजर भारत.

भारत

गुरुवार पौष व० १ दा १८४४

मद्यपान प्रतिबंध

मद्यपान प्रतिबंधाची आवश्यकता अनेकदां आह्मीं सरकारच्या नजरेस आणिली आहे. परंतु त्याचा व्हावा तसा व तितका उपयोग झाला नसल्यानें खालील मजकूर आह्मीं सरकाराच अर्पण करीत आहों. त्यामुळें तरी नोकरशाहीची 'मद्यपि' दृष्टि निवळून तिच्या मेंदूंत सुविचार जागृति होवो, असें इच्छितों

अमेरिकेंतील मॅसेच्युसेटस संस्थानामध्यें मद्यपानप्रतिबंधाचा–कायदा केल्यापासून गुन्हे, दारिद्र्य, रोगराई वगैरे समाजशत्रू कसे नाहींसे होत चालले आहेत याबद्दल बोस्टन येथील सायंटिफिक टेंपरन्स फेडरेशनच्या चिटणीस मिस्, कोरो फ्रांसेस स्टॉडर्ड यांनीं शोधक बुद्धीनें पाहणी करून मिळविलेली माहिती प्रसिद्ध केली आहे. ती पाहून हारवर्ड मेडिकल स्कूलचे डॉ. रिचर्ड सी कॅबॉट ह्मणतात— 'मद्यपानप्रतिबंधानें मॅसेच्युसेटस मधील गरिबांवर अनेक उपकार झाले ... गली आहे. बायकांतील मद्यपानाचें प्रमाण तर फारच कमी झालें आहे'

मिस स्टॉडर्ड यांनीं तुलनेसाठीं, मद्यपानप्रतिबंधाच्या आधींचीं स. १९११ ते १९१८ हीं सात वर्षें, व मद्यपानबंदी झाल्यानंतरचीं दोन स. १९२०-व २१ हीं वर्षें घेतलीं व त्या अवधींत मद्यपानप्रतिबंधापासून किती फायदा झाला हें दाखविलें आहे, त्यावरून असें दिसतें:–

दारूपायीं अटक होणारांची संख्या निम्म्यानेंहि कमी झाली. तुरुंगांतील कैद्यांची संख्या निम्म्याहून कमी झाली मद्यपानप्रतिबंधापूर्वीं शेंकडा अठरा मुलांचे बाप, व शेंकडा तीन मुलांच्या आया दारूबाज असत. आतां बापांचें प्रमाण शेंकडा एकावर आलें असून दारूबाज आयांचें तर नांव नाहीं.

शाळेंतील हजेरीचें प्रमाण वाढलें आहे.

मुलांना अन्नवस्त्र बरें मिळूं लागलें आहे.

दारूपायीं होणाऱ्या मृत्यूचें प्रमाण निम्म्यापेक्षां कमी झालें आहे.

दवाखान्यांतील दारूबाज रोग्यांचें प्रमाण कमी झालें आहे.

कुटुंबवत्सल मनुष्य दारूवाल्यांच्या कंपूतून फुटला आहे त्यामुळें भिक्षागृहांतील संख्या निम्म्यापेक्षां कमी झाली आहे.

मिस स्टॉडर्डची हीं विधानें सत्य असल्याबद्दल कित्येकांनीं ग्वाही दिलेली आहे.

सौथ एन्ड मिशनचे सुपरिंटेंडट ह्मणतात — मद्यपानप्रतिबंधाचा कायदा होण्यापूर्वी आमच्याकडे जे लोक मदत मागण्यास येत त्यास कारण दारूच होतें. आतां आमच्याकडे शेंकडा दोन माणसेंहि मदत मागण्यास येत नाहीत

सौथ एन्ड हाऊसचे आलबर्ट जे. केनेडी ह्मणतात— 'मद्यपानप्रतिबंधाचा कायदा होण्यापूर्वी आमच्या मोहल्लीं जी स्थिति होती त्यापेक्षां आतां किती तरी सुधारली आहे. कौटुंबिक सुखाची वृद्धि झाल्याचें दिसून येतें. मद्यपान सोडल्यानंतर दुसरें तत्सम पेय घेण्याकडे लोकांची प्रवृत्ति कमी आहे. सुखें कमी झाल्यामुळें लोकांस बरेंच वाटत आहे. दारू हा मोठा शत्रु आपणांत मिरला होता असें मजुरांसहि वाटत आहे, व असे सुरे (सलून) पुनः सुरू व्हावे अशी कोणाचीहि इच्छा ...'

मि सूर ह्मणतात— गेलीं पंचवीस वर्षें या मुलांचें फारच प्राबल्य माजलें होतें. परंतु मद्यपान प्रतिबंधाचें सुरू होऊन पुरीं वर्षें जरी लोटलीं तरी जुन्या भयानी शीं तुलना करितां पृथ्वीचा स्वर्ग झाला आहे, असें ह्मणण्यास हरकत वाटत नाहीं.

हारवर्ड युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष डॉ चार्लस डब्लू इलियट ह्मणतात - मद्यपान प्रतिबंधानें लोकांचें आरोग्य, सुख व काम करण्याची शक्ति वाढली आहे, अशा तऱ्हेचा पुरावा कारखानदार वैद्य, व इतर निरनिराळ्या संस्थांत कार्यें करणारी मंडळी यांजकडून मिळत आहे. दारिद्र्य, रोगराई, गुन्हेगारी व दुर्व्यसनें नाहींशीं होण्यास मद्यपानप्रतिबंधाशिवाय दुसरा उपायच नाहीं असें अनुभवास आलें आहे.

स्फुट विचार

बुडत्याचा पाय खोलांत:— गोमांतकाच्या टीचभर देशांत वीतभर नोकरशाही तिजोरीचा कसा फन्ना उडवीत आहे हें पोराटोरांसुद्धां कळून आलें असतां, नोकरशाहीची आणखीही वाढ करण्याच्या बेतांत प्रांतिक सरकार गुंतल्याचें पाहून, 'बुडत्याचा पाय खोलांत' या ह्मणीची आठवण कोणालाहि झाल्याखेरीज रहाणार नाहीं. आहे त्या नोकरशाहीचें प्रमाण कमी करण्यांत येऊन, तिच्या मद्द डोक्याच्या अधिकाऱ्यांनीं सारासार विचाराला दूर झुगारून ठरविलेले लठ्ठ पगारहि तिजोरीच्या ऐपतीनुरूप छाटण्यांत यावे, अशा अर्थाची लोकपक्षाची एकीकडून मागणी होत असतां, या मागणीकडे दुर्लक्ष करून दुसरीकडून उलट नोकरशाहीचीच वृद्धि करण्याचा सरकारनें अट्टाहास धरावा हें देशाचें दुर्दैव नव्हेतर काय ? अशानें देशाची सुधारणा कशी होईल ? 'तळलेली पोळी ब्राह्मणाला दान द्यावी लागली तर मालकाला–यजमानाला, त्याच्या कुटुंबाला व त्यानें आमंत्रिलेल्या इतर मंडळींना काय राहणार ? एकंदर कारांचें उत्पन्न नोकरशाहीच्या बकासुरी उदरांत 'गडप' होत असल्यानेंच कसलीहि उपयुक्त सुधारणा मूर्त स्वरूपांत आणणें अशक्य झालें आहे. ... आणीव सरकारला नाहीं असें नाहीं. आणीव आहे पण लोकमताला अनुसरून नोकरशाहीच्या वाढीविरुद्ध दोन हात करण्याला ... व ... सरकारला धीर कुठें आहे ? सरकारची ही दुटप्पी वृत्ति अशी कायम राहिल्यास तिनीं कडु फळें चाख... मात्र आमच्यानीं जातां जातां वजाविल्या शिवाय रहावत नाहीं.

जुन्या गोव्यांत: — जुन्या गोव्यांत नवे चमत्कार व्हावयास लागल्यापासून तेथील झुनेरणा विश्वास गेला असून नवीन संचरलें आहे. आंधळ्यांना दृष्टि फुटल्यामुळें, कित्येक विश्वासानुसार धर्मभिमानाच्या कोत्या समजुतीनें अंध बनले आहेत ! पांगळ्यांना पाय फुटल्यामुळें, नास्तिक लोकांचे पाय एकदम पंगू होत जात आहेत ! मुक्यांना वाचा फुटल्यामुळें, ख्रिस्तावर तशेरे ओढणाऱ्या लोकांची वाचा एकाएकीं बंद झाली आहे ! तात्पर्य शवप्रदर्शनाकडून धार्मिक क्रांति घडविली जात असून, त्यामुळें कित्येक हिंदुहि फसले जात आहेत ! चमत्कार आहे, झालें. असो. वस्तुस्थिति अशी आहे कीं, चमत्कारांच्या गर्जनेनें, मुके, पांगळे, आंधळे आणि थोटे अशा शारीरिक क्लेशांनीं जाचलेल्या लोकांचा घोळका शवा समोंवती जमत असून सपरील फक्त आल्या वाटेनें डोईवरी भरून परत जात आहे. अशा लोकांची दुःस्थिति पाहून, आमच्या अंतःकरणास घरें पडत आहेत. पण करणार काय ? अशक्य आशेनें विचारशक्ति लुप्त झालेल्या लोकांसमोर युक्तिवादाचें महत्त्व कसें राहील ? तेथें अनुभवच कांहीं कार्य करण्यास शकतो व हीच स्थिति अवलोकनांत येत असल्यानें कित्येक 'भागचे' शहाणपणा शिकावयास लागले आहेत, ही त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट होय.

मतदार व्हा:—या व येत्या आठवड्यांत मतदार होऊं इच्छिणाऱ्या लोकांनीं त्या त्या तालुक्याच्या मुनिसिपल कचेरींत

डत असलेल्यास वर काढण्यास पाण्यांत स्पर्श न करतां कांठावर राहून त्याला यु क्त्यांच्या गोष्टी सांगण्याच्या आणि तो अ धिकच बुडत आहे असें पाहून त्याच्या मूर्खपणाबद्दल त्याला नावें ठेवावींत व मोठ्या रागानें तो ऐकत नाहीं म्हणून त्याच्या नावानें खडे फोडावेत यांत काय शहाणपणा आहे ? अशाच रितीनें एकमेकांविषयीं द्वेष, टीका इ. उत्पन्न होत असतात.

ह्या परदोषाविष्करणामुळें समाजांत, एकमेकांविषयीं द्वेष इ. विघटना उत्पन्न करणारे गुण निर्माण होत असतात. आणि अशा रितीनें सुशिक्षित व देशभक्त म्हणविणारे लोक अशिक्षित व अज्ञान लोकांपासून अलग राहण्याचे प्रयत्न करीत असतात अणू काय अशा लोकांशी सहकारिता केल्यानें त्यांस यांचा अज्ञानरूपी सांसर्गजन्य रोग लागून अज्ञानच बनतील ! असांत काय पुरुषार्थ आहे ? जो पुरुष पतीताना, त्यांच्याशीं समतेनें वागून, त्यांचा उद्धार करतो, तोच खरा पुरुषार्थी होय. तोच खरा धैर्यवान होय ! सुशिक्षित वर्गानें अशिक्षित वर्गाशीं फटकून वागण्यांत त्यांचा भित्रेपणा व कमकुवतपणा मात्र दृष्टीस पडून येतो. हिरा उकिरड्यांत टाकला म्हणून त्याम कधींहि डाग पडायाचे नाहींत. तसाच खरा सुशिक्षित त्यास जरी अज्ञानाच्या गर्तेत बुडवून काढलें तरी सुद्धां तो मळणार नाहीं. अज्ञानाचा जर सुशिक्षितावर परिणाम होत असेल तर त्याचा तो सुशिक्षितपणाच नव्हे, आणि त्यांचें ज्ञानहि खरें ज्ञान नसून, ती एक ज्ञानाची व सुशिक्षितपणाची नक्कल आहे. आमच्यांत जे, (सुशिक्षित हाणविणारे लोक) लोकांशीं फटकून वागत असतात ते तशाच प्रकारचे खरे सुशिक्षित नसून इमिटेशन असतात, त्यांस आपणास लोकानीं बरें हाणावें अशी इच्छा मात्र असते. त्यांनां नकली हाटलेलें खपत नाहीं आणि लोक तर खोट्यास खरें हाणण्यास तयार होत नाहींत. अशाप्रकारें एकमेकांत बेबनाव उत्पन्न होऊन चुरस वाढत जाते आणि एक मेक परस्परांचे दोष काढून व्यंगें शोधू लागतात व मग टीकेस सुरवात होत असते. अशा प्रकारें परस्परांचें किती तरी नुकसान होत असतें ! तेव्हां अशा ह्या समाज संघटना नष्ट करणाऱ्या परदोषाविष्करणाचा त्याग करून प्रत्येकानें आपल्यांत काय दुर्गुण आहेत ते ओळखून काढून टाकणें व आपलें आणि दुसऱ्याचें कल्याण करून घेणें हें मानवजातीला शोभण्यासारखें व योग्य नव्हे काय ?

राजाध्यक्ष

राष्ट्रीय मराठी शाळा

आमच्या या प्रिय गोमांतकांत मराठी शिक्षण प्रसारार्थ जे प्रयत्न चालू आहेत, त्यांपैकींच पणजी येथें अलीकडे गोमांतकांतील मराठी शिक्षक, श्रीयुत शिवराम गोविंद साळगांवकर यांनीं सहा महिन्यापूर्वी स्वतःच्या प्रयत्नानें स्थापन करून भरभराटलेल्या स्थितींत चालविलेली 'राष्ट्रीय मराठी शाळा' ही एक होय; हें लिहिण्यांत आनंद वाटतो. गोमांतकांत पुष्कळ ठिकाणीं चालू असलेल्या शाळा या त्या त्या स्थानिक गृहस्थांनीं खाजगी किंवा सार्वजनिक स्वरूपानें वर्गणी वगैरे जमवून स्थापन करून पगारी मास्तर ठेवून शिक्षण-कार्य चालविलेलें असतें, पण ही शाळा एका उत्कट, मराठी शिक्षकाच्या स्वयंस्फूर्तीनें चालविलेल्या प्रयत्नाचें दृश्य फळ आहे. पगारी मास्तरांकरवीं चालविलेल्या मोठमोठ्या मंडळाच्या शिक्षण संस्था शेजारीं असतां ही शाळा स्थापन झाल्याबरोबर थोड्या मुदतीच्या आंत ५०-३० विद्यार्थी संख्या होते; हें कशाचें द्योतक आहे बरें ? विद्वान लोकांची भूमि जें पुणें शहर, तेथील डेक्कन कॉलेज सारख्या सरकारी संस्थेत ३०० विद्यार्थी व फर्ग्युसन कॉलेजमध्यें दोन हजार विद्यार्थी असतात, ह्या शिक्षकांच्या कळकळीनें दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा परिणाम होय. शिक्षकांनीं स्वतःच स्थापन करून चालविलेल्या शाळेंत ते ज्या आत्मिय भावनेनें उत्साहपूर्वक कार्य करतील तें कार्य जनतेनें स्थापिलेल्या शाळेंत पगारी मास्तराकडून होणें शक्य नसल्यास नवल नाहीं अशा स्वयंस्फूर्तीनें स्थापन झालेल्या शाळांत आपलीं प्रिय बालकें पाठवून जी गोमांतकांतील बिचारी जनता अशा शिक्षकांच्या मुलांची किंमत जाणते, तितें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे. असो.

वरील शाळेंत सध्या ५० विद्यार्थी असून चार इयत्तापर्यंत गोमांतकीय राष्ट्रीय आकांक्षेचा प्रश्न लक्ष्यांत घेऊन शिक्षण दिलें जातें. मराठी चौथ्या इयत्तेपासून दुय्यम भाषा ह्मणून पणजी येथील श्री. श्रीराम आत्माराम साळगांवकर हे लिसेवेतीर्ण तरुण राष्ट्रीय स्वयंसेवक भावनेनें पोर्तुगीज शिक्षण देत असतात, हें त्यांस भूषणावह व इतरांस अनुकरणीय आहे.

एक शिक्षण प्रसारेच्छु

Companhia Balavanta

Está dando os seus espectaculos no teatro *ad hoc* eregido em Pangim esta companhia melodramatica. Informam-nos que os seus actores são premiados e dos mais celebres

Falaremos na edição imediata dessa companhia, mais de espaço.

Avisando...

Previne-se que daqui em diante não se publicará no nosso jornal nenhum anuncio sem que venha acompanhado da importancia do seu custo provavel.

Temos de adoptar este *sistema* porque pessoas reputadas *acreditadas* procuram pregar-nos *calotes* .. tremendos, depois de se comprometer a pagar os seus anuncios, nos termos da nossa tabela.

Individualisaremos os casos, se fôr necessario.

वर्तमानसार

—मागील आठवड्यांत " धि लेडीज क्लब" मंडळीनें कवळें येथें श्रीशांतादुर्गा देवालयाच्या विस्तृत पटांगणांत उभार लेल्या भव्य तंबूत आपले खेळ करून दाखविले. शेवटच्या रात्रीं मंडळीने मालक श्री. पाटील व कुळकर्णी व म्यानेजर श्री. श्यामराव कसवेकर यांच्या खास निमंत्रणावरून श्रीमंत राजेसाहेब संस्थान सौंधा यांची स्वारी आपल्या परिवारासह हजर राहिली होती. खेळास लोकांची अतोनात गर्दी झाली होती. खेळांतील बहुतेक कामें फा[illegible] आश्चर्यकारक झाल्यानें श्रीमंत राजेसाहेबांची स्वारी खूष झाली. खेळाचे शेवटीं श्री. भास्कर प्रतापराव सरदेसाई यानीं समयोचित भाषण करून श्री राजेसाहेबांचे वतीनें मंडळीचे म्यानेजर यांस एक सुवर्णपदक देऊन मंडळीचा गौरव केल्याबद्दल श्रीमंत सादेकर राजेसाहेबांचे नम्रतापूर्वक अभार मानल्यावर खेळाचें काम संपलें. असें एक प्रेक्षक कळवितात.

—श्री रवळनाथ वाचनालय पेडणें या संस्थेचा दहावा वाढदिवस येत्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस पार पडणार आहे. भारतास आलेल्या आमंत्रणाबद्दल वाचनालयाचे अ० श्री. ना. प्रभु देसाई यांचा तो आभारी आहे.

—मुरगांव-जेठी शाळेनें जाहीर केलेल्या परीक्षा अपरिहार्य कारणामुळे पुढें ढकलण्यांत आल्या असून बक्षील समारंभ हि अर्थात् परीक्षा नंतर ठेवण्यांत आला आहे. असें संस्थेचे सेक्रेटरी लिहितात.

—'बालोन्नति समाज पेडणें' या लोकप्रीय संस्थेकडून भारतांत प्रसिद्ध होण्यासाठीं समाजाच्या वार्षिक व्याख्यानमालेचा कार्यक्रम आला होता. पण गेला अंक अर्ध्या स्वरूपांत छापणें भाग झाल्यावरून त्यास जागा मिळाली नाहीं. व्याख्यानमालेस हजर राहण्याविषयींहि आम्हांस प्रेमाचें आमंत्रण आलें होतें परंतु एकाच कारणामुळें —संपादकांच्या आजारामुळें—दोन्ही गोष्टी घडून आल्या नाहींत याबद्दल समाजाच्या सन्माननीय व [illegible] चालकांची आम्हीं क्षमा मागतों. संस्थेचा अभ्युदय होवो, असें इच्छितों.

जाहिर विनंति

॥ परोपकाराय पुण्याय पापाय पर पीडनाम् ॥

जलमार्गानें व अग्निरथद्वारां प्रवास करणारे लोक सावर्डें 'कुडचडें' येथें एकत्रित होत असल्यामुळें या ठिकाणीं एकादें विश्रांतिस्थान झाल्यास प्रवासीजनांस विश्रांति मिळून त्यांच्या सर्व गैरसोई दूर होऊं शकतात. बरेच दिवसांपासून ही अडचण गोव्याच्या बाहेरील मंडळीस व गोमांतकांतील रहिवासी यांस जाचत आहे. करितां येथें स्टेशन समोरील सरकारी जागेंत एक अत्यंत सोइस्कर अशी धर्मशाळा बांधण्याचा विचार ठरला असून जमीनीचे बाबतींत सरकारकडे मागणी केल्याचें आमचे गोव्यांतील बंधु जाणतच आहेत. हें काम पैशांचें असल्यानें त्यांस सर्वांनीं हात भार लावून दसका लकडी एक का बोजा या न्यायानें ही सर्वांची गैरसोय एकत्र मनानें सर्व मंडळीतर्फे दूर झाली पाहिजे. या कामीं सर्व गोमांचलवासी यांची पूर्ण सहानुभूति आहे असें ह्मणणे अन्यथा होणार नाहीं. सर्व भूत मात्रांचे अंतःकरणांत ज्याची वस्ती आहे असा जो अंतर्यामी दीनानाथ त्याची या कार्यास पूर्ण कृपा दृष्टि असलीच पाहिजे हें निराळे सांगणें नकोच. हें कार्य धर्माचें आहे. परोपकाराचें आहे, अत्यंतागत्याचें असून फारच लोकोपयोगी आहे. अशा सत्कार्यास प्रत्येकानें ईश्वरास ओळखून आपल्या शक्तीप्रमाणें योग्य ती मदत करणें हें मनुष्य मात्राचें कर्तव्य आहे. हें दान सात्विक वृत्ति वाढविणारें व तसेंच प्रत्यक्ष फल देणारें आहे.

येथें देश, काल पात्र, असा त्रिवेणी संगम असून या संगमांत स्नान करणारांचीं सर्व पापें भस्म होतील असा हा कपिला षष्ठीचा योग आहे. धर्माभिमानीं, देशाभिमानीं, सत्वशील याचा फायदा अवश्य घेऊन इतरांस तो घेण्यासहि रस्ता दाखवितील अशी उमेद आहे. 'श्रीमत् भगवत्गीतेंत देशे कालेच पात्रेच तद्दानं सात्विकरमृतं'. दान, हेंच खरें हेंच खरें तीर्थ व क्षेत्र असें म्हटलें आहे. याचा सूज्ञ जरूर विचार करतीलच.

अनेक देशांतील प्रसिद्ध धर्मशाळा आमचे अवलोकनांत असल्यामुळें या कामी योग्य ती सुधारणा व्यवस्थित मांडणी करून धर्मशाळा प्रवासी लोकांस अत्यंत उपयुक्त होईल, अशा तऱ्हेनीं करण्याचा विचार ठरला आहे. कोणींहि आम्हांस उपयुक्त सूचना केल्यास त्यांचेहि आम्हीं आभारी होऊं. धर्म शाळेकरितां सावर्डें येथीलच पंच नेमावेत असा विचार आहे. म्हणजे देखरेख चांगली राखिली जाऊन इमारतीची जोपासना व व्यवस्था कायम राहील. वर्गणीचे आकडे नामनिशिवार घेऊन ती पूर्ण जमा झाल्यावर ज्या गावांत ती केली जाईल त्या गावांकडूनच त्यांच्या संमतीनें ती थैली कोठें ठेवावी वगैरे ठराव पास झाल्यावर ती रवाना केली जाईल. म्हणजे कोणाचेहि तक्रारीस जागा राहणार नाहीं. या विश्रांतिस्थानांकरितां पत्रं पुष्पं जी योग्य ती व तशीं सेवा प्रत्येक बंधू भगिनीनीं करून आपल्या सत्कीर्तिं नौबदीचा डंका वाजेल अशा तऱ्हेची सुरवातगतभनी पाटीं गोमांतकांत गोमांतकातीलच लागावी व आम्हांस पूर्ण आभारांत ठेवावें अशी आमची नम्र विनंति आहे. सावर्डें, कुडचडें

मूर्ती.

भारत

गुरुवार पौष शु० ११ शी १८४४

सरकारचे 'अकरा' वाजले

आजपर्यंत आमच्या सरकारनें अनेक प्रकारचे नवे नवे खेळ खेळून जी अकलेची मनमुराद खैरात केली ती कमी पडली ह्मणूनच कीं काय, त्यानें आतां एक नवी शकल काढिली असून तिची अंमलबजावणीहि या महिन्यापासून सुरू झाली आहे. शस्त्रप्रदर्शनानिमित्त सरकारनें मुनिसिपालटीकडून जुगार खेळण्याला परवानगी देववून जें आपल्या शहाणपणाचें प्रदर्शन (त्या शस्त्रप्रदर्शनाबरोबरच) अखिल जगासमोर मांडलें आहे त्याचे किती अनिष्ट परिणाम भोगावे लागतील व त्याचें पर्यवसान कोणत्या वाईट स्वरूपांत परिणत होईल हें आजच सांगणें कठीण आहे. पण मागल्या एकंदर लक्षणावरून व 'बुडत्याचा पाय खोलांत' या न्यायाला अनुसरून हा घसरलेला पाय सरकारला व त्याच्याबरोबरच आम्हांलाहि कोणत्या खड्यांत वाहून नेईल याचा नेम नाहीं असें म्हणून ठेवायाला हरकत नाहीं. ११-१५ हजार रुपयांच्या जबरदस्त मोहापासून पणजीचें स्थानिक सरकार आपलें रक्षण करून घेण्याला शकलें नाहीं. ह्मणून हा ११-१५ हजार रुपयांच्या तोबऱ्यावर जुगाराच्या परवानगीचा हा मंगल [illegible] पालण्यांत आला असें कोणालाहि वाटणें साहजिक आहे. आणि ह्यावरूनच पुढें कदाचित् भरभक्कम रक्कम कोणी देऊं केली तर ह्या [illegible] सरकार लुटारूपणालाहि परवानगी देईल कीं काय, अशी जनतेला भीति वाटत असली तरीहि त्यांत आश्चर्य नाहीं. कारण जुगार व लुटारूपणा यांमध्यें विशेषसा फरक नाहीं. फरक असेल तर तो हाच कीं, पहिला व्यवहार उभय पक्षांच्या संमतीनें होतो व दुसरा उभय पक्षांपैकीं एकाची नाखुषी असतांना होतो. पहिल्या व्यवहाराचा परिणाम अनिश्चित व दुसऱ्याचा निश्चित असतो पण दोन्हींचें पर्यवसान एकच 'धननाश' हें असतें. एवढ्याशा चिटोऱ्याबद्दल ११००० हजार रुपये पणजी मुनिसिपालटीला मिळालें, ह्मणून वास्तविक आम्हीं सरकारचें अभिनंदन करायाला पाहिजे; पण त्या चिटोऱ्याचें मूळ जनतेच्या धनराशीच्या मूळावर येणारें असल्यामुळें तसें न करितां आम्हांला त्याचा निषेधच करणें योग्य वाटतें. आधींच सरकारनें प्रजेच्या सुखदुःखाकडे व आकांक्षाकडे दुर्लक्ष करून तिला पिळून काढणारी अनेक प्रत्यक्षाप्रत्यक्ष साधनानीं जनतेच्या पोटावर गोळीमारा चालविला आहेच. त्यांतच जुगार परवानगीला योग्य वेळीं आळा न पडून कायमचा समावेश करण्यांत आला तर प्रत्यक्ष लुटीचें दुसरें साधन जी 'दरोडेखोरी' तिचेंहि अवलंबन सरकारकडून होणार नाहीं अशी खातरी कोणी बाळगावी ?

'आधीं जाते बुद्धि व मग जाते लक्ष्मी' या न्यायान्वयें विनाशकाल जवळ आला ह्मणजे जसा बुद्धिभ्रंश होतो त्याप्रमाणें सरकारला जुगार परवानगी सारखा जो भयंकर व भिकार डोहळा झाला त्यावरून नुसती बुद्धीच चळली आहे व भविष्यकालाच्या पोटांत कसल्याहि 'गुणी बाळाचा गर्भसंभव' नाहीं असें ह्मणणें वरेंच चुकीचें होईल असें आम्हांला वाटतें. परंतु फक्त बुद्धिभ्रंशच ग्रहीत धरला तर 'साठी बुद्धि नाठी' हेंहि त्याचें कारण असूं शकेल. चारशें अधिक वर्षें वयोमानपरत्वें गोवा प्रांतावरील पोर्तुगीज सत्ता वृद्ध व खिळखिळी झाली आहे. तेव्हा वार्धक्यामुळेंहि नतभ्रष्ट बुद्धीचा उदय झाला असावा. एरव्हीं, जग पुढें पुढें चाललें असताना, अमेरिकेसारख्या अत्यंत सुधारलेल्या देशांतील दारुबाजी अजिबात बंद करण्याबद्दल कडक निर्बंध घालण्यांत येत असतानां व सर्वत्र व्यसनबाजीचें बंदीचे कायदे अस्तित्वांत येत असतानां, या सरकारला महाराजीकीच एका बाजीला —जुगाबाजीला—परवानगी देण्याचें कशाला सुचलें असतें ? या जुगाबाजींमुळें मोठमोठीं राज्यें वरें धुळीस मिळालेलीं आहेत. जुगारामुळें पांडवांना वनवास भोगावा लागला जुगारामुळेंच पुण्यश्लोक नलराजाला राज्यत्याग करण्याचें कपाळी आलें. हीं उदाहरणें डोळ्यांसमोर असतानां जुगाराला प्रोत्साहन दिलें जावें ही केवढी खेदाची गोष्ट आहे ? सरकारनें याचा सावकाश विचार केला पाहिजे तसें न झालें तर 'विनाशकाले विपरित बुद्धि' असें ह्मणणें आम्हांला भाग पडेल.

स्फुट विचार

सरकार व जुगारः— जुगार हा गुन्हा आहे असें खुद्द सरकारी कायद्यानींच ठरविल्यानंतर, त्याला समाजांत इतस्ततः नाचू देणें प्रत्यक्ष सरकारच्या इभ्रतीच्या दृष्टीनें किती धोक्याचें आहे हें ज्यास्त विशद करून सांगण्याचें कारण नाहीं. परंतु सरकारनें शस्त्रप्रदर्शनानिमित्त जुगारास वाव देऊन, इभ्रतीचा व आपला कांहींच संबंध नसल्याचें जगाच्या निदर्शनास आणलें आहे. या संबधीं आजच्या अग्रलेखांत निषेध व्यक्त केला आहे. आतां जनतेसमोर हाच प्रश्न मांडावयाचा आहे कीं, खुनावलेल्या व खुळावलेल्या सरकारचीं खुनी व खुळीं कृत्यें जशींच मूढासारखीं पहात रहाणार की कांहीं तरी हालचाल करणार ?

चमत्कारः— शस्त्रप्रदर्शनानें चमत्कारांची बहार उडवून दिली आहे. जिकडे तिकडे चमत्कारांशिवाय बोलणेंच निघत नाहीं. हा खरोखर चमत्कार होय. इतक्या चमत्कारिक शवाकडून चमत्कारिक स्थितींत सांपडलेल्या आमच्या देशाचें दुर्दैव संपविलें जात नाहीं, हाहि एक चमत्कार आहे. या इतक्या चमत्कारांची गर्दी उसळल्यामुळें मनाची व जनाची भावना चमत्कारिक बनत असल्यास नवल नाहीं. अमो या विषयावर जास्ती विचार प्रदर्शित केले गेल्यास कित्येकांस चमत्कारिक वाटण्याचा संभव असल्यामुळें, चमत्कारांच्या या चमत्कारिक पुराणास येथेंच आळा घातलेला बरा.

स्टेशन जवळील दुकानें व पंचवाडी येथील बहुतेक वर्गणीचें काम संपत आलेंच आहे. सवडीनुसार ती भारत पत्रांत दर्शित करणार आहोंत.

वरील धर्मशाळेप्रीत्यर्थ खटपट करावी या उद्देशानें सर्व गोमांतकीयांतर्फे झटणारा एक स्वयंसेवक

पूर्णाश्रम

भारत

गुरुवार पौष शु० ३ या १८४४

म. गांधींची योग्यता

महात्मा गांधीची व त्यांनीं रूढ केलेल्या उत्तम तत्वांची योग्यता समजण्यासाठीं एका अमेरिकन विद्वानाचें त्यांच्या संबंधाचें मत खालीं देत आहों. त्याचा विचार आमचे वाचक श्रद्धापूर्वक करतील अशी आम्हांस आशा आहे.

'दंडाचा अवलंब न करणें, हा सत्यमार्ग आहे, अशी माझी खात्री असल्यामुळेंच त्याच्या प्रचाराचा उपदेश मी करितों. दंडनीतीनें न्यायमार्ग स्वीकारणें हा न्यायच नव्हे तर स्वतःचें बलीदान करून न्यायारूढ होणें हेंच मानवजातीस उचित आहे. दंडापेक्षां क्षमा हें पुरुषार्थाचें अधिक उज्वल शस्त्र आहे, क्षमा हें वीराचें भूषण आहे. गांधी यांच्या चळवळींतील हीं अंगें प्रमुख असल्यामुळेंच आलें हें युद्ध म्ह० धर्मयुद्ध आहे, असें ते म्हणतात. दंडत्याग हा केवळ तात्पुरता उपाय म्हणून नव्हे तर तोच एक खरा मार्ग आहे, असा गांधी यांच्या बुद्धीचा निश्चय आहे. चिरकालिक स्वरूपाचा विजय आपणास मिळवावयाचा असेल तर त्याला हा एकच मार्ग आपणास मोकळा आहे. ते म्हणतात "दंडाचा पूर्ण अभाव हीच विजयाची पहिली कसोटी आहे. दंडाचें अस्तित्व शिल्लक असेपर्यंत विजय आला म्हणतां येत नाहीं. जीविताचा आणि वित्ताचा नाश करण्याचा मार्ग हिंदुस्थानानें पत्करला तरी त्याचा उपयोग काय? खरा मार्ग म्हटला म्हणजे अत्यंत सहनशीलतायुक्त अप्रतिकार हाच होय. विश्वरचनेचें आदिबीज काय आहे हें ज्याला समजत असेल, त्याच्या लक्षात या मार्गाचें रहस्य अगदीं सहज येईल. विश्वरचनेंचें मूलतत्व जडत्व नसून ती शुद्ध चैतन्यमय आहेत; हा मुख्य मुद्दा लक्षांत आला म्हणजे अप्रतिकाराचें रहस्य आपणासमोर उलगडलेलें उभें राहील आणि क्रोधाचा शब्द उच्चारण्याचें अथवा तरवार परजण्याचें कारणच आपणास नाहीं हेंहि आपणास समजेल. फार काय आपण कोणाविरुद्ध एक बोटहि उचें करण्याची इच्छा आपणास होणार नाहीं.

या दंडत्याग नीतींत आणखींहि एक पुढची पायरी आहे. केवळ दंडाचा त्याग केला म्हणजे त्यांत सर्व कांहीं आलें असें नाहीं. केवळ सहनशीलतेनें सर्व दुखें गिळून बसणें हें या तत्वाचें एकच अंग आहे, आणि यापुढें याचें दुसरें आंग पुरुषार्थाचें आहे. हें आंग असहकारिता हें होय. सहनशक्तीची क्रिया ही परोक्ष स्वरूपाची अथवा अव्यक्त क्रिया होय. तिच्या पुढील पायरी अपरोक्ष अथवा प्रत्यक्ष क्रिया असहकारिता ही होय. याकरतांच हिंदुस्थानांतील नोकरशाहीचा गाजावाजा ज्या क्रियांवर चालतो, त्यां क्रियांत तुम्ही कोणताहि भाग घेऊं नका, असा उपदेश गांधी आपल्या अनुयायांला करितात ज्या राजकीय किंवा सामाजिक क्रिया नोकरशाहीच्या जीविताला अत्यावश्यक आहेत त्यांत हिंदवासियांनीं कोणताहि भाग घेऊं नये, असा गांधी यांचा उपदेश आहे. याकरितां इंग्रजी वस्तूंचा त्याग करण्यास ते सांगतात. हा त्याग पूर्णतेस पोंचला म्हणजे नोकरशाहीच्या अमलाच्या सार्‍या नाड्या आंखडून तिला सन्निपात होईल हें उघड आहे.........

गांधी हे पूर्णत्वे पावलेले आणि विश्वरूप झालेले महात्मा होत. असा हिंदी लोकांचा विश्वास आहे आणि हा विश्वास अस्थानीं नाहीं असें दिसतें. राजकारणाच्या बाबतींत गांधी हे लेनीन इतकेच कठोर आहेत. लेनीनचे पाय ज्याप्रमाणें सामान्य भूमि कधींहि सोडीत नाहीं त्याचप्रमाणें गांधीहि या बाबतींत व्यवहाराला पक्के चिकटून आहेत. आपलें साध्य प्रत्यक्ष सृष्टींत आणण्या करितां लेनीन जितक्या चिकाटीनें धडपडतात तितक्याच चिकाटीनें गांधीहि आपलें अंगीकृत कार्य करीत आहेत; पण लेनीन प्रमाणें त्यांची बुद्धि रजोगुणी नाहीं, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. शुद्ध चैतन्याचा आश्रय रोमेन रोलंड यांची बुद्धि ज्याप्रमाणें सोडीत नाही, त्याचप्रमाणें गांधी यांच्या बुद्धीलाहि या शुद्ध पुण्यमय वातावरणाचा विसर पडत नाहीं. रोलंड यांचा विचार मनांत येण्यांबरोबर मला टॉलस्टॉय यांच्या मूर्ती[illegible] प-रण होतें. लेनीन यांच्या आठवणी बरोबर नेपोलियन मला दिसूं लागतो आणि गांधी यांचा विचार चित्तांत येतांच माझ्या मनःचक्षूपुढें मूर्तीमंत येशुख्रिस्त उभा रहातो ख्रिस्ताच्या जीवितयात्रेची पुनरावृत्ति येथें दिसूं लागते. ख्रिस्ताचेच शब्द गांधींच्या मुखानें पुन्हां ऐकूं येऊं लागतात. ख्रिस्ताप्रमाणेंच गांधी देहदंड भोगीत आहेत. मनुष्यजातीनें उन्नतिमार्गाला लागावें म्हणून ख्रिस्ताप्रमाणें आपल्या जिवाची आटापीट ते करीत आहेत आणि आपलें हें स्वर्गीय साम्राज्य पृथ्वीवर स्थापन करण्याचा उद्योग करीत असतां, ते वीराला उचित अशा स्थितींत देह सोडतील.

आपल्या शिष्यमंडळीसह येशुख्रिस्त कोठें परगांवीं जात असतां त्याच्या शिष्यमंडळींत मोठा वादविवाद सुरू झाला, म्हणून त्यानें चवकशी केली, तेव्हां एका शिष्यानें म्हटलें, सर्वश्रेष्ठ मनुष्य कोण याबद्दल आमचा वाद चालला आहे त्यावर ख्रिस्तानें उत्तर दिलें, 'सर्वांच्या शिरोभागीं बसण्याची ज्याची इच्छा असेल, त्यानें सर्वांची सेवा करावी' ख्रिस्ताच्या या उत्तराची आठवण आजच्या या प्रसंगीं झाल्यावांचून रहात नाहीं.

भावंडांमधील लढा

लेखांक २

लातीन भाषेंत डोक्याला Caput (कापुत) ही संज्ञा आहे, ह्या शब्दाचा इंग्रजी भाषाभिज्ञ कॅपट असा उच्चार करितात फ्रेंच भाषेंत बांकाला banc [बां) असें म्हणतात ह्याला इंग्रजी पद्धतीप्रमाणें बॅंक असें म्हणावें लागेल. स्पॅनिश किंवा इटालियन भाषा न शिकलेले पोर्तुगीज भाषाभिज्ञ ह्या राजभाषेच्या बळावर त्या दोनही भाषांमधील विषय सहजच वाचूं शकतात. स्पेनहून एका इसमाकडून एकदां मला पत्र आलें होतें. त्यांत 'पोर्तुगीजच्या सहवासानें हें पत्र वाचतां येईल' असें म्हटलें होतें. रिपब्लिकच्या अंमदानींत शुद्ध शब्दलेखन पद्धतींत क्षणोक्षणीं फेरबदल झाले नसते तर गोव्यांत अभ्यास करणाऱ्या नव्या पिढींतील विद्यार्थ्यांनां लातीन व इंग्रजी शिकण्यास पूर्वी प्रमाणें सोईवार पडलें असतें. मोनार्कीचे वेळीं दमा हा शब्द Asthma असा लिहून दाखविण्यांत येत असे, तोच आतां ख्रिस्त्यंतरासूर Asma असा लिहिण्यांत येऊं लागला. इंग्रजींत दम्याला प्राचीन पोर्तुगीज प्रमाणेंच Asthma असें म्हणण्यांत येतें, उच्चार मात्र ॲस्मा किंवा ॲस्थमा असा करण्यांत येतो व पोर्तुगीजमध्यें th चा लोप होऊन आज्म असा उच्चार होत असे. आज th ची भानगड मुळींच नाहीं, तथापि Asma म्हणून इंग्रजींत ह्याला काय म्हणतात हें पूर्वी प्रमाणें अर्थबोध होण्यास मार्ग नाहीं. पोर्तुगीज मधील ção (सांव] प्रत्ययान्त शब्द इंग्रजींत tion (शन) प्रत्ययान्त होतात ह्यामुळें अशा मराठ्यांचा शब्द अभ्यासाव्यतिरिक्त आरपाला सहज लिहितां येईल, उदाहरणार्थ Populaçāo [पोपुलसांव] म्हणजे लोकसंख्या हा शब्द इंग्रजींत Population (पॉप्युलेशन] असा लिहिण्यांत येतो.

लिस्बन येथें संस्कृत शाळेचा अध्यापक ख्रिस्तव सी सेबास्तीयांव दॅालेगाद हा होता. त्याच्या इंग्रजी संभाषणांत शन प्रत्ययान्त शब्दांचें वैपुल्य असे. ह्याचें कारण एका इंग्रजानें त्याला पुसलें असतां 'बोचक शब्द न सुचला म्हणजे पोर्तुगीजच्या सामर्थ्यावर शन वर भागवून घेतों' असा त्यानें जबाब दिला.

'सुख आणि शांति' हें पुस्तक एकदां मी वाचीत असतांना 'चाटोब्रायंड" असें एका ग्रंथकर्त्याचें नांव लिहिलेलें मला आढळलें, त्यावेळीं, पोर्तुगीजच्या सहाय्यानें एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांतील तो विद्वान फ्रेंच ग्रंथकार 'शातोब्रियां' (Chateaubriand) होता असें चटकन ध्यानांत आलें.

पोर्तुगीज शब्दांशीं कांहीं भाषांमधील शब्दांचें कसें साम्य आहे हें खालील वाक्यांवरून समजून येईल. ह्या वाक्यांतील मर्म पोर्तुगीज व इंग्रजी जाणणारांच्या लक्ष्यांत येईल. मराठीच फक्त जाणणारांच्या मनावर त्याचा परिणाम होणार नाहीं, म्हणून वाक्यांचें भाषांतर येथें देत नाहीं.

फ्रेंचः– Les Hindous étaient des penseurs profonds

पोर्तुगीजः—Os Hindus eram pensadores profundos

इटालियनः—La bella Ceilano, la perla d'Oriente,...il terreno paradiso...

पोर्तुगीजः—O belo Ceilão a pérola do Oriente,...o terreno paradislaco...

स्पॅनिशः—Una de las tareas mas importantes de la crética es haberse de ocupar de aquel linage de publicaciones.

पोर्तुगीजः—Uma das tarefas mais importantes da critica é haver-se (ter se) de ocupar da quela linhagem de publicações

इंग्लिशः—The celebrated Witsius was able to recite any passage of Scripture.

पोर्तुगीजः—O célebre Witsius era hábil em (era capaz de) recitar qualquer passagem (trecho) da Escritura

लातीन—Illa fuga nobis gloriosa, patriae calamitosa fuit.

पोर्तुगीज—Aquela fuga (retirada) foi para nós gloriosa, e calamitosa (prejudicial) a Patria.

हॉलंडी भाषेंतील उदाहरण देतां आलें नाहीं ह्या बद्दल दिलगीर आहें. भाषांतरांतील चुक भूल माफ असावी. वरील भाषांतील कांहीं शब्दांचा पोर्तुगीज शब्दांशीं कसा निकट परिचय आहे हेंच दाखवून देण्याचा माझा उद्देश होय.

एका पुस्तकांत लातीन भाषेंतील विषय मला सांपडला, तो पोर्तुगीज की लातीन आहे हें प्रथम दर्शनीं समजण्याची भ्रांति उत्पन्न होते. ग्रंथकार म्हणतो:

" Trechos ha que tanto podem dizer-se em latim como em portuguez, Sirva de exemplo esta passagem de Antonio de Souza de Macedo "

उदाहरणार्थ

O quam gloriosas memorias publico considerando quanto vales, *nobilissima lingua lusitana* com tua facundia excessivamente nos provocas, excitas, inflamas. "

पोर्तुगीजचें परिज्ञान असणारांना हा मजकूर समजण्यास कठीण जाणार नाहीं. नुसतें इंग्रजी जाणणारांनां लातीनचा अभ्यास असेल तरच तो वाचतां येईल.

पोर्तुगीज आणि इंग्रजी ह्यांची योग्यता समान दर्जाची आहे. पोर्तुगीज हिंदुस्थानांतील विद्यार्थ्यांनीं मराठीचा अभ्यास झाल्यावर दोन वर्षें पोर्तुगीज प्राथमिक शिक्षण घेऊन निदान दोन वर्षें तरी लिसेवांतील दुय्यम शिक्षण घ्यावें व मग इंग्रजी पढावें असें माझें मत आहे. लिसेवांतील पुढील शिक्षण मागाहून घेतल्यास चालेल. एकाच इयत्तेंतील इंग्रजी आणि पोर्तुगीज विद्यार्थ्यांची तुलना केली असतां प्रगतीचें प्रमाण इंग्रजी अमलांतील विद्यार्थ्यांच्या वाट्यास येणार नाहीं असा खातरीचा अनुभव निःपक्षपातानें सांगूं शकतों. संभाषणांच्या बाबतींत मात्र पोर्तुगीज विद्यार्थ्यांच्या वेगळी प्रतीची होईल, त्याचें मुख्य कारण इंग्रजी हिंदुस्थानांतील विद्यार्थी घरीं दारीं, सर्व ठिकाणीं इंग्रजी भाषतच बोलण्याचा परिपाठ ठेवित असतात. यामुळें त्यांना फार जलद बोलतां येतें इंग्रजीत बी.ए. झाले तरी मराठी विषय लिहिण्यांत मागसलेले असतात असा एकेकाळीं इंग्रजी अमलांतील मराठी वृत्तपत्रें खेदाश्चर्य प्रकट करीत असत, ह्यावरून तिकडे इंग्रजीला कसें कवटाळून धरितात ह्याचें हें दर्शक आहे.

पोर्तुगीज ही आपली राजभाषा आहे, प्रचलित व्यवहार अवगत होण्यास किंवा जुनें कागद पत्रांतील भावार्थ ओळखतां येण्यास हिची फार गरज आहे. डाणयमामीचे अमदानींत [सन १८८१ पूर्वी] गोव्यांत मराठी भाषेंतील खासगी पत्रव्यवहार कानडी लिपीनें फार करून होत असे. आज कानडी लिपीस अजिबात फांटा मिळाल्यामुळें कानडी लिपींतील सरकारी व खाजगी दप्तरें चाळणारांची उणीव भासणार, हा प्रकार डोळ्यांसमोर राहिला म्हणजे कानडी लिपीचें पुनरुज्जीवन होणें इष्ट आहे असेंच वाटेल.

पोर्तुगीज भाषा उपेक्षणीय नाहीं. गोमांतकांतील नामांकीत हिंदु प्रोफेसर, डॉक्टर, वकील देखी पण लिसेवांतून निघालेले आहेत, हल्लींच्या शिक्षण क्रमांत कदाचित् दोष असेल, त्याबद्दल खडाजंगी नको आहे.

मला वादविवाद करायाचा नाहीं. माझें मत अग्राह्य वाटल्यास, वाचनांत निरर्थक पांच दहा मिनिटें दवडावीं लागलीं म्हणून संभावित वाचक मला क्षमा करोत.

वि० कं० ४ आणे

भारतवर्त.

आर्यभूमींत उत्पन्न झालेल्या तत्वानुसार वागून आपली मुक्ति करून घेतलेले धडधडीत दाखले असतांना, त्यांवर अविश्वास ठेऊन मुद्दाम अज्ञानाचें पांघरूण घेत असलेल्या शहाण्यास आत्मघातकी न ह्मणावें तर दुसरें काय ?

हिंदुस्थानांत पाश्चात्य संस्कृतीचा पाया बसेल ही गोष्ट तर आह्मांस केव्हांहि अशक्य वाटतेच, पण ह्या संस्कृतीचा उपभोग घेऊन आपलें आयुष्य गमविणाऱ्या सुधारकांकडे पाहून कींव आल्याशिवाय रहात नाहीं.

हिंदुस्थानांतील कोणाहि सामान्य माणसास सुद्धां जितकें पारमार्थिक ज्ञान असतें तितकें एखाद्या पाश्चात्य पंडितासहि असेल किंवा नाहीं, ह्याची वानवाच आहे. मग अशा धर्मप्रवीण लोकांत पाश्चात्यांची नामधारी संस्कृति प्रविष्ट होईल असें कसें ह्मणतां येईल. परंतु दोन दोन दिवस एक एक वावटळ येऊन जाते, त्याप्रमाणें आधुनिक सुधारणेचें जाळें हिंदूसमाजावर पडूं पहात आहे व ह्यावरूनच त्याच्या धार्मिक अवनतीस जोर आला आहे. धार्मिक अवनति होते, असें ह्मणण्यापेक्षां धर्मानुयायांची वरचेवर अवनति होत आहे. असें ह्मणणें ज्यास्ती सयुक्तिक दिसेल. कारण हिंदुस्थान हा आजपर्यंतच्या अनेक धक्क्यांतून निभावूनहि मुळांत आहे तसाच आहे. हें गोष्ट मोठ्यांनीं कबूल केलेलें आहे. इंग्रजांस ज्याप्रमाणें व्यवहार ज्ञान, चिनी लोकांस कारागिरी, इराणी लोकांस शौर्य, त्याचप्रमाणें आर्य लोकांचें अध्यात्मज्ञान हें पिढीजाद वतन आहे, आणि ह्या वतनाचा प्रभाव इतका आहे कीं, त्याच्या आशेनें सर्व जग हिंदुस्थानाच्या पायांकडे आल्याशिवाय रहाणार नाहीं. परंतु जगाच्या नियमांप्रमाणें हिंदु लोक सध्या चांगल्या धर्माच्या हाता खालीं असतांही हैराण झाले आहेत, ही गोष्ट केवळ खोटी नाहीं. धार्मिक अवनति म्हटली कीं आपल्यापुढें ईश्वरी कोपाचा भयंकर देखावा दिसूं लागतो, व ह्या कोपांतून निसटून जाण्यासाठीं, साधुसंतानीं स्वानुभवावरून आम्हांस जो उपदेश केला आहे त्याचा अवलंबच उपाय आहे.

आपल्या धर्मांत सांगितलेल्या तत्वांची व आचारांची परिणति होतां होतां आतां मूळ तत्वांची आमच्याकडून अवक्रांति झाली आहे, व हीच आमची धार्मिक अवनति होय ह्या अवनतींतून सुटण्याकरितां आह्मांस नवे शोध लावावे लागतील असें नाहीं, तर ज्या मूळतत्वांवर आमच्याकडून आच्छादन पडलेलें आहे, तेंच दूर करावयाचें आहे. असो.

भरतभूमीसारख्या पवित्रस्थानीं, कीं जेथें उच्च आध्यात्मिक तत्वांचा उदय झाला, कित्येक शतकांपर्यंत त्यांचा परिपोष होऊन परिपोषकाचें साध्य प्राप्त झालें, अशा जागीं एखाद्या काळीं धार्मिक अवनति झाल्यास ती दूर होण्यास प्रयत्न करितांना ह्या कामीं आनुवंशिक संस्कारांचा बराच उपयोग होईल, ह्यांत शंका नाहीं. ह्यामुळें आमची धार्मिक सुधारणा होऊन पारमार्थिक सुख मिळण्यासाठीं प्रयत्न करणाऱ्यास आपल्या प्रयत्नाच्या फलप्राप्तीसाठीं संशय घेण्यास इतर साधनांइतकी जागाच नाहीं. मग आजच्या परिस्थितींत आम्हीं उगीच कां रडावें ?

आमचें खरें साध्य जर ईश्वरप्राप्ति आहे तर तिच्या प्राप्तीसाठीं आम्हीं खटपट करावी व साधुसंतांनीं आंखून दिलेल्या मार्गानें प्रयाण करावें ह्यांतच आमचा खरा दूरदर्शीपणा नाहीं काय ?

इकडे लक्ष द्या

भारत संस्थेला कुंडलीक प्रेसाशिवाय आतां पद्मावति छिनेल्हांची जोड मिळाली असून, इतर आवश्यक मशिनरीचीहि संख्यत भर पडली आहे. या मुळें भारत प्रकाशनाशिवाय कोणतींही पुस्तकें छापण्याची उत्तम सोय झालेली आहे उपरिनिर्दिष्ट दोन्हीं कामें व्यवस्थित रीतीनें पार पडण्यासाठीं संस्थेच्या कार्यक्षेत्राची दोन कडे विभागणी करण्यांत आली आहे. पैकी एकांत केवळ भारत व तदंतरगत व्यवहाराचा समावेश करण्यांत आला असून दुसरींत नुसत्या छपाई कामाची योजना केली आहे व सर्वांवर एक स्वतंत्र व हुषार मनेजराची नेमणूक करण्यांत आली आहे.

वरील गोष्टी विषयींची खुलासेवार माहिती लवकरच प्रसिद्ध होईल.

मालक भारत

ANUNCIOS

Pelo juizo de Direito da comarca de Quepem, e cartorio do escrivão do 2 º oficio, Barreto, vae ser vendido em hasta publica, á porta do tribunal judicial situada em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige á estação de Sanvordem no dia 9 do seguinte mez de Janeiro ás 13 horas pela primeira vez e pelo preço do seu valor o predio rustico denominado "Govindgal" sito em Loliem da cultura de arroz discrito na conservatoria predial desta comarca sob o n º 14761 a fl 15 v. do Livro B 41 do valor de 500 rupias e pinhorado nos autos civis de execução hipotecaria que Caetano Agostinho Fernandes de Loliem como pae administrador do seu filho menor Lourenço Fernandes da mesma promove contra Manuel Maria Fernandes sua mulher de Loliem e outros como pertencente aos ditos executados correndo por conta do arrematante a contribuição do registo por inteiro e as despezas da praça. São por este citados quaisquer credores incertos dos ditos executados e os co-proprietarios para deduzirem os seus direitos nos termos e para os fins de lei. E para ser publico se expediu este. Xeldem de Quepem 4 de Dezembro de 1922.

O escrivão de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito
A. Meireles

भारत

शुक्रवार मार्गशीर्ष कृ० ११ शी १८४४

गोमाता की जय !

आमच्या इकडे कित्येक ठिकाणीं कशा निर्दय व अमानुष रीतीनें गोमातेचा संहार होत असतो हें जास्ती विशद करून सांगण्याचें कारण नाहीं. कोणत्याहि एखाद्या शनिवारीं मार्मी महालाच्या प्रसिद्ध गांवांतून सकाळच्या प्रहरीं उठून केल्यास आमच्या या ह्मणण्याची सत्यता कोणासहि सहज पटणार आहे.

पण सवंगीमुळें ह्मणा अगर दुसऱ्या कोणत्याही कारणामुळें ह्मणा, तो गोवधाचा अत्यंत किळसवाणा व हृदयभेदक देखावा अवलोकून, आह्मांस त्याचें काहींच वाटेनासें झालें आहे ! ही वृत्ति अर्थात हिंदु ह्मणवून घेणारांस सर्वथैव योग्य नाहीं. गोमाता जिला आह्मीं दैवत मानितों, जी आमचें जीवित सुखावह होण्यास रात्रंदिवस झटत असते, थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे, जी आमच्या प्राणाचा प्राण होऊन राहिलेली आहे, तिचा राजरोस छळ होऊं देणें मोठें पाप होय.

राजसत्ता परकीयांची असल्यानें गोवध एकदम बंद करणें अशक्य असलें, तरी आळा घालणें कठीण नाहीं. मात्र ... जारीनें प्रयत्न झाले पाहिजेत. ...च्या मातानें कार्यभाग होणार ... पाहिजे.

या कृतीचें धोरण कसें असावें पाहिजे तें खालील लेखांत लेखकानीं व्यक्त केले आहे. ते अधिकारी असल्यानें त्यांच्या शिकवणीचा फायदा घेऊन, आमचे प्रेमळ वाचक गोभक्तीचें पुण्य संपादन करतील अशी आह्मांस आशा आहे.

लेखक काय ह्मणतात पहा:—

॥ परहित सरिस धर्म नही भाई
॥ परपीडा सम नही अधमाई
॥ निर्णय सकल पुराण वेदकर
॥ कहेउ तात जानहि कोविदनर

जीवाचा पूर्ण विकास करून घेणें हे मनुष्याचें कर्तव्यांतील एक श्रेष्टतम कर्तव्य होय अंतःकरणाची मृदुता, शुद्धता पवित्राचरण, सत्यप्रियता व त्याच प्रमाणें भूतदया हीं लक्षणें मुख्यतः दिसूं लागलीं ह्मणजे जिवाचा विकास होत चालला आहे असें ह्मणण्यांस कांहीं हरकत नाहीं. अंतःकरणांत दयेचे अंकुर उत्पन्न होऊं लागले कीं धर्माकडे प्रवृत्ति होत आहे असें ह्मणावें लागतें. व दया हेंच मुख्य धर्माचें मूळ आहे ॥ दया धर्म का मूल है। मरण मूल अभिमान। तुलसि दया न छांडिये। जबलग घट मोप्रान ॥; परंतु ही आसुरी माया अथवा वृत्ति मनुष्याचे प्रगतीस जर धक्का न देईल तर तिला आसुरी माया असें कोण शहाणा ह्मणूं शकेल ? प्रकृति त्रिगुणात्मिका असल्या कारणानें या जगावर सर्व तऱ्हेचे लोक आपणास भिन्न भिन्न दृष्टोत्पत्तीस येतात कांहीं मनुष्य पशुही असतात. त्यांत व्याघ्र स्वभावाचे मनुष्यांचा नंबर वर लागतो. त्या पैकींच ब्रिटिश इंडियांतून इकडे येऊन गोहत्या करणारी खाटकांची जात- या लोकांनां ज्यानीं एक वार पाहिलें असेल त्यांच्या हृदयांत पहातांच खात्रीनें धडकी भरली असली पाहिजे. ज्यांच्या चेहऱ्यावर इतकी निष्ठुरता, इतकी निर्दयता त्यांच्या पाषाण हृदयाला गोमातेची कींव येणें केव्हां तरी शक्य आहे काय ? सभ्य मुसलमान लोकसुद्धां या कसायाना अत्यंत नीच दर्जाचेच मानीत असले पाहिजेत. हें काबूलचे अमिरानी गोहत्या बंद केल्याचे उदाहरणानें उघडच होत आहे. ख्रिश्चन धर्मानुयायी लोकांत ज्याप्रमाणें पाश्चात्य व पौर्वात्य काळे ख्रिश्चन असा भेद आपणास दिसतो त्याचप्रमाणें काबूलचें जातिवंत मुसलमान व इकडील मुसलमानी अमलांत मुसलमानी अमलांत महंमदी धर्म स्वीकारलेले भारतीय मुसलमान असा भेद आहे. तथापि आज ब्रिटिश इंडियांत हिंदु मुसलमान सख्या बंधुप्रमाणें परस्परांचीं मनें एकवटीत असतां तिकडील कांहीं क्रूर स्वभावाचे, ज्यांच्या मनावर उदात्त वातावरणाचा कांहींच परिणाम होत नाहीं. असे हें शिवशिव गाय कसाई, गोमांसभक्षक असलें दुष्ट व निंद्यकर्म ज्या योगें आज सर्व हिंदु मुसलमानबंधुना चीड येईल असें करून आपल्या पोटाची खळगी भरण्यास तयार झाले आहेत, तेव्हां हें आमचें दुर्भाग्यच होय. सर्व जगावर आपण फिरलों तरी गोमातेचें दूध एकवारही पोटांत गेलें नाहीं असें निक्षून सांगणारी व्यक्ति खात्रीनें आढळणारच नाहीं. अशा अत्यंत उपयुक्त तृणाहारी व गरीब प्राण्याचा वध करून आपल्या जिव्हेची लालसा तृप्त करणें ह्मणजे मानवी बुद्धीचा राजरोस खून करण्यासारखेंच नव्हे काय ? आमच्या हिंदु धर्मशास्त्रांकडे नजर फेंकिली तर कृतघ्नपणासारखें भयंकर अधोगतीस नेणारें पातक दुसरें कोणतेंही नाहीं, असें स्पष्ट दिसून येतें. असें असतां आपल्या अमृतधारेनें उपकार करणारी जिच्या अस्तित्वें करून आमच्या उपजीविकेचें मूळ साधन जी शेती तिचें संरक्षण होतें, अशी जी गोमाता तिचें हनन करणें, करविणें, त्यास मदत देणें इत्यादि गोष्टी अन्यायाच्या नव्हेत काय ? आमच्या ख्रिश्चन बंधूनां गोमांस खाण्याची सवय कोणी लाविलेली असो अथवा ती संसर्गाने आपोआप त्याचे पचनी पडली असो, परंतु ती प्रयत्नानें सोडतां येणें कठीण नाहीं. आह्मीं त्यांस गोरक्षण, गोपालन, गोवर्धन, यांपासून होणारे फायदे व हननापासून उद्भव येणारे दुष्परिणाम या बद्दलची चांगली ओळख पटवून दिली पाहिजे. व हें कार्य गोमांसभक्षकांतील तरुण उत्साही धर्माभिमानी सुशिक्षिताचें आहे. निरपेक्षपणें सतत व चिकाटीनें कार्य हातीं धरिल्यास आज नाहीं परंतु कांहीं दिवसांनीं या सत्कार्यास गोड फळें लागूं लागलीं आहेत असें दिसूं लागेल. तोंपर्यंत आह्मांस दम धरिला पाहिजे. कोणताही आहार जन्मांपासून अंगवळणी पडला ह्मणजे त्यांतील दोषांकडे सहसा दृष्टि वळत नाहीं, हा साधारण नियम आहे. मद्यपानाची जन्मापासूनच ज्यांना सवय असते ते मद्यासच अमृत ह्मणूं लागतात; परंतु जरा थोडा विचार केला असतां मद्य हें चित्तभ्रंश करणारें असून पाप प्रवृत्तीस आधारस्तंभ असल्याचें स्पष्ट दिसून येईल. असें असतां अमृताची उपमा देणें अथवा मद्यांत समजणें हें हास्यास्पद नाहीं असें कोण ह्मणेल ? सारांश, हे सर्व सवयीचे परिणाम आहेत. गोमातेचे गोदुग्धाची गोष्ट याचीसुद्धां किंमत आम्हां आर्यांना आज हजारों वर्षे टाकून आहे, फार काय ? गोमय व गोमुत्र याशिवाय श्रा. शु. पौर्णिमा हा सर्व वर्षाचे प्रायश्चित्ताचा दिवसही साजरा होत नाहीं. पूजागृहासारख्या अत्यंत पवित्रस्थानीं रोज गोमयलेपन झालेंच पाहिजे असें शास्त्र आहे. प्रातःकालीं उठल्याबरोबर गोमातेचें दर्शन आह्मीं हिंदु लोक सुमंगल समजतों. काहीं अपवित्र पदार्थाचा स्पर्श झाला असतां तिच्या स्पर्शानें त्यांतून आह्मीं मोकळे झालों अशी आमची भावना होते. कोणत्याही सत्कृत्यापेक्षां गोप्रदानाचें पुण्य आह्मीं हिंदु लोक अधिक मानितों. गोमातेचे प्रसव कालीं प्रदक्षिणा करणें तर पृथ्वी प्रदक्षिणें बरोबर आहे अशी आमची समजूत आहे. गोब्राह्मणादिकांचें पालन जे करीत नाहींत त्यानां मनांतून तरी आह्मीं मोठा अपराध करीत आहोंत अशी जाणीव असते कारण यद्याचें सजिव गोमाता असल्यानें विशेष कारणाशिवाय आरोग्यास बाधा सहसा येत नाहीं अशीही आमच्या आर्यवैद्यकांची सांगणी आहे. असें असतां आह्मां हिंदूंच्या डोळ्यांनीं गोवध पहाणें व झालेला ऐकणें ही किती असह्य गोष्ट आहे, याची जरा तरी कल्पना आमच्या ख्रिश्चन बंधूना झाल्यास होऊं शकेल. पणजी मधील गत्यार दिवस भागांत समुद्र किनारीं गोहत्ये करितां जी जागा आजपर्यंत नेमून केली होती त्या ठिकाणांतून जो गाडा जात येत असे तो कांपाल मधील गोव्या अधिकाऱ्यांना नापसंत वाटून त्यानीं त्या हत्याकांडाची जागाच उठवून दुसरीकडेस नजरेआड करून टाकिली. खाणाऱ्या लोकांना जर तें पाहण्यास इतकें किळस वाटते तर जे त्या गोमातेला प्रत्यक्ष आपल्या मातुश्रीच समजतात त्यांची स्थिति काय होईल ! आमच्या किरिस्तांव भाईनांसुद्धां ब्रिटिश इंडियांतून येणाऱ्या दाढीवाल्यां करवींच तें भयंकर हननाचें कृत्य करवून घ्यावें लागतें. या वरूनही खाणाऱ्या लोकांनासुद्धां ती गोष्ट प्रत्यक्ष पहाणें व वध करणें किती किळसवाणें असतें हें दिसून येण्यासारखें आहे. असें असतां मडगांव येथील हिंदूंच्या नवीन वस्तीपासून बरोबर २६० कदमांवर काजूचे झाडाखालीं रोज संध्याकाळीं भररस्त्याजवळ अंदाज २० हातांवर होणारे निर्दयाचें हत्याकांड किती लाजिरवाणें आहे ! याचा विचार मडगांवच्या म्युनिसिपाल कमेटीनें करावयास नको काय ? आरोग्याच्या दृष्टिनें वस्तीच्या इतक्या सन्निध रक्ताचे पाट रहाणें हें किती भयंकर आहे ! शिवाय हिंदूंच्या घरांजवळूनच तो किळसवाणा गाडा घेऊन जात असतां रक्ताचे थेंब सारखे रस्त्यावर गळत रहाणें व तो आमच्या पहाण्याचे नशीबीं येणें हें किती कंटाळवाणें तसेंच हिंदूना लाजिरवाणें आहे. याचा विचार होईल काय ? अशावेळीं दरवाजे लाऊन घेण्याशिवाय दुसरा मार्ग हिंदूना कोणता उरला आहे ? आमच्या ख्रिश्चन बंधू करितां आह्मीं इतके त्रास सोसावे असे त्यांना त्यांचें अंतःकरण ग्वाही देईल काय ! अगर जर देत नसेल तर हिंदु व ख्रिश्चन या दोनहीं समाजांकडून अशा अत्याचारांचा निषेध झाला पाहिजे व शक्य तितक्या जलदी वस्तीपासून ती हननाची जागा बदलवून जनतेच्या दृष्टिआड कोठें तरी दूर नेण्याचा प्रयत्न जारीनें होणे अवश्य आहे असें आम्हांस वाटतें. लाऱ्यावांभावर या करितां म्युनिसिपालकमेटीनें जागा मुक्रर केला असून पूर्वी त्याच ठिकाणीं हें अघोरी कर्म होत असे असें असतां तेथें तें न होतां भर रस्त्यावर वस्तीचे. अगदीं जवळ ज्या ठिकाणीं गाईनें फोडलेला हंबरडासुद्धां सहज कानीं पडेल अशा उघड्या जागीं करणें ह्मणजे

Foi na costa da China que accidentalmente foi atacado de febre. Morreu em 1552. *Provavelmente devido á natureza do solo, em que fora enterrado, o seu corpo encontrou-se em bom estado de conservação sendo mais tarde* transferido para Malaca e daqui para Goa onde periodicamente tem sido exposto á veneração dos catolicos.

A Igreja de Bom Jesus é a mais visitada das Igrejas de Goa, certamente porque abriga o corpo do S. Xavier.

Das suas belezas e de algumas outras Igrejas da Velha Cidade-as nossas gravuras dão idea nitida. Albert de Mandalosio descreve-a nas seguintes palavras " uma vasta e magestosa construção, e nada com um gosto tam proporcional e sua grandeza que não é facil conceber qualquer coisa mais nobre.' Mas não é o unico desta opinião. Outros teem igualmente atestado sobre a beleza deste templo que apresenta de cumprimento 182 pés, 55 de largura e 61 de altura e é capaz de acomodar 4000 pessoas. O seu frontispicio com 78 pés de altura e 75 de largura é construido com granito preto ostentando ornatos, pilares e altos relevos de uma arte paciente, com filiação no estilo Dorico Corintio etc.

A simplicidade é a nota caracteristica do interior do templo feito em estilo mosaico etc. O seu forro é encantador, mas as paredes que outra ora eram todas douradas as galerias trabalhadas e pintadas com gosto, saidas das paredes laterais e em volta das janelas distinadas a acomodar pessoas de distinção em ocasiões solemnes avultam a beleza da nave. O altar principal é dedicado ao menino Jesus, é dai o nome da Igreja. No centro deste altar ve-se uma imagem do S. Inacio de Loiola tendo 10 pés de altura, com mão direito erguida para o ceu. Supoem-se que ela representa a atitude do Santo, quando em extasi, exclamou " quam sordet mihi tellus quam coelum aspicio'!...

वर्तमानसार

--रोमच्या पोपच्या प्रतिनिधीची स्वारी शवप्रदर्शनासाठीं गोव्यांत आली आहे.

--शवप्रदर्शनानिमित्त जिकडे तिकडे मोटारगाड्यांचा सुळसुळाट माजून राहिला आहे.

--गेल्या दोन तारखेला संध्याकाळच्या साडेपांच वाजतां गव्हर्नर व इतर अधिकारी हजर असताना सां. फ्रांसिस्कोचें शव उघडें केलें गेलें.

--गोव्यांत सर्कशीचे खेळ होणार आहेत. पणजीचें 'उ एराल्द' पत्र सदरील खेळांविरुद्ध आहे. आम्हालाही ते खेळ मान्य नाहींत.

—सध्याचे आमचे गव्हर्नरसाहेब येत्या मार्चमहिन्यांत पोर्तुगालला रवाना होणार आहेत.

--पणजी येथें बलवंत थियेटरांत गेल्या बुधवारीं 'बलवंत' संगीत मंडळीचा 'विद्याहरण" नाटकाचा प्रयोग झाला.

— मार्मगोवा-जेटी येथील मराठी शाळेच्या मुलांची परीक्षा येत्या २९ व ३० तारखेला घेण्यांत येणार आहेत.

चुकीची दुरुस्ती

गेल्या अंकीं प्रसिद्ध झालेल्या 'अनंत कवीच्या कवितेचा प्रथमचरण 'भारत भूमीवरि' असा नसून 'भारत भूमीवरि प्रेम करा' असा आहे.

जागृत व्हा !

(कवि— इंदिरात्मज, मडगांव)
(चाल— चंद्रकांत राजाची कन्या०)

देश आपुला अवनत स्थितीमध्यें आहे तरी ॥
प्रयत्न कांहीं करा झटुनियां तया काढण्या वरी ॥ १ ॥
निजतेजानें विलसत होतें पूर्वीच्या काळीं ॥
'भारत' हें परि आतां त्याची अवनति कशि झाली ॥ २ ॥
परिणाम असे मातृभूमिवरि लक्ष न दिधल्याचा ॥
ह्मणुनि पाहिजे प्रयत्न केला उन्नति करण्याचा ॥ ३ ॥
" पूर्वीचें तें वैभव आतां गेलें हो गेलें ! ॥
अवशेषहि राहिला न त्याचा स्वातंत्र्यहि गेलें ॥ ४ ॥ "
आक्रोश असा करुनि फ यदा काय होतसे आतां ! ॥
तोंडानें ही व्यर्थ करुनि कां बडबड दाखवितां ? ॥ ५ ॥
कृती करुनियां कांहिं दाखवा देशहिताची ती ॥
उठा ! उठा ! तरि जागृत होउनि जनीं करा जागृती ॥ ६ ॥

इकडे लक्ष द्या

भारत संस्थेला पुंडलीक प्रेसाशिवाय आतां पद्मावति मिनेर्व्हाची जोड मिळाली असून, इतर आवश्यक मशिनरीचीहि संस्थेत भर पडली आहे. या मुळें भारत प्रकाशनाशिवाय कोणतींही पुस्तकें छापण्याची उत्तम सोय झालेली आहे उपरिनिर्दिष्ट दोन्हीं कामें व्यवस्थित रीतीनें पार पडण्यासाठीं संस्थेच्या कार्यक्षेत्राची दोन कडे विभागणीं करण्यांत आली आहे. पैकी एकांत केवळ भारत व तदंतरगत् व्यवहाराचा समावेश करण्यांत आला असून दुसरींत नुसत्या छपाई कामाची योजना केली आहे व सर्वांवर एक स्वतंत्र व हुषार मनेजराची नेमणूक करण्यांत आली आहे.

वरील गोष्टी विषयींची खुलासेवार माहिती लवकरच प्रसिद्ध होईल.

मालक भारत

भारत

गुरुवार मार्गशीर्ष कृ० ३ या १८४४

स्फुट विचार

जुन्या गोव्यांत नवें जीवन:— जुनें गोवें ह्मणजे जवळ जवळ निर्जन प्रदेश. एका काळीं पूर्ण वैभवाच्या अत्युच्च शिखरावर विलसत राहिलेलें पण नंतर निसर्गाच्या अबाधीत नियमांनुरूप काळाच्या भयंकर दाढेंत चिरडलें जाऊन अगदीं जर्जर बनलेलें एक हर्ष, आश्चर्य, दुःख इत्याद्यनेक विकार उत्पन्न करणाऱ्या आठवणींनें ओतप्रत भरलेलें ऐतिहासिक शहर. किरकोळ पाद्री कांहीं दारू विकणारे व पिणारे, एक दोन दुकानदार व याकरांचा फायदा घेण्यानिमित्त जमत असलेले थोडेबहुत प्रवासू, इतक्यां लोकांची काय ती तेथें गडबड बडबड ऐकावयाची व पहावयाची. व, तीहि दिवसा. रात्रीचा तर निवळ शुकशुकाट, परंतु ह्या महिन्याच्या पहिल्या तारखेपासून 'शव प्रदर्शना'मुळें उपरिनिर्दिष्ट शहराला अपूर्वता प्राप्त झालेली आहे. निरनिराळ्या प्रांतांतील निरनिराळ्या पेहरावानीं युक्त अशा अनेकविध जनसमुदायानें जुनें गतवैभव गोवें अगदीं नव्या उत्साहानें खुलून गेलें आहे. तेथील जुन्या देवळांतील नवी 'आरास' चित्ताकर्षक असून आश्चर्य उत्पन्न करणारी आहे. नवीन व्यापारी घडामोड, यात्रेकरूंची वर्दळ व मिलिटरी लोकांची धरपकड या गोष्टी घडवणारी शवप्रदर्शनाची तीन कोट पुनिवाहोक [illegible] सां. फ्रांसिस्काच्या मृत देहाचें करावें तितकें अभिनंदन थोडें आहे. असो. सदरहू घडामोडींना, कोणत्याहि अपघातांमुळें प्राणनाशाची जोड न मिळतां 'न मिळे अशी मेजवानी पुन्हा राहण्या नरा' या कोटींत ढकलण्यास सर्वैव योग्य अशी ही लोकोत्तर मजा पार पडो, अशी आमची परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

एक सूचना:— शवप्रदर्शनानिमित्त आमच्या प्रांतांत बाहेरच्या लोकांची तुमती गर्दी उपळत आहे. डोईपट्टीचें उत्पन्न अर्थात् बरेंच होणार आहे या जादा उत्पनाचा उपयोग सरकारनें तिजोरीची तूट भरून काढण्याच्या कामीं करावा, अशी आमची सूचना आहे. येण्याच्या स्वरूपानें तळें सांचविण्याच्या या कराचें उत्पन्न सदरहू कार्यास अपुरें ठरल्यास, खुद्द सां. फ्रांसि-स्काच्या कृपेंत करांत येणाऱ्या धनाची त्याला भर घालावी व तुटीच्या ग्रहणापासून तिजोरीला कायमची मुक्त करावें. असें घडून आल्यासच शवप्रदर्शनाचें योग्य श्रेय संपादन केल्याचें पुण्य अनायासें सरकारच्या पदरांत पडणार आहे. इतकेंच नव्हे, तर गोमांतकाच्या आर्थिक इतिहासांतहि, खिस्ती धार्मिक इतिहासांतल्याप्रमाणेंच, प्रस्तुत प्रदर्शन अपूर्व होऊन बसणार आहे. नाहींतर उपड्या घागरीवर पाणी अशी स्थिति झाल्यास त्या खिस्ती संताच्या रुपड्यावरून लोकांचा विश्वाससुद्धां उडणार आहे, अशी आह्मांस भीति वाटते.

पोर्तुगीज शिक्षक:— 'धी होम इंग्लिश ट्यूटर' या पुस्तकाच्या आधारें दत्ताराम वामन नाईक यानीं हा शिक्षक तयार केला आहे. कर्त्यानें प्रस्तावनेंत हाटल्याप्रमाणें 'ज्यानां पोर्तुगेज भाषा शिकण्याची आवड असून घरच्या किंवा अन्य व्यवसायामुळें ती शिकतां येण्यासारखी नाहीं त्यानां या पुस्तकाच्या मदतीनें घरच्याघरीं पोर्तुगेज भाषेचा अल्प परिचय होईल, असें आह्मांसही वाटतें. मात्र पोर्तुगेज शब्दोच्चाराचें पायाशुद्ध आकलन होण्यास बोलण्याच शिक्षकाची कास धरणें जरूर आहे. तसें असलें तरी पुस्तकाची किंमत कोणत्याहि रीतीनें कमी होत नाहीं. उलट शिक्षकाच्या स्तुत्य प्रयत्नाबद्दल नाईकांचें कोणीहि अभिनंदन करील. असो. शिक्षकाचा फायदा घेऊन, कर्त्याच्या हुशारीचें आमचे देशबांधव कोड पुरवितील, अशी आह्मास उमेद आहे. पुस्तकें कर्त्याकडे रायबंदर येथें मिळतील.

भारताची नूतन व्यवस्था:— अखेर श्रीदत्तजयंतीच्या सुमुहूर्तावर भारताचें नवीन मशीन उभें केलें गेलें, हें कळविण्यास आह्मास परम संतोषाचें समाधान होत आहे. या नवीन व्यवस्थेच्या पायीं भारताला अनेक अडचणींशीं टक्कर द्यावी लागली, अनेक धकेचपेटे हन करावे लागले व अनेक प्रसंगीं झीज सोसावी लागली; पण शेवटीं परमेश्वराच्या कृपेनें व कांहीं हितचिंतकांच्या निःस्वार्थ मदतीनें नवीन धर्तीचा छापखाना उभारण्याचा आमचा फार दिवसांचा हेतु तडीस गेला. असो. भारताचा नवीन व्यवस्थेचा पहिला अंक येत्या महिन्यांत निघेल. व त्यांतच आमच्या उपकारकर्त्यांचा नामनिर्देश करण्यांत येईल. भारत छापखान्यांत यापुढें कसल्याहि छपाईचीं कामें माफक दरांत करून देण्याचीहि चोख व्यवस्था केली आहे; हें जातां जातां जाहीर केल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं.

Esperamos que daqui em diante não surgirão por ai fóra Nobrecos que pretendam desprestigiar, imerecidamente, os indios que estão envidando os seus melhores esforços em prol do progresso da Patria Portuguesa.

Diz-se-

Que vão ser anuladas as eleições municipais ultimamente efectuadas em Goa, por falta do cumprimento duma formalidade tocante ao praso.

Perguntamos: ¿ Quem é que paga tanta despeza feita para papeladas e viajatas para a realisação das mesmas eleições?

E, todavia, é certo que o Paiz está luctando com dificuldades de ordem economica, sendo assustadora a derrocada que nas suas garras nos está apertando!

Demos, porem, tempo ao tempo, para que a critica seja mais aceitada e mais a proposito.

...nte xitam nán edere mitam lá diz o ditado macarronico.

Expediente

Aquelas que não quizerem favorece-nos com o seu apoio desde o 8.º ano da publicação do *Bharat* dignem-se de no-lo comunicar já, a fim da Empresa poder regularizar a tiragem do jornal.

लिसेव, लिसेवस्थ व लिसेवोत्तीर्ण

ले. ५

पोर्तुगीजची आवश्यकता

मधून मधून अकल्पित कारणानें खंड पडलेल्या ह्या विषयाला एक दोन लेखांकांत निकालांत काढण्याचें योजिलें आहे. करतां 'स्पष्टवक्ता' ह्याच्या मुद्यांचा विचार करूं: 'स्पष्टवक्ता' ह्यानें उत्तरपक्षसमर्थनार्थ जो मजकूर लिहिला आहे त्यांत तीन गोष्टी 'स्थितिदर्शक' अशा दिग्दर्शित झालेल्या आहेत. त्यांतील पहिली-ही कीं लिसेवांतील शिक्षणानें खिस्ती समाजांत अनेकविध सुशिक्षित व्यक्ति, 'वकिल, डाक्टर, ब्यारिष्टर, जज्ज, वर्तमानपत्रकार, पुढारी असे निघाले असून त्यांनीं बहुमानाच्या जागाही बऱ्याच व्यापलेल्या आहेत'.

परंतु स्पष्टवक्त्याचा हा मुद्दा पूर्वपक्षांतील आरोपापैकीं कशाचेंही खंडन करण्याला उपयोगी नाहीं. कारण, ह्या खिस्ती व्यक्तींच्या हुद्देदारांचा उल्लेख पूर्वपक्षींनीं स्वपक्ष समर्थनाला बळकटी आणणारा असा जरी 'स्पष्टवक्त्याला' वाटला असला तरी जे आरोप पूर्वपक्षानें लिसेवाविरुद्ध केलेले आहेत त्यांतून

खिस्ती समाजांतील पुढारी

मुक्त नाहींत तर उलट ते त्यांचा अधिकच पात्र आहेत हें पूर्वपक्षांतील मुद्दे पुढें ठेवल्यास सहज दिसून येतें. ह्या पुढाऱ्यांनीं स्वभाषेंत 'फिरंगी' शब्दाची भेसळ केली नाहीं' असें स्पष्टवक्त्याला वाटतें काय? की भेसळ नव्हेच तर त्यांनीं 'खाण्यापिण्यांत, कपड्यालत्यांत, बोलीचालींत परक्यांचें अनुकरण केलें नाहीं असें स्पष्टवक्त्याला ह्मणतां येईल काय? त्यांना महाराष्ट्राच्या इतिहासाच्या किंवा हिंदुस्थानाच्या इतिहासाच्या अभिमानानें पुतळे असें स्पष्टवक्ता लेखतो काय? त्यांना पोर्तुगेजांच्या इतिहासाची प्रौढी व स्वदेशाच्या इतिहासाचा तिरस्कार किंवा अपेक्षा वाटत नाहीं. असा निर्वाळा स्पष्टवक्त्याला देतां येईल काय? ते स्वभाषेची, (अर्थात रा. तळावलीकर ह्मणतात त्याप्रमाणें आमच्या मातृभाषेची) सेवा करतानां शिवलाचें स्पष्टवक्त्यानें पाहिलें आहे काय? मग? ह्या अनेक प्रश्नांपैकीं एकालेंही जर होकारार्थी उत्तर देतां येणें, निदान स्पष्ट बोलायाचें झाल्यास, जर शक्य नाहीं तर त्यांना पुढें करून उत्तरपक्ष कसा करतां येईल? कायिक, वाचिक व मानसिक अशा तिन्ही प्रकारानीं स्वदेशाला स्वभाषेला, स्वेतिहासाला, स्वसंस्कृतीला पारखे झालेले हे लोक, आदर्शभूत ह्मणून पुढें करतानां, वादांतील उत्तरपक्ष ह्या दृष्टीनें निरर्थक हें तर राहोंच, पण लिसेवस्थाच्या तरुण बुद्धिचक्षुसमोर ह्मणून तरी स्पष्टवक्त्यानें दाखवायाचें नव्हतें. दराच्या बरांतून निघून जाराच्या घरीं देहशोभा करून घेणाऱ्या बायकोचे चोचले व वैभव पाहून घरच्या मंडळीनें स्वतःचें अभिनंदन करणें हें जितकें लौकिकदृष्ट्या ह्मणतां येईल, तितकेंच आमच्या खिस्ती समाजाचे चाळे व चोचले हे राष्ट्रीयदृष्ट्या अभिमानास्पद होऊं शकतील हें स्पष्टवक्त्याला कबूल करणें भाग नाहीं काय? जे स्वदेशाला स्वदेश लेखित नाहींत तर तिसऱ्याच एका देशाला 'स्वदेश' ह्मणतात, जे स्वभाषेचा इच्छिलेला संयोग होणें ह्मणजे विटाळ वाणें झाल्याप्रमाणें मानून अहोरात्र परभाषेंतच आपला व्यवहार करतात; स्वदेशाच्या संरक्षणार्थ किंवा स्वसंस्कृतीच्या संगोपनार्थ आहुति देणाऱ्या आपल्याच ऐतिहासिक पुरुषाचा यथास्थित उपहास करून, जे त्याच पूर्वजांचे हाल करणाऱ्याचे देव्हारे माजवतात, अशा लोकानां राष्ट्रीयदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या, स्वाभिमानदृष्ट्या आदर्शभूत ह्मणून दाखविणारा 'स्पष्टवक्ता' खात्रीनें आपल्या नावांला अन्वर्थक लिहीत नाहीं. असेंच ह्मणणें भाग नाहीं काय? आणि, त्यांच्या हृदयांतील स्वाभिमानाची ज्योत, लिसेवाच्या झाकणाखालीं सांपडली असली तरी मालवलेली नाहीं, फार तर कचित ठिकाणीं मंदावलेली असेल, असे आमचे लिसेवस्थ हिंदु विद्यार्थी किंवा लिसेवोत्तीर्ण हिंदु गृहस्थही असेंच ह्मणतील ह्याबद्दल शंका आहे काय? अर्थात मुळींच नाहीं.

आतां ह्या प्रतिपादनावरून, आह्मांला पोर्तुगीज शिकण्याची

आवश्यकता नाहीं असा जर कोणी निष्कर्ष काढू ह्मणेल तर मात्र तो चूक होईल असें आगाऊच सांगणें भाग आहे. पोर्तुगीज भाषेशीं, [illegible], इतिहासाशीं, कायदेकानूशीं आह्मांला पूर्ण परिचय करून घेणें अत्यन्त आवश्यक आहे. व त्याकरता अवश्य त्या सोई व साधनें उपलब्ध असलीं पाहिजेत, व असलेल्यांचा उपयोग करून घेतला पाहिजे ह्याबद्दल आमच्यापुरतें दुमत नाहीं. परंतु, त्या भाषेकडे, वाङ्मयाकडे इतिहासाकडे व कायदेकानूकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन मात्र मूलतः बदलला पाहिजे असें आमचें मत आहे. व तो बदलण्याचें कार्य चालू पोर्तुगीज शिक्षणाच्या लिसेवादि संस्थांतून होत आहे की नाहीं आणि नसल्यास त्याला उपाय काय ह्याचा तेवढा विचार करण्याकरतां ह्या वादांत पुढें आलेल्या मुद्यांचा खर्च केलेला आहे, हें ह्या ठिकाणीं नमूद करतो. ह्मणजे ह्या पुढील प्रतिपादनाचा रोख अधिक स्पष्ट दिसायाला मदत होईल.

२ 'स्पष्टवक्ता' ह्यानें चालू शिक्षणक्रमाच्या तरफदारीनें आणखी एक असें कारण पुढें केलेलें आहे कीं तो शिक्षणक्रम स्वीकारूनच हिंदूमध्यें त्यानें नामनिर्देश केलेले चार डाक्टर, एक ब्यारिस्टर, व एक दोन नावाजलेले शिक्षक व कामदार निर्माण झालेले आहेत व त्यानां लिसेवांतील शिक्षणाच्या दुष्परिणामाचे निदर्शक ह्मणून दाखवणें शक्य नाहीं. ही गोष्ट आह्मांला मान्य आहे. इतकेंच नव्हे तर स्पष्टवक्त्यानें ज्यांचा नामनिर्देश केलेला नाहीं असेही अनेक हिंदु गृहस्थ त्या नामावळींत जोडण्यालायक आहेत ह्याविषयीं शंका नाहीं. परंतु, एवढें मानिल्यावर, एक गोष्ट मात्र उघड करणें भाग आहे की अशा व्यक्तींच्या ठिकाणीं राष्ट्रीयदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या, स्वाभिमानदृष्ट्या संस्कृतिदृष्ट्या जो जो आदरणीय गुण दिसून येत असेल त्याचें श्रेय लिसेवांतील शिक्षणाला मुळींच नसून, हिंदु समाजानें आपल्या मातृभाषेच्या द्वारें किंवा धार्मिक, सामाजिक, किंवा संस्कृतीविषयक मार्गानें जे जे अनेकविध संस्कार त्या व्यक्तींवर केलेले आहेत त्या संस्कारांना आहे आणि ह्याच्या उलट, स्वराष्ट्रदृष्ट्या, स्वाभिमानदृष्ट्या, अनुचित असें जें कांहीं त्यांच्या ठिकाणीं आढळेल त्याचें श्रेय मात्र लिसे-

नाट्यनैपुण्याबद्दल श्रीमत् जगद्गुरु श्रीशंकराचार्य (डॉ. कूर्तकोटी, पी. एच. डी.) यांचेकडून पदव्या, ठिकठिकाणचे नागरिकांकडून मानपत्रें, बॅ. जयकर, दे. भ. अणे, महाराजा राय रायन किसनप्रसाद बहादूर, जी. सी. एस. आय., लो. बाळ गंगाधर टिळक यांचेकडून सुवर्णपदकें मिळविलेली, आणि श्रीमंत महाराज छत्रपती सरकार कोल्हापूर व श्रीमंत महाराज सवाई तुकोजीराव होळकर यांच्या आश्रयास पात्र झालेली,

संगीतरत्न मास्टर दीनानाथ मंगेशकर, स्वरसारंग रा. कोल्हापूरे व नटभूषण रा. कोल्हटकर यांची

बलवंत संगीत मंडळी

पणजी 'बलवंत' नाटकगृहांत

शनिवार तारिख २ । १२ । १९२२ रोजीं रात्रौ ९॥ वाजतां (स्टँ. टा.)

संगीत) कै. राम गणेश गडकरी कृत (नवा खेळ

पुण्य—प्रभाव

अंक १ ते ६

मंडळीचीं नवीं नाटकें

संगीत पुण्यप्रभाव
,, एकच प्याला
,, भावबंधन
,, राजसंन्यास
,, वेड्यांचा बाजार
(वरील पाच) — कै. राम गणेश गडकरीकृत

,, वीर विडंबन — केसरीचे संपादक दे. भ. न. चिं. केळकरकृत

,, जन्मरहस्य — सुप्रसिद्ध नाटककार श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरकृत

,, उग्र मंगल — 'तारामंडळ' 'शिवसंभव' इ. नाटकांचे कर्ते श्री. वासुदेव शास्त्री खरेकृत

,, सुडाचा संदेश — दे. भ. वीर वामनराव जोशीकृत

तिकेटांचे दर:— ५, ४, ३, २॥, २, १॥, १८=, ॥।=, ॥=.

तिकिटें—बलवंत थिएटरवर सकाळीं ८ ते ११ व दुपारीं ३ ते ७ वाजेपर्यंत विकत मिळतील

एन. एम. राव. कंत्राक्टर. जागा:— पणजी येथें म्युनिसिपालटीच्या मैदानावर मुद्दाम मंडळीकरितां उभारलेल्या बलवंत थिएटरांत

guido por todos aquelles que se dedicam á propaganda civica na massa popular.

O Bharat

Ate que finalmente, vencidas todas as dificuldades de ordem material, o *Bharat* vai entrar, brevemente, na *vida nova*, sob o ponto de vista grafico.

Provavelmente, desde o janeiro do novo ano teremos a dita de oferecer aos nossos presados leitores o *Bharat* transformado, transformação que representa o fruto de sacrificios de alguns muito poucos amigos sinceros do *Bharat* e do Paiz que o amam com todas as veras dalma.

Subraia V. Dessai

E' suplente do vogal do Conselho Legislativo pelas Novas Conquistas. Nada dissemos a seu respeito na edição passada nem coisa alguma podemos dizer neste numero, pela simples razão de ser parente muito proximo do nosso director aquele senhor.

Entretanto, muita gente de bem tom é de opinião de que o sr. Dessai reune requesitos necessarios para desempenhar condignamente as funcções do cargo, já indicado.

Registamo-la, apenas.

Uma idea

Nova-Goa, 17 de Novembro de 1922.

Exmo Sr. Presidente da Comissão da Exposição de Produtos da India Portugueza.

Nova-Goa

Já há tempo que se pensa em organizar nas filiais deste Banco existentes nos grandes centros, nomeadamente Londres, Paris e New York, salas de exposição dos nossos produtos coloniais, a fim de juntamente com a devida propaganda, fomentar as relações comerciais com esses centros, talvez até aqui um pouco descuradas.

Realiza-se em principio de 1923 uma Exposição Colonial Internacional em Paris, á qual sem duvida já haverá intenção de enviar os principais produtos desta Colònia tanto os produtos de terra como manufacturados.

Esses produtos, depois de figurarem na Exposição, poderiam ficar constituindo um mostruario permanente no nosso Banco o que decerto muito interessante seria para esta Colonia, pois o seu lado, como se está tratando, se instalará uma secção especial, a qual procurará ter sempre actualizadas todas as informações que se realacionem com a vida economica desta Colonia e especialmente as que interessam á colocação destes produtos nos mercados estrangeiros. Com o fim de obter este mostruario dispoz-se este Banco a custear todas as despesas de transporte dos produtos a expor como já tive ocasião de dizer a Sua Exa, o Governador Geral e a V. Exa. Apesar de esta despeza já ser avultada, supomos por informações particulares que ja temos colhido que isso não será suficiente para se obter uma digna representação da India Portuguesa na Exposição.

O nosso auxilio poderá ir um pouco mais longe, caso V. Exa. o julgue conveniente, prontificando-nos a pagar o trabalho dos artistas e inclusivamente a materia prima dos artefactos manufacturados, e tão interessantes que se poderão obter nesta Colonia.

A Comissão de mui digna presidencia de V. Exa, acórdaria com os expositores, que nos fossem cedidos, depois de expostos, todos os produtos que figurarem na proxima exposição de Goa e não apenas aquelles arranjados com o nosso auxilio e todos como digo ao principio seriam transportados de nossa conta para Paris.

Se V. Exa. entender que esta minha proposta é digna de ser considerada, muito me obsequiava submetendo-a à Comissão da digna Presidencia de V. Exa e tambem ao Governo desta Colonia e expositores, para efeito da cessão dos produtos.

Não tendo verba autorisada para tal despeza era igualmente obsequio V. Exa. informar me da quantia aproximada que julga ser provavel haver a dispender.

Protestando a V. Exa. e aos illustres membros da Comissão a nossa mais elevada consideração nos subscrevemos.

De V. Exa.

mto, atos. ven. e obgdos

V. Themudo

जाहीर विनंति

(जेटी-मराठी शाळा, मार्मुगांव हार्बर)

या शाळेचे मेंबर, पालक व इतर हितचिंतक यांस कळविण्यांत येतें कीं, उपरिनिर्दिष्ट विद्यालयांतील मुलांची वार्षिक परीक्षा रा. रा. शि. सामंत व रा. पांडुरंग जयराम देसाई या परीक्षकांकडून येत्या डिसेंबरच्या ता २९ व ३० रोजीं घेण्यांत येणार असून ता. ३१ रोजीं संध्याकाळीं २ वाजतां रा. हेगडे देसाई, सं. भारत यांच्या हस्तें बक्षिस समारंभ पार पडणार आहे, सदरहू प्रसंगीं अनेक वक्त्यांचींहि भाषणें होणार आहेत. तरी या दिवशीं तवीनीं हजर राहून शिक्षणप्रसारास सहाय्य करावें अशी नम्र पण आग्रहाची विनंति आहे.

मार्मुगांव, हार्बर ३०-११-२२	स. न. से. शां. का. दुभाईत से. जे. म. शाळा

—पणजीचे हायकोर्ट जज तोरगालरॉक हे पोर्तुगालला रवाना होणार आहेत.

—नवीन कायदेमंडळीतर्फे दोन व्यंकटेश राव देसाई व सुराय विठ्ठल देसाई हे लेजिस्लाटीव कौन्सिलांत मेंबर निवडून आले.

—श्री. दत्तात्रय वामन नाईक, रायबंदर, यां कडून 'पोर्तुगीज शिक्षक' हे उपयुक्त पुस्तक अभिप्रायार्थ आलें आहे. त्यांचा स्वीकार करितो. अभिप्राय येत्या अंकीं.

भारत

गुरुवार मार्गशीर्ष शु० ११ शी १८४४

नवीन नामदारांस—

गोमांतकाच्या तिजोरीची स्थिति हलाख बनवून, करवाढीच्या तीक्ष्ण शस्त्रानें जनतेवर हल्ला करण्यास सरकारला, भाग पाडणारीं जीं अनेकविध कारणें दाखवितां येतील त्यां पैकीं प्रांजेरीश द कोस्ता यांच्या 'राजकारण', अनावश्यक मिलिटरी लोकांची जोपासना व आळशी नोकरशाहीची कल्पनातीत वाढ, यांचा प्रामुख्यानें उल्लेख करितां येईल. संकटपरंपरेची आद्य व खरी जननी हीच कारणत्रयी होय. याच कारणत्रयीमुळें लोकांत असंतोष वाढत चालला असून, गोमांतकाच्या उन्नतीचा हेतु फल प होत नाहीं.

प्रा. कोस्तांनीं लोककल्याणाच्या दिखाऊ ध्येयांखालीं हरेक हुद्दे रचून आपल्या मित्रांचा तळीराम गार करण्याचा अंतस्थ डाव साधिला व स्वतःसाठींहि एक लठ्ठ पगाराची जागा कमावून तिजवर आरूढ झाले. शिवाय वेळ मिळेल तेव्हां 'कमिशन' रूपानें आपली सांपत्तिक स्थिति सुधारण्यास ते मागें पुढें पहात नाहींत, ही गोष्ट निराळीच एवच स्वार्थाशिवाय त्यानां राजकारणांत दुसरा कोणताच उपयुक्त अर्थ सांपडत नाहीं. व यदाकदाचित् सांपडलाच तर त्याचा उपयोग करून घेण्यास लागणारी बुद्धिमत्ता त्यांच्यांत बिलकूल नाहीं !

अनावश्यक मिलिटरी आफिसरांची जोपासना तर सर्वांच्या डोळ्यांत सलत आहे. शिपायांपेक्षां आफिसरांची संख्या जास्ती असल्याचा बोभाटा पसरला असल्यास नवल नाहीं. मिलटरी लोकांची सेवा राष्ट्रांनां वास्तविक जरूरी आहे तीं राष्ट्रें सुद्धां आपापलें सैन्य कमी करण्यांत चूर होऊन गेलीं आहेत; पण गोमांतकांत उलटाच कारभार दिसून येत आहे ! फाजील अफिसर व त्यांची लष्करी राखण्यांत खर्च होणारा द्रव्यनिधि यामुळें तिजोरी खिळखिळी बनली असल्यास नवल तें कोणतें ?

करांचें जाळें इतकें पसरलें आहे कीं, त्यांचीं पाळें मुळें सर्वत्र विस्तार पावत असून त्यांमध्यें तिजोरी 'आकंठ' गुरफटून गेली आहे. कितीहि पैसा तींत असला तरीहि तो नोकरशाहीला पुरत नाहीं. अशा अडचणीच्या स्थितींत आमची उन्नति व्हावी कशी ?

जों पर्यंत उपरोक्त कारणत्रयी कायम असेल, जोंपर्यंत कोस्ताच्या धिंगाणा, मिलिटरी आफिसरांचा थयथयाट व नोकरशाहीचा सुळसुळाट या देशहितविघातक गोष्टी चालू राहतील, तोंपर्यंत गोमांतकाच्या राजकीय सुधारणेचीं आशा करणें अगदीं व्यर्थ होय.

तात्पर्य, आमची राष्ट्रीय उन्नति सदरहू कारणत्रयीचा समूळ उच्चाटनांत आहे, हें ओघानेंच सिद्ध होतें. या गोष्टींकडे आमच्या नामदारांचें लक्ष जाईल काय ?

वर्तमानसार

—प्रांजेरीस दे कोस्तानें गुरगांवच्या कोन्सिलांव द मिल्योरामेंतवर शस्त्र धरलें असून, हिंदु आरक्शितस्त विरुद्धहि तोंड उघडण्याचें धाष्ट्य केलें आहे ! या दुसऱ्या गोष्टीसंबंधानें भारत साहेबांचा समाचार घेणार आहे.

—एकंदर मुनिसिपालटीच्या निवडणुकी रद्द होतील, अशी एक अफवा निघाली आहे गप्पीदासांची करामत नसेल ना !

—शर्वप्रदर्शनाचें दर्शन घेण्यासाठीं बाहेरचे पुष्कळ यात्रेकरू येण्याचा संभव आहे, असें वाटतात. पण अजूनपर्यंत तसा रंग दिसत नाहीं. सां.फ्रांसिस्काच्या 'कुरपेन' पावसानें मात्र मनमुराद बेरंग करण्याचा सपाटा चालविला आहे.

वर्गणीदारांस विनंति

ज्यां कडून भारताच्या वर्गणीची अजून फेड झाली नसेल त्यानीं ती येत्या महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यांत टपालमार्गानें किंवा दुसऱ्या कोणत्याही रीतीनें करावी. वर्गणी बाकी राहिल्यानें भारताला किती तोटा सोसावा लागत आहे, याची कल्पना पूर्ण करवत ना होण्यासाठीं, 'देणेदारांची' नामावली आम्हांस निरुपायानें प्रसिद्ध करावी लागेल. म्हणून ही शेवटची पण आग्रहाची विनंति करणें भाग आहे. येत्या जानेवारी महिन्यापासून भारताची नवीन व्यवस्था अमलांत येऊन भारत 'खास' अंकांतून खास मोकळा होणार आहे.

मनेजर भारत

भारतीय बांधवांस

पद - (चाल मी नव बाळा जोगिण)

कविः- लक्ष्मीरमण, हरवळ.

भारतभूमीवरि ॥ अभिमानधरा ॥ कीं जन्मधरा ॥ ब्रीद न विसरा ॥
दैन्यनिवारा ॥ पारतंत्र्य पीडी तिज तारा ॥ आर्यतेज दावा जगतास ॥ ध्रु०॥
क्षीण सोसुनी त्या अविनाशी ॥ पूर्ण स्वदेशीव्रता आचरा ॥१॥
खाद्य स्वदेशी, पेय स्वदेशी॥ वस्तु स्वदेशी नित्य वापरा ॥२॥
पेहराव हो स्वदेशी बरा ॥ जाडा भरडा तरि तोचि बरा ॥३॥
सदनें बनवा स्वदेशीमया ॥ उगवेल त्वरें स्वराज्य तारा ॥४॥
स्वदेशी असे स्वातंत्र्यपथी ॥ गुरुकिल्ली सांप्रत आर्यनरां ॥५॥
बहिष्कार असहयोग आदरा ॥ यशद गणुंनि स्वातंत्र्यसंगरा ॥६॥
महत गांधी तत्वें बोधी- ॥ 'अनंत' विनवी,-तयां अनुसरा ॥७॥

येणार ! येणार ! येणार !

नाट्यनैपुण्याबद्दल श्रीमत जगद्गुरु श्रीशंकराचार्य (डॉ. कूर्तकोटी, पी. एच. डी.) यांचेकडून पदव्या, ठिकठिकाणचे नागरिकांकडून मानपत्रें, बॅ. जयकर, दे. भ. अणे, महाराजा राय रायन किसनप्रसाद बहादूर, जी. सी. एस. आय., लो. बाळ गंगाधर टिळक यांचेकडून सुवर्णपदकें मिळविलेली, आणि श्रीमंत महाराज छत्रपती सरकार कोल्हापूर व श्रीमंत महाराज सवाई तुकोजीराव होळकर यांच्या आश्रयास पात्र झालेली,

संगीतरत्न मास्टर दीनानाथ मंगेशकर, स्वरसारंग रा. कोल्हापूरे व नटभूषण रा. कोल्हटकर यांची

बलवंत संगीत मंडळी

पणजी येथें 'बलवंत' थियेटरांत आपले प्रयोग सुरू करणार

पहिला प्रयोग

शनिवार तारिख २५ नव्हेंबर १९२२ रोजीं रात्रौ ९॥ वाजतां (स्टॅं. टा.)

(नवा खेळ) कै. राम गणेश गडकरी कृत (नवा खेळ)

पुण्य--प्रभाव

अंक १ ते ६

मंडळीचीं नवीं नाटकें

संगीत पुण्यप्रभाव
,, एकच प्याला
,, भावबंधन
,, राजसंन्यास
,, वेड्यांचा बाजार
} कै. राम गणेश गडकरीकृत

,, वीर विडंबन — केसरीचे संपादक दे. भ. न. चिं. केळकरकृत

,, जन्मरहस्य — सुप्रसिद्ध नाटककार श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरकृत

,, उग्र मंगल — 'तारामंडळ' 'शिवसंभव' इ. नाटकांचे कर्ते श्री. वासुदेव शास्त्री खरेकृत

,, सूडाचा संदेश — दे. भ. वीर वामनराव जोशीकृत

तिकेटांचे दरः— ५, ४, ३, २॥, २, १॥, १८=, ।॥=, ॥=.

सेक्रेटरी

ब. सं. मंडळी

भारत

गुरुवार ता. [illegible]

स्फुट विचार

रेजिस्ट्रेशन बिलेः—सांप्रत चालू असलेल्या या हुंडेहुंडी कायद्यापासून कसकशा अडचणी व भानगडी उत्पन्न होत आहेत. हें आम्ही येथें नव्यानें सांगावयास पाहिजे असें नाहीं. तथापि जर एखाद्याला या कायद्याचा खरा हाहाकारी ओळख पटवून घेण्याची इच्छा असेल तर त्यानें आजच्या अंकीं दुसरीकडे प्रसिद्ध झालेला पणशीकरांचा लेख वाचून त्याचें मनन करावें, अशी आमची सूचना आहे. पणशीकरांनीं प्रस्तुत सामाजिक कायद्यासंबंधीं जे विचार प्रदर्शित केले आहेत, ते अप्रामाणिक आहेत असें म्हणण्यास कोणी धजेल असें आम्हांस वाटत नाहीं. असें असतांहि जर आम्ही उपरोक्त कायद्यांविरुद्ध [illegible] लुप्त होण्याप्रीत्यर्थ चेष्टानें झटत नाहीं, तर आमच्यातील शहाणपणा एकदम गुप्त झाला असला पाहिजे, असें म्हणावें लागेल! सत्ताच्या जयवृद्धीकरितां कोणतीहि चळवळ ओढणें फार कठिण आहे. हें आम्हांस कबूल आहे परंतु दुसऱ्यांनीं चालविलेल्या चळवळीला मदत—व तीहि आपापल्या योग्यतेनुसार—पुरविणें अशक्य आहे, अशी मात्र आमची समजूत नाहीं. तेव्हां, पणशीकरांनीं अत्यंत कळकळीनें सुचविलेल्या मार्गानें सदरहू कायद्यासंबंधीं लोकांनीं आपलें स्पष्ट मत जाहीर रीतीनें सरकारास कळविण्यास आतां तरी अनुमान करूं नये, अशी त्यांस विनंति आहे.

वाळोंबलि समाज, केपें:—ही संस्था दिवसेंदिवस नावारूपास चढत असलेली पाहून आम्हांस आनंद वाटत आहे. संस्थेच्या मेंबरांच्या अविश्रांत परिश्रमामुळें, समाजाची सांपत्तिक स्थिति सुधारून तो कार्यक्रम यशस्वी चालत आहे. लोकांत स्वावलंबित्वविषयीं प्रेम वाढत आहे, हें खरोखर समाज चालकांस भूषणास्पद होय. गेल्या १८ तारखेस समाजाचा द्वितीय वार्षिक समारंभ मोठ्या थाटानें पार पडला. या प्रसंगानिमित्त भरलेल्या सभेचें अध्यक्षस्थान पुंडलिक व. [illegible] यांनीं मंडित केलें होतें. सभेंत अनंत राघव शिरोडकर, वासुदेव विठ्ठल देसाई व देगडे देसाई यांचीं प्रचलित विषयांवर भाषणें झालीं. अध्यक्षांचा समारोप उत्तम झाला. समारंभास ठिकठिकाणची मंडळी हजर होती. शिवाय समाजांतील वजनदार गृहस्थ व मुसलमान लोक यांनींहि आपल्या सान्निध्यानें उत्सवास शोभा आणली होती. एकंदरीत ता० १८ हा दिवस संस्थेच्या इतिहासांत अपूर्व असाच राहील, यांत कसलीच शंका नाहीं.

शोकजनक मृत्यु:—भारताचे एकनिष्ठ चहाते, येथील समाजांतील एक तरुण विद्वान, येथील एक कर्तृत्ववान व्यापारी व गोमांतकाच्या अभ्युदयासंबंधीं राजकीय विचार करणारे एक देशबंधु नारायण धर्मा शेट कळंगुटकर यांस आकस्मिक रीतीनें देवाज्ञा झाल्याचें कळविण्यास आम्हांस परम दुःख होत आहे. कै० नारायणरावांचें वर्तन शुद्ध व सरळ, स्वभाव गोड; तसेच हिंमतदार असून, स्वार्थ

लोकजागृतीचें कार्य

अमेरिकन राष्ट्राच्या पूर्वेतिहासाचें किंवा लोकसत्तात्मक युरोपियन देशांचें पूर्वपिठीकेचें निरीक्षण केल्यास त्या त्या कालांतील सुसंस्कृत तरुण मंडळींचे लोकशिक्षण वगैरे वरच लोकजागृतीचे प्रयत्नच आपापल्या राष्ट्रांतील लहान थोरांत स्वावलंबनाची ज्योत प्रज्वलित करण्यास कारणीभूत झाले असेंच अनुभवास येतें.

सुरुवातीला अशा यत्नाला समाजांत कमी महत्त्व असतें, पण देशभक्तांच्या चिकाटीमुळें एकदां या कामीं जनतेचें लक्ष वेधलें म्हणजे या कार्याचा परिघ वाढून त्यास सामुदायिक पद्धतीचें विशिष्ट स्वरूप प्राप्त होतें. त्यांच परिस्थितींतून कर्ते लोक पुढें येतात व प्रत्येकाचे सामर्थ्यानुसार आपणाकडे त्या परिस्थितीचें कर्तृत्व घेऊं शकतात.

अशा अल्प प्रमाणानें प्रथमतः लोकसंग्रहाची तयारी झाल्यावर पुढें त्या समुदायाचें किंवा राष्ट्राचें महत्त्व किंवा आत्मतेज इतकें वाढतें कीं, इतरांनां त्याबद्दल आदर व भीति या दोनही गोष्टींपासून अलग राहतां येत नाहीं. इतक्या पायऱ्या चढून जावयास लागणारें राष्ट्र स्वावलंबी किंवा उन्नतीच्या पायरीवर चढल्यावर उपभोगण्यास तो देश किंवा तो प्रांत अशा स्थितींत लायक होतो, यांत संदेह नाहीं.

चारपांचशें वर्षांचे परकी राजसत्तेचें जोखड जुन्यापासूनच्या गोमांतकांतील असहाय व नेभळट लोकांत खऱ्या अर्थानें प्रसार किंवा देशकार्यार्थ वाहून घेण्याची स्फूर्ति कशी उत्पन्न होईल ती सुद्धां पण वरील कार्याची आवड मात्र आज सुशिक्षित समाजांत उत्पन्न झाली आहे व त्याचें द्योतक म्हणजे मडगांव येथील "सरस्वती सेवक मंडळ" व त्या संस्थेप्रमाणें इतर संस्थांचें अस्तित्व व त्यांचें लोकजागृतीचे प्रयत्न हें होय.

स० से० मंडळानें आज सतत तेरा वर्षांत महाराष्ट्रांतील बहुजनमान्य व विद्वान मंडळींना मुद्दाम बोलावून आपल्या सरस्वतीपूजनांतील प्रतिवार्षिक व्याख्यानमाला

त्याग हा गुण त्यांच्यांत प्रामुख्यानें वसत असे. या सुंदर गुणसमुच्चयामुळें जे जे कळंगुटकरांना ओळखीत होते ते त्यांवर प्रेम करीत असत. यामुळें नारायणरावांच्या अत्यंत शोचनीय निधनानें त्यांचे वृद्ध आईबाप व इतर सगेसोयरे दुःखसागरांत बुडाले असल्यास नवल नाहीं. परंतु त्यांच्या कित्येक मित्रांचीहि स्थिति शोचनीय झालेली आहे. घडी घडी त्यांचे गुण आठवून ते शोक करीत आहेत. भारतास ते अनेक वेळां द्रव्यद्वारें प्रोत्साहन देत असत व हस्तद्वारें मदत पुरवीत असत. अशा स्थितींत कळंगुटकरांच्या अनपेक्षित मृत्यूनें भारताला किती भयंकर नुकसान झालें असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. असो. मृतांचें गुणवर्णन करावें तितकें थोडेंच आहे. म्हणून त्यांच्या आत्म्यास शांति मिळण्याविषयीं परमेश्वराजवळ प्रार्थना करून हा लहानसा मृत्युलेख इतक्यातच आटोपता घेतों.

—शिवोलें येथें श्री दत्तजयंतीचा वार्षिक उत्सव तारीख ४ डिसेंबर १९२२ सोमवार रोजी साजरा होणार आहे.

लेख जे कौतुकास्पद व यशस्वी स्वरूप आणलें आहे. त्याबद्दल ती संस्था खरोखर अभिनंदनास पात्र आहे. ह्या प्रांतांतील सुशिक्षित तरुण पिढी व विचारी जनांत या संस्थेबद्दल दिवसेंदिवस जो आदरभाव दृढ होत आहे त्याचें प्रत्यंतर पहावयाचें झाल्यास संस्थेच्या श्री दामोदर विद्याभुवनांतील सरस्वतीपूजनाच्या प्रसंगीं लोकगंगेचा जो प्रवाह वाहतो त्याकडे लक्ष द्यावें, म्हणजे आमच्या म्हणण्याची सत्यता पटेल.

मंडळानें आणखी एका दृष्टीनें गोमांतकाची उत्तम सेवा केली आहे. हिंदुस्थानच्या इतिहासांत गोमांतक आणि महाराष्ट्र यांच्यामधील जो निकट संबंध होता व त्यामुळें त्यास न महाराष्ट्रानें स्वकीयत्वानें ज्याला अंगीकारिलें होतें त्या आदर्शापासून दूर करण्याचें मंडळाचे प्रयत्न विशेष फलद्रूप झाले कारण असले याची साक्ष पुढील इतिहास लिहिणारे देतील.

एक वेळ असा आला कीं, कोंकणस्थ, चित्पावन व सारस्वत ब्राह्मणांत जातिभेदाचे शुष्क अभिमानापासून मोठें वितुष्ट माजलें. दोनही ब्राह्मण एकमेकांपासून तुटक राहूं लागले. आपापल्यापरी सत्य गोष्टीचें प्रदर्शन करण्यासाठीं अनेक वेळां निरनिराळ्या ठिकाणीं वादविवाद झाले पण कसलीच सलोख्याची युक्ति निघाली नाहीं. इतकेंच काय पण पुष्कळ गोष्टी पोंचल्या पण काळाचा ओघ बदलला. उभयतांच्या गैरसमजुतीचें धुकें हळूहळू दूर झालें. सारस्वत व कोंकणस्थ वैद्यांत नाना खटल्यांस सुरवात करून कार्य करण्याची स्फूर्ति झाली. याला उदाहरण म्हणजे दे. प्रा. अण्णासाहेब परांजपे यांचें तृतीय सरस्वतीपूजनाचे प्रसंगीं अध्यक्ष स्थानावरून केलेलें भाषण व त्याप्रमाणें केलेलें वर्तन हें होय.

आम्हांस येथें नमूद करण्यास मोठें अभिमान वाटतो कीं, कोंकणस्थ चित्पावन, देशस्थ वगैरे ब्राह्मणांना आतां प्रसिद्धपणें सारस्वतांकडे अन्नव्यवहार करण्यास कोणतीच दिक्कत वाटत नाहीं. उलट संतोष वाटतो हें दे. प्रो. अण्णासाहेब परांजपे, दे. दामले, दे. चिंतामणराव वैद्य, दे. गंगाधरराव देशपांडे, दे. ग. प. पांगारकर दे. केळकर, दे. कृ. शि. परांजपे, दे. पुणतांबेकर इत्यादि थोर मंडळींनीं प्रत्यक्ष उदाहरणानें लोकांचे नजरेस आणलें आहे.

याचें श्रेय जर कुणास असेल तर मडगांवच्या स. से. मंडळ संस्थेस होय. वरील मंडळींनीं आपापल्या भाषणांत गोमांतकाबद्दलचे उद्गार काढून गोमांतक हा महाराष्ट्राचा एक भाग आहे हें पुराव्यानिशीं सिद्ध करून देऊन या दोहोंच्या ऐक्यासाठीं महाराष्ट्र एकजीव होण्यास तयार आहे अशी आशा प्रकट केली आहे, या त्यांच्या थोरपणाबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोंत.

इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहिण्यासारखा हा सुयोग जुळवून आणण्यास मंडळास जो स्वार्थत्याग व श्रम सोसावे लागले व पुढेंही लागणार त्याबद्दल मडगांवकर बंधूंचे आभार मानावे तितके थोडेच.

लोकजागृतीचे कार्याचा याहून जास्त फायदा गोमांतकाचे अनुभवास येतो अशी आशा प्रकट करणें अस्थानीं होणार नाहीं.

यशवंत

हिंदुबांधवांनो ! हा योग दवडूं का !

सामाजिक (रेजिस्ट्रेशन सिव्हिल) कायद्याचें सुधारणाबिल हल्लीं कौन्सिलांत आलें आहे. तेव्हां ह्या वेळीं ह्या कायद्यापासून कसकशा अडचणी व घोटाळे उत्पन्न होतात आणि आधींच गांजलेल्या समाजावर कोणत्या आपत्ती कोसळतात, हें जिकडे तिकडे सभा भरवून ठरावांच्या किंवा अर्जीच्या रूपानें सरकारांत कळविण्याला ही नामी संधि आली आहे. ही वायां दवडू तर आमच्या सारखे अभागी आम्हींच !

सदर कायद्यांतील हिंदूंच्या धर्मावर न कळत घाव घालणारा व अत्यंत त्रासदायक असा जो विवाह नोंदणीचा भाग (नोंदणी कामदारानें अगोदर कायदेशीर लग्न झाल्याची नोंद केल्याशिवाय धार्मिक विवाह करण्यास प्रतिबंध असणें हा मुख्य भाग) तो आमच्या धर्मभावनेस व चालीरीतीस जुळेल अशा रीतीनें सुधारून घेण्यांत आम्ही सर्वांनीं मतभेद, पक्षभेद व जातिभिन्न अभिमान विसरून व एकटें एक हिंदुत्वाचें डोळ्यांपुढें ठेवून प्रयत्न करूं तर इष्टसिद्धी दूर नाहीं. 'हा दुरुस्तीचा मसुदा परभारेंच कौन्सिलांत आला याविषयीं आम्हांस हरकत त्या सुधारणेस परभारें लागू व्हावें; आज कामीं आम्ही आळशी व बहुतेक वेळ फुकट दवडण्याचें कारण नाहीं.' असें कोणी ठेवे तर त्यावर हु कूं न करतां काय ! नोकरशाहीस तुमचा धर्म किंवा अधिकार यांची पर्वा नाहीं. दुरुस्ती होणार ती तुमच्या फायद्याकरितां नसून नोकरशाहीच्या कायद्याकरितां आहे हें लक्षांत ठेवा.

श्रेष्ठ कौन्सिलरांच्या वंशजांनो ! 'हिंदु' म्हणवून घेण्यांत तुम्हांस भूषण वाटत असेल व आपल्या धर्माची लाज राखणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे याची जाणीव तुम्हांस असेल तर—हिंदुसमाज खडबडून जागा होईल एवढी धडाडीची चळवळ उठवून या आणि कौन्सिलांतील लोकपालांच्या [कौन्सिलमधील प्रतिनिधींच्या] कानठळ्या बसतील इतक्या उच्च स्वरानें सुधारणांची एकमुखी मागणी करा ! चालढकल करून ही मागणी चुकवाल तर आपल्या अधर्माचा व घोर अपराध केल्याचें पातक आम्हा सर्वांच्या माथीं पडेल !

आज ह्या कायद्याच्या पायीं आमचा निरपराधी, दिव्य व उच्च भावनांनी युक्त असा जो हिंदुसमाज तो सुधारणेच्या या अनुरोधानें कृत्रिम कायद्याच्या वजनाखालीं चिरडला जात आहे ! वैदिकधर्मांतील कर्मठांनो ! इकडे जरा डोळे उघडून पहा ! थोरल्यांच्या लग्नावर यथाविधि उभयतांची नजरानजर होईपर्यंत ज्या आपल्या वधूवरांनीं एकमेकांस पाहणें, विधि वगैरे या दृष्टीनें निषिद्ध मानलें आहे त्या अशा अशा ८।१२ वर्षांच्या नवरानवरीस नोंदणी कामदारापुढें हजर करून नोंदणी कामगारानें एकांतांत त्यांच्याशीं नात्याची विचारपूस करावी आणि लग्न लावून घेण्याची कबुली द्यावी हा फार्स करावा याची आम्हांला काहींच चिंता वाटूं नये काय?

आमच्या लाजा तरी गेल्या कोठें? कायद्याच्या तरतुदींच्या चमत्कारिक व अनादिकालापासून जे आम्हीं, वाङ्निश्चय आणि गोत्रप्रवर

FH 503

Ecos & Criticas

Pagodes podres

O sr. *Lax-Man*, nosso solicito correspondente insurge se numa carta a nós dirigida contra um tal *Paula de Cancela*, noticiarista de *l'Heraldo* por este ter procurado incompatibilizar a classe hindu com o emprego dos insultos *Pagode gentio* etc.

E' justificada a indignação do nosso referido correligionario e porisso a participamos, protestando contra a malcriação do objecto Cancela que, pelos modos, traz figados podres pelo progresso dos hindus.

Crê, porem, o desgraçado Cancela que não são os seus insultos ou doutros de sua laia que hão de pôr barreira.. invencivel ao mesmo progresso...

Pigmeu

E' um jornal que não sabe occultar o que sente, dóa a quem doer. E os sentimentos do *Pigmeu* são dignos dum coração que aspira unicamente ao bem do seu Paiz. Não admira, portanto, que a sua acção seja de molde a deitar por terra prepotencias absurdas, por mais giganteseas que sejam.

Ao intemerato colega, nossos cumprimentos de boas vindas e desejos de crescentes prosperidades.

Mala da India

Recebemos a visita deste novo semanario que se publica em S. Cruz Promete ser um defensor a valer dos interesses do nosso Paiz

Seja bem vindo e tenha um porvir, repleto de prosperidades.

Dharma-shala

O reverendo Suami Purnasram projecta construir em Sanvordem uma casa de descanço- *Dharma shala* para os viajantes que se encontrarem com dificuldades de ter um agasalho onde, com segurança, possam passar o tempo durante a mudança de transportes. E' claro que o referido projecto converter-se-há em facto a expensas da caridade publica que não há de deixar de acolhe-lo com agrado, dado o generoso fim a que ele visa.

Se depois do pão, a instrução é a primeira necessidade do Povo, o descanso tambem o è, depois duma viagem maçadora- E' portanto, necessaria a projectada obra. E sendo necessaria, é de esperar que o Governo a coadjuve no limite de suas forças.

Sabemos que Sua Excia o sr. Governador Geral vai receber ou recebeu uma representação dos principaes habitantes hindus de Goa na qual estes lhe solicitam concessão gratuita dum terreno ligado á estação ferro-viaria de Sanvordem para o indicado *Dharma shala*.

Confiadamente, aguardamos a satisfação do pedido dos interessados

---

—डिचोली येथील लक्ष्मीपूजनोत्सव थाटानें पार पडला. याप्रसंगीं सुरू केलेली व्याख्यानमाला यशस्वी रीतीनें पार पडली. कीर्तनाशिवाय, कुंभारजुवेंचे सामंत, सांगेचे नारायण अ. ना. पाठणकर, प्रो. काळे बी. ए. इ. गृहस्थांची मार्मिक व्या...

भारत

गुरुवार कार्तिक व० ५ मी १८४४

लाज कीं अज्ञान ?

O Conselho sabe muito bem que a metropole exerce a sua ampla função de superintendencia no governo das Colonias. O Poder Executivo está no seu pleno direito de conceder ou negar aprovação ás resoluções dos governos locaes que não tenham por si proprias força executoria. A organisação dos serviços de instrução superior, secundaria e especial constitui por lei, objecto de providencias geraes do Poder executivo, que até *nem depende da previa informação do Concelho Legislativo* da colonia interessada."

Dr. Jaime de Moraes, Governador Geral, falando no Concelho Legislativo, sessão de 18 da out 1922.

"ह्या कौंसीलाला पूर्ण माहीत असलें पाहिजे कीं पोर्तुगालसरकार 'वसाहतींच्या' राज्यकारभारावर, देखरेख ठेवण्याच्या नात्यानें हुकमत चालविण्याला पूर्ण अख त्यार आहे. स्थानिक सरकारें जे जे ठराव करतील त्यापैकीं ज्यांना, स्वयमेव, अम्मलबजावणी करण्यासारखा कायदेशीर पणा नाहीं, असे सारे ठराव मान्य करणें अगर झिटकारणें हें प्रधानमंडळाच्या सामान्य अधिकारांतलें आहे वरिष्ठ सरकारच्या हुकमतींतल्या ज्या सामान्य बाबी म्हणून ठरलेल्या आहेत. त्यापैकींच वरिष्ठ, दुय्यम, किंवा विशिष्ट शिक्षणालयाची घटना ही ही एक बाब आहे. आणि इतर बाबींतल्या प्रमाणें ह्या बाबींतही स्थानिक कायदेकौंसीलांचें मत प्रथम घ्यावें अशी मुळींच जरूरीही ठेवलेली नाहीं."

हा उतारा गेल्या महिन्याच्या १८ तारखेच्या कायदेकौंसीलांत अध्यक्ष ह्या नात्यानें केलेल्या गव्हर्नरसाहेबांच्या भाषणांतील आहे. पोर्तुगालहून एका लष्टं पगारवाल्या अधिकाऱ्याची शिक्षणखात्याचा प्रमुख म्हणून नेमणूक होऊन गेल्यावर त्याची वरणी पुरवण्याकरतां जादा रक्कमेची व्यवस्था करण्याबाबत जो ठराव स्वतः गव्हर्नरनीं पुढें मांडला होता. त्याला लोकनियुक्तपैकीं रॅंबेर्त कॉस्त वगैरेनीं प्रतिकूल मत प्रगट केल्यावर त्यांना तालावर आणण्याकरतां म्हणून गव्हर्नरनीं वरील मात्रेचा, आपल्या नेहमींचा, वळसा देऊन त्यांना गप्प बसायाला लावलें हें दैनिक वृत्तपत्रें वाचणाऱ्याच्या लक्षांत असेलच. परंतु हा परिपाठ नेहमीचाच असल्यावरून, म्हणजे जेव्हां जेव्हां राजकारभारांतील कोणतीही महत्वाची बाब चर्चेकरतां पुढें निघते तेव्हां तेव्हां ती बाजूला सारून वरिष्ठ सरकारचें घोडें पुढें दामटण्याकरितां कायदेकौंसीलाचें अधिकारक्षेत्र किती आकुंचित आहे ह्याची स्मरणानें सभासदांना आठवण करून देण्याची गव्हर्नरसाहेबांची वहिवाट असल्यावरून जसा इतर अनेक वेळीं तसाच आजही ह्या शब्दांनीं कोणाला काडीचाही धक्का पोंचला नाहीं, आणि आम्हांलाही त्यांत कांहीं नाविन्य वाटलें नाहीं.

असें असतांही आज आम्हीं हे शब्द मुद्दाम उतरून काढून वाचकांसमोर ठेवलेले आहेत. त्याचें कारण एवढेंच कीं आमच्यापैकीं कांहीं मंडळी, जेव्हां जेव्हां आमच्या "आवतोनोमी"ची चर्चा चालू असते तेव्हां तेव्हां ती स्वराज्यच आहे असल्या भोळ्या समजुतीनें तिच्या तरफदारीची वेडी यातायात करूं लागतात. अर्थात ह्यांत त्यांचा जाणून बुजून कोणाची दिशाभूल करावी असा हेतु असतो असें नाहीं. बहुतकरून ती त्यांची स्वताचीच प्रामाणिक समजूत असते. व ज्या कित्येकांची तशी प्रामाणिक समजूत नसते, ते, 'आमची आवतोनोमी' स्वराज्य नव्हे असें उघड कबूल केल्यास, इंग्रजी मुलखांतील गृहस्थ आमच्या अल्प परिचयामुळें जे कित्येकदां 'तुम्ही स्वराज्यांत आहां' असें म्हणून आम्हांला हरभऱ्यांच्या झाडांवर चढवून जातात तेथून आम्हीं अचानक खालीं पडूं अशी भीति बाळगूनही मूग गिळतात. परंतु, ह्या दोन्हीं प्रकारांपासून आमचें नुकसानच होतें. आपखुशी शिवाय, परक्या लोकांत हंसेंच होतें. कारण जे परस्थ लोक इकडे येतात त्यांना स्वताचे डोळे तर असतातच; शिवाय, चार चौकस प्रश्न करून त्यांना येथील राजस्थिति अजमावयाला हि मिळते. अर्थात, त्यांच्या डोळ्यांत आम्हीं मुद्दलक धूळ फेकली म्हणून जों इकडे आमचे स्वयंगत स्वराज्यवाले शेखी मिरवूं पाहतात, तों तिकडे हे लोक 'सुधारलो म्हणणारे 'गोंयबाबू किती मागासलेले आहेत हो!' असें म्हणून विस्मय प्रगट करतात.

आतां हा प्रकार गैर आहे असें कोण म्हणणार नाहीं? ह्यापेक्षां आमची आवतोनोमी ही आपली एक अमुक अमुक अर्थाची व अमुक अमुक मर्यादेची आहे नावाची चिज आहे असें उघड सांगणें हें आमच्या मंडळीनें चालू करणें चांगलें काय? त्यामुळें आपल्या कच्याबुऱ्या स्थितीची आपणालाही ओळख तर होईल. शिवाय परके लोकही आम्हांला राजकीय आकांक्षा आहेत. व राजकीय अधिकारांचें अज्ञान आमच्यामध्यें वसत नाहीं असें पाहून आम्हांलाही आदरानें व सहानुभूतीनें लेखूं लागतील. स्वराज्याचे अधिकार नसणें म्हणजे कांहीं वैगुण्य आहे मोठा कलंक आहे व तो लपवणें हें शहाणपण आहे असले अविद्यामूलक विचार आमच्या लोकांत कां रूढ व्हावे हेंच कळत नाहीं. हा सर्वसाधारण अज्ञानाचा परिणाम म्हणावें तर आजकाल इंग्रजी हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रांच्या व पुढाऱ्यांच्या अनेकविध चळवळींनीं व [illegible] विचारजागृतीनें अशा अज्ञानाला वाव ठेवला असावा ह्याचेंच सखेदाश्चर्य वाटतें आणि त्यामुळें, आमच्या 'सुधारलों' म्हणणाऱ्यांना, आपली खरी स्थिति प्रगट करण्याला, चुकीचीच का होईना, पण मनाची नसली तरी जनाची लाज वाटत असावी, अशीच समजूत केल्याशिवाय ह्या कोड्याचा उलगडाच होत नाहीं.

असें ऐकतों, कीं, कांहीं दिवसांमागें इकडे आलेले एक मुंबईकर राष्ट्रीय ह्या नामधारी 'आवतोनोमी'नें आमच्या पुढाऱ्यांना भुरळ पाडली तरी कसी व तिला ते स्वराज्य म्हणून मिरवूं पाहतात तरी कसे ह्याचें आश्चर्य वाटून शेवटीं, त्याचें कारण येथें सामान्यता वसणारें येथील लोकांच्या राजकीय स्थितीचें अज्ञान हें असावें असें ठरविते झाले. हें निदान खरें म्हणतां येईल काय? अर्थात नाहीं. परंतु तें करणाऱ्याची तरी चूक आहे का? मुळींच नाहीं ह्या दोन्हीं चुकांची खरी जबाबदारी कोणावर? अर्थात, जे आम्हीं जाणून बुजून ह्या 'आवतोनोमी'च्या 'बोडफळाला' स्वराज्याचें अमृतफळ म्हणून परक्यांना भासवून त्या योगानें स्वतःचें कल्पित महत्व वाढवूं पाहतों त्या आम्हांवरच नाहीं काय?

ज्या आवतोनोमीत शिक्षणासारख्या निरुपद्रवांत निरुपद्रवी व दुबळ्यांत दुबळ्या खात्याची घटना ठरविण्याचें व ती अमलांत आणण्याचें लोकांच्या प्रतिनिधीवर सोंपविलेलें नाहीं ती ती 'आवतोनोमी' म्हणजे खरोखरीच आमच्या 'फिर्गी सरकारनेंच देण्याच्या लायकीची व आम्हीं 'गोंयच्या लोकांनींच' घेण्याच्या लायकीची म्हटली पाहिजे! ज्या सुधारणेनाना इंग्रजी हिंदुस्थानांतील लोक स्वराज्याची पहिली पायरीही मानायाला नाकबूल त्या सुधारणांनींहि शिक्षण, आरोग्य, पब्लिकवर्क्स, शेतकी वगैरे अनेक खातीं लोकप्रतिनिधींच्या कौंसिलांवरच नव्हे तर त्यांतून निवडलेल्या प्रधानांवर सोंपविलेलीं आहेत. व त्याप्रमाणें आज अत्युच्च शिक्षणापासून तों प्राथमिक शिक्षणापर्यंत सारा व्यवहार हिंदी कायदेमंडळाच्या मतानें व हिंदी प्रधानाच्या नियंत्रणाखालीं चाललेला आहे. व त्यावर विलायत सरकारची तर नव्हेच पण दिल्लीसरकारचीही हुकमत चालत नाहीं. इतर प्रांतांची गोष्ट सोडाच. पण आमच्या शेजारच्या मुंबईप्रांतांचेंच जरी एक शिक्षणखातें तुळनेकरतां घेतलें तर त्याचा व्याप व आवक जावक आमच्या प्रांताच्या साऱ्या खात्यांच्या आणि 'स्वतलत्यांच्या' ह्याहीपेक्षां पुष्कळ पटीनें अधिक आहे. व तें सारें रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे नांवाच्या दरमहा साडे पांच हजार रुपये घेणाऱ्या एका लोकनियुक्त हिंदी गृहस्थांच्या हातांत आहे. आणि त्यांनी लोकाचा पाठिंबा नसतांही (कारण सुधारणाकायद्यानें लोक संतुष्ट झालेले नाहींत) सक्तीच्या शिक्षणाचा प्रश्नही हातीं घेऊन सोडविलेला आहे. व सध्या दडून राहिलेलें लोकमत अनुकूल झाल्यास, देशभाषांचीं विश्वविद्यालयें, प्रांतवार युनिवर्सिट्या व गैरे अनेक शैक्षणिक संस्था घडवून आणण्याची अखत्यारी त्याना आहे. ज्या जाग्यांवर आजवर 'इंग्लिशमन वाचून' अन्याला शिवाय मिळाला नाहीं त्या जाग्यांवर ते हिंदी माणसाना नेमूं लागले आहेत व त्या बाबतींत वरिष्ठ व कनिष्ठ सरकारला ब्रही काढतां येत नाहीं. जे डायरेक्टर साहेब बहादूर हिंदी शिक्षकवर्गाला पूर्वी 'आकाशस्थ देवासारखे दर्शन दुर्लभ होते तेच साहेब बहादूर आज त्याच शिक्षकांपैकीं एकाची धूळभेट व्हावी म्हणून खटपट करताना दिसतात. आणि ह्या वाग्याचा कळस म्हणजे एवढें [illegible] हातांतर घेऊन [illegible] तरी लोक स्वराज्याचा कणही लाभला नाहीं म्हणून सेंवी तुटो कीं पारंबी तुटो अशा हटातटानें सरकारशीं भांडायाला दुप्पट जोरानें तयार!

जें केवळ 'राजकीय सुधारणा' ह्या नावानें लेखलें जातें त्याची ही गोष्ट. आतां ज्याला 'स्वराज्य' आवतोनोमी अशीं नावें

499 513

निवडणुका व संस्कृति

'भारता'च्या गेल्या " अंकांत येत्या निवडणुका व हा मथळ्याखालीं जो अग्रलेख आला आहे त्यांतील बहुतेक विचार सर्वसंमत होण्यासारखे असेच आहेत ह्याबद्दल शंका नाहीं. परंतु त्यांतील शेवटच्या भागांत मतदारांना उद्देशून जो मजकूर लिहिला आहे त्या बाबतींत मात्र तसें होणें किंचित् अशक्य आहे असें आम्हांला वाटलें; तें कां वाटलें याचा थोडासा खुलासा करीत आहों.

'म्युनिसिपालट्या, जुंत लोकाळें आणि कायदेमंडळ यांत सभासद ह्या नात्यानें जाऊं इच्छिणारे आपली पुढील कामगिरी हिंदी संस्कृतीला धरून करणारे असतील तरच त्यांना आपलें मत देणें व इतरांनीही द्यावें म्हणून लोकमत तयार करणें रास्त होणार आहे,' असें वरील लेखांत सूचित केलेलें आहे. ह्यांत दिग्दर्शित केलेला हेतु व त्यावरून उघड होणारी आमच्या समाजांतील स्वसंस्कृतीविषयक अभिमानाची भावना ह्या दोन्हींही अगदीं वाजवी आहेत. परंतु, चालू स्थितींत निवडणुकांसारख्या ठिकाणीं पक्ष म्हणून हा कस उमेदवारांना लावूं पाहणें काहींसें घाईचें व अनवश्यक होणार आहे. पहिली गोष्ट अशी कीं, वरील मजकूर हिंदू समाज व हिंदू सभासद ह्यांना उद्देशून लिहिलेला आहे. परंतु आमचा जो सर्वसाधारण अनुभव आहे. यावरून हिंदू समाजांत हिंदी संस्कृतीच्याविरुद्ध अजूनपर्यंत कोठेंही बुद्धिपुरस्सर पक्ष स्थापन झालेला नाहीं. किंवा जाणूनबुजून त्या प्रतीचा तट उभा करावा अशी कोणी खटपटही करणारे नाहींत. व्यक्तिशः हा कस लावून पाहिला तरी तो लावून घ्यायला कबूल नाहींत अशा व्यक्ति फारशा आढळणार नाहींत. आतां त्यांनां कमजास्ती कसाला लावावें लागत असेल परंतु जोंपर्यंत तो कस कमी कमी करण्याकरतां म्हणून त्यांनीं पक्ष उभा केलेला नाहीं तोंपर्यंत त्यांच्याविरुद्ध तट उभा करणेंही मुळींच योग्य नाहीं. आतां त्यांचा कस अधिकाधिक वरचा लागावा अशी खटपट चालू ठेवणें भाग आहे परंतु त्याकरतां तशा व्यक्तींशीं विरोधाच्या भावनेनें न वागतां सहानुभूतीच्या भावनेनेंच वागलें पाहिजे. अर्थात, ज्या ठिकाणीं सहानुभूतीच्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे त्या ठिकाणीं निवडणुकांसारख्या प्रसंगींच्या तटांची उभारणी करणें म्हणजे जो जात्या विरोधी नव्हे अशाला विरोधी होण्यास भाग पाडण्यासारखें आहे. आणि हें हिंदी संस्कृतीच्या नावानें, व हिंदी संस्कृतीकरतां म्हणून, करणें म्हणजे त्यांत त्या संस्कृतीलाही कमीपणा आणणें आहे. कारण हिंदी संस्कृतीचें प्राबल्य एवढें आहे, तिचा ज्याच्या त्याच्याशीं परिचय होतो त्या त्या पुरुषावर एवढा पगडा बसणारा आहे, कीं तिच्यातर्फे आमच्या ह्या चिमुकल्या निवडणुकांत एखादा 'आपोर्तगेझाद' हिंदूबंधूविरुद्ध अस्तन्या सारून पुढें येणें हास्यास्पदच दिसेल. कारण जी एक गोष्ट ह्या बाबतींत आपण दृष्टीआड होऊं देणें योग्य नाहीं. ती ही कीं, ज्या व्यक्ति आपल्या समाजांत आपल्याच संस्कृतीविरुद्ध वावरल्यासारख्या भासतात त्या आपल्या संस्कृतीच्या द्वेषानें तशा बनलेल्या नसून केवळ तिच्या अज्ञानामुळें तशा बनलेल्या आहेत. व त्यांच्या तशा वावरण्यानें हिंदी संस्कृतीचें नखही न दुखावतां फक्त तेच मात्र स्वःताचें धन व भूषण हस्तगत न झाल्यानें परकीयांचें भूषण उसनें घेऊन व मिरवून आपल्या लोकांचे व परक्या लोकांचेही उपहासाचे विषय बनून गेलेले आहेत. अर्थात अशा लोकांना सावरणें म्हणजे फक्त त्यांचें वैभव व त्यांचीं भूषणें त्यांच्या हस्तगत होतील असें करणें व तसें करतांना होतां होईतों त्यांना कमी दुखवणें अर्थात; त्यांच्याविरुद्ध समाजांत तट उभे करणें हें नव्हे. म्हणून; आमच्या अल्प समजुतीप्रमाणें असें दिसतें कीं, ज्या अर्थी आमच्या निवडणुकांमध्यें अजून तत्त्वापेक्षां व्यक्तींवर लोकांचा रोख अधिक असतो त्या अर्थी केवळ व्यक्तिद्वेषाला कारणीभूत होईल, परंतु तत्त्वप्रसाराला सहाय्यभूत होणार नाहीं असा मतदारांचा दृष्टीकोन वळवणें योग्य नाहीं. आणि हिंदी संस्कृतीच्या तर्फे तसें करूं जाणें म्हणजे तिच्याविरुद्ध आपल्या समाजांत पूर्वींच पक्ष उभा करण्यांत आलेला आहे असा ध्वनितार्थ निघण्यासारखें आहे. आणि ज्या अर्थी तसा पक्ष तर अजून कोणीही पुढें केलेला नाहीं त्या अर्थी तें नाहीं व नसावें तें आहे व असावें असा विनाकारण दृष्टीभेद करणें ठीक नाहीं. असें केल्यानें जेथें सहानुभूतीची, अनुकंपेची व सख्यत्वाची भावना उद्भवली पाहिजे तेथें तिरस्काराची, निर्ममतेची व परत्वाची भावना पेरल्यासारखें होणारें आहे. आणि हें तर केव्हांही इष्ट नाहीं. आणि तें हिंदी संस्कृतीकरतां होणें म्हणजे तर वस्तुविपर्यासच होय. असो.

हे विचार प्रगट करण्याला कारण झालेला वर निर्दिष्ट केलेल्या लेखांतील तो बढा तो भाग वगळला म्हणजे इतर बाबतींत मतभेद मुळीच नाहीं हें सांगणें नकोच.

सु. रा. सामंत.

—पारोडें येथें पुं. वा. विर्जिनकर यांचें प्रवचन झालें.

भारत

गुरुवार कार्तिक शु० १३ शी १८४६

जुंत लोकाळें

ग्रामसंस्था

पोर्तुगाल सरकारनें वसाहतींना, स्वयंसत्ताकराज्यपद्धतीच्या गोड व मधुर नावांखालीं, बहाल केलेल्या अनेक देणग्यांपैकीं, जुंत लोकाल (स्थानिक मंडळ किंवा लोकल बोर्ड) ही एक महत्वाची देणगी होय. प्रत्येक वीस किंवा अधिक मतदार (पोर्तुगीझ भाषेंत लिहावयाला वाचावयाला जाणणारे) असणाऱ्या गावांस अथवा गांवांच्या गटांस, अध्यक्षांसह तीन लोकनियुक्त सभासदांचें हें मंडळ स्थापण्याचा अधिकार दिलेला आहे. या मंडळास आपल्या हद्दींत रस्ते बांधणें; तळीं, विहिरी खोदणें; दवाखानें, वाचनमंदिरें, शाळा, रुग्णालयें, बाजारहाट उघडणें, दुष्काळांत व साथीच्या दिवसांत लोकांनां मदत करणें, गांवच्या परिस्थितीस अनुसरून कर बसविणें, जरूर ते कायदे करणें; जमाखर्चाचे अंदाज तयार करणें व हरेक कामांत सरकारास लागेल ती माहिती पुरविणें वगैरे अनेक उपयुक्त अधिकार दिले आहेत. अशा रीतीनें सरकारनें आपणावर व मुनिसिपालिट्यांवर असलेली जबाबदारी जुंत लोकालांच्या म्हणजे पर्यायानें लोकांच्याच अंगावर फेंकून देऊन, त्यांच्या तात्पुरत्या उपजीविकेसाठीं म्हणून,' मुनिसिपालिटीकडून वसूल करण्यांत येणारा जो 'रस्तापट्टीचा' कर (imposto de viação) तो वसूल करून, त्यांतील दोन तृतियांश आपणासाठीं ठेवण्याचा हक्क देण्यांत आला आहे. या कराच्या उत्पन्नांतून मिळणारे पैसे फक्त नवे रस्ते बांधणें व जुन्याची जोपासना करणें यासाठींच खर्च केले पाहिजेत. इतर कोणत्याहि कामास, मग तें कितीहि महत्त्वाचें असो, खर्च करणें झाल्यास नवा कर बसविल्याशिवाय स्थानिक मंडळास गत्यंतर नाहीं.

आधींच सरकारी व मुनिसिपालकरांच्या जाचानीं व मुर्गाव सुधारणा कमिटीनें लादलेल्या करांच्या भारानें त्रस्त झालेली जनता, घरच्या घरीं, आपल्याच लोकानीं बसविलेल्या नव्या करांस आनंदी संमती देऊन, ते देण्यास राजखुषीनें तयार होईल हें संभवतच नाहीं. आणि नवे कर बसवून उत्पन्नांत वाढ केली नाहीं तर, मंडळाकडून स्थानिक लोककल्याणकारक कृत्यें व्हावयाचीं नाहींत. अशा पेंचांत हीं आमचीं बहुमोलाचीं जुंतलोकाळें सध्या सांपडलीं आहेत. तरी पण, वाईटांतूनहि कधीं कधीं बरें निघतें, असें म्हणतात त्याप्रमाणें, प्राप्त परिस्थितींतूनहि मार्ग काढून, मिळलेल्या या महत्वाच्या देणगीचा सदुपयोग करून, मिळेल तो फायदा पदरांत पाडून घेणें आमच्या लोकांच्या हातचें आहे. व त्यांतच आमची पात्रता सिद्ध होणारी आहे. असली ही स्वयंसिद्ध पात्रता मिळविणें हें प्रत्येक नागरिकाचें, स्वतंत्र नागरिकाचें कर्तव्य होय. आजकाल जो उठतो तो कायदेमंडळाच्या, दिल्लीच्या मंडळाचा व मुनिसिपालिटीचा सभासद होण्यासाठीं प्रयत्न करतो. परंतु, असें करतानां आपल्या हातून त्या जागेला साजेसी कामगिरी काय होईल याचा ते विचार करीत नाहींत. म्हणूनच आमच्या आवतोनोमीचे (स्वयंसत्ताकराज्यपद्धतीचे) धिंडवडे निघत आहेत. या लोकांनां आपल्या लोकांचा मगदूर ओळखण्याइतकें सुद्धां ज्ञान नसतें. असें कष्टानें म्हणावें लागतें. नाहीं तर कायदेमंडळांत लोकनियुक्त सभासदांचें प्रमाण निम्यावर असता त्यांच्या हातून खर्चांत वाढ व करांची बेसुमार निपज यांखेरीज काहींतरी लोकोपयोगी कृत्यें झालीं असतीं. असो. उपरोक्त बड्याबड्या संस्थांचे सभासद होऊं इच्छिणाऱ्या उमेदवारांनीं, आपण आजपर्यंत, आपल्या कुटुंबपोषणपलीकडे नजर देऊन, आपल्या देशास हितकारक असीं कोणकोणतीं कामें केलीं आहेत? सेनकींत असो किंवा रेपुब्लिकांत असो, सरकार किंवा सरकारी अधिकारी यांकडून, लोकांवर होणारे कायदेशीर अन्याय थांबविण्यासाठीं अगर त्यांचा प्रतिकार करण्यासाठीं, आपण कोणकोणते प्रयत्न केले आहेत व आज करीत आहोत? गेल्या ग्रिपीच्या साथींत, त्याचप्रमाणें दुष्काळांत किंवा चालू महागाईत अनाथ व गरीब देशबांधवांसाठीं आपण किती झीज सोसली आहे! आपले देशबांधव अज्ञानांधकारांत चांचपडत असतां, त्यांस ज्ञानमार्गास लावण्याचें सोडून हरेक निंद्य प्रयत्नानीं त्यांच्या अज्ञानतेचा फायदा घेऊन आपण गबर होण्यास कधीं चुकलों आहों कीं कसें? याचा आपणांशींच विचार करावा व ज्यांच्या जिवावर सभासदत्वाचा मान मिळवण्याचें इच्छितो त्यांस, आपली ओळख जाहीर रितीनें पटवावी आणि नंतर उमेदवारी दाखवावी. श्रीमतीच्या व घरकर्णी देशभक्तीच्या जोरावर अथवा इष्टमित्रांस पुढें घालून घोडेबाजारानें, मतें मिळवून निवडून येणें यांत पुरुषार्थ नाहीं. तो केवळ व्यापारी सवदा होईल. पण लोकांनीं आपण होऊन राजखुषीनें, सीवाच्या जिव्हाळ्यानें सभासदत्वाची माळ गळयांत घालणें यांतच थोरपणा आहे; यांतच भूषण आहे, व यांतच कृतकृत्यता आहे. लोकांशीं मिळून मिसळून वागणारे लोकांचीं दुःखें समजून घेऊन तीं काढून टाकण्यास झटणारे, व एकंदरींत लोकांच्या सुखदुःखांत समरस होऊन त्यांचे वांटेकरी होणारे, अशानांच लोक आपलेसे मानतात आणि त्यांच्या आज्ञा पाळण्यास मागेंपुढें पाहत नाहींत. लोकप्रियता ही चिज फुकट मिळत नाहीं; ती धरसवलत्या गोष्टी करून गावागिऱ्यांशीं संघटन ठेऊन, चहाकाफीचे डोस घेऊन मिळवावयाची नसते. ती मिळवण्यांस धनयज्ञ, शरीरयज्ञ, आत्मयज्ञ करावे लागतात. अनेक परिश्रमानें, आत्मशक्तीच्या जोरावर लोककल्याण साधूनच मिळवावी लागते. या सर्व गुणाचा पाया आपणास आपल्या गावांतच राहून घालणें सोपें आहे. कारण गावांत राहिल्यानें संसाराकडे लक्ष देण्यांस फुरसत घेतां येऊन हळुहळू देशभक्तीचाहि ओनामा गिरवितां येईल. व या दृष्टीनें जुंतलोकाळें फार उपयोगाचीं आहेत. जुंतलोकालचे सभासद होऊन अगर त्या सभासदावर आपलें सात्विक वजन घालून सरकार अधिकारी, मुनिसिपालट्यो यांच्या बऱ्या वाईट कृत्यांवर नजर ठेवितां येईल. अशा नजरेचा वचक ठेविल्यानें राज्यसुधारणेंत फार मदत झाल्याशिवाय राहणार नाहीं. शिवाय हरेक कायद्याचेंहि ज्ञान होईल.

गावांतल्या गावांत राहून, आपलीं मुलेंबाळें, आपला संसार यांकडे लक्ष पुरवून राहिलेल्या वेळांत जुंत लोकालच्या कामांत लक्ष घालणें फारसें कठिण नाहीं. व कालांतरानें लोकहिताचीं कामें करण्याचें एकदां अंगवळणीं पडलें म्हणजे आपली नजर गावावरून महालाकडे अर्थात दिल्लीत मंडळाच्या व त्यापुढें कायदेमंडळाच्या कामकाजाकडे अधिकारानें वळवितां येईल. अंगांत पात्रता आली कीं पुरे; पाहिजे ती खुर्ची आपलीच आहे व तेव्हांच ती अडविणें यांतच भूषण आहे. नाहींतर त्या खुर्च्यां अडकवून लोकांचें व आपलें नुकसान होण्याशिवाय काय साध्य होणार आहे? असो. येत्या महिन्याच्या १९ तारखेस जुंत लोकालांच्या निवडणुका होणार आहेत. त्यांत भाग घेण्यासाठीं प्रत्येक नागरिक बंधूनें आपल्या गावांत जुंत लोकाल आहे कीं नाहीं याचा शोध करावा. सुदैवानें जर असेल तर निवडणुकांत भाग घेऊन योग्य गृहस्थांची निवड होण्यासाठीं प्रयत्न करावें आणि जर तें नसलें तर तें कां नाहीं व काय केलें असतां तें मिळवितां येईल याचा विचारपूर्वक प्रयत्न करून स्थानिक स्वराज्याचा हक्क बजावून दाखवावा. अशी सर्वांस विनंतिवजा सूचना आहे.

भारत

गुरुवार कार्तिक शु० ७ मी १८४४

गोहत्येंतून मुक्त व्हा !

या आमच्या हिंदुस्थान देशाचें दारिद्र्य वाढवावयाला कारणीभूत होणाऱ्या अनेक परदेशी वस्तूंपैकीं, कापडाच्या खालोखाल साखरेचा नंबर लागतो. या साखरेच्या पायीं या गरीब हिंदुस्थानांतून, दरसाल जवळ जवळ दहा कोटी रुपये परदेशीं रवाना होत असतात. एकट्या जोधांतक प्रांतांतूनच तीन साडेतीन लाखांची त्या संख्येंत भर होत असते. या दहा कोटी रुपयांच्या मोबदल्यास मिळणारी जी साखर तिच्यामुळें आमचें जिव्हालोलुप्य तर वाढलेंच, शिवाय, चहा, कॉफी, कोको, यांसारख्या आरोग्यास अपायकारक अशा अनिष्ट व्यसनांचा फैलाव जारीनें सुरू होण्यास बरीच मदत झाली. आणि झालें काय कीं, दिवसेंदिवस जनता चैनबाज होऊन विनताकदवान व्हावयास लागली.

सांपत्तिक व शारीरिक बाबतींत अधोगतीला नेणारी ही साखर इतकेंच करून थांबली नाहीं. तर, मुसलमानी तरवारींनीं आणि ख्रिस्ती मिशननीं केली नाहीं, इतकी धर्मभ्रष्टता, नकळत, मुखावाटे आमच्या हाडीं मांसीं तिनें खिळविली. आह्मांला आमचा धर्म किती प्रिय होता व आहे हें आह्मीं मोठ्या अभिमानानें सांगूं शकतों. परंतु या साखरेनें आह्मांला धर्मलंड बनविलें, चैनबाजी वाढविली, नादान करून सोडलें आणि परमपवित्र अशा गोमातेच्या रक्तानें व अनेक जनावरांच्या हाडकांनीं इतकेंच नव्हे तर सजातीय अशा माणसांच्या प्रेतानीं आमचा देह विटाळून सोडला !! हे सर्व दुष्परिणाम आह्मांला स्वदेशी चळवळीनें जाणवून दिले असें असतां आह्मास त्याची लाज वाटत नाहीं. तिच्या अपवित्रतेचा किळस येत नाहीं, प्रत्यक्ष गोहत्येचा डाग लागत असतांनां चीड येत नाहीं., अनेक अपवित्र पदार्थांनीं पांढरी सफेत झालेली ही साखर पाहून तिचा वीट यावयाचा तो येत नाहीं व उलट घरांतून, देवस्थानांतून हजारों लाखों नव्हे कोट्यावधी रुपयांची साखर आह्मीं निर्बुद्धपणें वापरतों यास काय ह्मणावें ? आमची धर्माभिमानता नष्ट झाली कीं, [illegible]शक्ति लयाला गेली कीं, [illegible] झाली ? कसेंहि असो, परदेशी साखरेच्या [illegible], निवळ वरपांगी स्वरूपाला तिच्या क्षणिक रुचीला भुलून आह्मीं [illegible] आपल्याचा खर्च वाढविला, नवीन नवीन व्यसनें जडवून घेतलीं, [illegible]. दांताच्या व जंतांच्या विकारानीं बेजार झालों व देश शारीरिक, मानसिक, नैतिक व धार्मिक बाबतींत धुळीला मिळवून टाकिला.

प्रसिद्ध [illegible] नंतर स्वदेशी बहिष्काराची जी लाट सर्व हिंदुस्थानभर पसरली [illegible] या साखरेची खरीखुरी ओळख [illegible] करून दिली, पण आह्मीं [illegible] !! एकदां आपलीशी केलेली ही साखर, मग ती कितीहि अपवित्र असेना, कितीहि घातकी असेना सोडणें आमच्या जिवावर यावयास लागलें, व उलट तिला सोकावलेली, चटावलेली आमची जीभ, तिची तरफदारी करण्यास पुढें सरसावून आली. कोणी ह्मणावें, ही साखर आज शेंकडों, हजारों, लाखों वर्षें ह्मणजे जगाच्या उत्पत्तीपासून, आपण वापरीत आलों आणि आजच ही अपवित्र कशी झाली ? हें सर्व स्वदेशीवाल्यांचें ढोंग आहे, यांना इंग्रजी मालावर बहिष्कार घालून स्वराज्य मिळवावयाचें आहे, ह्मणूनच तें हें गोहत्येचें निमित्त पुढें करीत आहेत. कोणी ह्मणावें कीं, जर ही साखर आमच्या देवस्थानांतून वापरण्यांत येते तर तिच्या पवित्रतेची शंका आह्मांस काय ह्मणून यावी ? ती अपवित्र असली तरी 'पदरीं पडलें पवित्र झालें.' या न्यायानें तिला आह्मी पवित्र मानणार; कोणी ह्मणावें कीं, या साखरेंत कांहीं गुरांचें रक्त हाडकें वगैरे दिसत नाहींत, कारखान्यांत तीं वापरीत असतील पण 'डोळ्या आड ससण पाड' असें समजून खाण्यास काय हरकत आहे ? व कोणी याहि पुढें जाऊन ह्मणावें कीं, अहो हें सर्व त्या जहाल वर्तमान पत्रकारांनीं उठविलेलें काहूर आहे, त्यांना कोणत्याहि तऱ्हेनें आपल्या पत्राचे रकाने भरून काढावयास पाहिजेच होते, त्यांत ही वंगभंगाची स्वदेशीची बहिष्कारांची संधी सांपडली. मग काय विचारतां ? राजकीय सामाजिक, औद्योगिक निमित्तें पुढें केलीं तरी व्हावा तसा परिणाम झाला नाहीं ह्मणजे धार्मिक बाब पुढें करून परदेशी साखरेच्या अपवित्रतेवर दिले कोलमच्या कोलम खरडून. त्यांच्या त्या लिहिण्यावर हुरळून जाऊन साखर सोडूं गेलों तर आह्मी थोडेच पवित्र होणार आहों !! जी पूर्वी खाल्लेली साखर आमच्या रक्तांत हाडामांसांत मिसळली गेली आहे तिची वाट काय ? आह्मीं आमच्या खाण्याच्या पदार्थांवर "अपवित्र पवीत्रोवा" या मंत्रानें जलसिंचन करतों तें काय फुकटच ? त्यापुढें या लटक्या अपवित्रतेची काय विशाद लागून राहिली आहे ? असे एक ना दोन शेंकडों युक्तिवाद शर्कराभक्तांकडून पुढें आले होते व त्याला त्या वेळच्या वर्तमान पत्रांतून समर्पक उत्तरेंहि पण देण्यांत आलींच होतीं. परंतु, 'न कर्त्याचा वार शनिवार' या न्यायानें या तसल्या लोकांवर त्यांचा योग्य परिणाम झालेला दिसला नाहीं. सुदैवानें महात्मा गांधीच्या असामान्य कर्तृत्वानें असहकारितेची जी चळवळ चालू आहे तिचें स्वदेशी हें एक मुख्य आंग आहे. व या आंगानें चळवळ करणाऱ्यांनीं परदेशी साखरेवर जें वाङ्मय प्रसिद्ध केलें आहे, तें अत्यंत किळसवाणें असलें तरी प्रत्येक हिंदूनें विचार करण्याजोगें आहे. ह्मणून नमून्यादाखल बेळगांवच्या गोसेवक पत्रांत जी माहिती आली आहे त्या पैकीं कांहीं या खालीं आमच्या वाचकांस सादर करीत आहों

११४० अथवा १६८ मण साखर लोखंडाच्या एका कढईत टाकून गाळण्यांत येते. त्याला एक एक नळ लावण्यांत येतो. त्यांतून गरम पाणी आंत येत असतें. पहिल्यानें मळकट साखर रक्ताच्या योगानें साफ करतात. फिरून त्या रसाला जनावरांच्या राखेमध्यें मिसळतात.

एनसायक्लो पिडिया ब्रिटनिया.

साखर साफ करताना रक्ताच्या ऐवजीं जर अंड्याच्या आंत असलेल्या पांढऱ्या बलकाचा उपयोग केला तर फार चांगलें.

डिक्शनरी ऑफ आर्ट.

माझ्या विलायतच्या प्रवासांत मी जेव्हां विलायतेंतील साखरेचे कारखाने पाहण्यास गेलों तेव्हां पहिल्या मजल्यावर चढतांच नाकें रक्त आणि हाडांचे ढीग पाहून मला ओकाऱ्या येऊं लागल्या साखर तयार करण्यास असल्या अपवित्र वस्तु वापरीत असतील याची माझ्या मनांत मुळींच कल्पना नव्हती. जेव्हां जेव्हां मला या भयंकर देखाव्याची आठवण होते. तेव्हां माझें डोकें फिरून जाऊन मला ओकारी येऊं लागते.

स्वामी भास्करानंद सरस्वती

साखर सफेत करिताना मोरिशस मधले वाले गाईच्या चरबीचा उपयोग करितात

वृंदावन

मोरस साखर बैलांचें रक्त आणि पशुंच्याचें मूत्र यांच्या योगानें साफ करितात

श्रीवेंकटेश समाचार

शौचाला साफ न होणें आणि रक्त दूषीत होणें हे परदेशी साखरेचे उपकार आहेत.

वकील हनुमान

मोरस साखर खाल्ल्यानें प्लेग उत्पन्न झाला आहे.

पंडित राम दयाळ

परदेशी साखर साफ करताना नानाप्रकारच्या रोगानें मरण पावलेल्या गरीब मनुष्यांच्या प्रेतांचा उपयोग करतात. वगैरे

वर देण्यांत आलेली माहिती त्या विषयावरील अधिकारी पुस्तकांतून पत्रांतून आणि जबाबदार व्यक्तींनीं दिलेल्या व्याख्यानांतून आह्मी मिळविलेली आहे. हें त्या त्या खालीं दिलेल्या नावांवरून आमच्या सूज्ञ वाचकांस समजेलच. असें असतां तिजबद्दल संशय घेणें ह्मणजे आपल्या पदरांत अज्ञान बांधणें होय. त्यांतल्या त्यांत प्रस्तुत चळवळीशीं ज्यांचा काडी इतकाहि संबंध नाहीं अशा इंग्रजी ग्रंथांतून, सर्वमान्य इंग्रजी ग्रंथांतून घेतलेली माहिती कधींहि खोटी असणें शक्य नाहीं. तसेंच जोंपासून परदेशी साखरेच्या कारखानदारांकडून किंवा व्यापाऱ्यांकडून उलट पुरावा पुढें आला नाहीं तोंपर्यंत आह्मांस त्यांच्या घरीं, बसल्याजागीं, परदेशी अपवित्र साखरेनें तयार केलेले पदार्थ चघळीत चघळीत, अधिकारी पुस्तकांतून, पत्रांतून व जबाबदार व्यक्तींकडून मिळालेली माहिती खोटी आहे असें ह्मणण्याचा कसलाच अधिकार नाहीं. यापुढें व असला जबरदस्त पुरावा पुढं असतांना देखील जर आह्मीं या परदेशी साखरेशीं संसर्ग ठेवूं लागलों तर आमच्या सारखे नादान, धर्मलंड, गोभक्षक, नरभक्षक, आह्मीच ठरूं; ह्मणून सर्व देशबांधवांस व विशेषतः हिंदुधर्मबांधवांस अशी विनंति आहे कीं, स्वदेशाच्या कल्याणासाठीं, गोमातेची हत्या चुकविण्यासाठीं तसेंच इतर अनेक मूक मांसादि अपवित्र पदार्थांचें सेवन टाळण्यासाठीं आपल्या घरांतून देवस्थानांतून व इतरत्र ठिकाणीं होत असलेला परदेशी साखरेचा अनिरुद्ध संचार कडकडीत बहिष्कारानें बंद करा आणि जाणून बुजून, समजून उमजून होत असलेली गोहत्या टाळा. यांत तुमचें, तुमच्या देशाचें व तुह्माला प्राणाहूनहि प्रिय असणाऱ्या धर्माचें अत्यंत हित होणार आहे. गरीब जनता व गोमाता तुह्मांला आशीर्वाद देणार आहे. याच आशीर्वादानें गांधी महाराज सांगतात तें स्वराज्य, आत्मविश्वासानें मिळणारें स्वराज्य हळुहळू जवळ येणारें आहे. यतो धर्मः ततो जयः

स्फुट विचार

जुगारांविरुद्ध हुकूमः— सासष्टी महालाचे आदमिनिस्त्रासावातून तेथील पाटलांनां हुकूम करण्यांत आला आहे कीं, यापुढें कोणत्याहि जातीचे जुगार व विशेषतः गिरगिरी चालूं देणें सरकारच्या व राष्ट्राच्या इभ्रतीस कमीपणा आणणारें व समाजस्वास्थ्यास अपायकारक असल्यामुळें तो बंद करण्यासाठीं कसून प्रयत्न करण्यांत यावेत जुगारी लोक जुगार खेळतांनां पकडून, कैद करून आदमिनिस्त्रासांवांत पाठविण्यांत यावेत. इ. इ. हा हुकूम वाखाणण्याजोगा आहे व ज्यांनीं तो काढला ते आदमिनिस्त्रादोरसाहेब स्तुतीस पात्र आहेत याबद्दल संशय नाहीं. परंतु, ज्या हेतूनें तो हुकूम काढण्यांत आला, तो हेतु कितपत साध्य झाला ह्मणजे हुकुमाची अंमल बजावणी कशी काय झाली व होत आहे याकडे दुर्लक्ष करून चालावयाचें नाहीं; असें सदरील खात्यास सुचविणें आह्मांस क्रमप्राप्त आहे.

पुढें चालू:— इतकें बजावून सांगण्याचें कारण हेंच कीं, जत्रा वगैरे प्रसंगीं चालणारे जुगार बहुत करून पाटील साहेबानां, गांवच्या या मुख्याधिकाऱ्यांना, फार फायदेशीर होत असतात, हें सर्वांस विशेषतः देवस्थान कमिट्यांस तर माहीत आहेच. देवस्थानच्या तिजोरीचें उत्पन्न वाढावें हा सद्हेतु मनांत आणून देवस्थान कमिट्या जत्रासारख्या उत्सवप्रसंगीं जुगाराचा अड्डा स्थापन करण्यांस परवानगी देतात; व त्यास या पाटील साहेबांचें अनुमोदन मिळविण्यासाठीं उत्पन्नांतील कांहीं भाग तदर्पण करावे लागतात. तेव्हां आपल्या पथ्यावर पडणारे हे जुगार बंद करून ह्मणजे जाणून बुजून आपल्या हातानें आपल्याच पायावर, नव्हे पोटावर दगड आपटून घेऊन, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे हुकूम सचोटीनें पाळण्याइतके इमानी गृहस्थ या पाटीलवर्गात सांपडतील असें आजपर्यंतच्या अनुभवावरून आह्मांस वाटत नाहीं. कसेंहि झालें तरी आदमिनिस्त्रादोरसाहेबांनीं आपल्या हुकूमांचा अनादर होणार नाहीं याबद्दल आणि प्रत्येक गांवच्या नागरिकांनीं तो कसा काय पाळला जातो याबद्दल योग्य तजवीज ठेवावी. तसेंच, इतर महालांच्या आदमिनिस्त्रादोर साहेबांनींच हात्र किंवा गिरवून गांवचे रजिदोर, जुने लोकांकडे, देवस्थान कमिट्या व इतर जनता, यांच्या साह्यानें आपापल्या हद्दींत होणारा जुगार नाहींसा करण्याची खटपट केल्यास समाजास नैतिक व सांपत्तिक बाबतींत अधोगतीस पोचविणारा हा ब्रह्मराक्षस गाडून टाकल्याचें श्रेय त्यांस मिळाल्याशिवाय राहणार नाहीं.

—येथील लक्ष्मीपूजनोत्सव यंदा मोठ्या थाटानें पार पडला. दो. वैकूंट सा. शिरोडकर हे उत्सव चालक होते. आमच्या संपादकांचें सदरहू प्रसंगीं प्रवचन झालें.

—डॉ मोराइस यांस 'बोलावणें' आलें आहे, प्लेगामुळें सा. फ्रांसीस्कांचें प्रदर्शन येत्या मार्च महिन्यांत पार पडेल, मुनसिपाल व इतर निवडणुका पुढें ढकलण्यांत आल्या आहेत, अशा अनेक वंड्या गेल्या आठवड्या पासून पसरावयास लागल्या आहेत.

धर्म आणि व्यवहार

॥ यतोविद्वान्नावधानोभूत्वा स्वयमाचरन् कर्माणि सेवयेत्तः कर्माणि कारयेत्॥

श्री. मं. श्री मध्वम. मट्टो.ध्दा.

जगाच्या आरंभापासून--मनुष्यप्राण्यांस ज्ञानप्राप्ति झाल्यानंतर-- जो जो व्यवहार अबाधितपणें चालून त्यांच्यामुळें कर्मविषयाच्या चोख चालू लागली, त्या त्या व्यवहारांना मंहात्म्यानीं धर्म हें नांव दिलें.

धर्माचीं अंगें दोन, ज्ञान आणि कर्म. ज्या वेळीं ह्या दोन्हीं अंगांची तुलना करावयाची असते, त्या वेळीं पहिलें स्थान ज्ञानाला देतात, आणि प्रापंचिक व्यवहाराचा प्रश्न ज्या वेळीं उभा राहतो, तेव्हां एका कर्माच्याच बाजूचा विचार घेऊन यथाशक्ति शेवटीं ज्ञानाची पुष्टि त्याच्या समर्थनार्थ जोडतात. कोणत्याही पंथांत जरी आपण शिरलों--तो प्राचीनतम धर्माचा मात्र पंथ असला पाहिजे—तरी हाच प्रकार दिसून येईल.

आम्हाला आजकाल व्यवहाराचीच ज्यास्त गरज आहे. कारण ॥आधी तें करावें कर्म। कर्ममार्गें उपासना॥उपासकां सांपडे ज्ञान। ज्ञानें मोक्षचि पाविजे॥ या समर्थोक्तीनुसार प्रापंचिक व्यवहार पूर्णपणें अवगत झाल्याशिवाय प्रपंचांत राहून परमार्थ साधण्याची हांव बाळगणें व्यर्थ आहे. असो.

वरील एकंदर प्रतिपादनावरून वाचकांनीं इतकेंच लक्षांत घ्यावयाचें कीं, आमच्या प्रतिपादनाचा रोख प्रचलित व्यवहाराबद्दल असणार व तो हिंदुधर्मीय बांधवांपुरताच असणार, इतकें सांगून पुढील विवेचनाला सुरवात करितों.

बहुतेक हिंदुलोकांना पाश्चात्यांनीं अद्यापकाळीं वलयवान्पणें, परकीय संस्कृतीनें गांगरून गेल्यामुळें पोटाची खळगी भरण्यासाठी भगाशिवाय ज्या मार्गांनीं भरतां येईल अशा मार्गाचें अवलंबन करण्यापलीकडे स्वाभिमान म्हणून कांहीं चीज जगांत आहे कीं नाहीं, याचीसुद्धां जाणीव असण्याचा संभव नाहीं असें फार कष्टानें म्हणावें लागतें! कारण, कांहीं व्यक्ति अशा विचित्र समजुतीच्या दिसून पडतात कीं, ज्यांच्यामते हिंदूचें जें जें कांहीं आहे, तें कुचकामी; मग तो धर्म असो, व्यवहार असो, कांहींही असो. युरोपियनांच्या चालीरीति अनेक नियमांनीं जखडल्या गेल्या तरी त्यांना 'धर्म' ही दोन अक्षरें न लागल्यामुळें त्या चांगल्या, आणि आम्हां हिंदूंचे व्यवहार — कितीही पवित्र आणि सुखावह असले, तरी ते —'धर्म' ह्या सदरांत मोडणारे असले कीं, टाकाऊ. "खिस्ताचें रक्त" म्हणून प्राशन करितां येतें, कारण तें खिस्तीजनांनीं पवित्र हातांनीं बनवलेलें, पण पवित्र— हो! पवित्र फक्त अगदीं पांढरें!(?) --तुळशीच्या स्पर्शानें औषधी बनलेलें पाणी-तेंही दोनतीन थेंब-पिणें वेडगळपणाचें लक्षण. कांहींजणांची मजल इतक्या पर्यंत जाऊन पोहोंचली आहे कीं, जी पवित्र आणि देवत मानली जात आहे अशी गोमाता, तिला सुद्धां युरोपियनांच्या बनल्यामुळें न स्मरतां आपली राक्षसी हाव तृप्त करून घ्यावयाची; त्यांच्यामतें आपल्या हिंदूचें दररोजचें स्नानसुद्धां अमंगळ, परंतु वरून सुशोभित आणि भपकेदार दिसणारे खिस्तीयन चोचले तेवढे-आंत कितीही घाण भरलेली असली तरी-चांगले (?)!

ह्या हिंदभूमींत आमच्या हिमकुल्या गोमांतकाची गणना होते त्या हिंदुस्थान देशाच्या धार्मिक कलंकाला जर कोणता भाग कारणीभूत होत असेल तर मी प्रामाणिकपणें सांगतों कीं आजला हा गोमांतक होय.

आमचे गोमांतकेतर हिंदबांधव, जातिभेदादि आपसांतील कलहांकडे सुद्धां तात्पुरतें दुर्लक्ष करून जर केवळ-नोकरशाही बरोबर अर्थात पर्यायानें सरकारबरोबर-स्वतःचे हक्क मिळविण्यासाठीं असहकारिता-मुठींत प्राण घेऊन-पुकारीत आहेत, तर इकडे गोमांतकांत चांगले चांगले सुशिक्षित म्हणविणारे जनतेचे-गोमांतकीय हिंदूचे-पुढारी (?)—केवळ आपल्या स्वार्थाशिवाय ज्या नोकरशाहीला कांहींचाही विचार करण्याची सवड नाहीं, त्या नोकरशाहीला पैशापाई जनतेच्या रक्तशोषणांत देखील मजल नेण्याला कांहींचीही फिकीर वाटत नाहीं, केवळ पैशापाई मनुष्याची तुलना पशूकोटींत करून आपला खिसा होतां होईल तेवढा गरम झाला कीं पुरेसें वाटण्याला जिला द्रव न येतां उलट ज्यास्ती हुरूप चढतो, अशा नोकरशाहीशीं, आपले आचार विचार बेधरपणें सोडून देऊन सहकारिता करण्यांतच नव्हे तर सर्वस्वी सत्त्व गमावण्यांतच-मोठेपणा मानून बसतात. काय ही शोचनीय स्थिति!!

ह्या संतशिरोमणींनें (!) आपल्या उदरासोमी तृप्त करण्यासाठीं असंख्य लोकांच्या प्राणाची पर्वा न धरितां ब्रह्मतुल्य धर्माची महति वाढविण्याच्या मिषानें हजारों हिंदूंना बाटवून आणि तेंही बळजबरीनें खिस्तीयन बनवलें, ज्या महात्म्यांमुळें (!) आज गोमांतकांत बिनप्रतिकार गोमांताचा प्रचार--आम्हां दुर्दैवी अभिमानशून्य बनलेल्या हिंदु लोकांसमोर-वध होत आहे, ज्यांच्या पाई कुटुंबांचीं कुटुंबें देशोधडीला लागून परदारांनांथाप्तेषांना अंतरलीं, अशा संताच्या (!) हरित मुद्धां आम्हां हिंदु लोकांचें रक्त शोषणाला पहात आहेत, हें अवलोकून कोणा खऱ्या हिंदु रक्ताच्या मनुष्याला वेदना घडणार नाहीं?

भारताच्या वाचकांना सांत्रासिकांच्या जत्रेची गोष्ट नव्यानें सांगण्याची जरूर नाहीं कारण, तिजबद्दल भारतांत ऊहापोह झालेला आहे, आणि पुढेंही कदाचित होईल. एकंदरींत हा लेख पुष्कळ वाढत चालला सबब मुख्य गोष्टींचें दिग्दर्शन करून आटोपतें घेतों.

ह्या लेखाचा मुख्य मुद्दा म्हटला म्हणजे लेखाच्या मथाळ्यांत दर्शित केल्याप्रमाणें 'धर्म आणि व्यवहार' होय. धर्म म्हणजे काय चीज आहे व तो कसा बनला हें सदरील लेखाच्या पहिल्या प्याऱ्यांत सांगितलेंच आहे; तूर्त व्यवहार कसा असावा हें सांगणें बाकी राहिलें. प्रत्येक हिंदु म्हणवून घेणाऱ्या इसमाचा व्यवहार-आमच्या मतें जुन्या पिढीला व नव्या पिढीला ज्या पासून कांहींमांहीं-आचरण करतांनां अडचण पडूं नये; ज्या व्यवहाराला पहिल्यानें तिऱ्हाईत इसमाला 'जुनें तें सोनें' किंवा 'नवें तें हवें' अशा प्रकारचें आढळतां केवळ 'आंपल्याला पुरतें नवें' आणि 'धर्म रक्षणा पुरतें जुनें' दिसून यावें, अशाच प्रकारचा आधुनिक वळणाचा एकंदर व्यवहार असावा.

मित्रहो, मोठमोठ्या बॅरिस्टरादि हुद्देवाल्या युरोपियनांना जर धर्ममध्यें जाण्याला कमीपणा वाटत नाहीं, तर उलट तें स्वाभिमानाचें-आपल्या धर्माभिमानाचें-द्योतक असल्यामुळें त्यांत अभिमान मानून ते त्याचें समर्थन करतात, कट्टे खिस्ताचे भक्त बनलेले युरोपियन परधर्माचा प्रश्न उपस्थित झाला असतां आपल्या देशाला पार विसरून आपल्या विचार स्वातंत्र्यावर पाणी सोडून, परधर्माची निंदा किंवा परधर्माबद्दल तिटकारा करण्यांत स्वधर्मीयांबरोबर ऐक्य पावतात, एकंदर युरोपियनांना-मग तो आस्तिक असो किंवा नास्तिक असो—जगात जर खरा धर्म कोणता वाटत असेल तर तो आपला खिस्ती धर्म; तर हें सर्व स्वाभिमानाचें द्योतक नव्हे असें कोण म्हणेल? अशा स्वाभिमानाची महति काय आहे हें युरोपचा इतिहास खुशाल सांगू शकेल; इतकेंच केवळ नव्हे, तर आमच्या देशाच्याही इतिहासांत एकंदरींत हा स्वाभिमान शिवाजी महाराजांच्या चरित्रांत पूर्णपणें दृग्गोचर होण्यासारखा आहे. तर बांधवहो आपण आधुनिक शिक्षणाचें चीज धर्म रक्षणाच्या कामात साह्य घेण्यापुरतेंच करून आपलेपणा कायम राखण्याकडे अधिक लक्ष पुरविलें पाहिजे. ज्या कोणांस आम्हां हिंदूंचे आचार विचार चुकीचें वाटत असतील, त्यांनीं ते जनतासमोर मांडून त्यांच्या खोटेपणाचा शहानिशा करण्याच्या कामांत झटलें पाहिजे; नाहीतर हें अमुक कुठें आहे, किंवा तें तमुक धर्माचें अंग नव्हे, अशा तऱ्हेच्या वल्गना धर्मज्ञानाभावामुळें अज्ञ लोकांसमोर करून मनाचें समाधान करून घेण्यांत कांहींच अर्थ नाहीं. शेवटीं इतकीच विनंति करितों कीं, पुढारी म्हणविणाऱ्या सुधारक व्यक्तींनीं अनुकरणप्रिय व्यक्तिमात्राची दिशाभूल न करण्याकडे खबरदारी ठेऊन आचरण आचारांत ठेवावें, इतकें सांगून आजकरितां पुरी रजा घेतों.

शेवटीं ता पद्मनाभ प्रभु देसाई

ज्ञानसागरावरील आपली एक बंदर' या विषयावर पाऊणतास पर्यंत भाषण करून शिक्षणाचा उपयोग, वाचनमंदिरापासून जनतेस मिळत असलेल्या ज्ञानांचा फायदा व त्यामुळें ज्ञानसागरावरील 'एक बंदर गांठण्याचा सुलभ मार्ग वगैरे मुद्यांचें लोकांना पटेल अशीं उदाहरणें देऊन उत्तम विवेचन केलें. नंतर रा. पुणतांबेकर यांचें 'उत्तम राज्यपद्धती' या विषयावर फारच परिणामकारक व हृदयस्पर्शी भाषण झालें. थोडा उशीर झाल्यामुळें आपण थोडक्यांत आवरतें घेतों असें व्याख्यात्यांनीं इच्छा प्रदर्शित केली असतांनां लोकांनीं, कांहीं हरकत नाहीं चालूं द्या, असें सांगितलें. राज्यपद्धतीमधील सूक्ष्म भेदांचें विषदीकरण, हिंदी अगर आर्यांचे राज्यपद्धतीचें श्रेष्ठत्व, पाश्चिमात्यांचे राज्यपद्धतींतील अनुदार धोरण वगैरे मुद्यांचें आधारभूत व असरकारीत विवेचन करून आपल्या बहुश्रुतपणाचा अनुभव लोकांस नजरेस आणिला. नंतर रा. दत्तोपंत वझेकर यांनीं थोडें भाषण करून सरस्वतीसेवकमंडळाच्या स्तुत्य उपक्रमाबद्दल अभिनंदन करून निवडक विद्वानांच्या ज्ञानांचा फायदा गोमांतकस्थ जनतेस होत आहे. तेव्हां गोवेकरांत कार्यक्षमता वाढण्यास वाव मिळेल यांत संशय नाहीं. यासाठीं सर्वांनीं एकदिलानें देशसेवेचें कार्य करावें अशी विनंति केली. नंतर अध्यक्षांनीं उत्सवाचा समारोप करून संस्थेचे, स्वयंसेवकांचे व मदतगारांचे आभार मानले. रा. दलाल यांनीं थोडक्यांत पाहुण्यांचे अध्यक्षांचे, ते सहकुटुंब हजर राहून सभापतीचें कार्य सुकर केल्याबद्दल, इतर वक्त्यांचे व हजर असलेल्या लोकसमुहाचे आभार मानले. नंतर श्रीसरस्वतीचे नामघोषांत उत्सवांतील व्याख्यानमालेचा कार्यक्रम समाप्त झाल्याचें जाहीर झालें. दर रोज रात्रीं हरिकीर्तन, आरत्या, प्रसाद वगैरे होत असे. अशा प्रकारें बंदांचा उत्सव निर्विघ्नपणें पार पडला.

...etos de municipalidades, reorganização dos serviços de trabalho gratuito, etc.

Mais discursos sobre a ponte de Colvale. Acabou ? Não.

Prestaram mais relevantes serviços, criando novos e novos impostos para não crearem dificuldades ás despezas aumentadas, e por aumentar, com quanto não seja organizado o quadro dos cabos de policias ou "fouzdares" dos regedores, deixando ordenado, de categoria e exercicio com melhoria de subvenção para aquelles pobres servidores do Estado, interrando assim os seus eleitores debaixo destes—

E não absolutamente não se importaram, até hoje, com o beneficio comum do inventario !!....

Surge agora, o desejo de fazer economia para ingles ver, extinguindo-se as comarcas e os tabeliães que não são pagos pelo Estado etc.

¿ Por ventura quererá a nossa autonomia que voltemos ao antigo sistema seja por causa de quem for de *vastas* comarcas, abrangendo dois ou mais concelhos?

Então é natural que voltemos tambem aos antigos defeitos, deficuldades e embaraços que a administração de justiça experimentava tornando se inacessivel ás povoações mais afastadas como no tempo da intendencia.

Faz a pena tudo isso, e demais a mais, notando-se semelhantes propostas levianas partidas dos nossos jurisconsultos-ornamentos do foro indigno-que deviam e devem pa... o ...inar o regime civil contra o militar nesta epoca da democracia.

Aquem apelar ?

Oxalá que na Metropole tenha eco o brado lancinante do vigoroso e insigne jornalista sr. Paulo da Gama e tenha dó e compaixão deste pobre e pacato povo que ia pedir justiça ao tumulo do terribil Albuquerque.

O mesmo

ECOS & CRITIA

Bharat

Vai introduzir deversos melhoramentos, como já acabamos de anunciar aos nossos leitores. ...dimos porisso aos nossos assignantes a fineza de saldarem os seus debitos, com possivel urgencia.

Prof. Cossambi

Encontra-se em Góa o sr. Pro. Dharmananda Cossambi, de seu feliz regresso da America.

Ao sr. Cossambi que honrou, por algum tempo, as colunas do *Bharat* com a sua brilhante colaboração, apresentamos os nossos cumprimentos de boas vindas.

Bicholim

Logo estavamos de pensar que em tão breve, teriamos a dita de vermos uma realidade, restabelecendo-se de novo neste Cassabé a instituição *Vidia Vardaca Mandala* com a bibliotecá anexa, há uns quatro anos atrás, instituida, pelos incançavois e insanos trabalhos da mocidade hindu, com o louvavel e altruista fim de, por ali, ministrar a instrução adequada, baseada nos moldes essencialmente modernos e pedagogicos, na medida do possivel sem distinção de classes nem castas, de ricos nem pobres, ás centenas de crianças, mas o maldito vendaval, que soprou desabrido contra ela por parte de uns mal intencionados cristãos mataram-na logo no seu inicio recorrendo aos meios pouco licitos e decoro sos e desabando assim contra ela os maus tempos que ora correm.

Ora a instrução ai ministrada são cinco classes maratas e quatro de ingles, pelos professores competentes e habilitados, expressamente trazidos das escolas inglésas, sob a proficiente direcção duma comissão escolhida pelos seus habitantes que tomaram a seu peito as despezas e mais coisas referentes á mesma instituição.

O acto filantropico que é dado ver nesta ocasião, digno de todo o elogio é o oferecimento do edificio onde funcionam as mesmas escolas pelo sr. Dundá Apá Gadvi que mandou construir para o mesmo fim, e que tem-lhe acarretado a despesa de 5 mil rupias. Hourralho seja !

Por ocasião da sua fundação que recaiu no dia de *Vijia dossomim*, houve conferencias, discursos dos srs Kale, V. S. Codoodo, V. Colmulé, Pansicar. etc.

Nossos sinceros votos para que a mesma instituição faça rápidos progressos.

Franco

साभार स्वीकार

मराठी नवजीवन (साप्ताहिक):—या पत्रांत गुजराथी नवजीवनांतील महत्वाचे लेख मराठी पेहरावांत प्रसिद्ध होत असतात. भाषांतरें काळजीपूर्वक केलीं जात असल्यांवरून सरस निघतात. प्रकाशक, श्री. अनंत आवडे, मुंबई

वर्तमानसार

—पणजी शहर सुधराईचें काम जारीनें चाललें असून, नव्हंबर अखेर त्यांत महत्वाच्या सुधारणा झालेल्या आढळून येतील.

—ठिकठिकाणच्या संस्थांकडून वाढदिवस व सरस्वत्युत्सवास हजर रहाण्यासाठीं आलेल्या आमंत्रणाबद्दल भारत त्यांचा फार आभारी आहे.

—रा. दायमोडे, घन:शाम पाणंदीकर श्रीरंग तळावलीकर, ताल्या मळकर्णेकर, शंकर लाड, बाबु शिवराम प्रभू देसाई, गुणो गोविंद देसाई, बाबासाहेब सावर्डेकर इ. हिंदु गृहस्थानीं येथील कोर्टात वकीलीची परीक्षा देऊन ते पास झाले.

भारत

गुरुवार आश्विन व० ३०   १८४४

येत्या निवडणुका

येत्या नव्हंबर महिन्याच्या ५, १९ व २२ या तारखांस, अनुक्रमें मुनिसिपालिट्या, जुंतलोकाल व कायदेमंडळ यांचे सभासद निवडण्याकरितां सभा बोलावण्यांत आल्याचें सरकारी बोलेतींवर जाहिर झालें आहे. अशा रितीनें निवडणुका दारांशीं येऊन ठेपून ठेपा वण्यास लागल्या तरिहि आह्मीं या कुशीवरून त्या कुशीवर वळण्याचें सुद्धां मनांत आणीत नाहीं हें आमचें अनधिकारत्वाचें लक्षण नव्हे तर काय? लोकसत्ताक राज्य पद्धतीचें दिव्य तांबडें निशाण या आमच्या हिंदभूमीवर फडकावयास लागल्यास आज बरोबर एक तप होऊन गेला- इतकेंच नव्हे तर, घरच सल्या स्वयंसत्ताक पद्धतीचा" मग ती नामधारी कां असेना !! अमल सुरू झाल्यास तीन अधिक वर्षे होऊन गेलीं, तरी नागरिकत्वाचे स्वतंत्र नागरिकत्वाचे अधिकार वजावण्याचें अद्याप आमच्या जिवावर येत असतें हें पाहिलें म्हणजे, आज चारशें अधीक वर्षेपर्यंत पारतंत्र्याच्या मिळांत खारवलेले आमचे लोक अनायासें प्राप्त झालेल्या त्या स्वतंत्र व उदार राज्यपद्धतीस पात्र होण्यास किती काळ लोटणार आहे हें एक इशीच जाणे !!

परंतु आपल्या देशाचें दुर्दैव संपून आपल्या डोळ्यांदेखत त्यास सुखाचे दिवस मिळावे यायिषयीं विचार करणाऱ्या देशसेवकांनीं कधींहि निराश होतां कामा नये एका पिढींत न दिसणारे गुण कांहीं काळानें दुसऱ्या पिढींत दिसूं लागतील असें धरून चालण्यास हरकत नाहीं. मात्र त्या दृष्टीनें कळकळीचे प्रयत्न झाले पाहिजेत.

वर सांगितल्याप्रमाणें करण्याचे प्रयत्न कोणी करांवे हा एक महत्वाचा प्रश्न आहे. व तो हिंदुसमाजाच्या दृष्टीनें सोडविणें फार अगत्याचें आहे. धर्मवेड्या पोर्तुगेझ लोकानीं आपला पांढरा पाय येथें घट्ट रोवल्यानतर तो आचंद्रार्क कायम रहावा म्हणून आपला धर्म व संस्कृति याचा प्रसार करण्यास प्रारंभ केला. त्यासाठीं त्यांनीं कोणकोणत्या जुलमी, राक्षसी अतएव निंद्य मार्गाचा अवलंब केला. तें अजून साधारण मानानें समजून आलेंच आहे. तरी पण तें अधिकाधीक समजणें फार जरूरीचें आहे. त्यांच्या त्या जुलमांस बळी पडून खिस्ती झालेले लोक "पडला जन्म गोड" या न्यायानें त्यांच्या संस्कृतींतच गुरफटून गेले व आपला धर्म आपले राष्ट्र आपली भाषा, आपल्या चालीरीति वगैरेंस पारखे झाले. कालांतरानें पोर्तुगेझांच्या पराक्रमांस व भाग्यास उतरती कळा लागल्यामुळे त्यांच्या धार्मिक जुलमांसहि आळा बसत चालला व तेव्हां पासून स्वतःचा धर्म बचावून कसायसा जीव धरून राहिलेले हिंदु लोक हळुहळू खऱ्या व बाट्या पोर्तुगेझाशीं दळण वळण ठेवूं लागले. आपल्या देशभाषेचें म्हणजे मराठी भाषेचें "मग ते तुटाजें कां होइना" शिक्षण संभाळून पोर्तुगेझ भाषेचें ज्ञान मिळविण्याकडे कांहींनीं आपला मोर्चा वळविला. व त्या भाषेंत, सरकार दरबार करण्याइतकें प्राविण्य मिळविलें. कांहींनीं कामदार वर्गांत आपला प्रवेश करून घेतला व अशा रितीनें आपलें अस्तित्व सरकारच्या व धर्म आणि संस्कृति यांच्या योगानें प्रतीसरकार बनलेल्या येथील खिस्ती समाजाच्या निदर्शनास आणलें. सध्याच्या लोकसत्ताक राज्यपद्धतींत तर त्यास बराच वाव मिळाला. हें सर्व जरी खरें असलें आणि तसें होणें फार अगत्याचें असलें, तरी हा फायदा पदरांत पडून घेणाऱ्यानां हिंदी संस्कृतीशीं बेइमान व्हावें लागलें ही गोष्ट नाकबूल करता येणार नाहीं. जसजसा खिस्त्यांचा व आमचा परिचय वाढू लागला तसतसा त्यांनीं उमलून घेतलेल्या पाश्चिमात्य सुधारणेचा पगडा आमच्या लोकांच्या मनावर पडूं लागला. स्वतःच्या धर्मांचें स्वतःच्या चाली रीतीचें सोपपत्तिक ज्ञान होण्याजोगें शिक्षण न मिळाल्यानें, खिस्ती शाळा मास्तर, वरिष्ठ अधिकारी वगैरेंकडून होत असलेल्या हेटाळणीस प्रत्युत्तर देण्याचें सामर्थ्य आमच्यांत राहिलें नव्हतें व अशा रितीनें आमची बाजूच कमकुवत आहे असा आमचा आह्मांस भास होऊं लागला. आणि अनेक कारणांनीं कळत नकळत सुद्धां आमच्या आचरणांत पाश्चिमात्य सुधारणेची छाप पडत चालली व त्यामुळें झालें काय तर आचार विचार आहार विहार यांत मनस्वी फरक पडून त्याचे दुष्परिणाम सध्या आह्मांस रोगांच्या साथी, दुष्काळ, महागाई वगैरेंच्या रूपानें भोगावे लागत आहेत.

सुदैवानें इंग्रजी हिंदुस्थानांत चाललेल्या चळवळीनें, आमच्या लोकांस वरील गोष्टींची जाणीव होत चालली आहे परंतु" समजतें पण उमजत नाहीं,, अशी आमची स्थिति झाल्यामुळें त्यांतून मुक्त होण्यासारखे प्रयत्न आमच्या हातून व्हावे तसे होत नाहींत. प्रस्तुत पुढें दिसणाऱ्या निवडणुकांत भाग घेतानां आह्मांस याच दृष्टीनें पुढें पाऊल टाकिलें पाहिजे. मुनिसिपालट्या जुंतलोकाल आणि कायदेमंडळ यांत सभासद या नात्यानें जाऊं इच्छिणारे आपली पुढील कामगिरी हिंदी संस्कृतीला धरून करणारे असतील तरच त्यानां आपलें मत देणें व इतरानीहि द्यावीं म्हणून लोकमत तयार करणें रास्त होणार आहे. नाहीं तर 'जोडीचा सैतान खुनास झांबतो ,, या म्हणीचें प्रत्यतर पाहावयाचें नशिबीं येणार. या सर्व गोष्टींचा आपल्यां मनाशीं विचार करून,,प्रत्येक मतदार, प्रत्येक हिंदु मतदार आपलें मत योग्य उमेदवारास देईल अशी आशा आहे.

कुठेंही स्वीकारिलेले असलेले आढळून येत नाहींत; व त्याप्रमाणें, संभाजी, बाजीराव, चिमणाजी अप्पा, अंग्रे दर्यावर्दी किं. वा अशा प्रतीच्या अन्य ऐतिहासिक पुरुषांची ते स्तुति किंवा तरफदारी करित नाहींत. नाहीं तर, काळ्ळ, गामा, आल्बुकेर्क यांच्यासंबंधानें जें प्रतिपादन रा. तळावलीकर हे करित आहेत तेंच प्रतिपादन त्या पोर्तुगेज लिसेवस्थांनीं किंवा लिसेवोत्तीर्णांनीं वरील हिंदी वीरांना अनुलक्षून करायाला पाहिजे. कारण, संभाजी, बाजीराव, चिमणाजी वगैरेंनीं जीं जीं कृत्यें केलीं तीं तीं त्यांनीं स्वदेशाकरतां जिवाची पर्वा न करतां केलीं. आतां, तीं पोर्तुगेजांच्या नुकसानाला कारण झालीं ही गोष्ट मान्य आहे. 'परंतु, तीं त्यांनीं त्यांच्या नुकसानाकरतां केलीं ही समजूतही अविचारमूलक असली पाहिजे !

अशा मासल्याची ही विचारसरणी लिसेवांची मूस, फक्त हिंदु विद्यार्थ्यांच्याच मनावर ठसवते व पोर्तुगेज विद्यार्थ्यांच्या मनाला किंवा मेंदूला लागू देत नाहीं त्याचें कारण काय ? आह्मी पुनश्च अशी आशा प्रगट करतों कीं, ही विचारसरणी सर्वसामान्य हिंदू लिसेवस्थांची नसून कांहीं विशिष्ट व्यक्तींची असावी, आणि तसें सिद्ध करणारे लिसेवस्थ पुढें आल्यावांचून रहाणार नाहींत.

ह्या मुद्याला रजा देण्यापूर्वी एक गोष्ट मात्र आह्माला ओघाला आल्यामुळें नमूद करावीशी वाटते. ती ही कीं रा. भोसले ह्या आपल्यापैकींच एका व्यक्तीनें आफोंस आल्बुकेर्क, वास्कु द गाम ल्हुयांव दे कांमुश अशा आद्यांकडून 'धर्मी दारीं शय्येवरी रतिसुखाने अवसरीं' स्तवन केल्या जाणाऱ्या ऐतिहासिक व्यक्तींना उद्देशून चार कडक शब्द लिहिल्याबरोबर ज्या किती दर्यांत असलेलें नसलेलें पित्त खवळलें तेच कित्येक लोक, दोतोर झुझे झ्योआकीं फ्रागोझ या पोर्तुगेज गृहस्थानें शिवाजीची आई जारिणी होती व तीनें एका पोर्तुगेजाशीं व्यभिचार केला व त्यापासून शिवाजी जन्मला असा जितका खोटा तितकाच निंद्य, मजकूर लिहून एक लांबलचक चोपडें प्रसिद्ध केलें असतां स्वस्थ मूग गिळून बसले; त्याना जर 'तेव्हां गेला होता गधामुना कुठें तुझा धर्म ?' असा सवाल केला तर ते काय उत्तर देऊं शकतील ?

हो. पण चुकलों. ते अशा प्रश्नांना आपल्याबरील विचारसरणींनें खात्रीनें उत्तर देऊं शकतील. कारण, ते ह्मणतील कीं, दोतोर फ्रागोझानें जें कांहीं लिहिलें तें आमच्या शुद्ध शिव्यांची पर्वा न करतां स्वजातियाच्या रक्ताच्या थोरवी करतां लिहिलें आतां, तें आह्मांला हानिकारक झालें ही गोष्ट मान्य आहे. परंतु, त्यानें तें आमच्या नुकसानाकरतां लिहिलें अशी समजूत अविचारमूलक आहे !"

धन्य हे विचार आणि ही सरणी ! हिचा अवलंब न करतां, फ्रागोझाला 'शतमूर्ख' (Um grande tolo] ह्मणून शाब्दिक लात झाडून चालते झालेल्या भोसल्यानां आह्मी आतां खात्रीनें 'अधन्य' ह्मणूं !!

परंतु, आह्मांला एक मात्र जबरदस्त शंका येत, ती ही कीं, ज्या प्रतीचा नीच मजकूर लिहून फ्रागोझानें आपलें चोपडें प्रसिद्ध केलें, त्याच प्रतीचा मजकूर लिहून जर आमच्या पैकीं एखाद्यानें आल्बुकेर्काच्या किंवा गामाच्या आईसंबंधीं पुराव्याप्र सिद्ध केलें असतें तर त्या दाल्बुकेर्काच्या बापजाद्यांचे औरस वंशज जे पोर्तुगेज लोक ते तर सोडाच, परंतु बिन औरस वंशज असें मिरवीत, किंवा सांसारिक वंशज असें आमचे वाटे बांधव व बौद्धिक गुलाम असें आह्मांही त्यांच्या अनुसरणानें ते लिहिणाऱ्यावर तुटून पडलों असतों. तसें झालें असतें तर ही वर वर्णन केलेली, धन्य धन्य विचारसरणी पोर्तुगेजांनीं तर नव्हेच परंतु आह्मींही अनुसरली नसती. तसें झालें, असतें तर पोर्तुगेजांचें आजचें पोर्तुगेज पित्त खवळल्यावांचून राहतें ना, इतकेंच नव्हे तर कानेकार्चे उसनें पोर्तुगेज पित्त व आमचें 'कनेक्री' पोर्तुगीज पित्तही खवळलें असतें. परंतु, आमच्या स्वतःच्या ऐतिहासिक बाबतींमध्यें मात्र आमचें पित्त खवळूं शकत नाहीं, तर उलट आह्मांला वरच्यासारखी मेषपात्र विचारसरणी सुचते. ह्याचें कारण काय असावें ? दुसरें काय असणार? पोर्तुगेजांनीं आपल्या शिक्षणानें व संस्थांनीं जर आमच्या ऐतिहासिक बाबतींतलें पित्त आह्मांमध्यें उत्पन्नच होऊं दिलें नाहीं तर आमचें खवळणार काय ? कोलारिन्हेंय?

असो केवळ वादांतील विधानें व विचारसरणीचा विचार सोडून देऊन आह्मी निखळ परिस्थितीचें परीक्षण करूं तरी आह्मांला साऱ्या प्रकाराचा पूरेपूर खुलासा मिळतो. कारण, मूळ परिस्थितीच अशी आहे कीं, जें जें धन्याला रुचेल तें तेंच जसें पोपटाला बोलायाला किंवा गायाला शिकवायें त्याचप्रमाणें जें जें पोर्तुगीजांच्या रुचीचें व अभिमानाचें तें तेंच आह्मांला बोलायाला किंवा गायाला शिकविलें जातें. "माझा धनी, भला धनी,' माझा धनी भला धनी' असें ज्या पोपटाला पटविलें असेल तो चुकूनही दुसरें कांहीं बोलणार नाहीं पण, तेवढ्यावरून इतरांनीं अशी कल्पना करूं नये कीं, त्याचा धनी त्याला पिंजऱ्यांत कोंडणारा नसेल, किंवा, त्या कोंडण्यानें त्याला दुःख होत नसेल. ह्या दोन्हीं गोष्टी सत्य आहेत. फक्त त्याला जें पढविलें आहे त्यांत त्यांचा उल्लेख नाहीं. ह्यास्तव, तो जें कांहीं कथन करतो, त्यावरून त्याच्या परिस्थितीचें निदान करूं नये. त्याचप्रमाणें 'व्हिव्ह आफोंस आल्बुकेर्क' 'व्हीव्ह व्हास्कु दे गाम' असा, आमच्या राज्यकर्त्यांच्या सुरांत सूर मिळवून आह्मी शंखनाद करतों एवढ्यावरून कोणी असें समजूं नये कीं ह्या लोकांनीं आमच्या नाकांत वेसण घातली नाहीं किंवा त्या वेसणीला त्यानीं जेव्हां जेव्हां हिसके दिले तेव्हां तेव्हां आह्मांला इजा पोचली नाहीं. त्या दोन्हीं गोष्टी घडायाच्या त्या घडल्याच व त्यांचे दुःख आह्मीं भोगावयाचें तें भोगलेंच. परंतु, त्याचा परिस्फोट करण्याची परिभाषा आमच्या तोंडांत मुळींच न शिरूं देतां उलट "माझा धनी भला धनी' माझा धनी भला धनी' असेंच जें आह्मांला गेल्या कित्येक शतकांत पटविण्यांत आलें व सध्या पटविण्यांत येत आहे त्याप्रमाणें पाठ चालवीत बसलों आहोंत. आणि ह्या पाठघोषात मग्न असतां जेव्हां आह्मांला कोणी तरी 'गुलामांनो, हा कोणाचा जयजयकार करतां आहां !' असा सवाल टाकतो तेव्हां स्वाभाविकतःच आह्मांला आमच्या कृतीचें समर्थन करण्याची व त्याकरतां, वर वर्णन केलेल्या प्रकारची मेषपात्री विचारसरणी स्वीकारण्याची प्रवृत्ति होते. कारण, अलंकारिक भाषेंत जरी आह्मांला पोपट ह्मणून ह्यावें लागलें, व राजकीय परिस्थितीमुळें जरी आह्मांला पढविलेला पाठ करावा लागला, तरी वस्तुतः आह्मी माणसेंच आहोंत. व माणसुकीची पुष्कळशीं लक्षणें जरी आह्मीं गमावलीं असलीं तरी आत्मसमर्थन हें जें अगदीं वेड्यांत वेड्या माणसालाही न सोडणारें लक्षण तें कांहीं आह्मीं गमावलेलें नाहीं, आतां ह्या आत्मसमर्थनार्थ जी विचारसरणी आह्मीं पत्करतों ती मात्र आमच्या परिस्थितीप्रमाणें मेषपात्रच असते. कारण, जी परिस्थिति आह्मांला अन्य बाबतींत मेषपात्र बनवूं शकते तीच परिस्थिति आमच्या विचारशक्तिलाही मेषपात्र बनवूं शकते. अर्थात अशा विचारशक्तीनें जें समर्थन करायाचें त्या समर्थनांतही त्या परिस्थितीचेंच प्रतिबिंब पडायाचें हे ठरलेलेंच आहे. या नियमाप्रमाणें ज्या अर्थी आमच्या विचारशक्तीला वळण देणाऱ्या शिक्षणांत किंवा वातावरणांत आमच्या चालू परिस्थितीची तरफदारीच फार असते. ज्या अर्थी आफोंस आल्बुकेर्क, ल्हुयांव दे कांमुश अशा व्यक्तींचाच अखंड स्तुतिपाठ चालतेला असतो, त्या अर्थी ती तरफदारी किंवा तो स्तुतिपाठ आमच्या आंगवळणीं पडून जाणें व त्यांविरुद्ध चकार शब्द कानावर पडतांच आह्मांला तिडिक उठणें स्वाभाविक आहे मग, त्या परिस्थितीचा जाचकपणा, किंवा त्या व्यक्तींनीं केलेली आमची हानि ही जरी आह्मांला मान्य झाली, तरी देखील आह्मीं त्या स्तुतिपाठाचें आणि त्या तरफदारीचें समर्थन केल्याशिवाय रहाणार नाहीं आणि जरी तें समर्थन 'त्यांनीं केलें तें आमच्या नुकसानाकरतां केलें ही समजूत अविचारमूलक आहे, ह्या पलीकडे जाऊं शकलें नाहीं व त्या योगानें दुसऱ्याचें सोडाच पण आमचें स्वतःचें जरी चांगलेंसें समाधान झालें नाहीं तरी तें करीत राहण्याकडे आमची प्रवृत्ति त्या स्तुतिपाठाला खंड पडेपर्यंत होत जाणार हें साहजिक आहे.

आतां, ह्या क्रियेला प्रतिक्रिया नाहीं असा मात्र प्रकार नाहीं. आघाताला प्रत्याघात हा जसा इतर बाबतींत तसा ह्या बाबतींतही लागू आहेच, त्याचें दिग्दर्शन करणेंही ह्या ठिकाणीं अप्रस्तुत किंवा अशक्य नाहीं. परंतु, आमची नुसती समजूत नव्हे तर बरीचशी खात्रीही आहे कीं ही प्रत्याघाताची क्रिया वर वर्णन केलेल्या बाबतींत पूर्वींच चालू झालेली आहे व तिच्या योगानें वरच्यासारख्या जीर्ण व मेषपात्र विचारसरणीचा अवलंब न करणारे लिसेवस्थ प्रत्यहीं वाढत्या प्रमाणांत असून, तसली शेळपट विचारसरणी उराशीं कवटाळून बसणारे लोक ह्या प्रतिक्रियेच्या पूर्वकालांत जरी नियमानें निर्माण होते झाले तरी आतां ते अपवादानेंच बनूं शकतील. आणि, इराणी–दुराणी, खिलजी–गिलची, आल्बुकेर्क बाल्बुकेर्क, झ इव्हकर्झन, ह्या मालिकेंत 'उडदामाजीं काळें गोरें काय निवडावें निवडणारें' ह्याहून दुसरी कोणतीही विचारसरणी ऐतिहासिक चर्चेत अवलंबिणारे नव्हत असेच लिसेवस्थ नवीन दमाच्या आमच्या विद्यार्थ्यांत फारच मोठ्या प्रमाणांत आढळल्यावांचून राहणार नाहींत अशी असलेली आमची खात्री रा. तळावलीकरांच्या एतद्विरुद्ध प्रतिपादनानें मुळींच ढळलेली नाहीं, असें आह्मीं स्पष्टपणें नमूद करतों.

असो. ह्या एकाच मुद्याचा विस्तार विशेष वाढल्यामुळें अशीं बाकीचे मुद्दे, व त्याचप्रमाणें, ह्या वादविवादांत उभयपक्षीं ज्यांत तात्विक पण कोणताही नाहीं अशीं करण्यांत आलेलीं विधानें (अर्थात आमच्या मतें) काय काय आहेत तीं चाळण्याचें काम, पुढील लेखाकरतां ठेवून देतों.

dormindo soro profundo durante o tempo de *vacas magras*, preoccupando-se já os seus promotores á perspectiva de *espigas grossas* com os preparativos precisos para a hora e tempo surpreenderem os seus adversarios com os apréstos mais certeiros...?

Que essas questões se ventilem no campo de sãos principies de legalidade e do bom senso admite-se, o que, porem, não se comprehende é que se queira debatel-as por mero capricho e cega arbitrariedade tentando-se, não poucas vezes, liquida-las por meios violentos com atentados contra a ordem e a moralidade publicas.

De todas as autoridades administrativas que continuam á testa da administração dos concelhos e das outras policiais é de esperar todo o zelo, previdencia, prudencias e equidade para que nesses casos em que a *força* prevalecer sobre a *legalidade* sejam salvaguardados os interesses de quem tem a seu lado a justiça previdenciando, já se vê, no limite das suas atribuições, de modo que seja assegurada o producto a quem, de direito, pertença, não devendo ser arbitrariamente espoliado o mesmo e mantida a ordem publica.

Verem de Pondá — *V. D.*

A' janela...

Não pode, não deve passar sem o nosso mais indignado protesto, protesto que hoje tentamos levantar do alto desta modesta tribuna, protesto contra uma coisa a mais assombrosa, a mais surpreendente, a mais extraordinaria, a mais incrivel, dizemos mal, aqui nesta terra tudo é crivel, a mais improvista, embora as coisas mais improvistas sempre sejam as que mais cedo vem, a mais escandolosa, que é nada mais, nada menos que a formidanda legião de impostos.

S.Exa. o *Sr.* Governador Geral num discurso dissera : A verdade seja dita, a justiça seja feita. Pois vamos nós dizer a verdade nua e queremos e instamos, pedimos que se nos faça a...Justiça Diremos a verdade sem rebuços pois não nos atemorizam os Cerbéros do regimen e nem viemos nós leve de armas. atica-los...e se condenado formos, não seremos nós portanto perante as togas inaculadas dos nossos Hubert, que compareceremos como réu. Não. Tomemos alento. Volvamos os nossos olhos por essas duas colunas em tipo fino dos jornais em que vem relatada a avalanche de impostos que a Comissão Municipal das Ilhas *acaba* de despenhar *sobre* tudo e sobre todos por causa da Exposição do Santo Xavier.

Analizemos os factos. E' a primeira vez que vai aqui haver Exposição do Sagrado Corpo do Santo ? De certo que não. E' a primeira *vez* que o *deficit* está em tamanhas agruras? Não o esteve em 1910 ? Não? Não barafustaram os adversos ao regimen transacto, contra o *deficit* apodando-o " de um monstro de que nunca se formava uma idea exacta, nem pelas confusas indicações do *Diario do Governo*, nem pelas alusões picaras das revistas do ano,. E o *deficit* de 1910 seria maior do que o actual? Não. Folheem as estatisticas e verão. Em 1910 houve *deficit*, e não era esse superior ao de hoje; criaram-se impostos ?Não.E o que é que significa esse cataclismo de impostos quando o contribuinte está já soterrado, calcado por eles?

Não alimentemos ilusões. Não nos diga o Governo que o *deficit* não é tam pavoroso como pretendem alguns jornais. Não é? e não é porque é que o mesmo governo lançou impostos contra a casa, aumentou, desenitrambelhadamente, as pautas aduaneiras ?Falamos só destes por serem os mais notaveis. E para cumulo temos essa avalanche de impostos, de taxas, de sobre taxas, durante a Exposição. Quando por todas as aldeias e até na vizinha cidade se clama contra a gana de o governo lançar impostos sobre tudo e até sobre quem for beijar os pés do Santo, lançam se impostos ?... Não tem razão esse clamor ?. Digam os que se acham no poder.

Lançaram-se impostos, muito bem, saibam pelo menos lança-los Sim não tem muitos inconvenientes quando se lavram portarias de afogadilho.

Mas voltaremos.

Ramon de Quevedo

Ate' que a final...

Foi nomeado professor provisorio do Liceu Central o sr. Ramachondra Sridar Foi. E' com grande jubilo que registamos este facto que representa triunfo completo duma causa justa.

Cumprimentamos o joven hindu pela sua tão almejada nomeação.

—मुडीफंड संस्थेतर्फे सरस्वत्युत्सव करण्यांत आला, व त्यास जोडून एक व्याख्यानमाला ही सुरू टेविली होती. रा. दामोदर व्यंकटेश पै रायतुरकर, रा. हेगडे देसाई, रा. गणपत राव सामंत, रामचंद्र अडवलपालकर, प्रो. गजानन सांवर्डेकर, रा. रामचंद्र नारायण लंवदे, रा. उपेंद्र तळावलीकर, नामदार व्यंकटेश सूर्यराव सरदेसाई, डॉ. बोरकर, रा. शांबाराव सरदेसाई, व प्रो. राम चंद्र शंकर नाईक यांच्या मदतीनें पार पडली. (पणजी ता. १।१०।२२)

—राष्ट्रीय शाळेतर्फे ही सरस्वत्युत्सव साजरा करण्यांत येऊन उत्सवांत रा. रामचंद्र लंवदे, रा. उपेंद्र तळावलीकर, रा. शिवराम गोविंद साळगावकर यांचीं व्याख्यानें झालीं. (पणजी ता. १।१०।२२)

—कुंभारजुवें येथील श्री शारदा विद्यालयांत श्री शारदोत्सवप्रसंगीं गुंफण्यांत आलेली व्याख्यानमाला दे. गणेश शिवराम सामंत व सहाय्यक यांच्या अविश्रांत परिश्रमामुळें यशस्वी रीतीनें पार पडली. विशेष माहिती येत्या अंकीं.

एक इशारा

लेजीस्लेटीव कौंसिलच्या मेंबरांच्या निवडणुका जाहीर झालेल्या वाचकांच्या अवलोकनांत आल्याच असतील. एवढेंच नव्हे तर नवीन कार्सीजादीचा मेंबर हिंदूच निवडला जाईल अशा बद्दलही त्यांना खात्री आहे परंतु त्या प्रमाणें हिंदु समाजाकडून हा प्रश्न अगदीं बिनचूक व योग्य त्या प्रकारें सोडवला जात असतो त्याच प्रमाणें कौंसिलात जास्तींत जास्त मेंबर हिंदु समाजाकडून कसे निवडून देतां येतील या प्रश्नाकडेही आपल्या समाजानें लक्ष पुरविलें पाहिजे. कारण परिस्थितीच आपणांस मागील अनुभवानें तसें करण्यास आव्हान करिते हें सूक्ष्म विचारांतीं दिसून येईल.

सुदैवानें आणखी निदान २ तरी मेंबर हिंदुच्या वतीनें निवडून येणें फारशा श्रमाची गोष्ट नाहीं. मात्र त्या दिशेनें पुढाऱ्यांकडून चळवळ झाली पाहिजे. या २ मेंबरांपैकीं एक ग्राम संस्थांकडून निवडण्यांत येत असेलेला व दुसरा जमिनदारांचा यद्यपि उभयतांचे संख्याधीक्य नसलें तरी थोडक्याच प्रयत्नानें ही गोष्ट साध्य करून घेतां येईल. असें आमच्या अल्प बुद्धीस वाटतें. आतां या तीन जाग्यांवर हिंदु गृहस्थ कोण निवडून यावे हा प्रश्न उपस्थित होतो. आमच्या मतें हिंदु समाजामध्यें २।३ लायक इसम सांपडणें फारशी अवघड गोष्ट नाहीं. उदाहरणार्थ रा. वामनराव वाटकर, रा. माधवराव शिरवैकर, रा. सखारामपंत देसाई, रा. भास्करराव देसाई, रा. साखरदांडे या गृहस्थांची नांवें सध्या सुचविण्याची परवानगी घेतों.

सामाजिक संघाचें चालक मंडळ या महत्वाच्या गोष्टीकडे लक्ष पुरवून तांबडतोब योग्य त्या प्रकारची खटपट करण्यास कंबर बांधील काय?

परिचित.

वर्तमानसार

—दरवर्षाप्रमाणें यदा मुरगांव हारवर येथील जेठी मराठी शाळेंत 'श्री सरस्वति उत्सव तारीख २८ सप्टेंबर तें २ अक्टोबर पासून मोठ्या थाटानें करण्यांत आला. पहिले ३ दिवस शाळेंतील मुलांकडून शाळा मास्तर यानीं मुद्दाम उत्सवास अनसरून शिकविलेलीं स्वदेशीवर पदें म्हणविण्यात येऊन ४ थ्या दिवशीं रात्रौ ९ ते १० पर्यंत वे॥ श्रीधर नारायण जोशी यांचें 'विद्यार्थी' या विषयावर लहानसेंच पण चटकदार भाषण झालें. बहुतेक जेठी रहिवाशी यानीं शाळा गच्च भरली होती. रा. रामचंद्र कृष्ण राणें यांच्या मेळ्यामुळें उत्सवास बराच रंग आला होता. मेळा अगदीं लहान मुलांचा असून स्वदेशीवर पदें, अभंग, व मुलांचा नाच पाहण्यासारखा होता. ५ व्या दिवशीं संध्याकाळीं शाळामास्तर श्री बाबुराव शिकाजी प्रभू यानीं मुलांना फार सुंदर असा उपदेश केला आणि नंतर सरस्वतीचें विसर्जन करण्यांत आलें.

—विजया दशमी दिवशीं पणजी येथें श्री सरस्वती मंदिराचा ९वा वार्षिक समारंभ कुंभारजुवें येथील श्री शारदा विद्यालयाचे अध्यापक रा. रा. गणपतराव सामंत यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडला. समयास अनुसरून रा. रा. शांबाराव सरदेसाई यांचें भाषण झाल्यानंतर रा. रा. अनंत वासुदेव मोये यानीं सर्वांचे आभार मानल्यावर सभा बरखास्त झाली.

— मडगांव येथील सरस्वत्युत्सवाच्या व्याख्यानमालेंत भाग घेण्यासाठीं आलेले हिंदुस्थानचे विद्वान देशभक्त स्वराज्यपत्राचे संपादक कृष्णाजी शिवराम परांजपे, बी. पुणतांबेकर नॅशनल कालेज व मनुरेकर यांस पणजीच्या श्रीसरस्वतीमंदिरातर्फे पानसुपारी देण्यांत आली. रा. शांबाराव सरदेसाई यानीं पाहुण्याचा परिचय करून दिल्यावर समयासअनुरूप अशीं व्याख्यानें झालीं.

श्रीशांतादुर्गा ग्रंथ रत्नागार (कळंगुट-गोवा)

संस्थेच्या विद्यमानें 'श्रीशांतादुर्गा विद्यालयाच्या दिवाणखान्यांत दिपवाळीच्या सणानिमित्त पुढील व्याख्यान माला सुरू करण्यांत येणार आहे.

गुरुवार ता. १९ माहे अक्टोबर	विषय— हिंदु समाजापुढील प्रश्न. व्याख्याते— प्रो पांडुरंग अ. केंकरे बी.ए. अध्यक्ष— रा. गोविंद प्रभू पर्रीकर
शुक्रवार ता. २० माहे अक्टोबर	विषय— गोमांतकाची औद्योगिक अधोगती व्याख्याते— सि. इझिदोर द सा. अध्यक्ष— रा. रामचंद्र नारायण लंवदे.
शनिवार ता २१ माहे अक्टोबर	विषय— आमच्या स्वराज्याची चीज व्याख्याते— रा. नारायण बेरेकर अध्यक्ष— रा. गोविंद पु. हेगडे देसाई
रविवार ता. २२ माहे अक्टोबर	विषय— राजकारण व्याख्याते— प्रो. दत्ताराम गो नाईक अध्यक्ष— रा. गोविंद पुं. हेगडे देसाई
सोमवार ता. २३ माहे अक्टोबर	विषय— कृषीकर्म व्याख्याते— रा. विष्णु रघुनाथ सामंत अध्यक्ष— रा. गोविंद पुं. हेगडे देसाई

या शिवाय समयास अनुरूप अशा निबंधांचीं वाचनें रा. दत्ताराम श्रीधर नार्वेकर; रा. गोविंद रघुनाथ धीमे यांकडून होतील. सोमवार ता. २३ रोजीं सर्व व्याख्यांनाचा समारोप रा. हेगडे देसाई करतील. सभेच्या कार्यक्रमास प्रत्येक दिवशीं ६ वाजतां आरंभ होईल. सर्वांनीं नियमितपणें हजर रहावें अशी संस्थेच्या चालकांची विनंति आहे.

दसऱ्याच्या सणानिमित्त प्रस्तुतचा अंक आज छोट्या स्वरूपांत निघत आहे. — म. मा.

भारत

गुरुवार आश्विन शु० १५ मा १८४४

स्फुट विचार

विजयादशमी:— या उत्सवानिमित्त ठिकठिकाणीं गोव्यांत झालेल्या व्याख्यानमाला सुरक्षितपणें पार पडल्या हें कळविण्यास समाधान वाटतें. ज्ञानप्रसारद्वारा सरस्वतीची एकनिष्ठ सेवा करणें हेंच खरें सरस्वतीपूजन असल्यानें, गोव्यांतील मुख्य मुख्य सार्वजनिक संस्थानीं आज कित्येक वर्षांपासून अमलांत आणलेला व्याख्यानमालांचा उपक्रम अभिनंदनीय नाहीं असें कोण ह्मणेल ! असो. व्याख्यानमालांची ही लोकजागृति करण्याची पद्धत दिवसेंदिवस यशस्वी होवो, असें मनःपूर्वक इच्छितों.

सरोहि तेंच !:— आलफांताच्या करांची बेसुमार वाढ करण्याचें घाटत असल्यावरून लोकांत असंतोष पसरला आहे. या वाढीविरुद्ध हुद्द पोर्तुगालांत जोराची चळवळ चालू असून तीस थोडेंबहुत यश येण्याचा संभवहि आहे. उपरिनिर्दिष्ट करवाढ ह्मणजे व्यापारी दळणवळणावर मूर्तिमंत घाव असल्यावरून तिचा नायनाट करण्यास मनोभावानें झटणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

मुष्टिफंड संस्था:— पणजी येथील या लोकप्रिय संस्थेच्या उत्साही चालकांच्या अविश्रांत परिश्रमामुळें, संस्थेला स्वतंत्र इमारत बांधण्याचें सामर्थ्य येऊन, गेल्या महिन्याच्या २९ तारखेला तींत यथायोग्य प्रवेश करण्यांचें दुर्मिळ भाग्य लाभल्याबद्दल आह्मी पणजीकरांचें प्रेमपूर्वक अभिनंदन करितों. एकाकाळीं गोव्यांत मुष्टिफंडाच्या चळवळीस फार जोर आला होता; परंतु या जोराचा जोर अस्या युक्ती बनून तो पार दडपून गेला. मात्र पणजीच्या संस्थेनें स्वतः विरुद्ध उद्भवलेल्या हरेक अडचणीशीं नेटानें झगडून आपल्याला धन्य ह्मणवून घेतलें व मुष्टिफंडाच्या चळवळीची कीर्ति वाढविली. याबद्दल रा. रामचंद्र कामत ह्मामाय व रा. अनंत मये यांचें फरावें तितकें अभिनंदन थोडें आहे.

बालोन्नतिसमाज:— येथील या समाजाचा श्रीसरस्वतीपूजनानिमित्त आंखलेला व्याख्यानमालेचा कार्यक्रम थाटानें पार पडला. याचें सर्व श्रेय परकी व्याख्यात्याप्रमाणें संस्थेच्या प्रेमळ, खटपटी व उत्साही चालकांसहि आहे. यंदांप्रमाणें पुढेंहि ते येतील त्या अडचणींशीं टक्कर देऊन, संस्थेचा नांवलौकिक वाढविण्यास झटतील अशी आह्मांस खात्री आहे.

साधा पेहराव

आमची अशी एक भावना झालेली आहे कीं, युरोपियन लोक ह्मणजे सुखी व मान्यतावान लोक, आणि आह्मांस जर सुख व मान्यता मिळवावयाची असेल तर आह्मीं त्यांच्याच सारखें वागलें पाहिजे. याच भावनेमुळें त्यांचें अनुकरण करण्याची आमची प्रवृत्ति झालेली आहे व आह्मीं तसें करीत असतों. तेव्हां हें अनुकरण आह्मांस योग्य व फायदेशीर आहे कीं नाहीं याचा विचार करूं.

पेहराव व आचारविचार हे देश, काल व वर्तमान यांवर अवलंबून असतात. तेव्हां एका प्रदेशांतील लोकांनीं दुसऱ्या प्रदेशांतील अनुकरण करताना तें आपणांस मानवेल कीं काय आणि तें फायदेशीर आहे कीं नाहीं याचा पूर्वी विचार केला पाहिजे, नाहीं तर आपलें नुकसान होऊन उलट मूर्खपणा पदरीं यावयाचा. युरोपांतील हवा अतिशय थंड असल्यामुळें त्या लोकांना पुष्कळ व उबदार असे कपडे सदोदित वापरावे लागतात, पण इथें त्याच्या उलट आहे. ह्मणजे रात्रीचें सुद्धां जेथें थंडीच्या दिवसांशिवाय वस्त्र अंगावर घेतलीं असतां त्रास होतात, तेथें दिवसभर अंग कपड्यानीं लपेटून घेणें ह्मणजे किती त्रासाचें व अपायकारक आहे याची कल्पना करण्यासारखी आहे. तिकडील कपडे इकडे उपयोगी नाहींत, याची युरोपियन लोक सुद्धां कबुली देतात, पण त्यांना आपली संस्कृति सर्वत्र पसरावयाची असल्यामुळें व आपल्या संस्कृतीचा त्यांना फार अभिमान असल्यामुळें कितीही जरी त्रास सोसावे लागले तरी ते खाणें पिणें व पोषाख तिकडल्याप्रमाणेंच इकडेही वापरीत असतात. बरें, यांत मान्यता आहे असें ह्मणावें तर म. गांधी व इतर राष्ट्रीय पुढारी ज्यांचा पोषाख जाड्याभरड्या खादीचा असतो व ज्याची किंमत एका मजुराच्या पोषाखापेक्षां जास्ती नाहीं, अशाना कोणीच मान दिला नसता. व छक्केबाज जे लोक आहेत त्यांचीच महती झाली असती. पण याच्या उलट आज आह्मांला दिसत आहे. यावरून कपड्यांत कांहीं सुख व मान्यता नसून उलट नुकसान व त्रास मात्र भोगावे लागतात असें सिद्ध होत नाहीं काय ?

चैनबाजी ही मुळांतच वाईट आहे, आपले देशबांधव दारिद्र्यामध्यें तडफडत असतां आपण चैन करणें तर फारच वाईट आहे. मनुष्याच्या मनाची रचनाच अशी आहे कीं, त्याला एक मिळालें कीं, दुसऱ्याची इच्छा होते, दुसरें मिळालें कीं तिसऱ्याची, अशी त्याची इच्छा कधीं तृप्त ह्मणून व्हावयाची नाहीं. आणि एक वेळ त्याला नव्याची चटक लागली ह्मणजे मग तर नव्या नव्या वस्तूंशिवाय त्याला चैनच पडत नाहीं.

चैनी मनुष्याची ही हीच स्थिति होते. त्याला एक नवीन वस्तु मिळाली कीं थोडा वेळ आनंद वाटल्यासारखा दिसतो कांहीं वेळानें तिची त्याला किंमत वाटत नाहीं. आणि मग दुसरीची आवश्यकता भासूं लागते, मग तिसरीची अशा प्रकारें तो चैनीचा पक्का गुलाम बनतो. शेवटीं मग परिणाम त्यानें तनु, मन व धन यांची पर्वा न करितां तिची एक सारखी सेवा करावयाची प्रतिज्ञाच केली आहे. अशा प्रकारें नव्या नव्या वस्तु मिळविण्यासाठीं एकसारखा झटत असतो. अशानें त्याला कुलाच्या ऐवजीं त्रास मात्र, त्या मिळविण्यासाठीं, काढावे लागतात.

चैनी मनुष्य चैनीचेच विचार करीत असायाचा अर्थात् त्याला दुसऱ्यांविषयीं विचार करण्याला अवसरच नसतो आणि अशा प्रकारें त्याचें विचार क्षेत्र आकुंचित होतें. ह्मणजे त्याचें विचार 'स्वतः'च्या पलीकडे जात नाहींत. दुसऱ्यांचें कांहींही होवो पण आपल्या चैनींत व्यत्यय आलेला त्यास खपत नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे त्यांच्यांत आणि एखाद्या पशूंत फारसें अंतर नसतें.

आमची दृष्टि युरोपियन कसे पोषाख करतात, ते कसे चैन मारतात यावरच असते, आणि आम्ही याच बाबतींत त्यांचें अनुकरण करीत असतों, पण त्यांच्याकडे स्वाभिमान, राष्ट्राभिमान दीर्घोद्योगीपणा इत्यादि चांगले गुण आहेत त्यांच्याकडे आमची नजरच जात नाहीं व गेली तरी आह्मांस त्यांचें अनुकरण करवत नाहीं.

आमचे लाखो रुपये, फॅशनेबल कपडे व इतर चैनीच्या जिन्नसामुळें बाहेर जात आहेत आणि आम्हीं आधींच गरीब स्थितींत असलेले अधिकाधीक गरीब बनत चाललों आहोंत. पण त्यांचें आमच्या उलट आहे. ह्मणजे ज्या वस्तु वापरतात त्या सर्व युरोपांतीलच असतात, त्यांनीं खर्च केलेला सर्व पैसा युरोपांतच जात असतो आणि आम्हीं ही त्यांचें अनुकरण करूं लागल्यापासून आमचाही पैसा त्यांच्याचकडे जात असतो, अशा तऱ्हेनें ते दिवसेंदिवस गबर होत चाललेले आहेत. तिकडील [युरोपांतील) उत्पन्नाचा जर आढावा काढला तर दरमाणशीं २०० रुपये प्रमाणें उत्पन्न पडतें. आणि इकडील (हिंदुस्थानांतील) उत्पन्नाचा जर काढला तर २५ रुपये प्रमाणें पडतें असें तिकडच्या तज्ञानीं सिद्ध केलें आहे. तेव्हा आम्हीं किती गरीबींत आहोंत हें आमच्या निराळें सांगण्याची गरज नाहीं. असो.

साधी राहणी ही फारच हितकारक आहे आम्हीं जर मोठ्या थोर पुरुषांची चरित्रें पाहूं लागलो तर आह्मांस असेंच दिसून येईल कीं त्यांची राहणी फार साधी असते कारण त्यांनीं थाटमाटांत काय आहे हें पूर्ण ओळखलेलें असतें. तसेंच साधी राहणी किती महत्वाची आहे, हेंही ते जाणत असतात. तेव्हां साध्या राहणीनें राहून देशास कांहीं तरी उपयोगी पडावें हें आह्मांस योग्य नव्हे काय ? राजोपाध्ये

लिसेबे, लिसेवस्थ व लिसेवोत्तीर्ण

[ले० सु रा. सामंत]

रा. तळावलीकर यांनी उत्तरपक्षीय म्हणून जे दुसरे मुद्दे पुढें आणलेले आहेत ते पुढील प्रमाणें प्रश्नात्मक आहेत: (१) लिसेवांत जाऊन मुलानीं कसले वेडेचार केले आहेत! (२] व त्यामुळें त्यांचा कसला नैतिक व बौद्धिक ऱ्हास झालेला आहे (३) इंग्रजी युनिवर्सिट्यांत तो ऱ्हास का होत नाहीं ! (४) लिसेवांतील मुलांकडून देशकार्याची अपेक्षा कशी करतां येईल !

परंतु, उत्तरपक्षीय ह्या दृष्टिनें नं. [१] व [२] हे मुद्दे गैरलागू आहेत. कारण, पूर्वपक्षांत, रा. भोंसले यांच्या समजुतीप्रमाणें, त्यानीं त्यांची उत्तरें दिलेलीं आहेत अर्थात, त्यांचें निराकरण, त्या 'स्थितिदर्शक मुद्द्यांच्या उलट अशी स्थिति पुढें मांडल्याशिवाय होणें शक्य नाहीं. (३) मध्यें केलेल्या प्रश्नाचें, तो नैतिक व बौद्धिक ऱ्हास कोणता हें उत्तरपक्षाला माहीत आहे असा भास होतो व त्यामुळें पहिले प्रश्न अधिकच गैरलागू दिसतात. (४) मध्यें केलेला प्रश्नही पूर्वपक्षाला लागू होत नाहीं. कारण पूर्वपक्षांत 'लिसेवस्थ' मुलांना उद्देशून न लिहितां 'लिसेवोत्तीर्ण' उमेदवारांना उद्देशून मजकूर आलेला आहे. ह्मणून हे मुद्दे असेच सोडून आह्मीं पुढें जातों.

"हरएक लिसेवोत्तीर्ण आपण 'यंप्रेगाद' होणार ह्या शिवाय आपल्या विविध ज्ञानाच्या उपयुक्ततेविषयीं दुसरें कांहीं सांगूं शकत नाहीं" असा जो पूर्वपक्षांत 'स्थितिदर्शक' मुद्दा रा. भोंसले यांनी पुढें आणलेला आहे त्याला रा. तळावलीकर यांनीं जे उत्तर दिलेलें आहे त्यांत त्यांनी, अप्रत्यक्षतः, लिसेवोत्तीर्ण आपल्या विविध विषयांच्या उपयुक्ततेविषयीं जागृत असतात, व केवळ 'यंप्रेगाद' होण्याची हांव बाळगून नसतात असें सूचित केलेलें आहे. तो त्यांच्या तर्कांचा 'स्थितिदर्शक' मुद्दा ह्मणून मानायाला हरकत नाहीं. व तो मानल्यास रा. भोंसले यांच्या पूर्वपक्षांतील एका मुद्याचें त्यानें आपोआप निराकरण होतें. त्या प्रमाणें, लिसेवोत्तीर्ण उमेदवार, नुसते यंप्रेगाद होण्याची नव्हे, तर हर्शेल, पेरी, स्कॉट, अशा केवळ निरपेक्ष ज्ञानसेवा करणाऱ्या पुरुषांचा मार्ग क्रमण्याची हांव बाळगूं शकतात हें कळून कोणाही सहृदय मनुष्याला त्यांच्याविषयीं आदर वाटूं लागल्यावांचून राहणार नाहीं. आणि आह्मीही त्यांनीं ती हांव बाळगूं नये, असें मुळींच ह्मणणारे नसल्यामुळें, तशी वस्तुस्थिति असल्यास, लिसेवांतील शिक्षणावर सर्वस्वी तुटणारे चुकतात असें कबूल करतों. परंतु, रा. तळावलीकर यांनी सदरील मुद्यावर लिहितानां, दक्षिण ध्रुवाचा इंग्लिशांना उपयोग काय ?' व विशेषेंकरून, 'शनि वरुण प्रजापति हे कशाशीं खावयास उपयोगी पडतात ?' असे जे दोन गैरमाहितपणानें प्रश्न केले आहेत ते जर सर्वसाधारण लिसेवस्थांना तसेच वाटणारे असतील, तर ही साधी माहिती लिसेवस्थांना नसते कीं काय असा व्यर्थ गैरसमज होण्याचा संभव आहे. आमच्यामतें, शनि वरुणादि ग्रहांच्या नौकानयनाला अर्थात समुद्रप्रवासांत किती मोठा उपयोग हें लिसेवोत्तीर्णांना माहीत असल्यावांचूनच ते पेरी, स्कॉट यांच्या सारखी ज्ञानसेवेची हांव बाळगूं शकतील असें मुळींच संभवत नाहीं.

'मनुष्य सुशिक्षित झाला ह्मणजे त्याचा देशाला, समाजाला, भाषेला वगैरे मोठा फायदा होतो' असा जो रा. तळावलीकर यांचा मुद्दा आहे तो अगदीं निर्विवाद आहे त्या बाबतींत दुमत होणें मुळींच शक्य नाहीं. परंतु, हा मुद्दा ह्या ठिकाणीं अप्रस्तुत आहे. कारण, पूर्वपक्षांतील टीका सुशिक्षित होण्याविरुद्ध नसून 'कुशिक्षित' होण्याविरुद्ध आहे.

परंतु, रा. तळावलीकर यांचा, 'लिसेवांतील शिक्षणाचा मद्यपानाला उत्तेजक असा परिणाम झालेला नाहीं व लिसेवस्थ खिस्ती विद्यार्थ्यांचा सहवास दारूड्या खिस्त्यांच्या सहवासाप्रमाणें लेखणें योग्य नाहीं, असा जो मुद्दा आहे तो मात्र विचारार्ह आहे. व 'स्थितिदर्शक' या अर्थानें पूर्वपक्षांतील रा. भोंसले यांच्या ' लिसेवोत्तीर्णांची खिस्त्यांशीं सलगी मद्यपानाला उत्तेजक होते' या मुद्याला खोडणारा आहे. आमच्या समजुतीप्रमाणें व अनुभवाप्रमाणेंही लिसेवस्थां मध्येंच त्या सलगीनें मद्यपानाचा प्रसार विशेष होतो असें मुळींच दिसत नाहीं. व हिंदूविषयींच विचार करायाचा तर ज्यांना लिंबाची बाटली लागलेली नाहीं अशा लोकांमध्येंच त्या सलगीमुळें बनणाऱ्या मद्यप्यांची मोठी शेकडेवारी मिळेल.

हा पुढील रा. तळावलीकर यांचे मुद्दे विशेष महत्वाचे असल्याकारणानें व रा. भोंसले यांच्या इतर मुद्यांवर आह्मांला विरोधीमत प्रतिपादन करायाचें असल्यामुळें आणि रा. राजाध्यक्ष यांच्या लेखांत कांहीं मजकूर गैरमाहितगारपणाचा असल्यामुळें आह्मीं ह्या तीन गोष्टी पुढील लेखांकरतां ठेवून देतों.

भाषाच्या मूळापर्यंत जायाचें म्हणजे रा. भोसले यांनीं 'दुर्दैवाचे विचित्र पुतळे' ह्या मथळ्याखालीं लिहिलेला पहिला लेख होय. ह्या लेखानेंच वादाचा पूर्वपक्ष केला, व ह्या लेखालाच 'लिसेइस्तांवरील नसते आळ' अशा मथळ्याच्या लेखानें रा. तळावलीकर ह्यांनीं उत्तरपक्ष करून विषयाला वादविवादाच्या कक्षेत आणून सोडलें. व त्यावर उत्तर प्रत्युत्तर ह्यांचा ओघ सुरू झाला तो तसाच चालू आहे. ह्या ओघांत इकडून तिकडून लहान सहान लेखांचे निर्झर येऊन मिळत आहेत व त्यांला विशेष विस्तृत स्वरूप आणायाला मदत करीत आहेत हें फार नामी चिन्ह आहे असें आम्ही समजतों. आतां, रा. भोसले यानीं केलेला पूर्वपक्ष काय आहे त्याकडे वळूं. पण त्यापूर्वी एक गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे, ती ही कीं हे दोन्ही पक्ष आपले मुद्दे दोन सदरांखालीं विभागतां येतील अशा तऱ्हेनें मांडीत आलेले आहेत. परंतु, त्यांपैकीं एकानेंही हीं विभागणी स्पष्टपणानें वाचकांना किंवा प्रतिपक्षीय लेखकांना दिसावी अशा तऱ्हेनें केलेली नाहीं आणि त्यामुळें वादाला गुतागुतीचें रूप येत चाललें आहे. व जे मुद्दे पूर्वपक्षांत नाहींत त्यांवर उत्तरपक्षांत चर्चा, किंवा जे दोन्हीं पक्षांत नाहींत त्यांवर तृतीयपक्षाची टीका अशा कांहींसा प्रकार होत असल्याचा भास होतो. त्याच्या निराकरणाकरतां आम्ही हीं दोन सदरें स्पष्ट करून त्यांत प्रथम पूर्वपक्षांतील मुद्द्यांची व नंतर उत्तरपक्षांतील मुद्द्यांची विभागणी करूं.

अशा वर्गीकरणाकरतां ज्या दोन सदरांची योजना करायाची त्याना आटोपशीरपणाच्या दृष्टीनें 'स्थितिदर्शक' व 'मार्गदर्शक' अशीं दोन नावें द्यायाला हरकत नाहीं. एवढें मुक्रर केल्यावर आतां दोन्हीं पक्षांतील मुद्दे ह्या दोन सदरांत कसे येतात पहा. रा. भोसले याच्या नंतर एकूण्या लेखांत प्रास्ताविक भाग सोडल्यापासून कलम (६) अखेरपर्यंत जो भाग आहे तो बहुतेक 'स्थितिदर्शक' सदरांत पडणारा आहे. त्या भागांत, लिसेवातील शिक्षणानें कोणती परिस्थिति निर्माण केली आहे असें रा. भोसले यांना वाटतें तें त्यांनीं दिग्दर्शित केलें आहे. त्यांच्या मताप्रमाणें ही परिस्थिति पुढील प्रमाणें झालेली आहे. (१) लिसेवांतील विविध प्रकारचें शिक्षण संपादन केलेल्या उमेदवाराला, 'ह्या तुझ्या विविध ज्ञानाचा, तुला, तुझ्या भाषेला' तुझ्या समाजाला व जन्मभूमीला उपयोग काय असा प्रश्न टाकल्यास तो 'मी येंप्रेगाद होणार' ह्या वांचून अन्य उत्तर देऊं शकत नाहीं. (२) अशा उमेदवारानीं किंवा तशा 'एंप्रेगादानीं' आपल्या भाषेंत फिरंगी शब्दांची व्यर्थ भेसळ केली आहे. (३) 'क्रिस्तांव' लोकांचें खाण्यापिण्यांत व कपड्यालत्त्यांत, अनुकरण करून, मद्यपानाचा प्रसार केला व अशिक्षित लोकांचा 'बुद्धिभेद' केला. (४) नमस्काराऐवजीं 'आदेवस' वगैरे सुरू केले. (५) लिसेवनें लोकांनां स्वाभिमानशून्य केलें; महाराष्ट्राच्या इतिहासाचें अज्ञान, व पोर्तुगेजांच्या इतिहासातील आलबुकेर्कादिकांच्या ज्ञानांत आढ्यता व प्रौढी, हीं उत्पन्न केली. (६) 'लिसेवोतीर्ण' लोक स्वभाषेची हेटाळणी करतात. (७] तात्पर्य, स्वाभिमानाला पोषक असें शिक्षण लिसेवांत मिळत नाहीं. व जें अन्य शिक्षण मिळतें त्याचा देशाला किंवा समाजाला उपयोग होत नाहीं.

अशा तऱ्हेनें संक्षेप केलेले हे रा. भोसले यांच्या लेखांतील मुद्दे, त्यांच्या निरीक्षणाप्रमाणें व मताप्रमाणें वस्तुस्थिति उघड करतात. परंतु इतरांच्यां दृष्टिकोनांतून किंवा इतरांच्या मताप्रमाणें ही परिस्थिति अशा प्रतीची आहे असें दिसणें व ठरणें अशक्य आहे. आणि त्यामुळें हे जे स्थितिदर्शक म्हणून मुद्दे रा. भोसले यांनीं पुढें मांडले आहेत त्यानां उत्तरपक्ष झाल्यावांचून राहणें शक्य नाहीं. अशा प्रतीचे उत्तरपक्षिय 'स्थितिदर्शक' मुद्दे रा. तळावलीकर ह्यांनीं आपल्या 'लिसेइस्तांवरील नसते आळ' ह्या लेखांत मांडलेले आहेत, व वादाची दुसरी बाजू उभी केलेली आहे. ते मुद्दे काय आहेत हें आम्हीं त्यांच्या लेखांतून चाळून काढून यथावकाश मांडूं. तूर्त, रा. भोसले यांचे 'मार्गदर्शक' ह्या सदरांत चालतां येतील असे मुद्दे कोणते ते पाहूं. हे मुद्दे, अर्थात, त्यानीं ज्या स्थितीचें चित्र रेखाटलें आहे त्या स्थितींतून मार्ग काढण्याकरतां म्हणून सूचविलेले उपाय हेंच होत. हे उपाय त्यांच्या मताप्रमाणें व त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे म्हणजे पुढीलप्रमाणें ठरतात: [१]हुशार व बुद्धिमान मुलांनीं इंग्रजी युनिव्हर्सिट्यांत जाऊन आपल्या बुद्धीचा प्रकाश पाडला पाहिजे [२] स्वभाषेची सेवा केली पाहिजे [३] आजन्म स्वदेशाभिमान बाळगून आपलेपणा राखिला पाहिजे [४] लिसेवांत पाठवून 'दुर्दैवाचे विचित्र पुतळे, तयार करण्यापेक्षां, मुलांना अशिक्षित ठेवणें पुष्कळ हितकारक व फायदेशीर आहे.

ज्या नियमानें 'स्थितिदर्शक' मुद्द्यांच्या बाबतींत भिन्न दृष्टीला भिन्न मत बनवणें शक्य आहे त्याच नियमांत तंतोतंत या बाबतींतही शक्य आहे हें सांगणें नकोच. आणि त्याप्रमाणें श्री. तळावलीकर व कांहींशा हद्दीपर्यंत श्री. राजाध्यक्ष यांनीं आपले 'मार्गदर्शक मुद्दे उत्तरपक्ष घेऊन मांडलेले आहेत. व ह्या दुसऱ्या बाबतींतही वादाची बाजू उभी केलेली आहे. म्हणून आतां ह्या उत्तर पक्ष प्रतिपादन करण्याचे मुद्दे काय काय आहेत त्यांची आम्ही ठरविलेल्या दोन्हीं सदरांत विभागणी करूं. व तसें करतांकरतांच त्या बाबतींत आणखी कांहीं निष्पन्न होत गेल्यास त्याचाही उल्लेख करूं.

रा. तळावलीकर (१) पोर्तुगीज शब्दांची कोंकणी भाषेंत होत असलेली भेसळ मान्य करतात. परंतु, कोकणी भाषा ही अनेक भाषांचें मिश्रण असल्यामुळें, व पुन्हां, तिला ते मातृभाषेची जागा देत नसल्यामुळें इतकेंच नव्हे तर ती 'भाषा आहे असें ते म्हणायालाच नाकबूल असल्यामुळें, त्यानां पोर्तुगीज शब्दांच्या भेसळीची पर्वा करावी असें वाटत नाहीं.

आमच्या मतें ही विचारसरणी रास्त आहे. इतकेंच नव्हे तर आम्हीं रेसभर पुढें जाऊन असेंही म्हणतों कीं, पोर्तुगीज शब्दांचा प्रवेश आम्हीं जिला आमची मातृभाषा म्हणतों त्या मराठी भाषेंतही व्हायाला हरकत नाहीं. फक्त हा नियम अमलांत आणताना आम्हीं एक दोन गोष्टी मात्र ध्यानांत बाळगल्या पाहिजेत. त्या ह्या कीं, जे शब्द आम्ही प्रचारांत आणणार त्याला आपल्या भाषेंत प्रतिशब्द आहे किंवा नाहीं; आणि, आमच्या 'बोलण्यांत' किंवा बोलींत मराठी शब्दांशीं किंवा भाषेंत स्वभाषेंतील शब्दांनीं गौरव आणायचा किंवा विसंगत अशा परकी भाषेंतील शब्दानीं 'अडखळतेपणा' आणावा. उदाहरणार्थ अशी एखादी कल्पना असूं शकते कीं, जी, तो पोर्तुगीज शब्द वापरला तरच प्रगट होऊं शकेल, व त्या ठिकाणीं मराठी शब्द वापरल्यानें ती प्रगट होणें शक्य नाहीं. अशा ठिकाणी पोर्तुगीज शब्द वापरायाला मुळींच प्रत्यवाय नाहीं. मासल्याकरितां आमच्या बोलण्यांत 'चेंपे कादणें' असा एक वाक्यप्रचार आहे तो वाचकांनीं मनांत आणावा. 'त्याला आम्हीं चेंपे काढीत नाहीं, असें म्हणण्याऐवजीं जर कोणी 'त्याला आम्ही पगडी किंवा रुमाल काढीत नाहीं' असें म्हणेल तर तो संकल्पित अर्थ निघणार नाहीं हें उघड आहे. अर्थात अशा ठिकाणीं मूळ पोर्तुगीज शब्दच स्वीकारला पाहिजे. उलट, 'आज एका आमिगाचे येथ ज्यांतार घेतलें' असल्या प्रतीची भाषा 'आज एका दोस्ताचे किंवा मित्राचे येथ जेवण केलें' या ऐवजीं वापरणें विशोभित दिसतें. दुसरी एक गोष्ट ध्यानांत आणायाची म्हणजे, आम्हीं, आमच्या बोलण्यांत पोर्तुगीज शब्द आणतों ते कोणत्या भावनेनें आणतों, पोर्तुगीज लोक दाखविण्याकरतां आणतों. स्वभाषेशीं आपला संबंध तुटत चालला आहे असें ढोंगानें स्थापित करण्याकरतां आणतो; कीं स्वतःचा अर्थ विशेष स्पष्ट रीतीनें प्रगट व्हावा याकरितां जोरानें आणतों, व ज्या ज्या वेळीं तो शब्द आणतों त्या त्या वेळीं त्याला स्वभाषेंत परिशब्द नाहीं ह्या जाणिवेनें आणतों. हेंच दाखल्यानिशीं सांगायाचें म्हणजे ज्या प्रमाणें व ज्या भावनेनें पोर्तुगेज लोक आपल्या भाषेंत कोंकणी शब्दांचा प्रसंगविशेषीं अवलंब करतात, त्याप्रमाणेंच व त्या भावनेनेंच आम्हीं आमच्या बोलण्यांत पोर्तुगीज शब्दांचा आधार घेतों, कीं, ज्या प्रमाणांत व ज्या फिरंगीपणाच्या वृथा डौलानें व स्वभाषेच्या तुच्छतेनें, आमचे क्रिस्तांव विद्वान, फिरंगी शब्दांचा व वाक्यांचा पाऊस पाडतात, त्या डौलानें व त्या तुच्छतेनें आम्ही पोर्तुगीज शब्दांचे उद्गार काढतों, हें पाहणें आवश्यक आहे. प्रत्यक्ष शब्दांपेक्षां, ह्या 'कानेकी' भावनेच्या प्रदर्शनामुळेंच आमच्या 'क्रिस्तिसी' भाषेला —बोलीला—हास्यास्पदतेचें स्वरूप येतें. आणि तिचा उच्छेद करायाचा ती हीच भावना होय. बाकी तात्पुरत्या योजलेल्या शब्दांला स्थाईक महत्व नाहीं हें उघड आहे. आतां, आपला शिक्षणक्रम [लिसेवांतील व तत्संदृश] ह्या भावनेला प्रसरणारा आहे, पोषक आहे, कीं, उलट घातक व नियामक आहे ह्याचा विचार पुढें करूं. तूर्त एवढेंच नमूद करून ठेवतों कीं रा. तळावलीकर ह्यांचे जे विचार वर उद्धृत केले आहेत ते किंवा तत्सम विचार लिसेवाच्या आडांतून लिसेवस्थ विद्यार्थ्यांच्या पोहऱ्यांत उतरतात असें मानतां येत नाहीं. आणि त्या करतांच, ही विचारसरणी लिसेवस्थ विद्यार्थ्यांनीं अनुसरलेली असेल तर हें त्यांचें स्वयंसंपादीत श्रेय होय म्हणून आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों. आणि मोठ्या आस्थापूर्वक असें इच्छितों कीं प्रस्तुत लेखांत रा. तळावलीकर ह्यांनीं लिसेवस्थ विद्यार्थ्यांच्या वतीनें जो मातृभाषेसंबंधींचा अभिमान प्रगट करणारा मजकूर पुनः पुन: घातलेला आहे, तो अभिमान, व ती आवड, त्यांच्यामध्यें दिवसेंदिवस वृद्धिंगत होत जावोत, व ज्या 'कानेकी' वृत्तीची भीति क्रिस्तीक लोकांस अकारण वाटते ती निष्कारण ठरो. लेख दीर्घ लांबल्यामुळें यापुढील गोष्टींचा विचार दुसऱ्या लेखांत करूं.

सु. रा. सार्दे

लक्ष्यांत ठेवा

ज्या गोव्यांतील वर्गणीदारांकडून अजून वर्गणी आली नसेल त्यांच्या नावानें मागील बाकी आकारून २६ वा अंक व्ही. पीनें पाठविला जाईल. त्याचा स्वीकार करून आभारांत ठेवावें. नवीन व्यवस्थेसाठीं आम्हांला हा ठराव अमलांत आणावा लागत आहे. म. भारत

to apenas com a lama atirada sobre o bom nome duma senhora casta e santa como Jizabai, mas acaba de fazer tambem um *debochado*, dum veneravel ancião de uns sessenta ou setenta anos de idade que era o D. Manuel de Menezes, Chronista mor, Cosmografo-mor e general da Armada Real Portugueza, e que sempre gostou de viver, como ele diz, "abraçado com os seus livros e com os seus compassos.", O sr. Fragoso acusa-o de ter-se tornado naquela velha idade um *para-mour* da joven rainha Jizabai, de quem, falando a verdade, o pobre homem nem sombra vira.

Sem a exposição destes factos o bom nome de inocentes personagens historicos continuará manchado, pelo menos, aos olhos dos leitores menos cultos e ignorantes, do livro do sr. Fragoso. Pode ser que o sr. Fragoso e o seu livro sejam umas trivialidades ou cousa parecida. Mas, como as pessoas que ali entram em scena são muito importantes, sob o ponto de vista historico, é nos forçoso tomar conta de seu tão *precioso* livro, já referido.

Com este preambulo, feito com a consciencia e serenidade de quem quere ver tudo posto em pratos limpos, vamos volver a nossa atenção áquela investigação historica do sr. Fragoso que, na verdade, constitue uma deturpação da Historia.

Mas voltaremos.

Sá Manta

Dr Froilano de Melo

Um grupo dos amigos e admiradores deste eminente sabio da India resolveu prestar-lhe um publico testimunho de apreço e simpatia no salão dos Paços Municipais de Nova-Goa.

Com grande entusiasmo, o *Bharat* se associou a essa homenagem a que tem jus o grande homem pelos incalculaveis serviços por ele prestados ao seu Paiz natal e ás sciencias.

Oportunamente estamparemos nas nossas colunas a fotogravura e traços biograficos do Doutor Melo por quem nós simpatisamos sempre, como tivemos várias ocasiões de demonstra-lo,

Atè lá, pois !

Ecos & Critica

Guerra mortal

Pelos modos, o arquitecto hindu contratado pela Direcção das Obras Publicas tem sido constante pesadelo a muita gente do bom e mau *tom*.

Sabemos mesmo pelas informações que nos forneceram sobre o arquitecto pessoas insuspeitas, que se arquitecta uma formidavel campanha, tendente a provar a inutilidade do sr. Advolpalcar, autentico *pudvem* e *xendi*...

Mas a guerra promovida ao arquitecto hindu não marca certamente a era *nova* e *democratica* da franca perseguição á classe hindu: ela começou ha muito tempo e não sabemos quando acabará.

Não nos anima nenhum *espirito de classe* como aprouve insinuar a um "ilustrado cavalheiro" de Pondá, que já não come nem dorme, desde que a classe hindu tomou sob seus proprios hombros o seu levantamento; temos só pena de certos egoistas cristãos que não vêem a *dois dedos* deante do seu estomago saciado. Dai os nossos reparos, a nossa magua e os nossos queixumes.

De resto, isto de dizer que no conhecimento perfeito da lingua de Camões reside o verdadeiro amor da Patria é uma laracha propria do bestunto, privado de miolo...como é o do tal *ilustrado cavalheiro* de Pondá.

Mas *quod natura dedit nemo potest negare* ..

Colegio Nacional

Será aberto, a partir de um do proximo mez de novembro, um colegio deste nome sob a direcção do sr. *Ramachondra Sridora Poi*. O colegio terá por professores os jovens inteligentes e competentissimos que são os srs. Jenard na Upendra Concto, Raguvir Sridhar Poi, Sripada Porobo Laundo e outros, alem do referido director que certamente será o ornamento da nova casa de instrução a ser instalada.

Amigo sincero e leal daqueles corações francos e bem intencionados o *Bharat* almeja-lhes só um futuro prospero do que são dignos os fundadores do Colegio Nacional.

Para compras !

O sr. Director das O. P. foi fazer compras em Bombaim. Não havia aqui quem tal fizesse, a ponto de se gastar tanta pecunia para um servi o do... *almoxarife!*

Com um similhante sistema de compras, não tardará que tenhamos de vender a nossa... última camisa de resto, bem esfarrapada.

Assaltam-nos receios bem fundados que as compras *dali* *venham* *sair*-nos mais caras do que *daqui*, se elas cá fossem feitas.

Mas *das grandes tudo* é *grande*, como diz o outro.

Correspondencia

Daremos la cabida logo que nolo permita o espaço com cuja falta estamos a luctar seriamente. E' pela mesma razão que os artigos do sr. *Mesmo* não tem, mau grado nosso, podido ser publicados.

Desculpas, senhores!

Dr. C. S Sunctancar

Na Escola Medica de Nova-Goa fez o seu acto grande o sr. dr. Crisna S. Sunctancar, um dos jovens hindus de reconhecida tendencia para medicina.

O dr. Sunctancar não só teu curso brilhante mas tambem possui já uma cuidadosa pratica, o que é uma garantia para a sua rapida prosperidade que lhe almejamos *ab imo pectore*

Pelo Liceu

Ridiculo da Semana

Ouve-se um clamor por todos os lados. *Que foi?* Que será ? São preguntas que de todos os cantos e recantos surgem. Boatos desencontrados fazem giro. Dizem e afirmam que é verdade, que tendo um professor - cremos que e o sr. dr. Carmo dos Reis, pregado na mesa duma sala á quatro persevejos um papel, em que estava escrito o seu horario, este desapareceu misteriosamente ! Por isso é que tudo anda em bolandas porisso é que averiguações, minusculos inqueritos, estão sendo a ordem do dia. E' um *vá de roda, va de roda, va de roda* toda a gente !

Nada se averiguou. Tudo anda obumbrado. Atribuiram esse roubo, digamo-lo assim, aos alunos da 7.a classe de Letras que afirmaram que não foram eles, e a testimunha citada é o sr. professor Jaime de Costa Cruz que foi quem os defendeu bem e manda a verdade que se diga cuja aula eles tiveram ultimamente naquele dia.

Continuam averiguações porem a verdade é que não se sabe o que por ai vae, fala-se em processo disciplinar. Contra quem ? Porque ? Absoluto sigilo. Consta-nos que o Conselho Escolar do Liceu Central prometeu velar pela segurança do horario desaparecido do sr. dr. Diego de Carmo dos Reis. E andou o Conselho muito bem ! Sim, deste modo é que se deve gastar o tempo que é ... dinheiro !

Bate Certo ?

R. de Q.

—श्री. कृष्ण स. सुखठणकर यांनीं आपला मेडिकल कोर्स यशस्वी रीतीनें संपविल्याबद्दल आम्हीं त्यांचें अभिनंदन करितों. डॉ. सुखठणकर यांचा स्वभाव अत्यंत प्रेमळ असून त्यांचें वैद्यकविषयक ज्ञानहि असाधारण असल्यानें, त्यांच्या धंद्यास पूर्ण बरकत येईल, अशी उमेद आहे.

व्याख्यानांचा कार्यक्रम

दिवस	व्याख्यान	व्याख्याते
बुधवार ता. २७	आश्रमधर्म	रा. हेगडे देसाई
गुरुवार ता. २८	शिक्षण	प्रो. डी. वी. शिरोडकर
शुक्रवार ता. २९	स्वदेशी	रा. रामचंद्र प्र लवंदे

या शिवाय रो जयवंत मठकर्णीकर, प्रो. विश्वनाथ शिवराम शिरोडकर, रा. जनार्दन विष्णु कामत इ. सद्गृहस्थांचीं व्याख्यानें होतील. प्रत्येक दिवशीं व्याख्यानाला सात वाजतां प्रारंभ होईल.

भारत

गुरुवार आश्विन शु० ८ मी १८४८

स्फुट विचार

अनुकरणीय संस्था :— लिसेंवांतील शिक्षणांत जे दोष विद्यार्थ्यांची मानसिक शक्ति नष्ट होण्यास कारणीभूत होतांत, ते दोष काढून टाकून तें शिक्षण होतां होईतों उपयुक्त करावें या अत्युच्च हेतूनें पणजी येथें कोलेज्यु नासियोनाल (राष्ट्रीय विद्यालय) या नावाची नमूनेदार संस्था येत्या नव्हेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस स्थापण्यांत येणार आहे. या संस्थेचे मुख्याध्यापक व अध्यापक हिंदूच असतील हा तिचा विशेष आहे. रामचंद्र श्रीधर पै हे उत्साही व विद्वान तरुण कॉलेजच्या कर्णधारित्वाच्या जागीं विराजमान होणार असून त्यांच्या हाताखालीं जनार्दन उपेंद्र वेघटे, रघुवीर श्रीधर पै, श्रीपाद प्रभू लवंदे इत्यादि तरुण हिंदू शिक्षकांचीं कामें करणार आहेत, इतकें सांगितलें म्हणजे उपरोक्त संस्था किती लोकोपयोगी होईल याची सहज कल्पना पटेल. सदरहू कॉलेजसारख्या संस्थेची आज वरीच वर्षें गोव्यांत उणीव होती. ही उणीव उपरिनिर्दिष्ट जबाबदार तरुणांनीं भरून काढण्याचा प्रयत्न केल्याबद्दल, भारतास त्यांचें प्रेमपुरस्सर अभिनंदन करण्यास फार आनंद वाटत आहे.

निर्लज्जपणाचा कळस :— शव प्रदर्शनाच्या निमित्तानें तरी ठिकठिकाणीं दृष्टीस पडणाऱ्या मोडक्या धक्क्यां ऐवजीं नवीन धक्के व तुटक्या रस्त्यांऐवजीं 'सरळ' रस्ते पहाण्याचें भाग्य इतक्यांत लाभेल अशी आह्मांस उमेद होती; परंतु ती निष्फळ होईल कीं काय अशी भीति वाटावयास लागली आहे! जिकडून तिकडून उपरोक्त दुःस्थिती विरुद्ध एकसारखी हाकाटी चालू आहे पण आमचें मट्ठ सरकार स्वस्थ आहे तें आहेच. हा निर्लज्जपणाचा कळस नव्हे काय! कदाचित् पणजीच्या राजवाड्यांतील लक्ष्येचें भक्कम गाठोळें मांडवी नदींत वितळलें असल्यास नकळे! असो. पुन्हां पुन्हा एकाच विषयाचा ऊहापोह करण्याचा आह्मांस मनस्वी वीट येतो. तेव्हां सरकारनें या बाबतींत या पुढें तरी तावडतोब लक्ष्य पुरवावें, अशी सूचना आहे.

लिसेवांतील स्थित्यंतरें :— पणजीच्या पाठशाळेंत नवीन वर्षाचा शिक्षणक्रम सुरु झाल्यास आज जवळ जवळ चार महिने होत आले. पण इतक्या अवधींत पूर्वीं ठरविलेल्या शिक्षक व शिक्षण क्रमांत तसेंच वेळापत्रकांत कितीतरी स्थित्यंतरें झालीं. या बेबंदशाहीस खीळ पडून उपरोक्त क्रमांत स्थैर्य उत्पन्न होईल अशी कित्येकांस आशा होती. पण ती वाढत ठरून सदरहू कार्यक्रमांत आणखीहि फेरबदल करण्याचें घाटत आहे, असें समजतें. पाठशाळेचें चालू वर्ष १५ मार्च पर्यंत चालू राहील तेथपर्यंत या बेबंदशाहीचाहि गाडा चालू राहिल्यास विद्यार्थ्यांच्या शिक्षणा-

आहेत. त्यांना इतकें सांगितलें ह्मणजे पुरे कीं त्यांच्या आवडीची जी इंग्रजी युनिवर्सिटी ती सर्वांत पोर्तुगीज भाषा प्रविष्ट केली आहे ती त्या भाषेच्या वाङ्मयसमृद्धीमुळेंच होय, त्या भाषेंत कांहीं शब्द असे आहेत कीं; त्यांचा बरोबर अर्थवाहक प्रतिशब्द दुसऱ्या भाषेंत—इंग्रजींत सुद्धां–नाहीं—यांवर विशेष खात्री करून घ्यावयाची झाल्यास मागील सालांतील दैनिक एरा न्युव्हाचे अंक वाचावे. शिवाय जरी त्यांना पोर्तुगीज भाषेचें फारसें ज्ञान नसेल तरी पण अक्षर ओळख असे पर्यंत त्या भाषेची संपत्ती केवढी मोठी आहे हें पाहण्यास फार लांब जावयास नको. पणजींतील नॅशनल लायब्ररी फार काय; casa luso francesa या पुस्तक विक्रिच्या दुकानांत जाऊन तेथील कॅटलाग न पेक्षां कपाटें पाहिली ह्मणजे थोडी तरी कल्पना होईल तेव्हां त्यांनीं याचा अवश्य अनुभव घ्यावा अशी नम्र सूचना आहे. व हें त्यांस सुलभही पण आहे,

५) हा लेख वराच लांबल्यानें, आतां वाचकांचा फार वेळ घेववत नाहीं. ह्मणून थोडक्यांत एवढेंच सांगावयाचें कीं, भोंसल्यांच्या लेखांतील एकंदर विधानें बेजबाबदारीनें केलेलीं असून ती सर्व शब्दशः खोडून काढावयाचीं झाल्यास भारताचे कित्येक कॉलम सर्वीं घालावे लागतील.

६) "लिसेवांतून बाहेर पडलेल्या असंख्य मुलांपैकीं कोणी देशसेवा केल्याचें दिसून येत नाहीं" असें ह्मणणें ह्मणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करणें होय. गोमांतकांत आजकाल चाललेल्या हरप्रकारच्या चळवळी लिसेवांतील मुलांच्या श्रमांचें फळ नव्हे काय? कां त्या इंग्रजी युनिवर्सिट्यांतील अभ्युदयांनीं चालविलेल्या आहेत? कदाचित् भोंसल्यांना वाटत असेल कीं हा सर्व ब्रिटिश हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रांचा परिणाम ह्मणून. पण हीं वृत्तपत्रें बहुतेक हिंदु समाज वाचित असतो. तेव्हां ख्रिश्चन समाजावर त्यांचा परिणाम होणें शक्य नाहीं. अर्थात त्या समाजाकडून झालेल्या चळवळी लिसेवांतील शिक्षणामुळें आहेत हें तरी सिद्ध होतें कीं नाहीं? आतां राहतां राहिला हिंदुसमाज. त्याची सर्व कर्तबगारी या वृत्तपत्रांकडे—त्यांच्या संपादकांकडे आणि हे बहुतेक मॅट्रिक्युलेट असतात ह्मणून पर्यायानें इंग्रजी शिक्षणाकडे नेणें ह्मणजे उगीच ओढाताण करणें होय. अशा द्राविडी प्राणायामापेक्षां लिसेवांत शिकविण्यांत येणाऱ्या इंग्रजी शिक्षणांचाच हा परिणाम आहे असें ह्मणणें सोपें नेलें असतें.

यावरून असें मात्र समजूं नये कीं, सदर वृत्तपत्रांपासून कांहींच फायदा झालेला नाहीं. इतर राष्ट्रांतील विशेषतः एकाच संस्कृतीच्या ब्रिटिश हिंदुस्थानांतील चळवळीशी संलग्न होण्यास वृत्तपत्रें पाहिजेतच आहेत मात्र त्यांचा उपयोग करून घेणें प्रत्येकाच्या बुद्धीवर अवलंबून आहे. तेव्हां बुद्धीचा विकास करून वृत्तपत्रें किंवा इतर ग्रंथ यांचें आकलन करण्याची शक्ति कें शिक्षण देतें तेंच शिक्षण–गोव्यांत पोर्तुगीज—जास्ती श्रेयस्कर होय. असो. लिसेवांत शिक्षण घेतलेल्या व येंप्रेगाद झालेल्यांच्या माथीं मारलेले दोष निराधार आहेत. वृद्ध मंडळीचा आदेउस, स्त्रियांच्या तोंडीं पोर्तुगीज शब्द वगैरेंचा कार्य कारण भाव लिसेवाकडे लावण्यापूर्वी इंग्रजीच्या प्रेमानें वेडेपिसे झालेल्यां भोंसल्यांनीं एक वेळ ब्रि. हिंदुस्थानांत जाऊन तेथील लोकांच्या चालीरीति भाषा वगैरे पाहून यावें अशी त्यांस नम्र सूचना आहे. ह्या आक्षेपांचा फोलपणा दाखविण्याचें कारण नाहीं. खुद्द भोंसल्यांची लेखक होण्याची धुंदी निघून गेल्यावर तो त्यांस दिसून येईल.

६) स्वाभिमानाची उबळ आलेल्या भोंसल्यानीं इतिहास शिक्षणावर हल्ला चढवून वास्को द गाम, आफोंस द आल्बुकेर्क वगैरे पोर्तुगीज वीरांस जमिनदोस्त करण्याचा आव आणला आहे. या वेळचें त्यांचें लिहिणें वगैरे सर्व कांहीं रागामीम देमाच्या धर्तीवर. शाबास भोंसले! आज चारशें वर्षांनंतर आमच्या वाडवडिलांनीं भोगलेल्या छळांचा सूड घेऊन तुह्मीं आह्मांला धन्य केलेंत!

ग्रोटडफ प्रभृति इंग्लीश इतिहास कारांनीं "पोर्तुगीज लोक वाईट आहेत" असें ह्मटलें ह्मणून त्यांचा इतिहास शिकणें वाईट—आणि स्वाभिमानशून्यतेचें आहे परंतु त्याच इतिहासज्ञांनीं 'चोर, लुटारू, बंडखोर,' ह्मटलेल्या श्री छत्रपतींचा इतिहास इं. युनिवर्सिट्यांतून शिकविला जातो त्याची खंती भोंसल्यानां नाहीं काय? भोंसल्यानीं एकदां इतिहासाचा पाठ घेऊन तो कां शिकावयाचे कायदे कोणते हें लक्षांत घ्यावें. आणि मग इतिहासावर व्याख्यान देण्यास पुढें यावें. हीच सूचना, त्यांचे सहकारी मित्र श्री. सांखवाळकर जे 'अरेरे' करून धांवत आले, त्यांस आहे.

शेवटीं बेजबाबदारीनें खोटीं विधानें करण्यापूर्वी त्याच्या योग्यायोग्यतेचा विचार करून लेख लिहिण्याची श्री. भोंसल्यांस विनंति केल्यास ते रागावतील काय!

स्पष्टवक्ता.

या वेताळाला गाडून टाका

लिसेवांतील विद्यार्थ्यांनों। गरम रक्ताच्या तरुणानों ॥
देशाचा रस्तभानों। सावधान ॥ १ ॥
आरंभशूरत्वाचा वेताळ त्रास। ग्रासतो तुह्मां दिवसेंदिवस ॥
गाडोनि टाका जमिनींत त्यास। विलंबाविण ॥ २ ॥
नाहींतर वृद्धि पावोन अती। तुमच्या गुणाची करोन माती ॥
करंटी देईल तुमच्या हातीं। नारळाची ॥ ३ ॥
जेव्हां तेव्हां कसा ग्रासतो। वेताळ तो, हें स्पष्ट करतों ॥
आठवा एकच शब्द तो। 'गांधी टोपी' ॥ ४ ॥
" कुठें आहे गांधी टोपी। नको दुसरी कसलीच टोपी ॥
कुठला सांगा विकतो शिंपी। सांगा हो सांगा ॥ ५ ॥ "
" जरी दुसरें शिरोभूषण। यापुढें लिसेवांत वापरीन ॥
देईन कापून माझा कान। निश्चित हें ॥ ६ ॥ ,,
"राग प्रोफेसरांचा होवो। मार्क कितीही झेर देवो ॥
वर्षें कितीही फुकट जावो। परी निश्चय कायम ॥ ७ ॥ ,,
" देशास्तव करी सर्वत्याग। गांधी, ज्याही वंदी जग ॥
त्याही ऐशा महात्म्यास मग। कां न वंदू? ॥ ८ ॥ ,,
"सहानुभूति गांधी कार्यी। दर्शविणार आम्ही निश्चयें ॥
तीळही ढळणार नाहीं। त्या करीच्या पासून ॥ ९ ॥ ,,
" या भाग्यें किरू पाद्रींनें। त्या धर्मवेड्या दर्शवणें ॥
इतरांनींही अपमानें। कां असा दुखवावें? ॥ १० ॥ ,,
" असे समज सर्वत्र। हिंदू विद्यार्थी मेषपात्र ॥
सहनशील तीळमात्र। गर्दभाहुनी न कमी ॥ ११ ॥ ,,
" परी आला आतां प्रसंग। राहिलों आहों बांधोनि चंग ॥
न साहतो मानभंग। दाविणार हें ॥ १२ ॥ ,,
" मी गांधी टोपी घालणार। न यवन गुरूनां जुमानणार ॥
त्यांकडुन झुलूम न साहणार। आर्य आहें मी ॥ १३ ॥ ,,
" उद्योगावीण जेथ तेथ। माझे देशबंधू मरतात ॥
अन्नावीण हालांत। हाय हाय!! ॥ १४ ॥ ,,
" जरी खादी वस्त्रें वापरीन। विणणें, कांतणें काम मिळून ॥
तेच गरीब भाकरी खाऊन। दुवा मज देतील ॥ १५ ॥ ,,
" झक मारो हे गुरु यवन। खादीच यापुढें वापरीन ॥
सध्या टोपी तरी निदान। हाच माझा निश्चय ॥ १६ ॥ "
स्वाभिमानाच्या असल्या उक्ति। जिकडे तिकडे ऐकू येती ॥
गांधी भक्तीस उकळ्या येती। तीतच महिन्याभरी ॥ १७ ॥
तरुण मंडळीचा तो आवेश। पाहोन मरील होती खूष ॥
प्रोत्साहन, पाठिंबा त्यास। शक्य तो देती ॥ १८ ॥
कांहीं वदती विचारी जन। पडलें हो गोमांतकीं येऊन ॥
स्वदेशीचें बीज; रुजून। होईल वृक्ष आतां ॥ १९ ॥
परी होते ते स्वप्नांत दंग। तीन दिवस तेरड्याचा रंग ॥
तरुणाचा होईल आवेश भंग। लवकरच; हें न जाणलें ॥ २० ॥
परी तरुण जे घेनीस सोकावले। खरे गुण अपले उघड झाले ॥
आठच दिवस जरी न लोटले। निर्लज्ज रीतीनें ॥ २१ ॥
हळूहळू एकेकटा। गांधी टोपी शृंगारितां ॥
जुनी परदेशी चढवितां। शरमला नाहीं ॥ २२ ॥
कांहीं तर विद्यार्थी पुढारी। जेच पूर्वी बडबडले भारी ॥
करिती कशी इतरांपरी। तेंच आश्चर्य ॥ ॥२३ ॥
संगळ्यावरी कालस चढवून। डोकीवर शापेउ ठेवून ॥
गांवठी साहेब बनून। लिसेवांत आली ॥ २४ ॥
अशी स्थिती होतां होतां। लिसेवांत चहूंकडे पहातां ॥
क्वचितच गांधी टोपी दिसतां। मन खिन्न होई ॥ २५ ॥
धि:कार तुह्मां वाचाळांनों। विचार–विकार–चल्वाजों ॥
लिसेवांतील विद्यार्थ्यांनो। धिक्कार तुह्मां ॥ २६ ॥
गांधी विषयीं सहानुभूति। कशी आटून गेली सुकिती ॥
जिला आली होती भरती। पूर्णपणें ॥ २७ ॥
निरुद्योगी बांधवांविषयीं। दया तुमची कोठें जाई ॥
खादी वस्त्र वापरणेंही। तयां साठीं ॥ २८ ॥
कोठें तुमचा स्वाभिमान। पळाला आतां दडी देऊन ॥
घतलेले वाग्बाण गुरूंकडून। विसरलां कां? ॥ २९ ॥
आरंभशूरपणाचा वेताळ। आहे या सर्व गोष्टींचें मूळ ॥
त्याचा विनाश करा समूळ। अतिवेगें ॥ ३० ॥
ना तरी कर्तृत्वशून्य बनून। वाचाळता क्रियेवीण ॥
करण्यांत आयुष्य संपूर्ण। जाईल तें ॥ ३१ ॥
सद्धेतूनें स्पष्ट केला। दोष; पण जरी ओंगळ आला ॥
शब्द उणा अधिक विषाद वाटला। ऐसें होऊं नये ॥ ३२ ॥
लिसेवांतील विद्यार्थ्यांनों!। नमस्कार आतां मित्रांनों ॥
ओळख 'विनायका'ची गड्यानों। ठेवा दरें ॥ ३३ ॥

विनायक

sem o manto diafano de fantasia, que faça entrar tudo nos seus devidos eixos. A tremenda questão Luso-Transvaliana cujas negociações fracassaram ao redor da qual tanta celeuma se levantou e tantos misterios se fizeram, temos esperança que é a sinfonia da abertura duma proxima bancarrota se é que ainda não começou. E temos tambem inteira certeza que a hora de retaliações está para breve. A maré sobe, não a maré de ideias e de oposição mas de envilecimento geral, de fome, de desespero, de miseria, e do odio sem freio. Estamos debaixo de verdadadeiras gargalheiras de ignominia.

Qualquèr mão que seja, que venha depressa, porque qualquer que ela seja ha de ser melhor do que essa ignobil porcaria que tudo infecta...

P. S. Depois de termos escrito estas linhas apareceu uma outra sinecura, a de Director Gerál da Instrução do Estado da India com um chorudo vencimento ... Soma e segue.

Voltaremos para esse assunto oportunamente.

Ramon de Queved

Patrimonio da classe

A terra, no seu ultimo nº 519 Jornal aliás de ideias e do cunho essencialmente moderno, dá cabida a uma carta eivada de preconceitos castistas dum ilustrado cavalheiro do Pondá.

Ilustrado não ha duvida, mas duma ilustração provavelmente tacanha, impregnada de odio à classe Hindú e seus jovens como claramente se deduz do seu proprio artigo em que tomando por preâmbulo uma correspondencia do Marcela para O Heraldo, o seu assanhado autor, generalisa, divaga a seu belo talante, teoricamente nas duas colunas e pico, com exposição de varios factos justificativos a seu modo de ver, em defesa da sua doutrina tam perigosa, sem pensar que desta feita vai semear o germen de subversão e indisciplina entre as duas classes que sempre foram amigas, dizendo que salvo excepções honrosas na classe (então não havia de dizer isto ao menos pela seriedade do jornal e que a classe hindu que o agradeça) acabando finalmente, por vomitar o seu esverdinhado fél dos seus figados pôdres.

E nesta ordem de ideias e como grande autoridade no assunpto, não poupa até de abocanhar o a quem? um jornal hindú, naturalmente da sua digna direcção, pois é o unico que com enormes sacrificios de toda a especie está incansávelmente trabalhando, lesto, para levantamento da classe a que honra de pertencer. E' porque defende os direitos que assistem aos jovens hindus, e que são postergados!

Pontifica ainda lá do alto do jornal que os hindus não são hostilizados pelos cristãos porque é certo, muito antes deles eram os proprios cristãos que reivindicaram direitos para eles.(Hindus)

Diz bem, falou como dogmas immutáveis. Pudera !

Ai está a prova flagrante do seu acerto o proprio cavalheiro. Não fossem eles seus irmãos cristãos tam generosos, tam liberaies tam ditivosos, desde 400 anos da sua dominação, esta maldita fauna, a classe hindu que hoje lhes faz cócegas, e que só péca pelo bom desejo de se progredir, trabalhando honéstamente e nutrindo apenas expectativas, des mais puras de se igualarem aos seus irmãos cristãos, o que tudo se lhes afiguram obsessões e exaltações (que inveja!); ter-se ia acabado, para eles os dominarem como lhes derem na gana.

A que não leva o odio castista!

O odio o mais abominavel é que é causa do retrocesso da nossa classe

Felizmente o pequeno levantar que se nota nestes ultimos tempos dos jovens indús se deve simplesmente aos portuguezes que apostam estas paragens ; não da laia do dito cavalheiro e não poucos cristãos entre os quaes se acham cavalheiros despidos de odios raciaes e que nos merecem toda a consideração.

O atrazo dos jovens indus na lingua portugueza de que tanto gaudio se for e dai a incompetencia para exercerem os logares a que se deve ser Director ?

Seria porque não são portuguezes descendentes dos portuguezes herdando-lhes até o patrimonio de conhecerem a fôa e portugueza, sem indianismos? desta parte deria aind milhormente alem do que disso no seu belo romance "Jacob e Dulce" se fosse dos vivos o celebrado Gip.)

Franco

श्रीदामोदर वा. मंदिर, मडगांव

श्रीसरस्वती-सेवकमंडळ या संस्थेचा सहावा श्रीसरस्वत्युत्सव श्रीदामोदर विद्याभुवनांत येत्या विजयादशमीपासून तीन दिवस पर्यंत (शनिवार ता. ३० स., रविवार १ अ., सोमवार २ अ. रोजीं) पुराण, प्रवचन, हरिकिर्तन इत्यादि योगे साजरा होणार असून ता. २ अक्टोबर रोजीं श्रीदामोदर वाचनमंदिराचा पांचवा वाढदिवस समारंभ, रिपोर्ट वाचन वगैरे होणार आहे. यंदा या ज्ञानदेवतेच्या उत्सवाचे व्याख्यानमालेसाठीं पुण्यामुंबईहून 'वें पुणतांबेकर प्रिन्सिपाल नॅ. कॉ., 'स्वराज्य', कर्ते श्रीयुत कृ. शि. परांजपे बी. ए. एल. बी., श्रीयुत प्रो. श्रीकृष्ण नि. चाफेकर बी. ए. एल. एल. बी इत्यादि विद्वान गृहस्थांनीं येण्याचें कबूल केलें आहे. या महाराष्ट्रीय मंडळीच्या ज्ञानाचा फायदा गोमांतकस्थ आबालवृद्ध जनतेनें अवश्य घेऊन स. स. मंडलास आभारांत ठेवावें आणि दोनही समारंभ अलंकृत करावे अशी सर्वांस नम्र विनंति आहे

वि. सू. — रात्रौ ७ वाजतां व्याख्यानें व १० वाजतां पुराण किर्तन वगैरे होईल.

कार्यालय : मडगांव श्रीदामोदर विद्याभुवन– ता. १५ - ९ - २२

सर्वांचे नम्र

जगन्नाथ रघुवीर पै फोंडेकर

नारायण गो. विर्जिनेकर

विश्वनाथ पां. घोडे

व्यंकटेश गो. विर्जिनकर

दामोदर श्री. ना. दलाल

यशवंत वि. पै रायतुरकर

भारत

गुरुवार भाद्रपद व० ३० शा १८४४

व्यवहारशून्यतेचे परिणाम

पोर्तुगाल किंवा त्याचे वसाहतींत दिवसें दिवस जो कर्जबाजारीपणा वृद्धिंगत होत आहे याचें खरें कारण कोणतें याचा उलगडा केल्यास राज्यकर्त्यांचे व्यवहारज्ञान शून्यतेलाच प्रमुखस्थान दिलें जाईल. पोर्तुगीज राष्ट्र हें ब्रिटिशासारखे व्यापारी देशांचें नसल्यामुळें औद्योगिक बाबतींत जितकी उदासीनता पोर्तुगालांत वावरते त्याचें दुप्पट ती त्याच्या वसाहतींत दृग्गोचर होत असल्यास नवल नाहीं.

आमच्या या इतिहास प्रसिद्ध गोवा प्रांतावर पोर्तुगीजांच्या अंमल सुरू झाल्यास चारशें अधिक वर्षे झालीं. इतक्या अवधींत धार्मिक अवडंबरापायीं जो पैशांचा चुराडा उडाला (त्यांत हिंदु देवालयाचा व इतर धनिकांचा जमिनजुमला जो इंक्विजीशनच्या वेळीं जप्त केला त्याचाही अंतर्भाव होतो) त्याची गणती केल्यास कोणाही विचारी व निःपक्षपाती व्यक्तीस सरकारच्या या अरेरावी धोरणाची कींवच करावीशी वाटेल. ब्रिटिश अधिकाऱ्याचें अशा वेडगळ प्रवृत्तीकडे सदैव दुर्लक्ष असल्यामुळें त्यांनीं आपल्या हद्दीपर्यंत ज्या सुधारणा केल्या आहेत त्याच्या शतांशानेंहि आमच्या सरकारनें दाहरांत केलेल्या नाहींत.

वरील रकमेचा एक चतुर्थांश औद्योगिक बाबतीकडे विनियोग करण्याची सरकारनें तजवीज केली असती तर आज गोव्यांत सदर बाबतींत दिसून येणारी निकृष्टावस्था खास दिसली नसती. याच कारणामुळें पोर्तुगीज राज्यकर्त्यांचें हें व्यावहारीक अज्ञान नष्ट झाल्याशिवाय गोव्यांत कलाकौशल्यास थारा मिळेल असें वाटत नाहीं. याच विचारसरणीस अनुसरून जर कोणीहि "पोर्तुगीजांचा अंमल असेपर्यंत गोव्यांत कोणत्याच तऱ्हेचे कारखाने व. गर उपयुक्त औद्योगिक संस्था स्थापन होणें कठीण" असें भाकीत केल्यास तें अस्थानीं होणार नाही.

इकडील श्रीमंत लोकांची असावी तितकी औद्योगिक कारखान्याचे बाबीकडे प्रवृत्ती नाहीं, त्यांतून सरकारच्या प्रोत्साहनाभावींही ते पुढें येत नाहींत, हें जितकें खरें तितकेंच पोर्तुगीज सरकारच्या प्रसिद्ध लहरी सामर्थ्यास आपलें भांडवल बळी पडेल या भितीनें ब्रिटिश हिंदुस्थानांतील लक्ष्मीपुत्रहि या प्रांतांत कोणतीहि औद्योगिक संस्था स्थापन करण्यास पुढाकार घेत नाहींत, हेंहि तितकेंच सत्य आहे.

आमचें सरकार एखादी कापडाची गिरणी उभारण्यास सद्यःस्थितींत भांडवलाचे अभावीं तिकडे दुर्लक्ष करतें असांतला भाग नाहीं नवीन नवीन कर प्रस्थापित करून त्याचे मिषानें हजारों रुपये जमा करण्याची कल्पक शक्ति असलेली मढ डोक्याची नोकरशाही जर कुठें विराजित असेल तर पोर्तुगीज दरबारांतच !

शहर सुधारणारें मंडळ comissão de milhoramentos या संस्थेचें एक खातें अस्तित्वांत आल्यास आज दोन वर्षे होत आलीं, त्यांचे पायीं हजारों रुपये दरमहा गरीब प्रजेकडून वसूल केले जातात पर त्याचा विनियोग शहर सुधारण्याचे एकाकडे न होतां मोठमोठ्या टिपार्टि, नाचतमाशे व अनियमित व अव्यवस्थित मोटारसर्विस, या वांचून दुसऱ्या कोणत्याहि उपयुक्त कार्याकडे होत नाहीं, किंबहुना तसा तो करूं न देण्याबद्दल विचारी पुढारी सरकारास भाग पाडीत नाहींत, हें प्रजेचें दुर्दैव होय.

या एकाच खात्याचा निधि एखादी औद्योगिक संस्था अगर कापडाची गिरणी उभारण्यासाठीं मुकर झाला असता तर पांच वर्षांच्या आंतच एक मोठी 'मील' अस्तित्वांत आली असती. पण इकडे कुणाचेंहि लक्ष्य जात नाहीं. किंवा उभयपक्षीं जाणून बुजून दुर्लक्ष करितात. याचें एक कारण वरील खात्याचे छदराखालीं नोकरशाहीस जो धुडगूस घालण्यास किंवा चैन उपभोगण्यास जी संधी मिळते ती अन्य तऱ्हेनें मिळण्याचा संभव नाहीं.

अशीं अनेक उदाहरणें दाखवितां येतील कीं, एका गव्हर्नराचे कारकिर्दीत सांडपाण्याच्या मोईसाठीं जो एकेक 'प्रोजेक्त' मुक्रर झाला तो दुसऱ्या गव्हर्नराचे आगमनानें गुलदस्तांत पडून रहावा. जणूं काय मावळलेल्या गव्हर्नरांस कोणतेंच ज्ञान नव्हतें ! मात्र त्या साठीं सरकारला कागद व छापणावळीचा खर्च, सरकारी गजेटवर त्याची प्रसिद्धी करणें, कमिट्यांच्या नेमणुका व वृत्तपत्रांतून याबद्दल 'शाबासकीचा वर्षाव' इतक्या गोष्टी मात्र बिनचूक व्हावयाच्या !

मोठ्या आगबोटी बांधून त्याची गोव्याहून आफ्रीका, पोर्तुगाल इत्यादि ठिकाणीं डायरेक्टर येण्याजाण्याची दर्यावर्दी संस्था स्थापन करणें हा त्या प्रोजेक्तांपैकी एक होय. ज्या साहेबांनीं ही कल्पना काढली त्यास मिळावें तसें सरकारकडून प्रोत्साहन मिळालें नाहीं किंवा त्या साहेबाचे अंगीं चिकाटीचा अभाव होता म्हणून ही अत्युपयोगी व्यवस्था कुठल्याकुठें नाहींशी झाली. आजच्या सारख्या महागाईच्या वेळीं ही कंपनी अस्तित्वांत असती तर आज बराच मोठा फायदा व प्रजेची सोय झाली असती पण याला राज्यकर्त्यांची व्यवहारज्ञानशून्यताच आडवी आली असें कष्टानें म्हणणें भाग आहे.

बोरीच्या व इतर ठिकाणच्या पुलाचीहि कामें अर्धवटच राहिलीं आहेत, यालासुद्धां वरील एकच कारण नडलें. बांगें येथील पूल तो काय, तो आज पांच सहा वर्षे तयार व्हावयास घातला आहे, तरी होत नाहीं, इतकी ज्या नोकरशाहीत काम करून घेण्याची तत्परता (!) तिच्या हातून कोणतें सत्कृत्य होणार, हें दिसतेंच आहे याकरितांच गोव्यांत "पोर्तुगीज व्यापार" म्हणजे 'अव्यवस्थित धंदा " अशी म्हण रूढ होऊं पहात आहे.

अगदीं शेवटीं Navegação fluvial स्थानिक लहान बोटी [बाफोर]चा व्यवहार सरकारनें 'आक्शावें' विकून जी रक्कम आली त्यांतून बोटींची खरेदी करून आपल्या तंत्रानें सुरू केला. वास्तविक पाहू गेल्यास या धंद्यांत वर्षाची बराच नफा होत असतांनाहि त्याला लागणाऱ्या जळाऊ लाकूड किंवा कोळसा इत्यादि सामानाचा पुरवठाहि आमच्या हुशार नोकरशाहीकडून होऊं नये या सारखी लाजीरवाणी दुसरी गोष्ट असूं शकणार नाहीं. संबंध जंगलांत

…ल्यास त्यांची त्यासच चूक दिसून येईल. पण हें सांगण्यास आमचा हेतु, नोकरी हें शिक्षणाचें ध्येय आहे असें सिद्ध करण्याचा नाहीं. उलट प्रत्येक विद्यार्थी मोठमोठ्या आकांक्षा बाळगून शिक्षण घेत असतो. पुढें निरुपायास्तव त्याला नोकरीचा मार्ग स्वीकारावा लागला म्हणून त्याचें तें ध्येय होत नाहीं. आणि 'सरकारी नोकर' असलेल्या भोंसल्यांनीं "सुशिक्षित मंडळींनें यैंप्रेगाद (नोकर) होणें यासारखी दुर्दैवाची व घातक गोष्ट दुसरी नाहीं." म्हणून सिद्धांत ठोकून देणें त्यांच्याच सुशिक्षितपणाला, बाधक आहे. "सरकारी नोकरी पत्करून, त्यांच्या सेवा झाल्यामुळें सरकार विरुद्ध कोणतीही लोककल्याणाची गोष्ट करणें शक्य नसतें." हें विधान एवढ्यांतच गोव्यांस लावण्याचें कारण नाहीं. कारण सरकार विरुद्ध नसलेले लोककल्याणाचे मार्ग पुष्कळ आहेत. कदाचित् सरकारपाशीं भांडण्याचा प्रसंग आल्यास देखील त्यांना चिरडून टाकण्या इतकी कांहीं दडपशाही येथें माजलेली नाहीं. उलट लोकांच्या आकांक्षांस मूर्त स्वरूप येऊन त्यांच्या मागण्यांच्या अडचणी स्पष्टपणें कळाव्या म्हणून तर "प्रोव्हिन्शीयल कांग्रेस सारख्या संस्थेची इमारती सरकारच्याच प्रेरणेनें केली गेली आहे. गुरुवर्य भांडारकर, न्या. रानडे, न्या. तेलंग प्रभृतींनीं जी देशसेवा केली ती सरकारी नोकरी करूनच. यावरून एवढें निष्पन्न होईल कीं, पोर्तुगीज शिक्षणाच्यानें ध्येय इंग्रजी शिक्षणा प्रमाणेंच नोकरीचें नसतें. निरुपायास्तव नोकरीची वेळी पायांत पडली तरी देखील समाजसेवा देशसेवा करण्यास कांहीं त्यांचे हात जखडलेले नसतात. विशेषतः गोमांतकांत तरी ह्या गोष्टी एवढ्या थरावर पोंचलेल्या नाहींत. अंतःकरणाची तळमळ मात्र पाहिजे.

भाषा हें एक अर्थवाहक साधन असल्यानें, जगांत पसरलेलें ज्ञान कोणत्याही विशेषतः युरोपियन—भाषेंतून घेता येण्यासारखें आहे. याकरितां इंग्रजीच शिकलें पाहिजे किंवा इंग्रजी युनिवर्सिट्यांतूनच बाहेर पडलें पाहिजे असें नाहीं.

म. गांधी लोकमान्य टिळक, वगैरे पूज्यविभूतींनी जी राष्ट्रसेवा केली ती केवळ इंग्रजी भाषाभिज्ञतेमुळें नव्हे तर त्यावर भाषांतून संपादिलेल्या ज्ञानामुळें होय. केवळ शिक्षण किंवा बुद्धि अंगीं असल्यानेंच अशा विभूति होतां येत नाहीं. त्यासाठीं अंतःकरणाची तळमळ, निस्वार्थपणा, वगैरे विशिष्ट गुण अंगांत असावे लागतात व ह्या सर्वांचा विकास होण्यास देखील एका विशिष्ट—राजकीय सामाजिक—परिस्थितीची जरूरी असते. हें ब्रिटिश इंडियेंतील चळवळी व त्यांचे जनक यांचा इतिहास लक्षांत घेतां सहज दिसून येईल. उदाहरणार्थ न्या. रानडे तेलंग, लो. टिळक, गोखले, मेथा यांच्या तोडीचे विद्वान- किंबहुना भोंसल्यांच्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास, युनिवर्सिटींतून ज्यास्ती पदव्या घेऊन बाहेर पडलेले-—कमी आहेत असें नाहीं. पण त्यांनीं ठेवलेल्या जागा रिकाम्या त्या रिकाम्याच. तीच गोष्ट म. गांधी, लजपतराय वगैरे मंडळींच्या रिकाम्या झालेल्या जागांची. तेव्हां लो. टिळक वगैरेंच शिक्षण जर पणजीच्या लिसेवांत झालें असतें तर त्यांची बुद्धिमत्ता नष्ट न होतां येथेंहि जर ब्रि. इंडियेंतील परिस्थिति असती तर-त्याच जोमानें व्यक्त झाली असती. कारण म्हटलेंच आहे— मनुष्य हा परिस्थितीचा पुतळा आहे-— याबद्दल भोंसल्यांनीं साशंक होण्याचें कारण नाहीं.

३) मराठी भाषेचे शिवराय, कै. चिपळुणकर, मि. आगरकर, लो. टिळक, केळकर, खाडीलकर, गडकरी आणि इतर वाङ्मयोपासक यांनीं जी मराठी भाषेची सेवा केली ती त्यांचें स्वतःचें ज्ञान, आणि बुद्धि यांची कर्तबगारी होय. फक्त त्यांस इंग्रजी भाषा येत होती किंवा ते युनिवर्सिट्यांतून बाहेर पडलेले होते म्हणून त्यांस मराठी भाषा उत्तम प्रकारें लिहितां येऊन तीची सेवा करतां आली असें म्हणणें चुकीचें आहे. कारण जर ही गोष्ट खरी असती तर ग्रज्युएट तेवढा उत्तम वाङ्मयोपासक ठरला असता. त्यांनीं जी मोठ्या महत्वाची कामगिरी केली ती आपल्या ज्ञानाची-मग त्या कोणत्याहि भाषेंतून कां प्राप्त झालेलें असेना—भर मराठींत घालून तिचें वाङ्मय समृद्ध केलें ही होय. अर्थांत हा कांहीं एका इंग्रजी भाषेचा परिणाम नाहीं. जें इंग्लिश भाषेला शक्य आहे तें पोर्तुगीज भाषेला अशक्य नाहीं. मात्र गोमांतक ज्या परिस्थितींत आहे त्यांत बदल झाल्याशिवाय मराठीची प्रगति येथें होणें शक्य नाहीं. विशेषतः येथील लोकांची भाषा ऐतिहासिक दृष्ट्या मातृभाषा मराठी असली तरीं घरीं दारीं कोंकणी भाषेचाच प्रचार असल्यानें व मराठीच्या पद्धतशीर शिक्षणाच्या अभावामुळें आमच्यांत उत्तम मराठी लेखक फार कमी आहेत. आणि त्याचा दोष पोर्तुगीज भाषेवर लादणें कधींहि योग्य होणार नाहीं. कै. चिपळुणकर यांनीं जी इंग्रजी भाषेची महती गाइली ती एका विशिष्ट हेतूनेंच होय. हें विसरून चालावयाचें नाहीं. तो काल असा होता कीं महाराष्ट्रांत नुकतेंच इंग्रजी संपादन केलेल्या कांहीं व्यक्तींनीं मराठी भाषेची शब्द समृद्धि कमी आहे असें म्हणून तिची अवहेलना करण्यास सुरवात केली होती. आणि एखादा लेख किंवा ग्रंथ मराठींत लिहावयाचा झाल्यास प्रत्येक वाक्यांत दोन चार इंग्रजी शब्द घुसडून द्यावे व वाक्यरचना देखील इंग्रजीच्या धर्तीवर करावयाची. अशा कालाला अनुसरून त्यांनीं लिहिलेल्या लेखांचा एवढाच उद्देश होता कीं 'मराठींत कांहीं अर्थवाहक शब्द कमी असले तरि संस्कृत भाषेच्या मदतीनें पाहिजे तितके शब्द तयार करतां येतील. याखातीं इंग्रजींच्या तोंडाकडे पाहण्याचा महाराष्ट्रीयानां प्रसंग नाहीं मात्र याचा अर्थ असा नाहीं कीं इंग्रजी भाषेची जरूरी नाहीं. उलट पक्षी त्या भाषेचें ग्रंथ भांडार फार मोठें असून, त्यांतील कल्पना विचार जर आम्ही मराठींत आणूं तर त्याच्या सारखी उत्तम गोष्ट दुसरी नाहीं. व ह्याच दृष्टीनें त्यांनीं इंग्रजी भाषेला वाघिणीच्या दुधाची उपमा दिली आहे. आणि हें रा. भोंसल्यानीं आपल्या मुद्द्याच्या समर्थनार्थ दिलेल्या अवतरणावरूनहि सिद्ध होतें. पण त्यांचा अर्थ न समजतां फक्त शब्दाला शब्द जोडून चिपळुणकरांच्या नांवावर लोकांस चकीत करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें.

(येत्या अंकीं संपूर्ण)

एक हृदयस्थ

ANUNCIOS

जाहीर लिलांव

लक्ष द्या !

अशी संधि पुन्हां येणार नाहीं

पणजी येथील मयत गोकुळदास माधवजी शेट गुजर यांच्या पेढीवरील माल तारीख २९ आगष्ट १९२२ रोजीं जाहीर लिलांवनें विकण्याचें ठरलें होतें, परंतु बाजार भाव उतरल्यावरून लिलांव पूरा झाला नाहीं, म्हणून मालाचें दर पूर्वीच्या दरांतून १।५ कमी केले असून तहकूब ठेवलेला लिलांव चालू महिन्यांच्या २६ तारखेस दुपारीं २ वाजतां सदरहू गोकुळदास शेट यांच्या पेढीवर पुकारला जाऊन योग्य किंमत वाढविणाऱ्यांचे नांवें पूरा केला जाईल. सवलतीनें माल घेण्यास मिळावा म्हणून एकंदर मालाने ४५ लॉट केले असून त्याची खुलासेवार माहिती १८।८।२२ च्या Boletim Oficial नंबर ६६ च्या ७६७ पानावर पहावी.

मालाची जात व दागिनें		लिलांवाच्यावेळीं पुकारण्यांत येणारा दर
६	गोण तांदूळ सींगापूर	१४-०६-०६
१०	,, ,, युरोप	१३-१५-०३
१६	,, ,, बुटको	१३-०३-०३
३५	,, ,, मीलसुगंधी	१४-१२-१०
६३	,, ,, ल्हान मील लॉट २	१२-१२-१०
२०	,, हरभरे	१२-०६-०३
२५	,, हरभरे उंची	१४-११-१०
२०	,, वटाणे सफेत	१०-०६-०६
१४	,, वटाणे हिरवे	१२-०६-०६
१४	,, लवंगांची दाळ	१०-००-००
३०	,, गोण तुरदाळ	१४-००-००
६	,, आवरे	८-००-००
३१	,, मूग	१२-००-००
३०	,, गहूं	१५-००-००
३७	,, सवाद	१०-००-००
११	,, पीठ घोडा छाप	२१-०६-०६
२०	,, पीठ फुल छाप	२१-०१-०३
५	,, रुलांव	२१-०३-०३
१	डबा खोबरेल	११-०३-०३

२	पाठ कथील रत्तलची दर	१-०४-००
२८१	मुढी मंगळूरी तांदूळ. लॉट ५	७-०१-०३
१२१	पत्रे तांबें. लॉट ६. रत्तलची दर	०-१०-००
११७४	तोळे चांदी. लॉट ३. तोळ्याची दर	०-१२-१०
३८०	गोण.खालीबारदार शेंकडा	२०-०-०
१००	गोण तांदूळ करांची.लॉट ४.	१७-०-०
७३	पत्रे तांबें. लॉट ५. रत्तरची दर	०-९-८

1

PAGODE DE SRI SANTERI DE XELDEM

Em 27 do corrente mez pelas 10 horas irão a praça as avenças da receita do sobredito Pagode no local das suas sessões. Os que quizerem arrematal-as compareçam com fiança idonia.

Aos 7 de Setembro de 1922.

O escrivão de meza

Utoma Pandurenga Senay Odorcar 2

COMUNIDADE DE CACORA 3

Irão de novo á praça as restantes avenças de receita e despeza com diminuição e augmento deliberado por junta administrativa no dia 23 do corrente pelas 10 horas no lugar das suas sessões.

Aos 7 de Setembro de 1922

O escrivão da comunidade

Utoma P. Senay Odorcar

COMUNIDADE DE COTOMBI 4

Com diminuição e augmento votada pela junta administratina vão a praça as restantes avenças de receita e despeza da Comunidade de Cotombro pelas 5 horas do dia 19 de corrente no local das suas sessoes.

Aos 7 de Setemb de 1922

O escrivão da comunidade encarregado.

Utoma P. Sendy Vodorcar

Mogal, inimigo de Shahaji e não por este, segundo o sr. Fragoso insinua com muita astucia na pagina 26 da sua obra Tambem notamos que o sr. Fragoso, em abono de sua *investigação* está muito empenhado em ocultar aos seus leitores o logar do nascimento de Sivaji, apezar de todas as obras por ele citadas serem muito explicitas neste assunto.

Mas estes exemplos que escolhi são pouco condenaveis em relação aos que abundam na *obra* do sr. Fragoso Todavia, não são insuficientes para provar que quem é capaz de fazer manipulações desta natureza não pode nem deve ser atirado ao ar como um simples tolo.

Pouco me importa porem que seja tolo ou não o primoroso pae daquela engenhosa investigação. Mas, o que é certo que ninguem poderá nem deverá negar o facto do ilustre autor ser muito galánte de modo a incumbir-se de fazer aquela tão laboriosa quão curiosa investigação historica com o fim de elevar a Jizabai, consorte regia de Shahaji Raja á alta e dignificada categoria de uma concubina dum pacló, conseguindo assim arrancal-a duma situação acanhada e opressiva duma rainha hindu, e a lançal-a na posição desafogada e livre duma prostituta.

O erudito Colosso de Oxel, incumbindo-se dessa gloriosissima missão e dando á luz a grandiosissima obra, sem duvida, prestou relevantes serviços á nobre e simpatia causa do adulterio e prostituição clandestina!

गोमांतकांतील हिंदु समाजांत चैतन्य नाहीं व त्यामुळें त्या समाजाचा एक सारखा ऱ्हांस होत आहे हें पुन्हां पुन्हां उघडकीस आलेलें आहे. गोव्यांतील एकंदर लोकसंखेपैकीं अर्धे लोक जे बाटे किरिस्तांव, त्या किरिस्तांवांच्या अत्यंत तिरस्करणीय अशा चेष्टांनीं तर वरील समाजाला पुन्हां पुन्हां दुःखें भोगावीं लागत आहेत. युरोपियन लोक नर्तन प्रसंगीं जर नुसते पायच वर करून नाचतात, तर तोच नाच मोठमोठ्या उड्या मारून शोभविण्याची ह्या बाट्या लोकांची नेहमी तयारी असल्यामुळें व आणखींही कित्येक अन्य कारणामुळें सरकारांत या लोकांचें मोठें वजन आहे. उलट हिंदुसमाज पडला मुखदुर्बळ व 'काले माटकां, सप्ता व शिमगे' या मध्यें मग्न थोडेसे सुशिक्षित जे हिंदुलोक आहेत तेही या बाट्यांची व गोऱ्यांची मर्जी आपणावर होऊन ते आपणाला 'आदेउश् सिंयोर बाबकॉरा, उसे यँ उं इंदु इंलुस्त्राद' असें केव्हां म्हणतील व हें ऐकल्यावर आपण कसें नटणें मुरडणें करूं या विवंचनेंत नेहमीं असावयाचे. या सर्व कारणामुळें हिंदुलोकांच्या बऱ्या वाईटाचा मक्ता वरील बाट्यांच्या हातांत गेल्या सारखा झाला आहे.

अद्भूत चमत्कारांच्या पोरकट थापा अश हिंदूना मारून त्यांना बाटवून टाकलेला व त्याच हिंदूंच्या देशांत साधुपणा मिरविणारा जो सां फ्रांसिस्कु शाव्हियेर त्या सां. (!) फ्रांसिस्कूच्या कलेवराचें प्रदर्शन जगाच्या कल्याणार्थ (गोव्यांत बाटे लोक म्हणजे जग हें नेहमी ठरलेलेंच आहे) येथील कृष्णकृत्या कृष्णवर्ण पाद्रयांच्या अत्याग्रहाला मान देण्यांकरितां उघडण्याचें आमच्या या नमूनेदार सरकारनें ठरविलें आहे. आणि एतत्संबंधींचा सर्व भरिभार त्या सरकारनें नुकतेंच भाग व डाकादूर काब्राल यांचे फेस्त केलेल्या पणजीच्या तऱ्हेवाईक काम्रावर टाकलेला आहे.

आतां या जबाबदारींतून पार पडण्याकरितां त्या पणजीच्या काम्राला साठ हजार रुपये पाहिजे आहेत. हे साठ हजार रुपये कसे गोळा करावे याचा विचार करण्याकरितां सदरहू काम्रानें पणजीच्या ४० बड्या भाडकारांना बोलाविलें आणि या बड्या भाडकारांपैकीं सर्वांत बडा भाडकार व escola medica मधील बिचारे विद्यार्थी आकांत करतात त्या आकांताला जर महत्व दिलें तर 'जगांतलॉ मॉटॉ मॉटॉ मॉट्टॉ सुजॉव' जो मिगेल कैतान त्या मिगेल कैतांनानें काम्राला अशी सूचना केली:—"सां फ्रांसिस्काचें फेस्त म्हणजे राष्ट्रीय फॅस्त. हें फॅस्त सर्व गोव्यांतील लोकांचें; तें फेस्त निघडलें तर गोव्यांतील सर्व लोकांची अब्रू फस्त होऊन जाईल. ह्या करितां ह्या फॅस्ताला खर्च होणारे ६० साठ हजार रुपये नुसत्या पणजीच्याच डोक्यावर न लादतां, आईच्या, आजीच्या, पणजींच्या व खापर पणजींच्यांहि म्हणजे गोव्यांतील सर्व कॉंसेल्यांतील लोकांच्या डोक्यावर लादावे."

म्हणे ही सूचना ऐकतांच सर्व भाडकारांच्या 'आनंन्दोर्मि हेलावल्या'. अशी स्थिति होवून हीच सूचना बरोबर आहे, बरोबर आहे अशा त्यांनीं आरोळ्या टोकल्या व काम्रालाही त्या आरोळ्या पसंत पडून तशा अर्थाचा ठरावही पास करण्यांत आला. आणि सर्व गोव्यावर कर लादण्यांचा वरील मध्यमपदलोपी, बहुव्रीही व अव्ययीभाव भाडकारांच्या ह्या सूचना आप्रोव्हार करण्याकरितां गोवेर्नादोराकडे पाठविण्याचें काम्रानें ठरविलें.

आतां पहिला प्रश्न असा आहे कीं, गोव्यांतील लोकसंखेपैकीं अर्धेलोक हिंदू असतां ह्या सां [!] फ्रांसिकाच्या हाडांकरितां सर्व गोव्यावर कर काय म्हणून? हिंदू लोकांना हे बाटे लोक मूढ समजतात कीं काय?

परंतु बाट्यांचाच येथें अन्याय करणें चुकीचें आहे. तोंडावर लाथाही मारल्या तरी हिंदु लोकांना त्या पसंत असल्याचाच हा परिणाम होय. नपेक्षां वरील ४० भाडकारांमध्यें कांहीं हिंदू होते व काम्रांतही दोघे हिंदू गृहस्थ आहेत. त्यापैकीं एकानेंही याबद्दल शब्द काढल्याचें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेलें नाहीं. अशा लोकांनीं थोडा तरी स्वाभिमान दाखविणें जरूर आहे आणि तो दाखविलाही असावा असेंच गृहित धरून आम्हीं चालतों. पण तसें केलें नसेल तर मात्र स्वाभिमान शून्यतेचा व समाजद्रोहाचा दोष त्यांजवर लादणें भाग होईल.

ज्या सां फ्रांस्कानें हिंदुस्थानांत येऊन असंख्य हिंदूंना बाटवून त्यांचा सर्वतोपरी नाश केला व या आमच्या देशाची स्थिति अतिशय भ्रष्ट व घाणेरडी करून टाकिली त्या सां फ्रांस्काच्या फेस्ताला पैसे देण्याचा

भारत.

गुरुवार श्रावण व० १० मी १८४४

जुन्या शवांचें नवें प्रदर्शन

येत्या डिसेंबर महिन्यांत जुन्या गोव्यांत एका जुन्या खिस्ती देवळांत स्वर्गीय शांततेचा आस्वाद घेत असलेल्या एका जुन्या संताचें जुनें शव उघडण्यांचा नवा समारंभ होणार असून तन्निमित्त गोमांतकाबाहेरील क्यार्थोलिक पंथाच्या लोकांचे थव्याचे थवे आमच्या प्रांतांत लोटणार आहेत. या असंख्य पाहुण्याची बडदास्त योग्य रितीनें राखिली जाऊन आमच्या देशासंबंधीं त्यांच्या मनावर चांगला परिणाम व्हावा, या शुद्ध हेतूनें कांहीं महत्वाच्या सुधारणा पणजी व जुनें गोवें या दोन्ही ठिकाणीं अमलांत आणण्याचा पणजी-मुन्सिपालटीनें बेत केला आहे व याचसाठीं कर वाढविण्याचा तिचा विचार ठरलेला आहे, हें गेल्या अंकावरून आमच्या वाचकांस कळलेलेंच आहे. उपरिनिर्दिष्ट करवृद्धीच्या समर्थनासाठीं जीं अनेक कारणें पुढें केलीं जातात, त्यापैकीं एक मुख्य असें आहे कीं, सां. फ्रांसिस्काच्या शवाचें प्रदर्शन हें एक 'राष्ट्रीय' कार्य असल्यानें त्याचा योग्य मान राखण्याप्रीत्यर्थ शक्य तो स्वार्थत्याग करणें हें प्रत्येक नागरिकाचें पवित्रतम कर्तव्य होय. हा कोटिक्रम 'येन केन प्रकारेण' पैसा उकळण्याच्या दृष्टीनें सोयीचा असला, तरी राजकीय दृष्ट्या न्यायास धरून नाहीं हें, आमचें सरकार धर्माच्या बाबतींत तटस्थ असल्यानें, उघड उघड सिद्ध होतें. केवळ खिस्ती समाजास लागू होणारें प्रस्तुत प्रदर्शन हें 'राष्ट्रीय' मानण्यांत येतें तर आमच्या हिंदूची कोणतीहि जत्रा राष्ट्रीय ठरविण्यास वरील कोटिक्रम लढविणारी विद्वान व प्रतिष्ठित मंडळी तयार आहे काय? तसें असल्यास आमचें त्या कोटीक्रमासंबंधीं कसलाच वाद नाहीं. परंतु वस्तुस्थिति निराळीच आहे. व म्हणून आमचें असें म्हणणें आहे कीं, करवाढीच्या कक्षेंत केवळ सां. फ्रांसिस्काच्या शवाचें दर्शन घेणाऱ्याच लोकांचा समावेश व्हावा. दुसऱ्यांना त्याचा उपसर्ग पोंचू नये अशी कसलीहि तोड काढणें योग्य आहे, हें कोणीहि कबूल करील.

जे कोणी त्या शवाचें दर्शन घेण्यास इच्छितील त्यांच्याच डोक्यावर नवीन

नीचपणा करण्यास, हिंदु लोकांनो, तुम्ही तयार आहां काय? अत्यंत पवित्र अशा सनातन हिंदुधर्माबद्दल थोडा तरी अभिमान जर तुमच्या मध्यें वास करीत असेल व स्वाभिमान तुम्हाला कायमचा सोडून गेला नसेल तर वरील सां फ्रांस्काचा कर डोक्यावर पडण्याचा संभव दिसतांच त्याबद्दल जोरानें प्रतिकार करा. आणि आमच्या देशबंधूंस बाटवून स्वाभिमानशून्य करून आर्यधर्माचा नाश करणाऱ्या त्या सां फ्रांसिस्काच्या कादंबऱ्या हातभार लावण्याचा नीचपणा करूं नका.

एन्. आर. बी.

एक उतारा

जयनाम संवत्सर शके १८१६ मध्यें कैवल्य मठाधीश परमपूज्य गुरुवर्य बृह्मीभूत श्रीमत्परमहंस श्रीमदात्मानंद सरस्वती गौडपादाचार्य स्वामी महाराज कोंकणपट्टींत संचारार्थ निघाले असताना श्रींनीं शिष्यजनास धर्मश्रद्धेचा सदुपदेश केला होता, त्यांतील तात्पर्य कोणी धर्मपरायण शैव सारस्वत बंधूनें त्यावेळीं गोमंतकांत प्रसिद्ध केलें होतें, त्यांतील थोडासा उतारा आज द्यावासा वाटला

धर्म ह्मणजे " परमेश्वरानें लावून दिलेलें कर्तव्य " असें सांगून पुढें ह्मणतात.

" जो कोणीं धर्म मानीत नाहीं, त्याला खावें, प्यावें, मौज करावी, ह्याच्यापलीकडे कांहीं सुचत नाहीं. त्याला दुसऱ्याच्या सुखाची पर्वा नसते. आपल्या कल्पीत सुखासाठीं दुसऱ्याचा सर्वस्वी नाश करण्यासहि तो मागें पुढें पहात नाहीं. कारण त्याला त्या कृत्यांमध्यें अन्यायच वाटत नाहीं. परंतु हें सर्व कोठवर ? तर खुद्द त्यावर संकट आलें नाहीं तोंवर ! दुसरे कोणी त्यास त्रास देऊं लागले कीं, त्यांना शास्त्र सांगूं लागतो, आणि तो त्या वेळेपुरता आत्र बुद्धीवर येतो. तरी वेळ गेली कीं पुनः कांहीं नाहीं."

" पण जो धर्मनिष्ट आहे त्याचा प्रकार पहा. खाणें, पिणें, वागणें, उद्योग, व्यापार, इत्यादि प्रत्येक कार्यामधें तो परमेश्वराला भिऊन असतो. ह्मणजे बापाला किंवा सर्पाच्याच भितो असें नव्हे, तर परमेश्वराच्या ज्या आज्ञा आहेत त्या त्यानें कारुणिकत्वानें आह्माला दिल्या आहेत; मातापितरें जीं आपल्या लेंकरांचें सर्वदा कल्याण चिंतितात त्यांच्याही पेक्षां तो अत्यंत कारुणिक आहे. आणि त्याच्या सर्व अगाध कृत्यांमध्यें आमच्या कल्याणाची इच्छा भरलेली असते, असें जाणून, आणि अशा प्रकारच्या परमेश्वराची आज्ञा मोडणें हा महान अपराध आहे असें मानून, त्याच्या इच्छेविरुद्ध वागण्याला तो भितो."

ह्या सदुपदेशामृताचा घुटका राजापासून रंकापर्यंतच्या स्थितींतील मनुष्य प्राण्यानें अवश्य घेण्यासारखा आहे.

उपरिनिर्दिष्ट उतारा ह्मापसें येथील " विद्या प्रसारक " मुद्रणालयांत प्रसिद्ध झालेल्या तात्पर्याचा असें समजावें.

डि. फं. ४ आणे. सारस्वत

Anuncios

Pelo Juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio, Lobo, correm editos de 30 dias a contar do dia da 2a publicação deste, citando ao menor pubere Victorino Francisco de Noronha, por si e conjunetamente com o seu pae João José Noronha de ASSOLNA e actualmente ambos ausentes em Bombaim, territorio britanico em parte incerta para assistir a todos os termos atē final do inventario orfanologico a que se procede neste Juizo por obito de Ana Joaquina Vás por outro nome Assucena Vás, que foi de CUSMANE sendo inventariante e cabeça do casal Piedade da Costa de CUSMANE sem prejuizo do seu regular andamento. O que para ser publico se espediu este. Xeldem 12 de Julho de 1922

O escrivão de direito de 1 ° of.
Manuel José Sebastião Lobo

verifiqui
O juiz de direito 2 vez
A. Meireles 4

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Lobo, correm editos de 60 dias. a contar do dia da 2a. publicação deste, citando a Diogo Caeiro de Cuncolim e ora ausente em Bombaim, territorio britanico, em parte incerta' para, no praso de 10 dias findos os referidos 60 dias, pagar, no sbredito cartorio a quantia de 18 : 01 ; 00 proveniente de custas e selos liquidados nos autos de execução comum que o dito Caeiro move a Vonctexa *Ragobá* Naique e mulher Dropody de Agonda de Canacona, ou dentro do mesmo praso nomear bens suficientes á penhora para o pagamento do pedido e das custas e selos acrescidos da execução sob pena de não o fazendo ser a nomeação devolvi la ao exoquente *Ministerio* Publico proseguindō a execução seus termos o revelia, O que para ser publica se expediu este. *Xeldēm* 8 de julho de 1922.

O escrivão de direito do 1 ° ofo
Manuel José Sebastião Lobo
Verifiquei
O Juiz de direito 2 vez
A. Meireles 5

Pelo juizo do direito da comarca de Quepém e cartorio do escrivão do 1 ° oficio Lobo, correm editos de 60 dias a contar do dia da segunda publicação deste, citando a interessada Catarina Mendes seu marido José Maria Fernandes' Mateus Crasto marido da interessada Joana Piedade Mendes e a menor pubere Aleluia Mendes solteira todos de AVEDEM e ora ausentes em parte incerta de *B*OMBAIM para assistirem a todos *os* termos até final do inventario *o*rfanologico a que se procede por obito de Rosalina Fernandes domiciliada que foi no bairro MOLA de AVEDEM em que é inventariante e cabeça de casal Avelina Mendes de AVEDEM por apenso aos do inventario orfanologico procedido por obito de Vicente Mendes que foi de Avedem sem prejuizo do seu regular andamento. O que para ser publico se expediu este.

Xeldem 4 de Julho de 1922

Escrivão de direito do 1 ° ofi.
M*anuel josè* S*ebastião* L*obo*
Verifiquei
O juiso de Direito 2 vez
A *Meireles* 6

*
* *

Quando nos foi outorgado *self-government* e o bem quisto e saudoso governador sr. Freitas Ribeiro, reduziu a representação popular no Conselho por ele não achar o paiz preparado para arcar com as grandes responsabilidades do novo regimen, os nossos patriotas reuniram-se num magno comicio em Margão e protestaram contra esse medida aliás salutar do governo local e se resolveram a representar perante o governo da Metropole para a conquista da maioria para que prevalecesse o criterio dos que pagam sobre o dos que recebem.

E conseguiram de facto o seu *desideratum*, ouvindo-se então em toda a parte musica retumbante...

Mas votaram creditos extraordinarios "para não crearem dificuldades ao governo da provincia", para satisfazer as despezas da *cabasada* dos decretos, criando novos serviços e fixando vencimentos fabulosos.

Criaram a maravilhosa C. de Melhoramentos para o progresso do nosso Porto e da Cidade de Mormugão 'em que reside o nosso futuro prospero."

Criaram impostos adicionaes de Melhoramento e muito relevantes seviços prestaram não ha duvida; ninguem, porém, se lembra de inventarios, cuja reforma radical era um verdadeiro acto de patriotismo pelo qual o povo seria beneficiado geralmente, sem distinção de classes nem de cores e os sacrificios feitos pelo mesmo povo soberano seriam um tanto recompensados, praticamente.

Pelo contrario esse Povo, longe disto, foi insultado, ridicularisado e comparado ao... *suino* por uma das intelectualidades *natas* do Conselho do Governo transacto!...

Paciencia, meus senhores!

Bicholim — *O mesmo*

Responsabilisando--se

E' pena que nas estações competentes não tenha tido e'co, surtindo o seu almejado fim, o extraordinario e herculêo esforço duns poucos amigos particulares, levantado em prol da humanidade sofredora, numa justa ocasião de esta vasta aldea correr serio perigo com a *gripe* de mais a mais, com a ausencia do seu popular e querido medico sr. Dr. Caetano de Meneses numa densa população que orça por quatro mil habitantes de varias classes e castas, hindus, cristãos e moiros, pedindo conservação do seu queridinho medico sr. Dr. Pinto do Rosario, Delegado de Saude, quer por meio da representação, quer por telegramas sendo um dirigido a O Heraldo pedindo a sua interferencia no assunto, quer aínda pelas correspondencias, recheadas de lamurias porque neste tempo da gripe que atacara *numerosas* familias a sua deslocação seria um crime no seio das mesmas e finalmente pondo em fóco as belas qualidades e maie virtudes de bom medico etc. etc!...

Tudo isto até aqui está muito bem, mas quando toca aos habitantes em geral e que o fazem com incrivel desfaçatez há necessidade de a verdade, a pura verdade sobressair com toda a sua nudez, doa a quem doer e que é esta que está tranquila com a consciencia de todos eles.

Não se associaram áquilo a não ser poucos amigos que se podem contar a dedo, e não os habitantes, em geral, dada a infinita simpatia hoje em cuidades e em prantos, sobre a saida do seu ex-*Delegado*

Para restabelecer a verdade e desfazer o grito da consciencia de não tomarem por *impertinentes e descabidas considerações* seu arustado *até* aqui vindo importunar e pedir um cantinho do seu apreciado e imparcial jornal, na certesa de que é o unico que dá cabida a esta cometendo muito embora um grande pecado... a favor da verdade.

Bicholim — *Franco*

ECOS & CRITICA

Prof. Pissurlencar

A respeito deste distincto professor o conhecido literato lé se o seguinte na revista Ísis, vol-1° nos 6 e 7, de 1921:—

E' um eminente erudito luso indiano, de Sanquelim, que a maioria dos seus compatriotas portuguezes desconhece. Com a devida venia publicàmos a sua Antiguidade do Crixnaismo, que o Oriente Portugues, a belissima *Revista* da Comissão Arquiologica de Nova Gôa, publicou recentemente. E' um preito de homenagem ao ilustre critico da India Portuguesa e uma lição que enquadra belamente no 2° dos objectivos da *Sociedade* Teosofica.

Registando com imenso gaudio esta apreciação insuspeita da referida revista que se publica em Lisbôa feli citamos o sr. Pissurlencar, cordialmente.

Novo administrador

Encontra-se já à testa do concelho de Quepem o novo administrador sr. Mariano Rebelo.

Como sua excia é um dos advogados distinctos, como no-lo informam, é de esperar que saiba pôr-se no seu lugar condignamente, promovendo o bem estar dos seus jurisdicionados.

O *Bharat* dá ao novo administrador cumprimentos de boas vindas.

—आलफांताचे कर मुक्रर करण्यासाठीं जी कमेटी नेमण्यांत आली आहे तींत आमचे सन्माननीय देशबंधु रा. महादेव शे. भावे व काकुले यांचा समावेश झाल्याचें कळविण्यास आनंद वाटतो.

भारत

गुरुवार श्रावण व० ३ या १८४४

लोकमान्यांचें पुण्य स्मरण

लो० टिळक इहलोक सोडून गेल्यास दोन वर्षे पुरीं होऊन गेलीं त्यांच्या पुण्यस्मरणार्थ खालील लहानसा लेख प्रसिद्ध करीत आहों. त्याचा भारताचे वाचक श्रद्धापूर्वक मनन करून आपल्या प्रिय देशाचा उद्धार होण्यापीत्यर्थ मनोभावानें झटतील, अशी आम्हांस आशा आहे.

चोहोंबाजूनीं आमचा गोमांतक बिकट संकटानीं घेरला गेला आहे. 'करील त्याचा कारभार व मारील त्याची तरवार' या दुष्ट व बेबंद वृत्तीची छाप जेथें तेथें पडलेली दिसून येत आहे. शांततेचें तर केव्हांच उच्चाटन झालें असून, दुःखितांच्या हृदय भेदक आक्रोशानें सर्व वातावरण थरारून गेलें आहे. अशा अनुकंपनीय स्थितींत सदरहू लेखाचा कांहींच उपयोग होणार नाहीं, असें कसें ह्मणतां येईल? असो.

पुण्यश्लोक पुरुषांच्या चरित्राचें पठन व मनन वारंवार करावयाचें त्याचा उद्देश आत्मशुद्धी होय. आपण संसारांतल्या गोष्टींत इतके गढून जातों कीं, आयुष्यांत आपलें कर्तव्य काय व तें आपण पार पाडीत आहों कीं, नाहीं याचें भान आपल्याला रहात नाहीं. पुण्यवंताच्या चरित्राचें मधून मधून स्मरण केलें ह्मणजे आपण शुद्धीवर येतों, व आपली बरी वाईट कृति तपासूं लागतों असल्या तपासणीशिवाय आपली सुधारणा कदापि व्हावयाची नाहीं. आपल्या श्रेष्ट कर्तव्याची आपणाला आठवण व्हावी ह्मणूनच विसाव्या शतकांतील ह्या महान कर्मयोग्याच्या चरित्राचें स्मरण करण्याचें आपण आज योजिलें आहे.

लो. मा. टिळक हे महान देशभक्त होते इतकेंच नव्हे तर कार्यकर्ते राजकारणी पुरुष होते. त्यांनां त्यांच्या अंगीकृत कार्यांत अपूर्व अशी जी यशसिद्धी मिळाली त्यांत दैवाच्या कृपेचा अंश अत्यल्प होता. गणितशास्त्राच्या अभ्यासानें त्यानां कार्यकार्याचा खोल विचार करण्याची संवय लागली होती, कोणत्याही कार्यांत भावी यशाच्या कल्पनेनें वाहून जाऊन कार्यास ते एकदम आरंभ करीत नसत, त्यांत येणाऱ्या अपयशाचा, अडचणीचा व संकटाचाहि विचार ते करीत, यामुळें अडचणींत ते कधींहि गांगरून जात नसत.

आपल्या आयुष्याच्या कर्तव्याची त्यानीं अशीच आंखणी केलेली होती त्यामुळें अनिवार प्रसंगाच्या प्रचंड ओघाबरोबर ते कधींहि वहात गेले नाहीं.

लो. मा. टिळकांच्या अगोदरच्या सुशिक्षितांचा मार्ग ह्मटला ह्मणजे "आधीं करावें उदरंभरण। यथेष्ट मिळवावें धन॥ कचित बोलावें राजकारण। आचरूंच नये॥" असा होता ह्या मार्गानें आपलें इच्छित कार्य व्हावयाचें नाहीं, आपल्या देशावर परकीय अम्मलाबरोबर परकीय विचारांचें जें अनिष्ट दडपण पडलें आहे तें निवावयाचें नाहीं. त्याला सतत उद्योग केला पाहिजे इतकेंच नव्हे तर आपलें जिवित सर्वस्व अर्पण केलें पाहिजे, हाल अपेष्टा भोगल्या पाहिजेत. तरच आपण परकीय विचारांच्या दास्यापासून मुक्त होऊं. हा उद्योग, शाळा स्थापून, वर्तमानपत्रें काढून व व्याख्यानें देऊन करावयाचा अशा प्रकारची कार्याची दिशा त्यानीं संसारांत पडावयाच्या अगोदर ठरऊन टांकली. दुसरी गोष्ट ह्मटली ह्मणजे आपलें आचरण अत्यंत विशुद्ध ठेवावयाचें ही गोष्ट जर लो. मा. च्या लक्षांत न येती व त्यांचें खासगी व सार्वजनीक आचरण होतें तेवढें विशुद्ध ठेवण्यास ते न जपते तर जनतेवर त्यांची छाप न बसून आपल्या देशाची स्थिति भयंकर झाली असती. असो.

आपल्याला काय करावयाचें व तें कसें करावयाचें याची आंखणी बरोबर करून नंतर ते कार्यास लागले. प्रथम न्यू इंग्लिश स्कुलला ते मिळाले व त्या संस्थेत दहावर्षे आपल्या आयुष्याच्या ऐन उमेदीचीं त्यानीं काढलीं, पण पुढें पुढें ही संस्था सरकारी संस्थांची नकल होऊं लागल्याबरोबर ते त्यांतून निघाले. लोकांनीं व शिक्षकांनीं जो स्वार्थत्याग करावयाचा तो सरकारी शिक्षण संस्थांची जेथें राष्ट्रहिताचे शिक्षण मिळण्याची आशा नाहीं निव्वळ नकल करण्याकरितां नव्हे अशा स्वार्थत्यागाला जगांत कवडीचीहि किंमत नाहीं असें त्यानीं पुढें एका प्रसंगीं ह्मटलें आहे. शिक्षण संस्थेतून निघाल्यावर लोकशिक्षणाचें काम त्यांनीं केसरीद्वारें आजन्म केलें. हें करीत असतां त्यांस अनेक शत्रू उत्पन्न झाले. हे शत्रू परकीय लोकांतच होते असें नसून त्यापैकीं पुष्कळसे लो. मा. चे हिंदी बांधवच होते हे हिंदी बांधव लोभानें, मोहानें, अगर भयचकित होऊन, जाणतां अजाणतां, पुष्कळदां राष्ट्रहित करितोसें दाखवून राष्ट्रद्रोह करीत. अशा वेळीं लो. मा. त्यांच्यावर कडक टीका कराबी लागे ती न रुचून ते टिळक याच द्वेष करीत; ह्याच द्वेषाचा फायदा सरकारनें घेऊन लो. मा. ना अनेक वेळां तुरुंग दाखविला. शारीरिक हाल अपेष्टेनें गांगरून जाण्या इतके लो. मान्याच्या दिलाचे नव्हते. उलट आपलें मरण आपल्या डोळ्यानीं पाहून ठेवणाऱ्या सिद्धांच्या कोटीपैकीं ते असल्यानें संकटानें त्यानां काम करण्यास दुप्पट बळ चढे. याची साक्ष प्रत्येक तुरुंगवासानंतर जास्त जास्त महत्वाची व अत्यंत बिकट अशीं कामें हातीं घेऊन त्यांनीं पार पाडलीं आहेत. केसरींत लेख लिहून त्यांनी देशांत खळबळ करून सोडलीच पण त्यांच्या व्याख्यानाच्या दौऱ्यांनीं ह्याहीपेक्षां जास्त महत्वाचें कार्य केलें. कांग्रेससारख्या संस्था काय करूं शकतात हें ओळखून कांग्रेसला अनुकूल प्रसंगीं योग्य दिशा दाखवून तिला कार्यकर्ती बनविली. लो. मा. हे एक जिवंत स्फुर्ती असल्यानें ते जी जी गोष्ट हातीं घेत तिला जिवंत करून सोडीत यांची उदाहरणें ह्मणजे राष्ट्रीयसभा, पैसा फंड, मद्यपान निषेधाची चळवळ, वगैरे होत, वंग भंग, स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण हे प्रश्न राष्ट्रीय करण्याला लो. मा. चेच प्रयत्न विशेषतः कारणीभूत झाले. ज्या ज्या गोष्टींत त्यानां राष्ट्रीयहित दिसे ती ती गोष्ट ते हातीं घेत राष्ट्रहितार्थ आपला प्रतिस्पर्धी असलेल्या मनुष्याशींहि ते सहकारिता करीत प्रसंगी स्वमतहि गुंडाळून ठेवीत अशा प्रकारें स्वदेशाची अनन्य भक्ती त्यानीं केल्यामुळेंच जनताजनार्दन त्यावर प्रसन्न होऊन त्यानां लो. मा. ही अपूर्व पदवी देता

मणजीत परंतु लेखकांच्या दृष्टीनें व्यक्तीची कार्यक्षमता साक्षरतेवर अवलंबून नाहीं. याकरतां साक्षरतेपेक्षां बहुश्रुतपणा हाच उपाय श्रेष्ठ ठरेल व हा बहुश्रुतपणा समाजांत उत्पन्न करणें हेंच कार्यक्षमतेचें मर्म होय. हा बहुश्रुतपणा धार्मिक शिक्षणानेंही साधणार असल्यानें धार्मिक शिक्षणाचें महत्व साक्षरता शिक्षणापेक्षां जास्त ठरतें. याकरतां धार्मिक शिक्षणाचीच आगाऊ तजवीज लाविली पाहिजे. तें दिलें जात असतां जनतेंतील साक्षरता वाढवितां आली तर दुधांत साखर पडल्यासारखें होईल.

हें शिक्षण कोणतें व काय असावें याबद्दल मतभिन्नता बरीच असण्याचा संभव आहे. लेखकाच्या मतानें या बाबतींत पुढील कार्यक्रमाची रूपरेखा असावी. अर्थात ते किती असावें व विस्तार कोठपर्यंत करावा हें साधारणतः व्यक्तिविषयक ग्राहकशक्तीवर अवलंबून राहील.

रामायण, महाभारत, महाभागवत, पुराणें, कुराण, बायबल, झेंदावेस्ता; वेद, वेदांगें यांबद्दल मोटक माहिती हिंदुधर्मांतील सोळा संस्कार, इतर धर्मांतील मुख्य संस्कार; या संस्कारांचा आयुष्य क्रमाशीं असलेला संबंध. हिंदुधर्माचें वैशिष्ट्य; व्रतें वैकल्यें पूजा इत्यादिकांचें रहस्य व महत्व हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जाति पंथ इत्यादिकांची तात्विक माहिती व त्यांच्या मताचें दिग्दर्शन; साधारण व्यवहारांत लागणारी धार्मिक कृत्यें, वर्षांतील सण व त्यांचें [illegible] सामाजिक व धार्मिक दृष्ट्या आयुष्याचा इतिकर्तव्य[illegible] [illegible] असतांचें तात्विक ज्ञान; भक्ति योगाचें व आचरत धर्माचें रहस्य इत्यादि.

ह्या गोष्टी पुष्कळच [illegible]हेत असें वाटण्याचा संभव आहे; परंतु त्या अत्यावश्यक आहेत हें पूर्ण विचारांती कळून येईल वर रूपरेखा अत्यंत संक्षेपानें सांगितली आहे; परंतु त्यावरून सामाजिक धार्मिक शिक्षणाच्या लेखकाच्या कल्पनेची दिशा समजण्यास अडचण पडणार नाहीं.

अशा रीतीनें शिक्षणाच्या दिशा ठरल्यावर तें देण्याकरितां कार्यक्रम स्पष्ट व व्यवस्थितपणानें आंखला पाहिजे. नुसतें वर्तमानपत्रांत लेख लिहून अगर दोनें व ठिकाणीं शहरांतून व्याख्यानें प्रथम कार्य होऊन भागणार नाहीं. पत्रकें व पुस्तकें मार्गानेंच प्रयत्न झाले नंतर कार्यप्रदेशांत प्रवेश व वेळा ह्या विशिष्ट प्रचारकांनीं छापवून तयार तीं पत्रकें व पुस्तकें सूज्ञ प्रत्येक [illegible] मंडळीवर सोंपवून त्यास मार्ग [illegible] धावा व त्यांनीं या दर्शविलेल्या अनुसार त्या प्रत्रकांचा व पुस्तकांचा उपयोग करावा. साधारणतः खेड्यांतील लोकांत सुद्धां कार्य करण्याची जाणीव व तयारी असते परंतु कोणी तरी चालन देणारा त्यास हवा असतो. हें चालन प्रचारकांकडून दिल्यानें कार्यभाग सहज होईल.

हस्तपत्रकें व पुस्तकें हातीं येऊंच गांवांतील मंदिरापुढील पटांगणांतून त्यांचें वाचन विचार वगैरे जमतील त्या लोकांनसोर वारंवार होत गेल्यानें बहुजनसमाजास धार्मिक प्रश्न कळूं लागून तो त्यांत हळूं हळूं जास्त प्रमाणांत भाग घेऊं लागेल एकंदर समाज एकदम तयार होणें व्यावहारिक दृष्ट्या केव्हांहि अशक्य आहे, परंतु

मुष्टिफंड मराठी शाळा

पणजी–गोवा

मे महिन्याचे ११।१२।१३ तारखेस पणजी येथील मुष्टिफंड संस्थेनें चालविलेल्या दोनही मराठी शाळांतील मुलांच्या वार्षिक परीक्षा झाल्या.

परीक्षक रा. गणेश शिवराम सामंत, मुख्याध्यापक श्रीशारदा विद्यालय कुंभारजुवें गोवा, प्रो. रामचंद्र शंकर नाईक, रा. वासुदेव अनंत खंडेपारकर, रा. जनार्दन उपेंद्र नाईक खेवटे व रा. सगुण प्रभु मोये होते.

यश मिळविलेल्या मुलांचा बक्षीस समारंभ रा. गणेश शिवराम सामंत याच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटानें पार पडला.

ह्या समारंभास विद्यार्थ्यांकडून ईशस्तवन, स्वागतपर पद्यें, सुस्वर गाणी, चरख्यावर सूत काढणें कवाईत वगैरे कार्यक्रम मनोवेधक रीतीनें पार पडला.

मुलांना खालील बक्षीसें वाटण्यांत आलीं

यशस्वी मुलाचें नांव	पुस्तकाचें नांव
फट्टु बा. आगलीकार—	मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी
नारायणदास म. गुजर—	नीति दर्पण
संभाजी न. देसाई—	नीतिबोध

इयत्ता	प. बसलीं	पास झालीं
इयत्ता ४ थी.		
शाळा नं १	[illegible]	१
शाळा नं. २	५	५
इयत्ता ३ री.		
शाळा नं. २	१०	[illegible]
इयत्ता २ री.		१०
शाळा नं. १	१९	१०
शाळा नं. २	[illegible]	
इयत्ता १ ली.	[illegible]	१४
शाळा नं. १	२१	१७
शाळा नं. २		
[illegible]	१०	९
[illegible]ा. नं. २	१९	१७
	१४२	१२४

अशा रीतीनें व्यवस्थितपणानें कार्यक्रम आंखला गेल्यास ही धार्मिक जागृति ४।५ वर्षांत संबंध महाराष्ट्रांत सहज घडवून आणतां येईल.

वर लिहिलेला कार्यक्रम पार पाडण्याची जबाबदारी अर्थात प्रचारकांवर व त्यांच्या प्रयत्नावर अवलंबून आहे. हे प्रचारक म्हणजे धार्मिक गुरु व निरनिराळ्या पंथाचें प्रमुख हे असावेत; व यांनीं एकत्र होऊन विचार विनिमयानें कार्य केल्यास जागृति घडून येईल अशी खात्री आहे. मात्र या धार्मिक गुरूंनीं केवळ धर्मकार्या करतां स्वत्वाचा त्याग करून परोपकाराय सतां विभूतयः अशी प्रवृत्त ठेऊनच निरपेक्ष बुद्धीनें काम केलें पाहिजे.

या प्रमाणें शिक्षणामृत पिऊन समाज सजिव झाला म्हणजे उत्तरोत्तर उन्नतीच होईल व पुढील उच्च प्रकारचें परमेश्वर विषयक ज्ञान मिळविण्याची त्याचे अंगीं पात्रता येईल. सात्विकता वाढून प्रेमबंधनें दृढ होतील व जनता गुण्यागोविंदानें राहूं लागेल.

भारतवासी

Anuncios

Ultimas locais

Uma pergunta

Um leitor cuja principal ocupação se cifra em colher novidades pergunta-nos, ingenuamente, se não é uma *novidade* o desconhecimento da Direcção das Obras Publicas da inaptabilidade das *fossas Moura*, a que se referiu no seu artigo *Em Nova-Goa* o sr. Manuel Cardoso.

O referido leitor de novidades naturalmente ignora a novidade de que a mesma Direcção está sempre em actividade e que quem está em actividade não tem tempo para nenhuma *novidade*, ainda que esta *novidade* se refira ás ditas *fossas* do amigo Moura que ele proprio as condena no *Times of India*.

Fique-o sabendo.

Para o n° seguinte

Por falta de espaço tivemos de reservar para o n° seguinte duas correspondencias de Bicholim e outras tantas de Sanquelim.

A seus autores que são dedicados amigos do *Bharat* pedimos [illegible] por essa nossa [illegible]

Praz-nos regis[illegible] Dr. Soares Rebelo, instantes pedidos dalguns alunos, resolveu-se a leccionar o *Direito Patrio* na sua residencia em Margão, podendo aproveitar dessas lições todos os que pretendam fazer exames na sciencia juridica e preparar-se, com a necessaria pratica, para o treino da advocacia.

साभार स्वीकार

मौज [साप्ताहिक]:— हें मौजेचें साप्ताहिक मुंबई एथें प्रसिद्ध होत असून तें सर्व महाराष्ट्रांत मौजच मौज उडवून देत असतें. मौजेची विषयरचना, मौजेचे मथळे, मौजेची मांडणी व मौजेचीं चित्रें. जिकडे तिकडे मौजच मौज. 'मौजेच्या' प्रत्येक वाचकाला 'मौज' वाचून मौज वाटलीच पाहिजे असा आमचा अजमास आहे. विशेषतः मौजेंतील युरोपियन व [illegible] उदाहरणें [illegible]तील मनोरंजक नाहीं, असा [illegible]चून [illegible] असेल. मौजेचे संपादक 'अनंत हरि गद्रे' हे असून [illegible]र्षिक वर्गणी ट. हा. स. ३: १० आ. आहे. मौजेवर लोकांचें प्रेम आहे. अर्थात देवाचेंहि असलेंच पाहिजे तेव्हां तें चिरायू होईल हें सांगावयास पाहिजे काय ?

—आमचे संपादक गेल्या मंगळवारीं मुंबईहून परत आले. त्यांचा प्रवासाचा फायदा भारताला होईल अशीं सुचिन्हें दिसतात.

भारत

गुरुवार श्रावण शु० ११ शी १८४४

एकच उपाय !

करवाढीमुळें जनता हवालदील बनली असून तिच्यांत कांहींच त्राण राहिलेलें नाहीं, हें आह्मीं अनेकदां वाचकांच्या नजरेस आणलेंच आहे. गोमांतकांत उद्योगधंद्याची भरभराट झाली असती तर कदाचित् लोकांना करांपासून तितका त्रास झाला नसता. कोणत्याहि रितीनें त्यांना जीवनार्थ कलहांत टिकाव धरणें शक्य झालें असतें. दुर्दैवानें तशी स्थिति नसल्यानें करवाढ ही एक मोठी भयंकर आपत्ति होऊन बसली आहे !

या आपत्तिविरुद्ध घसे कोरडेपडेपर्यंत लोकांनीं ओरड केली वर्तमानपत्रांनीं करांविषयीं स्पष्ट शब्दांनीं आपली नापसंती व्यक्त केली. व्यापारीसंघानेंहिं आपल्या पक्षातर्फे करवृद्धीबद्दल आपला खेद प्रदर्शित केला. पण करवाढ मोटार वेगानें चालूच असून, तिला थोपवून धरण्याचें सामर्थ्य लोकांच्या ओरडींत, वर्तमानपत्रांच्या नापसंतींत अगर व्यापारी संघाच्या खेदांत आहे असें दिसून येत नाहीं. एखाद्या अंधा[illegible] पदींच्या नाचाला अगर तर्कच मेहत[illegible] समोर तानसे[illegible] लेल्या व कान असून बहिरें बनलेल्या पाषाण हृदयी सरकारसमोर उपरोक्त तिप्पट विरोधाला येत आहे, असेंच आजपर्यंतच्या अनुभवावरून छाती ठोक विधान केल्यास तें चुकीचें ठरेल असें वाटत नाहीं.

'बोलक्या' विरोधाला न जुमानतां, सरकार आपलें घोडें पुढें दामटतच आहे. हें सिद्ध झालेंच. तसेंच करवा[illegible] देण्यासारखी लोकांची पोटस्थिति तितकी चांगली नाहीं, हें तर स्पष्ट दिसतच आहे. प्रसंग अर्थात नाजूक असून, त्यांतून यशस्वी रितीनें आपला निभाव लावून घेण्य[illegible] खटपटीस जनतेनें तातडतोब लागलें पाहिजे या संबंधीं दुमत असणें शक्य नाहीं.

आमच्या मतें करवा[illegible] उपाय आहे. हा गाडण्यु[illegible] तिसरा नसून निःशस्त्र प्रतिकाराचा अष्टाक्षरी मंत्र जपणें होय. या मंत्रानें मात्र तो दुष्ट सर्प पूर्ण गाडला जाईल, असें ह्मणण्यास, मागील कित्येक गोष्टींवरून, बराच वाव आहे. भंडाऱ्यांवरील किंवा मच्छिमाऱ्या लोकांवरील करांचें अरिष्ट निःशस्त्र प्रतिकाराच्या परिणामकारक 'शस्त्रा'नें टळलेलें आहे, ही गोष्ट वाचकांच्या स्मरणांतून इतक्यांत बुजली नसेल.

अयोग्य, पोटाला चिमटा घेणारा व दरिद्री बनविणारा कर नष्ट होण्यास निःशस्त्र प्रतिकार हा एकच उपाय आतां शिल्लक राहिलेला आहे. त्याचा सामुदायिक पद्धतीनें उपयोग करण्यास जनता पुढें सरसावेल काय ?

स्फुट विचार

लोकमत व सरकार:—रिपब्लिक स्थापन झाल्यापासून असा एक कटु अनुभव यावयास लागला आहे कीं, सरकार लोकमताची बिलकूल पर्वा न करितां 'हम करेसो कायदा' हें तत्व अमलांत आणण्यास लोकमताच्या बापास सुद्धां भीत नाहीं ! ओर्तेइ कोस्ताच्या अमदानींत लोकमताविरुद्ध कोणतीहि गोष्ट आचरण्यास सरकार धजत नसे; लोकांस संतुष्ट ठेवण्यासाठीं तेव्हां नोकरशाही कसून प्रयत्न करीत असे. वास्तविक पहातां 'हम करेसो कायदा' हें तत्व मोनार्कीस लागू आहे. पण त्याची जाणीव मोनार्कींत न होतां लोकांस प्रजासत्ताक राज्यपद्धतींत भासू लागली हें जनतेचें दुःदैव तर खरेंच पण खुद्द रिपब्लिकचेंहि दुर्दैव होय ! लोकमताची थोडी तरी पर्वा सरकारला असती तर करवाढीसारखा पापी अत्याचार त्याकडून आचरला गेला नसता. बोटी व धक्के यांची स्थिति अनुकंपनीय राहिली नसती व आलफांताचे कर हि फुगले नसते. 'प्रजेचें मी दास आहें' असें तोंडानें सांगून हातानें तिला त्रास देणाऱ्या शस्त्रांची कास धरणाऱ्या सरकारचा मानभावीपणा अपूर्व आहे. यांत शंका नाहीं. पण सरकार आपलें कर्तव्य विसरलें आहे म्हणून लोकांनींहि त्याची 'री' ओढली पाहिजे असें, थोडेंच आहे. उलट झोंपी गेलेल्या नोकरशाहीला धक्के देवून जागें करणें हें जनतेचें कर्तव्य आहे ही कर्तव्यजागृति जितकी लवकर होईल, [illegible] थोपवून लोकांनीं एकदम कर्तव्य जागृ[illegible]तीच्या कार्यास नेटानें लागलें पाहिजे, असें आम्हांस वाटतें.

एक सूचना:—'फेदियाल' कर चुकते करण्याविषयीं सरकारनें चालू महिन्याची १५ तारीख पर्यंत मुदत दिली आहे, हें सर्वांस माहीत आहेच. परंतु या मुदतीचा लोकांस उपयोग होईल किंवा नाहीं, हा एक प्रश्नच आहे. कां कीं, शेतांचीं पिकें सप्टेंबर अखेर होऊन अक्टोबरांत त्यांचा क्रयविक्रय होत असतो व तेव्हांच लोकांच्या हातांत पैसे येत असतात. तोंपर्यंत मे महिन्यांत जशी त्यांची आर्थिक स्थिति असते तशीच किंबहुना त्यापेक्षा वाईट असते. जर मे महिन्यांत [illegible] जड जाईल म्हणून मुदत देण्यांत आली आहे. तर ती उपरि निर्दिष्ट स्थितींत कितीशी उपयोगी होईल ? म्हणून सरकारला आमची सूचना आहे कीं दिलेली मुदत अक्टोबर महिन्यापर्यंत वाढविण्याची उदारता प्रकट करावी.

वर्तमानसार

— ऐनवेळीं मेंबर होऊं इच्छिणाऱ्या कांहीं गृहस्थानीं पाय माघारे घेतल्यामुळें, पणजीच्या श्री मंगेशमीलच्या संस्थापनेस कांहीं कालावधी लागला. आतां त्या गिरणीची एकंदर जबाबदारी आमचे मित्र श्री. रामचंद्र वाळे यानीं पत्करल्याचें पत्करल्यावरून कामास लवकरच सुरुवात होणार असल्यानें कळविण्यास आनंद वाटतो

—मलेरियाची सांथ सुरु आहेच.

क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे विचारें तुझा तूंचि शोधोनि पाहे

रामदास

आज मितीला परकीय राजसत्तेमुळें नाश पावलेल्या स्वातंत्र्यासाठीं सर्व हिंदुस्थानांत प्रचंड चळवळ चालली आहे. ठिकठिकाणच्या प्रमुख राष्ट्रीय पुढाऱ्यांचीं मनें याच विचारानें व्यग्र झालीं असून लोकांत विचार जागृति व ऐक्यभाव उत्पन्न करण्याचे प्रयत्न त्यानीं जारीनें चालविले आहेत. आणि ते स्तुत्य आहेत. यांत कांहींच संदेह नाहीं. तरी पण त्याचें चीज अजून होत नाहीं. व सरकारी अधिकाऱ्यांचा जुलमी कायद्यांचा रामरगाडा अव्याहत मात्र चालला आहे. ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. कालाची गतीच विपरीत ! नाहीं तर आमच्या सर्व एतद्देशीय लोकांस सैतानी राज्यपद्धतीनें राज्य चालवून वाटेल तसा धिंगाणा घालणाऱ्या मूठभर लोकांची उचलबांगडी करणें केव्हांही अशक्य नव्हतें. ज्या लोकांत एका काळीं एवढें सामर्थ्य नांदत होतें कीं कोणाही परद्वीपस्थ शत्रूला इकडे हिंदुस्थानांकडे नुसतें वांकड्या नजरेनें पाहण्याचेंही धैर्य होऊं नये, त्यांचीच ही गत !!

या परिस्थितीची कल्पना बहुतांशीं करून देणारी एक कविता मला आठवली ती खालीं नमूद करतों:-

ज्याची स्पर्धा कराया इतर गज कधीं
शक्त नाहींच झाले ।
सांगावें काय ? त्याच्या मृगपतिहि भयें
रान सोडून गेले ॥
[illegible] सुरेक नाहीं निघाया ।
अव्हेरीती पहा हे कल कल करुनी
कुक्कुटहे तयाला ॥२॥

एवढें आलें तरी एकीच्या जोरावर मनुष्यास वाटेल तें करतां येण्यासारखें आहे. व करून दाखविल्याची उदाहरणें इतिहासांत किती तरी आहेत. पण या सुधारणेच्या (सुधारणेच्या नांवाखालीं गुलाम तयार करण्याच्या) काळांतही सुकर प्राण्यांतही असणारी गोष्ट मनुष्यास अशक्य झाली आहे. !

मला वाटतें यांत प्रयत्न करतानांच आमची कांहीं तरी दिशाभूल होत असली पाहिजे. वास्तविक आमच्यांत विद्वान, धोरणी, मुत्सद्दी, किंवा राजकारण-पटु लोक कमी आहेत असें नाहीं. पण त्यांचो खटपट करून न केल्यासारखी होते. एकी करणें म्ह० हिंदूनीं ख्रिस्ती किंवा ख्रिस्त्यानीं दुसरे कोणी तरी होऊन जातींत सरमिसळ करणें नव्हे. नुसती जात एक होण्यांत फायदा ऐवजीं तोटा मात्र आहे. ही एकी सर्वांच्या मनाची झाली पाहिजे. तिचें तत्व केवळ प्रतिपादणें सोपें पण तें परिणामकारक होणें त्या मानानें कठीण दिसतें. याबद्दल कांहीं तर्क करतां येतो तर पाहूं.

लोकांत विचार जागृतीमें ऐक्य उत्पन्न करण्याचीं मुख्यत्वें दोन साधनें दिसतात. एक वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें वगैरेंचा प्रसार आणि दुसरें सभा भरवून व्याख्यानें व प्रवचनें देणें होय. पैकीं सभा, भरवून व्याख्यानें याविषयीं मला विचार करावयाचा आहे. कारण या ठिकाणींच अनुभव परत्वें श्रद्धा डळमळण्याचा संभव दिसतो. व ज्या शंभर नंबरी सोन्यांच्या डागिन्यां। थोडेंच कां होईना पण हीण पडल्या। त्याची किंमत कमी होते. त्याप्रमाणें स्थिति होत आहे. पुष्कळ ठिकाणीं

गुणांनीं कशाप्रकारें अमलांत आणावे ही माहिती त्यांनां कळेल. सर्व सुधारणाचा, शिक्षणांचा हेतु, समाजाचें शील वाढविणें हाच होय. सुशील व्हावें हाच सर्वांचा उद्देश असला पाहिजे. शीलाच्या जोरावर विपत्तींतून पूर्ण वैभव प्राप्त करून घेतां येतें. आपल्या हिंदुस्थान देशाचा इतिहास सच्छिलतेवर उभारिला आहे म्हणूनच त्याचा एवढा गौरव होतो. आपल्या देशांतील सर्व इतिहास प्रसिद्ध व्यक्ति सच्छिल म्हणूनच जगाला आदर्शभूत झाल्या. शीलावांचून जीविताला किंमत नाहीं. असा भारतीय इतिहासाचा सिद्धांत आहे. शीलाच्या अभावीं कौरवांचा नाश झाला व शील खंबीर म्हणूनच महात्मा गांधी ब्रिटिश ब्युरोक्रासीचे प्रचंड परंतु शीलभ्रष्ट धूड धुळीस मिळवीत आहे. शीलाचा व नीतिमत्तेचा ऱ्हास झाला म्हणजे समाज कमकुवत होत जाऊन त्याचा नाश होतो. म्हणून प्रागतिक संघानें भावी सुराज्याचे आधारस्तंभ सध्याची तरुणपिढी सुशील व सुनीतिमान व्हावी या साठीं योग्य ते प्रयत्न केले पाहिजेत.

पुढाऱ्यानां बहुजन समाजाचे गुणदोष व त्यांचे परिणाम यांची जाणीव असल्यामुळें त्याच्या दुष्परिणामाबद्दलची सर्व जबाबदारी त्याजवर येऊन पडते. प्रागतिक संघ हा पुष्कळ पुढाऱ्यांचा समुदाय असल्यामुळें, गोव्यांतील समाजाचीं भावी संकटें आपली जबाबदारी ओळखून टाळण्याचा त्यानीं प्रयत्न केला पाहिजे. व या बद्दल ते परांङ्मुख झाल्यामुळें तो 'कर्म संन्यासी' बनला आहे. शिक्षणाचा खरा उद्देश 'शीलसंवर्धन' हा होय. हें वर सांगितलेंच आहे. तेव्हां राष्ट्राची उन्नति सुशिक्षणांच्या योगानें होते म्हणून पर्यायानें ती सुशिक्षकांच्या हातांत आहे.

सध्याचे शिक्षक कसे आहेत हें पाहावयाचें असल्यास भारताचा ' सुप्रसिद्ध सुक्षिमेन्तु ' हिंदूद्वेषी शिक्षक, इत्यादि लेख पहावे. सध्याचे शिक्षक अयोग्य (थोडे चांगले आहेत त्यानां ही गोष्ट लागू नाहीं) व द्रव्यभक्षक आहेत. त्यानीं प्रपंचा पाहिजे सुवर्ण, हा मंत्र घोकून नैतिक संपत्ति गौण मानून भौतिक संपत्ति हेंच मुख्य ध्येय धरून वागणूक ठेवली आहे. पण त्यांना ठाऊक नाहीं कीं, भौत्तिक संपत्ति ही, सूक्ष्म [illegible] भागाची अधिनियंत्रि जी नैतिक संपत्ति तिच्या पेक्षां पुष्कळ कमी दर्जाची आहे. पण हे जर नालायक (सुशिक्षक सोडून) तर शिक्षक कसे झाले ? वशिल्यांच्या [प्राजेरीसच्या जोरावर) जोरावर. वशिल्याशिवाय लिसेवांत कांहींच होत नाहीं. या देवतेचा सप्ताह टपालमार्गे फेब्रुआरीच्या दुसऱ्या पक्षांत सुरू होऊन परीक्षा संपे पर्यंत चालतो.

आतां शिक्षणाच्या मध्य जो पणजीचा लिसेव त्यांजकडे वळूं.

चार वर्षांमागें येथें ५ इयत्तापर्यंत शिक्षण मिळत असे. वर्गास पास झाल्यास १० नसल्यास ५ रुपये फीचा खर्च येत असे. पण आतां पहिल्या दोहोंस ३६ नंतर तीहींस ५० नंतर दोहोंस ७५ रुपये निवळ फिचेंच भरावे लागतात ! पुस्तकें जबर किंमतीचीं असून वर्षानवर्ष बदलतात. फीचे चार हप्ते भरण्यासाठीं सरकारी तिकिटें घेण्यास विद्यार्थ्यास पुष्कळ वेळ फाजेंदांत तिष्ठत रहावें लागतें. नंतर तीं ७-८ तिकिटें लिसेवांतील चोपदार [illegible] कटवून प्रत्येकावर तारीख सही, इ. कामांत फारच वेळ मोडतो.

५-१० रुपयांचे ३६-५०-७५ रुपये कां झाले ? तर मोठ्या पुतण्याची भर करण्यासाठीं लिसेव नासिओनालाचा लिसेव सेंत्राल केल्यामुळें नोकरशाहीचे चार पांचशांपर्यंत फुगलेले पगार भरण्यास. पण इतकेंही होऊन शिक्षकांचा द्रव्यलोभ सुटतो का ? छे ? आणखी दुसरीकडें शिक्षकगिरी, वकिली, डाक्टरी, वर्तमानकार, पुस्तकविक्या, सरकारी कामें इत्यादि एक एक दोन दोन धंदे पाहिजेतच. पण इतकेंही असून शिक्षण तरी नेमलेलें तासभर देतील ? छे ! खलबतखान्या (secretaria do liceu) मध्यें गोष्टीं करून राहिलेलीं ५-१० मिनिटें जास्तीच तर अर्धातास (एक तासांपैकीं) पण त्या वेळांत सुद्धां मुलांबरोबर, राजकीय, सामाजिक, धर्मद्वेष्टी इत्यादि किरकोळ गोष्टी. वेळापत्रक तरी विद्यार्थीसुख दायक ? छे ! आफिसांतील व कोर्टांतील वेळ राखून त्यानां घरीं जाण्यास रविवार खेरीज आणखी एक दोन दिवस सुटी घेऊन राहिलेल्या वेळीं मन मानेल तशा वांटून घेतलेल्या तासांत. एका हिंदुद्वेषी वकील शिक्षकानें तर असा क्रम आरंभिला (गेल्या वर्षी) होता कीं, वर्तमान पत्राच्या आफिसांत रात्रीं जागरण झाल्यामुळें दुसरे दिवशीं सकाळीं उशिरां तास संपण्यास ५-७ मिनिटें असतानां यावें, लगबगीनें पाठ केलेलें म्हणवून घ्यावें व खलबतखान्यांत चालतें व्हावे. एकादे दिवशीं वेळ संपत आल्यास 'vocês estão despensados असें म्हणावें व Livro do ponto dos professores वर तासाचे पैसे वसूल होण्याकरितां सही करण्यास निघून जावें. अशा तऱ्हेनें घडे पत्रका प्रमाणें अभ्यास न झाल्यामुळें वर्षाच्या शेवटीं वशिल्याच्या जोरावर मार्क मिळवून पास व्हावें. वाहवारे शिक्षण ! अशा तऱ्हेनें काय शिक्षण होणार !

बरें ! प्रोफेसर साहेबाची स्वारी येईपर्यंत बसण्यास तरी जागा मिळेल ? छे ! शिक्षकशाहीची संख्या फुगण्याकरितां २६-३० मुलांची एक याप्रमाणें तुकड्यावरून त्यांच्या करितां [illegible] नसेल त्या जाग्याचे मुत्रीचे सुद्धां क्लास करून राहिलेल्या थोड्याशा जागेत पांच सातशें मुलानीं धक्काबुक्की मारामारी, शिवाशिवी करीत रहावें अगर विन्हाडाकडून लिसेवांत असे दिवसांतून ८-१० हेलपाटे घालावे. तिमाही शेवटीं मार्क तरी भरपूर मिळतील ? छे ! मुलानीं मार्कांकरितां वशिले आणावे. चार चौघांनीं आपणाकडे भीडखर्च करावी व अशा तऱ्हेनें प्रसिद्धीस यावें. असली क्षुद्र इच्छा यां पेक्षां मोठ्यांची। पुरुषांचे खून, अवाढव्य इमारतींत आग किंवा घटं विद्यातपटं छिद्यात कुर्यात रासभरोहणम करून येन केन प्रकारेण प्रसिद्ध पुरुष होणें सांगे.

अशा रीतीनें शिक्षण नाहीं व पैशापरी पैसा खर्च होऊन योग्य पुढाऱ्याच्या अभावी मुलें वाईट मार्गास लागून शीलभ्रष्ट होतात. शीलभ्रष्टतेची प्रचीति पहावयाची असल्यास .लिसेवांतील गुरुभगीनीं बरोबरील पत्रव्यवहार, चेष्टा, व लिसेवांतील भिंतीवर लिहिलेलीं कवनें चित्र व शब्द पहावे.

कोणी म्हणतील शिक्षकानींच शिकविलें तर तुम्हां शिकावें ? याला उत्तर हेंच कीं, शिक्षकाची गरज नव्ती, तर पाठशक्ती प्रमाणें डिग्री देण्याकरितां परीक्षक नेमून काम भागलें असतें ! अशा रितीनें सध्या लिसेवांत मुलानां शिक्षण मिळत नाहीं. जें थोडेंसें काय मिळतें तें वाङ्मयविषयक व हिशेबी. [येम्प्रेगाद होण्याचें शिक्षण,] येंप्रेगाद होऊन सरकाराचा मिंधा बनल्यामुळे सरकाराविरुद्ध लोक कल्याणाची गोष्ट करणें त्याला शक्य नसतें. ही झाली बौद्धिक शिक्षणाची गोष्ट. शारीरिक शिक्षण व नैतिक शिक्षण, त्यांच्या काडी पैलवानासारख्या, ब्रह्मचर्याच्या ऱ्हास झालेले निर्वीर्य शरिरांवरून व सदोदीत तोंडांत घोळणाऱ्या आईबापांचा उद्धार करणाऱ्या शिव्यांवरून व त्यांच्या अधोगामी कृत्यांवरून त्याच्या शिक्षणांभावाचा परिणाम कळून येईलच. आतां तरी प्रागतिक संघाच्या सत्कार्योत्सुक कार्यकारी मंडळानें कर्मसंन्यास सोडून नवीन शिक्षणसंस्था किंवा जुन्यांचा फेरबदल करून, भावी पिढी, सुशी-, सुशिक्षित, सुनीतिमान होण्यासाठीं प्रयत्न करावे. फल दाता ईश्वर त्यानां कार्योत्तेजक शक्ति देऊन त्यांच्या कडून देशहित करून घेवो अशी मागणी मागून हा लेख संपवितों.

शिवदास.

Anuncios

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1° oficio Lobo, vai á praça para a venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situada em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige á estação de Sanvordem no dia 8 do proximo mez de Agosto ás 12 horas pelo maior lanço que se oferecer o direito á quarta parte do predio denominado SORVADEVADO, da cultura de arroz, coqueiros, jaqueiras e outras arvores fructiferas, situado em Sirvoy, discrito por inteiro na conservatorio desta comarca sob o n° 7.622 do valor de 141 : 04 : 00 penhorado nos autos de execução fiscal que a Fazendo Nacional move a Roulú Gauncar de Sirvoi, como herdeiro de Duzô Gauncar que foi do mesmo para haver a importancia de 8 ; 10 : 04 proveniente de contribuição predial dos anos de 1910 a 1919 alem de sêlos e custas do processo. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de três dias. Por este são citados quaisquer credores e co-proprietarios incertos. Xeldem 10 de Julho de 1922

O escrivão de direito do 1° ofie
Manuel José Sebastião Lobo

1 O Juiz de direito
2 vez *A. Meireles*

Cremos que nisto o dito sabio não erra.

Uma idea

Nem todos que saem fóra da nossa fronteira ou que entram pela fronteira dentro pagam o imposto da entrada e saida, sobretudo criaturas de *forma humana* da idade não superior a 10 anos, do que naturalmente resulta prejuizo incalculavel ás combalidas finanças do Estado.

Quanto a nós tal prejuizo pode evitar se e com facilidade, pois, se, em vez de se estar arrecadando o mesmo imposto *per capita*, se estabelecesse o sistema de sua cobrança segundo o peso de cada *unidade pessoal coletavel*, fixando-se um tanto por cada arratel, por exemplo, ninguem ficaria exempto da aludida taxa, que doutro lado teria tragado o *deficit* num instante, pelo seu colossal aumento pecuniario.

Cá fica a idea por cuja producção não exigimos nada a ninguem, tanto mais que o nosso patriotismo que tal idea produziu não é aparente, de *pechisbeque*, como se diz; é sincero, Só nos consideraremos pagos quando soubermos que os competentes tiraram dela *bom proveito*.

Cada um para si...

Os nossos leitores devem estar lembrados de que o nosso presado amigo sr. Ganes Sadassiva S. Sirodcar, encanecido pela experiencia das coisas deste mundo tem diante dos olhos afixado um cartaz com o seguinte letreiro *Cada um para si e Deus para todos.*

Tem o sr. Sirodcar carradas de razão, porque á medida que vamos adquirindo conhecimentos novos do mundo, arraiga-se em nós a convicção de que as acções dos homens giram, invariavelmente em volta do criterio daquela *maxima*. Em todos os ramos da actividade humana ressalta, nitida e triunfante, tal tendencia egoista. Ainda o altruismo tem por base o egoismo.

E' que o homem nasce, pelo que parece, com aquela maxima, nutre se da sua substancia e acaba os seus dias, pensando nela sempre.

Noutro lugar está publicado um *conto*, corroborativo da doutrina expendida na presente local.

E' pois, sempre verdade que *cada um é para si e Deus para todos*.

Conto politico

Era uma vez um *boto*, casado com uma senhora que o estremecia muito. O bom do homem tinha, tambem, a dita de ser acareciado por uma mãe que o amava muito.

Sucedeu, em uma ocasião, que o feliz *boto* tivesse, casualmente, encontrado com um *Foquir*, o qual lhe cantou, em prosa e verso, a gloria de Deus descrevendo-lhe a omnipotencia e omnisciencia divina.

Ia o *Foquir*, com fé e calor, fasendo o seu *sermão*, quando o ouvinte lhe cortou a palavra, alegando-lhe que, se se demorasse mais tempo em ouvi-lo, morreriam de susto as suas esposa e mãe.

—Estás enganado, meu filho que *cada um para si, Deus para todos*, a tua esposa não ê tua como a tua mãe não ê tua—respondeu-lhe o Santo continuando:-

"Se quizeres ter prova do que te digo, vai para casa, finge-te acometido dum mal e fica á minha espera que lá vou já,"

O *boto* pós em pratica o conselho. A esposa e a mãe, semi-mortas com o brusco e mortal ataque de doença de seu marido e filho humedecerem à terra com torrentes de lagrimas e saturaram a atmosfera de gritos comovedores. Chega, então, o Foquire examinando o doente promete-lhe salva-lo, dizendo a mãe aflicta:- "E's velha, tendo apenas 15 anos de vida. Se estás disposta a ceder a teu filho este resto de tua idade, eu t'o salvo"

—Te-lo-ia feito de bom grado-fala a mãe-mas é que minha nora ê desleixada e não sabe cuidar de seus filhos que morrendo eu, seguir-me-hão, concorrendo assim para liquidação da nossa nobre estirpe. Sô isto me impede a concordar convosco, santo homem...

Este voltou-se, então, para a esposa do doente e repetiu-lhe a mesma proposta acrescentando.

—Uma viuva hindu é disconsiderada em toda a parte. Fogem todos dela como duma *cobra-capelo*. Cede, pois, a tua idade ao marido moribundo e dá uma aleventada prova de tua estima por ele.

—Te-lo-ia feito de bom grado-declara, chorosa, a mulher-mas é que os meus pais que tanto me idolatram que morrerão de disgosto, quando receberem a infausta noticia da do meu passatempo, o que não desejo que suceda como filha grata que lhes sou...

O *boto* cuja indignação subira de ponto ergueu-se de subito,-da cama e exclamóu ao santo;-

—Enviado de Deus, tendes razão. Não há duvida que *Cada um é para si e Deus para todos*. E —disse, dirigindo-se á esposa e mãe—ficai com a casa que eu acompanho o santo que me tirou do engano... mundano.

¿ Haverá, por ai, alguem que, depois disto acredite na sinceridade dos *amores* que *se divorciam* das estimas que *se separam*, das promessas que *se anulam*, dos namores que se diluem no oiro.

Na politica observa-se o mesmo fenomeno, tambem. Se o governo segue na sua vida pratica o criterio de Cada um ..., o povo não deixa de imitar lhe o exemplo.

भारत

गुरुवार श्रावण शु० १ या १८४४

राक्षसी निर्दयता !

गेल्या अंकांतील एका स्फुटांत फर्टंबची—आलफांतची दहा टक्के करवाढ करण्याच्या आततायी बेतांत नोकरशाही गुंतली असल्याची दुष्ट बातमी देऊन त्या विरुद्ध आह्मीं आमचें निर्भिड मत व्यक्त केलें होतें. पण आतां असें समजतें कीं, उपरोक्त करवाढीची मजल त्याहिपेक्षां—कदाचित् दसपटीनें—जास्त उंच जाणार असून, ती तावडतोब अमलांतहि येण्याचा पूर्ण संभव आहे !

सांप्रतची आमची सांपत्तिक स्थिति किती खालावली आहे, याचें यथातथ्य वर्णन आह्मीं अनेकदां केलें असून जनता कशी डबघाईस आलेली आहे, याचें स्पष्ट चित्रहि भारतानें अनेकदां रेखाटलें आहे. भारताप्रमाणेंच इतर लोकपक्षीय पत्रांनींहि करवाढीविरुद्ध आपली नापसंती स्वच्छ प्रदर्शित करण्याचें कर्तव्य बजावलेलें आहे. इतकेंच नव्हे तर खुद्द मडगांव मुक्कामीं लोकांची जंगी सभा भरून करवाढीच्या धांवत्या गाडीला एकदम खीळ घालणें किती जरूर आहे, याचीहि आपीव सरकारला वेळींच करून दिलेली आहे.

पण 'सगळेंच मुसळ केरांत' अशा सारखी हास्यास्पद स्थिति होऊं पहात आहे !

याचें कारण आमच्या मतें असें आहे कीं, जनतेकडून ज्या धडाडीनें व धैर्यानें करवाढीविरुद्ध आपला असंतोष व्यक्त केला पाहिजे होता, त्या धडाडीनें व त्या धैर्यानें तो केला गेला नाहीं. असो.

असें सांगतात कीं, कांहीं व्यापारी पुढाऱ्यांनीं नामदार गव्हर्नरसाहेबांपाशीं करवाढीविरुद्ध तक्रार केली असतां साहेब मजकुरांनीं खालील उद्गार काढले:—

'करटमध्या करांची कशी व कितीहि वृद्धि झाली तर त्यापासून तुह्मांला कोणत्याहि रीतीनें तोटा नाहीं. तुह्मी गिऱ्हाइकाकडून नफ्यासह सर्व कांहीं चोपून वसूल करून घ्याल. असें असतां तुह्मी करांविरुद्ध बोंब मारतां कां ? गिऱ्हाइकाच्या हितसंबंधाची तुह्मांला पर्वा नको ! त्याविषयीं मी विचार केलेला आहे...'

नामदारसाहेबांची ही विचारसरणी केवळ राक्षसी निर्दयतेला मात्र साजेशी आहे. पण आह्मी त्यांना विचारतों कीं, आलफांतच्या करवाढीनें माल महाग विकावा लागला ह्मणजे गिऱ्हाइक अर्थात् परमुलुखांतून आपणास जरूर असलेल्या जिनसा खरेदी करून आणील व कशाबशा आपल्या गरजा भागवून घेईल. येथील व्यापाऱ्यांकडून माल खरेदी करणार नाहीं. अशामुळें जें नुकसान होईल त्याला जबाबदार कोण? करवाढ नव्हे काय ?

इतकेंच नव्हे; तर करवाढीमुळें व्यापारी दळणवळण मंदावणार असून, आलफांत चुकविण्यानें हरेक 'चोरमार्ग'हि स्थापन न होणें अपरिहार्य आहे. व याचा चटका खुद्द सरकारी तिजोरीलाहि बसणार आहे. त्याची वाट काय ! अस्तु.

उपरिनिर्दिष्ट करवाढीविरुद्ध पणजीच्या व्यापारी संघानें जोराची चळवळ चालविली असून, इष्ट ध्येय साध्य होईपर्यंत संघ आपली चिकाटी सोडणार नाहीं, अशी आनंदाची बातमी आह्मांस समजली आहे. ही बातमी खरी असल्यास संघाचें अभिनंदन केल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं.

आज इतकेंच पुरे. जास्त खात्रीलायक माहिती मिळतांच विस्तृत रीतीनें आंकड्यांच्या मदतीनें प्रस्तुत विषयावर आमचे विचार प्रदर्शित करणार आहों. तोंपर्यंत करवाढीनें त्रस्त झालेल्या जनतेनें ! याला पूर्ण पाठबळ मिळेल अशी आशा आहे.

स्फुट विचार

सुधारणा कमेटी:—येथील देवळांच्या कायदेकानूंत-नियमबंदींत सुधारणा घडवून आणण्यासाठीं सरकारनें एक कमेटी नेमिली असून, कोणाकडूनहि योग्य सूचना केल्या गेल्यास त्यांचा विचार कमेटीकडून होणार आहे, ही माहिती 'भारत' वाचकांस कळलेलीच आहे. त्याप्रमाणें पुष्कळ लोकांकडून पुष्कळ तऱ्हेच्या पुष्कळ सूचना केल्याहि असतील. पण या सूचना लक्ष्यांत घेणें अगर न घेणें हें जसें कमेटीच्या खुशीवर अवलंबून आहे, तसेंच त्या सूचना कमेटीसमोर मांडणें अगर न मांडणें लेखकांच्या खुशीवर अवलंबून आहे, ही गोष्ट कित्येकांच्या ध्यानांत नीटशी आलेली दिसत नाहीं. असें नसतें तर केवळ नामकेवास्ती हुकुमांनुरूप कांहीं तरी सूचना केल्या गेल्या त्या वाव केल्या गेल्या नसत्या, हें उघड होय. निदान वेरें-वाडेंच्या श्रीशांतादुर्गेच्या महाजन मंडळीनें आपल्या सूचना कळविण्यांत जी घाई केली, त्या घाईसंबंधानें तरी सदरहू विधानांत आह्मीं चुकत नाहीं, अशी आमची मनोदेवता आह्मांस साक्ष देत आहे.

अव्यापारेषु व्यापार:— वेरें येथील श्रीशांतादुर्गा नेत्रकरीण या देवस्थानच्या महाजन मंडळीच्या 'सूचनांचा' विस्तारानें समाचार घेण्यास आह्मांस सवड नाहीं. मात्र इतकेंच सांगितलें ह्मणजे पुरे आहे कीं, त्यांतील कित्येक जर धर्मस्वातंत्र्याला विरोधक आहेत, तर कित्येक व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या आहेत. कित्येकांचा नियमबंदींत समावेश झालेला आहे, तर कित्येक येथून तेथून अनावश्यक आहेत. एवंच उपरोक्त महाजन मंडळीची एकही सूचना लक्ष्यांत घेण्यासारखी नाहीं, असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. व आमच्या मताप्रमाणेंच त्या सूचनासंबंधीं कमेटीचेंहि मत बनेल, अशी आह्मांला पूर्ण खात्री असल्यावरून, याविषयीं जास्त चर्चा करण्याचें टाळलेलें बरें, असें आह्मांस वाटतें.

प्रागतिक संघ:— गेल्या अंकांतील लेख प्रसिद्ध झाल्यावर श्री. शिवदासांचा लेख आमच्या हातांत आला व तो आह्मी विशेष सुधारणा न करतां जसाचा तसा छापला. हेतु हा कीं, योग्य रितीनें मनस्वातंत्र्याचा हक्क गाजवूं इच्छिणाऱ्या लोकांचा हिरमोड होऊं नये. या किंवा श्री. द्वारकानाथाच्या लेखास कोणाहि संघाभिमान्याकडून उत्तर आल्यास त्यासहि अर्थात् 'भारता'त स्थळ मिळेल, हें आह्मी येथें, नसत्या तर्कवितर्कांस जागा राहूं नये ह्मणून, जाहीर करीत आहों.

Anuncios

COMUNIDADE DA ALDEA SIRVOI

Proceder-se-há a arrematação trienal [de 1923 a 1925] dos campos e outras avenças da receita, e anual (1928) das avenças da despeza da sobredita Comunidade de Sirvoi no dia 30 do corrente mez pelas 15 horas, no local das suas sessões.

Aos 16 de Julho de 1922

O escrivão encarregado da Comunidade

1 *Subraia S. Sirvoicar*

COMUNIDES DE AMBAULIM, AVEDEM, CHAIFI, CUSMANE E QUEPEM

Nos dias 25, 26, 27, 28, 29 do corrente mez pelas 15 horas irão á praça as avenças da despeza do seguinte ano de 1923 das sobreditas comunidades, respectivamente de Ambaulim, Avedem, Chaifi, Cusmane, e Quepem, no local das suas sessões.

Aos 15 de Julho de 1922.

O escrivão das comunidades

2 *Subraia S. Sirvoicar*

COMUNIDADE DE XELDEM

No dia 31 do corrente pelas 16 horas, irão á praça as avencas da receita trienal de 1923 a 1925 e despesa do ano de 1923 desta Comunidade no local das sessões. Aos 15 de Julho de 1922

3 O escrivão

Ramacrisna A. Narcornim

COMUNIDADE DE ODAR

No dia 30 do corrente pelas 15 horas irão á praça as avenças da despeza do ano de 1923 desta Comunidade no local das sessões. Aos 15 de Julho de 1922

4 O escrivão

Ramacrisna A. Naacornim

PAGODE DE SRY MOLICARJUNA DE MOLCORNEM

A arrematação trienal desde 1922-1923 a 1924-1925 dos predios e das varzeas pertencentes ao dito Pagode terá logar no dia 29 do corrente pelas 16 horas no dito pagode. Aos 17 de julho de 1922

5 O escrivão

Ramacrisna A. Narcornim

A arrematação ordinaria anual das avenças de despeza das comunidades de Quitol, Naqueri e Quedem do ano de 1923 terá lugar nos dias 28, 29 e 30 do corrente respectivamente, pelas 12 horas nos logares das suas sessões.

Aos 15 de julho de 1922 6

O escrivão ajudante das com'es

Manguexa Naique

COMUNIDADE DE MOLCORNEM

No dia 29 do corrente pelas 16 horas irão á preça as avenças da despeza do ano de 1923 desta Comunidade no local das sessões. Aos 15 de Julho de 1922. 7

O escrivão

Ramacrisna A. Narcornim

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio que este assina, correm editos de 30 dias, contados do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos do art° 197 § 2 ° do Codigo do Processo Civil, citando a interessada Baguem e seu marido Xencora Babagi Naique Gauncar vulgo Biungi, maiores, moradores em parte incerta de Redi do territorio britanico para assistirem a todos os termos do inventario orfanologico a que se procede por obito de Essó Rauto, morador que foi de Assoldá, sendo inventariante e cabeça de casal Datu Utoma Rauto, da dita deduzindo querendo nêle os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento. Para ser publico se expediu este. Quepem, 18 de Junho de 1922.

O Escrivão de Direito

Aores Manuel Barrêto

Verifiquei 2 vez

O Juiz de Direito 2 ° subst.

8 *L. José de Souza*

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio de escrivão do 1 ° oficio Lobo correm editos de trinta dias, a contar do dia da segunda publicação deste, citando a interessada Emuna e seu marido Balsu Sail, de Mazaly, territorio britanico, em parte incerta para no praso de 10 dias findos os referidos trinta dias, pagarem no sobredito cartorio a quantia de 20 : 03 : 06 13/16 proveniente de quota parte de custas e selos liquidados nos autos de inventario orfanologico procedido por obito de Siva Naique, que foi de Batpal em que foi inventariante e cabeça de casal Xencora Rama Naique, do mesmo lugar, ou dentro do mesmo praso nomearem bens suficientes á penhora para o pagamento do pedido e de custas e selos acrescidos da execução sob pena de, não o fazendo, ser a nomeação devolvida ao exequente Ministerio Publico prosseguindo-se a execução seus termos á revelia. O que para ser publico se expediu este.

Xeldem 12 de Junho de 1922

O escrivão de direito do 1of

Manuel José Sebastião Lobo

Verifiquei

O Juiz 1 ° substituto 9

2 vez *J. Baptista Gomes*

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 oficio Lobo, correm editos de 30 dias a contar do dia da 2 a. publicacão deste citando a interessada Damiana Fernandes e seu marido Fransisco Fernandes residentes em Karwar do territorio extrangeiro, para assistirem a todos os termos até final do inventario orfanologico a que se procede neste juizo por obito de Joaquim Fernandes, que foi de Ponsulem de Canacona, sendo inventariante e cabeça de casal Bomba Fernandes, do mesmo lugar sem prejuiso do seu regular andamento.- bem assim para comparecerem no tribunal judicial desta comarca sito em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige á estação de Sanvordem na primeira audiencia posterior ao dito praso afim de conferirem o dote de 50 rupias recebido por ocasião do seu cassamento segundo declarou a dita cabeça de casal. As audiencias deste juizo se fazem todas as sextas feiras ás doze horas no referido tribunal se não forem feriados porque neste caso terão lugar nos dias imediatos se tambem não o forem e não estiverem compreendidos nas ferias. O que para ser publico se expediu este.

Xeldem 10 de Junho de 1922

O escrivão de direito de 1 of

Manuel José Sebastião Lobo

11 Verifiquei

O Juiz de direito 1 ° subst.

2 vez *J. Baptista Gomes*

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Lobo, vai á praça para a venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situada em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige á estação de Sanvordem no dia 8 do proximo mez de Agosto ás 12 horas pelo maior lanço que se oferecer o direito á quarta parte do predio denominado SORVADEVADO, da cultura de varez, coqueiros, jaqueiras e outras arvores fructiferas, situado em Sirvoy, discrito por inteiro na conservatorio desta comarca sob o n ° 7 622 do valor de 141 : 04 : 00 penhorado nos autos de execução fiscal que a Fazendo Nacional move a Roulú Gauncar de Sirvoi, como herdeiro de Dazô Gauncar que foi do mesmo para haver a importancia de 8 ; 10 : 04 proveniente de contribuição predial dos anos de 1910 a 1919 alem de selos e custas do processo. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro é as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaisquer credores e co-proprietarios incertos. Xeldem 10 de Julho de 1922

O escrivão de direito do 1° ofio

Manuel José Sebastião Lobo

O Juiz de direito

13 *A. Meireles*

Houve, pois, descuido-e descuido indisculpavel sobretudo na revisão que -desculpem-nos a sinceridade-torna o referido livro inaceitavel, segundo o nosso *impedagogico* modo de pensar.

Ao sr. Governador

O empreteiro duma obra do Sanguem foi pelo sr. Director das Obras Publicas Amorim intimado a conclui-la dentro dum certo e determinado praso, durante o qual era, segundo *a sciencia e consciencia* da engenharia, absolutamente impossivel a satisfação da conclusão exigida.

O dito empreteiro, porisso, requereu ao Governo provincial, pedindo-lhe de ordenar que fosse examinada a aludida obra por todos os engenheiros residentes no territorio de Goa e verificada a possibilidade da satisfação da exigencia do ilustre Director das O. P. sr. Amorim.

Não sabemos se foi ou não despachada a pretenção do interessado; mas pela atitude deste parece que ele tem razão, porque no caso contrario se não atreveria a dirigir tal requerimento.

O caso que não deixa de ser curioso sugere-nos as seguintes perguntas:-

¿Em que fica a competencia dum director - engenheiro das O. P. que manda concluir em cinco dias por exemplo uma obra cujo acabamento pede cinco mezes ?

¿ Ou haverá em tudo isso um maquiavelico jogo da vingança dum serrador de cima contra o serrador de baixo. ?

Incompetencia ou vingança. De duas uma.

Torna-se, porisso, nescessaria a intervenção do sr. Governador Geral nesse conflito de graça mas de maldita...*graça*.

—धुळें प्राणीरक्षक संस्थेनें आपल्या मोफत आयुर्वेदिक दवाखान्यांत पटकीवर उत्तम गुणकारी औषध तयार केलें असून गरजूंस तें संस्थेकडून मोफत पुरविण्यांत येतें. या औषधापासून हजारों लोकांचे जीव गेल्या दोन तीन वर्षांत बचावले आहेत.

—बद्री नारायणाच्या यात्रेस जाण्याचा बेत यात्रेकरूंनीं रहित करावा, कारण तिकडे गेल्या महिन्यात पाऊस पडला नसल्यामुळें अन्नाची फार दुर्भिळता झाली आहे. हा धोका जाणूनही कोणी जाईल तर त्यांस लक्ष्मण झोल्यापासून परत पाठविण्यात येईल असें तेथील सरकारनें जाहीर केलें आहे.

—काळे पाण्यांची शिक्षा झालेला ब्रह्मी कैदी पं. रामरक्ष (ब्राह्मण] यांचें जानवें काढून घेतल्यामुळें त्यानें ९० दिवस तुरुंगांत उपवास काढून प्राण सोडला ! मॅकस्विनीनें फक्त ७४ दिवसच अन्नत्याग केला होता.

—कोल्हापूर येथील मंडईतील श्री महालक्ष्मीचे देवळापुढील मेरीन मार्केटातील किराणा मालाचीं सहा दुकानें गेल्या आठवड्यांत मध्यरात्रीच्या सुमारास आग लागून आंतील मालासह जळून खाक झालीं. नुकसान सुमारें [illegible] हजारांचें झाल्याचें कळतें.

भारत

गुरुवार आषाढ व० ११ शो १८४४

प्रागतिकसंघ व करवाढ

श्रीयुत द्वारकानाथ, सुरगांव यांचा 'प्रागतिक संघाचा राजसंन्यास ?' हा लेख प्रसिद्ध होतांच त्याला पुष्टि देणारे कित्येक पत्रव्यवहार आमच्या ऑफिसांत येऊन थडकले. यावरून संघासंबंधीं लोकमताचा ओघ कोणत्या दिशेकडे वहात आहे, याचें अनुमान करण्यास सोपें पडेल.

'संघ ही संस्था वजनदार खरी, त्यांत वावरणारांचा देशाभिमान उत्कट खरा; पण जोंपर्यंत त्या वजनाचा किंवा देशाभिमानाचा उपयोग लोकांवर ओढूं पहात असलेल्या संकटांचा चुराडा होण्याप्रीत्यर्थ होत नाहीं, तोंपर्यंत संघ असला काय किंवा नसला काय मिळून एकच.' अशा वऱ्हेची विचारसरणी एक दोन पत्रांत आढळून येऊन आमच्या मनास फार फार वाईट वाटलें. पण वाईट वाटून उपयोग काय ? करवाढीच्या बाबतींत संघाच्या हातून कसलीच महत्वाची कामगिरी घडलेली नाहीं, ही सत्य गोष्ट त्यामुळें थोडीच लपणार आहे ! अस्तु.

झाली गोष्ट होऊन गेली. त्याविषयीं हळहळल्यानें संघांत कार्यक्षमता उत्पन्न होईल असें नाहीं. प्रागतिक संघ कार्यक्षम होण्यास जी तळमळ त्याच्या स्थापनेस कारणीभूत झाली त्याच तळमळीनें संघाभिमान्यांनीं आपले कळकळीचे प्रयत्न वेंचले पाहिजेत. संघाच्या आजपर्यंतच्या प्रयत्नांनीं हिंदी जनतेस कांहीं कांहीं फायदे झाले आहेत. त्याचें अस्तित्व अगदींच निरुपयोगी झालें आहे, असें नाहीं. पण करवाढीसारख्या अत्यंत महत्वाच्या विषयांत त्यानें कांहींच कार्य न बजावल्यानें जो दोष त्याच्या शिरावर लादण्यांत येत आहे, त्यांतून मुक्त होण्यास त्याला धडाडीच्या कृतीशिवाय दुसरा कोणताच उपाय शिल्लक उरलेला नाहीं हें कोणीहि कबूल करील.

संघासंबंधानें लोकांत विश्वास व आदर उत्पन्न होण्यास उपरोक्त गोष्ट होतां होईतों लवकर अमलांत आली पाहिजे. तसें न झाल्यास संघाला अनेक व अपरिहार्य अडचणींशीं क्षणोक्षणी टक्कर द्यावी लागून त्याच्या चांगल्या शक्तीचा क्षय वाईट कार्यांत होणार आहे, हें संघाच्या प्रत्येक हितचिंतकानें ध्यानांत वाळगिलें पाहिजे.

संघाचे कामचलाऊ अध्यक्ष इतर देशहितविषयक गोष्टींत गुंतून राहिल्यामुळें, सन्माननीय उपाध्यक्षांनीं कार्यकारीमंडळाची ताबडतोब सभा भरवून, संघाच्या गाड्याची गति वाढवून विरुद्ध होऊं पहात असलेल्या लोकमताला गति दिली पाहिजे. तरच संघाचें पुढील मार्गक्रमण [illegible] निष्कंटक होऊन [illegible] शक्यताहि [illegible] पात्र होईल. श्री. द्वारकानाथ व इतर प्रामाणिक टीकाकारहि त्यामुळें आनंदित होऊन, संघाभोंवतीं गोळा होण्यास एका पायानें व मुदितांतःकरणानें तयार होतील व देशकार्याला जोराचा नेट मिळेल, यांत संशय नाहीं. असो.

तात्पर्य काय कीं, संघाच्या इतर अवांतर गोष्टींपेक्षां आतां मुख्य कार्यावर भार देण्याचा समय टेपला आहे. या समयाचा फायदा घेण्याचे कामीं कसूर झाल्यास, नफ्यापेक्षां तोटेच जास्त होतील, हें लक्षांत ठेवून संघानें पुढें सरसावलें पाहिजे.

प्रागतिक संघाची कीर्ति, प्रागतिक संघाचा नांव लौकिक वाढणें हें संघाच्या कार्यकारी मंडळाच्या या पुढील धोरणावर अवलंबून आहे, इतकें सांगितलें म्हणजे मंडळाच्या जबाबदारीचें महत्व किती जोखमीचें आहे हें स्पष्टपणें सिद्ध होतें. श्री. द्वारकानाथ व इतरांच्या लेखासंबंधीं आणखी जास्त तें काय लिहिणार ?

स्फुट विचार

संदेशः—गांधीकॅप प्रकरणांतून भारत मुक्त झाल्याचें वर्तमान प्रसिद्ध झाल्यापासून त्याला ठिकठिकाणाहून अभिनंदनपर संदेश यावयास लागले आहेत. यावरून जनताजनार्दनाची त्यावर पूर्ण कृपा आहे असें स्वयंसिद्ध सिद्ध होतें. या कृपेच्या मजबूत पायावरच भारताच्या भावी सुधारणेची इमारत उभारली जाणार आहे. एकदां या सुधारणेच्या कार्यांत पुढाकार घेतला म्हणजे केव्हांच माघार घेण्याचा दुर्धर प्रसंग ओढूं नये म्हणून अनेक मित्रांच्या आग्रहावरून आम्हीं भारतसुधारणेचें कार्य आजपर्यंत पुढेंपुढेंच ढकलत आलो आहों. हेतु हाकीं, सुधारणेमुळें 'समुलस्य विनिश्यते' होऊं नये. परंतु गांधीकॅप प्रकरणांत जो उत्साह चोहोंबाजूंनीं दिसून आला, त्यामुळें आमची उमेद वाढत असून, आतां अवघ्या थोड्या मुदतींत भारत नव्या स्वरूपांत प्रसिद्ध करण्याचा आमचा जुना हेतु जोरावत आहे. हें येथ प्रांजलपणें कबूल केल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं. असो. ज्या भारतमित्रांनीं भारताला अभिनंदनपर संदेश पाठवून त्याला देशहितकार्यां उत्तेजित केलें त्याचा तो पूर्ण आभारी आहे. त्यांच्या अगणीत उपकारांतून उतराई होणें त्याला कधींच शक्य नाहीं.

नवीन करः—येत्या महिन्यापासून आंकडाताची आणखी दश टके करवाढ होणार असल्याची दाट वोलवा आहे ! पूर्वीच्या करांनीं जनता मरावयास टेंकली आहे, याकडे पूर्ण दुर्लक्ष करून, आमचें निर्दय सरकार करवृद्धीच्या लोकहितनाशक व आत्मघातकी मार्गापासून दूर होत नाहीं. या सारखी शरमेची दुसरी कसलीहि गोष्ट असूं शकेल, असें आम्हांस तरी निदान वाटत नाहीं ! करांमुळे कुटुंबाचीं कुटुंबें दरिद्री बनत चाललीं आहेत व कितीं तरी घरें जमिनदोस्त होऊं पहात आहेत, परंतु अप्पलपोटी सरकारला त्याचें कांहींच नाहीं. त्यानें आपलें कर वाढविण्याचें व तो चोपून वसूल करण्याचें काम मोठ्या धडाडीनें चालविलेंच आहे ! जनता तरी करांविरुद्ध आपली नापसंती कुठें दर्शवित आहे ? 'मागेल तें द्यावें सुखी असावें' याच मंत्राचा जप ती, डोळे मिटून व कानाचीं भोंकें कापसानें घट्ट आच्छादून, एकसारखी जपत राहिलेली आहे ! अशा स्थितींत देशाचें खोबरें होऊं लागलें असल्यास नवल तें कोणतें ! तसें झालें नसतें तर मात्र नवल होतें. असो, आतां तरी स्वस्थ घोरत न पडतां करवाढीविरुद्ध लढण्यास एकदिलानें सज्ज व्हा !

सार्वजनिक रस्तेः—रस्ते सुस्थितींत ठेवण्यासाठीं म्हणून जनतेकडून 'ब्रुंत लोकालें' कर वसूल करून घेत असतात. परंतु करांचा उपयोग रस्ते सुधारण्याचेच कामीं नेहमीं झालेला आढळून येतो असें नाहीं. निदान कुंकळ्ळीसंबंधानें असें विधान करण्यास आम्हांस कसलीच शंका वाटत नाहीं. तेथील जनता नियमितपणें कर चुकते करीत असते. पण रस्ते इतक्या खराब स्थितींत आहेत कीं, त्यांचें वर्णन करण्यास आमची लेखणी असमर्थ आहे ! अर्थांत लोकमत 'ब्रुंत लोकाल'विरुद्ध झुकत असल्यास नवल नाहीं. ही स्थिति समाधानकारक नाहीं. ग्रामकमेटीचे एक दोन मेंबर आमच्या ओळखीचे असून, ते हुशार आहेत, अशी आमची समजूत आहे. त्यांना आमची अशी सविनय विनंति आहे कीं, लोकमत शांत करण्यासाठीं त्यांनीं ताबडतोब रस्ते सुधारण्याच्या कार्यांत जास्त लक्ष घावें. 'ताबडतोब' म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, सदरहू कामीं दिरंगाई झाल्यास 'ब्रुंत लोकाल' रस्ता सुधारेपर्यंत कुंकळ्ळीच्या रस्त्यांची सुधारणा होणें अशक्य होईल !

सविनय प्रार्थनाः— आजच्या अंकीं दुसरीकडे सांखळी येथील काहीं दत्तभक्तांची जाहीर विनंति प्रसिद्ध केली आहे. 'मुख्य हरि कथा निरूपण' या तत्वास सदरहू सूचना पोषक असल्यावरून तिचा भाविकांकडून अनादर होणार नाहीं, अशी आम्हांस उमेद आहे. पणजीच्या श्रीमहालक्ष्मीच्या देवालयाप्रमाणेंच सांखळीचें देवस्थानहि अत्यंत महत्वाचे असून प्रत्येक वर्षीं दत्तजयंतीला तेथें बराच लोकसमूह लोटत असतो, हें मशहूर असल्यानें देवभक्तांच्या मदतीची उणीव सदरहू देवालयास पडणार नाहीं अशी आमची अटकळ आहे ती खरी ठरो !

बोटी व 'धक्के':—आमच्या सरकारच्या बोटी व कित्येक ठिकाणचे 'धक्के' किती अवनत स्थितींत पडत आहेत, याचवेळोवेळीं

सूचना

ब्रिटिश हिंदुस्थानांतील वर्गणीदारांच्या नावानें व्ही. पी. रवाना केल्या आहेत. नेहमीप्रमाणें त्याचा स्वीकार होऊन ते भारताला आभारांत ठेवतील अशी त्याला आशा आहे.

म. भारत

द्वैतभावाचा श्रीमंतांना निषेध वाटला नाहीं. कंपनीच्या आगमनासंबंधानें प्रस्ताव नि-वून श्रीमंतांचें त्यांना अश्वासन मिळालें व ते कंपनीचे चालक निघूनही गेले. ह्याच दिवशीं सरासरी सकाळचे दहा की अकरा वाजतां श्रीमंत रावसाहेब पणजीच्या एका प्रसिद्ध हॉटेलांत (ओतेल फ्रेसेंतिमध्ये) एका युरोपियन अम्मलदाराची (आंतोनियु मारीय दे लियांव ह्याची) गांठ घ्यावयाची होती म्हणून गेले असतां त्या हॉटेलांतील मेजावर वरील दोघेही पुणेंकर मद्यमांसावर ! पुरुषा शोडित असलेले त्यांच्या पाहण्यांत आले, त्यावेळीं पुणेकर इतके लजील झाले कीं गोव्यांत त्यांचें पुनश्च दर्शन झालें नाहीं. सारस्वत ब्राह्मणाच्या हातचें पाणी खपलें नाहीं, पण अविंधानें पचविलेली न्याहारी फार प्रिय झाली ! असे शेंकडों दाखले हजर करितां येतील. ही कुत्सित बुद्धीनें रचलेली काल्पनिक गोष्ट नव्हे. खरी खुरी आहे.

सांखळींतील कऱ्हाडे ब्राह्मण ज्ञातींतील वेदमूर्तीनीं श्रीमत्पूर्णानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या श्रीविठ्ठल मंदिरांतील पादपूजेचे वेळीं मनाचा समतोलपणा राखिला नाहीं ह्या गोष्टीची वरील कृतीशीं तुलना केली तर दगडांपेक्षां वीट मऊ असेंच म्हणावें लागेल. केवढाही कर्मनिष्ठ सारस्वत ब्राह्मण का असेना त्याला अब्राह्मण तुल्य समजावयाचें हा ठरीव क्रम ! तेव्हां हे चुकतात कीं चकतात.

श्रीमत्पूर्णानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या सांखळींतील फेरींत शूद्र लोकांनीं देखील मान राखण्याच कमी केलें नाहीं. शिवाय गोब्राह्मण प्रतिपालक श्रीशिवाजी महाराज ह्यांच्या ज्ञातींतील श्रीमंत भाऊसाहेब राणे सर देसाई ह्यांनींही स्वतःच्या इतमामानें सांखळींतील श्रींच्या मठांत जाऊन सारस्वत वैदिकाकडून श्रींची पाद्यपूजा करविली व जरीकांठी रेशमी वस्त्रें श्रींना समर्पण केलीं!

उपरिनिर्दिष्ट पुणेंकरांची हकीकत श्रीमंत रावसाहेब कुंकळ्ळीकर ह्यांचे प्रतिष्ठित पुतणे श्रीमंत दादासाहेब [शिवराम सांतवा शेणवी] ह्यांच्या स्मरणांत अद्यापि राहिलीच असेल व ओतेल फ्रेसेंतचे त्या वेळचे व्यवस्थापक सिं. गोमिस हेही अजून हयात आहेत. ओघानुसार वरील पुणेंकरांचें चित्र रेखाटावें लागलें ह्या बद्दल फार फार दिलगीर आहें.

गुजराथेंत डाकोर क्षेत्रांत 'पंड्ये' उपनांवाचे नामधारी ब्राह्मण आहेत त्यांना देखील सारस्वत हें नांव उच्चारणास किळस येते. कोंकणांत किंवा देशावर जरी ह्या मासला ब्राह्मण, परभु, शेणवी अशी जर वर्गवारी होती तर सारस्वत हें नांव उदयास येण्याची आशाच नको.

डि. फं. ४ आणे — सारस्वत

आभार प्रदर्शन

ज्या वर्गणीदारांनीं आमच्या विनंतीला मान देऊन भारताच्या मागील व चालू सालच्या वर्गणी चुकत्या केल्या, त्याच भारत पूर्णाभारी आहे. ज्यांकडून अजून वर्गणी पाठविलेली नाहीं, त्यांकडून भारतास योग्य वेळीं मदत होईल अशी आम्हांस आशा आहे. पणजीच्या वर्गणीदारांनी मा. नि. स. रामचंद्र वंद्य यांकडे वर्गणी भरावी.

मनेजर भारत

Anuncios

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio que esta assina, correm editos de 30 dias, contados do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos do art.° 197 § 2 ° do Codigo do Processo Civil, citando a interessada Baguem e seu marido Xencora Babagi Naique Gauncar vulgo Biungi, maiores, moradores em parte incerta de Redi do territorio britanico para assistirem a todos os termos do inventário orfanológico a que se procede por obito de Esso Rauto, morador que foi de Assoldá, sendo inventariante e cabeça de casal Datu Utoma Rauto, da dita deduzindo querendo nele os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento. Para ser publico se expediu este. Quepem, 18 de Junho de 1922.

O Escrivão de Direito
Aores Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito 2 ° subst.
L. José de Souza

Visto
1 *S. B. Rau*

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio de escrivão do 1 ° oficio Lobo correm editos de trinta dias, a contar do dia da segunda publicação deste, citando a interessada Emuna e seu marido Balsu Soil, de Mazaly, territorio britanico, em parte incerta para no praso de 10 dias findos os referidos trinta dias, pagarem no sobredito cartorio a quantia de 20 : 03 : 06 13/16 proveniente de quota parte de custas e selos liquidados nos autos de inventario orfanologico procedido por obito de Siva Naique, que foi de Batpal em que foi inventariante e cabeça de casal Xencora Rama Naique, do mesmo lugar, ou dentro do mesmo praso nomearem bens suficientes á penhora para o pagamento do pedido e de custas e selos acrescidos da execução sob pena de, não o fizendo, ser a nomeação devolvida ao exequente Ministerio Publico proseguindo-se a execução seus termos á revelia. O que para ser publico se expediu este.

Xeldem 12 de Junho de 1922

O escrivão de direito do 1 of.
Manuel Jose Sebastião Lobo

Verifiquei
O Juiz 1 ° substituto
2 *J. Baptista Gomes*

अत्यंत सुलभ कृतीचा व अल्प श्रमात बनणारा कपडयांचा व आंगाचा स्वदेशी

साबणाचा धंदा

हा धंदा लहान खेडयापाडयांत सुद्धां पांच रुपयांच्या भांडवलापासून सुरू करितां येतो. यास विस्तवाची तर मुळींच गरज लागत नाहीं व यांत चरबी वगैरे अपवित्र वस्तु पडत नसून मुबलक मिळणाऱ्या वस्तु पासून तयार होत असतो. स्वदेश भक्तांनीं खालील पत्यावर पत्रव्यवहार करून माहितीची फी विचारून घ्यावी.

पत्ताः—
B. V. Kholkar
Post:— Marcela, Gôa 3

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 oficio Lobo, correm editos de 30 dias a contar do dia da 2 a. publicação deste citando a interessada Dumiana Fernandes e seu marido Francisco Fernandes residentes em Karwar do territorio extrangeiro, para assistirem a todos os termos até final do inventário orfanologico a que se procede neste juizo por obito de Joaquim Fernandes, que foi de Ponsulem de Canacona, sendo inventariante e cabeça de casal Bomba Fernandes, do mesmo lugar sem prejuiso do seu regular andamento.– bem assim para comparecerem no tribunal judicial desta comarca sito em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige á estação de Sanvordem na primeira audiencia posterior ao dito praso afim de conferirem o dote de 50 rupias recebido por ocasião do seu casamento segundo declarou a dita cabeça de casal. As audiencias deste juizo se fazem todas as sextas feiras ás doze horas no referido tribunal se não forem feriados porque neste caso terão lugar nos dias imediatos se tambem não o forem e não estiverem compreendidos nas ferias. O que para ser publico se expediu este.

Xelilem 10 de Junho de 1922

O escrivão de direito de 1 of
Manuel Jose Sebastião Lobo

Verifiquei
O Juiz de direito 1 ° subst.
4 *J. Baptista Gomes*


तुमच्या घराचें सौंदर्य



त्यांच्या कठड्यावरच विशेष अवलंबून आहे ही गोष्ट विसरूं नका. ओबडधोबड व बेडौल कठडे बसविल्यानें एखाद्या चांगल्या इमारतीची शोभा नाहींशी होते. तेंच डौलदार व सुंदर कठड्यांनीं साध्या घराचें स्वरूपही खुलून त्याला रम्यपणा येतो. तुम्हांस आपल्या घरासाठीं कठडे पाहिजे असल्यास ते कोठून मागवावे याबद्दल खोल विचार करण्यास नको कारण

किर्लोस्कर बंधूचे नक्षीदार कठडे

हे सर्व मार्मिक व हौशी गृहस्थांनीं पूर्ण पसंत केले असून तुम्हांलाही तेच आवडतील.



शोभिवंत बांक

तुमच्या घरांत अगर बागेंत नेहमींच्या उपयोगासाठीं ठेवण्यास फार लायक.

सचित्र पत्रकें मागवा
किर्लोस्कर बंधु लिमिटेड
पो. किर्लोस्करवाडी (जि सातारा)

5

COMUNIDAE DE CACORA

6

Vão á praça em 28 do corrente, ás 15 horas no local das sessões em Cacorá as avenças de receita e despesa da dita comunidade de Cacorá do trienio de 1923 a 1925 e de 1923 respectivamente.

Aos 10 de Julho de 1922.
O escrivão da Comunidade—
Utoma P. Sinai Odurcar.

COMUNIDADE DE COTOMBI

7

Em 25 do corrente ás 14 horas começará a arrematação ordinaria das avenças de receita trienal do triénio de 1923 á 1925 e das despesas do ano de 1923 da dita comunidade de Cotombi no local das suas sessões.

Aos 9 de Julho de 1922
O escrivão encarregado—
Utoma P. Sinai Odurcar.

mais, alem de procurações, reconhecimentos de escritos particulares e outros cujos emolumentos devem ser suficientes para os dois tabeliães não se julgarem pessimos empregados

Alem disto em vista da actual área da comarca que se compõe alem de todos os concelhos de Sanquelim e Satary das aldeias Orgão do concelho de Pondá, S. Estevam do concelho das Ilhas e Alorna e Abranpur do concelho de Pernem, tornam-se mesmo indispensaveis os dois cartorios dos tabeliães, para serem satisfeitas as necessidades do publico que com a reducção pretendida será obrigado a sujeitar-se a toda a sorte de dificuldades e transtornos, o que certamente convem evitar.

Mas o Estado que economia fará extinguindo o logar de tabelião? Da receita dos direitos de mercê que o tabelião novo tem de pagar ao Estado?

Se não, porque quere a nossa autonomia prejudicar os tabeliães de outras comarcas que hão de pedir as suas transferencias que legalmente lhes pertence? Quer eterniza-los no logar onde estão? Não pode sêr.

Bicholim *O mesmo*

ECOS & CRITICA

Administradores

Consta-nos que vão vagar alguns lugares de administradores concelhios. Aproveitamos deste ensejo para lembrar ao governo provincial a conveniencia da nomeação dum ou mais hindus competentes para aqueles cargos para que a classe hindu se convença de que tais lugares de confiança não constituem monopolio de ninguem e que o governo, sem nenhuma distincção, tira, em beneficio de boa administração, partido da competencia, onde quere que ela exista.

E, felizmente, hoje, não faltam hindus competentes.

Em Cuncolim

Estivemos outro dia em Cuncolim. Tivemos, então, a ocasião de experimentar a intransitabilidade da estrada que de Madecató se dirige a Sanvarcotó. Dizemos mal, quando dizemos a *intransitabilidade da estrada*, porque o que ai vimos e sentimos não foi *estrada* ou coisa que valha mas sim um longo e interminavel rigueiro duma profundidade variavel a cada passo.

Tudo al-os que pagam regularmente a contribuição do trabalho gratuito está indignado contra tal estado de coisas e com razão; pedimos por isso, a quem competir urgentes providencias sobre este assunto.

Para o n.° imediato

Por acumulação de anuncios obrigatorios, tivemos de reservar para o n.° imediato alguns assuntos de inter sse palpitante bem como reduzir esta secção.

Perdão, nos, leitores!

भारत

गुरुवार आषाढ व० ४ थी १८४४

सत्यमेव जयते

सत्य संकल्पाचा दाता भगवान
सर्व करी पूर्ण मनोरथ ॥

गांधीकॅपसंबंधीं 'भारता'विरुद्ध भरण्यांत आलेला खटला काढून टाकण्याविषयीं कोर्टाचा हुकूम झाला असून, सदरहू प्रकरणांत विद्यार्थ्यांच्या हितार्थ आह्मीं स्वीकारलेलें धोरण न्याय्य व योग्य होतें, याची ग्वाही पिंसलकोडानेंच जगाला दिल्याबद्दल आह्मांला फार समाधान वाटतें. व या आमच्या आनंदांत ज्या देशाभिमानी व निःस्वार्थी विद्यार्थ्यांनीं कशाचीहि पर्वा न करतां केवळ महात्मा गांधीच्या स्वराज्य पोषक चळवळीचा बोजवारा उडूं नये ह्मणून गांधीकॅप प्रकरणांत अगदीं अखेरपर्यंत नेट दाखविला, तेहि भाग घेतील हें उघड आहे.

उपरोक्त चळवळींत 'भारतानें' उचललेली बाजु न्यायाची होती. टोपी प्रकरणांत सत्याचा तेजस्वी प्रकाश पाडण्याखेरीज त्याचा दुसरा कोणताच हेतु नव्हता. असें असतां फिर्यादीपक्षानें आपलें अन्यायी वर्तन न्याय्य ठरविण्यासाठीं प्रत्यक्ष सत्याला पायाखालीं चिंगरून 'भारताला' कोर्टांत खेंचण्याचा सज्जनांस त्याज्य अशा वाम मार्गाचा अवलंब केला. पण न्याय दरबारांत त्याची कसलीच डाळ न शिजतां, जनता जनार्दनाच्या कृपेनें आम्हीं दोषमुक्त ठरून, अशाच्या मार्गें लुडबुड करणाऱ्या या क्षवल्या पण अतिशय महत्वाच्या खटल्याचा वादींविरुद्धच निकाल लागला व आम्हीं प्रतिपादन केलेल्या सत्याचा शेवटीं विजय झाला.

आजपर्यंत भारताला चार खटल्यांचा मारा सहन करावा लागला. पण त्या चारहि खटल्यांत कोणत्या ना कोणत्या अतर्क्य कारणानें परमेश्वरी संकेतानुरूप तो अखेर यशस्वी झाला. यावरून इतकाच बोध घ्यावयाचा कीं, परमेश्वरावर अढळ श्रद्धा ठेऊन कोणत्याहि सार्वजनिक कार्याला प्रारंभ केला ह्मणजे त्यांत यश हें ठरलेलेंच असतें. परमेश्वर कार्यकर्त्याचा पूर्ण वाली असल्यानें तो त्याला प्रत्येक संकटांत अनपेक्षित सहाय्य पुरवीत असतो हा सिद्धांत त्रिकालाबाधित आहे.

शेवटीं ज्या जगन्नियंत्यानें भारताला अनेक संकटांतून मुक्त करून कार्यक्षम केलें त्याला कृतज्ञतापूर्वक शतशः प्रणाम करून हा लहानसा लेख येथेंच आटोपतें घेतों.

—एका अमेरिकन तरुण लेडीनें पुरोहितासमक्ष, पाण्यांत पोहतां पोहतां, सायबाला विवाहित करून घेतलें !

स्फुट विचार

योग्य सूचनाः—वे. शा. सं. श्रीनिवास भट, रहाणार बडोदा, यांनीं गोव्यांतील एका देवळाचे महाजन या नात्यानें येथील सरकारला कांहीं सूचना केल्या आहेत. त्या आमच्या मतें योग्य असून सरकारनें तातडतोब लक्षांत घेण्यासारख्या आहेत. भटजीबोवांचें असें ह्मणणें आहे कीं, देवळास अनुलक्षून असलेले एकंदर कायदेकानू सरकाररित्या मराठी भाषांतरीत रूपानें असावे; देवळांतील एकंदर व्यवहार बालबोध लिपींतून व्हावा व सर्व कारभार योग्य जबाबदारीनें पार पडण्यासाठीं देवळांच्या चिटणीसांस ठरीव वेतनाची योजना करण्यांत यावी. आमच्या देवालयांच्या महाजनबंधूची संख्या गोव्यापेक्षां ब्रिटिश हिंदुस्थानांत जास्त असल्यावरून व तेथील रहिवाशी बहुतकरून पोर्तुगीज भाषेंत अनभिज्ञ असल्यावरून, भटजीबोवांनीं मांडलेल्या सूचना अमलांत येण्याप्रीत्यर्थ देवळाचे येथील हितचिंतक सहानभूतिपूर्वक प्रयत्न करतील अशी आह्मांस उमेद आहे. देवळांच्या नियमबंदींत सुधारणा सुचविण्यासाठीं नेमण्यांत आलेली कमिटीहि सुदैवानें विचारी हिंदु गृहस्थांचीच असल्यावरून आमची उमेद अनाठायीं नाहीं, असेंच कोणालाहि कबूल करावें लागेल.

एक कल्पनाः—आमचें सरकार 'रेडा' बनलें आहे, असें कोणी विधान केलें तर तो वेडा ठरेल असें आह्मांस तरी वाटत नाहीं. रेड्याच्या पाठीवर कितीहि मुसळधारा पाऊस पडला तरी जसें त्याचें समाधान होत नाहीं तसेंच सरकारच्या पाठीवर कितीहि करांचा पाऊस पडला तरी त्याच्या गरजा भागत नाहींत त्या नाहींतच ! अशा या अनुकंपनीय स्थितींत सरकारला कांहीं तरी मार्ग दाखविणें आमचें कर्तव्य आहे. व या कर्तव्यास अनुसरून आह्मीं सरकारसमोर अशी कल्पना मांडण्याचें धाडस करितों कीं, तिजोरीस पडलेली तूट भरून निघण्यासाठीं त्यानें यापुढें प्रत्येक डोक्याप्रमाणें कर वसूल करण्याऐवजीं प्रत्येक आंत–बाहेर येणाऱ्या जाणाऱ्या इसमाच्या वजनाप्रमाणें कर वसूल करण्याची पद्धत अमलांत आणण्याचा ठराव प्रसिद्ध करावा. वजनांप्रमाणें कर बसविण्यांत आल्यास तिजोरीचें वजन वाढलें हि सिवाय सरकारच्या इभ्रतीचें हि वजन वाढणार आहे ! इतकेंच नव्हे तर ही वजनदार नूतन व्यवस्था मूर्तस्वरूपांत उतरल्यास दहा वर्षांखालील मुलांची डोकीं जी आज करांविरहीत उघडीं [illegible] पडतात तींहि तशीं पडणार नाहींत, वजनाप्रमाणें त्यांची कशी तरी सोय लागणार आहे ! तात्पर्य सरकारनें ही वजनदार व [illegible] कल्पना अमलांत आणल्यास लोकांचें वजन [illegible] तिजोरीचें वजन शुक्लेंदुप्रमाणें वृद्धि पावणार आहे !

इतर फायदेः—उपरोक्त फायद्यांशिवाय वजनानुरूप कर बसविले गेल्यास इतर धार्मिक स्वरूपाचेहि फायदे होणार आहेत. ते असे कीं, वजन आकारण्याचे बाबींत सरकारनें लोकांना 'निर्जिव' माल मानलें पाहिजे. एखाद्या हालचाल न करणाऱ्या ट्रंकांत व हालचालीनें गडबड बडबडणाऱ्या माणसांत अंतर किंवा फरक ठेवितां कामा नये. अर्थात प्रतिमासिक सृष्टींत जड व अजड असे जे कित्येकांकडून प्रापंचिक दृष्टीमुळें काल्पनिक भेद मानले जातात ते, सरकारच्या सदरहू कृत्यानें समूळ विलयास जाऊन एखाद्या घोड्यांत व आपणांत बिलकूल भेद नाहीं, हें धार्मिक–पारमार्थिक–उच्चतम तत्व प्रत्येक नागरिकाच्या अंतःकरणांत वज्रलेप होणार आहे. वजनी पद्धतीनें इतक्या महत्वाचा आमचें पारमार्थिक वजन वाढविणारा फायदा झाल्यास आणखी काय पाहिजे ! मनुष्याचें अंतीम ध्येय पारमार्थिक उन्नति, हें होय. तें जर सहजासहजीं योगभोगांच्या त्रासदायक भानगडींत न सांपडतां सदरहू वजनी कल्पनेनें साध्य होत आहे, तर प्रत्येक धर्माभिमानी माणसानें तिला उराशीं बाळगलेंच पाहिजे, असा आग्रह कोणीहि केल्यास, त्याचा अनादर होणार नाहीं, असें वाटतें. तेव्हां 'भारत' सरकारशीं आमची अशी नम्र विज्ञप्ति आहे कीं, त्यानें सर्व कामें बाजूस सारून गोमांतकीय लोकांचें वजन आकारण्याच्या कामास एकदम लागावें !

ब्राह्मण व ब्राह्मणेतरः— ब्राह्मण व ब्राह्मणेतर असे पक्ष ब्रिटिश हिंदुस्थानांत आढळून येतात. सुदैवानें असले पक्ष गोव्यात उत्पन्न करण्याचा कोणी कितीहि प्रयत्न केल्यास त्यास यश येणें शक्य नाहीं. कारण, गोव्यातील मुख्य ब्राह्मण ह्मणजे सारस्वत हे होत. ते जात्याच उदारमतवादी असून व्यवहारदक्ष असल्यावरून दुसऱ्याच्या भानगडींत कारणाशिवाय पडण्यास त्यांस फुरसतच मुळीं नाहीं. यावरून असें मात्र समजावयाचें नाहीं कीं, सारस्वतांत स्वजातीविषयीं अभिमान वसत नाहीं. त्यांच्यांत आपल्या जातीविषयीं पूर्ण अभिमान आहे, पण ते केवळ आपल्या अभिमानाचा [illegible] दुसऱ्या जातींची उन्नति खुंटविण्यांत [illegible] नाहींत. हें [illegible] सिद्ध [illegible] आहे. [illegible] त्यांनीं अनेकदां दुसऱ्यांच्या अभ्युदयार्थ [illegible] वेचले. [illegible] लोककल्याणतत्परता [illegible] काळात [illegible] आहे; असें [illegible] जर कितीहि [illegible] 'ब्राह्मणेतर' [illegible] त्यांच्या [illegible] कारण नाहीं. [illegible] 'ब्राह्मणेतरांचें' [illegible] कृतघ्नतेचा [illegible] प्रसंग ओढवण्याचा [illegible] सारस्वतांनी [illegible] कोठें मारलेलें नाहीं. हें येथें नमूद करण्यास समाधान वाटतें.

गोव्यांतील चळवळीः—आजपर्यंत गोव्यांत अनेक चळवळी सारस्वतांच्या नेतृत्वाखालीं [illegible] आहेत. त्यांचा इतिहासानें सूक्ष्म परिशिलन के-

ANUNCIO 8

Nos dias 20, 21, 23 e 24 do corrente ás 14 horas [illegible] praça [illegible] cas das despezas do seguinte ano de 1923 e das comunidades respectivamente de A[illegible]odá, Corchodem, Cule Xelvona e Xelvona no local das suas sessões. Aos 10 de Julho de 1922.

O escrivão
Uttama P. Sinai Quarcar

जगांत होईल अनर्थ सारा ॥
जरी रुसे शेतकरी बिचारा ॥

आज आपल्या देशांतील लोकांची स्थिति काय झालेली आहे हें नव्यानें आतां कोणास सांगितलें पाहिजे असें नाहीं. कारण तिचा सर्वांस सारखा परिणाम सोसावा लागत आहे. ज्या बाजूनें विचार करावा ती प्रत्येक बाजू आपली लंगडी आहे ! त्या त्या बाजूनें आपली पीच्छेहाट होत आहे. अशा बिकट वेळीं ज्याला ज्या रीतीनें शक्य होईल व सुचेल तो उपाय प्रत्येकानें करीत राहिलें पाहिजे. आतां परकीयांनीं सर्वतोपरी ग्रसित केलें, तरी दुसऱ्यांस दोष देत बसण्यापेक्षां या विपन्नावस्थेंतून उत्तीर्ण होण्यासाठीं संतोष आणि ऐक्यभाव उत्पन्न करण्यास झटलें पाहिजे. व आपापली सुधारणा केली पाहिजे.

प्रथम संतोष कोणत्या लोकांत उत्पन्न करणें व कां इष्ट आहे. या बद्दल मला विचार करावयाचा आहे. प्राचीन काळीं आपल्या आर्य लोकांत मुख्य वर्ण चार असून ही वर्ण व्यवस्था त्यांच्या व्यवसाय भेदावरून झाली आहे. ज्यांनीं देशांत अध्ययन व अध्यापनद्वारें ज्ञानसंपत्ति वाढविण्याचें काम हातीं घेतलें ते ब्राह्मण; ज्यांनीं देशांतील मालमत्तेचें व लोकांचें परशत्रूपासून रक्षण करण्याचें काम पत्करलें ते क्षत्रिय; आणि परदेशाशीं व्यापार उदीम वगैरे करणारे ते वैश्य होत. शेवटीं राहतां राहिले शूद्र. यांचा धंदा म्हणजे मजुरी व शेती भाती करून उदर निर्वाह करणें होय. हे लोक जातीनें कनिष्ट समजले जात व आजही समजले जातील तरी आजच्या विषयाच्या दृष्टीनें त्यांचें इतरांपेक्षांही जास्त महत्व आहे.

वर लिहिलेले व्यवसाय व वर्ण आजमितीला आपल्यांत संगतवार असलेले दिसणें अशक्य आहे. अमक्याला अमुक व्यवसायावरून अमुक संज्ञा देतांच यावयाची नाहीं.कारण प्रस्तुतच्या विपरीत कालानें तसा निर्बंध पाळगण्याला कोठेंच सवड ठेवली नाहीं. पोटासाठीं ज्याला जो धंदा सुचेल तो तो प्रत्येक जण करूं लागला. नोकरी [सरकारी) करणें हें तर एक उपजिविकेचें मुख्यच साधन होऊन बसलें आहे. आपणांपैकीं बहुतेकांची याच बाजूस प्रवृत्ति असल्याचें अनुभवास येतें. अशानें देशाची ऊर्जितकळा उदयास येण्याची आशा तर नकोच. पण उलट अधिकाधिक विपन्नावस्था मात्र प्राप्त होत जाईल यांत संशय नाहीं. कारण ज्या गोष्टीकडे विशेषेंकरून लक्ष पुरविलें पाहिजे व जीमुळें एकंदरांचें जीवन चालतें, त्या बाबतींत आमची स्थिति बरीच असमाधानकारक आहे. ही गोष्ट म्ह. शेतकरी व मजूर वर्गाला उत्तेजन देऊन त्याला संतुष्ट ठेवणें ही होय. कारण देशाची संपन्नता वस्तुतः याच लोकांच्या परिश्रमावर अवलंबून आहे. व तीच खरी आहे.

कांहीं काळापूर्वी आपल्या देशांतील लोकांचे देवघेवीचे व्यवहार धान्याधान्यांनीं होत असत. हा एकधान्य दिलें तर त्या बद्दल त्याकडून दुसरें धान्य घ्यावयाचें. नाणीं क्वचित आढळत. पण पुढें हा मनु बदलत चालला. धान्यादिकांचा व्यवहार अदलाबदलीनें होणें उत्तरोत्तर कमी पडूं लागलें. व नाणीं प्रचारांत येऊं लागलीं. हीं नाणीं सोन्यारुप्याचीं तांब्याचीं आणि आतां तर कागदी नोटांपर्यंत मजल पोंचली आहे.असें झाल्यानें व्यवहारामध्ये सोय झाली. पण त्या मानानें समृद्धीचें पारडें हलकें होत चाललें. आतां धान्याधान्यांनीं व्यवहारच अशक्य झाला. याचें कारण धान्योत्पत्ति करणाऱ्या वर्गास अवश्य तितकें उत्तेजन नाहीं. इतरही सरकारी वगैरे बाजू किरकोळ आहेतच. नाहीं असें नाहीं. पण— मुख्यही—जर खरोखर ह्या शेतकरी वर्गास व मजूर वर्गास त्यांच्याशीं धनी व कूळ या नात्यानें किंवा इतर रितीनीं वर्चस्व चालवणाऱ्या लोकांकडून सलोख्याचें वर्तन असतें तर सांप्रतच्या इतकी निकृष्टावस्था प्राप्त झाली नसती असा माझा समज आहे.

कित्येक वेळां असे पुष्कळसे मासले दृष्टीस पडतात. गरीब शेतकरी लोकांनीं ग्रीष्म व उन्ह शेतांत काबाडकष्ट करून दाणे उत्पन्न करावेत व धन्याच्या घरीं नेऊन पोंचवावेत इकडे गुदस्तापेक्षां यंदां कुळाकडून ज्यास्त फायदा कसा घेतां येईल इकडे फाकडदृष्टीनें टपून बसलेले धनीसाहेब असतातच. कुळाकडून कांहीं मागें पुढें झाल्यास त्या बिचाऱ्यावर ते मनसोक्त असा गोप्रदानाचा वर्षाव करतात! प्रसंगविशेषीं या खाष्टपणाच्या अतिरेकानें त्यांचें नुकसान करण्यास प्रवृत्त होतात. पण हा केवळ प्रमाद आहे. हीच गोष्ट मोलमजुरी करणारांविषयीं.समजा, एखाद्या मजुराकडून काम करून आपण घेतों. तो बिनकसर काम करतो पण त्यास मजुरी देतेवेळीं मात्र कृपणता होईल त्या रीतीनें करण्याकडे व देशाची बचत करण्याकडे आपलें कसून लक्ष असतें. खरोखर असें करण्यानें तो मजूर संतोषानें काम करीत नाहीं. अर्थांत तें तितकें बिन कसूरही होत नाहीं. अशा वेळीं मनुष्यानें हात सैल ठेवणें दोन बाजूनीं हितकर व फायदेशीर आहे. एक कार्यसिद्धि व दुसरें समाधान.

अशा दृष्टीनें पाहतां आमच्यांत विचार जागृति फारच थोड्या लोकांत आढळून येईल. कित्येकांकडे पैसा असेल, जे मोठे धनिक असतील अशांनीं इकडे लक्ष देऊन द्रव्यसामर्थ्य खर्ची घालणें जरूर आहे. पैसे जवळ असल्यानें खरी संपन्नता कोणाचच होणार नाहीं. कारण पैसा ही खरी संपत्ति नसून तें एक विनिमयाचें साधन आहे. त्याचा खरा उद्देश कोणता असेल तर हाच कीं, जातीनें व दर्जानेंही कनिष्ठ पण उपयुक्तच्या दृष्टीनें इतरांपेक्षां कंकणभर जास्त श्रेष्ठ अशा लोकांस म्हणजे शेतकरी व मजूर ह्यांना समाधान राखण्याकडे होय कारण, आपणा सर्वांच्या जीवनाची मदार ह्यांवर अवलंबून आहे.

एखादे वेळीं जर हा वर्ग असंतोष होऊन संप होऊं लागतील तर आमच्या सारख्या पांढरपेशा पण निरुद्योगिता प्रिय अशांची कशी दैना उडेल याची नुसती कल्पनाच केली पाहिजे. अशा गोष्टी तूर्त होत आहेत व कित्येक कारखान्यांची कामें जेथल्या तेथें खोळंबून राहिलीं आहेत. तेव्हां या गोष्टीचा विचार करणें अवश्य आहे.

गणेश रामचंद्र बोडस.

नवदुर्गा वि. मडकई

या विद्यालयाची वार्षिक परीक्षा, श्री. गणपतराव सामंत हेडमास्तर श्री शारदाविद्यालय कुंभारजुवें (प्रचारक गोमांतकीय मराठी शिक्षक संघ) व रा. रा. काशीनाथ नारायण कामत यांनीं ता १० व ११ जूनला घेतली व सोमवार ता १९ रोजीं रा. सामंत यांच्या अध्यक्षतेखालीं बक्षीस समारंभ झाला. त्यावेळीं मुलांचीं गाणी, संवाद, चरक्यावर सूत काढणें वगैरे कामें झाल्यावर संस्थेचे व्यवस्थापक रा. शाणु व्यंकटेश भरणें [प्रो. नेवरें] यांचें भाषण झालें. नंतर रा. काशीनाथ नारायण कामत यांनीं रिझल्ट वाचून दाखविला. तो खालीं लिहिल्या प्रमाणें:—

इयता	विद्यार्थी	प. बसली	पास झाली
४	७	७	६
३	४	४	२
२	९	९	७
१	१२	१२	९
बालवर्ग	१५	—	—
—		३२	२४
४७			

नंतर मुलांस बक्षिसें वाटल्यावर अध्यक्षांनीं थोडक्यांत मुलांस समयोचित उपदेश करून, समारोप केला. रा. भरणें यांनीं आभारप्रदर्शन केल्यावर व हार तुरे वगैरे वांटल्यावर समारंभाचें काम आटोपलें.

शाळेचे हेडमास्तर रा. कामत यांनीं दरमहां दोन रुपये वर्गणी शाळेला देण्याचें जाहीर केलें; हें त्यास भूषणावह असल्यानें त्यांचें अभिनंदन करणें योग्य आहे. असो.

रा. गणपतराव सामंत ह्यांनीं आपल्या शाळेच्या कामाचा बोजा संभाळून या शाळेच्या परीक्षेस येण्याची तसदी घेतली याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

एक प्रेक्षक

Sabida essa tendencia de retaliações de muita parra e nenhuma uva que, embelesa o talento do sr. Tarcar; não é superfluo que eu continue a maçar o *Bharat* e os seus estimados leitores?

Vamona

Surje na scena o sr. Nanum Tarcar Pernencar e em tom intimativo proprio do *leader* dos ilustrados manejadores de navalha exige-me que eu lhe declare quem seja para me oferecer o saquinho de navalhas e tesouras e para me instruir...*ex-oficio* no oficio da sua profissão de barbeiro. Agradeço-lhe a gentilesa ainda que, em preço ela não valha nem ceitil.

Nada de fúrias, sr. Nanum que élas o comprometem seriamente.

¿*Não* acha que eu tenho razão quando-lhe disse que ele era incompetente para dar conselhos a outrem, de *limpar* os farazes, ele que com a sua classe, não fazem barba aos ditos farazes e alparqueiros?

¿ Não é injusto que quem, como o sr Nanum, tem a sua casa a *feder*, introduza o seu focinho nos monturos do lixo doutras casas?

Inda bem que concorda comigo; mas simplesmente por mero amor ...aos cabelos e barbas dos bramanes, deixam os correligionarios do sr. Tarcar de *tocar* nos farazes e alparqueiros, porque, se o fizessem, seriam os barbeiros perseguidos pelos bramanes e *considerados tambem aspraasa.* E assim não havendo barbeiros que não sejam *aspraasa*, ficarão os bramanes (como sucede em Borim?) com barbas e cabelos crescidos, o que o *generoso* sr. Nanum quer evitar, enquanto não tenha a certeza de que eu e os meus companheiros possamos desempenhar bem a profissão da classe a que pertenco. Apetitoso *pretexto*, não há duvida!

Apesar de eu não ser bramane pela simples razão de *sorcuruimbim* como todos sabem, garanto-lhe, todavia, que os bramanes não levarão a mal que os barbeiros *toquem* nos farazes e alparqueiros, admitindo-os tambem nas suas escolas, festas e jantares opiparos ou *oviparos*. Tenha mesmo a certeza de que não terá o sr. Nanum que embrenhar-se nas barbas e cabelos crescidos dos bramanes, juntamente com a sua numerosa classe. Mas por Deus sem limpar a sua casa e empregar os seus *esforços...de uvas em prol do progresso daquelas classes analfabetas*, não se atreva a levantar a cerviz para dictar leis, que então continuará a ser considerado *incompetente, sem autoridade nem direito* ...para falar nos farazes.

Quem tem telhado de vidro, não deve sentir-se com competencia, autoridade ou direito para atirar pedras ao do visinho, bem lembrou o *Bharat* de mistura com outros argumentos demonstrativos da *sem razão* ..das iras do sr. Tarcar.

Sim, sr. Nanum. Procedeu mal em tocar num assunto ... *intocavel* para si. Queria salientar-se, mas abusou-se: pretendeu sentir-se sobre a cabeça dos farazes, mas caiu ao pé deles sem forças para se levantar. Quiz mostrar se o que não era mas ficou *mostrado* o que era.

Trabalhou *pedibus manibusque* para provar que era liberal dos quatro costados e ficou provado que praticamente não passava dum simples amigo de parra. retaliações e odios, isto é, dum terrivel reaccionario. Quiz disfarçar a mentira e ficou descoberta a peta.

E' que quem faz o qual quere, experimenta o que não quere.

Aformosea o sr. Pernencar a sua carta com varias outras belezas, proprias—déle, mas como elas me não dizem respeito nem á minha opinião, ponho-as no cesto de... lixo que doutra coisa não são dignas.

Tucarama

Não deve ser

Neste sentido tem sido apresentadas as propostas de extincção das comarcas de Quepêm, Damão e Bicholim e uma outra da extincção dum logar de notario, exclusivamente da ultima comarca, apezar de se ter previsto no referido projecto a extincção e sua conversão em julgado.

Não é sem pena e sem menos magoa que recebemos a infausta noticia daquelas propostas da economia que alias devia ser feita cortando *as demasias* acabando com as sinecuras existentes e aumentando os pagamentos...

E' a nossa infelicidade. A sorte deste concelho desde a implantação do *self-goverment* tem sido das mais lamentaveis parecendo que os indomaveis fados da providencia querem acabar com esta pobre cassabé, séde da provincia do Batagrama e antiga e historica sede dos batalhões.

Está sobre ela suspensa a espada de Damocles para o seu aniquilamento.

Posto isto voltemos ao assunto.

Primeiramente, não é possivel ocultar, que movidos por interesses pessoaes, como dizem, alguns empregados de fazenda de Bicholim por seus valiosos esforços, conseguiram que o C. L. deliberasse aprovar a proposta da extinção dessa Repartição, como corre, sem olhar absolutamente pela conveniencia publica e a imperiosa necessidade da mesma Repartição na sède da comarca onde funcionando o tribunal da primeira instancia e os cartorios dos tabeliães, naturalmente o movimento judicial e as transacções exigem maxima facilidade no pagamento das contribuições.

Surge, agora, como se viu uma outra proposta igualmente injustificavel, qual a da extincção do juiso da comarca e a sua substituição pelo julgado municipal sem se calcular os graves inconvenientes que devem resultar dessa proposta

Ora estando preocupado o espanto publico com essa pretendida inovação surge a protestada reducção do numero dos tabeliães desta comarca, por haver benevolo acolhimento o memorial do tabelião Sr. J. F. de Silva Coelho que se queixa de que ele não ganha o suficiente para a vida, por supôr que o movimento da comarca não dá para dois tabeliães, alêm de trazer em abono da sua pretenção a reducção do numero dos escrivães do juizo de direito.

(continua)

Bicholim O me mo

भारत

गुरुवार आषाढ शु० १२ शी १८४४

प्रागतिक संघाचा राजसंन्यास ?

श्री. द्वारकानाथ, मुरगांव यांच्या लेखासंबंधीं आह्मांस जें कांहीं लिहावेंसें वाटतें तें आह्मी मागाहून भारतांत नमूद करणार आहोंच. लेखाच्या विस्तृतपणामुळें जरी हें काम आज शक्य नसलें तरी एका विधानाबद्दल मात्र आह्मांस त्यानीं आजच-सवडींत सवड साधून-खुलासा केल्याशिवाय रहावत नाहीं. तें विधान ह्मणजे संघाच्या कार्यकारी मंडळाची संवग लोकप्रियतेविषयीं लालसा' या संबंधीचें होय. सुदैवानें संघाच्या कार्यकारी मंडळांत निस्पृह व तत्वाभिमानीच लोक वावरत असून, लोककल्याणाशिवाय त्यांच्या मनांत दुसरें कांहींच घोळत नाहीं हें जाहीर करण्यास आह्मांस आनंद वाटतो. असें असतां जर त्यांकडून करवाढीच्या बाबतींत कांहींच सामुदायिक प्रयत्न झालेला नाहीं तर त्यास तशाच महत्वाच्या अडचणी आड आलेल्या आहेत, हें उघड होय. पण यांचा विचार मागाहून होणार असल्यामुळें सध्या इतकेंच पुरें आहे.

सं भारत

Paulo da Gama ह्या नांवाखालीं एक निस्पृह व बाणेदार लेखक आमच्या ह्या दीन बनलेल्या व बनवलेल्या गोमांतकाच्या हलाख स्थितीचें भेसूर चित्र व सद्याच्या आपण निवडून दिलेल्या प्रतिनिधींनीं आंखलेलें धोरण ह्या महत्वाच्या विषयावर आज बरेच दिवस पणजी येथें प्रसिद्ध होणाऱ्या O Heraldo ह्या नावांच्या पोर्टुगीज दैनिक पत्रांत आपले विचार प्रदर्शित करीत आहे. आह्मांला मिळाले ल्या स्वराज्याची सध्यां कशा प्रकारची दैना उडालेली आहे व हा सर्व अपराध कोणावर शाबीत होतो ह्या विषयीं जर कोणाला खरी खुरी माहिती पाहिजे असेल तर त्यानें सदर लेखकाची गेल्या दिवसांत प्रसिद्ध झालेली लेखमाला अवश्य पहावी अशी आमची त्यांस सूचना आहे.

राष्ट्रांत राज्यकर्ते व प्रजा हीं दोन अंगें असावयाचीं; व ह्या दोन समान चक्रांवरच राष्ट्रशकट सुरळीतपणें चालणें शक्य आहे. परंतु दोहोंतील एक चक्र जेव्हां अधिकाराच्या बलावर दुसऱ्याच्या ऱ्हासास कारणीभूत होत असतें तेव्हां त्याला खीळ पडून त्याची गति कुंठीतही झालीच पाहिजे. हा सिद्धांत आज कित्येक वर्षेपर्यंत खरा ठरत आलेला आहे. कोणत्याही राष्ट्राचा इतिहास पहा. त्या राष्ट्राच्या समूळ नाशाला अगर अवनतावस्थेला जर कोणतीही गोष्ट कारणीभूत झालेली असेल तर ती ह्या दोन चक्रांमध्यें उत्पन्न झालेलें वैमनस्य हीच होय! असें आपणाला बहुतकरून आढळून येईल. या न्यायानें पहातां आपला गोमांतक प्रांत पुष्कळ बाबतींत विशेषतः राजकीय बाबतींत सुरक्षीत रहाण्याला राजकर्ते व प्रजा ह्या दोन बाजूत ऐक्य असणें व एकमेकांनीं ऐक्यानें वागणें युक्त होय. परंतु वस्तुस्थिति ह्या गोष्टींच्या तंतोतंत विरुद्ध आहे असें आपणांस नुकत्याच जनतेवर लादल्या गेलेल्या नानाप्रकारच्या करांवरून कळून येण्यासारखें आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळें आधींच गोमांतकीय जनता हलाख झालेली. त्यांत आणखी मारुतीच्या शेंपटाप्रमाणें दरवर्षीं वाढत जाणाऱ्या करांचा बोजा तिच्या डोक्यावर असह्य झालेला, मग सर्वस्वी पिळून काढणारे कर तिनें कोठून सहन करावे बरें? ह्या करवाढीचें उत्पन्न गोमांतकाच्या सुधारणेला सर्वशः जरी खर्च झाले असतें, तर गोष्ट निराळी होती, पण ती स्थिति तर सध्याच्या करवाढीच्या बाबतींत नाहीं; मग करवाढ कशाला? तर अगडबंब पगार घेणाऱ्या ब्युराक्रसीचें कोड पुरवावयाला! तेव्हां अशा ह्या प्रजा-हित-राज्यकर्त्यांच्या [?] नानाप्रकारच्या चाळ्याला संमति न देणं अर्थांत उघड उघड नापसंती दर्शविणें व विरोध करणें हेंच योग्य होय!

पण इतकें देखील आमच्या 'भोळ्या व गरीब जनतेकडून न व्हावें हें खरोखरच राष्ट्राचें दुर्भाग्यच होय. नाहीं म्हटल्यास "भारत" पत्रासारख्या पत्रानें ह्या करवाढीविरुद्ध केलेला खटाटोप! [मग तो शाब्दिकच कां असेना?] पाहून उघड उघड तऱ्हेनें सरकारच्या कृत्याचा निषेध करण्याला एक तरी व्यक्ति पुढें आलेली पाहून समाधान वाटतें. परंतु कितीहि झालें तरी 'भारत' हें एक वर्तमानपत्र, तें फार झालें तर आपल्या वाचकांच्या मनांत करवाढी विरुद्ध गहजब उडवून देईल व एखादे वेळीं त्यांना विस्कळीत प्रयत्न करण्याला भाग ही पाडील, पण अशा आणीबाणीच्या वेळीं प्रत्येक जणानें कराच्या आपत्तीला—दैविक नव्हे-हो शिव्या दिल्यानें ती थोडीच टळणार आहे. त्याला निराळेच प्रयत्न अमलांत आणावे लागणार. बलकांवावर स्वस्थ बसून 'नवऱ्यानें मारलें व पावसानें भिजविलें तर फिर्याद कुणावर देणार' या म्हणीच्या राजकर्त्यांच्या अनुचित कृत्यांकडे उपयोग प्रत्येकानें करून सध्या भागण्यासारखें नाहीं. हा प्रसंग विस्कळीत प्रयत्न करून भागण्यासारखा नाहीं. संघटित प्रयत्न केला पाहिजे. सर्व साधारण गरीब जनता करांविरुद्ध आहे तिच्यामध्यें करांचा बोजा पाठीवर घेऊन उभें राहण्याचें त्राण नाहीं. ती जर्जर व अनाथ झालेली आहे हें खरोखरीचें चित्र दाखऊन देणाऱ्या आरोळ्या आपण अशा जागेवरून व अशा तऱ्हेनें मारल्या पाहिजेत कीं त्या जागेवरून त्या आरोळ्या आपल्या राजकर्त्यांच्या कर्णरंध्रावर जोरानें जाऊन धडकतील हेंच आपलें सध्याचें कर्तव्य होय. ह्याच्या पलीकडे अनाथ दुबळ्या प्रजेच्या हातांत आणखी काय

वरून प्राप्त झाली आहेत. गौडाचार्यांचा मान प्रथीड वर्गानें करावा व द्रविडाचार्यांचा मान गौडवर्गानें करावा, हें निर्विवाद होय. हा प्रकार पुरातन कालापासून ह्या सांखळी गांवांत चालत आलेला आहे हें प्रख्यात असून, आजच म्हणजे वैशाख वद्य तृतीया शके १८४४ शुक्रवारीं रात्रौ श्री विठ्ठल मंदिरांत द्रविडांतर्गत (कऱ्हाडे म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या) पुजारी मंडळीनें प्राक्कालिन क्रमास फांटा देऊन श्री गौडपादाचार्य (श्रीमत्पूर्णानंद सरस्वती स्वामी महाराज) महाराजांच्या पाद्यपूजेचा लाभ घेतला नाहीं असें समजून सखेदाश्चर्य वाटलें! असो. वरील प्रकारें वेदाध्ययन करणारा ब्राह्मण वर्तमानकाळीं मिळणें दुर्लभ झालें. त्यामुळें—वर्णाश्रमधर्माची मर्यादा राखून श्री नारदाश्रम अगर श्रीम द्भागवत ह्यांत सांगितल्या प्रमाणें—श्रीविष्णूची तरी उपासना करून ब्राह्मणानीं कृतार्थ व्हावें ह्मास्तव वैष्णव सांप्रदाय प्रसिद्धीस आला. ह्या सांप्रदायानुरूप चालणारे शिष्यही कृतकृत्य होतील, अशी गौडसार्थांची आशा होत आहे. म्हणून श्रीगौडाचार्यांची गादी विभूषित करणारे धर्मगुरु स्मार्त व वैष्णव ह्या नावांनीं प्रसिद्ध असले तरी उभयतांचें नेहमीं ऐक्यच आहे. तदनुसार स्मार्त आणि वैष्णव सांप्रदायी ब्रह्मदेव अभिन्नभावें श्री गौडाचार्यांची भक्तिपूर्वक सेवा करीत आहेत, हें पाहून परमानंद वाटतो. प्रमुखाचे अभावीं प्रतिनिधि काम करितो, ह्या न्यायानें मुख्य जें ब्राह्मण कर्तव्य त्याचा यद्यपि लोप झाला तथापि, प्रतिनिधिभूत वर्णाश्रम धर्म—संध्यावंदनादि कर्में यथासांग चालवून विष्णु अगर शिव ह्या परमपूज्य देवतांची मनोभावें उपासना करणारे गौडशिष्य त्यानीं सर्व पूर्णतेस कारणीभूत जे श्री गौडाचार्य त्यांच्या आज्ञेंत राहून त्यांची अखंडीत सेवा करित जावी हेंच त्याना कल्याणप्रद आहे इतकें सांगून आटोपतें घेतों. श्रीमत्पूर्णानंद सरस्वती स्वामी महाराजकी जय [शिष्यवृंदानें जय असा घोष करून टाळ्यांच्या गजरांत समाधान व्यक्त केलें.]

आज व्याख्यान दिलें आहे. मागाहून मला कांहीं सुचलेले विचार प्रकट करण्यांत येतील.

डि. फं. ४ आणे — सारस्वत

मराठी शाळा व त्यांच्या परीक्षा

श्रीशारदा विद्यालय-कुंभारजुवें

या शाळेची वार्षिक परीक्षण, श्री महेश्वर दत्तात्रेय बाके, बी. ए. उपाध्यापक लोकमान्य शिक्षणसंस्था-मालवण, श्री. रामचंद्र शंकर नायक धंखाबलीकर प्रो. नोमील स्कूल-पणजी, यानीं, ता. २७, २८ एप्रिल १९२९ रोजी केलें; परीक्षेचा परिणाम खालीं दर्शित केला आहे.

इयत्ता	परीक्षेस बसलीं	उत्तीर्ण झालीं
६	१	१
५	३	३
४	१०	१०
३	[illegible]	१०
२	२४	२४
१	२९	२२
शिशुवर्ग	१६	१६
	९०	८५

पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणें ता. २९ रोजीं श्री. बाके यांच्या अध्यक्षतेखालीं सायंकाळीं बक्षीस समारंभ झाला. मुलांकडून ईशस्तवन व स्वागतपर पद्यें, संवाद, गाणी कवाईत, चरक्यावर सूत काढणें, इत्यादि कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर उपरिनिर्दिष्ट विद्यालयाचें गोमंतकास ललामभूत झालेले सर्व मित्र मुख्याध्यापक श्री. गणपतराव सामंत यांचे विद्यार्थ्यांचें ध्येय व दिनचर्या या विषयावर भाषण झालें, नंतर बक्षिसें वांटलीं.

मडगांवचे श्री. यशवंतराव सरदेसाई यांनीं आपल्या पत्नी सौ. लक्ष्मी यांचे नांवें ठेवलेलें १ बक्षीस; मडगांवचे दुसरे एक गृहस्थ श्री. केशव कृष्ण नाईक यांचें लोकमान्य बक्षीस १; व श्रीमंत शिवाजी शिवराम शेणवी कुंडईकर यांचीं ५ बक्षिसें; व संस्थेचीं तेरा बक्षिसें; मिळून एकंदर वीस बक्षीस संख्या झाली.

बक्षिसें मिळालेल्या विद्यार्थ्यांची नाममाला

नांव	इयत्ता	प्रकार	
केशव अनंत भांडारे	६ वी	लो. बक्षीस	
त्र्यंबकटेश म. बर्वे	५ वी	संस्था	,,
अनंत जि. देसाई	,,	कुंडईकर	,,
अनंत नारायण धुमे	,,	संस्था	,,
वसंत अ. भांडारे	४ थी	,,	,,
भास्कर ल. भांडारे	,,	कुंडईकर	,,
विनायक वि. तेलंग	,,	संस्था	,,
पुतळाबाई कृ. धुमे	,,	देसाई	,,
केसरबाई कृ. देसाई	३ री	कुंडईकर	,,
रामा दत्तला नाईक	,,	संस्था	,,
भिकू रामा नाईक	,,	,,	,,
दिनानाथ न. भांडारे	२ री	,,	,,
पद्मनाभ रा. भांडारे	,,	,,	,,
सदाशिव मं. बोरकर	,,	,,	,,
मंगेश स. धुमे	,,	,,	,,
कृष्णनाथ वै. लवंदे	,,	कुंडईकर	,,
घनःश्याम अ. फट्टो	१ ली	संस्था	,,
वासू पुंडलीक नाईक	,,	,,	,,
कुळा तानो तारी	,,	,,	,,
वसंत रा. भांडारे	,,	,,	,,

बक्षिसें वाटून झाल्यावर समारोपादाखल अध्यक्षांचें सुश्राव्य भाषण झालें.

बक्षिस समारंभाच्या वेळीं विद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी तयार केलेल्या कलाकौशल्याच्या वस्तूंचें प्रदर्शन सर्वच दृष्टीनीं अपूर्व, अनुकरणीय असें होतें. कारण त्यांत विद्यालयांत बनविलेले चरके; त्या चरक्यावर मुलांनीं काढलेलें सूत, त्या सुतापासून तयार केलेली खादी व दुवाके आणि त्या खादीपासून बनविलेल्या टोप्या हीं मांडलेलीं दिसत होतीं. शिवाय रंगी बेरंगी काड्यांपासून बनविलेल्या चटया, मातीचीं व कागदाच्या लगद्याचीं फळें; निरनिराळ्या प्रकारचे पिंजरे, वागा वगैरे कितीतरी प्रेक्षणीय व उपयुक्त वस्तु प्रदर्शनांत मांडलेल्या असून त्या प्रेक्षकांस आश्चर्यचकित करून टाकीत होत्या. गेल्या दोन तीन महिन्यांत ३० पौंड कापसाचें सूत काढले. विद्यालयांत १५।२० चरके सुरू आहेत.

मराठी चौथ्या यत्तेपासून मराठी शिक्षणाबरोबर पोर्तुगीज शिक्षणाची जोड दिली असून, विद्यालयांत शिक्षण घेतलेलीं पांच मुलें शिमेर गावच्या परीक्षेस बसलीं होतीं व ती पांचही उत्तम प्रकारें उत्तीर्ण झालीं. याबद्दल पोर्तुगीज शिक्षक रा. कृष्ण गोविंद राजमये यांचें अभिनंदन कोण केल्याशिवाय राहील. या गृहस्थानीं अत्यंत स्वार्थत्यागपूर्वक या कामीं प्रयत्न केले आहेत. हें लिहिण्यास आनंद वाटतो.

ब्रिटिश हिंदुस्थानांतील विद्यार्थी देशभाषेची चौथ्या इयत्तेची परीक्षा झाल्यावर राजभाषा शिकण्यास जातात; परंतु राजभाषा—शिक्षण घेत असतां देशभाषादि शिकण्याची सोय असल्यानें त्यांचा फायदाहि होतो. म्हणजे इंग्रजी तिसऱ्या इयत्तेपर्यंत किंवा इच्छा असल्यास मॅट्रिकपर्यंत सुद्धां देशीभाषेचा अभ्यास चालू ठेवतां येतो, त्यामुळें मराठी किंवा इतर देशभाषाविषयक ज्ञान तितके उच्च दर्जाचें तिकडील विद्यार्थ्यांस होतें. पण, गोव्यांतील विद्यार्थी चौथ्या किंवा तिसऱ्या इयत्तेचा मराठी शिक्षणक्रम संपवून पोर्तुगीज शिक्षणास गेले म्हणजे लिसेच्या कुर्स कोंप्लेत करण्याकरितां जी मराठीची परीक्षा द्यावी लागते तेथपर्यंत म्हणजे सुमारें ७।८ वर्षे मराठीचें त्यांना दर्शनसुद्धां होत नाहीं! म्हणून गोमांतकांतील विद्यार्थ्यांचें मराठी भाषेचें ज्ञान अगदीं अपूर्ण असतें किंबहुना पोर्तुगीज शिकूं लागल्यावर मराठीवर पूर्ण पाणी पडतें असें म्हटलें तरी चालेल. हा अनिष्ट प्रकार टाळण्याकरितां उपरिनिर्दिष्ट प्रयत्नासारखा उपक्रम प्रत्येक विद्यालयांतून झाला पाहिजे व तो होईल अशी उमेद वाटते. असो.

या विद्यालयांत एकंदर विद्यार्थी संख्या १४० असून शिक्षक मराठीचे ३ आहेत. खरोखर प्रामाणिकपणानें या शाळेविषयीं यश प्रदर्शित करावयाचें म्हणजे गोमांतकांत काय पण महाराष्ट्रांत सुद्धां अग्रस्थानीं राहण्यांस योग्यही आहे असें म्हणावयास कोणतीच हरकत नाहीं. एखादा कळकळीचा शिक्षक योग्य सवलत दिली असतां आपल्या कार्यांत कसें यश मिळवितो हें पहावयाचें असल्यास ही एक शाळा पाहिली म्हणजे पुरे आहे. याविषयीं मागाहून केव्हां तरी माझे विचार आपल्याकडे लिहून पाठवीन तूर्त इतकेंच पुरे.

श्रीशांतादुर्गा विद्यालय, कळंगूट—गोवा मोफत शिक्षण संस्था

या विद्यालयाची वार्षिक परीक्षा म्हापसें येथील सारस्वत विद्यालयांतील मास्तर रा. रा. सोहीराजी रामचंद्र आरवंदेकर यानीं ता. १० जून १९२२ रोजीं घेतली. परीक्षेच्या निकालावरून विद्यालयांतील शिक्षक रा. रा. विष्णु रघुनाथ सामंत हे पुष्कळच परीश्रम करतात असें दिसून येतें.

परीक्षेचा निकाल येणें प्रमाणें

इयत्ता	बसलेलीं	पास झालेलीं
४	३	३
३	३	१
२	६	५
१	३	२
	१५	११

बक्षीस समारंभ मागाहून व्हावयाचा आहे.

एक प्रेक्षक

bros dos ditos correspondentes pedi que se promovesse a instrução dos mesmos, estabelecendo escolas especiais, a fim de com o andar dos tempos, acabar com o *aspresa* (untouchability of depressed classes.)

Se o sr Director não concorda nisso ? tambem o diga:—

"A ruina da India começou quando os hindús pronunciaram o as parsa,, diz o adorado Vivecananda suvami, que pelo seu saber e inteligencia poude conquistar lustre á religião hindu na America."

' O tratamento de intangibilidade das classes desprezadas é uma mancha que deshonra o hinduismo é um crime, é um pecado que carece de ser purificado, dando as mesmas classes o tratamento devido A intangibilidade não tem razão de ser, não tem sancção na religião, é a divisa do *scitan*;" diz o Mahatma Gandi

Como quere, pois o correspondente *Vamona* que essa intangibilidade seja um preceito religioso, ainda que determinado pela higiene e tomado mesmo que assim seja, não crê *Vamona*, que com a instrucção se conseguirá que aquelas classes abandonem os seus maus costumes ? Leia *Vamona* bem a proposta, que nela encontrará resposta antecipada para os conselhos que me dá.

Acusam-me os ditos correspondentes *Moropanta e outros* e ainda V. Exa. de incompetente para tratar de semelhante assunto pelo facto de, no entender deles, não haver na classe dos barbeiros (classe com muita pouca instrução do que a de casta bramane) pessoas que provam por actos e factos as ideas que professo.

Mas dirá me o ilustre *Director do Bharat*, o que é que tem feito a adeantada casta bramane' que mais responsabilidade tem no caso, para remover esta nodua do hinduismo, a ponto de ser aos ditos correspondentes insuportavel a lembrança por mim feita de *com o andar dos tempos* acabar com o vergonhoso tratamento de intangibilidade, que os homens nem aos cães dão, como quando por agora instituir os intangiveis, fazes o alparqueiros? Nada de certo.

¿Com que autoridade, com que direito, pertendem os mesmos correspondentes negar me competencia, alegando ter eu casa suja, não tendo eles, pelo menos, a sua casa limpa apesar do que são conhecidos do publico os esforços por mim empregados e que estou empregando no limite das minhas debeis forças para o progresso das classes analfabetas, esforços que concorreram ainda que indirectamente para o despertar de energias duma parte da população bramane?

Por esta forma de proceder nada se avança só faz lembrar o *Peshwaismo* em que eram oprimidas as outras classes em beneficio da classe previligiada—a bramane—e a grande reunião promovida em tempo nesta capital para obrigar os individuos de outras castas a vestirem-se panos curtos acima do joelhos no intuito de humilha las...

Tudo isto vem a proposito para frizar que ... mais instruidos e previligiados e ... quer *Tucarama* que os barbeiros façam desde já barba aos farazes quebrando o laço de intangibilidade imposto pelos bramanes ? Estou certo que parte dos barbeiros nenhuma objecção haverá para isso, existe apenas o único receio de que os barbeiros fazendo barba aos farazes ou aceitando-os no seu seio por ocasião de suas festas, sejam os barbeiros perseguidos pelos bramanes e considerados tambem *asparsa* resultando disso os bramanes ficarem com cabelos e barbas crescidas o que terà de ser removido pelos correspondentes *Moropanta*, *Vamona*, *Tucarama* e outros quijandos, abandonando os seus oficios habituais de *agricultor e literatos* arvoran lo-se em *barbeiros*, não de casta mas de profissão, terão que trazer ao hombro o saquinho de navalhas e tesouras, ou terão de aconselhar outros de sua casta (los correspondentes) a exercer a profissão de barbeiros.

Estão dispostos para isso os ilustres correspondentes ? Digam o abertamente e sem sofisma, firmando as correspondencias com suas assinaturas proprias, pois preciso se torna, antes de os barbeiros darem o passo indicado pelo *Tucarama* , a sociedade hindú e antes a classe dos barbeiros saiba positivamente com quem poderá contar para o exercicio dessa profissão...

Deixamos, pois, de retaliações que nada contribuem para o progresso da sociedade ou se produzem produzem parra e não uvas, as quais não sò desacredita a pessoa que as acima, como tambem o jornal que as aceita...

Trabalhemos de mãos dadas para conseguir do Governo a aprovação das propostas que teremos feito alguma cousa, pois ocasiões destas nem sempre se encontram.

Pondo ponto á questão para não ser demasiadamente extenso, somente voltarei no caso de serem discutidas serenamente as propostas, sem referencias directas ou indirectas que possam ferir qualquer pessôa ou casta, pois sou adverso ao azedamento de discussões inuteis.

Peço disculpa á classe bramane por qualquer expressão menos correnta que por ventura tenha escapado, pois confesso que tenho maxima consideração por ela e nem por imaginação desejaria ofende-la.

-Nanum Tarcar Pernencar

Não deve ser

Quando foi festejado o *Self government*, supunha-se que ele havia de promover não só o levantamento economico da colonia mas ainda o seu progresso material, moral e intelectual, mas infelizmente a amarga experiencia de tres anos e pico demonstrou evidentemente que a India ainda não està preparada para a Autonomia e os actos e factos confirmaram cabalmente a profecia feita por aquele ilustre homem de estado que se chama Freitas Ribeiro.

" A Autonomia nada ... A Autonomia nada fez de util. Lançou e arrecadou impostos novos, e a lançar e arrecadar novos impostos limitou ingloriamente toda a sua função.

A Autonomia agravou descaroavelmente a condição do pobre contribuinte e mais nada como diz o insigne jornalista sr. Paulo da Gama.

Querem, porem, agora, fazer a economia, para ingles ver, e extirpar o depauperamento das nossas finanças publicas afim de promover não sò o levantamento economico da colonia mas ainda o seu progresso intelectual e moral, extinguindo os tribunais de justiça (continua)

O mesmo

भारताची नवी व्यवस्था

येत्या महिन्याचे आरंभापासून नवीन व्यवस्था अमलांत यावयाची. पण एकंदर वर्गणी अजून वसूल न झाल्यावरून तसेंच आमच्या खात्रीच्या आश्रयादात्यांची संख्यादि निश्चित न झाल्यामुळें येत्या आगष्ट महिन्यापासून 'भारत' नवीन स्वरूपांत प्रसिद्ध करण्याचें, कित्येक हितचिंतकांच्या आग्रहावरून, ठरविलें आहे. दरम्यान आमच्या संपादकांचा दौराहि आटोपून त्यांच्या खास देखरेखेखालीं सर्व व्यवस्था होण्यासहि ठीक पडेल. केवळ शक्तिबाहेर तोटा सहन करावा लागून भारताचें अस्तित्व कधींहि अनिश्चित होऊं नये म्हणून इतकी खबरदारी घ्यावी लागत आहे. त्या बद्दल आमचे सहृदय आश्रयदाते भारतास क्षमा करतील अशी आशा आहे.

मनेजर भारत

भारत

गुरुवार आषाढ शु० ५ मी १८४४

स्वदेशी माल वापरा !

स्वराज्य मिळण्याचे कामीं अगर स्वराज्य प्राप्त झालें असतां तें संभाळून ठेवण्याचे कामीं स्वदेशीला किती मोठें महत्व आहे, हें आज कोणास नव्यानें सांगावयास पाहिजे असें नाहीं. स्वराज्य व स्वदेशी यांचा परस्पर संबंध अभेद्य आहे. अर्थात् जो स्वदेशीला मदत करतो तो स्वराज्य लाभि सहाय्य पुरवितो असें ओघानेंच सिद्ध होतें. म्हणूनच आम्हीं आमच्या एका मित्राचे स्वदेशी बद्दलचे विचार खालीं देत आहों:—

'स्वदेशी चळवळीमुळें हिंदुस्थानच्या व्यापाराच्या शरीरामध्यें चैतन्य जागृत होऊं लागल्यापासून हल्लीं ठिकठिकाणीं औद्योगिक प्रदर्शनें भरत आहेत. या प्रदर्शनापासून देशांत कोणकोणते जिन्नस कोठें पैदा होतात व परदेशी मालावर बहिष्कार घातला तरी तेवढ्यानें आपल्या संसाराच्या बहुतेक गरजा भागूं शकतात आणि ज्या कांहीं परदेशी वस्तूवांचून आपलें अडतें त्या इंग्लंडावांचून दुसऱ्या देशांतहि मिळूं शकतात हें लोकाना चांगलें कळूं लागलें आहे. पण आतां यापुढें एवढ्या फायद्यावरच संतुष्ट राहण्यांत अर्थ नाहीं. पूर्वीं इतकेंहि होत नव्हतें तें आज होऊं लागलें आहे हें ठीक आहे पण आपली मुख्य नजर ह्यावर नाहीं. याच्यापेक्षां जास्त पलीकडे आम्हांस गेलें पाहिजे. स्वदेशी चळवळ सुरू होऊन लोकांनीं स्वदेशी माल वापरण्याचा निश्चय केला, बऱ्याच दिवसांपासून निराश झालेल्या कारागिरांस उत्तेजन मिळालें व ते अहोरात्र श्रम करून स्वदेशी वस्तू तयार करूं लागले. कित्येकांनीं आपल्या मदतीस दुसरे कारागीर घेतले व कित्येकानीं आपल्या मजुरांची संख्या वाढविली तरी पण माल नाहीं अशी ओरड आज कां ऐकूं येते ? इंग्रज लोक पांच हजार कोसांवर राहून स्वतःच्या देशाच्या मागण्या पुरवून आम्हांलाहि पुरे पडतात व आम्हांला आमच्या लोकांची मागणी पुरविणेंसुद्धां नाकीं नव कां येतात ? याचें कारण उघड आहे कीं, तेथील कारागिरांस त्यांच्या दोन हातांखेरीज अनेक यंत्रांच्या हातचें साह्य आहे तसें येथील कारागिरांस नाहीं तें साहाय्य त्यांस मिळवून दिल्याखेरीज जे विलायती जिन्नस आज मोठ्या प्रमाणानें आपल्या घरांत घुसत आहेत त्यास कधींहि हाकलून लावतां येणार नाहीं आणि ते हाकून लावण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं आल्याशिवाय आपले हे हेतुहि साध्य होणें शक्य नाहीं.

स्वदेशी चळवळीचे पुरस्कर्ते महात्मा गांधी यांनीं अवघ्या थोड्या महिन्याच्या अवधींत स्वदेशी चळवळीची कसोटी जगजाहीर होण्याकरितां जो अलौकिक परिश्रम केला त्या बद्दल त्यांचें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे. हल्लींची वेळ ही राष्ट्रीय उन्नतीच्या चढाओढीची वेळ आहे. याकरितां स्वदेशोन्नतीच्या कामांत आपण एकमेकांच्या पुढें जाण्याची इर्षा बाळगली पाहिजे विद्यार्थ्यांनीं त्यांना मिळणाऱ्या सुट्टींत ते जेथ तेथें जातील अगर आपल्या गांवीं लहानापासून तों मोठ्यापर्यंत स्वदेशाचें महत्व सर्वांना सांगून तसें वागण्याचा उपदेश करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिकलेल्या लोकाना किंवा शिकाऊ विद्यार्थ्यांनासुद्धां आपापल्या गावांत बराच मान असतो तेव्हां अशा वेळीं आपण आपलें व-

---

Pondori Camotim

Este distincto aluno hindú foi galardoado com os premios da *Madame Novass e Fernando Cunha*, o que, com verdadeiro desvanecimento, registamos nas colunas do nosso jornal.

O sr. Pondori Camotim é o primeiro hindú que acaba de ter os referidos premios, facto virgem nos anais do Licêu Central de Nova-Gôa. E' porisso maior o nosso contentamento tanto mais que hindús como o sr. Camotim nobilitam a classe a que pertencem, alem de se nobilitarem a si proprios, consolidando-lhe com seu talento e esforços as gloriosas tradições.

Nossas cordiais felicitações pois, ao hindú laureado e á briosa classe que se orgulha de possuir no seu seio um aluno tão distincto como o sr. Camotim.

भारत

गुरुवार जेष्ट कृ० १२ शी १८४४

निभाव कसा लागेल ?

राज्यावर संकटपरंपरा कोसळावयास लागली ह्मणजे प्रजेनें निद्रानंदांत रममाण होतां कामा नये. तर जेणेंकरून राज्यावरील आपत्ति हटेल तेणेंकरून मयत्न करण्यास पुढें सरसावलें पाहिजे. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं प्रजेनें आपलें कर्तव्य ओळखण्यांत व तें तत्परतेनें पाळण्यांत जीवापाड झटलें पाहिजे. व्यक्तिसौख्यांत गुरफटून राहून, सामुदायिक स्वस्थतेचा चुराडा न होण्यासाठीं काळजीपूर्वक जपणें अत्यंतावश्यक आहे, यांत दुमत असणें शक्य नाहीं.

करवाढीच्या वणव्यानें गोमांतकची असहाय्य प्रजा होरपळावयास लागली आहे. करवाढीच्या प्रबल शस्त्रनें तिला अगदीं निर्बल बनविलें असून, दैन्यावस्थेची हृदयास घरें पाडणारी स्थिति अनुभवावयास, सत्तेच्या बळावर अप्पलपोटी सरकारनें, तिला भाग पाडलें आहे. तात्पर्य चोंहोंकडूनीं करवाढीच्या अक्राळ विक्राळ पिशाच्याकडून आमची जनता निर्दयपणें पछाडली गेली आहे.

पण दुःखाची गोष्ट कीं, प्रजा आपलें योग्य रितीनें कर्तव्य बजावण्यास अजून पुढें होत नाहीं. स्वार्थी नोकरशाहीनीं शक करण्याची सकल काढगच्या मागीला ती लागलेली अजून पहाण्यांत येत नाहीं. सत्र अकळ एकत्र मिळवून, तिचा उपयोग करांचें पाणी करण्यास, ती एकजुटीनें झटत असलेली अजून दिसत नाहीं.

अशानें राज्याची स्थिति सुधारणें अशक्य होय. उलट ती दिवसेंदिवस बिघडत जाऊन एक दिवस असा येईल कीं, त्या दिवशीं प्रत्येकाला आपल्या 'निर्जिव' अस्तित्वाचा पुरा पश्चात्ताप होईल. पण चोरांनी घर लुटून एकदर संपत्तीचा फडशा लावल्यानंतर दारांना लोखंडी कड्या लावून काय उपयोग होणार आहे ? आमची तर अशी समजूत आहे कीं, सरकार तर्फेनें करवाढीच्या बेबंद कारभाराने आमचीं घरें 'स्वच्छ' केल्यांवर लोखंडी कड्यापुर्ता सुद्धा पैसा आह्मांजवळ शिल्लक उरणार नाहीं ! असो.

अशा स्थितींत प्रजेनें स्वस्थ बसणें महत्पाप होय. इतर पापांचे परिणाम भोगण्यास कदाचित कालावधि लागेल पण सदरील महत्पापाचीं अनिष्ट फळें तावडतोब चाखावीं लागतात, असा सार्वत्रिक अनुभव आहे. अर्थात् अशा प्रसंगीं प्रजा आपल्या कर्तव्याला रजा देईल तर भयंकर सजा भोगण्याच्या अवस्थेप्रत पोंचेल, हें उघड होय.

तिजोरीस पडलेली तूट सध्या १७ लाखांची असून करवाढीचा सैतान इतस्ततः विहरत असतांहि ती तुटत नाहीं व प्रजेच्या मागचा हा घोर सुटत नाहीं. करवाढीच्या समप्रमाणान च तूटवाढ होत आहे. याचें कारण वाढत्या खर्चाच्या धांवत्या गाडीला खीळ घालण्याचें सामर्थ्य कोणातच राहिलेलें नाहीं.

नोकरशाही आपलें कर्तव्य विसरली आहे. व प्रजेला आपलें कर्तव्य बजावण्यास वेळ नाहीं. विसरभोळेपणा व वेळेचा अभाव अशा दुहेरी अडचणींत आमचा प्रांत चिरडत असून त्या त्याचा केव्हां नाश करतील याचा भरवंसा नाहीं. सत्ताधारी स्वकर्तव्यच्युत झाले ह्मणून प्रजेनें ख्यालीखुशालींत दंग असलेंच पाहिजे असें नाहीं. बाकी दरिद्री लोकांची ख्याली खुशाली कशा रितीची असेल ती दिसतेच आहे ह्मणा !

करवाढीवर आम्हीं पुष्कळच लिहिलें आहे. कित्येक वाचक तर आह्मांस चर्वितचर्वणाचा दोष लावण्यास सुद्धां मागें पुढें पहाणार नाहींत, परंतु करवाढीच्या अप्रिय परीणामाचें भेसूर चित्र आमच्या मनःचक्षूंसमोर नित्य वागडत असल्यावरून, त्या विषयीं लोकांत होईल तितकी जागृति कमीच आहे, अशा प्रामाणिक समजानें आमच्यानें प्रकृत विषयाला इष्ट साध्य हातीं येईपर्यंत सोडवत नाहीं. वेळ मिळेल तेव्हां आम्हीं त्याचा यथामती समाचार घेतल्याशिवाय कदापिच रहाणार नाहीं, हें येथें स्पष्ट जाहीर केलेलें बरें.

आम्हीं एकतंत्री नोकरशाहींत आहों असे जे समजतात ते भयंकर चूक करतात. 'आम्हीं एकतंत्री नोकरशाहींत नसून बहुतंत्री लोकशाहींत आहों. असें त्यांनीं पक्कें समजून, सध्या दिसत असलेला नोकरशाहीचा बरचष्मा फोडून टाकला पाहिजे. एवंच नोकरशाहीनें राज्याला लावलेला करांचा वणवा, प्रजेनें—लोकशाहीनें स्वप्रयत्नाच्या जलसिंचनानें कायमचा नामशेष करण्यास एका पायानें तयार झालें पाहिजे तरच आमचा निभाव लागेल.

स्फुट विचार

वाचकांशीं हितगूजः—केवळ जनताजनार्दनाची एकनिष्टपणें सेवा बजावण्यासाठींच भारताचा जन्म आहे. हें त्याच्या धोरणावरून वाचकांस कळून आलेंच आहे. स्वतःच्या जीविताची कांहींच पर्वा न करतां आह्मीं आजवर हजारांनीं तोटा सोसला आहे. हेतु हा कीं, भारतद्वारा गोमांतकाचें कल्याण व्हावें. पण संपादक हे कोणी श्रीमान गृहस्थ नसल्यानें भरपूर लोकाश्रयाचा अभाव असल्यास त्याच्यानें नेहमी वाढता नुकसानीशीं टक्कर देववेलच असें ह्मणवत नाहीं. आजपर्यंत त्यांनीं आपलें एकंदर वार्षिक उत्पन्न भारतार्पण केलें असून शिवाय नवीन व्यवस्थेपाटीं तोंडी व लेखी मिळून सुमारें तीन हजारांचें कर्ज उभारलें आहे. उद्देश हा कीं, भारत ही संस्था टिकाऊ होऊन तिचा फायदा सदा सर्वदा आमच्या पश्चातसुद्धां जनतेस मिळावा. आह्मांवर अनेक संकटें लोटलीं असतां, पूर्वार्जित जमिनजुमल्यावर खासखुद्द देखरेख ठेवतां येत नसल्यानें आह्मांस प्रत्यहीं नुकसान होत असतां व जिकडे तिकडे प्रवास करून प्रवचनाची कामगिरी सांभाळावी लागत असतांहि, आह्मीं आमचें भारताविषयींचें कर्तव्य बजावण्यास परमेश्वर कृपेनें कुचराई केलेली नाहीं.

आमचे वर्गणीदारः—आमचें कर्तव्य पार पाडण्याचे कामीं आह्मीं आमची सर्व शक्ति वेंचीत आहों. व सर्व वर्गणीदारांनीं हि आपली जबाबदारी ओळखून, आपलें भारतासंबंधींचें कर्तव्य बजावलें असतें तर सांप्रतची रडकथा 'गाण्याचा' प्रसंग व तोहि या जागीं—आह्मांवर खास आला नसता. काय हो, आमचीं येथील पत्रें आज जन्मतात व उद्यां मरतात. चालकांत चिकाटी नसल्यानें त्यांची ही अशी शोचनीय स्थिति झाल्यास नवल तें काय ! वर्गणीदारांच्या नांवानें हे कां बोंबलतात कळत नाहीं ! असे तारे तोडणाऱ्या लोकांस आह्मीं नम्रतापूर्वक जाहीर करतों कीं, मागें लिहिल्या प्रमाणें भारत आपलें कर्तव्य बजावण्यांत शिकस्त करीत असतांहि बहुतेक वर्गणीदारांनीं दोन दोन वर्षांची वर्गणी अजून फेडलेली नाहीं. कित्येकांनीं ४०।४५ अंक घेतल्यावर देणें होत असलेली वर्गणी चुकती न करतां, मध्येंच भारत बंद करण्याचा अव्यापारेषु व्यापार केला आहे. कित्येकांची मजल तर याहिपुढें गेलेली आहे. त्यांनीं मुद्दाम अंक मागून वर्गणीची फेड केलेली नाहीं ! तरी बरें कीं, सगळेच वर्गणीदार सदरील प्रकारचे नव्हत. नाहीं तर आह्मांस भारत ऑफिस केव्हांच बंद करून, नुसत्या प्रवचनावरच लोकसेवेची तहान भागवून घ्यावी लागली असती. तात्पर्य काय कीं, भारतानें आपलें कर्तव्य बजावण्यांत शक्य तो स्वार्थत्याग केला व करीत असतांहि, एकंदर वर्गणीदारांनीं आपलें कर्तव्य योग्य रितीनें पार पाडलेलें नाहीं. ही अभिमानाची गोष्ट नव्हे. तर आमच्या त्या वर्गणीदारांनीं आपलें कर्तव्य बजावण्यास पुढें सरसावून, त्यांस लागूं पहात असलेला दोष आधींच धुवून काढण्याविषयीं त्यांनीं खबरदारी घेतली पाहिजे.

आमची विनंतिः—ह्मणून विनंति—व तीहि शेवटची—करण्यांत येते कीं, बाकी असलेल्या वर्गणीदारांनीं आपापली वर्गणी चुकती करून भारताला हातभार लावावा. आमच्या इतर व्यवसाय बंधूंच्या सावधगिरीसाठीं भारतास नुकसानी आणलेल्या वर्गणीदारांची नांवनिशी प्रसिद्ध होईलच. यापुढें वर्गणी आल्याखेरीज कोणासहि अंक सुरू करावयाचा नाहीं अशी व्यवस्था केली असून लुटारू वर्गणीदारांच्या संपर्कापासून संस्थेला अलिप्त ठेवण्याचा कृतनिश्चय केला आहे. भारत प्रकाशनापासून आह्मांस नफा मिळवायाचा नाहीं. तर भारत जिवंत व तोहि चांगल्या स्वरूपांत ठेवावयाचा आहे. वसूलदार फिरवून वर्गणी गोळा करण्याच्या पद्धतीपासून आह्मांस तोटाच झाल्यामुळें, नवीन व्यवस्थेच्या सुरवातीपासून सदरहू पद्धत आह्मीं बंद पाडणार आहों. तेव्हां आमच्या हितचिंतकांनीं या गोष्टीचा विचार करून भारतासंबंधींचें आपलें कर्तव्य योग्य रितीनें पाळावें, अशी विनंति आहे. व या विनंतीकडे कोणाचेंहि दुर्लक्ष होऊं नये ह्मणून ती या सदरांत केली जात आहे.

पणजीची पाठशाळाः—गेल्या दोन वर्षांमागें या शाळेचा शिक्षणक्रम पांच वर्षांचा होता. तो लोकमताविरुद्ध सात वर्षांचा करण्यांत येऊन लिसेव नासियोनाल हें जुनें नांव काढून सदरहू पाठशाळेस लिसेव सेंत्राल आफोंस दे आल्बुकेर्क हा नवा किताब दिला होता. पण गेल्या दोन वर्षांच्या अवधींत या नूतन पद्धतीचा व्हावा तसा फायदा होत नसल्याचें आढळल्यावरून पुन्हां पूर्वींचाच शिक्षणक्रम कायम करण्याचें घाटत आहे. आह्मांस आलेल्या कित्येक पत्रांवरून तर सेंत्रालचें रूपांतर नासियोनालांत निश्चित झाल्यासारखेंच आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ही गोष्ट ऐकून आह्मांस फार आनंद होतो. उशीरां कां होईना, पण लोकमताला धाब्यावर बसवून केवळ सत्तेच्या जोरावर आचरलेली घोडचूक नोकरशाहीच्या ध्यानांत येऊन ती, ती सुधारण्यास उद्युक्त झालेली पाहून, कोणाला समाधान वाटणार नाहीं ? असो. याच उदार धोरणानें बाकीच्याहि—व त्या कोणत्या आहेत—हें बहुतेकांस अवगत आहेच—चुका सुधारल्या जातील तर नोकरशाहीबद्दल लोकांत धुसफुसत असलेला असंतोष नष्ट झाल्याखेरीज खास रहाणार नाहीं.

एक ठरावः—आमच्या लेजिस्लातीव्ह कोन्सिलच्या बैठकींत पन्नास रुपयांपेक्षां जास्त पगार घेणाऱ्या नोकरांवर दहा टक्के कर बसविण्यासंबंधानें कोन्सिलचे लोकपक्षीय मेंबर सि. वालीस दे आंद्राद यांनीं एक ठराव आणिला आहे. हा ठराव पास होणें अत्यंत अगत्याचें आहे. कारण तो न्याय्य असून तर्कालाहि धरून आहे. केवळ लोकांनींच कर भरून त्यावर नोकरशाहीनें कोणताही स्वार्थत्याग न करितां पुष्ट व्हावें हें योग्य नाहीं, हें कोणीहि कबूल करील. राष्ट्रावरील आपत्ति सर्वांस सारखी बाधक असते व तिचा नायनाट करण्यासाठीं सर्वांनींच कंबरा बांधल्या पाहिजेत. असें झालें तरच ती आपत्ति दूर होण्याचा संभव असतो. असो. उपरोक्त ठराव एक मतानें नाहीं तर नाहीं पण बहुमतानें तरी पास होईल अशी आशा आहे.

——भारतमित्राचा जून—जुलईचा जोड अंक जुलईच्या पहिल्या तारखेस प्रसिद्ध होईल असें संपादक कळवितात.

वाचकांस—

अगदीं ऐनवेळीं प्रेस 'सिक' पडल्यामुळें प्रस्तुतचा दोन पृष्ठांचाच अंक प्रसिद्ध करणें भाग पडलें. येता अंक नेहमींच्याच स्वरूपांत वाचकांची भेट घेईल.

म० भारत.

एक भाग असल्यामुळें त्याची मातृभाषा ह्मणजे मराठी हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. आणि ह्या भाषेविषयींचा अभिमान जागृत ठेऊन ही आपली मातृभाषा आहे असें आमच्या पूर्वजांनीं सिद्ध करून दाखविलें आहे ही आनंदाची गोष्ट होय.

अनेक राज्यक्रांतींत, बहुविध संकटांच्या वेळीं व प्रसंगानुरूप पडलेल्या स्थलांतरांत देखील आमच्या पूर्वजांनीं मराठी भाषेची मिठी सोडली नाहीं. सरकारचा आश्रय तर नसोच पण उलट एतद्देशीय भाषेंत व्यवहार करण्याबद्दल कडक कायदे करून देशी भाषेचें निर्मूलन करण्याकरितां पोर्तुगीज सरकारनें आटोकाट प्रयत्न चालविल्यावेळीं, दुष्काळांत वेदांचें रक्षण करणाऱ्या "सारस्वत" मुनी प्रमाणें आमच्या पूर्वजांनीं ही भाषा आपल्या समाजांतून नामशेष होऊं दिली नाहीं. इतकेंच नव्हे तर गुपचूपपणें तिची सेवा करण्यांत तत्परताच दाखविली. मातृभाषेचें संगोपन त्यांच्याकडून झालें. त्यांनीं राखून ठेवलेल्या बिजाची जोपासना करून त्याला सवृक्षत्व बनविण्याचें कार्य नंतरच्या पिढीचें होतें तें त्यांकडून व्हावें तसें झाले असें ह्मणतां येत नाहीं. आतां आह्मीं तरी मराठी भाषेकडे दुर्लक्ष करणें योग्य होणार नाहीं. दिवसेंदिवस ही भाषा केवढी संपन्न व समर्थ होत आहे. व दिवसेंदिवस तिच्यांत कोणकोणत्या ग्रंथ संपत्तीची भर पडत आहे हें आपल्याला विशद करून सांगण्याची गरज नाहीं.

मातृभाषेची सेवा करावी ह्या उद्देशानें एक मराठी विद्यालय स्थापन करून त्या द्वारें जनतेंत ज्ञानाचा प्रसार करावा. ह्या हेतूनें ता. १० अक्टोबर १९२० रोजीं 'मुरगांव-शिक्षण-संघ' या नांवाची संस्था येथील लोकांनीं स्थापन केली. संघानें प्रथमतः विद्यालय व वाचनालय अशीं दोन कार्यें आपल्या अंगावर घेतलीं व तीं कशीं चालली आहेत हें निदान मुरगांवच्या संबंधीस तरी सांगणें नको. विद्यालयांत सुरवातीस ह्मणजे ता. १-१२-२० रोजीं ४९ मुलें होतीं. त्यांची संख्या आतां ७९ झाली आहे. या सर्व मुलांच्या गेल्या आठवड्यांत योग्य प्रकारें परीक्षा घेण्यांत आल्या. कुंआरजुवें येथील श्रीशारदा विद्यालयाचे हेड मास्तर श्री. गणपतराव शि. सामंत व श्री. ग. भ. भांडारी यांना परीक्षक निवडण्यास आलें होतें, आजच्या समारंभास श्री. सामंत जर आज हजर असते तर शाळेंतील अभ्यासक्रमाविषयीं व शिकविण्याचे पद्धतीविषयीं त्यानीं आपलें मत दिलें असतें. त्यांच्या अभावीं त्यानीं शाळेविषयीं लिहून ठेवलेला शेरा वाचून दाखविण्याची मी परवानगी घेतों.

[येथें श्री. सरदेसाई यांनीं पुढील शेरा वाचून दाखविलाः-] चालकांचे निमंत्रणान्वयें ता. ५।५।२२ शुक्रवारी वार्षिक परीक्षणास आरंभ करून ता. ७ रविवारीं सकाळीं काम आटोपलें. शिक्षक व विद्यार्थी ह्यांची वार्षिक कामगिरी अल्पावकाशांत अजमावून निकाल देणें, हें काम बरेंच जबाबदारीचें आहे. मुलांस योग्य न्याय मिळावा ह्मणून कितीहि खबरदारी घेतली तरी दिलेला निकाल संतोतंत वस्तुस्थितीशीं नेहमींच जुळत असेल अशी ग्वाही कोणाच्यानेंही देववणार नाहीं. तरी एकंदर परिस्थिति लक्षांत घेऊन माझ्या प्रामाणिक मता प्रमाणें निकाल नमूद केला आहे. (भारत खास अंक ९ पहा.]

सदर निकालावरून शिक्षणाचें काम आस्थापूर्वक व कळकळीनें केलें जातें असें दिसून येईल. विद्यालयांत प्रवेश केल्यावरोबर सकृद्दर्शनींच विद्यार्थ्यांची शालीनता सभ्यता व सुप्रसन्न चेहरे पाहून विद्यालयाबद्दल झालेला चांगला ग्रह दोनी दिवसांचे अनुभवानें दृढ झाला. उपाध्यापकाची जोड मिळाल्यानें शिक्षणाचें कार्य यापुढें विशेष समाधानकारक रीतीनें होईल अशी आशा आहे. बालमित्रांनीं गाइलेल्या सुस्वर पद्यांत झटल्याप्रमाणें ज्ञानकाजास वाहिलेल्या संस्थेंतून निघणारे ज्ञान व शील संपन्न विद्यार्थी देशकाजास वाहून घेऊन गोमांतकाचा भविष्यत: काल सुखमय करोत. हा संघ आपल्या व्यापक कार्यक्षमतेमुळें मुरगांवच्या वाढत्या लौकिकांत भर घालील अशी बळकट आशा आहे.

श्री. सरदेसाई पुढें ह्मणाले,—सद्यस्थितींतील मुलांची संख्या इयत्तावार पाहिली असतां १ ल्या इयत्तेंत ५२ मुलें दुसऱ्या इयत्तेंत १३, ३ ऱ्या इयत्तेंत ६, ४ थींत ५ अशी आहे. विद्यालयास एप्रील १९२१ ते एप्रील १९२२ पर्यंत फीचें उत्पन्न २६४ रुपये ३ आणे झालें असून संस्थेच्या मेंबरांकडून व आकस्मिक देणगी वगैरे रुपये ६२१-६-६ जमा झालेली आहे. सुटते देणगीचे २९७ रुपयां पैकीं २४१ रुपये वसूल झाले असून ५६ रुपयां पैकीं ४४ रुपये बुडतखातीं असून १२ रुपये अजून यावयाचे आहेत.

वरभाडें शिक्षकांचा पगार वगैरे एकंदर खर्च ८४० रुपये ९ आणे ४ पै आहेत. घरभाडें वगैरे अजून पैशांच्या अभावीं पुरतें चुकतें झालेलें नाहीं व खालील रकमा अजून वसूल व्हावयाच्या आहेत. देणगी बारा रुपये मासिक वर्गणी ७०-१२ संघाचे आश्रयदाते आपपली वर्गणी सर देण्याची मेहेरबानी करतील तर संस्थेवरील हें ओझें कमी होण्यासारखें आहे.

मुरगांव शहर हळू हळू भरभराटींत येत आहे. अशा वेळीं येथें स्थापन होणारी संस्था तीस हातभार लावण्याची बुद्धि सर्वांना परमेश्वरानें द्यावी अशी त्याकडे प्रार्थना करून व निर्विघ्नपणें गेलेल्या एका वर्षाच्या काळाबद्दल त्याचे आभार मानून आपणा सर्वांची रजा घेतों.

श्री. सरदेसाई याच्या भाषणानंतर पास झालेल्या मुलांची नांवें वाचण्यांत आलीं व खालील मुलानां अध्यक्षांच्या हस्तें बक्षिसें वांटण्यांत आलीं:—

इयत्ता	नांवें
४ थी	रत्नाबाई मंगेशराव मुर्डेकर
,,	मारुती शशिधर घार्से.
३ री	परशुराम वासुदेव शेटये.
,,	रघुनाथ श्रीधर झांवरे.
,,	अनंत महादेव गोवेंकर.
२ री	कल्याणबाई व्यंकटेश कामत.
,,	प्रिताबाई मंगेश लाड.
;,	पांडुरंग मंगेश कारापुरकर.
,,	इंदुमतीबाई मंगेश कारापुरकर.
१ ली	अर्जुन रामचंद्र पाटील.
,,	श्रीधर पांडुरंग शेटये.
,,	रामनाथ नारायण चारी.
,,	मंगेश सदाशीव तेलंग.
,,	कल्याणबाई चं. कंठक.
अपुरी	हेमलताबाई पांडुरंग चक्रमणी.
,,	चंद्रकांत विश्राम पालेकर.
,,	इंदुमतीबाई मंगेश लाड.
,,	गौरीबाई सुरथा नाईक.
,,	श्रीपाद तात्याजी शेटये.

या नंतर मुलानां खाऊ वांटण्यांत आला व अशा रितीनें हा समारंभ उत्कृष्ट रितीनें पार पडला.

सभेचें काम संपल्यावर संघाच्या सभासदांची एक खासगी सभा भरविण्यांत आली. संस्थेच्या कित्येक अडचणी दूर करण्यास व शाळेमध्यें आवश्यक अशा नवीन सुधारणाचा उपक्रम करण्यास कोणकोणते उपाय केले पाहिजेत या विषयीं एक दीड तास पर्यंत वाटाघाट झाल्यावर संस्थेचे सेक्रेटरी ह्मणाले:—आजपर्यंत माझ्या एकट्याच्यानें होईल ती संस्थेची सेवा मी केली आहे. संस्थेच्या कित्येक वर्गणीदारांकडून अजून पुष्कळच रकम यावयाची आहे. त्याच प्रमाणें शाळेच्या व्यवस्थेचें काम व वर्गणी गोळा करण्याचें काम हीं दोन्हीं कामें मनुष्यबळाच्या अभावीं माझ्या हातून झेपणें शक्य नाहीं हें अनुभवांतीं सिद्ध झालेंच आहे. कारण तसें नसतें तर मी इतके परिश्रम करून देखील एवढी वर्गणी वसूल झाल्याशिवाय राहिली नसती. तेव्हां मी अशी सूचना करितों कीं, कार्यकारी मंडळानें रा. रा. मंगेश आत्माराम लाड यांजवर वर्गणी गोळा करण्याची जबाबदारी टाकावी. गावांतील वजनदार गृहस्थांपैकी ते एक आहेत. त्यानां वसुली करणें जितकें सोपें जाईल तितकें सें मला होणार नाहीं. ही सूचना एकमतानें मान्य करण्यांत आली व सभा आटोपली.

Não podemos concluir esta local sem exteriorisar o nosso indiscritivel jubilo pelo desejado . . . *renascimento* do sr. Gama a quem tomamos a liberdade de, mais uma vez, dirigir daqui nossas tão calorosas como sinceras felicitações pela sua *vida nova—mais uma vez*, porque o nosso enviado especial felicitou-o na sua apalaçada e principesca residencia de Molcornem, em nome singular e plural do *Bharat*.

Boa proposta

O *Heraldo* junior insurgiu-se contra a importante proposta do sr. Vogal do Conselho Legislativo dr. João de Figueiredo, referente á conversão em julgados municipais das comarcas de Quepem, Bicholim e Damão.

Nós somos, porem, a fávor da proposta do sr. dr. Figueiredo, a qual não só não acabará com despesas inuteis que ao presente se fazem com a manutenção das mesmas comarcas sem movimento mas tambem contribuirá preponderantemente para extirpar, de raiz o microbio—*litigioso* que a presença delas ora cria.

Mas as considerações do *Heraldo* reclamam uma resposta extensa que porem não pode ser dada nesta edição por falta de espaço. No entretanto limitar-nos-hemos a perguntar-lhe:—

—¿ Ignora, porventura, o ilustre colega que a criação de necessidades é directamente proporcional á facilidade de meios de sua satisfação ? Não, certamente.

—¿ Desconhece o *Heraldo* a exquesita *mania* de muita gente se dirigir *por dá cá aquela palha* aos tribunaís, quando estes lhe sejam accessiveis economica e corograficamente ainda por causa de questiunculas que podiam ser derimidas sem intervenção dos mesmos tribunais e o que nas referidas comarcas é frequente vêr-se ? Não, tambem.

—¿ Não sabe, finalmente, que nas referidas comarcas *lavra a peste de ociosidade* que è mãe de vicios.. *demandistas* ? Conhece-o, igualmente.

¿ Em que fica, pois, o seu desacordo ?

Paciencia!

Apesar de composta não poude ir na presente edição a resposta já acusada do sr. Nanum Tarcar Pernencar, acompanhada de nossas considerações. Calculamos, tambem, a anciedade de que devem estar possuidos os srs. *Moropanto*, *Tucarama* e *Vamona* para saborear, talvez com voracidade, a referida prosa da lavra do ilustre protector da importante classe de farazes. Mas não há remedio. E o que não pode remediar-se, remediado fica.

Paciencia, pois, senhores!

Progresso

Há neste mundo de Cristo muito pateta que por ser *muito pateta* não sabe o que diz ou não diz o que sabe. Assim surgiu por ai alguem que torceu nariz á nossa bela antonomia, porque na vigencia desta dadiva— emprestada, cresceram os impostos novos e engrossou o *deficit* que sobe a 17 laques de rupias, se a memoria não nos intruja.

Mas ¿ que significa *crescer* e que ascepção tem a palavra *engrossar* ?

Ambos estes verbos indicam aumento, disignam que nós estamos, a passo acelerado, marchando para a *frente—unida* e mostram que hoje possuimos mais alguma coisa do que houtem.

Logo : estamos no progresso ainda que este progresso seja do...*deficit soberbo* e de impostos de se lhes tirar coiro e cabelo, juntamente com o esfarrapado e sujo chapeu, cheio de persevejos e piolhos.

A antonomia fez, pois, progresso de— farrapos, persevejos, piolhos e companhia.

Mau, mau . . .

A Comissão de Milhoramentos de Mormugão, quando cá esteve o sr. Maravilhas, seu presidente, foi sempre elogiada pela maioria dos nossos jornais. Assim, ela nasceu pelo calor de elogios e até festejou os seus aniversarios pelo calor de elogios.

Agora, porem, que o sr. Maravilhas se encontra ausente, todos o acusam com o ardor que seria para louvar se o tivessem antecipado, porque é feio atacar uma pessoa ausente, não é proprio do cavalheirismo levantar campanha justa ou injusta, contra um funcionario que está no goso de licença fòra do Paiz nem serve para coisa alguma guerra contra um inimigo que não está no campo de batalha.

Pelo menos o *Bharat* que nas suas colunas declarara guerra sem treguas á mesma Comissão, desde a sua criação—o que podem atestar as suas colecções—suspendeu a sua campanha com a saída de seu presidente, porque julgou ser inutil tratar de pessoas e coisas, postas fora do campo de batalha.

E' possivel que estejamos laborando em erro com esta nossa orientação: temos, todavia, de nos conformar com ela, porque *quod natura dedit nemo potest negare*

Para refletir . , .

Há monarquias que são autenticas republicas e ha republicas que são autenticas monarquias A Inglaterra, por exemplo, é uma monarquia republicana e Portugal ê uma republica monarquica.

Ao passo que, aqui. quem manda é o governo sem fazer caso da opinião publica sensata, alì è a opinião publica sensata que regula os destinos da Nação, circuustancia que parece confirmar a doutrina defendida num *Conto Politico* publicado, há dias, pelo *Bharat* do seu colaborador *R*

Pelos modos, nem sempre as palavras fazem sentido... verdadeiro

O ex. governador monarquico desta Provincia sr. Horta e Costa tinha muito medo da opinião publica sensata e porisso, punha todo o seu empenho em acertar ná sua acção administrativa que era popular — faça-se a justiça.

A liberal orientação do sr. Costa não foi nem é seguida pelos governadores republicanos que fizeram e fazem, por via da regra, o que pensam, o que querem o o que podem. E não se importam com a opinião publica sensata do Paiz. Afrontam na até com toda a sem-ceremonia.

E' claro que assim vamos mal e pior iremos se as nossas coisas não tomaram bem depressa outro rumo.

Reflitam nisto os que tem a obrigação de fazer, para que não sejam responsaveis perante o Paiz que governam das consequencias... que surtirem de seus actos...

भारताची नवीन व्यवस्था

भारताच्या नियमित प्रकाशनाम बाध येऊं नये ह्मणून, संपादकानी नवी व्यवस्था थाटण्याचें काम दुसऱ्यांवर संपविलें होतें. ह्मणून अजून त्याची मांडणी जशी व्हावी तशी होत नाहीं. आतां इतर व्यवसाय सांभाळूनहि खुद्द आह्मीच आमच्या स्वतःच्या जबाबदारीवर एकंदर कामगिरी घेतली असल्यानें नूतन व्यवस्थेचा जम या महिन्याच्या आंत बसेल अशी खात्री आहे. केव्हांहि झालें तरी 'आपण तो आपण व दुसरा तो दुसरा' हें तत्व डोकावल्याशिवाय रहात नाहीं, याचें आह्मांस आणखीं एकदां खासें प्रत्यंतर आलें. खरेंच आहे. आपली तळमळ, आपला अभिमान, आपली उत्सुकता खुद्द आपल्या रक्ताच्या बंधूंच्या अंतःकरणांत उत्पन्न होणें कठिण आहे. दुसऱ्यांची गोष्ट तर विचारावयालाच नको ! असो. नवीन व्यवस्थेसाठीं आह्मांस कर्ज उभारावयास लागल्याचें वर्तमान आमच्या हितचिंतकांस अवगत आहेच. त्याची फेड या वर्षांतच करण्याचा करार असल्यावरून एकंदर वर्गणीदारानीं आपापली वर्गणी चुकती केल्यास, भारतास बहुत्वाची मदत होणार आहे. नवा पहिला अंक प्रसिद्ध होण्यापूर्वी—ह्मणजे या महिन्याच्या आंत, ज्या कोणांकडून वर्गणी येणार नाही त्यांस भारत बंद केला जाऊन त्यांचीं नावें "चोर वर्गणीदार" किंवा "लुटारू सभ्य गृहस्थ" या सदराखालीं स्पेशल अंकांत प्रसिद्ध होतील. या उपायानें तरी त्या प्रतिष्ठित लुटारूंची सांथ नष्ट होते कीं काय हें पाहिलें पाहिजे.

आमचे संपादक दौऱ्यावर निघालेले आहेतच. त्यांकडे वर्गणीची फेड केल्यास फार उत्तमच. न पेक्षां वसुलदाराची वाट न पहातां वर्गणी थेट भारताच्या पत्त्यावर येथें पाठवून देण्याविषयीं आग्रहाची सूचना आहे. वर्गणीदारांची नवी नावांनिशी छापण्यांत येत आहे. त्यांत केवळ पैसे देण्याऱ्या आश्रयदात्यांचाच समावेश होईल—मग त्यांची संख्या कितीहि अल्प असो. ह्मणूनहि आह्मीं वर्गणी चुकती करण्यासाठी विनवीत आहों. आजपर्यंत 'भारतानें हजारांवर नुकसान सोसलें आहे. परंतु सध्याच्या महागाईत ही स्थिति चालू ठेवणें सर्वतोपरी अनिष्ट असल्यावरून, केवळ ज्यांच्याकडून वर्गणी येईल—व तीहि आगाऊ त्यांसच भारत भेट देणार आहे. भारताला नफा तर केव्हांच मिळालेला नाहीं व त्याची त्यानें अपेक्षाहि पण केव्हां केलेली नाहीं. कसेंबसें खर्चाचें बस्तान बसलें कीं त्याला समाधान. तेव्हां वर्गणी चुकती करा.

मनेजर भारत

भारत.

गुरुवार जेष्ट व० ६ ष्टी. १८४४

जोरानें हल्ला करा!

एखाद्या व्यक्तीला किंवा संस्थेला चित्ताकर्षक नांव देण्यांत आलें ह्मणजे त्या व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून नांवाला अन्वर्थक अशीं नांवें कमविण्यांचीं चित्ताकर्षकच कृत्यें होत असतात, अशी गोष्ट नाहीं. नांव कर्ण असलें ह्मणजे कृतिहि कर्णाचीच असते असा नियम बांधतां येत नाहीं. नांव व कृति या उभय गोष्टींत सदासर्वदा मेळ असतोच असा प्रकार नाहीं.

या सर्वसाधारण सिद्धांताचें अगदीं जवळचें प्रत्यंतर पहावयाचें असेल तर आमच्या रिपब्लिक राज्यपद्धतीकडे नजर फिरविली कीं पुरे. प्रजासत्ताक असें या पद्धतीचें नांव साऱ्या जगांत गाजत आहे. पण या 'नेहमी' नूतन राज्यव्यवस्थेनें प्रजेला कल्याणकारक अशीं कितीशीं कृत्यें करून आपलें नांव सार्थ केलें आहे ? उलट मोनार्कीसुद्धां जीं कृत्यें करण्यास धजली नसती, ज्यां कृत्यांमुळें तिचें तोंड काळें ठिक्कर पडलें असतें, तींच कृत्यें या प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या ऐन तारुण्यांत राजरोस रितीनें आचरलीं जातात !

या वरून नांव व काम या परस्परांत नेहमींच मैत्री असते असें नाहीं उलट पक्षीं शत्रुत्वाचेंच नातें त्यांच्यांत बहुतकरून डोकावतें, असा अनुभव आहे. व अनुभवज्ञानाच्या भक्कम व टिकाऊ पायावर ज्या सिद्धांतांची उभारणी होत असते ते सिद्धांत फोल अथवा कवडीमोल ठरविणें सहसा शक्य नसतें.

पोर्तुगीज रिपब्लिकची मुहूर्तमेढ रोवल्यास आज दहा वर्षांपेक्षां जास्ती काळ लोटला. या अवधींत तिनें कोणकोणतीं शतकृत्यें करून प्रजेला सुख दिलें ? प्रजेची प्रसन्नता प्राप्त करून घेण्यासाठीं कोणत्या उदार व दिलदार धोरणाचा अवलंब केला ? मोनार्कीपासून डवचणाऱ्या क्लेशदायक यातना कमी करण्यांत कितीसा पुरुषार्थ दाखविला.

'कांहींच नाहीं' असें या तिन्हीं प्रश्नांला एकच उत्तर देतां येईल. परंतु पूर्वीची तरी 'परिस्थिति' असावी कीं नाहीं ? छे! देशाच्या दुर्दैवानें रिपब्लिक स्थापन झाल्यापासून पूर्वीपेक्षांहि आतां आमची स्थिति जास्त धोक्याची बनली आहे. तिजोरीवर मनमुराद चरणाऱ्यांची संख्या आतां पूर्वीपेक्षांहि जास्त वृद्धि पावल्यावरून सार्वजनिक संपत्तीला पडलेला तुटीचा खोल खड्डा जास्तच खोल खणला जात आहे. खर्चवाढीच्या नव्या कल्पनाना कल्पनातीतपीक येत असल्यावरून कल्पनेबाहेर लोकांच्या पैशाचा निर्भयपणें चुराडा करण्यांत येत आहे. व अशा या बेबंद कारभारामुळें पडत असलेली तूट भरून काढण्याच्या मिषानें करवाढीला पुढें करून व लोकमतावर सं-

महात्मा गांधींची योग्यता

महात्मा गांधी यांना हिंदुस्थान सरकारनें पकडल्याची वार्ता अमेरिकेस गेली, त्यावेळीं त्याच्या दुसऱ्या दिवशीं ह्मणजे ता. १२ मार्च रोजीं अमेरिकेंतील न्यू यार्क शहरचे सुप्रसिद्ध व विद्वान अध्यक्ष रे. जॉन हेनीज हॉलमेन यांनीं महात्मा गांधींच्या संबंधानें पुढील उद्गार काढले. ते ह्मणाले:—

महात्मा गांधी हे हिंदुस्थानचे रहिवासी असून त्यांनीं जगाच्या कल्याणाचें थोर कार्य चालविलें आहे. आज जगांत त्यांच्याइतकी थोर विभूति नाहीं. कांहीं महिन्यापूर्वी त्यांचें नांव हिंदुस्थानच्या बाहेर फारसें कोणाला माहीत नव्हतें. तें मागें सहकारासह्ची माझ्या वाचण्यांत आलें होतें, व त्याचवेळीं त्यांच्या संबंधानें मला माहिती होती, तीवरूनच हा कोणी तरी फार मोठा पुरुष असावा अशी माझी खात्री झाली होती. त्यांच्यासंबंधानें अधिक माहिती मिळविण्याकरितां त्या वेळींच मी प्रयत्न केला होता. परंतु त्यांत मला यश आलें नाहीं. परंतु आजकाल त्यांचें नांव साऱ्या दुनियेंत गर्जून राहिलें आहे. वर्तमानपत्रें व मासिकें त्यांच्यासंबंधानें लेखचे लेख लिहित आहेत. न्यू यार्क शहरांतील एका अत्यंत वजनदार वर्तमानपत्राच्या मालकी द्वारानें हिंदुस्थानांत आपला एक प्रतिनिधी पाठवून महात्मा गांधी व त्यांची अनत्याचारी असहकारिता यासंबंधानें पूर्ण व खरी बातमी मिळविण्याची व्यवस्था केली होती. महात्मा गांधी ह्या पुरुषानें अज्ञान अवस्थेतून अगदीं थोडक्या काळांत आपलें डोकें वर काढलें. आज त्यांना अद्वितीय व चिरंतन स्थान प्राप्त झालें आहे. साऱ्या जगाचें लक्ष त्या पुरुषाकडे लागून राहिलें असून तें तसें रहावें अशी त्यांची वास्तविक योग्यताच आहे. १९१८।१९ सालीं प्रे. विल्सन यांची जी स्थिति होती, किंवा १९२०।२१ सालीं निकोलय लेनिन यानें ज्याप्रमाणें आपलें नांव जगजाहीर करून सोडलें होतें, त्याप्रमाणें आजकाल या पौर्वात्य संस्कृतीच्या महापुरुषानें कीर्तीची अगर अधिकाराची अपेक्षा न करतां इंग्रजांच्या तुरुंगांत हाल अपेष्टा भोगीत असतां आपलें नांव सर्वतोमुखीं करून ठेवलें आहे.

आत्मशुद्धि आणि भक्ति या शब्दांचा अर्थ ज्यांना पूर्णपणें समजतो, अशा लोकांना महात्मा गांधीचें नांव ऐकलें ह्मणजे अत्यानंद होतो. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी कीं शब्द प्रामुख्यानें धर्मदर्शन असतांना केवळ राजकारणी आहेत अशी लोकांची समजूत होऊन बसली आहे. व ह्मणून ते लोक महात्मा गांधी यांची वुइल्यम टेल रॉबर्ट ब्रूस जॉर्ज वॉशिंग्टन यांच्याशीं तुलना करूं पाहतात, कारण त्यांना वरील पुरुषांत व म. गांधी यांच्यांत दोघेहि जित लोकांच्या उद्धारार्थ प्रयत्न करणारे ह्मणून साम्य दिसतें. जित लोकांच्या करतां महात्मा गांधी हे प्रयत्न तर करीत आहेतच. त्यांत [illegible] नाहीं; परंतु एवढ्यावरच त्यांचा मोठेपणा संपला नाहीं. राष्ट्रीय चळवळ हें त्याच्या एकंदर चळवळीचें उपांग असून प्रमुख अंग निराळेंच आहे. म. गांधी व जॉर्ज वाशिंग्टन गॅरिबॉल्डी प्रभृति मंडळी यांच्यांत एक अंतर असें आहे कीं, म. गांधी हे प्रतिपक्षीयांवर स्वातंत्र्याकरतां देखील तरवार उपसणारे नसून ते मनुष्यत्वाच्या उच्च भावनाच्या जोरावर आत्मिक बलावर कार्य साधन करूं इच्छितात. वॉशिंग्टन प्रभृति मंडळींनीं स्वातंत्र्याकरितां प्रतिपक्षीयांचें गळे कापले. परंतु महात्मा गांधींची तशी गोष्ट नाहीं. अहिंसा तत्व त्यांच्यांत बाणलेलें असल्यामुळें तें एका देशाचे अगर राष्ट्राचे प्रमुख पुढारी नसून तें साऱ्या जगताचे वंदनीय पुढारी आहेत. गांधीजींचें सर्व जिवित आत्मिक बळावर चाललें आहे. हिंदी लोकांचीच गुलामगिरींतून मुक्तता व्हावी, एवढ्याकरतांच त्यांची केवळ खटपट चालली नसून साऱ्या मानवजातीची आत्मिक उन्नति व्हावी, व तिचें कल्याण व्हावें. अशी त्यांची इच्छा आहे. महात्मा गांधीची तुलना बुद्ध, झोरोअॅस्टर महंमद पैगंबर यांच्याशीं केल्यास ती यथार्थ होणार आहे. आशिया खंडाच्या कुशींतून मधून मधून लोकांना असें धर्मज्ञान देणारे अवतारी पुरुष उत्पन्न होत आले आहेत. येशु ख्रिस्ताशीं त्यांची तुलना केल्यास ती शोभणार आहे. येशु ख्रिस्त व म. गांधी यांची चरित्रें जर कोणी एके ठिकाणी लिहिलें तर त्यांच्यांत साम्यता कोठें कोठें आहे हे चटकन दिसून येईल.

महात्मा गांधींच्या सर्व यशाची गुरुकिल्ली त्यांच्या आत्मिक सामर्थ्यांत सांठविलेली आहे. त्यांनीं हिंदी जनतेवर एवढी प्रचंड छाप पाडली आहे ही गोष्ट अगदीं खरी आहे. गांधी जिकडे जातात, तिकडे त्यांचें भाषण ऐकण्याकरितां अर्धा पाऊण लाख लोकसमूह लोटत असतो. पालेस्टाइन प्रांतांत जीसस ख्रिस्ताची जी स्थिति होती तीच स्थिति सध्या हिंदुस्थानांत गांधींना प्राप्त झाली आहे. अज्ञ व भोळसट लोकांना गांधी हे अवतार वाटत असून त्यांच्यांत चमत्कार करून दाखविण्याची शक्ति आहे असा त्यांचा समज होऊन राहिला आहे. सर्व लोक त्यांना महात्मा असें ह्मणतात, व देवाप्रमाणें मान देतात. त्यांच्या इतकी अनुयायांची प्रचंड संस्था कोणत्याहि पुढाऱ्याला आजपर्यंत लाभलेली इतिहासांत नमूद नाहीं.

म. गांधी यांच्यांत हें अद्भुत सामर्थ्य कोठून आलें हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. त्यांच्या मुद्रेकडे पाहिलें, तर त्यांचे मुखींच तेज पडत नसावेसें वाटतें, दिसण्यांत ते जवळ जवळ बावळटच दिसतात; आकारानें पाहतांहि ते बटूमूर्तीच आहेत, त्यांचें वजन शंभर पौंड सुद्धां नसेल. अखंड तपें एकसारखीं कष्टमय तपश्चर्येंत त्यांनीं घालविलीं असून त्यामुळें त्यांचें शरीर अगदीं कृश व हलकं झालें आहे. ते इतके अशक्त आहेत कीं, कित्येक वेळां जाहीर सभांतून भाषण करतांना उठून बोलण्याची ताकद नाहीं ह्मणून ते बसूनच भाषण करतात, दुसऱ्यावर थोडा फार छाप पाडतील असें फक्त त्यांचे पाणीदार डोळे मात्र ते आहेत. त्यांच्यांत मला बुद्धीची कुशाग्रता दृष्टीस पडत नाहीं, त्यांच्या बोलण्यांत वक्तृत्वाची छटा सुद्धां झळकत नाहीं, त्यांच्यांत वक्तृत्व नाहीं, बुद्धि नाहीं, पाणीदार व भव्य चेहरा नाहीं अगर धिप्पाड शरीर यष्टिहि नाहीं. आणि असें असतांहि त्यांच्यावर हिंदी लोकांचें अलोट प्रेम आहे. या प्रेमाच्या बुडाशीं जर कांहीं असेल तर म. गांधी यांचे वर्तन होय असेंच ह्मटलें पाहिजे. कुलीन व दिवाणाच्या कुळांत जन्मास येऊन व आधुनिक शिक्षणाचा लाभ विलायतेंत व हिंदुस्थानांतहि चांगल्या प्रकारें लाभला असतांना, व बॅरिस्टरची त्या मार्गावरून एकदम खालीं उतरून गरीबांतील गरीब अशा लोकांचे हाल स्वतः अनुभविण्यास त्यांनीं सुरवात केली! जीं दुःखें आपण्यास भोगण्याचा प्रसंग नाहीं अशीं दुःखें भोगण्याचा प्रसंग दुसऱ्यावर येऊं नये ह्मणून त्यांनीं सर्व प्रकारचीं दुःखें स्वतः भोगण्यास प्रारंभ केला! ज्यांना लोक तुच्छतेनें वागवितात त्यांशी त्यानीं सलगी केली. दक्षिण आफ्रिकेंत हिंदी मजुरांचा कड घेऊन अन्यायानें वागणाऱ्या सरकाराशीं त्यांनीं झगडा सुरू केला. त्या वेळच्या प्रसंगाचा वृत्तांत हृदयभेदी आहे. या वेळी प्रथम हा महात्मा उघड्या जमिनीवर आकाश पांघरून स्वस्थ झोंप घेत पडला. संन्यास-वृत्तीचें व्रत त्यांनीं या वेळीं स्वतः घेतलें व आपल्या अनुयायांवर बिंबविलें! त्यांनीं नुकतेच कपडे सुद्धां टाकून दिले असून फक्त एक धोतर गुंडाळून ते असतात. त्यांनीं विलायती व परदेशी कापडावर बहिष्कार पुकारला व रहाटावर सूत काढून त्याचें वस्त्र लोकांनीं वापरावें असा उपदेश केला, त्यावेळीं कापडाचा तुटवडा पडूं नये व उघडे बोडके हिंडण्याची लोकांना लाज वाटूं नये याकरतां स्वतःच त्यानीं उदाहरण घालून देण्याकरितां सर्व प्रकारच्या कापडाचा त्याग केला आहे, लोक त्यांच्याकडे केवळ पुढारी याच नात्यानें पहात नाहींत, तर त्यानां तो आपला सखा वाटतो, व ते त्यांना देवाप्रमाणें मानतात.

lingua-mãe e dos factos. "Quem deu luz arrancando das trevas da ignorancia e do estado de selvagem o povo da India, foram os *portugueses*" "Quem aboliu sati são os mesmos" "A par do J. Bosê temos aqui *Froilano*" "Tilak na India e *Liberio* em Goa" "O rei Shivaji deve ter nascido dum portuguss, porque foi grande" [sendo portanto a mãe do Shivaji uma puta como dizia o director do "Bharat"] e quantas descobertas mais que farão corar de vergonha, o Colombo Marcunde, Addison, Cook, Bose, Watt e outros.

Ainda bem, porque, o que esse senhor inventou, circula só aqui neste padrão imorredouro da Gloria de S. Francisco. Do contrario isto serveria lá na India ingleza para provocar fortes risos, á hora de chá.

Em conclusão, os senhores cristãos ou tem de declarar que são indios ou europeus. Se são indios, cabe-lhes o inevitavel dever de estudar a sua historia cultivar a lingua, sentir o justo orgulho de tudo quanto é da India e cooperando com os seus irmãos hindus trabalhar para engrandecer sob o ponto de vista *indiana* esta desgraçada terra de Goa, torrão do Maharastra, nossa patria, digna da melhor sorte. Se não são indios...mas isto é lá com o tempo e com Heróes do mar. O que por ora, absolutamente desgostamos è que eles sejam chamados por aquele malandro da 'Modern Review' "Unpatriotic and unnational" Que grande pateta!

B. N. R.

Ecos & Critica

Dr. Froilano de Melo

Encontra-se já na capital da India Portuguesa êste eminente homem de sciencias que honrou no estrangeiro o seu nome e o do amado Paiz que se ufana de o possuir.

A' sua chegada, teve Sua Excia uma cordial recepção em que tomou parte o elemento preponderante de todas as classes sociais da capital, testimunhando ao joven sabio o apreço em que é, cà, tido.

O *Bharat* que muito o estima pela desinteressada amisade que, especialmente, o sr. dr. Melo dedica á classe hindu e á sua associação *Pragatica-Sangh*, dá-lhe bôas vindas, e almeja que Sua Excia tenha longa vida para ser cada vez mais util á Sciencia, pelo progresso da qual está fazendo verdadeiros sacrificios.

Insuportavel!

Consta-nos que o sr. dr. Antão, antipatico administrador do concelho teve o imprudente arrojo de pisar com as suas botas o lugar considerado sagrado dum templo hindu de Fatorpá, quando lá esteve para qualquer diligencia.

A ser verdade o que nos contam, não podemos deixar de protestar contra tal feio acto que acabou de praticar, ofendendo a crença da classe hindu que, porisso, está contra o mesmo senhor profundamente indignada.

Mas o sr. Antão que parece ser de pedra e cal não faz caso do Povo que êle incomoda, porque esta certo de que o matara com o abrazador calor das *costas quentes* que possui.

E' *insuportavel* o seu acto, mas é feliz quem o praticou!

Gago e Sacadura

Os valentes aviadores portugueses srs. Gago Coutinho e Sacadura Cabral juntaram à gloria do "As armas e os barões assignalados que por mares nunca dantes navegados passaram alem da *Taprobana*" a "dos aviadores assignalados que por ares nunca dantes navegados passaram alem de *F. Noronha*", honrando o seu nome e o do Paiz que outrora foi *Londres* do mundo.

Gago Coutinho e Sacadura Cabral provaram, á humanidade inteira que *Portugal não pereceu e que o seu Povo* conserva ainda o arrojo, pai da Fortuna, que os seus gloriosos antepassados lhe legaram

E', pois, indiscritivel o nosso jubilo pelo inaudito feito aereo dos corajosos aviadores portuguezes srs. Coutinho e Cabral.

Viva Portugal Liberal!

Dr. Seabra

Despediu-se desta comarca o sr. dr. Julio de Seabra que á sua saida foi alvo duma manifestação bastante afectuosa, o que indica a consideração que Sua Excia cá gosava.

O Bharat prestou-lhe homenagem, em tempo. Agora faz só votos pelas suas prosperidades.

Sem importancia

Aprouve alguem dizer que o caso Excelso-Cota era sem importancia. Ora, o mesmo caso *sem importancia* provocou a reunião do conselho escolar do estabelecimento onde os originadores do *caso professam*...divergencias. O efeito da consequencia duma *causa sem importancia* tambem é *sem importancia*.

Ergo: o conselho escolar é uma coisa *sem importancia*, porque se reune por qualquer motivo *sem importancia*.

E' isto? Se o não é, tem razão o outro que diz que a logica é uma batata.

Merecido!

Os proprios que trabalharam pela construção do edificio para o novo tribunal estão agora arrependidos pela sua imprudencia que os está obrigando a maçadas que lhes fazem brotar lagrimas, em razão de distancia que tem que vencer...para alcançar o ponto.. almejado.

E' caso para dizer:

Merecido!

Para o nº imediato

Tivemos de reservar a resposta do sr. Nanum Tárçir Porneacar aos srs. *Moropanta*, *Vamana* e *Tucarama* sobre questão da *Fazes* por falta de espaço.

Nada se perderá com a demora.

भारत

गुरुवार जेष्ट शु० १४ शी १८४४

प्रत्यक्षाला प्रमाण नको!

सरकार ह्मणजे प्रजेनें नेमलेलें कारभारी मंडळ. या कारभारी मंडळाचा कारभार सुखाचा झाला तर प्रजा खूष असते. पण उलटपक्षीं कारभाऱ्यांकडून मालकांस हरेक तऱ्हेनें त्रास पोंचावयास लागला ह्मणजे उभय वर्गांत बेदिली सुरू होऊन परस्परांत परस्परां विषयीं द्वेषाग्नी धुसफुसावयास लागतो. व शेंवटीं त्याचें पर्यवसान बंडांत, क्रांतींत किंवा अशाच प्रकारच्या एखाद्या अनिष्ट प्रकारांत होत असतें.

कारभारी मंडळाच्या स्वार्थी धोरणामुळें करांची वाढ होते व करवाढीमुळें प्रजारूपी मालक असंतुष्ट होतो. असंतुष्टपणामुळें झगड्याचा 'सूत उवाच' होतो. व या 'सूत उवाचाचा' शेवट 'रहा युद्धाला उभा' यांत होऊन, अंतीं सत्पक्षाला ह्मणजे प्रजेला विजय मिळत असतो अशी ही राजकीय परंपरा आहे. व ती सर्वांस माहीत आहे.

यावरून स्वार्थी करवाढींतच बंडाचें, क्रांतीचें किंवा युद्धाचें बीज असतें, हें सिद्ध होतें. बंड टाळावयाचें असेल, क्रांतीचीं कडू फळें दूर फेंकून द्यावयाचीं असतील किंवा युद्धाच्या विवंचनेपासून डोकें अलिप्त व शांत ठेवावयाचें असेल तर पवित्र शास्त्रांतल्या जुन्या करारांतील ज्ञानप्रसवणाऱ्या झाडाप्रमाणें या करवाढीच्या लोकक्षोभ उत्पन्न करणाऱ्या झाडाला शिवतां उपयोगी नाहीं. नाहीं तर मनुष्य जातीचा आद्यजनक जो 'आदांव' याची जशी ज्ञानप्रसवणाऱ्या झाडापासून दुर्दशा झाली तशीच या करवाढीच्या झाडापासून सरकारची विटंबना होण्यास उशीर नको.

स्वार्थी करवाढीचीं फळें इतकीं विषारी असतां, आमच्या मूर्ख नोकरशाहीनें तीं पोटफुटेपर्यंत खाखण्याचा सारे सपाटा चालवावा, हें आत्मघातकीपणाचें लक्षण नव्हे काय? केव्हांना केव्हां तरी करवाढीचें वीष अंगांत भिनून निघृण मृत्यूच्या भीषण शय्येवर बादशाही पोपटाप्रमाणें आकाशाकडे डोळे 'वटारून' काळ निद्रा घेण्याचा प्रसंग येणार असल्याची खात्री असतांना सुद्धां जें सरकार आपलें अनिष्ट धोरण बेशरमपणें चालू ठेवतें त्या सरकारची बुद्धि स्थानभ्रष्ट झाली नाहीं तर काय?

करवाढीनें जनता धुळीस मिळाली असून तिचे हाल कुत्रासुद्धां खात नाहीं. गरीब लोकांच्या हाहाःकारानें दशदिशा व्यापून गेल्या आहेत. जेथें तेथें उपासमारीनें लोक पटापट इहलोक सोडून जात आहेत, अनेक प्रकारच्या विकट व बिकट अडचणींत कुटुंबस पडले आहेत. सुखलोक व पैतृक अन्नाचे अभारीं जनावराप्रमाणें कांहीं तरी खाऊन कसा तरी गुजारा करीत असलेले अनाथ व निर्धन मनुष्य प्राणी इतस्ततः पडलेले पहाण्यांत येतात. 'इंग्रेताराने' दरिद्री बनलेले, 'रजिस्त सिविलानें' मुदाम्याच्या पक्तीस बसलेले शिरपट्टीनें अकल जाऊन टकल पडलेले अनेक 'संसारी संन्यासी' जिकडे तिकडे आढळून येतात.

अशा नाजूक स्थितींत करवाढीची अनियंत्रित सत्ता लोकसत्तेवर अप्रतिहत चालू राहिल्यास त्याचा परिणाम कसल्या तरी अनिष्ट कार्यांत झाल्याखेरीज कदापि रहाणार नाहीं, असें, इतिहासाच्या लोखंडी सिद्धांतावरून भावी भविष्य वर्तविण्यास कसलीच आशंका वाटत नाहीं. असो. कोळसा उगळावा तितका काळाच.

अशी गोष्ट सांगतात कीं, गोव्यांत जेव्हां प्रथमच पोर्तगीज लोक आले, तव्हां त्यापकीं कित्येक सैनिकांस माशेण नावाच्या गावांत पाठविण्यांत आलें. तेथें त्यांनीं 'गाळे' नावाचीं विषारी फळें पेरूच समजून उदरांत लोटून दिलीं. त्यामुळ त्यांनां लगेच स्विस्तदर्शनास आकाशीं गमन करावें लागलें. केवळ समजूतीच्या घोटाळ्यामुळें ही भानगड उत्पन्न झाली. अशाच प्रकारची घोटाळ्याची समजूत त्यांच्या आतांच्या शहाण्या वंशजाची करवाढीच्या बाबतींत झाली नसेल ना!

पण प्रत्यक्षाला प्रमाण नको!

स्फुट विचार

"Pede providencias urgentes prisão arbitraria administrativa dois colonos Amtanem de Latambarcem concelho de Sanquelim, espera justiça urgente garantia segurança individual.

E como isso, a ser verdade, é intoleravel na plena democracia, limitamo-nos a, sem mais comentos, pedir ao sr. Governador Geral que nos leia, porque escrevemos para ler, pois o estado dos actos e factos não pode assim continuar e temos a certeza de que Sua excia. não há de querer que continue.

Volva, portanto, a sua valiosa atenção para este um dos importantes concelhos das N. Conquistas que está apelando a sua benevolencia misericordiosa.

Bicholim, 11-5 22.

O mesmo

भारत

गुरुवार वैशाख व० ७ सी १८४४

हं, पुरे करा!

आमच्या स्थानिक सरकारच्या करवाढीच्या जुलुमी व अरेरावी धोरणामुळे येथील जनतेंत असंतोषाचा वणवा कसा धुमसत आहे, हें सर्वांस अवगत आहेच. खुद्द सरकारहि या सर्वविश्रुत गोष्टीविषयीं अनभिज्ञ नाहीं. लादण्यांत आलेल्या असह्य करानीं प्रजा हवालदील बनत चाललेली असून, नेमस्त बाण्याच्या लोकांतसुद्धां स्वलक्षदाल विचारसरणी बावरू लागली आहे.

अशा करुणजन्य स्थितींत पोर्तुगाल सरकारनें एक नवीनच कायदा प्रसिद्ध करून दर १०० रैसांच्या स्टांपपेपर मागें ५० रैसांचा जादा कर असहाय्य जनतेच्या डोक्यावर लादण्याचा बेमुर्वतखोर व आततायी प्रयत्न केला आहे. या कामीं स्थानिक सरकारचें मत घेण्यांत आलें होतें कीं नाही, हें आतांच समजून येण्याचा मार्ग नाहीं. परंतु गोष्ट खरी कीं, उपरिनिर्दिष्ट करावें उच्छंखळ पिल्लूं बेशरमपणें सुसहून देतानां, वरिष्ठ सरकारनें येथील लोकमताचा निलकूल विचार केला नाहीं!

'पोर्तुगाल आमचा मायदेश असून, गोवा त्याचें शेंपूट आहे' असे वेळीं अवेळीं मुक्त कंठानें ओरडणाऱ्या देशभक्तानीं आपल्या प्रिय व लाडक्या मायदेशाच्या या गैरशिस्त, दुष्ट व घातकी कृत्याच्या विचार करावा व पुढील धोरण निश्चित करावें, अशी आमची त्यांस प्रेमाची, कळकळीची व आग्रहाची सूचना आहे. जो प्राणी आपल्या शेंपटाची काळजी वहात नाहीं, त्या प्राण्याची शेपटानें तरी पर्वा कां बाळगावी, हें समजणें कठिण आहे. 'जिवावर' आलेलें जेव्हां शेंपटीवरच 'घालण्याचा' प्रयत्न होतो, तेव्हां शेंपटीनें स्वसंरक्षणार्थ त्या मुख्य 'जिवाचा' सहवास कायमचाच सोडलेला बरा, असें कोण म्हणणार नाहीं?

पण आमच्या प्रतिनिधिनीं—देपुताद व सेनादोर—यानीं वरील सारख्या अमानुष कृत्यांचा विचार करावा कीं नाहीं? ते तर आपापल्या खुर्चीवर निवडणुकींत मिळालेल्या जयानंदातिशयानें बेहोष होऊन पहुडलेले दिसतात! सगे सोयरे व मित्र शेजारी यांच्या पोटाची काळजी वाहण्यापेक्षां जास्त कांहीं आपणाला कर्तव्य करणें नाहीं, अशीच ज्यांची ठाम समजूत झालेली आहे, त्यांना करवाढीमुळें लोकांचा सत्यनाश झाला तर त्याचें काय होय?! प्राजेरच्या येथील अंध भक्तानीं आपल्या डोळ्यांवरील स्वार्थी पडदे दूर ढकलून, पोर्तुगालसरकारच्या अनिष्ट व बेलगामी कृत्यांचा निरग्रहपणें विचार करण्यास पुढें सरसावलें पाहिजे. नाहीं तर राष्ट्रीय 'सब गोलांकार' होण्यास उशीर लागणार नाहीं.

'बुडत्याचा पाय खोलांत' किंवा 'विनाश काले विपरीत बुद्धि' या म्हणीचें सत्यत्व पटविण्यासाठीं परमेश्वरानें पोर्तुगीज सरकारास 'जयहथी' धोरण—मेकेल्यावर लत्ताप्रहार करण्याचें—स्वीकारण्याची चेतना केली नसेल ना?

कसेंहि असो. दिवा मालवताना मोठा होत असतो. त्याप्रमाणें आमच्या सरकारची प्रस्तुतची स्थिति झालेली आहे. कदाचित्, पोर्तुगीज राष्ट्राचें मरण करवाढींतच असल्यास, तें त्याला टाळणें तरी कसें शक्य होईल?

आम्ही मात्र आतां बिलकूल झोपतां कामां नये. झोंप फार झाली. झोंपेमुळें डोळे कुजण्याच्या बेतांत आले. मिरेमुळें परक्यानीं आम्हांस अज्ञास सेताद केलें, आमचें सर्वस्व लुटून आम्हांस भिकारी व कफल्लक बनविलें; आमच्या घरांतच आम्हांस गुलामाची योग्यता आणून, आम्हांस पशूच्या हीन व दीन कोटींत निर्दयपणें लोटून दिलें!

ही वेळ अर्थात् स्वस्थता घेण्याची नाहीं. शक्तिसर्वस्व एकवटून परकी अत्याचाराचा नायनाट करण्याची आहे. जुलमाचें जूं झुगारून देण्याची आहे. व आत्मतेजाच्या प्रभावानें राजकीय मोक्ष साधण्याची आहे. यापेक्षां ज्यास्त तें काय सांगणार! हं, पुरे करा आपली झोंप!

— कवळें व महाशेळ या ठिकाणीं हि आचार्योत्सव करण्यांत आला.

— भारतमित्राचा सहावा अंक प्रसिद्ध झाला असून नेहमींप्रमाणेंच तो वाचनीय झाला आहे. मित्राच्या अभ्युदयानें आम्हांस आनंद होत आहे.

— पणजीचे धनाढ्य गृहस्थ सि. लुईज गिल्येर्म डियस हे ख्रिस्तवासी झाले. यानां 'व्यापाराचे आजोबा' असें म्हणत असत.

— महाराज शाहू छत्रपति, कोल्हापूर यांच्या निधनामुळें आम्हांस परम दुःख वाटत आहे.

CONVITE

Devendo realisar-se no proximo domingo, 21 do corrente ás 19 horas a sessão solene comemorando o 5.° aniversario da instalação da biblioteca *Xri Vetala Prassadica Dnana Mandir* sob a presidencia do sr. Xambá Crisna Suria Rau Sar Dessai e no dia imediato, á mesma hora a conferencia do S. Pedro Correa Afonso sob a presidencia do sr. dr. CaitanoBartolomeu Vás, a qual versará sobre o tema "Civilisações oriental e ocidental" tenho a honra de solicitar a assistencia do publico.

Assonõrá, 15 5 922.

Voicunta G. C. Timlo
secretario

Aviso

O Doutor Julio Martins Lobo de Seabra, Juiz de direito da Comarca de Quepem.

Faço saber que desde 1 de Junho proximo o Tribunal do juizo desta Comarca passa a funcionar no seu novo e proprio edificio, sito na aldeia Xeldem da freguesia de Tilamola do concelho de Quepem.

E para ser publico se expediu este para ser publicado no jornal da localidade.

Quepem, 15 de Maio de 1922

5 *Julio de Seabra*

आधुनिक सुधारणा !

(लेखक:— दामुअण्णा)

गोष्ट खरी आहे कीं, युरोपियनानीं आपल्या तामसी सामर्थ्यानें सर्व जगावर वचक बसविला. जगांतील सध्याची बहुतेक जीत व परतंत्र राष्ट्रें युरोपियनांच्या हाताखालचीं होत. दुसऱ्यांवर हल्ला करून त्यांस कमकुवत करणें आणि त्यांवर आपली सत्ता बसविणें, इतकेंच ज्या पाश्चात्यांचें जाडें धोरण अशांच्या सुधारणेचा थोडा विचार केल्यास अस्थानीं होणार नाहीं.

ज्या गोष्टीपासून ईश्वरप्राप्ति सुलभपणें घडून ईश्वरानें नेमून दिलेली कामगिरी अंगीस बांधवसेवा अप्रतिहतपणें पार पडते, त्या गोष्टीची तरतूद असणें ह्यालाच सुधारणा असें ह्मणतात. कोणत्याहि मनुष्याचें शेवटचें साध्य ईश्वरप्राप्ति हेंच असलें पाहिजे. पण ही ईश्वरप्राप्ति उगाच 'रामा धांव' ह्मटलें ह्मणून मिळण्यासारखी नाहीं. जें कार्य आपल्या हातून पार पडलें असतां ईश्वराचीच सेवा घडते, त्या कार्याच्या फळाचा प्रकर्ष ईश्वरप्राप्तींत होत असतो. इहलोकांत येऊन ऐहिक सुख भोगणें व परलोकांत जाऊन पारलौकिक ग्रास भोगणें हा सामान्य मनुष्यांचा व्यवसायधर्म आहे. परंतु इहलोकांत आल्यावर इकडचें कार्य निर्बाधरीतीनें पार पाडलें पाहिजे ही गोष्ट तरी खरी आहे; आणि ह्याच खरेपणांत सांसारिक साधनांचें बीज रोवलें गेलें आहे.

संसारांत आल्यावर शरीरसंवर्धनासाठीं अन्न पाहिजे, अंग झांकण्याकरितां कपडे, परस्पर व्यवहार चालण्यासाठी भाषा, ज्ञानप्राप्तीसाठीं शिक्षण, रहाण्यासाठीं जागा, उन्हापाण्यापासून बचाव करण्यासाठीं घरेंदारें, स्वच्छता, करमणूक, रस्ते, गाड्याघोडे वगैरे सर्व साधनें मनुष्याची ऐहिक यात्रा सुखरूपपणें पार पाडण्यास योजलेलीं आहेत.

परंतु ह्या पलीकडे कांहीं राहिलेलें आहे काय ? इतक्यावरूनच आपलें कार्य होईल काय ?—नाहीं. वर सांगितलेलीं साधनें झालीं, परंतु हीं साधनें ज्या साध्याकरितां केलेलीं आहेत, तें साध्य निराळेंच आहे. वरील साधनें यथास्थितपणें अमलात आणलीं, एवढ्यावरूनच तें साध्य प्राप्त होईल ह्मणणें निरर्थक आहे किंवा त्याकामीं अतिक्रमणहि उपयोगी नाहीं. आपल्या समाजांत तरी सध्या हाच प्रकार चालू आहे. युरोपियनांची तर ह्या बाबतींत परमावधि झालेली आहे. ती कशी तें पाहिलें पाहिजे.

पाश्चात्यांच्या कपड्यांकडे पाहिलें ह्मणजे त्यांचा उद्देश थंडीपासून आपला बचाव करण्याचा आहे, असें कोणास चुकून सुद्धां वाटणार नाहीं. उलट हे कपडे वापरून हे स्वच्छंदी लोक कांहीं तरी अपराध करीत आहेत असेंच पाहणाऱ्याला वाटेल.

कपड्याचा खरा उद्देश हाच कीं, आपलीं गुप्तेंद्रियें छपलीं जावीं. सर्व अंग झांकलें जावें असा नव्हे. तरी परंतु आपली प्रवृत्ति सर्व अंग झांकण्याकडे झालेली आहे

ईश्वरानें आपणास दिलेल्या रोमरंध्रांचा उपयोग तरी हाच कीं, वारा स्वैरपणें सर्व शरीरावर संचरावा. असो, पण सर्व अंग झांकणेंहि जरी ग्राह्य मानलें, तरी त्यासाठीं सध्याची परमावधि नको आहे. अर्थातच इकडे साधेपणाचा प्रश्न आला, आणि त्याचा विचार भारतांत झाला आहे.

कपड्याच्या बाबतींत युरोपियनाची ही सुधारणा झाली !

शरीरसंवर्धनासाठीं अन्नाकडे पाहूं. तरी पण हाच तिरस्करणीय देखावा ! ! गुंगी आणणारीं पेयें, क्रोर्य प्राप्त करणारीं मांसें हें सुधारलेल्या लोकांचें खाण ! मांसाशन हें किंबहुना मानवजातीस ग्राह्यच नव्हे, तें क्रौर्यदायक आहे आणि ह्याचें प्रत्यंतर युरोपियनांच्या क्रूरतेकडे पाहून करतां येण्यासारखें आहे. ईश्वरानें निर्माण केलेले प्राणी आपल्या उदरंभरणासाठीं नाहीं आहेत. आपणांस ज्या प्रमाणें जीव प्रिय आहे, त्याचप्रमाणें त्यांसहि आहे मग आह्मी राक्षसांप्रमाणें त्यांच्यावर ताव कसा मारतों ? अन्नाच्या बाबतींत ही गोष्ट झाली !

राहण्याच्या बाबतींत आणि घरांत तरी साधेपणा असला पाहिजे होता. तोहिपण शून्यच ! युरोपियनाचें घर ह्मणजे प्रत्यक्ष इंद्राचें विलासमंदिरच. चित्रविचित्र रंग पडदे, भिंतीस रंगेल चित्रें, एकंदरींत जें कांहीं दृष्टीस मोहक असें दिसेल, तितकें घरांत असावयाचें.

अंतरंग कसेंहि असो. बहिरंग चांगलें आहे कीं मानवी सुधारण झाली. मनास पवित्रता येण्याची गोष्टहि नको आहे. ज्या योगें करून मन बेफाम व चंचल होईल, अशा स्त्रियांच्या इरतऱ्हेच्या चित्रांखेरीज आजपर्यंत युरोपियनाचें असें एकहि चित्र अवलोकनांत येत नाहीं. ध्यानीं, मनीं, कार्यीं, झोपीं, कोठेंहि विलास. ही युरोपियन राहणी स्वच्छतेच्या दृष्टीनें पाहूं गेलों, तर स्वच्छता ह्मणजे काय चीज आहे, हें त्यांस ठाऊक नाहीं असें ह्मणावें लागेल. घरांत कांहींहि असो, बाहेर रंगी पडदे असले कीं झालें. पंधरवड्यास किंवा महिन्यांतून एकदां स्नान. मात्र स्नानाभावानें मळकट झालेल्या कातडीवर पाणीचे आणखीं थर बसण्यासाठीं दिवसास ८-१० खेप माती फांसणें ! तीहि पण कोठें ? तर, जो भाग लोकांस दृष्टीस पडण्यासारखा आहे तेथें ! आंत मळलेला कपडा, वर लखलखीत रेशमी लुगडें ! ! !

अंतरंग कुजकें आणि बहिरंग दिखाऊ बनविणाऱ्या ह्या आततायांस नांव तरी कोणतें द्यावें, हें समजत नाहीं.

संसाराची इतर साधनेंहि स्वार्थाच्या पायांवरच रचलेलीं आहेत. गिरण्यांचेंच उदाहरण घ्या. जे भांडवलवाले गिरणी स्थापतात, ते गरीब मजुरांच्या कष्टरूपी इंधनावर पैसे मिळवून फुगत चालले. गरीब जनता सदोदीत पारतंत्र्यांतच. समतेसारख्या सात्विक तत्वांवर जुलूम करणारी गिरणी ही जणुं काय शक्तीच आहे. गिरणींत किती इसम हातपाय चिरडून मेले, ह्याची तर गणतीच नाहीं. आगगाडीचे अपघात तर नित्य आहेतच. विजेच्या प्रकाशानें लोकांस आंधळें केलें. लोकांची दृष्टि हरण केली.

वापरण्यांत येणाऱ्या बहुतेक वस्तु तर क्षणिकच ! तांबें, पितळ सोडून दिली. त्याजागीं कांच आरसे आले. ह्या फुटक्या पदार्थांवर ममता कां ? तर तें चकचकीत आहेत ह्मणून ! हातानीं कष्ट करण्याचें तर सोडूनच दिलें. बसलेल्यास उठविण्यासाठीं सुद्धां उद्यां एखादें यंत्र येईल तर पाहूं; कोणास हात पाय हालविण्याची शक्ति सुद्धां नाहीं !! ह्याचें पर्यवसान कशांत झालें तर आयुष्य हानींत. १०० वर्षें वांचणारा इसमच मिळणें कठीण. चाळीस वर्षांनंतर दृष्टिस्तैमित्यामुळें वापरण्यांत येणारी चाळिशी बारा वर्षें वयाच्या हाताऱ्यावर (!) जाऊन भडकली. आणि हीच त्याची चाळिशी आहे.

पूर्वींचें ४० वर्षें वय, हें आतां बारा वर्षांचें झालें. बरें, हा परिणाम कशाचा ? –सिनेमाचा, विजेचा आणि स्वेच्छाचाराचा हात, पाय, डोळे देण्यांत ईश्वराचा हेतु सदर कारण्यानीं जिरवूनच टाकला.

काय ही शोचनीय स्थिति ! आणि ह्या स्थितीला सुधारणा तरी ह्मणावें कसें ?

शिक्षणाच्या बाबतींत मात्र पाश्चात्यानीं फार मोठी आघाडी मारली असें ह्मणण्यास हरकत नाहीं. मोठमोठे शोध केले ही गोष्ट खरी आहे. पण ह्या शिक्षणाचा उपयोग कुणीकडे केला ?

ईश्वर प्राप्ति हें साध्य. व ह्या साध्यासाठीं बांधवसेवा हें साधन.

बांधवसेवा करण्यांत मनुष्यानें आपलें आयुष्य खर्च करावयाचें, आणि तें चांगल्या मार्गानें. परंतु जेथें वर सांगितलेले वांडे प्रकार, तेथें बांधवसेवा कोठची !

सुधारलेले, सुधारलेले ह्मणतां ह्मणतां रानटी व्यवहार करणें आणि उलट बांधवप्रेमाबद्दल पोकळ शेखी मिरविणें, ह्याला काय तें !

परवांचें महायुद्ध पाहून ह्या आसुरी कालसांनीं तप्त झालेल्या मानवी पुतळ्यांची कोण बरें कींव नाहीं करणार ? एवढ्याशा जमिनीच्या मालकीसाठीं सुधारलेले ह्मणवून घेणाऱ्या युरोपियनानीं कोट्यावधि लोकांचे आपसांत जीव घ्यावे ?

द्रव्यलोभानें, राज्यविस्ताराच्या लालसेनें बांधव मानल्या जाणाऱ्या इसमांवर घाव घालणें, कधींकाळी रानटी स्थितींत सुद्धां होऊन न गेलेलीं हत्यारें तयार करणें, मोहपाशानें बद्ध होऊन प्रत्यक्ष आपल्या बांधवांचे गळे कापणें, ह्यांसारखीं घनघोर कामें करणारे लोक सुधारलेले !

तोफांसारखीं राक्षसी हत्यारें बेमालूमपणें आपल्या प्रेमळ बांधवांवर चालवणाऱ्या नरपशूंस आसुरी न ह्मणावें तर काय ?

खरोखर पाश्चात्यांच्या अस्थिर सुधारणेच्या दिखाऊ प्रकाशानें आपले डोळे दीपवून घेणाऱ्या त्यांच्या भक्तांस परवांचें महायुद्ध हें एक रामबाण अंजनच झालें ह्मणावयाचें ! आतां तरी आमचे बांधव ह्या आसुरी सुधारणेच्या कचाट्यांतून सुटून पूर्वस्थिती वरयेतील अशी आह्मांस आशा आहे.

जगांत येऊन आपलें साध्य जर ईश्वरसेवा हेंच आहे व जर त्या साध्याचें साधन बांध सेवा, तर ऐहिक सुखांस बळी पडून आपल्या कर्तव्यावर पाणी सोडून ईश्वराचे भयंकर अपराधी होणें ह्यासारखे अन्याय आपल्या हातून कां घडावे ? मनुष्याचें खरें कार्य जें ईश्वरसेवा, तीच प्रत्यक्ष बांधवसेवा आहे. भगवान श्रीकृष्णानीं गीतेंत सांगितल्याप्रमाणें—

"ते प्राप्नुवंति नामेव सर्व भूत हिते रतः"
(जे सर्व लोकांच्या हितार्थ झटत असतात. ते माझ्याजवळ पोंचतात)

जगांत वास करीत असलेल्या आपल्या बांधवांची सेवा करणें ह्यालाच ईश्वरसेवा ह्मणतात. आणि ह्या परिचर्येनंतर अशा सात्विक परिचारकाचा आत्मा स्थूलमानानें ईश्वराधीन गेल्याशिवाय रहाणार नाहीं. मनुष्याचें अंतिम साध्य तरी हेंच आहे.

अर्वाचीन सुधारणेच्या निस्तेज कंदुकांस बळी पडून आपल्या जीविताचें मातेरें करून घेणें निदान आतां तरी आपल्या समाजास कां बरें ग्राह्य वाटावें ?

आंधळ्या प्रेमानें बद्ध होऊन आपल्या हातून अनेक वेळां चुका घडून येत असतात. सुबुद्ध मनुष्याच्या हातून अशा चुका घडणें असंभाव्य आहे. मन हें आपला ताबेदार असलें पाहिजे. त्याची सत्ता आपणावर असणें विघातक आहे. ज्या ज्या प्रमाणानें मनुष्य विचारी व प्रगल्भ, त्या त्या प्रमाणानें त्याचें मन त्याच्या स्वाधीन राहतें. परंतु अर्वाचीन राहाण्यास राहणें कोण ह्मणणार ?

वायफळ बडबड करून नाकानें वांगें सोलूं पाहणाऱ्या आधुनिक विद्वानानीं आपल्या कर्तव्यतत्परतेबद्दल मिथ्या श्लाघा करणें, हेंच त्यांच्या विद्वत्तेच्या आगंतुक फोलपणा ठरविण्यास समर्थ आहे.

आपल्या अंतःकरणांत गर्वास पुरा थारा देऊन अहंमन्यतेनें स्वार्थपूरक दृष्टीस अनुसरून समाजांत मोठमोठीं व्याख्यानें झोडलीं, ह्मणून थोडींच कामें होणार आहेत. आपलें अंतरंग कोरडें ठणठणीत ठेऊन लोकांस जगाचा अनुभव सांगू पाहणाऱ्या कार्यसाधु कवडीचुंबकावर चतुर लोकांची श्रद्धा बसणें अशक्य आहे.

आह्मांस बाता नको आहेत. कृति पाहिजे. औपचारिक बाब नको आहे. अंतरंग शुद्ध पाहिजे. मनांत परछुपुरुष वासनांचा थर मांडूं देऊन लोकांच्या मनावर शिष्टाचाराचा (etiqette) दरवेटा काढूं पाहणारानो युरोपियन पंडितानो बसूं द्या तिकडे येटिकेटस करीत ! आह्मांस बाह्य सौंदर्य नको आहे. अंतःशुद्धि हवी. जी गोष्ट करून अनाठायीं आहे. जिचा उपयोग शिक्षा मिळविण्याखेरीज अन्य जागीं निष्फल होतो. अशा सौंदर्यक शकुनां घेऊन आपल्या आयुष्याची नासाडी कां करितां ?

सुबुद्ध अज्ञत्वाबद्दल शेखी मिरवून दुसऱ्या कोटींवर सत्ता चालविणाऱ्या मनुष्यांची ही किती शोचनीय स्थिति आहे बरें ?

बांधवसेवा करण्यासारखीं हजारों कामें आज आपल्या देशांत असूनहि त्यांकडे कानाडोळा करून युरोपियन सुधारणेस मगरमिठी मारून बसलेल्या हिंदु बांधवांनीं आतां तरी आपल्या कामास कां बरें लागूं नये ?

असो. एकंदरींत जन्मास येऊन बांधवसेवा करणें हेंच आपलें आद्य कर्तव्य आहे छानछोकी करणें हें नव्हे. असें मनांत बाळगून अहर्निश स्वबांधवांच्या हितार्थ झटण्याचा सर्व बांधव प्रयत्न करतील व युरोपियनाच्या फोल सुधारणेस बळी न पडतां निःस्वार्थ व शुद्ध अंतःकरणानें कार्यारंभ करितील अशी आशा आहे.

ब्रिटिश हिंदुस्थानांतील

वर्गणीदारांस वर्गणी पाठविण्याविषयीं आग्रहपूर्वक विनंति आहे. २० मे पर्यंत वर्गणी न पोंचल्यास अंक व्ही. पी. नें रवाना होतील.

म. भारत.

estado inglez : "*Charity begins at home.* Não lhe quero mal porisso....

E, como, hoje, não tenho mais tempo para ocupar do *oficio* do sr. Tarcar, vou tratar do meu oficio.

Moropanta

N. da *R.* O sr. *Moropanta* refere-se, ao de leve, aism praticamente do que teòricamente, ao importante assunto de *asparzata.* Está bem. Seria, porem, para desejar que se apresentasse sobre o mesmo assunto estudo aprofundado, encarado sob todos os pontos de vista: historico, social moral e religioso.

¿ Surgirá, por ai, alguem que cumpra á risca a tal nobre missão para a honra da tradição dos farazes de quem se deseja a purificação ?

Ecos & Critica

Uma descoberta

O sr. dr. Fragoso descobriu nas veias do *S*hivaji globulos do sangue portuguez e isto bastou para o sr. N. Bonsle se insurgir contra o ilustre discobridor.

Naturalmente, o sr. Bonslé ignora que *o* sr. dr. Fragoso é operador distincto de—cadaveres, sobretudo dos reduzidos a pó, como sucede no caso do corpo inanimado do Shivaji.

E,' pois, descabida qualquer critica desfavoravel contra a discoberta...*cadaverica* do referido cirurgião sr. dr. Fragoso.

Sinal dos tempos

Antigamente, os professores punham todo o seu cuidado na boa preparação de seus discipulos, julgando-se recompensados pelo triunfo deles, nos respectivos exames.

O professor actual não se importa com o aproveitamento do seu aluno nem com o resultado do seu exame, pondo unicamente, o seu cuidado na regular arrecadação da *maça* por cujo aumento deveras se cança. Deleita-se mesmo com a reprovação do seu aluno que tem na conta dum inimigo figadal !!

O assustador resultado dos exames dos alunos internos e externos do Liceu Afonso de Albuquerque corrobora plenamente o que afirmamos. Sinal dos tempos !

Boa norma

Os hindus bramanes do concelho de Canacona deliberaram alhear as cerimonias de casamentos e de linhas da dança e presença de bailadeiras que lhes absorviam uma boa soma de rupias.

Fomos sempre contra a admissão de bailadeiras nas nossas festas. E', porisso, desnecessario dizer que nos encheu de alegria a aludida simpatica deliberação dos briosos habitantes de Canacona.

O templo hindu de Cacorà, por acordo de seus mazanes *nsaratas* e *sarasvâtas* libertou-se, não há pouco, do contagio impuro daquela classe, não devendo tardar que suceda outro tanto noutros templos, sucessivamente. Agora são os bramanes que a expulsaram das festas de seus casamentos e *linhas* dando a outros, com a sua boa norma, um bom exemplo.

Muito estimamos !

Alerta !

Continua pessimo o estado sanitario de Parodá ónde lavra, com virulencia, a *malaria* que está inutilisando existencias preciosas.

E' *o* seu canal que está prejudicando o estado sanitario de Parodá.

¿ O Estado que não deve ignorar que a saude publica é a suprema lei — *Salus populi suprema lex est* — procurou atalhar o mal, como é do seu dever ?

Se não, digne-se de tomar sobre o assunto medidas urgentes, pois é tal o panico provocado pela *malaria* em Parodá que começou a haver já o exodo de suas familias.

E depois = *salus populi suprema lex est*-repetimos em nome dos habitantes de *P*arodá-mais uma vez-Alerta, pois!

Upendra J. Counto'

Este estudioso aluno hindu obteve distincção na 6 a classe, apoz um brilhante exame que há dias fez no Liceu Afonso de Albuquerque.

E' o primeiro aluno hindu, que mercê do seu previlegiado talento e graças á sua boa aplicação, conquistou aquela honrosa classificação, honrando a si e o nome da classe a que pertence.

Felicitamos, porisso, o sr. Countò, fazendo ardentes vòtos para que êle continue a alcançar, louros, ainda mais brilhantes, na sua carreira.

Falencia

O *svadeshismo* produziu, como era de esperar, os seus efeitos que, se hoje são positivamente satisfatorios, prometem se-lo amanhã superlativamente.

De Março de 1920 á igual data do corrente ano de 1922, operou-se a falencia de 1212 tecelanias de Londres que forneciam diversos tecidos a India, devido ao movimento do *Svadeshismo*.

¿Que dirão a isto os que troçaram do *kadi* e mais do *Mahatmà* Gaudhi ?

Para notar

Há dias foram eleitos em Pangim corpos gerentes da recem-fundada Associação de Advogados da India Portùguesa.

Na lista dos advogados que fazem parte dos mesmos corpos não encontramos, porem, nome algum hindu, apesar de haver, hoje em dia, consideravel numero de advogados hindus-Sensibilisou-nos-para que ocultar ?- a exclusão dos hindus do seio da gerencia da referida Associação, ainda que tenhamos como certo que ela não será capaz de prestar outros serviços que não sejam eleitorais, a que o hindu liga pouca importancia.

Se, todavia, a dispeito disso, ficamos sensibilisados, é porque tivemos o desgôsto de notar *tendencia separatista*, mesmo por parte daqueles que acusavam, hipocritamente, alguns hindus do crime politico da organisação do movimento *separatista*.

E' caso para dizer: "Quem tem telhado de vidro, não deve cair na asneira de atirar pedras ao do visinho."

E a bom entendedor, meia palavra é bastante !

Logica

Afirmando o sr. dr. Fragoso circular nas veias do *Shivaji* o sangue portugues, deu de entender, indirectamente, que a mãe do *Grande Makarajà* era, sem mais nem menos uma mulher perdida ou antes *puta*

Shivaji era, portanto, na *pura* opinião do mesmo senhor um filho da.. *puta*.

¿ Será, porisso, que o *Shivagi* poude admirar o mundo com suas grandes façanhas ?

¿Todos os grandes homens por serem grandes terão sido gerados, impuramente, como Shivaji ?

¿ E', portando, falso que o fruto eja da mesma natureza da semente ?

Naturalmente, o sr. dr. Fragoso não mediu o alcance do que avançava. Estava ocioso e quiz escrever. E escreveu aquela asneira que, demais, tem o agravante de ofender os inumeros adoradores do *Shivaji*

¿ Mas, porque é que o sr. Fragoso não foi fazer colheres de pau?

Faltou-lhe a *materia prima* ?

Que fosse a Satari onde a teria encontrado em superabundancia.

Como vem, o cirurgião não andou nada direito na questão da verificação da paternidade de *Shivaji*.

एकीचें महत्व

(ले० गणेश रामचंद्र बोडस)

सांप्रतच्या बिकट परिस्थितीमधून पार पडण्याकरितां प्रत्येकानें आपला आपण उद्धार करावा या तत्वाला अनुसरून वागलें पाहिजे. आज इतकीं वर्षें परकी लोकांच्या जुलमी राज्य पद्धतीमुळें आपली हिंदी जनता कोणत्या अवस्थेस पोंचली याचा अनुभव सर्वांस आहेच. आह्मांस नागरिक या नात्याचे हक्क खरे असे नाहींतच, पण नांवाला असले तरी त्यांस सरकार जुमानीत नाहीं. मग त्यांचा काय उपयोग ? आणखींहि हरेक बाबतींत रयतेचा छळ चालला आहे.

एकावर एक अशी करांची किती तरी ओझीं आमच्यावर पडत आहेत. व त्यांच्या भारानें सर्वजण चिरडून जात आहेत. गोव्यांत तर बोलण्याची सोयच नाहीं ! कोणास पोर झालें कीं द्या आधीं सरकारी कर. वरें मेलें तरी सरकारास कर. मग पुढील व्यवस्था ! कोणी लग्न कार्य करावयास उठला या कर. गुरावासरांवर सरकारी कर. थिकल्या खोखल्यालांहि सरकारी कर, कौंन्सिलांत कर मंजूर व्हावे. व लोकांनीं मुक्यानीं राहून ते द्यावेत हा क्रम अव्याहत चालू आहे.

गोवधाचे कारखानें काढून हजारो गाईंचा आजवर फडशा उडवला जातो आहे. व पुढें आणखीं उडवण्याकरितां हें सत्र चाललें आहे. एकूण राजकीय आणि धार्मिक या दोन्ही गोष्टींवर डोळ्यांदेखत कुठार हाणले जात असतां त्यांचा प्रतिकार करण्याइतकी चेतना शक्ति आपल्या लोकांत निर्माण होऊं नये, याबद्दल वाईट वाटतें. आह्मांला सर्वस्वी अधोगतीस नेणाऱ्या राजसत्तेपासून बचाव करण्यास आपणांकडे काय साधन आहे ? कांहीं असेल तर लोकांत एकी हेंच आहे. पण तेंहि असावें तितकें नव्हे-मुळींच-नाहीं ह्मटलें तरी चालेल.

प्रतिपक्षी केवढाहि बलवान असला तरी त्याचें एक जुटीपुढें कांहीं चालत नाहीं मुंगी ह्मणजे किती लहान प्राणी पण त्यानेंहि एका अजस्र सर्पाला ठार करून आह्मांस धडा घालून दिलेला आठवतो. आतां आपण त्याकडे लक्ष देत नाहीं ह्मणजे त्या गुणाची किंमत आपणास कळत नाहीं, हें आतां पर्यंतच्या अनुभवांवरून ह्मणावें लागतें. तेव्हां मुंगी सारख्या मुक्या प्राण्यांत जे अनुकरण करण्यासारखे गुण असतात त्यांचें श्रेष्ठ मानव जातींत दारिद्र्य असावें ही गोष्ट किती तरी लाजिरवाणी आहे ?

ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकांकडे पहा. तिकडे लोकांत एकी व जागृति चांगलीच झाली आहे. म. गांधींच्या छावणींत सर्व राष्ट्रीय फौज गोळा होऊन शांतता-युद्धास सुरवातहि केव्हांच झाली-कायदे भंगापर्यंत मजल पोंचणार. स्वराज्य सूर्याची चकचकीत कडा क्षितिजावर चमकूं लागली. पण गोव्यांतल्या लोकांची मात्र अजून रात्र आहे. ते झोंपेंत आहेत. आतां ज्या कित्येकांस परिस्थितीची जाणीव होऊन जागृतीची कल्पना आलेली असे थोडे लोक इतरांस जागे व्हा, लोकांत ऐक्य भाव उत्पन्न करा, इ. इ. इषारा करीत असतात. पण उपयोग थोडाच होतो ! यामुळें ते निराश होतात बापडे ! !

आपल्या लोकांत बहुतेक, मतभेद, परस्परांविषयीं मनें कलुषित, द्वेष, मत्सर, हे प्रकार दृष्टीस पडतात. एकादा एकादें कार्य करूं पहातो पण तेंच दुसऱ्यास नको असतें. अर्थात त्यांत विघ्न आणण्यासाठीं शक्य ते यत्न करतो व हाणून पाडतो. यातरेच्या पोरचेष्टा पण थोरांतहि असाव्यात हें केवढें लहानपण ! विरोधीपणामुळें देशाची हानि होते. शिवाजी महाराजानें केवळ ऐकीच्या बळावर महाराष्ट्रांत राज्यस्थापना केली धर्म व सत्ता याचें रक्षण केलें. त्यास गोब्राह्मण प्रतिपालक असें ह्मणतात. पण पुढें पेशवाईत घरभेदे झाले व दुसऱ्या बाजीरावासारखा त्याड पेशवा होतांच ऐकीचा दुष्काळ पडून इंग्रजांचे पांढरें पाऊल मराठी राज्यांत पडून राज्य नामशेष झालें. आणीकहि कांहीं प्रबळ हिंदुराज्यें ऐक्याच्या अभावीं लयास गेल्याचे दाखले इतिहासात आढळतात.

यावरून एकीनें राष्ट्र उद्धरतात तर तिचा नाश होतांच राष्ट्राचाहि नाश होतो. या गोष्टीचा विचार सोडून देणें ह्मणजे आपला आपण अधःपात करून घेण्याप्रमाणें नव्हे काय ?

'शक्ति असते तीच परलोकांतही चालू राहते. अन्य तितक्या जोरानें मी प्रतिपादन करतों कीं, जीवितसातत्य आहे. कधाचाही नाश होत नाहीं. मृताशीं संवाद करतां येतो. आणि अनेक रीतीनें परलोकस्थ मृताशीं संवाद केला गेला आहे. ह्या पद्धतीनें कित्येक मृतांशीं भाषण करून क्वचित् काळीं मिळणारें ज्ञान मी संपादन केलें आहे. हें जगाला कळणें अवश्य असल्यामुळें या लेखद्वारा त्याचें दिग्दर्शन केलें आहे.

पूर्व कल्पना बाजूला ठेवा, पक्षपाताचा त्याग करा, निर्मय आणि सरळ मनानें ह्या मार्गानें मिळालेल्या ज्ञानाचा विचार करा. जर त्याचा परिणाम तुमच्या मनावर झाला नाहीं. तर तें टाकून द्या. जर तें तुमच्या दृष्टीस पटलें तर इहलोकीं व परलोकीं तें तुम्हांला सहाय्यक होईल.

मृत्यूला भिऊं नका

मृत्यूनंतर होणाऱ्या अवस्थेसंबंधीं अत्यंत अज्ञान असल्यामुळें मनुष्यें मृत्यूला फार भितात. काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्या अपराध्यास काय हाल भोगावे लागतील ह्याबद्दल सामान्यतः फार अज्ञान असल्यामुळें ती शिक्षा फार भयंकर मानली जाते, असें इंडियन पिनल कोडमध्यें लिहिलें आहे. त्यासारखीच स्थिति मृत्यूनंतर येणाऱ्या अनुभवासंबंधीं असल्यामुळें मनुष्यानां मृत्यूची फार भीति वाटते, पण सुदैवानें नवीन शोध लागून मृतांशीं बोलण्याचीं साधनें उपलब्ध झालीं आहेत. त्या योगानें प्रत्यक्ष मृतांकडून जी माहिती उपलब्ध झाली आहे त्यावरून कोणाही सत्पुरुषाला मृत्यूची भीति वाटण्याचें कांही एक कारण नाहीं, असें सप्रमाण सिद्ध झालें आहे. ह्या शिवाय परलोकांतील स्थितिविषयीं अत्यंत उपयुक्त व खात्रीयुक्त माहिती मिळाली आहे. प्रत्येक मनुष्याला स्थूल व सूक्ष्म अशीं दोन शरीरें असतात. हिंदुधर्मशास्त्रामध्यें स्थूल व सूक्ष्म कारण, महाकारण इत्यादि शरीरें मानलीं आहेत. सूक्ष्म शरीर स्थूल शरीराप्रमाणें असतें. आणि त्याला हस्तपादादिक अवयवही असतात. असें अनुभवावरून सिद्ध झालें आहे. निद्रावस्थेमध्यें हें सूक्ष्म शरीर स्थूल शरीरापासून विलग्न होतें. परंतु त्याचा संबंध सर्वांशानीं सुटत नाहीं. मृत्यूच्या वेळीं हें शरीर पूर्णतः विलग्न होऊन परलोकामध्यें संचार करूं लागतें. सूक्ष्म देह सूक्ष्म परिमाणूचा बनलेला असतो, स्थुल देह जितका सत्य आहे तितकाच सूक्ष्म देह सत्य आहे. याचा अर्थ असा कीं, इंद्रीयद्वारा त्याची प्रचिती होऊं शकते. ह्यावरून हें समजून येईल कीं, स्थूल देहापासून सूक्ष्म देह सुटणें ह्याला मृत्यू म्हणतात. त्या योगानें मनुष्याच्या विचारांत, स्मृतींत व कल्पनामध्यें कोणच्याही प्रकारचा फरक होत नाहीं. मृतांशी भाषण करून अशा प्रकारची माहिती व अनुभव सर्वत्र झालेला आहे. मृत मनुश्याला मरतेसमयीं फक्त अवस्थांतर झाल्याप्रमाणें वाटतें. आणि सापानें आपली कात टाकल्यावर त्यास जसें वाटत असेल त्याचप्रमाणें मृतानां अनुभव येतो, असें खुद्द मृतानीं सांगितलें आहे.

ह्या जगापासून परलोक शेंकडों कोसांवर नाहीं. तो फक्त अवस्थांतर आहे. त्यामध्यें मृत मनुष्य आहार विहारही करतात आणि पेशव्याप्रमाणें त्या अवस्थांमध्यें आत्मोन्नतिकारक कर्में करतां येतात मृत आप्तइष्टांचें दर्शन होतें. तेथें अनाथ आश्रम पाठशाळा वगैरे आहेत. त्यात लहान मुलें वाढतात. नव्वद अथवा शंभर वर्षांचे अवस्थेनंतर नवीन तरुण सूक्ष्म देह धारण करतात. कित्येक माणसें पुनः जन्म ही घेतात. परलोक साधारणपणें इहलोकांपेक्षां चांगला आहे. आणि तेथें गेलेला मनुष्य जन्म घेण्याची इच्छा करीत नाहीं. परंतु त्यानां कर्माप्रमाणें अथवा अन्य कारणामुळें ह्या जगांत यावें लागतें. परलोकांतील प्राण्यांचा देह सूक्ष्म पदार्थांचा असल्यामुळें तो आपल्या सामान्य दृष्टीस दिसत नाहीं. परंतु पुष्कळ वेळां ते आपल्या जवळ येऊन आपलें अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करितात. पुरेशा शक्तीच्या अभावीं आणि इहलोकांतील माणसाकडून कांहीं प्रयत्न होत नसल्यामुळें त्यांचें कार्य सफल होत नाहीं. झोंपेमध्यें ते आपल्याशीं बोलूं शकतात. परंतु आपणास त्याची आठवण रहात नाहीं. कारण आपली स्मरणशक्ति अल्प आहे. परलोकामध्यें त्यांनां आपल्या कृतकर्माबद्दल परिणाम भोगावा लागतो. असें कित्येक मृतानीं सांगितलें आहे. हा सिद्धांत जरी धर्मग्रंथांत असला तरी खुद्द मृतानीं ही हकीकत सांगितली असल्यामुळें त्याचें अपूर्व महत्व आहे. मृतानां आपल्यापेक्षां जास्त ज्ञान असतें. कर्मावर देखरेख ठेवण्याकरितां गुरु नियत आहेत. त्यांचे आज्ञेंत राहावें लागते. स्थूल जगावरील त्यांचें लक्ष निघालेलें नसतें. कित्येक दे. देशकार्यांत मदत करीत आहेत. म. गांधींस लोकमान्य, अण्णासाहेब पटवर्धन वगैरे मदत करीत आहेत. असें कित्येक मृतांनीं सांगितलें आहे. निरनिराळ्या धर्मांचे, जातीचे, पंथाचे लोक परलोकांत आहेत. ते आपल्या धर्माप्रमाणें ईश्वराची भक्ति करीत असतात. सारांश इहलोक हा परलोकाची छाया आहे, असेंच प्रमाण सिद्ध झालें आहे.

ज्या साधनाच्या द्वारा ही माहिती मिळू शकते. त्या साधनापैकीं महाराष्ट्रांत प्लँचेट नावाचें साधन कांहीं लोकांना माहीत झालें आहे. त्याशिवाय औजाबोर्ड, सायकोग्राफ ऑल्फाग्राफ, जॉयस्पिरीट, कम्यूनीकेटर वगैरे अनेक साधनें आहेत. त्याच्या योगानें मृत मनुष्यें लिहूं शकतात. ट्रंपेटच्या साधनानें त्यांचा आवाज आपण ऐकूं शकतों. इन्यूमिनेटरच्या मदतानें त्यांस पाहूं शकतों. ह्या साधनापैकीं कित्येकांच्या द्वारानीं अनुभव घेतला आहे. आणि शेंकडों मृत मनुष्यांशीं भाषण करून त्यांचें सुव्यवस्थेंत टीपण ठेविलें आहे. तें पाहिजे असल्यास आनंदानें दाखवीन. साधारणपणें लोक हे प्रयोग करण्याच्या इच्छेनें थोडासा प्रयत्न करतात. परंतु, पाहिजे तितका दीर्घ प्रयत्न व उत्कंठा नसल्यामुळें आणि त्यापासून होणाऱ्या फायद्याच्या अज्ञानामुळें सोडून देतात. आणि म्हणतात कीं, "ह्यांत कांहीं अर्थ नाही." ह्या सज्जनाना माझी इतकीच विनंति आहे कीं, बंधुहो, आपल्यास फुरसत व जिज्ञासा नसल्यास करूं नका. परंतु त्याला खोटें म्हणूं नका. मी आपली खात्री करण्यास तयार आहें. सहस्त्रावधी लोकांनीं अनुभव घेतले आहेत. त्यांच्या अनुभवाकडे लक्ष द्या. प्रख्यात शोधक श्री. मिसे यानीं स्पिरीट टाइपरायटर नावाचें यंत्र काढलें आहे. त्यायोगानें मृत मनुष्याचा लेख टाईपर केल्याप्रमाणें लिहून येतो. एडिसन साहेब स्पिरीटफोन काढीत आहेत. त्यायोगानें टेलिफोनप्रमाणें मृताशीं भाषण होईल. हें यंत्र पूर्ण झाल्यावर फार क्रांति होणार आहेत. तथापि निघालेल्या यंत्रांनीं मृत मनुष्यें समाधानकारक रीतीनें लिहूं शकतात.

ह्या विषयाच्या अभ्यासानें मृत आणि जिवंत मनुष्याचें हृदयस्पर्शी संमिलन होतें ह्या साधनानें मृताच्या नातलगांचें अनुपम समाधान होतें मृत मनुष्य फक्त दृष्टिआड झाले आहेत. असें सिद्ध झाल्यामुळें त्यांच्या विरहानें उत्पन्न होणारें दुःख बहुतांशीं नष्ट होतें त्यांची इच्छा कळल्यानंतर ती पूर्ण करतां येईल मृतांना आपल्यापेक्षां जास्त ज्ञान असल्यामुळें त्या ज्ञानाचा फायदा घेतां येतो. मृत्यूसंबंधीं अज्ञान दूर झाल्यास अत्यंत निर्भयता प्राप्त होते.

तसेंच प्रत्येक कार्यामध्यें मनुष्याचा उत्साह वाढतो. आत्मा अमर आहे. व देह नश्वर हा सिद्धांत सर्व धर्मांनीं प्रतिपादन केला आहे. परंतु त्या संबंधांत निःसंशय प्रमाण नसल्यामुळें जडवाद्यांना शंका होती ह्या साधनानें कोणाही नास्तीकाचें समाधान होऊं शकतें. म्हणून जडवादाचें खंडण होऊन आत्म्याचें अस्तित्व सप्रमाण सिद्ध होतें. हिंदु धर्माभिमान्याना हें मत फार महत्व देतें. शास्त्रामध्यें लिहिलेलीं श्राद्धादि कर्में केवळ निरुपयोगी आणि अज्ञानाचा परिणाम आहेत, असें जडवादी मानतात. परंतु ज्या त्रिकालदर्शी मुनीनीं ही व्यवस्था कायम केली आहे. त्यानां हें ज्ञान करतलामलकवत होते. व्यावहारिक आचरणावर त्या ज्ञानांचा फार परिणाम होईल. दुष्कर्मांचा परिणाम खराब होतो असें नुसतें विश्वासानें अथवा धर्मग्रंथ वरून न मानतां त्यानीं खुद्द सांगितल्यावर मनुष्याचें आचरण सुधारण्याचा फार संभव आहे कित्येक मृत स्थानीं कळविलें आहे कीं, आपल्या दुष्कर्माचा परिणाम त्यांनां भोगावा लागला. परलोकाच्या तयारीकरतां इहलोकांतील आचरण असलें पाहिजे. परलोकांतील अवस्थेचें ज्ञान झाल्यावर येथील शिक्षण व आचरण कशाप्रकारचें असलें पाहिजे हें कळून येईल. जडवादाच्या प्रसारामुळें आधुनिक सुशिक्षित लोक परलोकाचें अस्तित्व मानीत नाहींत त्यांचें सर्व शिक्षण इहलोकाकरतां आहे. ही सदोष पद्धति ह्या ज्ञानानें दूर होईल. धार्मिक अवनति दूर होण्याकरितां हें फार उपयुक्त साधन आहे. इहलोक व परलोक यांचा संबंध कशाप्रकारचा आहे आणि ते एकमेकांवर कसे अवलंबून आहेत. हें माहीत झाल्यावर मनुष्याच्या आचारविचारामध्यें फार क्रांति होईल. आजपर्यंत असें मानलें जात होतें कीं, मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाहीं. परंतु नवीन शोधानीं ज्या कित्येक आश्चर्यजनक गोष्टी घडून आल्या आहेत. त्याप्रमाणें ही घडून आली आहे. विमानाचा शोध, बिनतारेचें तारायंत्र वगैरे सर्व भौतिक शास्त्रांतील शोध ह्या शास्त्रापुढें तुच्छ आहेत. असें कित्येक विद्वानाचें मत आहे. वरील माहितीनें व साधनानीं देशबांधवांचें मृत्यूचें भय नाहींसें होवो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

---

quem todos os historiadores admiram como sendo uma senhora possuidora de grandes virtudes morais, elevando-a até a altura de Sità, a heroina do "Ramayana".

Portanto, quem faz atentado sem fundamento algum contra a honra duma mulher como Jizabai, ofendendo a India inteira, simplesmente com o intuito de rebaixar a gloriosa historia do Imperio Marata, não é outra coisa senão um grande tolo.

Bem diz Shakespeare:

"The fools rush in where the angels fear to tread"

Ai Fingoso! Tu és ainda criança e nem sabes adivinhar as consequencias desta tolice que praticaste! Ninguem te agarrará as mãos se amanhã disseres que Shivaji gerou Afonso de Albuquerque.

Vasco da Gama, 28-4-22

N. Bhonsle

Uma carta

O sr. Nanum Tarcar Pernencar pede-nos a publicação do seguinte:-

Tendo sido convidado o publico por aviso publicado no Bol. oficial n° 30 de 15 do corrente e assignado por V. na qualidade de ilustre presidente da comissão da reforma de regulamentos das mazanias dos pagodes e outras instituições similares tomo a liberdade de dirigir esta para tomar na consideração que merecer.

Sendo o principal fim de semelhantes instituições o culto que deve estar ligado a intenção, principalmente para haver a compreensão dos seus deveres e existir uma forte união entre os membros duma mesma seita, julgo ser de absoluta conveniencia que todos os pagodes tenham a seu cargo o exemplo de escolas paroquiais, como obrigatoria, pelo menos uma escola gratuita de lingua marata com o suficiente numero de professores em que se ministrem indistinctamente sem diferença alguma de castas nem profissões a mesma lingua e podendo ser até a lingua portuguesa e sanscrito, diminuindo para esse efeito sendo preciso, as despezas inuteis que se fazem com a ornamentação do culto externo, tornando-o até certo ponto ridiculo.

Quando o pagode não possa ter escola privativa deve procurar auxiliar as de iniciativa particular existente na localidade com obrigação do ensino de doutrina de religião hindu na sua essencia liberal e distituido de ideia castistas prejudiciais á sociedade.

Sendo possivel os pagodes principalmente os mais ricos como os de Queulá, Mangueixa etc. terão escolas industrias e de artes e oficios.

Para as castas chamadas dos farazes, alpaqueiros etc. a que se costuma dar o nome de *atisudra* o *asparsuzata* (isto é, a classe a que é proibido tocar,) cousa que não devia haver e que constitui uma das grandes maculas introduzidas posteriormente na religião hindu devem os pagoda ter no entanto escolas especiais, atè que as outras castas se abtuem a recebe-los de forma que, pelo menos com algum tempo, se extinga o vergonhoso *asprassa*.

E' tambem de indispensavel necessidade para não haver quebra da fraternidade que estabelecendo-se fortes penas seja banida para sempre a distincção que se faz notar em alguns pagodes, principalmente do concelho de Pondá, marcando lugares para assentos segundo as castas como se tornasse impuro o sangue de uns com a aproximação dos outros, o que é algo irrisorio, pois perante uma divindade todo o homem deve ter as mesmas regalias e vantagens e ser igualmente respeitado.

Convem ainda que nos pagodes chamados *gramadevalaia* seja aceito como mazane todo o hindu residente na localidade sem diferença de castas.

São estes poucos os alvitres que tenho a honra de apresentar por parecer que muito concorrerão para a prosperidade dos pagodes e bem assim para o progredimento da nossa classe hindu, hoje bastante decaida e fragmentada.

Saude e Fraternidade etc

Nanum Tarcar Pernencar

N. da R.

O *Bharat*, obedecendo a sua orientação liberal dá cabida a todas as opiniões nas suas colunas. Os que quizerem contestar o modo de ver do sr. Nanum, podem, igualmente, tambem fazê-lo. Ultima palavra porem, será nossa.

EM CANACONA

Algumas pessoas que encontramos em Canacona, quando ali estive nos na semana passada em objecto de propaganda informaram-nos que a última tabela camararia dali era gravosa, tendo-nos apresentado uma edição dO *Ultramar* onde, em artigo de fundo se tem tratado do assunto.

Somos contra o aumento de impostos em geral; mas tratando-se dos que tenham por fim coarctar a propagação do alcoolismo, a nossa opinião é a favor do mesmo aumento-diga-se de passagem

Ora, se a Camara de Canacona aumentou a taxa, referente a lavra de palmeiras, só temos de louvar, em principio, este seu gesto, se é que foi, como nos parece, originado pelo intuito de acabar com o alcoolismo.

Nada, porem, podemos dizer hoje, em relação a outros impostos camararios, cuja tabela ainda não estudámos, por falta do vaga, mas que emitiremos o nosso parecer sobre ela, logo que a conheçamos, e isto sem fazermos caso da relação de amizade que nos une aos ilustres membros da referida Camara.

A Deus, o que de Deus é e a Cesar o que de Cesar é

Como sabem, o *Bharat* que não tem nenhuma pretenção particular a conseguir, preza mais o principio do que a pessoas...

भारत

गुरुवार वैशाख शु० ०, शकी १८४४

स्वदेशीचा प्रभाव

स्वराज्यप्राप्ति स्वदेशीच्या प्रभावावर कशी अवलंबून आहे, हें आमच्या वाचकांस आह्मी अनेकदां पटवून दिलें आहे. स्वदेशी ह्मणजे स्वराज्याचा आत्मा आहे. स्वदेशीचें आत्मज्ञान झाल्याखेरीज स्वराज्याचा मोक्ष लाभणें दुर्लभ होय. 'खादीचा प्रसार झपाट्यानें करा ह्मणजे तुह्मांला हां हां ह्मणता स्वराज्य मिळेल' या म. गांधीजींच्या अनुभवी उक्तीतून उपरोक्त तात्पर्यार्थ निष्पन्न होतो हें कोणीहि कबूल करील.

हिंदुस्थानदेशावर जर आज कोणाची खरीखुरी सत्ता चालू आहे तर ती विलायती व्यापाऱ्यांची होय. या लोकांच्या स्वार्थी चिथावणीमुळेंच आज हिंदुस्थानांत नोकरशाहीकडून जिकडे तिकडे अत्याचार घडले जातात. हा आततायीपणा बंद होण्यास अर्थात तो उत्पन्न करणाऱ्या कारणावर ह्मणजे त्या चिथावणीवर घाव घातला पाहिजे. चिथावणी संपुष्टांत आली कीं अत्याचारानें राम ह्मटलाच ह्मणून समजावें. व चिथावणीवर घाव घालण्यास 'स्वदेशी' हत्यारासारखें बेमालूम कार्य करणारें दुसरें हत्यारच नाहीं, असें सिद्ध झालें आहे.

स्वदेशीच्या या अवर्णनीय प्रभावाचें प्रत्यंतर पहावयाचें असल्यास मार्च १९२० ते मार्च १९२२ पर्यंतच्या अवधींत स्वदेशीमुळें विलायती व्यापाऱ्यांवर घडून आलेला परिणाम लक्षांत आणला कीं पुरे. १९२० मार्च अखेर पुऱ्या होणाऱ्या तिमाहींत ३१० युरोपियन कंपन्यांची दिवाळीं निघालीं होतीं. १९२१ मार्चला पुऱ्या होणाऱ्या तिमाहींत या व्यापारी कंपन्यांच्या दिवाळ्यांचें प्रमाण ७५३ वर आलें व या सालतील हिंदी बहिष्काराच्या तडाख्यामुळें १९२२ मार्च अखेर पुऱ्या होणाऱ्या तिमाहींत तर एकंदर १२१२ कंपन्यांचीं दिवाळीं वाजलीं!

आणि हा स्वदेशीचा अत्यंत तेजस्वी प्रभाव ध्यानांत आणूनच महाराजांच्या पत्नीनें खालील संदेश जनतेस पाठविला आहे. त्याचा कितपत उपयोग होईल अशी आह्मांस बळकट आशा आहे.

"माझा संदेश वाचणारीं माणसें सुसंपन्न स्थितींत असतील. पण आपल्या या प्रिय देशांतील बरेच लोक उपासमारी अनुभवित आहेत. याची त्यांस आठवण करून देणें जरूर आहे. या गोष्टीची ज्यास खात्री पटवून घ्यावयाची असेल त्यानें खेडेगांवांत जरूर जावें. मुंबई, अमदाबाद या सारख्या श्रीमंत शहरांत देखील अत्यंत अनुकंपनीय स्थितींत रहाणारे आपले अनेक देशबांधव आढळतील.

अशा या गरीब लोकांस मदत न करतां आहे अशीच स्थिति चालू दिल्यास आज बऱ्या स्थितींत असलेल्या माणसांसहि कालांतरानें उपास मोडण्याची पाळी येण्याचा संभव आहे. गरीब लोकांनीं असल्या दुःखद स्थितींत आणखी किती दिवस रहावें? हा दुःख मुकाट्यानें सोसणारे लोक एकट्या हिंदुस्थानांतच आढळतील. त्यांच्या ओरडीकडे आपण आज लक्ष न पुरविलें तर आमचा देश बुडला ह्मणून खास समजा. यासाठीं आपण आपल्या आयुष्यक्रमांत नवीन वळण लावलें पाहिजे. श्रीमंतांनीं शौकमजूरी करण्याच्या लोफात मोकळेपणानें मिसळून त्यांच्या हालअपेष्टांचें पूर्ण ज्ञान संपादन केलें पाहिजे.

प्रजा सुखी तर आपण सुखी या तत्त्वाचा सरकारास विसर पडलेला दिसतो. सरकारचें डोकें ठिकाणावर नाहीं असेंच दिसतें. पण सरकारप्रमाणे आमचे श्रीमंत लोकहि जर उदासीन रहातील तर आमचा देश ठार झाला असें समजावें. यासाठीं आपण गरीबांच्या स्थितीकडे व्यापक दृष्टीनें आणि सहानुभूतीनें पहावयास शिकलें पाहिजे.

आह्मी आमच्या मुलांस सरकारी शाळांच्या कोंदट हवेंत शिक्षण न देतां राष्ट्रीय शिक्षणाच्या स्वतंत्र वातावरणांत त्यांस विहार करूं दिला पाहिजे. त्या ठिकाणीं देशाभिमान ह्मणजे काय, हें त्यास समजाविलें पाहिजे. साळी आणि शेतकरी लोकांच्या देशानें परदेशी कापड विकत घ्यावें हें केवढें दुर्भाग्य! या गोष्टीचें त्यास ज्ञान होईल

माझ्या प्रिय भगिनींनो! परदेशी कापड वापरणें किती पापमूलक आहे हें तुमच्या लक्ष्यांत येत आहे ना? तुह्मांला तलम कपडा हवा तर तुह्मी बारीक सूत कां काढीत नाहीं? स्त्रिया या सर्वांच्या मागून घरीं बसलेल्या असतात. स्वराज्य मिळविण्याच्या प्रयत्नाच्या आड हिंदी स्त्रियांचे तलम कपड्यांचे शील हें उभें राहिलें असें ह्मणण्याची पाळी पुढील पिढ्यांवर न येवो ह्मणजे झालें.'

स्फुट विचार

अनुकरणीय उदाहरणः— डांगोळशी काणकोण–येथून खालील मजकुराचें पत्र आह्मांस आलें आहेः—

"श्री भारतकार यांस स. न. वि. वि.– गेल्या रविवारीं माझ्या नातवाची मुंज व सोमवारीं नातीचें लग्न अशीं दोन कार्यें श्री कृपेनें निर्विघ्नपणें पार पडलीं. दोनहि कार्यांत विधवोपस्थितांचा संसर्ग लागूं न दे. त्याची पूर्ण खबरदारी घेण्यांत आली होती. काणकोण महालांत यापुढें सदरहु सारख्या कार्यांत कलावंतींच्या नाचगाण्यांस कायमच फांटा देण्याचें ठरलें असून हा ठराव येथें बऱ्याच ठिकाणीं अंमलांत येत आहे, ही आनंदाची गोष्ट होय.

आहे, आणि महत्वाची गोष्ट ही कीं, वरपांगी सौंदर्यावर बिलकूल लक्ष न देतां खरें सौंदर्य काय तें आपल्या कर्तव्याचरणांत भरून राहिलेलें आहे, अशी आपली खात्रीची समजूत करून दे. केळकर, दे. दास, दे. नेहरू, दे. लजपतराय प्रभृति पुढाऱ्यांनीं विचारानेंच साधेपणाचा मोठ्या आनंदानें स्वीकार केलेला आहे.

आज आपल्या गोमांतकीय पुढाऱ्यांचे डोळे ह्या बाबतींत कधीं उघडतील ते उघडोत. मोठमोठ्या, हिंदी संस्कृतीच्या पुनर्जीवनाची हांव बाळगून, पुस्तकें लिहिणाऱ्या लेखकानां सुद्धां जर कॉलर घालून भरजरी रुमाल बांधण्याचा मोह आवरत नाहीं, तर तो सामान्य जनानें तरी कोणाच्या उदाहरणावरून आवरावा! आपलें जीवन सर्वस्वी परदेशी संस्कृतीवर अवलंबून ठेऊन; आपल्या राष्ट्रीय संस्कृतीस कवडीमोल ठरविण्याऱ्या सध्याच्या तरुण समाजानें, कोणती एक गोष्ट प्राधान्येंकरून स्वीकारावयाची असेल, तर ती हिंदी संस्कृती हीच असली पाहिजे.

युरोपियन समाजाच्या सान्निध्यांत केवळ त्यांचे दुर्गुण तेच अनुकरित करण्याची प्रवृत्ति आपल्या समाजांत जी जारीनें चालू आहे, तिचें उच्चाटन करून, आपल्या उच्च संस्कृतीची आणि तत्वज्ञानाची त्यास ओळख करून देणें, हेंहि आजच्या पुढाऱ्यांचें कमी महत्वाचें काम आहे असें नाहीं. अंगांत राष्ट्रीयत्वाची भावना संचारून जोंपर्यंत आपल्या समाजास आपलेपणाबद्दल ज्ञान होणार नाहीं, तों पर्यंत त्याकडून देशाची सेवा कोणत्या स्वाभिमानरूपी इंधनाच्या जोरावर होईल हें मला समजत नाहीं.

औद्योगिक स्थिति सुधारण्याच्या दृष्टीनें जर आपण खादीकडे किंवा स्वदेशी कपड्यांकडे नजर दिली, तर फक्त ह्या स्वदेशी प्रसारामुळें औद्योगिक सुधारणाच नव्हे पण साधेपणाचाहि पवित्र धडा आपल्या समाजास आपोआप मिळण्यासारखा आहे. जितक्या जितक्या मानानें आपले कपडे ज्यास्ती भरजरी व लखलखीत होतील, तितक्या तितक्या प्रमाणानें आपली अधिकाधिक सुधारणा झाली, अशी विपरीत समजूत करून असलेला आपला समाज निद्रित नाहीं म्हणावें, तर दुसरें काय?

साधेपणा हें तत्व केवळ प्राचीन काळींच काय तें पद्धतींत होतें असें मुळींच नाहीं. तुकाराम महाराज, रामदास स्वामी साक्रेटीस, टॉलस्टाय, आगरकर वगैरे अर्वाचीन थोर पुरुषांची सुद्धां साहजिक प्रवृत्ति ह्याच मार्गाकडे झालेली होती.

युरोपियन समाज जरी कांहीं बाबतींत सुधारलेला असला तरी त्या समाजांत अत्यंत गर्हणीय अशी जर कोणती गोष्ट असेल तर ती छानछोकी व डामडौल हीच असली पाहिजे. पोशाखाच्या बाबतींत त्यांची मजल इतक्या किळसवाण्या स्थितीस पोंचलेली आहे कीं, त्यांची अधोगती होण्यास कोणतेंहि कारण प्रामुख्येंकरून साधनीभूत होणार असल्यास तें रंगेलपणा हेंच असलें पाहिजे. युरोपियन लोकांचे हे चाळे सोडून दिले, आणि आपल्या दरिद्री हिंदुदेशाकडे नजर दिली, म्हणजे जे कोणी डामडौलाच्या बाबतींत सुधारलेले [!] आहेत त्यांची कींव आल्याशिवाय रहात नाहीं.

ह्या अकिंचन देशांत अन्नपाण्याच्या व वस्त्रप्रावरणाच्या अभावामुळें वर्षास सुमारें ६ कोटी लोक मृत्युमुखीं पडतात, जो मृण्मय [सुवर्णमय नव्हे!] देश पोशाखाच्या बाबतींत सर्वस्वी परदेशावर अवलंबून आहे, आणि शेवटीं ज्या पवित्र देशाची स्थिती सुधारण्यास महात्माजींच्या मताप्रमाणें फक्त स्वदेशीप्रसार आणि साधेपणा हेंच साधन बाकी आहे, त्या दुर्दैवी पेशांतील कांहीं लोकांनीं आपल्या गरीब स्थितीच्या बांधवांकडे बिलकूल नजर न देतां केवळ शरीरसौंदर्यास भुलून परसंस्कृतीचे अनुकरण करणें आणि आपली हानि करून घेणें ह्यासारखी नीतिबाह्य व क्रूरपणाची गोष्ट दुसरी कोणती आहे काय?

आपल्या संस्कृतीच्या उदात्त भावनाच्या अभावांमुळें, परसंस्कृतीच्या विघातक चालींच्या संसर्गानें निःसत्व व हलाख बनलेला आपला समाज आतां तरी जाग्यावर येईल काय? आतांच्या पोशाखांत आणि आपल्या पूर्वजांच्या पोशाखांत जरी, अंतर असलें, तरी सध्या प्रचारांत असलेल्या पोशाखावर साधेपणाची जोड दिल्यास आर्यांच्या पोशाखाची बरोबरी करण्यास फारशी हरकत नाहीं. परंतु दुर्दैव आपल्या आर्यपूर्वजांचें कि ज्यांच्या वंशजांनीं पायात बुटांसारखें खड, कंमरेस रक्ताभिसरणप्रतिबंधक पट्टा, अंगास उष्म्याची परमावधि कशी असते, हें दाखविण्यासारखें एकावर एक कपडे, गळ्यास फांशीची शिक्षा प्रत्यंतरीत होण्यासारखा एक कॉलर, त्याखालीं फांशीची शिक्षा दिली असतांही पोरकटपणा जात नाहीं असें दर्शविण्यासाठींच कीं कोण जाणे, पण एक गळफांस किंवा आल्हाद, आणि ह्याहीपुढें ईश्वरानें कृपाळूपणानें दिलेल्या नयनाबद्दल अतृप्ती प्रदर्शित करण्यासाठीं शास्त्रीय डोळे किंवा चष्मा, असे हे युरोपियन सुधारणेचा फोलपणा आणि भपका ह्यांचें स्पष्टीकरण करण्यास समर्थ असे थंडे डोहाळे ग्राह्य मानावे!

तरुण बांधव हो,

आपण जर खरोखर त्या तत्वज्ञानी आर्यांचे वंशज असलों, त्या रम्य हिंदाचे सुपुत्र असलों, तर परंपरेनें चालत आलेल्या चाली, कांहीं न्यूनता नसतांहि, मनाचा नेभळेपणा व्यक्त करण्यासारखे हे तमासे स्वीकारून कां बरें आपण लाज्य मानाव्या?

जगांत येऊन आमचें खरें कार्य काय तें कर्तव्यपालन आहे, आणि ह्या कर्तव्यपालनाखेरीज जरी शरीरसंरक्षणार्थ खाणें, कपडे घालणें आणि सुखी असणें ह्या त्रयींची जरूरी असली तरी त्यांचा अतिरेक झाला कीं लगेच आपल्याकडून कर्तव्यपालनाच्या बाबतींत हेळसांड होते, आणि अशा रितीनें आपण ईश्वराच्या शिक्षेस पात्र होतो. ही ईश्वराची शिक्षा नाहींशी करण्याची शक्ति जर येशू खिस्तानें सांगितल्याप्रमाणें डामडौलांत किंवा शरीराच्या सौंदर्यांत नाहीं, तर अर्थातच आपल्या साध्या रहाणीपेक्षां फाजील कांहीं करणें हा ईश्वराचा एक गुन्हाच आहे. आजपर्यंत आपल्या समाजांत जे थोर पुरुष होऊन गेले त्यानीं आपलें कर्तव्य पूर्णपणें पार पाडलें व तें ईश्वरास प्रीय आहे. त्यानीं आपल्या कर्तव्यपालनाखेरीज, दुसऱ्या कोणत्याही गोष्टीवर निरवालस जोर दिला नाहीं, ह्या गोष्टी जर खऱ्या आहेत, व त्याबद्दल जर आक्षेप घेण्यास आम्हीं असमर्थ आहों, तर जाणून बुजून आपल्या कर्तव्याबाहेर वागणें व अशा रीतीनें, आपण आपल्या व पर्यायानें आपल्या देशाच्या अधोगतीस कारणीभूत होणें हें खरोखरच निंद्य नाहीं काय? आणि त्यांतल्या त्यांत सध्याची परिस्थिती अशी आहे कीं, आपल्या देशाची अनुकरणीय स्थिती केवळ आपल्या च नेभळेपणामुळें प्राप्त झालेली आहे. तिचें निराकरण करण्यास झटण्याखेरीज दुसऱ्या फंदांत पडणें हें खरोखर पाप आहे. आपलें कर्तव्य तेंच आपलें सौंदर्य, वरपांगी सौंदर्यात कांहीं मतलब नाहीं, मनाच्या उदात्तपणाशिवाय बाहेरील शृंगार अनाठाई आहे वगैरे विचार मनांत आणून माझे गोमांतकस्थ बांधव नैतिक मार्गाचें साधेपणा हें तत्व प्रचारांत आणतील अशी मला पूर्ण आशा आहे.

वर्तमानसार

—भारतमित्राचा पांचवा अंक प्रसिद्ध झाला असून तो नेहमीप्रमाणेंच फार उपयुक्त निघाला आहे.

—केंपेंच्या मामलेदारसाहेबांची उचलबांगडी होणार असल्याची दाट वदंता आहे.

—दे. कुंशरू यांची स्वारी गोव्यांत येणार आहे.

—गेल्या आठवड्यांत श्रीमत्पूर्णानंदस्वामीमहाराजांची स्वारी पणजी येथें होती.

—पं. मालवीय यानीं हिंदी लोकांस स्वदेशी कपडे वापरण्याविषयी विनंति केली आहे. आमच्या तरुणानीं इकडे सक्रिय लक्ष्य पुरविल्यास, त्यांचा व गोमांतकाचाहि फायदा होणार आहे.

जाहीर विनंति

महाराष्ट्र–स्वराज्य–संस्थापक छत्रपति श्री शिवाजीमहाराज यांची जयंति वैशाख शुद्ध २ या (ता. २९।४।२२) शनिवार रोजीं पडत असून, हा पुण्य दिवस 'सारस्वत ब्राह्मण समाज' या संस्थेमार्फत साजरा करण्याचें योजिलें आहे. सदरहू प्रसंगीं अध्यक्ष यां नात्यानें, रा. सु रा. सासंत यांचें मुख्य भाषण होणार असून इतर वक्त्यांचींही भाषणें होतील. तरी स्वराज्यप्रेमी सर्व गृहस्थानीं उत्सवास हजर रहावें अशी विनंति आहे.

मडगांव. केशव अ. नाईक.
सा. ब्रा. समाजगृह चिटणीस.
२३।४।२२

श्री शिवजयंति

ता. २९।४।२२ रोजीं संध्याकाळीं ७ वाजतां येथील बालोन्नति समाजांत श्री शिवाजीमहाराजांच्या जयंत्युत्सवा प्रीत्यर्थ दो. जयवंत म. मळकर्णेकर यांच्या अध्यक्षतेखालीं जाहीर सभा भरून, कित्येक वक्त्यांचीं भाषणें होणार आहेत. सर्वांस येण्याची विनंति आहे.

केपें, ता. २१।४।२२
से. बालोन्नति समाज.

ANUNCIOS

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do segundo oficio que este assina vão ser vendidos em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situado em *Xeldem* na estrada que de *Quepem* se dirige a Sanvordem no dia 6 de *Junho* de corrente ano ás 13 horas e pelo preço superior ao de avaliação os seguintes bens.

Predio denominado **MOTO** da cultura de coqueiros arvores fructiferas e de terra de semeadura de arroz. Predio denominado **AIAMOTO** por outro nome **DESSAIAN BAGA** da cultura de coqueiros e outras arvores e em que existe uma casa do manducares, ambos sitos em Parodá avaliados em 2800 rupias e 700 rupias e inscritos na conservatoria predial desta comarca sob os numeros 2560 e 5800 respectivamente. Penhorados nos autos da execução hypotecaria instalada pela *Junta* de Paroquia da Igreja de Parodá contra Ulá por outro nome Irabai vulgo Loximim Quenina viuva de Xanum Fotu Quenim por outro nome Bombi, por si e como mãe administradora do seu filho menor Ramacrisna *Xanum* Fotu Quenim vulgo Mortu residentes em Sanvordem. Para esta arrematação são citados todos os credores incertos dos ditos executados bem como co-proprietarios e quinhoeiros nos termos e para os fins de lei sendo que a contribuição de registo por inteiro correrá a cargo do arrematante. E para ser publico se pxpediu este.

Quepem 8 de Abril de 1922.

O Escrivão de direito
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de direito
1 *J. de Seabra*

ápira, pois, ao outro ideal senão ao que acima fica exposto.

Torna-se, poisso, digno de maiores encomios o sr, Vaglo cuja inconcussa probidade representa a melhor garantia da prosperidade da referida fabrica de que tambem è proprietario.

Notas soltas

Na legislação vigente das nossas Comunidades agricolas tratando-se de escrivães destas associações encontram-se muitas disposições iniquas comparando os escrivães aos serventuarios de pouca monta sendo, porisso, de boa moral que taes arbitrariedades se suprimam, para o bom nome e reputação da Republica Portugueza, e por os ditos escrivães serem cidadãos portuguezes e terem direito, como todos os outros o tem, a gosar de previlegios de *igualdade, fraternidade, liberdade e mais legalidades* etc.

Ora, sem mais preambulos, vejamos.

O art.º 90 º do Cod. das Comunidades de 1 de Dezembro de 1904, em vigor, diz:- " Que nenhum escrivão poderá acumular duas escrivanias das Comunidades, nem ao mesmo tempo occupar escrivania e outro cargo, quer do Estado quer de corporação, salvo quando a soma de denheiro dambos os empregos não exceda a 250 rupias e os lugares a acumular sejam nas aldeas limitrofes e ainda neste caso a acumulação não póde comprender mais de dois logares"

Quanto á acumulação das Comunidades, nada temos a dizer, pois nas Novas Conquistas, há grupos de 4 a 5 comunidades, embora de serviço rasoavel, sendo porisso, *letra morta* a respectiva parte do artigo supra transcrito.

Ora, quanto ao limite de vencimentos, é que temos de ver se esta parte tem razão de ser.

O proprio Cod. das Comunidades, na sua tabela n º 3, fixa vencimentos, sendo maximo de 400 rupias, nas comunidades de maior movimento e a regular pela disposição acima avocada, tem de ser nomeados 2 escrivães: cada um com vencimento não superior a 250 rupias, para o serviço de uma comunidade desta natureza; o que, é, na pratica um absurdo-

Temos, pois, de combinar estas disposições harmonicamente e com principios da moralidade e não, de molde, a torcel-*as*, quando nos aprouver-

Atê faculta o mesmo codigo ter, o escrivão da Com º de um escrivente, e sob este ponto de vista, não devia haver nenhum incoveniente para os escrivães das Comude.s de pequeno movimento, exercerem cumulativamente qualquer outro cargo até que perfizessem a soma de 400 rupias anuas de ordenado de ambos os empregos.

O referido Codigo s de 1904 por conseguinte a doutrina por nos espendida é aplicavel ao estado das cousas de 20 anos para traz mais ou menos

Mas, hoje em diante, esta doutrina tem de ser interpretada doutra forma desde que a carestia vai tomando um vulto gigantesco, nos preços de artigos da 1a. necessidade e dos mais inadiaveis como vestuario etc, foram aumentados os vencimentos dos escrivães das Comunidades, em geral, elevando-se os mesmos atê a cifra de 600 rupias, nas comunidades de maior movimento.

Deve, portanto a nosso modo de ver, alterar-se a disposição supracitada, mandando que qualquer escrivão da Comunide pode exercer ao mesmo tempo a escrivania e outro qualquer emprego, contanto que a soma anual de ordenado dambos os empregos não seja supêrior a 800 rupias, pois todos sabem e ninguem deve ignorar que os escrivães das Comunidades são creaturas humanas è não são feitos de pedra . . . e tem, a seu cargo, a substentação dos seus filhos e mulher etc-

Isto que acima fica dito, é tão coerente, que flui das proprias desposições e tabela do Codigo aplicando-se á epoca actual de carestia da vida; não devendo, porisso, haver obstaculo que qualquer escrivão exerça qualquer outro cargo nas condições acima expostas. Diz o art º 91 do citado Cod. " O escrivão da Com º de que perceber ordenado superior a 125 rupias terá residencia obrigatoria na aldea.-

Mas no nosso pensar hoje qúe tudo está elevado a duplo ou triplo: esse limite de vencimento para a obrigatoriedade de residencia deve ser modificado, mandando que os escrivães que percebam os vencimentos superiores a 400 rupias anuas, devem ter residencia obrigatória na aldea.

Feito assim, isto è, com introdução dessas modificações não há prejuizo de ninguem; e será uma medida utilitaria e benefica como a portaria de aposentações a estes modestos funcionarios; pois estamos a ver que certos funccionarios desta provincia a quem o exercicio cumulativo de qualquer outro emprego è incompativel com o exercicio das funcções do seu proprio cargo estão o fazendo (ja se ve' sem prejuizo do serviço) percebendo vencimentos e gratificações chorudas !

E sendo isto legal e viavel só qualquer melhoria a fazer-se aos escrivães das Com º es estará fora de lei e impossivel de se realisar?

Parece-nos que não, por que " a lei è igual para todos,"-

Pedimos, porisso, aos competentes que volvam a sua atenção a este assunto.

Sara

भा र त

गुरुवार वैशाख शु० १ शा १८४४

स्वामी विवेकानंदांचे विचार

पतितपरावर्तन—हिंदुधर्माची मर्यादा

[प्रबुद्ध भारत, एप्रिल, १८९९]

(गेल्या अंकीं वचन दिल्याप्रमाणें श्री स्वामी विवेकानंदजींचे पतितपरावर्तनासंबंधीचे विचार खालीं देत आहों. हे विचार स्वामीनीं 'प्रबुद्ध भारताच्या' एका रिपोर्टरपाशीं, त्यानीं घेतलेल्या मुलाखतींत, प्रदर्शित केले. ती मुलाखत जशाची तशी खालीं प्रसिद्ध केली जात आहे. सं भारत)

पतित व परधर्मी लोकांना हिंदुधर्मांत घेण्यासंबंधानें स्वामीचे विचार काय आहेत, हें मुद्दाम त्यांची मुलाखत घेऊन कळवावें, अशी आपली (प्रबुद्ध भारताच्या संपादकाची) आज्ञा झाल्यावरून एके दिवशीं सायंकाळची मीं तशी संधी साधली. गंगानदीवरील एका नौकागृहाच्या छपरावर आमची ही मुलाखत झाली. रात्र पडली होती. आम्हीं आपली नौका रामकृष्णमठाच्या घाटाजवळ उभी केली, व मग माझ्याजवळ बोलण्यासाठीं स्वामी मठांतून तेथें आले.

काळ व स्थळ हीं मोठी रम्य होतीं, वरतीं लखलखीत तारे, आणि सभोंवतीं खळाळणारी गंगा. एका बाजूला मंद दीपांच्या अंधुक तेजानें अर्धवट प्रकाशित अशी मठाची इमारत असून तिच्या पृष्ठभागीं ताल व इतर कांहीं विशाल वृक्ष दिसत होते. मीं पहिल्यानें बोलण्यास सुरवात करून म्हटलें, स्वामीजी, पतितपरावर्तनासंबंधानें आपले विचार कळावे, म्हणून मी मुद्दाम आपल्या भेटीला आलों आहें. हिंदुधर्म सोडून ज्यानीं परधर्माचा स्वीकार केला, त्याना आपण परत घ्यावें, असें आपल्याला वाटतें काय ?"

स्वामी म्हणाले, "अलबत ! त्यांना घेतां येईल व घेतलें पाहिजे."

ते अगदीं गंभीर मुद्रा करून कांहीं वेळ स्वस्थ विचार करित बसले व नंतर पुन्हा म्हणाले, तसें आपण नाहीं केलें, तर आपली संख्या कमी होत जाईल. पहिल्यानें ज्या वेळीं मुसलमान आले, त्यावेळीं आमची संख्या— मला वाटतें अत्यंत प्राचीन मुसलमान इतिहासकार जो फेरिस्ता त्याच्याच म्हणण्याप्रमाणें—साठ कोटी होती, असें म्हणतात. आतां आम्हीं सुमारें वीस कोटी आहों. बरें, जो मनुष्य बाहेर पडतो, तो आमच्यांतून कमी होतो इतकेंच नव्हे तर आमच्या शत्रूंची संख्या एकानें वाढवितो."

"बरें हिंदुधर्मांतून जे ख्रिस्ती किंवा मुसलमानी धर्मांत गेलेले आहेत, त्यांतील बहुतेक तरवारीच्या भीतीनें गेलेले आहेत, किंवा त्या भीतीनें गेलेल्याचे वंशज आहेत. तेव्हां कोणत्याहि दृष्टीनें त्याना कमी लेखणें, हा धडधडीत अन्याय आहे. जे जात्याच परधर्मी आहेत त्यांच्यासंबंधानेंहि आपण विचारलें, नाहीं का ? प्राचीन काळीं अशा परधर्मी लाखों लोकांना आम्हीं हिंदुधर्मांत घेतलें आहे, व तो क्रम अद्यापिहि सुरू आहे."

"भरतभूमींत वास करणारे मूळचे अनार्य रानटी लोक, हिंदुस्थानच्या सरहद्दीबाहेरचीं राष्ट्रें, आणि मुसलमानांनी

A eleiçao da India

A comissão de verificação de poderes da Camara dos Deputados ainda não resolveu o caso da eleição da India. Corria ontem, nos Passos Perdidos, que a comissão se inclinava para o candidato sr. Prazeres da Costa, o qual, ao que se dizia, daria a sua adesão ao Partido *Democratico*, em sinal de reconhecimento, ao que parece, porem nenhum dos boatos tem fundamento, porque está absolutamente demonstrada a inelegibilidade do sr Prazeres da Costa, no que já concordaram todos os membros da comissão, em conversas particulares.

Segundo nos informam o sr Prazeres da Costa argumenta dizendo que, tendo ido a Londres em missão oficial, não estava exercendo o lugar de auditor geral de fazenda no periodo eleitoral. Acontece porêm que pelo facto de ter ido a Londres, não perdeu o lugar nem a qualidade de auditor geral, como claramente demonstrou o sr. dr. Alvaro de Castro perante a referida comissão com documentos oficiais. Alegou mais o sr. *Prazeres* da Costa que interinamente exercia o lugar de auditor geral, quando é certo que o lugar é de comissão, dando-se ainda a circunstancia de ter sido anulado o primitivo decreto que o nomeara *como interino* e substituido o por outro, naturalmente a seu pedido do qual nada consta a respeito da *interinidade*. Consta-nos tambem que os Reconstituintes levantarão a questão, com o fim de estabelecer a boa doutrina, e que o sr. dr. Alvaro de Castro tenciona publicar as cartas que dirigiu á Comissão de Verificação de poderes. *Do Manhã*

सारस्वत ब्रा. समाज, मडगांव

१० वा वार्षिक समारंभ

हा वार्षिक समारंभ संस्थेच्या वाढदिवशीं [गेल्या चैत्र शु॥ १ ला बुधवार रोजीं] मोठ्या थाटानें व उत्साहानें पार पडला. अध्यक्षस्थानीं मुंबईचे सुप्रसिद्ध समाजसेवक श्री. शिवाजी कृष्ण परुळकर यांची योजना करण्यांत आली होती. शिवाय नेहमींप्रमाणें वार्षिक समारंभास जोडून, व्याख्यान माला गुंफण्यांत आल्यामुळें, व त्यांतल्या त्यांत श्री. सत्यागादेव केळकर व डॉ. श्री. सौ. इंदुमतीबाई नाईक इत्यादिकांच्या द्वारें होणाऱ्या व्याख्यानपुष्पांची भरपूर असल्या कारणानें, यंदाच्या समारंभास कांहीं निराळेंच महत्त्व प्राप्त झालें होतें.

वाढदिवस समारंभाकरितां समाजाच्या दिवाणखान्यांत पुष्पमाला, पुष्पपात्रें इत्यादिकांनीं सुशोभा प्राप्त झाली होतीच; पण त्यास निरनिराळ्या थोर पुण्यपुरुषांच्या तसबिरींमुळें तर विशेष गांभीर्य व पवित्रता आली होती. रात्रौ सुमारें ७ वाजतां, अध्यक्ष श्री. परुळकर व थोड्या वेळानें देशभक्त श्री. केळकर यांच्या स्वाऱ्या सभास्थानीं येऊन दाखल होतांच त्यांस सर्वांनी उत्थापन देऊन टाळ्यांच्या प्रचंड गजरांत त्यांचें अंतःकरणपूर्वक स्वागत केलें. या वेळचा समाजनाचा आनंद व उत्साह वर्णनातीत होता. समाजाचा एवढा मोठा प्रशस्त दिवाणखाना खरा; पण त्यांत अतोनात गर्दी होऊन, जागा न मिळाल्यामुळें तितकाच लोकसमूह बाहेर उभा होता.

अशा अत्यंत उल्हसित वृत्तींत लोक समूह असतानां, श्री. यशवंतराव सू. सरदेसाई यांनीं सर्वांचें स्वागत केलें; नंतर अध्यक्षांची सूचना मांडतांच ते म्हणाले;— श्री. बाबासाहेब परुळकर हे मुंबईतील गौ. सा. ब्रा. समाजांतील प्रमुख व वजनदार गृहस्थ असून, तेथील सारस्वत ज्ञातींतीलच नव्हे तर मुंबापुरींतील प्रमुख सार्वजनिक संस्थांतील कार्यकारी मंडळांतल्या अग्रभागीं विराजमान असणाऱ्या गृहस्थांपैकीं आहेत. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मिल ओनर्स असोशिएशन, निरनिराळ्या औद्योगिक संस्था, मराठा प्राव्हिडंट फंड, सारस्वत विद्यार्थीसहाय्यक मंडळी, सारस्वत बँकिंग सोसायटी, सारस्वत ज्ञातीचीं देवालयें व धर्मार्थ संस्था यांचे ट्रस्टी, दाभोलकर स्कॉलरशिप्स बोर्ड, इत्यादि संस्थांत मान्यतेच्या जागीं, निरनिराळ्या नात्यानें हे काम करीत आहेत. विशेषतः औद्योगिक बाबतींत त्यांची कामगिरी वाखाणण्याजोगी आहे असे अष्टपैलू वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध गृहस्थ यंदा या संस्थेच्या वार्षिक समारंभसमयीं अध्यक्षपदारूढ होत आहेत या बद्दल संस्था स्वतःस मोठी भाग्यवान समजत आहे या सूचनेस श्री. पुं. बा विर्जिनकर यांनीं अनुमोदन दिलें. नंतर टाळ्यांच्या प्रचंड गजरांत अध्यक्षानीं स्थानापन्न होऊन आपलें भाषण सुरू केलें. ते म्हणाले:— या संस्थेच्या चालकांचा उत्साह एकोप्यानें कार्य करण्याची हातोटी आणि संस्थेचा वार्षिक समारंभ वगैरे कार्यक्रम पार पाडण्यांत मुंबईकडील संस्थांत सुद्धां दिसून न येणारा नियमितपणा व शिस्त हीं पाहून मला फार आनंद वाटत आहे. नंतर ते आपल्या मुख्य विषयाकडे वळून 'समाज सेवेचें' महत्व त्यांनीं आपल्या रसाळ वाणीनें वर्णन केलें व उदाहरणादाखल मुंबईची 'सोशल सर्विस लीग' व तिनें चालविलेल्या कामांची ओळख करून दिली. उदाहरणार्थ मजुराकरितां रात्रीच्या मोफत शाळा, फिरतीं वाचनालयें, मॅजिकलँटर्न मधून दाखविण्यांत येणारे देखावे, खालच्या वर्गांत स्वच्छतेविषयीं आवड उत्पन्न करणें, अस्पर्शांनां शिक्षण देणें व त्यांच्यांतील वाईट संवयींचा नायनाट करणें, वगैरे वगैरे. नंतर सहकारी पतपेढ्या, सेव्हिंग बँक, डिबेटिंग युनियन, शारीरिक खेळाकरितां जिमखानें वगैरेची माहिती सांगून त्यांच्या समाजसेवेशीं कमासंबंध पोंचतो हें त्यानीं विशद करून सांगितलें व गोमांतकांत असे प्रयत्न अवश्य सुरू व्हावेत अशी सदिच्छा प्रदर्शित करून टाळ्यांच्या गजरांत त्यानीं आपलें भाषण संपविलें. नंतर दे. भ. केळकर यांचें थोडक्यांत भाषण झालें. त्यांत धर्म, भाषा, संस्कृति इत्यादिकांचा विचार करितां गोमांतक निराळें नसून महाराष्ट्राचाच एक भाग कसा आहे याचें तसेंच ज्ञातिविषयक संस्था देशहितास विघातक नसून शेवटीं पोषकच कशा होतात याचेंहि त्यानीं विवेचन केलें व देशकार्याच्या कामांत सारस्वत ज्ञात कशी मागें नाहीं हें दाखवितांना त्यानीं डॉ. भांडारकर, न्यायमूर्ती तेलंग, डॉ. भाऊदाजी, ना. कामत, डॉ. चंदावरकर, प्रो. वसंतराव नाईक इत्यादि व्यक्तिसंबंधीं प्रशंसापर उद्गार काढिले.

या नंतर श्री. विर्जिनकर यानीं अध्यक्ष श्री. परुळकर, दे. केळकर व इतर मंडळीचे आभार मानल्यावर अध्यक्ष व दे. केळकर यांना पुष्पाहार घालण्यांत येऊन इतर मंडळीला पानसुपारी अत्तर गुलाब देण्यांत आला. व उत्सवाचें पहिल्या दिवशीचें कार्य संपलें.

पुणें विद्यार्थी गृहाचें

महाराष्ट्र विद्यालय

पुणें अ. वि. गृहानें स्वतःच्या इमारतींत गेल्या वर्षं प्रतिपदेपासून महाराष्ट्र विद्यालय सुरू केलें आहे. दुय्यम शिक्षणांत शक्य त्या सुधारणा करून निर्दोष व उत्तम प्रकारचें शिक्षण द्यावें व वैदिक शिक्षणाबरोबर औद्योगिक शिक्षण घेण्यास विद्यार्थ्यांस अवसर मिळावा हा उद्देश आहे. त्याप्रमाणें तज्ज्ञांच्या सल्ल्यानें स्वतंत्र शिक्षणक्रम आंखून चांगल्या क्रमिक पुस्तकांची निवड केली आहे. शिक्षण मातृभाषेंतून देणें निष्कारण देणारी विषयांची पुनरावृत्ति टाळणें, संवाद पद्धतीनें इंग्रजी शिक्षण, भाषेच्या ओळखीस जरूर तेवढेंच संस्कृत व्याकरण, इतिहास, भूगोलांत राष्ट्रीय दृष्टि इत्यादि सुधारणा केल्यानें मॅट्रिक पर्यंतचा आतांचा अभ्यासक्रम ५ वर्षांत पुरा होऊं शकतो असा अनुभव आहे. ५ वर्षांनंतर विद्यार्थ्यांनां वाटल्यास टिळकमहाराष्ट्र-विद्यापीठाकडे जातां येईल अगर शेतकी, एजिनियरिंग, वैद्यकी, सायन्स इ० कॉलेजमधील उत्तम शिक्षण घेण्याकरीतां मुंबई विश्वविद्यालयाचे मॅट्रिक परीक्षेसही बसतां येईल. शिक्षण संस्थेच्या व बाहेरील पदवीधर शिक्षकांकडून देण्यांत येतें. शाळेची वेळ सकाळीं ७ ते १०॥ आहे. विद्यालयाच्या वार्षिक परीक्षा संपल्या असून नवीन वर्ग वर्षप्रतिपदेपासून सुरू झाले आहेत कांहीं मर्यादीत संख्येपर्यंत बाहेरचे हुषार विद्यार्थी वैदिक शिक्षणाकरितां महाराष्ट्र विद्यालयांत मोफत घेण्यांत येतील तर या संधीचा फायदा घेऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनीं समक्ष भेटावें अगर २ आणे पोस्टेजसह पत्रव्यवहार करावा.

६१७ कसबा पुणें, सरस्वति-भुवन

वि. ग. केतकर

व्यवस्थापक अ. वि. गृह

Ecos & Critica

Alerta !

Alguns amigos e dependentes do nosso Administrador sr. Antão estão promovendo uma representação ao sr. Governador Geral, pedindo-lhe a sua conservação à testa deste conselho.

Descobrindo a tempo a intrujice, o Povo do concelho dirigiu logo uma contra representação ao dr. Jaime de Morais, mostrando quão incompatível é o mesmo senhor, *incapaz delegado de saude*, com o referido Povo para administra-lo- *comme il faut.*

A nosso ver, o sr. Antão devia ser removido do seu lugar, há muito tempo, quando contra ele subiu uma representação com formidaveis acusações, representação que infelizmente se tornou a presa do sistema protecionista das regiões palacianas.

Agora, porem, a distituição urgente daquele funccionario se impõe. E o sr. dr. Morais tem de ordena-la já, se é que não quiser ver comprometer-se inda mais por causa do seu imcompreensivel feitio de querer estar bem com *Deus* e de não querer estar mal com *Demonio*.

Ou *carne* ou *peixe*. *Nem carne nem peixe*, isto é que não pode ser.

Virou a casaca...!

Tivemos á mão um numero do jornal metropolitano *A Manhã*. E sabem oque este diz a proposito do *presumivel* triunfo da *lista popular* ?

E' sem mais nem menos que o sr. *Prazeres* da *Costa* fez-se *democratico*, ele que, poucos minutos antes era *popular*.

O sr. Costa, como vem, virou pois a casaca de *popular* e meteu-se no capote *democratico* que hoje é governo. O triunfo não é-conclui-se do dito sr. Costa, mas sim do...governo.

E aqui os seus amigos a cantarem *hosanas* á lista popular e... Mas esperem até á semana seguinte.

Dr. Venctexa Dessaì

Este nosso presado amigo e digno representante das Novas Conquistas no Conselho Legislativo conseguiu que o rigor da lei de selos, há pouco regulamentada, não abrangesse os livros dos templos hindus, os quais, se não fosse a oportuna interferencia daquele nosso inteligente vogal, no importante assunto, teriam de, a cada passo, arcar com dificuldades de varia ordem.

E' mais um relevante serviço que o sr. Dessai acaba de prestar ás N. Conquistas que porisso lhe estarão muito gratas.

O *Bharat* cumprimenta a sua exa. pelo seu referido acto de patriotismo.

Uma carta

Sr. Director do *Bharat*.

Peço a VExa um cantinho no seu apreciado semanario para as seguintes linhas :-

Lá por ai, ao fazer o epilogo das ultimas eleições para deputado e senador, vão escrevendo tanta prosa que, a dar ás palavras o seu sentido proprio e a tomar como serios os principios que se estabelecem, a conclusão a tirar seria uma afirmação falsissima que, convem, se rebata sem perda de tempo.

Referindo-se o jornal que faz esse epilogo, aos *Srs.* Hipolito de Souza, Vitu Neurencar e Esvonta Colvalcar, diz que alguns hindus correligionarios destes ultimos colocaram-se ao lado do governo, produzindo a sua atitude tristissima impressão e que estavam eles entrincheirados atraz do governo e assim zombavam dos *populares* e tudo isso fizeram, porque por eles o governo teria mais consideração.

Sr. director ! V. bem vê que estas afirmações, sem pés nem cabeça são uma imagem fiel do que são aqueles que escrevem para publico com os seus *fins* de que estão muito longe os hindus.[alguns no seu dizer]

Se pelo facto de os hindus terem apoiado as candidaturas adversas ás dos Srs. Prazeres da Costa e Constantino Santos, a sua atitude se pode dizer como sendo de tristissima impressão, qual é a ajectivação que se hà de empregar para a atitude daqueles que sempre enxovalbaram um nome prestigioso por todos os meios e modos, ao seu alcance, nome que desde certo tempo e progressivamente vem apoteusando ?

O publico leitor que é o mesmo e cujas crenças politicas ainda não mudaram nem mudarão dum momento para o outro, devido a este e aquele facto, que idea fará desses homens, escritores jornalistas e *leaders* populares que devem encaminhar a sociedade pela perseverança nas ideas e firmeza nas convicções?

Eu acho que a impressão será tristissima, palavra que levianamente foi dislocada para a atitude de alguns hindus correligionarios de dois presos politicos *dignos* e *altivos*.

Estavam entrincheirados atrás do governo para zombar...". é um outro disparate que é preciso repelir a toda a força. Os hindus nunca estiveram entrincheirados atraz nem estiveram armados em frente do governo como por ai é natural e de costume para fazer irritar o espirito publico com palavras bombasticas, pintando tudo com cores negras, para fazer o *efeito* que tem sido a ordem do dia.

Afinal, Sr. director ! vem epilolar as afirmações falsas quanto a alguns correligionarios dos *dignos* e *altivos* dois hindus adulterando o seu gesto e dizendo que por estes correligionarios *o* governo não teria mais consideração.

Consideração ? é por causa desta palavra que por ai se lavra todo o movimento, le *fond en comble*. Os hindus nunca foram avidos da consideração de ninguem para os seus fins que por aquelas bandas tem feito uma conflagração geral. E aqueles que resistiam a essa conflagração por ser prejudicial ao paiz, querem nela ser abrangidos pouco lhes importando agora o prejuizo para o paiz, contanto que os seus celeiros se encham á cunha.

Sr. director não suponha V. que estas linhas tem por origem o prurido de provocações. Só tem em vista repelir fortemente afirmações falsas com que querem carregar as colunas dos seus jornaes.

Que impinjam adjectivações não so *dignas* e *altivas* mas ainda outras se quizerem !

Sò reflitam quando analisam atitudes alheias.

Um hindu

N. da *R.*:- Sobre este assunto reservamos as nossas considerações para a seguinte edição do nosso jornal.

भारत

गुरुवार चैत्र व० ९ मी १८४४

पतितपरावर्तन

'भारत'ाच्या वाचकांस माहीत आहेच कीं, मडगांवच्या सारस्वत समाजांत वे. शा. सं एकसंभेकरशास्त्री यांचें 'हिंदुधर्म' या विषयावर व्याख्यान झालें होतें. या प्रसंगीं दे. केळकर यानीं अध्यक्ष या नात्यानें समारोपादाखल केलेल्या भाषणांत धार्मिक दृष्टीनें अत्यंत महत्वाचा असा एक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्याविषयीं गोमांतकीय पुढाऱ्यांस विनति केली होती.

उपरोक्त प्रश्न दुसरा तिसरा नसून पतितपरावर्तनासंबंधीच होता. या विषयाची चर्चा चालू असतांना, त्याला विरोध करणारी एकहि व्यक्ति आढळून आली नाहीं. खुद्द एकसंभेकर नीं आपल्या मौन्यानें पतितपरावर्तनाला संमती दर्शविली. इतकेंच नव्हे, तर गोमांतकचे इतर लोकनाहि त्या विषयाला अनुकूलच आहे असें, आजपर्यंत तत्संबंधीं कोणतेहि विरोधात्मक उद्गार ऐकूं न आल्यानें; ह्मणण्यास कसलाच पत्यवाय नाहीं.

करंबळी व चिंबेल या दोन गावांत नावांनें ख्रिस्ती पण कृतीनें निवळ हिंदु अशीं सुमारें ३-४हजार पतित स्थितींत खिचपत पडलेलीं माणसें आहेत. हिंदु शूद्र लोक जे आचार पाळतात तेच अक्षरक्षः त्यांकडून पाळले जातात; मात्र जन्म व लग्न या दोन बावतींत ते ख्रिस्ती पाद्रीचें व देवाचें दर्शन, संबंध आयुष्यांत, दोनदांच घेतात ! या नांवाचे ख्रिस्ती लोकांचें हिंदुधर्मात परावर्तन झाल्यास हिंदूंचें नाव वाढणार आहे व जी आज हिंदुलोकसंख्या जवळ जवळ ख्रिस्ती लोकसंख्येबरोबर आहे ती चटदिशीं वृद्धि पावून, हिंदूंचा राजकीय दराराहि त्यांच्या सामाजिक वलानें, सरकारी दरबारात व इतर समाजांत प्रस्तुत होणार आहे.

हेच फायदे लक्ष्यांत घेऊन, आह्मांला वाटते, दे. तात्यासाहेब केळकरानीं, पतितपरावर्तनाचा प्रश्न सोडविण्याची आवश्यकता येथील जनतेस भासविली होती. केळकरांच्या लोककल्याणकारक विनंतीस मान देणें हें अर्थात आमचें पवित्रतम कर्तव्य ठरतें, हें ओघानेंच सिद्ध झालें.

कित्येक महिन्यामागें सदरहू पतित लोकांच्या परावर्तनाच्या चळवळीस —ही चळवळ गोव्यांत सुरू झाल्यास आज अनेक वर्षें लोटलीं, हें नमूद करण्यास समाधान वाटतें--यशस्वी स्वरूप आणण्याच्या उद्देशानें, रायचंद्रचे उत्साही व निःस्वार्थी तरुण रामचंद्र लवंदे व त्रिविक्रम येळेकर, यांच्या समवेत आह्मीं चिंबेल येथें जाऊन त्या समाजांतील पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्या होत्या. त्यावरून तेथील एकंदर पतित लोक हिंदु धर्मांत परत येण्याविषयीं फार उत्सुक आहेत, असें आह्मास फिरून एकदां दिसून आलें. त्यांच्या परावर्तनाची चळवळ आह्मी करून-- अल्पप्रमाणांत कां होईना ? --चालू होतीच. तिला आतां केळकरांच्या शिफारसीमुळें जास्ती चलन मिळणार असून, ते पतित लोक पावन झाल्याचें पहाण्याचें भाग्य लवकरच गोमांतकीय जनतेस लाभेल, अशी आशा करण्यास मुबलक जागा आहे. पहावें काय होतें तें.

स्फुट विचार

हरताळ ! :— हिंदुस्थानांतील 'राष्ट्रीय आठवड्या' विषयीं सहानुभूति प्रदर्शित करण्याच्या उद्देशानें, पणजींतील लहान मोठ्या एकंदर व्यापारी वर्गानें गेल्या १३ तारखेस हरताळ पाळून आर्यावर्ताच्या अभ्युदयाबद्दल सक्रिय कळकळ व्यक्त केल्यामुळें, भारत त्यांचें प्रेमानें अभिनंदन करीत आहे. निर्भयता व निःस्वार्थीपणा या देशहितपोषक गुणाची व्यापारी वर्गांत होत असलेली वाढ पाहून आह्मांस कौतुक वाटतें. हरताळानंतर कांहीं व्यापारी लोकांना तेथील मामलेदार कचेरींत नेण्यांत येऊन, त्यांस हरताळाचीं कारणें विचारण्यांत आलीं व त्यानींहि न डगमगतां उपरोक्त मुद्याचा निर्भयपणें उल्लेख केला यापुढें केव्हांहि हरताळ पाळावयाचा असल्यास, आठ दिवसपूर्वीं सरकारास सूचना द्यावी असें सांगून मामलेदार साहेबानीं त्यास परत पाठविलें.

'जन्मसिद्ध हक्क':— स्वराज्याप्रमाणेंच हरताळ हा जन्मसिद्ध हक्क असल्यामुळें, त्याची बजावणी पाहिजे तेव्हां करण्यास कोणालाहि कसलीच आडकाठी नाहीं, अशी आमची समजूत आहे. ह्या दृष्टीनें विचार केल्यास उपरोक्त मामलेदारी सूचनेची 'तिखट' अट अगदीं खुळचट असून, ती लक्ष्यांत घेण्यासारखी नाहीं, हें उघड होतें. अर्थात् आमचा निर्भय व्यापारी वर्ग त्या आक्षेपार्ह सूचनेला विशेषसें महत्व न देतां, आपणांस पाहिजे तेव्हां हरताळ पाळील अशीच आह्मांला खात्री आहे.

रंग बदलला ! :— आपली व आपल्या कोस्तांतीन मिंयाची निवड व्हावी या हेतूनें ऐनवेळी सिं. प्राजेरीस द कोस्त

Ecos & Critica

Alerta!

Alguns amigos e dependentes do nosso Administrador sr. Antão estão promovendo uma representação ao sr. Governador Geral, pedindo-lhe a sua conservação à testa deste concelho.

Descobrindo a tempo a intrujice, o Povo do concelho dirigiu logo uma contra representação ao dr. Jaime de Morais, mostrando quão incompativel é o mesmo senhor, *incapaz delegado de saude*, com o referido Povo para administra-lo- *comme il faut.*

A nosso ver, o sr. Antão devia ser removido do seu lugar, há muito tempo, quando contra ele subiu uma representação com formidaveis acusações, representação que infelizmente se tornou a presa do sistema protecionista das regiões palacianas.

Agora, porem, a distituição urgente daquele funccionario se impõe. E o sr. dr. Morais tem de ordena-la já, se é que não quiser ver comprometer-se inda mais por causa do seu imcompreensivel feitio de querer estar bem com *Deus* e de não querer estar mal com *Demonio.*

Ou *carne* ou *peixe. Nem carne nem peixe*, isto é que não pode ser.

Virou a casaca...!

Tivemos á mão um numero do jornal metropolitano *A Manhã*. E sabem oque este diz apropósito do *presumivel* triunfo da *lista popular* ?

E' sem mais nem menos que o sr. *Prazeres* da *Costa* fez-se *democratico*, ele que, poucos minutos antes era *popular*.

O sr. Costa, como vem, virou pois a casaca de *popular* e meteu-se no capote *democratico* que hoje é governo. O triunfo não é-conclui-se-do dito sr. Costa, mas sim do...governo.

E aqui os seus amigos a cantarem *hosanas* á lista popular e... Mas esperem até á semana seguinte.

Dr. Venctexa Dessai

Este nosso presado amigo e digno representante das Novas Conquistas no Conselho Lègislativo conseguiu que o rigor da lei de selos, há pouco regulamentada, não abrangesse os *livros* dos templos hindus, *os* quais, se não fosse a oportuna interferencia daquele nosso inteligente vogal, no importante assunto, teriam de, a cada passo, arcar com dificuldades de varia ordem.

E' mais um relevante serviço que o sr. Dessai acaba de prestar ás N. Conquistas que porisso lhe estarão muito gratas.

O *Bharat* cumprimenta a sua exa. pelo seu referido acto de patriotismo.

Uma carta

Sr. Director do *Bharat.*

Peço a VExa um cantinho no seu apreciado semanario para as seguintes linhas:-

Lá por ai, ao fazer o epilogo das ultimas eleições para deputado e senador, vão escrevendo tanta prosa que, a dar ás palavras o seu sentido proprio e a tomar como serios os principios que se estabelecem, a conclusão a tirar seria uma afirmação falsissima que, convem, se rebata sem perda de tempo.

Referindo-se o jornal que faz esse epilogo, aos *Srs.* Hipolito de Souza, Vitu Neurencar. e Esvonta Colvalcar, diz que alguns hindus correligionarios destes ultimos colocaram-se ao lado do governo, produzindo a sua atitude tristissima impressão e que estavam eles entrincheirados atraz do governo e assim zombavam dos *populares* e tudo isso fizeram, porque por eles o governo teria mais consideração.

Sr. director! V. bem vê que estas afirmações, sem pés nem cabeça são uma imagem fiel do que são aqueles que escrevem para publico com os seus *fins* de que estão muito longe os hindus.[alguns no seu dizer]

Se pelo facto de os hindus terem apoiado as candidaturas adversas ás dos Srs. Prazeres da Costa e Constantino Santos, a sua atitude se pode dizer como sendo de tristissima impressão, qual é a ajectivação que se há de empregar para a atitude daqueles que sempre enxovalharam um nome prestigioso por todos os meios e modos, ao seu alcance, nome que desde certo tempo e progressivamente vem apoteosando ?

O publico leitor que é o mesmo e cujas crenças politicas ainda não mudaram nem *mudarão* dum momento para o outro, devido a este e aquele facto, que idea fará desses homens, escritores jornalistas e *leaders* populares que devem encaminhar a sociedade pela perseverança nas ideas e firmeza nas convicções?

Eu acho que a impressão será tristissima, palavra que levianamente foi dislocada para a atitude de alguns hindus correligionarios de dois presos politicos *dignos* e *altivos.*

Estavam entrincheirados atrás do governo para zombar...". é um outro disparate que é preciso repelir a toda a força. Os hindus nunca estiveram entrincheirados atraz nem estiveram armados em frente do governo como por ai é natural e de costume para fazer irritar o espirito publico com palavras bombasticas, pintando tudo com cores negras, para fazer o *efeito* que tem sido a ordem do dia.

Afinal, Sr. director! vem epilogar as afirmações falsas quanto a alguns correligionarios dos *dignos* e *altivos* dois hindus adulterando o seu gesto e dizendo que por estes correligionarios o governo não teria mais consideração.

Consideração ? é por causa desta palavra que por ai se lavra todo o movimento, le *fond en comble.* Os hindus nunca foram avidos da consideração de ninguem para os seus fins que por aquelas bandas tem feito uma conflagração geral. E aqueles que resistiam a essa conflagração por ser prejudicial ao paiz, querem nela ser abrangidos pouco lhes importando agora o prejuizo para o paiz, contanto que os seus celeiros se encham á cunha.

Sr. director não suponha V. que estas linhas tem por origem o prurido de provocações. Só tem em vista repelir fortemente afirmações falsas com que querem carregar as colunas dos seus jornaes.

Que impinjam adjectivações não so *dignas* e *altivas* mas ainda outras se quizerem !

Só reflitam quando analisam atitudes alheias.

Um hindu

N. da *R.*:- Sobre este assunto reservamos as nossas considerações para a seguinte edição do nosso jornal.

भारत

गुरुवार चैत्र व० ९ मी १८४४

पतितपरावर्तन

'भारत'च्या वाचकांस माहीत आहेच कीं, मडगांवच्या सारस्वत समाजांत वे. शा. सं एकसंभेकरशास्त्री यांचें 'हिंदुधर्म' या विषयावर व्याख्यान झालें होतें. या प्रसंगीं दे. केळकर यानीं अध्यक्ष या नात्यानें समारोपादाखल केलेल्या भाषणांत धार्मिक दृष्टीनें अत्यंत महत्वाचा असा एक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्याविषयीं गोमांतकीय पुढाऱ्यांस विनति केली होती.

उपरोक्त प्रश्न दुसरा तिसरा नसून पतितपरावर्तनासंबंधीच होता. या विषयाची चर्चा चालू असतांना, त्याला विरोध करणारी एकहि व्यक्ति आढळून आली नाहीं. खुद्द एकसंभेकर शास्त्रीनीं आपल्या मौन्यानें पतितपरावर्तनाला संमती दर्शविली. इतकेंच नव्हे, तर गोमांतकचे इतर लोकहि त्या विषयाला अनुकूलच आहे असें, आजपर्यंत तत्संबंधीं कोणतेहि विरोधात्मक उद्गार ऐकूं न आल्यानें; म्हणण्यास कसलाच पत्यवाय नाहीं.

करंबळी व चिंबेल या दोन गावांत नावानें खिस्ती पण कृतीनें निवळ हिंदु अशीं सुमारें ३-४हजार पतित स्थितींत खिचपत पडलेलीं माणसें आहेत. हिंदु शूद्र लोक जे आचार पाळतात तेच अक्षरशः त्यांकडून पाळले जातात; मात्र जन्म व लग्न या दोन बाबतींत ते खिस्ती पाद्रीचें व देवाचें दर्शन, संबंध आयुष्यांत, दोनदांच घेतात! या नांवाचे खिस्ती लोकांचें हिंदुधर्मांत परावर्तन झाल्यास हिंदूंचें नांव वाढणार आहे व जी आज हिंदुलोकसंख्या जवळ जवळ खिस्ती लोकसंख्येबरोबर आहे ती चटदिशीं वृद्धि पावून, हिंदूंचा राजकीय दराराहि त्यांच्या सामाजिक. बळानें, सरकारी दरबारांत व इतर समाजांत प्रसृत होणार आहे.

हेच फायदे लक्ष्यांत घेऊन, आम्हांला वाटते, दे. तात्यासाहेब केळकरानीं, पतितपरावर्तनाचा प्रश्न सोडविण्याची आवश्यकता येथील जनतेस भासविली होती. केळकरांच्या लोककल्याणकारक विनंतीस मान देणें हें अर्थात आमचें पवित्रतम कर्तव्य ठरतें, हें ओघानेंच सिद्ध झालें.

कित्येक महिन्यामागें सदरहू पतित लोकांच्या परावर्तनाच्या चळवळीस —ही चळवळ गोव्यांत सुरू झाल्यास आज अनेक वर्षें लोटलीं, हें नमूद करण्यास समाधान वाटतें--यशस्वी स्वरूप आणण्याच्या उद्देशानें, रायबंदरचे उत्साही व निःस्वार्थी तरुण रामचंद्र लवंदे व त्रिविक्रम येळेकर, यांच्या समवेत आम्हीं चिंबेल येथें जाऊन त्या समाजांतील पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्या होत्या. त्यावरून तेथील एकंदर पतित लोक हिंदु धर्मांत परत येण्याविषयीं फार उत्सुक आहेत, असें आम्हांस दिसून आलें. त्यांच्या परावर्तनाची चळवळ आम्हांकडून-- अल्पप्रमाणांत कां होईना? --चालू होतीच. तिला आतां केळकरांच्या शिफारसीमुळें जास्ती चलन मिळणार असून, ते पतित लोक पावन झाल्याचें पहाण्याचें भाग्य लवकरच गोमांतकीय जनतेस लाभेल, अशी आशा करण्यास मुबलक जागा आहे. पहावें काय होतें तें.

स्फुट विचार

हरताळ!:— हिंदुस्थानांतील 'राष्ट्रीय आठवड्या' विषयीं सहानुभूति प्रदर्शित करण्याच्या उद्देशानें, पणजींतील लहान मोठ्या एकंदर व्यापारी वर्गानें गेल्या १३ तारखेस हरताळ पाळून आर्यावर्ताच्या अभ्युदयाबद्दल सक्रिय कळकळ व्यक्त केल्यामुळें, भारत त्यांचें प्रेमानें अभिनंदन करीत आहे. निर्भयता व निःस्वार्थीपणा या देशहितोत्पादक गुणाची व्यापारी वर्गांत होत असलेली वाढ पाहून आम्हांस कौतुक वाटतें. हरताळानंतर लगेच व्यापारी लोकांना तेथील मामलेदार कचेरींत नेण्यांत येऊन, त्यांस हरताळाचीं कारणें विचारण्यांत आलीं व त्यानींहि न डगमगतां उपरोक्त मुद्याचा निर्भयपणें उल्लेख केला यापुढें केव्हांहि हरताळ पाळावयाचा असल्यास, आठ दिवसपूर्वी सरकारास सूचना द्यावी असें सांगून मामलेदार साहेबानीं त्यास परत पाठविलें.

'जन्मसिद्ध हक्क':— स्वराज्याप्रमाणेंच हरताळ हा जन्मसिद्ध हक्क असल्यामुळें, त्याची बजावणी पाहिजे तेव्हां करण्यास कोणालाहि कसलीच आडकाठी नाहीं, अशी आमची समजूत आहे. ह्या दृष्टीनें विचार केल्यास उपरोक्त मामलेदारी सूचनेची 'तिखट' अट अगदीं खुळचट असून, ती लक्ष्यांत घेण्यासारखी नाहीं, हें उघड होतें. अर्थात् आमचा निर्भय व्यापारी वर्ग त्या आक्षेपार्ह सूचनेला विशेषसें महत्व न देतां, आपणांस पाहिजे तेव्हां हरताळ पाळील अशीच आम्हांला खात्री आहे.

रंग बदलला!:— आपली व आपल्या कोस्तांतीन मित्राची निवड व्हावी या हेतूनें ऐनवेळीं सिं. प्राजेरीश द कोस्त

गोरक्षण

'गावः प्रतिष्ठा भूतानाम्'

गोरक्षण अवश्य करावें. कोणी धार्मिक दृष्टीनें व कोणी आर्थिक दृष्टीनें गोमातेची महती समजतात. स्वमाता, भूमाता व गोमाता अशा तीन माता सांगितल्या आहेत. हिचें दूध सर्व दुधांत श्रेष्ठ असून तें मृत्युलोकीं अमृततुल्य मानण्यांत आलें आहे. हें 'अन्नं वै गवां क्षीरमित्युवाच प्रजापतिः' ह्या वचनावरून सिद्ध होतें. रासायनिक शोधांतीं दुधांत केसीन [काजेइन-Caseine] साखर, चरबी व क्षार अशीं चार तत्वें भरलीं असल्याचें गाइया वाचनांत आलें आहे. दूध हें मांसोत्पादक आहे, ह्या कामीं केसीनचा उपयोग होतो. साखर ही शरीरांतील उष्णतेचा संग्रह करिते आणि ह्या उष्णतेचें संरक्षण चरबीकडून घडून क्षार हा रक्तशुद्धीचें काम करितो. म्हटलें आहे. 'देहस्य रुधिरं मूलं रुधिरेणैव धार्यते तस्मायत्नेन संरक्ष्य रक्तं जीव इति स्थितिः॥' म्हणजे 'देहाचें मूळ रक्त होय व त्यायोगें देह धारण केला जातो, तस्मात् यत्नें करून देहाचें संरक्षण करावें, कारण, रक्ताला जीव ही संज्ञा आहे' हा हेतु गोरसपानानें सिद्ध होतो.

गोरक्षणांत बैलाचाही समावेश होतो. पूर्वीच्या पंडितानीं गाई पालन केल्याच्या दशगुणित पुण्य बैल पाळण्यांत सांगितलें आहे. हें महत्व शेतकीच्या बाजूनें दिलें आहे हें सांगणें नको. वैद्यशास्त्राधारेंही शेण्याची किंवा गोरसाची मातब्बरी वर्णनीय असावी. धार्मिक दृष्टीनें निरीक्षण केलें तर गोमातेच्या देहावर सर्व देव व ऋषी प्रतिष्ठित झाले आहेत असें आढळून येतें. यद्विषयीं एक श्लोक आहे तो विस्तारभयास्तव देत नाहीं.

गोरक्षणाचे अनेक मार्ग आहेत. आज हिंदुपद बादशाही नसल्यामुळें सर्वत्र ठिकाणीं सर्वज्ञानां गाई पाळण्याचीं साधनें उपलब्ध आहेत असा अर्थ नाहीं. गाई पाळण्यास मनुष्यबलाची आवश्यकता आहे. मजूर वर्ग पांढरपेशांपेक्षां सुस्थवस्तु बनत असल्यामुळें द्रव्यद्वारा गडी माणसाकरवीं गाईची सेवा करवून घेणें तूर्तच्या कालांत कांहीं ठिकाणीं दुस्तर झालें आहे, त्यायोगें स्वहस्तें निगा शुश्रूषा करण्यास असमर्थ अशानां गोपालन करण्याची हौस पुरवून घेतां येत नाहीं.

गाई पाळणें हा उत्तम पक्ष. पालन न घडेल तर कोणत्याही सनाथ किंवा अनाथ गाईला शक्त्यनुरूप चारावरण घालणें किंवा अन्य तऱ्हेचा ग्रास देणें, तिला निवाऱ्याची आशा पाहणें, तिला त्रास देऊं पाहणाराचें निवारण करणें, कसायाच्या हातून सोडविणें, गावांतल्या गाईंना गोठण तयार करणें इत्यादि गोरक्षणेंचे अनेक मार्ग आहेत. एप्रील मे महिन्यांत कांहीं गावांत घासभर गवत मिळत नसल्यानें बहुतेक गाई इतस्ततः वणवण करीत हिंडत असतात अशांवर शक्य असेल त्यांनीं दया करणें हाही एक गोरक्षणाचा भाग असें मानिलें पाहिजे. आपापल्या गोरक्षणानें पुण्य पदरांत [illegible] पडण्यासारखें आहे. इंग्रजींतून फिरंगणास उतरून गोरक्षणाभिमानी [illegible] करून स्वदेशांत [illegible] [illegible] गोमातेस त्या [illegible] [illegible] झाला असता तर [illegible]

अप्रतिम असा प्रकार घडला असता. इंग्रजींत गोमातेची महत्तरता जाणणारे फार आहेत. येथें बाळकडू नव्यानेंच पाजावयाचें आहे खरें. तुमच्या गाईचें कांहीही होवो, गोरक्षणाच्या शिक्क्याखालीं आमच्या गोपालनास मदत करा, असें म्हणणारे परके नेते आपणाला नको आहेत. स्वतःच्या पायावर उभें राहण्याची शक्ति गोमांतकस्थांत भरपूर असतांही परक्यांचा आश्रय करून त्यांस श्रेय देणें कोणास कबूल असेल तें असो. शाळा स्थापन करण्यांस व गोरक्षणास हलवायाच्या घरावर ब्रह्मार्पण सोडणारे परके मिशनरी आपणाला भारभूत आहेत. तुम्हीं आम्हीं एक असें जरी कोणी दिलदार मनानें म्हटलें तथापि कंठाळीला गेल.ही असावयाचीच ह्याची विस्मृति होतां कामा नये.

एखादा फाजूगोळा चघळण्याच्या लालसेनें गरीब गाय काजूच्या वाडींत शिरली तर तिला दगडांनीं मारहाण करणें, दरवाज्यात धान्य वाळत टाकलें आहे त्यांतील घांसभर तिच्या पोटांत जाईल ह्या भ्रांतीनें रस्त्यानें चालताना तिच्या पाठीवर काठीचा गरम रट्टा लगावणें, दुतर्फा भुसारू मालाचीं दुकानें लागून गेलीं असतां क्वचित प्रसंगीं गाय धान्याच्या टोपली जवळ आल्याबद्दल जबरदस्त थपाड देऊन धक्काबुक्कीखालीं पळती-वाट पुरे करणें, असल्या कृतींना जोंपर्यंत आळा पडणार नाहीं तोंपर्यंत गोरक्षणाची कल्पना गोव्यांत अव्यवहार्य असजली पाहिजे. गांवांत नाटक कंपनी आली असून कंच्या [illegible] आठ आणे पैदा होतात अशी झळूक लागली कीं, वांद्राची उपासमार करून गाईचे आंचळ कोरडे ठणठणीत पाडणारे हरीचे लालही मिळूं शकतील. गोव्यांत सत्वस्वरूपी प्रावरणाचा फैलावा नाहीं असें नव्हे, त्याचा उपयोग करणारांची संख्या शेंकडा पन्नास आहे.

गोवध बंध करण्याची कल्पना नामी खरी, पण गोव्यांत असें होण्यास कालावधि लोटेल. पोर्तुगालांत प्रसिद्ध झालेल्या नीतितत्वाश्रित एका पुस्तकात असें म्हटलें आहे. कीं "Ha de levar muito tempo a corrigir êsse erro em que quasi todos estão de que a carne é um bom alimento" [मांस हें एक उत्तम भक्ष आहे अशी जी प्रायः सर्वांची समजूत आहे ही चूक सुधारण्यास दीर्घकाल लागणार आहे) अन्न आणि वनस्पति ह्यांचा आहार सात्विक परंतु मांसाहार तामसी, कीं ज्याच्या योगें मानवी प्राण्यांत क्रौर्य संचरतें, इतकेंच नसून त्यानें मांसभक्षक अगर सर्वभक्षक व्हावें असा मानल्याची देखील त्याची शरीररचना नाहीं असाही त्या पुस्तकांत उल्लेख आहे. तात्पर्य, गोरक्षणाचा पाया बहुधा 'दया धर्मका मूल है' ह्या उदार तत्वावर रचिलेला आहे, ही प्रत्येक निरक्षर माणसास जाणीव शास्त्याशिवाय व साक्षर असलेल्यानीं ह्या मूलतत्वांतील साराचें संशोधन करून त्यांतील मर्म त्यांच्या मनांत ठसावल्याशिवाय गोरक्षणाची गोष्ट आमच्या दिशेला अनुसारणीय आहे, तथापि, 'अन्ते: पुण्य धर्मत्वम.' सारस्वत.

—शेवटीं प्राजेरीस द कोस्त [illegible] [illegible] ताद व कोस्तातीन [illegible] [illegible] [illegible] लिहून आले !

महात्मा गांधींची कैद !

आर्या

(कवि— "लक्ष्मीरमण")

हरहर ! काय परिशिलें वृत्त अतां मी अनिष्ट कटुतर हें ॥
जणु श्रवणीं विष कोणी निर्दय हृदयें क्षणांत ओतावें ॥१॥
नांव जयाचें गाजे जिकडे तिकडे अफाट या जगतीं ॥
ख्याति जयाची गाती परजनही आदरा धरुनि चित्तीं ॥२॥
अंगिं जयाचे वसती सद्गुण स्वर्गीय लव न ती शंका ॥
कीं जे पाहुनि डोलुनि मोठे मोठे करीति कौतुका ॥३॥
वृत्ति जयाची सात्विक शांति अढळ ती बघोनियां साधू ॥
लाजोनि पुसेल मना कवण्या नामें ययासि संबोधू ॥४॥
सत्यास्तव सर्वस्वावरि सोडायास राजि जो प्राणी ॥
धर्मास्तव नीतीस्तव छलहालां खरहि किमपि ना मानी ॥५॥
ऐसा वीरप्रसू ही पुण्यवती फार थोर आर्यधरा ॥
पूज्य महात्मा मोहन गांधी प्रसवली खरा अमोल हिरा ॥६॥
दुःसह दुःखपीडिता सांप्रत बघुनी प्रसिद्ध भारत भू ॥
ताराया अवतरला गांधीरूपें तिरीसि खास प्रभू ॥७॥
मानिति ज्ञाते ऐसें आणुनि इतिहास ध्यानि अजवरिचा ॥
तें अद्भुत पामर मी म्हणुनी कवं कीवि कळस मोख्याचा ॥८॥
राष्ट्रीय संत हिंदी हा बंदित ठेवि आंग्ल सरकार ॥
अर्ध तयाचें शासन फर्मावुनि मानि धन्यता फार ॥९॥
हा अविचार अजय हा केवळ सत्तावलेंचि कीं केला ॥
सरकारें परि न्यायी प्रभुवर घेईल अचुक झाडतीला ॥१०॥
गांधीसम साधुवरा पिडुनी फल क्षुद्रहि न तें लाभे ॥
पदरीं पापचि सांठे त्यायोगें बहुत ईश्वर क्षोभे ॥११॥
साधू शाप लया ने आजवरीची प्रचीति ती ऐशी ॥
साधुकृपा जोडावी ती दित साधी हरी दुरितराशी ॥१२॥
कारागृहवासा या दीर्घावधिच्याहि मानि न महात्मा ॥
संकट, चिंति धरोली खचित असे हें स्वराज्य ओनामा ॥१३॥
संकटिं अल्लुनीं बोले मोहन बोलां तया नसे मोल ॥
शतवि त्यांहीं सकलां अर्थ तयांचा असे बहुत खोल ॥१४॥
परि शिक्षा ही ऐकुनि हळहळती भारतीय जन हृदयीं ॥
अंतरला षड्वर्षे मोहन वदुनीं पुढें गती काई ॥१५॥
नेता कोण अतां ही हिंदी जनतेसि लागली चिंता ॥
इच्छी गांधीतनुसी सुमकोमल राष्ट्र ती सुरक्षितता ॥१६॥
अस्तुः ईशसंकेतें राष्ट्रावरि हें अरिष्ट ओढवलें ॥
त्यांतुनि पार करिल विभु आळवितां तोचि अभिपूर्ण दिलें ॥१७॥
गांधीचरण सरोजा नमुनी प्रिय देशबांधवां प्रार्थी ॥
गांधीपंथ अनुसरा सुखद खरा तोचि जाणुनी ह्तीं ॥१८॥

— रा. वासुदेव बोडके, वसुदेव खांडेपारकर, पुरुषोत्तम शेट वेरेंकर व पुरुषोत्तम मुद्रत हे नॉर्मल स्कूलच्या शेवटच्या परीक्षेत पास झाल्याचें कळविण्यास आनंद वाटतो.

---

parentesco que unem o nosso director a Pundolica V. Virginacar, inibem-nos infelizmente de largos comentarios sobre a sua conferencia. Ficamos, por aqui, porisso.

Pois não!

A governação do sr. dr. Jaime de Morais não será lá de muito agrado do nosso Povo, por causa de constantes e impertinentes impostos que lhe foram lançados-ouve-se dizer.

Dir-se-há, porem, que o culpado de tudo aquilo é o sr. Prazeres da Costa cujos disatinos obrigaram sua exa. á pratica doutros tantos para o equilibrio financeiro.

Quanto a nós, nem o sr. dr. Morais nem o dr. Costa tem culpas do aumento de impostos. Culpado é o sr. ...proprio Povo que teve a desdita de nascer numa terra em que se vive para morrer infeliz ou morre-se para viver feliz só... noutro mundo.

Culpado ? E' ele, o Povo !

Verdadeiro significado

Até que finalmente o sr. Prazeres da Costa ganhou a *partida* eleitoral, o que quer dizer que o Paiz perdeu uma boa ocasião de lhe pregar a lição...legal.

Doutro lado gostamos que a Comissão de Verificação dos Poderes desse por *verificada* a eleição do dito sr. dr. Costa porque do contrario haveria, cá e lá, muita lagrima de... crocodilo... branco e preto e preto e branco.

Viva, pois, o sr. Prazeres! Viva a sua Auditoria !! Vivam os seus decretos de aumento !! Viva o seu Instituto Comercial !!! Viva o seu Liceu Central !!!!! Viva, por fim, toda a asneira que fez !!!!!

E tambem o sr. Constantino seu *menino...doulho*.

Novos professores

Completaram o curso normal os srs. Vassudeva S. Bodcó, Vassudeva Sinai Candeaparcar, Puxotoma Xete Verencar e Puruxotoma Mudroto.

Conhecemos estes bons rapazes, sobretudo os nossos prestimosos amigos. Bodcó e Verencar e porisso podemos afirmar que os novos professores saberão desempenhar a sua tão alta quão util missão de preparar cidadãos prestantes á Patria que muito precisa deles.

Nossas calorosas felicitações.

Fogo contra jogo

A proposito da local contra o jogo de azar de Mapuçá recebemos as seguintes informações:

—Que o lucro, proveniente da *permissão* do jogo é distribuido entre o regedor Nazaret e o agente policial Castelino, alem do *senhor*, referido na edição passada.

—Que na *pousada* duma Bhagú é que se joga, todos os dias e todas as noites.

—Que os srs. Filipe José da Gama Botelho, João Ferreira e varios outros cavalheiros de respeitabilidade desejam ver limpa do maldito mal a vila de Mapuçá, inutilmente...!

Levando isto e mais o que ficou dito no numero transacto do *Bharat* ao conhecimento das autoridades competentes, pedimos-lhes:—

—Que sejam chamados á responsabilidade os protectores do jogo.

—Que seja fechada a tal *pousada* da Bhagú que se tem transformado em um verdadeiro antro da imunda jogatina.

Basta, por hoje, porem.

Em Mormugão

A festa de 29 de Março comemorativa da instalação da Comissão de Melhoramentos revestiu-se de extraordinario brilhantismo, graças aos tenases esforços do sr. Maravilhas que tem posto todo o seu cuidado na importante obra de levantar Mormugão, sob todos os pontos de vista, o que é para louvar.

Conforme nos transmitiu o nosso representante, cumpriu-se á risca o programa da referida festa, tendo evidenciado a sua incomparavel competencia, incontestavel actividade e superior inteligencia na organisação do serviço de autos o sr. Vinaeca Sinai Karcornim que teve palavras de elogio por parte de altos funcionarios que assistiram aos festejos da Comissão.

Os referidos festejos dão-nos ensejo para felicitarmos o sr. Maravilhas pela escolha do sr. Narcornim e este porque soube honrar o nome da classe a que pertence.

Uma recompensa

Pelos seus numerosos amigos e admiradores foi oferecido em *Margão* ao sr. Madeva Caculó, nosso prezado amigo e um dos importantes *leaders* da nossa classe, um copo de agua, como testimunho do apreço em que é tido o relevante serviço que Madeva Caculó está prestando com exemplar desinteresse e patriotica dedicação á classe hindu e ao Paiz.

Brindou do distincto homenageado o sr. Xambarau Sardessai que produziu um improvisado, entrecortado por frequentes apoiados.

Embora tarde, associamo-nos á manifestação dedicada a Caculó em quem estamos habituados a ver um cidadão de valor e de grandes merecimentos.

Pezames !

Muitos amigos nossos vieram dar-nos sentidos pezames pelo triunfo da chamada *lista popular*.

Com agradecimentos os aceitamos, porque o caso não é para outra coisa, dada a disgraça que o Paiz terá que sofrer com a eleição de tal lista popular.

Mas esperemos

वर्गणीदारांस सूचना

ज्यानीं अजून वर्गणी पाठविली नसेल त्यानीं तिची चालू महिन्याच्या १५ तारखेपर्यंत फेड करून आम्हांस आभारांत ठेवावें अशी सूचना आहे. या अवधींत ज्यांकडून वर्गणी न येईल त्यांस 'भारत' बंद केला जाईल.

वर्तमानसार

—असोळणें येथें सालाबादप्रमाणें यंदा शिमग्याचा उत्सव साजरा होऊन संत तुकाराम नाटक चांगलें झालें. विशेषेंकरून तुकारामाचा पार्ट घेणारे रा. रा. रामगोपाळ शेणवीं कैसरे यांनीं आपलें काम उत्तम रीतीनें बजावून हजारों प्रेक्षकांकडून शाबासकी मिळविली इतर बाहेरगांवच्या नाटक कंपन्यापेक्षांहि उत्तम काम करणारे तरुण गोव्यांत आहेत असें रा. कैसरे यांनीं लोकांच्या निदर्शनास आणिलें, असे एक प्रेक्षक लिहितात.

—पैत्या अंकांत मडगांवच्या सारस्वत ब्रा. समाजाच्या १० व्या वाढदिवसोत्सवाची राहिलेली माहिती सविस्तर प्रसिद्ध होईल.

—म. गांधींना किरकोळ कैद्याप्रमाणें वागवीत असल्याचा बोभाटा झाल्यावरून हिंदुस्थानांतील असंतोष वाढतच आहे !

—गांधी-टोपी प्रकरणामुळें 'भारता' विरुद्ध भरण्यांत आलेला खटला चालूच आहे !

ANUNCIO

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1.° oficio Lobo, correm editos de trinta dias, a contar d dia da segunda publicação deste citando a executado Subodri Porbina viuva de Nilconta Balcrisna, Porobo de Loliem, e ora ausente em Cuntá de India Ingleza para no praso de dez dias findos os referidos trinta dias, pagar a requerente Anta Vamona Porobo, morador da mesma de Loliem a quantia de 6622 : 7 ; 00 proveniente do remanecente contra ela liquidada nos autos da execução hipotecaria que o dito Antá, como subrogatorio do exequente Naraina Zoirama Naique de Camorlim de Bardez, e morador de Loliem, lhe move, ou dentro do mesmo praso nomear bens suficientes á penhora para o pagamento da referida quantia e de custas e selos arrecidos da execução, sob pena de, não o fazendo, ser a nomeação devolvida ao dito requerente Antá, seguindo a execução seus termos á revelia. O que para ser publico se expediu esse. Quepem 18 de Março de 922

O escrivão de direito de 1 ofi.
Manuel Jose Sebastião Lobo
Verifiquei
O juiz de direito
Julio de Seabra

भारत
गुरुवार चैत्र व० २ शा १८४४

स्वदेशाश्रित आचार

सार्वजनिक काकांच्या अमदानींत बीजरूपांत असलेल्या स्वदेशी चळवळीस १९०७ सालीं भरलेल्या राष्ट्रीय सभेंत लहानग्या झाडाचें स्वरूप प्राप्त होऊन, आज या झाडाचा गगनचुंबीत वृक्ष बनू पहात आहे. मध्यंतरीं हरेक कारणामुळें संदरील झाड कीमेजूं पहात होतें हें खरें, परंतु म. गांधींच्या आत्मिक जीवनाचा त्यावर अप्रतिबंध वर्षाव झाल्यावरून त्याला नवपालवी फुटून, तो सांप्रत प्रफुल्लीततेच्या आनंददायक वैभवांत नांदत आहे.

स्वदेशी चळवळीचें महत्व किती थोर आहे, हें सिद्ध करण्यास तिचा परोक्ष इतिहासच पुरे आहे, अर्थशास्त्राचा गहन व जाड्या सिद्धांतांची त्याला आवश्यकता नाहीं. इतिहास म्हणजे एका अर्थानें अनुभवच. व जी गोष्ट अनुभवानें सिद्ध ठरते, तिला आपलें श्रेष्ठत्व खुलविण्यास तत्वज्ञानाची मदत नको आहे, हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे.

हिंदुस्थानचें अंतीम ध्येय स्वराज्य हें आहे. आज ना उद्यां केव्हां तरी हिंदुस्थान स्वतंत्र झाल्याखेरीज रहाणार नाहीं. असें जरी असलें तरी तें स्वराज्य होतां होइतों अल्पकालांत हस्तगत होण्यास तसेंच एकदां तें प्राप्त झालें म्हणजे कायम-दीर्घ काल टिकण्यास त्याला स्वदेशीचीच जोड पाहिजे. स्वदेशीशिवाय स्वराज्याचा लाभ अल्पावधींत होणें कदापिहि शक्य नाहीं. व यदाकदाचित झालाच तर त्याची गोड व रसाळ फळें चाखण्यास पुष्कळ काळ लागणार नाहीं असा त्रिकालाबाधित सिद्धांत आहे.

म. गांधी जे आज आम्हांस खादी वापरण्यास कंठरवानें बजावीत आहेत त्याचें मर्महि उपरिनिर्दिष्ट सिद्धांतांतच आहे. शिवाय खादीचा स्वीकार करणें म्हणजे साधेपणाचेंहि तत्व पटल्याचें कबूल करणें होय. साधेपणा हा सात्विकवृत्तीचा पोषक असल्यानें त्यामुळें तामसवृत्तीचा लोप होऊन, हिंदुस्थान सत्वगुणप्रधान बनणार आहे. याहि दृष्टीनें स्वदेशी चळवळीची योग्यता अत्युच ठरते, हें विसरतां कामा नये.

अशा या श्रेष्ठतम चळवळीकडे यापुढें दुर्लक्ष करणें आमच्या माणुकीस शोभेल काय ? स्वदेशांत उत्पन्न होणारा पवित्र माल लाथाडून, परदेशांतून येणाऱ्या अपवित्र वस्तूंत आमचें देह व घरें गुरफटून घेणें यापुढें क्षम्य होईल काय ?

म्हणून गोमांतकीय नागरिकानीं स्वदेशीचीच उपासना करणें योग्य आहे. स्वदेशीच त्यांना खऱ्या व अस्सल स्वदेशी स्वराज्याचा लाभ करून देणार आहे. स्वदेशीमुळेंच शेवटीं त्यांनां परमार्थाचेंहि खरें सुख उपभोगण्यास मिळणार आहे. तेव्हां स्वदेशीनिरत आपल्यांस न...

आश्रयदात्यांस—

नवीन छापखान्याच्या उभारणीचें काम अत्यंत खटपट केली असतांहि अजून पुरें न झाल्यावरून प्रस्तुतचा अंक जुन्या स्वरूपांतच प्रसिद्ध होत आहे. नूतन व्यवस्थेचा योग्य जाम बसेपर्यंत कदाचित् आणखीं एक दोन अंक याच स्वरूपांत प्रसिद्ध करण्याचा प्रसंग आह्मांवर येईल.

श्रीनवदुर्गा शाळा

मडकई

वरील शाळेची स्थापना शके १८४३ ज्येष्ठ शु॥ ११ दशी तारीख १ माहे जुलै सन १९२१ शुक्रवार रोजीं करण्यांत आली ही मराठी शाळा 'श्रीनवदुर्गेच्या' भांडा-रांतून चालविली जाते.

आमच्या गोमांतकामध्यें हिंदु देवाल-यांतून स्थापन केलेली ही पहिलीच शाळा होय. अशीं उदाहरणें ख्रिश्चन देवालयांतून मात्र आढळून येतात. बहुतेक ते आपल्या जातभाईकरितां चर्चमधून मुलांस प्राथमिक शिक्षण देतात, हें मशहूर आहेच. असें असूनहि आमच्या समाजाची मात्र तिकडे नजर जात नाहीं, ही खेदाची गोष्ट. आह्मी ह्मणत असतों कीं, अवघ देवाच्या भांडा-रांतून पैसे काढून शाळा स्थापणें ह्मणजे निंद्य कृत्य आहे, असा आमचा गैरसमज आहे. कारण आमच्या मनावर असाच मूक परिणाम झालेला दिसत आहे कीं, आह्मी मुलांचे आईबाप. तेव्हां मुलांस दे-वाच्या पैशांतून कां शिक्षण द्यावें? दे-वाच्या पैशांतून चैन करायाची आह्मी. तें सोडून शिक्षण द्यावयाचें ह्मणजे काय?

परंतु ख्रिश्चन समाजाची मात्र अशी स्थिति नाहीं. ती आमच्या उलट आहे. याचें कारण त्यांचा बहुतेक कल असतो शिक्षणाकडे, वरून कोणत्याहि बाजूनें कां होईना, शिक्षण मिळालें ह्मणजे झालें. आ-मच्या समाजाची केव्हांना केव्हां तरी 'इ-कडे आड तिकडे विहीर' ह्या ह्मणीप्रमाणें फजिती व्हावयाचीच, कारण आपल्या हा-तांतून तर शिक्षणाकरितां पैसा द्यावयाचा नाहीं. नहून कोणत्याहि बाजूनें तो मिळणें शक्य असल्यास तोहि मिळूं द्यावयाचा नाहीं अशी आमची मोठी महत्वाकांक्षा असते. परंतु ह्लीं विसाव्या शतकाच्या एक विसाव्या वर्षांपासून आमच्या तरुण पिढीनें प्रयत्नाचा नांगर हातीं धरिलेला आहे. कर्मण्येः वाधिकारस्ते॥ मा फलेषू कदाचिन्। या उक्तीप्रमाणें प्रयत्न करणें हें तरुणाचें कर्तव्य आणि यश देणें हें ईश्वराचे आधीन आहे. आमचा समाज जर योग्य वेळीं कर्तव्यास जगला नाहीं तर ईश्वरानें आह्मांस काय ह्मणून सुख द्यावें. तरी अशी परिस्थिति असूनहि आमच्या ग्रामबंधूंनीं खटपट करून व श्रम घेऊन सर्वानुमतें एक मराठी शाळा स्थापन केली, हें एक मोठें 'श्रीनवदुर्गेच्या' कृपेचें फळच मी समजतों.

ह्या शाळेच्या खर्चाकरितां वार्षिक वेतन दोनशें रुपये श्रीच्या भांडारांतून मिळावे अशी महाजन मंडळीनें मागणी केली होती. त्याप्रमाणें 'ह्याईस गव्हर्नर जनरल' यांज-कडून सुद्धां [आवतोरिजासांव] मुभा मि-ळाली.

या शाळेबद्दल ज्यानीं ज्यानीं ह्मणून प्रयत्न केले आहेत किंवा आपलें कर्तव्य ह्मणून बजाविलें आहे त्या सर्वांचा मी आ-भारी आहें. त्याच प्रमाणें श्रीसंस्थानच्या कमिटीचे मेंबर्सहि आभारी आहेत.

सध्या या शाळेची स्थापना श्रीच्या अ-ग्रशाळेंत झालेली आहे, तरी सर्वांच्या मताप्रमाणेंच नवीन इमारत चांगल्या ह-वाशीर जागेंत बांधण्याची खटपट करण्याचें श्रेय संपादन केल्यास पुष्कळ अडचणी व गैरसोई दूर होतील.

दुसरें—गोमांतकांत पुष्कळ नावाजलेलीं देवस्थानें आहेत. तरी अशा तऱ्हेच्या शाळा देवस्थानाच्या भांडारांतून महाजन मंडळीनीं स्थापन करून प्राथमिक शिक्ष-णाची गैरसोय दूर केल्यास बरें होईल. कारण, ब्रिटिश हिंदुस्थानांत प्राथमिक शि-क्षणाची पुष्कळ खटपट चाललेली आहे. परंतु आमच्या गोमांतकांत मात्र शिक्षणा-संबंधीं अतिशय हलगर्जीपणा चाललेला आहे. अल्ला देईतर खाटलेपर खाई' या मुसलमानी ह्मणी प्रमाणें, आह्मी स्वस्थ पडून राहिलों आहों, खडबडून जागे होत नाहींत. तरी ज्यांच्याकडून ज्या ज्या रीतीनें शिक्षणसंबंधीं खटपट करण्याचें होत असेल त्यांनीं त्यांनीं अवश्य खटपट करावी. कारण, 'जीवित संरक्षणानंतर शिक्षण हीच जनतेची पहिली गरज होय' या वाक्याप्रमाणें शि-क्षणाची बाजू आज मोठी आहे.

पूर्वी वडीलांचें मत असें होतें कीं, दे-वाच्या पैशांतून अन्नाचीं सदावर्तें घालावीं कारण त्यावेळीं तशीच परिस्थिति होती. परंतु आजची परिस्थिती विद्येचीं सदावर्तें घालण्याची आहे कारण परिस्थिति येईल तसें समाजानें वागणें हें योग्य आहे. सर्व परिस्थितीवर अवलंबून असावयास पाहिजे हें सर्वांनीं ध्यानांत ठेवावें.

केव्हांहि झालें करी कसलीहि चळवळ करण्यास तयार झालों ह्मणजे अडचणीहि तयार असतात. पण यश संपादन केल्या-शिवाय राहूं नये. चांगल्या चळवळी कर-ण्यास आपण पुढें सरसावलें तर नाना तऱ्हेचे अडथळे हे येतातच ह्मणुन आपल्या समाजानें माघार घेता कामा नये. मात्र त्या चळवळी समाजहितासाठीं असाव्या नाहींत तर आपल्या स्वतःच्या हितासाठीं क-रून मोठा भपका आपला तर शेवटीं फसून जाण्याची पाळी यावयाची, हें पूर्ण ध्यानांत ठेवून कसल्याहि चळवळींत पुढाकार घे-तलेला बरा.

मडकई ता. २१ मार्च १९२२

रामचंद्र लक्ष्मण नेवरेंकर

—श्री. दुर्गाबाई फोंडेकर या सुईणीच्या कोर्साच्या पहिल्या वर्षाच्या परीक्षेंत पास झाल्या.

इतस्ततः

स्वागतः— भारतानें सहाव्या वर्षाची कारकीर्द आटोपल्यामुळें दीप्तिमंत सहस्र रश्मीप्रमाणें सातव्या वर्षात तें आज प्रका-शमान होत आहे त्याबद्दल 'स्वागतम्-सुस्वा गतम्' असें ह्मणून त्याचा गौरव करितों. आढावा काढला असतां त्याचें प्रगमन-शील पाऊल आहेच असें ह्मणावें लागतें. मायदेशाची स्थिति सुधारण्यानिमित्त चाल-लेले त्याचे दीर्घ प्रयत्न फलद्रुप होवोत. Perseverança— पेर्सेवेरांस ज्यास इंग्र-जींत पर्सिवीरन्स व मराठींत चिकाटी ह्मण-तात तें भारतांत मूर्तिमंत वसत आहे. नि-श्चित कार्य घडवून आणावयाचेंच अशा मनोनिग्रहानें भावी संकटास तोंड देऊन विनदिक्कत ह्मटत असणें व तें सिंहाच्या गुणलक्षणावरून तशीस नेऊं पहाणें त्या-लाच माझ्या मतें चिकाटी असें मी समजतों. चिकाटीचें तत्व देशभक्तांत वसत असतें. चिकाटी नाहीं तेथें देशभक्तीचें प्रमाण कमी. अशा चिकाटीनें देशसेवा करणाऱ्या भारताचें अभिष्ट चिंतून त्याच्या आयुरा-रोग्य वृद्धिसाठीं परमेश्वरापाशीं अनन्यभावें प्रार्थना करावी हें श्रेयस्कर आहे. शुभं भवतु.

गोरक्षणः— नुसत्या गाई पाळल्यानें गोरक्षण होतें असा भाग नाहीं. यद्विषयीं मतभेद आहे, तो स्वतंत्र लेखानें व्यक्त व्हावयाचा. कांहीं देशबांधवांस स्वदेशांतील गाईंची उपेक्षा करून परदेशांतील गाईंची कींव वाळगण्याची अलीकडे कोणी गुद-गुल्ली दाखविली आहे, त्या योगें "घेर नोछोकरो घटी चाटे, ने पडोशीनें आटो आपे" (स्वत: घरचें लेंकरूं जात्यास चिकटलेलें पीठ चाटित बसतें, कारण दळ-लेलें पीठ शेजारच्ये घरीं देण्यांत येतें) अशी स्थिति झालेली आहे. जेथें गोरक्ष-णाचा ओनामा मुळींच झळकत नाहीं ते-थील गाईंची निगा पहिल्यानें व्हावयाला नको काय!

वाहतुकीस गाईः— बार्देस प्रांतां-तील ख्रिस्ती गोणींवाले सदयदृष्टीचे असल्यानें वाहतुकीच्या कामीं बैलांप्रमाणें उदारपणानें गाईच्या पाठीवर मालाचीं पोतीं लादतात असा कोणी कोणी गवगवा करितात. कोणी वाली असल्यास Despaches de ex-portação temporária च्या आधारें तपास करून ह्याचा त्यास मोबदला देणें अवश्य होतें. त्वरीत फळ देणारें हें गोर-क्षण आहे.

देशी साखरः स्वदेशीच्या भक्तांस देशी साखरही हवी असेल. देशी साखर वापरा हो वापरा असें परोपकार बुद्धीनें सांगणारांना त्या साखरीचा पुरवठा करण्यास उत्तम संधि आहे. ' शुभस्य शीघ्रम्'.

डोइपट्टीचा प्रभावः— सवासहा आ-ण्याच्या डोईपट्टीमुळें आर्य-गावांतील बरह-द्दीवरील कापडाचीं दोन दुकानें सांखळींत प्राप्त झालीं, तिसरें दुकान फिरतें बनलें. ह्या पासून कोणाचा फायदा तर कोणाचा तोटा झाला. कोणी ह्मणतात कर दूर झा-ल्यास हीं दुकानें पूर्वस्थळीं जातील. तूर्त गिऱ्हाइकांचा तांडा त्या दुकानांपुढें असतो खरा.

उद्योगः—'उद्योगःखलु कर्तव्यम' खरें आहे. उद्योग अवश्य करावा. पण त्यांत नेकीचा अभाव असल्यास तो गिऱ्हाइ-कांच्या गळ्यास फांस होय. गिऱ्हाइकांच्या निढळावर अन्यायानें सोळांचे सत्तीस आणे करणें हा अधमपक्ष असें मी समजतों. बाजारभावांत तेजी झाली व सोळांचे दु-प्पट आणे फायदा होण्याचा योग आला तर ती गोष्ट निराळी, त्यांत कोणाचा ह-रकत नाहीं.

नशीबः—नशीब ह्मणजे झूट, उद्योग हा नशीबाचा कारागीर आहे, प्रयत्नांपुढें नशीब लंगडें असें कोणी ह्मणतात, परंतु उद्योगांत अहर्निश रमून काळ्याचे शुभ्र केश झालेल्यानां विपरीत दुर्दशेपुढें हात टेकावे लागल्याचीं अनेक उदाहरणें आ-हेत. फिरून बस्त करून पाहण्याच्या ईर्षेस पेटल्यामुळें विकट परिणामाचीं फळें चा-खावीं लागलीं आहेत. काळ प्रतिकूल अ-सला तर मनुष्याची मति कुंठित व्हाव याची असें माझें अनुभविक मत आहे. तरी 'का-लाय तस्मै नमः'.

स्वपरहितः—येगोइस्म Egoismo आणि आलत्रुइस्म Altruismo अशीं दोन भावें आहेत पहिल्याच्या होळ्यांत स्वहित तत्परता तेवढीच सलते व दुसऱ्याच्या मनांत परहित निष्ठा वास्तव्य करिते. Pri-meiro são dentes e depois pa-rentes ह्मणजे अगोदर स्वतःचें हित ब-घावयाचें व मागाहून परहित ही जगाची रूढी बलवत्तर आहे. तरी पण पराचा तोटा न करितां स्वतःचें हित साधावें हा राज-रोस मार्ग आहे. स्वार्थ साधून परार्थ सा-धणें हा मार्ग आक्रमण करण्यापासून दोष नाहीं, पण स्वार्थासाठीं परार्थ न पाहणें हें सर्वथैव त्याज्य आहे, हा उद्योग नव्हे.

डि. फं. ४ आणे सारस्वत

—दे० नरसोपंत केळकर यांस श्रीसर-स्वतीसेवकमंडळाकडून थाटाचें पानसु-पारी देण्यांत आली. या प्रसंगीं तात्यासा-हेबानीं त्या व गोमांतकांतील इतर संस्थांचे मराठी भाषेचा अभिमान कायम राख-ण्याचा प्रयत्न करीत असल्याबद्दल अभि-नंदन करून, मडगांवच्या हिंदुसमाजांत सार्वजनिक कामांत दिसून येत असलेले मतभेद नाहींसे होऊन त्यांत ऐक्य नांदावें अशी इच्छा प्रदर्शित केली. या अधिकारी सदुपदेशाचा तरी परिणाम होईल काय!

com severo castigo áquele ou áqueles que a estão fomentando Jogo de azar ?! Fóra com ele !

Na semana seguinte trataremos do assunto, mais de espaço.

Digam lá !

Os leitores devem estar lembrados de que fôra para India Britanica a fim de proceder ao estudo de poços tubulares uma comissão, nomeada pelo nosso governo. Esta comissão conforme a portaria que a criou tinha de prestar o seu relatorio no praso de 40 dias, após o seu regresso a Goa.

Está já em poder do governo este relatorio ? Que o publique então no *Boletim oficial*. Se, porém, ainda, não tiver sido cumprida a mesma obrigação pela mencionada comissão, sejam os membros da mesma obrigados a repôr, nos termos da citada portaria, o dinheiro que deve ter-lhes sido abonado.

Digam lá o que é que tem havido sobre este assunto que a imprensa tem o legitimo direito de saber como é empregado o produto do suor de seu sangue. Digam lá, pois!

mais ou mênos, foram nas alturas da igreja de Raia e em plena estrada barbaramente espancados os srs. Xembú A. Poi Palondicar, digno contador distribuidor da comarca de Salcete, o seu referendario Ladu Sinai Nagarcencar e Ramachondra Visnum Quenim, conhecido negociante da vila de Margão, tendo tambem sido molestado ligeiramente na testa o sr. Zoivonta Sinai Carapurcar, conceituado escrivão do juiso de direito da mesma comarca.

Os autores do atentado, autenticos bandidos que ora estão nos ferros da Republica, graças ás medidas energicas, tomadas pelo activo e zeloso administrador do concelho sr. Soares, substrairam ao sr. Quenim, não satisfeitos com os maustratos que lhe infligiram, algumas joias de valor.

Como é natural à chegada de primeiros rumores do terrivel crime a Margão-terrivel pela situação do lugar onde foi cometido, terrivel pela qualidade de pessoas a quem diz respeito e finalmente terrivel pelas suas consequencias–acorreram para o teatro do sinistro acontecimento centenas de pessoas, procurando noticias dos ofendidos.

Consta-nos que o regedor da aldeia conhecia os meliantes mas como os temia não se atrevia a persegui-los. E foi preciso que se desse aquele crime para ficarem catrafilados !

Vem males para o bem, diz um ditado. Do mal que incomodou os ilustres hindus, mal que deveras sentimos, de resto, veiu o bem de ficar livre a aldeia Raia e outras circunvisinhas do constante pesadelo do banditismo feroz.

Sentindo o contratempo por que passaram os cavalheiros ilustres, já referidos, desejamos-lhes pronto restabelecimento de seus incomodos.

Aos [leitores do Bharat]

Apesar de incançaveis esforços do nosso director, nao foi possivel imprimir-se a presente edição na nova maquina, sendo provavel que este impedimento se estenda ainda para mais um ou dois numeros, pelo que pedimos mil desculpas aos nossos amaveis leitores.

Ve-se pois, que nem sempre o esforço e' coroado do exito que se deseja.

De remissa.

O sr. director das Obras Publicas tivemo-lo sempre na conta de um funcionario activo, zeloso e fiel cumpridor de deveres, inerentes ao seu alto cargo.

Desejamos que se confirme este conceito, porisso que estamos a receber cartas, denunciativas do facciosismo pouco louvavel do sr. Amorim, cartas que por enquanto não pretendemos trazer á luz de publicidade.

Gandhismo

O infausto acontecimento que durante o nosso descanço, enluteu a alma do *Bharat* foi a despotica prisão do *Mahatmá Gandhi*, condenado a prisão de 6 anos.

Consola-nos, porem, a marcha vertiginosa que está seguindo o Gandhismo, arrostando intemeratamente as perseguições da burocracia britanica.

Um crime grave !

No dia 19 do mez p. f., pelas 18 e meia horas, pouco

Aos assignantes

Tenham a bondade de, até ao dia 15 do corrente saldar os seus debitos por via postal ou qualquer outra que lhes estiver ao alcance, prevenindo que expirado o mesmo praso ser-lhes-há suspensa a remessa do *Bharat*.

Edital

O Doutor Julio Martins Lobo de Seabra, juiz de direito da comarca de *Quepem*. Faço saber que pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2 oficio que este subscreve, vão ser vendidos em hasta publica, á porta do tribunal judicial da comarca situado na rua de Deão em Cusmane, no dia 7 do seguinte mez de Abril, ás 10 horas e pêlo preço superir ao da avaliação os seguintes bens:– Predio denominado 'MOTO' da cultura de coqueiros, arvores fructiferas e de terra de semeadura de arroz. – Predio denominado ATAMOTO por outro nome DESSAIBAGA da cultura de coqueiros e outras arvores e em que existe uma casa de morada, ambos sitos em Parodá, avaliados em 2800 rupias e 700 rupias e discritos na conservatoria do registo predial desta comarca sob os numeros 2960 e 5600 respectivamente, penhorados nos autos de execução hipotecaria instaurada, pela Junta Paroquia da igreja de Parodá contra Uá por outro nome Irabai vulgo Locximin Quenim, viuva de Xanum Fotu Quenim, por outro nome Botaporo e como mãe administradora do seu filho menor Ramacrisna Xanum Fotu Quenim vulgo Mortu residente em Sanvordem. Para esta arrematação são citados todos os credores incertos dos ditos executados bem como os co-proprietarios e quinheeiros nos termos e para os fins de lei, sendo que a contribuição de registo por inteiro correrá a cargo do arrematante. Para ser publico se espediu este.

Quepem 13 de Março de 1922

Vai colado selo de cem reis em uma estampilha. E eu escrivão *Aires Manuel Barreto* o escrevi a maquina e subscrevi

Julio Martins Lobo de Seabra

Aires Manuel Barreto

भारत

गुरुवार चैत्र शु० ९ मी १८४४

'भारत हमारा देश है'

दुसरीकडे प्रसिद्ध केलेल्या दे० केळकर यांच्या भाषणाच्या सारांशावरून गोमांतकचें ध्येय काय असलें पाहिजे हें उघड होत आहे. भूगोल, संस्कृति व मनःस्थिति अशा त्रिगुणात्मक संबंधानें हिंदुस्थानशीं एकजीव बनलेला आमचा गोमांतक केवळ राजकीय भिन्नत्वामुळें निराळा होऊं शकत नाहीं, हा सिद्धांत आतां तरी आमच्या विरोधी मित्रांस पटेल, अशी खात्री वाटते.

मागील एका लेखांत 'भारता'नें उपरोक्त ध्येय स्पष्ट शब्दांनीं आपल्या वाचकांसमोर मांडलें होतें; परंतु बेमुर्वत पणाची होळी पेटविण्यांत धन्यता मानणाऱ्या कांहीं महाशयांनीं त्याला नाकें मुरडून आमच्या तारतम्यज्ञानाच्या अभावाबद्दल कीवदि करण्यास कमी केलें नाहीं ! याच विरोधी लोकांपैकीं कांहींनीं आतां दे० साष्टासारख्यांच्या उल्लेखित व्याख्यानास टाळ्या पिटून, अप्रत्यक्ष रीतीनें कां होईना, 'भारता'नें व्यक्त केलेल्या ध्येयाला आपली पसंती दर्शविली, ही फार समाधानाची गोष्ट होय.

पण 'ध्येय ठरलें, आतां स्वस्थतेनें त्याला मूर्त स्वरूप आणण्यास योग्य मुहूर्त पाहून सवडीप्रमाणें करूं' असें म्हणून मात्र ऐषआरामांत व ख्यालीखुशालींत काल कंठणें कामा नये. 'भारत हमारा देश है' हें वाक्य रुचें हें डोळीं आम्हांस लागू होण्यास जे अडथळे व ज्या अडचणी आड्व्या येत आहेत त्या शक्य तितक्या लवकर निर्जीव करण्याकरितां पुढें सरसावलें पाहिजे. तरच ध्येय मान्य झाल्याचें सार्थक. व्यर्थ वडवड व निरर्थक खुबखुब काय कामाची ? त्याला 'बाताच्या वमना' पेक्षां लस्ती महत्व असेल असें आम्हांस वाटत नाहीं. समर्थांनीं म्हटलेंच आहे: क्रियेवीण शब्द ज्ञान । हे तों श्वानाचें वमन । भले तेथ अवलोकन कदापि न करती ॥.

स्वदेशी व्रत तर आचरण्यास आतां तातडीनें लागलें पाहिजे. उपरिनिर्दिष्ट ध्येयाशीं या व्रताचा संबंध

—गेल्या दिवसांत भरलेल्या कायदे-कौन्सिलच्या खास बैठकींत स्टांपच्या कायद्यांत महत्वाचे फेरफार झाल्याचें कळतें. त्यांचे फायदे दुर्दैवी जनतेच्या फाटक्या पदरांत केव्हां पडतील, तें एक 'हरीच जाणे.

हें नूतन संवत्सर तुह्मा–आह्मा–सर्वांसहि

सर्व प्रकारें सुखाचें जावो (तथास्तु)

श्लोक

झाला 'दुर्मति'चा पहा सुजन हो तो अंतलोकीं कसा ।
चिंता [illegible] बहुतें निपजलें होते जनीं दुर्दशा ॥
झाली आणि हरिकृपा म्हणवुनी या 'दुंदुभी' वाजवूं ।
प्रेम–श्री–[illegible] प्रमुदिरें जिंके रिपू लाजवूं ॥ १ ॥

॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

जगदंब उदयोस्तु उदयोस्तु उदयोस्तु

भारताचें सातवें वर्ष

येत्या एप्रिल महिन्यापासून भारताच्या नवीन (सातव्या) वर्षाला प्रारंभ होऊन. भारतमित्रांना त्यांत खालील सुधारणा आढळून येतील:—

उत्तम छपाई (ट्रेडल मशीनची)

भरपूर मजकूर

सरकारी बातम्या

पोर्तुगालचें राजकारण

ब्रिटिश हिंदुस्थानांतील व इतर परदेशांतील महत्वाचें वर्तमान शिवाय प्रचलित विषयांवर नेहमीप्रमाणें टीकात्मक लेख प्रसिद्ध होतील. इतकेंहि असून वर्गणी तीच.

विशेष सूचना

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारांनी आतांपासूनच पत्रव्यवहार करावा. गोव्यांतील वर्गणीदारांनीं वर्गणीची फेड वसूलदाराची वाट न पहातां फेब्रुवारअखेरपर्यंत करावी.

ब्रिटिश हिंदुस्थानांतील

आश्रयदात्यानीं व्ही पी. ची वाट न पहातां टपाल मार्गानें वर्गणी चुकती करून आभारांत ठेवावें.

कायमच्या जाहिराती देणारांस अमोल्य संधि गरजूंनी अवश्य फायदा घ्यावा.

पोर्तुगीज-भाषा-प्रवेश

छापत आहे — नांवें नोंदवा

शिकवताना आलेला अनुभव लक्षांत घेऊन भाषांवर पाठमालेच्या धर्तीवर पण तिच्याहीपेक्षां अधिक सुलभपणें पोर्तुगीज भाषा शिकतां यावी अशा रीतीनें या दोनशांवर पृष्ठसंख्या असणाऱ्या पुस्तकाची रचना केली असल्यानें व उपपदांची (artigos) योजना आणि पोर्तुगीजीची विशिष्ट वाक्यरचना यांची विस्तारशः माहिती दिली असल्यानें घरबसल्या पोर्तुगीज शिकूं पाहणाऱ्यांस काय किंवा प्रिमेर ग्रवपासून लिसेवच्या विद्यार्थीपर्यंत काय, सर्वांसही तें उपयुक्त झालें आहे, यांत संशय नको. पुस्तक मे महिन्यांत बाहेर पडणार असून त्याची किंमत दीड रुपयापेक्षां ज्यास्त असणार नाहीं. छपाईची महागाई व गोव्यांतील खप लक्ष्यांत घेतां प्रति अवघ्याच काढणें भाग आहे. सबब ज्या कोणास तें पाहिजे असेल त्यानें फेब्रुवारीअखेरपर्यंत दर प्रतीमागें आठ आणे भरून आपलें नाव नोंदवावें. या मुदती नंतर नावें नोंदवणारास सव्वापट किंमत घरावी लागेल. तेव्हां हयगय न करितां नावें नोंदवून पुस्तक-प्रकाशनास मदत करावी अशी सर्व प्रांतबंधूंपाशीं सविनय विनंति आहे.

दत्तात्रय व्यंकटेश पै 3

अल्मेद कॉलेज, फोंडा–गोवा.

पी. व्ही त्रिजिनकर यांची

आयुर्वेदिक फार्मसी

4 मडगांव-गोवा

आमच्या फार्मसींत सर्व प्रकारच्या देशी वनस्पती, भस्में रसायनें, मात्रा, गुटिका, चूर्णे, आसवें, अरिष्टें, पाक, अवलेह, तेलें वगैरे उत्तम औषधांचा संग्रह असून फारच माफक दरानें देण्याची व्यवस्था केली आहे,

त्याचप्रमाणें, बालामृत, सासोपरिला, अमृतांजन, शार्ड, दंतमंजन सुवासिक काफी, वगैरे महत्वाचे, व नित्युपयोगी पेटंट जिन्नस येथें मिळतील.

Anuncios

माल चोख किंमत रोख

खुशाला सुंदर खुर्च्या

निरनिराळ्या रंगाचीं सुंदर टेबलें

उत्तम तऱ्हेचीं मंगळुरी कौलें व घराचें कोणतेंहि सामान

पाहिजे असल्यास

गोविंद भिकू पऱ्हीकर

यांच्या कांदोळी-बार्देस येथील कारखान्यांत खरेदी करा

सुबक काम — माफक दाम

टीप:—कुशल सुताऱ्यांस लायकीप्रमाणें भरपूर पगार देऊन सदहू कारखान्यांत नोकरीवर ठेवण्यांत येतें. गरजूंनीं खालील पत्त्यावर अर्ज करावा.

गोविंद भिकू पऱ्हीकर.

कळंगूट–बार्देस. 1

ड्रोगारी आर्यन

2 नवीन–गोवा

आयोनिक फार्मसी, राणाघाट केमीकल वर्क्स, सांडु व झंडु फार्मसी यांचीं सर्व औषधें; तसेंच अमृतांजन, कर्णिक मिक्श्चर, आतंकनिग्रह गोळ्या आणि कार्डलिव्हर केपलर, कोल, पार्क वगैरे युरोपियन पेटंट औषधें माफक दरानें मिळतात.

मालक— नरसिंह प्रभू लंवदे

5 **एकच वेळ येऊन अनुभव घ्या.**

रा. पांडुरंग शे. कीर्तनी यांचें

ब्राम्हणी

चहा, काफी व फराळाचें दुकान.

शाखा नं. २

मडगांव नवा बाजार-मार्कीट पिंपळासमोर

आमच्या दुकानीं एकंदर जिन्नस साजूक तुपांत तळलेले असतात. भजी, पुरी, भजीं, शिरा, उसळ, जिलबी, अनारसे, बेसन, वगैरे वगैरे जिन्नस रोजे तयार मिळतील. आगाऊ कळविल्यास वाटेल ती मिठाई तयार करून दिली जाईल.

मालक— पांडुरंग शेणवीं कीर्तनीं

मडगांव–गोवा

भाताच्या शेतीसाठीं सर्वोत्कृष्ट साधन अवश्य मागवा ! 6



किर्लोस्कर बंधूचा

लोखंडी कोंकण नांगर

SATISFACTION guaranteed

WEIGHT 45 LBS.

SAVES TIME Labour Money Increases CROP.

Furrow 4 inches deep & 8 inches wide

बैलाना ओढण्यास हलका

नांगरण्याची तऱ्हा लांकडी नांगराप्रमाणेंच नांगरट व चिखल करणें, दोन्हीच्या उपयोगी लांकडी नांगराच्या दुपटीनें काम करणारा किंमत प्रत्येकी फक्त १० रुपये.

किर्लोस्कर बंधु लिमिटेड, किर्लोस्करवाडी जि. सातारा

Boa norma

Apraz-nos registar que os mazanes maratas *kxetrias* e brahamanes de Cacorá excluiram do serviço do Templo de Sri Mahadeu dali, bailadeiras e seus irmãos. Todas as solenidades religiosas do referido templo realisam-se, actualmente, sem a detestavel intervenção daquela classe, o que representa a satisfação da nossa velha aspiração.

Semana passada, os briosos mazanes do dito Templo festejaram com grande pompa o *Xiva-ratra*. Por esta ocasião fizeram conferencias politico-religiosas, alem do nosso director, os srs. Pundolica Vamona Virginacar e Balcriana Mahadeva Sathe.

Muito estimaremos que os mazanes doutros templos de Goa cujos serviços, ainda, estejam confiados á classe de bailadeiras, sigam o bom exemplo dos de Cacorá.

Um dever

Ao completar o sexto ano, o *Bharat* deixaria de cumprir um imprescindivel dever, se não deixasse consignado nestas colunas agradecimento a seus tipografos pela enternecedora dedicação e desinteressado amor que sempre lhe dispensam e sem os quais não teria ele a regularidade que adquiriu.

Sim o *Bharat* deve importantes favores a seus empregados, especialmente, a Mucunda Peganata Dalal, Sripada Nilconta S. Bendó e Naraina Sacarama S. Bendó, os quais por vezes, têm-lhe feito verdadeiros sacrificios.

Se há serviços que se não retribuem só com o dinheiro, são incontestavelmente, os que prestam aqueles tipografos, amigos fieis do *Bharat*.

Que Deus os pague!

Os nossos processos

Excepção feita do que diz respeito ao *Gandhicap* que corre seus termos na comarca das Ilhas, os restantes processos tiveram já o seu termo final, pelo que felicitamos a nossos assignantes e amigos que exteriorisaram o seu vivo interesse, quere por telegramas, quere por cartas, pela absolvição do *Bharat*.

Quanto ao do *Gandhicap* informa-nos o nosso solicito correspondente de Pangim, que ele está seguindo a sua marcha legal, ainda que a passo de caranguejo...

Grave! Grave!

Recebemos uma carta em que se narra que foi barbaramente espancado o sr. Vinaeca S. Narcornim, digno chefe de trafico da carreira de automoveis de Mapuçá-Betim, por um oficial militar, encarregado de manter a ordem publica e intacta a pele dos cidadãos, para o que é pago á custa destes!

É grave o atentado de que, recentemente, foi victima o sr. Narcornim a respeito de quem ainda há pouco, o *Bharat* registou merecido elogio pelos sacrificios que está fazendo para bem servir ao Estado e ao Povo.

Certamente não estamos na *antiga* Turquia. Estamos na Republica e, portanto, torna-se necessario que para o decoro de moralidade publica seja prontamente castigado o delinquente.

O caso está afecto ao Tribunal de Justiça de Mapuçá e á comissão de melhoramentos e esperamos que deles saírá só a luz que ilumine cabeças mergulhadas nas trevas de arrogancia e indelicadeza.

Sim. Aguardamo-lo.

A ultima hora

Amigos sinceros do *Bharat* desejam que o nosso jornal se transfira para Novo-Goa, desejo este que nos transmitiram á ultima hora.

Por enquanto nada de difinitivo está resolvido sobre o assunto de transferencia; mas se esta for resolvida, durante a quinsena do descanço legal do *Bharat*, comunica-la-hemos em suplemento especial, aos nossos queridos leitores.

Mais uma vez

Pedimos aos nossos assignantes em divida a finesa de saldarem os seus debitos por vales postais.

A necessidade não tem lei e porisso quebramo-la para importuno-los.

Diario da Noite

Há mais duma semana que não recebemos a visita deste nosso colega de Pangim. Porque será?

Logico!

Até 7 do corrente, não tinham sido pagos os funcionarios do Estado, segundo informa o *Heraldo*.

Tal desarranjo, porém, é logico, porque o aumento de impostos está na razão directa do aumento de encargos. Isto é: quanto maior fôr o aumento de impostos que se lançam successivamente, tanto maior se torna o aumento de encargos que se criam. Desta forma, o *deficit* não muda do seu lugar no orçamento, continuando *tudo como dantes, quartel general em Abrantes.*

— साष्टीची मुनिसिपालटी नवीन वाढ विलेल्या करांविरुद्ध वरिष्ठ सरकारापाशीं तंक्रार करणार असल्याची वातमी पोर्तुगीज पत्रांत प्रसिद्ध झाली आहे. बाकीच्याहि मुनिसिपालट्यानीं तिचें अनुकरण केलेलें बरें!

— पोर्तुगालचे प्रसिद्ध राजकारणी डा. आफोंस कोस्त हे सांप्रत पारीसमध्यें असून, येथून लवकर स्वदेशांत परत जाण्याचा त्यांचा मानस नाहीं, असें एक पत्र म्हणतें.

—फोंडें मुनिसिपालटीनें तेथील विद्याप्रसारक मंडळास ५० रुपयांची मासिक मदत देण्याचा ठराव पास केला होता. त्यास सरकारकडून मंजुरी मिळाली.

गोमांतकस्थ ब्राह्मणेतर वर्ग

(ले० वामन वासुदेव वखरकर)

इतर इंग्रजी अमदानींतील ब्राह्मणेतर वर्गाची व गोमांतकस्थ ब्राह्मणेतर वर्गाची तुलना केल्यास निराशेशिवाय गत्यंतर उरत नाहीं. ज्या मानानें इकडील ब्राह्मणेतर वर्गाची प्रगति झालेली दिसते निदान त्यांच्यांत जी शिक्षणविषयक जागृति दिसून येते तिचा अष्टमांशसुद्धां गोमांतकस्थ ब्राह्मणेतर वर्गांत दिसून येत नाहीं. ह्याचीं कारणें अनेक असतील पण पहिलें व मुख्य कारण हेंच कीं, गोव्यांत प्राथमिक मराठी शिक्षणाची होत असलेली हेळसांड व उदार पोर्तुगीज सरकारनें उघडलेल्या पाणपोई ऊर्फ स्वस्त दारूचीं दुकानें होत. अशिक्षित वर्गास सुशिक्षित करण्याची पहिली पायरी ह्मणजे स्वभाषेचें ज्ञान करून देणें, दुसरी पायरी राजभाषेची ओळख करून देणें व तिसरी व शेवटची ह्मणजे परभाषांचें अध्ययन करून जगाची ओळख करून घेणें ही होय. ह्याप्रमाणें एक एक पायरी क्रमाक्रमानें चढणें हेंच केव्हांहि रास्त व व्यवहार्य आहे. पण आमचें पोर्तुगीज सरकार ह्मणजे बुद्धिमत्तेची भली मोठी थैलीच असल्यामुळें त्यानें पहिली पायरी चुकवून दुसऱ्या पायरीवर एकदम उडी टाकण्याचा निवळ शहाणपणा केला व त्याचीं कडुफळें आज सर्वांसच कमीजास्त प्रमाणांत भोगावीं लागत आहेत. या नवीन विचित्र परिस्थितीस तोंड देणें अर्थातच अशिक्षित व पुराणप्रिय अशा ब्राह्मणेतर समाजास दुरापास्त होतें पण हीच स्थिति ब्राह्मणवर्गास फारशी दिशाभूल होण्यास कारण झाली नाहीं ही त्यांतल्यात्यांत आनंदाची गोष्ट होय. कारण बराचसा ब्राह्मणवर्ग हा सुशिक्षित असल्यामुळें नवीन परिस्थितीस अनुसरून वर्तन ठेवण्यास तो चुकला नाहीं.

अशा प्रकारें ब्राह्मणेतरवर्गास कोणी मार्गदर्शक न मिळाल्यामुळें पहिल्यांदा त्यांची शिपायगिरी गेली, नंतर वतनवाड्या गेल्या व आतां देवळांतल्या मानापमानाकरितां व ज्ञातींतील बहिष्कारापरबहिष्कारा करितां भांडण्यांत त्यांना आतां स्वर्ग सांगलें वाटूं लागलें आहे. आतां पोटाचा धंदा राहिला एक तो ह्मणजे, दुसऱ्या मालकींतील जमिनींत मजुरीकरितां अगर खंडाची भरपाई करण्याकरितां रावर्सी व वाणीची हमालीवजा मजुरी देईल त्याचीं कामें करणें हा होय. अशा निकृष्टावस्थेस पोंचलेल्या गोमांतकस्थ ब्राह्मणेतरवर्गाकडे पाहून कोणा सहृदय माणसाचें अंतःकरण कळवळणार नाहीं?

सध्या गोमांतकांत ज्या लहान सहान चळवळी ह्या जरी आपापल्यापरी स्तुत्य उद्देशानें चालवल्या असल्या तरी त्यांतील उत्तमोत्तम चळवळीचा रोख इंग्रजी हद्दींतील चळवळींची नक्कल करण्याकडे जास्त दिसतो. हा रोख बदलून त्यांचें एकीकरण, गोमांतकाचे हितसंबंध काय आहेत व त्यांना पोषक अशा कोणत्या गोष्टी आहेत त्यांच्याकडे लक्ष दिलें पाहिजे-पहिला व प्रमुख प्रश्न सध्या आपल्यापुढें जो ह्मणून उभा आहे तो हाच कीं 'सरकारनें प्राथमिक मराठी शिक्षणाची सोय ज्या वेळीं सर्वत्र मुबई इलाख्यांत सर्वांनीं प्राथमिक शिक्षण सुरू होण्याची वेळ येऊन ठेपली तरी पोर्तुगीज अमलाखालील गोमांतकांत नावाला तरी एकसुद्धां मराठी आणि प्राथमिक शिक्षणाची शाळा अजून असूं नये हें आहे तरी काय?* सरकार प्रजे हून क र घेतें तें कशा करितां? पण अशा प्रकारें हें सरकार आह्मांस झुलवणार तरी किती दिवस? गोमांतकाची ही एकमुखानें केलेली मागणी सरकारास मान्य केलीच पाहिजे व तीहि लवकरच.

गोव्यांत आमच्या ब्राह्मणबंधूंनीं खासगी संस्थांमार्फत आपल्या वस्तींत ठिकठिकाणीं शाळा काढून मराठी शिक्षणाच्या सोई केल्या आहेत. हा त्यांचा उपक्रम केव्हांहि स्तुत्यच होय. त्याप्रमाणेंच आमच्या ब्राह्मणेतर वर्गानेंहि म्हापसें सारख्या ठिकाणीं व क्वचित् दुसरीकडे अशाच शाळा उघडून आपलें कर्तव्य केलें आहे. पण एकंदरींत ब्राह्मणेतर वर्गाच्या लोकसंख्येच्या मानानें ब्राह्मण वर्गाशीं तुलना करितां हा वर्ग ब्राह्मणवर्गापेक्षां बराच मागें आहे हें कोणासहि कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. वरील दोनहि वर्गांच्या शाळांनीं दोनहि वर्गांस जाण्यास कसलाच मज्जाव नाहीं पण असें असतानां जेथें तेथें असें आढळून येतें कीं ज्या ज्या समाजामार्फत जी शाळा चालवली असेल त्या त्या समाजाच्या मुलांचा भरणा त्या शाळेंत बराच जास्त असतो. ह्याचीं कारणें स्थलसंकोचामुळें येथें देत नाहीं तरी पण दुसऱ्या एखाद्याप्रसंगीं तीं देण्यांत येतील. सध्या आपणास इतकेंच पाहणें आहे कीं, बहुजन समाज ज्या ठिकाणीं प्रगल्भ दशेस पोंचला आहे, तीं ठिकाणें सेरीस करून सर्वत्र हाच अनुभव आढळून येतो. व ह्यास करितां 'ब्राह्मणेतरांसाठीं ब्राह्मणेतरांच्याच शाळा ज्यास्त सोईस्कर, निदान सध्याच्या स्थितींत तरी आहे. ह्यांत कसलाच पक्षाभिमान नाहीं तर हा एक जगाचा धडधडीत अनुभव आहे.

तेव्हां माझें गोमांतकस्थ ब्राह्मणेतर वर्गास इतकेंच सांगणें आहे कीं, बावानों, नाटकें सोडा, ऐट सोडा, चैन सोडा व सरकार प्राथमिक शिक्षण देईल ह्याची वाट पाहत न बसतां ठिकठिकाणी तुमच्या वस्तींत शाळा व विद्यालयें स्थापा ह्मणजे आपोआपच मदिरा राक्षसीसारखी आपणांस भुलीस लावणारी भूतें नाहींशीं होतील.

---

*काणकोण, केपें, दासाळ, फोंडें, डिचोली व सत्तरी या सहा ठिकाणीं मराठी प्राथमिक शिक्षणाच्या शाळा आज कित्येक वर्षांपासून आहेत. ही गोष्ट लेखकास माहीत नसल्यानें त्याच्या या विधानावरून स्पष्ट होतें.

— भारत पत्रांतील प्रसिद्ध व्हावा असी पुष्कळांची इच्छा असून, त्यानी ती आह्मांपाशीं प्रकटहि केली आहे. तसा योग जुळून आल्यास पुरवणीच्या रूपानें वाचकास कळवूं.

— गेल्या रविवारीं हणजूण बार्देस येथें रा. रामा नारायण कळंगुटकर यांच्या वाड्यांत सार्वजनिक सत्यनारायण पूजोत्सव प्रसंगीं आमच्या संपादकाचें प्रवचन झालें. या समयीं श्री. रघोबा विश्वासराव सरदेसाई या प्रेमळ तरुणाचें सध्यस्थितीवर अत्यंत कळकळीनें भरलेलें जोरदार भाषेंत भाषण झालें.

— कांहीं कांहीं सरकारी कचेरींतील थोडे थोडे नोकर कमी करण्यांत येत आहेत.

ANUNCIOS

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2 ° oficio que este assina, vão ser vendidos em hasta publica á porta do Tribunal judicial da Comarca situado na rua de Deão em Cusmane, no dia 10 do seguinte mez de Janeiro, as 12 horas e pelo preço superior ao da avaliação os seguintes bens: 1 ° Metade do predio denominado 'CHITO' da cultura de coqueiros avaliada em 100 rupias, 2 ° quarta parte do predio denominado 'GORGINA' da cultura de coqueiros, ariqueiras e outras arvores avaliada em 150 rupias, Predio denominado 'BABNIALEM' da cultura de coqueiros ariqueiras jaqueiras e outras arvores, avaliada em 50 rupias 4 ° Predio denominado 'MADEM ou XABI BIDOTICAN da cultura de coqueiros e outras arvores avaliada em 50 rupias. 5 ° Metade da varzea denominado CHANFDOL da cultura de arroz avaliada em 200 rupias, 6 ° Predio denominado 'AMBLI' da cultura de coqueiros avaliada em 5 rupias 7 ° Metade do predio denominado CAROICASANA da cultura de arroz avaliada em 15 rupias, 8 ° Metade do predio denominado MADEM CUMBO da cultura de arroz avaliada em 50 rupias, 9 ° Predio mixto de palmar e arecal denominado 'GORGINA da cultura de coqueiros ariqueiras e outras arvores, avaliado em 30 rupias, 10 ° Metade do predio de varzea denominado SORODGALI da cultura de arroz, avaliado em 100 rupias, 11 °. Metade do predio denominado POLEM da cultura de coqueiros avaliado em 150 rupias, os ultimos dois sitos em Polem e os restantes em Loliem e discritos na Conservatoria do registo predial desta comarca respectivamente sob os nos. 10674, 12041, 12030, 12031 12037, 12032, 12038, 2039, 10673, 10675, e 11883, não constando dos autos os numeros da matriz. Penhorados nos autos de execução commum que Govinda Subraia Boto, de Loliem como cessionario de Subodri Porbina e seu marido Anauta Pundolica Porobo Gauncar da dita, promove contra Subodra Porbina por outro nome Emuna, viuva de Nilcouta Balcrisna Porobo e seus fiadores Guno Ananta Boto, e mulher da dita de Loliem como pertencentes a estes. Para esta arrematação são citados todos os credores incertos dos ditos executados bem como os co-proprietarios e quinhoeiros para deduzirem os seus direitos nos termos e sob as penas da lei, e a contribuição de registo por inteiro correrá a cargo do arrematante. Para ser publico se expediu este.

Quepem, 10 de Dezembro de 1921.

O escrivão de Direito
Aires Manuel Barreto
Verifiquei 2
O Juiz de direito
2 a. vez] *J. Seabra*

Pelo menos, é o que nos anima a esperança, *a bôa de salvação* dos menos favorecidos da fortuna.

A Cesar...

Um colega nosso houve por bem tecer elogios rasgados ao sr. Alfredo Rodrigues, quando este funcionario deixou *inopinadamente*, a *suprema* direcção dos serviços fazendarios.

Teriamo-lo feito outro tanto se o mesmo funcionario não tivesse ilegal e tristemente, celebrisado a sua carreira oficial pela escandolosa galopinagem eleitoral a favor do *Mampanso*...

Tirado este e outros senões não há duvida que o sr. Rodrigues honrou o alto lugar que ocupou, honrando-se, tambem a si proprio.

A Cesar o que é de Cesar.

Impossivel ?!...

Não há nada que neste mundo de Cristo seja impossivel.

Atē Miss Tarabai que divertiu o nosso Zé-povinho, aliviando-lhe a magra algibeira, confirmou, pelas suas proesas ...*acrobaticas*, a verdade do principio, acima exposto.

Se o impossivel se torna possivel no mundo acrobatico que é muito mais complicado que o mundo de sciencias economico-sociais não sabemos a razão porque sem aumento de novos impostos e mais vergonhas de *tres tangas* se considera impossivel o equilibrio financeiro.

E' que, pelo que parece, os do *polciro* e, justamente, são estes que recebem mais e pagam menos, não querem *incomodar*-se...

But:...Quem boa cama fizer nela se deitará.

Em Rivona

Os habitantes desta aldea e de Colomba, do vasto concelho de Sanguem vão pedir, segundo LO-lo informam um carteiro que faça diaria e regularmente distribuição postal domiciliaria naquelas aldeas onde a estação postal é a regedoria e o chefe è o regedor sendo gratuitas e *ad honorem* as suas funcções...postais !

E os distinatarios são obrigados a ir buscar a correspondencia na regedoria onde, por falta de quem a distribua, dorme sono profundo, muitas vezes dias inteiros.

Tem rasão os habitantes das aldeas Rivona e Colomba e, porisso, não nos resta a minima duvida que a sua pretenção justa como é, será imediatamente atendida.

Incrivel!

Informam-nos que um funccionario grande, mercê da sua alta qualidade e posição burocratica conseguiu contrair um emprestimo hipotecario do valor superior ao dos seus bens.

O nosso informador que não é gratuito não nos declara o nome do acusado nem nos indica qualquer *sinal* que o caracterise prometendo-nos, apenas fornecer oportunamente, varios dados de *criar bicho* e *levantar rabicho* como sucedia a um tal *bobo* italiano do circo da *Tarabai* sobre o mesmo alto empregado...

Nós que não somos exigentes, aguardamos a realisação de tais promessas, *oportunamente*.

Queixas

O *Bharat* aceita-as venham donde vierem, contanto que nos sejam dirigidas, devidamente, reconhecidas.

E'claro que, desde logo, não as publicaremos no jornal: entedenremonos antes de mais e á nossa custa, com as entidades oficiais a que disserem respeito, publicando, depois o resultado de nossas tentativas, quando desto houver a necessidade.

Em todo o caso, porem, os interessados terão informações detalhadas sobre suas queixas, tambem à nossa custa.

E' mais um serviço que o *Bharat* pretende prestar ao publico quando queira.

Trabalho e sorte

Diga o que disser a filosofia, quando o Trabalho e Sorte luctam prevalece sempre o dominio desta ultima

Um funccionario, por exemplo, trabalha por mãos e pés por *cimentar* se num lugar, mas, quando menos espera, é pela Sorte deslocado dêle abruptamente

Um deputado trabalha *manibus pedibus* que tambem por passar lá fora e não confundam com o nosso *Simbolo indiano* como amigo dos do dentro; eis, quando a Sorte lhe anula todo o seu trabalho.

E', pois verdade que o Trabalho põe e a Sorte dispõe.

श्रीशांतादुर्गा वाचनमंदिर

कुंकळ्ळींतील या संस्थेच्या तृतीय वार्षिकोत्सवारंभीं श्री. भास्कर भ. केणी यांनीं स्वतः रचून गायलेलीं पदें—

ईश स्तवनपर पद. चाल–प्रेमसेवा

विनति करितसें प्रभु पदांबुजीं तुझ्या ॥
राखीं चिरसमय संस्थेसीं सुखी आमच्या
॥धृ०॥ स्वकृपा सीकरा । विखरीं हि-
जवरीं सदा । हे प्रभु दयांभोढा ।
परिस विनतिस या ॥१॥

स्वागतपर पद. चाल—सुस्वागत करितों.

स्वागत प्रेमदला स्वीकारा ही विनति॥धृ
वार्षिकोत्सवा विरजानो । अनुरक्त म-
दिय बंधुनो । धीमान, श्रीमान, सुज-
नानो ! क्षीरिं मिश्री विघळली आगमनें
तुमच्या तीं ॥१॥ ही कन्यारूप संस्था
तुमचीं । स्वशक्ति वेंचि तरी कसची !
दावितां प्रेम जें त्याची ।' होईल बरें
उतराई जन्मजन्मांतीं ॥२॥

—"श्रीगीता वाचनाचें महत्व" या विषयावर एक निबंध लिहून पाठविणाऱ्यास त्याच्या योग्यतेप्रमाणें श्रीगीतारहस्य व मंडह गीता वगैरे पुस्तकें बक्षीस मिळणार आहेत, असें 'श्रीगीतावाचन प्रसारक' मुंबई ह्या संस्थेनें प्रसिद्ध केल्याप्रमाणें ज्या उमेदवारानीं उपरोक्त विषयावर निबंध पाठविले त्यांतील पास झालेल्या आठ जणांपैकीं ५ व्या नंबरास रा. दामोदर व्यं. पै रायतुरकर मडगांव यांचा निबंध पास होऊन त्यांस एक शुद्ध मंडहगीता बक्षीस मिळाली.

जातीद्वेषाचें दळण

श्री. ना. अ. शें. बांदिवडेकर यानीं, गेल्या ८ व्या भारताच्या अंकावर "श्री शि. प्रभूचें स्मारक व आक्षेपकांचा भ्रमनिरास" या मथळ्याखालीं एक पत्र प्रसिद्ध करून, आपल्या ३ नव्हंबरच्या अंकांतील जाहीर विनंतीवर आलेल्या अनेक टीकात्मक पत्रांतील आक्षेप खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे. वादाचा विषय होऊन राहिलेला समारंभ, उरकून गेल्यावर त्या वादांत शिरण्याचें कारण नव्हतें; तरी पण त्या पत्रांत, लेखकानें इतरांप्रमाणें मजवर जे खोडसाळ आरोप केले आहेत त्यांचें निराकरण करणें जरूर आहे. सदरील पत्रांत माझ्या "जबाब द्या" या पत्रास अनुलक्षून जो मजकूर आला आहे, त्यांत त्यानीं माझ्या प्रश्नाचीं समर्पक उत्तरें देण्याचें टाळून फक्त कांहीं शेलक्या शेलक्या विशेषणांनींच भ्रमनिरासाचा आव आणला आहे. मजकुराच्या आरंभींच भावना प्रधान आक्षेपक या विशेषणानें मला संबोधून, मागितलेला जबाब शोधण्यास पारलौकिक जगांत जावें लागेल ह्मणायाचें निमित्त पुढें आणलें आहे. पण श्री. बांदिवडेकरांसारख्या भावनाशून्य अंतःकरणाच्या माणसांना इंग्रजी नोकरशाहीच्या हातास हात लावून, स्मारकाविषयींची जाहीर विनंति प्रसिद्ध करण्यास सांगितलें होतें कोणी ? ज्यानां श्रीशिवाजीमहाराजांचा आत्मा परलोकाशिवाय दुसऱ्या कोठें तरी सांपडण्यासारखा आहे हें माहीत नाहीं, त्यांच्या मनांत, महाराजांविषयींच्या कोणत्याही भावना असूं नयेत हें आश्चर्य नव्हे. मृतात्म्यांशीं बोलण्याचें वाममार्ग त्यानां पसंत नसले तरी श्री. केळूसकरांचें श्री. शि. महाराजांचें चरित्र त्यानीं वाचावयास घेऊन त्यांत महाराजांचा आत्मा सांपडतो कीं नाहीं हें पाहावयाचें होतें. पण त्यानां ही उठाठेव पाहिजे कशाला ? युवराज स्वागताच्या धांदलींत आपणहि आंत शिरून राजे महाराजे, सरदार मानकरी यांत सामील व्हावें हीच भावना नव्हे हाच हेतु धरून महाराजांच्या स्मारकाची यांस आठवण झाली आहे. दुसरें काय ? मृताचे आत्मे त्यांच्या चरित्ररूपानें आह्मां जवळ तत्पर असतात, हें समजण्याइतकें ज्ञान त्यांनां असलें तरी, युवराजस्वागताच्या गडबडींत तें विसरून जाणें शक्य आहे ह्मणूनच हा दोष त्यांच्यावर लादण्यास मी इच्छित नाहीं यापुढें तरी तें चरित्र वाचून त्यानीं माझ्या प्रश्नात्मक सप्ताग्राचें निवारण करावें. माझ्या लेखांत त्यानां धर्मवेड अथवा धर्मविषयक फाजील दुराग्रह दिसला असला तर, तो माझा दोष नसून, त्यांनीं लावलेला सत्यसमाजी अतएव धर्माभिमानशून्यतेच्या चष्म्याचा दोष असावा. बाकी तें ज्याला धर्मवेड ही संज्ञा देत असतात, तसलें धर्मवेड उपरोक्त चरित्रांत त्यानां भरपूर पाहावयास मिळे'.

मी इं. न्या. कॉंग्रेसच्या प्रवाहांत सांपडलो असेना !! पण "या आमच्या गोवा प्रांतावर ब्रिटिशांचा अंमल आहे; आणि आह्मीं पो. नागरिकांनीं सुद्धां कॉंग्रेस मधून असहकारिता पुकारून, स्मारकावरच्या बहिष्काराचा प्रश्न केव्हांच सोडवून ठेविला आहे.' असें विधान कधींच केलें नाहीं, इतकेंच नव्हे तर माझ्या पत्रावरून तसें ध्वनित सुद्धां होत नाहीं. असें असतां श्री. बांदिवडेकरानीं माझ्या "सदरील समारंभास हजर रहावें किंवा न रहावें हा प्रश्न डॉ. वाळे उर्फ असहकारितावादी यानीं हिंदुस्तानदेशाच्या दृष्टीनें सोडविला आहे. त्यास हजर राहून आपलें हसें व देशाचें नुकसान करून घेण्यास कोणीहि धजणार नाहीं. या वाक्याचा तथा अर्थाचा विपर्यास करावा, हें त्यांच्या श्रीदास शोभणारें नाहीं.

त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें "श्री शिवरायाचें स्मारक त्यांच्या मृतात्म्यांस संतुष्ट करण्यासाठीं होत नसलें तरी, तें त्यांणीं आमरण बाळगून आचरणांत आणलेल्या ध्येयाशीं विसंगत होणें इष्ट होईल काय ? व तें तसें झालें तर त्यांचा महाराष्ट्रीय जनतेच्या कर्तव्य बोधार्थ उपयोग होईल कांय ! याचा विचार त्यांच्या पत्रांत झालेला दिसत नाहीं. अथवा तें तरी कां करितील ? गोब्राह्मण प्रतिपालक ह्मणवून घेणारे, श्रीसमर्थाचें शिष्यत्व पत्करणारे, श्रीतुकाराम महाराजांच्या शोधार्थ रानांवनांतून भटकणारे; गाय मारावयास नेणाऱ्या खाटकास खुद्द विजापुरांत कंठस्नान घालणारे, आपल्या आंगांत श्रीभवानीचा संचार झाला आहे ह्मणून आपल्या एकनिष्ठ मावळ्यांस सांगणारे, धर्मासाठीं व देशासाठीं आपला प्राण खर्ची घालणारे, स्वदेशी राजांचे दरबारांत भालदारी पत्करीन, पण परदेशी व परधर्मी सार्वभौम सत्तेतील राजेपणाच्या जाहगिऱ्या मानमरातब लाथाडून टाकीन, असें रजपुत राजे मानसिंग यांस स्पष्ट सांगणारे श्रीशिवाजीमहाराज; यांची मर्यादा त्यांच्याच वंशजांकडून जर राखली जात नाहीं तर, मृत होऊन गेले त्यांच्या ध्येयांचा विचार करून अनायासें प्राप्त झालेला हा राजपुत्र स्वागत योग ह्मणजे "टोपीच्या छत्रींत मान घालण्याची संधी" दवडण्याचें पाप त्यानीं कांय ह्मणून स्वीकारावें ?

त्यांचा सर्व पत्राचें निरीक्षण केलें तर ते, तें लिहितानां जातीद्वेषाचें दळण दळीत बसले होते आणि त्यावेळीं असहकारितेवरील शिव्यांच्या ओव्या गात होते, असा बळकट संशय येतो. आणि ह्मणूनच भारतकारानीं "त्यानीं जातीद्वेषाचा–नोकरशाही, सत्यसमाजी किंवा कोल्हापुरी चष्मा वापरण्यास घेतला असावा" असें ह्मणून त्यांची ओळखण केली असावी.

सदरील स्मारकास विरोध दाखविण्यांत आक्षेपकांच्या मनांतून जातीद्वेष आहे, असें एक कारण श्री. बांदिवडेकर गृहीत धरितात तर हाच न्याय म. गांधीच्या असहकारयोगास तें कां लावीत नाहींत ? म. गांधी हे वैश्य ज्ञातीचें आहेत आणि त्यांचे सहकारी ब. जयकर मराठे आहेत, बॅ. बाप्तीस्टा खिस्ती आहेत, मौ. अलीबंधु मुसलमान आहेत व हॉर्निमन खिस्ती असून युरोपियन इंग्रज आहेत, हें त्यांची ओळख असणाऱ्या श्री. बांदिवडेकरांस माहीत असलेंच पाहिजे. मग, त्यानीं धर्मवेडे, जातीद्वेष्टे, फाजील दुराग्रही ह्मणून गणलेले त्यांचे आक्षेपक वरील देशभक्तांविषयीं आदर व पूज्य बुद्धि दाखवून असहकारितेस सहानुभूति दाखवित असतां, केवळ वैश्यज्ञातीच्या बांदिवडेकरांनीं, मराठे ज्ञातीच्या श्रीशिवाजी महाराजांच्या स्मारक समारंभास हजर राहण्याविषयीं विनंति प्रसिद्ध केली आहे ह्मणून, जातीद्वेषानें आक्षेप आणतील काय ? थोडा विचार केल्यात आपल्या ह्मणण्यांत किती परस्पर विरोध खचून भरला आहे हें त्यां-

Anuncios

elogiem, importando-se bem pouco com os seus criticos de má fé: a sua ambição é ver levantamento da sua Patria e só isto.

Doutras fases se reveste certa politica cristã. Estaremos enganados ?

A' ultima hora

Alguns hindus de Mapuçá, instigados pelos amigos *agradecidos* e *muito obrigados* do sr. Frazeres da Costa realisaram ali uma reunião com o fim de fundar um partido denominado *Hindu Sabá*, não obstante a formidavel oposição dos que entenderam e demonstraram aos promotores do mesmo *Sabá* que era inutil ou antes prejudicial o seu passo por termos já o *Pragatica-Sangh*.

A proposito da local *O Hindu Sabā*, publicada no *Diario da Noite*, recebemos algumas cartas, desmentindo, com provas esmagadoras, muitas das afirmações que nela se lêem.

Do assunto das referidas cartas, bem como das impressões que nós e o nosso representante expressamente ai enviado colhemos do *Actual Hindu Sabà*, trataremos, detalhadamente, no proximo numero do *Bharat*, que hoje não nos sobra, infelizmente, espaço.

Pragatica-Sangh

Organisou-se a comissão aldeana deste Sang em Calangute, ficando nela abrangidas as aldeas de Candolá, Ordá e Nagoa. Em Verem e em algumas outras aldeas importantes do concelho de Bardez, está-se a trabalhar, com actividade, pela inscrição de socios e organisação de comissões locais. Reina grande entusiasmo em toda a parte.

Conferencias

Realisou-as o nosso director na semana passada no concelho de Bardez sobre a educação civica.

Bonito!

Consta-nos que vai uma verdadeira *barafunda* no Liceu Central quanto ao *quantum* da propina do encerramento de matriculas e exigencia de certidões que o regulamento respectivo dispensa, aliás, uma vez que se produza o caderno escolar.

Ponham a limpo isto que não deixa de ser... *bonito*... ás avessas !...

— मेल्या आठवड्यांत आमच्या संपादकांची राशवंतर येथें एक व कळंगूट येथें दोन अशीं तीन प्रवचनें झालीं.

— कळंगूट येथें प्रागतिक संघाची ग्राम कमेटी स्थापन झाली असून त्यांत कांदोळी, नागवें, वडें, वगैरे आदेस महालांतील हिंदुवस्तीच्या गांवाचा समावेश झाला आहे. वेरें व इतर गांवांतहि संघाची चळवळ जोरांत आहे.

— माशेल येथील प्रसिद्ध विद्वान वे. शा. सं. वासुदेव शास्त्री धूपकर यांस गेल्या माघ शु० ६ शनी रोजीं देवाज्ञा झाली, हें कळविण्यास वाईट वाटतें.

श्रीसमर्थ आणि शिवराय

वसिष्ठें जसें बोधिलें रामचंद्रा।
शिवाजीस तैसे तुह्मींही मुनींद्रा॥
स्वधर्मासि संरक्षिले लोकनाथा।
नमस्कार साष्टांग भावें समर्था॥५॥

गोब्राह्मणप्रतिपालक, स्वराज्यसंस्थापक आणि महाराष्ट्र क्षत्रीय कुलावतंस श्रीशिवाजीमहाराज यांनीं स्वधर्म व स्वराज्यस्थापनेचे जे महत्कार्य केलें त्याचा विचार केला असतां शिवरायानीं आधुनिक पद्धतीची अमूकच एक सुधारणा करण्यास माघार घेतली असें सिद्ध होत नाहीं. स्वधर्मी, विधर्मी, स्वजाति, विजाति, इत्यादि आपपर भेदानां अजीबात फांटा देणें, सर्व जातीचें असें संयुक्त प्रधानमंडळ नेमणें व त्यांच्या तंत्रानें एकंदर राज्यकारभारास चलन देणें न्यायान्यायाचे बाबतींत स्वतःचे पोटच्या गोळ्याचाही अभिमान न बाळगणें, एकदां दिलेला निकाल कालत्रयींही न बदलणें, यामुळें जनतेंत महाराजांविषयीं वसत असलेला वचक इत्यादि उदाहरणें कशाचीं द्योतक होत ?

पण या सर्व सुधारणापेक्षां त्यांनीं जी नैतिक सुधारणा अमलांत आणली होती ती फार वाखाणण्याजोगी होती. त्याचें एक हृदयस्पर्शी उदाहरण झटलें ह्मणजे एकदां त्यांच्या एका पदरच्या सरदारानें मोठ्या हिंमतीनें युद्धांत जिंकून आणलेली एक सुंदर स्त्री महाराजांना नजर केली असतां त्यानीं तीचा योग्य सत्कार करून तीला नमस्कार करून सांगितलें कीं, मातोश्री जीजाईंना जर तुजसारखें सुंदर रूप असतें तर तीच्या उदरांतसुद्धां तुझ्यासारखींच सुंदर मुलें झालीं असतीं या त्यांच्या उत्तरामुळें सगळी सभा चकीत होऊन सद्गदीत अंतःकरणानें सर्वांनीं शिवरायांचा जयजयकार केला.

एकंदरीत अशा प्रकारची नीतिमत्ता समाजांत किंवा राष्ट्रांत प्रसृत होण्यास मुख्यतः अंतःकरणांच्या शुद्धतेबरोबर समाजनेत्यांचें अथवा राष्ट्रोद्धारकांचें तपाचरण श्रेष्ट प्रतीचें असणें जरूर असतें. पण हे सर्व गुण शिवरायांच्या अंगीं जडण्याला परम हंसवृत्तीचें व जगत्कल्याणाचा मक्ता घेतलेले श्री समर्थ रामदासस्वामी यांचीं गुरुकृपाच कारण झालीं व ह्मणूनच महाराष्ट्र तरला यांत संदेह नाहीं.

समर्थांनीं 'तपश्चर्या' झाल्याबरोबर गिरीगुहांत बसून अंतर्शुद्धि करून घेतल्यानंतर जगत्कल्याणासाठीं सर्वत्र संचार केला व एकंदर परिस्थितीचें निरीक्षण केलें. यवनांच्या दंडुकेशाहीमुळें सर्व जनता त्रासून गेली होती. अधर्मी राज्यकर्त्यांच्या सहवासामुळें स्वधर्माभिमानशून्यतेचें वारें जिकडे तिकडे पसरलें होतें. सृष्टिनियमानुसार धर्मग्लानीच्या वेळीं असें हें व्हावयाचेंच. आणि असें होणें ह्मणजेच स्वधर्मसंस्थापनेसाठीं परमेश्वरी अंश अवतीर्ण होण्याचीं शुभ चिन्हें मानावयाचीं असें ज्ञानी लोक ह्मणतात.

'मुख्य हरिकथा निरूपण। दुसरें तें राजकारण।' हा समर्थांचा मुख्य मंत्र असल्याकारणानें असंख्य मठस्थापना करून हरिकथाकथन मिषानें सर्व जनतेंत स्वधर्म व स्वदेशाभिमानाची ज्योत प्रज्वलीत केली. समर्थांविषयीं जनतेंत पराकाष्ठेचा आदर उत्पन्न झाला. जनतेंत आत्मविश्वास उत्पन्न झाल्याचें समर्थांस अनुभवास येतांच शिवबांची गांठ घेऊन त्याला स्वराज्यस्थापनेविषयीं उपदेश देऊन मस्तकीं वरदहस्त ठेविला. झालें जिकडे तिकडें शिवरायांचा यशोदुंदुभी निनादूं लागला. समर्थांनीं योग्य समय साधून शिवरायांस राज्याभिषेक केला. सर्वत्र आनंदीआनंद झाला. या किंवा या पुढील गोष्टी इतिहासवाचकांस अवगत आहेतच.

असा एक समय आला कीं, शिवरायांस समर्थांनीं स्वराज्यसंस्थापनेसाठीं जे अपरंपार श्रम घेतले त्याचें वारंवार चिंतन होऊन ते फार कष्टी होऊं लागले. व यांतून उतराई होण्यासाठीं ह्मणून श्रीगुरुमाऊलीच्या चरणीं लीन होऊन राज्यदान करण्याचा सुयोग जुळवून आणला. समर्थांनीं शिष्याचा आत्मभाव ओळखून त्याची इच्छा पुरविली. व नंतर योग्य उपदेशामृताचें पान करून शिवरायांस परत तेंच दान घेण्यास लावलें त्यां वेळीं समर्थांनीं जें सांगितलें तें मनन करण्यासारखें आहे:—

स्वकष्टार्जित प्राप्य राज्यास भोगीं।
अकर्तात्मभावें अहंतेसी त्यागीं॥
प्रजापाळनी दक्ष राहोनि सेवी।
असें सांगुनी मस्तकीं हस्त ठेवी
मं. मं. ॥५६॥

श्री समर्थ हे अजूनही आपल्या परम वंद्य श्रीमंत दासबोधग्रंथाच्या रूपानें अखिल महाराष्ट्रांत वास करितात. दासबोधांत अमूक विषयांवर किंवा तत्वज्ञानावर मुद्देसुद व अनुभवशिर विवेचन नाहीं असें नाहीं. वितरागी असून संसारी जनाचा अनुभव आपल्या काव्यांत नमूद करणें यालाच आत्मज्ञानी किंवा अंतर्ज्ञानी अतएव ईश्वरी विभूति ह्मणण्याचा सज्जनाचा परिपाठ आहे तो असत्य ह्मणण्यास कोण अभागी पुढें येईल ? अशा ग्रंथाचीं थोरवी किती वर्णावी ?

गोमांतकाच्या इतिहासाचीं साधनें बहुशः उपलब्ध नाहींत, असें कष्टानें ह्मणावें लागतें. नाहीं तर श्रीसमर्थांचा संचार गोव्यापर्यंत झाल्याचे दाखले सांपडणार होते. दासबोधांत किंवा इतर त्यांचे कवितेंत गोव्यांतील कोंकणी रूढ शब्द अवलोकनांत येतात. यावरून व गोमांतकांतील त्यांचें शिष्यमंडळीपैकी गोविंदा ह्मणून एक शिष्य होता असें रामदासीमंडळ धुळें या संस्थेस ऐतिहासिक कागदोपत्रीं आढळल्याचें समजतें. यावरून हें परशुरामक्षेत्र समर्थांच्या पादस्पर्शानें पुनीत झाल्यानंतर गोवेकरांस अभिमान वाटणें साहजिक आहे.

दासबोधाच्या हल्लींच किती तरी आवृत्त्या निघाल्या व महाराष्ट्रांत बहुतेक ठिकाणीं श्रीदासनवमी उत्सव फार प्रेमानें व थाटानें साजरे होत असतात. यावरून समर्थांचे विषयींची पूज्यबुद्धि या सुधारकमन्यंतही तिळमात्र कमी झालेली दिसत नाहीं. गोमांतकांतही समर्थांविषयीं तितकीच पूज्य बुद्धि आहे हें येथें नमूद करणें अप्रस्तुत होणार नाहीं.

अचलारामवाडी [डोंगरी] येथें महानुभव कृष्णभट बखंडकर यांनीं ५८।६० वर्षांपूर्वी समर्थांची पुण्यतिथी प्रेमभावानें साजरी करण्याचा क्रम सुरू केला तो आजतागायत त्यांचे चिरंजीव ह० भ० प० मुकुंदराज चालवीत आहेत, महाशेल येथें दुर्गादत्तमंदिरांतही हा उत्सव सार्वजनिक स्वरूपाचा होत असतो. मडगांव येथें श्री रामनाथदामोदर वाचनालयानें ती पुण्यतिथी आपल्या अस्तित्वांत साजरी करण्यास कमी केलें नाहीं. पुढें श्रीदामोदर विद्याभुवनांत आज चार वर्षेंपर्यंत सरस्वतीसेवकमंडळाकडून हा उत्सव सुव्यवस्थीतपणें चालू आहे. विशेषकरून तरुण मंडळी या उत्सवास हजर राहते. यंदां हा उत्सव चालू महिन्याचे १९ ता० रविवार रोजीं साजरा होऊन श्री स० से० मंडळानें श्री समर्थांची आठवण व तसबिरीचें दर्शन सर्वांना करून दिलें, इतकें सांगून खालील श्लोकांत समर्थांना वंदन करून लेखणी आवरतों.

नमो ब्रह्मतेजा नमो क्षात्रतेजा।
नमो रामदासा शिवाजी सुतेजा॥
नमो सद्गुरो गां नमो शिष्यवर्या
सदा धांवगा पावगा राष्ट्रकार्या॥६०॥

म. म.
वेरेंकर

भा र त
गुरुवार माघ व० १२ शके १८४४

प्रागतिक संघ व निवडणुका

कोणत्याहि संस्थेचें अस्तित्व तिनें हातीं घेतलेल्या कार्याच्या यशापयशावर अवलंबून नसून; त्या संस्थेचें कार्य अगर ध्येय बहुजनसमाजास प्रिय आणि मान्य होण्यावरच अवलंबून असतें. हाच न्याय पोर्तुगीज हिंदुस्थानच्या व विशेषतः येथील हिंदुसमाजाची सर्वांग सुंदर उन्नति घडवून आणावी या उच्च हेतूनें जन्मास आलेल्या प्रागतिक संघ ह्या संस्थेसहि लागू आहे. प्रागतिक संघ स्थापन होऊन अद्याप पुरतें एक वर्ष लोटलें नाहीं, ठिकठिकाणीं थोडे बहुत सभासद मिळविण्याशिवाय त्याच्या हातून कोणतेंहि कार्य झालें नाहीं ही गोष्ट खरी असली तरी, आकस्मिक तऱ्हेनें लागोपाठ प्राप्त झालेल्या देपुताद व सेनादोर यांच्या दोनहि निवडणुकींत संघानें महत्वाचा भाग घेतल्यामुळें, संघाविषयीं वसत असलेली लोकप्रियता सूर्यप्रकाशाइतकी सर्वांच्या प्रत्ययास येऊन चुकली आहे. संघानें निवडणुकींत भाग घेणें योग्य होतें किंवा अयोग्य होतें याचा विचार करणें या प्रसंगीं अप्रस्तुत होणार आहे. तसेंच निवडणुकींत भाग घेतल्यापासून संघास कोणकोणते फायदे होण्यासारखे आहेत हेंहि आजच सांगतां येणार नाहीं. अनुभवांतीं ते सहज दिसून येतीलच; परंतु सांगावयाचें आहे तें इतकेंच कीं संघानें दोनहि निवडणुकींत भाग घेतल्याचें जाहीर होतांच, योग्यायोग्यतेचा विचार तात्पुरता बाजूस ठेवून, "केवळ संघासाठीं" अशा निश्चयानें ठिकठिकाणच्या हिंदुमतदारानीं दो. फ्रोइलान दे मेल, लें. क. हेल्डेर रिबैर आणि का. लें. नोबेल मोत यांस मतें देण्याची अगर मिळविण्याची जी पराकाष्टा केली, तीच संघाचें महत्व वाढत चाललें असून, बहुजनसमाजास ती संस्था उत्तरोत्तर प्रिय होत चालल्याचें द्योतक आहे. व यावरच संघाचें अस्तित्व अवलंबून आहे. संघाचा जन्म लोकांसाठींच झाला असला तरी तो अद्याप लोकनियुक्त झाला नाहीं हें येथें प्रांजळपणें कबूल करणें भाग आहे. तरी पण

भारताचें सातवें वर्ष

येत्या एप्रिल महिन्यापासून भारताच्या नवीन (सातव्या) वर्षाला प्रारंभ होऊन, भारतमित्रांना त्यांत खालील सुधारणा आढळून येतील:—

उत्तम छपाई (ट्रेडल मशीनची)

भरपूर मजकूर

सरकारी बातम्या

पोर्तुगालचें राजकारण

ब्रिटिश हिंदुस्थानांतील व इतर परदेशांतील महत्वाचें वर्तमान शिवाय प्रचलित विषयांवर नेहमीप्रमाणें टीकात्मक लेख प्रसिद्ध होतील. इतकेंहि असून वर्गणी तीच.

विशेष सूचना

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारांनी आतांपासूनच पत्रव्यवहार करावा. गोव्यांतील वर्गणीदारांनीं वर्गणीची फेड वसूलदाराची वाट न पहातां फेब्रुवार अखेरपर्यंत करावी.

ब्रिटिश हिंदुस्थानांतील

आश्रयदात्यानीं व्ही. पी. ची वाट न पहातां टपाल मार्गानें वर्गणी चुकती करून आभारांत ठेवावें.

कायमच्या जाहिरातीं देणारांस अमोल्य संधि गरजूंनी अवश्य फायदा घ्यावा.

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 2° oficio que este assina, vão ser vendidos em hasta publica a porta do tribunal judicial da comarca situado na rua de *Deão*, em Gusmane no dia 20 do corrente mez, ás 12 horar em segunda praça e pela metade do preço porque foram avaliados os seguintes bens.: —

1° Quarta parte do predio denominado Gorgina da cultura de coqueiros, ariqueiras e outras arvores avaliada em 150 rupias, 2° Predio denominado Ambli, da cultura de coqueiros avaliado em 5 rupias. 3° Metade do predio denominado Caroicasana, da cultura de arroz avaliado em 15 rupias, todos sitos em Loliem e discrito na conservatoria do registo predial desta comarca sob os n°s. 12041, 12032 e12038, não constando dos autos os numeros da matriz.

Penhorados nos autos de execução comum que Govinda Subrau Boto, de Loliem como cessionario de Subadri Porbina e seu marido Ananta Pundolica Porobo Gauncar da dita promove contra Sobodra Porbina por outro nome Emuna viuva de Nilcanta Balcrisna Porobo e seus fiadores Guno Ananta Boto e mulher da dita de Loliem como pertencentes a estes, Para esta arrematação são citados todos os credores incertos dos ditos executados bem como co-proprietarios e quinhoeiros para deduzirem os seus direitos nos termos e sob as penas de lei e a contribuição do registo correrá por inteiro a carga do arrematante. Para ser publica se espediu este.

Quepem 1 de Fevereiro de 1922

O Escrivão de Direito

Aires Manuel Barreto

2 vez) Verifiquei

O juiz de Direito

3 *J. de Seabra*

Anuncios

Um dialogo

—Sabes o' Antonio, o motivo porque eu votei na lista *popular*, apesar de desgostar do favoritismo antipatriotico do *mano* Prazeres?

—Não. Mas acho que procedeste mal, votando no pior inimigo da India que é o dito sr. Lamartine!

—E's um estupido e não sabes a politica! Se eu dei o meu voto á lista *popular*, como tantos outros é para os europeus terem uma lição *mestra*, eles que nos ferem a dignidade, supondo-se senhores da India cuja ruina, de resto, prefiro áquilo.

—Sim?! Os *brancos*, porem não nos tem feito nenhum mal, antes pelo contrario...

—O" seu besta! Estas já esquecido do caso da *Terra* de Margão?..

Não pudemos ouvir mais nada.

Proclamados!

Foram, finalmente, proclamados os seguintes candidatos no apuramento a que se procedeu na Camara das Ilhas: Bobela Mota, para senador e Prazeres da Costa para deputado.

E, sendo inelegivel o sr. Costa, em ultimo apuramento, é o sr. Helder Ribeiro quem será proclamado.

Até então, pois!

Aos assignantes do BHARAT!

Com mais 3 numeros, o BHARAT vai completar em março o seu corrente ano de publicaçao, devendo começar o novo que e' setimo, no proximo mez de abril. O numero 50 sera' o ultimo do corrente ano. A partir do novo serao introduzidos os seguintes aperfeiçoamentos:

Tipo novo e sorteado

Impressão arte moderna

Informaçoes mais desenvolvidas

Colaboraçāo selecta

Critica imparcial

No intervalo que há de medear entre a publicação do nº 50 em Março e a do nº 1 da 1a. semana de Abril, será montada a nova maquina e instalada a nova tipografia.

Apesar destes melhoramentos, a assinatura será porem a mesma.

Pagamento adiantado

ANUNCIO

श्री. ना. अ. शे. वांदिवडेकर यानीं, गेल्या ८ च्या भारताच्या अंकावर "श्री शि. प्रभूचें स्मारक व आक्षेपकांचा भ्रमनिरास" या मथळ्याखालीं एक पत्र प्रसिद्ध करून, आपल्या ३ नव्हेंबरच्या अंकांतील जाहीर विनंतीवर आलेल्या अनेक टीकात्मक पत्रांतील आक्षेप खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे. वादाचा विषय होऊन राहिलेला समारंभ, उरकून गेल्यावर त्या वादांत शिरण्याचें कारण नव्हतें; तरी पण त्या पत्रांत, लेखकानें इतरांप्रमाणें मजवर जे खोडसाळ आरोप केले आहेत त्यांचें निराकरण करणें जरूर आहे. सदरील पत्रांत माझ्या "जबाब द्या" या पत्रास अनुलक्षून जो मजकूर आला आहे; त्यांत त्यांनीं माझ्या प्रश्नाचीं समर्पक उत्तरें देण्याचें टाळून फक्त कांहीं शेलक्या शेलक्या विशेषणांनींच भ्रमनिरासाचा आव आणला आहे. मजकुराच्या आरंभींच भावना प्रधान-आक्षेपक या विशेषणानें मला संबोधून, मागितलेला जबाब शोधण्यास पारलौकिक जगांत जावें लागेल असें म्हणण्याचें निमित्त पुढें आणलें आहे. पण श्री. वांदिवडेकरांसारख्या भावनाशून्य अंतःकरणाच्या माणसांना इंग्रजी नोकरशाहीच्या हातास हात लावून, स्मारकाविषयींची जाहीर विनंति प्रसिद्ध करण्यास सांगितलें होतें कोणी? ज्यानां श्रीशिवाजीमहाराजांचा आत्मा परलोकाशिवाय दुसऱ्या कोठें तरी सांपडण्यासारखा आहे हें माहीत नाहीं, त्यांच्या मनांत, महाराजांविषयींच्या कोणत्याही भावना असूं नयेत हें आश्चर्य नव्हे. मृतात्म्यांशीं बोलण्याचे सत्यमार्ग त्यानां पसंत नसले तरीं श्री. केळुसकरांचें श्री. शि. महाराजांचें चरित्र त्यानीं वाचावयास घेऊन त्यांत महाराजांचा आत्मा सांपडतो कीं नाहीं हें पाहावयाचें होतें. पण त्यानां ही उठाठेव पाहिजे कशाला? युवराज स्वागताच्या धांदलींत आपणहि आंत शिरून राजे महाराजे, सरदार मानकरी यांत सामील व्हावें हीच भावना नव्हे हाच हेतु धरून महाराजांच्या स्मारकाची यांनां आठवण झाली आहे. दुसरें काय? मृतांचे आत्मे त्यांच्या चरित्ररूपानें आम्हांजवळ तत्पर असतात, हें समजण्याइतकें ज्ञान त्यांना असलें तरी, युवराजस्वागताच्या गडबडींत तें विसरून जाणें शक्य आहे म्हणूनच हा दोष त्यांच्यावर लादण्यास मी इच्छित नाहीं. यापुढें तरी तें चरित्र वाचून त्यानी माझ्या प्रश्नात्मक सप्तार्थाचें निवारण करावें. माझ्या लेखांत त्यांनां धर्मवेड अथवा धर्मविषयक फाजील दुराग्रह दिसला असला तर, तो माझा दोष नसून, त्यांनीं लावलेला सत्यसमाजी अतएव धर्माभिमानशून्यतेच्या चष्म्याचा दोष असावा. बाकी ते ज्याला धर्मवेड ही संज्ञा देत असतात, तसलें धर्मवेड उपरोक्त चरित्रांत त्यानां भरपूर पाहावयास मिळेल.

मी इं. न्या. कॉंग्रेसच्या प्रवाहांत सांपडलो असेना!! पण "या आमच्या गोवा प्रांतावर ब्रिटिशांचा अमल आहे, आणि आम्हीं पो. नागरिकांनीं सुद्धां कॉंग्रेस मधून असहकारिता पुकारून, स्मारकावरच्या बहिष्काराचा प्रश्न केव्हांच सोडून ठेविला आहे.' असें विधान कधींच केलें नाहीं, इतकेंच नव्हे तर माझ्या पत्रावरून तसें ध्वनित सुद्धां होत नाहीं. असें असतां श्री. वांदिवडेकरानीं माझ्या "सदरील समारंभास हजर रहावें किंवा न रहावें हा प्रश्न कॉं. बाळे उर्फ असहकारितावादी यानीं हिंदुस्थानदेशाच्या दृष्टीनें सोडविलाच आहे. त्यास हजर राहून आपलें हसें व देशाचें नुकसान करून घेण्यास कोणीहि धजणार नाहीं. या वाक्याचा तसा अर्थाचा विपर्यास करावा, हें त्यांच्या तीदांस शोभणारें नाहीं.

त्यांच्या म्हणण्याप्रमाणें "श्री शिवरायाचें स्मारक त्यांच्या मृतात्म्यास संतुष्ट करण्यासाटीं होत नसलें तरी, तें त्यांनीं आमरण बाळगून आचरणांत आणलेल्या ध्येयाशीं विसंगत होणें इष्ट होईल काय? व तें तसें झालें तर त्याचा महाराष्ट्रीय जनतेच्या कर्तव्यबोधार्थ उपयोग होईल काय? याचा विचार त्यांच्या पत्रांत झालेला दिसत नाहीं. अथवा ते तरी कां करितील? गोब्राह्मणप्रतिपालक म्हणवून घेणारे, श्रीसमर्थांचें शिष्यत्व पत्करणारे, श्रीतुकाराम महाराजांच्या शीघ्रार्थ रानांतून भेटीस येणारे, गायें मारावयास नेणाऱ्या खाटकास खुद्द विजापुरांत कंठस्नान घालणारे, आपल्या अंगांत श्रीभवानीचा संचार झाला आहे म्हणून आपल्या एकनिष्ट मावळ्यांस सांगणारे, धर्मासाठीं व देशासाठीं आपला प्राण खर्ची घालणारे, स्वदेशी राजांचे दरबारांत भालदारी पत्करीन, पण परदेशी व परधर्मी सार्वभौम सत्तेंतील राजेपणाच्या जाहगिऱ्या मानमरातब लाथाडून टाकीन; असें रजपुत राजे मानसिंग यांस ठाम सांगणारे श्रीशिवाजीमहाराज, यांना मनोदया त्यांच्याच वंशजांकडून जर राखली जात नाहीं तर; मृत होऊन गेले त्यांच्या ध्येयांचा विचार करून अनायासें प्राप्त झालेला हा राजपुत्र स्वागत योग म्हणजे "शेटीच्या छत्रींत मान घालण्याची संधी" दवडण्याचें पाप त्यानीं कांय म्हणून स्वीकारावें?

त्यांच्या सर्व पत्राचें निरीक्षण केलें तर ते, तें लिहितानां जातीद्वेषाचें दळण दळीत बसलें होते आणि त्यावेळीं असहकारितेवरील शिव्यांच्या ओव्या गात होते, असा बळकट संशय येतो. आणि म्हणूनच भारतकारांनीं "त्यानीं जातीद्वेषाचा—नोकरशाही, सत्यसमाजी किंवा कोल्हापुरी चष्मा वापरण्यास घेतला असावा" असें म्हणून त्यांची ओळखण केली असावी.

सदरील स्मारकास विरोध दाखविण्यांत आक्षेपकांच्या मनांतून जातीद्वेष आहे, असें एक कारण श्री. वांदिवडेकर गृहीत धरितात. तर हाच न्याय म. गांधीच्या असहकारयोगास ते कां लावीत नाहींत! म. गांधी हे वैश्य जातीचे आहेत आणि त्यांचे सहकारी ब. जयकर मराठे आहेत, बॅ. बाप्तीस्ता ख्रिस्ती आहेत, मौ. अलीबंधु मुसलमान आहेत व हॉर्निमन ख्रिस्ती असून युरोपियन इंग्रज आहेत, हें त्यांची ओळख असणाऱ्या श्री. वांदिवडेकरांस माहीत असलेंच पाहिजे. मग, त्यानीं धर्मवेडे, जातीद्वेष्टे, फाजील दुराग्रही म्हणून गणलेले त्यांचे आक्षेपक वरील देशभक्तांविषयीं आदर व पूज्य बुद्धि दाखवून असहकारितेस सहानुभूति दाखवित असतां, केवळ वैश्यजातीच्या वांदिवडेकरांनीं, मराठे जातीच्या श्रीशिवाजी महाराजांच्या स्मारक समारंभास हजर राहण्याविषयीं विनंति प्रसिद्ध केली आहे म्हणून, जातीद्वेषानें आक्षेप आणतील काय? थोडा विचार केल्यास आपल्या म्हणण्यांत किती परस्पर विरोध खचून भरला आहे हें त्या-

येत चालली असून ह्या संस्थेचें महत्व शाळा प्रमाणें मानलें जात आहे. वाचनालय हे ज्ञानार्जनाचें व ज्ञानविनिमयाचें शाळेच्या बरोबरीचें, किंबहुना त्याहून जास्त असें एक बळकट साधन होऊं पहात आहे

भालचंद्र विष्णु खोलकर.

जाहीर विनंति

सारस्वत समाजास

आम्ही अमूक बोलतों आणि दुसऱ्या समाजास तमूक बोलतों, अशा प्रकारचें समाजा समाजांत द्वेष उत्पन्न करण्याचे प्रयत्न कित्येकांकडून केले जातात असें आमच्या कानीं आल्यावरून आपल्या लोकप्रिय भारताच्याद्वारें सर्व सद्गृहस्थांस सविनय कळविण्यांत येतें कीं, असल्या खोट्यानाट्या कंड्यांवर कोणीहि विश्वास ठेवूं नये. आमचें इष्ट साध्य द्वेषावर नसून प्रेमबलावर आहे असें आमचें प्रामाणिक मत आहे. व या कामीं सर्व हिंदुबांधव आम्हांस सहाय्य करतील अशी आम्हांस पूर्ण खात्री आहे. तसेंच प्रगतीच्या आठव्या अंकांत भटांवर बहिष्कार या सदरा खालीं जो मजकूर प्रसिद्ध झाला आहे,तो चुकीचा असून तसा प्रकार आम्हीं केव्हांहि केलेला नाहीं. येथील महाजनमंडळीनें ब्राह्मणांस आमचीं धर्मकृत्यें करण्यास मनाई केली आहे. तथापि या महाजन मंडळीवर आमचा कसाहि प्रकारचा रोष नाहीं. आणि जोंपर्यंत इतर ब्राह्मणानीं आमचीं धर्मकृत्यें करण्याचें नाकारलें नाहीं तोंपर्यंत आम्हांस सर्व भटांवर बहिष्कार घालण्याचेंहि कारण नाहीं.

काकोडें ता. १-१२-९२१

सर्वत्रांचे नम्र कृपाभिलाषी.

आनंद काकोडकर.
कृष्णा अ. काकोडकर.
शांताराम व्हीं काकोडकर.
फरीसराम ह. काकोडकर.

ANUNCIOS

Anuncio ainda que repetido cada linha 0-1-0
Numero avulso 0-1-0

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1° oficio Lobo, vai á praça para venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situada em Quepem no dia 13 do proximo mez de janeiro ás doze horas pelo maior lanço que se oferecer o predio rustico denominado Padamola por outro nome Dacalembaga da cultura de coqueiros e outras arvores sito em Sirvoy, discrito na conservatoria desta comarca sob o numero 15997 avaliado por 750 rupias e penhorado nos autos civeis de execução hipotecaria que Atmarama Xeucorá Sinai Couddò de Sanguem move a Ramacrisna Vencu Sinai Regò e sua mulher Locximibay de Sirvoy para pagamento da quantia de 99 rupias juros penas e custas da execução. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaisquer credores e co-proprietarios incertos. O que para ser publico se expediu este. Quepem 13 de Dezembro de 1921. Fiz escrever subscrevo e assino.

O escrivão int. do 1° ofo.
Datarama Lingu Dolvy

Verifiquei
O Juiz de direito
J. de Seabra

341

nomiado para este cargo, mediante concurso e não por simples indicação – diz-nos uma carta que neste momento acaba mos de receber.

Registamo-lo para evitar equivocos

Sri Vimalesvar

Está sendo reconstruido o templo desta divindade hindu de Rivona, a expensas duma subscrição aberta pelos seus mazanes que tiveram tambem valioso apoio da Comunidade de Astagrar, dos hindus de Margão e do sr. Visnum Sinai Dempó, o qual ofereceu ao mesmo templo telhas do valor de mil rupias.

Consta-nos que o sr. Visconde de Pernem tambem prometeu auxiliar a reconstrucção do aludido importante templo com uma quantia bastante animadora que será conhecida dos nossos leitores, logo que a promessa se converta em facto.

Louvamos o gesto filantrofico dos que desinteressadamente ajudaram a reconstrucção cujos trabalhos estão bem adiantados.

Para 8 de Janeiro

Foram adiadas para o dia 8 do proximo mez de janeiro as eleições designadas para 11 do corrente.

Será ultimo este adiamento ?

Materia

Por causa de acumulação de materia, tivemos de retirar na semana passada e à ultima ho- [illegible]

Desculpas, leitores

Comunicado nº 2

Prazeres da Costa

Quando li por acaso, as palavras do sr. Prazeres da Costa escritas algures e que diziam que *ele preferia perder trinta mil vezes a sua eleição a ter de a ganhar com o apoio governamental*" ...entretive-me a analisa-las e achei que elas tinham saido do fundo do seu coração pela impulsão da *self-confidencia* e do seu *triunfo politico*.

Tais expressões briosas são referentes ás eleições da India expressões que indicam o patriotismo do sr. Costa.

E' corrente sob o ponto de vista politico que o primeiro dever dum Governo é de proporcionar meios de instrucção a seu povo. Este principio é admitido por todas as escolas da filosofia politica.

Respeito á *extensão* das funcções governamentaes ha *muita* divergencia entre politicos. Uns advogam a intervenção do Governo em todos as manifestações da actividade humana.

Outros vão no extremo oposto marcando-lhe uma esfera muito acanhada. Mas ainda nesta limitada área fica abrangido o meu principio.

Todos os filosofos concordam em que o dever do governo é assegurar a pessoa e a propriedade dos membros da comunidade. Admitido este principio, pode negar-se que a instrucção do povo em gerals, é o meio mais eficaz de segurar a nossa pessoa e propriedade? O desprezo por este principio, nunca pode deixar de trazer consequencias lamentaveis.

Se a massa do povo não for instruida, disordens constantes inutilisarão segurança pessoal e da propriedade.

Em conclusão, cabe ao Governo proteger a nossa pessoa e propriedade do *perigo*. A ignorancia do publico é a principal causa do *perigo* á nossa pessoa e propriedade. Por conseguinte o dever do Governo resume-se neste particular em trabalhar para que o publico em geral não fique distituido dos meios de adquirir a instrucção, segundo as suas crescentes necessidades.

O sr. Prazeres da Costa sempre procurou porisso facilitar o progredimento dos seus compatricios e empenhando-se em criar instituições que nos guiassem ao progresso quere na burocracia quere nas profissões liberais.

Eis a acção patriotica que impulsionou o sr. Costa para proferir tais palavras briosas e de *self-confidencia*.

Margão | *Ramachondra V.* Naique

भारत

गुरुवार मार्गशीर्ष व० १ शा. १८४३

अबकारीचा मक्ता

कायदे मंडळांत झालेल्या वादविवादाच्या वेळीं ना. गव्हर्नरसाहेबानीं आपल्या मधूर भाषणांत कितीहि सद्हेतु प्रकट केले असले तरी हें बील पुढें आणण्यांत सरकारचा हेतु आपलें उत्पन्न वृद्धीनें वाढविण्याचा होता हें बीलाच्या सध्याच्या स्वरूपांत सुद्धां म्हणण्यास कोणताच प्रत्यवाय दिसत नाहीं. नाहीं तर सरकारनें हें बील फक्त देशी दारू पुरतेंच ठेविलें आहे तें तसें न ठेवितां त्यांत परदेशी दारूचाहि समावेश केला असता. व जोंपर्यंत परदेशी दारूच्या प्रसारास आळा घालणारें नवें जोडिदार बील पुढें येऊन पास होणार नाहीं तोंपर्यंत गव्हर्नर साहेबांच्या भाषणाबद्दल साशंकच राहावें लागेल, हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे. कारण हें बील पास करून घेण्यांत त्यांस दोन हेतु साध्य करून घ्यावयाचे होते हें दुर्दैवानें कोणाहि नामदारांच्या लक्ष्यांत आलें नाहीं. असें कष्टानें म्हणावें लागतें. पहिला हेतु सरकारचें उत्पन्न वाढविण्याचा व दुसरा हेतु देशी दारूच्या प्रसारास आळा घालून तिच्या जागीं परदेशी दारूचा अनिरुद्ध संचार होऊं द्यावयाचा. वाढणाऱ्या दरानें व नव्या कायद्यांमुळें येणाऱ्या अनेक अडचणीनीं देशी दारू पिणाऱ्यांची प्रवृत्ति परदेशी रंगीबेरंगी दारूकडे वळणें साहजिक [illegible] होऊन बसलें आहे, त्यांत जर कांहीं नवीन भर पडली तर दारूबाजीस आळा पडण्याचें बाजूस राहून देशांतल्या देशांत खेळणारा पैसा परदेशी दारूच्या निमित्तानें परदेशीं रवाना होईल. असें झालें तरी डा. जाइम मोराईस साहेबानां तें नको आहे असें नाहीं; कारण येथें आयात होणाऱ्या परदेशी दारूंत ब्रांक, पोर्त या नावांने ओळखल्या जाणाऱ्या व अमेरिका वगैरे राष्ट्रांत मनाव झाल्या मुळें पोर्तुगालांत कुंडून राहिलेल्या, दारूचा खप विशेष होऊन गिऱ्हाईक नसल्यावरून हताश झालेल्या द्राक्षांच्या मळेवाल्याचें व दारूच्या व्यापाऱ्यांचें जें भयंकर नुकसान होत आहे तें भरून येण्यास बरीच मदत होईल. या कायद्यानें माडाची झाडें पुरेस देणाऱ्या कांहीं जमिनदारानें भयंकर नुकसान होऊन तें, आणि आपला धंदा बसल्यामुळें कायमचा भिकारी झालेले भंडारी व कलाल लोक सरकारास व त्याबरोबर आवतोनोमीय आणि कायदे मंडळांतील लोकनियुक्त सभासद यांस रोषानें शिव्याशाप देतील; पण या शिव्याशापानें भिऊन जाण्याचें त्यांस कारण नाहीं. कारण आपल्या दारूचा खप वाढविण्यास कारणीभूत होणाऱ्या या सरकारास व त्याच्या सल्लागार कायदेमंडळास, परदेशी व विशेषत: पोर्तुगालांतील दारूच्या व्यापाऱ्यांकडून भरपूर आशीर्वाद मिळणार आहेत. मग देशी दारूवाल्याची पर्वा केली नाहीं तरी चालेल पण बीलाच्या धोरणांत जो बिघाड येईल त्याचा विचार अवश्य झाला पाहिजे. व तो व्हावा म्हणूनच भीडभाड सोडून आम्हांस आज लेखणीस शिणवावा लागला. सरकारची चूक मग ती मुद्दाम घडो अथवा सहज घडो, उघडपणें नजरेस आणणें हें आमचें कर्तव्य आहे व तें आम्हीं बजाविलें नाहीं तर भावी दुष्परिणामाचें खापर आमच्या मस्तकावर फुटणार यांत आश्चर्य नाहीं.

फक्त देशी दारूच्या प्रसारास आळा घालण्यापुरतीच या बीलाची योजना असल्यावरून, मद्यपानाचें वाढतें व्यसन कमी होण्यास त्याचा उपयोग होणार नाहीं हें आम्हीं दाखविलेंच आहे. त्याचप्रमाणें येथें हेंहि सांगणें जरूर आहे कीं, सरकारला जर खरोखरच त्या व्यसनाला आळा घालावयाचा असेल तर सरकारामार्फत कोणत्याहि देशी परदेशी दारूसाठीं होणारा खर्च पूर्ण बंद झाला पाहिजे. सरकारनें जर आपल्या तिजोरींत येणाऱ्या पैशांतून अनेक [illegible] च्या खर्चास घाट दिली नाहीं तर सरकारचे मुख्य अधिकारी या नात्यानें डा. जाइम मोराइस यांची 'लोकां सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडा पाषाण' या कोटींत गणना व्हावयाची. देशी आणि परदेशी हा प्रश्न पुढें आणण्यांत आम्ही देशी दारूचा, ती स्वदेशी आहे म्हणून अभिमान बाळगितों असा कोणी लटका समज करून घेऊं नये. आमचें म्हणणें इतकेंच कीं व्यसन या नात्यानें दोनहि दारूंचे दुष्परिणाम जर कमी अधिक नाहींत तर देशी दारूचेंच नियमन केल्यानें दारूच्या व्यसनास आळा बसणें शक्य नाहीं; म्हणून देशी दारू प्रमाणेंच परदेशी दारूच्या विक्रीसहि कायद्याचें नियमन असणें जरूर आहे. असो. देशी आणि परदेशी या एका प्रश्नाशिवाय आणखीं काय काय मुद्दे विचारांत घेण्यासारखे या बिलांत आहेत तें पाहूं.

बीलाचीं एकंदर कलमें वाचून पाहिलीं आणि त्यावर झालेल्या वादविवादाचें निरीक्षण केलें तर त्यांत मक्तेदार कसा असावा या विषयीं कांहींच माहिती मिळत नाहीं, ही लक्ष्यांत घेण्यासारखी बाब आहे. रसायन क्रियेची माहिती असल्याचा पुरावा दाखविल्याशिवाय केवळ लोकोपयोगासाठीं निर्माण झालेल्या औषधांची विक्री करण्यास फार्मसीचा परवाना देण्यांत येत नाहीं तर जगाच्या दृष्टीनें वीपांत गणलेल्या दारूच्या गुत्तेवाल्यास म्हणजे बीलांतील मक्तेदारांस कोणत्याहि पात्रतेची अट असूं नये हें आश्चर्य नव्हे काय ? दारू घेणाऱ्यांस ज्यां प्रमाणें सज्ञानतेची [सोळा वर्षांवरील] अट ठेवण्यांत आली आहे त्याचप्रमाणें मक्तेदारांस ठेवावयास नको होती काय ? मागील व आतांचे अबकारी कायदे ज्यानीं पाळावयाचे आहेत, आपणाशिवाय इतरानीं चोरून दारू गाळण्याचा आणि विकण्याचा धंदा केल्याचा संशय आल्यास, रेजिदोराच्या साह्यानें चोरी उघडकीस आणून ती दारू जप्त करण्याचा, साक्षी पुरावा तयार करून पंचनामा लिहिण्याचा अधिकार ज्याकडे सोपविण्यांत येणार आहे त्या मक्तेदारास आपल्या धंद्यापुरतें तरी कायद्याचें ज्ञान होण्याइतकें शिक्षण असा बबात नको काय ? स्वत: कायदे पाळून इतऱ्यावर देहळणी करावयाची त्यानां जर कायद्याचें ज्ञान होण्यास आवश्यक असें प्राथमिक शिक्षण नसलें तर कायदा पुस्तकांतल्या पुस्तकांत राहून त्याचे दुष्परिणाम मात्र समाजास भोगावें लागणार नाहींत [illegible] काय ? अर्थात नाहीं. मग मक्तेदाराची पात्रता ठरविल्याशिवाय कोणाहि बेजबाबदार इसमाच्या गळ्यांत मक्त्याची माळ घालणें चुकीचें होईल. आतां मक्तेदारांची पात्रता कशी ठरवावयाची हा प्रश्न ओघानेंच पुढें येतो. आमच्या मतें मक्तेदार पूर्ण सज्ञान दर्शेत म्ह० २१ शीच्या वयांत आलेला, फक्त पुरुष आणि त्यास प्राथमिक शिक्षणाचा डिप्लोमा आहे असा असावा व त्यानें आपल्या सुवर्तनाबद्दल गांवच्या कुंत लोकालाचा पुरावा दाखल करावा. ही महत्वाची बाब वगळून जर कायदा लागू करण्याची घाई केली तर कायद्याचें मर्म न समजल्यावरून मक्तेदारांकडून वारंवार कायदाभंगाचें पातक घडणें स्वाभाविक आहे. म्हणून ही चूक सुधारण्याची तजवीज आमच्या Conselho executivo नें म्ह० कार्यकारी मंडळानें आपल्या अधिकाराचा उपयोग करून अवश्य करावी.

मक्तेदाराची पात्रता ठरविण्यांत आल्यानंतर गुत्ता कसा असावा हा प्रश्न पुढें येतो. कारण गुत्ता कोठें असावा याबद्दलचा विचार बीलांत आलाच आहे. आमच्यामतें चोंहोबाजूनीं भिंतिवर उभारलेला व पुढील बाजूस एक दरवाजा आणि दारू विकण्यापुरती एक खिडकी असलेला अशा आकाराचा आटोपशीर प्रमाणाचा गुत्ता असावा. कोणत्याहि बाजूस त्यास ओसरी नसावी व एखादि पुढील बाजूस ती असली तर तीवर खोपे, बांक, खुर्च्या, वगैरे कोणतींहि साधनें असूं नयेत. कां कीं यामुळें आलेलें गिऱ्हाईक तेथें ठाणें देऊन बसतें. व अशा लोकांचा जमाव जमला कीं पुन: पुन: दारू पिण्याकडे त्यांची प्रवृत्ति

आणण्याचा त्यानीं पुरस्कार करावा. त्यांची व टाळ्या पिटणाऱ्या त्यांच्या इकडील भगतांची तेवढी ऐपत खास आहे हें कोणीही सांगूं शकेल. आक्षेपांतून ध्वनित केल्याप्रमाणें, जर असहकारितेमुळेंच पुणें येथें होणारें स्मारक त्यानां मान्य नसेल तर, निदान जातीद्वेषाची स्वहस्तानें ओढून घेतलेली आपत्ति टाळण्यासाठीं, इकडे स्मारक घडवून आणणें त्यानां क्रमप्राप्त होत आहे. तसें ते करतील व विटाळ न मानतां आमच्यासारख्या गरीब, अशोचल्या व अज्ञजनांच्या अल्पस्वल्प सेवेचाही स्वीकार करून मनोदार्य दाखवितील अशी आशा आहे.

नारायण अनंत शेट वांदिवडेकर
डायरेक्टर आल्मैद-कॉलेज.

—कोंडंवी येथील देवांळयांत गेल्या सोमवारीं आमच्या संपादकांचें प्रवचन झालें.

—येत्या निवडणुकींत कोणी हे हिंदु नागरिकानें मत देण्यास जाऊं नये असें आम्हीं यांतील शीर्षच्या स्फुटांत सुचविलें होतें. परंतु यांतील भाग तयार होतांच, प्रा. सं. च्या कामचलाऊ मंडळानें 'हिंदूंच्या राजकीय आकांक्षा तृप्त करणाऱ्या गृहस्थांपैकीं कोणीहि उमेदवार पुढें सरसावल्यास त्यास कदाचित् मदत करण्याचें ठरविल्याबद्दल आम्हांस तार पाठविली आहे. हें ठरविण्यास पणजीच्या ता १ च्या सभेनें सदरहू मंडळास अधिकार दिला होता. काय तें जाहीर पत्रकाच्या रूपानें बाहेर पडेल.

—'जाहीर विनंति' या मथाळ्याचें व चार सह्यांचें एक पत्र डाकोडेहून आम्हांस आलें आहे. सह्यांच्या खरेपणाची खात्री पटतांच प्रसिद्ध करण्यास हरकत नाहिं.

बालोन्नति समाज, कसबा पेडणें

या संस्थेनें

संकल्पिलेल्या हैमंतिक व्याख्यान मालेचा कार्यक्रम

शुक्रवार ता. १६-१२-२१	अध्यक्ष— श्री. गोविंद पुंडलीक हेगडे देसाई. व्याख्याते— श्री परशुराम रामचंद्र सीनारी विषय— मातृभाषेच्या शिक्षणाभावीं परभाषा शिक्षणाचे बालबुद्धीवर घडणारे संस्कार
शनिवार ता. १७-१२-२१	अध्यक्ष— परशुराम रामचंद्र सिनारी. व्याख्याते — रामचंद्र सोनबा कामत. विषय — स्वाभिमानशून्यता व परानुकरण लालसा.
रविवार ता. १८-१२-२१	अध्यक्ष— शांबराव कृष्णाजी सूर्याव सर देसाई. व्याख्याते— गोविंद पुंडलीक हेगडे देसाई. विषय— बालोन्नति व संघशक्ति.
सोमवार ता. १९-१२-२१	अध्यक्ष— यशवंतजी जसवंतराव देसाई विषय— समारोप

व्याख्यानाची वेळ [स्थानिक कालमान] १७ तासांपासून २० तासांपर्यंत ठरविण्यांत आली आहे. कदाचित विषयाच्या महत्वानुसार किंवा व्याख्याते, अध्यक्ष व श्रोतवर्ग यांच्या इच्छेप्रमाणें ही वेळ अर्धा तासानें वाढविली जाईल. मालेच्या बैठका सार्वजनिक स्वरूपाच्या असून सर्व विद्येचे चाहते व उत्कर्षेच्छू अशा सद्गृहस्थांस, अगत्य येऊन कार्यास आपल्या सान्निध्यानें शोभा व प्रोत्साहन द्यावें अशी नम्र विनंति आहे

मालेचें व्यवस्थापक मंडळ

नागेश विष्णू प्रभू देसाई देशप्रभू.
यशवंत रामचंद्र प्रभू देसाई देशप्रभू.
सीताराम घनःशाम शेणवी देसाई.
गणेश रामचंद्र बोडस
रामजी जसवंत राव देसाई

ANUNCIOS

ao *deficit* orçamental. E depois esta classe produtiva não terá que estar dependente dos regedores pagando-lhes uma *certa* quantia reunida entre si como *premio de licença*...proibida. Ou, se verdadeiramente os regedores tem prejuizo, a ponto de ficar descontentes que mandem liquidar os seus serviços, dos quais alguns terão nada menos de dez, doze ou quinze anos de funcções ainda com acumulação de outras, pagas pelo Estado ou corporações

Será isso ?

De VExia etc.

Viritas

Comunicado

Prazeres da Costa

E' incontestavel o progresso que os hindus désta provincia vão fazendo, seja na literatura seja na burocracia ou seja nas profissões liberais, representando verdadeiro orgulho não só da nossa classe mas ainda do pais inteiro que vê frutificados os seus esforços.

Evidentemente, a comunidade hindu, animada pelo progredimento intelectual e moral dos seus irmãos da visinha India, impulsionu-se para uma vida activa, entrando, com todo o empenho, em todas as lutas do seu levantamento. E nesta labuta espera obter melhores loiros, rasgando horizontes para cosmopolitismo e quebrando preconceitos rotineiros.

Haja vista o exemplo do sr. Dr. Siurama Bolvonta Rau que soube dominar a corrente de preconceitos emancipando-se para uma vida salutar e desafogada e em recompênsa desto seu ousado cometimento colheu frutos opimos, ocupando presentemente uma posição brilhante.

A sua nomeação não só incitou o brio da classe a que ele pertence, mas tambem serviu para as gerações vindouras da nossa classe seguirem as suas boas pisadas.

Tanto influiu no nosso meio o seu bom exemplo, que dois filhos hindus adoptaram a mesma orientação, indo cursar na metropole.

Se o Dr. Rau não tivesse conseguido, logo após o seu curso universitario, a colocação que ocupa, e de mais a mais no seu pais natal, a sua acção teria sido improficua e disanimadora para a sua classe que se conservaria refractaria aos sacrificios dele como sucedeu, quando o sr. Dr Sacarama Lada [medico] voltou da metropole sem conseguir para si nem para os seus qualquer impulso na senda do progresso.

Atinando, politicamente, neste facto de carater social é que o sr. Prazeres da Costa, trabalhou pela colocação do sr. Dr. Rau na magistratura da sua terra natal e isto nao é apenas para galardoar o esforço do agraciado, como aparentemense mostra, mas antes para abrir caminho para que outros filhos da classe hindu se nobilitassem com o estudo universitario na metropole, animados do excelente sucesso do sr. Dr. Rau.

E a prova do que se afirma està na partida de dois filhos hindus para a *metropole*, logo depois do regresso do sr. Rau.

Não será ingratidão da classe hindu se ela puzer em olvido este importante beneficio que acaba de receber do sr. Prazeres da Costa ? Meditem !

Margão | *Ramachondra V Naique*

भा र त

गुरुवार मार्गशीर्ष शु० ९ मी. १८४३

अबकारीचा मक्ता

मद्यपानाचें व्यसन समाजास किती घातक आहे याची जाणीव आज सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत व्हावयास लागली असून, सुधारणेचें केंद्र ह्मणून जगभर जिचा डंका वाजत आहे त्या अमेरिकेनें तर आपल्या राष्ट्रांतून या व्यसनाचें समूळ उच्चाटन करण्यास कायदेशीर आरंभ केला व त्याचें इश्य फळहि थोड्याच कालांत दिसावयास लागलें आहे. इतर अनेक राष्ट्रांनींहि मद्यपानाच्या प्रसारास आळा घालण्यासाठीं आपापल्या परिस्थितीस अनुसरून कायदे हि केले आहेत. शेजारच्या इं. हिंदुस्थानांत सरकारचा आश्रय नसल्यामुळें तें काम प्रजेच्या पुढाऱ्यांवरच पडलें आहे व हें ओळखून महात्मा गांधीच्या पुढारित्वाखालीं मद्यपान प्रतिबंधाची चळवळ सुरू असून विचारी लोकांनीं तिला बरेंच यश आणलें आहे. या सुफळदायी व जीवंत चळवळीचा उष्ण वारा या आमच्या पोर्तुगीज हिंदुस्थानांत वाहूं लागल्यास नवल नाहीं व तसा तो वाहावयास लागला आहे असें खात्रीपूर्वक ह्मणण्यासारखीं सुचिन्हेंहि दिसूं लागलीं आहेत. त्या पैकींच गेल्या महिन्यांत आमच्या कायदे मंडळांत बऱ्याच वादविवादाअंतीं पास झालेलें "अबकारी कायद्यांत सुधारणा घडवून आणणारें" बील हें होय. या बीलाचें आयुष्य दोन वर्षांपुरतेंच वर्तविण्यांत आलें आहे. तथापि त्या दोन वर्षांत मिळणाऱ्या अनुभवानें पुढील धोरण निश्चित होणार असल्यानें या बीलानें मद्यपानप्रतिबंधाचा पाया घातला गेला आहे असें समाधान मानून घेण्यास हरकत नाहीं. कारण, हें बील चर्चेस आल्यावेळीं जो वादविवाद झाला व काहीं लोकनियुक्त नामदारांनीं ज्या उपसूचना पुढें आणून थोड्या फेरफारानें पास करून घेतल्या त्यावरून सर्व सभासदांचें 'या अवदसा बाईची हाकलपट्टी होईल तितक्या त्वरेनें केल्याशिवाय समाजांत सौख्य नांदणार नाहीं' या विषयीं एकमत दिसून आलें हें होय. कांहीं जणाचा कल सरकारी उत्पन्नाच्या रक्षणाकडे वाहत होता हें खरें पण दोतोर जुआंव फिगेरेद यानीं स्थानिक मंडळें ह्या. जुंत लोकालें यांस दारूची विक्री व निपज यांची बंदी करण्याचा अधिकार, सध्याचें आपल्या गांवचें सरकारी अबकारी उत्पन्न शेंकडा दहा टक्के वाढवून तें अन्य मार्गानें वसूल करण्याचा मार्ग सुचविण्याच्या करारानें देण्याचें एक कलम घालून मद्यपान प्रतिबंधाची सर्व जबाबदारी केवळ लोकनियुक्त अशा जुंत लोकालांवर घालून पर्यायानें सर्व लोकांस या संबंधीं विचार करण्याची पूर्व तयारीच करून ठेविली आहे. या साठीं त्यांचें आणि त्याच प्रमाणें डॉ. मिरांद व दोतोर व्यं. देसाई यानीं उपसूचना आणून अनुक्रमें शाळा, देवळें व सार्वजनिक कचेऱ्या यांपासून अडीचशें मेत्र ह्म. अज मासें ५६२॥ हात खालील अंतरांत दारूची दुकानें उघडण्याची बंदी करणें, दुकानांची संख्या व त्यांच्या मधील अंतर नियमीत करणें, सोळा वर्षांखालील मुलांस कोणत्याहि वेळीं व स्त्रियांस फक्त सूर्यास्तानंतर दारू विकण्याचा प्रतिबंध करणें, ज्या गावीं दारूचें दुकान नाहीं तेथें तें उघडूं न देणें वगैरे सारखे ठराव पास करून घेऊन बीलाचें स्वरूप उजळ करण्यांत आल्याबद्दल त्यांचेंहि अभिनंदन करणें जरूर आहे.

बऱ्याच उपयुक्त सुधारणांनीं पास झालेल्या या बीलाची रूपरेखा खालील प्रमाणें आहे:—

" प्रत्येक गांव अथवा अनेक गांवांच्या गटांत आजमितीस दारू अगर गूळ तयार करण्यास सुरेस दिलेल्या माडांच्या झाडांपासून आणि दारूच्या दुकानांपासून, सरकारास जें उत्पन्न येत आहे त्यांत १५ टक्क्यांची भर घालून होणाऱ्या किंमतीत सूर काढण्याचा व दारूचे गुते उघडण्याचा मक्ता लिलांवानें देण्यांत येईल. दारूच्या दुकानांची संख्या व दर दोन दुकानांमधलें अंतर कार्यकारी मंडळाकडून नियमीत करण्यांत येईल.

शाळा, देवळें व सार्वजनिक कचेऱ्या यांपासून २५० मेत्रांच्या अंतरांत दुकान उघडण्याची बंदी करण्यांत येईल

सोळा वर्षांखालील मुलांस कोणत्याहि वेळीं व स्त्रियांस, सूर्यास्तानंतर दारू विकण्यास प्रतिबंध करण्यांत येईल.

निवडक जत्रा वगैरेंच्या ठिकाणीं पंधरा दिवसांच्या करारानें नवीन दुकान उघडण्याचा परवाना देण्याचा अधिकार राखून ठेवण्यांत येईल. मात्र तो परवाना स्वतः मक्तेदारास घेण्याची सवलत ठेवण्यांत आली आहे.

मक्तेदारांशिवाय दारू गाळणें व विकणें बेकायदेशीर असून ती चोरी उघडकीस आणून गांवच्या रेजिदोराच्या (पाटलाच्या) मदतीनें जप्ती करण्याचा अधिकार मक्तेदारांस देण्यांत येईल, रोजिदोराकडून हयगय झाल्यास त्यास पंधरा दिवस पर्यंत कामावरून दूर केलें जाईल.

या बीलाची दोन वर्षांची मुदत वाढविण्याचा सरकारास अधिकार आहे.

जीं स्थानिक मंडळें (juntas locais) आपल्या हद्दींत दारूची निपज व विक्री बंद करण्याचा ठराव करून आपल्या गावांत होणारें अबकारी उत्पन्न, दहा टक्के वाढवून वसूल होण्यासारखा दुसरा कर घालण्याचा मार्ग सुचवितील तर, तो मार्ग पसंत वाटल्यास त्यास तसा अधिकार देण्यांत येईल. मात्र हा नवा कर इतर गावच्या लोकांस बाधक होऊं नये. शिवाय स्वतःच्या उत्पन्नांत भर घालण्यासाठीं वरील करांत आणखीं पांच टक्के वाढ करण्याचा व तो वसूल करण्याचा अधिकार मंडळासच राहील."

वरील बील ज्या स्वरूपांत पास झालें आहे तें मूळांत तसें नव्हतें हें ज्यानीं तें बील सरकारी बुलेतींवर प्रसिद्ध झालेलें वाचलें असेल त्यानां सहज दिसून येईल. किंबहुना त्याच्या मूळ स्वरूपांत त्याचा मद्यपान प्रसारास आळा घालण्याची ताकदच नव्हती असें ह्मटलें असतां चालेल. ही ताकद आणण्याच्या कामीं उपरोक्त नामदारत्रयानीं जी चिकाटी दाखविली ती त्यांस भूषणावह आहे. त्यानीं आपल्या सूचनाच्या पुस्त्या जर जोडून घेतल्या नसत्या तर बीलाचा पूर्वीचाच सूर कायम राहून मद्यपान प्रतिबंधास त्याचा व्हावा तसा उपयोग झाला नसता व उलट पक्षीं सरकारास आपलें उत्पन्न [अबकारी] दीड पटीनें वाढवून घेण्यास हें एक आयतेंच साधन झालें असतें.

स्फुट विचार

शेषं कोपेन पूरयेतः— ' श्री शिव प्रभूचें स्मारक व आक्षेपकांचा भ्रम निरास' या मथळ्याखालीं आमचे मित्र श्री. वांदिवडेकर यांचें पत्र आजच्या अंकांत दुसरीकडे दिलें आहे; तिकडे वाचकांचें लक्ष वळणें जरूर आहे. गेल्या ३ नव्हेंबरच्या भारतांत, पुणें येथील श्री शिव स्मारकाच्या पायाचा दगड इं. चे युवराज यांच्या हस्तें बसविण्याचा समारंभ, नोकरशाही व तिचे मूठभर देशद्रोही हस्तक मिळून दीड हजार लोकांच्या सानिध्यानें नुकताच साजरा करण्यांत आला. त्यात हजर रहाण्याविषयींची त्यांची विनंति प्रसिद्ध झाल्यावर दुसऱ्या अंकांत आमचें मत आह्मीं "नारायणीय जाहीर विनंति" या स्फुटांत दिलें होतें. त्या व त्यानंतर प्रसिद्ध झालेल्या इतर अनेक टीकात्मक पत्रांस उत्तरादाखल ह्मणून वरील पत्र जन्मास आलें आहे, हें वाचकांनीं ताडलेंच असेल. उपरोक्त स्मारक समारंभावर आलेल्या अनेक आक्षेपांचा निरास रा. वांदिवडेकरांच्या पत्रांतील मजकुरानें कसा होतो व तो झाल्याशिवाय त्या पत्राचें किंवा लेखाचें नांव सार्थ कसें होईल याची पृच्छा आमचे हजारों वाचक करतीलच. मात्र त्यांस इतकेंच सांगून ठेवणें भाग आहे कीं, रा. वांदिवडेकरांनीं आपली शक्ति असहकार योग, कुयोग, सत्यान्वेषण, जातीद्वेष, भावनाप्रधान, सोंवळें, दुराग्रह, धर्मवेड, कांग्रेस प्रवाह वगैरे अनेक शब्द वापरूनच आक्षेपकांस चीत करण्यांत खर्च केल्यामुळें त्याचें भ्रम निरासाचें कार्य कोठें तरी मथळ्यामध्येंच गडप झालें असावें. ह्मणूनच 'शेषं कोपेन पूर येत' याचें सदरांत त्यांस लोटावें लागत आहे.

जातीद्वेषाचा चष्माः— इं. हिंदुस्थानांतील आमचे भाइबंद आपल्या स्वातंत्र्य ध्येयाच्या आड येणाऱ्या नोकरशाहीचें, खोट्या इभ्रतीचें पांघरूण खालीं ओढावें ह्मणून युवराज स्वागत समारंभावर बहिष्कार घालण्याच्या तयारींत असतां, त्या बहिष्काराचें शस्त्र बोथट होण्यास नोकरशाहीनें आपल्या हस्तकांच्या सहायानें जे अनेक डाव टांकिले आहेत व टांकीत आहे त्या पैकींच श्री शिवस्मारक हाहि एक डाव होय. महाराष्ट्राच्या वंदनीय विभूतीचें नांव घेऊन त्या नावांवर आपली इभ्रत सांभाळून घेण्याचा हा डाव नोकरशाहीनें कि-

वाटत आहे. हें सरकारच्या निदर्शनास आणून दिले पाहिजे. उठवणीस आलेल्या रयतेस किती प्रमाणांत गांजावें हें मायबाप सरकार विसरल्यामुळें आपला बचाव आपणच करून घेण्याची आतां वेळ आली आहे. मध्यवर्ती देशबंधूंनीं हद्दीवरच्या करांशीं आपला संबंध नाहीं असें म्हणून आम्हांस नाउमेद व हताश करूं नये. आम्ही एकाच माय भूमीचीं सारीं लेंकरें असल्याच्या जाणिवेनें अन्योन्य सुखदुःखाची संवेदना सर्वांस झाली तर कसल्याही मानवी संकटास टक्कर देण्यास आमच्यांत अपूर्व संघशक्ति निर्माण होईल हें लक्ष्यांत ठेऊन सर्व देशबंधू आम्हांस सहाय्य करतील अशी आशा आहे.

एक हद्दीवरचा कंदील.

विचारा पतंग

(इंदिरातनय, मुंबई)

प्रदक्षिणा घालिसी पतंगा कां त्या दीपातें ?
भुलसी, मोहुनि जासी जसा मीन आमिषातें । १
चकाकतें तें सारें प्राण्या, हेम न मानावें ।
दुर्जन वदती मधुवच म्हणुनी तयां न वानावें । २॥
कितीकदा तुज पलीकडे मीं दिधलें लोटोनी ।
फिरसी परतुनि आत्मघात हा करिसी दाटोनी । ३॥
भक्ति तुझी जी असी जडावी या दीपज्योतीं ।
वाटे माते मुकसील वृथा प्राणातें अंतीं । ४॥
पहा, पहा, हीं प्रेतें पडलीं अशाचि अनुरागें ।
तरि चल बाबा, चल चल आतां फीर फीर मागें । ५॥
हाय ! हाय ! हा ! पुनरपि गेला तो ज्योतीपाशीं ।
शिव ! शिव ! हरहर ! भस्म होउनी देई जागृतिसी । ६

ANUNCIOS

वाटत आहे. हें सरकारच्या निदर्शनास आणून दिले पाहिजे. उठवणीस आलेल्या रयतेस किती प्रमाणांत गांजावें हें माबाप सरकार विसरल्यामुळें आपला बचाव आपणच करून घेण्याची आतां वेळ आली आहे. मध्यवर्ती देशबंधूंनीं हद्दीवरच्या करांशीं आपला संबंध नाहीं असें म्हणून आम्हांस नाउमेद व हताश करूं नये. आम्ही एकाच माय भूमीचीं सारीं लेंकरें असल्याच्या जाणिवेनें अन्योन्य सुखदुःखाची संवेदना सर्वांस झाली तर कसल्याही मानवी संकटास टक्कर देण्यास आमच्यांत अपूर्व संघशक्ति निर्माण होईल हें लक्ष्यांत ठेऊन सर्व देशबंधू आम्हांस सहाय्य करतील अशी आशा आहे.

एक हद्दीवरचा कंदील

विचारा पतंग

(इंदिरातनय, मुंबई)

प्रदक्षिणा घालिसी पतंगा कां त्या दीपातें ?
भुलसी, मोहुनि जासी जसा मीन आमिषातें । १
चक्राकर्ते तें सारें प्राण्या, हेम न मानावें ।
दुर्जन वदती मधुवच म्हणुनी तयां न वानावें । २॥
कितीकदा तुज पलीकडे मीं दिधलें लोटोनी ।
फिरसी परतुनि आत्मघात हा करिसी दाटोनी । ३॥
भक्ति तुझी जी असी जडावी या दीपज्योतीं ।
वाटे मातें मुकसील वृथा प्राणांतें अंतीं । ४॥
पहा, पहा, हीं प्रेतें पडलीं अशाचि अनुरागें ।
तरि चल राधा, चल चल आतां फीर फीर मागें । ५॥
हाय ! हाय ! हा ! पुनरपि गेला तो ज्योतीपाशीं ।
शिव ! शिव ! हरहर ! भस्म होउनी देई जागृतिसी । ६

ANUNCIOS

As referidas povoações que, na opinião dos entendidos reunem todas as condições para culturas vantajosas quando providas dagua seriam grátas ao Governo se este as favorecesse com o mesmo melhoramento.

Pensem nisto em vez de procurar matar o *deficit* por meio do lançamento de novos impostos.

De novo...

Do quartel general eleitoral de Pangim foram expedidas para diversos *destacamentos* aldeanos ordens para tudo estar preparado para a nova campanha do dia 11 do corrente a favor do *manipanso* ou seja *simbolo indiano* que, segundo corre com insistencia abalou para França por causa dumas questões em que a integridade da pele do impagavel representante nato corria o gravo perigo de sofrer... *abalos perigosos.*

Pelo que está sucedendo, parece que o *manipanso* ainda desta vez, queira ou não queira vai á feira.

*Q*ue vá e consiga, com ajuda dos *celestinos* e *constantinos* satisfazer ás pretenções de seus *criados, amigos* e *admiradores* eis os nossos sinceros votos.

Jogo de azar

Abriu-se já a barra.

Começaram os Zatrás e *Cales*. O jogo de azar campeará agora infrene cà e lá.

Para o prestigio e honra dos respectivos templos hindus, urge que as suas mesas administrativas envidem os seus milhores esforços de molde a que cesse a pagodeira impertinente do mesmo jogo.

Um reparo

A eleiçao anunciada para o proximo dia 11 terá vida regular duma legislatura ?

Naturalmente nada pode dizer-se, já, sobre este assunto do dominio, nem sempre sondavel, do Futuro.

E' certo, porem, que havendo nova revolução, o que Deus não permita, teremos nova eleição, o que tambem Deus nao permita, porque para nós a eleição, pelas suas consequencias, é mais temivel do [illegible] a revolução com o seu [illegible]angue, chachina *et cetera*.

Mas ¿porque é que a revolução triunfante, desde o momento em que representa a vontade do *Povo Soberano*, não fará a administração dos negocios publicos por meio dos revolucionarios victoriosos, [illegible]ando maçada ao pacato [illegible]o e *massa as camaras* [illegible]*pais* ?

[illegible]a uma idea aos futuros [illegible]narios, idea que se [illegible] economia, condição [illegible]matar o *deficit* [illegible]*it*.

[illegible] nada por [illegible]em [illegible]dãos *Pra*[illegible] difini-

भडंग

आमच्या दुकानीं एक

जी, पुरी, भजीं, शिरा, उस[illegible]

ताजे तयार मिळतील. आगां[illegible]

दिली जाईल.

हें चित्र पहा आणि तें चित्र पहा

स्वराज्याचे हक्क लाभल्यानंतर फिलिपाईन बेटांतील प्रजाजनाला केवळ पांचच वर्षांच्या अवधींत राजकीय, औद्योगिक वगैरे बाबतींत जी कल्पनेच्या बाहेर आघाडी मारतां आली, ती हकिगत वाचली ह्मणजे मजला सकौतुक आनंद वाटतो. व स्वातंत्र्याच्या जोरावर पाहिजेतर आपली मायभूमि कशी नंदनवनतुल्य बनवितां येते या गोष्टीची साक्ष पटते. परंतु लोकमतानुसार चालत असलेला सांप्रतचा गोमांतकाचा बेगडी ऊर्फ दिखाऊ राज्यकारभार अवलोकन केला ह्मणजे आनंद वाटण्याऐवजीं निराशेच्या ओघांत साहाजीकच मथळ्यांत दिलेले उद्गार बाहेर पडतात. गोमांतकाचा राज्यकारभार योग्य त्या दिशेनें चालल्यास थोड्याच कालामध्यें आपणासही चांगलें दिवस प्राप्त होणें कठीण नाहीं. फिलिपाईन बेटांची लोकवस्ती व क्षेत्रफळ हीं लक्ष्यांत घेतलीं असतां त्याच्याशीं आपल्या गोमांतकाची तुलना करणें जरा धाडसाचें होईल. परंतु केवळ राज्यकारभाराची दिशा एक असल्याकारणानें त्याचा येथें उल्लेख करणें ओघानें प्राप्त झालें. लोक सत्तेच्या कालांतील गोमांतकाच्या १० वर्षांच्या राज्य कारभाराचें सूक्ष्म निरीक्षण केलें तर आपल्याला काय आढळून येईल ? अर्थात निराशाजनक स्थितींतच सध्या आपला देश आहे असें ह्मणणें भाग पडेल. एवढेंच नव्हे तर सध्याची स्थिति आहे तशीच सुरु ठेवल्यास मग आणखीं उन्नतीचीं आशाच नको. देशाची उन्नति होण्यासाठीं अहोरात्र तळमळत असलेले फिलिपाईन लोक कोणीकडे आणि केवळ वरिष्ठांचा शब्द झेलण्याकडे आपली प्रवृत्ति ठेऊन व शक्य त्या प्रयत्नानी आपल्या बगलबच्यांच्या पोटाची सोय लागली कीं पुरे, यांतच धन्यता मानून घेणारे देशभक्त [!] कोणीकडे ! — वाच

--आज पणजीं मुक्कामीं तेथील व्यापारीसंघाच्या दिवाणखान्यांत सर्व हिंदुनागरिकांची सभा प्रागतिकसंघातर्फे भरणार आहे.

— कापितांव नोबेल मोत व सा कारदोझ हे अनुक्रमें सेनादोर व देपुताद निवडून येण्यासाठीं गोव्यातर्फे उमेदवार रहाणार आहेत.

rem a sua atitude nas proximas eleições de deputado e senador.

Espera-se que a mesma reunião seja bastante concorrida.

Prazeres da Costa

Sob esta epigrafe enviou-nos dois artigos o sr. Ramchondra Venctexa Naique, de Margão que pelos modos e não obstante a nossa critica sobre a individualidade politica do *Simbolo indiano* continua a pensar que o celebre *manipanso* é estadista dos quatro costados, patriota dos oito costados e politico dos dosaseis ditos

Não lhe queremos mal porisso porque é livro a cada um pensar da forma como melhor entender.

Simplismente sucede que por falta do espaço e para dar vasão à materia retardada torna-se impossivel a pronta satisfação do desejo do sr. Naique de ver publicado o o seu artigo n.° 1

São circustancias de força maior que nos impelem a reservar para ocasião oportuna a serie dos artigos já referidos.

देवस्थानांत नृत्यांगनांची अनावश्यकता

(ले० विरोधी)

वरील उपयुक्त विषय प्रतिपादन करण्यांत भारत पत्राने रकाने अनेक वेळ खर्ची पडले आहेत. त्याचें दृश्य फळ अद्याप जरी दिसलें नाहीं तरी दिसण्याच्या मार्गांत आहे हें कोणीही कबूल करील. वेश्यांच्या नाचगाण्याशिवाय देवस्थानांतून होणारे हरेक उत्सव पार पाडतां येतात याचें उदाहरण ह्मणून श्रीक्षेत्र सांखळी येथील दत्त मंदिराकडे बोट दाखविण्यांत येत असे. आतां इतकें दूर जावयास नको. अगदीं शेजारच्या काकोडें देवस्थानांत या दोन महिन्यांत तशी चाल पडून गेली आहे. तेथें सोमवारचा दिवस पाहून गेल्यास वरील तत्व कोणासही पटल्याशिवाय राहणार नाहीं.

देवस्थानें हींच आमचीं क्रिडास्थानें, त्यांची व वेश्यांच्या नाचगाण्यांची फारकत केली तर देवस्थानचा बदलौकिक होईल, देवता रुष्ठ होतील, उत्सवांची शोभा नष्ट होईल व. वगैरे बाष्कळ प्रलाप काढणारे कांहीं ऐदी चैनखोर व दिखाऊ धर्मभोळेपणा दाखविणारे रंगेल गडी बगळले, तर बहुजन समाज वरील मार्गानें जाणारा आहे मात्र त्यास नीट मार्ग दाखविणारे पुढारी पुढें आले पाहिजेत. चालत आहे तेंच बरें, सुधारणा करुन आमचीं काय व्हावयाचें आहे; पूर्वींचे लोक काय वेडे होते व आतांच काय ते शहाणे निपजले आहेत ? वगैरे सारख्या प्रश्नानीं आपल्या विचारीपणाचें प्रदर्शन करणारे कांहीं कमी नाहींत; किंबहुना अशाच वृत्तीचे लोक फार. त्यानां समजावून सांगणारा कोणी आणि त्यानां कोणतीच दगदग घ्यावी लागणार नाहीं ह्मणजे पुरे. लगेच ते वळणावर यावयाचे व एकदां वळले ह्मणजे मग मागें ह्मणून सरकावयाचे नाहींत. त्यांचा योग्य मान त्यांस दिला पाहिजे. प्रत्येक देवस्थानांतून आस्थापूर्वक याचा विचार होणें फार अगत्याचें आहे. सध्या तशीच परिस्थिति निर्माण झाली आहे. तिचा फायदा घेण्यांतच शहाणपणा आहे व हा शहाणपणा काकोडें येथील महाजनमंडळीनें दाखविला या बद्दल ते स्तुतीस पात्र आहेत. तसेंच अमली परिस्थिति निर्माण करण्यास कारणीभूत झालेल्यांचेही "मग ते कोणीही असोत" आभार मानणें योग्य आहे.

वरील विचार आह्मी गेल्या दिवसांत काकोडें येथील कालयाच्या उत्सवास गेलों होतों, त्या वेळीं सुचले. सदरील उत्सवांत पालखीतालखीच्या मिरवणुकींत लहान थोर सर्व लोक सामील झाले होते. प्रत्येकाच्या तोंडांतून या निमित्तानें तरी हरिनामसंकीर्तन चाललें होतें. देवाच्या सहवासांत असल्यावेळीं तरी ते जन्माचें एक कर्तव्य पार पाडीत होते. कोणाच्याही उत्सवांत न्यूनता भासलेली दिसत नव्हती. घटकाभर, तरी अंतःकरणांत आनंदाच्या उर्मी उसळल्या नाहींत असा कोणीही दिसत नव्हता. सर्व लोक उत्साहानें आपली भक्ती दर्शवीत असलेले दिसत होते. याचें सर्व श्रेय महाजन मंडळीस आहे. पण तात्विक दृष्टीनें पाहूं गेल्यास [illegible] दिसत असेल हें सांगणे [illegible] जाईल, कारण, [illegible] देशात करुन [illegible] देवस्थानच्या आज्ञानें आपले आसन मांडून बसला होता. फासे, पैसे वगैरे सारखे घडे जुगार खेळणाऱ्यांची सोय दूर कोठें तरी करण्यांत आल्याची गुणगुण ऐकूं येत होती. आणि पैसा दोन पैशांनींच गरीब लोक व लहान मुलें, केवळ अर्भकें, यांचे खिसे रिकामे करणारा "चिरचिऱ्यांचा" समूह, एका पैश्याला पांच पैश्याचें आमीष दाखवून आपल्या कागदी जाळ्यांत किती तरी लोकांस, लोखंडी कांटा दाखवीत दाखवीत पकडीत होता !! लोकही पण करमणुकीखातर त्यांत जाऊन सुखासुखीं पडत होते. अशा लोकांनां भजनीं मिरवणुकींत होणारें समाधान काय कामाचें ? अशानां देवधर्माच्या नादीं थोडा वेळ तरी लावावयाचें असेल तर वेश्यांप्रमाणेंच जुगारही त्यांच्या हद्दपार केलें पाहिजेत. जुगाऱ्यांची हद्दपार ह्मणजे पाताळ भेदून जावयाची अर्थात हद्दपार करणें ह्मणजेच बंदी करणें होय. आतां आहून झक मारणारे कांहीं निलाजरे असतीलच, त्यांचा शोध करीत बसणें गांवच्याच पाटीलसाहेबांकडे सोपविणें बरें. ह्मणून महाजन मंडळीनें अथवा त्यांच्या शिरोभागीं असणाऱ्या अधिकारी मंडळीनें आपलें कर्तव्य केलें असतें तर त्यांत त्यांचा शहाणपणा व त्याबरोबर तत्वनिष्ठाही दिसली असती. आतां, त्यांनीं वेश्यांचा मोह आवरला पण पैशांचा मोह आवरला नाहीं असें मानून, ही चूक सुधारण्याची संधि पुनः येईल तेव्हां तरी ते फुकट दवडणार नाहींत अशा आशावादीपणा दाखविणेंच बरें.

या पुढें जत्रांचाच सुकाळ आहे. पंचवाडी, कार्तिं, कुंडी, कोठंब, मडकईं, देऊळवाडा, शिरोडें, केरी, सांगे; काणकोण वगैरे अनेक ठिकाणच्या अशा यात्रा व्हावयाच्या आहेत. त्या त्या ठिकाणीं, महाजन ग्रामस्थ, व गांवचे अधिकारी वर्गानेंही जुगाराशीं विरोध दाखविला तर थोड्याच कालांत देवस्थानें व जुगार यांशीं फारकत झालेली दिसेल. प्रभू समर्थ आहे. प्रयत्न झाला पाहिजे. [illegible] अवलंबून राहणें फायदेशीर होणार नाहीं. स्वयंसेवा दर्शविणाऱ्या तरुणांनीं [illegible] कार्य पुढें येऊन, [illegible] प्रगट करावें. बुद्धिदाते [illegible] व साहाय्यकर्ते देव मिळाल्याशिवाय राहणार नाहींत. विरोधी एकसारखा विरोध करीत राहणार. तें त्याचें ब्रीद आहे व त्यांत त्याला समाधान आहे. असो. तूर्त इतकेंच पुरे. फिरुन अनेकदां भेट घेईन.

येत्या अंकीं

श्री. नारायण अ. [illegible] यांच्या "श्री शिवप्रभूचें स्मारक व आक्षेपकांचा भ्रमनिरास" या लेखाचा विचार होईल.

ठराव पास करण्यासाठीं 'टैान हॉल' अर्पण केला होता. कारण काय तर—नोकरशाहीस युवराजास मानपत्र देण्यास तयार अशा माणसांची अत्यंत गरज आहे. कोल्हापूरकरानें कोल्हापूरापासून पुण्यापर्यंत जाण्यास लोकांस—श्रीमंत गरिबांस—रेल्वेची गाडी मोफत ठेवली आहे कशा करितां तर स्वागतसमारंभास लोकांचा अपूर्व घोळका जमावा म्हणून ·या कामीं पुणें हरताळ पाळणार तें प्रिन्सच्या नजरेस येऊं नये या साठीं एवढा हा द्राविडी प्राणायाम. एवंच दोन्हीं बाजूनीं लोक स्वार्थ साधणार आहेत. मात्र भाडोत्री स्वार्थ व बिन भाडोत्री स्वार्थ यांत काय ती देशबंधूंची खरी करामत कळून येईलच. असो.

सर्व मराठा गायक समाजातर्फे २।३ इसम पुण्यास मानपत्र समारंभास हजर राहणार असें ता. १० रोजीं आम्हांस मिळालेल्या प्रगतिच्या ८ वे अंकावरून समजलें. तरी त्यानीं नोकरशाहीच्या ताटाखालचें मांजर बनून जाऊन म० गांधीच्या आज्ञेचा भंग करूं नये. अशी त्यांस आमची नम्र सूचना आहे. महात्माजीच्या आज्ञेचें उल्लंधन करून जाणार असल्यास स्वतःचें मानपत्र म्हणून द्यावें. मराठा गायक समाजाचें असल्यास आम्ही त्याचा तीव्र निषेध करितों.

पत्रकर्ते महाराज आपले पत्राची जागा अडविल्याबद्दल माफी करावी. व आपलेंहि मत दिल्यास आभार होतील.

पांडुरंग लाडू शिरोडकर.

गेल्या अंकांतील मजकूर कंपोज झाल्यावर सदरहू पत्र आमच्या हातीं आलें. यद्यपि उशिरां असलें, तथापि केवळ लोकमत समजण्यासाठीं, तें या अंकीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे. बाकी आमचें मत आम्हीं मागें नमूद केलेंच आहे.

सं. भारत.

ANUNCIOS

o professor será, aos seus alunos, *um bom modelo da educação* o que de preferencia á instituição ê muito essencial para a formação duma nação progressiva.

E descanço desta vez, deixando o sr. Frias exercer as suas *magias* prometidas em homenagem à redempção da sua patria porquê restam-lhe dias contados da velhice.

Margão 12-11-21 | *Ramachondra Venctexa* Naique

ECOS & CRITICA

Moratoria

O Governo concedeu moratoria atê o fim do proximo mez de Dezembro para o pagamento da contribuição predial em divida.

Como, porem, ela não exclui selos que, principalmente, agravam a divida, o previlegio facultado pelo Governo resulta quase que inutil.

A Sua Excia Sr. Governador Geral pediriamos, por isso em nome dos devedores do Estado, a graça de isenta-los do pagamento dos mesmos selos, se ê que, de facto, pretende favorecer o publico com a mencionada moratoria

E a proposito, lembrar-lhe-iamos, tambem, da necessidade de conferir igual regalia aos devedores das comunidades.

Seremos atendidos ?

Entrevista

Em lugar de honra publicamos, hoje, trechos importantes da entrevista concedida pelo sr. dr. Santana Rodrigues a um redactor do popular diario lisbonense *Diario de Noticias*

A referida entrevista em que o sr. dr. Rodrigues revela conhecimento perfeito das antiguidades da India, bem patentea o interesse que o ilustre patriota e insigne estadista nutre pelo levantamento do seu Paiz

Honra lhe seja, porisso.

Balonati Samaj

Como estava anunciada, realisou-se no dia 18, a sessão comemorativa desta instituição sob a presidencia do sr. Subraia Vithal Dessai que produziu um discurso, apropriado á ocasião. Alem do sr. presidente, fizeram uso de palavra os sr. dr Zoivonta Ganaxama Sinai *Mo*lcornencar, R. R. Sirvoicar e Givagi Xaba Dessai, que em nome da associação ofereceu ao secretario desta dito sr. R R. Sirvoicar uma medalha de prata

O nosso director fez uma conferencia sobre a educação civica, depois do que deu-se por terminada a sessão a que assistiram, tambem, principais mouros da séde do concelho.

A proposite de Abkari

O ilustre vogal do Conselho Legislativo sr. dr. Miranda entendeu e bem que a venda de espirito não devia ser confiada a menores e mulheres

Dada a competencia do sr dr. Miranda que ê medico distincto, era de esperar que a sua opinião fosse tomada em consideração. Mas...

सांगें व चळवळ

गेल्या बुधवार ता. १६ रोजीं रात्रौ येथील श्री विठोबाचे देवालयांत भारत संपादक श्री. हेगडे देसाई यांचें हेचि थोर भक्ति आवडती देवा । संकल्पाची माया संसाराची या श्री तुकाराम महाराजांच्या अभंगोक्तीवर दीड तास प्रवचन झालें. त्यांत त्यानी संसारांत राहूनही त्याची आसक्ति सोडून कसें दूर रहावें हें दासबोध, गीतारहस्य वगैरे ग्रंथांच्या आधारानें समजावून सांगून देव आणि देश हे कसे भीन्न नाहींत, देशाची भक्ति केली तर ती जनार्दनाला कसी प्रिय असते याचें विवेचन केलें आणि या जनतारूपी जनार्दनाची भक्ति घडावी ह्मणूनच प्रागतिक संघाची स्थापना झाली आहे त्यास मदत करणें हें सर्वांचें कर्तव्य कसें आहे याची जाणीव करून दिली व प्रवचन संपविलें.

नंतर श्री. ना. अ. पाटणकर यानीं प्रवचनकारांचे आभार मानून सर्वांस त्यांच्या उपदेशाचें चीज करण्याविषयीं विनति केली तेथून श्री. हेगडे देसाई यानीं श्री पाईक वाचन मंदिर या संस्थेस भेट दिली आणि संस्थेविषयीं आपला अनुकूल अभिप्राय देऊन तिच्या सभासदांचें अभिनंदन केलें. दुसरे दिवशीं प्रागतिक संघाचे उद्देश जाहीर रीतीनें समजावून देण्यासाठीं, श्री विठ्ठल सेवक मंडळातर्फे सभा भरविण्यांत आली होती- अध्यक्षस्थानीं रा. हेगडे देसाई होते त्यानीं सूचना केल्यावरून रा. अ. कामत यानी प्रागतिक संघाचे उद्देश थोडक्यांत सांगून, अशा ह्या राष्ट्रकार्यास सर्वांनीं मदत करून राष्ट्राचें व पर्यायानें स्वतःचें हित साधून घ्यावें अशी विनंति केली. अध्यक्षानींही भारतांतील वगैरे गोष्टी च्या आधारानें एकीचें महत्व दाखवून देऊन सर्वांस एकदिलानें, एकविचारानें, एकत्र होऊन संघास मिळण्याची प्रार्थना केली. नंतर रा. पाटणकर यानीं आभार प्रदर्शन करून अध्यक्ष व इतर मंडळी यांस फराळ स्वीकारण्याची विनंति केली, त्याप्रमाणें तो स्वीकारण्यांत आल्यावर जागच्याजागीं संघाचे बरेच फार्म वांटण्यांत आलेव सभेचें काम संपलें.

एक वाचक

Nós entendiamos mais, a nosso turno, que ao arrematante da venda do mesmo produto alcoolico devia exigir-se tambem a condição de não ser analfabeto possuindo, pelo menos, a habilitação do 2° grau. Mas...

E ficamos por hoje, em ...*mas*

Principe de Gales

A' chegada do futuro imperador da India á cosmopolita cidade de Bombaim, houve derramamento de sangue, mortes e chacina

E, se é verdade que pelo dedo se conhece o gigante, pelos tetricos factos que se deram naquela cidade, é possivel profetisar-se que a visinha India ficara a breve trecho *transformada*

E" sinal dos tempos e da epoca que atravessamos.

Laximibai Rau

Magoou-nos imenso o falecimento desta virtuosa sra mãe extremecida do sr. dr. Siurama Bolvonta Rau, digno Delegado desta Comarca e dos srs Ronlu Bolvonta Rau e Esvonta Bolvonta Rau, acreditados proprietarios da firma Despandě Brothers.

Por essa triste ocorrencia que teve lugar em 21 do corrente, enviamos aos ilustres enlutados os nossos sentidos pesames.

Os funerais foram imponentes com assistencia de varias pessoas de distaque na comarca.

मदत करा !

आह्मां हद्दीवरील मुक्या जनावरांवर कणा मोडून जाण्या इतकीं अवजड करांची ओझीं लादून सरकारनें आपली प्रजानुरंजनाची हौस पुरवून तर घेतलीच. आतां आमचे मध्यवर्ती देशबंधू तरी या बाबतींत आह्मांस पाठबळ देतील ह्या आशेनें आमचें दुःख आपले मार्फत वेशीवर टांगीत आहोंत याला आपण येत्याच अंकीं आश्रय द्यावा अशी प्रार्थना आहे.

गोवा हद्द ओलांडून परअमलांत जाणाऱ्या येणाऱ्यांवर सवासहा आणे कर बसल्यामुळे सर्व लोकांचे व्यवहार बंद पडून लोक हवालदील झाले आहेत. ह्या करांची ज्यांस पर्वा नाहीं असे श्रीमंत समाजांत थोडेच असावयाचे. ते सोडून दिले तर बाकी मध्यमवर्ग व शेंकडा ५० गरीब शेतकरी मजूर व इतर भिकारी टाकारी ह्या सर्वांस ह्या करानें तोंड दाबून बुक्यांचा मार झाला आहे. ता. १५ अक्टोबरच्या टाईम्स ऑफ इंडियांत 'हद्दीलगतच्या गांवांस हा माफ केला आहे' अशा अर्थाचा मजकूर लिहून त्या कराचें कागदी गोजिरवाणें स्वरूप वर्णिलें आहे. पण खाण्याचे व दाखविण्याचे दांत वेगळे ह्मणतात त्या प्रमाणें अंमल बजावणीच्या वेळीं त्याचें खरें स्वरूप व्यक्त होत आहे वस्तुतः हद्दीपलीकडील शाळेंत जाणारे विद्यार्थी, वैद्य व ज्यांची तिकडे जमीन किंवा व्यापार धंदा आहे अशा कांहीं विशिष्ट व्यक्तींस माफी पास मिळण्याची सवलत आहे असें सांगण्यांत येतें परंतु वशिल्याचें तट्टू ज्यांच्या पागेंत आहे किंवा दुसरी कसली तरी जडवाई ज्यांचेकडे आहे अशानीच बहुधा ह्या सवलतीचा फायदा घेतलेला दिसत आहे. बाकी दुबळ्या रयतेची दाद मात्र लागत नाहिं. काय न्याय आहे पहा ! ज्यानां एक पैसा ह्मणजे एक रुपयाच्या जागीं आहे व चार दोन पैशांच्या स्वस्ताईसाठीं जे हद्दीपलीकडच्या बाजारास जाऊन कसा तरी आपला योग क्षेम चालवितात अशा गरीब लोकानां तरी बिनशर्त हक्कानें अगोदर पास मिळाले पाहिजे होते ते त्यांस मिळत नाहींत आणि कर भरण्याचें सामर्थ्य ज्यांस आहे त्यांस पास मिळतात ! 'देवो दुबल घातकः !' दुसरें काय ? !

दुबळ्यांचें सुखदुःख 'जावें त्यांच्या वंशा तेव्हां कळे' मोल मजुरी करणाऱ्यानीं आतां जगावें कसें ? हे गरीब लोक पैसा पैसा करून जमविलेले आठ बारा आणे गांठीस बांधून पलीकडच्या आठवड्याच्या बाजारास जातात आणि कांदाकोथिबीर घासलेट बाटली वगैरे निर्वाहाचे जिन्नस घेऊन आठ दिवसांची बेगमी करितात. ही विचाऱ्यांची जन्माची सोय बुडवून ह्या करानें त्यांच्या पोटावर पाय आणला आहे ! जो जिन्नस पलीकडच्या बाजारांत चार आण्यास मिळतो तो अलीकडील खेडेगावांतल्या भिकारड्या दुकानांत सहा आण्यास मिळतो. ही प्रचीत सर्वांस आहे. तेव्हां हे शीरपट्टीचे सवासहा आणे वाचविण्यासाठीं हद्दीच्या पलीकडील हाकेवरचें दुकान सोडून अलीकडच्या दुकानावर गेलें तरी महागाई, जकात व नफेबाजी ह्या तीन द्वारानीं कराच्या इतके पैसे सरकारच्या नाहीं तर दुकानदाराच्या खिशांत उतरतात ? तेव्हां दोहींकडून होणाऱ्या ह्या गरिबांच्या नागवणुकीस जबाबदार कोण ? अशी खरी वस्तुस्थिति असतां 'ह्या करानें आपल्या गांवचा व्यापार भरभराटीस येणार ? असें ह्मणणाऱ्या, नोकरशाहीच्या शिष्टपणाचें डोळ्यावर पटल आलेल्या सज्जनांस नमस्कार असो ! आमच्या नतद्रष्ट व क्रियानष्ट अशा दरिद्री गोमांतकांत, जीवनाचे यच्चयावत् पदार्थ, इंग्रजी हिंदुस्थानांतून आणविल्याशिवाय गति नाहीं ही गोष्ट-घरील मुक्ताफळें गाळणाऱ्या कूपमंडूकांस कशी कळत नाहीं याचें नवल वाटतें.

आह्मां हद्दीवरच्या लोकांचे हितसंबंध परस्परांशीं इतके जखडून गेले आहेत कीं, एकाच राजसत्तेच्या नियंत्रणाखालील आह्मी लोक आहोंत असें उभयतांसही वाटतें. इकडचे तिकडे व तिकडचे इकडे वैवाहिक संबंध पुष्कळ काळापासून घडत आले आहेत व पुढें घडणार आहेत अलीकडचीं मुलें पलीकडच्या शाळांतून ठेवली असून त्या करितां त्यांचे पालक त्या ठिकाणी बिऱ्हाड करून राहिले आहेत ! विद्यार्थ्यांस पास मिळाला तरी तो दुसऱ्यास उपयोगी पडत नाहीं. इतकेंच नव्हे, तर ज्या तारीचा पास असेल त्या पासाचा उपयोग दुसऱ्या एकाद्या तरीवरून जातानां कोणी करितां कामा नये. मजुरांच्या तुटवड्यामुळें शेतें करण्यास किंवा अन्य कामें करण्यास तिकडचे मजूर इकडे आणावे लागतात ! आणखी पदोपदो कसे प्रसंग येतात त्यांचें वर्णन करणें शक्य नाहीं. तात्पर्य वर सांगितलेल्या प्रकारांवरून इरघडी माणसांचा राबता हद्दीवर कसा कसा चालत असेल याचें अनुमान हा कर पास करून देणाऱ्यांच्या शून्य डोक्यात झालें नसलें तरी विचारी माणसांस झाल्याशिवाय रहाणार नाहीं. लग्नाकरितां ५० । ७५ वऱ्हाडी मंडळी जर हद्द ओलांडू लागली तर ह्या गुन्हेगारीबद्दल अधिक उणें २५ रुपये भूर्दंडादाखल भरावे लागणार ह्मणजे गरिबांच्या लग्न खर्चांत ही एक बाब उत्पन्न झाली असें ह्मणावयास हरकत नाहीं. एकंदरींत ह्या करामुळें हद्दीवरची रहदारी बंद पडून आप्तआप्तांत ताटातूट पडत आहे. आणि एकमेकांची हाक एकमेकांस ऐकूं जाईल इतक्या जवळ रहाणाऱ्या लोकांस आपण किती तरी दूरच्या प्रवासांत आहोंत असें वाटत आहे.

दीव दमणच्या लोकानीं वेळींच आरडाओरड केल्यामुळें त्यांच्या वरील ही माणसांची जकात तहकूब झाली आहे. आणि आह्मीं घरच्या ह्मातारीचे काळ मात्र कपाळास हात लावून किंकर्तव्यमूढ बनलों आहोंत ह्या आमच्या अजागळ वृत्तीस काय ह्मणावें ! एकदां का दुर्दैव पाठीस लागलें ह्मणजे चांगलें काम करीत असताना देखील तें उलटें गळ्यांत कसें पडतें याचें ताजें उदाहरण — आमचे नामदार श्री. व्यंकटेशराव यानीं हल्लीं ह्याच कराच्या बाबतींत कोन्सिलांत आणलेली सूचना होय. फट् ह्मणतां ब्रह्महत्या ! अशी आमची राजकीय परिस्थिति ! सरकार, डोळ्यांत तेल घालून निमित्त शोधीत बसलेलें ! अशा स्थितींत हद्दपार मागतानां निद्रापद मागावें त्याप्रमाणें 'इकडचे जे मजूर पोट भरण्यासाठीं हद्दीपलीकडे जातात त्याची ह्या करानें गैरसोय होणार' अशा अर्थाचें उलटें कारण, कर रद्द होण्यास साधक ह्मणून सदरच्या सूचनेंत दाखविलें गेलें, आणि एवढीच एक मानीव सबब—मजुरांच्या निर्गतीत आळा घालण्याकरितां करांची आवश्यकता भासविणाऱ्या सरकारास पुरेशी होऊन सदर सूचना फेटाळण्यांत आली !

(पुढील अंकीं समाप्त)

एक हद्दीवरचा कष्टीक

स्थापन केलें, तें हिंदुस्थान, ते शिवरायाचे मावळे स्वराज्याला मुकलेले असून पारतंत्र्याच्या जड शृंखलांनीं जखडलेले आहेत इतकेंच नव्हे तर तुर्कांची नोकरशाही ह्या शृंखला जास्त मजबूत व जास्त जड करण्यांत आपली सर्व शक्ति वेंचीत आहे. अशा स्थितींत आमच्या देशबंधूंच्या ह्या केविलवाण्या स्थितीकडे पाहून गोमांतकीय हिंदुसमाजानें त्यांना सहानभूति दाखविण्याचें बाजूलाच ठेवून, बाबांनो, आह्माला स्वराज्य मिळालें आतां तुह्मी पारतंत्र्यांतच जन्मभर खिचपत पडा, तुमच्यावर नोकरशाहीकडून देण्यांत येणाऱ्या डागण्यास आह्मी तुमचेच देशबंधु मदत करतों ह्मणायाचें कीं काय हा मात्र प्रश्न आहे.

रा. ग. बांदिवडेकर यांनीं सांगितलेली दुसरी दृष्टि ह्मणजे आमचें सरकार ब्रिटिश सरकारचें दोस्त ह्मणून तूर्तच्या स्मारकाबद्दल आह्मी आदर दाखविलाच पाहिजे ही होय. ह्याही दृष्टींत दृष्टीकोन चुकलाच असें ह्मणणें भाग पडतें. ब्रिटिश सरकार आमचें दोस्त, तर मग ह्या दोस्ताला दोस्त या नात्यानें आमच्या देशबंधूंनीं आमच्या बरोबरीचें स्वराज्य देण्यास विनविणें हें दोस्त सरकारचें स्वराज्य उपभोगणारी प्रजा या नात्यानें आमचें, गोमांतकवासीयांचें मुख्य कर्तव्य होय. व श्रीशिवरायाच्या प्रिय हिंदुस्थानास, त्यांच्या प्रिय सवंगड्यांस स्वराज्य देण्यास दोस्त सरकारास भाग पाडणें हेंच श्री शिवरायांच्या स्मारकाबद्दल खरा आदर दाखविणें होय. श्री शिवरायांच्या स्मारकास जर मदत गोमांतकानें करायाची असली तर आज आमचे देशबंधु स्वराज्यप्राप्त्यर्थ करीत असलेल्या प्रयत्नास हातभार लावणें हीच होय व अशी मदत करणें ह्मणजे ज्या साधनानीं स्वराज्य गांठतां येईल त्या साधनांचा येथेंही उपयोग करणें गोमांतकवासीयांचें कर्तव्य होय. श्री शिवरायांचें खरें स्मारक ह्मणजे हिंदुस्थानवासी यांनीं गमावलेलें स्वराज्य त्यांना मिळवून देण्यासाठीं स्वदेशीव्रत गोमांतकानें पाळणें हें होय. तरी सर्व समाजास माझी अशी विनंति आहे कीं, गोमांतकीय समाजानें श्री शिवरायांच्या स्मारकाच्या तारखेपासून खादीच वापरण्याची शपथ घेऊन श्री शिवरायाच्या स्मारकास आरंभ करावा व त्याचा आशीर्वाद संपादन करावा.

उपेंद्र वि॰ तळावलीकर

प्रस्तुत विषयासंबंधीं आमचें स्पष्ट मत आह्मीं गेल्या अंकीं नमूद केलेंच आहे. आतां केवळ लोकमताचा वारा कोणीकडे वहात आहे हें वाचकांस समजण्यासाठीं आह्मांस आलेल्या अनेक पत्रांतून कांहीं पत्रें जशाचीं तशीं प्रसिद्ध केलीं आहेत.

सं. भारत.

A' hora em que estamos rabiscando estas linhas não nos consta ter-se apresentado no prosoenio de candidaturas alguma Celestino ou *Simbolo Indiano*...com a *fama* de promessas e recompensas em troca de serviços profusos pela festa do referido *santificado* dia 11.

Crêmos porem que na proxima festa não há de haver besta que mais oai nesta...

Estaremos enganados ?

Colonia ?

Dividem-se as opiniões sobre se a India é colonia ou possessão.

Quanto a nós, a India é sem mais nem menos possessão, pelo simples motivo de ter sido e continuar a ser uma terra da *posse* e não uma *terra colonisada*, tal como a India Britanica.

Mas não façamos caso de *nomes* porque somos bem tratados pelos europeus de Portugal que em generosidade e grandesa d'alma estão dez mil leguas acima de *beefe* por quem os nossos visinhos nutrem um odio encarniçado pelos tratos desumanos que lhes inflinge...

Gandhicap

Não temos tido noticias do processo originado pelo incidente do celebre *cap* do *Mahatma*.

Estará detido o seu curso ou estará seguindo os seus tramites ?

O feito crime que pesava sobre a nossa cabeça pelo artigo *Taxa de Guerra* foi amnistiado sucedendo apenas que fomos intimados para pagar a importancia de 60 rupias e pico proviniente das custas do recurso levado á Relação pelo M. P. e em que foramos condenados.

Como o assunto é de interesse comum, resolvemos deduzir embargos na mesma execução.

E' o que há de *novo* sobre os processos crimes, instaurados contra o *Bharat*.

Um livre importante

O sr. prof. Samant, de Mormugáo publicou um livro em marata, enaltecendo as virtudes da civilisação hindu e analisando, com uma imparcialidade de juiz integro, os vicios que caracterisam a civilisação europêa.

E' pena que o importante livro esteja escrito em marata.

Se o estivesse em portguez, teria certamente posto em conflagração certos *paclos* nativos *di ca*

Mas não importa. Para a sciencia e consciencia dos mesmos *paclós* pretendemos verter em portugues passagens principais do opusculo do sr. Samant. E verão que teremos prestado serviço valioso á fauna dos occidentalisados dos pés á cabeça...com a mesma tradução.

Pensem !

De certo tempo para cá, tem se multiplicado os casos de tifoide em Goa sendo em numero consideravel as vitimas que a mesma maldita febre fez, em um tempo relativamente curto. Isto dá que pensar.

A' autoridade sanitaria do Estado compete, sem perda de tempo, estudar as causas fundamentais do mal a que é forçoso aplicar pronto remedio.

Cremos que a doença é importada pelos emigrantes, ao lado do dinheiro com que enriquecem o Paiz.

Pensem, senhores, que o assunto é de *vital* interesse

श्रीशिवस्मारक व लोकमत

श्री शिवाजी स्मारक

नोव्हेंबरांतील येत्या १९ तारखेस पुण्यांत 'श्रीशिवाजी' महाराजांच्या स्मारकाची इमारत बांधण्यास सुरवात सध्याचे इंग्रजी हिंदुस्थानचे युवराज याच्या हस्तें व्हावयाची असून त्या समारंभास जाऊं इच्छिणारानीं आपणास कळवावें असी "जाहीर विनंति' आपल्या स्वतंत्र बाण्याच्या भारत पत्रांत आलेली पाहून सखेदाश्चर्य वाटत आहे.ज्या 'शिवाजी'ला "डोंगरांतला उंदीर" आणि लुटारू, बंडखोर अशा नांवानीं संबोधून हिंदूंतील एकंदर शातीचीं अंतःकरणें काल परवांपर्यंत दुखविण्याचें पाप ज्यानीं भरपूर केलें आहे त्यानींच आज एकाएकीं त्या पूण्य पुरुषांच्या स्मारकाची चळवळ उठवून लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकावी याचें मर्म काय आहे हें आपल्या ध्यानांतच आलें नाहीं काय !

श्रीशिवाजी महाराजांचें स्मारक राहूं द्याच पण नुस्ता जन्मोत्सव, राज्यारोहण-दिनोत्सव, पुण्यतिथी इत्यादि करणाऱ्या व्यक्तींला राजद्रोही म्हणून तुरुंगांत ठोकण्यांत येत असे; त्या त्या उत्सवांला शक्य तितके अडथळे घालण्यांत येत असे याची आपणास माहीतच नाहीं काय ! आपल्या पत्राचें नांव भारत आहे ना ! आज भारताची स्थिति काय चालली आहे ! पंजाबांत जालियनवाला बागेंत गेल्याचे मागील वर्षी काय प्रकार घडला ! त्याच्या नंतर मालेगांवांत काय प्रसंग गुदरला ! आणि काल नुकता धारवाडास कोणता देखावा दृष्टीस पडला ! तो आपल्या भारताला आवडला काय ? म्हणून आनंदानें टिऱ्या बडवीत पुण्याला जाऊन नाचावयाचें ! आपण अहां कोठें ! हा शिवाजी स्मारकाचा समारंभ कोण करीत आहे ! कशा करितां तो होत आहे, याचें भान तुम्हांला व जाहीर विनंति करणाराला मुळींच नाहीं काय ! ज्या हिंदुस्थानच्या प्रजेनें कोट्यावधी रुपये फंड मोठ्या भक्तीनें व राजनिष्टेनें जमा करून सरकाराला दिला, लाखो फौज जमवून इंग्रज सरकारच्या जिवावरचें संकट टाळून, महायुद्धांत त्याला जय मिळवून दिला, त्याच प्रजेची, अमृतसर मुक्कामीं नाहक कत्तल करून मालेगावांस कंठस्नान घालून आणि धारवाडास गोळीबार व बनावटीचे खटले करून अमानुष छळवाद मांडिलेला आहे, त्याचें समर्थन करण्यास आपल्याला देशद्रोही, धर्मद्रोही व आत्मद्रोही कोण कोण कुठारदंड सामील होतील हें पहावयाचा हा निवळ कावा आहे कावा !! आज सगळ्या भारत वर्षाचें शिरःस्थान असी जी राष्ट्रीय सभा त्या सभेच्या नाकावर टिचण्याकरितां, म्हणजें तिनें 'अन्यायाचें विसर्जन करा' अशी विनवणी केलेली धिक्कारून तिचा पूर्ण अपमान केलेला पचण्याकरितां आणि आह्मीं तो सत्तेच्या जोरावर असाच पचविणार हें दाखविण्याकरितां इंग्रजी नोकरशाहीनें अज्ञानी व बगलबच्ये लोकांचा जमाव जमविण्याकरितां ही केवळ भूल उभी केलेली आहे. राष्ट्रीय सभेनें युवराजांच्या स्वागताची ही वेळ नव्हे म्हणून बहिष्कार घातलेला फोल करून दाखविण्याचा हा शुद्ध कावा, कावेबाजीचा डाव आहे ! ज्यांचें प्रामाणिक पणानें पोट भरत नाहीं, आपल्याच खऱ्या देशभक्तांच्या सुतकाने वडेच ज्यांला आवडावयाचे त्यांनींच या वेळीं सदर उत्सवास हजर व्हावयाचें ! इतरांचें तेथें प्रयोजन नाहीं. अमृतसर. मालेगांव आणि धारवाड ह्या तीन ठिकाणीं मुद्दाम अन्यायानें बनविलेल्या स्मशानभूमींत नाचणारीं भूतें असतील तींच सदर उत्सवांत धांऊन जातील इतरांला तिकडे ढुंकूनही पाहवणार नाहीं आणि म्हणूनच तेथील एकंदर प्रजापक्षानें सदर उत्सवावर पूर्ण बहिष्कार घातलेला आहे. खरे हिंदु, मराठे, शूद्र, महार, चांभार, ब्राह्मण इतकेंच नव्हे खरे मुसलमान देखील वरील उत्सवावर बहिष्कार घालतील.

स्वर्गावरून श्रीशिवाजी महाराज हा उत्सव कोणकोण आणि कशा कशा हेतूनें करीत आहेत हें चक्क पाहत असले पाहिजेत आणि त्यांच्या अंतःकरणांत आपणा विषयीं खरी आदरबुद्धि असती तर आपल्या प्रिय प्रजेला 'स्वराज्य' हें नांव काढल्याबद्दल व न्यायाची मागणी केल्याबद्दल गोळीबारांचा वर्षाव झाला नसता आणि पुनः त्याच्या समर्थनार्थ असले फसवणुकीचे उत्सव करून आपलें नांव बद्ध केलें नसतें हें स्पष्ट पाहत असले पाहिजेत.

गोव्यांतील रिपब्लिक प्रजा हें सर्व जाणून आहे. कलहपुरींतून देशद्रोहाला चिरीमिरी मिळणार असी आशा वाटणारेच तेवढे ह्या जाहीर विनंतीनें पुढें सरत असले पाहिजेत. पण भारत पत्रानें त्यानां योग्य वाट दाखवून मार्गावर आणिलें पाहिजे अशी विनंति करून मी आपली रजा घेतों.या खालीं आपला शुद्ध अभिप्राय घाल व भ्रमनिरासाचें श्रेय घ्याल अशी आशा आहे. वाचक.

जबाब द्या !

इंग्लंडचे युवराज व हिंदुस्थानचे शहाजादे अर्थात भावी बादशहा, यांच्या पुणें येथील आगमनप्रसंगीं त्यांच्या हातून श्री शिवाजी महाराजांच्या स्मारकाची कोणशिला बसविण्याचा समारंभ, येत्या १९ तारखेस साजरा होणार आहे. त्या समारंभास आदरपूर्वक हजर राहण्याची, निदान स्मारकाप्रीत्यर्थ आर्थिक मदत पाठविण्याची किंवा त्या संबंधीं कांहीं व्यवहार्य सूचना पाठविण्याची विनंति श्री. शि. स्मारक क. एक घटक या नात्यानें फोंडा येथील आल्मैद कालेजचे डायरेक्टर रा. ना. भ. शे. बांदिवडेकर यानीं गेल्या तीन तारखेच्या भारत अंकावर केली आहे. ती वाचून रा. बांदिवडेकरांनीं, अनायासें प्राप्त होत असलेला हा राजयोग नव्हे राजपुत्रयोग आपल्या प्रांतबंधूस साध्य करून घेण्याची सुसंधि आणून दिल्याबद्दल त्यांचें अभिनंदन पूर्वक आभार मानल्याशिवाय रहावत नाहीं,

सदरील समारंभास हजर रहावें किंवा न रहावें हा प्रश्न कोंग्रेसवाले ऊर्फ असहकारितावादी यांनीं हिंदुस्थान देशाच्या हिताच्या दृष्टीनें सोडविलाच आहे. तेव्हां त्यास हजर राहून आपलें हसें व देशाचें नुकसान करून घेण्यास कोणीही धजणार नाहीं; हें जरी खरें असलें तरी रा. बांदिवडेकराकडे स्मारकासंबंधींचा कांहीं खुलासा त्याच्याच शब्दांचा आधार घेऊन, जर कां मागितला तर ते आनंदानें देतील अशी आशा आहे.

स्वराज्यसंस्थापक व स्वधर्मरक्षक श्री शिवाजीमहाराज यांच्या स्मारकाची कोणशिला विदेशीय व विधर्मीय अशा भावी स्वामीच्या हातून बसविली गेली तर ती परतंत्र हिंदुस्थानांतील कांहीं राजे महाराजानां आणि नोकरशाहीच्या भगतानां पसंत वाटली तरी, खुद्द ज्यांचें स्मारक होणार आहे त्या श्री शिवाजीमहाराजांच्या स्वर्गीय आत्म्याला मान्य होईल काय !

स्वतः हिंदुपदपादशाही स्थापन करण्यास ज्याणीं हाडांची काडें केलीं, अनेक दुख प्रसंग भोगण्यास कमी केलें नाहीं, बायकांमुलांची इतकेंच नव्हे तर स्वतःच्या जिवाचीही पर्वा केली नाही त्यांचें स्मारक, हिंदुस्थान देशास पारतंत्र्यांत लोटून त्यांतच खिचपत ठेवण्याची इच्छा धरणाऱ्या नोकरशाहीचे बुद्धिबळांतील युवराजेयांच्या हातून होणें रास्त होईल काय !

हिंदुधर्म व हिंदुसंस्कृति यांचे वंदनीय रक्षक होऊन गेलेल्या श्रीशिवरायाचें स्मारक त्या धर्मावर व संस्कृतीवर वरचेवर प्रहार करणाऱ्या नोकरशाहीच्या हातचें बाहुलें होऊन येणाऱ्या एका युरोपियन व ख्रिस्तीधर्मीय शहाजाद्यांच्या हातून होणें योग्य होईल काय !

गोब्राह्मणप्रतिपालक अशा अभिमानास्पद व सार्थ किताब ज्यानें आपल्या नावांमागें लावून घेण्यांत भूषण मानलें, त्यांत आपल्या जन्माचें सार्थक मानलें त्या दीव्य विभूतीच्या स्मारकास, ज्यांच्या सत्तेखाल हिंदुस्थान असतां प्रत्यही लाखो गोमांता कसाईखान्यांतून कापल्या जातात, हजारों

विकाऊ आहेत

महाल इल्यास येथील करमळी गावांतील खालील शेतांची विक्री आमच्या आफिसांत येत्या डिसेंबरच्या पहिल्या तारखेस दुपारीं एक वाजतां होणार आहे. विशेष माहिती मालक रा. राम नाईक करमळकर याकडे किंवा आमच्या आफिसांत समक्ष अगर पत्रद्वारें मिळेल. गरजूनीं अवश्य फायदा घ्यावा.

कान्याचे वांव-२ आदिसावां; १लें, २ रें, ३ रें व ४थें मेळग दे मुडदें; दिवटेचें वांव; वांव दे वरखाजन; वांव दे वळगटें; आणि कांतोर वाव ठिकाण.

प्रोकुरादोरी जेराल—

रस्ता ज़ुजे फालकांव, नवीन-गोवें

तरी त्या व्यसनाचा प्रतिकार करण्याची कर्थी आमच्या सुशिक्षित, धर्मनिष्ठ व व्यवहार चतुर म्हणून घेण्याऱ्या समाजबंधूस विशेषत: देवस्थानचें चालकत्व महाजन मंडळीं नें आणि सरकारनें ज्यांकडे सोंपविलें आहे त्या कोमिसांव मंडळीस अद्यापपर्यंत झालेली दिसत नाहीं. असें कष्टानें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं. श्रीमंगेश देवस्थानची कोमिसांव मंडळी यास अपवाद आहे असें खात्रीलायक वर्तमान समजलें होतें हें नमूद करून ठेवणेस फार आनंद वाटतो.

"झाली गोष्ट फिरून येत नाहीं" म्हणून शांतें व म्हाळशेल या देवस्थानच्या कोमिसांव मंडळींस व महाजन मंडळीस आमची अशी नम्र विनंति आहे कीं त्यानीं होईल तो प्रयत्न करून व प्रसंगीं सरकारचेंही साह्य घेऊन आपापल्या देवस्थानांतून जुगाराची हाकालपट्टी करणेची अवश्य तजवीज करावी व इतर देवस्थानासही योग्य धडा घालून द्यावा. जुगारी लोक तुम्हांला व स्थानिक अधिकाऱ्यांना पैशाचें आमीष दाखविण्यास कमी करणार नाहींत तरी पण तुम्ही तिकडे लक्ष न देतां आणि जुगाऱ्यांच्या प्रतिष्ठितपणाकडेही न पाहतां जुगार आणि जुगारी यांस मूठमाती देण्याचा निश्चय कायम राखून त्याप्रमाणें वागाल आणि देवस्थानच्या व पर्यायानें आपल्या लौकिकांत भर घालाल अशी आशा केल्यास ती अस्थानी अगर निरर्थक होणार नाहीं अशी खात्री आहे.

Pelo juiso de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio que este assina, nos autos civeis de execução hipotecaria instaurada por Vassu Vitola Porobo Chirmulcar e outro, de Orna de Fatorpá, contra Purxotoma Essô Naique Dessai e mulher, da dita de Fatorpá vão ser vendidos em asta publica, á porta do tribunal judicial, situado na rua de Deão em Cusmane, no dia 25 do seguinte mês de Novembro, ás 12 horas e pelo preço superior ao de avaliação, os seguintes bens: 1 ° predio rustico denominado "MINGUELIBANDLAM"; 2 ° predio rustico denominado "NOVORSORDO", ambos de cultura de arrôz, sitos em Morpirlá, avaliados, respectivamente, por 251 e 249 rupias e discritos na conservatoria do registo predial desta comarca sob os numeros 10615 e 10616 do livro B 30, pinhorados nos ditos autos como pertencentes aos executados. Por este são citados todos os credores dos ditos executados bem como os coproprietarios para daduzirem os seus direitos nos termos e para os fins de lei. A contribuição de registo por inteiro e as despezas de praça correrão a cargo do arrematante. Para ser publico se expedia este.

Quepem 27 de outubro de 1921.

O Escrivão de Direito
Aires Manoel Barreto
Verifiquei
J. de Seabra

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2 ° oficio que este assina, na execução hipotecaria instaurada por Antá Sinai Quensoiy, de Assolnã e ora seguida pelo seu cessionario Foti Hori Dessai, de Quitol, contra Gopal Fondó Naique e mulher, da dita de *Quitol* e outra, de *Fatorpá*, vão ser vendidos em hasta á porta do Tribunal judicial desta Comarca, situado na rua de Deão em Cusmane, no dia 2 do seguente mez de Dezembro, ás 12 horas e pelo preço superior ao de avaliação, os seguintes bens: 1 ° predio rustico denominado "MOIQUEM", da cultura de coqueiros; 2 ° predio rustico denominado "ZUNGUEM", da cultura de arroz; 3 ° predio rustico denominado GURVAGOTOVO", da cultura de coqueiros; 4 ° Direito á metade do predio rustico denominado "*MADIEM*", da cultura de coqueiros; 5 ° metade do predio rustico denominado MADIEM da cultura de coqueiros; 6 ° Direito a quarta parte do predio rustico denominado GORAMMAROGO, da cultura de arroz, todos sitos em Quitol e discritos na Conservatoria do registo predial desta comarca, respectivamente, sob os numeros 10816, 10817, 10818, 10819, 10820 e 10821 no Livro B31 e avaliados em 60, 100, 51, 50, 60 e 73 rupias, tambem respectivamente. Para esta arrematação são citados todos os credores incertos dos ditos executados bem como os quinhoeiros e coproprietarios nos termos e para os fins de lei e a contribuição de registo por inteiro correrá a cargo do arrematante. Para ser publico se expediu este.

Quepem, 21 de Outubro de 1921

O escrivão de direito
Aires Manoel Barreto
Verifiquei
J. de Seabra

---

depois convosco estarei concorrendo com o meu modesto esforço para ....

Carlos Frias

Uma carta

Ex.mo Sr.

Como V. é um daqueles que abriram as colunas do seu jornal somente para lutar pelos interesses do publico, pensei em usar deste modo, já que não acho outro mais facil, para trazer á luz as coisas que se passam na escuridão.

E' o caso da administração da camara municipal de Pondá que me leva a importunar a VEcia.

Há poucos dias tendo eu tido a ocasião de passar pela estrada que se dirige de Marcela para Candolá pelas 20 horas, ouvi uma vóz chorosa que solicitava socorro e que parecia ser duma criánça.

Apiadado, a grande custo cheguei ao sitio, pois a escuridão era tão densa que não deixava ver o que havia diante de mim, e vi com o auxilio duma vela que trazia na algibeira uma criança de quase sete anos de idade que por falta da luz tinha caido num fosso. Feita a indagação soube que a pobre da criança era desprovida dos pais e tinha como seu unico ponto do agasalho a sua avó octogenaria. Fui dar parte dêste caso ao sr. regedor da aldeia que me disse que tendo já participado por diversas vêzes de semilhantes accidentes tanto á administração do concelho como a Exma camara elas nada tinham providenciado até aquela data, sobre o assunto

Com a publicação desta, chamo a atenção dos competentes para que para diante se não deem casos destes.

Santo Estevam
23-10-21

De VEa. etc.
Diogo Joaquim Fernandes

Vinaeca Sacardando'

Vitima desta maldita febre tifoide que está a fazer tantos estragos veiu a falecer, hontem nesta cidade após um longo tratamento de 45 dias, este malogrado jovem que, devido ás suas qualidades distintas dum bom filho, bom amigo e bom camarada era esperança de todos quantos o conheciam e admiravam.

O lamentado rapaz morre numa edade bastante prematura, pois, contava apenas 19 primaveras e a sua morte foi e é geralmente lamentada, não só porque o extinto se impunha á estima dos que o conheciam, mas tambem por causa de sinceridade, simplicidade e firmeza em todos os seus actos.

Era estudante da VI classe (Letras) do nosso Liceu onde era assaz estimado pelos professores e colegas, os quais, assim que tiveram noticia do seu decesso foram prestar-lhe a ultima homenagem.

Destino cruel! que arrebata do seio da familia duma forma tão brutal e impiedosa este esperançoso jovem!

Quem escreve estas linhas teve a dita de o conhecer como amigo sincero e disposto a fazer sacrificios de toda a especie em proveito de interesse comum, onde o seu merito fôsse exigido, pois, esteve sempre na vanguarda de todo o movimento que fosse em pról da sua classe.

A mocidade via nêle um amigo sobretudo sacrificador, e ela o perdeu para sempre. Ai desta fatalidade!

Despensaram-se as aulas do Liceu quando se comunicou a sua secretaria o triste passamento deste aluno da classe adientada.

O seu funeral foi bem concorrido, pois, tomaram nele parte varios dos seus amigos e admiradores.

Lamentando a perda deste jovem esperançoso, sincero e sobretudo bom amigo enviamos a sua familia e demais relações em especial ao seu irmão Dr. Balcrisna Sacardandó os sentidos pesames.

Paz á grande alma do ilustre defunto.

Pangim 29-10-21
Balchondra Dessai

जिवबादादा केरकर

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशसंभवम्।
भ० गीता.

जेथें बहूविचार। तेथें ईश्वरी अवतार॥
मार्ग झाले थोर थोर। धके चपेटे सोसोनी॥
— रामदास

मार्गशीर्ष वद्य द्वादशी ही वरील पुण्य प्रतापी पुरुषाची पुण्यतिथी होय. श्री गुरुद्वादशी, दासनवमी, नाथाषमी वगैरे देवांचे व भक्तांचे ते ते दिवस पारमार्थिक बुद्धीनें साजरे करून आहीं आमचें धार्मिक कर्तव्य असें बजावतों, त्या प्रमाणें 'श्री शिवाजी महाराज' 'जिवबादादा वगैरे थोर राष्ट्रीय, स्वजन कल्याणकारी पुरुषांचे स्मारकोत्सव करून, आहीं आमचें त्यां विषयींचें प्रेम व पूज्यबुद्धि व्यक्त करणें हेंही आपलें तितक्याच महत्वाचें कर्तव्य होय. अशा थोर पुरुषांच्या उत्सवापासून लोकांत एक प्रकारची स्वाभिमानवृत्ति उत्पन्न होते व ती इतर अनेक सद्गुणांस प्रसवून त्यांची पोषक होते. हें तत्व लक्षांत आणून महाराष्ट्रीय विद्वानांनीं अलीकडे 'श्रीशिवजयंत्युत्सव,' 'नानाफडणवीस' उत्सव, 'श्रीशंकराचार्योत्सव' वगैरे लोकोत्साहकारक उत्सव सुरू केले. त्याचप्रमाणें आपल्या ह्या गोमांतक प्रांतांत—अगदीं गरीब कुळांत जन्मून आपल्या आंगच्या पराक्रमानें दिल्लीपतीस भरधर कांपविणाऱ्या गुलामकादरासारख्या भयंकर शत्रूंचा नाश करून ज्यानें त्या वेळीं दिगंतकीर्ति मिळविली, तत्कालीन महाराष्ट्रीय साम्राज्याच्या आधारस्तंभापैकींच एक असें अतुल विक्रमी 'महादजी शिंदे' ज्याला आपला उजवा बाहू व पदरचें एक अत्यंत अमोलिक रत्न समजत असत, ज्यांनीं आपल्या जन्मभूमीचे राजे सावंतवाडीकर भोंसले ह्यांना दिल्लीपतीकडून 'सरदेसाई राजेबहादूर' हा किताब व पालखी मोर्चेले वगैरे सरंजाम आणून देऊन आपली स्वामिभक्ति प्रगट केली त्या धीरोदात्त व शूर पुरुषाचा महाराष्ट्रीयांनी निदान एतद्देशीय गोमांतक प्रांतस्थांनीं, विशेषें सारस्वतसमाजानें—स्मारकोत्सव करणें हें अमोलीक व अत्यंत पवित्र कर्तव्यांपैकीं एक आहे. इतर ब्राह्मण लोक आपली निंदा करितात ह्मणून सारस्वत समाज त्यावर रुसतो, आणि तें वास्तविक आहे; परंतु आपल्या समाजाची निंदा करण्यास त्यांनीं कचरावें असें तेज आपल्या समाजांत उत्पन्न करण्याची हांव त्यानीं बाळगूं नये, उलट कांहीं तरी विरुद्ध प्रयत्न करावे, ही गोष्ट हास्यास्पद होय आपल्या समाजांत चांगले विद्वान पुरुष निपजावे, कलाकौशल्यवान माणसें उत्पन्न व्हावीं, शूरवीर मनुष्य प्रगट व्हावे, चांगले तपस्वी व साधुसंतमहात्मे आपल्यांत अवतरावे अशी उत्तम व सर्व प्रकारची शुभ महत्वाकांक्षा सारस्वतानीं कां धरूं नये? हा स्मारकोत्सव कांहीं वर्षामागें गोमांतक स्थानीं कांहीं गावांत साजरा केल्याचें समजतें. पुष्कळ ठिकाणीं हा उत्सव यंदांपासून सुरू होवो अशा आशेनें 'कर्मण्येवाधिकारस्ते' ह्या भगवद्वचनास अनुसरून शुभेच्छा धरून व परमेशसहाय्य प्रार्थून देशकालस्थित्यनुरूप शुभ कर्मे आचरीत असावीं. हेंच आज आज आपलें कर्तव्य आहे.

पत्रकर्तेमहाराज! अ पणास वरील कार्य पसंत वाटेल तर आपल्या बहुमान्य पत्रांतून ह्याबद्दल चर्चा करून आपल्या प्रांतस्थ पूर्वी मनें ह्या कार्यास प्रवृत्त करावी अशी विनंति करून हें पत्र पुरें करितों कळावें देशसेवारूप ईश भजनीं लोभ वृद्धिगत असावा हे विनंति.

मार्शेल, गोवा. १।११।१९२० } सर्वांचा नम्र दास
भालचंद्र वि. खोलकर

पारोडें येथील श्रीलक्ष्मीपूजन,

पारोडें येथील श्री दर्शन देवालयांत, गेल्या शु० १४ शी पासून पांच दिवसपर्यंत वार्षिक श्रीलक्ष्मीपूजनोत्सव थाटानें साजरा करण्यांत आला. शेवटल्या दिवशीं भारत संपादक रा. हेगडे देसाई यांचें प्रवचन व्हावयाचें होतें; पण प्रकृतीच्या अस्वास्थतेमुळें त्यांस हजर राहतां आलें नाहीं. निमंत्रित पाहुण्यापैकीं रा.पुं. या. विर्जिसकर यांचें समयास अनुसरून कळकळीचें भाषण झालें. त्यानीं आपल्या भाषणांत, सध्याच्या परिस्थितीचें दिग्दर्शन करून लक्ष्मीपूजनाचें महत्व समजावून देतानां सांगितलें कीं, दैत्यराज बळीनें जेव्हां आपल्या पराक्रमानें स्वर्ग आणि मृत्यू यां लोकांतील राज्यें पादाक्रांत करून सर्व लक्ष्मी आपल्या कबजांत घेतली, तेव्हां लोकांना फार वाईट स्थिति प्राप्त झाली, लोक कंगाल व भिकारी झाले; यामुळें यज्ञयागांस सहजच फांटा पडला, विद्यांचा लोप झाला, लोक अधर्मरत होऊन सर्व यमपुरी माजली; त्यायमनसुख नाहींसा होऊन बळी तो कान पिळी या तत्वास वाव मिळाला. दुर्जनांची पंढरी पिकली व सज्जनाला चोहोंबाजूंनीं त्रास होऊं लागला. तेव्हां शुद्ध व सुविचारी लोकांनीं स्वर्गीय देवांच्या राज्यानें परमेश्वराची करुणा भाकतांच तो धर्मावर आलेली ग्लानि निवारण करण्याकरितां वामन रूपानें पृथ्वीवर अवतार घेता झाला. त्याणें दैत्यगुरु शुक्राचार्यांच्या कोटिल्यशक्तीनें जुमानतां आपल्या अगाध चातुर्यानें आणि दिव्य तेजानें पण याचक वृत्तीनें बळी राजाला प्रतिग्रह मिषानें पाताळीं दडपून टाकिलें. अशा प्रकारें बळीराज्याची इतिश्री झाल्यावर लक्ष्मी बंधमुक्त झाली. त्या आनंदाप्रीत्यर्थ देव, गंधर्व, यक्ष, किन्नर मनुष्यें यानीं श्री लक्ष्मी देवीचें मोठ्या आनंदानें पूजन केलें. त्याची आठवण ह्मणून हा उत्सव लोकांत चालू आहे. त्या वेळचीच भयंकर स्थिति सध्या आह्मांस प्राप्त झाली आहे. ती कशी नाहींशी होईल या साठीं देशांतील विचारी लोक विचार करीत असून आपापल्यापरी प्रयत्न करीत आहेत. आह्मां सर्वांच्या परिचयाचे व आपल्या आत्मविश्वासाच्या बळावर दुष्ट लोकांस ताळ्यावर आणण्याचें कठीण व्रत घेतलेले प्रतिवामनावतारी महात्मा गांधी हे यांत अग्रणी होत. परदेशी अधिकारी व व्यापारी यानीं देशांतील संपत्ति आज अनेक वर्षांपासून पळवून नेली आहे व तशीच ती एकसारखी नेत आहेत तिचा प्रतिकार होऊन आर्यलक्ष्मी आर्यस्थानांत राहावी, वरचेवर येणारे दुष्काळ व टाणें देऊन बसलेली महागाई नाहींशी व्हावी ह्मणून महात्मा गांधी स्वदेशी चळवळींचा उपदेश करीत आहेत. आह्मीं जर त्यांच्या उपदेशाप्रमाणें कपडेलत्ते, खाणेंपिणें, आहारविहार वगैरेंत योग्य काटकसर करून साखर, साबण, सिगारेट सुगंधी, चहा वगैरे बहुतेक अनावश्यक वस्तूंचा त्याग केला तसेंच देशांतील उत्पादनशक्ति वाढवून सूत, कापड, धान्य गुरें वगैरेंची पैदास वाढविली तर आह्मी करीत आहों तें लक्ष्मीपूजन सार्थ होऊन देशांत आबादीआबाद होईल व लोक सुखी होतील. प्रत्येकानें द्रव्यार्जन करणें तें चैनीसाठीं करावयाचें नसून, ज्या प्रमाणें 'गुयो' नांवांच्या भिकारी स्थितींत दिवस कंठणाऱ्या एका मनुष्यानें आपल्या हयातीत जमविलेले लाखो रुपये मृत्युपत्रांत "लोकांनां विपुलजलाचा लाभ व्हावा ह्मणून, एका निर्जल गावांत सरोवर बांधण्यासाठीं ठेविले त्याप्रमाणें लोककल्याणार्थ ह्मणून करावें. कारण पैशाशिवाय परोपकार घडणें कठीण आहे. अशा अर्थाचें भाषण करून शेवटीं सर्वांना सुबुद्धी देण्याबद्दल श्री लक्ष्मी देवीची प्रार्थना केली. इ०

बातमीदार.

मुर्गांव येथील मराठी शाळेच

श्री सरस्वत्युत्सव

येथील मराठी शाळेचा वार्षिक सरस्वत्युत्सव ता० ८-१०-२१ रोजीं सुरू होऊन दुसऱ्या दिवशीं सायंकाळचे साडे सात वाजतां संपविण्यांत आला. रा. सेलेंकर यांच्या मेळ्यामुळें उत्सवास बराच रंग आला होता. मेळा अगदीं लहान मुलांचा होता. त्यांनीं स्वदेशासंबंधींचीं पदें ह्मणून नानांचें लक्ष्यास थक करून सोडलें. त्यांतील 'हरहर हरहर देश बुडाला धर्म रसातळाला। आर्य बंधु हो एक ..... तानें सदा स्वदेशी करीना। परदेशी वस्तु टाकुनी भुलूं नका सौदर्या' हीं पदें तर फारच परिणामकारक होतीं.

नंतर सदहू शाळेचे मास्तर श्री. बाबुराव वि. प्रभू यांचें समयास अनुसरून चटकदार भाषण झालें. त्याचा सारांश:

सांप्रत आमच्या गोमांतकांत चहा व दारू यांचे प्रस्त अतिशयच माजलें आहे. परंतु अद्यापि तिकडे कोणाचेंही जावें तसें लक्ष जात नाहीं, ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. हीं विपारी पेयें सर्व बाजूनीं वाईट असल्यानें, त्यांची वेळींच कहाल पट्टी करणें योग्य आहे.

गाय जगाची माय आहे. गाईचें महत्व

Pelo juiso de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2° oficio que este assina, nos autos civeis de execução hipotecaria instaurada por Vassu Vitola Porobo Chirmulcar e outro, de Orna de Fatorpá, contra Purxotoma Essò Naique Dessai e mulher, da dita de Fatorpá, vão ser vendidos em asta publica, á porta do Tribunal judicial, situado na rua de Deão em Cusmane, no dia 25 do seguinte mês de Novembro, ás 12 horas e pelo preço superior ao de avaliação, os seguintes bens: 1° predio rustico denominado "MINGUELIBANDLAM"; 2° predio rustico denominado "NOVORSOR—DO", ambos de cultura de arrôz, sitos em Morpirla, avaliados, respectivamente, por 251 e 249 rupias e discritos na conservatoria do registo predial desta comarca sob os numeros 10615 e 10616 do livro B 30, pinhorados nos ditos autos como pertencentes aos executados. *Por* este são citados todos os credores dos ditos executados bem como os coproprietarios para deduzirem os seus direitos nos termos e para os fins de lei. A contribuição de registo por inteirô e as despezas de praça correrão a cargo do arrematante. Para ser publico se espedia este.

Quepem27 de outubro de 1921,

O Escrivão de Direito

Aires Manoel Barreto

Verifiquei

J. de Seabra

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2° oficio que este assina, na execução hipotecaria instaurada por Antá Sinai Quenscry, de Assolnã e ora seguida pelo seu cessionario Foti Hori Dessai, de Quitol, contra Gopal Fondó Naique e mulher, da dita de *Quitol* e outra, de Fator*pá*, vão ser vendidos em hasta á porta do Tribunal judicial desta Comarca, situado na rua de Deão em Cusmane, no dia 2 do seguinte mez de Dezembro, às 12 horas e pelo preço superior ao de avaliação, os seguintes bens: I° predio rustico denominado "MOIQUEM,, da cultura de coqueiros; 2° predio rustico denominado "ZUNGUEM", da cultura de arroz; 3° predio rustico denominado GUR-VAGOTOVO", da cultura de coqueiros; 4° Direito á metade do predio rustico denominado "*MADIEM*", da cultura de coqueiros; 5° metade do predio rustico denominado MADIEM da cultura de coqueiros; 6° Direito a quarta parte do predio rustico denominado GORAMMAROGO, da cultura de arroz, todos sitos em Quitol e discritos na Consevatoria do registo predial desta comarca, respectivamente, sob os numeros 10816 10817, 10818, 10819, 10820 e 10821 no Livro B31 e avaliados em 60, 100,51, 50, 60 e 73 rupias, tambem respectivamente Para esta arrematação são citados todos os credores incertos dos ditos executados bem como os quinhoeiros e coproprietarios nos termos e para os fins de lei e a contribuição de registo por inteiro correrá a cargo do arrematante. Para ser publico se expediu este.

Quepem, 21 de Outubro de 1921

O escrivão de direito

Aires Manoel Barreto

Verifiquei

J. de Seabra

माल चोख किंमत रोख

मुलांला सुंदर खुर्च्यां

निरनिराळ्या रंगाचीं सुंदर टेबलें

उत्तम तऱ्हेचीं मंगळुरी कौलें व घराचें कोणतेंहि सामान

पाहिजे असल्यास

गोविंद भिकू पऱ्हीकर

यांच्या कांदोळी-बार्देस येथील कारखान्यांत खरेदी करा

सुरेख काम — माफक दाम!

टीपः- - कुशल सुताऱ्यांस लायकीप्रमाणें भरपूर पगार देऊन सदहू कारखान्यांत नोकरीवर ठेवण्यांत येतें. गरजूनीं खालील पत्त्यावर अर्ज करावा.

गोविंद भिकू पऱ्हीकर.

कळंगूट-बार्देस.

एकच वेळ येऊन अनुभव घ्या.

रा. पांडुरंग शे. कीर्तनी यांचें

ब्राम्हणी

चहा, काफी व फराळाचें दुकान.

शाखा नं. २

मडगांव नवा बाजार-मार्कीट पिंपळासमोर

आमच्या दुकानीं एकंदर जिन्नस साजूक तुपांत तळलेले असतात. भाजी, पुरी, भजीं, शिरा, उसळ, जिलबी, अनारसे, वेसन, वगैरे वगैरे जिन्नस ताजे तयार मिळतील. आगाऊ कळविल्यास वाटेल ती मिठाई तयार करून दिली जाईल.

मालकः—पांडुरंग शेणवीं कीर्तनीं

मडगांव

पी. व्हीं विर्जिनकर यांची

आयुर्वेदिक फार्मसी

मडगांव-गोवा

आमच्या फार्मसींत सर्व प्रकारच्या देशी वनस्पती, भस्में रसायने, मात्रा, गुटिका, चूर्णे, आसवें, अरिष्टें, पाक, अवलेह, तेलें वगैरे उत्तम औषधांचा संग्रह असून फारच माफक दरानें देण्याची व्यवस्था केली आहे,

त्याचप्रमाणें, बाळामृत, सार्सापरिला, अमृतांजन, शाई, दंतमंजन सुवासिक काफी, वगैरे महत्वाचे, व नित्युपयोगी पेटंट जिन्नस येथें मिळतील.

गैरसोय दूर झाली

पणजी येथील कोणत्याहि सरकारी कचेऱ्यांतील, कोर्टातील, हायकोर्टातील (रेलासांव) तसेंच पोर्तुगालच्या कोणत्या हि वरिष्ट कोर्टातील कामें

आ. शिज गोमिस पेरेर

श्रीधर वामन झांबावलकर

व्यंकटेश वि. राव सरदेसाई

वकील व सालिसिटर्स

यांच्या नवीनच स्थापलेल्या ऑफिसांतून अत्यंत योग्यपणानें योग्य वेतन घेऊन केलीं जातात. अनुभव घ्या व नाहक अवास्तव खर्च वांचवा! सर्व तऱ्हेचा पत्रव्यवहार खालील पत्यावरः —

व्यंकटेश वि. राव सरदेसाई

पणजी-गोवा.

सर्की सल्लागार आणि कमिशन एजंट

सहस्त्रबुद्धे आणि कंपनी

सोलापूर

आमचेकडे शेतीसंबंधीं (बागाईत व जिराईत) सर्व प्रकारची व उत्कृष्ट औतें, यंत्रें, खतें आणि बिबियाणीं मिळतात. किंमती पत्रक व माहिती पत्रकें मागवा.

सूचना— आम्हीं सोलापुरी गिरणींतील मजबूत आणि टिकाउ धोतरजोडे चादरी, सर्टींगचे व चेकचे कापड — गिरणींतील व हातमागावरील निरनिराळ्या प्रकारांची टिकाऊ, पक्या रंगाची, भरपूर लांब रुंद अशी सुती, गर्भ रेशमी व रेशमी लुगडीं फारच किफायतशीर भावांत पाठवूं. एकवार अनुभव घेणें. हातमागा संबंधानेंहि सर्व माहिती देऊं.

भाताच्या शेतीसाठीं सर्वोत्कृष्ठ साधन अवश्य मागवा !



किर्लोस्कर बंधु, लिमिटेड, किर्लोस्करवाडी (जि. सातारा

Uma carta

Exmo Snr. Dr. Govinda Pundolica Hegdó Dessai

Para ilucidar o publico para cuja apreciação teve VExa o incommodo de bordar considerações sôbre a minha modesta carta de 26 de mes findo julgándo-a cheia de *equivocos* e resultante de *grande confusão* e *intangibilidade* da *cartilha*, limito-me a expor o seguinte, não dessjando mais replica nem treplica sobre o assunto que considero para mim desde já findo :-

Tendo o prospecto de *Pragatica Sangh* circulado em quase todos os pontos do Estado da India Portuguesa e ainda na India Ingleza, graças aos voluntarios propagandistas, era natural que a minha renuncia relativa ao cargo de vogal de comissão executiva do mesmo *Sangh*, tivesse tambem a mais lata publicidade, o que certamente seria impossivel com a publicação da aludida carta somente no *Bharat*.

E' firme convicção minha que a *cartilha* enviada é um *prospecto* ou *programa* e não *projecto do regulamento*, tanto mais que a própria palavra *Sangatana* significa *rachana* isto é criação ou constituição; e o que ainda não foi difinitivamente criado, constituido ou organisado, não pode certamente ser regulamentado. Acresce a isso que a propria comissão executiva de que VExa é presidente é da caracter provisoria emquanto seja ela constituida nos termos do *Sanghatana*.

Não me lembro absolutamente de ter lido os *avisos convocatorios* a que se refere nem tão pouco tenho idea nitida de que o referido *Sangh* tivesse sido legal e moral ou socialmente organisado com precedencia de formalidades indispensaveis para a constituição de uma associação pública como ela inculca ser no nosso meio, arvorando-se em baluarte invencivel e exclusivo da comunidade hindu

Nada era mais natural do que dirigir-me directamente a VExca como 1° signatario da carta impressa no frontispicio da aludida *cartilha*, e não de forma alguma ao Sr. Datatria Venctexa Poi do Pondá tanto mais que não tinha alvitres ou alterações a sugerir nem entendimentos ou concilia ções de especie alguma que tratar sobre o *Sangh*. mas sim apenas renunciar com agradecimentos ao honroso cargo por entender conveniente que era absolutamente inoportuna e extemporanea a orientação e a propria instalação do *Sangh* como centro politico privative dos hindus.

Suponho ter assim devidamente esclarecido sobre as considerações que VExa teve de inserir 'mau grado seu'' de mistura com palavras e frases em italico, juntamente com a sua estimada carta marata, publicado no *Bharat* de 13 do corrente.

Com a publicação desta carta no proximo numero do *Bharat* muito captivará a quem.

De VExa
Mto Atto Obgmo
Srinivassa Voicunta Senai Dempó.

Vinaeca Sacardando

Desappreceu esta joia. !

O director do *Bharat* sentiu mais o passamento deste esperançoso rapas, do que as suas desgraças. Na proxima edição publicaremos a carta do sr. Bhalchondra Dessai.

श्रीसरस्वत्युत्सव, मडगांव

प्रसिद्ध झाल्याप्रमाणें ११।१२।१३।१४ रोजीं श्रीदामोदर विद्याभुवनांत वरील पूज्य समारंभ ह. प. लक्ष्मण रामचंद्र पांगरकर यांचे अध्यक्षतेखालीं थाटानें पार पडले.

पहिल्या दिवशीं रा. पांगरकर, चंदगडकर, कानविंदे, शिंडे, जोशी, गोखले, काकतकर व वरील शहापूरची भजनी मंडळी संध्याकाळचे मेलनें आली. त्यांचें मडगांव स्टेशनवर स्वागत होऊन हारतुरे अर्पण करण्यांत आल्यावर मिरवणूक निघाली ती ६॥ वाजतां श्रीदामोदर विद्याभुवनांत पोंचली. तेथें श्रीसरस्वतीचें दर्शन घेऊन सर्व मंडळी रा. दलाल यांच्या वाड्यांत उपहार व विश्रांतीसाठीं आली. नंतर सभेस ७ वाजतां सुरवात होऊन प्रथमतः रा. यशवंत विष्णु पै रायतुरकर यांचे स्वागतपर भाषण होऊन रा. द. पां. ना. दलाल यांचे सूचनेनें महानुभाव पांगरकर अध्यक्षस्थानीं विराजमान झाले. व त्यांचे दीडतासपर्यंत "श्रीसरस्वतीचें आध्यात्मिक स्वरूप" या विषयावर स्फूर्तिदायक व विचारपरिप्लुत भाषण झालें. शेवटीं रा. चंदगडकर यांचें श्रीसरस्वतीसेवकमंडळाचे अभिनंदनपर व गोव्यांतील तरुणांच्या उत्साहाचे आदरादिकयीं भाषण होऊन भजन, आरत्या होऊन प्रसाद व विरापन वाटण्यांत आल्या.

दुसऱ्या दिवशीं ५॥ वाजतां ह. प. शामराव शिंडे यांचें ज्ञानेश्वरीवर सुरेख प्रवचन झाल्यावर ७ वाजतां दोतोर कुरैय भाकोस यांचे अध्यक्षतेखालीं रा. मुकुंद गोविंद कामत यांचें "स्त्री समाजाशीं एक कर्तव्य" आणि प्रो. रामचंद्र शंकर नाईक यांचें "भावी स्थिति" या विषयांवर पोर्तुगीजमध्यें भाषणें झालीं. नंतर श्री. पांगरकर यांचे अध्यक्षतेखालीं प्रो. सुब्राय विठ्ठल देसाई यांचे "शीलं परं भूषणं" या विषयावर कोंकणींत भाषण झालें. अध्यक्षांनीं थोडक्यांत समारोप केल्यावर रात्रौ १०॥ वाजतां रा. पांगरकर यांचें सुश्राव्य किर्तन झालें.

तिसऱ्या दिवशी डॉ. सी. पी. सोआरीस यांचे अध्यक्षतेखालीं डॉ. श्रीधर नाईक पानवेलकर यांचें "समाजांतील स्त्रीयांचा दर्जा आणि रा. वामन कामत यांचे "मद्यपाननिषेध" या विषयांवर पोर्तुगीजमध्यें भाषणें झाल्यानंतर श्री. पांगरकर यांचे अध्यक्षतेखालीं श्रीदामोदर वाचनमंदिराचा चौथा वार्षिक रिपोर्ट रा. यशवंत विष्णु पै रायतुरकर यांनीं वाचला व सर्वांनीं तो मंजूर केल्यावर डॉ. वासुदेव विठ्ठल फेरकर यांचें "मद्यपानाचे दुष्परिणाम" आणि श्रीधर विष्णु पै रायतुरकर यांचें "संघशक्तिचा काळ" या विषयावर भाषणें होऊन अध्यक्षांनीं दोनही विषयांचा समारोप केला यावेळीं सर्वांनीं आग्रह केल्यामुळे व सरस्वती प्रिंटिंग प्रेसच्या मालकाचे प्रार्थनेवरून रा. पांगरकर यांचे सुरस प्रवचन होऊन भजन प्रसाद आरत्या प्रसाद वगैरे झालें.

चौथ्या दिवशीं ह. भ. प. रामचंद्र कृष्ण चंदगडकर यांचें नामस्मरणभक्ति या विषयावर प्रवचन झाल्यावर रा. द. पां. ना. दलाल यांनीं मराठी शिक्षणप्रसारासंबंधीं एक योजना सभेपुढें मांडली तिचा मडगांवकरांनीं, गोव्यांतील शाळांच्या चालक, पालक व शिक्षकवर्गानीं योग्य विचार करून मराठी शिक्षणांत असलेला विस्कळितपणा दूर करून या प्रांतांतील मराठी शिक्षण एकसूत्री करावें, क्रमिक पुस्तकें येथल्या लोकांनीच तयार करावीत वगैरे सूचना होत्या. नंतर ८॥ वाजतां श्री पांगरकर यांचें एकनाथ महाराजांचें चरित्रवर्णनपर प्रवचन होऊन शेवटीं उत्सवाचा समारोप केला. नंतर रा. दलाल यांनीं सभेचे अध्यक्ष, एकंदर व्याख्याते, प्रवचनकार, श्रोतेमंडळी वगैरेचे योग्य शब्दांत आभार मानून आरत्या वगैरे होतांच श्री सरस्वतीच्या जयजयकारांत उत्सवाची परिसमाप्ति केली. श्री. पांगरकर व इतर बाहेरगांवच्या मंडळीच्या आगमनानें यंदांचा उत्सव फारच छान झाला. पहिल्या दिवशींच्या वक्त्यांचीं भाषणें 'भारता'चे वाचकांस सवडीनुसार सादर करण्यांत येतील.

बातमीदार

भारत

गुरुवार कार्तिक शु० ४ शी १८४३

माणसांवर कर व देशावर कहर

अखेर आम्ही वर्तविलेलें भविष्य सत्य स्वरूपानें प्रगट व्हावयास लागलें आहे. असें, तीन आण्याच्या माणसावरील कराच्या वसूलीनें ठिकठिकाणीं व्यक्त झालेल्या लोकक्षोभावरून म्हणण्यास हरकत नाहीं. ज्या वेळीं हा तीन आण्याचा अमानुष कर गोव्यांत येणाऱ्या व गोव्याबाहेर जाणाऱ्या माणसांच्या डोक्यावर लादण्याचा विचार चालू होता, त्यावेळीं त्याचें भीषण स्वरूप पुढें इतकें भयंकर होईल, असें खुद्द कर्त्यांच्या चाहत्यांस सुद्धां वाटलें नसावें. तसें असतें तर त्यानीं प्रस्तुत कर बसविण्याचा तीन आणें मूर्खपणा कधींच केला नसता, अशी आमची समजूत आहे.

सदरहू माणसांवरील तीन आणे करानें मुरुगत्वें सीमेनजीक गावच्या लोकांत, मनस्वी असंतोष पसरावयास लागला असून, जेथें तेथें सरकारच्या नावानें खडे फोडल्याचा कर्णकटु आवाज ऐकावयास येत आहे. 'उपरिनिर्दिष्ट कर म्हणजे पोर्तुगीज सत्तेचें विनाशकालसूचक चिन्हच होय' असें टोमणेवजा उद्गार काढण्यास जनता कचरत नाहीं. यावरून तिच्या असंतोषाची डिग्री किती अंश चढली असेल याचें अनुमान करण्यास कोणासहि कठीण पडणार नाहीं.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे वर नमूद केलेल्या माणसांवरील 'तीन आण्याच्या' करानें देशावर कहरच आला आहे, अशा रोख ठोक विधानानें वस्तुस्थिति विपर्यास होण्याची भीति नाहीं. उलट विचारसरणी मात्र सत्याची खून करणारी आहे, हें कोणीहि कबूल करील. असो.

परंतु 'मायबाप सरकार लोकक्षोभानें जागृत होऊन असंतोषाचें मूळ उपटून टाकील अशीहि आशा करणें वाजवी होईल असें आम्हांस वाटत नाहीं. अर्थात् हा देशावरील कहर, जनतेकडून, तशाच रीतीचे प्रयत्न न झाल्यास, निष्कंटकपणें सुरू राहील हें उघड आहे. 'तशाच रीतीचे प्रयत्न' म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, योग्य तारतम्य ज्ञानाचे अभावीं आमचे बहुतेक प्रयत्न फोल ठरून त्याचें मोल नष्ट होतें, असा अनुभव आहे.

उक्त स्थिति प्राप्त होऊं नये व आपला प्रत्येक उद्योग यशस्वी व्हावा अशी इच्छा असलेल्यानीं खालील मननीय विचार आचारांत आणण्यास अंतःकरणपूर्वक झटावें अशी अत्याग्रहाची सूचना करून हा लहानसा लेख येथेंच आटोपता घेतों.

"आतां कोणतेंहि महत्कार्य म्हटलें म्हणजे तें अवघड असेंच असणार. व तें संपूर्ण व यशस्वी होण्यास अधिकारी पुरुषांची जरूरी असते. बहुजन समाजहि उन्नतावस्थेप्रत जात असावयास लागत असतो. अडचणी, निरनिराळे व्यत्यय व संकटें हीं येणारच. तीं थांबणें मुळीं शक्यच नाहीं. तीं न आलीं तरच आश्चर्य. संकटें जसजशीं अधिक प्र-

—जेठीचें पत्र येत्या अंकांत.

—येथील यंदांचा लक्ष्मीपूजनोत्सव थाटानें पार पडला.

उपसंहारार्थ) श्रीमल्लीकार्जून प्रसन्न (पंचार्या

आर्या

प्रवचनकारांस अर्पण केलेल्या आर्या

श्री मल्लीकार्जुना या, विभुतींनी कामना करीं पूर्ती ॥
सद्वन असदनवनकर, स्वयंभू प्रकट जाहली मूर्ती ॥१॥
ब्राह्मण अखिल समाजीं, प्रवचन देतांचि सौम्य उक्तींत ॥
गमलें मौक्तिक मुक्ता, सुकीर्तिच तें न अन्य उक्तींत ॥२॥
अनुकुल वैभव असतां, भोक्ता नव्हेचि सुख विलासाचा ॥
फिरतो परार्थ येणें, तद्‌गींचा कंठ सुखविलासाचा ॥३॥
आपुलिया ज्ञानबळें, खंडियले मान कापित्यासह सा ॥
ऐकुनि अमृतोक्ती, नच द्यावा सम मान का पित्या सहसा ॥४॥
प्रतिपादित विषयाचा, घ्यावा कर्णीं सुधासम भास ॥
शांतत्वें मनन करा, दर्शवितों परबुधा समभास ॥५॥

वि. वि. ना.

कवि वि. वि. नाईक वेळेकर यांनीं

सांगे महालांत

खालीं नमूद केलेल्या दिवशीं आमच्या संवादकाचीं प्रवचनें होतील:-

वार	ता.	गांव	जागा
रविवार	३१-१०-२१	सांगें	श्री विठोबाचें देवालय
सोमवार	१-११	कुर्डे	सार्वजनिक जागा
मंगळवार	२-११	नेत्रावळि	,, ,,

प्रवचनाला संध्याकाळीं ६ वाजतां प्रारंभ होईल. सवडीप्रमाणें प्रवचनांची संख्या कमीअधिक केली जाईल. प्रत्येक ठिकाणीं इतर गृहस्थांचींहि भाषणें होतील.

भारत मंडळ

Anuncios

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1º oficio Lobo correm editos de 30 dias a contar do dia de segunda publicação deste citando a Salusinho Vás, marido da interessada Maria Caudelina Eteltrudes Mendes, de Orlim de Salsete e residente actualmete nas terras britanicas em parte incerta, para assistir a todos os termos até final do iuventario orfanologico a que se procede por obito de Caitaninho Mendes que foi de Curchorem, sendo inventariante e cabeça de casal Elisa Furtado do mesmo lugar sem prejuizo do seu regular andamento.

O que para ser publico se expediu este

Quepem 28 de Setembro de 1921

O escrivão de direito do 1º oficio

Manoel José Sebastião Lobo

Verifiquei

O juiz de Direito

J. de Seabra (2 vez

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepêm e cartorio do Escrivão do 2º oficio que assina, correm editos de 30 dias, contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2º do artigo 197 do Codigo do Processo Civil, citando a interessada Tiru Sinainim, viuva de Ananta Hori Sinai Matmó, moradora em Mapuçá e ora ausente em parte incerta de Bombaim territorio britanico, para assistir a todos os termos até findada partilha adicional requerias nos autos de inventario orfanologico que Sitabai Sinainim, de Sanguem, prestou por obito do seu marido Sadassiva Bascora Sinai Narcomim, que foi da mesma e deduzir querendo nele os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento. Para ser publico se expediu êste.

Quepem, 12 de Outubro de 1921

O Escrivão de Direito

Aires Manoel Barreto

Verifiquei

J. de Seabra (2 vez

patentes e alega a razão de não terem eles os diplomas justificativos da sua competencia como se isto fosse o unico e exclusivo meio de se avaliar a competencia.

Pois tomo a liberdade de garantir ao sr. Frias que a experiencia dêmonstra que nem sempre são os diplomas que justificam a competencia. Há medicos com inumeros diplomas e contudo não sabem auscultar um doente! Há advogados com diplomas, ignorando ainda as formalidades dum simples requerimento! Não vemos sempre os advogados praticos ofuscarem e emendarem ainda os...b achareis novos? Mais adiante para provar a incompetencia dos aludidos professores diz o sr. Frias que a *mocidade actual* e os *homens de hoje* não sabem nada e são inferiores em comparação dos do seu tempo.

Pode ser que essa afirmação seja verdadeira e falsa. E ainda tomada como verdadeira o que tem os professores acusados de imcompetentes com essa *ignorancia* da mocidade e *imperfeiçao* dos homens de hoje? Os professores em que estão seguir permaneceram nos Liceus ainda o curto periodo duma rotação escolar para serem considerados como responsaveis da aludida *iguorancia* e *imperfeição*.

Portanto não é pelo *diploma* nem pela *edade* que podemos todas as vezes seguramente avaliar a competencia; o verdadeiro valor podemos tambem apurar do resultado da carreira de cada qual.

E por conseguinte será um acto da ingratidão e de suicidio moral incomodarmos, debaixo da nossa vaidade os recem nomeados professores e reprovarmos embora indirectamente [como o sr. Frias] os actos daquele patriotico filho da India que elevou o seu nome e da sua patria na metropole, ouvindo-nos a cada grito alarmado e sacrificando-se intelectual e fisicamente pelo bem da patria.

Margão 14-10-21

Ramachondra Venctexa Naique

ECOS & CRITICA

Free passes

Escrevem-nos que, desde que se começou a arrecadar a taxa de tres anas o *pico*, os respectivos empregados do caes dAlfandega não consentem, por ocasião da chegada de vapores de carreira de Bombaim, entrada aos negociantes que desejam iá para lá ir por causa de suas dependencias.

Não podemos concordar com tal proibição, sobretudo, porque se trata duma classe a que a mesma proibição pode trazer serios prejuisos.

¿ Recsam que haja *intrujice* por parte de qualquer comerciante menos consciencioso na arrecadação do mesmo já celebre imposto?

Franqueim-lhes, então, *free passes*, devidamente visados para que se evite tal receio, de resto, suposto.

Porquem é, não levantem obstaculos aos nossos comerciantes que pelos seus *negocios* ajudam prepônderantemente o nosso tesouro-bancarrotado.

Esperamos que os srs competentes satisfarão a esta justa solicitação para não dizer *exigencia* dos comerciantes de Pangim.

Caso Magnier

Tem-se falado muitó sôbre êste caso, últimamente.

O *Ultramar*, o *Heraldo* e o *Diario da Noite* tem ocupado colunas inteiras sobre a concessão *Magnier*, ninguem sabendo, no final de contas, a que lado milita a razáo, se ao lado do Governo se ao da imprensa, tal è a confusão que se tem estabelecido em volta da discussão, sobretudo, por banda daqueles que são *senhores e possuidores*, mansa e pacificamente, continua e públicamente, duma cabeça, feita de *ossos* que os cães vadios roem, nos seus ocios...

Discursos

Há muitos senhores patriotas que são afeitos a produzir discursos; são mesmo *ursos* nésta materia.

Chegada' porêm, a ocasião de traduzirem os seus *famosos*, *fluentes e eloquentes* discursos, tais oradores se recolhem é cidadela de indiferentismo...indiferente.

E' condenavel, isto. Pois a única maneira de ser útil aos nossos semelhantes é praticarmos obras que rialmente produzam algum beneficio positivo

Parla sem uva é corpo sem alma...

Não é verdade?

सार्वजनिक कार्यें व त्यांची जबाबदारी

[मागील अंकावरून समाप्त]

आमच्या अगदीं प्राचीन इतिहासाकडे पाहिल्यास रामकृष्णादि जगद्वंद्य विभूति सार्वजनिक कार्यासाठीं नेहमीं तत्पर असत असा उल्लेख मिळतो. धनुर्विद्येंत तरबेज झाल्यानंतर सगळ्या लोकांस त्रास देणाऱ्या एखाद्या राक्षसाचा नायनाट केल्यावांचून त्यानीं स्वतःच्या जीवितव्यवसायास सुरवात केलीच नाहीं व आज काल पहावें तर एखाद्या युवराजास सुद्धां कोणत्या तरी सार्वजनिक इमारतीच्या पायाचा दगड बसवून किंवा असलेंच कांहीं तरी करून, प्राप्त झालेल्या राजसत्तेस स्वतां पात्र आहों असें लोकांस दाखवावें लागतें तात्पर्य, राजा असो किंवा रंक असो त्यावर सार्वजनिक कार्याची जबाबदारी असतेच. जबाबदारीबरोबर कर्तव्य वास करितें म्हणून कर्तव्य हें काय आहे हें पाहूं सगळ्या माणसांस कर्तव्य हें केलेंच पाहिजे पण व्यक्ति भिन्नत्वाप्रमाणें कर्तव्य देखील भिन्न असतें. कधीं कधीं एकास जें कर्तव्य तें दुसऱ्यास अकर्तव्य असतें शक्ति वाढविण्यासाठीं दर रोज आठ दहा मणाचे ओंडे उचलणें हें पहिलवानाचें कर्तव्य होईल व तेंच दुसरा कोणी करूं गेल्यास शक्ति वाढण्याऐवजीं अशक्त होईल. ह्यावरून जें काय अंतःकरणास योग्य वाटेल व ज्यामुळें श्रेष्ठ लोकांस श्रेष्ठपणा प्राप्त झाला आहे तें कर्तव्य असें मानण्यास हरकत नाहीं. जबाबदारी पडली म्हणजे कर्तव्य सुचतें पण त्याशिवाय सार्वजनिक कार्यास आणखी मुख्य तीन गोष्टींची आवश्यकता आहे. अगोदर एक संस्था असावी लागते म्हणजे सुसंघटित व व्यवस्थित स्वरूप येऊन निरनिराळ्या व्यक्तींच्या कृतींत ऐक्य राहून कार्य लवकर यशस्वी होतें. दुसरी गोष्ट ही कीं, संस्थापकांत ध्येयाविषयीं पूर्ण एकी पाहिजे. व्यक्ति तितक्या प्रकृति हा विषय लागू केला कीं, संस्थेस विकृति जडलीच असें समजावें. आता तिसरी गोष्ट ती ही कीं चिकाटी पाहिजे. चार चौघ मिळाले व संस्था स्थापन केली. व त्यांची पाठ फिरली कीं, संस्था सपाट झाली हें बिलकूल उपयोगाचें नाहीं. संस्था चिकाटी व एकी इतकी सामुग्री मिळाली कीं तिच्या जोरावर अकल्पित फायदे होतात. सार्वजनिक कार्यांत पडणाऱ्यांस नुकसान भोगावें लागतें. असें म्हणणें नेहमीं खरें नसतें असा अनुभव येतो. वेळ वाय फळ गोष्टींत खर्च होण्याचें दूर राहून त्याचा विनियोग संस्थेची भरभराट कशी होईल ह्या विचारांत होतो, आपल्या आचरणांस शिस्त लागते. व संस्था ह्या लोकोपयोगासाठींच जन्मल्या असल्यानें व बरूंमित्र लोकांत संभवत असल्याकारणानें. आपपरभाव न वाढतां बंधुप्रीतीचें खरें मर्म पाहण्यास मिळतें.

एखादी संस्था कोठवर काम करूं शकते ह्याचें उदाहरण पाहिजे. असल्यास इस्ट इंडिया कंपनी या नावानें इंग्लंडाहून हिंदुस्थानांत स्थापन झालेली व्यापारी कंपनी दाखवितां येईल. कांहीं दुकांच स्थापन झाली होती. तिला पुष्कळ सवलती पाहिजे होत्या त्या कशा मिळवाव्या ह्या विवंचनेनें कंपनीचे मेंबर होते. इतक्यांत बादशहाचा मुलगा कीं स्त्री असाध्य रोगानें आजारी झाली. शेवटीं कंपनीच्या डॉक्टरानें औषध दिलें गुण पडला तेव्हां बादशहानें पाहिजे तें मागण्याविषयीं डाक्टरास सांगितलें त्यानें स्वतासाठीं कांहींच न मागतां आपल्या संस्थेसाठीं पुष्कळ सवलती मागून घेतल्या. इतक्या निस्वार्थीपणामुळें व्यापारी कंपनीचें मोठ्या राज्यांत रूपांतर झालें व आज आह्मीं ताबेदार झालों.

जयवंत घनःश्याम मळकर्णेकर.

—दो. जिऊ शाबा फळ देसाई, श्री. बाबु शिवराम प्रभू देसाई प्रभृति वगैरे मराठे क्षत्रियांतील नामांकित व वजनदार गृहस्थांच्या चालकत्वाखालीं लवकरच एक येथें नियतकालिक निघणार असल्याचें कळतें.

ANUNCIO

PAGODE DE XRY CHAMUNDEXVORY DE SIRVOY

Por ordem superior se annuncia novamente a arrematação das restantes avenças da receita e despesa do sobredito pagode no dia 6 de novembro proximo seguinte ás 15 horas no local da sessões.

O escrivão da mesa

Buto Xenco ra Sinay Sirvoica

भारत

गुरुवार आश्विन व० ११ शके १८४३

स्फुट विचार

शिक्षक संमेलनः—पणजी शहरांत "गोमांतकीय मराठी शिक्षक संमेलना"चें पहिलें अधिवेशन भरून तें यशस्वी रीतीनें पार पडल्याचें वर्तमान आह्मी आमच्या वाचकांस दिलेंच आहे. गेल्या ३।४ वर्षांमागें सदरील संमेलनाच्या कल्पनेस मूर्त स्वरूप आणविण्याचा कित्येक शिक्षणाभिमानी लोकांकडून प्रयत्न झाला होता परंतु लोकांच्या अनास्थेमुळें म्हणा अगर आवश्यक चिकाटीच्या अभावामुळें म्हणा, ती सुंदर कल्पना तेव्हां व्यवहारांत उतरूं शकली नाहीं, ती आतां फलद्रूप झाल्याचें पाहून समाधान वाटतें. गोमांतकांत ठिकठिकाणीं मराठी शाळांचें प्रमाण बरेंच मोठें आहे. पण त्या सर्वांचा शिक्षणक्रम एकवाक्यतेच्या पायावर उभारला गेला नसल्यामुळें परीक्षकांची तारांबळ उडत असते. शिक्षक संमेलनामुळे जे कित्येक फायदे होणार आहेत, त्यांत वरील घोटाळ्याची नड नष्ट होईल हा मुख्य होय. 'गोमांतकीय मराठी शिक्षक संमेलनाचीं येतीं अधिवेशनें अनुक्रमें म्हापसें व मडगांव येथें भरणार आहेत. तीं सर्व तऱ्हेनें यशस्वी होऊन, संमेलनाच्या प्रवर्तकाचें शुद्ध हेतु पूर्ण तडीस जावोत अशी श्री जगन्नियंत्याशीं आमची सविनय प्रार्थना आहे.

व्यापारी लोकांची अडचणः—तीन आणे दीड पैसा कर अमलांत येऊं लागल्यापासून मुंबईहून येणाऱ्या बोटी ज्या धक्क्याला लागतात, तेथें व्यापारी लोकांस आपल्या कामापरत्वें जाण्याची बंदी केल्याचें पणजीचे आमचे बातमीदार लिहितात. जेथें तेथें व्यापारी लोकांस सवलती असून, ज्या देमुनतखोर कृत्यानी व्यापारी लोकांचीं मनें दुखतील, तीं अगर तशा तऱ्हेचीं कृत्यें, कोणत्याही ठिकाणीं टाळण्याचा प्रघात असतांना, येथें मात्र उलटा प्रकार व्हावा, हें धक्केशाहीस योग्य असलें तरी माणुसकीला काळीमा आणणारें आहे. ह्यांत संशय नाहीं. अनेकविध कामाबद्दल व्यापारी लोकांना धक्यावर जावें लागतें. तेथें जाण्याचा प्रतिबंध झाल्यास, त्यानां कदाचित् नुकसानी होण्याचा संभव आहे. तेव्हां 'धक्केशाहीस' आमची अशी सूचना आहे कीं, तीनें व्यापारी लोकांस—ज्यांची धक्यावर कामें असतातच असतात—मोफत पास मिळण्याची व्यवस्था करावी. म्हणजे त्यांपाऱ्यांचीहि सोय लागून, शिवाय 'धकेशाही'स व्यापाऱ्यांच्या "खेर" जाण्या देण्यानें वाटणारी नुकसानीची भीति निराधार होणार आहे.

एक नवीन संस्थाः—हरेक राजकीय सामाजिक, औद्योगिक विषयांवर विचार विनिमय करण्यासाठीं तसेंच अभिनंदनपर वगैरे सभा भरविण्यास सुलभ व्हावें, अशा दुहेरी व तिहेरी हेतूनें 'हिंदुक्लब' या नांवाची एक संस्था पणजी मुक्कामीं स्थापन झाली असून, तिला बऱ्याच लोकांचें सहाय आहे, असें तेथील आमचे बातमीदार कळवितात. अनेक दिवसांपासून व

Obras Publicas do Estado da India, Secção de Deposito e Oficinas

Faz-se publico que se admitem carpinteiros e aprendizes para serviço permanente na oficina de carpintaria desta Direcção, devendo os individuos que pretenderem ser admitidos apresentar-se na Secção do Deposito e Oficinas até ao fim do corrente mez, das 11 ás 16 horas dos dias uteis.

As condições do trabalho são as seguintes: -

O trabalho diario é de 8 horas, com começo ás 8½ até as 12½ horas, e das 13½ até ás 17½ horas.

O pagamento dos salarios é mensal e efectuar-se-há até o dia 6 do mez imediato ao vencido.

O horario do trabalho acima indicado poderá ser alterado conforme a conveniencia dos serviços e dos operarios.

Secção de Deposito e Oficinas da Direcção das Obras Publicas em Nova-Goa. 10 de Outubro de 1921.

O Chefe da Secção int.º
Carlos C Pereira Garces
2.º Oficial

Visto-O Engenheiro Director
A. Mendonça

जाहिरात

पणजीच्या ओब्रस पुब्लिकच्या कारखान्यांत कायमची नोकरीकरण्यासाठीं सुतारकामांत तरबेज असलेल्या व होऊं पहाणाऱ्या इसमांची गरज आहे. ज्या कोणास सदरील जागीं नोकरीवर रहाण्याची इच्छा असेल, त्यानीं उपरोक्त कारखान्यांत, रविवार व सुटीचे दिवस खेरीज करून, सकाळचे ११ ते ४ पर्यंत, समक्ष भेटावें.

खालील प्रमाणें कामाच्या अटी आहेत:—

प्रत्येक दिवसाला ८ तास काम करावें लागेल. सकाळीं कामास साडे आठ वाजतां सुरवात होऊन साडे बारा वाजतां संपेल. नंतर दीड वाजतां कामास प्रारंभ होऊन साडे पांच वाजतां संपेल.

काम केलेल्या महिन्याचा पगार दुसऱ्या महिन्याच्या सहाव्या तारखेपर्यंत चुकता केला जाईल.

कामाच्या व कामगारांच्या सोयीप्रमाणें वरील वेळांत फेरफार केला जाईल. पणजी ता. १०।१०।१९२१

तपासली-इंजिनियर-डायरेक्टर
आ. मेंदोंस

सेक्सांवचे मुख्य
कारलुस से॰ पेरेर गारसेज
सेगुंद ओफिसियाल

माल चोख किंमत रोख

तुह्मांला सुंदर खुर्च्या
निरनिराळ्या रंगाचीं सुंदर टेबलें
उत्तम तऱ्हेचीं मंगळुरीं कौलें व घराचें कोणतेंहि सामान
पाहिजे असल्यास

गोविंद भिकू पऱ्हीकर

यांच्या कांदोळी–बार्देस येथील कारखान्यांत खरेदी करा

सुबक काम माफक दाम !

टीप:—कुशल सुताऱ्यांस लायकीप्रमाणें भरपूर पगार देऊन सदर्हू कारखान्यांत नोकरीवर ठेवण्यांत येतें. गरजूनीं खालील पत्त्यावर अर्ज करावा.

गोविंद भिकू पऱ्हीकर.
कळंगूट–बार्देस.

एकच वेळ येऊन अनुभव घ्या.

रा. पांडुरंग शे. कीर्तनी यांचें

ब्राम्हणी

चहा, काफी व फराळाचें दुकान.

शाखा नं. २

मडगांव नवा बाजार-मार्कीट पिंपळासमोर

आमच्या दुकानीं एकंदर जिन्नस साजूक तुपांत तळलेले असतात. भाजी, पुरी, भजीं, शिरा, उसळ, जिलबी, अनारसे, वेसन, वगैरे वगैरे जिन्नस ताजे तयार मिळतील. आगाऊ कळविल्यास वाटेल ती मिठाई तयार करून दिली जाईल.

मालक:—पांडुरंग शेणवीं कीर्तनी
मडगांव

पी. व्ही विर्जिनकर यांची

आयुर्वेदिक फार्मसी

मडगांव-गोवा

आमच्या फार्मसींत सर्व प्रकारच्या देशी वनस्पती, भस्में रसायने, मात्रा, गुटिका, चूर्णे, आसवें, अरिष्टें, पाक, अवलेह, तेलें वगैरे उत्तम औषधांचा संग्रह असून फारच माफक दरानें देण्याची व्यवस्था केली आहे,

त्याचप्रमाणें, बालामृत, सार्सापरिला, अमृतांजन, शार्द, दंतमंजन सुवासिक काफी, वगैरे महत्वाचे, व नित्युपयोगी पेटंट जिन्नस येथें मिळतील.

गैरसोय दूर झाली

पणजी येथील कोणत्याहि सरकारी कचेऱ्यांतील, कोर्टांतील, हायकोर्टांतील (रेलासांव) तसेंच पोर्तुगालच्या कोणत्याहि वरिष्ट कोर्टांतील कामें

रा. शिज गोमिस पेरेर
श्रीधर कामत शंखावळकर
व्यंकटेश वि. राव सरदेसाई
वकील व सालिसिटर्स

यांच्या नवीनच स्थापलेल्या ऑफिसांतून अत्यंत चोखपणानें योग्य वेतन घेऊन केलीं जातात. अनुभव घ्या व नाहक प्रवास खर्च वांचवा! सर्व तऱ्हेचा पत्रव्यवहार खालील पत्त्यावर:—

व्यंकटेश वि. राव सरदेसाई
पणजी–गोवा.

शेतकी सल्लागार आणि कमिशन एजंट

सहस्त्रबुद्धे आणि कंपनी

सोलापूर

आमचेकडे शेतीसंबंधीं (बागाईत व जिराईत) सर्व प्रकारची व उत्कृष्ट औतें, यंत्रें, खतें आणि बिंबियाणीं मिळतात. किंमती पत्रक व माहिती पत्रकें मागवा.

सूचना— आह्मीं सोलापुरी गिरणींतील मजबूत आणि टिकाउ धोतरजोडे चादरी, सर्टींगचे व चेकडे कापड — गिरणींतील व हातमागावरील निरनिराळ्या प्रकारांची टिकाऊ, पक्क्या रंगाची, भरपूर लांब रुंद अशी सुती, गर्भ रेशमी व रेशमी लुगडीं फारच किफायतशीर भावांत पाठवूं. एकवार अनुभव घेणें. हातमागा संबंधानेंहि सर्व माहिती देऊं.

भाताच्या शेतीसाठीं सर्वोत्कृष्ठ साधन अवश्य मागवा !



किर्लोस्कर बंधु, लिमिटेड, किर्लोस्करवाडी (जि. सा

foi nossa amiga.

Garantimo-lo ao sr. Camotim, nós que, por *dever de oficio*, estamos sempre ao corrente intimo do que se passa em todas as camadas sociais que formam a chamada classe hindu.

Sim, não tenha duvida...

Transferencias

Diz-se que na vizinha India o funcionario publico já não tem tempo para colher a hortaliça, em quanto aqui tem vagar para colher os frutos de marindo. Isto quer dizer que na India Britanica o funcionario publico não se conserva numa mesma localidade por muito tempo, enquanto na India Portuguesa um funcionario publico passa toda a sua vida numa mesma localidade.

E' sem duvida que o Gover- inglez conhece muito bem as vantagens que resultam da transferencia dos funcionarios publicos para a marcha da administração publica, e o Governo portugues tambem adoptou na sua administração o sistema de *land tax, surveying, agricultur deportment etc*, mas até aqui não vejo adoptar o sistema de transferencias. E' verdade que alguns chefes das repartições publicas são *transferidos* de tempo em tempo mas porque razão não hão de ser transferidos todos os funcionarios publicos pelo menos de 3 em 3 anos a exemplo do que faz o Governo inglez?

6-10-21 *L. P.*

Uma medida

Tem havido uma ensurdecedora algazarra em volta da perpetuidade dos regedores do concelho de Sanquelim, dos quais alguns, realmente, ha mais de 8 ou nove anos estão exercendo os seus cargos, sem serem removidos nem *transferidos* duma aldeia para outra, com o manifesto despreso pela lei.

O administrador do concelho que o administra a agrado de todos como nos consta já não quer exonerar nem transferi-los seguindo o sistema antigo dos seus predecessores de outorgar a dádiva e por isso tem deixado vaga sem preencher da regedoria de Mahem, há mais de 2 anos, pois, diz-se que o ilustre chefe do concelho pretende introduzir no preenchimento o seu *novo sistema moralizador*, de nomear os que tenham o *curso comercial* e que com esta clausula vai abrir em breve um *concurso documental* para só os pretendentes que tenham o rafeeido curso concorrerem com os seus *cabedais* áquelas dadivas sobremodo generosas.

Apenas sejam apuradas as classificações, serão exonerados os velhos e postos nos seus lugares os novos que com a arte nova novissimamente inventada com novo mètodo de "tomar e mandar ao sr. administrador a relação dos objectos roubados para indagar nos outros concelhos" coadjuvarão o seu superior hierarquico no descobrimento dos gatunos que de vez emquando infestam o concelho.

Não padece duvida que assim é que podemos conseguir o verdadeiro fim da discentralisação tão aspirada e suspirada?

Portanto não há por em quanto logar para "critica facil do gostinho imbecil"

Nòs por nòsso turno não podemos regatear os devidos encomios a quo tem jús, a ser verdade o respectivo administrador do concelh pela idea original que vai introduzir na administração do seu concelho.

Oxalá assim seja!

O mesmo

Anuncios

सार्वजनिक कार्यें व त्यांची जबाबदारी

कोणत्याहि विषयावर चार शब्द बोलावे अशी प्रेमळ सूचना बालोन्नति समाजाकडून आल्यावरून तिला सर्वथैव रुकार देणें हें पहिलें कर्तव्य व वरील समाज केवळ सार्वजनिक कार्यांसाठींच स्थापन करण्याचा मुख्य हेतु दिसून आल्यावरून वरील विषयच विवेचनासाठीं घेतला आहे. एका वर्षांत समाजानें एकसारख्या बजावलेल्या कामगिरीवरून जो सर्वांच्या आदरास पात्र झाला आहे. समाजाचें इष्ट कार्य जें बालोन्नति हें उत्तम रीतीनें पार पाडण्यास समाज कार्यक्षम असल्याचा दाखला एका वर्षांत मिळालाच आहे. तरी ह्या प्रस्तुतच्या विषयापासून त्यांस फायदा मिळाल्यास माझ्या श्रमाचें सार्थक झाल्या सारखें होईल.

एकादें मूल जसजसें वाढत जातें तसतसें त्याच्या अवलोकनांत असें येऊं लागतें कीं, सगळा संसार ह्मणजे आपला गांवच नसून, देश, खंड, पृथ्वी इत्यादि एकाहून एक विस्तृतपणा दाखविणारे भूभाग दृष्टींतील संकुचितपणा घालवितात. नंतर त्या मुलास असें अनुभवण्यास मिळतें कीं, आह्मी ज्या प्रमाणें लोकाशीं वागतो त्याच प्रमाणें लोकहि आह्मांपाशीं वागतात. पण आणखीं लोकांचा असा एक प्रकार आहे कीं आह्मी जरी वाईट रीतीनें वागलों तरी ते आह्मांस चांगल्या प्रकारें वागवितात अथवा आह्मी बरें केलें कीं वाईट केलें हें देखील न पहातां ते शक्य त्या वेळीं आमचें बरेंच करितात. असे मनुष्य विरळा असले तरी जगांत आहेत हें खास.

ह्या जगांत मानवी प्राण्यांचें सुख वाढावें व कधींहि न संपणाऱ्या गाढ अंधकारांतून त्यास मुक्त करावें ह्याकरितां पूर्वीपासून पुष्कळ विचारी माणसांनी बुद्धि खर्ची पडत आहे. प्रत्येकास स्वतःचा प्रपंच, व प्रपंच तर कधीं न संपे इतका मोठा असें असतांहि कित्येक प्रपंचावर पाणी सोडून मानवी समाजाचें दुःख कमी करून स्वताच्या मनाची तळमळ शांत करीत असतात. तर दुसरे आपलें धन खर्चून जगांतील आपत्ति दूर करण्यासाठीं अहोरात्र खटपट करीत आहेत असें आढळून येतें. असें करण्यांत त्या त्या व्यक्तीचे हेतु भिन्न असले तरी त्या हेतूंच्या मुळाशीं प्रामुख्यानें एक भावना असते ती हीच कीं, ज्या मानवी समाजांत आह्मीं जन्म घेतला त्याशीं प्रत्येक व्यक्तीचें मोठें कधीं न फिटणारें ऋण आहे. आज जें आह्मास ज्ञान, संपत्ति किंवा कोणतीहि उपयुक्त वस्तु प्राप्त झाली आहे तिचें कारण पाहूं जातां त्या सगळ्यांत, आमच्या पूर्वीं जगांत अस्तित्वांत आलेल्या लोकांचे श्रम, अनुभव इत्यादि खर्ची पडले आहेत ह्मणून त्या आमच्या पूर्वी होऊन गेलेल्या लोकांशीं नेहमी कृतज्ञ राहणें भाग आहे. व हें कृतज्ञतेचें ओझें हलकें होण्यासाठीं आपल्या समाजबांधवांशीं व भावी पिढ्यासाठीं ह्मणून कांहीं तरी केल्याशिवाय स्वस्थ राहणें कदापि शोभण्यासारखें नाहीं. ह्या विषयींची नेहमीं हृदयांत वास करणारी तळमळ परोपकारी व थोर अंतःकरणाच्या लोकांस लोकोपयोगी कामें केल्यावांचून उगी राहूं देत नाहीं. हीं लोकोपयोगी कामें सर्व जनांच्या उपयोगी पडतात ह्मणून त्यांस सार्वजनिक कार्यें असें ह्मणतात. सार्वजनिक कामें आहेत तर तीं सगळ्या लोकांनीं करावी असें कोणीं ह्मणेल, तर त्यास उत्तरादाखल सांगतां येईल कीं, सगळीं कामें सगळ्यांस करितां येण्यासारखीं नसतात हें एक कारण, शिवाय कित्येकांचें आयुष्य प्रपंच नेटका करण्यांत खपतें व कित्येकांचें वय प्रपंच संपवून परमार्थास कधीं आरंभ करावा ह्या विचारांतच पार निघून जातें ह्मणून येथें श्रमविभागाचें तत्व लागू करावें लागतें. ज्या प्रमाणें एक राज्य सुव्यवस्थित चालण्यास शहर सुधराई खातें, शिक्षण खातें, राज्यव्यवस्था खातें अशीं निरनिराळीं खातीं पाहिजेत त्या प्रमाणें सार्वजनिक कार्याचें खातें अस्तित्वांत येणें योग्य आहे. ह्या खात्यास सरकारकडून सहाय मिळण्याची अपेक्षा करणें उचित नसून गरज पडेल त्या वेळीं पदरमोड करून आपखुषीनें त्या सार्वजनिक खात्यांत शिरकाव करून घेतला पाहिजे. व ह्या सार्वजनिक खात्यांत इतकीं कामें अडून राहिलीं आहेत कीं, कितीहि स्वयंसेवक पुढें आले तरी तितकींच कामें शिल्लक आहेत असें दिसून येईल. व तीं सर्वांस पुरून उरतील. ह्मणून ज्यास जें शक्य तें त्यानें करून समाजऋणांतून मोकळें होण्यासाठीं प्रपंच साधतानांच सार्वजनिक कार्याविषयींची संवय अंगांत जडविली पाहिजे. ह्मणजे योग्य वेळीं परमार्थाचा विचार सुचेल. "आधीं प्रपंच करावा नेटका मग घ्यावें परमार्थ विवेका" ही साधूची वाणी आहे ती खोटी असणें संभवनीय नाहीं. व खरी ह्मणावी तर प्रपंचांतून परमार्थांत जाणें ह्मणजे अंतरिक्षांतून उडी मारून स्वर्गांत जाण्याइतकें किंबहुना ज्यास्तीच बिकट आहे हीं अडचण श्री रामदासांच्या अवलोकनांत आल्यामुळें त्यांनीं प्रपंच व परमार्थ यांमध्यें राजकारण या सार्वजनिक कार्याची सांगड घालून दिली असावी. परमार्थासाठीं लागणाऱ्या नम्रविनयतेचे कांहीं प्रकार राजकारणास अथवा सार्वजनिक कार्यास वाहिलेल्या लोकांस थोड्या बहुत प्रमाणानें अनुभवण्यास मिळतात. ज्यारूपी देवाची सेवा करितानां कधीं कधीं कोणाचें आर्जव करावें लागतें. सार्वजनिक कार्यास वाहिलेल्या म. गांधीसारख्यांचें गुण श्रवण करावे लागतात. आपलें सार्वजनिक कार्य कोणत्या स्वरूपाचें आहे हें सांगण्यास त्याच्या फायद्याचें कीर्तन करावें लागतें. शेवटीं, आपलें अंगीकृत कार्य कसें तडीस जाईल हा मंत्र नेहमी जपला पाहिजे. [पुढील अंकीं संपूर्ण]

साभार स्वीकार

वै० जनार्दन महादेव कीर्तनें (चरित्र) लेखक— श्री. मुकुंद वि. नाईक प्रतापराव सरदेसाई, मुर्गाव.

हिंदी लोक व फिरंगी संस्कृति (निबंध):— ले० प्रो. सुभाव रामकृष्ण सामंत, मुर्गाव.

स्वयंसेवक (कादंबरी):— ले. वा. वि. जोशी.

या पुस्तकांवर सविस्तर अभिप्राय लवकरच येईल.

या शिवाय श्री शिवाजी [साप्ताहिक]. पुणें, भगवा झेंडा [सा.] कोल्हापूर राष्ट्रवीर [सा.] बेळगांव, प्रबोध [सा.] धुळें इत्यादि साप्ताहिकें आह्मांस प्रेमानें भेट यावयास लागलीं आहेत.

स लेखांतून " कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन " हें गीतावाक्य उद्धारुन किंवा लिहून आपलें व्याख्यान किंवा आर्टिकल सजवावें या परतें गतानुगतिकाचं दुसरें कोणतें आहे ? साधन , चतुष्टय संपन्न इहामुत्रफलभोगविरक्त अशा तीव्रतर मुमुक्षावंतास जे वाक्य थोर गुरूनीं किंवा शास्त्रकारांनीं जे वचन लक्षांत वागविण्यास सांगावयाचें किंवा अर्जुनाच्या निमित्तानें भगवंतानें सर्व अधिकारी साधकांस सांगितलें तें वचन प्रसंगाभासाच्या सादृश्यावरून अत्यंत फाजीलपणें तागिलें जातां कामां नये. व्यवहारांतील महत्वाच्या अनेक इष्ट कामना अंतरीं बाळगून हाडाचीं काडें व रक्ताचें पाणी करणाऱ्या अभीप्सित फलासाठीं हापापलेल्या लेखक-वक्त्यांनीं सुखेच्छु वाचक श्रोतृवर्गास अशीं वाक्यें उपदेशिणें ह्मणजे त्या भगवद्भक्तीची नक्कल नालस्ती करणें किंवा आपल्या सम्यक ज्ञानांच्या अभावाचें प्रदर्शन करणें आहे. इतकेंच नव्हे तर डोळ्यापुढें धरलेलें ध्येय अथवा फलसंपादन करण्यास अवश्य लागणारी जी एक केंद्रीभूत अंतर्मानशक्ति असते तीच मुळीं पोकळ करणें आहे. थोरामोठ्या पदवीधरांनीं एखादें संस्कृत प्राकृत वाक्य कोठें कसेंही एकदा वापरलें ह्मणजे तशाच भावनेनें इतरांसही त्याचा उपयोग अन्यर्थ करावासा वाटतो. मग कालांतरानें त्या त्या वचनाचा मूळ अर्थ नष्ट होऊन रूढार्थच अज्ञ लोकांच्या मनांत भिनून जातो किंवा अनिष्ट अगर विपरीत असा रूढार्थ प्रचलित झाला तरी त्या त्या वचनाच्या असकृत अनाठायीं उल्लेख होत राहिला ह्मणजे त्याचें महत्वच उरत नाहीं.

(पुढील अंकीं संपूर्ण)

ANUNCIOS

चांगली सोय !

सांगें महालांतील दाभाळ नामें मोठें ठिकाण ज्यांत आगरें, बागायत, व शेत संभवत आहे आणि वाड्गण व मर्द पिकावळीचें थोर शेत नामें देवगाळ व कुंटी येथील दोन पिकांचें शेत नामें कोटावहाळ ज्यांत आंब्यांचीं झाडें व बागायत आहे, आणि तसेंच फोंडें कसब्यांत स्थित असलेलें १ चांगलें घर बागेसहीत हें व सदरील सर्व ठिकाणें विकलीं जात आहेत.

ज्यांचीं तीं विकत घेण्याची इच्छा असलेल्यांनीं येत्या औतुबर माहेचे १५ तारखेपर्यंत कसबा फोंडें येथें कापीतांव आ० येन्हीकीउ यांस येऊन भेटावें अगर पत्र लिहावें.

Serão novamente arrematadas as avenças de receita trienal e despeza anual das comunidades de Queddém, Naqueri e Quitol com diminuição e aumento dum quinto nos preços dos calculos, nos dias 16, 17 e 18 do corrente, respetivamente, pelas 12 horas, nos lugares das suas sessões.

Aas 5 de Outubro de 1921

O escrivão das comunidades

Manguexa Naique

mais a mais, vem despida, pór completo, das galas do...

Diz-se

Uma nota

Do sr. Superintendente da Comissão de Milhoramentos recebemos no dia 8 do corrente uma nota, pedindo-nos esclarecimentos sobre os factos narrados na nossa local " *Os nossos autos* "

Dirigimos á mesma entidade a nossa resposta ilucidativa, na tarde do mesmo dia 8.

Muito estimaremos que a nossa carreira de automoveis seja para o diante regular.

E lanchas?

Atenderam ás reclamações públicas sobre o serviço da Navegação fluvial?

Um donativo

Um rico parse de Bombaim fez a qualquer instituição de interesses públicos um donativo dum *crore*, isto é, de cem laques de rupias.

Chama-se Mr. Dhangi Bharocha o filantrofico cavalheiro que na sua mocidade foi empregado, ganhando dez rupias ao mez!

E' muito significativa a historia do sr. Bharochá, digna de ser estudada, em todas as suas manifestações, pelos ricos cá da nossa terra.

Não basta ter dinheiro, é preciso saber emprega-lo.

Em Bicholim

Quando na primeira semestre do ano corrente, se deram em serie roubos audaciosos nesta cassabé, a medida administrativa so se limitou a ordenar telegraficamente aos regedores "tomar a relação dos objectos roubados para indagar nos outros concelhos."

Como era de esperar para nada absolutamente para nada serviu a tal celebre medida, continuando as proezas assombrar a populaça, sem se descobrir sequer um gatuno, o que levou varios correspondentes dos jornaes desta casabé reclamar qualquer outra providencia, contra a falta do policiamento, mais eficaz, tendente a pôr cobro aos constantes roubos, que se praticam impunemente nesta casabé.

Contudo o sr. administrador do concelho não se importou com isso tendo conservado, a despeito de tanta berraria, nos cargos de regedores, até os que os estão exercendo, há mais de 7 anos.

A promulgação do novo diploma, criando a companhia dos sipais, acalentava-nos porem a esperança de que, pelo menos, ao tempo da instalação dos postos policiaes, o chefe do concelho não deixaria de indicar esta casabe para o alojamento dum posto, pelo menos.

Mas *fefelix-fem.* Já foram instalados os postos policiais com a previa audição do sr. administrador do concelho, em outras partes, com a exclusão desta casabé, onde é mister haver policiamento sob todos os pontos de vista e especialmente, porque são frequentes os roubos e furtos nas propriadades.

Porque será isso? Em fim é a nossa sina . . . . . !

Bicholim 29-9-21 [*O mesmo*

डोळे उघडुनि मजकडे पाहीं !

दुरुनी आलों तूझिया भेटी । सांगावया जिवींच्या गोष्टी । तुजला ख्रिस्ती समाजा ॥

अनावृत्त पत्र

ख्रिस्ती देशबंधूनो,

मी एक 'गोमांतकस्थ मुंबापुरवासी' हिंदु आहें. आज आपल्याला वर्तमानपत्राच्याद्वारें दोन शब्द लिहिण्याची प्रेरणा होत आहे, तसें करण्याची परवानगी घेऊन मुख्य विषयाकडे वळतो.

आज आपण ब्रिटिश हिंदुस्थानांत चाललेल्या मुख्य चळवळीकडे लक्ष वळविलें तर काय बरें दिसून येईल? ह्या चळवळीस चलन कां बरें मिळालें? 'स्वराज्याची' प्राप्ति करून घेण्यास ह्या चळवळीचा जन्म झालेला आहे असें एकदम उत्तर देतां येईल. परंतु 'स्वराज्य' लाभण्यास तत्पूर्वी हिंदु-मुसलमानांच्या एकीची फारच आवश्यकता आहे असें 'असहकारितेचे' जनक महात्मा गांधी यांचें ठाम मत झालें आहे असें त्यांनीं कैकवेळां जाहीर केलें आहे. महात्माजी जे आज कन्याकुमारी पासून हिमालयाच्या थेट पायथ्यापर्यंत, अविश्रांत व निस्वार्थ बुद्धीनें आपली देहयष्टि सतत झिजवीत आहेत ती केवळ हिंदु-मुसलमानांची एकी संपादण्याकरितां असावी असें माझ्या अल्पमतीला वाटतें. हिंदु मुसलमानांचें पूर्ण ऐक्य झालें म्हणजे 'स्वराज्याचा भास्करवि हिंदुस्थानांत आपोआप उगवेल, निदान उगवण्याची पूर्व सूचक प्रभा क्षितिजावर झळकूं लागेल. असें ब्रिटिश हिंदुस्थानवासीय हिंदु-मुसलमान पुढाऱ्यांस हल्लीं खात्रीकारक वाटत आहे.

ख्रिश्चन बंधूनो, सतत चारशें वर्षेपर्यंत आपणास दिलेल्या मुबलक सवलतीमुळें, आपण आपली सांपत्तिक, शैक्षणिक व इतर बाबतींत प्रगति करून घेतली आहे या बद्दल मला आपला तिटकार येत नसून उलट आनंदच वाटत आहे. व आणखी माझ्या सारख्या दुसऱ्या आपल्या कितीतरी हिंदुबंधूंस असें वाटत असेल, यांत संशय नाहीं.

दोतोर कारवाल्य सारख्या मुत्सद्यांच्या मुत्सद्दिगिरीचा त्रोटक इतिहास जेव्हां जेव्हां आह्मीं वडील माणसांच्या तोंडांतून ऐकतों तेव्हां तेव्हां तुमच्या बौद्धिक तरतरीबद्दल मला व इतर हिंदूंना आनंद होत आहे. अगदीं गरीब स्थितींतून केवळ आपल्या कर्तबगारीनें लाखोपति झालेले हणजूणचे ख्रिस्तवासी मास्कारेंज बंधूचें उदाहरण डोळ्यांसमोर आलें म्हणजे आपल्या जातीबद्दल आह्मांला स्वाभिमानपूर्वक आनंदच होत आहे. आब्रेव व कोन्हेय-आफोंस सारख्या नामांकित, कुलंदाज, व सुशिक्षित घराण्यांचा इतिहास आठवला म्हणजे प्रत्येक गोमांतकस्थ रहिवाश्यांस आनंदाच्या गुदगुल्या आल्याशिवाय राहणार नाहींत.

कारण आज जरी आपले आचार, विचार, पोषाख, खाणे, पिणें, वगैरे भिन्न रीतीचें असले तरी आह्मी, हिंदु लोक, असें समजतों कीं चारशें वर्षांपूर्वीं तुह्मीं आमचेच जातभाई होते, आमच्याच सारखी तुह्मांस शेंडी होती व आज सुद्धां तुमच्यांत हिंदु रक्त संचरत आहे. हें तुमच्या लक्ष्यांत नाहीं असें नाहीं. आहे हें उघड सिद्ध होत आहे. नपेक्षां ख्रिस्ती मातापितरांपासून जन्मास आलेल्या बालकांस आपण 'बाप्तिजम्' देण्यापूर्वी हिंदूत कां गणतां? व 'बापतिजम्' देण्याची धिसाडघाई कां करितां!

आज सतत चारशें वर्षें पर्यंत आपण आपल्या कौशल्यानें व कर्तबगारीनें मोनार्कीचा फायदा घेऊन अनेक रीतीनें हिंदुसमाजास गांजलें परंतु उलट हिंदुसमाज आपलेपणा न विसरून आपल्याशीं प्रेमानें वागला आहे; इतकें असून दयाळू पोर्तुगेज सरकारच्या रिपब्लिकच्या निशाणाखालीं नांदत होऊन जर आपली उन्नति करून घेण्याची हालचाल हिंदु लोक करून घेऊं लागले तर त्याबद्दल आपणास वाईट वाटून आपण आह्मांस दिलेल्या दुःखावर डागण्या आजहि देऊं लागलां तर तें आह्मांस कसें बरें रुचेल? परक्यानें शिव्या सुद्धां दिल्या तर त्या फारशा दुःखकारक होत नसतात. परंतु आपल्याच मनुष्याकडून एखादा अपशब्द उच्चारला गेला तर त्या बद्दल फारच खेद वाटतो व तो सहनहि होत नाहीं.

आपलेच जातभाई लिसेवाचे सहाध्यापक सि. आरासिज मास्कारेंज व कामचलाऊ रैतोर पाद्री येसेल्स, या उभयतांनीं हिंदुसमाजाबद्दल थोडक्याच दिवसांपूर्वी कशा तऱ्हेचे किळसवाणे शब्द कोमल अंतःकरणाच्या हिंदु विद्यार्थ्यांसमोर उच्चारले, ते आपल्या कानावर आलेच असतील. ते शब्द इतके अमंगल आहेत कीं त्यांचा उच्चारसुद्धां करणें म्हणजे पाप होय. ह्या त्यांच्या उद्धट वर्तनाबद्दल, भारतकारानीं त्यांचा खरपूस समाचार घेण्याचें धैर्य दाखविल्याबद्दल, त्यांच्यावर दावा मांडून चोराच्या उलट्या बोंबा मारणाऱ्या दुष्टांचा फायदा मिळाल्यास पाहुंया ह्मणून पाद्रीसाहेब पुढें सरसावले आहेत. 'भारतकार' सुद्धां कोर्टांत दोन हात करावयाला पाद्री येसेल्स पुढें उभे राहण्यास एका पायावर काय पण एकाच बोटावर उभे आहेत; व हिंदुसमाज त्यांस शक्य त्या रीतीनें ह्या लढ्यांत हातभार लावील याविषयीं मला संशय नाहीं. परंतु...

माझा आपल्याजवळ इतकाच सवाल आहे कीं अशा उद्धट वर्तनानें आपल्या समाजास कलंक लावणाऱ्या व हिंदु-ख्रिश्चन प्रेमांत बिघाड आणणाऱ्या व्यक्तीची पाठ थोपटून त्यांस आपण शाबासकी देणार काय? व अशाच तऱ्हेचीं आणखी कृत्यें करण्यास उत्तेजन देणार काय? तसें करणें गोमांतकाच्या उन्नतीच्या दृष्टीनें फारच चुकीचें होईल.

कारण अशा तऱ्हेच्या वर्तनानें हिंदु ख्रिश्चन मध्यें ज्यास्ती वैर उपस्थित होऊन गोमांतकाची प्रगति होणें फार दुर्लभ होईल. ब्रिटिश हिंदुस्थानांत 'स्वराज्य' मिळविण्यास हिंदु मुसलमानाची एकी पाहिजे. गोमांतकाची प्रगति करण्यास [स्वराज्य आह्मांस मिळालेंच आहे] हिंदु ख्रिश्चन एकीची फारच आवश्यकता आहे. हिंदु व ख्रिश्चन समाज हे एकाच गाडीचीं दोन चाकें आहेत. व गाडीची प्रगति होण्यास जशीं दोन्हीं चकें सारख्याच वेगानें फिरलीं पाहिजेत तद्वत गोमांतकाची खरीखुरी उन्नति होण्यास हिंदु समाजाचा वेग ख्रिश्चन समाजाएवढाच झाला पाहिजे. न पेक्षां कांहीं तरी आड शक्तीनें ख्रिश्चन समाजाचें चाक मोठ्या वेगानें फिरविण्याचा प्रयत्न झाला तर तें चाक गाड्यापासून अलिप्त होऊन, गोमांतकच्या उद्धाराचा गाडा ओढण्याचें सगळें काम सावकाश पण आत्मविश्वासानें चालणाऱ्या स्वदेशनिष्ट हिंदुसमाजावरच पडेल व अलिप्त झालेलें चाक कोठें तरी आदळून चक्काचूर होण्याचा संभव आहे.

या साठीं ख्रिश्चन बंधूनो, आपले हिंदु बांधव आपल्या स्वोन्नतीच्या कामास झटत आहेत ऐसा बद्दल विषाद न मानतां त्यांच्याकडे कौतुकानें पाहण्याची आपल्या मनाची प्रवृत्ति करा. व त्यांच्या प्रगतीच्या आकांक्षा हाणून पाडणाऱ्या प्रयत्नांत आपला अमोलिक वेळ निष्कारण नष्ट करून हिंदु ख्रिश्चन मध्यें वसत असलेल्या प्रेमभावाचा नाश करूं नका. कारण गोमांतकाचा खराखुरा भाग्योदय ज्या दिवशीं ख्रिश्चन हिंदूंना पूर्ण मिलाफ होईल, त्याच दिवशीं असें प्रस्तुत लेखकाला वाटतें.

आ. देशबंधु.

हणजूण ता. २३।९।२१ { व्यंकटेश पां. कामत. एस. बी. वी. एस.

गुरुजी !

[इंदिरातनय, शिरवडें.]

गुरुजी तुमच्या कुमतिसि पार नसे,
हाय! हाय! चालतसां अजुनि नयम कसे?
तापद शिष्यां तव दुर्वाणी भरली पूर्ण विषें!
गुरु० १

हिंदूंतें अवमानितसां कां फिरुनी तदुत्कर्षे?
मरण उद्यांचें आज आणुनी घेतां फरुनि हसें! गुरु० २

हिंदूंच्या उपमर्दाची ना आतां काळ वसे,
हिंदू नटले रिपु दंडाया क्रोधें सिंह तसे!
गुरु० ३

क्षितिजावरि हा ज्ञानरवि पहा तेजोनिधि विलसे
दुष्ट अधम खल निशाचरांचें बंड सकल निरसे! गुरु० ४

सावध वेळीं गुरुजी, तरी व्हा सलाम घ्या हर्षे!
पर्वा न; जरी रघुनाथावरि चरफडलां त्वेषें
गुरु० ५

…लोन्नति समाज, पेडणें

या समाजामार्फत विजयादशमी पासून पौर्णिमेपर्यंत व्याख्यानमाला चालू राहून रा. शांताराम द. देसाई, यशवंतजी ज. देसाई, रामचंद्र सोनबा कामत व हरि विष्णु शेणवी इ. गृहस्थाचीं श्री. वासुदेव आ. देशप्रभू, वे. शा. सं. रामचंद्र वा. ना. करंडे, रा. पांडुरंग स. दणाईत व डॉ. विठ्ठल रा. सिनारी यांच्या अध्यक्षतेखालीं व्याख्यानें होतील.

बालोन्नति समाज

या समाजातर्फे यंदापासून नवीनच सरस्वतीपूजनोत्सव होणार असून तो शुक्रवार पासून सोमवार पर्यंत ४ दिवस साजरा करण्यांत येईल. या च्या हि दिवसांत प्रवचनें, भजन, आरत्या वगैरेंनीं श्री सरस्वतीची व राष्ट्राची मनोभावानें सेवा करण्यांत येईल. सर्व लोकांस उपरिनिर्दिष्ट उत्सवास हजर रहाण्याविषयीं कळकळीची प्रार्थना आहे.

केपें ता. ३।१०।२१ { रा. रा. शिरवैकर. से. बा. समाज.

भजनी सप्ताह

साालाबादप्रमाणें हा येथील धार्मिक व राष्ट्रीय उत्सव येत्या बुधवारीं [आश्विन शु० ११] व गुरुवारीं साजरा होणार आहे. त्यास हजर रहाण्याविषयीं सर्वांस अगत्याची नम्र विनंति आहे.

केपें ५।१०।१९२१ | अध्यक्ष उत्सव कमेटी

ANUNCIOS

PAGODE DE SRI CHAMUNDESVORI DE SIRVOI

No dia 12 do corrente mez pelas 15 horas no local das suas sessões proceder-se há á arrematação trienál de 1922 a 1924 das avenças da receita, e de 1922 avenças da despeza com as condições constantes do respectivo calculo aprovado superiormente, as quais estarão patentes na ocasião de arrematação

Sirvoi 1º de Outubro de 1921

O escrivão da meza

Butó Xencora Sinay Sirvoicar

चांगली सोय !

सांगें महालांतील दाभाळ नांमें मोठें ठिकाण ज्यांत आगरें, बागायत, व शेत, संभवत आहे आणि वाड्गण वर्ष्द पिकावळीचें थोर शेत नांमें देवगाळ व कुटीं येथील दोन पिकांचें शेत नांमें कोटा व्हाळ ज्यांत आंब्याचीं झाडें व बागायत आहे, आणि तसेंच फोंडें कांवेंत स्थित असलेलें १ चांगलें घर बागेसहीत हें व सदरील सर्व ठिकाणें विकलीं जात आहेत.

ज्यांचीं तीं विकत घेण्याची इच्छा असलेल्यांनीं येत्या औतुब्र महिन्ये १५ तारखेपर्यंत कसबा फोंडें येथें कापीतांव आ० येन्हीकीस यांस येऊन भेटावें अगर पत्र लिहावें.

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1º oficio Lobo, correm editos de trinta dias, a contar do dia da segunda publicação deste, citando a interessada Pitol Gauncarina e seu marido Molu Gauncar, moradores em Karwar, territorio britauico, em parte incerta para assistirem a todos os termos até final do inventario orfanologico a que se procede por obito de Gurco Gauncar, que foi de Amonem de Canacona, em que é cabeça de casal o regedor de Galgibaga Caitano Francisco de Minezes, sem prejuizo do seu regular andamento. O que para ser publico se expediu este Quepem 1 de Setembro de 1921

O escrivão de direito do 1of.

Manuel José Sebastião Lobo.

Verifiquei

O Juiz de direito

J. de Seabra

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1º oficio Lobo, correm editos de 30 dias a contar do dia da segunda publicação deste, citando o interessado Durante Faustino Francisco da Piedade Mesquita, solteiro residente em Cusmane e actualmente ausente em Bombaim territorio britanico em parte incerta, para assistir a todos termos até final do inventario offanológico a que se procede por obito de Domingos Sebastião de Mesquita, que foi de Cusmane, por apenso aos de inventario orfanológico procedido por obito de Maria Verodiana Anunciação Dias, que foi da mesma, sem prejuizo do seu regular andamento O que para ser publico se expediu este Quepem 25 de Agosto de 1921

O escrivão de direito do 1º ofo.

Manuel José Sebastião Lobo

Verifiquei

O juizo de direito

J. de Seabra

sr. Dempó ter-se dirigido á imprensa, sem razão alguma.

De resto, o sr. Dempó e outros cavalheiros que nos conhecem, bem sabem que somos incapazes de provocar quem quer e.

A nossa aspiração como a de todos os cidadãos portugueses que amam esta terra, converge para a união completa, sólida e intima de todas as molecolas sociais que constituem este grande corpo que se chama o Estado da India Portuguesa. E outro não é o *desiderato* do *Pragatica Sangh*.

Para a semana

Reservamos, por falta de espaço, para a semana seguinte um brilhante artigo do sr. *Braz da Semana* e correspondencia de *O mesmo*.

5 d'Outubro

Passou, hontem, o aniversario da implantação da Republica Portuguesa.

Ainda que o novo regime não tenha podido, radicalmente, no longo periodo de 10 anos, acabar com a triste herança da extincta forma do Governo, é de esperar, todavia que a gloriosa Republica nos proporcione, num futuro não muito remoto, dias milhores, desfazendo as nuvens de pessimismo que faz, ainda, duvidar da excelencia da Democracia.

Que surja essa felicidade, quanto antes, eis os nossos sinceros votos.

Conversando...

O *Diario da Noite* nega a paternidade da afirmação que, sob informação, foi no *Bharat* atribuida ao seu ilustre director, a proposito de "proibição do ensino marata aos estudantes hindus antes da instrução portuguesa." Está bem.

¿Qual, então, o motivo que levou o sr. director do *Diario* a citar no discurso da conferencia pedagogica o exemplo dum seu colega hindu *que por saber menos do marata, sabia mais do portuguez, tendo uma pronuncia excelente das palavras desta ultima lingua em que até teve o mesmo professor hinduoptimas notas, quando aluno do sr. Marques Pereira?*

Tenha a bondade de se explicar que lhe seremos gratos com a ilucidação requerida.

Crêa, de resto, que não lhe fizemos nenhuma *insinuação* e muito menos, *torpe*, porisso que não frequentamos nem nunca desejamos frequentar a escola darte de...*insinuar*.

Com sinceridade lho dissemos.

Cai a mascara...!

O sr. Prazeres da Costa diz que "preferia perder trinta mil vezes a sua eleição a ter de a ganhar como apoio governamental". A intransigencia romantica do sr. Prazeres da Costa em materia de principios - não fora s. exa. Lamartine! - está, por demasiado conhecida, tão fora de qualquer controversia que a sua solene declaração seria absolutamente desnecessaria e inutil senão servisse para nos mostrar até onde vai, na largueza dos seus vôos hiperbolicos—a opulenta e rutilante imaginação indiana. A frase do sr. Prazeres da Costa tem com efeito, a magnificencia, o fulgor, o arrojo e a fantasia decorativa da arquetectura hindu. Não é mesmo uma declaração: é um pagode oriental...

(*D'A Manhã*)

Em carta endereçada para o *Seculo* o sr. Gouveia Pinto manifesta a sua estranheza por a imprensa de Lisboa, com complemento de telegramas não ter elucidado a opinião, perflexa, relatando como se passaram os factos què tanto emocionarãm a India.

E' sabido que a nossa opinião é de repulsa ao atentado condenavel e *in limine*. Mas, não temos elementos para sobre ele elucidar o publico

Esses elementos deviam fornecer-nos quem de direito.

E esse *manipanso* que por si anda, arvorado em Procurador da India e açambarcador de empregos para todas as Colonias mercê da tolerancia, ou antes de incompetencia dos ministros, sendo tão persuroso em procurar os reporters para solicitar-lhes referencias elogiosas á sua pessoa e aos seus feitos não só não tem tratado desta magna questão, mas atē tem pretendido atenuar tamanha ferocidade criminosa insinuando que ela não tem importancia

Porque será?

Não nos quererá o sr. Gouveia Pinto explicar este misterio!

(*D'O Tempo*)

O *Diario do Governo* 1a serie de 31 de àgosto publica em disposição testamentaria do sr. Celestino de Almeida dois decretos que tem os numeros 7696 e 7697, em que sob as aparencias duma generalisação se procura servir dois individuos protegidos por um alto funcionario das colonias useiro nestes decretos sobrepticios que facilmente iludem a quem náo conhece os *dessous* destas habilidades

O primeiro distina-se a um funcionario das associações agricolas de Goa ou, como queiram a um administrador das comunidades agricolas da India que ora se encontra no continente.

O segundo como se ve do seu artigo 3° alinea *a*) aplica-se a um medico que exerceu as funcçoes de director duma das tantas escolas normais primarias superiores que não funcionariam por falta de alunos.

Os dois contemplados são os unicos nestas condições.

Chamamos a atenção do sr. ministro das Colonias para a burla que aqueles decretos encerram.

E como a India é especialmente visada nestes decretos esperamos que se felicite pela excelencia do serviços dos seus representantes.

(*D'A Imprensa da manhã*)

दोन शब्द

स्पष्ट बोलावें पण खरें बोलावें असें निस्पृहीबाण्याच्या व्यक्तीचें व्रत असतें. भारतावर जी संकट परंपरा कोसळलेली दिसली ती केवळ स्पष्टवक्तृत्वाचेंच फळ होय. भारतकारानीं पत्करलेल्या धोरणान्वयें संकटें हीं दत्त ह्मणून उभीं रहावयाचींच. "मतभेद व त्यामुळे चालणारे लढे हेच खऱ्या व जिवंत प्रगतीचे द्योतक असतात" असा नेक नामदार ड्यूक ऑफ कॅनाटचा शेरा आहे, तथापि पौनःपुनिक दाव्यांच्या जाळ्यांत भारतकार गुरफटून जाऊं लागल्यास त्यांस उसास टाकण्यास वाव न मिळतां प्रवचनादि देशसेवेंत खंड पडण्याचा संभव आहे. टीकात्मक जोरदार लेख आह्मांस वाचण्याची हौस असेल, पण, खाणींत उडी टाकण्याचे वेळीं स्वतः संपादकांनीं सज्ज असलें पाहिजे. त्याच्यावर ओढवलेल्या आपत्तींनीं व्यग्र झालेल्या चित्तवृत्तीस थोडा विराम आवश्यक आहे, त्यासाठीं सार्वजनिक वादग्रस्त गोष्टींपासून अल्पकाळ त्यानीं अलग रहावें अशी पेमळ विनंति करावीशी वाटते. खटल्याची मगरमिठी एकदां पडली कीं ती ढिली होण्यास दिरंगाई लागते. एकाच योद्ध्यावर चहूं कडून बाणांचा वर्षाव होऊं लागल्यास एकाग्र चित्तवृत्तीला व्याघात येईलच येईल.

भारतांत माझ्या लेखांस अनेकदां स्थळ मिळाल्याबद्दल आभार प्रदर्शन करणें हें माझें आद्यकर्तव्य असतांही उलट भारतकारानीं सदर पत्रांत मला कृतज्ञता दर्शविली हें त्यानीं स्वतःच्या सच्छीलास अनुसरून केलें. ताजव्याच्या आश्रयानें आभारभारांची तुलना केली असतां ऋणकोचें पारडें माझ्याच बाजूस येईल.

माझी लेखन सरणी जुनीं पुराणी असून लेखणींत चमक नाहीं, अर्थात् लेख प्रतिभाशाली नाहींत, हें मी प्रांजलपणें कबूल करितों. विचारास आलें तें सादर केलें, सन्मान्य वाचकांस त्यांतील स्वल्प पसंत पडला ह्मणजे झालें.

कोणीही वर्गणी वक्तशीरपणें भरिली किंवा भारत फंडास शक्त्यनुरूप मदत केली ह्मणून भारतकार त्या देणाराचे पांगते झाले असें समजणें यथार्थ नाहीं. वर्गणी हें प्रत्येक वृत्तपत्राचें जीवन असून ती योग्य प्रसंगीं भरणें हें न्याय आहे, फंडास मदत करणें हें सार्वजनिक काम समजलें पाहिजे. "दसका लकडी एकका बोजा" ह्या तत्वाची गोमांतकस्थाला जाणीव होण्याइतके ते देशबंधु सुज्ञान आहेत. सढळ हातानें कांहीं सद्गृहस्थांनीं भारत फंडांत भर घातली हें तर प्रत्ययास येऊन चुकलेंच आहे. एखादा दुर्जन सरित्प्रवाहांमधून वाहत चालला किंवा खोल पाण्यांत गटंकळ्या खाऊं लागला तर त्याला हात देऊन वर काढण्याचा प्रयत्न करावा असें ज्ञान संमति देतें, मग भारतकारांसारखे लोक ज्यानीं केवळ सत्यासाटीं स्वतःचें जीवित धोक्यांत घालण्यास किमपिही माघार घेतला नाहीं अशा पुरुषाची कळकळ बाळगणें अवास्तव होणार नाहीं.

भारतकारानीं यद्यपि स्वतःच्या दृष्टीनें माझी गणना देशभक्तांच्या मालकेत केली असली तथापि मला ती डोईजड समजणें प्राप्त आहे. स्वतःच्या घरदारावर किंबहुना जमीन जुमल्यावर तसेंच मालमत्तेवर अर्थात स्थावर जंगम इष्टेटीवर किंवा स्वतःच्या हितसंबंधिक गोष्टीवर तुळसीदल ठेवून निर्भिडपणें लोकहितास वाहिले असतील तेच माझ्या मतें देशभक्त ठरतात. "ऐसे संत झाले कळीं। तोंडीं तमाखूची नळीं॥" असले संत देशभक्त नव्हत. भारतांत एखादा लेख मीं लिहिला तो निवळ करमणुकीदाखल होय. "ब्रह्मज्ञान नव्हे लेंकुराच्या गोष्टी" असें आहे तर देशभक्तीचा संस्कार माझ्यावर झाला नसतां मला देशभक्त ह्मणवून घेणें प्रशस्त होणार नाहीं. माझे विचार प्रत्यक्षपणें ज्यांला समजले असतील त्यांजकडून मी देशभक्त असल्याचा अनुकूल ध्वनि कधींही निघणार नाहीं हें खुल्या दिलानें येथें नमूद करण्यास परवानगी घेतों.

सारस्वत

आमच्या संपादकांसंबंधीं काढलेल्या प्रोत्साहनपर उद्गारांबद्दल भारत मंडळ सारस्वताचें आभारी आहे. त्यांच्याविषयी स्तुतिपर लेखांस, त्यांची खुषी नसतांहि त्यांस मंडळ जागा देत असतें, याचें कारण संपादकांची कीर्ति वाढवावी हें नसून भारत व भारतकार यांच्याविषयीं वजनदार व राष्ट्रहितप्रेमी निर्मळ अंतःकरणाच्या लोकांचें मत भारतांत नमूद होऊन रहावें, इतकेंच होय. या कामीं कुत्सित 'परिचितांची' मंडळास बिलकूल पर्वा वाटत नाहीं.

भा. मंडळ

अनुकरणीय उदाहरण

श्री. भारतकार यांस वि. वि.

स्वदेशाभिमानासारख्या उच्च प्रतीच्या भावनेचा विकास सुशिक्षित पदवीधरांच्याच अंतःकरणांत होतो, इतरांच्या होत नाहीं असा प्रकार बिलकूल नाहीं. श्रीराम प्रभूची मर्कट सेना, शिवाजीचे एकनिष्ठ मावळे हे पदवीधर नसतांहि त्यांचीं अंतःकरणें थोर वृत्तीनीं उचंबळून गेलीं होतीं.

अशाच तऱ्हेची भावना, कोणत्याहि 'लिसेवाचें कार्द' नसतां, पणजीच्या सुखनिवासाचे प्रेमळ व आनंदी मालकाच्या साध्या अंतःकरणांत उद्दीपित झाली ह्मणण्यास कोणतीहि हरकत नाहीं. श्री. रामपंत कित्येक वर्षांपासून धूम्रपानाचे भक्त होते परंतु केवळ लोकमान्यामार्फत हिंदुस्थानांतील सर्व चळवळीची माहिती करून देणारें दैनिक पत्र 'विनखर्चें' वाचावयास मिळावें, या सद्हेतूनें प्रेरित होऊन त्यानीं आपल्या जुन्या व आवडत्या व्यसनाला कायमचा फांटा दिला व सिगारेटच्या धुरांत चक्काचूर होणाऱ्या पैशांचा विनियोग 'लोकमान्य' आणण्याचे कामीं केला!

ज्या ज्या गृहस्थानां सदरील अनुकरणीय कृत्य अवगत झालें त्या त्या गृहस्थांच्या तोंडांतून 'शाबास, राम साखरदांडे!' असे उद्गार निघाले असल्यास त्यांत आश्चर्य तें कोणतें?

आमचे सुशिक्षित तरुण, विशेषतः 'सुखनिवासां'तील सुग्रास अन्नाचा रसास्वाद चाखणारे होतकरू विद्यार्थी राम साखरदांड्याच्या कृतीपासून उपयुक्त धडा घेतील अशी आशा करितों.

मुंबापुरस्थ प्रवासी

श्री. साखरदांड्याच्या उदाहरणानें आमचे तरुण व राष्ट्राचे आधार स्तंभ-विद्यार्थी अनावश्यक चोचल्यांत खर्च होणाऱ्या संपत्तीचा विनियोग कोणत्याहि राष्ट्रकार्यांत करतील, अशी पूर्ण आशा आहे.

सं. भारत.

जाहीर विनंति

श्री सरस्वती-सेवक मंडळ व श्रीदामोदर वाचनमंदिर

सर्व प्रांतबंधूंस सविनय कळविण्यांत येतें कीं, येत्या आश्विन शु० १० मी मंगळवार पाधून तीन दिवसपर्यंत [ता. ११ । १२ । १३ आक्टोबर रोजीं] सालाबादप्रमाणें श्रीदामोदर विद्याभुवनांत पंचम-सरस्वत्युत्सव, सुप्रसिद्ध वक्त्यांचीं व्याख्यानें, प्रवचनें, किर्तन-भजनादिकांच्या योगें साजरा करण्याचें वरील मंडळानें ठरविलें आहे. त्याच प्रमाणें आश्विन शु० १२ दशी (ता. १३ आक्टोबर) गुरुवार रोजी श्रीदामोदर वाचन मंदिराचा चौथा वाढदिवस समारंभहि प्रसिद्ध सरस्वती भक्ताचे अध्यक्षतेखालीं साजरा होऊन वार्षिक रिपोर्ट वाचन व समयास अनुसरून निवडक वक्त्यांचीं भाषणें वगैरे होणार आहेत. अशा या सर्ववंद्य विद्यादेवीच्या सेवेंत व सार्वजनिक संस्थेच्या वाढदिवससमारंभांत आपण आपल्या मित्रमंडळीसमवेत भाग घ्याल अशी उमेद वाळगतों. कळावें हे विनंति.

श्रीदामोदर विद्याभुवन, ता. २८-९-२१

आ. न.

दामोदर श्री. नाईक दलाल
से. श्री. स. से. मं.

यशवंत विष्णु पै रायतुरकर
से. श्री. दा. वा. मं.

विष्णु माधव धुमटकर
वैकुंठ विष्णु कारे
शांता पंढरी वागळे
गुरुदास पुंडलीक कारे
उत्सव कमिटी

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1° oficio Lobo, correm editos de trinta dias, a contar do dia da segunda publicação deste, citando a interessada Pitol Gauncarina e seu marido Molu Gauncar, moradores em Karwar, territorio britanico, em parte incerta para assistirem a todos os termos até final do inventario orfanologico a que se procede por obito de Gurco Gauncar, que foi de Amonem de Canacona, em que é cabeça de casal o regedor de Galgibaga Caitano Francisco de Minezes, sem prejuizo do seu regular andamento. O que para ser publico se expediu este. Quepem 1 de Setembro de 1921

O escrivão de direito do 1of.
Manuel Jose Sebastião Lobo.
Verifiquei
O Juiz de direito
J. de Seabra

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1° oficio Lobo, correm editos de 30 dias a contar do dia da segunda publicação deste, citando o interessado Durante Faustino Francisco da Piedade Mesquita, solteiro residente em Cusmane e actualmente ausente em Bombaim territorio britanico em parte incerta, para assistir a todos termos até final do inventario orfanologico a que se procede por obito de Domingos Sebastião de Mesquita, que foi de Cusmane, por apenso aos do iuventario orfanologico procedido por obito de Maria Verodiana Anunciação Dias, que foi da mesma, sem prejuizo do seu regular andamento O que para ser publico se expediu este Quepem 25 do Agosto de 1921

O escrivão de direito do 1° ofo.
Manuel Jōsè Sebastião Lobo
Verifiquei
O juizo de direito
J. de Seabra

जाहीर विनंति

श्री सरस्वती-सेवक मंडळ व
श्रीदामोदर वाचनमंदिर

सर्व प्रांतबंधूंस सविनय कळविण्यांत येतें कीं, येत्या आश्विन शु० १० मी मंगळवार पासून तीन दिवसपर्यंत [ता. ११ । १२ । १३ आक्टोबर रोजीं] सालाबादप्रमाणें श्रीदामोदर विद्याभुवनांत पंचम-सरस्वत्युत्सव, सुप्रसिद्ध वक्त्यांचीं व्याख्यानें, प्रवचनें, किर्तन-भजनादिकांच्या योगें साजरा करण्याचें वरील मंडळानें ठरविलें आहे. त्याच प्रमाणें आश्विन शु० १२ दशी (ता. ३ आक्टोबर) गुरुवार रोजी श्रीदामोदर वाचन मंदिराचा चौथा वाढदिवस समारंभहि प्रसिद्ध सरस्वती भक्ताचे अध्यक्षतेखालीं साजरा होऊन वार्षिक रिपोर्ट वाचन व समयास अनुसरून निवडक वक्त्यांचीं भाषणें वगैरे होणार आहेत. अशा या सर्ववंद्य विद्यादेवीच्या सेवेंत व सार्वजनिक संस्थेच्या वाढदिवससमारंभांत आपण आपल्या मित्रमंडळीसमवेत भाग घ्याल अशी उमेद वाळगतों. कळावें हे विनंति.

श्रीदामोदर विद्याभुवन, ता. २८-९-२१

आ. न.

दामोदर श्री. नाईक दलाल
से. श्री. स. से. मं.
यशवंत विष्णु पै रायतुरकर
से. श्री. दा. वा. मं.

विष्णु माधव घुमटकर
वैकुंठ विष्णु कारे
शांता पंढरी वागळे
गुरुदास पुंडलीक कारे
उत्सव कमिटी

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1º oficio Lobo, correm editos de trinta dias, a contar do dia da segunda publicação deste, citando a interessada Pitol Gauncarina e seu marido Molu Gauncar, moradores em Karwar, territorio britanico, em parte incerta para assistirem a todos os termos até final do inventario orfanologico a que se procede por obito de Gurco Gauncar, que foi de Amonem de Canacona, em que é cabeça de casal o regedor de *Galgibaga* Caitano Francisco de Minezes, sem prejuizo do seu regular andamento. O que para ser publico se expediu este. Quepem 1 de Setembro de 1921

O escrivão de direito do 1of.
Manuel Jose Sebastião Lobo.
Verifiquei
O Juiz de direito
J. de Seabra

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1º oficio Lobo, correm editos de 30 dias a contar do dia da segunda publicação deste, citando o interessado Durante Faustino Francisco da Piedade Mesquita, solteiro residente em Cusmane e actualmente ausente em Bom baim- territorio britanico em parte incerta, para assistir a todos termos até final do inventario orfanologico a que se procede por obito de Domingos Sebastião de Mesquita, que foi de Cusmane, por apenso aos de iuventario orfanologico procedido por obito de Maria Verodiana Anunciação Dias, que foi da mesma, sem prejuizo do seu regular andamento O que para ser publico se expediu êste Quepem 25 do Agosto de 1921

O escrivão de direito do 1º ofo.
Manuel Jõsè Sebastião Lobo
Verifiquei
O juizo de direito
J. de Seabra

¿ Com que autoridade moral e inteução oculta abusaram, pois, da bôa fê da gente os promotores do mencionado comicio?

Não queremos, de resto entrar na apreciação de compatibilidade ou incompatibilidade do sr. Governador Geral com a colonia, assunto que não vem ao caso.

Pelo dêdo se conhece o gigante. E' pelo telegrama abusivo de *incompatibilidade* se conhece o motivo porque os de Margão secundaram as candidaturas dos srs. Prazeres e Celestino de Almeida. Não havia portanto nisto nenhum *patriotismo* mas o sentimento de ...*disforra* !

E' assim que se faz a politica ? E' assim que se beneficia o Paiz ? E' assim que se educa, finalmente, o Povo de cujos representantes natos nos arvoramos ?

Triste, simplismente triste sobretudo, porque o tal abuso desvaneceu, como uma bola de sabão, a importancia social e politica que o caso da *Terra* atingira.

Sentimo-lo, imenso!

O nosso jornal

Devido á ausencia do nosso director que anda em propaganda civica e pela incuria do nosso revisor, sai, muitas vezes, cheio de erros de revisão, felizmente de facil inteligencia, o nosso jornal, pelo que pedimos mil disculpas aos nossos benevolos leitores.

Providenciaremos, porem, sobre esta lacuna logo que possamos fazel-o.

Ate la, tenham paciencia que o quê não se pode remediar, remediado fica !

Dr. Rajarama P. Quelecar

defendeu, a conclusão do curso medico, brilhantemente a sua tese inaugural que versava sobre "O ressurgimento da Goa," tendo obtido alta classificação êste prestimoso joven um dos que honram, já pela lucida inteligencia, já pela nobreza do sentimentos, a classe hindú que vê nele, com justificado orgulho, congl[o]bada uma solida esperança do seu rial ressurgimento.

Seja feliz; eis os nossos sinceros votos

Narana D. Calangutcar

Após defesa que muito o acredita da sua tese inaugural sobre o "Chloreto de Sodio" concluiu o seu curso de farmacia êste bom rapaz que a uma inteligencia pouco vulgar alia belas qualidades de alma, o que o faz querido de quantos o conhecem.

Ao joven farmaceutico, franco e leal, o nosso cordeal abraço.

Custa crer !

Consta-nos que sr. administrador do concelho, arrastado talvez, pela influência da favoritismo que nos enferma, vai encarregar a um militar que já é regedor e escrivão de qualquer comunidade, contra lei expressa, mais a comunidade de Sirvoi. custa crêr !

Descoberta...

Informam-nos que o sr. Luiz de Minezes não è apenas um professor distincto e jornalista de mão cheia: é tambem um pedágogo dos mais ilustres, pois na conferencia, pedagogica, há pouco realisada em Pangim, sua exa: espantou a ilustre assemblea com uma nova descoberta... pedagogica a de proibição do ensino de marata aos estudantes hindùs antes da instrução portuguza. E' que, na sua opinião, o marata prejudica-lhe a pronuncia

Ora, mezes, atraz houve quem afirmasse que o mesmo fenomeno era consequencia logica e natural dos malfadados hindùs não comerem a carne do porco.

Qual deles tem razão ? Não o sabemos.

Acaso estarão ambos *docentes* ? Neste caso é bom que eles vão recorrer aos prestimos do sr. Dr. Miguel Caetano Dias e tantos outros cristãos cuja pronuncia portuguesa, apesar de não maculados pelo *detestavel* marata, deixa muito a desejar...

Prof. Ramachondra Naique

Cumprimentamos a este talentoso professor da Escola Normal pela brilhante defesa que fez do ensino marata na Conferencia Pedagogica há pouco realsida em Pangim

O Bharat orgulha-se sempre dos hindús que, como o sr. prof. Naique pugnam pelos interesses públicos da sua classe

---

प्रांतिक संघ

संघाच्या मध्यवर्ति मंडळाच्या ज्या सभासदांकडे, स्वयंसेवकांकडे व इतर सद्गृहस्थांकडे सभासदांनीं भरून द्यावयाचे फॉर्म पोंचले असतील त्यांस आग्रह व नम्रतापूर्वक अशी विनंति करण्यात येत आहे कीं, येत्या आक्टोबर अखेर तरी कौंसिल कमीट्या स्थापन होणें सर्वांस इष्ट असल्यानें, त्यांनीं आरंभलेलें काम पुरें करून एकंदर फॉर्म, पावती पुस्तकें व हिशेब येत्या १८ तारखेपर्यंत थोडें थेथें संघाच्या कार्यालयांत पोंचतील अशा बेतानें पाठवण्याची कृपा करावी त्याचप्रमाणें ज्या सद्गृहस्थांस सभासद होण्याची इच्छा असेल त्यांनींहि अशा बेतानें फॉर्म मागविण्याची विनंति आहे की ते वरील मुदतींत संघाच्या कार्यालयांत परत पाठवतां येतील. कौंसिल कमीट्यांच्या स्थापनें संबंधाची व इतर माहिती वरचेवर जाहीर करण्यांत येईलच.

पु. श्री. दुकेरकर
चिटणीस प्रा. संघ

पेहराव-विचार

म. गांधींच्या चळवळीस सुरवात झाल्यापासून व विशेषतः गांधी टोपी अवतरल्यापासून हिंदुस्थानांत जिकडे तिकडे साधेपणा व सोई या तत्वास अनुसरून पोशाख पेहरावांत क्रांति होण्याचा समारंभ झाला आहे. गांधी टोपी सारखें स्वच्छ व हलकें शिरोभूषण मस्तकावर पडल्यापासून डोक्यांत चक्कू प्रकाश पडून त्या टोपीस साजेसाजे इतर पोषाख करण्याची सुबुद्धि सुचावी हें फार चांगलें आहे. हीच साधेपणाची दृष्टि इतर पेहरावांकडे, म्हणजे मळके डोक्यावरील केस राखणें कीं डोक्याची हजामत करविणें असल्या गोष्टींकडे, कांहींच्या मतें, वळवीं असल्यानें साधेपणा व सोई यांच्या आधारानें तसल्या बाबींचा विचार होणें सर्वथा योग्य आहे.

शेंडी राखण्याचें धार्मिक कारण काय असावें हें जरी आमचा कोणताच धर्मग्रंथ सांगूं शकत नाहीं तरी तें कारण-आरोग्य रक्षण हेंच आपल्या धर्माचें मुख्य अंग असल्यामुळें —कोणसाही शरीररक्षणाच्या तत्वावर अवलंबून असावें. व हें तत्व असें असलें पाहिजे कीं, ज्या स्थानीं शेंडी राखण्याचा प्रघात आहे तें स्थान मेंदू आंकरणाऱ्या तीन अस्थींच्या सांध्यावर आहे. तो सांधा Cartilagem [कार्टिलाईं] नावांच्या मृदु अस्थीच्या गिलाव्यानें जुळविला गेल्यानें त्याचें व परंपरेनें मेंदूचें विशेष संरक्षण होण्यासाठीं डोकीचे इतर केस काढले तरी देखील त्या स्थानीं केश राखावे अशी वैद्यशास्त्राची आज्ञा असावी. ह्यांत संशय असूं शकत नाहीं. आणि, कारण न शोधितां अंधपरंपरेची चाल हिंदूंस आंधळेपणी पडली असल्याकारणानें शेंडीतच सगळा हिंदुधर्म आहे, किंवा इतर धर्मावर बहिष्कार घालण्याचें तें एक साधन आहे असें वाटूं लागलें ! आतां, केश कापण्याचा प्रचार हिंदुस्थानांत कधींपासून सुरू झाला अता प्रश्न निघाल्यास त्यास असें उत्तर देतां येईल कीं, एकपाती धारेचें शस्त्र निर्माण झाल्यानंतर फार वाढलेल्या केसांचे छेदन करण्याची गरज पडल्यापासून तो प्रकार सुरू झाला. शिवाय, वाखराखेरीज एकपाती धारेच्या शस्त्रानें मुळापासून म्हणजे चामडी बरोबरच केश काढणें भाग पडल्यामुळें केसांच्या उच्चाटनाबरोबरच हजामतीचा जन्म झाला. फार वाढलेले केश उतरविणें सोईचें असलें तरी हजामतीनें केसांच्या मुळांस इजा करून परमेश्वरानें दिलेलें नैसर्गिक केशावरण, डोक्या सारख्या श्रेष्ठ व मेंदूसारख्या प्रधान अवयवांवरून काढावें, व ही चाल कात्री प्रमाणें, म्हणजे एकपाती शस्त्रांहून ज्यास्त सुधारलेलीं दुपाती शस्त्रें व्यवहारांत आल्यावर टिकावी हें कोणत्याच धर्मशास्त्रास किंवा आरोग्य शास्त्रास पसंत पडणार नाहीं. हें सांगणें नकोच. उलट, असा कायदा आहे कीं, डोक्यावरील केश राखल्यापासून न्हाव्याच्या वस्तऱ्यानें पसरणाऱ्या त्वचेच्या रोगांच्या संसर्गापासून मेंदू तरी ज्यास्त संरक्षिला जाईल.

आमांस कोणतीहि गोष्ट रूढीनें आंगवळणी पडली [illegible] देण्यात मन धजत नाहीं. वास्तविक पाहतां, एक नेसण व एक उपवस्त्र हीं आमचीं मूळचीं वस्त्रें असतांना मुसलमानी अमदानीपासून कोट अंगरखे इत्यादिकांचा आमच्या पोषाखांत प्रवेश होऊं लागला. तेव्हांपासून तो मूळचाच पोषाख असें समजण्याचा मोह वाढत चालला व 'प्राण गेला तरी बेहेत्तर, पण यावनी भाषा बोलायची नाहीं' इतक्या थरापर्यंत बहिष्कृत असलेल्या मुसलमानाचा पोषाख आह्मांस आवडूं लागला. ह्या परंपरेकडे पाहिलें असतां आज राज्यकर्ते वापरतात म्हणून तसले पोषाख वापरण्यांत धर्मद्रोह आहे असें मानून जरी ह्या ते पोषाख आह्मीं निंद्य मानूं लागलों तर उद्यां आमच्या राज्यकर्त्यांस पिटाळून लाविल्यानंतर चिनी किंवा जपानी लोकांनीं जर आह्मांवर स्वारी केली तर त्यांस शेंडी आहे म्हणून आह्मीं त्यांच्या उलट वर्तन करण्यासाठीं शेंडी काढून टाकण्यास प्रवृत्त होऊं ! व आजच्या युरोपियनाचेच पोषाख चांगले म्हणूं ! असें सयुक्तिक प्रमाण निघतें.

दुसऱ्या बाजूनें पाहूं जातां, गांधीजीच्या साधेपणा व उपयुक्तता या तत्वदृष्टीनें विचार करितां, केवळ डोक्याचेच नव्हे तर दाढीचे देखील केश राखण्यास पाहिजेत. कांकीं त्यांत साधेपणा व वेळ आणि खर्च यांची काटकसर आहे. पण दाढी राखणें म्हणजे मुसलमान होणें. डोकें राखणें म्हणजे ख्रिस्ती होणें व ह्याच दृष्टीनें शेंडी राखणें म्हणजे चिनी होणें! कदाचित् बुद्धधर्मावरून अहिंसेच्या तत्वानें जर पाहिलें तरी चिनी लोक सर्वभक्षक आहेत. म्हणून त्यांच्या शेंडीची आपल्या शेंडीशीं गांठ होणताच हिंदु व धणार नाहीं ! अर्थात हिंदुधर्म म्हणजे विपरित क्रियाधर्म असें सिद्ध होतें.

गांधी टोपीच्या इतिहासाकडे पाहतां टोपी ही अगोदर युरोपियन म्हणून युरोपियनास 'टोपीवाले' अशी संज्ञा आहे. ह्यावरून टोपी हीच आम्हांस त्याज्य वाटावयास पाहिजे होती. पण, तिच्या साधेपणावरून ती सर्वांस मान्य झाली. शिवाय, महात्मा गांधी हे तत्वनिष्ठीचे आग्रह धरणारे असल्यामुळें टोपी ही मुळची विदेशी ह्या दुराभावास बाध न देतां 'जें उपयुक्त तें कोणाहि पासून घ्यावें' या न्यायास अनुसरून टोपीच्या विदेशी आकारास त्यानीं स्वदेशी खादीनें नटविलें ! ह्यांतच त्यांची थोरवी आहे.

कोणत्याहि राज्यकर्त्या समाजाचा पगडा राहुज लोकांच्या पोषाखावर पडतो. हें कोणत्याहि देशाचा इतिहास सांगेल. खुद्द हिंदुस्थानात देखील त्या तिपीचे परिणाम दृष्टीस पडतात. हें पोषाखाचें अनुकरण योग्य आहे कीं नाहीं ह्याचा काथ्याकूट करण्यापेक्षां तें अनुकरण हितकर होण्याचें प्रयत्न झाले पाहिजे. तशा प्रयत्नास खात्रीनें यश येतें असें आमचाच इतिहास सांगतो. श्रीशिवाजीमहाराजांकडे पाहिल्यास पुरे. मुसलमान बादशाही विरुद्ध केवळ हिंदु राज्य स्थापण्यासाठीं झटणाऱ्या ह्या राजास यवनापारखी दाढी राखण्याची हौस, व्हावी ह्याचें कारण पाहिल्यास तें त्याच्या गुरुच्याच बोध वचनांत मिळतें. वरें हे गुरु पहावे तर ब्राह्मण असूनहि दाढीवाले! त्यांत राजकारण आहे ! त्या दाढीमुळें त्या गुरुशिष्यांस यावनी वेषांत बादशहांच्या खास मसलतींतील गोष्टींत सुद्धा भाग घेतां येऊन अनेकदां इष्ट कार्यें करितां आली असतील! म्हणून श्रीसमर्थांच्या [illegible] दाढीचें समर्थन कोणत्या शब्दानीं करावें ! इतक्या विवेचनावरून युरोपियन पेहरा-

मंगलमूर्ती मोरया

सारंग धुमाळी

[श्री. इंदिरातनय. शिरवडे यांनी गणेशचतुर्थीच्या उत्सवप्रसंगीं स्वकृत शिकविलेली आरती]

आरति ही तुज श्रीगणराया सद्भावें नमुनी।
दिव्य नाम तव पूर्व सुपुण्यें आजी ये वदनींधृ.
अज्ञ मुग्ध बापुडीं अर्भकें हीं अति दीन अनाथ
सुनीतिचा सत्याचा झाला सर्वस्वी अतिपात।
वाली न दिसे तुजविण कोणी विशाल या जगतांत।
विश्वांतक नामिश्रवणें कां व्हावें तृप्त मनी ।
आरति. १

हाय! हाय! हद कंठीं पडला शत्रुभुजंगमपाश
ग्रहण लागुनी ज्ञानरवीतें ह्यचोमीं खग्रास।
विवेकशून्यत्वीं मन विरुनी, मुकलीं मनुजत्वास
आयुष्पथ ऐसा आक्रमितों हा तिमिराम-
धुनी ॥ आर० ॥ २

चिदानंद सुखकंदा श्रीशिवहरगौरीतनया।
सुपंथ दावीं दीनत्वातें नेउनियां विलया,
न शिवो स्वप्नांतरिंहि कदापी रिपुमंगलहृदया
दे चरणांबुज सेवा ठेउनियां सुदयाचरणीं
॥आरति॥ ३

ANUNCIOS

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2° oficio que este assina, correm editos de 45 dias contados do dia em que se publicar o último anuncio, nos termos do §2° do art° 197 do Codigo do Processo Civil, citando os interessados incertos para uma justificação avulsa de mera posse requerida pela Comissão administrativa do Pagode de Xri Damodor de Zambaulim e pela qual, alegando ser o mesmo pagode possuidor, desde há mais de cinco anos, do predio denominado "ZAMBAULIM CUTUMBONA" ou "STOL CUTUMBONA", sito no bairro Zambaulim da aldea Rivona, da cultura de coqueiros e outras arvores frutiferas e em que existe o referido pagode de Sri Damodor com suas dependencias e casas em que moram a titulo precario, os servidores do mesmo pagode, pretende que seja julgada e justificada sua mera posse no referido predio para os efeitos juridicos, e para na 2a audiencia posterior ao praso de editos virem ver acusadas as citações e na qual ser-lhes-há marcado o praso de tres audiencias para deduzirem qualquer oposição por meio de contestação. As audiencias deste juizo se fazem em todas as terças e sextas feiras ou nos dias imediatos quando aqueles forem feriados ou empreendidos nas ferias, não o sendo também estes, no Tribunal judicial situado na rua de Deão em Cosmane, as 12 horas.

Quepem, 29 de Agosto de 1921

O escrivão de direito
Aires Manuel Barreto

2 vez.) Verifiquei
J. de Seabra

nho e bonitinho e o porá no berço, para que a mamã o embale enquanto papà se conservar cada vez mais mudo no Conselho.

Sabe a gente perfeitamente como os liceus são feitos na India e contudo teimam em pedir a elevação do liceu de Margão a Nacional e com mais uma meia duzia de anos para Central. Parecem crianças malcriadas que querem troçar do Govesno.

Aldonã 8-8-1921

Carlos Feias

ECOS & CRITICA

A Terra

Foram absolvidos os agressores do redactor dêste bissemanario de Margão no julgamento que teve lugar no dia 7 do corrente.

Como respeitadores das instituições que nos regem, acatamos o *veredictum* do Tribunal que os mandou em paz.

Gandhicap

Consta-nos que por causa deste já celebre *cap*, o sr. Sivescar, editor d'*A Provincia* teve desaguisados e dissabores, em Pangim. Sentimo-lo.

O nosso processo

Daremos aos nossos assignantes e amigos promenores circunstanciados sobre o novo processo.

A politica hindú

A politica hindú é franca Ela não conhece o jogo de pau de dois bicos, alimentando, ancan ente, o desejo de, levantar o nivel da classe hindú com o auxilio de europeus e cristãos liberais, igualá-la a êste no campo de instrução e politica, por todos os meios a seu alcance. E' êste o fito do *Pragatica Sangh*.

Mas os nossos adversarios atribuem á nossa politica fins inconfessais. Que lhes faça bom proveito.

Chegaram mesmo a dizer-nos alguns *politiqueiros* que o *centro Prazeres da Costa* fundado há pouco, tem por fim guerrear *à outrance* o *Pragatica Sangh*.

Não o acreditamos. Mas quando mesmo *aquilo* fôsse verdade, não teriamos motivo para *medos* e *tremores*...

Regime de papelada

As licenças para o corte de lenha fina não são em certas administrações concelhias concedidas, dentro do praso rasoavel, a contar de sua solicitação, resultando desta demora inesplicavel e injustificavel prejuiso aos interessados.

Não pode ser. Para haver rapidez na concessão das mesmas licenças, foram acumuladas as atribuições de administrador de matas de Pondá nos administradores concelhios doutros concelhos. E isto com o louvavel intuito de beneficiar os interessados, está a ver-se.

Chamamos para este assunto a atençao das administraçõis em que a concessão das licenças é bastante atrazada.

हिंदुद्वेष्टे शिक्षक

[ले० रामचंद्र सोनबा कामत, छापर्से]

सि. पाद्र येसेस्स या नांवाच्या बुढाचार्यांनीं तर यापेक्षां ही कमाल केली आहे ! विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं ते लिसेव सेंत्रालचे सध्या कामचलाऊ रेयतोर आहेत माझी खात्री आहे कीं ही त्यांची नेमणूक त्यांच्या वयाकडे पाहूनच केली असली पाहिजे. हे इतिहास व भूगोलचे अध्यापक आहेत. परंतु इतिहासाचें यांचें ज्ञान फारच जुन्या काळचें असल्यामुळें त्यावर गंज चढलेला आहे. जणु काय आपण इकिझिशनच्या काळातच अझून आहों असा आपल्या मनाचा ग्रह करून हे आपल्या हिंदू विद्यार्थ्यांस रानटी, तारतम्यशून्य पशू अशा प्रकारच्या तुच्छता दर्शक नांवानें संबोधून आपली स्वतःची क्षुद्र बुद्धि मात्र व्यक्त करितात. सूर्यावर थुंकणारा ज्या प्रमाणें आपला स्वतःचाच चेहरा मलीन करून घेतो त्याप्रमाणें हे आपल्या मूर्खपणाचे प्रदर्शन करून आपल्या स्वतःच्या रानटीपणाचें व पशुवृत्तीचें पाप आपल्या पदरांत घेतात. यांच्या आजापणजांस त्यांच्या इच्छे विरुद्ध, जबरदस्तीनें ज्यांनीं ख्रिस्ती धर्माची दिक्षा दिली ते यांचे धर्म गुरू ज्या काळीं अत्यंत रानटी अवस्थेमध्यें पशू वृत्तीनें कालक्रमण करित असत, झाडाच्या खालीं नेसून लज्जा संरक्षण करीत असत, त्या काळीं आमचे हिंदू लोक तत्वज्ञानासारख्या गहन विषयामध्यें गढून गेलेले होते याचा विसर आमच्या पाद्रीसाहेबांस 'साठी' मुळे पडला कीं खरोखरच त्या विषयीं त्यांस माहिती नाहीं हें आह्मांस समजत नाहीं अध्यात्मज्ञानांत तर खुद्द पाद्री साहेबानांही गुरुस्थानीं शोभेल असा एखादा हिंदू विद्यार्थी त्यांच्या वर्गांतच त्यांस आढळून येईल असें ह्मटलें असतां फारशी अतिशयोक्ती होईल असें आह्मांस वाटत नाहीं. हे प्रोफेसर साहेब आपल्या हिंदू विद्यार्थ्यांस पुढें असा प्रश्न करितात कीं तुह्मीं गांधी टोप्या कशा करितां वापरतां ? या प्रश्नाचें उत्तर सरळ आहे पण तें आमच्या प्रोफेसर साहेबांस समजेल कीं नाहीं याबद्दल मात्र प्रश्न आहे. महात्मा गांधी विषयीं आमच्या मनांत वसत असलेला आदरभाव त्या थोर विभूति विषयीं आमच्या हृदयांत निरंतर जाग्रत असणारी पूज्य बुद्धि व्यक्त करण्याकरितां आह्मी गांधी टोप्या वापरतों. स्वार्थावर पाणी सोडून आपल्या मातृभूमीच्या उत्कर्षाविषयी तनुमनधनें करून जे रात्रंदिवस झटत आहेत, पारतंत्र्याच्या मगर मिठींतून स्वदेशाची सुटका करण्याचा ज्यांनी चंग बांधिला आहे, मानसिक सामर्थ्याच्या बलावर आपल्या प्रिय भरतभूची उन्नति घडवून आणण्याची पवित्र कामगिरी ज्यांनीं आपल्या शिरावर घेतलेली आहे, सर्व भूतां यः सुहृन्नित्यं, सर्वेषांच हिते रतः । कायेन मनसा वाचा' अशा प्रकारच्या आपल्या सन्यस्त वृत्तीनें केवळ हिंदुस्थान देशांतच नव्हे तर एकंदर जगती तलावर जे आज आदरणीय होऊन बसलेले आहेत, आपल्या तपोबलांनें 'कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुंम्' अशा इंग्रज नोकरशाहीलाही आज भारी होऊन राहिलेले आहेत असे जे महात्मा गांधी त्यांची आज्ञा ह्मणून आह्मीं गांधी टोपी वापरतों. आमच्या मातृभूमीचा आह्मांस अभिमान आहे ह्मणून आह्मी गांधी टोपी वापरतों. हिंदुस्थानच्या भावी स्वातंत्र्याची शुभ पताका ह्मणून आह्मी गांधी टोप्या वापरतों आह्मी गांधीटोपी कां वापरतों यांतील मर्म, पाद्री साहेब ! आपणास समजणें मुष्कीलीचे आहे. कारण आपल्या पूर्वजांविषयीं आपणास अभिमान नाहीं. आपल्या मातृभूमिविषयीं आपल्या मनांत प्रेम वसत नाहीं उज्वल अशा प्रकारचा भूत काल आपल्या मागें नाहीं फार काय, आपल्याला आपली अशी भाषा सुद्धां नाहीं. अशा प्रकारच्या गुलाम गिरींतच सुख मानून त्यांत लोळत पडलेल्या गुलाम मनोवृत्तीच्या नरपशूला गांधी टोपीचे महत्व कसें समजावें ? पतिव्रतेच्या पातिव्रत्याचें माहात्म एखाद्या बाजारबसवीला कसें समजेल ? उकीरड्यावर उदरंभरण करणाऱ्या कुक्कुटाला रत्नाची पारख कशी असूं शकेल ? महात्मा गांधीची खरी योग्यता आपलेच जातभाई अमेरिकन विद्वद्वर्य डॉ. होलम्स् हें आपणास सांगतील ब्रिटिश पार्लमेंटचे मेंबर बेन स्पूर यांची भाषणें वाचल्यास महात्मा गांधीच्या यशाची गुरुकिल्ली थोडीबहूत आपल्या हातास चढेल. ग्लस्गो हेराल्ड सारखी वर्तमानपत्रें वाचल्यास महात्मा गांधीच्या मोठेपणाची थोडी बहुत कल्पना आपणास होईल फार लांब कशाला हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी खुद्द मांटेग्यू साहेब यांची ब्रिटीश पार्लमेंटांतील प्रश्नोत्तरें वाचल्यास महात्मा गांधी या व्यक्तीविषयीं त्यांच्या मनांत किती आदर आहे त्याची थोडी बहुत कल्पना आपल्यास झाल्याशिवाय राहणार नाहीं. हिंदुस्थानचे व्हाइसरायांनां प्रत्यक्ष गांधींची मुलाखत घेण्यास दिक्कत वाटू नये तर मग आमच्या पाद्री साहेबांनीं त्यांची टोपी पाहिल्याबरोबर एवढें मोठें अकांड तांडव कां करावें हें आह्मांस समजत नाहीं.

प्रोफेसर साहेबांचा आमच्या समाजावर दुसरा मोठा आक्षेप ह्मटला ह्मणजे गोमांतकांत जीं १९ बंडें झालीं तीं केवळ हिंदू लोकांनींच केलीं हा होय बंडें हिंदू लोकांनीं केलीं असलीं तरी तीं करण्यास त्यानां कोणी प्रवृत्त केलें हेंही पाहणें अत्यन्त महत्वाचें आहे. व अशा रीतीनें विचार केल्यास त्या बंडांचे खापर कोणाच्या माथ्यावर फुटेल याची कल्पना आमच्या पाद्री साहेबांस असेलसें आह्मांस वाटत नाहीं. तें, कसेंहि असलें तरी एखाद्या बलाढ्य सरकारविरुद्ध बंड उभारून समरांगणांवर त्याच्याशीं दोन हात करण्यास जी वीरवृत्ती, जें क्षात्रतेज धैर्य शौर्यादी जे अनेक गुण अंगांत असावे लागतात, ते चारशें वर्षांच्या परकीय अमलाखालीं राहून देखील हिंदू समाजानें जसेच्या तसे कायम राखिलेले आहेत हें त्या समाजास भूषणास्पद नाहीं काय ? ही एकच गोष्ट त्या समाजाच्या जिवंतपणा व्यक्त करीत नाहीं काय ? परंतु याचें महत्व सुरी कांटे चमचे यांच्या भाराखालीं दडपून गेलेल्या नेभळट पाद्री साहेबांना कसचे समजणार?

केवळ राजकीय दृष्टि सोडून दिली व सांपत्तिक किंवा व्यावहारिक बाजूनें विचार केला तरी एकंदर हिंदू समाजावर तुटून पडण्याइतका या प्रोफेसरांनीं गांधी टोपी विरुद्ध कांगावा कां करावा हें आह्मांस समजत नाहीं. प्रत्येक मनुष्यास आपणांस वाटेल त्या प्रकारचें शिरस्त्राण किंवा पोषाख वापरविण्याचा अधिकार या प्रोफेसरांस कोणी दिला ? परदेशीय मालाच्या रूपानें दरवर्षी क्रोडो रुपयांचा हिंदुस्थानच्या संपत्तीचा पाश्चिमात्य देशांकडे जाणारा ओघ आपली कोणत्याही प्रकारची गैरसोय न होतां कोणत्याही प्रकारें आपल्या खिशास चट्टा न बसतां थोड्या बहुत प्रमाणानें गांधी टोपीच्या निमित्तानें जर आह्मांस अडवितां आला तर तसें तुह्मी करूं नका असें सांगण्याचा या लहरी प्रोफेसरांस काय अधिकार आहे ? परंतु पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें उठल्या सुटल्या हिंदुसमाजावर तुटून पडण्याचा ज्यांचा जातिस्वभावच बनून राहिला आहे. त्या प्रोफेसर साहेबांस हें कसें समजावें ?

येथ पर्यंत केलेल्या विवेचना वरून एकंदर ख्रिस्ती समाजाविरुद्ध आमच्या मनांत किल्मीष आहे किंवा त्या समाजाची कोणत्याही प्रकारें नालस्ती करण्याचा आमचा उद्देश आहे असें समजण्याचें मुळींच कारण नाहीं. उलट त्या समाजा विषयीं आमच्या मनांत नेहमीं आदरभावच वसत असतो व या दोन्हीं समाजानीं आपल्यांतील भेदभाव बाजूस ठेवून प्रेमानें व बंधुभावानें हातांत हात घालून काम केल्या शिवाय गोमांतकाचा कधींही उत्कर्ष होणार नाहीं असेंच आमचें ठाम मत आहे. आमचे ख्रिस्ती बंधु परधर्मीय नसले तरी स्वकीय आहेत आमच्याच हाडामांसाचे आहेत आमच्यांत व त्यांच्यांत एकच रक्त वाहत असतें. हिंदू नसले तरी ते हिंदी आहेत यास्तव त्यांच्या विषयीं आह्मांला नेहमीं अभिमानच वाटत राहील. परधर्मीय एवढ्याच केवळ सबबीवर दुसऱ्यांचा द्वेष करण्याइतका किंवा दुसऱ्यांस तुच्छता दर्शक दाखविण्याइतका हिंदुधर्म असहिष्णु नाहीं हें पाद्री साहेबांनीं पक्कें लक्षांत ठेवावें.

शेवटीं आमच्या या हिंदु द्वेष्ट्या प्रोफेसर मजकुरांस आह्मांस एवढाच इषारा द्यावासा वाटतो कीं, महाराज इन्क्विझिशनचा व धार्मिक अत्याचारांचा काळ निघून गेलेला आहे. समता, बंधुभाव व मानवी स्वातंत्र्य यांच्या तेजोमय किरणानीं यच्चयावत् जगतीतल आक्रमून टाकलेलें आहे आपले ते पूर्वीचे चाळे आतां सोडून द्या, व नवीन परिस्थीतीस शोभेल अशाच प्रकारचें आपलें वर्तन ठेवा आपल्या अद्वा तद्वा वरळण्यानें आपण आपल्या विद्यार्थ्यांचाच केवळ नव्हे तर एकंदर हिंदुसमाजाचा जो उपमर्द केलेला आहे तो निमूटपणें सहन करून घेण्याइतका नेभळट गोमांतकांतील आजचा हिंदु समाज खास नाहीं. प्रत्येक शहरांतून, गावांतून, खेड्यापाड्यांतून आपल्या बोलण्याचा निषेध करून आपल्या वरिष्ठांमार्फत आपल्याला आपले शब्द जाहीर रितीनें मागें घेण्यास लावल्याशिवाय तो कधींही स्वस्थ बसणार नाहीं.

—पोर्तुगालचें जुनें प्रधानमंडळ बदलून त्या जागीं दुसरें नवीन आरूढ झालें. सि. प्राजेरीस द कोस्त यांचे 'जिवलग' मित्र सि. सेलेस्तीन द आल्मेद, कोलोनीचे प्रधान हे अर्थात् 'पूर्व स्थलीं' आले.

भारताची अधिपाई पुरवणी पणजीच्या एका छापखान्यांत छापली गेल्यावरून, आमच्यावर करण्यांत आलेला खटला तेथील क्रिमिनल कोर्टांत चालू आहे.

आभिनंदन [सारंग धुमाळी]

(इंदिरातनय-शिरवडें)

(ता. २५-८-१९२१ च्या भारतांतील "विद्यार्थ्यांचा स्वार्थत्याग" वाचून.)

कुरवंडावी काया वाटे ही तुझ्मावरुनी।
धन्य धन्य तुह्मि सारे, तुमचीं धन्य जनक जननीं ॥धृ०॥
ये कळुनी तव गुरुंतें तुह्मी 'नवयुग विद्यार्थी।
राष्ट्रवीर, देशभक्त, तुमची निधडी ती छाती।
आत्मोद्धारा करीं घेउनी स्वार्थाची माती—
घालाल उडी विकट मृत्युच्या अविलंबें वदनीं ॥कुर०॥ १
कृपाकटाक्षें,प्रमुदित चित्तें भारत भू सृष्टी—
तुह्मां विलोकी; सुरनर करितील सुमनांची वृष्टी।
मंगल आशीर्वच देइल पूर्वज कृपादृष्टी।
विशाल रघुनाथाचा माये आनंद न गगनीं ॥कुर०॥ २

ANUNCIOS

No día 25 do corrente mez ás 10 horas perante a comissão paroquial da Fabrica de Tilamola sērão arrematadas 2 arvores de gcalba e 2 de ruiva, pertencentes á dita Fabrica. As condições estarão patentes na casa das sessões da mesma Fabrica--Tilamola, 8 de Setembro de 1921.

O escrivão
de P. Teodozio Pereira.

Nos termos da determinação superior convoca-se a comunidade de Xeldem para uma sessão extraordinaria as 13 horas do dia 17 do corrente no edificio da administração do concelho de Quepem a fim de deliberar sobre se concorda em caucionar pelos bens da comunidade o emprestimo solicitado á Caixa Economica Postal á conta dos proprietarios da referida aldêa o distinado para o complemento das obras do canal entre as lagoas de Cacorá e Xeldem.

Aos 9 de Setembro de 1921
O escrivão da comunidade
Chrisna Sinai Xeldencar

पी. व्ही विर्जिनकर यांची

आयुर्वेदिक फार्मसी

मडगांव-गोवा

आमच्या फार्मसींत सर्व प्रकारच्या देशी वनस्पती, भस्में रसायने, मात्रा, गुटिका, चूर्णे, आसवें, अरिष्टें, पाक, अवलेह, तेलें वगैरे उत्तम औषधांचा संग्रह असून फारच माफक दरानें देण्याची व्यवस्था केली आहे,

त्याचप्रमाणें, बालामृत, सार्सापरिला, अमृतांजन, शाई, दंतमंजन सुवासिक काफी, वगैरे महत्वाचे, व नित्युपयोगी पेटंट जिन्नस येथें मिळतील.

गैरसोय दूर झाली

पणजी येथील कोणत्याहि सरकारी कचेऱ्यांतील, कोर्टांतील, हायकोर्टांतील (रेलासांव) तसेंच पोर्तुगालच्या कोणत्याहि वरिष्ट कोर्टांतील कामें

आ. शिज गोमिस पेरेर
श्रीधर कामत शंखावळकर
व्यंकटेश वि. राव सरदेसाई
वकील व सालिसिटर्स

यांच्या नवीनच स्थापलेल्या ऑफिसांतून अत्यंत चोखपणानें योग्य वेतन घेऊन केलीं जातात. अनुभव घ्या व नाहक प्रवास खर्च वांचवा! सर्व तऱ्हेचा पत्रव्यवहार खालील पत्यावरः—

व्यंकटेश वि. राव सरदेसाई
पणजी-गोवा.

माल चोख किंमत रोख

तुह्मांला सुंदर खुर्च्या
निरनिराळ्या रंगाचीं सुंदर टेबलें
उत्तम तऱ्हेचीं मंगळुरी कौलें व घराचें कोणतेंहि सामान
पाहिजे असल्यास

गोविंद भिकू पऱ्हीकर

यांच्या कांदोळी-वार्देस येथील कारखान्यांत खरेदी करा

सुबक काम माफक दाम!

टीपः—कुशल सुताऱ्यांस लायकीप्रमाणें भरपूर पगार देऊन सदहू कारखान्यांत नोकरीवर ठेवण्यांत येतें. गरजूनीं खालील पत्त्यावर अर्ज करावा.

गोविंद भिकू पऱ्हीकर.
कळंगूट-वार्देस.

शेतकी सल्लागार आणि कमिशन एजंट

सहस्त्रबुद्धे आणि कंपनी

सोलापूर

आमचेकडे शेतीसंबंधीं (बागाईत व जिराईत) सर्व प्रकारचीं व उत्कृष्ट जाते, यंत्रें, खतें आणि बिंबियाणीं मिळतात. किंमती पत्रक व माहिती पत्रकें मागवा.

सूचना— आह्मीं सोलापुरी गिरणींतील मजबूत आणि टिकाउ धोतरजोडे चादरी, सर्टींगचे व चेकडे कापड— गिरणींतील व हातमागावरील निरनिराळ्या प्रकारांची टिकाऊ, पक्या रंगाची, भरपूर लांब रुंद अशी सुती, गर्भ रेशमी व रेशमी लुगडीं फारच किफायतशीर भावांत पाठवूं. एकवार अनुभव घेणें. हातमागा संबंधानेंहि सर्व माहिती देऊं.

एकच वेळ येऊन अनुभव घ्या.

रा. पांडुरंग शे. कीर्तनी यांचें

ब्राम्हणी

चहा, काफी व फराळाचें दुकान.

शाखा नं. २

मडगांव नवा बाजार-मार्कीट पिंपळासमोर

आमच्या दुकानीं एकंदर जिन्नस साजूक तुपांत तळलेले असतात. [illegible]जी, पुरी, भजीं, शिरा, उसळ, जिलबी, अनारसे, बेसन, वगैरे वगैरे [illegible] ताजे तयार मिळतील. आगाऊ कळविल्यास वाटेल ती मिठाई तयार [illegible] दिली जाईल.

मालकः—पांडुरंग शेणवीं कीर्[illegible]
[illegible]गांव

भाताच्या शेतीसाठीं सर्वोत्कृष्ठ साधन! अवश्य मागवा!



किर्लोस्कर बंधु, लिमिटेड, किर्लोस्करवाडी (जि. सातारा)

289

mento de 17 do mez p. f. requerido pelo agente do M. P. á queixa do sr. Pe Excelso d'Almeida demoveu-nos naturalmente do nosso proposito.

Pelo mesmo motivo, tambem ficamos obrigados a aceder aos desejos de muitos dos nossos presados assignántes que nos solicitaram a transcrição do suplemento incriminado que eles terão lido no lugar de honra.

Estimamos

Há dias realisou-se em Cotombi, á inicictiva do sr. Babú Siurama Porobo Dessai e outros membros importantes da classe dos maratas *Kxetrias* uma reunião dêstes, na qual foram tratados muitos assuntos do seu interesse colectivo.

Vai breve haver uma outra reunião da mesma classe em Canacona para o mesmo fim.

Estimamos.

Conductor Gancar

O sr. Rama Cametim Gancar, ilustre e popular filho de Marcaim acaba de ser nomeado conductor das Obras Publicas.

E' o primeiro hindú que, á força de seus proprios esforços e superiores dotes de inteligencia invulgar, sóbe áquela posição que é, ùnicamente, fruto da sua incontestavel aptidão.

O sr. Gancar reune tambem em si, a par de seus merecimentos funcionais, qualidades pessoais distinctas que o tornam querido de todos quantos se aproximam de Sua Exa.

Sob todos os pontos de vista pois encheu-nos de júbilo a nomeação do sr. Gancar, aquem porisso apresentamos as nossas cordiais felicitaçõis.

Palavras dum velho

O sr. Carlos Frias, de Aldonã, um velho experimentado, segundo parece enviou-nos um artigo sensacional para ser publicado no *Bharat*.

Dar-lhe-hemos cabida, de muito bôa vontade, no proximo número

Incompreensivel !

Nos concelhos de Sanguem e Quepêm, como em outras partes, foram instalados postos policiaes. Está bem.

O que, porêm não está bem e não acabamos de perceber, é que as respectivas camaras e juntas locais sejam compelidas a ocorrer ás despesas de alojamento e iluminação dos mesmos postos, encargo no lançamento do qual os mesmos corpos administrativos não form ouvidos nem auscultados !

As camaras e juntas são autonomas ou não o são. Se o são tinham de ser ouvidas; se o não são, a impertinente exigencia dos postos de que se trata é legitima, contanto que se lhes mude o *estado*, voltando tudo á antiga.

Pedimos aos competentes o favor de difinir, com toda a urgencia, a situação das nossas camaras que certamente não são dos *varredores* e das juntas que segundo a nossa opinião não são dos *bois*.

Impostos

Recebemos uma copia da representação sobre os novos impostos.

E' um documento que comprova, exuberantemente, a impossibilidade material de se pagarem novas contribuições.

ANUNCIO

Pelo juizo de direito da Comarca de Quepêm e cartorio do escrivão do 2.° oficio que este assina, correm editos de 45 dias contados do dia em que se publicar o último anuncio, nos termos do §2.° do art.° 197 do Codigo do Processo Civil, citando os interessados incertos para uma justificação avulsa de mera pos e requerida *pela* Comissão administrativa do Pagode de Xri Damodar de Zambaulin e pela qual, alegando ser o mesmo pagode possuidor, desde há mais de cinco anos, do predio denominado "ZAMBAULIM CUTUMBONA" ou "STOL CUTUMBONA", sito no bairro Zambaulin da aldea Rivona, da cultura de coqueiros e outras arvores frutiferas e em que existe o referido pagode de Sri Damodor com suas dependencias e casas em que moram a titulo precario, os servidores do mesmo pagode, pretende que seja julgada e justificada sua mera posse no referido predio para os efeitos juridicos, e para na 2a audiencia posterior ao praso de editos virem ver acusadas as citações e na qual ser-lhes-há marcado o praso de tres audiencias para deduzirem qualquer oposição *por* meio de contestação. As audiencias deste juizo se fazem em todas as *terças* e sextas feiras ou nos dias imediatos quando aqueles forem feriados ou compreendidos nas ferias, não o sendo tambem estes, no Tribunal judicial situado na rua de Deão em Cosmane, as 12 horas.

Quepem, 29 de Agosto de 1921

O escrivão de direito

Aires Manuel Barreto

Verifiquei

J. de Seabra

वर्तमानसार

—पूर्वी प्रसिद्ध झाल्याप्रमाणें गेल्या गुरुवारीं पारोडें येथें श्री. सुकेरकरांच्या वाड्यांत श्रीगजाननासमोर आमच्या संपादकांचें प्रवचन झालें. प्रवचनानंतर श्री. पुं. वा. बिर्जिनकर यांचें स्वदेशीवर विचारपरिप्लुत व सुश्राव्य व्याख्यान झालें.

—'आ तेन्ह' पत्राच्या संपादकांवर हल्ला केलेल्या मिलिटरी ऑफिसरांविरुद्ध भरण्यांत आलेल्या खटल्याचा निकाल गेल्या आठवड्यांत होऊन आरोपींस निर्दोषी ठरविण्यांत आलें ! मानवी न्याय ! !

—असोळडें येथें गेल्या शुक्रवारीं श्री. सदा रावत देसाई यांच्या दिवाणखान्यांत मराठे क्षत्रिय समाजासाठीं 'देव [देश] वसे ज्याचे चित्तीं, त्याची धरावी संगती' या विषयावर आमच्या संपादकांचें प्रवचन झालें.

—गेल्या शुक्रवारीं पारोडें येथील श्री. सुकेरकरांच्या वाड्यांत काकोडेचे ह. भ. प व दे. आत्माराम महादेव साठे यांचें आधुनिक पद्धतीचें विद्वत्तापूर्ण कीर्तन झालें.

धि गोवा हिंदु आसोसिएशन

वरील संस्थेच्या सभासदांचें संमेलन ता. ३१ जुलै १९२१ रोजीं 'हरिश्चंद्रालयाच्या' दिवाणखान्यांत दुपारचे ३ वाजेपासून रात्रौं ११ वाजे पर्यंत भरलें होतें. संस्थेच्या अध्यक्षांच्या वतीनें रा. वस्तोडकर यांचें प्रथम थोडेंसें भाषण झाल्यावर त्या दिवसाच्या कार्यक्रमांतील मुख्य व्याख्याते सुप्रसिद्ध न्यायशास्त्री भवानी शंकर सुखटणकर यांनीं आपलें व्याख्यान सुरू केलें. त्यांनीं आपल्या व्याख्यान विषयाला अमुक एक नाव असें दिलें नव्हतें. परंतु त्यांच्या बोलण्याच्या धोरणावरून, आपले देशबांधव जे आपल्या सभोंवतीं गोळा झाले आहेत त्यांस दोन कळकळीचे शब्द सांगावयाचे असा त्यांचा हेतु होता असें दिसलें व हें काम त्यांनीं अत्यंत चटकदार व गमती भाषेनें केलें.

आमचे हिंदु लोक धामोदमयीत एकदां पाय ठेवला म्हणजे ते आपल्या जन्मभूमीचें स्मरण जितकें ताजें ठेविलें पाहिजे, तेवढें ठेवीत नसतात; किंबहुना त्यांस तिची विसरच पडून जाते. ही प्रवृत्ति आपल्या कल्याणाचें किंवा प्रगतीचें चिन्ह नसून सर्वस्वी विघातक आहे. आपण आपला हा देह पोटाची खळगी भरण्यासाठीं जरी इकडे घेऊन आलों आहोंत तरी आमचें मन आपल्या जन्मभूमीकडे सतत असणें अत्यंत जरूरीचें आहे. आपले कान, डोळे व इतर सर्व इंद्रियें आपल्या मायभूमींत चाललेल्या सामाजिक, राजकीय, व इतर सर्व चळवळींकडे सदोदित लागलीं पाहिजेत; नाहीं तर सरकार पगारापेक्षां पेन्शनें मोठीं देऊन उत्पन्नापेक्षां खर्च ज्यास्त करावयास लागलें, किंवा भलते सलते कर वाढवून गरीब जनतेची मान मुरगळूं लागलें तरी आह्मांला कांहीं समजावयाचें नाहीं, व मान मुरगळून प्राणोत्क्रमण झाल्यानंतर आमचे डोळे उघडतील !

ब्रिटिश हिंदुस्थानांत राहणाऱ्या आह्मा गोमांतकस्थ हिंदूंची स्थिति ह्मणजे 'ना हिंदू ना मुसलमान' अशी झाली आहे. गोमांतकीय ह्मणावें तर बहुतेक 'मुंबईकरच' बनण्याकडे आमची प्रवृत्ति. तिकडील सरकार काय करतें, ह्याकडे बिलकूल लक्ष न पुरविल्यामुळें आमच्या अधिकारांची पायमल्ली चालली आहे. पोर्तुगीज लिहिण्यावाचण्यास येत नाहीं ह्मणून आमचा मताधिकार तें सरकार हिसकावून घेत आहे. व इकडे आह्मांस विश्वविद्यालयाचें एखादें भलें मक्कम शेंपूट असलें तरी मुनिसिपालटी प्रतिनिधी सुद्धां निवडून देण्याचा अधिकार नाहीं. कौंसिलच्या प्रतिनिधींची तर गोष्टच सोडून द्या ! ह्या महत्वाच्या बाबीकडे आह्मीं दुर्लक्ष करितां कामां नये. यास्तव आपल्या जन्मभूमींत ज्या कांहीं चळवळी चालू असतील त्यांची पूर्ण माहिती प्रत्येक गोमांतकस्थ स्वाभिमानी हिंदूनें वेळोवेळीं करून घेतली पाहिजे व आपले तिकडचे हक्क राखण्यासंबंधीं काळजी घेतली पाहिजे.

या बाबतींत आमचे खिश्चन बंधु यांचें उदाहरण घेण्याजोगें आहे. ते कोणत्याही गावांस जाऊं दे, कोणताही धंदा पत्करूं दे त्यांस आपल्या जन्मभूमीची आठवण सतत राहत असते; हा गुण आह्मां हिंदूंत अगदींच कमी प्रमाणावर आहे असें दुःखानें कबूल करावें लागतें.

दुसरें, आपण आपलें मन व्यापार धंद्याकडे वळविलें पाहिजे. कारण गोमांतकांत उत्पन्न होत असलेलें धान्य आह्मांस पुरण्याजोगें नसल्यावरून आह्मांस दुसऱ्यांच्या तोंडाकडे पहावें लागत आहे. तेव्हां तें उत्पन्न वाढविण्याच्या व अन्य रीतीनें आमची सांपत्तिक स्थिति सुधारण्याच्या खटपटीस नेटानें लागलें पाहिजे. अशा तऱ्हेचें मुद्देसूद भाषण करून सभायद्द आनंदानें खुलवून टाकलें.

तदनंतर शास्त्री बुवांचे चिरंजीव रा० काशीनाथ भवानी शंकर सुखटणकर यांला ते मॅट्रीकचे परीक्षेंत वर आल्याबद्दल व शंकर शेट संस्कृत स्कॉलरशिप मिळाल्याबद्दल संस्थेच्या तर्फे पुस्तकें बक्षीस देण्यांत आलीं. बक्षीस दानांचा विधि रा. रा. बामनराम रघुनाथ वैद्य बालावलीकर यांनीं कोंकणी भाषेंत अत्यंत गोड भाषण करून केला. हें भाषण विस्तार भयास्तव येथें न देतां दुसरीकडे प्रसिद्ध करण्याची व्यवस्था केली आहे.

उपहार वगैरे आटोपल्यानंतर, गंधर्व महाविद्यालयांतील प्रसिद्ध गवई रा. लेलेबुवा, व रा. जोशी यांचें मन प्रफुल्लीत करणारें तास दोन तास गायन झालें व संस्थेच्या सेक्रेटरीनें सर्वांचे आभार मानल्यानंतर संमेलनाचा प्रोग्राम संपला.

मुंबई १९२१. | व्यंकटेश पां. कामत एम. बी. बी. एस्.

भा र त

गुरुवार भाद्रपद शु० १३ शी. १८४३

स्फुट विचार

मडगांवची पाठशाळा: —या सरकारी विद्यालयाचा शिक्षणक्रम ३ वर्षांचा असून त्यास 'लिसेव–मुनिसिपाल' अशी संज्ञा आहे, हें वाचकांस माहीत आहेच. या ३ वर्षांच्या शिक्षणक्रमाच्या ऐवजीं ५ वर्षांचा शिक्षणक्रम होऊन सदरील पाठशाळेस 'लिसेव नासियोनाला'ची योग्यता प्राप्त व्हावी, या हेतूनें कांहीं मुलांच्या पालकांनीं मडगांव येथें सभा भरवून व तारा पाठवून प्रांतिक व वरिष्ठ सरकारापाशीं विनंति केली आहे. या विनंतीस मूर्त स्वरूप आणणें ह्मणजे आधींच दुबळ्या बनलेल्या तिजोरीच्या दुःस्थितींत पराकाष्टेची भर घालणें होय; कारण 'लिसेव मुनिसिपाला'चें रूपांतर 'नासियोनालांत' झाल्यास 'सन्याशाच्या लग्नाला जशी शेंडीपासून' तयारी करावी लागते तशी 'लिसेव नासियोनालाची संस्थापना योग्य पायावर होण्यास प्रथमारंभींच खुद्द नवीन इमारतीसाठीं प्रेतवत् तिजोरीच्या अचेतन नरडीवर पाय देऊन नवीन पाया खोदावा लागेल ! ज्या इमारतींत सध्या जुनी पाठशाळा चालू आहे, ती इमारत अयोग्य व 'अशास्त्र' ठरली गेली नसती तर कदाचित् उपरोक्त रूपांतराचें कार्डें सुलभ रीतीनें सोडण्याच्या विचारांत मन घालण्यास वाव मिळाला असता. परंतु वस्तुस्थिति अगदीं उलट असल्यावरून व नवीन इमारतीच्या बांधकामासाठींच जवळ जवळ लाख पाऊण लाख रुपये खर्चण्याची पाळी येणार असल्यानें, उक्त पालकांचा वरील हेतु अव्यवहार्य आहे, असेंच आह्मांला वाटतें.

गांधी-टोपी बंड निदर्शक नाहीं

१७ आगष्टच्या भारताच्या पुरवणी पत्रामध्यें लिसेवाच्या ६ व्या वर्गाचे भूगोळ विषयाचे प्रोफेसर पाद्री एक्सेलस द आल्मेद व गांधी टोपी, या संबंधानें आलेल्या मजकुराविषयीं गेरहदच्या २४ आगष्टच्या अंकांत जो लिसेवाच्या नऊ ख्रिस्ती मुलांच्या सहीनें खुलासा प्रसिद्ध झाला आहे, त्यांत ते ह्मणतात कीं, कांहीं हिंदु मुलांच्या डोकीवर गांधी टोपी पाहून प्रोफेसोर मजकुरांनीं खालील प्रमाणें उद्गार काढले:—

"गांधी टोपी किंवा स्वदेशी टोपी ही इंग्रजी सत्तेविरुद्ध उठल्याची खूण होय. ह्मणून पोर्तुगीज अमलांतील हिंदूंनीं ह्या चळवळींत सामील होणें त्यांना शोभत नाहीं. आणि पोर्तुगीज सरकार इंग्रज सरकारचें दोस्त असल्यामुळें, पोर्तुगीज सरकारला तें—हिंदूंचे सामील होणें खपावयाचेंहीं नाहीं. इ. इ."

खादीची टोपी घालून फिरणें ह्मणजे [illegible] ह्मणच देऊन फिरणें, हें जर वरील अध्यापकांचें ह्मणणें खरें असेल, तर गोव्यांतील हिंदूंनीं अशा बंडखोरांशीं मिसळून स्वतः बंडखोर बनणें हें त्यांस योग्य नाहीं, असें कोणींही समंजस मनुष्य कबूल करील. पण खादीची टोपी किंवा गांधी टोपी ह्मणजे बंडाचें निशाण, असें जे हे प्रोफेसोर बिनदिक्कत ह्मणतात, तें आह्मीं कोणत्या आधारावर हें कळतें तर बरें होतें. खुद्द इंग्रजी हिंदुस्थानांत ह्या शुभ्र गांधी टोपीचा प्रसार दिवसेंदिवस अधिकाधिक होत असून, ह्या बागुलबोवांची भीति आतां कोणासही वाटेनाशी झाली आहे. प्रोफेसरांच्या ह्मणण्याप्रमाणें गांधी टोपी हें बंडाचें द्योतक असतें तर तिचा प्रसार खुद्द आपल्या डोळ्यांदेखत, इंग्रज लोकांनीं अलाबिनहरकत होऊं दिला नसता हें खास. तेथें कंपनींतील नोकरलोक ही टोपी वापरतात; शाळांतील मुलें वापरतात, कालेजांतील विद्यार्थिही पण ही टोपी वापरतात; इतकेंच नव्हे तर, फस्टम्स, हायकोर्ट सेक्रेटरीयट सारख्या सरकारी कचेऱ्यांतील नोकर लोक देखील ही गांधी टोपी आज खुशाल वापरतात. गांधी टोपीसारख्या क्षुल्लक चार आण्याच्या वस्तूनें आपलें राज्य डळमळून जाणार नाहीं, इतक्या भरभक्कम पायावर तें उभारलें आहे अशाविषयीं इंग्रज सरकारास पूर्ण खात्री आहे. आणि ह्मणूनच त्यानीं सरकारी कचेरींतील लोकांस गांधी टोपी वापरण्यास पूर्णपणें मोकळीक दिली आहे. प्रोफेसोर साहेबांप्रमाणें गांधी टोपी घालणें ह्मणजे बंडाचा बावटा उभारणें, असें इंग्रज सरकारासही जर वाटलें असतें तर सरकारी कचेऱ्यांतील ह्या बंडखोरांस केव्हांच अर्धचंद्र देण्यांत आला असता. पण तसें न करतां, उलट, स्वदेशीची ही चळवळ सुरू झालेली पाहून येथील सरकारी कचेऱ्यांतील वरिष्ठांनीं गांधी टोपीस आमचा कोणत्याही प्रकारचा, अडथळा नाहीं अशाबद्दल कबूली देऊन सर्वांना ही टोपी वापरण्यास मोकळीक देऊन ठेविली आहे. असें असतां, पणजीच्या लिसेवाचे वरील प्राफेसोर तेवढे ह्या टोपीशीं बंडाचा बादरायणसंबंध कसा काय लावूं पाहतात हें त्यांचें त्यानांच माहीत. बाकी बंडाची भीति प्राफेसोरांना काय, विद्यार्थ्यांना काय, किंवा इतरांना काय, सर्वांनांच सारखी वाटावयाची. पण वस्तुस्थितीस सोडून भलतेंच विधान करणें हें प्रोफेसरांना शोभेल तरी आपल्या इज्जतीस कमीपणा आणणारें होय असेंच वाटावयास पाहिजे. आ. ज. रा. मु.

भारत

गुरुवार भाद्रपद शु० ७ सी १८४३

स्फुट विचार

भारतावर नवीन खटला !:—भारतावर खटला झाल्याची बातमी जर आह्मीं आमच्या प्रिय आश्रयदात्यांस दिली तर त्यांस मुळींच आश्चर्य वाटणार नाहीं. अशी आमची खात्री आहे. कारण ज्या परिस्थितींत भारतास आपलें कठिणतर कार्य साधावयाचें आहे त्या परिस्थितींत भारतावर खटल्यांचा वर्षाव नाहीं झाला तरच आश्चर्य ह्मणावयाचें ! [illegible] भारत खटल्याची पर्वा करीत नाहीं.हें निराळें सांगणें नको. परंतु तूर्तचा खटला जरा व्यापक स्वरूपाचा असल्यामुळें त्याकडे विशेष लक्ष पुरविणें आह्मांला भाग असून सर्व हिंदुसमाजासहि तसें करण्यास आह्मीं बजावतों. आह्मीं भारताच्या विसाव्या अंकाची पुरवणी काढून पाद्री आल्मेद यांच्याकडून हिंदुसमाजाचा जो भयंकर अपमान झाला होता, त्याविरुद्ध केलेल्या स्पष्ट निषेधाचा परिणाम ह्मणजे हा खटला होय. हे पाद्री भारतावर खोडसाळपणानें आपली बेअब्रू केल्याचा आरोप ठेवीत असून ह्या गुन्ह्याबद्दल आह्मांस शिक्षा व्हावी ह्मणून पणजीच्या न्यायकचेरींत खटला दाखल करून मोकळे झाले आहेत. खटल्याचा परिणाम काय होईल हें आमच्यानें आजच सांगवत नाहीं आणि तो कसाहि झाला तरी त्याची आह्मांला खाजगी रीतीनें पर्वा नाहीं. परंतु सगळ्या हिंदुसमाजाच्या इभ्रतीचा हा प्रश्न असल्यामुळें त्याचा योग्य निकाल व्हावा असा प्रयत्न प्रत्येक हिंदु ह्मणवणाऱ्यानें करणें रास्त आहे असें आह्मांला वाटतें.

प्रत्यक्ष पुरावा !:—भारतानें आपल्यावर नसते आरोप केल्याबद्दल फिर्यादी कोर्टाची पायरी चढला असता तर आह्मांला खरोखर लाज वाटली असती- परंतु, ह्या कांहीं विशेष विधानाबद्दल त्यास विशेष वाईट वाटल्यासारखें दिसतें, त्या विधानास विशेष बळकटी आणण्यासारखें पाद्रीसाहेबांनीं ताजें उदाहरण देऊन जणू काय आपल्या कुजलेल्या अंतःकरणाचा आह्मांला प्रत्यक्ष पुरावा दिलेला आहे. वास्तविक खटल्यास कारण झालेल्या पुरवणी खटल्यापुरता एकटाच भारत जबाबदार असतां त्याबरोबर आमच्या समाजापैकीं दोन प्रसिद्ध देशभक्तांस त्यांत ओढण्याचा प्रयत्न फिर्यादीनें केला आहे आह्मांस असें समजलें आहे कीं, प्रो. आलबेर्त मार्तींसाच्या सांगण्यावरून पाद्रीनें माननीय दो. व्यंकटेश सूर्यराव देसाई व प्रो. दत्ताराम गोविंद कामत ह्यांस ह्या खटल्यांत सामील केलें आहे. वरील गृहस्थद्वयांस आह्मीं इतकेंच सुचवूं शकतो कीं, काळ्या कावळ्याच्या शापाचा परिणाम झालेला आज पर्यंत कोणाच्याही ऐकीवांत नाहीं.

भजनी सप्ताह:—'हरि भजनावीण काळ घालवूं नको रे,' ह्मणून कंठरवानें न सांगणारा असा एकहि संत झाला नाहीं. परंतु, संसारी लोकांस आपला सगळाच काल हरिभजनांत घालविणें शक्य नसल्यामुळें त्यानीं दिवसांतून कांहीं तास किंवा वर्षांतून कांहीं दिवस, ह्या आधिभौतिक मानवांस निरुपयोगी वाटणाऱ्या कामांत घालवावे, असा उपदेश बऱ्याच साधूंनीं केलेला आहे. संसारी माणसांस इतर व्यवसायापुढें हरिभजनाची आठवणच होणें बहुतेक शक्य नसल्यामुळें, व्यवहारी पद्धतीनें हा काल निश्चित् करणें योग्य होतें. आणि बोरकरबुवांनीं, ठरावीक वेळीं भजनी सप्ताह करण्याची टूम आमच्या गोव्यांत सुरू केल्याबद्दल इकडच्या लोकांनीं त्यांचें हमेशा आभारी असलें पाहिजे. अशा पैकींच व गेल्या पस्तीस वर्षांपासून अखंड चालत आलेला काकोडें येथील यंदांचा भजनी सप्ताह गेल्याच्या मागील सोमवारीं समाप्त झाला. यंदांच्या ह्या सप्ताहासंबंधानें विशेष लक्ष वेधण्यासारखी गोष्ट ह्मटली ह्मणजे गावांतील महार लोकांनीं त्यांत घेतलेला भाग ही होय. ह्या लोकांनीं सप्ताहास आपणास सामील होण्यास मिळावें ह्मणून ह्यापुढें केव्हांहि अभक्ष्य भक्षण करणार नाहीं किंवा मद्यास शिवणार नाहीं अशा शपथा घेतल्या असून त्यांकडून त्या पूर्णपणें पाळल्या जाण्याची खात्री आहे. गावांतील शूद्र वगैरे लोकांनीं ह्या पूर्वीच मद्यपान बंद केलें होतें व ह्यामुळें सर्व भजकांकडून यंदाचा सप्ताह विशेष उत्साहानें पार पाडला गेला. अतिशूद्रांच्या बाबतींत आमच्या लोकांकडून झालेल्या ह्या न्यायी वर्तनाबद्दल त्यांची प्रशंसा केल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं.

खुलासा:— प्रो. आल्बेर्त मार्तींस ह्यांकडून आह्मांस आलेल्या धमकीच्या पत्राबद्दल गोवेर्नादोर जेराल्दांकडे आह्मीं दाद मागितली होती. हें वाचकांस ठाऊक आहेच. ह्या बाबतींत गोवेर्नादोर साहेबांनीं तावडतोब चौकशी करून आह्मांस कळविलें आहे कीं, प्रोफेसर मजकूर तें पत्र आपण लिहिल्याचें साफ नाकबूल करितात. व्यक्ति स्वातंत्र्याचा किंवा उच्च शिक्षणाचा हा परिणाम असूं शकेल काय ? हेच लोक आमच्या भावी पिढीस फार चांगला धडा घालून सुशिक्षित करण्याचा विडा उचलणारे आहेत !

सोयरूराव मळकर्णेकर:—आह्मांस कळविण्यास फार वाईट वाटतें कीं, भारताविषयीं अत्यंत कळकळ बाळगणारे हे गृहस्थ गेल्याच्या मागील आठवड्यांत दिवंगत झाले. प्रसिद्ध मळकर्णेकर घराण्यांत ह्या गृहस्थांचा जन्म असून त्यानी आपला बहुतेक काल विद्याभ्यासंगांत घालविला. कोणत्याहि गोष्टींचा फार चिकित्सक दृष्टीनें विचार करणाऱ्या ज्या क्वचित् व्यक्ति समाजांत आढळतात त्यांपैकीं हे एक होते. त्यांच्या कुटुंबीय माणसांनीं जगाच्या रहाटीकडे लक्ष पुरवून आपलें समाधान करून घ्यावें एवढेंच आह्मांला त्यांस सांगतां येण्यासारखें आहे. परमेश्वर त्यांस परम पद प्राप्त करून देवो असें 'भारत' मनःपूर्वक इच्छीत आहे.

संपादक व प्रकाशक
गोविंद पुंडलीक हेगडे देसाई

प्रागतिक संघ वार्ता.

संघाचे स्वयंसेवक रा. मी. वि. दळवी प्रो. शिंगवाळ व द. व्यं. पै हे सावई-वेरें येथें जाऊन त्यांनीं तेथें संघास बरेच सभासद मिळवले. श्री. वैकुंठ द. सु. सरदेसाई, श्री. रायकर, श्री. शिंगवाळ वगैरे गृहस्थांनीं संघाविषयीं फारच कळकळ दाखविली.

तेच स्वयंसेवक तेथून यळवईस गेले. त्या गांवच्या लोकांनीं स्वयंसेवकांचा फार चांगला आदर सत्कार केला. तेथें व्याख्यान देण्याचा बेत ठरला होता पण गबच्या एका सार्वजनिक कामांची हौस असलेल्या गृहस्थांचा मुलगा आमांशाच्या विकारानें वारल्यामुळें स्वयंसेवकांनीं व्याख्यानाचा बेत रहित केला. तेथील रा. केशव सांवशेट, मनू देमू फडते, सांवळो कुमो तारी गुरुगुरो तातू सावंत इतक्यांनीं संघाच्या स्वयंसेवकांचें काम पतकरलें असून संघास सर्व प्रकारें मदत करण्याचें आश्वासन दिलें आहे. गांवच्या मंडळीचा हुरूप पाहून गोव्याची विस्कळीत झालेली शक्ति जर आपण एकवटूं तर त्याच्या सुधारणेस फार काळ लागणार नाहीं असें आपणास वाटलें असल्याचें तेथें गेलेल्या स्वयंसेवकांनीं आह्मांस लिहिलें आहे.

संघाचे स्वयंसेवक श्री. रामचंद्र ना. प्रभू लवंदे यांनीं, कळंगुट बार्देस येथें जाऊन सुमारें २५–३० सभासद मिळविले व आणखी बरेच मिळण्याचा संभव आहे.

वर्तमानसार

—आज रोजीं आमच्या संपादकांचें 'आतां तरी पुढें हाची उपदेश, नका करूं नाश आयुष्याचा [स्वदेशाचा]' या विषयावर परोडें येथें श्री.तुळेकरांच्या वाड्यांत प्रवचन होणार आहे.

—डॉ० व्यंकटेश राव सरदेसाई व प्रो. दत्ताराम गोविंद कामत यांस अन्यायमवेत निष्कारण खटल्यांत समाविष्टिल्यामुळें हिंदु समाजांत असंतोष माजला आहे.

—प्रागतिक संघास आजपर्यंत मिळालेल्या मेंबरांची संख्या पावणेदोन हजारांवर गेली असून, सध्याच्या स्वयंसेवकांच्या चिकाटीमुळें ही संख्या लवकरच दुप्पट होईल असा रंग दिसत आहे.

—मलबार येथील मोपला लोकांच्या बंडास भयंकर स्वरूप येत असून, अत्याचारांसहि ऊतधावत्यास लागला आहे कारण?

—पूर्वी वचन दिल्याप्रमाणें श्री गणेश चतुर्थीनिमित्त भाजचा खास पण अर्धा अंक प्रसिद्ध होत आहे.

—येत्या अंकांत प्रो रामचंद्र सो कामत व 'बाळकृष्णानुज' यांचे लेख प्रसिद्ध होतील.

—पणजी येथें 'संव प्राजेरीस दे कोस्त' या नावांची राजकीय संस्था कांहीं ख्रिस्त्यानीं स्थापिली आहे.

—गोमांतकांतील एकंदर क्षत्रिय—मराठे लोकांचा संघ होणार असल्याची शुभ सूचक वदंता आहे.

—आ तेन्द पत्राचे संपादक लिबेर पेरैर हे हॉस्पिटलांतून बाहेर निघाले.

—बै. दे. पुरुषोत्तम बामन शिरगांवकर यांच्या स्मारकानिमित्त लवकरच जारीची चळवळ सुरू होईल, असें कळतें. योग्य.

शनेबल पारशी स्त्रियाहि खादीचा पोशाख करण्यास लाजत नाहींत.

ह्या राष्ट्रीय झगड्यांत पारशी मागें रहतात कीं काय ह्मणून भीति वाटत होती. ती निराधार ठरून एकंदर हिंदुस्थान देश (कांहीं विचारवान युरोपयनसुद्धां] [ॲंड्युज, स्टोक्स, हेलस प्रभृति]—स्वराज्य मिळविणार ह्या एकाच ध्येयानें प्रेरित होऊन स्वराज्य आक्रमूं लागला आहे. आतां जनता तुरुंगाला भीत नाहीं. तुरुंगाचा मार्ग हाच स्वराज्याचा मार्ग असा उपदेश पुढारीहि करूं लागले आहेत. देशभक्ति व स्वार्थत्याग ह्या दोन गुणाच्या सहाय्यानें ब्रिटिश हिंदुस्थानांतील जनता स्वराज्य हिमालयाचीं हिमाच्छादीत शुभ्र शिखर लवकरच पाहील. त्यावेळीं पोर्तुगीज हिंदुस्थानांतील पोर्तुगीज नागरिक मागें राहणार काय असा विचार येऊन मनाला खिन्नता येते. पण नाहीं. प्रागतिक संघाचा जाहीरनामा, दारूची बंदी, स्वदेशीचा प्रयोग वगैरे गोष्टी भारताच्या आगष्ट ४ च्या अंकांत वाचून आपण प्रगतीच्या मार्गांत मागें राहणार नाहीं. असें वाटूं लागलें आहे. रोग एक, औषध एक, व वैद्यराजहि एक पण हवामानाप्रमाणें पथ्य व अनुपान बदलावें लागणार.

असतो मा सद्गमय ।
तमसो मा ज्योतिर्गमय ।
मृत्योर्मा अमृतं गमय ।
आविः आविः मा एधि ।

मुंबई
ता. १२ ८ २१. विष्णुशर्मा.

बोंबाबोंब

(कवि-इंदिरातनय, शिरवडें)

सावध वेळींच न राहुनियां–मग कां बोंबाबोंब!
वैश्वानर ग्रासी निजसदना, ज्वाळा भयंकर भिडती गगना,
तरी घोरतों पडुनी शयना,–अंतीं बोंबाबोंब ! १
भर दिवसा चौफेर गराडे–पडुनी, शत्रु लुटिती वाडे,
गातों परि तद्गुण पोवाडे ! अंतीं बोंबाबोंब ! २
कुंड पेटवुनि क्रोधाग्नीचें–बलिदान न करवे स्वार्थाचें !
प्रिय स्थान वाटे नरकाचें ! अंतीं बोंबाबोंब ! ३
विवेक धनु निज सज्ज करोनी–कर्तृत्वाच्या शरसंधानीं
पाडवे न जरि रिपुतें धरणी, अंतीं बोंबाबोंब ! ४
ज्ञान रवि अतां तेजोराशी–निज कर पसरी हृदयाकाशीं
तरि आह्मी जन भारतवासी, चुकवूं बोंबाबोंब ! ५

ECOS & CRITICA

Sinificativo

Alguns alunos cristãos da sexta classe tentaram, em vão, provar que o sr. Pe Excelso não proferiu os disparates que nos motivaram o historico suplemento do dia 17 do mez passado. Disculpamos-lhes a asneira, por que é livre a cada um proferir quantas asneiras lhe aprouverem

O que, porem, não podemos tolerar-lhes, ê que procurem atribuir ao *Gandhicap* o errado sinificado de *simbolo de revolução*! Isso nunca! Se o mesmo *cap* ê susceptivel de provocar revoluçõas tambem o seria o casaco de alpaca que o nosso visinho usa...

Gandhcap, simbolo da revolução! Isso nem ao demonio do ... meio dia lembraria!

Mas é louvavel o intuito dos tais alunos cristãos quererem *pro domo sua* dismentir.. a verdade, talvez por *insinnaçõ-es* alheas? E' significativo isto!

Mais um processo...

Chegam-nos vagos rumores de que o nosso director vai ser ou foi processado pelo crime de ter...protestados contra os insultos que inserimos no nosso suplemento de 17 do mez findo!

De colo erguido nos defenderemos, pois quem não deve não teme

Instituto Comercial

Um sr. *Marcelo Previostjr* enviou-nos uma carta descrevendo, em todos os detalhes, a festa realisada no dia *6* do mez passado pelo 5° aniversario da instalação do nosso Instituto Comercial.

Foi uma festa de *arromba*, havendo discursos nervosos e *Padre nossos* e *Ave-Maris* pelas prosperidades do sr. Prazeres da Costa e do seu filho.

Como prova inequivoca de gratidão, não podemos deixar de estimar a mesma festa.

A Cesar...

Os europeus liberais-e quase todos os europeus são liberais semearam na classe hindu só favores. Não é para admirar, portanto, que agora colham só a gratidão da mesma, porque é isto natural.

Os outros que nêla semearam ventos de perseguições de toda a casta e sórte, é claro que tem de prontificar-se a colher agora tempestades de *não-cooperação* e despreso por parte da mesma classe.

कृतघ्नतेचा आभास

दयाळु पोर्तुगीजांच्या कारवाईमुळेंच तुह्मी तो मुळचा देशी पोषाख तीं जुनीं नावें ती "गावाळ' पुराणें व तें "कोंकणपण" फार कशाला ती आपली परंपरागत भाषा व लिपी यांचाही त्याग करून युरोपीय संस्कृतीशीं एकजीव झालां आणि या मुळेंच तुह्मांला जो फायदा झाला तो कल्पनातीत आहे. धार्मिक जुलमामुळें देशत्याग करून गेलेल्या हिंदुबांधवांचा जमीनजुमला, वारस हक्कामुळें आयताच तुमच्या घशांत पडून तुह्मांस गबर होतां आलें. धार्मिक विधींस बंदी करण्याकरितां नानारूपानें अवतरलेल्या कायद्याच्या निर्घृण यंत्रांत, नेस्तनाबूद होऊन गेलेल्या हिंदुबांधवाचे ग्रामसंस्थाचे हक्क आयतेच तुमच्या खिशांत पडले. धर्मवेडानें पछाडलेल्या अधिकाऱ्यांनीं तुमच्या—गोऱ्यांच्या— साह्यानें जोराची गचांडी देऊन कोलमडून पाडलेल्या हिंदूंत, तीन चार शतकेंपर्यंत पुनरुत्थानाचें त्राण नसल्यामुळें, सरकारदरबारी वकिली वगैरे सर्व अधिकारांची माळ तुमच्याच गळ्यांत पडून, तुह्मास मनेप्सित स्वार्थ साधून घेतां आला व तो क्रम अजूनही चालू आहे. राज्यकर्त्यांशीं साधर्म्य पावल्या मुळेंच हिंदुसमाजास "जेंतिय" "पागांव" ही निंदाव्यंजक विशेषणें लावून शेकडो वर्षांपासून त्यांस हिणविण्याचें महत्कार्य तुह्मांस करतां येत आहे. राज्यकर्त्यांचें साह्य घेऊन हिंदुधर्मावर तुमच्या वाडवडिलांनीं हजारों वर्षें आचरलेल्या धर्मावर — धार्मिक मिरवणुकी बंद करणें वगैरे अनेक प्रकारें हल्ला चढवण्याचें शतकृत्य तुह्मांस करतां आलें. ख्रिस्ती देवालयांतील व्यासपीठावरून. इतकेंच, नव्हे तर पाठशाळांच्या अध्यापकांच्या जागेवरून हिंदुधर्माची, हिंदु विद्यार्थ्यांची त्यांच्या शेंडीची त्यांच्या चाली रीतींची, मातृभाषेच्या वाङ्मयाची मनसोक्त निंदा करण्याचा क्रम आजमितीसही तुह्मांस ठेवतां आला. पोर्तुगीजानीं जर तुमच्यावर कृपा केली नसती तर तुह्मांस युरोपीय संस्कृतीशीं समरस होण्याचा आनंद अनुभवतां आला असता काय? देशी विदेशी मद्यरूपी त्या मधुर रसाचा, तुमच्या जीवनाशीं जो सुखसंयोग झालेला आहे. त्याचें श्रेय राज्यकर्त्यांनीं दिलेल्या व तुह्मी आत्मसात् केलेल्या त्या मोहक पाश्चात्य संस्कृतीसच आहे. तिजमुळेंच तुह्मांस मनसोक्त खाद्य पेयांचा उपभोग घेऊन जिव्हानंद अनुभवतां येत आहे. असो. दयाळु व उदार पोर्तुगेजानीं तुह्मांस काय दिलें नाहीं? जें देतां आलें—तें सर्व कांहीं देण्यास त्यांनी हात आंखडला नाहीं.

तुमची पूर्वज परंपरा जुन्या करारांतील कंई आणि आबेलशीं जोडण्यांत येऊन तुमच्या त्या "कोंकण्या" पूर्वजांची लज्जास्पद आठवणही बुजवून टाकिली. आणि व्हास्कु दे गाम आफोंस दे आल्बुकेर्क व इतर शूर पोर्तुगीज शिपायांच्या पराक्रम चंद्रानें तुमच्या अभिमान सागरास अकल्पित भरती येण्याची त्यांच्या शौर्यानें तुमचे बाहु फुरफुरण्याचीही पण त्यानीं नामी व्यवस्था केली. फार कशाला तुमची जन्मभूमि—जो भारतांतर्गत गोमांतक-तिच्याकडून कदाचित् तुह्मांस मातृ सुखाची वाण पडेल ह्मणूनच कीं काय आपली स्वतःची जन्मभूमि जी पोर्तुगाल ती तुह्मांस बहाल करून ह्मणा अगर गोवानीज ख्रिस्त्यास तिला दत्तक देऊन ह्मणा Portugal é nossa mãe असें ह्मणून गोऱ्या—त्यांच्या स्वतःच्या—आईचें मातृसुख तुह्मांस प्राप्त करून देण्याचा स्वार्थत्याग करण्यासही त्यांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं!!

उपरिनिर्दिष्ट उपकारामुळें नेटिव ख्रिस्त्यानीं पोर्तुगीज लोकांशीं कृतज्ञ असावें हें साहजिकच आहे. परंतु अलिकडे नेटीव लोकांच्या वृत्तपत्रांतून "आह्मी पोर्तुगीज नाहीं' असा ध्वनि उठत असल्याचा कृतघ्नतेचा भास पोर्तुगीज लोकांस होत आहे. हें जर खरें असेल तर मग आमच्या पाश्चात राजकर्त्यांची अंतःकरणें— दयेनें थबथबलेली असलीं तरी—कृतघ्नताजन्य क्रोधानें करपून जावीत यांत नवल तें काय? आणि त्यानीं, नेटिवलोक बहकून भलत्याच मार्गानें जाऊं नयेत ह्मणून, पाठीवर चार रट्टे ओढून सुधीवर आणण्याचा प्रयत्न केला तर त्यांची ती कृति त्या आकाशांतील बापाच्या गतांकांतील कृतीपेक्षां नरीच साम्य नाहीं काय? निःसंशय आहे.

परंतु अगोदर पोर्तुगीज लोकांस येत असलेला हा कृतघ्नतेचा संशय वास्तविक आहे काय? नाहीं. आह्मांस तर वाटतें कीं हा नुसता आभासच आहे. वस्तुस्थिति नाहीं. अद्यापि गोमांतकीय ख्रिस्त्यांच्या शरिरांत पोर्तुगीज रक्तच खेळत असल्याबद्दल त्यांस अभिमान वाटत आहे! त्यांच्या मायदेशाच्या व राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेंत बदल झालेला नाहीं! मातृभाषेबद्दल त्यांस प्रेम वाटत नसून तिची ते आजमितीसही अवहेलनाच करीत आहेत. हिंदुबंधूबद्दलचा दुहीभाव अजून दूर झाला नाहीं! पाश्चात्य संस्कृतीचा मोह अंमरलेला नाहीं एवंच रोगाचीं लक्षणें कांहींच दिसत नसतां उगीच रोग, रोग ह्मणून इतकें भयभित होण्याचें कारण काय? अगदीं काल परवां, मिलिटरी ओफिसरांनीं, "तेर" पत्राचे बाणेदार संपादक मि. लिवेर पेरेर यांजवर आगळिक केल्यावरून, संतापून जाऊन, निषेधप्रदर्शनार्थ भरलेल्या मडगांवच्या सभेंतील मुख्य वक्ते लिगोर दीयस यानीं आपल्या भाषणाच्या शेवटीं Portugal é nossa mãe ह्मणून त्या गोऱ्या आईला, प्रेमातिशयानें घट्ट कवटाळून धरिली हें दृश्य सर्वांचा दृष्टीसमोर असतांना, पोर्तुगीज लोकांस येत असलेला तो संशय नुसता आभासच आहे, भ्रम आहे, असें ह्मणण्यास आम्हांस तरी कांहींच हरकत वाटत नाहीं. असो.

हिंदु समाजाच्या दृष्टीनें युरोपीय व नेटीव ख्रिस्ती लोकांच्या या शुष्कवादांत कांहींच अर्थ नाहीं. अद्यापि हा प्रेमकलहच आहे. ख्रिस्ती बंधूंचीं दृष्टी अजून शुद्ध व्हावयाची आहे. हिंदी संस्कृति तुडविली जाण्याचे दिवस संपले ही कल्पना अजून त्यांस झालेली नाहीं. पाश्चात्य संस्कृतीनें दिग्मूढ झालेले ख्रिस्ती लोक व त्यांच्या चिरपरिचयानें पाश्चात्यलेले मूठभर हिंदुबंधु यांस जरी आज हिंदी संस्कृतींत राम दिसत नाहीं, तथापि या हिंदी जगांत हिंदी संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाचा वारा जोरानें वाहत आहे, अशा वेळीं पाश्चात्य संस्कृतीची तळी उचलून धरून हिंदी संस्कृतीची पायमल्ली करण्याचे कितीही प्रयत्न केले तथापि हजारो वर्षें व कोट्यावधी लोकांत चिकाटीनें जीव धरून राहिलेली ही वज्रप्राय बळकट अशी हिंदी संस्कृतीच अखेर विजयी होईल. उलटपक्षीं, पोर्तुगीज लोकानीं मलबार किनाऱ्यावर लावलेलें व नेटीव ख्रिस्त्यानीं जोपासना केलेलें हें पाश्चात्य संस्कृतीचें रोपटें अनेक शतकांच्या दीर्घ पावसाळ्यांत जीव धरून असलेलें दिसत असलें. तथापि या विसाव्या शतकांतील हिंदी संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाच्या प्रखर उन्हाळ्यांत तें कसें काय टिकाव धरतें याकडेच ख्रिस्ती जगाचें लक्ष्य यापुढें वेधून राहील असें भाकीत करण्यांस कांहींच प्रत्यवाय वाटत नाहीं.

पुरुषोत्तम

भारत

गुरुवार श्रावण व० ३०शा १८४३

एका विद्यार्थ्याचे प्रतिज्ञा बोल

१ मी गोमांतकचा रहिवासी आहें.

२ गोमांतकच्या मोठेपणावर व ख्यातीवर माझा वारसा आहे.

३ माझ्या स्नायूंनीं, मज्जातंतूंनीं व रक्तबिंदूंनीं आपापलें काम बरोबर बजाविलें ह्मणजे जसें माझें शरीर सुखी व निरोगी राहतें, तसेंच प्रत्येक नागरिकानें आपापलें काम योग्य रीतीनें बजाविलें ह्मणजे देश सुखी व निरोगी होतो.

४ मी अशी कोणतीहि नोकरी धरणार नाहीं किंवा धंदा करणार नाहीं कीं, ज्यामुळें मला माझ्या बंधूंवर अवलंबून राहून त्यांच्या उपयोगी पडतां यावयाचें नाहीं. कारण, त्यामुळें कित्येकानां विपत्ति भोगावी लागेल, हें मला स्पष्ट दिसतें.

५ ज्याप्रमाणें रणभूमीवरून शिपायानें पळून जाणें हें भागूबाईचें लक्षण आहे, त्याचप्रमाणें नागरिकानें स्वदेशाच्या कल्याणांत भर न घालणें, हें भागूबाईचें लक्षण आहे.

६ गोमांतकनें मला जन्म दिला व माझें पालन पोषण केलें आहे, त्या अर्थी मी कर्तव्याला अनुसरून त्याची सेवा केलीच पाहिजे. गोमांतक भूमि जेणें करून भ्रष्ट पावेल, स्वदेशाची हवा जेणें करून दूषित होईल व गोमांतकीय बंधु भगिनी जेणें करून अवनतीला जाऊन पोंचतील असें कृत्य मी बिलकूल करणार नाहीं.

प्रिय गोमांतकीय बंधु भगिनींनों! जर तुह्मांला तुमच्या मातृभूमीची किंचित् तरी कळकळ असेल; अवनतीच्या खोल गर्तेत सांपडलेला आमचा प्रिय गोमांतक उन्नति शिखरावर पोंचविण्याची जर तुमची इच्छा असेल; आह्मांला खालीं पाडून आमच्या उरावर पाय देणाऱ्यांना पिटाळून लावून आपला प्रियतम गोमांतक आनंदी व सुखी करण्याची जर तुमची आकांक्षा असेल, तर वरील सुविचारी विद्यार्थ्याचे प्रतिज्ञा-बोल प्रत्येक गोमांतकीयानें अवश्य पाळले पाहिजेत.

सांप्रतचा काळ ऐष आरामांत कंठविण्याचा नव्हे. रिकामटेकड्या गुलगुल गोष्टींचें निरर्थक खूळ माजवून जनतेच्या डोळ्यांत धूळ फेकण्याची सध्याची स्थिति नाहीं. आपल्या बांधवाचें हित तेंच आपलें हित, अशा पवित्र भावनेनें, एकमेकांचीं वर्में कर्में काढण्यांत व्यर्थ कालक्षेप न करतां, लोक कल्याणार्थ झटण्याची ही वेळ आहे. गोमांतकांतच नव्हे तर सर्व जगांत

अनुमानें काढून डोक्यास शीण देण्यापेक्षां त्या वर्गाचीं मतदर्शक अशीं वृतपत्रें 'आपात्रिय' व "प्रोव्हींसिय" यांचे अलीकडील अंक वाचून पाहिले म्हणजे त्यांच्या मनःस्थितीचें यथार्थ ज्ञान होणार आहे. प्रोव्हींसिय पत्राच्या गेल्या २५ जुलईच्या अंकांत एका पोर्तुगीज इतिहासज्ञाचा आव आलण्याऱ्या लेखकाचे पत्र प्रसिद्ध झालें असून त्यांत, नेटीव लोकांत अलीकडे पोर्तुगीजांबद्दल अप्रीति उत्पन्न होत असल्याचें यथार्थ निधान करून लेखक पुढें म्हणतो "que cometeu grande erro talvez de descobrir e civilizar este recanto de Malabar, outrora feudo de Rajás [राजांच्या अमलाखालीं असलेला हा मलबारचा भाग शोधून काढण्यांत आणि सुसंस्कृत करण्यांत पोर्तुगालनें, कदाचित्, मोठीच चुक केली] खरोखरच मलबारच्या कोपऱ्यांत अडाणी स्थितींत खितपत पडलेल्या या लोकांची शुद्धि करून त्यांचें पोर्तुगीज लोकांनीं किती तरी कोट कल्याण केलें; परंतु त्याबद्दल कांहीं तरी कृतज्ञता !!

ख्रिस्ती बांधवहो, हिंदूंची गोष्ट सोडून द्या. परंतु तुह्मीं तरी इतके कृतघ्न व्हावयाचें नव्हतें. तुह्मीं तुमची पोर्तुगीज पूर्वकालीन स्थिति व आतांची स्थिति ताडून पहा व त्यांत जो विलक्षण बदल झालेला आहे त्याचें श्रेय कोणास आहे याचा विचार करा आणि असे कृतघ्न बनूं नका. पोर्तुगीज लोक इकडे येतांच प्रथमतः इकडील रहिवासी जेंतिवपणास कुजून नरकास जात असलेला, हृदयद्रावक देखावा त्यांस दिसून त्यांच्या हृदयाचें पाणी पाणी झालें. तत्क्षणींच त्यानीं त्यावरील रामबाण उपाय ख्रिस्ती धर्माची दीक्षा, तो सुरू करून तुह्मांस स्वर्गाचा रस्ता खुला करून देण्याची व्यवस्था केली. तें पण तुह्मीं त्यांस सुखानें करूं दिलें काय ? नाहीं. परंतु तुह्मीं कसले वस्ताद ! मुलें औषध खुषीनें घेत नसलीं तरी त्यांच्या कारणाकडे लक्ष देऊन तें जुलमानें तरी पोटांत कोंबावेंच लागतें ! लागलेंच त्यानी इंक्विजिशनचें भेसूर यंत्र सुरू करून ख्रिस्तावण्याचें काम सुरू केलें व अशा प्रकारें अत्यंत दगदग सोसूनही, तुमची आणि "आकाशांतील बापाची" कायमची गांठ त्यांनीं घालून दिली त्यांनीं केलेल्या अनंत उपकारांपैकीं या एकाच गोष्टीचा जरी विचार केला तरी उपरिनिर्दिष्ट उपकृतीच्या डोहांतून गटंगळ्या खात असलेले तुह्मीं, फिरून पैलतीर गांठाल अशी आशा करणेंही व्यर्थ झालें आहे.

पुरुषोत्तम

(चालू)

जाहीर विनंति

येत्या रविवारीं संध्याकाळीं सहा वाजतां येथील "बालचमूच्या" दिवाणखान्यांत सि. आराऊझ मासकारेंजस यानीं हिंदुविद्यार्थ्यांस अनुलक्षून उच्चारलेल्या अवहेलनात्मक शब्दांबद्दल चर्चा करण्यासाठीं सभा भरणार असून सभेनंतर श्री. भारतकारांचें प्रवचन होणार आहे. सर्व हिंदूंस हजर रहाण्याविषयीं विनंति आहे.

सेक्रेटरी "बालचमू"

मडगांव ता. २३।८।९२१

अनुमानें काढून लोकधास शीण देण्यापेक्षां ह्या वर्गाचीं मतदर्शक अशीं वृत्तपत्रें 'आ-पान्निय' व "प्रोव्हींसिय" यांचे अलीकडील अंक वाचून पाहिलें म्हणजे त्यांच्या मनःस्थितीचें यथार्थ ज्ञान होणार आहे. प्रोव्हींसिय पत्राच्या गेल्या २५ जुलईच्या अंकांत एका पोर्तुगीज इतिहासज्ञाचा आव घालण्यान्या लेखकाचें पत्र प्रसिद्ध झालें असून त्यांत, नेटीव लोकांत अलीकडे पोर्तुगीजांबद्दल अप्रीति उत्पन्न होत असल्याचें यथार्थ निधान करून लेखक पुढें म्हणतो "que cometeu grande erro talvez de descobrir e civilizar este recanto de Malabar, outrora feudo dē Rajás [राजांच्या अमलाखालीं असलेला हा मलबारचा भाग शोधून काढण्यांत आणि सुसंस्कृत करण्यांत पोर्तुगालनें, कदाचित्, मोठीच चुक केली] खरोखरच मलबारच्या कोपऱ्यांत अडाणी स्थितींत खितपत पडलेल्या या लोकांची शुद्धि करून त्यांचें पोर्तुगीज लोकांनीं किती तरी कोट कल्याण केलें; परंतु त्याबद्दल कांहीं तरी कृतज्ञता !!

ख्रिस्ती बांधवहो, हिंदूंची गोष्ट सोडून द्या. परंतु तुह्मीं तरी इतकें कृतघ्न व्हावयाचें नव्हतें. तुह्मीं तुमची पोर्तुगीज पूर्वकालीन स्थिति व आतांची स्थिति ताडून पहा व त्यांत जो विलक्षण बदल झालेला आहे त्याचें श्रेय कोणास आहे याचा विचार करा आणि असे कृतघ्न बनूं नका. पोर्तुगीज लोक इकडे येतांच प्रथमतः इकडील रहिवासी जेंतिवपणास कुजून नरकास जात असलेला, हृदयद्रावक देखावा त्यांस दिसून त्यांच्या हृदयाचें पाणी पाणी झालें. तत्क्षणींच त्यांनीं त्यावरील रामबाण-उपाय ख्रिस्ती धर्माची दीक्षा, तो सुरू करून तुह्मांस स्वर्गाचा रस्ता खुला करून देण्याची व्यवस्था केली. तें पण तुह्मीं त्यांस सुखानें करूं दिलें काय ? नाहीं. परंतु तुह्मीं कसले वस्ताद ! मुलें औषध खुषीनें घेत नसलीं तरी त्यांच्या कारणाकडे लक्ष देऊन तें जुलूमानें तरी पोटांत कोंबावेंच लागतें ! लागलेंच त्यानी इंकिजिशनचें भेसूर यंत्र सुरू करून ख्रिस्ताळण्याचें काम सुरू केलें व अशा प्रकारें अत्यंत दगदग सोसूनही, तुमची आणि "आकाशांतील बापाची" कायमची गांठ त्यांनीं घालून दिली. त्यांनीं केलेल्या अनंत उपकारांपैकीं या एकाच गोष्टीचा जरी विचार केला तरी उपरिनिर्दिष्ट उपकृतीच्या डोहांतून गटंगळ्या खात असलेले तुह्मीं, फिरून पैलतीर गांठाल अशी आशा करणेंही व्यर्थ झालें आहे. पुरुषोत्तम

(चालू)

जाहीर विनंति

येत्या रविवारीं संध्याकाळीं सहा वाजतां येथील "बालचमूच्या" दिवाणखान्यांत सि. आराऊज मास्कारेंजस यानीं हिंदुविद्यार्थ्यांस अनुलक्षून उच्चारलेल्या अवहेलनात्मक शब्दांबद्दल चर्चा करण्यासाठीं सभा भरणार असून सभेनंतर श्री. भारतकारांचें प्रवचन होणार आहे. सर्व हिंदूंस हजर रहाण्याविषयीं विनंति आहे.

सेक्रेटरी "बालचमू"
मडगांव ता. २३।८।९२१

अनुमानें काढून डोक्यास शीण देण्यापेक्षां त्या वर्गाचीं मतदर्शक अशीं वृत्तपत्रें 'आ पात्रिय' व "प्रोव्हींसिय" यांचे अलीकडील अंक वाचून पाहिले म्हणजे त्यांच्या मनःस्थितीचें यथार्थ ज्ञान होणार आहे. प्रोव्हींसिय पत्राच्या गेल्या २५ जुलईच्या अंकांत एका पोर्तुगीज इतिहासज्ञाचा आव घालण्याऱ्या लेखकाचें पत्र प्रसिद्ध झालें असून त्यांत, नेटीव लोकांत अलीकडे पोर्तुगीजांबद्दल अप्रीति उत्पन्न होत असल्याचें यथार्थ निधान करून लेखक पुढें म्हणतो "que cometeu grande erro talvez de descobrir e civilizar este recanto de Malabar, outrora feudo de Rajás [राजांच्या अमलाखालीं असलेला हा मलबारचा भाग शोधून काढण्यांत आणि सुसंस्कृत करण्यांत पोर्तुगालनें, कदाचित्, मोठीच चुक केली] खरोखरच मलबारच्या कोपऱ्यांत अडाणी स्थितींत खितपत पडलेल्या या लोकांची शुद्धि करून त्यांचें पोर्तुगीज लोकांनीं किती तरी कोट कल्याण केलें; परंतु त्याबद्दल कांहीं तरी कृतज्ञता !!

ख्रिस्ती बांधवहो, हिंदूंची गोष्ट सोडून द्या. परंतु तुम्हीं तरी इतकें कृतघ्न व्हावयाचें नव्हतें. तुम्हीं तुमची पोर्तुगीज पूर्वकालीन स्थिति व आतांची स्थिति ताडून पहा व त्यांत जो विलक्षण बदल झालेला आहे त्याचें श्रेय कोणास आहे याचा विचार करा आणि असे कृतघ्न बनूं नका. पोर्तुगीज लोक इकडे येतांच प्रथमतः इकडील रहिवासी जेंतिवपणास कुजून नरकास जात असलेला, हृदयद्रावक देखावा त्यांस दिसून त्यांच्या हृदयाचें पाणी पाणी झालें. तत्क्षणींच त्यांनीं त्यावरील रामबाण उपाय ख्रिस्ती धर्माची दीक्षा, तो सुरू करून तुम्हांस स्वर्गाचा रस्ता खुला करून देण्याची व्यवस्था केली. तें पण तुम्हीं त्यांस सुखानें करूं दिलें काय ? नाहीं. परंतु तुम्हीं कसले वस्ताद ! मुलें औषध खुषीनें घेत नसलीं तरी त्यांच्या कारणाकडे लक्ष देऊन तें जुलमानें तरी पोटांत कोंबावेंच लागतें ! लागलेंच त्यानी इंकिजिशनचें भेसूर यंत्र सुरू करून ख्रिस्तावण्याचें काम सुरू केलें व अशा प्रकारें अत्यंत दगदग सोसूनही, तुमची आणि "आकाशांतील बापाची" कायमची गांठ त्यांनीं घालून दिली त्यांनीं केलेल्या अनंत उपकारांपैकीं या एकाच गोष्टीचा जरि विचार केला तरी उपरिनिर्दिष्ट उपकृतीच्या डोहांतून गटंगळ्या खात असलेले तुम्हीं, फिरून पैलतीर गांठाल अशी आशा करणेंही व्यर्थ झालें आहे. पुरुषोत्तम

(चालू)

जाहीर विनंति

येत्या रविवारी संध्याकाळीं सहा वाजतां येथील "जालचमूच्या" दिवाणखान्यांत सि. आराऊझ मास्कारेंजस यानीं हिंदुविद्यार्थ्यांस अनुलक्षून उच्चारलेल्या अवहेलनात्मक शद्बांबद्दल चर्चा करण्यासाठीं सभा भरणार असून सभेनंतर श्री. भारतकारांचें प्रवचन होणार आहे. सर्व हिंदूंस हजर रहाण्याविषयीं विनंति आहे.

सेक्रेटरी "बालचमू"

मडगांव ता. २३।८।९२१

Um telegrama

Do senhor Dr. Froilano de Melo recebemos, de Berlim, o seguinte telegrama ...

Obrigado todos especial hindús.

O telegrama traz a data de 13-8-21.

ECOS & CRITICA

Banditismo

Consta-nos que em Pilerne de Bardez lavra profundo discontentamento popular eterminado por uns Dalgados, famosos filhos dum capitão-medico reformado, os quais estão impunemente exercendo a profissão de maltrapilhos.

Pelos modos, parece que os diabos implantaram o *estado no estado* a ponto de não haver quem lhes embargue a *faina* de incomodar, ás vezes com lamentaveis consequencias, o pacato Povo da localidade.

Entendemos ser obrigação do Governo livrar a referida aldea e já da persiguição dos tais *Dalgados*. E' o que esperamos.

Gandhismo

Incontestavel é a influencia que o Gandhismo está exercendo no nosso Paiz. Não só os estudantes que o veneram, colocando-o nas suas formosas cabeças, mas tambem conta ele defensores acerrimos noutras classes reputadas iletradas.

Basta notar-se que o bom do proprietario do *Saradarasrama*, Rama, um moço franco e cordato, de tal maneira se tem simpatisado com o Gandhismo que nos encheram de indiscriptivel satisfação e orgulho as suas conversas sobre ele, quando na semana passada tivemos em Pangim a ocasião de falar com o alegre rapaz.

Viva o Gandhismo!

Nao pode ser

Consta-nos que se exerceram por *mera suspeita* pressão e maus tratos contra alguns empregados do telegrafo-postal de Pangim para se descobrir paradeiro do autor da violação duma carta registada. Praticaram-se mesmo disparates que a Constituição não admite e os sentimentos da humanidade repelem com asco.

¿Então o Governo consente semilhante desrespeito á Constituição a titulo do descobrimento da verdade...duvidosa?

Mas desde o momento em que a Constituição de Republica não é ainda considerada farrapo, tudo exige que sejamos razoaveis. Não acham.

Responsavel?

O *Bharat* nunca soube ser parcial, circunstancia que tem concitado contra si, de resto sem razão, má vontade de muitos, até dos amigos. Mas amigos, amigos, jornalismo á parte!

Vem este pequeno prefacio a proposito da atitude, absolutamente, condenavel que o sr. dr. Sinari, professor do Liceu Central assumiu na questão do *Gandhicap*. Sua exeia, longe de logo ao principio, desfazer a atmosfera da confusão que se ia formando em volta do uso do inocente *cap* como conhecedor do assunto, desenvolveu, pelo contrario, toda a sua energia no sentido de ainda mais se carregar a mesma atmosfera. E' o que resam as nossas informações fidedignas.

Consideramo-lo, porisso, responsavel da persiguição de que foi *victima* a acadêmia hindu. Incrivel mas verdade!

Justificaremos, mais de espaço, esta nossa asserção no numero seguinte.

Grandissmo malandro!

Da boca dum professor em quem viamos personificada a seriedade, saiu esta expressão ofensiva, dirigida a um distinto aluno hindu, por causa do *Gandhicap*.

Parece que tem razão os que admitem a capacidade revolucionaria no mesmo *boné*...

Saibam quantos...

Pensam alguns que na interpretação revolucionaria que se deu ao uso do *Gandhicap* existe o proposito de comprometer, politicamente, os hindus no conceito dos europeus.

Se isto fôr verdade, lamentamo-lo, simplismente, pois a classe hindu, conquanto tenha os defeitos de não saber bem o portuguez, de não comer a carne do porco, de não pronunciar bem os fonemas portugneses e sabemos lá quantos, ela nunca teve, todavia, o de ser ingrata.

Fique-se, portanto, sabendo duma vez para sempre que os hindus de Goa nunca olvidarão que devido ao espirito liberal dos europeus é que eles puderam viver, atravez dos tempos... *post inquisitoriais* e ser, hoje, o que são, que, se não fossem eles, os generosos e maguanimos europeus, e tivessem de haver, exclusivamente com certa gente malfadada, egoista e patife daqui que nos odiou sempre o levantamento, há muito que teria desaparecido da circulação a classe hindu.

São factos e contra factos não há argumentos, ainda que haja sofismas ..politicos, aparencias ilusorias e intrujice disfarçada.

¿Os hindus serão inimigos dos europeus liberais, seus protectores contra o jesuitismo nativo?

Nunca, nunca, nunca!!!

Leve o diabo que os carregue, os intrigantis e mexeriqueiros!

हिंदूंचा भयंकर अपमान!

पणजीच्या पाठशाळेचे कामचलाऊ मुख्याध्यापक येसेस द आल्मेद यांकडून हिंदुसमाजाची झालेली अवहेलना

गोवेर्नादोर जेराल यांस:—

आम्हास वाईट वाटतें कीं, आमचे कांहीं दिवस अध्यापक असलेल्या व्यक्तीविरुद्ध त्यानीं केलेल्या हिंदुसमाजाच्या अवहेलनेचा प्रतिकार करण्यासाठीं, आज आह्मांला हा तांत लेखणी घ्यावी लागत आहे.

ही व्यक्ति ह्मणजे पाद्री येसेस द आल्मेद हे होय. गांधी-टोपीच्या प्रसारामुळें ह्यांचें डोकें भणाणून गेलेलें असावें, कारण त्यामुळें झालेल्या दुःखाच्या भरांत त्यानीं भरशाळेंत, गांधी-टोपी वापरलेल्या विद्यार्थ्यांसमोर खालील प्रकारचीं अपमानकारक मुक्ताफळें ओंकून स्वतःचें भणाणलेलें डोकें शांत करून घेतलें:—

"ए जेंतीय, अरे ज्ञानहीन जनावरा, तूं गांधी टोपी कां घातलीस?...

जेंतीयां मुळेंच सरकारी तिजोरीची कष्टमय अवस्था आहे, कारण त्याच्यांत सरकारी कामगार पुष्कळ आहेत....

गोव्यांतलीं आजपर्यंतचीं १९ बंडें ह्यांच्याच चिथावणीवरून झालीं.

सगळ्या जेंतीयांस ह्या देशांतून ताबडतोब हद्दपार केलें पाहिजे. सन १८२२ च्या घटनेनें जेंतीय व क्रिरिस्तांव यांस समान हक्क देण्यांत फारच मूर्खपणा झाला असें माझें मत आहे. सगळ्या जेंतीयांचा नायनाट करणारा एकादा सरकारी ठराव झाला असता तर फार बरें झालें असतें."

कोणीहि अशा प्रकारचें वर्तन करील हें खरें वाटत नाहीं. परंतु पाद्री आल्मेदनें लोकसत्ताक राज्यपद्धतीच्या इभ्रतीस व गोव्यांतील हिंदु समाजाच्या योग्यतेस कमीपणा आणणारे विचार बाजूस सोडून, आपल्या अंध श्रद्धेच्या सडक्या मेंदूचें व हिंदुसमाजाविषयीं मनांत वसत असलेल्या द्वेषाचें प्रदर्शन केलें, ही गोष्ट खरी आहे

परंतु गांधी-टोपीमुळें त्यांचें मस्तक कां चढलें असावें बरें? त्याच्यांत असें काय आढळलें कीं त्यानीं सहनशील, शांत व कर्तव्यप्रिय अशा हिंदुसमाजावर शिव्यांचा वर्षाव करावा?

कदाचित्, ह्या पेक्षां कमी अपमानकारक भाषा वापरली असतांहि त्यांचे एक माजी सहकारी अध्यापक बालदान पाद्रीस मिळालेल्या जरबेची त्यांस वार्धक्यामुळें विस्मृति पडली असेल काय?

परंतु गांधी-टोपीचा प्रसार कशाचा दर्शक आहे बरें? येशूच्या धर्माविरुद्ध चळवळ किंवा राज्यकर्त्यांविरुद्ध बंड करण्याच्या हेतूचा तो निदर्शक असूं शकेल?

नाहीं, पाद्री महाराज, नाहीं. गांधी-टोपी वापरणाऱ्यांचा मुख्य हेतु हा आहे कीं शेजारच्या बेजबाबदार सरकारच्या कचाट्यांतून आमच्या गरीब बंधूंना सोडविण्याची महात्मा गांधींची जी चळवळ चालली आहे तिला सहानुभूति दाखवावी. कारण अशा प्रकारची चळवळ हा जन्मसिद्ध हक्क आहे. उदाहरणार्थ असें समजा कीं, ब्राजील येथें अशी एखादी चळवळ झाली व पोर्तुगालच्या जनतेनें तिच्या संबंधानें सहानुभूति दाखविली तर त्यामुळें त्यांच्या चांगल्या हेतूबद्दल संशय येणें शक्य आहे काय? जर नाहीं, तर गांधी-टोपी विरुद्ध एवढा गिल्ला कां? शिवाय ह्या टोपीचा इतका लवकर प्रसार होण्याचीं दुसरीं कारणें तिचा स्वस्तपणा व अप्रत्यक्षपणें स्वदेशीला उत्तेजन दिल्याचें श्रेय, हीं होत. कदाचित् अशाच गुणांनीं युक्त अशी टोपी पाद्रीकडून बनविण्यांत आल्यास आह्मांला खात्री आहे कीं, येसेस टोपी ह्मणून ती वापरण्यांस हिंदु समाज बिलकूल कसूर करणार नाहीं.

अर्थात गांधी टोपी वापरण्यांत कोणताहि गुप्त हेतु नसून हिंदूंनीच नव्हे तर येशूच्या भक्तांनींहि ती वापरण्यास कोणतीच हरकत नाहीं व तिच्या निर्दोषित्वाबद्दल त्यांच्या बऱ्याच युरोपियन व एतद्देशीय सहकारी अध्यापकांचें मत असून ती वापरणें दोषाह नाहीं. असें त्यांचें मत आहे

आह्मांस अशी खात्री वाटते कीं— लिसेवचे मुख्याध्यापक दो. आंतोन मारतींस हे जर रजेवर नसते तर अशा प्रकारचा घोटाळा कधींहि माजला नसता- हिंदुसमाजाच्या ह्या अवहेलनेविरुद्ध आह्मीं जोरानें निषेध करून सि. गोवेर्नादोर जेरालास ह्या कृत्याबद्दल अपराधी माणसाला योग्य शिक्षा देण्याची आग्रहाची विनंति करीत आहों.

सरते शेवटीं, ज्या धार्मिक व श्रद्धाळू

New tax

[ता. २८-७-२१ च्या भारतांतील अग्रलेख वाचून]

(कवि-इंदिरातनय-शिरवडें)

करांतुनी या तुह्मां तराया कोणी देना करा!
कराल पाहुनि रूप तयाचें जरी पावलां दरा.
मराल सारे उरा कराचा नसतां तीक्ष्ण सुरा!
तराल न कधी घरांत बसुनी वृथा बडुनियां गिरा!
संघ शक्तिनें वरा, करोनि कुविकारांचा चुरा!
परा मानुनी पुरा शत्रु निज तयार व्हा संगरा!
धरा धैर्य दृढ, स्मरा पूर्व यश, स्वोन्नरा कार्या मरा!
पणी जयश्री हरा! न मागें सरा! लववुनी शिरा!
सुनीतिपथ हा खरा वरा भूतलीं आर्य नर वग.
धिःकारुनियां झरा सुधेचा, सेवावें का गरा?
तरी करा जा त्वरा, उद्धरुनि जनां स्वयें उद्धरा!
काव्यदोष नादरा! विनवितों, विमल तत्व आदरा!

स्वदेशासाठीं झगडा!

COMUNIDADE DE SIRVOI

No dia 29 do corrente, pelas 14 horas, serão levadas, em praça, as avenças de despeza do seguinte ano de 1922, pelo preço e condições constantes do respectivo calculo, no local das sessões da sobredita comunidade.

Aos 15 de Agosto de 1921
O Escrivão
Ananta Raia Sirvoicar.

COMUNIDADE DE AVEDDEM

No dia 28 do corrente, pelas 14 horas, serão levadas, em hasta, as avenças de despeza da referida comunidade do ano de 1922, pelo preço e condições constantes do respectivo calculo no local das sessõs.

Aos 15 do Agosto de 1921.
O Escrivão
Ananta Raia Sirvoicar

कामत कुरडेकर, आणि कंपनी
कुंडईबाजार—गोवा

आमच्या कारखान्यांत उत्तम फ्यान्सी, मखमालीच्या, व जरीच्या सर्व तऱ्हेच्या टोप्या तयार मिळतात. घाऊक घेणाऱ्यांस विशेष सवलत. टोप्यांविषयींची वगैरे माहितीसाठीं खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा.

श्रीधर केशव कामत, क्लॉथ व क्याप मर्चंट
कुंडई–गोवा

पी. व्ही विजिनकर यांची

आयुर्वेदिक फार्मसी

मडगांव-गोवा

आमच्या फार्मसीत सर्व प्रकारच्या देशी वनस्पती, भस्में रसायनें, मात्रा, गुटिका, चूर्ण, आसवें, अरिष्टें, पाक, अवलेह, तेलें वगैरे उत्तम औषधांचा संग्रह असून फारच माफक दरानें देण्याची व्यवस्था केली आहे.

त्याचप्रमाणें, बालामृत, सार्सापरिला, अमृतांजन, शाई, दंतमंजन सुवासिक काफी, वगैरे महत्वाचे, व नित्युपयोगी पेटंट जिन्नस येथें मिळतील.

भारत हार्मोनियम अँड
फर्निचर वर्क्स

आमचेकडे सर्व प्रकारच्या हातपेट्या व पायपेट्या हलक्या भारी ऑर्डरी प्रमाणें तयार करून दिल्या जातील, तसेंच अपटुडेट फर्निचरहि ऑर्डरी प्रमाणें तयार करून दिलें जाईल. विशेष माहिती पत्रद्वारें.

तयार पेट्या पायपेटी ३॥। सप्तक रु. १३५
„ ३। रु. १२५
हातपेटी सिंगल रीड रु. ३५
„ डबल रीड रु. ४५

प्रोपायटर्स
विठ्ठल सिताराम महांबरे आणि कं०
ताडवाडी–मुंबई नं २

गैरसोय दूर झाली

पणजी येथील कोणत्याहि सरकारी कचेऱ्यांतील, कोर्टातील, हायकोर्टातील (रेलासांव) तसेंच पोर्तुगालच्या कोणत्याहि वरीष्ट कोर्टातील कामें

आ. शिज गोमिस पेरेर
श्रीधर कामत शंखावळकर
व्यंकटेश वि राव सरदेसाई
वकील व सॉलिसिटर्स

यांच्या नवीनच स्थापलेल्या ऑफिसांतून अत्यंत चोखपणानें योग्य वेतन घेऊन केलीं जातात. अनुभव घ्या व नाहक प्रवास खर्च वांचवा! सर्व तऱ्हेचा पत्रव्यवहार खालील पत्यावरः—

व्यंकटेश वि. राव सरदेसाई
पणजी–गोवा.

माल चोख किंमत रोख

तुह्मांला सुंदर खुर्च्या
निरनिराळ्या रंगाचीं सुंदर टेबलें
उत्तम तऱ्हेचीं मंगळुरी कौलें व घराचें कोणतेंहि सामान
पाहिजे असल्यास

गोविंद भिकू पऱ्हेकर

यांच्या कांदोळी–वार्देस येथील कारखान्यांत खरेदी करा

सुबक काम माफक दाम!

टीपः—कुशल सुतारांस लायकीप्रमाणें भरपूर पगार देऊन सदई कारखान्यांत नोकरीवर ठेवण्यांत येतें. गरजूंनीं खालील पत्यावर अर्ज करावा.

गोविंद भिकू पऱ्हेकर.
कळंगूट–बार्देस.

शेतकी सल्लागार आणि कमिशन एजंट
सहस्त्रबुद्धे आणि कंपनी

सोलापूर

आमचेकडे शेतीसंबंधीं (बागाईत व जिराईत) सर्व प्रकारचीं व उत्कृष्ट औतें, यंत्रें, खतें आणि बिंबियाणीं मिळतात. किंमती पत्रक व माहिती पत्रकें मागवा.

सूचना— आह्मीं सोलापुरी गिरणींतील मजबूत आणि टिकाउ धोतरजोडे चादरी, सर्टींगचें व चेकडे कापड— गिरणींतील व हातमागावरील निरनिराळ्या प्रकारांची टिकाऊ, पक्क्या रंगाची, भरपूर लांब रुंद अशी सुती, गर्भ रेशमी व रेशमी लुगडीं फारच किफायतशीर भावांत पाठवूं. एकवार अनुभव घेणें. हातमागा संबंधानेंहि सर्व माहिती देऊं.

एकच वेळ येऊन अनुभव घ्या.

रा. पांडुरंग शे. कीर्तनी यांचें

ब्राम्हणी


चहा, काफी व फराळाचें दुकान.

शाखा नं. २.
मडगांव नवा बाजार–मार्कीट पिंपळासमोर

आमच्या दुकानीं एकंदर जिन्नस साजूक तुपांत तळलेले असतात. भाजी, पुरी, भजीं, शिरा, उसळ, जिलबी, अनारसे, बेसन, वगैरे वगैरे जिन्नस ताजे तयार मिळतील. आगाऊ कळविल्यास वाटेल ती मिठाई तयार करून दिली जाईल.

मालकः— पांडुरंग शेणवी कीर्तनी.
मडगांव

भाताच्या शेतीसाठीं सर्वोत्कृष्ठ साधन! अवश्य मागवा!



बैलाना ओढण्यास हलका
नांगरण्याची तऱ्हा लांकडी नांगराप्रमाणेंच.
नांगरट व चिखल करणें, दोन्हीच्या उपयोगी
लांकडी नांगराच्या दुपटीनें काम करणारा.
किंमत प्रत्येकी फक्त १० रुपये

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड, किर्लोस्करवाडी (जि. सातार

É isto mau agouro de que, únicamente, são responsaveis os mesmos impoliticos.

Emendem—se ou corrija—os o governo para o prestigio do regime democratico em que estamos, segundo se diz.

Sem isto, nada feito.

Campanha antialcoolica

Esta campanha que na India visinha vai, dia a dia, ganhando proporções gigantescas a ponto de ficar reduzido, consideravelmente, o consumo d'alcool, é devida aos incançaveis esforços de *Mahatma* Gandhi que dentro em pouco conta acabar com o terrivel mal, juntamente com outros de igual ou pior natureza.

A campanha contra o uso de bebidas alcoolicas entre nós é tambem, ainda que indirectamente, consequência dos trabalhos do eminente patriota que, porisso, se torna digno do agradecimento do nosso Povo, amigo da *Ordem* e *Trabalho*.

As estradas...

Por falta de boa conservação estão de todo intransitaveis quasi todas as estradas de Goa.

Charcos, lama e não sabemos que coisas mais se vêem em todas elas, não havendo quem olhe para essa pouca vergonha.

E, todavia, temos bem *apessoalada* uma repartição das obras publicas com um exercito de chefia da conservação de estradas.

Mas ninguem sabe o que fazem todos aqueles filhos de Fazenda e netos do ze-pagante que é o pai da Fazenda.

Olhem para as estradas, senhores !

Mahatma Gandhi

Por mais tentativas que façam, os inimigos do Sr. Gandhi não poderão apreciar-lhe o inabalavel prestigio que lhe auriola o patriota divinisado.

Mezes atraz o sr Gandhi propoz-se reunir, dentro dum mez, um *crore* de rupias e, com grande admiração dos seus detratores, conseguiu concretisar a sua proposta, pois apurou alem dum *crore*, mais 25 *laques* de rupias.

No começo do corrente mez, o sr. Gandhi publicou a sua pretensão de até 30 do proximo mez de setembro, conseguir expulsar do Indostão o tecido da Inglaterra.

Tem, porisso, sido alvo da critica *virulenta* dos anglo-indianos o mesmo *Mahatma*, que, porem, firme no seu proposito está trilhando, com segurança, o caminho do seu programa, de cuja viabilidade, dada a poderosa força de alma do Gandhi não temos a menor duvida.

Aguardemos os factos em todo o caso.

Cartas

Recebemos muitas cartas narrando a galopinagem de certos empregados que trapacearam a valer nas ultimas eleições.

Não queremos delas ocupar porque perderam já a actualidade.

Desculpem-nos os seus autores.

Dardos & Cardos

O Xendi...

Não padece duvida alguma que o *Xendi* é a causa da perdição dos hindus pois se tivessem seguido o *comodo e proveitoso* exemplo de seus semelhantes que, apavorados ofereceram o seu induismo á bem fiada espada do catolicismo dos famosos tempos inquisitoriais seria *outra* a sua *sorte*.

Disfrutariam, como *êles*, o delicioso prazer de apetitosos pratos na lauta meza do orçamento; *bacharelariam-se* com a mesma facilidade assim na universidade de Coimbra como no seminario de Rachol; poderiam comer, com a mesma perfeição, o quiabo e a *vaca*: poderiam finalmente, unir-se em laços matrimoniais ás mulheres ocidentais e ás raparigas orientais...

A maldita superstição, porem, conservou *hindus* os tais hindus que nem á quinta facada renegaram a sua detestavel religião ..

¿E insurgem-se, agora, contra o generoso *portuguez da India*, o sr. advogado Araujo Mascarenhas lá porque este senhor agregado teve a amabilidade de insultar o *Xendi* ?

Não se amofine, sr. Mascarenhas que os hindus não souberam compreender. Deixa-los, sim !

Um bicho...

Borra-se porque um certo bicho está causando destroços nas varzeas.

Ninguem se aflija porisso pois temos portas a dentro um outro bicho mais poderoso do que aquele (não confundam com o sr Kelker)

Vejam lá se podem recorrer aos bem custosos serviços do mesmo.

Talvez fiquem servidos !

Anuncios

माझा गोव्याचा प्रवास

सन्मान्य भारतकार ! आह्मांस गोव्यांत प्रवास करण्याचा फारसा कधीं प्रसंग येत नाहीं. परंतु बहुतेक आमच्या इकडील लोकांचें कुलदेव गोव्यांत असल्याकारणानें फार तर वर्षांतून एकच खेप, खास एखाद्या उत्साहासाठींच ह्मणून इकडील लोकांच्या नशिबीं गोव्याचा दुर्धर प्रवास करण्याचें येत असतें.

गेल्या महाशिवरात्रीला आह्मीं चार पांच मंडळी बॉम्बेहून बोटीनें गोव्याच्या प्रवासांस निघालों गोव्याचा हा माझा पहिलाच प्रवास असल्यानें, गोवा सरकारनें आपल्या त्या छोट्याशा इलाख्याची व्यवस्था कशी काय ठेवली आहे इ. इ. संबंधीं, गोवें जसजसें जवळ येऊं लागलें तसतशी अधिकाधिक माझी जिज्ञासा वाढत गेली. परंतु पांडुतात्याची मात्र ही गोव्यांत येण्याची दहावी खेप होती. त्यानी आह्मां सगळयाना परत परत बजावून सांगितलें कीं, 'सांभाळा हो, गोवासरकारचें राज्य आहे.' पांडुतात्यांच्या ह्या बोलण्याचा मला अद्यापि अनुभव आला नव्हता. ह्मणून मी त्यांना लगेच प्रश्न केला कीं, गोवा सरकारचें राज्य असलें ह्मणून इतकें संभाळून वागण्याचें कारण काय ? त्यावर पांडुतात्या ह्मणाले, वसंत, आतां तर पणजीच्या [गोव्याच्या राजधानीचें शहर] धक्का जवळच आला तेव्हां कसें काय संभाळून व० व्हावयाचें हें अनुभवा अंतींच ठरेल ह्मणजे झालें.

आमची बोट धक्याला लागली. प्रथमत: एक सोल्जर बोटींत आला आणि सर्व पॅसेजरांना उद्देशून ह्मणाला " एक कोण भायर सोरंक जाय ।। " एक दोन मिनिटांच्या आंतच डॉक्टर [सॅनिटरी इन्स्पेक्टर] आले व एकेका इसमाची नाडी पाहत त्या त्या इसमाना धक्यावर जाण्यास परवानगी देत होता प्रवाशांपैकीं एक यात्रेकरू होता तो गोव्यांचाच राहणारा होता असें त्याच्या बोलण्यावरून स्पष्ट कळत होतें. त्यानें श्रीकाशीयात्रेहून भागिरथीचा तांब्या भरून आणला होता तो तांब्या डॉक्टरच्या नजरेस पडतां तांब्यातील सगळी भागिरथी डॉक्टरनीं त्या सोलजरकडून समुद्रांत ओतविली, आणि त्या यात्रेकरूला उद्देशून डाक्टर ह्मणाला 'ओसलें उदोक केदींच आणूं नाकाय, किल्याकु तेंच्या पासोत ओशाचे रोग जातात.'

सगळ्यांच्या नाडी पाहिल्यावर उतारू धक्क्यावर आले. धक्क्यावर एक खिश्चन नोकर प्रत्येकांची नावें लिहीत होता, तिकडे आमची मंडळी गेली. आमचीं सगळ्यांचीं नांवें त्यानें आपल्या बूकमध्यें लिहून घेतलीं व आमच्याकडें जामीन मागूं लागला तिकडे आमच्या ओळखीचें कोणीच नव्हतें अर्थात आह्मांस लवकर निघण्याबद्दल त्याची विनवणी करावी लागली. परंतु, आमच्या कोरड्या विनवणीला तो थोडाच डगमगतो आहे. आमच्या सारखीच आणखीं वीस पंचवीस लोकांची जामिनासाठीं बरीच धांदल उडाली. कारण त्यांच्याहि ओळखीचें तिथें कोणीच नव्हते तरी पण त्यांतील एकानें आपली सुटका लक्ष्मीला पुढें घालून केली. ह्मणजे त्या क्लार्कच्या हातावर हळूच एक रुपयाची करन्सी नोट ठेवली आणि तो निघून गेली. " हीच युक्ति या प्रसंगीं केली तर आह्मीं लवकर जेवणखाणाला किंवा आपापल्या कामांला पोचूं न पेक्षां आतां धक्यावर ज्याप्रमाणें आह्मीं दोन तास उभे राहिलों तसेंच आणखीं किती वेळ रहावें लागेल याचा नेम नाहीं " असें त्या वीस पंचवीस लोकांपैकीं एकटा ह्मणाला. सगळयानां तेंच पसंत पडलें व त्यानी एकेकानें एक एक रुपयाप्रमाणें देऊन त्या मंडळींतील वीस एक माणसें त्याच्या तावडीतून सुटलीं. त्यांतील राहिलीं पांच माणसें. तीं पांचहि माणसें ह्मटलीं ह्मणजे एकच कुटुंब होतें. तें कुटुंब गोव्यांतीलच असून, गोवासरकारच्या रेजीस्त सिव्हिलाच्या अचाट खर्चाला भिवून नुकतेंच ब्रिटिश इंडियेंत लग्नाला ह्मणून गेलें होतें. असें मला त्या कुटुंबाच्या मालकाकडूनच कळलें.

हें कुटुंब मोठ्या गरीब स्थितीचें असल्यानें कांहीं थोडे बहुत पैसे बरोबर होते ते कधींच संपले. फक्त एक दोनच रुपये त्या मालकाच्या खिशांत राहिले होते, परंतु त्या रुपयांचा त्याला पुढें आवश्यक खर्च लागणार होता.

"पुढचें पुढें पाहतां येईल एकदांची इकडून तरी सुटका होऊं दे" असें तो मालक उद्गारला आणि त्या नोकराच्या हातांत त्यानें आपणाकडे असलेले दोनहि रुपये ठेऊन 'आह्मी लवकर मुक्तता करा' असें ह्मणून त्या नोकराला विनवूं लागला. परंतु तो नोकर ऐकतो कसचा ! त्यांच्या बेबंदशाहींतील लुटारू कोडग्या कलमावर वे प्रत्येक माणसामागें एक रुपया चोपून घ्यावा असें असतांना तो आपल्या नियमाला कधीं चुकेल काय ? नाहीं चुकायाचा त्या नोकरानें ते दोनहि रुपये परत केले व आणखी तीन देत असलास तर बरें. नाहीं तर उगीच वटवट करून मला त्रास करूं नकोस, असें त्या कुटुंबाच्या मालकास त्यानें सांगितलें.

ते दोनही रुपये त्या क्लार्कच्या टेबलावर ठेवून तो मालक त्या नोकराची परत विनवणी करूं लागला.

इकडे तिकडे कांहींच न पाहतां त्या लुटारू क्लार्कनें ते दोनही रुपये रागानें फेकून दिले.

पाहिलेंस गोवा सरकारचें राज्य ! पांडुतात्या ह्मणाले.

ईश्वरा काय ही जबरी !

पुढें धक्यावाहेरून नुकताच आलेल्या आमच्या एका स्नेह्याच्या सहाय्यानें त्या गरीब कुटुंबासहीत आह्मीं सगळी मंडळी एकदाची बाहेर पडलों व एका खाणावळींत आमचा मुक्काम दिला. दुपारीं जेवणं व० झाल्यावर तें कुटुंब आपल्या घराला गेलें व आह्मीं थेट श्री मंगेशीला जाण्यासाठीं वाफरकडे आलों. आम्हीं सगळयांनीं सेकंड क्लासचींच तिकिटें घेतलीं व बोटींत चढलों. काय ती वाफोरांतील घाणेरडी व्यवस्था ! भारतकार, ती आठवण काढली कीं अजून पर्यंत माझ्या अंगावर शहारे येतात. बाहेरच्या बाजूनें वाफरांत इतकें ऊन येत आहे कीं, पणजीहून सांवर्ड्यास पोंचेपर्यंत एक मनुष्य खुशाल कोरडा होईल. बसण्याची जागा अगदीं मोडक्या तोडक्या होऊन बऱ्याच सावधगिरीनें न बसल्यास जलसमाधी घेण्यास फारसा उशीर लागणार नाहीं. वाफरमध्यें उतारू असूनच घ्यावेत असा कांहीं नियम नसून येतील तितके मावत असतात, व त्यामुळें लहान मुलें व० चिरडून जाऊंन कासावीस होतात. खलाशांची तर धमकावणी कांहीं अशी तशी नाहीं. तें तर उतारूंच्या अंगावरूनच मशीनमधील अगदीं ऊन ऊन राख बाहेर टांकण्यासाठीं घेऊन जातात

रून दाखविण्यानें असले कारखाने उघडण्याकडे लोकांची प्रवृत्ति होण्यास आम्ही कारणीभूत होऊं अशी आम्हीं उमेद धरली आहे. तरी ज्या स्वदेशाभिमानी गृहस्थांची हे शेअर घेऊन कंपनीचे भागिदार होण्याची व आपल्या स्वतःच्या फायद्या बरोबरच देशाच्या औद्योगिक प्रगतीस हातभार लावण्याची इच्छा असेल त्यानीं खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा अशी विनंति आहे. प्रकृत धंद्यासंबंधानें आम्हीं जातीनिशीं विस्तृत माहिती घेऊन तो बराच फायदेशीर असल्याबद्दल पूर्ण खात्री करून घेतली आहे. व शेअर विकत घेण्याच्यापूर्वी कोणास या विषयीं खुलासा पाहिजे असल्यास तो करण्याची आमची तयारी आहे.

वि० सू० बहुतेक शेअर विकत घेण्याची खात्रीलायक आश्वासनें मिळतांच पुढील कार्यक्रम प्रसिद्ध करण्यांत येईल.

श्रीधर केशव कामत, क्लोथ मर्चंट
कुंडई–गोवा.

ta Almeida ou *popular ministerial* ou ainda *popular auditorial* defendem a sua atitude *altamente patriotica*, afirmando a todo o mundo e *son perc* que os sr. Prazeres da Costa e Celestino de Almeida libertará o paiz da formidavel queda que o ameaça.

Felizmente, a lista referida triunfou, com grande gaudio do *paiz inteiro*, esmagando ao mesmo tempo os *traidores*.

Não há portanto, agora, motivos para se dizer que somos um *povo desgraçado*.

Pois dora em diante, não teremos que pagar *novos impostos* nem curvar-nos a cerviz ante tantos disparates que conservam apartado da *civilisação* e *progresso* o nosso *ex-desventurado* paiz.

E' certo. A India Portuguesa vai ser agora, se o não foi ainda por culpa de *traidores* e *egoistas*, transformado num El-dorado, num verdadeiro paraiso .. terrestre.

Pedido justo

Remetido pelo nosso solicito correspondente de Bicholim recebemos uma copia da representação dos habitantes bicholenses. dirigida ao sr. Governador Geral e na qual pedem a conservação da Repartição da Fazenda d'ali, repartição cuja supressão os surpreendeu deveras.

E' perfeitamente justo o pedido e porisso esperamos que os competentes o tomarão em devida consideração.

Nota oficiosa

Da Administração do Concelho recebemos a seguinte nota oficiosa:-

Tendo saido a publico que o pessoal da Navegação Fluvial se tinha posto em greve por não serem atendidas as reclamações que vem fazendo ha perto de dois anos se informa haver equivoco, porquanto este pessoal viu a sua situação melhorada há menos de um ano quando da anterior greve, por uma proposta da Secretaria dos Serviços de Marinha aprovada então pelo Governo da Metropole, que tinha sido apresentada quando da discussão das propostas orçamentais e portanto muito anteriormente á declaração da mesma greve.

Há poucos dias reclamou o mesmo pessoal ao Governo deste Estado sobre a sua situação tendo sido no requerimento apresentado lançado o seguinte despacho por Sua Exia. o Governador Geral (Vai ser presente ao concelho um projecto sobre a situção deste pessoal. Este assunto será tratado pelo Conselho):-

Este despacho foi comunicado aos reclamantes que por isso não tinham razão alguma para se de declararem em greve sendo lhes perguntado o motivo deste movimento não o justificaram, alegando "não quererem o serviço".

Nestas condições foi determinado que o pessoal que dentro do prazo de 48 horas se não apresentasse ao serviço, fosse dispedido na certeza de que o Governo manterá firme esta sua decisão.

Secretaria dos Serviços de Marinha, em Nova-Goa 4 de Agosto de 1921,

O chefe dos Serviços da Marinha

(a) João Fiel Stockler

धर्म व आचार

(ले. श्री. गो. हेदे)

एकनाथ महाराजांनीं आपणास विटाळ झाला, म्हणून प्रत्यक्ष रीतीनें प्रतिकार न करितां किंवा तसेंच ओंवळें म्हणजे काय, असा समज धरून पुढें न जातां परत नदीवर जाऊन पुन्हां स्नान केलें असा ७!८ दां प्रकार झाला मुसलमानानें थुंकी टाकावी, व एकनाथमहाराजांनीं परत नदीवर जाऊन स्नान करावें ! शेवटीं मुसलमान कंटाळून जाऊन, त्यानें थुंकण्याचें सोडिलें !! व एकनाथ महाराजांस स्नानयुक्त सोंवळेपणानें जाऊं दिलें ! यांत त्यांनीं आपलें मनोधैर्य, सहनशीलता, अप्रत्यक्षप्रतिकार, कर्मनिष्ठपणा, चिकाटी, इ गुण जगास दाखवून त्याचा परिणामहि प्रत्ययास आणून दिला.

सात आठदां अंगावर थुंकी पडून विटाळ झाला तरी त्यांनीं आपलें कर्म सोडिलें नाहीं ! याचा परिणाम असा झाला कीं, यदा यदाहि धर्मस्यग्लानिर्भवति भारत । अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम ॥१॥ परित्राणाय साधूनाम विनाशायच दुष्कृताम ॥ धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ या गीतोक्तीप्रमाणें मग धर्माच्या व धर्म-कर्म पाळणाऱ्या साधूंच्या रक्षणार्थ, शिवाच्या रुपानें ईश्वरानें अवतार धारण करून हिंदुधर्माचें रक्षण केलें हिंदु लोकांस स्वातंत्र्य दिलें !! इ. इ. पुढील इतिहास वाचकांस ठाऊक असेलच असो.

सांगायाचें तात्पर्य इतकेंच कीं, स्वराज्य मिळण्यास स्वधर्म कर्म-त्याग करावयास नको आहे; तर स्वधर्म-कर्म-आचरिल्यानेच स्वराज्य मिळतें. हें एक कारण झालें. आतां दुसरें मुख्य कारण म्हटलें म्हणजे आमचा धर्म, आचार (कर्म) व रीति ह्या आरोग्य शास्त्राच्या [hygiene] पायावर उभारल्या गेल्या आहेत, हें होय ! धर्मानें वागण्यास आरोग्य पाहिजे, म्हणजे आरोग्य नाहीं तर धर्म पाळितां यावयाचा नाहीं. हें तत्व लक्षांत आणून आमच्या धर्मशास्त्रकारांनीं आमचें सदोदीत इहपरलोकीं कल्याण व्हावें, ह्या हेतूनें, आरोग्यशास्त्राच्या पायावर धर्मशास्त्र उभारून ठेविलें आहे ! या धर्म-कर्म शास्त्राप्रमाणें जर आम्ही हिंदु लोक वागूं तर आम्हांस बहुधा वैद्याचें घरीं जाण्याचा प्रसंग यावयाचा नाहीं, हें निःसंशय सिद्ध होय ! इतर धर्मशास्त्राच्या मुळाशीं हें आरोग्य शास्त्र नाहीं आहे ! त्यांचें धर्मशास्त्र [religião] निराळें व आरोग्य शास्त्र [hygiene] निराळें. परंतु आम्ही अधमांतले अधम बनून, खरें रत्न न ओळखून खोट्या रत्नाचा अंगीकार करूं लागलों आहों, हें खरोखरच आमचें दुर्दैवच होय ! आमच्या धर्मशास्त्रकारांचा अंतीम हेतु किती उदात्त पवित्र व लोक कल्याणकारी आहे बरें ! खरोखर त्यांचे आम्हां (आर्य) लोकांवर अगणित उपकार आहेत. यांत निखालस संशय नाहीं.

भारत

गुरुवार श्रावण शु० ८ मी १८४३

हे आमचे गुरूच नव्हत !

पणजीच्या पाठशाळेंतील पोर्तुगीज भाषेचे 'जादा' अध्यापक सि. आराऊज मास्कारेंजस् यांनीं गेल्या दिवसामागें आपल्या हिंदु विद्यार्थ्यांस अनुलक्षून पुढील उद्गार काढले:—जोंपर्यंत हिंदूंच्या डोक्यावर शेंडी लोंबकळत राहील,तोंपर्यंत त्यांनां पोर्तुगीज भाषेचें यथार्थ ज्ञान होणें कठीण आहे...माझ्या हातांत गव्हर्नरची सत्ता असती तर मी गोव्यांतील एकंदर मराठी शाळा बंद केल्या असत्या. इतकेंच नव्हे तर ब्रिटिश मुलखांतील मराठी वृत्त-मासिक पुस्तकांस गोव्यांत इतस्ततः थैमान घालण्याचीहि कायमची सक्त मनाई तावडतोब केली असती."

उपरिनिर्दिष्ठ अप्रबुद्ध व कोते विचार आणि ते बेजबाबदारपणें उच्चारणारे 'सांवळी साहेब' या दोनहि गोष्टीस आम्ही या जागीं महत्व दिलें नसतें. परंतु नकली युरोपीयन संस्कृतीनें वेअकली बनलेल्या बऱ्याच खिस्ती लोकांचीहि विचारसरणी सदरीलप्रमाणें असल्यावरून प्रस्तुत विषयावर दोन शब्द लिहावे लागत आहेत.

या 'सांवळी साहेबांच्या मतें', खरी सुधारणा काय ती पोर्तुगीज भाषाज्ञानावर अवलंबून असून, ती दृढ होण्यास अभक्ष्य भक्षण, अपेयपान व 'अपटुडेट' पाटलून या सैतानी त्रयीची नित्याराधना करणें जरूर आहे. शेंडी राखणें हें तर त्या शिक्षणाप रानटीपणाचें लक्षण वाटतें ! या विचारांतील अर्थशून्यता महात्मा गांधीची ऐकीव ओळख असलेलें आईचें दूध न सोडलेलें एखादें हिंदु मूल सुद्धां सहज सिद्ध करील. खरी सुधारणा भाषाज्ञानावरहि विसंबून नाहीं अगर मागें उल्लेखिलेल्या त्रयीवरहि नाहीं हें सत्य आतां प्रत्येक हिंदूच्या मनांत पूर्ण भिनून गेलेलें आहे, हें त्या अहमन्य साहेबांस काय ठाऊक !

गोव्यावर पोर्तुगीज लोकांचा ४०० वर्षें वर अमल आहे. इतक्या लांब अवधींत लो० टिळकांच्या म्हणण्याप्रमाणें "इंग्रजी हिंदुस्थानांत असणाऱ्या युरुपीयनास बटलर मिळणें सोपें करून ठेविल्याशिवाय" त्यांनीं दुसरें तें काय केलें ? जर आज हिंदु स्वातंत्र्योत्सुक झालेले दिसून येत आहेत व जर आज हिंदु स्वदेशाच्या कल्याणासाठीं, स्वदेशबांधवांच्या हितासाठीं कसलीहि आपत्ति खुषीनें भोगण्यास मागें पहात नाहीत तर या आशाजनक क्रांतीचें सर्व श्रेय मराठी शिक्षणास व इंग्रजी हिंदुस्थानांतील मराठी वृत्त मासिकांसच आहे, हें युरोपीयन संस्कृतीनें स्वत्वास मुकलेल्या 'कुऱ्हाडीच्या दांड्यास' समजूं नये व समजलें तरी उमजूं नये, ही फार लज्यास्पद गोष्ट होय !

परंतु शेंडी व पोर्तुगीज भाषेचें ज्ञान या उभय गोष्टींतील परस्पर विरोधाचा नूतन शोध लावून सि. मास्कारेंजानें खुद्द मूर्खचिंतामणीवरहि ताण केली आहे ! जणूं काय पोर्तुगीज भाषा करतलामलवत् असलेले 'शेंडीवाले' हिंदु हिंदून नव्हत. तरी बरें कीं, आमच्या गोव्यांतील पेजखाऊ लोकांसमोर प्रस्तुत प्रकार घडला. दुसऱ्या कोठेंहि जर तो घडला असता, तर आराऊझसाहेब स्वच्छ पाटलुणीनें व धड डोक्यानें पाठशाळेच्या इमारतींतून बाहेर निघण्यास शक्य झाले असते कीं काय, याचा संशयच आहे !

दुसरें,आमची भाषा पोर्तुगीज नसल्यानें ती आम्हांस यथार्थ न कळल्यानें राष्ट्राचें नुकसान होईल अशांतलाहि प्रकार नाहीं. लाला लजपतरायांच्या म्हणण्याप्रमाणें आम्हांस परकीय भाषेचें गरज भागविण्यापुरतें ज्ञान असलें कीं पुरे. महात्मा गांधीप्रभृतींचीहि विचारसरणी याच सारखी आहे.

अशा स्थितींत सि. आराऊझ मास्कारेंजस सारख्या आपल्याच देशबंधूंवर कुत्सित बुद्धीनें निष्कारण अश्रु पोरडणाऱ्या मूर्ख, अहंमन्य व बेमुर्वतखोर गुरुंस 'गुरूं मानल्यास अन्याय होईल असें आम्हांस तरी निदान वाटत नाहीं. असले लोक 'हे आमचे गुरूच नव्हत.'

स्फुट विचार

सौंदरापानः— सध्या आमच्या या लहानशा गोमांतक प्रांतांत मद्यपानाचें व्यसन इतकें कांहीं बळावत चाललें आहे कीं, त्याचा फैलाव सुशिक्षित वर्गांत सुद्धां झालेला आढळून येत आहे. अतिशय भयंकर व खेदाची गोष्ट म्हटली म्हणजे एवढीच कीं, कांहीं पुढारी लोक सुद्धां या व्यसनांचा तीव्र निषेध करणें बाजूला ठेवून उलट त्याच्याच नादीं लागलेले दिसत आहेत. फार वेळ नको, हें प्रस्थ आणखीं कांहीं वर्षें वाढत राहिलें तर गोमांतकाची राखरांगोळी होण्यास फारसा उशीर लागणार नाहीं.

परिणामः मद्यपानानें हमेशा भयंकर परिणाम घडत असतात. हें शरीराची व अक्कलेची हानि करतें. दारू पिऊन गटारांत लोळतांना आपण पुष्कळांना हमेशा पाहतों; त्यांच्याबद्दल आपणाला तिरस्कार येत नाहीं काय? सुरामत्त होवून कलह करून घरांत शिव्यागाळींचा वर्षाव चालू ठेऊन गोंधळ माजविणाराबद्दल आपल्याला चिळस वाटत नाहीं काय ?

उदाहरणें:— दारू अतिशय झाली म्हणजे कित्येक लोक पाण्यांत बुडून मरतात, कित्येक रक्ताच्या वांत्या होऊन मरतात,तर कित्येक थंडींत 'कांकडून' गार होतात. नुकसान किती भयंकर होतें? हें व्यसन म्हणजे घराला आग लावून त्यावर हात शेकीत बसण्यासारखें होय. यादवानीं या व्यसनापायींच आत्मनाश करून घेतला. संभाजी राजा या व्यसनामुळेंच मतीभ्रष्ट होऊन शेवटीं त्यांतच मोंगलाच्या हस्तगत होऊन वध पावला अशीं पुष्कळ अलिकडील-गोव्यांतील- सुद्धां उदाहरणें मिळतील परंतु विस्तारभयास्तव देतां येत नाहींत. असो.

विनंतिः— आतां सगळ्यांस आमची अतिशय कळकळीची व नम्र विनंति एवढीच आहे कीं, इतके दिवस काय होऊन गेलें, तें गेलें आतां तरी या भयंकर व्यसनाबद्दल प्रत्येकानें विचार केला पाहिजे. खेड्यापाड्यांतील दारूचीं दुकानें बंद केलीं पाहिजे. जो कोणी दारू पीत असेल त्याला ब्रिटिश इंडियेंतल्या चळवळीलोकांप्रमाणें गळ्यांत माळा व० घालून गाढवावर बसवून त्याची गावांत धिंड काढली पाहिजे. प्रत्येक ठिकाणदारानें आपल्या ठिकाणांतील माड सुरीस देण्याचें बंद केलें पाहिजे.

भासद मिळवून कौंसेल्य कमेट्या स्थापन व्हावे, व संघास देशकार्यक्षम करून सर्व करण्याच्या कामास सुरुवात झाली आहे. तरी सर्व सद्गृहस्थानीं संघाबद्दल दुजाभाव न ठेवतां, तसेंच नुकत्याच होऊन गेलेल्या निवडणुकीच्या प्रसंगीं मतभेदामुळें झालेल्या वाग्युद्धांत सदरहू धोरणाशीं विसंगत असा शब्दच्छल कोणाहीकडून झालेला असेल तर तो निवडणुकींतील चुरशीमुळें क्षणमात्र गढूळ झालेल्या वातावरणाचा परिणाम समजून जन्मास येऊन अद्याप नामकरणाशिवाय इतर कोणतेही संस्कार रीतसर न झालेल्या या संघरूपी बालकास त्याचा संसर्ग दोष न होऊं देतां; स्वतः सभासद होऊन मिळवील तितके ज्यास्त सभासद मिळवून हिंदु जनतेची इभ्रत, लौकीक व दर्जा वाढविण्याचें श्रेय संपादन करावें; अशी सर्व हिंदु नागरिकांपाशीं अत्यंत आग्रहाची अत्यंत कळकळीची व अत्यंत नम्रतापूर्वक विनति आहे.

वि॰ सूचना— घटनेंत प्रतिज्ञापत्राचा जो नमुना दिला आहे तो संस्थेच्या नियमाप्रमाणें कौंसेल्य कमिट्या स्थापन झाल्यानंतर उपयोगांत आणावयाचा आहे. अर्थात त्याच्या अगोदर होणाऱ्या सभासदांकरितां प्रतिज्ञा लेख निराळा असणें इष्ट होतें हें उघड आहे. ह्मणून तो गेल्या अंकाच्या पृ॰ ४ वर दिल्याप्रमाणें केला आहे.

आपले नम्र

[कार्यकारी मंडळ.]

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई.
सीताराम विश्वंभर केरकर.
भास्कर प्रतापराव सरदेसाई.
पुरुषोत्तम श्रीनिवास सुकेरकर.
आत्माराम गोविंद बोरकर.
शांताराम धर्माजी डांगी.
रघुनाथ अनंत भांडारी.
दत्तात्रय व्यंकटेश पै.

---

nha, assim como a derrota da lista *sabór sa*, quando se soube da sua *desistencia* e *inelegibilidade*, verdadeira ou falsamente *manifestados*

E' que o Prazer tantó dançou que acordou a dôr !

Que, pelo menos, agora, o dito Prazer se convença de que a India deixou de considera-lo seu idolo *proclamado* e mude de rumo que sempre havemos de estar-lhe ao lado. Pois não !

Pragatica Sangh

Lá porque um grupelho de hindus escreveu em qualquer *manifesto eleitoral* que este *sangh* não era de todos os hindus, por banda dos *Pragaticas* houve ferro e fogo mas sem razão.

¿Então pode haver no mundo que habitamos uma coisa que seja de *todos*, uma coisa de que todos possam tirar *partido* ao mesmo tempo ?

Se não, ¿ não é sem razão de ser tanto escarceu que se levantou em volta duma afirmação, de mais a mais, gratuita, duns cavalheiros , oportunistas que surgiram como cogumelos de epocas invernais ou antes caciques de tempos eleitorais ?

O *Pragatica Sangh não é de todos os hindus?* Seja; mas êle não obstante a desistencia do seu candidato, deu-lhe a este uma votação quasi igual a um quarto da que teve o candidato da lista adversa secundada por tantos propagandistas !

Inelegivel

O sr. Prazeres da Costa é *inelegivel*, na opinião de muitos advogados insuspeitos, diz-se

Inelegivel ele que elege ministros ?

Não o acreditamos !

ECOS & CRITICA

Perguntas inocentes

¿Porque é que o sr. Ministro das Colonias *candidato popular* (?) não respondeu á mensagem telegrafica dos vogais, tambem populares do C. L, pedindo a suspensão do decreto da equiparação, ele que tão prontamente respondeu á pretenção burocratica ?

¿Porque é que o sr. Prazeres, outro candidato *popular* (!) não empregou até hoje a sua valiosa influencia para reduzir o *deficit*, ele que só concorreu para o agravar, criando funcções desnecessarias, apenas para anichar, como por ai se fala, tanto *amigo, parente* e *visinho seu* ?

São perguntas que nos são feitas por alguns eleitores a quem os partidarios dos mesmos candidatos foram pedir votos, acentuando que eles acabariam com novos impostos, *deficit* e tudo o mais . . .

Ora, só temos que dizer-lhes que se enganaram com o numero da porta, pois quem os pode elucidar nessa *materia eleitoral* são os procuradores da lista *popular*.

Um dialogo eleitoral

— Oh amigo, você, custe o que custar tem de dar o seu voto á lista do Sr. Prazeres da Costa, se não quizer pagar mais impostos nem ver a India com *deficit*

— Pois, então, o sr. Costa vai acabar com tudo *isso* ?! Mas — franqueza franca — não lhe foi suficiente o longo periodo de dez anos para tal fazer, diga lá ?

— Ora oiça ! — mas isso fica entre nós — o sr. Costa durante o tempo a que se refere tinha de servir os seus por quem era apoquentado. E agora, como tudo está servido . . . á *tripa forra*, Sua exia. há de empregar toda a sua energia para *acabar com os impostos* e *matar* o *deficit* Entende ?

— Então você garante que de facto terminaram as apoquentações da sucia de *parentes, vizinhos* e *amigos* do sr. Auditor.

— Pois não, garanto-lhe sob palavra d'honra !

— Passe neste caso para cá a lista desse Messias Salvador.

De Constantino a . . . Celestino

Os que quatro dias antes trabalhavam a favor do sr. Constantino movidos como que por uma mola, voltaram-lhe, á ultima hora, as costas bandeando se para o acampamento do sr. *popular* ministro a quem, como se diz á boca cheia, ofereceram o lugar de senador.

Porque seria ?

¿Porventura aqueles senhores *patriotas* ignoravam que nesta hora *grave*, o unico que podia salvar-nos era o sr. ministro e souberam-no *só* quatro dias antes da realisação das eleições . . retardadas ?

Não respondemos, porque o publico não ignora o *porquê* de todas essas *reviravoltas* que longe de dignificar aviltam só.

वर्तमानसार

—काकोडें येथें पिकेटिंगला सुरुवात झाली असून दारूच्या विक्रीचें प्रमाण तेथें कमी व्हावयास लागलें आहे, असें एक वाचक कळवितात. आनंदाची गोष्ट !

—गोव्यांत ठिकठिकाणी गांधी टोप्यांचा व स्वदेशीचा प्रसार व्हावयास लागला असून 'साधी रहाणी व उच्च विचारसरणी' या तत्वाचें महत्व लोकांस कळावयास लागलें आहे. छान !

—प्रागतिक संघाचें स्वयंसेवक नवीन सभासद मिळविण्यासाठीं लवकरच फिरतीवर निघणार आहेत. लोकांकडून त्यांस हरतऱ्हेचें सहाय्य मिळेल, अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे.

—सि. प्राजेरीस द कोस्त हे 'येन केन प्रकारेण' देपुताद निवडून आल्यामुळें, त्यांच्या निरपेक्ष मित्रांनीं फक्त मदिरापानीं शेंकडो रुपयांचा धुव्वा उडवून दिला ! मजा आला ! अगदीं असेंच !

भारत

गुरुवार श्रावण शु० १ दा १८४३

प्रगतिपथ आक्रमा !

आमच्या देशापासून किती तरी दूर असलेल्या युरोपांतील लोकांनीं इकडे येऊन हा देश पादाक्रांत केला व येथें आपलें राज्य स्थापून आपल्या सत्तेखालीं आम्हांला दडपून टाकलें; याचें इंगित काय ?

ह्या देशांतील लोकांच्या अंगीं राष्ट्रीयत्वाची भावना जशी असावयास पाहिजे तशी नव्हती व नाहीं, हें ह्या गोष्टीचें मुख्य कारण आहे.

गोमांतकांतील लोकांच्या ठायीं राष्ट्रीयत्वाची भावना कमी परंतु अभिमान पुष्कळ आहे. देशाभिमानाच्या ऐवजीं गोमांतकीयांच्या अंगीं कुलाभिमान व जात्याभिमान आहे. परंतु कुलाभिमान फाजील झाल्यामुळें रजपुतांच्या हातून व्हावें तसें देशहित झालें नाहीं व जात्याभिमान फाजील झाल्यामुळें पेशवाईत मराठ्यांचें पुष्कळ नुकसान झालें. आतां आपणापैकीं बऱ्याच लोकांना राष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न झाली आहे, परंतु फाजील जात्याभिमान अजून आपल्या अंगीं मुरून राहिलेला आहे. व त्यामुळें आपलें अनेक प्रकारें नुकसान होऊन आम्हांला हरएक तऱ्हेचे त्रास सहन करावे लागत आहेत.

जातीचीं बंधनें शिथील करून देशहित साधण्यासाठीं आज आपण कंबर बांधली पाहिजे. मी अमुक जातीचा आहें व गोमांतकाचें कल्याण साधण्यासाठीं मला तनमनधन अर्पण केलें पाहिजे, ही गोष्ट प्रत्येकानें हृदयांत बाळगिली पाहिजे.

मी हिंदू आहें, तो ख्रिश्चन आहे असा आमच्या मनांत द्वैतभाव पार उडवून देऊन बंधुत्वाचें क्षेत्र आपण वाढविलें पाहिजे. आपण सर्वजण एका देशाचे, एका राष्ट्राचें, एकाच पंक्तीचे आहों ही भावना नेहमी जागृत ठेविली पाहिजे. क्षुद्र रागद्वेष, क्षुद्र स्पर्धा, परस्परांतील जातिमत्सर इ० मत्सर बाजूला ठेवून हृदयाला जखडून धरणारीं, मनोवृत्ति आकुंचित करणारीं बंधनें तोडून टाकून खुल्या हवेंत संचार करण्याची इच्छा बाळगिली पाहिजे. डोळे बांधून घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणें आणखीं किती दिवस आम्हीं लहानशा जागेत चक्राकार फिरत राहणार ? इतर राष्ट्रें झपाट्यानें पुढें पाऊल टाकीत आहेत आमच्या शेजारच्याच ब्रिटिश हिंदी लोकांकडे पहा !

प्रगतीचा मार्ग आपल्यापुढें खुला आहे कर्तव्याची रेषा आपल्याला स्पष्ट दिसत आहे. तर चला, अंधारांतून आपण उजेडांत येऊं, निद्रावस्थेंतून जागे होऊं आणि आपल्या स्वार्थत्यागानें, विचारशीलतेनें, बाणेदार भाषणानें व उदार आणि थोर आचरणानें आमचें स्वातंत्र्य सर्वस्वी लुबाडणाऱ्यांना आम्हीं बायको माणसें नसून मर्द पुरुष आहों असें दाखवूं !

हर हर महादेव !

स्फुट विचार

परिसमाप्ति !:—कोणत्याहि राष्ट्राच्या जेव्हां परिसमाप्तीची वेळ येते, तेव्हां त्या राष्ट्रांत बेबंदशाही माजावयाची, अत्याचार व्हावयाचे, थोडक्यांत म्हटलें म्हणजे 'हम करेसो कायदा' हें तत्व प्रचलित असावयाचें व त्यामुळें बळी तो कान पिळी असें व्हावयाचें. ज्याच्या अंगांत बळ आहे त्यानें आपल्या शक्तीचा प्रभाव अत्याचार करण्यांत दाखवावयाचा. व जे अशक्त दीन दुबळे आहेत त्यांनीं धाय मोकलून हंबरडा फोडण्यापलीकडे ते बिचारे काय करणार ? हीं सगळीं चिन्हें कशाचीं बरें ? समाप्तीचीं ! सार्वभौम दुर्योधनाचें राज्य जाण्याचे वेळीं त्याच्या राज्यांत सर्वत्र बेबंदशाही व अत्याचार सुरू झाले; पेशवाईच्या अंतकाळींहि अशीच बेबंदशाही माजली व त्याच तऱ्हेची बेबंदशाही व अत्याचारानीं दुर्दैवानें सध्यां आमच्या राष्ट्रांत आपलें साम्राज्य ठोकलें आहे.

पुरावा:—'परवां मडगांवच्या आलेंहें पत्राच्या संपादकांस आमच्या सरकारच्या युरोपियन मिलटरी आफिसरांनीं मडगांव शहराबाहेर नेऊन मनांत यत्किंचितहि दया न बाळगितां कसा चोप दिला हें आतां सर्वश्रुतच आहे. त्यांनीं राज्यांत स्वस्थता राखावी व दंग्यांस आळा घालावा अशा या भक्कम पगार भक्षक लोकांकडून वरील तऱ्हेचे अत्याचार होणें म्हणजेच राष्ट्राच्या अंतकालची वेळ समीप येणें होय' असें एक लेखक म्हणतो.

राखरांगोळी करा !:—जर तुम्हांला अशा तऱ्हेचे अत्याचार करणें आहे तर कायदेकानू तरी कां केले ? सिव्हील, पिनेल अशीं कोडें करण्यांत तरी फुकटचा श्रम कां घेतला ? राज्य तुमचेंच आहे. तुम्हांला कोणाची भीति नाहीं की पर्वा. शक्तीच्या जोरावर आसुरी अत्याचार करीत मर्द राष्ट्रभर तुम्हीं पाहिजे तसा धांगडधिंगा घाला. प्रजेच्या दुःखाकडे बिलकूल लक्ष्य देऊं नका. डोईजडकरांमुळें प्रजेचीं डोकीं जरीं भूमीला टेंकलीं तरी त्याकडें बिलकूल नजर न देता तुमचे पगार मोठ्या प्रमाणानें वाढवा व त्याच्या भरपाईसाठीं लोकांवर आणखीहि भयंकर रीतीनें करवाढी करा. राज्यांत शांतता कधींहि राखूं नका. कोणालाहि न्याय मुळींच मिळूं देऊं नका. आणि शेवटीं अशा या सर्व तऱ्हेनें गांजलेल्या प्रजेस स्मशान भूमींत सुद्धां तुम्हीच घेऊन चला व राखरांगोळी करून टाका; असें दुसरा लेखक उद्गारतो.

बेबंदशाही:—सध्यां या राष्ट्रांत बेबंदशाहीचें साम्राज्य किती अवाढव्य पसरलें आहे ! कोणत्याहि गोष्टीला सीमा असते; परंतु, ह्या गोमांतकीय बेबंदशाहीला मुळींच सीमा राहिली नाहीं. इकडे जर का आमचें सरकार लक्ष्य देतें तर किती उत्तम झालें असतें ! प्रजेचीं दुःखें तर बाजूलाच राहोत. परंतु सरकार सर्वत्र नजर सारखी देत नसल्यानें बेबंदशाहीनें राष्ट्रांत आपलें साम्राज्य स्थापिलें असून त्यामुळें त्याला सुद्धां बराच धक्का लागेल, यांत शंका नाहीं, असें आम्हीं म्हणतों.

—श्री. निळकंठ विठ्ठल दळवी यांनीं प्रागतिक संघाच्या स्वयंसेवकांच्या यादींत आपला समावेश करून घेतला आहे.

cional do *Diario* por estes dois motivos principaes:-

1 ° porque vinha sem o seu *diz-se*; 2 ° porque parecia tendente a comprometer-nos diante do publico com o *Pragatica Sangh*. Se não fossem estes dois motivos não,nos apressariamos a dirigir certa áquele diario, desmentindo-o mesmo infundadamentado boato que de resto ficou reduzido ás suas justas propor çóes perante o resulado das eleições da assemblea da naturalidade de quem estas linhas escreve, assemblea em que o senador da nossa lista triunfou e a do deputado teve apenas uma minoria de 8 votos dos *estranhos* não obstante a sua desistencia e titanicos esforços da lista adversa.

¿Mas para que havemos de gastar cera com uma noticia, referente ás eleições que passaram para a historia ?!

O que outros dizem

O Conselho Legislativo votou por maioria que a regente da Escola Nacional fosse equiparada aos directores da Escola Normal, Instituto Comercial etc

Verdade é que esse cargo é duma certa responsabilidade, como todos os demais e como tal incluiram-na nesta classe, pondo de parte os argumentos bem fundados e irrefutaveis do sr. João de Figueiredo. Perguntou ele que habilitações necessarias eram exigidas para exercer competentemente aquele cargo, ao passo que a queles a quem a equiparavam tinham de se sujeitar a varios cursos e concursos.

Uns apoiaram-no e outros que descordaram, responderam que desde que ela tinha de fiscalizar tudo o que lá se passa, seria um absurdo vencer ela pagamento igual ou menos que os seus subordinados como por exemplo, professores primarios oficiaes, mas que nenhum documento comprobativo da competencia era-lhe *nessessaria* porque a lei na a exprimia a esse respeito.

Ela tem de ter categoria em dinheiro mais do que os seus subordinados ? Pois então por que é que não deve te-la tambem em competencia legalmente comprov[illegible] ? O dinheiro suprirá esta f[illegible] ?

II

Falou-se p[illegible] muito tempo, que os professores primarios, nesta onda de aumentos digo da equiparação iam ser condignamente remunerados. Mas, o monte pariu rato e isto é somente porque a sua classe é *numerosa* e por consequencia iria ferir gravemente o tesouro.

Parece, porem, que esses senhores que tiveram muita pena por tesouro não enumeraram os professores nem os compararam com tantos oficiais de exercito que sem necessidade alguma ao paiz estão andando só de trens e automoveis.

Estes tem de vencer mais porque algum dia tem de sacrificar a sua vida para a defeza da Patria e aqueles e só aqueles tem de dar bons filhos á patria, e nestas condições os professores deviam ganhar tanto como um alferes. ou ao menos um sargento.

Falaram muito os vogais,ele varam ao cumulo de sacrificios a sua ardua missão, descreveram em comoventes expressões a lamentavel sorte a que estão votados, mas em fim tudo isto terminou por um aumento insignificante, dando-lhes somente o suficiente para o *tabaco* e *mainata*.

Qual é o criterio seguido para esta medida ? Ninguem o disse. Será para eles serem economicos para eles não se inclinarem para o luxo ou quaisquer destas man festações da civilização que sendo vistas pelas crianças surgirá o receio de elas as imitarem ? Ou será porque em vista de *deficit* se sintam com a necessidade de os futuros cidadãos serem capazes de produzir mais e gastar menos,ao contrario do que se vê agora e de o professor ter de ensinar isto politicamente.

Viskva Bandhn

धर्म व आचार

(ले. श्री. गो. हेदे)

आमच्या हिंदुधर्मास [illegible] राजाश्रय नाहीं, व यामुळें तो अस्ति[illegible]ला नामशेष होऊं पहात आहे. याचें [illegible] हेंच कीं, आह्मास सध्या धर्माचे [illegible] आडकाठी करणारा कोणींच [illegible]वरून आह्मांकडून यथायोग्य रीतीनें धर्माचें पालन होत नाहीं; आह्मांस आज आमच्यावर परकी राजा राज्य करीत असल्यामुळें धर्माचे बाबतींत पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य आहे--यामुळें आह्मीं धर्माचे बाबतींत जें काय आह्मांस करावयास पाहिजे तें करतों. आह्मांस विचारणारा कोणी नाहीं. धर्मगुरु आहेत पण त्यानां [illegible] जुमानतो व विचारतो कोण? त्यांला राजाश्रय नसल्यामुळें ते कमकुवत होऊन असून नसून सारखेच आहेत. अशी त्यांची स्थिति. आह्मांस पाहिजे तशी आह्मीं धर्माचे बाबतींत ढवळाढवळ करावी, विचारतो आहे कोण ? एवंच आह्मांस दोन्हीं बंधनें नसल्यामुळें आह्मीं हिंदु लोक धर्माचे बाबतींत मोकळे व स्वतंत्र असून आमची स्थिति, गोरक्षक व दावें नसलेल्या गुराप्रमाणें आहे, ह्मणजे ज्या प्रमाणें गोरक्षक व दावें नसलेला बैल, तो मोकळा व स्वतंत्र असल्याकारणानें त्यास इकडे जाऊं किंवा तिकडे भडकूं, हें शेत खाण्यांस चांगलें किंवा तें शेत चांगलें, असें होऊन तो सैरा बैरा धांवत सुटतो तद्वत आमची स्थिति आहे. व अशी स्थिति झाली असल्यानें आह्मीं दिवसें दिवस धर्मभ्रष्ट व आचारभ्रष्ट (कर्मभ्रष्ट] होत चाललों आहों. व हेंच आमच्या अवनतीचें मुख्यतः कारण होय !

A portaria que mandou executár aquele decreto determinava que a taxa acaba, esgotados seis mezes depois de terminado o estado da guerra que terminou com a publicação do decreto de 6 de Abril de 1920, consequentemente a taxa deixaria de se cobrar desde 11 de Novembro de 1920.

E portanto o artigo publicado no Bharat de 6 de Maio de 1920 foi alem de mais inoportuno e contrario á verdade.

Ao 2º. O § 2º. arto. 7 do cit. decreto nº 1 de 29-3-90 incrimina a ofensa por meio de publicação a algum dos poderes politicos legitimamente constituidos ou a quaisquer corporaçóes.

O Estado ou a nação é uma personalidade colectiva abrangendo todos os poderes politicos, legitimamente constituidos, consequentemente a ofensa feita a todos os poderes do Estado está abrangida na incriminação do §2º do arto. 7 do cit. dec. de 1890.

O ilustre lente da faculdade de Direito na Universidade de Coimbra Dr. Guilherme Moreira no lugar citado pelo digno A. do M. P. considera o Estado como uma corporação politica e neste presuposto tambem as palavras incriminadas estão abrangidas na desposição citada.

Alega o réu que os crimes da imprensa são hoje regulados pelo dec. de 20 de Outubro de 1910

Com esta data nenhum decreto sobre imprensa foi publicado, mas em 28 do mesmo mez e ano, decreto este que ainda não está em vigor no ultramar.

A admitir-se a doutrina do juiz *aquo* nenhuma difamação ou injuria contra o Estado poderia ser punida.

E provando-se pelo depoimento das testimunhas inqueridas que o jornal tem uma tiragem superior a 500 exemplares.

A Relação acorda em conferencia em revogar a decisão recorrida e julgando a acusação procedente e provada condenam o reu na pena de trinta dias de prisão correcional e sessenta mil reis de multa, selos e custas dos autos, mas:

Atendendo a que o reu não tem antecedentes judiciarios e o seu bom comportamento anterior ficou provado pelo depoimento das testimunhas inquiridas, substituem a prisão por multa a mil reis por dia. Pangim, 22 de Abril de 1921. as.) A Santos Vás. A. Roque Torgal. Emerico Alpoim.

काय हा अंधःकार !

काय हें अंधःकाराचें साम्राज्य ! या गोमांतका ! तू अजूनहि अंधःकाराच्या खोल गर्तेंत आहेस ना ! तुझेंच दुर्दैव दुसरें काय? प्रिय गोमांतकीय बंधूनो ! तुम्हीं अजूनहि निद्रासुख घेत आहांत ना! शाबास! प्रजा असावी तर अशीं गोमांतकीयांसारखी राजनिष्ठ असावी आज चार शतकांवर वय लोटलीं, गोमांतक पोर्तुगीजांच्या स्वाधीन आहे. ह्यांच्या प्रजापालनाच्या नेमामुळें गोमांतकीय प्रजा नोकरशाहीच्या पायांखालीं साखर झोप घेत आहे. सर्व जगभर चोहोंकडे तेजोमय स्वातंत्र्य सूर्यप्रभा पसरली तरी अद्यापि त्यानीं डोळे सुद्धां उघडले नाहींत!

गोमांतकाची सहनशक्ति इतकी वाढली आहे कीं, एक देवेळीं अखिल गोमांतकीय प्रजाजनांना तोफेच्या एकाच गोळीनें मारलें पाहिजे. करितां एकंदर लोकानां योग्य त्या तऱ्हेनें राहण्यासाठीं एखादी वर्दी आल्यास सगळे एकसारखे राहून प्राण देतील, मागें पुढें सरकणार नाहींत. खरोखरच निश्चय असावा तर असाच असावा.

सरकारनें ठिकाणदारांवर नवीन कर लादले, इतर टक्स वाढवले व आपण रणांगणांत जाण्याच्या पूर्वींच वॉरटॅक्स (Taxa de guerra) चा नवीन कर लादला! अहाहा!

नोकरशाहीनेंतर प्रजाजनांचा द्रव्यरूपी प्राण आपणाकडे सुरक्षित ठेवण्याची परमावधीच केली आहे. एकदरीत गोमांतकांत अजून कांहीं उजाडलें नसून भर मध्य रात्रीची वेळ झाली आहे. व त्या मुळें अखिल गोमांतकीय प्रजाजन गुलामी झोपेंत गुंगून पडले आहेत!

फक्त तेथील हातांच्या बोटावरच मोजण्याइतकें वर्तमानपत्र रूपी कोंबडे मात्र काय ते आरवत असतात. त्यामुळें दुरून पाहणाऱ्याला येथें देश आहे असें कळतें.

प्रिय गोमांतकीय, तुम्हांवर लत्ताप्रहार झाले तरी तुम्हीं अद्यापि घोरत आहांत खरे परंतु एक वेळ अशी येईल कीं, तुम्ही निद्रासुख घेत असलेलें बिछाने सुद्धा स्वारी लोक घेऊन जातील; व तुम्हीं अन्न न खाल तरी आतां ज्याप्रमाणें भूमीला, पोट लावून निजत असतां तें निद्रासुख सुद्धा तुमचे बिछाने गेल्यामुळें तुम्हाला खास अंतरणार!

सर्वत्र अंधःकार असल्यानें कांहीं सूज्ञ लोक सरकारकडे सुमती दिव्याची याचना करीत आहेत. पण तिकडे लक्ष्य देतो कोण! बोंब ठोकली तरी कोणी ओ देत नाहीं केवळ ह्याच साठीं व त्याना एका मनुष्या पेक्षां मोठा कंठ असल्यानें वर्तमान पत्ररूपी कोंबडे सरकारकडे सुमती दिव्याच्या प्रकाशाच्या याचनेसाठीं आरवत आहेत. परंतु सरकार प्रकाश तर देत नाहींच, उलट ह्या कोंबड्यांची मुस्कटदाबी करण्यास प्रवृत्त होतें. मग गोमांतका ! हें तुझेंच दुर्दैव नव्हे तर कुणाचें?

गोमांतकीय पोर्तुगीज लढाईला तर गेले नाहींच, परंतु वॉर टॅक्स (Taxa de guerra) त्यांस चुकला नाहीं. बरें, टॅक्स घातला तरी कांहीं चिंता नव्हती. लढाई संपून किती तरी दिवस गेले, तरी हा टॅक्स रद्द करण्याचा नाहीं हें काय ? व ही खरी गोष्ट भारत पत्रानें प्रसिद्ध केल्याबद्दल भारत पत्रावर क्रिमिनल खटला उभारण्यांत यावा याला काय ह्मणावें!

एकीकडे वर्तमान पत्रांस खरी खबर सुद्धा प्रसिद्ध करण्यास बंदी, तर दुसरीकडे व्याख्यातोंना कै. लो. टिळक व म. गांधी यांचीं नावेंच घेण्यास बंदी. अशा रीतीनें सत्तेचा दुरुपयोग करून लोकांना तोंड दाबून बुक्क्यांचा मार देणें हें प्रजाजनांचें रक्षण कीं भक्षण ?

सत्तेच्या जोरावर खुशाल तुम्हांला पाहिजे तसा धांगडधिंगा घाला. परंतु एक मात्र ध्यानांत ठेवा, कीं, संसारांतील चंगळेचे दिवस कांहीं सारखेच नसतात. हें युग सुधारणेचें आहे, स्वातंत्र्याचें आहे, स्वसंरक्षणाच्या तत्वाचें आहे. पाशवी शक्तीच्या जोरावर एका व्यक्तीच्या अगर अनेक विशिष्ट व्यक्तींच्या मूठभर समूहानें अनियंत्रित बेलगामी सुलतानशाही गाजविण्याचा हा काल नाहीं. उलट अशा पाशवी शक्तीच्या पायावर उभ्या राहिलेल्या एकतंत्री साम्राज्यांच्या टोलेजंग इमारती कोसळून पडलेल्या आपण आज डोळ्यांपुढें पहात आहों. पूर्ण लोकशाहीचा हा काल असल्यानें ह्या वेळीं अनियंत्रित सत्तेचें अगर पाशवी सामर्थ्याचें प्रदर्शन करूं लागल्यास कदाचित् किंचित् काल पर्यंत त्यांस यश येईल; पण शेवटीं या अन्यायमूलक अनियंत्रित सत्तेचा अगर पाशवी सामर्थ्याचा नायनाट झाल्यावांचून राहणें शक्य नाहीं. मी दांडगा, मी अधिक सशक्त, मी अधिक सामर्थ्यवान केवळ एवढ्याच कारणानें एकाद्या व्यक्तीला दुसऱ्या अशक्त, सामर्थ्यहीन अशा घोरत पडलेल्या लोकांवर जुलूम करणें किंचित काल शक्य असलें तरी अंतीं अशा जुलुमाचें कडु फळ त्याला भोगल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

पोर्तुगीज राष्ट्र खरोखरच दयाळू आहे. परंतु त्याचें आपल्या नोकरांकडे असावें तसें लक्ष नसल्यानें, गोमांतकांतील नोकरशाहीच्या अंगांत सुलतानशाहींतील भूतांचा संचार झालेला दिसत आहे. तेव्हां वेळींच सावध होणें हें पोर्तुगीज सुरसद्यांचें कर्तव्य कर्म आहे.

गोमांतकीय बंधूनो ! भारतावर जे खटले उभारण्यात आले आहेत ते भारतकारानीं केवळ स्वतःच्या स्वार्थामुळे ओढवून आणलेले नसून अखिल गोमांतकीयांच्या कल्याणासाठीं आहेत. हें आह्मी पूर्ण लक्ष्यांत ठेवून आमच्या गोमांतकीय प्रमुख कोंबड्याला, आह्मीं असल्यावेळीं हरएक तऱ्हेनें सहाय्य करून आरवण्यास उत्तेजन देणें हें आता गोमांतकीयाचें आद्य व पवित्र कर्तव्य होय.

असल्या जुलमी खटल्यांस भीक न घालतां देशभक्त भारतकार आपण चालविलेले लोककल्याणाचें कृत्य यापुढेंहि मोठ्या जोरानें चालवितील अशी पूर्ण आशा बाळगितों. ह्या कामांत तो सर्व व्यापक भगवान त्यांना पूर्ण यश देऊन गोमांतकाचा प्रभातकाल लवकरच समीप येवो असें त्या परम मंगल प्रभूपाशीं आह्मीं कळकळीचें मागणें आहे.

नरेंद्र

राग नसावा !

'एक कवळेंकर' याच्या पत्रव्यवहारास त्याच्या योग्यतेनुसार केराची टोपली दाखविण्यास भाग पडत आहे.

भा र त

गुरुवार वैशाख शु० ५ मी १८४३

विषाचे फवारे !

आमच्या शेजारच्या हिंदुस्थानांत 'टाइम्स ऑफ इंडिया' नामक पत्र प्रसिद्ध होत असून त्यांत बहुतकरून आंग्लोइंडियनांच्या एकंदर बऱ्यावाईट कृत्यांची तरफदारी होत असते, हें येथील वाचकांस माहीत असेलच. जालियानवाला बागेंत घडलेल्या अमानुष व राक्षसी कृत्यासारख्या गोष्टी सुद्धां, केवळ त्या इंग्रज बहादरांकडून आचरण्यांत आल्या ह्मणून त्या पत्रास अयोग्य वाटत नाहीत! हिंदुस्तानांतील लोकांची स्वराज्याची आकांक्षा, म. गांधीची असहकारिता, राष्ट्रीय सभेचे धोरण इ. त्यांच्या हिताचे विषय उपरोक्त पत्राच्या मतें मूर्खपणाचे ठरतात ! तात्पर्य, जितकें ह्मणून हिंदुस्थानांतील लोकांस हवें असतें तितकें 'टाइम्स ऑफ इंडिया'ला नको असतें, असा आजपर्यंतचा अनुभव आहे !

गोमांतकांत अशा पत्राची उणीव भासत होती; परंतु ती आ प्रोव्हींस नावाच्या साप्ताहिकानें भरून काढल्याबद्दल, त्याचे विशाळ व पोकळ डोके [illegible] संपादक पेरैर बाताल्य स्तुतीस पात्र आहेत !

ही कसली स्वतंत्रता ? या माथाळ्याखालीं सदर्हू पत्राच्या २५ एप्रिलच्या अंकांत एक अत्यंत नीच बुद्धीनें लिहिलेला लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत महालोके लेखक ह्मणतात कीं, गोमांतकांत पूर्ण स्वराज्याची चळवळ चालत असून, पोर्तुगालापासून वेगळें होण्याचा कांहींकांचा देशद्रोही प्रयत्न नजरेस येतो ! याचें प्रत्यंतर पहावयास 'त्रिबून' नावांच्या कळंगूट–बार्देस येथें प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांतील लेख वाचण्याची उपरिनिर्दिष्ट विशाळडोके पत्रकार गर्भित शिफारस करितात .

अशा लोकांची–वरील लेखक पुढें रडगाणें गातात–मुसकटदाबी होणें अत्यंत जरूर असून या महत्वाच्या कामासाठीं नवीन तऱ्हेचे विशिष्ट कायदे पास केले पाहिजेत; कां कीं, येथील कोर्टें व जज्ज ही कामगिरी सांप्रतच्या कायद्यानुरूप पार पाडण्यास सर्वथैव नालायक (पक्षभेदामुळें !) आहेत .

उदाहरणार्थ— तेच लेखक नंतर ह्मणतात – गेल्या दिवसांत एका जज्जानें वरिष्ठ हुकुमान्वयें एका पत्रावर[भारतावर] खटला उभारला असतांहि त्या पत्रास दोषमुक्त केलें ! वाचक हो, पहा या लुजो–इंडियन मूर्खाचें शहाणपण ! केवळ 'समर्थाः घरींचें श्वान' ह्मणून सारासार विचार न पहाता त्याला सर्व लोकांनीं मान द्यावा ! वरिष्ठापासून निघालेले हुकूम—मग ते योग्य वा अयोग्य असोत- डोळे झांकून मान्य करणें जज्याचें मुख्य कर्तव्य आहे ! कां ! आहे कीं नाहीं मजा?

इतक्यांतच उक्त लेखकाच्या शहाणपणाचा ओघ थांबत नाहीं. शेवटीं ते आपल्या जातभाईस उद्देशून बजावतात:— "जर सरकार या चळवळीचीं पाळें मुळें उपटून काढण्याचा प्रयत्न न करील तर, पोर्तुगीज लोक व पोर्तुगालचे मित्र हो, आह्मीं सर्व एक होऊं या व आमच्याच हातानीं त्या देशद्रोही लोकांचा खरपूस समा-

स्फुट विचार

विचारांचा कल:— आजचा अग्रलेख वाचून येथील काहीं क्षुद्रबुद्धि लुजो इंडियनाचा विचारांचा कल कोणत्या दिशेला झुकत आहे, हें सगळ्यांना समजून येईल. वास्कोडीगामाचे जातभाई तितके येथील रहिवाशांचे धनी असून इंडियेंतील सर्व लोक आपले चाकर आहेत, अशी त्या नीच मनोवृत्तींच्या गोऱ्यांची दृढ पण चुकीची कल्पना झालेली दिसते. यामुळेंच येथील वृत्तपत्रांत स्वतंत्र बाण्याचें लेख आढळून आल्यास, त्याच्या पोटांत पराकाष्ठेची कालवा कालव व्हावयास लागून, आपल्या तळीरामांवर गदाच आली कीं काय, असा त्यांस भास होतो. परंतु आह्मी त्यांस बजावतों कीं, सध्याचें युग हें स्वतंत्र विचाराचें उर्फ विचार स्वातंत्र्याचें आहे. आपले स्वतंत्र विचार योग्य रीतीनें जनतेसमोर मांडण्यास प्रस्तुतच्या काळात प्रत्येकाला कायदेशीर पूर्ण मुभा आहे. या हक्काचा उपयोग करणें ह्मणजे देशद्रोही [illegible] करणें नव्हे. दुसरें, पोर्तुगालदेश इंडियेचा कधींच 'धनी' नव्हता व सध्याहे नाहीं. परस्परांत मित्रत्वाचें व भ्रातृत्वाचें नातें आहे व तें सदैव टिकावें, अशी बहुतेकांचीं इच्छाहि आहे ! पण ती इच्छा सफळ होणें बहुतांशीं पोर्तुगालच्या राज्यपद्धतीवर अवलंबून आहे, हें निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. अशा स्थितींत उपरिनिर्दिष्ट गोऱ्या कुत्र्यांच्या भुंकण्याला कोण महत्व देईल?

भारत संरक्षक फंड:— आह्मांविरुद्ध दोन तीन क्रिमिनल खटले चालू असून त्यांपासून भारताला बरीच सांपत्तिक नुकसानी सोसावी लागणार आहे. या संकटांच्या वणव्यानें भारत बेचीराख होऊं नये, उलट तो, सर्व संकटातून सुरक्षित निभावून, गोव्यांतील एकंदर सर्व हिंदूंच्या मालकीचा व्हावा' एतदर्थ 'भारत संरक्षक फंड' या नांवाचा फंड उभारण्यांत यावा अशा अर्थाच्या कित्येक देशभक्तांकडून अनेक सूचना आल्यावरून उपरोक्त फंड उभारण्यात आला आहे. फंडाची पोंच तर वेळेवार प्रसिद्ध होईलच; हें दुसरीकडे छापलेल्या नांवनिशीवरून समजून येईल. शिवाय खर्चाचें कोष्टकहि खुलासेवार कळविण्याची व्यवस्था होईल. स्वदेशाच्या कल्याणासाठीं आत्मयज्ञ करण्याची संपादकांची पूर्ण तयारी आहे पण या कामीं जनतेकडून योग्य प्रोत्साहनाची मेहेर नजर झाल्यास, त्याला इष्ट हेतु फलप्राप्त्यर्थ झटण्यास विशेषच हुरूप येणार आहे. ह्मणून 'भारताला मदत करून, आमचे स्वदेशबांधव आह्मांला आभारांत ठेवतील अशी सबळ आशा आहे. मदत कितीहि अल्प असली तरी तिचा साभार उल्लेख झाल्याशिवाय रहाणार नाहीं. तसेंच 'भारतसंरक्षक फंड हेतु साध्य होइपर्यंत चालू राहील व त्याचा उपयोग फक्त उपरिनिर्दिष्ट कामींच होईल, हेंहि उघडपणें येथें नमूद करणें अत्यावश्यक आहे. प्रसंग आणीबाणीचा असल्यावरून, प्रस्तुत स्फुटाकडे जनताजनार्दनाची दयार्द्र दृष्टि वळेल, अशी खात्री आहे.

चार घेऊं द्या ! ! !

सांप्रतच्या स्वयंनिर्णयाच्या काळांत वरील गुलामगिरीचे चमत्कारिक विचार मजेदार नाहींत असें कोण ह्मणेल ?

वाचक हो, आपण वाचा व मित्रमंडळीस दाखवा !

देशी उद्योग धंदे:— कळंगूट येथील प्रसिद्ध व लोकप्रिय व्यापारी श्री. गोविंद भिकू पन्हीकर यानीं कांदोळी येथें फर्निचरचा भव्य कारखाना उभारला असून, त्यांतील कामें सुबकता व टिकाऊपणा या दोन्हीं दृष्टींनीं अत्यंत श्रेष्ट दर्जाचीं असतात, हें कळविण्यास आनंद वाटतो. कारखान्यांत बरीच मंडळी काम करीत असून, कसलीहि इमारत उभारण्यास लागणारें एकंदर सामानहि तेथें मिळतें. कारखान्याची उभारणी केवळ व्यापारी नफ्याच्या आशेवर झालेली नाहीं. तसें असतें तर त्याचा आह्मीं येथें बिलकूल उल्लेख केला नसता, हें उघड आहे. उलट श्री. पन्हीकरांचा उपरिनिर्दिष्ट कारखाना देशी उद्योग धंद्यास उत्तेजन देण्याच्या हेतूनें निघाला असून, देशीकारागिरास कारखान्याकडून महत्वाची मदत पुरविली जाते. तसेंच कारखान्यांत उत्पन्न होणारा माल किफायतशीर दरानें विकण्यांत येत असून, एकंदर व्यवस्थेंत देशाच्या अभिवृद्धीस सहाय्य व्हावें असें एकच धोरण दृष्टोत्पत्तीस येतें. विशेष ध्यानात ठेवण्यासारखी गोष्ट ह्मणजे मालकानीं व्यवस्थापक मंडळींत स्वतंत्र बाण्याच्या लोकाहते छु तरुणांचाच समावेश केला आहे, ही होय. तात्पर्य सदर्हू संस्थेंत देशहिताचा मनोल्हादक वारा वाहत असून, ती लोकाश्रयास व लोकादरास सर्वैव पात्र आहे. धकचपेटे खाऊन अशा नमुनेदार कारखान्यास जन्म दिल्याबद्दल श्री. गोविंदरावजाचे आह्मीं अंतकरणपूर्वक अभिनंदन करितों.

शांतादुर्गा विद्यालय:— कळंगूट येथील हें विद्यालय कळंगूटकर हिंदु लाकांच्या विद्याभिरुचीची जिवंत साक्ष पटवीत असून, सदर्हू शिक्षण संस्थेंत आधुनिक पद्धतीनें मराठी शिक्षण दिलें जातें. प्रो. दत्ता नाईक, श्री गोविंदराव पन्हीकर, श्री. वेरेकर श्री. लवंदे व इतर प्रमुख गृहस्थांच्या चिकाटीयुक्त परिश्रमानें उक्त शाळेची स्थापना स्वतंत्र इमारतींत झाल्यापासून, तिला सहजच स्थायीकपणा प्राप्त झाला आहे, ही मोठ्या समाधानाची गोष्ट होय. शांतादुर्गा-विद्यालयाच्याच धर्तीवर इतर खासगी स्वरूपाच्या मराठी शाळांची रचना झाली असती तर मराठी भाषेचा प्रश्न सुलभ रीतीनें सुटण्यास बरीच महत्वाची मदत झाली असती. प्रत्येक हिंदु लोक वस्तीच्या ठिकाणी एखादी लहान मोठी मराठी शाळा असतेच परंतु तींत प्रचारांत असलेला शिक्षण क्रम योग्य असतोच, अशांतला प्रकार नाहीं. चिरस्थायीपणा संबंधानें तर कित्येक खेड्यांतील शाळा अत्यंत भागसलेल्या स्थितींत खिचपत पडलेल्या नजरेस येऊन सखेदाश्चर्य वाटतें ! तशी स्थिति या पुढें राहू नये एतदर्थ त्या त्या खेड्यांतील पुढाऱ्यांनीं अंतःकरण पुरस्सर प्रयत्न केले पाहिजेत. मराठी शिक्षणाच्या महत्वाकडे तसेंच महतीकडे लक्ष पुरवून ते तसें करतीलहि, अशी उमेद वाटते. नमूद केलेल्या दोन्ही दोषांपासून कळंगूट करांची संस्था अलिप्त असल्याबद्दल आह्मीं त्यांचें सकौतुक अभिनंदन करतों.

एक नवीन व्यवस्था:—गोमांतकाच्या अभ्युदयार्थ निस्वार्थ बुद्धीनें झटणाऱ्या स्वदेशभक्तांची – मग ते कोठेंहि रहाणारे असोत — ओळख लोकांत व्हावी, या एकान हेतूनें " गोमांतकीय स्वदेशभक्त" या सदराखालीं त्यांचीं त्रोटक चरित्रें देण्याचा उपक्रम आह्मीं लवकरच करणार आहोंत. या कामीं लागणारी माहिती मागून कोणाहि देशभक्ताकडे आमच्या कचेरींतून पत्र गेल्यास, त्याची योग्य संभावना होईल, असा भरवंसा आहे. गोमांतकीय स्वदेशभक्तांच्या मालिकेवरून ठिकठिकाणच्या, स्वदेशाभिमानी लोकांची मोजदाद करण्यास सुलभ पडून परस्परांत परिचय होण्यासहि ही नवीन व्यवथा साधनीभूत होणार आहे.

पोर्तुगालची परिस्थिति:— समाधानकारक नाहीं. दंगेधोपे मारामारी व इतर अस्वस्थतादर्शक प्रकार नित्यशः घडत असतातच. तात्पर्य पोर्तुगालांत, बाकीच्या युरोपियन राष्ट्रांप्रमाणें, चोहों बाजूनीं अशांततेचा वारा सोसाट्यानें वाहत आहे. हें वादळ केव्हां नष्ट होईल तें जरी सांगता नाही तरी त्यातून आश्चर्यकारक मजा निष्पन्न होतात ही गोष्ट खरी आहे. उदाहरणार्थ सि. आगुस्त नेवपार्त खून झाल्याची अनिष्ट बातमी प्रसिद्ध झाली होती; परंतु आतां असें वर्तमान आलें आहे कीं, सदर्हू सि. नेवपार्त हे जिवंत असून धडधाकड आहेत !

भारत संरक्षक फंड

दो. सुब्राव विठ्ठल प्र. देसाई, सांवर्डें ५१ रु.
श्रीयुत एल. पे, काणकोण.......२५ रु.
प्रो. गिरी ग. पै काकोडे, कुंकळ्ळी २१ रु.

वर्तमानसार

—प्रोकुरादोरीय जेराल या नावांची एक संस्था पणजी येथें स्थापन झाली असून तिचे मेंबर वकील दो. गोमिस पेरैर, दो. श्रीधर शंखवाळकर व दो. व्यंकटेशराव सरदेसाई हे तेथील व पोर्तुगालांतील कचेऱ्यांतील व कोर्टांतील सरकारी व खाजगी कामें योग्य वेतनानें पार पाडतात. गरजूंची गैरसोय दूर झाली !

— मासिक भारतोदयाचा दुसरा अंक प्रसिद्ध झाला असून, तिसरा अंक मे अखेर निघेल, असें संपादक कळवितात.

— सि. प्राजेरीत द कोस्त यानीं उभारलेल्या खटल्यांत आमच्या संपादकांस येत्या महिन्याच्या प्रारंभीं आक्षेपार्ह लेखाचा ओरिजिनल कोर्टात दाखविण्याविषयीं इंतिमसांव निघालें आहे.

— वर्गणीची व डिफेंस फंडाची पोंच येत्या अंकापासून सुरू होईल

चुकीची दुरुस्ती

कैद न भोगल्यास प्रत्येक दिवसाला एक हजार रैस (२ रु. १३ आ. ८ पै.) याप्रमाणें ३० दिवसांचे सरासरी ८६ रु. आमच्या एडिटराला भरावे लागतील. २५ रु. नव्हत.

नवजीवन

एक वर्षपर्यंत मराठी पोर्तुगीज साप्ताहिक वृत्तपत्र रूपानें निघालेलें वरील नावांचें नियतकालिक छापुडें मराठी मासिक रूपानें चालू मे महिन्यांत प्रसिद्ध होणार.

जनार्दन नारायण पई असनोडकर
संपादक—नवजीवन

भा र त

गुरुवार चैत्र व० १३ शी १८४३

सत्य असेल तें बोलणार!

दोन बालबोध शब्द

ज्या वेळीं जुनाट पण अनेकविध दुर्धर रोगानीं पोखरलेला ब्रागांस राजघराण्याचा वृक्ष मुळासकट उन्मळून पडून नूतन प्रजासत्ताक राज्य व्यवस्थेची प्राणप्रतिष्ठा झाली त्यावेळीं जे पुष्कळ उदारमतवादी नागरिक हिंदूंचे हितकर्ते ह्मणून मिरवावयास लागले. त्यांत सिं प्राजेरीस द कोस्त यांची प्रामुख्यानें गणना करण्यास हरकत नाहीं. हे गृहस्थ डॉ. आंतोन जुझे द आल्मेद यांचे अनुयायी असल्यावरून, त्यांच्या लंबेलंबे अभिवचनावर सर्व हिंदूंचा विश्वास बसत चालला. त्या वेळच्या हिंदुपत्रांत कोस्तांची जिकडे तिकडे वाहवा होऊं लागली. प्रत्येक हिंदु नागरिक प्राजेरीसचा कट्टा अभिमानीं बनला व ज्यावेळीं देपुतादांच्या निवडणुकीचा समय ठेपला, त्यावेळीं आह्मीं हिंदूंनीं नाना तऱ्हेचे त्रास सोसून त्यांची निवडणूक यशस्वी करण्याचें श्रेय संपादन केलें.

खुद्द 'भारता'नें तर कोस्ताची ओळख सर्व हिंदूंना करून देण्याचे कामीं स्वताच्या खिशास बराच चट्टा लावून घेतला. त्यांच्या एका वाढदिवसानिमित्त तर 'भारता'नें आपल्या निवडक निवडक मित्रांस झीज सोसण्यास भाग पाडलें. हेतु हा कीं, त्यानीं हिंदूंवर प्रसन्न होऊन, त्यांची राजकीय मनीषा तृप्त करावी. पण...

पण 'सगळेंच मुसळ केरांत' अशांतली गत झाली! पार्लमेंटच्या वैभवशिखरावर एकदम विराजमान होतांच कोस्तसाहेबांचा दृष्टिकोण यक्षिणीच्या कांडीप्रमाणें बदलला व हिंदूंच्या विश्वासाची व भरंवशाची भक्कम इमारत क्षणार्धांत जमीनदोस्त झाली! हिंदूंच्या सर्व आशा गाशा गुंडाळून चौफेर पळाल्या! तात्पर्य हिंदूंचें कोस्तासंबंधींचें मत त्याच्या कृत्यानुरूप बदलत बदलत जाऊन, अखेर सख्यत्वाचें पर्यवसान तिटकाऱ्यांत झालें!

निरनिराळ्या सरकारी कचेऱ्यांतील कामकाज पाहण्यास योग्य इसमाची पैदास व्हावी, या वरपांगी हेतूनें सिं. कोस्तानीं व्यापारी शिक्षणसंस्था (Instituto comercial) या नांवांच्या कॉलेजची स्थापना केली; पण शिक्षकवर्गात केवळ आपल्या सगे सोयऱ्यांचा व मित्रांचा समावेश करून त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुलभतेनें सोडण्यास मात्र हातभार लावला! कां कीं, नोकरांच्या नेमणूक पद्धतींत वरील अप्रिय पाहुण्यासारख्या संस्थेमुळें फरक तर पडला नाहींच, उलट तिच्या खर्चाच्या नाहक बोजानें आधींच हलाख बनलेली तिजोरीची स्थिति मात्र जास्ती निकृष्ट झाली!

पणजीच्या पाठशाळेचा पूर्वीचा शिक्षणक्रम पांच वर्षांचा असे. त्यांत आणखीं दोन वर्षांची भर घालून शिक्षकवर्गाची वाढ केली. व त्यांत आपल्याच लोकांचीं भरती केली!! व ती केवळ स्वदेशासाठीं!!!

आपलें वर्चस्व खर्चून, सिं. प्राजेरीसनें स्वदेशहिताच्या मोहक नावाखालीं अनेक हुद्दे निर्माण केले व त्यांवर स्वकीयांचीच नेमणूक होण्याची खबरदारी घेतली!!

प्रत्यक्ष स्वताचा शिरकाव 'आवदितोरींत' करून घेऊन पोटोबाची व्यवस्था चोख रीतीनें राखिली. व या अनावश्यक नूतन घोरडीमुळें आमच्या तिजोरीचे बारा वाजतील याचा बिलकूल विचार मनांत न आणतां, ती आह्मांवर केवळ आमच्या कल्यासाठीं ह्मणून लादली!!!

एवंच सि. प्राजेरिसनें आपल्या वजनाचा, विद्वतेचा व शहाणपणाचा उपयोग नुसत्या आपल्या व आपल्यांच्या हितार्थ मनमुराद करून आमच्या तिजोरीला बऱ्याच मोठ्या नुकसानीचा खड्डा खणला. यामुळें अर्थातच सर्व हिंदूंचें मत त्याविषयीं पालटलें व उघड उघड जेथें तेथें त्यानां शिव्याशापांचा मारा बसावयास लागला. 'सि. कोस्त हे गोव्याचें मित्र नसून उलट भयंकर शत्रु आहेत. त्यांनीं गोमांतकाचा सत्यानाश केला असून, या उपर त्यांची स्तुति करणें ह्मणजे देशद्रोहाचाच गुन्हा करण्यासारखें आहे' अशा तऱ्हेचे उद्गार स्पष्ट ऐकूं याव' यावयास लागले.

याच उद्गारांचा प्रतिध्वनि 'भारता'च्या गेल्या वर्षाच्या ४० व ४१ व्या अंकांत उमटला. त्यामुळें कोस्तसाहेबानीं आह्मांविरुद्ध अब्रुनुकसानीचा दावा लावला असून आमच्या लेखणीला खीळ घासण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो!

परंतु आमची मनोदेवता आम्ही कोस्ताचा अन्याय केला नाहीं असेंच आह्मांला सांगत आहे. सत्याचा अनुवाद करणें हा जर गुन्हा असता, तर आम्हीं सि. कोस्ताचे अपराधी ठरलों असतों. तशी स्थिति नसल्यानें त्यांच्या खटल्यापासून आमच्या मनांत कसलीच भीति उत्पन्न होत नाहीं.

'भारतानें' आपलें अस्तित्व स्वदेशसेवेस वाहिलें असून या कामीं पडतील तितके त्रास सोसण्यास त्याची आनंदानें तयारी आहे. मानवी आपत्तींच्या भयानें तो आपल्या स्पष्टोक्तीच्या धोरणांत कदापिहि बदल करणार नाहीं.

'भारताचें' ध्येय ह्मणजे 'सत्य असेल तें स्पष्ट बोलणार व या कामीं होईल ती शिक्षा भोगण्यास एका पायानें तयार असणार' असें आहे. या ध्येयाचें संगोपन आमच्या हातून शांत चित्तानें होवो, इतकें परमेश्वराशीं प्रार्थून हे दोन बालबोध शब्द येथेंच आटोपते घेतों.

स्फुट विचार

भारतावरील नवीन खटलाः- आजच्या अग्रलेखांत सि. प्राजेरीस द कोस्त यानीं स्वदेशहिताच्या भपकेबाज नांवाखालीं आपल्या आप्त मित्र सखे सोयऱ्यांची तुंबडी कशी बेमालूम रीतीनें भरली याचें दिग्दर्शन केलेंच आहे. स्वदेशभक्तीचा अर्थ तुंबडींतच सांठलेला असता, तर आह्मी सि. कोस्ताचे अपराधी ठरलों असतों यांत संदेह नाहीं. परंतु वस्तुस्थिति तशी नसून अगदीं उलट आहे. जेथें स्वदेशभक्ति असते तेथें तुंबडीचा प्रश्नच उपस्थित होत नसतो, सर्व शहाणे लोकांचें मतहि असेंच आहे. तर मग आह्मी सि कोस्ताचे कसे अन्यायी होतों? जर होत नाहीं, तर त्यानीं इतकी घटपटादि खटपट करून उभालेला खटला मात्र अप्रस्तुत, गैरवाजवी व अयोग्य ठरत नाहीं काय? आपल्या प्रियतम मायदेशासाठी, आपल्या आवडत्या स्वदेशबंधूच्या हितासाठीं जेथें भारत आत्मसमर्पण करण्यास पुढें ठाकला आहे, तेथें त्याला वरील सारख्या बालिश व पोंचट खटल्याची पर्वा आहे काय?

सुख जवा एवढें, दुःख पर्वता एवढेंः- सि. कोस्ताचा "बागुलबोवा" मुळें येऊन जाऊन काय तीं भारताला सांपत्तिक नुकसानी भोगावी लागणार! परंतु 'सुख जवा एवढें व दुःख पर्वता एवढें' या पारमार्थिक तत्वाची त्याला पक्की जाणीव असल्यावरून व जनतारूपी जनार्दनाची कृपाहि त्याच्यावर परिपूर्ण असल्यामुळें उपरोक्त नुकसानी सोसण्याची भारताची बेंबीच्या देठापासून तयारी आहे, हें पुन्हा एकदां येथें नमूद केलेलें बरें. भारत पत्र जनतास्वरूपी समुद्राचा किनारा आहे. ज्या ज्या रीतीनें या सागरांत लाटा उसळतील त्या त्या तऱ्हेनें त्या किनाऱ्यावर आपटतील, लाटांच्या शक्तीवर आपटण्याचा जोर अवलंबून राहील, हें अर्थांत स्पष्ट असल्यावरून कोणत्याहि पीकळ सबबीवर लोकांच्या मनांत वसत असलेल्या भावनाच्या लाटांचा जोर कमी भासविण्याचा प्रयत्न भारताकडून कादपिहि होणें शक्य नाहीं; मग या कामीं त्याला कितीहि आपदा सोसाव्या लागल्या तरी बेहत्तर!

हायकोर्टांतील निकालः— जुन्या खटल्याचा हायकोर्टांत कसा काय निकाल लागला हें दुसरीकडे दिलेल्या हकीकतीवरून वाचकांच समजून आलेंच असेल. 'कोळसा उगळावा तितका काळाच' अशी खरी वस्तुस्थिति असल्यावरून त्याविषयीं जास्ती चर्चा करण्याची आवश्यकता आह्मांस भासत नाहीं. सुप्रेम कोर्टांत दाद लाऊन घेण्याचा मानस असून पणजीच्या आमच्या वकिलांस त्या संबंधीं लिहिलें आहे. परंतु डिफेन्सफंडाच्या मदतीनें एकंदर कार्यभाग पार पडणें शक्य असल्यासच मात्र उपरोक्त हेतूस मूर्त स्वरूप येणार आहे. न पेक्षां हायकोर्टानें दिलेलीच सजा निमुटपणें पण आनंदानें भोगून युद्धस्टांपच्या युद्धांतून मोकळें होण्याचा विचार आहे. जनतेच्या सुखासाठीं, स्वदेशाच्या कल्याणासाठीं व स्वदेशबांधवांच्या हितासाठीं सर्वस्व समर्पिण्याची जेथें तयारी आहे तेथें उपरिनिर्दिष्ट शिक्षा ह्मणजे कांहींच नाहीं, हे अगदीं उघड आहे.

जनता जनार्दनः— तरीपण जनता जनार्दनाच्या प्रेरणेनुसार वरील निकालाचा निकाल लावण्यासंबंधानें आमचें धोरण निश्चित करणार आहों. डिफेन्साची रकम ११० रुपयांपेक्षां जास्ती नसून, खटला सुप्रेम कोर्टांत नेण्यास, निदान ४२५ रुपये पाहिजे आहेत. अर्थात् आणखीं ३१५ रुपयांची जरूरी आहे. येता गुरुवारपर्यंत जनताजनार्दनाच्या कृपेनें इतकी रकम जमल्यास, सहजच पोर्तुगीज प्रिव्ही कोन्सीलच्या न्याय तराजूंत आमचा हा खटला ढकलण्यास शकूं. उलटपक्षीं आम्ही काय करणार, हें मागें ध्वनित केलेंच आहे. 'भारत' जनतेचा असून जनतेच्याच इच्छेनुरूप त्याच्या हातून थोडीफार कार्यनिष्पति घडत असते. अशा स्थितींत जनताजनार्दनाच्या प्रेरणेची एक आठवडा वाट पहात बसणें एकाएकीं अव्यवहार्य ठरेल असें आह्मांस वाटत नाहीं.

पणजीच्या हायकोर्टांतील

युद्धस्टांप खटल्याचा निकाल

एडिटरांस ३० दिवसांची साधी कैद

६० हजार रैस दंड (१७४ रु. ४ आ. ७ पै.)

खटल्याचा खर्च अजमासें २५० रु.

ह्मणजे सरासरी सवा चारशें रुपये खर्च येईल. त्या शिवाय कैद न भोगल्यास आणखी पंचवीस तीस रु. भरावे लागतील.

पणजीहून मागितलेला 'आकोर्दाव' अजून मिळला नाहीं. दिलेली माहिती अर्थात् त्रोटक आहे.

पत्रव्यवहार

रा. रा. भारत कर्ते यांस. वि. वि.

आपल्या ता. २१ एप्रिलच्या अंकांतील अग्रलेखांत "शेकडा चाळीस महाजन (देवस्थानचे) दारू पिणारे आहेत' असें विधान मडगावांतील व्याख्यान मालेच्या एका वक्त्यानें 'मद्यपान' या विषयावर झालेल्या व्याख्यानाच्या प्रसंगीं केलें असें आपण लिहिलें आहे, हें बरोबर नाहीं. वार्षिक समारंभाच्या दुसऱ्या दिवशीं 'देवस्थानें' या विषयावर रा. सुकेरकर यांचें व्याख्यान होतें. त्या प्रसंगीं अध्यक्षस्थान मला दिलें होतें. व्याख्यानानंतर रा. आंगले यानीं जांबावली येथें देवस्थानांत गुत्ता असल्याचा उल्लेख केला. त्यावर रा. यशवंत सूर्यराव सरदेसाई ह्मणाले कीं, "जांबावलीसच काय, इतरही देवस्थानांत गुत्ते दिसतात. कवळ्यांस मठा शेजारीं गुत्ता आहे. चाळीस टक्के लोकानां त्याचा उपयोग होतो. तर तो काढण्याची खटपट कोण करणार? इ." यांत त्यांनीं कोणत्याच देवस्थानाचा महाजनास लागतील असे शब्द वापरले नव्हते. व ते तसें वापरले असते तर माझ्या समारोपांत अध्यक्ष व विशेषतः कवळें देवस्थानचा महाजन या नात्यानें त्याचा निषेध केल्याशिवाय मी राहतों ना. कळावें कृपा लोभ असावा ही विनंति.

आपला

पांडुरंग सदाशिव दणाईत

आमचे संपादक

अमच्या संपादकांची प्रकृति अजून सुधरली नसून. त्यांचा मुक्काम रिवण येथेंच आहे. ह्मणून प्रस्तुतचा अंक अर्धा निघत आहे. कदाचित यापुढील एक अंकहि याच स्वरूपांत निघेल. त्या बद्दल वाचक व आश्रयदाते आह्मांवर रागावणार नाहींत अशी सबळ आशा आहे.

भा. मंडल

नवजीवन

एक वर्षपर्यंत मराठी पोर्तुगीज साप्ताहिक वृत्तपत्र रूपानें निघालेलें वरील नावांचें नियतकालिक ह्यापुढें मराठी मासिक रूपाने येत्या मे महिन्यांत प्रसिद्ध होणार.

जर्नादन. नारायण पई अस्नोडकर

संपादक—नवजीवन

bolim até a fonte de abundantes aguas em Naucim para poder o publico aproveitar dessas aguas.

E é muito conveniente que o governo mande traçar o plano para a construcção de futuras travessas em Nazareth e Tombossoró.

Finalmente é muito necessario e inadiavel que o governo construa um pequeno ramal da estrada de 12 metros em linha recta, que partindo do embarcadouro ou caes de Nazareth se una á estrada de Pangim a Agaçaim, perto a Egreja de Siridão para transitar os automoveis, carros e carroças de Pangim, Batim, Agaçaim e Juarim a esse caes, enquanto fique completa a estrada outejral de S. Cruz a Bambolim.

J, F.

PELA RELAçãO DE NOVA--GOA

FOI REVOGADA A

sentença que absolvera na la. instancia o nosso editor

O RESPECTIVO ACORDAO

Publicaremos na edição seguinte

ECOS & CRITICA

O nosso director

Encontra-se doente em Rivona, onde está submetido ao tratamento medico. Esperamos porisso que os nossos amaveis leitores relevar-nos-hão qualquer falta que por ventura haja no *Bharat*, durante o seu impedimento forçado.

Comite do Bharat Patriota

Na rigorosa acepção da palavra, *patriota* é quem se dedica exclusivamente ao bem do Paiz. O caudilho popular José Inacio de Loyola foi patriota. O sr. Meneses Bragança, o sr. Liberio Pereira e tantos outros que só trabalham no sentido de promover o bem estar do Paiz, sem mais outra ocupação são patriotas.

Apliquem esta bitola ao sr. Prazeres da Costa que, á custa do tesouro que substenta a sua auditoria, está levando uma vida principesca.

O sr. Costa é patriota? Então, tambem é patriota o porteiro da nossa Redacção que nas horas vagas fala da politica de todo o mundo e *son père* ... á custa das nossas esfarrafadas finanças-

Grande patriota é o sr. Lamartine !

O sr. Prazeres

Este senhor a quem o *Bharat* na doce ilusão de que seria util ao Paiz, cantou numa ocasião, lôas e dedicou-lhe festas retumbantes, julgou-se ofendido na sua honra e dignidade, quando, na nossa rude sinceridade, pomos no jornal, sem rodeios, verdades duras e cruas respeitantes a *pitoresca* vida politica do ex-deputado.

Pode porem Sua Excia estar certo de que seu precesso não conseguirá apagar do espirito publico a *intensa* impressão de que sob a capa de patriotismo guindou ás elevadas posições burocraticas a numerosa fauna de seus parentes, nomeou para as chorudas funcções os seus vizinhos e anichou em altos cargos os seus amigos, porque essa sua obra patriotica é tão *brilhante* que tem ofuscado vista ainda áquêles que sofrem da cegueira cronical Sim, Snr. Dr. Prazeres!

Instituto Comercial

O sr. José Lsmartine Prazeres da Costa para *beneficiar* a India conseguiu a criação deste instituto, com grandes encargos ao já depauperado tesouro publico.

Mas sabe o que se diz em toda a parte ? Que o ilustre *patriota* criou aquele instituto para garantir pão a alguns dos seus amigos!

Valha a verdade!

Liceu Central

Esta outra obra-rumoreja-se em toda a parte-tambem obedeceu ao mesmo criterio que gerou o instituto comercial. O sr. Prazeres tinha de colocar os *seus* e para isso elevou o Liceu Nacional a Central.

E duvidam do patrioismo do sr. José?

तिनें काय सांगितलें

गोप्य गोपन.

सन्मान्य संपादक महाराज, आपल्या लोकमान्य भारताच्या अंकांत प्रसिद्ध झालेली 'दोन लाख रुपयांची गोष्ट' वाचून मला गहिंवर आला ! कारण अशाच नमुन्याची एक गोष्ट गुदस्ता मी स्वत: अनुभवलेली होती, त्या संबंधीं योग्य न्याय मिळण्यासाठीं मी रेजिदोरापासून तो थेट वरिष्ट अधिकाऱ्यांपर्यंत दाद मागितली; परंतु, शेवट निष्फळच झाला ! शेवटीं आह्मां अबलांचें अखेरचें शर संधान जें शिव्या देणें, या तत्वाचा केवळ त्यांच्या रागामुळेंच मी त्या वेळीं उपयोग केला, "प्रभो ! सर्वव्यापक परमेश्वरा ! तूंच माझ्या गोष्टीचा योग्य न्याय निवडून अपराध्यांचा सत्यानाश कर" असें ह्मणून मी त्यांच्याकडें तिरस्कार मुद्रेनें एकवार दृष्टि फेंकली व कटाकट तीन वेळां बोटें मोडून हे अधिकारी न्याय निवडण्याला इथं बसलें नसून केवळ द्रव्य लोभानें गरीबांना लुबाडण्यासाठींच त्यांनीं अवतार घेतला आहे, असें ह्मणून मी थेट माझ्या घराकडें परतलें.

आजच्या दिवसापासून बरोबर या गोष्टीला दहा महिने झाले. तरी पण अद्यापि मला तिचा मुळींच विसर पडला नसून अधिकाधिक त्या अधिकाऱ्यांबद्दल मनांत तिरस्कार वाटत आहे. परंतु, करतें काय ? पडली अबला !

परवां गुरुवारीं संध्याकाळीं मी तिकडच्या पत्राची वाट लक्षित ओटीवर बसलें होतें. इतक्यांत पोष्टमननें मला 'भारता'चा अंक आणून दिला. उघडून पाहतांच 'ह्मातारीची दोन लाख रुपयांची गोष्ट' माझ्या दृष्टीस पडली. ती वाचल्यावर माझीहि गोष्ट आपणास कळवावी अशी मला उत्कट इच्छा झाल्यावरून ही गोष्ट मी आपणाकडें पाठवीत आहें; परंतु या गोष्टीचा विशेष गाजा करूं नका बरं का ! कारण, असल्या लोकांच्या लबाड्या उघडकीस आणल्यास त्यांना फारच त्रास होत असतात ह्मणे !

संध्याकाळचे सात वाजून गेले होते अंधार पडत चालला होता. आषाढ महिना असल्यानें पाऊस अगदीं मुसळधारा वर्षत होता. मधून मधून झग् झग् विजा चमकत असून काजवेहि लखलखत होते. अशा वेळीं अटरा वर्षें वयाची एक ख्रिश्चन तरुणी आमच्या घराजवळील रस्त्यानें चालत येत होती. पावसाच्या वर्षावामुळें तिचें अंगावरील वस्त्र भिजून अगदीं चींब झालें होतें. ती पावसांतून जात असलेली पाहून मला तिची कींव आली. व मी तिला आमच्या घरांत बोलावून आणलें. तिच्या तोंडून इत्यंभूत हकिकत ऐकून मला तिच्या दैनावस्थेबद्दल अतिशय वाईट वाटलें. मीहि पण घरांत एकटीच असल्यानें व तिहि निराधार असल्यानें, मी तिला आमच्या घरांत ठेऊन घेतलें. सात आठ दिवस गेले. तों मला तिकडून पत्र आलें कीं, माझी बदली दिल्लीस झाल्यामुळें मला तिकडें जावें लागत आहे. तेव्हां कांहीं दिवसांपूर्वी आह्मीं गुंडोपंताकडून घेतलेल्या शेतीचा रजिस्त लवकर उरकून घ्यावा, कारण मी दुसऱ्या महिन्याच्या ? त्या तारखेस तिकडे येईन तेव्हां तुलाहि इकडे आणण्याचा माझा इरादा आहे. या सोबत शंभर रुपये आंत आहेत पोंचल्याबद्दल जरूर कळवावें." त्या दिवशीं कांहीं गडबडीमुळें मी ते रुपये पेटींत ठेवण्याऐवजीं टेबलावरच ठेऊन दिलें रात्रींहि मला त्यांची आठवणच राहिली नाहीं. दुसऱ्या दिवशीं टेबलाकडे येऊन पहातें, तों तेथें नोटा नाहींत ! त्या नवीन बाईकडे तरी चवकशी करावी ह्मणून खोली बाहेर येऊन पाहिलें, परंतु तीहि तेथें दिसत नाहीं. त्याच वेळीं माझ्या लक्ष्यांत आलें कीं, त्या नोटांवर त्या बाईनेंच हातचलाखी केली असावी. मी थेट रेजिदोरींत जाऊन ह्या गोष्टीची फिर्याद दिली, व तिला पकडली सुद्धां झालें. चवकशीकरितां त्या बाईला रेजीदोरानें उभी केली. तोंच काय गौडबंगाल झालें कोणाला ठाऊक. तो व ती बाई एकदम उठून एका बाजूला झाली व बराच वेळ कांहीं पुटपुटलीं. त्या बाईनें त्यांच्या हातावर पांच रुपयांची एक नोट ठेविली. तिथूनच तो एकदम ओरडत निघाला कीं, ही बाई अगदीं निरपराधी आहे. पुष्कळ खटपट केली परंतु व्यर्थ. असें पाहून मी आदमिनिस्त्रादोराकडे धांव घेतली. परंतु तिथंहि एकच उत्तर कीं, ही बाई अगदीं निरपराधी आहे हें सांगण्याचें कारण हटलें ह्मणजे त्या बाईनें आदमिनिस्त्रादोराच्या हातावर वीस रुपयांच्या दोन नोटा ठेविल्या होत्या अशी दाट वदंता पसरली होती ! खासा न्याय ! ! !

दोन्हीं कडचा असा निकाल लागल्यावर मी सविस्तर हकिकतीची सरकारला अर्जी केली. परंतु सरकारची तरी काय विलक्षण तपासणी पहा ! एकदम आदमिनिस्त्रादोर व रेजिदोर यांस अशी नोटीस पाठविली कीं:-- अमक्या एका बाईनें तुह्मांवर केस दिलीं आहे. तेव्हां त्या संबंधीं एकंदर माहिती मला ताबडतोब कळवावी." कोणीहि, एका अज्ञान मुलानें सुद्धां, एखादि वाईट गोष्ट केल्यास तो आपल्या आईजवळ त्या गोष्टी संबंधीं खरी हकिकत सांगण्यास धजेल काय ? नाहीं. तर हेंच आपल्या तोंडून आपल्या जिवावर संकट कसं बरं बोलावून आणणार ?

शेवटीं त्यांकडून उत्तरें काय गेलीं असतील तें सांगवत नाहीं. परंतु, एक मात्र खरं कीं, माझे रुपये गेले ते गेलेच ! मला त्या रुपयाच्या धास्तीमुळें अगदीं चैन पडत नव्हतें. परंतु ह्या दिवसांत त्यांच येणं होईल करितां रेजिस्त लवकर झाला पाहिजे ह्मणून मी सर्व दुकुमेंतांसह कोंसेरव्हातोरींत गेलें. परंतु, तिथं काय, बोलण्याचीच सोय नव्हती. मी समग्र दोन तास उभें राहिलें, तरीहि माझी दादच लागत नाहीं असें पाहून मी तेथील एका 'इस्क्रेव्हेंतीकडे' मजकडील दुकुमेंत दाखवून त्याला ह्मटलें बाबारे, माझें हें एवढे काम करून दे ! मी आपलें जन्माचं ऋणी होईन, परंतु तो ऐकतो कसचा ?

बऱ्याच वेळानें त्यानें मला स्पष्टच सांगितलें कीं हें तुझें काम तुला लवकर करून दिलें पाहिजे असल्यास मी माझ्या ह्या हुषारी बद्दल वीस रुपये बक्षिस घेईन. काय ? कबूल असेल तर आण इकडे नाहीं तर चालती हो. उगाच वेळ दवडूं नकोस !

मी त्या कोंसेर्व्हादोरींतील सगळ्यांची विनवणी करून पाहिली; परंतु फुकट. त्यांनां माझी बिलकूल दया आली नाहीं त्यांनी सर्वांनी मला निक्षून एकच उत्तर सांगितलें

Pelo juizo do direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1.º oficio Lobo, vão à praça para venda, em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situada em Cosmane, na rua de D.ão, no dia 26 do corrente mez às 12 horas, pelo maior lanço que se oferecer, acima da avaliação, o direito á metade de uma terça parte do palmar "Nocodbab Gorbata" da cultura de coqueiros, jaqueiras e mais arvores, sito em *Soliem* de Cacorá, inscrito na matriz sob o n.º 233, avaliado por 350 rupias, o direito á quarta parte da varzea denominada 'Mosgale nomoxi", da cultura de arroz, sito em Cacorá, inscripto na matriz sob o n.º. 172, avaliado por 100 rupias, o direito á metade de uma terça parte da varzea denominada "Borchigalo" da cultura de arroz sito em Cacorá, inscrito na matriz sob o no. 177. avaliado por 200 rupias, o direito á metade de uma terça parte do predio denominado "Gongorla" da cultura de arroz e coqueiros, sito em Soliem de Cacorá, inscrito na matriz sob os numeros 267, 275, 276 e 284 avaliado por 175 rupias, o direito á metade de uma terça parte da varzea denominada "Vangnigandig" ou "Zotoganline", da cultura de arroz, sita em Soliem de Cácorá inscrito na matriz sob o n.º 169 avaliado por 100 rupias, o direito da metade de uma terça parte do predio denominado. "Boroda valechimago" ou Boroda delumao sito na dita da culture de arroz e coqueiros, inscrito na matriz sob o numero 260 avaliado por 350 rupias,— e o direito á metade da terça parte do predio denominado "Mortuvalo" da cultura de arroz e coqueiros sito na dita inscrito na matriz sob o n.º 286, avaliado por 200 rupias, e diseritos os inteiros predios, os primeiros dois na conservatoria desta comarca sob os nos. 895 e 3170, respectivamente, e os outros cinco no de Salcete sob os nos 1270, 1271 1272 1273 e 1274, respectivamente, e penhorados nos autos civeis de éxecução hipotecaria que Narana Bicarô Gauncar e outros de Soliem de Cacorá, como cessionarios do primitivo exequente Antonio Francisco Gomes, de Cavelossim, e residente em Cansaulim, movem a Mulu Argun Gauncar e outros de Soliem de Cacorá, para pagamento da quantia de 650 rupias, juros, penas e custas da execução. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaisquer credores e co- proprietarios incertos e os representantes dos credores falecidos Vitola Fotù Sinai Mopcar de Ponchevady de Pondá e João Miguel Abranches, advogado de Verná, a favor dos quis se acham reregistadas as hipotecas n.os 1901 e 2294 para segurança das quantias de 200 rupias e 1100 rupias respectivamente. O que para ser publico se expediu este. Quepem 5 de abril, de 1921

O escrivão de direito do 1.º of.
Manuel José Sebastião Lobo
Verifiquei
O 1.º substituto do Juiz de direito do auto t anecto.
2a. vez) *A Lobo*

dessa carreira durante o inverno.

Em todo o caso é necessario construir em Tombossoro uma casa com compartimentos sendo 2 para o posto do correio e 2 para a vendagem de bilhetes de navegação fluvial.

Feito isto, do embarcadouro de Nazareth deve partir uma estrada com igual largura e passando por proximidade da casa do finado José Paulo Pegado deve unir-se em S. Cruz perto da pampa a estrada que de Pangim passa a Agaçaim.

E deve tambem haver um pequeno ramal que partindo da estrada em projecto perto da casa do dito Pegado e, passando por fralda do outeiro, deve unir-se a dita estrada de Pangim a Agaçaim perto da Egreja de Sirideo e na proximidade desta Egreja deve haver uma escola da instrucção primaria, que hão de frequentar muitos filhos dessa aldeia e das outras circumvisinhas de Nazareth, Naocim Bambolim, Paiem, Curca e Juarim e o numero dos alunos hade exceder a 60.

Esta estrada para ser em linha recta é necessario que haja um ramal que partindo da estrada em S. Cruz perto de meia laranja se una a estrada na capital perto de casa do finado Filipe Nery Xavier. Em Nazazeth perto do embarcadouro ou caes deve haver uma casa como em Tombossoro para funccionar as repartições do correio e da navegação fluvial.

Certamente em Nazareth hade haver hotel e lojas de vinho europeus, e de varias outras coisas, e mercado, e não hade encontrar logar para esse fim, porque o proprietario não hade vencer o seu terreno e permitir construcção de casas e muitas familias do capital e de outras partes hão de querer ir para mudança em Nazareth e Tombossoiô, principalmente nos mezes de Março, Abril e Maio e hão de ficar privadas dessa desejada mudança a esses logares sadios por falta de casas por isso convem ao governo expropriar o terreno entretanto na superficie de 50000 metros quadrados e fazer lotes de 50 metros de cumpprimento e 40 de largura cada e vendel-os com condição de apresentar o comprador plena e construir casa dentro de 3 anos a contar da data da sua compra e do mesmo modo deve expropriar mais terreno passado o ano.

Isto deve extender-se ainda a Tombossoaô e Sirideo

As camaras municipaes dos concelhos das Ilhas e de Salsete sem perda do tempo devem construir mercados nas proximidades da dita Egreja de Sirideo e em dito Tombossorô.

O dinheiro da venda do terreno em lotes hade satisfazer o pagamento da sua expropriação.

A vista disto as medidas apresentadas são indispensaveis e inadiaveis para adoptar para o bem da ilustrução.

(continua)

ECOS & CRITICA

Sarasvat Brahman Samaj

Por ocasião do 9° aniversario de fundação desta Simpatica associação de Margão realisaram-se algumas conferencias, umas feitas pelos filhos desta terra e outras pelos da India visinha. Nada mais natural.

O que, porem, sencibilisou, tristemente a opinião publica é o escandalo motivado pelo alcool,

E' que, tendo quasi todos os oradores aconselhado *uda voce* o ilustre auditorio a não fazer, por qualquer titulo que seja, o uso de vinhos e outras bebidas alcoolicas, ardura Troia.. E um dos oradores, completada a conferencia dum desses dias do mesmo aniversario foi por alguns emeritos bebedores cercado no caminho..., mas tendo-lhe chegado o apoio dos seus amigos, o incidente ficou apenas em *cerco* sem outras consequencias nesse dia!

Desde o imediato dia, todavia em que, por signal, estava designado a conferencia dum caudilho da India Britanica, era o Salão de associação visitado por um Delegado do Sr. Admistador do Concelho, o qual Delegado impenha aos conferentes a condicão de não proferirem os nomes de *Tilak* e *Gandhi* !...

Consta-nos que em virtude duma queixa havida, por causa de campanha ante-alcoolica promovida a boa hora pelo *Samaj* houve averiguações na administração concelhia e em que foram ouvidas muitos dos oradores que condenaram o emprego do alcool, ignorando-nos o resultado final da toda *essa tradalhada* !!!

Limitando-nos por hoje a narrar, muito por alto o que ouvimos sobre o sensacional escandalo de Margão, reservando a critica necessaria para ocasião oportuna, isto é, logo depois de estar o livre o nosso Director, da doença que o obrigou a mudar de ares em Rivona onde ora se encontra.

Bharat processado

Como sabem, o sr. Prazos da Costa requereu nesta Comarca processo crime contra o *Bharat* por entender ofensivo do seu caracter e dignidade o artigo -resposto "Ao Sr. Sinrama Rau" publicado no numero 40 do ano transacto

Quanto a nós, o processo em questão não nos faz frio nem caor, proque temos consciencia do dever cumprido. Fique isto entretanto bem assente, até que possamos dizer mais do um espaço, sobre a curiosa individualidade do nosso antigo Deputado e actual auditor *desinteressado*...

स्वदेशासाठीं

म्लेंच्छ दुर्जन उदंड। बहुतां दिवसांचें माजलें बंड ॥
या कारणें अखंड। सावधान असावें ॥१॥
बहुत लोक मिळवावे। एक विचारें भरावें ॥
कष्ट करोनि घसरावें। म्लेंच्छांवरी ॥२॥

श्री रामदास

राष्ट्रकार्यार्थ देह झिजविण्यास तयार होणाऱ्या तरुणानीं कोणत्या मार्गाचा अवलंब करावा, हें आजच्या प्रसंगीं आमच्या 'भारता'च्या वाचकांस श्रीसमर्थांच्याच वाणीचा आधार घेऊन सांगणार आहें. त्यांची वाणी वीर्यवती असल्यामुळें मेलेल्या माणसाला ती जिवंत करणारी आहे. समर्थांच्या वाणींत मारुतीरायाचा भुभुःकार ऐकू येतो ! अहाहा ! धन्य ते कान कीं ज्यानीं ही वाणी प्रत्यक्ष ऐकिली ! व धन्य आह्मी महाराष्ट्रीय लोक, कीं ज्यानां परदास्योद्धरणार्थ 'दासबोधा'सारखा अक्षय गुरु मिळाला.

आज काल देशाचें तारण संघशक्तीशिवाय होणार नाहीं, व वर्णाश्रम पद्धतीचा भंग न करितां ब्राह्मणसंघ, जातीजातीचे संघ व सार्वजनिक संघ, असे त्रिप्रकारक संघ स्थापन झाल्यास उद्दिष्ट कार्यभाग होईल. आपलें राष्ट्र परक्यांच्या ताब्यांत गेलें आहे, आपल्या जमिनीवर परक्यानीं आपली सत्ता स्थापित केली आहे; आपलें असें आपल्या देशांत कांहींच राहिलें नाहीं. या गोष्टीची चटका प्रत्येकाला लागली पाहिजे. गतवैभव परत मिळवून तें वाढवितां आलें पाहिजे, तरच जीवंत रहाण्यांत अर्थ आहे.

असें 'चौबळ' झालें किंवा चारी बळांचा आपल्याला मिलाफ करितां आला म्हणजे आपलें अर्धें काम होईल.

शिवाजी महाराजानीं चारही बळें एकवटलीं म्हणून त्यानां स्वराज्याचा भव्य प्रासाद उभारतां आला. ही बळें राष्ट्रांत कोठें कोठें आहेत; तीं आपल्यांत कशीं उत्पन्न करितां येतील किंवा एकवटतां येतील, याची पहाणी करण्यासाठीं शेंकडो तरुण रामदासी राण्यानें राष्ट्रभर संचारासाठीं हिंडले पाहिजेत आबाळांत कुस्तीसाठीं उडी घालण्यापूर्वीं आपलें बळ आपल्याला अजमावतां आलें पाहिजे. या तरुणानीं 'वंदे मातरम्' सारखे राष्ट्रीय मंत्र खेडोपाडीं जाऊन आबालवृद्धांच्या कानांत फुंकले पाहिजेत. सर्व राष्ट्र सजीव, सचेतन झालें पाहिजे अन्याय, अपमान, अनीति हे सोसण्याची ज्या गुलामांना संवय होते ते पृथ्वीच्या पाठीवर जिवंत राहून तरी काय करायाचे आहेत ? म्हणून ही संवय मोडली पाहिजे.

राष्ट्रभर मर्दानीपणाचे विचार खेळले पाहिजेत. तालमीचे आखाडे जागोजाग स्थापून अंगात रग उत्पन्न करावी, म्हणजे सहजच पराक्रमाचें तेज दाखविण्याची बुद्धि होईल. तरुण देशभक्त देशकार्य करण्याची प्रतिज्ञा करून भडाभड घराबाहेर पडतील; राष्ट्रबल एकवटण्यासाठीं अविवाहित राहण्याचा निर्धार करतील. धर्म व नीति याचा पाया यत्किंचित्‌हि न ढळवितां भगवद्भक्तीच्या बळावर धर्मसंस्थापनेसाठीं स्वराज्याची मशाल पेटवून राष्ट्रभर हलकल्लोळ करून सोडतील, तर दहावीस वर्षांत हिंदुस्थानाला सोन्याचे दिवस आल्यावाचून खात्रीनें रहाणार नाहींत ! मनुष्य यत्न करील तर काय होणार नाहीं ? सर्व कांहीं यत्नावाचून खुंटलें आहे. माणसें पाहिजेत माणसांचीच वाण आहे. माणसें कशा तयार करावींत किंवा तयार झाल्यावर यानीं कोणता मार्ग धरावा हें 'दासबोध' तुम्हांस शिकवील. त्यांत सर्व कांहीं सांगितलें आहे. वाचा, पहा व वागा.

बहुत लोक मिळवावें। एक विचारें भरावें।
कष्ट करोनि घसरावें। म्लेंच्छांवरी ॥१॥

श्री रामदास

नवीन खटला

भारताच्या गेल्या वर्षाच्या ४० व्या अंकावर प्रसिद्ध झालेल्या "सिं. शिवराम बळवंत रावांस" या मथळ्याच्या लेखामुळें सिं. प्राझेरिस द कोस्त सेनादोर, आउदितोर जेराल व माजी देपुताद यांकडून, आह्मां विरुद्ध अब्रुनुकसानीचा खटला उभारण्यांत आला आहे ! संपादकांच्या प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें जरी आह्मांला आज या विषयीं जास्त लिहिणें शक्य नाहीं, तरी वरील सारख्या खटल्याची त्यांना बिलकूल पर्वा नसून उलट लोकसेवा करण्याची स्फूर्ती वाढत राहील असें आमच्यानें लिहिल्यावाचून रहावत नाहीं.

अंगांत पराक्रम असल्याशिवाय राजकारणहि साधणार नाहीं व परमार्थहि साधणार नाहीं. 'वर्णसंकर करूं नये ! जातीभेद वाढवूं नये ! या पद्धतीनें वागून सर्व लोक एकविचारानें भरावे, सर्वांच्या चित्तांत राष्ट्राच्या उन्नतीचा एकच विचार घोळत ठेवला पाहिजे.

आमच्या निजलेल्या राष्ट्राला जागें केलें पाहिजे प्रथम लोकशिक्षणाचें काम सर्वांनीं झटून केलें पाहिजे. 'बहुत लोक एकविचारानें भरावे' हें कार्य झाल्यावर पुढें हिंदुस्थानांतल्या ज्या भागांत ज्या जातींत कर्तबगारीचा व असामान्य पराक्रमाचा पुरुष निर्माण होईल त्याला त्या परिस्थितीत जें योग्य दिसेल तेंच बहुमतानें तो करील. तें आज तुह्मीं आह्मीं ठरवून किंवा कांग्रेसनें ठरवूनही कांहीं विशेष उपयोग नाहीं. 'स्वराज्या'चा हेतु डोळ्यांपुढें ठेवून बहुत लोक एकविचारानें भरायाचा उद्योग मात्र निरपेक्षपणानें करणारे तरुण पाहिजेत. बळावांचून शक्तीच्या गोष्टी बोलूं नयेत. बळें चार प्रकारचीं असतात. द्रव्य बळ, शरीर बळ, मनुष्य बळ, बुद्धिबळ. आपलें राष्ट्र

आमचे संपादक

प्रकृतीच्या अस्वास्थ्या मुळें रिवण येथें हवा बदल करण्यास गेले आहेत सबब कारण मुळें पत्रोत्तरास विलंब लागल्यास ते आमच्यावर रागावणार नाहींत अशी उमेद आहे.

मॅ. भारत

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1.º ofio. Lobo, vão à praça para venda, em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situada em Cusmane, na rua de D.ão, no dia 26 do corrente mez às 12 horas, pelo maior lanço que se oferecer, acima da avaliação, o direito á metade de uma terça parte do palmar "Nocodbab Gorbata" da cultura de coqueiros, jaqueiras e mais arvores, sito em Soliem de Cacorá, inscrito na matriz sob o n.º 233, avaliado por 350 rupias, o direito á quarta parte da varzea denominada 'Mosgale nomoxi", da cultura de arroz, sito em Cacorá, inscripto na matriz sob o n.º. 172, avaliado por 100 rupias, o direito á metade de uma terça parto da varzea denominada "Borchigale" da cultura de arroz sito em Cacorá, inscrito na matriz sob o no 177. avaliado por 200 rupias, o direito á metade de uma terça parte do predio denominado "Gongorla" da cultura de arroz e coqueiros, sito em Soliem de Cacorá, inscrito na matriz sob os numeros 267. 275. 276 e 284 avaliado por 275 rupias, o direito á metade de uma terça parte da varzea denominada "Vanguigandig' ou "Zotegandina", da cultura de arroz, sita em Soliem de Cácorá, inscrito na matriz sob o n.º 169 avaliado por 100 rupias,- o direito da metade de uma terça parte do predio denominado. "Boroda valechimig" ou Boroda delumago sito na dita da culture de arroz e coqueiros, inscrito na matriz sob o numero 260, avaliado por 350 rupias,- e o direito á metade da terça parte do predio denominado "Mortuvalo' da cultura de arroz e coqueiros sito na dita inscrito na matriz sob o n.º 286, avaliado por 200 rupias, e discritos os inteiros predios, os primeiros dois na conservatoria desta comarca sob os nos. 895 e 3170, respectivamente, e os outros cinco no de Salcete sob os nos. 1270, 1271 1272 1273 e 1274, respectivamente, e penhorados nos autos civeis de execução hipotecaria que Narana Bicaró Gauncar e outros de Soliem de Cacorá, como cessionarios do primitivo exequente Antonio Francisco Gomes, de Cavelossim, e residente em Cansaulim, movem a Madu Arguna Gauncar e outros de Soliem de Cacorá, para pagamento da quantia de 650 rupias, juros, penas e custas da execução. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quisquer credores e co proprietarios incertos e os representantes dos credores falecidos Vitola Fotù Sinai Mopcar de Ponchevaddy de Pondá e João Miguel Abranches, advogado de Verna, a favor dos quis se acham registadas as hipotecas n.ºs 1901 e 2294 para segurança das quantias de 200 rupias e 1100 rupias respectivamente. O que para ser publico se expodiu este. Quepem 5 de abril, de 1921

O escrivão de direito do 1.º ofi.
Manuel Jose Sebastião Lobo
Verifiquei
O 1.º substituto do Juiz de direito do auo transacto.
Lobo

base efectiva e sincera dum governo autonomo. Transferencia da auctoridade das mãos do poder central para as da população local deve ser a unica razão da autonomia. Deve ser sufecientemente ampla, com garantias efectivas da indipendencia politica local, para desenvolver o sentimento da responsabilidade. E' indispensavel precisar e limitar a intervenção superior

A autonomia da India deveria, pois, começar pelas instituições locaes. A's comunidades desembaraçadas da tutela oficial, e ás municipalidades eleitas seria concedida autonomia administrativa: com garantias prefixas, limitadas á area da sua jurisdicção, dentro das quaes seriam soberanas. Os seus presidentes seriam as respectivas autoridades locaes, sendo abolidos os esquipaticos regedores e administradores. O governo teria os seus delegados locaes, cuja funcção seria irreductivelmente fiscal, mas deveriam auxiliar as auctoridades locaes quando solicitados, na manutenção da ordem publica.

As communas em conjuncto ou em grupos, as municipalidades, cristãs e hindus, as associações de classe e as populações em geral, deveriam ser representadas no Conselho Legislativo, que não poderia ter menos de trinta membros, dois terços dos quaes, pelo menos, seriam electivos.

Ao Conselho Legislativo seria garantida a iniciativa e a votação difinitiva de qualquer proposta, fosse de que natureza fosse, salva a materia reservada ao Congresso Nacional.

Com o direito de *veto*, o Congresso reservaria para si as relações externas, os direitos civis e politicos, a organização do exercito, e por fim, todo o contracto ou concessão que envolvesse direito de soberania.

O presidente do Conselho Legislativo seria eleito e nunca o governador que deveria estar fora d'esse Conselho, não sò porque da discussão e votação d'uma proposta não saisse diminuida a sua auctoridade mas tambem para que a maioria tivesse efectivo o seu direito de dirigir os trabalhos do Conselho.

Em todos os outros Conselhos ou *Comites* que não seriam senão delegações do Legislativo, pelo menos, metade dos seus membros seria eleita pela parte electiva do Legislativo.

Assim, ao menos, a experiencia era de demonstrar e o resultado concludente!

Santana Rodrigues

—रायबंदरचे रा. रा. रामनाथ वामन पैंगेनकर यानी आपले बंधू रा. रा. उण्णो दा. पैंगेनकर यांच्या विवाह प्रसंगीं तेथील 'श्रीशांबदा वाचनमंदिरास' २१ रुपये दिले.

ECOS & CRITICA

Agradecendo

Recebemos mais as felicitações dos seguintes senhores pela absolvição do *Bharat*:- Sitarama Quercar, Ramachondra Panduronga Vaidia, Gopala Vaidia, Sridara P. Sinai Bangui, Roguvir Ananta Bandari, Fotú Mucunda P. Dessai, Ussó Govinda Porobo Dessai, Rama Subraia Porobo Dessai, Agapito Lourenço, Ananta Sinai Dessai, Govinda Porobo Parricar, Jená Visnum Camotim, Puruxotoma Sinai Suquercar. (continua)

Ca' e la' mas fadas ha'

Recebemos a seguinte carta:

लोकमान्य भारताच्या १६ जानेवारीच्या अंकांत प्रो कामत यांच्या पोर्तुगीज आणि श्री. रा.रा. केंकरे यांच्या मराठी पत्रांतून—माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीच्या लायकीबद्दल अनाठायी उल्लेख केलेला भाग वगळून प्रसिद्ध झालेले विचार फार मननीय आहेत.

श्री.केंकरे यांस, त्यांचें माझ्या ठिकाणीं वसत असलेल्या प्रेमामुळें, माझ्यांत नसलेली लायकी दिसावी यांत आश्चर्य वाटण्या सारखें कांहीं नाहीं. या त्यांच्या माझ्याविषयींच्या सहानुभूतीबद्दल फार फार आभारी आहें—असो.

प्रस्तुत परिस्थितींत नुसत्या "कोंसेल्य लेजिजलातीव" मध्यें मेंबर निवडून देण्यानेंच आपलें काम भागणार नाहीं. आह्मीं हिंदुलोकांनीं याशिवाय "कोंसेल्य दे दिस्त्रिक, त्रिबुनाल आदमिनिस्त्रातीव व फिस्काल अशा मंडळांतीं आपला शिरकाव करून घेण्यास झटलें पाहिजे. याचें तात्पर्य इतकेंच कीं आपल्या प्रांताच्या राज्यकारभारांत आपल्या ख्रिस्ती बंधूंच्या बरोबरीनें सर्व कामाची जबाबदारी आपण पत्करली पाहिजे.

आपल्या हिंदु लोकांकडून, दुःशील आणि सैतानी सारांत पराज्याचा अंमल आमच्यावर चालत असतां, सरकारशीं फटकून वागून किंवा स्वाभाविक औदासिन्यामुळें जें असहकार्य घडलें त्याबद्दल दोष देण्यास बिलकूल जागा नाहीं; परंतु प्रस्तुत सारख्या बदललेल्या परिस्थितींत आणि लोकशाहीच्या कालांत पूर्व कालाचाच धडा गिरवीत बसणें हें ईश्वराच्या घरीं केव्हांहि क्षम्य होणार नाहीं!

माझ्या वरील ह्मणण्याचा हेतु आपल्या ख्रिस्तिबांधवांशीं द्वेषमूलक असून, त्यांच्याशीं फटकून वागण्याचा आहे असें मात्र समजूं नये. अशा वागण्याचा मी मनापासून तिरस्कार करितों.

अंतस्थ हेतु इतकाच कीं, आजपर्यंत आपण आपल्या प्रांताच्या जबाबदारीच्या कारभाराचा सर्व भार आपल्या ख्रिस्ती बांधवांकडेच सोंपविल्यामुळें, आपल्या समाजाचें आणि एकंदर प्रांताचें फार नुकसान झालें आहे. यासाठीं तसेंच त्यांच्या विषयींच्या आपल्या बंधुप्रेमाकरितां एकट्या ख्रिस्ती वर्गावरच पडलेलें ओझें आपण हळुहळू कमी केल्याविना आपल्या ठिकाणीं वसत असलेली माणुसकी जगाच्या निदर्शनास येणार नाहीं.

परंतु या एकंदर विचारांस मूर्त स्वरूप येण्यास आपले प्रयत्न संघटीत स्वरूपाचे झाले पाहिजेत. लोकमतजागृतीचें आपलें कार्य नुसतें निवडणुकीच्या मोसमापुरतेंच न थांबतां त्याचा प्रचार सतत चालू ठेवला पाहिजे. नुसत्या व्यक्तिशः विचार प्रदर्शनापासून आपलें ध्येय साध्य होणें शक्य नाहीं, याचा अनुभव आपणास गेल्या खेपेच्या निवडणुकीपासून आलेला असून प्रस्तुत इलेक्शनहि तोच धडा आह्मांस शिकवीत आहे. नाहीं तर त्या इलेक्शनचा हुकूम [पोर्तारी] प्रसिद्ध झाल्यास उणा पुरा एक महिना होत आला तरीहि आपल्या समाजांत पुढील कर्तव्याविषयीं सर्वत्र औदासिन्य भरलेलें दिसावें हें कशाचें द्योतक बरें!!!

आपला उद्धार आपणच करून घेतला पाहिजे, दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याचे दिवस आतां राहिले नाहींत.

पूर्वीच्या काळा प्रमाणें आपण सदोदीत कीं कर्तव्यमूढ राहूं तर जगांत आपलें हंसें झाल्याविना राहणार नाहीं.

शिरवडें, १८।१।२१

गोपाळ कृष्ण गुडे

— ता. २३ रोजीं रात्रौ गुळी — अवेडें येथील श्री देवीच्या मंदिरांत 'जगाच्या कल्याणा संताच्या विभूती। देह कष्टविती, उपकारें' या विषयावर आमच्या संपादकांचें धार्मिक व राष्ट्रीय प्रवचन झालें.

—यंदाच्या निवडणुकींत एका उमेदवारास मदत करून सरकारनें, गाजत असलेल्या आपल्या लौकिकाच्या दिवाळ्यांत आणखी भर घालण्याचें शतकृत्य केलें!

—गोव्हेर्नादोर साहेब हे नूतन दौऱ्यावर निघाले असून त्यांचा प्रवास दमण, दीव, आग्रा, बनारस ह्या ठिकाणापर्यंत होईल. गोव्याच्या आर्थिक कंगाल स्थितीकडे लक्ष्य दिलें असतां प्रवासांत उधळण्यांत येणाऱ्या पन्नास हजार रुपयांचा आंकडा थोडाच ह्मणायाचा!

—अखेरीस भंडारी लोकांच्या मागणीचा निकाल सरकारकडून लावला गेल्यानें, त्यांनीं आपला धंदा येत्या फेब्रुवारीपासून पुनः सुरू करण्याचें ठरविलें आहे.

— मिशनच्या पाद्री लोकांच्या पगाराप्रीत्यर्थ होणारा खर्च पोर्तुगालच्या तिजोरींतून व्हावा अशा पूर्वीच्या कायद्याऐवजीं आंता गोवा सरकारनें तो सोसावा असें लिस्बन येथून फर्माविण्यांत आलें आहे!

—पावसाळ्यांत व्यापाराच्या सोईसाठीं पणजीहून सांवर्ड्यास येण्याजाण्याकरितां आणखी २ आगबोटी विकत घेण्याचें गोवासरकारनें ठरविलें आहे असें कळतें.

मिरवणूक काढण्यांत आली. व रात्रौ ७॥ वाजतां जाहीर सभेस सुरवात झाली. सभेचे पहिले व्याख्याते वे० अनंत भट सहकारी सांवडें, यांनीं सुश्राव्य भाषण केल्यानंतर रा. पाटणकर यांचें "संस्थाकार्य व लोकमान्याची महति" या विषयावर भाषण वगैरे होऊन सभा बरखास्त झाली.

—महाशाल येथील 'श्रीदुर्गादत्त मंदिरांत' ह. भ. दामोदर बुवा रिसबुड यांचीं भक्तिरसपूर्ण कीर्तनें झालीं. बुवांनी चहा, सिगरेट, मद्यपान इ. व्यसनाचा निषेध करून, गोसेवा, गोपालन व गोवर्धन इ. विषयाचें महत्व सांगितलें.

—मडगांव येथें श्रीमत्सुब्रमण्यानंदतिर्थ यांची पुण्यतिथी ता. ५ रोजीं साजरी करण्यांत आली. या प्रसंगीं रा. जनार्दन विष्णु कामत, पुंडलीक वामन विर्जिनकर, श्री पूर्णाश्रम स्वामी (अध्यक्ष) यांची भाषणें होऊन रा. भिडे याचें प्रवचन झालें.

—राजापुरकर 'नाटक मंडळीनें परवां शनिवारीं सार्वजनिक फंडार्थ दिलेल्या खेळाचें उत्पन्न (खर्च वजा न करितां) ७५९ रु. झालें. बाहेर गांवची बरीच मंडळी येऊन फंडार्थ खेळास मदत केली. दुसऱ्या अंकाचे शेवटीं रा. दलाल यानीं, एकंदर मंडळीचे, मंडळीचे मालक रा. माधवराव राणे, 'भारत'कारांचे व तिकिटा घेऊन त्या परत फंडार्थ देणाऱ्यांचे आभार मानल्यावर रा. रा. पाणदीकर आणि कारापुरकर यांनीं रा. राणे यांना हार तुरे अर्पण केले.

—पूर्वी ठरल्याप्रमाणें रायबंदर येथील श्री शारदा वाचन मंदीर या संस्थेचा हरिभक्तिपरायण दामोदर बुवा रिसबुड यांच्या अध्यक्षतेखालीं ८वा वार्षिक सभारंभ साजरा करण्यांत आला. दिवाणखाना लोकांनीं गच्च भरला होता. प्रथमारंभीं संस्थेचे सेक्रेटरी रा. रामचंद्र ना. लंवदे यानीं सर्वांचें मोठ्या प्रेमानें स्वागत करून महाशालच्या 'श्री दुर्गादत्तमंदीरांतील' जयंत्युत्सवासाठीं पुण्याहून आलेले ह. प. दामोदर बुवा रिसबुड यानीं सभेचें अध्यक्षस्थान मंडित करावें अशी सूचना करतांच तीस अनुमोदन मिळून टाळयांच्या कडकडाटांत बुवामहाराज स्थानापन्न झाले.

नंतर संस्थेचे सेक्रेटरी रा. लंवदे यानीं रिपोर्ट वाचून संस्थेच्या ८ वर्षांत घडलेल्या कार्यांचा अहवाल लोकांपुढें मांडला. तो मंजूर होतांच येथील सुप्रसिद्ध नागरिक डॉ. आदोल्फ दे कोस्त याचें भाषण झालें. त्यानीं हिंदुसमाजाच्या प्रगतीबद्दल हर्ष प्रदर्शित करून या समाजाच्या कार्याची महति व शिक्षण प्रसार (वाचनालयें व शाळा) यांचा उल्लेख केला. त्याच प्रमाणें रा. हेगडे देसाइ, रा. रामचंद्र पां. वैद्य. रा. सीताराम वि. केरकर यांच्या देशहितपर कार्याचें दिग्दर्शन करून सदरहु संस्थेस उर्जितावस्था प्राप्त होण्यासाठीं परिश्रम करणारे तिचे सेक्रेटरी रा. लंवदे व रा. त्रिविक्रम गो. का. येळेकर यांचें अभिनंदन केलें, आणि सर्व लोकांस तीस मदत करण्यासाठीं कळकळीचा उपदेश केला.

यानंतर महाशाल येथील बालसरस्वती वे. शा. स अंतोबा शास्त्री धुपकर यांचें धर्म व वाचनमंदिरांची आवश्यकता या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झालें. संस्थेचे सभासद रा. रा. विष्णु रा. का. आपरेंकर यानींहि कार्यकर्त्याचे आभार मानून प्रत्येक नागरिकानें गाईचा वध बंद करण्याविषयीं झटावें अशी आग्रहाची विनंति केली.

अध्यक्षानीं वाचनालयांची महति, विद्याव्यासंग, एकीचे फायदे इ. विषयांचीं सांगोपांग चर्चा करून समारोपादाखल भाषण केलें.

सरतेशेवटीं "श्री शारदा वाचनमंदीर" संस्थेच्या कार्याचें क्षेत्र विस्तृत होण्यास सर्वांनीं हातभार लाविला पाहिजे असें सांगितलें. नंतर अत्तर, गुलाब हारतुरे, फोनोग्राफ वादन वगैरे झाल्यावर सभा बरखास्त करण्यांत आली, असें एक प्रेक्षक कळवितात.

Rosa, com tanto zelo administraram os interesses municipaes do concelho de Sanguem, com tanta *actividade* e *inteligencia* geriram-lhe o cofre municipal que hoje, passados tantos anos, se descobrem nêle desfalques e falsificações!...

Zeloso zelo, activa actividade e inteligente inteligencia!!!

O caso dá *uso* para muitas considerações.

Mas esperemos...

Dr. Sinari

Revistiu-se duma pompa sem igual a manifestação de simpatia que os hindus de Bardez dedicaram, no dia 15 do corrente, ao sr. dr. Sinari que a todos os titulos era dela digno.

Mais uma vez o abraçamos por esta sua apoteose.

Dr. Venctexa Dessay

E' cadidato para vogal efectivo pelas N. Conquistas este nosso presado amigo, apoiado por maioria da classe hindù.

O *Bharat* que vê em sua exa. defensor abnegado dos intereses do Paiz, deseja-lhe cordialmente, na eleição de 23, completo triunfo de que è merecêdor, em razão de brilhantes qualidades que o exornam.

A' urna, pois, pelo sr. Dr. Venctexa Dessai!

UMA CARTA

Sr. Redactor do *Bharat*

Em referencia ao seu eco "Sem rei nem roque..." e em que V. borda considerações sobre a *transferencia da sède* por *conveniencias pessoaes* devo informar que esse jogo *comodo e secretamente publico* da *tranferencia*, data do tempo do Bacharel sr. Antonio Ferreira da Fonseca, hoje Procurador da Republica interino; pois esse magistrado há 3 ou 4 anos, quando Delegado do procurador da Republica desta comarca de Quepem se ausentava, *sem licença*, por longos mezes, da cassabé transferindo a sède da Delegacia e da Conservatoria para Pangim, para onde os interessados tinham de se dirigir para *colher assignaturas* do sr. dr. nos respectivos documentos *estudados* e *preparados* pelos amanuenses; ou que tinham de recorrer ao intermediario do dito Bacharel que se encarregava de as trazer á custa dos interessados que tinham de gastar *alma coisa*, alem de emulumentos, pelo trabalho que fazia.

Vê, portanto, V. que esse jogo ou negocio da *transferencia* é *historico* e *tradicional*, jogo a que, de resto, estão acostumados tanto os chefes como o publico *que olha e pensa*.

A local de V., portanto, nada de novo nos conta...

E' tudo velho

Quepem 16/1/921 — De V. etc. *Sara*

N. da R.

E' uma *novidade sensacional* a que nos dá o sr. Sara na sua carta e para a qual chamamos a atenção dos srs. competentes, se é que acham tal jogo, imoral e prejudicial ao bom publico e ao prestigio de funcções.

Mas o sr. Sara acordou tarde. Para o diante habitue-se a madrugar, sim?

Imoralidade

Escrevem-nos:-

Os jornais *Debate* e *Provincia* trouxeram ao publico um caso bastante escandaloso ocorrido na Praganã, a proposito da ultima eleição do professorado primario.

Eram dois os candidatos que disputavam a eleição para vogal do Conselho da Instrução Publica a sra. D. Maria Ermelinda dos Stuarts Gomes, professora primaria de Colvá, ora professora interina da Escola Normal, e o sr. Luis Matias de Menezes, professor primario de Serulá servindo interinamente em Pangim, e director do *Diario da Noite* que trabalhava para ser reconduzido.

Em apuramento de votos feito no Conselho da Instrução Publica, da eleição realisada no dia 1 de Dezembro ultimo, soube-se que a sra. Stuarts Gomes ganhara a eleição por uma maioria de 3 votos sobre o sr. Matias de Menezes. Mas aconteceu que os envelopes contendo listas dos seis professores da Praganã todos a favor da sra. Stuarts Gomes, encontraram-se avariados em poder do secretário do Conselho da Instução, tendo portanto que repetir-se essa eleição da Praganã.

O caso curioso foi que os mesmos seis professores de Praganã, que na eleição do 1 de dezembro haviam *todos seis* votado pela sra. Stuarts Gomes, votaram na repetição da eleição *todos seis* pelo sr. Menezes, e isso num intervalo duns poucos dias.

O caso fez escandalo. Agitou-se a imprensa. O jornal *Provincia* em especial num gesto de indignação violenta apelou para o governo sobre o proceder dos seis professores que um dia votavam por um candidato e outro dia por outro candidato como se fossem bonecos da feira que executam movimentos pelos cordelinhos do *mencar*.

Há ainda coisa mais curiosa nessa eleição. Houve reclamação sobre a forma da repitição dessa eleição, queixando-se de irregularidades havidas. O sr. Governador geral determinou um inquerito sobre as queixas alegadas, encarregando de o abrir o delegado da comarca.

O inquerito principiou e continua. E antes de o concluir fez-se o apuramento dessa mesma eleição, sobre as irregularidades da qual, está-se fazendo o inquerito. E o Conselho da Instrução aliás composto de 10 membros, por uma maioria de 5 membros, incluindo o proprio candidato, resolve fazer o apuramento dessa assemblea e apurall.........

E perguntamos nós. A candidata que ganhou a eleição terá a culpa da avaria dos envelopes contendo listas por causa da qual teve de repetir-se a eleição? Não por certo. Se não, porque é que ela deverá ficar prejudicada?

BHARAT

Està designado para o dia 17 do proximo mez de Fevereiro o julgamento do *Bharat*, (Taxa de guerra).

लोक काय बोलतात

लोकहिताची गोष्ट

खालील लोकहिताची गोष्ट "श्रीसयाजी-विजय" पत्राच्या २६-१२-२०च्या अंकांत प्रसिद्ध झाली असून तिचा गोव्यांत प्रसार होण्याच्या हेतूनें जशाची तशी ती उतरून घेतली आहे:-

"मुलतानच्या न्यायाधीशापुढें विष प्रयोगाचा एक कज्जा चालला होता. इस्माइल नांवाच्या दुधवाल्यानें दुधांत विष मिसळून विकलें व त्यामुळें रामशरण नांवाच्या एका गृहस्थास मृत्यू आला असें त्या कज्जाचें स्वरूप होतें, परंतु डॉ. दिवाण अली हे आपल्या धंद्यांत पूर्ण वाकबगार असल्या मुळें त्यांनीं रामशरणाच्या मृत्यूचें खरें कारण शोधून काढून बिचाऱ्या इस्माइलच्या गळ्याचा फांस वांचविला. रामशरण यानें मेवेकऱ्याच्या दुकानांतून कांहीं मिठाई घेऊन खाल्ली होती, व ती मिठाई रंगी बेरंगी दिसण्याकरितां मिठाईवाल्यानें जे रंग वापरिले होते त्यांच्या विषानें तो मेला असें डॉ. दिवाण अलींनीं सांगितलें. लोकांचीं विशेषत: लहान मुलांचीं मनें आकर्षण करण्याकरितां मिठाईवाले जे नाना तऱ्हा करून आपल्या जिनसांना रंग देतात त्यांनीं वरील उदाहरणाचें मनन केलें तर इस्माइल सारख्या निरपराधी मनुष्याला फांसावर चढविण्याचें पातक त्यांच्या डोकीवर बसणार नाहीं. रंगदार मिठाईला भाळणाऱ्या मुलांनीं व त्यांचे कोड पुरविण्याकरितां नेहमीं सज्ज असलेल्या वडील माणसांनींही वरील उदाहरण लक्षांत ठेवण्या सारखें आहे."

गोव्यांतील मेवेवाले उर्फ हलवाई हरहमेश साखरीचे कित्येक पदार्थ रंगी बेरंगी तयार करून विक्रीसाठीं दुकानांत मांडीत असतात. ह्या पदार्थांच्या सेवनानें विषारी परिणाम घडला असल्याचें अद्यापि ऐकिवांत नसलें, तथापि ते मनुष्यमात्राच्या देहावर अनिष्ट कार्य घडविल्यावांचून रहात नाहींत. जगाचे डोळे दिपवून टाकिलेल्या जर्मन लढाईचा ओनामा रेखाटल्या मिती पासून पक्या मालाच्या जागीं आतां कच्चा मालाचीच भर पडत चालली आहे. जपानी मालाचा हिंदुस्थानांत अनिरुद्ध संचार झाल्याच्या योगें "अस्सल" हा शब्द नामशेष झाला. गतवर्षीं जपानांतून म्याग्नेशिया (मार्गेज) [जिला इंग्रजींत Epsom salt किंवा Sulphate of magnesia असें म्हणतात] सारखाक्षार आयात झाला तो पोटांत घेतल्यामुळें देहावर विघातक कार्य घडलें असल्याचा गवगवा होता तोच प्रकार रंगांनींही लागू होण्याचा संभव आहे. लोईवार विकतां याचें म्हणून अलीकडे विषारी द्रव्यांनीं युक्त असे रंग बनविले गेले असावे. किरमिजी रंगांत मोरचूद असतो असें कित्येकांचें मत असून किरमिजी रंग हा Cochinilha [कोशिनिल्ह म्हणजे किरमीज] ह्या प्राण्यापासून काढण्यांत येतो. रेशमाचे किडे तुतीच्या झाडावर विस्तार पावतात तसेच किरमीज हे किडे Coca (कोक) नांवाच्या झाडावर दक्षिण अमेरिकेंतील पेरू देशांत सांपडतात. अशा ह्या प्राण्याचा अंश पोटांत शिरल्यानें एखादा प्रसंगीं जीविताला बाध येणें शक्य आहे. वरील दोन रंगांव्यतिरिक्त अन्य रंगांमध्येंही विषारी द्रव्यांचे संमेलन असणें संभवतें, ह्या साठीं प्राणज अथवा विषारी द्रव्यांला पोटांत थारा देण्यापेक्षां रंगीत मिठाईला अजीबात फांटा दिला असतां हितावह होणार नाहीं काय?

आपल्या इकडे सुखवस्तु गृहस्थांचे घरीं ईदिच्या दिवसांत बदाम, अक्रोड किंवा खारीक, काजूचा गर इत्यादी खाद्य पदार्थ मिसळून साखरेचा खेदार हलवा करण्यांत येतो व त्यांतील कांहीं दाण्यांना हिरवा, किरमिजी, पिवळा असा तऱ्हेचा रंग दिलेला असतो, परंतु वरील हकीगत ध्यानांत आली म्हणजे 'पुढच्यास ठेंच मागचा शहाणा' या म्हणीस अनुसरून लोकांनीं सावधगिरी बाळगणें उचित आहे-

सारस्वत

मतदारांस विनंति

मोनार्की वाईट म्हणून रेपुब्लिक निर्माण झालें पण ह्या निर्माण झालेल्या रेपुब्लिकांनून तरी पूर्वीचा वाईटपणा गेला काय? प्रत्येकाचा अनुभवच याचें उत्तर देईल! मोनार्की हें नांव जाऊन या जागीं रेपुब्लिक

सारस्वत मंडळीच्या पुढारी पणानें व पूर्ण मदतीनें चालली आहे. इ.

—शिरवई [मु. जांबावली] ह्या शेतकरी व कुंभार लोकवस्तीच्या गावांत श्रीमत् स्वामी पूर्णाश्रम यांनें 'शेतकऱ्यांनीं आपल्या मुलांस शिक्षण देऊन शेतकीची सुधारणा करावी" ह्या संबंधीं सुश्राव्य व्याख्यान झालें. व्याख्यानास जांबावलीकर मराठा-गायक समाजांतील बरीच मंडळी हजर होती, असें मराठा शिक्षण प्रसारक समाजाचे सेक्रेटरी कळवितात.

—जांबावली येथील रहिवाशी "श्री-दामोदर विद्या मंदिर" नांवाची शाळा उघडणार असून मराठा-शिक्षण-प्रसारक-समाजानें आपल्या "श्रीकृष्ण भुवनांत" शाळेस जागा देण्याचें वचन दिल्याचें कळतें

blicos cria por eles uma funda antipatia no espirito do povo e esta circunstancia prejudica á causa publica.

E' preciso que os reformadores ou os homens publicos anteponham aos seus comodos e prazeres, ás suas conveniencias e interesses o bem publico. E' necessario que eles se identifiquem com a alma popular fazendo suas as alegrias e as tristezas do maior numero. E' indispensavel que eles se aproximem mais e mais das massas populares, dizendo-lhes palavras que possam calar fundo no seu animo, aconselhando-as a banir os costumes rotineiros, preconceitos estupidos e os prejuizos absurdos e encarreirando-as por meio de persuasão e de exemplo pessoal no verdadeiro caminho do progresso e felicidade. E' finalmente mister que eles deem iniludiveis provas da sua tolerancia, de seu amor patriotico, da sua coragem civica, e do seu espirito de sacrificio, ganhando assim a confiança do povo.

Sigam os nossos caudilhos este rumo e verão como o povo corre atraz d'eles, considerando-os como seus guias e bemfeitores, apoiando todos os movimentos que eles iniciem e escutando a sua palavra, como um oraculo. Mas dirão talvez alguns: " Nós não ambicionamos a popularidade dos indoutos. Cumpriremos o nosso dever pela forma como o temos cumprido até aqui. Estamos quites com a nossa consciencia, E isto nos basta".

Mas, senhores, convem reflectir-se n'isto. Vós sois a fina flor da intelectualidade goeza. Vós sois eruditos e conhecedores dos negocios publicos e portanto competentes para se porem na vanguarda dos movimentos conducentes ao bem publico. Não ignorais, de certo, que nenhum movimento pode triunfar, nenhuma ideia pode vingar sem que logre forte apoio da opinião publica

E desde que é a norma por vòs adotada que contribue para se abrir um hiato entre vòs e as massas populares, urge que vós, como verdadeiros patriotas que os sois mudeis o rumo, sacrificando o amor proprio e as conveniencias pessoaes no altar da entranhada Patria e ganhando assim a confiança do povo.

Oxalá as nossas palavras que traduzem verdades nùas e crúas não sejam tomadas à conta de disparates. E, oxalá as duras e amargas experiencias colhidas na materia do nosso Congresso Provincial sirvam de lição aos nossos ilustres caudilhos.

Bascora P. Sar. Dessay

Santo Tucarama

A Companhia melodramatica *Rajapurcar* vai levar á scena este importante e popular drama, no proximo sabado, no Teatro Sri Damodar, de Margão, drama cujo producto integral será oferecido ao Fundo Publico.

Dado o fim altruista a que o mesmo drama se distina, esperàmos que o nosso ilustrado publico envidará os seus esforços de moldo a que ele seja bem concorrido

ECOS & CRITICA

Sem rei nem roque...

O concelho de Quepem ficou sem administrador efectivo nem substituto nos dias 4, 5, 6 e 7 do corrente.

Durante este tempo, factos importantes se desenrolaram no concelho, merecendo especial menção a greve dos lavradores de palmeiras, factos sobre que, segundo nos consta, *vieram* providencias mas com delongas, naturalmente, inevitaveis, de Chandor, aldea *salsetana* da respeitavel residencia do sr. administrador efectivo que, pelo visto *houve por bem* transferir a sède da administração de Quepem para lá...

Não sabemos se o sr. Antão estava ou não autorizado superiormente a administrar, naqueles quatro dias... festivos, o concelho de Quepem, pela forma *estranha* como o administrou. O que sabemos ê que um sipai da Administração, moido pelas fadigas do *vai-vem* de Chandor para Quepem e daqui para lá, para receber e cumprir ordens administrativas, solicitou, finalmente, a sua exoneração! ..

Ignoramos se o mesmo sucede em quaesquer outras repartições deste e doutros concelhos com incalculaveis prejuizos ao *Zé povinho*...

Seria muito conveniente que se apurasse e se providenciasse...tambem por causa da moralidade publica.

Jogo de azar

Ao passo que em outras partes se coibe, fortemente, este vicio, cá no concelho joga-se sem freio e ás barbas das autoridades administrativas.

Em Sirvoi, por exemplo, poucas milhas distantes da sede do concelho houve jogo de azar...e pelos modos, parece-nos que ele não faltarà em Guddò de Avedom, Fatorpá e em outras partes onde se realisam *zatras*.

E' lamentavel, è condenavel.

Aos competentes se è que querem educar o povo deste concelho ou pelo menos não deseduca-lo...

Muita uva e pouca parra, sim!

Uma carta

Duma senhora que se chama *Magdalena* recebemos uma carta, a proposito do caso *Rau Prazeres*. Por ser um pouco extensa, tivemos de reserva-la para o numero imediato.

Desculpas, senhora!

Serviço telegrafo postal

Tabem publicaremos no numero seguinte a correspondencia do sr. Agapito Lourenço, de Cuncolim, sobre este assunto.

Camara de Sanguem

Informam-nos que foram descobertas graves irregularidades nas contas...*pecuniarias* do cofre da antiga comissão municipal de Sanguem.

Irá aí, de visu, estudar o assunto um nosso *reporter*

Atè lá, pois.

लोक काय बोलतात

सांखळी येथील श्रीदत्तजयंत्योत्सव

सालाबादाप्रमाणें गेल्या ७ मी पासून श्रीच्या जयंत्योत्सवास प्रारंभ होऊन त्याची समाप्ति प्रतिपदेस झाली. येथें हा उत्सव दहा दिवस मोठ्या बहारीचा होत असतो या उत्सवासाठीं मुद्दाम लांबलांबहून श्रीदत्तभक्त येत असून ते मोठ्या प्रेमानें सदहू उत्सवाचा लाभ घेत असतात. आरंभीं आठ दिवस पर्यंत पुराण कीर्तन होत असून नवव्या दिवशीं जन्मोत्सव होऊन दहाव्या दिवशीं दिवसा ब्राह्मण संतर्पण व रात्रौ ललित होऊन उत्सवाची समाप्ति होत असते. हा उत्सव चालू असतांना शेवटच्या दिवशीं सर्व क्षेत्र लोकांच्या झुंडींच्या झुंडींमुळे फार गजबजलें जात असून प्रत्येक घर परक्या माणसांनीं व्यापलें जात असतें. या उत्सवास येणाऱ्या भक्तांचीं मनें श्रीदत्तभक्तीनें ओतप्रत भरण्यास श्रीच्या संस्थानची नैतिक व्यवस्था कारणहोय. येथील उत्सवांस देवदासींचीं कामें, कलावंतीचे नाच, जुगाराचे अड्डे व अभक्ष्यपेय विक्री, असले निंद्यप्रकार देवळाच्या आसपास मुळींच दृष्टोत्पत्तीस न आल्यामुळें श्रीगुरुदत्तमहाराजावरचें मन षड्रिपूंच्या जाळ्यांत तिळक्यापुरतें तरी सांपडत नाहीं हा एक सदहू उत्सवांतील विशेष आहे. हें प्रत्येक वर्षी उत्सवास हजर असलेल्या श्रीदत्तभक्तांच्या लक्षांत येऊन चुकलेंच आहे. ज्यांना या उत्सवाचा व खऱ्या भक्तीचा मासला प्रत्यक्ष घ्यावयाचा असेल त्यांनीं एकवेळ येऊन हा श्रीचा जयंत्योत्सव पाहून स्वानुभव घ्यावा, अशी माझी त्यांना आग्रहाची विनंति आहे.

यंदा या उत्सवास श्रीपूर्णाश्रम नांवाचे एक संन्यासी–हे संन्यासी गोव्यांत आज सरासरी दोन वर्षे फिरत असून त्यांची जात, आचार, विचार व हेतु यांची अद्याप जाणीव लोकांना पाहिजे तशी झालेली नाहीं; यांना जसजसी मंडळी भेटेल तसतसे त्यांना ते आपले विचार सांगत असतात – आले होते. त्यांना, सावंतवाडी-संस्थानापैकीं उसप नांवाच्या गांवचा एक ढोंगी मुसलमान भेटून, गोरक्षण, प्राथमिक शिक्षण व कन्या विक्रय यांवर आपलें व्याख्यान लोकांना ऐकावयास लावण्याविषयीं विनंति केल्यामुळें स्वामीजींनीं त्या प्रमाणें संतर्पण भोजन समारंभाच्यावेळीं सर्व लोकांना, त्याच संध्याकाळीं २ वाजतां व्याख्यानास हजर राहण्याविषयीं विनंति केल्यानें, ठरलेल्या वेळीं सर्व मंडळी हजर होतांच त्या मुसलमान ढोंग्यानें उघड्या डोक्यानें अंगावर आडवा तांबडा फडका घेऊन व 'माळ जपाची करिं धरुनी' अशा वेशांत एकदांचें अशुद्ध मराठी भाषेंत अनेक विषयांच्या घोळक्याचें चऱ्हाट ऊर्फ व्याख्यान सुरू केलें. या वेळीं वरील स्वामी हजर नसून स्नानास गेले होते; ते कांहीं वेळानें व्याख्यानास पोंचले. लोकांनीं कंटाळून व आपल्या अमुल्य वेळाचा दुरूपयोग होत असलेला पाहून एकंदर हें चऱ्हाटरूप व्याख्यान बंद करण्यास लाविलें. पुढें श्री स्वामीजींनीं, गोरक्षण, गोपालन व गोवर्धन या विषयांवर अधिकारयुक्त वाणीनें लोकांना रुचतील असे चार शब्द सांगून व या ढोंग्या अजुनीच्या चऱ्हाटाची जाणीव श्रोतृसमूहास थोडक्यांत करून देऊन आपलें भाषण संपविलें, नंतर या ढोंग्यानें आपलें ताट पैशासाटीं लोकापुढें ठेऊन बकसन्यास वृत्तीनें ध्यानस्थ पण कोण पैसे घालतो न घालतो याकडे दृष्टि ठेऊन पुनः माळ ओढण्यास सुरवात केली-

सांखळींतील लोक या ढोंग्याला पूर्वी चांगले ओळखूनच होते. परंतु श्रीस्वामीजीच्या विनंतीला मान देऊन अन्य लोकांबरोबर त्यानाहीं हजर रहावें लागलें. असो.

माझ्या एकंदर गोमांतकस्थानां या पत्रद्वारें अशी एक आग्रहाची सूचना आहे कीं, हा मुसलमान इसम ढोंगी असून त्यानें सध्या परअमलांत चालू असलेली असहकारिता, हिंदुमुसलमानांचें ऐक्य, स्वदेशीची चळवळ, गोरक्षण वगैरे वगैरे चळवळींचा फायदा घेऊन आपण २८ मौलाना – पंडित – पैकीं एक असून देशकार्यासाठीं स्वतः २०० रुपयांच्या नोकरीवर लाथ मारून ही स्वदेश व स्वबांधव सेवा स्वीकारली असल्याचें अश लोकांना सांगून, उगाच व्याख्यानाची सोंगाची वतावणी करून दाखवून, महात्मा गांधी, मौ. शौकत अल्ली व महंमद अल्ली वगैरे पुढाऱ्यांचीं नावें घेऊन ' अहिल्या द्रौपदी सीता तारा आणि त्यांत आमची झालकुमहि धरा' अशा रीतीनें आपणांस

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão de 1 ° oficio Lobo vão a praça para a venda em hasta publica, á porta do tribunal judicial situado em Cusmane na rua de Deão no dia 11 do proximo mez de Janeiro ás doze horas, pela terceira vez e pelo preço que a praça der na carta precatoria vinda da comarca de Salsete extraida dos autos de execução de sentença que Tertuliano Exaltação de Santa Cruz Rebelo de Verna e José Francisco Fernandes de Margão promovem contra Loeximim Sinainim e o seu marido Visnum Sinai Cont. co, de Aquem, dos seguintes bens a estes pertencentes:- Aforamento Ducrafonde sito em Molcornem, discrito na conservatoria do Quepem sob o n° 15:500. inscrito na matriz de Underna sob o n° 28, e aforamento Zambolichem mola, inculto, sito em Molcoponā de Molcornem, discrito na mesma conservatoria sob o n° 1550 e inscrito na matriz de Molcopona sob o no. 13, e penhoradas na dita execução, apensa ao traslado extraido da acção ordinaria instaurada pela dita Loeximim contra os referidos Tertuliano, e José Francisco, para pagamento de 241 rupias 12 tangas e 7 reis sendo metade proveniente de custas e metade de indenisação determinada por acordão da Relação de Nova Goa proferido na aludida acção ordinaria e de custas acrescidas da execução. O arrematante pagará a contribuição do registo por inteiro e as despezas de praça alem do preço da mesma, dentro de tres dias. Por este são citados quaisquer credores e coproprietarios incertos. O que para ser publico se expediu este. Quepem 22 de Dezembro de 1920.

O escrivão de direito do 1.° of.
Manuel José Sebastião Lobo
Verifiquei
O juiz de direito
M. de Quadros.

येत्या अंकांत

वै. पी. व्ही. विर्जिनकर यांची फार्मासी संबंधानें जाहिरात प्रसिद्ध होईल. लक्ष्यांत ठेवा.

convincente, os inconvenientes que hão de, infalivelmente, resultar da aludida extincção que estabelecerá uma lamentavel confusão nas relações comerciais e vida activa duma tão populosa aldea como Sirodá.

Conhecemos *de visu* Sirodá e o seu ilustrado povo, e, porisso, podemos afirmar que há nacessidade toda e inteira da conservação da sua estação postal, como a solicita o sr. Hedó.

Conservem-no, pois, os srs. competentes se é que são amigos do Povo!

Bom sinal!

Parece que o *Vidia-prassar* e todos os demais inimigos do alcool vão ter finalmente a dita de ver realisado o seu ideal do desaparecimento de *bebedores eximios*; pois consta-nos que os lavradores de palmeiras á sura, arrependidos de seus pecados...*imortais* desistiram já do seu *abominavel oficio* de lavrar...miseria alcolica! Vá lá...

E' caso para felicitar o sr. Estado que por todos os meios ao seu alcance e ao dos seus cooperadores se empenha em moralisar o Povo......

Bom signal!

Revisão

Bem sabemos que o nosso jornal sai muitas vezes salpicado de *gralhas*, felizmente de facil inteligencia

E' isto devido á pressa com que, por causa da regularidade, è composto e impresso o *Bharat*. E tambem ás amiudadas ausencias forçadas do nosso director.

Aguardamos, porisso, indulgencia dos nossos presados leitores

Dr. Sinary

Até que, finalmente, acaba de ser publcado na folha oficial o decreto da nomeação deste distincto membro da classe hindu para o lugar de professor do Liceu Central de Nova-Goa, pelo que tornamos a felicita-lo.

O sr. dr. Vitola R. Sinary não ë so membro distincto da classe hindu, é tambem o seu milhor ornamento, não sò pelo seu previlegiado talento, mas tambem pela sua fina educação que lhe tem criado uma vasta roda de amigos e admiradores sinceros.

Do mais recondito dalma desêjamos a sua exa.longa vida nas suas novas funcções.

Satiagraha?...

No movimento encetado pelos lavradores de palmeiras á sura parece reflectir-se o principio do *Satiagraha* do *Mahatmá* Gandhi, quanto á união.

O espirito d'união que se observa nelé torna-o, pois, simpatico; mas o *fim* egoista. que os mesmos lavradores tem em mira, não justifica o *meio* que ë condenavel,

Pois ê verdade. A greve dos lavradores de palmeiras se não inspira em quaisquer principios politicos de elevado alcance:basêa-se nos interêsses estomacais.

¿Que querem eles?

Reducção de taxas de alambique e...coisas.

¿Que dará em resultado essa reducção?

Diminuição do preço d'alcool e aumento do espirito que gerará infalivelmente, o aumento de *bebados*, fauna da pior especie.

E' o fraco do movimento dos lavradores referidos que, porisso, não conseguirão abalar o forte.

Em fim, a ver vamos.

Interinidades...eternas

Há já algum tempo, que certos lugres de amanuenses das administrações de comunidades são ocupados *interinamento*, por mais dum ano, contra lei expressa.

Ou se cumpre a lei ou não. Na primeira alternativa, tal *interinidade* que antes parece *eternidade* não tem a razão de ser. Na segunda alterurtiva não compreendemos porque motivo há de figurar como *disposição legal* uma coisa que se espesinha com toda a sem cerimonia..

Corroborando...

Bem diziamos que nas eleições que cá se fabricam, não influi a propaganda jornalistica, mas sim a importancia pessoal e partidarismo.

O triunfo do sr. Prazeres da Costa na eleição para vogal do Conselho Colonial corrobora mais uma vez a nossa asserção.

A grande maioria da classe hindu já não adora o seu antigo idolo, que em sua opinião tratou só de intruja-la, *de certo tempo para cá*, não tendo, porisso desejado, nem *no sonho* o seu triunfo.

Como, porem, ele não era *materia prima* do fabrico do dito vogal que pertencia á *maior contribuição* ... da insignificante *minoria*, o sr. Prazeres da Costa logrou ver satisfeito o seu desiderato. Não lhe queremos mal porisso.

Fique, apenas, registado um exemplo comprobativo do que deixamos escrito na transacta edição.

Bharatodaya

E' o nome duma revista mensal que sob os auspicios do *Hindu-Samaj* vai encetar em breve a sua publicação nesta comarca.

Serão nela ventilados de preferencia assuntos que secundem o desenvolvimento industrial, agricola e comercial.

PAGODE DE XRI XANTADURGA CUNCOLCARINA DE FATORPA

No dia 20 do corrente, pelas 13 horas, serão arrematadas em hasta publica, joias de ouro e prata e roupa julgadas inserviveis, pertencentes ao cofre do dito Pagode.

Os pretendentes compareçam no dito Pagode no dia e hora marcados com fiança idonea.

O escrivão da meza administrativa.

Rama Pandù Naique

Aos 4 de Janeiro de 1921

डॉ. शिवराम राव यांस-

प्रस्तावनेशिवाय व इतर गोष्टींपूर्वी डॉ. राव यांस आह्मीं खात्रीपूर्वक इतकें सांगूं शकतों कीं, ज्या टीकात्मक लेखामुळें त्यानीं 'तेन्हांत' आपलें पत्र प्रसिद्ध केलें, त्याचा हेतु सि. प्राझेरीस द कोस्त यांचा कोंसेल्य कोलोनियालच्या सभासदाच्या निवडणुकीविरुद्ध गिल्ला करावा असा नव्हता. केवळ त्यानीं हिंदुसमाजाच्या हितसंबंधाच्या विषयांत, मताधिकाराच्या बाबतींतसुद्धां जी तटस्थ वृत्ति धरिली, त्यामुळे ती टीका प्रसिद्ध करण्यांत आली; आणि, वास्तविक पहातां, हें 'आपण आणास....' या लेखाच्या हेतूवरून व अर्थावरून स्पष्टपणें सिद्ध होतें.

या शिवाय आणखी एक कारण असें आहे कीं, ज्यानीं सि. कोस्त यांची निवड करावयाची अशा मोठ्या करवाल्यांच्या तर्फेचें 'भारत' पत्र नव्हे. व आह्मांस दिसतें कीं, डॉ. राव यांस, जरी ते कांहीं वर्षें पोर्तुगालास होते तरी, इकडे निवडणुका [एलैसांवें] कशा प्रकारें होतात व त्यांत वर्तमानपत्रांच्या वजनापेक्षां व्यक्तिविषयक व पक्षभेदांचें वजन किती ज्यास्त असतें, याची पूर्णपणें माहिती आहे. या नंतर हिंदूतील पहिले बाशारेल (डा. राव) असें विचारतात कीं, सरकारकडून राष्ट्रभाषा–पोर्तुगीज–ती लिहितां वाचतां न येणाऱ्या नागरिकांचा मत देण्याचा हक्क काढून टांकण्यांत आला तर त्यांत सि. कोस्त यांचा कोणता अन्याय होतो ?

कोणता अन्याय होतो ? प्रश्न मजेदार खरा !

जाहीर खबर

मि. व्ही एस्. व्हेमुला D. M.
Singer Co Belgaum

आपलें ११-१२-२० चें पत्र मिळालें. पुन: सिंगर कंपनींत नोकरी करण्याविषयीं केलेल्या सूचनेबद्दल आभारी आहें. अशाच आपल्या वचनांवर विश्वास ठेवून आज सरासरी ७००-८०० रुपयांची ठोकर बसली असल्यामुळें आपली सूचना अमान्य करणें भाग पडल्याबद्दल दिलगीर आहें. क्षमा असावी.

१८५ रुपयासंबंधानें आपणांस भरपूर व समाधानकारन पुरावे मिळाले होते. व ही सर्व रक्कम मुसाकडून वसूल झाली पाहिजे असें आपण सांगितलें होतें. परंतु त्याची दया येऊन असो, अगर आपली नोकरी सुरक्षित रहावी या हेतूनें असो, "मुसा यास ६५ रुपयांची मदत करावी" असें मला सांगून माझ्याकडून ६५ रुपये आपण घेतले. परंतु मुसा खोटें बोलल्याबद्दल त्यानें चारचौघांसमक्ष माझ्या जवळ लेखी क्षमा मागून ती वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केली पाहिजे. ही घातलेली अट धाब्यावर बसवून आपण परस्पर निघून गेलां. हा अनुभव केवळ १ दिवसाचा आहे यावरून संबंध दोन वर्षांत........ असो.

पुन: सिंगर कंपनींत राहण्याच्या अटी आपणांस गोकाक पत्त्यावर कळविल्या आहेत. परंत त्या आपणांस मान्य होतील असें मला वाटत नाहीं. त्यापेक्षां "आह्मी जातों आमुच्या गांवा, आमुचा रामराम घ्यावा." काय वाईट ?

रघुनाथ पांडुरंग हेदे

ज्या कायद्यानें हिंदुसमाजाचा मताधिकार, उपरिनिर्दिष्ट कारणामुळें, काढून टाकण्यांत आला, तो कायदा पास करतांना इंदियेंतील व्यक्तींचें व वस्तूंचें यथार्थ ज्ञान असलेले; सेनादोर व बहुविध हुद्यांमुळें वसाहतींतील एक प्रसिद्ध पुरुष मानले जाणारे असे सि. कोस्त यांची मसलत घेण्यांत आली नव्हती काय? तशी मसलत घेतली गेली यांत कोणताच संशय नाहीं; असें असतां हिंदुसमाजाचे मित्र व त्यांचें हितगुज जाणणारे सि. कोस्त हे पोर्तुगाल सरकारच्या हातून होणाऱ्या उपरोक्त घोडचुकीपुढें एकाद्या मुक्या व शांत पाषाणाप्रमाणें, हात पांघरून स्तब्ध कसे राहिले ?

त्याणीं या विषयास महत्व न दिल्यामुळेंच त्यांवरील रुसवा सदरहु टीकेंत आह्मीं व्यक्त केला व त्या टीकेविरूद्ध सि. प्राजेरीस् यांच्या बाजूच्या फुकट . . . . समर्थनाकडे हिंदूतील पहिले देलेगाद यांचें चित्त वेधल.

या बाबतींत हिंदु समाजानें त्यांचें सहाय मागितलें पाहीजे होतें काय?

सि. कोस्त, इंदियेच्या तर्फेंच नामांकित सेनादोर यांस हिंदुसमाजाच्या शिक्षणांतील प्रगतीची ओळख नसती तर वरील कारण लागू पडलें असतें, परंतु सि कोस्त याणीं पुष्कळदां असें ध्वनित केलें आहे कीं, ते हिंदुसमाजास पूर्णपणें ओळखतात - यासाठीं त्यांचें कायदेशीर व नैतिक कर्तव्य मताधिकाराच्या बाबतींत हिंदूंची बाजू राखणें हें होतें. तें त्याणीं बजाविलें नाहीं.

डॉ. राव यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें असेल कीं मुनिसिपालटींच्या निवडणूकींत (एलैसावांत) पोर्तुगीझ लिहितां वाचतां न येण्याच्या सबबीवरून, हिंदूंचा मताधिकार काढून टाकण्याच्या कायद्यांत सि. कोस्त यांचा पुष्कळ अन्याय झाला. ह्या वरून पोर्तुगालांत हिंदूंच्या योग्य मागण्याची तरफदारी करणारा कोणच नाहीं हें 'भारताचें' ह्मणणें अप्रयोजक नव्हे.

त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट ही कीं नामांकित बाशारेल[डॉ.राव]याणीं सि.कोस्त याच्या प्रयत्नामुळें हिंदुसमाजास आपल्या योग्य आकांक्षा फलद्रूप झालेल्या दिसतील, हें कळविण्याची आह्मांवर कृपा केली, व आह्मीं असें इच्छीतों कीं, (शुभस्य शिघ्र या न्यायानें) ही सुवेळ लवकर येवो!

यापुढें सि. कोस्त याणे आपल्या सख्या सोयऱ्यांस व शेजाऱ्यापाजाऱ्यांस अनेक सरकारी जागांवर नेमिलें आहे या आमच्या विधानास अनुलक्षून डॉ. राव यानीं असें ह्मटलें आहे कीं, सि. कोस्त यांस "हिंदूंच्या आकांक्षा व त्यांचीं नांवें जाणण्याची शक्ति नाहीं;" ह्मणजे जर सि. प्राझेरिस द कोस्त यांस त्या गोष्टी कळल्या असत्या तर "भारतास" यद्विषयीं त्याविरुद्ध कसलीच तक्रार करण्याचें कारण नव्हतें.

परंतु हिंदूंनीं आपलीं नांवें व आपल्या आकांक्षा सि. प्राजेरिस् द कोस्त यांस कळविल्या नाहींत, असें डॉ. रावास कोणी सांगितलें? खरोखर डॉ. रावांतहि दुर्दैवेंकरून हें जाणण्याची शक्ति नांहीं, कारण आह्मीं बिनचुकरणें असें सांगतों कीं पुष्कळ हिंदूंनीं पुष्कळदां आपल्या पुष्कळ योग्य आकांक्षा आपले मित्र व माजी देपुताद व सेनादोर यांस कळविल्या; परंतु सि. कोस्त यांस त्या हलक्या व कमी भारदस्त वाटून त्यांस कदचित् केराच्या टोपलींची

साधनानें सज्ञानावस्थेस पोंचण्याचें कार्य अनेक प्रकारची शीकहि सोसून करणें अवश्य आहे. कारण "नहिज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते" ज्ञानासारखी या लोकीं पवित्रता नाहीं असें स्पष्ट गीतावचनही आहे. असो.

महाराष्टांत जीं एवढीं सुप्रसिद्ध शहरें आहेत, त्यांच्या उन्नतीस इतर कारणां प्रमाणें वाचनालयें हेंहि एक असाधारण कारण होय. अशा उद्योगाचें अनुकरण करण्याचे कामीं आमचा गोमांतक प्रांत हळूहळू नेटानें पुढें सरेल असें आजच्या स्थितीवरून तरी म्हणण्यास हरकत नाहीं.

बरींच वर्षें हा प्रांत पुढें सरण्यास पहात होता, पण गेल्या २०-२५ वर्षांपर्यंत तसा योग न आल्यावरून, या विषयीं मध्यम स्थितींतच होता. पण कांहीं वर्षांपासून ही स्थिति पालटून येथील कांहीं शहरांत ज्ञानविषयक चळवळ सुरू होऊन मडगांवच्या "सारस्वत ब्राह्मण समाज" व "दामोदर विद्या भुवन" सारख्या संस्था अस्तित्वांत येण्यापर्यंत मजल पोंचली आहे. ही मोठ्या संतोषाची गोष्ट होय. सदर संस्थांबद्दल श्री. सी. के. दामले, सर ना. चंदावरकर वगैरे विद्वान पुरुषांनीहि अभिनंदनीय उद्गार काढले आहेत, या वरून प्रस्तुत संस्थांनी या प्रांतास किती भूषण प्राप्त करून दिलें आहे हें कळेलच. तरीपण इतक्यावरच न थांबतां या प्रांतांतील इतर बऱ्याच गांवांनी अशा तऱ्हेच्या संस्थांनी, ज्ञान सत्रांत भाग मिळविणें अत्यंत अवश्य आहे. व याकामीं प्रत्येक ग्राम धुरिणांनीं वाचनालयें स्थापण्याच्या कामीं कसून प्रयत्न केले पाहिजेत. त्याचप्रमाणें शाळा, व्याख्यानमाला वगैरे बाबतींतसुद्धां मडगांवच्या सद्गृहस्थांचें अनुकरण करणें फायदेशीर होईल.

याचरोबर हेंहि लिहिणें प्राप्त होतें कीं, प्रत्येक तालुक्यांतील शहर मुनिसिपालटीनें लोकोपयोगार्थ अशीं वाचनालयें सुरू करून शिक्षणविषयक कार्य साधण्यास पुढें सरसावलें पाहिजे. यांत जनसमुदायानेंहि पूर्ण सहकारिता करून अशीं कृत्यें घडवून आणणें फारच हितावह आहे. आनंदाची गोष्ट ही कीं, मडगांव येथील मुनिसिपालटीनें नुकतेंच एक "फिरतें वाचनालय" सुरू करून शिक्षणविषयक उदार धोरण स्वीकारल्याबद्दल आम्ही त्या संस्थेच्या उत्साही चालकांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों.

हाच कित्ता प्रत्येक मुनिसिपालिटीनें गिरवून लोकांस सुशिक्षित बनविण्याचें ध्येय पुढें ठेवणें योग्य होय. सुदैवानें स्वराज्यासारखा काल प्राप्त झाला आहे. मग या वेळीं हिंदूनी उदासीन राहणें श्रेयस्कर आहे काय? तर या विषयीं सरकारकडे जोराची मागणी करून या निस्तेज प्रांतास सतेज बनविण्यास आळस करतां कामा नये प्रत्येक मुनिसिपालटी अशा दिशेनें प्रयत्न करून लोकांस विद्याविभूषित करण्याचें श्रेय संपादन करील अशी मडगांवच्या उदाहरणावरून आशा वाटत आहे. या करितां लोकांनीहि विशेष खटपट करून सर्व श्रेष्ठ असा ज्ञानविषयक फायदा करून घेतला पाहिजे. व असें होण्यास प्रत्येक गांवीं एकतरी वाचनालय असणें अवश्य आहे.

नारायण अनंत नाईक पाटणकर

PAGODE DE XRY CHAMUNDESVORY DE SIVOI

D'ordem superior se annuncia para o dia 3 de Janeiro seguinte ás doze horas, na administração deste Concelho o arrendamento para o seguinte anno de 1921, da varzea Nomós sito em Sirvoy, pertecente ao dito Pagode. Aos 15 de Dezembro de 1920.

O escrivão
Butó Xencora Sinay Sirvoica

ceu Central, no Instituto Comercial, na Fazenda, na Auditoria e em diferentes ramos de serviços publicos, foram atè a metropole para repetir o seu curso medico, para prosseguir no curso do Liceu ou para se formar pelas diferentes faculdades?

Pedimos o favor de no-lo responder que depois lhe diremos sobre a sua lista o que se nos oferecer.

E quanto á desistencia do director do *Bharat* de ir então para Portugal, saibam todos-diga-se a proposito-foi ela determinada por uma serie de contratempos cuja continuação o está ainda perseguindo, como o sabem todos quantos o rodeiam.

Crêmos, todavia, que o sr Rau não pode julgar-se habilitado a afirmar que outro conceito fariamos do sr. Prazeres da Costa se não tivessemos desistido de ir para Portugal, porquanto *nem todos os que foram para là e conviveram com aquele senhor falam dele tão bem* como o sr. Rau, apesar de serem tão bons cavalheiros como o ilustre delegado da comarca de Quepem o è.

Não há duvida que "quem tem parentes e amigos (e visinhos) tem o dever de os servir de preferencia aos que o não são.

Simplismente sucede que este criterio se não torna aplicavel ao sr. Costa cuja entrada no Parlamento foi exclusivamente devida à *classe hindu* cujas pretensões porisso tinha o dever de as servir, de preferencia ás dos seus parentes e amigos (e vizinhos).

Nem é forte, por conseguinte, ainda deste lado, a fraca defesa do sr Costa, feita expontaneamente pelo bacharel hindu.

Certo é que o senador pela India deixou vinculado o seu nome a alguns actos de interesse geral. O *Bharat* tem-lhe prestado, porisso, a justa homenagem. E se *agora* se refere disfavoravelmente ao sr. ex-deputado, é porque ele se tornou *agora*, por seus actos, merecedor disso.

Já vê, portanto, em conclusão, o sr. Rau que as afirmações do nosso suelto não são nada injustas nem disprimorosas para o sr. Prazeres da Costa: representam, pelo contrario, a genuina expressão da verdade.

Uma Carta

E' do seguinte teor a carta que o s. dr. Rau enviou para a *Terra*:

"O *Bharat* de hoje publica um suelto sob a epigrafe *Cada um para si* .....em que faz afirmações injustas e disprimorosas para o sr. Prazeres da Costa, as quais podem, porventura, ser interpretadas como uma campanha contra a reeleição de s. exa. para vogal do Conselho Colonial que está designada para breve.

Que culpa pode ter o sr. Prazeres da Costa de que o governo Central tenha decretado que só podem ser eleitores os cidadãos que saibam ler e escrever o portugues que é a lingua da Nação? E' certo que a sua excia, como representante do Estado da India no parlamento, compete trabalhar para que a classe hindu seja restituida no direito do voto de que foi esbulhada, mas a esta tambem cumpre solicitar o seu concurso para êsse fim. A afirmação do *Bharat* portanto, de que em Portugal não há quem advogue a justa apiração dos hindus é prematura.

Quem, como eu, conviveu, com o sr, Prazeres da Costa e o conheceu de perto não deixará de fazer a justiça merecida ao seu espirito recto e imparcial e de nutrir a esperança de que oportunamente, devido aos esforços de s. exa. a classe hindu verá a sua legitima aspiração realizada

O *Bharat* no referido suelto, acusa-o tambem de ter colocado os seus parentes, visinhos e amigos em varios lugares. O Sr, Prazeres da Costa não possue o dom de adivinhar *os nomes dos hindus e as suas pretensões*. Se os meus correligionarios se tivessem mexido, se tivessem ido atè a metropole uns para repetir o seu curso medico, outros para prosseguir no curso do Liceu outros ainda para se formar pelas diferentes faculdades e, finalmente se se lhe tivessem recomendado, quer daqui, quer na metropole pelas suas habitações e pela sua competencia, alguns, pelo menos, estariam esta hora disfrutando varias situações de distinção. Mas os preconceitos da religião......Se o proprio director do *Bharat* não tivesse então desistido de ir para Portugal, outro conceito faria de s. exa.

Quem *tem* parentes e amigos tem o dever de os servir de preferencia aos que o não são. Filhos da India houve que se limitaram apenas a anichar os *seus* parentes e outros há que sò tratam de si; ao passo que o sr. Prazeres da Costa, antes de anichar os parentes, vizinhos e amigos tinha deixado o seu nome vinculado a muitos actos de interesse geral da India e o *Bharat* conheceu melhor do que eu.

Com publicação destas linhas, creia-me, sr *Redactor*.

De V, etc.

Siurama Rau

Quepem, 16-XII-20.

ECOS & CRITICA

Uma ilusao desfeita

Sob esta epigrafe, publica o nosso colega da *Renovação* um artigo do sr. *Visva Bandhu* sobre alguns actos do sr. Prazeres da Costa, *amigo* da classe hindu.

Ao sincero articulista que no final do seu artigo faz referencias elogiosas ao *Bharat*, consignamos os nossos agradecimentos, chamando para *Uma ilusão desfeita* a atenção dos defensores do sr. Auditor Geral do Ultramar.

Declarando e agradecendo

Pelos mesmos motivos que nos constrangeram a disistir de irmos para Portugal, não nos é possivel entrar no proximo Conselho, ficando obrigados a limitarmo-nos a acção ao *Bharat* e ás modestas conferencias de propaganda politica a que temo-nos dedicado, desde muito.

Fazemos esta declaração por ter-nos constado que alguns amigos nossos desejam a nossa entrada no Conselho e neste sentido pretendem já trabalhar, desejo e pretensão que lhes agradecemos, em todo o caso, sumamente penhorados.

डॉ रावांचें 'तेऱ्हास' पत्र

संपादक महाराज

आजच्या 'भारतांत 'आपण आपणास'...या मथळ्याखालीं एक टीकात्मक लेख प्रसिद्ध झाला असून त्यांत सि. प्राजेरीस कोस्त यांजविरुद्ध कांहीं अप्रशस्त व अयोग्य विधानें केलीं आहेत. त्यांचा अर्थ सि. कोस्त यांची येत्या कोंसेल्य कोलोनियाल मध्यें सभासद या नात्यानें निवड न व्हावी, असा कदाचित् करितां येईल.

जर सरकारकडून पोर्तुगीज लिहितां वाचतां न येणाऱ्या नागरिकांचा मताधिकार काढून टाकला गेला तर त्यांत सि. कोस्त यांचा कसला अपराध !

सि. कोस्त यानीं पोर्तुगीझ इंडियाच्या वतीनें हिंदूंच्या हिरावून घेतलेल्या अधिकारांविषयीं खटपट करावी हें जरी खरें असलें, तरी हिंदु समाजानें त्यांजपाशीं आपलें गाऱ्हाणें नेणें योग्य नव्हतें काय ? होतें. अर्थात, पोर्तुगालमध्यें हिंदुसमाजाच्या योग्य मागण्यांना पुरस्कार करणारा कोणच नाहीं हें 'भारता'चें ह्मणणें अप्रयोजक होय.

ज्यांचा, मजप्रमाणें, सि. कोस्त यांजकडे सहवास घडला असेल, त्यांची खात्री होऊन चुकली असेल कीं, सि. कोस्त हे सरळ विचारांचे, निःपक्षपाती व कोणाच्याहि आकांक्षा पुरविण्यांस मागें पुढें न पहाणारे असे होत. व याचा प्रत्यय हिंदुसमाजास पुढें आल्याशिवाय रहाणार नाहीं.

'भारतानें' सदरहू लेखांत, सि. कोस्त यानें आपल्या सगळ्या सख्या सोयऱ्यांस शेजाऱ्या पाजाऱ्यांस अनेक सरकारी जागांवर नेमल्याचेंहि विधान केलें आहे. सि. कोस्त यांजपाशीं (त्रिकालज्ञ मांत्रिकांप्रमाणें) हिंदूंच्या आकांक्षा व त्यांचीं नावें ह्मणण्याची शक्ति नाहीं. जर माझ्या समाजबंधूंनीं कांहीं हालचाल केली असती, व ते पोर्तुगालास जाऊन, कांहींनी वैद्यकशास्त्रांत, कांहींनीं लिसेयाचें पुढचें शिक्षण संपादण्यांत, किंवा हरएक प्रकारच्या उच्च शिक्षणांत, प्राविण्य मिळवून, मग सि. कोस्त यांजकडे जर आपल्या शिक्षणाची व नैपुण्याची शिफारस केली असती तर त्यांतील थोड्यांस तरी बहुमानाच्या सरकारी नोकऱ्यांवर आरूढ होतां आलें असतें. परंतु, धर्माच्या वेडगळ समजुती......जर स्वतः 'भारत' संपादकांनीं पोर्तुगालास जाण्याचा आपला बेत रहीत केला नसता, तर सि. कोस्त यांजविषयीं त्यांचा दुसऱ्या प्रकारचा मत बनला असता.

ज्यांस सखेसोयरे असतील, त्यांचें मुख्य कर्तव्य ह्मटलें ह्मणजे, इतरेजनापेक्षां, त्यांस पूर्वी उपयोगी पडावें, हें होय. कांहीं हिंदपुत्रांनीं फक्त आपल्याच सोयरेसायऱ्यांस उपयोगी पडण्याचें काम केलें असून, कांहीं तर फक्त स्वार्थ लोलुप बनले आहेत, परंतु सि. कोस्त यानीं आपल्या सख्यासोयऱ्यांस उपयोगी पडण्यापूर्वी इंडियेच्याअर्थ पुष्कळ जनहिताचीं कामें केलीं आहेत, व त्यांची, मजपेक्षां, 'भारता'स जास्ती जाणीव आहे.

ह्या पत्राच्या प्रसिद्धीनें मला आभारांत ठेवावें–

आपला इत्यादि

केपें. शिवराम राव

१६।१२।९२०

या पत्राचें उत्तर विस्तृत झाल्यामुळें त्याचें भाषांतर येत्या अंकावर प्रसिद्ध करणें भाग आहे.

भारत

खुलासा

अनेक कारणांमुळें आमच्या संपादकास येत्या कोन्सिलांत शिरणें अशक्य आहे. भारत व प्रवचनें या दोन मार्गांनींच ते आपल्या देशबांधवांची सेवा बजावण्याचा क्रम चालू ठेवतील.

मॅ. भारत

वर्तमानसार

—ता. २३ रोजीं मडगांव येथील श्री दामोदराच्या दिवाणखान्यांत रा. मोहनलाल रघुवीर रामनाथकर यांचें पियानवादन होऊन त्यांस श्रीयुत वै. पुंडलीक वामन विर्जिनकर यांच्या हस्तें सुवर्णपदक अर्पण करण्यांत आलें, असें एक प्रेक्षक कळवितात.

—नेत्रावळी, सांगे, येथील एका ग्रहस्थानें अनेक तीर्थें फिरून गंगोदकाचे तांबे भरून आणले होते. परंतु कुळें येथें तें ओतून टाकण्यांत आल्यावरून सदरहू ग्रहस्थ आपला तीव्र निषेध प्रदर्शित करतात.

—मुंबई प्रेसिडेंटीचे कष्टम आफिसर ऑनरेबल एडोव्हन व सबकमिशनर विल्यम म्यकडोनाल्ड हे पणजी येथें गव्हर्नर साहेबापाशीं कांहीं खलबत करण्यासाठीं आले आहेत

—येत्या ३ तारखेच्या सुमारास इटलीचे मुंबई येथील कोंसुल सि. गोन्हियो हे पणजी येथें येणार असल्यानें कळतें

— ग्रामसंमंडळाच्या लेखकांस व त्या त्या महालच्या कचेरीच्या कामदारांस पेनशन देण्याचा कायदा पास करण्यांत आला आहे.

जाहीर विनंति

येत्या मार्गशिर्ष वद्य १२ शीं [ता.५-१-२१] बुधवार रोजीं सालाबादप्रमाणें श्रीमत् ब्रह्मण्यानंदतीर्थयति यांच्या पुण्यतिथीचा उत्सव साजरा होणार असून, त्यासमयीं श्रीमत्पूर्णाश्रमस्वामी यांच्या अध्यक्षतेखालीं स्थानिक व बाहेरील वक्त्यांचीं व्याख्यानें तसेंच प्रवचन व कीर्तन इत्यादि होणार आहे. अशा मंगल प्रसंगीं सर्व बंधुभगिनींनीं हजर राहून आभारांत ठेवावें अशी विनंति आहे.

उत्सव कमेटीचा सेक्रेटरी

पु. वा. विर्जिनकर

[illegible]गीची पोंच

श्री. रामचंद्र शेणवी अवदी, बाणावली २ रु.
,,विनायकराव वा. हरमलकर, हरमळ २ रु.
,, गुणबा शिवा देसाई, शिरवडे २ रु.
,, काशीनाथ उपेंद्र देदे ,, २ रु.
,, अनंत सगूण देसाई ,, २ रु.
,, भिकाजी पांडूरंग वालावलीकर मुर्गांव २ रु.
,, राम सुबाय प्रभू देसाई, रिवण २ रु.
,, राणू विष्णुदास केणी रोबोल, कुंकळ्ळी १॥
Sr. João Rebelo कुंकळ्ळी २ रु.

भारत डिफेन्सफंड

श्री. गुणबा शिवा देसाई, शिरोडें १॥ रु.
,, विनायक मोरेश्वर भट ,, १ रु.
,,अनंत सगूण देसाई ,, ,, १ रु.

वर्गणीदारांस विनंति

'भारताचें' पांचवें वर्ष संपत आलें असून सहाव्या वर्षास लवकरच प्रारंभ होणार आहे. नवीन वर्षापासून भारतांत महत्वाच्या सुधारणा होणार असून, साधल्यास आकारांतहि वाढ करण्याचा विचार आहे. ज्या आश्रयदात्यानीं अजून वर्गणी चुकती केली नसेल त्यांनी ती पाठवून भारताला आभारांत ठेवावें अशी सविनय विनंति आहे.

मनेजर भारत

मुंबईंतील

ज्या वर्गणीदारांकडून अजून वर्गणी आली नसेल त्यांकडे भारताचा ४१ वा अंक व्ही. पी. नें पाठविला जाईल. तिचा स्वीकार करून ते आह्मांस प्रोत्साहन देतील अशी उमेद आहे.

मनेजर भारत

अननसें पाहिजेत

वि. मा. कोओपेराटीव येकोनोमिक-- नवीन गोवा व कोस्त कं. मडगांव येथें मिळेल. 1

शिक्षक पाहिजे !

आह्मांस एका मराठी शिक्षकाची गरज आहे. मराठी पांच इयत्ता पास असून इंग्लिश ५ चें सर्टिफिकीट असलें पाहिजे. पगार २० ते २५ रु. लायकी प्रमाणें. उमेदवार खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा.

2 पत्ता:-दत्तवाचनमंदीर
सांगें -गोंव

संगीत

श्रीशिवभक्तविजय नाटक

नाटकमंडळींस प्रयोगास योग्य असून सर्वहक्कांसह विक्रीस तयार आहे. खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

3 शंकर रघुवीर संजगिरी.
c/o तालक वास्कोडिगामा मार्मगोवा

सुरू होणार ! सुरू होणार ! !

नांवें नोंदवा ! {'हिंदु--समाजाचें' मासिक} नांवें नोंदवा !

भारतोदय

या मासिकांत येथील व ब्रिटिश हिंदुस्थानांतील नामांकित लेखकांचे भारदस्त लेख प्रसिद्ध होणार असून त्यांत शेतकी व उद्योगधंदे या विषयांची प्रामुख्यानें चर्चा केली जाईल. छापखान्याची खास व्यवस्था असल्यानें सुबग छपाई व चोख निर्भिडपणा याहि दृष्टीनें 'भारतोदय' लोकाश्रयास पात्र होईल, अशी उमेद आहे.

पत्ता { संपादक भारतोदय
c/o सं. भारत
केपें-गोवा

4

पी. व्ही विर्जिनकर यांची

निळी काळी शाई

व

कार्बोलिक टूथ पॉवडर

(दंतमंजन)

शाईच्या थोरल्या बाटलीची किं. आठ आणे. दंतमंजन डबी चार आणे.

आमची शाई व दंतमंजन, मोठमोठे डाक्टर, विद्वान लोक, सरकारी कामदार यांनीं वापरून, उत्तम अभिप्राय दिले आहेत, ते पहावे.

व्यापाऱ्यांस किंवा घाऊक घेणारांस भरपूर कमीशन. ठिकठिकाणी एजंट पाहिजेत.

पुंडलीक वामन विर्जिनकर
मडगांव-गोवा

5

जग प्रसिद्ध पक्क्या रंगा चीं उत्तम
सर्व तऱ्हेचीं **महेश्वरी लुगडीं** तलम सुबक
अनेक रंगाचीं टिकाऊ

प्रसिद्ध महेश्वरी लुगडीं सर्वांगसुंदर असण्याचें कारण त्यांत सूत पक्क्या व टिकाऊ रंगाचें रेशीम (चायनासिल्क) वापरलें जातें. विणाईचें काम फारच सुबक असून लांबी रुंदीत भरपूर असतें. या योगें हीं लुगडीं सर्वत्रप्रिय असतात. परंतु त्याचे खरेपणाचे माहितीचे अभावीं अनेक जागीं दुसराच माल महेश्वरी ह्मणून विकतो व तो अस्सल नव्हे त्यानें फसवणूक होते; करितां एकवेळ आमचे कारखान्याहून माल मागवून खात्री व ओळख करून घ्यावी.

नंबर माळाचे भाव

१ लुगडें रेशीमकांठी दोन्हीं पदर मोठे रेशमी लांब हात १६+२॥ दर रु. १३
२ लुगडें रेशीमकांठी दोन्हीं पदर मोठे रेशमी लांब हात १६+२॥। दर रु. १५
३ लुगडें रेशीमकांठी सूत नं.६० दोन्हींपदर मोठे रेशीमी लांब हात १७+२॥। दर १९
४ लुगडें गर्भरेशमी सर्व तऱ्हेचे लांब हात १७+२॥। दर २४ ते ३५ पर्यंत.
५ लुगडें रेशीमकांठी जरीबुगडी. सूत नं १२० लांबहात १८+३ दर ४१ ते ५०
६ लुगडें जरीकांठी जरपक्के-सुत नं. १२० लांबहात १८+३ दर ५० ते ६५ पर्यंत.
७चीरडी सर्व तऱ्हेची लांबहात १४+२ दर १० पा० ३० पर्यंत.
८ खण सर्व तऱ्हेचे--दर ॥=; पासून ४ रुपये पर्यंत.

या शिवाय वाटेल त्या किंमतीचा व तऱ्हेचा माल आर्डरीनें तयार करून पाठविला जातो--टीप- मालाचे चांगुलपणाबद्दल आह्मांस ग्वाल्हेर प्रदर्शनांतून रौप्यपदक व या शिवाय निरनिराळ्या ठिकाणची सर्टिफिकिटें मिळालीं आहेत.

घाऊक व किरकोळ माल मागविण्याचा पत्ता--
अशा वेळीं कांहींतरी कृति करून दाखविण्याच्यावेळीं — शक्याशक्यतेच्या वादांत, आवश्यक आहे किंवा नाहीं या वादांत, व्यर्थ काळ घालवून पुनः कोरडे ते कोरडेच राहून काळानें चिरडलें जावें काय? नको असली तरी लढाईला तयार झालें पाहिजे! हिन्दुपरिषदेच्या आवश्यकतेचा प्रश्न आज हातीं घेणें म्हणजे काळाच्या गतीच्या बरेंच मागें आहोंत अशी कबुली देण्यासारखें नाहीं काय? वर सांगितल्याप्रमाणें दुखणेकऱ्याच्या स्थितींत असलेला आपला समाज गुलामगिरींत खितपत राहूं नये म्हणून स्वतःची व्यवस्था स्वतः पहाण्यासाठीं तयार होणार नाहीं काय? बहुसंख्याकांचा जुलूम अल्पसंख्यांकावर चालूं नये म्हणून अल्पसंख्यांकांची एक सारखी धडपड चाललेली असते. आपण तर समसमान आहोंत; पण धडपड मात्र नाहीं. लोकतृंक राज्याच्या काळांत 'दुसरे वाढतील त्या वेळीं ओरडूं' ही स्थिति गेली. स्वार्थांधःकार व्यक्तिविषयक असो जिकडे तिकडे दाट पसरल्यामुळें राष्ट्र किंवा जातीविषयक अशा संघासारख्या संस्था फांसील गणल्या जात आहेत, म्हणून एकाचें तूप दुसऱ्यानें आपल्या पोळीवर ओढून घेऊं नये म्हणून एकदिलाची ज्योत पाजळून एकजुटीनें आपली वाट आपण शोधून काढल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

असा एक सिद्धांत मांडण्यांत येतो कीं, कोणत्याहि वस्तूची आवश्यकता किंवा अस्तित्व त्या वस्तूच्या जाणिवेवरून ठरतें. देवाचें अस्तित्व सिद्ध करतांना एकानें देव आहे ही जाणीवच देवाचें अस्तित्व ठरवितें असें म्हटलें आहे. या वरून पाहूं गेलें असतां परिषदेची जाणीव परिषदेची आवश्यकता ठरवीत नाहीं काय! गरज ही शोधकतेची आई आहे, म्हणून तशी गरज असल्यामुळेंच परिषदेचा प्रश्न पुढें आलेला आहे. स्वतःची गरीबी लपविण्यासाठीं निराशावादी लोक हा प्रश्न आज शक्य नाहीं, असें स्पष्ट सांगतात. परंतु नॅशनल कॉंग्रेस सारखी लोक सभा ज्या वेळीं अस्तित्वांत आली, त्या वेळीं कितीसे लोक कॉंग्रेसचे भक्त होते? आज हजारांवर विद्यार्थ्यांना ज्ञानदान करणारी क्षेवियर कॉलेज सारखी संस्था दहाबारा विद्यार्थ्यांना घेऊनच सुरू करण्यांत आली होती. म्हणूनच परिषदेसारख्या संस्था लोकांना आवश्यक वाटल्यास ते त्या कायम ठेवतील, व म्हणूनच शक्याशक्यतेचा प्रश्न कालावरच सोपवून आवश्यकतेचा भागच आपण येथें घेतला आहे.

थुंकी झेलीत बसण्याचे प्रसंग वारंवार येऊं नयेत म्हणून, टेटाळणीचे स्वर अजिबात बंद पडावे म्हणून, आपलें आयुष्य केवळ अळवावरच्या पाण्याप्रमाणें होऊं नये म्हणून पोटांत दुष्काळदेवतेच्या यातना होत असतांना, आपल्या व्यवसायबंधूशीं संगनमत करून लांडवळांचें वैभव करणाऱ्या आगीसारखी प्रचंडशक्ति पोखरून सारखा मनुष्य उत्पन्न करूं शकतो! स्वतःचा घाम दरदरां निथळत असतांना मिळविलेल्या पैशांवर दुसऱ्यांनीं पांढरपेशांचा मनमुराद फन्ना उडवावा व आपणाला कसेबसे घशाखालीं कोंबण्यासाठीं दोन घांसहि मिळूं नयेत, हें त्या बिचाऱ्यालाहि कसें सहन होईल? प्राण जाण्याची वेळ आली तरी ज्यांच्यावर सर्व मदार होती ते आपलेच घोडें पुढें ढकलून याचे घोडे बाजूला सारूं लागले, परंतु खऱ्या स्वरूपानें प्रतिकार करण्याची शक्ति आपल्या अंगांत नसल्यामुळें त्यानें एक मोठा घोरला उसासा टाकला व तोच स्ट्राइकच्या स्वरूपांत प्रतिकार करूं लागला.

हेंच पहाना! ज्या वेळीं दोघांच्या पैशाची व्यवस्था एकट्याला करावयाची असते त्यावेळी भयंकर सौजन्याचा कोट घालून, दुसऱ्यांच्या गरजांकडे दुर्लक्ष करून कोणत्या ना कोणत्या युक्तीनें, तो आपलेच खिसे गरम करतो. केव्हांहि झालें तरी charity begins at home खऱ्या निःस्वार्थ बुद्धीनें कामें करणारे लोक फारच विरळा असल्यामुळें प्रत्यक्षपणें कामांत असलेल्या लोकांनीं स्वार्थ बुद्धीनें प्रेरित होऊन जनतेच्या पैशांची कशीहि विल्हेवाट लावून आपलेंच घरदार भरावें व आम्हीं मात्र मूग गिळीत स्वस्थ रहावें व अशा वेळीं होऊं

दाखविला आहे. हा सध्याच्या बाल व तरुण व पुढील पिढीला फार उपयोगी पडेल व त्यांकडून स्वधर्म-कर्म व चालीरीति यांचें शास्त्र व परिस्थित्यनुसार योग्य आचरण घडेल व तेणें करून आमचा समाज उन्नत होऊन स्वराज्यास पात्र होईल. नीति व ज्ञान यांच लाभ होण्याकरितां आणखी आरोग्यशास्त्र (Higiène) नीतिशास्त्र [moral] व ज्ञानशास्त्र [Seiencia] ही निरनिराळीं शिकावयास नको आहे, तर या सर्वांचें ज्ञान व लाभ आह्मांला सहज आमच्या धर्म--कर्म शास्त्रांत मिळणार आहे.एवढ्याच शुद्ध स्वाभिमानाच्या उद्देशानें प्रेरित होऊन सदर निबंध पुस्तक रूपानें छापून काढून, तें माझ्या धर्म बांधवांस देण्याचें मनांत आणिलें आहे. या विषयीं दे. भ. वि. चिंतामण विनायक वैद्य एम्. ए. एल्. एल्. बी. या अधिकार संपन्न पुरुषाचाही अभिप्राय फार उत्तम आहे. पण सध्याच्या छपाईच्या महर्गतेमुळें त्याच्या फार प्रति काढणें अशक्य होत असल्यामुळें माझ्या प्रिय व सन्मान्य धर्मबांधवांपाशीं एवढी सप्रेम विनंती आहे कीं, ज्या ज्या कोणास सदर पुस्तकाची जरूर असे-त्यांनीं त्यांनीं मला किंवा भारताच्या संपादकाला अगाऊ तोंडीं अगर एका पैशाच्या कार्डद्वारें तसें कळविण्याची मेहेरबानी करावी, इतकेंच नव्हे, तर ज्यांच्यानें प्रथमतः ह्मणजे सदर पुस्तक छापून तें हस्तगत होण्यापूर्वी द्रव्यद्वारा मदत करितां येईल त्यांनीं ती केल्यास त्यांचा मी फार आभारी होईन आणि त्यांस प्रतीही इतरांपेक्षां कांहीं सवलतीनें देण्यांत येतील.

पुस्तकांच्या प्रतींप्रमाणें त्यांची किंमत ठरविण्यांत येईल.तरी पण आठ आण्यांत कमी देण्यास पुरवणार नाहीं. पुस्तकाचा आकार व जाडी सरासरी "अवतार रहस्या" एवढी होईल असें वाटतें बुकसेलरांनींही आपलीं नांवें अगाऊ कळविल्यास त्यांसहीप्रती सवलतीनें देण्यांत येतील- कळावें ही विनंति.

सर्व स्वधर्म बांधवांचा नम्र सेवक
श्रीपाद गोविंद शेणवी हेदे
पो. शिरवडें (महाल--फोंडा -Goa)

ता. क. ही माझी विनंति आमच्या इतर वृतपत्रकर्त्यांनीं आपापल्या पत्रांतून प्रसिद्ध करण्याची कृपाकरून मला आभारांत ठेवावें अशी त्यांपाशीं ही नम्र प्रार्थना आहे.

Pelo juizo de direio da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Lobo correm editos de 10 dias, a contar do dia em que se publicar o ultimo anuncio, citando, nos termos do artigo931do Codigo do Processo Civil, os credores que pretendam deduzir preferencias á quantia de 230 rupias 12 tangas e 9:5/12 reis, depositada por Durgá Suriagy Sinai Sirvoicar, de Cusmane, no cofre dos depositos dos Orfãos por guia n ° 13 que segundo o conhecimento n ° 134 de 20 de Setembro de 1917 passado pela repartição de Fazenda de Quepem,se acha acentada a folhas vinte e cinco do respectivo livro, como devida ao menor Rajaratna Visvambora Sinai Sirvoicar, do mesmo lugar,no inventario orfanologico requerido de Visvambora Sinai Sirvoicar e começado a prestar-se por obito do tronco comumSuriagy Sinai Sirvoicar, moradores que foram da mesma deCusmane, achando-se essa quantia penhorada na data de 11 de Julho de 1919, nos autos da execução por custas e selos em que é exequente subrogatario Bicu Venctexa Sinai Sunctancar de Cacorá e executados Indirabai Sinainim, viuva daquele Visvambora, e Rajarama Visvambora Sinai Sirvoicar, ambos de Cusmane, apensos áquele inventario. O que para ser publico se expediu este.

Quepem 12 de Novembro de 1920

O escrivão de direito do 1 ofi
Manuel José Sebastião Lo bo

7 Verifiquei
O juiz de direito
M. de Quadros

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Lobo vão a praça para a venda em hasta publica, á porta do tribunal judicial, situado em Cusmane na rua de Deão, no dia 3 do proximo mez de Dezembro, ás doze horas, pelo maior lanço, acima da avaliação na carta precatoria vinda da comarca de Salsete extraida dos autos de execução de sentença que Tertuliano Exaltação de Santa Cruz Rebelo, de Verná, e José Francisco Fernandes, de Margão, promovem contra Loximim Sinainim e seu marido Visnum Sinai Contoco, de Aquem, dos seguintes bens a estes pertencentes:-Aforamento Ducrafondi, sito em Molcornem, discrito na conservatória de Quepem sob o n ° 15.500, e inscrito na matriz de Undorna sob o n ° 28, avaliado por 200 rupias, e aforamento Zambolichem mola, inculto, sito em Molcopona de Molcornem, discrito na mesma conservatoria sob o n ° 15.501 e inscrito na matriz de Molcopona sob o no. 13, avaliado por 50 rupias e penhorados na dita execução, apensa ao traslado extraido da acção ordinaria instaurada pela dita Laximim contra os referidos Tertuliano e José Francisco, para pagamento de 241 rupias 12 tangas e 7 réis' sendo metade proveniente de custas e metade de indinisação determinada por acordão da Relação de Nova-Goa proferido na aludida acção ordinaria e de custas acrescidas da execução. O arrematante pagará a contribuição do registopor inteiro e a despezas de praça alem do preço da mesma dentro de tres dias Por este são citados quaisquer credores e coproprietarios incertos. O que para ser publico se expediu este Quepem 12 de Novembro de 1920

O escrivão de direito do 1of.
Manuel José Sebastião Lobo.

Verifiquei
8 O juiz de direito
M. de Quadros

recuperar os seus *palmares* abadonados mas tambem aumentar a sua riqueza.

Esta é que é a verdade.

Alcoolismo

O *Vidia-prassar* de Pondá tem empregado e emprega a sua melhor energia no sentido, de ver neutralisada a alastração do terrivel mal-alcoolismo.

Não obstante, porem, esse despresivel vicio vai, dia a dia, alargando e á porfia a esfera de seus adoradores.

¿Que fazer nestas condições? ¿Limitar-se, apenas, á propaganda anti-alcoolista por meios jornalisticos, que, pelo visto, não surtem resultados desejados?

Quanto a nós entendemos que o alcolismo sò pode ser debelado por uma associação cujos membros se dediquem, de corpo e alma, para, de viva voz, retrair da degeneração *espiritual* os amigos e adoradores do deus Baco, votando ao secundario plano *outras oficios*

Só então é que o alcoolismo sofrerá derrota que será estrondosa.

Não haja duvida.

Pelo Liceu Central

Bonitas coisas...liceáis no-las conta a *Renovação*.

A serem verdadeiras, tais coisas de *estarrecer* porão em perigo o prestigio do nosso Liceu Central, no seio do qual conhecemos, de resto, professores de invulgar talento e de grande envergadura moral, porisso que foram nossos respeitaveis Mestres.

Gremio L. Hindu

Delicia-nos imenso *o* proposito desta simpatica instituição, de promover conferencias sobre diferentes assuntos de intereses publicos.

Duas cartas

...Sr. Redator do *Bharat V.* referiu-se no ultimo número do *Bharat* e na local subordianda ao titulo de *Bonito*! a um *poço...celeste* do Cacorá.

A's informações que lá ficaram registadas, tenha a bondade do, em nome do publico interesse, acrescentar mais as seguintes:

O tal encarregado da abertura do poço, fez tentativas de abri-lo, de facto para o que, segundo calculo, deve ter gasto umas 20 rupias. *Sem* mais nem menos.

Mandou-se depois vir o material, abriu-se a subscrição, mas tendo apenas *o futuro* poço atingido uma profundidade de dez mãos, foi um ar que lhe deu!.

E desapareceu como por encanto o pouco material que tinha chegado ao sitio do *poço...celeste* no qual, ao que parece, está a nadar a subscrição publica.

E estando o *poço...celeste* nesta altura...*terrestre*, consta que se arrecadou do cofre municipal a tal importancia cujo quan titativo ignoro.

Oportunamente darei mais informações se necessario for, porque o que se quere é que se faça luz completa sobre este assunto de interesse publico.

Cacorá | De V. etc.
20-11-920 | *Um Cacorense*

Em um suelto intitulado "*De nossa justiça* o publicado no Debate em resposta aos artigos do sr. Bascora Sar Dessai, o sr. Menezes Bragança procura corroborar a sua asserção, relativa ás tendencias separatistas do movimento da classe indú, invocando o depoimento do "*Vidiaprassar* e acentuando que para este jornal hindu *o* projetado congresso indu e o diario que os indus pretendem fundar não passa de sintomas de separatismo ou fragmentação,

Mas *o Vidiaprassar* no mesmo seu suelto afirma que os europeus dizem ter a sua plataforma especial e por onde sopram mais tubas do *divide et regna* do que os écos da união, acrescentando que os descendentes ergueram o seu pendão do separatismo com o orgão á parte.

Ora, se o ilustre director do *Debate* nos permite, nós lhe perguntaremos se ele aceita tais afirmações do jornal hindu como sendo a fiel expressão da verdade, ligando-lhe consequentemente alguma importancia.

Se sim, bem está. Se não, é para extranhar que o sr. Menezes Bragança tenha ligado importancia ao depoimento do *Vidiaprassar* apenas na parte que diz respeito ao congresso e diario hindus.

Ignora, porventura, o sr. Menezes Bragança que, como o sr. Bascora Dessai disse, ha varios problemas da ordem social, roligiosa e educativa do esclusivo interesse da classe hindu? Não acha sua exa. conviniente que para a solução desses problemas os indus se reunam numa Conferencia ou Congresso? Supõe o ilustre director do *Debate* que na inauguração d'um tal congresso será o inicio da separação dos hindus des seus irmãos cristãos no campo politico! Entende o sr. *Menezes* Bragança que o simples facto da fundação duma diario pelos hindus constitue o sintoma de separatismo ou fragmentação?

Afòra o *Vidiaprassar* que é orgão da liga da propaganda da instrução hà dous jornais hindus: *O Bharat* e a *Renovação*. Em todos estes jornais indus colaboram por vezes os cristãos, como nos jornais cristão de quando em quando artigos firmados por hindus

Para que, então, esses juizos temerários do exclusivismo o separatismo?

Para que essas hipoteses absurdas que só servem para se criar uma atmosfera de suspeições em torno das pessoas e movimentos?

O que n'esta malfadada terra mais se vê não é o separatismo de classes mas sim o separatismo de individuos. E' o induvidualismo que campeia infrene n'este nosso reduzido meio social. E os agentes? São a intolerancia, a vaidade, o egoismo, o prurido da critica, a exibição do amor patriotico.

Esta é que é a verdade.

Um hindu

N. da R. Limitamo-nos a publicar estas cartas, sem mais comentos.

आमचें शेतकी खातें

भारत पत्राचे संपादक यांसः–

कृ. सा. नं. वि. वि. खालील चार ओळींस आपल्या पत्रांत थोडीशी जागा द्याल अशी आशा आहे. अलिकडे गेल्या सपटेंबर महिन्यांत मेहेरवान गव्हर्नरसाहेब गोवा प्रांत, यांनी पणजी मुक्कामीं कौन्सिलांत शेतकीसंबधीं भाषण केल्यावर नंतर पोर्तुगिझ पत्रांतून बरीच टीका होऊं लागली आहे. टीकेंतील मुख्य मुद्दा ह्मणजे येथें शेतकीखात्याची स्थापना होऊन सुमारें आठ वर्षें झालीं, तथापि शेतकींत कोंणत्याहि तऱ्हेची सुधारणा झालेली दिसून येत नाहीं. आपण ह्मणतां ही गोष्ट खरी आहे. परंतु कोणतीही नवी संस्था निघाली, तिची उर्जितावस्था होऊन ती लोकांच्या उपयोगी होण्यास फार कालावधी लागते, हें सर्व लोकांस माहीतच आहे. मुंबई इलाख्यांतील शेतकीखातें सन १८८३ सालीं सुरू झालें. ह्मणजे आज जवळ जवळ पसतीस छत्तीस वर्षें झालीं. याखात्याची थोडी बहूत कामगिरी गेल्या १५ वर्षांतच दिसून येत आहे. शेतकींत सुधारणा घडवून आणणें ह्मणजे गारुड्याच्या काठीनें आंब्यांच्या फांदीला तावडतोब आंबे आणणें नव्हे. जमीन, हवापाणी वगैरे संबधीं निरनिराळी परिस्थिति शेतकसणारे लोक, त्यांच्या पूर्वापारअसलेल्या रुढी, नवीन कोणी कांहीं सांगितल्यास त्यावर अविश्वास वगैरे बऱ्याच गोष्टींचा विचार केला असतां, शेतकींत सुधारणा घडवून आणणें, वाटतें तितकें सोपें नाहीं त्याला अवधी लागेल. नुसत्या डायरेक्टरची नेमणूक झाल्यानें सुधारणा होणें शक्यनाहीं. त्यांनां खेडोपाडीं हिंडण्यांस वेळ नाहीं. त्यांचें मुख्य काम हाताखालच्या लोकांस डायरेक्ट करण्याचें आहे. तालुक्या तालुक्यांतील शेतकीची माहिती असणारे लोक पाहिजेत. या लोकांची अद्यापि कमतरता आहे. ह्या सर्व गोष्टी घडवून आणण्यास मुबलक पैसा पाहिजे. गेल्या एक दोन वर्षांपासून शेतकी खात्याच्या चळवळींस सुरवात झाली आहे. या साठीं लोकांस अशी विनंति आहे कीं, नुसती टीका करीत न बसतां जनतेस काय काय पाहिजे, शेतकरी लोकांच्या काय काय अडचणी आहेत, असें सूचनात्मक प्रश्न शेतकी खात्यापुढें मांडावे. डायरेक्टर व इतर अधिकारी यांच्याशीं सलोख्यानें वागून आपला होईल तितका फायदा करून घ्यावा व आपली मागसलेली शेती उर्जितावस्थेस आणण्यास प्रयत्न करावा, अशी माझी जनतेस विनंति आहे. कळावें हे विनंती

ता. २–११–२०

गणेश केशव केळकर

*या पत्रांतील कांहीं विधानांसंबंधीं आमचें मत आह्मी येत्या अंकांत प्रदर्शित करणार आहोंत. सं भारत

सुधारलेला नांगर

(बुधवार तारिख १७ माहे नोव्हेंबर रोजीं मडगांव नजीक नावेली येथें शेतकी खात्यानें भरविलेलें प्रात्यक्षिक.)

आसोळणें येथील सरकारी इस्टेटींत प्रयोगसिद्ध ठरलेल्या सुधारलेल्या नांगराचें प्रात्यक्षिक नावेली येथील चर्च जवळच असलेल्या एका शेतांत भरविण्यांत आलें. मीं गेल्या महिन्यांत पेडणें मुक्कामीं एक शेतकीवर व्याख्यान दिलें त्यावेळीं असें प्रतिपादिलें होतें कीं ज्या ज्या ठिकाणीं यात्रा भरतील त्या त्या ठिकाणीं – प्रयोग सिद्ध झालेल्या गोष्टी शेतकी खात्यानें आयत्या जमा झालेल्या लोकांच्या नजरेस आणाव्या. व अशी ही संधि वायां दवडूं नये त्याप्रमाणें हें नांगराचें पहिलें प्रात्यक्षिक होय. असो. शेताची मशागत उत्तम रीतीनें झाली पाहिजे याजबद्दल कोणाचाही मतभेद नाहीं व मशागतीच्या आऊतांत जगांत कोठेंही गेलें असतां नांगरच्च पहिलें आऊत होय. त्या प्रमाणें गोमांतकांतील परिस्थितीला योग्य अशा निरनिराळ्या ठिकाणच्या नांगरांचे प्रयोग चालू आहेत त्या पैकीं हल्लीं ज्या तऱ्हेची लोक मशागत करीत आहेत तो प्रश्न पहिल्यानें सोडविला पाहिजे. हल्लीं गोमांतकांत मुख्यत्वें करून समुद्रकिनारीं पट्ट्यांत गडी व बाया खोऱ्यानें जमीन खणीत असलेलीं दृष्टीस पडतात. अशा वेळीं हेंच काम फायदेशीर रीतीनें कसें करितां येईल हें ठरवून, यात्रेच्या दिवशीं चर्च जवळील शेतांत म्हैसूरच्या नांगरानें नांगरट करण्यांत आली. सकाळपासून संध्याकाळ पावेतों नांगर चालू ठेविला होता. हें काम रस्त्याजवळच चालू ठेविलें असल्यामुळें लोकांच्या झुंडीच्याझुंडी उभ्या राहून काम पहात होत्या. लोकांना काम पसंत पडलें. व ते आपसांत नांगराची तारीफ करतांना दिसले. ह्या नांगर ओढण्यांस चांगले दोन टोणगे लागतात. नांगराची किंमत १५ रुपये आहे. हल्लीं आशोळण्यांत असलेला नांगर कांहीं लोक भाड्यानें नेतात. त्या प्रमाणें लोकांची मागणी झाल्यास शेतकीखातें जागोजागीं डेपो काढून भाड्यानें नांगर देण्याची तजवीज करील असें वाटतें.

लोकांना खणण्यापूर्वी जमिनीवरील तण कापून टाकावें लागतें. तसें ह्या नांगरटीच्या वेळीं करण्याची जरूरी नाहीं. ह्या नांगरानें जमीन खोल खणली जाऊन ढेकळें उलटून पडतात. कारण फाळाला माती उलटण्याची तक्का लाविलेला आहे. शिवाय वरील तण ढेकळा खालीं गाडलें गेल्या मुळें तें कुजल्याकर जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होईल.

दुसरें प्रात्यक्षिक मडगांव येथें तारिख ८ ते १० डिसेंबर रोजीं भरणाऱ्या यात्रेच्या समयीं भरविण्यांत येणार आहे. त्या वेळीं नांगराचें काम पहाण्याची संधी लोकांनी दवडूं नये. अवश्य यावें अशी विनंति आहे. ह्या प्रात्यक्षिकांस मिं. कोरिआ आफोनसो, ॲडमिनिस्ट्रेटर असोळणा, यांनीं पुष्कळ श्रम घेतले.

ग. के. केळकर

हिंदु परिषद

ह्या संस्थेस पाठबळ देऊन पुष्कळ गृहस्थांचीं पत्रें आलीं असून त्यांची नावनिशी एकदमच जादा पत्रकांत प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. भारतांत पूर्वी प्र. सिद्ध झालेल्या नावांचाहि त्यांत समावेश होईल.

सं. भारत.

वर्गणीची पोंच

श्री. कृष्ण अनंत प्रभू भेंब्रे, जांबावली ३ रु.
,, शिवराम गो. शे. नाडकर्णी, सांगें ३ रु.
,, सदाशिव सांवळो भाटकार, ,, ३ रु.
,, श्रीनिवास सां. कोसंबी, ,, ३ रु.
,, मोताबा साजू नाडकर्णी, ,, ३ रु.
,, माधव उ. कामत खाडीये, ,, ३ रु.
,, राम अनंत शे. नावेलकर, असोळणें ३ रु.
,, गणपत लक्ष्मण मांजरेकर, ३ रु.
,, आत्माराम स. शे. नाडकर्णी, कुर्पे ३ रु.

डिफेन्सफंड

श्री. लक्ष्मण र. संजगिरी, विद्यार्थी सारस्वत विद्यालय ह्मापसें, २ रु.
,, भास्कर प्र. सरदेसाई, वाडी १ रु.

ANUNCIOS

o... orante apelo do sr. presidente, sendo por unanimidadadē de votos aprovada a proposta, no meio do forte tossir e sonoras gargalhadas sarcasticas dalguns conselheiros desdentados e...avelhentados.

E encerrou-se a sessão.

ECOS & CRITICA

7 de novembro

Raiou-nos feliz e precursor de rendenção politica este dia em que cá se recebeu o telegrama do seguinte teor:

"Decretado Conselho Legislativo. Dezoito vogais sendo onze eleitos. Mantida actual representação, excepto Mormugão. Diu representante privativo."

Felicitamo-nos e conosco o Paiz!

Quem mauda?

Pergunta alguem quem é que aqui manda, se o Estado da India ou o Governo da Metropole.

Pelos modos, esse alguem deve ser algum habitante do planeta...*lunar* ou *solar*.

Pois se fosse residente *daqui*, tal *alguem* convencer-se-hia de que quem cá manda é o Egoismo, amigo intimo do Estomago.

Laximi pujan

Solenisou-se essa festividade emQuepem com grande pompa.

Creditos...

Diariamente, se abrem creditos-Tal è o seu numero què eles são bem capazes de desacreditar quem os abre...em dado momento da necessidade financeira.

Não parece?

Nao cooperaçao

Neste artigo, publicado no numero anterior, lea-se "cargos honorarios e retribuidos" em vez de "cargos honorarios e tributarios"

Julgamento do Bharat

Está designado para o dia 22 do proximo mez de dezembro o julgamento do *Bharat*, relativo á *taxa de guerra*.

Congresso Provincial

Pedimos a todos os que almejam o bem estar do nosso Paiz o favor de lerem com atenção o artigo *Horror de responsabilidades*, publicado no ultimo numero do nosso preado colega do *Debate*

Quanto a nós encontramos ali só considerações que fotografam a verdade e só esta, no seu tamanho natural.

Não haja duvida: no brilhante artigo em questão o articulista revela um estudo completo das pessoas e coisas do meio em que vive

Nunca lhe doam as mãos!

Uma carta

Do sr. Rao Bahadur G. S. Kelker recebemos uma carta que nos foi remetida por intermedio da Direcçao dos Serviços Agricolas

Por falta de espaço, tivemos de reserva-la para o numero imediato do *Bharat*.

Bonito!

Informações fidedignas di-

Dardos e Cardos

Doido varrido...

Pensa muita gente boa *di cà e di lá* que o mr. Gandhi é um *doido varrido*, porque pretende libertar a India do pesado jugo do governo inglez, por meio do seu movimento de *não cooperação*.

Nós, tambem, lêmos pelo breviario da referida gente que temos na conta de sisuda, sèria e muito amiga de...comodismo.

¿ Não é uma doidice propria dum *mahatmá* a não-cooperação que obriga ao subdito inglez a não beber chá, a não mandar seus filhos para escolas oficiais, a regeitar e abandonar como *tigelas quentes* titulos, condecorações e merçês honorificas, a não pagar impostos, por fim, a não auxiliar o governo inglez em coisa alguma?

Oh que horror!

Certamente, o adjectivo *Mahatmà* que a populaça colocou antes do nome...*malfadado* do Gandhi, deve conter uma significação politica, verdadeiramente temivel-!

Longe de nós o Ghandbi, os seus irmãos Alis e sucia que, pelo visto, estão empenhados em perder sono ao inglez e socego ao subdito ordeiro, pacato e mais pacifico do que o Grande Oceano Pacifico!

Não é *mahatmà* vedico o Gandhi. E' um autentico doido e...varrido, sem duvida!

Mormugão

Afigura-se-nos que se duvida do *maravilhoso* futuro da *futura* cidade de Mormugão

Terá havido intrigas no Terreiro do Paço?

¿Pois, então, porque fizeram de Mormugão no primeiro dia comarca e no imediato reverteram a *futura* cidade do *maravilhoso* futuro ao seu anterior estado de julgado?

Inspira-nos compaixão-francamente o dizemos-a cidade que num abrir e fechar de olhos mudou, duas vezes, de ...estado!

---

zem-nos que um individuo de Cacorá arrecadou da Comissão Municipal, antecessora da actual Camara Municipal do concelho de Quepem uma razoavel importancia do tesouro dela, *como dinheiro gasto para a abertura dum poço naquela aldea...sem te-lo aberto*!

Mas perguntamos:

¿Como è que a extincta comissão passou a tal individuo dinheiro sem se certificar de abertura do poço?

¿ Ou terá havido qualquer jogo .. *combinatorio* do *favoritismo* para se subtrair ao cofre municipal aquele dinheiro publico e se empregar em proveito individual?

Que è isto?

Mete-nos nojo isso; mas se, não obstante, com grande pesar, referimo-nos ao *celebre* poço.. celeste, è que está neste *mergulhado* o dinheiro publico.

Faça-se a luz!

Será ela feita?

ठिकठिकाणचे राष्ट्रीय उत्सव.

मडगांवचा सरस्वत्युत्सव

गेल्या अंकांत प्रसिद्ध झाल्याप्रमाणें श्री. वैद्य यांचें चित्तवेधक भाषण झाल्या नंतर डॉ. वासुदेवराव केरकर यानीं लो. टिळकांच्या निधनाबद्दल दुःखप्रदर्शनाचा ठराव पुढें मांडला. या ठरावावर बेळगांवचे प्रसिद्ध पुढारी देशभक्त गंगाधरराव देशपांडे यानीं आपल्या अस्खलित वाणीनें लोकमान्यांच्या कांहीं चित्तवेधक आठवणी, मायदेशावरील त्यांचें अकृत्तिम पेम, स्वदेश हिताकरितां कसल्याहि प्रकारच्या आपत्ति सोसण्याची त्यांची तयारी, "महाराष्ट्राचा सिंह" ही सार्थ पदवी जनतेनें त्यानां कां दिली याचा खुलासा, ज्या पुण्यपुरुषाचा अंतःकालपर्यंत आपणास सहवास घडला व या एकाच कारणामुळें स्वताच्या जीविताची वाटणारी सार्थकता वगैरे गोष्टी इतक्या सप्रमाण व स्फूर्तिदायक वाणीनें मांडिल्या कीं बऱ्याच प्रेक्षकांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहून "धन्य लोकमान्यांचे सेनानी" असे उद्गार निघाले. नंतर अध्यक्षानीं लोकमान्याच्या गुणवर्णनोद्गार काढून श्रीसरस्वतीसेवकमंडळानें हा दुःखवट्याचा ठराव पास केल्याबद्दल व फोटोचा अनावरणविधी आपल्या हातून करण्याची संधि दिल्याबद्दल अभार मानून फोटोवरील पडदा दूर केला. या वेळीं फटाक्याच्या कडकडाटांत, टाळ्यांच्या व चौघुड्याच्या निनादांत सर्व सभागृह दुमदुमून गेलें होतें. नंतर रा. दलाल यांचा मराठीसंबंधी पास केलेल्या योजनेबद्दल स्थानिक पार्लमेंटच्या आभारप्रदर्शनाचा ठराव पास होऊन व इतर धार्मिक विधी उरकल्यावर पहिल्या दिवसाचें काम संपलें.

दुसऱ्या दिवशीं समारंभाला ७ वाजतां आरंभ होतांच रा. दलाल यांनीं ठिकठिकाणाहून आलेलीं पत्रें व तारा वाचून दाखविल्या. त्यांत प्रो. परांजपे, दे० केळकर, भोपटकर, दामले, पांगारकर, मसुरेकर, वगैरे पुणेंकरांचेहि सहानभूतीचे संदेश होते. नंतर डॉ. वासुदेवराव केरकर यानीं "जुटीचा प्रभाव" या विषयावर लिहून आणलेला निबंध वाचून दाखविला. नंतर दो. व्यंकटेशराव देसाई यांचें पोर्तुगीजमध्यें भाषण होऊन त्याच विषयावर रा. रा. पुंडलीक वामन विर्जिनकर यांचेंहि व्याख्यान झालें. नंतर दे. भ. देशपांडे हे ज्यावेळीं बंगालचे फाळणीमुळें झालेली जुटी, व तिनें दाखविलेला प्रभाव, हिंदुमुसलमानांची एकी उर्फ जूट करण्याचा संकल्प ज्या महाराष्ट्राच्या सिंहानें केला व आपल्या आयुष्यांतील शेवटच्या दिवसांत त्या प्रयत्नाचें योग्य चीज झालेलें त्यानां पहाण्यांस मिळालें त्याचींच गोड फळें असहाकारितेच्या रूपानें थोड्याच अवधींत सर्वांना चाखावयास मिळतील वगैरे गोष्टी लोकानां समजावून सांगू लागले, त्यावेळीं प्रेक्षकसमुदाय चित्राप्रमाणें तटस्थ होऊन गेला होता.

या एकाच गोष्टीवरुन त्यांच्या प्रभावशाली विवेचन पद्धतीचें कोणासहि अनुमान करितां येईल. आपल्या भाषणाच्या शेवटीं दे. देशपांडे यानीं आपण लोकमान्यांचे सेनानी नसून शेवटच्या पायरीचा त्यांचा एक शिपाई गडी आहें, असें सांगून सर्वांचा निरोप घेतला. या वेळीं रा. दलाल यानीं दे. देशपांड्याचे आभार मानतानां सांगितलें कीं, त्यानीं जरी आपणाला लोकमान्याचे शेवटचे शिपायी असें मानलें तरी आह्मीं त्याना हुषार सेनापतीच समजूं. अशानीं आपल्या शेजारच्या प्रांताकडे प्रेमभावानें पहावें, अशी विनंति केली. नंतर अध्यक्ष वरील विषयाचा समारोप करताना ह्मणाले कीं, सर्व व्याख्यात्यानीं आजच्या विषयाचें प्रतिपादन उत्तम प्रकारें केलेंच आहे, पण ही जुटी अगर एकी जुळून येण्याला काय केलें पाहिजे-अडतेंकुठें-एवढेंच मी सांगणार आहें. केवढाहि मोठा हत्ती असला तरी त्याला बांधावयाला दोरखंडाची गरज असते. पण हा दोरखंड कशापासून करतात, तर यःकश्चित तृणापासून. तृणाच्या काड्यांतहि हत्तीला बांधून टाकण्यांचें सामर्थ्य उत्पन्न होतें. पण तें केव्हां होतें? हाच फार महत्वाचा प्रश्न आहे. तृणाच्या कांहीं काड्या आगें मागें रचून दोरखंड तयार होण्याला ज्यावेळीं वळसा घालण्याचा त्रास सहन करितात, तेव्हांच दोरखंड तयार होऊन हत्तीला बांधण्याची शक्ति त्यांत येते. अर्थांत समाजांत जूट उत्पन्न होण्यास समाजांतील पुढाऱ्यांनीं तृणाच्या काड्या प्रमाणें आगें मागें होण्याची व वळसा घालण्याचा त्रास ह्मणजे आपल्या तामसी महत्वाकांक्षेला दाबांत ठेऊन केवळ समाजाच्या कल्याणाकरितां सर्वांशीं मिळून मिसळून वागण्याचा संकल्प करणें ह्यांतच खऱ्या समाज कल्याणाचें मर्म आहे. रात्रौ हरि कीर्तन, आरत्या प्रसाद वगैरे होऊन दुसऱ्या दिवसाचें काम संपलें.

तिसऱ्या दिवशीं गोमांतकांतील तरुण पिढीचें कर्तव्य या विषयावर प्रथमतः पोर्तुगीज मध्यें दो. व्यंकटेश राव देसाई यांच्या अध्यक्षतेखालीं प्रो. दत्ताराम गोविंद कामत, वासुदेव शे. वोडके व प्रो. बाळकृष्ण वामन सांवर्डेकर यांचीं भाषणें होतांच रा. आत्माराम शंभू पांणदीकर यानीं अध्यक्ष व व्याख्यात्यांचे आभार मानले-- नंतर रा. ब. वैद्य हे अध्यक्षस्थानीं आरूढ होतांच रा. रा. यशवंत विष्णु पै रायतूरकर यानीं श्री दामोदरवाचनमंदिराचा तृतीय वार्षिक अहवाल वाचून दाखविला. त्यावर अध्यक्षानीं लहानसें भाषण करतांच तो सर्वांनीं मंजूर केला. नंतर रा. द. पां ना. दलाल यानीं "गोमांतकांतील तरुण पिढीचें कर्तव्य" या विषयावर लिहून आणलेला निबंध वाचला. याच विषयावर रा. त्रिविक्रम वि. वैद्य, वा. ना. पालेकर व रा. रामचंद्र नारायण प्रभु लंवदे यांचीं भाषणें झाल्यावर अध्यक्षानीं समारोपांत तरूण पिढीच्या कर्तव्याबद्दलच्या उपदेशाच्या गोष्टी सांगितल्या. त्यांत शिक्षणाची वाढ सुसंघटीत प्रयत्न, गोव्यांतील परिस्थिती-- प्रमाणें पुढाऱ्यांशीं व सरकाराकडे सहकारित्व आणि शारीरिक बलाची वाढ वगैरे मुद्दे प्रामुख्यानें होते. नंतर वें. शा. सं. सहकारी यानीं समारंभ, अध्यक्ष, पाहुणे, व सभाजन यांच स्तुतिपर संस्कृतांत तयार करवून आणलेले श्लोक ह्मणून दाखऊन त्यांचा अर्थ सांगितल्यावर, रा. ब, वैद्य यानीं अध्यक्षस्थान स्वीकारून सर्वांना आपल्या विद्वत्ताप्रचुर व अनुभविक विवेचन पद्धतीनें ज्ञानामृत पाजल्याबद्दल रा. दलाल यांनीं त्यांचे आभार मानले. शेवटीं तीनहि दिवसांचे व्याख्याते मंडळीचे व उत्सवास

ANUNCIOS

COMUNIDADE DA PROVINCIA DE BALY

No dia 16 do corrente, pelas 10 horas, estará aberto o novendio para oferecimento das sexímas sobre os lanços arrematados da receita trienal para o ano de 1921 a 1923 e da despeza anual para o ano de 1921, da sobredita comunidade, no templo de Xri Deus Vitol, de Baly, lugar das sessões da comunidade da mesma.

Aos 3 de Novembro de 1920

O escrivão da com.

Ramacrisna Vencù Sinai Regò

1

जन्मपत्रिका

साग्र जन्मवेळ कळवून आर्डर दिल्यास नं. २-३ फी. रु. २॥-१।. टिपण ८ आठ आणे नं. १ व अन्य खुलाशास अर्ध्या आण्याचें टिकीट पाठवा.

एफ आर-प्रभू

2 कळंगूट—गोवा

The Norwitch Union Life Insurance

Capital incluindo bonus Rps. 345 000 000

Premios pagos Rps. 480 000 000

Esta companhia de seguros que foi fundada em 1808 é a mais antiga e rica do mundo com um consideravel numero de assegurados.

Agentes em Goa
R. S. Kamat
English. Prof.
Mapuçà

Agentes em Bombaim
W. S. A. Graham e C°

3

पैसे परत देऊं] मदनविलासचूर्ण [हमी वाचून पहा

अथवा

इंडियन टॉनिक फूड

शरीरांत कीड ठेवणें हें मरणाचें मूळ आहे. हें चूर्ण दुधांत सेवन करीत गेलें असतां आंगांतील कडकी, उष्णता, पित्तरोग, वातरोग, प्रदररोग, मधुमेह, क्षयरोग, बाळंतरोग, खोकला, जीर्णज्वर, मूळव्याध, नपुंसकत्व, धातूचा पातळपणा यांचा नाश होतो. कंबरदुखी, हातपायांची आग, तोंडांतील चट्टे, वास मारणें, अन्नपचन न होणें हे विकार नाहींसे होतात. हें चूर्ण धातुपौष्टिक, वीर्यस्तंभक, कामोत्तेजक, रक्तशुद्धिकारक असें असून यानें शौचास साफ होतें.

किंमत ३० तोळ्यांचे डब्यास एक रुपया. व्ही. पी. सह १८६ आणे अनुपान सोबत. गुणाबद्दल शेकडों अभिप्राय आले आहेत. हमी—ह्या डब्यांत ३० तोळे चूर्ण असतें. ह्यांतून दररोज एक तोळ्याप्रमाणें १० दिवस चूर्ण खाऊन पसंत न पडल्यास बाकीचें चूर्ण परत करावें ह्मणजे ट. ख. वजा करून पैसे परत पाठवून देऊं. दहा तोळ्यांचेवर चूर्ण खर्च केल्यास एक तोळ्यामागें दोन आणे कापले जातील.

तयार करणार —नारायण सखाराम पेंढारी

4 मशीद बंदर, तार ऑफिस समोर.—मुंबई

पी. व्हा. विर्जिनकर यांची

निळी काळी शाई

व

कार्बोलिक टूथ पॉवडर

(दंतमंजन)

शाईच्या थोरल्या बाटलीची किं. आठ आणे. दंतमंजन डबी चार आणे.

आमची शाई व दंतमंजन, मोठमोठे डाक्टर, विद्वान लोक, सरकारी कामदार यांनी वापरून, उत्तम अभिप्राय दिले आहेत, ते पहावे.

व्यापाऱ्यांस किंवा घाऊक घेणारांस भरपूर कमीशन. ठिकठिकाणी एजंट पाहिजेत.

पुंडलीक वामन विर्जिनकर

5 मडगांव-गोवा

कामत, कुरडेकर आणि कंपनी

कुंडईबाजार—गोवा

आमच्या कारखान्यांत उत्तम फ्यान्सी, मखमालीच्या, व जरीच्या सर्व तऱ्हेच्या टोप्या तयार मिळतात. घाऊक घेणाऱ्यांस विशेष सवलत. टोप्यांविषयींची वगैरे माहितीस खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा.

श्रीधर केशव कामत, क्लॉथ व क्याप मर्चंट

6 कुंडई-गोवा

जग प्रसिद्ध — पक्क्या रंगाचीं — उत्तम

सर्व तऱ्हेचीं — अनेक रंगाचीं

महेश्वरी लुगडीं

तलम सुताचीं — टिकाऊ

प्रसिद्ध महेश्वरी लुगडीं सर्वांगसुंदर असण्याचें कारण त्यांत सूत पक्क्या व टिकाऊ खरें रेशीम (चायनासिल्क) वापरलें जातें. विणाईचें काम फारच सुबक असून लांबी रुंदींत भरपूर असतें. या योगें हीं लुगडीं सर्वत्रप्रिय असतात. परंतु त्याचे खरेपणाचे माहितीचे अभावीं अनेक जागीं दुसराच माल महेश्वरी ह्मणून मिळतो व तो अस्सल नसल्यानें फसवणूक होते; करितां एकवेळ आमचे कारखान्याहून माल मागवून खात्री व ओळख करून घ्यावी.

नंबर — मालाचे भाव

१ लुगडें रेशीमकांठी दोन्हीं पदर मोठे रेशमी लांब हात १६+२॥ दर रु. १३
२ लुगडें रेशीमकांठी दोन्हीं पदर मोठे रेशमी लांब हात १६+२॥। दर रु. १५
३ लुगडें रेशीमकांठी सूत नं-६० दोन्हींपदर मोठे रेशीमी लांब हात १७+२॥। दर १९
४ लुगडें गर्भरेशमी सर्व तऱ्हेचे लांब हात १७+२॥। दर २४ ते ३५ पर्यंत.
५ लुगडें रेशीमकांठी जरीबुगडी. सूत नं १२० लांबहात १८+३ दर ४१ ते ५० प०
६ लुगडें जरीकांठी जरपक्के-सुत नं. १२० लांबहात १८+३ दर ५० ते ६५ पर्यंत.
७ चीरडी सर्व तऱ्हेची लांबहात १४+२ दर १० पा० ३० पर्यंत.
८ खण सर्व तऱ्हेचे—दर ॥=; पासून ४ रुपये पर्यंत.

या शिवाय वाटेल त्या किंमतीचा व तऱ्हेचा माल आर्डरीनें तयार करून पाठविला जातो—टीप-मालाचे चांगुलपणाबद्दल आह्मांस ग्वाल्हेर प्रदर्शनांतून रौप्यपदक व या शिवाय निरनिराळ्या ठिकाणचीं सर्टिफिकिटें मिळालीं आहेत.

घाऊक व किरकोळ माल मागविण्याचा पत्ता—

आर. जी. प्रधान लुगड्यांचे कारखानदार हेडऑफीस इतवारा बाजार

7 पोस्ट महेश्वर [होळकर स्टेट

CONTOCO & COMPNHIA

Novo mercado—Margão

PAPELARIA E LUXOSOS ARTIGOS DO ESCRITORIO

Acabam de despachar

Papel almaço, liso e pautado, foolscap, dito de marca legal de 25 linhas para serviço judicial, sabino de maquina de escrever, de oficios, papel quimico, chupante. Grande sortimento de papel de cartão, cartõis de visita, writing-pad, blocks, cadernos, lembretes e envelopes correspondentes. Tinta stefens, tinta academica para caneta permanente, vidros de goma, aparos canetas, lapis, borracha, lacre, alfinetes e tinteiros de vidros e varios outros artigos dependentes do expediente.

Secção de cutelarias facas, garfos, colheres, colherinha cadeadas etc. Para toilette pós, sabonetes do corpo e de barba, pomada, pó de dentes, perfumes e varios artigos de quinquilharia.

8 Preços modicos

ManuelJosé Sebastião Lobo, aliás Manuel José Francisco Lobo, vulgo Manuel Sebastião Lobo, filho de Luciano João Baptista Sebastião Lobo, e de Jacinta Berence de Santana Lobo, natural de Damão Pequeno, casado, escrivão de direito da comarca de Quepem e domiciliado em Quepem, anuncia por termo do numero 3 do artigo 178° do Codigo do Registo Civil que pretende que seja autorizado a usar legalmente o nome de Manuel José Sebastião Lobo, pelo qual foi nomeado para o referido cargo. São por isso convidados quaisquer interessados para deduzirem por escrito autentico e autenticado perante o Governo Geral a oposição que tiverem no prazo maximo de 30 dias

Este anuncio vai ser publicado em vertude da autorização concedido por despacho do Governo Geral de 30 de Agosto de 1919 proferido no respectivo processo instaurado na repartição do Registo Civil de Quepem.

Quepem, 30 de Outubro de 1920

9

Manuel José Sebastião Lobo.

ओरियंटल इंडियल बर्केची अत्यंत नावाजलेली निळी काळी शाई वापरून खात्री करून घ्या- दर डजनी साडेसात रुपये.

प्रभू देसाई-सांवर्डें [एजंट]

A profecia...

Vai-se verificando a profecia...

A Comissão de Milhoramentos de Mormugãoue foi objecto da mais veemente critica popular pretende, pelos modos, imortalisar-se pela loucura... dum palacio, pois, segundo se rumoreja, ela pensa iniciar a sua maravilhosa obra de milhoramentos com um palacio de...loucura!

Loucura ou sinecura?

O que quer que seja, o certo é que a dita Comissão descura de verdadeiros melhoramentos, curando de coisas de que devia lançar mão só no fim, no dizer do *Heraldo*.

Banditismo

Majordá é uma das principais aldeas do Concelho de Salcete. Salcete um dos Concelhos principais das Velhas Conquistas. As V. Conquistas gosam do prelegiode ser chamadas *civilisadas*.

Ergo: Majordá é uma principal aldea que gosa do previlegio de ser chamada *civilisada*.

E' nesta aldea *civilisada*, localidade em que predomina o catolicismo *sincero*, que se dão á luz do dia e...noite scenas do mais abominavel banditismo, não havendo quem as coiba!

E' numa aldea *civilisada* e livre da *semente da revolta* que medra nas *barbaras* Novas Conquistas— que isto se dá, dando margem a que muita gente da gravata limpa pense que Majordá seja qualquer coisa parecida com Calabria.

E' pena!

Escola de Cuncolim

O edificio em que funciona a escola primaria oficial de Cuncolim é uma vergonha nacional, testimunho vivo de como se vota ao ultimo plano o principal assunto de instrução.

O mesmo edificio é um curral com a diferença de que lhe falta luz e ar!

O mais engraçado ou antes desgraçado é que o referido edificio foi *pedogogica* e *higienicamente* condenado por um exame medico *oficialmente* determinado! E isto há mais de tres anos e pico...!

E, todavia, continua ai a funcionar a escola que longe de preparar *futuros cidadãos*, está fabricando, por enquanto, *presentes doentes* !!!

E não há quem olhe para isso!

Grave!

Contra um empregado de Administração outro de Fazenda do concelho de Quepem, muito amigos de *penhoras* e *custas* recebemos algumas queixas devidamente reconhecidas.

Havemos de ver o que isso é.

Mahatma Ghandhi

Este eminente patriota e desinteressado organisador do movimento de *Não-cooperação* esteve em Belgaum, na passada segunda. Muitos hindus de Goa foram visita-lo e assistir aos seus discursos sabre o *assahi-carità*,

Mahatmá Gandhi é hoje quem guia o movimento politico da India Britanica, gosando duma influencia que nenhum patriota chegou até aqui disfrutar.

Urge previdenciar!

Já estamos fartos de saber que os alunos do nosso Liceu Central na disciplina de matematica estão muito *salientados*, obtendo cada um deles notas altas como as de 4 5, 6. 7,8 valores, havendo um e outro cujo merito è de 10 e mais.

Deve--se esta *saliencia* da classe academica ao *benevolo* professor da respetiva cadeira sr. Alberto Garcia da Silva, digno administrador do concelho das Ilhas, que, segundo nos consta é bastante *irregular* em dar aulas cujo numero mensal em media não excede a 7 ou 8 quando pelo horário devia este nùmero ser de 12 para alunos da 4a.. 5a. e 6a. e de 20 para os da 7a. classe.

A Mma. Carta organica diz que "um fúncionário, em prejuizo do serviço não pode acumular dois cargos". Como se explica então a irregularidade do aludido professor?

Serà isto *para ingles ver*?

Naturalmente o sr. Garcia espera que os alunos-tendo cada um delos notas (valores) desses, hão de trabalhar mais, para elevar as suas notas, mas é impossivel que essa *teoria* do sr. professor entre na pratica, visto que todo o estudante está convencido de que dos valores nunca dependerá, nem depende o seu mérito, a sua inteligencia; que o estudar não é obter valores, (é exatamente neste ponto que o pobre aluno depende do ilustre professor) mas sim assimilar o que se lecciona na aula.

Vê ele os seus alunos inspirados num espirito revolucionário contra ele que aprecia as coisas sob um prisma muito engraçado. Pois, isto será o *luar para o gatuno*?

Quando SExa. apareceu na India como professor da matemática no liçeu central, cremos, era conhecido neste nosso meio como um bom professor e sobretudo um homem de consiencia, pois. como se sabe, o foi no ano letivo p. findo, notando-se, porem, ser ele agora contrario.

Qual seria a causa da mudança instantanea na pessoa deste professor? Por acaso seria a sua nomeação para o cargo de administrador do conselho fator influente desta mudança pois, é desde então que o sr. *administrador* tem sido um mau professor?

Deve o sr. *administrador* estar ao facto do que o mal dum estudante é o duma classe inteira e que "*vox populi est vox dei*"

O dar valores aos alunos não será, nem é o mesmo que marcar o preço do peixe e verdura do mercado, pois, não é daqui que se avalia a competencia de cada qual.

E' licito, pois, que SExa. o sr. Governador Geral repare bem no *portar-se* do sr. Garcia que é muito regular (?) no seu oficio e desde já volva a sua atenção para o estado das coisas.

A bom entendor...

(*Do nosso reporter*)

मडगांवचा चौथा सरस्वत्युत्सव

श्री. वैद्य यांचें भाषण

"शारदेचा उत्सव करणें ह्मणजे ज्ञानाचा उत्सव करणें होय. शारदा देवी ही ज्ञानाची देवता आहे. तिची उपासना अगर कोणत्याहि देवतेची उपासना करण्यास त्याचें मर्म, त्याचें हृद्गत कळलें पाहिजे. त्या वांचून ती उपासना अधिक वीर्यवान व तेजस्वी होत नाहीं, व त्या मुळें मनास विशेष आनंद व समाधानहि प्राप्त होणें कठीण. वास्तविक देव एकच आहे. देव एकच असल्याबद्दल आपल्या धर्मांत आणि तत्वज्ञानांत चांगल्याप्रकारें सिद्ध करून दाखविलें आहे. बृहदारण्यांत अशी एक गोष्ट आहे कीं, याज्ञवल्क्यऋषींनीं कोणा एकास देव किती आहेत असा प्रश्न केला. तेव्हां त्यानें तेहतीस कोटी देव आहेत असें सरळ उत्तर दिलें, तेव्हां त्यास पुन्हां विचारलें, देव किती आहेत? त्यानें तेहतीस आहेत असें उत्तर दिलें. पुन्हां प्रश्न केला, देव किती आहेत? त्यावर त्यानें बारा आहेत असें सांगितलें. व पुन्हांः विचारतांच देव एकच आहे. असें त्यानें सांगितलें. ह्यावरून आपण जरी देव अनंत मानिले तरी देव एकच आहे त्या देवांत अनंत गुण भरले आहेत, जगांत असलेले सर्व गुण त्याच्यांत एकवटलेले आहेत. ह्या सर्व गुणाचा समुच्चय आपल्या अंतःकरणांत होणार नाहीं, ह्मणून त्याच्या कांहीं गुणाचें एकीकरण करून एक देव मानिला आहे उदाहरणार्थ दाशरथी राम. ह्याच्यांत सत्यवचनी, सत्यपत्नी, सत्यवाणी, इत्यादी गुणाचा समुच्चय आहे. असे त्या सर्वैश्वर संपन्न देवाचे अनेक देव मानण्यांत येऊन, त्यांपैकीं ज्या ज्या गुणाची आपणास आवड असते, त्या त्या देवाची आपण उपासना करीत असतों. वास्तविक परमेश्वर सर्वत्र भरलेला असून, त्याचें अस्तित्व जरी प्रत्येक वस्तूंत आहे तरी, नेहमींच्या वागणुकींत तो सर्व ठिकाणीं आहे, असें धरून चालतां येणार नाहीं. कारण तसें झाल्यास जमिनीवर उभें राहाण्यास सुद्धां आह्मांला संकोच वाटेल." या बद्दल स्वतः अनुभवलेली एक गोष्ट सांगून हा मुद्दा सर्वांना समजाऊन सांगितला. नंतर आपल्या आराध्य देवतेच्या मूर्तींत परमेश्वराचें अस्तित्व आपल्या भावनेनेंच उत्पन्न केलें पाहिजे. आपण ज्या ज्या वस्तूंच्या ठिकाणीं परमेश्वराची भावना करूं त्यांत तो कसा दृग्गोचर होतो ह्या बद्दल भक्तश्रेष्ठ प्रल्हादाची गोष्ट सांगून त्याच्या पित्यानें स्तंभांत देव आहे काय, असें विचारतांच त्यानें स्वतःच्या भावनेच्या बळावर "होय" असें उत्तर देतांच हिरण्यकश्यपूच्या लाथेनें स्तंभांत श्री नरसिंह स्वरूपी ईश्वर कसा प्रगट झाला हें सांगितलें. प्रतीमा पूजन हें एक उपासनेचेंच अंग आहे, पूजनानें देवता फलद्रूप होते, ह्मणून देवताच्या मूर्ति करितात. त्या आकाराला नांवें ठेवितात. परंतु त्या मूर्तीला प्राणप्रतिष्ठा करून मंत्रोच्चारानें अक्षता टाकून ईश्वराच्या अस्तित्वाची भावना आपण कशी उत्पन्न करितों हें गणपतीपूजनावरून सर्वांनाच अनुभवास येईल. अर्थात शारदेची उपासना ह्मणजे परमेश्वराचीच उपासना होय. ज्ञानस्वरूप शारदादेवीचें पुराणादिकांच्या आरंभीं श्लोकरूपी ध्यान करितात तें असें:—या कुंदेन्दु तुषार हार धवला या शुभ्र वस्त्रांवृता ॥ या विणावर दंडमंडित करा या श्वेत पद्मासना । या ब्रह्माच्युत शंकर·प्रभृति भिर्देव सदा वंदिता । सामांपातु सरस्वती भगवती निःशेष जाड्या पहा ॥१॥ ह्या श्लोकाचा अर्थ सांगतानां श्री सरस्वतीच्या स्वरूपाबद्दल अध्यक्षांनीं आपल्या विद्वत्ता-प्रचूर भाषणानें जमलेल्या शेंकडों प्रेक्षकांस थक्क करून टाकिलें. त्याचा साधारण गोषवारा असाः ईश्वराची शक्ति ह्मणजे देवीची मूर्ति; ती शक्ति तीन प्रकारची असते. सत्वमय, रजोमय आणि तमोमय. ज्याप्रमाणें कफ, वात आणि पित्त या त्रयीमुळें शरिराचे व्यापार चालतात त्या प्रमाणें परमात्म्यांच्या या तीन शक्तीमुळें जगताचे व्यापार चालतात. ह्या तीन शक्तींस तीन देवतांचें रूप दिलें असून त्यांतील सत्वशक्ति ही महासरस्वती, रजोशक्ति महालक्ष्मी व तमोशक्ति ह्मणजे महाकाली होय. सर्व शक्तिमान परमेश्वराच्या ह्या शक्ति असल्यामुळें त्यांच्यां त्री देहात्मक मूर्ति बनवितात. श्री सरस्वती देवीची मूर्ति "या कुंदेन्दु तुषार हार धवला अशी असावी. धवला ह्मणजे पांढरा रंग हा सत्व गुणाचा द्योतक आहे. पांढरा रंग केवळ ज्ञान व प्रकाशमय आहे. गीतेंत सत्वाचें स्वरूप श्वेत—ज्ञानमय—प्रकाशमय आणि सुखमय आहे, असें स्पष्ट वर्णन केल्याचें सांगून, श्री गीतेचा दररोज एक तरी अध्याय प्रत्येक तरुणानें वाचावा असा कळकळीचा उपदेश केला. श्री शारदादेवी ही प्रत्यक्ष सत्वाची, अर्थात मनास प्रकाश देणारी सुखाची आणि ज्ञानाची आदिदेवता होय. ह्मणून शारदेची उपासना करणें ह्मणजे परमेश्वराच्या सत्स्वरूपाची आणि ज्ञानाची उपासना करणें होय. तिचें वस्त्रहि शुभ्रच आहे. "या शुभ्र वस्त्रांवृता" ज्ञानाचें वस्त्रप्रावरण ह्मणजे शब्दालंकार होय. श्री सरस्वती देवीनें शुभ्र वस्त्र धारण करून तुह्मांस असें दर्शविलें आहे कीं, श्री शारदेच्या उपासनेनें प्राप्त झालेल्या सात्विक ज्ञानापासून उत्पन्न होणारे शब्द सत्वमय--सुखमयच असतील. ज्या शब्दांपासून आनंदाची आणि समाधानाची प्राप्ती होतें, असें महाभारताचे--गीतेचे-शेक्सपीयरचे--प्लेटोचे व कालीदासाचे शब्द ह्मणजे अंतःकरणास प्रकाश देणारें श्री शारदादेवीचें शुभ्र तेजोमय आणि सत्वस्वरूपी प्रावरण होय. तिनें आपल्या हातामध्ये विणा धारण केलेला आहे. "या विणावर दंडमंडित करा" ह्या विण्यानें तर आपल्या सत्वस्वरूपाचीं, सतगुणांच्या आवडीची आह्मांस पुरीच ओळख करून दिलेली आहे. विणा ह्मणजे सप्तसुरांच्या एकीकरणानें बनविलेलें कर्णमधूर व आल्हादकारक वाद्य होय. विण्याच्या तारा ह्मणजे शास्त्रें. शास्त्रांच्या एकतानतेचें दर्शक तो विणा. हार्मनीच्या तत्वाप्रमाणें सातहि सुरांच्या मिलनानें त्याचे स्वरांत जसें अत्यंत माधुर्य येत असतें; त्याच प्रमाणें समाजांतील मार्गदर्शकांची हार्मनी ह्मणजे एकी झाल्यानें समाजांत उच्चतम आनंदाचा उपभोग घेण्यास सांपडतो, त्यांतील एखादा सूर बदसूर झाल्यास त्या विण्याचें जसें मार्दव नाहींसें होतें, तसेंच समाजाच्या धुरीणांत एखादी व्यक्ति सुद्धा द्वेषमूलक अगर बदसूरी निघाल्यास, ती कार्यविघातकी होऊन समाजाच्या अधोगतीस कारणीभूत होते; अर्थात मिलनानें — एकीनें — गोडीनें समाजांत कोणतेहि कार्य करण्यानें तें आल्हादकारक व इष्टपरिणामी होतें. व तें श्रीशारदा

PAGODE DE SRI SANTERI DE XELDEM

A arrematação do bate cobrado dos arrematantes terá logar no dia 10 do corrente mez pelas 15 horas no templo do mesmo.

Aos 2 de Novembro de 1920

O escrivão *Utoma P. Sinai Odarcar.* 1

ANUNCIOS

जन्मपत्रिका

साग्र जन्मवेळ कळवून आर्डर दिल्यास नं. २-३ फी. रु. २॥-१।. टिपण ८ आठ आणे नं. १ व अन्य खुलाशास अर्ध्या आण्याचें टिकीट पाठवा.

एफ आर-प्रभू

2 कळंगूट-गोवा

The Norwitch Union Life Insurance

Capital incluindo bonus Rps. 345 000 000
Premios pagos Rps. 480 000 000

Esta companhia de seguros que foi fundada em 1808 é a mais antiga e rica do mundo com um consideravel numero de assegurados.

Agentes em Goa
R. S. Kamat
English. Prof.
Mapuçà

Agentes em Bombaim
W. S. A. Groham e C°

3

पैसे परत देऊं] मदनविलासचूर्ण [हमी वाचून पहा

अथवा

इंडियन टॉनिक फूड

शरीरांत कीड ठेवणें हें मरणाचें मूळ आहे. हें चूर्ण दुधांत सेवन करीत गेलें असतां आंगांतील कडकी, उष्णता, पित्तरोग, वातरोग, प्रदररोग, मधुमेह, क्षयरोग, बाळंतरोग, खोकला, जीर्णज्वर, मूळव्याध, नपुंसकत्व, धातूचा पातळपणा यांचा नाश होतो. कंबरदुखी, हातपायांची आग, तोंडांतील चट्टे, वास मारणें, अन्नपचन न होणें हे विकार नाहींसे होतात. हें चूर्ण धातुपौष्टिक, वीर्यस्थंभक, कामोत्तेजक, रक्तशुद्धिकारक असें असून यानें शौचास साफ होतें.

किमत ३० तोळ्यांचे डब्यास एक रुपया. व्ही. पी. सह १८६ आणे अनुपान सोबत. गुणाबद्दल शेकडों अभिप्राय आले आहेत. हमी---ह्या डब्यांत ३० तोळे चूर्ण असतें. ह्यांतून दररोज एक तोळाप्रमाणें १० दिवस चूर्ण खाऊन पसंत न पडल्यास बाकीचें चूर्ण परत करावें म्हणजे ट. ख. वजा करून पैसे परत पाठवून देऊं. दहा तोळ्यांचेवर चूर्ण खर्च केल्यास एक तोळ्यामागें दोन आणे कापले जातील.

तयार करणार ---नारायण सखाराम पेंढारी

4 मशीद बंदर, तार ऑफिस समोर.--मुंबई

पी. व्ही. विर्जिनकर यांची

निळी काळी शाई

व

कार्बोलिक टूथ पॉवडर

(दंतमंजन)

शाईच्या थोरल्या बाटलीची किं. आठ आणे. दंतमंजन डबी चार आणे.

आमची शाई व दंतमंजन, मोठमोठे डाक्टर, विद्वान लोक, सरकारी कामदार यांनी वापरून, उत्तम अभिप्राय दिले आहेत, ते पहावे.

व्यापाऱ्यांस किंवा घाऊक घेणारांस भरपूर कमीशन. ठिकठिकाणी एजंट पाहिजेत.

पुंडलीक वामन विर्जिनकर

5 मडगांव-गोवा

कामत, कुरडेकर आणि कंपनी

कुंडईबाजार—गोवा

आमच्या कारखान्यांत उत्तम फ्यान्सी, मलमालीच्या, व ज़रीच्या सर्व तऱ्हेच्या टोप्या तयार मिळतात. घाऊक घेणाऱ्यांस विशेष सवलत. टोप्यांविषयींची वगैरे माहितीस खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा.

श्रीधर केशव कामत, क्लॉथ व क्याप मर्चंट

6 कुंडई-गोवा

जग प्रसिद्ध पक्क्या रंगाचीं उत्तम
सर्व तऱ्हेचीं तलम सुताचीं
अनेक रंगाचीं टिकाऊ

महेश्वरी लुगडीं

प्रसिद्ध महेश्वरी लुगडीं सर्वांगसुंदर असण्याचें कारण त्यांत सूत पक्क्या व टिकाऊ खरें रेशीम (चायनासिल्क) वापरलें जातें. विणाईचें काम फारच सुबक असून लांबी रुंदींत भरपूर असतें. या योगें हीं लुगडीं सर्वत्रप्रिय असतात. परंतु त्याचे खरेपणाचे माहितीचे अभावीं अनेक जागीं दुसराच माल महेश्वरी म्हणून मिळतो व तो अस्सल नसल्यानें फसवणूक होते; करितां एकवेळ आमचे कारखान्याहून माल मागवून खात्री व ओळख करून घ्यावी.

नंबर मालाचे भाव

१ लुगडें रेशीमकांठी दोन्हीं पदर मोठे रेशमी लांब हात १६+२॥ दर रु. १३
२ लुगडें रेशीमकांठी दोन्हीं पदर मोठे रेशमी लांब हात १६+२॥। दर रु. १५
३ लुगडें रेशीमकांठी सूत नं.६० दोन्हींपदर मोठे रेशीमी लांब हात १७+२॥। दर १९
४ लुगडें गर्भरेशमी सर्व तऱ्हेचे लांब हात १७+२॥। दर २४ ते ३५ पर्यंत.
५ लुगडें रेशीमकांठी जरीबुराडी. सूत नं १२० लांबहात १८+३ दर ४१ ते ५० प०
६ लुगडें जरीकांठी जरपक्के-सुत नं. १२० लांबहात १८+३ दर ५० ते ६५ पर्यंत.
७ चीरडी सर्व तऱ्हेची लांबहात १४+२ दर १० पा० ३० पर्यंत.
८ खण सर्व तऱ्हेचे-दर ।/=; पासून ४ रुपये पर्यंत.

या शिवाय वाटेल त्या किंमतीचा व तऱ्हेचा माल आर्डरीनें तयार करून पाठविला जातो–टीप–मालाचे चांगुलपणाबद्दल आम्हांस ग्वाल्हेर प्रदर्शनांतून रौप्यपदक व या शिवाय निरनिराळ्या ठिकाणची सर्टिफिकिटें मिळालीं आहेत.

घाऊक व किरकोळ माल मागविण्याचा पत्ता–

आर. जी. प्रधान लुगड्यांचे कारखानदार हेडऑफीस ईतवारा बाजार

7 पोस्ट महेश्वर [होळकर स्टेट

CONTOCO & COMPANHIA

Novo mercado—Margão

PAPELARIA E LUXOSOS ARTIGOS DO ESCRITORIO

Acabam de despachar

Papel almaço, liso e pautado, fooliscap, dito de marca legal de 25 linhas para serviço judicial, subino de maquina de escrever, de oficios, papel quimicó, chupante. Grande sortimento de papel de cartão, cartões de visita, writing-pad, blocks, cadernos, lembretes e envelopes correspondentes. Tinta stefens, tinta academica para caneta permanente, vidros de goma, aparos canetas, lapis, borracha, lacre, alfinetes e tinteiros de vidros e varios outros artigos dependentes do expediente.

Secção de cutelarias facas, garfas, colheres, colherinhas cadeadas etc. Para toilette pós, sabonetes do corpo e de barba, pomada, pó de dentes, perfumes e varios artigos de quinquilharia.

8 Preços modicos

ManuelJosé Sebastião Lobo, aliás Manuel José Francisco Lobo, vulgo Manuel Sebastião Lobo, filho de Luciano João Baptista Sebastião Lobo, e de Jacinta Berence de Santana Lobo, natural de Damão Pequeno, casado, escrivão de direito da comarca de Quepem e domiciliado em Quepem, anuncia por termo do numero 3 do artigo 178°. do Codigo do Registo Civil que pretende que seja autorizado a usar legalmente o nome de Manuel José Sebastião Lobo, pelo qual foi nomeado para o referido cargo. São por isso convidados quaisquer interessados para deduzirem por escrito autentico e autenticado perante o Governo Geral a oposição que tiverem no prazo máximo de 30 dias

Este anuncio vai ser publicado em vertude da autorização concedido por despacho do Governo Geral de 30 de Agosto de 1919 proferido no respectivo processo instaurado na repartição do Registo Civil de Quepem.

Quepem, 30 de Outubro de 1920 9

Manuel José Sebastião Lobo.

ओरियंटल इंडस्ट्रियल वर्क्सची

अत्यंत नांवाजलेली निळी काळी शाई वापरून खात्री करून घ्या- दर डजनीं साडेसात रुपये.

10 प्रभू देसाई–सांवर्डें(एजंट)

terra, mas tambem porque sobre eles, mesmo na visinha India, as opiniões se dividem. *Votemos*, pois ao ostracismo o *tilakismo* que resume o metodo de realisações politicas mas abracemos esse outro *Tilakismo* que representa o conjuncto de apreciabilissimas qualidades intelectuaes, civicas e moraes.

E' esse o verdadeiro sentido da palavra *Tilakismo* do jornal hindú *Bharat*. E' esse o *tilakismo* de que nós necessitamos e que é tendente a unir os hindùs e os cristãos, a prende-los numa mesma aspiração e a identifica lo num mesmo esforço.

Falemos claro. Houve tempos em que os hindús foram votados ao desprezo pelos seus irmãos cristãos constituindo para estes objecto de escarneo. Passaram felizmente á Historia esses tempos. Mas ainda hoje—triste è dize-lo-os hindûs são tratados pelos seus irmãos cristãos com certa indiferença. Os problemas ou as questões que envolvem os interesses da classe hindû não merecem á comunidade cristã o carinho e a solicitude que deviam merecer. Ainda não há muito, a classe hindû solicitou do Governo a introducção do ensino marata no projecto da reorganisação do ensino publico e os cristãos em vez de apoiarem essa justa pretenção dos seus irmãos hindus mostraram-se indiferentes, não faltando quem se insurgisse contra as suas legitimas reivindicações. Suprime-se o direito do voto aos que sabem ler e escrever o marata e os cristãos não se importam de se solidarisar com os seus irmãos hindus no movimento conducente á almejada solução desse problema de vital interesse para a numerosa comunidade hindu.

E quando os leaders hindus lamentam no seu intimo esse indiferentismo dos seus irmãos cristãos perante os problemas do interesse da classe hindu, o sr. Menezes Bragança tomando a nuvem por Juno diz que o movimento que se está esboçando nessa classe vae assumindo uma feição separatista.

Os hindus--dizemo--lo bem alto e bem claro—consideram os cristãos como seus irmãos e não querem separar-se deles para formarem um grupo á parte. Uma tal politica seria nociva não *sò* aos interesses da patria comum, mas tambem e de preferencia aos da propria classe hindu. Hindus propriamente ditos e hindus convertidos ao cristianismo *são* todos filhos da mesma Patria. O progresso desta pequenina terra depende do esforço conjugado de todos os seus filhos. Acima das divergencias confessionaes e acima da diversidade de usos e costumes estão *os* sagrados interesses da patria comum.

Portuguezes metropolitanos, descendentes de portuguezes *ou* luso--indianos, hindus propriamente ditos, hindus convertidos ao cristianismo, vivem todos sob a bandeira da gloriosa Republica Portugueza em perfeita igualdade de direitos e regalias. Hoje mais do que nunca a união de todos se impõe, para que de mãos dadas possamos trabalhar para o levantamento desta nossa pequenina terra do degradante estado em que jaz.

Abaixo, portanto, a politica da cor! Abaixo a preeminencia de classes!

ECOS & CRITICA

Contagio ?

O sr. Rau Bahadur Quelker envidenciou nas funcções que desempenhou na India visinha competencia e actividade incomparáveis. Na sciencia agricola e sobretudo no seu campo experimental conquistou o nome duma verdadeira sumidade.

Quando professor do Colegio da Agricultura de Poona, o sr. Quelker esteve cá em Goa, com seus alunos, para excursão escolar, tendo igualmente confirmado a brilhante fama que o auriolava.

Recentemente, tambem, quando se soube que o nosso governo acabara de, para seu serviço agricola, contratar o ilustre *agricultor*, a nuvem de pessimismo que pairava por sobre a cabeça dos *detratores* da nossa Inspecção de Agricultura batisada pela Autonomia com o simpatico nome da *Direcção de Serviços agricolas* ia-se desfazendo, a pouco e pouco.

Consta-nos que, justamente nessa esperada, aspirada e suspirada aora da libertação da nossa Agricultura do pesado e *ominoso* jugo do Ocio, é que o sr. Quelker ficou *contaminado* do mal da nossa burocracia que geralmente, *sò* se julga com o direito de receber *maças* sem trabalhar...

O sr. Quelker habitou-se na sua terra a ganhar dinheiro, trabalhanndo como um moiro.

Pois habitue-se, agora, a ganha-lo, *ociando*, como um fidalgo.

E olhe que as comunidades substenta-lo-hão, com sua pecunia, pela ardua tarefa que lhe marcou o nosso generoso Estado!

O sr. Maravilhas

Consta-nos que o sr. Maravilhas, ilustre presidente da Comissão de Milhoramentos de Mormugão foi chamado telegraficamente para Portugal, pelo governo metropolitano.

¿Serà o caso de que este esteja pensando em introduzir quaisquer melhoramentos em Portugal e para os quais julgue indispensavel a valiosa cooperação do sr. Maravilhas?

Ai de automoveis, caminhões e milhoramentos *anunciados* se o sr. engenheiro Maravilhas tiver de ausentar-se desta terra ..maravilhosa!

Agradecendo

Agradecemos ao nosso colega bombaense The Goa Mail a transcrição das nossas locais *Um conto* e *A sua aplicação*, no seu lugar de honra.

Vidia Bhuvan

No *Damodar Vidia Bhuvan*, de Margão realisaram-se festas solenes pelos aniversarias de Sri Damodar Váchan-Mandir e Sri sarasvati--Sevaca-mandal.

मडगांवचा चौथा सरस्वत्युत्सव

प्रसिद्ध झाल्या प्रमाणें ता.-२२ अक्टोबर शुक्रवार रोजीं संध्याकाळीं श्रीसरस्वती सेवक मंडळाच्या विनंतीवरून श्रीदामोदर विद्या भुवनांत साजरा होणाऱ्या चौथ्या 'श्रीसरस्वत्युत्सवा" साठीं व "श्रीदामोदर वाचन मंदिराच्या" तृतीय वाढदिवसा करितां कल्याण येथील प्रसिद्ध देशभक्त चिंतामणराव वैद्य व बेळगांवचे सुप्रसिद्ध पुढारी देशभक्त गंगाधरराव देशपांडे हे आपल्या कांहीं मित्र मंडळीसह मडगांव स्टेशनवर दाखल झाले. बहुतेक स्टेशनवर त्यांच्या स्वागतासाठीं ठळक मंडळी हजर होती. आपल्या पाहुण्याचे स्वागतासाठीं सरस्वती सेवक मंडळाचे कांहीं सभासद क्यासलरॉकपर्यंत गेले होते. मडगांव स्टेशनवर गाडी पोंचतांच शेंकडों लोकांनीं फटाक्यांचे कडकडाटांत व त्यांच्या सुस्वर आवाजांत उपरोक्त देशभक्तद्वयांच्या नांवांचा जयजयकार करून उत्तम प्रकारें स्वागत केलें. शि मंडळींनीं पाहुण्यांचे गळ्यांत पुष्पहार घालून सर्व शहरांतून लांबचलांब थाटाची मिरवणूक काढिली. ही मिरवणूक श्रीदामोदर विद्याभुवनांत पोंचण्यास १॥ तास लागला. सभागृहांत जयजयकारानें प्रवेश-करितांच श्रीसरस्वतीचें दर्शन करून पाहुणे मंडळींनां ठरविलेल्या रा. कातकर यांच्या वाड्यांत नेण्यांत आलें. तेथें उपहार झाल्या नंतर सर्वमंडळी सभागृहांत दाखल झाली.

दिवस पहिला

या दिवशीं सभेला ७ वाजतां आरंभ होऊन प्रथमतः रा. रा. द. पां. ना. दलाल यांनीं प्रास्ताविक भाषण केलें त्याचा गोषवारा येणें प्रमाणें:— मंडळाच्या विनंतीस मान देऊन आमच्या गोमांतक बंधूनां व आम्हांस ज्ञानामृत पाजण्यासाठीं श्रीयुत चिंतामणरावजी वैद्य अणि श्रीयुत गंगाधर-रावजी देशपांडे यांनीं आपल्या सार्वजनिक कामाच्या महत्वाच्या अडचणी दूर सारून त्यांनीं जी मडगांवीं येण्याची तसदी घेतली याबद्दल आह्मीं फार आभारी आहों.

श्री शारदा देवीच्या प्रेरणेनें तिचे भक्त वर्षप्रतिवर्षी येथें येण्याबद्दल तत्पर असतात. ही गोमांतकाच्या भाग्योदयाची, पूर्व पिठीकेची शुभ योजना असेल यांत शंका नाहीं. सरस्वती सेवकमंडळ ही संस्था सुप्रसिद्ध वक्त्यां-कडून आपल्या वाढदिवससमारंभानिमित्त विविध विषयांवर व्याख्यान माला सुरू करून ज्ञानाचा फायदा सर्वांस देत असते हें कांहीं लोकांना सध्या आवडत नाहीं, पण कालांतरानें याचा फायदा अनुभवास येतांच हेच लोक व्याख्यानमालेची प्रशंसा केल्या-वांचून राहणार नाहींत.

गेल्यासालीं प्रो. परांजपे व रा. सीताराम पंत दामले यांनीं जें तुम्हांस बोधामृत पाजिलें त्याचा बराच फायदा म्हणजे आज येथें जमलेला प्रचंड जनसमूह होय. हा समूह याहून किती तरी अधिक आज येथें जमला असता. आज मडगांव शहरांत मुंबईत लोकांची जशी रहदारी असते तशी येथें झाली असती. आजच्या सारखा स्वागत समारंभ अगर मिरवणुकीची जंगी तयारी याहून ज्यास्त पटीनें झाली असती व आपल्या अमोघ आणि अधिकारी वाणीनें गोमांतकजनतेला स्वदेशभक्तीच्या वर्माचा धडा समजावून सांगून खरें चैतन्य उत्पन्न केलें असतें, पण महाराज हें केव्हां घडलें असतें? तर हिंदमातेचा तिलक, स्वतंत्रतेचा जनक, स्वदेशीचा पुरस्कर्ता ह्यात असून वचन दिल्या प्रमाणें आजच्या वेळीं येथें हजर असता तर! प्रिय बंधूनो, ही सोन्यासारखी संधि गेली तेवढें भाग्य आमच्या नशिबीं नव्हतें म्हणूनच कीं काय लोकमान्यांनीं १ आगष्टाला आपली इहलोकची तेजस्वी आणि प्रखर यात्रा संपविली आणि त्यामुळें आह्मां सर्वांचें मनोराज्य पार ढांसळून पडलें ज्या प्रेमानें लोकमान्यांनीं आह्मांस आपल्या आगमनाचें आश्वासन दिलें होतें, तशाच किंबहुना जास्त आदरभावानें गोवेंकरांनीं बहुमानपूर्वक त्यांचें स्वागत केलें असतें हें उघड आहे. पण प्रेमळ बंधूनो, तें आश्वासन पूर्ण करण्या-करितां तो पुण्यात्मा अमूर्तरूपानें आज येथें हजर नसेल तरी कशावरून? लोकमान्याचें हृदय म्हणून नांवाजलेले श्रीयुत चिंतामण--रावजी वैद्य हे येथें आहेत ते त्यांच्या ऐवजीं बरेंच काम करितील. त्याच प्रमाणें लोकमान्यांचे सेनानी म्हणून नांवाजलेले देशभक्त गंगाधर रावजी देशपांडे आपल्या जोरदार व अस्खलित वाणीनें तुमच्यांत-विशेषीं करून तरुण पिढींत- देशकार्याबद्दल जास्त आदर उत्पन्न करितील यांत शंका नाहीं. आमच्या या उभयतां पाहुण्याची जास्त ओळख करून देण्याचें कारण नाहीं. कारण ते स्वतःच्या कर्तबगारीनें पुढें आले आहेत. व त्यांचीं नावें माहित नाहीं असा निदान मराठी वाचकांत तरी कोणी नाहीं. असे हे दोन राष्ट्रीय वीर आह्मांस आज लाभले या बद्दल धन्यता वाटते. "राव बहादुर' या सरकारी पदवीपेक्षां "लोकमान्यांचें हृदय " व लोकमान्यांचे "सेनानी" ह्या पदव्या फार श्रेष्ठ आहेत. ज्या पुण्यात्म्यानें हिंदुस्थानांत नवा मनु स्वसामर्थ्यानें उत्पन्न केला व ज्याच्या जाज्वल्य स्वदेशभक्तितेजापुढें त्यांचे शत्रुसुद्धां दिपून जात अशांचें हृदय म्हणवून घेण्यास सुद्धां तशीच अंगीं पात्रता असली पाहिजे. त्याच प्रमाणें लोकमान्यांचे सेनानी म्हणवून घेण्यासहि शिवाजी महाराजाच्या तानाजींत असलेल्या लोकोत्तर गुणांची आवश्यकता पाहिजे. आतांच्या काळांत ती ज्या प्रकारची असावी लागते तशी ती देशभक्त गंगाधरपंतांत आहे, यांत संदेह नाहीं.

पौराणिक किंवा ऐतिहासिक काळांत हि राजेमहाराजे आपापल्या शत्रूंचा निःपात करण्यासाठीं व म्लेंच्छ निर्दालनार्थ विजया-दशमीच्या मुहुर्तावर नानाप्रकारचीं शस्त्रास्त्रें घेऊन शिबिरांतून बाहेर निघत व विजयी होऊन परत येत. आमच्या दयाळु सरका-च्या कृपेनें वरील प्रकारच्या शत्रूंकडून आ-ह्मांस आज भिती नाहीं. परंतु प्राप्त परिस्थि-तींतील आमचा कट्टा शत्रू जो अज्ञानांधः-कार त्याचा नाश करण्यासाठीं मात्र आह्मीं याच मुहुर्तावर पुढें सरसावलें पाहिजे. अ-शा शत्रूला पराङ्मुख करण्यास ज्या प्रकार-ची विद्वत्ता, कुशलता व शक्ति पाहिजे आहे ती संपादन करण्यास आह्मांस श्री. वैद्य व श्री. देशपांडे यांच्या सारखीं माणसें पाहिजे आहेत, तीं आजच्या सारख्या शुभवेळीं ब्रिटिश हिंदुस्थानाची सीमा उल्लंघून पोर्तु-गीज हिंदुस्थानांत आलीं आहेत. तेव्हां त्यांच्या सदुपदेशानें गोवा प्रांतस्थानीं या प-वित्र कार्यास तयार व्हावें हें सर्वांचें कर्तव्य होय.

लोकमान्यांनीं आपल्या प्रभावशाली "केसरी"च्या द्वारें जी गोव्यांत जागृति केली ती कोणालाही नाकबूल करितां येणार

अपरिहार्य अडचणीमुळें

ह्या अंक प्रस्तुतच्या स्वरुपांत निघत आहे. येत्या अंकापासून 'भारत' नेहमीच्याच आकारांत आपल्या प्रेमळ, वाचकांची भेट घेईल. सं. भारत

कृषिकर्म

बागायतांतील जमिनीचा पृष्ठभाग पर्जन्य काळानंतर खणून भुसभुशीत करणे हेंहि निसर्ग सिद्ध वनांतील भूमीस अनुसरून आहे. याच्या योगें जमिनींत असलेला ओलावा उन्हांपासून भराभर हवेंत न जातां अगदीं मंद प्रमाणानें चालल्यामुळें विशेष दिवस टिकाव धरून झाडांच्या पाळांमुळांस थंडाई देत असतो. ह्यावरून वनांतील स्वाभाविक भूमीसारखें जीवजंतूंकडून जमीन भुसभुशीत होण्याचें कार्यहि कृत्रिम रीतीनें भागतें.

उंचवट्यावरील बागायताची जमीन प्रतिवर्षी पर्जन्याच्या योगें थोडथोडी नकळत वाहून जात असते. त्या कारणानें वर आलेलीं झाडांचीं मुळें उन्ह थंडी वाधून त्रास पावतात. त्यांवर गेलेल्या मातीच्या मानानें बाहेरून माती आणून घालणें चांगलें व ती माती पाला पातेरा वगैरे कुजून अरण्यांत तयार होणाऱ्या माती प्रमाणें असेल तर अतैव गाळयुक्त पाल्या पातेऱ्यानें मढून पुरामुळें नदी–ओहोळाच्या कांठीं सांठलेली माती सुलभ प्रकारें मिळण्यासारखी असेल तर उत्तमच होय. ती माती ओहोळाच्या कांठीं वगैरे बरेच दिवस दडपून असल्यामुळें झाडांच्या मुळांस अपाय करणारीं रोगबीजें तींत असण्याचा संभव असतो. अशा मातीस थोडीशी आंच दिली ह्मणजे रोगबीजें अपायकारक होण्यांची भीति नाहींशी होते. तींत मीठ मिश्रित केलें असतांहि कार्य भागेल. तशी सोय नसल्यास शेजारच्या झाडझुडपांच्या मुळांतील खतयुक्त मातीचें वरील कवच उकरून ती माती थोडथोडी घालावी. ह्या तीनहि सोई नसलेल्या बागाईतवाल्यांनी अगदीं थोड्या प्रमाणानें खतरहित माती घालून ती खत युक्त करण्यास पाला पातेरा अतैव मांस मासळी मिश्रित केली पाहिजे. खतरहित माती झाडांच्या बुडाशीं घातल्यास त्यांवर उपासमाराची पाळी येते. कां कीं, खतरहित मातीचें दडपण पडल्यानें अगोदर जमिनींत सांचलेले सेंद्रीय पदार्थ कुजणें बंद होऊन पक्कं खत तयार न झाल्यामुळें झाडांस अन्न मिळत नाहीं. अर्धकची भाजलेली माती फलोत्पत्तिक झाडांस घालण्याचा प्रघात आहे. कचें खत असलेली माती अर्धवट भाजली असतां एखादीं उत्पन्न होणारीं रोगबीजें मरून जाऊन झाडांस प्रिय असलेले क्षार वगैरे त्या मातींत तयार होत असतात–माती भाजल्यापासून हा फायदा असला तरी दुसऱ्या बाजूनें नुकसानच होण्याचा संभव असतो. कारण हेंच कीं, माती घातलेल्या वर्षी पर्जन्य काळीं तींत असलेलें खत पाण्याबरोबर विद्रत होऊन झाडांच्या पाळांस मिळतें- येणें करून झाडांस टवटवी येते. हें खरें पण दुसऱ्या वर्षी शिल्लक राहिलेल्या खतरहित व निस्तेज मातीपासून नुकसान होत असतें. सबब निस्तेज [illegible]लेल्या मातींत खत वगैरे घालून [illegible]णिल्यास काम भागेल.

पी. एम.

भारत

गुरुवार, आश्विन शु॥ १ दा १८४२

राष्ट्रीय कर्म–मार्ग

एकदां टीचभर पोटाचा कूटप्रश्न सुगम प्रकारें सुटला ह्मणजे, मनास मानेल तर, फुरसद असेल तर, स्वहितास कोणत्याच रीतीनें धोका न येईल तर मग खुशाल देशहित हा शब्द काहींदां उच्चारण्यांतच कर्तव्याची परमावधि होते, असा, स्वताचा समज करून दुसऱ्यांसहि तसेंच उमजवूं पाहणाऱ्यांस, असहकारितेचा कर्ममार्ग स्वीकारून स्वताचा जीवितनिर्वाह कष्टप्रद करून घेणाऱ्या, ब्रिटिश हिंदुस्थानांतील राष्ट्रीय वीरांच्या कृतीबद्दल सहानभूतियुक्त विस्मय वाटल्याशिवाय राहणार नाहीं. एकदां, कोणत्या ना कोणत्या रीतीनें नोकरशाहींत शिरकाव करून दरमाही कुटुंब–खर्च जेमतेम भागविण्यासारखा थोडा बहुत पगार मिळूं लागला ह्मणजे त्यास बिलगून राहून, त्याहून उंच पायरीवर कसें पाऊल टाकितां येईल ह्या विवंचनेंत सांपडलेल्यांस कर्ममार्गी राष्ट्रभक्तानीं पटापट नोकऱ्या सोडण्यांत दाखविलेलें मनोधैर्य व निस्वार्थीपणा यांच्या विषयीं खरी कल्पना होणें शक्य नाहीं. कां कीं, जी गोष्ट प्रत्यक्ष आचरण्यापासून किती आयास पडतात हें समजणें कठीण ती नुसती वर्तमानपत्रावर वाचल्यानें समजणें किती दुर्घट हेंहि पण कल्पनेनेंच थोडेंसें जाणतां येईल तरी त्यांस स्वानुभव पाहिजे. न पेक्षां त्या गोष्टीचें महत्व कसें कळेल ? आतां, केवळ 'दुरून डोंगर साजरे' ह्या श्रेणीच्या अन्वयें जर ब्रिटिश हिंदुस्थानांतील राष्ट्रीय चळवळींकडे विहंगम दृष्टीनें पाहून समाधान मानतां येईल तर असलीं स्वार्थत्यागाचीं कृत्यें करण्यांस तिकडील तसलींच माणसें पाहिजेत असें मानल्याशिवाय आह्मी बेजबाबदार ठरून त्या समाधानाची परिपूर्णता होणार नाहीं !

असहकारितेचा कर्ममार्ग स्वीकारणें ह्मणजे राजाच्या अनादरास पात्र होऊन उदरनिर्वाहास बिकट अवस्था प्राप्त करून देण्याप्रमाणेंच आहे. एकाहून एक तीव्र अशा दोन संकटांशीं टक्कर देण्यांत स्वार्थत्यागाचें उत्कट व व्यावहारिक उदाहरण देणारे, तोंडानें उच्चारण्यापेक्षां किंवा दुसऱ्यानीं आचरलेलें विस्मयतेनें टकमक पाहण्यापेक्षां कृतीनें करून दाखविण्यांतच देशहित ह्या शब्दाची–त्याच्या थोर नावांसारखी-योग्य बजावणी होत आहे. हें उघड सिद्ध करून देतात. ह्यावरून, स्वहितास कोणत्याच रीतीनें बाधा न आणितां जें काम करितां येईल त्यास देशहित हें मोहक नाव देण्याहूनहि वेळीं प्रसंगीं स्वहित धोक्यांत घालून सुधां आचरलेलें जें देशहित तेंच खरें राष्ट्रीय कर्तव्य होय. हें आमच्याच शेजारीं आह्मांस पाहावयास मिळावें ही गोष्ट शुभ लक्षणाची आहे.

इतक्या निकट शेजारीं चाललेल्या चळवळीचा परिणाम गोव्यावर होणें स्वाभाविक असून आज ब्रिटिश हिंदुस्थानांत चाललें आहे तें फक्त त्यां लोकांपुरतेंच, गोव्यांतील लोकांचा त्याशीं कोणताहि संबंध नाहीं असें समजण्या इतकी गोमांतकस्थाची दृष्टि मंद झाली आहे असें मानणें देखील उचित होणार नाहीं. त्याशीं पूर्ण सहानुभूति ठेवणें हें तर आमचें कर्तव्य आहेच. शिवाय, त्यांच्या सारखें मनोधैर्य आमच्याहि कडून वेळ पडल्यास, दाखविण्याची तयारी ठेवून त्या अखिल भारतवासी लोकांपैकींच आह्मी देखील आहोंत, हें पाहिजे त्या वेळीं दिसून यावें.

असहकारी लोकाशीं सहानुभूति ठेवणें ह्याचा अर्थ असा नाहीं कीं आह्मींहि आतांच पोर्तुगीज सरकारशीं असहकारिता पुकारून त्याचें अनुकरण करावें ! सुदैवानें तशी वेळ आली नाहीं. यदाकदाचित् आली असती तरी असहकारिता अमलांत आणण्यासारखी इकडे परिस्थिति नव्हे मनःस्थिति अनुकूल नाहीं असें मोठ्या दिलगिरीनें ह्मटल्याविना सत्याविष्करण होणार नाहीं.

आतां कोणी असेंहि ह्मणेल कीं ह्या असहकारितेचा परिणाम ह्मणजे नोकऱ्या गमावून बसणें हाच होय. हें खरें मानलें तरी आपल्या पोटापुरतें न पाहतां, राष्ट्राची स्वराज्य–क्षुधा शमविण्याच्या कामीं ते हाल सोशितील व आज पोटाचें नुकसान करणारे, स्वदेशासाठीं, गोळीबारांस, ऐटीनें छाती अर्पण करून स्वराज्यास किती पात्र आहोंत ह्याची खातर जमा इंग्रजांस पटवून इच्छेप्रमाणें वांकणें भाग पाडितील–व शेवटीं राष्ट्रीय कर्ममार्गापासून च्युत न होतां स्वराज्य मोक्ष साधितील. तथास्तु.

स्फुट विचार

नवा हुद्दाः— न्यायखात्याच्या तपासणीसाठीं "इंसपेक्तोर जुदिसियारियु" या नावांच्या नवीन हुद्यावर सि. दोतोर आंतोन द नोरोंज यांची नेमणूक झाल्याची बातमी आली आहे. या नवीन हुद्याची कोणती गरज होती व त्याच्या अभावांमुळें न्यायखात्यावर कोणतें भयंकर संकट उलटणार होतें हें एक "बुडत्याचा पाय खोलांत" अशा स्थितीला पोंचलेल्या मा-बाप सरकारास च माहीत ! आह्मांला तर या नवीन हुद्याच्या बुडाशीं तिजोरीचें नुकसान; या शिवाय दुसरें कसलेंहि नवीन तत्व किंवा फायदा आढळून येत नाहीं. अंधेरनगरी आहे झालें. दुसरें काय ?

सप्ताहः— दहाजणांनीं आरंभिलेलें सत्कार्य यशस्वी झाल्याखेरीज कदापि रहात नाहीं, या जुन्या तत्वाचा प्रत्यय गेल्या शनिवारीं व रविवारीं साजरा करण्यांत आलेल्या धार्मिक व राष्ट्रीय सप्ताहोत्सवांत येथील सर्व लोकांनां आला. या सप्ताहांत येथील बहुतेक नव्या जुन्या मतांच्या व जोमाच्या देव व राष्ट्रभक्तांनीं भाग घेतला होता. उत्सवानिमित्त काढण्यांत आलेल्या श्री रामदासस्वामीच्या तसबिरीच्या मिरवणुकीला तर इतकी गर्दी जमली होती कीं या पूर्वी तसा जमाव कोणत्याहि कार्याला येथें झाला नव्हता, असें सांगतात. एकंदरींत हा नवीन तऱ्हेचा राष्ट्रीय उत्सव अपूर्व थाटानें पार पडल्या बद्दल त्याला सहाय्य करणाऱ्या येथील व बाहेरून मुद्दाम आलेल्या जनतेचें आह्मी मोठ्या प्रेमानें अभिनंदन करितों- सप्ताहांत गाण्यांत आलेल्या कांही अभंगांची भेट आह्मी आमच्या वाचकांस देणार आहों. त्यावरून उत्सवाच्या नाविन्याची पूर्ण कल्पना वाचकांस झाल्याखेरीज रहाणार नाही.

सहकारी व्यापारी संघ

येथील बहुतेक धान्याच्या व्यापाऱ्यानीं "सहकारी व्यापारी संघ" या नांवाची नवीन संस्था स्थापन केली असून तिचा स्थापनोत्सव समारंभ गेल्या आश्विन शु. २ या शके १८४२ रोजीं संघाच्या जागीं [श्री. नेत्रेकर यांच्या माडीवर] श्री. शांबा कृष्णाजी सूर्यराव देसाई यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. समारंभास आमंत्रित दीड दोनशें मित्रमंडळीं हजर होती.

आरंभीं श्री. नारायण जनार्दन कामत शंखावलीकर यांनीं, संघ स्थापन करण्याचें कारण व संघाचे उद्देश सांगितल्यावर, श्री. शांबा कृष्णाजी सूर्यराव देसाई यांनीं सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल सूचना आणली व तिला श्री. रामनाथ नारायण पै अस्नोडकर यांनीं अनुमोदन दिल्यावर, श्री. शांबा कृष्णाजी सूर्यराव देसाई हे टाळ्यांच्या गजरांत अध्यक्ष–स्थानापन्न होऊन सभेच्या कामास सुरवात झाली.

नंतर अध्यक्षांचें संघास उद्देशून उपदेशपर व सुविचारपरिप्लुत असें सुश्राव्य भाषण झाल्यावर, दौतोर व्यंकटेशराव देसाई यांनीं पोर्तुगीज भाषेंत भाषण करून संघाची आवश्यकता व उपयुक्तता, जपानची औद्योगिक व व्यापारविषयक प्रगति वगैरे संबधीं बरीच माहिती दिली. त्याचप्रमाणें श्री. शिवेस्कर, श्री. आजरेकर वगैरे वक्त्यांचीं मराठी भाषेंत संघाच्या उद्देशास अनुसरून प्रोत्साहनपर भाषणें झालीं.

शेवटीं अध्यक्षानीं समारोप केल्यावर श्री. रावजी दत्तू महात्मे यांनीं अध्यक्षांचें व आमंत्रित मित्रमंडळीचे आभार मानले व अत्तर–गुलाब देण्यांत आल्यावर सभा बरखास्त झाली.

नवीन-गोवें } सेक्रेटरी
२०-१०-२० } सहकारी व्यापारी संघ

वर्तमानसार

—मुरगांवचें जुलगाद कोमार्क बनविण्यांत आलें असल्याची बातमी आहे.

—गोव्यांतील ठिकठिकाणचे सार्वजनिक सरस्वत्युत्सव मोठ्या थाटानें पार पडले.

—मडगांव येथें राजापुरकर संगीत नाटक मंडळी येणार असून ती आपले प्रयोग तेथील विद्यासुवन थीयेटरांत येत्या नव्हेंबरांत सुरू करणार असें कळतें. दुष्काळांत तेरावा महिना न होवो, इतकेंच इच्छितों!

—मुंबई शहरांत व शहराच्या आसपास कांहीं कुटुंबच्या कुटुंबें सुमारें दोन शतकांपूर्वी खिश्चन धर्मांत गेलीं. यापैकीं कांहीं कुटुंबें आपल्या मूळ हिंदुधर्मांत येऊं इच्छितात त्यांचा उपनयनविधि हिंदुमिशनरी सोसायटीमार्फत दसऱ्याचे सुमुहूर्तावर मुंबई येथें मांडवीवर कोळीवाड्यांत होणार होता, असें केसरीवरून समजतें.

मेसर्स कामत, कुडेंकर आणि कंपनी, कुंडई, यांकडून आह्मांस काळ्या मखमालीच्या टोपीची भेट आली आहे. आभारी आहों. अभिप्राय पुढील अंकीं-

---

वर्गणीची पोंच

श्री. यशवंत शे. रेगे, ,,	१॥ रु.
,, त्रिविक्रम शे. कूंकळीयेंकर, ,,	१ रु. १०आ.
,, रघुवीर शे. कुकळयेंकर, ,,	३ रु.
,, अनंत र. शेट केरकर, चांदर	३ रु.
O sr. dr Alfredo Antão,	3 rs
O sr dr João Figueiredo,	3 rs
,, Salinho da Silva	3 rps
,, Aires Manuel Barrto	1-8tgs.
,, Dr Luiz José de Sousa	3 rps
,,DrAlbinoCaitano Lobo	1-8ts.
,, Camilo F. de Minezes	3 rps
Nuno B. Nogueira	1-8 ts

ANUNCIOS

जन्मपत्रिका

साग्र जन्मवेळ कळवून आर्डर दिल्यास नं. २-३ फी. रु. २॥-१I. टिपण ८ आठ आणे नं. १ व अन्य खुलाशास अर्ध्या आण्याचें टिकीट पाठवा.

एफ आर-प्रभू

1 कळंगूट-गोवा

The Norwiteh Union Life Insurance

Capital incluindo bonus Rps. 345 000 000

Premios pagos Rps. 480 000 000

Esta companhia de seguros que foi fundada em 1808 é a mais antiga e rica do mundo com um consideravel numero de assegurados-

Agentes em Goa
R. S. Kamat
English. Prof.
Mapuçà

Agentes em Bombaim
W. S. A. Graham e C°

2

पैसे परत देऊं] मदनाविलासचूर्ण [हमी वाचून पहा

अथवा

इंडियन टॉनिक फूड

शरीरांत कीड ठेवणें हें मरणाचें मूळ आहे. हें चूर्ण दुधांत सेवन करीत गेलें असतां आंगांतील कडकी, उष्णता, पित्तरोग, वातरोग, प्रदररोग, मधुमेह, क्षयरोग, बाळंतरोग, खोकला, जीर्णज्वर, मूळव्याध, नपुंसकत्व, धातूचा पातळपणा यांचा नाश होतो. कंबरदुखी, हातपायांची आग, तोंडांतील चट्टे, वास मारणें, अन्नपचन न होणें हे विकार नाहींसे होतात. हें चूर्ण धातुपौष्टिक, वीर्यस्थंभक, कामोत्तेजक, रक्तशुद्धिकारक असें असून यानें शौचास साफ होतें.

किंमत ३० तोळ्यांचे डब्यास एक रुपया. व्ही. पी. सह १८६ आणे अनुपान सोबत. गुणाबद्दल शेकडों अभिप्राय आले आहेत. हमी---ह्या डब्यांत ३० तोळे चूर्ण असतें. ह्यांतून दररोज एक तोळ्याप्रमाणें १० दिवस चूर्ण खाऊन पसंत न पडल्यास बाकीचें चूर्ण परत करावें ह्मणजे ट. ख. वजा करून पैसे परत पाठवून देऊं. दहा तोळ्यांचेवर चूर्ण खर्च केल्यास एक तोळ्यामागें दोन आणे कापले जातील.

तयार करणार ---नारायण सखाराम पेंढारी

3 मशीद बंदर, तार ऑफिस समोर.---मुंबई

पी. व्हां. विर्जिनकर यांची

निळी काळी शाई

व

कार्बोलिक टूथ पॉवडर

(दंतमंजन)

शाईच्या थोरल्या बाटलीची किं. आठ आणे. दंतमंजन डबी चार आणे.

आमची शाई व दंतमंजन, मोठमोठे डाक्टर, विद्वान लोक, सरकारी कामदार यांनी वापरून, उत्तम अभिप्राय दिले आहेत, ते पहावे.

व्यापाऱ्यांस किंवा घाऊक घेणारांस भरपूर कमीशन. ठिकठिकाणी एजंट पाहिजेत.

पुंडलीक वामन विर्जिनकर

4 मडगांव-गोवा

कामत, कुरडेकर आणि कंपनी

कुंडईबाजार---गोवा

आमच्या कारखान्यांत उत्तम फ्यान्सी, मखमालीच्या, व जरीच्या सर्व तऱ्हेच्या टोप्या तयार मिळतात. घाऊक घेणाऱ्यांस विशेष सवलत. टोप्यांविषयींची वगैरे माहितीस खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा.

श्रीधर केशव कामत, क्लॉथ व क्याप मर्चंट

5 कुंडई-गोवा

जग प्रसिद्ध पक्क्या रंगाचीं उत्तम
सर्व तऱ्हेचीं तलम सुताचीं
अनेक रंगाचीं टिकाऊ

महेश्वरी लुगडीं

प्रसिद्ध महेश्वरी लुगडीं सर्वांगसुंदर असण्याचें कारण त्यांत सूत पक्क्या व टिकाऊ खरें रेशीम (चायनासिल्क) वापरलें जातें. विणाईचें काम फारच सुबक असून लांबी रुंदीत भरपूर असतें. या योगें हीं लुगडीं सर्वत्रप्रिय असतात. परंतु त्याचे खरेपणाचे माहितीचे अभावीं अनेक जागीं दुसराच माल महेश्वरी ह्मणून मिळतो व तो अस्सल नसल्यानें फसवणूक होते; करितां एकवेळ आमचे कारखान्याहून माल मागवून खात्री व ओळख करून घ्यावी.

नंबर मालाचे भाव

१ लुगडें रेशीमकांठी दोन्हीं पदर मोठे रेशमी लांब हात १६+२॥ दर रु. १३
२ लुगडें रेशीमकांठी दोन्हीं पदर मोठे रेशमी लांब हात १६+२॥। दर रु. १५
३ लुगडें रेशीमकांठी सूत नं-६० दोन्हींपदर मोठे रेशीमी लांब हात १७+२॥। दर १९
४ लुगडें गर्भरेशमी सर्व तऱ्हेचे लांब हात १७+२॥। दर २४ ते ३५ पर्यंत.
५ लुगडें रेशीमकांठी जरीबुगडी. सूत नं १२० लांबहात १८+३ दर ४१ ते ५० प०
६ लुगडें जरीकांठी जरपक्के-सुत नं. १२० लांबहात १८+३ दर ५० ते ६५ पर्यंत.
७ चीरडी सर्व तऱ्हेची लांबहात १४+२ दर १० पा० ३० पर्यंत.
८ खण सर्व तऱ्हेचे--दर ॥=; पासून ४ रुपये पर्यंत.

या शिवाय वाटेल त्या किंमतीचा व तऱ्हेचा माल आर्डरीनें तयार करून पाठविला जातो--टीप--मालाचे चांगुलपणाबद्दल आह्मांस ग्वाल्हेर प्रदर्शनांतून रोप्यपदक व या शिवाय निरनिराळ्या ठिकाणची सर्टिफिकिटें मिळालीं आहेत.

घाऊक व किरकोळ माल मागविण्याचा पत्ता--

आर. जी. प्रधान लुगड्यांचे कारखानदार हेडऑफीस इतवारा बाजार

6 पोस्ट महेश्वर [होळकर स्टेट

फुकट ! बक्षिस फुकट !

दद्रुविनाशक

गजकर्णं, इसब व लायटे यांवर रामबाण किं. ४ आणे.

२४ डब्या एकदम घेणारास रास्कोप घड्याळ फुकट !

रेल्वेरेग्यूलेटर घड्याळ

अगदीं बरोबर टाईम देणारें घड्याळ किं. रु. ४॥.

६ बाटल्यांचे बरोबर अत्तरदान फुकट मिळेल.

रिस्टवॉचः---हातांत बांधण्याचें घड्याळ किंमत रु. ५॥ पट्टयासह.

7 किंग जार्ज कारोनेशन कं मुंबई नं४

नमुना फुकट

सु. सी. चक्रवर्ति यांच्या मशिननें तयार केलेल्या

8

तकतकीत शाईच्या १४४ पुड्या..

फक्त पंधरा आण्यांत.

श्रीयुत सुरेंद्रनाथ बानर्जी यांचा प्रसिद्ध 'बंगाली' ह्मणतो, हीं शाई फार उत्तमपैकीं असून परदेशी शाईच्या तोडीची खात्रीनें आहे. इतकें असूनहि तिची किंमत अगदीं अल्प ठेविलेली आहे.

हा एक वडी घेऊन एक औंसभर पाण्यांत टाकली असतां उत्तम पक्की तकतकीत शाई तयार होते.

ब्रे ईट निळीकाळी	०-१५-०	ग्रीस ग्रीन	रु. १-४ ग्रोस.
डायमंड निळीकाळी	१--४--०	ग्रीस कमर्शिपलब्लु	. १-६ ग्रोस.
चापब्ल्यु	०-१०-०	ग्रीस निळी	रु. १-४ ग्रोस.
लाल	१--६--०	ग्रीस व्हायोलेट	रु. १-० ग्रोस.

पोस्टखर्चासाठीं एक आण्याचें तिकीठ पाठविणारांस निरनिराळ्या प्रकारच्या आठ वड्यांचें पाकिट फुकट. व्यापाऱ्यास व घाऊक गिऱ्हाइकांस भरपूर कमिशन. **वर्धमान आणि सन्स, पायधुणी मुंबई नं. ४**

tilakismo— não pertence ao jornal hindu mas sim ao jornal genuinamente cristão "O *Diario da Noite*". Foi este diario que cunhou aquela palavra.

Ora vejam.

Tilak morreu em 1 de Agosto e o *Diario da Noite* estampando na sua edição de 4 do mesmo mez o retrato do eminente indio fe-lo acompanhar de um brilhante artigo intitulado "*Um morto que manda*. Com a devida venia transcrevemos d'esse artigo o seguinte trecho:-

"E' ainda bem cedo para se tomar contorno á obra de Tilak tão vasta como complexa e que de um modo inconfundivel operou nos distinos dos povos da India uma transformação que a fez hoje bem diferente da que era hontem e que ainda mais diferente a fará amanhã.

Por Ele falará a propria India emancipada com mais ou menos anos, mas num futuro que tudo faz prever não será muito longinquo, porque a verdade é ésta: *se Tilak morreu*, o *tilaquismo vive e viverà sempre emquanto* o ideal que o acalenta se desentranhe dessa realidade que constitue hoje a suprema ambição de todo o espirito indiano.

Alguns periodos desse artigo do Diario da Noite vertidos para marata foram reproduzidos no Kessary, como sendo as palavras dedicadas á grandiosa obra patriotica de Tilak pelo sr. Luiz de Minezes.

E o *Bharat* só no editorial da sua edição de 19 do mesmo mez empregou a palavra tilakismo:

"Desenvolva e fortaleça portanto, cada um no seu sér o *tilakismo se pretende* honrar a memoria de Tilak, cumprindo para com este o dever de gratidão pelos incontestaveis beneficios que da sua nobre acção patriotica auferiu."

Vê, portanto, o sr. Menezes Bragança que a palavra *tilakismo* que tanto o afligiu e lhe perturbou o somno, arrancando á sua scintilante pena quatro colúnas de prosa compacta para aconselhar os hindus a mudarem do rumo errado, não saiu primeiro da pena de um hindu mas sim de um autentico cristão que, pelos modos, tem uma clara e nitida visão das pessôas e coisas. Quem cunhou a palavra tilakismo foi o jornal cristão e não hindu.

Terão os dois jornais o O *Diario da Noite* e o *Bharat* empregado a palavra tilakismo num mesmo sentido?

Veremo-lo.

Bascora P. Rau Sar Dessay.

Para meditar

O *amir* de Afaganistan honrou com sua *real* assistsncia uma grande reunião, promovida pelos seus subditos em Kabul para manifestarem o pesar pelo falecimento ,do... *revolucionario* Tilak.

¿Que dizem a *isto* os tilakofagos *di cá* e outros a quem a palavra *Tilakismo* provoca còlicas *anti-patrioticas!*

ECOS & CRITICA

Passado e futuro

Se o futuro é a repetição do passado e se éste demonstra documentalmente que projetos dos mais simpaticos ficaram no papel...oficial, por falta da continuidado na acção administrativa, ¿porque havemos de condenar o justifiicado descontentamento popular, motivado pela criação de novos impostos para novos projectos de problematico futuro?

O mas...

Prometem muito, não há duvida os patrioticos projectos do sr. Dr. Jaime de Morais, aprovados pelo nosso Parlamento provincial Mas...

E' o Satanaz este *mas* distruidor do que há de bom nos referidos projectos cujo cabal triunfo depende, portanto, da distruição do proprio *mas*

E todos sabem a parte *secreta* da floresta dos projectos em que o diabolico *mas* se oculta.

Tragam-no para a rua o matemno que terá cor da certesa animadora, em vez da da duvida minadora, o futuro da patriotica obra, dos bemfeitores da Patria e... malfeitores do sr. Carmelino Machado.

Guerra ao *màs*, pois!

Ilustre enfeermo

Ignoromes se o sr. Estado entrou ou não em franca convalecença, livro da grave enfermidade por que ultimamente passou pela *contudente* penada que apanhou na guerra que moveramos no canno de -*Taxa de Guerra*.

Nem há quem nos de informações *esmiuçadas* sobre o estado da saude do Estado, nosso poderoso e respeitavel adversario... politico.

Eis a razão porque o nosso presado amigo sr. dr. Soares Rebelo fará, a nosso pedido -esta-claro - no seu frèquentado consultorio *Jurisprudencia Administrativa* o exame analitico e critico do Estado, perdão de sua exa., ainda perdão, de sua Magestade o sr. Estado, na semana seguinte.

Teremos, então, nòs e os nossos leitores, graças á pericia do ilustre e distincto homem do leis, o raro ensejo de conhecermos de perto tal por tento.

Balcão provinciano

Como protesto contra a criação de novos impostos, não se realisaram as sessões *ordinarias* désta instituição que continua ainda encerrada por causa da consternação produzida pela mesma criação que a deixa em esta nação.

Reaberto o Balcão, recomeçaremos, tambem o relato de suas sessões.

Processos crimes

Sobre a mui humilde cabeça do director do *Bharat* pesam dois processos, motivado um pela *Taxa de guerra*, causado outro pelas *Cartas Abertas sobre o arroz em Quepem*.

Tivemos razão num e noutro assunto?

Usamos do direito da liberdade de imprensa en prol de nossos concidadãos ou abusamos dele em nosso prejuiso?

Aproximou-se o momento de ficar tudo esclarecido

लोक काय बोलतात

गोमांतकच्या अवनतीचीं कारणें

गोमांतक सध्या अवनतावस्थेंत आहे ह्या बद्दल मतभेद नाहीं. २००० वर्षांपूर्वी जंगली अवस्थेंत असलेले युरोपमधील देश आज सर्व जगाच्या अग्रभागीं विराजित आहेत. कोलंबसानें आत्यंतिक रानटी अवस्थेंत पाहिलेली अमेरिका जर आज सुधारणा, स्वातंत्र्य व विद्या यांचें केंद्र बनली आहे, तर याच्या उलट गोमांतक क्रमशः परावलंबी, धनहीन, शीलहीन, सामर्थ्यहीन व अल्पायु होऊं लागला आहे. या कारणाचा शोध झाल्यावांचून कार्याचा प्रतिकार करतां येणें शक्य नाहीं.

आमच्या अवनतीचें पहिलें कारण निरुद्योगीपणा हें आहे. कलाकौशल्य, कारागिरी यांजवर आमची वक्रदृष्टि आहे. पूर्वी पाकशास्त्र, विद्याध्ययन, अश्वविद्या वगैरेंची फार आवश्यकता असे व सर्व मोटमोठे लोक ती विद्या समजावून घेण्याचा प्रयत्न करीत. पांडवानीं स्वयंपाकशास्त्र व इतर विद्याप्राविण्यतेवरच अज्ञातवासांतील दिवस कंठिले. परशुराम, द्रोणाचार्य, अश्वत्थामा वगैरे ब्राह्मण असूनहि शस्त्रविद्येंत प्रविण होते. कलाकौशल्याच्या जोरावरच आज पाश्चात राष्ट्रें भरभराटीस आलीं आहेत. पण इकडील जमिनदाराचा मुलगा सुद्धां शिक्षण किंवा कला संपादन करणें ह्मणजे कालाचा व सामर्थ्याचा अपव्ययच होय असें समजतो."आमच्या वाडवडीलानीं भरपूर कमाई करून ठेविली आहे." लिहावयास शिकून आह्मांस खर्डेघाशी थोडीच करावयाची आहे?" असलें तर्कशास्त्र लढविणारे शब्दशूरच इकडे फार आहेत.

आजकाल साधारण दर्जाच्या कुटुंबाचेंहि स्वयंपाक्यावांचून चालेनासें झालें आहे. आपल्या पतिपुत्रांस स्वहस्तें स्वच्छ व पवित्र स्वयंपाक करून वाढणें हें पुष्कळ कुलस्त्रियांस त्रासदायक व अनावश्यक वाटूं लागलें आहे. पुरुषांचे कपडे तर राहोच परंतु साध्या चोळयासुद्धा शिंप्यांकडून शिवून घेणें जरूर पडूं लागलें आहे. खुशाल पडून व एकत्र जमून रिकामटेंकड्या गप्पा मारणें व कुचेष्टा करणें हेंच त्यांचें महत्वाचें काम झालें आहे. ज्या देशांतील स्त्रीपुरुषांची इतकी अवनत अवस्था झाली आहे. त्यांचें रक्षण प्रत्यक्ष परमात्मा तरी करूं शकेल कीं नाहीं कोण जाणें !

पुष्कळ लोकांचें ह्मणणें असतें कीं प्रयत्न व्यर्थ आहे. नशीब हेंच श्रेष्ठ. कारण प्रत्येक मनुष्य सुखासाठीं प्रयत्न करीतच आहे. परंतु त्यास विशेषतः दुःखच भोगावें लागतें; पण हें मत भ्रमात्मक आहे. संसारांतील सर्व दुःखांचे मूळ अविद्या हें आहे. अविद्येचा नाश विद्येनें होतो व विद्या ही प्रयत्नसाध्य आहे. यास्तव प्रयत्नवादच युक्तिप्रमाण आहे.

जर आमच्यांत आळस नसता तर किती तरी बरें झालें असतें? आळस सोडून जर प्रत्येक गोमांतकवासी कमर कसून उद्योगास लागेल तर गोमांतकाची उन्नति कांहीं लांब नाहीं. परंतु जोंपर्यंत आह्मी पोटासाठीं भीक मागून अद्वैब्रह्मास्मीच्या वादांत गुंग झालों आहोंत व संधि सांपडतांच गोमुखींतून सुरी बाहेर काढून बांधवांच्या गळयावर ठेवण्यास मागें पुढें पहात नाहीं तोंपर्यंत ह्या राष्ट्रोद्धाराच्या वार्ता व्यर्थ आहेत. गोमांतकच्या अवनतीचें दुसरें कारण भेदबुद्धि हें आहे.

शरीरांतील एका अवयवाचें दुःख तेंच साऱ्या शरीराचें दुःख हा न्याय लोपून "दुसऱ्याच्या सुखदुःखाशीं आह्मांस काय करावयाचें आहे? आह्मीं आपलें सुख पाहिलें ह्मणजे पुरें" हें तत्व प्रचलित झालें आहे. ही भेदबुद्धि व इतरांविषयींची बेफिकीरी इतकी वाढली आहे कीं सांगवत नाहीं. ह्या भेदबुद्धीमुळेंच कुरुक्षेत्रांत कौरव पांडवाचा नाश झाला, श्रीरामचंद्रास वनवास पत्करावा लागला.

गोमांतकच्या अवनतीचें तिसरें कारण व्यसनप्रियता हें आहे. मद्यपान हें त्या सर्वांमध्यें अनेक दृष्टींनीं प्रमुख व भयंकर आहे. हें व्यसन देशांतील मजूर, कामकरी वगैरे मध्यें फार वाढून श्रीमान व मध्यम लोकांपर्यंत पोचलें आहे. ज्यांची विवेकबुद्धि व निरीक्षणशक्ति जागृत आहे अशा प्रत्येक मनुष्यास त्याचे भीषण परिणाम प्रत्यहीं दिसून येत आहेतच.

कज्जेदलाली मध्यें तर द्रव्याचा किती अपव्यय होत आहे, त्याची कल्पना करणेंहि कठीण आहे. ह्या पासून सरकारास चांगलीच प्राप्ति असून शिवाय न्यायाधीश [juizes] व तदनुषंगिक कामगार व वकील [advogados] यांचा योगक्षेम चालत आहे. या शिवाय भांग, गांजा अफु, इ. जबरदस्त व्यसनें गोमांतकच्या आर्थिक शारीरिक व नैतिक अधोगतीस नेटानें हात भार लावीत आहेत. चहा, तंबाकू यांची तर व्यसनांत गणना करणेंहि अशक्य झालें आहे.

परंतु ह्या सर्व गोष्टी ऐकावयास इच्छा व सवड आहे कोणास? विद्वान लोक 'भवति न भवति, चक्रांत भ्रमण करीत आहेत. श्रीमान लोक परदेशी नकली मालाचा खप कसा होईल या विवंचनेंत आहेत; बाकी सर्व जनसमूह दारिद्य व अज्ञान यांनी ग्रस्त झाला आहे. परंतु, अशा अंधःकारांतहि कांहीं सुविचारी गृहस्थांच्या प्रयत्नांच्या आशेचीं किरणें चमकूं लागलीं आहेत. त्यामुळें या अंधःकाराची मुदत संपत आली असून गोमांतकच्या उन्नतीचा उषःकाल होण्याचा समय जवळ आला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

(रिवण) एन्. बी. नाईक

खुनाला वाचा फुटते !

आपला समाज हळुहळू जगांतील उलाढाली समजून घेण्यांच्या साधनाकडे—वर्तमानपत्रांकडे—आतां लक्ष पुरवूं लागला आहे. ज्यानां शक्य ते स्वतः पैसे भरून(निदान जेथें वाचनालयें नाहींत अशा जागीं) वर्तमानपत्रें मागवितात. ज्यानां शक्य नसेल ते दुसऱ्याकडून मागून आणून वाचतात. पण तिसऱ्या जातीच्या लोकांची मात्र गोष्ट निराळी. ते स्वतः आणावयाचे नाहींत, दुसऱ्याकडून मागून आणून वाचणार नाहींत,मात्र तिसऱ्याचें चोरून, मालकाला धाब्यावर बसवून स्वतःच्या मेंदूची खाच वाढवीत असतात. पण ही चोरी कुठें होते हें मात्र समजत नाहीं. पण खुनाला वाचा फुटते ह्मणतात !......

निदान आमच्या खेड्यांत येणाऱ्या इंग्लिश, पोर्तुगीज व मराठी वर्तमानपत्रां-

वर्गणीची पोंच

,, जिऊ सुबा फडतो, वांदिवडें	३ रु.
,, पांडुरंग राम फडतो, ,,	३ रु.
,, बाबलू व्यंकटेश पडियार, शिरवडें	३ रु.
,, देऊ नाईक, ,,	३ रु.
, श्रीपाद गोविंद शे. हेदे, ,,	३ रु.
,, दत्तात्रय व्यंकटेश पै, फोंडें	१॥ रु.
;, गोविंद स. पाणंदीकर, मडगांव	३ रु,
,, रघुवीर शे. संजगिरी, अणजूण	३ रु.
;, कृष्ण ना. कुराडे, कुंकळ्ळी	३ रु.
,, त्रिविक्रम वि. पै वैद्य, ,,	३ रु.
,, अनंत गो. हेगडे, ,,	३ रु.
,, रघुवीर हेगडे, ,,	३ रु.
,, अनंत र. कामत, बाळ्ळी	३ रु.
,, नृसिंह शे. अवदी, ,;	३ रु.
,, भगवंत भा. केणी रोवोल, कुंकळ्ळी	३ रु.
,, नृसिंह के. पै काकोडे, ,,	३ रु.
,, राणु शे. तळावलीर ,,	३ रु.
,, मंगेश उसो नाईक,बाळ्ळी	३ रु.
,, आर. एन. प्रभू, शिरवडें	३ रु.
,, विणु रा. प्र. चोडणेंकर, करमणें	३ रु.
, सक्रेटरी कुशबनवासीवाचनमंदीर केपें	३ रु.
,, नारायण विठ्ठल शेट ,,	१॥ रु.
,, जिऊ शाबा फळ देसाई. ,.	३ रु.
,, सुब्राय शे. कुंकळीयेंकर, ,,	३ रु.

Não se nega nem se esqu.e-ce que o povo de Goa fala o concani; mas o que se quer saber é que se este representa uma lingua ou o dialecto ou forma provinciana da lingua principal; e para resolver este ponto não podemos fundar-nos nos exemplos das linguas europeas, cuja constituição social è muito diferente da que temos na India mosaica de raças onde a diversidade da estrutura social e de crenças exerce fortemente a sua influencia nas linguas, criando um sem numero de dialectos duma e mesma lingua, fenomeno que começou a ter logar desde o ano de 1000 A. C, segundo certos historiadores,tornando a lingua falada distinta da escrita (Vid Civil. in the Bud Age, by Dutt, 1908 p. 109 e 110) e que continua atè aos nossos dias.

Confessa o meu ilustre contendor que o concani não tenha a sua forma erudita fixada pelos documentos literarios. E enquanto-diga-se entre parenteses,-personagens eminentes da visinha India para acabar com um dos factores da disassociação, pensam na unificação da lingua e alfabeto, os nossos redentores de cá estão preocupados em criar mais uma lingua !

Gopal C. S. Gudò

P. S.

Depois de concluido o presente artigo deparei na revista marata *Vividha-Dnianavistar* [Vol. 37, n°. XII, ano 1906) um interessante estudo, sobre Puranas, já citados por mim no meu anterior artigo do *Padre Stefon*, da lavra de brilhante pena do saudoso e imparcial escritor e distincto sanscrotologo, Rajarama Ramacrisna Bhgavat sob a epigrafe 'Dedicação dum catolico a marati,, *Neste* estudo muito anterior ao proconcanismo encontra-se o seguinte:-

E' para lamentar que entre os cristãos maratas, não haja cultura do marati em escala satisfatoria e se achem eles envolvidos no inadmissivel preconceito de se considerar *concanès* como se os concanès não fossem *maratas*. Foï bem que os Xenovins [Sarasvotos bramanes] goanos, como Soirobá, *Vitol*, Subananta etc. alheios a simelhantes preconceitos se dedicassem á cultura do marati, enfileirando-se assim estes concanés hindus nos hindus maratas,.

"O concão-" não passando de um dialecto utilisado na fala, não pode ter foros da lingua. O concão não é representado só pela Goa, extende-se tambem até á foz de Damão e esta parte è conhecida pelo concão norte e a Goa pelo concão sul.

Como que não existissem concanés e a sua lingua fora de Goa ocultam eles o vocabulo Gomantaki,substituindo-o pelo concani sò para si.

A população que hoje se chama concanese era considerada como marata no seculo 17° e não padece duvida que ela comprehendia o marati e tinha por esta lingua grande amor. Insistir no contrario é mostrar-que acham invalidos pela obstinação diabolica dos seus preconceitos, o que podia admitir-se se não houvese povas positivas daqueles tempos.

Que dizem a isto os srs. Proconcanistas?

G. C. S. Guddò

ECOS & CRITICA

Sacrificios

Os nossos impostos votados para diversos fundos representam verdadeiros sacrificios, mas basta que estes não arrastem o zé-pagante ao fundo da sua completa bancarrota.

Taxa de gnerra

Diz *O ultramar*

"No tribunal desta comarca já não se exige, desde o dia 6 do corrente o selo da taxa de guerra, porque o seu ilustre e distincto juiz entendeu que, expirados já 6 mezes sobre o termo da guerra declarado oficialmente não havia razão para continuar por mais tempo esse imposto.

Infelizmente nos consta que os tabeliães ainda continuam a exigir tal taxa, o que é para estranhar. Em vista aos competentes para tomarem as medidas precisas sobre o caso."

E aqui ?

Funcionalismo

Querem uns reducção proporcional no vencimento do funcionalismo da colonia, pretendendo outros que o numero de empregados publicos seja diminuido.

¿Mas para que servem esses *quereres* e *pretenderes* se no lançamento de novos impostos se não pensou fazer nem uma nem outra coisa?!

E dizem que *Vox populi è vox Dei*!

Palavras que o vento leva...

Uma defesa...oficisa

O Sr. Dr. *Wolfango* da Silva gastou no Conselho a sua milhor inergia *pro domo sua* isto ê, para defender os interesses materiais da ilustre corporação a que pertence Crêmos porêm que outra seria a atitude de SuaExa se conhecesse de per a misera condição em que actualmente está vivenndo o zé-pagante, reduzido á pobresa franciscana...

Para a semana seguinte

Reservamos o artigo sobre o *Tilaquismo* do distincto escritor e nosso corriligionario sr. Bascora Pratapprao Sar Dessai, 2° da serie *Em pratos limpos* cuja publicação sofreu demora por falta de espaço e ausencia do nosso director em Bombaim na quinzena decorrida.

AVISO

A pedido d'administração deste concelho se faz publico que se aceitam 55 mancebos que disejem alistar-se nas unidades indigenas deste Estado sendo 5 para corneteiros.

Os pretendentes deverão apresentar-se ás 12 horas do dia 25 de Outubro corrente no Quartel General.

Pedimos aos srs. assignantes a gentilesa do pagamento de suas assinaturas em divida.

कृषिकर्म

वरील मथाळ्याखालीं आजपर्यंत लिहिलेल्या मजकुरावरून त्याविषयींची सर्व साधारण माहिती समजेल. पुढें आलेला विषय कोंकणपट्टीसंबंधानें आहे ही गोष्ट लक्षांत असली पाहिजे. विशेषें करून कोंकणपट्टी ही सह्याद्रीपासून समुद्रापर्यंत थोडथोडी कलती होत गेली असल्यामुळें व तिजवर अधिक जोराचा पाऊस पडत असल्या कारणानें त्या जमिनींत उत्पन्न होणारें खत प्रतिवर्षी समुद्रांत वाहत जाऊन तिची भूमि घांटावरील प्रदेशा इतकी सुपिक नसते.

माणसांच्या उपयोगी अशा बागायतांतील फलोत्पत्तिक झाडाझुडपांची लागलागवड, निगा वगैरे, माणसांनीं स्वताच्या पोषणार्थ आपल्या अटोक्यांत घेण्यांपूर्वी नैसर्गिक वनांतील खनाच्या भूमींत स्वाभाविकपणें जन्म, विकास व मरण पावत होतीं. आणि तसल्या खतयुक्त भुसभुशीत जमिनींच्या व झाडांझुडपांच्या लक्षानुलक्ष पिढ्या गेल्या असल्यामुळें त्या खतांत व झाडांत जुळवाजुळवीनें व चिरकालीक सवईमुळें परस्परावलंबता प्राप्त झाली आहे. फलोत्पत्तिक झाडांस स्वभावत:च इतर झाडांपेक्षां अधिक खत लागत असलें पाहिजे. फळें प्राणीवर्गाकडून आपल्या उपयोगार्थ लांबविलीं जातात व नवीन खताची आवश्यकता सहज भासूं लागते. शिवाय, त्या झाडांच्या पाल्यापातेऱ्याचा सुधां सर्पण वगैरे साठीं मनुष्यांच्या उपयोगाकडे खर्च होत असेल तर त्या पदार्थांपासून उत्पन्न होणाऱ्या खतास मुकून बागायताचें नुकसान होतें. कदाचित्, त्या भूमींत अगोदरच सांठलेलें नैसर्गिक विपुल खत असेल किंवा वर्षानुवर्षे व वर्षांआड हरएक प्रकारें आपोआप अथवा कृत्रिम रीतीनें बाहेरचें येऊन पडत असेल तर मात्र येथील झाडांस खताची उणीव एकदम भासणार नाहीं.

खतयुक्त जमिनींत वाढण्याऱ्या चिरकालीक सवयीं जडलेल्या झाडांझुडपांचा विकास नि:सत्व, रखरखीत व कठीण अशा इतर भूमींत होणें शक्य नाहीं. व ही वंशपरंपरेनें जडलेली अनंत कालीन सवय मनुष्यकृत सुधारणेच्या अल्प काळांत ह्मणजे माणसांनीं फलोत्पत्तिक झाडझुडपांची लागलागवड शुश्रषा वगैरे आपल्या उपयोगाकरितां ताब्यांत घेतल्यापासून तों आजपर्यंत गेलेल्या स्वल्प काळांत—बदलणें शक्य नाहीं. ह्यास्तव, त्या झाडझुडपांच्या प्रत्येक जातीस मानेल अशाच तऱ्हेच्या निसर्गत: तयार असलेल्या किंवा मुद्दाम तयार केलेल्या भूमींत खत पाणी योग्यतेनुरुप केल्यास तींत पेरलेल्या झाडाझुडपांचा योग्य विकास होऊन फलनिष्पत्ति होईल.

बागायतांत बाहेरून येणारें खतयुक्त पावसें पाणी परस्पर बाहेर जाण्याकरितां मेरा घालून चरा सारखा पाठ करून देण्याची वहिवाट आहे. असें केल्यामुळें विशेषत: पहिल्या जोरदार पावसाच्या पाण्याबरोबर वाहत येणारें खत सांठवून ठेवण्याची अगोदरपासून सवय जडलेल्या भूमींत ऐन वेळीं ह्मणजे खत खाऊन टांकणारीं बागायताचीं झाडें पेरल्यानंतर वाहत आयतें येऊन पडणारें खत न मिळून झाडांचें नुकसान होतें. ज्या ठिकाणी पुराचें पाणी आयतें येऊन पडण्यासारखें नसेल तेथील बागातांत, शक्य झाल्यास, ओहोळाचें वगैरे पावसें खतयुक्त पाणी आडवून खेळतें ठेवावें. मात्र, हें पाणी सांभाळितां येईल तितकेंच आणून मेरा न मोडण्याची खबरदारी घ्यावी. नारळी, पोफळी अशा तऱ्हेच्या झाडांच्या बुडाशीं समतळ करून पर्जन्याचें पाणी बाहेर न जाण्यासाठीं धरण अगर मेरा घालण्याची चाल आहे. येणें करून कृत्रिम अतैव स्वाभाविक रीतीनें येऊन सांचलेलें खत पर्जन्याच्या पाण्याबरोबर वाहून बाहेर न जातां, धरणामुळें समतळ होऊन पाण्यांत संथपणा आल्याकारणानें तेथेंच कुजून झाडांस अन्न मिळतें.

पी. एम्.

वर्तमानपत्राची दिशा

आपणाला आज गोव्यांत अशा तऱ्हेच्या वर्तमानपत्राची जरूर आहे कीं, हिंदु व हिंदेतर वाचकांनीं तें पाहून थक्क व्हावें व सर्वांना त्या पत्राबद्दल सहानुभूति असावी, मग तें दैनिक, साप्ताहिक किंवा द्विसाप्ताहिक कां असेना? सुक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां पोर्तुगीज आणि मराठी विषयाचें एकाच पत्रांत संमिश्रण करण्यापेक्षां पृथक पृथक पत्रांमध्यें दरएक भाषेंतील विषयरचन होणें यशस्कर आहे. प्रसंगीं, सोईखातर, उभय भाषांतील मजकूर एकाच पत्रांत समाविष्ट करणें असेल तर त्या सांचा पत्राच्या निदान "केसरी"एवढा कल्पून किमान पक्षीं सहा पृष्टें देणें अगत्याचें आहे. ह्यांतील दोन पृष्ठांमध्यें पोर्तुगीज विषय देत जाऊन दोन पृष्ठांमध्यें मराठी मजकुरास जागा देणें अगत्याचें आहे, जेणेंकरून भरपूर विषयानें वाचक वर्गाची तृप्ति होईल. राहिलेलीं दोन पृष्ठें फक्त जाहिरातींस वाहिलेलीं असावीं. हेंच पत्र प्रात्याहिक असून सांचा जरा आटोपशीर असला तथापि हरकत नाहीं, परंतु पृष्टांची वांटणी मात्र वरील प्रमाणें झाली पाहिजे.

एका अनुभविक गृहस्थाच्या तोंडून वारंवार असें निघत असे कीं ह्या दुनयेंत हैसे, नवसे व गवसे अशा तीन वर्गांतील लोकांचा भरणा विशेषेंकरून आहे. पहिल्या सदरांतील लोक हैसेच्या आधीन झाले असून दुसऱ्यांतील नवाईचे भोक्ते आहेत व तिसऱ्यांतील लोकांचा कल उपयुक्ततेकडे झुकलेला आहे. ह्यांतील भावार्थ हाच कीं, पहिल्या वर्गातील हैसेकरितां, दुसऱ्यांतील नवलविशेष अवगत व्हावें ह्मणून आणि तिसऱ्यांतील गुणग्रहण करण्यांसाठीं वर्तमान पत्रास आश्रय देतात,अशानां संतुष्ट ठेवण्यांस 'अठरा धान्यांचें कडबोळें' हाच मार्ग खुला आहे, कारण 'भिन्न रुचिर्हि लोक:.'

वर्तमान पत्राचा उदय होऊन त्याची तेजस्विता कायम राहण्यास स्वतंत्र लेखक, मुबलक द्रव्य आणि स्वत:चें मुद्रणालय ह्या साधनत्रयीचें आनुकुल्य अवश्य असलें पाहिजे. मुख्यत्वेंकरून त्याजें जीवन जें द्रव्य सहाय्य त्याची तरी वाण भासतां कामा नये. ह्या जीवन शक्तीचीवृद्धि होणें आश्रयदात्यांवर सर्वथैव अवलंबून आहे. व्यवस्था, नियमितपणा, नीटनेटकेपण भारदस्तपणा आणि गांभिर्य ह्या पंचतत्वांचा वृतपत्राला निकट परिचय असला ह्मणजे वाचकांची संख्या वृद्धिंगत होऊन तें हयात राहण्यांस अलौकिक सामर्थ्य प्राप्त होतें. उदाहरणार्थ पणजींतील 'एराल्द' हें दैनिक व मडगांवांतील "उल्त्रामार" हें द्विसाप्ताहिक एवढीच पुरे आहेत.

वर्तमानपत्र ह्मणजे ज्यांत चहूंकडील

108

वर्गणीची पोंच

श्री. कृष्ण गोविंद वाळे, साडोळशें	३ रु.
,, वासुदेव ल. राजाध्यक्ष, काणकोण	३ रु.
,, त्रिविक्रम शेणवीं कुंदे, कुकळ्ळी	३ रु.
,, प्रो. सिदवा सूर्यराव, सिलवासा	३ रु.
,, रामचंद्र शे. सांवर्डेकर, केंपें	३ रु.
,, सखाराम शेणवीं सांवर्डेकर, सांवर्डें	३ रु.
,, सुब्राय वि. शे. कुंकळ्येकर, केंपें	३ रु.
,, प्रो. शंकर र. कुडचडकर, केंपें	३ रु
,, अनंत शेणवीं अग्नी, चिंचोणें	२ रु.
,, कृष्ण भिक्रू केणी, मडगांव	३ रु.
,, गोविंद पै रायतूरकर, ,,	३ रु.
,, बाबु विठ्ठल प्रभू, पैंगीण	३ रु.
,, विठ्ठल नारायण प्रभू मागदाल ,,	३ रु.
,, पद्मनाभ अनंत भट तळेकर, ,,	१॥ रु.
,, व्यंकटेश पुरुषोत्तम फळ, ,,	३ रु.
,, राजाराम पैंगीणकर ,,	३ रु.
,, विष्णु राम नाईक गावोड, मडगांव	१॥ रु.
,, गणेश रा. भ. सावैकर, सावैय	३ रु.
,, वामन गोविंद शेटीये, ,,	३ रु.
,, वैकुंट शे. नगसेंकर, काणकोण	३ रु,
,, रघुवीर गु. मावजे, माजोर्डें	३ रु.
,, जनु मुकडो फडतो, ब्रांदिवाडें	३ रु.
,, बाबुली गांगु फडतो, ,,	३ रु.

ANUNCIOS

COMUNIDADE DE QUEDEM

Quanto aos pagodes, mesquitas e confrarias seria igualmente menos justo lembrar duma nova Administração para éssas instituições, pois o seu numero é tão limitado que há concelhos onde nem mesmo existem confrarias nem mesquitas.

Nestas condiçoes torna-se necessário excluir porenquanto, as Novas Conquistas do movimento da descentralisação administrativa e por isso chamo a atenção de Sua Exa Sr. Governador Geral para o presente assunto.

Pela aldeia Quepem

Não sabemos que providências a Administração do Concelho tomou contra as scenas de selvageria... predial que se repetem na aldeia de Quepém!

Torna-se, porisso, urgente que a acção administrativa não se limite, apenas, ás circulares, notas e ordens; é preciso que vá para mais alem, directamente ao encontro do mal que tais scenas gera, por forma que a estes ponha cóbro, imediatamente. E' preciso isto.

Uma carta

Exmo Sr. director do Bharat.

A fim de concorrer para o fundo da defesa do *Bharat*, muito apreciado e ávidamente lido semanario que V. publica, e cujo fim visa, unicamente á regeneração da sociedade indo-portuguesa, o qual acaba de ser processado pelo M. P. tomo a liberdade de enviar-lhe a importancia de tres rupias para a mesma defesa.

De. V. etc.
Newton de Sousa
Director de S. *Marys High School, Assolná*

सर नारायण चंदावरकर

(मडगांवच्या साः ब्रा. समाजांत केलेल्या भाषणाचा सारांश.)

"गोमांतकांत मीं पहिल्यांदा १२ वर्षांचा असतांना आलों होतों. आज ५४ वर्षांनीं दुसऱ्यांदा येत आहें. आपणा सर्वांना पाहून मला आनंद होत आहे. समाजोन्नति व्हावी, शिक्षण वाढावें, मन व बुद्धि सुसंस्कृत व्हावी विचारशक्ति वाढावी या हेतूनें सारस्वत बंधूंनीं स्थापन केलेल्या या संस्थेचें मी अभिनंदन करतों. सारस्वत या शब्दाबद्दल मजकडे पुष्कळांनीं पृच्छा केली आहे. त्याला उत्तर आह्मीं सरस्वतीची भक्ति करून कृतीनें देत आहों ही समाधानाची गोष्ट होय.

जगांत, जी एकप्रकारची नवीन जागृति उत्पन्न झाली आहे, तिचा फायदा गोमांतकानें कितपत घेतला कळत नाहीं. पण आपल्या एकंदर उत्साहावरून सर्व देशांप्रमाणें आपलीहि स्थिति पालटून गेली आहे यांत मला शंका नाहीं. राज्यकर्ते कोणतेहि असले तथापि सर्व हिंदुस्थान एक आहे अशी भावना दृढ झाली पाहिजे. देशभक्ति हा शब्द आमच्या लोकांनां नवीन नाहीं. सर्व लोकांवर प्रेम करणें, सर्वांचें हित पहाणें सर्वांचे उन्नति करतां झटणें हें देशभक्तीचें लक्षण आहे. आमच्या वेद, पुराण, इतिहास साधुसंत, वगैरेनीं सांगितलेल्या वाङ्मयांतसुद्धां याचें बीज आह्मांस सांपडतें. आह्मीं आर्य आहोंत. अर्थात नांवांला साजण्यासारखींच कृति आमच्याकडून झाली पाहिजे. आपल्या जन्माविषयींचा विचार केला तर आपल्या पूर्वजांपासून सर्व संपत्ति आपण घेतली आहे असें दिसेल. पूर्वजानीं सुरू केलेली विचार परंपरा आपल्या पर्यंत आली आहे. ती त्यापेक्षांहि उज्ज्वल करून पुढील पिढींत चालू ठेवणें हें आपलें कर्तव्य आहे. या संबंधानें आपण त्याजकडे जबाबदार आहों. जन्मानंतर पितृऋण, ऋषीऋण व देवऋण अशीं तीन ऋणें माणसावर असतात. कुटूंब उत्तम तऱ्हेनें चालवून पितृऋण फेडावयाचें. विद्यासंपन्न होऊन ऋषीऋण फेडायाचें. व जगाच्या उपयोगी पडून देवऋण फेडायाचें. आपल्या वडिलांच्या योग्य कृत्याबद्दल आदरभाव बाळगून तदनुरूप शुद्ध वर्तन ठेवणें; आपण विद्वान होऊन सर्व समाज---त्यांतील सगळया पायऱ्या सुसंस्कृत करणें, व जनसेवा हीच ईश्वरसेवा अशी भावना धरून देशाच्या कल्याणासाठीं झटणें, हीच ऋणाची फेड होय. ही सेवा निष्काम असावी. फळाची आशा धरून कर्म केलें तर दुःखास कारण होतें. जनाची सेवा करण्यांत पर्यायानें आपण आपलीच सेवा करीत असतों. आमच्यांत समाजसुधारणेचे विचार वाढत चालले आहेत; कुटूंब, समाज, राष्ट्र यांचें कल्याण साधून सर्वांना सुखाचे दिवस येतील अशी चळवळ चालू ठेवणें व ती ठेवतांना तुकारामबुवांनीं सांगितल्याप्रमाणें दया, क्षमा, शांति, हे गुण आणणें मनुष्यत्वाचें ध्येय आहे. अपकाऱ्यावरी उपकार करिती ॥ तयासी झांपली गा निजशांती ॥ असें श्रीएकनाथांची शांतीचें लक्षण सांगितलें आहे. अशाप्रकारचे सद्गुण अंगांत भिनण्यासाठीं मुलांनां लहानपणापासूनच वळण लावलें पाहिजे. त्यांना बाऊ दाखवून, भूतांची भीति सांगून भेडसावलीं तर तीं दुबळीं होतात. त्यांच्या अंगांत युरोपियन मुलांप्रमाणें धैर्य आलें पाहिजे. आपल्या कुटुंबांत अभयाचें शिक्षण देऊन त्यांत शौर्य, उत्साह, जोम, कर्तबगारी आपण उत्पन्न केली व प्रत्येकानें अशी कुटुंबसुधारणा केली तर राष्ट्राची सुधारणा सहज होईल. ही सुधारणा करतांना आप्पलपोटेपणा असूं नये. आपल्या कुटूंबाचीच तेवढी सुधारणा व्हावी, आपल्या जातीचीच तेवढी व्हावी असा स्वार्थ धरूं नये. सर्व समाजाच्या— निकृष्ट वर्गांच्याहि—सुधारणेविषयीं तळमळ असावी. एका वर्गाला आह्मीं खालीं दाबतांना आपणहि त्या बरोबर दाबले जातों हें लक्षांत ठेवावें. धर्म, अर्थ, काम, आणि मोक्ष हे चारहि पुरुषार्थ साधण्यास माणसाला मोकळीकच हवी आहे. ती मोकळीक—मुक्ति—दिली तर सर्व राष्ट्र मुक्तीला जाईल यांत शंका नाहीं. आपल्या अंगांत स्वतंत्रता, बंधुता व समता बाणली तर डेमॉक्रसीचीं तत्वें आपणास उकलतां येतील. शेवटीं सर्व बाजूनीं आपलें राष्ट्र उन्नत होऊन इतर राष्ट्रांच्या पंक्तीस बसण्याची पात्रता त्यांच्यांत येवो अशी प्रार्थना करून मीं आपली रजा घेतों."

धर्मजागृतीची गडबड

आजकाल जिकडे तिकडे धर्मग्लानि होत असल्याचा डंका वाजत असून, धर्मलंड धर्मच्युत, धर्मभ्रष्ट झालेल्यांना ताळ्यावर आणण्याकरितां परिश्रम केले पाहिजेत अशा आशयाचे उद्गार कर्मनिष्ट, धर्मशील, धर्मप्रेक्ष्य वर्गाच्या तोंडून ऐकण्यांत येतात. डोईवर केश राखले, बूट पाटलूण वापरली देवास दंडवत प्रणाम न केला, जुन्या चाली प्रमाणें वागण्यांत कसूर झाली कीं तो धर्मभ्रष्ट झाला असें ठरतें

धर्म या शब्दाचा अर्थ फार व्यापक आहे. तथापि तो शब्द धर्मचर्या [धर्माचरण] ह्या दृष्टीनें आपल्या श्रुति, स्मृति पुराणोक्त कर्तव्यास इकडे लागू केलेला दिसून येतो. धर्म ह्या शब्दांत न्याय, नीति ह्यांचाही समावेश होतो. ज्याप्रमाणें नाणकमुद्रेला ह्मणजे नाण्यांलापूर्व भाग [Anverso] व पश्चिमभाग (Reverso) अशा दोन बाजू असतात त्याप्रमाणंच धर्ममुद्रेला देखील कर्म आणि नीति हीं माझ्या मतें दोन अंगें आहेत. नीतीचा उदय झाल्याविना कर्माची प्रवृत्ति लंगडी पडावयाचीच. परमपूज्य सनातन आर्यधर्माचीं तत्वें बिनचूक पाळणें हें जरी आपलें कर्तव्यकर्म असलें, तथापि त्या तत्वांना देशकालवर्तमानानुरूप अक्षरशः मान देण्यांत न आला तर धर्मग्लानि झाली असें ह्मणणें गैर होईल. वस्तुतः धर्मजागृति करूं पाहणाऱ्या महात्म्याचा प्रयत्न स्तुत्य आणि वंदनीय असला तरी नीतीच्या पायाविना कर्माची अगर धर्माची इमारत ढिलीच पडेल, कां कीं, नीति हा धर्माचा पाया आहे.

जुन्या चालीच्या आचारांचा प्रसार होत गेला ह्मणजे धर्माची उन्नति झाली असें नव्हे, तिची [उन्नतीची] सर्व मदार प्रत्येकाच्या उदात्त व नीतिमूलक विचारांवर अवलंबून आहे. कपाळास रुपया एवढा गोपिचंदनाचा तिलक ठोकला, त्रिकाल स्नानसंध्या केली, अहर्निश पूजा अर्चा करण्यांत निमग्न झाला, तोंडानें "रामकृष्ण हरि" ह्या पवित्र नामांचा जप चालविला, अशानें कर्मनिष्ट बनला असें विधान करणें चुकीचें होईल. अंगांत भूतदया असणें, बोलण्याप्रमाणें वागणं, धनतृष्णा अमर्याद न होणें, विचार प्रगल्भ असणें, स्वतःच्या सुखासाठीं परास धोक्यांत न घालणें, "सत्य

चुकीची दुरुस्ती

सर चंदावरकर यांस काणकोण येथील सरस्वतीमंदिरांत देण्यांत आलेल्या टीपार्टीच्या वेळीं भाषण करणारे इसम सि० आवदितोर हे नसून, त्यांचे सेक्रेटरी सि० पिंत हे होत.

वर्गणीची पोंच

रा. रा. गणेश स. शें. शिरोडकर, सांखळी
,, ,, सुब्राय भिकू केणी, सांकवाळ
,, ,, लक्ष्मण अनंत लाड, ,,
,, ,, धोंडों राघोबा जोशी, श्रीनागेश

या आश्रयदात्यांचे आह्मी फार फार आभारी आहों.

संपादक

ANUNCIOS

...COS & CRITICA

...nda bem!

O sr. ... Delegado viu no nosso artigo *Taxa de guerra*, de 6 de maio, expressões, tendentes a perigarem a estabilidade nacional do Estado, que, se não tivesse vindo em seu auxilio o referido magistrado com seus *dignos, doutos* e *zelosos* oculos, teria de marchar, á esta hora, para as regiões etéreas do Nada.

Ainda bem que o sr. Agente do M. P. limitou, apenas, a sua obra ao procedimento criminal: podia bem preconisar aos seus superiores hierarquicos o nosso exilio para qualquer colonia para o que de resto estamos, igualmente dispostos!

¡ Que grave crime o nosso o de termos dito verdades e só estas!

Dele so ..

? Que nome se dá a quem adquiri uma divida e não a pagar no praso fixado ?

Mau pagador.

¿ Com que epiteto se cognomina quem dá a palavra e deixa de cumpri-la ?

Mau cumpridor da sua palavra.

Mas a hermineutica juridica do digno, douto e zeloso agente do M. P. da comarca de Quepém entende isso da diversa forma que é só dele... e dêle sò.

...ax... de guerra

A taxa de guerra era um imposto extraordinario da guerra

Esta já deixou de existir e portanto devia deixar de existir tambem a mesma taxa, pois *sublata causa tolitur efectus*

Não foi, porêm, isso assim, continuando a vigorar a taxa, ainda depois duma paz... podre ... nestas condições não é êla digna de ser chamada *incomoda ...* e do *sinistro vigor* ?

Ou então a lógica è uma batata ...

Lavra de palmeiras

"A industria da lavra de palmeiras que é uma das principais fontes da receita do Estado è hoje fiscalisada pelo pessoal da Guarda Fiscal.

Ainda que esta fiscalisação continue com todo o rigor não pode todavia deixar de haver lavra clandestina em prejuizo da Fazenda Nacional e isto nem a pau pode evitar-se.

A meu vēr, em vēs de prosseguir o sistema actual, seria conveniente que, a titulo de experiencia, fosse dado em hasta publica rendimento da lavra de cada aldeia ou organisando-se ... delas mas isto com previa fiscalisação do referido pessoal da Guarda Fiscal por meio de rondas *volantes*.

DARDOS & CARDDOS

Um prato

O M. P. requerendo processo crime contra o *Bharat* promoveu uma boa obra de saneamento moral.

Pois que ? ! Pode lá consentir-se que o *Bharat* vomite o nauseabundo bilis de verdades nuas e cruas no brilhante, scintilante e possante prato de mentiras... convencionais que hoje é saboriado com delicias, prato que faz crescer agua nas bocas, ávidas de sucalentas e *etiqueticas* .. falsidades ? !

E' digno de maiores elogios portanto o passo do M. P., pois se se *furtasse* ao mesmo, nós haviamos de considera-lo *Mau Poder*, em vez de *Ministerio Publico*, o que aquelas abeviaturas de M. P. significam.

Muitissimo muito bem.

B0a oportunidade

¿ Os senhores viram o Estado em carne e osso, êsse mesmo a quem o *Bharat* aplicou a proposito da taxa de guerra ou guerra de taxa uma espessa cataplasma de mostarda que lhe subiu atè ao nariz ?

Certamente, não.

Pois agora vão ter a rara e cara oportunidade de poder encara-lo, de cima para baixo, da cabeleira á planta dos pés, no julgamento do *criminoso Bharat* que, patife, sentiu-se como Antonio José no seu estomago para guerrear a taxa, em prejuiso da caixa do mesmo Estado!

Não a percam, pois, visto que o Estado è mais lindo do que a bailadeira que dançou na Comissão de Milhoramentos.

Esta medida não só servirá, como se calcula para acabar, de vēs, a lavra clandestina, mas ainda favorecerá muito ao Estado para a boa arrecadação da sua receita."

E' o que nos escreve o sr. *V.*

ERRATA

Não é o sr. Auditor que falou em Canacona, Mas sim o seu secretario sr. Tomé Pinto. Fique assim rectificado o erro devido a um *qui pro quo* da imformação.

भारत डिफेन्सफंड

श्रियुत आयुर्वेदाश्रमी, सांखळी, यांच्या प्रेरणेनें वरील नांवाचा फंड उभारण्यात येत असून जे जे देशभक्त सरकारनें केलेल्या राजद्रोही खटल्यांतून भारत बिनखर्च मुक्त व्हावा या उदार हेतूनें आपापल्या ऐपतीप्रमाणें मदत पुरवितील त्यांचीं त्यांचीं नांवें रकमेसह या सदरांत साभारपूर्वक प्रसिद्ध केलीं जातील.

आयुर्वेदाश्रमी .... १ रु.

कृषिकर्म

वनस्पतिविषयक ज्ञान सगळ्यांस सुलभ प्रकारें मिळण्याकरितां ह्या विषयाचें विवेचन मुख्यत: निसर्गावर भार टाकून केलें आहे. ह्मणून व वनस्पतीच्या निसर्गसिद्ध जीवितक्रमाकडे लक्ष्य देण्यासाठीं एखाद्या अरण्यांत व त्याच्या जवळपास, विचारपूर्वक एकसारखे बरेच दिवस पाहत गेल्यास असें दृष्टीस पडेल कीं, उद्भिज व प्राणीज यांचे शरिरादि अवयव आणि लहान थोर प्राण्याची विष्टा वगैरे कुजणाऱ्या कच्च्या खतानें वरील भूपृष्ठभाग तयार झाला आहे, व नवीन होत आहे, आणि, तें कच्चें खत हवेच्या सान्निध्यांत ओलाव्यामुळें एका प्रकारच्या सूक्ष्म प्राण्यांकडून कुजण्याची क्रिया चालून त्यापासून तयार झालेलें पक्कें खत पर्जनाच्या पाण्यांत विद्रुत होऊन झिरपत झिरपत झाडांच्या पाळांमुळांच्या भक्ष्यस्थानीं पडण्याचें कार्य सुलभ प्रकारें होत असतें. हवेचें सान्निध्य फक्त वरच्याच पृष्ठभागावर विशेष घडत असतें. खालच्या जमिनींत क्रमानें कमी होत जात असतें. ज्या मानानें जमीन सढळ असते त्या मानानें तींत हवा शिरलेली असते. यामुळें झाडांच्या पाळांमुळांना देखील थोड्या प्रमाणानें कां होईना हवा प्रिय असते. व हें कार्य पाल्यापातेऱ्यांच्या खतयुक्त भूमींत चांगलें चालत असतें. असो. कधीं कधीं वायूच्या सोसाट्यासरशीं काष्टाच्या घर्षणानें अतैव भूकंपामुळें निसटलेल्या दोन पाषाणाच्या आगांतुक तडाक्यानें उत्पन्न होणाऱ्या अग्नीस बळी पडलेल्या वनाच्या राखेचाहि कोठें कोठें पावसा पाण्याबरोबर वाहत येऊन, त्या खतांत समावेश झाला आहे असें दृष्टीस पडेल. व मुंग्या, कीटक, घुशी, गांडूळ, डुकरे इत्यादि प्राण्यानीं भूपृष्टावर आपापल्या घरट्यासाटीं एकालगत एक अशीं भोकें केल्यामुळें त्या भूमींत खताची कालवाकालव होऊन पृष्टभाग भुसभुशीत झालेलाहि दृष्टीस पडेल. भुसभुशीत जमिनीतील ओलाव्यानें कच्चें खत कुजून तयार झालेलें पक्कें खत, पर्जन्याच्या पाण्यांत विद्रुत होऊन झिरपत खालीं जात असतां आयतें पाळांमुळांच्या तोंडांत पडून वनस्पतीचें पोषण होत असतें.

रानावनाचा विस्तार सहज रीतीनें अशा प्रकारें होत असतो कीं, फलोत्पत्तिक झाडझुडपांचीं फळें प्राण्यांच्या उपयोगिक असतील तीं, त्या प्राण्याकडून खाण्याकरितां लांबविलीं जाऊन त्यांतील बीजें खतयुक्त उघड्याजागीं पडून रुजतात, अथवा, सांवर, कुडा, रुई यांच्या बियांसारखीं कापसांमुळें हवेंत तरंगणारी बीजें वाऱ्याबरोबर दूरवर जाऊन पडतात. शिवाय, पुराच्या पाण्याबरोबर वाहून खतयुक्त उघड्या जागीं पडतात. अशा ठिकाणीं पडून रुजलेलीं बीजें चांगलीं विकास पावतात. इतर निस्तेज जमिनीवर पडलीं असतां विकास न पावतां मरून जातात हें सांगणें नको. अशा अनेक रूपानीं उत्तरध्रुवाकडून इतर भूपृष्टभागावर आस्ते आस्ते परिस्थितीनुरूप येतानां लक्षानुलक्ष वर्षे जाऊन जी सवय त्या झाडझुडपास जडून गेली ती आजवर कायम आहे. दक्षिण ध्रुवाकडे, समुद्राच्या पाण्यावांचून भूपृष्टभाग नसल्या कारणानें तिकडे वनस्पतींचा प्रारंभ झाला नाहीं, हें सांगण्याची गरज नाहीं.

पी . एम

—येत्या अंकांत अत्यंत महत्वाचे लेख प्रसिद्ध होतील.

फिरंगी वकील वालावलीकर व त्यांचें दप्तर

लेखक:— घन:शाम सांब मळकर्णेकर

मागील कालाकडे नजर फेंकली ह्मणजे जेवढें समाधान वाटतें तेवढेंच दु:खहि पण होतें. राज्य, हुद्दा किताब इत्यादि वैभव प्राप्त झालें कीं आनंद, आणि तें गमावलें, नष्ट झालें, अर्थात हातचें गेलें, कीं त्रास व्हावे ह्या गोष्टी सहजासहजीं घडून जाणाऱ्या आहेत. पण त्या विभवकालाची स्मृति देखील स्फूर्तिदायक असते व आज लुप्त झालेलें भाग्य निदान कल्पनागम्य होऊन दु:खांतहि एक प्रकारचें सुख अनुभवण्यास मिळतें. केवळ खिस्तीधर्मावाह्य असल्यावरून 'जेंतीयु' अशा निदांव्यंजक नावानें संबोधिल्या जाणाऱ्या हिंदूंतील राजकारणी बुद्धिमान पुरुषांच्या बुद्धीचा फायदा घेण्यांतहि आपला गुणग्राहीपणा व्यक्त करून पोर्तुगीज राजकर्ते आपली सत्ता दृढ करण्यास कसे झटत हेंहि वालावलीकर वकिलाच्या माहितीवरून कळण्यास मदत होईल. पोर्तुगीज राजसत्तेचें वजन परदरबारीं वाढवून ज्या कांहीं पुरुषांनीं, परधर्मी नृपति व स्वधर्मी जनपद अशा उभयतांचें हित साधलें त्यांची थोडी उपलब्ध असलेली माहिती प्रसिद्ध करावी असा विचार आहे. पेशवाई सारख्या प्रबल हिंदुदरबाराशीं आपलें सख्य ठेवण्याकरितां जे वकील पाहिजेत तेहि हिंदुच असले ह्मणजे इष्ट कार्य सुलभ होईल अशी पक्की खात्री असल्यामुळें बुद्धिमान हिंदूंच्या बुद्धिमत्तेचा फायदा घेतल्याशिवाय पोर्तुगीजांस गत्यंतर नव्हतें. ह्मणून ती जबाबदारी वकील ह्या नात्यानें बजावण्याची कामगिरी वालावलीकर वकिलांवर पडली. आधींच राजाची मर्जी ह्मणजे वारांगनेच्या प्रेमा सारखी. त्यांत वकील ह्या नात्यानें दोन देशी विदेशी राजांची मर्जी संपादन करून त्या उभयतांचें, शिवाय जनपदाचें हित साधणें हें तर अतिशय कठीण काम. पण तें उत्तम प्रकारें पार पाडल्यावरून सुज्ञजनाच्या स्तुतीस पात्र झालेल्या वालावलीकर वकिलाच्या दप्तरांतून मिळालेली माहिती प्रसिद्ध करण्यांत येईल. तिजवरून इतिहासाच्या एका अप्रकाशित भागावर उजेड पडून त्या पुरुषाची हकीगतहि कळेल. इसवी सन अठराशेंच्या उत्तरार्धापासून तहत इसवी सन अठराशें अठरा पर्यंतच्या दरम्यान पोर्तुगीज गोवा सरकारकडून जे वालावलीकर वकील सरंजामानशीं पेशवे-दरबारांत रवाना झाले त्यांस enviado किंवा emissario या किताबानें ओळखत असत. त्या वेळच्या दरबारी पत्रव्यवहारांतील कागदांचे उतारे या पुढें क्रमश: प्रसिद्ध होतील.

साभार स्वीकार

धर्मजागृति:—हें धार्मिक विचारांचें अत्युत्कृष्ट मासिक पुस्तक पुण्यांत प्रसिद्ध होत असून त्याचे संपादक रा. विष्णु रघुनाथ करंदीकर, बी. ए. हे विद्वान धर्मपरायण गृहस्थ आहेत. या मासिकांतील एकंदर विषय धर्मजागृति करण्यासारखेच असतात. वा. व. १॥ रु.

मराठी शिक्षक:—सं. रा. रामचंद्र गोविंद आपटे, पुणें. या मासिकांत शिक्षकांस योग्य अशाच विषयांची सांगोपांग चर्चा होत असते. वा. व. ट. हं. १ रु ३ आ.

ANUNCIOS

Anuncio, ainda que repetido cada linha 0-1-0
Numero avulso 0-1-0

Pelo juiz de Direito da Comarca de Quepem e pelo cartorio do escrivão do 2 ? oficio, vão ser vendidos em hasta publica, á porta do tribunal judicial, situado na rua de eão em Custoraje, no dia 18 do seguinte mez de Junho, ás 12 horas e pelo preço superior ao da sua avaliação os seguintes bens:— 1 ° Direito a terça parte do predio denominado **Gorbata** por outro nome **Moroddaticana,** da cultura de coqueiros, avaliado por 20 rupias:— 2 ° Direito á terça parte do predio denominado **Betul**, da cultura de arroz avaliado por 150 rupias: e 3 ° Direito á terça parte do predio denominado **Gorbata gonico** em que existe casa de morada, da cultura de coqueiros e outras arvores frútiferas, avaliado por 50 rupias, todos sitos em Mudcudda de Canacona descritos na conservatoria predial desta com area sob os nos. 11212, 11210, e 11213 afl. 2827 e 48 v do livro B 32 respectivamente e pênhorados nos autos de execução por custas que o Ministerio Publico nesta comarca promove contra Emuna e seu marido Putú Vitoba Folo e outros, de Mudcudda de Canacona por apenso ao inventario orfanologico procedido pelo falecimento de Bicaró Naique Dessay que foi de Ponsulem de Nogcrcem, como pertencentes aos executados, correndo por conta do arrematante a contribuição do registo por inteiro e as despezas da praça. Por este são citados todos os credores incertos dos ditos executados bem como os quinhoeiros e comproprietarios para os fins de lei.

E para ser publico se expediu este.

Quepem, 20 de Abril de 1920

O Escrivão de direito
Aires Manuel Barreto-

Verifiquei (Repetido)
M. de Quadros 1

आर्य-वैद्यक—बोध

वैद्यकाच्या चर्चेचें सुबोध साप्ताहिक पत्र. यांत वनस्पतीचे प्रसिद्ध व अप्रसिद्ध अनुभविक प्रयोग प्रसिद्ध होत असतात. खेड्यांतील लोकांस तर अत्यंत उपयोगी. अनुभवानें खात्री. वार्षिक वर्गणी टपाल. हं. सह २८९ दोन रु. नऊ आणे.

वर्ष फळ:— शके १८४२ चें. यांत प्रत्येक राशीचें, प्रत्येक महिन्याचें ग्रहफल वर्तविलें असल्यामुळें, प्रत्येकास अत्यंत उपयोगीं व्यापारीलोकांस तर केवळ अमूल्य देणगी. सुख, दुःख, नोकरी, प्रमोशन, बढती, व्यापार, शेती, लाभ, यात्रा, इ. गोष्टी यांचा स्पष्ट खुलासा आहे. किंमत साडे आठ आ. ट. ख. निराळा. 5

पत्ताः— संपादक आर्यवैद्यक बोध. मु. पो. कल्याण जि. ठाणें

गोव्यांचा व्यापार

हल्लीं मंदावला आहे काय ? तुम्हांला माहित नाहीं. मग व्यापार म्हणजे काय या विषयींची तुम्हांला माहिती पाहिजे आहे तर आजपासून उद्योगी भारत मालेचे वर्गणीदार व्हा. वार्षिक वर्गणी ट. ख. सह रु. २ आ. १२. नमुना अंकासाठीं चार आण्याची पोष्टाचीं तिकेटें पाठवा. गोव्यांचीं चालतील.

व्यवस्थापक
6 उद्योगी भारतमाला
गिरगांव, मुंबई

फुकट ! बक्षिस फुकट !

दद्रुविनाशक 7

गजकर्णे, इसब व नायटे यांवर रामबाण किं. ४ आणे.
२४ डब्या एकदम घेणारास रास्कोप घड्याळ फुकट !

रेल्वेरेग्यूलेटर घड्याळ

अगदीं बरोबर टाईम देणारें घड्याळ किं. रु. ४॥.
६ बाटल्यांचे बरोबर अत्तरदान फुकट मिळेल.

रिस्टवॉचः—हातांत बांधण्याचें घड्याळ किंमत रु. ५॥ पट्ट्यासह.

किंग जार्ज कारोनेशन कं मुंबई नं४

2 रोल्डगोल्ड सोन्याचे

कधींच काळे न पडणारे दागिनें.

खमिसचे बटन सेट किं. रु. ३; जॅकेटचे बटन सेट किं. रु. ३; कोटाचे बटन सेट किं. रु. ३; चद्रहार किं. रु ३–४; गोट जोडी किं. रु २–२॥; पाटल्या जोडी किं. रु. २–२॥; वज्रटीका किं. रु. ३–४ टुसी किं. रु. ६; नथ मोत्याची बांधलेली किं. रु. ४–५; शिंपाचे मोती लहान मोठे पाहिजे त्या सराची किं. रु. २–३–४; आंगठी किं. रु. १; सल्ल्याची जोडी किं रु. १॥; बांगड्या जोडी किं. रु. २, २॥; सरी किं. रु. ३–४; घड्याळाचा छडा रु. ३.

केंस काळे करण्याचा साबण

हा साबण फार परिश्रमानें तयार केला आहे. यानें केंस काळे होतात. तीन डब्याचे बॉक्सची किं. रु. १॥.

पत्ता मगनलाल के आणि कंपनी. गिरगांव मुंबई

ताप आला

कीं डॉक्टरकडे धांवण्याची गरज नाहीं. आजच एक 'पसार' ची बाटली मागवून संग्रहीं ठेवा.
पसार हें तापावर हटकून गुण देणारें औषध आहे. वेळोवेळ भयंकर सांथीच्या वेळीं याची परीक्षा झाली असून हें सर्वांत उत्तम ठरलेलें आहे. एकवेळ अनुभव घ्या.

व्ही. के. रानडे. गिरगांव मुंबई.

8

५० वर्षांच्या अनुभवानें सर्वोत्कृष्ट ठरलला व निरनिराळ्या प्रदर्शनांतून
3 सोन्याचांदीचीं पदकें मिळालेला

डॉ. वामन गोपाळ यांचा

आयोडाइज्ड

सार्सापरिला

रक्त हाच जीवित्वसर्वस्व. निरोगीपणा, सुख आणि दीर्घ आयुष्य यांचा लाभ शुद्ध आणि जोमदार रक्तच करून देते. तर मग भयकर ... रक्तांतील दोष व त्यापासून होणारी पीडा नाहींशी करावयाची असेल, तर तावडतोब सार्सापरीला घेण्यास सुरवात करा. एका बाटलीस किं. १। रु. चार बाटल्यांस पोस्टेज सुद्धां फक्त ४॥ मोठमोठ्या शहरांत प्रसिद्ध व्यापाऱ्यांकडे मिळेल.

डॉ. गौतमराव केशव आणि सन
ठाकुरद्वार–मुंबई.

कां नाहीं इंग्रजी शिकत ?

9 साधन नाहीं म्हणून. आमच्याकडे मिळणारे मराठी इंग्रजी शिक्षक हें घरच्या घरीं दुसऱ्याच्या मदतीशिवाय इंग्रजी शिकण्याचें उत्तम साधन आहे.

व्ही. पी. खर्चासह फक्त एक रुपया
स्नेहल आणि कंपनी—गिरगांव मुंबई

terra, tem de, revolucionado pela mesma campanha, fazer-se *missionário* para, com seus sacrificios, abnegação e patriotismo, esterelisar senão totalmente, pelo menos, em grande parte, a acção perniciosa que tais males estão produzindo na sociedade.

Avante, cidadãos que não vos conserveis de braços cruzados e indiferentes ao movimento bem intencionado do *Vidia-prassar*.

Não pode ser

Um alvitre

O sr. Constancio Roque da Costa, antigo deputado da Nação Portuguesa e distincto publicista, recomendando ao sr. dr. Jaime de Morais a pretensão do fomento de Damão, secundado no seu artigo, publcado no *Heraldo* de 13 do corrente, o alvitre da venda das aldeias Bambotim e Regunverá que o Estado possui ali,—preconisado em um memorial para, com o producto da mesma venda, se construirem tres estradas.

Salvo o devido respeito pela opinião do sr. Costa, não podemos concordar com êle, porque a idea de vendas de terras nascionais para melhoramentos publicos alem de redundar em prejuiso do prestigio do Estado, dará, mais dia menos dia, margem a que se efectui muita venda sem a segura garantia de que o seu produto se aplique aos fins que a determinarem, como sucedeu com o emprestimo da viação que dêsta se *desviou* para o pagamento de funcionarios publicos, a ser verdade o que por ai se rumoreja.

Admitindo-se até por momentos a hipotese de que as vendas das terras do Estado não pecassem por êsse *excesso*, ainda assim, êlas não devem ser preconisadas, porque dêlas pode vir o *deficito* da maior parte da receita, proviniente do negocio oficial ser absorvida nos seus proprios arranjos...primordiais.

¿ Venda de *duas* aldeias para *tres* estradas ?

Sair-nos-há muito *caro* êste negocio...raro.

De resto, não há duvida que todos os alvitres sejam bons, quando *boamente* sejam executa dos e o que, nos falta precisamente é a *boa* excução.

Sobre queda...

Já mais duma vez reclamamos contra a absurda continuação da taxa de guerra que foi estabelecida *só para vigorar seis meses* ?

Mas como se fôsse de pouca monta o prejuiso que nos está dirivando a mesma taxa, testimunho vivo de como o Estado faltou à sua palavra, determinou-se, á mingua do papel selado de 30 *linhas*, que se utilisasse o de 25 *linhas*, colando-se-lhe a estampilha correspondente !

E' caso para se dizer: sobre queda, coice !

Pois o litigante ou quem tiver de fazer uso do papel de 30 linhas, terá de empregar o de 25 linhas, com 5 linhas a menos !

E o prejuizo de 5 linhas ao interressado é uma bagatela ao Estado que, não há duvida, está *rico* com a taxa de guerra.

Um quadrado

Analfabetismo, alcoolismo, jogo de azar e bailadeiras são quatro poderosos inimigos que nos estão difinhando a existencia social, arredando-nos para muito longe do verdadeiro patriotismo e reduzindo o atacado por qualquer deles á triste condição de besta...*quadrada*.

Vergonha das vergonhas, tal *quadrado* que se acha traçado no quadro preto da sóciedade goeza com o giz de imbecilidade é mister apagar-se com a exponja do patriotismo, com o pano de sacrificio.

E é nisto que reside a nossa salvação social, moral e politica.

Errata

No artigo do sr. Dr. Soares Rebelo, publicado na edição precedente, onde se lê = continua a ser decidido pelos tribunais = carrija-se — dicidido diversamente =

साभार स्वीकार

दूत (मासिक):—या औद्योगिक मासिकाचे चालक, मुद्रक व प्रकाशक रा० चिंतामण रामचंद्र टिकेकर हे असून तें नवीपेठ, सोलापूर येथें प्रसिद्ध होत असतें. वा० व० ट. हं. २ रुपये. प्रस्तुत मासिकांतील एकंदर विषय औद्योगिकदृष्टीनें अत्यंत महत्वाचे असून प्रत्येकाला त्याचा फार उपयोग होण्यालायक असतात. उद्योगी लोकानीं तर सदरहू मासिकाचे वर्गणीदार व्हावेंच, अशी आमची त्यांस आग्रहाची शिफारस आहे.

आर्यावर्त (मासिक) :—हें मासिक रा० पुरुषोत्तम गोपाळ लातूरकर अंजनगांव, सी० पी० रेलवे, यांच्या संपादकत्वाखाल प्रसिद्ध होत असून, त्यांतील विषय जोरदार रीतीनें प्रतिपादलेले असतात. खुद्धांची विनोदी लेखणी चित्ताल्हादक आहे. वा. व. ट. ह. १ रु. १२ आणे.

खेळगडी [मासिक] :—या लहान मुलांस अत्यंत उपयुक्त मासिकाचे संपादक रा. बा. रा. पालवणकर हे असून यानीं मुलांच्या सद्गुण वाढीप्रीत्यर्थ 'खेळगडी'च्या रूपानें सुरू ठेविलेला उपक्रम फार अभिमानास्पद आहे. पत्ताः—गिरगांव, ब्याकरोड, मुंबई. वा. व. ट. हं. २ रुपये.

मूकनायक (साप्ताहिक) :—या पत्रांत ब्राह्मणेतरांच्या हिताहित संबंधाची जोरदार, मुद्देसूद व विचारपरिप्लुत चर्चा होत असून, त्याचें 'मूकनायक' हें नांव सार्थ आहे. संपादक पी. एन भटकर, परेल, मुंबई. वा. व. ट. ह. २॥ रुपये.

विजयी मराठा [साप्ताहिक]:—मराठे लोकांच्या सामाजिक व राजकीय हितसंबंधाची जोरदार चर्चा करणारें हें पत्र पुणें येथें प्रसिद्ध होत असतें. संपादक रा. श्रीपतराव लक्ष्मणराव शिंदे.

शीलाचें मोल :—या कादंबरीचे लेखक प्रसिद्ध कवि रा. विटल कृष्ण नेरूरकर बी. ए. हे असून ती रा. बा. रा. पालवणकर, संपादक 'खेळगडी' या मुलांच्या कर्त्या हितचिंतकांनीं प्रसिद्ध केली आहे. कादंबरीचें संविधानक सद्गुणपरिपोषक असून त्याच्या वाचनानें मुलांसच नव्हे तर त्यांच्या पालकांससुधां बराच नैतिक फायदा होण्यासारखा आहे. संग्रहास फार योग्य. किं. १२ आणे.

सारस्वत ब्रा. समाजाचा अहवालः—मडगांव, गोवा येथें स्थापन झालेल्या सारस्वत ब्रा. समाज या उपयुक्त संस्थेचा ७ वर्षांचा खुलासेवार इतिहास सदरहू पुस्तकांत लिहिला असून त्याच्या वाचनानें समाजचालकांविषयीं, त्यानीं समाज कार्यार्थ दाखविलेल्या नेट व चिकाटी या दोन बहुमोल गुणामुळें, मन अगदीं प्रेमादरानें ओथंबून गेल्याशिवाय रहात नाहीं. 'सारस्वत समाजाच्या सध्याच्या उपक्रमामुळें तो महाराष्ट्रात बहुतेकांच्या ओळखीचा व आवडीचा झाला असल्यामुळें त्या संबंधीं आणखी ज्यास्ती लिहिण्याचें कारण वाटत नाहीं.

देशी भाषेंतून शिक्षणाची आवश्यकता

(ले. २ रा.)

शिक्षण हें ज्ञानाकरितां ना ? तें ज्ञान जर आह्मांस शिक्षणाच्या योगानें सरकार देणार आहे व तें सुलभ, सुसाध्य व पूर्ण झालें पाहिजे, तर तें आह्मांस आमच्या मूळ भाषेंतूनच द्यावयास पाहिजे. असें असतां तें आह्मांस आपल्या—माय—भाषेंतूनच न देतां, जन्मतः गैरमाहित असलेल्या—पोर्तुगीज— भाषेंतून कां दिलें जात आहे, याचा उलगडा—आह्मांस तरी—बरोबर होत नाहीं. काय ? आमच्या भाषेंत ज्ञान नाहीं ? किंवा आमच्या भाषेंतून शिक्षण देतां येत नाहीं ? किंवा आम्ही परतंत्र झाल्यानें सरकारनें ज्या प्रमाणें आपले कायदेकानू व आपली सत्ता हीं बळेंच आमच्यावर स्थापित केलीं आहेत, त्या प्रमाणेंच, आपली भाषा व आपल्या भाषेंतून शिक्षण हींहि आमच्यावर लादलीं आहेत काय ? यांपैकीं कांहींच आह्मांस समजत नाहीं. आतां ज्ञानभांडार हें जसें पोर्तुगीज भाषेंत आहे, त्याप्रमाणेंच तें मराठी (किंवा संस्कृत) भाषेंतही आहे, आणि तें जसें पोर्तुगीज भाषेच्या शिक्षणद्वारा देतां येतें, तसेंच तें मराठी भाषेच्या शिक्षण द्वाराही देतां येतें, हें आम्हीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. तर इंग्लिश सरकारनें हें कांहींसें सिद्ध करून, त्यानें हिंदुस्थानांतील प्रजेस—इतरांबरोबर महाराष्ट्रांतील लोकांसही देशी भाषेच्या शिक्षणद्वारा ज्ञानदान करण्याचें योजून मराठीं शिक्षण देण्याचें केलें आहे. पोर्तुगीज सरकारपेक्षां इंग्लिश सरकार हें कांहीं कमी राजकार्यनिष्णात नाहीं. किंचित कांकणभर ज्यास्तच आहे ह्मटलें तर त्यांत पोर्तुगीज सरकारची नालस्ती केली असें होणार नाहीं. त्या सरकारचा तरी आमच्या सरकारनें कित्ता कां गिरवूं नये !

आमच्या प्रमाणें जर पोर्तुगीज लोकांवर परक्या राष्ट्राचा अंमल असता; त्यांस त्यांच्या भाषेंतून शिक्षण न मिळतां, तें जर परभाषेंतूत ह्मणजे मराठी, संस्कृत, अरबी, उर्दु किंवा फ्रेंच, इंग्लिश, जर्मनी—वगैरे यां पैकीं कोणत्याही एका भाषेंतून मिळण्याचा प्रसंग आला असता, तर पोर्तुगीज लोकांस तें शिक्षण किती लाभदायक व सुसाध्य झालें असतें ? आणि पोर्तुगीज लोकांनीं त्या संबंधानें काय ह्मटलें असतें ? पोर्तुगीज लोकांनीं त्या प्रसंगीं जें काय ह्मटलें असतें, तेंच आम्हीं आज ह्मणत आहों. तेव्हां ह्यांत कांहीं आमचा गुन्हा होणार नाहीं.

शिक्षण हें सरकारवर विशेष अवलंबून आहे, हें खरें; ह्मणून तें त्यानें स्वतःस पाहिजे त्या रीतीनें प्रजेस द्यावें, अशी गोष्ट नाहीं. तर ज्या रीतीनें प्रजेस तें दिलें असतां तिला तें अधिक ग्राह्य होईल, त्या रीतीनें देणें हें सरकारचें आद्य कर्तव्य आहे. 'हम करेसो कायदा' उपयोगी नाहीं. स्वतंत्र राष्ट्रांतील प्रजेस, स्वभाषेंतून शिक्षण मिळत नाहीं काय ? त्याप्रमाणेंच परतंत्र राष्ट्रांतील प्रजेस त्यांच्या त्यांच्या भाषांतून शिक्षण कां मिळूं नये ? ! राष्ट्र परतंत्र झालें ह्मणून काय झालें ? परतंत्र झालें ह्मणून त्यांतील लोकांस परभाषेंतून शिक्षण मिळावें, हा कोठला न्याय ? स्वतंत्र व परतंत्र राष्ट्रं यांतील प्रत्येक बाबतींत कायदे जरी निरनिराळे झाले तरी शिक्षणविषयक बाबहि तशीच कां व्हावी ? दैवदुर्विलासाच्या योगानें—परवशतेमुळें—परक्यांचें सर्व कांहीं—कायदे वगैरे—परकीय घ्यावे लागले ह्मणून, शिक्षणही परकी भाषेंत घ्यावें काय ? राजनीति असें सांगत असावी असें आह्मांस तरी वाटत नाहीं !

सध्याच्या काळीं शिक्षण हें सरकारवर अवलंबून राहिलें आहे, ह्मणून निरुपायानें सरकारच्या ओंजळीनें पाणी प्यावें लागत आहे व सरकार वागवील, तसें वागणें भाग होत आहे, आणि ह्मणूनच अशा तऱ्हेचा लेख लिहिण्याचा प्रसंग आला आहे. शिक्षण हें सरकारावर अवलंबून न रहातां, तें जर पूर्वीप्रमाणें लोकांवरच अवलंबून राहिलें असतें, तर हा लेख लिहिण्याचा प्रसंग येता ना. आपणांस पाहिजे तसें लोकांनीं शिक्षण घेतलें असतें. पण असें झालेलें नाहीं. सरकारच्या हातीं शिक्षण असणें हें कांहीं वाईट नव्हे; पण तें लोकांस पाहिजे तसें मिळालें ह्मणजे बरें. सरकारास पाहिजे तसें मिळून उपयोगी नाहीं.

येथील गोमांतकांतील मुळची ह्मणजे पोर्तुगीज लोक इकडे येऊन हा प्रांत पादाक्रांत करून, बाटवूत सोडण्याच्या पूर्वीची—लोकवस्ती, सगळी हिंदूचीच होती. पण पुढें त्यापैकीं कांहीं पोर्तुगीज लोकांनीं बाटवून टाकिल्यामुळें, आतां अर्धी खिस्ती व अर्धी हिंदु अशी येथील लोकवस्ती आहे. पोर्तुगीज येणाच्या अगोदर सर्व लोकांना मराठीच शिक्षण मिळत असे; पण आतां सर्व लोकांपैकीं निम्मे खिस्ती झाल्यानें व त्यानीं जन्मापासून पोर्तुगीज भाषेचा आश्रय घरल्यानें, त्यांना मराठीची विशेषशी—नव्हे निखालस—गरज नाहीं. त्यांची पोर्तुगीज लोकांप्रमाणें ह्या लोकांच्या धर्माबरोबरच—पोर्तुगीज ही जन्मभाषा होऊन बसली आहे. पण बाकीच्या निम्मे लोकांची तशी स्थिति

ANUNCIOS

Anuncio, ainda que repetido cada linha 0-1-0
Numero avulso 0-1-0

Pelo juiz de Direito da Comarca de Quepem e pelo cartorio do escrivão do 2 ° oficio, vão ser vendidos em hasta publica, á porta do tribunal judicial, situado na rua de Ceão em Cusmane, no dia 18 do seguinte mez de Junho, ás 12 horas e pelo preço superior ao da sua avaliação os seguintes bens:— 1 ° Direito a terça parte do predio denominado **Gorbata** por outro nome **Moroddaticana**, da cultura de coqueiros, avaliado por 20 rupias;— 2 ° Direito á terça parte do predio denominado **Betul**, da cultura de arroz avaliado por 150 rupias: e 3 ° Direito á terça parte do predio denominado **Gorbata gonico** em que existe casa de morada, da cultura de coqueiros e outras arvores frutiferas, avaliado por 50 rupias, todos sitos em Mudcudda de Canacona descritos na conservatoria predial desta comarca sob os nos. 11212, 11210, e 11213 afl. 2527 e 48 v do livro B 32 respectivamente e penhorados nos autos de execução por custas que o Ministerio Publico nesta comarca promove contra Emuna e seu marido Putú Vitoba Folo e outros, de Mudcudda de Canacona por apenso ao inventario orfanologico procedido pelo falecimento de Bicaró Naique Dessay que foi de Ponsulem da Nogorcem, como pertencentes aos executados, correndo por conta do arrematante a contribuição do registo por inteiro e as despezas da praça. Por este são citados todos os credores incertos dos ditos executados bem como os quinhoeiros e comproprietarios para os fins de lei.

E para ser publico se expediu este.

Quepem, 20 de Abril de 1920

O Escrivão de direito
Aires Manuel Barreto.

Verifiquei
M. de Quadros 1

Pessoas que pela sua qualidade nos merecem inteira fè, vieram queixar-se, nesta Redacção de infames selvagerias perpetradas nos seus predios dali, por alguns individuos de má nota, que têm organisado um *complot* para se apoderar do alheio, com toda a sem-cerimonia...

São autenticos perturbadores do socegó pùblico tais ratoneiros que, segundo se diz, á sombra de influencias dos seus *batcaràs*, aos quais impingem naturalmente lérias, julgam-se uns verdadeiros potentados!

E' muito feio, isto, tornando-se necessario que aos referidos espertalhões se aplique um correctivo tal que nunca mais se abalacem á continuação impune de suas criminosas proesas.

Esperamos que os competentes volverão a sua preciosa atenção ao que acima fica exposto.

Saibam quantos...

O *Bharat* è um jornal, genuinamente, popular, distinado á defesa dos interresses publicos.

'Fiel a êste seu principio, êle dá cabida nas suas colunas ás queixas e reclamações que tenham por origem a mais ligeira violação de qualquer direito ligitimo do Povo, garantido pelas leis da Republica, contanto que as mesmas queixas e reclamações venham devidamente *fundamentadas e assignadas pelos seus autores*.

Vem estas considerações a talhe de foice por termos na nossa meza de trabalho varias cartas, registando queixas e reclamações que, alem de imperfeitamente fundamentadas são... anónimas.

E' claro que não vamos publica-las, sem que os seus *desconhecidos* autores supram a dupla deficiencia que nas suas cartas se nota.

Sinão... não!

ESTADO DA INDIA

QUARTEL GENERAL

1a. Repartigao—2a. Secgao

AVISO

S. Exa. o Sr. Governador Geral determina que se publique o seguinte:—

1.° Que aceitam voluntarios "maratas" para o serviço de policia civil de Macau em numero de 40.

2.° Que os individuos que desejem alistar-se deverão apresentar-se no Quartel General e satisfazer as seguintes condições:—

a) Roubustez e altura minima de 1 m. 54.

b) Idade não inferior a 18 nem superior a 35 anos

c) Bom comportamento civil

d) Compromisso de serviço de 3 anos a contar da data do desembarque em Macau.

3.° Que os individuos alistados gosarão as seguintes vantagens:

a) Garantias dos seus usos e costumes religiosos.

b) Passagem por conta do Governo da Provincia de Macau, de ida e regresso, quando terminado o tempo de serviço ou por incapacidade julgada pela Junta de Saude.

c) Vencimentos de entrada, de 33 patacas mensaes, sem descontos e sem direitos á alimentação.

Este vencimento pode ser aumentado a 40 e 47 patacas.

Informam-se os pretendentes de que a pataca ao cambio actual equivale a mais de duas rupias.

Administração do Conselho de Quepèm, 4 de Maio de 1920

O Admor do Concelho
Alfredo Antão

Camara Municipal de Salcete

CONVITE

Tendo esta Camara Municipal resolvido e sido superiormente autorisada colocar na sala de suas sessões o retrato do insigne, eminente e inolvidavel Dr. José Inacio de Loiola, tenho, em cumprimento da deliberação da Camara da minha presidencia, de 20 do corrente a honra de convidar todos os cidadãos deste Estado a autorisarem com a sua presença o acto de descerração do referido retrato, o qual acto terá lugar ás 12 horas de 19 do proximo mez de Maio, dia de aniversario do geralmente pranteado falecimento daquele grandioso e genial vulto, ficando-me o fundo convecimento de que esse preito de justa e merecida homenagem anda na consciencia geral e que a assistencia que solicito, traduzirá a exteriorização de um tal sentir.

Peço e espero merecer igualmente se digne a assistencia autorisar o acto da instalação da "Biblioteca Munipal Circulante", que, em conformidade da citada deliberação, terá lugar nesse mesmo dia e em seguida ao acto da descerração do retrato.

Em breve, será dado á publicidade o respectivo programa.

Paços do Concelho em Margão. 24 de Abril de 1920.

O Presidente da Camara
Antonino Salvador C. C. Xavier Miranda

देशी भाषेंतून शिक्षणाची आवश्यकता

(ले. १ ला.)

कोणतेंही शिक्षण असो, तें स्वभाषेंतूनच मिळणें उत्तम व सोईस्कर होईल, हें नव्यानें कोणास सांगितलें पाहिजे, असें नाहीं. नामांकित व विद्वान लोकांचाही असाच अभिप्राय आहे. स्व ह्मणजे आपल्या भाषेंतून शिक्षण न मिळतां, तें पर ह्मणजे दुसऱ्या-परकी भाषेंतून मिळणें दुष्कर व अप्राप्य होईल; कांतर स्वभाषेंतून दिलेल्या शिक्षणाचा जितक्या लवकर व सहज रीतीनें बोध होऊन ज्ञानाकलन होईल, तितक्या लवकर व सहजरीतीनें परभाषेंतून दिलेल्या शिक्षणाचा बोध होऊन, ज्ञानाकलन होणार नाहीं, हें निःसंशय होय.

शिक्षण घेण्यास प्रथमतः भाषाज्ञान पाहिजे. भाषाज्ञानावांचून शिक्षण संपादणें कधींच शक्य नाहीं. कसें होईल? मग ती भाषा कोणतीही असो—पण शिक्षण घेण्यापूर्वीं कोणत्याही एका भाषेचें ज्ञान, तात्पूर्तिक कां असेना, पण होऊन— त्यांतूनच तें मिळालें पाहिजे. त्याशिवाय अन्य साधन नाहीं. जनावरांस कधीं मानवी शिक्षण देतां येईल काय? नाहीं. कां तर माणसांसारखी त्यांची भाषा नव्हे. माणसांसारखें त्यांस भाषाज्ञान नसतें. अर्थात माणसांचें शिक्षण त्यांस देतां येणार नाहीं. भाषा ह्मणजे मनांतील अव्यक्त विचार व्यक्त व स्पष्टपणें प्रदर्शित करण्यांचें एक साधन, बोलण्यांची कला आहे. तें साधन शिक्षणापूर्वीं पाहिजे असतें. त्यावांचून शिक्षण ह्मणजे शिकविणें कदापि साध्य होणार नाहीं. आणि अशामुळेंच मुक्यांस शिकविणें अशक्य कोटींतील—जरी यदाकदाचित् हरप्रयत्नें करून ह्मणजे नानायुक्त्या व उपायांनीं कोठें कोठें मुक्यांस शिकविण्याचें शक्य होत आहे, तरी तें कांहींसें अशक्य कोटींतील—झालेलें आहे. या करितां शिक्षणापूर्वीं कोणत्याही एकाभाषेचें ज्ञान झालें असलें पाहिजे व तेंही चांगलें पूर्णपणें पाहिजे; कां तर त्यांतून मिळणाऱ्या शिक्षणाचा चांगला व पूर्ण बोध होऊन ज्ञानाचें सहज व सुलभ रीतीनें लवकर आकलन झालें पाहिजे. अशा तऱ्हेनें ह्मणजे शिक्षणापूर्वींचें चांगलें व पूर्ण भाषाज्ञान स्वभाषेवीण अन्य भाषेचें नसतें. स्वभाषेचें ज्ञान प्रत्येकास जन्मतः होतें व तेंही चांगलें व पूर्ण असें असतें. तें कोणास बळेंच शिकवावें पडत नाहीं; तर तें सहज आईच्या कडेवरून प्राप्त होतें. मग ती स्वभाषा कितीही कठिण अथवा सुलभ असो. तेव्हां अशा सहज रीतीनें प्राप्त होऊन, पूर्ण व चांगलें भाषाज्ञान झालेल्या स्वभाषेंतून शिक्षण दिलें तर तें शिक्षण सुलभही होऊन त्याचा बोध लवकर होतो; व ज्ञान संपादन सुसाध्य होतें. आणि असें झालें तरच त्या शिक्षणापासून फायदा होईल.

आतां हा फायदा परभाषेंतून शिक्षण मिळाल्यानें नसतो. याचीं कारणें अनेक आहेत. एकतर शिक्षणापूर्वीं—शिक्षणास आवश्यक असें भाषाज्ञान पाहिजे असतें, तें—परभाषेचें असत नाहीं. अर्थात त्या भाषेचें ज्ञान होण्यापूर्वीं तो तिजविषयीं मुकाच असतो, ह्मटलें तरी चालेल. तेव्हां जें शिक्षण दिलें पाहिजे, तें देण्यापूर्वीं त्यास प्रथमतः परभाषाज्ञान करून दिलें पाहिजे. आणि तें परभाषाज्ञान परभाषेंतूनच दिलें गेलें ह्मणजे मग एवढा द्राविडी प्राणायाम करूनही शेवटीं 'पालथ्या घागरीवर पाणी' ओतण्यासारखें होणार! यदाकदाचित महत्प्रयासानें व दीर्घ काळानें जरी कांहीं तिचें ज्ञान झालें, तरी तें अपूर्ण व दुर्बोधच असणार; आणि अपूर्ण व दुर्बोध असलेल्या भाषेंतून दिलेलें शिक्षण किती लवकर, सुलभ पूर्ण, सुसाध्य व सुबोध होईल, हें आणखीं सांगितलें पाहिजे काय? शिक्षणच जर दुर्बोध, अपूर्ण, दीर्घकालिक व दुःसाध्य झालें, तर त्याचा हेतु जो ज्ञानाकलन तो कितपत पूर्ण होईल, हेंही सांगण्याची जरुरी वाटत नाहीं. आतां जें ज्ञानाकलन सुबोध व पूर्णपणें, लवकर, सुलभ व सुसाध्य रीतीनें व्हावयाचें, तें तसें न होतां जर दुर्बोध व अपूर्ण, दीर्घकालिक व दुःसाध्यरीतीनें झालें तर त्यापासून कितपत फायदा होईल, हें दिसतच आहे! याचा अनुभव वरील रीतीनें शिक्षण संपादन करणाऱ्यास आला असेलच! अर्थात परभाषेंतून शिक्षण दिल्यानें बिलकूल फायदा नाहीं.

शिक्षण हें ज्ञान प्राप्त होण्याकरितां आहे, व ज्ञान हें अज्ञानाचा नाश होण्याकरितां आहे. ज्ञान ह्मणजे जाणीव आणि अज्ञान ह्मणजे नेणीव. मनुष्यांत असलेली नेणीव नाहींसी करून, जाणीव उत्पन्न करणें हेंच शिक्षणांचें मुख्य उद्दिष्ट आहे. ज्ञान हें एकाच प्रकारचें नसून, अनेक प्रकारचें आहे. ह्मणजे शास्त्रीय, वाङ्मयात्मक, राजकीय, पारमार्थिक, धार्मिक, नैतिक, औद्योगिक, कलाकौशल्यविषयक, भौतिक इ. इ. व हें सर्व ज्ञान शिक्षणानें प्राप्त व्हावयाचें असतें अशा तऱ्हेचें हें ज्ञान फक्त एका विशिष्ट भाषेंतच असतें, आणि तें त्याच भाषेच्या शिक्षणांतून प्राप्त व्हावयाचें असतें असें नाहीं. तर तें जसें पोर्तुगीज भाषेंत असतें, तसेंच तें इंग्लिश, फ्रेंच, जर्मनी ग्रीक, रोमन इ. युरोपियन व जपानी, चिनी हिंदी, संस्कृत मराठी इ. आशियाटिक भाषांतही असतें व तें जसें पोर्तुगीज भाषेच्या शिक्षणांतून मिळतें, तसेंच तें इतर भाषांच्या शिक्षणांतूनही मिळतें हें निर्विवाद आहे.

पोर्तुगीज भाषेंतच हें सर्व ज्ञान भरलेलें आहे, व तें त्याच भाषेच्या शिक्षणांतून मिळवावयाचें असतें; इतर भाषांत तें नाहीं, अर्थात त्या त्या भाषांच्या शिक्षणानें तें प्राप्त व्हावयाचें नसतें, अशी गोष्ट नाहीं. तर ज्ञान हें सर्व भाषांत सरीस सारखें भरलेलें आहे. आतां तें त्यांत एखादें कमी अधिक प्रमाणानें असो ह्मणजे एका भाषेंत ज्यास्त आणि दुसऱ्या भाषेंत त्यापेक्षां जरा कमी—पण असणार हें सर्वथैव सिद्ध आहे. उदाहरणार्थ— भौतिकशास्त्रज्ञानाची प्रगति जशी युरोपियन भाषांत झाली आहे, तशी ती जरी आमच्या संस्कृत (किंवा मराठी) भाषेंतून झालेली नसली, तरी तत्वज्ञानाची (अध्यात्मिक) प्रगति जशी आमच्या संस्कृत भाषेंत झालेली आहे, तशी ती युरोपियन भाषांत झालेली नाहीं, हें कोणीही कबूल करील. असें जरी आहे, तरी युरोपियन भाषांत तात्विकज्ञान मुळींच नाहीं, व आमच्या संस्कृत (किंवा मराठींत) भौतिक शास्त्रज्ञान मुळींच नाहीं, असें मात्र नाहीं. दोहोंतही तें ज्ञान आहे; पण कमी अधिक प्रमाणानें आहे, इतकेंच.

असें जर आहे, तर प्रत्येकास प्रत्येकाच्या भाषेंतूनच प्रथमतः शिक्षण मिळालें पाहिजे. ह्मणजे ज्ञानापरी ज्ञान संपादन होऊन, शि-

ANUNCIOS

Anuncio, ainda que repetido cada linha 0-1-0
Numero avulso 0-1-0

Pelo juiz de Direito da Comarca de Quepem e pelo cartorio do escrivão do 2 º oficio, nos autos civeis de execução hypotecaria que Vassu Vitola Porobo Chirmulcar e outro, de Orna de Fatorpà, promovem contra Purxotoma Essó Naique Dessae e mulher, de Fatorpá, vão ser vendidos em hasta publica, á porta do tribunal judicial, situado na rua de Deão, em Cusmane, no dia 4 do proximo seguinte mez de Junho, ás 12 horas, pela primeira vez e pelo preço do seu valor os seguintes predios: 1 º Predio rustico denominado " Minguelimbandiam avaliado por 251 rupias e 2 º Predio rustico denominado "Novorsordo, " avaliado por 249 rupias, ambos da cultura de arroz, sitos em Morpirla e discritos na conservatoria do registo predial desta comarca sob os nos. 106 5 e 10616 af 127 ef 127 v. do livro B 30 respetivamente e penhorados nos referidos autos de execução hypotecaria, como pertencentes aos executados. São por este citados todos e quaisquer credores dos executados e os co-proprietarios para deduzirem os seus direitos nos termos e para os fins de lei, correndo por conta do arramatante a contribuição do registo por titulo oneroso por inteiro e as despezas da praça.

E para ser publico se expediu este.

Quepem 20 de Abril de 1920

O Escrivão de direito
Aires Manuel Barreto

Verifiquei
M. de Quadros 1

(Repetido)

आर्य-वैद्यक बोध

वैद्यकाच्या चर्चेचें सुबोध साप्ताहिक पत्र. यांत वनस्पतीचे प्रसिद्ध व अप्रसिद्ध अनुभविक प्रयोग प्रसिद्ध होत असतात. वैद्यांतील लोकांस तर अत्यंत उपयोगी. अनुभवानें खात्री. वार्षिक वर्गणी टपाल. ह. सह २॥ दोन रु. आठ आणे.

वर्ष फल:— शके १८४२ चें. यांत प्रत्येक राशीचें, प्रत्येक महिन्याचें ग्रहफल वर्तविलें असल्यामुळें, प्रत्येकास अत्यंत उपयोगी व्यापारी लोकांस तर केवळ अमूल्य देणगी. सुख, दुःख, नोकरी, प्रमोशन, बदली, व्यापार, शेती, लाभ, यात्रा, इ. गोष्टी यांचा स्पष्ट खुलासा आहे. किंमत साडे आठ आ. ट. ख. निराळा. 5

पत्ता:— संपादक आर्यवैद्यक बोध. मु. पो. [illegible] जि. ठाणें.

गोव्यांचा व्यापार

हल्लीं मंदावला आहे काय ? तुह्मांला माहित नाहीं. मग व्यापार ह्मणजे काय या विषयींची तुह्मांला माहिती पाहिजे आहे तर आजपासून उद्योगी भारत मालेचे वर्गणीदार व्हा. वार्षिक वर्गणी ट. ख. सह रु. २ आ. १३. नमुना अंकासाठीं चार आण्याची पोष्टाची तिकिटें पाठवा. गोष्टी चालतील.

व्यवस्थापक
6 उद्योगी भारतमाला
गिरगांव, मुंबई

2 गोल्डगोल्ड सोन्याचे

कधींच काळे न पडणारे दागिनें.

खमिसचे बटन सेट किं रु. ३; जॅकेटचे बटन सेट किं. रु ३; कोटाचे बटन सेट किं. रु. ३; चद्रहार किं. रु ३-४; गोट जोडी किं रु. २-२॥; पाटल्या जोडी किं. रु. २-२॥; वज्रटीका किं. रु. ३-४ टुसी किं. रु. ६; नथ मोत्यांची बांधलेली किं. रु. ४-५; शिपाचे मोती लहान मोठें पाहिजेल त्या साराची किं. रु. २-३-४; आंगठी किं. रु. १; [illegible] जोडी किं रु. १॥; बांगड्या जोडी किं. रु. २, २॥; सरी किं. रु. ३-४; घड्याळाचा छडा रु. ३.

केंस काळे करण्याचा साबण

हा साबण फार परिश्रमानें तयार केला आहे. यानें केंस काळे होतात. तीन डब्याचे बॉक्सचीं किं. रु. १॥.

पत्ता मगनलाल के आणि कंपनी. गिरगांव मुंबई

फुकट ! बक्षिस फुकट !

दद्रुविनाशक 7

गजकर्णें, इसब व नायटे यांवर रामबाण किं. ४ आणे.
२४ डब्या एकदम घेणारास रास्कोप घड्याळ फुकट !

रेल्वेरेग्यूलेटर घड्याळ

अगदीं बराबर टाईम देणारें घड्याळ किं. रु. ४॥.
६ बाटल्यांचे बरोबर अत्तरदान फुकट मिळेल.

रिस्टवॉच:—हातांत बांधण्यांचें घड्याळ किंमत रु. ५॥ पट्ट्यासह.

रघुनाथ छ जार्ज कारोनेशन कं मुंबई नं २०. ग.

५० वर्षांच्या अनुभवानें सर्वोत्कृष्ट ठरलला व निरनिराळ्या प्रदर्शनातून
3 सोन्याचांदीचीं पदकें मिळालेला

डॉ. वामन गोपाळ यांचा

आयोडाइज्ड

सार्सापरिला

रक्त ह्मणजेच जीवित्वसर्वस्व, निरोगीपणा, सुख आणि दीर्घ आयुष्य याचा लाभ शुद्ध आणि जोमदार रक्तच करून देतें. तर मग भयंकर रोगांपासून नासलेल्या रक्तांतील दोष व त्याप सून होणारी पीडा नाहींशी करावयाची असेल, तर ताबडतोब सार्सापरीला घेण्यास सुरवात करा. एका बाटलीस किं. १। रु. चार बाटल्यांस पोस्टेज सुद्धां फक्त ४॥ मोटमोठ्या शहरात प्रसिद्ध व्यापाऱ्यांकडे मिळेल.

डॉ. गौतमराव केशव आणि सन
ठाकुरद्वार-मुंबई.

ताप आला

कीं डॉक्टरकडे धांवण्याची गरज नाहीं. आजच एक 'पसार' ची बाटली मागवून संग्रहीं ठेवा.

पसार हें तापावर हटकून गुण देणारें औषध आहे वेळोवेळ भयंकर सांथीच्या वेळी याची परीक्षा झाली असून हें सर्वांत उत्तम ठरलेलें आहे. एकवेळ अनुभव घ्या.

व्ही. के. रानडे. गिरगांव मुंबई.

8

जरूर लागेल तेव्हां

खरी शिके व त्यालां लागणारें इतर सामान आमच्याकडे किफायतशिर भावानें मिळेल.

किका अन्ड कंपनी
गिरगांव-मुंबई. 4

कां नाहीं इंग्रजी शिकत ?

9 साधन नाहीं ह्मणून. आमच्याकडे मिळणारे मराठी इंग्रजी शिक्षक हे घरच्या घरीं दुसऱ्याच्या मदतीशिवाय इंग्रजी शिकण्याचें उत्तम साधन आहे.

व्ही. पी. खर्चासह फक्त एक रुपया
स्नेहल आणि कंपनी—गिरगांव मुंबई

mos e pelo grisalho de seus cabelos.

